# विक्रीस तयार पुस्तकें.

श्रीस्वामी विवेकानंदकृत.

## राजयोग पूर्वार्ध.

ज्ञानाभ्यासाला जागा कशी असावी ? अन्न कोणतें व किती सेवन करावें ? आचार कसा असावा ? मुद्रा कशी करावी ? इत्यादि योगाभ्यासाचें विवेचन अथपासून इतिपर्यंत केलें आहे. प्राणांचें अद्भुत सामर्थ्य व व्यापकता सांगून–प्राणायाम–प्राणांला ताब्यांत आणण्याचा अभ्यास कसा करावा त्याची पद्धत सांगितली आहे. हृदयस्थ चक्रांची माहिती देऊन प्रत्येक प्राणिमात्राच्या नाभिकमलामध्यें 'कुंडलिनी' नामक गुप्त असलेली शक्ति जागृत कशी करावी तें शिकविलें आहे. 'प्रत्याहार' 'ध्यान' 'धारणा' 'समाधि' इत्यादि योगाभ्यासाच्या सर्व पायऱ्या अगदीं सुलभ करून दिल्या आहेत. योगसिद्धि होऊं लागली म्हणजे प्रथमतः सुगंध सुटणें, गुप्त तेज प्रगट होणें, तोंडांतून निघालेला शब्द खरा होणें, इत्यादि होणारीं पूर्व लक्षणेंही कथन केलीं आहेत. व यथोचित रीतीनें परिश्रम करून योगाभ्यास केल्यास, सहा महिन्यांत योगसिद्धि प्राप्त होईल असें स्वामींनीं वचन दिलें आहे. व सरते शेवटीं योग्याला दीर्घायुष्य, ऋद्धिसिद्धींचें अद्भुत सामर्थ्य कसें प्राप्त होतें हेंही निवेदन केलें आहे. आणखी विशेष हें कीं, ही गोष्ट अगदीं शक्य असल्याबद्दल, अर्वाचीन शास्त्रपद्धतीनेंही सिद्ध करून दिलें आहे. किंमत अवघी ८ आणे. ट. ख. १ आणा.

## कर्मयोग.

ह्याचा उपयोग गृहस्थाश्रमी मनुष्याला–व ज्याला प्रपंच साधून परमार्थ साधणें आहे त्याला किती आहे, ह्याचें शब्दांनीं वर्णन करणें निखालस अशक्य आहे. ह्या योगामध्यें 'नित्यमृता'चा केवळ पाऊस पाडलेला आहे. त्यांत तरुण असोत, वृद्ध असोत; अज्ञान असोत, सज्ञान असोत; पुरुष असोत; स्त्रिया असोत; प्रत्येकास तो पुनीत करून आनंदानें प्रफुल्लित करून सोडील. हें पुस्तक प्रत्यक्ष वाचल्यावांचून त्याच्या थोरवीची व उपयुक्ततेची कल्पना सुद्धां मनांत येणें शक्य नाहीं, गुह्य व आवडत्या विषयाची गोडी स्वभाषेंत फार येते. ती विद्वान्, मार्मिक, व लोकमान्य के. कोकिळच्या एडिटरांनीं लोकसेवेसाठीं आणून दिली आहे. तिचा स्वीकार करणें रसिकवर्याकडे आहे. एकंदर भाग ८. किंमत ८ आणे. ट. ख. १ आणा.

---

## केरळकोकिळ मासिकपुस्तक.

### वर्षारंभ जानेवारी. अगाऊ, वर्षाची वर्गणी १॥ ट. ख. सह.

ह्या प्रतिमहिन्यास नेमानें, सुबक, सुरेख व अपूर्व **चित्र दाखवितो.** मलबार, इतर प्रांत आणि देश ह्यांतले अद्भुत, अलौकिक गुण व **व्यवहार सांगतो.** सरळ, सोप्या व रसिक **कवितांचा प्रसाद करितो.** नीतिध[...] त्यांचा उपदेश ठसवितो. **लोकोत्तर चमत्कारांचें** दर्शन देतो. मनोरंजक व स्फुट गोष्टींनीं हृदयांत गु[...] करितो. ह[...], **पुस्तकपरीक्षा** निःशंकपणें, गुणदोषविवेचनानें सणसणीत करतो. ह्या अनेक व्यवहाराच्या व गोष्टी सांगत सांगत देशोदेशीं हजारों विद्वान्, रसिक व मार्मिक गृहस्थांच्या घरीं सारखा १४ वर्षे जाऊन किती लोकांनीं ह्याला कुरवाळलें आहे, व साधु साधु, धन्य धन्य, म्हणून स्तुतिपत्रें दिलीं आहेत. ह्या लद्दा[...] [...]रा-वर, बायकामुलांबरोबर अधिकारासारखें बोलतो. ह्याचें **सिंहावलोकन**—त्या त्या वर्षांत घडलेल्या ठळक ठळक गोष्टींचें तारीखवार दिग्दर्शन करितें. **संवत्सरमाहात्म्य** हिंदुस्थानच्या लोकांस तें साल कसें काय सुखासमाधानांत गेलें; हें दाखवितें. असा ह्या **"केरळकोकिळ"** एक रुपया तीन आण्यांत प्रतिमासीं वर्षभर भेट देतो. (१) ह्या प्रत्येक महिन्याच्या पंधरा तारखेचे आंत प्रसिद्ध होतो. (२) ह्याचा वर्षारंभ जानेवारीपासून असल्यामुळें केव्हांही मध्यंतरीं वर्गणीदार होणारांस त्या वर्षाचे मागील सर्व अंक पाठवून पुढें सुरू करण्यांत येतो. (३) वर्गणी अगाऊ पाठवावी किंवा **व्हा. पे.** नें पाठविण्यास लिहावें. (४) **पत्त्यावरील नंबर** पत्रांत, व मनिआर्डर कूपनांतून वगैरे दर्शविल्यानें बिनचूक काम होईल. (५) किरकोळ अंकाची किंमत ८४. (६) वर्गणीदारांस **"सोईनें पुस्तकसंग्रह"** करण्यास सवड होते.

सार्थ व सटीप

# ज्ञानेश्वरी.

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-156237

( पदच्छेद अर्थ, टीका, टिपणी वगैरेसह )

कृष्णाजी नारायण आठल्ये,

फोटोग्राफर, मद्रास

आणि

एडिटर, केरळकोकिळ,

यांनी तयार केली

ती

जनार्दन महादेव गुर्जर, प्रोप्रायटर आणि पब्लिशर,

यांनी

[illegible] छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

---

या [illegible] सर्व हक्क प्रसिद्धकर्त्याचे ताब्यात

[illegible] ठेविले आहेत.

---

सन १९२२ [illegible] शके १८४३.

गुजर ...सेलर रामवाडी—मुंबई." २

ओ... ...स्तकें वर्ष ५ ते १३ पर्यंतचीं.

दशक ५ व

...पा न जोडे **वर्ष ५ वें. सबंध पुस्तक.**

...ळेचाचें (बाराही अंक एकत्र, सुरेख, जाड कापडी पुठ्ठयानें बांधलेले.)

...र्रीं घालित अनेक विषय २५, कविता भिन्न भिन्न विषयांच्या व छंदांच्या ६ ...मत्कार १६, अनेक ग्रंथकारांनीं पाठविलेल्या पुस्तकांपैकीं ४४ पुस्तकांची

...द्गुरुवचनें विषय ४, नवीन शोध १०, किरकोळ २ आणि सिंहावलोकन.

...विण जन्मा टोकळ गोष्टींची थोडक्यांत तारीखवार अनुक्रमणिका, हरपलेलीं

...विण तव. याप्रमाणें केरळकोकिळ वर्ष ६।७।८।९।१०।११।१२।१३ यांचें विषय- १० ०≥ केरळकोकिळ वर्ष ११ वें. मुंबईतील प्लेगमुळें अंक ६ च छापले गेले

...ं सद्गुरु=

...वे कृपेनें

## धनुर्धारी.

सद्गुरुचें मराठी वाचक विरळा. यांच्या लेखांतील ऐटदार भाषा, खोंचदार व मार्मिक ...ले ऊन् ओळख पटे अशा तऱ्हेनें विषय प्रतिपादण्याची खुबी, आतां, सर्वांच्या ...सरकारी रिपोर्टांत यांची भाषा "अगदीं शुद्ध–इडियामेटिक–आवेशयुक्त ...सा शेरा मिळालेला आहे व शिवाय त्याबद्दल सर्वांची खात्री पूर्वींच झालेली अस- ...ना हिजे असें नाहीं.

### धनुर्धारीकृत पुस्तकें.

| ग्र... | कि. रु. | ट. ख. | नांवें | कि. रु. | ट. ख. |
|---|---|---|---|---|---|
| १... | ०≥ | ०॥ | मराठेसरदार भाग १. ... ... | ०≥ | ०॥ |
| ... | ०≥ | ०॥ | " भाग २. .... ... | ।– | ०॥ |
| ... | ०≥ | ०॥ | प्रौढप्रतापनिधि माधवराव. .... ... | ।– | ०॥ |
| ... | ०≥ | ०॥ | पैसा कसा मिळेल. .... ... ... | ।॥। | ०– |
| ... | ०≥ | ०॥ | नीतिधर्मपाठ पु० पहिलें. ... ... | ०– | ०॥ |
| ... | ०≥ | ०॥ | आपणावरील जबाबदारी. ... ... | ०–॥ | ०॥ |
| नाना. | ।≥ | ०– | स्वभाव. ... .... ... ... | ०–॥ | ०॥ |
| ...रत्न. | ०≥ | ०॥ | आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी. | ०–॥ | ०॥ |

## ...ार्ङ्गधरसंहिता मराठी भाषान्तरसहित.

...न सुधारून तयार केलेली, आवृत्ति १ ली.

...वैद्यकांचें, अनुभविक विचारानें मथन करून श्रीमच्छार्ङ्गधराचार्यांनीं "शार्ङ्गधरसं- ...रचिला, हें सर्वविश्रुत आहेच. शार्ङ्गधराची बरोबरी करणारा वैद्यकग्रंथ प्रस्तुत दुसरा ...च ग्रंथाचा प्रायः उपयोग करितात. विद्वन्मान्य ग्रंथ आहे.

...कृष्णशास्त्री नवरे वैद्य यांनीं, अवलोकनानें आणि वैद्यप्रक्रियेच्या अनुभवानें मूलग्रंथही शुद्ध केला आहे. बहुत ठिकाणीं माधववाग्भटादि ग्रंथांच्या आधा-

...बाजूस, विषयानुक्रमांकसहित बारीक टाईपानें ...चें प्रदर्शन. ...व त्यावरील ... आहेत, जाहरात. ...

॥.

आंधळ्याप्रमाणें ...ठेंचकळून कड्यावर ...ळ्यांत अंजन घातलें पडतो, त्याप्रमाणें ३८ सद्गुरुशि- ...ा सारें दुःखच नाहीं. ३९

...ारखें नव्ह ...या सद्गुरू ...गितलें आहे.

सांगतो ती ...रणांत ज्ञान ...

...केलें; तरी अंत-

...ई कांहीं टाकत ...य केलें आहे ...ावींत; नीचासार ...रूं नये हें ज्ञान ...हे ज्याचे आज्ञाव मनुष्य आहेस. ...ून काय गेलें ? ...ाटतें, तो व्रजज्ञ देहाभिमानी आहे,

...होंत; आणि देव ह ...कार तर पांच पन्नास ...ाला माहित आहे.

## वैद्यविनोद.

( संस्कृतवैद्यक ग्रंथ; मराठी भाषांतरसहित

केरळकोकिल ...

## माझें कळसूत्री ...

अथवा

## नरदेहाची रचना-...

ह्यावर डा० मोरेश्वर गोपाळ देशमुख एम्. डी. व डा० बाळाजी ... साधारण माणसालाही देहांतील माहिती थोडीबहुत होईल असें आहे. कि. ...

## श्रीमच्छंकराचार्यचरि...

श्रीकृष्णशास्त्री आठल्येकृत गद्यरूप शंकरविजयाच्या आधारें मराठ... गुरुगृहीं जाऊन संन्यासाश्रम घेईपर्यंत; मंडनमिश्रादि पंडितांशीं संवाद; दिग्वि... उत्तम छापलेलें डेमी बारापेजी, पृष्ठें १६०, सुंदर सोनेरी बांधणी. कि. १२ ...

### संस्कृत पुस्तकें.

## ऋग्वेद संहिता-मूळ पो...

आठ अष्टक समग्र परिशिष्टें व संहिताशेष ह्यांसहित. ...

" " रंगीत फळ्या वेष्टनसह. ... ...

## ऋग्वेद मंत्रसंहिता.

पुण्याहवाचनादि याज्ञिक प्रयोगांच्या अनुक्रमानें सर्व मंत्र प्रयोगवार जोडून, ... पानीं स्वरांसहित छापलेली पोथी. **विषयः—**

१ पुण्याहवाचनमंत्राः २ नांदीश्राद्धमंत्राः ३ उत्सर्जन स्थालीपाकादि ४ उपाकर्म... कम् ७ शांतिसूक्तरात्रिसूक्तानि ( शांतिपाठः ) ८ कौतुकबंधादि मंत्राः ९ रक्षोघ्नसूक्त... श्रीसूक्तम् १२ पंत्रसूक्तम् १३ विष्णुसूक्तम् १४ हरिसूक्तम् १५ सरस्वतीसूक्तम् १... परिशिष्टोक्तग्रहयज्ञमंत्राः १९ गर्भाधानादिमंत्राः २० इष्टिप्रायश्चित्तादि २१ पुंसवना... वर्धापनविधौ २४ उपनयनादिमंत्राः २५ समावर्तने विशेषमंत्राः २६ देवपूजादिमंत्राः... वृहस्पत्यादि सूक्तानि ३० अग्निद्वयसंसर्गादौ ३१ प्रकीर्णमंत्राः ३२ आचार्यविशेषः ३... ब्राह्मणखण्डानि ३६ श्राद्धखंडानि ३७ निरुक्तखण्डम् ३८ ब्राह्मणखण्डम् इत्यादि. कि. ...

## ऋग्वेदी ब्रह्मकर्म.

( आवृत्ति ४ थी. )

विषय ४१ उत्तम, फारच मोठा टाईप, कागद जाड गुळगुळीत, शुद्ध स्वरांसहित. ... कृति ५ वैश्वदेवकुंड व याजक बलिहरण आ. ३ विषय—

१ प्रातःस्मरणम् २ स्नानविधिः ३ उष्णोदकस्नानविधिः ४ भस्मधारणविधिः ... लघुन्यासः ८ देवपूजा ९ पुरुषसूक्तम् १० श्रीसूक्तम् ११ अथर्वशीर्ष १२ रुद्रः १... नमस्काराः ... १९ ... २० बलिहरण...

# सार्थ व सटीप दासबोधाचा नमुना.

## ओव्यांचा नमुना.

दशक ५ वा. समास १ ला.

ा न जोडे । आणि भलतीकडे वोंवडे ।
ळेचा चरुनि पडे । गारीं आणि गडदरीं॥
घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान ।
रुवचनें ज्ञान । प्रकाश होय ॥ ३८ ॥
ग जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ।
ा तळमळ । जाणार नाहीं ॥ ३९ ॥

द्गुरु ते कैसे । नव्हेत इतर गुरु ऐसे ।
पेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ॥ ४५ ॥
ची वोळखण । पुढिले समासीं निरूपण।
असें श्रवण । अनुक्रमें करावें ॥ ४६ ॥

दशक ६ वा. समास १ ला.

ध्यें वागे । परी जनावेगळी गोष्टी सांगे ।
तरीं ज्ञान जागे । तोचि साधू ॥१८॥
पोट भरिलें । देहाचें संरक्षण केलें ।
चि व्यर्थ गेलें । अंतकाळीं ॥ २२ ॥

दशक ६ वा. समास ७ वा.

मिथ्या झालें । परंतु अवघें नाहीं टाकि-
ा भजनेंचि काय केलें । सांग बापा १८
टांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
स न मानावें । हें कोण ज्ञान ॥ १९ ॥
ादिक । हे जयाचे आज्ञाधारक ।
ी रंक । भजसिना तरी काय गेलें २०

टे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।
ां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ॥२५॥

दों दिवसांचा । आणि देव बहु-
। आपण थोडे ओळखीचा । देवास
त्रैलोक्य जाणे ॥ ३८ ॥

बरळती. १७ ओके राळून, शुद्धन, चुकून.
राळमांत. १९ आनंत, निदिरांत.

## गद्यरूप अर्थाचा नमुना.

सद्गुरुकृपा प्राप्त झाली नाहीं तर तो आंधळ्याप्रमाणें भलतीकडेच सैरावैरा भडकतो, आणि ठेंचकळून कड्यावर आपटतो, व खड्डयांत पडतो. ३७ डोळ्यांत अंजन घातलें ह्मणजे जसा ( भूमींतील ) ठेवा दृष्टीस पडतो, त्याप्रमाणें सद्गुरूच्या वचनानें ज्ञानाचा प्रकाश पडतो. ३८ सद्गुरूशिवाय सारा जन्म निष्फळ आहे; सद्गुरूशिवाय सारें दुःखच आहे; सद्गुरूशिवाय तळमळ ह्मणून जाणार नाहीं. ३९

आतां सद्गुरु ते कसले ? ते इतर गुरूसारखे नव्ह ज्यांच्या कृपेनें शुद्धज्ञान प्रकाशतें. ४५ त्या सद्गुरू ओळखीचें निरूपण पुढल्या समासांत सांगितलें आहे. तेंही अनुक्रमानें श्रवण करावें. ४६

जो जनांमध्येंच वागतो; पण गोष्ट सांगतो ती नाच्या वेगळी सांगतो. ज्याचा अंतःकरणांत ज्ञान ... असतें, तोच साधु. १८


जन्मभर पोट भरलें; देहाचें संरक्षण केलें; तरी अंतकाळीं सारेंच व्यर्थ जातें. २२

ज्ञान विवेकानें मिथ्या होतें; परंतु सर्व कांहीं टाकत येत नाहीं. मग बाबा ! भजनानेंच काय केलें आहे सांग बरें. १८ साहेबाला लोटांगणें घालावींत; नीचासार व्हावें; आणि देवाला मात्र नमस्कार करूं नये हें ज्ञान ... ठचें ? १९ शंकर, विष्णु ब्रह्मदेवादिक हे ज्याचे आज्ञाध... आहेत. आणि तूं एक केवळ रंक मनुष्य आहेस. एकानें त्याचें भजन केलें नाहींस ह्मणून काय गेलें ?

मी थोर असें ज्याला मनांत वाटतें, तो ब्रह्मज्ञानी नव्हे. विचारानें पाहिलें ह्मणजे तो देहाभिमानी आहे, प्रत्यक्ष दिसून येतें. २५

आपण हे दोन दिवसांचे आहोंत; आणि देव ह नंतकालाचा आहे. आपणा... फार तर पांच पन्नास ओळखतात. पण देव त्रैलोक्याला माहित आहे.

२० ठेवा, पुरून ठेवलेला पैसा.



## कपिलधारातीर्थ.

हें नाशिक जिल्ह्यांतील [illegible] तालुक्यांतील "[illegible]" गांवाचे [illegible] [illegible] जी. आय्. पी. रेल्वेच्या घोटी स्टेशनावर उतरून पुढें ५ मैल जावें लागतें.

"[illegible] कपिलो मुनिः" ह्या श्रीभगवद्वाक्यानें सर्वविश्रुत जे कपिलमहामुनि त्यांचे [illegible] [illegible] हें तीर्थ आहे; कपिलमुनींनी आपल्या मातोश्री देवहूति यांना याच ठिकाणी [illegible] [illegible] [illegible] आहे. हें मुमुक्षु पाहणारें कपिलधारातीर्थ फार पुरातन आहे. [illegible] [illegible] लिहिलेली आहे.

"[illegible] [illegible]" असे सर्वसंगपरित्याग [illegible] [illegible] [illegible] त्यांचे शिष्य द्वारकादास हेही गुरु [illegible] होते. त्यांचे शिष्य [illegible]. [illegible] [illegible] शिष्य ब्रह्मचर्याने, योगबलानें ओजस् पावलेले अतएव तेजोमय शरीर [illegible] [illegible] महाराज हे वयोवृद्ध, अंतःकरणानें शुद्ध व सिद्ध आहेत. [illegible] [illegible] [illegible], महंत पुरवितात. महंतांनी श्रीबद्रिनारायण, श्रीजगन्नाथ, [illegible] [illegible] आहेत. त्यांना शोप घेतांना कोणीच पाहिलें नाहीं म्हणतात. येथें [illegible] [illegible] [illegible] आहे; महंतांच्या अंतःकरणोत्पन्नांनें हें वंदनीय आहे; [illegible] [illegible] हें [illegible] आहे.

[illegible] हें स्थान "[illegible]" [illegible] [illegible] आपलेशी [illegible] [illegible] [illegible]

(मुंबई [illegible] १९०२)

# सार्थ व सटीप

# ज्ञानेश्वरी

(गद्यात्मक अर्थ, टीपा, टिप्पणी वगैरेसह.)

कृष्णाजी नारायण आठल्ये टेंभूकर,

फोटोग्राफर, आर्टिस्ट

आणि

एडिटर, केरळकोकिळ,

ह्यांनीं तयार केली

ती

सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी.

जनार्दन महादेव गुर्जर: बुकसेलर आणि पब्लिशर,

ह्यांनीं

जी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

(ह्या भाषान्तराचीं परभाषेंत भाषांतरें करण्याचे सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेवले आहेत.)

सन् १९०२ अक्टोबर. शके १८२४.

156287

हिंदुस्थान सरकारच्या सन् १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून,
कापीराईटचे सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

# मनोगत.

जो ज्ञानराज भगवान् श्रवणीं सुज्ञान दे, वदे वाचा; ।
अवतार गमे अकरावा कां सुज्ञान देवदेवाचा? ॥ १ ॥
श्रीमद्भगवद्गीता व्याख्या केली जगासि ताराया ।
सारा या सद्ग्रंथा सेविति संसारताप साराया ॥ २ ॥
श्रीहरिहरकीर्ति तशा बा! विश्वास प्रिया तुझ्या ओव्या ।
जो व्यास तोहि बहुधा ह्मणतो, श्रुतिशाचि या मला होव्या ॥ ३ ॥
ज्ञानेशा त्वत्कृतितें करिती ज्ञाते समस्तही प्रणती ।
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोहमहिष हे ह्मणती. ॥ ४ ॥

—मोरोपंत—

मनुष्यप्राणी जन्मास आला, कीं तो भवसागरांत ह्मणजे संसारसमुद्रांत पडला असें ह्मणतात. पण त्याहीपेक्षां तो संशयसागरांत पडला ह्मटलें तर विशेष शोभेल. किंवा संसार ह्याचा अर्थच संशय असा धरला, तर प्रत्येक मानवी प्राण्याला आत्मस्थितीची साक्ष उत्तमप्रकारें पटेल. क्षणोक्षणीं संशयाच्या प्रचंड लाटा आमच्यावर येऊन आदळत असतात. आमच्या भोंवतीं त्यांचें काहूर जमतें व आपला पुढें जाण्याचा मार्ग कोणता, किंवा आपल्या समोर पुढें काय येणार, व आपणांस कोणांशीं टक्कर द्यावी लागणार, ह्याबद्दल कांहींच कल्पना होत नाहीं. सायंकाळ, धुकें आणि त्रिदोष ह्यांची स्थिति, आणि संशयग्रस्ताची स्थिति अगदीं एकसारखी आहे. धड रात्रही नव्हे आणि धड दिवस नव्हे, अशी जी वेळा तिचें नांव संध्याकाळ. अशा वेळीं प्रकाशधर्म व ...गयाधर्म मंदावतो; उंच व सखल दिसेनासें होतें; वाट ...णती व आडवाट कोणती हें समजत नाहीं; समोर ... तें झाड आहे, दगड आहे, का हत्ती आहे ह्याचाही ...ेत नाहीं. धुक्याची स्थिति ह्याहूनही विलक्षण. ...ाणि ... । भोंवतालचें सारेंच आकाश एका तत्त्वानें ...शांच ... . त्याला प्रकाशही ह्मणतां येत नाहीं, सुरुप्रथ- ... ो ह्मणतां येत नाहीं. पर्वतप्राय एखादा तर, उंचें, ... पुढें चार हातांवर असला, तरी त्याचें हुतेत संश- ... होत नाहीं. ह्मणूनच कित्येक आगबोटींच्या टकरा होतात, व कित्येक जाऊन खडकावर आदळतात! मनुष्यप्राण्याची स्थितिही हुबेहुब अशीच आहे. तो यावज्जन्म संशयाच्या भयंकर जाळ्यांत गुरफटलेला असतो, व नानाप्रकारच्या तीव्र भयंकर खड्यांवर आदळत असतो; कपाळाला टणू येत असतें किंवा लहान मोठ्या खळग्यांत पाय लचकून कोठें ठेंच, कोठें लचक भरून विवळण्याचें काम सारखें सुरू असतें. "ज्याच्या आंगांत सन्निपातज्वर भरलेला असतो, त्याला शीत आणि उष्ण हीं कळत नाहींत. ऊन्ह आणि चांदणें सारखेंच वाटतें. तसें संशयित मनुष्याला खरें आणि खोटें; अनुकूल आणि प्रतिकूल; हित आणि अहित; हीं ओळखत नाहींत. जन्मांधाला ज्याप्रमाणें हा दिवस, ही रात्र असें समजत नाहीं, त्याप्रमाणें संशययुक्ताच्या मनालाही कांहीं कळत नाहीं.[1]"

मनुष्यानें भूतलावर येऊन एक श्वासोच्छ्वास घेतला पुरे, कीं 'सोहं' 'कोहं' ही संशयाची पहिली सुपारी! 'मी कोण?' 'मी कोण?' 'तूं कोण' 'तो कोण?' हा जप. ही जरी कविकल्पना असली, तरी साऱ्या अध्यात्मविषयाचें मूळ व ज्ञानकैलासाच्या शिखराचा शेंडा ह्या दोन अज्ञानमय व सर्वांच्या आद्य शब्दांतच आहे, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. ह्यास्तव ह्या खोल मुळांत प्रथमच न शिरतां, थोडासा वरच्याच विस्ताराचा विचार

१ ज्ञानेश्वरी अ० ४ ओं० २००।२.

करूंया. मूल उपजतांच त्याला जरी संस्कृत भाषा येत नसली, गहन ज्ञानाचे विचार त्याच्या मनांत प्रथमदर्शनींच येणें असंभवनीय, हें मत जरी खरें धरलें, तरी, 'मी कोण?' 'हें दुःख कसलें?' 'ह्यांतून मी मुक्त होईन काय?' 'माझी करुणा करून मला सहाय करण्यास कोणी असेल काय?' इत्यादि अस्पष्ट विचारतरंग, किंवा ज्ञानाचे अंकुर त्याच्यामध्यें असले पाहिजेत, हें सूक्ष्म विचाराअंतीं कळण्यासारखें आहे. तथापि ह्यांतील गुह्य फार गूढ असल्यामुळें, केवळ मूळांतलाच विचार प्रथमतः न करितां पुढें काय होतें तें पाहूं या.

ज्ञानेंद्रियांनीं आपलें काम सुरू केलें कीं, पहिला बोध आईचा. भूक लागली आई! तहान लागली आई! दुःख झालें आई! थंडी वाजली आई! आंग पोळलें आई! सर्वस्व काय तें आई. प्रेमाचा सागर आई; सर्वसमर्थ आई; कर्तुमकर्तुं आई. आईवांचून थोर ह्मणून जगांत कोणीच नाहीं, असें बाल्यदशेंत वाटत असतें. कोणी आंगावर आलें, कोणीं भीति दाखविली, किंवा कोणाची भीति वाटली, तर मिठी घालावयाची ती आईला. जणों काय आईइतका बलाढ्य वीर साऱ्या त्रिभुवनांत कोणी नाहीं. पण ज्ञानाचा जों जों अधिक विकास होऊं लागतो, तों तों त्याच्या पहिल्या समजाची चुकी लक्ष्यांत येत जाते. कारण, जी आईच सर्वसमर्थ अशी मनाची दृढ समजूत असते, त्याच आईवर बापाचा ताबा असलेला दृष्टीस पडतो. तीच त्याच्या हुकमांत वागते; त्याच्या पायाशीं लीन होते; येवढेंच नव्हे, तर त्यानें तिला शिक्षा केली, तरी सुद्धां तिच्यानें त्याचें कांहींच निवारण करवत नाहीं. जी आपल्या हरएक संकटांत आपणाला पोटाशीं घेऊन धीर देते, संरक्षण करते, तीच बापाच्या शासनानें मुळमुळ रडत बसते. तेव्हां अर्थातच मुलाच्या मनांत प्रकाश पडूं लागतो कीं, सर्वसमर्थ अशी एक आईच असें जें मी आजपर्यंत समजत होतों, ती निखालस चूक होय. तर बाप मात्र सर्व श्रेष्ठ खरा. कारण, त्यानें घरांत अन्न आणून दिल्यावांचून मला तर काय, पण प्रत्यक्ष माझ्या आईला सुद्धां खावयास मिळत नाहीं. तेव्हां आतां ती चुकी सुधारून बापावरच सर्व भार टाकावा हें उक्त दिसतें. पण पुढें कांहीं दिवस गेले, कीं तीही चूक वाटूं लागते. कारण, यःकश्चित् सरकारचा पट्टेवाला आला कीं, घरीं ज्याच्या त्याच्यावर तावणारा, पोराबाळांस चोप देणारा जो बाप, त्याचीही घाबरगुंडी उडून जाते. तेव्हां बापापेक्षांही 'सरकार' ह्मणून जें काय आहे तें थोर असा मनाचा ग्रह होतो. परंतु अशा बलाढ्य सरकाराच्या तावडींतून सुटावयाचा प्रसंग आला किंवा अपरिहार्य व्याधीसारख्यांतून पार पडावयाचें असें तर आईबापें मनोभावें देवघरांत जाऊन देवापुढें साष्टांग नमस्कार घालतात; त्याला नवस करतात; त्याच्यापुढे चुकल्याबद्दल नाक घांसतांनाही दृष्टीस पडतें. तेव्हां सर्वसमर्थ जो काय तो काळा शालिग्राम, किंवा पितळेचा, हातांत लोण्याचा गोळा घेतलेला बाळकृष्ण; किंवा सोंड मुरडलेला गणपति. पुढें पहावें तों गांवांत वर्षोवर्षास दुसऱ्याच एका मोठ्या कृष्णाबाईसारख्या मूर्तीचा सारे लोक जमून अतिशय मोठा उत्सव करतात. 'हे आई!' 'हे माते!' 'हे जगदंबे!' असें ह्मणून तिच्या पुढें हजारों लोक दासानुदासाप्रमाणें भजन करितात, हात जोडतात, लोटांगण घालतात, करुणा भाकतात, डोळ्यांत प्रेमाश्रु भरतात, तेव्हां अर्थातच पहिले सर्व समज चुकीचे असून त्रिभुवनावर, सर्व विश्वावर व ब्रह्मांडावर सत्ता चालविणारी काय ती मूर्ति ही. सर्व भयापासून, संकटापासून मुक्त करणारा देव हा; आपल्या हाकेस 'ओ' देऊन धांवून येणारा हा; आपल्यास अन्नवस्त्र पुरविणारा हा; आपल्यास आंधेरांत व उजेडांत पाहणारा हा; भवसंसारांत गटकळ्या खाणाऱ्यांचा उद्धार करणारा हाच. हाच काय तो खरा सिद्धांत. परंतु विचारशकट सारखाच चालू असेल, तर तें स्थल तरी कितीसें कायम रहाणार? तेंही हळूहळू लयास जातें. कारण, ही मूर्तीच जर सर्वशक्तिमान् ह्मणावी, तर यवनांनीं तिचे तुकडे तुकडे करतांना तिनें एकही हात वर कां बरें उगारला नाहीं? यःकश्चित् मांजर येऊन पुढ्यांतील नैवेद्याचें दूध खाऊं लागलें, किंवा उंदीर येऊन फुलें विसकटूं लागला, तरी जो हाकवि नाहीं, तो आमचा उद्धार तरी करणार कसा? ह्याला प्रमाण काय? मग काय ह्मणे, परमेश्वर हा निराकार मग मूर्ति कशाला? आणि तिचा उपयोग तरी काय? परमेश्वर जर निर्विकार, निराकार, अदृश्य आहे, तर अ... ह्मणण्यांत तरी अर्थ कोणता? मागल्या जन्मींची जर आ... णांस आठवण रहात नाहीं, तर मागल्या जन्मींचा प्रा... जन्मास आला काय, आणि नवाच एक प्राणी निर्माण झाला काय, दोहींचा अर्थ एकच! पूर्वसंचितप्रमाणें जर प्राण्यांना बुद्धि, व सुखदुःखें प्राप्त होतात, तर मनाच ह्मणून जो जन्म असेल, त्याला पूर्वसंचित कोठें? बुद्धि कोठची, व सुखदुःख तरी कोठचें? अशा

यांच्या हजारों लाटा अंतःकरणावर एकावर एक आदळतात, आणि तें गटकळ्या खात रहातें.

अफाट महासागरांत जसें दाही दिशांला पाण्यावांचून दुसरें कांहींच नसतें, त्याचप्रमाणें ह्या भवसागरांत संशयावांचून दुसरें कांहींच नाहीं. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं सारा तोच. अमावास्येच्या रात्रीत, उजाडेपर्यंत जसें आंधारावांचून दुसरें कशाचें नांव नसतें, तशीच गोष्ट ह्या जन्माची आहे. पहिला सिद्धांत चुकीचा वाटावा, व दुसरा खरा वाटावा, हाच ह्यांतला नित्यक्रम. यःकश्चित् कांचेचा लोलक, बाल्यदशेंत केवळ जीव कीं प्राण वाटतो. थोर होऊन हिरे माणकांची किंमत समजूं लागली, कीं तो पहिला समज चुकीचा ठरतो. आणि सुवर्ण, रत्नें हीच कायती संपत्ति अशी खात्री वाटूं लागते. प्रसंगवशात् मनाला उपरति झाली, किंवा श्रीसद्गुरुकृपामृताचा एखादा शितोडा प्राप्त झाला तर तींच रत्नें मातीमोल वाटून जनास ज्ञानोपदेश करणें हेंच काय तें वैभव; हेंच काय तें सर्वस्व असें वाटूं लागतें. पण त्यांतही जर, पूर्व पुण्याईनें, पायांस चिंतामणी लागण्याप्रमाणें प्रत्यक्ष ईश्वराचाच प्रसाद झाला, तर तेंही सर्व तुच्छ वाटून खऱ्या सुखाचें साधन, व खऱ्या संपत्तीचें सूचक निरालेंच कांहीं होऊन रहातें.

बरें; 'चक्षुर्वै सत्यं' हा सिद्धांत खरा ह्मणावा, तर त्याची सुद्धां दशा तीच. सूर्य प्रत्येक दिवशीं पूर्वेहून निघून पश्चिमेस जातांना डोळ्यांना प्रत्यक्ष दिसतो. पण शाळेंत जाऊन थोडे दिवस जातात न जातात तोंच, शाळेंतील गुरुजी त्याला खोटें ठरवून पार! ते ह्मणतात "सूर्य हा मुळींच फिरत नाहीं; तर तुह्मी आह्मीच दर तासाला एक हजार मैल, पूर्वेकडे धांव मारून गिरक्या खात आहों." आणि सबळ प्रमाणें देऊन ही गोष्ट ते सिद्ध करून देतात. त्यांच्यावर आपल्याच्यानें उत्तर देववत नाहीं. पाश्चात्य लोकांसारख्या व्यवहारशास्त्रांत पारंगत झालेल्या लोकांची दशाही तीच! जी युक्ति केवळ अपूर्व ह्मणून आज लोक तारीफ करतात, तिला थोडीं वर्षें लोटलीं, कीं तिचीच उपहास्यता होते. अर्थात् तिच्यांत चूक असल्याचें कबूल करतात. ह्याला तारायंत्राचेंच उदाहरण पुरें आहे. तारायंत्राचें काम प्रथमच सुरू झालें, तेव्हां एका तारेवरून काम भागत नसे. तर, प्रवाहाचें मंडळ (सर्कल) पुरें होण्यासाठीं त्यास दुहेरी तार घालावी लागे. किंवा प्रत्येक स्टेशनावरची तार आगगाडीच्या रुळाला नेऊन गुंडाळीत. कारण, तीस विद्युत्प्रवाह पदार्थाची गरज असे. तो रुळाच्या योगानें सुरू होई. ह्यामुळें जेथें आगगाडीचे रूळ असत तेथेंच तारायंत्र असे. इतर ठिकाणीं नसे. पुढें एकानें असा शोध लावला कीं, पृथ्वी—ह्मणजे जमीन—हीच मुळीं विद्युद्वाहक आहे. मग तारेला आगगाडीचे रूळच कशाला पाहिजेत? तिचें प्रत्येक स्टेशनावरचें एक एक टोंक जमिनींत पुरलें ह्मणजे मंडळ पुरें होऊन विद्युत्प्रवाह सुरू होईल. आणि त्याप्रमाणें तो प्रयोग बरोबर वठला, आणि आतां आपण पहातों, त्याप्रमाणें पाहिजे तिकडे तार सुरू झाली. तेव्हां अर्थातच पहिल्या शोधाची उपहास्यता झाली, व ह्या नव्या शोधाची मोठी तारीफ होऊं लागली. सांप्रत ईथरच्या लहरींतून—ह्मणजे वातावरणांतूनच विद्युत्प्रवाह सुरू करून तारेशिवायच बातमी जात येत असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. इतकेंच नव्हे, तर तो प्रकार इंग्लंद, अमेरिका इत्यादि ठिकाणीं चालू असल्याचेंही वर्तमानपत्रद्वारें आपण ऐकतों. तोच प्रकार अमलांत आला, व दैवयोगानें हुकमतीमध्यें जर विमानें चालूं लागलीं, तर ह्या साऱ्या जगभर रूळ पसरणाऱ्या व तारा बांधणाऱ्या कल्पक लोकांना, आह्मीच किंवा आमचे वंशज तरी हांसतीलच. तात्पर्य काय कीं, आगगाडींतून जाणाराला ज्याप्रमाणें मागें पडलेल्या वस्तु तेवढ्या लहान लहान, दूर, अंधुक व अपूर्ण आणि पुढें येणारी वस्तु तेवढी संपूर्ण, स्पष्ट व मोठी; त्याप्रमाणें मागें झालेल्या त्या सर्व चुका, घडलेल्या गोष्टी क्षुद्र; व केलेले विचार अपक्व; आणि आजचे विचार खरे, चाललेल्या गोष्टी महत्वाच्या; व झालेले समज परिपक्व; हीच परंपरा मनुष्यमात्राच्या पाठीस लागलेली असते. असेच वारंवार अनुभव येत गेले, घडीघडीला असाच ठेंचा लागत चालल्या, ह्मणजे आतां खरें तरी कोणतें? हाच संशय जेथें तेथें उत्पन्न होतो. मध्यें एक लहानशी सरकी असून तिच्या भोंवतीं कापूस असावा, किंवा मध्येंच एक आगटी असून तिच्या भोंवतीं धूर जमावा, किंवा एखाद्या लहानशा होडीभोंवतीं खवळून तुफान झालेल्या लाटांचा समुद्र असावा, त्याप्रमाणें हा आपला जीव संशयाच्या अपरंपार भरलेल्या जाळ्यांत गुरफटलेला आहे.

जिवाची सारी धडपड फक्त एका सुखाकरितां. पण त्या बिचाऱ्यास त्याची व्याख्या सुद्धां माहीत नसते.

करूंया. मूल उपजतांच त्याला जरी संस्कृत भाषा येत नसली, गहन ज्ञानाचे विचार त्याच्या मनांत प्रथमदर्शनींच येणें असंभवनीय, हें मत जरी खरें धरलें, तरी, 'मी कोण?' 'हें दुःख कसलें?' 'ह्यांतून मी मुक्त होईन काय?' 'माझी करुणा करून मला सहाय करण्यास कोणी असेल काय?' इत्यादि अस्पष्ट विचारतरंग, किंवा ज्ञानाचे अंकुर त्याच्यामध्यें असले पाहिजेत, हें सूक्ष्म विचाराअंतीं कळण्यासारखें आहे. तथापि ह्यांतील गुह्य फार गूढ असल्यामुळें, केवळ मूळांतलाच विचार प्रथमतः न करितां पुढें काय होतें तें पाहूं या.

ज्ञानेंद्रियांनीं आपलें काम सुरू केलें कीं, पहिला बोध आईचा. भूक लागली आई! तहान लागली आई! दुःख झालें आई! थंडी वाजली आई! आंग पोळलें आई! सर्वस्व काय तें आई. प्रेमाचा सागर आई; सर्वसमर्थ आई; कर्तुमकर्तुं आई. आईवांचून थोर ह्मणून जगांत कोणीच नाहीं, असें बाल्यदर्शेत वाटत असतें. कोणी आंगावर आलें, कोणीं भीति दाखविली, किंवा कोणाची भीति वाटली, तर मिठी घालावयाची ती आईला. जणों काय आईइतका बलाढ्य वीर साऱ्या त्रिभुवनांत कोणी नाहीं. पण ज्ञानाचा जों जों अधिक विकास होऊं लागतो, तों तों त्याच्या पहिल्या समजाची चुकी लक्ष्यांत येत जाते. कारण, जी आईच सर्वसमर्थ अशी मनाची दृढ समजूत असते, त्याच आईवर बापाचा ताबा असलेला दृष्टीस पडतो. तीच त्याच्या हुकमांत वागते; त्याच्या पायाशीं लीन होते; येवढेंच नव्हे, तर त्यानें तिला शिक्षा केली, तरी सुद्धां तिच्यानें त्याचें कांहींच निवारण करवत नाहीं. जी आपल्या हरएक संकटांत आपणाला पोटाशीं घेऊन धीर देते, संरक्षण करते, तीच बापाच्या शासनानें मुळमुळ रडत बसते. तेव्हां अर्थातच मुलाच्या मनांत प्रकाश पडूं लागतो कीं, सर्वसमर्थ अशी एक आईच असें जें मी आजपर्यंत समजत होतों, ती निखालस चूक होय. तर बाप मात्र सर्व श्रेष्ठ खरा. कारण, त्यानें घरांत अन्न आणून दिल्यावांचून मला तर काय, पण प्रत्यक्ष माझ्या आईला सुद्धां खावयास मिळत नाहीं. तेव्हां आतां ती चुकी सुधारून बापावरच सर्व भार टाकावा हें उक्त दिसतें. पण पुढें कांहीं दिवस गेले, कीं तीही चूक वाटूं लागते. कारण, यःकश्चित् सरकारचा पट्टेवाला आला कीं, घरीं ज्याच्या त्याच्यावर तावणारा, पोराबाळांस चोप देणारा जो बाप, त्याचीही घाबरगुंडी उडून जाते. तेव्हां बापापेक्षांही 'सरकार' ह्मणून जें काय आहे तें थोर असा मनाचा ग्रह होतो. परंतु अशा बलाढ्य सरकाराच्या तावडींतून सुटावयाचा प्रसंग आला, किंवा अपरिहार्य व्याधीसारख्यांतून पार पडावयाचें असलें तर आईबापें मनोभावें देवघरांत जाऊन देवापुढें साष्टां ग नमस्कार घालतात; त्याला नवस करतात; त्याच्यापुढें चुकल्याबद्दल नाक घांसतांनाही दृष्टीस पडतें. तेव्हां सर्व समर्थ जो काय तो काळा शालिग्राम, किंवा पितळेचा हातांत लोण्याचा गोळा घेतलेला बाळकृष्ण; किंवा सों मुरडलेला गणपति. पुढें पहावें तों गांवांत वर्षावर्षा दुसऱ्याच एका मोठ्या कृष्णाबाईसारख्या मूर्तीचा सा लोक जमून अतिशय मोठा उत्सव करतात. 'हे आई! 'हे माते!' 'हे जगदंबे!' असें ह्मणून तिच्या पुढें हजार लोक दासानुदासाप्रमाणें भजन करितात, हात जोडतात लोटांगण घालतात, करुणा भाकतात, डोळ्यांत प्रेमा भरतात, तेव्हां अर्थातच पहिले सर्व समज चुकीचे अस त्रिभुवनावर, सर्व विश्वावर व ब्रह्मांडावर सत्ता चालविणार काय ती मूर्ति ही. सर्व भयापासून, संकटापासून मुक्त कर णारा देव हा; आपल्या हाकेस 'ओ' देऊन धांवू येणारा हा; आपल्यास अन्नवस्त्र पुरविणारा हा; आप ल्यास आंधेरांत व उजेडांत पाहणारा हा; भवसंसारां गटकळ्या खाणाऱ्यांचा उद्धार करणारा हाच. हाच का तो खरा सिद्धांत. परंतु विचारशकट सारखाच चाल असेल, तर तें स्थल तरी कितीसें कायम रहाणार? तें हळूहळू लयास जातें. कारण, ही मूर्तीच जर सर्वशक्ति मान् ह्मणावी, तर यवनांनीं तिचे तुकडे तुकडे करतां तिनें एकही हात वर कां बरें उगारला नाहीं? यःकश्चि मांजर येऊन पुढ्यांतील नैवेद्याचें दूध खाऊं लागलें, किं उंदीर येऊन फुलें विसकटूं लागला, तरी जो हाकवि नाहीं, तो आमचा उद्धार तरी करणार कसा? ह्या प्रमाण काय? मग काय ह्मणे, परमेश्वर हा निराकार मग मूर्ति कशाला? आणि तिचा उपयोग तरी काय परमेश्वर जर निर्विकार, निराकार, अदृश्य आहे, तर अ ह्मणण्यांत तरी अर्थ कोणता? मागल्या जन्मींची जर आ णांस आठवण रहात नाहीं, तर मागल्या जन्मींचा प्रा जन्मास आला काय, आणि नवाच एक प्राणी निम झाला काय, दोहींचा अर्थ एकच! पूर्वसंचिताप्रमा जर प्राण्यांना बुद्धि, व सुखदुःखें प्राप्त होतात, तर मचाच ह्मणून जो जन्म असेल, त्याला पूर्वसंचित को बुद्धि कोठची, व सुखदुःख तरी कोठचें? अशा

यांच्या हजारों लाटा अंतःकरणावर एकावर एक आदळतात, आणि तें गटकळ्या खात रहातें.

अफाट महासागरांत जसें दाही दिशांला पाण्यावांचून दुसरें कांहींच नसतें, त्याचप्रमाणें ह्या भवसागरांत संशयावांचून दुसरें कांहींच नाहीं. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं सारा तोच. अमावास्येच्या रात्रींत, उजाडेपर्यंत जसें आंधारावांचून दुसरें कशाचें नांव नसतें, तशीच गोष्ट ह्या जन्माची आहे. पहिला सिद्धांत चुकीचा वाटावा, व दुसरा खरा वाटावा, हाच ह्यांतला नित्यक्रम. यःकश्चित् कांचेचा लोलक, बाल्यदशेंत केवळ जीव कीं प्राण वाटतो. थोर होऊन हिरे माणकांची किंमत समजूं लागली, कीं तो पहिला समज चुकीचा ठरतो. आणि सुवर्ण, रत्नें हीच कायती संपत्ति अशी खात्री वाटूं लागते. प्रसंगवशात् मनाला उपरति झाली, किंवा श्रीसद्गुरुकृपामृताचा एखादा शितोडा प्राप्त झाला तर तींच रत्नें मातीमोल वाटून जनास ज्ञानोपदेश करणें हेंच काय तें वैभव; हेंच काय तें सर्वस्व असें वाटूं लागतें. पण त्यांतही जर, पूर्व पुण्याईनें, पायांस चिंतामणी लागण्याप्रमाणें प्रत्यक्ष ईश्वराचाच प्रसाद झाला, तर तेंही सर्व तुच्छ वाटून खऱ्या सुखाचें साधन, व खऱ्या संपत्तीचें सूचक निराळेंच कांहीं होऊन रहातें.

बरें; 'चक्षुर्वै सत्यं' हा सिद्धांत खरा ह्मणावा, तर त्याची सुद्धां दशा तीच. सूर्य प्रत्येक दिवशीं पूर्वेहून निघून पश्चिमेस जातांना डोळ्यांना प्रत्यक्ष दिसतो. पण शाळेंत जाऊन थोडे दिवस जातात न जातात तोंच, शाळेंतील गुरुजी त्याला खोटें ठरवून पार! ते ह्मणतात "सूर्य हा मुळींच फिरत नाहीं; तर तुह्मी आह्मीच दर तासाला एक हजार मैल, पूर्वेकडे धांव मारून गिरक्या खात आहों." आणि सबळ प्रमाणें देऊन ही गोष्ट ते सिद्ध करून देतात. त्यांच्यावर आपल्याच्यानें उत्तर देववत नाहीं. पाश्चात्य लोकांसारख्या व्यवहारशास्त्रांत पारंगत झालेल्या लोकांची दशाही तीच! जी युक्ति केवळ अपूर्व ह्मणून आज लोक तारीफ करतात, तिला थोडीं वर्षें लोटलीं, कीं तिचीच उपहास्यता होते. अर्थात् तिच्यांत चूक असल्याचें कबूल करतात. ह्याला तारायंत्राचेंच उदाहरण पुरें आहे. तारायंत्राचें काम प्रथमच सुरू झालें, तेव्हां एका तारेवरून काम भागत नसे. तर, प्रवाहाचें मंडळ (सर्कल) पुरें होण्यासाठीं त्यास दुहेरी तार घालावी लागे. किंवा प्रत्येक स्टेशनावरची तार आगगाडीच्या रुळाला नेऊन गुंडाळीत. कारण, तीस विद्युत्प्रवाह पदार्थाची गरज असे. तो रुळाच्या योगानें सुरू होई. ह्यामुळें जेथें आगगाडीचे रूळ असत तेथेंच तारायंत्र असे. इतर ठिकाणीं नसे. पुढें एकानें असा शोध लावला कीं, पृथ्वी—ह्मणजे जमीन—हीच मुळीं विद्युद्ग्राहक आहे. मग तारेला आगगाडीचे रूळच कशाला पाहिजेत? तिचें प्रत्येक स्टेशनावरचें एक एक टोंक जमिनींत पुरलें ह्मणजे मंडळ पुरें होऊन विद्युत्प्रवाह सुरू होईल. आणि त्याप्रमाणें तो प्रयोग बरोबर वठला, आणि आतां आपण पहातों, त्याप्रमाणें पाहिजे तिकडे तार सुरू झाली. तेव्हां अर्थातच पहिल्या शोधाची उपहास्यता झाली, व ह्या नव्या शोधाची मोठी तारीफ होऊं लागली. सांप्रत ईथरच्या लहरींतून—ह्मणजे वातावरणांतूनच विद्युत्प्रवाह सुरू करून तारेशिवायच बातमी जात येत असल्याचें आतां प्रसिद्ध झालें आहे. इतकेंच नव्हे, तर तो प्रकार इंग्लंद, अमेरिका इत्यादि ठिकाणीं चालू असल्याचेंही वर्तमानपत्रद्वारें आपण ऐकतों. तोच प्रकार अमलांत आला, व दैवयोगानें हुकमतीमध्यें जर विमानें चालूं लागलीं, तर ह्या साऱ्या जगभर रूळ पसरणाऱ्या व तारा बांधणाऱ्या कल्पक लोकांना, आह्मीच किंवा आमचे वंशज तरी हांसतीलच. तात्पर्य काय कीं, आगगाडींतून जाणाराला ज्याप्रमाणें मागें पडलेल्या वस्तु तेवढ्या लहान लहान, दूर, अंधुक व अपूर्ण आणि पुढें येणारी वस्तु तेवढी संपूर्ण, स्पष्ट व मोठी; त्याप्रमाणें मागें झालेल्या त्या सर्व चुका, घडलेल्या गोष्टी क्षुद्र; व केलेले विचार अपक्व; आणि आजचे विचार खरे, चाललेल्या गोष्टी महत्वाच्या; व झालेले समज परिपक्व; हीच परंपरा मनुष्यमात्राच्या पाठीस लागलेली असते. असेच वारंवार अनुभव येत गेले, घडीघडीला अशाच ठेंचा लागत चालल्या, ह्मणजे आतां खरें तरी कोणतें? हाच संशय जेथें तेथें उत्पन्न होतो. मध्यें एक लहानशी सरकी असून तिच्या भोंवतीं कापूस असावा, किंवा मध्येंच एक आगटी असून तिच्या भोंवतीं धूर जमावा, किंवा एखाद्या लहानशा होडीभोंवतीं खवळून तुफान झालेल्या लाटांचा समुद्र असावा, त्याप्रमाणें हा आपला जीव संशयाच्या अपरंपार भरलेल्या जाळ्यांत गुरफटलेला आहे.

जिवाची सारी धडपड फक्त एका सुखाकरितां. पण त्या बिचाऱ्यास त्याची व्याख्या सुद्धां माहीत नसते.

ह्मणून, त्याची नेहमीं, वांईला जाणारानें कोल्हापुरचा रस्ता धरल्यासारखी स्थिति होते. प्रथमतः त्यास असें वाटत असतें, ईश्वरकृपेनें माझें एवढें जर लग्न होईल, तर राजाप्रमाणें किंबहुना त्यापेक्षांही अधिक मी सुखी होईन. सुखाचें सर्वस्व; विश्रांतीचें नंदनवन; व विलासाची रत्नखचित इमारत कायती एक स्त्री. पण 'सुंदर कांता व्हावी' असें जें मनांत येतें त्याच्या ऐवजीं 'पाठी कर्कशा लावावी' अशी 'देवाजीची मर्जी' होते. मग तो सुखसोहळा काय विचारावा? जी केवळ आपल्या प्राणांची धनीन बनावयाची, तीच अर्धांगी आगीची खाय, व्याघ्राची गुहा, व विंचवाचें पेंव असें वाटूं लागतें. तरी पुन्हा पुत्रप्राप्तीची इच्छा असतेच. पुत्र कर्तासवरता, शहाणासुर्ता, निपजला तर आपल्यावरचें संसाराचें ओझें काढून घेऊन हायसें बसावयास मिळेल. पण त्यांतही 'भीक नको, पण कुत्रा आंवर' किंवा 'कुसंतानापेक्षां निसंतान बरें' असेंच ह्मणावयाची बहुधा पाळी येते. आणि जो आपला आत्मा ह्मणून आपल्या विश्रांतीस कारणीभूत होईल अशी आशा बाळगलेला पुत्र, तोच अधिक दुःखास व संतापास मात्र कारण होतो. आत्महत्त्येपर्यंत मजल ठेपली नाहीं, तर मोठें भाग्य ह्मणून समजावें. मग मनाचा असा ग्रह होतो, कीं स्त्रीपुत्र नीट वागत नाहींत, ह्याचें कारण आपणापाशीं असलेलें दारिद्र्य होय. ह्याकरितां, पैसा जर विपुल प्राप्त होईल, तर कुटुंबांतील सर्व मंडळी खुषींत राहतील, व जिकडे तिकडे आपली मानमान्यता वाढेल. पण तो पैसाही जरी लक्ष्मीपतींनीं दिला, तरी तोही विपत्तीस कारण होतो, एवढेंच नव्हे, तर पुष्कळांच्या प्राणघातास तोच कारण झाला आहे! मिळून खरें काय, आणि सुखाचें साधन कशांत, हा प्रश्न जशाचा तसा शिल्लकच.

उन्हानें तप्त झालेला मृग जसा जळासाठीं माळरानांत भटकत फिरतो, ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत धापा टाकीत जाऊन आपला ताप अधिक वाढवितो, त्याचप्रमाणें हुबेहुब ह्या जगाची स्थिति आहे. तें एखाद्या जन्मांधाप्रमाणें राजरस्ता गांठावा ह्मणून धांव घेत असतें, आणि शेवटीं पडतें खड्ड्यांत! ह्मणूनच ज्ञानदेवासारखे व तुकारामासारखे साधु ह्मणतात कीं,

**"कोण जाणे खरें खोटें। जग चाललें उफराटें।"**

जगामध्यें जे अचाटबुद्धीचे होऊन गेलेले लोक; महान् तत्त्ववेत्ते; पूर्ण ज्ञानी; जगद्वंद्य साधु ह्या सर्वांचा शेवटचा

सिद्धांत पाहिला तर हा कीं:—"दिसतें तें सर्व मिथ
न दिसतें तें, ह्मणजे अदृश्य तेवढें खरें." आणि
खरा आहे असें शेवटीं प्रत्ययास येतें. जेथें कांहीं न
असें आपण ह्मणतों, तेथेंच सर्व कांहीं असतें; अ
जेथें सर्व कांहीं आहे असें आपण ह्मणतों, तेथें मुळ
कांहीं असत नाहीं. ज्या वस्तु भिन्नभिन्न आहेत अ
आपली समजूत असते, ती वस्तु एकच असते; व
वस्तु एकच आहे अशी खात्री वाटते, तिचे लक्षाव
प्रकार दृष्टीस पडतात. यावरून 'द्वैतमय अद्वैत'
ह्या विश्वांतलें सारें गूढ आहे. ह्याचीं उदाहरणेंही
रशीं खोल आहेत असें नाहीं. कोणी एखाद्यानें मृत्ति
घेऊन तोंडांत घातली, तर ती बेचव लागते. ह्मार
तिला तो कोणतीच चव नाहीं असें ह्मणतो. पण
गामध्यें जेवढे ह्मणून रस आहेत, तेवढे सारे तिच्याम
आहेत. एक चिंचोका घेऊन तो तोंडांत घातला,
त्याची चव आंबट लागत नाहीं. पण तोच जमिनीम
रुजत घातला कीं, तिच्यांतील रसांचें पृथक्करण कर
आंबट रस तेवढाच शोषण करून वर घेतो. तो
केवळ चिंचेच्या फळामध्येंच येतो असें नाहीं, तर
नामध्यें सुद्धां भरतो. ह्मणूनच तीं आंबट लागता
प्रत्येक वनस्पतीचा धर्म हाच. उंसाचा डोळा, बेचव
असतो, परंतु तोही जमिनीचें पृथक्करण करून गोड
तेवढाच वर घेऊन सारा ऊंस त्यानें भरून सोडल
मिरचीचें बीं, तीक्ष्ण रस शोषण करून मिरचीमध्यें भर
ह्मणून ती तिखट लागते. काजऱ्याची बी जमिनींती
कडू रस असेल तो शोषून घेते. ह्यावरून प्रत्ये
बीजाच्या आंगांत पृथ्वींतील रसाचें पृथक्करण करून ए
एक विवक्षित रस ग्रहण करण्याची शक्ति आहे हें दिस
येईल. व पृथ्वी ह्मणजे जमीन ह्मणा कीं माती ह्मण
ती जरी बेचव असली, तरी तिच्यामध्यें सर्व रस आहेत
अर्थात् मृत्तिका ही जगांतील सर्व रसांचें मिश्रण हो
ह्मणूनच तिला संस्कृतामध्यें 'रसा' असें अन्वर्थक
गुणविशिष्ट व व्यापक नांव आहे. दुसरा दृष्टांत रंगाच
निळा आणि पिंवळा रंग मिळून हिरवा होतो; किरमिज

१ मृत शब्दापासून मृत्तिका शब्द झालेला आहे. मृ
तांची अर्थात् कलेवरांची जी राशी ती मृत्तिका होय. ह्या
वरून पृथ्वी ही प्राण्यांच्या अनंतकोटि कलेवरांचेंच थोडें
रूपांतर होय. हें चुनखडू, पोंवळीं, इत्यादि खनिज पद
र्थांवरून ध्यानांत येण्यासारखें आहे.

व पांढरा मिळून गुलाबी होतो; पिंवळा व लाल मिळून नारंगी होतो. अशी रंगाची उपपत्ति सांगतां येते. परंतु पांढरा रंग दुसऱ्या कांहीं रंगांच्या मिश्रणानें होईल, ही कल्पना सुद्धां मनांत येत नाहीं. परंतु सर्व रंगांचें मिश्रण तोच पांढरा रंग होय. ऑईल पेंटिंग—ह्मणजे तेली रंगाचें काम करणारे चितारी असतात त्यांच्या कामाकडे लक्ष्य द्यावें, ह्मणजे ही गोष्ट तेव्हांच लक्ष्यांत येते. ते प्रथमत: मध्यंतरीं एखाद्या मनुष्याची तसबीर तयार करतात, आणि 'प्यालेटवर' त्यांतील तांबडा, पिंवळा, काळा, निळा, हिरवा, इत्यादि रंगांचे जे थोडे बहुत अंश शिल्लक रहातात, ते सारे सुरीनें एकत्र कालवितात, आणि तो रंग 'ब्याकग्राउंडला' देतात. तो पांढरा होतो ... चमत्कार! आतां तें मिश्रण यथा... पण त्यामुळें अगदीं पांढरा ...तो ही गोष्ट खरी आहे. पण ...तो; परंतु त्यामध्यें गहन विचार करण्य. सूर्यकिरणांचें पृ- सर्व रंगांच्या मिश्रणा: इत्यादि सात खरी आहे. उन्हाचा' विद्यार्थ्यास कांचेचा पैलूदार ... रंगही थकरण होऊन तांबडा, पिंवळा, ... रंग बाहेर पडतात. ही गोष्ट अलीकडे ... सुद्धां माहिती आहे. ह्यावरून उन्हाचा पांढरा ... भिन्नभिन्न अनेक रंग मिळूनच झालेला आहे ही गोष्ट ध्यानांत येते. हाच विचार पुढें चालविला ह्मणजे आ- काश याचा अर्थ कांहीं नाहीं असा जो आह्मी समजतों, तो चुकीचा असून आकाश ह्मणजेच सर्व कांहीं हें आ- पल्यास समजून चुकेल. सर्व प्रकारचीं बीजें, लहान मोठे जीव, जीवांचे अंकुर, अनंत आत्म्यांचा सांठा, ह्या सर्वांचें भांडार त्याचें नांव आकाश. इतकेंच नव्हे, प्रत्यक्ष परमात्म्याचें जें स्वरूप त्याचेंच नांव आकाश ह्मटलें तरी सुद्धां शोभेल. ह्मणून प्रत्येक वस्तु निर्माण होणें ती त्यापासून होते, त्यांतच रहाते, त्यांतच तिचा लय होतो; व तिच्यांत सारें तेंच व्यापलेलें असतें.

...झुळूक आंगास ...ास... अतिशय थंड, हातास कळा येणतीही ... आणि मधल्या भांड्यांत सोमळ पाणी ... मनुष्याला त्या कढत पाण्यांत हात घालावयास सांगावें, व दुसऱ्यास गार पाण्यांत हात घालावयास सांगावें, व त्यांना त्यांत हात ठेवणें दुःसह झालें ह्मणजे दोघांनाही एकदम त्यांतून हात काढून ते मधल्या भांड्यांत घालाव- यास सांगावें. ह्मणजे एक ह्मणेल 'हा! बरें गार वाटलें.' दुसरा ह्मणेल 'हा! बरी ऊब आली.' मधल्या ... एकच उष्णतेचें असतां, एक त्यालाच ... भांड्यांतील पाण्याचे ... ह्यावरून गार ह्मणतो, व दुसरा त्याल... थंडी आणि उष्णता, ह्यांतील भेद ... सहज ध्यानांत येतें.

द्वैतमय अद्वैत ह्याची व्यापकताही अशीच अनंत आहे. अंधार व प्रकाश; उष्णता व थंडी; ज्ञान व अज्ञान; ह्यांतील प्रत्येक द्वंद्व जरी परस्पराच्या अगदीं विरुद्ध दिसतें, तरी तीं नेहेमीं एकरूपच असतात. भेद ही केवळ कल्पना. प्रकाश आणि अंधार ह्मणजे तरी काय? एखादा मनुष्य भर दोन प्रहरीं एखाद्या माजघरांतील खोलींत पुस्तक वाचित पडतो, दुसरा बाहेरून येतो, तो त्याला ठेंचळून पडतो! त्याला तो मनुष्यही दिसत नाहीं. तेव्हां जो प्र- काश एकाच्या दृष्टीला मुळींच दिसत नाहीं, तो दुसऱ्याला पुस्तक वाचण्यालाही पुरतो. जेथें आह्मांला कांहींच दिसत नाहीं, अशा अंधाऱ्या रात्रीं घुबडादि प्राणी उत्तम प्रकारें विहार करतात. इतकेंच नव्हे, तर तोच त्यांचा दिवस होतो. आणि आमचा दिवस ती त्यांची रात्र! तेव्हां आह्मी जेथें प्रकाश नाहीं असें ह्मणतों, तेथें प्रकाश हा असलाच पाहिजे हें उघड आहे. आमच्या दृष्टिशक्तीच्या प्रमाणा- पेक्षां कमी प्रकाश झाला, तरी आह्मांला दिसत नाहीं, आणि अधिक ... तरी आह्मांला दिसत नाहीं! अधिक ... कणगा, त्याप्रमाणें आत्म... '...ळे दिपले' असें ह्मणतों, भरलेल्या कोठाराचें नांव आकाश. ...गोष्ट तशीच. ... कोणालाही नाहीं. ब्रह्मांड हा सारा रूपांतराचा ... ...वस्तु आपल्या दृष्टिकटाक्षमर्यादेच्या ... ह्मणजे ती नाश पावली, असें आपण ... ...वाफ होते; वाफेचा ... ...ांचा समुद्र; ...हटगाडगें ... पाण्याचा ...च्या दृष्टि- ...गी आटलें. ...तों. पण तें ...गेणत्याच व- ...र खरा नाहीं,

जगावर आजपर्यंत कोट्यवधि मनुष्यें होऊन गेलीं, आज कोट्यवधि आहेत, व पुढें कोट्यवधि होतील, तरी एकासारखें एक मनुष्य कोठेंही आढळत नाहीं; एकाच वळणाचीं अक्षरें, एकच कित्ता, एकच गुरु असतां एकाचें हस्ताक्षर दुसऱ्यासारखें होत नाहीं; येवढेंच नव्हे पण काढतां सुद्धां येत नाहीं; तोच स्वर; तींच अक्षरें; तोच उच्चार असतां, एकच शब्द दुसऱ्याच्या शब्दाला मिळत नाहीं. हें तर काय, पण हातांच्या अक्षरांच्या रेषा सुद्धां एकासारख्या दुसऱ्याच्या नसतात. ह्मणूनच सरका- रानें हल्लीं, ज्यांस सही करतां येत नाहीं, त्यांच्या हाताच्या आंगठ्याचा छाप कागदावर घ्यावा असें ठरविलें आहे. हा द्वैतभाव झाला. पण 'मनुष्य' शब्द उच्चारा, कीं त्यांत

[illegible]

[illegible]

[illegible]

व पांढरा मिळून गुलाबी होतो; पिंवळा व लाल मिळून नारंगी होतो. अशी रंगाची उपपत्ति सांगतां येते. परंतु पांढरा रंग दुसऱ्या कांहीं रंगांच्या मिश्रणानें होईल, ही कल्पना सुद्धां मनांत येत नाहीं. परंतु सर्व रंगांचें मिश्रण तोच पांढरा रंग होय. ऑईल पेंटिंग–ह्मणजे तेली रंगाचें काम करणारे चितारी असतात त्यांच्या कामाकडे लक्ष्य द्यावें, ह्मणजे ही गोष्ट तेव्हांच लक्ष्यांत येते. ते प्रथमतः मध्यंतरीं एखाद्या मनुष्याची तसबीर तयार करतात, आणि 'प्यालेटवर' त्यांतील तांबडा, पिंवळा, काळा, निळा, हिरवा, इत्यादि रंगांचे जे थोडे बहुत अंश शिल्लक रहातात, ते सारे सुरीनें एकत्र कालवितात, आणि तो रंग 'ब्याकग्राउंडला' देतात. तो पांढरा होते ... चमत्कार! आतां तें मिश्रण यथा... पण त्यामुळें अगदीं पांढरा ...तो ही गोष्ट खरी आहे. पण ...तो; परंतु त्यामध्यें गहन विचार करण्य... सूर्यकिरणांचें पृ- सर्व रंगांच्या मिश्रणा... इत्यादि सात खरी आहे. उन्हाचा' विद्यार्थ्यांस कांचेचा पैलूदार ... रंगही थकरण होऊन तांबडा, पिंवळा, ... रंग बाहेर पडतात. ही गोष्ट अलीकडी ... सुद्धां माहिती आहे. ह्यावरून उन्हाचा पांढरा ... भिन्नभिन्न अनेक रंग मिळूनच झालेला आहे ही गोष्ट ध्यानांत येते. हाच विचार पुढें चालविला ह्मणजे आकाश याचा अर्थ कांहीं नाहीं असा जो आह्मी समजतों, तो चुकीचा असून आकाश ह्मणजेच सर्व कांहीं हें आपल्यास समजून चुकेल. सर्व प्रकारचीं बीजें, लहान मोठे जीव, जीवांचे अंकुर, अनंत आत्म्यांचा सांठा, ह्या सर्वांचें भांडार त्याचें नांव आकाश. इतकेंच नव्हे, प्रत्यक्ष परमात्म्याचें जें स्वरूप त्याचेंच नांव आकाश ह्मटलें तरी सुद्धां शोभेल. ह्मणून प्रत्येक वस्तु निर्माण होणें ती त्यापासून होते, त्यांतच रहाते, त्यांतच तिचा लय होतो; व तिच्यांत सारें तेंच व्यापलेलें असतें.

द्वैतमय अद्वैत ह्याची व्यापकताही अशीच अनंत आहे. अंधार व प्रकाश; उष्णता व थंडी; ज्ञान व अज्ञान; ह्यांतील प्रत्येक द्वंद्व जरी परस्पराच्या अगदीं विरुद्ध दिसतें, तरी तीं नेहेमीं एकरूपच असतात. भेद ही केवळ कल्पना. प्रकाश आणि अंधार ह्मणजे तरी काय? एखादा मनुष्य भर दोन प्रहरीं एखाद्या माजघरांतील खोलींत पुस्तक वाचित पडतो, दुसरा बाहेरून येतो, तो त्याला ठेंचळून पडतो! त्याला तो मनुष्यही दिसत नाहीं. तेव्हां जो प्रकाश एकाच्या दृष्टीला मुळींच दिसत नाहीं, तो दुसऱ्याला पुस्तक वाचण्यालाही पुरतो. जेथें आह्मांला कांहींच दिसत नाहीं, अशा अंधाऱ्या रात्रीं घुबडादि प्राणी उत्तम प्रकारें विहार करतात. इतकेंच नव्हे, तर तोच त्यांचा दिवस होतो. आणि आमचा दिवस ती त्यांची रात्र! तेव्हां आह्मी जेथें प्रकाश नाहीं असें ह्मणतों, तेथें प्रकाश हा असलाच पाहिजे हें उघड आहे. आमच्या दृष्टिशक्तीच्या प्रमाणापेक्षां कमी प्रकाश झाला, तरी आह्मांला दिसत नाहीं, आणि ... तरी आह्मांला दिसत नाहीं! अधिक ... कणगा, त्याप्रमाणें आत्म... '...ळे दिपले' असें ह्मणतों, भरलेल्या कोठाराचें नांव आकाश. ... गोष्ट तशीच. ... कोणालाही नाहीं. ब्रह्मांड हा सारा रूपांतराच... ...त ... येणवीही वस्तु आपल्या दृष्टिकटाक्षमर्यादेच्या ... ह्मणजे ती नाश पावली, असें आपण ... ...ाफ होतें; वाफेचा ... ...ांचा समुद्र; ...टगाडगें ... पाण्याचा ...च्या दृष्टि- ...गी आटलें. ...तों. पण तें ... गेणत्याच व- ...र खरा नाहीं,

जगावर आजपर्यंत कोट्यवधि मनुष्यें होऊन गेलीं, आज कोट्यवधि आहेत, व पुढें कोट्यवधि होतील, तरी एकासारखें एक मनुष्य कोठेंही आढळत नाहीं; एकाच वळणाचीं अक्षरें, एकच किता, एकच गुरु असतां एकाचें हस्ताक्षर दुसऱ्यासारखें होत नाहीं; येवढेंच नव्हे पण काढतां सुद्धां येत नाहीं; तोच स्वर; तींच अक्षरें; तोच उच्चार असतां, एकच शब्द दुसऱ्याच्या शब्दाला मिळत नाहीं. हें तर काय, पण हातांच्या अक्षरांच्या रेषा सुद्धां एकासारख्या दुसऱ्याच्या नसतात. ह्मणूनच सरकारानें हल्लीं, ज्यांस सही करतां येत नाहीं, त्यांच्या हाताच्या आंगठ्याचा छाप कागदावर घ्यावा असें ठरविलें आहे. हा द्वैतभाव झाला. पण 'मनुष्य' शब्द उच्चारा, कीं त्यांत

---

...झुळुक आंगास ...वास... अतिशय थंड, हावास कळा ... आणि मधल्या भांड्यांत सोमळ पाणी ... मनुष्याला त्या कढत पाण्यांत हात घालावयास सांगावें, व दुसऱ्यास गार पाण्यांत हात घालावयास सांगावें, व त्यांना त्यांत हात ठेवणें दुःसह झालें ह्मणजे दोघांनाही एकदम त्यांतून हात काढून ते मधल्या भांड्यांत घालावयास सांगावें. ह्मणजे एक ह्मणेल 'हा! बरें गार वाटलें.' दुसरा ह्मणेल 'हा! बरी ऊब आली.' मधल्या ... एकच उष्णतेचें असतां, एक त्यालाच ... भांड्यांतील पाण्याला ... गार ह्मणतो, व दुसरा त्याला ... ह्यावरून थंडी आणि उष्णता, ह्यांतील भेद ... सहज ध्यानांत येतें.

---

सर्वांचा समावेश होतो. मनुष्यें ह्मटलीं कीं तीं सर्व सारखीं, असें मनांत येतें. त्यांचे अवयव एक, त्यांचे गुणधर्म एक, त्यांचें खाणें पिणें एक; सर्व कांहीं एक. ह्मणजे झालें अद्वैत! पण तेंच बायकांचें नांव घ्या, कीं पुन्हां भेदभाव आला. बरें; प्राणी ह्मटलें कीं, सर्वांची व्याप्ति झाली. हत्ती, घोडा, बेडूक, पाल, कृमी सर्व कांहीं त्यांत आलें. आणि आहार, निद्रा, भय, मैथुन इत्यादि सर्व प्रकार एक; असें वाटावयास लागलें. ह्याच रीतीनें प्रत्येक वस्तु ह्मटली कीं, साऱ्या ब्रह्मांडाचा बोध झाला. असा अधिक अधिक विचार करीत निघाले, ह्मणजे जिकडे तिकडे "द्वैतमय अद्वैत" च भरलेलें दिसूं लागेल. [illegible]र्व असें वाटूं लागत.

मोठमोठ्या श[illegible] इच्छा असतेच. पुत्र कर्तासवर[illegible]

व्याख्या [illegible] नपजला तर आपल्यावर[illegible] किती‍ही बारिक काढून घेऊन ह्मायसें [illegible] परिमाण हें असणारच. सूक्ष्म 'भीक न[illegible] तर सूक्ष्मदर्शक यंत्रानें परिमाण निघेल. [illegible] परिमाण हें पाहिजेच. परिमाणच जर नसेल, तर बिंदूचें अस्तित्व तरी मानावयाचें कसें? तोच मासला रेषेच्या व्याख्येचा. 'जिला लांबी मात्र आहे, व रुंदी नाहीं' हें लक्षण मनांत ठेवून रेषा काढावयाची कशी? कसलीही रेषा असली तरी, तिला मध्यें गर्भ ह्मणून असणारच, व त्याच्या दोन बाजूंला दोन हद्दी [illegible] पाहिजे तर) ह्या असणारच. [illegible] होय. वाट काय? मिळ[illegible]इल, तर कुटुंब[illegible] प्रत्येक दिव[illegible], व जि[illegible] (रषा ह्मणा मानमान्यता वाढल[illegible] पण [illegible] रषा झाल्या तीन, त्यांची दिला, तरी तोही [illegible]मात त्यांत ह्याच सावळा गोंधळ. तर पुष्क[illegible] सूर्य तर आह्मी डोळ्यांनीं पाहतों, तो तरी [illegible]हता त्या ठिकाणीं आहे काय? एखाद्या पटाईत गोलंदाजानें त्याच्यावर तोफेचा नेम धरून गोळा सोडला, तर तो सूर्याला सोडून कोट्यवधि योजनें दूर कोणीकडच्या कोणीकडेच जाईल. कारण, सूर्याच्या खऱ्या स्थानामध्यें व आमच्या दृश्य किरणांमध्यें वातावरणांतील किरणाच्या वक्रीभवन धर्माप्रमाणें अठरा अंशांचा फरक आहे!

आपल्या भोंवतीं असलेल्या संशयसागराचा विस्तार किती अफाट आहे, त्याच्या कल्लोळामध्यें आपला जीव कसा घुटमळलेला आहे, ह्याची थोडीशी कल्पना मनांत यावी, ह्मणून वर इतक्या विस्तारानें लिहिलें आहे. त्यावरून विचार करूं लागलें तर "ब्रह्मघोटाळा" ह्मणून जी ह्मण पडली आहे, ती अगदीं यथार्थ आहे, अशी मनाची खात्री होते. तेव्हां ब्रह्मांड हें आहे तरी काय? असा सहजींच प्रश्न उद्भवतो. पण त्याचें उत्तर अगदीं थोडक्यांत आहे. तें उत्तर हेंच कीं, तें अंडाकृति आहे. अंड ह्मणजे वर्तुळ. सर्व कांहीं वर्तुळांत आहे. नियम वर्तुळांत; गति वर्तुळांत; आकार वर्तुळांत; जाणें वर्तुळांत; येणें वर्तुळांत; जन्म वर्तुळांत; आणि लयही वर्तुळांतच. वर्तुळाशिवाय दुसरी गोष्ट नाहीं. आणखी, ह्या वर्तुळांत अत्यंत महत्वाचा मुद्दा ध्यानांत ठेवण्यासारखा असतो, तो हा कीं, त्यांतील इंग्रजी भाषेंत ज्यांना निगेटिव्ह पॉइंट आणि पॉझिटिव्ह पॉइंट ह्मणतात ते, किंवा आपल्या भाषेंत साध्या शब्दांनीं सांगावयाचें तर-आदि आणि अंत किंवा शेंडा आणि बुडखा-हे [illegible]र असतात. जी आदीची स्थिति तीच यावय[illegible] त्यांत चूक नाहीं. एक टोंक दुसऱ्या अमर्याद कर[illegible] तरीही चुकावयाचें नाहीं. कोणत्याही ग्रहाचें जेथें [illegible]ह्मणून काढतांच जर दगड फेंकला, त[illegible]ठेवली वाढवा, तिला यांत शंका नाहीं. नाहा[illegible] मेकांस मिळालींच. असणार? कोणतीच[illegible]हीं, अशा अंतरिक्षांत परत पृथ्वीवर येतो अ[illegible] ठिकाणींच येणार, तें नसून ह्म[illegible]ला दुसरी गति ती कोणती [illegible]वनस्पतीचा [illegible] नाहीं. पृथ्वीवरून फेंकलेला दगड असतो [illegible], ह्याचें कारण, तिचें गुरुत्वाकर्षण होय. [illegible] तर त्याला गति वर्तुळाचीच. शिशाचे छरे वाटोळे गरगरीत होण्याकरितां, शिशाचा रस उंचावरून चाळणींत घालून ओततात. हीच मनुष्यानें केलेली अनंत ब्रह्मांडाची नक्कल होय. आईबापें मुलांमुलींचीं खरोखरी लग्नें करून, खराखुरा संसार करितात. मुलें लुटपुटीचीं लग्नें करून, लुटपुटा संसार करतात. त्याप्रमाणेंच ईश्वर करतो, व मनुष्य त्याची नक्कल उठवितो. परमेश्वरानें प्राण्यांच्या हाडांमध्यें सांधे केले; मनुष्यानें त्याच नमुन्यावर बिजागऱ्या केल्या. ईश्वरानें डोळे घडविले; त्याच नियमानें मनुष्यांनीं लेन्स क्यामेरा करून, ईश्वरानें निर्मिलेल्या वस्तूंचीच प्रतिमा घेण्यास सुरवात केली. ईश्वरानें कान केले; मनुष्यानें तीच कल्पना घेऊन, फोनोग्राफचें यंत्र तयार केलें, व शब्दांची नक्कल केली. तथापि सर्वांचें पर्यवसान वर्तुळांतच, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. लेन्साची आकृति वर्तुळ; फोनोग्राफच्या नळ्याही वर्तुळच. वर्तुळावांचून कांहींच नाहीं. बिंदु ह्मणजे तरी काय? लहान वर्तुळच होय. रेषा ह्मणजे तरी काय? असंख्य बिंदु एका हारीनें मांडणें.

ह्मणजे शेंकडों वर्तुळांचीच पंक्ति. वर्तुळांची परिघरेषा, आणि रेषा ह्मणजे बिंदूंची सांखळी. एवंच वर्तुळाचा परिघ बिंदुमयच. हेंच स्पष्ट सांगावयाचें ह्मणजे वर्तुळाची सीमा असंख्य वर्तुळें! असेंच ह्मटलें पाहिजे. जगांत कोणतीच व्याख्या बरोबर सांगतां येत नाहीं. लिंबाची रुचि कसली? आंबट. चिंचेची रुचि कसली? आंबट. ताक कसें असतें? आंबट. तर मग तिन्हींचीही रुचि एकच का? ती मात्र नव्हे. उंसाची रुचि कसली? गोड. साखर कशी लागते? गोड. गुळाची चव कोणती? गोड. आंब्याचा रस कसा वाटतो? गोड. तर मग ह्या सर्वांची रुचि एकच का? तर ती मात्र नव्हे. मऊ गादीवर लोळलें ह्मणजे काय वाटतें? मौज. उष्ण काळांत वाऱ्याची झुळूक आंगास लागली ह्मणजे काय वाटतें? मौज. पुष्पांचा सुगंध घेतला ह्मणजे कसें वाटतें? मौज. रतिसुखांत काय आहे? मौज. तिहींचेंही सुख एकच का? तें मात्र नव्हे. तात्पर्य काय, कीं ह्यांतील भेद शब्दांनीं व्यक्त होण्यासारखा नाहीं. तो अनुभवानेंच ज्याचा त्यानें जाणला पाहिजे.

सूक्ष्म विचाराअंतीं हें दिसून येईल कीं, बिंदूचा परिघ ती रेषा असलीच पाहिजे. आणि रेषा तर बिंदूची सांखळी धरलेलीच आहे!! ही वर्तुळाची सर्व व्यापकता सर्वत्र सारखी भरून राहिलेली आहे. चंद्र, सूर्य, तारे, पृथ्वी इत्यादि गोल वर्तुळच आहेत. येवढेंच नव्हे तर, त्यांवरील सर्व सृष्टिक्रम सुद्धां वर्तुळांतच आहे. प्रत्येक वस्तूची, प्रत्येक क्रियेची, आरंभींची व शेवटची स्थिति अगदीं एकसारखी असावयाची. ह्याला उदाहरण हल्लींच्या आपल्या सरकारचेंच कां ध्याना? तें पहा कसें द्वैतमय अद्वैतस्वरूपीच आहे तें! पोलिसचा शिपाई एखाद्याला धरून नेतो. ह्मणजे प्रजेलाच धरून नेतो. ह्मणून प्रजा ही हलकी, व सरकार श्रेष्ठ! तेंच का सरकार? त्याच्याच हुकुमानें सर्व होईल काय? नाहीं. तें मुख्य सरकार नव्हे. तर त्याच्यावर एक पोलिस सुपरिंटेंडंट असतो. तें तरी खरें सरकार? नव्हे. तर त्या सर्वांवर गव्हरनर असतो. तें तरी खरें सरकार? नव्हे. तर त्याच्यावर गव्हरनर जनरल! तें तरी सरकारचें खरें स्वरूप काय? छे:! त्या सर्वांची धनीन, महाराणी साहेब. त्याच सर्व राज्याचा चालक. तर मग मूळ सरकार आह्मांस मिळालें. छे:! तिच्याहीवर संमती देणारी पार्लमेंट आहे. पार्लमेंट ह्मणजे काय? निवडलेले लोक, तर मग प्रजा ह्मणजेच सरकार कीं काय? होय. तर मग पोलिसच्या शिपायानें प्रजेला धरून नेणें, ह्मणजे प्रजेनेंच प्रजेला धरून नेणें होय. ह्याचा स्पष्टार्थ हाच कीं, प्रजेवरचा अधिकारी सरकार व सरकारचा अधिकारी प्रजा! द्वैतमय अद्वैत तें हेंच. जन्माच्या आधीं बीज घ्या; किंवा शून्य घ्या. नंतर बाल्य; नंतर तारुण्य; नंतर वृद्धापकाल; आणि तदनंतर पुन्हा शून्य किंवा बीज. येथें हें एक ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, शून्य ह्मणजे कांहींच नाहीं, असें नव्हे, तर शून्य ह्मणजे मूळबीज असें धरलें पाहिजे. ह्मणूनच आकाश ह्मणजे कांहीं नाहीं, असें नव्हे, तर तें सर्वांचें बीज! अनंत बीजांचा संग्रह, त्याचें नांव आकाश. धान्याच्या बीजांच्या संग्रहाचें कोठार जसा कणगा, त्याप्रमाणें आत्म्याच्या किंवा प्राण्यांच्या बीजानें भरलेल्या कोठाराचें नांव आकाश. नाश हा केव्हांही कोणालाही नाहीं. ब्रह्मांड हा सारा रूपांतराचा बाजार आहे. कोणतीही वस्तु आपल्या दृष्टिकटाक्षमर्यादेच्या अतीत झाली, ह्मणजे ती नाश पावली, असें आपण ह्मणतों.

बर्फाचें पाणी होतें; पाण्याची वाफ होते; वाफेचा पाऊस होतो; पावसाच्या नद्या होतात; नद्यांचा समुद्र; आणि समुद्राचा पुन्हा बर्फ. पुन्हा पुन्हा रहाटगाडगें हेंच. बर्फाचा नाश ह्मणजे पाण्याची उत्पत्ति. पाण्याचा नाश ह्मणजे वाफेचा जन्म! पण वाफ आमच्या दृष्टिकटाक्षमर्यादेच्या पलीकडे जाते, ह्मणून पाणी आटलें. पाण्याचा नाश झाला असें आपण ह्मणतों. पण तें मिथ्या! नाश असा कशाचाच नाहीं.

कोणतीच व्याख्या जर बरोबर नाहीं; कोणत्याच वस्तूला जर नाश नाहीं; द्वंद्वांतील भेदही जर खरा नाहीं, तर मग खरें तरी काय? आणि सुख तरी कशांत? असा प्रश्न सहजीं उद्भवतो. कारण प्रत्येक प्राणी जो इतका जीव तोडीत असतो, तो एका सुखाकरितां. आणि रासेलसच्या कादंबरीप्रमाणें सुखाचा मागमोस तर कोठेंच नाहीं. जेथें जेथें मनुष्य तान्हेनें व्यापलेल्या मृगासारखा धांवत जातो, तेथें तेथें त्याला मृगजळाप्रमाणें वाटाण्याच्या अक्षता मात्र मिळतात, आणि केलेले श्रम व गेलेलें आयुष्य मात्र व्यर्थ जातें. तेव्हां अर्थातच आमचे सुखाकरितां, जे जे प्रयत्न चालले आहेत, ते "शाखा तोडून, त्याचे बुडख्याला कुंपण करावें; चुनेगच्ची घरें मोडून, त्याचीं देवळें बांधावीत, लोकांना बुडवून अन्नसत्र घालावें, मस्तकावर पांघरूण घेऊन खालचें आंग उघडें टाकावें, घर मोडून त्याचा मंडप घालावा,

चिरगुटें जाळून शेकत बसावें, बैल विकून गोटा बांधावा, किंवा राघू सोडून पिंजरा तयार करावा" अशांपैकींच होत. साधारण लोक ज्या ठिकाणीं सुख आहे, ह्मणून कल्पना करतात, त्या ठिकाणीं तें मुळींच नसतें. इतकेंच नव्हे, तर भयंकर दुःख मात्र असतें. आह्मी, मनुष्यप्राण्यांनीं 'सर्व प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ, ज्ञानी, परिपूर्ण, विचारी काय ते आह्मी!' ह्मणून कितीही जरी टेंभा पाजळला, तरी गळाला लागणाऱ्या माशाची व आमची स्थिति–व योग्यता–सारखीच! तो जितका मासा अज्ञानी–ज्ञानशून्य, तितकेच आह्मीही अज्ञानी–ज्ञानशून्य! तिळमात्र कमी तर नाहींच, पण कांकणभर अधिक मात्र आहोंत. कारण त्या माशाला बुद्धिज्ञान नाहीं, व त्याच्यापुढें हा गळ आहे, ह्मणून "कंठशोष" करणारा तर कोणी नाहीं. पण हें सर्व आपणांला कळत असून, ज्या अर्थीं आपण जाणूनबुजून, संसाररूप गळाला डांस मारतों, त्या अर्थीं आह्मी, अज्ञान ह्मणविणाऱ्या प्राणिवर्गांतीलही "शतंभीष्म" नव्हे काय? संसार हा एक गळच आहे, आणि विषयसुख हें त्या गळाला लागलेलें मांस होय. त्याच्या लालचीनें आह्मी संसारच्या संसार एकदम तोंडांत घालतों, आणि त्याच्या प्राणहारक कांट्यांच्या दुःसह वेदना लागल्या ह्मणजे हिसकाहिसकी करूं लागतों. पण त्यामुळें अधिकाधिकच व्याकुळ होऊन सर्वस्वास मुकतों. हा अनुभव कोणत्या बरें संसारिक पुरुषास नाहीं? ह्मणून श्रीसमर्थ रामदासस्वामींनीं मूर्खांचीं लक्षणें सांगून, सरतेशेवटीं सांगितलें आहे कीं, "मूर्खांमाजीं परम मूर्ख। जो संसारीं मानी सुख। संसारदुःखायेवढें दुःख। आणीक नाहीं ॥ १ ॥"

ह्याप्रमाणें हरघडी ठेंचा लागूं लागल्या; वारंवार रस्ता चुकून, आडमार्ग भेटूं लागला; खुणेचे पदार्थ नाहींसे होऊन, सारीच दिशाभूल झाली; संशयसागराच्या लाटा एकामागून एक तोंडांत शिरून, जीवाचा कोंडमारा होऊं लागला, ह्मणजे मग 'हें करूं कीं तें करूं? असें करणें चांगलें कीं तसें करणें चांगलें? ह्यांत सुख आहे का त्यांत सुख आहे? हा मार्ग सोयीचा कीं तो मार्ग सोयीचा? ह्या मार्गांत जय का त्या मार्गांत जय? इकडून गेलें तर यश येईल कीं, तिकडून गेलें तर यश येईल?' ह्याच जपमाळेचे मणी मनुष्य हा अहोरात्र ओढीत असतो. सोमलांतल्या किड्यांना सोमल हीच षड्रसाची मेजवानी, नरकांतल्या किड्यांना नरक हेंच विलासमंदिर, मद्यप्यांना मद्य हेंच अमृत वाटतें. न्यायानें संसाराच्या यातायातींत; व दुःखाग्नीच्या खाईं जे परमसुख मानून लोळत असतात, त्यांच्या मनांत व खालचे विचार येत असतील तर नकळे! किंवा कोणी "होईल तें होईल; पुढची बात पुढें" अशं मनाशीं समजूत करून, प्रारब्धावर हवाला ठेवून ब असतील, त्यांची गोष्ट निराळी! परंतु ज्याला ह्मणून डीशी बुद्धि आहे; ज्याला ह्मणून सारासार विचार अ ज्याच्या अंतःकरणांत थोडीशी तरी विचाराची स्पृ जागृत आहे, त्याच्या मनांत खालील प्रश्नपरंपरा ट त्यावांचून कधींच रहावयाची नाहीं. निदान–दो टोंकांची स्थिति समसमान–ह्या तत्त्वावर तरी अतिश शांत स्थितींत व अतिशय उद्विग्न स्थितींत तरी येईलच येईल.

पृथ्वी ही केवढी आहे? चंद्रसूर्यांच्या पलीकडे क असेल? आपल्या ग्रहमालेसारख्या ग्रहमाला व आपल सूर्यासारखे सूर्य आहेत ह्मणतात, ते किती असतील त्यांच्या पलीकडे काय असेल? ह्या विश्वाची मर्या तरी कोठपर्यंत? हें असेंच किती काल चालणार सर्वांचा लय होऊन कल्पांत होतो, पण कल्पांताच्या पु काय? ईश्वर ह्मणून कोणी आहे किंवा नाहीं? असे तर तो दिसत कां नाहीं? मेल्यानंतर आपलें काय होतें कोणत्याच वस्तूला नाश नाहीं, तर मरणोत्तर आपल स्थिति कोणती? यमदंड असेल तर तो देह गेल्यानंत भोगावयाचा कसा? नसेल ह्मणावें तर परमेश्वराच्य घरीं सारीच झोटिंगपाच्छाई आहे, असें ह्मणावें लागेल पुनर्जन्म असण्याचा संभव आहे काय? मागील जन्माचं जर स्मृति नाहीं, तर मागचा जन्म पुन्हा आला काय आणि नव्याच जीवाचा प्राणी निर्माण झाला काय दोहींचा अर्थ एकच आहे. सर्वच ब्रह्मांड जर द्वैतम अद्वैत आहे, तर पापपुण्य ह्यांतील भेद कां मानावा भेदाभेद जर काल्पनिक आहे, असें सिद्ध होतें, त पापपुण्य, नीतिअनीति, तेवढीच तरी खरी कां मानावीं? आमच्याजवळ असलेलें आह्मीं दुसऱ्यास देऊन, परोपकार तरी कां करावा? लोकांचे गळे कापून तरी आपली तुंबडी कां भरूं नये? "श्रीमंतांचे प्राण घेणं जर पाप खरें, तर त्यांचें सर्वस्व हाताला येतें, हें पुण्याचें फळ नव्हे काय? बळी निर्बळांना खातात हें जर पाप, तर माशांचें निसंतान कां होत नाहीं? प्रत्येक लग्न शुभ

मुहूर्त पाहून करतात, मग जगामध्यें इतक्या विधवा तरी कां ? प्रजोत्पत्तीच्या साधनासाठीं जर लग्नविधीची खटपट, तर पशुपक्ष्यादि जाती, ज्यांच्या संततीला पार नाहीं, त्यांचे कोणीं विधिपूर्वक विवाह केले होते ? चोरीचें द्रव्य आणलें, ह्मणून तें कोणाला विष झालें आहे ? आवडीनें व्यभिचार केला, ह्मणून कोणाला कोड भरतें ? आह्मी करतांच मरून जातों, मग भोगावयाला रहाणार कोण ? देव जर दिसत नाहीं, तर तो आहे, ह्मणणें व्यर्थ होय." इत्यादि चार्वाकमतें व आसुरीविचारही मनांत उभे राहिल्यावांचून रहात नाहींत.

वरच्या प्रश्नांचीं समाधानकारक व यथायोग्य उत्तरें कळणें ह्याचें नांव ज्ञान. व खरें सुख ह्मणून जें आहे तें ज्ञानांतच आहे. इतर ठिकाणीं सुख अशी मनाची समजूत असणें, तीच अविद्या किंवा भ्रांति होय. आपलीं संसारांतील सुखदुःखें केवळ काल्पनिक असतात. दुःखाचीच का मजा पहाना ? विंचू चावला, हात तुटला, जखम झाली अशा प्रसंगीं मनुष्य रडला, आरडला तर कांहीं तरी शोभेल. कारण, त्याच्या योगेंकरून, त्याच्या देहामध्यें तीव्र वेदना तरी होत असतात. पण पुत्र गेला, बायको मेली, घर जळलें, अशा प्रसंगीं जो शोक करतो, तें दुःख केवळ त्याचें त्यानेंच उकरून काढलेलें असतें. कारण, त्याच्या देहाला खरोखर वेदना अशा कांहींच नसतात. आणखी दुसरा चमत्कार हा कीं, दुसऱ्याचें घर जळतांना, हा पाणी घालण्याची वगैरे मदत तर करीत नाहींच, पण उलट समोर मोठ्या काठीस टेंकून राहून, मोठ्या मौजेनें गप्पा छाटीत असतो. कीं:—"हं ! आतां वारा छान सुटला आहे. आतां तीं शेजारचीं दोन्ही घरें पेटतील !" जणों काय ह्याच्या घरीं पुत्रोत्सवच चालला आहे. पण तोच मनुष्य आपलें घर पेटलें कीं, छाती पिटून आरडूं लागतो, आणि 'हायहाय !' करून सारी आळी दणाणून सोडतो ! तेव्हां हें दुःख मानीव नव्हे तर काय ? हीं जशीं दुःखें काल्पनिक त्याचप्रमाणें आपलीं सारीं सुखें हीं काल्पनिक व क्षणभंगुरच असतात. ह्याकरितां खऱ्या व शाश्वत सुखाचें स्थान एकच आहे. तें कोणतें ? तर ज्ञान. परंतु ज्ञानाविषयीं प्रत्येक मनुष्याची कल्पना कांहीं निराळीच असते. त्यांच्या मतीं ज्ञान हें प्रत्येक मनुष्याला थोडेंना थोडें तरी असतेंच. परंतु मनुष्यानें केलेल्या सान्या व्याख्या जशा चुकीच्या असतात, त्याचप्रमाणें "विद्या" व "ज्ञान" ह्यांचीही व्याख्या चुकीचीच आहे. एखाद्या गांवढळ गांवांतल्या गांवठी शाळेंत "ओनामा" शिकणारें एखादें पोर सुद्धां धुळीच्या पाटीवर सरस्वती काढून, "छडी लागे छम् छम्" "विद्या येई घम् घम्" "छडीवर पडली सांवली, आह्मांस विद्या पावली" ह्मणून ह्मणत असतें. ह्मणून आपण त्यानें संपादिलेल्या चार अक्षरांस "विद्या" ह्मणूं काय ? किंवा सहावी इयत्ता पास झाली ह्मणून तरी विद्या आली काय ? बी. ए. एम्. ए. झालें ह्मणजे तरी विद्या झाली काय ? नाहीं. तर विद्या आणि ज्ञान तें पुढेंच आहे. ही ज्ञान संपादण्याची तयारी झाली. विद्येच्या आरंभाला अक्षरें शिकणें, व पुस्तकें वाचूं लागणें ही जशी विद्येची तयारी, तशीच बी. ए. एम्. ए. ही ज्ञानाची तयारी होय. चुटपुटल्या विद्या व चुटपुटतीं ज्ञानें ह्यांचे शेवट नेहमीं अज्ञानांतच मिळत असतात. मूल ह्मटलें कीं, त्याला दांत नाहींत, ज्ञान नाहीं, अन्न पचत नाहीं, कीं धड चालावयाला व बोलावयाला येत नाहीं. तशीच गोष्ट ह्मातान्याची आहे. आणि मुलाचें आधीं जसें अज्ञान, तसेंच ह्मातान्याच्या अंतींही अज्ञानच असतें. तीच तऱ्हा व्यवहारज्ञानाची ! सहावी इयत्ता झाली ह्मणजे तो शिकला असें ह्मणतात. बी. ए. एम्. ए.ची परीक्षा झाली ह्मणजे तो विद्वान् झाला, असें ह्मणतात. त्यांपेक्षां अधिक गहन सिद्धांत सोडवूं लागला, ह्मणजे तो अधिक ज्ञानसंपन्न झाला, अशी त्याची कीर्ति पसरते. पण जो अतिविद्वान् होतो, तो पुन्हा व्यवहारशून्य होतो, ह्मणजे त्याचीही गणना वेड्यांतच किंवा अज्ञान्यांतच करणें भाग पडतें. पुण्यास सुद्धां कित्येक अतिप्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ लोक रस्त्यानें जात असतांही अगदीं आपल्याच विचारांत निमग्न असलेले आह्मीं सुद्धां पाहिलेले आहेत. त्यास वाटेंत गुरांनीं धक्का दिला तरी त्यांस त्याची दाद नसे ! हेंचसें काय ?

१ प्रख्यात आंग्लकवि शेक्स्पीअर, यानें "जग ही एक रंगभूमि आहे" असें एक मनोरम रूपक रचिलें आहे. त्यांत मनुष्यजन्माच्या सात भूमिका कल्पिल्या आहेत. तें रूपक फारच वाचण्यासारखें आहे. "As you like it" हें नाटक पहावें. अथवा के०कोकिळ पु० १० अं० १० "नरदेहाविषयीं थोर लोकांचें ह्मणणें" हें सदर पहावें. त्यांत "An old man is twice a child"—वृद्धापकाळ ही बाल्यदशेची पुनरावृत्तिच होय, असें प्रस्तुत कवीनें ह्मटलें आहे.

पाश्चात्य देशांतील मोठमोठ्या तत्ववेत्त्यांच्याही अशा वेडगळ गोष्टी प्रसिद्ध आहेत. गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढणारा तत्ववेत्ता न्यूतन एके दिवशीं कांहीं ग्रंथ लिहीत असतां, त्याच्या नोकरानें नित्याप्रमाणें त्याच्या पुढें एक चूल आणून ठेविली. तिजवर पाणी तापत ठेविलें, व एक कोंबड्याचें अंडें ठेवून, तो निघून गेला. पाणी तापल्यानंतर त्यांत अंडें टाकून तें शिजल्यानंतर त्याचा उपहार करण्याची न्यूटनची नेहमींची चाल होती. त्या दिवशीं ह्या स्वारींचा लय आपल्याच आवडत्या विषयाकडे लागला होता. त्यांनीं त्या दिवशीं पाण्यामध्यें अंडें टाकण्याऐवजीं आपलें वॉचच टाकून दिलें, आणि मधून मधून तें शिजलें का नाहीं, हें आठवण होतांच, पहावयास उठत, आणि पाण्यांत हात घालून बोटानें चेपून पहात. तें कठीण लागलें ह्मणजे न्यूटनबोवा पुन्हा आपल्या कामास लागत. याप्रमाणें दुपारीं पुन्हा जेवणाची वेळ आली, तेव्हां चाकर बोलवावयास आला. त्यास न्यूटनसाहेब ह्मणाले, "अरे! पण आज हें अंडें अद्यापि कां शिजत नाहीं?" चाकरानें आंत पाहिलें आणि ह्मणाला "वॉच शिजणार कांय कपाळ!" जॉन्सनची गोष्ट ह्याहूनही मजेची आहे. हा गृहस्थ, साऱ्या युरोपांतही ५।२५ वर्षें सुटलेला नाहीं असा एक सिद्धांत सोडविण्याच्या कामास लागला. तो न जेवतां, न खातां, अहोरात्र चार दिवस, पाटी पेन्सल घेऊन बिछान्यावर लोळत पडला होता. अखेर चार दिवसांनंतर तो सिद्धांत सुटला. त्या वेळीं त्यास जो आनंद झाला तो काय सांगावा? त्यानें आपल्या खोलीचें दार उघडलें, व त्या ब्रह्मानंदाच्या भरांतच, तें आनंदाचें वर्तमान सांगावयास एका जिवलग स्नेह्याकडे धांवत निघाला. पण त्या चार दिवसांच्या भरांत स्वारींच्या पायांतील विजार, निघून अंथरुणांतच पडली होती, त्याची त्यास शुद्धही नव्हती! तो आपल्या मित्रास आनंदानें सांगूं लागला कीं, "तो सिद्धांत सुटला बरें!" तेव्हां तो त्याच्याकडे आश्चर्यचकित मुद्रेनें पाहून ह्मणाला "तो सिद्धांत सुटला असेल, पण त्यासाटीं तूं दिगंबरवृत्ति कां धरलीस?" तेव्हां त्यानें आपल्या पायांकडे पाहिलें व तो मनांत फारच लज्जित झाला. ह्या जर मोठमोठ्या विद्वानांच्या गोष्टी तर खरें ज्ञान तरी कशांत आहे? यंत्रशास्त्र शिकण्यांत, ज्योतिषशास्त्र शिकण्यांत, का भूगर्भशास्त्र शिकण्यांत? छे:! छे:! "शास्त्रें हीं अविद्याहरणाचीं साधनें मात्र आहेत. पण आत्मबोध करण्यास तीं समर्थ नाहींत." आत्मबोध ह्मणजे खरें ज्ञान होय. ह्या सर्व ब्रह्मांडाचें जें मूलतत्व त्याचें नांव ब्रह्म. ब्रह्मज्ञान झालें कीं, सर्व कांहीं काम—ज्ञान—झालें. सर्व सुखाचें खरें भांडार काय तें तेंच! त्याच्या पोटांत सर्व शास्त्रें आलीं! आपला आत्मा हा मध्यबिंदु व ब्रह्म हा त्याचा परिघ होय. आत्म्याचें ज्ञान झालें कीं, परब्रह्माचेंही ज्ञान झालें ह्मणून समजावें. ज्ञानाचा उदय होण्याला आधीं आत्मबोध झाला पाहिजे. ज्ञानाचा विचार करावयाला चंद्रसूर्यासारख्या दूरदूरच्या पदार्थांचे प्रश्न कशाला हवेत? आधीं "मी" कोण? ह्याचाच विचार करा, त्यांत सर्व कांहीं आलें. "मी" ह्याच्या इतकें जवळ आपणांस कोणीच नाहीं. पण चमत्कार हा कीं, त्याचें त्यालाच तें माहीत नाहीं. का हाडें मी? का मांस मी? का डोकें मी? का पाय मी? मी आहें तरी कोण? ह्याचा विचार करूं लागलें ह्मणजे अखेर येतें शून्यच! मी ह्मणून कांहींच नाहीं. ह्मणूनच श्रीमच्छंकराचार्यांसारख्यांनीं "ब्रह्म, सत्यं जगन्मिथ्या" असे सिद्धांत बांधले आहेत. तेव्हां अर्थातच पूर्वी सांगितलेल्या "द्वैतमय अद्वैत" सिद्धांतामध्यें 'मी' ह्मणजे कांहीं नाहीं. आणि कांहीं नाहीं ह्मणजेच सर्व कांहीं आहे तें 'मी'च. तेव्हां ह्या सर्वांचें मूळ कोठें? अशी सहजींच जिज्ञासा उत्पन्न होते. ज्या एका तत्वाचा ह्या ब्रह्मांडाशीं संबंध आहे, त्या तत्वालाच 'परब्रह्म' असें ह्मणतात. परब्रह्म हा एक अनंताकार फोंफावलेला वृक्ष आहे. जीवसृष्टि ह्या त्याच्या पारांब्या होत. वेद हीं त्याचीं पानें; आणि रामकृष्णादि अवतार, हीं त्यास लटकलेलीं सुंदर फळें होत. किंवा ब्रह्म हा परमात्म्याचा अपरंपार खजिना, आणि जीवसृष्टि ही लहानमोठ्या नळांतून आलेलें त्यांतील यत्किंचित् जीवन होय. ह्यावरून आत्म्याचा, व परमात्म्याचा संबंध काय आहे, तो थोडा तरी ध्यानांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. ब्रह्माचें जें ज्ञान, त्यासच 'अध्यात्मज्ञान' असें ह्मणतात. अध्यात्मज्ञानापुढें इतर ज्ञानें केवळ तुच्छ होत. ह्मणून अध्यात्मशास्त्राचा अभ्यास केला, ब्रह्मज्ञान मनांत बिंबलें कीं, वरच्या प्रश्नांतील एकाचेंही उत्तर त्यांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. इतकेंच नव्हे, तर अशा आणखी कोट्यवधि प्रश्नमालिका आल्या तरी त्यांचें पाणी होऊन जातें. आणि वरच्या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें हेंच खऱ्या सौख्याचें मूळ ठिकाण होय. जोंपर्यंत कोणतीही

गोष्ट निश्चयात्मक कळली नाहीं, तिच्या विषयींचा संशय गेला नाहीं, तोंपर्यंत तींत दुःख असतें. तीच निश्चयात्मक कळली कीं, दुःखाचा अस्त झालाच! अमुक मार्गानें गेलें ह्मणजे निश्चयेंकरून गांव लागणार, असें ठाम कळलें, किंवा अमक्या तऱ्हेनें काम केलें असतां हटकून त्यांत यश येणार, अशी खात्री पटली, तर मग त्या स्थितीसारखी सुखप्रद स्थिति कोणती? ह्याकरितां ब्रह्म ह्मणजे काय, व त्याचें स्वरूप कसें ह्याचाही थोडासा विचार करूं.

ब्रह्म जाणण्याची जी विद्या, तिचें नांव अध्यात्मशास्त्र. सर्व जगांतील लोक व्यवहारशास्त्रामध्यें पाहिजे तितकी आढ्यता मिरवूं द्यात, परंतु अति उच्च अशा तत्वज्ञान्यांनींही मान डोलवावी; संसारतापानें होरपळलेल्यांसही जेथें आराम वाटावा; विपत्तिदुःखानें बद्ध झालेल्यांनींही जेथें मुक्तिसुख अनुभवावें; असें एक अध्यात्मशास्त्रच. हें आमच्याच पूर्वजांनीं साध्य करून ठेवलें आहे. आज आह्मांवर कितीही संकटें आलीं; दारिद्र्यानें आह्मी कितीही ग्रस्त झालों; प्लेगनें आह्मांस कितीही धायधाय मोकलावयास लावलें; तरी खऱ्या समाधानाचा ठेवा आमच्या घरांत आहे. परकीय लोकांनीं कितीही आह्मांस बुचाडलें, तरी त्याला त्यांच्यानें हातही लाववणार नाहीं. आमचें ज्ञानभांडार कितीही गुप्त असलें, व आह्मी अज्ञानसागरांत कितीही गटकळ्या खात असलों, तरी कधींना कधीं तरी तें आह्मी उघडूंच. आमचें खरें वैभव तेंच! आमचें विश्रांतिस्थान तेंच! आमचे राजविलास सगळे तेथें! आमचें आर्य नांव अन्वर्थक होण्याला, कारण काय तें हें आमचें अध्यात्मशास्त्र किंवा ब्रह्मविद्या. पण आमची सध्यांची स्थिति मात्र केवळ गर्भश्रीमंतांच्या मुलांसारखी आहे. "ब्रह्म आणि माया" हे शब्द आमच्या वेदांती भक्तांच्या तोंडीं अद्यापि बरेच आहेत, ऐकूं येतात हें आमचें भाग्यच खरें! पण त्यांपैकीं कित्येकांच्या मनांत त्याची कल्पना किंवा स्वरूप आलें असेल, ह्याचा मात्र वानवाच दिसतो. पण वानवा तरी कसला? ज्याला अमृताची प्राप्ति होईल, तो कलालाचे उंबरठे कशाला पुजील? तद्वत् ब्रह्माचें ज्यास ज्ञान झालें, तो संसारसागरांत गटकळ्या खात कशाला बसेल? श्रीज्ञानेश्वर महाराज, तुकाराम, रामदास ह्यांसारखे महात्मे लपून रहातात थोडेच!

पूर्वी सांगितलें आहे कीं, मनुष्याला कोणतीच व्याख्या घड अशी करतां येत नाहीं. मग अचिंत्य, निराकार, निर्विकार, अभेद्य, अनंत, अगोचर असें जें ब्रह्म त्याची त्यास कशी करतां येईल. तथापि आमचे पूर्वज तत्वज्ञानामध्यें इतके पोंहलेले होते, व त्यांची एखादा विषय समजून देण्याची शैली, अशी अपूर्व होती कीं, त्याचें शब्दांनीं वर्णन करणें, केवळ अशक्य आहे. ब्रह्माची ओळख होण्याकरितां, वेदानें त्यास 'ओं' हें गुणविशिष्ट नाम देऊन, त्याची आकृतीही ठरविली आहे. ती ही—'ॐ'. ह्या आकृतींत व नामांतच जे काय ब्रह्माच्या अनंतत्वाचे चमत्कार भरलेले आहेत, ते सांगूं लागल्यास एक मोठा प्रचंड ग्रंथच होईल. ॐ हें ब्रह्माचेंच स्वरूप असल्यानें त्याचें स्वरूपमहात्म्य फारच वर्णिलें आहे, व ह्मणूनच वेदाचा व कोणत्याही ग्रंथाचा आरंभ प्राचीनकाळचे लोक ॐकारानेंच करीत आले. ओंकाराचें वर्णन ज्ञानेश्वरीच्या १७ व्या अध्यायांतही फार मार्मिकपणानें करून त्याचें महात्म्य सांगितलें आहे. ओंकारापासूनच हें ब्रह्मांडाचें चक्र सुरू होतें व पुन्हा ओंकारांतच लय पावतें. ह्याच धर्माचें दर्शक ह्मणून अतिशय पोक्त व दूरदर्शीपणानें ॐ ही आकृति व ओं हा शब्द तयार केला आहे. ब्रह्मापासूनच सर्व उत्पत्ति होते. त्याचप्रमाणें ॐकार ह्या आकृतीपासून यावत् स्थूलसूक्ष्म, भूचर, जलचर, खचर, इत्यादींचे आकार उत्पन्न होतात. हा विषय ग्वाल्हेर येथील श्री० जठार ह्यांनीं आपल्या 'स्वानंदसाम्राज्य' व 'अव्यक्तबोध' ह्या पुस्तकांतून फार उत्तम, विस्तृत, व अति मनोहर रीतीनें वर्णिला आहे, तो अवश्य पहावा. वेदांतसंबंधानें कोणताही विषय ज्ञानेश्वरींत नाहीं, असें तर नाहींच, पण त्यांच्या पुढें त्याहून अधिक सांगणारा तरी कोण भेटणार? मग आमच्यासारख्या पामरानें पृष्ठांची, विनाकारण, आणखी खोगीरभरती ती कशाला करावयाची? तथापि आणखी थोडी समजूत पडेल, या आशेनें, आमचीही थोडीशी मनांत जमलेली कल्पना येथें नमूद करून ठेवितों.

अनंताचें व्रत, हेंही सत्यनारायणाच्या व्रताप्रमाणें अर्वाचीन कालांतच सुरू झालेलें दिसतें. तरी त्यांत पूजेसाठीं जो रेशमी अनंत तयार करतात, व पुढें जो दंडांत बांधतात, ती आकृति ओंकाराची किंवा परब्रह्माची अर्थात् अनंताची दर्शक असून, तिच्या रचनेंत रचणारानें अतिशयच चातुर्य खर्च करून, परिपूर्ण ज्ञान भरलेलें आहे. अनंताच्या मध्यभागीं एक मोठी वज्रगांठ असते.

नंतर तिच्या दोहों बाजूंस सारख्या गांठींची रांगच्या रांग असते. त्यापुढें निमुळतीं कलाबतूचीं टोकें असतात. त्यांच्यापुढें बारीक गोपांचे लांब पदर असतात, आणि विरड्यांची एक गांठ असते. सृष्टिचक्राची आकृति ती हीच. वरचें विरडें तें पूर्णब्रह्म होय. त्याचें मूळ वर आहे. तेथून रेशमी गोफाप्रमाणें सर्व शाखा मृत्युलोकावर ओथंबल्या आहेत. अनंतांतील निमुळतीं कलाबतूचीं दोहों बाजूचीं दोन टोकें ह्या मनुष्याच्या बाल्य व वृद्धदशा होत. वज्रगांठ हें तारुण्य आणि इतर गांठी हे सुखदुःखांचे प्रसंग होत. असें रूपक प्रत्येक चक्राला लावलें ह्मणजे सृष्टिक्रमाचा देखावा हुबेहूब मनांत उतरेल.

ॐ ह्या आकृतीची व शब्दाची योजना अशीच व्यापक आहे. ओं ह्या शब्दाचा उच्चार अ–उ–व म् हीं अक्षरें मिळून होतो. आणि अ ह्या अक्षराच्या आकृतीचें अनंताच्या आकृतीशीं साम्य असल्याचें दिसून येईल. पुढचा फांटा ती वज्रगांठ कल्पावी, व मागील टोंकें तंतु समजावेत, आणि त्यांच्यामध्यें असलेली पोकळी तें ब्रह्म. ब्रह्मावांचून जीव होत नाहींत, हें तर उघडच आहे. ते कसे होतात, तें पाहूं. जीव ह्मटला कीं, ब्रह्म व माया यांचा संयोग असलाच पाहिजे. त्यावांचून जीव होणारच नाहीं. आंतील निराकार अद्भुतशक्ति तें ब्रह्म आणि वरील दृश्य स्वरूप ती माया. मायेमध्यें अर्थात्–जडद्रव्यामध्यें–बीजरूपानें आत्मा–ब्रह्माचा अंश शिरतो. आणि आपल्या इच्छाशक्तीनें तींत जीवांश उत्पन्न करणें, ह्मणजे तीस चेतना देणें होय. शक्तीशिवाय चेतना उत्पन्न होणें नाहीं. चेतना उत्पन्न होणें, ह्मणजे काय, ह्याचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, सूक्ष्म पदार्थाला विस्तृत करणें, त्याला वर उचलणें, त्याला सतेज करणें, त्याला विभागणें, ह्याचेंच नांव चेतना! किंवा चेतनेला यथायोग्य शब्द 'स्फोट' हाच देतां येईल. मात्र त्याचा अर्थ थोडासा व्यापक धरला पाहिजे. केवळ ज्वालामुखीचाच स्फोट, किंवा विद्युत्पाताचाच स्फोट समजतां नये, तर जमिनींत बीं रुजून तें फुटून त्यांतून अंकुर बाहेर पडणें, किंवा मूल पोटांतून बाहेर पडून, त्याचें तोंड उघडणें इत्यादि क्रिया सुद्धां स्फोटांतच धरल्या पाहिजेत. आतां जीवांकुर उदयास येणें, ह्मणजे स्फोट होणें, ही कल्पना मनांत धरली ह्मणजे त्या समयीं काय काय होतें तें पहा! स्फोट ह्मटला कीं, त्याला अंतःशक्ति पाहिजे. त्या शक्तीनें जडाचा भेद केला पाहिजे. तो करतांना शब्द हा होणारच. आणि त्या शब्दाचें अगदीं मूळचें स्वरूप ह्मणजे अ हें सांगणें नकोच. अ शब्द सुरू झाला कीं, त्याला कांहीं तरी काल मर्यादा ह्मणून पाहिजेच. ती उ ह्या अक्षरानें ध्वनित होते. ती मर्यादा झाली ह्मणजे तिला अंत पाहिजे हें उघडच ठरलें. आणि शब्दाचा अंत होतांना तोंड बंद होणें हें आलें. तोंड बंद होतांना कोणत्याही शब्दाचा शेवट ह्मणजे म् हें 'ओष्ठ्य' वर्णावरून सहजच समजेल. ह्यावरून ॐकार शब्दानें व आकृतीनें स्फोटाचें स्वरूप कसें व्यक्त होतें तें पहा! पृथ्वीची आकर्षणशक्ति मध्याकडे असतां; प्रत्येक पदार्थाचा पडण्याचा धर्म पृथ्वीच्या मध्याकडे असतां; वटवृक्षाच्या बीजासारखें मोहरीयेवढ्या आकाराचें बीजही पृथ्वींतील खंडोगणती वजनाचीं जडतत्वें वर उपसून आणून शेंकडों फूट उंचीच्या विस्ताराचा वृक्ष तयार करतें. हा केवढा अद्भुत चमत्कार व केवढी ही ओंकाराची अद्भुत शक्ति! असो.

तर ज्याला ह्या संशयसागरांतून पार जाणें असेल; ज्याला संसारतापांतून मुक्त होणें असेल; ज्यास परमानंदसुखाच्या उद्यानांत यथेच्छ विहार करणें असेल; ज्याला अपरिहार्य संकटांचा परिहार करून येणें असेल; ज्याला सर्वशास्त्रांचें रहस्य एकसमयावच्छेदेंकरून, ग्रहण करणें असेल; ज्याला 'मी कोण?' ह्या आत्मस्वरूपाची ओळख करून घेणें असेल; त्यानें ब्रह्मज्ञानप्राप्तीच्या मार्गास लागलें पाहिजे. आणि तो मार्ग ह्मणजे अध्यात्मशास्त्र होय. आमचे वेद, उपनिषदें, शास्त्रें इत्यादिकांत अध्यात्मविचार सांगितलेला आहे. परंतु ते ग्रंथ अत्यंत गहन व विस्तृत असल्यामुळें ज्यास लाभ पाहिजे त्यास होणें, परम दुर्घट होय. ज्ञानेश्वरांनीं तरी 'वेद कृपण आहेत' असें स्पष्ट ह्मटलें आहे. कारण वेदांनीं शूद्रादिकांस अनधिकारी करून ठेविलें आहे. परंतु ती सर्व उणीव दूर करण्याकरितां व्यासांनीं त्या सर्वांचें जें सार तें थोडक्यांत मथन करून, ७०० श्लोकांची भगवद्गीता केली आहे. भगवद्गीतेचें वर्णन काय करावें? ह्याच देशांतील नव्हे, तर जगांतील सर्व ज्ञाते लोक तिच्यावर मधुपाप्रमाणें उड्या घालीत आहेत. तिच्यावर ज्या विद्वानांनीं भाषणें केलीं नाहींत; तिच्यावर टीका लिहिल्या नाहींत; तिचीं भाषांतरें केलीं नाहींत; असे विद्वान् विरळाच सांपडतील. श्रीमच्छंकराचार्य, शंक-

रानंद, मधुसूदन, आनंदगिरि, श्रीधर इत्यादि प्राचीन महात्मे व संस्कृतज्ञ कवि, इत्यादींच्या टीका प्रसिद्धच आहेत. महाराष्ट्र कविमंडळांत तर बहुतेक कवींच्या टीका आहेत. श्रीज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, ह्यांच्या ओंव्या, तुकारामाचे अभंग, वामनपंडितांची समश्लोकी, मोरोपंतांच्या आर्या, उद्धवचिद्घनाच्या सवाया, कबीराचे दोहरे, यांखेरीज अर्वाचीन भाषांतरकार व कवि अनेक आहेत. इंग्रजी भाषेसारख्या परक्या भाषेंत तिचीं किती तरी भाषांतरें होऊन, तद्भाषाभिज्ञ तत्ववेत्ते आनंदभरानें डुलत आहेत. यावरून गीतेची महती केवढी आहे, हें लक्ष्यांत येण्यासारखें आहे. श्रीज्ञानेश्वरांनीं तर 'गीता ही एक लहानशी गोजिरवाणी श्रुतिच आहे' असें ह्मणून, अठराव्या अध्यायांत तिचें फार मार्मिक वर्णन केलें आहे. ज्ञानेश्वरीच्या मूळ प्रस्तावनेंत, व गीतेच्या उपसंहारांत, गीतेचें अगदीं यथातथ्य वर्णन केलें आहे, ह्यास्तव त्याचा विचार येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. येथें "अध्यात्मशास्त्र ह्मणजे काय तें पहाणें असल्यास, गीताच पहावी." एवढेंच सांगितलें ह्मणजे पुरे.

श्रीमच्छंकराचार्यांसारख्या महात्म्यांनीं गीतेवर ज्या टीका केल्या आहेत, त्या फारच समर्पक, गहन विचारांनीं व अगाध ज्ञानानें परिप्लुत, आणि ईश्वरी प्रसादानें भरलेल्या आहेत, ह्यांत तर तिळमात्र शंका नाहींच. परंतु त्या सर्वांतही श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं 'भावार्थदीपिका' किंवा जिला 'ज्ञानेश्वरी' हेंच प्रसिद्ध नांव आहे, ती केवळ अप्रतिम होय, असें आह्मी स्पष्ट ह्मणतों. त्या ह्मणजे ज्ञानांत, विचारांत, सिद्धांतांत, व ईश्वरी प्रसादांत कमी आहेत, असें आह्मी ह्मणत नाहीं. परंतु प्राकृत जनांला—निदान हल्लींच्या स्थितींतील आमच्या सारख्या लोकांना श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं 'ज्ञानेश्वरी' हा एक अत्यंत सोईकर मार्ग करून ठेवला आहे. तो इतका सुलभ व रमणीय आहे कीं, ज्ञानेश्वरांनींच जसें ह्मटलें आहे, 'ज्ञानाला उपमा ज्ञानाचीच,' त्याप्रमाणेंच 'ज्ञानेश्वरीला उपमा ज्ञानेश्वरीचीच' असें आह्मांस ह्मणणें भाग पडतें. अध्यात्मशास्त्रासारखा गहन विषय, एखाद्या कादंबरीप्रमाणें सोपा व मनोरंजक करण्याची हातोटी; नानाप्रकारचे समर्पक व यथोचित व्यावहारिक दृष्टांत देण्याचें चातुर्य; प्रधानतत्व मनांत बिंबवून देण्याचा अनुपम गुण; आपल्याकडे लीनता घेण्याची साधुत्वशैली; ठिकठिकाणीं व्यक्त केलेली निस्सीम भक्ति; गुरुप्रसादानें प्रगट केलेलें सोज्वळ ज्ञान; हीं पाहून ज्याच्या मनास पाझर फुटणार नाहीं, ज्याची वृत्ति ईश्वराकडे वळणार नाहीं, ज्याच्या मनाला समाधान वाटणार नाहीं, ज्याची वृत्ति सम्यक् ज्ञानाकडे वळणार नाहीं, जो संतचरणीं लीन होणार नाहीं, असा रसिक जनांमध्यें कोण असेल तो असो!!

ज्ञानेश्वरी ही जरी गीतेची टीका आहे; तरी इतर भाष्यकारांत, टीकाकारांत व हिच्यांत महदंतर आहे. ह्यांतील वर्णन फारच खुलासेवार असून, अगदीं प्राकृत जनांस सुद्धां तिच्यांतील सिद्धांतांचा गूढार्थबोध व्हावा, ह्याकरितां त्यांनीं अनेक दृष्टांतांनीं प्रत्येक मुद्याचें फार रसभरित वर्णन केलें आहे. ह्यामुळें गीतेच्या आधारें "ज्ञानेश्वरी" हा एक स्वतंत्रच अध्यात्मशास्त्राचा ग्रंथ झाला आहे, ह्मटलें तरी शोभेल. इतका विस्तार केल्यामुळेंच गीतेच्या मूळ ७०० श्लोकांवर ज्ञानेश्वरीच्या ओंव्या ९०३७ झाल्या आहेत. तिच्यांतील प्रतिपादनाचें धोरण थोडेंसें कळावें, ह्मणून येथें कांहीं टांचण देतों.

१ पहिल्या अध्यायाच्या आरंभीं बरीच विस्तृत व मंगलसांप्रदायानुसार प्रस्तावना दिली आहे. प्रथम ॐकाररूप परमेश्वरास नमस्कार करून, गणेशही ओंकारस्वरूपच आहे, असें सुंदर रूपक केलें आहे. नंतर शारदेस नमस्कार करून, पुढें तिचेंच महात्म्य वगैरे कथन करून, व श्रीसद्गुरुचरणीं वंदन करून, आपली नम्रता दर्शविली आहे. पुढें श्रीगुरु द्रोणाचार्यांचा स्वभाव सुंदर रीतीनें वर्णन करून पुढील विषय सांगत सांगत, 'अर्जुनविषादयोग' नामक पहिला अध्याय संपविला आहे.

२ दुसऱ्या अध्यायांत अर्जुनाच्या मनांत उत्पन्न झालेली दया व त्यावर भगवंताचें मार्मिक उत्तर, आत्मानात्मविचार इत्यादि सांख्ययोग प्रतिपादन करून, दुसरा अध्याय संपविला आहे.

३ तिसऱ्या अध्यायापासून कर्मयोगाच्या प्रतिपादनास आरंभ केला आहे, व त्यांत आपआपलीं कर्में कशीं करावींत त्याचें वर्णन आहे. इंद्रियांचे लाड कधींही पुरवूं नयेत, इत्यादि सांगून स्वधर्माचरणाचें महात्म्य फारच वर्णिलें आहे. पुढें कामक्रोध ह्यांच्या भयंकर स्वरूपाचें वर्णन उत्कृष्ट करून, हा अध्याय समाप्त केला आहे.

४ कर्म व अकर्म ह्यांचीं लक्षणें व भेद; निरनिराळ्या यज्ञांचे विधि; त्यांत ज्ञानमय श्रेष्ठ असून, त्याच्या पद्धतीचें रूप; ज्ञानाची थोरवी; संशयग्रस्त मनुष्याची स्थिति इत्यादि विषय चवथ्या अध्यायांत आहेत.

५ ओंकाराचें स्वरूप; मनाची समता; विषयसुखांतच मग्न होणाऱ्यांच्या मनाची स्थिति; इंद्रियनिग्रह केल्याचें फल; व योगमार्गानें ब्रह्मस्वरूप कसें होतां येतें, तो प्रकार इत्यादि गोष्टी पांचव्या अध्यायांत आहेत.

६ पहिल्या अध्यायापासून पांच अध्यायांपर्यंत प्रस्तावना नाहीं. परंतु सहाव्याला प्रस्तावना आहे. तींत व ह्या अध्यायापासूनच गीतावल्लीला अंकुर फुटला, असें ह्मटलें आहे. या अध्यायांत राजयोगाचा अभ्यास कसा करितात, त्याचा विधि सांगितला आहे. योगाभ्यासास स्थळ कसें असावें, तें फार मनोहर रीतीनें सांगून, योगाभ्यासांतील निरनिराळ्या मुद्रा कथन केल्या आहेत; व नाभिकमलामध्यें असलेल्या "कुंडलिनी" नामक देदीप्यमान आदिशक्तीचें स्वरूप स्पष्ट केलें आहे. नंतर सर्पानें कांत टाकल्याप्रमाणें योग्याच्या आंगावरील त्वचा निघून जाते; नवे दांत येतात; नवे केंस फुटतात; आंगकांति वाढते; अद्भुत शक्ति प्राप्त होते; पाण्यावरून चालतां येतें; ऋद्धिसिद्धि अंकित होतात, इत्यादि अपूर्व चमत्कार योग्यास सहज प्राप्त होतात, हा विषय सहाव्या अध्यायांत आहे.

७ सातव्या अध्यायाला प्रस्तावना नाहीं. आधीं मायेचीं स्वरूपें; नामरूपांची उपपत्ति; नंतर मायारूप नदीचें फार सुंदर व विस्तृत रूपक देऊन, ईश्वराचे भक्त चार प्रकारचे व त्यांची भक्तिही कथन केली आहे, व पुढें "अधियज्ञ" इत्यादि नवीन आठ शब्द मात्र कथन करून, हा अध्याय पुरा केला आहे.

८ आठव्या अध्यायांतही प्रस्तावना नाहीं. त्यांत प्रथम मागील अध्यायांत कथन केलेल्या "अधियज्ञादि" आठ शब्दांचा अर्थ प्रथम विशद करून, मरणसमयीं ज्या कल्पना मनांत येतात, त्याच गतीला तो जातो. ह्याकरितां अंतकाळीं माझें स्मरण असलें तर तो मत्स्वरूपाला पोंचतो. ह्याकरितां त्याचाच अभ्यास करावा. हें सांगितल्यानंतर ब्रह्मदेवाचा काल, व प्रयाणाचे दोन मार्ग उत्कृष्ट रीतीनें कथन करून, हा अध्याय समाप्त केला आहे. ह्यांतच नरदेहावर फारच सुंदर व समर्पक रूपक केलें आहे. तें अवश्य पहावें.

९ नवव्या अध्यायाला प्रस्तावना विस्तृत असून, फार सुंदर आहे, व तींत ज्ञानेश्वरांनीं आपणाकडे घेतलेली नम्रता, हृदयाला अत्यंत द्रवविणारी आहे. ह्या अध्यायाचें महात्म्यवर्णन ज्ञानेश्वरांनीं फारच सुरस केलें आहे. पुढें गुप्त गोष्ट कोणापाशीं फोडावी, याचा विचार सांगितला आहे, तो फारच ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ज्ञानाचें महात्म्य; तें मिळविण्याविषयीं लोकांची हेळसांड; त्यांस दिलेला गोचिडाचा दृष्टांत फारच समर्पक आहे. (हा दृष्टांत ऐकून आमच्या एका रसिक मित्राच्या अंतःकरणास अतिशय पाझर फुटला. व अद्यापिही ते त्याची वारंवार स्मृति काढतात.[१]) ह्या विषयांत विश्वात्मक—अर्थात् सर्वव्यापक—परमेश्वराची कल्पना फार विशालरूपानें कथन केली आहे. चामड्याच्या नोटीचा दृष्टांत ह्याच अध्यायांत आला आहे. भक्तीचे प्रकार यांत सांगून, त्यांत गौणीमध्यें लोक कसे फसतात, व देवभोळे होतात, त्याचें निरूपण आहे. नंतर खरी भक्ति ह्मणजे काय? व ती परमेश्वराला किती आवडते, ह्याचें स्वरूप सांगितलें आहे. व ज्ञानयज्ञ कसा करितात, तेंही कळविलें आहे. नंतर "मला न जाणून जें भजन करतात, तें फुकट कांहीं-तरी होतें. ह्मणून ज्ञान हे कर्माचे डोळे आहेत, ते निर्मल असावे" हा सिद्धांत प्रतिपादिला आहे. त्यापुढें "मृत्युलोकांतील सारेंच उफराटें" हा भाग अत्यंत मनोरंजक असा वठवून हा अध्याय संपविला आहे.

१० दहाव्या अध्यायाच्या आरंभीं बरीच विस्तृत प्रस्तावना असून, व नऊ अध्यायांत पूर्वार्ध कसा समाप्त झाला, ह्याचें सिंहावलोकन केलें आहे, व नववा अध्याय जो अत्यंत गहन तो माझ्या मुखांतून वदविल्याबद्दल, सद्गुरूंची व श्रोत्यांचा धन्यता मानली आहे. ह्या अध्यायांत परमेश्वराच्या मुख्य मुख्य विभूतिच सांगितल्या आहेत, तरीही त्यांत मनोरमपणा कमी नाहीं.

११ अकराव्या अध्यायालाही विस्तृत प्रस्तावना आहे. ह्या अध्यायांत विश्वरूपाचें व दिव्यदृष्टीचें वर्णन इतकें गोड लिहिलें आहे कीं, तें वाचतांना पुरेंसेंच होत नाहीं. ह्या अध्यायावरून भगवंताचें अर्जुनावर किती निस्सीम प्रेम होतें तें उत्तम रीतीनें व्यक्त होतें.

१२ बाराव्या अध्यायालाही लहानशी प्रस्तावना असून, तींत गुरुकृपादृष्टीला सद्गदित अंतःकरणानें नमन केलें आहे. ह्या अध्यायांत भक्तीचा महिमा आहे. व

१ ज्ञा० पा० १८५ पहा.

समचित्त कसें करावें, ह्यावर ज्या ओंव्या आहेत, त्या मासल्याच्या रसभरित ओंव्या साऱ्या ज्ञानेश्वरींतही फारच थोड्या आढळतील.

१३ तेराव्या अध्यायाला प्रस्तावना मुळींच नाहीं, तरी तो सारा अध्याय, अतिशय विस्तृत व रसिक मनुष्याचें तनमनधन एक क्षणभरही ढळूं नये, इतका मनोल्हादक आहे. ह्यांत क्षेत्र व क्षेत्रज्ञ, ह्मणजे देह आणि आत्मा ह्यांचें विवरण आहे. नंतर हिंसेचा निषेध; व ती करणाराच्या उलट्या कृतीचा अज्ञानपणा, अनेक चमत्कारिक दृष्टांतांनीं, व्यक्त केला आहे. पुढें खरी अहिंसा ह्मणजे काय, त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. 'आचार्योपासनं' ह्या मूळ पदावर, गुरुभक्तीचें खरें खरें स्वरूप, ९३ ओंव्यांनीं व्यक्त केलें आहे. जरेचें चित्र हुबेहुब वर्णन केलें आहे. अज्ञान्यांचीं लक्षणेंही फार फार वाचण्यासारखीं आहेत. "न जाणें न नेणें अशा पामराला," अनुपम असा जो दिव्याचा दृष्टांत दिला आहे, तो ह्याच अध्यायांत. ( ओं० ७१९–२२ ) अभक्तांचीं लक्षणें ऐकूनही मनाला फार करमणूक होते. इत्यादि विषयांनीं हा अध्याय परिप्लुत आहे.

१४ चवदाव्या अध्यायांत प्रस्तावना आहे. सत्व, रज व तम ह्या तीन गुणांचें वर्णन ह्या अध्यायांत आहे. ह्यांतील २६ व्या श्लोकाच्या टीकेंत "अव्यभिचार" भक्तीचें स्वरूप फार उत्कृष्ट रीतीनें व्यक्त केलें आहे.

१५ पंधराव्या अध्यायाला विस्तृत प्रस्तावना आहे. पुढें संसाररूप वृक्षाचें मनोहर वर्णन असून, तो छेदण्याला वैराग्याचें साधन पाहिजे, हा विषय प्रतिपादिला आहे.

१६ व्या अध्यायांतही विस्तृत प्रस्तावना आहे. त्यापुढें दैवी संपत्तीचें वर्णन आहे. चार्वाकमतें, ह्मणजे पाखांड्याचीं भाषणें ह्यांची नक्कल ह्यांत फार मौजेची केली आहे. ह्या अध्यायांत "लोखंडाच्या ओतलेल्या खांबाचा" एक दृष्टांत आहे.

१७ सतराव्या अध्यायालाही विस्तृत प्रस्तावना आहे. ह्यांत तीन प्रकारच्या श्रद्धेचें वर्णन असून, तामसादिकांचे आहार, यज्ञ वगैरेंचें प्रतिपादन आहे, व शेवटीं ॐकाराचें स्वरूप, नाममाहात्म्य, त्याचा विनियोग कसा करावा, हा मुख्य विषय सांगून, अध्याय संपविला आहे.

१८ अठरावा अध्याय हा सर्वांत मोठा आहे. ह्याची प्रस्तावनाही फार विस्तृत असून, तींत मागील सर्व अध्यायांचें सिंहावलोकन केलेलें आहे, व ह्या अध्यायाला "एकाध्यायी गीता" असें नाम दिलें आहे. मागील सतरा अध्याय ते सात मजले, असें रूपक करून, अठराव्याला कलशाध्याय असें ह्मटलें आहे. ज्ञानेश्वरांनीं नवव्या अध्यायांत जसें आपलें सर्व चातुर्य खर्च केलें आहे, तसेंच ह्या अध्यायांतही केलें आहे. ह्या एक अध्यायांत गीतेंतील प्रत्येक सिद्धांत संक्षेपानें आला आहे. ह्यामुळें ह्यांत मनोरमपणा विशेष आहे. ह्यांतील मुख्य विषय त्याग व संन्यास हे होत. ह्यांतील शेवटच्या श्लोकाचें माहात्म्य तर विशेषच वर्णिलें आहे. उपसंहार तर फारच वाचनीय आहे. सर्व वेदांचें व उपनिषदांचें सार एकत्र करून श्रीव्यासांनीं "गीते"च्या रूपानें जसा उपकार केला, त्याप्रमाणेंच श्रीज्ञानेश्वर महाराजांनींही अशा प्रकारें गीतेची अठरा मजली इमारत रचून महाराष्ट्रीयांवर निरंतरचा संस्मरणीय उपकार करून ठेविला आहे.

ही इमारत शके १२१२ त रचली गेली. त्या वेळीं तिच्याकडे लोकांचें जितकें लक्ष वेधावें, तितकें वेधलें होतेंसें दिसत नाहीं. ३०० वर्षेंपर्यंत ती तशीच पडून राहिली होती. पुढें शके १५१२ मध्यें श्रीएकनाथ महाराजांनीं तिचा जीर्णोद्धार केला. अर्थात् पाठांतरानें अशुद्ध शब्द झाले होते, त्यांचें सर्व शुद्धीकरण करून, नवी प्रत तयार केली. त्याबद्दल त्यांनीं स्वतः केलेल्या ओंव्या शेवटीं दिल्याच आहेत. त्यानंतर पुन्हा ती सुमारें ३०० वर्षें तशीच राहिली. पण सृष्टीची रहाटी कोठें बंद आहे[1]. तिचा रूपांतराचा क्रम सुरूच आहे. त्याप्रमाणें आमच्या महाराष्ट्र भाषेंत बदल होत होत, मुग्धवधूला तारुण्य प्राप्त व्हावें, तद्वत् तिचेंही स्वरूप बदललें. तें इतकेंच कीं, ज्ञानेश्वरींतील एक एक शब्द प्रचारांतून जातां जातां, अखेर पुष्कळच शब्द दुर्बोध झाले. तेव्हां अर्थातच नवशिक्यांना तिचा आस्वाद घेणें उत्तरोत्तर दुर्घट होत चाललें. इतक्यांत मुंबईतील 'गणपत कृष्णाजी'चा, छापखाना भरभराटीस आला. तेव्हां त्यांनीं सावंतवाडीचे वे. शा. सं. रा. रा. शंकर गणेशशास्त्री देवस्थळी यांजकडून ज्ञानेश्वरींतील दुर्बोध शब्दांचा, फार

१ ह्या विषयावर केलेल्या आर्या के. कोकिळांत येऊन, त्यांचें स्वतंत्र पुस्तकही छापलें आहे.

परिश्रमानें, कोश तयार करविला. हाच ज्ञानेश्वरीचा पहिला कोश होय. त्यानंतर पुण्याच्या प्रसिद्ध जगद्धितेच्छु छापखान्याचे मालक रा. रा. रावजी श्रीधर गोंधळेकर ह्यांनीं त्याच कोशाच्या आधारें परिभाषेसह ज्ञानेश्वरी छापिली. तिच्यावर निबंधमालेमध्यें प्रसिद्ध रसिकवर्य व विद्वन्मणि कै. विष्णुशास्त्री यांचा अभिप्राय आलाच आहे. त्यांत त्यांनीं आपल्यास उपलब्ध झालेल्या प्रतींत ४६० ओंव्या अधिक आहेत व गोंधळेकरांच्या प्रतींत कमी आहेत, असें ह्मटलें आहे. परंतु त्या ओंव्या कोठें उपलब्ध–निदान आह्मांस तरी–झाल्या नाहींत, ह्याबद्दल वाईट वाटतें. त्याच लेखांत शास्त्रीबोवांनीं, ज्ञानेश्वरी-विषयीं येणेंप्रमाणें अभिप्राय दिला आहे–“ आह्मी आमच्या वाचकांसही आनंदानें कळवितों कीं, कवित्वाच्या तरंगांत मौजेनें लोटत जाऊन, उपमादृष्टांतादिकमळें ज्यांस लीलेनें खुडावयाचीं असतील, त्यांनीं प्रस्तुत ‘ परिभाषा ’रूप तुंबीफळाचा आश्रय करून, महाराष्ट्र भाषेच्या आद्यकवींच्या वाक्तरंगिणींत उडी घालावी. हिचें आजपर्यंत जें दूरावगाहत्व वाटत होतें, तेंही प्रत्यक्ष अनुभवावरून पुष्कळ अंशीं मिथ्याच अशी आमची खात्री झाली.” ह्यावरून आह्मांस एक गोष्ट दिसून येते, ती ही कीं, शास्त्रीबोवांनीं संस्कृतकवींचे ग्रंथ जसे साद्यंत व मनःपूर्वक अवलोकिले होते, तशी ज्ञानेश्वरी मात्र अवलोकन केलेली नव्हती. ती जर त्यांनीं तशाच दृष्टीनें पाहिली असती तर आपल्या वाचकांना केवळ ‘ कवित्वाच्या तरंगांत मौजेनेंच लोटत जावयाला ’ व केवळ ‘ उपमादृष्टांतादिकमळेंच खुडून घेण्याला, ’ खास सांगितलें नसतें. तर ‘ त्या कमळां’तील मकरंदाचा सुगंध लुटीत लुटीत ब्रह्मज्ञानांत एकदम उडी टाकून, बुडी देऊन, किंवा मनसोक्त विहार करून, किंवा यथेच्छ अमृतपान करून, अमरत्व संपादण्यास खचित शिफारस केली असती, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. असो. वरच्या लेखांतील ‘ दूरावगाहत्व पुष्कळ अंशीं मिथ्या ’ ह्या शब्दांवरून सदरहू परिभाषेनें बऱ्याच अंशानें तें शिल्लक होतें, येवढें निश्चित झालेंच. त्यानंतर जगदीश्वर छापखान्याचे मालक रा. रा. नारायण रामचंद्र सोहनी ह्यांनीं मूळ ज्ञानेश्वरी बुकसाइज छापून, तिच्या मागें कठीण शब्दांचा कोश जोडला. परंतु ज्ञानेश्वरींतील विभक्तिरूपें जुन्या पद्धतीचीं; प्रथमा व द्वितीया सारख्याच; तृतीया व सप्तमी एकरूप ! वाक्यें सूत्रासारखीं त्रोटक ! ह्यामुळें पुन्हा थोड्या बहुत अंशानें दुर्बोधत्व राहिलेंच. ह्याच्या पाठीमागून निर्णयसागरचे मालक रा. रा. जावजी दादाजी ह्यांनीं डा० अण्णा मोरेश्वर कुंटे यांजकडून टीपा देऊन, सटीप ज्ञानेश्वरी छापिली. ती बुकसाइज असून, तींत गीतेंतील पदांचीं प्रत्याहिकें, कठीण शब्दांवर–पेजाखालीं टीपा, अशी बरीच व्यवस्था होती. पुढें कोल्हापूर येथील राहणारे वकील रा. रा. भावे ह्यांनीं सुमारें तीन वर्षांपूर्वीं ‘ भावार्थचंद्रिका ’ ह्या नांवाची, सार्थज्ञानेश्वरी तयार करून, ती छापिली. तींत कठीण शब्दांचे अर्थ किंवा कोशही दिलेला नाहीं, आणि पोथीचा साइज असल्यामुळें वागवावयास अडचण पडते. त्यानंतर ह्याच ग्रंथाधारें रा. रा. नारायण हरी भागवत ह्यांनीं ‘ गीताज्ञानेश्वरीरहस्य ’ ह्मणून लहानसें पुस्तक केलें आहे. तेंही ज्ञानेश्वरीच्याच कांहीं भागांचें भाषांतर असून, त्याच्यांतील भाषा फार चांगली वठली आहे. तथापि त्यांत नऊ अध्यायांचाच समावेश असून, शिवाय सारेंच भाषांतर नाहीं, तर वेंचे मात्र आहेत.

वरील सर्व अडचणी दूर करून, ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ह्याहीपेक्षां सुलभ होईल तर पहावें, ह्मणून प्रसिद्ध बुकसेलर व ‘ केरळकोकिळ’चे प्रस्तुतचे प्रोप्रायटर रा. रा. जनार्दन महादेव गुर्जर, यांनीं तीन वर्षांपूर्वी तें काम मजकडे सोंपविलें. पण त्यांनीं काम सोंपविलें ह्मणण्यापेक्षां त्यांनीं श्रीसद्गुरुकृपामृताचा जो अनुपम प्रसाद मिळविला आहे, त्याचा अल्पांश तरी आपल्या प्रिय मित्रांस मिळावा ह्मणून त्यांनीं सदय अंतःकरणानें गुर्वधिकाराच्या पायरीची श्रेष्ठता संरक्षण करण्याकरितां, ह्मणूनच श्रीज्ञानेश्वरीच्या निमित्तानें मला आपले अंशभाक् करण्यास पात्रता दिली असें मी समजतों. कारण, गीता ही किती थोर व गहन आहे, ह्याचें विवेचन श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं केलें आहे. पण खुद्द ज्ञानेश्वरीचीही योग्यता तशीच आहे. तिचा अर्थ करणें ह्मणजे कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. सहाव्या अध्यायाच्या वेळेस आमचेंही धैर्य खचण्याची पाळी आली होती. परंतु श्रीमद्विवेकानंदासारख्यांच्या भाषणामृताचा लाभ वगैरे होऊन, असलें दुर्घट कामही शेवटास जाण्याचा सुदिन उगवला आहे. इतकेंच नव्हे, तर त्या अर्थामध्यें माझ्या मतें तरी निदान कोठें संशय राहिला नाहीं. हेंचसें काय, पण वेदांतविषयासंबंधानें मला एकही शंका उरलेली नाहीं. व त्याप्रमाणें मला कोणीं कांहीं विचारल्यास त्याची यथामत्या

सेवा करण्यास मी केव्हांही सादर राहीन. ज्ञानेश्वरीसंबंधानें माझ्या मनांत जो पूज्यभाव उत्पन्न झालेला आहे, तो केवळ अपूर्व होय. ज्ञानेश्वरीच्या तोडीचा किंवा त्याहून अधिक एखादा समाधानकारक ग्रंथ असेल, असें सांगण्यास आज तरी निदान माझें मन घेत नाहीं. श्रीमद्विवेकानंदांच्या व्याख्यानांची आह्मी तारीफ करतों, परंतु त्यांच्या कानीं जर ज्ञानेश्वरी पडेल, तर ते सुद्धां आनंदभरानें डुलत राहतील, ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. ज्ञानेश्वरीचें माहात्म्य सांगणारे व ती वाचणारे गृहस्थ आमच्या देशांत कांहीं कमी आहेत, असें नाहीं. पण ज्ञानेश्वरीची खरी योग्यता कितीकांच्या मनांत बिंबली असेल, ह्याचा मला वानवाच दिसतो. इतरांचें कांहीं असो. तिच्या, आज सुमारें तीन वर्षांच्या व्यासंगानें माझ्या मनाला जी शांति व समाधानस्थिति प्राप्त झाली आहे ती केवळ निरुपम होय. अशा ग्रंथाचें काम मजसारख्या पामराच्या हातून शेवटास गेलें, ही माझ्या वडिलांची पुण्याई; पूर्वसंचिताचा सांठा; व श्रीज्ञानेश्वर महाराजांचाच केवळ प्रसाद होय. ह्मणून आमचे मित्र गुर्जर ह्यांनीं आजपर्यंत मजवर अनेक उपकार केले आहेत, आज करीत आहेत, व पुढेंही करितील, तरी ह्या अलभ्य लाभाचें ऋण माझ्याच्यानें फिटण्यासारखें नसल्यामुळें, मी केवळ सद्गदित अंतःकरणानें त्यांचा जन्मोजन्मींचा ऋणी आहें, येवढेंच ह्मणून थांबतों. असो.

ज्ञानेश्वरीचें भाषांतर आपणाकडून कितीही सुबोध केलें; तरी तो विषयच मुळीं शब्दातीत असल्यामुळें त्यांत काठिण्य हें थोडें बहुत तरी राहणारच. प्रस्तुत पुस्तकांत ज्ञानेश्वरीचें भाषण जशाचें तसेंच, चालू भाषेंत वठविण्याचा प्रयत्न केला आहे. ओंवीचा अर्थ संपला तेथें प्रत्येक ओंवीचा आंकडा दिला आहे. कठीण शब्दांचे अर्थ आजपर्यंतच्या सर्व कोशांचें संशोधन करून, पृष्ठांखालीं जेथच्या तेथें दिले आहेत. मधून मधून कित्येक कथानकांचा संबंध कळण्याकरितां, कथानकें वगैरे टीपेमध्यें थोडक्यांत दाखल केलीं आहेत. कित्येक लोकांचें मत असें ऐकूं येतें कीं, ज्ञानेश्वराच्या कालीं बोलण्याची भाषा निराळी असून, त्यांनीं हा ग्रंथ एका वेगळ्याच भाषेंत केलेला आहे. परंतु ज्ञानेश्वराच्या कालीं ज्ञानेश्वरींतीलच भाषा व शब्दच प्रचारांत होते, हें ध्यानांत यावें, ह्मणून पांचशें वर्षांपूर्वी गोमंतकांतून शेणवी, वैश्य, कुणबी वगैरे जातींचीं कुटुंबें मलबारांत जाऊन कोची वगैरे ठिकाणीं स्थाईक झालेलीं आहेत, व त्यांच्या त्या वेळच्या महाराष्ट्र भाषेवर अद्यापि नवा संस्कार झालेला नसल्यानें ती मूळचीच कायम आहे. तींत आज मितीस प्रचारांत असलेल्या ज्ञानेश्वरींतील शब्दांची यादी निराळी जोडली आहे. सहाव्या अध्यायांतील योगाभ्यास अध्यायांतील कुंडलिनी व चक्रें वगैरेंची नीट समजूत पडावी, ह्मणून कुंडलिनीची आकृति आरंभीं निराळ्याच पृष्ठावर दिली आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांचीं चरित्रें बरींच उपलब्ध आहेत, ह्यास्तव येथें आणखी निराळें चरित्र देण्याचा प्रयत्न केला नाहीं. आमचे परम मित्र व प्रस्तुतचे प्रसिद्ध वक्ते व शीघ्रकवि रा. रा. बळवंत खंडूजी पारख यांनीं लिहिलेलें श्रीज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र फार गोड आहे. यास्तव जिज्ञासूंनीं तेंच अवश्य पाहण्याची कृपा करावी.

ज्ञानेश्वरीमध्यें व्यवहारसंबंधीं पुष्कळ उपयुक्त माहिती आलेली आहे, व सुंदर सुंदर वेंचे, दृष्टांत, ऐतिहासिक, कलाकौशल्यात्मक, ज्योतिषसंबंधीं वगैरे माहिती अत्यंत मनोरम आहे. त्या सर्वांचें निरनिराळें विषयवार टिपण सोबत जोडलें आहे. सुदैवानें दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग माझ्याच हयातींत आला, तर आणखी पुष्कळ सुधारणा करण्यासारखी वाटते, तीही शक्ति असल्यास मी करण्यास आळस करणार नाहीं. अस्तु.

ह्याप्रमाणें यथामति सुचली तशी सेवा केली आहे. आतां उपसंहारादाखल दोन शब्द सांगावयाचे. परंतु ज्ञानेश्वरीमध्यें नाहीं असें कांहींच नाहीं. आणि त्यांच्यापेक्षां कोमल शब्द कोण कोठून आणणार ? ज्ञानेश्वरांनीं "व्यासोच्छिष्ट जगत्त्रय" असें ह्मटलें आहे. तें कांहीं माझ्या मनांत नीटसें बिंबलेलें नाहीं. परंतु "ज्ञानेश्वरोच्छिष्ट जगत्त्रय" असें मात्र मी प्रतिज्ञेनें सांगेन. ह्याकरितां त्यांच्याच प्रासादिक व कोमल शब्दांनीं उपसंहार करतों:—"अशा प्रकारें गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें जें समाधिरूप धन, तें प्रभूंनीं ग्रंथरूपानें बांधून माझ्या स्वाधीन केलें. नाहीं तर, मी कांहीं शिकलेला नाहीं; कांहीं वाचलेलें नाहीं; स्वामींची—सद्गुरूंची—सेवा करावयाचीही माहिती नाहीं. अशा मला ग्रंथ करण्याची योग्यता कोठची ? परंतु खरोखर गुरुनाथांनीं माझें निमित्त करून—मला पुढें करून—काव्याच्या निमित्तानें जगाचें संरक्षण केलें. हेंच खचित समजा. तर महाराज ! परस्वाधीनपणानें—आचार्य या नात्यानें—मी जें उणें पुरें बोललों,

त्याची आपण जननीच्या नात्यानें मला क्षमा करावी. शब्द कसा योजावा ? अर्थ कसा साधावा ? अलंकार ह्मणजे काय ? तें मला माहीत नाहीं. कळसूत्री बाहुलें, नाचविणाराच्या दोऱ्यानें नाचत असतें; त्याप्रमाणें माझ्या स्वामींनीं–सद्गुरूंनीं–मला दाखवून दिलें, तसतसें बोलत गेलों. ह्याकरितां गुणदोषांबद्दल फारशी क्षमा मागत बसत नाहीं. कारण, ग्रंथद्वारें मीं जें सारें भाषण केलें आहे तें आचार्यांच्या नात्यानें केलेलें आहे. आणखी तुह्मां संतांच्या सभेमध्यें उणीव जर जशीच्या तशीच राहील,–ती पूर्ण होणार नाहीं, तर ममतेनें–लडिवाळपणानें–मी तुह्मांवरच रुसेन. परिसानें स्पर्श केला असूनही लोखंडांतील हलकेपणा निघून गेला नाहीं, तर त्याचा शब्द कोणावर बरें ? ओढ्याचें काम एवढेंच कीं, त्यानें जाऊन गंगेस मिळावयाचें. इतकें करूनही तो गंगा झाला नाहीं, तर तो काय करणार ? ह्मणून मोठ्या सुदैवानें तुह्मां संतांचे हे पाय मला प्राप्त झाले आहेत. आतां जगामध्यें उणेपणा रहाणार कोठें ? अहो महाराज ! माझ्या सद्गुरुस्वामींनीं मला आपली संतांची जोड मिळवून दिली. तिच्या योगानें सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. मला आपल्यासारखे मायबाप मिळाले ह्मणून त्यांच्या अनुकूलतेनें ग्रंथाचा हट्ट शेवटास गेला. महाराज ! साऱ्या सोन्यानेंच पृथ्वी ओतवून काढतां येईल; सारे पर्वत चिंतामणीचेच करतां येतील; सात समुद्रही अमृतानें सहज भरतां येतील; तारांचा चंद्र करावयाचेंही कठीण नाहीं. कल्पतरूंचे मळे लावण्यालाही फारशी अडचण नाहीं; पण गीतार्थाचें मर्म मात्र काढतां येणार नाहीं. तो मी एक केवळ मुका; असें असतां मराठी भाषेंत तो प्रत्यक्ष घेतां येईल असें जें केलें; हा एवढा ग्रंथसागर उतरून कीर्तिविजयाचा जो पलीकडे झेंडा फडकाविला; गीतार्थाचें देऊळ महामेरु कळसासहवर्तमान तयार करून त्यामध्यें श्रीगुरुमूर्तीचें पूजन केलें; गीतारूप निष्कपट मातेला चुकून हें मूल व्यर्थ भटकत होतें, त्या मायलेंकरांची भेट झाली; हा तुमचा प्रसाद. ज्ञानदेव ह्मणतात "महाराज ! तुह्मीं सज्जनांनीं केलेल्याचा विचार करून मी बोलतों. तें उगाच कांहीं तरी भाषण नव्हे. फार काय सांगूं ? ग्रंथसमाप्तीचा हा जो सोहळा आपण दाखविलात येणेंकरून सकल जन्माची सफलता झाली. महाराज ! मी आपल्या भरंवशावर जितक्या जितक्या आशा धरल्या, तितक्या तितक्या सर्व परिपूर्ण होऊन मी अप्रतिम सुखास पात्र झालों. महाराज ! तुह्मीं माझ्याकडून ग्रंथाची ही दुसरी सृष्टि निर्माण केली, ती पाहून आह्मी विश्वामित्राला सुद्धां हिणावूं. कारण, त्रिशंकूकरितां ब्रह्मदेवालाही कमीपणा आणावा, ह्मणून त्यानें दुसरी सृष्टि निर्माण केली. पण ती नाशवंत होती, व ही माझी अविनाशी आहे. उपमन्यूच्या मोहासाठीं शंकरांनीं क्षीरसागरही निर्माण केला. पण तोही येथें उपमेला योग्य होत नाहीं. कारण त्याच्या पोटांत विष आहे. अंधकाररूप राक्षस स्थावरजंगमास गिळूं लागला असतां, सूर्य धांवून संरक्षण करतो खरा, पण लोकांना त्याच्यापासून ताप होतो. संतप्त झालेल्या जगासाठीं चंद्रानें चांदणें पाडलें पण त्या कलंकयुक्त चंद्राला ह्यासारखें कसें ह्मणावें ? ह्मणून महाराज ! तुह्मीं संतांनीं मजकडून जो हा ग्रंथाच्या रूपानें त्रिभुवनावर उपकार केलात, तो फारच निरुपम आहे ! एवढेंच नव्हे तर महाराज ! तुमचें जें हें मीं धर्मकीर्तन केलें तें तुमचें तुह्मींच सिद्धीस नेलेंत. आणि त्यांत माझा सेवकपणा मात्र उरला. आतां विश्वात्मक देवानें हा जो मीं वाग्यज्ञ केला–गीतेवर टीका केली–तिच्या योगानें संतुष्ट होऊन मला एवढा प्रसाद द्यावा. कीं, दुष्टांची दुष्टबुद्धि जाऊन त्यांना सत्कर्माची अभिरुचि उत्पन्न व्हावी. प्रत्येक प्राणिमात्रामध्यें परस्परांचा स्नेह जमावा. पापरूपी अंधकार लयास जाऊन विश्वामध्यें स्वधर्मरूप सूर्याचा उदय व्हावा. आणि जो जो प्राणी जी जी इच्छा करील, ती ती त्याची परिपूर्ण व्हावी. सदासर्वकाळ जगताचें कल्याण इच्छिणारे, भाग्यवान्, अशा ईश्वरनिष्ठांचे समुदायच्या समुदाय निरंतर प्राणिमात्रांस भेटावेत. कोव्यवधि चालते बोलते कल्पतरूच; सजीव चिंतामणींचे गांवच; अमृताचे बोलते चालते समुद्रच; जे कलंकरहित चंद्र; जे तापरहित सूर्य; असे जे संतसज्जन ते, सर्वांचे सदासर्वकाळ सोयरे–आप्त–होवोत. किंबहुना तिन्ही लोक सर्वसुखीं पूर्ण होऊन सदासर्वकाळ आदिपुरुष जो परमेश्वर त्याच्या भजनीं लागोत. आणखी महाराज ! ह्या लोकांमध्यें जे कोणी विशेष आदरानें ग्रंथ बाळगतील ते या लोकांत व परलोकांतही विजयी व्हावेत; ह्यावर सद्गुरु ह्मणाले "हा प्रसाद होईल." त्या वराच्या योगेंकरून ज्ञानदेवांना फार आनंद झाला."

आतां सर्वांचा निरोप घेतांना ज्ञानेश्वरीसंबंधानें, शे-

वटीं एक वाक्य मला लिहिल्यावांचून लेखण खालीं ठेववत नाहीं, तें वाक्य हें:—" आनंदामृत पाजून पुष्टि देणारी माता; आत्मस्वरूपाची ओळख करून देणारी भगिनी; निर्मल अंत:करणास भक्तिरसाचा पाझर फोडणारी चंद्रिका; संतप्त हृदयास आराम करणारी भागीरथी; हृदयाकाशांत वैराग्याचा परिमळ भरविणारी कमलिनी; ज्ञानामृताची वृष्टि करणारी मेघपंक्ति; अज्ञानांधःकाराचा विध्वंस करणारी विद्युल्लता; फोंफावलेल्या संशयवृक्षाचीं पाळेंमुळें खणून काढणारी समशेर; संसारसमुद्रांतून पार पाडणारी नौका; आणि मुमुक्षूंच्या मनास सद्गदित करणारी प्रेमरसाची वृष्टि, मात्र ह्या जगज्जननी श्रीज्ञानेश्वरीवांचून" दुसरी कोणतीही मिळणार नाहीं, ही प्रत्येकानें खूणगांठ बांधून ठेवावी. अहाहा! श्रीज्ञानेश्वर म्हणजे साक्षात् ईश्वरी अवतारच ते! त्यांची व त्यांच्या वाणीची थोरवी ती कोठपर्यंत वर्णन करावी? ज्यांनीं आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी, ज्ञानेश्वरीसारखा अप्रतिम व गहन विषयावर ग्रंथ लिहून अवतार संपविला, ते मयूरपंतांच्या वाणीप्रमाणें श्रीविष्णूचे अवतार कोण म्हणणार नाहीं? इतकें सांगून श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेनें सर्वात्मक देवाला मी अल्पमतीनें ही फूल नव्हे, फुलाची पाकळी वाहत आहें, ती त्यास रुजू होवो.

मुक्काम—पार्पुड—शांताश्रम, ता० २१।१ इ०स. १९००. } सर्वांचा दासानुदास, **केरळकोकिळ.**

मिति पौष कृष्ण ५ रोज रविवार शके १८२१ विकारीनाम संवत्सरे.

## श्लोक.

ग्रंथीं ह्या अढळेल न्यून बरवें जें वाचतां त्वन्मना ।
तें मातें अति आदरें कळविणें ही प्रार्थना सज्जना ॥
ईशा वंदुनि शेवटीं सविनयें मी एक मागें वर ।
कीं सेवा तुमची घडो पुनरपी ह्या हातुनी सत्वर ॥ १ ॥

# सूचना.

वेदांत व ज्ञानेश्वरी हे दोन शब्द मनांत आले ह्मणजे, किती व काय लिहावें असें होऊन जातें. समुद्र तो हा; ह्मणून कोठपासून कोठपर्यंत दाखवावा? तशीच 'मनोगत' लिहितांना अंतःकरणाची अवस्था होऊन गेली. संशयसमुद्र जसा विस्तारेंकरून वर्णन केला, तसाच त्यावरील निश्चय सांगणें जरूर होतें. परंतु होतां होतां तो विषय इतका लांबला कीं, भरधांव घोड्याची अनीन आंखडल्याप्रमाणें आह्मांस एकदम हात आंखडणें भाग पडलें, व ईश्वर घडवील तर, निराळाच ग्रंथ लिहिण्याचें मनांत आलें. तूर्त ज्ञानेश्वरी लक्ष्यपूर्वक अवलोकन केली, तर तींत सर्व अफाट संशयाब्धीचें मंथन केल्याचें कोणालाही दिसून येणार आहे, व त्याहून अधिक असें कोणीच सांगण्याला समर्थ होणार नाहीं. ह्यास्तव वाचकही विस्तारभयाचें कारण मनांत आणून 'मनोगतां'तील किंचित् अपुऱ्या लेखाबद्दल क्षमा करितील अशी आशा आहे.

सर्वांचा नम्र सेवक,

**"केरळकोकिळ."**

# ज्ञानेश्वरींतील उपयुक्त माहितीचें त्रोटक टिपण.

(धर्म, नीति, व्यवहार, ज्योतिष, सृष्टिचमत्कार, कलाकौशल्य व शेतकी ह्यांसंबंधीं माहिती.)

## १ धर्म, नीति व व्यवहार यांसंबंधीं.

| | | पान. | ओंवी. |
|---|---|---|---|
| १ | शहरांत जाऊन राहिलें ह्मणजे चातुर्य प्राप्त होतें. ... ... ... | ६ | ४१ |
| २ | स्त्रियांना वरचढपणा सहन होत नाहीं. ... ... ... ... | १६ | १८६ |
| ३ | मांत्रिक मंत्रोच्चारांत चुकला, तर अनिष्ट होतो. ... ... ... | १६ | १९० |
| ४ | लांकडावर लांकूड घांसलें ह्मणजे अग्नि उत्पन्न होतो.... ... ... | २० | २४३ |
| ५ | गाईचें दूध नवज्वरांत विष.... ... ... ... ... | ३७ | ८४ |
| ६ | वेदांत सांगितलेलें सारेंच कांहीं प्रत्येकास घेतां येत नाहीं. ... ... | ४३ | ६०।६३ |
| ७ | चित्तांत समता राखणें हेंच योगाचें सार. ... ... ... | ४४ | ७३ |
| ८ | रागद्वेष नाहींसे झाल्यावर इंद्रियें विषयांत रमलीं तरी चिंता नाहीं. ... | ४९ | ३२ |
| ९ | वर्णाश्रमधर्मानेंच मोक्ष प्राप्त होतो. ... ... ... ... | ५८ | ८० |
| १० | स्वधर्माशिवाय इतर कोणतींच साधनें नकोत. ... ... ... | ५९ | ८९।९१ |
| ११ | वडील जें जें करतात, तोच धर्म. ... ... ... ... | ६४ | १५८ |
| १२ | कर्मालाच जे अधिकारी, त्यांना निरिच्छता सांगूं नये. ... ... | ६५ | १७३ |
| १३ | कौतुकाखातर सुद्धां इंद्रियांचे लाड पुरवूं नयेत. ... ... ... | ६७ | २०२ |
| १४ | शूद्राच्या घरीं ब्राह्मणानें जेवूं नये. ... ... ... ... | ७९ | २२१ |
| १५ | साखर आणि दूध जंतांच्या विकारावर वावडें (होतें.) ... .... | ,, | २२६ |
| १६ | ठेवीवरचे भुजंग, वाटमारे मांग, किल्ल्यांचे धोंडे, व गांवाचें गांवकुसूं (सारखेच) | ७० | २४१।४२ |
| १७ | चंदनाच्या मुळाशीं सर्प (राहतो.) ... ... ... ... | ७१ | २६० |
| १८ | ज्ञानासाठीं संतांची सेवा (करावी.) ... ... ... ... | ८५ | १६५।६६ |
| १९ | बायका मुलांना नाव सोयीची (असते.) ... ... ... ... | ९२ | १६ |
| २० | मुलें चेष्टा करतात, तद्वत् योगी कर्म करतात. ... ... ... | ९५ | ५२ |
| २१ | दरिद्री कोंडा खातो. ... ... ... ... ... | ९९ | ११० |
| २२ | समंध जनांमध्येंच असून दिसत नाहींत.... ... ... ... | ९८ | ९९ |
| २३ | तान्हेलेले मृग दुपारच्या वेळीं माळजमिनीलाच पाणी समजतात... ... | १०० | १११ |
| २४ | पोंहत जाण्यापेक्षां उतार बरा.... ... ... ... ... | १०३ | १६५ |
| २५ | इंद्रियातीत ज्ञानानें पाहिजे तें दिसतें. ... .... ... ... | १०७ | ३३ |
| २६ | देशी-मऱ्हाठी-भाषेत बोलूं लागलें ह्मणजे साहित्यरंगाची वृद्धि व्हावयाचीच. | ११५ | १३३ |
| २७ | सापानें कांत टाकल्याप्रमाणें योगाभ्यासी मनुष्यासही कांत टाकतां येते. ... | १२४ | २५२ |
| २८ | मोत्यें पक्कदशेस आलीं ह्मणजे शिंपला उकलतो. .... ... ... | १२६ | २६६ |
| २९ | योग्याला समुद्राच्या पलीकडचें दिसतें; मुंगीच्या मनांतील समजतें इ० ... | ,, | २६ |
| ३० | योगाभ्यासानें देहाला अदृश्यता प्राप्त होते. ... ... ... | १२९ | २९३ |
| ३१ | योग्याच्या चालण्यानें सिद्धि प्राप्त होतात... ... ... ... | ,, | २९७ |

| | | पान. | ओंवी. |
|---|---|---|---|
| ३२ | क्षणैक विरक्त अधिकारास पात्र नाहीं. ... ... ... ... | १३० | ३४२ |
| ३३ | सर्व कांहीं प्रमाणांत असावें. ... ... ... ... ... | १३१ | ३४९।५२ |
| ३४ | शस्त्राच्या खणाखणीनंतर विजय मिळतो.... ... ... ... | १४४ | १२ |
| ३५ | डोळयाचाच पडदा डोळ्यांत वाढतो. ... ... ... ... | १४८ | ६२ |
| ३६ | जळांतून झालेलीं मोत्यें जळांत विरत नाहींत. ... ... ... | ,, | ६४ |
| ३७ | मातीची कच्ची घागर मातींत मिळते; पण तीच भाजली कीं मिळत नाहीं. ... | ,, | ६५ |
| ३८ | ईश्वर अमूर्ति असतांना, त्यास मूर्तिमंत तरी कां मानावें ? ... ... | १५५ | १५६ |
| ३९ | गुरूला कांहीं विचारणें तर विनयानें विचारावें. ... ... ... | १५९ | २०४ |
| ४० | मोगऱ्याचे कळे नाकाला व डोळ्यांना दोहोंनाही तृप्त करतात. ... ... | ,, | २०८ |
| ४१ | पंधरांच्या दराचें सोनें ( ज्ञानेश्वरीच्या कालीं होतें.) ... ... ... | १६३ | ३८ |
| ४२ | केंसाच्या गुतवळीवर स्फटिक ठेवला तर भेगलेला दिसतो. ... ... | ,, | ४२ |
| ४३ | अभ्यासाच्या योगानें पाहिजे तें होतें. ( असाध्य तें साध्य करितां सायास। कारण अभ्यास तुका ह्मणे ॥ १ ॥ हा अभंग तुकारामांनीं ह्याच ओंव्यांवरून केला असावा.) ... ... ... ... ... | १६६ | ८१।८५ |
| ४४ | घागरीखालचा दिवा, केव्हां जातो, हें समजत नाहीं.... ... ... | १६७ | ९८ |
| ४५ | कर्जाचें ओझें. ... ... ... ... ... ... | १७० | १३१ |
| ४६ | मापाची शीग. ... ... ... ... ... ... | १७२ | १६६ |
| ४७ | चव्हाट्यावर दुकानें उघडतात. ... ... ... ... | १७४ | १८४ |
| ४८ | साखरेचा पुन्हा ऊंस करितां येत नाहीं. ... ... ... ... | ,, | २०० |
| ४९ | एकोऱ्याच्या वाढीसाठीं जळत्या आगींत उडी. ... ... ... | १८५ | ५४ |
| ५० | मी (परमेश्वर) हवा तेथें असून सुलभ आहें. ... ... ... | ,, | ६३ |
| ५१ | काविळ झाली ह्मणजे चांदणें पिंवळें दिसतें. ... ... ... | १९२ | १४१ |
| ५२ | मूर्ति आहे, तेथपर्यंत देव आहे; मूर्ति गेली कीं देव गेला! ... ... | १९३ | १५३।६९ |
| ५३ | वाऱ्यानें धूळ उडाली तर, पुन्हां पृथ्वीवरच पडते.... ... ... | २०० | २५६ |
| ५४ | हा सूर्य किंवा हें डवकें हें मनांत न आणितां सूर्य सारखाच प्रतिबिंबित होतो. (नाहीं विचारित । मेघ हगणदारी शेत ॥ १ ॥ तुकाराम.)... ... | २०२ | २९० |
| ५५ | जवळची कवडीन् कवडी संपली कीं, वेश्या दाराला बोट लावूं देत नाहीं तशी दीक्षितांची पुण्याई. ... ... ... ... ... | २०५ | ३२९ |
| ५६ | पंख न फुटलेल्या पिलांचे जीव पक्षीण वांचविते. ( आंधळयाच्या गाई देव राखितो.) ... ... ... ... ... ... | २०६ | ३३९ |
| ५७ | ज्ञानी ह्मणवितो, त्याला कांहींच समजत नाहीं. (फारच मजेची ओंवी.) | २१२ | ४३२ |
| ५८ | भक्तीशिवाय सर्व व्यर्थ. (फारच वाचण्यासारखी ओंवी.) ... ... | २१२ | ४३२ |
| ५९ | मृत्युलोकचें सारेंच उफराटें ( फार मनोरंजक वर्णन.) कोण जाणे खरें खोटें। जग चाललें उफराटें ॥ १ ॥ हा अभंग तुकारामांनीं ह्याच ओंव्यांच्या आधारानें केला असावा. ... ... ... ... ... | २१७।१८ | ५०२।१६ |
| ६० | पूर आला तरी रेडा उठत नाहीं. ... ... ... ... | २१९ | ५२२ |
| ६१ | हिरा पाण्यांत पडला तरी त्याचें तेज कमी होत नाहीं. (जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य–मोरोपंत.) ... ... ... | २२५ | ७८ |
| ६२ | झाडें शिंपलीं तरी फळें यावयाचीं वेळेवरच. ... ... ... | २३२ | १६९ |

| | | पान. | ओंवी. |
|---|---|---|---|
| ६३ | गुरुकृपेवांचून वेदपठण, योगाभ्यास सर्व व्यर्थ. ... ... ... | २३२ | १७२ |
| ६४ | सूर्य शिळा; अग्नि ओंवळा; आणि गंगा पारोशी. ... ... ... | २३४ | २०२ |
| ६५ | आंगावरचे केस मोजवत नाहींत. ... ... ... ... | २३५ | २१० |
| ६६ | चंदनावर सर्प; व ठेव्यावर इडळ. ... ... ... ... | २५० | ७५ |
| ६७ | खिडकींतून पडलेल्या किरणांतील अणुरेणूंप्रमाणें ब्रह्मांडें. ... ... | २५६ | १४९ |
| ६८ | ( ब्रह्म ) सर्व ठिकाणीं आहे; सीमा मात्र कोठेंही नाहीं. [ The center is everywhere, and circumference is nowhere. Dr. Dods.] | २६६ | २८१ |
| ६९ | उंट अशोकाचे कोंभ खातो. ... ... ... ... ... | २७६ | ४१२ |
| ७० | वाघानें नेलें, ही 'ह्मण.' ... ... ... ... ... | २८० | ४७९ |
| ७१ | सौदागर आणि वस्त्राची घडी. (व्यापाराचा दृष्टांत.) ... ... | २९१।९२ | ६२४।२७ |
| ७२ | भक्तिमार्गाला लागलें ह्मणजे दुःखें कळत नाहींत. ... ... ... | ३०२ | ७५ |
| ७३ | फलत्याग हा सोपा असून, योगांतील एक श्रेष्ठ योग आहे. ... ... | ३०६ | १३४ |
| ७४ | अहंकार अज्ञान्यापेक्षां सज्ञान्याचें नरडें धरतो. ... ... ... | ३२१ | ८२ |
| ७५ | पंचमहाभूतांचें परस्पर वैर असून, देहांत मात्र तीं मित्रत्वानें राहतात. ... | ३२३ | १४३।४६ |
| ७६ | दारूवाजाच्या आंगावरचें वस्त्र; व बैलाच्या पाठीवर बांधलेलें शास्त्र (सारखें.) | ३४६ | ५३३ |
| ७७ | आषाढामध्यें गुरांना लाळ येते. ... ... ... ... | ३४७ | ५५९ |
| ७८ | स्वयंपाकाच्या चुलीपुढें मोरी व खातेरें ( असायचींच. ) ... ... | ,, | ५६३ |
| ७९ | उकिरडा; निवारशी वस्तु; आणि पावसाचें छप्पर ( सारखींच )... ... | ३५८ | ७०० |
| ८० | अन्नछत्रांतील स्वयंपाक, व वेश्येचें सौंदर्य, पाहिजे त्यानें लुटावें. ... | ,, | ७०१ |
| ८१ | सर्पाच्या तोंडांत सांपडलेला बेडूक माशांची इच्छा करतो. ... ... | ३५९ | ७३१ |
| ८२ | व्याधाच्या गाण्यांत मृग वेडावतो. ... ... ... ... | ३६० | ७४० |
| ८३ | नायट्याला नागाची शपथ. ... ... ... ... ... | ३६२ | ८०१ |
| ८४ | अखंड सुवासीन गांवचा उंबरठा पुजते. ... ... ... | ,, | ८८२ |
| ८५ | घट हा मातीचा मुलगा; वस्त्र हें कापसाचें नातवंड.... ... ... | ३९० | १२१।२२ |
| ८६ | श्रीमंतांच्या लग्नाला बैल. ... ... ... ... ... | ३९७ | २४१ |
| ८७ | पाताळांतील ठेवा, अंजन व पायाळू. ... ... ... ... | ४११ | ३४ |
| ८८ | ज्ञान थोर वाटेल, इतकें मन शुद्ध पाहिजे. ... ... ... | ४११ | ३५ |
| ८९ | रथाचा अतिशय वेग. ... ... ... ... ... | ४१६ | १२३ |
| ९० | हातांतील कोलती गरगर फिरविली ह्मणजे रेषा दिसते. ... ... | ४१७ | १३७ |
| ९१ | विरक्ति मनांत न बिंबेल, तर सर्व व्यर्थ.... ... ... ... | ४३३ | ३९२।९६ |
| ९२ | प्राणापानांचा दुहेरी भाता. ... ... ... ... ... | ४३४ | ४०८ |
| ९३ | स्त्री न सांगण्यानेंच पतीचें नांव सांगते. ... ... ... ... | ४३७ | ४६८ |
| ९४ | पाण्याला खळगा भरल्याशिवाय पुढें जावयाचें समजत नाहीं. ... ... | ४५६ | १६८ |
| ९५ | पूजा करून मग दर्शन; शेतकी करून मग शेत पाहणें. ... ... | ४५७ | १६८ |
| ९६ | पतिव्रता सती जाते. ... ... ... ... ... | ४५८ | १८७ |
| ९७ | सर्व प्रकारचीं विषें एकत्र करणें, ह्याचें नांव काळकूट. ... ... | ४५९ | २१६ |
| ९८ | आपली माता लोकांत नग्न दाखविली, तर तें तीर्थ असूनही पतनास कारण होतें. | ४६१ | २१८ |
| ९९ | पळीला रसास्वाद कळत नाहीं. ( दर्वीपाकरसानिव–संस्कृतकवि. ) ... | ४६२ | २४८ |

| | | पान. | ओंवी. |
|---|---|---|---|
| १०० | त्रिदोष झाला तर मरण चुकत नाहीं. ... ... ... ... | ४६२ | २५६ |
| १०१ | जीवन, दुसऱ्याच्या संगतीनें मारक होतें;–किंवा त्यास संगतीप्रमाणें गुण लागतो. | ४८० | ६८ |
| १०२ | वाडा कोणींही बांधला; तळें कोणींही खटलें, तरी दुसऱ्यास त्याचा उपभोग घेतां येतो. | ४८१ | ८९।९० |
| १०३ | भक्ष्य कुजेपर्यंत वाघ वाट पहातो. ... ... ... ... | ४८६ | १५८ |
| १०४ | पशुपक्ष्यांच्या लग्नांत कामाशिवाय दुसरा उपाध्याय नाहीं. ... ... | ४८८ | १६९ |
| १०५ | जितकें आहे, असें दिसतें, तितकें मिथ्या. ... ... ... | ५०१ | ३८२ |
| १०६ | फुरशावर उपाय चालत नाहीं. ... ... ... ... | ३५९ | ७२६ |
| १०७ | कळसाच्या दर्शनानें देवतेच्या दर्शनाचें फल येतें. ... ... ... | ५०७ | २० |
| १०८ | ब्रह्मनामाविषयीं आस्तिकबुद्धि सोडल्यास सारीं दुष्कर्में होतात. ... | ५०८ | ४८ |
| १०९ | राब घातल्याशिवाय भात पिकत नाहीं. ... ... ... ... | ५१० | ९५ |
| ११० | इच्छा ही फळ बांधून भोगावयास लावते. ... ... ... | ५११ | १०० |
| १११ | फलत्याग साधत नाहीं, ते कर्माला बाधक ह्मणतात.... ... ... | ५१३ | १३५ |
| ११२ | सत्कर्में हींच तीर्थें आहेत. ... ... ... ... ... | ५१४ | १६० |
| ११३ | कर्में आरंभाला कष्टप्रद असतात. ... ... ... ... | ५१६ | १८४।८९ |
| ११४ | शास्त्राच्या सहायावांचून, तें 'कर्म' केलेंसें होत नाहीं. ... ... | ५२८ | ३७२ |
| ११५ | आपण हरवलों, असें वाटेल तेव्हां संतांचें दर्शन घ्यावें. ... ... | ५३० | ३९९।४०० |
| ११६ | वेडा मनुष्य नग्न आहे, कां नेसला आहे? युद्धांत पतन पावलेल्याचे घाव किती? हें दुसऱ्यांनीं पहावयाचें.... .. ... ... ... | ५३३ | ४३९ |
| ११७ | उंसाचीं कणसें; नपुंसक माणसें; व निवडुंगाचें बन (हीं सारखींच). ... | ५४१ | ५७६ |
| ११८ | तामस ज्ञानाला 'ज्ञान' शब्द लावणें, ह्मणजे जन्मांधाला डोळे मोठे मोठे आहेत (असें) ह्मणणें (होय). ... ... ... ... | ,, | ५७९ |
| ११९ | भिक्षेपेक्षां माती सुद्धां अधिक मिळत नाहीं, तरी गारोडी सर्प बाळगतात!... | ५४३ | ६०८ |
| १२० | माशी आपणाला खावविते व दुसऱ्यास ओकून पाडविते. ... ... | ५४४ | ६२० |
| १२१ | खऱ्या प्रीतीपुढें प्राण तुच्छ आहे. ... ... ... ... | ५४५ | ६४२ |
| १२२ | आपण दुसऱ्याला कसें कापतों? हें शस्त्राला समजत नाहीं. ... ... | ५४७ | ६६४ |
| १२३ | बैलाच्या खालीं गोचिड. ... ... ... ... ... | ,, | ६६८ |
| १२४ | द्रव्याचा ठेवा कोळशाचा ढीग होतो. ... ... ... ... | ५५१ | ७२५ |
| १२५ | सर्प द्वेष सोडीत नाहीं. ... ... ... ... ... | ५५३ | ७५९ |
| १२६ | ऋण काढून लग्न करणें. ... ... ... ... ... | ५५५ | ७९५ |
| १२७ | खुषमस्कऱ्याची थट्टा. ... ... ... ... ... | ५५६ | ६९७ |
| १२८ | क्षत्रिय व वैश्य यांचा मान ब्राह्मणाप्रमाणें समजावा. ... ... | ५५७ | ८१९ |
| १२९ | सूर्याच्या प्रभावानें नक्षत्रें लोपतात. ... ... ... ... | ५६० | ५५८ |
| १३० | आपलेंच रत्न परीक्षकाच्या हातून घ्यावें, तसें कर्मही शास्त्रद्वारेंच करावें. ... | ५६२ | ८८९ |
| १३१ | विहित कर्म हीच ईश्वराची श्रेष्ठ सेवा. ... ... ... ... | ,, | ९०६ |
| १३२ | विहित केलें कीं, ईश्वर हस्तगत झालाच. ... ... ... | ५६३ | ९११ |
| १३३ | जिवाच्या कसोटीला उतरलेली दासी धनीन होते. ... ... ... | ,, | ९१२ |
| १३४ | धन्याचें मनोगत न चुकतां सेवा करणें, तीच परमसेवा. ... ... | ,, | ९१३ |
| १३५ | विहित क्रिया करणें ह्मणजेच ईश्वराची आज्ञा पाळणें. ... ... | ,, | ९१४ |

| | | पान. | ओंवी. |
|---|---|---|---|
| १३६ | पाण्याहून तूप चांगलें, पण तें मत्स्यांना काय होय? ... ... | ५६४ | ९२९ |
| १३७ | दुसऱ्याच्या आचारानें वागणें ह्मणजे डोक्यानें चालणें होय. ... ... | ,, | ९३२ |
| १३८ | पत्नीला व वेश्येला पोसावयाला यातायात सारखीच. ... ... | ५६५ | ९४२ |
| १३९ | कर्माच्या आरंभाला कष्ट (फार वांचण्यासारखें). ... ... ... | ,, | ९३६।५० |
| १४० | समर्थाची आज्ञा दासी मोडीत नाहीं. ... ... ... ... | ५६६ | ९६० |
| १४१ | साम्य दशा प्राप्त झाली ह्मणजे आपोआपच श्रीगुरु भेटतात. ... ... | ५६७ | ९६६ |
| १४२ | गाणें बंद झालें ह्मणजे मृदंग वगैरे वाद्यें बंद पडतात. ... ... | ५७५ | १०९३ |
| १४३ | मी (परमेश्वर) सर्व ठायीं आणि आयताच आहें.... ... ... | ५८३ | ११२४ |
| १४४ | काष्ठामध्यें अग्नि, आणि कांसेमध्यें दूध हीं मूळचींच आहेत. ... ... | ,, | ११२६ |
| १४५ | असतें तेंच प्राप्त होतें, तरी त्याला उपाय करावे लागतात. ... ... | ,, | ११२८ |
| १४६ | शास्त्रें हीं अविद्याहरणाचीं साधनें आहेत; पण तीं आत्मबोध करण्यास समर्थ नाहींत. ... ... ... ... ... ... | ५८४ | ११३३ |
| १४७ | अध्यात्मशास्त्र ह्मणजे काय? तें पाहिजे असल्यास गीता पहावी. ... | ,, | ११३४ |
| १४८ | एका गीताशास्त्रानें सर्व शास्त्रें समर्थ होतात. ... ... ... | ,, | ११३५ |
| १४९ | माझा (परमेश्वराचा) आश्रय केल्यावर चुकून निषिद्ध कर्मे आचरण केलीं, तरी तीं एकरूप होतात. ... ... ... ... ... | ५८५ | ११५१।५२ |
| १५० | हातपाय बांधून रथावर घातलेला मनुष्य, चालला नाहीं तरी दिगंताला जातो. | ५८७ | ११९३ |
| १५१ | श्रीगुरु भेटले असतां, भय धरून आत्मज्ञान जर विचारून घेतलें नाहीं, तर आपण आपल्यासच ठकवून घेतल्यासारखें होतें, व परवंचना केल्याचें पातक लागतें. ... ... ... ... ... ... | ५९० | १३३५।३६ |
| १५२ | कांसवांच्या पिलांचा पान्हा दृष्टींतूनच फुटतो. (मत्स्य आठवितां पाळी। कूर्म दृष्टीनें सांभाळी ॥१॥ रामदास.) ... ... ... ... | ५९१ | १३४३ |
| १५३ | सज्जनावर दृष्टि ठेव. ... ... ... ... ... | ५९२ | १३५६ |
| १५४ | लज्जेची आठवण होऊं न देणें, हेंच प्रीतीचें लक्षण. ... ... | ५९३ | १३६९ |
| १५५ | मी (कृष्णपरमात्मा) अर्धा आहें. तूं (अर्जुन) मिळालास ह्मणजे संपूर्ण होतों. | ,, | १३७२ |
| १५६ | ज्ञानानें धर्म व अधर्म हे दोन्हीही नाश पावतात. ... ... ... | ५९४ | १३८९ |
| १५७ | कामीण झाली ह्मणजे चांदणें पिंवळें दिसतें. ... ... ... | ५९६ | १३९३ |
| १५८ | धर्माधर्माच्या मुळाशीं अज्ञान असतें, ह्याकरितां दरोबस्त धर्म सोडावे. ... | ,, | १३९५ |
| १५९ | राजाचें बटकुर राजाच्या बरोबरीचें होतें. ... ... ... ... | ५९७ | १४०३ |
| १६० | मला (ईश्वराला) शरण आलास, ह्मणजे तुला धर्माधर्माची गरज नाहीं. ... | ,, | १४०७ |
| १६१ | गीता ही वेदाचें मूळ. ... ... ... ... ... | ,, | ,, |
| १६२ | वेदासारखा कृपण दुसरा कोणी नाहीं. ... ... ... ... | ५९९ | १४५७ |
| १६३ | वासराच्या पान्ह्यानें साऱ्या घराला दुभतें होतें. ... ... ... | ,, | १४६७ |
| १६४ | जोडलेल्याचा उपभोग घेणें कठीण आहे. ... ... ... | ,, | १४७५ |
| १६५ | उपभोग घेणें माहित नसेल तर विटंबना होते. ... ... ... | ,, | १४७८ |
| १६६ | श्रीगुरु प्रसन्न होतील; शिष्याला विद्याही येईल; परंतु संप्रदायानें उपासना केल्यावांचून फलप्राप्ति होणें नाहीं. ... ... ... ... | ६०० | १४८४ |
| १६७ | यज्ञाचा अवशेष कावळ्याला घालीत नाहीं. ... ... ... | ६०१ | १४८८ |

| | | पान. | ओंवी. |
|---|---|---|---|
| १६८ | जेथें जें योग्य असतें, तेंच फलद्रूप होतें.... | ६०१ | १४९५ |
| १६९ | गीतेचा अर्थ जाणणाराला व पठण करणाराला, सारखें फल प्राप्त होतें. ... | ६०३ | १५२८ |
| १७० | सर्व गुणांमध्यें मुलानें जिंकावें, अशी बापाला मोठी हौस असते. ... | ६१५ | १६५३ |
| १७१ | गीतेशिवाय इतर शास्त्रांना काय करावयाचें ? ... | ६१७ | १६९६ |
| १७२ | वाऱ्यासाठीं शहाण्यानें पंखा केला आहे.... ... | ,, | १६९९ |
| १७३ | गीता अर्थासह भूषणभूत होईलच, पण येरवीं सुद्धां उणेपणा येणार नाहीं. ... | ६१९ | १७६८ |


## २ ज्योतिष व सृष्टिचमत्कारसंबंधी.


| | | | |
|---|---|---|---|
| १ | सूर्य हा खरोखरी चालत नसतां, चालल्याचा भास होतो. ... | ८० | ९९ |
| २ | जिकडे जिकडे सूर्य जातो, तिकडे तिकडे उजाडतें. ... | १११ | ८६ |
| ३ | समुद्र हा मेघांच्या मुखांतून शुद्ध होऊन, परत आपल्या ठिकाणीं येतो. ... | १२९ | ३०७ |
| ४ | चंद्राला पाहून, समुद्राला भरती येते. ... | १९० | ११५ |
| ५ | सूर्यानें आटतें; व मेघानें पुन्हां भरतें. ... | २०२ | २९६ |
| ६ | आकाशांत मेघ कोणीं भरले ? अंतरिक्षांत नक्षत्रास कोण धरतो ? गवताचें छत कोणीं बांधलें ? वाऱ्यानें फिरत रहावें हें कोणाचें मत ? ... | ३१७ | ५४।५५ |
| ७ | ( पृथ्वी अंतरिक्षीं धरणें । धूकटीं उदकाचें लवणें । हें तों मनुष्याचें करणें । नव्हे सर्वथा ॥ १ ॥ रामदास. ) | | |
| ८ | मेघाच्या एका तोंडांतून समुद्र आंत जात असतो, आणि दुसऱ्या तोंडानें नद्या भरत असतात. ... | ४१६ | ११९ |
| ९ | इंद्रधनुष्याचा दृष्टांत. ... | ४२३ | २४० |
| १० | पृथ्वी केवळ परमाणूंची ढेंप असतांही, समुद्रासारख्या महाजळानें कां विरली जात नाहीं ? ... | ४३३ | ४०१ |
| ११ | समुद्रापासून मेघ होतो. ... | ६१५ | १६४९ |
| १२ | स्वातीच्या पाण्यानें मोतीं तयार होतात. ... | ६१७ | १७०१ |
| १३ | मेघ हा समुद्रांतलेंच पाणी आणतो. ... | ,, | १७०६ |
| १४ | नरदेह. ( सृष्टींतला अपूर्व चमत्कार. विशेषणें फार वाचण्यासारखीं ). ... | १७०।७१ | १३९।१५१ |
| १५ | इंद्रधनुष्याच्या अडणीवर मेघ. ... | २९० | ६०३ |


## ३ कलाकौशल्यसंबंधी.


| | | | |
|---|---|---|---|
| १ | कळसूत्री बाहुलीं ( उपमा. ) ... | ५ | ८१ |
| २ | गारोडी. ( दृष्टांत. ) ... | २९ | २७ |
| ३ | कवच व शस्त्रप्रहार. ... | ४१ | ३२ |
| ४ | खची केलेला वृक्ष अधिकच फुटतो. ... | ४७ | ५१६ |
| ५ | बहुरूपी ( दृष्टांत ). ... | ६५ | १७६ |
| ६ | गळाला लावलेलें मांस. ... | ६८ | २१३ |
| ७ | चुनेगची वाडे व गवताच्या झोंपड्या. ... | ६९ | २२३ |
| ८ | कोथळा बाहेर काढून पेंढा भरणें. ... | ७१ | २४८ |
| ९ | खरें नाणें व खोटें नाणें. ... | ७९ | ८६ |
| १० | 'वाहन' कसें असावें. ... | ९१ | ८ |

| | पान. | ओंवी. |
|---|---|---|
| ११ तीन तीन मजले चुनेगची वाडे. .... ... ... ... | १०० | ११४ |
| १२ गळाचें मांस. ... ... ... ... ... ... | ,, | ११८ |
| १३ कापडावर चित्रें काढणें. ... ... ... ... ... | १०२ | १५६ |
| १४ पारधी लोक नळीनें राघू धरतात. ... ... ... ... | ११० | ७६ |
| १५ ओतलेली प्रतिमा.... ... ... ... .. ... | ११५ | १२० |
| १६ सोन्याची जिल्हई दिलेली लगड. ... ... ... .... | १२३ | २२४ |
| १७ तापलेल्या मुशींतील मेण. ... ... ... ... ... | १२४ | २४९ |
| १८ फराळ, शाकभाजा, पक्वान्नें. ... ... ... ... ... | १२७ | २८१।८२ |
| १९ पुतळी व पीतांबर. ... ... ... ... ... | ,, | २८४ |
| २० बासनांतील घडी. ... ... ... ... ... ... | ,, | २९२ |
| २१ रस ओतून घडविणें. ... ... ... ... ... | १३० | ३२७ |
| २२ लग्नघटका. ... ... ... ... ... ... | १४० | ४७१ |
| २३ टांकसाळ. ... ... ... ... ... ... | १४५ | २२ |
| २४ नाण्यांचा छाप. ... ... ... ... ... ... | ,, | २६ |
| २५ डांक देणें. ... ... ... ... ... ... | १६३ | ४४ |
| २६ ( सोनें ) आटून केलेला आकार ती लगड. ... ... ... | १७३ | १७३ |
| २७ कळसूत्री बाहुलीं. ... ... ... ... ... ... | १८३ | ३० |
| २८ गाडग्यांचे कोंभ जमिनींतून येत नाहींत. ... ... ... ... | १८७ | ७४ |
| २९ कापसाच्या पोटांत कापडाची पेटी नसते.... ... ... ... | ,, | ७६ |
| ३० पाण्यांत जाळें टाकणें. .... ... ... ... ... | १९१ | १३८ |
| ३१ मातीचे स्वार, ऐंद्रजालिक अलंकार. ... ... ... ... | १९४ | १९३ |
| ३२ नगारा.... ... ... ... ... ... ... | १९७ | २१३ |
| ३३ ओतलेले पदार्थ. ... ... ... ... ... ... | २०३ | ३०२ |
| ३४ कोंडा उपणणें. ... ... ... ... ... ... | २०५ | ३३३ |
| ३५ पलंग. ... ... ... ... ... .... ... | २०९ | ३९० |
| ३६ दीपमाळ. ... ... ... ... ... ... | ,, | ३९१ |
| ३७ चामड्याच्या नोटी. ... ... ... ... ... | २१४ | ४५३।५४ |
| ३८ मोत्यांची माळ. ... ... ... ... ... ... | २१९ | ५२९ |
| ३९ मोत्यांवर अभ्रकाचें पुट देणें. ... ... ... ... | २२२ | १४ |
| ४० सोन्यारुप्याचा मुलामा. ... ... ... ... ... | ,, | १५ |
| ४१ भांडारी कसा पसंत करावा? ... ... ... ... ... | २२४ | ५२ |
| ४२ सोनें पुटें देऊन शुद्ध करणें. ... ... ... ... ... | ,, | ५६ |
| ४३ जिना.... ... ... ... ... .. ... | २४६ | ९ |
| ४४ राघूला बोलावयास शिकविणें. ... ... ... ... | २४७ | १७ |
| ४५ शिकविलेलें पांखरूं व बाळगलेलें जनावर. ... ... ... | २५८ | १७० |
| ४६ कापराच्या केळींतून कापूर काढणें. ... ... ... ... | २६३ | २५० |
| ४७ नाचणारीं बाहुलीं. .... .... ... ... ... | २८० | ४७० |
| ४८ लगोऱ्याचा खेळ. ... .... ... ... ... ... | ,, | ४७९ |

| | पान. | ओंवी. |
|---|---|---|
| ४९ कापडावर लिहिणें. .... ... ... ... ... ... | २८० | ४८१ |
| ५० शेणाच्या कृतीचीं हुबेहुब फळें. ... ... ... ... | ३४२ | ४७१ |
| ५१ लोखंडाचा रस. ... .... ... ... ... ... | ३४५ | ५१६ |
| ५२ डोंबाऱ्याचें माकड. ... ... ... ... ... | ३६१ | ३९३ |
| ५३ व्यापारांत बरकत. .... ... ... ... ... ... | ३८४ | १६ |
| ५४ मळणीच्या वेळीं बीं निवडून काढणें. ... ... ... ... | ४०४ | ३५३ |
| ५५ सोंगाड्या आपल्या वेषानें लोकांस भूल पाडतो. ... ... ... | ४४३ | २४१ |
| ५६ पाहरेकऱ्याची स्थिति. ... ... ... ... ... | ४६७ | ३४० |
| ५७ पारध्याची सामुग्री. .... ... ... ... ... | ४६७ | ३४५ |
| ५८ ओतलेल्या लोखंडाचे खांब. ... ... ... ... ... | ४७० | ३७९ |
| ५९ पेंढा भरलेलें वांसरूं पुढें ठेवून गायीचें दूध काढणें. ... | ४७० | ३८६ |
| ६० रसाची ओतलेली मूर्ति. ... ... ... ... ... | ५०७ | २० |
| ६१ मोर्तबाची मुद्रा. ... ... ... ... ... ... | ,, | २७ |
| ६२ सोन्याला क्षाराचीं पुटें देऊन शुद्ध करणें.... ... ... ... | ५१४ | १५७ |
| ६३ नळीवरचा राघू. ... ... ... ... ... ... | ५२९ | ३९३ |
| ६४ सोळांच्या कसाहून पंधरांचा कस उणा. ... ... ... ... | ५७४ | १०८७ |
| ६५ कवच व खड्ग ... ... ... ... ... ... | ,, | १०७७।७८ |
| ६६ महाद्वारावरचा चौघडा. ... ... ... ... .... | ६०२ | १५३३ |
| ६७ चंदनाचे खोडे. ... ... ... ... ... ... | ५६२ | ८९८ |

## ४ शेतकीसंबंधी.

| | | |
|---|---|---|
| १ कोंडा आणि बीं. ... ... ... ... ... ... | ३२ | १३० |
| २ पेरण्याचें चाडें. ... ... ... ... ... ... | १४२ | ४९२ |
| ३ मुळ्यांतून धान्य काढणें. ... ... ... ... ... | १८४ | ३९ |
| ४ कोंड्यांतील धान्य. ... ... ... ... ... ... | १९१ | १३६ |
| ५ जमिनीची वाफ ... .... .... ... ... ... | २१९ | ५३१ |
| ६ बीज, खत व पीक. .... .... ... ... .... | ,, | ५३३ |
| ७ गुळाच्या ढेंपा व साखरेच्या ढेंपा सारख्याच. ... ... ... | २२२ | ३३ |
| ८ न नांगरतां जमीन पेरणें. ... ... ... ... ... | २५६ | १६२ |
| ९ जोंधळा, कणसें व दाणा. ... ... ... ... ... | ३९० | १२७ |
| १० द्राक्षीला दुधाचें खत. ... ... ... ... ... | ४४५ | ५०२ |
| ११ बीजाचें झाड, व झाडाचें बीज. ... ... ... ... | ४७८ | २५।२५ |
| १२ कणसांतील दाणा पडून उगवतो. ... ... ... ... | ५२१ | २५३ |
| १३ द्राक्षीच्या झाडाला दुधाचा रतीब. ... ... ... ... | ५४३ | ५९६ |

## किरकोळ, जनरीती, जनावरें वगैरेंची माहिती.

| | | |
|---|---|---|
| १ विधवेचा अपमान.... ... ... ... ... ... | ३८ | १९९ |
| २ पेजेचा दृष्टांत. .... ... ... .... .... .... | ५१ | ६४ |

| | पान. | ओंवी |
|---|---|---|
| ३ स्मशानांतील भुतें. | ६१ | ११३ |
| ४ अजागलस्तन. | ६३ | १४२ |
| ५ मातुकली. | ७१ | २४८ |
| ६ प्रतिध्वनि. | ७८ | ७५ |
| ७ ओंवाळणी. | ८१ | २४८ |
| ८ पाहुण्यास मेजवानी. | १०६ | २ |
| ९ ठाणवई. | १०७ | २३ |
| १० परीस व किमया. | ,, | ३३ |
| ११ आंगाभोंवतीं कोश बांधणारा किडा. | ११० | १७२ |
| १२ बागुलबावा. | १३२ | ३६२ |
| १३ पायाळ, अंजन व भूमींतील द्रव्य. | १३९ | ४५८ |
| १४ सोन्याच्या सुतांत ओंवलेले सोन्याचे मणि. | १४५ | ३२ |
| १५ मशालजी. | १४७ | ४८ |
| १६ उदकावर वाढलेली शेवाळ. | १४८ | ६० |
| १७ वाटमारे. | १५७ | १७४ |
| १८ खोटें नाणें, खरें नाणें. | १८४ | ४३ |
| १९ लोहचुंबक व लोखंड. | १९० | ११६ |
| २० कल्पतरूला बाभळ समजणें, (कल्पतरू रुया नव्हती बाभुळा ॥ तुकाराम). | १९२ | १४७ |
| २१ नीलमण्यांचा हार. | ,, | १४८ |
| २२ गारगोट्या. | ,, | ,, |
| २३ खैराचे निखारे. | ,, | १४९ |
| २४ शेराचे गुण; व अजागलस्तन. | १९४ | १७४ |
| २५ कांजी पिणें. | १९३ | १५१ |
| २६ सांवरीचें फळ. | १९४ | १७५ |
| २७ बोनें. | ,, | १८४ |
| २८ कुंपण व तोफखाना. | १९७ | २१३ |
| २९ निंबलोण उतरणें, कुरवंडी करणें. | २०८ | ३८१ |
| ३० वेतनें व सत्रें. | २१० | ३९१ |
| ३१ दागिने मागून आणणें. | २११ | ४१२ |
| ३२ हिंवराच्या सांवलीचा निषेध. | २१३ | ४३७ |
| ३३ कावळे निंबोण्या खातात. | ,, | ४३८ |
| ३४ मेजवानी व आमंत्रण. | २४६ | २ |
| ३५ लग्नसमारंभ, वऱ्हाडी अलंकार, पालखी. | ,, | ३ |
| ३६ सिंह विहिरींत घालून घेणार (पंचतंत्रांतील गोष्टीचा रोख). | २४९ | ५५ |
| ३७ सैन्याच्या वल्गना. | २७९ | ४६०।६९ |
| ३८ मुलाचें हट्टानें मागणें. | २८८ | ५८०।८१ |
| ३९ चिंतामणीला लाथ मारणें. (दृष्टांत.) | २९१।९२ | ६२४।२७ |
| ४० जन्माचा घाणेरेपणा. | ३४६ | ५३३ |

| | पान. | ओंवी. |
|---|---|---|
| ४१ वाळलेली काचरी. ... ... ... ... ... | ३४७ | ५५६ |
| ४२ उंटाचे गुडघे. ... ... ... ... ... ... | ,, | ५५८ |
| ४३ आषाढाच्या महिन्यांत पर्वतशिखरावरील लोंढे. ... ... ... | ,, | ५६८ |
| ४४ पिंजरा व राघू. ... ... ... ... ... ... | ३४८ | ५९९ |
| ४५ गाढवीपाठीमागें लागणारा कोडगा गाढव (एक ब्रह्मचारी गाढवा झोंबतां । मारूनियां लाता पळालें तें ॥ गाढवही गेलें । ब्रह्मचर्य गेलें । तोंड काळें झालें । जगामाजीं.—तुकाराम—) ... ... ... ... | ३५८ | ७०६ |
| ४६ रेड्याची झुंज. ... ... ... ... ... ... | ३६० | ७५६ |
| ४७ मूग खाऊन बसणें. ... ... ... ... ... | ३८४ | ११ |
| ४८ गळ्यांत नागर घालून भिक्षा मागणें. .... ... ... ... | ३८५ | ३२ |
| ४९ पेज घुसळणें. .... ... ... ... ... ... | ४५५ | १२५ |
| ५० मोहळ, मधमाशा, जळ, जळचरें. ... ... ... ... | ४५७ | १६३।६४ |
| ५१ सातनांग्यांची इंगळी. ... ... ... ... ... | ४६२ | २६० |
| ५२ उंटाचें वर्णन—सारेंच वांकडें. ... ... ... ... ... | ४६४ | २९३ |
| ५३ सर्पाच्या फणींतील मणी व सिंहाच्या नाकांतील केश.... ... ... | ४७८ | २४।२५ |
| ५४ माझें कांहीं नाहीं म्हणून आंग झाडणें. ... ... ... ... | ५०० | ३७२ |
| ५५ गोतांबिल (सर्वांनीं एका ताटांत जेवणें). ... ... ... | ४८६ | १६० |
| ५६ हौस आणि आंबोण. ... ... ... ... ... | ४८५ | १५४ |
| ५७ कोट्यवधि कल्प झाले तरी जात मोडत नाहीं. ... ... ... | ४८० | ५९ |
| ५८ कुत्र्याचें भक्ष्य. ... ... ... .... ... ... | ५४० | ५५३ |
| ५९ उकिरडा व स्मशान. ... ... ... ... ... | ५४६ | ६५० |
| ६० उकिरडा. ... ... ... ... ... .... | ५४८ | ६७० |
| ६१ वेश्या. ... ... ... ... ... ... .... | ,, | ६७२ |
| ६२ तिठ्यावरील जुगाराचें घर. ... ... ... ... .... | ,, | ६७३ |
| ६३ लुटारू भिल्लांचा गांव. ... ... ... ... ... | ,, | ६७४ |
| ६४ नीट पाहिल्यावांचून मोत्यें घेणें. ... ... ... ... | ५५० | ७२१ |
| ६५ लसणीची घाण. ... ... ... ... ... .... | ५५३ | ७५७ |
| ६६ पाटीवरचीं अक्षरें पुसणें. .... ... ... ... ... | ५७५ | १०९९ |
| ६७ भाट. .... ... ... ... ... ... ... | ३१६ | १६७२ |
| ६८ हत्तींचे कळपच्या कळप पाणी प्यावयास येतात. ... ... ... | ६१७ | १७१२ |

सुमारें ५०० वर्षांपूर्वी गोमांतकांतून (गोव्याहून) कांहीं महाराष्ट्रीय कुटुंबें-शेणवी, वाणी कुणबी-इत्यादि जातींचीं मलबारांत-कोची वगैरे ठिकाणीं जाऊन स्थाइक राहि-लीं आहेत. त्यांच्या मूळ मराठी भाषेंत आज तागाइत बदल झालेला दिसत नाहीं. त्या भाषेंत ज्ञानेश्वरींतील शब्द प्रचलित आहेत ते:—

१ भांगार=सुवर्ण, सोनें.
२ धू=वधू, मुलगी.
३ कांजी=पेज.
४ लेखा=हिशेब.
५ केर=उंट.
६ डोणी=होडी.
७ मशी=काजळ, शाई.
८ कुपी=बाटली.
९ मशी कुपी=दौत.
१० दाम=पैसा.
११ मोड धरणें=अभ्र येणें.
१२ आपै=बोलाव.
१३ तिंबणें=भिजणें.
१४ बके=बाजूला.
१५ अव्हासवा=अवाच्यासवा.
१६ पूत=मुलगा.
१७ पुती= मुलगी.
१८ गुर्विण=गर्भिणी.
१९ बळें=कुंपण.
२० आर=अजगर.
२१ सुणें=कुत्रें.
२२ नाट=घर.
२३ रुख=वृक्ष.
२४ वच=जा.
२५ बेली=कुंपण.
२६ हुडा=बुरूज.
२७ हळुवारपण=मृदुलता.
२८ सानुला=लहान. ( पुरुषाचें नांव असतें. )
२९ साद=शब्द.
३० सांदणें=सिद्ध होणें.
३१ सपूर=बारीक.
३२ शीस=शीर.
३३ वेच=खर्च.
३४ वेख=वेष.
३५ विकडी=चातुर्याचें भाषण.
३६ वाळणें=त्याग करणें.
३७ वास=वाट.
३८ मेचु=प्रीति.
३९ मुदी=मुद्रा.
४० भोंवरी=बुगडी.
४१ भुरें=पिसें.
४२ भिंगोरी=भोंवरा.
४३ भाष=भाषा.
४४ भाख=भाषा.
४५ भवणें=भ्रमण करणें.
४६ बोबाणणें=मोठ्यानें हाक मारणें.
४७ बिदी=मार्ग. (अर्थ निकाल, असाच होतो.)
४८ बहाळ=विस्तार.
४९ बाबुळी=शेवाळ.
५० बाप=श्रेष्ठ.
५१ पैल=पलीकडे.
५२ पेणें=मुक्काम.
५३ पिसें=वेड.
५४ पारी=आच्छादन, आंब्याची कोय.
५५ पाडा=खोंड.
५६ पाउठी=पायरी.
५७ पटा=अधिकार.
५८ निद=झोंप.
५९ तेतुला=तितका.
६० तूष=कोंडा.
६१ तुकणें=वजन करणें.
६२ डुडुळ=घुबड.
६३ ठाय=ठिकाण.
६४ झुंज=युद्ध.
६५ केतुलें=केवढें.
६६ कुडें-कुडा=वाईट.
६७ दुधी=भोपळा.
६८ चमक=जा, चल.

# ठळक राहिलेलीं अशुद्धें.

कचित् स्थळीं अल्पस्वल्प राहिलेले हस्तदोष, बहुधा वाचतांना संदर्भावरून ध्यानांत येतातच. ह्याकरितां, ते दुरुस्त करण्याच्या भरीस न पडतां, ठळक नजरेंत आलेलीं अशुद्धें येथें दाखल करितों.

| पान. | कालम. | ओळ. | असें आहे. | तेथें असें वाचावें. |
|---|---|---|---|---|
| १३७ | १ | ८ | ' युक्ताची ' | युक्तीची. |
| २१७ | १ | १५ | 'आणि त्रिशुद्धी' | निश्चयेंकरून. |
| २४१ | १ | १३ | ' असणारा जो ' | त्याच्या पुढें 'श्रीमंत'. |
| २७२ | १ | २४ | ' मरण्याला ' | मारण्याला. |
| ३३९ | २ | ७ | ' निर्मल गादी ' | ' निर्मल शेषरूप गादी '. |
| ५७६ | १ | २५ | ' माझें अज्ञान ' | 'माझ्या विषयींचें अज्ञान '. |

## श्रीनिवृत्तिनाथस्तव.

आर्या.

सद्योगगुणमणींची, ज्याच्या हृदयीं, सदा सुखनिवृत्ति, ।
तो मज दीना दासा देऊ, दावुनि पदा, सुख निवृत्ति. ॥ १ ॥

# श्रीज्ञानेश्वरस्तव.

( मोरोपंतकृत. )

आर्या.

श्रीविष्णुसा न तारी जन काय ज्ञानदेव वेगानें? ।
हा दे तें स्वर्गाच्या जनका यज्ञा न देववे गानें. ॥ १ ॥
यास्तव, या स्तवनार्हा स्तवितों, कवि तो नव्हे, यथाबुद्धि. ।
स्तविता भावें, देतो ज्ञानेश्वरविष्णु हा मनःशुद्धी ॥ २ ॥
ज्ञानेशा! भगवंता! भगवज्जनवल्लभा! महासदया! ।
कलियुगवर्ती जन जो, देशी, स्मरणेंचि, मुक्तिचें पद या. ॥ ३ ॥
त्वन्नाम महामंत्र ज्ञानप्रद होय; यासि जो भावें ।
जपतो, ज्ञान तयाचें, त्या जनकाचें तसेंचि, शोभावें. ॥ ४ ॥
कोणा जडा न होशिल सुगतिप्रद जाहलासि भिंतीतें. ।
श्रीरामाचें तैसें, तव यश सज्जनसमाज चिंती तें. ॥ ५ ॥
ज्ञानेशा! जें जाड्य, त्वत्तेजें क्षिप्र तें विरें; डाजो ।
खळमानसीं प्रताप; श्रुति वदला विप्र तेविं रेडा जो. ॥ ६ ॥
श्रीमद्भगवद्गीताव्याख्या केली जगासि ताराया ।
सारा या सद्ग्रंथा सेविति, संसारताप साराया. ॥ ७ ॥
श्रीहरिहरकीर्ति तशा बा! विश्वास प्रिया तुझ्या ओव्या ।
जो व्यास तोहि बहुधा ह्मणतो, 'श्रुतिशाचि या मला होव्या.' ॥ ८ ॥
ज्ञाता शिष्यासि ह्मणे, 'प्राकृत दिसतो, परंतु न तसा रे; ।
गोपप्रभुसा अमृतानुभव, तया पाहि सुजन जन सारे.' ॥ ९ ॥
ज्ञानेशा! त्वत्कृतितें करिती ज्ञाते समस्तही प्रणती. ।
ज्ञानेश्वरी भवानी होय महामोह महिष हे ह्मणती ॥ १० ॥
शंकर निवृत्ति, हरि! तूं ज्ञानेश, ब्रह्मदेव सोपान; ।
विद्या मुक्ता; तुमच्या कीर्तिसुधेचें सदा असो पान. ॥ ११ ॥
त्वां बहुजड उद्धरिले, प्रकट ज्ञानेश्वरा! दयालो! हें ।
तारीं मयूरहि; तुला परिसासि हिणाविजे न या लोहें. ॥ १२ ॥

---

# ज्ञानेश्वरीची अध्यायानुक्रमणिका.


| अध्याय. | विषयाचें नांव. | श्लोकसंख्या. | ओंवीसंख्या. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १ | अर्जुनविषाद. | ४७ | २७५ | ३ |
| २ | सांख्ययोग. | ७२ | ३७५ | २३ |
| ३ | कर्मयोग. | ४३ | २७६ | ५३ |
| ४ | ब्रह्मार्पणयोग. | ४२ | २२५ | ७३ |
| ५ | संन्यासयोग. | २९ | १८० | ९१ |
| ६ | अभ्यासयोग. | ४७ | ४९७ | १०५ |
| ७ | ज्ञानविज्ञानयोग. | ३० | २१० | १४३ |
| ८ | अक्षरब्रह्मयोग. | २८ | २७१ | १६० |
| ९ | राजविद्याराजगुह्ययोग. | ३४ | ५३५ | १८१ |
| १० | विभूतिविस्तारयोग. | ४२ | ३३५ | २२० |
| ११ | विश्वरूपदर्शनयोग. | ५५ | ७०८ | २४५ |
| १२ | भक्तियोग. | २० | २४७ | २९८ |
| १३ | क्षेत्रक्षेत्रज्ञयोग. | ३४ | ११७१ | ३१४ |
| १४ | गुणत्रयविभागयोग. | २७ | ४१६ | ३८३ |
| १५ | पुरुषोत्तमयोग. | २० | ५९९ | ४०९ |
| १६ | दैवासुरसंपद्विभागयोग. | २४ | ४७३ | ४४६ |
| १७ | श्रद्धात्रयविभागयोग. | २८ | ४३३ | ४७६ |
| १८ | मोक्षसंन्यासयोग. | ७८ | १८११ | ५०४ |
| | | ७०० | ९०३७ | |
| | एकंदर | | ९७३७ | |

## नमः परमात्मने ।

### मंगलम् ।

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी-
मंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥

प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ २ ॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ३ ॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ४ ॥

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय १ ला.

### श्रीगणेशाय नमः ॥

*ॐनमोजी आद्या[1] । वेदप्रतिपाद्या[2] । जय जय स्वसंवेद्या[3] आत्मरूपा ॥ १ ॥ देवा तूंचि गणेश । सकळमतिप्रकाश । ह्मणे निवृत्ति[4]दास । अवधारिजो[5] जी[6] ॥ २ ॥ हें शब्दब्रह्म[7] अशेष[8] । तेचि मूर्ति सुवेष[9] । तेथ वर्णवपु[10] निर्दोष । मिरवत असे ॥ ३ ॥ स्मृती तेचि अवयव । देखा आंगीक[11]भाव । तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥ ४ ॥ अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें[12] । पदपद्धती[13] खेवणें[14] । प्रमेयरत्नांचीं[15] ॥ ५ ॥ पदबंध[16] नागर[17] । तेंचि रंगथिलें[18] अंबर । जेथ साहित्य वाणें संपूर[19] । उजाळांचें[20] ॥ ६ ॥ देखा काव्यनाटका । जें निर्धारितां सकौतुका । त्याचि रुणझुणती क्षुद्र[21]घंटिका । अर्थध्वनि ॥ ७ ॥ नाना प्रमेयांची[22] परी । निपुणपणें पाहतां कुसरी । दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ॥ ८ ॥ जेथ व्यासादिकांची मती । तेचि मेखळा[23] मिरवती । चोखाळपणें[24] झळकती । पल्लेवसडका[25] ॥ ९ ॥ देखा षड्दर्शनें ह्मणिपती[26] । तेचि भुजांची आकृती । ह्मणऊनि विसंवाद[27] धरिती । आयुधें हातीं ॥ १० ॥ तरी तर्क तोचि परशु[28] । नीतिभेद अंकुशु । वेदान्त तो महारसु । मोदक मिरवे ॥ ११ ॥ एके हातीं दंत । जो स्वभावता खंडित । तो बौद्धमत[1]संकेत । वार्तिकांचा[2] ॥ १२ ॥ मग सहजें सत्कारवाद । तो पद्मकर वरद । धर्मप्रतिष्ठा तो सिद्ध । अभयहस्त ॥ १३ ॥ देखा विवेकवंत सुविमळ । तोचि शुंडादंड सरळ । जेथ परमानंद केवळ । महासुखाचा ॥ १४ ॥ तरी संवाद तोचि दशन । जो समताशुभ्रवर्ण । देव उन्मेष[3]सूक्ष्मेक्षण । विघ्नराज ॥ १५ ॥ मज अवगमलिया[4] दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं । बोधमदामृत मुनी । अली सेविती ॥ १६ ॥ प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ[5] । सरिसे एकवटती इभ- । मस्तकावरी ॥ १७ ॥ उपरि वेदोपनिषदें । जियें उदारज्ञानमकरंदें । तियें कुसुमें मुकुटीं सुगंधें । शोभती भलीं ॥ १८ ॥ अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल । मकार महामंडल । मस्तकाकारें ॥ १९ ॥ हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म[6] कवळलें । तें मियां श्रीगुरुकृपा[7] नमिलें । आदिबीज[8] ॥ २० ॥ आतां अभिनव[9] वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी । ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥ २१ ॥ मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु । ह्मणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकांवरी[10] ॥ २२ ॥ जैसें डोळ्यां अंजन[11] भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे । मग वांस[12] पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ॥ २३ ॥ कां चिंतामणी आलिया हातीं । सदां विजयवृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ती । ज्ञानदेव ह्मणे ॥ २४ ॥ ह्मणोनि जाणतेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे । जैसें मूळसिंचनें सहजें । शाखा पल्लव सं-

---

* ॐ हें परब्रह्मवाचक आहे. त्याबद्दलचें विवेचन सतराव्या अध्यायामध्यें फार चांगलें केलें आहे. ह्मणूनच तें बहुतेक मोठमोठाले आद्य कवि काव्यग्रंथाचा प्रारंभ ह्या मंगळाक्षरानें करतात. १ अनादि. २ वेदांनीं प्रतिपादन केलेला. ३ आपलें आपण जाणणाऱ्या. ४ ज्ञानदेव हे निवृत्तिनाथांचे कनिष्ठ बंधु असून शिष्य होते. ५ ऐकावें. ६ महाराज. ७ वेद. ८ सर्व, एकंदर. ९ उत्तम पोषाख. १० अक्षररूप देह. ११ शरीराचे. १२ रत्नखचित अलंकार. १३ शब्दांची ठेवण. १४ कोंदणें. १५ सिद्धांतरत्नांचीं. १६ शब्दरचना. १७ उत्तम. १८ उत्तम रंगविलेलें. १९ बारीक वीण. २० दीप्तीचे. २१ घुंगरूं. २२ अर्थाची, सिद्धांताची. २३ कफनी, वस्त्रविशेष, कडदोरा. २४ चकचकीतपणानें. २५ पदराचे सोगे. २६ ह्मणतात. २७ मतांतर. २८ परशु.

१ बौद्धमत खंडन करणारें. २ व्याससूत्रावरील वृत्तीचें व्याख्यान. ३ सूक्ष्मज्ञानरूप नयन. ४ वाटतात. ५ गंडस्थळें. ६ वेद. ७ श्रीगुरूच्या कृपेनें. ८ मूळरूप. ९ अपूर्व. १० विचारावर. ११ भूमिगत द्रव्य कोठें आहे तें दृष्टीस पडण्यासाठीं, पायाळूच्या डोळ्यांत घालण्यासाठीं एक विशेष प्रकारचें अंजन करतात तें. ( हा दृष्टांत ज्ञानेश्वरीमध्यें अनेक ठिकाणीं आढळतो, ह्यावरून त्या काळीं हा समज किंवा प्रघात दृढतर होता असें दिसतें.) १२ मार्ग.

तोषती ॥ २५ ॥ कां तीर्थे जियें त्रिभुवनीं । तियें घडती सं-मुद्रावगाहनीं । ना तरी अमृतरसस्वादनीं । रस सकळ॥२६॥ तैसा पुढतपुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरूचि । अ-भिलाषित मनोरुचि । पुरविता तो ॥ २७ ॥ आतां अवधारा कथा गहन । जे सकळ कथां जन्मस्थान । कीं अभिनव उ-द्यान । विवेकतरूचें ॥ २८ ॥ ना तरी सर्वसुखाची आदि । जे प्रमेयमहानिधी । नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ॥२९॥ कीं परमधाम प्रगट । सर्व विद्यांचें मूळपीठ । शास्त्रजातां वॅसौट । अशेषांचें ॥ ३० ॥ नातरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनाचें जिव्हार । लावण्यरत्नभांडार । शारदेचें ॥ ३१ ॥ नाना कथारूपें भारती । प्रगटली असे त्रिजगती । आविष्करोनि महामती । व्यासाचिये ॥ ३२ ॥ ह्मणोनि हा काव्यां रावो । ग्रंथगुरुवतीचा ठावो । एथूनि रसां झाला आंवो । रसाळप-णाचा ॥ ३३ ॥ तेवींचि आइका आणीक एक । एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक । आणि महाबोधीं कोंवळीक । दुणावली ॥३४॥ एथ चातुर्य शाहणें झालें । प्रमेयें रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥ ३५ ॥ माधुर्यी मधुरता । शृंगारीं सुरेखता । रूढपण उचितां । दिसलें भलें ॥ ३६ ॥ एथ कळाविदपण कळा । पुण्यासि प्रताप आगळा । ह्मणऊनि ज-नमेजयाचे अवलीळा । दोष हरले ॥ ३७ ॥ आणि पाहतां नावेक । रंगीं सुरंगतेची आगळिक । गुणां सगुणपणाचें बिक । बहुवस एथ ॥ ३८ ॥ भानुतेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें । तैसें व्यासमती कवळिलें । मिरवे विश्व॥३९॥ कां सुक्षेत्रीं बीज घातलें । तें आपलियापरी विस्तारिलें । तैसें भारती सुरवाडलें । अर्थजात ॥ ४० ॥ नातरी नगरांतरीं वसिजे । तरी नागरचि होइजे । तैसें व्यासोक्तितेजें । धवळत सकळ ॥ ४१ ॥ कीं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रगटे जैसी आगळी । अंगनाआंगीं ॥ ४२ ॥ ना तरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे । आदिलांपासोनि अपाडें । जियापरी ॥ ४३ ॥ नाना घनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण । मग अळंकारीं बरवेपण । निवाड दावी ॥ ४४ ॥ तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडे तें बरवेपण पातलें । तें जाणोनि आश्रयिलें । इतिहासीं ॥ ४५ ॥ नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं । सानीव धरूनि आंगीं । पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ॥ ४६ ॥ ह्मणऊनि महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं । येणें कारणें ह्मणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय ॥ ४७ ॥ ऐसी जगीं सुरस कथा । ते जन्मभूमि परमार्था । मुनि सांगे नृपनाथा । जनमेजया ॥ ४८ ॥ जें अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम । परम मंगळधाम । अवधारिजो ॥ ४९ ॥ आतां भारतकमळपराग गीताख्य प्रसंग । जो संवादला श्रीरंग । अर्जुनेसीं ॥ ५० ॥ ना तरी शब्दब्रह्माब्धि । मथियला व्यासबुद्धि । निवडिलें निरवधि । नवनीत हें ॥ ५१ ॥ मग ज्ञानाग्निसंपर्कें । कढसिलें विवेकें । पद आलें परिपाकें । आमोदासी ॥ ५२ ॥ जें अपेक्षिजे विरक्तीं । सदां अनुभविजे संतीं । सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥ ५३ ॥ जें आकर्णिजे भक्तीं । जें आदिवंद्य त्रिजगतीं । ते भीष्मपर्वी संगती । सांगिजेल ॥ ५४ ॥ जें भगवद्गीता ह्मणिजे । जें ब्रह्मेशांनीं प्रशंसिजे । जें सनकादिकीं सेविजे । आदरेसीं ॥ ५५ ॥ जैसें शारदींचिये चंद्रकळे । माजि अमृतकण कोंवळे । ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ॥५६॥ तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ॥ ५७ ॥ हे शब्देंवीण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोलाआदि झोंबिजे । प्रमेयांसी ॥ ५८ ॥ जैसे भ्रमर पराग नेती । परी कमळदळें नेणती । तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ॥ ५९ ॥ कां आपुला ठाय न सांडितां । आलिंगिजे चंद्र प्रगटतां । हा अनुराग भोगितां । कुमुदिनी जाणे ॥ ६० ॥ ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंतःकरणें । आथिला तोचि जाणे । मानूं इये ॥ ६१ ॥ अहो अर्जुनाचिये पांती । जे परिसणया योग्य होती । तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावें ॥ ६२ ॥ हें सलगी म्यां ह्मणीतलें । चरणां लागोनि विनविलें । प्रभू सखोल हृदय आपुलें । ह्मणूनियां ॥ ६३ ॥ जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा । तरी अधिकं तयाचा । संतोष आथी ॥ ६४ ॥ तैसा तुह्मीं मी अंगिकारिला । सज्जनीं आपुला ह्मणीतला । तरी उणें सहजें उपसाहला । प्रार्थू काई ॥ ६५ ॥ परी अपराध तो आणीक आहे । जें मी गीतार्थ कवळूं पाहें । तें अवधारा विनवूं लाहें । ह्मणऊनियां ॥ ६६ ॥ हें अनावर न विचारितां । वायांचि धिंवसा उपनला चित्ता । येरवीं काय भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ॥ ६७ ॥ कीं टिटिभू चांचुवरी । मांप सूये सागरीं । मी

१ समुद्रस्नानानें. २ पुन्हां पुन्हां. ३ सिद्धांतसमुद्र. ४ आश्रय. ५ जिव्हाळा. ६ शिरून. ७ ग्रंथाचा राजा. ८ थोरवी. ९ शोभा. १० सिद्धांत. ११ कुशलता. १२ लीलेनेंच. १३ क्षणेक. १४ सामर्थ्य. १५ फार. १६ तारुण्यामध्यें. १७ प्रथमपासून. १८ शेवटापर्यंत. १९ किंवा. २० गट, लगड. २१ स्पष्ट. २२ किंवा.

१ ऐकावें. २ अर्जुनावरोबर. ३ शब्दब्रह्मरूप समुद्र. ४ कढविलें. ५ सुवासाला. ६ शरदृतूंतल्या. ७ मृदुल. ८ चकोरपक्ष्यांचीं पिलें. ९ मवाळपणा. १० सिद्धांताला. ११ चंद्रविकासी कमलिनी. १२ श्रवण करण्याला. १३ क्षमा करण्याला. १४ मोठा. १५ धैर्य. १६ टिटवी. १७ चोचीनें. १८ मोजणी. १९ घातली.

नेणत त्यापरी । प्रवर्ते एथ ॥ ६८ ॥ आयका आकाश गिव-सावें । तरी आणीक त्याहूनि थोर होआवें । म्हणऊनि अपाड हें आघवें । निर्धारितां ॥ ६९ ॥ तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी । जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनी ॥ ७० ॥ तेथ हर म्हणे नेणिजे । देवी जैसें कां स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ॥ ७१ ॥ हा वेदार्थ सागर । जया निद्रिताचा घोर । तो स्वयें श्रीसर्वेश्वर । प्रत्यक्ष अनुवादला ॥ ७२ ॥ ऐसें जें अगाध । जेथ वेडावती वेद । तेथ अल्प मी मतिमंद । काय होय ॥ ७३ ॥ हें अपार कैसेनि कळावें । महातेज कवणें धवळावें । गमन मुठीं सुवावें । मशकें केवीं ॥ ७४ ॥ परी एथ असे एक आधारु । तेणेंचि बोलें मी सधरु । जें सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे ॥७५॥ येऱ्हवीं तरी मी मूर्ख । जरी जाहला अविवेक । तऱ्ही संत-कृपादीपक । सोज्वळ असे ॥ ७६ ॥ लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे । कां मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धि ॥ ७७ ॥ जरी प्रगटे सिद्धिसरस्वती । तऱ्ही मुकया आथि भारती । एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ॥७८॥ कां जयातें कामधेनु माय । तयासी अप्राप्य कांहीं आहे । म्हणऊनि मीं प्रवर्तों लाहें । ग्रंथीं इये ॥ ७९ ॥ तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करूनि घ्यावें हें तुमतें । विनवित असें ॥ ८० ॥ आतां देइजो अवधान । तुह्मी बोलविला मी बोलेन । जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ॥ ८१ ॥ तैसा मी अनुगृहीत । साधूंचा निरूपित । ते आपला अलंकारित । भलतयापरी ॥ ८२ ॥ तंव श्रीगुरु म्हणती राहीं । हें तुज बोलावें नलगे कांहीं । आतां ग्रंथा चित्त देईं । झडकरी वेगां ॥ ८३ ॥ या बोला निवृत्तिदास । पावूनि परम उल्हास । म्हणे परिसा मना अवकाश । देऊनियां ॥ ८४ ॥

हे मूळ, अनादि, वेदप्रतिपादित, ओंकाररूप परमेश्वरा! तुला नमस्कार असो. हे आपलें आपण जाणणाऱ्या आत्मस्वरूपा! तुझा जयजयकार असो. १

देवा! सकलबुद्धिप्रकाशास विकसित करणारा गणेश तूंच. कसा? तें निवृत्तिदास ज्ञानदेव कथन करीत आहे. तरी महाराज! कृपा करून हिकडे अवधान असावें. २ सर्व वेद हीच उत्कृष्ट मूर्ति; आणि त्यांतील पवित्र वर्णरचना हीच अंगकांति जाणावी. ३ स्मृति हे त्या शरीरास चलनवलन देणारे अवयव; आणि अर्थशोभा हेंच त्या लावण्याचें भांडार होय. ४ अठरा पुराणें हीं रत्नालंकार भूषणें; तत्त्वज्ञान हीं रत्नें, आणि पदपद्धति हीं त्यांचीं कोंदणें होत. ५ अत्युत्तम पदलालित्य हें भडक रंगाचें वस्त्र; आणि साहित्य हे त्यांत लखलखणारे भरजरीचे तंतु. ६ तशींच हीं काव्यनाटकें. जीं पाहिलीं असतां परम कौतुक वाटतें, तीं घुंगरूं होत. तीं रुणझुण रुणझुण वाजलीं म्हणजे मंजुळ प्रतिध्वनि प्रगट होतो. ७ तत्त्वज्ञानाचे नानाप्रकार, विचारपूर्वक अवलोकन केले असतां, त्यांत विलक्षण कौशल्य दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांतील एक एक पद इतकें योग्य आहे, कीं जणूं काय अप्रतिम रत्नेंच! ८ त्यांत व्यासादिकांचा बुद्धिप्रभाव म्हणजे एक भरजरीची मेखलाच; जिच्या पवित्र पदराच्या दशा पायघोळ सुटलेल्या आहेत. ९ आणखी पहा! ज्यांना षट्दर्शनें[1] असें म्हणतात, ते हात, आणि मतांतरें हीं त्यांतील आयुधें समजावीं. १० न्यायशास्त्र हा परशु; अर्थशास्त्र हा अंकुश; आणि महारसानें थबथबलेला वेदांत, मोदकाच्या ठिकाणीं शोभतो. ११ आतां एका हातांत मुळचाच मोडका एक दांत पाहिजे. तो व्याससूत्रावरील वृत्तीच्या व्याख्यानांतील 'बौद्धमतखंडन' हा होय. १२ तेव्हां अर्थात् वादाचा सत्कार हाच वरदहस्त; व धर्मप्रतिष्ठा हा अभयसूचक कर झाला. १३ तसेंच पहा! अति निर्मल विचार तोच सरळ शुंडादंड होय. जेथें महत्सुखाचा केवळ परमानंद दाटून राहिला आहे. १४ यावरून वाद हाच समतारूप शुभ्र वर्णाचा दांत; आणि सूक्ष्मज्ञानदृष्टि, हेच त्या विघ्नराज देवाचे नेत्र होत. १५ दोन्ही मीमांसा माझ्या मतें कर्णस्थानीं उत्तम शोभतील. बोधामृत हा गंडस्थळांतून निघणारा मदस्राव, आणि त्याचा रसास्वाद घेणारे मुनि, हे भ्रमर होत. १६ त-

१ अनुचित. २ विचार करतांना. ३ ध्यावें. ४ आधार. ५ धैर्य धरून.

[1] पातंजल, सांख्य, वैशेषिक, न्याय, मीमांसा, हीं सहा दर्शनें किंवा वेदांत "सौरं च वैष्णवं शाक्तं शैवं वैनायकं तथा । स्कांदे च शक्तिमार्गे च दर्शनानि षडेव हि."

स्वार्थ हेंच उत्तम रंगाचें पोंवळें. द्वैत आणि अद्वैत हीं दोन गंडस्थळें, गजमस्तकावर एकत्र झालीं आहेत. १७ तसेंच, ज्ञानमकरंदानें भरलेलीं उपनिषदरूपी सुवासिक पुष्पें मुकुटामध्यें फारच खुलतात. १८ अकार हें चरणयुग्म; उकार हेंच विशाळ उदर, आणि मकार हेंच मस्तकाकार महामंडल होय. १९ हीं तिन्हीं एकत्र झालीं, तेव्हां वेदांचा त्यांत समावेश झाला. त्या ओंकाररूपी आदिबीजास श्रीगुरुकृपेंकरून मी अभिवंदन करतों. २०

आतां चातुर्यार्थ कला देणारी वाणीची अपूर्व देवता जी सरस्वती, त्या अखिल जगास मोहून टाकणाऱ्या श्रीशारदेलाही मी नमस्कार करतों. २१

संसारमहापूरांतून तारून नेणारा श्रीसद्गुरु तर माझ्या हृदयांत आहे. ह्मणूनच विचारावर माझी भक्ति विशेष जडलेली असते. २२ नेत्रांत अंजन घातलें ह्मणजे दृष्टीला जसे फांटे फुटतात, आणि पाहिजे तेथून भूमिगत द्रव्याचा सांठा दिसूं लागतो; २३ किंवा चिंतामणि हातांत आला असतां, इच्छित मनोरथ जसे सफल होत जातात, त्याप्रमाणें ज्ञानदेव ह्मणतात 'मी निवृत्तिदास सदा पूर्णकाम आहें.' २४ ह्मणून ज्ञात्यानें नित्य गुरूचें भजन करावें. तेणेंकरून कृतार्थता प्राप्त होईल. कारण, झाडाचें मूळ शिंपलें कीं शाखापल्लवांस सहजच संतोष होतो. २५ किंवा समुद्रस्नान केलें असतां, त्रिभुवनांत जेवढीं ह्मणून तीर्थें आहेत, तितक्या सर्वांचें श्रेय प्राप्त होतें; अथवा अमृतरस चाखून पाहिला, तर त्यांत सर्व रसांचा अंतर्भाव होतो. २६ हेंच मनांत आणून श्रीगुरूंस मी पुनः पुनः अभिवंदन करतों. कारण, तो इच्छित मनोरथ पुरविणारा आहे. २७

आतां सर्व कथांची केवळ जन्मभूमीच; किंवा विचारतरुवरांचा अपूर्व बागच; अशी एक गहन कथा श्रवण करावी. २८ ही कथा ह्मणजे सर्व सुखांचें आदिस्थान; तत्त्वार्थसिद्धांताचें भांडार, अथवा नवरसामृताचा भरलेला समुद्रच ह्मटलें तरी शोभेल. २९ किंवा हें प्रत्यक्ष परमधाम; सर्व विद्यांचें मूळपीठ; आणि हरएक शास्त्रांचा आधार होय. ३० किंवा सकल धर्मांचें माहेरघर; सज्जनांचा जीवप्राण; आणि शारदेच्या लावण्यरत्नांचें भांडार. ३१ साक्षात् सरस्वती, व्यासाच्या बुद्धींत संचार करून विविधकथारूपानें त्रिजगतामध्यें प्रगट झाली आहे. ३२ ह्मणून हें काव्य सर्व काव्यांचा राजा; ग्रंथांतील श्रेष्ठ ग्रंथ; प्रत्येक रसाला रसाळपणाची शोभा देणारें उत्तम स्थान. ३३ त्याचप्रमाणें आणखी एक गोष्ट श्रवण करा. उत्तम शास्त्रांची शब्दशोभा, व सत्योपदेशांतील कोमलता येथूनच विस्तार पावली आहे. ३४ चातुर्य येथेंच शहाणें झालें, तत्त्वार्थाला येथेंच गोडी चढली, आणि सुखाचें सौभाग्य येथेंच वृद्धि पावलें. ३५ ह्याच्यांतील रुचींत माधुर्य, शृंगारांत सुरेखपणा आणि योग्यतेंत प्रौढी हींच दिसून येतात. ३६ कलांना येथेंच कौशल्य प्राप्त झालें आहे. ह्यांतील पुण्याचा पराक्रम फार अपूर्व आहे. ह्मणूनच जनमेजयाचे दोष सहज नाश पावले. ३७ आणखी जों जों ह्यांत पाहूं लागावें, तों तों प्रत्येक रंगाची कळा चढतीच दिसूं लागते. प्रत्येक गुणामध्यें सद्गुणाचें सामर्थ्य अधिक अधिकच आढळून येतें. ३८ सूर्याच्या प्रभेनें त्रैलोक्य प्रकाशमान झालें ह्मणजे तें जसें सुप्रभ दिसतें, त्याप्रमाणें व्यासाच्या बुद्धीनें हें विश्व व्यापल्यामुळें फार शोभिवंत दिसत आहे. ३९ किंवा उत्तम शेतांत बीं पेरलें, ह्मणजे त्या जातीच्या पिकानें तें शेत भरून जातें; तद्वत् भारतामध्यें विविधार्थसमुच्चयाचें पीक घनदाट भरून राहिलें आहे. ४० किंवा नगरांत जाऊन राहिलें ह्मणजे सहजच चातुर्य प्राप्त होतें, त्याप्रमाणें व्यासोक्तीच्या तेजानें सर्व कांहीं सतेज होतें. ४१ किंवा तारुण्य प्राप्त झालें ह्मणजे स्त्रियेच्या अंगीं

जशी लावण्यशोभा विशेष प्रगट होते, ४२ किंवा वसंत ऋतु प्राप्त झाला ह्मणजे उद्यानाची शोभा पहिल्यापेक्षां अधिक वाढते; ४३ सोन्याची नुसती लगड पाहिली तर साधारणच दिसते, पण तिचेच अलंकार केले कीं, तीस कांहीं निराळीच शोभा प्राप्त होते; ४४ त्याप्रमाणें व्यासोक्तीही अलंकृत झालेली आहे; मनाप्रमाणें तिच्यांत सौजन्य आलें आहे. हें मनांत आणूनच इतिहासानें तिचा आश्रय केला. ४५ किंवा आपला पूर्ण विकास व्हावा ह्मणून पुराणेंही लघुरूप धारण करून आख्यानरूपानें भारतांत शिरून जगांत प्रगट झालीं आहेत. ४६ ह्मणून महाभारतांत नाहीं, असें त्रैलोक्यांतही कांहीं नाहीं. 'हें सर्व जगत्त्रय व्यासोच्छिष्ट आहे' असें ह्मणतात, ह्याचें कारण तरी हेंच. ४७ अशा प्रकारची जगतामध्यें जी सुरस कथा, आणि परमार्थाची तर केवळ जन्मभूमि, ती जनमेजय राजाला वैशंपायन ऋषींनीं सांगितली. ४८ ती कथा फार उत्तम, केवळ अद्वितीय, अत्यंत पवित्र, जिला दुसरी उपमाच नाहीं; अशी असून परम कल्याणकारक आहे. ह्यास्तव श्रवण करावी. ४९ आतां, भारत हें एक कमळ आहे असें मानलें तर, श्रीकृष्णांनीं अर्जुनास प्रतिपादन केलेला 'गीता' नामक प्रसंग, हा त्यांतील पराग-मकरंद-होय. ५० किंवा व्यासबुद्धीनें वेदरूपी महासागर घुसळून, त्यांतील हें गीतारूप अपरंपार नवनीत काढलें, ५१ आणि मग त्यास ज्ञानरूपी अग्नि लावून विचारानें कढविलें, तेव्हां तें परिपक्व होऊन स्वादास चढलें. ५२ इतकें कीं, विरक्तांनीं सुद्धां ज्याची अपेक्षा करावी; साधूंनीं ज्याचा निरंतर अनुभव घ्यावा; आणि अहंभाव सोडलेल्यांनीं सुद्धां जेथें रममाण व्हावें. ५३ भक्तीनें श्रवण करण्यास योग्य, त्रिजगताला परमपूज्य असें जें भीष्मपर्व, त्यांत हा गीतारूपी संवाद सांगितला आहे. ५४ ह्या संवादाला 'भगवद्गीता' असें ह्मणतात. ब्रह्मदेवांनीं व शंकरांनीं तिची स्तुति करावी; आणि सनकादिकांनीं आदरपूर्वक तिचें सेवन करावें, अशी तिची योग्यता आहे. ५५ ज्याप्रमाणें शरद्ऋतूंतील चांदण्यांत चंद्रकलांतर्गत अमृताचे कोमल रजःकण, जमिनीवर राहणाऱ्या चातक पक्ष्यांचीं पिलें मृदुल चित्तानें ग्रहण करतात, ५६ त्याप्रमाणें, श्रोत्यांनीं आपल्या मनास अत्यंत मृदुलत्व आणून ह्या कथेचा रसास्वाद ग्रहण करावा. ५७ ही शब्दाशिवाय बोलावी; इंद्रियांना न समजतां तिचा उपभोग घ्यावा; आणि शब्दोच्चारापूर्वीच तत्त्वार्थाला गांठ घालावी. ५८ ज्याप्रमाणें भ्रमर हे कमळांतील पराग हरण करून नेतात, परंतु कमळांच्या पाकळ्यांना ती गोष्ट समजत नाहीं. त्याप्रमाणें ह्या ग्रंथाची सेवनपद्धति आहे. ५९ किंवा आपलें स्थळ न सोडतां, चंद्रोदय होतांच त्यास प्रीतीनें आलिंगन देणें हें प्रेमसुख चंद्रविकासी कमलिनीसच माहित असतें; ६० तद्वत् गंभीरपणानें आपलीं अंतःकरणें ज्यांनीं स्थिर केलीं आहेत, त्या भाग्यवंतांसच या ग्रंथाची योग्यता कळेल. ६१ तरी, अर्जुनाच्या पंक्तीस बसून हें गीतामृत प्राशन करण्यास जे योग्य असतील, त्या सज्जनांनीं कृपा करून हिकडे अवधान द्यावें. ६२ प्रभो! आपलें अंतःकरण फार खोल आहे, हें जाणून केवळ लडिवाळपणानें चरणांपाशीं ही विनंती करीत आहें. ६३ मूल बोबड्या बोलानें बोललें तरी, त्या भाषणानें मातापितरांस प्रमोद होणें, हा जसा त्यांचा स्वभावधर्म पडला, ६४ त्याप्रमाणें आपणही माझा अंगीकार केलेला आहे; आणि सज्जनांनीं मला 'आपलें' ह्मटलें आहे. तेव्हां स्वभावगत्या जें उणें पडेल त्याबद्दल क्षमा असावी ह्मणून प्रार्थना तरी कशाला? ६५ पण मी गीतार्थाचें आकलन करूं पहातों, आणि तो श्रवण करा, ह्मणून विनंती करण्याचें धाडस करतों, हा अपराध फार मोठा आहे. ६६ हें काम मला झेंपणें कठीण, ह्या गोष्टीचा विचार

न करितां, उगाच चित्तांत धैर्य धरलें आहे. बाकी सूर्यप्रकाशांत काजव्याची शोभा ती काय? ६७ टिटवीनें आपल्या चोंचीच्या टोंकानें समुद्राची मोजदात करण्यासारखेंच हें माझें अज्ञानपणाचें कृत्य होय. ६८ आणखी ऐका! आकाशास गवसणी करण्याचें मनांत आणलें, तर ती गवसणी आकाशापेक्षांही थोर असली पाहिजे. ह्याचा विचार केला ह्मणजे, निश्चयेंकरून हें सारें अशक्यच दिसतें. ६९ "ह्या गीतार्थाची थोरवी तरी केवढी आहे?" ह्मणून मोठ्या विस्मित अंतःकरणानें भवानीनें शंकरास प्रश्न केला होता. तेव्हां ती त्यांनीं तीस निवेदन केली. ७० शंकर ह्मणाले "देवी! तुझें स्वरूप नित्य नवें असल्यामुळें, त्याचा जसा अंत लागत नाहीं, त्याप्रमाणें गीतातत्त्वही नित्य नवें असल्यामुळें त्याचाही अंत नाहीं." ७१ ज्याच्या योगनिद्रेच्या घोरण्यापासून वेदार्थसमुद्र उत्पन्न झाला, त्या प्रत्यक्ष श्रीसर्वेश्वरानेंच तें प्रतिपादन केलें आहे. ७२ तें इतकें गहन, कीं वेदांनींही ज्याच्या पुढें मौनव्रत धारण केलें. तेथें मी तर यःकश्चित् मनुष्य; बुद्धीनें जड; माझा पाड काय? ७३ ज्याला अंतपार नाहीं, त्याचा ठाव कसा लागावा? महत्तेजाला उजळा देणार कोण? मशकानें गगनास मुठींत धरावें कसें? ७४ पण येथें एक आधार आहे. त्यामुळें मी समर्थ आहें असें ह्मणतों. तो आधार कोणता ह्मणाल तर, ज्ञानदेव ह्मणतात कीं "श्रीगुरूची अनुकूलता हा." ७५ येऱ्हवीं पाहूं गेलें, तर मी मूर्ख; मजकडून जरी अविचार घडला, तरी संतकृपादीप लखलखीत आहे. ७६ लोखंडाचें सुवर्ण करणें, हें सामर्थ्य परिसामध्येंच आहे. किंवा अमृतसिद्धि झाली, तर मृत मनुष्यही जिवंत होतो. ७७ सिद्धि सरस्वती प्रसन्न झाल्या तर मुक्यालाही वाणी फुटते. ही सर्व वस्तुसामर्थ्याची शक्ति आहे. त्यांत आश्चर्य तें कोणतें? ७८ किंवा ज्याची माताच कामधेनु आहे, त्यास मिळणार नाहीं, अशी वस्तु कोणती? ह्मणून मीही ह्या ग्रंथरचनेस प्रवृत्त होण्याचें धाडस करतों. ७९ तर, ह्यांत न्यून असेल तें पुरतें करून घ्यावें; अधिक असेल तें त्याज्य करावें; येवढी आपणांस विनंती आहे. ८० आतां लक्ष्य द्यावें. आपण प्रेरणा कराल तर मी बोलेन. कळसूत्र नाचवावें, तसें बाहुलें नाचतें. ८१ तद्वत् मी साधूंचा अनुगृहित असून जासुदगिरी करणारा आहें. 'आपला' ह्मटला, कीं ते त्याला पाहिजे त्या प्रकारें भूषणीभूत करतील. ८२ तेव्हां श्रीगुरु ह्मणाले "थांब. हें तुला बोलून दाखविण्याची गरज नाहीं. तर तूं आतां त्वरा कर, आणि ग्रंथरचनेकडे लक्ष्य दे." ८३ हें भाषण ऐकून निवृत्तिदासास–ज्ञानदेवास–परम उल्हास प्राप्त झाला आणि ते ह्मणाले कीं "तर आतां मनाला स्थिर करून श्रवण करा." ८४

धृतराष्ट्र उवाच–

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

तरी पुत्रस्नेहें मोहित। [ धृतराष्ट्र उवाच ] धृतराष्ट्र असे पुसत। ह्मणे संजया सांगें मात। [ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे ] कुरुक्षेत्रींची ॥ ८५ ॥ जें धर्मालय ह्मणिजे। [ मामकाः पांडवाश्चैव ] तेथ पांडव आणि माझे। [ समवेता युयुत्सवः ] गेले असती व्याजें। झुंझाचेनि ॥ ८६ ॥ [किमकुर्वत संजय]तरी तिहीं येतुला अवसरीं। काय किजत असे येरयेरीं। तें झडकरी कथन करीं। मजप्रती ॥ ८७ ॥

पुत्रप्रेमानें मोहित होऊन धृतराष्ट्र संजयास विचारितो, कीं "हे संजया! कुरुक्षेत्रांतील वृत्तांत सांग. ८५ कुरुक्षेत्र ह्मणजे धर्माचें केवळ घर. तेथें युद्धाच्या निमित्तानें माझे आणि पंडूचे पुत्र गेले आहेत. ८६ त्या परस्परांनीं इतक्या वेळांत काय काय केलें, तें मला शीघ्र कथन कर." ८७

१ वृत्तांत. २ निमित्तानें. ३ इतक्या. ४ परस्परांनीं.

संजय उवाच.

दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥
पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

[संजय उवाच–पांडवानीकं व्यूढं] तिये वेळीं तो संजय बोले । ह्मणे पांडवसैन्य उंचललें । जैसें महाप्रलयीं पसरलें । कृतांतमुख ॥ ८८ ॥ तैसें तें घनदाट । उठावलें एकवाट । जैसें उसळलें काळकूट । धरी कवण ॥ ८९ ॥ नातरी वडवानल सादुकेला । प्रलयवातें पोखला । सागर शोषूनि उधवला । अंबरासी ॥ ९० ॥ तैसें दळ दुर्धर । नानाव्यूहीं परिकर । अवगमलें भयासुर । तिये काळीं ॥ ९१ ॥ [दुर्योधनस्तदा दृष्ट्वा तु] तें देखोनि दुर्योधनें । अव्हेरिलें कवणें मानें । जैसें न गणिजे पंचाननें । गजघटांतें ॥ ९२ ॥ [आचार्यमित्यर्धं] मग द्रोणापासीं आला । तयातें ह्मणे हा [पश्येत्यर्धं] देखिला । कैसा दळभार उचलला । पांडवांचा ॥ ९३ ॥ गिरिदुर्ग जैसें चालतें । [व्यूढमित्यर्धं] तैसे विविध व्यूह भंवते । रचिले आथि बुद्धिमतें । द्रुपदकुमरें ॥ ९४ ॥ जो कां तुह्मीं शिष्य आपुला । विद्या देऊनि कुरुठा केला । तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला । देखदेख ॥ ९५ ॥

तेव्हां संजयानें सांगण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला "राजा! पांडवांचें सैन्य असें कांहीं खवळून गेलें होतें कीं, जणों काय महाप्रळयांतलें काळाचें तोंडच पसरलें आहे! ८८ तें घनदाट सैन्य एकदम जेव्हां चालून आलें, तेव्हां असें वाटलें कीं, समुद्रमंथनसमयीं गगनचुंबित उसळलेलें हें कालकूट विषच आहे! त्याचें शमन करणार कोण? ८९ किंवा प्रलयवातानें वडवानल भडकून सागरास शोषून तो गगनास लागावा, ९० त्याप्रमाणें तें सैन्य परमदुःसह; नानाव्यूहरचनेनें सिद्ध असल्यामुळें, त्या समयीं फारच भयंकर दिसूं लागलें. ९१ तें दुर्योधनानें पाहून, सिंह जशी गजसमुदायाची गणना करीत नाहीं, तद्वत् ती सेना त्यानें तुच्छ मानिली. ९२ आणि द्रोणापाशीं येऊन त्यास ह्मणतो 'आचार्य! हा पांडवांचा सैन्यभार कसा तयार होऊन आला आहे, पाहिलात ना! ९३ त्याच्या सभोंवार रचलेले नानाप्रकारचे व्यूह, ह्यांकडे पाहिलें ह्मणजे हे डोंगरी किल्लेच चालून येत आहेत कीं काय, असें वाटतें. ही रचना, द्रुपदाचा बुद्धिवान् पुत्र याणें केली. ९४ अहो! तो तुमचाच शिष्य. तुह्मींच विद्या देऊन त्याला शहाणा केला; त्यानेंच हा सैन्यसमुद्र कसा पसरला आहे, तो पहा पहा तर खरा!' ९५

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥

[अत्र शूरा इत्यर्धं] आणीकही असाधारण । जे शस्त्रास्त्रीं प्रवीण । क्षात्रधर्मी निपुण । वीर आहाती ॥ ९६ ॥ जे बळें प्रौढी पौरुषें । भीमार्जुनासारिखे । ते सांगेन कौतुकें । प्रसंगेंची ॥ ९७ ॥ [युयुधान इत्युत्तरार्धं] एथ युयुधान सुभट । आला असे विराट । महारथी श्रेष्ठ । द्रुपद वीर ॥ ९८ ॥

'ह्याशिवाय आणखी मोठमोठे, शस्त्रास्त्रांत प्रवीण; क्षत्रियधर्मांत निपुण असेही योद्धे आहेत. ९६ जे बळानें, प्रौढीनें आणि पुरुषार्थानें भीमार्जुनांची बरोबरी करणारे, त्यांचींही प्रसंगानुसार कौतुकानें नांवें सांगतों. ९७ हा येथें युयुधान योद्धा. विराटही आलेला आहे. द्रुपदवीर तर श्रेष्ठ महारथी. ९८'

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।
पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥
युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् ।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

[धृष्टकेतुरिति । स्पष्टमन्यत्] चेकितान धृष्टकेतु । काशीराज विक्रांतु । उत्तमौजा नृपनाथु । शैब्य देख ॥ ९९ ॥ हा कुंतिभोज पाहें । एथ युधामन्यु आला आहे । आणि पुरुजितादि राय हे । सकळ देख ॥ १०० ॥ हा सुभद्राहृदयनंदन । जो अपर नवार्जुन । तो अभिमन्यु ह्मणे दुर्योधन । देखें द्रोणा ॥ १ ॥ आणीकही द्रौपदीकुमर । हे सकळही महारथी वीर । मिती नेणिजे परि अपार । मीनले असती ॥ २ ॥

'तसेंच हे पहा! चेकितान, धृष्टकेतु, पराक्रमी काशिराजा, राजा उत्तमौजा, आणि

१ खवळलें. २ पेटला. ३ भटकला. ४ लागला. ५ रचलेलें. ६ वाटलें. ७ गजसमुदायाला. ८ पर्वतांचे किल्ले. ९ शहाणा, निष्णात.

१ जमलेले आहेत.

शैब्य. ९९ हा कुंतिभोज पहा; हा येथें युधामन्यु आलेला आहे; आणि हे पुरुजित् आदिकरून सर्व राजेही अवलोकन करा.' १०० दुर्योधन पुन्हा म्हणतो 'द्रोणाचार्य! हा सुभद्रेच्या हृदयास आनंद देणारा अभिमन्यु. हाही सामान्य नव्हे. पराक्रमांत प्रतिअर्जुन! नव्हे सवाई अर्जुन! हा पहा तर खरा. १ तसेंच हे आणखी द्रौपदीचे पुत्र. हे सारेच महारथी वीर आहेत. ह्यांशिवाय आणखी पुष्कळ योद्धे जमलेले आहेत. त्यांची गणना कोण करणार? यांचा अंतच नाहीं.' २

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च॥ ८ ॥

[अस्माकमिति] आतां आमुच्या दळीं नायक । जे रूढ वीर सैनिक । ते प्रसंगें आइक । सांगिजती ॥ ३ ॥ [संज्ञार्थमिति] उद्देशें एक दोनी । जायिजती बोलोनी । [भवानित्यर्ध] तुम्ही आदिकरूनी । मुख्य जे जे ॥ ४ ॥ हा भीष्म गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु । रिपुगजपंचाननु । कर्ण वीर ॥ ५ ॥ एकेकाचेनि मनोव्यापारें । हें विश्व होय संहरे। हा कृपाचार्य न पुरे । एकलाचि ॥ ६ ॥ [अश्वत्थामेत्यर्ध] एथ विकर्ण वीर आहे । हा अश्वत्थामा पैल पाहें । याचा अडेंदर सदां वाहे । कृतांत मनीं ॥७॥ समितिंजय सौमदत्ति।

'आतां ओघानुसार आमच्या सैन्यांतील सेनापति व मुख्य मुख्य वीर कोण कोण आहेत तेंही सांगतों. ३ फक्त दिग्दर्शनासाठीं म्हणूनच आपण आदिकरून जे जे योद्धे आहेत, त्यांपैकीं श्रेष्ठश्रेष्ठांचीं नांवें सांगतों. ४ हा गंगेचा पुत्र भीष्म; प्रतापतेजाचा केवळ दिनकरच; तसाच हा कर्णवीर; शत्रुरूप गजांना केवळ सिंहासारखा. ५ ह्या एकेकाच्या संकल्पमात्रानेंच विश्वाचा संहार व्हावयाचा. हा कृपाचार्य तर एकटाच साऱ्यांना पुरून उरेल. ६ हा येथें विकर्णवीर आहे. तो पलीकडे अश्वत्थामा आहे, तो पहा. प्रत्यक्ष यम सुद्धां रात्रंदिवस मनामध्यें ज्याचा धाक वहात असतो. ७ समितिंजय, सोमदत्ति,–'

१ उत्पन्न होतें आणि त्याचा संहार होतो. २ धाक.

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

[अन्येच बहवः शूराः] ऐसे आणीकही बहुत आहाती । जयांचिया बळा मिती । धाताही नेणे ॥ ८ ॥ [नानाशस्त्रप्रहरणाः] जे शस्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त । हो कां जें अस्त्रजात । एथूनि रूढ ॥ ९ ॥ हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रताप आंगीं । [मदर्थे त्यक्तजीविताः] परी सर्व प्राणें मजविलागीं । आरोपिले असती ॥ ११० ॥ पतिव्रतेचें हृदय जैसें । पतिवांचूनि न स्पर्शे । मी सर्वस्व यां तैसें । सुभटांसी ॥ ११ ॥ आमुचिया काजाचेनि पाडें । देखती आपुलें जीवित्व थोकडें । ऐसे निरवधि चोखडे । स्वामिभक्त ॥ १२ ॥ [सर्वे युद्धविशारदाः] झुंझती कुळकैणी जाणती । कळे कीर्तीसी जिती । हें बहु असो क्षात्रनीती । एथोनियां ॥ १३ ॥ ऐसे सर्वांपरी पुरते । वीर दळीं आमुतें । आतां काय गणूं यांतें । अपार हे ॥ १४ ॥

'असेच आणखीही पुष्कळ आहेत. ज्यांच्या बळाचा अंत ब्रह्मदेवाला सुद्धां लागावयाचा नाहीं. ८ शस्त्रविद्येमध्यें जे निपुण; मंत्राचे साक्षात् अवतार; आणि अस्त्रांचें उगमस्थान. ९ जगांत कोणी प्रतिस्पर्धी नाहीं, असा ज्यांच्या आंगांत पराक्रम; परंतु ते केवळ माझ्यासाठीं प्राण देण्यासही सिद्ध झाले आहेत. ११० जसें पतिव्रतेचें हृदय पतिवांचून इतरत्र स्पर्श सुद्धां करीत नाहीं; पति हेंच तिचें दैवत. त्याप्रमाणें ह्या महायोद्ध्यांना सर्वस्व काय तें मीच असें वाटतें. ११ माझ्या कार्याच्या योग्यतेपेक्षां, त्यांस आपले प्राणही कमी वाटतात. इतके निस्सीम आणि कट्टे स्वामिभक्त. १२ युद्धांतील चातुर्य जाणणारे; स्वकौशल्यानें, कीर्तीस जिंकून आणणारे; फार काय सांगावें? क्षत्रियांचा धर्म कोणता, तो ह्यांच्यापासून शिकून घ्यावा. १३ असे सर्व गुणांनीं संपन्न आमच्या सैन्यांतील वीर, किती म्हणून वर्णन करावेत? असंख्यात आहेत.' १४

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥१०॥

१ आहेत. २ मूर्तिमंत. ३ प्रत्येक अस्त्र. ४ उत्पन्न झाले. ५ अर्पण केले आहेत. ६ लहान. ७ चातुर्य. ८ कौशल्यानें.

[तदिति] वरी क्षमियांमाजी श्रेष्ठ। जो जगजेठी जगीं सुभट। तया दळवैपणाचा पाट। भीष्मासि पैं ॥ १५ ॥ आतां याचेनि बळें गवसलें। हें दुर्ग जैसें पन्नासिलें। येणें पाँडें थेंकुलें। लोकत्रय ॥ १६ ॥ [पर्याप्तं तु] आधींच समुद्र पाहीं। तेथ दुर्वाडपण कवणा नाहीं। मग वडवानळ तैसेयांही। विरजा जैसा ॥ १७ ॥ नातरी प्रलयवन्हि महावात। या दोघां जैसा सांघात। तैसा हा गंगासुत। सेनापति ॥ १८ ॥ आतां येणेंसीं कवण भिडे। [अपर्याप्तं] हें पांडवसैन्य कीर थोकडें। वेंचिलेनि पाडें। दिसत असे ॥ १९ ॥ [इदमिति] वरी भीमसेन बेथु। तो जाहला असे सेनानाथु। ऐसें बोलोनियां मातु। सांडिली तेणें ॥ १२० ॥

**'आणि जगामध्यें जो सुप्रसिद्ध जगद्योद्धा; इंद्रियनिग्रहांत अग्रगण्य; अशा भीष्माकडे तर सर्व सैन्याचें आधिपत्य आहे. १५ आतां हें किल्ल्याप्रमाणें रचना केलेलें सैन्य ह्याच्या सत्तेखालीं आहे. त्याच्या योग्यतेपेक्षां त्रैलोक्य सुद्धां लहान! १६ आधीं समुद्र म्हटला म्हणजे कोणाला दुस्तर नाहीं? त्यांत त्याला हा आणखी वडवानलासारखा साह्यकर्ता. १७ किंवा प्रळयाग्नीचा आणि महावाताचा जसा जोड जमावा, तसा हा आमच्या सेनेला भीष्माचार्य सेनापति मिळाला आहे. १८ आतां यांच्याशीं युद्ध करणार कोण? ह्या सांगितलेल्या आमच्या सैन्याशीं तुलना करून पाहिलें तर, त्यापुढें हें पांडवांचें सैन्य, खरोखरच फार थोडें आहे. १९ आणि त्याच्या वरचा सेनापति तो जवान भीमसेन!' इतकें भाषण करून दुर्योधन स्तब्ध राहिला. २०**

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः।
भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥ ११ ॥

[अयनेष्विति] मग पुनरपि काय बोले। सकल सैनिकांतें म्हणितलें। आतां दळभार आपुलाले। सैरसे करा ॥ २१ ॥ [यथाभागमवस्थिता इति] जया जिया अक्षौहिणी। तेणें तिया ओरणी। वर्गण कवणकवणी। महारथिया ॥ २२ ॥ तेणें तिया आवरिजे। भीष्मातळीं राहिजे। [भवंतः सर्वे एव हीति] द्रोणातें म्हणे पाहिजे। तुम्ही सकळ ॥ २३ ॥ [भीष्ममेवाभिरक्षंतु] हाचि एक रक्षावा। मी तैसा हा देखावा। येणें दळभार आघवा। सांच आमुचा ॥ २४ ॥

**नंतर सकलसेनानायकाकडे वळून पुन्हां म्हणतो 'अरे! आपआपलें सैन्य सिद्ध असूं द्या. २१ ज्यांच्या हाताखालीं जितक्या अक्षौहिणी असतील, त्यांनीं तितक्याही युद्धांत आणून ज्या महारथ्याचा जो विभाग असेल, त्या विभागावर अधिकार चालवून भीष्माच्या आज्ञेखालीं रहावें. २२ द्रोणाचार्य! तुम्ही ही सर्व व्यवस्था पहावी. २३ सर्वांनीं मिळून ह्या भीष्माचें संरक्षण करावें. मी तसा तो असें मानावें. तरच आमचें सैन्य सत्यनिष्ठ खरें.' २४**

तस्य संजनयन् हर्षं कुरुवृद्धः पितामहः।
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

[तस्येत्यर्धे] या राजयाचिया बोला। सेनापति संतोषला। [सिंहनादं विनद्योच्चैः] मग तेणें केला। सिंहनाद ॥ २५ ॥ तो गाजत असे अद्भुत। दोहीं सैन्यांआंत। प्रतिध्वनि न समांत। उपजत असे ॥ २६ ॥ तयाचि तुलगासवें। वीरवृत्तीचेनि थावें। [शंखं दध्मौ] दिव्य शंख भीष्मदेवें। आस्फुरिला ॥ २७ ॥ ते दोन्ही नाद मिनले। तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें। जैसें आकाश कां पडिलें। तुटोनियां ॥ २८ ॥ घडघडीत अंबर। उचंबळत सागर। क्षोभलें चराचर। कांपत असे ॥ २९ ॥ तेणें महाघोषगजरें। दुमदुमिताती गिरिकंदरें। तंव दळामाजि रणतुरें। आस्फुरिलीं ॥ १३० ॥

**हें राजाचें भाषण ऐकून सेनापति भीष्मास आनंद झाला. आणि त्यांनीं सिंहनाद केला. २५ त्याची गर्जना फार अद्भुत झाली. त्याचा प्रतिध्वनि दोन्ही सैन्यांत न राहतां बाहेर फुटून निघाला. २६ त्या प्रतिध्वनीबरोबर वीरवृत्तीसही स्फुरण येऊन भीष्मदेवांनीं दिव्य शंख वाजविला. २७ ते दोन्ही नाद एकत्र झाल्यामुळें त्रैलोक्य बधिरीभूत होऊन गेलें. जणों**

१ इंद्रियनिग्रहामध्यें. २ सेनापत्याचा. ३ पदाभिषेक, अधिकार. ४ आच्छादिलें. ५ किल्ले. ६ रचलें. ७ योग्यतेला. ८ थोडें. ९ दुर्घटपणा. १० असल्याला सुद्धां. ११ साह्यकर्ता. १२ संयोग. १३ वर सांगितलेल्या आमच्या सैन्याच्या मानानें. १४ ज्वान, बळकट. १५ एकत्र, सज्ज. १६. २१८७० रथ, तितकेच हत्ती, हत्तीच्या तिप्पट घोडे, पांचपट पायदळ= २१८७००. १७ युद्धस्थानीं. १८ वांटणी, वर्गणी. १९ दहाहजार योद्ध्यांशीं एक युद्ध करणारा.

१ भीष्माच्या आज्ञेखालीं. २ पहावें, दक्षता ठेवावी. ३ सारा. ४ खरा, सत्यनिष्ठ. ५ भीष्माचार्य. ६ सिंहासारखा शब्द-गर्जना. ७ राहीना. ८ प्रतिध्वनीबरोबर. ९ बळानें. १० मिळाले. ११ पर्वतांच्या गुहा. १२ रणवाद्यें.

काय आकाशच तुटून पडलें, असा भास झाला. २८ आकाश गडगडूं लागलें; समुद्र खवळला; आणि स्थावर जंगम खडबडून कांपूं लागलें. २९ त्या महाघोषाच्या नादानें, पर्वताच्या गुहा सुद्धां दणाणून गेल्या. इतकें होत आहे, तों सैन्यांतील रणवाद्यांची एकच घाई उडाली. ३०

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यंत स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥१३॥

[ततः शंखाश्चेति] उदंड सैंघ वाजतें । भयानकें खाखातें। महाप्रळय जेथें । धोकंडांसीं ॥ ३१ ॥ भेरी निशाण मांदेळ । शंख काहळा भोंगळें । [सहसैवेति] आणि भयासुर रणकोल्हाळ । सुभटांचे ॥ ३२ ॥ आवेशें भुजा त्राहाटिती । विसणेले हांका देती । जेथ महामद भद्रजाती । आवरती ना ॥ ३३ ॥ तेथ भेडांची कवण मात । कांचेया केर फिटत । जेणें दचकला कृतांत । आंग नेघे ॥ ३४ ॥ एकां उभयांचि प्राण गेले । चांगांचे दांत बैसले । बिरुदाचे दोंदुले । हिंवें ताती ॥ ३५ ॥ [सशब्दस्तुमुलोऽभवदिति] ऐसा अद्भुत तुरंबबाळ । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळ । देव ह्मणती प्रळयकाळ। वोढवला आजि ॥ ३६ ॥

नानाप्रकारचीं भयंकर व कर्कश वाद्यें एकसारखीं झडूं लागलेलीं पाहून, बळवंतांस सुद्धां महाप्रळय असें वाटलें. ३१ नौबती, ध्वज, डंका, शंख, झांजा, तुताऱ्या यांचा दणदणाट, आणि त्यांतच मोठमोठ्या योद्ध्यांच्या आरोळ्या; यामुळें तेथें त्या समयीं एकच रणकल्लोळ माजून राहिला. ३२ कोणी खाड खाड दंड थोपटूं लागले; कोणी पुढें घुसून हाका मारूं लागले. मदोन्मत्त हत्ती चवताळून निघाले, ते तर कोणासच आवरेनात. ३३ अशा प्रसंगीं भित्र्यांची दशा काय विचारावी? लेचेपेचे होते ते तर केरासारखे उडाले. तो अनर्थ पाहून यम सुद्धां मनांत दचकला. त्याची सुद्धां पुढें येण्याची छाती होईना. ३४ कोणाचे उभ्याउभ्याच प्राण गेले! चांगले धट्टेकट्टे होते, त्यांची तेथच्या तेथेंच दांतखिळी बसली. मी मी ह्मणविणारांचे सुद्धां पाय लटपटले. ३५ इतका तो वाद्यध्वनि भेसुर होता. तो ऐकून ब्रह्मदेवाच्या पोटांत सुद्धां धडकी भरली. देव तर 'आज प्रळयकाळ ओढवला' असें ह्मणाले. ३६

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।
माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥१४॥
पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ।
पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥१५॥
अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

[तत इति] ऐसी स्वर्गीं मात । देखोनि तो आकांत । तंव पांडवदळाआंत । वर्तलें कायी ॥ ३७ ॥ [श्वेतैर्हयैर्युक्ते] हो कां निजसार विजयाचें । कीं तें भांडार महातेजाचें । जेथ गरुडाचिये जोवळिचे । कांतले चाऱ्ही ॥ ३८ ॥ [महति स्यंदने इति] कीं पाखांचा मेरु जैसा । रहंवर मिरवतसे तैसा । तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ॥ ३९ ॥ [माधवः पांडवश्चैव] जेथ अश्ववाहक आपण । वैकुंठींचा राणा जाण । तया रथाचे गुण । काय वर्णूं ॥ १४० ॥ ध्वजस्तंभावरी वानर । तो मूर्तिमंत शंकर । सारथी शार्ङ्गधर । अर्जुनेंसी ॥४१॥ देखा नवल तया प्रभूचें । अद्भुत प्रेम भक्ताचें । जें सारथ्यपण पार्थाचें । करीत असे ॥ ४२ ॥ [पांचजन्यं हृषीकेशः] पाइके पाठिसीं घातला । आपण पुढां राहिला । तेणें पांचजन्य आस्फुरिला । अवलीळाचि ॥ ४३ ॥ परी तो महाघोष थोर। गर्जत असे गंहिरे । जैसा उदेला लोपी दिनकर । नक्षत्रांतें ॥ ४४ ॥ तैसे तुरंबबोळ भवते । कौरवदळीं गाजत होते । ते हारपोनि नेणों केउते । गेले तेथ ॥ ४५ ॥ [देवदत्तं धनंजयः] तैसाचि देखें येरें । निनादें अति गजरें । देवदत्त धनुर्धरें । आस्फुरिला ॥ ४६ ॥ ते दोनी शब्द अचाट। मिनले एकवट । तेथ ब्रह्मकटाह शतकूट । हों पाहत असे ॥ ४७ ॥ [पौंड्रं दध्मौ इत्यर्थं] तंव भीमसेन विसणेला । जैसा महाकाळ खवळला । तेणें पौंड्र आस्फुरिला । महाशंख ॥४८॥ तो महाप्रळयजलधर। जैसा गडगडित गंहिरे । [अनंतविजयमित्यर्थं] तंव अनंतविजय युधिष्ठिर । आस्फुरितें असे ॥ ४९ ॥ [न-

१ पुष्कळ प्रकारचीं वाद्यें. २ कर्कश. ३ बलवंतानां सुद्धां. ४ रणभेरी. ५ एकप्रकारचें वाद्य. ६ झांज. ७ तुतारी. ८ थोपटूं लागले. ९ सरसावून. (आवेशानें.) १० हत्ती. ११ भित्र्यांची. १२ कचे–प्राकृत–तर पाचोळ्यासारखे उडाले. १३ उभ्याउभ्याच. १४ बाणेदारांमध्यें. १५ श्रेष्ठ. १६ कांपूं लागले. १७ वाद्यध्वनि.

१ जणों काय. २ बरोबरी करणारे. ३ जोडलेले. ४ रथ. ५ अर्जुनासह. ६ सेवक, भक्त. ७ वाजविला. ८ सहज. ९ गंभीर. १० वाद्य. ११ गजर. १२ एकत्र झाले. १३ शतधा. १४ आवेशास चढला. १५ शंखाचें नांव. १६ शंखविशेष.

कुलः सहदेवश्चेत्यर्धं] नकुळें सुघोषें[1] । सहदेवें मणिपुष्पक[2] । जेणें नादें अंतक[3] । गजबला[4] ठाके ॥ १५० ॥

तो आकांत पाहून स्वर्गलोकांत तर अशी धांदल उडाली. आतां इकडे पांडवसैन्यांत काय झालें तें ऐका. ३७ जणों काय जयश्रीचें सार; किंवा महत्तेजाचें भांडार; गरुडाची बरोबरी करणारे असे चार अश्व जोडलेला ३८ रथ तर, असा कांहीं शोभत होता कीं, जणों काय पंख फुटलेला मेरुपर्वतच. त्याच्या तेजानें दाही दिशा भरून राहिल्या होत्या. ३९ अहो! ज्या रथाचे घोडे हांकणारा साक्षात् वैकुंठींचा राजा कृष्ण; त्या रथाच्या गुणांचें वर्णन काय करावें? १४० ध्वजस्तंभावर **मारुति** रुद्राचा अवतार, आणि **श्रीकृष्ण भगवान्** ज्या **अर्जुनाचा** सारथी! ४१ अहो काय त्या प्रभूचें आश्चर्य! आणि केवढें हो भक्ताचें प्रेम! कीं त्यासाठीं ज्यानें पार्थाचें सारथ्य कि हो पत्करलें! ४२ सेवकास पाठीशीं घातलें; आपण पुढें झाला; आणि रीतीप्रमाणें पांचजन्य नांवाचा शंख वाजविला. ४३ तो शब्द इतका खणखणीत व गंभीर होता कीं, सूर्योदय झाला ह्मणजे नक्षत्रें जशीं लोपून जातात, ४४ तद्वत् सभोंवतीं कौरवांच्या सैन्यांत जे वाद्यघोष माजून राहिले होते, ते कोठें लुप्त झाले कोण जाणे? ४५ तसाच दुसरा, ज्याचा नाद अतिशय मोठा असा, देवदत्त नांवाचा शंख **अर्जुनानें** वाजविला. ४६ ते दोन्ही भयप्रद शब्द जेव्हां एकत्र झाले, तेव्हां असें वाटलें कीं, ह्या ब्रह्मांडाचे आज शतशः तुकडे होतात कीं काय? ४७ हें पाहून **भीमालाही** स्फुरण चढलें. आणि तोही काळाप्रमाणें खवळून त्यानेंही भला मोठा, पौंड्र नांवाचा शंख वाजविला. ४८ त्याचा प्रळयकाळाच्या मेघांतील गडगडाटाप्रमाणें भयंकर शब्द उठला. इतक्यांत **धर्मराजानेंही** अनंतविजय नांवाचा शंख फुंकला. ४९ तसेंच **नकुळानें** सुघोष, व **सहदेवानें** मणिपुष्पक शंख वाजविला. त्याच्या नादानें यम सुद्धां अगदीं घाबरून गेला. १५०

काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥१७॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक् पृथक् १८
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥१९॥

[काश्यश्चेति] तेथ भूपती होते अनेक । द्रुपद द्रौपदेयादिक । हा काशीपति देख । महाबाहू ॥ ५१ ॥ [सौभद्रश्चेति] तेथ अर्जुनाचा सुत । [सात्यकिश्चापराजितः] सात्यकि अपराजित[1] । [धृष्टद्युम्नः] धृष्टद्युम्न नृपनाथ । [शिखंडी चेति] शिखंडी हन ॥ ५२ ॥ [विराटश्च] विराटादि नृपवर । जे सैनिक मुख्य वीर । [शंखान्दध्मुः पृथक् पृथक्] तिहीं नानाशंख निरंतर । आस्फुरिले ॥ ५३ ॥ [स घोषः–तुमुल इति] तेणें महाघोषनिर्घातें[2] । [नभश्च पृथिवीं चैव] शेष कूर्म अवचितें । गजबजोनि भूभारातें[3] । सांडूं पाहाति ॥ ५४ ॥ तेथ तिन्ही लोक डळमळित । मेरु मांदार आंदोलित[4] । समुद्रजळ उसळत । कैलासवेरी[5] ॥ ५५ ॥ पृथ्वीतळ उलथों पाहात । आकाश असे आसुडत[6] । तेथ सडा होत । नक्षत्रांचा ॥ ५६ ॥ सृष्टि गेलीरे गेली । देवां मोकळवादी[7] जाहली । ऐसी एक टाळी पिटिली । सत्यलोकीं ॥ ५७ ॥ दिहाची दिन थोकला[8] । जैसा प्रळयकाळ मांडला । तैसा हाहाकार जाहाला । तिहीं लोकीं ॥ ५८ ॥ तें देखोनि आदिपुरुष[10] विस्मित । ह्मणे ह्मणें होय पां अंत । मग लोपिला[9] अद्भुत । संभ्रम तो ॥५९॥ ह्मणोनि विश्व सांवरलें । एऱ्हवीं युगान्त होतें वोडवलें । जैं महाशंख आस्फुरिले । कृष्णादिकीं ॥ १६० ॥ तो घोष तरी उपसंहरला । [व्यनुनादयन्] परी पडिसाद[11] होता राहिला । [धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्] तेणें दळभार विध्वंसिला । कौरवांचा ॥ ६१ ॥ जैसा गजघटांआंत[12] । सिंहलीला विदारित । तैसा हृदयांतें भेदित । कौरवांचिया ॥ ६२ ॥ तो गाजत जंव आइकती । तंव उभेचि हियें[13] घालिती । एकमेकांतें ह्मणती । सावध रे सावध ॥ ६३ ॥

तेथें **द्रुपद, द्रौपदेय** आदिकरून अनेक राजे

---

१ शंखाचें नांव. २ शंखविशेष. ३ यम. ४ गडबडून गेला.

१ पराजय न होणारा–विजयशाली. २ धक्कधानें. ३ टाकून देण्याच्या बेतांत आले. ४ हालूं लागला, डळमळला. ५ कैलासापर्यंत. ६ हालूं लागलें. ७ निराधार. ८ दिवसाढवळ्या. ९ लुप्त झाला. १० ब्रह्मदेव. ११ प्रतिध्वनि. १२ हत्तींच्या समुदायांत. १३ हातपाय गळूं लागले.

होते. महाबाहु काशीपतिही होता. ५१ अर्जुनाचा पुत्र, अजिंक्य असा सात्यकी, राजा धृष्टद्युम्न, तसाच शिखंडी, ५२ विराटादि राजे आणि सेनेंतील मुख्य मुख्य वीर, ह्यांनींही मग अनेक शंख वाजविले. ५३ त्यांच्या प्रचंड गजरानें शेष व कूर्म एकाएकीं दचकून, पृथ्वीला फेंकून देतात कीं काय असें वाटलें. ५४ त्या वेळीं तिन्ही लोकांस धक्का बसला; मेरु, मांदार डळमळूं लागले, समुद्राचें जळ उचंबळून तें कैलासास भिडलें! ५५ पृथ्वी उपडी होते कीं काय, आकाश कोसळतें कीं काय असें वाटूं लागलें. नक्षत्रांचा तर केवळ सडा झाला. ५६ "सृष्टि गेली हो गेली! देवा! तिला आतां कोणाचाच आश्रय उरला नाहीं" अशी सत्यलोकामध्यें एकच टाळी पडली. ५७ दिवसाढवळया सूर्य दिसेनासा झाला. अशा प्रकारचा प्रळयकाळ प्राप्त झाल्यामुळें, तिन्ही लोकांमध्यें एकच हाहाःकार उडून गेला! ५८ तें पाहून ब्रह्मदेवालाही फार आश्चर्य वाटलें! आणि न जाणों, अशा अनर्थानें कदाचित् विश्वाचा अंत सुद्धां होईल असें मनांत आणून आलेला अपूर्व आवेश त्यांनीं आवरून धरिला, ५९ ह्मणून ब्रह्मांड वांचलें. नाहीं तर कृष्णादिकांनीं मोठमोठाले शंख वाजविले तेव्हां, युगांताचाच समय येऊन ठेपला होता. १६० तो शब्द नाहींसा झाला खरा; परंतु त्याचा पडसाद बाकी राहिला होता, तेवढ्यानेंच कौरवसैन्याची अगदीं दुर्दशा उडाली. ६१ सिंहानें हत्तींच्या कळपांत शिरून यत्किंचित् लीला केली तरी सुद्धां त्यांचीं हृदयें जशीं फाटून जातात, त्याप्रमाणें ह्या शंखध्वनीनें कौरवांचीं हृदयें फाटून गेलीं. ६२ ती गर्जना कानावर पडतांच, उभे होते त्यांचे तेथल्या तेथेंच हातपाय गळून गेले. आणि एकमेकांस ह्मणूं लागले "अरे! सावध रे सावध!" ६३

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥ २० ॥

[ अथ व्यवस्थितानिति ] तेथ वळप्रौढी पुरते । महारथी वीर होते । तिहीं पुनरपि दळातें । आवरिलें ॥ ६४ ॥ मग सरिसेपणें उठावले । दुणवटोनि उचलले । तया दंडीं क्षोभलें । लोकत्रय ॥ ६५ ॥ [ प्रवृत्ते शस्त्रसंपाते ] तेथ बाणवरी धनुर्धर । वर्षताती निरंतर । जैसे प्रळयांत जलधर । अनिवार कां ॥ ६६ ॥ [ दृष्ट्वा ] ते देखिलिया अर्जुनें । संतोष घेऊनि मनें । मग संभ्रमें सेने । दिठी घालीतसे ॥ ६७ ॥ [ व्यवस्थितान्-धार्तराष्ट्रान् ] तंव संग्रामीं सज्ज जाहले । सकळ कौरव देखिले । [ धनुरुद्यम्य पांडवः ] तंव लीला धनुष्य उचलिलें । पांडुकुमरें ॥ ६८ ॥

त्यांत बलाढ्य असे जे महारथी वीर होते, त्यांनीं पुन्हां सेनेला धीर दिला. ६४ तेव्हां ते एक जुटीनें पुढें सरसावले आणि दोहींकडून एकदम उचल झाली. त्या सैन्याच्या योगानें तिन्ही लोक त्रस्त होऊन गेले. ६५ प्रळयकाळीं जशी अनिवार मेघवृष्टि होते, त्याप्रमाणें सारे वीर बाणावर बाण सोडूं लागले. ६६ तें पाहून अर्जुनाच्या मनास फार संतोष झाला. आणि त्यानें आदरपूर्वक सेनेवर नजर टाकली. ६७ संग्रामामध्यें सकळ कौरव तयार होऊन राहिले आहेत, असें पाहून पंडुपुत्रानेंही मग सहज धनुष्य उचलून हातांत घेतलें. ६८

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।

अर्जुन उवाच–

सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥

[ हृषीकेशमिति ] ते वेळीं अर्जुन ह्मणतसे देवा । आतां झडकरी रथ पेलावा । [ सेनयोरिति ] नेऊनि मध्यें घालावा । दोहीं दळां ॥ ६९ ॥

आणि अर्जुन ह्मणाला "देवा! हा रथ शीघ्र चालवून दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं ने पाहूं." ६९

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥ २२ ॥
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

[ यावदेतानित्यर्धं ] जंव मी नावेक । हे सकळ वीर सैनिक । न्याहाळीन अशेखें । झुंजते जे ॥१७०॥ [ य एतेऽत्र

१ धीर दिला. २ एका जुटीनें. ३ सरसावले. ४ दुप्पट जोरानें. ५ त्या सैन्यानें. ६ आदरानें. ७ न्यावा. ८ क्षणेक. ९ सारे, एकून एक. १० युद्ध करणारे.

समागताः ] एथ आले असती आघवे । [ कैर्मयेत्यर्ध ] परी कवणेंसीं म्यां झुंझावें । हें रणीं लागे पहावें । ह्मणुनियां ॥७१॥ [ धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः ] बहुतकरूनि कौरव । हे आतुर दुःस्वभाव । वांटिवोंवीण हांव । बांधिती झुंझीं ॥७२॥ [ योत्स्यमानानवेक्षेऽहं ] झुंझाची आवडी धरिती । परी संग्रामीं धीरें[3] नव्हती । हें सांगोनि रायाप्रती । काय संजयो ह्मणे ॥ ७३ ॥

**"ह्मणजे युद्ध करणारे वीर कोण कोण आहेत ते सारे मी क्षणभर पाहीन तरी. १७० सारेच येथें आलेले आहेत. पण मला रणामध्यें युद्ध करण्याचा प्रसंग कोणकोणाशीं येणार, तें पहाणें अवश्य आहे. ७१ कौरव हे बहुतकरून दुष्ट स्वभावाचे असून उतावळे आहेत. पराक्रमावांचून युद्धाचा आव घालतात. ७२ ह्यांना युद्धाची हौस मोठी; परंतु रणांत टिकाव धरतील तर शपथ." इतकें राजा धृतराष्ट्रास सांगून संजय ह्मणतो. ७३**

संजय उवाच–

एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥२४॥

[ एवमित्यर्धं ] आइका अर्जुन इतुकें बोलिला । [सेनयोरिति] तंव श्रीकृष्णें रथ पेलिलों । दोहीं सैन्यांमाजि केला । उभा तेणें ॥ ७४ ॥

**राजा, श्रवण कर. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अर्जुन बोलला मात्र; तोंच श्रीकृष्णानें रथ नेऊन दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं उभा केला. ७४**

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ।
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥२५॥
तत्रापश्यत् स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा २६
श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।
तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंधूनवस्थितान् २७

[ भीष्मेत्यर्धं ] जेथ भीष्मद्रोणादिक । जवेंळिकेचि सन्मुख । पृथिवीपति आणिक । बहु आहांती ॥ ७५ ॥ तेथ स्थिर करूनियां रथ । अर्जुन असे पाहत । तो दळभार समस्त । संभ्रमेंसीं ॥ ७६ ॥ [ उवाचेति ] मग देवा ह्मणे देख देख । हे गोत्र गुरु अशेख । तंव कृष्णा मनीं नावेकें । विस्मो जाहला ॥ ७७ ॥ तो आपणयां आपण ह्मणे । एथ कायी कवण जाणे । हें मनीं धरिलें येणें । परी कांहीं आश्चर्य असे ॥७८॥ ऐसी पुढील से[1] घेत । तो सहजें जाणे हृदयस्थ । परि उगा असे निवांत । तिये वेळीं ॥ ७९ ॥ [ तत्रेत्यर्धं ] तंव तेथ पार्थ सकळ । पितृ पितामह केवळ । [आचार्यानिति] गुरु बंधु मातुळ । देखता जाहला ॥ १८० ॥ इष्ट मित्र आपुले । कुमर जन देखिले । हे सकळ असती आले । तयांमाजी ॥ ८१ ॥ [ श्वशुरानिति ] सुहृज्जन सासरे । [ सर्वानिति ] आणीकही सखे सोइरे । कुमर पौत्र धनुर्धरें । देखिले तेथ ॥ ८२ ॥ जयां उपकार होते केले । कीं आपदीं[2] जे रक्षिले । हें असो वडिल धाकुले । आदिकरूनी ॥ ८३ ॥ [ सेनयोरिति ] ऐसें [3]गोत्रचि दोहीं दळीं । उदितें[4] जालें असे कळीं[5] । [ तानिति ] हें अर्जुनें तियेवेळीं । अवलोकिलें ॥ ८४ ॥

**भीष्मद्रोणादिक, नातेवाईक व अनेक राजे समोरच उभे आहेत; ७५ अशा ठिकाणीं रथ स्थिर होतांच, अर्जुन मोठ्या विस्मयानें सर्व सेना अवलोकन करूं लागला. ७६ आणि ह्मणाला, "देवा पहा पहा! अहो! हे सारे आमचे वडिलांसारखे भाऊबंद!" हें ऐकून कृष्णालाही क्षणभर आश्चर्य वाटलें. ७७ तो आपणाशींच ह्मणाला "हें काय आहे कोण जाणे? असें ज्या अर्थी ह्याच्या मनांत आलें, त्या अर्थी ह्यांत कांहीं तरी विलक्षण असावें." ७८ इतक्यांत त्यास पुढील गोष्टीचीही आठवण झाली. आणि मनोगत सहज समजला. पण त्या वेळीं तो उगी राहिला. कांहीं बोलला नाहीं. ७९ अर्जुन सैन्याकडे पहातच होता. त्यास आजे, पणजे, प्रत्यक्ष गुरु, बंधु व मामाही दृष्टीस पडले. १८० त्यानें पाहिलें तों आपले इष्ट, मित्र, पुत्र, सगळेच आले आहेत. ८१ मित्र, सासरे, सखे, सोयरे, आणखी पुत्र, पौत्र हेच सारे अर्जुनानें पाहिले. ८२ ज्यांनीं उपकार केले होते, संकटसमयीं रक्षण केलें होतें, असे वडील व धाकटे आदिकरून, ८३ दोन्ही सैन्यांमध्यें आपलेच भाऊबंद कलह करण्यास उद्युक्त झाले आहेत, हें जेव्हां अर्जुनानें पाहिलें. ८४**

कृपया परयाऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

[ कृपया परयाऽविष्टः ] तेथ मनीं गजबज जाहली । आणि

१ उतावळे. २ पराक्रमावांचून. ३ टिकणारे. ४ नेला. ५ नातेवाईक. ६ आहेत. ७ क्षणभर. ८ विस्मय.

१ आठवण, स्मृति. २ संकटकालीं. ३ भाउबंद. ४ उद्युक्त झालेले. ५ कलहास. ६ चलबिचल.

आपैसी कृपा उपजली । तेणें अपमानें निघाली । वीरवृत्ति ॥८५॥ जिया उत्तमकुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथि । तियो आनिकीतें न साहती । सुतेजंपणें ॥ ८६ ॥ नविये आवडी-चेनि भरें । कामुक निजवनिता विसरे । मग पाडेंवीण अनुसरे । भ्रमला जैसा ॥ ८७ ॥ कीं तपोबळें ऋद्धी । पातलिया भ्रंशे बुद्धी । मग तया विरक्तासिद्धी । नाठवे ती ॥ ८८ ॥ तैसें अर्जुना तेथ जाहालें । असतें पुरुषत्व गेलें । जें अंतः-करण दिधलें । कारुण्यासी ॥ ८९ ॥ देखा मंत्रज्ञ बरळे जाय । तेथ कां जैसा संचार होय । तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला ॥ १९० ॥ म्हणऊनि असता धीर गेला । हृदया द्रव आला । जैसा चंद्रें कळीं शिवतला । सोमकांत ॥ ९१ ॥ तयापरी पार्थ । अतिस्नेहें मोहित । [ विषीदन्निदमब्रवीत् ] मग सखेद असे बोलत । श्रीअच्युतेसीं ॥ ९२ ॥

**तेव्हां त्याच्या मनाची चलविचल होऊन साहजिक दया उत्पन्न झाली. दयेचा पगडा बसला तेव्हां, तिच्याशीं विरोधवृत्तीनें राहणारी जी शूरवृत्ति, तिला अपमान झाला असें वाटून अर्थातच तिनें आपला पाय काढून घेतला. ८५ ज्या स्त्रिया उत्तम कुळांत जन्मतात, लावण्यांनीं व गुणांनीं युक्त असतात, त्यांना एकमेकींचा वरचढपणा सहन होत नाहीं. ८६ नव्या प्रेमाच्या भरांत विषयलंपट पुरुष, स्वतःच्या स्त्रीला सुद्धां विसरून जातो, आणि भ्रांतिष्टासारखा योग्यायोग्यतेचाही विचार न करतां तशा कामास प्रवृत्त होतो. ८७ किंवा तपोबळानें संपत्ति प्राप्त झाली, तरीही बुद्धीला भ्रंश होतो आणि वैराग्याची आठवण सुद्धां होत नाहीं. ८८ अर्जुनाचीही तशीच अवस्था झाली. अंतःकरण ममतेला अर्पण केल्यामुळें असलेलें पुरुषत्व नाहींसें झालें. ८९ जसा एखादा मांत्रिक, मंत्रोच्चारांत चुकला म्हणजे त्याच्याच आंगांत संचार होऊन भ्रमिष्ठ होतो, त्याप्रमाणें महामोहानें अर्जुनासही ग्रासून टाकलें. १९० असलेला धीर निघून गेला आणि सोमकांतशिळेला चंद्रकिरणांचा स्पर्श होतांच जसा पाझर सुटतो, ९१ त्याप्रमाणें अर्जुनाच्या मनांतही अनिवार स्नेह उत्पन्न झाल्यामुळें, त्याच्याही हृदयास पाझर फुटला आणि अतिशय दुःखाकुल अंतःकरणानें त्यानें श्रीकृष्णाशीं बोलण्यास प्रारंभ केला. ९२**

१ सहज. २ करुणा, दया. ३ ज्या. (स्त्रिया.) ४ संपन्न. ५ त्या. ६ दुसरीचे. ७ वरचढपणा. ८ नव्या. ९ विषयलंपट. १० योग्यतेचा विचार न करतां. ११ ऋद्धिसिद्धि. १२ शौर्य. १३ कारण. १४ मंत्रवेत्ता. १५ मंत्रोच्चारांत चुकतो. १६ कळांनीं. १७ स्पर्श करावा. १८ श्रीकृष्णाला.

अर्जुन उवाच–

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥२८॥
सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥२९॥
गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः॥३०॥

[ अर्जुन उवाच–दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण ] तो म्हणे अवधारीं देवा । म्यां पाहिला हा मेळावा । तंव गोत्रवर्ग आघवा । देखिला एथ ॥९३॥ [ युयुत्सुं समुपस्थितं ] हे संग्रामीं उदित । जाहाले असती कीरे समस्त । पण आपणपेयां उचित । केंवि होय ॥९४॥ येणें नांवेंचि नेणों कायी । मज आपणपें सर्वथा नाहीं । मन बुद्धी ठायीं । स्थीर नोहे ॥ ९५ ॥ [ वेपथुश्च शरीरे मे ] देखें देह कांपत । [ मुखं च परिशुष्यति ] तोंड असे कोरडें होत । विकळता उपजत । गात्रांसी ॥ ९६ ॥ [ रोमहर्षश्च जायते ] सर्वांगा कांटोळा आला । [ त्वक् चैव परिदह्यते ] अति संताप उपजला । [ गांडीवं स्रंसते हस्तात् ] तेथें बेंबळ हात गेला । गांडीवाचा ॥ ९७ ॥ तें न धरतचि निष्टलें । परि नेणेचि हातोनि पडिलें । ऐसें हृदय असे व्यापिलें । मोहें येणें ॥ ९८ ॥ जें वज्रापासोनि कठिण । दुर्धर अतिदारुण । तयाहून असाधारण । हें स्नेहनवल ॥ ९९ ॥ जेणें संग्रामीं हर जिंतिला । निवातकवचांचा ठाव फेडिला । तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजी ॥ २०० ॥ जैसें भ्रमर भेदी कोरडें । भलतैसें काष्ठ कोरडें । परि कळिकेमाजि सांपडे । कोंवळिये ॥ १ ॥ तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणे । तैसें कठिण कोवळेपणें । स्नेह देखा ॥ २ ॥ हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाही नयेचि आया । म्हणऊनि भुलविला ऐकें राया । संजयो म्हणे ॥ ३ ॥ [ न च शक्नोम्यवस्थातुं ] अवधारीं मग तो अर्जुन । देखोनि सकळ स्वजन । विसरला अभिमान । संग्रामींचा ॥ ४ ॥ कैसी नेणों

१ समुदाय. २ निश्चयेंकरून. ३ व्याकुळता. ४ शरीराला. ५ कांटा, रोमांच. ६ ढिला. ७ वज्राहून. ८ राक्षसविशेष. ९ ग्रस्त केला. १० कोणतेंही. ११ उदार. १२ ब्रह्मदेवालाही. १३ आवरत नाहीं.

सदयता। उपजली तेथ चित्ता। मग ह्मणे कृष्ण आतां। नसिजे एथ ॥ ५ ॥ [भ्रमतीव च मे मनः] माझें अतिशयें मन व्याकुळ। [सीदंति मम गात्राणि] होतसे वाचा बरळ। जे वधावे हे सकळ। येणें नांवें ॥ ६ ॥

तो ह्मणाला "देवा! ऐक. हा सर्व समुदाय मीं पाहिला; पण यांत सारा माझा गोत्रवर्गच दिसतो. ९३ हे सारे अगदीं निश्चयानें युद्ध करण्यास उद्युक्त झाले आहेत; पण आपणांसही तसें करणें योग्य कसें होईल? ९४ हा विचार मनांत आल्यामुळें कांहीं सुचत नाहीं. माझें देहभानच मुळीं नाहींसें झालें आहे. मन व बुद्धि एका ठिकाणीं ह्मणून राहतच नाहींत. ९५ हें शरीर पहा कसें कांपतें आहे! तोंडास कोरड पडते आहे आणि शरीराला व्याकुळता येत आहे. ९६ सर्वांगावर रोमांच उभे राहिले आहेत, आंगाचा अतिशय दाह होत आहे, आणि गांडीवाचा हात ढिला पडला.९७ त्याचा आधार सुटल्यामुळें तें हातांतून निसटलें; पण हातांतून पडलेलें समजलें सुद्धां नाहीं. इतकें मोहानें हृदय व्यापून गेलें आहे."९८ अहो! हें गांडीव ह्मणजे वज्राहूनही कठीण, महाभयंकर आणि दुर्धर; पण त्याहूनही हा स्नेह दांडगा! ही किती आश्चर्याची गोष्ट आहे? ९९ ज्या अर्जुनानें रणामध्यें शंकराचा पराभव केला; निवातकवच* राक्षसाच्या स्थानाचा विध्वंस करून टाकला; अशा अर्जुनालाही एका क्षणांत मोहानें ग्रासून टाकलें! २०० दुसरें कोणतेंही कठीण लांकूड असूं द्या; तें भ्रमर मोठ्या आवडीनें पोखरून त्याचें भूस पाडतो, पण कोंवळ्या कळींत तो बंदिवान होऊन पडतो.२०१ तो जिवावर सुद्धां उदार होईल; परंतु कमळाची पाकळी चिरणार नाहीं. इतका स्नेह हा कोंवळेपणानें कठीण आहे पहा! २ संजय ह्मणतो "राजा! श्रवण कर. ही भगवंताची माया आहे. ती ब्रह्मदेवाला सुद्धां आवरत नाहीं, ह्मणूनच तोही मोहाच्या फेऱ्यांत सांपडला होता." ३ असो. पुढें ऐक. सारे लोक आपलेच आहेत असें पाहून तो अर्जुन युद्धाचा अभिमान विसरून गेला. ४ तेथें त्याच्या अंतःकरणांत दया कशी उत्पन्न झाली हें समजत नाहीं, पण तो श्रीकृष्णास ह्मणाला "कृष्णा! आतां येथें राहून उपयोग नाहीं. ५ ह्यांना आतां मारावयाचें हें मनांत येतांच माझें मन अतिशय व्याकुळ झालें आणि वाणीला भ्रम उत्पन्न झाला." ६

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥३१॥

[हत्वा स्वजनमाहवे] या कौरवां जरी वधावें। तरी युधिष्ठिरादिकां कां न वधावें। हे येरयेर आघवे। गोत्रज आमुचे ॥७॥ [न च श्रेयोऽनुपश्यामि] ह्मणोनि जळो हें झुंझें। प्रत्येया नये मज। एणें काय काज। महापापें ॥ ८ ॥ [निमित्तानीत्यर्धं] देवा बहुतांपरी पाहतां। एथ वोखटें होईल झुंझतां। वैरी कांहीं चुकवितां। लाभ आथी ॥ ९ ॥

" ह्या कौरवांना जर मारावयाचें, तर धर्मराजादिकांना तरी कां मारूं नये? हे सारे परस्पर आमचे गोत्रजच आहेत. ७ ह्याकरितां आग लागो ह्या युद्धाला! माझ्या मनाला तें येत नाहीं. ह्या महत्पातकावांचून आमचें काय अडलें आहे? ८ पुष्कळ प्रकारें विचार केला, पण युद्ध करण्यापासून वाईट होण्याचेंच लक्षण दिसतें. तें टाळलें तरच कांहीं कल्याणाचा मार्ग आहे." ९

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।
किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥३२॥
येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च॥३३॥

[न कांक्षे विजयं कृष्ण] तया विजयवृत्ती कांहीं। मज सर्वथा काज नाहीं। [न च राज्यं] एथ राज्य तरी कायी। पावोनियां ॥ २१० ॥ या सकळांतें वधावें। [किं भोगैः] मग जे भोग भोगावे। ते जळोत आंघवे। पार्थ ह्मणे ॥११॥ [सुखानि च] तेणें सुखेंवीण होईल। तें भलतैसें साहिजेल।

१ येथें नसावें, राहूं नये. २ भ्रमिस्त. ३ हें नांव काढतांच.
* अध्याय २ ओवी १० पान २४ पहा.

१ परस्पर. २ युद्ध. ३ मनाला. ४ वाईट. ५ तरच. ६ जय मिळाल्याचें. ७ सारे. ८ पाहिजे तें. ९ पतकरेल, सोशीन.

वरि जीवितही वेंचिजेल । याचिलागीं ॥ १२ ॥ [किं नो राज्येन गोविंद ] परी यांसी घात कीजे । मग आपण राज्यसुख भोगिजे । हें स्वप्नींही मन माझें । करूं न शके ॥ १३ ॥ [ जीवितेन वा ] तरी आह्मीं कां जन्मावें । कवणालागीं जियावें । जरी वडिलां यां चितावें । विरुद्ध मनें[1] ॥१४॥ पुत्रातें इच्छी कुळ । तयाचें कायि हेंचि फळ । जे निर्दळिजे केवळ । गोत्र आपुलें ॥ १५ ॥ हें मनींचि केविं धरिजे । आपण वज्राचेंयां[2] होइजे । वरि घडे तरी कीजे । भलें इयां ॥ १६ ॥ [ येषामर्थे कांक्षितं नो ] आह्मीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें । हें जीवितही उपकारावें[3] । काजीं इयांच्या ॥ १७॥ आह्मी दिगंतींचे भूपाळ । विभांडूनि सकळ । मग संतोषविजे कुळ । आपुलें जें ॥ १८ ॥ [ त इमेऽवस्थिता युद्धे ] तेचि हे समस्त । परि कैसें कर्म विपरीत । जे जहाले असती उद्यत । झुंझावया ॥ १९ ॥ [ प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ] अंतोरियाँ[4] कुमरें । सांडोनियां भांडारें । शस्त्राग्रीं जिव्हारें । आरोपुनी ॥ २२० ॥ ऐसियांतें कैसेनि मारूं । कवणावरी शस्त्र धरूं । निजहृदया करूं । घात केवीं ॥ २१ ॥

"त्या जयाची मला मुळींच गरज नाहीं. असलें राज्य मिळून तरी काय करावयाचें? २१० ह्या सगळ्यांना मारावेत आणि मग त्या वैभवाचा उपभोग घ्यावा! जळो तें सर्व वैभव! ११ तसल्या सुखाशिवाय दुसरें कोणतेंही असो, तें मी सोशीन. किंवा त्यासाठीं प्राण खर्ची घालावा लागला तरी घालीन. १२ पण ह्यांचा घात करून राज्यसुखाचा उपभोग घेण्याची इच्छा स्वप्नांत सुद्धां मी करावयाचा नाहीं. १३ स्वमनानें आह्मी वडिलांचें जर वाईट चिंतूं लागलों, तर आह्मी जन्मास तरी आलों कशाला? आणि वांचलों तरी कशाला? १४ पितर, पुत्राची अपेक्षा करीत असतात, त्याचें फळ हेंच वाटतें कीं, आपल्या गोत्राचें निर्दाळण करावयाचें? १५ वज्रासारखें कठोर होण्याचें मनांत तरी कसें आणावें? उलट, ह्यांचें जितकें चांगलें होईल तितकें करणें, हाच आमचा धर्म आहे. १६ आह्मीं संपादन करावें, आणि त्याचा ह्या सर्वांनीं उपभोग घ्यावा. ह्यांच्या कार्यासाठीं, आमचे प्राण सुद्धां ह्यांच्या उपकारास लावावेत. १७ देशोदेशींच्या सर्व राजांस

१ मारावेत. २ वज्रासारखें–कठोर. ३ खर्च करावें. ४ क्रिया.

जिंकून आह्मीं आपल्या कुळास संतोष द्यावा. १८ पण कर्म किती विचित्र आहे तें पहा! तेच हे सारे! स्त्रिया, पुत्र, धन, वैभव सोडून देऊन, तरवारीच्या टोंकावर आपले जीव ठेवून, २१९ युद्ध करण्यास तयार झाले आहेत. २२० अशा लोकांना कसें मारावें? कोणावर शस्त्र उचलावें? आपल्या जिवलगांचा घात कसा करावा?" २१

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ॥३४

[आचार्या इति ] हे नेणसी तूं कवण । परि पैल भीष्म द्रोण । जयांचे उपकार असाधारण । आह्मां बहुत ॥ २२ ॥ [ मातुला इति ] एथ शालक सासरे मातुळ । आणि बंधु कीं हे सकळ । पुत्र नातू केवळ । इष्टही असती ॥ २३ ॥ अवघांरीं अति जवळिकेचे । हे सकळही सोयरे आमुचे । ह्मणोनि दोष आथि[3] वाचे । बोलतांचि ॥ २४ ॥

"हे कोण आहेत तें तुला माहीत नाहीं काय? ते पलीकडे भीष्माचार्य आणि द्रोणाचार्य, ज्यांचे आह्मांवर इतके उपकार आहेत कीं त्यांना सीमा नाहीं. २२ येथें मेहुणे, सासरे, मामा, बंधु, पुत्र, नातु सारे इष्टच. २३ हे आमचे अगदीं जवळचे सोयरे व भाऊबंद. ह्मणून भलता शब्द तोंडांतून काढणें, हा सुद्धां दोष आहे." २४

एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते॥३५॥

[ एतान्नेति ] हे वरी भलतें[4] करितु । आतांचि एथें मारितुं[5] । परी आपण मनें घातुं[6] । न चितावा ॥ २५ ॥ [ अपि त्रैलोक्येति ] त्रैलोक्यींचें अनकळित[7] । जरी राज्य होईल प्राप्त । तरी हें अनुचित । नोंचरें[8] मी ॥ २६ ॥ जरी आजि एथ ऐसें कीजे । तरी कवणाच्या मनीं उरिजे[9] । सांगें मुख केवीं पाहिजे[10] । तुझें कृष्णा ॥ २७ ॥

"हे आपण होऊन भलती गोष्ट करीत असतील तर करूंद्यात. ते आतां येथें आह्मांस मारीत असतील तर मारूंद्यात. पण आह्मी तर मनानें सुद्धां त्यांचा घात चिंतणार नाहीं. २५

१ लक्ष्यांत ठेवा. २ अगदीं जवळचे. ३ आहेत. ४ पाहिजे तें करोत. ५ मारोत. ६ घात, अनिष्ट. ७ निष्कंटक. ८ करणार नाहीं. ९ रहावें. १० पहावें.

त्रैलोक्याचें निष्कंटक राज्य मिळालें, तरी सुद्धां मी हें अनुचित कर्म करणार नाहीं. २६ येथें आज असें करून मग कोणाच्या अंतःकरणामध्यें रहावें? कृष्णा! तुझें मुखावलोकन तरी कसें करावें? सांग." २७

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

[ निहत्येत्यर्धे ] जरी वध करीं गोत्रजांचा। तरी वेसौटा होऊनि दोषांचा। मज जोडिलासि तूं हातींचा। दूर होसी ॥ २८ ॥ [पापमेवाश्रयेदिति] कुळहरणीं पातकें। तियें आंगीं जडती अशेखें। तयेवेळीं तूं कवणें कें। देखावासी ॥ २९ ॥ जैसा उद्यानामाजि अनळे। संचरला देखोनि प्रबळ। मग क्षणभरी कोकिळ। स्थिर नोहे ॥ २३० ॥ कां सकर्दम सरोवर। अवलोकुनी चकोर। न सेवित अव्हेर। करूनि निघे ॥ ३१ ॥ तयापरी तूं देवा। मज झकऊन नयेसि मावा। जरी पुण्याचा वोलावाँ। नाशिजैल ॥ ३२ ॥

**"गोत्रजांचा वध केला, तर दोषाचा अधिकारी होईन. आणि मग तूं मिळालेला आहेस, तोही दुरावशील. २८ कुलाचा नाश करणाऱ्याच्या आंगीं सारीं पातकें जडतात. त्या वेळीं तुला कोण कोठें दाखवील? २९ बागेंत आग लागून भडका झालेला पाहिला, ह्मणजे तेथें कोकिल क्षणभर सुद्धां थारा करीत नाहीं. २३० किंवा चिखलानें भरलेलें सरोवर पाहिलें ह्मणजे चकोरपक्षी त्याचा उपभोग न घेतां अव्हेर करून चालता होतो. ३१ त्याप्रमाणें देवा! पुण्याचा ओलावा संपला, कीं तूं मला मायेंत गुंतविशील, आणि जवळ सुद्धां येणार नाहींस." ३२**

तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान्।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव॥३७॥

[ तस्मान्नार्हा वयं हंतुं ] ह्मणोनि मी हें न करीं। इये संग्रामीं शस्त्र न धरीं। हें किडाळ बहुतीं परीं। दिसतसे ॥३३॥ तुजसीं अंतराय होईल। मग सांगें आमुचें काय उरेल। तेणें दुःखें हियें फुटेल। तुजवीण कृष्णा ॥ ३४ ॥ [धार्तराष्ट्रान्स्वबांधवान्] ह्मणऊनि कौरव हे वधिजती। [ सुखिनः स्याम माधव ] मग आह्मी भोग भोगिजती। [स्वजनं हि कथं हत्वा] हे असो मात अघडती। अर्जुन ह्मणे ॥ ३५ ॥

१ अधिकारी. २ कुळाचा नाश करण्यामध्यें. ३ अग्नि. ४ चिखलानें भरलेलें. ५ गुंतवून. ६ मायेंत. ७ झरा, उगम. ८ वाईट, नीच. ९ हृदय दुभंग होईल. १० न घडणारी.

**"ह्याकरितां मी हें करावयाचा नाहीं. ह्या युद्धांत शस्त्र धरावयाचा नाहीं. हें कृत्य अनेक प्रकारांनीं फार नीच दिसतें. ३३ ह्यांत मुख्य, आधीं तुझा वियोग होईल. मग आमचें काय बरें राहिलें? सांग. कृष्णा! तुझ्याशिवाय आह्मांला फार दुःख होईल आणि त्या दुःखानें हृदय फाटून जाईल." ३४ ह्मणून अर्जुन ह्मणाला "कौरवांना मारावयाचें आणि मग आह्मीं वैभव भोगावयाचें, ही गोष्ट घडणारी नव्हे."३५**

यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम्॥३८॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

[ यद्यप्येते इति ] हे अभिमानमदें भुलले। जर्‍हीं पां संग्रामा आले। [कथं न ज्ञेयमिति] तर्‍हीं आह्मां हित आपुलें। जाणावें लागे ॥ ३६ ॥ हें ऐसें कैसें करावें। [ कुलक्षयकृतं इति ] जे आपुले आपण मारावे। जाणत जाणतांचि सेवावें। काळकूट ॥ ३७ ॥ [कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिरिति] हां जी मार्गी चालतां। पुढां सिंह जाहला अवचितां। तो तंव चुकवितां। लाभ आथि ॥ ३८ ॥ असता प्रकाश सांडावा। मग अंधकूप आश्रावा। जरी तेथ कवण देवा। लाभ सांगें ॥३९॥ कां समोर अग्नि देखोनी। जरी न वंचिजे वोसंडोनी। तरी क्षणीं एका कवळुनी। जाळूं सके ॥ २४० ॥ [पापादस्मान्निवर्तितुं] तैसे दोष हे मूर्त। अंगीं वांजों असती पाहात। हें जाणतांही केविं एथ। प्रवर्तावें ॥ ४१ ॥ ऐसें पार्थ तिये अवसरीं। ह्मणे देवा अवधारीं। या कल्मषांची थोरी। सांगेन तुज ॥ ४२ ॥

**"उन्मत्तपणानें भुरळ पडल्यामुळें हे युद्धास आले आहेत. पण आमचें हित आह्मांला पाहिलें पाहिजे. ३६ आपल्याच लोकांचा वध आपणच कसा करावा? समजून उमजून काळकूट विष कसें प्यावें? ३७ हें पहा! आपण एखादा मार्ग चालत असलों आणि अकस्मात्**

१ जाणूनबुजून. २ अगा! ३ आला. ४ आहे. ५ टाकून द्यावा. ६ आंधार असलेली विहीर. ७ आश्रय करावा. ८ जाईल. ९ चुकवून. १० लागू पहातात. ११ पातकाची. १२ थोरवी.

समोरून सिंह आला, तर त्याला चुकवून जाणें ह्यांतच कल्याण आहे. ३८ असलेल्या प्रकाशांतून निघून अंधेऱ्या विहिरींत जाऊन पडण्यांत अर्थ कोणता ? ३९ समोर आग लागलेली डोळ्यांला दिसत असून ती जर चुकविली नाहीं, तर एका क्षणांत ती आपणावर येऊन आपणासही जाळून टाकील. २४० त्याप्रमाणें ह्यांत प्रत्यक्ष दोष आंगाला लागूं पहातात, हें समजत असून त्या कामास कसें प्रवृत्त व्हावें ?" ४१ त्या वेळीं इतकें बोलून अर्जुन देवास ह्मणतो "देवा! या पातकापासून केवढा अनर्थ आहे, तें तुह्मांस सांगतों ऐका." ४२

कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥

[कुलक्षये इति] जैसें काष्ठें काष्ठ मथिजे[1]। तेथ वन्हि एक उपजे। तेणें काष्ठजात जाळिजे। प्रज्वळलेनी ॥ ४३ ॥ तैसा गोत्रींचि परस्परें। जरी वध घडे मत्सरें। तरी तेणें महादोषें घोरें। कुळचि नासे ॥ ४४ ॥ [धर्मे नष्टे इति] ह्मणऊनि येणें पापें। वंशजधर्म[2] लोपे। मग अधर्मचि आरोपे[3]। कुळामाजी ॥४५॥

"लांकडावर लांकूड घांसलें ह्मणजे अग्नि उत्पन्न होतो, आणि त्याच्या भडाक्यानें सारींच लांकडें जळून जातात. ४३ त्याप्रमाणें आपल्या कुळांतील मत्सरानेंच परस्परांचा वध झाला, तर त्या महाभयंकर पातकाच्या योगानें कुळाचाही समूळ नाश होतो. ४४ शिवाय, ह्या पातकाच्या योगानें कुलधर्माचा लोप होतो आणि कुलामध्यें अधर्माची प्रवृत्ति होते. ४५

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

[अधर्माभिभवादिति] एथ सारासार विचारावें। कवणें काय आचरावें। आणि विधिनिषेध आघवे। पारुषती[4] ॥४६॥ असता दीप दवडिजे। मग अंधकारीं राहाटिजे[5]। तरी उंजूचि[6] कां अडखुळिजे। जयापरी ॥ ४७ ॥ तैसा कुळीं कुळक्षय होय। तये वेळीं तो आद्यधर्म जाय। मग आन कांहीं आहे। पापावांचुनी ॥ ४८ ॥ जैं यमनियम ठाकती। तेथ इंद्रियें सैरा राहाटती। ह्मणऊनि व्यभिचार घडती। कुळस्त्रियां ॥ ४९ ॥ [स्त्रीषु दुष्टास्विति] उत्तम अधमीं संचरती। ऐसें वर्णावर्ण मिसळती। तेथ समूळ उपडती। जातिधर्म ॥ २५० ॥ जैसी चोहटाचिये[1] बळी। पाविजे सैरा काउळीं[2]। तैसीं महापापें कुळीं। संचरती ॥ ५१ ॥

"असें झालें ह्मणजे सार कोणतें व असार कोणतें ? कोणीं काय आचरण करावें ? कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें ? इत्यादि सर्व गोष्टींचा विचारच खुंटून जातो. ४६ असलेला दिवा मालवून अंधारांत वावरत बसलें तर जशी तत्काळ ठेंच लागते, ४७ त्याप्रमाणें कुलामध्येंच कुलाचा क्षय झाला ह्मणजे अनादि धर्म नाश पावतो. मग पापावांचून दुसरें राहणार काय ? ४८ मनोनिग्रहच बंद पडला, ह्मणजे इंद्रियें स्वेच्छ वर्तन करूं लागतात आणि तेणेंकरून स्त्रिया व्यभिचारिणी होतात. ४९ कुलीन आणि कुलहीन यांचा संबंध घडला ह्मणजे वर्णसंकर होऊन जातिधर्माचा समूळ उच्छेद होतो. २५० चव्हाटा पाहिला ह्मणजे तेथें जसे भराभरा कावळे येऊन जमतात, त्याप्रमाणें कुलांतही महापापें येऊन शिरतात." ५१

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥

[संकर इत्यर्थं] मग कुळा तया अशेखां[3]। आणि कुळघातकां। येरयेरां[4] नरका। जाणें आथि[5] ॥ ५२ ॥ देखें वंशवृद्धि समस्त। यापरी होय पतित[6]। [पतंति पितर इति] मग वोवांडिती स्वर्गस्थ। पूर्वपुरुष ॥५३॥ जेथ नित्यादि क्रिया ठाके[7]। आणि नैमित्तिक क्रिया पारुखे[8]। तेथ कवणा तिळोदकें। कवण अर्पी ॥ ५४ ॥ तरी पितर काय करिती। कैसेनि स्वर्गीं वसती। ह्मणोनि तेही येती। कुळापासीं ॥ ५५ ॥ जैसा नखाग्रीं व्याळ लागे। तो शिखांत व्यापी वेगें। तेवीं आब्रह्म कुळ अवघें। आप्लविजे[9] ॥ ५६ ॥

"असें झालें ह्मणजे त्या साऱ्या कुळाला, आणि कुळाचा घात करणाऱ्याला, दोघांनाही नरकांत

१ घासलें. २ कुलपरंपरागत धर्म. ३ प्रवृत्ति होते. ४ बंद पडतात. ५ वावरावें. ६ सहजच.

१ चव्हाट्यावर. २ कावळ्यांनीं. ३ सर्व. ४ परस्परांच्या. ५ आहे, जावें लागतें. ६ पतन पावतात. ७ रहाते. ८ बंद पडते. ९ बुडून जातें, नाश पावतें.

जावें लागतें. ५२ पहा! याप्रमाणें सारी वंशशुद्धि नष्ट होऊन, स्वर्गांत असलेल्या पूर्वजांनाही पतन प्राप्त होतें. ५३ स्नानसंध्यादि नित्यकर्मच जेथें बंद पडतें, नैमित्तिक क्रिया खुंटून जाते, तेथें कोण कोणाला तिळोदक देणार? ५४ मग पितर तरी काय करतील? स्वर्गांत तरी राहतील कसे? ह्मणून तेही कुळापाशींच येतात. ५५ नखांच्या अग्रांना जरी सर्पदंश झाला, तरी तो जसा निमिषार्धांत नखशिखांत विषाची व्याप्ति करतो, त्याप्रमाणें अशा दोषानें सारें आब्रह्मकुळ बुडून जातें. ५६

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।
उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ४३
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।
यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥

[दोषैरिति] देवा अवधारीं आणीक एक । एथ घडे पहा पातक । जे संगदोषें हा लौकिक । भ्रंश पडे ॥ ५७ ॥ जैसा घरीं आपुला । वानिवसें अग्नि लागला । तो आणिकांहीं प्रज्वळिला । जाळूनि घाली ॥ ५८ ॥ [उत्साद्यंत इति] तैसिया तया कुळसंगती । जे जे लोक वर्तती । तेही बाधा पावती । निमित्तें येणें ॥ ५९ ॥ [उत्सन्नेति] तैसें नाना दोषें सकळ । अर्जुन ह्मणे तें कुळ । [नरके इति] मग महाघोर केवळ । निरय भोगी ॥ २६० ॥ पडिलिया तिये ठायीं । मग कल्पांतींही उकल नाहीं । येसणें पतन कुळक्षयीं । अर्जुन ह्मणे ॥ ६१ ॥ [अनुशुश्रुम] देवा हें विविध कानीं ऐकिजे । [अहो इति] परि अझुनिवरी त्रास नुपजे । हृदय वज्राचें हें काय कीजे । अवधारीं पां ॥ ६२ ॥ [यदिति] अपेक्षिजे राज्यसुख । जयालागीं तें तंव क्षणिक । ऐसें जाणतांही दोख । अव्हेरूं ना ॥ ६३ ॥ जे हे वडिल सकळ आपुले । वधावया दिठी सूदले । सांग पां काय थेंकुलें । घडलें आह्मा ॥ ६४ ॥

"देवा! आणखी सांगतों ऐकून ठेवा. त्यांत आणखी एक मोठाच दोष आहे. तो हा कीं, त्याच्या संसर्गदोषानें लोकाचार सर्फ बुडून जातो. ५७ आपल्या घरांतील माजघराला आग लागली आणि ती भडकली, तर त्याच्या जवळचे बाकीचे भागही जळून फस्त होतात. ५८ तसें ह्या अशा कुळाच्या संगतीनें जे जे लोक राहिलेले असतात, तेही त्याच्या संगतीनें बाधा पावतात." ५९ आणखी शिवाय अर्जुन ह्मणतो, "ह्याप्रमाणें नाना दोषांच्या योगेंकरून तें सर्वच कुल अति भयंकर नरकांत पडतें, २६० आणि एकदां नरकांत पडलें, कीं कल्पांतींही त्याची सुटका व्हावयाची नाहीं." आणखी अर्जुन ह्मणाला, "कुलक्षयाच्या योगानें असा अनर्थ आहे पहा! ६१ देवा! हें नानाप्रकारानें कानांनीं ऐकूनही मनाला अद्याप उपरति होऊं नये ना? हें हृदय वज्रासारखेंच ठेवावेंना! ६२ ज्यांच्यासाठीं राज्यसुखाची इच्छा करावयाची, ते तर क्षणिक; हें समजूनही दोषाचा अव्हेर करूं नयेना? ६३ हे आपले वडील, वधाच्या निमित्तानें डोळ्यांनीं पहाण्याइतकें आमचें कोणतें नडलें आहे?" ६४

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

[यदिति] आतां यावरी जें जियावें । तयापासूनि हें बरवें । जे शस्त्रें सांडूनि साहावे । वाण यांचे ॥ ६५ ॥ [धार्तराष्ट्रा इति] तयावरी होय जितुकें । तें मरणही वरि निकें । परी येणें कल्मषें । चाड नाहीं ॥ ६६ ॥ ऐसें देखून सकळ । अर्जुनें आपुलें कुळ । मग ह्मणे राज्य तें केवळ । निरयभोग ॥ ६७ ॥

"आतां या पुढें जगावें, त्यापेक्षां शस्त्रें टाकून देऊन त्यांचेच वाण सहन करावेत हेंच प्रशस्त होय. ६५ तेणेंकरून जें दुःख होईल तें, किंवा मरण आलें तरी तेंही उत्तम; परंतु ह्या असल्या पातकांत पडण्याची गरज नाहीं." ६६ पुन्हा आपल्या सर्व गणगोताकडे पाहून अर्जुन ह्मणाला "राज्य हा निखालस नरकवास आहे." ६७

१ माजघराला, मध्यभागीं. २ नरक. ३ सुटका. ४ दोष. ५ दृष्टि. ६ घालावी. ७ नडलें, संकट.

१ जगावें. २ त्यापेक्षां. ३ चांगलें, बरें. ४ पातकाची. ५ इच्छा. ६ नरकवास.

**संजय उवाच–**

एवमुक्त्वार्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

[एममुक्त्वार्जुनः संख्ये] ऐसें तिये अवसरीं । अर्जुन बोलिला समरीं । संजय ह्मणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ६८ ॥ [शोकसंविग्नमानसः] मग अत्यंत उद्वेगला[1] । न धरत गहिंवर[2] आला । [रथोपस्थ उपाविशत्] तेथ उडी घातली खालां[3] । रथौनियां[4] ॥ ६९ ॥ जैसा राजकुमर पदच्युत । सर्वथा होय उपहत[5] । कां रवि राहुग्रस्त । कळाहीन ॥ २७० ॥ नातरी महासिद्धिसंभ्रमें । जिंतिला तापस भ्रमें । मग आकळूनि कामें । दीन कीजे ॥ ७१ ॥ तैसा तो धनुर्धर । अत्यंत दुःखें जर्जर । दिसे जेथ रहंवरें[6] । त्यजिला तेणें[7] ॥ ७२ ॥ [विसृज्य सशरं चापं] मग धनुष्यबाण सांडिलें । न धरत अश्रुपात आले । ऐसें ऐक राया वर्तलें । संजयो ह्मणे ॥ ७३ ॥ आतां यावरी तो वैकुंठनाथ । देखोनि सखेद पार्थ । कवणेपरी परमार्थ । निरूपील ॥७४॥ -क्षेपक-"वेदीं त्रिकांडनिरूपण । कर्म उपासना ज्ञान । हेंचि श्रीकृष्ण आपण । निरूपित असे ॥ २७५ ॥ जेणें अर्जुनाचा मोह नाशे । सम्यक्[8] ज्ञान प्रकाशे । ऐसीं उत्तरें विश्वेशें । बोलिजैती[9] ॥२७६ ॥ जे उत्तरमिमांसा उपनिषदें । ते मथूनियां[10] "गोविंदें[11] । निरूपिजैल[12] स्वानंदें । जेणें पार्थ उमजे" ॥ २७७ ॥ तें सविस्तर पुढारी कथा । अति सकौतुक ऐकतां । ज्ञानदेव ह्मणे आतां । निवृत्तिदास ॥ २७८ ॥

इति श्रीज्ञानदेवकृतभावार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

श्लोक ४७, ओव्या २७५.

संजय **धृतराष्ट्रास** ह्मणाला ऐक. याप्रमाणें समरांगणांत त्या वेळीं **अर्जुनानें** भाषण केलें, ६८ आणि उद्विग्न झाला; आलेला हुंदका त्यास आवरेना. त्यानें लागलीच रथाखालीं उडी टाकली. ६९ पदच्युत झालेला राजपुत्र जसा मानहीन होतो, ग्रहणामध्यें सूर्य जसा निस्तेज होतो; ७० किंवा महासिद्धीच्या संभ्रमानें तपस्व्यास भुरळ पडून कामेच्छेनें तो जसा दीन होतो; ७१ तसा रथाचा त्याग केलेला तो **अर्जुन**, दुःखानें फार जर्जर झालेला दिसूं लागला. ७२ **संजय** ह्मणतो "राजा! मग त्यानें धनुष्यबाण टाकून दिले. त्याचे अश्रुही त्यास आवरेनात अशी दशा झाली." श्रवण करा. ७३ आतां यापुढें तो वैकुंठाधिपति, दुःखयुक्त **अर्जुनाला** पाहून परमार्थ सांगेल. ७४ वेदामध्यें कर्म, उपासना व ज्ञान या तीन कांडांचें निरूपण केलें आहे. तेंच **श्रीकृष्ण** पुढें निरूपण करील. ७५ जेणेंकरून **अर्जुनाचा** मोह नाश पावेल, उत्तम ज्ञान प्रगट होईल, अशा रीतीचें विश्वेश भाषण करील. ७६ उत्तरमीमांसा, उपनिषदें शोधून त्यांतील सार, गोविंद मोठ्या आनंदानें सांगेल. असें कीं, तेणेंकरून पार्थाची समजूत पटावी. ७७ निवृत्तिदास ज्ञानदेव ह्मणतात ती कथा पुढें सविस्तर आहे. ती श्रवण केली असतां परम कौतुक वाटेल. २७८

१ उद्विग्न झाला. २ अनावर. ३ खालीं. ४ रथावरून. ५ निस्तेज. ६ रथ. ७ त्या अर्जुनानें. ८ उत्तम, श्रेष्ठ. ९ बोलेल. १० शोधून. ११ श्रीभगवंतांनीं. १२ निरूपण करतील.

## अध्याय पहिला समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय २ रा.

संजय उवाच.

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

[संजय उवाच—] मग संजयो ह्मणे रायातें । [तं तथा] आइकें तो पार्थ तेथें । [अश्रुपूर्णाकुलेक्षणं] शोकाकुल रुदनातें । करीत असे ॥ १ ॥ तें कुळ देखोनि समस्त । [कृपयाविष्टं] स्नेह उपनलें अद्भुत । तेणें द्रवलें असे चित्त । कवणेपरी ॥ २ ॥ जैसें लवण जळें झळंबळें । नातरी अभ्र वातें हाले । तैसें सधीर परि विरमलें । हृदय तयाचें ॥ ३ ॥ ह्मणोनि कृपा आकळिला । [विषीदंतमित्यर्थ] दिसतसे अति कोमाइला । जैसा कर्दमीं रुपला । राजहंस ॥ ४ ॥ तयापरी तो पांडुकुमर । महामोहें अति जर्जर । देखोनि श्रीशार्ङ्गधर । काय बोले ॥ ५ ॥

**मग संजय, राजाला (धृतराष्ट्राला) ह्मणतो, राजा! ऐक. तेथें त्यावेळीं तो अर्जुन, शोकग्रस्त होऊन रडूं लागला. १ तें सारें कुलगोत आपलेंच, असें पाहून त्याच्या मनांत कांहीं विलक्षण स्नेह उत्पन्न झाला. आणि त्यामुळें त्याचें चित्त अगदीं विरघळून गेलें. कशा रीतीनें? २ जसे मिठाचे मोठमोठाले खडे असले तरी, पाण्यानें विरघळून जातात, किंवा वाऱ्यानें अभ्रांची जसी खळबळ उडून जाते, तद्वत् अर्जुनाचें हृदय धैर्ययुक्त होतें तरी सुद्धां त्यास पाझर फुटला. ३ अशाप्रकारें स्नेहानें बद्ध झाल्यामुळें, तो अगदीं म्लान दिसूं लागला. चिखलांत रुतलेला राजहंस ज्याप्रमाणें ४ अतिशय दुःखाकुळ व्हावा, त्याप्रमाणें तो पंडूचा पुत्र (अर्जुन) तीव्र मोहानें अगदीं जर्जर झालेला पाहून श्रीकृष्णांनीं बोलण्यास प्रारंभ केला. ५**

१ जुन्या प्राकृत ग्रंथांत प्रथमा विभक्तीला 'ओ' हा अंत्याक्षर घालण्याची चाल आहे. जसें:—रावो; ठावो इ०. २ शोकग्रस्त. ३ वंशज, भाऊबंद. ४ उत्पन्न झाला. ५ विरघळलें, पाझरलें. ६ नाहींतर, किंवा. ७ द्रवलें, पाझर फुटला. ८ आधीन झाला. ९ म्लान दिसूं लागला. १० चिखलामध्यें. ११ रुतला.

श्रीभगवानुवाच.

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच—कुतस्त्वा] ह्मणे अर्जुना आदि पाहीं । हें उचित काय ईये ठायीं । तूं कवण हें कायी । करीत आहासी ॥ ६ ॥ तुज सांगें काय झालें । कवण उणें आलें । करितां काय ठेलें । खेद कायिसा ॥ ७ ॥ तूं अनुचिता चित्त नेदिसी । धीर कहीं न संडिसी । तुझेनि नामें अपयशीं । दिशा लंघिजे ॥ ८ ॥ तूं शूरवृत्तीचा ठावो । क्षत्रियांमाजि रावो । तुझिया लाठेपणाचा आवो । तिहीं लोकीं ॥ ९ ॥ तुवां संग्रामीं हर जिंकिला । निवातकवचांचा ठाय फेडिला । पवाडा तुवां केला । गंधर्वांसीं ॥ १० ॥ पाहतां तुझेनि पाडें । दिसे त्रैलोक्यही थोकडें । ऐसें पुरुषत्व चोखडें । पार्था तुझें ॥ ११ ॥ तो तूं कीं आजि येथें । सांडूनियां वीरवृत्तीतें । [कश्मलमिदं] अधोमुख रुदनातें । करीत आहासी ॥ १२ ॥ विचारीं तूं अर्जुनु । कीं कारुण्यें कीजसी दीनु । सांग पां अंधकारें भानु । ग्रासिला आथी ॥ १३ ॥ ना तरी पवन मेघासि बिहे । कीं अमृतासि मरण आहे । पाहें पां इंधनचि गिळोनि जाये । पावकातें ॥ १४ ॥ कीं लवणेंचि जळ विरे । संसर्गें काळकूट

१ ह्या. २ काय. ३ आहेस. ४ अडलें. ५ देऊं नकोस. ६ कधीं. ७ सोडूं नको. ८ स्थान. ९ राजा, धुरीण. १० थोरपणाचा. ११ डंका. १२ ह्या नांवाचे दोन राक्षस. (विशेष माहिती अर्थामध्यें ह्याच शब्दावरील टिपेंत पहा.) १३ योग्यतेला. १४ लहान. १५ उत्तम. १६ अर्जुन. (ही प्रथमा विभक्ति आहे. जुन्या प्राकृत काव्यग्रंथांत प्रथमेला 'उ' हा प्रत्यय घालण्याची वहिवाट दिसते.) १७ केला गेलास-करावें काय? १८ पां हें निश्चयार्थी किंवा पादपूरणार्थी अव्यय आहे. १९ आहे काय? २० भितो काय? २१ स्पर्शानें.

मरे । सांग पां महाफणी दर्दुरें । गिळिजे कायी ॥ १५ ॥ सिंहासी झोंबे कोल्हा । ऐसा अपाडें आथि कें जाहाला । परी तो त्वां साच केला । आजि एथ ॥ १६ ॥ [ विषमे समुपस्थितम् ] ह्मणोनि अझुनी अर्जुना । झणें चित्त देसी या हीनां । वेगीं धीर करूनियां मना । सावध होईं ॥ १७ ॥ सांडीं हें मूर्खपण । उठीं घे धनुष्यबाण । संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ॥ १८ ॥ [अनार्यजुष्टं] हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां । सांगें झुंजावेळे सदयता । उचित कायी ॥ १९ ॥ [अस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन] हें असतिये कीर्तिसी नाश । आणि पारत्रिकांसि अपभ्रंश । ह्मणे जगन्निवास । अर्जुनातें ॥ २० ॥

**ते ह्मणाले "अर्जुना! येथें–अशा ठिकाणीं हें तुला योग्य आहे काय ? तूं कोण ? आणि करतोस काय ह्याचा आधीं विचार कर. ६ तुला झालें तरी काय ? सांग पाहूं. कमी काय पडलें ? करतांना नडलें कोठें ? खेद कशाकरितां ? ७ भलतेंच मनांत आणूं नकोस; धैर्य कांहीं सोडूं नकोस; तुझें नांव ऐकलें कीं, अपयशानें देशोधडीस जावें. ८ तूं शूरवृत्तीचें भांडार; क्षत्रियांतला राजा; त्रिभुवनांत तुझ्या पराक्रमाचा डंका. ९ तूं रणांगणांत शंकराचा पराजय केलास; निवातकवच* राक्षसांचा ठावठिकाण नाहींसा करून टाकलास. गंधर्वांना तर तूं आपले गुणानुवाद गावयास लावलेस. १० तुझ्या बरोबरीस पाहूं लागलें तर, त्रैलोक्यसुद्धां कमी वाटतें. इतका तुझा पराक्रम थोर आहे. ११ तो तूं, आज येथें वीरवृत्ति सोडून, खालीं तोंड घालून रडत बसला आहेस! १२ तूं अर्जुन असून यःकश्चित् कारुण्यानें तुला दीन करावेंना? ह्याचा कांहीं विचार कर. सूर्याला अंधकार कधीं ग्रासील काय ? सांग बरें. १३ किंवा वारा हा मेघास पाहून भय पावेल काय ? अमृतास कधीं मरण येईल काय ? हें तर जळणानेंच अग्नीस गिळून टाकल्याप्रमाणें झालें! १४ किंवा मिठानें पाणी विरेल काय ? स्पर्श केल्यानेंच काळकूट मरेल काय ? मोठा थोरला भुजंग असला, तर तो बेडकाच्यानें गिळवेल काय ? सांग बरें. १५ कोल्ह्यानें सिंहाशीं टक्कर दिली, असा अद्भुत चमत्कार कोठें घडला आहे काय ? पण तूं मात्र येथें आज तें खरें करून दाखविलेंस. १६ याकरितां अर्जुना! अद्याप तरी ही गोष्ट वाईट आहे हें लक्षांत आण. आणि मनाला लौकर धीर देऊन सावध हो. १७ चल ऊठ! हा मूर्खपणा सोडून देऊन धनुष्यबाण हातांत घे. ह्या रणभूमीवर तुझी माया कसली ? १८ हें पहा अर्जुना, तूं तर ज्ञाता आहेस. असें असून तूं हा विचार कसा करीत नाहींस ? युद्धाच्यावेळीं मनांत दया येणें उचित आहे काय ? तूंच सांग बरें." १९ जगन्निवास श्रीकृष्ण अर्जुनास ह्मणतात "अर्जुना! ह्या योगानें असलेल्या कीर्तीस मुकशील, आणि परलोकही अंतरेल." २०**

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

[क्लैब्यं मा स्म गमः पार्थ] ह्मणोनि शोक न करीं । तूं पुरता धीर धरीं । हे शोच्यता आव्हेरीं । पांडुकुमरा ॥ २१ ॥ [नैतत्त्वय्युपपद्यते] तुज नव्हे हें उचित । येणें नासेल जोडलें बहुत । तूं अझुनि तरी हित । विचारी पां ॥ २२ ॥ येणें संग्रामाचेनि अवसरें । एथ कृपाळुपण नुपकरे । हे आतांचि काय सोयरे । जाहले तुज ॥ २३ ॥ तूं आधींच काय नेणसी । कीं हे गोत्रज नोळखसी । वायांचि काय करिसी । अतिशय आतां ॥ २४ ॥ आजिचें हें झुंज । काय जन्मां नवल तुज । हें परस्परें तुह्मां व्याज । सदांचि आथी ॥२५॥ [क्षुद्रं] तरी आतां काय जाहालें । कायि स्नेह उपनलें । हें नेणिजे परि कुडें केलें । अर्जुना तुवां ॥ २६ ॥ मोह धरिलिया ऐसें होईल । जे असती प्रतिष्ठा जाईल । आणि परलोकही अंतरेल । ऐहिकेंसी ॥ २७ ॥ [हृदयदौर्बल्यं] हृद-

१ मोठा भुजंग. २ बेडकाच्यानें. ३ चमत्कार. ४ आहे. ५ कोठें. ६ कदाचित्, न जाणो. ७ क्षुल्लक गोष्टीकडे. ८ युद्धाच्या वेळीं. ९ पारलौकिक.

* प्रल्हादाचा भाऊ संल्हाद, ह्याचे हे पुत्र. हे समुद्रतीरीं रहात असून इंद्रासही अजिंक्य होते. त्यांचा अर्जुनानें वध केला. (भार० वनपर्व अ० १६९।१७०.)

१ खेद. २ उपयोगी नाहीं. ३ पाल्हाळ. ४ जन्मांतील चमत्कार. ५ कौरवपांडवांना. ६ निमित्त. ७ आहे. ८ उत्पन्न झाला. ९ वाईट. १० तूं. ११ इहलोकासहवर्तमान

याचें ढिलेपण । एथ निकर्यासि नव्हे कारण । [त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप] हें संग्रामीं पतन जाण । क्षत्रियांसीं ॥ २८ ॥ ऐसेनि तो कृपावंत । नानापरी असे शिकवित । हें ऐकोनि पांडुसुत । काय बोले ॥ २९ ॥

ह्याकरितां **अर्जुना!** तूं दुःख करूं नकोस. पुरता धीर धर. आणि हा शोक सोडून दे. २१ हें तुला उचित नव्हे. अशानें आजपर्यंत जितकें संपादन केलें आहेस, त्या साऱ्यावर पाणी पडेल. तूं अजून तरी तुझें हित कशांत आहे, ह्याचा विचार कर. २२ युद्धाची वेळ येऊन ठेपली, आतां येथें कृपाळूपणा कामाचा नाहीं. हे सारे तुझे सोयरे झाले, ते का आतां झाले? २३ हें पूर्वीं तुला माहित नव्हतें काय? कां ह्या गोत्रजांची आणि तुझी ओळखच नव्हती? मग आजच त्यांचा विनाकारण पाल्हाळ कां माजविला आहेस? २४ आजचें हें युद्ध ह्मणजे तुझ्या जन्मांतला एक अपूर्व चमत्कार, असें का कांहीं आहे? हें तुमचें परस्परांतलें नेहेमींचेंच निमित्त आहे. २५ मग आजच काय झालें? आजच खेद कोठून आला? हें मला कांहीं समजत नाहीं. पण **अर्जुना!** तूं हें वाईट केलेंस. २६ असा मोह धरलास, तर काय होईल समजलास? असलेली प्रतिष्ठा नाहींशी होईल. आणि इहलोक व परलोक, ह्या दोहोंलाही मुकशील. २७ अंतःकरणाचा ढिलेपणा, हें कांहीं चांगल्याचें लक्षण नव्हे. असें करणें हें क्षत्रियांना संग्रामांत पतन पावल्याप्रमाणेंच आहे." २८ अशाप्रकारें त्या दयाळू **भगवंतानें** नानाप्रकारें बोध केला. तो ऐकून **अर्जुन** काय ह्मणतोः—२९

अर्जुन उवाच·

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

[अर्जुन उवाच–कथमिति] देवा हें येतुलेंवरी । बोलावें नलगे अवधारीं । आधीं तूंचि विचारीं । संग्राम हा ॥ ३० ॥ हें झुंज नव्हे प्रमाद । एथ प्रवर्तलिया दिसतसे बाध । हा उघड लिंगभेद । बोडवला आह्मां ॥ ३१ ॥ [पूजार्हावरिसूदन] देखें मातापितरें अर्चिजती । सर्वस्वें तोष पावेविजती । तियें पाठीं केविं वधिजेती । आपुलिया हातीं ॥३२॥ देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । हें वांचूनि केविं निंदिजे । स्वयें वाचा ॥ ३३ ॥ तैसे गोत्रगुरु आमुचे । हे पूजनीय आह्मां नेमीचे । मज बहुत भीष्मद्रोणांचें । वर्ततसे ॥ ३४ ॥ [इषुभिः प्रतियोत्स्यामि] जयालागीं मनें विरूं । आह्मी स्वप्नीं न शकों धरूं । तयां प्रत्यक्ष केवीं करूं । घात देवा ॥ ३५ ॥ वरि जळो हें जियालें । एथ अंघवेयांसि हेंचि काय जाहालें । जें यांच्या वधीं अभ्यासिलें । मिरविजे आह्मी ॥ ३६ ॥ मी पार्थ द्रोणाचा केलों । येणें धनुर्वेद मज दिधलें । तेणें उपकारें काय आभारैलों । वधीं तयातें ॥३७॥ जेथींचियें कृपा लाहिजे वर । तेथेंचि मनें व्यभिचारें । तरी काय मी भस्मासुर । अर्जुन ह्मणे ॥ ३८ ॥

"देवा! हें इतकें सांगायाला नको. ऐक. ह्या युद्धाबद्दल तूंच आधीं आपल्या मनांत विचार कर पाहूं. ३० हें कांहीं युद्ध नव्हे; हा एक महद्दोष आहे. त्यापासून पीडा मात्र होईल. ह्यांत गुरुजनांचा वध करण्याचें मात्र आह्मांस भाग पडलें आहे. ३१ पहा! मातापितरांची पूजा करावी; त्यांना होईल तितका संतोष द्यावा; तें सोडून उलट आपल्या हातानेंच त्यांचा वध कसा करावा? ३२ देवा! संतवृंदांस नमस्कार करावा; किंवा हातानें झाली तर पूजा करावी; हें सारें सोडून आपल्याच तोंडानें त्यांची निंदा कशी बरें करावी? ३३ तसेच हे आमचे कुलगुरु. ह्यांची नित्य नेमानें आह्मी पूजा करावी हेंच उचित. ह्या **भीष्मद्रोणांच्या** उपकारांचें तर मला फिरून फिरून स्मरण होतें. ३४ ह्यांच्याशीं मनानें स्वप्नांतसुद्धां आह्मी वैर धरणार नाहीं; देवा! त्यांचा प्रत्यक्ष कसा बरें घात करावा? ३५ त्यापेक्षां जळेना कां हें आयुष्य? सुखाचें सर्वस्व

१ चांगुलपणाला. २ इतकें. ३ मोठ्यांचा उच्छेद.

१ पूजिलीं जातात. २ संतोष दिला जातो. ३ वध करावा. ४ पूजा करावी. ५ सोडून. ६ आपल्याच वाणीनें. ७ कुलगुरु. ८ निश्चयेंकरून. ९ स्मरण होतें. १० वैर. ११ ह्यापेक्षां. १२ जिणें, आयुष्य. १३ सर्वस्व. १४ वधाला. १५ उद्युक्त करून. १६ प्रतिष्ठा मिरवावी. १७ केलेला शिष्य. १८ पढविला. १९ उपकारबद्ध होऊन. २० ज्या ठिकाणाहून. २१ प्राप्त झाला. २२ कृतघ्नपणा. २३ हा एक राक्षस होता. (विशेष माहिती अर्थाच्या टिपेंत पहा.)

मरे । सांग पां महाफणी दर्दुरें । गिळिजे कायी ॥ १५ ॥ सिंहासी झोंबे कोल्हा । ऐसा अपाडें आथि कें जाहाला । परी तो त्वां साच केला । आजि एथ ॥ १६ ॥ [ विषमे समुपस्थितम् ] ह्मणोनि अझुनी अर्जुना । झणें चित्त देसी या हीनां । वेगीं धीर करूनियां मना । सावध होईं ॥ १७ ॥ सांडीं हें मूर्खपण । उठीं घे धनुष्यबाण । संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें ॥ १८ ॥ [अनार्यजुष्टं] हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां । सांगें झुंजावेळे सदयता । उचित कायी ॥ १९ ॥ [अस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन] हें असतिये कीर्तिसी नाश । आणि पारत्रिकांसि अपभ्रंश । ह्मणे जगन्निवास । अर्जुनातें ॥ २० ॥

ते ह्मणाले "**अर्जुना !** येथें–अशा ठिकाणीं हें तुला योग्य आहे काय ? तूं कोण ? आणि करतोस काय ह्याचा आधीं विचार कर. ६ तुला झालें तरी काय ? सांग पाहूं. कमी काय पडलें ? करतांना नडलें कोठें ? खेद कशाकरितां ? ७ भलतेंच मनांत आणूं नकोस; धैर्य कांहीं सोडूं नकोस; तुझें नांव ऐकलें कीं, अपयशानें देशोधडीस जावें. ८ तूं शूरवृत्तीचें भांडार; क्षत्रियांतला राजा; त्रिभुवनांत तुझ्या पराक्रमाचा डंका. ९ तूं रणांगणांत **शंकराचा** पराजय केलास; **निवातकवच*** राक्षसांचा ठावठिकाण नाहींसा करून टाकलास. गंधर्वांना तर तूं आपले गुणानुवाद गावयास लावलेस. १० तुझ्या बरोबरीस पाहूं लागलें तर, त्रैलोक्यसुद्धां कमी वाटतें. इतका तुझा पराक्रम थोर आहे. ११ तो तूं, आज येथें वीरवृत्ति सोडून, खालीं तोंड घालून रडत बसला आहेस ! १२ तूं **अर्जुन** असून यःकश्चित् कारुण्यानें तुला दीन करावेंना? ह्याचा कांहीं विचार कर. सूर्याला अंधकार कधीं ग्रासील काय ? सांग बरें. १३ किंवा वारा हा मेघास पाहून भय पावेल काय ? अमृतास कधीं मरण येईल काय ? हें तर जळणानेंच अग्नीस गिळून टाकल्याप्रमाणें झालें ! १४ किंवा मिठानें पाणी विरेल काय ? स्पर्श केल्यानेंच काळकूट मरेल काय ? मोठा थोरला भुजंग असला, तर तो बेडकाच्यानें गिळवेल काय? सांग बरें. १५ कोल्ह्यानें सिंहाशीं टक्कर दिली, असा अद्भुत चमत्कार कोठें घडला आहे काय? पण तूं मात्र येथें आज तें खरें करून दाखविलेंस. १६ याकरितां **अर्जुना!** अद्याप तरी ही गोष्ट वाईट आहे हें लक्षांत आण. आणि मनाला लौकर धीर देऊन सावध हो. १७ चल ऊठ! हा मूर्खपणा सोडून देऊन धनुष्यबाण हातांत घे. ह्या रणभूमीवर तुझी माया कसली ? १८ हें पहा **अर्जुना,** तूं तर ज्ञाता आहेस. असें असून तूं हा विचार कसा करीत नाहींस ? युद्धाच्यावेळीं मनांत दया येणें उचित आहे काय ? तूंच सांग बरें." १९ जगन्निवास **श्रीकृष्ण अर्जुनास** ह्मणतात "**अर्जुना!** ह्या योगानें असलेल्या कीर्तीस मुकशील, आणि परलोकही अंतरेल." २०

१ मोठा भुजंग. २ बेडकाच्यानें. ३ चमत्कार. ४ आहे. ५ कोठें. ६ कदाचित्, न जाणो. ७ क्षुल्लक गोष्टीकडे. ८ युद्धाच्या वेळीं. ९ पारलौकिक.

* प्रऱ्हादाचा भाऊ संऱ्हाद, ह्याचे हे पुत्र. हे समुद्रतीरीं रहात असून इंद्रासही अजिंक्य होते. त्यांचा अर्जुनानें वध केला. (भार० वनपर्व अ० १६९।१७०.)

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

[क्लैब्यं मा स्म गमः पार्थ] ह्मणोनि शोक न करीं । तूं पुरता धीर धरीं । हे शोच्यता आव्हेरीं । पांडुकुमरा ॥ २१ ॥ [नैतत्त्वय्युपपद्यते] तुज नव्हे हें उचित । येणें नासेल जोडलें बहुत । तूं अझुनि तरी हित । विचारी पां ॥ २२ ॥ येणें संग्रामाचेनि अवसरें । एथ कृपाळुपण नुपकरे । हे आतांचि काय सोयरे । जाहले तुज ॥ २३ ॥ तूं आधींच काय नेणसी । कीं हे गोत्रज नोळखसी । वायांचि काय करिसी । अतिशय आतां ॥ २४ ॥ आजिचें हें झुंज । काय जन्मा नवल तुज । हें परस्परें तुह्मां व्याज । सदांचि आथी ॥२५॥ [क्षुद्रं] तरी आतां काय जाहालें । कायि स्नेह उपनलें । हें नेणिजे परि कुडें केलें । अर्जुना तुवां ॥ २६ ॥ मोह धरिलिया ऐसें होईल । जे असती प्रतिष्ठा जाईल । आणि परलोकही अंतरेल । ऐहिकेंसी ॥ २७ ॥ [हृदयदौर्बल्यं] हृद-

१ खेद. २ उपयोगी नाहीं. ३ पाल्हाळ. ४ जन्मांतील चमत्कार. ५ कौरवपांडवांना. ६ निमित्त. ७ आहे. ८ उत्पन्न झाला. ९ वाईट. १० तूं. ११ इहलोकासहवर्तमान

याचें ढिलेपण । एथ निकयांसि नव्हे कारण । [त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप] हें संग्रामीं पतन जाण । क्षत्रियांसीं ॥ २८ ॥ ऐसेनि तो कृपावंत । नानापरी असे शिकवित । हें ऐकोनि पांडुसुत । काय वोले ॥ २९ ॥

ह्याकरितां **अर्जुना!** तूं दुःख करूं नकोस. पुरता धीर धर. आणि हा शोक सोडून दे. २१ हें तुला उचित नव्हे. अशानें आजपर्यंत जितकें संपादन केलें आहेस, त्या साऱ्यावर पाणी पडेल. तूं अझून तरी तुझें हित कशांत आहे, ह्याचा विचार कर. २२ युद्धाची वेळ येऊन ठेपली, आतां येथें कृपाळूपणा कामाचा नाहीं. हे सारे तुझे सोयरे झाले, ते का आतां झाले? २३ हें पूर्वीं तुला माहित नव्हतें काय? कां ह्या गोत्रजांची आणि तुझी ओळखच नव्हती? मग आजच त्यांचा विनाकारण पाल्हाळ कां माजविला आहेस? २४ आजचें हें युद्ध ह्मणजे तुझ्या जन्मांतला एक अपूर्व चमत्कार, असें का कांहीं आहे? हें तुमचें परस्परांतलें नेहेमीचेंच निमित्त आहे. २५ मग आजच काय झालें? आजच खेद कोठून आला? हें मला कांहीं समजत नाहीं. पण **अर्जुना!** तूं हें वाईट केलेंस. २६ असा मोह धरलास, तर काय होईल समजलास? असलेली प्रतिष्ठा नाहींशी होईल. आणि इहलोक व परलोक, ह्या दोहोंलाही मुकशील. २७ अंतःकरणाचा ढिलेपणा, हें कांहीं चांगलयाचें लक्षण नव्हे. असें करणें हें क्षत्रियांना संग्रामांत पतन पावल्याप्रमाणेंच आहे." २८ अशाप्रकारें त्या दयाळू **भगवंतानें** नानाप्रकारें वोध केला. तो ऐकून **अर्जुन** काय ह्मणतो:—२९

अर्जुन उवाच·

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

[अर्जुन उवाच–कथमिति] देवा हें येतुलेंवरी । बोलावें लगे अवधारीं । आधीं तूंचि विचारीं । संग्राम हा ॥ ३० ॥ हें झुंज नव्हे प्रमाद । एथ प्रवर्तलिया दिसतसे वाध । हा उघड लिंगभेद । वोडवला आह्मां ॥ ३१ ॥ [पूजार्हावरिसूदन] देखें मातापितरें आर्चिजती । सर्वस्वें तोष पावेविजती । तियें पाठीं केविं वधिजेती । आपुलिया हातीं ॥३२॥ देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । हें वांचूनि केविं निंदिजे । स्वयें वाचा ॥ ३३ ॥ तैसे गोत्रगुरु आमुचे । हे पूजनीय आह्मां नेमीचे । मज वहुत भीष्मद्रोणांचें । वर्ततसे ॥ ३४ ॥ [इषुभिः प्रतियोत्स्यामि] जयालागीं मनें विरूं । आह्मी स्वप्नीं न शकों धरूं । तयां प्रत्यक्ष केवीं करूं । घात देवा ॥ ३५ ॥ वरि जळो हें जियालें । एथ अघवेयांसि हेंचि काय जाहालें । जें यांच्या वधीं अभ्यासिलें । मिरविजे आह्मी ॥ ३६ ॥ मी पार्थ द्रोणाचा केलों । येणें धनुर्वेद मज दिधलों । तेणें उपकारें काय आभारैलों । वधीं तयातें ॥३७॥ जेथींचियें कृपा लाहिजे वर । तेथेंचि मनें व्यभिचारें । तरी काय मी भस्मासुरें । अर्जुन ह्मणे ॥ ३८ ॥

"देवा! हें इतकें सांगायाला नको. ऐक. ह्या युद्धावद्दल तूंच आधीं आपल्या मनांत विचार कर पाहूं. ३० हें कांहीं युद्ध नव्हे; हा एक महद्दोष आहे. त्यापासून पीडा मात्र होईल. ह्यांत गुरुजनांचा वध करण्याचें मात्र आह्मांस भाग पडलें आहे. ३१ पहा! मातापितरांची पूजा करावी; त्यांना होईल तितका संतोष द्यावा; तें सोडून उलट आपल्या हातानेंच त्यांचा वध कसा करावा? ३२ देवा! संतवृंदांस नमस्कार करावा; किंवा हातानें झाली तर पूजा करावी; हें सारें सोडून आपल्याच तोंडानें त्यांची निंदा कशी वरें करावी? ३३ तसेच हे आमचे कुलगुरु. ह्यांची नित्य नेमानें आह्मी पूजा करावी हेंच उचित. ह्या **भीष्मद्रोणांच्या** उपकारांचें तर मला फिरून फिरून स्मरण होतें. ३४ ह्यांच्याशीं मनानें स्वप्नांतसुद्धां आह्मी वैर धरणार नाहीं; देवा! त्यांचा प्रत्यक्ष कसा वरें घात करावा? ३५ त्यापेक्षां जळेना कां हें आयुष्य? सुखाचें सर्वस्व

१ चांगुलपणाला. २ इतकें. ३ मोठ्यांचा उच्छेद.

१ पूजिलीं जातात. २ संतोष दिला जातो. ३ वध करावा. ४ पूजा करावी. ५ सोडून. ६ आपल्याच वाणीनें. ७ कुलगुरु. ८ निश्चयेंकरून. ९ स्मरण होतें. १० वैर. ११ ह्यापेक्षां. १२ जिणें, आयुष्य. १३ सर्वस्व. १४ वधाला. १५ उद्युक्त करून. १६ प्रतिष्ठा मिरवावी. १७ केलेला शिष्य. १८ पढविला. १९ उपकारवद्ध होऊन. २० ज्या ठिकाणाहून. २१ प्राप्त झाला. २२ कृतघ्नपणा. २३ हा एक राक्षस होता. (विशेष माहिती अर्थाच्या टिपेंत पहा.)

**काय तें एक शरीरच का? जें यांच्या वधाला उद्युक्त करून मग त्याची प्रतिष्ठा मिरवावी! ३६ मी अर्जुन, द्रोणाचार्यांचा शिष्य. ज्यांनीं मला धनुर्वेद पढविला, त्यांचा वध करणें, हीच त्यांच्या उपकारांची फेड वाटतें?" ३७ अर्जुन ह्मणतो—"ज्याच्या कृपेनें वरप्रसाद प्राप्त झाला, त्याच्यावरच कृतघ्नमनानें उलटून पडायाला मी भस्मासुर*, आहें का? ३८.**

गुरूनहत्वा हि महानुभावान्
श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव
भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥

[गुरूनहत्वा हि महानुभावान्] देवा समुद्र गंभीर आंइकिजे[1] । वरि तोहि ओंहाच[2] देखिजे । परी क्षोभ मनीं नेणिजे । द्रोणाचिये[3] ॥ ३९ ॥ हें अपार जें गगन । वर तयाही होईल मान[4] । परी अगाध भलें गहन । हृदय याचें ॥ ४० ॥ वरि अमृतही विटे[5] । कीं काळवशें[6] वज्रही फुटे । परि मनोधर्म न लोटे[7] । विकरविलाही ॥ ४१ ॥ स्नेहालागीं माये[9] । ह्मणिपें[10] कीर[11] होये । परि कृपा ते मूर्त[12] आहे । द्रोणीं इये[13] ॥ ४२ ॥ हा कारुण्याची आदि[14] । सकळगुणांचा निधि[15] । विद्यासिंधु निरवधि[16] । अर्जुन ह्मणे ॥ ४३ ॥ हा येणें मानें महंत[17] । वरि आह्मांलागीं कृपावंत । आतां सांग पां येथें घात । चिंतू येईल ॥ ४४ ॥ [श्रेयो भोक्तुं] ऐसे हे रणीं वधावे । मग आपण सुखें राज्य भोगावें । तें मना नये आघवें[18] । जीवितेसीं[19] ॥ ४५ ॥ हे येणें मानें दुर्धर[20] । जे यांहीहूनि भोग सर्धर[1] । ते असंतु[2] एथवर । [भैक्ष्यमपीह लोके] भिक्षा मागतां भली ॥ ४६ ॥ नातरी देशत्यागें जाइजे । कां गिरिकंदर सेविजे । परी शस्त्र आतां न धरिजे । इयांवरी[3] ॥ ४७ ॥ [हत्वार्थकामांस्तु गुरून्] देवा नवनिशितीं[4] शरीं । वावरोनि[5] यांचा जिव्हारीं । [भोगान् रुधिरप्रदिग्धान्] भोग गिंवसावे[6] रुधिरीं[7] । बुडाले जे ॥ ४८ ॥ [इहैव भुंजीय] ते काढूनि काय कीजती[8] । लिप्त केविं सेविजती[9] । मज नये हे उपपत्ती[10] । याचिलागीं[11] ॥ ४९ ॥ ऐसें अर्जुन ते अवसरीं । ह्मणे श्रीकृष्णा अवधारीं । परि तें मना नयेचि मुरारी ! । आइकोनियां ॥ ५० ॥ हें जाणोनि पार्थ भ्याला । मग पुनरपि बोलों लागला । ह्मणे देवो कां चित्त या बोला । देतीचि नों[12] ॥ ५१ ॥

**देवा! समुद्र गंभीर असें ऐकतों. पण तो देखील वरवरच बरें! परंतु द्रोणाच्या मनांत मुळींसुद्धां राग नाहीं. ३९ गगन हें अपार आहे. तरी सुद्धां त्याचें मोजमाप होईल. पण या द्रोणाचें हृदय त्याहूनही मोठें! ४० प्रसंगानुसार अमृतसुद्धां विघडेल; किंवा कालमाहात्म्यानें वज्रही फुटेल; परंतु द्रोणाचे कितीही अपराध केले तरी, त्याचे मनोधर्म ह्मणून बदलावयाचे नाहींत. ४१ ममतेमध्यें आई ही प्रमुख मानतात; परंतु ह्या द्रोणाची कृपा ही ममतेची प्रत्यक्ष मूर्तीच आहे." ४२ अर्जुन ह्मणतो—"हा द्रोण दयेचा उगम; सर्व गुणांचें भांडार आणि अपरंपार भरलेला विद्येचा महासागर आहे. ४३ ह्यामुळें मानानें श्रेष्ठ; आणि आह्मांवर तर त्याची अत्यंत कृपा; तेव्हां येथें त्याचा घात करावा, अशी गोष्ट मनांत तरी येईल का? तूंच सांग. ४४ अशा अशा लोकांना रणांत मारावें आणि मग आपण राज्याचा उपभोग घ्यावा, ह्यांतलें कोणतेंही आपल्या मनाला येत नाहीं. ४५ हे येवढे मोठे, मानानें अत्यंत श्रेष्ठ; ह्यांच्याहीपेक्षां राज्योपभोग श्रेष्ठ काय? असतील तर असूंद्यात. ह्यापेक्षां भिक्षा मागून राहिलेलें उत्तम! ४६ नाहींतर देशत्याग**

*ह्या नांवाचा एक राक्षस असून त्याजकडे, प्रत्यहीं चिताभस्म आणण्याचें काम शंकरानें सोंपविलें होतें. व चिताभस्म न मिळाल्यास तूं ज्याच्या मस्तकीं हात ठेवशील, तो भस्म होईल असा त्यास वर दिला होता. तेव्हां त्याच्या मनांत पार्वतीविषयीं अभिलाषबुद्धि उत्पन्न झाली. आणि शंकराच्याच मस्तकावर हात ठेवून त्यास दग्ध करण्यासाठीं तो त्याच्या पाठीस लागला. तेव्हां श्रीविष्णूंनीं स्त्रीचें स्वरूप धारण करून त्यास नादास लावलें. आणि मोठ्या युक्तीनें त्याचाच हात त्याच्या मस्तकावर ठेवून त्याचें भस्म केलें.

१ ऐकतों. २ वरकरणीच. ३ द्रोणाचार्यांच्या. ४ माप, मोजदात. ५ बिघडेल. ६ कालांतरानें. ७ पालटणार नाहीं. ८ क्षोभविला तरी. ९ माता. १० ह्मणतात. ११ खचित. १२ मूर्तिमंत. १३ ह्या द्रोणाच्या ठिकाणीं. १४ मूळ. १५ समुद्र, ठेवा. १६ अपरंपार. १७ थोर. १८ सर्व. १९ मुळींच, अंतःकरणापासून. २० मोठे.

१ ह्याहूनही मोठे. २ असोत. ३ ह्यापुढें. ४ नवी धार लावलेल्या बाणांनीं. ५ प्रहार करून. ६ शोधावे. ७ रक्तामध्यें. ८ करावें. ९ सेवन करावेत, उपभोग घ्यावा. १० युक्ति. ११ ह्याचसाठीं. १२ देत नाहीं.

करावा, किंवा पर्वतांच्या गुहेंत जाऊन बसावें. पण याउप्पर शस्त्र ह्मणून हातांत धरूं नये. ४७ देवा! पाजळून चकचकित केलेले बाण ह्यांच्या मर्मस्थानांत घुसवून, त्या रक्तांत बुडालेले जे भोग, ४८ ते घेऊन काय करावयाचे? अशुद्धानें लिप्त झालेल्या भोगाचें सेवन कसें करावें? ह्मणूनच ही युक्ति मला पसंत नाहीं." ४९ इतकें सांगून अर्जुन ह्मणतो "कृष्णा! ऐक." पण तें भाषण कृष्णाचे मनास आलें नाहीं. ५० हें पाहून अर्जुनास भय वाटलें आणि तो पुन्हा बोलूं लागला. "देवा! या माझ्या बोलण्यावर आपण कां बरें लक्ष देत नाहीं? ५१.

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो
यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषाम-
स्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

[कतरन्नो गरीयः] ये[1]ऱ्हवीं माझ्या चित्तीं जें होतें। तें मी विवरूनि[2] बोलिलों एथें। परि निकें[3] काय यापरौतें[4]। तें तुह्मी जाणा ॥ ५२ ॥ [यानेवेलर्ध] पैं विरु[5] जयांसि ऐकिजे। आणि या बोलींचि[6] प्राण सांडिजे। ते एथ संग्रामव्याजें[7]। उभे आहाती[8] ॥५३॥ [यद्वा जयेम] आतां ऐसेयांतें वधावें। [यदि वा नो जयेयुः] कीं अव्हेरूनियां निघावें। [न चैतद्विद्मः] या दोहींमाजि बरवें। तें नेणों आह्मीं ॥ ५४ ॥

बाकी, जें माझ्या मनांत आलें, तें मी येथें स्पष्ट बोलून दाखविलें. परंतु यापलीकडे खरें काय, तें तुह्मास माहीत. ५२ ज्यांनीं वैर असें ह्मटलें कीं, तत्काल आह्मी प्राणत्याग करावा, ते येथें युद्धाच्या निमित्तानें उभे आहेत. ५३ आतां अशा लोकांना मारावें, कां टाकून चालतें व्हावें? ह्यापैकीं चांगलें काय, तें कांहीं आह्मांस कळत नाहीं. ५४.

कार्पण्यदोषोपहतस्वभावः
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७ ॥

१ बाकी. २ स्पष्ट. ३ खरें. ४ यापलीकडे. ५ वैर. ६ असें ह्मणतांच. ७ युद्धाच्या निमित्तानें. ८ आहेत.

[कार्पण्यदोषोपहतस्वभावः] आह्मां काय उचित। तें पाहतां न स्फुरे[1] येथ। जें[2] मोहें येणें चित्त। व्याकुळ माझें ॥ ५५ ॥ तिमिरावरुद्ध[3] जैसें। दृष्टीचें तेज भ्रंशे। मग पां[4]सींच असतां न दिसे। वस्तुजात[5] ॥ ५६ ॥ [धर्मसंमूढचेताः] देवा तैसें मज जाहलें। जें[6] मन हें भ्रांती ग्रासिलें। आतां काय हित आपुलें। तेंही नेणें ॥ ५७ ॥ [पृच्छामि त्वां] तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें। निकें तें आह्मां सांगावें। जे सखा सर्वस्व आघवें। आह्मांसि तूं ॥ ५८ ॥ [शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं] तूं गुरु बंधु पिता। तूं आमुची इष्ट देवता। तूंचि सदां रक्षिता। आपदीं[7] आमुतें ॥ ५९ ॥ जैसा शिष्यातें गुरू। सर्वथा नेणे अव्हेरूं। कीं सरितांतें[8] सागरू। त्यजी केवीं ॥ ६० ॥ नातरी अपत्यांतें[9] माये[10]। सांडूनि[11] जरी जाये। तरी तें कैसेनि जिये। ऐकें कृष्णा ॥६१॥ तैसा सर्वांपरी आह्मांसी। देवा तूंचि एक आहासी[12]। आणि बोलिलें जरी न मनिसी[13]। मागील माझें ॥ ६२ ॥ [यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे] तरी उचित काय आह्मां। जें व्यभिचरेना धर्मा। तें झडकरीं पुरुषोत्तमा। सांग आतां ॥६३॥

आह्मांस उचित कोणतें? ह्याचा विचार केला, तर येथें कांहीं सुचत नाहीं. कारण, ह्या मोहानें माझें चित्त व्याकुळ होऊन गेलें आहे. ५५ चहूंकडे काळोख पसरला, ह्मणजे नेत्रांचें तेज निरुपयोगी होतें आणि जवळ असलेला कोणताही पदार्थ दिसत नाहीं. ५६ देवा! माझीही अवस्था तशीच झालेली आहे. कारण, मन संशयग्रस्त झाल्यामुळें, आपलें खरें हित कशांत आहे, तेंही यासमयीं कळेनासें झालें आहे. ५७ तर श्रीकृष्णा! तूंच ह्याचा विचार करून खरें काय असेल तें सांग. कारण, आमचा मित्र, सोयरा, सारें काय तें तूंच. ५८ आमचा गुरु, बंधु, पिता तूंच; आमचा कुलस्वामी तूंच; आणि आह्मांला वेळोवेळ संकटांतून मुक्त करणाराही तूंच. ५९ ज्याप्रमाणें गुरु शिष्याचा केव्हांही अव्हेर करीत नाहीं; किंवा सागर तरी नद्यांना कसा टाकील? ६० किंवा कृष्णा! आणखी ऐक. एखादी आई आपल्या मुलाला टाकून गेली, तर त्यानें वांचावें कसें? ६१ तसें

१ सुचत नाहीं. २ कारण. ३ अंधारानें वेष्टित. ४ अगदीं नजीक. ५ कोणताही पदार्थ. ६ कारण. ७ संकटामध्यें. ८ नद्यांना. ९ मुलाला. १० माता. ११ टाकून. १२ आहेस. १३ मान्य करीत नाहींत.

**देवा! आमचें सर्वस्व काय तें तूं. आणि तुझ्या मनाला, पूर्वी मी सांगितलेलें बोलणें मानवत नसेल, ६२ तर आह्मांस उचित, आणि धर्मास विरुद्ध नाहीं, असें जें काय असेल तें पुरुषोत्तमा! यावेळीं झडकर सांग. ६३.**

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्-
यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥ ८ ॥

[नहीत्यर्ध] हें सकळ कुळ देखोनी । जो शोक उपनलासे मनीं । तो तुझिया वाक्यावांचुनि । न जाय आणिकें ॥ ६४॥ [अवाप्येत्यर्ध] एथ पृथ्वीतळ आपं होईल । हें महेंद्रपदही पाविजेल । परि मोह हा न फिटेल । मानसींचा ॥ ६५ ॥ जैसीं सर्वथा बीजें आहाळलीं । तीं सुक्षेत्रीं जऱ्ही पेरिलीं । तरी न विरूढती सिंचलीं । आवडे तैसीं ॥ ६६ ॥ नातरी आयुष्य पुरलें आहे । तरी औषधें कांहीं नोहे । एथ एकचि उपेगा जाये । परमामृत ॥ ६७ ॥ तैसें राज्यभोगसमृद्धी । उज्जीवन नोहे इये बुद्धी । एथ जिव्हाळा कृपानिधी । कारुण्य तुझें ॥ ६८ ॥ ऐसें अर्जुन तेथें बोलिला । तंव क्षण एक भ्रांती सांडिला । मग पुनरपि व्यापिला । उर्मी तेणें ॥ ६९ ॥ कीं मज पाहतां उर्मी नोहे । हें अनारिसें गमत आहे । तो ग्रासिला महामोहें । काळसर्पे ॥ ७० ॥ सवर्म हृदयकल्हारीं । तेथ कारुण्यवेळेच्या भरीं । लागला ह्मणोनि लहरी । भांजेचिना ॥ ७१ ॥ हें जाणोनि ऐसी प्रौढी । जो दृष्टिसवेंचि विष फेडी । तो धांवया श्रीहरी गारुडी । पातला कीं ॥ ७२ ॥ तैसिया पंडुकुमरा व्याकुळा । मिरवतसे श्रीकृष्ण जवळा । तो कृपावशें अवलीळा । रक्षील आतां ॥ ७३ ॥ ह्मणोनि तो पार्थु । मोहफणिग्रस्तु । म्यां ह्मणितला हा हेतु । जाणोनियां ॥ ७४ ॥ मग देखा तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती केवळु । जैसा घनपडळीं भानु । आच्छादिजे ॥ ७५ ॥ तयापरी तो धनुर्धर । जाहलासे दुःखें जर्जर । जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवर । वणवला कां ॥ ७६ ॥ ह्मणोनि सहजें सुनीळ । कृपामृतें सजळ । तो वोळला श्रीगोपाळ । महामेघ ॥ ७७ ॥ तेथ सुदर्शनाची द्युती । तेचि विद्युल्लता झळकती । गंभीर वाचा ते आयती । गर्जनेची ॥ ७८ ॥ आतां तो उदार कैसा वर्षेल । तेणें अर्जुनाचळ निवेल । मग नवी विरूढी फुटेल । उन्मेषाची ॥ ७९ ॥ ते कथा आइका । मनाचिया आराणुका । ज्ञानदेव ह्मणे देखा । निवृत्तिदास ॥ ८० ॥

१. उत्पन्न झाला आहे. २ सारी पृथ्वी. ३ प्राप्त. ४ इंद्राचें स्थानही. ५ नाश पावेल. ६ बिया. ७ भाजून काढलेलीं. ८ उत्तम शेतांत. ९ उगवत नाहींत. १० पाणी दिलेलीं. ११ उपयोगाला. १२ येतें. १३ भगवन्नामामृत. १४ नानाप्रकारचे सुखोपभोग. १५ ह्या बुद्धीला उत्तेजन येत नाहीं. १६ आश्रय. १७ वेग, लहर. १८ वेगळेंच. १९ मर्मयुक्त. २० हृत्कमलाच्या ठाईं. २१ ऐनसंधीला. २२ मोडेचना. २३ कठीण प्रसंग. २४ पाहण्याबरोबर. २५ उतरतो. २६ संकटांत धांवून येणारा. २७ ग्रस्त झालेला. २८ सन्निध. २९ सहज. ३० मोहरूप भुजंगानें ग्रस्त केलेला. ३१ अर्जुन. ३२ कवटाळून.

**हा सारा गोतवळा पाहून मनामध्यें जो शोक उत्पन्न झाला आहे, तो तुझ्या वाक्याशिवाय दुसऱ्या कशानेंही जावयाचा नाहीं. ६४ येथें पृथ्वीचें सार्वभौमत्व मिळालें, किंवा इंद्राचें पद प्राप्त झालें, तरी मनांतला मोह ह्मणून कांहीं जावयाचा नाहीं. ६५ ज्याप्रमाणें अगोदरच बिया भाजून काढल्या आणि मग त्या उत्तम प्रकारच्या जमिनींत रुजत घातल्या, हवेंतसें पाणी दिलें, तरी त्या उगवत नाहींत. ६६ किंवा एखाद्याचें आयुष्यच संपलें आहे; तर तेथें दरोबस्त औषधें निरुपयोगी होतात. अशा ठिकाणीं उपयोगीं पडणारें एकच; काय? तर परमामृत. ६७ तसें, कितीही राज्यभोग असले तरी या बुद्धीला उत्तेजन येणार नाहीं. अशा ठिकाणीं हे दयासागरा! तुझी कृपा हाच आश्रय." ६८ याप्रमाणें अर्जुनानें त्यावेळीं तेथें भाषण केलें. आणि क्षणभर भ्रांतीही दूर झाली होती. परंतु पुन्हा एक लहर उठली आणि तींत तो मग्न झाला. ६९ पण मला वाटतें, ती लहर नव्हे. माझ्या बुद्धीला तर तें दुसरेंच कांहीं दिसतें आहे. तें काय? तर महामोहरूपी काळसर्पानेंच त्यास ग्रासलें! ७० तो मोहाची ऐनसंधि पाहून मर्मस्थानीं काळजाला डसला; ह्मणून लहरी मोडेनात. ७१ हा बिकट प्रसंग जाणून, ज्यानें नजर फेंकली असतांच**

१ अभ्रपटलांनीं. २ उष्णकाळांत. ३ मोठा पर्वत. ४ वणवा लागला. ५ उत्तम श्यामवर्ण. ६ आर्द्र. ७ वर्षला. ८ दांतांचें तेज. ९ तेज. १० विस्तार. ११ अर्जुनरूपी पर्वत. १२ पालवी. १३ ज्ञानाची. १४ समाधान.

विष उतरतें, असा संकटीं धावून रक्षण करणारा **श्रीहरी** आला. ७२ आतां **श्रीकृष्णा**जवळच अशाप्रकारें व्याकुळ होऊन पडलेला जो **अर्जुन**, त्यास तो आपल्या कृपाकटाक्षेंकरून सहज रक्षण करील. ७३ हा हेतु मनांत आणूनच मीं त्या **अर्जुना**ला मोहरूपकाळसर्पानें ग्रासलें असें ह्मटलें. ७४ मग पहा! **सूर्य** जसा ढगांच्या पडद्यांत आच्छादून जातो, त्याप्रमाणें **अर्जुन**ही संशयानें ग्रस्त होऊन गेला. ७५ उन्हाळ्यांत एखाद्या मोठ्या पर्वताला वणवा लागल्याप्रमाणें तो **अर्जुन** दुःखानें अगदीं जर्जर झाला, ७६ हें पाहून, स्वभावतःच उत्तम श्यामवर्ण, कृपामृतानें आर्द्र झालेला असा जो **श्रीगोपाळ**रूप मेघ, तो त्यावर वर्षाव करूं लागला. ७७ दंतप्रभा, हीच तेथें चमकणारी वीज; आणि गंभीर वाणी हाच मेघगर्जनेचा विस्तार होय. ७८ आतां तो उदार मेघ अशी कांहीं वृष्टि करील, कीं तेणेंकरून **अर्जुन**रूपी पर्वत गारीगार होऊन, त्यावर ज्ञानाची नवी कोमल पालवी फुटेल. ७९ **निवृत्तिदास ज्ञानदेव** ह्मणतात "मनाच्या समाधानासाठीं ती कथा लक्ष्य देऊन श्रवण करा." ८०

संजय उवाच.

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।

न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ९

[संजय उवाच—एवमिति] ऐसें संजय असे सांगत । ह्मणे राया तो पार्थ । पुनरपि शोकाकुलित । काय बोले ॥ ८१ ॥ [न योत्स्य इति] आइकें सखेद बोले श्रीकृष्णातें । आतां नोळवावें तुह्मी मातें । मी सर्वथा न झुंझें एथें । भरंवसेनी ॥ ८२ ॥ ऐसें येकिहेळां बोलिला । मग मौन धरूनि ठेला । तेथ श्रीकृष्ण विस्मयो पावला । देखोनि तयातें ॥८३॥

असें सांगतां सांगतां **संजय** ह्मणतो "राजा! तो **अर्जुन** पुन्हा शोकाकुळ होऊन काय ह्मणाला? ८१ दुःखित होऊन **श्रीकृष्णास** ह्मणतो "ऐक. मी खास सांगतों, मी कांहीं आतां येथें युद्ध करणार नाहीं. आणि तुह्मीही त्याविषयीं भीड घालूं नये." ८२ असें एकदम बोलून स्तब्ध राहिला; तेव्हां त्याला पाहून **श्रीकृष्णा**ला मोठा चमत्कार वाटला. ८३

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।

सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥

[हृषीकेशः] मग आपुलां चित्तीं ह्मणे । एथ हें काय आदरिलें येणें । अर्जुन सर्वथा कांहीं नेणे । काय कीजे ॥८४॥ हा उमजे आतां कवणेपरी । कैसेनि धीर स्वीकारी । जैसा ग्रहांतें पंचाक्षरी । अनुमानी कां ॥ ८५ ॥ नातरी असाध्य देखोनि व्याधि । अमृतासम दिव्य औषधि । वैद्य सूंची निरवधि । निदानींची ॥ ८६ ॥ तैसें विवरीत असे श्रीअनंत । [सेनयोरिति] तया दोहीं सैन्यांआंत । जयापरी पार्थ । भ्रांति सांडी ॥ ८७ ॥ तें कारण मनें धरिलें । मग सरोष बोलों आदरिलें । जैसें मातेच्या कोपीं थोंकलें । स्नेह आथी ॥ ८८ ॥ कीं औषधाचिया कडवटपणीं । जैसी अमृताची पुरेवणी । ते आहाच न दिसे परि गुणीं । प्रकट होय ॥८९॥ [तमुवाच] तैसी वरिवरी पाहतां उदासें । आंत तरी अतिसुरसें । तियें वाक्यें हृषीकेशें । बोलों आदरिलीं ॥ ९० ॥

आणि तो मनांत ह्मणाला, आज ह्यानें हें येथें काय आरंभिलें आहे? ह्या **अर्जुना**ला तर कांहीं समजत नाहीं. आतां काय करावें? ८४ आतां ह्याची समजूत पडणार कशी? ह्याला धीर येणार कसा? ज्याप्रमाणें ग्रहपीडेचा ज्योतिषी विचार करतो, ८५ किंवा असाध्य रोग पाहिला ह्मणजे वैद्य जसा झटकर निदानीच्या अमृतासमान औषधीची योजना करतो, ८६ त्याप्रमाणें **अर्जुना**ची भ्रांति कोणत्या उपायानें घालवावी, ह्मणून त्या दोन्ही सैन्यांमध्यें **श्रीकृष्ण** विचार करूं लागले. ८७ आणि मनांत त्याचा निश्चय करून क्रोधयुक्त वाणीनें बोलण्यास प्रारंभ केला. ज्याप्रमाणें मातेच्या रागांत गुप्त रूपानें स्नेह असतो; ८८ किंवा औषधाच्या

१ शोकानें व्याप्त झालेला. २ आग्रह करूं नये, भीड घालूं नये. ३ युद्ध करणार नाहीं. ४ निश्चयेंकरून. ५ एकदम. ६ राहिला. ७ चमत्कार, आश्चर्य.

१ आपुल्या. २ काय. ३ आरंभिलें. ४ नवग्रहांना. ५ ज्योतिषी. ६ परीक्षा करितो. ७ योजना करतो. ८ तत्काळ. ९ अखेरची, आणीबाणीची. १० विचार करीत. ११ क्रोधयुक्त. १२ गुप्तरीतीनें. १३ सांठा, गुण. १४ वरवरच. १५ प्रारंभ केला.

**कडवटपणांत जशी अमृताची भर असते, ती वर वर दिसत नाहीं तरी, गुणामध्यें प्रगट होते. ८९ त्याप्रमाणें वरून दिसण्यांत रागाचीं, पण आंतून अत्यंत सुरस अशा वाक्यांनीं श्रीकृष्णांनीं बोलण्यास प्रारंभ केला. ९०**

श्रीभगवानुवाच.

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥

[श्रीभगवानुवाच—] मग अर्जुनातें म्हणितलें । आम्ही आजि हें नवल देखिलें । जें तुवां एथ आदरिलें । माझारींचि ॥ ९१ ॥ [त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे] तूं जाणता तरी म्हणविसी । परी नेणिवेतें न सांडिसी । आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी । बहुसालें नीति ॥ ९२ ॥ जात्यंधा लागे पिसें । मग तें सैरा धांवे जैसें । तुझें शाहाणपण तैसें । दिसतसे ॥ ९३ ॥ तूं आपणांपें तरी नेणसी । [अशोच्यानन्वशोचः] परी या कौरवांतें शोचूं पाहासी । हा बहु विस्मय आम्हांसी । पुढतपुढती ॥ ९४ ॥ [प्रहसन्निव भारत इति १० श्लोकस्थं ] तरी सांग पां अर्जुना । तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना । हे अनादि विश्वरचना । तें लटकें कायी ॥ ९५ ॥ एथ संमर्थ एक आथी । तयापासूनि भूतें होती । तरी हें वायांचि काय बोलती । जगामाजी ॥ ९६ ॥ हो कां सांप्रत ऐसें जाहालें । जे हे जन्ममृत्यू तुवां सृजिले । आणि नाश पावे नाशिलें । तुझेनि कायी ॥ ९७ ॥ तूं भ्रमलेपणें अहंकृती । यांसि घात न धरिसी चित्तीं । तरी सांगें कायि हे होती । चिरंतन ॥ ९८ ॥ कीं तूं एक वधितां । आणि सकळ लोक हा मरता । ऐसी भ्रांति झणें चित्ता । येवों देसी ॥ ९९ ॥ अनादिसिद्ध हें आघवें । होतें जात स्वभावें । तरी तुवां कां शोचावें । सांगें मज ॥ १०० ॥ परी मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी । आणि तूंचि नीति सांगसी । आम्हाप्रति ॥ १ ॥ [गतासूनित्यर्धं ] देखें विवेकी जे होती । ते दोहींतेंही न शोचिती । जे होय जाय हे भ्रांती । म्हणऊनियां ॥ २ ॥

१ मध्येंच. २ अज्ञानपणाला. ३ नानाप्रकारें. ४ जन्मांधाला. ५ वेड. ६ हवेंतिकडे. ७ स्वतःला. ८ शोक करूं पहातोस. ९ पुन्हा पुन्हा. राहून राहून. १० आधार. ११ शक्तिमान्. १२ आहे. १३ प्राणीमात्र, पंचमहाभूतें. १४ तर. १५ तूं. १६ उत्पन्न केलें. १७ तुझ्यामुळेंच. १८ भ्रमानें. १९ चिरंजीव. २० मारणारा. २१ मरणारे. २२ कदाचित्. २३ उत्पन्न होतें. २४ नाश पावतें. २५ शोक करावास. २६ कारण.

**मग अर्जुनाला म्हणतात—"आज तूं जें हें मध्येंच मांडलें आहेस, तें पाहून आपणास तर फार आश्चर्य वाटलें बुवा! ९१ तूं ज्ञाता तर म्हणवितोस; पण अज्ञानपणा सोडीत नाहींस आणि शिकवूं म्हटलें, तर नानाप्रकारची नीति सांगतोस! ९२ मूळचा जन्मांध असावा; आणि त्याला वेड लागावें. म्हणजे तो जसा मनास वाटेल तिकडे भटकूं लागतो तशांतलेंच तुझें शहाणपण दिसतें. ९३ तूं कोण ? तें तुझें तुला माहित नाहीं. आणि कौरवांसाठीं शोक करावयाला तूं तयार होतोस. ह्याच गोष्टीचें आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटतें. ९४ तर हे अर्जुना! हें त्रिभुवन तुझ्याच आश्रयानें चाललें आहे होय? सांग पाहूं. आणि ही विश्वरचना अनादि असें जें म्हणतात, तें खोटेंच का? ९५ कोणी एक सर्वसमर्थ आहे. त्यापासून हे सर्व प्राणिमात्र होतात, असें जगामध्यें जें बोलतात तें मिथ्याच का? ९६ तर आतां असें झालें कीं, हे जन्ममृत्यु तूं उत्पन्न केलेस. आणि नाश पावले ते तूंच नाश करून पावले ना? ९७ तूं अभिमानें भ्रमिष्ट झाल्यामुळें ह्यांस मारण्याचें तुझ्या मनांत येत नाहीं. म्हणून हे काय चिरंजीव होणार होय? ९८ किंवा तूंच एक मारणारा, आणि बाकी सगळे लोक मरणारे, अशी तुझ्या चित्तांत भ्रांति उत्पन्न झाली आहे? ९९ बाबा! हें सर्व अनादिसिद्ध आहे. तें सृष्टिनियमाप्रमाणेंच उत्पन्न होतें, आणि सृष्टिनियमाप्रमाणेंच नाश पावतें. मग त्याबद्दल तूं काय म्हणून शोक करावास? सांग बरें मला. १०० पण अज्ञानपणानें तुला तें समजत नाहीं. जी गोष्ट मनांत आणूं नये ती आणतोस. आणि तूंच आम्हाला नीति सांगतोस! १ हें पहा अर्जुना! विचारी पुरुष आहेत ते, जन्मास येणें आणि मरणें या दोन्हीही भ्रांति आहेत, हें मनांत आणून त्या दोहोंबद्दल खेद करीत नाहींत. २**

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥१२॥

[न त्वेवाहं] अर्जुना सांगेन आइक । एथ आह्मी तुह्मी देख । आणि हे भूपति अशेखे । आदिकरूनी ॥ ३ ॥ [न चेत्यर्थे] नित्यता ऐसेचि असोनी । नातरी निश्चित क्षया जाउनी । हे भ्रांति वेगळी करूनी । दोन्ही नाहीं ॥ ४ ॥ हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे । येऱ्हवीं तत्त्वता वस्तु जें असे । तें अविनाशचि ॥ ५ ॥ जैसें पवनें तोय हालविलें । आणि तरंगाकार जाहालें । तरी कवण कें जन्मलें । ह्मणोंये तेथ ॥ ६ ॥ तेंचि वायूचें स्फुरण ठेलें । आणि उदक सहज सपाट जाहालें । तरी आतां काय निमालें । विचारीं पां ॥ ७ ॥

**अर्जुना, आणखी सांगतों ऐक. पहा! येथें तुह्मी व आह्मी, आणि सर्व राजे आदिकरून ३ आहोंत, असेच नित्य असणार किंवा निश्चयेंकरून क्षयास जाणार, ही भ्रांति आहे. ती टाकून दिली तर दोन्हीही नाहींत. ४ हें जन्मलेलें आणि नाश पावलेलें दिसतें, तें मायेच्या योगानें. बाकी, खरी वस्तु (आत्मा, परब्रह्म.) जी आहे,ती अविनाशीच आहे. ५ जसें वाऱ्यानें पाणी हाललें आणि लाटांच्या आकारानें दिसूं लागलें, तर तेथें कोण आणि कोठें जन्मलें ह्मणावें? ६ तसेंच वायूचा प्रवाह बंद झाला, आणि उदकही आपोआप सपाट झालें; तर त्यांत नाश पावलें कोण? याचा विचार कर बरें. ७**

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

[देहिन इति] आइकें शरीर तरी एक । परी वयसाभेदें अनेक । हें प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ॥ ८ ॥ एथ कौमारत्व दिसे । मग तारुण्यीं तें भ्रंशे । परी देहीच न नाशे । एकेकासवें ॥ ९ ॥ [तथेति] तैसीं चैतन्याच्या ठायीं । इयें शरीरांतरें होती जाती पाहीं । ऐसें जाणे तया नाहीं । व्यामोहदुःख ॥ ११० ॥

**आणखी ऐक. शरीर तर एक आहेना? परंतु वयपरत्वें त्याचे देखील भेद होतात. हेंच प्रत्यक्ष प्रमाण तूं पाहून घे ह्मणजे झालें. ८ त्यांत बाळपण दिसून येतें; तारुण्य लागलें ह्मणजे तें नाहींसें होतें; परंतु आत्मा असतो तो कायमच असतो. तो त्या प्रत्येकाबरोबर कांहीं नाश पावत नाहीं. ९ त्याप्रमाणें चिच्छक्तीमध्यें हीं नानाप्रकारचीं शरीरें उत्पन्न होतात, आणि नाश पावतात. हें ज्यास कळतें, त्यास भ्रांतिपासून होणारें दुःख होत नाहीं. ११०**

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत १४॥

[मात्रास्पर्शा इति] एथ नेणावया हेंचि कारण । जें इंद्रियां आधीनपण । तिहीं आकळिजे अंतःकरण । ह्मणऊनि भ्रमे ॥ ११ ॥ इंद्रियें विषय सेविती । तेथ हर्ष शोक उपजती । ते अंतर आप्लविती । संगें येणें ॥ १२ ॥ जयां विषयांचा ठायीं । एकनिष्ठता कहीं नाहीं । तेथ दुःख आणि कांहीं । सुखही दिसे ॥ १३ ॥ देखें शब्दाची व्याप्ति । निंदा आणि स्तुती । तेथ द्वेषाद्वेष उपजती । श्रवणद्वारें ॥ १४ ॥ मृदु आणि कठिण । हे स्पर्शाचे दोनी गुण । जे वपूचेनि संगें कारण । संतोषखेदां ॥ १५ ॥ भ्यासुर आणि सुरेख । हें रूपाचें स्वरूप देख । जें उपजवी सुखदुःख । नेत्रद्वारें ॥ १६ ॥ सुगंध आणि दुर्गंध । हा परिमळाचा भेद । जो घ्राणसंगें विषाद । तोष देता ॥ १७ ॥ तैसाचि द्विविध रस । उपजवी प्रीतित्रास । ह्मणूनि हा अपभ्रंश । विषयसंग ॥ १८ ॥ देखें इंद्रियां आधीन होइजे । तैं शीतोष्णातें पाविजे । आणि सुखदुःखीं आकळिजे । आपणपें ॥ १९ ॥ या विषयांवांचूनि कांहीं । आणीक सर्वथा रम्य नाहीं । ऐसा स्वभावचि पाहीं । इंद्रियांचा ॥ १२० ॥ [आगमापायिन इति] हे विषय तरी कैसे । रोहिणीचें जळ जैसें । कां स्वप्नींचा आभासे । भद्रजाति ॥ २१ ॥ देखें अनित्य ते यापरी । ह्मणऊनि तूं अव्हेरीं । हा सर्वथा संग न धरीं । धनुर्धरा ॥ २२ ॥

**हें ध्यानांत न येण्याचें कारण इंद्रियाधीनपणा. इंद्रियांनीं अंतःकरणाला ओढ लावलेली असते, ह्मणून तें भ्रमांत पडतें. ११ विषयांचे उपभोग इंद्रियें घेतात; ह्मणून तेथें हर्ष आणि शोक उत्पन्न होतो. आणि तेच ह्यांच्या संगतीनें अंतःकरण बुडवून टाकतात. १२ विषयांच्या**

१ सर्व. २ सार्वकाल. ३ असणार. ४ जाणार. ५ मायेच्या योगानें. ६ नित्य असणारी, अजरामर. ७ तत्त्व. ८ नाशरहित. ९ वाऱ्यानें. १० पाणी. ११ लाटांच्या आकाराचें. १२ कोण. १३ कोठें. १४ ह्मणतां येईल. १५ हालचाल. १६ बंद झालीं. १७ नाश पावलें. १८ वयपरत्वें. १९ नष्ट होतें. २० आत्मा. २१ चिच्छक्ति. २२ भ्रांतीचें दुःख.

१ स्वाधीन. २ ओढलें जातें. ३ बुडवितात. ४ नाकाच्या योगानें. ५ दुःख. ६ दोन प्रकारचा. ७ मृगजळ. ८ भासतो. ९ हत्ती. १० क्षणिक. ११ ह्याप्रमाणें, असे.

ठिकाणीं ज्यांची कधींच आसक्ति नाहीं, त्यांना दुःख किंवा दुसरें कांहीं असलें तरी सुखच वाटतें. १३ निंदा किंवा स्तुति पाहूं गेलें तर दोन्हीही शब्दच आहेत; पण तेच कानावर पडले कीं, द्वेष किंवा स्नेह उत्पन्न होतो! १४ मृदु आणि कठीण, हे दोन स्पर्शाचे गुण आहेत. पण शरीराच्या संगतीनें तेच संतोषाला किंवा खेदाला कारण होतात. १५ भेसूर आणि सुरेख, हे पाहूं गेलें तर स्वरूपाचे भेद आहेत. पण ते नेत्राच्या द्वारानें सुख आणि दुःख उत्पन्न करतात. १६ सुगंध आणि दुर्गंध हा वासाचा भेद आहे. परंतु तो नाकाच्या अनुषंगानें आनंद आणि दुःख देतो. १७ त्याचप्रमाणें दोन प्रकारचा रस हाही प्रीतीला आणि त्रासाला कारण होतो. ह्मणून विषयाची संगति हेंच अविचाराचें मूळ आहे. १८ हें पहा, इंद्रियांच्या आधीन झालें ह्मणजे शीत आणि उष्ण हीं प्राप्त होतात; आणि मग स्वतःच सुखदुःखांत गुरफटून जातो. १९ या विषयांवाचून दुसरें कोणतेंही रम्य वाटूं नये, असा ह्या इंद्रियांचा स्वभावच पडला पहा! १२० हे विषय कसे आहेत? तर ज्याप्रमाणें मृगजळ, किंवा स्वप्नांतील हत्ती क्षणिक, २१ त्याप्रमाणें हेही क्षणिक—भासमान—आहेत. ह्मणून अर्जुना! तूं त्यांचा अव्हेर कर. काडीमात्र संगति धरूं नकोस. २२

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुपर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

[यं हीति] हे विषय जयातें नाकळिती । [समेति] तया सुखदुःखें न पवती । आणि गर्भवाससंगती । नाहीं तया ॥२३॥ तो नित्यरूप पार्था । वोळखावा सर्वथा । जो या इंद्रियार्थां । नागवेचि ॥ २४ ॥

विषय ज्याला बद्ध करीत नाहींत, त्याला सुखें किंवा दुःखें प्राप्त होत नाहींत. आणि त्याला गर्भवासाचाही फेरा नाहीं. २३ अर्जुना! जो या विषयांच्या सपाट्यांत सांपडत नाहीं, तो सदासर्वकाल तृप्त आहे ह्मणून समजावें. २४

१ ओढीत नाहींत. २ प्राप्त होत नाहींत. ३ पुनर्जन्म. ४ विषयांच्या पाशांत. ५ सांपडत नाहीं.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।
उभयोरपि दृष्टोंऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

[तत्त्वदर्शिभिः] आतां अर्जुना कांहीं एक । सांगेन मी आइक । जें विचारें परलोक । वोळखती ॥ २५ ॥ [उभयोरपि दृष्टोंऽतस्त्वनयोः] या उपाधिमांजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत । तें तत्त्वज्ञ सतत । स्वीकारिती ॥ २६ ॥ सलिलीं पय जैसें । एक होऊनि मिनलें असे । परी निवडूनि राजहंसें । वेगळें कीजे ॥ २७ ॥ कीं अग्निमुखें किडाळ । तोडोनियां चोखाळ । निवडिती केवळ । बुद्धिमंत ॥ २८ ॥ नातरी जाणिवेच्या आयणी । करितां दधिकडसणी । मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें ॥ २९ ॥ कीं भूस बीं एकवट । उपाणितां राहे घनवट । तेथ उडे तें फळकट । जाणो आलें ॥ १३० ॥ [नासतो विद्यते भावः] तैसें विचारितां निरसलें । तें प्रपंच सहजें सांडवलें । [नाभावो विद्यते सतः] मग तत्त्वता तत्त्व उरलें । ज्ञानियांसि ॥ ३१ ॥ ह्मणोनि अनित्याच्या ठायीं । तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं । निष्कर्ष दोहींही । देखिला असे ॥ ३२ ॥

आतां अर्जुना! ज्याच्या विचारानें परलोकाची ओळख होईल, असें आणखी एक कांहीं सांगतों. २५ या जगामध्यें सर्व व्यापक अशी एक गुप्त चिच्छक्ति आहे. तिचा तत्त्वज्ञ लोक नेहमीं स्वीकार करतात. २६ ज्याप्रमाणें पाण्यामध्यें दूध मिश्र होऊन एकरूप झालें, तरी राजहंस तें निवडून वेगळें करितो, २७ किंवा अग्नींत हिणकस जाळून सोनार जसा शुद्ध सोनें निवडून काढतो, २८ किंवा ज्ञानाच्या चातुर्यानें दहीं घुसळलें असतां, शेवटीं जसें लोणी दिसूं लागतें, २९ किंवा कोंडा आणि बीं एकत्र उपणलें असतां सारभूत धान्य असतें तें खालीं राहतें; आणि उडून जातें तें फोल, हें सहजच कळून येतें. १३० त्याप्रमाणें विचारा अंतिं मिथ्या ठरलेल्या प्रपंचाचें अस्तित्व आपोआपच नाहींसें होतें. मग अर्थातच यथार्थतत्त्व हाच ज्ञान्यांला विषय उरतो. ३१ ह्मणून ज्ञा-

१ ज्या. २ जगामध्यें. ३ सर्वव्यापक. ४ पाण्यामध्यें. ५ दूध. ६ मिथ्या ठरलेला. ७ हीण (सुवर्ण.) ८ ज्ञानाच्या. ९ चातुर्यानें. १० दही. ११ घुसळणें. १२ लोणी. १३ शेवटीं. १४ पाखडलें असतां. १५ भरीव धान्य. १६ विरक्त झाले. १७ अशाश्वताच्या ठिकाणीं. १८ त्यांना. (ज्ञानी जनांना.) १९ सत्यताबुद्धि. २० निर्णय, सिद्धांत.

त्यांची अनित्याच्या ठिकाणीं सत्यताबुद्धि रहात नाहीं. कारण, दोहोंमध्यें तथ्य काय तें त्यांनीं पाहिलेलें असतें. ३२

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

[अविनाशि तु तद्विद्धि] देखें सारासार विचारितां । भ्रांति ते पाहीं असारता । तरी सार तें स्वभावता । नित्य जाणें ॥ ३३ ॥ [येन सर्वमिदं ततं] हा लोकत्रयाकार । तो जयाचा विस्तार । तेथ नाम वर्ण आकार । चिन्ह नाहीं ॥ ३४ ॥ [विनाशमिति] जो सर्वदा सर्वगत । जन्मक्षयातीत । तया केलियाहि घात । कदा नोहे ॥ ३५ ॥

पहा! सारासारविचारानें पाहिलें तर असार ती भ्रांति, आणि सार ह्मणून जें आहे, तें स्वभावधर्माप्रमाणेंच नित्य आहे. ३३ हा तिन्ही लोकांचा आकार ज्यापासून विस्तार पावला आहे, त्याला नांव, रंग, रूप इत्यादि कोणतेंही चिन्ह नाहीं. ३४ तो सदासर्वकाल सर्वांमध्यें व्यापून राहिलेला आहे. तो जन्ममरणाविरहित आहे. त्याचा घात करूं ह्मटलें तरी सुद्धां कधीं व्हावयाचा नाहीं. ३५

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥

[अंतवंत इमे देहाः] आणि शरीरजात आघवें । हें नाशवंत स्वभावें । [नित्यस्येति । शेषं स्पष्टं] ह्मणोनि तुवां झुंझावें । पंडुकुमरा ॥ ३६ ॥

आणि शरीर धारण करणारें ह्मणून जेवढें आहे तेवढें सारें स्वभावतःच नाशिवंत आहे. या करितां अर्जुना! तूं युद्ध कर. ३६

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥१९॥

[य एनमिति] तूं धरूनि देहाभिमानातें । दिठी सूनि शरीरातें । मी मारिता हे मरते । ह्मणत आहासी ॥ ३७ ॥ [उभाविति] तरी अर्जुना तूं हें नेणसी । जरी तत्त्वता विचारिसी । तरी वधिता तूं नव्हसी । ते वध्य नव्हती ॥ ३८ ॥

१ निस्सारपणा, पोंचटपणा. २ अजरामर. ३ सर्वव्यापक. ४ जन्ममरणविरहित. ५ त्याचा (आत्म्याचा, परब्रह्माचा) ६ प्राणिमात्र. ७ सर्व. ८ दृष्टि. ९ ठेवून. १० मारणारा. ११ मरणारे. १२ यथार्थ. १३ मारणारा. १४ नव्हेस. १५ मरणारे.

तूं देहाभिमान धरून शरीरावरच दृष्टि ठेविली आहेस. आणि मी मारणारा व हे मरणारे असें ह्मणत आहेस. ३७ पण अर्जुना! त्यांतील मर्म तुला कळत नाहीं. खरें विचारशील तर तूं मारणाराही नव्हेस, आणि ते मरणारेही नव्हेत. ३८

न जायते म्रियते वा कदाचि-
न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥२१॥

[न जायत इति] जैसें स्वप्नामाजि देखिजे । तें स्वप्नींचि आपजे । [अज इति] मग चेऊनियां पाहिजे । तंव कांहीं नाहीं ॥ ३९ ॥ [न हन्यते हन्यमाने शरीरे] तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासि वायां । शस्त्रें हाणितलिया छाया । जैसी आंगीं न रुपे ॥ १४० ॥ [वेदेति] कां पूर्ण कुंभ उलंडला । तेथ बिंबाकार दिसे भ्रंशला । परी भानु नाहीं नासला । तयासवें ॥ ४१ ॥ नातरी मठीं आकाश जैसें । मठाकृती अवतरलें असे । तो भंगलिया आपैसें । स्वरूपचि ॥ ४२ ॥ [कथमिति] तैसें शरीराच्या लोपीं । सर्वथा नाश नाहीं स्वरूपीं । ह्मणऊनि तूं हें नारोपीं । भ्रांति बापा ॥ ४३ ॥

ज्याप्रमाणें स्वप्नांत पाहिलेलें सर्व स्वप्नामध्यें खरेंच दिसतें; पण जागें होऊन पहावें, तों कांहीं नाहीं. ३९ तशी ही माया आहे, समजलास? तूं मात्र फुकट भ्रमांत पडला आहेस. छायेवर तरवारीचा वार केला, तरी तिच्या आंगास जसा भंग होत नाहीं, ४० किंवा भरलेली घागर उपडी झाली, तरी तिच्याबरोबर तींत पडलेलें सूर्याचें प्रतिबिंब नाहींसें होतें, परंतु सूर्य

१ खरें वाटतें. २ जागृत होऊन. ३ आहेस. ४ वार केल्यास. ५ लागत नाहीं. ६ लवंडला. ७ आंत पडलेलें प्रतिबिंब. ८ नाश पावलें. ९ नाश झाला. १० गृहामध्यें. (मलबारांत अद्यापि ब्राह्मणाच्या घराला 'मठ' अशीच संज्ञा आहे.) ११ घराच्या आकारासारखें. १२ होऊन राहतें. १३ मठ (घर.) १४ मोडलें. १५ आपोआप. १६ मूळचेंच स्वरूप. १७ नाशानें. १८ ही. १९ धरूं नको

**कांहीं नाहींसा होत नाहीं. ४१ किंवा, घरांतील आकाशाचा आकार घराप्रमाणेंच बनतो; पण तें घर मोडलें, तर त्याचें पूर्वरूप कायम तें कायमच. ४२ तसें, शरीराचा नाश झाला तरी आत्म्याचा ह्मणून नाश नाहीं. ह्याकरितां बाबा! तूं भलतीच भ्रांति घेऊं नको. ४३**

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २२ ॥

[वासांसीति] जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे । [तथेति] तैसें देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ॥४४॥

**वस्त्र जुनें झालें ह्मणजे जसें आपण तें टाकून देऊन नवें नेसतों, तद्वत् आत्मा हा दुसरा देह धारण करतो. ४४**

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥

[नैनं छिंदंति शस्त्राणि] हा अनादी नित्यसिद्ध । निरुपाधि विशुद्ध । ह्मणऊनि शस्त्रादिकीं छेद । न घडे यया ॥ ४५ ॥ [न चैनं क्लेदयंत्यापः] हा प्रळयोदकें नाप्लवे । [नैनं दहति पावकः] हा अग्नीदाह न संभवे । [न शोषयति मारुतः] एथ महाशोष न प्रभवे । मारुताचा ॥ ४६ ॥ [नित्य इति] अर्जुना हा नित्य । अचळ हा शाश्वत । सर्वत्र सदोदित । परिपूर्ण हा ॥४७

**तो उत्पत्तिरहित, नित्यस्वरूप, मायावरणादिरहित आणि पवित्र आहे. ह्मणून शस्त्रादिकांनीं त्याचा छेद होत नाहीं. ४५ हा जलप्रलयानें बुडावयाचा नाहीं; अग्नीच्या भडक्यानें जळावयाचा संभव नाहीं; झंझावातानें सुद्धां शुष्क व्हावयाचा नाहीं. ४६ अर्जुना! ह्याचा कधींही नाश होणें नाहीं. हा अचल आणि शाश्वत असून सर्वत्र ठिकाणीं नेहेमीं परिपूर्ण आहे. ४७**

अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

[अचिंत्योऽयं] हा तर्कांचिये दिठी । गोचर नोहे किरीटी । ध्यान यांचिये भेटी । उत्कंठा वाहे ॥ ४८ ॥ हा सदा दुर्लभ मना । आंप नोहे साधना । निःसीम हा अर्जुना । पुरुषोत्तम ॥ ४९ ॥ [अविकार्योऽयमुच्यते] हा गुणत्रया रहित । अनादि अविकृत । [अव्यक्तोऽयं] व्यक्तीसि अतीत । सर्वरूप ॥ १५० ॥ [तस्मादिति] अर्जुना ऐसा हा जाणावा । सकळात्मक देखावा । मग सहजें शोक आघवा । हरेल तुझा ॥ ५१ ॥

**हे किरीटी! तर्कशास्त्राच्या दृष्टीनें ह्याचें स्वरूप व्यक्त व्हावयाचें नाहीं. योग्यांचें ध्यान मात्र, ह्याच्या (आत्म्याच्या) भेटीला नेहेमीं उत्सुक असतें. ४८ हा नेहमीं मनाला प्राप्त होणें कठीण. साधनानेंही तो मिळावयाचा नाहीं. अर्जुना! हा पुरुषोत्तम, पाररहित आहे. ४९ हा तीन गुणांपासून निराळा, अनादि, व्यक्तिपासून भिन्न, आणि सर्वरूप, १५० असा असून तो सर्वव्यापक आहे, हें मनांत आण; ह्मणजे अर्जुना! तुझा शोक सहजीं नाहींसा होईल. ५१**

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथाऽपि त्वं माहाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥

[अथेत्यर्धं] अथवा ऐसा नेणसी । तूं अंतवंतचि मानिसी । तर्‍हीं शोचूं न पवसी । पंडुकुमरा ॥ ५२ ॥ जे आदि स्थिति अंत । हा निरंतर असे नित्य । जैसा प्रवाह अनुस्यूत । गंगाजळाचा ॥ ५३ ॥ तें आदि नाहीं खंडलें । समुद्रीं तरी असे मिनलें । आणि जातांचि मध्यें उरलें । दिसे जैसें ॥ ५४ ॥ इयें तीन्हीं तयापरी । सरसींच सदा अवधारीं ।

१ टाकावें. २ नवें. ३ नेसावें. ४ दुसरें शरीर. ५ धारण करावें. ६ आत्म्यानें. ७ आत्मा. ८ उत्पत्तिरहित. ९ नित्य असणारा. १० मायावरणादिरहित. ११ परम निर्मल. १२ नाश. १३ त्याला. १४ महापूरानें. १५ बुडत नाहीं. १६ अग्नीनें जळणें. १७ सुकवून टाकणें. १८ समर्थ नाहीं. १९ वायूचें.

१ तर्कशास्त्राच्या. २ दृष्टीला. ३ दिसत नाहीं. ४ समाधि. ५ ह्याच्या. ६ प्राप्त. ७ साधनाला. ८ तीन गुणांपासून. ९ वेगळा. १० विकार न पावणारा. ११ गुणरूपरंग. १२ भिन्न, रहित. १३ सर्वव्यापी. १४ सर्वांमध्यें भरलेला. १५ सर्व. १६ समजूत पटत नसेल, असें तुझें मत नसेल. १७ नाशवंत. १८ शोक करणें. १९ योग्य नाहीं. २० अखंड. २१ मिळालें. २२ हीं. २३ सारखींच. २४ ध्यानांत ठेव.

भूतांसि कवणीं अवसरीं। ठाकतीना ॥ ५५ ॥ [तथेति] ह्मणोनि हें आघवें। एथ तुज नलगे शोचावें। जे स्थितीचि हे स्वभावें। अनादि ऐसी ॥ ५६ ॥ नातरी हें अर्जुना। नयेचि तुझिया मना। जे देखोनि लोक अधीना। जन्मक्षया ॥ ५७ ॥ तरी एथें कांहीं। तुज शोकासि कारण नाहीं। हे जन्म मृत्यु पाहीं। अपरिहरें ॥ ५८ ॥

**अथवा, तशा प्रकारचा तो आहे, हें तुझ्या मनांत भरत नसेल, आणि तो नाशिवंतच आहे, असें तूं ह्मणत असशील, तरी सुद्धां तुला शोक करण्याचें कारण नाहीं. ५२ कारण, उत्पत्ति, स्थिति, आणि लय, हे गंगेच्या प्रवाहाप्रमाणें अखंड आहेतच. ५३ गंगेचा प्रवाह समुद्राला जाऊन मिळत असतो; पण मूळांत कांहीं खंड पडत नाहीं. आणि तो वहात असतांना मध्यंतरी तर स्पष्ट दिसतो; ५४ त्याप्रमाणेंच हीं तिन्हीं सारखीं चालू आहेत हें ध्यानांत ठेव. तीं प्राणिमात्रांना टाळतां यावयाचीं नाहींत. ५५ ह्मणून त्याकरितां तुला शोकही करावयास नको. कारण, हें सृष्टिचक्र असेंच अनादिकालापासून अव्याहत चाललें आहे. ५६ किंवा लोकांच्या मागें जन्म मरण लागलेलें आहे हें पाहून, हे अर्जुना! हेंही तुझ्या मनास येत नसेल, ५७ तरीही तुला शोक करण्याचें कारण नाहीं. कारण असें पहा कीं, जन्म आणि मृत्यु हे कोणालाही सुटावयाचे नाहींत. ते अपरिहार्य आहेत. ५८**

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि॥ २७॥

[जातस्य हि ध्रुवो मृत्युः] उपजे तें नाशे। [ध्रुवं जन्म मृतस्य च] नाशलें पुनरपि दिसे। हें घटिकायंत्र तैसें। परिभ्रमे गा ॥ ५९ ॥ नातरी उदो अस्तु आपैसे। अखंडित होत जात जैसे। हें जन्ममरण तैसें। अनिवार जगीं ॥ १६० ॥ महाप्रळयअवसरें। हें त्रैलोक्यही संहरे। [तस्मादपरिहार्येऽर्थे] ह्मणोनि हा न परिहरे। आदि अंत ॥ ६१ ॥ [न त्वं शोचितुमर्हसि] तूं जरी हें ऐसें मानिसी। तरी खेद कां करिसी। काय जाणतचि नेणसी। धनुर्धरा ॥ ६२ ॥ एथ आणिकही एक पार्था। तुज बहूतीं परी पाहातां। दुःख करावया सर्वथा। विषो नाहीं ॥ ६३ ॥

**जें उत्पन्न होतें, त्याचा नाश होतो; नष्ट होतें, तें पुन्हा उत्पन्न होतें. घड्याळाप्रमाणेंच हें राहटगाडगें सारखें चालू आहे. ५९ किंवा उदय झाला, ह्मणजे अस्त व्हावयाचा; अस्त झाला ह्मणजे पुन्हा उदय व्हावयाचा; चुकावयाचें नाहीं. त्याप्रमाणेंच जगामध्यें जन्म आणि मरण हेंही चुकावयाचें नाहीं. तेंही अनिवार्य आहे. ६० महाप्रळयाच्या वेळेस ह्या साऱ्या त्रिभुवनाचा सुद्धां संहार होऊन जातो. ह्याकरितां हा आदि आणि अंत सुटावयाचा ह्मणून नाहीं. ६१ हें तुला जर मान्य आहे तर मग खेद कां करतोस? धनुर्धरा! तुला सारें कळत असून माहीत नसल्यासारखें काय करतोस? ६२ आणखी अर्जुना! कोणत्याही तऱ्हेनें विचार केला, तरी तुला शोक करण्याला कारण ह्मणून मुळीं दिसतच नाहीं. ६३**

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना॥ २८॥

[अव्यक्तादीनि भूतानि] जियें समस्तें इयें भूतें। जन्मा-आदि अमूर्तें। मग पातलीं व्यक्तीतें। जन्मलेया ॥ ६४ ॥ [अव्यक्तनिधनान्येव] तियें क्षयासि जेथ जाती। तेथ निभ्रांत आनें नव्हती। देखें पूर्वस्थितीच येती। आपुलिये ॥ ६५ ॥ [व्यक्तमध्यानि भारत] येरें मध्यें जें प्रतिभासे। तें निद्रिता स्वप्न जैसें। तैसा आकार हा मायावशें। सत्स्वरूपीं ॥ ६६ ॥ ना तरी पवनें स्पर्शिलें नीर। पढियासे तरंगाकारें। कां परापेक्षें अळंकार। व्यक्ती कनकीं ॥ ६७ ॥ तैसें सकळ

१ प्राणिमात्रांना. २ कोणत्याही. ३ वेळीं. ४ टाळतां येत नाहींत. ५ शोक करणें. ६ कारण. ७ आधीन आहेत त्यांना. ८ जन्ममृत्यूच्या. ९ अनिवार्य. १० घड्याळ. ११ उदय. १२ अस्त. १३ आपोआप. १४ वेळीं. १५ नाश पावतें.

१ टळे. २ मान्य असेल. ३ कारण, विषय. ४ जीं. ५ हीं. ६ उत्पन्न होण्याच्यापूर्वी. ७ निराकार. ८ आकारास. ९ जन्मास आल्यानंतर. १० तीं. ११ वेगळ्या रूपानें. १२ आपल्या. १३ दुसरें. १४ भासमान होतें. १५ मायेच्या योगानें. १६ चित्स्वरूपामध्यें. १७ वाऱ्यानें. १८ हालविलेलें. १९ पाणी. २० दिसूं लागतें, भासतें. २१ लाटारूप. २२ दुसऱ्याच्या इच्छेनें. २३ प्रगटपणा. २४ सुवर्णामध्यें.

हें मूर्त । जाण पां मायाकारित । जैसें आकाशीं विव्रत । अभ्रपटळ ॥ ६८ ॥ तैसें आदीच्चि जें नाहीं । [ तत्र का परिदेवना ] तयालागीं तूं रुदसी कायी । तूं अवीट तें पाहीं । चैतन्य एक ॥ ६९ ॥ जयाची आर्तीच्चि भोगिंते । विषयीं त्यजिले संतें । जयालागीं विरक्त । वनवासिये ॥ १७० ॥ दृष्टी सूनि जयातें । ब्रह्मचर्यादि व्रतें । मुनीश्वर तपातें । आचरताती ॥ ७१ ॥

**जन्मास येण्यापूर्वीं हीं सारीं भूतें निराकार असतात; जन्मास आलीं, ह्मणजे मात्र त्यांस आकार प्राप्त होतो. ६४ तीं जेथें लयास जातात, तेथेंही निःसंशय त्यांस दुसरें स्वरूप असत नाहीं. त्यांची पूर्वस्थितीच त्यांस प्राप्त होते. ६५ आतां मध्यंतरीं दिसणारें जें हें स्वरूप, तें निद्रिस्थाच्या स्वप्नाप्रमाणें मायेच्या संसर्गानें आत्म्याचाच हा दृश्याकार बनून झालें आहे. ६६ किंवा, वाऱ्यानें हालविलेलें पाणी, लाटारूप दिसूं लागतें. किंवा दुसऱ्याच्या इच्छेवरून निरनिराळ्या अलंकाररूपानें सुवर्ण दिसूं लागतें. ६७ तसें आकाशांत ढगाची फळी उत्पन्न झाल्याप्रमाणें, मायेमुळें हें विश्व दृश्याकारास आलें आहे. ६८ ह्याकरितां ज्याला जन्मच नाहीं, त्याच्याकरितां तूं कां रडतोस? ज्याचा कधींही वीट येणारा नव्हे, त्या एका चैतन्याकडे तूं पहा ह्मणजे झालें. ६९ त्याची इच्छा उद्भवली कीं, विषयाचे भोग आपोआपच मनुष्यास सोडून जातात. ज्याच्यासाठीं कित्येक साधूंनीं वैराग्य धारण धरून अरण्यवास पत्करला आहे. ७० मोठमोठाले ऋषिवर्य त्याच्यावर दृष्टि ठेवूनच ब्रह्मचर्यादिव्रतांचें आणि तपांचें आचरण करतात. ७१**

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन-
माश्चर्यवद्वदति तथैव चाऽन्यः ।
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥

[आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनं] एक अंतरीं निश्चळ । जें निहाळितां केवळ । विसरले सकळ । संसारजातें ॥ ७२ ॥ [आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः] एकां गुणानुवाद. करितां । उपरती होऊनि चित्ता । निरवधि तल्लीनता । निरंतर ॥ ७३ ॥ [आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति] एक ऐकतांच्चि निवाले । ते देहभावीं सांडिले । [श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्] एक अनुभवें पातले । तद्रूपता ॥ ७४ ॥ जैसे सरिताओघ समस्त । समुद्रामाजि मिळत । परी माघौते न समाते । परतले नाहीं ॥ ७५ ॥ तैसिया योगीश्वरांच्चिया मती । मिळणीं सवें एकवटती । परी जे विचारूनि पुनरावृत्ती । भजेतीच्चिना ॥ ७६ ॥

**कित्येक लोक त्याला पाहतांच, अंतःकरणांत स्तब्ध होऊन, प्रपंचाची यातायात विसरून गेले. ७२ कोणी त्याचे गुणानुवाद गातांगातांच त्यांच्या चित्तास उपरति होऊन सदासर्वकाल त्यांतच निमग्न होऊन गेले. ७३ कोणीं ऐकूनच विषयनिवृत्त होऊन मीपणा सोडला. कोणीं त्याचा अनुभव घेऊन तदाकार बनले. ७४ ज्याप्रमाणें साऱ्या नद्यांचे ओघ जाऊन समुद्रास मिळतात; पण तेथें जागा नसल्यामुळें त्यांपैकीं कोणी परत आले, असें कधीं घडत नाहीं, ७५ त्याप्रमाणें योगी श्रेष्ठांची मति एक वेळ तिकडे लागली कीं, तत्काल तद्रूप होऊन जाते. पुन्हा पुनर्जन्माच्या फेऱ्यांत ह्मणून पडावयाचीच नाहीं. ७६**

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥३०॥

[देहीति] जें सर्वत्र सर्वही देहीं । जया करितांही घात नाहीं । तें विश्वात्मक तूं पाहीं । चैतन्य एक ॥ ७७ ॥ [तस्मादिति] इयांचेनि स्वभावें । हें होत जात आघवें । तरी सांग काय शोचांवें । एथ तुवां ॥ ७८ ॥ एऱ्हवीं तरी पार्था । तुज कां नेणों न मनें चित्ता । परी किडाळ हें शोचितां । बहुतां परी ॥ ७९ ॥

**सर्व ठिकाणीं, सर्व देहांत, भरून राहि-**

---

१ दृश्य पदार्थ, साकार. २ मायेच्या आकारानें झालेले आहेत. ३ उत्पन्न होतें. ४ रडतोस. ५ वीट न येणारे. ६ चिच्छक्ति, ज्ञानकला. ७ आवडच. ८ उपभोग घ्यावयास लावते. ९ विषयांनीं. १० वर्ज्य केले. ११ साधु. १२ अरण्यवासी. १३ ठेवून.

१ पाहतां, अवलोकन करितां. २ सारी यातायात. ३ तृप्त झालें. ४ मीपणाला. ५ मुकले. ६ माघारे. ७ समुद्रांत न राहतां. ८ मिळतांच. ९ पावतच नाहींत. १० केला तरीसुद्धां. ११ नाश. १२ ब्रह्मांडांत भरून राहिलेलें. १३ चिच्छक्ति. १४ ह्याच्या. १५ अंगच्या गुणानें, धर्मानें. १६ सर्व. १७ शोक करावा. १८ वाईट.

लेलें,–करीन ह्मटलें तरी सुद्धां ज्याचा घात व्हावयाचा नाहीं–तें जगद्रूप चैतन्य एकच आहे, हें ध्यानांत ठेव. ७७ त्याच्या स्वभावधर्माप्रमाणेंच हें सर्व उत्पन्न होतें, आणि नाश पावतें. मग येथें तूं शोक कोणाचा करतोस? सांग. ७८ **अर्जुना!** हें सर्व तुझ्या मनाला कळावें, मग कसें कळत नाहीं हें मला समजत नाहीं. परंतु येवढें खरें कीं, हा शोक फार वाईट आहे. ७९

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते॥३१

[स्वधर्ममिति] तूं अझुनि कां न विचारिसी । काय हें चिंतित आहोसी । स्वधर्म तो विसरलासी । तरावें जेणें ॥१८०॥ या कौरवां भलतें जाहालें । अथवा तुजचि कांहीं पातलें । कीं युगचि हें बुडालें । जऱ्ही एथ ॥ ८१ ॥ तरी स्वधर्म एक आहे । तो सर्वथा त्याज्य नोहे । [न विकंपितुमर्हसि] मग तरिजेल काय पाहें । कृपाळूपणें ॥ ८२ ॥ अर्जुना तुझें चित्त । जऱ्ही जाहालें द्रवीभूत । तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ॥८३॥ अगा गोक्षीरें जरी जाहालें । तरी पथ्यासि नाहीं घेतलें । ऐसेनिहि विष होय सुदलें । नवज्वरीं देतां ॥ ८४ ॥ तैसें आनीं आन करितां । नाश होईल स्वहिता । ह्मणऊनि तूं आतां । सावध होईं ॥ ८५ ॥ [धर्म्याद्धीति] वायांचि व्याकुळ कायी । आपुला निजधर्म पाहीं । जो आचरितां बाध नाहीं । कवणें काळीं ॥ ८६ ॥ जैसें मार्गेंचि चालतां । अपायो न पवे सर्वथा । कां दीपाधारें वर्ततां । नाडळिजे ॥ ८७ ॥ तयापरी पार्था । स्वधर्में राहाटतां । सकळ कामपूर्णता । सहजें होय ॥ ८८ ॥ ह्मणोनि यालागीं पाहीं । तुह्मां क्षत्रियां आणिक कांहीं । संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणें ॥ ८९ ॥ निष्कपट होआवें । उसिणा घाईं जुंझावें । हें असो काय सांगावें । प्रत्यक्षावरी ॥ १९० ॥

असून तूं ह्या गोष्टीचा विचार कसा करीत नाहींस? मनामध्यें हें भलतेंच काय आणलें

१ मनांत आणतो. २ आहेस. ३ तरणोपाय होणार. ४ ज्यानें. ५ समाप्त झालें. ६ तरणोपाय होईल. ७ दयाळूपणानें. ८ आर्द्र. ९ अरे. १० गायीचें दूध. ११ असें असूनही. १२ दिलें. १३ भलत्याच ठिकाणीं भलतें. १४ अपाय. १५ वागतां. १६ अडखळत नाहीं, ठेंच लागत नाहीं. १७ वागलें असतां. १८ मनोरथसिद्धि. १९ युद्धाशिवाय. २० व्हावें. २१ समोरासमोर. २२ एकमेकावर घाव करून. २३ लढावें. २० अनुभविकाला.

आहेस? जेणेंकरून तुझा तरणोपाय व्हावयाचा, तो तुझा धर्म तर तूं विसरूनच गेलास. ८० ह्या **कौरवांवर** भलताच प्रसंग गुदरला किंवा तुझ्यावरच कांहीं आलें, अथवा आज येथें सारें युगच समाप्त झालें ८१ तरी आपला धर्म ह्मणून जो एक आहे, तो मुळींच टाकतां कामा नये. ह्या असल्या कृपाळूपणानें का तुझा मग तरणोपाय होणार? ८२ **अर्जुना!** तुझें चित्त दयेनें आर्द्र झालें आहे खरें; पण तें ह्या युद्धप्रसंगीं केवळ अनुचित होय. ८३ असें पहा! गाईचें दूध असलें, तरी तें किित्येक व्याधींच्या पथ्याला वर्ज्य आहे. तें जर नवज्वरांत दिलें, तर विष दिल्याप्रमाणें आहे. ८४ तसें भलत्या वेळेस भलतेंच केलें, तर आपल्याच हितावर पाणी पडेल. याकरितां **अर्जुना!** ह्या वेळीं तूं सावध हो. ८५ व्यर्थ व्याकुळ का होतोस? आपला धर्म कोणता तें मनांत आण. त्याप्रमाणें चालावयाला केव्हांही प्रत्यवाय नाहीं. ८६ जसें राजमार्गानें चाललें, ह्मणजे हानि होण्याची केव्हांही भीति नाहीं. किंवा दिव्याच्या आश्रयानें वागलें ह्मणजे ठेंच लागावयाला नको. ८७ त्याप्रमाणें **अर्जुना!** आपल्या धर्माप्रमाणें चाललें, ह्मणजे सर्व मनोरथ आपोआप पूर्ण होतात. ८८ याकरितां तुह्मां क्षत्रियांना युद्धावांचून दुसरें कोणतेंही योग्य नाहीं, हें तूं पक्कें ध्यानांत ठेव. ८९ निष्कपट मन करून समोरासमोर लढावें. असो, हें तुला अनुभवशीराला काय सांगितलें पाहिजे? ९०

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥३२॥

[यदृच्छया चोपपन्नं] अर्जुना जुंझ देख आतांचें । हें हो कां दैव तुमचें । कीं निधान सकळ धर्माचें । प्रगटलें असे ॥ ९१ ॥ [स्वर्गद्वारमपावृतं] हा संग्राम काय ह्मणिपे । कीं स्वर्गचि येणें रूपें । मूर्त कां प्रतापें । उदय केला ॥ ९२ ॥ नातरी गुणाचेनि पैतिकरें । आर्तीचेनि पडिभरें । हे कीर्तीचि स्वयंवरें । आली

१ ठेवा. २ प्राप्त झाला. ३ ह्मणावा. ४ मूर्तिमंत. ५ अनुभवानें. ६ आवडीच्या. ७ आधिक्यानें. ८ आपण होऊन माळ घालण्यास.

तुज ॥ ९३ ॥ [सुखिन इति] क्षत्रियें बहुत पुण्य कीजे । तैं जुंझ ऐसें लाहिजे । जैसें मार्गे जातां आडळिजे । चिंतामणीसी ॥ ९४ ॥ ना तरी जांभैया पसरे मुख । तेथ अवचटें पडे पीयूंख । तैसा हा संग्राम देख । पातला असे ॥ ९५ ॥

**अर्जुना! हें आतांचें युद्ध ह्मणजे तुमचें भाग्यच; किंवा सर्व धर्मांचा ठेवाच तुह्माला मिळाला आहे असें समजा. ९१ हें युद्ध ह्मणण्यापेक्षां, युद्धाच्या रूपानें तुह्मांस हा स्वर्गच प्राप्त झाला आहे; किंवा प्रतापच मूर्तिमंत उदयास आला आहे. ९२ किंवा तुझ्या गुणांस भुलून, प्रीतीनें वेडी होऊन कीर्ति हीच तुझ्याशीं स्वयंवर करण्यास आली आहे. ९३ क्षत्रियानें जेव्हां महत्पुण्य करावें, तेव्हां मार्गानें जातांना पायास चिंतामणी लागल्याप्रमाणें असलें युद्ध प्राप्त होतें.९४ किंवा जांभई देण्यासाठीं ह्मणून तोंड पसरावें, तों अकस्मात् त्यांत येऊन अमृत पडावें, त्याप्रमाणें हें युद्ध आज प्राप्त झालें आहे असें समज. ९५**

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

[अथेत्यर्धे] आतां हा ऐसा अव्हेरिजे । मग नोथिलें शोचूं बैसिजे । [ततः स्वधर्मं] तरी आपण आहाणा होइजे । आपणपेयां ॥ ९६ ॥ पूर्वजांचें जोडलें । आपणचि होय धाडिलें । जरी आजि शस्त्र सांडिलें । रणीं ईयें ॥ ९७ ॥ [कीर्तिंच हित्वा] तरी असती कीर्ति जाईल । जगचि आभिशाप देईल । आणि गिंवसित पावतील । महादोष ॥ ९८ ॥ जैसी भर्तारेंहीन वनितें । उपहेती पावे सर्वथा । मग तैसी दशा जीवितें । स्वधर्मेंवीण ॥ ९९ ॥ [पापमवाप्स्यसि] नातरी रणीं शव सांडिजे । चौमेरीं गिधीं विदारिजे । तैसें स्वधर्महीनां अभिभविजे । महादोषीं ॥ २०० ॥

**आतां हें असें आलेलें युद्ध टाकलें आणि नाहीं त्याचा शोक करीत बसलें तर आपली आपणच हानि करून घेतली असें होईल. ९६ आज ह्या रणांत शस्त्र टाकून दिलें, तर पूर्वजांनीं जोडून ठेवलेलें आपण घालविलें असें होईल. ९७ तशानें असलेली कीर्ति जाईल; साऱ्या जगाचा तळतळाट लागेल; आणि मोठमोठाले दोष तुला शोधीत येतील. ९८ स्त्रीला एक पति नसला, ह्मणजे तिचा जसा चहूंकडे अपमान होतो, तशी स्वधर्म टाकला ह्मणजे आयुष्याची दशा होईल. ९९ किंवा रणांत प्रेत टाकलें ह्मणजे चहूंकडून गिधाड जमून त्याला फाडफाडून खातात; त्याप्रमाणें स्वधर्म त्याग करणारांची मोठमोठाले दोष येऊन दुर्दशा करतात. २००**

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ।
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

[अकीर्तिमित्यर्धे] ह्मणोनि स्वधर्म हा सांडसील । तरी पापा वरिपडा होसील । आणि अपेश तें न वचेल । कल्पांतवरी ॥ १ ॥ जाणतेनि तंवचि जियावें । जंव अपकीर्ति आंगा न पवे । [संभावितस्य चाकीर्तिः] आणि सांग पां केविं निगावें । एथोनियां ॥ २ ॥ तूं निर्मत्सर सदयता । एथूनि निघसील कीर्र माघौतो । परी ते गति समस्तां । न मनेल येयां ॥ ३ ॥ हे चहूंकडूनि कवळितील । वाण वरी घेतील । तेथ पार्था न सुटिजेल । कृपाळूपणें ॥ ४ ॥ [मरणादतिरिच्यते] ऐसेंनिहि प्राणसंकटें । जरी विपायें पां निघणें घटे । तरी तें जियालें वोखटें । मरणाहुनि ॥ ५ ॥

**ह्याकरितां हा आपला धर्म जर सोडशील, तर पातकांत पडशील. आणि कल्पांतपर्यंत तुझ्या कपाळाचें अपेश कांहीं टळणार नाहीं. २०१ अपकीर्तीचा डाग आंगाला लागला नाहीं, तोंपर्यंतच ज्ञात्यानें जगावें. असें जर आहे, तर**

१ करावें. २ लाभतें. ३ आढळावें. ४ इच्छित फळ देणारें रत्न. ५ जांभई देण्यासाठीं. ६ अकस्मात्. ७ अमृत. ८ अव्हेर करावा. ९ नसत्यासाठीं. १० शोक करीत. ११ बसावें. १२ हानी करणारा. १३ संपादन केलेलें. १४ गमावलें. १५ ह्या. १६ असलेली. १७ तळतळाट. १८ शोधीत. १९ येतील. २० महत्पातकें. २१ पतिवांचून. २२ स्त्री. २३ अपमान. २४ जन्माची. २५ आपला धर्म सोडला असतां. २६ प्रेत. २७ टाकलेलें, पडलेलें. २८ चोहोंकडून. २९ गिधाडांनीं. ३० फाडफाडून घ्यावें. ३१ आपल्या धर्माचा त्याग करणाराला. ३२ जिंकतात, पराभव करतात.

१ योग्य, प्राप्त. २ जाणार नाहीं. ३ महाप्रळयापर्यंत. ४ शहाण्यानें. ५ जगावें. ६ लागली नाहीं. ७ निघावें. ८ निश्चयानें. ९ माघारा, परत. १० दया येऊन जाणें. ११ खरें वाटणार नाहीं, मान्य होणार नाहीं. १२ त्यांना. १३ वेढा देतील. १४ आणखी वर. १५ सुटका होणार नाहीं. १६ अशांतूनही. १७ जिवाच्या आकांतानें. १९ कदाचित्. १९ घडलें. २० वांचणें, आयुष्य. २१ वाईट.

येथून कसें बरें निघावें? सांग. २ तूं मत्सर सोडून सदय अंतःकरणानें निश्चयेंकरून येथून माघारा फिरशील; पण तें ह्या सर्वांना कांहीं पत्करणार नाहीं. ३ हे तुला चहूंकडून वेढा देतील; बाणावर बाण सोडतील; तेव्हां मग तुझ्या दयाळूपणानें तूं कांहीं सुटावयाचा नाहींस. ४ इतकेंही करून मोठ्या जिवाच्या आकांतानें त्यांतूनही तूं कदाचित् पार पडलासच, तरी तें राहिलेलें आयुष्य मरणापेक्षांही वाईट! ५

भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥३५॥

[भयादिति] तूं आणिकही एक न विचारिसी । एथ संभ्रमें झुंझों आलासी । आणि सकणवपणें निघालासी । मागुता जरी ॥ ६ ॥ [मंस्यंते त्वां] तरी तुझें तें अर्जुना । या वैरियां दुर्जना । कां प्रत्यया येईल मना । सांगें मज ॥ ७ ॥

दुसरा आणखी एक विचार तूं मनांत आणिला नाहींस. तूं येथें समारंभानें युद्ध करावयास आलास, आणि दयार्द्र होऊन जर माघारा निघालास, ६ तर तें तुझें दयालुत्व या तुझ्या दुष्ट वैऱ्यांच्या मनाला खरें वाटेल का? सांग बरें मला. ७

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ।
निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

[अवाच्यवादानिति] हे ह्मणती गेलारे गेला । अर्जुन आह्मा बिहालो । हा सांगें बोल उरला । निको कायी ॥ ८ ॥ लोक सायासें करूनि बहुतें । वेंचिती आपुलीं जीवितें । परी वाढविती कीर्तीतें । धनुर्धरा ॥ ९ ॥ ते तुज अनायासें । अनेकळित जोडिली असे । हें अद्वितीय जैसें । गगन आहे ॥ २१० ॥ [येषां च त्वं बहुमतो] तैसी कीर्ति निःसीम । तुझ्या ठायीं निरुपमें । तुझे गुण उत्तम । तिहीं लोकीं ॥ ११ ॥ दिगंतींचे भूपती । भाट होऊनि वाखाणिती । जे ऐकिलिया दचकती । कृतांतादिक ॥ १२ ॥ ऐक ऐसी महिमा घनवट । गंगा तैसी चोखट । जया देखी जगीं सुभटे । वांठ जाहाले ॥ १३ [भूत्वा] तें पौरुष तुझें अद्भुत । आइकोनियां हे समस्त । जाले अति विरक्त । जीवितेंसी ॥ १४ ॥ जैसा सिंहाचिया हांकां । युगांत होय मदमुखां । तैसा कौरवां अशेखां । धाक तुझा ॥ १५ ॥ जैसे पर्वत वज्रातें । नातरी सर्प गरुडातें । तैसे अर्जुना हे तूतें । मानिती सदा ॥ १६ ॥ तें अगाधपण जाईल । [यास्यसि लाघवं] मग हीनत्व आंगा येईल । जरी मागुता निघसील । न झुंझतचि ॥ १७ ॥ आणि हे पळतां पळों नेदिती । धरूनि अवकळा करिती । न गणित कुंटी बोलती । आइकतां तुज ॥ १८ [तत इति] मग ते वेळीं हियें फुटावें । आतां लंठेपणें कां न झुंझावें । हें जितलें तरी भोगावें । महीतळ ॥ १९ ॥

हे ह्मणतील "गेलारे गेला! अर्जुन आह्मांला भ्याला." असा शब्द आलेला चांगला होय? सांग बरें. ८ हे धनुर्धरा! लोक पाहिजे तितका सायास करतात; आपला प्राण सुद्धां खर्ची घालतात; पण कीर्तीला वाढवितात. ९ ती कीर्ति, तुला अनायासें सहज मिळालेली आहे. गगन हें जसें अद्वितीय, १० तशी तुझी कीर्ति निरुपम आणि निस्सीम आहे. तुझे गुण त्रैलोक्यांत उत्तम. ११ देशांतरींचे राजे भाट बनून तुझी स्तुति करतात. ती ऐकून यमादि देवांच्या सुद्धां अंतःकरणास धक्का बसतो. १२ समजलास? असा तुझा गंगेसारखा सोज्वळ महिमा. ज्याला पाहून मोठमोठाले योद्धे सुद्धां थक्क होऊन जातात. १३ असा तुझा अद्भुत पराक्रम श्रवण करून हे सारे आपल्या जिवावर

---

१ विचार करीत नाहींस. २ समारंभानें. ३ युद्ध करण्यासाठीं. ४ दयाळूपणानें. ५ परत, माघारा. ६ दयालुत्व. ७ ह्या दुष्ट वैऱ्यांना. ८ अनुभवास येईल काय? खरें वाटेल काय? ९ भ्याला. १० शब्द. ११ आलेला. १२ चांगला. १३ काय? १४ खर्ची घालतात. १५ प्राण. १६ ती (कीर्ति.) १७ कोणतेही क्लेश न पडतां. १८ प्राप्त झाली. १९ अप्रतिम. २० आकाश. २१ अतिशय. २२ उपमारहित.

१ दूरदूर देशचे. २ स्तुतिपाठक. ३ जी (कीर्ति, किंवा स्तवन.) ४ भयभीत होतात. ५ यमादिक. ६ गहन. ७ पवित्र. ८ ज्या महिम्याला. ९ मोठमोठाले योद्धे. १० तटस्थ. ११ पराक्रम. १२ हे सारे योद्धे. १३ उदार. १४ जीवितावर. १५ हाकेला, गर्जनेला. १६ प्रळय. १७ मदोन्मत्त हत्तीला. १८ सर्वांस. १९ हे सर्व वीर. २० मोठेपणा. २१ नीचपणा. २२ देणार नाहींत. २३ फजिती, उपहास, करतील. २४ निंदा, अपशब्द. २५ हृदय. २६ शूरपणानें. २७ पराजय केला. २८ पृथ्वीचें राज्य.

अगदीं उदार झाले आहेत. १४ सिंहाची गर्जना ऐकली, ह्मणजे मदोन्मत्त हत्तीला सुद्धां प्रळयकालचा समय भासतो, त्याप्रमाणेंच ह्या झाडून साऱ्यांना तुझा दरारा आहे. १५ वज्राला जसे पर्वत मानतात; सर्प जसे गरुडास मानतात; त्याप्रमाणें हे सारे सदासर्वदा तुला मानतात. १६ आणखी, तूं जर आतां युद्ध न करितां माघारा फिरशील, तर ती तुझी थोरवी नाहींशी होईल, आणि अंगीं कमीपणा येईल. १७ बरें; तूं पळूं लागलास, तर हे तुला पळूं सुद्धां देणार नाहींत. तुला धरून तुझी विटंबना करतील; करूं नये तितकी तुझी निंदा करतील. ती तूं ऐकलीस, १८ ह्मणजे मग त्यावेळीं तुझें हृदय दुभंग होऊन जाईल. त्यापेक्षां आतां शूरत्वानें युद्धच कां करूं नये? त्यांचा पराजय झाला तर पृथ्वीचें राज्य भोगायाला सांपडेल. १९

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥३७॥

[हत इति] नातरी रणीं एथ । जुंझतां वेंचलें जीवित । तरी स्वर्गसुख अनकळित । पावसील ॥ २० ॥ [तस्मादिति] ह्मणोनि ये गोष्टी । विचार न करीं किरीटी । आतां धनुष्य घेऊनि उठीं । जुंझ वेगीं ॥ २१ ॥ देखें स्वधर्म हा आचरतां । दोष नाशे असता । तुज भ्रांति हे कवण चित्ता । पातकाची ॥ २२ ॥ सांगें प्लवेंचि काय बुडिजे । कां मार्गीं जातां आंडळिजे । परी विपायें चालों नेणिजे । तरी तेंही घडे ॥ २३ ॥ अमृतें तरीचि मरिजे । जरी विषेसीं सेविजे । तैसा स्वधर्मीं दोष पाविजे । हेतुकेपणें ॥ २४ ॥ ह्मणोनियां पार्था । हेतु सांडूनि सर्वथा । तुज क्षात्रवृत्ति जुंझतां । पाप नाहीं ॥ २५ ॥

किंवा ह्या समरभूमीवर युद्ध करतां करतां तुझें आयुष्य संपलें, तर खुशाल स्वर्गसुख मिळेल. २० याकरितां अर्जुना! ही भलतीच गोष्ट मनांत आणूं नकोस. आतां लौकर धनुष्य घे; आणि युद्ध करावयाला लाग. २१ हें पहा! ह्या आपल्या धर्माप्रमाणें आचरण केलें, तर असलेले दोष सुद्धां नाहींतसे होतात. मग त्यापासून पातक लागेल, ही भ्रांति तुझ्या मनांत येते तरी कशी? २२ नावेंत बसून चाललें तर नांवच बुडवून टाकील होय? किंवा राजमार्गानें चाललें तर ठेंच लागेल होय? सांग पाहूं. आतां चालणारा अडाणी असला, तर मात्र कदाचित् तसें होईल. अमृतानें सुद्धां मरण येईल*. पण केव्हां? विषाबरोबर सेवन करावें तेव्हां! २३ तसा स्वधर्मांतही दोष होतो. पण केव्हां? हेतु धरून आचरण करावें तेव्हां. २४ याकरितां, अर्जुना! मनांतील चटसारे हेतु सोडून देऊन केवळ क्षत्रियधर्माप्रमाणें युद्ध कर. ह्मणजे कांहीं पाप नाहीं. २५

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥३८॥

[सुखदुःखे इति] सुखीं संतोषा न यावें । दुःखीं विषादा न भजावें । आणि लाभालाभ न धरावे । मनामाजी ॥ २६ ॥ एथ विजयपण होईल । कीं सर्वथा देह जाईल । हें आधींचि कांहीं पुढील । चिंतावेंना ॥ २७ ॥ [ततो युद्धाय युज्यस्व] आपणयां उचिता । स्वधर्में राहटतां । जें पावे तें निवांता । साहोनि जावें ॥ २८ ॥ [नैवं पापमवाप्स्यसि] ऐसेया मनें होआवें । तरी दोष न घडे स्वभावें । ह्मणोनि आतां जुंझावें । निभ्रांत तुवां ॥ २९ ॥

सुखाचा संतोष मानूं नये; दुःखाचा खेद करीत बसूं नये; लाभ किंवा हानि हीं मनांतच आणूं नयेत. २६ ह्यांत आपणाला जय मिळेल, कां मीच येथें मृत्यु पावेन, ह्या भवितव्याचा

---

१ खर्चीं पडलें. २ उपद्रवरहित, निरामय. ३ ह्या गोष्टीचा. ४ असलेला सुद्धां. ५ नावेनेंच. ६ बुडेल काय? ७ ठेंच लागेल काय? ८ कदाचित् ९ मरण येईल. १० विषासहवर्तमान. ११ सेवन केलें तर. १२ घडेल. १३ सकामनेनें, हेतु धरून. १४ क्षत्रियधर्मानें.

*अमृत हा श्रेष्ठ व अद्भुत गुणकारी पदार्थ आहे, आणि विष हा क्षुद्र पदार्थ आहे. तेव्हां विषाचा दोष अमृतानें नाश करावा. अमृताचा गुण विषास नाश करतां येऊं नये. ह्या लौकिक दृष्टीनें विचार केला ह्मणजे वरील वाक्यांत विरोध उत्पन्न होतो. ह्यास्तव 'विषेसीं' ह्याचा अर्थ 'भावनेनें' असा करावा "अमृत हें विषाच्या भावनेनें घेतलें तर मरण येईल" हें विधान सयुक्तिक दिसतें. भावनेनें मृत्यु कसा येतो, ह्याचीं उदाहरणें 'केरळकोकिळ' पुस्तक ७ अं० ११ पृष्ठ २५१।२५२ टीपेंत आहेत. तीं फार चमत्कारिक आहेत. तीं वरील सिद्धांताच्या पुष्टीकरणार्थ अवश्य पहावींत.

१ मानावें. २ खेदास. ३ यश येईल. ४ विचार करीत बसूं नये. ५ आपल्याला. ६ चाललें असतां. ७ निमूटपणें. ८ सहन करावें. ९ असें. १० व्हावें. ११ निःसंशय.

**विचार आज करीत बसूं नये. २७ स्वधर्मानें वागत असतां, जें काय प्राप्त होईल, तें शांत वृत्तीनें सहन करणें, हेंच आपणास उचित आहे. २८ अशा प्रकारें मन घट्ट केलें, तर मग दोष होण्याला कारणच राहणार नाहीं. याकरितां, अर्जुना! आतां तूं भ्रांति सोडून दे. आणि युद्ध कर. २९**

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धियोंगे त्विमां शृणु।
बुध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥३९॥

[एषेति] हे सांख्यस्थिति मुकुळित ॥ सांगितली तुज एथ । आतां बुद्धियोगे निश्चित । अवधारी पां ॥ २३० ॥ [बुध्येति] जया बुद्धियुक्ता । जालिया पार्था । कर्मबंध सर्वथा । बाधूं न पवे ॥ ३१ ॥ जैसें वज्रकवच लेईजे । मग शस्त्रांचा वर्षावे सांहिजे । परी जैतेंसीं उरिजे । अचुंबित ॥ ३२ ॥

**येथपर्यंत हा ज्ञानयोग-बुद्धियोग—( आत्मतत्त्वज्ञान ) तुला थोडक्यांत सांगितला. आतां निष्काम कर्मयोग ( समाधियोग ) कोणता, तें सांगतों श्रवण कर. ३० जो कर्माचरण करतांना आपल्या मनामध्यें निष्काम बुद्धि धारण करतो, तो कर्मानें बद्ध होत नाहीं. ३१ ज्याप्रमाणें वज्राचें कवच धारण केलें, तर शस्त्रांची वृष्टि सहन करतां येऊन अचुक जय मिळवितां येतो, ३२**

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

[नेहाभिक्रम इति] तैसें अहिक तरी न नशे । आणि मोक्ष तो उरला असे । जेथ पूर्वानुक्रम दिसे । चोखाळत ॥ ३३ ॥ कर्माधारें राहाटिजे । परी कर्मफळा न निरीक्षिजे । जैसा मंत्रज्ञ न बाधिजे । भूतबाधा ॥ ३४ ॥ तियापरी जे सुबुद्धि । आपु जालिया निरवधि । हा असताचि उपाधि । आकळूं न सके ॥ ३५ ॥ जेथ न संचरे पुण्यपाप । जें सूक्ष्म अति निष्कंप । गुणत्रयादि लेप । न लगति जेथ ॥ ३६ ॥ [स्वल्पमिति] अर्जुना ते पुण्यवशें । जरी अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे । तरी अशेषही नाशे । संसारभय ॥ ३७ ॥

**त्याप्रमाणें ऐहिक सुखाचा नाश न होतां, मोक्षांत अंतर न येतां, ह्यांतच पूर्वी सांगितलेला ज्ञानयोग उत्तम प्रकारेंकरून व्यक्त होतो. ३३ करावयाच्या रीतीप्रमाणें सर्व कर्मे करावींत; परंतु त्यापासून मिळणाऱ्या फळावर दृष्टि ठेवूं नये. मंत्रवेत्त्यांना भूतबाधेची पर्वा नसते, ३४ त्याप्रमाणें परिपूर्ण सुबुद्धि प्राप्त झाली, ह्मणजे हा असलेला उपाधि सुद्धां बद्ध करूं शकत नाहीं. ३५ जींत पापपुण्य शिरत नाहीं; जी अत्यंत सूक्ष्म असून निश्चळ; जिला गुणत्रयाचा संपर्क सुद्धां लागत नाहीं; ३६ अर्जुना! अशा प्रकारची जी सुबुद्धि, ती पुण्याईच्या बळानें यत्किंचित् जरी हृदयामध्यें प्रगट झाली, तरी संसाराचें झाडून सारें भय नाहींसें होतें. ३७**

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन।
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥४१॥

[व्यवसायेति] जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रगटी । तैसी सद्बुद्धि हे थेंकुटी । ह्मणों नये ॥ ३८ ॥ पार्था बहुतीं परी । हे अपेक्षिजे विचारशूरीं । जे दुर्लभ चराचरीं । सद्वासना ॥ ३९ ॥ आणिकासारिखा बहुवस । जैसा न जोडे परिस । कां अमृताचा लेश । दैवगुणें ॥ २४० ॥ तैसी दुर्लभ सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि । जैसा गंगेसि उदधि । निरंतर ॥ ४१ ॥ तैसें ईश्वरावांचुनि कांहीं । जिये आणिक लाहोणें नाहीं । ते एकचि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ॥ ४२ ॥ [बहुशाखा इति] येरें ते दुर्मती । जे बहुधा असे विकरती । तेथ निरंतर रमती । अविवेकिये ॥ ४३ ॥ ह्मणोनि तयां पार्था । स्वर्ग संसार नरकावस्था । आत्मसुख सर्वथा । दृष्ट नाहीं ॥ ४४ ॥

१ ज्ञानयोग, ज्ञानावस्था. २ संक्षिप्त. ३ कर्मयोग, किंवा समाधियोग. ४ ऐक. ५ ज्याची बुद्धि स्थिर झाली त्याला. ६ शकत नाहीं. ७ वज्राचें चिलखत. ८ घातलें. ९ वर्षाव, भडिमार. १० सहन करतां येतो. ११ जशाचें तसें. १२ राहतां येतें. १३ अबाधित. १४ इहलोकचें. १५ नाश पावत नाहीं. १६ अंतर न पडतां. १७ पूर्वी सांगितलेला ज्ञानयोग. १८ स्पष्ट. १९ चालावें. २० कर्मापासून प्राप्त होणाऱ्या फळाला. २१ पाहूं नये. २२ मंत्रवेत्ता देवार्षि. २३ जुमानित नाहीं. २४ प्राप्त. २५ निःशेष.

१ न शिरे. २ कंपरहित, निश्चल. ३ संसर्ग. ४ लागत नाहीं. ५ सुबुद्धि, आत्मज्ञान. ६ पुण्याईनें. ७ दिव्याची ज्योत. ८ लहान, अल्प. ९ ही सद्बुद्धि. १० इच्छावी. ११ विचारवंतांनीं. १२ इतरासारखा. १३ जिकडे तिकडे, पुष्कळ. १४ अंश, थुटका. १५ नशिबानें. १६ जिला. १७ शेवट, सीमा. १८ जिला. १९ प्राप्त करून घेणें. २० इतर. २१ विकार पावलेल्या. २२ अविचारी. २३ स्वरूपानंद.

ज्याप्रमाणें दिव्याची ज्योत लहान असली, तरी प्रकाश पुष्कळ पाडते; त्याप्रमाणें सद्बुद्धि ही लहान, असें ह्मणूं नये. ३८ पार्था! चराचरांमध्यें दुर्लभ अशी जी सद्वासना, तिची विचारज्ञांनीं परोपरीनें इच्छा करावी. ३९ इतर पदार्थांप्रमाणें परीस कांहीं खंडोगणती सांपडत नाहींत; किंवा अमृताचा एक घुटका प्राप्त होण्याला सुद्धां नशीब बलवत्तर लागतें. ४० त्याप्रमाणेंच सद्बुद्धिही दुर्लभ आहे. परमात्मा हेंच तिचें शेवटचें स्थान. गंगा ज्याप्रमाणें नेहमीं समुद्रास जाऊन मिळते, ४१ त्याप्रमाणें ईश्वरावांचून जिला दुसरें कांहीं प्राप्तच करून घेणें नाहीं, अशी अर्जुना! जगामध्यें एकच बुद्धि आहे. ४२ तिच्या शिवाय इतर ज्या बुद्धि त्या दुर्बुद्धि होत. त्या वहुधा विकारयुक्त असून त्यांत अविचारी लोकच रममाण होतात. ४३ ह्मणून त्यांस स्वर्ग, संसार, आणि नरकावस्था ह्या प्राप्त होतात. आत्मसुख-स्वरूपानंद त्यांस मुळींच मिळत नाहीं. ४४

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥

[वेदवादरताः पार्थ] वेदाधारें बोलती । केवळ कर्म प्रतिष्ठिती । परी कर्मफळीं आसक्ती । धरूनियां ॥ ४५ ॥ [स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदां] ह्मणती संसारीं जन्मिजे । यज्ञादिक कर्म कीजे । मग स्वर्गसुख भोगिजे [यामिमां पुष्पितां वाचं] मनोहर ॥ ४६ ॥ [नान्यदस्तीति वादिनः] एथ हेंवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा सुखचि नाहीं । [प्रवदंत्यविपश्चितः] ऐसें अर्जुना बोलती पाहीं । दुर्बुद्धि ते ॥ ४७ ॥

ते वेदाच्या आधारानें बोलून कर्माची मात्र स्थापना करितात. पण ती, कर्मफळाचा लोभ धरून करतात. ४५ त्यांचें ह्मणणें संसारांत जन्मास यावें; यज्ञादिक कर्म करावें; आणि मग मनोहर स्वर्गसुख भोगावें. ४६ अर्जुना! असे जे दुर्बुद्धि आहेत, ते ह्याशिवाय जगांत दुसरें सुख ह्मणून कोणतेंच नाहीं असें ह्मणतात. ४७

१ स्थापना करतात. २ लोभ. ३ जन्मास यावें. ४ करावें. ५ मनाला रममाण करणारें. ६ ह्याच्या शिवाय.

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥

[कामात्मान इति] देखें कामनांअभिभूत । होऊनि कर्म आचरत । [भोगैश्वर्यगतिं प्रति] ते केवळ भोगीं चित्त । देऊनियां ॥ ४८ ॥ [क्रियाविशेषबहुलां] क्रियाविशेषें बहुतें । न लोपिती विधीतें । निपुण होऊनि धर्मातें । अनुष्ठिती ॥ ४९ ॥

ते केवळ सुखोपभोगावरच लक्ष्य ठेवून सहेतुकपणानें कर्मांचें आचरण करतात. ४८ ते अनेक अनुष्ठानें करितात. त्यांत विधि न सोडतां अत्यंत धर्मनिष्ठेनेंच आचरण करितात. ४९

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

[व्यवसायेति] परी एकचि कुंडें करिती । जे स्वर्गकाम मनीं धरिती । यज्ञपुरुषा चुकती । भोक्ता जो ॥ २५० ॥ जैसा कर्पूराचा राशि कीजे । मग अग्नि लाऊनि दीजे । कां मिष्टान्नीं संचरविजे । काळकूट ॥ ५१ ॥ दैवें अमृतकुंभ जोडला । तो पायें हाणोनि उलंडिला । तैसा नासिती धर्म निपजला । हेतुकपणें ॥ ५२ ॥ सायासें पुण्य आर्जिजे । मग संसार कां अपेक्षिजे । [तयापहृतचेतसां] परी नेणती ते काय कीजे । अप्राप्त देखें ॥ ५३ ॥ [भोगैश्वर्यप्रसक्तानां] जैसी रांधवणी रससोय निकी । करूनियां मोलें विकी । तैसा भोगासाठीं अविवेकी । धांडिती धर्म ॥ ५४ ॥ ह्मणोनि हे पार्था । दुर्बुद्धि देख सर्वथा । तयां वेदवादरतां । मनीं वसे ॥ ५५ ॥

परंतु एक मात्र त्यांच्यांत वाईट असतें. तें हेंच कीं, ते स्वर्गेच्छा मनांत बाळगतात. त्यामुळें यज्ञभोक्ता जो परमेश्वर तो दुरावतो. २५० ज्याप्रमाणें कापराची रास करून तिला आग लावून द्यावी; किंवा उत्तम प्रकारचीं पक्वान्नें तयार करून त्यांत, काळकूट विष मिसळावें; ५१ किंवा दैवयोगानें अमृतानें भरलेली घागर मि-

१ सहेतुकपणानें. २ नाना प्रकारचीं कर्मानुष्ठानें. ३ नाश करीत नाहींत. ४ प्रयोगादि विधीचा. ५ प्रवीण. ६ आचरण करतात, कर्म करतात. ७ वाईट. ८ स्वर्गाची इच्छा. ९ परमेश्वराला. १० यज्ञाचा स्वीकार करणारा. ११ कापराची. १२ रास. १३ करावी. १४ मिसळावें. १५ कालकूट नांवाचें विष. १६ लवंडून दिला. १७ उत्पन्न झालेला. १८ फलाची इच्छा धरून. १९ श्रमानें. २० संपादन करावें. २१ इच्छा करावी? २२ अज्ञानी. २३ स्वयंपाकीण. २४ स्वयंपाक. २५ चांगला. २६ अविचारी. २७ गमावतात. २८ वेदांतील अर्थवादांत निमग्न झालेल्यांना.

ळाली, तर ती लाथेनें लवंडून द्यावी; त्याप्रमाणें आयता उत्पन्न झालेला धर्म, सहेतुकपणानें विघडून टाकतात! ५२ मोठ्या प्रयत्नानें पुण्य संपादन केल्यावर मग संसाराची इच्छा कां करावी? पण अज्ञान्यांना हें कळत नाहीं, त्यास काय करणार? ५३ ज्याप्रमाणें एखाद्या स्वयंपाकणीनें उत्तम प्रकारचीं पक्वान्नें तयार करावींत, आणि मग पैसे घेऊन विकून टाकावींत; त्याप्रमाणें अविचारी लोक भोगासाठीं धर्म गमावतात. ५४ म्हणून हे अर्जुना! वेदाच्या अर्थवादांतच मग्न झालेले जे लोक आहेत, त्यांच्या मनांत नेहमीं दुर्बुद्धिच राहत असते, हें ध्यानांत ठेव. ५५

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ४५

[ त्रैगुण्यविषया वेदाः ] तिहीं गुणीं आवृत । हे वेद जाण निभ्रांत । म्हणोनि उपनिषदादि समस्त । सात्विक ते ॥ ५६ ॥ येरें रजतमात्मक । जेथ निरूपिजे कर्मादिक । जे केवळ स्वर्गसूचक । धनुर्धरा ॥ ५७ ॥ [ निस्त्रैगुण्यो भवार्जुन ] म्हणोनि तूं जाण । हे सुखदुःखासीच कारण । एथ झणें अंतःकरण । रिघों देसी ॥५८॥ तूं गुणत्रयातें अव्हेरीं । [ निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो ] मी माझें हें न करीं । [ निर्योगक्षेम आत्मवान् ] एक आत्मसुख अंतरीं । विसंबे झणीं ॥ ५९ ॥

वेद हे निःसंशय तीन गुणांनीं वेष्टिलेले आहेत. म्हणून उपनिषदादि सारीं सात्विक होत. ५६ तसेंच अर्जुना! इतर कर्मकांड सर्व रजोगुणांनीं व तमोगुणांनीं वेष्टित असून त्यांत केवळ स्वर्गाचाच विषय असतो. ५७ म्हणून तें सुखदुःखालाच कारण आहे, हें तूं लक्ष्यांत ठेव; आणि त्यांत आपलें मन घालूं नकोस. ५८ तूं तिन्ही गुणांना सोडून दे; 'मी' आणि 'माझें' करीत बसूं नको. अंतःकरणांत फक्त एक आत्मसुख असूं दे. त्यांत अंतर पडूं देऊं नको. ५९

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥

[ यावानिति ] जरी वेदें बहुत बोलिलें । विविधें भेद सूचिले । तऱ्ही आपण हित आपुलें । तेंचि घेपे ॥ २६० ॥ जैसा प्रगटलिया गभस्ती । अशेषही मार्ग दिसती । तरी तेतुलेहि काय चालिजती । सांगें मज ॥ ६१ ॥ कां उदकमय सकळ । जऱ्ही जाहालें असे महीतळ । तरी आपण घेपे केवळ । आर्त्तीचजोगें ॥ ६२ ॥ [ तावानिति ] तैसे ज्ञानी जे होती । ते वेदार्थातें विचारिती । मग अपेक्षित तें स्वीकारिती । शाश्वत जें ॥ ६३ ॥

वेदांत जरी पुष्कळ सांगितलेलें आहे, अनेक प्रकारचे भेद दाखविले आहेत, तरी, आपलें ज्यांत कल्याण होईल, तेंच आपण घेतलें पाहिजे. ६० ज्याप्रमाणें सूर्योदय झाला म्हणजे एकून एक मार्ग दिसूं लागतात, म्हणून तितक्या सर्वांवरून कां आपणास चालतां येतें? ६१ किंवा जिकडे तिकडे जलमय होऊन जमिनीवर पाणीच पाणी होऊन गेलें असलें तरी, आपण आपल्या तान्हेपुरतेंच घेतलें पाहिजे. ६२ तसे ज्ञानी आहेत ते, वेदाच्या अर्थाचा विचार करून मग त्यांतील आपणांस पाहिजे असेल त्याचा व शाश्वत असेल त्याचाच स्वीकार करतात. ६३

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

[ कर्मण्येवाधिकारस्ते ] म्हणोनि आइकें पार्था । याचि परी पाहातां । तुज उचित होय आतां । स्वकर्म हें ॥ ६४ ॥ आह्मी समस्तही विचारिलें । तंव ऐसेंचि हें मना आलें । जे न सांडिजे तुवां आपुलें । विहितं कर्म ॥ ६५ ॥ [ मा फलेषु कदाचन ] परी कर्मफळीं आस न करावी । [ मा ते संगोऽस्त्वकर्मणि ] आणि अकर्मी संगती न व्हावी । [ मा कर्मफलहेतुर्भूः ] हे सत्क्रियाचि आचरावी । हेतूविण ॥ ६६ ॥

म्हणून अर्जुना ऐक! या सर्वांवरून पाहतां, तुला आतां तुझें कर्मच योग्य आहे. ६४ आह्मीं सर्व प्रकारें विचार करून पाहिला. त्यावरून आमच्या मनालाही असेंच येतें कीं, तूं तुझें कर्तव्यकर्म सोडूं नयेस. ६५ मात्र इतकेंच कीं, कर्मापासून प्राप्त होणाऱ्या फळाची आशा करूं

---

१ वेष्टिलेले. २ इतर. ३ प्रतिपादन केलेलें आहे. ४ कदाचित्, नको. ५ शिरूं देऊं. ६ त्याग कर. ७ अहंभाव. ८ अंतर देऊं नको. ९ अनेक. १० सुचविले. ११ घ्यावें.

१ सूर्य. २ तितके सारे. ३ चालून जातात. चालले जातात. ४ जलमय. ५ घ्यावें. ६ तान्हेपुरतेंच. ७ विचार करतात. ८ इच्छित. ९ अविनाशी. १० उचित. ११ कर्मापासून प्राप्त होणाऱ्या फळांविषयीं. १२ आशा. १३ निषिद्ध कर्मामध्यें. १४ सत्कर्म. १५ हेतु धरल्याशिवाय.

**नये; निषिद्ध कर्मांची संगत धरूं नये; आणि हेतूशिवाय हें सत्कर्मच आचरण करावें. ६६**

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ४८

[ योगस्थ इत्यर्धं ] तूं योगयुक्त होउनी । फळाचा संग टाकुनी । मग अर्जुना चित्त देउनी । करीं कर्में ॥ ६७ ॥ [ सिद्धसिद्ध्योः समो भूत्वा ] परी आदरिलें कर्म दैवें । जरी समाप्तीतें पावे । तरी विशेषें तेथ तोषावें । हेंही नको ॥ ६८ ॥ कीं निमित्तें कोणे एकें । तें सिद्धी न वचतांचि ठाके । तरी तेथिचेनि अपरितोखें । क्षोभावें ना ॥ ६९ ॥ आचरतां सिद्धी गेलें । तरी कीजाचि कीरें आलें । परी ठेलेंयाही संगुण जाहालें । ऐसेंचि मानीं ॥ २७० ॥ देखें जेतुलें कर्म निपजे । तेतुलें आदिपुरुषीं समर्पिजे । तरी परिपूर्ण सहजें । जाहालें जाणें ॥ ७१ ॥ [ समत्वं योग उच्यते ] देखें संतासतकर्मीं । हें जे सरिसेपण मनोधर्मीं । तेंचि योगस्थिती उत्तमीं । प्रशंसिजे ॥ ७२ ॥

**अर्जुना! तूं योगयुक्त (निष्काम) हो; फळाची अपेक्षा सोडून दे; आणि मन लावून कर्म कर. ६७ आतां, आरंभिलेलें कर्म दैवयोगानें जरी यथासांग शेवटास गेलें, तरी तेथें विशेष हर्ष मानण्याचें कारण नाहीं. ६८ किंवा कोणत्याही एखाद्या कारणानें तें सिद्धीस गेलें नाहीं; मध्येंच पडलें; तरी असंतोषानें त्रासूं नये. ६९ आचरण करतां करतां सिद्धि मिळाली, तर कामच झालें. बरें, न होऊन मध्येंच पडलें; तरी सफल झालें असेंच मानावें. ७० हें पहा! केलेलें ह्मणून जितकें कर्म असेल, तितकें ईश्वरार्पण करावें, ह्मणजे सहजच तें परिपूर्ण होतें. ७१ कर्मामध्यें बरें वाईट कांहीं झालें तरी, मनोधर्मामध्यें सारखेंच मानावयाचें. हीच योगस्थिति. आणि हिचीच मोठमोठाले लोक प्रशंसा करितात. ७२**

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥४९॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ५०

[ बुद्धियोगाद्धनंजय ] अर्जुना समत्व चित्ताचें । तेंचि सार जाण योगाचें । जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य आथि ॥ ७३ ॥ तो बुद्धियोग विवरितां । [ दूरेण ह्यवरं कर्म ] बहुतें पाडें पार्था । दिसे हा अरुता । कर्मयोग ॥ ७४ ॥ [ तस्मादिति ] परी तेंचि कर्म आचरिजे । तरीच हा योग पाविजे । जे कर्मशेष सहजें । योगस्थिती ॥ ७५ ॥ [ बुद्धौ शरणमन्विच्छेति ] ह्मणोनि बुद्धियोग संधर । तेथ अर्जुना होईं स्थिर । मनें करीं अव्हेर । फळहेतूचा ॥ ७६ ॥ [ बुद्धियुक्त इति ] जे बुद्धियोगा योजिले । तेचि पारंगत जाहाले । ईहीं उभयसंबंधीं सांडिले । पापपुण्यीं ॥ ७७ ॥

**अर्जुना! चित्तांत समता राखणें, हेंच योगाचें सार आहे. त्यांतच मन आणि बुद्धि यांचें ऐक्य होतें. ७३ त्या बुद्धियोगाचा विचार करूं लागलें तर अर्जुना! हा सकाम कर्मयोग पुष्कळ मानानें कमी प्रतीचा दिसतो. ७४ पण तो बुद्धियोग प्राप्त होण्याला तींच कर्में आचरण करावीं लागतात. परंतु निष्काम बुद्धीनें आचरण केलीं, ह्मणजे त्याच कर्मांपासून योगाची स्थिति सहज प्राप्त होते. ७५ ह्मणून बुद्धियोग हाच उत्तम आहे. याकरितां अर्जुना! तूं यांतच स्थिर हो; आणि मनःपूर्वक फळाच्या हेतूचा अव्हेर कर. ७६ बुद्धियोगाला जे जे प्रवृत्त झाले, ते ते पार पडले; आणि या पापपुण्याच्या संबंधांतून मुक्त झाले. ७७**

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ।
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥५१॥

[ कर्मजमिति ] ते कर्मीं तरी वर्तती । परी कर्मफळा नातळती । [ जन्मबंधविनिर्मुक्ताः ] आणि यातायाती लोपती । अर्जुना तयां ॥ ७८ ॥ [ पदं गच्छंत्यनामयं ]

---

१ आरंभिलेलें. २ अतिशय. ३ संतोष मानणें. ४ न जातां. ५ मध्येंच थांबलें, विघ्न आलें. ६ असंतोषानें. ७ त्रासूं नये. ८ कामच झालें. ९ निश्चयें करून. १० राहिलें असतांही. ११ सफल. १२ जेवढें. १३ उत्पन्न होतें. १४ तेवढें. १५ ईश्वराच्या ठाईं. १६ समर्पण करावें. १७ चांगल्या किंवा वाईट. १८ सारखेंपण.

१ समता. २ आहे. ३ विचार करतां. ४ पुष्कळ मानानें. ५ आलीकडचा. ६ बुद्धियोग. ७ कर्मसिद्धि. ८ वळकट. ९ त्याग. १० उद्युक्त झाले. ११ प्रवीण, पार. १२ यांहीं. १३ बुद्धियुक्त झालेले. १४ शिवत नाहींत. १५ जन्ममरणाचे फेरे. १६ लुप्त होतात.

मग निरामय[1]भरित । पावती पद अच्युत[2] । ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ॥ ७९ ॥

**ते लोक कर्म तर करितात; परंतु कर्मफळाला शिवत नाहींत. आणखी अर्जुना! त्यामुळें त्यांच्या मागच्या पुनर्जन्माच्या यातनाही सुटतात. ७८ आणखी मग धनुर्धरा! ते बुद्धियोगयुक्त होऊन सुखानें भरलेल्या अशा अविनाशी पदाप्रत पोंचतात. ७९**

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥५२॥

[ यदा ते मोहेति ] तूं ऐसा तैं[3] होसी । जैं[4] मोहातें येथा[5] सांडिसी[6] । आणि वैराग्य मानसीं । संचरेल[7] ॥ २८० ॥ [ तदेति ] मग निष्कळंक[8] गहन[9] । उपजेल आत्मज्ञान । तेणें निर्वांड[10] होईल मन । अपैसें[11] तुझें ॥ ८१ ॥ तेथ आणिक कांहीं जाणावें । कां मागील तें स्मरावें । हें अर्जुना आघवें[12] । पारुषेल[13] ॥ ८२ ॥

**ह्या मोह टाकून दिलास ह्मणजे तूंही तसाच होशील; आणि तुझ्या मनांत वैराग्य उत्पन्न होईल. ८० आणि मग निर्दोष आणि गहन असें आत्मज्ञान प्राप्त होऊन तुझें मन आपोआपच निष्काम होईल. ८१ तेथें मग आणखी कांहीं ज्ञान प्राप्त करून घ्यावें, किंवा पूर्वीच्या ज्ञानाची कांहीं आठवण करावी हें सर्व राहील. ८२**

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥५३॥

[ श्रुतीति ] इंद्रियांचिया संगती । जिये[14] पसैर[15] होतसे मती । ते स्थिर होईल मागुती[16] । आत्मस्वरूपीं ॥ ८३ ॥ [ समाधाविति ] समाधिसुखीं केवळ । जैं बुद्धि होईल निश्चळ । तैं पावसी तूं सकळ । योगस्थिति ॥ ८४ ॥

**तुझी बुद्धि इंद्रियांच्या संगतीनें जी फांकते आहे, ती पुन्हा आत्मस्वरूपांत स्थिर होईल. ८३ केवळ समाधिसुखामध्यें तुझी बुद्धि स्थिर झाली, ह्मणजे मग पूर्ण योगस्थितीप्रत पोंचशील." ८४**

१ क्लेशरहित. २ अढळ. ३ तेव्हां. ४ जेव्हां. ५ ह्या. ६ सोडशील. ७ शिरेल. ८ कलंकरहित, निर्दोष. ९ अतिखोल. १० निष्काम. ११ आपोआप. १२ सर्व. १३ राहील. १४ जी. १५ विस्तृत. १६ पुन्हा.

अर्जुन उवाच·

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ५४

[ अर्जुन उवाच–] तेथ अर्जुन ह्मणे देवा । हाचि अभिप्रावो[1] आघवा । मी पुसेन आतां सांगावा । कृपानिधी ॥८५॥ मग अच्युत ह्मणे सुखें । जें किरीटी तुज निकें[2] । तें पूस पां उन्मेखें[3] । मनाचेनि ॥ ८६ ॥ या बोला पार्थें । ह्मणीतलें[4] सांग पां श्रीकृष्णातें । [ स्थितप्रज्ञस्य का भाषा ] काय ह्मणिपे[5] स्थितप्रज्ञातें । वोळखों केवीं[6] ॥ ८७ ॥ [ स्थितधीः ] आणि स्थिरबुद्धि जो ह्मणिजे[7] । [ किं प्रभाषेत ] तो कैसिया[8] चिन्हीं[9] जाणिजे[10] । [ समाधिस्थस्य केशव ] जो समाधिसुख भुंजे[11] । अखंडित ॥ ८८ ॥ [ किमासीत ] तो कवणे स्थिती असे[12] । [ व्रजेत किं ] कैसेनि रूपीं विलसे[13] । देवा सांगावें हें ऐसें । लक्ष्मीपती ॥ ८९ ॥ तंव परब्रह्म अवतरण[14] । जो षड्गुणाधिकरण[15] । तो काय श्रीनारायण । बोलत असे ॥ २९० ॥

**तेव्हां अर्जुन ह्मणाला " देवा कृपानिधे! ह्याचाच सारा खुलासा मी आतां आपणास विचारितों, तो सांगा." ८५ तेव्हां अच्युत ह्मणतात–'किरीटी! फार चांगलें. तुझ्या मनःसंतोषानें जें काय तुला विचारणें असेल, तें तूं खुशाल विचार." ८६ यावर अर्जुन श्रीकृष्णास ह्मणाला "स्थिरबुद्धि कोणाला ह्मणावें? आणि त्याला ओळखावें कसें? तें सांग. ८७ तसेंच ज्याला स्थिरबुद्धि असें ह्मणतात; जो समाधीचें अखंड सुख भोगतो; त्याचीं लक्षणें कोणतीं? ८८ तो कशा प्रकारें राहतो? तो कोणत्या रूपांत रममाण होतो? हे देवा! हे लक्ष्मीपते! हें सर्व सांगावें." ८९ तेव्हां परब्रह्माचा अवतार, षड्गुणांचा आधार, असा जो श्रीनारायण तो काय ह्मणाला ? ९०**

श्रीभगवानुवाच.

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ५५

१ अभिप्राय. २ बरें वाटेल. ३ संतोषानें. ४ ह्मणावें. ५ ज्याची बुद्धि स्थिर झाली त्याला. ६ कसें. ७ ह्मणतात. ८ कोणत्या. ९ लक्षणांनीं. १० जाणावा. ११ भोगतो. १२ राहतो. १३ वर्तन करतो. १४ अवतार. १५ ऐश्वर्य, कर्म, यश, लक्ष्मी, ज्ञान आणि विज्ञान ह्या सहा गुणांचा आधार.

[ श्रीभगवानुवाच-पार्थ ] ह्मणे अर्जुना परियेसीं । [ मनोगतान् ] जो हा अभिलाष प्रौढे मानसीं । तो अंतराय स्वसुखेंसीं । करीत असे ॥ ९१ ॥ जो सर्वदा नित्यतृप्त । अंतःकरणभरित । परी विषयामाजि पतित । जेणें संगें कीजे ॥ ९२ ॥ [ प्रजहाति यदा कामान्सर्वान् ] तो काम सर्वथा जाये । [ आत्मन्येवात्मना तुष्टः ] जयाचें आत्मसंतोषीं मन राहे । [ स्थितप्रज्ञस्तदोच्यते ] तोचि स्थितप्रज्ञ होये । पुरुष जाणें ॥ ९३ ॥

**"अर्जुना! ऐक. मनांतील प्रबळ इच्छा, हीच आपल्या सुखाला विघातक होते. ९१ जो सदासर्वकाळ तृप्त; अंतःकरणांत समाधान; आणि ज्याच्यायोगानें विषयांत पतन होतें, ९२ असा जो काम, तो ज्याचा निखालस लयास गेला आहे; ज्याचें मन आत्मसंतोषांत निमग्न झालें आहे; तोच पुरुष स्थिरबुद्धि झाला ह्मणून समजावें." ९३**

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

[ दुःखेष्विति ] नाना दुःखीं प्राप्तीं । जया उद्वेग नाहीं चित्तीं । आणि सुखाचिया आर्ती । अडपैचिजेना ॥ ९४ ॥ [ वीतरागभयक्रोधः ] अर्जुना तयाच्या ठायीं । कामक्रोध सहजें नाहीं । आणि भयातें नेणे कहीं । परिपूर्ण तो ॥९५॥ [ स्थितधीर्मुनिरुच्यते ] ऐसा जो निरवधी । तो जाण पां स्थिरबुद्धी । जो निरसूनि उपाधी । भेदरहित ॥ ९६ ॥

**"कितीही दुःखें प्राप्त झालीं तरी, ज्याच्या मनाला उद्विग्नता नाहीं; आणि जो सुखाच्या आशेंत गुंतत नाहीं. ९४ अर्जुना! त्याच्या ठाईं सहजच कामक्रोध राहत नाहींत. आणि भय ह्मणून कसलें असतें, तें त्याला माहीतच नसतें. तोच योग्य ह्मणून समजावें. ९५ अशा प्रकारें संसार सोडून जो निखालस भेदरहित होतो, तोच स्थिरबुद्धि ध्यानांत ठेव बरें. ९६**

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥५७॥

[ यः सर्वत्रानभिस्नेहः ] जो सर्वत्र सदा सरिसा । परिपूर्ण चंद्र कां जैसा । अधमोत्तम प्रकाशा । माजि न ह्मणे ॥९७॥ ऐसी अनवच्छिन्न समता । भूतमात्रीं सदयता । [ तत्तत्प्राप्य शुभाशुभं ] आणि पालट नाहीं चित्ता । कवणे वेळे ॥ ९८ ॥ [ नाभिनंदति न द्वेष्टि ] गोमटें कांहीं पावे । तरी संतोषें तेणें नाभिभवे । जो ओखटेनि नागवे । विषादासी ॥ ९९ ॥ ऐसा हरिखशोकरहित । जो आत्मबोधभरित । [ तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ] तो जाण पां प्रज्ञायुक्त । धनुर्धरा ॥ ३०० ॥

**पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें जो सर्व ठिकाणीं सर्वकाळ सारखा परिपूर्ण. प्रकाश पाडतांना चंद्र ज्याप्रमाणें हा उत्तम, हा अधम, असें मनांत आणीत नाहीं, ९७ त्याप्रमाणें अखंड ज्याची समबुद्धि; प्राणिमात्रावर दया; कोणत्याही वेळीं चित्ताला पालट ह्मणून नाहींच. ९८ काहीं चांगलें झालें तरी, संतोषाचा जो अंकित होत नाहीं; किंवा कांहीं वाईट झालें तरी दुःख पावत नाहीं. ९९ अर्जुना! अशा प्रकारें जो हर्ष शोक सोडून आत्मबोधानें भरलेला, तोच स्थिरबुद्धि. समजलास? ३००.**

यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५८॥

[ यदेति ] कां कूर्म जियें परी । उवाइला अवेव पसरी । नातरी इच्छावशें आवरी । आपुले आपण ॥ १ ॥ [ इंद्रियाणीति ] तैसीं इंद्रियें आपैतीं । जयाचें ह्मणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पावली असे ॥ २ ॥

**किंवा कासव जसा आनंदांत असला ह्मणजे आपले हातपाय बाहेर पसरतो; किंवा पाहिजे तर आपले आपण आवरून संकोचित करून घेतो. १ त्याप्रमाणें इंद्रियें ज्याच्या स्वाधीन झालीं आहेत; त्याच्या ह्मटल्याप्रमाणें जीं चालतात; त्याची बुद्धि स्थीर झाली ह्मणून समजावें. २**

१ इच्छा. २ प्रबळ. ३ विघ्न. ४ प्राप्त झाली असतां. ५ त्रास. ६ इच्छेमध्यें. ७ अडचणींत पडतच नाहीं. ८ योग्यतेस पोंचलेला. ९ उत्तम. १० सोडून. ११ उपसर्ग, संसार.

१ सारखा. २ अखंड. ३ प्राणिमात्रावर. ४ चांगलें. ५ अभिमानास चढत नाहीं. ६ वाईटानें. ७ पावत नाहीं. ८ दुःखाला. ९ हर्षशोकहीन. १० कांसव. ११ ज्याप्रमाणें. १२ आनंदांत असतां. १३ अवयव. १४ स्वाधीन, वश. १५ ह्मटलेलें.

विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥

[ विषया इति ] अर्जुना आणिकही एक । सांगेन ऐकें कवतिक[1] । जे विषयातें साधक[2] । त्यजिती नियमें[3] ॥ ३ ॥ श्रोत्रादि इंद्रियें आवरिती । [ रसवर्जं ] परी रसने[4] नियम न करिती । ते सहस्रधा[5] कवळिजती[6] । विषयीं इहीं ॥ ४ ॥ जैसी वरिवरी पालवी[7] खुडिजे[8] । आणि मुळीं उदक घालिजे । तरी कैसेनि नाश निपजे । तया वृक्षा ॥ ५ ॥ तो उदकाचेनि बळें अधिकें । जैसा आडवेनि आंगें फांके[9] । तैसा मानसीं विषय पोखे[10] । रसनाद्वारें[11] ॥ ६ ॥ येरां[12] इंद्रियां विषय तुटे । तैसा नियमूं नये रसें[13] हटें । जे जीवनेंचि[14] हें न घटे । येणें-विण ॥ ७ ॥ [ रसोप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ] मग अर्जुना स्वभावें । ऐसियाही नियमातें पावे । जे कां परब्रह्म अनुभवें । होऊनि जाइजे ॥ ८ ॥ तैं शरीरभाव नासती । इंद्रियें विषय विसरती । जैं सोहंभावप्रतीती[15] । प्रगट होय ॥ ९ ॥

**अर्जुना!** तुला आणखी एक चमत्कार सांगतों, ऐक. कितीएक योगसाधन करणारे इंद्रियांचें दमन करून विषयाचा त्याग करतात. ३ ते आपलीं कर्णादि इंद्रियें स्वाधीन ठेवतात. परंतु रसनेंद्रियाचें (वासनेचें) दमन करीत नाहींत. ते हजारों प्रकारांनीं ह्या विषयांत ओढले जातात. ४ झाडाचे वरचे वरचे शेंडे खुडले, आणि मुळांत पाणी घातलें, तर त्या वृक्षाचा नाश कसा होणार? ५ तो त्या पाण्याच्या जोरानें आडव्या आंगानें अधिकच फुटतो; त्याप्रमाणें वासनेच्या द्वारानें मनामध्यें विषय अधिकच बळावतात. ६ इतर इंद्रियांना विषय नाहींसे होतील, अशा प्रकारें ह्या वासनेचा हट्टानें निग्रह करतां येत नाहीं. कारण तिच्याशिवाय आयुष्यच चालणार नाहीं. ७ अनुभवानें परब्रह्मस्थितीप्रत पोंचलें, ह्मणजे मग **अर्जुना!** आपोआपच तसाही निग्रह करतां येतो. ८ आपण ब्रह्म असा अनुभव प्रगट झाला, ह्मणजे शरीराची विस्मृति होते; आणि इंद्रियांचा विसर पडतो. ९

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥

[ पुरुषस्य विपश्चितः ] येऱ्हवीं तरी अर्जुना । हें आया[1] नये साधना । जे जे राहाटताति[2] जैतना[3] । निरंतर ॥ ३१० ॥ [ यततो ह्यपि कौंतेय ] जयातें अभ्यासाची धेरटी[4] । यमनियमांची तोटी[5] । जे मनातें सदा मुठी । धरूनि ओहाति[6] ॥ ११ ॥ [ इंद्रियाणि प्रमाथीनि ] तेही किजंती[7] कासाविसी । या इंद्रियांची प्रौढी[8] ऐसी । जैसी मंत्रज्ञातें[9] विवसी[10] । भुलवी[11] कां ॥ १२ ॥ देखें विषय हे तैसे । पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषें । [ हरंति प्रसभं मनः ] मग आकळिती स्पर्शें । इंद्रियांचेनी. ॥ १३ ॥ तिये संधी[12] मन जाये[13] । मग अभ्यासीं थोटावलें[14] ठाये । ऐसें बळकटपण[15] आहे । इंद्रियांचें ॥ १४ ॥

**अर्जुना!** हीं इंद्रियें स्वाधीन राहण्याविषयीं निरंतर प्रयत्न केला, तरी आत्मानुभवाशिवाय ती गोष्ट साध्य होत नाहीं. १० अभ्यास हेंच ज्यांचें घर; मनोनिग्रह हीच ज्यांची तटबंदी; मनाला तर ज्यांनीं मुठींत ठेवलें आहे, ११ त्यांचीही गडबड उडून जाते. अशी ह्या इंद्रियांची शक्ति आहे. किंवा मंत्रवेत्त्याला जशी एखाद्या हडळीनें भुरळ घालावी, १२ तसे हे विषय आहेत पहा! हे ऋद्धिसिद्धींच्या मिषानें येतात, आणि मग इंद्रियांकडे संधान लावून त्याला बद्ध करतात. १३ अशा प्रसंगीं मन मोहांत पडतें; अभ्यासांत व्यत्यय येतो. असा इंद्रियांचा जोर आहे. १४

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

[ तानि सर्वाणि संयम्य ] ह्मणोनि आइकें पार्था । यांतें[16] निर्दळी[17] जो सर्वथा । सर्वविषयीं आस्था । सांडूनियां ॥ १५ ॥ [ तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ] तोचि तूं जाण । योगनिष्ठेसि कारण । [ वशे हि यस्येंद्रियाणि ] जयाचें विषयसुखें अंतःकरण ।

१ कौतुक, नवल. २ योगसाधन करणारे, मुमुक्षु. ३ दमन करून. ४ वासनेचा. ५ हजारों प्रकारांनीं. ६ गुरफटून जातात. ७ पाला. ८ खुडावी. ९ फुटतो. १० पुष्ट होतात. ११ वासनेच्या द्वारानें. १२ इतर. १३ वासना. १४ आयुष्य, प्राण. १५ आपण ब्रह्म असा अनुभव.

१ स्वाधीन करण्यास. २ वागतात. ३ यत्नानें. ४ गस्त. ५ बांध, मर्यादा. ६ राहतात, आहेत. ७ केले जातात. ८ जोर, वळ. ९ मंत्रवेत्त्यांना. १० लावसट. ११ भुरळ घालते. १२ अशा वेळीं. १३ जातें. १४ निर्बळ होऊन राहतें. १५ जोर. १६ ह्या विषयांना. १७ संहार करतो.

झंकवे ना ॥ १६ ॥ [ युक्त आसीत मत्परः ] जो आत्मबोधयुक्त । होऊनि असे सतत । जो मातें हृदयाआंत । विसंबेना ॥ १७ ॥ येऱ्हवीं बाह्य विषय तरी नाहीं । परी मानसीं होईल जरी कांहीं । तरी सायंतचि पाहीं । संसार असे ॥ १८ ॥ जैसा कां विषाचा लेश । घेतलियां होय बहुवस । मग निभ्रांत करी नाश । जीवितासी ॥ १९ ॥ तैसी विषयाची शंका । मनीं वसती देखा । घात करी अशेखा । विवेकजाता ॥ ३२० ॥

**ह्मणून अर्जुना,** ऐक. सर्व विषयांची आस्था सोडून देऊन ह्यांचा जो अगदीं बीमोड करून सोडतो, १५ विषय सुखानें ज्याचें अंतःकरण फसत नाहीं, जो निरंतर आत्मबोधयुक्त होऊन राहतो, हृदयांतून मला कधीं दूर करीत नाहीं, तोच योगनिष्ठेस पात्र होतो, असें समज. १६।१७ परवीं बाहेरून विषय सोडले, आणि अंतःकरणांत यत्किंचित् जरी राहिले, तरी तो संसारांत बुडालाच ह्मणून समजावें. १८ ज्याप्रमाणें विषाचा एक बिंदु घेतला, तरी तो चहूंकडे पसरतो, आणि हटकून प्राणाचा नाश करतो, १९ त्याप्रमाणें, विषयाची छाया जरी मनांत राहिली, तरी ती सर्व विचारांचा नाश करून सोडते. २०

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

[ ध्यायत इति ] जरी हृदयीं विषयस्मृति । तरी निःसंगाही आपजे संगती । [ संगात्संजायते कामः ] संगें प्रगटे मूर्ती । अभिलाषाची ॥ २१ ॥ [ कामात्क्रोधोभिजायते ] जेथ काम उपजला । तेथ क्रोध आधींचि आला । [ क्रोधाद्भवति संमोहः ] क्रोधीं असे ठेविला । संमोह जाणें ॥ २२ ॥ [ संमोहात्स्मृतिविभ्रमः ] संमोहा जालियां व्यक्ती । तरी नाश पावे स्मृती । चंडवातें ज्योती । हंते जैसी ॥ २३ ॥ कां अस्तमानीं निशि । जैसी सूर्यतेजातें ग्रासी । तैसी दशा स्मृतिभ्रंशीं । प्राणियासी ॥ २४ ॥ [ स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो ] मग अज्ञानांध केवळ । तेणें आप्लविजे सकळ । तेथ बुद्धि होय व्याकुळ । हृदयामाजी ॥ २५ ॥ जैसें जात्यंधा पळणी पावे । मग तें काकुळती सैरा धांवे । तैसी बुद्धीसि होती भंवें । धनुर्धरा ॥ २६ ॥ ऐसा स्मृतिभ्रंश घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे । तेथ समूळ हें उपडे । ज्ञानजात ॥ २७ ॥ [ बुद्धिनाशात्प्रणश्यति ] चैतन्याच्या भ्रंशीं । शरीरा दशा जैसी । तैसें पुरुषा बुद्धिनाशीं । होय देखें ॥ २८ ॥ ह्मणोनि आइकें अर्जुना । जैसा विस्फुलिंग लागे इंधना । मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना । पुरों शके ॥ २९ ॥ तैसें विषयांचें ध्यान । जरी विपायें वाहे मन । तरी येसणें हें पतन । गिंवसीत पावे ॥ ३३० ॥

**हृदयांत विषयाचें स्मरण जरी असलें, तरी निःसंगाला संगत उत्पन्न होते. संगत उत्पन्न झाली ह्मणजे कामाची मूर्ती प्रगट होते. २१ काम उत्पन्न झाला कीं, त्याच्या आधींच क्रोध आला ह्मणून समजावें. क्रोध आला कीं, त्यांत अविचार ठेवलेलाच. २२ अविचार प्रगट झाला कीं, प्रचंड वाऱ्यानें ज्योती मालवते त्याप्रमाणें स्मृतिही नष्ट होते. २३ किंवा सायंकाळीं रात्र जशी सूर्यप्रकाशाला ग्रासून टाकते, तद्वत् ती दशा प्राण्यांची स्मृति भ्रंश करून टाकते. २४ मग तो अज्ञानानें अंध होतो, आणि त्याच्या हृदयांतील बुद्धि व्याकुल होऊन जाते. २५ जन्मांधास धावण्याचा प्रसंग आला, ह्मणजे तो जसा दीनवाणीनें सैरावैरा पळत सुटतो, त्याप्रमाणें अर्जुना ! ही बुद्धि भ्रमांत पडते. २६ अशाप्रकारें स्मृतीचा भ्रंश झाला, ह्मणजे बुद्धीस भ्रम पडून ज्ञानजात उपडून जातें. २७ चैतन्य नाहींसें झालें ह्मणजे जी दशा शरीराची, तीच दशा, बुद्धि नाहींशी झाली ह्मणजे पुरुषाची ! २८ ह्मणून अर्जुना, ऐक. जळणाला ठिणगी लागून ती भडकली, ह्मणजे त्रिभुवनाला पुरून उरते; २९ त्याप्रमाणें**

---

१ फसत नाहीं. २ त्याग करीत नाहीं, विसरत नाहीं. ३ सर्व. ४ अंश. ५ पुष्कळ. ६ विषयांचें स्मरण. ७ विरक्ताला सुद्धां. ८ उत्पन्न होते. ९ लोभाची. १० महामोह. ११ प्रगट. १२ स्मरणशक्ति. १३ प्रचंड वाऱ्यानें. १४ दिव्याची ज्योत. १५ नष्ट होते, मालवते. १६ रात्र.

१ बुडतें. २ कासावीस. ३ जन्मांधाला. ४ धांवाधांव. ५ दीनवाणा. ६ भलतीकडे. ७ भ्रमण. ८ अडचणींत सांपडते. ९ नाहींसें होतें. १० प्राण नाहींसा झाल्यानें. ११ बुद्धि नष्ट झाल्यानें. १२ ठिणगी. १३ जळणाला. १४ कदाचित्. १५ येवढें. १६ शोधीत येतें.

झकून जरी विषयाचें ध्यान धरलें, तरी हा येवढा अनर्थ चालून येतो. पतन शोधीत येतें. ३०

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥

[ विधेयात्मा ] ह्मणोनि विषय आघवे । सर्वथा मनौनि सांडावे । [ रागद्वेषेत्यर्धं ] मग राग द्वेष स्वभावें । नाशतील ॥ ३१ ॥ पार्था आणिकही एक । जरी नाशले हे रागद्वेष । तरी इंद्रियां विषयीं बाधक । रमतां नाहीं ॥ ३२ ॥ जैसा सूर्य आकाशगत । रश्मिकरें जगातें स्पर्शत । तरी संगदोषें काय लिंपते । तेथिचेनि ॥ ३३ ॥ तैसा इंद्रियार्थी उदासीन [ आत्मवश्यैः ] आत्मरसेंचि निर्भिन्न । जो कामक्रोधविहीन । होऊनि असे ॥ ३४ ॥ तरी विषयांतही कांहीं । आपणपें-वांचूनि नाहीं । मग विषय कवण कायी । बाधितील कवणा ॥ ३५ ॥ जरी उदकीं उदकें बुडिजे । कां अग्नि आगी पोळिजे । तरी विषयसंगें आप्लविजे । परिपूर्ण तो ॥ ३६ ॥ ऐसा आपणचि केवळ । होऊनि असे निखिळें । [ प्रसादमधिगच्छति ] तयाची प्रज्ञा अचळ । निभ्रांत मानीं ॥ ३७ ॥

ह्मणून, सारे विषय मनापासून सोडावेत, ह्मणजे राग आणि द्वेष आपोआपच नाहींसे होतील. ३१ अर्जुना ! आणखी असें आहे कीं, हे रागद्वेष जर नाहींसे झाले, तर विषयाच्या ठिकाणीं इंद्रियें रममाण झालीं असतांही कांहीं बाधक नाहीं. ३२ जसा सूर्य आकाशांत असतो, आणि किरणांनीं जगांतील द्रव्या त्या पदार्थांस स्पर्श करतो, ह्मणून त्यांचा संसर्ग त्यास लागतो काय ? ३३ तसा, इंद्रियांनीं ग्राह्य विषयांचे ठायीं उदासीन, आत्मरसानें परिपूर्ण, आणि कामक्रोधरहित होऊन राहिला, ३४ तर विषयांत देखील स्वतः आपल्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. मग विषय ते कोण ? आणि बांधतील कोणाला ? ३५ पाणी जर पाण्यांत बुडेल, अग्नि जर अग्नीनें भाजेल, तर परिपूर्ण आहे तो विषयांच्या संगतीनें बुडेल. ३६ याप्रमाणें आपणच जो त्रैलोक्यरूप बनून राहतो, त्याची बुद्धि स्थिर झाली, असें निःसंशय मनांत समज. ३७

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥

[ प्रसादेइति ] देखें अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥ ३८ ॥ जैसा अमृताचा निर्झर । प्रसवे जयाचा जठर । तया क्षुधेतृषेचा अडदर । कांहींचि नाहीं ॥ ३९ ॥ [ प्रसन्नचेतस इति ] तैसें हृदय प्रसन्न होये । तरी दुःख कैंचें कें आहे । तेथ अपैसी बुद्धि राहे । परमात्मरूपीं ॥ ३४० ॥ जैसा निर्वातीचा दीप । सर्वथा नेणें कंप । तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूप । योगयुक्त ॥ ४१ ॥

हें पहा ! जेथें चित्ताला निरंतर प्रसन्नता आहे, तेथें कोणत्याही संसारदुःखाचा प्रवेश नाहीं. ३८ ज्याच्या पोटांतूनच अमृताचा झरा निघत असला, तर त्याला जसें क्षुधेचें किंवा तृषेचें भय नाहीं, ३९ तसें हृदयच प्रसन्न झालें, तर दुःख कशाचें ? आणि कोठें ? तेथें आपोआपच परमात्मस्वरूपामध्यें बुद्धि राहते. ४० निवाऱ्यांतील दिवा जसा हालत नाहीं, त्याप्रमाणें योगी आपली बुद्धि स्थिर करून आत्मस्वरूपामध्येंच निमग्न असतो. ४१

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चाऽयुक्तस्य भावना ।
न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

[अयुक्तस्य] ये युक्तीची कडसणी । नाहीं जयाच्या अंतःकरणीं । तो आकळिला जाण गुणीं । विषयादिकीं ॥ ४२ ॥ [नास्ति बुद्धिः] तया स्थिरबुद्धि पार्था । केंहीं नाहीं सर्वथा । [न चायुक्तस्य भावना] आणि स्थैर्याची आस्था । तेही नुपजे ॥ ४३ ॥ [न चाभावयतः शांतिः] निश्चळत्वाची भावना । जरी नव्हेचि देखें मना । तरी शांति केवीं अर्जुना । आप होय ॥ ४४ ॥ [अशांतस्य कुतः सुखं] जेथ शांतीचा जिव्हाळा नाहीं । तेथ सुख विसरोनि न रिघे कहीं । जैसा पापियाच्या ठायीं । मोक्ष न वसे ॥ ४५ ॥ देखें अग्निमाजि घांपती । तियें बीजें जरी विरूढती । तरी अशांता सुखप्राप्ती ।

१ मनापासून. २ इंद्रियांस. ३ आकाशांत असलेला. ४ किरणांनीं. ५ लिप्त होतो. ६ इंद्रियांनीं ग्राह्य विषयांचे ठायीं. ७ आपल्या वासनेनेंच. ८ परिपूर्ण. ९ कामक्रोधरहित. १० आपल्या स्वतां शिवाय. ११ बुडेल. १२ सर्व. १३ बुद्धि.

१ आहे. २ रिघाव. ३ झरा. ४ उदर. ५ भय. ६ कोठें? ७ निवाऱ्यांतला. ८ विचार. ९ गुणांनीं. १० विषयादिकांनीं. ११ केव्हांही. १२ उत्पन्न होत नाहीं. १३ प्राप्त. १४ ज्या ठिकाणीं. १५ उद्भव. १६ कधीं. १७ घातलेली. १८ उगवतील. १९ ज्यांचें मन शांत नाहीं त्यांला.

नडों शके ॥ ४६ ॥ ह्मणोनि अयुक्तपण मनाचें । तेंचि सर्वस्व दुःखाचें । याकारणें इंद्रियांचें । दमन कीजे ॥ ४७ ॥

ह्या युक्तीचा विचार ज्याच्या अंतःकरणांत नाहीं, तो शब्दादि विषयांनीं व गुणांनीं बद्ध झाला ह्मणून समजावें. ४२ त्याची बुद्धि कधीं स्थिर व्हावयाची नाहीं; आणि स्थिर होण्याची आस्थाही त्याला उत्पन्न होणार नाहीं. ४३ आणखी असें पहा अर्जुना! स्थिर होण्याची कल्पनाच जर मनामध्यें येत नाहीं, तर त्याला शांति कशी प्राप्त होणार? ४४ पापी मनुष्यामध्यें जसा मोक्ष राहावयाचा नाहीं, त्याप्रमाणें जेथें शांतीचा उद्भव नाहीं तेथें चुकूनसुद्धां सुख जावयाचें नाहीं. ४५ पहा! अग्नींत घालून काढलेलीं बीजें जर उगवतील, तर द्वैतभाव असणाऱ्याला सुख घडेल. ४६ यावरून मनाचा अविचारपणा हाच सर्व दुःखाचें कारण आहे. याकरितां, इंद्रियांचें दमन करावें. ४७

इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।
तदस्य हरति प्रज्ञा वायुर्नावमिवांभसि ॥ ६७ ॥

[इंद्रियाणामिति] इंद्रियें जें जें ह्मणती । तें तेंचि जे पुरुष करिती । ते तरलेचि न तरती । विषयसिंधु ॥ ४८ ॥ [तदस्येति] जैसी नाव थडिये ठाकितां । जरी वैरपडी होय वाता । तरी चुकलाही मागौता । अपावो पावे ॥ ४९ ॥ तैसी प्राप्तेंही पुरुषें । इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें । तरी आक्रमिला जाण दुःखें । सांसारिकें ॥ ३५० ॥

जे पुरुष इंद्रियांनीं ह्मटलेलें करतात, ते विषयसिंधु तरले तरी न तरल्याप्रमाणेंच आहेत. ४८ जसें, नाव तीरास उभी असली, आणि तिच्यावर वादळ येऊन कोसळलें, तर टळलेला अपाय सुद्धां पुन्हा घडतो; ४९ तसें, आत्मानुभव प्राप्त झालेल्या पुरुषानें कौतुकानें जरी इंद्रियें पोसलीं, तरी तो संसारसंबंधी दुःखानें घेरलाच ह्मणून समजावें. ५०

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

[तस्मादिति] ह्मणोनि आपुलीं आपणपया । जरी इंद्रियें येती आया । तरी अधिक कांहीं धनंजया । सार्थक असे ॥ ५१ ॥ देखें कूर्म जियापरी । उवाइला अवयव पसरी । नातरी इच्छावशें आवरी । आपणपेंचि ॥ ५२ ॥ [इंद्रियाणीति] तैसीं इंद्रियें अपैतीं होती । जयाचें ह्मणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पातली असे ॥ ५३ ॥ आतां आणिक एक गहन । पूर्णाचें चिन्ह । अर्जुना तुज सांगेन । परिस पां ॥ ५४ ॥

ह्याकरितां, आपोआप इंद्रियें जर स्वाधीन होतील, तर अर्जुना! आणखी सार्थक तें काय राहिलें? ५१ पहा! कासव ज्याप्रमाणें आनंदानें आपले अवयव पसरतो, किंवा इच्छामात्रें करून आपणच ते आवरून घेतो; ५२ त्याप्रमाणें, ज्याला इंद्रियें वश होतात, त्याच्या ह्मणण्याप्रमाणें चालतात, त्याची बुद्धि स्थिर झाली ह्मणून समजावें. ५३ अर्जुना! आतां आणखी एक पूर्णाचें गहन चिन्ह आहे, तें तुला सांगतों, ऐकून ठेव. ५४

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥ ६९॥

[या निशेति] देखें भूतजात निदेलें । तेथेंचि जया पाहलें । [यस्यामिति] आणि जीव जेथ चेइले । तेथ निद्रित जो ॥५५॥ तोचि तो निरुपाधि । अर्जुना तो स्थिरबुद्धि । तोचि जांणे निरवधि । मुनीश्वर ॥ ५६ ॥

पहा! प्राणीमात्र जेथें निजलेले असतात, तेथें ज्याला उजाडलेलें; आणि प्राणी जेथें जागृत असतात, तेथें जो निजलेला; ५५ अर्जुना! असा जो तोच संसारमुक्त; तोच स्थिरबुद्धि; आणि तोच उपाधिरहित मुनिश्रेष्ठ. ५६

---

१ अनियमितपणा. २ निग्रह, संयमन. ३ तीरास. ४ उभी असतां. ५ प्राप्त. ६ वादळ. ७ पुन्हा. ८ अपाय. ९ ज्ञालाही. १० पोसलीं, लाड केले. ११ ओढला. १२ संसारसंबंधी.

१ आपणास. २ स्वाधीन. ३ सुखावलेला. ४ आपल्या इच्छेनें. ५ आखडून घेतो. ६ आपणच. ७ स्वाधीन, वश. ८ गूढ. ९ ज्ञान्याचें, योगयुक्ताचें. १० प्राणीमात्र. ११ निजलेले, निष्काळजी. १२ उजाडलें, जागृति. १३ प्राणीमात्र. १४ जागृत. १५ उपाधिरहित, दुःखमुक्त. १६ परिपूर्ण, निस्सीम.

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे
स शांतिमाप्नोति न कामकामी ॥ ७० ॥

[आपूर्यमाणमिति] पार्था आणीकही परी । तो जाणों येईल अवधारीं । [समुद्रमापः प्रविशंति यद्वत्] जैसी अक्षोभता[1] सागरीं । अखंडित ॥ ५७ ॥ जऱ्ही सरितौघ[2] समस्त । परिपूर्ण होऊनि मिळत । तऱ्ही अधिक नोहे ईषत[3] । मर्यादा न सांडी ॥ ५८ ॥ ना तरी ग्रीष्मकाळीं सरिता । शोषूनि जाती समस्ता । परी न्यून नव्हे पार्था । समुद्र जैसा ॥ ५९ ॥ [तद्वदिति] तैसा प्राप्तीं ऋद्धि सिद्धी । तयासि क्षोभ नाहीं बुद्धी । आणि न पैवतां[4] न बाधी । अधृति[5] तयातें ॥ ३६० ॥ सांगें सूर्याच्या घरीं । प्रकाश काय वांतीवेन्ही[6] । कां न लविजे[7] तरी अंधकारीं । कोंडेल तो ॥ ६१ ॥ देखें ऋद्धिसिद्धि तयापरी । आली गेली से[8] न करी । तोचि गुंतला असे अंतरीं । महासुखीं ॥ ६२॥ जो आपुलेनि नागरपणें[9] । इंद्रभुवनातें पांवळें[10] ह्मणे । तो केविं रंजे पालवणें[11] । भिल्लांचेनि ॥ ६३ ॥ जो अमृतातें ठि[12] ठेवीं । तो जैसा कांजी[13] न सेवी । तैसा स्वसुखानुभवी[14] । न भोगी ऋद्धि ॥ ६४ ॥ पार्था नवल हें पाहीं । जेथ स्वर्गसुखा लेखणी[15] नाहीं । [न कामकामी] जेथ ऋद्धिसिद्धि कायी । प्राकृता[16] होती ॥ ६५ ॥

**अर्जुना!** तो आणखीही एका गुणानें ओळखतां येईल. ऐकून ठेव. सागरामध्यें ज्याप्रमाणें निरंतर शांतता असते, ५७ तुडुंब भरलेल्या साऱ्या नद्यांचे प्रवाह जरी त्याला येऊन मिळतात, तरी तो यत्किंचित्ही मर्यादा उल्लंघन करीत नाहीं. ५८ किंवा **अर्जुना!** उन्हाळ्यांत साऱ्या नद्या आटून गेल्या ह्मणून तो जसा कमी होत नाहीं, ५९ त्याप्रमाणें ऋद्धिसिद्धि प्राप्त झाल्या तरी, ज्याच्या बुद्धीला क्षोभ होत नाहीं; किंवा प्राप्त झाल्या नाहींत ह्मणून ज्याला अधैर्याची कधीं बाधा होत नाहीं. ६० सूर्याच्या घरामध्यें दिवा लावून का प्रकाश केला पाहिजे? तो लावला नाहीं, तर सूर्य आंधेरांत कोंडेल का? सांग. ६१ त्याप्रमाणेंच पहा. ऋद्धिसिद्धि आल्या काय आणि गेल्या काय, त्यांची ज्याला आठवण सुद्धां नाहीं, तोच अंतःकरणांतील महासुखांत निमग्न झाला ह्मणून समजावें. ६२ जो आपल्या घराच्या सौंदर्यापुढें इंद्रभुवनाला तुच्छ मानतो, तो भिल्लाच्या झोपडींत रममाण कसा होणार? ६३ अमृताला सुद्धां जो नांवें ठेवतो, तो पेज पिणार कशी? तसें आत्मसुखानुभव घेणारा ऋद्धिसिद्धींचा उपभोग घेत नाहीं. ६४ **पार्था!** हा एक चमत्कारच आहे. जेथें स्वर्गसुखाची मातब्बरी नाहीं, तेथें ऋद्धिसिद्धींचा पाड काय? त्या बिचाऱ्या अर्थातच हिणकस! ६५

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥

[स शांतिमधिगच्छति] ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदें पोखला[1] । तोचि स्थिरप्रज्ञ[2] भला । वोळख तूं ॥ ६६ ॥ [निर्ममो निरहंकारः] तो अहंकारातें दवडुनी । [विहायेति] सकळ काम सांडुनी । विचरे[3] विश्व होउनी । विश्वामाजी ॥ ६७ ॥

अशाप्रकारें आत्मबोधानें संतोष पावलेला, परमानंदानें पोसलेला, तोच उत्तम स्थिरबुद्धि असें तूं ओळख. ६६ तो अभिमान सोडून, सकल इच्छा टाकून देऊन, विश्व होऊन विश्वांत संचार करतो. ६७

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि ब्रह्म निर्वाणमृच्छति ॥७२॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥२॥

[एषेति] हे ब्रह्मस्थिति निःसीम[4] । जे अनुभविती निष्काम[5] । [ब्रह्म निर्वाणमृच्छति] ते पावले परब्रह्म । अनायासें ॥६८ ॥ [स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि] जे चिद्रूपीं[6] मिळतां । देहांतींची व्याकुळता । आड ठाकों न सके चित्ता । प्राज्ञा[7] जया[8] ॥ ६९ ॥ तेचि हे स्थिति । स्वमुखें श्रीपति । सांगत अर्जुनाप्रति । संजयो ह्मणे ॥ ३७० ॥ [उत्तराध्यायबीजं] ऐसें कृष्णवाक्य

१ शांतता. २ नद्यांचे प्रवाह. ३ यत्किंचित्ही. ४ प्राप्त झाल्या नाहीं तरी. ५ अधीरपणा. ६ दिवा लावतो काय? ७ न लावील. ८ आठवण, स्मृति. ९ सौंदर्यानें, तेजानें. १० तुच्छ, हलकें. ११ पर्णकुटीनें, झोंपडीनें. १२ दोष, नांव. १३ पेज. १४ आत्मसुखानुभवी. १५ परवा, गणना. १६ अल्प, क्षुद्रपदार्थ.

१ पुष्ट झाला. २ स्थिरबुद्धि. ३ फिरतो, राहतो. ४ सीमारहित. ५ सर्वसंगपरित्यागी. ६ ज्ञानस्वरूपांत. ७ ज्ञान्याला. ८ ज्या ब्रह्मस्थितीनें.

ऐकिलें । तेथ अर्जुनें मनीं ह्मणितलें । आतां आमुचिया काजा आलें । उपपत्ती ईया ॥ ७१ ॥ जें कर्मजात आघवें । एथ निराकारिलें देवें । तरी पौरुषलें म्यां झुंझावें । ह्मणूनियां ॥ ७२ ॥ ऐसा श्रीअच्युताचिया बोला । चित्तीं धनुर्धर उवायिला । आतां प्रश्न करील भला । आशंकोनी ॥ ७३ ॥ तो प्रसंग असे नागर । जो सकळ धर्मासि आगर । कीं विवेकामृतसागर । प्रांतहीन ॥ ७४ ॥ जो आपण सर्वनाथ । निरूपिता होईल श्रीअनंत । ज्ञानदेव सांगेल मात । निवृत्तिदास ॥ ३७५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ श्लोक ७२, ओंव्या ३७५.

जे निरिच्छ असतात, तेच या निस्सीम ब्रह्मस्थितीचा अनुभव घेतात, आणि तेच अनायासें परब्रह्माप्रत पोंचतात. ६८ अशाप्रकारचे जे ज्ञानी आहेत त्यांना, या ब्रह्मस्थितीच्या योगानें, ज्ञानस्वरूपांत मिळण्याच्या वेळीं, देहाच्या अंतकाळींची व्यथा चित्ताच्या आड येऊं शकत नाहीं." ६९ संजय ह्मणतोः—तीच ही स्थिति श्रीपतीनें स्वतः अर्जुनाला सांगितली. ७० असें कृष्णाचें वाक्य ऐकून अर्जुन मनांत ह्मणाला— 'आतां ठीक झालें. ही युक्ति आमच्या खाशी उपयोगीं पडण्यासारखी आहे. ७१ कारण, देवानें साऱ्या कर्मांचा निषेध केला. तेव्हां मला युद्ध करण्याचेंही कारण राहिलें नाहीं.' ७२ अशाप्रकारें श्रीअच्युताच्या भाषणानें धनुर्धर मनामध्यें आनंद पावला. आतां पुढें शंका घेऊन खासा प्रश्न करील. ७३ तो प्रसंग सुंदर असून सकळ धर्मांचें उत्पत्तिस्थान आहे. किंवा विचारामृताचा अपरंपार समुद्रच भरलेला आहे. ७४ जो आपण स्वतः सर्वांचा अधिपति, असा श्रीअनंत त्याचें उत्तर सांगेल. आणि तेंच निवृत्तिदास ज्ञानदेव कथन करील. ३७५

१ युक्ति. २ ही. ३ सर्व कर्में. ४ निषेध केला. ५ राहिलें. ६ हर्ष पावलेला. ७ उत्तम, सुंदर. ८ उत्पत्तिस्थान. ९ अमर्याद, पाररहित.

## दुसरा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ३ रा.

अर्जुन उवाच.

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥१॥

अर्जुन उवाच.

[ज्यायसीति]मग आइका अर्जुनें ह्मणितलें । देवा तुह्मी जें वाक्य बोलिलें । तें म्यां निकें परिसिलें । कृपानिधी ॥ १ ॥ तेथ कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहतां । ऐसें मत तुझें श्रीअनंता । निश्चित जरी ॥ २ ॥ [तदिति] तरी मातें केविं श्रीहरी । ह्मणसी पार्था संग्राम करीं । इंये लाजसीना महाघोरीं । कर्मीं सुतां ॥ ३ ॥ हां गा कर्म तूंचि अशेष । निराकरिसी निःशेष । तरी मजकरवीं हें हिंसक । कां करविसी ॥ ४ ॥ तरी हेंचि विचारीं श्रीहृषीकेशा । तूं मान देसी कर्मलेशा । आणि येसेणी हे हिंसा । करवीत आहासी ॥ ५ ॥

**मग अर्जुन ह्मणाला "कृपानिधि देवा! ऐका. तुह्मी जें जें भाषण बोललांत, तें मीं नीट लक्ष्य लावून श्रवण केलें. १ त्यावरून पाहतां, कर्म आणि कर्ता हीं राहतच नाहींत. श्रीअनंता! हाच जर तुझा निश्चितार्थ असेल, २ तर श्रीहरी! 'अर्जुना तूं युद्ध कर.' असें कसें सांगतोस? आणि या अत्यंत घोर कर्मास प्रवृत्त करवितोस, ह्याबद्दल तुझ्या मनाला संकोच तरी कसा वाटत नाहीं? ३ ह्याडून साऱ्या कर्मांचा तूं निषेध करतोस; मग माझ्याकडून असलें हें घातक कर्म तरी कां करवितोस? ४ हे श्रीहृषीकेशा! तूं कर्ममार्गाला मान देतोस; आणि ही असली भयंकर हिंसा मजकडून करवितोस. ह्याचा तूंच आधीं विचार कर.५**

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥२॥

१ नीट. २ त्या. ३ संकोच वाटत नाहीं. ४ घालतांना. ५ सर्व, सारें. ६ निषेध करतोस. ७ वध, हिंसा, हत्या. ८ कर्ममार्गाला. ९ येवढी.

[व्यामिश्रेणेवेति] देवा तुवांचि ऐसें बोलावें । तरी आह्मी नेणतीं काय करावें । आतां संपेलें ह्मणों पां आघवें । विवेकाचें ॥ ६ ॥ हां गा उपदेश जरी ऐसा । तरी अपभ्रंश तो कैसा । आतां पुरला आह्मा धिंवसा । आत्मबोधाचा ॥ ७ ॥ वैद्य पथ्य वारूनि जाये । मग जरी आपणचि विष सुये । तरी रोगिया कैसेनि जिये । सांगें मज ॥ ८ ॥ जैसें आंधळें सुइजे आंव्हांटा । कां मोजवण दिजे मर्कटा । तैसा उपदेश हा गोमटा । वोढवला आह्मां ॥ ९ ॥ मी आधींचि कांहीं नेणें । वरी कवळिलों मोहें येणें । श्रीकृष्णा विवेक याकारणें । पुसिला तुज ॥ १० ॥ तंव तुह्मी एकेक नवाई । एथ उपदेशामाजि गोंवाई । तरी अनुसरलिया काई । ऐसें कीजे ॥ ११ ॥ आह्मीं तनुमनजिवें । तुझिया बोलां वोठंगावें । आणि तुवांचि ऐसें करावें । तरी सरलें ह्मणें ॥ १२ ॥ आतां ऐसियापरी बोधिसी । तरी निकें आह्मां करिसी । एथ ज्ञानाची आस कायसी । अर्जुन ह्मणे ॥ १३ ॥ तरी ये जाणिवेचें कीर सरलें । [बुद्धिं मोहयसीव मे] परी आणिक एक असें जाहालें । जे थिरें डहुळलें । मानस माझें ॥ १४ ॥ तेवींचि श्रीकृष्णा हें तुझें । चरित्र कांहीं नेणिजे । जरी चित्त पाहसी माझें । येणें मिषें ॥ १५ ॥ नातरी झकवीत आहासी मातें । कीं तत्त्वेंचि कथिसी ध्वनितें । हें अवगमितां निरुतें । जाणवेना ॥ १६ ॥ [तदेकं वद निश्चित्य] ह्मणोनि आइकें देवा । हा भावार्थ आतां न बोलावा । मज विवेक सांगावा । मऱ्हाटाजी ॥ १७ ॥ मी

१ अज्ञान्यांनीं. २ आटोपलें. ३ विचाराचें. ४ भ्रष्टपणा. ५ मनोरथ, इच्छा. ६ सांगून. ७ घालील, देईल. ८ वांचावें. ९ धाडावें, घालावें. १० आडमार्गानें. ११ कैफ. १२ सुरेख. १३ प्राप्त झाला. १४ ग्रस्त झालों. १५ ह्या. १६ विचार. १७ नवल, मजा. १८ गुंतागुंत. १९ शरण आलेल्याला. २० करावें? २१ कायावाचामनेंकरून. २२ शब्दाला. २३ आश्रय करावा. २४ चांगलेंच! २५ ह्या. २६ ज्ञानाचें. २७ निश्चयेंकरून. २८ स्थिर असलेलें. २९ चंचळ झालें. ३० ह्या निमित्तानें. ३१ फसवीत. ३२ आहेस. ३३ ब्रह्मस्वरूपच. ३४ गूढार्थानें. ३५ अनुमान करितां. ३६ खरें. ३७ स्पष्ट, प्राकृत.

अत्यंत जड असें । परी ऐसाहि निकें परियेसें । श्रीकृष्णा बोलावें तुवां तैसें । एकनिष्ठ ॥ १८ ॥ देखें रोगातें जिणावें । औषध तरी देयावें । परी तें अति रुच्य व्हावें । मधुर जैसें ॥१९॥ तैसें सकळार्थभरित । तत्त्व सांगावें तरी उचित । [येन श्रेयोऽहमाप्नुयां] परी बोधे माझें चित्त । जयापरी ॥२० ॥ देवा तुजऐसा निज गुरु । आजि अर्तीधणी कां न करूं । एथ भीड कवणाची धरूं । तूं माय आमुची ॥२१॥ हां गा कामधेनूचें दुभतें । दैवें जाहालें आपैतें । तरी कामनेची कां तेथें । वाणि कीजे ॥२२ ॥ जरी चिंतामणी हाता चढे । तरी वांछेचें कवण सांकडे । कां आपुलेनि सुरेवाडें । इच्छावें ना ॥ २३ ॥ देखें अमृतसिंधूतें ठाकावें । मग ताहानाचि जरी फुटावें । तरी सायास कां करावे । मागील ते ॥ २४ ॥ तैसा जन्मांतरीं बहुतीं । उपासितां श्रीकमळापती । तो तूं दैवें आजि हातीं । जाहालासि जरी ॥ २५ ॥ तरी आपुलेया सवेसों । कां न मागावासि परेशा । देवा सुकाळ हा मानसा । पाहिला असे ॥ २६ ॥ देखें सकळार्तिचें जियालें । आजि पुण्य यशासि आलें । हे मनोरथ जाहले । विजयी माझे ॥ २७ ॥ जी जी परममंगळधामा । सकळदेवदेवोत्तमा । तूं स्वाधीन आजि आह्मां । ह्मणऊनियां ॥ २८ ॥ जैसें मातेच्या ठायीं । अपत्या अनवसर नाहीं । स्तन्यालागूनि पाहीं । जियापरी ॥ २९ ॥ तैसें देवा तूतें । पुसिजतसें आवडे तें । आपुलेनि आर्तें । कृपानिधी ॥ ३० ॥ तरी पारत्रिकीं हित । आणि आचरितां तरी उचित । तें सांगें एकनिश्चित । पार्थ ह्मणे ॥ ३१ ॥

**"देवा! तूंच जर असें बोलूं लागलास, तर आह्मीं अज्ञजनांनीं काय बरें करावें? असें झालें ह्मणजे विचाराचें मूळच संपलें असें ह्मटलें पाहिजे. ६ ह्यालाच जर उपदेश ह्मणावयाचा असेल, तर भ्रष्टपणा तो आणखी कसला असतो? आत्मबोधाचा मनोरथ आज मात्र परिपूर्ण झाला खरा! ७ वैद्य पथ्य सांगून गेला, आणि मागाहून त्यानेंच विष घातलें, तर त्या रोग्यानें वांचावें कसें? मला सांग. ८ आंधळयाला नेऊन जसें आडवाटेला सोडावें, किंवा माकडाला कैफ द्यावा, त्याप्रमाणें आजचा हा चोख उपदेश आह्माला मिळाला ह्मणावयाचा! ९ मला आधींच कांहीं कळत नाहीं; त्यांत मोहानें ग्रस्त झालों. ह्मणून श्रीकृष्णा! तुला विचार पुसला. १० तर तुझी एक एक मजा कांहीं निराळीच! तुझ्या उपदेशांत सारीच गुंतागुंत. विशद असें कांहींच नाहीं. शरण येऊन विचारतो त्याशीं असें करावें होय? ११ आह्मीं कायावाचामनेंकरून तुझ्या शब्दावर विश्वास ठेवावा, आणि तूं असें करावेंस, ह्मणजे संपलेंच ह्मणावयाचें. १२ आतां असा जर तूं आह्मास उपदेश करूं लागलास, तर आमचें कल्याणच झालें ह्मणावयाचें!" अर्जुन ह्मणतो "आतां येथें ज्ञानाची आशा कसली? १३ नवें ज्ञान मिळण्याचें तर संपलेंच. पण आणखी एक नवेंच उत्पन्न झालें. तें काय? तर माझें स्थिर असलेलें मन मात्र चंचल झालें. १४ तसेंच श्रीकृष्णा! ह्या तुझ्या चरित्रांतील हेतु कांहीं माझ्या ध्यानांत येत नाहीं. कां अशा निमित्तानें माझें मन पाहतोस? १५ कां मला फसविण्याची युक्ति काढलीस? कां गूढार्थानें ब्रह्मस्वरूपाचें कथन करतोस? ह्याचा विचार केला तर खरें काय तें कळत नाहीं. १६ याकरितां देवा! ऐका. हें असें गूढ कांहीं सांगूं नका. महाराज! काय सांगणें असेल तें स्पष्ट सांगावें. १७ श्रीकृष्णा! मी अत्यंत मंदमति आहें. ह्मणून माझी नीट समजूत पटेल, आणि माझा ज्यावर निश्चय ठरेल, असें तूं मला सांग. १८ हें पहा! औषध तर द्यावें; रोगाचा तर नाश व्हावा; पण त्याला रुचि सुद्धां मधुर असावी. तरच वैद्याची कुशलता. १९ तसें सर्व अर्थानें भरलेलें; व ज्यांत योग्य तत्त्व भरलें आहे, असें भाषण असून त्या योगानें माझ्या चित्तावर ठसा उठावा. २० देवा! तुझ्यासारखा माझा गुरु. मग माझ्या मनकामनापूर्तीची मीं आशा कां बरें करूं नये? तूं तर आमची माता आहेस. मग आतां येथें भीड**

१ अशानेंही. २ चांगलें. ३ भक्ति वसण्यासारखें. ४ नाहींसें करावें. ५ द्यावें. ६ स्वादिष्ट, रुचकर. ७ समजूत पटेल. ८ इच्छेची तृप्ति. ९ प्राप्त झालें. १० कमताई. ११ संकट. १२ आवडेल तसें. १३ जाऊन मिळावें. १४ तहानेनें. १५ तडफडावें. १६ खटपट. १७ मागची (तेथपर्यंत जाण्याची.) १८ आपल्या. १९ इच्छेनें. २० समृद्धि. २१ सर्व इच्छेचें. २२ जीवसाफल्य. २३ फळास. २४ अवेळ. २५ दुग्धपान करण्याला. २६ ज्याप्रमाणें. २७ इच्छेनें. २८ परलोकीं.

कोणाची धरावयाची? २१ अहो! दैवयोगानें कामधेनूचें दुभतें मिळालें, तर मग तेथें इच्छेची कमतरता कां करावी? २२ चिंतामणीच जर हातांत पडला, तर तेथें मागावयाचें संकट कशाकरितां? आपल्याला आवडेल तें कां मागूं नये? २३ हें पहा! अमृताच्या समुद्राजवळ जाऊन मग जर तहानेनें चरफडत राहिलें तर, त्या समुद्रापर्यंत जाण्याचा उपद्व्याप तरी कशाला करावा? २४ त्याप्रमाणें, **श्रीकमळापति!** जन्मोजन्मीं तुझ्याकरितां उपासना केल्या, तेव्हां मोठ्या दैवयोगानें तूं आज आमच्या हातीं लागलास, २५ तर आपल्याच इच्छेनें परमेश्वरा! आतां कां बरें मागूं नये? देवा! मनाला तर आज समृद्धि होऊन राहिली आहे. २६ येवढेंच नव्हे, तर आज सर्व मनोरथांचें साफल्य झालें. पुण्यास फळ प्राप्त झालें. हे माझे सर्व मनोरथ जयशाली झाले असें मी समजतों. २७ कारण, परमकल्याणाचें स्थान, सकल देवांतील उत्तम देव जो तूं, तो आज आमच्या स्वाधीन आहेस. २८ ज्याप्रमाणें मातेचें स्तनपान करण्याला मुलाला वेळ अवेळ पहावयाला नको. २९ त्याप्रमाणें देवा! कृपानिधि! माझ्या इच्छेप्रमाणें मला आवडेल तें मी तुह्माला विचारीत आहें." ३० "तर" **अर्जुन** ह्मणतो "जें आचरण करण्यास योग्य, व परलोकीं सुखप्रद असेल, तें एकच निश्चयेंकरून सांग."३१

श्रीभगवानुवाच.

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम्. ३

[पुरा प्रोक्ता मयानघ] या बोला श्रीअच्युत। ह्मणत असे वेस्मित। अर्जुना हा ध्वनितें। अभिप्रावो ॥ ३२ ॥ जे बुद्धियोग सांगतां। सांख्यमतसंस्था। प्रकटिली स्वभावता। प्रसंगें आह्मी ॥ ३३ ॥ तो उद्देश तूं नेणसीचि। ह्मणोनि शिणलासि वायांचि। तरी आतां जाणें मीचि। उक्त दोन्हीं ॥३४॥ अवधारीं वीरश्रेष्टा। [लोकेऽस्मिन्द्विविधा निष्टा] ये लोकीं या दोनी निष्टा। मजचिपासूनि प्रगटा। अनादिसिद्धा ॥३५॥ [ज्ञानयोगेन सांख्यानां] एक ज्ञानयोग ह्मणिजे। जो सांख्यीं अनुष्टिजे। जेथ वोळखीसवें पाविजे। तद्रूपता ॥ ३६ ॥ [कर्मयोगेन योगिनां] एक कर्मयोग जाण। जेथ साधकजन निपुण। होऊनियां निर्वाण। पावती वेळे ॥ ३७ ॥ हे मार्ग तरी दोनी। परी एकवटती निदानीं। जैसी सिद्धसाध्यभोजनीं। तृप्ति एक ॥ ३८ ॥ कां पूर्वापरें सरिता। भिन्न दिसती वाहतां। मग सिंधूमिळणीं ऐक्यता। पावती शेखीं ॥३९॥ तैसीं दोनीही मतें। सूचिती एका कारणातें। परी उपास्ति ते योग्यते। आधीन असे ॥ ४० ॥ देखें उत्प्लवनासरिसा। पक्षी फळासि झोंवे जैसा। सांगें नर केविं तैसा। पावे वेगा ॥ ४१ ॥ तो हळू हळू ढांळेंढाळें। केतलेनि एके वेळे। मार्गाचेनि बळें। निश्चित ठाकी ॥ ४२ ॥ तैसें देख पां विहंगममतें। अधिष्टूनि ज्ञानातें। सांख्यें सद्य मोक्षातें। आकळिती ॥ ४३ ॥ येर योगिये कर्माधारें। विहितेंचि निजाचारें। पूर्णता अवसरें। पावते होती ॥ ४४ ॥

हें भाषण ऐकून **श्रीअच्युत** साश्चर्य होऊन बोलतात. "**अर्जुना!** हा संक्षिप्त अभिप्राय आहे. ३२ आह्मी ज्ञानयोग सांगत असतां, ओघानुसार आलेला आत्मानात्मविचार प्रगट केला. ३३ त्याचा उद्देश तुझ्या लक्षांतच आला नाहीं. ह्मणून व्यर्थ तुला श्रम पडले. तर आतां ते दोन्हीही मीं सांगितलेले मार्ग उक्तच आहेत हें ध्यानांत ठेव. ३४ वीरश्रेष्टा! ऐक. या जगामध्यें हे दोन्हीही मार्ग अनादि सिद्ध असून ते माझ्यापासूनच निघालेले आहेत. ३५ एकाला ज्ञानयोग असें ह्मणतात. तो ज्ञानी जन आचरण करतात. त्याच्या अभ्यासाच्या योगानें ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें. ३६ दुसऱ्याला कर्मयोग

---

१ संक्षिप्त. २ अभिप्राय. ३ ज्ञानयोग. ४ आत्मानात्मविचार. ५ व्यक्त केली. ६ ज्ञानयोग व कर्मयोग.

१ मार्ग. २ निघालेले आहेत. ३ नित्यसिद्ध, सनातन. ४ ज्ञान्यांनीं. ५ आचरण करावा. ६ ज्ञान झाल्याबरोबर. ७ ब्रह्मस्वरूप. ८ मुमुक्षु. ९ कुशल. १० मोक्ष. ११ योग्यकालीं. १२ शेवटीं. १३ आयत्या केलेल्या जेवणांत व हातानें केलेल्या जेवणांत. १४ किंवा. १५ पूर्वेकडे जाणाऱ्या व पश्चिमेकडे जाणाऱ्या. १६ शेवटीं. १७ सुचवितात. १८ उपासना. १९ उड्डाणाबरोबर. २० ह्या ढाळीवरून त्या ढाळीवर. २१ कांहीं काळानें. २२ साधतो. २३ पक्षिपद्धतीनें. २४ आश्रय करून. २५ ज्ञानी. २६ तत्काल. २७ इतर. २८ हितकारक अशा. २९ आपआपल्या आचारानें, वर्णाश्रमधर्मानें. ३० अवकाशानें.

असें ह्मणतात. ह्यांत मुमुक्षु जन निष्णात होऊन चित्तशुद्धीनें मोक्षपद प्राप्त करून घेतात. मात्र त्याला थोडा अवकाश लागतो. ३७ हे मार्ग दिसण्यांत जरी दोन आहेत, तरी ते शेवटीं एकेच ठिकाणीं मिळतात. ज्याप्रमाणें अन्न तयार करून भोजन केलें, किंवा आयतें घेऊन भक्षण केलें, तरी तृप्ति सारखीच. ३८ किंवा, पूर्वपश्चिम वाहणाऱ्या नद्या, वाहतांना भिन्न दिसतात, परंतु शेवटीं समुद्राला मिळतांना एकत्र होतात. ३९ त्याप्रमाणें हीं दोन्ही मतें एकच कार्य करतात; परंतु त्याची उपासना करणें योग्यतेवर अवलंबून आहे. ४० आणखी पहा! एखादा पक्षी उड्डाणाबरोबर एखाद्या उंच झाडाच्या फळास जाऊन धरतो; तितक्याच झपाट्यानें तें काम एखाद्या मनुष्यानें करूं ह्मटलें तर कसें बरें होईल? सांग. ४१ पण तोच हळू हळू ह्या ढाळीवरून त्या ढाळीवर, उभा रहात रहात, योग्य मार्गानें गेला, तर तें फळ सुद्धां त्यास खात्रीनें मिळेल. ४२ त्याप्रमाणेंच पहा! पक्षिपद्धतीनें, ज्ञानी आहेत ते ज्ञानाचा आश्रय करून तत्काल मोक्ष प्राप्त करून घेतात. ४३ दुसरे, योगी आहेत ते, कर्माच्या आधारानें वर्णाश्रमधर्माला विहित अशीं कर्में आचरण करून अवकाशानें पूर्णतेप्रत पोहोंचतात.'' ४४

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥

[न कर्मणामनारंभात्] वांचोनि कर्मारंभ उचित । न करितां सिद्धवत । कर्महीना[१] निश्चित । होइजेना ॥ ४५ ॥ कीं प्राप्तकर्म[२] सांडिजे[३] । येतुलेनि[४] नैष्कर्म्य[५] होइजे । हें अर्जुना वायां बोलिजे । मूर्खपणें ॥ ४६ ॥ [सिद्धिं समधिगच्छति] सांगें पैलतीरा जावें । ऐसें व्यसन[६] कां जेथ पावे । तेथ नावेतें त्यजावें । घडे केवीं ॥ ४७ ॥ [अश्नुते] ना तरी तृप्ति इच्छिजे । तरी कैसेनि पाक न कीजे । कीं सिद्धही न सेविजे । केवि सांगें ॥ ४८ ॥ जंव निरार्ततां[७] नाहीं । तंव व्यापार असे पाहीं । मग संतुष्टीच्या ठायीं । कुंठे सहजें ॥ ४९ ॥ [नैष्कर्म्यं पुरुषः] ह्मणोनि आइकें पार्था । जया नैष्कर्म्यपदीं[१] आस्था । तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ५० ॥ [न च संन्यसनादेव] आणि आपुलालिये चाडे[२] । आपादिलें[३] हें मांडे[४] । कीं त्यजिलें कर्म सांडे । ऐसें आहे ॥ ५१ ॥ हें वायांचि सैरा[५] बोलिजे । उकल[६] तरी देखोनि पाहिजे । परी त्यजितां कर्म न त्यजे । निभ्रांत मानीं ॥ ५२ ॥

"उचितकर्माचा त्याग करून सिद्धासारखें कर्महीन निश्चयानें होतां येत नाहीं. ४५ कारण, प्राप्त कर्म सोडून दिल्यानेंच तो निष्काम होतो, हें ह्मणणें व्यर्थ—केवळ मूर्खपणाचें—होय. ४६ नदींतून पलीकडे जाण्याचा प्रसंग पडला आहे, तर तेथें नावेला सोडून देऊन कसें चालेल? सांग. ४७ किंवा पोटांत क्षुधा लागली आहे; आणि हातानेंही स्वयंपाक करावयाचा नाहीं, व तयार असलेलें अन्नही भक्षण करावयाचें नाहीं, तर पोट भरणार कसें? सांग. ४८ जोंपर्यंत निरिच्छपणा प्राप्त झाला नाहीं, तोंपर्यंत उद्योग हा आहेच; तो तृप्ति झाल्यानंतर मग सहजच नाहींसा होतो. ४९ ह्मणून अर्जुना! ऐक. ज्याला नैष्कर्म्यपद ह्मणजे परमहंसस्थिति पाहिजे असेल, त्यानें उचित कर्माचा मुळींच त्याग करतां कामा नये. ५० आणखी कर्म हें, आपल्याच इच्छेनें करितां येण्यासारखें किंवा सोडतां येण्यासारखें आहे, ५१ असें बोलणें हें केवळ स्वच्छंदपणाचें आहे. हें अनुभवावरून समजतें. तर, कर्म हें सोडूं ह्मटल्यानें सुटत नाहीं. हें निःसंशय ध्यानांत ठेव.'' ५२

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥

[प्रकृतिजैर्गुणैः] जंव प्रकृतीचें[७] अधिष्टान[८] । तंव सांडी[९] हें अज्ञान । जे चेष्टा[१०] ते गुणाधीन । अपैसी[११] असे ॥ ५३ ॥ [कार्यते ह्यवशः कर्म सर्वः] देखें विहित कर्म जेतुलें[१२] । तें सगळें जरी वोसंडिलें[१३] । तरी स्वभाव काय निमाले[१४] । इंद्रियांचे ॥ ५४ ॥ सांगें श्रवणीं ऐकावें[१५] ठेलें[१६] । कीं नेत्रींचें तेज गेलें । हें नासारंध्र बुझालें । परिमळ नेघे ॥ ५५ ॥ ना तरी

१ कर्मत्याग करणाराला. २ अवश्य पुढें आलेलें कर्म. ३ टाकलें. ४ इतक्यानें, एवढ्यानेंच. ५ निष्काम ६ संकट. ७ निरिच्छता.

१ परमहंसस्थितीमध्यें, मोक्षपदाचे ठाई. २ इच्छेप्रमाणें. ३ संपादिलें असतां. ४ घडतें. ५ स्वच्छंद. ६ अनुभव हवा असेल. ७ मायेचें. ८ आश्रय. ९ त्याग. १० वर्तन, हालचाल. ११ आपोआप, सहज. १२ जितकें. १३ टाकलें. १४ नाहींसे झाले. १५ ऐकावयाचें. १६ सोडलें.

प्राणापानगति । कीं निर्विकल्प जाहाली मति । कीं क्षुधातृषादि आर्ति । खुंटलिया ॥ ५६ ॥ हे स्वप्नावबोध ठेले । कीं चरण चालों विसरले । हें असो काय निमाले । जन्म मृत्यू ॥ ५७ ॥ हें न ठकेची जरी कांहीं । तरी सांडिलें तें कायी । म्हणोनि कर्मत्याग नाहीं । प्रकृतिमंता ॥ ५८ ॥ कर्म पराधीनपणें । निपजत असे प्रकृतिगुणें । येरीं धरीं मोकळीं अंतःकरणें । वाहिजे वायां ॥ ५९ ॥ देखें रथीं आरूढिजे । मग जरी निश्चळ बैसिजे । तरी चळ होऊनि हिंडिजे । परतंत्रा ॥ ६० ॥ कां उचलिलें वायुवशें । चळे शुष्क पत्र जैसें । निचेष्ट आकाशें । परिभ्रमे ॥ ६१ ॥ [नहीत्यर्थ] तैसें प्रकृतिआधारें । कर्मेंद्रियविकारें । निष्कर्मीही व्यापारें । निरंतर ॥ ६२ ॥ म्हणऊनि संग जंव प्रकृतीचा । तंव त्याग न घडे कर्माचा । ऐसियाहि करूं म्हणती तयांचा । आग्रहचि उरे ॥ ६३ ॥

"मायेचा जोंपर्यंत आश्रय आहे, तावत्कालपर्यंत मी कर्म सोडीन किंवा करीन म्हणणें हा अज्ञानपणा होय. वर्तन घडतें तें, गुणांच्या जोरानें आपोआप घडतें. ५३ हें पहा! विहित कर्म सारें टाकून दिलें, म्हणून इंद्रियांचे स्वभावधर्म नाहींसे होतील काय? ५४ कानानें काय ऐकूं येणार नाहीं? कां डोळ्यांचें तेज नाहींसें होईल? कां हें नाकाचें छिद्र बुजून वास येण्याचेंच बंद पडेल? काय होईल सांग. ५५ कां प्राणापानवायूच्या गति कुंठित होतील? कां बुद्धि निर्विकल्प होईल? कां क्षुधा, तृषा इत्यादि पीडा चुकतील? ५६ ही निद्रा आणि जागृति राहील? कां पाय चालावयाचें विसरतील? हेंही सारें असो. पण हे जन्म आणि मृत्यु हे तरी टळतील का? ५७ ह्यांपैकीं एकही जर राहत नाहीं, तर मग टाकलें तें काय? आणि त्याग तो कशाचा केला? म्हणून देहाभिमान्याला—मायाधीनाला—कर्मत्याग होणें नाहीं. ५८ कर्म हें पराधीन आहे. तें मायेच्या गुणांप्रमाणें उत्पन्न होतें. म्हणून मीं कर्म केलें, किंवा टाकलें असें मानणें हें व्यर्थ होय. ५९ हें पहा! आपण रथांत चढून बसलों, आणि यत्किंचित्ही हाललों नाहीं, तरी तेथें आपण पराधीन असल्याच्या योगानें तो जाईल तिकडे जाणें भाग पडतें. ६० किंवा, एखादें वाळलेलें पान, वाऱ्यानें उडून गेलें, तर तें निर्जीव असूनही आकाशांत भ्रमण करीत असतें. ६१ त्याप्रमाणें, निरिच्छ मनुष्य देखील, मायेच्या आधारानें, व कर्मेंद्रियांच्या विकाराप्रमाणेंच कर्में करीत असतो. ६२ याकरितां, मायेची संगति म्हणून जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत कर्माचा त्याग होणार नाहीं. इतकें असूनही जे कोणी करूं म्हणतील, त्यांचा हट्ट मात्र शिल्लक राहणार." ६३

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते. ६

[कर्मेंद्रियाणि संयम्य] जे उचित कर्म सांडिती । मग नैष्कर्म्य हों पाहती । परी कर्मेंद्रियप्रवृत्ती । निरोधुनी ॥ ६४ ॥ [य आस्ते मनसा स्मरन्] तयां कर्मत्याग न घडे । जें कर्तव्य मनीं सांपडे । [मिथ्याचारः स उच्यते] वरी नटती तें फुडें । दरिद्र जाण ॥ ६५ ॥ [इंद्रियार्थान् विमूढात्मा] ऐसे ते पार्था । विषयासक्त सर्वथा । वोळखावे तत्वता । भ्रांति नाहीं ॥ ६६ ॥ आतां देईं अवधान । प्रसंगें तुज सांगेन । या नैराश्याचें चिन्ह । धनुर्धरा ॥ ६७ ॥

"पण जे कोणी कर्मेंद्रिय प्रवृत्तीचा अवरोध करून उचित कर्म टाकतात, आणि निरिच्छ होऊं पहातात, ६४ त्यांना कर्माचा त्याग घडत नाहीं. जें करावयाचें तें मनांत राहतें. अशा प्रकारें वरकरणीचा आव आणणें हें केवळ ढोंग होय. ६५ अर्जुना! असे जे कोणी असतील, ते निखालस विषयलंपट म्हणून समजावेत, त्यांत शंका नाहीं. ६६ धनुर्धरा! आतां प्रसंगानुसार तुला निरिच्छ मनुष्याचें लक्षण सांगतों. हिकडे लक्ष दे." ६७

यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

[यस्त्विति] जो अंतरीं दृढ । परात्मरूपीं गूढ । बाह्य

---

१ हृदयस्थ व गुदस्थ वायूची गति. २ कल्पनारहित. ३ इच्छा. ४ बंद पडल्या. ५ निजणें व जागणें. ६ राहिले. ७ चुकले. ८ राहत नाहीं. ९ देहाभिमान्याला, मायाधीनाला. १० समजणें. ११ चैतन्यरहित. १२ निष्कामही. १३ इतक्या उपरही.

१ कर्मविमुक्त. २ होऊं. ३ आवरून. ४ वर वर. ५ दांभिकपणा करतात, सोंग आणतात. ६ स्पष्ट. ७ निरिच्छांचें, निरिच्छतेचें. ८ बाह्यात्कारीं, वरकरणी.

तरी रूढ । लौकिकें जैसा ॥ ६८ ॥ तो इंद्रियां आज्ञा न करी। विषयांचें भय न धरी । प्राप्त कर्म नाव्हेरी । उचित जें जें ॥ ६९ ॥ [ कर्मेंद्रियैः कर्मयोगं ] तो कर्मेंद्रियें कर्मीं । राहटतां तरी न नियमी । परी तेथिचेनि उर्मी । झांकोळेना ॥ ७० ॥ [ असक्तः ] तो कामनामात्रें न घेपे । मोहमळें न लिंपे । जैसें जळीं जळें न शिंपे। पद्मपत्र ॥ ७१ ॥ तैसा संसर्गामाजि असे । सकळां सारिखा दिसे । जैसें तोयसंगें आभासे । भानुबिंब ॥ ७२ ॥ [ स विशिष्यते ] तैसें सामान्यत्वें पाहिजे । तरी साधारणचि देखिजे । येरवीं निर्धारितां नेणिजे । सोय जयाची ॥ ७३ ॥ ऐशा चिन्हीं चिन्हित । देखसी तोचि मुक्त। आशापाशरहित । वोळख पां ॥ ७४ ॥ अर्जुना तोचि योगी। विशेषीजे जो जगीं । ह्मणोनि ऐसा होय यालागीं । ह्मणिपे तूतें ॥ ७५ ॥ तूं मानसा नियम करीं । निश्चळ होयें अंतरीं । मग कर्मेंद्रियें व्यापारीं । वर्ततु सुखें ॥ ७६ ॥

"जो हृदयामध्यें निश्चळ, परमात्मरूपामध्यें निमग्न, आणि बाह्य आचरणानें इतर लोकांप्रमाणें, ६८ तो इंद्रियांना आज्ञा करीत नाहीं; विषयाचें भय धरीत नाहीं; उचित कर्म जें जें प्राप्त होईल त्याचा अव्हेर करीत नाहीं. ६९ कर्मेंद्रियें कर्मामध्यें वागत असतां, तो त्यांना प्रतिबंध करीत नाहीं खरा; पण त्यांच्या वेगानें आच्छादलाही जात नाहीं. ७० तो इच्छेनें बद्ध होत नाहीं; मोहमळानें लिप्त होत नाहीं. कमळाचें पान जसें पाण्यानें भिजत नाहीं, ७१ त्याप्रमाणें तो संसारांत असून सर्वांसारखाच दिसतो. पाण्याच्या योगानें सूर्यबिंबाचा जसा आभास होतो, ७२ तद्वत् सामान्य दृष्टीनें पाहिलें तर, तो सामान्य जनासारखाच दिसतो. पण दुसऱ्या दृष्टीनें पाहिलें तर त्याचें वर्णन सुद्धां करतां येत नाहीं. ७३ अशा लक्षणांनीं जो युक्त असेल तोच मुक्त; आणि आशापाशरहित आहे असें ओळख. ७४ अर्जुना! तोच योगी; आणि तोच जगामध्यें थोर. ह्मणूनच तुला त्यासारखा हो ह्मणतों. ७५ तूं मनाचें दमन कर. अंतःकरणांत स्थिर हो; आणि मग खुशाल कर्मेंद्रियें कर्में करोत." ७६

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८ ॥

[ शरीरेति ] ह्मणोनि नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे । आणि निषिद्ध केविं राहाटावें । विचारीं पां ॥ ७७ ॥ [ नियतं कुरु कर्म त्वं ] ह्मणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकेरूनि प्राप्त । तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥ ७८ ॥ [ कर्म ज्यायो ह्यकर्मणः ] पार्था आणिकही एक । नेणसी तूं हें कवतिक । जें ऐसें कर्ममोचक । आपैसें असे ॥ ७९ ॥ देखें अनुक्रमाधारें । स्वधर्म जो आचरे । तो मोक्ष तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥ ८० ॥

"येवढ्यावरून कर्ममुक्त होणें संभवनीय नाहीं, हें तुझ्या ध्यानांत येईलच. शिवाय, शास्त्राच्या विरुद्ध कसें वागावें ? ह्याचाही विचार कर. ७७ जें जें कर्म उचित, आणि प्रसंगानुसार प्राप्त होईल, तें तूं हेतुरहित आचरण कर. ७८ अर्जुना, आणखी एक आपोआपच कर्मबंधापासून मुक्त करणारा चमत्कार आहे, तो तुला माहीत नाहीं. ७९ हें पहा! जो आपल्या वर्णधर्माधिकारापरत्वें स्वधर्मानें आचरण करतो, तो त्या आचरणाच्या योगेंकरूनच निश्चयेंकरून मोक्षास जातो." ८०

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥

[ यज्ञार्थात्कर्मणः ] स्वधर्म जो बापा । तोचि नित्य यज्ञ जाण पां । ह्मणोनि वर्ततां तेथ पापा । संचार नाहीं ॥ ८१ ॥ [ अन्यत्र ] हा निजधर्म जैं सांडे । आणि कुकर्मीं रति घडे । तैंचि बंध पडे । सांसारिक ॥ ८२ ॥ [ तदर्थमिति ] ह्मणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञ याजन । जो करी तया बंधन । कहींचें न घडे ॥ ८३ ॥ [ लोकोऽयं कर्मबंधनः ] हा लोक कर्में बांधिला । जो परतंत्रा भूलला । तो नित्य यज्ञातें चुकला । ह्मणोनियां ॥ ८४ ॥ आतां येचि विषयीं पार्था । तुज सांगेन एक मी कथा । जैं सृष्ट्यादिसंस्था । ब्रह्मेनें केली ॥ ८५ ॥

---

१ आचरण करणारा. २ लोकाचाराप्रमाणें. ३ वागत असतां. ४ आवरीत नाहीं. ५ वेगानें. ६ झांकत नाहीं. ७ आकळला जात नाहीं. ८ भिजत नाहीं. ९ संसारांत. १० भासमान होतें. ११ स्थिति, योग्यता. १२ वर्णन करावा, श्रेष्ठ. १३ ह्मणतों. १४ वर्तन करूं देत.

१ निष्काम. २ शास्त्रविरुद्ध. ३ समयानुसार. ४ कामना सोडून. ५ कौतुक, चमत्कार. ६ कर्ममुक्त करणारें. ७ आपोआपच. ८ वर्णाश्रमानुरूप अधिकाराप्रमाणें. ९ शिरकाव, रीघ. १० आवड, प्रीति. ११ कधींच. १२ प्रकृतीला, मायेला. १३ जगदादिकांची व्यवस्था. १४ ब्रह्मदेवानें.

"बाबा! स्वधर्म हाच रोजचा यज्ञ आहे, हें ध्यानांत ठेव. ह्मणून त्याप्रमाणें वर्तन केलें तर पातकाचा शिरकाव होत नाहीं. ८१ हा आपला धर्म जेव्हां सुटतो, आणि वाईट कर्मांची आवड होते, तेव्हां संसारी आहे तो बंधनांत पडतो. ८२ याकरितां स्वधर्माप्रमाणें वागणें, हेंच निरंतरचें यज्ञयाजन आहे. तें जो करतो, तो कधींही बंधनांत सांपडत नाहीं. ८३ हें जग कर्मानें बद्ध झालेलें आहे. ह्मणून जो मायेच्या स्वाधीन होतो, तो नित्य यज्ञास अंतरतो. ८४ आतां **अर्जुना!** याविषयीं तुला मी एक कथा सांगतों. ब्रह्मदेवानें जेव्हां जगदादिकांची व्यवस्था लावली," ८५

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोस्त्विष्टकामधुक् ॥ १०॥

[सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा] तैं नित्य योगसहितें । सृजिलीं भूतें समस्तें । परी नेणतीचि तियें यज्ञातें । सूक्ष्म ह्मणउनी ॥ ८६ ॥ [पुरोवाच प्रजापतिः] ते वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा । देवा काय आश्रयो एथ आह्मा । तंव ह्मणे तो कमळजन्मा । भूतांप्रति ॥ ८७ ॥ [अनेन प्रसविष्यध्वं] तुह्मा वर्णविशेषवशें । आह्मी हा स्वधर्म विहिला असे । [एष वोस्त्विष्टकामधुक्] यातें उपासा मग आपैसे । पुरती काम ॥ ॥ ८८ ॥ तुह्मी व्रत नियम न करावे । शरीरातें न पीडावें । दूरि केंही न वचावें । तीर्थांसि गा ॥ ८९ ॥ योगादिकें साधनें। साकांक्ष आराधनें । मंत्रे यंत्र विधानें । झणी करा ॥ ९० ॥ देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें । तुह्मी स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ॥ ९१ ॥ अहेतुकें चित्तें । अनुष्ठा पां यातें । पतिव्रता पतीतें । जियापरी ॥ ९२ ॥ तैसा स्वधर्मरूप मख । हाचि सेव्य तुह्मां एक । ऐसें सत्यलोकनायक । बोलता जाहाला ॥ ९३ ॥ देखा स्वधर्मातें भजाल । तरी कामधेनु हा होईल । मग प्रजा हो न संडिलें । तुमतें कदा ॥ ९४ ॥

"तेव्हां त्यानें प्राण्याच्या उत्पत्तीबरोबरच नित्ययज्ञ त्याच्यामागें लावून दिला. परंतु तो फार गूढ असल्यामुळें लोकांस समजेना. ८६ तेव्हां सर्व प्राण्यांनीं ब्रह्मदेवाची प्रार्थना केली कीं 'देवा! येथें आह्मांस आधार काय?' तेव्हां तो ब्रह्मदेव प्राण्यांस ह्मणाला, ८७ 'तुह्माला वर्णविशेषाप्रमाणें, आह्मीं स्वधर्म लावून दिला आहे; त्याप्रमाणें वागा. ह्मणजे आपोआपच तुमचे मनोरथ पूर्ण होतील. ८८ तुह्मी व्रत नियम पाळूं नका; शरीराला पीडा देऊं नका; किंवा दूर कोठें तीर्थाला जाऊं नका. ८९ योगादिक साधनें, सहेतुक अनुष्ठानें, मंत्रतंत्र इत्यादि साधनें कांहींएक करूं नका. ९० किंवा इतर देवतांस भजणें यांपैकीं कोणतेंही करण्याचें कारण नाहीं. स्वधर्म हाच यज्ञ; तो साहजिक आचरण करावा. ९१ तो अहेतुक चित्तानें—निष्कामपणानें—आचरण करावा ह्मणजे झालें. पतिव्रता स्त्री, पतीवरच निष्ठा ठेवून राहते, ९२ त्याप्रमाणें स्वधर्मरूप यज्ञ हाच एक तुह्माला सेवन करण्याला योग्य आहे.' याप्रमाणें ब्रह्मदेवांनीं भाषण केलें. ९३ 'पहा! तुह्मी जर स्वधर्माला भजाल, तर तो तुह्माला कामधेनूप्रमाणें फलद्रूप होईल. मग प्रजाजन हो! तुह्मांला तो कधींही सोडणार नाहीं.' ९४

देवान्भावयताऽनेन ते देवा भावयंतु वः ।
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥

[देवानिति] जें येणेंकरूनि समस्तां । परितोष होईल देवतां । मग ते तुह्मा ईप्सितां । अर्थातें देती ॥ ९५ ॥ या स्वधर्मपूजा पूजितां । देवतागणां समस्तां । योगक्षेम निश्चिता । करिती तुमचा ॥ ९६ ॥ [परस्परं भावयंतः] तुह्मी देवांतें भजाल । देव तुह्मां तुष्टतील । ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ॥ ९७ ॥ [श्रेयः परमवाप्स्यथ] तेथ तुह्मी जें करूं ह्मणाल । तें अपैसें सिद्धी जाईल । वांछितही पुरेल । मानसींचें ॥ ९८ ॥ वाचासिद्धी पावाल । आज्ञापक होआल । ह्मणियें तुमतें मागतील । महाऋद्धि ॥ ९९ ॥ जैसें ऋतुपतीचें द्वार । वनश्री निरंतर । वोळगे फळभार । लावण्येंसीं ॥ १०० ॥

---

१ यज्ञासहवर्तमान. २ उत्पन्न केलीं. ३ तीं. ४ प्रजांनीं, लोकांनीं. ५ प्रार्थना केली. ६ ब्रह्मदेव. ७ प्राण्यांना. ८ वर्णभेदाप्रमाणें. ९ नेमून दिला. १० कोठेंही. ११ जावें. १२ सकाम. १३ तांत्रिक अनुष्ठानें. १४ करूं नका. १५ इतर देवतांस. १६ स्वधर्म व वर्णधर्म हाच यज्ञ त्याला. १७ निष्काम. १८ यज्ञ. १९ आदर करण्यास योग्य. २० ब्रह्मदेव. २१ सोडणार नाहीं. २२ तुह्माला.

१ संतोष. २ इच्छिलेल्या. ३ अप्राप्त वस्तूची प्राप्ति व प्राप्त वस्तूचें पालन. ४ बोलण्याप्रमाणें होणें ही सिद्धि. ५ आज्ञाकर्ते. ६ चाकर, आज्ञा. ७ वसंताचें. ८ अरण्यशोभा. ९ आश्रय करी.

'सर्वप्रकारें देवतांना संतोष झाला, ह्मणजे ते देव तुमचे इच्छित हेतु पूर्ण करतील. ९५ या स्वधर्मरूप पूजेनें सर्व देवतागणांची पूजा केली, ह्मणजे ते तुमचा योगक्षेम चालवितील. ९६ तुह्मी देवांला भजाल, आणि देव तुह्मांवर प्रसन्न होतील. अशी परस्परांमध्यें प्रीति उत्पन्न झाली, ह्मणजे तुह्मी जें जें कांहीं करूं ह्मणाल, तें तें आपोआपच होत जाईल. आणि मनांतील हेतुही सफल होत जातील. ९७ तुमच्या तोंडांतून निघालेला शब्द खरा होत जाईल; तुमची आज्ञा सर्व लोक पाळतील; आणि महाऋद्धि तुह्मापुढें हात जोडून उभ्या राहतील. ९९ ज्याप्रमाणें वसंतऋतूच्या द्वारावर निरंतर वनश्री व सुंदर फळभारांचे घोंस लटकलेले असतात,' १००

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

[ इष्टानिति ] तैसें सर्व सुखेंसहित । दैवचि मूर्तिमंत । येईल देखा कोढत । तुह्मापाठीं ॥ १ ॥ ऐसे समस्त भोगभरित । होआल तुह्मी अनार्त । जरी स्वधर्मैकनिरत । वर्ताल बापा ॥ २ ॥ [ तैर्दत्तानप्रदायैभ्यो ] कीं जालिया सकळ संपदा । जो अनुसरेल इंद्रियमदा । लुब्ध होऊनियां स्वादा । विषयांचिया ॥ ३ ॥ तिहीं यज्ञभावितीं सुरीं । जे हे संपत्ति दिधली पुरी । तयां स्वधर्मी सर्वेश्वरीं । न भजेल जो ॥ ४ ॥ अग्निमुखीं हवन । न करील देवतापूजन । प्राप्तवेळ भजन । ब्राह्मणाचें ॥ ५ ॥ विमुख होईल गुरुभक्ती । आदर न करील अतिथी । संतोष नेदील ज्ञाती । आपुलिये ॥ ६ ॥ [ यो भुंक्ते ] ऐसा स्वधर्मक्रियारहित । आथिलेपणें गर्वित । केवळ भोगासक्त । होईल जो ॥ ७ ॥ [ स्तेन एव सः ] तया मग अपावो थोर आहे । जेणें तें हातिंचें सकळ जाये । देखा प्राप्तही न लहे । भोग भोगूं ॥ ८ ॥ जैसें गतायु शरीरीं । चैतन्य वास न करी । कां निदैवाच्या घरीं । न राहे लक्ष्मी ॥ ९ ॥ तैसा स्वधर्म जरी लोपला । तरी सर्व सुखाचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाश जाय ॥ ११० ॥ तैसी निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे । आइका प्रजाहो फुडें । विरिंचि ह्मणे ॥ ११ ॥ ह्मणऊनि स्वधर्म जो सांडील । तयातें काळ दंडील । चोर ह्मणूनि हरील । सर्वस्व तयाचें ॥ १२ ॥ मग सकळ दोष भंवते । गिंवसोनि घेती तयातें । रात्रिसमयीं श्मशानातें । भूतें जैसीं ॥ १३ ॥ तैसीं त्रिभुवनींचीं दुःखें । आणि नानाविधें पातकें । दैन्यजात तितुकें । तेथेंचि वसे ॥ १४ ॥ ऐसें होय तया उन्मत्ता । मग न सुटे बापा रुदतां । कल्पांतींही सर्वथा । प्राणिगण हो ॥ १५ ॥ ह्मणऊनि निजवृत्ति हे न सांडावी । इंद्रियें बरळों नेदावीं । ऐसें प्रजातें शिकवी । चतुरानन ॥ १६ ॥ जैसें जळचरां जळ सांडे । मग तत्क्षणीं मरण मांडे । हा स्वधर्म तेणें पाडें । विसंबों नये ॥ १७ ॥ ह्मणोनि तुह्मी समस्तीं । आपुलालिया कर्मी उचितीं । निरत व्हावें पुढतपुढती । ह्मणिपैत असे ॥ १८ ॥

'त्याप्रमाणें तुमचें मूर्तिमंत दैवच, सर्व सुखें घेऊन तुह्माला शोधीत तुमच्या पाठीमागें येईल. १०१ बाबांनो! तुह्मी जर स्वधर्मानें वागाल, तर एकून एक भोग तुह्माला प्राप्त होऊन तुह्मी निखालस दुःखमुक्त व्हाल. १०२ सर्व संपत्ति प्राप्त झाली असतां, विषयांच्या गोडीला लुब्ध होऊन, इंद्रियांच्या उन्मत्तपणाला वश होऊन, १०३ यज्ञानें संतुष्ट झालेल्या ज्या देवांनीं त्यास संपूर्ण वैभव दिलें, त्या सर्वेश्वराला आपल्या धर्मानें जो भजणार नाहीं; १०४ अग्निमुखांत हवन करणार नाहीं; देवांची पूजा करणार नाहीं; यथाकाळीं ब्राह्मणाचें आदरातिथ्य करणार नाहीं; १०५ गुरुभक्तीला विन्मुख होईल; अतिथींचा सत्कार करणार नाहीं; आपल्या ज्ञातीला संतोष देणार नाहीं; १०६ असा जो स्वधर्मक्रियाशून्य, द्रव्यमदानें धुंद होत्साता केवळ भोगासक्त होईल, १०७ अशाला मग फारच मोठा अपाय आहे. त्या योगानें असलेलें सर्व जाईल, आणि पहा! प्राप्त झालेले भोग सुद्धां त्याला भोगावयाला मिळावयाचे नाहींत. १०८ आयुष्य संपलें ह्मणजे त्या शरीरांत जसें चैतन्य राहत नाहीं; किंवा हतभाग्याच्या घरीं जशी लक्ष्मी टिकत

१ मार्ग. २ शोधित. ३ व्हाल. ४ सुखी, निरिच्छ. ५ इंद्रियांच्या उन्मत्तपणाला. ६ यज्ञांनीं संतुष्ट झालेल्या देवांनीं. ७ संपन्नपणें. ८ अपाय, दुःख. ९ भोगावयाला मिळत नाहीं. १० आयुष्य सरलेल्या. ११ जीवात्मा. १२ स्पष्ट, नीट.

१ सभोंवार, आसपास. २ शोधून काढतात, घेरतात. ३ सर्व दुःखें. ४ रडला तरी. ५ पाहिजे तसें वागूं देऊं नये, स्वेच्छ. ६ त्याप्रमाणें. ७ विसरूं नये. ८ तत्पर. ९ वारंवार. १० सांगत.

नाहीं; १०९ त्याप्रमाणें स्वधर्मच जर नाहींसा झाला, तर सर्व सुखांचा थारा मोडला ह्मणून समजावें. ज्याप्रमाणें दिवा गेला, ह्मणजे त्याच्या बरोबर प्रकाशही जातो, ११० त्याप्रमाणें आपली वृत्ति नाहींशी झाली कीं, तेथें स्वतंत्रता राहत नाहीं.' ब्रह्मदेव ह्मणतात 'प्रजाजन हो! नीट ऐका. १११ याकरितां, जो कोणी स्वधर्म सोडील, त्याला काळ शिक्षा करील. त्यास चोर ह्मणून त्याचें सर्वस्व हरण करून घेईल. ११२ मग रात्रीं स्मशानांत जशीं भुतें जमा होतात, त्याप्रमाणें त्याच्या भोंवतीं सारे दोष जमून त्याला अगदीं वेढून टाकतील. ११३ त्रिभुवनांतील संकटें, नानाप्रकारचीं पातकें, आणि दुःखें ह्मणून जितकीं आहेत, तितकीं सारीं तेथें येऊन तळ देतील. ११४ प्राणीजन हो! त्या उन्मत्ताची अशी दुर्दशा झाली, ह्मणजे मग बाबा! तो मोठ्यानें रडला, ओरडला, तरी कल्पांतींही त्याची सुटका व्हावयाची नाहीं. ११५ ह्मणून स्वधर्म हा सोडूं नये; इंद्रियांना मनःपूत वागूं देऊं नये.' याप्रमाणें ब्रह्मदेवानें प्राण्यांना उपदेश केला. ११६ ज्याप्रमाणें जळ नाहींसें झालें ह्मणजे जलचरांना तत्काल मरण येतें, त्याप्रमाणेंच ह्या स्वधर्माची गोष्ट आहे. ह्मणून त्याला सोडूं नये. ११७ याकरितां तुह्मी सर्वांनीं आपआपल्या उचित कर्माचे ठाईं तत्पर असावें, असें पुनःपुन्हा सांगतों." ११८.

यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ।
भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात्.१३

[ यज्ञशिष्टाशिनः संतो ] देखा विहित क्रियाविधि । निर्हेतुका बुद्धि । जो असातिये समृद्धि । विनियोग करी ॥ १९ ॥ गुरु गोत्र अग्नि पूजी । अवसरीं भजे द्विजीं । निमित्तादिकीं यंजी । पितरोद्देशें ॥ १२० ॥ या यज्ञक्रिया उचिता । यशेशीं हवन करितां । हुतशेष स्वभावता । उरे जें जें ॥ २१ ॥ तें सुखें आपुले घरीं । कुटुंबेसीं भोजन करी । [ मुच्यंते सर्वकिल्बिषैः ] कीं भोग्यचि तें निवारी । कल्मषातें ॥ २२ ॥ तें यज्ञावशिष्ट भोगी । ह्मणोनि सांडिजे तो अघीं । जयापरी महारोगी । अमृतसिद्धी ॥ २३ ॥ कीं तत्त्वनिष्ठ जैसा । नागवे भ्रांतिलेशा । तो शेषें भोगी तैसा । नाकळे दोषा ॥ २४ ॥ ह्मणोनि स्वधर्में जें अर्जे । तें स्वधर्मेंचि विनियोगिजे । मग उरे तें भोगिजे । संतोषेंसीं ॥ २५ ॥ हें वांचूनि पार्था । राहाटों नये अन्यथा । ऐसी आद्य हे कथा । श्रीमुरारि सांगे ॥ २६ ॥ [ भुंजते ते त्वघं पापा ] जे देहचि आपणपें मानिती । आणि विषयांतें भोग्य ह्मणती । यापरतें न स्मरती । आणिक कांहीं ॥ २७ ॥ हें यज्ञोपकरण सकळ । नेणतसाते बैरळ । अहंबुद्धि केवळ । भोगूं पाहती ॥ २८ ॥ इंद्रियरुची सारिखें । करविती पाक निकें । ते पापिये पातकें । सेविती जाण ॥ २९ ॥ हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें । मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं ॥ १३० ॥ [ ये पचंत्यात्मकारणात् ] हें सांडोनियां मूर्ख । आपणपेयालागीं देख । निपजविती पाक । नानाविध ॥ ३१ ॥ जिहीं यज्ञ सिद्धी जाये । परेशा तोष होये । तें हें सामान्य अन्न न होये । ह्मणोनियां ॥ ३२ ॥ हें न ह्मणावें साधारण । अन्न ब्रह्मरूप जाण । हें जीवनहेतु कारण । विश्वा यया ॥ ३३ ॥

"हें पहा! जो निर्हेतुक बुद्धीनें विहित क्रियाविधि यथाशक्ति करतो; ११९ गुरु, गोत, अग्नि, यांची पूजा करतो; प्रसंगानुसार ब्राह्मणाचा सत्कार करतो; पर्वकाळीं पितरांच्या निमित्तानें यज्ञ करतो; १२० आणि या उचित यज्ञक्रियांच्या निमित्तानें यज्ञनारायणप्रीत्यर्थ हवन करून, हवनद्रव्यांपैकीं, अवशेष राहील तें, १२१ आनंदानें आपल्या घरीं कुटुंबांसहवर्तमान घेऊन भोजन करतो, त्या सेवनानेंच त्याचे दोष नाहींसे होतात. १२२ ज्याप्रमाणें अमृत प्राप्त झालें असतां महारोगी रोगापासून मुक्त होतो, त्याप्रमाणें यज्ञावशिष्ट सेवन केल्यानें त्याचीं सर्व पातकें दूर होतात. १२३ किंवा ब्रह्मनिष्ठ जसा भ्रांतींत पडत नाहीं, त्याप्रमाणें यज्ञशेषान्न खाणाराला दोष लागत ना-

---

१ कर्मानुष्ठान. २ निरिच्छ. ३ यथाशक्ति. ४ खर्च, उपयोग. ५ प्रसंगोपात. ६ पर्वकाळीं. ७ यज्ञ करतो, हवन करतो. ८ हवनद्रव्यांतील शेष. ९ भक्ष्यच. १० पातकाला.

१ हवनशेष. २ सेवन करतो. ३ पातकांनीं. ४ ब्रह्मनिष्ठ. ५ न सांपडे. ६ यज्ञावशिष्ट. ७ आकर्षिला जात नाहीं. ८ मिळवावें. ९ खर्चावें. १० आपणच. ११ यापलीकडे. १२ यज्ञसंबंधी. १३ न जाणून, अज्ञ होत्साते. १४ भ्रांतिष्ट. १५ अहंकारानें. १६ चांगलें, गोडगोड. १७ पापी. १८ सर्व संपत्ति. १९ परमेश्वराच्या ठायीं. २० आपल्याकरितां. २१ परमेश्वराला. २२ जगताला. २३ ह्या.

हीत. १२४ याकरितां स्वधर्मानेंच संपादन करावें; आणि स्वधर्माकडेच खर्च करावें. आणि मग त्यांतून उरेल तें संतोषानें सेवन करावें. १२५ अर्जुना! ह्याशिवाय अन्य रीतीनें वागूं नये." याप्रमाणें श्रीमुरारीनें ही पुरातन कथा सांगितली. १२६ "देह हाच आत्मा; विषयांचें सुख भोगणें हेंच काय तें साफल्य; यापलीकडे दुसरें कांहींच ज्यांना दिसत नाहीं, १२७ जे भ्रांतीनें यज्ञसंबंधी कोणतेंही कृत्य न समजून केवळ अहंकारानें भोग भोगूं पहातात, १२८ इंद्रियांच्या रुचीप्रमाणें उत्तमोत्तम पकान्नें करवितात; ते लोक पापी असून पातकेंच सेवन करतात. १२९ ही सर्व संपत्ति हवनद्रव्य आहे असें मानावें, आणि मग तें स्वधर्मयज्ञाच्या द्वारानें त्या आदिपुरुषाला अर्पण करावें. १३० पहा! हें सर्व सोडून देऊन मूर्ख लोक आपल्यासाठींच नानाप्रकारचीं पकान्नें तयार करवितात. १३१ अन्नानें यज्ञ सिद्धीस जातो. परमेश्वराला संतोष होतो. ह्मणून अन्न हें सामान्य नव्हे. १३२ अन्नाला हलकें समजूं नये. तें परब्रह्मरूप आहे, हें लक्षांत ठेवावें. कारण ह्या जगताच्या जीवनाला कारण तेंच आहे." १३३.

अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

[ अन्नादिति ] अन्नास्तव[1] भूतें । प्ररोह[2] पावती समस्तें । मग पर्जन्य या अन्नातें । सर्वत्र प्रसवे[3] ॥ ३४ ॥ [ यज्ञादिति ] तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञातें प्रगटी कर्म ।

"अन्नापासून सर्व प्राणिमात्र वाढतात; आणि अन्नाला सर्वत्र पर्जन्य उत्पन्न करतो. १३४ त्या पर्जन्याची उत्पत्ति यज्ञापासून, आणि यज्ञ उत्पन्न करणारें कर्म."

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥१५॥

[ कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ] कर्मासि आदि ब्रह्म । वेदरूप ॥ ३५ ॥ [ ब्रह्माक्षरसमुद्भवं ] मग वेदांतें परात्पर[1] । प्रसवतसे अक्षर[2] । [ तस्मादिति ] ह्मणऊनि हें चराचर । ब्रह्मबद्ध[3] ॥ ३६ ॥ परी कर्मांचिये[4] मूर्ति । यज्ञीं अधिवास[5] श्रुति । ऐकें सुभद्रापति । अखंड गा ॥ ३७ ॥

"कर्माचें मूळ वेदरूप ब्रह्म. १३५ ते वेद अविनाशी परब्रह्मापासून उत्पन्न होतात. ह्मणून हें चराचर ब्रह्माधीन आहे. १३६ पण हे सुभद्रापती! ऐक. कर्माची मूर्ति जो यज्ञ, त्यांत श्रुतीचें (वेदाचें) निरंतर वास्तव्य असतें." १३७.

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥१६॥

[ एवं प्रवर्तितं चक्रं ] ऐसी हे आदि परंपरा[6] । संक्षेपें तुज धनुर्धरा । सांगीतली या अध्वरा[7] । लागूनियां ॥ ३८ ॥ [ नानुवर्तयतीह यः ] ह्मणूनि समूळ हा उचितु । स्वधर्मरूप क्रतु[8] । नानुष्ठी[9] जो मंतु[10] । लोकीं इये ॥ ३९ ॥ [ अघायुरिंद्रियारामो ] तो पातकांची राशी । जाण भार भूमीसी । जो कुकर्मे इंद्रियांसी । उपेगा[11] गेला ॥ १४० ॥ [ मोघं पार्थ स जीवति ] तें जन्मकर्म सकळ । अर्जुना अति निष्फळ । जैसें कीं अभ्रपटळ । अकाळींचें ॥ ४१ ॥ कां गळां स्तन अजेचे[12] । तैसें जियालें[13] देखें तयाचें । जया अनुष्ठान स्वधर्माचें । घडेचिना ॥ ४२ ॥ ह्मणौनि ऐकें पांडवा । हा स्वधर्म कवणें न संडावा । सर्वभावें भजावा । हाचि एक ॥ ४३ ॥ हां गा शरीर जरी जाहलें । तरी कर्तव्य वोघें[14] आलें । मग उचित कां आपलें । वोसंडावें[15] ॥ ४४ ॥ परिस पां सव्यसाची । मूर्ति लाहोनि[16] देहाची । खंती करिती कर्माची । ते गांवढे[17] गा ॥ ४५ ॥

"याप्रमाणें अर्जुना! ही पूर्व पीठिका तुला संक्षेपेंकरून सांगितली. १३८ ह्यावरून हा स्वधर्मरूप यज्ञ पहिल्यापासूनच उक्त आहे. या लोकांत जो मत्त असेल, तो त्यास अनुसरत नाहीं. १३९ तो पातकाची राशी, भूमीला भार, आणि कुकर्मानें इंद्रियांच्या उपयोगीं पडणार आहे, हें लक्षांत ठेव. १४० अर्जुना! अशा प्रकारचें जन्मकर्म अकाळींच्या

---

१ अन्नापासून. २ वाढ, वृद्धि. ३ निपजवितो, उत्पन्न करितो.

१ आपला–परका, मागील–पुढील. २ अविनाशी ब्रह्म. ३ ब्रह्माधीन. ४ कर्मांची. ५ राहणें. ६ मालिका, क्रम. ७ यज्ञसंबंधी. ८ यज्ञ. ९ करीत नाहीं. १० उन्मत्त. ११ उपयोगाला. १२ शेळीचें. १३ जिणें, जन्म. १४ ओघानें. १५ टाकावें. १६ प्राप्त होऊन. १७ अडाणी.

अभ्रपटलाप्रमाणें अत्यंत निष्फळ होय. १४१ किंवा ज्याला स्वधर्माचें अनुष्ठान घडत नाहीं, त्याचें जीवित पहा! केवळ अजागलस्तनवत् समजावें. १४२ ह्मणून अर्जुना! ऐक. हा स्वधर्म कोणींही सोडूं नये. हाच एक सर्वभावें-करून भजावा. १४३ आणखी हें पहा! शरीरच ज्या अर्थीं झालेलें आहे, त्या अर्थीं त्याचीं कर्तव्यकर्में त्याच्या मागून ओघानेंच आलेलीं आहेत. मग आपलें उचितकर्म असेल तें टाकावें काय ह्मणून? १४४ हे सव्यसाची! आणखी ऐक. देहाचा आकार प्राप्त झाल्यानंतर कर्माची जे खंती करतात, ते गव्हार होत." १४५

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते १७

[यस्त्विति] देखें असतेनि देहधर्में। एथ तोचि एक न लिंपे कर्में। जो अखंडित रमे। आपणपें ॥ ४६ ॥ [आत्मनीति] जे तो आत्मबोधें तोषला। तरी कृतकार्य देख जाहला। ह्मणोनि सहजें सांडवला। कर्मसंगा ॥ ४७ ॥

"हें पहा! देहव्यापार चालत असतां जो आपणाशींच निरंतर रममाण होऊन असतो, तो एक मात्र कर्मानें लिप्त होत नाहीं. १४६ कारण, तो आत्मबोधानें तृप्त होऊन कृतकार्य झालेला असतो. ह्मणून तो आपोआपच कर्माच्या संगतीला मुकतो." १४७

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन।
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः॥ १८॥

[नैव तस्येत्यर्ध] तृप्ति जालिया जैसीं। साधनें सरतीं आपैसीं। देखें आत्मतुष्टी तैसीं। कर्में नाहीं ॥ ४८ ॥ [न चास्येत्युत्तरार्ध] जंववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना। तंवचि या साधना। भजावें लागे ॥ ४९ ॥

"तृप्ति झाली ह्मणजे साधनें जशीं आपोआप नाहींशीं होतात, त्याप्रमाणें आत्मस्वरूपामध्यें सर्व कर्में नाहींशीं होतात. १४८ अर्जुना! मनाला जोंपर्यंत बोध झाला नाहीं, तोंपर्यंत च या साधनांचें आचरण करावें लागतें." १४९

१ चालत असलेल्या. २ बद्ध होत नाहीं. ३ आपणाशीं. ४ मुकला, अंतरला. ५ आपोआप. ६ आत्मस्वरूपामध्यें. ७ आचरावें.

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर।
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः॥ १९॥

[तस्मादिति] ह्मणऊनि तूं नियत। सकळ कामनारहित। होऊनियां उचित। स्वधर्में राहाटें ॥ १५० ॥ [असक्त इति] जे स्वधर्में निष्कामता। अनुसरले पार्था। ते कैवल्यपद तत्वता। पावले जगीं ॥ ५१ ॥

"ह्मणून तूं नियमशील व सर्व कामनारहित होऊन, उचित अशा स्वधर्मानें वाग. १५० कारण, पार्था! जगामध्यें ज्यांनीं निष्कामबुद्धीनें स्वधर्माचरण केलें, ते निश्चयेंकरून ब्रह्मपदाप्रत पोंचले." १५१

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः।
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि॥ २०॥

[कर्मणैवेति] देख पां जनकादिक। कर्मजात अशेख। न सांडितां मोक्षसुख। पावते जाहले ॥ ५२ ॥ [लोकसंग्रहमिति] याकारणें पार्था। होआवी कर्मीं आस्था। हे आणिकाही एका अर्था। उपकारेल ॥ ५३ ॥ जे आचरतां आपणपेयां। देखी लागेल लोका यया। तरी चुकेल हा अपाया। प्रसंगेंचि ॥ ५४ ॥ देखें प्राप्तार्थ जाहाले। जे निष्कामता पावले। तयांही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं ॥ ५५ ॥ मार्गीं अंधासरिसा। पुढें देखणाही चाले जैसा। अज्ञाना प्रकटावा धर्म तैसा। आचरोनी ॥ ५६ ॥ हां गा ऐसें जरी न कीजे। तरी अज्ञाना काय उमजे। तिहीं कवणेंपरी जाणिजे। मार्गातें या ॥ ५७ ॥

"हें पहा! जनकादिक कोणतेंही कर्माचरण न सोडतां, मोक्षसुखाला पावले. १५२ याकरितां अर्जुना! कर्मावरही आस्था असावी. ह्मणजे ती आणखीही एका कार्याला उपयोगीं पडते. १५३ कारण, आपण स्वतःच त्याप्रमाणें आचरण केलें, ह्मणजे इतर लोकांनाही तोच मार्ग लागतो. आणि ओघानुसारच त्यांचीं दुःखें टळतात. १५४ हें पहा! ज्यांचे मनोरथ पूर्ण होतात, ते निरिच्छ असतातच. तरी त्यांनीं लोकांसाठीं कर्में करणें हेंच योग्य आहे. १५५ आंधळा वाटेनें चालूं लागला, ह्मणजे डोळस

१ नियमशील. २ मोक्षपद. ३ सर्व. ४ असावी, व्हावी. ५ कार्याला. ६ उपयोगीं पडेल. ७ आपणाला. ८ दीक्षा, वळण. ९ दुःख, संकट. १० पूर्ण मनोरथ. ११ डोळस. १२ समजेल?

पुढें चालत असतो. त्याप्रमाणें हा आपला धर्म, अज्ञजनांना आपण आचरण करून दाखवावा लागतो. १५६ तसें आपण जर न करूं, तर अज्ञलोकांना काय समजणार? त्यांना हा मार्ग कळावा कसा?" १५७

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥

[यद्यदिति] एथ वडील जें जें करिती । तया नाम धर्म ठेविती । तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥ ५८ ॥ [स यदिति स्पष्टं] हें ऐसें असे स्वभावें । ह्मणोनि कर्म न संडावें । विशेषें आचरावें । लागे संतीं ॥ ५९ ॥

**"वडील जें जें करितात, त्यालाचा धर्म असें नांव देतात. आणि इतर सारे सामान्यजन त्याचेंच अनुकरण करतात. १५८ हा असा सृष्टिक्रमच आहे. ह्मणून कर्माचा कधीं त्याग करूं नये. येवढेंच नव्हे, तर श्रेष्ठ लोकांनीं तें अवश्य आचरण करावें." १५९**

न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

[न मे पार्थेति] आतां आणिकाचिया गोठी । कायशा सांगों किरीटी । देखें मीचि इये राहाटी । वर्तत असें ॥ १६० ॥ काय सांकडें कांहीं मातें । कीं कवणें एकें आर्ते । आचरें मी धर्मातें । ह्मणसी जरी ॥ ६१ ॥ तरी पुरतेपणालागीं । आणिक दुसरा नाहीं जगीं । ऐसी सामग्री माझ्या आंगीं । जाणसी तूं ॥ ६२ ॥ [नानवाप्तमिति] मृत गुरुपुत्र आणिला । तो तुवां पवाडा देखिला । तोही मी उगला । कर्मी वर्ते ॥ ६३ ॥

**"आतां अर्जुना! दुसऱ्याच्या गोष्टी मी तुला कशाला सांगूं? मी स्वतःच त्या रीतीनें वागतों आहे, हें पहा ह्मणजे झालें. १६० मजवर कांहीं एखादें संकट पडलें असेल, किंवा मला कशाची तरी इच्छा असेल, ह्मणून मी स्वधर्मानें वागतों. असें जर तूं ह्मणशील, १६१ तर पूर्णपणांत माझी बरोबरी करणारा ह्या जगांत दुसरा कोणी नाहीं. असें माझ्या अंगांत सामर्थ्य आहे, हें तूं जाणतोसच. १६२ गुरूचा मृत झालेला पुत्र* सुद्धां म्यां आणिला. तो प्रभाव तूं पाहिलासच. तो मी, कांहीं कारण नसतांही कर्म करतोंच." १६३**

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

[यदीति] परी स्वधर्मी वर्ते कैसा । साकांक्ष कां होय जैसा । तयाचि एका उद्देशा । लागोनियां ॥ ६४ ॥ [मम वर्त्मेति] जें भूतजात सकळ । असे आह्मांआधीनचि केवळ । तरी न व्हावें वरळ । ह्मणोनियां ॥ ६५ ॥

**"मी स्वधर्मांत कसा वागतों? कीं जसा**

---

१ श्रेष्ठ, वृद्ध. २ दुसऱ्याच्या. ३ गोष्टी. ४ संकट. ५ इच्छेनें. ६ पूर्णपणाला. ७ साहित्य, सामर्थ्य. ८ सांदीपनीचा पुत्र.

* बळराम व श्रीकृष्ण ह्यांची बाललीला पुरी झाल्यानंतर त्यांस गुरुगृहीं वास करण्याची इच्छा झाली. ह्मणून ते उभयतां अवंतीनगरांत वास्तव्य करणाऱ्या 'काश' गोत्रोत्पन्न 'सांदीपनी' नामक ब्राह्मणाकडे गेले, आणि त्याजपाशीं विद्या शिकण्यास प्रारंभ केला. त्यांनीं इंद्रियनिग्रह करून गुरुपाशीं इतकें निर्मल वर्तन ठेविलें कीं, त्यांना नांवें ठेवण्यास कोठें जागाच राहिली नाहीं. त्यांनीं गुरूची सेवा केवळ देवाप्रमाणें केली. तेव्हां गुरु संतुष्ट झाले. आणि त्या उभयबंधूंस अध्ययन सांगण्यास आरंभ केला. रामकृष्णांची बुद्धि अप्रतिम होती. त्यांनीं सर्व विद्या, शास्त्रें, राजनीति एकदां सांगतांच ग्रहण केली. चौसष्ट दिवसांत चौसष्ट कला साध्य केल्या. आणि गुरुजींस कांहीं गुरुदक्षिणा मागण्याविषयीं प्रार्थना केली. तेव्हां सांदीपनानें आपल्या पत्नीच्या विचारें मागितलें कीं, "महासागरांतील प्रभासतीर्थामध्यें माझा लहान मुलगा मरण पावला आहे तो परत आणावा."

ती आज्ञा शिरसावंद्य करून रामकृष्ण समुद्रतीरीं गेले. तेव्हां समुद्रानें मोठा आदरसत्कार केला. त्यांची षोडशोपचार पूजा केली. तेव्हां ते समुद्रास ह्मणाले "तूं आपल्या प्रचंड लाटांनीं आमच्या गुरुजींचा पुत्र ग्रासला आहेस तो परत दे." समुद्र ह्मणाला "तो पुत्र मीं हरण केलेला नाहीं. पण माझ्या उदकांत शंखरूप धारण करून एक पंचजन्यनामें मोठा असुर फिरत असतो, त्या दैत्यानें नेलेला आहे. त्यास शिक्षा करण्याचें मजमध्यें सामर्थ्य नाहीं." तेव्हां भगवंतांनीं त्या दैत्याचा वध केला. पण त्याच्याही उदरांत तो पुत्र सांपडला नाहीं. तेव्हां त्या दैत्याचें उत्पत्तिस्थान जो शंख ( हाच पांचजन्य होय. ) तो घेऊन 'संयमिनी' नामक यमाच्या राजधानीस गेले. तो शंख वाजविला. अर्घ्यपाद्यादि पूजा करून यम पुढें हात जोडून उभा राहिला. तेव्हां त्यास तो पुत्र आणून देण्याविषयीं भगवंतांनीं आज्ञा केल्याप्रमाणें त्यानें तो आणून दिला. त्यास घेऊन भगवंतांनीं गुरूची इच्छा परिपूर्ण केली. व आणखीही कांहीं गुरुदक्षिणा मागण्याविषयीं गुरुस आग्रह केला. (ही कथा भागवतांतील दशमस्कंद अध्याय ४५ मध्यें आहे.)

१ साभिलाष, आतुर. २ हेतूसाठीं. ३ भ्रष्ट.

ाय आतुर मनुष्यच. पण कशाकरितां? फक्त का हेतूकरितां. १६४ कीं सर्व प्राणिमात्र वळ आमच्या आधीन आहेत, तर त्यांनीं भ्रष्ट ोऊं नये ह्मणून." १६५

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ।
संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः॥२४॥

[न कुर्यां कर्म चेदहं] आह्मी पूर्णकाम होउनी। जरी ात्मस्थितीं राहुनी। [संकरस्येति] तरी प्रजा हे कैसेनी। स्तरेल ॥ ६६ ॥ [उत्सीदेयुरिति] इहीं आमुची वास पाहावी। ग वर्ततीपरी जाणावी। ते लोकस्थिति आघवी। नासिली ोईल ॥ ६७ ॥ ह्मणोनि समर्थ जो एथें। आथिलीं सर्वज्ञते। र्णे विशेषें कर्मातें। त्यजावें ना ॥ ६८ ॥

"आह्मी तृप्त होऊन आत्मस्थितींतच राहेलों, तर ह्या इतर लोकांचा उद्धार कसा ोईल? १६६ आमचें वर्तन पाहून तेही त्याप्रमाणेंच वर्तन करतील. आणि लोकस्थिति ारी बिघडून जाईल. १६७ ह्मणून जो समर्थ । सर्वज्ञ असेल, त्यानें कधीं ही कर्म टाकूं नये." १६८

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ।
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥२५॥

[सक्ताः कर्मणीति] देखें फळाचिया आशा। आचरे कामुक ैसा। [कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तः] कर्मीं भरे होऔवा तैसा। ेरांशाही ॥ ६९ ॥ [चिकीर्षुर्लोकसंग्रहं] जे पुढतपुढती पार्था। ः सकळ लोकसंस्था। रक्षणीय सर्वथा। ह्मणऊनियां ॥१७०॥ ार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरे लावावें। अलौकिक ोहावें। लोकांप्रति ॥ ७१ ॥

"हें पहा! कामेच्छु फळाच्या आशेनें जसें कर्माचरण करितो, तसेंच निरिच्छानेंही मोठ्या ल्हासानें कर्म करावें. १६९ कारण हे अर्जुना! ी सर्व लोकस्थिति नेहमीं संरक्षण करणें फार अवश्य आहे. ह्मणून, १७० आपण मार्गानें ालावें, आणि जगाला मार्ग लावून द्यावा. लोकांशीं विरुद्ध होऊं नये." १७१

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन्॥२६॥

[न बुद्धिभेदमिति] जें सायासें स्तन सेवी। तें पक्वान्नें केवि जेवी। ह्मणोनि बाळका जैसीं नेदावीं। धनुर्धरा ॥ ७२ ॥ तैसी कर्मीं जयां अयोग्यता। तयांप्रति नैष्कर्म्यता। न प्रगटावी खेळेतां। आदिकरुनी ॥ ७३ ॥ [जोषयेदिति] तेथें सत्क्रियाचि लावावी। तेचि एकी प्रशंसावी। निष्कर्मीही दावावी। आचरोनी ॥ ७४ ॥ तया लोकसंग्रहालागीं। वर्ततां कर्मसंगीं। तो कर्मबंध आंगीं। बाजेलना ॥ ७५ ॥ जैसी बहुरूपियांची रावो राणी। स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं। परी लोकसंपादणी। तैसीच करिती ॥ ७६ ॥

"ज्या मुलाला स्तन तोंडांत घेण्याला प्रयास पडतात, तें पक्वान्नें काय जेवील? ह्मणून अर्जुना! तीं त्यास जशीं देतां कामा नये, त्याप्रमाणें कर्मालाच जे अधिकारी आहेत, त्यांना मुख्यत्वेंकरून ही निरिच्छता उगाच सांगत बसूं नये. १७२ त्यांना सत्कर्मालाच लावावें. त्याचीच एकाची थोरवी गावी. आणि निष्कामजनांनींही तसेंच आचरण करून दाखवावें. १७४ अशाप्रकारें वर्णाश्रमधर्मसंरक्षणासाठीं जो कर्म करून राहील, त्याला कर्मबंध लागावयाचा नाहीं. १७५ ज्याप्रमाणें बहुरूप्यांमध्यें राजाराणी होतात; परंतु त्यांच्या मनांत कांहीं स्त्रीपुरुषभाव वसत नाहीं. तरी ते लोकांची समजूत तशी करतात." १७६

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।
अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते ॥ २७ ॥

देखें पुढिलाचें वोझें। जरी आपुला माथां घेइजे। तरी सांगें कां न दांटिजे। धनुर्धरा ॥ ७७ ॥ [प्रकृतेरिति] तैसीं शुभाशुभें कर्में। जियें निपजती प्रकृतिधर्में। [अहमिति] तियें मूर्ख मतिभ्रमें। मी कर्ता ह्मणे ॥ ७८ ॥ ऐसा अहंकारारूढ। एकदेशी मूढ। तया हा परमार्थ गूढ। प्रगटावाना ॥ ७९ ॥ हें असो प्रस्तुत। सांगिजेल तुज हित। तें अर्जुना देऊनि चित्त। अवधारीं पां ॥१८०॥

१ तृप्त. २ आत्मस्वरूपांत. ३ वर्तेल, पार पडेल. ४ वर्तन, ाळ. ५ वर्तनक्रम. ६ वर्णाश्रमधर्मव्यवस्था. ७ संपन्न. ८ फलेच्छु. ९ आवड. १० व्हावी. ११ निरिच्छास देखील. १२ वारंवार. १३ पाळली पाहिजे. १४ मार्गास. १५ न ावें.

१ कर्म न करणें. २ उगाच. ३ मुख्यत्वेंकरून. ४ निरिच्छलोकांनींही. ५ वर्णाश्रमधर्मसंरक्षण करण्यासाठीं. ६ लागणार नाहीं. ७ राजा. ८ लोकांची समजूत. ९ दुसऱ्याचें. १० वांकावयाला. ११ मायेच्या गुणाप्रमाणें. १२ अल्पव्यापी, परिच्छिन्न. १३ गहन. १४ सांप्रत, तूर्त.

"आणखी अर्जुना असें पहा! दुसऱ्याचें ओझें, आपण आपल्या माथ्यावर घेतलें तर थोडें तरी वांकावयाला नको का? तूंच सांग. १७७ तशीं हीं शुभाशुभ कर्में, मायेच्या गुणांनीं उत्पन्न होतात. पण मूर्ख आहे तो, बुद्धिभ्रमानें त्यांचा कर्ता मी असें ह्मणतो. १७८ असा अहंकारास पेटलेला, व विपरित भावनेचा जो मूर्ख असेल, त्याला हा गहन परमार्थ कधींही सांगूं नये. १७९ अर्जुना! हें तूर्त असूंदे. तुझें हित तुला सांगतों, तें तूं चित्त देऊन ऐक कसा." १८०

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।
गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥२८॥

[तत्त्वविदिति] जे तत्त्वज्ञानियांच्या ठायीं । तो प्रकृतिभाव नाहीं । जेथ कर्मजात पाहीं । निपजत असे ॥ १८१ ते देहाभिमान सांडुनी । गुणकर्में वोलांडुनी । [गुणा गुणेषु वर्तंते] साक्षिभूत होउनी । वर्तती देहीं ॥ ८२ ॥ [इति मत्वा न सज्जते] ह्मणोनि शरीरी जरी होती । तरी कर्मबंधा नाकळती । जैसा कां भूतचेष्टा गभस्ती । घेपवेना ॥ ८३ ॥

"तत्त्वज्ञान्यांपासून कर्मसमूह निपजतो. तरी त्यांच्या ठाईं तो प्रकृतिभाव असत नाहीं. १८१ ते देहाभिमान सोडून गुणकर्मांना मागें सारून, साक्षीभूत होऊन देहांत राहतात. १८२ सर्व प्राणीमात्रांचे व्यापार सूर्याच्या आधारानें चालतात, पण सूर्य कांहीं त्या व्यापारांत पडत नाहीं, त्याप्रमाणें ते देहधारी असले तरी, कर्मबंधांत सांपडत नाहींत." १८३

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥२९॥

[प्रकृतेरिति] एथ कर्मी तोचि लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे । प्रकृतीचेनि आटोपें । वर्तत असे ॥ ८४ ॥ [तानिति] इंद्रियें गुणाधारें । रहाटती निजव्यापारें । [कृत्स्नविदिति] तें परकर्म बलात्कारें । आपोदी जो ॥ ८५ ॥

"इंद्रियें गुणांच्या आधारानें आपआपलीं कर्में करीत असतात. तें दुसऱ्याचें कर्म बलात्कारानें जो आपल्याकडे ओढून घेतो; प्रकृतीच्या आधीन होऊन गुणांच्या अनुरोधानें चालतो, तोच कर्मानें बद्ध होतो." १८४:१८५

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥३०॥

[मयीति] तरी उचित कर्में आघवीं । तुवां आचरोनि मज अर्पावीं । परी चित्तवृत्ति विन्यसावी । आत्मरूपीं ॥ ८६ ॥ [निराशीर्निर्ममो भूत्वा] हें कर्म मी कर्ता । कां आचरेन यों अर्था । ऐसा अभिमान झणें चित्ता । रिघों देसी ॥ ८७ ॥ तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें । मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥ ८८ ॥ [युध्यस्व] आतां कोदंडें घेऊनि हातीं । आरूढ पां इये रथीं । देईं आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ॥ ८९ जगीं कीर्ति रुंढवीं । स्वधर्माचा मान वाढवीं । इया भारापासोनि सोडवीं । मेदिनी हे ॥ १९० ॥ [विगतज्वरः] आतां पार्था निःशंक होईं । या संग्रामा चित्त देईं । एथ हें वांचूनि कांहीं । बोलों नये ॥ ९१ ॥

"ह्या करितां उचित कर्में असतील तीं सारीं तूं आचरण करून मला अर्पण कर. आणि चित्तवृत्ति आत्मस्वरूपांत ठेव. १८६ हें कर्म; मी हा कर्ता; या करितां मी तें करणार; असा अभिमान चित्ताला होऊं देऊं नको. १८७ तूं देहाधीन होऊं नकोस. मनांतील हेतु सर्व सोडून दे. आणि मग समयानुसार जे जे भोग प्राप्त होतील, ते सर्व भोग. १८८ आतां धनुष्य हातांत घे; ह्या रथांत बस; आणि समाधानवृत्तीनें शौर्याचा अंगिकार कर. १८९ जगामध्यें कीर्ति पसर; स्वधर्माचा मान वाढीव; आणि ह्या पृथ्वीला ह्या भारापासून मुक्त कर. १९० अर्जुना! आतां निश्शंक हो. ह्या युद्धाकडे लक्ष दे. युद्धाशिवाय दुसरें कांहीं येथें बोलूं नको." १९१

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः ।
श्रद्धावंतोऽनसूयंतो मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥३१॥

[ये मे इति] हें अनुपरोध मत माझें । जिहीं परमादरें स्वीकारिजे । [श्रद्धावंत इति] श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे । धनुर्धरा

१ कारण. २ कर्मसमूह. ३ चित्तवृत्ति निरोधून. ४ बद्ध होत नाहींत. ५ सूर्य. ६ सांपडत नाहीं, करवीत नाहीं. ७ गुणसंबंधानें विपरीत बुद्धीप्रत पावल्यानें. ८ स्वाधीन होऊन. ९ स्वीकार करतो, घेतो.

१ ठेवावी, योजावी. २ या फळासाठीं. ३ नको. ४ देहाधीन. ५ सर्व हेतु. ६ समयोचित. ७ धनुष्य. ८ वाढीव. ९ सिद्ध, ठाम. १० आचरतील.

॥ ९२ ॥ तेही सकळ कर्मीं वर्तत । जाण पां कर्मरहित । ह्मणोनि हें निश्चित । करणीय गा ॥ ९३ ॥

“धनुर्धरा! हें माझें ठाम मत आहे. ह्याचा परम आदरानें स्वीकार करून भक्तिभावानें त्याप्रमाणें आचरण कर. १९२ कर्मत्याग केलेले लोक आहेत, ते सुद्धां सारे कर्माचरण करतात. ह्मणून कर्माचरण करणें हेंच योग्य आहे.” १९३

ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् ।
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

[ये त्विति] ना तरी प्रकृतिमंत होउनी । इंद्रियां लळा देउनी । जे हें माझें मत अव्हेरुनी । वोसंडिती ॥ ९४ ॥ जे सामान्यत्वें लेखिती । अवज्ञा करूनि देखिती । कां अर्थवाद ह्मणती । वाचाळपणें ॥ ९५ ॥ [सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि] ते मोहमदिरा भुलले । विषयविषें घारले । अज्ञानपंकीं बुडाले । निभ्रांत मानीं ॥ ९६ ॥ [नष्टान्] देखें शवाच्या हातीं दिधलें । जैसें कां रत्न वायां गेलें । ना तरी जात्यंधा पाहलें । प्रमाण नोहे ॥ ९७ ॥ कां चंद्राचा उदय जैसा । उपयोगा नर्वचे वायसा । मूर्खा विवेक हा तैसा । रुचेल ना ॥ ९८ ॥ तैसे जे पार्था । विमुख या परमार्था । तयांसीं भाषण सर्वथा । करावेंना ॥ ९९ ॥ [अचेतसः] ह्मणोनि ते न मानिती । आणि निंदाही करूं लागती । सांगें पतंग काय साहाती । प्रकाशातें ॥ २०० ॥ पतंगा दीपीं आलिंगन । तेथ त्यासि अचुक मरण । तेविं विषयाचरण । आत्मघाता ॥ १ ॥

“या उपर जे कोणी देहाभिमानास गुंतून, इंद्रियांचे लाड पुरवून ह्या माझ्या मताचा अव्हेर करतील, १९४ किंवा हे विचार क्षुद्र आहेत असें मानतील; अथवा ह्याची अवहेलना करतील; किंवा फाजीलपणानें ही आत्मस्तुति आहे असें ह्मणतील, १९५ ते निःसंशय मोहरूप मद्यानें गुंगले; त्यांना विषयाचें विष चढलें; आणि अज्ञानरूप चिखलांत बुडाले असें समज. १९६ हें पहा! प्रेताच्या हातांत रत्न दिलेलें जसें व्यर्थ; किंवा जन्मांधास उजाडलेलें जसें प्रमाण मानतां येत नाहीं. १९७ किंवा चंद्रोदय झालेला जसा कावळ्यांच्या उपयोगीं नाहीं; त्याप्रमाणें हा विचार मूर्खालाही रुचावयाचा नाहीं. १९८ तर अर्जुना! परमार्थाला जे मुकले, त्यांच्याशीं कधीं भाषणसुद्धां करूं नये. १९९ कारण, ते आपलें भाषण मानित तर नाहींतच, पण उलट निंदा मात्र करतात. खरेंच आहे. पतंगाला प्रकाश कसा बरें सहन होईल? सांग. २०० पतंगानें दिव्याला आलिंगन दिलें, तर त्याचें मरण चुकावयाचेंच नाहीं. त्याप्रमाणें विषयाचें आचरण, हेंच आत्मघातास कारण आहे.” २०१

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।
प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

[सदृशं चेष्टत इति] ह्मणोनि इंद्रियें एकें । जाणतेनि पुरुखें । लाळावीं ना कौतुकें । आदिकरुनी ॥ २ ॥ हां गा सर्पेंसीं खेळों येईल । कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धी जाईल । सांगें हालाहल जिरेल । सेविलेंया काई ॥ ३ ॥ देखें खेळतां अग्नि लागला । मग तो न सांवरे जैसा उधवला । तैसा इंद्रियां लळा दिधला । भला नोहे ॥ ४ ॥ येरवीं तरी अर्जुना । या शरीरा पराधीना । कां नानाभोगरचना । मेळवावी ॥ ५ ॥ आपण सायासेंकरूनि बहुतें । सकळाही समृद्धिजातें । उदोअस्त या देहातें । प्रतिपाळावें कां ॥ ६ ॥ सर्वस्वें शिणोनि एथें । आर्जवावीं संपत्तिजातें । तेणें स्वधर्म सांडूनि देहातें । पोखावें काई ॥ ७ ॥ [प्रकृतिं यांति भूतानीति] मग हें तंव पांच मेळावा । शेखीं अनुसरेल पंचत्वा । ते वेळीं केला कें गिंवसावा । शीण आपुला ॥ ८ ॥ ह्मणूनि केवळ देहंभरण । तें जाणें उघडी नागवण । यालागीं एथ अंतःकरण । देयावेंना ॥ ९ ॥

“ह्या करितां जाणत्या पुरुषानें मुख्यत्वेंकरून कौतुकाखातरसुद्धां इंद्रियांचे लाड पुरवूं नयेत. २०२ सर्पाबरोबर क्रीडा करतां येईल का? वाघाची संगत धरून चालेल का? कालकूट विष घेतलें, तर तें पचेल काय? सांग बरें. २०३ हें पहा! खेळतां खेळतां जरी आग लागली, तरी ती भडकते. आणि मग आवरतां आवरत नाहीं. तशीच गोष्ट इंद्रियांची आहे.

१ करण्यास योग्य. २ देहाभिमानी. ३ फूस देऊन, लाड करून. ४ टाकून देतात. ५ स्तुतिपाठ. ६ व्यापले. ७ उजाडलेलें. ८ न पडे. ९ कावळ्याला. १० सहन करतात? ११ आपला घात करणारे.

१ पुरुषानें. २ लाड करूं नयेत. ३ वाघाचा सहवास. ४ कालकूट विष. ५ भडकला. ६ विषयोपभोग. ७ अहोरात्र. ८ मिळवावें. ९ पोसावें. १० जमाव. ११ पंचतत्त्वाला. १२ कोठें? १३ शरीरपोषण. १४ हानि, बुडवणूक. १५ देऊं नये.

ह्मणून त्यांचा लळा पुरविणें चांगलें नव्हे. २०४ **अर्जुना!** दुसरा विचार असा कीं, या पराधीन शरीराला नानाप्रकारचे भोग तरी काय ह्मणून संपादन करावेत? २०५ आपण नाहीं नाहीं त्या खटपटी करून सर्वप्रकारची समृद्धि आणून रात्रंदिवस ह्या देहाचें कां बरें प्रतिपालन करावें? २०६ सर्वप्रकारें थकून भागून नानाप्रकारची संपत्ति मिळवावी, आणि तिनेंच स्वधर्म सोडून देहाचें पोषण करावें होय? २०७ हें शरीर तर पंचतत्त्वांचें बनलेलें आहे. तें शेवटीं पंचतत्त्वास मिळेल. मग त्यावेळीं आपण केलेले श्रम कोठें शोधावयाचे? २०८ ह्या करितां केवळ शरीराचें पोषण करणें, ही शुद्ध बुडवणूक आहे. ह्मणून तिकडे चित्त देऊं नये." २०९

इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ।
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥३४॥

[इंद्रियस्येति] येऱ्हवीं इंद्रियांचिया अर्थी । सारिखा विषय पोषितां । संतोष कीर चित्ता । आपजेल ॥ २१० ॥ परी तो संवचोरांचा सांगात । जैसा नांवेक स्वस्थ । जंव नगराचा प्रांत । सांडिजेना ॥ ११ ॥ बापा विषयाची मधुरता । झणें आवडी उपजे चित्ता । तो परिणाम विचारितां । प्राण हरी ॥ १२ ॥ देखें इंद्रियीं काम असे । तो लावी सुखदुरासे । जैसा गळीं मीन आमिषें । भुलविजे गा ॥ १३ ॥ परी तयामाजि गळु आहे । जो प्राणातें घेऊनि जाये । तो जैसा ठाउवा नोहे । झांकलेपणें ॥ १४ ॥ तैसें अभिलाषें येणें कीजेल । विषयांची आशा धरिजेल । तरी वरपडा होइजेल । क्रोधानळा ॥ १५ ॥ जैसा कवळोनियां पारधी । घातेचिये संधी । आणी मृगातें बुद्धी । साधावया ॥ १६ ॥ [तयोरिति] एथ तैसीची परी आहे । ह्मणूनि संग हा तुज नोहे । पार्था दोन्ही काम क्रोध हे । घातक जाणें ॥ १७ ॥ ह्मणऊनि हा आश्रयोचि न करावा । मनेंही आठवो न धरावा । एक निजवृत्तीचा वोलावा । नासों नेदीं ॥ १८ ॥

**" बाकी, इंद्रियांच्या आवडीप्रमाणें विषयांचें सेवन केलें, तर चित्ताला संतोष होतो, ही गोष्ट खरी आहे. २१० पण तो वरपंगी साधुत्व दाखविणाऱ्या चोराचाच सोबती. तो जसा गांवाच्या वेशीबाहेर पडेपर्यंत क्षणमात्र स्वस्थ असतो, त्याप्रमाणेंच हाही क्षणमात्र गोड असतो. २११ बाबा! ह्या विषयांच्या गोडीनें चित्ताला आवड उत्पन्न होते खरी; पण तिचा परिणाम विचारशील तर, जीव घेणारा आहे. २१२ हें पहा! गळाला लावलेलें मांस जसें माशाला भुरळ घालतें, तसें इंद्रियांमध्यें इच्छा असते ती, सुखप्राय वाटणाऱ्या दुराशेला लावते. २१३ पण त्यांत गळ आहे; तो प्राण हरण करील. हे जसें त्याच्या गुप्तपणामुळें माशास समजत नाहीं, २१४ त्याप्रमाणें ह्याच्या अभिलाषांत गुंतून जो विषयांची आशा धरतो तो क्रोधानळाच्या स्वाधीन होतो. २१५ ज्याप्रमाणें पारधी मारण्याची संधि पाहून आपला मतलब साधण्याकरितां मृगांस वळवून आणतो, २१६ तद्वत् यांची दशा आहे. ह्मणून अर्जुना! तुला त्यांचा संग नसावा. कारण, काम आणि क्रोध, हे दोन्ही घातकी आहेत. २१७ ह्याकरितां त्यांचा आश्रयच धरूं नको; मनांत आठवण सुद्धां करूं नको. फक्त आत्मवृत्तीचा जिव्हाळा बिघडून देऊं नये, ह्मणजे झालें." २१८**

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

[श्रेयान्स्वधर्मो विगुणः] अगा स्वधर्म हा आपुला । जरी कां कठिण जाहाला । तरी हाचि अनुष्ठिला । भला देखें ॥१९॥ [परधर्मात्स्वनुष्ठितात्] येरु आचार जो परावा । तो देखतां कीर बरवा । परी आचरतेनि आचरावा । आपुलाचि ॥२२०॥ सांगें शूद्रघरीं आघवीं । पक्वान्नें आहाति बरवीं । तीं द्विजें केविं सेवावीं । दुर्बळ जरी जाहाला ॥ २१ ॥ हें अनुचित कैसेनि कीजे । अग्राह्य केविं इच्छिजे । अथवा इच्छिलेंही पाविजे । विचारींपां ॥ २२ ॥ तरी लोकांचीं धवळारें । देखोनियां मनोहरें । असतीं आपुलीं तेणारें । मोडावीं केवीं ॥२३॥ [स्वधर्मे निधनं श्रेयः] हें असो वनिता आपुली । कुरूप जरी जाहाली । तऱ्ही भोगितां तेचि भली । जियापरी ॥२४॥ तेविं

१ इंद्रियांच्या. २ आवडीप्रमाणें. ३ सेवन केलें तर. ४ निश्चयेंकरून. ५ उत्पन्न होईल. ६ सावासारख्या दिसणाऱ्या चोराचा सोबती. ७ क्षणभर, थोडासा. ८ जरी. ९ सुखावह वाटणारी दुराशा. १० गळ. ११ ठाऊक, माहित. १२ स्वाधीन. १३ मरणाची संधि साधून. १४ बुद्धया, मुद्दाम. १५ मारण्याकरितां. १६ जिव्हाळा. १७ बिघडूं नको.

१ आचरण केला असतां. २ दुसरा, अन्य. ३ दुसऱ्याचा ४ निश्चयेंकरून ५ आचरण करणारांनीं. ६ सर्व. ७ दरिद्री. ८ चुनेगची घरें. ९ गवताची झोंपडी.

आवडे तैसा सांकडे।आचरतां जऱ्ही दुर्वाड । तऱ्ही स्वधर्मेचि सुरवाड । परत्रींचा ॥२५॥ [परधर्मो भयावहः] हां गा साकर आणि दूध । हें गौल्यें कीर प्रसिद्ध । परी कृमिदोषीं विरुद्ध । घेपे केवीं ॥ २६ ॥ ऐसेनिही जरी सेविजेल । तरी ते आंलुकीचि उरेल। जे तें परिणामीं पथ्य नव्हेल । धनुर्धरा ॥२७॥ ह्मणोनि आणिकांसि जें विहित । आणि आपणपेयां अनुचित । तें नाचरावें जरी हित । विचारिजे ॥ २८ ॥ या स्वधर्मातें अनुष्ठितां । वेचु होईल जीविता । तोहि निका वर उभयतां । दिसत असे ॥ २९ ॥ ऐसें समस्त सुरशिरोमणी । बोलिजे जेथ श्रीशार्ङ्गपाणी । [अर्जुन उवाच–] तेथ अर्जुन ह्मणे विनवणी । असे देवा ॥ ३० ॥ हें जें तुह्मीं सांगीतलें । तें सकळ कीर म्यां परिसिलें । तरी आतां पुसेन कांहीं आपुलें । अपेक्षितें ॥ ३१ ॥

**"अरे! हा आपला स्वधर्म जरी कठीण असला, तरी तोच आचरण केला असतां चांगलें. २१९ आचार दुसऱ्याचा असून, विचार करतांना तो खरोखर चांगला आहे असें वाटलें, तरी करणारानें आपलाच आचरण करावा. २२० शूद्राच्या घरीं उत्तमोत्तम सारीं पक्वान्नें तयार असलीं; आणि एखादा ब्राह्मण दरिद्रि असला, तरी त्यानें कशीं वरें सेवन करावीं? सांग. २२१ उचित नव्हे तें करावें कसें? ग्रहण करण्याला जें योग्य नव्हे, त्याची इच्छा करावी का? अथवा इच्छा केली; तर तें लागलेंच मिळतें, याचा तरी नेम आहे का? ह्याचाही विचार कर. २२२ लोकांचे चुनेगची सुंदर वाडे पाहून, आपल्या गवताच्या झोंपड्या मोडाव्यात कशा? २२३ हेंही असो. आपली स्त्री रूपानें जरी वाईट असली, तरी उपभोग घेतांना तीच ज्याप्रमाणें उत्तम वाटते, २२४ त्याप्रमाणें, हवा तितका कठीण असला, आचरण्याला दुर्घट असला, तरी आपला धर्म असेल तोच परलोकीं सुखकर होतो. २२५ किंवा साखर आणि दूध हे दोन्ही पदार्थ गोड असल्याविषयीं प्रसिद्धच आहेत. पण जंतांचा विकार ज्यास झाला आहे, त्यास ते विरुद्ध आहेत. मग त्यानें ते कसे घ्यावे? २२६ अर्जुना! इतक्याउप्परही त्यानें ते सेवन केलेच, तर क्षणमात्र तृप्तता होईल खरी; पण परिणामीं ते हितकर व्हावयाचे नाहींत. २२७ ह्याकरितां दुसऱ्याला कल्याणकर, आणि आपणाला अनुचित असून हितकर वाटलें, तरी तें आचरण करूं नये. २२८ हा स्वधर्म आचरण करीत असतां, प्राण खर्चीं पडला तरी तो उभयलोकीं श्रेष्ठता पावतो." २२९ सर्व देवांचा देव, असा जो शार्ङ्गपाणी तो जेव्हां याप्रमाणें बोलला, तेव्हां अर्जुन ह्मणाला "देवा! एक विनंति आहे. २३० हें जें आपण सांगितलें, तें मी नीट श्रवण केलें. तर आतां मला काय वाटतें तें मीही विचारतों." २३१**

१ कठीण. २ दुर्घट. ३ सुखकर. ४ परलोकीं. ५ गोडीनें. ६ जंतांच्या विकाराला. ७ घ्यावें. ८ आवड. ९ हितकर. १० दुसऱ्यांस. ११ आपणाला. १२ खर्च, नाश. १३ उत्तम. १४ श्रेष्ठ. १५ दोन्ही लोकीं. १६ नीट. १७ इच्छित.

अर्जुन उवाच-

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः॥३६॥

[अथेति] तरी देवा हें कैसें । जे ज्ञानियांचिही स्थिति भ्रंशे । मार्ग सांडूनि अनारिसे । चालत देखों ॥ ३२ ॥ सर्वज्ञही जे होती । हे उपायही जाणती । तेही परधर्मे व्यभिचरती । कवणें गुणें ॥ ३३ ॥ बीजा आणि भुसा । अंध निवाडे नेणे जैसा । नोवेक देखणांही तैसा । बरळे कां पां॥३४॥ [अनिच्छन्निति] जे असता संग सांडिती । तेचि संसर्ग करितां न धीती । वनवासीही सेविती । जनपदातें ॥ ३५ ॥ [बलादिव नियोजितः] आपण तरी लपती । सर्वस्वें पाप चुकविती । परी बळात्कारें सुईजेती । तयाचि माजी ॥ ३६ ॥ जयाची जीवें घेती विवसी । तेचि जडोनि ठाके जीवेंसीं । चुकवितां ते गिवसी । तयातेंचि ॥ ३७ ॥ ऐसा बलात्कारु एक दिसे । तो कवणाचा एथ आग्रहो असे । हें बोलावें हृषीकेशें । पार्थ ह्मणे ॥ ३८ ॥

**"तर देवा! ज्ञान्यांची स्थिति सुद्धां बिघडून तेही मार्ग सोडून आडमार्गानें जातांना आह्मी पहातों, हें कसें? २३२ ते सर्वज्ञ असतात; त्यांना उपाय सुद्धां माहित असतो; असें असून**

१ बिघडते. २ वेगळें. ३ व्यभिचार करतात, आपलेपणा सोडतात. ४ भेद. ५ एखादे वेळीं. ६ चांगल्या दृष्टीचा, सारासार विचार जाणणारा. ७ चुकतो, भलतेंच करतो. ८ तृप्त होत नाहींत. ९ गांवाला, देशाला. १० घातलें जातात. ११ राक्षशीण. १२ शोधीत येते.

**तेही स्वकीय आचार सोडून परधर्माप्रमाणें वागतात, तें कोणत्या गुणामुळें? २३३ हें बीं; आणि हें भूस; हें जसें आंधळ्याला दिसत नाहीं, त्याप्रमाणें एखादे वेळीं चांगल्या दृष्टीच्या मनुष्याला सुद्धां दिसत नाहीं. तोही भ्रमांत पडतो. तो कां? २३४ असलेला संग ज्यांनीं सोडून दिलेला असतो, तेच संसर्ग करतांना तृप्त होत नाहींत! वनवासी सुद्धां गांवांत येऊन राहतात! २३५ आपण तर लपून राहातात; पापाला सर्वस्वी चुकवितात; पण दुसऱ्याला मात्र बलात्कारानें त्यांत ढकलतात. २३६ त्यांची एक राक्षशीण* आहे. ती प्राण घेण्यांत मोठी तत्पर. पण तीच जिवाला अगदीं चिकटून असते. तिला चुकवावयाला गेला, तर त्याला ती शोधून काढते!" २३७ अर्जुन ह्मणतो "असा एक जुलूम आढळून येतो. तो कोणाचा आग्रह? तेवढें देवांनीं सांगावें." २३८**

श्रीभगवानुवाच-

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः।

महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम्॥३७॥

[श्रीभगवानुवाच–] तंव हृदयकमळ आराम। योगियांचा निष्काम। तो ह्मणतसे पुरुषोत्तम। सांगेन आइक॥ ३९॥ [काम एष क्रोध एषः] तरी हे काम क्रोध पाहीं। जयांतें कृपेची सांठवण नाहीं। हे कृतांताच्या ठायीं। मानिजती॥ २४०॥ हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरीचे वाघ। भजनमार्गींचे मांग। मारक जे॥ ४१॥ हे देहदुर्गींचे धोंडे। इंद्रियग्रामींचें कोंडे। यांचें व्यामोहादिक बंड। जगावरी॥ ४२॥ [रजोगुणसमुद्भवः] हे रजोगुणं मानसाचे। समूळ आसुरियेचे। धायपण ययांचें। अविद्या केलें॥ ४३॥ हे रजाचे कीर जाहाले। परी तमासी पढियंते भले। तेणें निजपद यां दीधलें। प्रमाद मोह॥ ४४॥ हे मृत्यूच्या नगरीं। मानिजती निकियापरी। जे जीविताचे वैरी। ह्मणऊनियां॥ ४५॥ [महाशनः] जयांसि भुकेलियां आमिषा। हें विश्व न पुरेचि घांसा। कुळवाडियाचि आशा। चाळीत असे॥४६॥ कौतुकें कवळितां मुठी। जिये चवदा भुवनें थेंकुटीं। तिये भ्रांतिही धाकुटी। वाल्हीदुल्ही॥४७॥ जे लोकत्रयाचें भातुकें। खेळतांचि खाय कवतिकें। तिच्या दासीपणाचेनि बिकें। तृष्णा जिये॥ ४८॥ हें असो मोहें मानिजे। यांतें अहंकारें घेपें दीजे। जेणें जग आपुलिया भोजें। नाचवीत असे॥ ४९॥ [महापाप्मा] जेणें सत्याचा भोकसा काढिला। मग असत्य तृणकुटा भरिला। तो दंभ रूढविला। जगीं इहीं॥२५०॥ साध्वी शांति नागविली। मग माया मांगी शृंगारिली। तियेकरवीं विटाळविलीं। साधुवृंदें॥ ५१॥ इहीं विवेकाची त्रांय फेडिली। वैराग्याची साल काढिली। जितयां मान मोडिली। उपशमाची॥ ५२॥ इहीं संतोषवन खांडिलें। धैर्यदुर्ग पाडिलें। आनंदरोप सांडिलें। उपडूनियां॥ ५३॥ इहीं बोधाचीं रोपें लुंचिलीं। सुखाची लिपिही पुसिली। जिव्हारीं आगी सूंदली। तापत्रयाची॥ ५४॥ हे आंगा तंव घडले। जीवींचि आंथि जडले। परी नातुडती गिंवसिले। ब्रह्मादिकां॥५५ हे चैतन्याचे शेजारीं। वसती ज्ञानाच्या एका हारीं। [विद्ध्येनमिह वैरिणं] ह्मणोनि प्रवर्तती महामारी। सांवरती ना॥ ५६॥ हे जळेंवीण बुडविती। आगीवीण जाळिती। न बोलतां कवळिती। प्राणियांतें॥ ५७॥ हे शस्त्रेंवीण सोंधिती। दोरेंवीण बांधिती। ज्ञानियासी तरी वधिती। पैज घेउनी॥ ५८॥ हे चिखलेंवीण रोविती। पाशेंवीण गोविती। हे कवणाजोगे न होती। आंतुवटपणें॥५९॥

**तेव्हां, हृदयाचें विश्रांतिस्थान; योग्यांचें निर्हेतुक साधन; असा जो पुरुषोत्तम तो ह्मणाला "सांगतों. ऐक. २३९ बाबा! हे काम आणि क्रोध. हे केवळ काळासारखे आहेत. ह्यांना दया ह्मणून लेशमात्र नाहीं. २४० हे ज्ञानाच्या ठेवीवरचे भुजंग; विषयाच्या खोऱ्यांतले वाघ; आणि भजनमार्गांतले जीव घेणारे हे मांग होत. २४१ हे देहरूप किल्ल्याचे धोंडे; इंद्रियरूप गांवाचें गांवकुसूं; यांचें अज्ञानादिक बंड सर्व**

* येथें 'इच्छा' ही राक्षशीण असें समजावें.

१ हृदयाला रममाण करणारा, हृदयविश्राम. २ योगी ज्याचें निर्हेतुकपणें साधन करतात. ३ लवलेश. ४ ज्ञानरूप ठेव्यावरचे. ५ विषयरूप खोऱ्यांतले. ६ मारेकरी. ७ दगड. ८ गांवकुसूं. ९ अज्ञानादिक. १० रजोगुणरूप दोर. ११ अविद्येचे. १२ दाईपणा. १३ मायेनें. १४ रजोगुणापासून. १५ निश्चयेंकरून. १६ आवडते. १७ असावधपणा. १८ मित्राप्रमाणें.

१ भक्ष्याला, खावयाला. २ उदीम, व्यापार. ३ उलटापालट करीत. ४ लहान. ५ फार प्रिय, जिवलग. ६ भातुकली. ७ कौतुकानें, सहज. ८ बळें. ९ तृष्णा जिवंत असते. १० देवघेव होते. ११ हौसेनें. १२ आंतील गर्भ. १३ पेंढा. १४ संतसमूह. १५ आश्रय. १६ जिवंत. १७ शांतीची. १८ खोदलें. १९ तोडलीं. २० नांव. २१ जिव्हाळ्यांत. २२ घातली. २३ आहेत. २४ सांपडत नाहींत. २५ मारतात.

जगावर चालू आहे. २४२ हे रजोगुणरूप मानसाच्या दोऱ्या; हे नखशिखांत आसुरी संपत्तीपासून झालेले असून अविद्यारूप दाईनें ह्यांना पोसलेले आहेत. २४३ हे रजोगुणापासून झालेले आहेत तरी, तमाचे मोठे आवडते. त्यानें प्रमाद व मोह हे आपले अधिकार ह्यांस दिले आहेत. २४४ हे जीविताचे मोठे वैरी असल्यामुळें मृत्यूच्या शहरांत यांचा मित्रभाव मोठा. २४५ हे भुकेले ह्मणजे हें विश्व त्यांच्या एका घासालाही पुरणार नाहीं. व्यवसायाची आशा मात्र वृद्धिंगत करीत असतात. २४६ तिनें सहज लीलेनें मूठ झांकली, तर चवदा भुवनांचासुद्धां त्यांत पत्ता लागावयाचा नाहीं. भ्रांति ही तिची आवडती कन्या. २४७ ही खेळतांना त्रैलोक्याची भातुकली करून कौतुकानेंच खाऊन टाकते. हिचा दासीपणा करण्याला तृष्णा ही सदासर्वकाल तत्पर असते. २४८ हें असो. मोह ह्यांचा मान राखतो; आणि आपल्या हौसेनें जगास नाचविणारा अहंकार हा त्यांच्याशीं देवघेव करीत असतो. २४९ ह्यांनीं सत्याचा कोथळा बाहेर पाडून त्यांत गवताचा पेंढा भरला, आणि जगांत दंभ वाढवून सोडला. २५० शांतिरूप पतिव्रता लुटली. आणि मायारूप मांगीं शृंगारून तिच्याकडून साधुसमुदाय विटाळून सोडला. २५१ ह्यांनीं विवेकाचा आश्रम जमीनदोस्त केला; वैराग्याचें चामडें काढलें; उपशमाची जिवंतपणींच मान मोडली. २५२ ह्यांनीं संतोषरूपी वन तोडून टाकलें; धैर्यरूप किल्ले खणून काढले; आनंदाचें रोप उपटून फडशा पाडला. २५३ ह्यांनीं बोधरूप रोपांची खची केली; सुखाचें नांव पुसून टाकलें; मुळांत तापत्रयाची आग घातली. २५४ हे शरीराबरोबर घडलेले आहेत; जिवांबरोबर खिळलेले आहेत; परंतु शोधावयाला गेलें तर ब्रह्मादिकांनासुद्धां सांपडत नाहींत. २५५ हे चैतन्याचे शेजारी असून ज्ञानाच्या एका आळींत राहणारे आहेत. ह्मणून मोठी मारामारी करावयाला धांवतात. ऐकत नाहींत. २५६ हे पाण्याशिवाय बुडवितात; आगीशिवाय जाळतात; न बोलतां प्राण्याला मिठी घालतात. २५७ हे शस्त्राशिवाय मारतात; दोराशिवाय बांधतात; ज्ञान्याला तर पैज मारून ठार करतात. २५८ हे चिखलाशिवाय रुतवितात; दांव्याशिवाय जखडून ठेवतात; बळकटपणामध्यें तर ते कोणालाच ऐकत नाहींत.” २५९

धूमेनाव्रियते वह्निर्यथाऽदर्शो मलेन च ।
यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

[यथोल्बेनावृतो गर्भः] जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनि घेपे व्याळीं । ना तरी उल्वाची खोळी । गर्भस्थासी ॥ २६० ॥ [धूमेनेति] कां प्रभावीण भानु । धूमेंवीण हुताशनु । जैसा दर्पण मळहीनु । कहींचि नसे ॥ ६१ ॥ [तथा तेनेदमावृतं] तैसें इहींवीण एकलें । आह्मीं ज्ञान नाहीं देखिलें । जैसें कोंडेनि पांगुतलें । बीज निपजे ॥ ६२ ॥

“ज्याप्रमाणें साप चंदनाची मुळी कवटाळून धरतो, किंवा गर्भाभोंवतीं जसें गर्भवेष्टण असतें; २६० किंवा प्रभेवांचून सूर्य; धूम्राशिवाय अग्नि; मळाशिवाय आरसा कधींच असत नाहीं, २६१ त्याप्रमाणें ह्यांच्याशिवाय ज्ञान आह्मीं कधींच पाहिलेलें नाहीं. बीज जसें कोंड्यानें आच्छादलेलें असतें,” २६२

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।
कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणाऽनलेन च ॥ ३९ ॥

[आवृतं ज्ञानमेतेन] तैसें ज्ञान तरी शुद्ध । परी इहीं असे प्ररुद्ध । [ज्ञानिनो नित्यवैरिणा] ह्मणोनि तें अगाध । होऊनि ठेलें ॥ ६३ ॥ आधीं यांतें जिणावें । मग तें ज्ञान पावावें । [कामेत्यर्ध] तंव पराभवो न संभवे । रागद्वेषां ॥ ६४ ॥ यांतें सैंधावया लागीं । जें बळ आणिजे आंगीं । तें इंधनें जैसीं आगी । सावावो होय ॥ ६५ ॥

“तसें, ज्ञान शुद्धच आहे तरी तें, ह्यांनीं रोधलेलें असतें. ह्मणूनच तें फार खोल होऊन बसलें आहे. २६३ आधीं यांना जिंकावें, आणि मग तें ज्ञान मिळवावें. तोंपर्यंत रागद्वेषांचा पराभव होणें संभवनीय नाहीं. २६४ ह्यांना मारण्यासाठीं जें बळ आंगीं आणावें तें, किंवा जे जे उपाय

१ शोधून. २ घेते. ३ गर्भवेष्टणा चर्मांची. ४ पिशवी. ५ कधींच. ६ कोंड्यानें. ७ आच्छादलेलें. ८ रोधलेलें. ९ जिंकावें. १० मारण्यास. ११ सहाय्य.

**करावेत ते ते, जळणानें आगीला साह्य केल्या-प्रमाणें," २६५**

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ।
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तैसे उपाय किजती जे जे । [एतैरित्यर्धं] ते यांसीच होती विरजे[1] । ह्मणोनि हटियातें[2] जिणिजे[3] । इहींचि जगीं ॥ ६६ ॥ ऐसियाही सांकडां[4] बोला । एक उपाय आहे भला । तो करितां जरी आंगवला[5] । तरी सांगेन तुज ॥ ६७ ॥

**"उलटें त्यानांच साह्य करतात. ह्मणून सर-तेशेवटीं जगामध्यें हट्टयांनासुद्धां जिंकतात हेच. २६६ अशा संकटाला देखील एक सांगण्या-सारखा उपाय आहे. तो तुला पसंत पडत अ-सेल तर सांगतों." २६७**

तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ।
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥४१॥

[इंद्रियाणीत्यर्धं] इयांचा पहिला कुरुंठा[6] इंद्रियें । एथूनि प्रवृत्ति कर्मातें वियें[7] । [तस्मादित्यर्धं]आधी निर्दळूं[8] घालीं तियें । सर्वथैव ॥ ६८ ॥

**"ह्यांचें मूळ वसतिस्थान इंद्रियें; तेथूनच कर्माची प्रवृत्ति होते. त्यांचेंच आधीं निर्दाळण करावें, ह्मणजे झालें." २६८**

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

मग मनाची धांव पारुषेल[9] । आणि बुद्धीची सोडवण होईल । इतुकेनि थारा मोडेल । या पापियांचा ॥ ६९ ॥

**"असें केलें ह्मणजे मनाची धांव कुंठित होऊन, बुद्धीची सोडवणूक होईल. आणि तेणें-करून ह्या पाप्यांचा थारा मोडेल." २६९**

एवं बुद्धेः परं बुद्धा संस्तभ्यात्मानमात्मना ।
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥४३॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

[संस्तभ्यात्मानमात्मना] हे अंतरींहूनि जरी फिटले । [जहीत्यर्धं] तरी निभ्रांत जाण निवटले[10] । जैसें रश्मीवीण[11] उरलें । मृगजळ नाहीं ॥ २७० ॥ तैसे राग द्वेष जरी निमाले[1] । [एवं बुद्धेः परं बुद्धा] तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ॥७१॥ ते गुरुशिष्याची गोठी[2] । पिंडापदाची[3] गांठी । तेथ स्थिर राहोनि तुठी[4] । कवणे काळीं ॥ ॥ ७२ ॥ ऐसें सकळ सिद्धांचा रावो । देवीलक्ष्मीयेचा नाहो[5] । राया ऐकें देवदेवो । बोलता जाहला ॥७३॥ आतां पुनरपि तो अनंत । आद्य[6] एकी मात । सांगेल तेथ पंडुसुत । प्रश्न करील ॥ ७४ ॥ तया बोलाचा[8] हंन पाड । कीं रसवृत्तीचा[9] निवाड । येणें श्रोतयां होईल सुरवाड[10] । श्रवणसुखाचा ॥ ७५ ॥ ज्ञानदेवो ह्मणे निवृत्तीचा । चांग[11] उठावा करुनि उन्मेषांचा[12] । मग संवाद श्रीहरिपार्थाचा । भोगावा बापा ॥ २७६ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ श्लोक ॥ ४३ ॥ ओव्या ॥ २७६ ॥

**"हे जर अंतःकरणांतून निघाले, तर ते निःसंशय ठार झालेच ह्मणून समजावें. ज्याप्रमाणें सूर्यकिरणाशिवाय मृगजळ ह्मणून निराळें कांहीं राहत नाहीं, २७० त्याप्रमाणें रागद्वेष जर नाश पावले, तर ब्रह्मींचें स्वराज्य प्राप्त झालेंच ह्मणून समजावें. मग तो आपलें आपणच सुख भोगतो. २७१ गुरुशिष्यांची गुप्त गोष्ट ती हीच; जीवब्रह्माचें ऐक्य तें हेंच; त्याठिकाणीं तूं स्थिर हो. तेथून केव्हांही ढळूं नको." २७२ ह्याप्रमाणें राजा ऐक. सकल सिद्धांचा राजा; प्रत्यक्ष लक्ष्मीदेवीचा पति; सकल देवांचा देव; असें बोलला. २७३ आतां पुन्हा तो अनंत प्रथमारंभीं एक गोष्ट सांगेल. आणि त्यावर अर्जुन प्रश्न करील. २७४ त्या भाषणाची योग्यता काय सांगावी? रसाळपणा किती वर्णन करावा? त्याच्या योगेंकरून श्रोत्यांना अप्रतिम श्रवण-सुखाचा लाभ होईल. २७५ निवृत्तीचा ज्ञानदेव ह्मणतो 'बाबानो! ज्ञानाची चांगली उठावणी करा; आणि मग श्रीहरीच्या आणि पार्थाच्या संवादाचा लाभ घ्या.' २७६**

---

१ विरजण, सहाय. २ हट्टयांस, हठयोग्यांस. ३ जिंकतात. ४ संकटाला. ५ मानवला, अनुकूळ झाला. ६ घरटें. ७ प्रसवे. ८संहार करण्याला. ९कुंठित होईल. १० मेले. ११ किरणाशिवाय.

१ नाश पावले. २ गोष्ट. ३ जीवब्रह्माची. ४ उठत नाहीं. ५ नाथ. ६ प्रथम गोष्ट. ७ समुच्चयार्थक अव्यय. ८ योग्यता. ९ रसभरितपणाचा. १० अनुकूलता, सुख. ११ चांगला. १२ ज्ञानाचा.

**तिसरा अध्याय समाप्त.**

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ४ था.

आजि श्रवणें[1]द्रिया पाहलें । जे येणें गीतानिधान[3] देखिलें । आतां स्वप्नचि हें तुकलें[4] । साचासारिखें[5] ॥ १ ॥ आधींचि विवेकाची गोठी[6] । वरि प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी[7] । आणि भक्तराज किरीटी । परिसत असे ॥ २ ॥ जैसा पंचमालाप[8] सुगंध । कीं परिमळ आणि सुस्वादें[9] । भला जाहला विनोदें[10] । कथेचा इये ॥ ३ ॥ कैसी आगळिकें[11] दैवाची । जे गंगा जोडेली अमृताची । हो कां जे तपें श्रोतयांचीं । फळा आलीं ॥ ४ ॥ आतां इंद्रियजातें[12] आघवें । तिहीं श्रवणाचें घर रिगावें । मग संवादसुख[13] भोगावें । गीताख्य हें ॥ ५ ॥ हा अतिसो[14] अति प्रसंगें । सांडूनि कथाचि ते सांगें । जे कृष्णार्जुन दोघे । बोलत होते ॥ ६ ॥ ते वेळीं संजयो रायातें म्हणे । अर्जुन आंथिला[15] दैवगुणें[16] । जे अतिप्रीती श्रीनारायणें । बोलिजत असे ॥ ७ ॥ जें न सांगेचि पितया वसुदेवासी । जें न सांगेचि माते देवकीसी । जें न सांगेचि बंधु बळिभद्रासी । तें गुह्य अर्जुनेंसीं बोलत ॥ ८ ॥ देवी लक्ष्मीये एवढी जंवळिक[17] । तेही न देखे या प्रेमाचें सुख । आजि श्रीकृष्ण प्रेमाचें बिकें[18] । यातेंचि आंथी[19] ॥ ९ ॥ सनकादिकांचेया आशा । वाढीनल्या कीरें[20] बहुवसां[21] । परी त्याही येणें मानें यशा । येतीचिना ॥ १० ॥ या श्रीजगदीश्वराचें प्रेम । येथ दिसतसे निरुपम । कैसें पार्थें येणें सर्वोत्तम । पुण्य केलें ॥ ११ ॥ हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त[23] हा आला व्यक्ती । आज एकवंकी[24] याची स्थिती । आवडेंत[25] असे ॥ १२ ॥ येऱ्हवीं हा योगियां नांडळे[26] । वेदार्थासी नांकळे । जेथ ध्यानाचेही डोळे । पावतीना ॥ १३ ॥ तो हा निजस्वरूप । अनादि निष्कंपें । परी कवणे मानें सकृप[29] । जाहला आहे ॥ १४ ॥

१ कानाला. २ उजाडलें. ३ गीतारूप ठेवा. ४ झालें. ५ खऱ्यासारखें. ६ गोष्ट, विषय. ७ जगत्श्रेष्ट. ८ पंचम+आलाप =पंचमस्वर. ९ मधुर, गोड. १० कौतुक, करमणूक. ११ गौरवी. १२ यच्चयावत् इंद्रियें. १३ प्रश्नोत्तर भाषणाचें सुख. १४ पाल्हाळ, विषयांतर. १५ युक्त झाला. १६ सत्वगुणानें, इच्छेनें. १७ सन्निध असणारी. १८ बळ, जोर. १९ आहे. २० निश्चयेंकरून. २१ पुष्कळ. २२ इतक्या मानाला. २३ निराकार. २४ एकनिष्ट. २५ वाटते. २६ आढळत नाहीं, भास होत नाहीं. २७ कळत नाहीं. २८ अढळ. २९ दयार्द्र.

हा त्रैलोक्यपटाची[1] घडी । आकाराची पैलथडी[2] । कैसा याचिये आवडी । आवरलों[3] असे ॥ १५ ॥

आज कर्णांना उजाडलें असें ह्मटलें पाहिजे. कारण त्यांनीं गीतेचा ठेवा पाहिला. आणि जी गोष्ट स्वप्नासारखी वाटत होती, ती खऱ्याप्रमाणें झाली. १ आधींच हा विषय विचाराचा; त्यांत **श्रीकृष्ण** जगजेठी प्रतिपादन करणारा; आणि भक्तशिरोमणि **अर्जुना**सारखा ऐकणारा. मग काय विचारावें? २ पंचम स्वर ज्याप्रमाणें सुगंधयुक्त असावा; किंवा परिमळ आणि माधुर्य हीं एकत्र व्हावींत; त्याप्रमाणें ह्या कथेचा मनोहरपणा उत्तम वठला आहे. ३ दैव केवढें बलवत्तर पहा! कीं ही आज अमृताची नदी मिळाली; किंवा श्रोत्यांच्या तपश्चर्याच फलद्रूप झाल्या ह्मणावयाच्या. ४ आतां एकूनएक इंद्रियांनीं कर्णमंदिरांत शिरून गीता नामक प्रश्नोत्तरभाषणसुखाचा अनुभव घ्यावा. ५ आतां हें ओघानुसार झालेलें विषयांतर सोडून देऊन, **श्रीकृष्ण** व **अर्जुन** जें भाषण बोलले तेंच सांगतों. ६ **संजय**, राजास ह्मणतोः– "ते समयीं **अर्जुना**चें अंतःकरण सद्गदित होऊन आंगावर रोमांच उभे राहिले. कारण, **श्रीकृष्णा**चें भाषण अत्यंत प्रेमयुक्त होतें. ७ जें पित्या **वसुदेवा**लाही सांगितलें नाहीं; जें माता **देवकी**लाही सांगितलें नाहीं; जें बंधु **बळिभद्रा**लाही सांगितलें नाहीं; तें गुह्य **अर्जुना**स सांगितलें. ८ देवी **लक्ष्मी**, इतकी सान्निध्याला असणारी, परंतु तिनेंसुद्धां ह्या प्रेमाच्या सुखाचा अनुभव घेतला नाहीं. इतकें श्रीकृष्णप्रेमाचें वळ

१ त्रैलोक्यरूप वस्त्राची. २ परतीर. ३ स्वाधीन झाला आहे.

**ह्या एका अर्जुनालाच आज आहे. ९ सनकादिकांच्या बहुत कालापासून वाढत आलेल्या आशा खऱ्या,परंतु त्यासुद्धां इतक्या फलद्रूप होण्याच्या मानास पात्र झाल्या नाहींत. १० ह्या श्रीजगदीश्वराचें प्रेम, येथें–ह्या अर्जुनाच्या ठिकाणीं–अगदीं निरुपम दिसतें. मग अर्जुनानें असें सर्वोत्तम पुण्य कोणतें केलें असेल तें असो. ११ अहो! ज्याच्या भक्तीस्तव हा निर्गुण असून सगुण झाला. मला तर त्याची स्थिति एकनिष्ठ वाटते. १२ नाहीं तर, हा योग्यांना आढळत नाहीं; वेदार्थाला कळत नाहीं; ध्यान करूनही ज्याच्या ठिकाणीं नेत्र पोंचत नाहींत. १३ तो हा निजस्वरूप, अनादि, अचल असा असतां कोणत्या कारणानें दयार्द्र झाला? १४ हा त्रैलोक्यरूप वस्त्राची घडी; आकाराचें परतीर*; तो ह्याच्या कसा स्वाधीन झाला पहा!" १५**

श्रीभगवानुवाच–

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ १ ॥

[श्रीभगवानुवाच—इममिति] मग देव ह्मणे पंडुसुता । हाचि योग आह्मीं विवस्वता । कथिला परी ते वार्ता । बहुवा दिवसांची ॥ १६ ॥ [विवस्वानिति] मग तेणें विवस्वतें रवी । हे योगस्थिति आघवी । निरूपिली बरवी । मनुप्रति ॥ १७ ॥ मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुंवा उपदेशिली । [एवं परंपराप्राप्तं] ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा ॥ १८ ॥

**मग देव ह्मणतात "पंडुसुता! ह्याच योग आह्मी विवस्वताला सांगितला, परंतु त्या गोष्टीला फार दिवस होऊन गेले. १६ मग त्या +विवस्वतसूर्यानें, ही सर्व योगस्थिति मनूला साद्यंत सांगितली. १७ मनूनें तिचा अनुभव घेतला, आणि मग ती त्यानें आपला पुत्र जो इक्ष्वाकु त्याला सांगितली. अशी ह्याची मूळ परंपरा चालत आली आहे." १८**

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥

[इमं राजर्षयो विदुः] मग आणिकही या योगातें । राजर्षि जाहले जाणते । [स कालेनेह महता योगो नष्टः] परी तेथोनि आतां सांप्रतें । नेणिजे कोण्ही ॥ १९ ॥ जें प्राणीयां कामीं भर । देहाचिवरी आदर । ह्मणोनि पडिला विसर । आत्मबोधाचा ॥ २० ॥ अव्हांटलिया आस्थाबुद्धि । विषयसुखचि परमावधि । जीव तैसा उपाधि । आवडे लोकां ॥ २१ ॥ येरवीं तऱ्ही खवणेंयांच्या गांवीं । पाटावें काय करावीं । सांगें जात्यंधा रवी । काय आंधि ॥ २२ ॥ कां बहिरयाच्या आस्थानीं । कवण गीतातें मानी । कीं कोल्हेयां चांदणी । आवडी उपजे ॥ २३ ॥ पैं चंद्रोदया आरौतें । जयांचे डोळे फुटती असते । ते कावळे केविं चंद्रातें । वोळखती ॥ २४ ॥ तैसी वैराग्याची शिंवें न देखती । जे विवेकाची भाषा नेणती । ते मूर्ख केविं पावती । मज ईश्वरातें ॥ २५ ॥ कैसा नेणों मोहें वाढिनला । तेणें बहुतेक काळ व्यर्थ गेला । ह्मणोनि योग हा लोपला । लोकीं इये ॥ २६ ॥

**"त्यानंतर आणखीही कितीएक राजर्षींना हा योग माहीत झाला. पण तेव्हांपासून आतांपर्यंत मात्र कोणास माहीत नाहीं. १९ कारण, सर्व प्राणिमात्रांची विषयसेवनावर आवड; आणि देहावरच प्रेम; असें झाल्यामुळें आत्मबोधाचा विसर पडला. २० आस्तिक्यबुद्धि आडमार्गानें गेल्यामुळें, विषयसुख हीच कायती शेवटची मर्यादा असें वाटून, संसार यातनाही जिवाप्रमाणेंच लोकांस आवडूं लागल्या. २१ दिगंबर राहणाऱ्यांच्या गांवीं उंची वस्त्रें काय कामाचीं? जन्मांधांना सूर्य काय होय? सांग. २२ किंवा, बहिऱ्यांच्या सभेंत गायनाला मान देणार कोण? चोरांना चांदणें आ-**

* ह्मणजे आकाराहून निराळा. आकारातीत असें समजावें.
+ हें बारा सूर्यांपैकीं एका सूर्याचें नांव आहे. विवस्वान अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण, मित्र, शक्र व उरुक्रम, असे हे बारा आदित्य कश्यपऋषीपासून अदितीचेठायीं उत्पन्न झाले"

१ पूर्वी सांगितलेला मनोनिग्रह करण्याचा योग. २ बारा आदित्यांपैकीं, विवस्वत नांवाचा जो सूर्य, त्यास. ३ फार. ४ त्या विवस्वत नांवाच्या सूर्यानें. ५ सर्व. ६ मनूला. ७ इक्ष्वाकुनामक ज्येष्ठ पुत्राला. (विवस्वताचा पुत्र वैवस्वतमनु, वैवस्वतमनूचा पुत्र इक्ष्वाकु. हा शिंकेपासून उत्पन्न झाला होता. ह्मणून त्यास हें नांव पडलें.)

१ कारण. २ विषयसेवनामध्यें. ३ प्रीति. ४ आडमार्गानें जात असल्यामुळें. ५ सार्थक. ६ वाटतें. ७ दिगंबर–नग्न राहणाऱ्यांच्या. ८ उंची वस्त्रें. ९ जन्मांधाला. १० होय. ११ सभेंत. १२ चोरांना. १३ तसेंच. १४ आधींच. १५ सीमा. १६ विचाराची. १७ श्रम.

वडणार कसें ? २३ तसेंच, चंद्रोदय होण्यापूर्वींच ज्यांचे असलेले डोळे* फुटून जातात, ते कावळे चंद्राला ओळखणार कसे ? २४ त्याप्रमाणें वैराग्याची सीमासुद्धां ज्यांनीं पाहिलेली नाहीं; विवेकाचें नांवसुद्धां ज्यांस माहीत नाहीं; ते मूर्ख मला ईश्वराला पावणार कसे ? २५ हा मोह फैलावला कसा, हें समजत नाहीं. पण त्यामुळें बहुत काल व्यर्थ गेला, आणि ह्या लोकांमध्यें योगाचा लोप झाला." २६

स एवाऽयं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥३॥

[स एवेति] तोचि हा आजि आतां । तुजप्रति कुंतीसुता । सांगीतला आह्मीं तत्त्वता । भ्रांति न करीं ॥ २७ ॥ [रहस्यं ह्येतदुत्तमं] हें जीवींचें निज गुज । परी केवि राखों तुज । जे पढियेसी तूं मज । ह्मणऊनियां ॥ २८ ॥ [भक्तोसि मे सखा चेति] तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा । मैत्रियेची चित्कळा । धनुर्धरा ॥ २९ ॥ तूं अनुसंगाचों ठावो । आतां तुज काय वंचों जावों । जऱ्ही संग्रामारूढ आहों । जाहलों आह्मी ॥ ३० ॥ तरी नावेक हें सहावें । गाजाबज्यही न धरावें । परी तुझें अज्ञानत्व हरावें । लागे आधीं ॥ ३१ ॥

"हे कुंतीसुता ! तोच हा योग तुला आज आतां आह्मीं यथातथ्य सांगितला. आतां भ्रांति धरूं नको. २७ ही गोष्ट अगदीं प्राणतुल्य आहे, तरी ती तुझ्यापासून लपवून कशी ठेवावी ? कारण, तूं तर माझा जिवलग पडलास. २८ धनुर्धरा ! तूं प्रेमाची मूर्ति; भक्तीचा उगम; आणि मित्रतेचा जीव आहेस. २९ सकल विश्वासाचें स्थळ तूं; आणि तुझ्या ठिकाणींच आज प्रतारणा करूं होय ? आह्मी जरी युद्धाला सिद्ध झालों आहों; ३० तरी गडबडून उपयोगी नाहीं. क्षणभर धीर धरून आधीं तुझें अज्ञान नाहींसें केलें पाहिजे." ३१

* येथें 'डोळे फुटून जातात' ह्याचा अर्थ निरुपयोगीं होतात इतकाच घ्यावयाचा.

१ गुप्त ठेवूं. २ जिवलग. ३ मैत्रीचा. ४ जीव. ५ विश्वासाचा. ६ प्रतारणा करावी ? ७ युद्धाला सिद्ध. ८ क्षणभर. ९ गडबड.

अर्जुन उवाच-
अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति॥ ४ ॥

[अर्जुन उवाच-] तंव अर्जुन ह्मणे श्रीहरी । माय आपुलेयाची स्नेह करी । तेथ विस्मय काय अवधारीं । कृपानिधे ॥ ३२ ॥ तूं संसारश्रांतांची साउली । अनाथ जीवांची माउली । आमुतें कीरें प्रसवली । तुझीच कृपा ॥ ३३ ॥ देवा पांगुळ एकाधें विईजे । तरी जन्मोनि जोजार साहिजे । तें बोलों काय तुझें । तुजचि पुढां ॥ ३४ ॥ आतां पुसेन जें मी कांहीं । तेथें निकें चित्त देईं । तेवींचि देवें कोपावें नाहीं । बोला एका ॥ ३५ ॥ [त्वमादौ प्रोक्तवानिति] तरी मागील जे वार्ता । तुवां सांगितली होती अनंता । ते नावेक मज चित्ता । मानेचिना ॥३६॥ [परं जन्म विवस्वतः] जे तो विवस्वत ह्मणजे कायी । ऐसें हें वडिलां ठाउवें नाहीं । तरी तुवांचि केविं कहीं । उपदेशिला ॥ ३७ ॥ तो आइकिजे बहुतां काळांचा । [अपरं भवतो जन्म] आणि तूं तव श्रीकृष्ण सांपेचों । ह्मणोनि गा इये मांतुचा । विसंवाद ॥ ३८ ॥ तेवींचि देवा चरित्र तुझें । आपण कांहींचि नेणिजे । हें लटिकें केविं ह्मणिजे । एकिकिहेळां ॥ ३९ ॥ [कथमेतद्विजानीयां] परी हेचि मातु आघवी । मी परियेसें ऐशी सांगावी । जे कां तुवां तया रवी । उपदेश केला ॥ ४० ॥

तेव्हां अर्जुन ह्मणाला "श्रीहरि ! कृपानिधे ! ऐका. माता आपल्या बालकावर स्नेह करते ह्यांत आश्चर्य तें काय ?. ३२ तूं संसारतापानें तप्त झालेल्याची सावली आहेस; अनाथ जीवांची माउली आहेस; आणि खरोखर तुझ्या कृपेकरूनच आह्मी जन्मास आलों. ३३ देवा ! एखादें पांगळें पोर जन्मास आलें, तर जन्मापासून त्याचा जंजाळ सोसलाच पाहिजे. हें तुझें तुझ्यापुढेंच काय बोलून दाखवावें ? ३४ आतां मी जें कांहीं विचारीन, तिकडे लक्ष्य द्यावें. आणि तसेंच देवांनीं एका प्रश्नाचा राग मानूं नये. ३५ तो प्रश्न हा कीं, अनंता ! तूं कालांतरींची ह्मणून ही गोष्ट सांगितलीस खरी; पण ती माझ्या मनाला क्षणभर सुद्धां मान्य होत नाहीं. ३६ कारण, तो सूर्य ह्मणजे

१ लेंकराचा. २ निश्चयेंकरून. ३ पोटीं आलें. ४ जन्मापासून. ५ त्रास. ६ नीट. ७ क्षणभर सुद्धां ८ माहीत. ९ आलीकडचा, आजचा. १० आपणाचा. ११ विरोध. १२ एकदम. १३ सूर्याला.

**काय ? कधींचा ? हें वाडवडिलांस सुद्धां ठाउक नाहीं. असें असतां, त्याला तूंच कसा आणि केव्हां उपदेश केलास ? ३७ सूर्य हा अनादि आहे असें ऐकतों. आणि तूं श्रीकृष्ण तर आजचा. ह्मणून ही गोष्ट विरुद्ध दिसते. ३८ देवा ! तुझें चरित्र आपणास कांहींच कळत नाहीं. बरें; हें एकदम लटिकें तरी कसें ह्मणावें ? ३९ ह्याकरितां तुह्मीं सूर्याला कसा काय उपदेश केलात, तो सर्व वृत्तांत माझ्या नीट लक्ष्यांत येईल असा सांगावा." ४०**

श्रीभगवानुवाच-

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ।
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥

[श्रीभगवानुवाच-] तंव श्रीकृष्ण ह्मणे पंडुसुता । तो विवस्वत जैं होता । तैं आह्मी नसों ऐसी चित्ता । भ्रांति जरी तुज ॥ ४१ ॥ तरी तूं गा हें नेणसी । [बहूनि मे व्यतीतानीति] पैं जन्में आह्मा तुह्मासी । बहुतें गेलीं [न त्वं वेत्थ परंतप] परी न स्मरसी । आपुलीं तूं ॥ ४२ ॥ [तान्यहं वेद सर्वाणि] मी जेणें जेणें अवसरें । जें जें होऊनि अवतरें । तें तें समस्तही स्मरें । धनुर्धरा ॥ ४३ ॥

**तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले "पंडुसुता ! तो सूर्य ज्या वेळीं होता, त्या वेळीं आह्मी नव्हतों, अशी तुझ्या चित्ताला जरी भ्रांति उत्पन्न झाली आहे, ४१ तरी, तुमचे व आमचे जन्म बहुत होऊन गेले. त्यांची स्मृति नसल्यामुळें तुला तें समजत नाहींत. ४२ पण धनुर्धरा ! मी ज्या ज्या वेळीं जे जे अवतार घेऊन प्रगट होतों, ते ते सर्व मला स्मरतात." ४३**

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥

[अजोऽपि सन्] ह्मणोनि हें आघवें । मागील मज आठवे । मी अजही [संभवाम्यात्ममायया] परि संभवें । प्रकृतियोगें ॥ ४४ ॥ [अव्ययात्मा] माझें अव्ययत्व तरी न नसे । परी होणें जाणें एक दिसे । तें प्रतिबिंबे मायावशें । माझ्याचि ठायीं ॥ ४५ ॥ माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीन ऐसा आवडे । तेंही भ्रांति बुद्धि तरी घडे । येऱ्हवीं नाहीं ॥ ४६ ॥ कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें । येऱ्हवीं काय वस्तुविचारें । दुजें आहे ॥ ४७ ॥ तैसा अमूर्तचि मी किरीटी । [प्रकृतिं स्वामधिष्ठाय] परी प्रकृति जैं अधिष्ठीं । [भूतानामीश्वरोऽपि सन्] तैं साकारपणें नटनटीं । कार्यालागीं ॥ ४८ ॥

**"ह्मणून हें पाठीमागचें सर्व मला आठवतें. मी जन्मरहित आहें; तरी मायेच्या योगानें मला जन्म घ्यावा लागतो. ४४ तरी माझी अविनाशता भंग होत नाहीं. माझ्या ठायीं एक होणेंजाणें दिसतें, तें मायेच्या योगानें भासतें. ४५ त्याच्या योगानें माझी स्वतंत्रता मोडत नाहीं; तरी पण मी कर्माधीन आहें असें वाटतें. तें देखील अविद्यावृत बुद्धीनें पाहिलें तर. येऱ्हवीं नाहीं. ४६ एकाचेंच दुसरें प्रतिबिंब दिसतें, तें आरशामुळें दिसतें. बाकी सारासार विचारानें पाहिलें तर ती वस्तु दुसरी का असते ? ४७ तसा किरीटी ! मी हा निराकारच. पण कार्यासाठीं मायेला वश होऊन नटासारखा नटतों." ४८**

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥

[तदात्मानं सृजाम्यहं] जें धर्मजात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें । ऐसा ओघ हा स्वभावें । आद्य असे ॥ ४९ ॥ ह्मणोनि अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्तपणही नाठवीं । [यदा यदा हीति पादाः ३] जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्म हा ॥ ५० ॥

**"धर्म ह्मणून जितके आहेत, त्या सर्वांचें युगायुगामध्यें म्यां संरक्षण करावें, असा पूर्वापार चालत आलेला ओघ आहे. ४९ ह्याकरितां अधर्म हा धर्माचा ऱ्हास करूं लागतो तेव्हां, मी जन्मरहितपणा एका बाजूस ठेवतों; निराकारपणा मनांत आणीत नाहीं," ५०**

---

१ विवस्वत नांवाचा सूर्य. २ ज्या ज्या वेळीं. ३ सर्व. ४ जन्मरहित. ५ अवतार घेतों, देह धारण करतों. ६ मायेच्या योगानें. ७ अविनाशित्व. ८ नाश होत नाहीं. ९ भासतें. १० मायेच्या योगानें.

१ वाटतो. २ खरा विचार केला तर. ३ निराकार. ४ माया. ५ स्वीकार करतो, वश होतो. ६ सगुणरूपानें, देह धारण करून. ७ नटासारखी भूमिका घेतो. ८ कारणासाठीं. ९ सारे धर्म. १० सर्व. ११ प्रत्येक युगांत. १२ सृष्टिक्रम. १३ आपोआप चालत आलेला. १४ अनादि. १५ जन्मरहितपणा. १६ निराकारपणासुद्धां. १७ आठवीत नाहीं. १८ भासतो.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ ॥

[ परित्राणाय साधूनां ] ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकार होऊनि अवतरें । [विनाशाय च दुष्कृतां] मग अज्ञानाचे आंधारें । गिळूनि घालीं ॥ ५१ ॥ अधर्माची अवधी तोडीं । दोषांचीं लिहिलीं फाडीं । सज्जनाकरवीं गुढी । सुखाची उभवीं ॥ ५२ ॥ दैत्यांचीं कुळें नाशीं । [धर्मसंस्थापनार्थाय] साधूंचा मान गिंवशीं । धर्मासीं नीतीसीं । शेंस भरीं ॥ ५३ ॥ मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळीं । तैं योगियां पाहे दिवाळी । निरंतर ॥ ५४ ॥ स्वसुखें विश्व कोंदे । धर्मचि जगीं नांदे । भक्तां निघती दोंदें । सात्विकांचीं ॥ ५५ ॥ तैं पापांचा अंचळ फिटे । पुण्याची पहांट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ॥५६॥ [संभवामि युगे युगे] ऐसेया काजालागीं । अवतरें मी युगीं युगीं । परी हेंचि वोळखे जो जगीं । तो विवेकियाँ ॥ ५७ ॥

**"आणि तशा प्रसंगीं आपल्या भक्तांच्या कैवारासाठीं अवतार घेऊन—ह्मणजे देह धारण करून—येतों, व अज्ञानांधःकार सारा गिळून टाकतों. ५१ अधर्माची आयुष्य मर्यादा खुंटवितों; दोषांचे लेखपट फाडून टाकतों; आणि सज्जनांकडून सुखाचा ध्वज उभारतों. ५२ दैत्यांचा कुलक्षय करतों; साधूंचा मान राखतों; धर्माचें आणि नीतीचें लग्न लावून देतों. ५३ मी अविवेकाची काजळी काढून, विवेकदीप प्रज्वलित करतों, तेव्हां योग्यांना निरंतरची दिपवाळीच होऊन जाते. ५४ आत्मसुखानें विश्व भरून जातें; जगामध्यें धर्माचा प्रसार होतो; आणि भक्तजनांच्या सात्विकतेचीं दोंदें वाढतात. ५५ अर्जुना! माझी मूर्ति जेव्हां प्रगट होते, तेव्हां पातकांचा पर्वत फुटतो, आणि पुण्याचा उदय होतो. ५६. अशा कार्यासाठींच मी युगायुगीं अवतार धारण करतों, हें ज्यास कळतें तो ज्ञानी." ५७**

१ स्वभक्तांच्या. २ सगुण रूप धरून. ३ अवतरतों. ४ काळोख. ५ नाहींसा करतो. ६ सीमा, वई. ७ करारपत्रें. ८ ध्वजा. ९ उभारतों. १० वाढवितों. ११ लग्न लावून देतों, शेज भरतों. १२ काढून. १३ उजाडतें. १४ भरतें. १५ पोटें फुगतात, विपुलता होते. १६ शुद्धसत्वाचीं. १७ पर्वत. १८ उजाडतें. १९ विचारी, ज्ञानी.

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥९॥

[जन्मेति] माझें अजत्वें जन्मणें । अक्रियताचि कर्म करणें । हें अविकार जो जाणे । तो परममुक्त ॥ ५८ ॥ [त्यक्त्वेति] तो चालिलासंगें न चले । देहींचा देहीं नाकळे । मग पंचत्वीं तंव मिळे । माझ्याचि रूपीं ॥ ५९ ॥

**"माझें जन्मादि विकारराहित्यानें जन्मास येणें; अक्रियतेनें कर्म करणें; हें विकार रहित आहे असें जो जाणतो, तो परमयुक्त असें समजावें. ५८ तो चालल्याच्या संगतीनें चालत नाहीं; देहधारी असून देहांत आकळत नाहीं. आणि शेवटीं तर माझ्याच स्वरूपांत—पंचत्वांत—मिळतो." ५९**

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ १० ॥

[वीतरागभयक्रोधाः] येऱ्हवीं पैरापर न शोचिती जे कामनाशून्य होती । वोटा कोणे वेळीं न वंचती । क्रोधाचिया ॥ ६०॥ [मन्मया मामुपाश्रिताः] सदा मियांचि आंथिले । माझिया सेवा जियाले । कीं आत्मबोधें तोषले । वीतराग जे ॥६१॥ जे [बहवो ज्ञानतपसा पूताः] जे तपोतेजाचिया राशी । कीं एकायतन ज्ञानासी । जे पवित्रता तीर्थांसी । तीर्थरूप ॥६२॥ [मद्भावमागताः] ते मद्भावा सहजें आले । मी तेचि ते होऊनि ठेले । जें मज तयां उरले । पदर नाहीं ॥६३॥ सांगें पितळेचि गंधिकाळिक । जैं फिटली होय निःशेख । तैं सुवर्ण काइ आणिक । जोडूं जाइजे ॥ ६४ ॥ तैसे यमनियमीं कडसले । जे तपोज्ञानें चोखाळले । मी तेचि ते जाहले । एथ संशयो कायसा ॥ ६५ ॥

**"आणखी, जे आपल्याबद्दल किंवा दुसऱ्याबद्दल—शोक करीत नाहींत; जे कामनाशून्य असतात; क्रोधाच्या वाटेलाही कधीं जात नाहींत; ६० जे निरंतर माझ्याच योगानें भाग्यवान्; माझ्या सेवेसा-**

१ जन्मरहितपणानें. २ क्रियारहितपणानें. ३ विकाररहित. ४ चालत असलेल्याच्या. ५ आकळला जात नाहीं, बद्ध होत नाहीं. ६ मरणकाळीं. ७ आपपर, मागीलपुढील. ८ शोक करीत नाहींत. ९ मार्गाला, वाटेला. १० जात नाहींत. ११ माझ्याचमुळें. १२ थोर. १३ वांचलेले. १४ निरिच्छ. १५ एकच स्थान. १६ माझ्या स्वरूपाला. १७ कारण. १८ माझ्यामध्यें. १९ अंतर, आडपडदा. २० गंज, कीट. २१ इंद्रियनिग्रहानें. २२ शुद्ध झालेले. २३ निर्मळ झाले.

**ठींच वांचलेले; किंवा जे निरिच्छ, आणि आत्मबोधानें तृप्त झालेले; ६१ जे तपोतेजाची राशी; ज्ञानाचें अद्वितीय स्थान; जे पवित्र तीर्थालाही पवित्र तीर्थ; ६२ ते मत्स्वरूपाला सहजच मिळतात. मी तेंच ते होऊन राहतात. कारण, माझ्यामध्यें व त्यांच्यामध्यें पदर ह्मणून कांहीं उरतच नाहीं. ६३ पितळेंतील सारा गंज जर निखालस निघून गेला, तर सुवर्णामध्यें अधिक तें काय राहिलें? ६४ तसें यमनियमांनीं जे शुद्ध झाले, तपोज्ञानानें जे निर्मळ झाले; ते मीच झाले, ह्यांत संशय तो कसला?" ६५**

ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥

[ये यथा मां प्रपद्यंते] येन्हवीं तरी पाहीं । जे जैसे माझ्याठायीं । [तांस्तथैव भजाम्यहं] भजती तयां मीही । तैसाचि भजें ॥ ६६ ॥ [मम वर्त्मानुवर्तंते इति] देखें मनुष्यजात सकळ । हें स्वभावता भजनशीळ । जाहलें असे केवळ । माझ्या ठायीं ॥ ६७ ॥ परी ज्ञानेंवीण नाशिले । जे बुद्धिभेदासि आले । त्यांणीं एकाची येया कल्पिलें । अनेकत्वें॥६८॥ ह्मणऊनि अभेदीं भेद देखती । यया अनामेया नामें ठेविती । देवी देवो ह्मणती । अवर्चातें ॥ ६९ ॥ जें सर्वत्र सदा सम । तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें संभ्रमें । विवंचिती ॥७०॥

**"शिवाय, हेंही ध्यानांत ठेव, कीं जे जसे माझ्याठायीं भजतात, तसा मीही त्यांना भजतों. ६६ हें पहा! येथूनतेथून मनुष्यप्राणी हे सारे माझ्या ठायीं केवळ भजनशीलच आहेत. ६७ परंतु ज्ञान नसल्यामुळें, ते बिघडले आहेत. कारण, त्यांनीं मला एकालाच अनेक अशी कल्पना करून विविध धर्मपद्धति प्रगट केल्या आहेत. ६८ त्यामुळें अभेदाच्या ठिकाणीं भेद आहे असें मानतात. मी हा नामरहित असतां, मला नांवें ठेवतात. चर्चा करण्यास अशक्य असतां, कोणी 'देव' ह्मणतात, कोणी 'देवी' ह्मणतात! ६९ जें सदासर्वकाल सर्व ठिकाणीं सम, त्याचे भ्रामक बुद्धीनें उत्तम, अधम असे विभाग मानतात." ७०**

१ विविधधर्मपद्धति. २ ह्या एकाला. (मला). ३ नामरहिताला. ४ अनिर्वाच्याला. ५ भ्रामक. ६ मानतात.

कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥१२॥

[यजंत इह देवताः] मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें । मानिलीं देवतांतरें । उपासिती ॥ ७१ ॥ [कांक्षंतः कर्मणां सिद्धिं] एथ जें जें अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त । परी तें कर्मफळ निश्चित । बोळख तूं ॥ ७२ ॥ वांचूनि देतें घेतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यकें । [क्षिप्रं हीति] एथ कर्मचि फळसूचक । मनुष्यलोकीं ॥ ७३ ॥ जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तेंवांचूनि आन न निपजे । कां पाहिजे तेंचि देखिजे । दर्पणाधारें ॥ ७४ ॥ ना तरी कडेयां तळवटीं । जैसा आपुलाचि बोल किरीटी । पडिसाद होऊनि उठी । निमित्तयोगें ॥ ७५ ॥ तैसा समस्तां यां भजना । मी साक्षिभूत पैं अर्जुना । एथ प्रतिफळे भावना । आपुलाली ॥ ७६ ॥

**"आणि मग भिन्न हेतूंच्या प्रकाराप्रमाणें यथोचित उपायांनीं निरनिराळ्या मानलेल्या देवतांची उपासना करतात. ७१ तेणेंकरून त्यांस जें जें इच्छित असतें तें सारें प्राप्त होतें. परंतु तें खरोखर कर्माचें फळ आहे, हें ध्यानांत असूंदे. ७२ तरी पण तें देणारा किंवा घेणारा मजशिवाय दुसरा कोणी नाहीं, हें तूं पक्कें लक्ष्यांत ठेव. येथें ह्या मृत्युलोकांत कर्म हेंच फलसूचक आहे. ७३ शेतांत जें बीं पेरावें, त्याशिवाय अन्य कांहीं निपजत नाहीं. किंवा जें पहावें तेंच आरशामध्यें दिसतें. त्याप्रमाणें, ७४ किंवा डोंगराच्या कड्याखालीं, उभें राहिल्यामुळें जसा आपलाच शब्द, प्रतिध्वनीच्या रूपानें उठतो, ७५ तसा अर्जुना! मी सर्वांच्या भजनाला साक्षिभूत मात्र असतों. पण त्यांस फलद्रूप होणारी त्यांची त्यांची भावनाच." ७६**

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ १३ ॥

[चातुर्वर्ण्यमिति] आतां याचिपरी जाण । चाऱ्ही हे वर्ण । सृजिले म्यां गुणीं । कर्मविभागें ॥ ७७ ॥ जे प्रकृतीचेनि आधारें । गुणाचेनि व्यभिचारें । कर्में तदनुसारें । विवंचिलीं

१ ह्याशिवाय. २ खरें पाहतां. ३ त्याशिवाय. ४ अन्य, दुसरें. ५ डोंगराच्या पायथ्याला. ६ फलद्रूप होते. ७ उत्पन्न केले. ८ गुण. ९ कर्मांच्या भेदानें. १० मिश्रणाप्रमाणें. ११ मानलीं, लावून दिलीं.

। ७८ ॥ [तस्य कर्तारमपि मां] एथ एकचि हें धनुष्यपाणि । री जाहालें गा चहूंवर्णीं । ऐसी गुणकर्मकडसणी । केली हृजें ॥ ७९ ॥ [विद्ध्यकर्तारमव्ययं] ह्मणोनि आईकें पार्था । वर्णभेदसंस्था । मी कर्ता नव्हे सर्वथा । याचिलागीं॥८०॥

"अशाप्रकारें गुणांच्या आणि कर्मांच्या रादाप्रमाणें, हे चार वर्णही मींच उत्पन्न केले गाहेत. ७७ प्रकृतीच्या आधारानें, आणि गुांच्या मिश्रणानें, जातीप्रमाणें ज्यास त्यास ोग्य अशी कर्मांची व्यवस्था लावलेली आहे. ७८ हे धनुर्धरा! हे सारे मूळचे एकच आहेत. ार वर्ण झाले आहेत ते फक्त गुणकर्मांच्या प्रवस्थेनें स्वाभाविकपणें झाले आहेत. ७९ णून अर्जुना ऐक. ह्या वर्णभेदस्थापनेचा र्ता मी मुळींच नव्हें." ८०

न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा ।
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते॥१४॥

[न मामिति] हें मजचिस्तव जाहालें । परी म्यां नाहीं लें । [इति मामिति] ऐसें जेणें जाणितलें । तो सुटला गा८१

"हे वर्ण माझ्यापासून झाले आहेत तरी, मीं केलेले नव्हेत. असें जो जाणतो तो क्त." ८१

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

[एवं ज्ञात्वेति] मागील मुमुक्षु जे होते । तिहीं ऐसिया ाणोनि मातें । कर्में केलीं समस्तें । धनुर्धरा ॥८२॥ पेरितां जें जैसीं दग्धलीं । नुगवतीचि पेरिलीं । तैसीं कर्मेंचि परि यां जाहालीं । मोक्षहेतु ॥ ८३ ॥ [कुरु कर्मैवेति] एथ आकही एक अर्जुना । हे कर्माकर्मविवंचना । आपुलिये चाडें ज्ञाना । योग्य नोहे ॥ ८४ ॥

"धनुर्धरा! प्राचीनकालीं जे जे मोक्षाची च्छा करणारे होऊन गेले, त्यांनीं अशा मला ाणूनच कर्में केलीं. ८२ ह्यामुळें, पेरतांनाच ाजलेलीं बीजें जशीं उगवत नाहींत, तद्वत् ांचीं कर्मेंच त्यांस मोक्षास कारणभूत झालीं. ८३ अर्जुना! येथें आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती हीच कीं, ह्या कर्माकर्मांचा विचार शहाण्या मनुष्यानें आपल्याच मताप्रमाणें करणें बरोबर नाहीं." ८४

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्१६

[किं कर्म किमकर्मेति] कर्म ह्मणिपे तें कवण । अथवा अकर्मीं काय लक्षण । ऐसें विचारितां [कवयोऽप्यत्र मोहिताः] विचक्षण । गुंफोनि ठेले ॥ ८५ ॥ जैसें कां कुडें नाणें । खऱ्याचेनि सारखेपणें । डोळ्याचेचि देखणें । संशयीं घाली ॥ ८६ ॥ तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें । गिंवसिजैंत आहाती कर्में । जे दुजी सृष्टि मनोधर्में । करूं सकती ॥ ८७ ॥ वांचूनि मूर्खाची गोठी कायसी । एथ मोहले गा दीर्घदर्शी । [तत्ते कर्म प्रवक्ष्यामि] ह्मणोनि आतां तेचि परियेसीं । सांगेन तुज॥८८॥

"कर्म ह्मणतात तें कोणतें? किंवा अकर्माचीं लक्षणें कशीं? ह्याचा विचार करतांना शहाणेशहाणेसुद्धां गोंधळांत पडतात. ८५ ज्याप्रमाणें खोटें नाणें खऱ्यासारखेंच असल्यामुळें, डोळ्यांच्या पाहण्यानें संशयांत पाडतें; ८६ त्याप्रमाणें मनोधर्मानें प्रतिसृष्टि करूं शकणारे, ते सुद्धां निष्कामतेच्या भ्रमानें कर्मांत गुरफटून जातात. ८७ त्यापुढें मूर्खाची कथा काय? ह्याला पाहून ज्ञानीसुद्धां भ्रमांत पडतात. ह्मणून तेंच आतां तुला सांगतों श्रवण कर." ८८

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥

[कर्मणो ह्यपि बोद्धव्यं] तरी कर्म ह्मणिजे स्वभावें । जेणें विश्वाकार संभवे । तें सम्यक् आधीं जाणावें । लागे एथ ॥ ८९ ॥ [बोद्धव्यं च विकर्मणः] मग वर्णाश्रमासी उचित । जें विशेष कर्म विहित । तेंही बोळखावें निश्चित । उपयोगेंसीं ॥ ९० ॥ [अकर्मणश्च बोद्धव्यं] पाठी जें निषिद्ध ह्मणिपे । तेंही बुझावें स्वरूपें । [यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्. १६] येतुलेनि कांहीं न गुंफे । आपैसेंचि ॥ ९१ ॥ [गहना

१ धनुर्धरा. २ गुणकर्मांचा विचार. ३ जातिभेदस्थिति. माझ्यापासून. ५ मोक्षाची इच्छा करणारे. ६ मोक्षाला कारण. विधि व निषेधकर्मांचा विचार. ८ आपल्याच इच्छेनें.

१ ह्मणतात. २ विचारी, शहाणे. ३ गोंधळून गेले. ४ खोटें. ५ पहाण्यानें. ६ निरिच्छतेच्या. ७ गुंततात, सांपडतात. ८ मनाच्या चंचळतेनें. ९ ह्यापुढें. १० गोष्ट. ११ विश्वरचना. १२ उपयोगासहवर्तमान. १३ याच्या उलट. १४ जाणावें. १५ येवढ्यानें. १६ गुंतत नाहीं. १७ आपोआप.

कर्मणो गतिः] येऱ्हवीं जग हें कर्माधीन । ऐसी याची व्याप्ती गहन । परी तें असो आइकें चिन्ह । प्राप्तांचें ॥ ९२ ॥

**"तर वस्तुतः ज्याच्या जातीस्वभावाप्रमाणें जगाचे व्यापार चालतात, तें कर्म असें प्रथम नीट समजलें पाहिजे. ८९ नंतर वर्णाश्रमास योग्य जें विशेष, किंवा विहित कर्म, ज्याला 'विकर्म' असें ह्मणतात, तेंही त्याच्या उपयोगासहवर्तमान समजून घ्यावें. ९० नंतर ह्याच्या उलट ज्याला 'निषिद्ध कर्म'-अकर्म-असें ह्मणतात, त्याचेंही स्वरूप समजून घ्यावें. ह्मणजे सहजच तो त्यांत गुंतून पडणार नाहीं. ९१ बाकी जग पाहिलें तर, सारें कर्माधीनच आहे. इतकी ह्या कर्माची व्याप्ति गहन आहे. ह्याकरितां तें राहूंदे. तुला आतां प्राप्ताचें–सिद्धाचें–लक्षण सांगतों तें ऐक," ९२**

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ।
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥१८॥

[कर्मण्यकर्म यः पश्येत्] जो सकळकर्मीं वर्ततां । देखे आपुली नैष्कर्म्यता । कर्मसंगें निराशता । फळाचिया ॥९३॥ [अकर्मणि च कर्म यः] आणि कर्तव्यतेलागीं । जया दुसरें नाहीं जगीं । ऐसिया नैष्कर्मता तरी चांगी । बोधला असे ॥ ९४ ॥ [स बुद्धिमान्] तरी क्रियाकलाप आघवा । आचरत दिसे बरवा । तोचि तो ये चिन्हीं जाणावा । ज्ञानिया गा ॥ ९५ ॥ जैसा कां जळापाशीं उभा ठाके । तो जरी आपणपें जळामाजि देखे । तरी तो निभ्रांत वोळखे । ह्मणे मी वेगळा आहें ॥ ९६ ॥ अथवा नावे ह्नें जो रिगे । तो थडियेचे रुख जातां देखे वेगें । तेचि साचोकारें पाहों जों लागे । तंव रुख ह्मणे अचळे ॥ ९७ ॥ तैसें सर्वकर्मीं असणें । तें फुडें मानूनि वायाणें । मग आपण जो जाणे । नैष्कर्म्य ऐसा ॥ ९८ ॥ आणि उदोअस्ताचेनि प्रमाणें । जैसें नें चलतां सूर्याचें चालणें । तैसें नैष्कर्म्यतत्त्व जाणें । कर्मीचि असतां ॥ ९९ ॥ [मनुष्येषु] तो मनुष्यांसारिखा तरी आवडे । परी मनुष्यत्व तया न घडे । जैसें जळामाजी न वुडे । भानुबिंब ॥ १०० ॥ [स युक्तः कृत्स्नकर्मकृत्] तेणें न पाहतां विश्व देखिलें । न करितां सर्व केलें । न भोगितां भोगिलें । भोग्यजात ॥ १ ॥ एकेचि ठायीं बैसला । परि सर्वत्र तोचि गेला । हें असो विश्व जाहाला । आंगेंचि तो ॥२॥

**"जो सर्व कर्में करीत असतां आपली नैष्कर्म्यता पाहतो, कर्माबरोबर फळाची आशा करीत नाहीं; ९३ आणि कर्तव्यकर्म करण्याइतकें जगांत ज्याला दुसरें कांहीं थोर नाहीं, त्याच्या मनांत नैष्कर्म्यता चांगली ठसली ह्मणून समजावें.९४ तरी सर्व प्रकारच्या क्रिया तो नीटपणें आचरण करीत असलेला दिसतो; अशा लक्षणांनीं जो युक्त तोच ज्ञानी. ९५ ज्याप्रमाणें जळापाशीं उभा राहणारा, त्यांत आपलें स्वरूप पाहतो, तरी त्याला निःसंशय ओळखून मी ह्या त्यापासून भिन्न आहें असें ह्मणतो. ९६ अथवा नौकेंत बसणारा, तीराचे वृक्ष पळत जातांना पाहतो, पण तेंच खरें पाहिलें ह्मणजे ते वृक्ष अचल आहेत असें ह्मणतो. ९७ त्याप्रमाणें, जो सर्व कर्मांमध्यें राहून हें सर्व मिथ्या आहे; व मी त्यापासून अगदीं वेगळा आहें, असें जो जाणतो तोच निष्काम होय. ९८ ज्याप्रमाणें सूर्य हा खरोखर चालत नसतां, उदयास्ताच्या योगानें तो चालल्याचा भास होतो, त्याप्रमाणें कर्मामध्यें नैष्कर्म्यतेचें तत्व असतें, हें लक्ष्यांत ठेव. ९९ निष्काम मनुष्य दिसण्यामध्यें इतर मनुष्यांसारखाच दिसतो, तथापि सूर्याचें बिंब जसें पाण्यांत बुडत नाहीं, त्याप्रमाणें त्याला मनुष्यत्वाचा-मायेच्या प्रभावाचा-सांसर्ग घडत नाहीं. १०० त्यानें कांहीं पाहिलें नाहीं, तरी सारें विश्व पाहिलें ह्मणून समजावें. त्यानें कांहीं केलें नाहीं, तरी सर्व केलें, आणि कांहीं न भोगतां सर्व भोगलें असें जाणावें. १०१ तो एकाच ठिकाणीं बसला असला, तरी तो सर्व ठिकाणीं गेला. हें तर काय? पण तो स्वरूपेंकरून स्वतःच विश्वरूप झाला ह्मणून समजावें." १०२**

यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥ १९ ॥

[यस्य सर्वे इति] जया पुरुषाच्या ठायीं । कर्माचा तरी

१ निरिच्छता. २ निरपेक्षता. ३ चांगली. ४ समजला. ५ अनुष्ठानादिक, कर्मादिक. ६ सर्व. ७ आपल्याला. ८ नौकेंत. ९ समुच्चयार्थक अव्यय. १० तीराचे. ११ वृक्ष. १२ खरेपणानें. १३ न हालणारे, अढळ. १४ स्पष्ट. १५ व्यर्थ, खोटें. १६ उदयअस्ताप्रमाणें. १७ चालत नसतां. १८ वाटतो.

१ सारे विषय. २ स्वतःच.

ेद नाहीं । तरी फळापेक्षा कांहीं । संचरेना ॥ ३ ॥ आणि
कर्म मी करीन । अथवा आदरिलें सिद्धी नेईन । येणें सं-
ल्पेंही जयाचें मन । विटाळे ना ४ ॥ [ज्ञानाग्नीति] ज्ञाना-
ीचेनि मुखें । जेणें जाळिलीं कर्में अशेखें । तो परब्रह्मचि
नुष्यवेखें । वोळख तूं ॥ ५ ॥

**"ज्या पुरुषामध्यें कर्मांचा वियोग नसून फळाची इच्छा ह्मणून कसली ती शिरत नाहीं, १०३ किंवा हें कर्म मी करीन; अथवा आरंभिलेलें शेवटास नेईन; अशा संकल्पानेंही ज्याचें मन विटाळत नाहीं; १०४ ज्यानें ज्ञानाग्नीच्या मुखानें एकूनएक कर्में जाळून टाकिलीं, तो मनुष्यरूपानें परब्रह्मच आहे हें ध्यानांत ठेव." १०५**

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥

[त्यक्त्वेति] जो शरीरीं उदास । फळभोगीं निरास । नित्यता उल्हास । होऊनि असे ॥ ६ ॥ [कर्मणीति] जो संतोषाचा गाभारा । आत्मबोधाचिया वोगरां । पुरे न ह्मणेचि धनुर्धरा । आरोगितां ॥ ७ ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ।
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥
यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ॥ २२ ॥

[निराशीर्यतचित्तात्मा] कैसी अधिकाधिक आवडी । घेत महासुखाची गोडी । [त्यक्तसर्वपरिग्रहः] सांडोनियां आशा फ्रोंडी । अहंभावेसीं ॥ ८ ॥ [यदृच्छालाभसंतुष्टो] ह्मणोनि अवसरें जें जें पावे । तेणेंचि तो सुखावे । जया आपुलें आणि परावें । दोन्हीं नाहीं ॥ ९ ॥ [शारीरं केवलं कर्म] तो दिठीं जें पाहे । तें आपणचि होऊनि जाये । आइके तें आहे । तोचि जाहला ॥ १० ॥ चरणीं हिंने चाले । मुखें जें बोले । ऐसें चेष्टाजात तेतुलें । आपणचि जो ॥ ११ ॥ असो विश्व पाहीं । जयासि आपणपेंवांचूनि नाहीं । [कुर्वन्नाप्नोति किल्बिषं] आतां कवण तें कर्म कायीं । बाधी ततें ॥ १२ ॥ [द्वंद्वातीतो विमत्सरः] हा मत्सर जेथ उपजे । तुलें नुरेचि जया दुजें । तो निर्मत्सर काइ ह्मणिजे । बोलवरी ॥ १३ ॥ [समः सिद्धावसिद्धौ च] ह्मणोनि सर्वांपरी मुक्त । [कृत्वापि न निबध्यते] तो सकर्मचि कर्मरहित । सगुण परि गुणातीत । एथ भ्रांति नाहीं ॥ १४ ॥

**"जो शरीराच्या ठिकाणीं उदास; फलभोगाविषयीं निरिच्छ; परंतु सदासर्वकाल उल्हासवृत्तीनें असणारा, १०६ अर्जुना! संतोषाचें जो मध्यगृह; आत्मबोधान्नाचें जेवण जेवतांना जो पुरे ह्मणून ह्मणत नाहीं. १०७ जो अहंभावासहवर्तमान आशेची ओंवाळणी टाकून, अधिकाधिक आवडीनें महत्सुखाची गोडी घेतो. १०८ ह्मणून समयानुसार जें जें प्राप्त होईल त्यानेंच तो आनंदी असतो, ज्याला आपलें आणि दुसऱ्याचें हीं दोन्हीही नाहींत. १०९ तो दृष्टीनें जें जें पाहतो, कानांनीं जें जें ऐकतो, तें तें तो आपण स्वतःच होतो. ११० पायानें जें जें चालतो; मुखानें जें जें बोलतो; चलनवलनादि जितकें कांहीं करतो, तितकें सर्व तो स्वतःच असतो. १११ हें तर असो. पण विश्वाविषयीं विचार करतांना, त्यास आपल्याशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं. मग त्याला कर्म तें कोणतें व कसें बाधणार? ११२ जेथें मत्सर उत्पन्न व्हावयाचा, तेथें त्याला दुजाभाव ह्मणून नसतोच. तेव्हां त्यास 'निर्मत्सर' असें शब्दांनीं आणखी वेगळें तें काय ह्मणावयाचें? ११३ ह्मणून सर्वोपरीनें जो मुक्त, तो कर्म करूनही कर्महीन; आणि सगुण असूनही गुणातीत; ह्मणजे परब्रह्मस्वरूपी होय, ह्यांत संशय नाहीं." ११४**

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥

[गतसंगस्येति] तो देहसंगें तरी असे । परि चैतन्यासारिखा दिसे । पाहतां परब्रह्माचेनि कसें । चोखाळ भला ॥ १५ ॥ [यज्ञायाचरतः कर्म] ऐसाही परी कौतुकें । जरी कर्में करी यज्ञादिकें । [समग्रं प्रविलीयते] तरी तियें लया जाती निःशेखें । तयाच्याचि ठायीं ॥ १६ ॥ आकाळींचीं अभ्रें जैशीं । उर्मीवीण आकाशीं । हारपती आपैशीं । उदयलीं सातीं ॥ १७ ॥

१ शिरत नाहीं. २ सर्व. ३ मनुष्यरूपानें. ४ निरिच्छ. ५ मध्यगृह. ६ जेवण. ७ भोजन करतांना. ८ ओवाळणी. ९ अभिमानासह. १० दृष्टीनें. ११ समु० अव्यय. १२ चलनवलनादि सर्व. १३ तितकें, तेवढें. १४ आपल्याशिवाय. १५ तितकें, तेवढें.

१ शब्दांनीं. २ देहधारी. ३ गुणाच्या पलीकडचा, ब्रह्मस्वरूपी. ४ निर्गुण. ५ कसोटीनें. ६ शुद्ध, पवित्र. ७ तीं. ८ संपूर्ण, निखालस. ९ वृष्टीवांचून. १० आपोआप.

तैसीं विधिविधानें विहितें । जरी आचरे तो समस्तें । तरी तियें ऐक्यभावें ऐक्यातें । पावतीचि गा ॥ १८ ॥

**"तो देहाबरोबर तर असतो; पण दिसण्यांत निर्गुणासारखा दिसतो. परब्रह्माची कसोटी लावून पाहिली, तर निखालस शुद्ध. ११५ असा असूनही त्यानें कौतुकानें यज्ञादिक कर्में केलीं, तर तीं एकूनएक त्याच्या ठायींच लय पावतात. ११६ अकालींचीं निर्जीव अभ्रें जशीं आकाशांत उद्भवून आपोआपच नाहींशीं होतात, ११७ तशीं, त्यानें यज्ञयागादिक विहित कर्में सर्व यथाविधि जरी आचरण केलीं, तरी तीं ऐक्यभावानें ऐक्यासच पावतात." ११८**

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥

[ब्रह्मार्पणमिति] हें हवन मी होतां । कां इंये यज्ञीं हा भोक्ता । ऐसिया बुद्धीसि नाहीं भिन्नता । ह्मणऊनियां ॥१९॥ जे इष्टयज्ञ यजावे । तें हविमंत्रादि आघवें । तो देखतसे अविनाशभावें । आत्मबुद्धि ॥ १२० ॥ [ब्रह्मकर्मसमाधिना] ह्मणऊनि ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जया सम । तया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्धरा ॥ २१ ॥ [ब्रह्मैव तेन गंतव्यं] आतां अविवेक कुमारत्वा मुंकले । जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहालें । मग उपासन जिहीं आणिलें । योगाग्नीचें ॥ २२ ॥

**"हें हवन; मी होता; किंवा ह्या यज्ञांत हा भोक्ता; अशी बुद्धीची भिन्नता नसते. ह्मणून, ११९ आत्मज्ञानी आहे तो इष्ट यज्ञ करतांना त्यांतील होमाचे मंत्र, द्रव्यें, इत्यादि सर्वांस अविनाशभावानें–ब्रह्मरूपानें–पहातो. १२० ह्याकरितां धनुर्धरा! ब्रह्म तेंच कर्म अशी समबुद्धि ज्याच्या मनांत बिंबली, त्याला कर्म तेंच नैष्कर्म होतें. १२१ आतां ज्यांनीं अविवेकबाल्यत्वांतून मुक्त होऊन विरक्तीचें पाणिग्रहण केलें; ते योगाग्नीचें अग्निहोत्र घेतात." १२२**

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥

[दैवमिति] जे यजनशील अहर्निशीं । जिहीं अविद्या हंविली मनेंसीं । गुरुवाक्यहुताशीं । हवन केलें ॥ २३ ॥ तिहीं योगाग्निकीं यजिजे । तो दैवयज्ञ ह्मणिजे । जेणें आत्मसुख कामिजे । पंडुकुमरा ॥ २४ ॥ दैवास्तव पाळण । जो चिंतीना देहभरण । तो महायोगी जाण । दैवयोगें ॥ २५ ॥ [ब्रह्माग्नाविति] आतां अवधारीं सांगेन आणिक । जे ब्रह्माग्नी साग्निक । तयांतें यज्ञेंचि यज्ञ देख । उपासिजे ॥ २६ ॥

**"जे अहोरात्र यज्ञ करणारे; मनासहवर्तमान आपलें अज्ञान ज्यांनीं गुरुवाक्याग्नींत जाळून टाकलें; १२३ ज्यांना आत्मसुखाची इच्छा आहे; ते योगरूप अग्नींत यज्ञ करतात. पंडुकुमरा! ह्या यज्ञाला "दैवयज्ञ" असें ह्मणतात. १२४ दैवानें जें काय पाळण होईल तेवढें. परंतु देहभरणाची चिंता ह्मणून जो वाहत नाहीं, तो दैवयोगेंकरून महायोगी आहे असें समजावें. १२५ आतां आणखी एक सांगतों ऐक. हें पहा! जे ब्रह्मरूप अग्नि पाळणारे अग्निहोत्री आहेत, ते यज्ञानेंच–ब्रह्मरूप द्रव्यानेंच–यज्ञाची उपासना करतात." १२६**

श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।
शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

[श्रोत्रादीनीति] एक संयमाग्निहोत्री । ते युक्तित्रयाच्या मंत्रीं । यजन करिती पवित्रीं । इंद्रियद्रव्यीं ॥ २७ ॥ [शब्दादीनिति] एकां वैराग्य रवि विवळे । तंव संयतीविहार केले । तेथ अपरोक्ष जाहाले । इंद्रियानळ ॥ २८ ॥ तिहीं विरक्तीची ज्वाळा घेतली । तंव विकारांचीं इंधनें पळिपलीं । तेथ आशाधूमें सांडिलीं । पांचही कुंडें ॥ २९ ॥ मग वाक्यविधीचिया निरवडी । विषयआहुती उदंडीं । हवन केलें कुंडीं । इंद्रियाग्नीच्या ॥ ३० ॥

**"कोणी आत्मसंयमरूप अग्नीमध्यें होम करणारे असतात; ते युक्ति*त्रयमंत्रानें पवित्र इं-**

१ यज्ञयागादि कर्में. २ यज्ञ करणारा आचार्य. ३ ह्या. ४ यज्ञ करणें. ५ होमाचें द्रव्य, मंत्र इत्यादि. ६ बाल्यत्वापासून. ७ सुटले. ८ भक्ति. ९ अज्ञान. १० दग्ध केली.

१ मनासहवर्तमान. २ गुरुवाक्यरूप अग्नींत. ३ योगाग्निहोत्र्यांनीं. ४ यज्ञ करावा, होम करावा. ५ इच्छावें. ६ ब्रह्मरूप अग्नि. ७ अग्निहोत्री. ८ आत्मसंयमरूप अग्नीमध्यें होम करणारे. ९ वज्रासन, जालंधर, ओडियाण; अथवा आहारविहार, चेष्टा, निद्रा व बोध परिमित हें युक्तित्रय. १० इंद्रियरूप द्रव्यानें. ११ सूर्य. १२ प्रगटे. १३ इंद्रियनिग्रह हेंच कुंड. १४ भडकले. १५ इंद्रियरूप अग्नि. १६ लांकडें. १७ पेटविलीं. १८ आशारूप धुरानें. १९ अंतःकरणपंचक. २० गुरुवाक्य. २१ कौशल्यानें.

* ध्यान, धारणा व समाधि. किंवा वज्रासन, ओडियाण,

द्रियद्रव्याचा यज्ञ करतात. १२७ कोणी वैराग्यसूर्य प्रकाशमान होईपर्यंत इंद्रियनिग्रहाचें कुंड तयार करतात. त्यांत इंद्रियाग्नि प्रगट होतो. १२८ आणि विरक्तीच्या ज्वाळा प्रज्वलित होऊन विकाररूप लांकडें पेटलीं, ह्मणजे अंतःकरणपंचकांतील आशारूप धूर नाहींसा होतो. १२९ मग ते इंद्रियाग्नीच्या कुंडामध्यें, गुरुवाक्याच्या कुशल विधीनें, विषयाच्या मनमुराद आहुती टाकून हवन करतात." १३०

सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ।
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७॥

[आत्मसंयमयोगाग्नौ] एकीं ययापरी पार्था । दोष क्षाळिले सर्वथा । एकीं हृदयारणीं[1] मंथा[2] । विवेक केला ॥ ३१ ॥ तो उपशमें[3] निहटिला[4] । धैर्यभारें दाटिला[5] । गुरुवाक्यें काढिला । बळकटपणें ॥ ३२ ॥ [ज्ञानदीपिते] ऐसें समरसें[6] मंथन केलें । तेथ झडकरी काजा आलें । जें उजीवन[7] जाहालें । ज्ञानाग्नीचें ॥ ३३ ॥ पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रम[8] । तो निवर्तोनि गेला धूम । मग प्रगटला सूक्ष्म । विस्फुलिंग[9] ॥ ३४॥ तया मनाचें मोकळें । तेंचि पेटवण घातलें । जें यमनियमीं[10] हळवारलें[11] । आइतें होतें ॥ ३५ ॥ तेणें सांदुकपणें[12] ज्वाळा समृद्धा । [सर्वाणि] मग वासनांतराचिया समिधा । स्नेहेंसि[13] नानाविधा । जाळिलिया ॥ ३६ ॥ [इंद्रियकर्माणि] तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं[14] । इंद्रियकर्मांचिया आहुती । तिये ज्ञानानळीं[15] प्रदीप्तीं । [जुह्वति] दिधलिया ॥ ३७ ॥ [प्राणकर्माणि चापरे] पाठीं प्राणकर्मांचिये स्रुवेनिशीं[16] । पूर्णाहुती पडलिया हुताशीं । तेथ अवभृथ[17] समरसीं । सहजें जाहालें ॥ ३८ ॥ मग आत्मबोधिचें सुख । जें संयमाग्नीचें हुतशेष[18] । तोचि पुरोडाश[19] देख । घेतला तिहीं ॥ ३९ ॥ एक ऐशिया इहीं यजनीं । मुक्त ते जाहाले त्रिभुवनीं । या यज्ञक्रिया तरी आनानी[20] । परि प्राप्य तें एक ॥ १४० ॥

"पार्था ! ह्याप्रमाणें कोणी समूळ दोष क्षालन करून टाकतात; कोणी हृदयरूप अरणीमध्यें विवेकाचा मंथा करून, १३१ तो शांतीनें आंवळतात; धैर्यभारानें सांवरून धरतात; आणि गुरुवाक्याच्या जोरानें घुसळतात. १३२ अशा प्रकारें सर्व वृत्तींच्या ऐक्यानें त्याचें मंथन करतांच, तत्काल कार्यसिद्धि होते; ह्मणजे ज्ञानरूप अग्नि उत्पन्न होतो. १३३ प्रथमतः ऋद्धिसिद्धीचा मोहरूपी धूर निघून गेला, ह्मणजे मग सूक्ष्म तेज प्रगट होतें, १३४ त्याला मनाचा अनावरपणा—जो इंद्रियनिग्रहानें आयताच वाळून कोळ झाला असतो—त्याचें पेटवण घालतात, १३५ ह्मणजे तें भडाभड पेटूं लागून हजारों ज्वाळा उत्पन्न होतात. त्यांत मग निरनिराळ्या वासनारूप समिधा, मोहरूप तुपासहवर्तमान जाळून टाकतात. १३६ अशा प्रकारें यज्ञकर्त्यांनें 'सोहं'— तोच मी—ह्या मंत्रानें त्या ज्ञानरूप अग्नींत इंद्रियकर्मांच्या आहुती दिल्या, १३७ ह्मणजे मग प्राणकर्मांच्या 'स्रुवा' नामक यज्ञपात्रासहवर्तमान अग्नींत पूर्णाहुति पडते, आणि ब्रह्मानंदामध्यें सहजच अवभृथ स्नान होतें. १३८ मग पहा ! संयमाग्नीचा होम करून राहिलेलें शेष—जें आत्मबोधाचें सुख, तो पुरोडाश होय. तो ते सेवन करतात. १३९ अशा प्रकारचा यज्ञ करून कोणी कोणी त्रिभुवनांतून मुक्त झाले. अशा ह्या यज्ञक्रिया भिन्न भिन्न आहेत. परंतु त्यांपासून फलश्रुति अशी एकच. ती कोणती ? तर ब्रह्मप्राप्ति." १४०

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८॥

[द्रव्ययज्ञा इति] एक द्रव्ययज्ञ ह्मणिपती[1] । एक तपसामग्रिया[2] निपजविती । एक योगयागही आहाती । जे सांगितले ॥ ४१ ॥ [दिवमेवापरे यज्ञं श्लो. २५ । स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च] एकीं शब्दीं शब्द यैजिजे[3] । तो वाग्यज्ञ ह्मणिजे । ज्ञानें ज्ञेय[4] गैमिजे[5] । तो ज्ञानयज्ञ ॥ ४२ ॥ हें अर्जुना सकळ कुवाडें[6] ।

---

व जालंधर (ह्यांचीं लक्षणें पुढें सहाव्या अध्यायांत येतील.) हे बंध, अथवा यमनियम, आसन, प्राणायाम, इत्यादि.

१ हृदयरूप अरणीमध्यें. २ रवीनें. ३ शांतीनें. ४ आंवळतात. ५ सांवरून धरतात. ६ सर्व वृत्तींच्या ऐक्यानें. ७ प्रदीपन, उद्दीपन. ८ मोह. ९ ठिणगी. १० इंद्रियनिग्रहानें. ११ वाळून हलकें झालें. १२ प्रदीप्तपणानें. १३ मोहरूप घृतासहवर्तमान. १४ यज्ञकर्त्यांनीं. १५ ज्ञानाग्नीमध्यें. १६ होमांत आहुती घालण्याचें 'स्रुवा' नामक पळीसारखें जें पात्र असतें, त्यासह. १७ यज्ञसमाप्तीचें स्नान. १८ होम करून राहिलेलें द्रव्य. १९ यज्ञसंबंधी चरु. २० भिन्न भिन्न.

---

१ ह्मणतात. २ तपस्साधनें. ३ होम केला जातो. ४ जाणण्यास योग्य. ५ पावतें. ६ कठीण.

जें अनुष्ठितां अतिसांकडें । [यतयः संशितव्रताः] परी जितें-द्रियासीचि घडे । योग्यतावशें ॥ ४३ ॥ ते प्रवीण तेथ भले। आणि योगसमृद्धि आथिले । म्हणोनि आपणपां तिहीं केलें । आत्महवन ॥ ४४ ॥

"एकाला 'द्रव्ययज्ञ' असें म्हणतात. एकानें तपाचें साहित्य प्राप्त होतें. ह्याशिवाय 'योगयज्ञ' म्हणून आहेत. ते तुला पूर्वीं सांगितलेच. १४१ कोणी शब्दामध्यें शब्दाचाच होम करतात. त्यास 'वाग्यज्ञ' असें म्हणतात. ज्ञानानें जाणण्यास जें योग्य तें प्राप्त करून घेण्याचा जो यज्ञ तो 'ज्ञान-यज्ञ' होय. १४२ अर्जुना! हे सारे यज्ञ फार विकट आहेत. ते करतांना महाप्रयास पडतात. परंतु इंद्रियें स्वाधीन ठेवणारालाच त्याच्या योग्यतेमुळें ते साध्य होतात. १४३ ते कुशल आणि भले असून योगसमृद्धीनें भाग्यवान् असतात, म्हणून ते आपल्याच ठायीं आत्महवन करतात." १४४

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे ।
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥

[अपाने जुह्वतीति] मग अपानाग्नीचे मुखीं । प्राणद्रव्यें देखीं । हवन केलें एकीं । अभ्यासयोगें ॥ ४५ ॥ [प्राणायामपरायणाः] एक अपान प्राणीं अर्पिती । [प्राणापानगती रुद्ध्वा] एक दोहींतेंही निरुंधिती । ते प्राणायामी म्हणिपती । पंडुकुमरा ॥ ४६ ॥

"कोणी एक अभ्यासाच्या योगानें अपान वायूरूप अग्नीच्या मुखांत प्राणद्रव्याचें हवन करतात; १४५ कोणी प्राणामध्यें अपान अर्पण करतात; आणि कोणी कोणी दोहोंचाही निरोध करतात. अर्जुना! त्यांना 'प्राणायामी' असें म्हणतात." १४६

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥

[अपरे इति] एक वज्रयोगक्रमें । सर्वाहारसंयमें । प्राणीं प्राण संभ्रमें । हवन करिती ॥ ४७ ॥ [सर्वेऽपीति] ऐसे मोक्षकाम सकळ । समस्त हे यजनशीळ । जिहीं यज्ञद्वारां मनोमळ । क्षाळण केले ॥ ४८ ॥ जया अविद्याजात जाळितां । जें उरलें निजस्वभावता । जेथ अग्नि आणि होता । उरेचिना ॥ ४९ ॥ जेथ यजितयाचा काम पुरे । यज्ञींचें विधान सरे । मागुते जेथोनि वोसरे । क्रियाजात ॥ १५० ॥ विचार जेथ न रिगे । हेतु जयातें नेघे । जें द्वैतदोषसंगें । लिंपेचिना ॥ ५१ ॥

"कोणी हटयोगेंकरून सर्व विषयरूप आहार बंद करून आदरानें प्राणामध्येंच प्राणाचें हवन करतात. १४७ ह्याप्रमाणें हे सर्व मोक्षेच्छु यज्ञकर्तेच आहेत. ते यज्ञद्वारें आपला मनोमल सर्व धुऊन टाकतात. १४८ ज्याला, सर्व प्रकारचें अज्ञान-अविद्या-जाळून टाकल्यामुळें शुद्ध स्वरूप शिल्लक राहतें; अग्नि आणि यज्ञकर्ता हा जेथें भेदच राहत नाहीं; १४९ जेथें यज्ञ करणाराची मनीषा तृप्त होते; यज्ञाची क्रिया समाप्त होते; आणि मग कोणतेंही कर्म म्हणून रहात नाहीं. १५० जेथें विचाराचें कारण उरत नाहीं; हेतु ज्याला स्पर्श करीत नाहीं; आणि द्वैतदोषाच्या संगतीनें जें मलिन होत नाहीं." १५१

यज्ञशिष्टामृतभुजो यांति ब्रह्म सनातनम् ।
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

[यज्ञशिष्टामृतभुजो] ऐसें अनादिसिद्ध चोखट । जें ज्ञान यज्ञावशिष्ट । तें सेविती ब्रह्मनिष्ठ । ब्रह्माहंमंत्रें ॥ ५२ ॥ ऐसे शेषामृतें धाले । [यांति ब्रह्म सनातनं] कीं अमर्त्यभावा आले । म्हणोनि ब्रह्म ते जाहाले । अनायासें ॥ ५३ ॥ [नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य] येरां विरक्ति माळ न घालिचि । जयां संयमाग्नीची सेवा न घडेचि । जे योगयाग न करितीचि । जन्मले सांते ॥ ५४ ॥ जयां ऐहिक धड नाहीं । [कुतोऽन्यः कुरुसत्तम] तयांचें परत्र पुससी काई । म्हणोनि असो हे गोष्टी पाहीं । पंडुकुमरा ॥ ५५ ॥

" असें जें अनादिसिद्ध शुद्ध यज्ञावशिष्टज्ञान, तें ब्रह्मनिष्ठ 'ब्रह्माहं'—मी ब्रह्मरूप आहें—ह्या मंत्रानें सेवन करतात. १५२ अशा प्रकारच्या शेषामृतानें ते तृप्त होतात; किंवा अमरत्वाप्रत

१ इद्रियें स्वाधीन ठेवणाराला. २ भाग्यवान्. ३ आपल्यामध्येंच. ४ अपानरूपअग्नीच्या. ५ निरोध करतात. ६ म्हणतात. ७ हटयोगाच्या अनुरोधानें. ८ सर्व भक्ष्य वर्ज्य करून. ९ मोक्षाची इच्छा करणारे. १० यज्ञकर्ते.

१ सारें अज्ञान. २ होम करणारा आचार्य. ३ यज्ञकरणाराचा. ४ यज्ञविधि. ५ सारे विधी. ६ सारासारज्ञान. ७ कामना. ८ यज्ञांतील शिल्लक राहिलेलें द्रव्य. ९ 'अहं ब्रह्मास्मि'—मी ब्रह्मस्वरूपच आहें—ह्या मंत्रेंकरून. १० तृप्त झाले. ११ अमरपणाला. १२ असून. १३ परलोकींचें.

**पोंचतात. ह्मणून ते अनायासेंच ब्रह्मस्वरूप होतात. १५३ जन्मास येऊन जे कोणी योग-याग करीत नाहींत, ज्यांच्याकडून संयमाग्नीची सेवा घडत नाहीं; त्यांना विरक्ति माळ घालीत नाहीं. १५४ ह्या लोकींच ज्यांचें धड नाहीं, त्यांची परलोकांतील दशा काय विचारतोस? ह्याकरितां पंडुकुमरा! तीं गोष्ट सोडून देऊं. तिचा विचार तुझा तूंच कर." १५५**

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२॥

[एवमिति] ऐसें बहुतीं परी अनेक । जे सांगीतले तुज कां याग । ते विस्तारूनि वेदें चांग । ह्मणितले आहाती ॥ ५६ ॥ [कर्मजानिति] परि तेणें विस्तारें काय करावें । हेंचि कर्मसिद्ध जाणावें । येतुलेनि कर्मबंध स्वभावें । पावेलना ॥ ५७ ॥

**"असे परोपरीचे अनेक यज्ञ मीं तुला सांगितले. त्यांचा वेदांत चांगला विस्तार केलेला आहे, १५६ पण तो विस्तार कांहीं कामाचा नाहीं. कारण, ते सर्व कर्मांपासून झालेले आहेत हें ध्यानांत आणावें, ह्मणजे आपोआपच कर्मबंध प्राप्त होत नाहीं." १५६**

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते॥ ३३ ॥

[श्रेयानिति] अर्जुना वेद जयांचें मूळ । जे क्रियाविशेष स्थूळ । जया नेंव्हाळियेचें फळ । स्वर्गसुख ॥ ५८ ॥ ते द्रव्यादियाग कीर होती । परी ज्ञानयज्ञाची सैरी नें पवती । जैसी तारातेजसंपत्ती । दिनकरापाशीं ॥ ५९ ॥ देखें परमात्म सुखनिधानें । साधावया योगीजन । जें न विसंबिती अंजन । उन्मेषनेत्रीं ॥ १६० ॥ [सर्वमिति] जें धांवतेया कर्मांची लोणी । नैष्कर्म्यबोधाची खाणी । जें भुकेलिया धणी । साधनाची ॥ ६१ ॥ जेथ प्रवृत्ति पांगुळ जाहाली । तर्काची दृष्टी गेली । जेणें इंद्रियें विसरलीं । विषयसंग ॥ ६२ ॥ मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचें बोलकेपण ठेलें । जयामाजि सांपडलें । ज्ञेय दिसे ॥ ६३ ॥ जेथ वैराग्याचा पांग फिटे । विवेकाचाही सोस तुटे । जेथ न पाहतां सहज भेटे । आपणपें ॥ ६४ ॥

**"अर्जुना! ज्यांचें मूळ वेद; जे कर्माधिक्यानें वृद्धि पावलेले; आणि ज्यांच्या अपूर्वतेचें फळ काय? तर स्वर्गसुख. १५८ असे जे द्रव्यादियाग, तेही निश्चयेंकरून यज्ञच होत. तथापि नक्षत्रांच्या तेजोवैभवाला सूर्याची बरोबरी होत नाहीं, त्याप्रमाणें त्यांना ज्ञानयज्ञाची बरोबरी होत नाहीं. १५९ पहा! योगीजन परमात्मसुखाचा ठेवा प्राप्त करून घेण्यासाठीं नेत्रांमध्यें ज्ञानांजन घालण्यास विसरत नाहींत. १६० जें कर्माच्या धांवेचा शेवट; नैष्कर्म्यबोधाची खाण; जें क्षुधार्तोला तृप्तीचें साधन; १६१ ज्या ठिकाणीं प्रवृत्ति लंगडी पडते; तर्काची दृष्टि जाते; ज्याच्या योगानें इंद्रियांना विषयसंगाचें विस्मरण होतें, १६२ मनाचें मनपण नाश पावतें, शब्दाचें पांडित्य जेथें खुंटतें; ज्याच्यामध्यें जाणण्याला जें योग्य तें प्राप्त होतें. १६३ वैराग्याचें दारिद्र्य जेथें नाश पावतें; विवेकाची उत्कंठा (हांव) तुटते; जेथें अनायासें आत्मस्वरूपाची भेट होते," १६४**

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥

[तद्विद्धि प्रणिपातेन] तें गा ज्ञान पैं बरवें । जरी मनीं आथि आणावें । तरी संतांतें भजावें । सर्वस्वेसीं ॥ ६५ ॥ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारिवंठा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळंगोनि ॥ ६६ ॥ [सेवया] तरी तनुमनुजीवें । चरणासी लागावें । आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ॥ ६७ ॥ [परिप्रश्नेन] मग अपेक्षित जें आपुलें । [उपदेक्ष्यंति ते ज्ञानं] तेंही सांगतील पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा नये ॥ ६८ ॥

**"अर्जुना! अशा प्रकारचें जें ज्ञान तें उत्तम. तें आपणास प्राप्त व्हावें अशी मनांत इच्छा असेल तर, सर्वस्वेंकरून संतांना भजावें. १६५ संत हें ज्ञानाचें घर आहे. आणि सेवा हा त्याचा उंबरठा आहे. ह्याकरितां वीरश्रेष्ठा!**

१ पुष्कळ. २ यज्ञ. ३ चांगले. ४ आहेत. ५ येवढ्यानें. ६ यज्ञादि कर्में. ७ अपूर्वतेचें. ८ निश्चयेंकरून. ९ बरोबरी. १० पावत नाहींत. ११ सुखाचा ठेवा. १२ ज्ञानचक्षूंमध्यें. १३ धांवत असलेल्या, चालू. १४ शेवट. १५ तृप्ति. १६ जाणण्यास योग्य. १७ दारिद्र्य.

१ उत्कंठा. २ आत्मस्वरूप. ३ प्राप्त व्हावें. ४ घर. ५ उंबरा. ६ हे शूरा! ७ सेवा करून. ८ कायावाचामनेंकरून. ९ अभिमान सोडून. १० विकार पावत नाहीं.

सेवा करून तो हस्तगत कर. १६६ कायावाचामनेंकरून संतांच्या चरणांस लागावें, आणि सकल अभिमान सोडून त्यांचें दास्य करावें. १६७ ह्मणजे आपण जें जें अपेक्षित विचारावें तें तें सर्व सांगतील. आणि तेणेंकरून अंतःकरणास बोध होऊन, मन, कल्पनारहित होईल." १६८

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ।
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥

[ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ३४] जयाचेनि वाक्यउजिवडें । जाहालें चित्त निधडें । ब्रह्माचेनि पाडें । निःशंक होय ॥६९॥ [येन भूतानीति] ते वेळीं आपणपेंया सहितें । इयें अशेषेंहि भूतें । माझ्या स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥ १७० ॥ [यज्ज्ञात्वेति] ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकार जाईल । जैं श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा ॥ ७१ ॥

"त्यांच्या वाक्यप्रकाशानें चित्त निःसंशय होऊन ब्रह्मासारखें निर्विकल्प होईल. १६९ आणि मग आपणासहवर्तमान हीं दरोबस्त भूतें निरंतर तूं माझ्या स्वरूपामध्येंच पाहशील. १७० पार्था! असें जेव्हां ज्ञानोदयानें उजाडेल; श्रीगुरूची कृपा होईल; तेव्हां मोहरूप अंधकार लयास जाईल." १७१

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ।
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥

[अपीति] जरी कैल्मषाचा आगर । तूं भ्रांतीचा सागर । व्यामोहाचा डोंगर । होऊनि अससी ॥ ७२ ॥ [सर्वमिति] तऱ्ही ज्ञानशक्तिचेनि पाडें । हें आघवेंचि गा थोकडें । ऐसें सामर्थ्य असे चोखडें । ज्ञानीं इयें ॥ ७३ ॥ देखें विश्वसंभ्रमाऐसा । जो अमूर्ताचा कडवसा । तो जयाचिया प्रकाशा । पुरेचिना ॥ ७४ ॥ तया कायसे हे मनोमळे । हें बोलतांचि अति किडाळ । नाहीं येणें पाडें ढिसाळ । दुजें जगीं ॥ ७५॥

"तूं जरी पापाची खाण; भ्रांतीचा समुद्र; आणि भ्रमाचा पर्वत होऊन राहिला असलास, १७२ तरी ज्ञानसामर्थ्याला हीं सर्व लहानच आहेत, असा ह्या ज्ञानामध्यें अद्भुत प्रभाव आहे. १७३ विश्ववैभव हा एक निराकाराचा कवडा आहे. त्याच्यानें सुद्धां ह्या ज्ञानप्रकाशाची बरोबरी करवत नाहीं. १७४ त्याला हे मनोमल काय होत? केवल कःपदार्थ. त्यांचें नांव काढतांच त्यांचा हिणकटपणा डोळ्यासमोर उभा राहतो. ज्ञानाच्या तोडीला श्रेष्ठ, जगांत दुसरें कांहीं नाहीं." १७५

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥३७॥

[ज्ञानाग्निरिति] सांगें भुवनत्रयाची काजळी । जे गगनामाजि उधवली । तिये प्रळयींचे वाहटुळी । काय अभ्र पुरे ॥ ७६ ॥ [यथैधांसीति] कीं पवनाचेनि कोपें । पाणियेंचि जो पळिपे । तो प्रळयानळ दडपे । तृणकाष्ठें काई ॥ ७७ ॥

"त्रैलोक्याच्या धुराला सुद्धां गगनांत उधळून देणारी जी प्रलयकालची वावटळ, तिच्यापुढें अभ्र टिकेल का? सांग. १७६ वाऱ्याच्या प्रकोपानें पाण्याला सुद्धां जाळून टाकणारा जो प्रळयाग्नि, तो गवतानें आणि लांकडानें दबून जाईल होय?" १७७.

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥३८॥

[नहि ज्ञानेन सदृशं] ह्मणोनि असो हें न घडे । तें विचारितांचि असंगडें । पुढती ज्ञानाचेनि पाडें । पवित्र न दिसे ॥७८॥ एथ ज्ञान हें उत्तम होये । आणिकही एक तैसें कें आहे । जैसें चैतन्य कां नोहे । दुसरें गा ॥७९॥ या महा तेजाचेनि कैसें । जरी चोखाळ प्रतिबिंब दिसे । कां गिंवसिलें गिंवसे । आकाश हें ॥ १८० ॥ नातरी पृथ्वीचेनि पाडें । कांटाळें जरी जोडे । तरी उपमा ज्ञानीं घडे । पंडुकुमरा ॥ ८१ ॥ [पवित्रमिह विद्यते] ह्मणूनि बहुतीं परी पाहतां । पुढतपुढती निर्धारितां । हे ज्ञानाची पवित्रता । ज्ञानींचि आथि ॥ ८२ ॥ जैसी अमृताची चवी निवडिजे । तरी अमृतांचिसारिखी ह्मणिजे । तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेंसींचि ॥ ८३ ॥ [तत्स्वय-

१ उजेडानें. २ धैर्यवान्, पराक्रमी. ३ सारखें, बरोबरीचें. ४ आपल्या सहवर्तमान. ५ हीं. ६ उजाडेल. ७ पातकाचा. ८ मळ, खाण. ९ भ्रमाचा. १० विचारशक्तीच्या. ११ योग्यतेनें. १२ सर्व. १३ लहान. १४ चांगलें. १५ ह्या. १६ जगद्वैभवासारखा. १७ निराकार स्वरूपाचा. १८ कवडा. १९ मनःपातकें. २० वाईट.

१ धूर. २ पसरली. ३ वावटळ. ४ जाळी. ५ असंगत. ६ योग्यतेला. ७ कोठें. ८ कसोटीनें. ९ शुद्ध, पवित्र. १० कवटाळलें असतां. ११ ताजवा. १२ वारंवार. १३ आहे. १४ रुचि. १५ तुलावयाचें तर. १६ ज्ञानाबरोबरच.

मिति] आतां यावरी जें बोलणें । तें वायांचि वेळ फेडणें । तंव साचचि हें पार्थ ह्मणे । जें बोलत असां ॥ ८४ ॥ परी तेंचि ज्ञान केविं जाणावें । ऐसें अर्जुनें जंव पुसावें । तंव तें मनोगत देवें । जाणीतलें ॥ ८५ ॥ मग ह्मणतसे किरीटी । आतां चित्त देयीं इये गोठी । सांगेन ज्ञानाचिये भेटी । उपाय तुज ॥ ८६ ॥

"हें घडणारें नव्हे. ह्मणून तें सोडून देऊं या. त्याचा विचार करतांनाच तें विसंगत दिसतें. ज्ञानाची बरोबरी करणारें त्याच्याच तोडीचें पवित्र असें दुसरें कांहीं दिसत नाहीं. १७८ चैतन्य जसें दुसरें होत नाहीं, तसें ज्ञान हें अप्रतिम आहे. त्याच्या तोडीला दुसरें कोण व कोठें आहे? १७९ या महत्तेजाची बरोबरी करणारें जर दुसरें तत्तुल्य तेज आढळेल; किंवा आकाश जर कवटाळून धरण्यास मिळेल; १८० अथवा पृथ्वीच्या समतोल जर बरोबर जोडी मिळेल; तर पंडुकुमरा! ह्या ज्ञानालाही उपमा सांपडेल. १८१ ह्मणून, पुष्कळ प्रकारें पाहिलें, पुनः पुनः विचार केला तरी ज्ञानाची पवित्रता व थोरवी ज्ञानामध्येंच आहे. इतरत्र नाहीं. १८२ ज्याप्रमाणें अमृताचा स्वाद सांगावयाचा तर तो अमृतासारखाच ह्मणून सांगावयाचें, त्याप्रमाणें ज्ञानाला उपमा देणें तर ज्ञानाचीच द्यावयाची. १८३ ह्यापेक्षां अधिक याचें विवरण करणें ह्मणजे व्यर्थ वेळ गमावणें आहे." तेव्हां अर्जुन ह्मणाला "आपण बोलतां तें अगदीं खरें आहे" १८४ पण तें ज्ञान कळावें कसें? असें जों अर्जुन विचारणार, तोंच देवांनीं त्याचा भावार्थ ओळखला. १८५ आणि ह्मणाले "किरीटी! आतां तें ज्ञान प्राप्त करून घेण्याचा उपाय तुला सांगतों, त्याच्याकडे लक्ष्य दे." १८६.

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति॥३९

आत्मसुखाचिया गोडिया । विटे जो कां सकळ विषयां । जयाच्या ठायीं इंद्रियां । मान नाहीं ॥ ८७ ॥ [श्रद्धावान् लभते ज्ञानं] जो मनासी चाड न सांगे । जो प्रकृतीचें केलें नेघे । जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया जाहाला ॥ ८८ ॥ तयातेंचि गिवसित । तें ज्ञान पावे निश्चित । जयामाजि अचुंबित । शांति असे ॥ ८९ ॥ [ज्ञानं लब्ध्वा परां शांतिं] तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । [अचिरेणाधिगच्छति] मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ॥९०॥ मग जेउती वास पाहिजे । तेउती शांतीचि देखिजे । तेथ आपपर नेणिजे । निर्धारितां ॥ ९१ ॥ ऐसा हा उत्तरोत्तर । ज्ञानबीजाचा विस्तार । सांगतां असे अपार । परि असो आतां ॥ ९२ ॥

"आत्मसुखाची गोडी लागल्यामुळें, जो सकल विषयांला विटतो; ज्याच्यामध्यें इंद्रियांना मान नाहीं; १८७ जो मनाला इच्छा सांगत नाहीं; जो मायेनें केलेलें घेत नाहीं; श्रद्धेचा उपभोग घेऊनच जो सुखी असतो; १८८ त्याला तें ज्ञानच खरोखर शोधीत येतें. ज्यामध्यें परिपूर्ण शांति भरलेली आहे, १८९ असें ज्ञान हृदयामध्यें स्थिर झालें ह्मणजे त्यास, शांतीचा अंकुर फुटतो. आणि मग आत्मबोधाचा विस्तार जिकडे तिकडे फैलावतो. १९० मग ज्या ज्या वाटेला पहावें, त्या त्या वाटेला शांतीच दृष्टीस पडते. तेथें निवडानिवड करूं लागलें तर आपलें कोणतें, व दुसऱ्याचें कोणतें तेंही समजत नाहीं. १९१ असा हा ज्ञानबीजाचा विस्तार सांगावयाला गेलें तर उत्तरोत्तर अपारच आहे. पण आतां तो असो." १९२

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ४०

[अश्रद्दधानश्च] ऐकें जया प्राणियांच्या ठायीं । इया ज्ञानाची आवडी नाहीं । तयाचें जियालें ह्मणों काई । वरी मरण चांग ॥ ९३ ॥ [अज्ञश्च] शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह । तैसें जीवित तें संमोह । ज्ञानहीन ॥ ९४ ॥ अथवा ज्ञान कीर आपु नोहे । परि ते चाड एकी जरी वाहे । तरी तेथ जिंव्हाळा कांहीं आहे । प्राप्तीचा पैं ॥ ९५ ॥ [संशयात्मा]

१ खर्च करणें. २ कसें. ३ ह्या. ४ गोष्टीकडे. ५ प्राप्तीस. ६ इच्छा.

१ एकनिष्ठेच्या. २ उपभोगानें. ३ सुखी. ४ शोधीत. ५ परिपूर्ण. ६ जेवढी. ७ वाट. ८ तेवढीं. ९ प्राण्याच्या. १० जिणें. ११ चांगलें. १२ जिवाविरहित. १३ भ्रमयुक्त. १४ निश्चयेंकरून. १५ प्राप्त. १६ वागवितो. १७ आशा, संभव.

वांचूनि[1] ज्ञानाची गोठी[2] कायसी । परि ते आस्थाही न धरी मानसीं । तरि तो संशयरूप हुताशीं । पडिला जाण ॥ ९६ ॥ जे अमृतही परि नावडे । ऐसें सावियांचि[3] अरोचक[4] जें पडे । तें [विनश्यति] मरण आलें असें फुडें[5] । जाणोंये[6] कीं ॥ ९७ ॥ तैसा विषयसुखें रंजे । जो ज्ञानेसींचि[8] माजे[9] । तो संशय अंगिकारिजे । एथ भ्रांति नाहीं ॥९८॥ [नायं लोकोऽस्ति न परो] मग संशयीं जरी पडिला । तरी निभ्रांत जाणें नासला । तो ऐहिक परत्रा [न सुखं संशयात्मनः] मुकला । सुखासि गा ॥ ९९ ॥ जया काळज्वर आंगीं बाणे । तो शीतोष्णें जैशीं नेणे । आंगी[10] आणि चांदिणें । सरिसेंचि मानी ॥ २०० ॥ तैसें साच आणि लटिकें । विरुद्ध आणि निकें[11] । संशयी तो नोळखे । हिताहित ॥ १ ॥ हा रात्री दिवस पाहीं । जैसा जात्यंधा[12] ठाउवा[13] नाहीं । तैसें संशयीं असतां कांहीं । मना नये ॥ २ ॥

**“ ऐक ! ज्या प्राण्यामध्यें अशा प्रकारच्या ज्ञानाची आवड नाहीं; त्याच्या जिण्याला काय ह्मणावें ? त्याच्यापेक्षां मरण बरें. १९३ वस्तीवांचून जसें घर; प्राणावांचून जसा देह, तसें ज्ञानहीन जीवित केवळ भ्रामक होय. १९४ आतां एखाद्याला ज्ञान मिळालेलें तर नाहींच; पण तें मिळावें अशी दृढतर इच्छा आहे. तर तशा ठिकाणीं तें मिळण्याचा कांहीं तरी जिव्हाळा आहे. १९५ जिव्हाळ्याशिवाय ज्ञानाची गोष्ट कसली ? पण ती आस्था सुद्धां जर मनांत धरीत नाहीं, तर तो संशयाग्नीमध्यें पडला ह्मणून समजावें. १९६ कारण, अमृत सुद्धां आवडेना, इतकी स्वभावगत्याच अरुचि उत्पन्न झाली, ह्मणजे सहजच पुढें मरण ओढवल्याचें चिन्ह समजावयाचें. १९७ तसें विषयसुखांत रममाण होऊं लागला; ज्ञानाला कंटाळला; ह्मणजे त्यानें संशयाचा स्वीकार केला ह्मणून समजावें, त्यांत भ्रांति नाहीं. १९८ अशा प्रकारच्या संशयांत जो पडला, तो निःसंशय बिघडला. आणि इहलोकींच्या व परलोकींच्या सुखास अंतरला ह्मणून समजावें. १९९ ज्याच्या आंगांत सन्निपातज्वर भरलेला असतो, त्याला शीत आणि उष्ण हीं कळत नाहींत. उन्ह आणि चांदणें सारखेंच वाटतें. २०० तसें संशयी मनुष्याला खरें आणि खोटें; अनुकूल आणि प्रतिकूल; हित आणि अनहित हीं ओळखत नाहींत. २०१ जन्मांधाला ज्याप्रमाणें हा दिवस, व ही रात्र असें समजत नाहीं, त्याप्रमाणें संशययुक्ताच्या मनालाही कांहीं कळत नाहीं. ” २०२**

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ।
आत्मवंतं न कर्माणि निबध्नंति धनंजय ॥४१॥

[योगसंन्यस्तेति] ह्मणऊनि संशयाहूनि थोर । आणिक नाहीं पाप घोर । हा विनाशाची[1] वागुर[2] । प्राणियांसी ॥ ३ ॥ येणें कारणें तुवां त्यजावा । आधीं हाचि एक जिणावा[3] । जो ज्ञानाचिया अभावा । माजि[4] असे ॥ ४ ॥ जें अज्ञानाचें गडदपडे । तें हा बहुवस[6] मनीं वाढे । ह्मणोनि सर्वथा मार्ग मोडे । विश्वासाचा ॥ ५ ॥ [आत्मवंतमिति] हृदयीं हाचि न समाये । बुद्धीतें गिंवसूनि ठाये । तेथें संशयात्मक होये । लोकत्रय ॥ ६ ॥

**“ ह्मणून संशयाहून अत्यंत घोर असें दुसरें पातक नाहीं. संशय हा प्राण्याला घातकी जाळें आहे. २०३ ह्यासाठीं ज्ञानाच्या अभावांत राहणारा संशय, तूं टाकून दे. ह्याचाच आधीं पराजय कर. २०४ अज्ञानाचा गर्द अंधार पडला ह्मणजे हा मनामध्यें फार फैलावतो, आणि त्यामुळें विश्वासाचा मार्ग निखालस मोडून जातो. २०५ हा हृदयांतच भरून राहत नाहीं, तर तो बुद्धीलाही आच्छादून टाकतो, आणि त्यामुळें त्रैलोक्य संशयात्मक होतें.” २०६**

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥४२॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ब्रह्मार्पणयोगोनाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

[ तस्मादिति ] ऐसा जरी थोरावे[9] । तरी उपायें एकें आंगवे[10] । जरी हातीं होय बरवें । ज्ञानखड्ग ॥ ७ ॥ तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखटें[11] । निखळ[12] हा निवटे[13] । मग निःशेष खांत[14]

१ ह्याशिवाय. २ गोष्ट. ३ सहजच. ४ अरुचि. ५ पुढें. ६ समजून येतें. ७ सुख पावे. ८ ज्ञानाबरोबरच. ९ माजतो, पुष्ट होतो. १० आग. ११ अनुकूल. १२ जन्मांधास. १३ ठाऊक.

१ नाशाची. २ जाळें. ३ जिंकावा. ४ मध्यें, आंत. ५ अंधार. ६ अत्यंत. ७ मावत नाहीं. ८ आच्छादून. ९ माजला. १० हार येतो. ११ तीव्र. १२ निखालस. १३ निर्मूल होतो. १४ क्षत, किंतु.

फुटे । मानसींचा ॥ ८ ॥ [ छित्त्वैनमिति ] याकारणें पार्था । उठीं वेगीं वरौता । नाश करोनि हृदयस्था । संशयासी ॥९॥ ऐसें सर्वज्ञाचा बाप । जो श्रीकृष्ण ज्ञानदीप । तो ह्मणतसे स-कृप । ऐकें राया ॥ २१० ॥ तंव या पूर्वापार बोलाचा । वि-चारूनि कुमर पंडूचा । कैसा प्रश्न अवसरींचा । करिता हो-ईल ॥ ११ ॥ ते कथेची संगती । भावाची संपत्ती । रसाची उन्नती । ह्मणिपेल पुढां ॥ १२ ॥ जयाचिया बरवेपणीं । कीजे आठांरसांची वोंवाळणी । जो सज्जनाचिये आयणी । विसावा जगीं ॥ १३ ॥ जो शांतचि अभिनवेल । ते परियसा मन्हाटे बोल । जे समुद्राहूनि सखोल । अर्थभरित ॥ १४ ॥ जैसें बिंब तरी बचकेचि एवढें । परि प्रकाशासि त्रिभुवन थोकडें । शब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी ॥ १५ ॥ ना तरी कामितयाचिया इच्छा । फळे कल्पवृक्ष जैसा । बोल व्यापक होय तैसा । तरी अवधान द्यावें ॥ १६ ॥ हें असो काय ह्मणावें । सर्वज्ञ जाणती स्वभावें । तरी निकें चित्त द्यावें । हे विनंति माझी ॥ १७ ॥ जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती । जैसी लावण्यगुण कुळवती । आणि पतिव्रता ॥ १८ ॥ आधींचि साखर आवडे । तेचि जरी ओखंदीं जोडे । तरी सेवावी ना कां कोडें । नांवानावां ॥ १९ ॥ सहजें मलयानिल मंद सुगंध । तया अमृताचा होय स्वाद । आणि तेथेंचि जोडे नाद । जरी दैवगत्या ॥ २२० ॥ तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें ना-चवी । तेविंचि कानांकरवीं ह्मणवी । बाप माझा ॥ २१ ॥ तैसें कथेचें इये ऐकणें । एक श्रवणासि होय पारणें । आणि संसारदुःख मूळेंवीण । विकृतीविणें ॥ २२ ॥ जरी मंत्रेंचि वैरी मरे । तरी वायां कां बांधावे कुठारे । रोग जाय दुधें साखरें । तरी निंब कां पियावा ॥ २३ ॥ तैसा मनाचा मार न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्ष असे आयता । श्रवणाचिमाजि ॥ २४ ॥ ह्मणोनि आथिलिया आराणुका । गीतार्थ हा निका । ज्ञानदेव ह्मणे आइका । निवृत्तिदास ॥ २२५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्थोऽ-ध्यायः ॥ ४ ॥ श्लोक ४२, ओव्या २२५

"इतका जरी फैलावला, तरी तो स्वाधीन होण्याला एक उपाय आहे. ज्ञानरूप तेजस्वी खड्ग जर हातांत असेल, २०७ तर त्या तीव्र ज्ञानशस्त्रानें हा समूळ छेदन करतां येतो. आणि मग मनांतील किंतु निःशेष लयास जातो. २०८ ह्याकरितां पार्था! हृदयांतील संशयाचा नाश करून लौकर ऊठ." २०९ राजा ऐक! सर्वज्ञाचा पिता जो ज्ञानदीप श्रीकृष्ण तो कृपा-वंत होऊन असें ह्मणाला. २१० ह्यावर पंडूचा कुमार, ह्या पूर्वापार भाषणाचा विचार करून स-मयोचित प्रश्न करील. २११ त्या कथेचा विस्तार पुढें आहे. त्याला भक्तीची संपत्ति; व रसाची उ-न्नति असें ह्मणतील. २१२ त्याच्या चांगुलपणा-वरून आठ रस ओंवाळून टाकावेत. सज्ज-नाच्या बुद्धीला जगामध्यें तो एक विसावा आहे. २१३ जो शांत रूपानेंच प्रगट होईल. ते मऱ्हाठी भाषेचे शब्द ऐका. हे शब्द अर्थ-भरित असून समुद्रापेक्षांही खोल आहेत. २१४ जसें सूर्याचें बिंब पाहूं गेलें तर बचके-येवढेंच असतें. पण प्रकाश पडावयाला त्रि-भुवन सुद्धां थोडें होतें. त्याप्रमाणेंच ह्यांतील शब्दांची व्याप्ति आहे, तिचा अनुभव घ्यावा. २१५ किंवा कामुकाच्या इच्छेप्रमाणें कल्प-वृक्ष जसा फल देतो, तसे हे शब्द व्यापक आहेत. ह्याकरितां नीट लक्ष्य द्यावें. २१६ असो, हें काय सांगायाला पाहिजे? सर्वज्ञ आहेत, त्यांना आपोआपच कळतें. तरीही नीट चित्त देण्याविषयीं माझी विनंती आहे. २१७ ज्याप्रमाणें एखादी स्त्री कुलवान् रूपवान् असून पतिव्रता असावी, त्याप्रमाणें ही कवित्वरचना साहित्य आणि शांतिच सांगत आहे, असें वाटतें. २१८ आधींच साखर आवडते, आणि तीच औषधांत पडली, तर ती आनंदानें पुनः पुन्हा कां ग्रहण करूं नये? २१९ चंदनावरून आलेला वारा मूळचाच मंद आणि सुगंधित असतो. त्याला अमृताची चव आली; आणि त्यालाच दैवयोगानें सुस्वर प्राप्त झाला, २२० तर तो स्पर्शाच्या योगानें सारें अंतःकरण निववील;

१ वर. २ समयोचित. ३ ह्मणाल. ४ बुद्धीला. ५ अप्र-तिम प्रगट होईल. ६ सूर्याचें मंडळ. ७ लहान. ८ माग-णारांच्या. ९ कवित्वरचना. १० औषधामध्यें. ११ आनं-दानें. १२ वारंवार. १३ घालवणें. १४ विकाररहित. १५ कुऱ्हाड. १६ संपन्न असतां. १७ समाधान.

स्वादानें जिव्हेला नाचवील; आणि तसेंच कानाकडून 'तूं आमचा मायबाप' असें ह्मणवील. २२१ तशीच गोष्ट ह्या कथाश्रवणाची आहे. हिच्या योगानें एक तर कानाला पारणें होतें, आणि अनायासें संसारदुःख घालवितां येतें. २२२ मंत्रानेंच जर शत्रु मरण पावतो आहे, तर विनाकारण तरवार बांधण्याचें प्रयोजन कोणतें? दुधानें आणि साखरेनेंच जर रोग बरा होत आहे, तर लिंब कशाकरितां प्यावा? २२३ तसें, मनाचा कोंडमारा न करितां, आणि इंद्रियांना दुःख न देतां, येथें श्रवणांतच मोक्ष आहे. २२४ ह्मणून समाधानयुक्त होण्याला हा गीतार्थ फार उत्तम आहे. ह्याकरितां निवृत्तिदास ज्ञानदेव ह्मणतात 'ऐका.' २२५

## चौथा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ५ वा.

अर्जुन उवाच-

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ।
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥१॥

[अर्जुन उवाच-संन्यासं कर्मणां कृष्ण] मग पार्थ श्रीकृष्णातें ह्मणे । हांहो हें कैसें तुमचें बोलणें । एक होय तरी अंतःकरणें । विचारूंये ॥ १ ॥ मागां सकळकर्मांचा संन्यास। तुह्मीच निरोपिला[1] होता बहुवसें[2] । [पुनर्योगं च शंससि] तरी कर्मयोगीं केविं अतिरस । पोखीतसां[3] पुढती[4] ॥ २ ॥ ऐसें द्व्यर्थ हें बोलतां । आह्मा नेणतयांच्या चित्ता । आपुलिये[5] चाडे श्रीअनंता । उमज[6] नोहे ॥ ३ ॥ ऐकें एकसारातें[7] बोधिजे । तरी एकनिष्ठचि बोलिजे । हें आणिकीं[8] काय सांगिजे । तुह्मांप्रति[9] ॥ ४ ॥ तरी याचिलागीं तुमतें । म्यां रांउळासि[10] विनविलें होतें । जे हा परमार्थ ध्वनितें[11] । न बोलावा ॥ ५ ॥ परी मागील असो देवा । [यच्छ्रेय एतयोरेकमिति] आतां प्रस्तुतीं उकल[12] देखावा[13] । सांगें दोहींमाजि बरवा । मार्ग कवण ॥ ६ ॥ जो परिणामींचा[14] निर्वाळा[15] । अचुंबित[16] ये फळा । आणि अनुष्ठितां प्रांजळा[17] । सावियांचि[18] ॥ ७ ॥ जैसें निद्रेचें सुख न मोडे । आणि मार्ग तरी बहुसाल सांडे । तैसें सुखासना[19] सांगडें । सोहपें[20] होय ॥ ८ ॥ येणें अर्जुनाचेनि बोलें । देवो मनीं रिझले[21] । मग होईल ऐकें ह्मणितलें । संतोषोनियां ॥ ९ ॥ देखा कामधेनुऐसी माये । सदैवा जया होये । तो चंद्रही परि लाहे[22] । खेळावया ॥ १० ॥ पाहें पां श्रीशंभूची प्रसन्नता । तया उपमन्युचिया आर्ती[23] । काय क्षीराब्धि दूधभाता । देइजेचिना ॥ ११ ॥ तैसा औदार्याचा कुरुठा[24] । श्रीकृष्ण आपु जाहालिया[25] सुभटा[26] । कां सर्व सुखाचा वसौटा[27] । तोचि नोहावा[1] ॥ १२ ॥ एथ चमत्कार कायसा । गोसावी[2] श्रीलक्ष्मीकांताऐसा । आतां आपुलिया सवेसा[3] । मागावा कीं ॥ १३ ॥ ह्मणोनि अर्जुनें ह्मणितलें । तें हांसोनि येरें दिधलें । तेंचि सांगेन बोलिलें । काय कृष्णें ॥ १४ ॥

मग पार्थ श्रीकृष्णाला ह्मणाला "अहो! हें तुमचें बोलणें कसें? एक असेल, तर त्याचा अंतःकरणांत विचार करतां येईल. १ पूर्वी तुह्मीच परोपरीनें सकल कर्मांचा संन्यास सांगितला, आणि आतां पुन्हा कर्मयोगाची प्रशंसा कशी करितां? २ श्रीअनंता! आपल्या ह्या इच्छानुरूप द्व्यर्थी बोलण्यानें आह्मा अज्ञांचा समज पडत नाहीं. ३ ऐका. एक तत्त्व सांगणें झालें, तर तें एकनिष्ठेनेंच सांगितलें पाहिजे. हें तुह्माला काय दुसऱ्यानें सांगावें? ४ ह्याचसाठीं तर मीं आपणास माहेरघर मानून विनंती केली होती कीं, हा परमार्थ गूढार्थानें सांगूं नये. ५ पण देवा! ती मागची गोष्ट आतां राहूं द्या. प्रस्तुत त्या दोहोंमध्यें चांगला मार्ग कोणता? त्याचा खुलासा करावा. ६ तो अखेरचा निर्णय असावा; त्याच्या योगानें बिनचूक फलप्राप्ति व्हावी; आणि त्याचें अवलंबन करूं ह्मटलें तर, तो सहज आणि सुगम असावा. ७ ज्याप्रमाणें, निद्रासुख तर अंतरूं नये; आणि वाट तर पुष्कळ सरावी; अशा सुखासनाबरोबर असलें, तर मोठी सोय होते." ८ अर्जुनाच्या ह्या भाषणानें देव मनामध्यें आनंदित झाले आणि प्रसन्नमुद्रेनें ह्मणतात "ठीक आहे, तसेंच होईल. ऐक." ९ अहो! ज्याला सदासर्वकाल कामधेनूसारखीच माता मिळाली, त्याला कमी तें काय? खेळायाला चंद्र मागि-

१ सांगितला, प्रतिपादन केला. २ परोपरीनें. ३ वाढवितां. ४ पुन्हा. ५ आपल्या. ६ समजूत. ७ एकच तथ्यांश. ८ दुसऱ्यानें. ९ तुह्माला. १० माहेरघरास. ११ गूढार्थानें. १२ उलगडा. १३ दाखवावा. १४ शेवटचा. १५ निवाडा. १६ बिनचूक. १७ सुगम. १८ सहज. १९ सोयीचें वाहन. २० सोपें. २१ संतोषले. २२ मिळतो. २३ इच्छेसाठीं. २४ घर. २५ प्राप्त. २६ शूराला (अर्जुनाला). २७ आश्रय.

१ न व्हावा. २ धनी. ३ स्वेच्छा.

तला तरी सुद्धां मिळेल. १० **श्रीशंकराचीच** प्रसन्नता पाहाना ? त्या **उपमन्यूच्या*** इच्छेसाठीं, दूधभाताला क्षीरसमुद्र तिच्यानें देववला नाहीं काय ? ११ तसें, औदार्याचें घर जो **श्रीकृष्ण**, तो त्या शूर योद्ध्याला प्राप्त झाला. मग तो सर्व सुखाचें स्थान कां होऊं नये ? १२ ह्यांत चमत्कार तो काय ? **श्रीलक्ष्मीकांता**सारखा धनी असल्यावर आपल्या इच्छेप्रमाणें मागावें. १३ ह्मणून **अर्जुनानें** जें मागितलें, तें त्यानीं आनंदानें दिलें. तें **कृष्णाचें** भाषण काय ? तें आतां सांगतों. १४

श्रीभगवानुवाच.

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥

[ श्रीभगवानुवाच–संन्यास इति ] तो ह्मणे गा कुंतीसुता । हे संन्यासयोग विचारितां । मोक्षकर[1] तत्त्वता । दोनीही होती ॥ १५ ॥ [ तयोरिति ] तरीं जाणानेणां[2] सकळां । हा कर्मयोग कीरे[3] प्रांजळां[4] । जैसी नावें[5] स्त्रियां बाळां । तोयतरणीं[6] ॥ १६ ॥ तैसें सारासार पाहिजे । तरी सोहपा[7] हाचि देखिजे । येणें संन्यासफळ लाहिजे[8] । अनायासें ॥ १७ ॥ आतां याचिलागीं सांगेन । तुज संन्यासियांचें[9] चिन्ह[10] । मग सहजें हे[11] अभिन्न । जाणसी तूं ॥ १८ ॥

तो ह्मणाला " हे **कुंतीसुता**! खरा विचार केला तर हा संन्यास आणि योग, हे दोन्हीही मोक्षप्रदच आहेत. १५ तरी, जाणत्या नेणत्या सर्वांना हा कर्मयोगच निश्चयेंकरून सुलभ आहे. उदकांतून तरून जाण्याला बायकामुलांना नांव जशी सोयीची, १६ तसा सारासार विचार करून पाहिलें तर, हा कर्मयोगच सोपा दिसतो. शिवाय, ह्याच्या योगानें संन्यासाचें फलही अनायासें प्राप्त होतें. १७ ह्याकरितां तुला आतां संन्याशाचीं लक्षणें सांगतों. ह्मणजे ह्या दोहोंत कांहीं भेद नाहीं, हें तुला सहज कळून येईल. " १८

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ।
निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ३ ॥

[ न कांक्षति ] तरी गेलियाची से[1] न करी । न पेवतां[2] चोंड[3] न धरी । जो सुनिश्चळ[4] अंतरीं । मेरु जैसा ॥ १९ ॥ [ निर्द्वंद्वो हि महाबाहो ] आणि मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण । [ ज्ञेयः स नित्यसंन्यासी ] पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥ २० ॥ जो मनें ऐसा जाहला । संगीं[5] तोचि सांडिला[6] । [ सुखं ] ह्मणोनि सुखें सुख पावला । अखंडित ॥ २१ ॥ आतां गृहादिक आघवें[7] । तें कांहीं नलगे त्यजावें । जें घेतें[8] जाहालें स्वभावें । निःसंग ह्मणऊनि ॥ २२ ॥ [ बंधात्प्रमुच्यते ] देखें अग्नि विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळ होये । तैं ते कापुसें विवंसुये[9] । जियापरी ॥ २३ ॥ तैसा असंतेनि[10] उपांधी[11] । नोकळिजे[12] तो कर्मबंधीं । जयांचिये[13] बुद्धि । संकल्पें[14] नाहीं ॥ २४ ॥ ह्मणोनि कल्पना[15] जैं सांडे[16] । तैंचि गा संन्यास घडे । इयें कारणें दोनी सांगडे[17] । संन्यासयोग ॥ २५ ॥

" तर जो गेल्याची आठवण करीत नाहीं; प्राप्त न झालें तर इच्छा धरीत नाहीं; जो मनामध्यें मेरूप्रमाणें अढळ, १९ आणि ज्याचें अंतःकरण 'मी' व 'माझें' याची आठवणच विसरून गेलेलें. **पार्था**! तो सदासर्वकाल संन्याशीच आहे

* हा वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपाद ऋषीचा ज्येष्ठ पुत्र. व धौम्य ऋषीचा ज्येष्ठ बंधु. हा लहान असतांना, दुसऱ्या एका ऋषीच्या आश्रमांत बंधूसहवर्तमान खेळावयास गेला होता. तेथें एका ऋषिपत्नीनें आपल्या गायीचें दूध काढून आपल्या मुलास प्यावयास दिलें. व त्याबरोबर उपमन्यूस व त्याच्या भावासही थोडथोडें दिलें. तेव्हां उपमन्यू घरीं आल्यावर आईपाशीं दूध मागूं लागला. पण घरांत फार गरीबी असल्यामुळें, तिनें नित्याप्रमाणें पीठ पाण्यांत कालवून तेंच दूध ह्मणून दिलें. पण उपमन्यू तें घेईना. आपण आतां प्यालों तसलें दूध दे ह्मणून हट्ट घेऊन बसला. तेव्हां आई ह्मणाली " बावारे ! येवढें सुकृत देवापाशीं तुह्मीं केलें नाहींत. " तेवढ्यावरूनच त्यास उपरती होऊन त्यानें शंकराचें आराधन करून त्यास प्रसन्न करून घेतलें, आणि क्षीरसमुद्र संपादन केला. ( ही कथा महाभारत, अनुशासन पर्वांत अ० १४ मध्यें आहे. )

१ मोक्ष देणारे. २ जाणत्याला व नेणत्याला. ३ निश्चयेंकरून. ४ सुलभ. ५ नौका, तर. ६ उदक तरून जाण्यास. ७ सोपा, सुलभ. ८ मिळतें, लाभतें. ९ संन्याशाचें. १० लक्षण. ११ कर्मयोग व संन्यासयोग.

१ आठवण, स्मृति. २ न मिळतां. ३ इच्छा, आवड. ४ अत्यंत स्थिर. ५ संसाराला, संसर्गाला. ६ मुकला, अंतरला. ७ सर्व. ८ अंतःकरण (घेणारे). ९ झांकतां येते. १० असलेला. ११ सांवसर्ग. १२ बद्ध होत नाहीं. १३ ज्याच्या. १४ हेतु. १५ विकल्प. १६ नाहींशी होईल. १७ समसमान.

ह्मणून समजावें. २० असें ज्याचें मन झालें, त्यानेंच संसार सोडला; आणि त्यामुळें तोच सुखानें अखंड सुखावला असें समजावें. २१ आतां घर, दार, आदिकरून सर्व कांहीं टाकण्याची गरज नाहीं. कारण त्यास वश होणारें अंतःकरण अपोआपच निरिच्छ झालेलें असतें. २२ हें पहा! अग्नि विझून गेला, आणि रक्षा मात्र शिल्लक राहिली, तर ती ज्याप्रमाणें कापसानें सुद्धां झांकतां येते, २३ त्याप्रमाणें ज्याच्या बुद्धीला संकल्प नाहीं, तो उपाधींत असतांही कर्मबंधांत बांधला जात नाहीं. २४ ह्मणून कल्पना जेव्हां नाहींशी होते, तेव्हांच संन्यास घडतो. ह्याकरितां संन्यास आणि योग हे दोन्ही सारखे आहेत." २५

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः ।
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥ ४ ॥

[सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति] येन्हवीं तरी पार्था । जे मूर्ख होती सर्वथा । ते सांख्ययोगसंस्था । जाणती केवीं ॥ २६ ॥ सहजें ते अज्ञान । ह्मणोनि ह्मणती ते भिन्न । [ न पंडिताः ] येन्हवीं दीपाप्रति काइ आनान । प्रकाश आहेती ॥ २७ ॥ [ एकमप्यास्थिव इति ] पैं सम्यक एकें अनुभवें । जिहीं देखिलें तत्त्व आघवें । ते दोहींतेंही ऐक्यभावें । मानिती गा ॥ २८ ॥

"आणखी **पार्था!** जे निखालस मूर्खच आहेत; त्यांना सांख्य आणि योग यांचीं स्वरूपें कळणार कशीं? २६ ते बोलून चालून अज्ञान असल्यामुळें, हे दोन्ही भिन्न आहेत असें ह्मणतात. वस्तुतः दिव्यांचे प्रकाश काय वेगळे वेगळे असतात? २७ तथापि ज्यांनीं सारें वास्तविक स्वरूप पुऱ्या अनुभवानें ओळखलें, ते दोहोंलाही एकरूप मानतात." २८

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥

[ यत्सांख्यैरिति ] आणि सांख्यीं जें पाविजे । तेंचि योगीं पामिजे । ह्मणोनि ऐक्य दोहींतें सहजें । इयांपरी ॥ २९ ॥

१ ज्ञानयोग आणि कर्मयोग ह्यांची व्यवस्था. २ काय. ३ वेगळे वेगळे. ४ आहेत. ५ परंतु. ६ चांगलें. ७ परब्रह्मरूप. ८ ज्ञानमार्गानें. ९ कर्मयोगानें. १० पावतें. ११ त्याप्रमाणें.

[ एकमिति ] देखें आकाशा आणि अवकाशा । भेद नाहीं जैसा । तैसें ऐक्य योगसंन्यासा । वोळखे जो ॥ ३० ॥ तयासींचि जगीं पाहलें । आपणपें तेणेंचि देखिलें । जया सांख्य योग जाणावले । भेदेंविण ॥ ३१ ॥

"आणखी, ज्ञानमार्गानें जें प्राप्त होतें, तेंच कर्मयोगानेंही प्राप्त होतें; ह्मणून दोहोंचें असें ऐक्य असणें हें साहजिकच आहे. २९ हें पहा! आकाश आणि पोकळी यांत जसा भेद नाहीं, तसा योग आणि संन्यास ह्यांत भेद नाहीं. ते एकरूपच आहेत असें जो ओळखतो, ३० त्यालाच जगामध्यें उजाडलें. ज्याला सांख्य आणि योग अभेदभावानें आहेत असें कळलें, त्यालाच आत्मस्वरूपाची ओळख झाली." ३१

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाऽधिगच्छति ॥ ६ ॥

[ योगयुक्त इति ] जो युक्तिपंथें पार्था । चढे मोक्षपर्वता । तो महासुखाचा निमथा । वहिला पावे ॥ ३२ ॥ [ संन्यासस्त्विति ] येरा योगस्थिती जया सांडे । तो वायाचि गा हव्यासीं पडे । परि प्राप्ति कहीं न घडे । संन्यासाची ॥ ३३ ॥

"**पार्था!** जो योगमार्गानें मोक्षपर्वतावर चढून जातो, तो ब्रह्मसुखाच्या शिखराला त्वरित पोहोंचतो. ३२ दुसरा, ज्याला योगस्थिति घडत नाहीं, तो विनाकारण त्या छंदांत पडतो, त्याला कधीं संन्यासाची प्राप्ति घडत नाहीं." ३३

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥

[ योगयुक्तो विशुद्धात्मा ] जेणें भ्रांतीपासूनि हिरतलें । गुरुवाक्यें मन धुतलें । मग आत्मस्वरूपीं घातलें । रोऊनियां ॥ ३४ ॥ जैसें समुद्रीं लवण न पडे । तंव वेगळें अल्प आवडे । मग होय सिंधूचिएवढें । मिळे तेव्हां ॥ ३५ ॥ [ विजितात्मा जितेंद्रियः ] तैसें संकल्पोनि काढिलें । जयाचें मनचि चैतन्य जाहालें । [ सर्वभूतात्मभूतात्मा ] तेणें एकेदे

१ पोकळीला. २ उघड झालें, उजाडलें. ३ स्वतःला. ४ कळले. ५ योगमार्गानें. ६ ब्रह्मसुखाचा. ७ शिखर. ८ सत्वर. ९ इतरांना. १० कर्मयोग. ११ घडत नाहीं. १२ छंदांत. १३ कधीं. १४ हिरावून घेतलें. १५ दडपून, खोंचून. १६ वाटतें. १७ संकल्पापासून. १८ ब्रह्मस्वरूप. १९ अल्प व्यापकत्वानें.

शियें परी व्यापिलें । लोकत्रय ॥३६॥ [कुर्वन्नपि न लिप्यते] आतां कर्ता कर्म करावें । हें खुंटलें तया स्वभावें । आणि करी जऱ्ही आघवें । तऱ्ही अकर्ता तो ॥ ३७ ॥

**"ज्यानें भ्रांतीपासून मन काढून घेऊन गुरुवाक्यानें क्षालन करून मग तें आत्मस्वरूपामध्यें खेंचून टाकलें; ३४ मीठ समुद्रामध्यें पडलेलें नसतें, तावत्कालपर्यंत तें जसें थोडें वाटतें, पण तें जेव्हां समुद्राला मिळतें तेव्हां समुद्रायेवढेंच होतें. ३५ तसें, ज्याचें मन संकल्पापासून निघून ब्रह्मस्वरूप झालें, त्यानें अल्पव्यापकतेनेंच लोकत्रय व्यापलें. ३६ मग त्याचें कर्ता आणि कर्म करणें आपोआपच राहिलें. आणि जरी त्यानें सर्व कर्म केलें, तरी तो अकर्ताच." ३७**

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।
पश्यन्शृण्वन्स्पृशन्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ॥८
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि ।
इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तंत इति धारयन् ॥ ९ ॥

[नैव किंचिदिति] जे पार्था तया देहीं । मी ऐसा आठऊ नाहीं । तरी कर्तृत्व कैचें काई । उरे सांगें ॥ ३८ ॥ ऐसें तनुत्यागेंविण । अमूर्ताचे गुण । दिसती संपूर्ण योगयुक्तां ॥ ३९ ॥ येऱ्हवीं आणिकांचिये परी । तोही एक शरीरी । अशेषाही व्यापारीं । वर्तत दिसे ॥ ४० ॥ [पश्यन्शृण्वन्स्पृशन्जिघ्रन्] तोही नेत्रीं पाहे । श्रवणीं ऐकत आहे । परी तेथिंचा सर्वथा नोहे । नवल देखें ॥ ४१ ॥ स्पर्शासि तरी जाणे । परिमळ सेवी घ्राणें । [प्रलपन्] अवसरोचित बोलणें । तयाहि आथि ॥ ४२ ॥ [अश्नन् गृण्हन्] आहारातें स्वीकारी । [विसृजन्] त्यजावें तें परिहरी । [स्वपन्] निद्रेचिया अवसरीं । निदिजे सुखें ॥ ४३ ॥ [गच्छन्] आपुलेनि इच्छावशें । तोही गा चालत दिसे । पैं सकळ कर्म ऐसें । राहाटे कीर ॥ ४४ ॥ हें सांगों काइ एकैक । [श्वसन्] देखे श्वासोश्वासादिक । [उन्मिषन्निमिषन्नपि] आणि निमिषोन्निमिष । आदिकरूनि ॥ ४५ ॥ पार्था तयाचे ठायीं । हें आघवेंचि आथि पाहीं । परि तो कर्ता नव्हे कांहीं । प्रतीतिवळें ॥४६॥ जैं भ्रांतिसेजे सुतला । तैं स्वप्नसुखें भुतला । मग तो ज्ञानोदयीं चेइला । म्हणोनियां ॥ ४७ ॥

**"कारण, त्याच्या देहामध्यें 'मी' हें टाउकच नाहीं. मग पार्था! कर्तृत्व तें कसलें आणि काय उरलें? सांग. ३८ अशाप्रकारें जो योगयुक्त आहे, त्याच्या आंगीं, शरीराचा त्याग न करितांही, संपूर्ण विदेह्याचे गुण दिसून येतात. ३९ बाकी, इतरांप्रमाणेंच तोही एक शरीरी असून सर्व कर्मांत राहत असतो. ४० तोही डोळ्यांनीं पाहतो; व कानांनीं ऐकतो, पण आश्चर्य पहा! कीं तो मुळींच तेथचा नव्हे. ४१ स्पर्शाला तर जाणतो; नाकानें सुगंध घेतो; समयोचित बोलणेंही त्याला आहे. ४२ भक्ष्याचा स्वीकार करतो; टाकावयाचें तें टाकतो; निजावयाची वेळ आली म्हणजे खुशाल निजतो. ४३ आपल्या इच्छेप्रमाणें तोही चाललेला दिसतो. ह्याप्रमाणें निश्चयेंकरून सर्व कर्में करतो. ४४ नेत्रांची उघडझांप करणें, श्वासोच्छ्वास करणें आदिकरून एक एक किती सांगावींत? ४५ पार्था! हें सर्व कांहीं त्याच्या ठायीं आहे पहा. परंतु अनुभवसामर्थ्यामुळें तो कांहीं कर्ता नव्हे. ४६ भ्रांतीच्या बिछान्यावर निजलेला असतो, तोंपर्यंत तो स्वप्नसुखाला भुललेला असतो. म्हणूनच मग तो ज्ञानोदयानें जागृत होतो." ४७**

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥ १० ॥

[ब्रह्मण्याधाय कर्माणि] आतां अधिष्ठानसंगती । [इंद्रियाणींद्रियार्थेष्विति श्लो. ९] अशेषाही इंद्रियवृत्ती । आपुलालिया अर्थीं । वर्तत आहाती ॥ ४८ ॥ [संगं त्यक्त्वा करोति यः] दीपाचेनि प्रकाशें । गृहींचे व्यापार जैसे । देहीं कर्मजात तैसें योगयुक्ता ॥ ४९ ॥ तो कर्में करी सकळें । [लिप्यते नेति] परी कर्मबंधा नाकळे । जैसें न सिंपे जळीं जळें । पद्मपत्र ५०

**आतां, ब्रह्माच्या अनुषंगानें, इंद्रियांच्या सर्व प्रवृत्ति, आपआपल्या विषयांमध्यें वर्तत असतात. ४८ दीपाच्या प्रकाशानें जसें घरांतील व्यापार**

१ सर्व. २ करणारा नव्हे. ३ स्मरण, आठवण. ४ शरीराचा त्याग केल्याशिवाय. ५ विदेह्याचें, निराकाराचे. ६ इतरांच्या. ७ देहधारण करणारा. ८ समयोचित. ९ आहे. १० टाकतो. ११ निजतो. १२ निश्चयें करून. १३ काय. १४ नेत्र उघडणें व झांकणें. १५ अनुभवाच्या सामर्थ्यानें.

१ भ्रांतीच्या बिछान्यावर. २ निजला. ३ अनुभविला. ४ जागृत झाला. ५ ब्रह्माच्या संगतीनें. ६ एकंदर. ७ विषयामध्यें. ८ सारीं कर्में. ९ भिजे.

**चालत असतात, त्याप्रमाणें योगयुक्ताचीं कर्मे देहामध्यें चाललेलीं असतात. ४९ ज्याप्रमाणें कमलाचें पान पाण्यामध्यें असून तें पाण्यानें भिजत नाहीं, त्याप्रमाणें तो सारीं कर्मे करतो परंतु कर्मबंधांत सांपडत नाहीं" ५०**

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ।
योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वाऽत्मशुद्धये ११

[कायेन] देखें बुद्धीची भाष[1] नेणिजे । मनाचा अंकुर नुदेजे[2] । ऐसा व्यापार तो बोलिजे । शारीर[3] गा ॥ ५१ ॥ हेंच मराठें परियेसीं [illegible] बाळकाची चेष्टा जैसी । योगिये कर्मे करिती तैसीं । केवळा तनू ॥ ५२ ॥ [मनसा] मग पांच[5]भौतिक संचलें[6] । जेव्हां शरीर असे निदेलें । तेथें मनचि राहाटे[7] एकलें । स्वप्नीं जेवीं ॥ ५३ ॥ नवल ऐकें धनुर्धरा । कैसा वासनेचा संसारा[8] । देहाहीं नेदी उजगरा[9] । परी सुखदुःखें भोगी ॥ ५४ ॥ इंद्रियांचा गांवीं नेणिजे । ऐसा व्यापार जो निपजे । तो केवळ गा ह्मणिजे । मानसाचा[10] ॥ ५५ ॥ [योगिनः कर्म कुर्वंति] योगिये तोही करिती । परी कर्मे ते न बंधिजती । जे[11] सांडिली आहे संगती । अहंभावाची॥५६॥ आतां जाहालिया भ्रमहत[12] । जैसें पिशाचाचें चित्त । [केवलैरिंद्रियैरपि] मग इंद्रियांचें चेष्टित । विकळ[13] दिसे ॥ ५७ ॥ स्वरूप तरी देखे । आळविलें[14] आइके । शब्द बोले मुखें । परि ज्ञान नाहीं ॥ ५८ ॥ हें असो काजेंविण । जें जें कांहीं करणें । तें केवळ कर्म जाण । इंद्रियांचें ॥ ५९ ॥ [बुद्ध्या] मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें[15] । वोळखे अर्जुनातें । ह्मणे श्रीहरी ॥ ६० ॥ ते बुद्धि धुरे[16] करुनी । कर्म करिती चित्त देउनी । परि ते कर्मापासुनी । मुक्त दिसती ॥ ६१ ॥ जे बुद्धीचिये ठांवूनि[17] देहीं[18] । तया अहंकाराची सेचि[19] नाहीं । ह्मणोनि कर्म करितां पाहीं । चोखाळले[20] ॥६२॥ [संगं त्यक्त्वा] अगा करितेनवीण[21] कर्म । तेंचि तें निष्कर्म । हें जाणती सुवर्म[22] । गुरुगम्य[23] जें ॥६३॥ [आत्मशुद्धये]आतां शांतरसाचें भरितें[24]। सांडीत आहे पात्रांतें । जें बोलणें बोलोंपरौतें[25] । बोलवलें ॥ ६४ ॥ एथ इंद्रियांचा पांग[26] । जया फिटला आहे

१ वार्ता. २ उगवत नाहीं. ३ देहाचा. ४ सुलभरीतीनें. ५ पंचभूतांनीं. ६ घटित. ७ व्यापार करतें. ८ विस्तार. ९ जागृती. १० मनाचा, मानसिक. ११ कारण. १२ भ्रमयुक्त. १३ अव्यवस्थित. १४ हाक मारलेली, बोललेलें. १५ खरें. १६ प्रमुख. १७ स्थानापासून. १८ देहापर्यंत. १९ आठवण, स्मृति. २० शुद्ध झाले. २१ कर्तृत्वाच्या अभिमानावांचून. २२ खरें वर्म. २३ गुरूपासून मिळणारें. २४ पूर. २५ शब्दातीत. २६ काळजी.



चांग । तयासीचि आथि[1] लागे[2] । परिसावया ॥ ६५ ॥ हा असो अतिप्रसंग[3] । न संडी पां कथालाग[4] । होईल श्लोकसंगती[5] भंग[6] । ह्मणऊनियां ॥ ६६ ॥ जें मना आकळितां[7] कुवांडें[8] । घाघुसितां बुद्धीसी नातुडे[9] । तें दैवांचेनि[10] सुरवाडें[11] । सांगवलें तुज ॥ ६७ ॥ जें शब्दातीत[12] स्वभावें । तें बोलींचि जरी फावे[13] । तरी आणिकें काय करावें । कथा सांगें ॥ ६८ ॥ हा आर्तिविशेष[14] श्रोतयांचा । जाणोनि दास निवृत्तीचा । ह्मणे संवाद दोघांचा । परिसोनि परिसा ॥ ६९ ॥ मग श्रीकृष्ण पार्थातें । आतां प्राप्तांचें[15] चिन्ह पुरतें । सांगेन तुज निरुतें[16] । चित्त देईं ॥ ७० ॥

**"हें पहा! बुद्धीची वार्ता माहीत नसणें; मनाचा अंकुर न उगवूं देणें; असा जो व्यापार तो शारीरिक व्यापार असें ह्मणतात. ५१ ह्याचा स्पष्टार्थ ऐकावयाचा असेल तर इतकाच कीं, मुलें जशीं चेष्टा करतात तद्वत् योगीही केवळ शरीरानें कर्मे करितात. ५२ अशाप्रकारें पंचभौतिकानें बनलेलें शरीर, जेव्हां निद्रिस्त असतें, तेव्हां स्वप्नांतल्याप्रमाणें मन एकटेंच वागत असतें. ५३ धनुर्धरा! ह्या वासनेच्या विस्ताराचा काय चमत्कार आहे पहा! ती देहाला जागृत होऊं देत नाहीं, पण सुखदुःखें भोगविते. ५४ इंद्रियांचें नांव सुद्धां माहिती नाहीं, असा जो व्यापार, तो केवळ मनाचा व्यापार असें ह्मणतात. ५५ तोही योगी करतात, परंतु ते कर्मानें बद्ध होत नाहींत. कारण, त्यांनीं अहंभावाची संगती सोडलेली असते. ५६ आतां पिशाच्याच्या चित्ताप्रमाणें भ्रमयुक्त झाले, ह्मणजे त्या इंद्रियांच्या चेष्टा अव्यवस्थित दिसतात. ५७ स्वरूप तर पाहतो; हाका मारलेल्या ऐकतो; तोंडानें शब्द बोलतो; परंतु ज्ञान नाहीं. ५८ असो. तात्पर्य काय कीं, निष्कारण जें जें कांहीं करणें, तें केवळ इंद्रियाचें कर्म आहे असें समजावें." ५९ मग श्रीहरी ह्मणाले "अर्जुना! सर्वत्र जें जाणतें,**

१ आहे. २ अधिकार. ३ विषयांतर. ४ कथेचा संबंध. ५ श्लोकांचा संदर्भ. ६ सुटेल. ७ अवघड. ८ शोधितां. ९ सांपडत नाहीं. १० दैवाच्या. ११ अनुकूलतेनें. १२ वाचेच्या पलीकडचे. १३ स्पष्ट होत आहे. १४ विशेष इच्छा. १५ योग्याचे. १६ खरें.

तें बुद्धीचें खरें कर्म असें ओळख. ६० त्या बुद्धीला प्रमुख करून मनापासून कर्म करतात. परंतु ते कर्मापासून मुक्त असे दिसतात. ६१ कारण, बुद्धीपासून तों देहापर्यंत त्यांना अहंकाराची आठवणच नसते. ह्मणून कर्म करतांनाच ते शुद्ध असतात असें समज. ६२ अरे! कर्तृत्वाच्या अभिमानावांचून जें कर्म, तेंच निष्कर्म. हें गुरूपासून मिळालेलें उत्कृष्ट मर्म त्यांस माहीत असतें." ६३ आतां, ज्याच्यांतील शांतरसाचा पूर पात्रांतून सांडत आहे; जें शक्तीच्या पलीकडचें वाटत होतें, तें भाषण मजकडून झालें. ६४ ह्याकरितां, ज्यांच्या इंद्रियांची काळजी निखालस मोडली आहे, त्यांसच तें ऐकण्याचा अधिकार आहे. ६५ हें विषयांतराचें वर्णन राहूं दे. कथेचा संदर्भ सोडूं नको. नाहीं तर श्लोकांचा संबंध सुटेल. ६६ जें मनाला आकलन करण्याला कठीण; शोधूं लागलें तर बुद्धीला सांपडावयाचें नाहीं; तें दैवाच्या अनुकूलतेनें तुला सांगवलें. ६७ तें स्वभावधर्मानें वाणीच्या पलीकडचें, असें भाषणांतच जर स्पष्ट होत आहे, तर इतर गोष्टी घेऊन काय करावयाचें? कथा सांगा. ६८ ही श्रोत्यांची उत्कट इच्छा जाणून, दोघांचा* संवाद ऐकून निवृत्तिदास ह्मणतात "ऐका." ६९ मग श्रीकृष्ण अर्जुनाला ह्मणाले "आतां तुला प्राप्ताचें—सिद्धाचें—योग्याचें—पूर्ण लक्षण सांगतों. लक्ष्य दे." ७०

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् ।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते ॥ १२ ॥

[युक्त इति] तरी आत्मयोगें आथिला । जो कर्मफळाशीं विटला । तो घर रिघोनि वरिला । शांती जगीं ॥ ७१ ॥ [अयुक्त इति] येर कर्मबंधें किरीटी । अभिलाषाचिया गांठी । कळासिला खुंटी । फळभोगाच्या ॥ ७२ ॥

* श्रोतृसमुदाय व श्रीगुरु निवृत्तिदास हे पुढें असून श्रीज्ञानेश्वर महाराज ग्रंथप्रतिपादन करीत आहेत, असा ग्रंथांतील ध्वनितार्थ आहे. तेव्हां दोघांचा संवाद ह्मणजे, श्रोत्याचें आणि श्रीगुरु निवृत्तिदास ह्यांचें मध्यंतरी झालेलें भाषण असें समजावें.

१ आत्मज्ञानानें. २ संपन्न झाला. ३ लोभाच्या. ४ बद्ध झाला.

"जो आत्मज्ञानानें युक्त झाला; ज्याला कर्मफळाचा वीट आला; त्याला ह्या जगामध्यें घरीं बसल्याच शांततेनें माळ घातली ह्मणून समजावें. ७१ अर्जुना! अन्यजन कर्मबंधाच्या योगानें, अभिलाषाच्या गांठीनें फळभोगाच्या खुंटीला जखडलाच ह्मणून समजावें." ७२

सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी ।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥

[सर्वकर्माणीति] जैसा फळाचिये हांवे । तैसें कर्म करी आंघवें । मग न कीजेचि येणें भावें । उपेक्षी जो ॥ ७३ ॥ तो जयाकडे वास पाहे । तेउतीं सुखाची सृष्टि होये । तो ह्मणे तेथ राहे । महाबोध ॥ ७४ ॥ [नवद्वारे इति] नवद्वार देहीं । तो असतचि परि नाहीं । करितचि न करी कांहीं । फळत्यागी ॥ ७५ ॥

"जो फळाची आशा असल्याप्रमाणेंच सारीं कर्मे करतो, आणि मग तीं केलींच नाहींत अशा भावनेनें सोडून देतो. ७३ तो ज्या वाटेकडे पहातो, त्या वाटेला सुखाची सृष्टि होते. आणि तो ह्मणेल तेथें महाबोध राहतो. ७४ फलत्याग करणारा, नवद्वार देहामध्यें असून नसल्यासारखा, आणि सर्व करून न केल्यासारखा असतो." ७५

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

[लोकस्य सृजति प्रभुः] जैसा कां सर्वेश्वर । पाहिजे तंव निर्व्यापार । परि तोचि विस्तार । त्रिभुवनाचा ॥ ७६ ॥ [न कर्तृत्वं न कर्माणि] आणि कर्ता ऐसें ह्मणिपे । तरी कवणें कर्मीं न शिंपे । जे हातपांवो न लिंपे । उदासवृत्तीच्या ॥ ७७ ॥ योगनिद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा सळु न घडे । परि महाभूतांचें दळवाडें । उभारी भलें ॥ ७८ ॥ [न कर्मफलसंयोगमिति] जगाच्या जीवीं आहे । परी कवणाचा केंहीं नोहे । जगचि हें होय जाये । तो शुद्धीही नेणे ॥ ७९ ॥

"ज्याप्रमाणें परमेश्वर हा पाहूं गेलें तर अकर्ता आहे. पण त्रिभुवनाचा विस्तार रचतो

१ आशेनें. २ सर्व. ३ केलेंच नाहीं. ४ मार्ग. ५ तिकडे. ६ पहावें. ७ अकर्ता, क्रियाशून्य. ८ ह्मणावें. ९ लिप्त होत नाहीं. १० हातपाय. ११ अभिमान. १२ समुदाय. १३ केव्हां, कधीं.

ोच. ७६ वरें; त्याला कर्ता असें ह्मणावें, तर ो कोणत्याही कर्मांत गुंतत नाहीं. उदासवृत्ती-मुळें त्याचे हात पाय लिप्त होत नाहींत. ७७ योग-निद्रा ध्यानस्थ वृत्ति तर मोडीत नाहीं; अकर्ते-पणाचा अभिमान बाळगीत नाहीं; पण महा-भूतांचे समुदाय मात्र भले उभारून देतो. ७८ जगाच्या जीवांत आहे, पण तो कधीं कोणाचा नव्हे. हें जगच होतें आणि जातें, त्याची याला शुद्धही नाहीं." ७९

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥ १५ ॥

[ नादत्ते इति ] पापपुण्यें अशेषें । पासींचि असतु न देखें । आणि साक्षीही होऊं न ठेके । येरी गोष्टी कायसी ॥ ८० ॥ ? मूर्तीचेनि मेळें । तो मूर्तचि होऊनि खेळे । परि अमूर्तपण न मेळे । दादुलयाचें ॥ ८१ ॥ [ अज्ञानेनेति ] तो सृजी ाळी संहारी । ऐसें बोलती जें चराचरीं । तें अज्ञान गा अ-वधारीं । पंडुकुमरा ॥ ८२ ॥

"सगळीं पापपुण्यें जवळ असतांही तो पहात नाहीं. साक्षीदार सुद्धां होऊन राहत नाहीं, मग दुसरी गोष्ट कशाची? ८० तो दे-हांच्या बरोबर त्यांच्या समुदायांतून देही हो-ऊन खेळतो. तरी त्या प्रभूची निराकारता मळत नाहीं. ८१ अर्जुना! तो निर्माण करतो; पाळतो; संहार करतो; असें चराचर बोलतात, तें अज्ञान आहे, हें ध्यानांत ठेव." ८२

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥

[ ज्ञानेनेति ] तें अज्ञान जैं समूळ तुटे । तैं भ्रांतीचें म-रें फिटे । मग अकर्तृत्व प्रकटे । मज ईश्वराचें ॥ ८३ ॥ थ ईश्वर एक अकर्ता । ऐसें मानलें जरी चित्ता । आणि ोचि मी हें स्वभावता । आदीचि आहे ॥ ८४ ॥ ऐसेनि वि-ेकें उदो चित्तीं । [ तेषामिति ] तयासि भेद कैंचा त्रिज-ातीं । देखे आपुलिया प्रतीती । जगचि मुक्त ॥ ८५ ॥ शी पूर्वदिशेच्या राउळीं । उदया येतांचि सूर्य दिवाळी । ें येरीही दिशा तियेचि काळीं । कालिमा नाहीं ॥ ८६ ॥

"तें जेव्हां समूळ नाहींसें होतें, तेव्हां भ्रांतीची काजळी निघून जाऊन माझें ईश्वराचें अकर्तृत्व प्रगट होतें. ८३ ईश्वर एक अकर्ता आहे, असें जर चित्तास मानवलें, आणि तो स्वभावता मी मूळचाच आहें, ८४ असा विचार मनांत उत्पन्न झाला, तर त्याला त्रिभुवनांत भेद कसला? तो आपल्या अनुभवानें जगच मुक्त आहे असें पाहतो. ८५ ज्याप्रमाणें पूर्व दिशेच्या घरीं सूर्य उदयाला आला कीं, तेथें प्रकाशाची रेलचेल होतेच, पण दुसऱ्या दिशां-तील अंधारही त्याचवेळीं नाहींसा होतो." ८६

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ।
गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥

[ तद्बुद्धय इति ] बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान । ब्रह्मरूप भावी आ-पणा आपण । ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण । तत्परायण अहर्निशीं ॥ ८७ ॥ ऐसें व्यापक ज्ञान भलें । जयांचिया हृदया गिंवसित आलें । तयांची समताद्दष्टि बोलें । विशेषूं काई ॥ ८८ ॥ [गच्छंतीति] एक आपणपेंचि जैसें । ते देखती विश्व तैसें । हें बोलणें का-यसें । नवल एथ ॥ ८९ ॥ परी दैव जैसें कवतिकें । कहींचि दैन्य न देखे । कां विवेक हा नोळखे । भ्रांतीतें जेवीं ॥ ९० ॥ ना तरी अंधकाराची वानी । जैसा सूर्य न देखे स्वप्नीं । अ-मृत नायके कानीं । मृत्युकथा ॥ ९१ ॥ हें असो संताप कैसा । चंद्र न स्मरे जैसा । भूतीं भेद नेणती तैसा । ज्ञानिये ते ॥ ९२ ॥

"जो बुद्धीच्या निश्चयानें आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन आपण आपणांस ब्रह्मरूप आहें असें मानतो; ब्रह्माच्या ठिकाणीं परिपूर्ण निष्ठा ठेवून रात्रंदिवस त्यांतच निमग्न असतो. ८७ असें व्यापक उत्तम ज्ञान ज्याच्या हृदयांत शो-धीत आलें, त्याची समद्दष्टि शब्दांनीं काय वर्णन करावी? ८८ ते स्वतः जसें आपण, तसेंच विश्व आहे असें मानतात. हें येथें सांगण्यांत विशेष तें काय? ८९ परंतु भाग्य जसें कौतुका-खातर सुद्धां दैन्य पाहत नाहीं; किंवा विवेक हा जसा भ्रांतीला ओळखत नाहीं; ९० किंवा सूर्य जसा अंधःकाराची वानगी स्वप्नांत सुद्धां पहात नाहीं; अमृत हें मृत्यूची वार्ता कानांनीं

१ जवळच. २ असूनही. ३ राहे. ४ देहाच्या. ५ संग-ानें. ६ निराकारत्व. ७ बिघडत नाहीं, मळत नाहीं. ? प्रभूचें. ९ मशी, काजळ १० उदय. ११ घरीं. १२ प्र-ाश होतो.

१ शोधीत. २ वर्णन करूं. ३ स्वतः, आपण. ४ कौतुकानें. ५ स्वरूप. ६ उष्मा.

**सुद्धां ऐकत नाहीं; ९१ हें ह्मणा. किंवा, संताप जसा चंद्राची आठवण करीत नाहीं; त्याप्रमाणें ज्ञानी आहेत ते प्राणीमात्रामध्यें भेद समजत नाहींत." ९२**

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

[ विद्याविनय—श्वपाके च ] मग हा मशकु हा गज । कीं श्वपंच हा द्विज । पैलें इतर हा आत्मज । हें उरलें कें ॥९३॥ ना तरी हे धेनु हें श्वान । एक गुरु एक हीन । हें असो कैचें स्वप्न । जागतया ॥ ९४ ॥ [ पंडिताः समदर्शिनः ] एथ भेद तरी कीं देखावा । जरी अहंभाव उरला होआवा । तो आधींचि नाहीं आंघवा । आतां विषम काई ॥ ९५ ॥

**"मग ही माशी, हा हत्ती; किंवा हा अंत्यज, हा ब्राह्मण; पलीकडचा तो दुसऱ्याचा, व हा माझा. हें कोठें राहिलें? ९३ किंवा ही गाय, हें कुत्रें; एक थोर, एक लहान; हें राहूंद्या. कारण, जागृताला स्वप्न कशाचें? ९४ अहंभाव राहिला असेल, तर भेद दिसावयाचा; तो मुळींच नाहींसा केला, मग विषम तें काय?" ९५**

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः॥१९॥

[ निर्दोषं हि समं ब्रह्म ] ह्मणोनि सर्वत्र सदा सम । तें आपणचि अद्वय ब्रह्म । हें संपूर्ण जाणें वर्म । समदृष्टीचें ॥ ९६ ॥ [ इहैव तैर्जितः सर्गो ] जिहीं विषयसंग न सांडितां । इंद्रियांतें न दंडितां । परि भोगिली निःसंगता । कामनेविण ॥ ९७ ॥ जिहीं लोकांचेनि आधारें । लौकिकेंचि व्यापारें । परि सांडिलें निदसुरें । लौकिक हें ॥ ९८ ॥ जैसा जनामाजि खेचर । असतूंचि जना नव्हे गोचर । तैसा शरीरीं परि संसार । नोळखे तयातें ॥ ९९ ॥ हें असो पवनाचेनि मेळें । तैसें जळींचि जळ लोळे । तें आणिकें ह्मणती वेगळें । कल्लोळ हे ॥ १०० ॥ [ तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ] तैसें नाम रूप तयाचें । येऱ्हवीं ब्रह्मचि तो साचें । [ येषां साम्ये स्थितं मनः ] मन साम्यां आलें जयाचें । सर्वत्र गा ॥ १ ॥ ऐसेनि

---

१ माशी. २ अंत्यज. ३ पलीकडचा. ४ आपला मुलगा. ५ कोठें? ६ जागृताला. ७ कोणी? ८ मीपणा. ९ व्हावा. १० सारें. ११ विरुद्ध. १२ व्यावहारिक. १३ क्रियेनें. १४ अज्ञान. १५ समंध, भूत. १६ असूनही. १७ दिसत नाहीं. १८ वायूच्या. १९ लाटा. २० समतेला.

समदृष्टी जो होये । तया पुरुषा लक्षणही आहे । अर्जुना संक्षेपें सांगेन पाहें । अच्युत ह्मणे ॥ २ ॥

**"ह्मणून सदा सर्वत्र सम अद्वय ब्रह्म तें आपणच आहों असें मानणें, हें सारें समदृष्टीचें वर्म आहे हें ध्यानांत ठेव. ९६ ज्यांनीं विषयांचा संग सोडला नाहीं; इंद्रियांना दंड केला नाहीं; पण कामनाविरहित निःसंगता भोगली; ९७ ज्यांनीं लोकांच्या आधारानें लौकिकव्यवहार केला; परंतु तो लौकिक अज्ञानमूलक आहे असें मानलें. ९८ ज्याप्रमाणें समंध हा जनांमध्येंच असून जनांच्या दृष्टीस पडत नाहीं; त्याप्रमाणें तो शरीरांत असून संसाराची व त्याची ओळख नसते. ९९ हें असो. वाऱ्याच्या संगतीनें ज्याप्रमाणें पाण्यावरच पाणी खेळतें; पण त्याला इतर लोक लाटा असें ह्मणतात. १०० अर्जुना! तसें ज्याचें मन सर्वत्र सम झालें, त्याला नाम, रूप मात्र आहे. बाकी तो साक्षात् ब्रह्मच झाला." १०१ अच्युत ह्मणाले "अर्जुना! अशा प्रकारें जो समदृष्टी होतो, त्या पुरुषाचें एक लक्षण आहे, तेंही तुला आतां संक्षेपानें सांगतों." १०२**

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाऽप्रियम् ।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥

[ स्थिरबुद्धिरसंमूढो ] तरी मृगजळाचेनि पूरें । जैसें न लोटिजे कां गिरिवरें । [ न प्रहृष्येदिति ] तैसा शुभाशुभीं न विकरे । पातलिया जो ॥ ३ ॥ [ ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ] तोचि तो निरुता । समदृष्टि तत्त्वता । हरी ह्मणे पंडुसुता । तोचि ब्रह्म ॥ ४ ॥

**"मृगजळाच्या पुरानें विशाल पर्वत जसा वहात जावयाचा नाहीं, तसा शुभ किंवा अशुभ प्राप्त झालें तरी सुद्धां, जो विकार पावत नाहीं, १०३ तोच खरोखर समदृष्टी." श्रीहरी ह्मणतात "अर्जुना! तोच ब्रह्म." १०४**

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥

[ ब्राह्यस्पर्शेष्वसक्तात्मा ] जया आपणपें सांडूनि कहीं । इंद्रियग्रामावरि येणें नाहीं । तो विषय न सेवी हें काई । विचित्र

---

१ विकार पावत नाहीं. २ खरा. ३ आत्मस्वरूपाला. ४ कधीं. ५ इंद्रियांच्या वसतिस्थानांत. ६ काय? ७ नवल.

येथ ॥५॥ [ सुखमक्षय्यमश्नुते ] सहजें स्वसुखाचेनि अपारें। सुरवाडलेंनि अंतरें । रचिला ह्मणऊनि बाहिरें।पाउल न घली ॥ ६ ॥ सांगें कुमुददळाचेनि ताटें । जो जेविला चंद्रकिरणें चोखटें । तो चकोर काय वाळुवंटें । चुंबित असे ॥ ७ ॥ [ विंदत्यात्मनि यत्सुखं ] तैसें आत्मसुख उपाइलें । [स ब्रह्मयोगयुक्तात्मा ] जयासि आपणपेंचि फावलें । तया विषय सहज सांडवलें । ह्मणों काई ॥८॥ येऱ्हवीं तरी कौतुकें । विचारूनि पाहें पां निकें । या विषयाचेनि सुखें । झकविजती कवण॥९॥

**"ज्याला आत्मस्वरूप सोडून इंद्रियग्रामाकडे कधींच येणें नाहीं, तो विषयसेवन करीत नाहीं, ह्यांत आश्चर्य तें कोणतें ? १०५ आपल्या स्वाभाविक अमर्याद सुखानें, आणि सुखित झालेल्या अंतःकरणानें, आपल्याच ठायीं तो रंगलेला असतो. ह्मणून बाहेर पाऊलच घालीत नाहीं. १०६ चंद्रविकासी कमलदलाच्या ताटामध्यें चंद्रकिरणाचें भोजन केलेला चकोर पक्षी, वाळवंट चोखीत बसेल काय? सांग. १०७ तसें आत्मसुख उत्पन्न होऊन ज्याला आत्मस्वरूप प्राप्त झालें, त्याला विषय सहज सुटले, हें काय सांगावें ? १०८ आतां ह्या विषयांच्या सुखानें फसतात कोण कोण ? तेंही करमणुकीसाठीं नीट विचार करून पहा." १०९**

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ।
आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

[ ये हि संस्पर्शजा भोगाः ] जिहीं आपणपें नाहीं देखिलें। तेचि इहीं इंद्रियार्थी रंजले । जैसें रंकें कां ओंवुकैलें । तुंपातें जेवी ॥ ११० ॥ नांतरी मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरोनि जळातें । मग तोयबुद्धी बरडीतें । टाकूनि येती ॥ ११ ॥तैसें आपणपें नाहीं दिठें।जयातें स्वसुखाचे सदा खरांटे।तयासीचि विषय हे गोमटे। आवडती ॥१२॥ [आद्यंतवंतः] येऱ्हवीं विषयीं सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे । तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाजी ॥ १३ ॥ सांगें वांतवर्ष आतपधरे । ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे । तरी त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां ॥ १४ ॥ [भोगाः] ह्मणोनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे । जैसें महुर कां ह्मणिजे । विषकंदातें ॥ १५ ॥ ना तरी भौमा नाम मंगळ । रोहिणीतें ह्मणती जळ। तैसा सुखप्रवाद बरळ । विषयिक हा॥१६॥ हे असो आघवी बोली । सांग पां सर्पफणीची साउली । ते शीतल होईल केतुली । मूषकासी ॥ १७ ॥ जैसा आमिषकवल पांडवा । मीन न सेवी तंवचि बरवा । तैसा विषयसंग आघवा । निभ्रांत जाणें ॥ १८ ॥ हे विरक्तांचिये दृष्टी । जैं न्याहाळिजे किरीटी । तैं पांडुरोगाचिये पुष्टी । सारिखें दिसे ॥ १९ ॥ [दुःखयोनय एव ते] ह्मणोनि विषयभोगीं जें सुख। तें साद्यंतचि जाण दुःख । परि काय करिती मूर्ख । न सेवितां न सरे ॥ १२० ॥ तें अंतरें नेणती बापुडे । ह्मणोनि अगत्य सेवणें घडे । सांगें पूयपंकींचे किडे । काय चिळसी घेती ॥ २१ ॥ तयां दुःखियां दुःखचि जिव्हार । ते विषयकर्दमींचे दर्दुर । ते भोगजळींचे जळचर । सांडिती केवीं ॥ २२ ॥ आणि दुःखयोनी जिया आहती । तिया निरर्थका तरी नव्हती।जरी विषयांवरी विरक्ती।धरिती जीव ॥२३॥ ना तरी गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे कष्ट । हे विसांवेवीण वाट । वाहवी कवणें ॥ २४ ॥ जरीं विषयीं विषयो सांडिजेल । तरी महादोषीं कें वसिजेल । आणि संसार हा शब्द नव्हेल । लटिका जगीं ॥ २५ ॥ ह्मणोनि अविद्याजात नाथिलें । तें तिहींचि साच दाविलें । जिहीं सुखबुद्धी घेतलें । विषयदुःख ॥ २६ ॥ [कौंतेय] याकारणें गा सुभटा। हा विचारितां विषय वोखटा । तूं झणें कहीं या वाटा । विसरोनि जाशी ॥ २७ ॥ [न तेषु रमते बुधः] पैं यातें विरक्त पुरुष । त्यजिती कां जैसें विष । निराशा तयां दुःख । दाविलें नावडे ॥ २८ ॥

**"ज्यांनीं आत्मस्वरूप ओळखलें नाहीं; तेच— भुकेलेला दरिद्री जसा कोंडा सुद्धां—त्याप्रमाणें ग्रहण करतो—ह्या इंद्रियसुखांत रममाण होतात. ११० किंवा तान्हेलेले मृग, भ्रमानें**

---

१ अपार. २ सुख पावलेल्या, तृप्त झालेल्या. ३ अंतःकरणानें. ४ घाली. ५ चंद्रविकासी कमलाच्या. ६ उत्तम. ७ वाळू. ८ उत्पन्न झालें. ९ प्राप्त झालें. १० स्वस्वरूप. ११ रममाण होतात. १२ दरिद्री. १३ भुकेलेला. १४ कोंड्याला. १५ किंवा. १६ तान्हेलेलीं. १७ भ्रमानें. १८ पाण्याच्या भ्रांतीनें. १९ माळावर. २० स्वस्वरूप. २१ पाहिलें. २२ सड. २३ सुंदर. २४ योग्य. २५ विजेच्या चमकीनें. २६ दिसावें. २७ वारा, वृष्टि आणि वीज ह्यांनीं युक्त.

१ अशी. २ पुरे, निर्वाह होईल. ३ तीन तीन मजली. ४ चुनेगच्ची घरें. ५ मधुर. ६ ह्मणावें. ७ वत्सनाभास. ८ मंगळग्रहाला. ९ मृगजळास. १० विषयसेवनांत सुख आहे हें ह्मणणें. ११ व्यर्थ. १२ सर्व. १३ बोलणें. १४ कितीशी ? १५ मांसाचा घांस. १६ पहावें. १७ हृद्य, कारण. १८ पुवांच्या चिखलांतील. १९ कंटाळा, किळस. २० जिवाचें सुख. २१ ज्या. २२ आहेत. २३ त्या. २४ विश्रांतीवांचून. २५ चालावी. २६ विषयासक्तांनीं. २७ कोण ? २८ होणार नाहीं. २९ सारें अज्ञान. ३० लटकें, मिथ्या. ३१ कदाचित्. ३२ कधीं.

पाणी टाकून, माळ जमिनीलाच पाणी समजून जसे धापा टाकीत येतात, १११ तसें ज्यांनीं स्वस्वरूप अनुभविलें नाहीं, ज्यांच्या हातीं नेहेमीं आत्मसुखाचें खुंटारें, त्यांनाच हे विषय गोड वाटतात, व आवडतात. ११२ बाकी, विषयांत सुख आहे, असें ह्मणणेंच उक्त नव्हे. तसें असेल तर, विजेच्या चमकीनें तरी जगांमध्यें कां उजाडूं नये? ११३ अभ्राच्या छायेनेंच जर वारा, पाऊस व ऊन्ह यांचें संरक्षण होईल, तर हे तीन तीन मजली चुनेगच्ची वाडे तरी कशाला बांधावेत? सांग. ११४ ह्मणून 'विषयसुख' असें जें ह्मणणें तें विषकंदाला मधुर ह्मटल्याप्रमाणें केवळ अज्ञानाची वडवड होय. ११५ किंवा भौम हा अनिष्ट ग्रह असून त्यास मंगल नांव देणें, रोहिणी ह्मणजे 'मृगजळ'-जलाचा भास-त्यास जळ ह्मणणें, हें जसें असंबद्ध; तसें विषयभोगांत सुख आहे असें ह्मणणेंही व्यर्थ होय. ११६ हेंही असो. सर्पाच्या फणीची सावली, उंदराला कितीशी शीतल होईल? सांग बरें. ११७ **अर्जुना!** गळाला लागलेल्या मांसाचा घांस मत्स्यानें भक्षण केला नाहीं, तोंच ठीक. हा सर्व विषयसंग निःसंशय तसाच आहे हें ध्यानांत ठेव. ११८ **किरीटी!** हें विरक्तांच्या दृष्टीनें जेव्हां पहावें, तेव्हां ते पंडुरोगानें प्राप्त झालेल्या सुजेप्रमाणें दिसतात. ११९ ह्मणून विषयोपभोगांत जें सुख असतें तें, मूळापासून शेवटपर्यंत दुःखरूपच असतें. पण मूर्खांना सेवन करतांना तें पुरेसें होत नाहीं. त्याला ते काय करतील? १२० त्या बापड्यांना त्यांतील हृद्य कळत नाहीं. ह्मणून आदरानें सेवन करतात. रक्तांतील किंवा पुवांतील किड्यांना कधीं किळस येते का? सांग. १२१ त्या दुःखितांना दुःख हेंच जिवाचें सुख. ते विषयरूप चिखलांतील बेडूक; व भोगजलांतील जलचर होत. ते त्याला सोडणार कसे? १२२ आणखी असें पहा, ह्या विषयांवर जिवांनीं जर विरक्ति धरली, तर दुःखयोनी ह्मणून ज्या आहेत, त्या निरर्थक होणार नाहींत का? १२३ किंवा गर्भवासांतील संकट, जन्ममरणांतील कष्ट, ही वाट तरी विश्रांती घेतल्याशिवाय, चालावी कोणीं? १२४ विषयासक्तांनीं जर विषय सोडून दिले, तर महादोष राहतील तरी कोठें? आणि संसार हा शब्द जगामध्यें लटका होणार नाहीं काय? १२५ ह्मणून विषयदुःख तेंच सुख असें ज्यांच्या बुद्धीनें घेतलेलें असतें, तेच लटकें असलेलें अज्ञान सर्व खरें करून दाखवितात. १२६ ह्याकरितां हे वीरश्रेष्ठा! विचार करून पाहिलें तर, विषय हा वाईट आहे. तूं चुकून कधीं त्याच्या वाटेस जाशील हो! १२७ विरक्त पुरुष त्याचा विषाप्रमाणें त्याग करतात. निराशेमुळें प्राप्त झालेलें दुःख, त्यांना दुःख असें वाटतच नाहीं." १२८

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः॥२३॥

[शक्नोतीहैव–वेगं] ज्ञानियांच्या हेन[1] ठायीं । याची भातही[2] कीरें[3] नाहीं । देहीं देहभाव जिहीं । स्ववश केले ॥ २९ ॥ [स युक्तः स सुखी नरः] जयांतें बाह्याची[4] भाष । नेणिजेचि निःशेष । अंतरीं सुख । एक आथि[5] ॥ १३० ॥ परि तें वेगळेपणें भोगिजे । जैसें पक्षियें फळ चुंबिजे । तैसें नव्हे तेथ विसरिजे । भोगितेपणही ॥ ३१ ॥ भोगीं अवस्था एकी उठी । ते अहंकारांचा अंचळ[6] लोटी[7] । मग सुखेंसि घे आंटी[8] । गाडेपैणें[9] ॥ ३२ ॥ तिये आलिंगनमेळीं । होय आपेंआप कंवळी[10] । तेथ जळ जैसें जळीं । वेगळें न दिसे ॥ ३३ ॥ कां आकाशीं वांयो[11] हरपे । तेंथ दोन्ही हे भाष[12] लोपे । तैसें सुखचि उरे स्वरूपें । सुरतीं[13] तिये ॥ ३४ ॥ ऐशी द्वैताची भाष जाय । मग ह्मणों जरी एकचि होय । तरी तेथ साक्षी कवण आहे । जाणतें जें ॥ ३५ ॥

"ज्यांनीं देहांतील देहभाव (काम, क्रोध इ०) आपल्या स्वाधीन केले, त्या ज्ञात्यांच्या अंतःकरणांत त्यांची वार्ता सुद्धां खरोखर असत नाहीं. १२९ त्यांना बाह्य विषयांचा भास मुळींच नसतो. अंतःकरणामध्यें एक सुख मात्र असतें. १३० पण तें कांहीं निराळ्याच रीतीनें भोगलें पाहिजे. पक्षी फळ चाखून पाहतो तसें मात्र नव्हे. तर त्यावेळीं भोगतेपणही विसरावें लागतें. १३१ त्या भोगामध्यें ऐक्या-

१ समुच्चयार्थक अव्यय. २ वार्तासुद्धां. ३ निश्चयेंकरून. ४ विषयाचा भास. ५ आहे. ६ पदर, पडदा. ७ सोडी. ८ आलिंगन. ९ दृढपणानें. १० एकरूप, आकर्षण. ११ वायु. १२ बोलणें. १३ ऐक्यपणांत.

वस्था उत्पन्न होऊन ती अहंकाराचा पडदा काढून टाकते. आणि मग सुखाला घट्ट मिठी पडते. १३२ त्या आलिंगनाच्या योगानें अपोआपच, पाण्यामध्यें पाणी जसें वेगळें दिसत नाहीं, त्याप्रमाणें एकजीव होतो. १३३ किंवा आकाशामध्यें वायु लय पावला तर, तेथें वायु आणि आकाश हे दोन्हीही शब्द नाहींसे होतात. तसें त्या ऐक्यभावांत सुखच मूर्तिमंत उभें राहतें. १३४ अशाप्रकारें द्वैताचें बोलणें खुंटलें, ह्मणजे मग ं एकच आहे असें जर ह्मणावें, तर जें जाणायाला साक्षीदार तरी कोण आहे." १३५

योऽतःसुखोऽतरारामस्तथांतर्ज्योतिरेव यः ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥२४॥
लभंते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकलमषाः ।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥२५॥

[योंऽतः सुखोंऽतरारामः] ह्मणोनि असो हें आघवें । एथ । बोलणें काय बोलावें । ते खुणाचि पावेल स्वभावें । आमाराम ॥ ३६ ॥ जे ऐसेनि सुखें मातले । आपणपांचि आण राहिले । ते मीं जाणें निखिळें वोतले । सामरस्याचे । ३७ ॥ ते आनंदाचे अनुकार । सुखाचे अंकुर । कीं महाधें विहार । केले जैसे ॥ ३८ ॥ ते विवेकाचे गांव । कीं रब्रह्मींचे स्वभाव । ना तरी अळंकारले अवयव । ब्रह्मविद्येचे ३९ ॥ ते सत्वाचे सात्विक । कीं चैतन्याचे आंगिकें । हें हु असो एकैक । वानिसी काई ॥ १४० ॥ तूं संतस्तवनीं तसी । तरी कथेची से न करिसी । कीं निरांळीं बोल देसी । सेंनागर ॥ ४१ ॥ परि तो रसातिशयो मुकुळीं । मग थार्थदीप उजळीं । करीं साधुहृदयराउळीं । मंगळ उखा ४२ ॥ ऐसा गुरूचा उंबायिला । निवृत्तिदासासी पातला । ग तो ह्मणे कृष्ण बोलिला । तेंचि आइका ॥ ४३ ॥ [स गी ब्रह्मनिर्वाणं] अर्जुना अनंतसुखाच्या डोहीं । एकसरां ळचि घेतला जिहीं । मग थिराऊनि तेही । तेंचि जाहालें ४४ ॥ [तथांतर्ज्योतिरेव यः] अथवा आत्मप्रकाशें चोखें । ो आपणपेंचि विश्व देखे । [लभंते ब्रह्मनिर्वाणं] तो देहेंचि रब्रह्म सुखें । मानूं येईल ॥ ४५ ॥ [ऋषयः क्षीणकल्मषाः] जें साचोकारें परम । ना तें अक्षर निःसीम । जिये गांवींचे निष्काम । अधिकारिये ॥ ४६ ॥ जें महर्षी वाढलें । [ छिन्नद्वैधा यतात्मानः ] विरक्तांभागा फिटलें । [सर्वभूतहिते रताः] जें निःसंशया पिकलें । निरंतर ॥ ४७ ॥

"ह्याकरितां हें सर्व असो. जी गोष्ट सांगावयाला येत नाहीं, ती सांगावी कशी? त्याची खूण आत्मारामाला आपोआपच पटेल. १३६ अशा प्रकारच्या सुखानें जे पुष्ट झाले; आत्मज्ञानानें स्वस्वरूप होऊन राहिले; ते निखालस ब्रह्मानंदानेंच ओतलेले आहेत असें मी समजतों. १३७ ते आनंदाची मूर्ति; सुखाचे अंकुर; किंवा महाबोधानें केलेलें जणो काय क्रीडास्थानच. १३८ ते विवेकाचें गांव; किंवा परब्रह्माचे स्वभाव; किंवा आत्मज्ञानाचे श्रृंगारलेले अवयवच होत. १३९ ते सत्वाचे पुतळे; व जीवात्म्याचे शरीरावयव." "हा विस्तार आतां राहूंदे. त्या एकएकाचें वर्णन तूं कोठपर्यंत करशील? १४० तूं साधूंच्या स्तवनांमध्यें रममाण झालास, तर कथेची आठवण सुद्धां तुला होणार नाहीं. कारण, निर्गुण विषयांतच तुझे प्रेमयुक्त शब्द गुंततील. १४१ ह्याकरितां त्या रसातिशयाचा संक्षेप करून, ग्रंथार्थदीप लाव; आणि साधूंच्या हृदयमंदिरांत सोज्वळ प्रकाश कर." १४२ अशी निवृत्तिदासावर गुरूची प्रसन्नता झाली. (बोलले.) तेव्हां ते (ज्ञानदेव) "कृष्ण काय बोलला तें ऐका, असें ह्मणाले. १४३ "अर्जुना! जे सुखाच्या अपरंपार डोहांत ऐक्यतेनें बुडी देतात, ते मग तेथेंच स्थिर होऊन तद्रूप बनतात. १४४ अथवा दिव्य आत्मप्रकाशाच्या योगानें जो आपणच विश्व आहे असें पाहतो, तो देही असूनच परब्रह्मरूप आहे असें खुशाल मानतां येईल. १४५ जें वस्तुतः श्रेष्ठ; किंवा जें अविनाशी; अनंत. निरिच्छ हे ज्या गांवचे अधिकारी. १४६ जें महर्षींमध्यें वाढलेलें; विरक्तांच्या वांट्यास आलेलें; आणि संशयरहितांस निरंतर पीक पिकून राहिलेलें." १४७

१ पुष्ट झाले. २ स्वस्वरूपांत. ३ निखालस, सर्व. ४ ब्रह्मानंचे. ५ आकार. ६ क्रीडास्थान. ७ आत्मज्ञानाचे. ८ जीत्म्याचे. ९ अवयव. १० आठवण. ११ निर्गुणविषयांत. २ प्रेमयुक्त, उत्कृष्ठ. १३ संक्षिप्त कर. १४ साधूच्या हृदयमंरांत. १५ कल्याणाचा. १६ उदय. १७ प्रसन्नपणा. ८ ऐक्यतेनें. १९ चांगल्या. २० स्वतःच.

१ खरेपणानें. २ अविनाशी. ३ निरिच्छ. ४ अधिकारी. ५ विरक्तांच्या दिशास.

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।
अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥

[ कामक्रोध इति ] जिहीं विषयापासोनि हिरतलें । चित्त आपुलें आपण जिंतिलें । ते निश्चित जेथ सुतले । चेतीचिना ॥ ४८ ॥ [ अभित इति ] तें परब्रह्म निर्वाण । जें आत्मविदांचें कारण । तेंचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ॥ ४९ ॥ ते ऐसे कैसेनि जाह्ाले । जे देहींचि ब्रह्मत्वा आले । हें पुससी तरी भलें । संक्षेपें सांगों ॥ १५० ॥

**"ज्यांनीं आपलें चित्त आपण जिंकलें; विषयापासून काढून घेतलें; ते जेथें निश्चयानें निजले तेथून जागेच होत नाहींत. १४८ पंडुकुमरा! ते पुरुष आत्मज्ञान्यांचें कारण जें कैवल्यपद परब्रह्म तेंच होत. १४९ ते असे कशानें होतात? त्यांना देहांतच परब्रह्मत्त्व कसें येतें? असें विचारशील, तर ठीक आहे. तेंही संक्षेपानें सांगतों." १५०**

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥२७॥

[ स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यान् ] तरी वैराग्याचेनि आधारें । जिहीं विषय दवडूनि बाहिरें । शरीरीं एकंदरें । केलें मन ॥ ५१ ॥ [ चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ] सहजें तिहीं संधी भेटी । जेथ भ्रूपल्लवां पडे गांठी । तेथ पाठिमोरी दिठी । पारुखोनियां ॥ ५२ ॥ [ प्राणापानाविति ] सांडूनि दक्षिण वाम । प्राणापानसम । चित्तेंसी व्योमें । करिती ॥ ५३ ॥

**"जे वैराग्याच्या आधारानें विषय बाहेर घालवून शरीरामध्यें एकनिष्ठ मन करतात. १५१ इडा, पिंगला व सुषुम्ना ह्या तिहींची जेथें भेट होते, डोळ्यांच्या पापण्या जेथें एकत्र होतात, तेथें जे अंतर्दृष्टि ठेवून, १५२ उजवे व डावे श्वासोच्छ्वास बंद करून, प्राणापानसम करून, मनाला आकाशगामी करतात*." १५३**

१ हिरावून घेतलें. २ निजले. ३ जागेच होत नाहींत. ४ कैवल्यपद. ५ आत्मज्ञान्याचें. ६ एकनिष्ठ. ७ इडा, पिंगळा व सुषुम्ना ह्या तिन्ही नाड्यांची जेथें गांठ पडते तेथें. ८ डोळ्यांच्या पापण्यांची. ९ दृष्टि. १० ठेवून. ११ उजवें. १२ डावें. १३ आकाशगमनी.

* ही प्राणायाम करण्याची पद्धत आहे. अर्धोन्मीलित दृष्टि करून ती नासिकाग्रावर धरावी. सर्व चित्ताची एकाग्रता करून तें, दोन्ही भिवयांच्या मध्यभागीं लावावें. उजव्या व डाव्या नाकपुड्यांतून जाणारे येणारे श्वासोच्छ्वास बंद करून प्राण—हृदयस्थ वायु, व अपान—गुदस्थ वायु, यांची गती सम करून त्यांस ब्रह्मांडीं—मस्तकांतील पोकळीमध्यें—न्यावेत. हाच योगाभ्यासाचा प्रारंभ. त्याचा विस्तार पुढें—सहाव्या अध्यायांत—उत्तम केला आहे.

यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥ २८ ॥

[ यतेंद्रियेति ] तेथ जैसीं रथ्योदकें सकळें । घेऊनि गंगा समुद्रीं मिळे । मग एकेक वेगळें । निवडूं नये ॥ ५४ ॥ तैसी वासनांतराची विवंचना । मग आपैसी पारुखे अर्जुना । जे वेळीं गगनीं लयो मना । पवनें कीजे ॥ ५५ ॥ जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूप पट फाटे । जैसें सरोवर आटे । मग प्रतिभा नाहीं ॥ ५६ ॥ [विगतेच्छेति] तैसें मन एथ मुदल जाय । मग अहंभावादिक कें आहे । ह्मणोनि शरीरेंचि ब्रह्म होये । अनुभवी तो ॥ ५७ ॥

**"तेथें, रस्त्यावरील उदकें घेऊन गंगा समुद्रास मिळाल्यानंतर तीं जशीं निराळीं करतां येत नाहींत, १५४ त्याप्रमाणें अर्जुना! वायूनें मनाचा लय आकाशांत लावला ह्मणजे निरनिराळ्या इच्छांचे विचार आपोआपच नाहींसे होतात. १५५ ज्यावर हें संसाराचें चित्र उमटावयाचें, तें मनोरूप वस्त्रच फाटून जातें. ज्याप्रमाणें सरोवर आटलें ह्मणजे प्रतिबिंब नाहींसें होतें, १५६ त्याप्रमाणें तेथें मनच मुळीं नाहींसें होतें, मग अहंभावादिक राहतील कोठें? ह्मणून अनुभवी आहे तो, शरीरानेंच ब्रह्म होतो." १५७**

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥२९॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
संन्यासयोगो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

[ लभंते ब्रह्मनिर्वाणमिति २५ श्लोके उक्ताः ] आह्मी मागां हन सांगितले । जे देहींचि ब्रह्मत्व पावले । [ भोक्तारं यज्ञतपसामिति ज्ञानमार्गेण ] ते येणें मार्गें आले । ह्मणऊनियां ॥ ५८ ॥ [ ज्ञात्वेति ] आणि यमनियमांचे डोंगर । अभ्यासाचे सागर । क्रमोनि हें पार । पातले ते ॥ ५९ ॥ तिहीं आपणपें करूनि निर्लेप । प्रपंचाचें घेतलें माप । मग साच

१ रस्त्यावरील उदकें. २ इतर इच्छेची. ३ राहे. ४ प्रतिबिंब. ५ कोठें? ६ यम, नियम, असन, धारणादिक योग. ७ आपलें, आपणास. ८ उपाधिरहित.

शांतीचें चित्स्वरूप[1] । होऊनि ठेले ॥ १६० ॥ [ एतच्छ्लोकव्याख्यानमंतिमाध्याये व्याख्यास्यति । उत्तराध्यायबीजम् ] ऐसा योगयुक्तीचा उद्देश । जेथ बोलिला हृषीकेश । तेथ अर्जुन सुदर्शें[2] । म्हणोनि चमत्कारिला[3] ॥ ६१ ॥ तें देखिलिया कृष्णें जाणितलें । मग हांसोनि पार्थातें म्हणितलें । काइ पां चित्त उवाइलें[4] । इये बोलीं तुझें ॥ ६२ ॥ तंव अर्जुन म्हणे देवो । परचित्तलक्षणाचा[5] रावो । भला जाणितला जी भावो । मानस माझा ॥ ६३ ॥ म्यां जें कांहीं विवरूनि[6] पुसावें । तें आधींचि जाणितलें देवें । तरी बोलिलें तेंचि सांगावें । विवळ[7] करूनि ॥ ६४ ॥ येन्हवीं तरी अवधारा । जो दाविला तुम्ही अनुसारा[8] । तो पव्हण्याहूनि[9] पायउतारा[10] । सोहंपा जैसा ॥ ६५ ॥ तैसा सांख्याहूनि प्रांजळ[11] । आम्हासारिखिया अबळां[12] । एथ आहे कांहीं परिकोळा[13] । तो साहों ये वर ॥ ६६ ॥ म्हणोनि एक वेळ देवा । तोचि पडताळा[14] घेयावा[15] । विस्तारेल तरी सांगावा । सायंतचि ॥ ६७ ॥ तंव श्रीकृष्ण म्हणती होकां । तुज हा मार्ग गमला निकों[16] । तरी काय जाहालें आइकीं जो कां । सुखें बोलों ॥ ६८ ॥ अर्जुना तूं परिससी । परिसोनि अनुष्ठिसी[17] । तरी आम्हासीचि वाणि[18] कायसी । सांगावयाची ॥ ६९ ॥ आधींच चित्त मोयेचें[19] । वरी मिषें[20] जाहालें पढियंतयाचें[21] । आतां तें अद्भुतपण स्नेहाचें । कवण जाणे ॥ १७० ॥ ते म्हणे कारुण्यरसाची वृष्टी । कीं नेवेया[22] स्नेहाची सृष्टी । हें असो नेणिजे दृष्टी । हरीची वानूं[23] ॥ ७१ ॥ जे अमृताची वोतली । कीं प्रेमचि पिऊन मातली । म्हणोनि अर्जुनमोहें गुंतली । निघों नेणें ॥ ७२ ॥ हें बहु जें जें जल्पिजेल । तेथें कथेसि फांकें[24] होईल । परि तें स्नेहरूपा न येलें[25] । बोलवरी ॥ ७३ ॥ म्हणोनि विस्मुरा[26] काय येणें । तो ईश्वर कवळावा कवणें । जो आपुलें मौन[27] नेणें । आपणचि ॥ ७४ ॥ तरी मागील ध्वनीआंत[28] । मज गमला सोवियाचि[29] मोहित । जे बळात्कारें असे म्हणत । परिस बापा ॥ ७५ ॥ अर्जुना जेणें जेणें भेदें[30] । तुझें कां चित्त बोधे । तैसें तैसें विनोदें[31] । निरूपिजेल ॥ ७६ ॥ तो कोइसया[32] नांव योग । तयाचा कवण उपेग[33] । अथवा अधिकारप्रसंग । कवणा एथ ॥ ७७ ॥ ऐसें जें जें कांहीं । उक्त असे इये ठाईं । तें आघवेंचि पाहीं । सांगेन आतां ॥ ७८ ॥ तूं चित्त देऊनि अवधारीं । ऐसें म्हणोनि श्रीहरी । बोलिजेल ते पुढारी । कथा आहे ॥ ७९ ॥ श्रीकृष्ण अर्जुनासीं संगें[1] । न सांडोनि सांगेल योग । तो व्यक्त करूं प्रसंग । म्हणे निवृत्तिदास ॥ १८० ॥

इति श्रीज्ञानदेवकृतायां भावार्थदीपिकायां पंचमोऽध्यायः
॥ ५ ॥ श्लोक २९, ओव्या १८०.

“जे देहांतच ब्रह्मस्वरूप पावले, ते याच मार्गानें गेले, म्हणून आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. १५८ आणि ते यमनियमाचे पर्वत, व अभ्यासाचे समुद्र ओलांडून पार पडले. १५९ त्यांनीं आपणाला स्वतःला उपाधिरहित करून प्रपंचाचें माप घेऊन मग खऱ्या शांतीचे जीव होऊन राहिले.” १६०

ह्याप्रमाणें योगयुक्तीचा प्रकार हृषिकेशांनीं सांगितला. आणि अर्जुनही ज्ञाता–मार्मिक–असल्यामुळें त्यासही चमत्कार वाटला. १६१ तें पाहतांच कृष्णांनीं जाणलें, आणि हांसून अर्जुनास म्हणतात “अर्जुना! ह्या भाषणानें तुझें चित्त प्रसन्न झालें का?” १६२ तेव्हां अर्जुन म्हणाला “देवा! दुसऱ्याचें मनोगत जाणण्याविषयीं तुम्ही राजे आहांत. माझ्या मनांतील भाव तुम्हीं खासा ताडलात. १६३ मी विचार करून जें कांहीं पुढें बोलणार तें देवांनीं आधींच जाणलें. तर आपण बोललां तेंच विशद करून सांगावें. १६४ बाकी–ऐका–तुम्हीं जो मार्ग दाखवून दिला तो, पोहत जाण्यापेक्षां उतारानें जाण्याचा मार्ग जसा सोपा, १६५ तसा आम्हासारख्या दुबळ्यांना सांख्याहून योगमार्ग सुगम आहे खरा; परंतु तो गहन असल्यामुळें त्याचें आकलन करण्याला बराच कालावधि पाहिजे. १६६ ह्याकरितां देवा! एक वेळ तो पर्यायानें पुन्हा सांगा. आतां, त्याचा विस्तार मोठा होईल हें खरें; तथापि तो साद्यंत सांगाच.” १६७ तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले “तुला जर हा मार्ग चांगला वाटतो, तर आम्हाला सांगायला काय झालें? तो खुशाल सांगूं. ऐक. १६८ अर्जुना! तूं ऐकायला तयार आहेस; ऐकून

१ जीव, चिच्छक्ति. २ मार्मिक, ज्ञाता. ३ आश्चर्य वाटलें. ४ प्रसन्न झालें. ५ दुसऱ्याच्या मनोगताचा. ६ खुलासा करून. ७ व्यक्त. ८ मार्ग. ९ पोहण्यापेक्षा. १० सोपा. ११ सुगम. १२ दुर्बळांला. १३ अवकाश. १४ अनुभव. १५ घ्यावा. १६ चांगला. १७ आचरण करतोस. १८ न्यूनता. १९ ममतायुक्त. २० निमित्त. २१ आवडत्याचें. २२ नवीन. २३ वर्णन करूं. २४ विस्तार, आडकथा. २५ येईल. २६ आश्चर्य. २७ प्रमाण. २८ सूचित अभिप्राय. २९ सहज, अकस्मात्. ३० प्रकारें. ३१ कौतुकानें. ३२ कोणत्या. ३३ उपयोग.

१ सहवास.

घेऊन आचरण करण्याला सिद्ध आहेस, तर मग सांगावयाला आमचें काय वेचतें?" १६९ आधींच मायेचें चित्त; त्यांत निमित्त जाहलें आवडीचें. मग त्या स्नेहाची अपूर्वता कोणास कळणार? १७० तिला करुणरसाची वृष्टि ह्मणावें, का नव्या स्नेहाची सृष्टि ह्मणावें ? हें कळत नाहीं. ह्याकरितां तें राहूंद्या. हरीच्या कृपादृष्टीचें वर्णन करतां येत नाहीं. १७१ ती अमृताची ओतली, किंवा प्रेम पिऊन मत्त झाली, ह्मणून **अर्जुना**च्या मोहांत गुंतली. तेथून परतण्याचें तिला भान राहिलें नाहीं. १७२ अशा जेवढ्या जेवढ्या कल्पना कराव्यात, तेवढी तेवढी कथा मात्र वाढेल. पण त्या स्नेहाचें स्वरूप शब्दांनीं कांहीं सांगतां यावयाचें नाहीं. १७३ ह्यामध्यें आश्चर्य तें कोणतें? तो ईश्वर कोणीं आकलन करावा? त्याचें प्रमाण त्यालाच कळत नाहीं! १७४ तरी मागील आपणांत तो मला अकस्मात् मोहित झाला असें वाटलें. कारण, त्यांत "ऐक बाबा." असें मुद्दाम आपण होऊन त्यानें सांगितलें. १७५ "**अर्जुना**! ज्या ज्या प्रकारानें तुझ्या चित्तांत उपदेश ठसेल, तसें तसेंच आनंदानें सांगूं. १७६ त्या योगाचें नांव काय? त्याचा उपयोग कोणता? किंवा तो करण्याचा अधिकार कोणाला? १७७ इत्यादि जें जें कांहीं येथें सांगणें उक्त आहे, तें सर्व कांहीं सांगतों." १७८ असें ह्मणून **श्रीहरी** 'चित्त देऊन ऐक' असें ह्मणाले. ती कथा पुढें आहे. १७९ निवृत्तिदास ह्मणतात; **श्रीकृष्ण, अर्जुना**चा सहवास न सोडतां योग सांगेल; तो प्रसंग व्यक्त करूं. १८०

पांचवा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ६ वा.

मग रायातें संजयो ह्मणे जो । तोचि अभिप्राय अवधारिजो । श्रीकृष्ण सांगती आतां जो । योगरूप ॥ १ ॥ सहजें ब्रह्मरसाचें पेंरगुणें । केलें अर्जुनालागीं नारायणें । कीं तेचि अवसरीं पाहुणे । पातलों आह्मी ॥ २ ॥ कैसी दैवाची थोरी नेणिजे । जैसें तान्हेलिया तोय सेविजे । कीं तेंचि चवी करूनि पाहिजे । तंव अमृत आहे ॥ ३ ॥ तैसें आह्मा तुह्मा जाहालें । जें आंडमुठी तत्त्व फांवलें । तंव धृतराष्ट्रें ह्मणितलें । हें न पुसों तूतें ॥ ४ ॥ तया संजया येणें बोलें । रायाचें हृदय चोजवलें । जे अवसरीं आहे घेतलें । कुमरांचिया ॥ ५ ॥ हें जाणोनि मनीं हांसिला । ह्मणे ह्मातारा मोहें नाशिला । येऱ्हवीं बोलं तरी भला जाहाला । अवसरीं इये ॥ ६ ॥ परि तें तैसें कैसेनि होइल । जात्यंधा कैसें पाहेल । तेवींचि येरू रोष घेइल । ह्मणोनि बिहे ॥ ७ ॥ परि आपण चित्तीं आपुला । निकियांपरि संतोषला । जे तो संवाद फांवला । श्रीकृष्णार्जुनाचा ॥ ८ ॥ तेणें आनंदाचेनि धांलेपणें । साभिप्राय अंतःकरणें । आतां आदरेसीं बोलणें । घडेल तया ॥ ९ ॥ तो गीतेमाजि षष्टींचा । प्रसंग असे आयणीचा । जैसा क्षीरार्णवीं अमृताचा । निवाड जाहाला ॥ १० ॥ तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधूचें पार । नाना योगविभववभांडार । उघडलें कां ॥ ११ ॥ जें आदिप्रकृतीचें विसंवणें । जें शब्दब्रह्मासि न बोलणें । जेथूनि गीतावल्लीचें ठाणें । प्ररोह पावे ॥ १२ ॥ तो अध्याय साहावा । वरि साहित्याचिया वरवा । सांगिजेल ह्मणोनि परिसावा । चित्त देउनी ॥ १३ ॥ माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंके । ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १४ ॥ जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे । वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ १५ ॥ ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा । बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥ १६ ॥ सहजें शब्द तरी विषो श्रवणाचा । परि रसना ह्मणे रस हा आमुचा । घ्राणासि भाव जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥ १७ ॥ नवल बोलतीये रेखेची वाहाणी । देखतां डोळा पुरों लागे धणी । ते ह्मणती उघडली खाणी । रूपाची हे ॥ १८ ॥ जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें । बोलें भुजाही आविष्करे । आलिंगावया ॥ १९ ॥ ऐसीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी । जैसा एकला जग चेववी । सहस्रकर ॥ २० ॥ तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण । पाहातया भावज्ञां फांवती गुण । चिंतामणीचे ॥ २१ ॥ हें असो तयां बोलांचीं ताटें भलीं । वरी कैवल्यरसें वोगरलीं । ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥ २२ ॥ आतां आत्मप्रभा नित्य नवी । तेचि करूनि ठाणदिवी । जो इंद्रियांतें चोरूनि जेवी । तयासीचि फांवे ॥ २३ ॥ तेथ श्रवणाचेनि पांगें । वीण श्रोतयां व्हावें लागे । हे मनाचेनि निजांगें । भोगिजे गा ॥ २४ ॥ अहाच बोलाची वालीफ फेडिजे । आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे । मग सुखेंसीं सुरवाडिजे । सुखाचिमाजि ॥ २५ ॥ ऐसें हळुवारपण जरी येईल । तरीच उपेगा जाइल । येऱ्हवीं आघवी गोष्टी होइल । मुकया बहिरयाची ॥ २६ ॥ परि तें असो आतां आघवें । नलगे श्रोतयांतें कडसावें । जे अधिकारिये एथ स्वभावें । निष्काम-

---

१ धृतराष्ट्राला. २ महाराज. ३ भोजन, मेजवानी. ४ चाखून. ५ अनायासें. ६ परब्रह्म. ७ प्राप्त झालें. ८ विस्मय वाटला. ९ बाधेनें, संचारानें. १० शब्द, भाषण. ११ जन्मांधाला. १२ दिसेल. १३ हा. १४ भ्याला. १५ चांगल्या रीतीनें. १६ मिळाला. १७ तृप्तीनें. १८ मनांतल्या अर्थासह. १९ सहाव्या अध्यायांतील सटीचा. २० तत्वनिर्णयाचा. २१ उत्पत्ति. २२ योगसंपत्तीचा खजीना. २३ आदिमायेचें. २४ विश्रांतिस्थान. २५ वेदाला. २६ स्वरूप. २७ अंकुर. २८ सर्व कौशल्याच्या उपसंहारासहित. २९ प्राकृत, साधाच. ३० मृदुलत्वाच्या बरोबरीनें.

१ सप्तसुरांचे. २ छंदानें. ३ बळ. ४ ज्याच्या योगेंकरून. ५ कलह. ६ विषय. ७ अक्षरांची, कवित्वाची. ८ पद्धत, सरणी. ९ तृप्ति. १० अर्थावबोधक वाक्य. ११ बाहेर. १२ शब्द. १३ स्वभावानें. १४ ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें. १५ बोध करतो. १६ प्रकाशित करतो. १७ अर्थ जाणणारांस. १८ प्राप्त होतात. १९ इच्छित देणारें रत्न त्याचें. २० मोक्षरसानें. २१ वाढलीं. २२ मेजवानी, ग्रंथरचना. २३ मीं. २४ निरिच्छास. २५ आत्मज्योति. २६ स्थान दाखविणारा दिवा. २७ मिळे. २८ गरजहीन. २९ आच्छादन, गवसणी. ३० सुख भोगावें. ३१ सूक्ष्मता, नाजुकपणा. ३२ सावध करावें.

काम[1] ॥ २७ ॥ जिहीं आत्मबोधाचिया आवडी। केली स्वर्गसंसाराची कुरोंडी[2]। तेवांचूनि एथिची गोडी। नेणती आणिक॥२८॥ जैसा वायसीं[3] चंद्र नोळखिजे। तैसा प्राकृतीं ग्रंथ हा नेणिजे। आणि तो हिमांशु[4]चि जेविं खाजें[5]। चकोराचें ॥ २९ ॥ तैसा सज्ञानासी तरी हा ठावो। आणि अज्ञानासी आन[6] गांवो। ह्मणोनि बोलावया विषय पहाहो। विशेष नाहीं॥३०॥ परि अनुवादलों[7] मी प्रसंगें। तें सज्जनीं उपसहावें[8] लागे। आतां सांगेन काय श्रीरंगें। निरोपिलें जें ॥ ३१ ॥ तें बुद्धीही आकळितां सांकडें[9]। ह्मणऊनि बोलीं[10] विपायें[11] सांपडे। परि श्रीनिवृत्तिकृपादीपउजियेडें। देखेन मी ॥ ३२ ॥ जें दिटीही[12] न पविजे। तें दिठीवीण देखिजे। जरी अतींद्रिय[13] लाहिजे[14]। ज्ञानबळ ॥ ३३ ॥ नातरी जें धातुवादाही[15] न जोडे। तें लोहींचि पंधरें[16] सांपडे। जरी दैवयोगें चडे। परिस हाता॥३४॥ तैसी सद्गुरुकृपा होये। तरी करितां काय आंपु[17] नोहे। ह्मणऊनि ते अपार मातें आहे। ज्ञानदेव ह्मणे ॥ ३५ ॥ तेणेंकारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचें रूप दावीन। अतींद्रिय परि भोगवीन। इंद्रियांकरवीं ॥ ३६ ॥ [श्रीभगवानुवाच–] आइका यश श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य। हे साही गुणवर्य। वसती जेथ ॥ ३७ ॥ ह्मणोनि तो भगवंत। जो निःसंगांचा[18] सांगात[19]। तो ह्मणे पार्था दत्तचित्त[20]। होईं आतां ३८

मग **संजय धृतराष्ट्रास** ह्मणाला "महाराज! **श्रीकृष्णांनीं** जो योगरूप अभिप्राय सांगितला; तोच आतां ऐकावा. १ **नारायणांनीं अर्जुनाला** ब्रह्मरसाची सहज मेजवानी केली; तों तेथें अवचित् आह्मी पाव्हणे झालों. २ ह्या दैवाची थोरवी केवढी हें कांहीं समजत नाहीं. एखाद्या तृषार्तानें पिण्यासाठीं पाणी ह्मणून घ्यावें, आणि चाखून पहावें तों अमृत असावें; ३ तसें आज तुह्माआह्मास झालें आहे. कारण तें ब्रह्म अनायासें प्राप्त झालें." तेव्हां **धृतराष्ट्र** ह्मणाला "तें तुला विचारीत नाहीं." ४ येवढ्या भाषणावरून राजाचें हृदय पुत्रसंचारानें व्याप्त झालें आहे, असें **संजया**च्या मनांत येऊन तो विस्मित झाला. ५ ती गोष्ट लक्ष्यांत येतांच तो मनांतल्या मनांत हांसला, आणि ह्मणाला, 'पुत्रवात्सल्यानें ह्मातारा बिघडला. बाकी, माझें भाषण ह्या वेळीं अगदीं यथार्थ होतें.' ६ तें ह्याला समजण्याला मार्ग कोणता? जन्मांधाला दिसणार कसें? पण तसें स्पष्ट बोललों तर ह्याला राग येईल, ह्मणून **संजय** मनांत कचरला. ७ परंतु आपल्या मनांत मात्र, **श्रीकृष्णा**चा व **अर्जुना**चा संवाद बोलावयाची संधि आली ह्मणून फार आनंदयुक्त झाला. ८ त्या आनंदाच्या भरांत आपल्या मनांतील अभिप्रायासहवर्तमान, आतां त्याजकडून भाषण होईल. ९ तो गीतेंतील सहाव्या अध्यायांतला तत्त्वनिर्णयाचा प्रसंग आहे. ज्याप्रमाणें क्षीरसागरांतून अमृत उत्पन्न झालें, १० त्याप्रमाणें विचारसागराचें पैलतीरच असें हें गीतार्थाचें सार; किंवा योगसंपत्तीचें भांडारच उघडलें आहे. ११ जें आदिमायेचें विश्रांतिस्थान; जें वेदांसही बोलण्यास अशक्य; ज्याच्यापासून गीतावल्लीच्या स्वरूपाला अंकुर फुटतो, १२ असा जो सहावा अध्याय तो, सकल कौशल्ययुक्त उपसंहारासहित सांगण्यांत येईल. ह्याकरितां चित्त देऊन श्रवण करावा. १३ माझें भाषण प्राकृतच आहे. तथापि कौतुकानें अमृतालाही पैजेनें जिंकतील, अशा रसभरित शब्दांची त्यांत मी योजना करीन. १४ ज्यांच्या बरोबरीला सप्तसुरांचे रंजनप्रकार थोडे होतील. ज्यांच्या छंदापुढें सुगंधही हतवीर्य होईल. १५ आणखी ऐका. ह्यांच्या रसाळपणास लुब्ध होऊन कर्ण हेच जिव्हा होतील. ह्या भाषणानें इंद्रियांमध्यें आपआपसांत कलह लागेल. १६ शब्द हा कानांचा विषय, हें तर उघड आहे. पण जिव्हा ह्मणेल हा माझा रस; नाक हें सुगंधाचें जाणतें असल्यामुळें तेथें शब्दही सुगंधरूपीच होतील. १७ शब्दरचनेची ठेवण पाहून डोळे तर आश्चर्यभरित होत्साते समाधानवृत्तीनें 'ही एक सौंदर्याची खाणच आहे' असें ह्मणतील. १८ एक एक वाक्य प्रगट झालें कीं,

---

१ इच्छेविषयीं पराङ्मुख. २ ओवाळणी. ३ कावळ्यांनीं. ४ चंद्रच. ५ खाद्य. ६ दुसरा. ७ बोललों. ८ क्षमा करावी. ९ कठीण. १० बोलावयास. ११ कष्टानें. १२ दृष्टीलाही. १३ इंद्रियातीत. १४ लाभेल. १५ किमया करणारांस. १६ पंधराच्या दराचें सोनें. १७ प्राप्त. १८ निरिच्छांचा. १९ सोबती. २० लक्ष्य दिलेला असा.

मन हेंच आवेशानें बाहेर येऊन शब्दांस आलिंगन देण्यास बाहू पुढें करील. १९ ह्याप्रमाणें इंद्रियें आपआपल्या स्वभावाप्रमाणें झटापटी करतील; पण ते ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्यास त्यास संतुष्ट राखितील. ज्याप्रमाणें एकटा सूर्य सर्व जगाला प्रकाशमान करतो, २० त्याप्रमाणें ह्यांतील शब्दांचें व्यापकपण कांहीं विशेष आहे. पहा! भक्तिभावानें पाहणाराला त्यांत चिंतामणीचे गुण दिसून येतील. २१ हें असो. ह्या शब्दरूप उत्तम ताटांत मोक्षरस भरून निष्काम जनांना मीं आज मेजवानी केली आहे. २२ आतां नित्य नवी असणाऱ्या आत्मज्योतीची ठाणवई करून, इंद्रियांस न कळतां जो भोजन करील, त्याच्या हा लाभ पदरीं पडेल. २३ त्यांत श्रोत्यांना कर्णाची आवश्यकता बाळगण्याचें कारण नाहीं. ह्याचा उपभोग मनानें स्वतःच घेतला पाहिजे. २४ शब्दावर असलेली गवसणी काढून टाकावी, शरीर ब्रह्मरूप करावें, आणि मग खुशाल सुखामध्येंच सुखाचा उपभोग घ्यावा. २५ असा प्रेमळपणा आला, तरच हें निरूपण उपयोगीं पडेल. नाहीं तर सारी मुक्याबहिऱ्याचीच गोष्ट होऊन जाईल. २६ पण तें सारें आतां असो. श्रोत्यांना सावध करण्याची गरज नाहीं. कारण, ते स्वभावतःच निष्काम असल्यामुळें ह्याचे अधिकारीच आहेत. २७ ज्यांनीं आत्मबोधाच्या आवडीवरून स्वर्ग व संसार ओवाळून टाकला, त्यांच्याशिवाय इतरांना ह्यांतील गोडी कळावयाची नाहीं. २८ कावळ्यांना ज्याप्रमाणें चंद्राची ओळख नाहीं, त्याप्रमाणें सामान्य जनांना हा ग्रंथ समजावयाचा नाहीं. आणि चंद्रांतील अमृताचे परमाणू हें जसें चकोरांचेंच खाद्य, २९ तसें हा ग्रंथ सज्ञान्यांचा गांव आहे. अज्ञान्यांचा गांव दुसरा. ह्मणून अहो! अधिक बोलण्याचें कारणच नाहीं, पहा. ३० परंतु प्रसंगानुसार मी बोललों, त्याची सज्जनांनीं क्षमा केली पाहिजे. आतां **श्रीरंगांनीं** जें काय निरूपण केलें तें सांगतों. ३१ तें बुद्धीलाही आकलन करण्यास कठीण; ह्मणून भाषणांत येणेंही दुरापास्तच. तथापि **श्रीनिवृत्तिदासां**च्या कृपारूप प्रकाशानें तेंही मी पाहीन. ३२ इंद्रियातीत असें ज्ञानसामर्थ्य प्राप्त झालें, तर दृष्टीला जें दिसणें अशक्य, तें दृष्टीशिवायही पाहतां येतें. ३३ किंवा दैवयोगानें परीस जर हातीं आला, तर किमयागारालाही जें मिळत नाहीं, तें पंधराच्या दराचें (उत्तम) सोनें लोखंडांतच प्राप्त होतें. ३४ तसें, सद्गुरूची कृपा झाल्यावर प्रयत्न करतांना काय प्राप्त होणार नाहीं? ह्मणून **ज्ञानदेव** ह्मणतात, ती तर माझ्याजवळ अपार आहे. ३५ त्यामुळें मी बोलेन. शब्दामध्येंच निराकाराचें स्वरूप दाखवून देईन. तें अतींद्रिय आहे; तथापि इंद्रियांकडून त्याचा उपभोग घेववीन. ३६ ऐका; कीर्ति, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य; हे सहा श्रेष्ठ गुण त्यांत वास्तव्य करतात, ३७ ह्मणून त्याला '**भगवंत**' असें ह्मणतात. तो निष्काम जनांचा सखा, **पार्थाला** ह्मणाला "आतां लक्ष्य दे." ३८

श्रीभगवानुवाच ।

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥१॥

आइकें योगी आणि संन्यासी जनीं । हे एकचि सिनाने ह्मणीं मानीं । येन्हवीं विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ॥३९॥ सांडिजे दुजया नामाचा आभास । तरी योग तोचि संन्यास । पाहातां ब्रह्मीं नाहीं अवकाश । दोहींमाजि ॥४०॥ जैसें नामाचेनि अनारिसेपणें । एका पुरुषातें बोलावणें । कां दोहीं मार्गीं जाणें । एकाचि ठाया ॥४१॥ ना तरी एकचि उदक सहजें । परि सिनानिा घटीं भरिजे । तैसें भिन्नत्व जाणिजे । योगसंन्यासाचें ॥४२॥ आइकें सकळ संमतें जगीं । अर्जुना पाहें तोचि योगी । [अनाश्रितः कर्मफलं] जो कर्में करूनि रागी । नोहेचि फळीं ॥४३॥ जैसी मही हे उद्भिजें । जनी अहंबुद्धीवीण सहजें । आणि तेथिचीं तियें बीजें । अ-

१ फलेच्छा नसून कर्माचरण करणारे. २ सर्वसंगपरित्यागी. ३ वेगवेगळे. ४ मानूं नको. ५ आरोप. ६ समावेश. ७ निराळेपणानें. ८ निरनिराळ्या. ९ इच्छा ठेवणारा. १० वृक्षादिक. ११ उत्पन्न करते.

पेक्षीना ॥ ४४ ॥ तैसा अन्वयाचेनि आधारें । जातीचेनि अनुकारें । जें जेणें अवसरें । करणें पावे ॥ ४५ ॥ [कार्यं कर्म करोति यः] तें तैसेंचि उचित करी । परी साटोप नोहे शरीरीं । आणि बुद्धीही करोनि फळवेरी । जायेचिना ॥ ४६ ॥ [स संन्यासी च योगी च] ऐसा तोचि संन्यासी । पार्था गा परियेसीं । तोचि भरंवसेनिसीं । योगीश्वर ॥ ४७ ॥ [न निरग्निर्न चाक्रियः] वांचूनि उचित कर्म प्रासंगिक । तयातें ह्मणे हें सांडावें वद्धक । तरी टांकोटांकीं आणिक एक । मांडीचि तो ॥ ४८ ॥ जैसा क्षाळूनियां लेप एक । सवेंचि लाविजे आणिक । तैसेनि आग्रहाचा पाइक । विंचंबे वायां ॥ ४९ ॥ गृहस्थाश्रमाचें वोझें । कपाळीं आधींचि आहे सहजें । कीं तेंचि संन्यासें वाढविजे । सरिसें पुढती ॥ ५० ॥ ह्मणूनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ॥ ५१ ॥

**" ऐक. योगी—ह्मणजे—निरिच्छ—फलेच्छा नसून कर्माचरण करणारे—आणि संन्यासी—ह्मणजे सर्वसंग परित्यागी—हे एकच असून लोकांमध्यें वेगवेगळे मानतात. पण विचाराअंतीं ते दोन्ही एकच आहेत. ३९ दुसऱ्या नांवाचेंच काय तें भिन्नत्व आहे. तें दूर केलें, तर योग तोच संन्यास असें कळून येईल. ब्रह्मामध्यें पाहूं गेलें तर दोहोंमध्येंही भेद नाहीं. ४० ज्याप्रमाणें निरनिराळ्या नांवानें एकाच पुरुषास हाका मारिल्या तरी त्या पुरुषांत भेद नाहीं; किंवा दोन निरनिराळ्या मार्गांनीं एकाच गांवास गेलें, तर त्या गांवांत भेद होत नाहीं; ४१ किंवा एकच उदक सहज निरनिराळ्या घागरींत भरलें तर, त्यांत जितकें भिन्नत्व आहे, तितकेंच योगामध्यें आणि संन्यासामध्यें भिन्नत्व आहे असें समज. ४२ अर्जुना! ऐक. जो कर्में करून फळाची इच्छा करीत नाहीं, तोच जगामध्यें सर्वमान्य योगी आहे हें लक्ष्यांत ठेव. ४३ ज्याप्रमाणें पृथ्वी ही अहंबुद्धिधारण केल्यावांचून वृक्षादिकांना सहज उत्पन्न करते, पण त्यांच्या फळांची अपेक्षा धरीत नाहीं; ४४ त्याप्रमाणें आपल्या स्थितीच्या आधारानें, जातीला अनुरूप जें जें ज्या ज्या वेळीं करावें लागेल, ४५ तें तें त्याप्रमाणें उचित असेल तें करतो, परंतु आंगीं अहंकार धरीत नाहीं; आणि फळाच्या आशेवर बुद्धीही ज्याची जात नाहीं, ४६ असा असेल तोच संन्यासी. हे अर्जुना! ऐक. निश्चयेंकरून योगीश्वर असा तोच. ४७ ह्याशिवाय, प्रसंगोपात्त उचित कर्म असून 'तें वद्धक आहे. टाकून द्यावें' असें ह्मणतो, तो त्याच वेळीं आणखी एका नव्या कर्माला आरंभ करतोच. ४८ तो, एक लेप धुऊन टाकून लागलाच त्यावर दुसरा लेप लावणाऱ्या दुराग्रही चाकराप्रमाणें व्यर्थ खटाटोप करणारा होय. ४९ मूळचेंच आधीं गृहस्थाश्रमाचें ओझें कपाळावर लादलेलें आहे. तें (तशा प्रकारच्या) संन्यासानें अधिक वाढतें मात्र. ५० ह्यावरून योगसुख हें मुळीं आपलें आपल्यापाशींच आहे. त्याकरितां ( श्रौत स्मार्त होमादि ) अग्नीची सेवा सोडण्याची गरज नाहीं; किंवा कर्माची मर्यादा उल्लंघन करण्याची जरूर नाहीं." ५१**

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव ।
नह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥

[यं संन्यासमिति] ऐकें संन्यासी तोचि योगि । ऐसी एकवाक्यतेची जगीं । गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरीं ॥५२॥ [न ह्यसंन्यस्त इति] जेथ संन्यासिला संकल्प तुटे । तेथचि योगाचें सार भेटे । ऐसें हें अनुभवाचेनि घटे । साचें जया ॥ ५३ ॥

**" जगांत अनेकांनीं अनेक शास्त्रांमध्यें, जो संन्यासी तोच योगी; अशा एकवाक्यतेची गुढी उभारून ठेवलेली आहे. ध्यानांत ठेव. ५२ त्याग केलेला संकल्पच जेथें नाहींसा होतो, तेथेंच योगाचें सार प्राप्त होतें. ही गोष्ट, अनुभवानें दृढनिश्चय ज्यांच्या आंगांत विंवतो, त्याच्या प्रत्ययास येते." ५३**

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ॥
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥

[आरुरुक्षोर्मुनेर्योगं] आतां योगाचळाचा निमथा । जरी ठा-

१ वंशाच्या, आत्मव्याप्तीच्या. २ अनुरूप. ३ अहंकारयुक्त. ४ फलपर्यंत. ५ ह्याशिवाय. ६ नोकर. ७ श्रम पावतो. ८ श्रौत, स्मार्त होमादि. ९ आपल्या पाशींच.

१ अनेकांनीं. २ सोडलेला. ३ दृढनिश्चयानें. ४ शिखर.

कावा आथि पार्था । [ कर्म कारणमुच्यते ] तरी सोपानां या कर्मपथा । चुकों झणीं ॥ ५४ ॥ येणें यमनियमाचेनि तळवटें । रिगे आसनांचिये पाउलवाटे । येई प्राणायामाचेनि आड-कोटें । वरौतां गा ॥ ५५ ॥ [ योगारूढस्य तस्यैव ] मग प्र-त्याहारांचा अधांडा । जो बुद्धीचियाहि पायां निसरडा । जेथ हटियें सांडिती होडा । कडेलग ॥ ५६ ॥ [ शमः कारणमुच्यते ] तरी अभ्यासाचेनि बळें । प्रत्याहारीं नेरांळें । नखी लागेल ढाळेंढोळें । वैराग्याची ॥ ५७ ॥ सा पवनाचेनि पाठारें । येतां धारणेचेनि पैसारें । क्रमी यानाचें चंवरें । सांडे तंव ॥५८॥ मग तया मार्गाची धांवे । रेल प्रवृत्तीची हांवे । जेथ साध्यसाधना खेंवें । समरसें ोय ॥ ५९ ॥ जेथ पुढील पैसे पारुखे । मागील स्मरावें तें के । ऐसिये सरिसीये भूमिके । समाधि राहे ॥ ६० ॥ येणें पायें योगारूढ । जो निरवधि जाहला प्रौढ । तयाचिया चिन्हाचा निवाड । सांगेन आइकें ॥ ६१ ॥

**"आतां योगपर्वताच्या शिखरावरच चढून ाणें असेल तर अर्जुना! हा कर्ममार्गाचा ाट सोडून उपयोग नाहीं. ५४ ह्या इंद्रियनि-ाहाच्या पायथ्यापासून योगांतील आसनांच्या ळलेल्या रस्त्यानें, प्राणायामाच्या कड्यावरून र यावें. ५५ ह्मणजे प्रत्याहाराचा—मनोनिग्र-ाचा—मध्य लागतो. तेथें मोठें निसरडें आहे. द्धीचा पाय सुद्धां ठरत नाहीं. त्या ठिकाणीं ठयोगी सुद्धां पैजा हरून कड्यावरून ोसळतात. ५६ प्रत्याहारांत कशाचाही आ-य नसतो. केवळ निराधार जावें लागतें. तरी ास अभ्यासाच्या बळानें हळू हळू वैराग्याचा का मिळतो. ५७ अशा प्रकारें वायूच्या पाठ-ळानें, आत्मसंयमाच्या मार्गानें चालून, ध्या-ाचा शेवट होईपर्यंत जावें, ५८ ह्मणजे तेथें ो मार्ग संपेल. पुढें जाण्याची इच्छा परिपूर्ण होईल, आणि ब्रह्मानंदाच्या योगानें साध्यसा-धनाची—जीवाची आणि ब्रह्माची—गांठ पडेल. ५९ जेथें पुढील रस्ता संपतो; मागचें स्मरण वंद पडतें; तेथेंच समाधि—ह्मणजे एकाग्रता—वास करते. ६० अशा उपायांनीं योगारूढ हो-ऊन जो उच्चपदाप्रत पोंचतो, त्याच्या चिन्हांचा निर्णय सांगतों ऐक." ६१**

यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥

[ यदा हि नेंद्रियार्थेषु ] तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयाचिया येरझारा । जो आत्मबोधाचा वोवरां । पहुडला असे ॥ ६२ ॥ [ न कर्मस्वनुषज्जते ] जयाचे सुख-दुःखाचेनि आंगें । झगडलें मानस चेवो नेघे । विषय पासींही आलिया से नें रिघे । हें काय ह्मणऊनि ॥ ६३ ॥ [ सर्वसंकल्पसंन्यासी ] इंद्रियें कर्माच्या ठायीं । वाढींनलीं परि कहीं । फळहेतूची चाड नाहीं । अंतःकरणीं ॥ ६४ ॥ असतेनि देहे एतुला । जो चेतुंचि दिसे निदेला । [ योगारूढस्तदोच्यते ] तोचि योगारूढ भला । वोळखें तूं ॥ ६५ ॥ तेथ अर्जुन ह्मणे अनंता । हें मज विस्मो वहु आइकतां । सांगे तया ऐसी योग्यता । कवणें दीजे ॥ ६६ ॥

**"तर, ज्याच्या इंद्रियाच्या घराला विषयांच्या खेपा नाहींत; जो आत्मबोधाच्या ओवरींत निजलेला; ६२ सुखदुःखें आंगाशीं येऊन भिडलीं तरी, ज्याचें मन ढळत नाहीं; विषय जवळ येऊन ठेपले तरी, हें अमुक ह्मणून ज्याला स्मरण सुद्धां होत नाहीं; ६३ कर्माच्या ठिकाणीं इंद्रियें रत असतात, परंतु अंतःकरणांत फलाशेची कधींच इच्छा नाहीं; ६४ असलेल्या देहांत जागृत असूनही असा निद्रिस्तासारखा दिसतो, तोच उत्तम योगारूढ झाला असें तूं ओळख." ६५ तेव्हां अर्जुन ह्मणाला 'अनंता! हें ऐकून मला फार आश्चर्य वाटतें. येवढी योग्यता त्याला कोण देतें? तें सांगावें.' ६६**

उद्धरेदात्मनात्मानमात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥

१ चढावा. २ घाट. ३ चुकूं नको. ४ इंद्रियनिग्रहाच्या. तळापासून. ६ शीर. ७ योगविधींतील आसनाच्या. ८ पालवाटेनें. ९ अष्टांगयोगांतील चवथें आंग जो प्राणायाम, ाच्या. १० आडमार्गानें. ११ वर. १२ विषयांपासून इंद्रियें ावरणें. १३ मध्यभाग. १४ पाय न ठरण्यासारखी जागा. ५ हठयोगी. १६ प्रतिज्ञा, पैजा. १७ कडेलोट. १८ निराधीं. १९ आश्रय. २० हळू हळू. २१ पाठबळानें. २२ निधि. २३ मार्गानें. २४ शेवट. २५ चालणें. २६ इच्छा. ७ आलिंगन. २८ ब्रह्मानंदीं. २९ पाऊल. ३० बंद होते. १ अशा अवस्थेजवळ. ३२ एकाग्रता.

१ खोलींत. २ जागृती. ३ स्मरण. ४ एवढा. ५ जागृत असतां. ६ निजलेला.

[ उद्धरेदात्मनात्मानं ] तंव हासोनि कृष्ण ह्मणे । तुझें नवल ना हें बोलणें । कवणासि काय दिजेल कवणें । अद्वैतीं येथ ॥ ६७ ॥ [ नात्मानमवसादयेत् ] पैं व्यामोहाचिये शेजे[2] । बळिया अविद्या निद्रित होइजे । ते वेळीं दुःस्वप्न हा भोगिजे । जन्ममृत्यूचा ॥ ६८ ॥ [ आत्मैव ह्यात्मनो बंधुः ] पाठीं अवसांत[4] चेंवो । तैं तें अवघेंचि होय वावो[6] । ऐसा उपजे नित्य सद्भावो । तोही आपण पांचि ॥ ६९ ॥ [ आत्मैव रिपुरात्मनः ] ह्मणवूनि आपणचि आपण यां । घात किजत असे धनंजया । चित्त देऊनि नाथिलियां । देहाभिमाना ॥ ७० ॥

**तेव्हां कृष्ण हांसले आणि ह्मणाले "हें तुझें बोलणें चमत्कारिक नव्हे का? अरे! येथें अद्वैताच्या ठिकाणीं कोण कोणाला काय देणार? ६७ गाढ अज्ञानानें भ्रांतीच्या शय्येवर जेव्हां निद्रिस्त व्हावें, तेव्हांच हें जन्ममृत्यूचें दुष्ट स्वप्न पडतें. ६८ नंतर अकस्मात् जागें झाल्यावर तें सर्व लटकें आहे, असा जो निरंतर सद्भाव उत्पन्न होतो, तोही आपोआपच. ६९ ह्मणून धनंजया! मिथ्या देहाभिमानांत गुंतून आपणच आपला घात करून घेतो." ७०**

बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥

[ बंधुरात्मा इति ] हा विचारूनि अहंकार सांडिजे । मग असंतीचि वस्तु होइजे । तरी आपली स्वस्ति[9] सहजें । आपण केली ॥ ७१ ॥ [ अनात्मनस्त्विति ] येऱ्हवीं कोशकीटकां[10]चिया परी । तो आपणयां आपण वैरी । जो आत्मबुद्धि[11] शरीरीं । चारुस्थळी[12] ॥ ७२ ॥ कैसे प्राप्तीचिये वेळे । [13]निर्दैवां आंधळेपणाचे डोहळे । कीं असते आपुले डोळे । आपण झांकी ॥ ७३ ॥ कां कवण एक भ्रमलेपणें । मी तों नव्हे गा चोरलों ह्मणे । ऐसा नाथिलें[14] छंद अंतःकरणें । घेऊनि ठाके ॥ ७४ ॥ येरवीं होय तें तोचि आहे । परि काइ कीजे बुद्धि तैसी नोहे । देखा स्वप्नींचेनि घायें । कीं मरे साचें ॥ ७५ ॥ जैसी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली[15] [16]एरी मो[17]हरें । तरी तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ॥ ७६ ॥ वायांचि मान पिळी । [18]अडुवें हियें[19] आंवळी । टिटांतु[20] नळी । धरूनि ठाके ॥ ७७ ॥ ह्मणे बांधला मी फुंडा[1] । ऐसिया भावनेचिया पडे खोडां[2] । कीं मोकळिया पायांचा चवडा । गोंवी अधिकें ॥ ७८ ॥ ऐसा काजेंवीण आंतुडला[3] । तो सांगपां काय आणिकें बांधला । मग न सोडीच जऱ्ही नेला । तोडूनि अर्धा ॥ ७९ ॥ ह्मणवूनि आपणयां आपणचि रिपु । जेणें वाढविला हा संकल्पु । येर[4] स्वयंबुद्धी ह्मणे बोपु[5] । जो [6]नाथिलें नेघे ॥ ८० ॥

**"हा विचार मनांत आणून अहंकार सोडून द्यावा. आणि मग सत्स्वरूप वस्तु व्हावें. तरच आपलें आपण सहज कल्याण केलें असें होईल. ७१ असें न करितां, जो शरीर हाच आत्मा अशी बुद्धि धारण करतो, तो आपल्या आंगाभोंवतीं कोश बांधणाऱ्या किड्याप्रमाणें आपला आपणच शत्रु होय. ७२ हतभाग्याला लाभाच्याच संधीला आंधळेपणाचे डोहळे कसे लागतात तें पहा! तो आपले असलेले डोळे आपणच झांकून घेतो! ७३ किंवा एखादा भ्रमिष्ट भ्रांतिष्टपणानें 'मी हा मी नव्हें. मी तो हरवलों आहें.' असा अंतःकरणांत मिथ्या छंद घेऊन बसतो, ७४ पण तो तसा हरवलेला असतो होय? त्याच्या बुद्धीला त्याच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटत नाहीं, त्याला काय करणार? हें पहा! स्वप्नांतील घावानें खरें मरण येईल का? ७५ ज्याप्रमाणें पारधी लोक राघूला धरण्यासाठीं दोरी बांधून तींत नळी ओवून ठेवतात. तिच्यावर राघू बसला ह्मणजे त्या राघूच्या आंगच्या भारानें ती नळी दुसऱ्या बाजूला फिरली, तर त्यानें उडून जावें. पण त्याच्यानें जाववत नाहीं. कारण, मनाची शंका. ७६ तो व्यर्थ मानेला अळोके पिळोके देतो; आणि छाती वांकडी करून पायानें ती नळी अधिकच आंवळून धरतो. ७७ त्याला असें वाटत असतें कीं, मी खरोखरच बांधलेला आहें. ह्या भ्रांतीनेंच तो खोड्यांत पडतो. किंवा खरोखर मोकळ्या असलेल्या पायाचा पंजा त्या नळीला अधिकाधिकच गुंतवून ठेवतो. ७८ असा निरर्थक जो गुंतून पडतो, तो काय दुसऱ्यानें बांधलेला**

१ भ्रांतीच्या. २ आंथरुणावर. ३ नंतर. ४ अकस्मात्. ५ जागृति. ६ व्यर्थ. ७ लटिक्या. ८ असलेली, नित्य. ९ कल्याण. १० आपल्या आंगाभोंवतीं घर बांधणारा किडा. ११ शरीर हेंच आपण अशी बुद्धि. १२ उत्तम स्थळ, मानतो. १३ हतभाग्याला. १४ मिथ्या, लटका. १५ फिरलेली. १६ उलट, दुसरीकडे. १७ बाजूनें. १८ संकोचित. १९ छाती. २० पायांत.

१ खरोखर. २ खोड्यांत. ३ सांपडला. ४ इतर. ५ जगज्जनक. ६ मिथ्या.

असतो? सांग. तरी पण त्याला अर्धा तोडून नेला तरी तो त्या नळीला सोडीत नाहीं. ७९ ह्याकरितां संकल्प जो वाढवितो, तो आपला आपणच शत्रु होतो." जगज्जनक जो श्रीकृष्ण तो ह्मणाला "अन्य, जो मिथ्यत्वाचा स्वीकार करीत नाहीं; तो बुद्धिवान्." ८०

जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः ।
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ७ ॥

[ जितात्मन इति ] तया स्वांतःकरणजिता । सकळकामोपशांता । परमात्मा परौता । दूर नाहीं ॥ ८१ ॥ जैसा किडाळाचा दोष जाये । तरी पंधरे तेंचि होये । तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ॥ ८२ ॥ हा घटाकार जैसा । निमालिया तया अवकाशा । नलगे मिळों जाणें आकाशा । आना ठाया ॥ ८३ ॥ तैसा देहालंकार नाथिलो । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे ॥ ८४ ॥ [ शीतोष्णेति ] आतां शीतोष्णाचिया वाहणी । तेथ सुखदुःखाची कडसणी । इयें नसमाती कांहीं बोलणीं । मानापमानाचीं ॥ ८५ ॥ जे जियेवाटा सूर्य जाये । तेउतें तेजाचें विश्व होये । तैसें तया पावे तें आहे । तोचि ह्मणनी ॥ ८६ ॥ देखें मेघौनि[11] सुटती धारा । तियों न रुपती तैसिया सागरा । तैसीं शुभाशुभें योगीश्वरा । नव्हती आनें ॥ ८७ ॥

"त्या स्वांतःकरण जिंकणाराला, सकलेच्छा शांत झालेल्याला, परमात्मा फार दूर नाहीं. ८१ ज्याप्रमाणें हिणकटाचा दोष नाहींसा झाला ह्मणजे तेंच पंधराच्या दराचें उत्तम सोनें होतें, त्याप्रमाणें संकल्पाचा नाश झाला कीं, जिवालाच ब्रह्मत्व येतें. ८२ घागरीचा आकार मोडला, ह्मणजे त्यांतील अवकाशाला आकाशाला मिळावयाला जसें दुसरीकडे जावें लागत नाहीं, ८३ तसें हा देहाचा मिथ्या अहंकार ज्याचा समूळ नाश पावला तो मूळचाच सर्वव्यापी परमात्मा आहे. ८४ मग शीतोष्णाचे प्रवाह, सुखदुःखाचे विचार, मानापमानाचीं बोलणीं, त्याच्यामध्यें मुळींच राहत नाहींत. ८५ कारण, ज्या ज्या मार्गानें सूर्य जातो तिकडे तिकडे विश्व प्रकाशित होतें. त्याप्रमाणें त्याला जें जें कांहीं प्राप्त होतें, तें तें तोच होऊन राहिलेला असतो. ८६ हें पहा! मेघापासून निघालेल्या धारा जशा सागराला खुपत नाहींत, त्याप्रमाणें योगीश्वराला शुभ किंवा अशुभ हीं भिन्न असत नाहींत." ८७

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥ ८ ॥

[ ज्ञानविज्ञानतृप्तात्मा ] जो हा विज्ञानात्मक भावो । तया विवरितां जाहला वावो । मग लागला जंव पाहों । तंव ज्ञान तें तोचि ॥ ८८ ॥ [ कूटस्थ ] आतां व्यापक कीं एकदेशी । ऊहापोहि जे ऐसी । ते करावी ठेली आपैसी । दुजेनवीण ॥ ८९ ॥ [ विजितेंद्रियः ] ऐसा शरीरींचि परि कौतुकें । परब्रह्माचेनि पाडें तुके । जेणें जिंतलीं एकें । इंद्रियें गा ॥ ९० ॥ तो जितेंद्रिय सहजें । [ युक्त इत्युच्यते योगी ] तोचि योगयुक्त ह्मणिजे । जेणें सानें थोर नेणिजे । कवणें काळीं ॥ ९१ ॥ [ समलोष्टाश्मकांचनः ] देखें सोनयाचें निखळ । मेरुयेसणें ढिसाळ । आणि मातियेचें डिखळ । कीं सरिसेंचि मानीं ॥ ९२ ॥ पाहातां पृथ्वीचें मोल थोडें । ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें । देखें दगडाचे निपाडें । निचाड ऐसा ॥ ९३ ॥

"हें संसारिक ज्ञान विचार करतांना त्याला मिथ्या असें वाटतें. आणि मग पाहूं लागतो तों खरें ज्ञान तें आपणच. ८८ असें झालें ह्मणजे व्यापक आणि अव्यापक अशाविषयींचे तर्क, भिन्नत्व नाहींसें झाल्यामुळें आपोआपच राहतात. ८९ ह्याप्रमाणें बाबा! इंद्रियें ज्यानें जिंकलीं, तो आनंदानें शरीरांतच असतो तरी, परब्रह्माच्या योग्यतेला सदृश होऊन राहतो. ९० तो अर्थातच जितेंद्रिय होय. त्यालाच

१ फार. २ हिणकटाचा. ३ पंधराच्या दराचें उत्तम सोनें. ज्ञानेश्वराच्या कालांत उत्तम–शंभर नंबरी सोन्याचा भाव धरा रुपये तोळा होता हें ह्यावरून उघड होतें. त्यानंतर ठराच्या दराचें सोनें उत्तम मानीत. तेंच मान प्रस्तुत कां तिसापेक्षांही अधिक झालें आहे. तसेंच सोन्याच्या उत्तम राची सीमा पूर्वी बावन्न होती. हें रघुनाथ पंडितांदिकांा कवितांवरूनही दिसून येतें. तोच कस हल्लीं शंभर नंबचा झाला आहे. ) ४ संकल्प नाश पावल्यानें. ५ मिथ्या. व्यापलेला. ७ विचार. ८ रहात नाहींत. ९ ज्या वाटेनें. ० तितकें. ११ मेघापासून. १२ त्या.

१ संसारिक ज्ञान. २ विचार करितां. ३ व्यर्थ. ४ अव्यापक. ५ वाटाघाट. ६ राहिली. ७ द्वैताशिवाय. ८ लहान. ९ शुद्ध. १० मेरुपर्वतायेवढें. ११ मोठें. १२ अमोल. १३ चांगलें. १४ निष्काम, निरिच्छ.

योगी असें ह्मणावें. त्याला लहान आणि थोर हें केव्हांही नाहीं. ९१ हें पहा! सोन्याचा गोळा मेरु पर्वतायेवढा असला तरी तो, किंवा मातीचें ढेंकूळ, हीं तो सारखींच मानतो. ९२ पृथ्वीचें मोलही ज्याच्या पुढें थोडें होईल, असें एखादें अमूल्य रत्न पाहिलें, तरी तो दगडासारखें मानतो इतका निरिच्छ!" ९३

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुपु ।
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥

[ सुहृन्मित्रेति ] तेथ सुहृद आणि शत्रु । कां उदास आणि मित्रु । हा भावभेद विचित्रु । कल्पू कैंचा ॥ ९४ ॥ तया बंधु कोण कांह्याचा । द्वेषिया कवण तयाचा । मीचि विश्व ऐसा जयाचा । बोध जाहला ॥ ९५ ॥ [ साधुष्वपि च पापेषु ] मग तयाचिये दृष्टी । अधमोत्तम असे किरीटी । काय परिसाचिये कसवटी । वानियाँ कीजे ॥ ९६ ॥ ते जैसी निर्वाणें सुवर्णचि करी । [ समबुद्धिर्विशिष्यते ] तैसी जयाची बुद्धी चराचरीं । होय साम्यचि उजरी । निरंतर ॥ ९७ ॥ जे ते विश्वाळंकाराचे विसुरे । जरी आहाती आनानें आकारें । तरी घडलें एकचि भांगारें । परब्रह्में ॥ ९८ ॥ ऐसें जाणणें जें बरवें । तें फावलें तया आघवें । ह्मणोनि अहाचवाहाचे न झकवे । येणें आकारचित्रें ॥ ९९ ॥ घांपे घटामाजि दृष्टी । दिसे तंतूची सैंघ सृष्टी । परि तो एकवांचूनि गोष्टी । दुजी नाहीं ॥ १०० ऐसेनि प्रतीची हें गवसे । ऐसा अनुभव जयातें असे । तोचि समबुद्धी हें अनारिसें । नव्हे जाणें ॥ १ ॥ जयाचें नांव तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तीसि ठावो । जयाचेनि संगें ब्रह्मभावो । भ्रांतासही ॥ २ ॥ जयाचेनि बोलें धर्म जिये[१८] । दिठी[१९] महासिद्धीतें विये[२०] । देखें स्वर्गसुखादि इये । खेळ जयाचा ॥ ३ ॥ विपायें जरी आठवला चित्ता । तरी दे आपुली योग्यता । हें असो तयातें प्रशंसितां । लाभ आथि ॥ ४ ॥

"त्याच्या ठिकाणीं मित्र आणि शत्रु; किंवा आपला आणि परका; ह्या विचित्र भेदभावाची कल्पना कोठून आणावी? ९४ मीच विश्व असा ज्याला बोध झाला, त्याला बंधु कोण? आणि कशाचा? आणि त्याचा द्वेषी तर कोण? ९५ मग किरीटी! त्याच्या दृष्टीला अधम आणि उत्तम राहिलें का? परिसानें झालेल्या सोन्याला प्रतवारी का असते? ९६ तो सोनें करतो तें उत्तम प्रतीचेंच करतो. त्याप्रमाणें त्याची बुद्धि स्थिरचराचे ठायीं निरंतर सम असल्याचेंच स्पष्ट दिसून येतें. ९७ विश्वाचे प्राणी आदिकरून आश्चर्यकारक भरलेले जे अलंकार, ते एका परब्रह्मरूप सोन्याचेच घडलेले आहेत; ९८ असें जें उत्तम ज्ञान, तें सर्व त्यास प्राप्त झालेलें असतें. ह्मणून ह्या चित्रविचित्र रचनेच्या वरकरणी देखाव्याला तो फसला जात नाहीं. ९९ वस्त्राकडे पाहिलें, तर त्यांत सारे तंतूच दिसून येतात. तंतूवांचून दुसरें त्यांत कांहींच आढळत नाहीं. त्याप्रमाणें सर्वत्र ब्रह्मच भरलेलें आहे, १०० अशी ज्याला साक्ष पटते, असाच ज्याला अनुभव घडतो, तोच समबुद्धि असें समज. ह्यांत संशय नाहीं. १०१ तीर्थराज हें ज्याला नांव शोभतें; ज्याच्या दर्शनानें पूज्य बुद्धीस स्थान मिळतें; आणि ज्याच्या संगतीनें भ्रमिष्टास सुद्धां ब्रह्मरूप प्राप्त होतें. १०२ ज्याच्या शब्दानें धर्माचें रक्षण होतें; दृष्टीनें महासिद्धि उत्पन्न होतात; आणि स्वर्गादि सुखें, हे तर त्याचे खेळच आहेत पहा! १०३ त्याचें चित्ताला स्मरण जरी झालें, तरी त्यास तो आपली योग्यता देतो. हें तर असो. पण त्याच गुणानुवाद गाइले, तरी सुद्धां कल्याण होतें." १०४

योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः ।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥

[ योगीति ] पुढती अस्तवेना ऐसें । जया पाहलें अद्वैत दिवसें । मग आपणपांचि आपण असे । अखंडित ॥ ५ ॥ [ एकाकीति ] ऐसिया जो दृष्टी विवेकी । पार्था तो एकाकी । सहजें अपरिग्रही जो तिहीं लोकीं । तोचि ह्मणउनी ॥ ६ ॥ ऐसियें असाधारणें । निष्पन्नाचीं लक्षणें । आपुलेनि बहुवसपणें । श्रीकृष्ण बोले ॥ ७ ॥ जो ज्ञानियांचा बाप । देखणेयांचे दिठीचा दीप । जया दादुलेयाचा संकल्प । विश्व रची

१ कशाचा. २ द्वेष्टा. ३ परिसाच्या. ४ भेद. ५ उत्तम. ६ स्पष्ट. ७ समुदाय, आश्चर्य. ८ सुवर्ण. ९ समजलें. १० वरचेवर. ११ फसवत नाहीं. १२ चित्रविचित्र विश्वरचनेनें. १३ घातल्यानें. १४ केवळ, सर्व. १५ अनृत. १६ तीर्थांचा राजा, प्रयाग. १७ पूज्यतेला. १८ जगतो. १९ दृष्टि. २० प्रसवे. २१ सहज, चुकून.

१ पुन्हा. २ अस्त होईना. ३ प्रकाशित केलें. ४ आपला आपणच. ५ अद्वितीय. ६ संग्रह न करणारा. ७ सिद्धांचीं. ८ आपल्यापेक्षांही अधिक. ९ पाहाणाऱ्यांच्या. १० दृष्टीचा. ११ दिवा, प्रकाशक. १२ प्रभूचा.

॥ ८ ॥ प्रणवांचिये[1] पेठे[2] । जाहालें शब्दब्रह्म[3] माजिठें[4] । तें जयाचिये यशा धाकुटें । वेंटू[5] न पुरे ॥ ९ ॥ जयाचेनि आंगिकें[6] तेजें । आवो रविशशीचिये वर्णिजे[7] । ह्मणऊनि जग हें वेसे जे । वीण असे तया ॥ ११० ॥ हां गा नामचि एक जयाचें । पाहतां गगनही दिसे टांचें[9] । गुण एकैक काय तयाचे । कळिशील[10] तूं ॥ ११ ॥ ह्मणोनि असो हें वानणें । सांगों नेणों कवणांचीं[11] लक्षणें । दावावीं मिषें येणें । कां बोलिलों तें ॥१२॥ ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी[12] । ते ब्रह्मविद्या किजेल[13] उघडी । तरी अर्जुना पढिये[14] हे गोडी । नाशेल हन ॥ १३ ॥ ह्मणोनि तें तैसें बोलणें । नव्हे सेंपातळ[15] आड लावणें । केलें मनचि वेगळवाणें[16] ।·भोगावया ॥ १४ ॥ जया सोहंभाव अटक । मोक्षसुखालागोनि रंक । तयाचिये दिठीचा [17]झंणें कळंक । लागेल तुझिया प्रेमा ॥ १५ ॥ विपर्यायें[18] अहंभाव ययाचा जाइल । मी तेंचि हा जरी होइल । तरि मग काय कीजेल । एकलेया ॥१६॥ दिठीचि[19] पाहतां निविजे[20] । कां तोंड भरोनि बोलिजे ।ना तरी दाटूनि खेंवं[21] दीजे । ऐसें कोण आहे ॥१७॥ आपुलिया मना बरवी । असमाई[22] गोठी[23] जीवीं । ते कवणेंसि चांवळावी[24] । जरी ऐक्य जाहलें ॥१८॥ इया काकुळती जनार्दनें । अन्योपदेशाचेनि हातांसनें[25] । बोलांमाजि[26] मन मनें । आलिंगू सरलें ॥ १९ ॥ हें परिसतां जरि कानडें[27] । तरि जाण पां पार्थ उघडें । श्रीकृष्ण सुखाचेंचि रुपडें । वोतलें गा १२० ॥ हें असो वयसेचिये[28] शेवटीं । जैसें एकचि विये वांझोटी । मग ते मोहाची त्रिपुटी[29] । नाचों लागे ॥ २१ ॥ तैसें जाहलें श्रीअनंता । ऐसें तरि मी न ह्मणता । जरी तयाचा न देखता । अतिशय एथ ॥ २२ ॥ पाहा पां नवल कैसें चोजें[30] । कें[31] उपदेश कोडें[32] तें झुंझ । परि पुढें बालभांचें[33] भोजें[34] । नाचत असे ॥ २३ ॥ आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी । पिसें आणि न भुलवी । तरि तें काइ ॥ २४ ॥ ह्मणऊनि भावार्थ तो ऐसा । अर्जुन मैत्रिचा[35] कुवासा[36] । कीं सुखें शृंगारलिया मानसा । दर्पण तो॥२५॥

१ ओंकाराच्या. २ बाजारांत. ३ वेद. ४ उत्तम वस्त्र. ५ आच्छादण्याला, गुंडाळण्याला. ६ महत्व. ७ व्यापाराला. ८ प्रकाशावांचून. ९ लहान. १० जाणशील. ११ ज्यांचीं. १२ नाहींसा करी. १३ केली जाईल. १४ अतिप्रिय. १५ पडदा. १६ भिन्न. १७ कदाचित्. १८ न जाणों. १९ दृष्टीनेंच. २० तृप्त व्हावें. २१ आलिंगन. २२ न मावणारी. २३ गोष्ट. २४ बोलावी. २५ युक्तीनें, मिषानें. २६ बोलण्यामध्यें. २७ अवघड. २८ वयाच्या. २९ प्रपंचरचना. (ज्ञान, ज्ञाता, आणि ज्ञेय. किंवा ध्यान, धाता, आणि ध्येय.) ३० ज्ञान, आवड. ३१ कोठें. ३२ कोठें, कोणीकडे. ३३ प्रीतीचें. ('वल्लभ' ह्यावरून 'वालभ' झालें असावें.) ३४ प्रेम, कौतुक. ३५ मैत्रीचा. ३६ आश्रय.

यापरी बाप पुण्यपवित्र । जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र । तो श्रीकृष्ण कृपे पात्र । याचिलागीं ॥ २६ ॥ हो कां आत्मनिवेदनातळींची[1] । जे पीठिका[2] होय सख्याची । पार्थ अधिष्ठात्री तेथिंची । मातृका[4] गा ॥ २७ ॥ पासीचि गोसांवी[5] वर न वानिजे[6] । मा गा पाइकाचा गुण घेइजे । ऐसा अर्जुन तो सहजें । पढिये[10] हरी ॥ २८ ॥ पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें[11] मानिजे । ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता ॥ २९ ॥ तैसा अर्जुनचि विशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा । जे तो त्रिभुवनींचिया दैवां । एकायतन[12] जाहाला ॥ १३० ॥ जयाचिया आवडीचेनि पांगें[13] । अमूर्तही मूर्ति आवगे[14] । पूर्णाहि परि लागे । अवस्था[15] जयाची ॥ ३१ ॥ तंव श्रोते ह्मणती दैव । कैसी बोलाची हेवाव[16] । काय नादांतें हन बैरव । जिणोनि[19] आली ॥ ३२ ॥ हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरि ऐशी । वांणें उमटतां हे आकाशीं । साहित्य रंगाचें ॥ ३३ ॥ कैसें उन्मेखचांदिणें[24] तार । आणि भावार्थ पडे गार । हेचि श्लोकार्थ कुमुदिनीं फार[26] । सावियां होती ॥ ३४ ॥ चाडचि निर्वाडा करी । ऐसी मनोरथीं ये थोरी । तेणें विवळले[29] अंतरीं । तेथ डोलें आला ॥३५॥ तें निवृत्तिदासें जाणितलें । मग द्या अवधान ह्मणितलें । नवल पांडवकुळीं पाहिलें[31] । कृष्णदिवसें[32] ॥ ३६ ॥ देवकीयां[33] उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला । शेखीं[34] उपेगा[35] गेला[36] । पांडवांसी ॥ ३७ ॥ ह्मणऊनि बहु दिवस वोळगावा[37] । कां अवसरू[38] पाहोनि विनवावा । हाही सोसे[39] तया सदैवां[40] । पडेचिना ॥३८॥ हें असो कथा सांगें वेगीं । मग अर्जुन ह्मणे सलगी[41] । देवा इयें संताचिन्हें आंगीं । न ठकती[42] माझ्या ॥ ३९ ॥ येन्हवीं या लक्षणाचिया निजसारा[43] । मी अपाडें[44] कीरे[45] अपुरा । परि तुमचेनि बोलें अवधारा । थोरावें[46] जरी ॥ १४० ॥ जी तुह्मी

१ 'आत्मनिवेदन' ही नववी भक्ति, तिच्या मागची, ह्मणजे आठवी. 'सख्यमात्मनिवेदनम्' असें मूळ आहे. तेव्हां अर्थात् 'सख्य'. २ आसन. ३ आश्रयभूत. ४ देवता. ५ स्वामी, इंद्रियदमन करणारांत श्रेष्ठ. ६ न वर्णन करावा. ७ मग. ८ सेवकाचा. ९ अतिप्रिय. १० प्रीतीनें. ११ नवऱ्यानें. १२ पात्र, एकच अधिष्ठान. १३ सांटीं. १४ धारण केली. १५ उत्कंठा. १६ शोभा. १७ वेदातें. १८ सौंदर्य. १९ जिंकून. २० रंग. २१ प्रकट होतात. २२ आकाशामध्यें. २३ श्रवणसुखाचें, अलंकारशास्त्राचे. २४ ज्ञानरूप चांदणें. २५ स्वच्छ. २६ विस्तृत. २७ प्रफुल्लित. २८ निरिच्छ. २९ प्रकाशित झाले. ३० विस्मय. ३१ उजाडलें. ३२ कृष्णरूप दिवसानें. ३३ देवकीनें. ३४ शेवटीं. ३५ उपयोगास. ३६ आला. ३७ सेवावा. ३८ समय, संधि. ३९ अडचण. ४० भाग्यवंताला. ४१ लडिवाळपणानें. ४२ रहात नाहींत. ४३ तुलनेला. ४४ अयोग्य. ४५ निश्चयेंकरून. ४६ महत्त्व मानावें.

चित्त देयाल। तरी ब्रह्म मियां होइजेल। काय जाहलें अभ्यासिजेल। सांगाल जें ॥४१॥ हांहो नेणों कवणाची काहाणी[1]। आइकोनि श्राधिजतें[2] असों अंतःकरणीं। ऐसी जाह्यलेपणाची शिरेयाणी[3]। कायसी देवा ॥४२॥ हें आंगें म्यां होइजो कां। येतुलें[4] गोसावी[5] आपुलेपणें कीजो[6] कां। तंव हांसोनि श्रीकृष्ण होकां। करूं ह्मणती ॥४३॥ देखा संतोष एक न जोडे। तंवचि सुखाचें सैंघ[7] सांकडें[8]। मग जोडलिया कवणेकडे। अपुरें असे ॥ ४४ ॥ तैसा सर्वेश्वर बळिया[9] सेवकें। ह्मणोनि ब्रह्मही होय तो कौतुकें। परि कैसा भारें आतला[10] पिकें। दैवाचेनि ॥ ४५ ॥ जो जन्मसहस्रांचियासाठीं। इंद्रादिकांहीं महाग भेटी। तो अधीन केतुला[11] किरीटी। जे बोलही न साहे ॥ ४६ ॥ मग ऐका जें पांडवें। ह्मणितलें म्यां ब्रह्म होआवें[12]। तें अशेषही देवें। अवधारिलें ॥ ४७ ॥ तेथ ऐसेंचि एक विचारिलें। जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहले। परि उदरा वैराग्य आहे आलें। बुद्धीचिया ॥ ४८ ॥ येऱ्हवीं दिवस तरी या अपुरे। परि वैराग्यवसंताचेनि[13] भरें। जे सोहंभावमहुरें[14]। मोडोनि[15] आला ॥ ४९ ॥ ह्मणोनि प्राप्तिफळीं फळतां। ययासि वेळ न लगेल आतां। होय विरक्त ऐसा अनंता। भरंवसा जाहाला ॥ १५० ॥ ह्मणे जें जें हा आंधिष्ठील[16]। तें आरंभींच येथा[17] फळेल। ह्मणोनि सांगीतला न वचेल[18]। अभ्यास वायां ॥ ५१ ॥ ऐसें विवंरोनियां[20] श्रीहरी। ह्मणितलें तिये अवसरीं। अर्जुना हा अवधारीं। पंथराज[21] ॥ ५२ ॥ तेथ प्रवृत्तितरूच्या[22] बुडीं। दिसती निवृत्तिफळाचिया[23] कोडी[24]। जिये मार्गीचा कापडी[25]। महेश आझुनी ॥ ५३ ॥ पैं योगिवृंदें वहिलीं[26]। औडवीं आकाशीं निघालीं। कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं। धोरणें पडिला ॥५४॥ तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें[29]। धांव घेतली एकेसरें[30]। कीं येर सकळ मार्ग निर्दसुरे[31]। सांडूनियां ॥ ५५॥ पाठीं[32] महर्षी येणें आले। साधकांचे सिद्ध जाहाले। आत्मविद[33] थोरावले[34]। येणेचि पंथें ॥ ५६ ॥ हा मार्ग जैं देखिजे। तैं ताहान भूक विसरिजे। रात्रिदिवस नेणिजे। वाटे इये ॥ ५७ ॥ चालतां पाउल जेथ पडे। तेथ अपवर्गाची[35] खाणी उघडे। आव्हांटलिया[36] तरि जोडे। स्वर्गसुख ॥ ५८ ॥ निगिजे[1] पूर्वीलियां[2] मोहरां[3]। कीं येयिजे पश्चिमेचिया घरा। निश्चळपणें धनुर्धरा। चालणें एथिचें ॥ ५९ ॥ येणें मार्गें जया ठाया जाइजे। तो गांव आपणचि होइजे। हें सांगों काय सहजें। जाणसी तूं ॥ १६० ॥ तेथें पार्थ ह्मणितलें देवा। तरि तेंचि मग केव्हां। कां आर्तिसमुद्रौनि[4] न काढावा। बुडतु[5] जी मी ॥ ६१ ॥ तंव कृष्ण ह्मणती ऐसें। हें उत्संखळ[6] बोलणें कायसें। आह्मीं सांगतसों आपैसें। वरि पुसिलें तुवां ॥ ६२ ॥

"ज्याला पुढें कधीं अस्तच नाहीं, असा अद्वैतरूप दिवस ज्याला उगवतो, तो पुढें निरंतर आत्मस्वरूपांतच निमग्न असतो. १०५ अर्जुना! अशा दृष्टीनें जो विचारशील बनून राहतो, त्याला तिन्ही लोकांमध्यें अर्थात्‌च स्वीकार करण्यासारखें कांहीं राहत नाहीं. ह्मणून तो एक अद्वितीय पुरुष होय" १०६ ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं आपल्यापेक्षांही अधिक अशी सिद्धाचीं–योग्याचीं–अद्भुत लक्षणें सांगितलीं. १०७ ज्ञानी जनांचा जो मुगुटमणी; पाहणाऱ्यांच्या दृष्टीचा प्रकाशक; ज्या समर्थांच्या संकल्पानेंच विश्व निर्माण झालें; १०८ ओंकाराच्या पेठेंत वेदरूप तयार झालेलें सुंदर वस्त्र, ज्याच्या यशापुढें आंखूड होऊन तेंही आच्छादण्यास समर्थ झालें नाहीं; १०९ ज्याच्या आंगच्या तेजानें चंद्रसूर्यांचे व्यापार सुरू झाले आहेत, त्याच्या दृष्टीला दिसत नाहीं असें काय? सर्व जग प्रकाशावांचूनच त्याच्या डोळ्यांसमोर आहे. ११० "अरे! योग्याची योग्यता तुला किती ह्मणून सांगू? त्याच्या एका नामाचाच नुसता विचार केला तर, हें आकाश सुद्धां लहान होईल. मग त्याचे एक एक गुण तूं किती ह्मणून समजून घेशील? १११ ह्याकरितां ही स्तुति असूं दे. त्याचीं लक्षणें सांगतां येण्यासारखीं नाहींत. पण कांहीं निमित्तानें तुला तीं समजून द्यावींत ह्मणून सांगितलीं. ११२ दुसरी गोष्ट. द्वैताचा बीमोड करणारी ब्रह्मविद्या जर उघड केली, तर अर्जुना! तुमच्या आमच्यांत असलेलें अकृत्रिम प्रेमच

१ गोष्ट. २ स्तुति करीत राहूं. ३ योग्यता. ४ इतकें. ५ प्रभो. ६ कराल. ७ फार. ८ संकट. ९ निस्सीम. १० वांकलेला. ११ केवढा. १२ व्हावें. १३ वैराग्यरूप वसंतऋतूच्या बहारानें. १४ तें ब्रह्मच मी या भावनारूप मोहानें. १५ बहार. १६ ग्रहण करील. १७ ह्याला. १८ प्राप्त होईल. १९ व्यर्थ जाणार नाहीं. २० विचार करून. २१ राजमार्ग. २२ संसारवृक्षाच्या. २३ मोक्षफळाच्या. २४ कोटी. २५ प्रवाशी २६ निरनिराळीं. २७ आडवाटेनें. २८ हमरस्ता. २९ सरळ मार्गानें. ३० एकसारखी. ३१ अज्ञानांतील. ३२ पूर्वी. ३३ तत्वज्ञानी. ३४ श्रेष्ठत्वाला चढले. ३५ मोक्षाची. ३६ विक्षेप आला तरी.

१ निघावें. २ पूर्वेच्या. ३ मार्गानें. ४ उत्कंठासागरांतून. ५ बुडत आहे. ६ उतावळिपणाचें. ७ आणखी.

नाहींसें होऊन जाईल. ११३ तसलें प्रेमनाशक बोलणें उपयोगी नाहीं. त्यानें आडपडदा कांहीं राहावयाचा नाहीं. ह्मणून त्या प्रेमाचें सुख भोगण्यासाठीं मन हें भिन्नच राखलें पाहिजे. ११४ **परमेश्वर** तो मी येवढाच ज्यांना आडपडदा राहिलेला आहे; मोक्षसुखाविषयीं जे दीन होऊन राहिले आहेत; अशा लोकांच्या डोळ्यांची दृष्ट सुद्धां कदाचित् तुझ्या प्रेमाला लागेल. इतकें तुझें प्रेम अनिवार आहे." ११५ जर कदाचित् ह्याचा मीपणा निघून गेला, आणि मी तोच हा होऊन राहिला,-ह्मणजे मत्स्वरूप बनला,-तर मग मीं एकट्यानें काय करावें? ११६ नेत्रांचें पारणें फेडावयाला, तोंडभर बोलावयाला, किंवा प्रेमानें दृढ आलिंगन देण्याला तरी मला दुसरें कोण बरें आहे? ११७ अशी दोघांची एकरूपता झाली, तर मग आपल्या मनांत न ठेवण्यासारखी जिवाची गोष्ट असेल ती कोणापाशीं बोलावी? ११८ ह्या काळजीनेंच **जनार्दनांनीं** प्रकारांतरानें उपदेशाचें निमित्त करून बोलण्यामध्येंच मनोमन साक्षित्वानें प्रेमसुखाचा उपभोग घेतला. ११९ हें ऐकतांना जरा अवघडसें दिसतें. परंतु **अर्जुन** ही **श्रीकृष्णाचीच** ओतलेली प्रतिमा आहे हें लक्ष्यांत आणावें ह्मणजे झालें. १२० हें राहूंद्या. एखादी स्त्री वांझ असावी, आणि तिला वृद्धापकाळीं एकच अपत्य व्हावें, ह्मणजे मग तिचा जीवप्राण सगळा त्या एका मुलांत एकत्र होऊन राहतो. १२१ तसेंच **श्रीअनंताला** होऊन राहिलें होतें. त्याच्या प्रेमाचा इतका अतिशयपणा माझ्या दृष्टीस पडला नसता, तर मीं सुद्धां असें ह्मटलें नसतें. १२२ अहो! हा केवढा चमत्कार! आणि काय आश्चर्य हें पहा! कोठें युद्ध; आणि कोठें उपदेश; कशास कांहीं मेळ? परंतु प्रीति आणि आवड हीं आहेतना? तीं **श्रीकृष्णाच्या** रूपानें पुढें नाचतात. १२३ आवडीच्या ठिकाणीं लज्जा; प्रीतीच्या ठिकाणीं तिरस्कार; आणि वेडामध्यें शुद्धि हीं जर राहिलीं मग त्यांची प्रतिष्ठा ती काय? १२४ एवंच ह्यांतलें तात्पर्य इतकेंच कीं, **अर्जुन** हा **श्रीकृष्णाच्या** स्नेहाचें एक आश्रयस्थान, किंवा सुखानें शृंगारलेल्या अंतःकरणाचा आरसा होय. १२५ असा तो श्रेष्ठ, पुण्यपवित्र, जगांतील भक्तिरूप बीजाचें उत्तम शेत होता, ह्मणूनच **श्रीकृष्णाच्या** कृपेस पात्र झाला. १२६ अथवा आत्मनिवेदनभक्तीच्या पूर्वीचें जें सख्याचें सिंहासन, त्या सिंहासनावर स्थापन केलेली **पार्थ** ही एक देवता होय. १२७ प्रत्यक्ष जगत्पति जवळ असतां, त्याचें वर्णन न करितां, आह्मी त्याच्या सेवकाचेंच वर्णन करतों हें काय? परंतु खरोखरच त्या **अर्जुनाचें श्रीकृष्णावरील** प्रेम कांहीं विलक्षण होतें. १२८ हें पहा! प्रीतीनें पतीची सेवा करते आहे; पतीसुद्धां पूज्यत्वानें जिला मान देतो आहे; अशा पतिव्रता स्त्रीचें, तिच्या पतीपेक्षांही वर्णन करावयास नको का? १२९ त्याप्रमाणें **अर्जुनाचीच** विशेष प्रशंसा करावी असें माझ्या मनास वाटतें. कारण, त्रिभुवनांतील भाग्याला तो एकटाच पात्र होऊन राहिला आहे. १३० ज्याच्या आवडीसाठीं निराकारानें आकार धारण केला; आणि सदा तृप्त असूनही त्याला त्याची चट लागली. १३१ तेव्हां श्रोते ह्मणाले हें केवढें हो आमचें भाग्य! आणि केवढी ह्या शब्दांची शोभा! जणों काय वेदाचें सौंदर्यच ह्यांनीं हिरावून आणलें आहे असें वाटतें. १३२ पण महाराज! ह्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं. देशी-मऱ्हाठी-भाषेंत बोलूं लागलें ह्मणजे आकाशांतील रंगाप्रमाणें साहित्यरंगाचीही विशेष वृद्धि व्हावयाचीच. १३३ ज्ञानरूप चांदणें कसें स्वच्छ पडलें आहे; श्रद्धारूप शीतळाई चहूंकडे पसरून राहिली आहे; ह्मणून श्लोकरूप चंद्रविकासी कमळें आपोआपच प्रफुल्लित झालीं. १३४ हें ऐकण्याची इच्छा, हीच मनुष्याला निरिच्छ करून सोडते, असा ह्या मनोरथामध्यें गुण उद्भवतो. त्यामुळेंच श्रोत्यांचीं हृदयें प्रकाशित होऊन तल्लीन झालीं आहेत.

१३५ हें **निवृत्तिदासांनीं** जाणून हिकडे अवधान असावें, असें ह्मणाले. **पांडवांच्या** कुळामध्यें **श्रीकृष्ण** दिवस उगवला, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे? १३६ **देवकीनें** नऊ महिने उदरांत वागविला; **यशवदेनें** कष्ट सोसून ज्याचा प्रतिपाळ केला; आणि सरतेशेवटीं उपयोगास आला **पांडवांच्या**! १३७ ह्मणून वर्षानुवर्षं सेवा करावी; किंवा विनंती करण्याला संधि पहावी; इत्यादि गोष्टींचा त्या भाग्यशाली **अर्जुनाला** कांहीं त्रास पडला नाहीं. १३८ तें राहूंदे. लवकर कथा सांगावी. मग **अर्जुन** लडिवाळपणानें ह्मणाला "देवा! हीं साधूंचीं लक्षणें माझ्या आंगीं वसत नाहींत. १३९ आणखी, त्या लक्षणांबरोबरच तुलना करूं गेलें तर, मी खचित अगदीं कमी पडेन. पण तुमच्या उपदेशानें मी पूर्णतेस चढेन, हें मात्र लक्ष्यांत असूंद्या. १४० महाराज! आपण जर मनावर घ्याल, तर मी ब्रह्म सुद्धां होईन. जें आपण सांगाल तें आचरण करण्याला काय हरकत आहे? १४१ अहो! ज्याचीं नुसतीं लक्षणें ऐकल्यानेंच जर अंतःकरणांत इतका आल्हाद उत्पन्न होतो आहे, तर देवा! तद्रूप झाल्यावर किती बरें आनंद होईल? १४२ तसा मी स्वतः होईन का हो? भगवन्! आपलेपणानें येवढें कराल का हो?" तेव्हां **श्रीकृष्ण** हांसले आणि ह्मणाले "अरे हो. न करायाला काय झालें? खुशाल करूं." १४३ हें पहा! संतोष प्राप्त झाला नाहीं, तोंपर्यंतच सुखाविषयीं संकट असतें; तो प्राप्त झाल्यावर अपुर्तेपणा राहणार कोठें? १४४ त्याप्रमाणें सर्वेश्वराचा निस्सीम सेवक असेल तो सहज ब्रह्मरूप होईल हें खरें. पण येथें तो (परमेश्वर) दैवाच्या भारानें वांकून जाऊन आपोआप कसा फलद्रूप झाला तें पहा! १४५ हजारों जन्म खर्चीं घातले तरी, इंद्रादिकांना सुद्धां ज्याचें दर्शन दुर्लभ, तो **अर्जुनाच्या** इतका आधीन झाला आहे कीं, सांगतां सुद्धां येत नाहीं. १४६ ऐका. नंतर देवांनीं, **अर्जुनानें** मला ब्रह्मस्वरूप करावें असें ह्मटलें तें सर्व ऐकून घेतलें. १४७ आणि मनामध्यें असा एक विचार आणला कीं, ह्याला ब्रह्मस्वरूप होण्याचे डोहळे लागले आहेत, ह्यावरून बुद्धीच्या पोटांत वैराग्याचा गर्भ राहिला आहे हें खचित. १४८ पण ह्याचे दिवस अपुरे आहेत. तरी, वैराग्यवसंताच्या भरानें, मी ब्रह्मरूप ह्या भावनेचा मोहोर अगदीं गजबरून गेला आहे. १४९ तेव्हां ह्याला पाहिजे तें फळ येण्याला आतां उशीर लागावयाचा नाहीं. हा आतां चांगला विरक्त झाला अशी **श्रीकृष्णाची** खात्री झाली. १५० आतां हा जें जें कांहीं आचरण करील, त्याचें फळ त्याला तत्काल मिळेल. ह्याकरितां ह्याला आतां योगाचा अभ्यास सांगितला तर तो व्यर्थ जाणार नाहीं. १५१ असा विचार करून **श्रीहरी** त्या वेळीं ह्मणाले "**अर्जुना**! हा राजमार्ग श्रवण कर. १५२ ह्या योगवृक्षाच्या मुळाशीं गेलें, कीं तेथूनच कोट्यावधि मोक्षफळें दिसूं लागतात. **शंकर** हे त्या मार्गांतील अद्याप प्रवाशीच आहेत. १५३ किती एक योग्यांचे समुदाय आडवाटेनें भटकत चालले होते; परंतु अनुभवाच्या पावलांनीं मग तो रस्ता मळला, १५४ तेव्हां त्यांनीं दुसरे सर्व अज्ञानाचे आडमार्ग सोडून देऊन एका आत्मबोधाच्याच सरळ रस्त्यानें धांव घेतली. १५५ पूर्वींचे महर्षी ह्याच मार्गानें येऊन साधकांचे सिद्ध झाले. तत्त्वज्ञानीही ह्याच मार्गानें योग्यतेस चढले. १५६ हा मार्ग दृष्टीस पडला ह्मणजे तहान किंवा भूक ह्यांचें स्मरण सुद्धां होत नाहीं. ह्या मार्गामध्यें रात्र आहे किंवा दिवस आहे ह्याचें भानही रहात नाहीं. १५७ चालतांना जेथें जेथें ह्मणून पाऊल पडतें, तेथें तेथें मोक्षाचीच खाण उघडते. अथवा मध्यें कांहीं विक्षेप आला, तरी सुद्धां स्वर्गसुख मिळतें. १५८ हें पहा **अर्जुना**! सूर्य पूर्वेकडच्या मार्गानें निघून आपल्या पश्चिमेकडील घरास येतो, त्याप्रमाणें ह्या योगमार्गानें निश्चळपणानें चालून मोक्ष-

**पदास जावें लागतें. १५९ ह्या मार्गानें ज्या ज्या ठिकाणीं जावें, तो तो गांव आपणच व्हावें लागतें. पण हें कशाला सांगावें? तुला आपोआपच अनुभवानें कळेल." १६० तेव्हां अर्जुन ह्मणाला "देवा! मग हें केव्हां करणार हो? महाराज! मी तर तृष्णासमुद्रांत गटकळ्या खातों आहें, मग आपण मला कां वरें वर काढीत नाहीं?" १६१ तेव्हां कृष्ण ह्मणाले "हें इतकें उतावळेपणाचें बोलणें कशाला? आह्मी आपण होऊनच तुला सांगणार होतों, आणखी तूंही विचारलेंस. बरेंच झालें." १६२**

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥

[ शुचौ देशे प्रतिष्ठाप्य ] तरी विशेषें आतां बोलिजेल । परि तें अनुभवें उपेगा जाईल । ह्मणोनि तैसें एक लागेल । स्थान पाहावें ॥ ६३ ॥ जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे । वैराग्यासि दुणीव चढे । देखिलिया जें ॥ ६४ ॥ जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सावावो । मना होय उत्सावो । धैर्याचा ॥ ६५ ॥ अभ्यासचि आपण यातें करी । हृदयातें अनुभव वरी । ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥ ६६ ॥ जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा । पाखांडियाही आस्था । समूळ होय ॥ ६७ ॥ स्वभावें वाटे येतां । जरि वरपडा जाहाला अवचितां । तरि सकामही परि माघौता । निघों विसरे ॥ ६८ ॥ ऐसेनि न राहत्यातें राहावी । भ्रमतयातें बैसवी । थापटूनि चेवंवी । विरक्तीतें ॥ ६९ ॥ हें राज्य वेर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे । ऐसें शृंगारियांहि उपजे । देखतं खेवो ॥ १७० ॥ जे येणें मानें बरवंट । आणि तैसेंचि अतिचोखट । जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥ ७१ ॥ आणिकही एक पहावें । जें साधकीं वसतें होआवें । आणि जनाचेनि पायरवें । रुळेचिना ॥ ७२ ॥ जेथ अमृताचेनिपाडें । मुळाही सकट गोडें । जोडती दाटें झाडें । सदा फळती ॥ ७३ ॥ पाउलां पाउला उदकें । वर्षाकाळावीण अतिचोखें । निर्झरें कां विशेषें । सुलभें जेथें ॥ ७४ ॥ हा ओतपही अळुमाळ । जाणिजे तरि शीतळ । पवन अति निश्चळ । मंद झुळके ॥ ७५ ॥ बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिघे श्वापद । शुक हन षट्पद । तेउतें नाहीं ॥ ७६ ॥ पाणिलगें हंसें । दोनी चारी सारसें । कवणे एके वेळे बैसे । कोकिळही होकां ॥ ७७ ॥ निरंतर नाहीं । तरि आलीं गेलीं कांहीं । होतु कां मयूरेंही । आह्मी ना न ह्मणों ॥ ७८ ॥ परि आवश्यक पांडवा । ऐसा ठाव जोडावा । तेथ निगूढ मठ होआवा । कीं शिवालय ॥ ७९ ॥ दोहींमाजि आवडे तें । जें मानलें होय चित्तें । बहुतकरूनि एकांतें । बैसिजे गा ॥ १८० ॥ [स्थिरमासनमात्मनः] ह्मणोनि तैसें तें जाणावें । मनराहतें पाहावें । राहेल तेथ रचावें । आसन ऐसें ॥ ८१ ॥ [चैलाजिनकुशोत्तरं] वरि चोखट मृगसेवडी । माजि धूतवस्त्राची घडी । तळवटीं अमोडी । कुशांकुर ॥ ८२ ॥ सकोमळ सरिसे । सुबद्ध राहती आपैसे । एकपाडें तैसे । वोजा घालीं ॥ ८३ ॥ [नात्युच्छ्रितं नातिनीचं] परि सौवियाची उंच होइल । तरि आंग हन डोलेल । नीच तरी पावेल । भूमिदोष ॥ ८४ ॥ ह्मणोनि तैसें न करावें । समभाव धरावें । हें बहु असो होआवें । आसन ऐसें ॥ ८५ ॥

**"तर आतां अधिक विस्तारानें सांगूं. पण त्याप्रमाणें आचरण केलें, तरच त्याचा उपयोग. प्रथमतः योगाभ्यास करण्यासाठीं योग्य असें एक स्थान पाहिलें पाहिजे. १६३ त्यांत समाधानवृत्ति व्हावी अशा इच्छेनें बसलें असतां उठावेंसेंच वाटूं नये. आणि तें स्थान पाहिलें असतां मनास दुप्पट वैराग्य चढावें. १६४ तसेंच तें स्थान साधूंनीं वसविलेलें असावें; तेथें संतोषवृत्तीला सहाय्य व्हावें; आणि धैर्याचा उत्कर्ष व्हावा. १६५ त्या ठिकाणीं योगाभ्यास करण्याची आपोआपच इच्छा उत्पन्न व्हावी; हृदयाला अनुभव घडावा; आणि सदासर्वकाल तेथें अत्यंत रमणीयता असावी. १६६ अर्जुना! ज्या जाग्यामध्यें गेलें असतां, पाखांड्याला सुद्धां तपश्चर्या करण्याची दृढतर आस्था उत्पन्न व्हावी. १६७ एखादा सकाम**

---

१ समाधानाच्या. २ सहाय. ३ आंत. ४ प्राप्त. ५ परतून. ६ फिरणाऱ्याला. ७ जागृत करते. ८ देखील. ९ चैनी. १० पहातांक्षणींच. ११ आवड. १२ थोरपणानें, सौंदर्यानें. १३ चांगलें. १४ सर्वोत्कृष्ट. १५ ब्रह्मस्वरूप. १६ वस्ती कराती. १७ वर्दळीनें. १८ मळूं नये. १९ लागून राहिलेली. २० फलद्रूप झालेलीं. २१ ठिकठिकाणीं. २२ निर्मळ. २३ झरे.

१ ऊन्ह. २ थोडें. ३ राघू, पोपट. ४ भ्रमर. ५ त्याचप्रमाणें. ६ पाण्याच्या सन्निध असणारीं. ७ चक्रवाकपक्षी. ८ असलीं तरी. ९ गुप्तस्थान. १० किंवा. ११ मृगचर्म, कृष्णाजिन. १२ साम्र. १३ कोंवळे दर्भ. १४ व्यवस्थित. १५ कदाचित. १६ गारठा, वाळवी इत्यादि. १७ असावें.

पुरुष, सहज वाटेनें जातां जातां, जरी अकस्मात् त्या ठिकाणीं प्राप्त झाला, तरी त्याला सुद्धां परत जाण्याचें विस्मरण व्हावें. १६८ अशा प्रकारचें न राहणाराला सुद्धां राहावयास लावणारें, फिरणारास सुद्धां बसवून स्थीर करणारें, आणि पाठ थोपटून विरक्ती उत्पन्न करणारें, १६९ जें पाहतांक्षणींच सार्वभौम राज्य सुद्धां सोडून देऊन येथेंच निवांत राहावें, असें विलासी पुरुषाला देखील वाटविणारें, १७० अशा प्रकारें जें सुंदर आणि अत्यंत पवित्र स्थान; जें पाहिलें असतां ब्रह्मस्वरूपच प्रगट व्हावें. १७१ त्यांत आणखी ही एक सोय असावी. ती अशी कीं, योगाभ्यास करणारांचीच तेथें वस्ती असावी. इतर लोकांच्या जाण्यायेण्याची वर्दळ असूं नये. १७२ त्यामध्यें अमृताप्रमाणें मुळासकट गोड असे सदासर्वकाल फलद्रूप होणारे वृक्ष असावेत. १७३ पावलापावलावर जल असून पर्जन्यकाळ नसला तरी सुद्धां निवळशंख पाण्याचे झरे वहात असावेत. १७४ ऊन्ह थोडें असून त्यांत गारवा असावा; मंद झुळु झुळु वारा वाहत असावा. १७५ फारकरून कोणाचा शब्द ऐकूं येऊं नये. श्वापदांची गर्दी असूं नये. राघू, भ्रमर हे सुद्धां असूं नयेत. १७६ पाण्याजवळ राहणारे हंस, किंवा चार दोन चक्रवाक पक्षी, किंवा वेळेनुसार कोकिल पक्षी येऊन वसला तरी चालेल. १७७ नेहमीं नव्हेत; पण एखाद्या वेळीं कांहीं मोर आले गेले तरी त्यानाही आमची ना नाहीं. १७८ पण अर्जुना! अशा प्रकारची जागा मात्र अवश्य पाहिली पाहिजे. तेथें एकांत मठ असावा, किंवा शिवालय असावें. १७९ दोहोंपैकीं जें मनाला आवडेल तें असलें तरी चिंता नाहीं. अशा ठिकाणीं बहुतकरून एकांतांत बसावें. १८० अशा प्रकारच्या सोयी त्यांत आहेत किंवा नाहींत ह्याची परीक्षा करावी; मन रमतें किंवा नाहीं तें पहावें; आणि जेथें बरें वाटेल तेथें आपलें आसन घालावें. १८१ वर सुंदर कृष्णाजिन–ह्मणजे मृगचर्म. मध्यें धूतवस्त्राची घडी; आणि खालीं शेंडे असलेले दर्भ. १८२ हे दर्भ कोंवळे लुसलुशीत असून सारखे बांधलेले राहावेत. त्यांची विसकटाविसकट न होईल अशा रीतीनें पसरावेत. १८३ पण तें आसन कदाचित् उंच झालें तर आंग हालेल; तसेंच नीच झालें तर–ओल–वाळवी इत्यादि–भूमिदोषांची पीडा होईल. १८४ ह्याकरितां तसें न होऊं देतां, बेतानें घालावें. आतां अधिक सांगत नाहीं. अशा प्रकारचें आसन असावें हें ध्यानांत ठेव ह्मणजे झालें." १८५

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ।
उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥

[तत्रैकाग्रं मनः कृत्वा] मग तेथ आपण । एकाग्र अंतःकरण । करूनि सद्गुरुस्मरण । [1]अनुभविजे ॥ ८६ ॥ [आत्मविशुद्धये] जेथ [2]स्मरतेनि आदरें । सबाह्य सात्विकें भरे । जंव काठिण्य विरे । अहंभावाचें ॥ ८७ ॥ [यतचित्तेंद्रियक्रियः] विषयांचा विसर पडे । इंद्रियांची [3]कैसमस मोडे । मनाची घडी घडे । हृदयामाजी ॥ ८८ ॥ ऐसें ऐक्य हें सहजें । [युंज्यात्] [4]फावे तंव राहिजे । [उपविश्यासने] मग तेणेंचि [5]वोधें बैसिजे । आसनावरी ॥ ८९ ॥ [योगं] आतां आंगातें आंग वरी । पवनातें पवन धरी । ऐसी अनुभवाची [6]उंजरी । होंचि लागे ॥ १९० ॥ [7]प्रवृत्ति [8]माघौती मोहरे । [9]समाधि [10]ऐलांडी उतरे । आघवें अभ्यासूं सरे । [11]बैसत [12]खेवो ॥ ९१ ॥ [13]मुद्रेची प्रौढी ऐशी । तेचि सांगिजेल आतां परियेसि । तरि [14]ऊरु या [15]जंघनासी । जडोनि घालीं ॥ ९२ ॥ चरणतळें [16]देव्हडीं । [17]आंधारद्रुमाच्या बुडीं । [18]सुघटितें [19]गांढीं । [20]संचरीं

---

१ अभ्यासास लागावें. २ स्मरणाच्या योगानें. ३ कासाविशी, तळमळ. ४ घडेपर्यंत. ५ स्थितीनें. ६ उत्कर्ष. ७ संसार. ८ परत. ९ ध्यान, एकाग्रता. १० आलीकडे. ११ बसल्याबरोबर. १२ निश्चयानें. १३ 'अभ्यासाचे वेळीं वाहूपासून वरच्या आंगाची जी ठेवण होते, तिचें नांव मुद्रा. घेरंड संहितेंत २५ व हटप्रदीपिकेंत १० मुद्रा वर्णिल्या आहेत.'

'अभ्यासाचे वेळेस मांड्यांपासून खालच्या आंगाची जी स्थिति होते, तीस 'आसन' असें ह्मणतात. आसनें ८४००० असून त्यांत ८४ प्रमुख अशीं मानलेलीं आहेत.'

१४ मांडी. १५ पोटरीबरोबर. १६ एका पायावर भार टेकून दुसरा वर वांकडा ठेवणें. १७ गुदस्थानाच्या. १८ सुस्थीर. १९ घट्ट. २० शिरकवावा.

ां ॥ ९३ ॥ सव्य तो तळीं ठेविजे । सिवणीमध्य पीडिजे । ारि वैसे तो सहजें । वामचरण ॥ ९४ ॥ गुद मेंढाआंतौतीं। ारी अंगुळें निगुतीं । तेथ सार्ध सार्ध प्रांतीं । सांडूनियां । ९५ ॥ माजि अंगुळ एक निगे । तेथ टांचेचेनि उत्तरभागें। ाहेटिजे वरि आंगें । पेललेनी ॥ ९६ ॥ उचलिलें कां ने- ागजे । तैसें पृष्ठांत उचलिजे । गुल्फद्वय धरिजे । तेणेंचि ानें ॥ ९७ ॥ मग शरीर संचु पार्था । अशेषही सर्वथा । ार्ष्णीचा माथा । स्वयंभ होय ॥ ९८ ॥ अर्जुना हें जाण । ूळबंधाचें लक्षण । वज्रासन गौण । नाम यासी ॥ ९९ ॥ ासी आधारीं मुद्रा पडे । आणि अधींचा मार्ग मोडे । तेथ ापान आंतुलेकडे । वोहोटों लागे ॥ २०० ॥

"मग तेथें आपण एकाग्र अंतःकरण करून ाद्गुरूचें स्मरण करून योगाभ्यासास लागावें. १८६ त्या भक्तियुक्त स्मरणाच्या योगानें अंत- ाह्य सात्विकता भरेपर्यंत, अहंभावाचें काठिण्य ोडेपर्यंत, १८७ विषयांचें विस्मरण पडून, ाद्रियांची कासाविशी मोडून हृदयामध्यें ानाची घडी बसेल, १८८ अशा प्रकारचें ापोआप ऐक्य प्राप्त होईपर्यंत थांबावें. आणि ाच स्थितीमध्यें आसनावर बसावें. १८९ ाणजे त्या वेळीं आंगांस आंगें, व वायूस वायू ावरून धरतात, हें स्पष्ट अनुभवास येतें. १९० प्रवृत्ति माघारी फिरते; समाधि जवळ ते; आणि बसतांक्षणींच सर्व गोष्टींचा अभ्यास ाडतो. १९१ आतां मुद्रेचा आकार कसा अ- ावा तें सांगतों ऐक. पायांच्या मांड्या पो- ाऱ्यांबरोबर घेऊन, १९२ दोन्ही पावलें उ- ाणीं करून तीं आधारचक्रा (गुदस्थान) ाालीं नीट घट्ट बसवावींत. १९३ उजवा पाय खालीं ठेवून त्यानें शिवणीचा मध्य दाबून धरावा. ह्मणजे डावा पाय सहज वर बसतो. १९४ गुदस्थान आणि वृषण ह्यांच्यामध्यें बरोबर चार अंगुळें जागा असते, त्यापैकीं दीड अंगुळ खालीं, व दीड अंगुळ वर सोडावी. १९५ ह्म- णजे मध्यें एक अंगुळ जागा राहते, तेथें टां- चेची मागची बाजू, वरचें सर्व आंग तोलून धरील अशा बेतानें रेटून बसवावी. १९६ किंचित् उचलला न उचलला अशा रीतीनें पाठीचा खालचा भाग, उचलून धरावा. व तशाच रीतीनें घोटेही थोडे उंच करावेत. १९७ असें केलें ह्मणजे **अर्जुना!** हा शरी- राचा झाडून सारा भाग टांचेचें स्वयंभु शि- खरच बनून रहातो. १९८ **अर्जुना!** मूळ- बंधाचें लक्षण हें अशा प्रकारचें आहे हें ध्यानांत ठेव. ह्यालाच **वज्रासन** असेंही कोठें कोठें नांव आहे. १९९ ह्याप्रमाणें आधारचक्रावर आसन पडलें ह्मणजे वायूची अधोगति ना- हींशी होऊन अपानवायु आंतल्या बाजूस आकर्षण होऊं लागतो." २००

१ उजवा. २ वृषणापासून गुदापर्यंत असणाऱ्या शि- ाणीचा मध्य. ३ दाबून धरावा. ४ गुदस्थान व शिश्न ांच्या मध्यें. ५ बरोबर. ६ दीड दीड अंगुळ. ७ मध्यंतरीं. ८ बोट. ९ शिल्लक रहातें. १० टांचेच्या. ११ पुढच्या भागानें. १२ रेटून द्यावें. १३ तोलून धरून. १४ ाटीच्या कण्याचा शेवटचा भाग. १५ दोन घोटे. १६ संच. १७ खोटेचा. १८ मूळचाच असल्याप्रमाणें. १९ ह्यांत वायु ाबला जातो ह्मणून त्यास 'मूळबंध' असें नांव आहे. २० दुसरें, उपनाम. २१ आधारचक्रावर. २२ खालचा. २३ गुदद्वारांतून वाहणारा वायु. २४ आंतल्या बाजूस.



समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥

[समं कायशिरो] तंव करसंपुट आपैसें । वाम चरणीं बैसे । बाहुमूळीं दिसे । थोरींव आली ॥ १ ॥ माजि उभा- रिलेनि दंडें । शिरकमळ होय गाढें । नेत्रद्वारींचीं कवाडें । लागूं पाहती ॥ २ ॥ [संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं] वरचिलें पातीं न ढळती । तळींचीं तळीं पुंजाळती । तेथ अर्धोन्मीलित स्थिती । उपजे तया ॥ ३ ॥ दिठी राहोनि आंतुलेकडे । बा- हेर पाउल घाली कौडें । ते ठायीं ठावो पडे । नासाग्रपीठीं ॥ ४ ॥ ऐसें आंतच्या आंतचि रचे । बाहेरि मागुतें न वचे । ह्मणोनि राहणें अधिये दिठीचें । तेथेंचि होय ॥ ५ ॥ [दि- शश्चानवलोकयन्] आतां दिशांची भेटी घ्यावी । कां रूपाची वाट पहावी । हे चोड सरे आघवी । आपसया ॥ ६ ॥

१ आपोआप. २ उंचपणा, फुगवटी. ३ दंड उंच उचलल्यानें. ४ गाढल्यासारखें. ५ वरचीं. ६ पसरतात. ७ अर्धी उघडी व अर्धी मिटलेली. ८ दृष्टि. ९ अंतर्मुख. १० कौतुकानें. ११ नाकाच्या शेंड्यावर. १२ अर्ध्या दृष्टीचें. १३ इच्छा.

[ग्रीवं धारयन्नचलं स्थिर:] मग कंठनाळ आटे । हनुवटी हें- डौती दाटे । ते गाढी होऊनि नेहेटे । वक्षस्थळीं ॥ ७ ॥ माजि घंटिका लोपे । वरि बंधें जो आरोपे । तो जाळंधर म्हणिपे । पंडुकुमरा ॥ ८ ॥ नाभी वरी पोखे । उदर हें थोके । अंतरीं फांके । हृदयकोश ॥ ९ ॥ स्वाधिष्ठानावरिचिले कांटीं । नाभिस्थानतळवटीं । बंध पडे किरीटी । वोढियाणा तो ॥ २१० ॥ ऐसी शरीरावाहेरलीकडे । अभ्यासाची पाखर पडे ॥

**“ त्या वेळीं दोन्ही हातांचे तळवे आपोआपच डाव्या पायावर जाऊन बसतात, आणि खांदे उंच दिसूं लागतात. २०१ त्या उचललेल्या बाहुट्यामध्यें शिरकमळ गच्च बसतें, आणि नेत्रद्वारांचीं कवाडें बंद होण्याच्या बेतांत येतात, २०२ वरचीं पातीं हालत नाहींत; आणि खालचीं पातीं विस्तृत होतात. त्यामुळें त्यांना अर्धें नेत्र उघडे व अर्धें झांकलेले, अशी अर्धोन्मीलित स्थिति प्राप्त होते. २०३ दृष्टि अंतर्गत राहून कौतुकानें बाहेर पाऊल टाकते. म्हणून ती नाकाच्या शेंड्यावर स्थीर होते. २०४ ह्याप्रमाणें आंतल्याआंतच ती लागून राहते, बाहेर जात नाहीं, म्हणून त्या अर्धदृष्टीचें वास्तव्य त्या ठिकाणीं होतें. २०५ मग चारही दिशांकडे पहावें, किंवा अमुक एक पदार्थ दृष्टीस पडावा, ही इच्छा आपोआपच नाहींशी होते. २०६ नंतर उंच असलेली गळ्याची नळी बसते, आणि हनुवटी गळ्याच्या खळग्यांत गच्च बसून वक्षस्थळास चिकटून राहते, २०७ आणि तिच्या आंत कंठमणी जिरून जाऊन अर्जुना! जो आकार उत्पन्न होतो त्याला ‘जालंधर’ असें म्हणतात. २०८ नाभी वर येते; पोट सपाट होतें; आणि हृदयकोश आंतून विस्तृत होतो. २०९ लिंगाच्या वर आणि नाभिस्थानाच्या खालीं जो आकार उत्पन्न होतो त्यास ‘वोढियाणा’ असें म्हणतात. २१० ह्याप्रमाणें शरीराच्या बाहेर योगमुद्रेचा आकार दिसूं लागला,”**

प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

[प्रशांतात्मा] तंव आंत न्याय मोडे । मनोधर्मांची ॥ ११ ॥ कल्पना निमे । प्रवृत्ती शमे । आंग मन विरमे । सांवियाची ॥ १२ ॥ क्षुधा काय जाहाली । निद्रा केउती गेली । हे आठवणही हारपली । न दिसे वेगां ॥ १३ ॥ जो मूळबंधें कोंडला । अपान माघौता मुरडला । तो सवेंचि वरी सांकडला । धरी फुंगू ॥ १४ ॥ क्षोभलेपणें माजे । उवाइलाठायीं गाजे । मणिपूरेंसीं झुंजे । राहोनियां ॥ १५ ॥ [विगतभी:] मग थांवलिये वाहटुळी । सैंघ घेऊनि घर डहुळी । बाळपणींची कुह्ही दुळी । बाहेर घाली ॥ १६ ॥ भीतरीं वेंळी न धरे । कोठ्यामाजी संचरे । कफपित्ताचे थांरे । उरों नेदी ॥ १७ ॥ धातूचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फोडी । आंतली मज्जा काढी । अस्थिगत ॥ १८ ॥ नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी । साधकातें भेडसावी । परि बिहावें ना ॥ १९ ॥ व्याधीतें दावी । सवेंचि हारवी । आप पृथ्वी कालवी । एकवाट ॥ २२० ॥ [श्रीभगवता संक्षेपेणोक्तं योगं विशेषेण व्याचष्टे– ब्रह्मचारिव्रते स्थित:] तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा । शक्ति करि अंजगरा । कुंडलिनीतें ॥ २१ ॥ नागिणीचें पिलें । कुंकुमें नाहलें । वेंळण घेऊनि आलें । सेजे जैसें । ॥ २२ ॥ तैसी ते कुंडलिनी । मोटकी औटे वळणी । अधोमुख सार्पिणी । निदेली असे ॥ २३ ॥ विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वाळांची घडी । पंधरेयाची चोखडी । घोंटींव जैशी ॥ २४ ॥ तैसी सुबंध आटली । पुंटीं होती दाटली । ते व-

१ गळा. २ गळ्याखालच्या खळगीला. ३ दाबते. ४ कंठमणी. ५ मुद्रा. ६ दिसतो. ७ एका मुद्रेचें नांव. ८ उचलते. ९ सपाट होतें. १० हृदयकमल. ११ हें द्वितीय चक्र लिंगमूलांत असून रक्तवर्णयुक्त व सहा दलांचें आहे. १२ सुषुम्रा मार्गानें नाभीचे वरचे भागानें उजवीकडे वर वायु जातो तो बंध. १३ योगमुद्रेचें स्वरूप.

१ ठिकाण. २ संसार. ३ नाहींसा होतो. ४ सहज. ५ आधारबंधामध्यें बद्ध झाला. ६ संकोचित झाला. ७ फुगवटा. ८ प्रशस्तस्थळीं. ९ नाभिस्थलांतील तृतीय चक्र हेमवर्ण दशदलात्मक आहे. १० स्थिरावलेली. ११ वावटळीनें. १२ सर्व. १३ बाल्यदशेंतील पूर्वीची. १४ कुचकी घाण, रोग. १५ वेढा. १६ शिरते. १७ स्थळें. १८ पालथे करिते. १९ हाडांतील. २० वायुमार्गास. २१ अवयवांना. २२ योगाभ्यास करणाराला. २३ भिऊं नये. २४ हिकडे. २५ उष्णता. २६ जागे. २७ नाभिकमलाजवळ एक सतेज प्राणवल्ली आहे, तिला. २८ वेटाळें. २९ निद्रेला. ३० नाभिकमळाभोंवतीं असलेली वल्लिकारूप शक्ति. ३१ लहान, वेटोळें घातलेली. ३२ साडे तीन. ३३ वेढ्यांची. ३४ निद्रिस्त. ३५ कडें. ३६ पंधराच्या दराच्या (उत्तम) सोन्याची. ३७ झिल्हई दिलेली. ३८ उत्तम बंधांनीं. ३९ आंवळलेली. ४० दोन पट्यांमध्यें.

ासनें चिमुटली । सावध होय ॥ २५ ॥ तेथ नक्षत्र जैसें लंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें । तेजाचें बीज विरूढलें कुरेंशीं ॥ २६ ॥ तैसी वेढियातें सोडिती । कवतिकें आंग ाडिती । कंदावरी शक्ती । उठिली दिसे ॥ २७ ॥ सहजें हुतां दिवसांची भूक । वरि चेवविली तें होय मिष । मग ावेशें पसरी मुख । ऊर्ध्व उजू ॥ २८ ॥ तेथ हृदयकोशा-ळवटीं । जो पवन भरे किरीटी । तया सगळेयाची मिठी । ऊनि घाली ॥ २९ ॥ मुखींच्या ज्वाळीं । तळीं वरी कवळी । ांसाची वडवाळी । आरोगूं लागे ॥ २३० ॥ जे जे ठाय मांस । तेथ अहाच जोडे घांउस । पाठी एकदोनी घांस । हृयींही भरी ॥ ३१ ॥ मग तळवे तळहात शोधी । ऊर्ध्वींचें ंड भेदी । झाडा घे संधी । प्रत्यंगांचा ॥ ३२ ॥ अधोभाग री न सांडी । परि नखींचेंही सत्व काढी । त्वचा धुवूनि ांडी । पांजरेंशीं ॥ ३३ ॥ अस्थीचे नळे निरपे । शिरांचे ीर वोरपे । तंव बाहेरी विरूढी करपे । रोमबीजांची ॥ ३४ ॥ मग सप्तधातूंच्या सागरीं । ताहानेली घोट भरी । ाणि सवेंचि उन्हाळा करी । खडखडीत ॥ ३५ ॥ नासापु-ांनि वारा । जो जातसे अंगुळें बारा । तो गचिये धरूनि ाधारा । आंत घाली ॥ ३६ ॥ तेथ अधवरौतें आकुंचे । र्ध्वेतळौतें खाचे । तया खेवांमाजि चक्राचे । पदर उरती ॥ ३७ ॥ येऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंड-ळेनी नावेक दुचित्तें होती । ते तयातें ह्मणे परौती । तुह्मीचि ाय एथें ॥ ३८ ॥ आइकें पार्थिवें धातु आघवी । आरो-ातां कांहीं नुरवी । आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ३९ ॥ ऐसीं दोनीं भूतें खाये । ते वेळीं संपूर्ण धाये । मग ाम्य होऊनि राहे । सुषुम्नेपाशीं ॥ २४० ॥ तेथ तृप्तीचेनि तोषें । गरळ जें वमी मुखें । तेणें तियेचेनि पीयूषें । प्राण जिये ॥ ४१ ॥ तो अग्नि आंतूनि निघे । परि सबाह्य निव-वूंचि लागे । ते वेळीं कसु बांधिती आंगें । सांडिली पुढती ॥ ४२ ॥ मार्ग मोडती नाडीचे । नवविधपण वायूचें । जाय ह्मणऊनि शरीराचे । धर्म नाहीं ॥ ४३ ॥ इडा पिंगळा एक-वटती । गांठी तिन्ही सुटती । साही पदर फुटती । चक्रांचे हे ॥ ४४ ॥ मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अ-नुमानु । तो वातीवरी पवनु । गिवसितां न दिसे ॥ ४५ ॥ बुद्धीची फुलिका विरे । परिमळ घ्राणीं उरे । तोही शक्ती-सवें संचरे । मध्यमेमाजी ॥ ४६ ॥ तंव वरिलेकडोनि ढाळें । चंद्रामृताचें तळें । कानवडोनि मिळे । शक्तिमुखीं ॥ ४७ ॥ तेणें नाळकें रस भरे । तो सर्वांगामाजि संचरे । जेथिंचा तेथ मुरे । प्राणपवनें ॥ ४८ ॥ तातलिये मुसें । मेण नि-घोनि जाय जैसें । मग कोंदली राहे रसें । वोतलेनी ॥४९॥ तैसें पिंडाचेनि आकारें । ते कळाचि कां अवतरे । वरि त्व-चेचेनि पदरें । पांघुरली असे ॥ २५० ॥ जैसी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती । मग फिटलियां दीप्ती । धरून ये ॥ ५१ ॥ तैसा आहाचवरि कोरडा । त्वचेचा असे पोतोडा । तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ॥ ५२ ॥ मग कांश्मी-रीचें स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ । अवयवकांतीची भांब । तैसी दिसे ॥ ५३ ॥ नातरी संध्यारागींचे रंग । का-ढूनि वळिलें तें आंग । कीं अंतर्ज्योतिचें लिंग । निर्वा-ळिलें ॥ ५४ ॥ कुंकुमाचें भरींव । सिद्ध रसाचें वोतींव । मज पाहतां सावेव । शांतीचि ते ॥ ५५ तें आनंदचित्रींचें लेपें । नातरी महासुखाचें रूप । कीं संतोषतरूचें रोप । थांवलें जैसें ॥ ५६ ॥ तो कनकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पु-

१ दाबली गेल्यामुळें. २ पतन पावावें. ३ उगवलें. ४ ना-ीवर. ५ वेल. ६ जागृत केली, चिथवली. ७ हृदयाच्या ाकळीखालीं. ८ सर्वांला. ९ खालीं वर. १० घांस. ११ खाऊं ागते. १२ मांसल. १३ सहज. १४ घांस. १५ हृदयांतही. ६ प्रत्येक अवयवाचा. १७ भिडते. १८ अस्थिपंजराला. ९ साफ करते. २० जाळ्या. २१ धुऊन काडते. २२ वाड. ३ केसांच्या मुळांची. २४ रस, असृक्, मांस, मेद, अस्थि, ज्जा व शुक्र हे शरीरांतील सप्त धातु. त्यांच्या समुद्रांत. ५ नाकाच्या दोन्ही नाकपुड्यांतून. २६ गचांडी. २७ खा-ला भाग वर. २८ वरचा भाग खालीं. २९ मिठीमध्यें. ० पडदे. ३१ इडा व पिंगळा. ३२ क्षणभर. ३३ व्यग्र, ित. ३४ पलीकडे व्हा. ३५ पृथ्वीसंबंधी. ३६ खातांना. ७ उदकाला. ३८ तृप्त होते. ३९ इडा व पिंगळा या दोन ाांच्या मधील मुख्य नाडीच्या जवळ. ४० विष. ४१ अमृतानें.

१ वांचतो. २ विषरूप अग्नी. ३ सामर्थ्य. ४ पूर्वी. ५ शरीरांतील प्राणवायूचे वृत्तिभेदानें नऊ भेद मानलेले आहेत. ते असेः—अपान, समान, उदान, व्यान, नाग, कूर्म, कृकर, देवदत्त आणि धनंजय. ६ डाव्या नाकपुडींतील नाडी. ७ उजव्या नाकपुडींतील नाडी. ८ सहा. ९ नाभिकमलामध्यें चक्र असतें त्याचे. १० चंद्र. (नामक वायु.) ११. सूर्य. (नामक वायु.) १२ बारा अंगुळें वारा. १३ शोध केला तरी. १४ प्रसन्नता. १५ सुषुम्नेमध्यें. १६ हळूच. १७ 'चंद्र' या नांवाचें अमृत. १८ एका आंगानें. १९ कुंडलीमध्यें. २० त्या बाजूच्या नळीनें. २१ प्राणवायूच्या योगानें. २२ तापलेल्या. २३ मुशींतून. २४ कांति. २५ पडदा. २६ सूर्य. २७ आभाळ गेल्यावर. २८ उगाच. २९ पापोद्रा. ३० स्फटिकाचे. ३१ शोभा. ३२ सायंकाळच्या आकाशाचे. ३३ आंतल्या प्रकाशाचें. ३४ स्वच्छ केलें. ३५ मला. ३६ मूर्तिमंत. ३७ रंग. ३८ स्थीर झालें.

तळा । नाना सासिनला मळा । कोंवळिकेचा ॥ ५७ ॥ होकां जे शारदियेचेनि वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें । कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ॥ ५८ ॥ तैसें शरीर होये । जे वेळीं कुंडलिनी चंद्रं पिये । मग देहाकृति बिहे । कृतांतें गा ॥५९॥ वार्धक्य तरी बेहुडे । तारुण्याची गांठी विघडे । लोपली उघडे । बाळदशा ॥ २६० ॥ वयसा तरी येतुलेवरी । येऱ्हवीं बाळाचा बळार्थ करी । धैर्याची थोरी । निरुपमा ॥ ६१ ॥ कनकद्रुमाच्या पालवीं । रत्नकळिका नित्य नवी । नखें तैसीं बरवीं । नवीं निघती ॥ ६२ ॥ दांतही आन होती । परि अपाडें सानेजती । जैसीं दुवाहीं बैसे पांती । हिरेयांची ॥ ६३ ॥ माणिक्कुलियांचिया कणिया । सावियांचि अणुप्रमाणिया । तैसिया सर्वांगीं उंथवती आणिया । रोमांचिया ॥ ६४ ॥ करचरणतळें । जैसीं कां रातोत्पलें । पाखाळीव होती डोळे । काय सांगों ॥ ६५ ॥ निडाराचेनि कोंदाटें । मोतियें नावरती संपुटें । मग शिवणी जैसी उतटे । शुक्तिपल्लवांची ॥ ६६ ॥ तैसी पातियांचिये कवळिये नसमाये । दिठी जौकळोनि निघों पाहे । आधिलीचि परी होये । गगनांकळिती ॥ ६७ ॥ आइकें देह होय सोनियांचें । परि लाघव घे वायूचें । जे आप आणि पृथ्वीचे । अंश नाहीं ॥६८॥ मग समुद्रापैलिकडील देखे । स्वर्गींचा आलोच आइके । मनोगत वोळखे । मुंगियेचें ॥ ६९ ॥ पवनाचां वारिकां वळघे । चाले तरी उदकीं पाउल न लागे । येणें येणें प्रसंगें । येती बहुता सिद्धी ॥ २७० ॥ आइकें प्राणाचा हात धरूनी । गगनाची पाउठी करुनी । मध्यमेचेनि दोंदराहुनी । हृदया आली ॥ ७१ ॥ ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जया विश्वबीजांचिया कोंभा । साउली केली ॥ ७२ ॥ जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मयाशिवाची करंडी । जे प्रणवाची उघडी । जन्मभूमी ॥ ७३ ॥ हें असो ते कुंडलिनी बाळी । हृदया आंत आली । तंव अनाहताची बोली । चावळे ते ॥ ७४ ॥ शक्तीचिया आंगा लागलें । बुद्धीचें चैतन्य होतें जाहालें । तें तेणें आइकिलें । अलुमाळ ॥ ७५ ॥ घोषाचा कुंडीं । नादचित्रांचीं रुपडीं । प्रणवाचिया मोडी । रेखिलीं ऐसीं ॥ ७६ ॥ हेंचि कल्पावें तरी जाणिजे । परि कल्पितें कैंचें आणिजे । तरि नेणों काय गाजे । तियेठायीं ॥ ७७ ॥ विसरोनि गेलों अर्जुना । जंव नाश नाहीं पवनां । तंव वाचा आथी गगना । ह्मणऊनि घुमे ॥ ७८ तया अनाहताचेनि मेघें । आकाश दुमदुमों लागे । तंव ब्रह्मस्थानीचें बगें । सहज फिटे ॥ ७९ ॥ आइकें कमलगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें । जेथ चैतन्य आधांतुरें । होऊनि असिजे ॥ २८० ॥ तया हृदयाच्या पैरिवरीं । कुंडलिनिया परमेश्वरी । तेजाची शिदोरी । विनियोगिली ॥ ८१ ॥ बुद्धीचेनि शाकें । होंतबोनें निकें । द्वैत तेथ न देखे । तैसें केलें ॥ ८२ ॥ निजकांती हारविली । मग प्राणचि केवळ जाहाली । तेवेळीं कैसी गमली । ह्मणावी पां ॥ ८३ ॥ हो कां जे पवनाची पुतळी । पांघुरली होती सोनेसळी । ते फेडूनियां वेगळी । ठेविली तिया ॥ ८४ ॥ नातरी वायूचेनि आंगें झगटली । दीपाची दृष्टी निमटली । कां लखलखोनि हारपली । वीज गगनीं ॥ ८५ ॥ तैसी हृदयकमळवेऱ्हीं । दिसे जैसी सोनियाची सरी । नातरी प्रकाश जळाची झरी । वाहत आली ॥ ८६ ॥ मग ते हृदयभूमी पोकळे । जिराली कां एके वेळे । तैसें शक्तीचें रूप मावळे । शक्तीचि माजी ॥ ८७ ॥ तेव्हां तरी शक्तीचि ह्मणिजे । येऱ्हवीं तो प्राण केवळ जाणिजे । आतां नादबिंदु नेणिजे । कळाज्योती ॥ ८८ ॥ मनाचा हन मार । कां पवनाचा आधार । ध्यानाचा आदर । नाहीं परी ॥ ८९ ॥ हे कल्पना घे सांडी । ते नाहीं इये परवडी । हे महाभूतांची फुंडी । आटणी देखा ॥ २९० ॥ पिंडें पिंडाचा ग्रास । तो

१ भरास आला. २ मृदुलतेचा. ३ शरदृतूच्या. ४ विकसित झालें. ५ नाभिचक्राजवळील वह्नी. ६ अमृत. ७ पिते. ८ भितो. ९ काळसुद्धां. १० मागें हटतें. ११ बाल्यावस्था. १२ वयानें. १३ इतका. १४ बळ असा अर्थ. १५ वेगळे. १६ अप्रतिम. १७ लहान होतात. १८ दुतर्फा. १९ पंक्ति. २० माणक्यांच्या. २१ सहज. २२ उद्भवतात. २३ अग्रें. २४ स्वच्छ. २५ पक्वदशेस आल्यामुळें. २६ मोत्यें. २७ सांधा. २८ शिंप्यांची. २९ व्यापून. ३० स्वाधीन. ३१ गगनाला आकलन करणारी. ३२ लघुत्व. ३३ नाद. ३४ वायूच्या घोड्यावर. ३५ चढतो. ३६ पायरी. ३७ जिन्यावरून. ३८ जीवात्म्याची. ३९ जगद्बीज, ओंकार. ४० निराकाराची. ४१ मूर्ति. ४२ ओंकाराची.

१ कुंडलिनीरूप कुमारिका. २ 'अनाहत' नांवाच्या हृदयस्थ चक्राचीं. ३ शब्द. ४ बोलते. ५ किंचित्. ६ नादाच्या. योगधारणेनें, दहा नादांचा ध्वनि ऐकूं येतो. घोषाकार परा नांवाची पहिली वाचा आधारचक्रांत आहे. ७ मध्यमेचीं. ८ ओंकाराच्या. ९ आकारानें. १० कल्पना करणारें. ११ गर्जना करतें, वाजतें. १२ वायूला. १३ आहे. १४ घुमतें. १५ खिडकी, खीळ. १६ अतृप्त, अधांतरीं. १७ गुप्तस्थानीं, घरीं. १८ न्याहारी, फराळ. १९ नेमली. २० एका अंशानें, भाजीपाला. २१ नैवेद्य. 'बोनें' हा शब्द मंगळागौरीच्या पुरणाच्या किंवा कणकीच्या वगैरे नैवेद्याकडे अद्यापही लावतात. २२ पीतांबर. २३ लागली, धक्का दिला. २४ हृदयकमळापर्यंत. २५ वेल, तार. २६ पोकळीमध्यें. २७ मध्यमावाचा, सिद्धांत. २८ प्राप्तीपर्यंत. २९ स्पष्ट. ३० निर्मळदशा. शुद्धि किंवा संहार.

ह्रा नाथसंकेतींचा[1] दंश । परि दाऊनि गेला उद्देश । श्रीमहाविष्णु ॥ ९१ ॥ तया ध्वनितार्चे[3] केणें[4] सोडुनी । यथार्थाची घडी झाडुनी । उँपलविली म्यां जाणुनी । ग्राहीक[6] श्रोते ९२

"ह्मणजे आंतील मनोधर्माचें ठिकाण मोडून जातें. २११ कल्पना नाहींशी होते; प्रवृत्ति बंद पडते; आणि मन आपोआपच शांत होतें. २१२ क्षुधा काय झाली? निद्रा कोठें गेली? ह्याची आठवण सुद्धां नाहींशी होऊन त्यांचा वेगही दिसेनासा होतो. २१३ अपानवायु मूळबंधांत कोंडल्याकारणानें तो मागें मुरडतो, आणि वर सांठून त्यास फुगवटी येते. २१४ त्याचा क्षोभ झाल्यामुळें तो वाढतो, विस्तृत सांपडलेल्या जाग्यांत गुरगुरूं लागतो, आणि नाभिस्थानाबरोबर राहून राहून युद्ध करूं लागतो. २१५ आणि मग कोंडून राहिलेले सर्व वायू एकत्र होऊन सारें घर (देह) ढवळून सोडतात. लहानपणची असलेली सर्व घाण (रोग) बाहेर घालतात. २१६ नंतर तो मध्यंतरीं जोर वगैरे कांहीं न करतां कोठ्यांत शिरून कफपित्तांचीं ठिकाणें नाहींशीं करून टाकतो. २१७ धातूंचे समुद्र पालथे करतो; मेदाचे पर्वत फोडतो; हाडांच्या आंत असलेला मगज सुद्धां बाहेर काढतो. २१८ नाड्या मोकळ्या करतो; अवयवांचा बिघड करतो; योगाभ्यास करणाऱ्याला भेवडावतो. परंतु त्यास भितां कामा नये. २१९ व्याधी उत्पन्न करतो, व तत्काल नाहींशाही करतो; पृथ्वीचे अंश आणि आपाचे अंश एकत्र कालवून सोडतो. २२० इतक्यांत **अर्जुना!** दुसरीकडे आसनाची उष्णता जोर करून *कुंडलनीला जागृत करून सोडते. २२१ कुंकुमानें मंडित केलेलीं नागिणीचीं पिलें, वेटाळीं घालून जशीं निजावींत, २२२ त्याप्रमाणें कुंडलिनी ही लहान, साडेतीन वेढ्यांची असून सर्पिणीसारखी खालीं तोंड घालून निजलेली असते. २२३ विद्युल्लतेचें कंकण; अग्नीज्वालांची घडी; किंवा पंधराच्या दराच्या उत्तम सोन्याची जिल्हई दिलेली लगड जशी दिसण्यांत दिसावी, २२४ तशी ती उत्तम बंधांनीं बांधलेली, नाभीच्या खळग्यामध्यें दाटून बसलेली असते, ती आसनाच्या धक्यानें हालूं लागते. २२५ तेव्हां तेथें ज्याप्रमाणें एखादें नक्षत्र पतन पावावें, किंवा सूर्यबिंब डळमळावें, तेजोबीजास अंकुर फुटून त्याचा विस्तार व्हावा, २२६ त्याप्रमाणें ती आपले वेढे सोडूं लागते; कौतुकानें आंगास आळेपिळे देते; आणि नाभिकमलावर वेल उमटल्याप्रमाणें दिसूं लागते. २२७ आधींच बहुत दिवसांची क्षुधा; आणि त्यांत जागृत केल्याचें निमित्त झाल्यामुळें ती मग आपलें तोंड सरळ वर पसरते. २२८ आणि **अर्जुना!** हृदयकमळाखालीं जो वायु भरून राहिलेला असतो, त्या सर्वाला धरून एकदम तोंडांत घालते. २२९ मुखाच्या ज्वाळा खालवर पसरून मांसाचे घांस खाऊं लागते. २३० जेवढे जेवढे मांसल भाग ह्मणून असतील तेवढ्यांना तर ती सहज डांस मारतेच, पण हृदयाचेही एकदोन लचके तोडते. २३१ मग हातांचे व पायांचे तळवे धुंडूं लागते; ऊर्ध्वभागाचा

१ शिवरहस्याचा. २ गूढाभिप्राय. ३ उद्देशाचें. ४ विकला असतां पैसा होण्याजोगा माल, बासन. ५ विस्तारिली, उलगडली. ६ गिऱ्हाईक, ग्रहण करणारे.

* सशैलवनधात्रीणां यथाधारोऽहिनायकः ।
सर्वेषां योगतंत्राणां तथाधारो हि कुंडली ॥ १ ॥

"सर्पांचा नायक जो शेष, तो जसा संपूर्ण पर्वत व बनांनीं युक्त अशा भूभागांचा आधार आहे, त्याप्रमाणें सर्व योगोपायांचा आधार ही कुंडली आहे."

गुप्ता गुरुप्रसादेन यदा जागर्ति कुंडली ।
तदा सर्वाणि पद्मानि भिद्यंते ग्रंथयोपि च ॥ २ ॥

"गुप्त–निद्रिस्त–असलेली कुंडली, गुरुप्रसादाच्या योगेंकरून जेव्हां जागृत होते, तेव्हां हृदयांतील सर्व चक्रें, व गांठीसुद्धां भिन्नभिन्न–अर्थात् शिथिल–होतात."

हठयोगप्रदीपिका. तृतीयोपदेशः

ह्यावरून 'कुंडली' किंवा 'कुंडलिनी' ह्मणजे पोटांतील 'मोठें आंतडें' ज्यास इंग्रजींत 'लार्जबाउल' ह्मणतात, तें कीं काय? साडेतीन वेढे वगैरे लक्षणें जुळतात, परंतु तेजाविषयीं कांहीं कल्पना बसत नाहीं. 'माझें कळसूत्री घर' यांतील पान २८ आकृति १२ पहा. ह्मणजे ह्याचें अनुमान करण्यास बरेंच साधन होईल.

नाश करूं लागते; आणि प्रत्येक अवयवाच्या संधीसंधींचा झाडा घेऊन सोडते. २३२ अधोभाग तर सोडीत नाहीं; पण नखांतील सत्त्व सुद्धां काढून घेते. त्वचा सारी धुऊन काढून अस्थिपंजराला जाऊन चिकटते. २३३ अस्थींचे नळ निरपून काढते; शिरांच्या जाळ्या शोषून घेते; त्यामुळें रोमरंध्रांची वाढ खुंटते. २३४ मग तिला तहान लागते तेव्हां ती सप्त धातूंच्या समुद्राचा घोट करून टाकून जिकडे तिकडे अंतर्भागीं खडखडीत उन्हाळा करून सोडते. २३५ नाकपुड्यांतून जो बारा अंगुळें बारा बाहेर पडतो, त्याला गचांडी धरून आंत घालते. २३६ तेव्हां खालचा वायु वर ओढला जातो, आणि वरचा वायु खालीं ओढला जातो. पण ह्या दोहोंच्या सांध्यामध्यें चक्राचे पडदे राहतात. २३७ नाहीं तर हे दोन्ही तेव्हांच एकत्र मिळाले असते. परंतु कुंडलिनी क्षणभर कोपायमान होऊन 'तुह्मी एकट्यांनींच येथें काय ह्मणून रहावें?' असें ह्मणते, ह्मणून आडपडदा राहतो. २३८ श्रवण कर. पृथ्वीसंबंधीं जेवढी ह्मणून धातु आहे, तेवढी सर्व ती खाऊन टाकते, कांहीं एक बाकी ठेवीत नाहीं. आणि उदकाला तर ती चाटूनपुसूनच ठेवते. २३९ ह्याप्रमाणें दोन्ही भूतें तिनें खाऊन टाकलीं ह्मणजे तिची परिपूर्ण तृप्ति होते. आणि मग ती सौम्य होऊन *सुषुम्नेपाशीं राहते. २४० तेथें तृप्तीच्या संतोषानें, विष असतें तें सर्व मुखानें ओकून टाकते. विष नाहींसें झालें ह्मणजे राहिलेल्या अमृताच्या योगेंकरून प्राण वांचतात. २४१ तो अमृतरूप अग्नि बाहेर निवतो, तरी आंतून बाहेरून तो सुखावहच होऊं लागतो. तेव्हां आंगें, निघून गेलेल्या शक्ति पुन्हा धरूं लागतात. २४२ नाडीचे मार्ग मोडतात; वायूचे नवविध प्रकार बंद होतात; ह्मणून शरीरांतील धर्मही लयास जातात. २४३ *इडा आणि पिंगळा एकत्र होऊन तिन्ही नाड्यांच्या गांठी सुटून सहा चक्रांचे पदरही फुटून जातात. २४४ मग सूर्य चंद्र नांवाचे मानलेले नाकांतून वाहणारे वायू, शोधले तरी सांपडत नाहींत. २४५ बुद्धीचा विकसितपणा नाहींसा होतो. नाकामध्यें सुगंध राहिलेला असतो, तोही शक्तीबरोबर सुषुम्नेमध्यें शिरतो. २४६ तेव्हां वरच्या बाजूनें चंद्रामृताचें तळें हळू हळू एका बाजूनें वांकडें होऊन त्याचा प्रवाह कुंडलिनीमध्यें पडतो. २४७ त्या बाजूच्या नळीनें तींत रस भरतो, आणि तो सर्वांगांत शिरून प्राणवायूच्या योगानें जेथल्या तेथें मुरून जातो. २४८ तापलेल्या मुशींतून मेण निघून गेलें ह्मणजे ओतलेल्या मुख्य धातूच्या रसानें ती मूस जशी भरून राहते, २४९ त्याप्रमाणें शरीराच्या आकारानें ती कांतीच अवतार घेऊन येते. फक्त वर मात्र त्वचेचें आच्छादन असतें. २५० ज्याप्रमाणें अभ्रांचा बुरखा घेऊन सूर्य राहतो, आणि तो गेल्यावर पुन्हा तेजःपुंज होऊन येतो, २५१ त्याप्रमाणें वर उगाच असलेला त्वचेचा पापोद्रा, कोंड्यासारखा झडून जातो; २५२ आणि मग शुद्ध स्फटिकासारखी किंवा रत्नबीजाला कोंभ फुटल्याप्रमाणें अवयवांच्या कांतीची शोभा दिसूं लागते. २५३ किंवा सायंकाळच्या आकाशाचे रंग एकत्र करूनच तें आंग बनविलें आहे किंवा अंतर्ज्योतीचें लिंगच स्वच्छ केलें आहे असें वाटतें. २५४ किंवा केशर भरूनच तें के-

* सुषुम्ना शून्यपदवी ब्रह्मरंध्रं महापथः ।
स्मशानं शांभवी मध्यमार्गश्चेत्येकवाचकाः ॥ ४ ॥
—ह० प्र० उपदेश. ३—

"शून्यपदवी, ब्रह्मरंध्र, महापथ, स्मशान, शांभवी, मध्यमार्ग हे सर्व शब्द सुषुम्ना नाडीचे पर्यायवाचक आहेत. अर्थात् इतक्या शब्दांचा अर्थ एकच."

* देहामध्यें सार्धलक्षत्रय नाड्या आहेत. त्यांत १४ मुख्य. त्या चवदांमध्यें इडा, पिंगळा आणि सुषुम्ना ह्या मुख्य. ह्या तिहींत सुषुम्ना मुख्य असून ती परमपदाची दात्री आहे. दुसऱ्या सर्व तिच्या आश्रयानें शरीरांत राहतात. इचीं सहा स्थानें व शक्ति आहेत. आणि ही इडा व पिंगळा ह्यांच्यामध्यें आहे. डाव्या नाकपुडींतील नाडीचें नांव 'इडा,' व उजव्या नाकपुडींतील नाडीचें नांव 'पिंगळा.'

लेलें किंवा सिद्ध रसाचें ओतलेलें; किंवा मला वाटतें ती मूर्तिमंत शांतीच. २५५ आनंदमूर्तीची कांति; किंवा महत्सुखाची मूर्ति; किंवा संतोषतरूचें रोपच स्थीर झालें आहे असें वाटतें. २५६ तो सोनचांफ्याचा कळा; किंवा अमृताचा पुतळा; किंवा नाना प्रकारच्या नाजुकपणांचा पिकलेला मळाच. २५७ किंवा शरदृतूंतील अमृतानें थबथबलेलें चंद्रबिंबच; किंवा आसनावर बसलेलें मूर्तिमंत तेजच. २५८ कुंडलिनी जेव्हां अमृत प्राशन करिते, तेव्हां शरीर अशा प्रकारचें दिव्य होतें. अरे! तो देहाचा आकार पाहून यम सुद्धां भितो. २५९ वार्धक्य नाहींसें होतें; तरुणपण मोडतें; आणि गेलेली बाल्यदशा पुन्हा प्राप्त होते. २६० वय बाळाचें असतें. पण शक्तीच्या संबंधानें बाळ याचा अर्थ मात्र 'बळ' असा होतो. धैर्य किती वाढतें त्याला तर उपमाच नाहीं. २६१ सुवर्णाच्या वृक्षाला पालवी फुटून नित्य नव्या नव्या रत्नाच्या कळ्या याव्यात, त्याप्रमाणें नखेंही उत्तम नवीं प्राप्त होतात. २६२ दांतही दुसरे येतात, पण ते अपूर्व आणि बारीक असून दुतर्फा हिरे बसविल्याप्रमाणें दिसतात.* २६३ बारीक बारीक माणक्यांप्रमाणें सर्वांगावर केशांचीं अग्रें उद्भवतात. २६४ हात, पाय केवळ रातोत्पलाप्रमाणें दिसतात. डोळे

---

* ह्यावरून सर्पानें कांत टाकल्याप्रमाणें, मनुष्याला योगाभ्यासाच्या योगानेंही आपल्या आंगावरची त्वचा टाकून तरुण होतां येतें, ही गोष्ट सिद्ध होते. वाग्भटानेंही हाच प्रयोग रसायनसेवनानें होत असल्याचें आपल्या ग्रंथांत नमूद केलें आहे. तें असें:—

दीर्घमायुः स्मृतिं मेधामारोग्यं तरुणं वयः ।
प्रभावर्णस्वरौदार्यं देहेन्द्रियबलोदयम् ॥ १ ॥
वाक्सिद्धिं वृषतां कांतिमवाप्नोति रसायनात् ।
लाभोपायो हि शस्तानां रसादीनां रसायनात् ॥ २ ॥
वाग्भट–रसायनाध्याय. ३९.

"पुष्कळ आयुष्य, स्मरणशक्ति, धारणाशक्ति, आरोग्य, तारुण्य, उत्तम तेज, चांगला वर्ण, गोड स्वर—देह व इंद्रियें (नेत्रोदक) यांस शक्ति, वाणीची सिद्धि, वृषता (शुक्रवृद्धि) व सौंदर्य हीं रसायनापासून प्राप्त होतात; कारण रसायन ह्मणजे शरीरांतील रसादि धातु उत्तम रीतीनें प्राप्त होण्याचा उपाय.

पूर्वे वयसि मध्ये वा तत्प्रयोज्यं जितात्मनः ।
स्निग्धस्य सुतरक्तस्य विशुद्धस्य च सर्वथा ॥ ३ ॥

आत्मसंयमन करणाऱ्या मनुष्यानें पूर्ववयांत (२५ च्या आंत) किंवा मध्यमवयांत (५० च्या आंत) स्निग्ध होऊन, रक्त काढून व मनादिकांनीं शुद्ध जाहल्यानंतर रसायन घ्यावें.

अविशुद्धे शरीरेहि युक्तो रासायनो विधिः ।
वाजीकरो वा मलिने वस्त्रे रंग इवाफलः ॥ ४ ॥

शरीर शुद्ध जाहल्यावांचून, जर रसायन किंवा वाजीकरण केलें तर मळक्या वस्त्रास दिलेल्या रंगाप्रमाणें व्यर्थ होतें.

रसायनानां द्विविधं प्रयोगमृषयो विदुः ।
कुटिप्रावेशिकं मुख्यं वातातपिकमन्यथा ॥ ५ ॥

रसायन घेण्याचे दोन तऱ्हेचे प्रयोग ऋषींनीं सांगितले आहेत. एक झोंपडींत बसून राहून औषध घेणें, व दुसरा तसें न करितां औषध घेणें. पहिला कुटिप्रावेशिक हा उत्तम, आणि दुसरा वातातपिक हा गौण होय.

निर्वाते निर्भये हर्म्ये प्राप्योपकरणे पुरे ।
दिश्युदीच्यां शुभे देशे त्रिगर्भां सूक्ष्मलोचनाम् ॥ ६ ॥
धूम्रातपरजोव्यालस्त्रीमूर्खाद्यविलंघितम् ।
सज्जवैद्योपकरणां सुमृष्टां कारयेत्कुटिम् ॥ ७ ॥

ज्या शहरांत सर्व साहित्य मिळण्यासारखें आहे, तेथें निर्भय व निवाऱ्याच्या जाग्यांत किंवा वाड्यांत उत्तर दिशेस पवित्र जागीं एक झोंपडी तयार करावी. तिला तीन गर्भ असावे. ह्मणजे, आंत एक खोली (देवळाच्या गाभाऱ्याप्रमाणें) तिच्या बाहेर दुसरी भिंत, व तिच्या बाहेर तिसरी भिंत याप्रमाणें झोंपडी करावी. तिला बारीक खिडक्या ठेवाव्या, धूर, ऊन्ह, धुरळा, श्वापदें, बायका आणि मूर्ख लोक यांचा तेथें संसर्ग नसावा. वैद्याची सर्व सामुग्री तयार असावी, आणि ती झोंपडी चांगली सारवलेली असावी.

अथ पुण्येऽन्हि संपूज्य पूज्यांस्तां प्रविशेच्छुचिः ।
तत्र संशोधनैः शुद्धः सुखी जातबलः पुनः ॥ ८ ॥
ब्रह्मचारी श्रुतियुतः श्रद्दधानो जितेंद्रियः ।
दानशीलदयासत्यव्रतधर्मपरायणः ॥ ९ ॥
देवतानुस्मृतियुतः युक्तस्वप्नप्रजागरः ।
प्रियौषधः पेशलवाक् प्रारभेत रसायनम् ॥ १० ॥

रसायन घ्यावयाचें असल्यास निश्चय झाल्यानंतर सुमुहूर्तावर पवित्र होऊन, देव, ब्राह्मण व गुरु यांची पूजा करून, त्या झोंपडींत प्रवेश करावा. तेथें रेचकें वगैरे घेऊन पुन्हा शक्ति आली ह्मणजे औषध सुरू करावें. तो निरोगी असावा. ब्रह्मचर्यानें रहावें. नेहमीं संतोषित रहावें. औषधावर श्रद्धा

तर इतके तेजस्वी होतात कीं काय सांगावें ? २६५ मोत्यें पक्कदशेस येऊन दाटलीं ह्मणजे मग तीं शिंपल्याच्या पुडांत राहीनातशीं होऊन त्या शिंपल्याचे सांधे निखळतात, २६६ त्याप्रमाणें दृष्टी ही पापण्याच्या आंत न राहतां, बाहेर पडावयाला पाहते. ती अर्धीच असते तरी आकाश व्यापून राहते. २६७ आणखी ऐक. देह


असावी. इंद्रियें स्वाधीन ठेवावीं. दान, सुस्वभाव, दया, सत्य, व्रतें, व धर्म यांविषयीं तत्पर असावें. देवतांचें नामस्मरण करावें. योग्य वेळीं निजावें, व योग्य वेळीं जागावें. औषधाची आवड असावी, व गोड बोलावें.

नीरुजार्द्रपलाशस्य छिन्ने शिरसि तत्क्षतम् ।
अंतर्द्विहस्तं गंभीरं पूर्यमामलकैर्नवैः ॥ २८ ॥
आमूलं वेष्टितैर्दर्भैः पद्मिनीपंकलेपितम् ।
आदीप्य गोमयैर्वन्यैर्निर्वाते स्वेदयेत्ततः ॥ २९ ॥

स्विन्नानि तान्यामलकानि तृप्त्या ।
खादेन्नरः क्षौद्रघृतान्वितानि ॥
क्षीरं शृतं चानुपिबेत्प्रकामम् ।
तेनैव वर्तेत च मत्समेकम् ॥ ३० ॥
वर्ज्यानि वर्ज्यानि च तत्र यत्नात्
स्पृश्यं च शीतांबु न पाणिनापि ।
एकादशाहेऽस्य ततो व्यतीते
पतंति केशा दशना नखाश्च ॥ ३१ ॥
अथाल्पकैरेव दिनैः सुरूपः
स्त्रीष्वक्षयः कुंजरतुल्यवीर्यः ।
विशिष्टमेधाबलबुद्धिसत्त्वो
भवत्यसौ वर्षसहस्रजीवी ॥ ३२ ॥

न किडलेल्या ओल्या पळसाचा शेंडा तोडून तें दोन हात खोल आंत पोंखरावें, व नव्या आंवळ्यांनीं भरावें. त्या झाडास बुंधापासून वरपर्यंत दर्भ गुंडाळावे, आणि वर कमळाच्या खालच्या चिखलानें लिंपावें. नंतर सभोंवतीं रानशेणी लावून त्यास वारा लागूं न देतां पेटवावें. ते आंवळे शिजल्यावर काढून मध व तूप घालून नकोसे होईपर्यंत खाऊन वर दूध प्यावें. याप्रमाणें दुसरें कांहीं न खातां एक महिना तेंच खाऊन रहावें. जे वर्ज्य प्रकार सांगितले आहेत, ते बिलकूल करूं नयेत. थंड पाण्यास स्पर्श सुद्धां करूं नये. अकरा दिवस झाले कीं दांत केश व नखें गळून पडतात. व पुढें थोड्याच दिवसांनीं तो सुस्वरूप आणि हत्तीप्रमाणें सामर्थ्यवान् होऊन, कितीही स्त्रिया भोगून थकत नाहीं, धारणाशक्ति, बल, बुद्धि व धैर्य हीं त्याचीं वाढतात, व तो एक हजार वर्षे वांचतो.

सुवर्णाचा होतो, पण त्यांत वायूचा हलकेपणा असतो. कारण, पाण्याचा आणि पृथ्वीचा अंश मुळींच राहिलेला नसतो. २६८ त्यामुळें समुद्राच्या पलीकडचें त्याला दिसतें; स्वर्गांतील शब्द ऐकूं येतो; आणि मुंगीच्या मनांतील हेतु सुद्धां समजतो. २६९ वायूच्या घोड्यावर बसतो, उदकावरून चालतो, तरी उदकाला पाऊल लागत नाहीं. अशा वेळोवेळीं नाना प्रकारच्या सिद्धि प्राप्त होतात. २७० ऐक. प्राणाचा हात धरून, गगनाच्या पायऱ्या करून सुषुम्नेच्या जिन्यावरून हृदयांत आलेली २७१ जी कुंडलिनी, ती जगाची माता; जिवाच्या सार्वभौमत्वाची शोभा; जिची जगद्बीजाच्या कोंभाला सावली होऊन राहिली आहे. २७२ जी शून्यलिंगाची बैठक; जी परमात्मशिवाची करंडी; आणि ओंकाराची तर ती साक्षात् जन्मभूमि. २७३ हें असो. ती सकुमार कुंडलिनी हृदयांत शिरली ह्मणजे, तेथें असणाऱ्या 'अनाहत' नांवाच्या चक्राचे शब्द उच्चारूं लागते. २७४ त्या शक्तीच्या आंगास जी बुद्धि, चैतन्यरूप होऊन चिकटून राहिलेली असते, तीस तो शब्द किंचित् मात्र ऐकूं येतो. २७५ त्या अनाहत शब्दाच्या कुंडामध्यें वाणीच्या चारही प्रकारचीं स्वरूपें ओंकाराच्या आकारानें रेखलेलीं असतात, २७६ तीं सारीं कल्पनेनेंच जाणलीं पाहिजेत, पण कल्पना करणारे तरी कोठून आणावेत ? ह्मणून तिच्यामध्यें कशाचा शब्द होतो, तें सांगतां येत नाहीं. २७७ पण अर्जुना ! एक विसरलों. वायूला जेव्हां बाहेर पडतां येत नाहीं, तेव्हां आकाशामध्यें शब्द उत्पन्न होतो, आणि त्यामुळें तें वाजावयास लागतें. २७८ त्या अनाहत शब्दाच्या मेघानें अंतराकाश गडगडूं लागतें. आणि ब्रह्मरंध्र आपोआपच उघडतें. २७९ ऐक. तेथेंच कमलगर्भाच्या आकाराचें जें दुसरें महदाकाश असतें, त्यांत चैतन्य क्षुधित होऊन राहिलेलें असतें. २८० त्या हृदयाच्या गुप्त स्थानांत कुंडलिनी परमेश्वरी, त्या चैतन्याला आपल्या ते-




ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जया विश्वबीजाचिया कोंभा । सावली केली ॥ ७२ ॥

ज्ञानेश्वरी अध्याय ६.

जाचा फराळ देते. २८१ बुद्धीच्या शाकभाज्या व तेजाचीं उत्तम पक्वान्नें खाऊं घालून द्वैत ह्मणून तेथें दिसेनासेंच करून टाकते. २८२ त्या कुंडलिनीची स्वतःची कांति नाहींशी होऊन गेली ह्मणजे ती केवळ प्राणरूपच होऊन राहते. त्यावेळीं कशी दिसते आहे ह्मणून सांगूं? २८३ जशी कांहीं वायूची बनलेली पुतळी, पितांबर पांघरली होती तो एकीकडे ठेवून मूळरूपच बनावी, २८४ किंवा दिव्याची ज्योत वायूच्या आंगास झोंवतांच तद्रूप व्हावी, किंवा गगनामध्यें वीज एकदम प्रकाशित होऊन लुप्त व्हावी, २८५ तद्वत् हृदयकमळापर्यंत ती सोन्याच्या सरीप्रमाणें दिसते. किंवा एखादा पांढऱ्या सफेत रंगाच्या जलाचा झराच वाहत आहे असें वाटतें. २८६ आणि ती त्या हृदयांतील पोकळ जाग्यामध्यें आली कीं, तत्काल तेथें शक्तीमध्यें शक्तीचाच लय झाल्याप्रमाणें ती लुप्त होते. २८७ तेथें तरी तिला शक्ति असेंच ह्मणतात. परंतु खरोखर तो प्राणच आहे असें समजावें. त्यावेळीं जीवनकलेला शब्दाचा लवलेशही कळत नाहीं. २८८ तेथें मनाचा जोर मोडतो; वायूचा आधार नाहींसा होतो; आणि ध्यानाचाही आदर राहत नाहीं. २८९ कल्पना करावयाच्या, किंवा टाकावयाच्या हे प्रकारच राहत नाहींत. कारण, ही महाभूतांच्या संहाराचीच दशा आहे असें समज." २९० पिंड पिंडाचा नाश करतो, हाच नाथांच्या संकेतांतील गूढार्थ आहे. परंतु त्यांतील उद्देश श्रीमहाविष्णूंनीं दाखवून दिला. २९१ श्रोतेही ग्राहक आहेत असें मनांत आणून त्या गूढार्थाचें बासन सोडून यथार्थाची घडी झाडून ती मीं उलगडून दाखविली. २९२

युंजन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥१५॥

[ युंजन्नेवं सदात्मानं ] ऐकें शक्तीचें तेज जेव्हां लोपे । तेथ देहाचें रूप हारपे । मग तो डोळ्यामाजि लपे । जगाचिया ॥ ९३ ॥ येऱ्हवीं आधिलाचि ऐसें । सावयव तरी दिसे । परि वायूचें जैसें । वेढिलें होय ॥ ९४ ॥ नातरी कर्दळीचा गाभा । बुंथी सांडोनि उभा । कां अवयवचि नभा । उदयला तो ॥ ९५ ॥ तैसें होय शरीर । तैं तें ह्मणिजे खेचर । हें पद होतां चमत्कार । पिंडजनीं ॥ ९६ ॥ देखें साधकँ निघोनि जाये । मागां पाउलांची वोळ राहे । तेथ ठायीं ठायीं होये । अणिमादिक ॥ ९७ ॥ परि तेणें काय काज आपणपेंयां । अवधारीं ऐसा धनंजया । लोप आथी भूतत्रया । देहींच्या देहीं ॥ ९८ ॥ पृथ्वीतें आप विरवी । आपातें तेज जिरवी । तेजातें पवन हरवी । हृदयामाजी ॥ ९९ ॥ पाठीं आपण एकला उरे । परि शरीराचेनि अनुकारें । [ योगी नियतमानसः ] मग तोही निगे अंतरें । गगना मिळे ॥ ३०० ॥ तेवेळीं कुंडलिनी हे भाष जाये । मग मारुत ऐसें नाम होये । परि शक्तीपण तें आहे । जंव न मिळे शिवीं ॥ १ ॥ मग जाळंधर सांडी । ककारांत फोडी । गगनाचिये पांडीं । पैठी होय ॥ २ ॥ ते ओंकाराचिये पाठी । पाय देत उठाउठी । पश्यंतीचिये पाउठी । मागां घाली ॥ ३ ॥ पुढें तन्मात्रा अर्धवरी । आकाशाचा अंतरीं । भरती गमे सागरीं । सरिता जेवीं ॥ ४ ॥ [ मत्संस्थामधिगच्छति ] मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी । सोहंभावाच्या बाह्या पसरुनी । परमात्मलिंगा धावोनी । आंगा घडे ॥ ५ ॥ तंव महाभूतांची

१ कैलासनाथ (शंकर) हेच योगशास्त्राचे अधिपति. २ पहिल्यासारखाच. ३ साकार.

१ बनविलेलें. २ केळीचा. ३ सोपट. ४ आकाशाला. ५ आकाशगामी. ६ शरीरावयवांत. ७ योग धारण करणारा. ८ माग, आकृति. ९ अणिमा आदि करून अष्टसिद्धि योग्यास प्रथमतःच प्राप्त होतात. 'अणिमा महिमा चैव, लघिमा गरिमा तथा । प्राप्तिः प्राकम्यमीशत्वं वशित्वं चाष्ट सिद्धयः ॥' पाहिजे तितके दिवस न खातां रहातां येतें; व पाहिजे तितकें खाल्लें तरी, तें पचन होतें; देह पाहिजे तितका हलका (अगदीं आकाशमार्गानें जाण्यासारखा सुद्धां) करतां येतो; आणि पाहिजे तितका जड (कोणांसही न हालण्यासारखा) करतां येतो; आपणास पाहिजे ती वस्तु आणतां येते; व पाहिजे ती वस्तु लोकांस देतां येते; पाहिजे त्यावर सत्ता करतां येते; व पाहिजे तें मनुष्य वश करतां येतें. ह्या आठ प्रकारच्या धर्मास 'अष्टसिद्धि' असें ह्मणतात. १० आपल्याला. ११ आहे. १२ आकारानें. १३ कांहींवेळानें. १४ शब्द. १५ जातो. १६ वायु. १७ ब्रह्मांत. १८ कंठ आकुंचन करून हनुवटी वक्षस्थलावर दाबून वसविली असतां 'जालंधर' नांवाचा बंध (आसन)—होतो. 'कंठमाकुंच्य हृदये स्थापयेच्चिबुकं दृढम् । बंधो जालंधराख्योयम्'. १९ सुषुम्ना नाडी. २० बरोबर. २१ प्रविष्ट. २२ परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाचांतील दुसरी वाचा. २३ सूक्ष्मभूतें. २४ मस्तकाच्या पोकळींत. २५ ब्रह्म तें मीच ह्या भावानें. २६ हात. २७ परब्रह्माचें चिन्ह.

जेवनिक फिटे । मग दोहींसि होय झेटें । तेथ गगनासकट आटे । समरसीं तिये ॥ ६ ॥ पैं मेघाचेनि मुखीं निवंडला । समुद्र कां वोघीं पडिला । तो मागुता जैसा आला । आपण पयां ॥ ७ ॥ तेविं पिंडाचेनि मिषें । पदीं पद प्रवेशे । तें एकत्व होय तैसें । पंडुकुमरा ॥ ८ ॥ [ शांतिं निर्वाणपरमां ] आतां दुजें हन होतें । कीं एकचि हें आइतें । ऐशिये विवंचने पुरतें । उरेचिना ॥ ९ ॥ गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होय । तो होऊनि ठाके ॥ ३१० ॥ ह्मणोनि तेथिंची मात । न चढेचि बोलाचा हात । जेणें संवादाचिया गांवाआंत । पैठी कीजे ॥ ११ ॥ अर्जुना येऱ्हवीं तरी । इया अभिप्रायाचा जे गर्व धरी । ते पाहें पां वैखरी । दुरी ठेली ॥ १२ ॥ भ्रूलता मागलीकडे । तेथ मकराचेंचि आंग न मांडे । सेंडे या प्राणा सांकडें । गगना येतां ॥ १३ ॥ पाठीं तेथेंचि तो भेसळला । तैं शब्दाचा देवो मावळला । मग तयाही वरी ऑडु भविन्नला । आकाशाचा ॥ १४ आतां महाशून्याचिया डोहीं । जेथ गगनासीचि थावो नाहीं । तेथ तागा लागेल काई । बोलाचा इया ॥ १५ ॥ ह्मणूनि आखिरामाजि सांपडे । कीं कानावरी जोडे । हें तैसें नव्हे फुंडें । त्रिशुद्धी गा ॥ १६ ॥ जैं कांहीं दैवें । अनुभविलें फावे । तैं आपणचि हें ठाकावें । होऊनियां ॥१७॥ पुढती जाणणें तें नाहींचि । ह्मणोनि असो किती हेंचि । वोलावें आतां वायांचि । धनुर्धरा ॥ १८ ॥ ऐसें शब्दजात मोघौतें सरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे । वाराही जेथ न शिरे । विचाराचा ॥ १९ ॥ जें उन्मनियेचें लावण्य । जें तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परमतत्त्व ॥ ३२० ॥ जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ । जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ॥ २१ ॥ जें आकाराचा प्रांत । जो मोक्षाचा एकांत । जेथ आदि आणि अंत । विरोनि गेले ॥ २२ ॥ जें महाभूतांचें वीज । जें महातेजाचें तेज । एवं पार्था जें निज । स्वरूप माझें ॥ २३ ॥ ते हे चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रूपासि आली । देखोनि नास्तिकीं नोकिलीं । भक्तवृंदें ॥ २४ ॥ तें अनिर्वाच्य महासुख । पैं आपणचि जाहाले जे पुरुष । जयांचे कां निष्कर्ष । प्राप्तिवेरी ॥ २५ ॥ आह्मीं साधन हें जें सांगितलें । तेंचि शरीरा जिहीं केलें । ते आमुचेनि पाडें आले । निर्वाळलेयां ॥ २६ ॥ परब्रह्माचेनि रसें । देहाकृतीचियेनि मुसें । वोतींव जाहाले तैसे । दिसती आंगें ॥ २७ ॥ जरि हे प्रतीति हन अंतरीं फांके । तरी विश्वचि हें अवघें झांके । तव अर्जुन ह्मणे निकें । साचचि जी हें ॥ २८ ॥ कां जे आपण आतां देव । हा बोलिले जो उपाव । तो प्राप्तीचा ठाव । ह्मणोनि घडे ॥ २९ ॥ इये अभ्यासीं जे दृढ होती । ते भरंवसेनि ब्रह्मत्वा येती । हें सांगतियाचि रीती । कळलें मज ॥ ३३० ॥ देवा गोठीचि हे ऐकतां । बोध उपजतसे चित्ता । मा अनुभवें तल्लीनता । नोहेल केविं ॥ ३१ ॥ ह्मणऊनि एथ कांहीं । अनारिसें नाहीं । परि नावेंभरी चित्त देईं । वोला एका ॥ ३२ ॥ आतां कृष्णा तुवां सांगीतला योग । तो मना तरी आला चांग । परि न शकें करूं पांग । योग्यतेचा ॥ ३३ ॥ सहजें आंगिक जेतुलें आहे तेतुलियाचि जरि सिद्धि जाये । तरि हाचि मार्ग सुखोपायें । अभ्यासीन ॥ ३४ ॥ ना तरी देव जैसें सांगतील । तैसें आपणपें जरी न ठकेल । तरी योग्यतेवीण होइल । तेंचि पुसों ॥ ३५ ॥ जीवींचिये ऐसी धारणें । ह्मणोनि पुसावया जाहालें कारण । मग ह्मणे तरी आपण । चित्त देइ जो ॥ ३६ ॥ हां होजी अवधारिलें । जें हें साधन तुह्मीं निरूपिलें । तें आवडतयाहि अभ्यासिलें । फावों शके ॥ ३७ ॥ कीं योग्यतेवीण नाहीं । ऐसें हन आहे कांहीं । तेथ श्रीकृष्ण ह्मणती काई । धनुर्धरा ॥ ३८ ॥ हें कोंज कीर निर्वाण । परि आणिकही जें कांहीं साधारण । तेंही अधिकाराचे वोडवेविण । काय सिद्धी जाय ॥ ३९ ॥ पैं योग्यता जे ह्मणिजे । ते प्राप्तीचे आधीं न जाणिजे । कां जें योग्य होऊनि कीजे । तें आरंभिलें फळे ॥ ३४० ॥ तरी तैसी एथ कांहीं । साविंयोंचि कोणी नाहीं । आणि योग्यतेची काई । खाणी असे ॥ ४१ ॥ नावेक विरक्त । जाहला देहधर्मीं नियत । तरि तोचि नव्हे व्यवस्थित । अधिकारिया ॥ ४२ ॥ येतुलालिये ऑयणीमाजि येवडें । योग्यपण तुतेंही जोडे । ऐसें प्रसंगें सांकडें । फेडिलें तयाचें ॥ ४३ ॥ मग ह्मणे पार्था । ते हे ऐसी व्यवस्था । अनियंतासि सर्वथा । योग्यता नाहीं ॥ ४४ ॥

**"ऐक. शक्तीचें तेज लोपलें ह्मणजे देहाचा**

---

१ पडदा. २ ऐक्य. ३ ब्रह्मानंदीं, समदृष्टीमध्यें. ४ शिरला. ५ कुंडलीच्या निमित्तानें. ६ ब्रह्मपदीं. ७ सिद्ध होतो. ८ शिरकाव. ९ चवथी वाचा. १० ओंकारांतील तिसरी मात्रा, तुर्यावस्था. ११ एकटे. १२ संकट. १३ मिसळला. १४ दिवस. १५ आटणी, शरीरसंकोच. १६ झाला. १७ शून्याधिष्ठान–परब्रह्म. १८ अक्षरामध्यें. १९ खचित. २० त्रिवार. २१ प्राप्त होतें. २२ रहावें. २३ सारे शब्द. २४ मागें. २५ जींत मनाचा लय होतो, त्या पांचव्या अवस्थेचे,–सहजस्थितीचे. २६ चवथी समाधी अवस्था. २७ परब्रह्म. २८ जीव, प्राण. २९ शेवट. ३० उत्पन्न झाली. ३१ नास्तिकांनीं. ३२ छळलीं.

१ निश्चय. २ प्राप्तीपर्यंत. ३ निर्मळपणास. ४ सांगितलेली. ५ मग. ६ न होईल. ७ वेगळें. ८ क्षणभर. ९ दुर्लभत्व. १० आपल्याच्यानें. ११ होईल. १२ इच्छा. १३ भल्यालाही. १४ प्राप्त होईल काय? १५ कार्य. १६ खचित. १७ मोक्षाचें. १८ योग्यतेवांचून. १९ तत्काळ मिळणारा, सहज प्राप्त होणारा. २० पदार्थ. २१ क्षणभर. २२ विहित धर्मामध्यें. २३ नियमित. २४ येवढाले. २५ इच्छेमध्यें, युक्तिमध्यें. २६ कोडें, संशय. २७ अव्यवस्थिताला.

आकारही नाहींसा होऊन जातो. तेव्हां अर्थांतूच जगाच्या नेत्रांना तो दिसेनासा होतो. २९३ बाकी तो असतो पूर्वीसारखाच; त्याला सारे अवयव असतात. परंतु ते सारे वायूचेच केलेले आहेत असें दिसतात. २९४ किंवा बाहेरचीं सोपटें काढलेला कर्दळीचा गाभाच उभा असावा असें वाटतें. किंवा तो आकाशाचाच एक अवयव होऊन राहतो ह्मटलें तरी चालेल. २९५ असें शरीर झालें ह्मणजे त्यास 'आकाशसंचारी' असें ह्मणतात. ह्या योग्यतेला पोंचलें ह्मणजे त्या अवयवांनीं विलक्षण चमत्कार घडून येतात. २९६ पहा. असा योगी निघून गेला ह्मणजे त्याच्या पाठीमागें जी पाउलें उमटल्याची ओळ राहते, त्या ठिकाणीं अणिमादिक सिद्धि उत्पन्न होतात. २९७ परंतु **अर्जुना**! ऐक. त्याच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे? अशा प्रकारें देहांतल्या देहांतच तीन भूतांचा लोप होतो, हें ध्यानांत ठेव ह्मणजे झालें. २९८ पाणी पृथ्वीला विरवितें; तेज पाण्याला विरवितें; आणि वायु तेजाला हृदयामध्यें नाहींसा करून टाकतो. २९९ आणि आपण एकटाच मागें राहतो. परंतु तो शरीराच्या आकारानें राहतो. आणि तोही मग कांहीं कालानें निघून आकाशाला मिळतो. ३०० त्या वेळीं कुंडलिनी हा शब्द जाऊन वायु असें नांव प्राप्त होतें. तरी पण तो ब्रह्मामध्यें मिळेपर्यंत त्याची शक्ति कायमच असते. ३०१ मग तो जालंधर सोडून देऊन सुषुम्ना नाडी फोडून आकाशांत प्रविष्ट होतो. ३०२ नंतर लागलीच ओंकाराच्या पाठीवर पाय देऊन पश्यंतीच्या पायरीला मागें टाकतो. ३०३ त्यावेळीं नद्या जशा समुद्राला येऊन मिळतात, तशीं तीं सूक्ष्म भूतें अर्धमात्रारूप आकाशांत भरतात. ३०४ तदनंतर मस्तकाच्या पोकळींत स्थीर होऊन ब्रह्म तें मीच ह्या भावनेच्या बाह्या पसरून परब्रह्माशीं ऐक्य होतें. ३०५ तेव्हां महाभूतांचा पडदा नाहींसा होऊन जीव आणि ब्रह्म ह्या दोघांचें ऐक्य होतें. व त्या ब्रह्मानंदांत गगनाचा सुद्धां लय होऊन जातो. ३०६ ज्याप्रमाणें मेघाच्या मुखांतून समुद्र शुद्ध होऊन वाहूं लागतो, व पुन्हा आपला आपणाकडेच येतो, ३०७ त्याप्रमाणें हे **अर्जुना**! पिंडाच्या निमित्तानेंच ब्रह्म आहे तें ब्रह्मांत शिरतें. हें त्याचें ऐक्य त्या समुद्राप्रमाणें आहे. ३०८ आतां तें दुसरें होतें, किंवा मूळचें एकच आहे, हा सुद्धां विचार करण्याला राहत नाहीं. ३०९ गगनामध्येंच गगन लुप्त होऊन जावें, असें जें काय तें स्वतः योगी आपण होऊन राहतो. ३१० ह्मणून तेथची गोष्ट बोलावयाला किंवा त्या संवादरूप ग्रामांत शिरावयाला शब्दांचा हात चालत नाहीं. ३११ **अर्जुना**, असें असून ज्याच्या वाणीला हें सांगेन असा गर्व राहील, ती वाणी अगदीं भिन्न आहे हें ध्यानांत ठेव. ३१२ भ्रूलतेच्या मागच्या बाजूसच कांहीं तुर्यावस्था प्राप्त होत नाहीं. एकह्या प्राण्याला आकाशाकडे येतांना मोठें संकट पडतें. ३१३ तो तेथें जाऊन पोंचला कीं त्यांतच मिश्र होतो, आणि शब्दाचा दिवस मावळतो. असें झाल्यावर आकाशाच्या शरीराचाही संकोच होतो. ३१४ आतां महाशून्याच्या डोहामध्यें—जेथें आकाशाला सुद्धां ठिकाण नाहीं तेथें, ह्या शब्दाचा पत्ता काय लागणार? ३१५ ह्मणून तें बोलावयाला मिळेल, किंवा ऐकावयाला सांपडेल, ही गोष्ट शक्य नव्हे, हेंच त्रिवार सत्य होय. ३१६ जर प्रारब्धच अनुकूल होऊन मनाला कांहीं अनुभव घडेल, तर आपण तद्रूप व्हावें. ३१७ ह्मणजे मग जाणावयाची कांहीं अपेक्षा राहत नाहीं. ह्याकरितां **अर्जुना**! तें सोडून देऊं या. कारण, तेंच तेंच पुन्हा पुन्हा वायफळ किती सांगत बसावें? ३१८ ह्याप्रमाणेंच सर्व बोलणें लयास गेलें ह्मणजे संकल्पाचेंही आयुष्य संपतें. तेथें विचाराचा वारा सुद्धां शिरत नाहीं. ३१९ जें सहजस्थितीचें लावण्य; जें समाधिस्थितीचें तारुण्य; जें अनादि आणि अगण्य असें ब्रह्मस्वरूप, ३२० जें विश्वाचें मूळ; जें योगवृक्षाचें फळ; आणि आ-

१ मूळ ओवी खालची टीप पहावी. (पृ.१२७ टी. ९ वी.)

नंदाचा केवळ प्राण. ३२१ जें आकाराचा शेवट; जो मोक्षाचा एकांत; ज्या ठिकाणीं आदि व अंत हेही नाहींसे होऊन जातात; ३२२ जें महाभूतांचें मूळकारण; जें महातेजाचें तेज, अर्जुना! अशा प्रकारचें जें माझें निजस्वरूप, ३२३ तें, हें, नास्तिकांनीं भक्तांचा छळ केलेला पाहून मीं प्रगट केलें आहे. आणि त्याचीच ही चतुर्भुजाकृति व्यक्त झाल्यामुळें शोभा प्राप्त झाली आहे. ३२४ जे कोणी दृढ निश्चयानें शेवटपर्यंत योगाचा अभ्यास करतात, ते मग स्वतःच हें अनिर्वाच्य सुख बनतात. ३२५ हें आम्हीं सांगितलेलें साधन जे कोणी आपलें शरीर झिजवून करतात, ते शुद्ध होऊन आमच्या योग्यतेस पोंचतात. ३२६ देहाकृतीच्या मुशीमध्यें परब्रह्म रस ओतूनच त्यास घडविलें आहे अशी त्याची अंगकांति होते. ३२७ हा अनुभव जर हृदयांत येऊन चुकला, तर हें विश्वच परब्रह्मावांचून अन्य नाहीं असें ज्ञान प्राप्त होईल." तेव्हां अर्जुन ह्मणाला "महाराज! हें अगदीं खरें आहे. ३२८ कारण देवा! आपण आतां जो हा उपाय सांगितला, तो ब्रह्मप्राप्तीची जागा असल्यामुळें तसें घडतें. ३२९ ह्या अभ्यासामध्यें जे पारंगत होतात, ते निश्चयेंकरून ब्रह्मपदाप्रत पोंचतात, हें आपल्या सांगण्यावरून माझ्या लक्ष्यांत आलें. ३३० देवा! ही गोष्ट ऐकूनच जर चित्तामध्यें बोध होतो, तर अनुभव घेतल्यानें तद्रूपता कशी प्राप्त होणार नाहीं? ३३१ ह्मणून ह्यांत कांहीं मिथ्या नाहीं. परंतु क्षणभर मी एक विचारतों तिकडे लक्ष्य द्यावें. ३३२ कृष्णा! आतां तूं जो योग सांगितलास तो मनाला फार आवडला. परंतु माझ्या आंगीं योग्यता नसल्यामुळें तो माझ्या हातून घडणें कठीण आहे. ३३३ स्वभावतः माझ्या आंगीं जेवढें सामर्थ्य आहे, तितक्यानेंच जर तो सिद्धीस जाण्यासारखा असेल, तर त्या मार्गाला मी आनंदानें अनुसरेन. ३३४ किंवा देव जसें सांगतील त्याप्रमाणें अपणाकडून घडलें नाहीं, तर तितक्या योग्यतेशिवायच जें होण्यासारखें असेल, तेंच विचारतां येईल. ३३५ अशी इच्छा मनांत उद्भवल्यावरून विचारावयास कारण झालें." मग ह्मणाला, "तर आपण हिकडे लक्ष्य द्यावें. ३३६ अहो महाराज! आपण जें हें साधन सांगितलें, तें मीं श्रवण केलें. पण त्याचा पाहिजे त्यानें अभ्यास केल्यास त्यास तें साध्य होईल काय? ३३७ का त्या योग्यतेशिवाय व्हावयाचें नाहीं असें कांहीं आहे?" तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले "अर्जुना! हें काय विचारतोस? ३३८ अरे! हें तर प्रत्यक्ष मोक्षसाधनाचें काम आहे पण दुसरें कोणतें ही साधारण काम घेतलें, तर योग्यतेशिवाय तें तरी सिद्धीस जातें का? ३३९ योग्यता ह्मणून जी ह्मणतात, ती सिद्धीच्या आधीं कांहीं सांगतां येत नाहीं. कारण, योग्य होऊन जें काम आरंभावें तें फलद्रूप होतें. ३४० तर तशी तत्काल मिळणारी वस्तु कांहीं येथें नाहीं. शिवाय योग्यतेची ह्मणून एखादी खाण का कांहीं आहे? ३४१ क्षणेक विरक्त होऊन देहधर्मांतच गुरफटलेला असतो, तो व्यवस्थितही नव्हे व तो अधिकारासही पात्र नाहीं. ३४२ येवढ्या युक्तीनें तुला हवी तेवढी योग्यता प्राप्त होईल." ह्याप्रमाणें त्यावेळीं आलेला त्याचा संशय फेडला. ३४३ मग ह्मणाले "अव्यवस्थिताला मुळींच योग्यता नाहीं. इतकाच त्यांतला सरांश आहे." ३४४

नात्यश्नतस्तु योगोस्ति नचैकांतमनश्नतः ।
नचातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥

[ नात्यश्नतस्तु योगोऽस्ति ] जो रसनेंद्रियाचा अंकिला । [ न चातिस्वप्नशीलस्य ] कां निद्रेसि जीवें विकला । तो नाहीं एथ ह्मणितला । अधिकारिया ॥ ४५ ॥ अथवा आग्रहाचिये वांदोडी । क्षुधा तृषा कोंडी । आहारातें तोडी । माल्हनियां ॥ ४६ ॥ [ जाग्रतो नैव चार्जुन ] निद्रेचिया वाटा न वचे । ऐसा हटिवेचेनि अवतरणें नाचे । तें शरीरचि नव्हे तयाचें । मग योग कवणाचा ॥ ४७ ॥ ह्मणोनि अतिशयें विषय सेवावा । ऐसा बोध नोहावा । कां सर्वथा निरोधावा । हेंही नको ॥ ४८ ॥

१ जिव्हेचा. २ अंकित झाला. ३ सर्वथैव. ४ बंधन. ५ हटतेच्या. ६ आगमनानें.

"जो जिव्हेचा अंकित झाला; किंवा निद्रेला ो सर्वथैव वश झाला; त्याला ह्याचा अधिकारी असें ह्मणत नाहींत. ३४५ अथवा आग्राच्या बंधनानें क्षुधा व तृषा ह्यांचा मुद्दाम कोंमारा करतात, ३४६ किंवा झोंपेचें मुळीं नांवच ोडून आपल्या आंगांत मोठा सोशिकपणा ाला ह्मणून जे नाचणारे आहेत, तें शरीर सुद्धां ांचें नव्हे, मग योग कोणाचा ? ३४७ ह्मणून ापय सेवन करणें तेंही अतिशय करूं नयेत; ंवा त्यांचा सर्वथैव त्यागही करूं नये. ३४८

युक्तहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥१७॥

[ युक्ताहारविहारस्य ] आहार तरी सेविजे । परि युक्तीनि मापें मविजे । [युक्तचेष्टस्य कर्मसु] क्रियाजात आचजे । तयाचि स्थिती ॥ ४९ ॥ मापितला बोलें बोलिजे । तलियां पाउलीं चालिजे । [ युक्तस्वप्नावबोधस्य ] निद्रेही न दीजे । अवसरें एकें ॥ ३५० ॥ जागणें जरी जाहालें । री व्हावें तें मितलें । येतुलेनि धातुसाम्य संचलें । सेल सुख ॥ ५१ ॥ [ योगो भवति दुःखहा ] ऐसें युक्तीनि हातें । जैं इंद्रियां वोपिजे भातें । तैं संतोषासि वाढतें । नचि करी ॥ ५२ ॥

"आहार तर सेवन करावा; पण तो सयुक्त आणि मोजका असावा. सर्व कर्मेंही त्या रीतीनें आचरण करावींत. ३४९ मोजके शब्द लावेत; मोजक्या पावलांनीं चालावें; प्रसंानुसार झोंपेलाही मान देत जावा. ३५० ागावयाचें झालें तरी तें प्रमाणांत असावें. सें केल्यानें शरीरांतील धातु सम राहून सुख ईल. ३५१ अशा युक्तीच्या मार्गानें जेव्हां इंद्रियांना खाद्य द्यावें, तेव्हां मनच संतोषाची द्धि करतें." ३५२

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा १८

[ यदा विनियतं चित्तं ] बाहेर युक्तीची मुद्रा पडे । तंव त आंत सुख वाढे । तेथें सहजेंचि योग घडे । नाभ्याां ॥ ५३ ॥ [ निःस्पृहः सर्वकामेभ्यो ] जैसें भाग्याचिये भडसे । उद्यमाचेनि मिषें । मग समृद्धिजात आपैसें । घर रिघे ॥ ५४ ॥ [ मात्मन्येवावतिष्ठते ] तैसा युक्तिमंत कौतुकें । अभ्यासाचिया मोहरा ठाके । आणि आत्मसिद्धीचि पिके । अनुभव तयाचा ॥ ५५ ॥ [ युक्त इत्युच्यते तदा ] ह्मणोनि युक्ति हे पांडवा । घडे जया सदैवा । तो अपवर्गीचिये रांणिवा । अळंकरिजे ॥ ५६ ॥

"बाहेर युक्तीचा आकार दिसूं लागला कीं, आंत सुख वाढतच जातें. आणि मग अभ्यास केल्यावांचून आपोआपच योग घडतो. ३५३ भाग्यानें उचल खाल्ली ह्मणजे उद्योगाचें निमित्त होतें; आणि मग सर्व प्रकारची संपत्ति आपोआप घरांत चालत येते. ३५४ त्याप्रमाणें युक्तिवान् आहे तो अभ्यासाच्या पुढें उभा राहतो, आणि त्याच्या अनुभवाला आत्मसिद्धि येते. ३५५ ह्मणून अर्जुना ! ही युक्ति ज्यास घडते तो महद्भाग्यवान् होय. व तोच मोक्षाच्या राज्यास भूषण भूत होतो." ३५६

यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता ।
योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥१९॥

[ योगिन इति ] युक्ति योगाचें आंग पावे । ऐसें प्रयाग जेथ होय बरवें । तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावे । मानस जयाचें ॥ ५७ ॥ [ यथेति ] तयातें योगयुक्त तूं ह्मण । हें ही प्रसंगें जाण । तें दीपाचें उपलेक्षण । निर्वातींचिया ॥ ५८ ॥ आतां तुझें मनोगत जाणोनी । कांहीं एक आह्मीं ह्मणोनी । तें निकें चित्त देउनी । परिसावें गा ॥ ५९ ॥ तूं प्राप्तीची चाड वाहसी । परि अभ्यासीं दक्ष न होसी । तें सांगपां काय बिहेसी । दुवाडपणें ॥ ३६० ॥ तरि पार्था हें झणें । सायास घेशी हो मनें । वायां बागूल इयें दुर्जनें । इंद्रियें करिती ६१ पाहें पां आयुष्यातें अढळ करी । जें सरतें जीवित वारी । तया औषधातें वैरी । काय जिव्हा न ह्मणे ॥ ६२ ॥ ऐसे हितासि जें जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुखे । येऱ्हवीं सोपें योगासारिखें । कांहीं आहे ॥ ६३ ॥

"युक्तीसच योगाचें स्वरूप येऊन असें जेव्हां प्रयागासारखें उत्तम क्षेत्र बनतें, आणि

१ भोजाचा. २ मोजका, नियमित. ३ शब्द. ४ मोा. ५ शरीरांतील सप्तधातूंची समतोलता. ६ द्यावें. ाय. ८ कांति, चर्या.

१ पूरानें. २ समोर. ३ भाग्यवंताला. ४ मोक्षाच्या. ५ राज्याला. ६ भूषणभूत होतो. ७ संगम, ऐक्य. ८ क्षेत्रांतून-देहांतून बाहेर जाणें नाहीं, अशा निश्चयेंकरून. ९ उपमा, दृष्टांत. १० सांगतों. ११ इच्छा. १२ प्रवीण. १३ भितोस काय ? १४ दुर्घट आहे ह्मणून. १५ कदाचित्. १६ नाशवंत. १७ चांगलें, हितकर. १८ काय.

त्या क्षेत्रांतून आमरण हालूं नये असा ज्याच्या मनाचा दृढ निश्चय होतो, ३५७ त्याला तूं योगयुक्त असें ह्मण. आणि निर्वातस्थळीं ठेवलेल्या दीपाच्या सादृश्यानें त्याचीं लक्षणेंही प्रसंगानुसार ध्यानांत घे. ३५८ आतां तुझ्या मनांतील उद्देश मनांत आणून आह्मी तुला कांहीं एक सांगणार आहों, तेंही तूं लक्ष्य देऊन ऐक. ३५९ तूं योगप्राप्तीची इच्छा करतोस; पण अभ्यास करावयाला तयार होत नाहींस. तर काय त्याच्या दुर्घटपणाला भितोस होय? ३६० अर्जुना! अशी जर तुझ्या मनाला धास्ती वाटत असेल, तर ती सोडून दे. कारण, हीं इंद्रियें महादुष्ट आहेत. तीं व्यर्थ हा बागुलबावा करून दाखवितात. ३६१ हें पहा! आयुष्याची वृद्धि करणारें, निघालेल्या प्राणास थांबवून धरणारें असें औषध असलें, तरी त्याला ही जिव्हा शत्रुसारखें मानित नाहीं कां? ३६२ मानलें. तसें हिताला जें जें चांगलें असतें, तें इंद्रियांना नेहेमीं दुःखदायक वाटावयाचेंच. बाकी खरें पाहिलें तर योगासारखें दुसरें काय बरें आहे?" ३६३

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति २०
सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः २१

[ निरुद्धं योगसेवया ] ह्मणोनि आसनाचिया गाढिकां[1] । जो आह्मी अभ्यास सांगीतला निका । तेणें होईल तरी होकां । निरोधें[2] ययां ॥ ६४ ॥ [ यत्रोपरमते चित्तं ] येन्हवीं तरी येणे योगें । जैं इंद्रियां विंदाण[3] लागे । तैं चित्त भेटों रिगे । आपणपेयां ॥ ६५ ॥ [ यत्र चैवात्मना त्मानं पश्यन्नात्मनि ] परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियातें आपण देखे । देखतां[4] खेंवो वोळखे । ह्मणे तत्त्व हें मी ॥ ६६ ॥ [ तुष्यति ] तिये वोळखीचि सरिसें । सुखाचिया साम्राज्यीं बैसे । [ सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यं ] मग आपण पां समरसें[5] । विरोनि[6] जाय ॥६७॥ [वेत्ति यत्र न चैवायं] जयापरतें आणिक नाहीं । [ अतींद्रियं ] जयातें इंद्रियें नेणती कहीं[7] । [ स्थितश्चलति तत्त्वतः ] तें आपणचि आपुलयाठायीं । होऊनि ठाके ॥६८॥

१ दृढपणानें. २ अटक. ३ निग्रह. ४ पहातांच. ५ साम्यतेनें. ६ लय पावतें. ७ कधीं.

"ह्मणून आह्मी जो आसनाचा उत्तम अभ्यास सांगितला, त्याच्याच दृढतेनें ह्या इंद्रियांना कांहीं अटक झाली तर झाली. ३६४ शिवाय ह्या योगानें इंद्रियांना जेव्हां निग्रह प्राप्त होतो, तेव्हां चित्तास आपोआपच ब्रह्म दिसूं लागतें. ३६५ तें सर्व विषयावरून मुरडून आपलें आत्मस्वरूप आपणच पाहूं लागतें. आणि तें पाहतां पाहतां स्वस्वरूपाची त्यास तत्काल ओळख पटून तें परब्रह्म तें मीच आहें असें ह्मणू लागतें. ३६६ अशी ओळख पटली कीं तत्काल सुखाच्या साम्राज्यावर बसून आपल्याच ब्रह्मानंदांत निमग्न होऊन जातें. ३६७ ज्याच्याहून अधिक श्रेष्ठ असें कांहीं नाहीं, ज्यांना इंद्रियें कधींच जाणत नाहींत, असें जें ब्रह्मस्वरूप तें तें आपल्यामध्येंच होऊन राहतें." ३६८

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते २२

[ यमिति ] मग मेरूपासूनि[1] थोरें । देहदुःखाचेनि डोंगरें । दाटिजो पां परी भारें । चित्त न दाटे ॥६९॥ कां शस्त्रें वरी तोडिलिया । देह अग्नीमाजि पडलिया । चित्त महासुखीं पहुडलिया । चेवोनेये[2]॥ ३७० ॥ [ यस्मिन्निति ] ऐसें आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वास[3] न पाहे । आणिकचि सुख होऊनि जाये । ह्मणूनि विसरे ॥ ७१ ॥

"असें झालें ह्मणजे मेरूपेक्षांही थोर, असे देहदुःखाचे डोंगर त्याच्यावर कोसळले, तरी त्याच्या भारानें चित्त कधींही दडपलें जात नाहीं. ३६९ किंवा शस्त्रानें त्याच्यावर जरी घाव घातले; देह अग्नींत पडला; तरी त्याचें चित्त महत्सुखांत जें निजलेलें असतें, तें जागें सुद्धां होत नाहीं. ३७० अशा प्रकारें मन आत्मसुखांत निमग्न झालें ह्मणजे मग तें देहाकडे मुळींच लक्ष्य ठेवीत नाहीं. सुखाची विपुलता झाल्यानें त्याचा त्याला विसरच पडून जातो." ३७१

तं विद्याद्दुःखसंयोगं वियोगं योगसंज्ञितम् ।
स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्णचेतसा २३

[ तं विद्यादिति ] जया सुखाचिया गोडी । मन आर्तीची[4]

१ मेरूपेक्षां. २ जागें होत नाहीं. ३ वाट. ४ इच्छेची.

चिं सोडी । संसाराचिया तोंडीं । गुंतलें जें ॥ ७२ ॥ जें
गाची बरव । संतोषाची राणिव । ज्ञानाची जाणिव । ज-
लागीं ॥ ७३ ॥ [ स निश्चयेनेति ] तें अभ्यासिलेनि योगें ।
वयव देखावें लागे । देखिलें तरी आंगें । होइजेल गा ७४

"त्या सुखाच्या गोडीनें मन इच्छेची आ-
वणच सोडून देतें. आणि संसाराचा गुंता
ाडून टाकतें. ३७२ जें योगाचा अलंकार; सं-
ाषाचें राज्य; आणि ज्याच्यासाठीं ज्ञानाची
ावश्यकता; ३७३ तें परब्रह्म अभ्यासाच्या यो
ानें मूर्तिमंत दृष्टीस पडतें. आणि तें दृष्टीस
डलें ह्मणजे आपण स्वतःच तद्रूप बनतें." ३७४

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।
मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥

[ संकल्पप्रभवानिति ] तरि तोचि योग बापा । एके परी
हे सोपा । जरी पुत्रशोक संकल्पा । दाखवीजे ॥ ७५ ॥
मनसैवेति ] हा विषयांतें निमालियें आइके । इंद्रियें नेमा-
या धारणीं देखे । तरि हियें घालूनि मुके । जीवित्वासि
७६ ॥ ऐसें वैराग्य हें करी । तरि संकल्पाची सरे वोरी ।
ं धृतीचिया धवळारीं । बुद्धि नांदे ॥ ७७ ॥

"बाबा! असें आहे तरी सुद्धां हा योग
ा रीतीनें सोपाच आहे. ती रीती कोणती
गशील तर, संकल्पाचे पुत्र–जे काम क्रोधादि
षय–त्यांचा संहार करून त्यास पुत्रशोक दा-
वेणें ही. ३७५ विषयांचा संहार झाला ह्मणजे
संकल्प आपोआप ताळ्यावर येईल, आणि
द्रयें नियमानें राहूं लागलीं ह्मणजे मग तर
छाती फुटून मरेल. ३७६ अशा प्रकारें वै-
ग्य संपादन कर, ह्मणजे संकल्पाची यात्रा
ाल आणि बुद्धिही धैर्याच्या रंगमहालांत
नंदानें राहूं लागेल." ३७७

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् २५

१ आठवणच. २ शोभा. ३ राज्य. ४ ज्ञातेपणा. ५ अभ्या-
या. ६ मूर्तिमंत. ७ स्वतः, जातीनें. ८ संकल्पाचे
, ह्मणजे कामक्रोध, त्यांचा नाश केला ह्मणजे त्यास शोक
ल असा भाव. ९ संकल्प. १० लय पावला असतां.
स्थितींत. १२ हृदय. १३ यात्रा, फेरी. १४ धैर्याच्या.
महालांत.

यतो यतो निश्चलति मनश्चंचलमस्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

[ बुद्ध्या धृतिगृहीतया ] बुद्धि धैर्या होय वसौटा । तरि
मनातें अनुभवाचिया वाटा । [ शनैरिति ] हळुहळु आणूनि
करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ॥ ७८ ॥ याहि एके परी । प्राप्ति
आहे विचारीं । हें न ठके तरी सोपारी । आणीक ऐकें
॥ ७९ ॥ [ आत्मसंस्थमिति ] आतां नियमचि हा एकला ।
जीवें करावा आपुला । जैसा कृतनिश्चयाचिया बोला । बा-
हेरा नोहे ॥ ८० ॥ जरी येतुलेनि चित्त स्थिरावे । तरी
काजीं आलें स्वभावें । नाहीं तरी घालावें । मोकळुनी ॥८१॥
मग मोकलिलें जेथ जाइल । तेथूनि नियमूचि घेऊनि येइल ।
ऐसेनि स्थैर्यचि होइल । सावियांचि कीं ॥ ८२ ॥

"बुद्धीला धैर्याचा आश्रय मिळाला ह्मणजे
ती मनाला अनुभवाच्या वाटेनें हळू हळू आ-
णून आत्मस्वरूपरूपी मंदिरांत स्थापन करते.
३७८ अशी ही एका रीतीनें आत्मानुभावाची
प्राप्ती होण्यासारखी आहे. ह्याचा विचार कर.
हेंही घडत नसेल तर, आणखीही एक सोपी
युक्ति आहे ती ऐकून ठेव. ३७९ ती युक्ति ही
कीं, केलेल्या निश्चयाचा शब्द फिरणार नाहीं
अशा रीतीचा मनोभावें दृढनिश्चयच करून र-
हावें. ३८० येवढ्यानें चित्त स्थीर झालें, तर
कामच झालें. नाहीं तर त्याला जिकडे जाईल
तिकडे जाऊं द्यावें. ३८१ आणि तें सुटल्यावर
जेथें जाईल, तेथून त्याचा निग्रह करून परत
आणावें; ह्मणजे आपोआप स्थीर होईल."३८२

प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥

[ उपैति शांतरजसमिति ] पाठीं केतुलेनि एके वेळे ।
तया स्थैर्याचेनि मेळें । आत्मस्वरूपा जवळें । येईल सहजें
॥ ८३ ॥ तयातें देखोनि आंगीं घडेल । तेथ अद्वैतीं द्वैत
बुडेल । आणि ऐक्यतेजें उघडेल । त्रैलोक्य हें ॥ ८४ ॥
आकाशीं दिसे दुसरें । तें अभ्र जैं विरे । तैं गगनचि कां
भरे । विश्व जैसें ॥ ८५ ॥ [ प्रशांतेति ] तैसें चित्त लया
जाये । आणि चैतन्यचि आघवें होये । ऐसी प्राप्ति सुखोपायें ।
आहे येणें ॥ ८६ ॥

१ आश्रय. २ स्थापना. ३ आत्मस्वरूपांत. ४ हें घडत
नसल्यास. ५ सुलभ असें. ६ मनापासून. ७ उपयोगाला,
कामाला. ८ सोडून. ९ सोडलेलें. १० सहजच. ११ कितीएक
वेळां. १२ स्थीर झाल्याच्या योगानें. १३ स्वतः. १४ ब्रह्म.

"त्या स्थैर्याच्या योगानें तें आपोआप किती तरी वेळां पाठीमागें आत्मस्वरूपाजवळ येईल. ३८३ आणि त्याला पाहिलें म्हणजे तें तद्रूप बनेल. आणि मग तेथें द्वैत आहे तें अद्वैतामध्यें लय पावून हें त्रैलोक्य तेजःपुंज दिसूं लागेल. ३८४ ज्याप्रमाणें आकाशांत दिसणारें दुसरें अभ्र वितळून गेलें म्हणजे पूर्वीच्या गगनानेंच विश्व भरून जातें, ३८५ त्याप्रमाणें चित्त लयास गेलें म्हणजे सारें परब्रह्मच होऊन राहतें. असा हाही एक सुलभोपायानें लाभ होण्यासारखा आहे." ३८६

युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥

[ युंजन्निति ] या सोपिया योगस्थिती । उकल देखिला गा वहुतीं । संकल्पाचिया संपत्ती । रुसोनियां ॥ ८७ ॥ ते सुखाचेनि सांगातें । आले परब्रह्मा आंतौते । तेथ लवण जैसें जळातें । सांडूं नेणें ॥ ८८ ॥ [ अत्यंतं सुखमश्नुते ] तैसें होय तिये मेळीं । मग सामरस्याचिया राउळीं । महासुखाची दिवाळी । जगेंसि दिसे ॥ ८९ ॥ ऐसें आपले पायावरी । चालिजे आपुले पाठीवरी । हें पार्था नोगवे तरी । आन ऐकें ३९०

"संकल्पाच्या संपत्तीवर रुसून या सोप्या योगस्थितीचा अनुभव पुष्कळांनीं पाहिला, ३८७ आणि ते सुखासहवर्तमान परब्रह्मामध्यें ही येऊन पोचले. तेथें मीठ ज्याप्रमाणें पाण्याला बाहेर सोडूं शकत नाहीं, ३८८ त्याप्रमाणें त्यांची एकरूपता होते. आणि मग ब्रह्मानंदाच्या मंदिरांत महत्सुखाचा उत्साह जगताला दिसूं लागतो. ३८९ ह्याप्रमाणें आपल्याच पायानें उलटें चालावें लागतें. अर्जुना! हेंही घडत नसेल तर, दुसरें ऐक." ३९०

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥
यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ३०

[ सर्वभूतस्थमिति ] तरि मी तंव सकळ देहीं । असें एथ

१ सोप्या. २ आंत. ३ ब्रह्मानंदाच्या. ४ मंदिरांत. ५ उत्सव. ६ जगाला. ७ पायांनीं. ८ पाठीमागें, उलटें. ९ घडत नसेल. १० दुसरें.

विचार नाहीं । आणि तैसेंचि माझ्याठायीं । सकळ असे ॥ ९१ ॥ हें ऐसेंचि संचलें । [ ईक्षते ] परस्परें मिसळलें । बुद्धी घेपे ऐतुलें । होआवें गा ॥ ९२ ॥ [ योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ] येऱ्हवीं तरी अर्जुना । जो एकवटलिया भावना । सर्व भूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ ९३ ॥ भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें । केवळ एक तत्त्वचि माझें जाणे । सर्वत्र जो ॥ ९४ ॥ [ तस्याहमिति ] मग तो एक हा मियां । बोलतां दिसतसे वायां । येऱ्हवीं न बोलिजे तरि धनंजया । तो मीचि आहें ॥ ९५ ॥ [ यो मां पश्यतीति ] दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडु जैसा । तो माझ्या ठायीं तैसा । मी तयामजी ॥ ९६ ॥ जैसा उदकाचेनि आयुष्यें रस । कां गगनाचेनि मानें अवकाश । तैसा माझेनि रूपें रूपसें । पुरुष तो गा ॥ ९७ ॥

"मी सकल देहामध्यें आहें, ह्यांत तर शंका नाहीं. आणि तसेंच सर्व जगही माझ्यामध्यें आहे. ३९१ हें असेंच होऊन परस्परांत एकरूप झालें आहे हें बुद्धि ग्रहण करील असें व्हावें. ३९२ बाकी अर्जुना! ज्याच्या भावना एक होऊन सर्व प्राणिमात्राच्या ठिकाणीं अभिन्नता प्राप्त झाल्यामुळें जो मला भजतो, ३९३ प्राण्यांच्या भिन्नभिन्नपणानें, अंतःकरणें किंवा आत्मे कांहीं अनेक होत नाहींत. सर्वत्र केवळ माझें एकत्वच भरलेलें आहे असें जो जाणतो, ३९४ तो व मी मग निराळे आहोंत, हें बोलणें व्यर्थ होय. बाकी अर्जुना! बोललें नाहीं तर तो आणि मी एकच आहोंत. ३९५ दिव्याची आणि प्रकाशाची जशी एकाकारता आहे, तसा तो माझ्यामध्यें व मी त्याच्यामध्यें आहें. ३९६ उदकाच्या आयुष्यावर जसा रस अवलंबून असतो, किंवा गगनाच्या मानानें अवकाश असतो, त्याप्रमाणें माझ्या स्वरूपानेंच त्या पुरुषाचा आकार बनलेला असतो." ३९७

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।
सर्वथा वर्तमानोपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

[ सर्वभूतस्थितमिति ] जेणें ऐक्याचिये दिठी । सर्वत्र मातेंचि किरीटी । देखिला जैसा पटीं । तंतु एक ॥ ९८ ॥ कां स्वरूपें तरी बहुतें आहाती । परि तैसीं सोनीं बहुवें न

१ घेईल. २ येवढें. ३ व्हावें. ४ एक भावानें. ५ मीं. ६ एकाकाराचा. ७ योग्यता. ८ रूपवान्.

ाती । ऐसी ऐक्याचळाची स्थिती । केली जेणें ॥ ९९ ॥ नारी वृक्षांचीं पानें जेतुलीं । तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं । सी अद्वैतदिवसें पाहली । रात्री जया ॥ ४०० ॥ [ सर्वथाते ] तो पंचात्मकीं सांपडे । तरी मग सांग पां कैसेनि अडे । प्रतीतीचेनि पाडें । मजसीं तुके ॥ १ ॥ माझें व्यापकपण ाघवें । गवसलें तयाचेनि अनुभवें । तरी न ह्मणतां स्वभावें । ापक जाहाला ॥ २ ॥ आतां शरीरीं तरीं आहे । परि शराचा तो नोहे । ऐसें बोल वैरी होये । तें करूं ये ॥ ३ ॥

**"अर्जुना! ज्याप्रमाणें साऱ्या वस्त्रामध्यें ्त किंवा धागा एकच असतो, त्याप्रमाणें स-त्र ठिकाणीं व्यापक असा मीच एक आहे सें ऐक्य दृष्टीनें पाहिलें, ३९८ किंवा नानाप्र-ारचे अलंकार केलेले दृष्टीस पडतात, परंतु ातकीं निरनिराळीं कांहीं सोनीं असत ना-ीत; अशा प्रकारची ऐक्यरूप पर्वतासारखी ्यानें स्थिति केली, ३९९ किंवा वृक्षांचीं जि-कीं पानें असतात, तितकीं कांहीं रोपें लाव-लीं नसतात; अशी ज्याची रात्र अद्वैत दिव-ानें-अभेद्भावानें-उजाडली, ४०० तो पंचभूता-मक देहांत असला तरी त्याचें कशानें अडणार? ो अनुभवानें माझ्याच योग्यतेला पोंचतो. ०१ माझें व्यापकपण अनुभवानें त्याला प्राप्त ालेलें असतें. मग त्याला कोणी सर्वव्यापक टलें नाहीं, तरी तो आपोआपच सर्वव्यापक ोऊन राहिलेला असतो. ४०२ आतां तो देह ारण करून असतो तरी, त्या शरीराचा व ाचा कांहीं संबंध नाहीं. जी गोष्ट शब्दाच्या ातीत-बाहेरची-आहे, ती सांगतां येईल ाय?" ४०३**

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ३२

[ आत्मौपम्येन सर्वत्र ] ह्मणोनि असो तें विशेषें । अ-वा आपणपेंया सारिखें । जो चराचर देखे । अखंडित ॥४॥ सुखं वा यदि वा दुःखं ] सुखदुःखादि वर्में । कां शुभाशुभें र्में । दोनी ऐसीं मनोधर्में । नेणेचि जो ॥ ५ ॥ हे समविषम ाव । आणिकही विचित्र जें सर्व । तें मानी जैसे अवयव । ापुले होती ॥ ६ ॥ [ समं पश्यति योर्जुन ] हें एकैक काय सांगावें । जया त्रैलोक्यचि आघवें । मी ऐसें स्वभावें । बोधा आलें ॥ ७ ॥ [ स योगी परमो मतः ] तयाही देह एक कीरे आथी । लौकिकीं सुखदुःखी तयातें ह्मणती । परि आह्मांतें ऐसी प्रतीती । परब्रह्मचि हा ॥ ८ ॥ ह्मणोनि आपणपां विश्व देखिजे । आणि आपण विश्व होइजे । ऐसें साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ॥ ९ ॥ हें तूतें बहुतीं प्रसंगीं । आह्मी ह्मणों याचिलागीं । जे साम्या परौती जगीं । प्राप्ति नाहीं ॥ ४१० ॥

**"ह्मणून तें असो. जो आपणाहून अधिक किंवा आपल्या बरोबरीनें चराचरांना पाहतो, ४०४ सुखदुःखादि वर्में; किंवा शुभाशुभ कर्में; हीं दोन असें मनानेंही ज्यास माहीत नाहीं; ४०५ हे सम किंवा विषम भाव; किंवा आणखी जें जें ह्मणून कांहीं चमत्कारिक असेल तें, आपलेच अवयव असल्याप्रमाणें मानतो. ४०६ हें सारें त्रैलोक्यच मी, असा ज्याच्या मनाला स्वभावगत्याच अनुभव येऊन चुकला, त्याच्याबद्दल एक एक निराळें तें काय सांगावयाचें आहे? ४०७ त्यालाही एक देह असतो; व्यवहारांत देखील लोक त्याला सुखी व दुःखी ह्मणतात हें खरें; तथापि आमच्या अनुभवानें तो केवळ परब्रह्मच आहे. ४०८ ह्याकरितां अर्जुना! आपणच विश्व असें मानतां येईल, आणि त्याप्रमाणें स्वतः विश्वरूप होतां येईल, अशी एक समदृष्टीच ठेवण्याचा अभ्यास करावा. ४०९ याकरितांच तुला आह्मी वारंवार सांगतों कीं, समदृष्टीहून श्रेष्ठ असा जगामध्यें दुसरा कांहीं लाभ नाहीं." ४१०**

अर्जुन उवाच–

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।
एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात् स्थितिं स्थिराम् ॥
चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ३४

[ अर्जुन उवाच–योऽयं योगस्त्वया प्रोक्तः ] तंव अर्जुन ह्मणे देवा । तुह्मी सांगा कीरे आमुचा कणवा । [ एतस्याहं न पश्यामि ] परि न पुरो जी स्वभावा । मनाचिया ॥ ११ ॥ हें मन कैसें केवढें । ऐसें पाहों ह्मणों तरी न सांपडे । [ चंच-

१ ऐक्यरूपपर्वताची. २ उजेडली. ३ पंचभूतात्मक शरी-त. ४ अनुभवाच्या. ५ योग्यतेनें. ६ शब्दाच्या अतीत. अधिक. ८ आपल्या.

१ अनुभवास आलें, ज्ञान झालें. २ खचित. ३ आहे. ४ आपल्यासारखें. ५ समदृष्टी. ६ पेक्षां अधिक. ७ लाभ. ८ सांगत आहां. ९ खरोखर. १० कळकळीनें.

ल्त्वात्स्थितिं स्थिरां ] येन्हवीं राहाटा[1]वया थोडें । त्रैलोक्य यया ॥ १२ ॥ [ चंचलं हि मनः कृष्ण ] ह्मणोनि ऐसें कैसें घडेल । जें मर्कट समाधी येइल । [ वायोरिव सुदुष्करं ] कां राहों ह्मणितलिया राहेलें । महावात ॥ १३ ॥ [ प्रमाथि ] जें बुद्धीतें सैं[4]ळी । [ बलवत् ] निश्चयातें टाळी । [ दृढ ] धैर्येंसीं हातफॅ[5]ळी । मिळऊनि जाय ॥ १४ ॥ जें विवेकातें भुलवी । संतोषासी चाडें[6] लावी । बैसिजे तरी हिंडवी । दाही दिशा ॥ १५ ॥ [ तस्याहं निग्रहं मन्ये ] जें निरोधलें घे उंवावो । जया संयमचि होय सावावो । तें मन आपुला स्वभावो । सांडील काई ॥ १६ ॥ ह्मणोनि मन एक निश्चळ राहेल । [ साम्येन मधुसूदन ] मग आह्मांसि साम्यं[10] होईल । हें [11]विशेषेंही न घडेल । याचिलागीं ॥ १७ ॥

**तेव्हां अर्जुन ह्मणाला "देवा! तुह्मी आह्मावर ममता करून सांगतां ही गोष्ट खरी आहे. पण महाराज, ह्या मनाच्या स्वभावापुढें कांहीं चालत नाहीं. ४११ हें मन कसें आणि केवढें आहे, ह्याचा विचार करूं लागलें तर, कांहीं कळत नाहीं, मति गुंग होते. आणि ह्याला कारभार करावयाला त्रैलोक्यसुद्धां थोडें होतें. ४१२ ह्मणून असें घडेल कसें? माकडाला समाधि लागेल, का झंझावाताला थांब ह्मटल्यानें तो थांबेल ? ४१३ जें बुद्धीला छळतें; निश्चयाला चुकवितें; धैर्याच्या हातावर हात मारून निघून जातें; ४१४ जें विचाराला भुरळ घालतें; संतोषाला चटक लावून सोडतें; बसलें तरी दाहीदिशा धुंडावयाला लावतें; ४१५ निरोध केला तर उसळी घेतें; इंद्रियनिग्रहच ज्याला सहाय होतो; तें मन, आपला स्वभाव सोडील काय ? ४१६ ह्मणून मन हें एक जागीं स्थिर होईल आणि मग आह्माला समदृष्टी प्राप्त होईल, हें कधींहीं घडणार नाहीं." ४१७**

श्रीभगवानुवाच–

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।

अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥३५॥

[ श्रीभगवानुवाच–असंशयमिति ] तंव श्रीकृष्ण ह्मणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि । यया मनाचा कीर[12] चपळचि । स्वभावो गा ॥ १८ ॥ [ अभ्यासेनेति ] परि वैराग्याचेनि आधारें । जरि लाविलें अभ्यासाचिये मोहरें । तरि केतुलेनि एके अवसरें । स्थिरावेल ॥ १९ ॥ कां जें यया मनाचें एक [4]निकें । जे देखिले गोडीचिया ठाया [5]सोके । ह्मणोनि अनुभवसुखाचीं कवतिकें[6] । दावीत जाइजे ॥ ४२० ॥

**तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले "खरें आहे. तूं ह्मणतोस तसेंच आहे. ह्या मनाचा स्वभाव खरोखरच तसा चपळ आहे. ४१८ परंतु वैराग्याच्या आधारानें त्यास जर अभ्यासाच्या मार्गास लावलें, तर कांहीं अवकाशानें तेंही स्थीर होईल. ४१९ कारण, मनाचा एक गुण चांगला आहे. कीं तें जेथें गोडी लागेल तेथें अगदीं चिकटून राहतें. ह्मणून आपणही त्याला अनुभवाचेच चमत्कार दाखवीत जावें."४२०**

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।

वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ३६

[ असंयतात्मनेति ] येन्हवीं विरक्ति जयांसि नाहीं । जे अभ्यासीं नरिघती कंहीं । तयां [8]नाकळे हें आह्मीही । नेमनूं[9] काई ॥ २१ ॥ परि यमनियमां[10]चिया वाटा न वचिजे । [11]कंहीं वैराग्याची [12]से न करिजे । केवळ विषयजळीं [13]टाकिजे । बुडी देउनी ॥ २२ ॥ यया जालियाँ[14] मानसा कहीं । युक्तीची [15]कोंबी लागली नाहीं । तरी निश्चळ होईल काई । कैसेनि सांगें ॥ २३ ॥ ह्मणोनि मनाचा निग्रह होये । ऐसा उपाय जो आहे । तो [16]आरंभीं मग नोहे । कैसा पाहों ॥ २४ ॥ [वश्यात्मनेति] तरी योगसाधन जितुकें । तें अवघेंचि काय लटिकें । परि आपणपयां अभ्यासें न [17]टंके । हेंचि ह्मणों ॥ २५ ॥ आंगीं योगाचें होय बळ । तरि मन केतुलें चपळ । काय महदादि[18] हें सकळ । [19]आपु नोहे ॥ २६ ॥ तेथ अर्जुन ह्मणे निकें[20] । देवो बोलती तें न चुके । साचेंचि योगबळें[21]सीं न [22]तुके । मनोबळ ॥ २७ ॥ तरि तोचि योग कैसा केविं जाणों । आह्मी येतुले दिवस याची मां[23]तु ही नेणों । ह्मणोनि मनातें जी ह्मणों[24] । अनावर ॥ २८ ॥ हा आतां आघवेयां[25] जन्मा । तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा । योग परिचय आह्मा । जाहाला आजी ॥ २९ ॥

---

१ फिरावयाला. २ थांब. ३ थांबेल काय ? ४ छळी. ५ हातोहात, हातावर हात देऊन. ६ चटक, नाद. ७ उसाळी. ८ निग्रहच. ९ सहाय. १० समदृष्टी. ११ कधींही. १२ खरोखर.

१ रस्त्याला. २ कांहीं. ३ कालानें. ४ चांगलें आहे. ५ आसक्त होते. ६ चमत्कार. ७ कधीं. ८ आवरत नाहीं. ९ मान्य न करूं ? १० मनोनिग्रहाच्या. ११ कधीं. १२ आठवण. १३ रहावें. १४ जन्मास आल्यापासून. १५ काठी. १६ आरंभ कर. १७ होत नाहीं. १८ मूळमायादि. १९ प्राप्त. २० उत्तम. २१ योगसामर्थ्यासीं. २२ सदृश नाहीं, बरोबरी होत नाहीं. २३ वार्ताही. २४ ह्मणतों. २५ सान्या.

" बाकी, ज्यांना विरक्ति नाहीं; जे अभ्या-
ग्रामध्यें कधीं शिरतच नाहींत; त्यांना हें मन
आवरणार नाहीं ही गोष्ट आह्मी नाहीं का मान्य
करणार? ४२१ तसेंच जे इंद्रियनिग्रहाच्या वाटेस
जात नाहींत; वैराग्याची कधीं आठवणसुद्धां क-
रीत नाहींत; जे केवळ विषयजळांतच बुडी देऊन
असतात; ४२२ ज्यांच्या मनाला जन्मामध्यें
युक्ताची काठी कधीं मिळतच नाहीं; तर त्यांचें
मन स्थीर कशानें होणार? सांग बरें. ४२३ ह्मणून
मनाचा निग्रह होईल असा जो उपाय, तो तूं क-
रावयास आरंभ कर. मग चित्त कसें स्थीर होत
नाहीं पाहूं या. ४२४ तर योगसाधन जितकें
आहे, तितकें सारें खोटेंच का? 'पण आपल्याला
अभ्यास होत नाहीं' असें ह्मण. ४२५ आंगांत यो-
गाचें जर सामर्थ्य उत्पन्न झालें, तर मूळमाया-
देक सुद्धां आपल्या मुठींत येणार नाहींत काय?
मग मन मन तें कितीसें चपळ?" ४२६ तेव्हां
अर्जुन ह्मणाला "देवा! आपण बोलतां तें
सर्व खरें. त्यांत कांहीं चूक नाहीं. योगबलाच्या
बरोबरीला पाहूं गेलें तर मनोबल टिकावयाचें
नाहीं, हें तर खरेंच. ४२७ पण तो योग आहे
कसा? आणि आह्मीं जाणावा कसा? इतके
दिवसपर्यंत आह्मीं त्याची वार्तासुद्धां ऐकलेली
नाहीं. ह्मणून महाराज, मीं मनाला अनावर असें
म्हटलें. ४२८ आतां **पुरुषोत्तमा!** तुझ्या
प्रसादानें साऱ्या जन्मांत आजच आह्मास हा
योगाचा परिचय झाला." ४२९

अर्जुन उवाच—

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ।
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ३७
कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥३८॥
एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।
त्वदन्यः संशयस्यास्य च्छेत्ता न ह्युपपद्यते ॥३९॥

[ अर्जुन उवाच–एतन्मे संशयं कृष्णेति ] परि आणीक
क गोसांविया । मज संशय असे सांविया । [ त्वदन्य इति]
तुजवांचूनि फेडावया । समर्थ नाहीं ॥ ४३० ॥ [ अय-
तिरिति ] ह्मणोनि सांगें श्रीगोविंदा । कवण एक मोक्षपदा ।
झोंबत होता श्रद्धा । उपायेंविण ॥ ३१ ॥ [ विमूढो ब्रह्मणः
पथि ] इंद्रियग्रामोनि निगाला । आस्थेचिये वाटा लागला ।
आत्मसिद्धीचिया पुढिला । नगरा यावया ॥ ३२ ॥ [ अप्राप्य
योगसंसिद्धिं ] तंव आत्मसिद्धि न ठेकेचि । [ अप्रतिष्ठो महा-
बाहो ] आणि मागुतें न येववेचि । [ नश्यति ] ऐसा अस्तु
गेला माझारींचि । आयुष्यभानु ॥ ३३ ॥ [ छिन्नाभ्रमिवेति ]
जैसें अकाळीं आभाळ । अलुमाळ सपातळ । विपायें आलें के-
वळ । वसे ना वर्षे ॥ ३४ ॥ [ कच्चिन्नोभयविभ्रष्टः ] तैसीं दो-
न्हीं दुरावलीं । जे प्राप्ती तंव अलग ठेली । आणि अप्रा-
प्तिही सांडवली । श्रद्धा तया ॥ ३५ ॥ ऐसा दोहींलों अंत-
रला काजी । [ योगाच्चलितमानसः ] जो श्रद्धेच्या समाजीं ।
बुडाला तया होजी । कवण गति ॥ ३६ ॥

१ हे स्वामी, प्रभो! २ साहजिक. ३ तुझ्याशिवाय.

"परंतु स्वामी! मला आणखी एक सहज
संशय उत्पन्न झाला आहे. तो तुमच्यावांचून दूर
करण्यास कोणी समर्थ नाहीं. ४३० ह्मणून **श्री-
गोविंदा!** सांगा. कोणी एखादा मोक्षपदा-
साठीं विश्वास धरून योगाभ्यासाचा यत्न करूं
लागला; ४३१ इंद्रियग्रामांतून निघून पुढील
आत्मसुखाच्या नगरांत जाण्यासाठीं आस्थेच्या
वाटेस लागला; ४३२ तो आत्मसिद्धीचा पल्ला
तर पोंचला नाहींच, आणि माघारेंही पण ये-
ववलें नाहीं. अशा स्थितींत आयुष्यभानु अ-
स्तास गेला. ४३३ ज्याप्रमाणें अकाळीं अभ्र आ-
लेलें पातळ पडद्यासारखें असून निखालस
क्षणभंगुर असतें—तें टिकतही नाहीं—आणि प-
र्जन्यवृष्टीही करीत नाहीं. ४३४ त्याप्रमाणें तो
दोहींसही मुकतो. ह्मणजे श्रद्धावंत असून त्याला
प्राप्ती तर अलग राहतेच, पण अप्राप्ती-झालेली
योगसिद्धीही-नाहींशी होते. ४३५ अशा श्र-
द्धेच्या भरांत जो मृत्यु पावतो, तो दोहींलाही
अंतरतो काहो? महाराज! त्याला गति तरी
कोणती?" ४३६

श्रीभगवानुवाच—

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ४०

१ विश्वास. २ इंद्रियांच्या गांवांतून. ३ मार्गाला. ४ पावे. ५ मावळला. ६ आयुष्यरूपी सूर्य. ७ भलत्याच दिवसांत. ८ किंचित्. ९ पडद्यासारखें. १० राहिली. ११ अभ्यास व ब्रह्मप्राप्ति. १२ दृढतर श्रद्धेमध्यें.

[ श्रीभगवानुवाच—पार्थ ] तंव श्रीकृष्ण ह्मणती पार्था। [ नहि कल्याणकृदिति ] जया मोक्षसुखीं आस्था। तया मोक्षावांचूनि अन्यथा। गती आहे गा ॥ ३७ ॥ [ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ] परि एतुलें हेंचि एक घडे। जें माझारीं विसांवावें पडे। तेंही परि ऐसेनि सुरवाडें। जो देवां नाहीं ॥ ३८ ॥ [ अयं भावः ] येऱ्हवीं अभ्यासाचा उचलता। पाउलीं जरी चालता। तरि दिवसाआधीं ठाकिता। सोहंसिद्धीतें ॥ ३९ ॥ परि तेतुला वेग नव्हेचि। ह्मणऊनि विसावा तरि निकाचि। पाठीं मोक्ष तंव तैसाचि। ठेविला असे ॥ ४४० ॥

**तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले "पार्था! ज्याला खरोखर मोक्षसुखाची आस्था आहे, त्याला मोक्षसुखावांचून अन्यगति प्राप्त होईल होय? ४३७ आतां त्यामध्यें इतकेंच एक घडून येतें कीं, मध्यंतरी थोडासा विसावा घ्यावा लागतो. पण तेवढ्या अवकाशांत इतकें कांहीं सुख मिळतें कीं, तितकें देवांसही मिळणें दुर्लभ. ४३८ बाकी त्यानेंही जर अंमळ झपाट्यानें अभ्यास केला असता, तर तो सुद्धां आयुष्याचा दिवस असतांनाच ब्रह्मप्राप्तीला मिळाला असता. ४३९ परंतु तितका वेग झेपला नाहीं, ह्मणून विसावा घेणें किंवा मुक्काम करणें हेंही उत्तमच आहे. मागाहून पुन्हा मोक्ष आहे तसाच ठेवलेला आहे." ४४०**

प्राप्य पुण्यकृताँल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः।
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥४१॥

[ प्राप्य पुण्यकृतामिति ] ऐके कवतिक हें कैसें। जे शतमखा लोक सायासें। ते तो पावे अनायासें। कैवल्यकाम ॥ ४१ ॥ मग तेथिंचे जे अमोघ। अलौकिक भोग। भोगितांही सांग। कांटाळे मन ॥ ४२ ॥ हा अंतराय अवचितां। कां वोढवला श्रीभगवंता। दिविभोग भोगितां। अनुतापी नित्य ॥ ४३ ॥ [ शुचीनामिति ] पाठीं जन्मे संसारीं। परि सकळ धर्मांचिया माहेरीं। लांवो उगवे आगरी। विभवश्रियेचा ॥ ४४ ॥ जयानें नीतिपंथें हालिजे। सत्यपूत बोलिजे। देखावें तें देखिजे। शास्त्रदृष्टी ॥ ४५ ॥ वेद तो जागेश्वरु। जया व्यवसाय निजाचारु। सारासारविचारु। मंत्री जया ॥४६॥ जयाच्या कुळीं उचिता। जाली ईश्वराची पतिव्रता। जयातें गृहदेवता। आदि ऋद्धि ॥ ४७ ॥ ऐसी निजपुण्याची जोडी। वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी। तिये जन्मे तो सुरवाडीं। योगच्युत ॥ ४८ ॥

१ विश्रांति, मुक्काम. २ सुखानें. ३ आयुष्यरूप दिवस आहे तोंच. ४ पोंचता. ५ ब्रह्म तें मीच या भावनेला. ६ तितका. ७ योग्यच. ८ मागाहून, नंतर. ९ नवल, आश्चर्य. १० इंद्राला, शंभर यज्ञ करूनही. ११ मुमुक्षु. १२ निष्फळ न होणारे. १३ अप्रतिम. १४ कंटाळतें, विटतें. १५ दिव्य, स्वर्गीचे. १६ पश्चात्ताप करतो. १७ पुन्हा. १८ विश्रांतिस्थानांत. १९ खुंटाऱ्याला फुटून उगवलेलें झाड.

**"हें कसें नवल आहे ऐक. इंद्रालाही जे लोक मिळवावयाला सायास पडतात, ते लोक ह्या मुमुक्षूला अनायासें प्राप्त होतात. ४४१ मग तेथचे ते सफळ व अप्रतिम भोग यथेच्छ भोगतां भोगतां त्याचेंही मन कंटाळतें. ४४२ ते दिव्य भोग भोगित असतांही त्यास वारंवार पश्चात्ताप होऊन तो ह्मणत असतो कीं, "श्रीभगवंता! हें मध्यें विघ्न कांवरें आलें?" ४४३ नंतर तो पुन्हा संसारांत जन्म घेतो. पण जेथें सर्व धर्मांचें माहेर असेल, सकल ऐश्वर्याचें आगर असेल, अशा ठिकाणींच त्याचा पूर्व बीजांकुर उदयास येतो. ४४४ नीतिमार्गानें चालावें, सत्यभाषण करावें, कोणताही विचार करावयाचा तो शास्त्रदृष्टीनें करावा, असा त्याचा तेथें स्वभावच बनून राहतो. ४४५ वेद तर त्याचें आराध्यदैवत; आपला आचार हाच ज्याचा व्यवसाय; आणि सारासार विचार हाच ज्याचा मंत्री. ४४६ प्रत्यक्ष परमेश्वराची स्त्री जी लक्ष्मी, ती चंचल असतांही पतिव्रता होऊन ज्याच्या कुळांत रावण्यास योग्य होते. ऋद्धि सिद्धि ह्या तर ज्याच्या घरांतील गृहदेवता बनून राहतात. ४४७ असें सर्व सुखाचें जेथें पीक पिकलेलें असतें, त्या कुलामध्यें योगच्युत झालेला असतो तो पूर्वपुण्याईच्या बळानें जन्मास येतो." ४४८**

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥

१ सत्यानें निर्मळ असें. २ आराध्यदैवत, जीवप्राण. ३ संपत्ति. ४ उदीम, व्यापार. ५ सुखांत. ६ योगभ्रष्ट झालेला.

[ अथवा योगिनामिति ] अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे पर-ह्म श्रोत्री । महासुखक्षेत्रीं । आदिवंत ॥ ४९ ॥ जे सिद्धां-तांचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं । जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ॥ ४५० ॥ जे विवेक द्रुमाचेमुळीं । बसले आहाति नित्यफळीं । तयां योगियांचिया कुळीं । जन्म पावे ॥ ५१ ॥ मोटकी देहाकृती उमटे । [ तत्र तं बुद्धिसं-योगमिति ] आणि निजज्ञानाची पाहांट फुंटे । सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा ॥ ५२ ॥ तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचियें गांवा न येतां । बाळपणीच सर्वज्ञता । वरी त-यातें ॥ ५३ ॥ [ यतते च तत इति ] तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ॥ ५४ ॥ [ एतद्धि दुर्लभतरमिति ] ऐसें जें जन्म । जयालागीं देव सकाम । स्वर्गीं ठेले जप होम । क-रिती सदां ॥ ५५ ॥ अमरीं भाट होइजे । मग मृत्युलोकातें वानिजे । ऐसें जन्म पार्था गाजे । तें तो पावे ॥ ५६॥

**"अथवा जे ज्ञानरूप अग्नीमध्यें हवन कर-णारे जे ब्रह्मविषयक श्रुतीस अनुसरून वाग-णारे; जे महासुखक्षेत्राचे वतनदार; ४४९ जे आत्मप्राप्तीच्या सिंहासनावर बसून त्रि-भुवनाचें राज्य करितात; जे संतोषवना-मध्यें कोकिलासारखा मधुर स्वर काढ-तात, ४५० जे निरंतर विवेकवृक्षाच्या मुळा-मध्यें बसून त्याच्या फलाचें सेवन करतात; त्या योग्यांच्या कुळामध्यें तो जन्म घेतो. ४५१ त्याच्या देहाची आकृति लहानच असते. पण तिच्यांतून आत्मज्ञानाची प्रभा बाहेर फांकलेली असते. ज्याप्रमाणें सूर्याच्या आधीं अरुणोदय होतो, ४५२ त्याप्रमाणें प्रौढ दशेची वाट न पाहतां, वयाची अपेक्षा न करितां, बाल्यदशें-तच त्याला सर्वज्ञता माळ घालते. ४५३ त्या सिद्धबुद्धीच्या योगानें त्याचें मनच सर्व विद्या प्रगट करतें. आणि त्यामुळें त्याच्या मुखांतून आपोआपच सर्व शास्त्रें निघतात. ४५४ ज्याच्या करितां देवही हेतु धरून स्वर्गामध्यें निरंतर जपहोमादि करीत बसतात, अशा प्रकारचें जें जन्म, ४५५ किंवा अर्जुना! देवांनीं भाट होऊन मृत्युलोकाची सुद्धां स्तुति करीत रहावें असें जें जन्म, तें त्यांस प्राप्त होते बरें." ४५६**

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

[ पूर्वाभ्यासेन तेनैव ] आणि मागील जे सद्बुद्धि । जेथ जीवित्वा जाहाली होती अवधि । मग तेचि पुढती निरवधि । नवी लाहे ॥ ५७ ॥ तेथ सदैवा आणि पायाळा । वरि दिव्यांजन होय डोळा । मग देखे जैसीं अवलीळा । पाताळधनें ॥ ५८ ॥ [ शब्दब्रह्मातिवर्तते ] तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय । तेथ संसरेंवीण जाय । बुद्धि तयाची ॥ ५९ ॥ [ ह्रियते ह्यवशोपिसः ] बळियें इंद्रियें येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजें गगना । मि-ळोंचि लागे ॥ ४६० ॥ ऐसें नेणों काय अपैसें । तयातेंचि कीजे अभ्यासें । समाधि घर पुसे । मानसाचें ॥ ६१ ॥ [जि-ज्ञासुरपि योगस्य] जाणिजे योग पीठींचो भैरवें । काय हा आरंभ भरेंचो गौरव । कीं वैराग्यसिद्धीचा अनुभव । रूपा आला ॥ ६२ ॥ हा संसार उभाणितें माप । कां अष्टांग सा-मग्रीचें द्वीप । जैसें परिमळेंचि धरिजे रूप । चंदनाचें ॥६३॥ तैसा संतोषाचा काय घडिला । कीं सिद्धिभांडारींहुनि का-ढिला । दिसे तेणें मानें रूढला । साधक दशे ॥ ६४ ॥

**"आणि पूर्वजन्मींची बुद्धि, जिच्या मध्येंच त्याचें आयुष्य समाप्त झालें असतें तीच, त्यास पुढें मग अखंडित नवी प्राप्त होते. ४५७ दैव-वान् असून पायाळू असावा, आणि त्यांत त्याच्या डोळ्यांत अंजन पडावें; म्हणजे त्याला जशीं पाताळांतील द्रव्यें दृष्टिगोचर होऊं ला-गतात, ४५८ त्याप्रमाणें अगम्य असणारे अ-भिप्राय, किंवा गुरुमुखावांचून न प्राप्त हो-**

१ ज्ञानाग्नीमध्यें हवन करणारे. २ वैदिक. ३ मूळचे र-हिवाशी. ४ आत्मप्राप्तीच्या. ५ अखंड फळामध्यें. ६ लहान-सर, ठेंगणी. ७ उजाडतें. ८ सूर्याच्या पूर्वी. ९ प्रौढ अव-स्थेची. १० वयाच्या. ११ उपजत बुद्धीमुळें. १२ सर्व विद्येनें. १३ स्तुतिपाठक.

१ आयुष्याला. २ मर्यादा, सीमा. ३ दैववान्. ४ पायाळू मनुष्य. ५ भूमिगत द्रव्यादि दिसणारें काजळ. (पायाळू–म्हणजे पायाकडून उपजलेल्या मनुष्याच्या डोळ्यांत एक प्रकारच्या साधनानें तयार केलेलें काजळ घातलें, म्हणजे भूमीच्या आंत पुरलेलें द्रव्य दिसतें, अशी पूर्वीपासून फार प्रसिद्धि आहे.) ६ सहज. ७ पाताळांतील, भूमींतील–द्रव्य. ८ अगम्य, दुर्घट. ९ गुरुपासूनच प्राप्त होणारे. १० कष्टा-वांचून. ११ वळतीवर येतात, ताब्यांत रहातात. १२ आपो-आप. १३ मुख्य स्थानावरचा. १४ आधिदेवता. १५ मोठे-पणाचा. १६ मोजणारे. १७ योगसाहित्याचें. १८ भांडारखा-न्यांतून. १९ वाढला, उत्पन्न झाला.

**णारें ज्ञान; अशा ठिकाणीं त्याची बुद्धि अगदीं अचुक जाते. ४५९ इंद्रियें येवढीं बलिष्ठ असूनही त्याच्या मनाच्या स्वाधीन होतात. मनाचें आणि वायूचें ऐक्य होतें. आणि वायू गगनास सहज मिळूं लागतो. ४६० त्याच्या मनाचें घर कोठें आहे त्याचा शोध करीत समाधि आपोआपच घरीं चालून येते. हें त्याच्या पूर्वाभ्यासाचेंच फळ, हें आपणास सहजीं कळत नाहीं काय? ४६१ हा, योगासनावरील भैरव देव, किंवा प्रीतीचा उगवलेला जोमदार कोंभ, किंवा वैराग्यसिद्धीचा अनुभवच अवतार घेऊन आला असें वाटतें. ४६२ हा संसार मोजावयाचें माप, किंवा अष्टसिद्धींचें रोप, किंवा सुगंधच चंदनाचें रूप धारण करून आला आहे कीं काय असें वाटतें. ४६३ त्याचप्रमाणें तो संतोषाचा पुतळा घडविलेला असावा, किंवा सिद्धीच्या जामदारखान्यांतून काढावा, त्याप्रमाणें साधकदशेनें वाढलेला दिसतो." ४६४**

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

[ प्रयत्नाद्यतमानस्तु ] जे वर्षशतांचिया [1]कोडी । जन्मसहस्रांचिया [2]आडी । लंघितां पातला थडी । आत्मसिद्धीची ॥ ६५ ॥ ह्मणोनि [3]साधनजात आघवें । अनुसरे तया स्वभावें । मग [4]आयतिये बैसे [5]रांणिवे । विवेकाचिये ॥ ६६ ॥ पाठीं वि[6]चारि तया वेगां । तो विवेकही ठाके मागां । मग अवि[7]चारणीय तें आंगा । घडोनि जाय ॥ ६७ ॥ [ संशुद्धकिल्बिषः ] तेथ मनाचें [8]मेहुडें विरे । पवनाचें पवनपण सरे । [9]आपणपां आपण मुरे । आकाशही ॥ ६८ ॥ [10]प्रणवाचा माथा बुडे । येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे । ह्मणोनि आधींचि बोल [11]वहुडे । तयालागीं ॥६९॥ ऐसी ब्रह्मींची स्थिति। जे सकळा गतीसीं गती । तया अमूर्ताची मूर्ती । होऊनि ठाके ॥४७०॥ [अनेकजन्मसंसिद्धः] तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं । विक्षेपांचीं [12]पांणिवळें झाडिलीं । ह्मणोनि उपजत[13]खेंवो बुडाली । लग्नघटिका ॥ ७१ ॥ [ ततो याति परां गतिं ] आणि तद्रूपतेसि सुलग्न । लागोनि ठेलें अभिन्न । जैसें लोपलें अभ्रें गगन । होऊनि ठाके ॥ ७२ ॥ तैसें विश्व जेथ होय । मागुतें जेथ लया जाये । तें विद्यमानेंचि देहें । जहाला तो गा ॥ ७३ ॥

१ कोटी. २ आड, प्रतिबंध. ३ सर्व साधनें. ४ आयताच. ५ राज्यावर. ६ विचार करण्याचा वेग. ७ विचार करण्याच्या पलीकडचें. ८ मेघ. ९ आपल्या ठिकाणीं. १० ओंकाराचा. ११ मागें फिरतो. १२ पाण्यांतला मळ. १३. जन्मतःच.

**"कारण, कोट्यवधि वर्षांनीं हजारों गर्भवास भोगल्यानंतर त्यास आत्मसिद्धीचा किनारा मिळतो. ४६५ ह्मणून सर्व साधनें त्यास आपोआप प्राप्त होतात, आणि तो आयताच विवेकाच्या राज्यावर बसतो. ४६६ त्याला शोधीत जाणारा विचार सुद्धां मागें राहतो, आणि अविचारणीय असें जें ब्रह्म तें तो स्वतःच बनून राहतो. ४६७ तेथें मनाचें अभ्र विरून जातें. वायूचें वायुत्व लयास जातें. आणि आकाशही आपल्याठाईं मुरून बसतें. ४६८ ओंकाराचा माथा बुडून जाईल इतकें त्यास अनिर्वाच्यसुख प्राप्त होतें. ह्मणून शब्द आधींच मागें फिरतात. ४६९ ह्याप्रमाणें सर्व गतीस गति देणारें जें निराकार परब्रह्म त्याचीच मूर्ति तो बनून राहतो. ४७० त्यानें मागल्या पुष्कळ जन्मांतील विघ्नरूप पाण्यांतील मळ झाडून टाकलेला असतो, ह्मणून जन्मतांच त्याची लग्नघटिका बुडते. ४७१ आणि तद्रूपतेशीं लग्न लागून तो अगदीं एकजीव होऊन जातो. ज्याप्रमाणें अभ्रांचा नाश पावल्यानंतर गगन पूर्ववत् निर्मल होतें, ४७२ त्याप्रमाणें विश्व जेथून उत्पन्न होतें, व तें पुन्हा जेथें लयास जातें, तें ठिकाणच तो विद्यमान देहानें होतो." ४७३**

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।
कर्मिभ्यश्चाऽधिको योगी तस्माद्योगी भवाऽर्जुन ॥ ४६

[ कर्मिभ्यश्चाधिको योगी ] जया लाभाचिया आशा । करूनि धैर्य बाहुंचा भरंवसा । घालीत [1]षट्‌ [2]कर्माचा धारसा । कर्मनिष्ठ ॥ ७४ ॥ [ ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ] कां जिये एक वस्तुलागीं । बाणोनि ज्ञानाची [3]वज्रांगी । झुंझत प्रपंचेसीं समरंगीं । ज्ञानि योगा ॥ ७५ ॥ [ तपस्विभ्योऽधिको योगी ] अथवा नि[4]लागें निसरडा । तपोदुर्गाचा आडकडा । झोंबती [5]तपिये चाडों । जयाचिया ॥ ७६ ॥ जें भजतियां भर्ज्य ।

१ प्रवाह. २ कर्म करणारे. ३ दृढ कवच. ४ निराश्रय. ५ तुटलेला कडा. ६ तपश्चर्या करणारे. ७ इच्छेनें. ८ ज्याकरितां भजन करावयाचें तें, भजनास योग्य.

ाज्ञिकांचें याज्य । एवं जें पूज्य । सकळां सदां ॥ ७७ ॥ ान्वि तो आपण । स्वयें जाहाला निर्वाणें । जें साधकांचें का- ण । सिद्ध तत्व ॥ ७८ ॥ ह्मणोनि कर्मनिष्ठां वंद्य । तो ानियासि वेद्य । तापसांचा आद्य । तपोनाथ ॥ ७९ ॥ पैं ीवपरमात्मसंगमा । जयाचें येणें जाहालें मनोधर्मा । तो रीरींचि परि महिमा । ऐसी पावे ॥ ४८० ॥ तस्माद्योगी भवाऽर्जुन ] ह्मणोनि याकारणें । तूतें मी सदां णें । योगी होईं अंतःकरणें । पंडुकुमरा ॥ ८१ ॥

**"ज्याच्या लाभाची आशा धरून कर्मनिष्ठ ोक धैर्यरूप बाहूंचा भरंवसा धरून–( यजन, ाजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह ा )–सहा कर्मांचा प्रवाह सुरू ठेवतात, ४७४ ंवा ज्या एका वस्तूकरितां ज्ञानीलोक ज्ञानाचें ाभेद्य कवच आंगांत घालून समरभूमीवर प्र- चाशीं युद्ध करीत असतात, ४७५ अथवा याच्या प्राप्तीसाठीं तपस्वी लोक, निसरडें ासलेल्या तपोरूप किल्ल्याच्या तुटलेल्या क- याला झोंबत असतात, ४७६ भजन करणा- ांस जें भजनास योग्य; याज्ञिकांना यज्ञकर- यास योग्य; असें सकलांना सदासर्वकाल ा पूज्यस्थान, ४७७ साधकाचें कारण व सि- ्तत्त्व असें जें कैवल्यस्वरूप, तेंच तो आपण वतः होऊन राहतो. ४७८ ह्मणून तो कर्म- ेष्ठांना वंद्य; ज्ञानीजनांना जाणण्यास योग्य; ाणि तपस्वी जनांचा गुरु. ४७९ जीव आणि रमात्मा ह्यांच्या संगमाच्या वेळीं ज्याच्या म- ोधर्माचें येणें होतें. तो देहधारीच असतो, थापि त्याच्या आंगीं अशा प्रकारची योग्यता ाते. ४८० याकरितांच अर्जुना! मी तुला ानोभावेंकरून नेहेमीं सांगतों कीं तूं योगी ो." ४८१**

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ।

श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ४७

ति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णा- र्जुनसंवादे अभ्यासयोगो नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

[ योगिनामपीति ] अगा योगी जो ह्मणिजे । तो देवाचा देव जाणिजे । आणि सुख सर्वस्व माझें । चैतन्य तो ॥८२॥ [ श्रद्धावान्भजते यो मां ] तेथ भजता भजन भजावें । हें भक्तिसाधन जें आघवें । तो मीचि जाहालों अनुभवें । अ- खंडित ॥ ८३ ॥ [ स मे युक्ततमो मतः ] मग तया आह्मा प्रीतीचें । स्वरूप बोलीं निर्वचे । ऐसें नव्हे गा तों साचें । सुभद्रापती ॥ ८४ ॥ तया एकवटलीया प्रेमा । जरी पाडें पाहिजे उपमा । तरि मी देह तो आत्मा । हेचि होय ॥८५॥ ऐसें भक्त चकोरचंद्रें । बोलिलें गुणसमुद्रें । त्रिभुवनैकनरेंद्रें । संजय ह्मणे ॥ ८६ ॥ तेथ आदीपासूनि पार्था । ऐकिजे ऐ- सीचि आस्था । दुणावली हें यदुनाथा । भावों सरलें ॥८७॥ कीं सावियाचि मनीं संतोषला । जे बोला आरिसा जोडला । तेणें हरिखें आतां उपलवला । निरूपील ॥ ८८ ॥ तो प्रसंग आहे पुढा । जेथें शांत दिसेल उघडा । तो पालविजेल मुडा । प्रमेयबीजांचा ॥८९ ॥ जे सात्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें । सहजें निडारले वाफे । चतुरचित्ताचे ॥ ४९० ॥ वरी अवधानाचा वांफसा । लाधला सोनया ऐसा । ह्मणोनि पेरावया धिंवसा । श्रीनिवृत्तीसीं ॥ ९१ ॥ ज्ञानदेव ह्मणे मी चाडें । सद्गुरूनि केलें कोडें । माथां हात ठेविला तें फुंडें । बीजचि वोंइलें ॥ ९२ ॥ ह्मणऊनि येणें मुखें जें निगे । तें संतांच्या हृदयीं साचेंचि लागे । हें असो सांगों श्रीरंगें । बोलिलें जें ॥ ९३ ॥ परि तें मनाच्या कानीं ऐकावें । बोल बुद्धीच्या डोळां देखावे । हे साटोवाटीं घ्यावे । चित्ता- चिया ॥ ९४ ॥ अवधानाचेनिहातें । ने यां पां हृदया आं- तौतें । हे रिझवतील आयणीतें । सज्जनाचिये ॥ ९५ ॥ हे स्वहितातें नीचंविती । परिणामातें जीवविती । सुखाची वा- हती । लाखोली जिवां ॥ ९६ ॥ आतां अर्जुनेसीं श्रीमुकुंदें । नागर बोलिजेल विनोदें । तें वोंविसेचेनि प्रबंधें । सांगेन मी ॥ ४९७ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ श्लोक ४७, ओव्या ४९७.

---

१ यज्ञ करण्यास योग्य. २ मोक्ष, ब्रह्म. ३ जाणण्यास ोग्य. ४ पहिला. ५ जीवाच्या आणि आत्म्याच्या संयोगानें.

१ प्राण. २ भजन, भजन करणारा, व भजन करण्याचा देव ही त्रयी. ३ बोलण्यास अशक्य. ४ बरोबरीची. ५ समजलें. ६ सहजच. ७ हर्षानें. ८ विकसित झाला. ९ शांत रस. १० सोडण्यांत येईल. ११ मुढा. ( धान्य वगैरे घालून भोंवतीं गवत बांधलेला गठ्ठा. ) १२ सिद्धांताच्या साराचा. १३ शोभा. १४ गुंताडे. १५ परिपक्व झालें. १६ शहाण्यांच्या चित्ताचें. १७ शेतें वगैरे पेरण्यास येणारी वाफ. १८ धैर्य. १९ बीं पेरण्यासाठीं शेतकरी लोक बाळगतात तें चाडें. २० चमत्कार. २१ खरोखर. २२ पेरलें. २३ अदलाबदलीनें. २४ न्यावें. २५ आंत. २६ आवडीला. २७ निववितात. २८ सर्वोत्कृष्ट. २९ ओव्यांच्या. ३० छंदानें.

"अरे! योगी असें ज्याला ह्मणतात, तो देवाचाही देव आहे असें समज. आणि माझें सारें सुख, जीव, प्राण, काय तें तो. समजलास? ४८२ तेथें भजन करणारा, भजन आणि भज्य हीं भक्तीचीं सारीं साधनें अनुभवानें मींच निरंतर होऊन राहतों. ४८३ मग हे **सुभद्रापती!** त्याच्या आणि माझ्या प्रीतीचें यथार्थ वर्णन शब्दांनीं करतां यावयाचें नाहीं. ४८४ त्याच्या आमच्या जमलेल्या प्रेमाला बरोबर उपमाच पाहिजे असेल तर, मी देह आणि तो आत्मा. हीच योग्य आहे." ४८५ **संजय** ह्मणतो 'याप्रमाणें भक्त चकोराचा चंद्र; सकल गुणांचा समुद्र; त्रिभुवनांतील अपूर्व नरमणी; असा जो **भगवान् श्रीकृष्ण** तो याप्रमाणें बोलला.' ४८६ तेव्हां पहिल्यापासून मी जें काय **अर्जुनाला** सांगितलें, तें त्यास नीट कळलें, व तें अधिक ऐकण्याविषयीं याची आस्था दुणावली आहे असें **यदुनाथाच्या** ह्मणजे **श्रीकृष्णाच्या** मनांत येऊन चुकलें. ४८७ तेव्हां तत्काल त्यांच्या मनाला संतोष झाला. कारण आपल्या शब्दांना आरसा झाला, असें वाटलें. त्यायोगें त्यांस उल्हास प्राप्त होऊन आतां पुढें अधिक विस्तारानें निरूपण करतील. ४८८ तो प्रसंग पुढें आहे. त्यांत शांतरस अगदीं व्यक्त होऊन अर्थगांभीर्याचा मुद्दा सुटेल. ४८९ कारण, सात्विक गुणाच्या वृष्टीनें अध्यात्मिक डिखळ मोडून चतुरांचें चित्तरूपी उत्तम क्षेत्र तयार झालें आहे. ४९० आणि त्यांत सोन्यासारखी अवधानाची वाफ आलेली पाहून **श्रीनिवृत्तिदासास** पेरण्याचें धैर्य आलें. ४९१ **ज्ञानदेव** ह्मणतात. सद्गुरूंनीं एक मोठी मौज केली. ती अशी कीं, मला पेरण्याचें चाडें केलें. आणि माझ्या मस्तकावर हात ठेवला. तेव्हां आपोआप ज्ञानबीज पेरलें जाऊं लागलें. ४९२ आणि त्यामुळें यामुखांतून जें जें निघतें तें सज्जनांच्या हृदयांस खरेंच भासूं लागलें. असो. आतां हें सोडून देऊन **श्रीरंगांनीं** जें निरूपण केलें तें सांगूं या. ४९३ पण तें मनाच्या कानांनींच श्रवण करावें; त्यांतील शब्द बुद्धीच्या नेत्रांनींच पहावेत; आणि चित्ताचें साटें लोटें करून घ्यावें. ४९४ लक्ष्याच्या हातांनीं हृदयांत न्यावेंत, ह्मणजे ते सज्जनांचें रंजन करतील ४९५ हे शब्द स्वहिताला प्रसवतात; शेवट गोड करतात; आणि जिवाला सुखाची लाखोली वहातात. ४९६ आतां **श्रीमुकुंद** अर्जुनाबरोबर फार आनंदानें उत्कृष्ट भाषण करतील. आणि तें मी ओंवीच्या छंदानें सांगेन. ४९७.

## सहावा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ७ वा.

श्रीभगवानुवाच.

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।

असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।

यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥२॥

[ श्रीभगवानुवाच—मय्यासक्तमना इत्यर्धं ] आइका मग तो
अनंत । पार्थातें असें ह्मणत । [1]पैं गा तूं योगे[2]युक्त । जालासि
तां ॥ १ ॥ [ असंशयं समग्रं मां ] मज समग्रां[3]तें जाणसी
ं ।आपलिया तळहातिंचें रत्न जैसें । [ ज्ञानं तेऽहं सविज्ञानं ]
न ज्ञान सांगेन तैसें । विज्ञानेंसीं[4] ॥२॥ एथ विज्ञानें काय
ावें । ऐसें घेसी जरी मनोभावें । तरी पैं आधीं जाणावें ।
चें[5] लागे ॥ ३ ॥ मग ज्ञानाचिये वेळे । झांकती [6]जाणिवेचे
ळे । जैसी तीरीं नाव न ढळे । टेंकली सांती[7] ॥ ४ ॥
ी जाणीव जेथ न रिगे[8] ।विचार मागुतापाउलीं[9] निघे । तर्क
[10]यणी नेघे । आंगीं जयाच्या ॥५ ॥अर्जुना तया नांव ज्ञान ।
प्रपंच हें विज्ञान[4] । तेथ[11] सत्यबुद्धि तें अज्ञान । हेंही
ण ॥ ६ ॥ आतां अज्ञान अवघें हारपे । विज्ञान[4] निःशेष
पे । आणि ज्ञान तें स्वरूपें । होऊनि जाइजे ॥७॥
ज्ज्ञात्वेति ] जेणें सांग[12]तेयाचें बोलणें खुंटे । ऐक[13]तेयाचें
न[14] तुटे । हें जाणणें सानें[15] मोटें । उरों नेदी ॥ ८ ॥
दं वक्ष्याम्यशेषतः ] ऐसें वर्म जें गूढें[16] । तें किजेल वाक्या-
। जेणें थोडेनि पुरे कोडें[18] । बहुत मनींचें ॥ ९ ॥

ऐका. मग ते **श्रीअनंत अर्जुनाला** णूं लागले कीं "तूं आतां निश्चयेंकरून योगी झालास. १ ज्याप्रमाणें तळहातांतील रत्नाच्या सर्व बाजूंचें ज्ञान होतें, त्याप्रमाणें मला सर्व प्रकारें तूं जाणशील असें तुला ज्ञान सांगून देतों. आणि त्यावरोबर विज्ञानही पण सांगतों. २ येथें विज्ञानानें-ह्मणजे व्यवहार ज्ञानानें-किंवा विपरीत ज्ञानानें-काय करावयाचें आहे? असें तुझ्या मनांत येईल, पण बावा! आधीं तेंच समजून घेतलें पाहिजे. ३ मग ज्ञानाच्या वेळीं जाणिवेचे डोळे झांकतात. ज्याप्रमाणें नदीच्या तीराला नांव टेंकून ठेवली असतां ती हलत नाहीं, ४ त्याप्रमाणें जाणीव जेथें रिघत नाहीं; विचार मागच्या पावलीं माघारी फिरतो; आणि ज्याच्या आंगीं तर्कास तर येण्याची इच्छाच होत नाहीं. ५ अर्जुना! त्याचें नांव ज्ञान. इतर जें व्यवहारज्ञान तें विपरीत ज्ञान होय. व त्या विपरीत ज्ञानाच्या ठायीं सत्यबुद्धि-तेंच खरें असें मानणें-तेंच अज्ञान हेंही लक्ष्यांत ठेव. ६ आतां अज्ञान ज्याच्या योगानें समूळ नाहींसें होईल; विपरीत ज्ञान निखालस जळून जाईल; आणि ज्ञान तें शुद्ध स्वरूपानें प्रगट होऊन राहील, ७ ज्याच्या योगानें बोलणाराचें बोलणें खुंटेल, व ऐकणाराचें दुःख नाश पावेल, हें लहान किंवा मोठें हे दोन भेदच जेथें राहणार नाहींत, ८ असें एक गुप्त वर्म तुला सांगतों. तें थोडेंसें ऐकलेंस तरी सुद्धां तुझ्या मनांतील पुष्कळ हेतु पूर्ण होतील." ९

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।

यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥३॥

[ मनुष्याणां सहस्रेषु ] पैं गा मनुष्यांचिया सहस्रशा[1] ।
माजिविपाइलेचियां[2] येथ धिंवसा[3] । तैसे या धिंवसेकरां बहु-

१ निश्चयेंकरून. २ योगी. ३ सर्वतोपरी. ४ प्रपंचज्ञान, व्यवहारज्ञान किंवा विपरीतज्ञान. ५ विज्ञानच. ६ ज्ञातृत्वाचे. असतां. ८ शिरत नाहीं. ९ मागच्या पायानें. १० इच्छा, ड. ११ विज्ञानाच्या ठिकाणीं. १२ वक्तयाचें. १३ श्रोचें. १४ दुःख, ताप. १५ लहान किंवा मोठें. १६ गहन, गुप्त. १७ बोलण्यांत व्यक्त करूं. १८ आवड, इच्छा.

१ विरळा, एखादाला. २ चटक. ३ चटक लागलेल्यांत.

"अरे! योगी असें ज्याला ह्मणतात, तो देवाचाही देव आहे असें समज. आणि माझें सारें सुख, जीव, प्राण, काय तें तो. समजलास? ४८२ तेथें भजन करणारा, भजन आणि भज्य हीं भक्तीचीं सारीं साधनें अनुभवानें मींच निरंतर होऊन राहतों. ४८३ मग हे **सुभद्रापती!** त्याच्या आणि माझ्या प्रीतीचें यथार्थ वर्णन शब्दांनीं करतां यावयाचें नाहीं. ४८४ त्याच्या आमच्या जमलेल्या प्रेमाला बरोबर उपमाच पाहिजे असेल तर, मी देह आणि तो आत्मा. हीच योग्य आहे." ४८५ **संजय** ह्मणतो 'याप्रमाणें भक्त चकोराचा चंद्र; सकल गुणांचा समुद्र; त्रिभुवनांतील अपूर्व नरमणी; असा जो **भगवान् श्रीकृष्ण** तो याप्रमाणें बोलला.' ४८६ तेव्हां पहिल्यापासून मी जें काय **अर्जुनाला** सांगितलें, तें त्यास नीट कळलें, व तें अधिक ऐकण्याविषयीं याची आस्था दुणावली आहे असें **यदुनाथाच्या** ह्मणजे **श्रीकृष्णाच्या** मनांत येऊन चुकलें. ४८७ तेव्हां तत्काल त्यांच्या मनाला संतोष झाला. कारण आपल्या शब्दांना आरसा झाला, असें वाटलें. त्यायोगें त्यांस उल्हास प्राप्त होऊन आतां पुढें अधिक विस्तारानें निरूपण करतील. ४८८ तो प्रसंग पुढें आहे. त्यांत शांतरस अगदीं व्यक्त होऊन अर्थगांभीर्याच मुद्दा सुटेल. ४८९ कारण, सात्विक गुणाच वृष्टीनें अध्यात्मिक डिखळ मोडून चतुरांचें चि त्तरूपी उत्तम क्षेत्र तयार झालें आहे. ४९ आणि त्यांत सोन्यासारखी अवधानाची वा आलेली पाहून **श्रीनिवृत्तिदासास** पे ण्याचें धैर्य आलें. ४९१ **ज्ञानदेव** ह्मणता सद्गुरूंनीं एक मोटी मौज केली. ती अशी कं मला पेरण्याचें चाडें केलें. आणि माझ्या म स्तकावर हात ठेवला. तेव्हां आपोआप ज्ञा बीज पेरलें जाऊं लागलें. ४९२ आणि त्यामु यामुखांतून जें जें निघतें तें सज्जनांच्या ह यांस खरेंच भासूं लागलें. असो. आतां हें से डून देऊन **श्रीरंगांनीं** जें निरूपण केलें सांगूं या. ४९३ पण तें मनाच्या कानांनीं श्रवण करावें; त्यांतील शब्द बुद्धीच्या नेत्र नींच पहावेत; आणि चित्ताचें साटें लोटें व रून घ्यावें. ४९४ लक्ष्याच्या हातांनीं हृदयां न्यावेंत, ह्मणजे ते सज्जनांचें रंजन करतील ४९ हे शब्द स्वहिताला प्रसवतात; शेवट गो करतात; आणि जिवाला सुखाची लाखोल वहातात. ३९६ आतां **श्रीमुकुंद** अर्जुना रोबर फार आनंदानें उत्कृष्ट भाषण करतील आणि तें मी ओंवीच्या छंदानें सांगेन. ४९७

सहावा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ७ वा.

श्रीभगवानुवाच.

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥
ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥२॥

[ श्रीभगवानुवाच—मय्यासक्तमना इत्यर्थ ] आइका मग तो
नंत । पार्थातें असें ह्मणत । पैं गा तूं योगयुक्त । जालासि
ां ॥ १ ॥ [ असंशयं समग्रं मां ] मज समग्रातें जाणसी
।आपलिया तळहातिंचें रत्न जैसें । [ ज्ञानं तेऽहं सविज्ञानं ]
ज्ञान सांगेन तैसें । विज्ञानेंसीं ॥२॥ एथ विज्ञानें काय
तें । ऐसें घेसी जरी मनोभावें । तरी पैं आधीं जाणावें ।
लागे ॥ ३ ॥ मग ज्ञानाचिये वेळे । झांकती जाणिवेचे
! जैसी तीरीं नाव न ढळे । टेंकली सांती ॥ ४ ॥
जाणीव जेथ न रिगे ।विचार मागुतापाउलीं निघे । तर्क
णी नेघे । आंगीं जयाच्या ॥५ ॥अर्जुना तया नांव ज्ञान ।
प्रपंच हें विज्ञान । तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान । हेंही
॥ ६ ॥ आतां अज्ञान अवघें हारपे । विज्ञान निःशेष
। आणि ज्ञान तें स्वरूपें । होऊनि जाइजे ॥७॥
ज्ञातवेति ] जेणें सांगतयाचें बोलणें खुंटे । ऐकतयाचें
न तुटे । हें जाणणें सानें मोठें । उरों नेदी ॥ ८ ॥
वक्ष्याम्यशेषतः ] ऐसें वर्म जें गूढ । तें किजेल वाक्या-
। जेणें थोडेनि पुरे कोड । बहुत मनींचें ॥ ९ ॥

ऐका. मग ते श्रीअनंत अर्जुनाला
( लागले कीं "तूं आतां निश्चयेंकरून योगी झालास. १ ज्याप्रमाणें तळहातांतील रत्नाच्या सर्व बाजूचें ज्ञान होतें, त्याप्रमाणें मला सर्व प्रकारें तूं जाणशील असें तुला ज्ञान सांगून देतों. आणि त्याबरोबर विज्ञानही पण सांगतों. २ येथें विज्ञानानें-ह्मणजे व्यवहार ज्ञानानें-किंवा विपरीत ज्ञानानें-काय करावयाचें आहे? असें तुझ्या मनांत येईल, पण बावा! आधीं तेंच समजून घेतलें पाहिजे. ३ मग ज्ञानाच्या वेळीं जाणिवेचे डोळे झांकतात. ज्याप्रमाणें नदीच्या तीराला नांव टेंकून ठेवली असतां ती हलत नाहीं, ४ त्याप्रमाणें जाणीव जेथें रिघत नाहीं; विचार मागच्या पावलीं माघारीं फिरतो; आणि ज्याच्या आंगीं तर्कास तर येण्याची इच्छाच होत नाहीं. ५ अर्जुना! त्याचें नांव ज्ञान. इतर जें व्यवहारज्ञान तें विपरीत ज्ञान होय. व त्या विपरीत ज्ञानाच्या ठायीं सत्यबुद्धि-तेंच खरें असें मानणें-तेंच अज्ञान हेंही लक्ष्यांत ठेव. ६ आतां अज्ञान ज्याच्या योगानें समूळ नाहींसें होईल; विपरीत ज्ञान निखालस जळून जाईल; आणि ज्ञान तें शुद्ध स्वरूपानें प्रगट होऊन राहील, ७ ज्याच्या योगानें बोलणाराचें बोलणें खुंटेल, व ऐकणाराचें दुःख नाश पावेल, हें लहान किंवा मोठें हे दोन भेदच जेथें राहणार नाहींत, ८ असें एक गुप्त वर्म तुला सांगतों. तें थोडेंसें ऐकलेंस तरी सुद्धां तुझ्या मनांतील पुष्कळ हेतु पूर्ण होतील." ९

१ निश्चयेंकरून. २ योगी. ३ सर्वतोपरी. ४ प्रपंचज्ञान, व्यवहारज्ञान किंवा विपरीतज्ञान. ५ विज्ञानच. ६ ज्ञातृत्वाचे. ७ ...नां. ८ शिरत नाहीं. ९ मागच्या पायानें. १० इच्छा, ... ११ विज्ञानाच्या ठिकाणीं. १२ वक्तयाचें. १३ श्रो-... १४ दुःख, ताप. १५ लहान किंवा मोठें. १६ गहन, ...ग. १७ बोलण्यांत व्यक्त करून. १८ आवड, इच्छा.



मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥३॥

[ मनुष्याणां सहस्रेषु ] पैं गा मनुष्यांचिया सहस्रशा ।
माजिविपाइलेचियां येथ धिंवसा । तैसे या धिवसेकरां बहु-

१ विरळा, एखादयाला. २ चटक. ३ चटक लागलेल्यांत.

वसां । माजि विरळा जाणे ॥१०॥ जैसा भरलेया त्रिभुवना । आंत एक एक चांगे[1] अर्जुना । निवडूनि कीजे सेना । लक्षवरी[2] ॥ ११ ॥ [ कश्चिद्यतति सिद्धये ] कीं तयांहीपाठी[3] । जे वेळीं लोहें[4] मांसातें[5] घांटी[6] । ते वेळीं विजयश्रीयेच्या[7] पाटीं[8] । एकचि बैसे ॥ १२॥ [ यततामपि सिद्धानां ] तैसे आस्थेच्या महापुरीं । रिघताति कोटिवरी[9] । [ कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ] परी प्राप्तीच्या पैलतीरीं । विपाइला[10] निगे ॥१३॥ [ यथा ज्ञास्यसि तच्छृणु १ श्लोक ] ह्मणऊनि सामान्य गा नोहे । सांगतां वडिलें[11] गोठि गा आहे । परी तें बोलों येईल पाहें । आतां प्रस्तुत ऐकें ॥ १४ ॥

**" अरे असें पहा! हजारों मनुष्यांमध्यें एखाद्यालाच माझी चटक लागते. आणि असे चटक लागून राहणारे पुष्कळ असावेत, तेव्हां त्यांतील एखाद्यालाच माझ्या सत्य स्वरूपाची ओळख होते. १० अर्जुना! ज्याप्रमाणें भरलेल्या त्रिभुवनांतून एक एक चांगला निवडून लाखों सैन्य तयार करतात; ११ नंतर शस्त्रांची खणाखणी होऊन कत्तल उडते; आणि मग सरतेशेवटीं विजयश्रीच्या पदावर एकटाच बसतो. १२ त्याप्रमाणें आस्थेच्या महापुरामध्यें कोट्यवधि लोक उड्या घालतात. परंतु प्राप्तीच्या पैलतीरास लागतो असा एखादाच. १३ ह्याकरितां बाबा! ही गोष्ट सामान्य नव्हे. सांगावयालाच लागलें तर फार मोठी आहे. पण ती मग सांगतां येईल. सध्यां येवढें लक्ष्यांत ठेव ह्मणजे पुरें. " १४**

भूमिरापोऽनलोवायुः खं मनो बुद्धिरेव च ।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥

तरी अवधारीं गा धनंजया । [ अहंकार इति ] हे महदादिक[12] माझी माया । जैसी प्रतिबिंबे छाया । निजांगाची ॥ १५ ॥ [ भिन्ना प्रकृतिरष्टधा ] आणि इयेतें प्रकृति[13] ह्मणिजे । जे अष्टधा[14] भिन्न जाणिजे । लोकत्रय निफजे[15] । [ इयं ] इयेस्तव[1] ॥१६॥ हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्वनि[2] धरिसी जरी मानसीं । तरी तेचि गा आतां परियेसीं । विवंचनों[3] ॥१७॥ [ भूमिरिति ] आप[4] तेज[5] गगन[6] । मही[7] मारुत[8] मन । बुद्धि अहंकार हे भिन्न । आठ[9] भाग ॥ १८ ॥

**" धनंजया! ऐक तर. आपआपल्या देहाची ज्याप्रमाणें पडछाया पडते, त्याप्रमाणें महत्तत्त्वादिक ही सर्व माझी माया आहे. १५ हिलाच प्रकृति असें ह्मणतात. हिचे भेद–किंवा स्वरूपें–आठ असून, त्यापासूनच हें त्रैलोक्य उत्पन्न होतें. १६ ते तिचे आठ भेद कोणते? अशी तुझ्या मनांत जिज्ञासा उत्पन्न होईल. तर तोही विचार आतां ऐक. १७ आप, तेज, गगन, पृथ्वी, वायु, मन, बुद्धि आणि अहंकार हे तिचे निरनिराळे आठ भेद आहेत. " १८**

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

[ अपरेयं ] या आठांची जे साम्यावस्था[10] । [ इतस्त्वन्यामिति ] ते माझी परम[11] प्रकृति पार्था । [ जीवभूतां महाबाहो ] तिये नाम व्यवस्था । जीव ऐसा ॥ १९ ॥ जे जडातें[12] जीववी[13] । चेतनेतें[14] चेतवी[15] । मना करवीं मानवी । शोक मोहो ॥२०॥ पैं बुद्धीच्या अंगीं जाणणें । तें जिये जवळिकेचें[16] करणें । [ ययेदं धार्यते जगत् ] जिया अहंकाराचे विंदाणें[17] । जगचि धरिजे ॥ २१ ॥

**" अर्जुना! ह्या आठांची जी साम्यस्थिति -एकीकरण-तीच माझी परम-सूक्ष्म-प्रकृति होय. तीसच जीवभूता असें ह्मणतात. १९ ती अचेतनाला जीवत्व ( जन्म ) देते; चैतन्याला चेतना उत्पन्न करते; मनाकडून शोक, मोह ह्यांचा उपभोग घेवविते. २० तसेंच बुद्धीच्या आंगीं जाणतेपण आणणें हेंही तिच्याच सान्निध्याचें कृत्य आहे. तिच्याच अहंकारकुशलतेनें हें जग चाललें आहे. " २१**

१ चांगला, सशक्त, शूर. २ लक्षापर्यंत, लाखों. ३ त्याच्या नंतर. ४ शस्त्र. ५ मांसाला. ६ कापून. ७ विजयरूपलक्ष्मीच्या. ८ पदावर, सिंहासनावर. ९ कोट्यवधि. १० एखादा. ११ मोठी. १२ महत्तत्व आदिकरून. १३ माया. १४ आठप्रकारानें. १५ उत्पन्न होतें.

१ हिच्यापासून. २ शंका, संशय. ३ विचार. ४ उदक. ५ प्रकाश. ६ आकाश. ७ पृथ्वी. ८ वायु. ९ आठही. १० एकीकरण. ११ आत्मस्वरूप. १२ अचेतनाला. १३ चेतना देते. १४ चैतन्याला. १५ जागृत करते. १६ सान्निध्याचा परिणाम. १७ कुशलतेनें.

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥

[ एतदिति ] ते सूक्ष्म प्रकृति कोडें[1] । स्थूळाचिया आंगा घडे । तैं भूतें[3] सृष्टीची पडे । टांकसाळ ॥ २२ ॥ चतुर्विध[4] ठसा । उमटों लागे आपैसा । मोला[6] तरीं सरिसा । परि थ-टचि आनान ॥ २३ ॥ होती चौऱ्यासीं लक्ष थरा। येरा मिती नेणिजे भांडारा । भरे आदिशून्याचा[10] गाभारा । नाणेयांसी[11] ॥२४॥ ऐसें एकतुकें[12] पांचभौतिक[13] । पडती बहुवस टांकें[14] । मग तिये सम्रुद्धीचे लेखे[15] । प्रकृतीचि धरी ॥२५॥ जें आंखूनि[16] नाणें विस्तारी । पाठीं[17] तयाची ओटणी करी । माजी कर्माक-र्मांचिया व्यवहारीं । प्रवर्तु[19] दावी ॥ २६ ॥ हें रूपकें[20] परी असो । सांगों उघड जैसें ये[21] परियेसों[22] । तरीं नामरूपाचा अतिसो[23] । प्रकृतीच कीजे ॥ २७ ॥ [ अहमिति ] आणि प्र-कृति तंव माझ्या ठायीं । बिंबे येथ आन नाहीं । ह्मणोनि आदि मध्य अवसान पाहीं । जगासि-मी ॥२८॥

"ही सूक्ष्म प्रकृति, आपल्या इच्छेनें स्थूल प्रकृतीशीं जेव्हां संयोग पावते, तेव्हां प्राणि-मात्रांची टांकसाळ सुरू होते. २२ आणि (जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज) चार जातींचीं स्वरूपें आपोआप व्यक्त होऊन दिसूं लागतात. जीव पाहूं गेलें तर सर्वांचे सा-रखेच; परंतु जाती मात्र भिन्न भिन्न ! २३ ह्या निरनिराळया योनी-जाती-चवऱ्यायशीं लक्ष आहेत. शिवाय इतर संग्रहास तर संख्याच नाहीं. या सर्व प्राण्यांनीं आकाशाची पोकळी भरून जाते. २४ अशा प्रकारें एकासारखे एका नमुन्याचे पंचमहाभूतांचे ठसे उमटतात. त्यांचें मोजमाप करणारी मायाच. २५ ह्या नाण्यांचा मुद्रेप्रमाणें छाप करून ती सुकाळ करून सोडते, व मागाहून पुन्हा सर्वांची आटणी करते. मध्यंतरीं मात्र चां-गल्या वाईट कर्मांच्या व्यवहारामध्यें प्रवृत्ति दाख-विते. २६ हें एक रूपकसादृश्याचें उदाहरण आहे. तें असो. तुझ्या मनांत नीट भरेल असें स्पष्ट सांगणें तर इतकेंच सांगावयाचें कीं, नां-वाचा व रूपांचा अतिशय विपुलता प्रकृतिच क-रते. २७ आणि ती प्रकृति ह्मणजे माया—माझ्याच ठिकाणीं एकरूप होते, ह्यांत संशय नाहीं. ह्मणून जगाचा आदि, मध्य, व अंतही मीच." २८

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

[ मत्तः परतरमिति ] हें रोहिणीचें[1] जळ। तयाचें पाहातां येइजे मूळ । तैं रश्मि नव्हती केवळ । होय तें भानु ॥ २९ ॥ तयाचिपरी किरीटी । इया प्रकृती जालिये सृष्टी । जैं उप-संहरूनि[2] कीजेल ठी[3] । तैं मीचि आहें ॥ ३० ॥ [ मयीति ] ऐसें होयें[4] दिसे न दिसे । हें मजचिमाजी असे । मियां विश्व धरिजे जैसें । सूत्रें मणि ॥३१॥ सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुतीं वोंविले । तैसें म्यां जग धरिलें । सबाह्याभ्यं-[5]तरीं ॥ ३२ ॥

"हें सर्व मृगजळवत् आहे असें समज. मृ-गजळाचें मूळ शोधूं लागलें तर केवळ किरणच नव्हेत. तर सूर्य हें त्याचें मूळ आहे. २९ त्या-चप्रमाणें अर्जुना ! माया ही सृष्टि उत्पन्न करून तिचा पुन्हा संहार करून मूळरूपाशीं आणील, तेव्हां मीच आहें. ३० ह्यावरून उत्पन्न होतें, दिसतें, व नाहींसें होतें, तें सर्व मजमध्येंच आहे. सूत्रानें मणी धरल्याप्रमाणेंच मी हें विश्व धरलें आहे. ३१ सोन्याचे मणी करावेत, आणि ते सोन्याच्याच सुतांत ओवा-वेत, त्याप्रमाणें मी हें जग अंतर्बाह्य धरलें आहे." ३२

रसोऽहमप्सु कौंतेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥
पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

१ आवडीनें. २ महाभूतांच्या, जडांच्या. ३ प्राण्यांच्या उत्पत्तीची. ४ जरायुज (संयोगानें होणारे) अंडज, (आंड्यां-तून उत्पन्न होणारे) स्वेदज, (घामापासून होणारे) उद्भिज, (जमिनींतून वर येणारे) असे चार प्रकारचे. ५ आपोआप. ६ किमतीनें. ७ सारखाच. ८ जाति. ९ वेगवेगाळ्या. १० आकाशाचा. ११ नाण्यांनीं, प्राणिमात्रांनीं. १२ एका-सारखें एक. १३ पंचमहाभूतांची. १४ नाणीं, ठसे. १५ हि-शेब, जमाखर्च. १६ मोजून, आकारून, ठरवून. १७ पुन्हा. १८ गाळणी, नाश. १९ प्रवृत्ति. २० दृष्टांत, उपमा. २१ येईल. २२ समजण्यास. २३ अतिशय, विपुलता.

१ मृगजळ. २ नाश करून. ३ शेवट, पर्यवसान. ४ होतें. ५ अंतर्बाह्य.

[ रसोऽहमिति ] ह्मणोनि उदकीं रसें[1] । कां पवनीं जो स्पर्शे[2] । शशिसूर्यी जो प्रकाश । तो मीचि जाण ॥ ३३ ॥ [ पुण्यो गंधः पृथिव्यां च ] तैसाचि नैसर्गिक[3] शुद्ध । मी पृथ्वीच्या ठायीं गंधु[4] । [ शब्दः खे ] गगनीं मी शब्द । [ प्रणवः सर्ववेदेषु ] वेदीं प्रणव[5] ॥ ३४ ॥ [ पौरुषं नृषु ] नराच्या ठायीं नरत्व[6] । जें अहंभाविये[7] सत्व[8] । तें पौरुष[9] मी हें तत्व[10] । बोलिजत असे ॥ ३५ ॥ [ तेजश्चास्मि विभावसौ ] अग्नि ऐसें आहाच[11] । तेजीं नामाचें आहे कवचें[12] । तें परतें[13] केलिया साच । निजतेज[14] तें मी ॥ ३६ ॥ [ जीवनं सर्वभूतेषु ] आणि नानाविध योनि । जन्मोनि भूतें त्रिभुवनीं । वर्तत आहाति जीवनीं[15] । आपुलाल्या ॥ ३७ ॥ एकें पवनेंचि पीति । एकें तृणास्तव[16] जीतीं[17] । एकें अन्नाधारें राहाती । जळें एकें ॥ ३८ ॥ ऐसें भूतप्रति[18] आनान[19] । जें प्रकृतिवशें दिसे जीवन[20] । तें आघवांठायीं[21] अभिन्न । मीचि एक ॥ ३९ ॥

**"ह्मणून उदकामध्यें जो रस; किंवा वायूमध्यें जो स्पर्श; किंवा शशिसूर्यामध्यें जो प्रकाश तो मीच असें समज. ३३ तसेंच पृथ्वीमधील स्वाभाविक सुगंध तो मी. गगनामध्यें शब्द तो मी. आणि वेदामध्यें ओंकार तो मी. ३४ पुरुषांच्या ठायीं अभिमानरूप राहणारा जो पराक्रम तो मीच, हें एक तत्त्व तुला सांगून ठेवतों. ३५ अग्नि, असें तेजाला केवळ टोपणनांव आहे. तें बाजूस केलें तर, खरें तेज तें मी. ३६ त्रिभुवनांतील अनंत जातींमध्यें प्राणी जन्म घेऊन, आपआपल्या उदरपोषणार्थ यत्न करीत असतात. ३७ कोणी वायूच भक्षण करतात; कोणी तृणावरच आपला चरितार्थ चालवितात; कोणी अन्न सेवन करून राहतात; व कोणी पाणीच पिऊन असतात. ३८ ह्याप्रमाणें प्रत्येक प्राणिमात्राला मायेच्या योगानें अन्न हें भिन्न भिन्न दिसतें खरें. तरी मी त्या सर्व ठिकाणीं व्यापलेला असून अभिन्नच आहें." ३९**

१ स्वाद. २ आंगांस ज्ञान होण्याचा धर्म. ३ स्वाभाविक. ४ सुवास. ५ ओंकार. ६ मनुष्यपणा, पुरुषत्व. ७ अभिमान उत्पन्न करणारे. ८ बळ. ९ पराक्रम, शौर्य. १० खरी गोष्ट. ११ वरवर. १२ आवरण, टोपण. १३ काढून टाकलें तर. १४ खरें तेज, स्वस्वरूप. १५ उपजीवनार्थ. १६ तृणानें. १७ निर्वाह करतात. १८ प्रत्येक प्राणी. १९ निरनिराळे. २० अन्न, भक्ष्य. २१ सर्वठिकाणीं.

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥
बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

[ बीजं मां सर्वभूतानां ] पैं आदिचेनि[1] अवसरें । विरुढे[2] गगनाचेनि अंकुरें । जें अंतीं गिळी अक्षरें । प्रणवपीठींचीं[3] ॥ ४० ॥ जंव हा विश्वाकार असे । तंव जें विश्वाचिसारिखें दिसे । मग महाप्रळयदशे । कैसेनि नव्हे ॥ ४१ ॥ ऐसें अनादि जें सहज । तें मी गा विश्वबीज । हें हातातळीं[4] तुज । देइजत असे ॥ ४२ ॥ मग उघड करूनि पांडवा । जैं हें आणिसी सांख्याचिया[5] गांवा । तैं ययाचा उपेग[6] वरवा । देखसील ॥ ४३ ॥ परी हे अप्रासंगिक आलापें । आतां असतु[8] बोलों[7] संक्षेपें । [ तपश्चास्मि तपस्विषु ] तपियांच्या[9] ठायीं तप । तें रूप माझें ॥ ४४ ॥ [ बलं बलवतां चाहमिति ] बळियामाजि बळ । तें मी जाण अढळ । [ बुद्धिर्बुद्धिमतामस्मि ] बुद्धिमंतीं केवळ । बुद्धि ते मी ॥ ४५ ॥ [ धर्माविरुद्धो भूतेष्विति ] भूतांच्या ठायीं काम । तो मी ह्मणे आत्माराम । जेणें अर्थास्तव[10] धर्म । थोर होय ॥ ४६ ॥ येऱ्हवीं विकाराचेनि पैसें[11] । करी कीर[12] इंद्रियाच्याचि ऐसें । परी धर्मासि वेखासें[13] । जावों नेदी ॥ ४७ ॥ जों अप्रवृत्तीचा[14] अव्हांटा[15] । सांडूनि विधीचिया[16] निघे वाटा । तेवींचि नियमाचा दिवटी[17] । सवें चाले ॥ ४८ ॥ काम ऐशिया वोजा[18] प्रवर्ते । ह्मणोनि धर्मासि होय पुरतें[19] । मोक्षतीर्थींचे मुक्त[20] । संसार भोगी ॥ ४९ ॥ [ कामोऽस्मि भरतर्षभ ] जो श्रुतिगौरवाच्या[21] मांडवीं । कामसृष्टीचा[22] वेल वाढवी । जंव कर्मफळेंसि पालवी । अपवर्गीं[23] टेंके ॥५०॥ ऐसा नियम कां कंदर्प[24] । जो भूतां यां बीजरूप[25] । तो मी ह्मणे बाप । योगियांचा ॥ ५१ ॥ [ तेजस्तेजस्विनामहं ] हें एकेक किती सांगावें । आतां वस्तुजातचि[26] आघवें । मजपासूनि जाणावें । विकारलें[27] असे ॥५२॥

**"विश्वोत्पत्तीच्या वेळीं, गगनाच्या अंकुरानें जें विस्तार पावतें; आणि तेंच संहार-**

१ प्रारंभीं. २ विस्तार पावतें. ३ ओंकारांतील. ४ हातांत. ५ विचाराच्या. ६ उपयोग. ७ बोलणें. ८ अस्तु, असो. ९ तपस्व्यांच्या. १० द्रव्यसंग्रहास्तव. ११ मार्गानें. १२ निश्चयेंकरून. १३ विरुद्ध. १४ स्वधर्मत्यागाचा. १५ आडरस्ता. १६ कर्तव्यकर्माच्या. १७ मशाल. १८ रिति. १९ पूर्ण. २० मुक्तीनें. २१ वेदमंडनाच्या. २२ अभिलाषाचा. २३ मोक्षामध्यें. २४ काम. २५ कारणभूत, मूळ. २६ एकूनएक पदार्थ. २७ विस्तार पावलें.

ालीं ओंकारांतील अक्षरें (अ-उ-म्) गिळून ाकतें. ४० जोंपर्यंत हा विश्वाकार दिसतो, ोंपर्यंत जें विश्वाकार रूप दिसतें; तें मग महा-लयाच्या अवस्थेंत तरी मूळरूपास पों-चल्यावांचून कसें राहील ? ४१ असें जें मूळ, नादिसिद्ध–विश्वाचें बीज–जगाचें कारण–तें ीच वरें. तें हें, मी तुझ्या अगदीं आज हातांत त आहें. ४२ **अर्जुना !** हें उघड करून तूं ज्ञा-ाच्या गांवीं आणशील, तेव्हां त्याचा तुला ांगला उपयोग करून येईल. ४३ पण हें अ-ासंगिक भाषण आतां पुरे करून, चालू विषय ंक्षेपानें सांगूं. तपस्व्यामध्यें जें तप, तें माझेंच वरूप हें ध्यानांत ठेव. ४४ बलिष्ठ लोकांमध्यें ळ तें निःसंशय मीच. बुद्धिवंतांमध्यें बुद्धि ी निश्चयेंकरून मी." ४५ आत्माराम आणखी णतात "प्राणिमात्रामध्यें काम तो मी. जो ाळगल्याच्या योगानें द्रव्यसंग्रहादि करतां ये-न मोठमोठाले धर्म साधतां येतात. ४६ बाकी, वेचाराच्या मार्गानें पाहिलें तर तो देखील द्रियांच्याच अनुषंगानें असतो ही गोष्ट खरी; थापि तो त्यांना धर्मास विरुद्ध जाऊं देत नाहीं. ७ जोंपर्यंत स्वधर्मत्यागाचा आडमार्ग सोडून, ऱ्या कर्तव्याच्या मार्गानें तो जात असतो, ावत्कालपर्यंत नियमरूप मशालजी त्याच्या ारोवर असतो. ४८ अशा सरळ रीतीनें काम ालतो, ह्मणून धर्म परिपूर्ण होतो. आणि तो ी मोक्षतीर्थाच्या मुक्ततेनें संसाराचा उपभोग तो. ४९ वेदसत्काराच्या मंडपावर, कर्मफळा-ाद्दवर्तमान मोक्षास पोंचेपर्यंत जो कामसृष्टीच्या ळाची पालवी वाढविणारा," ५० सर्व ोग्यांचे जनक जे श्रीकृष्ण ते ह्मणतात "असा ो नियमन केलेला व प्राणिमात्रांच्या उत्पत्तीस ीजरूप असणारा काम–ह्मणजे मदन–तो ी. ५१ असें एक एक किती ह्मणून तुला ातां सांगावें ? यच्चयावत् जितक्या ह्मणून स्तु आहेत, तितक्या सर्व माझ्याच पासून त्पन्न झाल्या आहेत हें ध्यानांत ठेव." ५२

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥१२॥

[ ये चैव सात्त्विका भावा इति ] जे सात्त्विक हन भावे[1] कां रजतमादि सर्वे । [ मत्त एवेति तान्विद्धि ] ते ममरूपसंभव[2] । वोळखें तूं ॥ ५३ ॥ [ ते मयि ] ते हे जाले तरी माझ्याठायीं । [ न त्वहं तेषु ] परी तयांमाजी मी नाहीं । जैसी स्वप्नीच्या डोहीं । जागृती न बुडे ॥ ५४ ॥ जैसी रसाचीच[3] सुघट[4] । बीजकणिका[5] घनवट[6] । परी तियेस्तव होय काष्ठ । अंकुरद्वारें ॥ ५५ ॥ मग तया काष्ठाच्या ठायीं । सांग पां बीजपण असे काई । तैसा मी विकारीं नाहीं । जरी विकारला दिसें ॥ ५६ ॥ पैं गगनीं उपजे आभाळ । परी तेथ गगन नाहीं केवळ । अथवा आभाळीं होय सलिलें । तेथ अभ्र नाहीं ॥५७॥ मग त्या उदकाचेनि आवेशें[8] । प्रगटलें तेज जें लखलखीत दिसें । तिये विजूमाजि[9] असे । सलिल कायि ॥ ५८ ॥ सांगें अग्नीस्तव धूम[10] होये[11] । तिये धूमीं काय अग्नि आहे । तैसा विकार हा मी नोहें । जरीं विकारला असें॥५९॥

"सात्त्विक वृत्ति ह्मण, किंवा रजतमादि सर्व वृत्ति ह्मण, त्या साऱ्या माझ्या पासूनच उत्पन्न झाल्या आहेत, हें ध्यानांत असूं दे. ५३ ह्या सर्व वृत्ति जरी माझ्या पासूनच उत्पन्न झालेल्या आहेत, तरी त्यांच्यामध्यें मात्र मी नाहीं. ज्याप्रमाणें स्वप्नरूप डोहांत जागृतावस्था बुडत नाहीं; ५४ त्याप्रमाणें, किंवा रसाळ व सत्त्वयुक्त बीजपरमाणू पासूनच अंकूर फुटून त्याचें मोठें लाकूड होतें; ५५ मग त्या लाकडां-मध्यें बीजाचे धर्म कांहीं तरी राहतात काय ? सांग वरें. त्याप्रमाणें मीच जरी सर्वत्र प्रगटलेला दिसतों, तरी त्या विकारामध्यें मी नाहीं. मी अलग आहें. ५६ अथवा आकाशांत अभ्र येतें, तेथें शुद्ध आकाश असत नाहीं; तसेंच, अभ्रा-मध्यें पाणी होतें त्यांत अभ्र असत नाहीं. ५७ मग त्या पाण्याच्या जोरानें निघालेलें तेज लखलखीत दिसतें. त्या लखलखणाऱ्या ते-जांत–ह्मणजे विजेंत–मग पाणी असतें का ? ५८ अग्नीपासून धूर उत्पन्न होतो; त्या धुरांत

१ वृत्ति. २ माझ्याच स्वरूपापासून उत्पन्न झालेले. ३ द्रवरूप पदार्थाचीच. ४ घडलेली. ५ बी, दाणा. ६ ठेचून, घट्ट. ७ पाणी. ८ हालचालीनें. ९ विजेमध्यें. १० धूर. ११ उत्पन्न होतो.

**अग्नि असतो काय? सांग. त्याप्रमाणें सारे विकार जरी माझ्यापासूनच झाले आहेत, तरी त्या विकारांत मी नाहीं." ५९**

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत्।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम्॥१३॥

[ त्रिभिर्गुणमयैर्भावैरिति ] परी उदकीं जाली वार्उुळी। ते उदकातें जैसी झांकोळी। कां वायांचि आभाळीं। आकाश लोपे ॥ ६० ॥ हां गा स्वप्न लटिकें म्हणों ये। परि निद्रावशें बाणलें होये। तंव आठव काय देत आहे। आपणपेयां ॥६१॥ हें असो डोळयांचें। डोळांचि पडळ रचे। तेणें देखणेपण डोळयांचें। न गिळिजे काथि ॥ ६२ ॥ तैसी हे माझीच बिंबली। त्रिगुणात्मक साउली। [ मोहितं ] कीं मजचि आड वोडावली। जवनिका जैसी ॥ ६३ ॥ [ नाभिजानाति ] म्हणऊनि भूतें मातें नेणती। [ मामेभ्यः परमव्ययं ] माझींच परी मी नव्हती। जैसीं जळींचीं जळीं न विरती। मुक्ताफळें ॥ ६४॥ पैं पृथ्वीयेचा घट कीजे। सवेंचि पृथ्वीसि मिळे जरी मेळविजे। येऱ्हवीं तोचि अग्निसंगें सिजे। तरी वेगळा होय ॥ ६५ ॥ तैसें भूतजात सर्व। हे माझेचि कीर अवयव। परि मायायोगें जीव। दशे आले ॥ ६६ ॥ म्हणोनि माझेचि मी नव्हती। माझेचि मज नोळखती। अहंममताभ्रांती। विषयांध जाले ॥ ६७ ॥

**"उदकांत शेवाळ वाढलेली असली म्हणजे ती जशी उदकाला आच्छादून टाकते; किंवा वायफळ अभ्रांनीं सुद्धां आकाश लोपून जातें. ६० आणखी असें पहा! स्वप्न हें लटकें आहे असें आपणांस म्हणतां येतें. पण निद्रिस्त असतांना तेंच अगदीं खऱ्याप्रमाणें वाटतें. त्या वेळीं त्याच्या मिथ्यात्वाची आठवण तरी होते कां? ६१ हें असो. डोळ्याचाच पडदा डोळ्यांत वाढून डोळ्याची दृष्टि नाहींशी होत नाहीं काय? ६२ त्याप्रमाणें, माझीच ही प्रतिबिंबरूप त्रिगुणात्मक छाया, पडद्याप्रमाणें माझ्याच आड आलेली आहे. ६३ म्हणून प्राणी मला जाणत नाहींत. जळापासून झालेलीं मोत्यें असतात, पण तीं जशीं जळांत विरत नाहींत, त्याप्रमाणें, सारे प्राणी माझेच आहेत तरी, मत्स्वरूप होत नाहींत. ६४ मातीची घागर केली, आणि ती लागलीच्या लागलीच मातींत मिळवली, तर मिळते–तद्रूप होते–पण तीच भट्टींत घालून भाजून काढली, तर तींत मिळत नाहीं–वेगळी राहते. ६५ त्याप्रमाणें सारे प्राणिमात्र हे माझेच अवयव आहेत खरे; तरी ते मायेच्या योगानें जीवदशेस पोंचलेले आहेत. ६६ म्हणून मी व माझें या भ्रांतीनें विषयांध होत्साते, माझे असून ते माझे नव्हेत असे झाले आहेत. कारण, ते माझे असून मला ओळखत नाहींत!" ६७**

१ शेवाळ. २ खरेंसें वाटतें. ३ पडदा. ४ दृशपणा. ५ प्रतिबिंब. ६ प्राप्त झाली. ७ पडदा. ८ मोत्यें. ९ मातीचा. १० भाजला, पचला. ११ मी व माझें या भ्रांतीनें.

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥

[दैवी ह्येषा] आतां महदादि हे [मम माया] माझी माया। उतरोनियां धनंजया। मी होइजे हें आर्यां। कैसेनि ये ॥६८॥ जिये ब्रह्माचळाचा आधाडा। पहिल्या संकल्पजळाचा उभाडा। सवेंचि महाभूतांचा बुडबुडा। साना आला ॥ ६९ ॥ जे सृष्टीविस्ताराचेनि वोघें। चढत काळकळनेचेनि वेगें। प्रवृत्ति निर्वृत्तीचीं तुंगे। तटें सांडी ॥७०॥ [ गुणमयी ] जे गुणघनांचेनि वृष्टिभरें। भरली मोहाचेनि महापूरें। घेऊनि जात नगरें। यमनियमाचीं ॥ ७१ ॥ जे द्वेषाच्या आवर्ती दाटत। मत्सराचे वेंळसे पडत। माजि प्रमादादि तळपत। महामीन ॥ ७२ ॥ जेथ प्रपंचाचीं वळणें। कर्माकर्माचीं वोभाणें। वरी तरोती वोसाणें। सुखदुःखांचीं ॥ ७३ ॥ रतिचिया बेटा। आदळती कामाचिया लाटा। जेथ जीवफेन संघाटा। सैंघ दिसे ॥७४॥ अहंकाराचिया चेळिया। वरि मदत्रयांचिया उकळिया। जेथ विषयोर्मीच्या आकळिया। उल्लाळ घेतिं ॥ ७५ ॥ उदयास्तांचे लोंढे। पाडीत जन्ममरणाचे चोंढे।

१ महत्तत्त्व आदिकरून. २ समजुतीस. ३ ब्रह्मरूप पर्वताचा. ४ मध्यभाग. ५ झरा. ६ लहानसा. ७ कालगतीच्या. ८ स्वार्थाचीं व परमार्थाचीं. ९ उंच. १० तीरें, डगरीं. ११ तीन गुण हेच कोणी घन; त्यांच्या. १२ इंद्रियनिग्रहाचीं. १३ भोवऱ्यांनीं. १४ वळणें. १५ असावधपणा आदिकरून. १६ चमकतात. १७ पूर, वेग. १८ तरंगतात. १९ पुईड. २० विषयसुखाच्या. २१ जीव–प्राणीरूप फेसाचे ढीग. २२ विपुल. २३ लहरी. २४ विद्या, धन, सामर्थ्य–ह्या तीन मदाच्या. २५ विषयतरंगाच्या. २६ लाटा. २७ उसासा. २८ धरण, डोहो.

ेथ पांचभौतिक[1] बुडबुडे । होती जाती ॥ ७६ ॥ सम्मोह[2]
ेभ्रम मासे । गिळिताति धैर्याचीं आमिषें[3] । तेथ देव्हडे[4] भों-
ात वळसे[5] । अज्ञानाचे ॥ ७७ ॥ भ्रांतीचेनि खडुळें[6] । रेवलें[7]
ास्थेचें अवगाळें[8] । रजोगुणाचेनि खळाळें । स्वर्ग गाजे
। ७८ ॥ तमाचे धीरसे वोढ[9] । सत्वाचें स्थिरपण जाड ।
दुरत्यया] किंबहुना हे दुर्वाड[10] । मायानदी ॥ ७९ ॥ पैं
नरावृत्तीचेनि उभडें[11] । झळंवती[12] सत्यलोकींचे हुडे[13] । घायें[14] ग-
ावडती धोंडे । ब्रह्मगोळकाचे ॥ ८० ॥ तया पाणियाचेनि
हिलेपणें[15] । अझुनी न धरती वोभाणें[16] । ऐसा मायापूर हा
वर्णे । तरिजेल गा ॥ ८१ ॥ येथ एक नवलावो[17] । जो जो
ेजे तरणोपावो[18] । तो तो अपावो[19] । होय तें ऐक ॥ ८२ ॥
क स्वयंबुद्धीच्या[20] बाहीं[21] । रिगाले तयांची शुद्धीचि नाहीं ।
क जाणिवेचे[22] डोहीं । गर्वेंचि गिळिले ॥ ८३ ॥ एकीं वेद-[23]
याचिया सांगडी । घेतल्या अहंभावाचिया[24] धोंडी । ते मद-
ीनाच्या[25] तोंडीं । सगळेचि गेले ॥ ८४ ॥ एकीं वयसेचें[26] जोंड[27]
ांधले । मग मन्मथीचिये[28] कासे लागले । ते विषयमगरीं[29]
ांडिले । चघळूनियां ॥ ८५ ॥ आतां वार्धक्याच्या तरंगा ।
ाजि मतिभ्रंशाचा जरंगा[30] । तेणें कवळिजताति[31] पैंगा । चहूं-
डे॥८६॥ आणि शोकाचा कडा उपडत । क्रोधाच्या आ-
र्तीं[32] दाटत । आपदागिधीं[33] चुंबिजत[34] । उधवलाठायीं[35] ॥ ८७ ॥
ग दुःखाचेनि बरबटें[36] बोंवले[37] । पाठीं मरणाचे रेवें[38] रेवले[39] ।
से कामाचे कासे लागले । ते गेले वायां ॥ ८८ ॥ एकीं
जनक्रियेची[40] पेटी । बांधोनि घातली पोटीं ते स्वर्गसुखाच्या
पाटीं । शिरकोनि ठेले ॥ ८९ ॥ एकीं मोक्षीं लागावया-
ेया आशा । केला कर्मबाह्यांचा[41] भरंवसा । परी ते पडिले
ळसां । विधिनिषेधांच्या ॥ ९० ॥ जेथ वैराग्याची नाव न
ेगे । विवेकाचा तागा नलगे । वरि कांहीं तरोंये योगें । तरी
विपायें[1] तो ॥ ९१ ॥ ऐसें तरी जीवाचिये आंगवणें[2] । इये
मायानदीचें तरणें । हें कासयासारिखें बोलणें । म्हणावें पां
॥ ९२ ॥ जरी अपथ्यशीळा[3] व्याधी । नाकळे[4] साधूसि दुर्ज-
नाची बुद्धी । कीं रागी[5] सांडी सिद्धी । आली सातीं[6] ॥ ९३ ॥
जरी चोरा सभा दाटे[7] । अथवा मीना गळ घोंटे[8] । ना तरी
भेडा[9] उलटे । पिवसी[10] जरी ॥ ९४ ॥ पाडस वागुर करांडी ।
कां मुंगी मेरु वोलांडी । तरी मायेची पैलथडी । देखती
जीव ॥ ९५ ॥ म्हणऊन गा पंडुसुता । जैसी सकामा[11] न जि-
णवेचि वनिता । तेवीं मायामय हे सरिता[12] । न तरवे जीवां
॥ ९६ ॥ [मामेव ये प्रपद्यंते] येथ एकचि लीला[13] तरले । जे
सर्वभावें मज भजले । तयां ऐलीचे[14] थडी सरलें । मायाजळ
॥ ९७ ॥ जयां सद्गुरु तारूं फुडें । जे अनुभवाचे कासे गाढे[15]
जयां आत्मनिवेदन[16] तरांडे[17] । आकळलें[18] ॥ ९८ ॥ जे अहंभा-
वाचें वोझें सांडुनी । विकल्पाचिया झुळका चुकाउनि । अनु-
रागाचा[19] निरुतें[20] होउनी । पाणिढाळें[21]॥९९॥ जया ऐक्याचिया
उतारा । बोधाचा जोडला तारों[22] । मग निवृत्तीचिया पैल
तीरा । झेंपावले[23] जे ॥ १०० ॥ ते उपरतीच्या[24] वावीं[25] से-
लतें[26] । सोहंभावाचेनि[27] थावें[28] पेलतें[29] । मग निघाले अनकळित[30] ।
निवृत्तितटीं[31] ॥ १ ॥ येणें उपायें मज भजले । [मायामेतां
तरंति ते] ते हे माझी माया तरले । परि ऐसे भक्त विपा-
इले[32] । बहुवस नाहीं ॥ २ ॥

**"आतां धनंजया! महत्तत्त्वादिक जी ही माझी माया, त्या मायेंतून पार पडून मद्रूप कसें व्हावें, तें सांगतों. ६८ प्रथम ब्रह्मरूप पर्वतापासून आदि संकल्परूप पाण्याचा झरा उत्पन्न होऊन, त्यांतून पंचमहाभूतांचे बारीक बारीक बुडबुडे येतात, ६९ आणि ते सृष्टिविस्ताराच्या ओघानें, आणि कालगतीच्या वेगानें वाढत वाढत, प्रपंच व मोक्ष हीं दोन्हीं**

१ शरीरें. २ तीव्रमोह. ३ मांसें. ४ मोठे. ५ भोवरे. ६ गढूळ होतें. ७ माजून राहिली. ८ दलदल. ९ प्रवाह, वेग. १० दुर्घट. ११ लोट. १२ बुडतात. १३ बुरूज. १४ तडाक्यानें. १५ प्रवाहानें, वेगानें. १६ प्रवाह. १७ आश्चर्य. १८ तरून जाण्याचा उपाय. १९ अपाय. २० आत्मबुद्धीच्या. २१ बाहुबळानें. २२ ज्ञानाच्या. २३ ऋक्, यजु, साम–ह्या तीन वेदांच्या. २४ मीपणाच्या. २५ गर्वरूप माशाच्या. २६ तारुण्याचें. २७ बळ. २८ मदनाच्या. २९ विषयरूप सुसरीनें. ३० जाळें. ३१ कोंडाळले जातात. ३२ भोंवऱ्यांत. ३३ आपत्तिरूप गिधाडें. ३४ चोंचा मारतात. ३५ निघाल्याठिकाणीं. ३६ चिखलानें. ३७ माखले. ३८ रेवेंत, वाळूंत. ३९ रुततात. ४० यज्ञादिककर्मांची सांगड. ४१ बाह्यकर्मांचा.

१ कठीणच. २ अनुकूल. ३ अपथ्य करणाराला. ४ आकळत नाहीं. ५ विषयासक्त. ६ आली असतां. ७ भरेल. ८ गिळवेल. ९ भितरा. १० राक्षशीण. ११ विषयी पुरुषाला. १२ नदी. १३ लीलेनें, सहज. १४ आलीकडच्याच. १५ बळकट. १६ आत्मा ईश्वरास अर्पण करणें. १७ ताफा, तारूं. १८ सांपडला. १९ अहंभावाच्या. २० चांगला. २१ पायउतार. २२ सांगड. २३ पोचले. २४ वैराग्याच्या. २५ हातांनीं. २६ पाणी तोडीत. २७ मीच ब्रह्म अशा भावनेच्या. २८ बळानें. २९ पोहत पोहत. ३० दुःखरहित. ३१ मुक्तीच्या तीराला. ३२ विरळा, थोडे.

तीरें दोहों बाजूस करून नदीच्या रूपानें वाहूं लागतात. ७० आणि तिच्यावर सत्वादि गुण-रूप मेघांची वृष्टि होत असल्यानें, भ्रांतीचा महापूर येऊन ती तुफान होते. व इंद्रियनिग्रह, विधियुक्त कर्म, इत्यादि शहरें तमाम खणून नेते. ७१ तिच्या मध्यें द्वेषाचे भोंवरे फिरत असतात; मत्सराचीं वळणें पडत असतात. आणि त्यामध्यें असावधपणादिक मासे चमक-तात. ७२ ज्या नदींतील प्रपंचरूपी वळणांवर, आणि कर्माकर्मरूपधारेवर सुखदुःखाचें पुईड तरंगत असतें. ७३ विषयसुखाच्या बेटाला, मदनाच्या लाटा येऊन आदळतात. तेव्हां तेथें जीवरूपी फेंसच फेंस जमून राहतो. ७४ तेथें अहंकाराच्या वाऱ्यानें, मदत्रयाच्या (विद्या, धन आणि सामर्थ्य) धक्क्यानें विषयतरंगाचे लोंढे एकावर एक उसळ्या घेत असतात. ७५ उदयास्ताच्या लोंढ्यांनीं जन्ममरणाचे डो-होच्या डोहो तयार होऊन त्यामध्यें शरीराचे बुडबुडे उत्पन्न होतात व नाश पावतात. ७६ ह्या नदींतील मोहभ्रमरूपी मासे, गळास लावलेलें धैर्यरूप मांस खात असतात. तेथें अज्ञानाचे भोंवरे उत्पन्न होऊन गर गर गर गर फिरतात. ७७ भ्रांतीच्या गढूळपणानें आस्थेची दलदल माजून राहते. रजोगुणाच्या खळाळानें तर स्वर्ग दणाणून जातो. ७८ त-माची धार मोठी; सत्वाचें स्थीरपण जाड; अशीही माया नदी महादुस्तर आहे. ७९ हिच्या वारंवार येणाऱ्या लोंढ्यांनीं सत्यलोकचे बुरूज कोसळतात; त्यांच्या धक्क्यांनीं ब्रह्मलोकचे धोंडे ढांसळून पडतात. ८० ह्या पाण्याच्या वेगाला अद्याप उतार ह्मणून झालेला नाहीं. असा हा मायापूर कोणाच्यानें तरवेल ? ८१ ह्यांत हें एक मोठें विलक्षण आहे तें ऐक. कीं, हींतून तरून जाण्याविषयीं जो जो ह्मणून उपाय करावा, तो तो अपायच होतो. ८२ कोणीं आपल्या बुद्धिरूप भुजबळाच्या जोरावर आंत उडी टो-कली; त्यांचा मागमोस सुद्धां उरला नाहीं. कोणीं ज्ञानडोहांत शिरले होते, त्यांस गर्वानेंच गिळून टाकलें. ८३ कोणी वेदत्रयांच्या ( ऋक्, यजु, साम ) सांगडी करून अहंभावाचे धोंडे कमरेस बांधले. ते सगळेच्या सगळेच मदम-त्स्याच्या तोंडांत पडले ! ८४ कोणी तारुण्याचें बळ बांधून मदनाच्या कासेस लागले. ते विषयरूप सुसरीनें चावून त्यांचीं हाडें चूर करून टाकलीं. ८५ मग ते वृद्धपणांच्या ला-टांतून वहात वहात बुद्धिभ्रंशरूप जाळ्यांत सांपडल्यानें चहूंकडून जखडले गेले. ८६ आणि शोकाच्या कड्यावर आपटत आपटत, क्रोधरूप भोवऱ्यांत गिरके खात खात वाहत चालले. कोठें वर डोकें काढावयास संधि मिळाली, तर तेथें आपत्तिरूप गिधाडें चोंचवोंचून घेऊं लागलीं. ८७ दुःखरूप चिखलानें सारें अंग लिडबिडून जाऊन अखेर मरणाच्या रेवेंत रुतून वसले ! ह्याप्रमाणें कामाच्या कासेस लागलेले लोक फुकट गेले. ८८ कोणी कोणी यज्ञक्रियेची पेटीच पोटाखालीं बांधून घेतली होती; ते स्वर्ग-सुखाच्या खबदडींत अडकून राहिले. ८९ कोणी मोक्षास लागावयाच्या आशेनें बाह्यकर्मावर वि-श्वास ठेवला. पण ते कर्तव्याकर्तव्यतेच्या धारेंत सांपडले ! ९० हिच्यामध्यें वैराग्याची नाव घालतां येत नाहीं; विचाराचा तागा लागत नाहीं; बरें; दुसऱ्या कोणत्या तरी उपायानें तरून जाऊं ह्मटलें, तर तो अपाय मात्र होतो. ९१ अशा ह्या मायारूप नदींतून पार पडणें मोठें जि-वावरचें काम आहे. हें कशासारखें आहे ह्मणून सांगावें बरें ? ९२ अपथ्य करणाराला व्याधी; व साधूला दुर्जनाची बुद्धि; हीं कांहींच जर अ-पाय न करतील, किंवा घरीं चालून आलेली सिद्धि जर विषयलोभी टाकून देईल, ९३ चो-रांची जर सभा भरेल, अथवा मत्स्याला गळ गिळवेल, भिऱ्याला जर भूत भिऊन पळेल, ९४ हरणाचें पाडस जर जाळें करकंडील, किंवा मुंगी जर मेरुपर्वत ओलांडून जाईल, तर जीव हे मा-येच्या पैलतीरास पोंचतील. ९५ ह्मणून **पंडुसुता !** विषयी पुरुषाला ज्याप्रमाणें स्त्री जिंक-वत नाहीं,—तिचा शब्द मोडतां येत नाहीं—त्या-

प्रमाणें मायानदी ही जीवांनाही तरवत नाहीं. ९६ जे सर्व भावेंकरून मला भजतात; तेवढे मात्र ही नदी अगदीं हां हां ह्मणतां तरून जातात. फार काय सांगावें ? त्यांना पाहतांच, ते अलीकडच्या थडीला आहेत तोंच, मायाजळ आटून ती नदी अगदीं कोरडी ठणठणीत पडते. ९७ ज्यांच्या पुढें सद्गुरु हा नावाडी आहे; जे अनुभवाच्या घट्ट कासेला लागलेले आहेत; आत्मनिवेदनरूप गलवत ज्यांच्या हातीं लागलें आहे, ९८ जे अहंभावाचें ओझें टाकून, विकल्पाच्या झुळुका चुकवून खऱ्या प्रीतीचा उतार उतरूं लागतात, ९९ ऐक्याच्या उतारांत बोधाची नांगडही ज्यांच्या हातास लागते, आणि जे झपाट्यानें मोक्षाच्या पैलतीराला जावयास निघतात, १०० ते वैराग्याच्या हातांनीं पाणी तोडीत तोडीत, मीच ईश्वर अशा भावनेच्या बळानें पोहत पोहत, अगदीं कष्ट न पडतां मोक्षतीरास पोंचतात. १०१ अशा उपायांनीं जे मला भजले, तेही माझी माया तरून गेले. परंतु असे भक्त क्वचित्, फार नाहींत." १०२

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यंते नराधमाः ।
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिता ॥ १५ ॥
चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥

[ मूढाः ] जे बहुतां एकां अंवांतर । अहंकाराचा भूतसंचार । जाहाला ह्मणोनि विसर । आत्मबोधाचा ॥ ३ ॥ [ दुष्कृतिनः ] ते वेळीं नियमाचें वस्त्र नाठवे । पुढील अधोगतीची लाज नेणवे । आणि करितात जें न करवे । वेद ह्मणे ॥ ४ ॥ [ नराधमाः ] पाहें पां शरीराचिया गांवा । जया-कार्गीं आले पांडवा । तो कार्यार्थ आघवा । सांडूनियां ॥ ५ ॥ [ आसुरं भावमाश्रिताः ] इंद्रियेंग्रामींचे राजबिदीं । अहंममतेच्या जल्पवादीं । विकारांतरांची मांदी । मेळवूनियां ॥ ६ ॥ [ माययापहृतज्ञानाः ] दुःखशोकाच्या घाईं । मारिलियांची सेंचि नाहीं । हें सांगावया कारण काई । जे ग्रासिले मायां ॥ ७ ॥ [ मां न प्रपद्यंते ] ह्मणोनि ते मातें चुकले । [ चतुर्विधा इति ] एक चतुर्विध मज भजले । जिहीं आत्महित केलें । वाढतें गा ॥ ८ ॥ [ आर्त इति ] तो पहिला आर्तं ह्मणिजे । दुसरा जिज्ञासु बोलिजे । तिजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानिया चौथा ॥ ९ ॥

"कारण, ह्या एका शिवाय बहुतेकांना अहंकार पिशाच्चाचा संचार झालेला असतो, ह्मणून आत्मज्ञानाची विस्मृति होते. १०३ अशा वेळीं निग्रहाच्या वस्त्राची आठवण होत नाहीं; पुढच्या अधोगतीची लाज राहत नाहीं; आणि वेदांत करूं नये ह्मणून सांगितलेलें असतें तेंच करतात. १०४ हें पहा अर्जुना! ज्यासाठीं शरीराच्या गांवाला ते आले आहेत, तो कार्यभाग ते सोडूनच देतात. १०५ ते इंद्रियग्रामांतील राजमार्गामध्यें, अहंममतेच्या वडबडीमध्यें, विकाररूप मंडळी मिळवून त्यांतच निमग्न होऊन गेलेले असतात. १०६ दुःखशोकांनीं केलेल्या घायांची त्यांना आठवण सुद्धां होत नाहीं. हें सांगण्याचें तरी कारण काय ? तर, ते मायेनें ग्रासलेले असतात, १०७ ह्मणून मला चुकतात. आतां मला भजणारे जे लोक आहेत ते चार प्रकारचे आहेत. त्यांनीं मात्र आत्महित वृद्धिंगत केलें खरें. १०८ ह्या चारांपैकीं पहिला आर्त–ह्मणजे दुःखानें पीडित झालेला. दुसरा जिज्ञासू–ह्मणजे ज्ञानप्राप्तीची इच्छा करणारा; तिसरा अर्थी–ह्मणजे द्रव्याची इच्छा करणारा; आणि चौथा ज्ञानी–ह्मणजे ज्ञाता हें ध्यानांत ठेव." १०९

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः १७

[ तेषां ] तेथ आर्त तो आर्तीचेनि व्याजें । जिज्ञासु तो जाणावयालागीं भजे । तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धि ॥ ११० मग चौथियाच्या ठायीं । कांहींचि करणें नाहीं । ह्मणोनि भक्त एक पाहीं । ज्ञानिया जो ॥ ११ ॥ [ ज्ञानी नित्ययुक्तः ] जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें । फिटलें भेदाचें कडवसें । मग मीचि जाहाला सैंमरसें । आणि भक्तही तेविंचि ॥ १२ ॥

---

१ ह्याशिवाय. २ सारा. ३ इंद्रयरूपग्रामांच्या. ४ राजमार्गानें. ५ बडबडीनें. ६ समुदाय. ७ आठवणसुद्धां. ८ चार प्रकारचे.

१ दुःखी, रोगी. २ ज्ञानाची इच्छा करणारा. ३ धनादिकांची इच्छा करणारा. ४ ज्ञानी, जाणता. ५ निमित्तानें. ६ आंधार. कुणबी वगैरे लोक, संध्याकाळच्या वेळीं 'कडुसं' पडलें असें अद्यापही ह्मणतात. ७ ऐक्यानें.

परी आणिकाचिये दिठी[1] नावेक[2] । तैसा स्फटिकचि भासे उदक । तैसा ज्ञानी नव्हे कौतुक । सांगतां तो ॥ १३ ॥ जैसा वारा कां गगनीं विरे[3] । मग वारेपण वेगळें नुरे । तेंवि भक्त हे पैंज[4] न सरे । जरीं ऐक्या आला ॥ १४ ॥ [ एकभक्तिर्विशिष्यते ] जरी पवन हालवूनि पाहिजे । तरी गगनावेगळा देखिजे । येऱ्हवीं गगन तों सहजें । असे जैसें ॥ १५ ॥ तैसें शरीरीं हैन[5] कर्मे । तो भक्त ऐसा गमे । परी अंतरप्रतीतिधर्में[6] । मीचि जाला ॥ १६ ॥ [ प्रियो हीति ] आणि ज्ञानाचेनि उजिडलेपंणें[7] । मी आत्मा ऐसें तो जाणे । ह्मणऊनि मीही तैसेंचि ह्मणें । उचंबळल्लांसांता[8] ॥ १७ ॥ हां गा जीवापैलीकडिली खुणे । जो पावोनि वावरों[9] जाणे । तो देहाचेनि वेगळेपणें । काय वेगळा होय ॥ १८ ॥

**"आतां ह्यांत आर्त असतो तो, दुःखांतून मुक्त व्हावें ह्या निमित्तानें मला भजतो. जिज्ञासु असतो तो ज्ञानसंपन्न होण्यासाठीं मला भजतो. तिसऱ्यास तर धनप्राप्तीचीच इच्छा असते ह्मणून तो मला भजतो. ११० पण चौथ्याला कांहींच मागणें नसून तो मला भजतो, ह्मणून ज्ञानी आहे तोच माझा भक्त होय. हें लक्ष्यांत असूं दे. १११ कारण, त्याच्या ज्ञानाच्या प्रकाशानें भेदाचा अंधःकार नाहींसा होऊन ऐक्याच्या योगानें तो मत्स्वरूपच होऊन राहतो, आणि तो भक्तही तसाच एकनिष्ठ असतो. ११२ परंतु इतरांच्या दृष्टीला ज्याप्रमाणें स्फटिकच क्षणभर उदकासारखा भासतो, त्याप्रमाणें चमत्कार सांगत बसणारा मात्र ज्ञानी नव्हे. ११३ वारा आकाशांत शांत झाला ह्मणजे मग त्याचें वायुपण कांहीं वेगळें राहत नाहीं; त्याप्रमाणें तो जरी ऐक्याला पोंचला, तरी त्याची भक्त ही संज्ञा नाहींशी होत नाहीं. ११४ वारा जर हालवून पाहिला तर तो गगनाच्या वेगळा दिसतो, आणि आकाश जसें मूळच्या प्रमाणेंच असतें, ११५ तसें, शरीराचीं सर्व कर्मे करीत असल्यामुळें तो भक्तासारखा वाटतो; पण स्वानुभवानें तो मत्स्वरूपच असतो. ११६ ज्ञानाच्या उदयानें मी हा केवळ आत्माच असें तो जाणतो; ह्मणून मीही उल्हासवृत्तीनें तोही माझा आत्माच असें ह्मणतों. ११७ अरे! जिवाच्याही पलीकडच्या तत्त्वाला पोंचून जो व्यवहार करूं जाणतो, तो देहाच्या वेगळेपणामुळें वेगळा होईल काय?" ११८**

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम्१८

[ उदारा इति ] ह्मणोनि आपुलाल्या हिताचेनि लोभें । मज आवडे[1] तोही भक्त झोंबे । परी मीचि करीं वालभें[2] । ऐसा ज्ञानिया एक ॥ १९ ॥ पाहें पां दुभतेयाचिया आशा । जग धेनूसि करीतसे फांसा[3] । परि दोरेंवीण कैसा । वत्साचा वळी[4] ॥ १२० ॥ कां जे तनुमनप्राणें । तें आणिक कांहींचि नेणें । देखतसांतें ह्मणे । हे माय माझी ॥ २१ ॥ तें येणेंमानें[6] अनन्यगती । ह्मणऊनि धेनूही तैसीचि प्रीती । तयालागीं लक्ष्मीपती । बोलिले सांचें ॥ २२ ॥ हें असो मग ह्मणितलें । जे कां तुज सांगीतलें । तेही भक्त भले । पैडियंते आह्मां ॥ २३ ॥ [ आस्थित इति ] परि जाणोनियां मातें । जे पाहों विसरले मांधुतें[10] । जैसें सागरा येऊनि सरिते[11] । मुरडावें[12] ठेलें ॥ २४ ॥ तैसी अंतःकरणकुहरीं[13] जन्मली । जयाची प्रतीतिगंगा[14] मज मीनली[15] । तो मी हे काय बोलीं । फार करूं ॥ २५ ॥ येऱ्हवीं ज्ञानिया जो ह्मणिजे । तो चैतन्यचि[16] केवळ माझें । हें न ह्मणावें परि काय कीजे । न बोलणें[17] बोलों ॥ २६ ॥

**"ह्मणून आपल्या हिताच्या लोभानें पाहिजे ते भक्त माझ्या भक्तीस लागतात, तरी मी प्रीति करतों अशी एका ज्ञान्यावरच. ११९ हें पहा! दुभत्याच्या आशेनें सारें जग गायीला दावें लावतें, पण वासराचें दावें दोराशिवायच किती वरें वळकट असतें? १२० कारण, त्याच्या जिवाभावाला दुसरें कांहींच समजत नाहीं. तिला पहातांच 'ही माझी आई' असें तें ह्मणतें. १२१ अशा प्रकारें तें केवळ तिच्यावरच जीव ठेवून असल्यामुळें, गायही तशीच त्याच्यावर प्रीति करते," ह्मणून लक्ष्मीपतींनीं खरें होतें तें सांगितलें. १२२ मग ह्मणतात "हें**

१ लोकदृष्टया. २ क्षणभर. ३ शांत होतो. ४ वाणा, प्रतिज्ञा. ५ समुच्चयार्थक अव्यय. ६ आत्मानुभावधर्मानें. ७ उदयानें. ८ हर्षयुक्त होत्साता. ९ व्यवहार करण्यास जाणतो.

१ कोणताही. २ प्रीति. ३ बंधन, दावें. ४ वळकट. ५ पाहिल्यावरोबर. ६ अशा प्रकारें. ७ अन्य आधाररहित. ८ खरें. ९ आवडते. १० माघारें. ११ नदीला. १२ परत फिरणें राहिलें. १३ अंतःकरणरूपीं गुहेंत. १४ अनुभवरूप गंगा. १५ मिळाली. १६ जीव, प्राण. १७ बोलूं नये तें.

असो. तुला जे दुसरे भक्त सांगितले, तेही आह्मांला आवडतेच आहेत. १२३ नदी येऊन समुद्राला मिळाली, ह्मणजे तिचें मार्गें परतणें राहतें; त्याप्रमाणें मला ओळखून जे मार्गें पहावयाचें विसरले; १२४ ज्यांच्या अंतःकरणगुहेंत उत्पन्न झालेली अनुभवरूपी गंगा, मला मिळाली, ते प्रत्यक्षतः मीच आहेत हें विशेष काय सांगूं ? १२५ तरी पण ज्ञानी ह्मणून जो ह्मणतात, तो मात्र माझा अगदीं जीवप्राण खरा. हें कांहीं बोलावयाचें नव्हे, पण काय करावें ? न बोलण्यासारखी गोष्टसुद्धां प्रसंगोपात्त बोलणें भाग पडतें.” १२६

वहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥१९॥

[ बहूनां जन्मनामंते ] जे तो विषयाची मोठी झाडी । ाजि कामक्रोधांचीं सांकडीं । चूकावूनि आला पांडीं । सद्वासनेचेया ॥ २७ ॥ मग साधुसंगें सुभटा । उजू सत्कर्मांचिया ाटा । अप्रवृत्तीचा अव्हांटा । डावलूनी ॥ २८ ॥ आणि ान्मशतांचा वाहतवणा । तेविं आस्थेचिया न लेचिं वाणा । तेथ फळहेतुचा उगाणा । कवण चाळी ॥ २९ ॥ ऐसा ारीरसंयोगाचिये रातीं । माजि धांवतां सडियां आयती । व कर्मक्षयाची पाहाती । पाहांट जाली ॥ १३० ॥ [ ज्ञानान् ] तैसीच गुरुकृपा उखा उजळली । ज्ञानाची वोतपली डली । तेथ साम्याची ऋद्धि उघडली । तयाचिये दृष्टी ३१ ॥ [ मां प्रपद्यते ] ते वेळीं जयाकडे वांस पाहे । तेता मीचि तया एक आहें । अथवा निवांत जरीं राहे । ऱ्हीं मीचि तया ॥ ३२ ॥ हें असो आणिक कांहीं । तया र्वत्र मीवांचूनि नाहीं । जैसें सबाह्य जळ डोहीं । बुडालिया टा ॥ ३३ ॥ तैसा तो मजभीतरी । मी तया आंतबाहेरी । सांगिजेल बोलेंवरी । तैसें नव्हे ॥ ३४ ॥ ह्मणोनि असो हें ापरी । तो देखे ज्ञानाची वोखारी । तेणें संसरलेनि री । आप विश्व ॥ ३५ ॥ [ वासुदेवः सर्वमिति ] हें समही श्रीवासुदेव । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भाव । ह्मणोनि भक्तांमाजी राव । आणि ज्ञानिया तोचि ॥ ३६ ॥ [ स महात्मा सुदुर्लभः ] जयाचिये प्रतीतीच्या वाखारां । पवांड होय चराचरा । तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभ आथी ॥ ३७ ॥ येर बहुत जोडती किरीटी । जयांचीं भजनें भोगासाठीं । जे आशातिमिरें दृष्टी । मंद जाले ॥ ३८ ॥

“कारण, तो विषयाच्या निविड अरण्यांतून त्यांतील कामक्रोधांचीं संकटें टाळून, सद्वासनेच्या पर्वतावर आलेला असतो. १२७ आणि मग वीरश्रेष्ठा ! तो साधूच्या संगतीनें असत्कर्माच्या आडवाटा सोडून देऊन सत्कर्मांच्या सरळ रस्त्यानें, १२८ शेंकडों जन्मांचा प्रवास करीत असतो. आस्थेच्या वाहणासुद्धां जो बरोबर घेत नाहीं, तो फलहेतूची गणना थोडीच करणार ? १२९ अशा रीतीनें शरीरसंयोगाच्या रात्रींत एकटाच सैरावैरा धांवत असतो. इतक्यांत कर्मक्षयाच्या उजेडानें पहाट होते. १३० मागाहून गुरुकृपारूप उषःकाल होतो; ज्ञानाचें कोंवळें ऊन पडतें; आणि समदृष्टीचें वैभव त्याच्या दृष्टीस दिसूं लागतें. १३१ त्या वेळीं ज्या ज्या दिशेकडे तो पहातो, त्या त्या दिशेकडे मीच एक त्याला दिसत असतों. अथवा तो निवांत राहिला तरी, त्याच्यापुढें मीच असतों. १३२ हें तर काय ? पण दुसरें कोणतेंही त्याच्या दृष्टीस पडलें तरी, त्याला माझ्याशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. ज्याप्रमाणें डोहांत घागर बुडाली, तर तिच्या आंतून आणि बाहेरून सारें पाणीच असतें, १३३ त्याप्रमाणें तो माझ्या आंत, आणि त्याच्या आंतबाहेर मी. हें शब्दांनीं व्यक्त होण्यासारखें नाहीं. १३४ ह्मणून तें सोडून देऊं या. ज्ञानाचें भांडार त्याच्या दृष्टीस पडतें, ह्मणून आपण विश्वच असें समजून तो वर्तन करीत असतो. १३५ हें चराचर सर्व वासुदेवरूपी आहे, असा स्वानुभवानें त्याच्या हृदयांत ठसा उमटून राहिलेला असतो. ह्माकरितां ज्ञानीही तोच, आणि भक्तांचा राजाही तोच. १३६ **अर्जुना !** ज्याच्या अनुभवरूपीं भांडार-

१ अडचणी, संकटें. २ पहाडीं. ३ वीरश्रेष्ठा. ४ सरळ. आडमार्ग. ६ बाजूस घालून. ७ प्रवाशी. ८ घालीत नाहीं. गणना. १० रात्रीमध्यें. ११ एकटा. १२ दूरवर. १३ उडाची. १४ उषःकाळ. १५ कोंवळें ऊन. १६ ऐश्वर्य, वैभव. ॰ वाट, मार्ग. १८ तिकडे तिकडे. १९ आंतबाहेर. ॰ वाचेनें, शब्दांनीं. २१ वखार, दुकान. २२ आश्रयानें. १ स्वानुभवाचा.

१ वखारीनें. २ विस्तार, महत्त्व. ३ आहे. ४ आशारूप अंधकारानें.

खान्यानें चराचरांस महत्त्व प्राप्त होतें, असा महात्मा महादुर्लभ आहे. १३७ बाकी अर्जुना! आशारूप अंधकारानें ज्यांचे डोळे मंदावले आहेत, असे सुखोपभोगाप्रीत्यर्थ भजनीं लागणारे दुसरे भक्त पुष्कळ असतात." १३८

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः ।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥२०॥

[ कामैरिति ] आणि फळाचिया हांवा । हृदयीं कामा जाला रिगावा । कीं तयाचिये घसणी दिवा । ज्ञानाचा गेला ॥३९॥ ऐसे उभयतां आंधारीं पडले । ह्मणोनि पांसींचि मातें चुकले । मग सर्वभावें अनुसरले । देवतांतरां ॥ १४० ॥ [ प्रकृत्या नियताः स्वया ] आधींच प्रकृतीचे पाइक । वरि भोगालागीं तंव रंक । मग तेणें लोलुपत्वें कौतुक । कैसेनि भजती ॥४१॥ [ तं तं नियमास्थाय ] कवणी तिया नियमबुद्धि । कैसिया हन उपचारसमृद्धि । कां अर्पण यथाविधि । विहित करणें ॥४२॥

"त्यांच्या हृदयांत फलाच्या लोभानें काम घुसला, कीं त्याच्या संसर्गानें ज्ञानाचा दिवा मालवतो. १३९ आणि त्यास इहलोक व परलोकही दोन्ही दिसेनासे होतात. मी जवळ असतांही ते मला चुकतात, आणि सर्वतोपरी अन्य देवतांचें आराधन करूं लागतात. १४० आधींच मायेचे बनलेले गुलाम; त्यांत सुखोपपभोगप्राप्त्यर्थ दीन झालेले; तेव्हां त्या लंपटपणाच्या आनंदभरांत त्यांच्या कसे नादीं लागतात ह्मणून सांगूं? १४१ कांहींतरी नियम करतात; या देवास अमुक अमुक उपचार करावेत ह्मणून विधि ठरवितात; अमुक अमुक बळी अर्पण करावेत असे निर्बंध करितात; आणि त्याप्रमाणें त्यांची उपासना चालते."१४२

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याऽचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्॥२१॥

[ यो य इति ] पैं जो जिये देवतांतरीं । भजावयाची चाड करी । [ तस्य तस्येति ] तयाची ते चाड पुरी । पुरविता मी ॥ ४३ ॥ देवोदेवीं मीचि पाहीं । हाही निश्चय त्यासि नाहीं । भाव ते ते ठायीं । वेगळाला धरी ॥ ४४ ॥

"पण जो जो ज्या ज्या देवतेची उपासना करण्याची इच्छा धरतो, त्याची ती इच्छा पूर्ण करणारा मीच. १४३ कोणत्याही देवांत किंवा देवींत पाहिलें, तरी मीच आहें, हा त्याला निश्चय नसल्याच्या योगानें प्रत्येक ठिकाणीं तो वेगवेगळा भाव धरतो. ह्मणजे देव वेगळा, देवी वेगळी इत्यादि मानतो." १४४

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च ततः कामान्मयैव विहितान्हि तान् ॥ २२ ॥

[ स तयेति ] मग तिया श्रद्धायुक्त । तेथिंचें आराधन जें उचित । तें सिद्धिवरी समस्त । वर्तों लागे ॥४५ ॥ [लभते इति] ऐसें जेणें जें भाविजे । तें फळ तेणें पाविजे । परी तेंही सकळ निपजे । मजचिस्तव ॥ ४६ ॥

"आणि तेथील पूजाअर्चादि जे उचित विधि ते सर्व करून सिद्धि प्राप्त होईपर्यंत श्रद्धेनें वागत असतो. १४५ ह्याप्रमाणें जो जो जी जी इच्छा करतो, तें तें फळ त्याला प्राप्त होतें. पण तें सारें मिळतें मजपासून." १४६

अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।
देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥२३॥

[ अंतवत्तु फलं तेषां ] परी ते भक्त मातें नेणती । जे कल्पनेबाहेरी न निघती । ह्मणोनि कल्पित फळा पावती । अंतवंत ॥ ४७ ॥ [ तद्भवत्यल्पमेधसां ] किंबहुना ऐसें भजन । तें संसाराचेंचि साधन । येर फळभोग तो स्वप्न । नावभेरी दिसे ॥ ४८ ॥ [ देवान्देवयजो यांति ] हें असो परौतें । मग हो कां आवडतें । परि यजी जो देवतातें । तो देवत्वासीचि ये ॥ ४९ ॥ [ मद्भक्ता यांति मामपि ] येर तनुमनप्राणीं । जे अनुसरले माझेयाचि वाहणीं । ते देहाच्या निर्वाणीं । मीचि होती ॥ १५० ॥

"इच्छेच्या बाहेर न जाणारे जे भक्त आहेत, ते मला जाणत नाहींत. ह्मणून त्यांना ईप्सित–परंतु नाशिवंत–अशीं फळें प्राप्त होतात. १४७ किंवा अशा प्रकारची भक्ति हें एक संसाराचें साधन असतें. बाकी खरोखर पाहिलें तर, फळाचे भोग हे स्वप्नासारखे क्ष-

---

१ लोभासाठीं. २ संघट्टनानें. ३ इहलोक व परलोक दोन्हीही. ४ जवळ असतांही. ५ आराधना करूं लागले. ६ दास. ७ लंपटपणानें. ८ कोणत्या. ९ उपायसंपत्ति. १० ज्या ज्या. ११ इच्छा.

१ त्या त्या. २ पूजन. ३ सिद्धि होईपर्यंत. ४ करूं लागतो. ५ मनांत आणावें. ६ माझ्याच पासून. ७ इच्छित. ८ नाशिवंत. ९ क्षणभर. १० बाजूस. ११ पूजनादि करतो. १२ मार्गाला. १३ अंतकालीं.

णिक आहेत. १४८ हें एका बाजूस राहूं दे. त्यांचीं आवडतीं दैवतें कां असेनात? पण त्या देवतांच्या आराधनेंकरून तो देवत्वाला पोंचतो. १४९ ह्याशिवाय जे कोणी कायावाचामनेंकरून माझ्याच भजनीं लागतात, ते देहाच्या अंतसमयीं मीच होतात." १५०

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ।
परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥

[ अबुद्धयः ] परी तैसें न करिती प्राणिये । वांयां आपुल्या हितीं वाणिये । जे पोंहताति पाणियें । तळहातिंचेनी ॥ ५१ ॥ [ ममाव्ययं ] नाना अमृताच्या सागरीं बुडिजे । मग तोंडा कां वेंञमिटी पाडिजे । आणि मनीं तरीं आठविजे । थिल्लरोदकातें ॥ ५२ ॥ हें ऐसें कैसया करावें । जें अमृतींहीं रिगोनि मरावें । तें सुखें अमृत होऊनि कां नसावें । अमृतामाजी ॥ ५३ ॥ तैसा फळहेतूचा पांजरा । सांडूनियां धनुर्धरा । [ अनुत्तमं ] कां प्रतीतिपाखीं चिदंबरा । गोसांवियां नोहावें ॥ ५४ ॥ जेथ उंचावलेनि पैंवाडें । सुखाचा पैसांर जोडे । आपुलेनि सुरवाडें । उडों ये ऐसा ॥ ५५ ॥ [अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मां] तया उपमा माप कां सुवावें । मज अव्यक्ता व्यक्त कां मानावें । सिद्ध असतां कां निमांवें । सांधनवरी ॥ ५६ ॥ [ परं भावमजानंतो ] परि हा बोल आघवा । जरी विचारिजे तसे पांडवा । तरी विशेषें या जीवा । न चोजवे गा ॥ ५७ ॥

"पण प्राणी त्याप्रमाणें करीत नाहींत. विनाकारण आपल्या हिताला वाण–उणीव आणतात. ते आपल्या तळहातांत पाणी घेऊनच पोहणारे होत. १५१ किंवा अमृताच्या समुद्रांत बुडाल्यावर तोंड घट्ट कां मिटावें? आणि मनांत खातेऱ्याची आठवण तरी कां करावी? १५२ अमृतांत पडूनही मरावयाचें, असें कां करावें? त्यापेक्षां अमृतांत अमृतच होऊन कां राहूं नये? १५३ तसेंच **अर्जुना!** हा फलहेतूचा पिंजरा टाकून देऊन अनुभवाच्या पंखानें चिदाकाशांत धनी होऊन कां बसूं नये? १५४ ज्ञानरूपआकाशांत उंच गेल्यावर त्या महत्त्वाच्या योगानें आपल्या इच्छेनुरूप उडण्याजोगा पिसाराही प्राप्त होईल. आणि आत्मसुखाचें भांडार हातीं लागेल. १५५ त्या सुखाचें माप कां करावें? मला अमूर्ताला, मूर्तिमंत असें तरी कां मानावें? आपण स्वतः तद्रूप असतां, साधनें करून कां दमावें? १५६ पण **अर्जुना!** खरें विचारशील तर, हें बोलणें कोणालाही बहुधा आवडत नाहीं. १५७

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥२५॥

[ योगमायासमावृतः ] कां जे योगमायापडळें । मूढोऽयं-लोकः ] हे जाले आहाती आंधळे ।[नाहं प्रकाशः सर्वस्य] ह्मणोनि प्रकाशाचेनि देहवळें । [ नाभिजानाति ] न देखती मातें ॥ ५८ ॥ [ मां ] येऱ्हवीं मी नसे ऐसें । काय वस्तुजात असे । [अजं] पाहें पां लवण जळरसें । रहित आहे ॥ ५९ ॥ [अव्ययं] पवन कवणातें न शिवेचि । आकाश कें न समायेचि । हें असो एक मीचि । विश्वीं आहें ॥१६०॥

"कारण कीं, आदिमायेचीं पटलें त्यांच्या डोळ्यावर आलेलीं असल्यामुळें, ते आंधळे झालेले असतात. ह्मणून प्रकाशाच्या धर्मानें मला पहात नाहींत. १५८ बाकी जिच्यांत मी नाहीं अशी एखादी तरी वस्तु आहे काय? पाण्याशिवाय मीठ कसें होईल? सांग. १५९ वायु कोणाला स्पर्श करीत नाहीं? आकाश कोठें असत नाहीं? हें असो. साऱ्या विश्वामध्यें मीच भरलेला आहें, हें ध्यानांत ठेव ह्मणजे झालें." १६०

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चाऽर्जुन ।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥२६॥

[वेदाहं समतीतानि] येथें भूतें जियें आहाति जेतुलीं । तियें मीचि होऊनि ठेलीं । [वर्तमानानि चार्जुन] आणि वर्तत आहाति जेतुलीं । तींही मीचि ॥ ६१ ॥ [मां तु वेद न कश्चन] कां भविष्येमाण जियें हीं । तींही मजवेगळीं नाहीं । हा बोलचि येऱ्हवीं कांहीं । होय ना जाय ॥ ६२ ॥ दो-

१ उणें करतात. २ अथवा. ३ घट्ट मिटी. ४ डबक्यांतील पाण्याला. ५ कां. ६ न राहावें. ७ पिंजरा. ८ अनुभवरूप पंखांनीं. ९ चिदाकाशाचे. १० धनी. ११ महत्त्वानें. १२ पिसारा. १३ इच्छेनुरूप. १४ घालावें. १५ कष्ट सोसावेत? मरावें. १६ साधनें करून करून. १७ विचार केला तर. १८ आश्चर्य वाटणार नाहीं.

१ आदिमायेच्या पडद्यानें. २ प्रकाशशक्तीनें. ३ कोठें. ४ सामावत नाहीं. ५ जीं. ६ जितकीं. ७ तीं. ८ राहिलीं. ९ पुढें होणारीं. १० हें बोलावयालाच.

राचिया सापासी । डोंबा वडिया ऐसी । संख्या न करवे कोण्हासी । तेविं भूतांसि मिथ्यत्वें ॥ ६३ ॥ ऐसा मी पंडुसुता । अनुस्यूत सदां असतां । या संसार जो भूतां । तो आनें बोलें ॥ ६४ ॥ तरि तेचि आतां थोडीसी । गोठी सांगिजेल परियेसीं । जेथ अहंकारतनूंसी । वालभ पडिलें॥६५॥

"आजपर्यंत जितके ह्मणून प्राणी होऊन गेले, तितके मीच होऊन राहिलों होतों. आणि जे जगांत वागत आहेत तितके सारे मीच. १६१ बरें; पुढें होणारे जितके ह्मणून आहेत, तेही सारे माझ्याहून भिन्न नाहींत. आतां खरें ह्मणशील तर 'झालें' ह्मणणें आणि 'होतील' ह्मणणें हे तरी बोलावयाचेच शब्द आहेत. वस्तुतः कांहीं होतही नाहीं, आणि कांहीं जातही नाहीं. १६२ एखादा दोर पडला असला, आणि त्याचा साप असा भास झाला, तर तो काळा आहे का कौडका आहे हें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच प्राण्यांचें मिथ्यत्व आहे. १६३ ह्मणून अर्जुना! मी सदासर्वकाल अखंडच आहें. आणि प्राण्यांना हा जो संसार–पुनर्जन्माचा फेरा–लागला आहे, तो निराळ्याच रीतीनें लागला आहे. १६४ त्यांतील थोडासा प्रकार तुला सांगतों ऐक. ह्मणजे त्यामध्यें शरीर व अभिमान ह्यांचें सख्य कसें जडतें तें तुझ्या लक्ष्यांत येईल." १६५

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यांति परंतप ॥ २७ ॥

[ इच्छाद्वेषसमुत्थेन ] तेथ इच्छा हे कुमारी जाली । मग ते कामाचिया तारुण्या आली । तेथ द्वेषेंसी मांडिली । वेंराडिक ॥ ६६ ॥ [द्वंद्वमोहेन भारत] तया दोघांस्तव जन्मला । ऐसा द्वंद्वमोह जाला । मग तो आजेयानें वाढविला । अहंकारें ॥ ६७ ॥तो धृतीसि सदां प्रतिकूळ। नियमाही नागवे स्थूळ। आशारसें दोंदिल । जाला सांतां ॥ ६८ ॥ असंतुष्टीचिया मदिरां । मत्त होवोनि धनुर्धरा । विषयाचे वोवेरां । विकृतीसीं ॥ ६९ ॥ तेणें भावशुद्धीचिया वाटे । विखुरले विकल्पाचे कांटे । मग चिरिले अव्हांटे । अप्रवृत्तीचे ॥ १७० ॥ [सर्वभूतानि संमोहं] तेणें भूतें भांबावलीं । [सर्गे यांति परंतप] ह्मणोनि संसाराचिया आडवामाजि पडिलीं । मग महादुःखाच्या घेतलीं । वोझें वरी ॥ ७१ ॥

"कामाला इच्छा ही कन्या आहे. ती उपवर झाली ह्मणजे द्वेषाशीं तिचें लग्न लागतें. १६६ नंतर त्या दंपत्यापासून द्वंद्व व मोह हीं अपत्यें जन्मास येतात. आणि अहंकार आजोबा त्यांचे लाड पुरवून पालग्रहण करतात. १६७ त्याचें आणि धैर्याचें सदा वांकडें; तो आशारूप दूध पिऊन भला दोंदिल झाला असल्यामुळें, तो दांडगा नियमांच्या सुद्धां कबजांत येत नाहीं. १६८ अर्जुना! हा असंतोषरूपी मद्यप्राशन करून मदोन्मत्त होत्साता, विषयाच्या खोलींमध्यें लोळत पडलेला असतो. १६९ हा स्वभावशुद्धीच्या मार्गावर विकल्पकंटक पसरतो, आणि कुमार्गाचे अनेक फांटे फोडून ठेवतो. १७० त्यामुळें प्राणिमात्र भ्रमांत पडतात, आणि संसारारण्यांत सांपडून महद्दुःखाच्या ओझ्याखालीं दडपून जातात." १७१

येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥२८॥

[येषां त्वंतगतं पापं] ऐसे विकल्पाचे वांयाणें । कांटे देखोनि सिणाणे । जे मतिभ्रमाचें पोसावणें । घेतीचिना ॥७२॥ उजू एकनिष्ठेच्या पाउलीं । रगडूनि विकल्पाचिया भालीं । महापातकांची सांडिली । अटवी [जनानां] जिहीं ॥ ७३ ॥ [पुण्यकर्मणां] मग पुण्याचे धांवा घेतले । [भजंते मां दृढव्रताः] आणि माझी जवळीक पावले। [ते द्वंद्वमोहविनिर्मुक्ताः] किंबहुना ते चुकले । वाटवधेयां ॥ ७४ ॥

"अशा प्रकारचे तीक्ष्ण कांटे पाहून, विकल्पाचें मिथ्यत्व मनांत आणून जे मतिभ्रमाचें सान्निध्यच करीत नाहींत, १७२ एकनिष्ठेच्या सरळ पावलांनीं विकल्परूप कांटे मोडून टाकून जे महापातकरूप अरण्य ओलंडतात, १७३ व

१ काळा. २ कउडका. ३ श्रमानें. ४ अखंड. ५ वेगळा. ६ विचार. ७ गोष्ट. ८ अभिमान व शरीर यांस. ९ सख्य. १० लग्नसमारंभ. ११ दोघांपासून. १२ आजानें. १३ धैर्याला. १४ विरुद्ध. १५ सांपडत नाहीं. १६ दांडगा. १७ आशारूप दुधानें. १८ झाला असतां. १९ मद्यानें. २० कोठडीमध्यें. २१ स्वभावशुद्धीनें.

१ फोडले. २ आडमार्ग. ३ कुमार्गाचे. ४ अरण्यांत. ५ स्वाधीन केलीं. ६ भार. ७ निष्फळ, व्यर्थ. ८ तीक्ष्ण. ९ सान्निध्यास असणारें. १० कांटे. ११ अरण्य. १२ मदतीनें. १३ सान्निध्य. १४ वाटमाऱ्यांना.

**ुण्यरूपधावेनें माझ्याजवळ येऊन ठेपतात, ते ात्र वाटमाऱ्यांच्या तडाक्यांतून सुटतात."**

नरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ।
े ब्रह्म तद्विदुःकृत्स्नमध्यात्मं कर्म चाऽखिलम्॥२९॥

[जरामरणमोक्षाय] येन्हवीं तरी पार्था । जन्ममरणाची नेमे कथा । [यतंति ये] ऐसिया प्रयत्नानें आस्था । विये याची ॥ ७५ ॥ [ते ब्रह्म तद्विदुःकृत्स्नं] तया तो प्रयत्नचि के वेळे । मग समग्र परब्रह्में फळे । जया पिकलेया रस ळे । पूर्णतेचा ॥ ७६ ॥ ते वेळीं कृतकृत्यता जग भरे । अध्यात्मं कर्म चाखिलं] तेथ अध्यात्माचें नवलपण पुरे । र्मीचें काम सरे । विरमे मन ॥ ७७ ॥ ऐसा अध्यात्मलाभ या । होय गा धनंजया । [मामाश्रित्य] भांडवल जया । उँ- मीं मी ॥ ७८ ॥ तयांतें साम्याचिये वाढी । ऐक्याची ंदे कुळवाडी । तेथ भेदाचिया दुर्बळवाडी । नेणिजे या ॥ ७९ ॥

**"बाकी अर्जुना! जन्ममरणाचे फेरे चुक- ावेत अशा प्रयत्नाविषयीं ज्याच्या मनांत ास्था उत्पन्न होते, १७५ त्याचा तो प्रयत्नच ग एखादे वेळीं समग्र परब्रह्मरूपानें फळतो. ाणि तीं फळें पक्व झालीं ह्मणजे पूर्णतेचा रस ळूं लागतो. १७६ तेव्हां कृतकृत्यतेनें जग भ- न जातें; आत्मज्ञानाचा आश्चर्यपणा नाहींसा ोतो; कर्माचें काम संपून जातें, आणि मन ेराम पावतें. १७७ अर्जुना! असा आत्म- ानाचा त्यास लाभ होतो. व त्याच्या त्या प्र- त्नरूपव्यापारांत भांडवल मीच असतों. १७८ ााला समदृष्टीच्या व्याजानें ऐक्यरूप कुळें र- ड मिळतात–संपत्ति वाढते–आणि भेदाचें दा- ्र्य ह्मणून नांवास राहत नाहीं." १७९**

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः॥३०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे ीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्यायः॥७॥

[साधिभूताधिदैवं मां] जिहीं साधिभूता मातें । प्रतीती- नि हातें । धरूनि अधिदैवातें । शिवतलें गा ॥ १८० ॥ [साधियज्ञं च ये विदुः] जया जाणिवेचेनि वेगें । मी अधि- यज्ञ दृष्टी रिगें । [प्रयाणकालेऽपि च मां] ते तनूचेनि वियोगें । विन्हये नव्हती ॥ ८१ ॥ येन्हवीं आयुष्याचें सूत्र विघडतां । भूतांची उमटे खडाडता । काय न मरतयाहि चित्ता । युगांत नोहे ॥ ८२ ॥ परि नेणों कैसें पैं गा । जे जडोनि गेले मा- झिया आंगा । ते प्रयाणींचिया लगबगा । न सांडितीच मातें ॥ ८३ ॥ [ते विदुर्युक्तचेतसः] येन्हवीं तरी जाण । ऐसे जे निपुण । तेचि अंतःकरण । युक्त योगी ॥ ८४ ॥ [उत्तराध्या- यबीजं] तंव इये शब्दकुपिकेतळीं । नोडवेचि अवधानाची अंजुळी । जे नावेक अर्जुन तये वेळीं । मागांचि होता ॥ ८५ ॥ जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें । जियें नानार्थरसें रसाळें । बेहकतें आहाति परिमळें । भावाचेनि ॥ ८६ ॥ सहज कृपामंदानिळें । श्रीकृष्णद्रुमाचीं वचनफळें । अर्जुन श्रवणाचिये खोळे । अ- वचिति पडिलीं ॥ ८७ ॥ तियें प्रमेयाचीं हो कां वळलीं । कीं ब्रह्मरसाच्या सागरीं चुबकळिलीं । मग तैसींच कां घो- ळिलीं । परमानंदें ॥ ८८ ॥ तेणें बरवेपणें निर्मळें । अर्जुना उन्मेषाचे डोहळे । घेताति गळाळे । विस्मयामृताचे ॥ ८९ ॥ तिया सुखसंपत्ती जोडलिया । मग स्वर्गा याचे वांकुलिया । हृदयाच्या जीवीं गुतकुलिया । होत आहाती ॥ १९० ॥ ऐसें वरिचिलीचि बरवा । सुख जावों लागलें फांवा । तंव रसस्वादाचिया हांवां । लांहो केला ॥ ९१ ॥ झडकरी अनुमा- नाचेनि करतळें । घेऊनि तियें वाक्यफळें । प्रतीतिमुखीं एके वेळ । घालूं पाहे ॥ ९२ ॥ तंव विचाराचिया रसना न दाटती । परि हेतूच्या दशनीं न फुटती । ऐसें जाणोनि सुभ- द्रापती । चुंबीचिना ॥ ९३ ॥ मग चमत्कारला ह्मणे । इयें जळींचीं मा तारांगणें । कैसा झकविलों असलागपणें । अक्ष- रांचेनि ॥ ९४ ॥ इयें पदें नव्हती फुडियें । गगनाचिया घडिया । येथ आमुची मती बुडालिया । थांव न निघे ॥ ९५ ॥ वांचूनि जाणावयाची कें गोठी । ऐसें जीवीं कल्पूनि किरीटी । तिया पुनरपि केली दृष्टी । यादवेंद्रा ॥ ९६ ॥ मग विनविलें सुभटें । हां हो जी यें एकवाटे । सातही पदें अनुच्छिष्टें । नवलें आहाती ॥ ९७ ॥ येन्हवीं अवधानाचेनि वहिलेपणें ।

१ संपत. २ उत्पन्न होते. ३ साफल्यानें. ४ आत्मज्ञानाचें. अपूर्वाई. ६ शांत होते. ७ व्यापारामध्यें. ८ व्याज. सिद्ध होते. १० संपत्ति. ११ दैन्य. १२ साकाराला. ३ प्रतीतीशीं पाणिग्रहण करून.

१ दुःखी. २ खळबळ. ३ प्रळय. ४ धांदलींत. ५ शब्दरूप शिशीच्या बुडाला. ६ प्राप्त होत नाहीं. ७ सावधपणाची. ८ उपाधि निरासपूर्वक आत्मज्ञानरूप फळें. ९ पसरलेलीं. १० कृपारूप मंद वारा. ११ ओटींत. १२ अर्थाची, सिद्धां- ताचीं. १३ बुचकळून काढलेलीं. १४ ज्ञानाचे. १५ घोट. १६ दाखवी. १७ वांकुल्या, वेडावणें. १८ गुदगुल्या. १९ वा- हेरच. २० विस्तार. २१ इच्छांनीं. २२ प्रारंभ. २३ दडपत नाहींत. २४ दांतांनीं. २५ ओठासच लावीना, चाखीना. २६ कीं हो. २७ फसलों. २८ सुगमपणानें. २९ खऱ्या. ३० ठाव, अंत. ३१ कोठें, काय. ३२ गोष्ट. ३३ एकत्र. ३४ निराळेपणानें.

नाना प्रमेयांचे उगाणे । काय श्रवणाचेनि आंगवणें । बोलों लाहाती ॥ ९८ ॥ परि तैसें हें नोहेचि देवा । देखिला अक्षरांचा मेळावा । आणि विस्मयाचिया जीवा । विस्मयो जाला ॥ ९९ ॥ कानाचेनि गवाक्षद्वारें । बोलाचें रश्मी अभ्यंतरें । पाहेनां तंव चमत्कारें । अवधान टाकलें ॥ २०० ॥ तेविंचि अर्थाची चाड मज आहे । ते सांगतांही वेळ न साहे । ह्मणूनि निरूपण लवलाहें । किजो देवा ॥ १ ॥ असा मागील पंडताळा घेऊनी । पुढां अभिप्राय दृष्टीं सूनी । तेविंचि माजि शिरऊनि । आर्ती आपुली ॥ २ ॥ कैसी पुसती पाहे पां जाणिव । भिडेची तरी लंघों नेदी शिंवं । येन्हवीं श्रीकृष्ण हृदयासि खेंवं । देवों सरला ॥ ३ ॥ अहो श्रीगुरूतें जें पुसावें । तें येणेंमानें सावध व्हावें । हें एकचि जाणें आघवें । सव्यसाची ॥ ४ ॥ आतां तयाचें तें प्रश्न करणें । वरी सर्वज्ञ श्रीहरीचें बोलणें । हें संजयो आवडलेपणें । सांगेल कैसें ॥ ५ ॥ तिये अवधान द्यावें गोठी । बोलिजेल नीट मन्हाटी । जैसी कानाचे आधीं दृष्टी । उपयोगा जाय ॥६॥ बुद्धिचियां जिभा । बोलाचा न चाखतां गोंभा । अक्षरांचिया भांवों । इंद्रियें जिती ॥ ७ ॥ पाहा पां मालतीचे कळे । घ्रांणासि कीर वाटले परिमळें । परि वरिचिया बरवा काइ डोळे । सुखिये नव्हती ॥ ८ ॥ तैसें देशियेचिंयां हेवावा । इंद्रियें करिती राणिवा । मग प्रमेयांचिया गांवां । लेसीं जाइजे ॥ ९ ॥ ऐसेनि नोंगरपणें । बोलें निमे तें बोलणें । ऐका ज्ञानदेव ह्मणे । निवृत्तीचा ॥२१०॥

इति श्रीज्ञानेश्वरविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

"ज्यांनीं अनुभवाच्या हातानें **अधिदैवास** धरून **साधिभूत** ह्मणजे साकार असा जो मी त्या मला स्पर्श केला, १८० ज्यांच्या ज्ञानाच्या योगानें मी **अधियज्ञ** आहें असें दृष्टीस भासलें, ते देहाच्या वियोगानें दुःख पावत नाहींत. १८१ येरवीं, आयुष्याची दोरी विघडली, कीं प्राण्याची गडबड उडून जाते. मग मरणाऱ्याच्या चित्ताला प्रळयकाळ भासेल ह्यांत आश्चर्य तें काय? १८२ परंतु जे मत्स्वरूप बनून गेले, त्या प्राण्यांची मरणसमयीं मुळींच गडबड उडत नाहीं. अशा वेळीं सुद्धां ते मला सोडीत नाहींत. हें कसें होतें कोण जाणे? १८३ बाकी, असे जे पूर्णतेप्रत पोंचलेले तेच अंतःकरणयुक्त–एकनिष्ठ–योगी होत हें ध्यानांत ठेव." १८४

तेव्हां ह्या शब्दरूप कुपीच्या तळाला लक्ष्यरूप ओंजळ पोंचली नाहीं. कारण, **अर्जुन** त्या वेळीं थोडासा मागेंच राहिलेला होता. १८५ इतक्यांत नानार्थरसांनीं थवथवलेलीं, भावरूप परिमळानें सुगंधित झालेलीं आत्मज्ञानरूप फळें, १८६ अकस्मात् **श्रीकृष्ण**वृक्षापासूनकृपारूप मंद वायूच्या झुळुकीनें **अर्जुना**च्या कर्णरंध्ररूप पदरांत पडलीं. १८७ तीं जणों काय सारवस्तूंचीं केलेलीं; किंवा ब्रह्मरसाच्या समुद्रामध्येंच बुडवून आणलेलीं आणि परमानंदामध्यें घोळलेलींच अशीं होतीं. १८८ अशा त्या सर्वोत्कृष्टत्वामुळें **अर्जुनास** ज्ञानाचे डोहाळे उत्पन्न होऊन त्याची इच्छा विसयामृताचे घोट घेऊं लागली. १८९ असें सौख्य व वैभव प्राप्त झाल्यामुळें तो स्वर्गाला सुद्धां वांकुल्या दाखवूं लागला. त्याच्या हृदयांत अगदीं गुदगुल्या होऊन राहिल्या. १९० असें बाह्य सुखच जेव्हां विस्तारलें, तेव्हां आंतील रसास्वादाच्या इच्छेनेंही निकड लावली. १९१ तेव्हां तत्काल तर्करूपहातामध्यें तीं वाक्यफळें घेऊन **अर्जुनानें** एकदम तोंडामध्यें घातलीं. १९२ पण विचाराजिव्हेनें तीं त्रिरेनात येवढेंच नव्हे, पण हेतुरूप दांतांनीं फुटेनात. तेव्हां **अर्जुनानें** तीं खावयाचींच सोडून दिलीं. १९३ तो मोठ्या गोंधळांत पडला, आणि मनांत ह्मणतो 'कीं हीं पाण्यांतील नक्षत्रें तर नव्हेत ना? अक्षरांच्या सुगमपणानें मी फसलों तरी कसा? १९४ हीं कांहीं खरोखर पदें नव्हेत. ह्या निखालस आकाशाच्या घड्या आहेत. ह्यांत आमच्या बुद्धीनें बुडी दिली तरी, अंत लागावयाचा नाहीं. १९५ ह्या गोष्टीचा उलगडा **श्रीकृष्णा**वांचून कोठें होणार? असें **अर्जुनानें** मनांत आणून पुन्हां एकदां **श्रीकृष्णा**कडे पाहिलें. १९६ आणि

---

१ अनुभव. २ मानणें, बळ. ३ सांपडतात. ४ जमाव. ५ झरोक्यांतून. ६ किरण. ७ उजाडेना. ८ प्रत्यंतर. ९ शिरवून, घालून. १० सीमा. ११ आलिंगन. १२ ह्याप्रमाणें. १३ प्रेमानें. १४ सार. १५ भ्रांती, शोभा. १६ मोगरीचे. १७ नाकाला. १८ बाहेरच्या. १९ सुरेखपणानें. २० मराठीभाषेच्या. २१ शोभेनें. २२ राज्य. २३ अर्थाच्या, सिद्धांताच्या. २४ खुशाल. २५ चांगुलपणानें. २६ बोल बंद करणारें.

त्या शूरानें विनंती केली कीं "महाराज! हे एकसारखे सातही शब्द अगदीं नवे आहेत. १९७ बाकी, नीट लक्ष्य देऊन ऐकलें, अनेक अर्थांचे अनुभव मनांत आणले, तर ऐकलेली गोष्ट सांगतां यावयाची नाहीं काय? १९८ पण देवा! येथें मात्र तसें होत नाहीं. अक्षरांचा जमाव पाहिल्याबरोबरच विस्मित झालेल्या जिवास आणखी आश्चर्य उत्पन्न होतें. १९९ कानाच्या खिडकीच्या द्वारांतून शब्दरूप किरण आंत उजेड पाडिनात, त्यामुळें अवधान मंद झालें. २०० ह्याकरितां त्या सात शब्दांचा अर्थ (हे शब्द वर जाड टाईपाने लिहिले आहेत.) जाणण्याची फार इच्छा झाली आहे. तो सांगण्यांत वेळ गेल्याचें सुद्धां कठीण वाटतें. ह्याकरितां देवा! तेवढें निरूपण फार लौकर करावें." २०१ अशा प्रकारें मागील अनुभव घेऊन, पुढील अभिप्रायावर दृष्टि ठेवून, आपली इच्छा त्यांत घुसवून, २०२ हें ज्ञान (जाणीव) कसें विचारतें आहे पहा. मर्यादा तर उल्लंघन करीत नाहीं, पण आंतून श्रीकृष्णाच्या हृदयाला अगदीं मिठी मारण्यास तयार झालें आहे. २०३ अहो! श्रीगुरूला जर कांहीं विचारणें झालें, तर तें अशा प्रकारें विनयानें आणि मर्यादेनें विचारण्याची खबरदारी ठेवावी. पण ही सर्व मर्यादा आणि विनय ठेवणारा एक **अर्जुनच** खरा. इतरांनीं तीं काय ठेवावयाचीं आहेत? १०४ आतां त्याचे ते प्रश्न आणि त्यावर सर्वज्ञ **श्रीहरीचें** उत्तर, हें **संजय** कसें प्रेमानें सांगेल पहा! २०५ त्या गोष्टीकडे नीट लक्ष्य द्यावें. तें सारें मी सरळ मराठींतच सांगेन. कानाच्या आधीं दृष्टी उपयोगीं पडते, ह्या न्यायानें, २०६ बुद्धीच्या जिभांनीं शब्दार्थ चाखला नाहीं, तोंच अक्षरांची शोभा पाहून इंद्रियें ताजींतवानीं होतात. २०७ हेंच कां पहाना? मोगऱ्याचे कळे सुगंधाच्या योगानें नाकास उत्तम वाटतात, परंतु बाहेरच्या सुरेखपणानें नेत्रांची तृप्ति होत नाहीं का? २०८ त्याप्रमाणें इंद्रियें ही मराठीभाषेच्या शोभेचें राज्य भोगून मग हळूहळू सिद्धांताच्या-अर्थाच्या-गांवाला जातील. २०९ **निवृत्तीचे ज्ञानदेव** ह्मणतात 'मीही शब्द चांगले मनांत भरतील, अशाच रीतीनें बोलतों, तर ऐकावें.' २१०

**सातवा अध्याय समास.**

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ८ वा.

अर्जुन उवाच

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ।
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥

[ अर्जुन उवाच– ] मग अर्जुनें ह्मणितलें । हां हो जी अवधारिलें । जें म्यां पुसिलें । तें निरूपिजे ॥ १ ॥ [ किं तद्ब्रह्मेति ] सांगा कवण तें ब्रह्म । कायसया[1] नाम कर्म । अथवा अध्यात्म । काय ह्मणिपे ॥ २ ॥ [ अधिभूतमिति ] अधिभूत तें कैसें । एथ अधिदैवत तें कवण असे । हें उघड मी परियेसें । ऐसें बोला ॥ ३ ॥

**मग अर्जुन ह्मणाला "अहो महाराज! आपण ऐकलें काय? मी विचारतों, तेवढें कृपा करून सांगावें. १ ब्रह्म तें काय? कर्म असें कशाला नांव आहे? अथवा अध्यात्म असें तरी कशाला ह्मणतात? हें कथन करा. २ अधिभूत तें कसलें? अधिदैवत तें कोण असतें? हें माझी नीट समजूत पटेल, असें सांगा." ३**

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ।
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः॥२॥

[ अधियज्ञ इति ] देवा अधियज्ञ तो काई । कवण पां इये देहीं । हें अनुमानासि कांहीं । दिटी[2] न भरे ॥ ४ ॥ [ प्रयाणकाले इति ] आणि नियता[3] अंतःकरणीं । तूं जाणिजशी[4] देहप्रयाणीं[5] । तें कैसेनि हें शार्ङ्गपाणी । परिसवा मातें ॥ ५ ॥ देखा धवळारीं[6] चिंतामणींचा । जरी पँहुडला[7] होय दैवांचा । तरी वोसणतांही[8] बोल तयाचा । सोपें[9] न वचे ॥ ६ ॥ तैसें अर्जुनाचिया बोलासवें । आलें तेंचि ह्मणितलें देवें । परियेसें गा बरवें । जें पुसिलें तुवां ॥ ७ ॥ किरीटी कामधेनूचा पांडा[10] । वरी कल्पतरूचा आहे मांदोडा[11] । ह्मणोनि मनोरथसिद्धीचिया चाडा । तो नवल नोहे ॥ ८ ॥ श्रीकृष्ण कोपोनि ज्यासि मारी । तो पावे परब्रह्मसाक्षात्कारीं । मां[12] कृपेनें उपदेश करी । तो कैशापरी न पवेल ॥ ९ ॥ जैं कृष्णचि होइजे आपण । तैं कृष्ण होय आपुलें अंतःकरण । तेथवां संकल्पाचें आंगण । वोळगती[1] सिद्धी ॥ १० ॥ परि ऐसें जें प्रेम । तें अर्जुनींचि आथि निःसीम । ह्मणऊनि तयाचे काम[2] । सदां सफळ ॥ ११ ॥ याकारणें श्रीअनंतें । तें मनोगत तयाचें पुसतें । होईल जाणूनि आइतें । वोगरूनि[3] ठेविलें ॥ १२ ॥ जें अपत्य थानीं निगे । तयाची भूक ते मातेसीचि लागे । येऱ्हवीं तें शब्दें काय सांगे । मग स्तन्य दे येरी ॥ १३ ॥ ह्मणवोनि कृपाळुवा गुरुचियाठायीं । हें नवल नोहे कांहीं । परि तें असो आइका काई । जें देव बोलते जाहाले ॥१४ ॥

**"देवा! ह्या देहामध्यें अधियज्ञ तें काय व कोण? ह्याचा कितीही विचार केला तरी ध्यानांत येत नाहीं. ४ आणखी हे शारंगपाणी! नियमशील अंतःकरणानें अंतकालाचे वेळीं तुला कसें जाणावें? हें मला ऐकवा." ५ हें पहा! एखादा भाग्यवान् मनुष्य, चिंतामणीच्याच मंदिरांत निजला असला, आणि तो झोंपेंत बरळला, तरी त्याचे शब्द व्यर्थ जावयाचे नाहींत. ६ त्याप्रमाणें अर्जुनाचें भाषण ऐकण्याबरोबर देव ह्मणाले, "मनांत होतें तेंच प्राप्त झालें. तर आतां तूं विचारलेंस, तें नीट ऐक." ७ अर्जुन हा आधींच कामधेनूचा पाडा; त्यांत त्यावर कल्पतरूचा मंडप घातलेला; तेव्हां त्याचे मनोरथ सिद्धीस जाऊं लागले ह्यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं. ८ श्रीकृष्ण रागाच्या सपाट्यांत ज्याचा नाश करतात, तो सुद्धां साक्षात् परब्रह्मास पोंचतो, तर मग ते कृपेनें ज्यास उपदेशच करतात तो कसा पोंचणार नाहीं? ९ आपण स्वतःच कृष्ण बनलें, तर कृष्णही आपला जीवप्राण होऊन राहतो, आणि मग इच्छेच्या आंगणामध्यें ऋद्धिसिद्धि खपूं**

---

१ कोणाला. २ तर्क चालत नाहीं. ३ नियमशील. ४ समजशील. ५ अंतकाळीं. ६ शुभ्र बांधलेल्या मंदिरांत. ७ निजला. ८ बरळतां. ९ व्यर्थ. १० खोंड. ११ मंडप. १२ तर मग.

१ राबतात. २ इच्छा, मनोरथ. ३ वाढून.

**लागतात. १० पण असें जें निस्सीम प्रेम, तें एका अर्जुनाच्या ठिकाणींच होतें. ह्मणून सदासर्वकाल त्याचे मनोरथ सफल होत. ११ ह्यासाठींच श्रीकृष्णांनीं तो आतां विचारील, हा मनोरथ जाणून आधींच ताट वाढून ठेवलें. १२ स्तनपान करणारें जें बालक असतें, त्याची भूक आईलाच लागत असते. असें जर न ह्मणावें, तर तें काय भूक लागली असें बोलून दाखविल्यावर मग ती त्यास पाजते? १३ ह्मणून गुरूच्या ठायीं कृपाळूपणा असणें ह्यांत कांहीं मोठें नवल नव्हे. परंतु तें असो. आतां देव जें काय बोलले तें ऐका. १४**

श्रीभगवानुवाच

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

[ श्रीभगवानुवाच–अक्षरं ] मग ह्मणीतलें सर्वेश्वरें । जें आकारीं इये खोंकरें । कोंदलें असत न खिरे । कवणे काळीं ॥ १५ ॥ [ ब्रह्म परमं ] येऱ्हवीं सेंपुरपण तयाचें पाहावें । तरि शून्यचि नव्हे स्वभावें । वरि गगनाचेनि पालवें । गाळूनि घेतलें ॥ १६ ॥ जें ऐसेंही परि विरुळें । इये विज्ञानाचिये खोळे । हालवलेंही न गळे । तें परब्रह्म ॥ १७ ॥ [ स्वभावोऽध्यात्ममुच्यते ] आणि आकाराचेनि जालेपणें । जन्मधर्मातें नेणें । आकारलोपीं निर्मणें । नाहीं कहीं ॥ १८ ॥ ऐसिया आपलियाचि सहजस्थिती । जया ब्रह्माची नित्यता असती । तया नाम सुभद्रापती । अध्यात्म गा ॥ १९ ॥ [ भूतभावोद्भवकरो ] मग गगनीं जेविं निर्मळें । नेणों कैंचीं एक वेळें । उठती घनपटळें । नानावर्णें ॥ २० ॥ तैसे अमूर्तीं तेये विशुद्धें । महदादि भूतभेदें । ब्रह्मांडाचे बांधे । होंचि लागती ॥ २१ ॥ पैं निर्विकल्पाचिये बरडी । फुटे आदिसंकल्पाची विरुढी । आणि ते सवेंचि मोडोनि ये ढोंढी । ब्रह्मगोळकांच्या ॥ २२ ॥ तया एकैकाचे भीतरीं पाहिजे । तंव बीजाचाचि भरिला देखिजे । माजि होतियां जातियां नेणिजे । लेखं जीवां ॥ २३ ॥ [ विसर्गः ] मग तया ब्रह्मगोळकांचे अंशांश । प्रसवती आदिसंकल्प अैसमास । हें असो ऐसी बहुवस । सृष्टी वाढे ॥ २४ ॥ परि दुजेनवीण एकला । परब्रह्मचि संचला । अनेकत्वाचा आला । पूर जैसा ॥ २५ ॥ तैसें समविषमत्व नेणों कैचें । वायांचि चराचर रचे । पाहातां प्रसवतिया योनीचे । लक्ष दिसती ॥ २६ ॥ [ कर्मसंज्ञितः ] येरी जीवभावाचिये पैलविये । कांहीं मर्यादा करूं नये । पाहिजे कवण हें आघवें विये । तंव मूळ तें शून्य ॥ २७ ॥ ह्मणूनि कर्ता मुदल न दिसे । आणि सेखीं कारणही कांहीं नसे । माजि कार्यचि आपैसें । वाढोंचि लागे ॥ २८ ॥ ऐसा कैरितेनवीण गोचर । अव्यक्तीं हा आकार । निपजे जो व्यापार । तया नाम कर्म ॥ २९ ॥

**मग सर्वेश्वर ह्मणतात "ह्या नाशिवंत शरीराच्या आकारामध्यें जें भरून राहिलें असून, जें कधींही गळून पडत नाहीं; १५ बरें; त्याच्या अत्यंत सूक्ष्मपणावरून त्याला शून्य ह्मणावें, तर स्वभावधर्माप्रमाणें तें शून्यही नव्हे. पण इतकें पातळ कीं जणों काय गगनाच्या पदरांतूनच गाळून काढलें आहे! १६ इतकें जरी हें सूक्ष्म आहे तरी, ह्या विज्ञानाच्या पदरांतून हालविलें, तथापि ज्याचा एक बिंदूही गळत नाहीं, तें परब्रह्म. १७ आणखी आकार प्राप्त झाला ह्मणून ज्यास जन्म नाहीं, व दृश्य वस्तूचा नाश झाला तरी, ज्यास कधीं मृत्यु नाहीं, १८ हे सुभद्रापती! अशी ब्रह्माची नित्यता असणारी जी आपली सहज-आत्म्याची-स्थिति, तिलाच अध्यात्म असें नांव आहे. १९ गगनामध्यें एकाएकीं नानाप्रकारच्या वर्णांचीं अभ्रपटलें उठतात. तीं कशीं उठतात तें समजत नाहीं. २० त्याप्रमाणें त्या शुद्ध निराकारामध्यें, प्रकृति, अहंकार इत्यादि महत्तत्वांच्या भेदानें ब्रह्मांडांचे आकार उत्पन्न होऊं लागतात. २१ कल्पनातीत शुद्ध ब्रह्माच्या माळ जमिनींत, आदि संकल्पाचा अंकुर फुटतो, आणि त्याबरोबरच ब्रह्मांडगोलांचे आकार दाटून राहतात. २२ त्या एकएकामध्यें पाहिलें तर सारीं बीजेंच भरलेलीं दिसतात. आणि त्यांत जन्मास येऊन नाश पावणाऱ्या जिवांची तर संख्याच नाहीं! २३ नंतर त्या ब्रह्मांडाचे आणखी भाग प्रतिभाग ह्यांच्यापा-**

१ मोडकें, रात्छिद्र. २ गळे. ३ सूक्ष्मत्व. ४ पदरानें. ५ विरळ, सूक्ष्म. ६ पदरानें. ७ उत्पत्तीनें. ८ नाश होणें. ९ निराकार परब्रह्माच्या ठिकाणीं. १० महत्तत्त्व आदिकरून. ११ आकार. १२ कल्पनातीत अशा ब्रह्माच्या. १३ माळजमिनींत. १४ अंकुर, वाड. १५ दाट भरून. १६ आकार. १७ आंत. १८ गणना, मोजदाद. १९ असंख्यात.

१ उत्पन्न होणाऱ्या. २ इतर. ३ अंकुर. ४ कांहीं नाहीं. ५ शेवटीं. ६ कर्त्यावांचून.

**सून असंख्यात आदिसंकल्प (इच्छा) उत्पन्न होतात. असो. अशा प्रकारें अनेक प्रकारची सृष्टि वाढते. २४ परंतु त्या सर्वांत अनेकत्वाचा पूर आल्याप्रमाणें फक्त एक परब्रह्मच भरलेलें असतें. दुसरें कांहीं नसतें. २५ तसेंच त्याला समविषमत्व कोठून प्राप्त होतें, तेंही कळत नाहीं. आणि उत्पन्न होणाऱ्या जाती तर लक्षावधी दृष्टीस पडतात. २६ ह्याशिवाय इतर प्राण्यांची तर संख्याच करतां येत नाहीं. हें सर्व कोणापासून होतें, याचा विचार करूं लागलें तर मूळामध्यें शून्यच! २७ कर्ता म्हणून मुद्दल दिसत नाहीं. आणि अखेरीस कारणही कांहीं नाहीं. मध्यंतरीं कार्य आपोआपच वाढीला लागतें. २८ असा कर्त्याशिवाय, निराकारामध्यें आकार होण्याचा जो व्यापार, त्याचें नांव कर्म." २९**

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥

[क्षरो भावः] आतां अधिभूत जें म्हणिपे । तेंही सांगों संक्षेपें । तरि होय[1] आणि हारपे । अभ्र जैसें ॥ ३० ॥ तैसें असतेपण आहाच[2] । नाहीं होइजे हें साच । जयांतें रूपा आणिती पांचपांच[3] । मिळोनियां ॥ ३१ ॥ [अधिभूतं] भूतांतें अधिकरूनि[4] असे । आणि भूतसंयोगें तरि दिसे । जें वियोगवेळे भ्रंशे । नामरूपादिक ॥ ३२ ॥ तयातें अधिभूत म्हणिजे । [पुरुषश्चाधिदैवतं] मग अधिदैवत पुरुष जाणिजे । जेणें प्रकृतीचें भोगिजे । उपार्जिलें[5] ॥ ३३ ॥ जो चेतनेचा चक्षु[6] । जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु[7] । जो देहास्तमानीं वृक्षु । संकल्पविहंगमाचा[8] ॥ ३४ ॥ जो परमात्माचि परि दुसरा[9] । जे अहंकारनिद्रा निदसुरा[10] । म्हणोनि स्वप्नाचिया वोरबारा[11] । संतोषे शिणे ॥ ३५ ॥ जीव येणेंनांवें । जयातें ओळविजे[12] स्वभावें । तें अधिदैवत जाणावें । पंचायतनीचें[13] ॥ ३६ ॥ [अत्र देहे] आतां इयेचि शरीरग्रामीं । [अधियज्ञोऽहं] जो शरीरभावातें उपशमी[14] । तो अधियज्ञ एथ गा मी । पंडुकुमरा ॥ ३७ ॥ [एव] येर अधिदैवाधिभूत । तेहि मीचि कीर समस्त । परि पंधरें[1] किडाळा[2] मिळत । तें काय साकें[3] नोहे ॥ ३८ ॥ तरि तें पंधरेपण न मैळे । आणि किडाळाचियाही अंशा न मिळे । परि जंव असे तयाचेनि मेळें[5] । तंव सांकेचि[4] म्हणिजे ॥ ३९ ॥ तैसें अधिभूतादि आघवें । हें अविद्येचेनि[6] पालवें । झांकलें तंव मानावें । वेगळें पैसें ॥ ४० ॥ तेचि अविद्येची जवनीक[7] फिटे । आणि भेदभावाची अवधी[8] तुटे । मग म्हणों एक होऊनि जरी आटे । तरि दोनी काय होती ॥ ४१ ॥ पैं केशांचा गुंडाळा । वरि ठेविली स्फटिकशिळा । ते जंव पाहिजे डोळां । तंव भेदली[9] गमती ॥ ४२ ॥ पाठीं[10] केश परौते[11] नेले । आणि भेदलेपण काय नेणों जाहालें । तरि डांक देऊनि सांदिलें । शिळेतें काई ॥ ४३ ॥ नों[12] ते अखंडचि आयती[13] । परि संगें भिन्न गमली होती । ते सारिलिया[14] मागौती[15] । जैसी कां तैसी ॥ ४४ ॥ तेवींचि अहंभाव जाये । तरि ऐक्य तें आधींचि आहे । हेंचि साचें जेथ होये । तो अधियज्ञ मी ॥ ४५ ॥ पैं गा आम्ही तुज । सकळ यज्ञ कर्मजें[16] । सांगीतलें जें कांज[17] । मनीं धरूनि ॥ ४६ ॥ तो हा सकळ जीवांचा विसावा । नैष्कर्म्यसुखाचा[18] ठेवा । परि उघड करूनि पांडवा । दाविजत असे ॥ ४७ ॥ पहिलें वैराग्यइंधन[19] परिपूर्तीं । इंद्रियानळीं प्रदीप्तीं । विषयद्रव्याचिया[20] आहुती । देऊनियां ॥ ४८ ॥ मग वज्रासन[21] तेचि उर्वा[22] । शोधूनि आधारमुद्रा[23] बरवी । वेदिका[24] रचे मांडवीं । शरीराच्या ॥ ४९ ॥ तेथ संयमाग्नीचीं[25] कुंडें । इंद्रियद्रव्याचेनि पवाडें[26] । यजिजेती[27] उदंडें । युक्तिघोषें[28] ॥ ५० ॥ मग मनप्राणसंयम[29] । हाचि हवनसंपदेचा[30] संभ्रम[31] । येणें संतोषविजे निर्धूम । ज्ञानानळ ॥ ५१ ॥ ऐसेनि हें सकळ ज्ञानीं समर्पे[32] । मग ज्ञान तें ज्ञेयीं[33] हारपे । पाठीं ज्ञेयचि स्वरूपें । निखिल उरे ॥ ५२ ॥ तया नांव गा अधियज्ञ । ऐसें बोलिला जंव सर्वज्ञ[34] । तंव अर्जुन अतिप्राज्ञ[35] । तया पातलें[36] तें ॥ ५३ ॥ हें जाणोनि म्हणितलें देवें । पार्था परिसत आहासि बरवें । या कृष्णाचिया बोलासवें । येरु सु-

---

१ उत्पन्न होतें. २ लटकें, मिथ्या. ३ पंचीकरण होऊन. ४ आश्रय करून. ५ उत्पन्न केलें. ६ बुद्धीचा द्रष्टा. ७ मुख्य, अधिपति. ८ मनोरथरूप पक्ष्यांचा. ९ कारण. १० निजलेला. ११ खटपटीला. १२ म्हणावें. १३ ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत व अधिदैव (–किंवा पंचमहाभूतांचें). १४ लयास नेतो.

१ पंधराच्या दराचें (उत्तम) सोनें. २ हिणाला. ३ डाकलग. ४ डाकलगच. ५ पदरानें. ६ अज्ञानाची. ७ पडदा, काजळी. ८ अंतर. ९ भंगलेली, चीर गेलेली. १० पुन्हा. ११ पलीकडे, एका बाजूस. १२ नाहीं तर. १३ स्वाभाविक. १४ सारली. १५ मागें. १६ कर्मापासून उत्पन्न झालेले. १७ हेतु. १८ अहेतुक कर्मसुखाचा. १९ वैराग्यरूप सर्पण. २० शब्द, स्पर्श इत्यादिकांच्या. २१ आसनविशेष. २२ पृथ्वी. २३ मुद्राविशेष (शिवसंहिता ४–१–७.) २४ ओटा. २५ इंद्रियनिग्रहरूप अग्नीचीं. २६ विस्तारानें. २७ यज्ञ करितात. २८ योगमंत्रानें. २९ मनोनिग्रह. ३० हवनद्रव्याचा. ३१ समारंभ. ३२ अर्पण होतें. ३३ जाणावयाचें जें त्यामध्यें. ३४ सर्व ज्ञानसंपन्न–श्रीकृष्ण. ३५ महाबुद्धिमान्. ३६ मान्य झालें.

ाचा जाहाला ॥ ५४ ॥ देखा बाळकाचिया धणी धाइजे । ां शिष्याचेनि जाहालेपणें होइजे । हें सद्गुरूचि एकलेनि ाणिजे । कां प्रसवतिया ॥ ५५ ॥ म्हणोनि सात्विकभावांची ांदी । कृष्णा आंगीं अर्जुना आधीं । न समातसे परी बुद्धी । ांवरूनि देवें ॥ ५६ ॥ मग पिकलिया सुखाचा परिमळ । ां निवालिया अमृताचा कल्लोळ । तैसा कोंवळा आणि र- ाळ । बोल बोलिला ॥ ५७ ॥ [ देहभृतां वर ] म्हणे परि- णेयांच्या राया । आइकें बापा धनंजया । ऐसी जळों सैर- ्या माया । तेथ जाळितें तेंही जळे ॥ ५८ ॥

"आतां ज्याला अधिभूत असें ह्मणतात, याचें लक्षण थोडक्यांत सांगावयाचें तर, अभ्र याप्रमाणें उत्पन्न होतें, व नाश पावतें, ३० ाप्रमाणें ज्याचें अस्तित्व हें मिथ्या; आणि ाश होणें हें खरें; आणि ज्याला पंचमहाभूतें कत्र होऊन आकारास आणतात तें; ३१ कंवा जें भूतांचा आश्रय करून असतें; भू- ांच्या संयोगानेंच दृष्टिगोचर होतें; आणि त्या रस्परांचा वियोग झाला असतां, ज्याचें नांव- पही नाहींसें होऊन जातें, ३२ त्याला 'अ- धेभूत' असें ह्मणतात. तसेंच प्रकृतीनें उ- ान्न केलेल्याचा जो उपभोग घेतो, तो 'अधि- वत पुरुष' असें समजावें. ३३ जो बुद्धीचा ्टा; इंद्रियदेशाचा अधिपति; देहाच्या अस्त- ानीं मनोरथरूप पक्ष्यांचा वृक्ष; ३४ जो पर- ात्माच, परंतु भिन्न; कारण, अहंकाररूपी झोंप णारा, अज्ञान; ह्मणून स्वप्नाच्या खटपटींत संतोष ावतो, दमतो; ३५ ह्मास्तव स्वभावधर्माप्रमा- च ह्याला जीव असें ह्मणतात. तेंच पंचायत- ाचें-पंचमहाभूतांचें-अधिदैवत समजावें. ३६ ातां अर्जुना! ह्या शरीरग्रामांत शरीरभाव यास पाठविणारा जो अधियज्ञ तो मीच. ७ बाकी, खरोखर ह्मणशील, तर अधिदैवत ाय आणि अधिभूत काय, सारीं मीच आहें. ण पंधराच्या दराचें सोनें, हिणाशीं मिश्र ले, तर डाकलग होत नाहीं का? ३८ तरी ण, त्याचा शुद्धपणा कांहीं मलिन होत नाहीं. आणि तो हीणपणांतही मिसळत नाहीं. तथापि तें त्याच्या संगतीला असेपर्यंत डाकलग असें ह्मणतातच. ३९ त्याप्रमाणें अधिभूतादि सारीं हीं अविद्येच्या-अज्ञानाच्या-पडद्यानें जोंपर्यंत झांक- लेलीं आहेत, तावत्कालपर्यंत तीं वेगळीं असेंच ह्मटलें पाहिजे. ४० तोच अविद्येचा पडदा नि- घाला, भेदभावाची मर्यादा नाहींशी झाली, आणि सारें जर ऐक्य होऊन राहिलें, तर तीं दोन होतीं असें ह्मणतां येईल काय? ४१ हें पहा! एक केसांची गुतवळ घेऊन, तिच्यावर एखादी स्फटिकाची शिळा ठेवली, आणि ति- च्याकडे नजर लावून पाहिलें, तर त्या स्फटि- कशिळेला भेगा गेल्या आहेत असें दिसतें. ४२ मग ती गुतवळ काढून टाकावी; ह्मणजे तिचें फुटकेपण कोठें जातें कळत नाहीं. ह्मणून ती शिळा, डाक देऊन सांधलेली का असते? ४३ तर ती मूळची अखंडच आहे. पण दुसऱ्याच्या सांसर्गानें भिन्न दिसली. तो सांसर्ग दूर केला, ह्मणजे स्फटिकशिळा जशाच्या तशीच! ४४ त्याप्रमाणें अहंभाव नाहींसा झाला असतां, मू- ळचेंच ऐक्य आहे, हें जेथें प्रत्ययास येतें, तो अधियज्ञ मी. ४५ अरे! जो हेतु मनांत ध- रून आह्मी तुला कर्मसाध्य यज्ञ पूर्वी सां- गितले, ४६ तो सकळ जीवांचा विसावा, नि- ष्कामरूप यज्ञसुखाचा ठेवा, तो हाच. पण अर्जुना! तुला ह्मणून तो उघड करून सां- गतों. ४७ प्रथम वैराग्यरूप लांकडें जमा क- रावींत; इंद्रियरूप अग्नि पेटवावा; आणि त्यांत विषयरूप होमद्रव्याच्या आहुती देऊन, ४८ मग वज्रासन हीच भूमी करून, आधारमुद्रा नीट लावून, शरीररूप मंडपामध्यें वेदिका (ओटा) रचावी. ४९ आणि तिच्यावर इंद्रिय- निग्रहाच्या कुंडामध्यें, अनेक योगरूप मंत्रांच्या उच्च स्वरानें इंद्रियरूप विपुल होमद्रव्याचें ह- वन करावें. ५० मनाचें आणि प्राणाचें निय- मन हीच होमद्रव्याची राशी, तिनें धूम्ररहित ज्ञानरूप अग्नीला तृप्त करावें. ५१ असें केलें ह्मणजे हें सारें ज्ञानामध्यें अर्पण होतें. आणि

१ तृप्तीनें तृप्त व्हावें. २ परिपूर्णतेनें. ३ किंवा. ४ मा- तें. ५ समुदाय. ६ मावत नाहीं. ७ विवेकानें. ८ लाटा. ोत्यांत श्रेष्ठ, शुद्ध. १० जाळूं लागले ह्मणजे.

मग ज्ञान असतें तें जाणावयाचें जें, (ब्रह्म) त्यामध्यें लय पावलें ह्मणजे पाठीमागें सारें ज्ञेय (ब्रह्म) रूपानेंच रहातें. ५२ त्याचेंच नांव अधियज्ञ." सर्वज्ञ असा जो भगवान् त्यानें ह्याप्रमाणें सांगतांच, अर्जुन मोठा ज्ञाता असल्यामुळें, त्यास तें फारच मानवलें. ५३ हें लक्ष्यांत आणून देव ह्मणाले "अर्जुना! तूं खरोखरच फार लक्ष्यपूर्वक श्रवण करतोस." हें कृष्णाचें भाषण ऐकून अर्जुनासही फार संतोष झाला. ५४ हें पहा! मुलाच्या तृप्तीनें संतोष पावणें, किंवा शिष्याच्या परिपूर्णतेनें प्रसन्न होणें, ह्याचा अनुभव एक सद्गुरूला, किंवा एक आईलाच माहिती. ५५ ह्मणून अर्जुनाच्या आधीं कृष्णाच्याच आंगावर रोमांचादि सात्विक भावांची दाटी झाली. ती इतकी कीं, त्यांस रहावयास ठाव नाहींसा झाला. तथापि देवांनीं त्यास विवेकानें आवरलें, ५६ आणि मग पक्व झालेल्या सुखाचा सुगंध, किंवा थंडगार अमृताचा कल्लोळ असावा त्याप्रमाणें कोमल आणि रसाळ शब्द बोलण्यास प्रारंभ केला. ५७ ते ह्मणाले "हे श्रुतज्ञा! धनंजया! बाबा ऐक. ह्याप्रमाणें माया जळून गेली ह्मणजे तीस जाळणारें (ज्ञान) तेंही जळून जातें." ५८

अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः॥५॥

[मामेव] जें आतांचि सांगीतलें होतें । अगा अधियज्ञ ह्मणितला जयातें । जे आधींचि तया मातें । [अंतकालेच] जाणोनि अंतीं ॥ ५९ ॥ तें देह झोळ ऐसें मानुनी । [स्मरन्] ठेले आपणपें आपण होउनी । जैसा मठ गगना भरूनी । गगनींचि असे ॥ ६० ॥ ये प्रतीतीचिया माजघरीं । तया निश्चयाची वोवरी । आली ह्मणोनि बाहेरी । नव्हेचि से ॥ ६१ ॥ ऐसें सबाह्य ऐक्य संचलें । मीचि होऊनि असतां रचिलें । [मुक्त्वा कलेवरं] बाहेरि भूतांचीं पांच हीं खेंवळें । नेणतांचि पडिलीं ॥ ६२ ॥ [यः प्रयाति] आतां उभयां उभेपण नाहीं जयाचें । मा पडिलिया गहन कवण तयाचें । ह्मणोनि प्रतीतीचिये पोटींचें । पाणी न हाले ॥६३॥ ते ऐक्याची आहे वोतिली । कीं नित्यतेचिया हृदयीं घातली । जैसी समरससमुद्रीं धुतली । रुळेचि ना ॥ ६४ ॥ पैं अथावीं घट बुडाला । तो आंत बाहेरी उदकें भरला । पाठीं दैवगत्या जरी फुटला । तरी उदक काय फुटे ॥ ६५ ॥ नातरी सर्पे कवच सांडिलें । कां उबारेनें वस्त्र फेडिलें । तरी सांग पां कायें मोडलें । अवेवांमाजी ॥ ६६ ॥ तैसा आकार हा आहाच भ्रंशे । वांचूनि वस्तू ते सांचलीचि असे । तेचि बुद्धि जालिया विसुकुसे । कैसेनि आतां ॥ ६७ ॥ [स मद्भावं याति] ह्मणोनि यापरी मातें । अंतकाळीं जाणतसाते । जे मोकळिती देहातें । ते मीचि होती ॥ ६८ ॥ येऱ्हवीं तरी साधारण । उरीं आदळलिया मरण । जो आठव धरी अंतःकरण । तेंचि होइजे ॥ ६९ ॥ जैसा कवण एक कांकुळती । पळतां पवनगती । दुंपावलीं अवचितीं । कुंहामाजि पडियेला ॥ ७० ॥ आतां तया पडणयाआरौतें । पडण चुकवावया परौतें । नाहीं ह्मणोनि तेथें । पडावें चि पडे ॥ ७१ ॥ तेविं मृत्यूचेनि अवसरें एकें । जें येऊनि जीवासमोर ठाके । तें होणें मग न चुके । भलतयापरी ॥ ७२ ॥ [नास्त्यत्र संशयः] आणि जागतां जंव असिजे । तंव जेणें ध्यानें भावना भाविजे । डोळां लागतखेंवो देखिजे । तेंचि स्वप्नीं॥७३॥

"अरे! ज्याविषयीं आतांच तुला सांगितलें; ज्याला 'अधियज्ञ' असें ह्मटलें; तो मी आदिं व अंतीं आहें असें जाणतात, ५९ व देह हा मिथ्या आहे असें जाणून, घरांतील आकाशांत आकाशच भरलेलें असल्याप्रमाणें, जे कोणी आत्मा होऊन आत्मस्वरूपांतच राहतात, ६० त्यांना अनुभवरूप माजघरांतील निश्चयाची खोली मिळते. ह्मणून बाहेरचें स्मरण होत नाहीं. ६१ ह्याप्रमाणें अंतर्बाह्य एकच भरून राहिलें, शरीरीं असतांही मद्रूपच होऊन राहिलें, ह्मणजे हीं पंचभूतांचीं कवचें न समजतांच पडतात. ६२ आतां शरीर उभें असलेल्यास, उभें असल्या-

१ अगोदर. २ मिथ्या. ३ स्वतः. ४ घर. ५ अनुभवाच्या. ६ कोठडी. ७ स्मरण. ८ आंतबाहेर. ९ भरलें. १० खवलें, कवचें. ११ उभे असलेल्यांस. १२ मग. १३ कठिण, संकट.

१ अनुभवाच्या. २ पूर्णानंदरूप समुद्रांत. ३ मळतच नाहीं. ४ डोहामध्यें. ५ कांत. ६ उष्णतेमुळें. ७ अवयवामध्यें. ८ वरचेवर. ९ भरलेलीच. १० बुद्धीनें जाणलें असतां. ११ गोंधळेल. १२ जाणत असतां. १३ सोडतात. १४ छातीवर. १५ दैन्यवाणी. १६ दोन पावलांत. १७ कुव्यांत, विहिरींत. १८ पडण्याच्या पूर्वी. १९ पडणें. २० दुसरें. २१ भाग पडतें. २२ कोणत्याही तऱ्हेनें. २३ शुद्धीवर. २४ हेतु. २५ लागतांक्षणीं.

ीच जर शुद्ध नाहीं, तर तें पडल्यावर दुःख कशाचें? ह्मणून अनुभवाच्या पोटांतील ाणी हालत नाहीं. ६३ तो अनुभव ऐक्याचा ोतलेला असतो; नित्यतेच्या पोटांत शिरलेला सतो; आणि समरसरूप समुद्रामध्यें धुऊन नेर्मळ झालेला असतो, ह्मणून पुन्हा मळत ाहीं. ६४ अथवा डोहामध्यें घागर बुडाली, र तिच्या आंत व बाहेर उदकच असतें. तेथें वगतीनें ती फुटली, ह्मणून काय पाणी फुट- ार? ६५ किंवा सर्पानें कात टाकली; किंवा कडतें ह्मणून वस्त्र टाकून दिलें; तर अवय- ांत कोणतें कमी पडलें? सांग. ६६ त्याप्रमाणें ाकार हा (शरीर) वारंवार नाश व्हावया- ाच. त्यावांचून जी अन्य वस्तु (आत्मा) ती रलेलीच आहे. हें बुद्धीस कळलें, ह्मणजे ासाविशी राहील. ६७ ह्मणून अशा रीतीनें रणसमयीं जे मला जाणत असतां, देहाचा ाग करतात, ते मत्स्वरूप होतात. ६८ आणि ाधारणपणें सुद्धां मृत्यु येऊन उराशीं ठेपला ाणजे, अंतःकरणांत जें स्मरण ठेवावें, तद्रूप प्राणी होतो. ६९ ज्याप्रमाणें कोणी एखादा नवाणीनें वाऱ्याप्रमाणें पळत सुटला असतां, ोन पावलें गेला नाहीं तोंच, अकस्मात् वि- रीमध्यें पडतो. ७० त्या पडण्याच्या पूर्वी, पडणें चुकवावयास तेथें दुसरें कोणी नसतें, ्णून त्याला विहिरींतच पडणें भाग पडतें. १ त्याप्रमाणें मरणसमयीं एखादें जिवापुढें ऊन उभें राहिलें, ह्मणजे मग तद्रूपच व्हावें ागतें. तें कोणत्याही उपायानें चुकत नाहीं. २ आपण जोंपर्यंत जागृत आहों, तोंपर्यंत ा ज्या मनाच्या कल्पना होतात, त्या त्या ाऱ्या डोळा लागतांच स्वप्नामध्यें दिसूं ला- तात.'' ७३

यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥

[ यं यमिति ] तेविं जितेनि[१] अवसरें । जें आवडोनि जीवीं उरे । तेंचि मरणाचिये मेरे[२] । फार हों लागे ॥ ७४ ॥ [ तं तमिति ] आणि मरणीं जया जें आठवे । तो तेचि गतीतें पावे ।

''त्याप्रमाणें जिवंत असतांना मनास आवड- ल्यामुळें जें हृदयांत राहतें, तेंच मरणकाळीं वृ- द्धिंगत होत असतें. ७४ आणि मरणसमयीं ज्याला जें आवडतें, त्याच गतीला तो जातो.''

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयः ॥ ७ ॥

[ तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर ] ह्मणोनि सदां स्मरावें । मातेंचि तुवां ॥ ७५ ॥ डोळां जें देखावें । कां कानीं हन ऐकावें । मनीं जें भावावें । बोलावें वाचे ॥ ७६ ॥ तें आंत बाहेरि आघवें । मीचि करूनि घालावें । मग सर्वां काळीं स्वभावें । मीचि आहें ॥ ७७ ॥ [ युध्य च ] अर्जुना ऐसें जाह्यलिया । मग न मरिजे देह गेलिया । मा संग्राम केलिया । भय काय तुज ॥ ७८ ॥ [ मय्यर्पितमनोबुद्धिः ] तूं मन बुद्धि साचेंसी । जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी । [ मामेवैष्यस्यसं- शयः ] तरी मातेंचि गा पावसी । हे माझी भाक[६] ॥ ७९ ॥ हेंचि कैंयिसया[७] वरी होये । ऐसा जरी संदेह वर्तत आहे । तरी अभ्यासूनि आदीं पाहें । मग नव्हे तरी कोपें ॥ ८० ॥

''ह्मणून तूं सदासर्वकाल माझेंच स्मरण कर. ७५ डोळ्यांनीं जें जें पहावें, कानांनीं जें जें ऐकावें, मनानें जें जें चिंतावें, किंवा वाचेनें जें जें बोलावें, ७६ तें तें सर्व अंतर्बाह्य मीच आहें असें समजून करीत जावें. ह्मणजे सदा- सर्वकाल सर्वांमध्यें आपोआप मीच आहें. ७७ अर्जुना! असें झालें ह्मणजे मग, देह गेला तरी मृत्यु नाहीं. मग युद्ध केल्यांत तुला भय कोणतें? ७८ तूं खरेपणानें मन आणि बुद्धि जर माझ्याच स्वरूपामध्यें अर्पण करशील, तर खचीत सांगतों तूं मलाच पावशील. ७९ पण हें व्हावें कसें? असा जर तुला संशय वाटत असेल, तर आधीं अभ्यास करून पहा. आणि मग जर तसें झालें नाहीं तर, खुशाल माझ्यावर रा- गाव.'' ८०

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थाऽनुचिंतयन् ॥ ८ ॥

[ अभ्यासयोगेति ] येणेंचि अभ्यासेंसीं योगू । चित्तासि

१ जिवंत असल्यावेळीं. २ हृदयांत रहातें.

१ वेळेस. २ अधिक. ३ (आत्मा) मरत नाहीं. ४ मग. ५ खरेपणानें. ६ प्रतिज्ञा. ७ कशानें.

करी पां चांगू । अगा उपायबळें पंगू । पेहाड ठाकी ॥ ८१ ॥ [ परमं पुरुषं दिव्यं ] तेविं सदभ्यास निरंतर । चित्तासि परमपुरुषाची मोहर । लावीं मग शरीर । राहो अथवा जावो ॥ ८२ ॥ [ याति पार्थानुचिन्तयन् ] जें नाना गतीतें पावविते । तें चित्त वरील आत्मयातें । मग कवण आठवी देहातें । गेलें कीं आहे ॥ ८३ ॥ पैं सरितेचेनि ओघें । सिंधुजळा मीनले घोघें । ते काय वर्तत आहे मागें । ह्मणोनि पाहों येती ॥ ८४ ॥ ना ते समुद्रचि होऊनि ठेले । तेविं चित्ताचें चैतन्य जाहालें । जेथ यातायात निमालें । घनानंद जें ॥ ८५ ॥

**"ह्याच अभ्यासाच्या योगेंकरून चित्त शुद्ध कर. अरे! उपायाच्या बळानें पांगळा सुद्धां पर्वत चढून जातो. ८१ ह्याकरितां निरंतर चांगला अभ्यास कर. चित्ताला परमात्म्याचा मार्ग दाखवून दे. मग शरीर जाऊं दे, किंवा राहूं दे. ८२ असें केलेंस ह्मणजे नाना कल्पना उत्पन्न करणारें चित्त, आत्म्याचा अंगिकार करील. मग देह आहे, का गेला? ह्याचें स्मरण तरी कोण करणार? ८३ हें पहा! नदीचे ओघ फोफावत जाऊन समुद्रास मिळाले, ह्मणजे मग मागें काय चाललें आहे, तें पहावयास येतात काय? ८४ तर ते समुद्ररूपच होऊन जातात. त्याप्रमाणें चित्ताचें चैतन्य झालें ह्मणजे तेथें परमानंद असल्यामुळें यातायाती नाहींशा होतात." ८५**

कविं पुराणमनुशासितार-
मणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।
सर्वस्य धातारमचिंत्यरूप-
मादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ ९ ॥

[ कविं ] जयाचें आकारावीण असणें । जया जन्म ना निमणें । जें आंघवेंचि आघवेपणें । देखत असे ॥ ८६ ॥ [ पुराणं ] जें गगनाहूनि जुनें । [ अणोरणीयांसमनुस्मरेद्यः ] जें परमाणूहूनि सानें । [ अनुशासितारं ] जयाचेनि सन्निधानें । विश्व चळे ॥ ८७ ॥ [ सर्वस्य धातारमचिंत्यरूपं ] जें सर्वांतें थेया विये । विश्व सर्व जेणें जिये । हेतु जया विहे । अचिंत्य जें ॥ ८८ ॥ [ तमसः परस्तात् ] देखें वोळंवा इंगळ न चरे । तेजीं तिमिर न शिरे । जें देहाचें आंधारें । चर्मचक्षूसीं ॥ ८९ ॥ [ आदित्यवर्णं ] सुसडा सूर्यकणांच्या राशी । जो नित्य उदो ज्ञानियांसी । अस्तमानाचें जयासी । आडनांव नाहीं ॥ ९० ॥

**"जें आकाररहित; ज्याला जन्म व नाश हीं दोन्हींही नाहींत; जें परिपूर्णतेनें परिपूर्ण दिसणारें; ८६ जें आकाशापेक्षांही जुनें; परमाणूहूनही सूक्ष्म; ज्याच्या सान्निध्यानें विश्व चाललें आहे; ८७ जें ह्या सर्वांना उत्पन्न करतें; ज्याच्या योगानें हें विश्व वांचलें आहे; अहंकार ज्याला भितो; जें अचिंत्य; ८८ वाळवीला विस्तव खातां येत नाहीं, अंधकाराला प्रकाशांत शिरतां येत नाहीं, त्याप्रमाणें पहा! जें दिवसाप्रमाणें सुप्रकाशित असून, चर्मचक्षूला अंधाराप्रमाणें दिसतें; ८९ पण ज्ञान्यांना जें सदासर्वकाल निर्मल सूर्यकिरणांच्या राशीप्रमाणें सुप्रभ; अस्तमानाचें ज्याला नांवच नाहीं;" ९०**

प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या
युक्तो योगबलेन चैव ।
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्
स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥

[ प्रयाणकाले मनसाचलेन ] तया अव्यंगवाणेया ब्रह्मातें । प्रयाणकाले प्रांसे । जो स्थिरावलेनि चित्तें । [ अनुस्मरेद्यः श्लोक ९ ] जाणोनि स्मरे ॥ ९१ ॥ [ योगबलेन चैव ] वाहेर पद्मासन रचुनी । उत्तराभिमुख बैसोनी । जीवीं सुख सूनि । कर्मयोगाचें ॥ ९२ ॥ [ भक्त्या युक्तो ] आंतु मिनलेनि मनोधर्में । स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें । आपेंआप संभ्रमें । मिळावया ॥ ९३ ॥ [ भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य ] आंकळलेनि योगें । मध्यमा मध्यमार्गें । अग्निस्थानौनि निगे । ब्रह्मरंध्रा ॥ ९४ ॥ तेथ अचेत चित्ताचा सांगात । ओहाचवाणा दिसे मांडत । जेथ प्राण गगनाआंत । संचरे कां ॥ ९५ ॥ [ सम्यक् ] परि मनाचेनि स्थैर्यें धरिला । भक्तीचिया भावना भरला । योगबळें आंवरला । सज्ज होउनी ॥ ९६ ॥ तो ज-

१ पांगळा. २ पर्वत चढतो. ३ मार्ग. ४ मिळाले. ५ घो घो करीत. ६ तरते. ७ ज्ञानकला. ८ ज्या ठिकाणीं. ९ आनंदमय. १० मरणें. ११ सारेंच. १२ सूक्ष्म. १३ ह्या. १४ उत्पन्न करतें. १५ जगतें. १६ न्यायशास्त्राचें अनुमान. १७ भितें.

१ वाळवी. २ प्रकाशामध्यें. ३ दिवसाचे. ४ अज्ञानदृष्टया. ५ निर्मळ. ६ उदय. ७ परिपूर्ण. ८ मरणसमय. ९ प्राप्त झाला असतां. १० योगासनाचा एक प्रकार. ११ घालून. १२ एकवटलेल्या. १३ त्वरेनें. १४ संपादन केलेल्या. १५ सुषुम्ना. १६ आधारचक्रापासून. १७ मस्तकांतील पोकळीपर्यंत. १८ जड. १९ उगाच. २० व्यापलेला.

ाजडातें विरवितु । भ्रूलतामाजी संचरेतु । जैसा घंटानाद ंयस्तु । घंटेसींच होय ॥ ९७ ॥ कां झांकलिये घटींचा ःवा । नेणिजे काय जाहाला केव्हां । या रीती जो पांडवा । ःह ठेवी ॥ ९८ ॥ [ स तं परं पुरुषमुपैति दिव्यं ] तो केवळ रब्रह्म । जया परम पुरुष ऐसें नाम । तें माझें निजधाम । ऊनि ठाके ॥ ९९ ॥

"त्या अव्यंग अशा **परब्रह्माला** जाणून, रणकाल प्राप्त झाला असतां, स्थीर झालेल्या चित्तानें जो त्याचें स्मरण करतो, ९१ बाहेर ासन घालून, उत्तराभिमुख बसून, जिवाध्यें कर्मयोगाचें सुख सांठवून, ९२ आंत एवटलेल्या मनोधर्मानें, आत्मस्वरूप प्राप्तीच्या मानें, त्यांत सहज रीतीनें मिळण्यासाठीं, ोठी त्वरा करून, ९३ संपादन केलेल्या योगेरून, सुषुम्नानाडीच्या मध्यमार्गानें, अग्निस्था[आधारपद्म]पासून निघून ब्रह्मरंध्राकडे प्राास वळवून, ९४ तेथील आकाशांत (पोकींत) प्राण जाऊन पोंचला तरी, अचेतनाची ाणि चैतन्याची मैत्रीच आहे असें वरवर दिसें मात्र, ९५ पण तो मनाच्या स्थैर्यानें धरला असल्यामुळें, भक्तीच्या भावनेनें भरलेला सल्यामुळें, योगबळानें व्यापलेला असल्यामुळें ९६ जडाला आणि चैतन्यालाही विरवून, घंानादाचा लय घंटेंतच झाल्याप्रमाणें, भृकुटीध्यें संचार करून लय पावतो. ९७ किंवा घड्या घागरीखालचा दिवा, केव्हां काय ाला तें कळत नाहीं, त्याप्रमाणें **अर्जुना!** ो आपला देह नकळत ठेवतो, ९८ तो केवळ रब्रह्म होय. त्यासच **परमपुरुष** असें णतात. तो माझें निजधाम होऊन राहतो." ९९

यदक्षरं वेदविदो वदंति
विशंति यद्यतयो वीतरागाः ।
यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति
तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

[ यदक्षरं ] सकळां जाणणेयां जे लाणी । तिये जाणिवेची खाणी । तयां ज्ञानियांचिये आयणी । जयातें अक्षर म्हणिपे ॥ १०० ॥ चंडवातेंही न मोडे । तें गगनचि कीं फुडें । वांचूनि जरी होईल मेहुडें । तरी उरेल कैंचें ॥ १ ॥ तेविं जाणणेया जें आकळलें । तें जाणिवलेपणेंचि उमाणलें । मग नेणवेचि तया म्हणितलें । अक्षर सहजें ॥ २ ॥ [ वेदविदो वदंति ] म्हणोनि वेदविदें नर । म्हणती जयातें अक्षर । जें प्रकृतीसीं पर । परमात्मरूप ॥ ३ ॥ [ विशंति यद्यतयो वीतरागाः ] आणि विषयांचें विष उलंडूनि । जे सर्वेंद्रियां प्रायश्चित्त नेऊनि । ओहाति देहाचिया वैसोनि । झाडातळीं ॥४॥ ते यापरी विरक्त । जयाची निरंतर वाट पाहात । निष्कामाति अभिप्रेत । सर्वदा जें ॥ ५ ॥ [ यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति ] जयाचिया आवडी । न गणिती ब्रह्मचर्याचीं सांकडीं । निष्ठुर होऊनि बापुडीं । इंद्रियें करिती ॥ ६ ॥ [ तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ] ऐसें जें पद । दुर्लभ आणि अगाध । जयाचिये थडियें वेद । बुबुकळिले ठेले ॥ ७ ॥ तें ते पुरुष होती । जे यापरी लया जाती । तरी पार्था हेचि स्थिती । एक वेळ सांगों ॥ ८ ॥ तेथ अर्जुनें म्हणितलें स्वामी । हेंचि म्हणावया होतों पां मी । तंव सहजें कृपा केली तुम्ही । तरी बोलिजो कां ॥ ९ ॥ परि बोलावें तें अति सोहोपें । तेथें म्हणितलें त्रिभुवनदीपें । तुज काय नेणों संक्षेपें । सांगेन ऐक ॥ ११० ॥ तरी मना बाहेरिलीकडे । येयाची सावियां सवे मोडे । हें हृदयाचिया डोहीं बुडे । तैसें कीजे ॥ ११ ॥

"सर्व ज्ञानांतील कळस अशा ज्ञानाची जे खाणीच, अशा ज्ञान्यांच्या बुद्धीनेंही ज्यास **'अक्षर'** म्हणजे 'अविनाशी' असें म्हणतात. १०० झंझावातानेंही ज्यास भंग होत नाहीं, तेंच खरें आकाश होय. त्याशिवाय इतर उठलेले ढग असतील, तर ते टिकणार कसे? १०१ त्याप्रमाणें ज्या ज्ञानाला तें समजलें, त्याच ज्ञानानें त्याचें माप केलें, तरी त्यास अंत लागेना. ह्यास्तव सहजच त्यास अविनाश असें म्हटलें. १०२ म्हणून वेदवेत्ते पुरुष ज्याला **'अक्षर'** असें म्हणतात, तें परमात्मस्वरूप प्रकृतीहून भिन्न आहे. १०३ विषयाचें विष ओलांडून, सर्व इंद्रियांना प्रायश्चित्त देऊन, देहरूप झाडाखालीं बसलेले, १०४ असे जे विरक्त, ते नि-

१ लीन करतो. २ भृकुटीमध्यें. ३ शिरतो. ४ लय होतो. ५ घागरीखालचा. ६ अवधी, अवकाश. ७ निर्णयानें, ... ८ अविनाश.

१ तुफानाच्या वाऱ्यानेंही. २ स्पष्ट. ३ अभ्र. ४ समजलें. ५ माप केलें. ६ वेदवेत्ते, वेदार्थपारंगत. ७ मायेहून. ८ निराळें. ९ आहेत. १० इष्ट. ११ संकटें. १२ अनाथ, दीन. १३ तीरीं. १४ भिजून चिंब होतात. १५ सोपें, सुलभ. १६ श्रीकृष्णांनीं. १७ सहज, सर्वथा. १८ संवय.

रंतर ज्याची मार्गप्रतिक्षा करतात; आणि निरिच्छाला जें सदासर्वकाल प्रिय; १०५ ज्याच्या आवडीसाठीं, ब्रह्मचर्यासारख्या संकटाची सुद्धां परवा करीत नाहींत; जे निष्ठुर होऊन इंद्रियांना केवळ दीन करून सोडतात; १०६ अशा प्रकारचें जें दुर्लभ आणि अगाध पद, ज्याच्या तीरालाच वेद हे गटकळ्या खात बसले आहेत; १०७ तें, अशा प्रकारें मृत्यु पावणारांस प्राप्त होतें. तोच प्रकार तुला पुन्हा सांगतों." १०८ तेव्हां **अर्जुन** ह्मणाला "महाराज! मी सुद्धां तेंच विचारणार होतों. तों तुह्मीं आपणहूनच कृपा केलीत. तर आतां काय तें बोलावें. १०९ पण तें अतिशय सोपें करून सांगावें." तेव्हां त्रिभुवनाचा दीप जो श्रीकृष्ण तो ह्मणाला "तुला काय आह्मी ओळखत नाहीं होय? तर तें संक्षेपानें सांगतों ऐक. ११० तर आतां, मनाची बाहेर धांवण्याची संवय बंद करून, तें हृदयरूप डोहांतच बुडेल असें कर." १११

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥१२॥

[ सर्वद्वाराणि संयम्य ] परि हें तरीच घडे । जरी संयमाचीं[1] अखंडें । सर्वद्वारीं कवाडें । कळासती[2] ॥ १२ ॥ [मनो हृदि निरुध्य च ] तरी समजें मन कोंडलें । हृदयींचि असेल उगलें[3] । जैसें करचरणीं मोडलें । परिवर[4] न संडी[5] ॥ १३ ॥ तैसें चित्त राहिल्या पांडवा । प्राणांचा प्रणवेंचि[6] करावा । [ मूर्ध्न्याधायात्मनः प्राणं ] मग अनुवृत्तिपंथें[7] आणावा । मूर्ध्निवेंरी[8] ॥ १४ ॥ [ आस्थितो योगधारणां ] तेथ आकाशीं मिळे न मिळे । तैसा धरावा धारणीबळें[9] । जंव मात्रात्रय[10] मावळे । अर्धबिंबीं[11] ॥ १५ ॥ तंववरी तो समीरु[12] । निराळीं[13] कीजे स्थिरु । मग लग्नीं[14] जेवि ओंकारु । बिंबींचि[15] विलसे ॥ १६ ॥

"पण सर्व इंद्रियांच्या द्वारांचीं निग्रहरूप कवाडें सारीं बंद होतील, तरच हें घडेल. ११२ तीं लागलीं ह्मणजे, मन हें आपोआपच कोंडलें जाऊन, हृदयांतच निर्विकल्प होऊन बसतें. ज्याप्रमाणें हातपाय मोडलेल्यास घर सोडून जाववत नाहीं, ११३ त्याप्रमाणें **अर्जुना!** चित्त स्थीर झालें ह्मणजे, प्राणाचेंच आकर्षण करून तो **सुषुम्ना** नाडीच्या मार्गानें ब्रह्मरंध्रांत (मस्तकाच्या पोकळींत) आणावा, ११४ आणि तेथें धारणाशक्तीच्या बळानें मात्रात्रय—अकार, उकार, मकार—अर्धमात्रेंतच लय पावेपर्यंत, तो आकाशांत मिळतो न मिळतो असा धरावा. ११५ ह्याप्रमाणें आकाशामध्यें (मस्तकाच्या पोकळींत) वायु स्थीर होईपर्यंत धरला ह्मणजे, ओंकार हा ऐक्यरूपानें अर्धमात्रेंतच जसा रममाण व्हावा;" ११६

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्१३

[ ओमिति ] तैसें ओम् हें स्मरों[1] सरे । आणि तेथेंचि प्राण पुरे[2] । मग प्रणवातीत[3] उरे । पूर्णघनें[4] जें ॥ १७ ॥ ह्मणोनि प्रणवैकनाम[5] । हें एकाक्षर ब्रह्म । जो माझें स्वरूप परम । स्मरतसांता[6] ॥ १८ ॥ [यः प्रयातीति] यापरि त्यजी देहातें । तो त्रिशुद्धी[7] पावे मातें । जया पावण्यापरौतें । आणीक पावणें नाहीं ॥ १९ ॥ तेथ अर्जुना जरीं विपायें[8] । तुझ्या जीवीं[9] हन ऐसें जाये । नों हें स्मरण मग होये । कायसयावरी अंतीं ॥ १२० ॥ इंद्रियां अनगंड[10] पडिलिया । जीविताचें[11] सुख बुडालिया । आंत बाहेरि उघडलियां[12] । मृत्युचिन्हें ॥ २१ ॥ ते वेळीं बैसावेंचि कवणें । मग कवण निरोधी करणें[13] । तेथ काह्याचेनि[14] अंतःकरणें । प्रणवें[15] स्मरावा ॥ २२ ॥ तरि गा ऐशिया हो ध्वनी[16] । झणें[17] थारा देशी गा मनीं । पैं नित्य सेविला मी निदानीं[18] । सेवक होय ॥ २३ ॥

"त्याप्रमाणें ओम् हें स्मरण नाहींसें होतें; आणि तेथेंच प्राणाची परिपूर्णता होते. आणि मग ओंकाराहून भिन्न असें जें सर्वव्यापी पूर्ण ब्रह्म

१ इंद्रियनिग्रहाचीं. २ बंद असतील तर. ३ स्तब्ध, निर्विकल्प. ४ परिवार, कुटुंब. ५ सोडीत नाहीं. ६ ओंकार. ७ क्रमाक्रमानें, हळूहळू. ८ ब्रह्मरंध्रापर्यंत. ९ धारणाशक्तीनें. १० अकार, उकार व मकार. ११ अर्धमात्रेंतच. १२ वायु. १३ आकाशामध्यें. १४ ऐक्यावस्थेंत. १५ अर्धमात्रेंतच.

१ स्मरण करणें. २ पूर्ण होतो. ३ ओंकाराहून भिन्न. ४ पूर्णानंदस्वरूप. ५ प्रणव हेंच एक नांव ज्याचें. ६ स्मरत असतां. ७ त्रिवार, निश्चयानें. ८ कदाचित्. ९ किंवा. १० अवघड. ११ जिवंतपणाचें. १२ दिसूं लागलीं असतां. १३ इंद्रियें, कर्में. १४ कोणत्या. १५ ओंकार. १६ संशयाला. १७ कदाचित्, नको. १८ शेवटीं, अंतकाळीं.

तेंच एक शिल्लक राहतें. ११७ ह्मणून प्रणवाचें ॐ हें एकाक्षरी नाम, तेंच माझें खरें स्वरूप होय. त्याचें स्मरण करीत असतां, ११८ तशा स्थितींतच जो देहाचें विसर्जन करतो, तो निश्चयेंकरून मला पावतो. त्यापेक्षां उत्तम गति अशी कांहीं नाहींच. ११९ आतां अर्जुना! तुझ्या मनांत कदाचित् असें येईल कीं, पण हें स्मरण मरणसमयीं व्हावें कसें? १२० इंद्रियांवर संकट येऊन पडलें; जिवंतपणाचें सुख बुडालें; आणि आंतबाहेर मृत्यूचीं चिन्हें दिसूं लागलीं, १२१ ह्मणजे त्या वेळीं बसावें तरी कोणीं? इंद्रियांचा निरोध तरी करणार कोण? तेथें कोणत्या अंतःकरणानें प्रणव (ॐकार) स्मरावा? १२२ असा संशयही कदाचित् तूं आपल्या मनांत घेशील. पण जो निरंतर माझी सेवा करतो, त्याचा निदानींच्या समयाला मी सेवक होऊन रहात असतों." १२३

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः।
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः १४
मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्।
नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः १५

[अनन्यचेताः] जें विषयांसि तिळांजळी देउनी। प्रवृत्तीवरी निगेंड वाउनी। मातें हृदयीं सूनी। भोगिताती ॥२४॥ [सततं] परि भोगितया नाराणुका। भेटणें नाहीं क्षुधादिकां। तेथ चक्षुरादि रंकां। कवण पाड ॥ २५ ॥ [नित्यशः] ऐसे निरंतर एकवटले। [यो मां स्मरति] जे अंतःकरणीं मजशीं लिगटले। मीहि होऊनि आतिले। उपासिती ॥२६॥ [तस्याहं सुलभः पार्थ] तयां देहावसान जैं पावे। तैं तिहीं मातें स्मरावें। मग म्यां जरी न पावावें। तरि उपास्ति ते कायसी ॥२७॥ पैं रंक एक आडलेपणें। काकुळती धांव गा धांव ह्मणे। तरि तयाचिये ग्लांनी धांवणें। काय न घडे मज ॥२८॥ आणि भक्तांही तेचि दशा। तरी भक्तीचा सोस कायसा। ह्मणऊनि हा ध्वनी ऐसा। न वाखाणावा ॥ २९ ॥ तिहीं जे वेळीं मी स्मरावा। ते वेळीं स्मरिला कीं पावावा। तो आभारही जीवा। साहवेचि ना ॥ १३० ॥ तें ऋणवैपण देखोनि आंगीं। मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं। भक्तांचिया तनुत्यागीं। परिचर्या करीं ॥ ३१ ॥ [नित्ययुक्तस्य योगिनः] देहवैकल्याचा वारा। झणें लागेल या सकुमारा। ह्मणोनि आत्मबोधाचे पांजिरा। सुयें तयातें ॥ ३२ ॥ वरि आपुलिया स्मरणाची उवाईली। हींवे ऐसी करीं साउली। ऐसेनि नित्य बुद्धि संचली। मी आणीं तयातें ॥३३॥ ह्मणोनि देहांतींचें सांकडें। माझियां कहींचि न पडे। मी आपुलीयातें आपुलीकडे। सुखेंचि आणीं ॥ ३४ ॥ वरेंचील देहाची गंवसणी फेडुनी। आहाच अहंकाराचे रज झाडुनी। शुद्धवासना निवडुनी। आपणपां मेळवीं ॥ ३५ ॥ आणि भक्तां तरी देहीं। विशेष एकवंकीचा ठाव नाहीं। ह्मणऊनि अव्हेर करितां कांहीं। वियोग ऐसा न वाटे ॥ ३६ ॥ नातरी देहांतींचि मियां यावें। मग आपणपें यातें न्यावें। हेंही नाहीं जें स्वभावें। जे आधींचि मज मिनले ॥ ३७ ॥ येरी शरीराचिया सलिलीं। असतेपण हेचि साउली। वांचूनि चंद्रिका ते ठेली। चंद्रींच आहे ॥ ३८ ॥ ऐसे जे नित्ययुक्त। तयांसि सुलभ मी सतत। [मामुपेत्य] ह्मणऊनि देहांतीं निश्चित। मीचि होती ॥ ३९॥ [दुःखालयं] मग क्लेशतरूची वाडी। जे तापत्रयाग्नीची सगडी। जे मृत्युकाकासि कुरोंडी। सांडिली आहे ॥ १४० ॥ जें दैन्याचें दुभतें। जें महाभयातें वाढवितें। जें सकळदुःखाचें पुरतें। भांडवल ॥ ४१ ॥ जें दुर्मतीचें मूळ। जें कुकर्माचें फळ। जें व्यामोहाचें केवळ। स्वरूपचि ॥ ४२ ॥ जें संसाराचें बैसणें। जें विकाराचें उद्यानें। जें सकळ रोगांचें भोणें। वाढिलें आहे ॥ ४३ ॥ जें काळाचा खिंचं उशिटा। जें आशेचा आंगवेंठा। जन्ममरणाचा वोलिंवेंटा। स्वभावें जें ॥ ४४ ॥ जें भुलीचें भरिंव। जें विकल्पाचें वोतिंव। किंबहुना पेंव। विंचुवांचें ॥ ४५ ॥ जें व्याघ्राचें क्षेत्र। जें पण्यांगनांचें मित्र। जें विषयविज्ञानयंत्र। सुपूजित ॥४६॥ जें लावेचा कळवळा। निवालिया विपीदकाचा गलोळा। जें वि-

१ पाणी सोडून. २ संसारावर. ३ शपथ. ४ वाहून. ५ ठेवून. ६ असमाधान. ७ तल्लीन झाले. ८ व्यापले. ९ उपासना, भक्ति. १० निरुपाय होऊन. ११ संकटाला. १२ हव्यास. १३ अंदेशा. १४ मनांत आणूं नये. १५ ओझें.

१ कर्जाचें ओझें. २ ऋणमुक्त होण्यासाठीं. ३ सेवा. ४ विकलपणाचा. ५ कदाचित्. ६ कवच. ७ घालतों. ८ स्पष्ट. ९ गार, सौम्य. १० अशा रीतीनें. ११ माझ्या भक्तांना. १२ कधींच. १३ वर असलेली. १४ व्यर्थ. १५ तादात्म्याचा. १६ मिळाले. १७ बाकी राहिलेल्या. १८ पाण्यामध्यें. १९ प्रतिबिंब. २० चांदणें. २१ निरंतर माझा ध्यास करणारे. २२ बाग, मळा. २३ शेगडी. २४ मृत्युरूप कावळ्याला. २५ ओंवाळणी. २६ भ्रांतीचें. २७ सिंहासन, बैठक. २८ बाग. २९ खाद्य. ३० खिचडी. ३१ उष्टी. ३२ शरीर. ३३ रहदारीचा रस्ता. ३४ वेश्यांचें. ३५ विषयाच्या माहितीचें यंत्र. ३६ राक्षसीचा. ३७ घोट.

श्वासु[1] आंगवळा[2] । संवचोराचा[3] ॥ ४७ ॥ जें कोडियाचें खेंव[4] । जें काळसर्पाचें मार्दव । गोरियेचें[5] स्वभाव । गायन जें ॥४८॥ जें वैरियाचा पाहुणेर[6] । जें दुर्जनाचा आदर । हें असो जें सागर । अनर्थाचा ॥ ४९ ॥ [ अशाश्वतं ] जें स्वप्नीं देखिलें स्वप्न । जें मृगजळें सांसिनलें[7] वन । जें धूम्ररजांचें[8] गगन । ओतलें आहे ॥ १५० ॥ [ पुनर्जन्म नाप्नुवंति ] ऐसें जें हें शरीर । तें ते न पवतीचि पुढती नर । [ महात्मानः ] जे होऊनि ठेले अपार । स्वरूप माझें ॥ ५१ ॥

"विषयांना तिळांजळी देऊन, प्रवृत्तीबद्दल शपत घेऊन, मला हृदयांत ठेऊन, जे आत्मसुखाचा अनुभव घेतात, १२४ त्यांना क्षुधादिकांपासून सुद्धां असमाधान होत नाहीं; मग नेत्रादिकांची कथा काय ? १२५ ह्याप्रमाणें ऐक्यरूपास पोंचलेले, अंतःकरणांत माझ्याशीं तल्लीन झालेले, मत्स्वरूप होऊन सर्वव्यापकाची उपासना करूं लागलेले, १२६ अशांना जेव्हां मरण प्राप्त होतें, तेव्हां त्यांनीं माझें स्मरण केलें असतांही, मीं जर न पावावें, तर मग भक्ति ती काय ? आणि उपासना ती कसली ? १२७ तसें कशाला ? एखादा अनाथ संकटसमयीं मोठ्या दीनवाणीनें 'धांवा हो, धांवा' असें ह्मणाला, तर त्याच्या दुःखासाठीं मला धांवत जावें लागत नाहीं का ? १२८ आणि भक्तांनाही जर तीच दशा प्राप्त झाली, तर भक्तीची हांव तरी कशाला बाळगावी ? ह्मणून हा असा संशय घेऊं नये. १२९ ते ज्या वेळीं माझें स्मरण करतात, त्या वेळीं त्यांच्या त्या स्मरणाला मी पावतों. तें ओझें माझ्या जिवाला सहन होत नाहीं. १३० तें कर्जाचें ओझें आपणावर लादलें आहे असें समजून, त्या कर्जाची फेड करण्यासाठीं भक्ताच्या मरणसमयीं मी त्याची सेवा करतों. १३१ त्या बापड्याला कदाचित् देहवैकल्याचा वारा लागेल, ह्मणून त्याला मी आत्मबोधाचें कवच घालतों. १३२ आणि त्यावर आपल्या स्मरणाची शीतल छाया करतों. अशा रीतीनें त्याच्या ठायीं मी स्थीर बुद्धि आणतों. १३३ ह्मणून देहांतींचें दुःख माझ्या भक्तांना कधींच पडत नाहीं. माझ्या भक्तांना मी सुखानेंच माझ्याकडे आणतों. १३४ वरून असणारी देहाची गवसणी काढून, अहंकाराचा वायफळ धुरोळा झाडून काढून शुद्ध वासना उत्पन्न करून, आपणास मिळवितों. १३५ आणि भक्तांना तरी, तादात्म्यतेवांचून इतर स्थळ नसतेंच; ह्मणून तो (देह) टाकतांना 'वियोग' असेंही त्यांस वाटत नाहीं. १३६ किंवा, मरणसमयीं मीं यावें, आणि आपणांस न्यावें, ह्याची त्यांना आवश्यकताही असत नाहीं. कारण, ते स्वभावधर्मेंकरून पूर्वींच मत्स्वरूपाला मिळालेले असतात; १३७ नाहीं तरी, शारीराच्या पाण्यांत जीव हा प्रतिबिंबरूपच आहे. पाण्यापासून चांदणें भिन्न; तें चंद्रामध्येंच असतें. १३८ तसे जे निरंतर माझ्या ध्यानांमध्यें रममाण होणारे, त्यांना मी नेहेमीं सुलभच आहें; ह्मणून मरणसमयीं ते मद्रूपच होतात. १३९ जें क्लेशरूप तरूंचा मळा; आध्यात्मिक, आधिदैविक, व आधिभौतिक ह्या तापत्रयांच्या अग्नीची शेगडी; जी मृत्युरूप कावळ्याला टाकलेली उंडी; १४० जें दैन्याचें दुभतें; महाभयाला वाढविणारें; आणि सकल दुःखाचें भरपूर भांडवल. १४१ दुर्मतीचें मूळ; कुकर्माचें फळ; आणि भ्रांतीची मूर्ति. १४२ जें संसाराचा पाया; विकाराचें उद्यान; सकल रोगांचें वाढलेलें खाद्य; १४३ काळाची जी उष्टी खिचडी; आशेची प्रतिमा; आणि स्वभावानें जन्ममरणाचा राजरस्ता. १४४ भुलीची ठेव; विकल्पाची मूस; किंवा विंचवांचें पेंव; १४५ व्याघ्राची गुहा; वेश्येचे सोबती; विषयांच्या माहितीचें उत्कृष्ट यंत्र. १४६ राक्षसिणीचा कळवळा; शीतल विषोदकाचा घुटका; मानभावी चोरांचें विश्वासस्थळ; १४७ कोड्याचें आलिंगन; काळसर्पाची मृदुलता; पारध्याचें प्रत्यक्ष गायन; १४८ शत्रूचें आदरातिथ्य; दुर्जनाचा सत्कार; हें तर काय ? पण जें अनर्थाचा समुद्र. १४९ जें स्वप्नांत पाहिलेलें स्वप्न; मृगजळानें भरलेलें

१ भरंवसा. २ स्थान. ३ मानभावी चोराचा. ४ आलिंगन. ५ पारध्याचें. ६ मेजवानी. ७ सांचलेलें. ८ धुराचें.

न; किंवा धुराचें तयार झालेलें अभ्र; १५० अशा प्रकारचें जें हें शरीर, तें जे पुरुष माझें अनंत स्वरूप बनून राहिले, त्यांस पुढें प्राप्त होत नाहीं." १५१

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥

[ आब्रह्मेति ] येऱ्हवीं ब्रह्मपणाचिये भंडसे । न चुकतीचि नरावृत्तीचे वळसे । [ मामिति ] परि निवटलियाचें जैसें । टि न दुखे ॥ ५२ ॥ नातरी चेइलिया नंतरें । न बुडिजे वप्नींचेनि महापुरें । तेविं मातें पावले ते संसारें । लिपतीचि ा ॥ ५३ ॥ येरवीं जगदाकाराचें सिरें । जें चिरस्थाइयांचे रे । ब्रह्मभुवन गा चवरें । लोकाचळाचें ॥ ५४ ॥ जिये गां-ांचा पहोर दिवोवरी । एका अमरेंद्राचें आयुष्य न धरी । वळोनि पांती उठी एकसरी । चवदा जणांची ॥ ५५ ॥

**"बाकी ब्रह्मत्वाचा बाणा मिरविणाऱ्या ोटमोठ्या धेंडांना सुद्धां, पुनरावृत्तीचे फेरे ुकत नाहींत. परंतु मेलेल्याचें जसें पोटांत ुखत नाहीं, १५२ किंवा जागृत झाल्यानंतर, वप्नांतील महापुरांत जसें कोणी बुडत नाहीं, ाप्रमाणें जे मत्स्वरूपाला पोंचले, ते पुन्हा ंसारानें लिप्तच व्हावयाचे नाहींत. १५३ ास्तविक पाहिलें तर, जगाच्या आकाराचें जें ारण; चिरस्थाइकांमध्यें जो धुरीण; त्रैलोक्य-र्वताचें शिखर; असा जो ब्रह्मलोक, १५४ या ब्रह्मलोकरूपी गांवांतील दिवसाच्या एका हराला इंद्राचेंही आयुष्य पुरत नाहीं; एका ेवसांत त्यांच्या एकसारख्या चौदा पंक्ति ठतात;" १५५**

सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।
रात्रिं युगसहस्रांतां तेऽहोरात्रविदो जनाः १७

[ सहस्रयुगपर्यंतमहः ] जें चौकडियों सहस्र जाये । तैं-गेटावो विळाचि होये । [ रात्रिं युगसहस्रां तां ] आणि तैं-सेंचि सहस्रवेरिये पाहें । रात्री जेथ ॥ ५६ ॥ [ यद्ब्रह्मणो विदुः ] येवढें अहोरात्र जेथिंचें । तेणें न लोटेती भाग्याचे । देखती ते स्वर्गीचे । चिरंजीव ॥ ५७ ॥ येरां सुरगणांची नें-वाई । विशेष सांगावी तेथ काई । मुदल इंद्राचीचि दशा पाहीं । जे दिहाचे चौदा ॥ ५८ ॥ [ तेऽहोरात्रविदो जनाः ] परि ब्रह्मयाचियाहि आठा प्रहरांतें । आपुलिया डोळां देखते । जे आहाति गा तयांतें । अहोरात्रविद म्हणिजे ॥ ५९ ॥

**"हजार युगांच्या चौकड्या जाव्यात, तेव्हां तेथचा खरा एक दिवस होतो. आणि तशीच हजार चौकड्यांपर्यंत रात्र असते. १५६ येवढी जेथली अहोरात्र; तीस, जे भाग्यवान् न मरतां पहातात, ते स्वर्गीचे चिरंजीव होत. १५७ त्यांच्यापुढें इतर देवतांचें नवल तें काय सांगावें ? प्रत्यक्ष इंद्राचीच दशा पहा ! ते एका दिवसांत चौदा होतात. १५८ ब्रह्मदेवाच्या आठही प्रहराला, आपल्या डोळ्यांनीं जे पाहणारे आहेत, त्यांना 'त्रिकालज्ञ' असें म्हणतात." १५९**

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ।
राञ्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥
भूतग्रामः स एवाऽयं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।
राञ्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

[ अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः ] तये ब्रह्मभुवनीं दिवसें पाहे । ते वेळीं गणना केंहीं न समाये । ऐसें अव्यक्ताचें होये । व्यक्त विश्व ॥ १६० ॥ [ राञ्यागमे प्रलीयंते ] पुढती देहांची चौपाहारी फिटे । आणि हा आकारसमुद्र आटे । [ भूत्वा ] पाठीं तैसाचि मग पाहांटे । भरों लागे ॥ ६१ ॥ [ प्रलीयते ] शारदीयेचिये प्रवेशीं । अभ्रें जिरती आकाशीं । [ भूत्वा ] मग ग्रीष्मांतीं जैशीं । निगती पुढती ॥ ६२ ॥ [ भूतग्रामः स एवायं ] तैसी ब्रह्मदिनाचिये आदी । हे भूतसृष्टीची मांदी । [ अवशः ] मिळे जंव सहस्रावेंधी । निमित्त पुरे ॥ ६३ ॥ [ राञ्यागमे ] पाठीं रात्रीचा अवसर होये । [ अव्यक्तसंज्ञके ] आणि विश्व अव्यक्तीं लया जाये । तोही युगसहस्र मोटका

---

१ धेंडांना. २ मेलेल्याचें. ३ जागृत झाल्यानंतर. ४ का-ा, निमित्त. ५ फार दिवस राहणारांतील. ६ अग्रगण्य. शेवट. ८ त्रैलोक्यपर्वताचें. ९ प्रहर. १० दिवसभर. १ एका दिवसांत. १२ पंक्ति. १३ चार युगें. १४ वास्तविक. ५ पुरा दिवस.

१ हजार चौकड्यांपर्यंत. २ दिवस आणि रात्र. ३ मृत्यु पावत नाहींत. ४ चिरकाल रहाणारे. ५ नवल. ६ एका दिवसाचे. ७ कालज्ञानवेत्ते. ८ कोठेंही. ९ निराकाराचें. १० साकार. ११ दिवसाचे. १२ चार प्रहर. १३ संपतात. १४ अनंत विश्वाकार. १५ शरत्कालाच्या. १६ समुदाय. १७ सहस्र वर्षेंपर्यंत. १८ वेळ. १९ निराकाराच्या ठिकाणीं. २० लहान.

पाहे। [ प्रभवन्त्यहरागमे ] आणि तैसेंचि रचे ॥ ६४ ॥ [ सहस्रयुगपर्यंतमित्यादिश्लोकत्रयतात्पर्य ] हें सांगावया काय उपपत्ती। जे जगाचा प्रळयो आणि संभूती। इये ब्रह्मभुवनींचिया होती। अहोरात्रामाजी ॥ ६५ ॥ कैसें थोरियेचें मान पाहें पां। तो सृष्टिबीजाचा सांटोपा। परि पुनरावृत्तीचिया मापा। शीग जाहाला ॥ ६६ ॥ येऱ्हवीं त्रैलोक्य हें धनुर्धरा। तिये गांवींचा गा पसारा। तो हा दिनोदयीं एकसरां। मांडतें असे ॥ ६७ ॥ पाठीं रात्रींचा समो पावे। आणि अपैसाचि सांठवे। म्हणिये जेथिचें तेथ स्वभावें। साम्यासि ये ॥ ६८ ॥ जैसें वृक्षपण बीजासि आलें। कीं मेघ हें गगन जाहालें। तैसें अनेकत्व जेथ सामावलें। तें साम्य म्हणिपे ६९

**"त्या ब्रह्मलोकांत जेव्हां दिवस उगवतो, त्या वेळीं मोजदातही करतां येत नाहीं, इतकी जीवसृष्टी उत्पन्न होते. १६० पुढें दिवसाचे चार प्रहर संपतात, आणि चराचरादि आकाररूप जीवसमुद्र आटून जातो. नंतर पहाट झाली म्हणजे, पहिल्याप्रमाणेंच पुन्हां भरूं लागतो. १६१ शरत्कालास आरंभ झाला म्हणजे, अभ्रें जशीं आकाशांतल्या आकाशांत जिरून जातात, आणि ग्रीष्मऋतू संपत आला म्हणजे तीं जशीं पुन्हां उद्भवूं लागतात, १६२ त्याप्रमाणें, ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या प्रारंभीं, हा भूतसृष्टीचा समुदाय सहस्र युगांचें निमित्त पुरें होईपर्यंत असतो. १६३ त्यानंतर रात्रीची वेळ होते आणि मग तें विश्व निराकारामध्यें लयास जातें. तोही हजार युगांच्या चौकड्याचा काल गेला म्हणजे, पुन्हा पहिल्याप्रमाणें उत्पत्ति होते. १६४ हें सांगावयास कारण काय? तर जगाची उत्पत्ति आणि नाश हीं, त्या ब्रह्मलोकाच्या एका अहोरात्रीमध्यें होत असतात. १६५ थोरपणाचा प्रभाव कसा आहे पहा! ब्रह्मदेव म्हटलें म्हणजे सर्व सृष्टीच्या बीजांचें भांडार; पण तो सुद्धां पुनरावृत्तीच्या मापाची शीग होतो. म्हणजे त्यालाही पुनर्जन्म सुटत नाहीं. १६६ खरोखर विचार केला तर अर्जुना! हें सारें त्रैलोक्य त्या ब्रह्मलोकाच्याच गांवचा पसारा आहे. प्रत्येक दिवस उगवण्याबरोबर त्याची तो एकदम मांडामांडी करतो. १६७ पुन्हा रात्रीची वेळ येऊन ठेपली, कीं आपोआपच जेथच्या तेथें समान अवस्थेप्रत पोंचतें. १६८ बीजाला ज्याप्रमाणें वृक्षत्व येतें; मेघ हे जसे गगनरूप होतात; त्याप्रमाणें, अनेकत्व जेव्हां ऐक्यास पोंचतें, तेव्हां त्याला 'साम्य' असें म्हणतात." १६९**

परस्तस्मात्तु भावोऽन्यो व्यक्तोऽव्यक्तात्सनातनः।
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति २०

[ अव्यक्तात् ] तेथ समविषम न दिसे कांहीं। म्हणोनि भूतें भाषे नाहीं। जेविं दुधचि जाहालिया दहीं। नामरूप जाय ॥ १७० ॥ तेविं आकारलोपासरिसें। जगाचें जगपण भ्रंशे। परि जेथें जाहालें तें जैसें। तैसेंचि असे ॥ ७१ ॥ तें तया नांव सहज अव्यक्त। आणि आकारा ये तेंचि व्यक्त। हें एकात्त्व एक सूचित। येऱ्हवीं दोनी नाहीं ॥ ७२ ॥ जैसें आटलिया रूपें। आटलेपण ते खोटी म्हणिपे। पुडती तो घनाकार हारपे। जे वेळीं अळंकार होती ॥ ७३ ॥ [ परस्तस्मात्तु भावोऽन्यो व्यक्तः ] हीं दोन्ही जैशीं होणीं। एकीं साक्षिभूत सुवर्णीं। तैसी व्यक्ताव्यक्ताची कडसणी। वस्तूच्या ठायीं ॥ ७४ ॥ [ सनातनः ] तें तरी व्यक्त ना अव्यक्त। नित्य ना नाशवंत। या दोहीं भावां अतीत। अनादिसिद्ध ॥ ७५ ॥ [ यः स सर्वेषु भूतेषु ] जें हें विश्वचि होऊनि असे। [ नश्यत्सु न विनश्यति ] परि विश्वपण नासिलेनि न नासे। अक्षरें पुसिल्या न पुसे। अर्थ जैसा ॥ ७६ ॥ पाहें पां तरंग तरी होत जात। परि तेथ उदक तें अखंड असत। तेवीं भूताभावीं न नाशत। अविनाश जें ॥ ७७ ॥ नातरी आटतिये अळंकारीं। नाटतें कनक असे जयापरी। तेवीं मरतिये जीवाकारीं। अमर जें आहे ॥ ७८ ॥

**"तेथें अधिकउणें कांहींच दिसत नाहीं. म्हणून भूतें हा शब्दच नाहीं. ज्या प्रमाणें दुधाचेंच दहीं झालें, म्हणजे मग त्याचें नाम ही जातें, आणि रूपही जातें. १७० त्याप्रमाणें आकाराच्या नाशाबरोबर जगाचें जगपणही नाहींसें होतें. परंतु जेथून तें झालेलें असतें, तें असतें तसेंच**

१ उत्पन्न होतें. २ कारण. ३ उत्पत्ति. ४ थोरवीचें. ५ साठवण, कोठार. ६ अग्रेसर. ७ पुन्हां उत्पन्न होतो. ८ समय. ९ आपोआप. १० म्हणून. ११ समान अवस्थेला.

१ शब्द. २ दृश्य पदार्थांचा लोप झाल्यावरोबर. ३ नाहींसें होतें. ४ लगड. ५ घट्टपणा. ६ साकार निराकाराची. ७ विचार. ८ ब्रह्माच्या ठायीं. ९ स्थिति. १० भूतें नाहींशीं झालीं असतां. ११ न आटणारें. १२ सुवर्ण. १३ मरणाऱ्या.

असतें. १७१ ह्मणून त्याला सहजच अव्यक्त असें ह्मणतात. आणि आकाराला येतें तें व्यक्त; ईं तरी एकमेकामुळें ह्मणावयाचीं. बाकी वा-स्तविक पाहिलें तर, दोन्हीही नाहींत. १७२ त्याप्रमाणें आटून केलेल्या आकाराला लगड असें ह्मणतात; पण पुढें त्याचे अलंकार केले ह्मणजे तो लगडीचा आकारही नाहींसा होतो. १७३ तीं दोन्हीही जशी एका साक्षीभूत सुवर्णा-ासूनच होतात, तसाच ब्रह्माच्या ठिकाणीं, यक्त आणि अव्यक्ताचा विचार आहे. १७४ ब्रह्म ाहूं गेलें तर व्यक्तही नाहीं आणि अव्यक्तही ाहीं. नित्य नाहीं, आणि अनित्यही नाहीं. तें दो-हीही स्थितींच्या पलीकडे असून अनादिसिद्ध ाहे. १७५ अक्षरें पुसल्यानें जसा अर्थ पुसला ात नाहीं, तसें विश्वरूपच होऊन राहणारें ह्म, विश्वाचें विश्वरूप नाहींसें झालें तरी, तें ाहींसें होत नाहीं. १७६ हें पहा! लाटा उत्पन्न ेतात, आणि नाहींशा होतात. तरी, तेथें उ-क हें अखंडच असतें. त्याप्रमाणें भूतांचा ाश झाला तरी, जें अविनाश आहे तें नाश ावत नाहीं. १७७ किंवा आटून केलेल्या अ-ंकारामध्यें ज्याप्रमाणें न आटलेलें सोनें अ-तें, त्याप्रमाणें मरणाधीन जीवांच्या आका-ामध्यें हेंही अमर असतें.” १७८

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥
पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।
यस्यांऽतस्थानि भूतानि येनसर्वमिदं ततम् ॥२२॥

[अव्यक्तः] जयातें अव्यक्त ह्मणों ये कोडें। ह्मणतां स्तुति ऐसें नावडे । जें मन बुद्धी न सांपडे । ह्मणऊनियां ॥७९॥ अक्षरः] आणि आकारा आलिया जयाचें । निराकारपण वेचे । आकारलोपें न विसंचे[४] । नित्यता गा ॥ १८० ॥ णोनि अक्षर जें ह्मणिजे । [इत्युक्तस्तमाहुः परमां गति] वींचि ह्मणतां बोधही उपजे । जया परौता पैसं न देखिजे । नाम परमगती ॥ ८१ ॥ [पुरुषः] परि आघवां इहीं देहपुरीं । ाहे निजेलियाचे परी । जे व्यापार करवी ना करी । ह्मण-ऊनियां ॥ ८२ ॥ येन्हवीं जे शारीरचेष्टा । त्यामाजी एकिही न ठेके गा सुभटा । दाही इंद्रियांचिया वाटा । वाहतचि आ-हाती ॥ ८३ ॥ उकलूनि विषयांचा पेंठों । होत मनाचा चो-हटा । तो सुखदुःखांचा राजवांटों । भितराही पावे ॥ ८४ ॥ परि रावो पहुडलिया सुखें । जैसा देशींचा व्यापार न ठेके । प्रजा आपुलालेनि अभिलाखें । करितीच असती ॥ ८५ ॥ तैसें बुद्धीचें हन जाणणें । कां मनाचें घेणें देणें । इंद्रियांचें करणें । स्फुरण वायूचें ॥ ८६ ॥ हे देहक्रिया आघवी । न क-रितां होय बरवी । जैसा न चलवितेनि रवी । लोक चाले ॥ ॥ ८७ ॥ अर्जुना तया परी । सुतला ऐसा आहे शरीरीं । ह्म-णोनि पुरुष गा अवधारीं । ह्मणिपै जयातें ॥ ८८ ॥ आणि प्रकृती पतिव्रते । पडिला एकपत्नीव्रतें । येणेंही कारणें ज-यातें । पुरुष ह्मणोंये ॥ ८९ ॥ [स परः पार्थ] पैं वेदांचें बहुवसपण । देखेचिना जयाचें आंगण । हें गगनाचें पांघुरण । होय देखा ॥ १९० ॥ ऐसें जाणूनि योगीश्वर । जयातें ह्म-णती परात्पर । [अनन्यया] जें अनन्यगतीचें घर । गिंवे-सीत ये ॥ ९१ ॥ [भक्त्या लभ्यस्तु] जे तनू वाचा चित्तें । नाइकती दुजिये गोष्टीतें । तयां एकनिष्ठेचें पिकतें । सुक्षेत्र जें ॥ ९२ ॥ हें त्रैलोक्यचि पुरुषोत्तम । ऐसा साचा जयाचा मनोधर्म । तया आस्तिकाचा आश्रम । पांडवा गा ॥ ९३ ॥ [यं प्राप्य] जें निर्वाणींचें गौरव । जें निर्गुणाची जाणिव । जें सुखाची राणिव । निराशांसी ॥ ९४ ॥ जें संतोषियां वा-ढिलें ताट । जें अचिंता अनाथाचें मायपोट । भक्तीसी उजू वाट । जया गांवा ॥ ९५ ॥ हें एकैक सांगोनि वायां । काय फार करूं धनंजया । पैं गेलिया जया ठाया । तो ठावोचि होइजे ॥ ९६ ॥ हिंवाचियें झुळुका । जैसें हिंवचि पडे उ-ष्णोदका । कां सामोर जालिया अर्का । तमचि प्रकाश होये ॥ ९७ ॥ [यस्यांतस्थानि भूतानि] तैसा संसार जया गांवा । गेलिसांता पांडवा । होऊनि ठाके आघवा । मोक्षाचाचि ॥ ९८ ॥ [येन सर्वमिदं ततं] तरि अग्निमाजी आलें । जैसें इंधन अग्नि जाहालें । पाठीं न निवडेचि कांहीं केलें । काष्ठ-पण ॥ ९९ ॥ नातरी साखरेचा माधौतों । बुद्धिमंतपणेंही

१ कौतुकानें. २ न वाटे. ३ जात नाहीं. ४ विघडत ाहीं. ५ अविनाश. ६ विस्तार. ७ ब्रह्मप्राप्ति. ८ पूर्ण, सर्व.

१ देहव्यापार. २ रहात नाहीं. ३ चालतच आहेत. ४ उघडून. ५ बाजार. ६ चव्हाटा. ७ राजमार्ग. ८ आं-तसुद्धां. ९ राजा. १० बंद पडत नाहीं. ११ इच्छेनें. १२ हालणें. १३ न चालवितां. १४ निद्रिस्त. १५ पुरि= शरीरांत. शेते=निजतो तो. १६ माया. १७ थोरपणा. १८ एकनिष्ठेचें. १९ शोधीत. २० उत्तम शेत. २१ महत्व. २२ ज्ञान. २३ राज्य. २४ निस्पृहांना. २५ चिंतारहित. २६ अधिष्ठान. २७ थंडीच्या. २८ सूर्याच्या. २९ अंधकार असतो तोच. ३० गेला असतां. ३१ सर्पण, जळण. ३२ वेगळें होतच नाहीं. ३३ पुन्हा.

करितां । परि ऊंस नव्हे पंडुसुता । जियापरी ॥ २०० ॥ लोहाचें कनक जाहालें । हें एके परिसेंचि केलें । आतां आणिक केचें तें गेलें । लोहत्व आणी ॥ १ ॥ ह्मणोनि तूप होऊनि माघौतें । जेवीं दुधपणा न येचि निरुतें । [न निवर्तंते] तेविं पावोनियां जयातें । पुनरावृत्ति नाहीं ॥ २ ॥ [तद्धाम परमं मम] तें माझें परम । साचोकारें निजधाम । हें अंतेवट तुज वर्म । दाविजत असे ॥ ३ ॥

"ज्याला मोठ्या आनंदानें अव्यक्त असें ह्मणतां येतें. आणि तें मनाला व बुद्धीला ही आकळत नाहीं ह्मणून, त्या ह्मणण्यांत अतिशयोक्ति आहे, असेंही वाटत नाहीं. १७९ आणखी जें आकाराला आलें असतांही, ज्याचें निराकारत्व नाहींसें होत नाहीं, किंवा आकाराच्या नाशानें ज्याची नित्यताही बिघडत नाहीं. १८० ह्मणून 'अक्षर' असें ह्मटलें कीं, त्याच वेळीं मनाला एक प्रकारचा बोध होतो; तो हा कीं, त्याच्या पलीकडे दुसरें स्थळ नाहीं. त्याचेंच नांव ब्रह्मप्राप्तीचें स्थान. १८१ परंतु ह्या देहरूप ग्रामामध्यें तो निजल्यासारखा असतो. कारण, कोणताही व्यापार जो करीतही नाहीं; व करवीतही नाहीं ह्मणून. १८२ बाकी हे **वीरश्रेष्ठा!** शरीर व्यापार जे आहेत, त्यांपैकीं एकही रहात नाहीं. दशेंद्रियांचे रस्ते चालूच असतात. १८३ मनाच्या चव्हाट्यावर विषयांचीं दुकानें उघडतात, आणि त्यांतील सुखदुःखाचा राजविभाग आंतही पोंचतो. १८४ परंतु राजा खुशाल निजला असतां, देशांतील व्यापार जसा बंद पडत नाहीं, प्रजा आपआपल्या इच्छेनें तो जसा चालवितच असतात; १८५ त्याप्रमाणें बुद्धीचें सर्व जाणणें, मनाचें देणेंघेणें, किंवा इंद्रियांची कृति, किंवा वायूचें स्फुरण पावणें, १८६ हे देहव्यापार, ज्यानें न करतांच उत्तम रीतीनें चाललेले असतात. ज्याप्रमाणें सूर्यानें न चालवितां लोक चालतात, १८७ त्याप्रमाणें **अर्जुना !** शरीरांत असणारा निजलेला असतो, ह्मणून त्याला 'पुरुष' असें ह्मणतात. ध्यानांत ठेव. १८८ आणखी, मायारूप पतिव्रतेबरोबर तो एकपत्नीव्रतानें राहतो, ह्या कारणानेंही त्यास पुरुष असें नांव आहे. १८९ तसेंच, वेदांची येवढी थोरवी गातात खरी, तरी त्यांच्यानें ज्याचें आंगण सुद्धां पहाणें झालें नाहीं. ह्मणजे ती एक आकाशाचीच गवसणी आहे असें समज. १९० हें मनांत आणूनच, योगी श्रेष्ठ आहेत ते, त्याला **'परात्पर'** असें ह्मणतात. तें एकनिष्ठेचें घर शोधीत येतें. १९१ जे काया वाचा मनेंकरून दुसरी गोष्टच ऐकत नाहींत, त्यांना एकनिष्ठतेचें पिकणारें उत्तम शेत आहे. १९२ **अर्जुना !** हें सारें त्रैलोक्य **पुरुषोत्तम**च आहे, असा ज्याच्या मनाचा धर्म झाला, त्या भक्ताचें हें विश्रांतिस्थान. १९३ जें मोक्षाचें गौरव; निर्गुणाचें ज्ञान; आणि निरिच्छांना सुखाचें राज्य. १९४ संतोष्यास जें वाढलेलें ताट; अनाथाचें जें निश्चित मायपोट; ज्या गांवास जाण्याला भक्तीला सरळ वाट. १९५ **धनंजया!** हें एक एक व्यर्थ भाराभर सांगून काय करावयाचें आहे? ज्या स्थानीं गेलें असतां, तें स्थानच आपण बनून जातो. १९६ थंडीच्या झुळुकीनें ऊन्ह पाणी ज्याप्रमाणें थंड होतें; किंवा आंधार सूर्यापुढें गेला असतां आंधारच प्रकाशरूप होतो, १९७ त्याप्रमाणें **पांडवा !** ज्या गांवाला संसार गेला असतां तो स्वतः मोक्षरूपच होऊन राहतो. १९८ अग्नीमध्यें पडलेलें जळण जसें अग्निरूप होतें; मागाहून कांहीं केलें तरी, त्याचा लांकूडपणा निराळा करतां येत नाहीं. १९९ किंवा **अर्जुना !** कितीही शहाणपण खर्च केलें तरी, साखरेचा पुन्हां कांहीं ऊंस करतां यावयाचा नाहीं, २०० लोखंडाचें सोनें होतें; तें एका परिसानें होतें. पण त्याला फिरून लोखंडपणा कशानें येणार ? २०१ तसेंच तूप झाल्यावर त्याला दूधपणा खास यावयाचा नाहीं. त्याप्रमाणें ज्याला पावलें असतां, पुनर्जन्माचा फेरा नाहीं. २०२ तें माझें उत्तम आणि खरें गृह होय. हें गुप्त वर्म तुला दाखवून देत आहें." २०३

१ पुन्हां, दुसरा परीस. २ निश्चयेंकरून. ३ पुनर्जन्म. ४ खरोखर. ५ अंतरंग, जिवाची गोष्ट.

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।
प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥

[ यत्र काले त्वनावृत्तिं ] तेवींचि आणिकेंही एके प्रकारें । हें जाणतां आहे सोपारें । तरि देह सांडितेनि अवसरें । जेथें मिळती योगी ॥ ४ ॥ [ आवृत्तिं चैव योगिनः ] अथवा अचंवटे ऐसें घडे । जे अनवसरें देह सांडे । तरि माघौतें येणें घडे । देहासीचि ॥ ५ ॥ [ प्रयाता यांति ] ह्मणोनि काळशुद्धी जरी देह ठेविती । तरि ठेवीत खेंवी ब्रह्मचि होती । एरवीं अकाळीं तरी येती । संसारा पुढती ॥ ६ ॥ तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ती । या दोन्ही अवसरा आहती । [ तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ] तोचि अवसर तुजप्रती । प्रसंगें सांगों ॥ ७ ॥ तरि ऐकें गा सुभटा । पातलिया मरणाचा तांजेवटा । पांचै आपुलिया वाटा । निघती अंतीं ॥ ८ ॥ ऐसा वरि वरिपडिलें प्रयाणकाळीं । बुद्धीतें भ्रम न गिळी । स्मृति नव्हे आंधळी । न मरे मन ॥ ९ ॥ हा चेतनावर्ग माधवा । मरणीं दिसे टवटवा । परि अनुभविलिया ब्रह्मभावा । गंवसणी होउनी ॥ २१० ॥ ऐसा सावध हा समाभावो । आणि निर्वाणवेर्‍हीं निर्वाहो । हें तरीच घडे सांवावो । अग्नींचा आथी ॥ ११ ॥ पाहा पां वारेनें कां उदकें । जैं दिवियाचें दिवेपण झांके । तैं असतीच काय देखे । दिठी आपुली ॥ १२ ॥ तैसें देहांतींचेनि विषमवातें । देह आंत बाहेरी श्लेष्मआतें । तैं विझोनि जाय उजितें । अग्निचें तेव्हां ॥ १३ ॥ ते वेळीं प्राणासि प्राण नाहीं । तेथ बुद्धि असोनि करील काई । ह्मणोनि अग्निवीण देहीं । चेतना न थारे ॥१४॥ अगा देहींचा अग्नि जरी गेला । तरी देह नव्हे चिखल ओला । वायां आयुष्यवेळ आपुला । आंधारें गिंवसी ॥१५॥ आणि मागील स्मरण आंघवें । तें तेणें अवसरें सांभाळावें । मग देह त्यजूनि मिळावें । स्वरूपीं कीं ॥ १६ ॥ तंव तया देहश्लेष्माचे चिखलीं । चेतनाचि बुडोनि गेली । तेथ मागिली पुढिलीहि ठेली । आठवण ॥ १७ ॥ ह्मणोनि आधीं अभ्यास जो केला । तो मरण न येतां निमोनि गेला । जैसें ठेवणें न दिसतां मालवला । दीप हातींचा ॥ १८ ॥ आतां असो हें सकळ । जाण पां ज्ञानासि अग्निमूळ । तया अग्नीचें प्रयाणीं बळ । संपूर्ण आथी ॥ १९ ॥

"त्याचप्रमाणें देह योग्य समयीं सोडला ह्मणजे योगी ज्या स्थानाप्रत पोंचतात, तें स्थान कळणेंही एका प्रकारानें सोपें आहे. २०४ अथवा अकस्मात् असें घडतें कीं, अकाळींच देह पडतो. तसा पडला तर देहाला परत यावें लागतें. २०५ ह्याकरितां योग्य समयीं जे देह ठेवितात, ते तत्काल ब्रह्मस्वरूपच होतात. आणि अकाळीं जे देह ठेवितात, ते पुन्हा संसारांत येतात. २०६ त्याचप्रमाणें ब्रह्मार्शी ऐक्य होणें, आणि पुनर्जन्म प्राप्त होणें ह्याचे दोन काल आहेत. ते कालही ओघानुसार तुला सांगतों. २०७ तर हे **वीरश्रेष्ठा** ऐक. मरणकाळची धांदल उडाली कीं, शेवटीं पंचमहाभूतेंही आपआपल्या वाटेनें जावयास निघतात. २०८ इतका प्रसंग प्राप्त झाला तरीही अंतकालाचे ठायीं ज्याच्या बुद्धीला भ्रम ग्रासित नाहीं, स्मृति आंधळी होत नाहीं, किंवा मनही नाश पावत नाहीं. २०९ मरणसमयींही हा प्राणसमुदाय टवटवीत दिसतो. परंतु ब्रह्मभावाचा अनुभव घडल्यामुळें, त्याची तो गवसणी होऊनच बसतो. २१० ह्याप्रमाणें सावध असून ऐक्यभाव, आणि तोही मरणकाळपर्यंत असणें, हें अग्नीचें सहाय असलें तरच घडेल. २११ हें पहा ! पाण्यानें, किंवा वाऱ्यानें जेव्हां दिव्याचें दिवेपण नाहींसें होतें, तेव्हां आपल्याला डोळे असून तरी त्यांनीं दिसतें काय ? २१२ त्याप्रमाणें मरणकाळच्या दूषित वायूनें देह आंतून व बाहेरून कफानें व्याप्त झाला, ह्मणजे अग्नीचें तेज विझून जातें. २१३ त्या वेळीं प्राणालाच प्राण नसतो, तेथें बुद्धि असून करणार काय ? ह्मणून देहामध्यें अग्निशिवाय जीवनकला रहात नाहीं. २१४ अरे ! ह्या देहांतील अग्नि–तेज–जर नाहींसा झाला, तर तो देह नव्हे; शुद्ध ओला चिखल. तसें झालें ह्मणजे आपल्या आयुष्याचा वेळ, व्यर्थ अंधार शोधित असतो. २१५ आणि मागील सारी आठवण करीत राहतो. मग देह टाकून ब्रह्मस्वरूपास मिळावें कोणीं ? २१६ इतक्यांत त्या देहांतील कफरूपी चिखलांत जीवनकलाच

१ सोपें, सुलभ. २ अंतकालीं. ३ अकस्मात्. ४ अकालीं. ५ सुसमयीं. ६ तत्क्षणीं. ७ पुन्हा. ८ ब्रह्मांशीं ऐक्य. ९ समग्र. १० गुंगी. ११ पंचमहाभूतें. १२ प्राप्त झालेल्या. १३ गिळणार नाहीं. १४ प्राणसमुदाय. १५ संरक्षक. १६ ऐक्यभाव. १७ मरेपर्यंत. १८ सहाय. १९ दृष्टि. २० वायुप्रकोपानें. २१ कफानें व्याप्त. २२ उजेड, शुद्धि. २३ ओला. २४ शोधीत बसतो. २५ नाश पावला.

बुडून जाते. अर्थात् मागची पुढची आठवणही नाहींशी होते. २१७ याकारणानें आधीं अभ्यास केलेला असतो तो, ठेवलेली वस्तु दिसण्यापूर्वीच हातचा दिवा मालवावा, त्याप्रमाणें मरण आलें नाहीं तोंच लयास जातो. २१८ आतां हें सारें असो. ज्ञानाला मूळ कारण अग्नि आहे आणि अंतकालाचे वेळीं सारें बळ त्या अग्नीचें असतें, येवढें ध्यानांत ठेव." २१९

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।
तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥२४॥

[अग्निर्ज्योतिरिति] आंत अग्निज्योतीचा प्रकाश । बाहेरी शुक्लपक्ष आणि दिवस । आणि सा मासांमाजि मास । उत्तरायण ॥ २२० ॥ [तत्र प्रयातेति] ऐसिया समयोगाची निरुती । लाहोनि जे देह ठेविती । ते ब्रह्मचि होती । ब्रह्मविद ॥२१॥ [अग्न्यादिपंचसोपानात्मकमर्चिरादिमार्गं दर्शयति] अवधारीं गा धनुर्धरा । येथवरी सामर्थ्य यया अवसरा । तेवींचि हा उजू मार्ग स्वपुरा । यावया पैं ॥ २२ ॥ एथ अग्नी हें पहिलें पायतरें । ज्योतिर्मय हें दुसरें । दिवस जाणें तिसरें । चौथें शुक्लपक्ष ॥ २३ ॥ आणि सोमास उत्तरायण । तें वरचील गा सोपान । येणें सायुज्यसिद्धिसदन । पावती योगी ॥ २४ ॥ हा उत्तम काळ जाणिजे । यातें अर्चिरादि मार्ग ह्मणिजे । आतां अकाळ तोही सहजें । सांगेन आइक ॥ २५ ॥

"(देहाच्या) आंत अग्निज्योतिचा प्रकाश; बाहेर शुक्लपक्ष असून दिवस; आणि उत्तरायणांतील सहा महिन्यांपैकीं कोणताही एक महिना. २२० अशा सर्व योगाचें ऐक्य साधून जे ब्रह्मज्ञानी देह ठेवतात, ते ब्रह्मस्वरूपच होतात. २२१ हे धनुर्धरा! ऐक. ह्या कालाचें सामर्थ्य इतकें आहे. आणि माझ्या ग्रामास येण्यास हा मार्गही खरोखर सरळ आहे. २२२ त्यांत अग्नि ही पहिली पायरी; सतेजता ही दुसरी पायरी; दिवस ही तिसरी पायरी; आणि शुक्लपक्ष ही चौथी पायरी. २२३ आणखी, उत्तरायणांतील कोणताही महिना, ही अगदीं शेवटची पायरी. ह्या जिन्याच्या सहाय्यानें योगी हे सायुज्यमुक्ति पावून ब्रह्ममंदिरांत जातात. २२४ हा काल उत्तम होय. ह्याला अग्निमार्ग–किंवा ऊर्ध्वमार्ग असें ह्मणतात. आतां ओघास आलेला अकाल –ह्मणजे अयोग्य काल–कोणता तोही सहज सांगतों; ऐक." २२५

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।
तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥२५॥

[धूमः] तरि प्रयाणाचिया अवसरें । वातश्लेष्मां सुभरें । तेणें अंतःकरणीं आंधारें । कोंदलें ठाके ॥ २६ ॥ सर्वेंद्रियां लांकुड पडे । स्मृति भ्रमामाजी बुडे । मन होय वेडें । कोंडे प्राण ॥ २७ ॥ अग्नीचें अग्निपण जाये । मग तो धूमचि अवघा होय । तेणें चेतना गिंवसिली ठाये । शरीरींची ॥२८॥ [ रात्रिस्तथा कृष्णः ] जैसें चंद्राआड आभाळ । सदट दाटे सैंजळ । मग गडद ना उजाळ । ऐसें झांबळें होय ॥ २९ ॥ कां मरे ना सावध । ऐसें जीवितासि पडे स्तब्ध । आयुष्य मरणाची मर्याद । वेळ टाकी ॥ २३० ॥ ऐसी मनबुद्धि करणीं । सभोंवतीं धूमकुळाची कोंडणी । तेथ जन्में जोडलिये वोहणी । युगचि बुडे ॥ ३१ ॥ हांगा हातींचें जे वेळीं जाये । ते वेळीं आणिका लाभाची गोठी कें आहे । ह्मणऊनि प्रयाणीं तंव होय । येतुली दशा ॥ ३२ ॥ ऐसी देहाआंत स्थिती । बाहेरि कृष्णपक्ष वरि राती । [ षण्मासा दक्षिणायनं ] आणि सामासही वोडवती । दक्षिणायन ॥ ३३ ॥ इये पुनरावृत्तीचीं घराणीं । आघवीं एकवटती जयाचिया प्रयाणीं । तो स्वरूपसिद्धीची काहाणी । कैसेनि आइके ॥३४॥ [ तत्र प्रयाता इति ] ऐसा जयाचा देह पडे । तया योगी ह्मणोनि चंद्रवरी जाणें घडे । मग तेथूनि मागुता बहुडे । संसारा ये ॥ ३५ ॥ आह्मीं अकाळ जो पांडवा । ह्मणितला तो हा जाणावा । आणि हाचि धूम्रमार्ग गांवा । पुनरावृत्तीचिया ॥ ३६ ॥ येर तो अर्चिरादि मार्ग । तो वसता आणि असलग । सोंविया स्वस्त चांग । निवृत्तीवरी ॥ ३७ ॥

"तर अंतकाळाच्या वेळीं कफवाताची गर्दी

१ सहा महिन्यांतील कोणताही महिना. २ निश्चय, योग. ३ साधून. ४ तत्ववेत्ते, ज्ञानी. ५ वेळीं. ६ स्वस्वरूपाला. ७ पायरी. ८ ज्वाला. ९ सहा महिन्यांतील कोणताही एक महिना. १० शिडी, जिना. ११ ब्रह्ममध्यें लीन होणें. १२ अग्निमार्ग किंवा ऊर्ध्वमार्ग. १३ अयोग्य काळ.

१ कफवातादिकांनीं. २ भरानें. ३ काष्ठवत्. ४ जीव. ५ आच्छादलेली. ६ गडद. ७ पाण्यानें भरलेलें. ८ आंधार. ९ प्रकाश. १० झुंजुक. ११ इंद्रियें. १२ जन्मानें. १३ क्रमानें. १४ कोठें. १५ आणखी. १६ रात्र. १७ प्राप्त होतात. १८ ठिकाणें. १९ योगी होता ह्मणून. २० चंद्रलोकापर्यंत. २१ पुन्हां, फिरून. २२ फिरतो. २३ जन्ममरणाच्या. २४ अग्निमार्ग, ऊर्ध्वमार्ग. २५ वस्ती असलेला. २६ सोपा. २७ सर्वथा. २८ मोक्षापर्यंत.

होऊन अंतःकरणांत केवळ आंधार–भ्रम–दाटून राहतो, २२६ सर्व इंद्रियें लांकडांसारखीं होतात; स्मृति भ्रमामध्यें बुडून जाते; मन वेडें होऊन प्राणही गुदमरून जातो. २२७ अग्नीचें तेज गेलें ह्मणजे सारा धूरच धूर माजून राहतो. आणि त्यामुळें जीवशक्ति शरीरांतच गुरफटून राहते. २२८ ज्याप्रमाणें चंद्राच्या आड गर्द भरलेलें ढग आलें ह्मणजे मग धड आंधारही नाहीं, आणि धड उजेड नाहीं, अशी झांजड पडते, २२९ त्याप्रमाणें धड मरणही नाहीं, आणि धड शुद्धिही नाहीं, असें जिवास कुचमावें लागतें. आयुष्य मरणाच्या वेळेची वाट पहात राहतें. २३० अशा प्रकारें मन, बुद्धि व इंद्रियें ह्यांच्या भोंवतीं धुराची अगदीं गर्दी उसळते. तेव्हां जन्मापासून जोडलेलें सर्व हळूहळू नाहींसें होऊन प्रळय ओढवतो. २३१ अरे! मिळालेलेंच जेव्हां नाहींसें होतें, तेव्हां तेथें नव्या लाभाची गोष्ट कोठून आणावी? ह्मणून तर अंतकाळीं अशी दशा होते. २३२ देहाच्या आंत ही अशी स्थिति. बाहेर कृष्णपक्ष असून शिवाय रात्र; आणि महिनाही दक्षिणायनांतील सहा महिन्यांपैकीं एखादा! २३३ अशीं पुनरावृत्तीचीं सारीं कुळें ज्याच्या अंतकाळचे समयीं एकत्र होतात, तो ब्रह्मस्वरूपाची गोष्ट ऐकेल तरी कशी? २३४ अशा प्रकारें ज्याचा देह पडतो, त्याला, तो योगी असल्यामुळें चंद्रलोकापर्यंत जाणें घडतें. मग तो तेथून फिरून गिरकी खाऊन संसारांत येतो. २३५ अर्जुना! आह्मीं अयोग्य काल ह्मणून जो हटला तो हा, हें लक्ष्यांत ठेव. जन्ममरणाच्या फेऱ्याच्या गांवचा 'धूम्रमार्ग' ह्मणतात तो हाच. २३६ दुसरा जो मार्ग, तो 'उत्तरायणादि' किंवा 'अग्नि' मार्ग होय. तो वस्तीचा, सुगम, सुलभ असा असून नीट मोक्षापर्यंत गेलेला आहे." २३७

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ।
एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽवर्तते पुनः ॥२६॥

[ शुक्लकृष्णे इति ] ऐसिया अनादिया दोनी वाटा । एकी उजू एकी अव्हांटा । ह्मणवूनि बुद्धिपूर्वक सुभटा । दाविलिया तुज ॥ ३८ ॥ कां जे मार्गामार्ग देखावे । साच लटिकें वोळखावें । हिताहित जाणावें । हिताचिलागीं ॥ ३९ ॥ पाहें पां नाव देखतां बरवी । कोणी आंड घाली काय अथावीं । कां सुपंथ जाणोनि अडवीं । रिगवत असे ॥ २४० ॥ जो विष अमृत वोळखे । तो अमृत काय सांडूं शके । तेविं जो उजू वाट देखे । तो अव्हांटा नवचे ॥ ४१ ॥ ह्मणोनि पुढें । पारखावें खरें कुडें । पारखिलें तरी न पडे । अनवसरें कांहीं ॥ ४२ ॥ एऱ्हवीं देहांतीं थोर विषम । या मार्गाचें आहे संभ्रम । जन्में अभ्यासिलीयाचें हन काम । जाईल वांयां ॥ ४३ ॥ जरि अर्चिरादि मार्ग चुकलिया । अवचटें धूम्रपंथें पडिलिया । तरी संसारपंथीं जुंतलियां । भंवतचि असावें ॥ ४४ ॥ हे सायास देखोनि मोठे । आतां कैसेनि पां एकवेळ फिटे । ह्मणोनि योगमार्ग गोमटे । शोधिले दोन्ही ॥ ४५ ॥ [ एकया यात्यनावृत्तिं ] तंव एकें ब्रह्मत्वा जाइजे । [ अन्ययाऽवर्तते पुनः ] आणि एकें पुनरावृत्ती येइजे । परि दैवगत्या जो लाहिजे । देहांतीं जेणें ॥ ४६ ॥

"एक सरळ, आणि एक आडवीतिडवी, अशा ह्या दोन वाटा अनादिसिद्ध आहेत. ह्मणून हे वीरश्रेष्ठा! तुला त्या मुद्दामच दाखवून दिल्या. २३८ कारण कीं, चांगला मार्ग आणि वाईट मार्ग दिसावा; सत्य कोणतें आणि असत्य कोणतें तें ओळखतां यावें; आणि आपले कल्याणासाठींच हित कोणतें व अहित कोणतें तें समजावें लागतें. २३९ हें पहा! एखादी नांव पहातांना चांगली दिसली असून कोणी डोहांत उडी घालील काय? किंवा चांगला रस्ता सोडून मुद्दाम कोणी आडवाटेनें जाईल काय? २४० ज्याला हें विष आहे व हें अमृत आहे असें ओळखतां येतें, त्याच्यानें अमृत टाकवेल काय? त्याप्रमाणें सरळ वाट ज्याला दिसते, तो आडवाटेनें जात नाहीं. २४१ ह्याकरितां खरें कोणतें व खोटें कोणतें ह्याची आधीं पारख करावी. ती पारख केली ह्मणजे कोणताही भलताच प्रसंग गुदरत नाहीं. २४२ बाकी, मरणकाळीं ह्या मार्गाचा लाभ घडणें मोठें दुर्घट आहे. जन्मभर अभ्यास के-

१ प्राचीन. २ आडवाट. ३ उडी. ४ डोहांत, महापुरांत. ५ आड मार्गांत, अरण्यांत. ६ खोटें. ७ कठीण समय. ८ भय. ९ जुंपलेल्यांनीं. १० गिरक्या खात.

**त्याचें कामही व्यर्थ होतें. २४३ अग्नीचा–किंवा उत्तरायणादिकाचा मार्ग चुकून अकस्मात् जर धूम्रमार्गांत पडलें, तर संसारांत पडून जन्ममरणाच्या फेऱ्यांतच गोते खात रहावें लागतें. २४४ त्यांत मोठे सायास आहेत असें पाहून तो एकदांचा टाळावा कसा? ह्मणून हे दोन योगमार्ग करून ठेवले आहेत. २४५ परंतु दैवयोगानें मरणकाळीं ज्याला ज्याला जो जो मार्ग प्राप्त होतो, त्या त्या मार्गाप्रमाणें त्याला गति मिळते. एका मार्गानें ब्रह्मस्वरूप होतां येतें, आणि एकानें जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडावें लागतें." २४६**

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवाऽर्जुन ॥२७॥

[ नैते इति ] ते वेळीं ह्मणितलें हें नव्हे । वायां अवचटें[1] काय पावे । देह त्यजूनि वस्तु[2] होआवें । मार्गेंच कीं ॥ ४७ ॥ तरि आतां देह असो अथवा जावो । आह्मी तों केवळ वस्तूचि आहों । कां जें दोरीं सर्पत्व वावो[3] । दोराचिकडुनी ॥ ४८ ॥ मज तरंगपण असे कीं नसे । ऐसें हें उदकाप्रति कहीं[4] भासे । तें भलतेव्हां जैसें । तैसें उदकचि कीं ॥ ४९ ॥ तरंगाकारें न जन्मेचि । ना तरंग लोपें निमेचि । तेवीं देहीं जे देहेंचि । वस्तु जाहले ॥ २५० ॥ आतां शरीराचें तयांचिया ठाईं । आडनांवही उरलें नाहीं । तरि कोणें काळें काई । निमे तें पाहें पां ॥ ५१ ॥ मग मार्गातें कासया शोधावें । कोणें कोठूनि कें जावें । जरी देशकाळादि आघवें । आपणचि असे ॥ ५२ ॥ [ नैते सृती पार्थ जानन् ] आणि हां गा घट जे वेळीं फुटे । ते वेळीं तेथिचें आकाश लागे नीट वाटे । वाटा लागलें तरि गगना भेटे । येरवीं चुके ॥ ५३ ॥ पाहें पां ऐसें हन आहे । कीं तो आकारुचि जाये । येर गगन तें गगनींचि आहे । घटत्वाही[9] आधीं ॥ ५४ ॥ [ योगी मुह्यति कश्चन ] ऐसिया बोधाचेनि सुरवाडें[10] । मार्गामार्गाचें सांकडें[11] । तया सोहंसिद्धां[12] न पडे । योगियांसीं ॥५५॥ [ तस्मात् ] याकारणें [ योगयुक्तो भवार्जुन ] पंडुसुता । तुवां होआवें योगयुक्ता । [ सर्वेषु कालेषु ] तेतुलेनि सर्वकाळीं साम्यता[13] । आपैसया[14] होईल ॥ ५६ ॥ मग भलतेथ भलतेव्हां । देह असो अथवा जावा । परि अवंध्या[1] नित्य ब्रह्मभावा । विघड नाहीं ॥ ५७ ॥ तो कल्पादि जन्मा नागवे[2] । कल्पांतीं मरणें नाप्लवे[3] । माजि स्वर्गसंसाराचेनि लाघवें । झकवेना[4] ॥ ५८ ॥ येणें बोधें जो योगी होये । तयासीचि या बोधाचें नीटपण आहे । कां[5] जे भोगातें पेलून[6] पायें । निजरूपा ये ॥ ५९ ॥ पैं गा इंद्रादिका देवां । जयां सर्वस्वें स्वर्गी गाजती राणिवा । तें सांडणें मानूनि पांडवा । डांवली[10] जो ॥ २६० ॥

**"मरणसमयीं अकस्मात् काय प्राप्त होणार? कांहीं नाहीं. ह्याकरितां देहाचा त्याग करून पूर्वी सांगितल्या मार्गानेंच ब्रह्मस्वरूप व्हावें, असें जें ह्मटलें तें कांहीं खोटें नव्हे. २४७ तर आतां देह असूं दे किंवा जाऊं दे. आह्मी तर मूळचेंच ब्रह्मस्वरूप आहों. कारण, दोरीच्या ठिकाणीं सर्पत्व मानणें, हा भ्रम दोरीमुळेंच असतो. २४८ मला लाटा आहेत किंवा नाहींत, हें उदकाला कधीं कळत असतें? उदक हें सदा सर्वकाल जसेंच्या तसेंच. २४९ लाटा उत्पन्न झाल्यानें उदक उत्पन्नही होत नाहीं, आणि त्या नाहींशा झाल्या ह्मणून तें नाशही पावत नाहीं. त्याप्रमाणें देहांत असून देहानेंच ब्रह्मस्वरूप झालें, २५० ह्मणजे त्या ठिकाणीं शरीराचें आडनांव सुद्धां उरत नाहीं. मग त्याचा नाश केव्हां होईल? विचार कर. २५१ मग मार्ग तरी कशाला धुंडीत बसावें? देशकालादि सारे आपण स्वतःच बनल्यावर कोण, कोठें आणि कसा जाणार? २५२ आणखी असें पहा! घागर जेव्हां फुटते, तेव्हां त्यांतील आकाश नीट वाटेला लागतें, आणि वाटेला लागलें तरच तें गगनाला मिळतें. नाहींतर मिळणार नाहीं, असें कां कांहीं आहे? २५३ आणखी असा एक विचार पहा! कीं तो आकारच नाहीं-**

१ एकदम. २ ब्रह्मरूप. ३ व्यर्थ, मिथ्या. ४ कधीं. ५ केव्हांही. ६ नाश होत नाहींच. ७ कोणी. ८ कोठें. ९ घट होण्याच्याही पूर्वी. १० सोयीनें. ११ संकट. १२ ब्रह्मच आपण असा अनुभव आलेल्यांस. १३ ऐक्यता. १४ आपोआप.

१ मुक्त आहे त्याला. २ सांपडत नाहीं. ३ बुडत नाहीं. ४ फसत नाहीं. ५ कां, कीं. ६ लोटून. ७ गर्जना करतात. ८ राज्यें. ९ त्याज्य. १० दूर लोटून देतो.

ा झाला, ह्मणजे बाकी राहिलेलें जें आकाश, ं घागर निर्माण होण्याच्या पूर्वीं आकाशम-येंच आहे. २५४ अशा ज्ञानबोधानें ब्रह्म तें ापणच, असा ज्या योग्यांना अनुभव घडून ुकला, त्यांना मार्गाचें किंवा अमार्गाचें संकट डत नाहीं. २५५ ह्याकरितां अर्जुना! तूं ोगयुक्त हो. तेणेंकरून सदासर्वकाल आपो-ापच समता प्राप्त होईल. २५६ आणि मग ोठेंही आणि केव्हांही, देह जाऊंदे किंवा रा-दे, अप्रतिबंध अशा ब्रह्मभावनेमध्यें बिघड ह्म-ुन पडावयाचा नाहीं. २५७ तो कल्पारंभीं न्मांत सांपडावयाचा नाहीं, व कल्पांतांत म-णानें तो बुडावयाचाही नाहीं. २५८ अशा ानानें जो योगी बनेल, त्यानेंच या बोधाचें ार्थक केलें. कारण, भोगांना पायानें लोटून ऊन तो निजरूपाला पोंचतो. २५९ तसेंच र्जुना! इंद्रादिदेवांचें स्वर्गासारखें वैभव–कीं याच्या चांगुलपणाची गर्जना वेद सुद्धां करीत ाहेत, तें–सुद्धां तो लाथेनें झुगारतो." २६०

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥ २८ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

[ वेदेष्विति ] जरी वेदाध्ययनाचें जालें । अथवा यज्ञाचें त पिकलें । कीं तप दानाचें जोडलें । सर्वस्व हन जें ॥६१॥ अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा ] तया आघवां पुण्यांचा मेळा । र आंतौनि जया ये फळा । तें परब्रह्म निर्मळा । सांठि रे ॥ ६२ ॥ जें नित्यानंदाचेनि मानें । उपमेचा कांटाळां दिसे सोनें । पाहा पां वेदयज्ञादिसाधनें । जया सुखा ६३ ॥ जें विटे ना सरे । भोगीतयाचेनि पवाडें पुरे । पुढती महासुखाचें सोयरें । भावंडचि ॥ ६४ ॥ ऐसें दृष्टी-चेनि सुखपणें । जयासी अदृष्टाचें बैसणें । जें शतमखाही आंगवणें । नोहेचि एका ॥ ६५ ॥ [ योगी ] तयातें योगी-श्वर अलौकिकें । दिठीचेनि हातवुकें । अनुमानती कौतुकें । तंव हळेवार आवडे ॥ ६६ ॥ मग तया सुखाची किरीटी । करूनियां गा पाउठी । [ परं स्थानमुपैति चाद्यं ] परब्रह्मा-चिये पाठीं । आरूढती ॥ ६७ ॥ ऐसें चराचरैकभाग्य । जें ब्रह्मेशां आराधने योग्य । योगियांचें भाग्य । भोगधन जें ॥ ६८ ॥ जो सकळ कळांची कळा । जो परमानंद पुतळा । जो जिवाचा जिव्हाळा । विश्वाचिया ॥ ६९ ॥ जो सर्वज्ञ-तेचा वोलावा । जो यादवकुळींचा कुळदिवा । तो श्रीकृष्णजी पांडवा–। प्रती बोलिला ॥ २७० ॥ ऐसा कुरुक्षेत्रीं वृत्तांत । संजयो रायासि असे सांगत । तेचि परियेसा पुढारी मात । ज्ञानदेव ह्मणे ॥ २७१ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

"वेदाध्ययनाचें जाळें पसरून, अथवा यज्ञाचें शेत पिकून, किंवा तपापासून, यज्ञापासून मिळालेलें जें सर्वस्व; २६१ इतक्या साऱ्या पुण्यांचा मळा अतिशयेंकरून फलद्रूप झाला, तरी त्यानें निर्मळ अशा परब्रह्माची बरोबरी होणार नाहीं. २६२ आतां त्यापासून होणारा जो नित्यानंद त्याच्या मानानें विचार केला, व उपमेच्याच कांट्यांत घातलें तर तें सुखही कांहीं कमी असें ह्मणतां येत नाहीं. कारण, त्या सुखाला सुद्धां वेदयज्ञादि महत्साधनें करावीं लागतात. २६३ तें सुख विटत नाहीं; सरत नाहीं; उपभोग घेणाराची इच्छा परिपूर्ण करतें. आणि शिवाय तें महत्सुखाचें (परब्रह्माचें) सोयरें भावंडच आहे. २६४ अशा प्रकारें दृश्य सुखाच्या आनंदानेंच अदृश्याचें स्थान प्राप्त होतें. जें शंभर यज्ञ करून

१ आंतून. २ बरोबरी. ३ ताजव्यांत, उपमेंत. ४ ल-न. ५ हेतु.

१ अदृश्याचें, निराकाराचें. २ इंद्रालाही. ३ स्वाधीन. ४ अटकळीनें. ५ सूक्ष्म वाटतें. ६ पायरी. ७ स्थावर-जंगमाचें श्रेष्ठ भाग्य. ८ ब्रह्मदेव व शंकर यांना. ९ ओलावा. १० कुलदीपक.

एकाही इंद्राला मिळत नाहीं. २६५ त्याच्याकडे योगी जेव्हां अलौकिक दृष्टीनें पहातात, व आनंदानें तुलना करूं लागतात, तेव्हां त्यांस तें हलकेंच दिसतें. २६६ मग अर्जुना! त्या सुखाची पायरी करून तिच्यावरून परब्रह्माच्या पाटीवर चढतात. २६७ अशा प्रकारें चराचराचें भाग्य, जें ब्रह्मदेवांनीं व शंकरांनींही आराधण्यास योग्य, जें योग्यांचें भाग्य व उपभोग्य साधन, २६८ तें, जो सकल कलांची कला, परमानंदाची मूर्ती, जो विश्वाच्या जिवांचा जिव्हाळा, २६९ सर्वज्ञतेचा झरा, जो यादवकुळाचा कुळदीपक, त्या श्रीकृष्णानें अर्जुनाला ह्याप्रमाणें कथन केलें. २७० अशा प्रकारें कुरुक्षेत्रांतील वृत्तांत, संजय, राजाला–धृतराष्ट्राला–सांगत होता. ज्ञानदेव ह्मणतात "तीच कथा पुढें ऐका." २७१

## आठवा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ९ वा.

तरि अवधान येकलें दीजे । मग सर्वसुखासि पात्र होइजे । प्रतिज्ञोत्तर माझें । उघड आइका ॥ १ ॥ परि प्रौढी न लें हो जी । तुझ्या सर्वज्ञांच्या समाजीं । देयावें अवधान माझी । विनवणी सलगीची ॥ २ ॥ कां जे लळेयाचे े सरती । मनोरथांचे मनोरथ पुरती । जरी माहेरें श्री- ं होती । तुह्मांऐसीं ॥ ३ ॥ तुमचे या दिठिवेयाचिये ालें । सांसिन्नले प्रसन्नतेचे मळे । ते साउली देखोनि लोळें । त जी मी ॥ ४ ॥ प्रभू तुह्मी सुखामृताचे डोहो । ह्म- नि आपुलिया स्वेच्छा वोलावा लाहों । तेथही जरी सलगी ऽ विहों । तरी निवों कें पां ॥ ५ ॥ नातरी बाळक बो- ां बोलीं । वांकुडा विचुका पाउलीं । ते चोजें करूनि उली । रिझे जेवीं ॥ ६ ॥ तेवीं तुह्मा संतांचा पढियावो । ेनि तरी आह्मावरि हो । या वहुवा आंलुकिया जी आहों । ागी करित ॥ ७ ॥ वांचूनि माझिये बोलतिये योग्यते । ाज्ञ अवधारिता श्रोते । काय धेंड्यावरी सौरखतें । पढों किजे ॥ ८ ॥ अवधारा आवडे तेसणां धुंधेरु । परि महा- ीं न मिरवे काय करूं । अमृताचिया ताटीं वोगरु । ऐसी ाोय केवी ॥ ९ ॥ हां हो हिमकराती विंजेणें । कीं ना- ुडें आइकवणें । लेणियासि लेणें । हें कहीं आथी ॥ १० ॥ ा परिमळें काय तुरंबावें । सागरें कवणेटायीं नाहावें । गगनचि आंडे आघवें । ऐसा पैवाडु कैंचा ॥ ११ ॥ तैसें ाचें अवधान धाय । आणि तुह्मी ह्मणा हें होये । ऐसें वक्तृत्व कवणा आहे । जेणें रिझा तुह्मी ॥ १२ ॥ तरि विश्वप्रगटितिया गभस्ती । काय हातिवेन न कीजे आरती । कां चुळोदकें अपांपती । अर्घ्य नेदिजे ॥ १३ ॥ प्रभू तुह्मी महेशाचिया मूर्ती । आणि मीं दुबळा अर्चितसें भक्ती । ह्मणोनि बोल जऱ्ही गंगावती । तऱ्ही स्वीकाराल कीं ॥ १४ ॥ बाळक बापाचिये ताटीं रिगे । आणि बापातेंच जेवऊं लागे । कीं तो संतोषलेनि वेगें । मुखचि वोढवी ॥ १५ ॥ तैसा मी जरी तुह्माप्रती । चावटी करितसें बाळमती । तरी तुह्मी संतोषिजे ऐसी जाती । प्रेमाची असे ॥ १६ ॥ आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें । तुह्मी संत घेतले असा बौहें । ह्मणोनि केलिये सलगीचा नोहे । आभार तुह्मा ॥ १७ ॥ अहो तान्हयाचें लागतां झटें । तेणें अधिकचि पान्हा फुटे । रोषें प्रेम दुणवटे । पढियंतयाचेनि ॥ १८ ॥ ह्मणऊनि मज लेंकुरुवाचेनि बोलें । तुमचें कृपाळूपण निदैलें । तें चेइलें ऐसें जी जाणवलें । यालागीं बोलिलों मी ॥ १९ ॥ येऱ्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणीं । कीं वारेया घापत आहे वाहणी । हां हो गगनासि गंवसणी । घालिजे केवीं ॥ २० ॥ आइका पाणि वोथिजावें न लगे । नवनीतीं मांधुला न रिगे । तेवीं लाजिलें व्याख्यान निगे । देखोनि जयातें ॥ २१ ॥ हें असो शब्दब्रह्म जिये बाजे । शब्द मावळलेया निवांत निजे । तो गीतार्थ मऱ्हाटीया बोलिजे । हा पाड काई ॥ २२ ॥ परि ऐसियाही मज धिंवसा । तो पुढतियाचि येकि आशा । जे धिटींवा करूनि अवधारशां । पढियंतया होआवें ॥ २३ ॥ तरि आतां चंद्रापासोनि निववितें । जें अमृताहूनि जिववितें । तेणें अवधानें कीजे वाढतें । मनोरथां माझिया ॥ २४ ॥ कां जैं दिठिवा तुमचा वरुषे । तैं सकळार्थ सिद्धिमती पिके ।

१ लक्ष्य, चित्त. २ एकाग्र. ३ योग्य. ४ आह्मांतेनें. ावें. ६ लळा करणाराचे. ७ प्रीति करणारे, आप्त. कृपादृष्टीच्या. ९ ओलाव्यानें. १० भरास आले. ११ भ्र- ठेला. १२ महाराज. १३ भ्यालों. १४ शांत व्हावें. १ कोठें? १६ वांकडी तिकडी. १७ कौतुक. १८ आनंद ाते. १९ प्रीति. २० इच्छेनें, आवडीनें. २१ तुह्मांसारखे. २ धडे पाठ करून. २३ सरस्वतीपुत्रानें. २४ तेवढा. १ काजवा. २६ वाढूं. २७ पाक. २८ चंद्राला. २९ पं- ानें वारा घालणें. ३० कधीं झालें आहे? ३१ हुंगावें. २ अंडें, सांडें. ३३ मोठा विस्तार. ३४ तृप्त होतें. १ मान्य, उत्तम.

१ सर्व ब्रह्मांड प्रकाशित करणाऱ्या. २ काडवातीनें. ३ चूळभर पाण्यानें. ४ समुद्राला. ५ वनस्पतिविशेष–निर्गुंडी. ६ पुढें करतो. ७ अतिशयपणा. ८ जड. ९ प्रीति करणाराचें. १० निजलेलें. ११ जागें झालें. १२ आडींत. १३ वाऱ्याला. १४ घालाव्या लागतात काय? १५ वाहणा, पादुका. १६ पातळ करावें. १७ रवि. १८ वेद. १९ योग्यता. २० धैर्य. २१ एकच. २२ धाडस. २३ आपल्यासारख्यांच्या. २४ प्रीतीस पात्र. २५ कृपादृष्टी.

येऱ्हवीं कोंभेला उन्मेष[1] सुके । जरि उदास तुह्मी ॥ २५ ॥ सहजें तरि अवधारा । वक्तृत्वा[2] अवधानाचा होय चारा । तरि दोंदें पेलेती अक्षरां । प्रमेयाचीं[3] ॥ २६ ॥ अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें विये । भावाचा फुलौरा[4] होत जाये । मतिवरी ॥ २७ ॥ ह्मणूनि संवादाचा सुवावो[5] ढळे । तऱ्ही हृदयाकाशा सारस्वत[6] वोळे । आणि श्रोता दुश्चित तरि वितुळे । मांडला रस ॥ २८ ॥ अहो चंद्रकांत द्रवता कीर होये । परि ते हातवटी चंद्रीं कीं आहे । ह्मणऊनि वक्ता तो वक्ता नोहे । श्रोतेनिविण ॥ २९ ॥ परि आतां आमुतें गोड करावें । ऐसें तांदुळीं कासया विनवावें । सांइखडियानें काइ प्रार्थावें । सूत्रधारातें ॥ ३० ॥ तो काय बाहुलियांचिया[7] काजा नाचवी । कीं आपुलिये जाणिवेची[8] कळा वाढवी । ह्मणऊनि आह्मा या ठेवोठेवी[9] । काय काज ॥ ३१ ॥ तंव श्रीगुरु ह्मणती काइ जाहालें । हें समस्त ही आह्मा पावलें । आतां सांगें जें निरोपिलें । श्रीकृष्णदेवें ॥३२॥ येथ संतोषोनि निवृत्तिदासें । जी जी ह्मणऊनि उल्हासें । अवधारा श्रीकृष्ण ऐसें । बोलते जाहले ॥ ३३ ॥

**आतां एकाग्र चित्त कराल, तर सर्व सुखाला पात्र व्हाल. हें माझें प्रतिज्ञेचें भाषण आहे. हें स्पष्टपणें ऐकून ठेवा. १ पण महाराज! तुम्हां सर्वज्ञांच्या समाजामध्यें हें आढ्यतेनें मात्र सांगत नाहीं हो! तर लक्ष्य द्यावें ही माझी लडिवाळपणाची विनंती आहे. २ कारण, मातापितरें आपणांसारखीं श्रीमान् असल्यावर आवडत्याची आवड पुरेल, आणि मनोरथ धारण करणारांचे मनोरथ परिपूर्ण होतील. ३ महाराज! आपल्या कृपादृष्टीच्या ओलाव्यानें प्रसन्नतेचे मळे हिरवेगार लागून राहिले आहेत. आणि मी श्रमलेला आहें, ह्मणून ती सावली पाहून लोळण घेतों. ४ प्रभो! आपण सुखामृताचे डोहो आहांत, ह्मणून मी यथेच्छ बुड्या मारून घेतों. येथेंही मी मन मोकळें करावयास भ्यालों, तर मग शांत तरी कोठें व्हावें? ५ किंवा मूल बोबड्या शब्दानें बोलतें, वांकड्यातिकड्या पावलानें चालतें, तरी, माता त्याचें कौतुक करून ज्याप्रमाणें आनंदभरित होते, ६ त्याप्रमाणें तुह्मां सज्जनांचें मजवर केवढें हो प्रेम! ह्मणून महाराज! मोठ्या भक्तीनें सलगी करतों आहें. ७ नाहींतर, आपणांसारख्या श्रोत्यांपुढें माझ्या शब्दांची योग्यता ती काय? सरस्वतीपुत्रानें विद्यासंपादनार्थ धडे का पाठ करायला पाहिजेत? ८ अहो ऐका. केवढाही मोठा काजवा असला, तरी महत्तेजापुढें त्याचें तेज पडावयाचें नाहीं. अमृताच्या ताटांत वाढण्यासारखें अन्न कोठून मिळणार? ९ अहो महाराज! चंद्राला पंखा; स्वरांना गायन; आणि भूषणांना भूषण कधीं तरी मिळेल काय? १० सुगंधानें वास घ्यावयाचा कशाचा? समुद्रानें रहावें कोठें? हें सर्व गगन सांठेल असें स्थल कोणतें? ११ तसें, तुमची इच्छा तृप्त होईल, तुह्मी मान डोलवाल, इतकें आपणांस आनंदभरित करण्यासारखें वक्तृत्व कोणाला आहे? १२ तथापि सर्व ब्रह्मांडास प्रकाशित करणाऱ्या सूर्याला काडवातीनें ओंवाळूं नये काय? १३ महाराज! आपण साक्षात् शंकराच्या मूर्ती आहांत. आणि माझे शब्द निर्गुंडीच्या पाल्याप्रमाणें आहेत. पण ते भक्तिभावानें अर्पण करीत असल्यामुळें आपण त्यांचा स्वीकार कराल. १४ लेंकरूं बापाच्याच ताटांत जेवावयास बसतें, आणि बापालाच जेऊं घालूं लागतें, तरी तो मोठ्या आनंदानें तोंड पुढें करतोच. १५ त्याप्रमाणें मी जरी आपल्यापुढें बालबुद्धीनें बडबड चालविली आहे तरी, आपण संतोषच मानाल. असा ह्या प्रेमाचा गुण आहे. १६ आणि त्या आपलेपणाच्या मोहानें तुह्मी संत बद्ध झालां आहांत ह्मणून ह्या केलेल्या सलगीचा आपणांस विषाद वाटणार नाहीं. १७ अहो! तान्हें मूल आंगास झोंबूं लागलें, तर तेणेंकरून अधिकच पान्हा फुटतो. आणि रागाच्या योगानें आवडत्या मनुष्याचें प्रेम दुणावतें. १८ याकरितां महाराज! माझ्या लेंकराच्या भाषणानें आपलें कृपाळुपण निजलें होतें तें जागृत झालें असें पाहून मी बोललों. १९ बाकी चांदण्याला आडींत घालून पिकविणार कसें? किंवा वाऱ्याला उपणार कसें? आणि गगनास गवसणी**

१ ज्ञान. २ पुष्ट होतात, वाढतात. ३ अर्थांचीं, सिद्धांतांचीं. ४ मोहोर, गुच्छ. ५ अनुकूल वारा. ६ विद्या, वक्तृत्व प्राप्त होतें. ७ बाहुलीनें. ८ ज्ञानाची, शहाणपणाची. ९ उठाठेवीचें.

ारी घालणार कशी? २० आणखी ऐका. पा-
याला कांहीं पातळ करावें लागत नाहीं. लो-
यामध्यें रवी ही शिरत नाहीं. त्याप्रमाणें आ-
:णांस पाहिल्यानेंच भाषण लज्जित होऊन बा-
:र पडतें. २१ हें राहूं द्या. कारण, जेथें वेद-
ुद्धां शब्द नाहींसे झाल्यामुळें, ज्याच्या पलं-
ावर खुशाल झोंप घेत पडतात, तो गीतार्थ
न्हाठी भाषेमध्यें सांगावा, येवढी योग्यता कोठून
ाणावी? २२ परंतु पुढच्या एका आशेवरूनच
ाझ्या आंगीं धैर्य आलें आहे. ती आशा हीच
ीं, आपल्यापुढें धाडस करून आपल्या प्रीतीस
ात्र व्हावें. २३ तर आतां माझ्या हेतुसाठीं,
ंद्रापेक्षांही आराम करणारें, अमृतापेक्षां जी-
ात्व देणारें, जें लक्ष्य तें वृद्धिंगत करावें. २४
ारण, तुमच्या कृपादृष्टीची वृष्टि झाली कीं,
कलार्थीचें आपोआपच पीक पिकतें. आणि
ह्मी उदासीन राहिलांत तर, ज्ञानांकुराला मोड
ालेलासुद्धां सुकून जाईल. २५ भाषणाला
क्ष्याचा नेहमीं चारा होत असतो. ही सहज
ाष्ट ध्यानांत असूंद्या. तसा चारा मिळाला ह्मणजे
र्थाचीं दोंदें अक्षरें तोलून धरतात. २६ शब्द
व्हां येतात ह्मणून अर्थच जेव्हां वाट पाहूं ला-
ंतो, तेव्हां अभिप्रायांतूनच अभिप्राय निघूं लाग-
ः. आणि बुद्धीवर भक्तीचा मोहर फुलून रा-
ंो. २७ ह्मणून संवादाचा सुंदर वायु सु-
ुा तर, हृदयरूप आकाशांत मेघ भरून जा-
ःल, आणि श्रोते दुर्लक्ष्य करतील, तर जम-
ला रसही वितळून जाईल. २८ अहो! चंद्र-
ांतून जल पाझरतें ही गोष्ट खरी आहे. पण
गुण चंद्राच्याच आंगचा आहे. ह्मणून श्रो-
ांशिवाय वक्त्यालाही वक्तेपणा येत नाहीं.
पण आतां, आह्मांला गोड करून घ्या, ह्म-
न तांदळांनीं कशाकरतां विनवण्या करा-
ात? कळसूत्री बाहुल्यांनीं मला नाचवा ह्म-
र सूत्रधाराची प्रार्थना का करावी लागते?
तो त्यांस नाचवितो तो, आपलें चातुर्य
ढविण्याकरतां नाचवितो, का त्या बाहुल्यां-
ा कामाकरतां नाचवितो? ह्मणून ह्या उठा-

ठेवींची आह्मांला काय गरज? ३१ तेव्हां **श्री-
गुरु** ह्मणाले 'झालें काय?' हें सारें आह्मांस
भरून पावलें. आतां **श्रीकृष्णदेवांनीं** जें काय
सांगितलें, तें सांगावें. ३२ तेव्हां **निवृत्तिदा-
सास** मोठा संतोष झाला व मोठ्या उल्हास-
वृत्तीनें ह्मणाले "महाराज आज्ञा. **श्रीकृष्ण**
येणेंप्रमाणें बोलले. ऐका." ३३

श्रीभगवानुवाच–

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्॥१॥

[ श्रीभगवानुवाच–इदं तु ते गुह्यतमं ] ना तरि अर्जुना हें बीज। पुढती सांगिजेल तूज। जें हें अंतःकरणींचें गुज। जिवाचिये॥ ३४॥ [ अनसूयवे ] येणें मानें जीवाचें हियें फोडावें। मग गुज कां पां मज सांगावें। ऐसें कांहीं स्वभावें। कल्पिशी जरि॥ ३५॥ तरी परियेसीं गा प्राज्ञा। तूं आस्थेचीच संज्ञा। बोलिलिये गोष्टीची अवज्ञा। नेणसी करूं॥ ३६॥ ह्मणोनि गूढपण आपुलें मोडो। वरि न बोलणेंही बोलावें घडो। परि आमुचिये जीवींचें पडो। तुझ्या जिवीं॥ ३७॥ अगा थानीं कीर दूध गूढ। परि थानासींचि नव्हे कीं गोड। ह्मणोनि सरो कां सेवितयाची चाड। जरि अनन्य मिळे॥ ३८॥ मुडांहूनि बीज काढिलें। मग निर्वीळलिये भूमी पेरिलें। तरि तें सांडिविखुरी गेलें। ह्मणोंये काय॥ ३९॥ यालागीं सुमन आणि शुद्धमती। जो अनिंदक अनन्यगती। पैं गा गौप्यही परि तयाप्रती। चावळिजे सुखें॥ ४०॥ तरि प्रस्तुत आतां गुणीं इहीं। तूं वांचून आणिक नाहीं। ह्मणोनि गूज तरी तुझ्याठायीं। लपऊं नयें॥ ४१॥ [ ज्ञानं विज्ञानसहितं ] आतां किती नावानावा गुज। ह्मणतां कोनडें वाटेल तुज। तरि सांगेन ज्ञान सहज। विज्ञानेसीं॥ ४२॥ [ प्रवक्ष्यामि ] परि तेंचि ऐसेनि निवाडें। जैसें भेसळलें खरें कुडें। मग काढिजे फाडोवाडें। पारखुनियां॥ ४३॥ कां चांचूचेनि सांडसें। खांडिजे पय पाणी राजहंसें। तुज ज्ञान विज्ञान तैसें। वांटूनि देऊं॥ ४४॥ [यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्] मग वारयाचिया धारसा। पडिनला कोंडा कां तुरेचि जैसा। आणि कणाचा आपैसा। राशिवा जोडा॥४५॥ तैसें जें जाणीतलेया सौठी। संसार

१ हृदय, गुह्य. २ मूर्ती. ३ पूर्ण होवो. ४ अन्य आश्रय न करणारा. ५ मुळ्यांतून. ६ साफ केलेल्या, नांगरलेल्या. ७ सांडीवांडीला. ८ शुद्धचित्ताचा. ९ सांगावें. १० पुन्हा पुन्हा. ११ कंटाळवाणें. १२ संसारज्ञानासहवर्तमान. १३ खोटें. १४ वेगळें. १५ चोंचीच्या. १६ वेगळें वेगळें करावें. १७ प्रवाहांत. १८ रास. १९ बरोबर.

संसारा[1]चिये गांठी । लाऊनि बैसवी पाठीं । मोक्षश्रियेच्या ॥ ४६ ॥

"नाहींतर अर्जुना! पुढें जें आह्मी तुला गुह्य सांगणार आहों, तें केवळ अंतःकरणांतलें व जिवासारखें बाळगलेलें आहे. ३४ आतां कदाचित् तुझ्या मनांत असें कांहीं येईल कीं येवढी, केवळ जिवासारखी, प्राणापरती जी गोष्ट, ती माझ्यापाशींच कां फोडतां? ३५ तर हे सुज्ञा! ऐक. तूं भक्तीची केवळ मूर्ती आहेस. सांगितलेल्या गोष्टीची अवज्ञा कशी करावी, हें तुला माहितसुद्धां नाहीं. ३६ ह्याकरितां आमचें गुप्तपण नाहींसें झालें तरी होवो; न बोलावयाची गोष्ट बोलावयास लागली तरी लागो; परंतु आमच्या हृदयांत असलेलें सारें तुझ्या हृदयांत पडो. ३७ अरे! थानामध्यें दूध असतें तेंही खरोखर गुप्तच असतें; पण तें थानालाच कांहीं गोड लागत नाहीं. तर जो कोणी त्याचें एकनिष्ठेनें सेवन करतो, त्याची इच्छा तृप्त होते. ३८ मुड्यांतून धान्य काढलें, आणि तें तयार केलेल्या जमिनींत पेरलें, तर तें सांडावांडावारी गेलें असें ह्मणतां येईल काय? ३९ ह्याकरितां प्रशस्त अंतःकरणाचा, शुद्ध बुद्धीचा, निंदा न करणारा, व निष्ठावंत असा जो कोणी असेल, त्याच्यापाशीं गुप्त गोष्ट असली तरीसुद्धां खुशाल बोलावी. ४० तर अशा गुणांनीं युक्त तुझ्यावांचून दुसरा कोणी नाहीं, ह्मणून ही गोष्ट गुप्त आहे तरी, तुझ्या ठिकाणीं लपवितां कामा नये. ४१ आतां पुन्हा पुन्हा 'ही गुप्त गोष्ट' 'ही गुप्त गोष्ट' ह्मणून कितीदां सांगावें? तुला त्याचा कंटाळासुद्धां येईल. ह्याकरितां आतां प्रसंगानुसार तुला विज्ञानासहवर्तमान ज्ञान सांगतों. ४२ पण तें अशा रीतीनें सांगतों कीं, खरें नाणें आणि खोटें नाणें एके ठिकाणीं मिसळलेलें असून मग तें पारखून शुद्ध करावें त्याप्रमाणें. ४३ किंवा चोंचीच्या सांडसानें राजहंसानें पाणी आणि दूध निरनिराळें करावें, त्याप्रमाणें ज्ञान आणि विज्ञान स्पष्ट रीतीनें तुला वेगळीं वेगळीं करून देऊं. ४४ ह्मणजे मग वाऱ्याच्या प्रवाहांत सांपडलेला कोंडा जसा शिल्लक न राहतां, आपोआप धान्याचीच रास राहते, ४५ त्याप्रमाणें जें प्राप्त झाल्यावरोबर संसाराचा नाश करून मोक्षश्रीच्या पाठीवर बसवितें;" ४६

१ नाशाच्या.

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥

[ राजविद्या राजगुह्यं ] जें जाणणेया सुविद्येच्या गावीं । गुरुत्वाची आचार्यपदवी । जें सकळगुह्याचा गोसा[1]वी । पवित्र रावो ॥ ४७ ॥ [ धर्म्यं ] आणि धर्माचें निजधाम । [इदमुत्तमं ] तेविंचि उत्तमाचें उत्तम । पैं जया येतां नाहीं काम । जन्मांतराचें ॥ ४८ ॥ [ प्रत्यक्षावगमं ] मोटकें[2] गुरुमुखें उदैं[3]जत दिसे । आणि हृदयीं स्वयंभचि असे । प्रत्यक्ष फावों[4] लागे तैसें । आपैसयाचि ॥ ४९ ॥ [ कर्तुं ] तेवींचि गा सुखाच्या पाउटीं[5] । चढतां येइजे जयाच्या भेटी । मग भेटल्या कीर मिठी । भोगणे याहि[6] पडे ॥ ५० ॥ [ सुसुखं ] परि भोगाचिये ऐलीकडिलिये मेरे[7] । चित्त उभें ठेलें सुखा[8]भरें । ऐसें सुलभ आणि सोपारें । वरि परब्रह्म ॥ ५१ ॥ [अव्ययं] पैं गा आणिकही एक याचें । जें हाता आलिया तरी न वचे[9] । आणि अनुभवितां कांहीं न वेचे । वरि विटेहि ना ॥ ५२ ॥ येथ जरी तूं तार्[10]किका- । ऐसी हन घेसी शंका । तो[11] येवढी वस्तु से लोकां । उरली केविं पां ॥ ५३ ॥ जे एको[12]त्तरेयाचिया वाढी । जळतिये आगीं घालिती उडी । ते अनायासें स्वगोडी । सांडिती केविं ॥ ५४ ॥ तरि पवित्र आणि रम्य । तेविंचि सुखोपायं सुगम । आणि सु[13]सुख परम धर्म्य । वरि आपण जोडे ॥ ५५ ॥ ऐसा अवघाचि हा सु[14]रवाड आहे । तरी जनाहातीं केविं उरों लाहे । हा शंकेचा ठाव कीर होये । परि न धरावी तुवां ॥ ५६ ॥

"प्राप्त करून घेण्यासारख्या ज्या उत्तमोत्तम विद्या, त्यांच्या गांवांत ज्याला आचार्य ही बहुमानाची पदवी आहे; जें सकल गुह्यांचें स्वामी; पवित्रांतील राजा; ४७ धर्माचें माहेरघर; उत्तमाहून उत्तम; जें प्राप्त झालें असतां जन्ममर-

१ स्वामी, धनी. २ थोडें. ३ उदयास आलेलें. ४ प्राप्त होतें. ५ पायरीवर. ६ इतर भोगालाही. ७ सीमेवर. ८ सुखानें युक्त. ९ जात नाहीं. १० तर्कज्ञान्याप्रमाणें. ११ मग. १२ एकोत्र्याच्या व्याजासाठीं. १३ अत्यंत सुखकारक. १४ अनुकूल.

ाचा फेरा नाहीं. ४८ गुरुमुखानें हळू हळू
्दयास येणारें; हृदयांत स्वयंभू वास्तव्य कर-
ारें आणि सहजगत्या प्राप्त होणारें. ४९ सु-
ाच्या पायऱ्यांवरून जातां जातांच ज्याची
ट होते; आणि भेट झाली कीं, प्राप्त करून
णाराला मगरमिठी पडलीच ह्मणून समजावें,
.० हें तर काय, पण त्याच्या प्राप्तीच्या अगदीं
लीकडच्या सीमेवर जरी चित्त उभें राहिलें,
री तें सुखानें परिप्लुत होतें. असें हें ज्ञान सु-
ानें मिळविण्यास सोपारें असून परब्रह्माची-
ी प्राप्ती करून देणारें आहे. ५१ शिवाय,
ाणखीही ह्याचा गुण विशेष आहे. तो हा कीं,
एकदां हातीं आलें ह्मणजे जात नाहीं, आणि
ाचा उपभोग घेतला तर तें कमी होत नाहीं.
केंवा त्याचा वीटही पण येत नाहीं. ५२ आतां
र्कज्ञान्याप्रमाणें तूं कदाचित् अशी शंका घे-
िल कीं, ज्ञान ही वस्तु जर येवढी मोठी
ाहे, तर लोकांनीं शिल्लक कशी ठेवली? ५३
ी एकोत्र्याच्या वाढीसाठीं जळत्या आगींत
डी घालतात, ते अनायासें प्राप्त झालेली
ोडी टाकतात कशी? ५४ तर पवित्र, रम्य,
ुखोत्पत्तीचा मार्ग, आणि सुगम; अत्यंत संतो-
ादायक, उत्कृष्ट धर्मयुक्त, आणखी शिवाय आ-
ली प्राप्ती करून देणारें. ५५ अशी सारीच
र अनुकूलता आहे, तर जनांच्या हातांपुढें
टिकलें कसें? अशीही एक शंका येण्या-
ारखी आहे खरी, पण ती तूं घेऊं नको." ५६

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप।
अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

[ अश्रद्दधानाः पुरुषाः ] पाहें पां दूध पवित्र आणि गोड। ारीं त्वचेचिया पदरा आड। परि तें अव्हेरूनि गोचिड। ुद्धचि सेवी ॥ ५७ ॥ कां कमलकंदा आणि दर्दुरीं। नां-णूक एकचि घरीं। परि पराग सेविजे भ्रमरीं। येरां चिख-चि उरे ॥ ५८ ॥ ना तरि निदैवाच्या पैंरिवरी। लोह्यां ंतलिया आहाति सहस्रवरी। परि तेथ बसोनि उपवास ्री। कां दरिद्रें जिये ॥ ५९ ॥ [ धर्मस्यास्य परंतप ] तैसा हृदयामध्यें मी राम। असतां सर्वसुखाचा आराम। कीं भ्रां-तासी काम। विषयांवरी ॥ ६० ॥ [ अप्राप्येति ] बहु मृग-जळ देखोनि डोळां। थुंकिजे अमृताचा गिळितां गळाळा। तोडिला परिस बांधिला गळां। शुक्तिकालाभें ॥ ६१ ॥ तैसी अहंममतेचिये लेवडसवडी। मातें न पवतीचि बापुडीं। ह्म-णोनि जन्ममरणाचिये दुथडीं। डहुळितें ठेलीं ॥ ६२ ॥ येऱ्हवीं मी तरि कैसा। मुखाप्रति भानु कां जैसा। केंही नसे न दिसे ऐसा। वाणीचा नोहें ॥ ६३ ॥

"अरे असें पाहा. दूध हें पवित्र व गोड असून अगदीं नजीक—एका पदराच्या—त्वचे-च्याच आड असतें. पण तें टाकून, गोचिड असतो तो रक्तच पिऊन राहतो. ५७ किंवा भ्रमर आणि बेडूक एकाच जाग्यांत रहातात. पण भ्रमर भक्षण करतो पराग, आणि यांना उ-रतो चिखल! ५८ अथवा हतभाग्याचे घरीं हजारों मोहरा पुरलेल्या असतात, पण तो तेथें बसून उपास काढतो; कारण, दारिद्र्यानें पी-डलेला. ५९ त्याप्रमाणें सर्व सुखाची विश्रांति, असा आत्माराम मी हृदयांत असतां, वेड्या लोकांना विषयांची इच्छा होते! ६० डोळ्यांनीं पुष्कळसें मृगजळ पाहून अमृताचा घेत अस-लेला घुटका थुंकून टाकावा; ६१ त्याप्रमाणें अहंममतेच्या गडबडींत बिचारे मला पावत नाहींत. ह्मणून जन्ममरणाच्या दोन्ही तीरांवर आदळत रहातात. ६२ बाकी मी जर ह्मणशील तर, जसा सूर्य तोंडासमोर असावा तसा आहें. तो जसा अमुक एक ठिकाणीं नाहीं, किंवा अमक्याला दिसत नाहीं असें नाहीं; तसाच मी दुर्लभ नाहीं," ६३

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाऽहं तेष्ववस्थितः ॥४॥

[ मया ततमिदं सर्वं जगत् ] माझेया विस्तारलेपणाचेनि नांवें। हें जगचि नोहे आघवें। जैसें दूध मुरालें स्वभावें। तरि तेंचि दहीं ॥ ६४ ॥ कां बीजचि जाहलें तरु। अथवा भांगारचीं आळंकारु। तैसा मज एकाचा विस्तारु। तें हें जग ॥ ६५ ॥ [ अव्यक्तमूर्तिना ] हें अव्यक्तपणें थिजलें। तेंचि

१ नजिक, जवळ. २ रक्तच. ३ बेडकांना. ४ मकरंद. ५ दुसऱ्यांला–बेडकाला. ६ अभाग्याच्या. ७ घरांत. ८ मो-हरा. ९ पुरलेल्या.

१ घोट. २ गडबडीनें. ३ आपटत. ४ दुर्लभ. ५ नांव घेतलें तर. ६ थिजलें. ७ सोनेंच. ८ अदृश्यपणानें.

मग विश्वाकारें बोथिजलें[1]। तैसें अमूर्तमूर्ति[2] मियां विस्तारलें। त्रैलोक्य जाणे ॥ ६६ ॥ [मत्स्थानि सर्वभूतानि] महदादि[3] देहांतें। इयें अशेषेंही भूतें। पैं माझ्याठायीं बिंबितें[4]। जैसे जळीं फेण ॥ ६७ ॥ [न चाहं तेष्ववस्थितः] परि तया फेनाआंत पाहातां। जेवीं जळ न दिसे पंडुसुता। ना तरी स्वप्नींची अनेकता। चेईलेया[5] नोहिजे[6] ॥ ६८ ॥ तैसीं भूतें इयें माझ्या ठायीं। बिंबती तयांमाजि मी नाहीं। इया उपपत्ती[7] तुज पाहीं। सांगीतलिया मागां[8] ॥ ६९ ॥ म्हणऊनि बोलिलिया[9] बोलाचा अतिसो[10]। न किजे यालागीं हें असो। परि मज आंत पैसो[11]। दिठी[12] तुझी ॥ ७० ॥

**"माझें स्वरूप जिकडे तिकडे फैलावलें, म्हणजे मग हें सारें जगच नाहींसें होऊन जातें. ज्याप्रमाणें दूध थिजलें म्हणजे तेंच दहीं. ६४ किंवा बीज असतें त्याचाच वृक्ष होतो; अथवा सुवर्णाचाच अलंकार होतो; त्याप्रमाणें माझ्या एकाचाच जो हा विस्तार, तेंच जग. ६५ जें अदृश्यत्वानें थिजलेलें असतें, तेंच विश्वरूपानें वितळतें. ह्याप्रमाणें मी निर्गुण असून सगुण रूपानें ह्या त्रैलोक्याचा विस्तार केला आहे. ६६ महत्तत्वापासून देहापर्यंत हीं झाडून सारीं भूतें, पाण्यांत फेस असल्याप्रमाणें माझ्यामध्यें प्रतिबिंबित झालीं आहेत. ६७ अर्जुना ! त्या फेसामध्यें पाहूं लागलें तर, ज्याप्रमाणें पाणी दिसत नाहीं, किंवा स्वप्नांतील नाना प्रकार जागें झाल्यावर असत नाहींत, ६८ त्याप्रमाणें हीं भूतें माझ्यामध्यें प्रतिबिंबित झालेलीं असतात. मी मात्र त्यांच्यामध्यें नाहीं. हा विचार तुला पूर्वीं सांगितला आहेच. ६९ म्हणून त्याच भाषणाचा पुनः पुनः पाल्हाळ करण्यांत अर्थ नाहीं. ह्याकरितां तें राहो. तुझ्या दृष्टीचा प्रवेश माझ्या अंतर्यामीं होऊं दे म्हणजे झालें". ७०**

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

[नच मत्स्थानि भूतानि] आमुच्या प्रकृतीपैलीकडील भांवो[13]। जरी कल्पनेवीण लागसी पाहों। तरि मजमाजि भूतें

१ पातळ झालें. २ निर्गुणाच्या सगुणरूपानें. ३ महत्तत्वांपासून देहापर्यंत. ४ प्रतिबिंब पावलेलीं. ५ जागें झाल्यावर. ६ नाहींशी होते. ७ उपपादन. ८ पूर्वीं. ९ बोललेल्या. १० पाल्हाळ. ११ राहो, प्रवेश करो. १२ दृष्टि. १३ स्वरूप.

हेंही वांवो[1]। जें मी सर्व म्हणऊनी ॥ ७१ ॥ [भूतभृत्] येऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे। नावेकें[2] तिमिरेजती[3] बुद्धीचे डोळे। म्हणोनि अखंडितचि परि झांवळे[4]। भूतभिन्न ऐसें देखे ॥ ७२ ॥ [ममात्मा] तेचि संकल्पाची सांज जें लोपे। तैं अखंडितचि आहे स्वरूपें। जैसें शंका जातेखेंवो[5] लोपे। सापपण माळेचें ॥ ७३ ॥ [भूतभावनः] येऱ्हवीं तरी भूमी आंतूनि स्वयंभ। काय घडेयां[6] गाडगेयांचे निघती कोंभ[7]। परि ते कुलालमतीचे गर्भ। उमटले कीं ॥ ७४ ॥ ना तरि सागरींच्या पाणीं। काय तरंगाचिया आहाती खाणी। ते अवांतर[8] करणी। वारयाची नव्हे ॥ ७५ ॥ पाहें पां कापसाच्या पोटीं। काय कापडाची होती पेटी। तो वेढीतयाचिया[9] दिठी। कापड जाहला ॥ ७६ ॥ जरी सोनें लेणें होऊनि घडे। तरि तयाचें सोनेपण न मोडे। येर अलंकार हे वरचिलीकडे[10]। लेतयाचेनि[11] भावें ॥ ७७ ॥ सांगें पडिसादांचीं[12] प्रत्युत्तरें। कां आरिसा जें आविष्करे[13]। तें आपलें कीं साचोकारें[14]। तेथेंचि होतें ॥ ७८ ॥ तैसी इये निर्मळ माझ्या स्वरूपीं। जो भूतभावना[15] आरोपी। तयासि तयाच्या संकल्पीं। भूताभास असे ॥ ७९ ॥ तेचि कल्पिती[16] प्रकृती पुरे। तरि भूताभास आधींच सरे। मग स्वरूप उरे एकसरें। निखळ[17] माझें ॥ ८० ॥ हें असो आंगीं भरलिया भवंडी। जैशा भोंवत दिसती अरडीदरडी[18]। तैशीं आपलिया कल्पना अखंडीं। गमती भूतें ॥ ८१ ॥ [नच भूतस्थो] तेचि कल्पना सांडूनि पाहीं। तरि मी भूतीं भूतें माझिया ठायीं। स्वप्नींही परि नाहीं। कल्पावयाजोगें ॥ ८२ ॥ [योगमैश्वरम्] आतां मीच येक भूतांतें धर्ता[19]। अथवा भूतांमाजि मी असतां[20]। या संकल्पसन्निपाता[21]। आंतुलियां बोलिया ॥ ८३ ॥ म्हणोनि परियेसीं गा प्रियोत्तमा। यापरि मी विश्वेंसीं विश्वात्मा। जो इया लटिकिया[22] भूतग्रामा। भाव्य[23] सदां ॥ ८४ ॥ रश्मीचेनि[24] आधारें जैसें। नव्हतेंचि मृगजळ आभासे। माझ्या ठायीं भूतजात[25] तैसें। आणि मातेंही भावी[26] ॥ ८५ ॥ मी येपरीचा भूतभावनु[27]। परि सर्व भूतांसि अभिन्नु। जैसी प्रभा आणि भानु। एकचि ते ॥ ८६ ॥ [पश्य मे] हा आमुचा ऐश्वर्ययोग। तुवां

१ मिथ्या, व्यर्थ. २ क्षणेक. ३ अंधक होतात. ४ भ्रमांत पडल्यामुळें. ५ जातांक्षणीं. ६ घडलेल्या. ७ अंकुर, कोंभ. ८ निराळी. ९ नेसणाऱ्याच्या. १० वरवर. ११ वापरणाराच्या. १२ प्रतिध्वनीचीं. १३ प्रगट होतें. १४ खरोखर. १५ प्राण्याची कल्पना. १६ कल्पना करणारी. १७ शुद्ध. १८ भोंवतालचे गिरिकंदर. १९ धारण करणारा. २० असणारा. २१ संकल्परूप सन्निपाताच्या. २२ लहरींतील. २३ भावना करण्याजोगा. २४ किरणांच्या. २५ प्राणीमात्र. २६ कल्पना कर. २७ सर्व प्राणीमात्रास व्यापून राहणारा, विष्णु.

देखिला कीं चांग । आतां सांगें कांहीं एथ लागे । भूतभेदाचा असे ॥ ८७ ॥ यालागीं मजपासूनि भूतें । आनें नव्हतीं हें निरुतें । आणि भूतांवेगळिया मातें । कांहींचि न मनी हो ॥ ८८ ॥

"तूं कल्पना सोडून–विकाररहित होऊन–आमचें, मायेच्या पलीकडील स्वरूप पाहूं लागशील तर, माझ्यामध्यें सर्व प्राणीमात्र आहेत हेंही व्यर्थच होय. कारण, सर्व स्वरूपामध्यें भरलेला आहे तो मीच. ७१ परंतु संकल्पाची संध्याकाळ येऊन ठेपली, ह्मणजे क्षणभर बुद्धीच्या डोळ्यावर कालिमा येते. ह्मणून अभेद स्वरूप असूनही त्याविषयीं भ्रम उत्पन्न होतो, आणि प्राणिमात्र भिन्न असें वाटतें. ७२ तीच संकल्पाची संध्याकाळ नाहींशी झाली कीं, ज्याप्रमाणें शंका गेली असतां तत्काल माळेंतील सर्पपणा नाहींसा होतो, त्याप्रमाणें मूळचें अविकृत स्वरूप दृष्टीस पडतें. ७३ खरोखर विचार केला तर, भूमींतून घडलेल्या गाडग्याचे कोंभ आपोआप का बाहेर पडत असतात ? नाहीं. तर ते कुंभाराच्या बुद्धींतले अंकुर उदयास येतात. ७४ किंवा समुद्रांतल्या पाण्यामध्यें लाटांच्या खाणी का आहेत ? तें वाऱ्याशिवाय इतरांचें कृत्य नव्हे. ७५ आणखी असें पहा ! कापसाच्या पोटांत कापडाची पेटी का भरलेली असते ? तर नेसणाराच्या दृष्टीनें तो कापडस्वरूप बनतो. ७६ सोनें जरी अलंकाराचें रूप घेऊन आलें, तरी त्याचें सोनेपण मोडत नाहीं; पण घालणारा आपल्या मनाप्रमाणें त्यास अलंकार असें दुसरें टोपण नांव देतो. ७७ प्रतिध्वनींतून निघालेले शब्द किंवा आरशांत दिसणारें प्रतिबिंब, हीं आपलीं असतात, का खरोखरी त्यांतलीं असतात ? सांग. ७८ तसें, जो माझ्या निर्मल स्वरूपामध्यें भूतें आहेत अशी जो कल्पना करतो, त्यास त्याच्या संकल्पामुळेच त्यांत भूतें–प्राणिमात्र–आहेत असें वाटतें. ७९ तीच कल्पना करणारी माया नाहींशी झाली कीं, त्यापूर्वींच भूताभास संपतो आणि माझें शुद्ध स्वरूप बाकी राहतें. ८० हें असो. आपण आपल्याच आंगाभोंवतीं फिरूं लागलों, ह्मणजे सभोंवतालच्या दरी खोरी सुद्धां जशा फिरूं लागतात, तद्वत् आपल्याच कल्पनेनें अखंड स्वरूपामध्यें–परब्रह्मामध्यें–सर्व भूतें आहेत असा भास होतो. ८१ तीच कल्पना सोडून देऊन पाहूं लागावें ह्मणजे मी भूतांमध्यें, व भूतें माझ्यामध्यें ही कल्पना स्वप्नांत सुद्धां येत नाहीं. ८२ आतां ह्या प्राणीमात्रांना धरणारा काय तो मी एकटाच; किंवा भूतांमध्यें वास्तव्य करणारा काय तो मीच; हीं बोलणीं संकल्परूप संन्निपातांतील होत. ८३ ह्मणून हे प्रियसख्या ! ह्या मिथ्या भूतग्रामामध्यें सदासर्वकाल भासणारा जो मी, तो अशा रीतीच्या विश्वाबरोबर विश्वव्यापक आहें हें ध्यानांत ठेव. ८४ ज्याप्रमाणें सूर्यकिरणांच्या योगानें नसलेल्या मृगजळाचा भास होतो, त्याप्रमाणें माझ्यामध्यें सारे प्राणीमात्र, आणि प्राणीमात्रामध्यें सारा मी भरलेला आहें असें समज. ८५ अशा रीतीनें सर्व भूतांस धारण करणारा मी आहें. पण त्यांच्यापासून निराळा मात्र नव्हें. ज्याप्रमाणें प्रभा आणि सूर्य हीं दोन्ही एकच तद्वत्. ८६ हा आमचा ऐश्वर्याचा योग नीट लक्ष्यांत आणलास ना ? आतां ह्यांत भूतभेदाचा कांहीं संबंध आहे का ? सांग. ८७ ह्याकरितां प्राणित्रमा हे माझ्यापासून वेगळे नव्हेत, आणि भूतांशिवाय मीही कांहीं वेगळा नाहीं. हेंच खरें. ध्यानांत ठेव." ८८

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

[ यथाकाशस्थितो नित्यमिति ] पैं गगन जेवढें जैसें । पवनहि गगनीं तेवढाचि असे । सहजें हालविलिया वेगळा दिसे । येऱ्हवीं गगन तेंचि तो ॥ ८९ ॥ [ तथा सर्वाणीति ] तैसें भूतजात माझ्या ठायीं । कल्पिजे तरी आभासे कांहीं । निर्विकल्पीं तरी नाहीं । तेथ मीचि मी आघवें ॥ ९० ॥ ह्मणऊनि नाहीं आणि असे । हें कल्पनेचेनि सौरसें । जें कल्पनालोपें भ्रंशे । आणि कल्पनेसवें होय ॥ ९१ ॥ तेंचि कल्पितें

१ संबंध. २ खरें. ३ कधींच.

१ भास होतो. २ कल्पना न केली. ३ संबंधानें ४ कारण.

मुदल जाये । तैं असे नाहीं हें कें आहे । ह्मणउनि पुढती तूं पाहें । हा ऐश्वर्ययोग ॥ ९२ ॥ ऐसिया प्रतीति[1] बोधसागरीं । तूं आपणेंयोतें कल्लोळें एक करीं । मग जंव पाहासी चराचरीं । तंव तूंचि आहासी ॥ ९३ ॥ या जाणणेयाचा चेवो[4] । तुज आला ना ह्मणती देवो । तरी आतां द्वैत स्वप्न वांवो[5] । जालें कीं ना ॥ ९४ ॥ तरी पुढती जरी विपायें[6] । बुद्धीसि कल्पनेची झोंप ये । तरि अभेदबोध जाये । जैं स्वप्नीं पडिजे ॥ ९५ ॥ ह्मणोनि ये निद्रेची वाट मोडे । निखिळ उद्बोधाँचेंचि आपणपें घडे । ऐसें वर्म जें आहे फुडें । तें दावों आतां ॥ ९६ ॥ तरी धनुर्धरा धैर्या[9] । निकें अवधान देईं वा धनंजया । पैं सर्व भूतांतें माया । करी[10] हरी गा ॥ ९७ ॥

**"आकाश हें जसें आणि जेवढें असतें, तेवढाच त्या आकाशामध्यें वायुही असतो. तो सहज हालविला कीं वेगळा भासूं लागतो. बाकी आकाश तेंच तो. ८९ त्याप्रमाणें प्राणीमात्र माझ्या ठायीं आहेत अशी कल्पना केली, तर तसा कांहीं भास होतो खरा; पण ती कल्पना टाकली, तर तेथें मीच भरलेला आहें. ९० ह्मणून नाहीं ह्मणणें किंवा आहे ह्मणणें हें फक्त कल्पनेचें द्योतक आहे; कारण तें कल्पनेबरोबरच उत्पन्न होतें, आणि कल्पनेबरोबरच नाहींसें होतें. ९१ तें कल्पनेचें बीजच नाहींसें झालें तर, आहे आणि नाहीं हें कोठें राहणार? ह्याकरितां ह्या ऐश्वर्ययोगाचा तूं पुन्हा विचार कर. ९२ आणि त्या अनुभवानें बोधसमुद्रांतील तूं एक लाट होऊन रहा. आणि मग चराचराकडे पाहूं लाग. ह्मणजे ते सारे तूंच होऊन रहाशील." ९३ देव ह्मणतात, "ह्या ज्ञानाची तुला जागृती झालीना? आणि द्वैतभावना ही आतां स्वप्नासारखी मिथ्या आहे असें वाटलें कीं नाहीं? ९४ आतां याउप्पर जर कदाचित् बुद्धीला कल्पनेची झोंप येईल, आणि ती स्वप्नांत गुरफटेल, तर मात्र अभेदबोध नाहींसा होईल. ९५ ह्याकरितां त्या झोंपेची वाटच खुंटेल, निवळ जागृतपणाच आपणास प्राप्त होईल, असें एक शुद्ध तत्त्व आहे, तें तुला आतां सांगतों. ९६ तर हे धैर्यमूर्ते, धनुर्धरा, धनंजया! नीट लक्ष्य देऊन ऐक. ह्या सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न करणारी व संहार करणारी माया आहे." ९७**

सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ।
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

[ प्रकृतिं ] जिये नांव गा प्रकृती । जे द्विविध[1] सांगीतली तुजप्रती । एकी अष्टधा[2] भेदव्यक्ती । दुजी जीवरूपा ॥ ९८ ॥ हा प्रकृतिविखो[3] आघवा । तुवां मागां परिसिलासे पांडवा । [ ७ अध्याये भूमिरिति ४।५ श्लोकयोर्व्याख्यातं ] ह्मणोनि असो काइ सांगावा । पुढतपुढती[4] ॥ ९९ ॥ [ मामिकां ] तरी ये माझिये प्रकृती । [ कल्पक्षये ] महाकल्पाच्या[5] अंतीं । [ सर्वभूतानि कौंतेय ] सर्व भूतें अव्यक्तीं[6] । [ यांति ] ऐक्यासि येती ॥ १०० ॥ ग्रीष्माच्या अतिरसीं[7] । सबीजें[8] तृणें जैसीं । मागुती भूमीसी । सुलीनें[9] होती ॥ १ ॥ कां वांषिये[10] ढेंढ[11] फिटे । जेव्हां शारदीयेचा[12] अनुघडु[13] फुटे । तेव्हां घनजात आटे । गगनींचें गगनीं ॥ २ ॥ ना तरी आकाशाचे खोंपे[14] । वायु निवांतचि लोपे । कां तरंगाकार हारपे । जळीं जेवीं ॥ ३ ॥ अथवा जागिनलिये वेळे । स्वप्न मनींचें मनीं मावळे । तैसें प्राकृतें[15] प्रकृतीं मिळे । कल्पक्षयीं[16] ॥ ४ ॥ [ पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहं ] मग कल्पादीं पुढती । मीचि सृजीं ऐसी वदंती[17] । तरी इयेविषयीं निरुती[18] । उपपत्ती[19] आइक ॥ ५ ॥

**"तिचें नाव प्रकृति. तिचे दोन प्रकार तुला सांगितले. एकीचे भेदभावानें आठ प्रकार झाले आहेत, आणि दुसरी जीवरूप आहे. ९८ अर्जुना! हा मायेचा सर्व विषय तूं मागें ऐकला आहेसच. तेव्हां पुन्हा पुन्हा काय सांगावा? ह्मणून सोडून देतों. ९९ तर ह्या माझ्या प्रकृतीच्या योगानें महाप्रळयाच्या शेवटीं अव्यक्तामध्यें हे सर्व प्राणिमात्र ऐक्यता पावतात. १०० ज्याप्रमाणें ग्रीष्म ऋतूंतील कडक उन्हाळ्यांत बीजासहवर्तमान गवत पुन्हा भूमीमध्यें मिळून जातें, १०१ किंवा वर्षा ऋतूंतील**

१ अनुभवानें. २ आपल्याला. ३ तरंग, लाट. ४ जागृति. ५ व्यर्थ. ६ कदाचित्. ७ जागृतपणाचें. ८ खरें. ९ धैर्यमूर्ते. १० उत्पन्न करते.

१ दोन प्रकारची. २ आठ प्रकारच्या रूपानें. ३ मायेचा विषय. ४ पुनः पुनः. ५ महाप्रळयाच्या. ६ निराकाराच्या ठायीं. ७ उष्णकाळीं. ८ बीजांसहवर्तमान. ९ गुप्त. १० वर्षाकालाचें. ११ अवडंबर. १२ शरदृतूचा. १३ गुप्तपणा. १४ पोटांत. १५ प्रकृतीपासून झालेलें. १६ महाप्रळयाच्या वेळीं. १७ बोलतात, ह्मणतात. १८ खरी. १९ गोष्ट, तत्व.

अवडंबर नाहींसें झालें, शरदृतूंतील गुप्तपणा पुढें आला, ह्मणजे एकून एक मेघ आकाशांतील आकाशांत लुप्त होऊन जातात; १०२ किंवा वायु स्थीर असला तर तो आकाशाच्या पोटांत गुप्त होतो, किंवा पाण्यामध्यें उठलेल्या लाटा ज्याप्रमाणें जिरून जातात, १०३ अथवा जागृतीच्या वेळेस स्वप्न हें मनांतल्या मनांत मावळतें, त्याप्रमाणें महाप्रळयाच्या वेळीं, प्रकृतीपासून झालेलें सर्व प्रकृतींतच ऐक्य पावतें. १०४ मग पुन्हा सृष्टीच्या आरंभीं त्यास मीच करतों असें ह्मणतात. तर त्यांतील सार काय तें सांगतों ऐक " १०५

प्रकृतिं स्वामधिष्ठाय विसृजामि पुनः पुनः ।
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

[ प्रकृतिं स्वामवष्टभ्य ] तरी हेचि प्रकृती किरीटी । मी स्वकीया सहजें अधिष्ठीं[1] । तेथ तंतूसमवायपटीं[2] । जेविं विणा[3]णी दिसे ॥ ६ ॥ [ विसृजामि पुनः पुनः ] मग तिये विणाणीचेनि आधारें । लाहाना चौकडिया पटत्व भरे । तैसी पंचात्मकें[4] आकारें । प्रकृतीचि होय ॥ ७ ॥ जैसें विरजणिय़ाचेनि संगें । दूधचि आटेजों[5] लगे । तैसी प्रकृती आंगा रेगे । सृष्टीपणाचिया ॥ ८ ॥ बीज जळाची जवळीक लाहे । आणि ते[6]चि शाखोपशाखीं होये । तैसें मज करणें आहे । भूतांचें हें ॥ ९ ॥ अगा नगर हें रायें केलें । या ह्मणणया साचपण कीर आलें । परि निरुतें पाहातां काय सिणले । रायाचे हात ॥ ११० ॥ आणि मी प्रकृती अधिष्ठीं तें कैसें । जैसा स्वप्नीं जो असे । मग तोचि प्रवेशे । जागृतावस्थे ॥ ११ ॥ तरि स्वप्नौनि जागृती येतां । काय पाय दुखती पंथुता । कीं स्वप्नामाजि असतां । प्रवास होय ॥ १२ ॥ या आघवियाचा अभिंप्रावो[8] कायी । जे हें भूतसृष्टीचें कांहीं । मज एकही करणें नाहीं । ऐसाचि अर्थ ॥ १३ ॥ [ प्रकृतेर्वशात् ] जैसी रायें अधिष्ठिली[10] प्रजा । व्यापारे आपुलालिया काजा । तैसा प्रकृती संग माझा । येर करणें तें इयेचें ॥ १४ ॥ पाहें पां पूर्णचंद्राचिये भेटी । समुद्रीं अपार भरतें दाटी । तेथ चंद्रासि काज किरीटी । उपखा[11] पडे ॥ १५ ॥ जड परि जवळिका । लोह चळे तरि चळो कां । तरि कवण शीण भ्रामका[1] । सन्निधानाचा ॥ १६ ॥ किंबहुना यापरी । मी निजप्रकृती अंगिकारीं । आणि भूतसृष्टी एकसरी[2] । प्रसवोंचि लागें ॥ १७ ॥ [ भूतग्राममिमं कृत्स्नं ] जो हा भूतग्राम[3] आघवा । [ अवशं ] असे प्रकृतीअधीन पांडवा । जैसी बीजाचिया वेलपालवा । समर्थ भूमी ॥ १८ ॥ ना तरी बाळादिकां वयसा[4] । गोसांवी देहसंग जैसा । अथवा घनावळी आकाशा । वार्षिये जेवीं ॥ १९ ॥ कां स्वप्नासि कारण निद्रा । तैसी प्रकृती हे नरेंद्रा । या अशेषाहि भूतसमुद्रा । गोसांविणी[6] गा ॥ १२० ॥ स्थावरा आणि जंगमा । स्थूळा अथवा सूक्ष्मा । हे असो भूतग्रामा । प्रकृतीचि मूळ ॥ २१ ॥ ह्मणोनि भूतें हन सृजांवीं[7] । कां सृजिलीं प्रतिपाळावीं । ईयें करणीं न येती आघवीं । आमुचिया आंगा ॥ २२ ॥ जळीं चंद्रकेचिया पसरती वेली । ते वाढी चंद्रें नाहीं केली । तेविं मातें पावोनि ठेली । दूरी कर्में ॥ २३ ॥

"तर किरीटी ! ह्या माझ्याच मायेचा मी सहज आश्रय करतों, ह्यामुळें वस्त्रांतील विणकरीप्रमाणें तंतूंचा समुदाय दिसूं लागतो. १०६ मग त्या विणकरीच्या आधारानें लहान लहान चौकड्यांना वस्त्रत्व येतें, त्याप्रमाणें पंचमहाभूतांच्या रूपानें आकारास येणारी प्रकृतीच. १०७ विरजणाच्या संगतीनें जसें दूधच आटूं लागतें, त्याप्रमाणें प्रकृति–ह्मणजे माया–ही स्वतांच सृष्टींत शिरून सृष्टि बनते. १०८ पाण्याला बीजाचें सान्निध्य असतें. पण त्या बीजाच्या तेवढ्या सान्निध्याच्या योगानेंच तें पाणी शाखांना व उपशाखांना पोंचतें. त्याप्रमाणेंच ह्या भूतांच्या उत्पत्तीची व माझी गोष्ट आहे. १०९ अरे! "हें नगर राजानें वसविलें" असें ह्मणतात. तें खरेंच असतें. पण खोल विचार केला तर, तें वसवितांना राजाचे हात का झिजलेले असतात ? ११० आतां मी मायेचा आश्रय कसा करतों ह्मणशील, तर एकादा मनुष्य स्वप्नांत असावा, आणि तो जागृतावस्थेंत यावा तद्वत्. १११ अर्जुना ! स्वप्नांतून जागृतींत येतांना पाय का दुखतात ? कां स्वप्नामध्यें आपणाला प्रवास करावा लागतो ? ११२ ह्या सर्वांचा मथितार्थ काय ह्मणशील, तर ह्या प्रा-

१ आश्रय करतों. २ तंतूंचा समुदाय. ३ विणकर. ४ पंचमहाभूतात्मक. ५ आटूं लागतें, थिजूं लागतें. ६ तें पाणीच. ७ स्वप्नांतून. ८ उद्देश, हेतु. ९ कीं. १० स्थापन केलेली. ११ श्रम, कष्ट.

१ लोहचुंबकाला. २ एकदम. ३ प्राणीसमुदाय. ४ वयास. ५ आत्म्याला. ६ मातोश्री, आई. ७ उत्पन्न करावीं. ८ ह्या कृती. ९ उत्पत्ति.

णीमात्रांचें मला कांहींएक करावें लागत नाहीं, इतकाच. ११३ राजानें आश्रय दिलेली प्रजा, जशी आपआपल्या कामांत चूर असते, त्याप्रमाणें प्रकृतीला माझा संग घडतो, इतकेंच. बाकी सारी कृति तिची. ११४ आणखी असें पहा. पौर्णिमेच्या चंद्राला पाहून समुद्राला अतोनात भरती येते, ह्मणून त्याचें चंद्राला कांहीं श्रम का पडतात? ११५ लोखंड जड असतें, तें जवळ आलें, तर येईना? त्याच्या जवळ येण्यापासून लोहचुंबकाला कष्ट थोडेच आहेत? ११६ तर अशाच प्रकारें मी आपल्या प्रकृतीचा अंगिकार करतों, आणि तेणेंकरून भराभर प्राणीसमुदाय उत्पन्न होऊं लागतात. ११७ अर्जुना! बीजाच्या वेलांना व पल्लवांना भूमी कारणीभूत होते, त्याप्रमाणें हा सर्व प्राणीसमुदाय प्रकृतीच्या आधीन आहे. ११८ किंवा बालकांना वगैरे वृद्धिंगत होण्याला, देहाची संगति हाच मुख्य आधार असतो, अथवा आकाशांत मेघ उत्पन्न होण्याला वर्षाकाल कारणीभूत होतो; ११९ किंवा स्वप्नाला निद्रा कारणीभूत होते; त्याप्रमाणें हे **नरश्रेष्ठा!** ह्या ह्याहून साऱ्या प्राणीसमुदायाला प्रकृति हीच माता आहे बरें. १२० स्थावराला आणि जंगमाला; स्थूलांना आणि सूक्ष्मांना; हेंचसें काय? ह्या सर्व प्राणिमात्रांना प्रकृति ह्मणजे माया हीच मूळ आहे. १२१ ह्मणून प्राणिमात्र उत्पन्न करणें, किंवा झालेल्यांचा प्रतिपाळ करणें, इत्यादि कोणतींही कृत्यें आपणाकडे येत नाहींत. १२२ पाण्यामध्यें चंद्रविकासी कमलाच्या वेली पसरतात, पण त्यांची वृद्धि कांहीं चंद्र करीत नाहीं. त्याप्रमाणें सारीं कमैं मला पोंचूनही दूर राहतात." १२३

न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय ।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥

[ न च मां तानि कर्माणि ] आणि सुटलिया सिंधुजळाचा लोट । न शके धरूं सैंधवांचा घांट । तेविं सकळ कर्मा मीच शेवट । [ निबध्नंति धनंजय ] तीं काय बांधती मातें ॥ २४॥

१ मिठाचा.

धूमरजांची पिंजरी । वाजतिया वायूतें जरी होकारी । कां सूर्यबिंबामाझारीं । आंधारें शिरे ॥ २५ ॥ हें असो पर्वताचिये हृदयींचें । जेविं पर्जन्यधारास्तव न खोंचे । तेविं कर्मजात प्रकृतीचें । न लगे मज ॥ २६ ॥ [ उदासीनवदासीनं ] येऱ्हवीं इये प्रकृतीविकारीं । एक मीचि असें अवधारीं । परि उदासिनाचिया परी । करीं ना करवीं ॥ २७ ॥ जैसा दीप ठेविला परिवरीं । कवणातें नियमी ना निवारी । आणि कवण कवणिये व्यापारीं । राहाटे तेंहि नेणे ॥ २८ ॥ [ असक्तं तेषु कर्मसु ] तो जैसा कां सांक्षिभूतु । गृहव्यापारप्रवृत्तिहेतु । तैसा भूतकर्मीं अनासक्तु । मी भूतीं असें ॥ २९ ॥ हा एकचि अभिप्रावो पुढतंपुढती । काय सांगों बहुतां उपपत्ती । येथ एकहेळों सुभद्रापती । येतुलें जाण पां ॥ १३० ॥

"आणखी असें पहा! समुद्राच्या पाण्याचा लोट आला तर तो मिठाच्या बांधानें थांबावयाचा नाहीं. त्याप्रमाणें सकल कर्मांचें पर्यवसान जर मीच आहें, तर तीं मलाच कशीं बांधतील? १२४ धूम्रकणांचा पिंजरा, सोसाट्याच्या वाऱ्याला थांबवील काय? किंवा सूर्यबिंबामध्यें अंधेर शिरेल काय? १२५ हेंही असो. पर्वताच्या पोटांत असलेल्या पदार्थाला, पर्जन्याच्या धारांनीं कांहीं आघात व्हावयाचा नाहीं. त्याप्रमाणें मायेचीं कोणतींही कर्में मला बद्ध करूं शकत नाहींत. १२६ बाकी, मायेच्या विकारामध्यें असणारा मीच. हें ध्यानांत ठेव. पण तो उदासीनासारखा असतो. मी कोणतेंही कर्म करीत नाहीं, व करवीतही नाहीं. १२७ घरामध्यें दिवा ठेवला, तर तो जसा कोणाला काम कराही ह्मणत नाहीं, किंवा कोण कोण कोणत्या कोणत्या उद्योगांत गुंतले आहेत, तेंही त्याला ठाऊक नसतें. १२८ तो जसा घरांतील कामकाज करण्याला कारण असून साक्षीभूत होतो, त्याप्रमाणें प्राणीमात्रांत मी असून कर्माला मात्र उदासीन असतों. १२९ ही एकच मुद्याची गोष्ट निरनिराळ्या रीतींनें व पुन्हां पुन्हां तुला किती सांगावी? हे **सुभद्रापती!**

१ धुराच्या कणांचा. २ पिंजरा. ३ प्रतिबंध करील. ४ भोंकें पडत नाहींत. ५ घरामध्यें. ६ व्यवहार करतो. ७ द्रष्टा. ८ गृहकृत्यांच्या प्रवृत्तिस कारण. ९ उदासीन. १० पुनः पुनः. ११ एकवेळ.

ातां एक वेळ येवढें लक्ष्यांत ठेव ह्मणजे ालें." १३०

मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुनानेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥

[ हेतुना ] जे लोकचेष्टा समस्तां । जैसा निमित्तमात्र कां विता । तैसा जगत्प्रभवीं [ कौंतेय ] पंडुसुता । हेतु मी ाणें ॥ ३१ ॥ [ मयाध्यक्षेणेति ] कां जे मियां अधिष्ठिलिया कृती । होती चराचराचिया संभूती । ह्मणोनि मी हेतु हे त्पत्ती । घडे यया ॥ ३२ ॥ [ अनेन ] आतां येणें उजियेडें रुतें । न्याहाळीं पां ऐश्वर्ययोगातें । [ जगद्विपरिवर्तते ] जे झ्या ठायीं भूतें । परी भूतीं मी नसें ॥ ३३ ॥ अथवा भूतें झ्या ठायीं । आणि भूतांमाजि मी नाहीं । या खुणा तूं कहीं । कीं नको ॥ ३४ ॥ हें सर्वस्व आमुचें गूढ । परि दाविलें त उघड । आतां इंद्रियां देऊनि कवाड । हृदयीं भोगीं ३५ ॥ हा दंशु जंव नये हाता । तंव माझें साचोकारपण र्या । न संपडे गा सर्वथा । जेविं तुंषीं कण ॥ ३६ ॥ येऱ्हवीं तुमानाचेनि पैसें । आवडे कीर कळलें ऐसें । परि मृगज-चेनि वोलांशें । काय भूमी तिमे ॥ ३७ ॥ जें जाळ जळीं गिलें । तेथ चंद्रबिंब दिसे आतुडलें । परि थडिये काढूनि डिलें । तेव्हां बिंब कें सांगे ॥ ३८ ॥ तैसे बोलेंवरी वाचा-ई । वायांचि झकविजती प्रतीतीचे डोळे । मग साचोकारें ावेळे । आंथि ना होइजे ॥ ३९ ॥

."लोकांच्या सर्व प्रकारच्या उद्योगाला सूर्य जसा निमित्तास कारण आहे, तसा अर्जुना! ाच्या उत्पत्तीलाही मी कारण आहें असें मज. १३१ कारण, त्या प्रकृतीला मी आश्रयभूत झालों, ह्मणजे चराचर उत्पन्न होतात. ग़ून, जगाच्या उत्पत्तीला परंपरेनें माझेंच रण होतें. १३२ अशा आतां ह्या दिव्यदृष्टीनें झ्या ऐश्वर्ययोगाकडे पहा. तो योग ह्मणजे च कीं, माझ्या ठायीं भूतें आहेत; परंतु भूमध्यें मी नाहीं. १३३ अथवा असें ह्मण कीं—ंही माझ्या ठिकाणीं नाहींत, आणि भूतमात्रांतही मी नाहीं. ही गोष्ट कधींही विसरूं नको. १३४ आमचें सर्वस्व, आणि गुह्यगोष्ट ती हीच. परंतु ती तुला उघड करून सांगितली. ह्याकरितां आतां इंद्रियांचें द्वार बंद करून अंतःकरणांत तिचा उपभोग घे. १३५ अर्जुना! हें मर्म जावत्कालपर्यंत हातीं आलें नाहीं, तावत्कालपर्यंत, कोंड्यांत धान्य शोधीत बसल्याप्रमाणें, माझें खरें स्वरूप कधींही सांपडणार नाहीं. १३६ बाकी, अनुमानाच्या मार्गानें तें आपणास खास कळलें असें वाटतें; पण तें व्यर्थ. मृगजळाच्या ओलाव्यानें भूमी कधीं भिजेल काय? १३७ पाण्यांत एखादें जाळें पसरलें असलें, ह्मणजे त्यांत चंद्रबिंब गुरफटलें आहे असें वाटतें, पण तेंच किनाऱ्यावर आणून झाडल्यावर मग चंद्रबिंब कोठें राहतें? १३८ त्याप्रमाणें वाणीच्या बळावर शब्द हे अनुभवाच्या डोळ्यांना व्यर्थ फसवितात. त्यामुळें बोधाच्या वेळीं खरें काय तें असतही नाहीं, व होतही नाहीं." १३९

अवजानंति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानंतो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥

[ अवजानंति ] किंबहुना भवा बिहाया । आणि साचें चाड आथि जरीं मियां । तरि तूं गा उपपत्ती इया । जतन कीजे ॥ १४० ॥ येऱ्हवीं दिठी वेधली कवळें । तैं चांदिणियातें ह्मणे पिवळें । तेविं माझ्या स्वरूपीं निर्मळें । देखती दोष ॥ ४१ ॥ [ मानुषीं तनुमाश्रितं ] नातरीं ज्वरें विटाळलें मुख । तें दुधातें ह्मणे कडूविख । तेविं अमानुषा मानुष । मानिती मातें ॥ ४२ ॥ [ मां ] ह्मणऊनि पुढतपुढती धनंजया । ह्मणें विसंबसी या अभिप्राया । जे थिया स्थूळदृष्टी वायां । जाईजेल गा ॥ ४३ ॥ [ मूढाः ] पैं स्थूळदृष्टी देखती मातें । तेंचि न देखणें जाण निरुतें । जैसें स्वप्नींचेनि अमृतें । अमर नोहिजे ॥ ४४ ॥ एऱ्हवीं स्थूळदृष्टी मूढ । मातें जाणती कीर दृढ । परि तें जाणणेंचि जाणणेया आड । रिगोनि ठाके ॥ ४५ ॥ [ परं भावमजानंतो ] जैसा नक्षत्राचिया आभासा । साठीं घात केला तया हंसा । माजि रत्नबुद्धीचिया आशा । रिगोनियां ॥ ४६ ॥ सांगें गंगा या बुद्धी मृगजळ । टांकोनि

१ लोकांच्या व्यापाराला. २ जगाच्या उत्पत्तीला. ३ आकेला ह्मणजे. ४ उत्पत्ति. ५ कारण. ६ ह्या जगाला. ७ . ८ दार लावून. ९ मर्म. १० खरेपण. ११ कोंड्यामध्यें. विस्तारें. १३ वाटतें. १४ ओलाव्यानें. १५ भिजते. जाळें. १७ पसरलें. १८ सांपडलें. १९ शब्दांनीं. फसवितात. २१ खरें. २२ आहे.

१ संसाराला. २ भिण्यासाठीं. ३ इच्छा. ४ हे शब्द. ५ दृष्टी. ६ कामिणीनें. ७ मनुष्य नसणाराला. ८ ह्या. ९ जड दृष्टीनें. १० होत नाहीं. ११ प्रतिबिंबाला.

आलियाचें कवण फळ । काय सुरतरु ह्मणोनि बाबुळ । सेविली करी ॥ ४७ ॥ हा निळयोचाचि दुसरा । या बुद्धी हात घातला विखारा । कां रत्नें ह्मणोनि गारा । वेंची जेविं ॥ ४८ ॥ अथवा निधान हें प्रगटलें । ह्मणोनि खदिरांगार खोळे भरिले । कां सांउली नेणतां घातलें । कुहा सिंहें ॥ ४९ ॥ तेविं मी ह्मणोनि प्रपंचीं । जिहीं बुडी दिधली कृतनिश्चयाची । तिहीं चंद्रासाठीं जेविं जळींची । प्रभा धरिली ॥ १५० ॥ तैसा कृतनिश्चय वायां गेला । जैसा कोण्ही एक कांजी प्याला । मग परिणाम पाहों लागला । अमृताचा ॥ ५१॥ तैसें स्थूळाकारीं नाशिवंतें । भरंवसा बांधोनि चित्तें । पाहती मज अविनाशातें । तरी कैंचा दिसें ॥ ५२ ॥ अगा काइ पश्चिमसमुद्राचिया तटा । निगिजेत आहे पूर्विलियां वाटा । कां कोंडा कांडितां सुभटा । कैण जोडे ॥ ५३ ॥ तैसें विकोरलें हें स्थूळ । जाणितलेया मी जाणवतसे केवळ । काइ फेण पितां जळ । सेविलें होय ॥ ५४ ॥ [ मम ] ह्मणोनि मोहिलेनि मनोधर्में । हेंचि मी मानूनि संभ्रमें । मग येथिचीं जियें जन्मकर्में । तियें मजचि ह्मणती ॥ ५५ ॥ [ भूतमहेश्वरं ] येतुलेनि अनामा नाम । मज अक्रियासि कर्म । विदेहासि देहधर्म । आरोपिती ॥ ५६ ॥ मज आकारशून्या आकार । निरुपाधिका उपचार । मज विधिवर्जिता व्यवहार । आचारादिक ॥ ५७ ॥ मज वर्णहीना वर्ण । गुणातीतासि गुण । मज अचरणा चरण । अपाणियां पाणी ॥ ५८ ॥ मज अमेया मान । सर्वगतासि स्थान । जैसें सेजेमाजी वन । निदेला देखे ॥ ५९ ॥ तैसें अश्रवणा श्रोत्र । मज अचक्षूसी नेत्र । अगोत्रा गोत्र । अरूपा रूप ॥ १६० ॥ मज अव्यक्तासि व्यक्ती । अनार्तासि आर्ती । स्वयंतृप्ता तृप्ती । भाविती गा ॥ ६१ ॥ मज अनावरणा प्रावरण । भूषणातीतासि भूषण । मज सकलकारणा कारण । देखती वे ॥ ६२ ॥ मज सहजातें करिती । स्वयंभातें प्रतिष्ठिती । निरंतरातें आव्हानिती । विसर्जिती गा ॥ ६३ ॥ मी सर्वदा स्वतःसिद्ध । तो कीं बाळ तरुण वृद्ध । मज एकरूपा संबंध । जाणती ऐसे ॥ ६४ ॥ मज अद्वैतासि दुजें । मज अकर्तयासि काजें । मी अभोक्ता कीं भुंजे । ऐसें ह्मणती ॥ ६५ ॥ मज अकुळाचें कुळ वानिती । मज नित्याचे निधनें शिणती । मज सर्वांतरातें कल्पिती । अरि मित्र गा ॥ ६६ ॥ मी स्वानंदाभिराम । तया मज अनेकसुखाचा काम । आघवाचि मी असें सम । कीं ह्मणती एकदेशी ॥ ६७ ॥ मी आत्मा एक चराचरीं । ह्मणती एकाचा कैंपक्ष करीं । आणि कोपोनि एकातें मारीं । हेचि रूढविती ॥ ६८ ॥ किंबहुना ऐसे समस्त । जे हे मानुषधर्म प्राकृत । तयाचि नांव मी ऐसें विपरीत । ज्ञान तयांचें ॥ ६९ ॥ जंव आकार एक पुढां देखती । तंव हा देव येणें भावें भजती । मग तोचि विघडलिया टाकिती । नाहीं ह्मणोनि ॥ १७० ॥ मातें येणें येणें प्रकारें । जाणती मनुष्य ऐसेनि आकारें । ह्मणऊनि ज्ञानचि तें आंधारें । ज्ञानासि करी ॥ ७१ ॥

**"संसाराचें भय वाटत असेल, आणि माझी खरोखर इच्छा असेल, तर ह्या गोष्टी तूं नीट जतन कर. १४० बाकी, ज्याच्या दृष्टीला काविळ झाली, तो चांदणें पिंवळें दिसतें असें ह्मणतो; त्याप्रमाणें माझ्या निर्मळ स्वरूपामध्येंही कोणाकोणाला दोष दिसतात. १४१ किंवा तापानें तोंडाची चव गेली, ह्मणजे तें दुधाला सुद्धां कडू विष ह्मणूं लागतें; त्याप्रमाणें मी मनुष्य नसतांही मला मनुष्य असें मानतात. १४२ ह्याकरितां अर्जुना! पुन्हा पुन्हा तुला सांगणें हेंच कीं, ही गोष्ट विसरूं नको. कारण, ह्या स्थूळदृष्टीनें पाहिलेलें सारें व्यर्थ होणार. १४३ स्वप्नांतील अमृतानें ज्याप्रमाणें अमर होत नाहीं, त्याप्रमाणें, स्थूल दृष्टीनें मला पाहणें, हेंच कांहींएक न पाहिल्यासारखें आहे, हें लक्ष्यांत ठेव. १४४ बाकी मूर्ख आहेत ते, स्थूल दृष्टीनें मला ओळखतात. परंतु तें ओळखणेंच त्यांच्या खऱ्या ज्ञानाला आडवें येतें. १४५ ज्याप्रमाणें 'नक्षत्राचें प्रतिबिंब हें रत्न आहे' ही आशा आंत शिरून तिनें राजहंसाचा घात मात्र केला. १४६ हीच गंगा असें समजून मृगजळाकडे आलें, तर त्याचें फल काय? कल्पतरु ह्मणून बाभळ घेतली, तर ती काय करील? सांग. १४७ 'हा नीलमण्याचाच हार आहे' असें समजून सर्पाला हात लावावा; किंवा रत्नें सम-**

१ इंद्रनीलमण्याचा. २ हार. ३ सर्पाला. ४ ठेवा. ५ खैराचे निखारे. ६ पदरांत. ७ पडच्छाया. ८ विहिरीमध्यें. ९ पेज. १० पूर्वेच्या. ११ धान्य. १२ विस्तारलें. १३ भ्रांतीनें. १४ नामशून्याला. १५ उत्पन्न होणें, वाढणें, लय पावणें इत्यादि. १६ कर्तव्याकर्तव्यरहिताला. १७ हस्तरहिताला. १८ परिमाणातीताला. १९ बिछान्यांतच. २० दुःखमुक्ताला. २१ मानतात. २२ स्वतःसिद्ध असणाराला. २३ आवाहन करतात. २४ विसर्जन करतात. २५ भोगतो.

१ मरणानें, नाशानें. २ सर्वांत राहणाराला. ३ निजानंदांत निमग्न. ४ कैवार घेतों. ५ पसरवितात. ६ काळोख.

जून गारगोट्या वेचाव्या त्याप्रमाणें; १४८ अथवा ठेवा सांपडला ह्मणून खैराचे निखारे पदरांत घ्यावेत; किंवा आपली पडच्छाया हें न समजून सिंहानें जसें विहिरींत घालून घ्यावें, १४९ त्याप्रमाणें प्रपंच्यामध्यें काय तो 'मी'च, ह्मणून ज्यांनीं कृतनिश्चयाची बुडी दिली, त्यांचा तो निश्चय चंद्रासाठीं जळांतील प्रतिबिंब धरावें, १५० त्याप्रमाणें एखाद्या कांजी पिऊन अमृताचा गुण येतो कीं काय ह्मणून वाट पहात बसणाऱ्यासारखा व्यर्थ जातो. १५१ तसेंच मला अविनाशाला नाशिवंत;—स्थूलाकार—हाच चित्तांत भरंवसा धरून पाहतात. तेव्हां मी दिसणार कसा? १५२ अरे! पश्चिम समुद्राच्या तटाकाला जावयाचें आहे, तर पूर्वेच्या बाजूनें का निघावयाचें? किंवा हे वीरश्रेष्ठा! कोंडा कांडला, तर धान्य मिळेल काय? १५३ तसें, विस्तारलेलें हें सर्व स्थूल आहे. त्याचें ज्ञान झालें, ह्मणून माझें खरें ज्ञान होईल काय? फेंस प्याल्यानें पाणी प्याल्यासारखें होईल, होय? १५४ ह्मणून मनोधर्माच्या मोहानें भ्रमांत पडतात; दृश्य हेंच मी असें मानतात; आणखीं येथचीं जन्मादिक जीं कर्में, तीं माझींच असें ह्मणतात. १५५ अशा रीतीनें मी नामरहित असतां, मला नाम आहे; मी अकर्ता असतां मला कर्म आहे; मी विदेही असतां, मला देहधर्म आहेत; इत्यादि आरोप मजवर लादतात. १५६ मी आकारहीन—निराकार—असतां मला आकार आहे; मी निरुपाधि असतां मला उपचार आहेत; मी कर्तव्याकर्तव्यरहित असतां मला व्यवहार आहे, आचार आहे, सर्व कांहीं आहे. १५७ मी वर्णहीन असतां, मला वर्ण आहे; मी गुणातीत असतां मला गुण आहेत; मी चरणरहित असतां, मला चरण आहेत; हस्तहीन असतां हस्त आहेत. १५८ निद्रिस्त मनुष्य बिछान्यावर असतांच, जसें वन पाहतो, त्याप्रमाणें मला परिमाणातीताला परिमाण; व सर्वत्र संचार करणाराला एक जागीं पहातात. १५९ तसेंच मला कर्णहीनाला कर्ण; नेत्रहीनाला नेत्र; अगोत्राला गोत्र; निराकाराला आकार; १६० मला अव्यक्ताला व्यक्ति; दुःखहीनाला दुःख; आणि नित्यतृप्ताला तृप्ति, असें ही मानतात. १६१ मला अनाच्छादिताला आच्छादन; भूषणातीताला भूषण; आणि सर्वकारणांस कारणही मीच असें मानतात. १६२ मी सहज असतां, नवा तयार करतात; मी स्वयंभू असतां, माझी स्थापना करतात; मी नित्य, शाश्वत असतां, माझें आवाहन करतात व विसर्जनही पण करतात. १६३ सदासर्वदा स्वतः सिद्ध असणाऱ्या माझ्या एका रूपालाच बाल, तरुण, वृद्ध अशा अवस्था आहेत असें मानतात. १६४ मी अद्वैत असतां वेगळा आहें; अकर्ता असतां मला कर्में आहेत; मी अभोक्ता असतां भोग भोगणारा आहें; असें ह्मणतात. १६५ मला मुळींच कुल नाहीं; तरी माझ्या कुलाचें वर्णन करतात; मी नित्य असतां माझ्या नाशानें कष्टी होतात; मी सर्वांत सम असतां, मला शत्रु आहेत, मित्र आहेत, अशी कल्पना करतात. १६६ निजानंदांत निमग्न असणारा मी; त्या मला अनेक सुखांची इच्छा आहे; आणि मी सर्वत्र सम आहें हें ह्मणणें एकदेशीय आहे, असें ह्मणतात. १६७ मी चराचरामध्यें आत्मस्वरूप होऊन राहणारा एक, असें असून मी एकाचा पक्ष घेतों; आणि एकावर रागावून त्याला मारतों; असें उठवितात. १६८ किंबहुना अशा प्रकारचे सारे हे जे मायेपासून झालेले मनुष्यांचे धर्म, तोच मी; असें त्यांचें ज्ञान उलटें असतें. १६९ जोंपर्यंत एखादा आकार पुढें पाहतात, तोंपर्यंत 'देव' अशा भावनेनें त्याला भजतात; आणि तोच नाश पावला कीं, तो देव आतां नाहीं, असें ह्मणून सोडून देतात. १७० अशा अशा प्रकारानें मी मनुष्याच्या आकाराचा आहें असें समजतात; ह्मणून ज्ञानच ज्ञानाला आंधळें करून सोडतें." १७१

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः॥१२॥

[ मोघाशाः ] यालागीं जन्मले ते मोघ । जैसें वार्षियेवीण मेघ । कां मृगजळाचे तरंग । दुरूनीचि पाहावे ॥ ७२ ॥ अथवा कोल्हेरीचे असिवारें । नातरी बोडंबरीचे अळंकार । कीं गंधर्वनगरीचे आवारें । आभासती कां ॥ ७३ ॥ सावरी वाढिन्नल्या सरळा । वरी फळ नाहीं आंत पोकळा । कां स्तन जाले गळां । शेळिये जैसे ॥ ७४ ॥ तैसें मूर्खाचें तया जियालें । [ मोघकर्माणः ] आणि धिग कर्म तयांचें निफजलें । जैसें सांवरी फळ आलें । घेपे ना दीजे ॥ ७५ ॥ [मोघज्ञानाः] मग जें कांहीं ते पढिन्नले । तें मर्कटें नारेळ तोडिलें । कां आंधळयाहातीं पडिलें । मोतीं जैसें ॥ ७६ ॥ किंबहुना तयाचीं शास्त्रें । जैसीं कुमारीहातीं दीधलीं शस्त्रें । कां अशौच्या मंत्रें । बीजें कथिलीं ॥ ७७ ॥ [ विचेतसः ] तैसें ज्ञानजात तयां । आणि जें कांहीं आचरलें गा धनंजया । तें आघवेंचि गेलें वायां । जे चित्तहीन ॥ ७८ ॥ [ राक्षसीमासुरीं चैव ] पैं तमोगुणाची राक्षसी । जे सुबुद्धीतें ग्रासी । विवेकाचा ठावचि पुसी । निशाचरी जे ॥ ७९ ॥ [ प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ] तिये प्रकृती वरपडे जाले । ह्मणऊनि चिंतेचेनि कपाटें गेले । वरि तामसीयेचि पडिले । मुखामाजी ॥ १८० ॥ जेथ आशेचिये लाळे । आंत हिंसा जीभ लोळे । तेवींची असंतोषाचे चाकेळे । अखंड चघळी ॥ ८१ ॥ जे अनर्थाचे कानवेरी । आवाळुवें चाटीत निघे बाहेरी । जे प्रमादपर्वतींची दरी । सदाचि मातली ॥ ८२ ॥ जेथ द्वेषाचिया दाढा । खसखसां ज्ञानाचा करिती रगडा । जे त्वगस्थि गवसणी मूढां । स्थूळबुद्धी ॥ ८३ ॥ ऐसे आसुरिये प्रकृतीचे तोंडीं । जे जाले गा भूततोंडीं । ते बुडोनि गेले कुंडीं । व्यामोहाच्या ॥ ८४ ॥ एवं तमाचिये पहिले भरतें । न पविजतीचि विचाराचेनि हातें । हें असो ते गेले जेथें । ते शुद्धीचि नाहीं ॥ ८५ ॥ ह्मणोनि असोतु इयें वायोंणीं । कायसीं मूर्खाचीं बोलणीं । वायां वाढवितां वाणी । शिणेल हन ॥ ८६ ॥ ऐसें बोलिलें देवें । तेथ जी जी ह्मणीतलें पांडवें । आइकें जेथ वाचा विसंवे । ते साधुकथा ॥ ८७ ॥

"ह्याकरितां, अशा प्रकारचे लोक जन्मास येऊन व्यर्थ होत. वर्षाकालावांचून आलेले मेघ, किंवा मृगजळाच्या लाटा, जशा दुरून पहावयाच्या, १७२ किंवा मातीच्या चित्रांतले स्वार; अथवा ऐंद्रजालिक अलंकार, नाहींतर गंधर्वनगराचे तट जसे दिसावेत, १७३ किंवा शेर सरळ वाढलें तर, वर फळ नाहीं आणि आंत पोकळ. किंवा शेळीच्या गळयांखालीं उत्पन्न झालेले जसे स्तन; १७४ तसें त्या मूर्खाचें जन्म. त्या जन्माला, आणि त्याच्या त्या निष्फळ कर्मालाही धिःकार असो. सावरीला फळ आलें, तर जसें 'देणें नाहीं, आणि घेणें नाहीं.' १७५ मग ते जें कांहीं पढले असतील तें, माकडानें नारळ तोडल्याप्रमाणें, किंवा आंधळ्याच्या हातांत मोतीं पडल्याप्रमाणें समजावें. १७६ किंवा त्यांचीं शास्त्रें, हीं कुमारीच्या हातीं दिलेल्या शस्त्राप्रमाणें होत. किंवा अशुचिर्भूताला, मंत्ररूपानें बीजें सांगितलीं तर तीं जशीं, १७७ व्यर्थ जातात, तसें **अर्जुना!** ज्याचें चित्त स्वाधीन नाहीं, त्याचें सर्वज्ञान, त्यानें कांहीं आचरिलें असेल तें, सारें व्यर्थ जातें. १७८ तमोगुणरूप राक्षशीण त्यांच्या बुद्धीला ग्रासून टाकते; ती रात्रीं संचार करणारी असून विवेकाचा तर ठावच पुसून टाकते. १७९ ह्यामुळें ते मायेच्या सपाट्यांत सांपडतात, आणि चिंतेच्या द्वारांतून जाऊन तामसीच्या मुखांत पडतात. १८० तेथें आशेची लाळ भरलेली असून. तींत हिंसारूप जीभ लळ लळ लळ करीत असते, ती निरंतर असंतोषरूपी मांसाचे तुकडे चघळित असते. १८१ ती अनर्थरूप कानापर्यंत ओंठ चावितच बाहेर पडते. जी सदासर्वकाल प्रमादपर्वताची माजलेली दरी; १८२ त्या दरींत द्वेषाच्या दाढा, ज्ञानाचा खसाखस चुराडा करून टाकतात. जी स्थूलबुद्धि मूर्खांना त्वचास्थीची गवसणी; १८३ अशा राक्षशिणीच्या तोंडांत जे बोनें होऊन राहतात, ते भ्रांतीच्या कुंडांत बुडून गेले ह्मणून समजावें. १८४ अशा प्रकारें जे तमाच्या खळग्यांत पडतात, ते विचाराच्या हाताला

१ व्यर्थ. २ वर्षाकालावांचून. ३ मातीच्या चित्रांचे. ४ स्वार. ५ नजरबंदीचे. ६ आकाशांत उठणाऱ्या ढगाचे. ७ तट, कुसूं. ८ शेर. ९ वांचणें. १० घेणें ना देणें. ११ अशुद्ध, अमंगल. १२ जखीण, राक्षशीण. १३ ग्रस्त. १४ दारांत. १५ मांसाचे गोळे. १६ कानापर्यंत. १७ ओंठाचे भाग. १८ अपराधपर्वताच्या गुहेंत. १९ कारण. २० चर्म आणि अस्थि. २१ मंदबुद्धीला. २२ राक्षसी. २३ भुतांचा बळी. २४ भ्रांतीच्या. २५ खळग्यांत. २६ असूं देत. २७ वायफळ. २८ विश्रांति पावते.

पोंचत नाहींत. ते जेथें जातात, तेथें त्यांची शुद्धच नाहींशी होते. १८५ ह्मणून ही निष्फळ कथा राहूं दे. मूर्खाच्या बोलण्यामध्यें अर्थ कोणता? तीं वाढविलीं तर वाचेला व्यर्थ कष्ट मात्र." १८६ देव ह्मणतात "त्यापेक्षां वाचेला जेथें विश्रांति मिळेल अशी साधु कथा ऐक." तेव्हां अर्जुन ह्मणाला "आज्ञा महाराज." १८७

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥१३॥

[ महात्मानस्तु मां पार्थ ] तरी जयाचे चोखटे मानसीं । मी होऊनि असें क्षेत्रसंन्यासी । जया निजेल्यातें उपासी । वैराग्य गा ॥ ८८ ॥ [ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ] जयाचिया आस्थेचिया सद्भावा । आंत धर्म करी राणिवा । जयाचें मन ओलावा । विवेकासी ॥ ८९ ॥ जे ज्ञानगंगे नाहाले । पूर्णता जेऊनि धाले । जे शांतीसि झाले । पल्लव नवे ॥ १९० ॥ जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ । जे आनंदसमुद्रीं कुंभ । चुबुकुळोनि भरिले ॥ ९१ ॥ [ भजंति ] जयां भक्तीची येतुली प्राप्ती । जे कैवल्यातें परतें सर ह्मणती । जयाचिये लीळेमाजि नीती । जियाली दिसे ॥ ९२ ॥ [ अनन्यमनसः ] जे आघवांचि करणीं । लेइले शांतीचीं लेणीं । जयांचें चित्त गवसणी । व्यापका मज ॥ ९३ ॥ [ ज्ञात्वा भूतादिमव्ययं ] ऐसे जे महानुभाव । दैविये प्रकृतीतें दैव । तें जाणोनियां सर्व । स्वरूप माझें ॥ ९४ ॥ मग वाढतेनि प्रेमें । मातें भजती जे महात्मे । परि दुजेपण मनोधर्में । शिवतलें नाहीं ॥ ९५ ॥ ऐसे मीच होऊनि पांडवा । करिती माझी सेवा । परि नवलाव तो सांगावा । असे आइक ॥९६॥

"तर ज्याच्या शुद्ध अंतःकरणांत क्षेत्र–देह–असेपर्यंत मीच राहण्याचा संकल्प केलेला असतो; जो निजला असतांही, वैराग्य ज्याची सेवा करतें; १८८ ज्याच्या आस्थेच्या सद्भावामध्यें धर्म राज्य करीत असतो; ज्याचें मन विवेकाला ओलावा होतें; १८९ जे ज्ञानरूप गंगेमध्यें स्नान केलेले; जे पूर्णतेचें भोजन करून तृप्त झालेले; जे शांतीचे कोमल पल्लव; १९० जे परिणामास फुटलेले कोंभ; जे धैर्यमंडपाचे स्तंभ; जे आनंदसमुद्रांतून भरून निघालेले कुंभ; १९१ ज्यांच्या भक्तीची शक्ति इतकी कीं, जे मोक्षालाही मागें सर ह्मणतात; ज्यांच्या लीलेंतही मूर्तिमंत नीति प्रगट होते; १९२ सर्व इंद्रियांना ज्यांनीं शांतीचे अलंकार घातले आहेत; ज्यांनीं मला सर्वव्यापकाला आपल्या चित्ताची गवसणी केली आहे; १९३ असे जे महानुभाव, ते माझें सर्व स्वरूप ओळखून दैवी प्रकृतीचेंही दैव बनतात. १९४ जे महात्मे मला वाढत्या प्रेमानें भजतात; परंतु मनोधर्मानेंही ज्यांना दुजाभाव शिवत नाहीं; १९५ अर्जुना, अशा प्रकारें मद्रूप होऊन ते माझी सेवा करतात. तो चमत्कार खरोखरच सांगण्यासारखा आहे. ऐक." १९६

सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।
नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते॥१४॥

[ सततं कीर्तयंतः ] तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे । जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केले ॥ ९७ ॥ यमदमा अवकळा आणिली । तीर्थें ठायावरूनि उठविलीं । यमलोकींची खुंटिली । रहाटी आघवी ॥ ९८ ॥ यम ह्मणे काय यमावें । दम ह्मणे कवणातें दमावें । तीर्थें ह्मणती काय खावें । दोष औषधासि नाहीं ॥ ९९ ॥ ऐसें माझेनि नामघोषें । नाहींचि करिती विश्वाचीं दुःखें । अवघें जगचि महासुखें । दुमदुमित भरलें ॥ २०० ॥ ते पाहांटेवीण पाहोवित । अमृतेंवीण जीववित । योगेंविण दावित । कैवल्य डोळां ॥ १ ॥ परि राया रंका पाड धरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं । एकसरें आनंदाचें आवारु । होत जगा ॥ २ ॥ कहीं एकाधेनि वैकुंठा जावें । तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें । ऐसें नामघोषगौरवें । धवळलें विश्व ॥ ३ ॥ तेजें सूर्य तैसे सोज्वळ । परि तोही अस्तवे हें किडाळ । चंद्र संपूर्ण एखादे वेळ । हे सदा पुरते ॥ ४ ॥ मेघ उदार परी वोसरे । ह्मणऊनि उपमेसि न पुरे । हे निःशंकपणें सपाखरे । पंचानन ॥ ५ ॥ जयाचे वाचेपुढां भोजें ।

१ निर्मळ. २ जिवितावधि एकाच क्षेत्रांत राहण्याचा संकल्प केलेला. ३ सेवा करतें. ४ राज्य. ५ तृप्त झाले. ६ बुडवून. ७ सामर्थ्य. ८ मोक्षाला. ९ सजीव. १० इंद्रियांचे ठायीं. ११ पिशवी, खोळ. १२ द्वैत. १३ आश्चर्य, कौतुक. १४ सांगण्यासारखा आहे.

१ कीर्तनांतील नटवत् जो नाच त्यानें. २ व्यापार. ३ प्रायः ( बहुधा ) चित्ताचे. ४ निग्रह करावा. ५ उजेडवितात. ६ योग्यता. ७ लहानथोरांस. ८ विचार. ९ मंदिर. १० स्वच्छ केलें. ११ हीनत्व. १२ सरतो, पडत नाहीं. १३ सरूप. १४ शिव, सिंह. १५ भक्तीनें.

अखंड नाम नाचत असे माझें । जें जन्मसहस्रीं वोळंगीजे । एकवेळ यावया ॥ ६ तो मी वैकुंठीं नसें । वेळ एक भानुबिंबींही न दिसें । वरी योगियांचींही मानसें । उमरडोनि जाय ॥ ७ ॥ परी तयांपासीं पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ॥ ८ ॥ कैसे माझ्या गुणीं धाले । देशकालातें विसरले । कीर्तनसुखें सुखावले । आपणपांचि ॥ ९ ॥ कृष्ण विष्णु हरी गोविंद । या नामाचे निखिल प्रबंध । माजी आत्मचर्चा विशद । उदंड गाती ॥ २१० ॥ [ मां ] हें बहु असो यापरी । कीर्तित मातें अवधारीं । एक विचरिति चराचरीं । पांडुकुमरा ॥ ११ ॥ [ यतंतश्च ] मग अणिक ते अर्जुना । सावियां बहुवा जतना । पंचप्राण मना । पाढाउ घेउनी ॥ १२ ॥ बाहेरी यमनियमांची कांटी लाविली । वज्रासनाची पौळी पन्नासिली । वरी प्राणायामाचीं मांडिलीं । वाहोतीं यंत्रें ॥ १३ ॥ तेथ उल्हाटशक्तीचेनि उजिवडें । मन पवनाचेनि सुरवाडें । सतरावियेचें पाणियाडें । बळाविलें ॥ १४ ॥ तेव्हां प्रत्याहारें ख्याती केली । विकारांची संपली बोहली । इंद्रियें बांधोनि आणिलीं । हृदयाआंत ॥ १५ ॥ [ दृढव्रताः ] तंव धारणावारू दाटिले । महाभूतांतें एकवटिलें । मग चतुरंग सैन्य निवटिलें । संकल्पाचें ॥ १६ ॥ तयावरी जैतरे जैत । म्हणोनि ध्यानाचें निशाण वाजत । दिसे तन्मयाचें झळकत । एकछत्र ॥१७॥ पाटीं समाधिश्रियेचा अशेखा । आत्मानुभवराज्यसुखा । पट्टाभिषेक देखा । समरसें जाहाला ॥१८॥ ऐसें हें गहन । अर्जुना माझें भजन । आतां ऐकें सांगेन । जे करिती एक ॥ १९ ॥ [ भक्त्या ] तरी दोन्ही पालववेरी । जैसा एक तंतू अंबरीं । तैसा मीवांचूनि चराचरीं । जाणती ना ॥ २२० ॥ आदि ब्रह्मा करुनी । शेवटीं मशक धरूनी । माजी समस्त हें जाणोनी । स्वरूप माझें ॥ २१ ॥ [नमस्यंतश्च मां] मग वाडें धाकुटें न म्हणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलीये वस्तु उजू लुंठिती । मीचि म्हणोनि ॥ २२ ॥ आपुलें उत्तमत्व नाठवे । पुढील योग्यायोग्य नेणवे । एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें । नेमूंचि आवडे ॥ २३ ॥ जैसें उंचींहूनि उदक पडिलें ।

१ आश्रय करावा. २ सूर्यमंडळांत. ३ उल्लंघून. ४ गवसावा, सांपडावा. ५ तृप्त झाले. ६ ग्रंथ व कविता. ७ आत्मानात्मविचार. ८ गुणानुवाद गात. ९ हिंडतात. १० सर्वथा. ११ वाटाड्या. १२ कुंपण. १३ मूळबंधाची. १४ आवार शृंगारलें. १५ तोफा. १६ कुंडलिनीच्या. १७ अनुकूलतेनें. १८ बुद्धीचें. १९ तळें. २० इंद्रियांच्या अंतर्मुखतेनें. २१ बोलणें. २२ ध्यानपरिपक्वदशा हेच घोडे. २३ जय रे जय. २४ नगारा, भेरी. २५ अधिकार, गादी. २६ पदरांपर्यंत. २७ वस्त्रामध्यें. २८ मोठें. २९ गणतात. ३० सर्व वस्तूंच्या. ३१ नमन करणें.

तें तलवटवरी येऊं लागलें । तैसें नमिजे भूतजात देखिलें । ऐसा स्वभावचि तयांचा ॥ २४ ॥ कां फळलिया तरुची शाखा । सहजें भूमीसीं उतरे देखा । तैसें जीवमात्रां अशेखां । खालावती ते ॥ २५ ॥ अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय हेचि संपत्ती । जे जयजयमंत्रें अर्पिती । माझ्या ठायीं ॥ २६ ॥ नमितां मानापमान गळाले । म्हणोनि अवचितां मीचि जाहाले । [ नित्ययुक्ता उपासते ] ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ॥ २७ ॥ अर्जुना हे गुरुवी भक्ती । सांगीतली तुजप्रती । आतां ज्ञानयज्ञें यजिती । ते भक्त आइकें ॥ २८ ॥ परि भजन करिती हातवटी । तूं जाणत आहासि किरीटी । जे मागां इया गोष्टी । केलिया आह्मीं ॥२९॥ तंव आथि जी अर्जुन म्हणे । हें दैविकियांप्रसादाचें करणें । तरि काय अमृताचें आरोगणें । पुरे म्हणवेल ॥ २३० ॥ या बोला श्रीअनंतें । लागट देखिलें तयातें । कीं सुखावलेनि चित्तें । डोलत असे ॥ ३१ ॥ म्हणे भलें केलें पार्था । येऱ्हवीं हा अनवसर सर्वथा । परि बोलवीतसे आस्था । तुझी मातें ॥ ३२ ॥ तंव अर्जुन म्हणे हे कायी । चकोरेंवीण चांदिणेंचि नाहीं । जगचि निववीजे हा तयाच्या ठायीं । स्वभावो कीं जी ॥ ३३ ॥ येरें चकोरें तिये आपुलिये चाडे । चांचूं करिती चंद्राकडे । तेविं आह्मी विनऊं तें थोकडें । देवो कृपासिंधु ॥ ३४ ॥ जी मेघ आपुलिये प्राैढी । जगाची आर्ती दवडी । वांचूनि चातकाची ताहान केवढी । तो वर्षाव पाहुनी ॥ ३५ ॥ परि चुळ एकाचिया चाडे । जेविं गंगेतेंचि ठाकणें पडे । तेविं आर्त बहु कां थोडे । तरि कां सांगावें देवें ॥ ३६ ॥ तेथें देवें म्हणितलें राहें । जो संतोष आह्मा जाहाला आहे । तयावरी स्तुती साहे । ऐसें उरलें नाहीं ॥ ३७ ॥ पैं परिसंतु आहासि निकियापरी । तेंचि वक्तृत्वा वेऱ्हाडी करी । ऐसें पुरस्करोनि श्रीहरी । आदरिलें ॥ ३८ ॥

**"तर, कीर्तनाच्या रंगानें रंगून, चित्ताचे बहुतेक व्यवसाय सोडून देतात; कारण, त्यांनीं पापाचें नांवच नाहीं, असें करून टाकलेलें असतें. १९७ यमाच्या नियमाला बाध आणतात; तीर्थांना जागाच नाहींशी करतात; यमलोकांतील सारी रहाटीच बंद पाडतात. १९८**

१ नम्र होतात. २ नम्रता. ३ श्रेष्ठ, मोठी. ४ ईश्वरी कृपेचें. ५ सेवन, प्राशन. ६ लगट करणारा. ७ अप्रसंग, अवेळ, अयोग्य समय. ८.समाधान करावें. ९ गरजेसाठीं. १० चोंच. ११ थोडकें, अल्प. १२ थोरपणानें. १३ पीडा. १४ इच्छेनें. १५ गांठणें. १६ दुःखी. १७ ऐकत आहेस. १८ उत्तम श्रवणच. १९ मढत. २० आधीं बोलून.

म, 'नियमन कशाचें करावें?' असें ह्मणूं लागतो. दम, 'कोणाला दमावें,' असें ह्मणूं लागतो. तीथें ह्मणूं लागतात कीं, 'औषधाला दोष नाहीं, आतां खावें तरी काय?' १९९ ह्याप्रमाणें माझ्याच नामसंकीर्तनानें, विश्वाचीं दुःखें नाहींशीं करून टाकतात. सारें जगच महत्सुखानें दुमदुमून जातें. २०० ते उजेडल्याशिवायच उजाडवितात; अमृताशिवायच वांचवितात; आणि योगाशिवायच डोळ्याला मोक्ष दाखवितात. २०१ तसेंच, रावाची व रंकाची योग्यता सारखीच धरतात; लहानामध्यें आणि थोरामध्यें भेद मानीत नाहींत; जगाला एकसारखें आनंदाचें मंदिरच होऊन रहातात. २०२ कधीं एखादे वेळीं वैकुंठास जावें ह्मटलें, तर यांनीं सारेंच वैकुंठ केलेलें असतें! अशा प्रकारें नामघोषाच्या योगानें सारें विश्वच निर्मळ करून सोडतात. २०३ ते तेजानें सूर्याप्रमाणें दिसतात; परंतु तो सूर्यही अस्तास जातो, हें त्याच्यांत व्यंग. चंद्र ह्मणावें, तर तो एखादे वेळेस संपूर्ण असतो; हे सदासर्वकाल पुरतेच. २०४ मेघ उदार आहे खरा, पण तो सरतो; ह्मणून उपमेला यथायोग्य होत नाहीं. हे निःशंकपणानें सदयपणाचे प्रभु. २०५ जें एक वेळ गोंडास येण्याकरितां हजारों जन्म घेतले पाहिजेत, तें माझें नाम, ज्यांच्या वाचेपुढें नाचत असतें. २०६ तो मी, वैकुंठांत नसेन; एखादे वेळीं सूर्यबिंबांत सुद्धां दिसावयाचा नाहीं; योग्याचीं मनेंही कदाचित् उल्लंघून जाईन; २०७ पण अर्जुना! जेथें यथासांग नामघोष चाललेला असतो, त्याच्यापाशीं मी हरवलेला असलों तरी सुद्धां हुडकून काढावा. २०८ अहाहा! ते माझ्या गुणानुवादांत कसे समाधान पावतात ह्मणून सांगूं? कीर्तनाच्या आनंदानें ते आपआपणांतच मग्न होऊन देशकालही विसरून जातात. २०९ निरंतर **कृष्णा, विष्णु, गोविंदा** ह्या नामांच्या कविता, आणि त्यांत आत्मचर्चेच्या विवरणाचें किती तरी गायन चाललें असतें. २१० हें विशेष राहूं दे. पंडुकुमरा! ऐक. याप्रमाणें कितीएक माझे गुणानुवाद गात गात चराचरामध्यें वागत असतात. २११ अर्जुना! नंतर मग ते सदासर्वदा परोपरीनें जतन केलेले पंचप्राण व मन, ह्यांना वाटाडे घेऊन, २१२ बाहेरच्या बाजूनें यमनियमाचें–मनोनिग्रहाचें–कुंपण घालून, आंत मूळबंधाचा खासा कोट घालून त्यावर प्राणायामाचा तोफखाना सुरू करतात. २१३ तेथें कुंडलिनीच्या प्रकाशानें, मनाच्या आणि वायूच्या अनुकूलतेनें ब्रह्मस्थानच्या अमृताचा डोहो काबीज करतात. २१४ तेव्हां इंद्रियांच्या अंतर्मुखतेचा अंमल बसतो; विकाराचीं बोलणीं खुंटतात; कारण सारीं इंद्रियें हृदयाच्या आंत बांधून आणलेलीं असतात. २१५ त्यामुळें ध्यानांच्या घोड्यांची गर्दी उसळते; महाभूतें एकत्र जमतात; आणि संकल्पाच्या चतुरंग सैन्याचा फडशा पडतो. २१६ त्या वेळीं 'जय रे जय' ह्मणून ध्यानाचा नगारा दुमदुमूं लागतो. आणि तन्मयवृत्तीचें एक छत्र चमकूं लागतें. २१७ नंतर सर्व समाधिवैभवाच्या सिंहासनावर आत्मानुभवाच्या राज्यसुखाला ऐक्यरूपानें पट्टाभिषेक होतो. २१८ अर्जुना? असें हें माझें भजन गहन आहे. आतां दुसरेंही कित्येक निराळ्या रीतीनें करतात, तेंही सांगतों. ऐक. २१९ वस्त्रामध्यें दोन्ही पदरांपर्यंत जसा एकच तंतु असतो, तसें चराचरामध्यें माझ्यावांचून दुसरें कांहींच नाहीं असें मानणारे, २२० सर्वांआधीं उत्पन्न झालेला जो ब्रह्मदेव, त्याच्यापासून तों शेवटचा क्षुल्लक जीव जी माशी, ह्यांच्यामधील सारें स्वरूप माझेंच असें मनांत आणून, २२१ हें मोठें किंवा हें धाकटें असें ह्मणतच नाहींत; सजीव व निर्जीव ह्यांचा भेद सुद्धां जे जाणत नाहींत; जी जी वस्तु ह्मणून पहातात, ती ती मीच ह्मणून मानतात. २२२ आपल्या चांगलेपणाची ज्यांना आठवण होत नाहीं; पुढें आलेल्यामध्यें योग्य किंवा अयोग्य हेंही ज्यांना समजत नाहीं; प्रत्येक वस्तूला सरसकट नमनच करावें

असें वाटतें; २२३ उंचावरून उदक पडलें, तर तें ज्याप्रमाणें सखल प्रदेशाकडेच येऊं लागतें, त्याप्रमाणें प्राणिमात्र पाहिलें कीं, त्याला नम्र व्हावें असाच ज्यांचा स्वभाव; २२४ किंवा फळें आलेली झाडाची ढाळी, आपोआप जशी जमिनीकडे लवते, तसे जे सर्व प्राणिमात्रांना नम्रच होतात; २२५ जे नेहेमीं गर्वरहित होऊन राहतात; विनय हीच ज्यांची संपत्ति; तिला जे 'जय जय' ह्या मंत्रानें मलाच अर्पण करितात. २२६ ह्याप्रमाणें सर्वांशीं नम्र झालें ह्मणजे मान आणि अपमान हे नाहींसे होतात. आणि तेणेंकरून ते अकस्मात् मीच होऊन जातात. अशा प्रकारें निरंतर मद्रूप होऊनच माझी सेवा करतात. २२७ अर्जुना! ही भक्ति फार मोठी आहे. ह्मणून ती तुला सांगितली. आतां ज्ञानरूप यज्ञानें माझें यजन करणारे भक्त कसे असतात तें ऐक. २२८ पण अर्जुना! ती भजन करण्याची रीति तुला माहित आहे; कारण, पूर्वीं ह्या गोष्टी तुला आह्मीं सांगितलेल्याच आहेत." २२९ तेव्हां अर्जुन ह्मणाला "महाराज! होय. सांगितल्या हा ईश्वरी प्रसादच झाला. तरी अमृतपान कधीं पुरे असें ह्मणवेल काय?" २३० ह्या बोलण्यावरून श्रीअनंतांनीं तो पुन्हा ऐकण्याविषयीं उत्सुक आहे असें जाणलें, आणि आनंदवृत्तीनें डोलूं लागले. २३१ मग ह्मणतात "अर्जुना! फार चांगलें. येरवीं हा प्रसंग अगदीं योग्य नाहीं, तथापि तुझी आस्थाच मला बोलावयाला लावते." २३२ तेव्हां अर्जुन ह्मणाला "हें काय? चकोर नसला, ह्मणून चांदणें नसतें काय? महाराज! साऱ्या जगाला आनंदित करावें, हा चंद्राचा स्वभावच पडला. २३३ त्यांत चकोरही आपल्या गरजेसाठीं चंद्राकडे चोंच करतात. त्याप्रमाणें आह्मी विनंती करूं तेवढी थोडीच; कारण, देव कृपेचे समुद्र पडले. २३४ अहो महाराज! मेघ आपल्या थोरपणानें साऱ्या जगाची पीडा दूर करतो. तो वर्षाव पाहिला, तर त्यापुढें चातकाची तृषा ती केवढी? २३५ पण एका चुळीसाठीं ज्याप्रमाणें गंगेला जावें लागतें, त्याप्रमाणें दुःख थोडें असो कीं बहुत असो, तें देवापाशींच सांगितलें पाहिजे." २३६ तेव्हां देव ह्मणाले "थांब. आह्मांला जो संतोष झालेला आहे, त्याच्यावर ही स्तुति सांठवून ठेवण्याला स्थानच उरलेलें नाहीं. २३७ तूं चांगल्याप्रकारें ऐकतोस, तें ऐकणेंच वक्तृत्वाला साह्य करतें." इतकें आधीं सांगून मग श्रीहरींनीं भाषणास सुरवात केली. २३८

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतो मामुपासते ।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥१५॥

[ ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतः] तरि ज्ञानयज्ञ तो एवंरूप । जेथ आदि संकल्प हा यूप[1] । महाभूतें मंडप । भेदें[2] तो पशू ॥ ३९ ॥ मग पांचांचे जे विशेष गुण । अथवा इंद्रियें आणि प्राण । हेचि यज्ञोपचार[3]भरण । अज्ञान घृत ॥ २४० ॥ तेथ मनबुद्धी[4]चिया कुंडा । आंत ज्ञानाग्नि धेडफुडा[5] । साम्यतेचि सुहाडा[6] । वेदिका जाणें ॥ ४१ ॥ सविवेकमतीपाटव[8] । तेचि मंत्र विद्यागौरव[9] । शांति स्रुक्स्रुव[10] । जीव यज्वा[11] ॥ ४२ ॥ तो प्रतीतीचेनि पात्रें । विवेकमहामंत्रें । ज्ञानाग्निहोत्रें । भेद नाशी ॥ ४३ ॥ तेथ अज्ञान सरोनि जाये । आणि यजिता यजन हें ठाये । आत्मसमरसीं[12] न्हाये । अवभृथीं[13] जेव्हां ॥ ४४ ॥ [ एकत्वेन ] जेव्हां भूतें विषय[14] करणें[15] । हें वेगळालें कांहीं न ह्मणे । आघवें एकचि ऐसें जाणें । आत्मबुद्धि ॥ ४५ ॥ जैसा चेइला[16] तो अर्जुना । ह्मणे स्वप्नींची हे विचित्र सेना । मीचि जाहालों होतों ना । निद्रावशें ॥ ४६ ॥ आतां सेना ते सेना नव्हे । हें मीच एक आघवें । ऐसें एकत्वें मानवे । विश्व तया ॥ ४७ ॥ मग तो जीव हे भांष[17] सरे । आब्रह्म[18] परमात्मबोधें भरे । ऐसें भजती ज्ञानाध्वरें[19] । एकत्वें येणें ॥ ४८ ॥ [ पृथक्त्वेन ] अथवा अनादि हें अनेक । जें आनासारिखें[20] एका एक । आणि नामरूपादिक । तेंही विषम ॥ ४९ ॥ ह्मणोनि विश्व भिन्न भिन्न । परि न भेदे तयाचें ज्ञान । जैसे अवयव

---

१ यज्ञस्तंभ. २ जीवेश्वर यांची भिन्नता. ३ यज्ञाचें साहित्य. ४ मन व बुद्धि यांच्या कुंडांत. ५ खरा, प्रदीप्त. ६ बळकट. ७ ओटा. ८ विचाररूप बुद्धीची कुशलता. ९ विद्यागौरव स्रुक् व शांति स्रुवा. १० हवनपात्रें. ११ यज्ञ करणारा. १२ आत्मानंदरसांत. १३ यज्ञाचें शेवटचें स्नान. १४ शब्द, स्पर्श आदिकरून. १५ इंद्रियें. १६ जागृत झालेला. १७ भास, बोलणें. १८ ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत. १९ ज्ञानयज्ञानें. २० एकाला एक निराळें.

तरी आन आन । परि एकेंचि देहींचे ॥ २५० ॥ कां शाखा ज्ञानिया थोरा । परि आहाति एकाचि तरुवरा । बहु रश्मि ारि दिनकरा । एकाचे जेविं ॥ ५१ ॥ तेविं नानाविधा यक्ती । आनानें नामें आनानी वृत्ती । ऐसें जाणती भेदलां ूर्तीं । अभेदा मातें ॥ ५२ ॥ येणें वेगळालेपणें पांडवा । करिती ज्ञानयज्ञ बरवा । जे न भेदती जाणिवा । जाणते ह्म- ाउनि ॥ ५३ ॥ [ बहुधा ] ना तरी जेधवां जियेठायीं । ःखती कां जें जें कांहीं । तें मीवांचूनि नाहीं । ऐसाचि बोध । ५४ ॥ पाहें पां बुडबुडा जेउता जाये । तेउतें जळ तया ्क आहे । मग विरे राहे । तऱ्ही जळाचिमाजी ॥ ५५ ॥ ां पवनें परमाणु उचलले । ते पृथ्वीपणावेगळे नाहीं गेले । ाणि माघौते जरी पडले । तरी पृथ्वीचि वरुते ॥ ५६ ॥ ्सें भलतेथ भलतेणें भावें । भलतेंही हो अथवा नोहावें । रि तें मी ऐसें आघवें । होऊनि ठेलें ॥ ५७ ॥ अगा हे ाव्हडी माझी व्याप्ती । तेव्हडीचि तयांची प्रतीती । तैसे हुधाकारीं वर्तती । मीचि होउनी ॥ ५८ ॥ [ विश्वतोमुखं ] भानुबिंब आवडे तया । संमुख जैसें धनंजया । तैसे ते ्श्वा इया । समोर सदां ॥ ५९ ॥ अगा तयांचिया ज्ञाना । ाटी पोट नाहीं अर्जुना । वायु जैसा गगना । सर्वांगीं असे २६० ॥ [ मामुपासते ] तैसा मी जेतुला आघवा । तेंचि के तयांचिया सद्भावा । तरी न करितां पांडवा । भजन जाहालें ६१ ॥ येऱ्हवीं तरी सकळ मीच आहें । तरी कवणीं कें उपासिला ाहें । एथ एके जाणणेवीण ठाये । अप्राप्तीसि ॥ ६२ ॥ परि तें ्सो येणें उचितें । ज्ञानयज्ञें यजितसांते । उपासिती मातें । सांगितले ॥ ६३ ॥ अखंड सकळ हें सकळां मुखीं । स- ज अर्पत असे मज एकीं । कीं नेणणे यासाठीं मूर्खीं । न प- ाजेचि मातें ॥ ६४ ॥

"तर आतां ज्ञानयज्ञ तो असा. त्यांत मूळ ंकल्प हा यज्ञस्तंभ; महाभूतें हा मंडप; ाणि–जीवेश्वर–भेद तो पशू. २३९ आणि ंचांचे जे विशेष गुण, अथवा इंद्रियें आणि ाण; हेंच यज्ञाचें साहित्य; आणि ज्ञान हें त होय. २४० मनाच्या आणि बुद्धीच्या कुं- ांत धडाडलेला ज्ञानाग्नि; आणि साम्य हीच ळकट वेदिका असें समज. २४१ विवेक बु- ्धीची कुशलता हे मंत्र; विद्यागौरव स्रुक्, शांति स्रुवा, व जीव हा यज्ञ करणारा. २४२ तो अनुभवाच्या पात्राच्या द्वारें, विचाररूप महामंत्रानें, ज्ञानाग्नीच्या ज्वालेमध्यें भेदाचा होम करतो. २४३ तेव्हां अज्ञान संपून जातें; आणि मग यज्ञ व यज्ञ करणारा हें उरत नाहीं. आणि तो ज्ञानानंदरसांत जेव्हां अवभृथस्नान करतो, २४४ तेव्हां भूतें, विषय, इंद्रियें हीं कांहीं वेगळीं असें ह्मणतच नाहीं. तो आत्मबुद्धीनें सारीं एकच आहेत असें समजतो. २४५ अर्जुना! जागा झालेला मनुष्य ह्मणतो कीं 'स्वप्नांत पाहिलेली विलक्षण सेना, निद्रावश झाल्यामुळें मीच बनलों होतों ना? २४६ आतां ती सेना कांहीं खरोखर सेना नव्हे. ती आणि मी सारीं एकच आहों.' तसें त्यांना ऐक्यभावानें विश्व वाटूं लागतें. २४७ मग 'तो जीव' हें बोलणें खुंटून, ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत सारें परमात्मस्वरूपच दिसूं लागतें. अशा एकरूपतेनें कोणी कोणी ज्ञानयज्ञेंकरून मला भजतात. २४८ अथवा एकाहून एक भिन्न भिन्न, आणि नामरूप आदिकरूनही निरनिराळें हें सारें असेंच वेगवेगळें असून अनादि आहे. २४९ ह्मणून विश्व हेंही भिन्न भिन्नच आहे, असेंही कोणी कोणी मानतात. तथापि त्यांच्या ज्ञानांत भेद नसतो. अवयव हे सारे वेगवेगळे असतात, तरी ते एकाच देहाचे. २५० किंवा लहानमोठ्या शाखा असल्या, तरी त्या एकाच झाडाच्या. किरण पुष्कळ आहेत, पण ते जसे एकाच सूर्याचे, २५१ त्याप्रमाणें मला अभेदाला निरनिराळ्या व्यक्ति, निरनिराळीं नामें, निरनिराळे स्वभाव, येणेंकरून भूतांच्या ठायीं वेगळा वेगळा झाला आहे असें समजतात. २५२ अर्जुना! अशा वेगळेपणानें ज्ञानयज्ञ यथासांग करतात. कारण, ते ज्ञानी असल्यामुळें, ज्ञानाचा भेद करीत नाहींत. २५३ बाकी, जेव्हां जेव्हां, ज्या ज्या ठिकाणीं, जें जें कांहीं ते पहातात, तें तें माझ्याशिवाय नाहीं, असाच त्यांचा समज असतो. २५४ आणखी असें पहा! बुडबुडा जिकडे जिकडे

१ किरण. २ अनेक. ३ भिन्न भूतांमध्यें. ४ ज्ञानाला. ५ जिकडे. ६ वाऱ्यानें. ७ बारीक कण. ८ मागुतें, पुनः. ९ पाहिजे तेथें. १० न व्हावें. ११ समोर. १२ जितका. १३ प्रमाण, तोल. १४ कोठें. १५ पूर्ण ज्ञानाशिवाय. १६ त्या. १७ यज्ञ करीत असतां.

जातो, तिकडे तिकडे त्याला पाणी एकच असतें. ह्मणून तो विरला, किंवा राहिला, तरी जळांतल्या जळांतच. २५५ किंवा वाऱ्यानें धूळ उडाली, तरी तिच्यांतील पृथ्वीचा अंश कांहीं नाहींसा होत नाहीं. आणि पुन्हा ती पडली, तरी पडावयाची पृथ्वीवरच. २५६ त्याप्रमाणें पाहिजे तेथें, पाहिजे त्या भावनेनें, पाहिजे तें हो, अथवा न हो; तरी तें मीच असे ते होऊन रहातात. २५७ अरे! माझी जेवढी व्याप्ती आहे, तितकाच त्यांचा अनुभव असल्यामुळें, तेही तसेच निरनिराळ्या आकारांत मीच होऊन वागतात. २५८ अर्जुना! हें सूर्याचें बिंब, पाहिजे त्याला जसें समोर असतें, तसें ते सदासर्वकाल ह्या विश्वाला समोर असतात. २५९ बा अर्जुना! त्यांच्या ज्ञानाला पाठही नाहीं, आणि पोटही नाहीं. गगनाच्या सर्व ठिकाणीं जसा वायु असतो, २६० तसा मी जितका संपूर्ण, तितका त्यांच्या सद्भावाला उतरतो. ह्मणून अर्जुना! त्यांना, न करतांही माझें भजन घडतें. २६१ बाकी, जिकडे तिकडे मीच असल्यामुळें, माझी उपासना कोण व कोठें करीत नाहीं? परंतु एका ज्ञानाभावामुळें अप्राप्तीस कारण होतें. २६२ पण तें असो. यथोचित ज्ञानयज्ञ करीत करीत, जे कोणी माझी उपासना करतात, ते सांगितले. २६३ हें सारें निरंतर सर्वांच्या मुखानें माझ्या एकस्याच्या ठिकाणींच येऊन पोंचतें. पण मूर्ख आहेत त्यांना न समजल्यामुळें ते मला पावतच नाहींत." २६४

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाऽहमहमौषधम् ।
मंत्रोऽहमहमेवाऽज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥

[ अहं क्रतुः ] तोचि जाणवेचा जरी उदय होये । तरी मुदल वेद मीचि आहें । आणि तो विधानातें[१] जया विये । तो क्रतुही[२] मीचि ॥ ६५ ॥ [ अहं यज्ञः ] मग तया कर्मापासूनि बरवा । जो सांगोपांग आघवा । यज्ञ प्रकटे पांडवा । तोही मी गा ॥ ६६ ॥ [स्वधाहमहमौषधं] स्वाहा[३] मी स्वधा[४] । सोमादि[५] औषधी विविधा । [ मंत्रोऽहमहमेवाज्यं ] आज्य[६] मी समिधा । मंत्र मी हवि ॥ ६७ ॥ [ अहमग्निरहं हुतं ] होता[१] मी वहन कीजे । तेथ अग्नी तो स्वरूप माझें । आणि हुत[२] वस्तु जें जें । तेंही मीचि ॥ ६८ ॥

"तोच जर ज्ञानाचा उदय झाला, तर वेद ते मुळीं मीच, आणि तो जे जे विधि सांगतो, ते विधीही मीच. २६५ तेव्हां अर्जुना! त्या कर्मापासून जो सारा सांगोपांग उत्तम यज्ञ प्रगट होतो, तोही मीच. २६६ स्वाहा ( देवास हवि देण्याचा मंत्र ) मीच; स्वधा ( पितरांस हवि देण्याचा मंत्र) मीच; सोमवल्ली आदिकरून अनेक औषधी त्या मीं; तूप मी; समिधा मी; मंत्र मी; व हवीही मीच. २६७ होता होऊन हवन करणारा मी; तेथें अग्नि प्रदीप्त होतो, तें स्वरूप माझें; आणि होमद्रव्याच्या ज्या ज्या वस्तु, त्याही साऱ्या मीच." २६८

पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः ।
वेद्यं पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च ॥ १७ ॥

[ पिताहमस्य जगतः ] पैं जयाचेनि अंगसंगें । इये प्रकृतीस्तव अष्टांगे । जन्म पाविजत असे जगें । तो पिता मी गा ॥ ६९ ॥ [ माता ] अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । तेविं मी चराचरीं । माता ही होय ॥ ७० ॥ [ धाता ] आणि जाहालें जग जेथ राहे । जेणें जीवित वाढत आहे । तें मीवांचूनि नोहे । आन[३] निरुतें ॥ ७१ ॥ [ पितामहः ] इयें प्रकृतिपुरुषें दोन्हीं । उपजलीं जयाचिया अमनंमनीं[४] । तो पितामह त्रिभुवनीं । विश्वाचा मी ॥ ७२ ॥ [वेद्यं] आणि आघवेया[५] जाणणेयाचिया वाटा । जया गांवा येती गा सुभटा । वेदांचिया चोहटां[८] । वेद्य[९] जें ह्मणिजे ॥ ७३ ॥ [ पवित्रं ] जेथ नानामतां बुझावणी[१०] आली । एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली । चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं । जें पवित्र ह्मणिजे ॥ ७४ ॥ [ ओंकारः ] पैं ब्रह्मबीजा जाहाला अंकुर । घोषध्वनीनादाकार[११] । तयाचें गा भवन[१२] जो ओंकार । तोही मी गा ॥ ७५ ॥ जया ओंकाराचिये कुशीं । अक्षरें होती अउमकारेंसीं[१३] । जियें उपजत वेदेंसीं । उठलीं तीन्हीं ॥ ७६ ॥ [ ऋक्सामयजुरेव च ] ह्मणोनि ऋग्यजुःसाम । हे तीन्ही ह्मणें मी आत्माराम । एवं मीचि कुळक्रम[१४] । शब्दब्रह्मांचा[१५] ॥ ७७ ॥

१ विधीला, कर्माला. २ यज्ञसुद्धां. ३ देवास हवि देण्याचा मंत्र. ४ पितरांस हवि देण्याचा मंत्र. ५ सोमवल्ली आदिकरून. ६ घृत.

१ होमद्रव्य. २ ऋत्विज. ३ होम करण्याच्या. ४ माझ्याशिवाय. ५ अन्य, दुसरें. ६ खरोखर. ७ अमनस्क मनस्संकल्पांत. ८ चव्हाटा. ९ जाणण्यास योग्य. १० समजूत, एकवाक्यता. ११ चतुर्विध वाचा. १२ मंदिर. १३ अकार, उकार, मकारासह. १४ वंशपरंपरा. १५ वेदाचा.

"तसेंच ह्या प्रकृतीला ज्याचा अंगसंग घड-ल्यामुळें, ब्रह्मांडें उत्पन्न होतात, तो पिता मीच. २६९ अर्धनारीनटेश्वराच्या मूर्तीत जो पुरुष तोच स्त्री होतो. त्याप्रमाणें चराचराच्या ठेकाणीं माता ही मीच होतों. २७० आणि उत्पन्न झालेलें जग जेथें राहतें, किंवा ज्याच्या योगानें त्याच्या आयुष्याची वृद्धि होते, तेंही बरोबर माझ्याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. २७१ मन नसतांही ज्याच्या मनःसंकल्पानें प्रकृति आणि पुरुष हीं दोन्हीं उत्पन्न झालीं, तो त्रिभुवनांतील विश्वांचा पितामह–ह्मणजे आजा–ही मीच. २७२ आणखी हे **वीरश्रेष्ठा!** ज्ञानाच्या सर्व वाटा ज्याच्या गांवाला येतात; वेदाच्या चव्हाट्यावर ज्याला जाणण्यास योग्य असें ह्मणतात, २७३ जेथें नानाप्रकारच्या मतांची समजूत एक होते; भिन्न भिन्न शास्त्रांचा परकेपणा नाहींसा होतो; चुकलेलीं ज्ञानें जेथें एकत्र होतात; ज्याला पवित्र असें ह्मणतात; २७४ तसेंच ब्रह्मबीजाला फुटणारा जो अंकुर; जो चतुर्विध वाचेच्या आकाराचें मंदिर; असा तो ओंकार तोही मीच. २७५ ज्या ओंकाराच्या पोटीं अकार, उकार, मकार, ह्यांसह अक्षरें उत्पन्न होतात. तीं तिन्हीं अक्षरें जन्मास येतांच वेदांस घेऊन बाहेर पडतात." २७६ ह्मणून आत्माराम ह्मणतात "ऋक्, यजु आणि साम हे तिन्ही वेद मी. व त्यांची अशा प्रकारें वंशपरंपराही मीच." २७७

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ।
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥

[गतिः] हें चराचर आघवें । जिये प्रकृतीआंत सांठवे । शिणली जेथ विसंबे । ते परम गती मी ॥ ७८ ॥ [भर्ता] आणि जयांचेनि प्रकृती जिये । जेणें अधिष्ठिली विश्व विये । जो येऊनि प्रकृती इये । गुणातें भोगी ॥ ७९ ॥ तो विश्वश्रियेचा भर्ता । मीचि गा एथ पंडुसुता । [प्रभुः] मी गोसावी समस्ता । त्रैलोक्याचा ॥ ८० ॥ आकाशें सर्वत्र वसावें । वायूनें नावभरी उगें नसावें । पावकें दाहावें । वर्षावें जळें ॥ ८१ ॥ पर्वतीं बैसका न संडावी । समुद्रीं रेखा नोलांडावी । पृथ्वीयां भूतें वाहावीं । हे आज्ञा माझी ॥ ८२ ॥ म्यां बोलविल्या वेद बोले । म्यां चालविल्या सूर्य चाले । म्यां हालविल्या प्राण हाले । जो जगातें चाळिता ॥ ८३ ॥ मियांचि नियमिलासांता । काल प्रासितसे भूतां । इयें ह्मणियेंागतें पांडुसुता । सकळें जयाचीं ॥ ८४ ॥ जो ऐसा समर्थ । तो मी जगाचा नाथ । [साक्षी] आणि गगनाऐसा साक्षिभूत । तोहि मीचि ॥ ८५ ॥ [निवासः] इहीं नामरूपीं आघवा । जो भरला असे पांडवा । आणि नामरूपांचाही वोल्हावा । आपणचि जो ॥ ८६ ॥ जैसे जळाचे कल्लोळ । आणि कल्लोळीं आथी जळ । ऐसेनि वसवीतसे सकळ । तो निवास मी ॥ ८७ ॥ [शरणं] जो मज होय अनन्यशरण । त्याचें निवारीं मी जन्ममरण । यालागीं शरणागता शरण । मीचि एक ॥ ८८ ॥ [सुहृत्] मीचि एक अनेकपणें । वेगळालेनि प्रकृतिगुणें । जीत जगाचेनि प्राणें । वर्तत असें ॥ ८९ ॥ जैसा समुद्र थिल्लरें न ह्मणतां । भलतेथ बिंबे सविता । तैसा ब्रह्मादि सर्वां भूतां । सुहृद तो मी ॥ २९० ॥ [प्रभवः प्रलयः] मीचि गा पांडवा । या त्रिभुवनासि वोल्हावा । सृष्टिक्षयप्रभवा । मूळ तें मी ॥ ९१ ॥ [बीजं] बीज शाखांतें प्रसवे । मग तें रूखपण बीजीं समावे । तैसें संकल्पें होय आघवें । पाठीं संकल्पीं मिळे ॥ ९२ ॥ ऐसें जगाचें बीज संकल्प । अव्यक्त वासनारूप । [स्थानं] तया कल्पांतीं जेथ निक्षेप । होय तें मी ॥ ९३ ॥ [अव्ययं] इयें नामरूपें लोटतीं । वर्णव्यक्ती आटती । जातीचे भेद फिटती । जैं आकार नाहीं ॥ ९४ ॥ [निधानं] तैं संकल्पवासनासंस्कार । मागौतें रचावया आकार । जेथ राहोनि असती अमर । तें निधान मी ॥ ९५ ॥

"ज्या प्रकृतीच्या आंत हें सर्व चराचर राहतें, ती श्रमली असतां, जेथें विश्रांति पावते, ती उत्तम गति मीच. २७८ आणि ज्याच्या योगानें प्रकृति उत्पन्न होते; आणि ज्यानें तिचा आश्रय केला असतां, विश्वाची उत्पत्ति होते; जो तिच्याशीं संलग्न होऊन तिच्या गुणांचा उपभोग घेतो, २७९ हे **अर्जुना!** तो

१ विश्रांति पावते. २ ती. ३ ज्याच्या योगेंकरून. योजना केलेली, आश्रय केलेली. ५ उत्पन्न करते. ६ ह्या. विश्वरूप लक्ष्मीचा पति. ८ धनी, स्वामी.

१ क्षणभरही. २ बैठक, आसन. ३ रेषा, मर्यादा. ४ पृथ्वीनें. ५ आज्ञा दिली ह्मणजे. ६ आज्ञाधारक. ७ जिव्हाळा. ८ असतें. ९ वसतिस्थान. १० आश्रयस्थान. ११ जिवंत. १२ डबकें, खातेरें. १३ आप्त. १४ उत्पत्ति, स्थिति व नाश ह्यांना. १५ राहतें. १६ लय पावतात. १७ पुन्हां, फिरून.

येथें विश्वरूप लक्ष्मीचा भर्ता मीच; साऱ्या त्रैलोक्याचा स्वामी मीच. २८० आकाशानें सर्व ठिकाणीं रहावें; वायूनें क्षणभरही स्थिर वसूं नये; अग्नीनें जाळावें; पाण्यानें वृष्टि करावी; २८१ पर्वतांनीं आपली बैठक सोडूं नये; समुद्रानें आपली मर्यादा भंगूं नये; पृथ्वीनें प्राणिमात्रांचा भार घ्यावा; ही आज्ञा माझी. २८२ मी बोलविलें तर वेद बोलतो; मी चालविलें, तर सूर्य चालतो; जगाला चालविणारा जो प्राण, तो मी हालवितों. २८३ मीच आज्ञा केल्याप्रमाणें, काळ हा भूतांस ग्रासतो. अर्जुना! हे सारे ज्याचे चाकर आहेत, २८४ असा सर्वसमर्थ जगाचा नाथ तो मी. आणि गगनासारखा साक्षीभूत तोही मीच. २८५ अर्जुना! ह्या एकूणएक नामरूपामध्यें जो सर्व भरून राहिलेला, व जो नामरूप उत्पन्न करणारा तोही मीच. २८६ ज्याप्रमाणें पाण्याच्या लाटा बनतात, आणि लाटांत पाणी असतें; तशाच रीतीनें सर्व वसविणारें वसतिस्थान तें मी. २८७ अशा मला जो अनन्यभावेंकरून शरण येतो, त्याचें जन्ममरण मी चुकवितों. ह्मणून शरणागत येणारांना मीच एक आश्रयस्थान आहें. २८८ प्रकृतीच्या गुणामुळें, सजीव प्राण्यांच्या रूपानें मीच एक अनेकत्वेंकरून वागत असतों. २८९ ज्याप्रमाणें 'हा समुद्र आहे; किंवा हें डबकें आहे' असें न ह्मणतां, पाहिजे तेथें सूर्य प्रतिबिंबित होतो, त्याप्रमाणें ब्रह्मदेव आदिकरून सर्व प्राणिमात्रांना सुहृद् तो मी. २९० बा अर्जुना! ह्या त्रिभुवनाच्या उत्पत्ति, स्थिति आणि लय ह्यांना मूळ मीच. २९१ बीजापासून शाखा वगैरे उत्पन्न होतात, नंतर तो सर्व झाडांचा आकार पुन्हां बीजांत राहतो; त्याप्रमाणें संकल्पानें सर्व होतें, आणि पुन्हां संकल्पास मिळतें, २९२ असें जें जगाचें अव्यक्त वासनारूप संकल्पबीज, तें कल्पांतांमध्यें जेथें राहतें, तो मी. २९३ आकार नाहींसा झाला ह्मणजे हीं नामरूपें नाश पावतात; वर्णव्यक्तींचा लय होतो; आणि जातिभेदही मोडून जातात. २९४ त्या वेळीं पुन्हां आकाराची रचना करण्यासाठीं, संकल्पवासनासंस्कार जेथें अमर होऊन राहिलेले असतात, तें निजधाम मी." २९५.

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥

[ तपाम्यहं ] मी सूर्याचेनि वेषें । तपें [ निगृह्णामि ] तैं हें शोषे । [ अहं वर्षं ] पाठीं इंद्र[1] होउनि वर्षें । [ उत्सृजामि च ] तैं पुडती भरे ॥ ९६ ॥ [ मृत्युश्च ] अग्नि काष्ठें खाये । तें काष्ठचि अग्नि होये । तैसें मरतें मारितें पाहें । स्वरूप माझें ॥ ९७ ॥ यालागीं मृत्यूच्या भागीं जें जें । तें तेंही पैं रूप माझें । [ अमृतं चैव ] आणि न मरतें तंव सहजें । मीचि आहें ॥ ९८ ॥ [ सदसच्चाहमर्जुन ] आतां बहु बोलोनि सांगावें । तें एकेहेळां[2] घे पां आघवें । तरी सतोसतही[3] जाणावें । मीचि पैं गा ॥ ९९ ॥ ह्मणोनि अर्जुना मी नसें । ऐसा कवण ठाव असे । परि प्राणियाचें दैव कैसें । जे न देखती मातें ॥ ३०० ॥ तरंग पाणियेवीण सुकती । रश्मि वातीवीण न देखती । तैसे मीचि ते मी नोहती । विस्मो देखें ॥ १ ॥ हें आंतबाहेर मियां कोंदलें । जग निखिल माझेंचि वोतिलें । कीं कैसें कर्म तयां आड आलें । जे मीचि नाहीं ह्मणती ॥ २ ॥ परि अमृत कुहा[6] पडिजे । कां आपणपयांतें कडिये काढिजे । ऐसें अर्थीं काय कीजे । अप्राप्तासी ॥ ३ ॥ ग्रासा एका अन्नासाठीं । अंध धांवताहे किरीटी । आडळला चिंतामणि पायें लोटी । आंधळेपणें ॥ ४ ॥ तैसें ज्ञान जें सांडूनि जाये । तैं ऐसी हे दशा आहे । ह्मणोनि कीजे तें केलें नोहे । ज्ञानेंविण ॥ ५ ॥ आंधळेया गरुडाचे पांख[9] आहाती । ते कवणा उपेगां[10] जाती । तैसे सत्कर्मांचे उपखे[11] ठाती । ज्ञानेंविण ॥ ६ ॥

"मी सूर्याच्या रूपानें तापलों, ह्मणजे हें आटून जातें. आणि पुन्हां इंद्र होऊन वृष्टि केली, ह्मणजे पुन्हा भरतें. २९६ अग्नि काष्ठें भक्षण करतो, पण तें काष्ठच अग्नि होतें. त्याप्रमाणें मरतें आणि मारतें स्वरूपही माझेंच.

१ मेघ. (ह्या शब्दाच्या अर्थावरून वैदिक कालांतील देवतांचीं नांवें सारीं अलंकारिक असावींत असें अनुमान होतें, व त्याच अलंकाराच्या अनभिज्ञत्वामुळें अर्थाचे अनर्थ होतात.) २ एकदांच. ३ असणारे व नसणारे. ४ नाहीं असे होतात. ५ विस्मय, आश्चर्य. ६ विहिरींत. ७ समजणाराला. ८ हतभाग्याला. ९ पंख. १० उपयोगाला. ११ श्रम व्यर्थ होतात.

२९७ ह्मणून मृत्यूच्या वांट्याचें जेवढें जेवढें ह्मणून आहे, तेवढें तेवढें माझेंच स्वरूप. आणि न मरणारें तें मी हें उघडच आहे. २९८ बाबा! आतां फार बोलून सांगावयाचें तें एकदमच सारें ऐकून घे. तर असणारें व नसणारें दोन्हीही मीच ह्मणून समज ह्मणजे झालें. २९९ मग अर्जुना! मी नाहीं अशी जागा कोणती राहिली? पण प्राण्यांचें प्रारब्ध कसें आहे तें पहा! कीं ते मला पहात सुद्धां नाहींत. ३०० पाण्यावांचून लाटा सुकतात; दिव्यावांचून किरण दृष्टीस पडत नाहींत, त्याप्रमाणें ते मीच असून मी नाहीं असे होतात. हें केवढें आश्चर्य आहे पहा! ३०१ त्यांच्या आंतून बाहेरून मीच भरलेलों आहें; सारें जग माझेंच ओतलेलें आहे; असें असतां त्यांचें कर्म त्यांनांच कसें आडवें येतें तें पहा! कारण, मी मुळीं नाहींच असें ह्मणतात. ३०२ परंतु अमृताच्या विहिरींत पडलें, तर आपणच निघून कडेस यावें, असें समजणाऱ्या अभाग्याला काय करावयाचें आहे? ३०३ अर्जुना! अन्नाच्या एका घांसासाठीं आंधळा धांवत असतो, आणि पायाला अडखळलेला चिंतामणी, न दिसल्यामुळें पायानेंच लोटून देतो. ३०४ त्याप्रमाणें ज्ञान सांडून गेलें ह्मणजे ही अशीच दशा असावयाची. ह्मणून ज्ञानाशिवाय जें जें करावें, तें तें न केल्याप्रमाणें होतें. ३०५ आंधळ्या गरुडाला पंख आहेत, तर ते कोणाच्या उपयोगीं पडणार? तद्वत् ज्ञानावांचून सत्कर्माचा खटाटोप व्यर्थ होय." ३०६

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते ।
ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोक-
मश्नंति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ २० ॥

[ त्रैविद्याः ] देख पां गा किरीटी । आश्रमधर्मांचिया राहाटी[1] । विधिमार्गा कसवटी[2] । जे आपणचि होती ॥ ७ ॥ यजन करितां कौतुकें । तिहीं[3] वेदांचा माथा तुके[4] । क्रिया फळेंसि उभी ठाके । पुढां जयां ॥ ८ ॥ [ सोमपाः ] ऐसे दीक्षित जे सोमपें[1] । जे आपणचि यज्ञाचें स्वरूप । [पूतपापाः] तिहीं तया पुण्याचेनि नांवें पाप । जोडिलें देखें ॥ ९ ॥ [ यज्ञैरिष्ट्वा ] जे श्रुतित्रयातें[2] जाणोनि । शतेंवरी[3] यज्ञ करूनि । [ मां ] यजिलिया मातें चुकोनि । [ स्वर्गतिं प्रार्थयंते ] स्वर्गा वरिती ॥ ३१० ॥ जैसें कल्पतरुतळवटीं । बैसोनि झोळिये देतसे गांठीं । मग निदैवें[4] निघे किरीटी । दैन्येंचि[5] करूं ॥ ११ ॥ तैसे शतक्रतु[6] यजिलें मातें । कीं ईप्सिताति[7] स्वर्गसुखातें । आतां पुण्य कीं हें निरुतें[8] । पाप नोहे ॥ १२ ॥ ह्मणोनि मजवीण पाविजे स्वर्ग । तो अज्ञानाचा पुण्यमार्ग । ज्ञानियें[9] तयातें उपसर्ग[10] । हानि ह्मणती ॥ १३ ॥ येऱ्हवीं तरी नरकींचें दुःख । पावोनि स्वर्गा नाम कीं सुख । वांचूनि[11] नित्यानंद गा निर्दोष । तें स्वरूप माझें ॥ १४ ॥ मज येतां पैं सुभटा । या द्विविधा गा अंव्हांटा[12] । स्वर्ग नरक या वाटा । चोरांचिया ॥ १५ ॥ स्वर्गा पुण्यात्मकें[13] पापें येइजे । पापात्मकें पापें नरका जाइजे । मग मातें जेणें पाविजे । तें शुद्ध पुण्य ॥ १६ ॥ आणि मजचिमाजी असतां । जेणें मी दुऱ्हावें[14] पांडुसुता । तें पुण्य ऐसें ह्मणतां । जीभ न तुटे काई ॥ १७ ॥ [ते] परि हें असो आतां प्रस्तुत । ऐकें यापरि ते दीक्षित[15] । यजूनि[16] मातें याचित[17] । स्वर्गभोग ॥ १८ ॥ [ पुण्यमासाद्य ] मग मी न पविजे ऐसें । जें पापरूप पुण्य असे । तेणें लाधलेनि[18] सौरसें[19] । स्वर्गा येती ॥ १९ ॥ [ सुरेंद्रलोकं ] जेथ अमरत्व हें सिंहासन । ऐरावतासारिखें वाहन । राजधानी भुवन । अमरावती ॥ ३२० ॥ [ दिव्यान्दिवि देवभोगान् ] जेथ महासिद्धींचीं भांडारें । अमृताचीं कोठारें । जिये गांवीं खिल्लारें । कामधेनूंचीं ॥ २१ ॥ जेथ वोळगे[20] देव पाइकों[21] । सैंघ[22] चिंतामणीचिया भूमिका । विनोदैवनवाटिका[23] । सुरतरूंचिया[24] ॥ २२ ॥ गंधर्व गात गाणीं । जेथ रंभेऐशिया[25] नाचणी[26] । उर्वशीमुख्य विलासिनी । अंतौ-

१ रीतीप्रमाणें. २ कसोटी लावण्याची शिळा. ३ तिन्ही. ४ डोलतो.

१ सोमपान करणारे. (यज्ञामध्यें सोमवल्लीचा रस पिणें हें मुख्य कर्तव्य असलेलें प्रसिद्धच आहे.) २ तिन्ही वेदांना. ३ शंभरांपर्यंत. ४ हतभागी. ५ भीक मागावयाला. ६ शंभर यज्ञ. ७ इच्छा करतात. ८ निश्चयेंकरून. ९ ज्ञानी. १० उपद्रव, नाश. ११ ह्याशिवाय. १२ आडवाटा. १३ पुण्याशीं संमिश्र असलेलें. (ह्याला अशुद्ध धातूची उपमा चांगली शोभते). १४ अंतरतो, दूर होतो. १५ यज्ञ करणाऱ्याला 'दीक्षित' अशी संज्ञा प्राप्त होते. ज्यांचें ज्यांचें उपनाम हल्लीं 'दीक्षित' असें ऐकण्यांत येतें, त्यांनीं त्यांनीं किंवा त्यांच्या पूर्वजांपैकीं कोणी तरी यज्ञ केलेला होता असें समजावें. १६ याजन करून. १७ मागतात. १८ प्राप्त झालेल्या. १९ गोडीनें, हौशीनें. २० प्राप्त होते. २१ सेवेला. २२ सर्वत्र. २३ ऐपआरामाचीं उपवनें. २४ कल्पतरूंच्या. २५ रंभेसारख्या. २६ नृत्यांगना.

रियों[1] ॥ २३ ॥ मदन वोळगे[2] शेजारें[3] । जेथ चंद्र शिंपे सांवरें[4] । पवनाऐसें झणियारें[5] । धांवणें जेथ ॥ २४ ॥ पैं वृहस्पती मुख्य आपण । ऐसे स्वस्तीश्रियेचें[6] ब्राह्मण । भाटिवेचे[7] सुरगण । बहुवस जेथें ॥ २५ ॥ लोकपाळ रांगेचे[8] । राउते[9] जिये पदवीचे । उच्चैःश्रवा[10] खांचे[11] । खोसणिये[12] ॥ २६ ॥ हें असो बहु ऐसें । भोग इंद्रसुखासरिसे[13] । [अश्नंति] ते भोगीजती जंव असे । पुण्यलेश ॥ २७ ॥

"आणखी **अर्जुना** असें पहा! आश्रमधर्मांच्या रीतीप्रमाणें, आपणच विधिमार्गाची कसोटी बनून, ३०७ कौतुकानें यज्ञ केला, तर वेदांचें मस्तक डुलतें–अर्थात् ते प्रसन्न होतात. आणि तें कर्म, फळासह्वर्तमान त्यांच्या पुढें उभें राहतें. ३०८ असें सोमपान करणारे जे दीक्षित; जे स्वतः यज्ञाचें स्वरूप; त्यांनीं तें पुण्याच्या नांवानें पापच जोडलें असें समज. ३०९ कारण, तिन्ही वेदांना समजून घेऊन, शंभरांपर्यंत यज्ञ करून, माझ्या प्रीत्यर्थ विधि करून मला टाकून स्वर्ग मिळवितात. ३१० अर्जुना! ज्याप्रमाणें कल्पतरूच्या खालीं बसून झोळीला गांठी देतो आणि मग तो भद्रकपाळीं भिक्षाच मागावयाला निघतो, ३११ त्याप्रमाणें शंभर यज्ञांनीं माझें यजन करतात; आणि स्वर्गसुखाची इच्छा करितात. तेव्हां तें खरोखर पुण्य का? पाप नव्हे? ३१२ असें माझ्या वांचून स्वर्ग मिळविणें, हा अज्ञान्यांचा पुण्यमार्ग. त्याला ज्ञाते, हानि करणारा उपसर्ग असें म्हणतात. ३१३ आणखी, माझें नित्यानंद व निर्दोष अशा स्वरूपाशिवाय, स्वर्ग मिळून तरी सुखाचें नांव कसलें? नरकाचें दुःख मात्र. ३१४ हे **वीरश्रेष्ठा!** माझ्याकडे यावयाला स्वर्ग व नरक असे दोन प्रकारचे आडरस्ते आहेत. त्या चोरांच्या वाटा. ३१५ स्वर्गाला जावयाचें तें पुण्यात्मक पापानें जावयाचें आणि पापात्मक पापानें नरकाला जावयाचें. पण माझ्याकडे यावयाचें जें पुण्य तें मात्र शुद्ध होय. ३१६ आणखी **अर्जुना!** माझ्यामध्यें असून तो मीच ज्यानें अंतरतो, तें पुण्य असें म्हणतांना जीभ झडणार नाहीं काय? ३१७ पण प्रस्तुतकालीं तें राहूं दे. अशा प्रकारें ते दीक्षित माझ्या प्रीत्यर्थ यज्ञ करून स्वर्गाचे भोग मागतात. ३१८ आणि माझी ज्यानें प्राप्ती व्हावयाची नाहीं, असें जें पापात्मक पुण्य असतें, त्याच्या लाभानें स्वर्गाला येतात. ३१९ तेथें काय विचारावें? अमरत्व हेंच सिंहासन; **ऐरावता**सारखें वाहन; अमरावती नगर ही तेथली राजधानी; ३२० जेथें महासिद्धींचीं भांडारें; अमृताचे तलाव; आणि ज्या गांवांत कामधेनूंचीं खिल्लारें; ३२१ देव हे जेथें सेवक मिळतात; जिकडे तिकडे चिंतामणींची जमीन; कल्पतरूंचीं उपवनें; ३२२ गंधर्व जेथें गायन करित असतात; रंभेसारख्या जेथें नृत्य करीत असतात; तेथें स्त्रिया तर असंख्य; आणि त्यांत उर्वशी प्रमुख. ३२३ मदन जेथें पलंगावर येऊन निजतो; चंद्र सडा घालीत असतो; वायूसारखे चाकर पुढें धांवत असतात. ३२४ बृहस्पति ज्यांत मुख्य आहे, असे कल्याणदायक आशीर्वाद देणारे ब्राह्मण; स्तुतिपाठ करणारे देव तर काय असंख्यात. ३२५ ज्या ठिकाणचे स्वार केवळ राजाच्या पंक्तीस बसणारे; उच्चैःश्रव्यासारखा घोडा ज्यांच्या विनीला. ३२६ असो. अशा प्रकारचे इंद्रसुखासारखे भोग, जावत्कालपर्यंत त्यांचा पुण्यांश असतो, तावत्कालपर्यंत भोगतात." ३२७

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ।
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना
गतागतं कामकामा लभंते ॥ २१ ॥

[ते तमिति] मग तया पुण्याची पाउटी सरे । सवेंचि इंद्रपणाची उटी[1] उतरे । आणि येऊं लागती मागारें । मृत्यु-

१ स्त्रिया. २ निद्रिस्त होता. ३ पलंगावर. ४ जलवर्षाव, सडा. ५ चाकर. ६ क्षेम इच्छिणारे. ७ स्तोत्र पाठ करणारे. ८ मालिकेंतील. ९ सरदार, मानकरी. १० समुद्रमंथनसमयीं चवदा रत्नांत निघालेला, अश्वविशेष. ११ चालतो. १२ पुढें, जिलबीला. १३ सारखे.

१ तेज, पुण्याई.

ोका ॥ २८ ॥ जैसा वेश्याभोगीं कवडा वेचे । मग दारही ेपूं नये तियेचें । तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें । काय सांगों । २९ ॥ [ कामकामा लभंते ] एवं तिथिंया मातें चुकले । जेहीं पुण्यें स्वर्ग कामिले । [ गतागतं ] तयां अमरपण तें ावो जालें । अंतीं मृत्युलोक ॥ ३० ॥ मातेचिया उदरकुरीं । पचूनि विष्ठेच्या दार्थरीं । उकडूनि नवमासवरी । जमजन्मोनि मरती ॥ ३१ ॥ अगा स्वप्नीं निधानें फावे । परि ाइलिया हारपे आघवें । तैसें स्वर्गसुख जाणावें । वेदज्ञांचें ॥ ३२ ॥ [ अनुप्रपन्नाः ] अर्जुना वेदविद जऱ्ही जाहला । रि मातें नेणतां वायां गेला । कण सांडूनि उपणिलीं । कोंडा ासा ॥ ३३ ॥ [ एवं त्रयीधर्मं ] ह्मणऊनि मज एकेंविण । त्रयीधर्म अकारण । आतां मातें जाणोनि कांहीं नेण । तूं ुखिया होसी ॥ ३४ ॥

**“नंतर त्या पुण्याची पायरी संपली कीं, द्रपणाचा रंग उतरतो, आणि ते परत मृत्युोकांस येऊं लागतात. ३२८ ज्याप्रमाणें वेयेच्या भोगामध्यें कवडीन् कवडी खर्च ाली ह्मणजे मग तिच्या दाराला बोट सुद्धां ावतां येत नाहीं, त्याप्रमाणें दीक्षितांची जी जिती होते, ती काय सांगावी? ३२९ अशा कारें जे पुण्याईनें स्वर्गाची इच्छा करतात, मला सदासर्वदां असणाराला मुकतात; ांचें तें अमरत्व व्यर्थ होतें, आणि अखेर मृत्युलोकावरच येतात. ३३० आणि नऊ महिनेयंत मातेच्या उदरगुहेंत शिजून, विष्ठेच्या काड्यांत उकडून जन्मजन्म जन्मतात, व रमर मरतात. ३३१ बाबा! स्वप्नामध्यें ठेवा ांपडावा आणि जागे झालें ह्मणजे तो सारा ाहींसा व्हावा, त्याप्रमाणें हें वेदवेत्त्यांचें वर्गसुख आहे असें समज. ३३२ अर्जुना! ोठा वेदवेत्ता असून मला जर जाणत नाहीं, र तो धान्यावांचून कोंडा उपणल्याप्रमाणें व्यर्थ गेला ह्मणून समजावें. ३३३ माझ्या एकाशिवाय, हे तिन्ही वेदांचे धर्म निष्कारण होत. ह्याकरितां आतां तूं मला ओळख; अन्य कांहीं मनांत आणूं नको. ह्मणजे सुखी होशील.” ३३४**

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥२२॥

[ अनन्याश्चिंतयंतो मां ] पैं सर्वभावेंसीं उखितें । जे वोपिले मज चित्तें । जैसा गर्भगोळ उद्यमातें । कोण्याही नेणे ॥ ३५ ॥ तैसा मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटेंचि नाहीं । मजचि नांम पाहीं । जिणेया ठेविलें ॥ ३६ ॥ ऐसे अनन्यगतिकें चित्तें । चिंतितसाते मातें । [ ये जनाः पर्युपासते ] जे उपासिती तयांतें । मीचि सेवीं ॥ ३७ ॥ [ तेषां नित्याभियुक्तानां ] ते एकवटूनि जिये क्षणीं । अनुसरले गा माझिये वाहेणीं । तेव्हांचि तयांचि चिंतवणी । मजचि पडली ॥ ३८ ॥ [ योगक्षेमं वहाम्यहं ] मग तिहीं जें जें करावें । तें मजचि पडिलें आघवें । जैसी अजातपक्षाचेनि जीवें । पक्षिणी जिये ॥ ३९ ॥ आपुली ताहान भूक नेणे । तान्हया निकें तें माउलीसचि करणें । तैसे अनुसरले मज प्राणें । तयांचें सर्व मी करीं ॥ ४० ॥ तयां माझिया सायुज्याची चाड । तरि तेंचि पुरवीं कोड । कां सेवा ह्मणती तरी आड । प्रेम सुयें ॥ ४१ ॥ ऐसा मनीं जो जो धरिती भावो । तो पुढां पुढां लागें तयां देवों । आणि दिधलियाचा निर्वाहो । तोही मीचि करीं ॥ ४२ ॥ हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि पडिला पांडवा । जयांचिया सर्व भावा । आश्रय मी ॥ ४३ ॥

**“तसेंच जे सर्व उक्त भावानें मनेंकरून मलाच वाहिलेले; गर्भाचा गोळा जसा कोणताही उद्योग जाणत नाहीं, ३३५ त्याप्रमाणें माझ्याशिवाय दुसरें चांगलें ह्मणून कांहीं वाटतच नाहीं; माझ्याकरितांच ज्यांनीं जीव ठेवलेला; ३३६ अशा अनन्यगतिक चित्तानें जे माझें चिंतन करीत करीत माझी उपासना करतात, त्यांची मीच सेवा करतों. ३३७ ते ऐक्यरूप**

१ द्रव्य, कवडीन् कवडी. २ बोटही लावतां येत नाहीं. यज्ञ करणारांचें. ४ सर्वदां असणाराला. ५ इच्छा केली. व्यर्थ झालें, फुकट गेलें. ७ उदररूप गुहेमध्यें. ८ उकाांत. ९ ठेवा. १० प्राप्त झाला. ११ जागृत झाल्यावर. २ वेदवेत्त्याचें. १३ उपणला, पाखडला. १४ वेदत्रयाचे र्म. १५ दुसरें कोणतेंही मनांत आणूं नको.

१ उक्त, उचित. २ वाहिलेले. ३ चांगलें. ४ माझ्याकरितांच. ५ जीव ठेवलेला. ६ एकनिष्ठ. ७ चिंतन करित असतां. ८ ऐक्यरूप होऊन. ९ मार्गाला. १० चिंता. ११ पंख न फुटलेल्या, पिलांच्या. १२ इच्छा. १३ जवळ. १४ घालतों, देतों. १५ संरक्षण. १६ योग ह्मणजे अप्राप्ताची प्राप्ती; आणि क्षेम ह्मणजे संरक्षण.

होऊन माझ्या मार्गाला लागले, कीं त्याच वेळीं त्यांची चिंता मला पडलीच. ३३८ मग त्यांनीं जें जें करावयाचें, तें तें सारें मजवरच पडतें. ज्याप्रमाणें पंख न फुटलेल्या पिलांचे जीव पक्षीण वांचविते, ३३९ आपली तहानभूक त्याला समजत नाहीं तरी, लेंकराला जें बरें तें आईलाच करावें लागतें. त्याप्रमाणें जे कोणी जीवेंभावेंकरून मला अनुसरतात, त्यांचें सारें मीच करतों. ३४० त्याला माझ्या सायुज्याची–तद्रूपतेची–इच्छा असली, तर तेंच त्याचें कोड मी पुरवितों. किंवा सेवा करावयाची ह्मणतील तर, त्यांच्या जवळ प्रेम देतों. ३४१ याप्रमाणें ते मनामध्यें जी जी भावना धरतील ती ती, त्यांस सर्वांच्या आधीं द्यावी लागते. आणि दिलेल्याचें संरक्षणही मीच करतों. ३४२ **अर्जुना!** हा त्यांचा सारा योगक्षेम–योग–अप्राप्ताची प्राप्ति–क्षेम–प्राप्ताचें संरक्षण–चालविणें, मलाच भाग पडतें. कारण, त्यांच्या सर्व भावाला मीच आश्रयभूत असतों." ३४३

येप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः ।
तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥ २३ ॥

[ येप्यन्यदेवताभक्ता इति ] आतां आणीकही संप्रदायें । परि मातें नेणती समवायें[1] । जे[2] अग्निइंद्रसूर्यसोमाये । ह्मणऊनि यजिती[3] ॥ ४४ ॥ [ तेऽपीति ] तेही कीर[4] मातेंचि होये । कां जें हें आघवें मीचि आहें । परि ते भजेती[5] उजेरी[6] नव्हे । विषम[7] पडे ॥ ४५ ॥ पाहें पां शाखा पल्लव रुखाचे[8] । हे काय नव्हती एकाचि बीजाचे । परि पाणी घेणें मुळाचें । तें मुळींचि घापे[9] ॥ ४६ ॥ कां दहाही इंद्रियें आहाती । इयें जरी एकेचि देहींचीं होती । आणि इहीं सेविले विषय जाती । एकाचि ठाया ॥ ४७ ॥ तरि करोनि रससोय[10] बरवी । कानीं केविं भरावी । फुलें आणोनि तुरंबावीं[11] । डोळां केविं ॥ ४८ ॥ तेथ रस तो मुखेंचि सेवावा । परिमळ तो घ्राणेंचि घ्यावा । तैसा मी तों यजावा[12] । मीचि ह्मणोनि ॥ ४९ ॥ येर मातें नेणोनि भजन । तें वांयांचि गा आनेंआन[13] । ह्मणोनि कर्माचे डोळे ज्ञान । तें निर्दोष होआवें ॥ ३५० ॥

१ सर्वत्र सम असणाराला. २ कारण. ३ पूजन करतात. ४ निश्चयेंकरून. ५ भजन. ६ सरळ. ७ वांकडें, आडमार्गाचें. ८ वृक्षाचे. ९ घालतात, घातलें पाहिजे. १० स्वयंपाक. ११ हुंगावीं. १२ पूजावा. १३ कांहीं तरी.

"आतां आणखीही एक रीती आहे. तिच्यांत मला समष्टीरूपानें समजत नाहींत. तर **अग्नि, इंद्र, सूर्य, सोम** इत्यादि ह्मणून पूजा करतात. ३४४ तें पूजनही खरोखर मलाच होतें. कारण, हें सारें मीच आहें. पण तें भजन सरळ होत नाहीं. वांकडें होतें. ३४५ बाबा! असें पहा. झाडाच्या डहाळ्या, पानें, हीं एकाच बीजाचीं नव्हेत का? परंतु पाणी घेणें हें मुळाचें काम. तें मुळासच घातलें पाहिजे. ३४६ किंवा दहा इंद्रियें आहेत. तीं एकाच देहाचीं आहेत. आणि त्यांनीं सेवन केलेले विषय एकाच ठिकाणीं जातात. ३४७ ह्मणून उत्तम स्वयंपाक करून तो कानांत कसा भरावा? फुलें आणून तीं डोळ्यांनीं हुंगलीं, तर कसें चालेल? ३४८ तर, रस असेल तो तोंडानें ग्रहण केला पाहिजे; वास असेल तो नाकानेंच घेतला पाहिजे. त्याप्रमाणें मी तो मीच ह्मणून पूजा केली पाहिजे. ३४९ मला न जाणून जें भजन करतात, तें निखालस फुकट कांहीं तरी. ह्मणून ज्ञान हें कर्माचे डोळे आहेत. तें निर्मल असावें." ३५०

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥ २४ ॥

[ अहं हि सर्वयज्ञानां ] येऱ्हवीं पाहें पां पांडुसुता । यज्ञोपहारां[1] समस्तां । [ भोक्ता च प्रभुरेव च ] मीवांचूनि[2] भोक्ता । कवण आहे ॥ ५१ ॥ मी सकळां यज्ञाची आदि । आणि यजना यया मीचि अवधि[3] । [ न तु मामभिजानंति ] कीं मातें चुकोनि दुर्बुद्धि । देवा भजले ॥ ५२ ॥ गंगेचें उदक गंगे जैसें । अर्पिजे देवपितरोद्देशें । माझें मज देती तैसें । परि आनानिभावीं[4] ॥ ५३ ॥ [ तत्त्वेनातश्च्यवंति ते ] ह्मणऊनि ते पार्था । मातें न पवतीचि सर्वथा । मग मनीं वाहिली[5] जे आस्था । तेथ आले ॥ ५४ ॥

"आणखी **अर्जुना!** असें पहा. ह्या साऱ्या यज्ञांच्या उपहाराला माझ्याशिवाय दुसरा भोक्ता कोण आहे? ३५१ सकल यज्ञांचें मूळ मी. आणि त्या पूजनाचा शेवट मीच. त्या

१ यज्ञरूप उपहाराचा. २ माझ्याशिवाय. ३ शेवट. ४ निराळ्या भावनेनें. ५ धरली.

**मला सोडून ते दुर्बुद्धीचें भजन करतात. ३५२ देवांच्या आणि पितरांच्या प्रीत्यर्थ, गंगेचें उदक जसें गंगेलाच अर्पण करावें, त्याप्रमाणें तेही माझें मलाच देतात; पण वेगळया भावनेनें. ३५३ ह्मणून अर्जुना! ते, कांहीं केलें तरी, मला ह्मणून पावत नाहींत. आणि मनांत जो हेतु धरलेला असतो, तेथें येतात." ३५४**

यांति देवव्रता देवान्पितॄन्यांति पितृव्रताः ।
भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम्२५

[यांति देवव्रता देवान्] मनें वाचाकरणीं । जयांचिया भजनीं देवांचिया वोंहणी । ते शरीर जातिये क्षणीं । देवचि जाले ॥ ५५ ॥ [पितॄन्यांति पितृव्रताः] अथवा पितरांचीं व्रतें । वाहाति जयांचीं चित्तें । जीवित सरलिया तयांतें । पितृत्व वरी ॥ ५६ ॥ [भूतानि यांति भूतेज्याः] कां क्षुद्र देवतादिभूतें । तियेंचि ज्यांचीं परमदैवतें । जिहीं अभिचारिकीं तयांतें । उपासिलें ॥ ५७ ॥ तयां देहाची जवनिका फिटली । आणि भूतत्वाची प्राप्ति जाहाली । एवं संकल्पवशें फळलीं । कर्में तयां ॥ ५८ ॥ [मद्याजिनोऽपि] मग मींचि डोळां देखिला । जिहीं कानीं मींचि ऐकिला । मींचि मनीं भाविला । वानिला वाचा ॥ ५९ ॥ सर्वांगीं सर्वांठायीं । मींचि नमस्कारिला जिहीं । दानपुण्यादिकें जें कांहीं । तें माझियाचि मोहरां ॥ ३६० ॥ जिहीं मातेंचि अध्ययन केलें । जे आंतबाहेरि मियांचि धाले । जयांचें जीवित्व जोडलें । मजचिलागीं ॥ ६१ ॥ जे अहंकार वाहत आंगीं । आह्मी हरीचे भूपार्वयालागीं । जे लोभिये एकचि जगीं । माझेनि लोभें ॥ ६२ ॥ जे माझेनि कामें सकाम । जे माझेनि प्रेमें सप्रेम । जे माझिया भुली सभ्रम । नेणती लोक ॥ ६३ ॥ जयांचीं जाणती मजचि शास्त्रें । मी जोडें जयांचेनि मंत्रें । ऐसे जे चेष्टागात्रें । भजले मज ॥ ६४ ॥ [मां] ते मरणाऐलीचकडे । मज मिळोनि गेले फुडें । मग मरणीं आणिकीकडे । जातील केविं ॥ ६५ ॥ [यांति] ह्मणोनि मद्याजी जे जाहाले । ते माझिया सायुज्या आले । जिहीं उपचारमिषें दिधलें । आपणपें मज ॥ ६६ ॥ अर्जुना माझे ठायीं । आपणपेंवीण सौरसें नाहीं । मी उपचारें कवणाही । नाकळें गा ॥ ६७ ॥ एथ जाणीव करी तोचि नेणे । आथिलेपण मिरवी तेंचि उणें । आह्मी जाहालों ऐसें जो ह्मणे । तो कांहींचि नव्हे ॥ ६८ ॥ अथवा यज्ञदानादि किरीटी । कां तपें हन जे हुटहुटी । ते तृणा एकासाठीं । न सरे एथ ॥ ६९ ॥ पाहें पां जाणिवेचेनि बळें । कोण्ही वेदापासूनि असे आगळें । कीं शेषाहूनि तोंडाळें । बोल कें आथी ॥ ३७० ॥ तोही आंथरुणातळवटीं दडे । येरु नेति नेति ह्मणोनि बहुडे । एथ सनकादिक वेडे । पिसे जाहाले ॥ ७१ ॥ करितां तापसांची कडसणी । कवण जवळां ठेविजे शूळपाणी । तोहि अभिमान सांडूनि पायवणी । माथा वाहे ॥ ७२ ॥ ना तरी आथिलेपणें सरिशी । कवणी आहे लक्ष्मियेऐसी । श्रियेसारिखिया दासी । घरीं जियेतें ॥ ७३ ॥ तियां खेळतां करिती घरकुलीं । तयां नामें अमरपुरें जरि ठेविलीं । तरि न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ॥ ७४ ॥ तियां नावडोनि जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे रंक होती । तिया जिया झाडाकडे पाहाती । ते कल्पवृक्ष ॥ ७५ ॥ ऐसिया तियेचिया जवळिका । सामर्थ्य घरींचिया पाइकां । ते लक्ष्मी मुख्यनायका । न मनेचि एथ ॥ ७६ ॥ मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमान सांडूनि पांडवा । ते पाय धुवावयाचिया दैवा । पात्र जाहली ॥ ७७ ॥ ह्मणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ॥ ७८ ॥ अगा सहस्रकिरणाचिये दिठी । पुढां चंद्रही लोपे किरीटी । तेथ खद्योत कां हुटहुटी । आपुलेनि तेजें ॥ ७९ ॥ तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे । जेथ शंभूचेंही तप न पुरे । तेथ येर प्राकृत हेंदरें । केविं जाणों लाहें ॥ ३८० ॥ यालागीं शरीरसांडोवा कीजे । सकळगुणांचें लोण उतरिजे । संपत्तिमद सांडिजे । कुरवंडी करूनि ॥ ८१ ॥

**"मनाची, वाणीची, आणि इंद्रियांची सुद्धां प्रवृत्ति ज्यांच्या भजनांत देवाकडेच असते, ते शरीर लय पावतांच देव होतात. ३५५ किंवा ज्यांच्या चित्तांत पितरांचीं व्रतें असतात, ते आयुष्य संपलें ह्मणजे पितर होतात. ३५६ किंवा क्षुद्र-**

---

१ वाणीनें व इंद्रियांनीं. २ मार्गे. ३ धरतात. ४ जारण-मारणादिकांनीं. ५ पडदा. ६ मार्गाकडे. ७ तृप्त झाले. ८ भूषणभूत होण्यासाठीं. ९ भुललेले. १० मरणाच्या आधींच. ११ उघड रीतीनें. १२ दुसरीकडे. १३ माझें भजन करणारे. १४ रूपामध्यें. १५ उपचाराच्या रूपानें. १६ आपलेपणावांचून. १७ गोडी.

१ ज्ञानी ह्मणवितो. २ संपन्नता. ३ कृतकृत्य. ४ उतावीळ, तळमळ. ५ वेदाहून. ६ बोलकें. ७ दुसरा-वेद. ८ असें नव्हे, तसें नव्हे, इत्यादि. ९ मागें सरतो. १० विचार, शोध. ११ शंकराच्या. १२ विष्णुपादोदक, भागीरथी. १३ संपन्नपणानें. १४ ऋद्धिसिद्धीसारख्या. १५ त्या. १६ देवांचीं नगरें. १७ त्या. १८ चाकरांना, सेवकांना. १९ पलीकडे, बाजूस. २० तर्कवितर्क. २१ सूर्याच्या. २२ दृष्टीनें. २३ काजवा. २४ तळमळ. २५ अजागळ. २६ निंबलोण. २७ ओंवाळणी.

देवतादि भूतें, हींच ज्यांचीं परम दैवतें; ज्यांनीं जारणमारणांनींच त्यांची उपासना केलेली; ३५७ त्यांच्या देहाचा पडदा पडला कीं, त्यांना भूतत्वाचीच प्राप्ति होते. आणि संकल्पाप्रमाणें त्यांचीं कर्में त्यांना फळतात. ३५८ परंतु ज्यांच्या डोळ्यांनीं मलाच पाहिलें; ज्यांनीं कानांनीं मलाच ऐकिलें; मनांत माझीच भक्ति धरली; वाणीनें माझेंच वर्णन केलें; ३५९ ज्यांनीं सर्वांगानें, सर्व ठायीं मलाच नमस्कार केला; दानपुण्यादिक जें जें कांहीं, तें सारें माझ्याच प्रीत्यर्थ केलें; ३६० ज्यांनीं माझेंच अध्ययन केलें; जे आंतबाहेर माझ्यानेंच तृप्त झालेले; माझ्याकरितांच ज्यांनीं जीव ठेवलेला; ३६१ आह्मी हरीचे अलंकार, असा जे अहंकार धरतात; जे जगामध्यें एका माझ्याच लोभाला लुब्ध असतात; ३६२ माझ्याच इच्छेची जे इच्छा करणारे; माझ्याच प्रेमानें जे सप्रेम होणारे; जे माझ्याच भुलीनें भुललेले; लोक ह्मणजे काय तें ज्यांस माहित नाहीं; ३६३ ज्यांचीं शास्त्रें मलाच जाणतात; ज्यांच्या मतांनीं माझीच प्राप्ती होते; अशा कृतीनें जे मला भजतात, ३६४ ते मरणाच्या आधींच धडधडीत येऊन मला मिळतात. मग मरणानंतर दुसरीकडे कसे जातील? ३६५ ह्मणून माझें ज्यांनीं यजन केलें; ज्यांनीं सेवाहेतूनें आपणांस मला वाहिलें; ते मत्स्वरूपाप्रत पोंचतात. ३६६ **अर्जुना!** माझ्यामध्यें आपलेपणावांचून गोडी नाहीं. उपचारानें मी कोणालाही सांपडावयाचा नाहीं. ३६७ आणखी, जो ज्ञानी ह्मणवितो, त्याला कांहींच समजत नाहीं; जो योग्यता मिरवितो, त्याला ती मुळींच नसते; आणि आपण कृतकृत्य आहों असें जो ह्मणतो, तो कांहींच नसतो. ३६८ अथवा **अर्जुना!** यज्ञदानादिक किंवा तपें, किंवा दुसऱ्या कोणत्याही खटपटी, ह्याच्या एका कसपटालाही लागावयाच्या नाहींत. ३६९ अरे बाबा! ज्ञानाच्या सामर्थ्यानें पाहिलें तर, वेदापेक्षां कोणी श्रेष्ठ आहे काय? **शेषाहून** अधिक, तोंडानें कोणी बोलका आहे काय? ३७० पण तोही आंथरुणाखालीं दडपून बसतो. आणि वेद 'नेति' 'नेति' ह्मणून मागें सरतो. सनकादिक तर त्याच्यासाठीं वेडेपिसे होऊन गेले. ३७१ तपस्व्यांविषयीं विचार केला, तर **शंकराच्या** बरोबरीला कोणी लागेल काय? पण तोही अभिमान सोडून चरणतीर्थ मस्तकीं धारण करतो. ३७२ अथवा संपत्तीमध्यें **लक्ष्मीपेक्षां** सरस अशी कोण आहे? सिद्धीसारख्या जिच्या घरांत दासी आहेत. ३७३ त्या खेळतांना जीं घरकुलें करतात, त्यांना जर **अमरपुरी** अशीं नांवें ठेविलीं आहेत, तर **इंद्रादिक** हीं त्यांचीं बाहुलीं नव्हेत काय? ३७४ त्यांना आवडेनासें होऊन त्यांनीं तीं मोडलीं, कीं **महेंद्राचे**ही रंक बनतात. आणि त्या ज्या झाडाकडे पहातात, ते कल्पवृक्ष होतात. ३७५ अशा ऋद्धिसिद्धींनीही जिच्या घरामध्यें जवळ राहून सेवा करावी, एवढें जिचें सामर्थ्य, ती मुख्य नायिका **लक्ष्मी**ही ह्याच्या तुलनेला लागली नाहीं. ३७६ ह्मणून **अर्जुना!** तीही अभिमान सोडून सेवा करूं लागली. तेव्हां ती पाय धुण्याच्या पदवीला योग्य झाली. ३७७ ह्मणून थोरपण एकीकडे ठेवावें; तर्कवितर्क सारे विसरून जावेत; आणि जगाला नम्र व्हावें; तेव्हांच मी जवळचा होईन. ३७८ बा **अर्जुना!** सूर्याच्या दृष्टीपुढें चंद्रही लुप्त होतो, तेथें काजव्यानें आपलें तेज किती मिरवावें? ३७९ तसें, लक्ष्मीचें थोरपण जेथें बरोबरी करीत नाहीं; शंकराचें तपही जेथें पुरें पडत नाहीं; तेथें इतर–प्राकृत–हैंदऱ्यानें काय जाणावयाचें आहे? ३८० ह्याकरितां शरीराचें निंबलोण उतरावें; सकळ गुण त्याच्यावरून ओंवाळून टाकावेत; आणि संपत्तिमदाची त्याजवरून कुरवंडी करावी." ३८१

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥

[भक्त्युपहृतं] मग निःसीमभावउल्हासें । मज अर्पावे-

याचेनि मिसें[1] । [फलं] फळ एक आवडे तैसें । भलतयांचें[2] हो ॥ ८२ ॥ [तदहं] भक्त माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोडवीं[4] । [अश्नामि] मग देंठ न फेडितां[5] सेवीं । आदरेंसीं[6] ॥ ८३ ॥ [पुष्पं] पैं गा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज द्यावें । तें लेखें तरि म्यां तुरंबावें[7] । परि मुखींचि घालीं ॥ ८४ ॥ [पत्रं] हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहालें । तें साजूकही[8] न हो सुकलें । भलतैसें[9] ॥ ८५ ॥ परि सर्वभावें[10] भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखे । तैसें पत्रचि परी तेणें सुखें । आरोगूं[11] लागें ॥ ८६ ॥ [तोयं] अथवा ऐसेंही एक घडे । जे पालाही परी न जोडे । तरि उदकाचें तंव सांकडें[12] । नव्हेल कीं ॥ ८७ ॥ तें भलतेथ[13] निमोलें[14] । न जोडितां आहे जोडलें । [यो मे भक्त्या प्रयच्छति] तेंचि सर्वस्व करूनि आर्पिलें । जेणें मज ॥ ८८ ॥ तेणें वैकुंठापासोनि[15] विशाळें । मजलागीं केलीं राउळें[16] । कौस्तुभाहोनि[17] निर्मळें[18] । लेणीं[19] दिधलीं ॥८९॥ दुधाचीं सेजारें[20] । क्षीराब्धीऐसीं मनोहरें । मजलागीं अपारें । रचिलीं[21] तेणें ॥ ३९० ॥ कर्पूर चंदन अगरु । ऐसेया सुगंधाचा महामेरु । मजेंहातिवा[22] लाविला दिनकरु[23] । दीपमाळे ॥ ९१ ॥ गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूचीं उद्यानें । कामधेनूंचीं गोधनें । अर्पिलीं तेणें ॥ ९२ ॥ मज अमृताहूनि सुरसें । वोनीं[24] वोगरिलीं[25] बहुवसें । ऐसा भक्तांचेनि उदकलेशें[26] । परितोषें[27] गा ॥ ९३ ॥ [प्रयतात्मनः] हें सांगावें काय किरिटी । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी[28] । मी सुदामयाचिया सोडीं गांठी । पव्हयांसाठीं[29] ॥ ९४ ॥ पैं भक्ती एकी मी जाणें । तेथ सानें[30] थोर न ह्मणें । आह्मी भावाचे[31] पाहुणे । भलतेया[32] ॥ ९५ ॥ येर[33] पत्र पुष्प फळ । हें भजावया मिस[34] केवळ । वांचूनि[35] आमुचियालागीं निष्कळ[36] । भक्तितत्त्व ॥ ९६ ॥ ह्मणोनि अर्जुना अवधारीं । तूं बुद्धी एकी सोपारीं[37] करीं । तरी सहजें आपुलेया मनोमंदिरीं । न विसंबें[38] मातें ॥ ९७ ॥

"मग निस्सीम भक्तीच्या उल्हासानें, मला अर्पण करण्याच्या इच्छेनें हवें तसलें एक फळ–मग तें कशाचेंही असो. ३८२ भक्तानें तें माझ्याकडे दाखविलें पुरे, कीं मी दोन्ही हात पुढें केलेच, आणि आदरानें खेवन केलेंच ह्मणून समजावें. त्याचा देंख सुद्धां मी काढीत नाहीं. ३८३ तसेंच एखाद्यानें मला फूल दिलें, तर तें खरें ह्मटलें ह्मणजे मी हुंगावयाचें. पण मी तें तोंडांतच घालतों! ३८४ हें तर असो. पण फूलचसें काय? एक पान जरी आवडतें असलें–तें सुद्धां ताजें नव्हे हो–सुकलेलें–कसलें तरी, ३८५ पण त्यांत जर सारी भक्तीच भरलेली असेल, तर भुकेला जसा अमृतानें संतोष होतो, तद्वत् तें पानच मी आनंदानें खाऊं लागतों. ३८६ अथवा तो पाला देखील मिळत नाहीं, असें जर एखादे वेळीं घडलें, तर पाण्याला तर दुष्काळ नाहीं ना? ३८७ तें पाहिजे तेथें–फुकट–प्रयत्न केल्याशिवायच मिळणारें आहे, आणि तेंच ज्यानें मला निस्सीम भक्तीनें अर्पण केलें, ३८८ त्यानें माझ्यासाठीं वैकुंठापेक्षांही मोठमोठीं देवाळयें बांधल्याप्रमाणें, व कौस्तुभ रत्नाहूनही सतेज अलंकार अर्पण केल्याप्रमाणें होतें. ३८९ त्यानें माझ्याकरितां क्षीराब्धीसारखे दुधाचे अपार पलंग तयार केले; ३९० कापूर, चंदन, अगरु, अशा सुगंधीचा केवळ महामेरु, त्याचें माझ्या आंगास उटणें लावून सूर्याची दीपमाळ लावली; ३९१ त्यानें गरुडासारखीं वाहनें, कल्पवृक्षाचे बाग, व कामधेनूंचीं खिल्लारें मला अर्पण केलीं; ३९२ त्यानें मला अमृताहून गोड अशीं अनेक पक्वान्नें वाढलीं; इतका त्या भक्ताच्या यत्किंचित् उदकानें मी संतोषित होतों. ३९३ अर्जुना! हें काय सांगावयाचें आहे? मी सुदामाच्या पोह्यांची गांठ सोडलेली तूं आपल्या डोळयांनीं पाहिलीसच. ३९४ मी फक्त एक भक्ति जाणतों. त्यांत लहानथोर ह्मणत नाहीं. आह्मी पाहिजे त्याला भक्तीचे पाहुणे आहों. ३९५ पान, फूल, फळ

१ निमित्तानें. २ वाटेल तें. ३ कशाचेंही असो. ४ पुढें करतों. ५ न खुडतां. ६ खरोखर, रीतीप्रमाणें. ७ हुंगावें. ८ ताजेंही. ९ कशाचेंही. १० निस्सीम भक्तीनें. ११ भक्षण करूं लागतों. १२ संकट, दुर्भिक्ष. १३ पाहिजे तेथें. १४ मोलाशिवाय, फुकट. १५ वैकुंठापेक्षांही. १६ देवळें. १७ कौस्तुभाहून. १८ सुंदर, पवित्र. १९ अलंकार, भूषणें. २० शय्यास्थानें. २१ बांधलीं. २२ काडवाती. २३ सूर्य. २४ पक्वान्नें. २५ वाढलीं. २६ अल्प उदकानें. २७ तृप्त होतों. २८ दृष्टीनें. २९ पोह्यांसाठीं. ३० लहान. ३१ भक्तीचे. ३२ कोणालाही. ३३ बाकी. ३४ आमिष, निमित्त. ३५ शिवाय. ३६ निष्कलंक. ३७ सोपी, स्वाधीन. ३८ विसरूं नको.

हें भजन करण्याला—उपासनेला एक निमित्त आहे. बाकी, निष्कलंक भक्तीशिवाय, हीं सारीं आह्मांला व्यर्थ होत. ३९६ ह्मणून अर्जुना ! ऐक, तूं बुद्धि स्वाधीन कर. ह्मणजे तुझ्या मनोमंदिरांत माझें सहजींच विस्मरण पडणार नाहीं.” ३९७.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥

[यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्] जे जे कांहीं व्यापार करिसी । कां भोग हन भोगिसी । अथवा यज्ञीं यजिसी । नानाविधीं ॥ ९८ ॥ ना तरी पात्रविशेषें दानें । कां सेवकां देसी जीवनें[1] । [यत्तपस्यसि कौंतेय] तपादि हन साधनें । व्रतें करिसी ॥ ९९ ॥ [तत्कुरुष्व मदर्पणं] तें क्रियाजात[2] आघवें[3] । जैसें निपजेल स्वभावें । तें भावना करोनि करावें । माझिया मोहरां[4] ॥ ४०० ॥ परि सर्वथा आपुले जीवीं । केलियाचि सें[5] कांहींचि उरवीं । ऐसीं धुवोनि कर्में द्यावीं । माझिया हातीं ॥ १ ॥

“जे जे कांहीं उद्योग करशील, किंवा भोग भोगशील, किंवा यज्ञामध्यें नानाप्रकारचे विधि करशील, ३९८ किंवा उत्तम पात्र पाहून दान देशील, किंवा सेवकांना वेतनें देशील, तपादिक साधनें आचरशील, सत्रें ठेवशील, ३९९ तीं, किंवा स्वभावधर्मानें उत्पन्न होणारीं सारीं कर्में तूं भक्तिपुरस्सर माझ्या पुढें कर. ४०० परंतु आपल्या जिवामध्यें केल्याची आठवण सुद्धां ठेवूं नको. अशीं सारीं कर्में धुऊन माझ्या हातीं दे.” ४०१

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥

[शुभाशुभेति] मग अग्निकुंडीं बीजें घातलीं । तियें अंकुरदशे[6] जेवि मुकलीं । तेवि न फळतीचि मज अर्पिलीं । शुभाशुभें ॥ २ ॥ अगा कर्में जैं उरावें । तैं तिहीं सुखदुःखीं फळावें । आणि तयातें भोगावया यावें । देहा एका ॥ ३ ॥ तें उंगाणिलें[7] मज कर्म । तेव्हांचि पुसिलें मरण जन्म । जन्मासवें श्रम । वंरचिलही[8] गेले ॥ ४ ॥ [संन्यासेति] ह्मणऊनि अर्जुना यापरी । पाहें वा वेळे न व्हेल भारी । हे संन्यासयुक्ति सोपारी । दिधली तुज ॥ ५ ॥ या देहाचिये बांदोडीं[1] न पडिजे । सुखदुःखाचिया सागरीं न बुडिजे । सुखें सुखरूपा[2] घडिजे । माझियाचि आंगा ॥ ६ ॥

“ह्मणजे मग अग्निकुंडांत घातलेलीं बीजें, जशीं कोंभ येण्याच्या अवस्थेला मुकतात, तद्वत् मला अर्पण केलेलीं कर्में, कधींही फलद्रूप होत नाहींत. ४०२ बाबा ! कर्में जेव्हां शिल्लक राहतात, तेव्हां त्यांचीं सुखदुःखांचीं फळें भोगावीं लागतात. आणि तीं भोगावयाला एका देहाला यावें लागतें—ह्मणजे पुनर्जन्म घ्यावा लागतो. ४०३ तेंच, कर्में मला अर्पण केलें कीं, जन्ममरण चुकतें आणि त्या जन्माबरोबर त्याचे कष्टही नाहींसे होतात. ४०४ ह्मणून अर्जुना ! ही संन्यासाची सोपी युक्ति तुला सांगितली. हिला फार वेळही नको; ४०५ ह्या देहाच्या बंधनांत पडावयास नको; सुखदुःखाच्या सागरांत बुडावयाला नको; आनंदानें माझ्या स्वरूपालाच मिळावें.” ४०६

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाऽप्यहम् ॥२९॥

[समोऽहं सर्वभूतेषु] तो मी पुससी कैसा । तरि जो सर्वभूतीं सदा सरिसा[3] । [न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः] जेथ आप पर ऐसा । भाग नाहीं ॥ ७ ॥ [ये भजंति तु मां भक्त्या] जे ऐसिया मातें जाणोनि । अहंकाराचा कुरुठा[4] मोडोनि । जे जिवें कर्म करूनि । मातें भजले ॥ ८ ॥ [मयि ते तेषु चाऽप्यहं] ते वर्तत दिसती देहीं । परि ते देहीं ना माझ्या ठायीं । आणि मी तयांच्या हृदयीं । समग्र असें ॥ ९ ॥ सविस्तर वटत्व[5] जैसें । बीजकणिकेमाजि[6] असे । आणि बीजकण वसे । वटीं जेवीं ॥ ४१० ॥ तेवि आह्मा तया परस्परें । बाहेर नामाचीचि अंतरें । वांचूनि आंतुवट[7] वस्तुविचारें[8] । मी तेचि ते ॥ ११ ॥ आतां जायाचें[9] जैसें लेणें । आंगावरी आहाचवाणें[10] । तैसें देहधरणें । उदास तयांचें ॥ १२ ॥ परिमळ निघालिया पवनापाठीं । मागें वोस[11] फूल राहे देटीं । तैसें आयुष्याचिये मुठी । केवळ देह ॥ १३ ॥ येरें[12] अवष्टंभ[13] जो आघवा । तो आरूढोनि मद्भावा । मजचि आंत पांडवा । पैठा[14] जाहला ॥ १४ ॥

१ वेतन, पगार, बक्षीस. २ हरएक क्रिया. ३ साऱ्या. ४ पुढें, समोर. ५ आठवण. ६ मोड येण्याच्या धर्माला. ७ हवालीं केलें. ८ त्याचे संबंधीं. ९ वेळही फार लागणार नाहीं.

१ बंधनांत. २ मद्रूप. ३ सारखा. ४ घरटा. ५ वडाचें झाड. ६ वियेच्या एका दाण्यांत. ७ अंतरंग. ८ तत्त्वदृष्टीनें. ९ जाणारें, उसनें, मागून आणलेलें. १० व्यर्थ. ११ बाकी. १२ अहंकार, प्रपंच. १३ सारा. १४ प्रविष्ट.

"तो मी कसा असतों ह्मणून विचारशील तर, सर्व भूतांच्या ठायीं सारखा. तेथें आपपर असा भाव नाहीं. ४०७ अशा मला, जे अहंकाराचें घरटें मोडून जाणतात, जे जीवाकडून कर्मे करून मला भजतात; ४०८ ते देहामध्यें वागतात असे दिसतात तरी, ते देहांत नसतात. माझ्या ठायीं ते, व त्यांच्या हृदयांत मी भरलेला असतों. ४०९ वडाचा सारा विस्तार जसा एका बीजाच्या दाण्यांत भरलेला असतो, आणि बीजाचा दाणा जसा वडांत राहतो, ४१० तसें त्याच्या आणि आमच्यामध्यें वाहेरच्या नांवांतच काय तें अंतर असतें. बाकी अंतरंगांतील स्थिति पहाशील तर, मी तेच ते. ४११ आणखी उसनवारीचे अलंकार आंगावर जसे वरकरणी, तसें त्याचें देहधारण केवळ उदास होय. ४१२ वाऱ्याच्या पाठीमागें वास निघून गेला ह्मणजे मागें देठावरचें फूल जसें निःसत्त्व, तसा त्याचा देह केवळ आयुष्याच्या मुठींतला. ४१३ बाकी **अर्जुना!** सारा अहंकार जो माझ्या भक्तींत घालतो, तो माझ्या मध्येंच प्रविष्ट होतो." ४१४

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥३०॥

[भजते मामनन्यभाक्] ऐसें भजतेनि प्रेमभावें । जयां शरीरही पांटीं[1] न पेवे[2] । तेणें भलतया व्हावें । जातीचिया ॥ १५ ॥ [अपि चेत्सुदुराचारः] आणि आचार पाहतां सुभटा । तो दुष्कृताचा कीरे[3] सेलवांटा[4] । परि जीवित वेचिलें चोहटां[5] । भक्तीचिया कीं ॥ १६ ॥ अगा अंतीचिया मती । साचपण पुढिले गती । ह्मणोनि जीवित जेणें भक्ती । दिधलें शेखीं ॥ १७ ॥ [साधुरेव स मंतव्यः] तो आधीं जरी दुराचारी । तरी सर्वोत्तमचि अवधारीं । जैसा बुडाला महापूरीं । न मरत निघाला ॥ १८ ॥ तयाचें जीवित ऐलथडिये[6] आलें । ह्मणोनि बुडालेपण जेविं वायां गेलें । तेविं नुरेचि पाप केलें । शेवटलिये भक्ती[7] ॥ १९ ॥ यालागीं दुष्कृती जऱ्ही जाहाला । तरि अनुतापतीर्थी[8] न्हाला । न्हाऊनि मजआंत आला । सर्वभावें ॥ ४२० ॥ तरि आतां पवित्र तयाचें कुळ । आभिजात्य[1] तेंचि निर्मळ । जन्मलेयाचें फळ । तयासीच जोडलें ॥ २१ ॥ [सम्यग्व्यवसितो हि सः] तो सकळही पढिनला[2] । तपें तोचि तपिनला[3] । अष्टांग[4] अभ्यासिला । योग तेणें ॥२२॥ हें असो बहुत पार्था । तो उतरला[5] कर्मे सर्वथा । जयाची अखंड गा आस्था । मजचिलागीं ॥ २३ ॥ अवघिया मनोबुद्धीचिया राहटी[6] । भरोनि एकनिष्ठेची पेटी । मजमाजि किरीटी । निक्षेपिली[7] जेणें ॥ २४ ॥

"अशा प्रेमानें जो भजेल, त्याला पुन्हा शरीर-जन्महीं प्राप्त व्हावयाचा नाहीं. मग तो कोणत्याही जातीचा कां असेना? ४१५ आणखी **वीरश्रेष्ठा!** आचार पाहिला तर, तो खरोखर पापाची राशीच. परंतु 'आर्त, जिज्ञासु, अर्थी व ज्ञानी,' इत्यादि चतुष्पथभक्तीमध्यें त्यानें आपलें आयुष्य खर्च केलें ह्मणजे पुरे. ४१६ अरे! अंतकालीं जी बुद्धि असते, त्यास तीच गति प्राप्त होते. ह्याकरितां ज्यानें आपलें आयुष्य अखेरीस भक्तीलाच अर्पण केलेलें असतें, ४१७ तो आधीं जरी दुराचारी असला, तरी तो सर्वोत्तमच, असें समज. जसा एखादा मनुष्य मोठ्या पुरामध्यें बुडून न मरतां बाहेर निघतो, ४१८ त्याचा जीव आलीकडच्या कडेस आला ह्मणजे त्याचें बुडणें व्यर्थ होतें, त्याप्रमाणें शेवटीं भक्ति केल्याच्या योगानें त्याचें पापही उरत नाहीं. ४१९ ह्मणून तो जरी दुराचारी असला तरी, अनुतापतीर्थांत न्हातो. आणि न्हाला ह्मणजे सर्व भावानें तो माझ्यामध्यें येतो. ४२० मग त्याचें कुळ पवित्र होतें; त्याचा कुलीनपणा निष्कलंक होतो; आणि जन्मास आल्याचें फळ त्यालाच प्राप्त होतें. ४२१ सर्व कांहीं शिकला असा तोच; सर्व तपांचें आचरण केलें त्यानेंच; अष्टांग योगाचा अभ्यास केला त्यानेंच. ४२२ **अर्जुना!** हा पाल्हाळ असो. माझ्याच ठिकाणीं ज्याची निरंतर आस्था, तो सर्व कर्मांच्या पार झाला. ४२३ **अर्जुना!** त्यानें सकल

१ फिरून. २ येत नाहीं. ३ खरोखर. ४ उत्तम वांटा. ५ चव्हाटा–मागें सांगितलेल्या आर्त, जिज्ञासु, अर्थी, व ज्ञानी ह्या चार प्रकारचा भक्तियोगरूप चतुष्पथ. ६ आलीकडच्या कडेला. ७ ज्ञानभक्तीनें. ८ पश्चात्तापरूप तीर्थांत.

१ कुलीनपणा. २ शिकला, पडला. ३ तपाचरण केलें. ४ योगमार्ग. ५ पार पडला. ६ वृत्तीनें. ७ ठेविली.

**मनोबुद्धीच्या वृत्तीनें एकनिष्ठेची पेटी भरून माझ्यामध्यें ठेवली." ४२४**

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥

[न मे भक्तः प्रणश्यति] तो आतां अवसरें मजसारिखा होइल । ऐसा हन भाव तुज जाइल । हां गा अमृता आंत राहिल । तया मरण कैंचें ॥ २५ ॥ पैं सूर्य जो वेळु नुदैजे । तयां वेळा कीं रात्रि म्हणिजे । तेविं माझिये भक्तीविण जें कीजे । तें महापापा नोहे ॥ २६ ॥ [क्षिप्रं भवति धर्मात्मा] म्हणोनि तयाचिया चित्ता । माझी जवळिक पांडुसुता । तेव्हांचि तो तत्वता । स्वरूप माझें ॥ २७ ॥ जैसा दीपें दीप लाविजे । तेथ आदील कोण हें नोळखिजे । तैसा सर्वस्वें जो मज भजे । तो मीचि होऊनि ठाके ॥ २८ ॥ [शश्वच्छांतिं निगच्छति] मग माझी नित्य शांती । तया दशा तेचि कांती । किंबहुना जिती । माझेनि जीवें ॥ २९ ॥ [कौंतेय प्रतिजानीहि] एथ पार्था पुढतपुढती । तेंचि तें सांगों किती । जरी मियां चाड तरी भक्ती । न विसंबिजे गा ॥ ४३० ॥ अगा कुळा कुळाचिया चोखटपणा नलगा । आभिंजात्य म्हणी श्लाघों । व्युत्पत्तीचा वाउगा । सोसं कां वाहावा ॥ ३१ ॥ कां रूपवयसा माजा । आथिलेपणें कां गाजों । एक भाव नाहीं माझा । तरी पोल्हाळ तें ॥ ३२ ॥ कणेंवीण सोपटें । कणसें लागलीं घनदाटें । काय करावें गोमटें । वोस नगर ॥ ३३ ॥ ना तरी सरोवर आटलें । रानीं दुःखियां दुःखी भेटले । कां वांझ फुलीं फुललें । झाड जैसें ॥ ३४ ॥ तैसें सकळ तें वैभव । अथवा कुळ जाति गौरव । जैसें शरीर आहे सांवित्र । परि जीवचि नाहीं ॥ ३५ ॥ तैसें माझिये भक्तीविण । जळो तें जियालेंपण । अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती काई ॥ ३६ ॥ पैं हिवरीची दाट साउली । सज्जनीं जैसी वांळिली । तैसीं पुण्यें डावलूनी गेलीं । अभक्तांतें ॥ ३७ ॥ निंब निंबोळिया मोडोनि आला । तरि तो कांउळियासींचि सुकाळ जाहाला । तैसा भक्तिहीन वाढिनला । दोषांचिलागीं ॥ ३८ ॥ कां षड्रस खापरीं वाढिले । वाढूनि चोहटां ठेविले । ते सुणियांचे उपेगा आले । जियापरी ॥ ३९ ॥ तैसें भक्तिहीनाचें जिणें । जो स्वप्नींहि परि सुकृत नेणे । तेणें संसारदुःखासि भाणें । ओगरिलें ॥ ४४० ॥ म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाती अंत्यजही व्हावें । वरि देहाचेनि नांवें । पशूचेंही लाभो ॥ ४१ ॥ पाहें पां सावजें हातिरु धरिलें । तेणें तया काकुळती मातें स्मरिलें । कीं तयाचें पशुत्व वावो जाहालें । पावलिया मातें ॥ ४२ ॥

**"आतां कदाचित् तो कालांतरानें माझ्यासारखा होईल, अशी तुझ्या मनांत कल्पना येईल. पण अमृतांत राहणाराला मरण कशाचें? ४२५ सूर्य ज्या वेळीं उगवलेला नसतो, त्या वेळेला रात्र असें म्हणतात. त्याप्रमाणें माझ्या भक्तीशिवाय जें करणें तें महापाप नव्हे काय? ४२६ म्हणून अर्जुना! त्याच्या चित्ताला जेव्हां माझें सान्निध्य येईल, तेव्हांच तो माझी खरी सरूपता पावेल. ४२७ ज्याप्रमाणें दिव्यानें दिवा लावला म्हणजे आधीं लावलेला कोणता हें ओळखत नाहीं, त्याप्रमाणें एक निष्ठेनें जो मला भजतो, तो मीच होऊन राहतो. ४२८ मग माझी नित्य शांती तीच त्याची दशा; तीच त्याची कांती; किंबहुना माझ्याच जीवानें तो जगतो असें समज. ४२९ आतां पार्था! येथें पुन्हा पुन्हा तेंच तें किती सांगावें? माझी इच्छा असेल तर, भक्ति सोडूं नको. ४३० बाबा! तिला कुळाचा चांगुलपणा लागत नाहीं; वर्णनीय कुलीनपणाही नको; मग विद्वत्तेचा हव्यास तरी कशाला बाळगावा? ४३१ किंबहुना एक माझी भक्ती जर नाहीं, तर उत्तम रूप; मुसमुसलेलें तारुण्य; किंवा अतुल वैभव हीं सारीं व्यर्थ होत. ४३२ दाण्याशिवाय पिशा भरलेलीं कणसें घनदाट लागून राहिलीं आहेत; किंवा नगर चांगलें आहे, पण तें ओस आहे; तर त्याला काय करावयाचें? ४३३ किंवा आटलेलें सरोवर असावें; अरण्यामध्यें दुःखिताला दुःखी भेटावा; किंवा वांझया फुलांनीं फुललेलें झाड असावें, ४३४ त्याप्रमाणें तें सारें वैभव, व जातीकुलाचा मोठेपणा होय. ज्याप्र-**

१ कालांतरानें. २ उगवलेला नसतो. ३ पहिला. ४ जगतात, वांचतात. ५ माझी. ६ लागत नाहीं. ७ कुलीनत्व. ८ स्तुति. ९ तर्कवितर्क. १० हांव, उरस्फोड. ११ तारुण्यानें. १२ सर्वज्ञतेनें. १३ प्रसिद्ध. १४ भक्ति. १५ गाबाळ. १६ दाण्याशिवाय. १७ अवयवयुक्त. १८ जगणें. १९ 'हिंवर' ह्या नांवाचा एक निषिद्ध वृक्ष आहे. २० टाळतात. २१ दूर टाकून. २२ कावळ्यालाच. २३ कुत्र्यांच्या. २४ उपयोगाला.

१ ताट, पान. २ जातीनें. ३ नकार्नें. ४ हत्ती. ५ तेणेंकरून. ६ व्यर्थ.

**ाणें शरीर सर्व अवयवांनीं युक्त आहे, परंतु तीव मात्र नाहीं, ४३५ त्याप्रमाणें माझ्या भक्तीशिवाय वांचणें त्याला आग कां लागेना? अरे! पृथ्वीवर पाषाण नाहींत का? ४३६ हिंवराची दाट सावली असली, तर भला मनुष्य तिला निषिद्ध मानतो. त्याप्रमाणें अभक्ताला पुण्यें डावलून जातात. ४३७ निंब, निंबोण्यांनीं भरून गेला, तर तो कावळ्यांनाच सुकाळ होतो; त्याप्रमाणें भक्तिहीन मनुष्य दोषासाठींच वाढलेला असतो. ४३८ किंवा षड्रसपक्वान्नें खापरांत घातलीं, आणि तीं चव्हाट्यावर नेऊन ठेवलीं, तर तीं जशीं कुत्र्यांच्या उपयोगीं पडतात, ४३९ त्याप्रमाणें भक्तिहीनाचें जन्म आहे. त्याला स्वप्नांत सुद्धां पुण्य घडलें असतें तें कळत नाहीं. तो संसारदुःखाचाच ताट वाढून ठेवतो. ४४० म्हणून कुल उत्तम नसो; जातीनें अंत्यज असला तरी चिंता नाहीं; आणखी देह, ज्याला पशू म्हणतात तो मिळाला तरी सुद्धां हरकत नाहीं. ४४१ हें पहा! नक्रानें हत्ती धरला; तेव्हां दीनवाणीनें त्यानें माझें स्मरण केलें. आणि तो मत्स्वरूप झाल्यामुळें त्याचें पशुत्व व्यर्थ झालें कीं नाहीं?" ४४२**

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्॥३२॥

[येऽपि स्युः पापयोनयः] अगा नांवें घेतां ओखटीं । जे आघवेया अधमाचिये शेवटीं । तिये पापयोनीही किरिटी । जन्मले जे ॥ ४३ ॥ ते पापयोनि मूढ । मूर्ख जैसे कां दगड । [मां हि पार्थ व्यपाश्रित्य] परि माझ्याठायीं दृढ । सर्वभावें ॥ ४४ ॥ जयांचिये वाचे माझे आलाप[1] । दृष्टी भोगी माझेंचि रूप । जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ॥ ४५ ॥ माझिया कीर्तीविण । जयांचे रिते नाहीं श्रवण । जयां सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥ ४६ ॥ जयांचें ज्ञान विषो[2] नेणे । जाणीव[3] मज एकातेंचि जाणे । जयां ऐसें लाभे तरी जिणें । येऱ्हवीं मरण ॥ ४७ ॥ ऐसा आघवाचि[4] परी पांडवा । जिहीं आपुलिया सर्वभावा । जियावयालागीं वोळावा । मीचि केला ॥ ४८ ॥ ते पापयोनीही होतु[5] कां । ते श्रुताधीत[6]ही न होतु कां । परि मजसीं तुकितां तुका[7] । तुटी[1] नाहीं ॥ ४९ ॥ पाहें पां भक्तीचेनि आथिलेपणें[2] । दैत्यीं देवां आणिलें उणें । माझें नृसिंहत्व लेणें । जयाचिये महिमे[3] ॥ ४५० ॥ तो प्रऱ्हाद गा मजसाठीं[4] । घेतां बहुतें सदा किरीटी । कां जें मियां द्यावें तें गोष्टी । तयाचिया[5] जोडे ॥ ५१ ॥ येऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें[6] । परि इंद्रही सरि[7] न लाहे उपरें । म्हणोनि भक्ति गा एथ सरे[8] । जाति अप्रमाण[9] ॥ ५२ ॥ राजाज्ञेचीं अक्षरें आहाती । तियें चामा[11] एका जया पडती । तया चामासाठीं जोडती । सकळ वस्तु ॥ ५३ ॥ वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे । तेंचि चाम[12] एक जैं लाहे । तेणें विकती[13] आघवीं ॥ ५४ ॥ तैसें उत्तमत्व तैंचि तरे । तैंचि सर्वज्ञता सरे । जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥ ५५ ॥ म्हणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण[14] । एथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ॥ ५६ ॥ तेंचि भलतेणें भावें । मन मज आंतु येतें होआवें । आलें तरी आघवें । मागील[15] वावो[16] ॥ ५७ ॥ जैसे तंवचि वहाळ[17] वोहळ । जंव न पवती गंगाजळ । मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ॥ ५८ ॥ कां खैर चंदन काष्ठें । हे विवंचना[18] तंवचि घटे । जंव न घोपती[19] एकवटे । अग्निमाजि ॥ ५९ ॥ [स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः] तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इयां[20] । जाती तंवचि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥ ४६० ॥ [तेपि यांति परां गतिं] मग जाति व्यक्ती पडे बिंदुलें[21] । जेव्हां भावें[22] होती मज मीनले । जैसे लवणकण घातले । सागरामाजी ॥ ६१ ॥ तंववरी नदनदीचीं नांवें । तंवचि पूर्वपश्चिमेचे यावे[23] । जंव न येती आघवे । समुद्रामाजि ॥ ६२ ॥ हेंचि कवणे एके मिसें । चित्त माझेठायीं प्रवेशे । येतुलें हो मग आपैसें । मीचि होणें असे ॥ ६३ ॥ अगा वरी फोडावयाचि[24] लागीं । लोहो मिळो कां परिसाचे आंगीं । कां जे मिळतिये[25] प्रसंगीं । सोनेंचि होईल ॥ ६४ ॥ पाहें पां वल्लभाचेनि व्याजें[26] । तियां[27] व्रजांगनांचि[28] निजें[29] । मज मिनलियां[30] काय माझें । स्वरूप नव्हती ॥ ६५ ॥ ना तरी भयाचेनि मिसें । मातें न पविजेचि काय कंसें । कीं अखंड

१ नामोच्चार, गुणानुवाद. २ विषय. ३ ज्ञान. ४ सर्वतोपरी. ५ असोत. ६ शास्त्र पढलेले. ७ बरोबर होतात.

१ कमी भरत नाहींत. २ भक्तियुक्त असल्यानें. ३ मोठेपणाला. ४ माझ्या बदली. ५ त्यालाच. ६ खरोखर. ७ बरोबरी. ८ श्रेष्ठ, अधिक. ९ पुढारी, श्रेष्ठ. १० गौण. ११ चामड्याला. १२ चामडें. १३ विकत मिळतात. १४ निष्फळ. १५ पूर्वी सांगितलेलें, नीच वर्णादिक. १६ व्यर्थ. १७ लहान लहान ओढे. १८ विचार. १९ घातलीं जात नाहींत. २० ह्या. २१ शून्य. २२ भक्तीनें. २३ आगमन. २४ फोडण्यासाठीं. २५ स्पर्श होतांच. २६ निमित्तानें. २७ त्या. २८ गोपी. २९ आपण होऊन. ३० मत्स्वरूप झाल्या असतां.

वैरवशें । चैद्यादिकीं ॥ ६६ ॥ अगा सोयरेपणेंचि पांडवा । माझें सायुज्य यादवां । कीं ममत्वें वसुदेवा- । दिकां सकळां ॥ ६७ ॥ नारदा ध्रुवा अक्रूरा । शुका हन सनत्कुमारा । इयां भक्ती मी धनुर्धरा । प्राप्य जैसा ॥ ६८ ॥ तैसाचि गोपिकांसि कामें । तया कंसा भयसंभ्रमें । येरां घातका मनोधर्में । शिशुपालादिकां ॥ ६९ ॥ अगा मी ऐकलाणीचें खागें । मज येवों ये भलतेनि मार्गे । भक्ति कां विषय विरागें । अथवा वैरें ॥ ४७० ॥ ह्मणोनि पार्था पाहीं । प्रवेशावया माझ्या ठायीं । उपायांची नाहीं । वाणी एथ ॥ ७१ ॥ आणि भलतिया जाति जन्मावें । मग भजिजे कां विरोधावें । परि भक्ता का वैरिया व्हावें । माझियाचि ॥ ७२ ॥ अगा कवणें एके वोलें । माझेपण जऱ्ही जाहालें । तरी मी होणें आलें । हाता निरुतें ॥ ७३ ॥ यालागीं पापयोनीही अर्जुना । कां वैश्य शूद्र अंगना । मातें भजतां सदना । माझिया येती ॥ ७४ ॥

"**अर्जुना!** जिचें नांव ऐकतांच वाईट वाटतें; जी सर्व अधमाहून अधम; अशा पापयोनींत जन्मलेले; ४४३ जन्माची योनी अशी पापाची; आणि मूढ तर असे कीं, जसे काय दगड. परंतु माझ्या ठायीं भक्ति मात्र अगदीं निस्सीम. ४४४ ज्यांच्या वाणीमध्यें माझाच नामोच्चार; ज्यांची दृष्टि माझेंच स्वरूप पहाते; ज्यांचें मन माझाच संकल्प वाहतें; ४४५ माझ्या गुणानुवादाशिवाय ज्यांचे कान रिकामे नाहींत; माझी सेवा हेंच ज्यांच्या सर्वांगाला भूषण; ४४६ ज्यांच्या ज्ञानाला विषय माहीत नाहींत; ज्यांचें जाणीव मला एकालाच जाणतें. असें मिळेल तरच जे जगतात, नाहीं तर मरण. ४४७ **अर्जुना!** असा सर्वोपरीनें ज्यांनीं आपल्या निस्सीम भक्तीनें जन्माला माझाच ओलावा केला, ४४८ ते पापयोनींत जन्मलेले असोत; ते शास्त्र पढलेले नसोत; परंतु माझ्याशीं त्यांची तुलना केली, तर ते बरोबर भरतील. कमी पडावयाचे नाहींत. ४४९ हें पहा! भक्ति करून करूनच दैत्यांनीं देवांना कमीपणा आणला; ज्यांच्या कीर्तीला माझें नृसिंहत्व हें एक भूषण झालें आहे. ४५० **अर्जुना!** तो **प्रल्हाद** जर माझ्या ठिकाणीं घेतला, तर अधिकच होईल. कारण, मी ज्या गोष्टी द्यावयाच्या त्या त्यानेंच मिळविल्या. ४५१ खरें ह्मटलें तर, कुल दैत्याचें. पण त्याची बरोबरी इंद्रही करणार नाहीं. तो अधिकच. ह्मणून येथें भक्ति हीच विशेष आहे. जातीचें कांहीं कारण नाहीं. ४५२ राजाज्ञेचीं अक्षरें असतात आणि तीं एखाद्या चामड्यावर पडलीं, तर त्या चामड्यानें पाहिजे ती वस्तु प्राप्त होते. ४५३ त्यापुढें सोनें, रुपें, सुद्धां कोणी अधिक मानीत नाहीं. तेथें राजाची आज्ञाच समर्थ असते. तेंच एक चामडें मिळालें कीं, त्यानें सारें विकत मिळतें. ४५४ त्याप्रमाणें माझ्या प्रेमानें मनोबुद्धि भरली कीं, उत्तमत्व तरतें, आणि सर्वज्ञता सरते. ४५५ ह्मणून कुल, जाति, वर्ण ह्या कशाचेंच कारण नाहीं. **अर्जुना!** येथें माझेपणा हेंच एक सार्थक आहे. ४५६ कोणत्या कां भक्तीनें होईना, माझ्यामध्यें मन येईल असें करावें. तें आंत आलें कीं, मागें सांगितलेलें सर्व व्यर्थ आहे. ४५७ ज्याप्रमाणें गंगाजळास पोंचले नाहींत, तोंपर्यंतच ओढे, नाले, असें ह्मणतात. - ते तेथें मिळाले कीं, मग गंगास्वरूपच होऊन राहतात. ४५८ किंवा हीं चंदनाचीं लांकडें; हीं खैराचीं लांकडें; हे विचार तीं सारीं एके ठिकाणीं करून अग्नींत घातलीं नाहींत तोंपर्यंत चालावयाचे. ४५९ तसें क्षत्रिय, वैश्य, स्त्रिया, किंवा शूद्र अंत्यज इत्यादि ह्या वेगवेगळ्या जाती कोठपर्यंत? जोंपर्यंत मला पोंचल्या नाहींत तोंपर्यंत. ४६० भावानें मत्तुल्य झाले कीं, ज्याप्रमाणें मिठाचे खडे समुद्रांत घालावेत, त्याप्रमाणें ह्या जातीवर आणि व्यक्तीवर पाणी पडलेंच. ४६१ जोंपर्यंत समुद्रांत सारीं आलीं नाहींत, तोंपर्यंतच नदांचीं आणि नद्यांचीं नांवें. आणि तोंपर्यंतच ही पूर्वेकडून येते, आणि ही पश्चिमेकडून येते, असें ह्मणावयाचें. ४६२ तसें, कोणत्या तरी निमित्तानें माझ्या ठिकाणीं आलें, कीं मग आपोआप मीच व्हावयाचें आहे. ४६३ वरून फोडण्यासाठीं कां होईना? लोखंड परि-

१ शिशुपालादिकांनीं. २ ह्यांना. ३ भक्तित्व. ४ विषयबुद्धीनें. ५ निर्वाणीचें. ६ स्थान. ७ विरक्ततेनें. ८ कमतरता. ९ खरोखर.

साच्या आंगाला लागलें कीं पुरे. त्या स्पर्शाच्या योगानें सोनेंच होईल. ४६४ हें पहा! पतीच्या निमित्तानें गोपींनीं आपलीं अंतःकरणें मजवर ठेविलीं, त्या मत्स्वरूप झाल्या नाहींत काय? ४६५ किंवा भयाच्या निमित्तानें **कंस**, किंवा निरंतर वैर करून **शिशुपालादिक** मला पावले नाहींत काय? ४६६ हे **अर्जुना!** यादवांना माझें स्वरूप प्राप्त झालें, तें सोयरेपणानेंच झालें; किंवा **वसुदेवादि** सर्वांना ममतेनें. ४६७ **नारदाला, ध्रुवाला, अक्रूराला,** तसेंच **अर्जुना! शुकाला, सनकादिकांना** जसा मी भक्तीस्तव प्राप्त झालों,४६८ तसाच गोपींनां विषयबुद्धीनें; त्या **कंसाला** जबरदस्त भीतीनें; आणि **शिशुपालादिकांना** घातकी मनोधर्मानें. ४६९ भक्तीच्या मार्गानें, विषयाच्या मार्गानें, वैराग्याच्या मार्गानें, वैराच्या कीं कोणत्याही मार्गानें मजकडे येऊं दे. मी निर्वाणींचें स्थान आहें. ४७० ह्मणून हें पहा **अर्जुना!** मजमध्यें प्रवेश करण्याला उपायांची कांहीं वाण नाहीं. ४७१ पाहिजे त्या जातींत जन्मावें, आणि मग माझें भजन करावें, किंवा माझ्याशीं विरोध करावा. कांहीं केलें तरी चिंता नाहीं. पण माझ्याच भक्तांनीं माझ्याशीं विरोध कां बरें करावा? ४७२ अरे! कोणत्याही एका सांगितलेल्या उपायानें जरी माझेंपण आलें, तरी खरोखर मद्रूप होणें हाताला आलेंच. ४७३ याकरितां **अर्जुना!** वैश्य, शूद्र, स्त्रिया, किंवा पापयोनी; कोणीही असोत. माझें भजन केलें असतां माझ्या सदनाला येतील.” ४७४

कें पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।
अनित्यमशुभं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥

[ब्राह्मणाः पुण्या भक्ताः] मग वर्णामाजि छेत्रचामर । र्गो जयाचें अग्रहार । मंत्रविद्येसि माहेर । ब्राह्मण जे ॥ ७५ ॥ पृथ्वीतळींचे देव । जे तपोवतार सावयव । सकळतीर्थांसि व । उदयलें जे ॥ ७६ ॥ जेथ अखंड वसिजे यागीं । वेदांची वज्रांगी । जयांचिये दिठीचिया उत्संगीं । मंगळ वाढे ॥ ७७ ॥ जयांचिये आस्थेचेनि वोलें । सत्कर्म पाल्हाळीं गेलें । संकल्पें सत्य जियालें । जयांचेनी ॥ ७८ ॥ जयांचेनि गा बोलें । अग्नीसि आयुष्य जाहालें । ह्मणोनि समुद्रें पाणी आपुलें । दिधलें यांचिप्रीती ॥ ७९ ॥ मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती । फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं । मग वोढविली वक्षस्थळाची वाखती । चरणरजां ॥ ४८० ॥ आझूनि पाउलाची मुद्रा । मी हृदयीं वाहें गा सुभद्रा । जे आपुलिया दैवसमुद्रा । जतनेलागीं ॥ ८१ ॥ जयांचा कोप सुभटा । काळाग्निरुद्राचा वसौटा । जयांचे प्रसादीं फुकटा । जोडती सिद्धी ॥ ८२ ॥ ऐसे पुण्यपूज्य जे ब्राह्मण । आणि माझ्या ठायीं अतिनिपुण । [किं पुनः] आतां मातें पावती ते हे कवण । समर्थावें ॥ ८३ ॥ पाहें पां चंदनाचेनि अंगानिळें । शिवतिले निंब होते जे जवळें । तिहीं निर्जिवीं देवांचीं निडळें । बैसणी केली ॥ ८४ ॥ मग तो चंदन तेथें न पवे । ऐसें मनीं कैसेनि धरावें । अथवा पातला हें समर्थावें । तेव्हां कायि साच ॥ ८५ ॥ तेथ निववील ऐसिया आशा । हरें चंद्रमा ओंधा ऐसा । वाहिजत असे शिरसा । निरंतर ॥ ८६ ॥ तेथ निवविता आणि सगळा । परिमळें चंदनाहून आगळा । तो चंदन केविं अवलीळा । सर्वांगीं न बैसे ॥ ८७ ॥ कां रथ्योदकें जियेचिये कासे । लागलिया समुद्रजालीं अनायासें । तिये गंगेसि काय अनारिसें । गत्यंतर असे ॥ ८८ ॥ [राजर्षयस्तथा] ह्मणोनि राजर्षी कां ब्राह्मण । जयां गति मति मीचि शरण । तयां त्रिशुद्धी मीचि निर्वाण । स्थितीही मीचि ॥ ८९ ॥ [इमं प्राप्य] यालागीं शतजर्जर नावे । रिगोनि केविं निश्चित होआवें । कैसेनि उघडिया असावें । शस्त्रवर्षीं ॥ ४९० ॥ आंगावरी पडतां पाषाण । न सुवावें केविं वोडण । रोगें दाटला आणि उदासपण । वोखदेंसी ॥ ९१ ॥ जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केविं पांडवा । तेविं लोका येऊनि सोपद्रवा । केविं न भजिजे मातें ॥ ९२ ॥ अगा मातें न भजावयालागीं । कवण बळ पां आपुलिया आंगीं । काइ घरीं कीं भोगीं । निश्चिती केली ॥ ९३ ॥ ना तरी विद्या कीं वयसा । ययां प्राणियांसी हा ऐसा । मज

१ श्रेष्ठ. २ इनामगांव. ३ तपश्चर्येचे अवतार. ४ मूर्तिमंत. ५ वळकट कवच. ६ मांडीवर.

१ ओलाव्यानें. २ विस्तारलें. ३ जन्मास आलें. ४ याकरितांच. ५ ढकलून. ६ काढून. ७ खळगी. ८ ठसा. ९ अर्जुना. सु = उत्तम; भद्र = कल्याण करणारा. १० स्थान. ११ प्रतिपादन करावें. १२ आंगच्या वाऱ्यानें. १३ स्पर्श केलेले. १४ मस्तकें. १५ बसण्याचीं स्थानें. १६ पावला. १७ खरें. १८ शंकरानें. १९ अर्धा. २० मस्तकावर. २१ रस्त्यावरील पाणी. २२ निराळें, भिन्न. २३ त्रिवार. २४ शेवटीं. २५ शंभर ठिकाणीं फुटलेल्या. २६ शस्त्रांच्या वर्षावामध्यें. २७ न घालावें. २८ ढाल. २९ न निघावें.

न भजतां भरंवसा । सुखाचा कोण ॥ ९४ ॥ [ असुखं ] तरी भोग्यजात जेतुलें । तें एका देहाचिया निकिया लागलें । आणि एथ देह तंव असे पडिलें । काळाचिये तोंडीं ॥ ९५ ॥ बाप दुःखाचें केणें सुटलें । जेथ मरणाचें भरें लोटलें । तिये मृत्युलोकींचें शेवटिलें । हाटवेळे येणें जाहालें ॥ ९६ ॥ आतां सुखेंसि जीविता ॥ केंची ग्राहिकी किजेल पांडुसुता । काय राखोंडी फुंकितां । दीप लागे ॥ ९७ ॥ अगा विषाचे कांदे वाटुनी । जो रस घेईजे पिळुनी । तया नाम अमृत ठेउनी । जैसें अमर होणें ॥९८॥ तेविं विषयांचें जें सुख । तें केवळ परमदुःख । परि काय कीजे मूर्ख । न सेवितां न सरे ॥९९॥ कां शीसें खांडूनी आपुलें । पायींच्या खतीं बांधिलें । तैसें मृत्युलोकींचें भलें । आहे आघवें ॥ ५०० ॥ ह्मणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी । ऐकिजेल कवणाचिये श्रवणीं । केंची सुखनिद्रा आंथरुणीं । इंगळाच्या ॥ १ ॥ [ अनित्यं ] जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी । जेथ उदय होय अस्तालागीं । दुःख लेऊनि सुखाची आंगी । सळिंत जगातें ॥ २ ॥ जेथ मंगळाचिया अंकुरीं । सवेंचि अमंगळाची पडे पोरी । मृत्यु उदराचिया परिवरीं । गर्भ गिंवसी ॥ ३ ॥ जें नाहीं तें तयातें चिंतवी । तंव तेंचि नेइजे गंधर्वीं । गेलियाची कवणें गांवीं । शुद्धी न लगे ॥ ४ ॥ अगा गिंवसितां आघविया वाटीं । परतलें पाउलचि नाहीं किरीटी । सैंघ निमालियाचिया गोष्टी । तियें पुराणें जेथिंचीं ॥ ५ ॥ जेथींचिये अनित्यतेची थोरी । करितया ब्रह्मयाचे आयुष्यवेरी । कैसें नाहीं होणें अवधारीं । निपटूनियां ॥ ६ ॥ [लोकं] ऐसी लोकींची जिये नांदणुक । तेथ जन्मले आथि जे लोक । तयांचिये निश्चितीचें कौतुक । दिसत असे ॥ ७ ॥ पैं दृष्टादृष्टाचिये जोडी—। लागीं भांडवल न सुटे कवडी । जेथ सर्वस्वें हानि तेथ कोडी । वेंचिती गा ॥ ८ ॥ जो बहुवे विषयविलासें गुंफे । तो ह्मणती उवाई पडिला सोपें । जो अभिलाषभारें दडपे । तयातें सज्ञान ह्मणती ॥ ९ ॥ जयाचें आयुष्य धाकुटें होय । बळ प्रज्ञा जिरोनि जाय । तयाचे नमस्कारिती पाय । वडिल ह्मणुनी ॥ ५१० ॥ जंव जंव बाळ बळिया वाढे । तंव तंव भोजें नाचती कोडें । आयुष्य निमालें आंतुलियेकडे । ते ग्लानीचि नाहीं ॥ ११ ॥ जन्मलिया दिवसदिवसें । हों लागे काळाचेंयाचि ऐसें । कीं वाढती करिती उल्हासें । उभविती गुढिया ॥ १२ ॥ अगा मर हा बोल न साहती । आणि मेलिया तरीं रडती । परि असतें जात न गणिती । गाहिंसपणें ॥ १३ ॥ दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा । कीं तो मासियां वेंटाळी जिभा । तैसे प्राणिये कवणे लोभा । वाढविती तृष्णा ॥ १४ ॥ अहा कटकटा हें वोखटें । इये मृत्युलोकींचें उफराटें । [ भजस्व मां ] एथ अर्जुना जरि अवचटें । जन्मलासी तूं ॥ १५ ॥ तरि झडझडोनि वाहिला निघ । ईये भक्तिचिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग । निजधाम माझें ॥ १६ ॥

१ सर्व उपभोग्य वस्तु. २ बरेपणास. ३ माल, वासन. ४ पूर. ५ शेवटचें. ६ बाजाराच्या वेळीं. ७ गिऱ्हाइकी. ८ सेवन करतांना दूर होत नाहीं. ९ मस्तक. १० तोडून. ११ क्षतावर. १२ गोष्ट. १३ कवच, आंगरखा. १४ छळतो. १५ कीड. १६ घरामध्यें. १७ शोधतो. १८ गंधर्वांनीं. १९ बहुत. २० कर्ता. २१ आयुष्य सरेपर्यंत. २२ सर्वथैव. २३ कोट्यावधि. २४ गुंततो. २५ सुखामध्यें. २६ प्रस्तुत. २७ लोभाच्या ओझ्यानें. २८ उणें. २९ वुद्धि. ३० संतोषानें. ३१ कमी होतें. ३२ आंतून.

**"मग वर्णांमध्यें जे केवळ छत्रचामर;-श्रेष्ठ-स्वर्ग हाच ज्यांचा इनामगांव; मंत्रविद्येचें माहेर; असे जे ब्राह्मण, ४७५ जे पृथ्वीवरचे देव; जे तपश्चर्येचे अवतार; जे सकलतीर्थांचें उदयास आलेलें दैव; ४७६ जे निरंतर यज्ञामध्यें असणारे; जे वेदाचें दृढतर कवच; ज्यांच्या दृष्टीच्या मांडीवर मंगळ वाढतो, ४७७ ज्यांच्या आस्थेच्या ओलाव्यानें सत्कर्म विस्तार पावलें आहे; ज्यांच्या संकल्पानें सत्य जन्मास आलें; ४७८ ज्यांच्या शब्दांनीं अग्नीला आयुष्य प्राप्त झालें; ह्मणून समुद्रानेंही आपलें पाणी त्यांच्या स्वाधीन केलें. ४७९ मी लक्ष्मी ढकलून दूर केली; कौस्तुभ काढून हातांत घेतला; आणि त्यांच्या चरणरजांना वक्षस्थळाचा खळगा तयार केला. ४८० हे अर्जुना! ती पाउलाची मुद्रा, आपल्या दैवसमुद्राला जतन करण्यासाठीं, अझून मी हृदयावर धारण केली आहे. ४८१ हे वीरश्रेष्ठा! ज्यांचा कोप ह्मणजे काळाग्निरुद्राचें स्थान; आणि ज्यांच्या प्रसादानें फुकट सिद्धि प्राप्त होतात. ४८२ असे पुण्यानें पूज्य झालेले जे ब्राह्मण, आणि माझ्या ठिकाणीं जे अत्यंत तत्पर; ते मला पावतील हें काय सांगितलें पाहिजे ? ४८३ हें पहा चंदनाच्या आंगावरून आलेल्या वाऱ्यानें, जवळ असलेल्या निंबाला**

१ खेदच नाहीं. २ काळाच्याच स्वाधीन. ३ वाढदिवस. ४ जात असतें, नाश होत असतें. ५ मूर्खपणानें. ६ माशांना. ७ अरेरे! ८ वाईट. ९ अकस्मात्, यदृच्छेनें. १० दूर, वेगळा. ११ ह्या. १२ जिच्या योगानें.

स्पर्श केला, तर ते निर्जीव देखील देवांच्या मस्तकावर बसण्यास योग्य होतात. ४८४ मग प्रत्यक्ष चंदन तेथें जाणार नाहीं, हें मनांत तरी कसें आणावें ? अथवा जातो असें प्रतिपादन करावें तेव्हांच का खरें ? नाहीं तर खोटें ? ४८५ निववील अशा आशेनें शंकरांनीं चंद्रमा अर्धा असतांही तो निरंतर मस्तकीं धारण केला आहे. ४८६ मग निवविणारा; सगळा; आणि सुगंधामध्यें तर चंद्राहून श्रेष्ठ, तो सहज सर्वांगावर कसा बसणार नाहीं ? ४८७ रस्त्यावरील उदकेंही जिच्या कासेला लागलीं असतां समुद्ररूपी होऊन जातात, त्या गंगेला काय निराळी गति प्राप्त होईल ? ४८८ ह्मणून राजर्षि किंवा ब्राह्मण; जे मलाच शरण आलेले; त्यांना गति, मति आणि त्रिशुद्धि मीच; आणि त्यांची शेवटची स्थितीही मीच. ४८९ ह्याकरितां शेकडों छिद्रें पडलेल्या नावेंत बसून निष्काळजी कसें असावें ? शस्त्रांची वृष्टि चालली असतां, उघडें कसें रहावें ? ४९० आंगावर दगड पडत असेल, तर ढाल नको का पुढें करावयाला ? रोगानें झालों आहों जर्जर, आणि औषधाविषयीं कां निष्काळजी ? ४९१ अर्जुना ! जेथें चहूंकडून वणवा पेटलेला आहे, तेथून न निघावें कसें? त्याप्रमाणें दुःखमय लोकांत येऊन मला कसें न भजावें ? ४९२ अरे ! मला न भजण्याइतकें सामर्थ्य आपल्या आंगीं काय बरें आहे? घरामध्यें किंवा सुखोपभोगामध्यें, शाश्वती अशी कांहीं आहे का? ४९३ माझें भजन न केलें, तर विद्या किंवा तारुण्य ह्या सुखांचा, प्राण्यांना भरंवसा तरी कसा लागेल? ४९४ उपभोग्य वस्तु तेवढ्या एका देहाच्या बरेपणाला लागतात, आणि तो देह तर येथें काळाच्या तोंडांत सांपडलेला आहे. ४९५ जेथें मोठमोठाल्या दुःखाचा माल येऊन पडला आहे; मरणाची रास लागून गेली आहे; त्या मृत्युलोकामध्यें मनुष्यरूपानें शेवटचें जन्म बाजाराच्या वेळेसच प्राप्त झालें. ४९६ अर्जुना ! आतां जीविताला सुख लागेल असा कोणता सवदा करावा ? राखुंडी फुंकली, तर दिवा लागेल काय ? ४९७ अरे ! विषाचे कांदे वांटून त्यांचा पिळून रस काढून त्याचें नांव अमृत ठेवणें, आणि त्यापासून जसें अमर होणें, ४९८ तसें हें जें विषयांचें सुख, तें केवळ परम दुःख आहे. पण मूर्खांना काय करावें ? सेवन केल्याशिवाय रहातच नाहींत. ४९९ किंवा आपलें मस्तक कापून पायाच्या क्षतावर बांधणें जितकें चांगलें, तितकेंच मृत्युलोकींचें सगळें चांगलें आहे. ५०० ह्मणून मृत्युलोकामध्यें कोणाच्या कानांनीं सुखाची गोष्ट ऐकावयाला सांपडेल ? इंगळांच्या आंथरुणावर सुखाची निद्रा कशाची? ५०१ पण ज्या लोकांतील चंद्र क्षयरोगी; जेथें अस्तासाठीं उदय होतो; जेथें दुःख हें सुखाचें आंगरखें घालून जगास छळतें. ५०२ जेथें मंगळाला अंकुर फुटला, कीं लगेच त्यांत अमंगळाची कीड पडलीच; जेथें मृत्यु हा, पोटाच्या घरांत शिरून गर्भ सुद्धां धुंडाळतो. ५०३ नाहीं त्याची चिंता करावयाला लागते. तो अदृश्य पुरुष येऊन तेंच घेऊन जातो. आणि तें कोणत्या गांवाला गेलें, ह्याचा पत्ता सुद्धां लागत नाहीं. ५०४ अर्जुना ! साऱ्या वाटा शोधल्या तरी, परत पाऊल ह्मणून पडतच नाहीं. असंख्यात लोक नाहींसे झाले ह्या गोष्टी, हींच जेथलीं पुराणें; ५०५ जेथच्या अनित्यतेची थोरवी, सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाच्या आयुष्यापर्यंत वर्णन करीत बसलें तरी संपावयाची नाहीं. ५०६ अशी ज्या लोकांतली रहाटी; तेथें जे जन्मले आहेत, त्यांची शाश्वति ह्मणजे आश्चर्याचीच गोष्ट दिसते. ५०७ ऐहिक व पारलौकिक जोडण्याला, एक कवडीचें भांडवल सुटत नाहीं; आणि ज्यांत सर्वस्वी हानि आहे, तेथें कोट्यावधि खर्च करितात. ५०८ जो अनेक विषयविलासांत गुरफटून जातो, तो आतां सुखांत पडला आहे असें ह्मणतात. जो अभिलाषाच्या भारानें दडपून जातो, त्याला ह्मणतात सज्ञान ! ५०९ ज्याचें आयुष्य उणें होतें, शक्ति व बुद्धि ना-

हीशी होऊन जाते; त्याला वडील ह्मणून पायां पडतात! ५१० बाळाचें जों जों बळ वाढतें, तों तों मोठ्या संतोषानें नाचतात. पण आंतून आयुष्य कमी झालें, त्याचें कांहींच दुःख नाहीं. ५११ जन्मलेला दिवस पुन्हां पुन्हां आला, तर तो काळाच्या अधिक जवळ जवळ जाऊं लागतो. पण त्याचा मोठ्या आनंदानें वाढदिवस करितात, आणि गुढ्या उभारतात! ५१२ अरे, 'मर' हा शब्द सुद्धां खपत नाहीं, आणि मेला ह्मणजे रडतात. पण आयुष्य जात असतें त्याची मूर्खपणानें खिसगणती करीत नाहींत. ५१३ साप बेडकाला उभा गिळीत असतो; तरी तो आपल्या जिभेनें माशा धरितो. तसें प्राणी हे भलत्याच लोभानें तृष्णा वाढवितात. ५१४ हाय हाय! हें किती वाईट! ह्या मृत्युलोकचें सारेंच उफराटें. अर्जुना! येथें जर तूं दैवयोगानें जन्मला आहेस, ५१५ तर झडझडून वेगळा निघ; ह्या भक्तीच्या वाटेला लाग. ह्मणजे तिच्या योगानें अव्यंग अशा माझ्या घराला येशील." ५१६

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥३४॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

[ मन्मना भव मद्भक्तो ] तूं मन हें मीचि करीं । माझिया भजनीं प्रेम धरीं । [ मां नमस्कुरु ] सर्वत्र नमस्कारीं । मज एकातें ॥ १७ ॥ [ मद्याजी ] माझेनि अनुसंधानें देख । संकल्प जाळणें निःशेष । मैयाजी चोखें । याचि नांव ॥१८॥ [ युक्त्वैवमात्मानं ] ऐसा मियां आथिला होसी । [ मामेवैष्यसि ] तेथ माझियाचि खरूपा पावसी । हें अंतःकरणींचें तुजपासीं । बोलिजत असें ॥ १९ ॥ [ मत्परायणः ] अगा अवघियां चोरियां आपुलें । जें सर्वस्व आह्मी असे ठेविलें । तें पावोनि सुख संचलें । होऊनि ठासी ॥ ५२० ॥ ऐसें सांवळेनि परब्रह्में । तेणें भक्तकामकल्पद्रुमें । बोलिलें श्रीआत्मारामें । संजयो ह्मणे ॥ २१ ॥ अहो ऐकिजत असे कीं अवधारा । तंव इया बोला निवांत ज्ञातारा । जैसा ह्मैसा तुठी कां पुरा । तैसा उगाचि असे ॥२२॥ तेथ संजयें माथा तुकिला । अहो अमृताचा पाउस वर्षला । कीं हा एथ असतुचि गेला । सेजिया गावां ॥ २३ ॥ तऱ्ही दातारें हा आमुचा । ह्मणोनि हें बोलतां मैळेल वाचा । काय कीजे याचा । खभावचि ऐसा ॥ २४ ॥ परि बाप भाग्य माझें । जे वृत्तांत सांगावयाचेनि व्याजें । कैसा रक्षिलों मुनिराजें । श्रीव्यासदेवें ॥ २५ ॥ येतुलें हें वाड सायासें । जंव बोलत असे दृढमानसें । तंव न धरवेचि आपुलिया ऐसें । *सात्त्विकें केलें ॥ २६ ॥ चित्त चाकाटलें आंडु घेत । वाचा पांगुळली जेथिंची तेथ । आपादकंचुकित । रोमांच आले ॥ २७ ॥ अर्धोन्मीलित डोळे । वर्षताति आनंदजळें । आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ॥ २८ ॥ पैं आघवाचि रोममूळीं । आली स्वेदकणिका निर्मळी । लेइला मोतियांचीं कडियाळीं । आवडे तैसा ॥ २९ ॥ ऐसा महासुखाचेनि अंतिरसें । जेथ आटणी हों पाहे जीवदशे । तेथ निरोपिलें व्यासें । तें नेदीचें हों ॥ ५३० ॥ आणिक श्रीकृष्णाचें बोलणें । घोंकरी आलें श्रवणें । कीं देहस्मृतीचा तेणें । वोपसा केला ॥ ३१ ॥ तेव्हां नेत्रींचें जळ विसर्जी । सर्वांगींचा स्वेद परिमोर्जी । तेवींचि अवधारा ह्मणे होजी । धृतराष्ट्रातें ॥३२॥ आतां श्रीकृष्णवाक्यबीजनिवाड । आणि संजय सात्त्विकाचा बिवड । ह्मणोनि श्रोतया होईल सुरवाड । प्रमेयपिकाचा ॥ ३३ ॥ अहो अंलुमाळ अवधान देयावें । येतुलेनि आनंदाचे राशीवरी बैसावें । बाप श्रवणेंद्रियां दैवें । घातली माळ ॥ ३४ ॥ ह्मणोनि विभूतींचा जो ठावो । अर्जुना दावील सिद्धांचा रावो । तो ऐका ह्मणे ज्ञानदेवो । निवृत्तीचा॥५३५॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ श्लोक ३४, ओंव्या ५३५.

१ अनुलक्षानें. २ माझें यजन करणारा. ३ निर्मळ. ४ माझ्या योगानें संपन्न. ५ चोरून ठेवलेलें. ६ रहाशील.

१ रेडा. २ पुराला, पाण्याच्या लोंढ्याला. ३ असूनच. ४ शेजारच्या. ५ धनी. ६ दूषित होईल. ७ मोठें, बलवत्तर. ८ मोठें. ९ आपणाला. १० गहून गेलें. ११ संकोच, आटणी. १२ नखशिखांत. १३ अर्धे उघडे व अर्धे झांकलेले नेत्र. १४ घर्मबिंदु. १५ मोत्यांची. १६ माळा. १७ भरानें. १८ आकुंचन. १९ देईनासाच झाला. २० झटकर. २१ वाफ आलेली जमीन. २२ पुसून टाकला. २३ श्रीकृष्णाचें शब्दरूप उत्तम बीज. २४ खत. २५ अनुकूलता. २६ अर्थरूप पिकाचा. २७ किंचित्. २८ येवढ्यानें. २९ श्रेष्ठ. ३० ईश्वरी अवताराचा. ३१ राजा.

* येथून पुढें सात्त्विकतेचे आठ भाव जे "स्तंभः स्वेदोथ रोमांचः स्वरभंगोथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्त्विका मताः ॥" गहिंवर येणें, घाम फुटणें, आंगावर रोमांच उभे रहाणें, कंप सुटणें, विवर्णता प्राप्त होणें, अश्रु गळणें इत्यादि ते वर्णन केले आहेत.

"तूं आपलें मन मद्रूप कर; माझ्या भजनामध्यें प्रेम धर; जिकडे तिकडे मला एकालाच नमस्कार कर. ५१७ हें पहा! माझ्या अनुसंधानानें जो निखालस संकल्प जाळून टाकतो, त्यालाच माझें उत्तम यजन करणारा असें ह्मणतात. ५१८ असा माझ्या योगानें संपन्न झालास कीं, माझ्याच स्वरूपाला पोंचशील. ही अंतःकरणांतील गोष्ट तुझ्यापाशीं सांगतों. ५१९ अरे! आजपर्यंत सर्वत्र चोरून जें जें कांहीं आह्मीं ठेवलेलें आहे, तें तुला मिळून तूं सुखरूप होऊन राहशील." ५२०

**संजय** ह्मणतो "ह्याप्रमाणें सांवळें स्वरूप धारण करणारा; जो परब्रह्माचा अवतार; भक्तांच्या कामनेचा कल्पवृक्ष; अशा स्वस्वरूपीं रममाण होणाऱ्या **श्रीकृष्णांनीं** सांगितलें. ५२१ अहो! ऐकलेंतना नीट?" परंतु हें ऐकून तो ह्मातारा-**धृतराष्ट्र**-जसा एखादा रेडा, पूर आला तरी उठत नाहीं, त्याप्रमाणें स्वस्थ बसला. त्याच्या मनाला कांहींच विकार होईना. ५२२ तेव्हां **संजयानें** मान डोलवेली, आणि ह्मणाला "अहाहा! हा तर अमृताचा केवळ पाऊस पडतो आहे. पण हा गृहस्थ पहा! येथें असूनच शेजारच्या गांवीं गेला. ५२३ पण हा आमचा धनी पडला. ह्मणून हें बोललों तर, वाचा दूषित होईल. काय करावें? ह्याचा स्वभावच असा. ५२४ परंतु माझें दैव बलवत्तर. कीं, मुनिराज **श्रीव्यासदेवांनीं**, हा वृत्तांत सांगण्याच्या निमित्तानें, माझें कसें संरक्षण केलें पहा!" ५२५ हें इतकें दृढ मन करून मोठ्या सायासानें जो बोलतो आहे, तों प्रेमानें आतां आपणास धीर धरवत नाहीं असें करून सोडलें. ५२६ चित्त गर्क होऊन संकोचित झालें; वाणी जेथल्या तेथें पांगुळली; आंगरखा घातल्यासारखे नखशिखांत रोमांच उभे राहिले; ५२७ नेत्र अर्धोन्मीलित होऊन त्यांतून आनंदाश्रु निघूं लागले; अंतस्सुखाच्या लहरीच्या जोरानें बाहेर कंप सुटला; ५२८ तसेंच, प्रत्येक रोमरंध्रावर बारीक बारीक घामाचे निर्मळ बिंदु उत्पन्न झाले; त्यामुळें मोत्यांची माळाच घातली आहे असें वाटलें. ५२९ अशी महत्सुखाच्या अतिरसानें जीवदशेची आटणीच होते कीं काय असें भासूं लागलें. तेव्हां **व्यासांनीं** सांगितलेलें तें देईनासाच झाला. ५३० इतक्यांत **श्रीकृष्णाचे** शब्द चट्कर कानावर आले. आणि त्यांनीं देहस्मृतीची वाफ आलेली जमीन तयार केली. ५३१ तेव्हां डोळ्यांचें पाणी काढून टाकलें; साऱ्या आंगावरचा घाम पुसला; आणि लागलेंच **धृतराष्ट्रास** ह्मणाला 'अहो महाराज? ऐका.' ५३२ आतां **श्रीकृष्णवाक्यरूप** उत्तम बीज, आणि **संजयाच्या** प्रेमाचें खत हीं दोन्हीं मिळालीं. तेव्हां सिद्धांताचें पीक श्रोत्यांच्या पदरीं पडेल. ५३३ अहो! थोडेंसें लक्ष्य द्या. ह्मणजे तेवढ्यानें तुह्मी आनंदाच्या राशीवर बसाल. कर्णांनां आज महद्भाग्यानें माळ घातली आहे, ५३४ ह्मणून **निवृत्तीचे ज्ञानदेव** ह्मणतात "विश्वाचा राजा जो **भगवान्** तो आतां **अर्जुनाला** ईश्वरमूर्तीचीं स्थळें दाखवील. तीं ऐका." ५३५

## नववा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय १० वा.

नमो विशद[1]बोधविदग्धा । विद्या[2]रविंदप्रबोधा । परा[3]प्रमेयप्रमदा । विलासिया ॥ १ ॥ नमो संसार[4]तमसूर्या । अपरिमित[5]परमवीर्या । तरुण[6]तरतूर्या । लालनलीला ॥ २ ॥ नमो जगदखिल[7]पालना । मंगळमणिनिधाना[8] । सज्जन[9]वनचंदना । आराध्य[10]लिंगा ॥ ३ ॥ नमो चतुरचित्त[11]चकोरचंद्रा । आत्मानु[12]भवनरेंद्रा । श्रुतिसार[13]समुद्रा । मन्मथ[14]मन्मथा ॥ ४ ॥ नमो सुभाव[15]भजना । भवेभकुंभभंजना[16] । विश्वोद्भव[17]भुवना । श्रीगुरुराया ॥ ५ ॥ तुमचा अनुग्रहो गणेश । जैं आपुला दे सौरस[18] । तैं सारस्वतीं[19] प्रवेश । बाळकाही आंथि[20] ॥ ६ ॥ जी दैविकी[21] उदार वाचा । जैं उद्देश दे नाभिकाराचा[22] । तैं नवरससुधाब्धीचा । थाउ लाभे ॥ ७ ॥ जी आपुलिया स्नेहाची वाग्गे[23]श्वरी । जरी मुकेयातें अंगीकारी । तो वाचस्पतीसीं करी । प्रबंधहोडा[24] ॥ ८ ॥ हें असो दिठी[25] जयावरी झळके । कीं हा पद्मकर माथां पोरुखे[26] । तो जीवचि परि तुके[27] । महेशेंसीं ॥ ९ ॥ एवढें जिये महिमेचें करणें । ते वाचावळें वानूं मी कवणें । कां सूर्याचिया आंगा उटणें[28] । लागत असे ॥ १० ॥ केउतों[29] कल्पतरुवरी फुलौरा[30] । कायसेनि पाहुणेर[31] क्षीरसागरा । कवणे वासीं कापुरा । सुवास देवों ॥ ११ ॥ चंदनातें कायसेनि चर्चावें । अमृतातें केउतें रांधावें[1] । गगनावरी उभवावें[2] । घडे केवि ॥ १२ ॥ तैसें श्रीगुरुचें महिमान । आकळितें कें[3] असे साधन । हें जाणोनियां नमन । निवांत केलें ॥ १३ ॥ जरी प्रज्ञेचेनि आंथिलेपणें[4] । श्रीगुरु सामर्थ्यरूप करूं ह्मणे । तरि तें मोतियां भिंग[5] देणें । तैसें होईल ॥ १४ ॥ कां साडेपंधरया[6] रंजतवणी[7] । तैसीं स्तुतीचीं बोलणीं । उगियाचि माथा ठेविजे चरणीं । हेंचि भलें ॥ १५ ॥ मग ह्मणितलें जी स्वामी । भलेनि ममत्वें देखिला तुह्मी । ह्मणोनि कृष्णार्जुनसंगमीं । प्रयागवट[8] जाहालों ॥ १६ ॥ मागां दूध दे ह्मणितलियासाठीं । आघविया क्षीराब्धीची करूनि वाटी । उपमन्यूपुढें धूर्जटी[9] । ठेविली जैसी ॥ १७ ॥ ना तरी वैकुंठपीठनायकें । रुसला ध्रुव कवतिकें । वुझाविला[10] देऊनि भातुकें[11] । ध्रुवपदाचें ॥ १८ ॥ तैसी जे ब्रह्मविद्यारावो । सकळशास्त्रांचा विसंवतों[12] ठावो । ते भगवद्गीता ओंविये[13] गावों । ऐसें केलें ॥ १९ ॥ जे बोलणियाचे रानीं हिंडतां । नायकीजे फळलिया अक्षराची वार्ता । परि ते वाचाचि केली कल्पलता । विवेकाची ॥ २० ॥ होती देहबुद्धी एकसरी । ते आनंदभांडारा केली वोवरी । मन गीतार्थक्षीरसागरीं । जळशयन जालें ॥ २१ ॥ ऐसें एकेक देवाचें करणें । तें अपार बोलों केवि मी जाणें । तऱ्ही अनुवादलों धीटपणें । तें उपसाहिजो[14] जी ॥ २२ ॥ आतां आपुलेनि कृपाप्रसादें । मियां भगवद्गीता वोवीप्रबंधें । पूर्वखंड[15] विनोदें । वाखाणिलें ॥ २३ ॥ प्रथमीं[16] अर्जुनाचा विषाद[17] । दुजीं बोलिला योग विशद[18] । परि सांख्यबुद्धीसि भेद । दाऊनियां ॥ २४ ॥ तिजीं केवळ कर्म प्रतिष्ठिलें । तेंचि चतुर्थीं ज्ञानेसीं प्रगटिलें । पंचमीं गव्हारिलें[19] योगतत्त्व ॥ २५ ॥ तेंचि षष्ठामाजि प्रगट । आंसनालागोनि[20] स्पष्ट । जीवात्मभाव एकवट । होती जेणें ॥ २६ ॥ तैसी जे योगस्थिती । आणि योगभ्रष्टां जे गती । ते आघवीचि उप[21]-

---

१ स्पष्ट बोध करण्याविषयीं कुशला. २ विद्या हेंच कमल, त्यास विकसित करणाऱ्या. ३ प्रकृतिस्त्रीशीं विलास करणाऱ्या. ४ संसाररूप अंधकाराच्या सूर्या. ५ अपरिमित बलशाले. ६ अत्यंत तरुण तूर्येचें लालन, हीच ज्याची लीला. ७ अखिल विश्वाचें पालन करणाऱ्या. ८ कल्याणरूप रत्नांच्या भांडारा. ९ सज्जनरूप वनांतील चंदना. १० आराध्यमूर्ते. ११ चतुरजनांचें चित्त हाच कोणीएक चकोर, त्यास चंद्राप्रमाणें शीतल करणाऱ्या. १२ आत्मस्वरूपाचा सुखानुभव घेणाऱ्या श्रेष्ठपुरुषा. १३ श्रुत्यर्थाच्या समुद्रा. १४ मदनाचें मथन करणाऱ्या. १५ सद्भाव वाहणाऱ्या. १६ संसाररूप हत्तीचें गंडस्थळ विदारण करणाऱ्या. १७ विश्वोत्पत्तिस्थाना. १८ प्रसाद. १९ सर्व विद्येंत. २० होतो. २१ गुरूची. २२ अभयाचा. २३ सरस्वती. २४ ग्रंथ करण्याची प्रतिज्ञा. २५ दृष्टी. २६ स्थिर होतो. २७ साम्य पावतो. २८ लेप, रंग, उटी. २९ कोठून. ३० मोहोर. ३१ मेजवानी.

१ पक्वान्न करावें. २ उंच करावें. ३ कोठें? ४ संपन्नतेनें. ५ मुलामा, पाणी. ६ उत्तम सोन्याला. ७ रुप्याचा मुलामा. ८ प्रयाग. ९ शंकरानें. १० समजूत केली. ११ खाऊ. १२ विश्रांतिस्थान. १३ ओव्यांच्या रूपानें. १४ क्षमा करावी. १५ पूर्वार्ध. १६ पहिल्या अध्यायामध्यें. १७ दुःख. १८ स्पष्ट. १९ गौरव केला. २० आसनासहवर्तमान. २१ प्रतिपादन.

पत्ती । सांगीतली षष्ठीं ॥ २७ ॥ तयावरी सप्तमीं । प्रकृतिपरिहार उपक्रमीं । भजती जे पुरुषोत्तमीं । ते बोलिले चान्ही ॥ २८ ॥ पाठीं सप्त प्रश्नसिद्धी । बोलोनि प्रयाणसमयशुद्धी । एवं सकळवाक्यावधि । अष्टमाध्यायीं ॥ २९ ॥ मग शब्दब्रह्मीं असंख्याकें । जेतुला कांहीं अभिप्राय पिके । तेतुला महाभारतें एकें । लक्षें जोडे ॥ ३० ॥ तिये आघवाचि जें महाभारतीं । तें लाभे कृष्णार्जुनवचनोक्तीं । आणि जो अभिप्रावो गीते सातेंशतीं । तो एकलाचि नवमीं ॥३१॥ ह्मणोनि नवमींचिया अभिप्राया । सहसा मुद्रा लावावया । विहाला बेद मग मी वायां । गर्व कां करूं ॥ ३२ ॥ अहो गुळा साखरे मीलयाचे । वांधे तरि एकाचि रसाचे । परि स्वाद गोडियेचे । आन आन जैसे ॥ ३३ ॥ एक जाणोनियां बोलती । एक ठायेंठाय जाणविती । एक जाणों जातां हारपती । जाणते गुणेसीं ॥ ३४ ॥ हे ऐसे अध्याय गीतेचे । परि अनिर्वाच्यपण नवमाचें । तो अनुवादलों हें तुमचें । सामर्थ्य प्रभू ॥ ३५ ॥ अहो एकाची शांटी तपिन्नली । एकीं सृष्टीवरि सृष्टि केली । एकीं पाषाणीं वांऊनि उतरलीं । समुद्रीं कटकें ॥ ३६ ॥ एकीं आकाशीं सूर्यातें धरिलें । एकीं चुळींचि सागरातें भरिलें । तैसें मज मुकेयाकरवीं बोलविलें । अनिर्वाच्या तुह्मी ॥ ३७ ॥ परि हें असो एथ ऐसें । श्रीराम रावण झुंझिनले कैसे । श्रीराम रावण जैसे । मीनले समरीं ॥ ३८ ॥ तैसें नवमीं कृष्णाचें बोलणें । तें नवें मीचियाचि ऐसें मी ह्मणें । या निवाडा तत्त्वज्ञ जाणे । जया गीतार्थ हातीं ॥३९॥ एवं नवही अध्याय पहिले । मियां मतीसारिखे वाखाणिले । आतां उत्तरखंड उपाइलें । ग्रंथाचें ऐका ॥ ४० ॥ जेथ विभूतीप्रतिविभूती । प्रस्तुत अर्जुना सांगीजती । ते विदग्धा रसवृत्ती । ह्मणिपैल कथा ॥ ४१ ॥ देशियेचेनि नागरपणें । शांत शृंगारातें जिणें । तरि वोंविया होती लेणें । साहित्यासी ॥ ४२ ॥ मूळग्रंथींचिया संस्कृता । वरि मन्हाटी नीट पाहातां । अभिप्राय मानलिया चित्ता । कवण भूमी हें न चोजवे ॥ ४३ ॥ जैसें आंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगचि होय लेणें । तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ॥ ४४ ॥ तैसी देशी आणि संस्कृतवाणी । एका भावार्थाच्या सुखासनीं । शोभती आयणी । चोखट आइका ॥ ४५ ॥

१ मायेपासून सुटका. २ आरंभीं. ३ चार प्रकारचे. ४ वेदांत. ५ लक्षानें. ६ स्पष्ट सांगण्याला. ७ भ्याला. ८ ढेपीचें. ९ भिन्न भिन्न. १० ठिकाणोठिकाणीं, कोठें कोठें. ११ बोललों, प्रतिपादन केला. १२ छाटी, वस्त्र. १३ वाहून. १४ सैन्यें. १५ मुक्याकडून. १६ बोलावयास अगम्य असेंही. १७ भिडले. १८ नवव्यांतच. १९ मीं. २० यथामति. २१ आरंभ झाला. २२ सुंदर. २३ जिंकतो. २४ ओव्या. २५ सांगतां येत नाहीं. २६ आवडीनें.

उदयलिया भावारूप । करितां रसवृत्तीचें लागे वेडप । चातुर्य ह्मणे पैडप । जोडलें आह्मां ॥ ४६ ॥ तैसें देशियेचें लावण्य । हिरोनि रसां आणिलें तारुण्य । मग रचिलें अगण्य । गीतातत्त्व ॥ ४७ ॥ जो चराचरपरमगुरु । चतुरचित्तचमत्कारु । तो ऐका यादवेश्वरु । बोलता जाहाला ॥ ४८ ॥ ज्ञानदेव निवृत्तीचा ह्मणे । ऐसें बोलिलें श्रीहरी तेणें । अर्जुना आघवियाचि मातू अंतःकरणें । घेडौता आहासी ॥ ४९ ॥

**हे सुगमबोधकुशला? हे विद्यापद्मविकासका! हे प्रकृतिरूप स्त्रीशीं विलास करणाऱ्या! तुला नमस्कार असो. १ हे संसारतमाच्या सूर्या! हे अपरिमित परमवीर्या! हे थोर समाधीचें लालन करणाऱ्या! तुला नमस्कार असो. २ हे अखिल जगत्पालका! हे मंगलरत्नभांडारा! हे सज्जनवनचंदना! हे आराध्यदैवता! तुला नमस्कार असो. ३ हे चतुरचित्तचकोरचंद्रा! हे आत्मानुभवनरेंद्रा! हे श्रुतिसारसमुद्रा! हे मदनमथना! तुला नमस्कार असो. ४ हे सुभावभजना! हे संसारगजमस्तकविदारका! हे विश्वोत्पत्तिस्थाना श्रीगुरुराया! तुला नमस्कार असो. ५ तुमच्या अनुग्रहरूप गणेशाचा प्रसाद झाला, कीं मुलें सुद्धां सर्व विद्येंत पारंगत होतात. ६ गुरूची उदार वाणी जेव्हां अभयाचा प्रसाद देते, तेव्हांच नवरसामृतसमुद्राचा ठाव लागतो. ७ महाराज! आपली प्रेमसरस्वती मुक्याला जर पदरीं घेईल, तर तो सुद्धां ग्रंथरचनेंत बृहस्पतीशीं पैज मारील. ८ हें तर असो. परंतु ही दृष्टि ज्याच्यावर जाईल, किंवा हा कमलहस्त ज्याच्या मस्तकावर पडेल, तो मनुष्य असूनही शंकराच्या बरोबरीचा होतो. ९ येवढी ज्या महिम्याची करणी, त्याला मी कोणत्या वाणीच्या बळानें वर्णन करावें? सूर्याच्या आंगाला उटणें लागेल काय? १० कल्पतरूवर मोहर कोठचा? क्षीरसागराला कशाची मेजवानी करावी? कापुराला कोणत्या वासानें सुगंधित करावें? ११ चंदनाला कशाचा लेप द्यावा? अमृताला**

१ भावाला रूप चढलें ह्मणजे. २ आश्रय. ३ प्रतिष्ठा, सन्मान. ४ गोष्टीला. ५ धड, घेण्यास तयार.

पक्वान्न काय करावें? गगनावर उंच जाणें कसें घडणार? १२ त्याप्रमाणें श्रीगुरूचा महिमा समावेश होण्यासारखें साधन कोठें आहे? हें मनांत आणूनच मी मुकाट्यानें नमस्कार मात्र करतों. १३ शहाणपणाच्या जोरावर श्रीगुरूच्या सामर्थ्याचें यथोचित वर्णन करूं ह्मटलें तर, तें मोत्यावर अभ्रकाचें पुट दिल्याप्रमाणें होईल. १४ किंवा स्तुतिपर भाषणें हीं, उत्तम सोन्यावर रुप्याचा मुलामा चढविल्याप्रमाणें होतील. ह्मणून मुकाट्यानें चरणावर मस्तक ठेवावें हेंच बरें. १५ मग ह्मणाले "महाराज! प्रभो! आज आपण मोठ्या कृपादृष्टीनें मजकडे पाहिलें. ह्मणून **कृष्णा**च्या आणि **अर्जुना**च्या संगमामध्यें मी प्रयागवट बनलों. १६ पूर्वी 'दूध द्या' असें ह्मटलें, तेवढ्यासाठीं, साऱ्या क्षीरसमुद्राची वाटी करून **शंकरांनीं** जशी **उपमन्यूपुढें** ठेविली; १७ किंवा **वैकुंठनाथांनीं**, ध्रुवपदाचा मेवा देऊन जशी रुसलेल्या **ध्रुवाची** समजूत केली, १८ त्याप्रमाणें ब्रह्मविद्येचा राजा; सर्व शास्त्रांचें विश्रांतिस्थान; अशी जी भगवद्गीता, ती, मीं ओव्यांनीं गावी असें केलें. १९ कारण, भाषणारण्यांत विचरत असतां, फलद्रूप झालेल्या अक्षरांची वार्ता सुद्धां ऐकूं येत नव्हती. पण तीच वाणी विवेकाची कल्पवल्लरी करून सोडली. २० देहबुद्धि होती ती सारी अभेदभावाची ओवरी करून सोडली; व गीतार्थक्षीरसागरामध्यें मनाला जलमंदिर बांधून दिलें. २१ असें एकेक देवाचें करणें आहे! त्याला अंतपार नाहीं. तेव्हां तें मला कसें बोलतां येईल? तरी महाराज! धीटपणानें बोललों, त्याची क्षमा असावी. २२ येवढा वेळपर्यंत आपल्या कृपाप्रसादाच्या योगेंकरून मीं ओवीछंदानें भगवद्गीतेचें पूर्वखंड आनंदानें वर्णन केलें. २३ पहिल्या अध्यायांत **अर्जुनाचें** दुःख; व दुसऱ्या अध्यायांत योगाचें स्पष्टीकरण केलें. पण सांख्यबुद्धीला भेद दाखवून. २४ तिसऱ्या अध्यायामध्यें फक्त कर्माची प्रशंसा करून चवथ्या अध्यायांत तें ज्ञानासहवर्तमान प्रगट केलें. पांचव्यांत योगतत्त्वाचें प्रतिपादन. २५ तेंच सहाव्यामध्यें खुलासेवार; जीवात्मभाव ज्याच्यामध्यें ऐक्यता पावतात, असें आसनासहवर्तमान सांगितलें. २६ त्याचप्रमाणें योग्याची स्थिति, व योगभ्रष्ट झालेल्यांची गति ह्या साऱ्याचें प्रतिपादनही सहाव्यांतच केलें. २७ नंतर सातव्यांत प्रकृतीचा परिहार सांगण्याच्या आधीं, जे चार प्रकारचे लोक पुरुषोत्तमाचें भजन करतात, त्यांचें कथन केलें. २८ त्यानंतर सात प्रकारचे प्रश्न व त्यांचीं उत्तरें सांगून, प्रयाणास उत्तम समय कोणता? इत्यादि विवेचन आठव्या अध्यायांत सांगितलें. २९ तदनंतर—असंख्य वेदांमध्यें जेवढा ह्मणून अर्थ निघतो, तितका भारतांतील एका लक्षांत येतो. ३० आणखी सर्व भारतांतील सार, **कृष्णार्जुनांच्या** भाषणांत प्राप्त होतें. आणि गीतेच्या सातशें श्लोकांमध्यें जो अभिप्राय आहे, तो एका नवव्या अध्यायांत येतो. ३१ ह्मणून नवव्या अध्यायांतील अभिप्राय स्पष्ट सांगण्याला वेद सुद्धां भ्याला. मग मीं फुकट गर्व कां करावा? ३२ अहो! ज्याप्रमाणें गुळाच्या ढेपा आणि साखरेच्या ढेपा एकाच रसाच्या असतात; परंतु त्यांची गोडी आणि स्वाद जशीं वेगवेगळीं; ३३ त्याप्रमाणें कित्येक अध्यायांतील अर्थ समजून घेऊन सांगतां येतात, कित्येकांमध्यें मधून मधून समजतें. आणि कित्येक समजून घ्यावयाला लागावें, तों ज्ञानच नाहींसें होऊन जातें. ३४ असे हे गीतेचे अध्याय आहेत. पण नवव्या अध्यायाविषयीं तर बोलणेंच नाहीं. हे प्रभो! तो मीं प्रतिपादन केला, हें तुमचें सामर्थ्य. ३५ अहो! एकानें छाटी शेकली;* एकानें सृष्टीवर सृष्टी केली; एकांनीं पाषाणावरून सैन्यें नेऊन समुद्रपार केलीं. ३६ कोणी

* वसिष्ठ ऋषींनीं छाटी शेकली; विश्वामित्र ऋषींनीं प्रतिसृष्टि निर्माण केली; श्रीरामचंद्रांनीं समुद्रावर पाषाण तारून सैन्य उतरलें. जरत्कारुनें सूर्यास भांबवून धरलें, आणि अगस्तिऋषींनीं साऱ्या समुद्राची चूळ भरून टाकली.

आकाशांत सूर्याला धरलें; कोणी समुद्राची चूळच भरून टाकली; त्याप्रमाणें तुह्मी वाणीला अगम्य जें ब्रह्म, तें माझ्यासारख्या मुक्याकडून बोलविलेंत. ३७ पण तें वितर्केंच असो. कारण, तें सांगणें ह्मणजे **श्रीराम** आणि **रावण** कसे झुंजले? तर जसें **श्रीरामरावणांनीं** युद्ध केलें त्याप्रमाणें, असें ह्मणावयाचें. ३८ तसें नवव्या अध्यायांतील **कृष्णाचें** बोलणें तें नवव्या अध्यायांतील बोलण्यासारखेंच आहे, असें मी ह्मणतों. गीतेचा अर्थ ज्यांना हस्तगत झालेला आहे, असे तत्त्वज्ञ पुरुष ह्याचा निवाडा करतील. ३९ अशाप्रकारें पहिले नऊ अध्याय, मीं यथामतीनें वर्णन केले. आतां यापुढें ग्रंथाच्या उत्तरखंडास आरंभ झाला. तेंही ऐका. ४० यांत आतां **अर्जुनाला** विभूति, प्रतिविभूति सांगतील. ती कथा किती तरी रसाळ आहे असें ह्मणाल. ४१ देशी–मऱ्हाटी–भाषेच्या चांगुलपणानें शांतरस शृंगाररसास जिंकील, तर ह्या ओव्या अलंकारशास्त्रासही अलंकार होऊन रहातील. ४२ मूलग्रंथांतील संस्कृत आणि त्यावरचें मऱ्हाटी; हीं जर नीट अवलोकन केलीं, आणि त्यांतील अभिप्राय चित्तांत बिंबला, तर मूळ कोणतें हें समजणार सुद्धां नाहीं. ४३ ज्याप्रमाणें आंगाच्या सुंदरपणानें, अलंकारांना आंगच अलंकार होतें. तेथें कोणीं कोणाला शोभा आणिली हें कांहीं सांगतां येत नाहीं. ४४ त्याप्रमाणें देशी भाषा आणि संस्कृत भाषा ह्या एका भावार्थाच्या सिंहासनावर बसल्या आहेत. तर प्रेमानें नीट ऐका. ४५ अर्थ मूर्तिमंत उभा राहिला कीं रसाचे लोंढे वाहूं लागतात; आणि चातुर्य ह्मणतें, आमचा मोठा सन्मान झाला. ४६ त्याप्रमाणें देशी भाषेचें लावण्य लुटून रसास आणिलें, आणि मग अगणित गीतातत्त्वाची रचना केली आहे. ४७ जो चराचराचा परम गुरु; जो चतुरांच्या चित्तांचा चमत्कार; तो **यादवेश्वर** बोलूं लागला. ऐका. ४८ **निवृत्तीचे ज्ञानदेव** ह्मणतात "**अर्जुना!** सर्व गोष्टींना अंतःकरणपूर्वक लक्ष्य देतोसना?" असें **श्रीहरी** ह्मणाले. ४९

श्रीभगवानुवाच—

भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥१॥

[श्रीभगवानुवाच भूय एव] आह्मी मागील जें निरूपण केलें। तें तुझें अवधानचि पाहिलें। तंव टांचें[1] नव्हे भलें। पुरतें आहे ॥ ५० ॥ घटीं थोडेंसें उदक घालिजे। तेणें न गळे तरी वरिता भरिजे। ऐसा परिसौनि पाहिलासि तंव परिसविजे। ऐसेंचि होतसे ॥ ५१ ॥ अवेचित[2] यावरी सर्व सांडिजे। मग चोख तरी तोचि भांडारी कीजे। तैसा किरीटी तूं आतां माझें। निजधाम कीं ॥ ५२ ॥ ऐसें अर्जुना येउतें सर्वेश्वरें। पाहोनि बोलिलें अत्यादरें। गिरी देखोनि सुभरे[3]। मेघ जैसा ॥ ५३ ॥ तैसा कृपालुवांचा रावो। [महाबाहो] ह्मणे आइकें गा महाबाहो। सांगितलाचि अभिप्रावो। सांगेन पुढती ॥ ५४ ॥ [वक्ष्यामि हितकाम्यया] पैं प्रतिवर्षी क्षेत्र[4] पेरिजे। पिकाची जरी वाढी देखिजे। यालागीं नुंवगिजे[5]। वाहो[6] करितां ॥ ५५ ॥ पुंढतपुढती[7] पुटें देतां। जोडे वानियेची[8] अधिकता। ह्मणोनि सोनें पांडुसुता। शोधूंचि[9] आवडे ॥ ५६ ॥ तैसें एथ पार्था। तुज ओंभार[10] नाहीं सर्वथा। आह्मी आपुलियाचि स्वार्था। बोलों पुढती ॥ ५७ ॥ [यत्तेऽहं प्रीयमाणाय] जैसें बाळका लेवविजे लेणें। तैयाप्रमाणें[11] बाळ काई जाणे। परि ते सुखाचे सोहळे भोगणें। माउलिये दिठी ॥ ५८ ॥ तैसें तुझें हित आघवें। जंव जंव कां तुज फांवे[12]। तंव तंव आमुचें सुख दुणावे। ऐसें आहे ॥ ५९ ॥ आतां अर्जुना असो हे विकडी[13]। मज उघड तुझी आवडी। ह्मणोनि तृप्तीची सेवडी[14]। बोलतां न पडे ॥ ६० ॥ आह्मा येतुलियाचि कारणें। तेंचि तें तुजशीं बोलणें। परि असो हें अंतःकरणें। अवधान देईं ॥ ६१ ॥ [शृणु मे परमं वचः] तरी ऐकें ऐकें गा सुवर्म[15]। वाक्य माझें परम। जें अक्षरें लेऊनि परब्रह्म। तुज खेंवासि[16] आलें ॥ ६२ ॥ परि किरीटी तूं मातें। नेणसी ना निरुतें। तरि तो गा जो मी एथें। तें विश्वचि हें ॥ ६३ ॥

"आह्मीं मागें निरूपण केलें, त्यांत तुझें लक्ष्य कितपत असतें हें पाहिलें. त्यावरून तें कमी

१ अपुरें. २ अपरिचित, नकळत. ३ भरून येतो. ४ शेत. ५ कंटाळा करूं नये, सोडूं नये. ६ लागवड करावयाची. ७ पुन्हां पुन्हां. ८ कांतीची, वर्णाची. ९ शुद्ध करावें असेंच. १० भार. ११ त्याप्रमाणें. १२ समजतें. १३ चातुर्याचें भाषण. १४ शेवट. १५ उत्तम वर्म. १६ आलिंगन देण्याला.

नाहीं येवढेंच नव्हे, तर चांगलें परिपूर्ण आहे, असें दिसून आलें. ५० घागरींत आधीं थोडेंसें पाणी घालून पहावें, आणि तेवढ्यानें जर ती गळली नाहीं, तर मग वर भरावी. त्याप्रमाणें तुला सांगून पाहिलें, तों आणखी आणखी सांगावें असेंच वाटतें. ५१ अपरिचित मनुष्यावर सर्व सोंपवावें. आणि त्यांत तो चोख निघाला, तर त्यासच भांडारी नेमावा. त्याप्रमाणें **अर्जुना!** तूं आतां माझें विश्वासाचें स्थळ झालास." ५२ **अर्जुना**ला उत्कंठित झालेला पाहून सर्वेश्वरांनीं ह्याप्रमाणें अति आदरानें भाषण केलें. आणखी, पर्वत पाहतांच मेघ जसा भरून येतो, ५३ त्याप्रमाणें दयावंताचा राजा जो **भगवान्** तो ह्मणाला "**अर्जुना!** ऐक. पूर्वीं सांगितलेला अभिप्रायच मी तुला पुन्हां सांगणार आहें. ५४ प्रत्येक वर्षीं शेत पेरावें आणि पिकाची जर वाढ दिसून येईल, तर तें पुन्हां पेरावयाचें सोडूं नये. ५५ पुन्हां पुन्हां पुटें दिलीं असतां अधिकाधिक तेज चढत जातें. ह्मणून **अर्जुना!** सोनें हें शुद्धच करावेंसें वाटतें. ५६ तसें **पार्था!** ह्याचा तुझ्यावर भार असा मुळींच नाहीं. आह्मी आपल्या स्वार्थाकरतांच पुन्हां सांगतों आहों. ५७ बाबा! जसे बालकाला अलंकार घातले, तर ते त्याला काय होत? पण त्या सुखाचे सोहळे आईच्या डोळ्यांनीं भोगावयाचे. ५८ त्याप्रमाणें तुझें सारें हित, जों जों तुला कळूं लागतें, तों तों आमचें सुख वाढतें. असा प्रकार आहे. ५९ **अर्जुना!** आतां हें चातुर्याचें भाषण–किंवा कोड्या–पुरेत. मला खरोखर तुझी आवड आहे, ह्मणून बोलतांना तृप्ति ह्मणून होतच नाहीं. ६० येवढ्याच कारणाकरितां तेंच तें तुझ्यापाशीं बोलावें लागतें. पण तें असो. आतां अंतःकरणपूर्वक लक्ष्य दे. ६१ बाबा! ऐक. ऐक. हें माझें वाक्य फार खोचीचें आहे. हें अक्षरांच्या रूपानें परब्रह्मच तुला आलिंगन देण्यास आलें आहे. ६२ पण **अर्जुना!** तूं मला खरोखर जाणत नाहींसना? तर, जो मी येथें आहें तोच हें विश्व." ६३

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः॥ २॥

[ न मे विदुः ] एथ वेद मुके जाहाले। मन पवन पांगुळले। रातीविण मावळले। रविशशी ॥ ६४ ॥ [-सुरगणाः ] अगा उदरींचा गर्भ जैसा। न देखे आपुलिये मायेची वयसा[1]। मी आघवेया देवां तैसा। नेणवे कांहीं ॥ ६५ ॥ [ न महर्षयः ] आणि जळचरां उदधीचें मान। मशका नोलांडवेचि गगन। तेविं महर्षींचें ज्ञान। न देखेचि मातें ॥ ६६ ॥ [ प्रभवं ] मी कवण पां केतुला[2]। कवणाचा कैं जाहाला। या निरुती[3] करितां बोला। कल्प[4] गेले ॥ ६७ ॥ [ अहमादिर्हि देवानामिति ] कां जे महर्षी आणि या देवां। येरां भूतजातां सर्वां। मीचि आदि ह्मणोनि पांडवा। अवघड जाणतां॥६८॥ उतरलें उदक पर्वत वळघे[5]। जरी झाड वाढत मुळीं लागे। तरी मियां[6] जालेनि जगें। जाणिजे मातें ॥ ६९ ॥ कां गा[7]-भेवनें वट गिंवसवे[8]। जरी तरंगीं सागर सांठवे। कां परमाणुमाजी सामावे। भूगोल हा ॥ ७० ॥ तरि मियां जालिया[9] जीवां। महर्षी अथवा देवां। मातें जाणावया होआवा। अवकाश गा॥ ७१ ॥ ऐसाही जरी विपायें[10]। सांडूनि पुढील[11] पाये। सर्वेंद्रियांसि होये। पाठिमोरा[12] जो जो ॥ ७२ ॥ प्रवर्तलाही वेगीं बहुडे[13]। देह सांडूनि मागलीकडे। महाभूतांचिया चढे। मायथावरी ॥ ७३ ॥

" त्या मला जाणावयासाठीं वेद मुके झाले; मन, वायु, हे लंगडे पडले; रात्र नसतांनाच चंद्रसूर्य अस्तास गेले. ६४ बाबा! उदरांतील गर्भाला ज्याप्रमाणें आईचें वय कळत नाहीं, त्याप्रमाणें सर्व देवांनाही मी कांहीं कळत नाहीं. ६५ आणखी, जलचरांना समुद्राचें मोजमाप कळत नाहीं; माशीला गगन उल्लंघन करवत नाहीं; त्याप्रमाणें महर्षींच्या ज्ञानालाही मी कळत नाहीं. ६६ मी कोण? केवढा? कोणाचा? झालों कधीं? ह्याचा निश्चय करण्याच्या आपणामध्यें कल्पच्या कल्प निघून गेले. ६७ कारण **अर्जुना!** ह्या महर्षींना, देवांना, आणि इतर सर्व प्राणिमात्रांना मूळ मीच आहें. ह्मणून कळावयाला कठीण पडतें. ६८ खालीं उतरलेलें उदक, जर पर्वतावर चढेल, वाढलेलें झाड जर

१ वय. २ केवढा. ३ निश्चय करतांना. ४ युगांचीं युगें. ५ चढेल. ६ माझ्यापासून झालेल्या. ७ बीजांतील अंकुरानें. ८ झांकवेल. ९ माझ्यापासून झालेल्या. १० कदाचित्. ११ बाह्यप्रवृत्ति. १२ पराङ्मुख. १३ मुरडतो.

मुळांना लागेल, तर माझ्यापासून झालेलें जगही मला ओळखील. ६९ किंवा बीजांतील मोडानें जर वटवृक्ष आच्छादला जाईल, लाटामध्यें जर समुद्र राहील, किंवा परमाणूंमध्यें जर हा भूगोल सांठवेल, ७० तर माझ्यापासून झालेल्या जीवांना, महर्षींना, किंवा देवांना मला जाणावयाला अवकाश होईल. ७१ असा जरी मी आहें तरी, जो चुकून बाह्यप्रवृत्ति सोडतो; सर्व इंद्रियांना पाठमोरा होतो; जो, ७२ पुढें सरसावला असतांही झपाट्यानें मागें फिरतो; तो देहासही मागें टाकून पंचमहाभूतांच्याही शिखरावर चढतो." ७३

योो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥

[ यो मामजं ] तेथ राहोनि ठायठिके[1] । स्वप्रकाशें चोखे[2] । अजत्व माझें देखे । आपुलिया डोळां ॥ ७४ ॥ [ अनादिं च वेत्ति लोकमहेश्वरं ] मी आदिसीं पर । सकळ लोकेमहेश्वर[3] । ऐसिया मातें जो नर । यापरी जाणे ॥ ७५ ॥ तो पाषाणामाजि परिस । जैसा रसाआंत सिद्धरस[4] । तैसा मनुष्याआंत तो अंश । माझाचि जाण ॥ ७६ ॥ [ असंमूढः स मर्त्येषु ] तें चालतें ज्ञानाचें बिंबें[5] । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ । येर माणुसपण तें भांव[6] । लौकिक भाग ॥ ७७ ॥ अगा अवचितां कां पुरा । माजि सांपडला हिरा । वरि पडिलिया नीरा । नेंगवे कांहीं ॥ ७८ ॥ तैसा मनुष्यलोकाआंत । तो जरी जाहाला प्राकृत । तऱ्ही प्रकृतिदोषाची मात । नेणेचि कीं ॥ ७९ ॥ तो आपभयेंचि सांडिजे पापीं । जैसा जळत चंदन सर्पीं । तेविं मातें जाणे तो संकल्पीं[9] । वर्जूनि घांपे[10] ॥ ८० ॥ [ सर्वपापैः प्रमुच्यते ] तेंचि आमुतें कैसें जाणिजे । ऐसें कल्पी जरी चित्त तुझें । तरी मी ऐसा हे माझे । भांव[11] एकें ॥ ८१ ॥ जे वेगळालिया भूतीं । सारिखे होऊनि प्रकृती । विखुरले[12] आहेति त्रिजगती । आघवियें ॥ ८२ ॥

"आणि तेथें जागच्या जागीं स्थीर राहून, आपल्या देदीप्यमान तेजानें माझें अजत्व—जन्मराहित्य—आपल्या डोळ्यांनीं पहातो. ७४ मी मूळापासून भिन्न; सकल लोकांत श्रेष्ठ; त्या मला जो अशा प्रकारें जाणतो, ७५ तो, पाषाणामध्यें जसा परिस; किंवा रसामध्यें जसें अमृत; त्याप्रमाणें मनुष्यांमध्यें माझाच अंश आहे, असें समज. ७६ चालत्या ज्ञानाची मूर्तीच ती; त्याचे अवयव ते सुखाचे कोंभ; त्याचें बाकीचें जें मनुष्यपण तीं केवळ भ्रांति—लौकिकाचा भाग. ७७ अरे! एखादा हिरा अकस्मात् पुरामध्यें सांपडला, आणि त्यावर पाणी पडलें, म्हणून त्याच्यांतलें कांहीं कमी का होतें? ७८ त्याप्रमाणें मृत्युलोकामध्यें तो जरी मायेनें बनलेला असतो तरी, मायेच्या दोषाची वार्ता सुद्धां त्याला माहीत नसते. ७९ त्याचीं पापें असतात, तीं आपआपल्या भयानेंच त्याला सोडून देतात. जळत असलेल्या चंदनाला जसे साप सोडून देतात, तद्वत् जो मला जाणतो, त्यास संकल्प आहेत ते वगळून टाकतात. ८० पण त्या आह्मास जाणावें कसें? अशी जर तुझ्या मनांत कल्पना येईल, तर मी तो कसा, आणि माझे भाव ते कोणते? हें सांगतों ऐक. ८१ हे भाव निरनिराळ्या प्राण्यांमध्यें प्रकृत्यनुसार होऊन त्रिभुवनांत पसरलेले आहेत." ८२

बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।
सुखं दुःखं भवो भावो भयं चाऽभयमेव च ॥ ४ ॥
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।
भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥

[ बुद्धिः ] तेथ प्रथम जाण बुद्धी । [ ज्ञानं ] मग ज्ञान जें निरवधी[1] । [ असंमोहः ] असंमोह[2] सहनसिद्धी । [ क्षमा सत्यं ] क्षमा सत्य ॥ ८३ ॥ [ दमः शमः ] मग शम दम दोन्ही । [ सुखं दुःखं ] सुखदुःख वर्तत जनीं । [ भवो भावो ] अर्जुना भवाभाव[3] मानीं । भावाचिमाजी ॥ ८४ ॥ [ भयं चाभयमेव च ] पैं भय आणि निर्भयता । [ अहिंसा समता ] अहिंसा आणि समता । [ तुष्टिस्तपः ] तुष्टि तप पांडुसुता । ओळख तूं ॥ ८५ ॥ [ दानं यशोऽयशः ] अगा दान यश अपकीर्ती । [ भवंतीति ] हे जे भाव सर्वत्र दिसती । ते मजचिपासूनि होती । भूतांचियां[4] ठायीं ॥८६॥ जैसीं भूतें आहाती तिनांनीं[5] । तैसेचि हेही वेगळाले मानीं । एक उपजती माझ्या ज्ञानीं । एक नेणती मातें ॥ ८७ ॥ प्रकाश आणि कडंवसें । हें सूर्या-

१ ठिकाणचे ठिकाणीं. २ शुद्ध, निर्मळ. ३ सर्वश्रेष्ठ. ४ अमृत, रसायन. ५ मूर्ति. ६ भ्रम. ७ कांहीं उणें होत नाहीं. ८ आपल्या भयानें. ९ संकल्पांना, कल्पनांना. १० घालतो. ११ धर्म-अंश. १२ पसरले.

१ निःसीम. २ मोह नसणें. ३ जन्म व नाश. ४ प्राण्यामध्यें. ५ आहेत. ६ निरनिराळे. ७ आंधार, झांजड. ८ सूर्यामुळेंच.

चिस्तव जैसें । प्रकाश उदयीं दिसे । तम अस्तुसीं ॥ ८८ ॥ आणि माझें जाणणें नेणणें । तें तंव भूतांचिया भावाचें करणें । ह्मणोनि भूतीं भावाचिया होणें । विषम पडे ॥ ८९ ॥ यापरी माझिया भावीं । हे जीवसृष्टि आहे आघवी । गुंतली असे जाणावी । पांडुकुमरा ॥ ९० ॥ आतां इये जे सृष्टीचे पालक । जयांआधीन वर्तती लोक । ते अकरा भाव आणिक । सांगेन तुज ॥ ९१ ॥

**"त्यांत पहिल्या प्रथम बुद्धि; मग निस्सीम असें ज्ञान; मोहाचा अभाव; सहनशीलता; क्षमा; आणि सत्य. ८३ नंतर शम, दम हे दोन्ही; आणि जगांत असणारीं सुखें व दुःखें. आणखी अर्जुना! जन्म व नाश ह्या दोहोंचीही गणना भावांतच-कर. ८४ त्याचप्रमाणें भय, आणि निर्भयता; अहिंसा आणि समता; संतोष आणि तप हींही अर्जुना! मनांत आण. ८५ किंवा दान, यज्ञ, अपकीर्ति हे जे भाव सर्वत्र दृष्टीस पडतात, ते प्राणिमात्रांच्या ठायीं माझ्यापासूनच होतात. ८६ प्राणी हे ज्याप्रमाणें वेगवेगळे आहेत, त्याप्रमाणें हे भावही वेगवेगळे आहेत. त्यांतील कितीएक माझ्या ज्ञानापासून उत्पन्न होतात, आणि कितीएकांस माझी ओळखही नसते. ८७ जसे प्रकाश आणि अंधार हे सूर्यामुळेच होतात तद्वत्. त्याचा उदय झाला ह्मणजे प्रकाश दिसतो, आणि तो अस्तास गेला ह्मणजे अंधार पडतो. ८८ आणखी मला ओळखणें किंवा न ओळखणें, हें तर प्राणिमात्रांच्या भावाचें फल आहे. ८९ ह्याप्रमाणें अर्जुना! ही सारी जीवसृष्टि माझ्या भावामध्यें गुरफटलेली आहे हें लक्ष्यांत ठेव. ९० आतां ह्या सृष्टीचें पालन करणारे, ज्यांच्या आज्ञेनुसार लोक वागतात, ते अकरा भाव-अंश-किंवा अवतार-तुला आणखी सांगतों ऐक." ९१**

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।
मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः॥६॥

[ महर्षयः सप्त पूर्वे ] तरी आघवाचि गुणीं वृद्ध । जे महर्षींमाजि प्रबुद्ध । कश्यपादि प्रसिद्ध । सप्त ऋषी गा ॥ ९२ ॥ [ चत्वारो मनवस्तथा ] आणीकही सांगिजतील । जे कां चौदा आंतुल मुदल । स्वयंभूमुख्य वडिल । चारी मनु ॥ ९३ ॥ ऐसे हे अकरा । [ मद्भावा मानसा जाताः ] माझ्या मनीं जाहाले धनुर्धरा । सृष्टीचिया व्यापारा । लागोनियां ॥ ९४ ॥ जैं लोकांची व्यवस्था न पडे । जैं या त्रिभुवनाचें कांहीं न माडे । तैं महाभूतांचें दळवाडें । अचुंबित असे ॥ ९५ ॥ तैंचि हे जाहाले । [ येषां लोक इमाः प्रजाः ] मग इहीं लोक केले । तेथ अध्यक्ष रचुनि ठेविले । इहीं जन ॥ ९६ ॥ ह्मणोनि अकराही हे राजा । मग येर जग यांचिया प्रजा । एवं विश्वविस्तार हा माझा । ऐसेंचि जाण ॥ ९७ ॥ पाहें पां आरंभीं बीज एकलें । मग तेंचि विरुढलिया बुड जाहालें । बुडीं कोंभ निघाले । खांदियांचे ॥ ९८ ॥ खांदिपासूनि अनेका । फुटिलिया नाना शाखा । शाखांस्तव देखा । पल्लव पानें ॥ ९९ ॥ पल्लवीं फूल फळ । एवं वृक्षत्व जाहालें सकळ । तें निर्धारितां केवळ । बीजचि आघवें ॥ १०० ॥ तैसें मी एकचि पहिलें । मग मी तेंचि मनातें व्यालें । तेथ सप्तऋषी आणि जाहाले । चारी मनु ॥ १ ॥ इहीं लोकपाळ केले । लोकपाळीं विविध लोक सर्जिले । लोकांपासूनि निपजलें । प्रजाजात ॥ २ ॥ ऐसेनि हें विश्व येथें । मीचि विस्तारिलोंसें निरुतें । परि भावाचेनि हातें । मानें जया ॥ ३ ॥

**"तर सर्व गुणांनीं श्रेष्ठ; मोठमोठ्या ऋषींमध्यें जे ज्ञाते; असे कश्यपादिकरून जे सप्तर्षि; ९२ आणखी, चौदांमध्यें श्रेष्ठ, स्वयंभुमुख्य असे जे चार मनु, तेही तुला सांगून देतों. ९३ अर्जुना! असे हे अकरा, सृष्टीच्या व्यापारासाठीं माझ्यापासून झालेले आहेत. ९४ ज्या कालीं लोकांची व्यवस्था लागलेली नव्हती; त्रिभुवनांत जेव्हां कोणतीच रचना नव्हती; पंचभूतांचे समुदाय जेव्हां अस्पष्ट होते; ९५ त्या वेळेस हे झाले. आणि नंतर त्यांनीं लोक उत्पन्न केले. आणि त्यांनींच थोर थोर लोकांची स्थापना केली. ९६ ह्मणून हे अकराही राजे, आणि बाकीचें सारें जग ही त्यांची प्रजा होय. अशा प्रकारें**

१ अस्तमानीं. २ कठीण. ३ विभूति. ४ सर्व. ५ ज्ञाते.

१ चौदांतील मुख्य. २ मनापासून. ३ व्यवस्था लागलेली नव्हती. ४ समुदाय. ५ अस्पष्ट. ६ श्रेष्ठ. ७ वाढल्यावर. ८ डाहळ्यांपासून. ९ निश्चय करतांना. १० तसें मी 'अहं' पहिलें. ११ अहं हें. १२ राजे. १३ राजांनीं. १४ उत्पन्न केले. १५ प्रत्येक प्रजा. १६ भावाच्या योगानें. १७ मान्य होतें.

ह्या विश्वाचा जो विस्तार, तो माझाच आहे हें लक्ष्यांत ठेव. ९७ असें पहा! प्रारंभाला बीं एकच असतें. आणि तेंच मोठें झालें ह्मणजे बुडखा होतो. आणि त्या बुडख्यापासून खांद्याचे कोंभ निघतात. ९८ खांद्यांपासून अनेक डाहळ्या फुटतात, आणि त्या डाहळ्यापासून पानें व शेंडे फुटतात. ९९ शेंड्यापासून फुलें व फळें. याप्रमाणें सारा वृक्ष तयार होतो. त्या सर्वांचा विचार केला तर, तो सारा विस्तार एका बीजाचाच. १०० त्याप्रमाणें मी-अहं-हें पहिलें. आणि मी ह्मटलें कीं, त्यांत मनाचा समावेश झालाच. त्या मनापासून सप्तऋषी आणि चारही मनु झाले. १०१ त्यांनीं लोकांना पालन करणारे-राजे-निर्माण केले. त्या राजांनीं नानाप्रकारचे लोक उत्पन्न केले. आणि त्या लोकांपासून अनेक प्रकारची प्रजा उत्पन्न झाली. १०२ अशा रीतीनें खरोखर हें विश्व, येथें मीच विस्तारलेलें आहे. परंतु ज्याला भाव-माझा अंश-आहे त्यालाच हें कळतें" १०३

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ।
सोऽविकंपेन योगेन युज्यते नाऽत्र संशयः ॥ ७ ॥

[एतां विभूतिं] यालागीं सुभद्रापती । हे भाव ईया[1] माझिया विभूती । आणि यांचिया व्याप्ती । व्यापिलें जग ॥ ४ ॥ [योगं च] ह्मणोनि गा यापरी । ब्रह्मादिपिपीलि-[2]कावरी । मीवांचूनि[3] दुसरी । गोष्टीच नाहीं ॥ ५ ॥ [मम यो वेत्ति तत्त्वतः] ऐसें जाणे जो साचें । तया चेथिरें[4] जाहालें ज्ञानाचें । ह्मणोनि उत्तमाधमभेदाकें । स्वप्न न देखे ॥ ६ ॥ मी माझिया विभूती । विभूतीं अधिष्ठिलीया व्यक्ती । हें आघवें योगप्रतीती । एकचि मानी ॥ ७ ॥ [सोऽविकंपेन योगेन] ह्मणोनि निःशंकें येणें महायोगें[6] । [युज्यते नात्र संशयः] मज मीनले[5] मनाचेनि आंगें । एथ संशय करणें न लगे । तो त्रिशुद्धी[7] जाहाला ॥८॥ कां जे ऐसें किरीटी । मातें भजे जो अभेदा दिठी । तयाचिये भजनाचे नाटीं । मीचि लाभें ॥ ९ ॥ ह्मणऊनि अभेदें जो भक्तियोग । तेथ शंका नाहीं नये खंगें । करितां ठेलों तरी चांग । तें सांगितलें षेठीं ॥ ११० ॥ तोचि अभेद कैसा । हें जाणावया मानसा । सादर जालां तरी परियेसा । बोलिजेल ॥ ११ ॥

"ह्याकरितां अर्जुना! हे भाव ह्याच माझ्या विभूती होत. त्यांच्या वस्तीनें हें सर्व जग व्यापून गेलें आहे. १०४ ह्मणून अशा प्रकारें ब्रह्मदेवापासून तों मुंगीपर्यंत माझ्या-वांचून दुसरी गोष्ट नाहीं. १०५ हा खरा प्रकार ज्यास कळतो, त्याचें ज्ञान जागृत होतें. आणि तेणेंकरून त्याला उत्तम व अधम या भेदाचें स्वप्नसुद्धां पडत नाहीं. १०६ मी; माझ्या विभूती; माझ्या विभूतीनें आश्रय केलेल्या व्यक्ती; हीं सारीं योगानुभवानें एकच आहेत असें समज. १०७ याकरितां, या निःशंक महायोगाच्या योगानें जे मनाच्या योगेंकरून माझ्याशीं ऐक्य पावले, ते सिद्ध झाले कीं काय, असा संशय सुद्धां घ्यावयास नको. १०८ कारण अर्जुना! अशा प्रकारें जे मला अभेद-दृष्टीनें भजतात, त्यांच्या भजनाच्या ठिकाणीं मीच प्राप्त होतों. १०९ ह्मणून अभेदभावानें जो भक्तियोग करावा, त्यांत, शंका रहात नाहीं, व त्यांत कोणता व्यत्ययही येत नाहीं. बरें, तो करितां करितां मध्यें खंड पडला, तरी चांगलेंच; त्याविषयीं सहाव्या अध्यायांत सांगितलेंच आहे. ११० आतां तो अभेदभाव कसा? हें जाणावयाला उत्कंठित झाला असशील, तर सांगतों. ऐक". १११

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ।
इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥

[अहं सर्वस्य प्रभवः] तरि मीचि एक सर्वां । या जगा जन्म पांडवा । आणि [मत्तः सर्वं प्रवर्तते] मजचिपासूनि आघवा । निर्वाह यांचा ॥ १२ ॥ कल्लोळमाळा अनेगा । जन्म जळींचि पैंगा । आणि तया जळचि आश्रय तरंगा । जीवनही जळ ॥ १३ ॥ ऐसें आघवांचि ठायीं । तयां जळचि जेविं पाहीं । तैसा मीवांचूनि नाहीं । दिर्धी इये ॥१४॥ [इति मत्वा भजंते मां] ऐसिया व्यापका मातें । मानूनि जे भजती भलतेथें । परि साचोकारें उदितें । प्रेमभावें ॥ १५ ॥ देश काळ वर्तमान । आघवें मजसीं करूनि अभिन्न । जैसा

१ त्या. २ ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत. ३ माझ्याशिवाय. ४ जागृत. ५ मिळाले. ६ योगानें. ७ सिद्ध झाला. ८ ठिकाणीं. ९ थकणें, हरकत, प्रतिबंध. १० बंद पडला.

१ सहाव्या अध्यायामध्यें. २ लाटांच्या ओळी. ३ कोणत्याही रीतीनें. ४ खऱ्या उत्कंठेनें.

वायू होऊनि गगन । गगनींचि विचरे ॥ १६ ॥ [बुधा भावसमन्विताः] ऐसेनि जे निजज्ञानी । खेळत सुखें त्रिभुवनीं । जगद्रूपा मनीं । सांठऊनि मातें ॥ १७ ॥ जें जें भेटे भूतें । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ १८ ॥

" अर्जुना ! ह्या साऱ्या जगाला मीच एक जन्म; व त्याचा सारा निर्वाहही माझ्याचपासून. ११२ लाटांच्या अनेक मालिका असल्या तरी, त्यांचा जन्म पाण्यांतच; आणि त्या उठायाला आश्रय पाण्याचाच; आणि त्या वांचावयाला कारणही पाणीच. ११३ असें साऱ्या ठिकाणीं त्यांना जसें पाणीच असतें तसें माझ्याशिवाय ह्या विश्वांत कांहीं नाहीं. ११४ मला अशा व्यापकाला जाणून जे कोणी कोठेंही भजन करितात. पण तें खऱ्या उत्कंठेनें आणि प्रेमभावानें करतात. ११५ देश, काल, वर्तमान सारें माझ्याहून भिन्न नाहीं, असें करून ज्याप्रमाणें वायु हा गगन होऊन गगनांतच संचार करतो, ११६ त्याप्रमाणें जे आत्मज्ञानी मला—जगद्रूपाला—मनांत सांठवून आनंदानें त्रिभुवनांत विहार करतात. ११७ आणि जो प्राणी भेटेल तो तो भगवंतच आहे असें मानतात. तोच खरा भक्तियोग. लक्ष्यांत ठेव. " ११८

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ।
कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥९॥

[मच्चित्ता मद्गतप्राणाः] चित्तें मीचि जाहाले । मियेंचि प्राणें धाले । मग जीवों मरों विसरले । बोधाचिया भुली ॥ १९ ॥ [बोधयंतः परस्परं] मग तया बोधाचेनि माजें । नाचती संवादसुखांचीं भोजें । आतां एकमेकां घेपे दीजे । बोधचि वरी ॥ १२० ॥ जैसीं जवळिकेचीं सरोवरें । उचंबळलिया कालवती परस्परें । मग तरंगासीं धवळारें । तरंगचि होती ॥ २१ ॥ तैसी येरयेरांचिये मिळणी । पडत आनंदकल्लोळांची वेणी । तेथें बोधबोधांचीं लेणीं । बोधेंची मिरवी ॥ २२ ॥ जैसें सूर्यें सूर्यातें वोंवाळिलें । कीं चंद्रें चंद्रम्या क्षेम दीधलें । ना तरीं सरिसेनि पांडें मिनले । दोनी वोघ ॥ २३ ॥ तैसें प्रयाग होत सामरस्याचें । वरी वोसाण तरत सात्विकाचें । ते संवाद चतुष्पथींचे । गणेश जाहाले ॥ २४ ॥ [कथयंतश्च मां नित्यं] तेव्हां तया महासुखाचेनि भरें । धांवोनि देहाचिये गांवांबाहेरें । मियां धाले तेणें उद्गारें । लागती गाजों ॥ २५ ॥ पैं गुरुशिष्याचिया एकांतीं । जे अक्षरा एकाचि वेदती । ते मेघाचियापरी त्रिजगतीं । गर्जती सैंघे ॥ २६ ॥ जैसी कमलकळिका जालेपणें । हृदयींचिया मकरंदातें राखों नेणे । दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥ २७ ॥ [तुष्यंति च] तैसेंचि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषें कथूं विसरत । [रमंति च] मग तया विसरामाजि विरत । आंगें जीवें ॥ २८ ॥ ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें । नाहीं राती दिवो जाणणें । केलें माझें सुख अव्यंगवाणें । आपणपेयां जिहीं ॥ २९ ॥

" चित्तानें मत्स्वरूप बनले; प्राणानें मीच झाले; ह्मणजे मग अनुभवाच्या भुलीमध्यें जगावयाचें किंवा मरावयाचें ह्या दोहोंचीही त्यांस विस्मृति होते. ११९ आणि अनुभवाच्या अमलानें संवादसुखाची आवड नाचूं लागते. त्या वेळीं एकमेकाला देणें किंवा घेणें हेंही अनुभवच करतो. १२० ज्याप्रमाणें जवळ जवळ असणारीं सरोवरें तुडुंब भरून एकमेकांत मिसळून गेलीं ह्मणजे लाटांना रहावयाला लाटा हेच चुनेगची वाडे होतात. १२१ त्याप्रमाणें एकमेकांच्या भेटीमध्यें आनंदाच्या लहरींची मिठी पडते, तेव्हां अनुभवाचे अलंकार घालून अनुभवच मिरवत असतो. १२२ सूर्यानें जसें सूर्यालाच ओवाळावें; किंवा चंद्रानेंच चंद्राला आलिंगन द्यावें; किंवा दोन प्रवाह समोरासमोर येऊन मिळावेत, १२३ त्याप्रमाणें ऐक्याचा संगम होऊन जातो, आणि त्यावर सात्विकतेचें—प्रेमाचें—पुईड तरंगूं लागतें. आणि तेंच संवादरूप चव्हाट्यावरील गणपती होऊन रहातें. १२४ तेव्हां ते त्या महत्सुखाच्या भरानें देहग्रामाच्या बाहेर येऊन, माझ्या तृप्तीच्या योगेंकरून उक्त शब्दांनीं गर्जना करूं लागतात. १२५ गुरुशिष्यांच्या एकांतामध्यें जे एकच अक्षर सांगतात, तेच त्रिभुवनामध्यें मेघासारखी गर्जना करीत राहतात. १२६

१ आत्मज्ञानी. २ प्राणी. ३ तृप्त झालेले. ४ अतिशयानें. ५ संतोष. ६ चुनेगचींघरें. ७ योग्यतेनें. ८ ऐक्याचें. ९ पुईड.

१ संवादरूप चव्हाट्यावरचें. २ सांगतात. ३ पुष्कळ. ४ सुगंधाचें. ५ रममाण होतात. ६ आधिक्यानें. ७ दिवस. ८ पूर्ण.

कमळाची कळी जशी विकसित झाली ह्मणजे पोटांतील मकरंदाला दडवूं शकत नाहीं; रंकाला आणि रावाला सुगंधाची मेजवानी देते, १२७ त्याप्रमाणेंच ते जगामध्यें माझे गुणानुवाद वर्णन करतात. आणि ते सांगतां सांगतां त्या आनंदाच्या भरांत त्या सांगण्याचीही त्यांना विस्मृति पडते. १२८ अशा प्रेमाच्या अतिशयानें ज्यांनीं आपणाहून माझें सुख परिपूर्ण अनुभविलें, त्यांस दिवस आणि रात्र हींही कळत नाहींत." १२९

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ १० ॥

[ तेषां ] तयां मग जें आह्मी कांहीं । द्यावें अर्जुना पाहीं । ते ठायिंचीच[1] तिहीं । घेतली सेलें[2] ॥ १३० ॥ [सततयुक्तानां] ां जे ते जिया वाटा । निगाले गा सुभटा[3] । ते सोयें[4] पाहोनि अव्हांटों[5] । स्वर्गापवर्ग[6] ॥ ३१ ॥ [ भजतां ] ह्मणोनि तिहीं नें प्रेम धरिलें । तेंचि आमुचें देणें उपांइलें[7] । परि आह्मी देयावें[8] तेहीं केलें । तिहीं ह्मणियें[9] ॥ ३२ ॥ [ प्रीतिपूर्वकं ] आतां यावरी येतुलें घडे । जे तेंचि सुख आगळें वाढे । आणि काळाची दृष्टी न पडे । हें आह्मां करणें ॥ ३३ ॥ लळेयाचिया ाळका किरीटी । गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी । जैसी खेळतां पाठोपाठीं । माउली धांवे ॥ ३४ ॥ तें जो जो खेळ ावी । तो तो पुढें सोनयाची[10] करूनि ठेवी । तैसी उपास्तीची[11] दवी । पोषित मी जायें ॥ ३५ ॥ [ येन मामुपयांति ते ] जये पदवीचेनि[12] पोषकें[13] । ते मातें पावती यथासुखें[14] । हे ळेती मज विशेखें[15] । आवडे करूं ॥ ३६ ॥ पैं गा भक्तासि ाझें कोड[16] । मज तया अनन्यगतीची चाड । कां जे प्रेमाचें सांकड[17] । आमुचिया घरीं ॥ ३७ ॥ [ ददामि बुद्धियोगं तं ] पाहें पां स्वर्ग मोक्ष उपायिले[18] । दोन्ही मार्ग तयांचये वाहणी[19] केले । आह्मी आंगही शेखीं वेचिलें । लक्ष्मिसि[20] ॥ ३८ ॥ परि आपणपेंवीण[21] जें एक । तें तैसेंचि सुख ाजुकें[22] । सप्रेमालागि देख । ठेविलें जतन ॥ ३९ ॥ हा ायेंवरी[23] किरीटी । आह्मी प्रेमळ घेवों आपण यासाठीं । या

१ त्या ठिकाणचीच. २ उत्तम वाट. ३ वीरश्रेष्ठा. ४ वाट, ार्ग. ५ आडवाटा. ६ स्वर्ग व मोक्ष. ७ उत्पन्न केलें. ८ द्यावें. ९ ह्मणावें. १० गोजिरवाणा, उत्तम. ११ उपासनेचा मार्ग. १२ त्या उत्तम मार्गाच्या. १३ पुष्टीनें. १४ आपल्या इच्छेप्रमाणें. १५ रक्षण. १६ आवड. १७ संकट. १८ उत्पन्न केले. १९ स्वाधीन केले. २० लक्ष्मीसहवर्तमान. २१ आत्मसुखावांचून. २२ नाजूक. २३ आजपर्यंत.

बोलीं[1] बोलाविया गोष्टी । तैसिया नव्हती गा ॥ १४० ॥

"हें पहा अर्जुना! मग त्याला आह्मी जें कांहीं द्यावयाचें, त्या ठिकाणचीच वाट त्यानें घेतलेली असते. १३० किंवा हे वीरश्रेष्ठा! ते ज्या वाटेला निघालेले असतात, तिचा चांगुलपणा पाहून स्वर्ग व मोक्ष ह्यासुद्धां आडवाटा आहेत असें वाटतें. १३१ ह्मणून त्यांनीं जें प्रेम धरलें, तेथूनच आमच्या देण्यास प्रारंभ होतो. पण आह्मी द्यावयाचें तें ते आधीं आपणच संपादन करतात, पण ह्मणतात मात्र आह्मी दिलें ह्मणून. १३२ पण त्यानंतर एवढें मात्र होतें कीं, तेंच प्रेमसुख पुष्कळ पटीनें अधिक वाढतें. आणि त्याच्यावर काळाची नजर न जावी, येवढें आह्मास करावें लागतें. १३३ अर्जुना! लाडक्या मुलाला आपल्या कृपादृष्टीची गवसणी करून तें खेळत असतां, आई जशी पाठोपाठ धांवते, १३४ आणि तें जो जो खेळ दाखवील, तो तो सोन्याचा करून पुढें मांडते, त्याप्रमाणें त्याच्या उपासनेचा मार्ग मी वाढवीत जातों. १३५ ज्या मार्गाच्या वाढीनें ते मला यथासुखें पोंचतील, असें करणें मला फार आवडतें. १३६ तसेंच भक्ताला माझें कौतुक वाटतें; आणि मला त्याच्या एकनिष्ठेची इच्छा असते. कारण आमच्याही घरीं प्रेमळ भक्ताची उणीवच आहे. १३७ हें पहा! स्वर्ग आणि मोक्ष हे दोन उत्पन्न करून ते दोन्ही मार्ग ज्याचे त्यास दिले. आणि लक्ष्मीसहवर्तमान आपला देह सुद्धां अर्पण केला. १३८ पण आत्मसुखावांचून जें एक सुख आहे, तें फार नाजूक आहे. तें प्रेमळभक्तासाठींच मी जतन करून ठेवलें आहे पहा! १३९ ह्याकरितां अर्जुना! प्रेमळ भक्त आहेत ते, आमच्यासाठींच आह्मी आजपर्यंत घेतों. पहा बाबा! ह्या गोष्टी तोंडांतून बाहेर काढण्यासारख्या नव्हेत." १४०

तेषामेवाऽनुकंपार्थमहमज्ञानजं तमः ।
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥

१ शब्दांनीं.

[ तेषामेव ] ह्मणोनि मेज आत्मयाचा भाव । जिहीं जियावया केला ठाव । [ आत्मभावस्थः ] एक मीवांचूनि वाव । येरें मानिलें ॥ ४१ ॥ [ अनुकंपार्थ ] तयां तत्वज्ञान चोखटा । दिवी पोतासाची सुभटा । [ ज्ञानदीपेन भास्वता ] मग मीचि होऊनि दिवटा । पुढां पुढां चालें ॥ ४२ ॥ [ अज्ञानजं तमः ] अज्ञानाचिये राती- । माजि तमाची मिळणी दाटती । [ अहं नाशयामि ] ते नाशूनि घालीं परौती[6] । तयां करीं नित्योदय ॥ ४३ ॥ ऐसें प्रेमळाचेनि प्रियोत्तमें । बोलिलें जेथ पुरुषोत्तमें । तेथ अर्जुन मनोधर्में । निवालों ह्मणतसे ॥ ४४ ॥ हांहो जी अवधारा । भला केर फेडिला संसारा । जाहलों जननीजठरजोहरा- । वेगळा प्रभू ॥ ४५ ॥ जी जन्मलेपणा आपुलें । हें आजि मियां डोळां देखिलें । जीवित हाता चढलें । आवडे ऐसें ॥ ४६ ॥ आजि आयुष्या उजवण जाहाली । माझिया दैवा दशा उदयली । जे वाक्यकृपा लाधली । दैविकेनि[12] मुखें ॥४७॥ आतां येणें वचनतेजाकारें । फिटलें आंतील वाहेरील आंधारें । ह्मणोनि देखतसें साचोकारें[13] । स्वरूप तुझें ॥ ४८ ॥

" ह्मणून ज्यांनीं आपल्या जन्मसार्थकाकरितां, आत्मस्वरूप जो मी, त्या माझी भक्ति केली; एका माझ्यावांचून बाकी सर्व व्यर्थ मानलें; १४१ अर्जुना! त्या उत्तम तत्त्वज्ञांच्या पुढें मीच मशालजी होऊन, कापराची मशाल पेटवून पुढें पुढें चालतों. १४२ अज्ञानाच्या रात्रीमध्यें अंधकाराच्या झुंडीच्या झुंडी येतात, त्यांना पलीकडे सारून माझ्या भक्ताला मी नित्योदय देतों." १४३ प्रेमळभक्तांचा प्रियसखा जो **पुरुषोत्तम** तो ह्याप्रमाणें बोलला. तेव्हां **अर्जुन** अंतःकरणपूर्वक ह्मणाला कीं "शांत झालों." १४४ "महाराज काय हो सांगावें! ऐका. हा ससाररूप केर काढून टाकलात, मोठें छान झालें. प्रभो! आईच्या उदरगर्तेतून सुटलों. १४५ महाराज! हें आपलें जन्ममरण मी आज डोळ्यांनीं पाहिलें. आणि हवें तसें जीवित हातास चढलें. १४६ आज आयुष्याचें साफल्य झालें, आणि दैवाचें भाग्य उदयास आलें. कारण, देवाच्या मुखानें शब्दकृपेचा लाभ झाला. १४७ आणि त्या वाक्प्रभावानें आंतील व बाहेरील आंधार नाहींसा झाला. ह्मणून तुझें यथार्थस्वरूप दिसूं लागलें." १४८

अर्जुन उवाच—

परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १२ ॥

[ अर्जुन उवाच–परं ब्रह्मेति ] तरि होसी गा तूं परब्रह्म । जें या महाभूतां विसवेंतें धाम । पवित्र तूं परम । जगन्नाथा ॥ ४९ ॥ तूं परमदैवत तिहीं[2] देवां । [ पुरुषमिति ] तूं पुरुष जी पंचविसावा । दिव्य तूं प्रकृति[3]भावा । पैलीकडील ॥ १५० ॥ अनादिसिद्ध तूं स्वामी । जो नाकळिजसी[4] जन्मधर्मी । तो तूं हें आह्मी । जाणितलें आतां ॥ ५१ ॥ तूं या कालयंत्रासि सूत्री । तूं जीवकळेची अधिष्ठात्री[6] । तूं ब्रह्मकटाहधात्री । हें कळलें फुडें[8] ॥ ५२ ॥

" ह्या महाभूतांस विश्रांतीचें जें स्थान तें तूं आहेस. हे **जगन्नाथा**! तूं परमपवित्र आहेस. १४९ तूं तिन्ही देवांना परमदैवत; तूं पंचविसावा पुरुष; तूं मायेच्या पलीकडचा; तूं दिव्य. १५० हे स्वामी! जन्माच्या फेऱ्यांत न सांपडणारा असा जो अनादिसिद्ध तो तूं; हें आह्मांस आतां कळलें. १५१ ह्या कालयंत्राचा सूत्रधार तूं; जीवकळेची मुख्य देवता तूं; ब्रह्मांडास आश्रयभूत तूं; हें स्पष्ट समजून चुकलें." १५२

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥१३॥

[ आहुस्त्वामृषयः सर्वे ] पैं आणीकही एकेपरी । इयें प्रतीतीची येतसे थोरी । जें मागें ऐसेंचि ऋषीश्वरीं । सांगीतलें तूतें ॥ ५३ ॥ [ स्वयं चैव ब्रवीषि मे ] परि तया सांगितलियाचें साचपण । हें आतां माझें देखतसे अंतःकरण । जे कृपा केली आपण । ह्मणोनि देवा ॥ ५४ ॥ [ देवर्षिर्नारदस्तथा ] येऱ्हवीं नारद अखंड जवळां ये । तोही ऐसेंचि वचनीं गाये । परि अर्थ न बुजोनि ठांये । गीतसुखचि ऐकों ॥ ५५ ॥ जी आंधळेयाच्या गांवीं । आपणपें प्रगटले रवी । तरि तिहीं

१ आत्मा लोभी, त्या माझा. २ व्यर्थ. ३ अन्य. ४ कापुराची. ५ समुदाय. ६ पलीकडे, दूर. ७ शांत झालों. ८ केर. ९ आईच्या उदररूप गर्तेपासून मुक्त. १० हवें तसें. ११ साफल्य. १२ देवाच्या मुखानें. १३ यथार्थतेनें.

१ विश्रांतीचें स्थान. २ ब्रह्मा, विष्णु, महेश ह्या तिन्ही देवांना. ३ मायेच्या. ४ आकळिला जात नाहींस. ५ कालरूप यंत्राचा चालक. ६ मुख्य देवता. ७ ब्रह्मांडास आश्रयभूत. ८ स्पष्ट. ९ चुकून. १० स्थान.

वोतपलीचि घ्यावी । वांचूनि प्रकाश कैंचा ॥ ५६ ॥ परि देवर्षी अध्यात्म गातां । आइ्कांच रागांगेंसी जे मधुरता । तेचि फावे येरें चित्ता । नलगेचि कांहीं ॥ ५७ ॥ [ असितो देवलो व्यासः ] पैं असिता देवलाचेनि मुखें । मी एवंविधा तूतें आइकें । परि तैं बुद्धी विषयविखें । घारिली होती ॥ ५८ ॥ विषयविषाचा पडिपाडु । गोड परमार्थ लागे कडू । कडु विषय तो गोडु । जीवासि जाहाला ॥ ५९ ॥ आणि हें आणिकांचें काय सांगावें । राउळा आपणचि येऊनि व्यासदेवें । तुझें स्वरूप आघवें । सर्वदां सांगिजे ॥ १६० ॥ परि तो आंधारीं चिंतामणी देखिला । जेविं नव्हे या बुद्धी उपेक्षिला । पाठीं दिनोदयीं वोळखिला । होय ह्मणोनि ॥ ६१ ॥ तैसीं व्यासादिकांचीं बोलणीं । तिया मजपाशीं चिद्रत्नांचिया खाणी । परि उपेक्षिल्या जात होतिया तरणी । तुजवीण कृष्णा ॥६२॥

**" तसेंच आणखीही एका रीतीनें ह्या अनुभवाचें मोठें महत्त्व दिसून येतें. कारण, मागें महान् महान् ऋषिवर्यांनींही तुझें स्वरूप सांगितलें होतें. १५३ पण त्या सांगण्याचा खरेपणा माझ्या अंतःकरणास आज पटला. तो तरी देवा! आपण कृपा केली ह्मणून. १५४ याकी नारद नेहमीं जवळ येतो; तो असेंच गाणें गातो; पण मूळ गुप्त असल्यानें अर्थ मात्र कळत नाहीं. गायन तेवढें मोठ्या आनंदानें ऐकतों. १५५ महाराज! आंधळ्यांच्या गांवामध्यें आपण होऊन सूर्य प्रगट झाला, तरी त्यांनीं कोवळें ऊन मात्र घ्यावें. त्याशिवाय त्यांना प्रकाश कशाचा? १५६ त्याप्रमाणें नारदांनीं अध्यात्माचें गायन केलें तर, त्यामध्यें वर वर असणारें जें रागदारीचें माधुर्य, तेवढेंच काय तें मिळतें. दुसरें कांहींएक चित्ताला प्राप्त होत नाहीं. १५७ त्याचप्रमाणें असिताच्या व देवलाच्या मुखानेंही याच प्रकारचें तुझें स्वरूप ऐकलें. परंतु त्या वेळीं बुद्धीही विषयविषानें घेरलेली होती. १५८ विषयविषाचा अंमल फार जबर! त्यामध्यें गोड जो परमार्थ तो कडू लागत होता, आणि कडू विषय तो जिवाला गोड वाटत होता. १५९ हें दुसऱ्याचें काय सांगावें? परंतु साक्षात् व्यासदेवही घरीं येऊन तुझें सारें स्वरूप सदासर्वकाल सांगत होते. १६० परंतु तें, आंधारांत चिंतामणी पाहून तो चिंतामणी नव्हे ह्मणून टाकून द्यावा, आणि पुन्हा उजाडल्यावर 'होय तो चिंतामणीच' ह्मणून ओळखावा; १६१ त्याप्रमाणें व्यासादिकांचीं बोलणीं, ह्या केवळ चिद्रत्नाच्या खाणीच माझ्याजवळ असतां त्यांचा प्रकाशक जो तूं, त्या तुजवांचून त्यांची उपेक्षा करीत होतों. " १६२**

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।
न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥१४॥

[ सर्वमेतदृतं मन्ये ] ते आतां वाक्यसूर्यकर तुझे फांकले। आणि ऋषींनीं मार्ग होते जे कथिले । तयां आघवयांचेंचि फिटलें । अनोळखपण ॥ ६३ ॥ जी ज्ञानाचें बीज तंव तयांचे बोल । माजि हृदयभूमिके पडिले सखोल । वरि इये जाहली वोल । ह्मणोनि संवादफळ ॥ ६४ ॥ अहो नारदादिकां संतां । त्यांचिया उक्तिरूप सरितां । मी महोदधी जाहालों अनंता । संवादसुखाचा ॥ ६५ ॥ प्रभु आघवेनि येणें जन्में । जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें । तयांचीं न टैंकतीचि अंगीं कामें । सद्गुरु तुवां ॥ ६६ ॥ [ यन्मां वदसि केशव ] येऱ्हवीं वडिल वडिलांचेनि मुखें । मी सदां तुतें कानीं आइकें । परि कृपा न कीजेचि तुवां एकें । तंव नेणवेचि कांहीं ॥ ६७ ॥ ह्मणोनि भाग्य जैं सानुकूळ । जालिया केले उद्यम सदां सफळ । तैसें श्रुताधीत सकळ । गुरुकृपा साच ॥ ६८ ॥ जी बैनकर झाडें सिंपी जीवें सांटी । पाहूनि जन्में काढी आटी । परि फळेंसीं तैंचि भेटी । जैं वसंत पावे ॥ ६९ ॥ अहो विषमा जैं वोहट पडे । तैं मधुर तें मधुर आवडे । पैं रसायन तैं गोडें । जैं आरोग्य देहीं ॥ १७० ॥ कां इंद्रियें वाचा प्राण । यां जालियांचें तैंचि सार्थकपण । जैं चैतन्य येऊनि आपण । संचरे माजी ॥ ७१ ॥ तैसें शब्दजात आलोडिलें । अथवा योगादिक जें अभ्यासिलें । तें तैंचि ह्मणोंये आपुलें । जैं सानुकूळ श्रीगुरु ॥ ७२ ॥ ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजें । अर्जुन निश्चयाचीं नाचतुसे भोजें । तेवींचि ह्मणे देवा तुझें । वाक्य मज मानलें ॥ ७३ ॥ [नहि ते भ-

१ कोंवळें ऊन. २ वरवरच. ३ मिळे. ४ दुसरें. ५ अशा प्रकारें. ६ विषयरूप विषानें. ७ व्यापली. ८ थोरवी. ९ धरला. १० तूं जो प्रकाशक सूर्य, त्या तुझ्यावांचून.

१ शब्दरूप सूर्याचे किरण. २ फार खोल. ३ संवादरूप फळ. ४ भाषणरूप. ५ नद्या. ६ जीं. ७ रहातच नाहींत. ८ ऐकलेलें व अध्ययन केलेलें. ९ गुरुकृपेनें. १० माळी. ११ जिवापाड. १२ श्रम, कष्ट, १३ विषमज्वराला. १४ वाटतात. १५ वेदशास्त्रादि. १६ अभ्यासिलें. १७ अतिशयानें. १८ संतोषानें.

गवन्निति ] तरि साचचि हें कैवल्यपती । मज त्रिशुद्धि आली प्रेतीती । जे तूं देवां दानवांचिये मती । जोगा नव्हसी ॥ ७४ ॥ तुझें वाक्य व्यक्ती न येतां देवा । जो आपुलिया जाणे जाणिवा । तो कहींचि नोहे हें सद्भावा । भरंवसेनि आलें ॥ ७५ ॥

"ते आतां तुझे शब्दरूप किरण फांकले, आणि ऋषींनीं जे जे मार्ग सांगितले होते, त्या सर्वांचें अनोळखेंपण नाहींसें झालें. १६३ महाराज! त्यांचे शब्द ह्मणजे ज्ञानाचें बीज. तें हृदयरूप भूमीमध्यें खोल जाऊन पडलें होतेंच. त्यावर ह्या आपल्या कृपेची ओल झाली, ह्मणून संवादरूप फळ प्राप्त झालें. १६४ अहो! नारदादिक संतांच्या उक्तीरूप नद्यांना, अनंता! मी संवादसुखाचा महोदधि कींहो झालों! १६५ प्रभो! ह्या साऱ्या जन्मामध्यें मीं जीं जीं उत्तमोत्तम पुण्यें केलीं, त्यांचें आतां कांहीं काम राहिलें नाहीं. कारण, आपण सद्गुरु झालांत. १६६ बाकी, वाडवडिलांच्या मुखानें मी आपणांस कानांनीं ऐकत होतों; परंतु तुह्मी आपली एक कृपा केली नव्हतीत तोंपर्यंत, खरें कांहींच समजत नव्हतें. १६७ ह्मणून, भाग्य अनुकूल झालें असतां, सारे उद्योग जसे सफल होतात, त्याप्रमाणें, सारें ऐकलेल्याचें व अध्ययन केलेल्याचें, गुरुकृपा होईल तेव्हांच सार्थक होतें. १६८ महाराज! माळी जिवापलीकडे झाडें शिंपीत असतो; सारा जन्म कष्टांत काढतो; परंतु वसंतकाळ येईल तेव्हांच तीं फलद्रूप होतात. १६९ अहो! विषमज्वर जेव्हां कमी कमी होऊं लागतो, तेव्हां मधुर पदार्थ असतात ते मधुर लागूं लागतात, येवढेंच नव्हे तर, देहाला आरोग्य झालें ह्मणून रसायन—औषध—असतें तें सुद्धां गोडच लागतें. १७० किंवा, इंद्रियें, वाचा, प्राण ह्यांमध्यें जेव्हां आपणच येऊन चैतन्य शिरेल; तेव्हांच तीं झाल्याचें सार्थक. १७१ तद्वत् वेदाचें पठण केलें; अथवा योगादिकांचा अभ्यास केला; तरी श्रीगुरूची कृपा होईल, तेव्हांच त्यांस आपलें असें ह्मणतां येईल." १७२ ह्याप्रमाणें अनुभवाची गर्दी उसळतांच, अर्जुनाची खात्री पटली. आणि संतोषानें तो केवळ नाचूं लागला. आणि लगेच ह्मणाला "देवा! तुझें भाषण मला मान्य झालें. १७३ हे मुक्तिदात्या! माझी त्रिवार खात्री झाली कीं, तूं देवांच्या किंवा दानवांच्या बुद्धीस कळण्यासारखा नव्हेस. १७४ देवा! तुझें वाक्य कळल्याशिवाय, जो आपल्याच ज्ञानानें कल्पना बांधतो, तो तुझ्या अंशाला कधींच पात्र होणार नाहीं, अशी खात्री झाली." १७५

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥

[ स्वयमेवात्मनात्मानमिति ] एथ आपुलें वाडपण जैसें । आपणचि जाणिजे आकाशें । कां मी येतुली घनवट ऐसें । पृथ्वीचि जाणे ॥ ७६ ॥ तैसा आपुलिये सर्वशक्ती । तुज तूंचि जाणसी लक्ष्मीपती । येर वेदादिक मती । मिरवती वायां ॥ ७७ ॥ हां गा मनातें मागां सांडावें । पवनातें वांवीं मवावें । आदिशून्य उतरोनि जावें । केउतें वाहीं ॥ ७८ ॥ तैसें हें तुझें जाणणें आहे । ह्मणोनि कोणाही ठावकें नोहे । आतां तुझें ज्ञान होय । तुजचि जोगें ॥ ७९ ॥ जी आपणयातें तूंचि जाणसी । आणिकांतें सांगावयाही समर्थ होसी । तरि आतां एकवेळ घाम पुसीं । आर्तीचिये निडळींचा ॥ १८० ॥ [भूतभावनेति] हें आइकिलें कीं भूतभावना । भवगजपंचानना । सकळदेवदेवतार्चना । जगन्नायका ॥ ८१ ॥ जरी थोरी तुझी पाहत आहों । तरी पांसीं उभें ठाकावयांही योग्य नोहों । या शोच्यता जरी विनवूं बिहों । तरी आन उपाय नाहीं ॥ ८२ ॥ भरले समुद्र सरिता चहूंकडे । तरि तें बापियांसि कोरडें । कां जैं मेघांनि थेंबुटा पडे । तैं पाणि कीं तया ॥ ८३ ॥ तैसें श्रीगुरु सर्वत्र आथि । परि कृष्णा आह्मां तूंचि गती । हें असो मजप्रती । विभूती सांगें ॥ ८४ ॥

"ह्या ठिकाणीं आपला मोठेपणा जसा आकाशानेंच जाणावा; किंवा मी इतक्या वजनाची व इतक्या जाडीची आहें, हें जसें पृथ्वीचें पृथ्वीलाच माहित, १७६ त्याप्रमाणें हे

१ हे मुक्तिदात्या श्रीकृष्णा. २ त्रिवार. ३ अनुभव. ४ मतीनें जाणण्याजोगा. ५ अनुभवास. ६ ज्ञानानें. ७ पक्षया.

१ मोठेपणा. २ इतकी. ३ जाड. ४ वावेनें. ५ माया, अव्यक्त. ६ बाहूंनीं. ७ आवडीच्या. ८ कपाळाचा. ९ जगदुत्पन्न करणाऱ्या. १० जवळ. ११ संकटानें. १२ भ्यावें. १३ चातकाला. १४ मेघांतून. १५ थेंब. १६ आहेत.

लक्ष्मीपते! तुझ्या सर्व शक्तींना तुझा तूंच जाणतोस. बाकी, वेदादिक इतर हे व्यर्थ डौल मिरवतात. १७७ अहो! मनाला मागें टाकावें; वायूला वावेमध्यें धरावें; मायेला बाहूंनीं तरून जावें हें कसें होईल? १७८ त्याप्रमाणें हें तुला जाणणें आहे. ह्मणून कोणालाही समजत नाहीं-तुला जाणण्यासारखें ज्ञान तुझेंच. १७९ महाराज! आपण आपल्याला जाणतां, आणि दुसऱ्यास सांगावयासही समर्थ होतां. तर आतां एक वेळ आवडीच्या कपाळाचा घाम पुसा. १८० हे जगदुत्पादका! हे भवगजपंचानना! हे सकलदेवदेवतार्चना! हे जगन्नायका! हें ऐकलेंत ना? १८१ तुझी योग्यताच पाहूं लागलों तर, आमची तुझ्यापाशीं उभें राहण्याची सुद्धां योग्यता नाहीं. बरें; त्या लज्जेनें विनंती करण्यास भिऊं लागलों, तर दुसरा उपाय नाहीं. १८२ नद्या, समुद्र, चहूंकडे भरलेले असले तरी, ते चातकाला कोरडे असल्याप्रमाणेंच आहेत. कारण, मेघांतून थेंब पडेल, तेव्हांच ना त्याला पाणी? १८३ त्याप्रमाणें श्रीगुरु सर्व ठिकाणीं आहेत. परंतु कृष्णा! आह्मांला गति तूंच. हें असो. आतां विभूती सांगाव्यात." १८४

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः।
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि॥१६॥

[वक्तुमर्हसीति] जी तुझिया विभूती आघविया। परि व्यापिती शक्ति दिव्या जिया। तिया आपुलिया दावाविया। आपण मज ॥ ८५ ॥ [याभिर्विभूतिभिरिति] जिहीं विभूती ययां समस्तां। लोकांतें व्यापूनि आहासी अनंता। तिया प्रधाना नामांकिता। प्रगटा करीं ॥ ८६ ॥

"महाराज! साऱ्या विभूती तर तुमच्याच आहेत. पण ज्यांच्यामध्यें दिव्य शक्ति व्यापून राहते, अशा विभूती असतील त्या आपण मला दाखवून द्याव्यात. १८५ अनंता! ज्या साऱ्या विभूतींनीं तूं लोकांत भरून राहिला आहेस, त्यांतील मुख्य मुख्य व नामांकित असतील त्या प्रगट कराव्यात." १८६

१ आहेस. २ श्रेष्ठ, मुख्य.

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन्।
केषु केषु च भावेषु चिंत्योऽसि भगवन्मया॥१७॥

[कथमिति] जी कैसें मियां तुतें जाणावें। काय जाणोनि सदा चिंतावें। जरी तूंचि ह्मणों आघवें। तरी चिंतनचि न घडे ॥ ८७ ॥ ह्मणोनि मागां भाव जैसे। आपुले सांगीतले तुवां उद्देशें। आतां विस्तारोनि तैसें। एकवेळ बोलें ॥८८॥ [केषु केष्विति] जया जया भावाचिया ठायीं। तुतें चिंतितां मज सायास नाहीं। तो विवळ करूनि देईं। योग आपुला ॥८९॥

"प्रभो! मी आपणाला कसें ओळखावें? काय समजून नेहेमीं आपलें चिंतन करावें? सारें आहे तें तूंच असें ह्मटलें तर तुझें चिंतन मुळींच घडावयाचें नाहीं. १८७ ह्मणून पूर्वीं ज्या प्रमाणें आपण आपले भाव-विभूती-संक्षेपानें सांगितल्यात, त्याप्रमाणें, आतां एक वेळ त्याच विस्तारानें सांगाव्यात. १८८ आणि ज्या ज्या विभूतींच्या ठिकाणीं तुझें चिंतन करण्यास मला सायास पडावयाचे नाहींत, तो आपला योग-युक्ति-मला स्पष्ट करून द्यावा." १८९

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम्॥१८॥

आणि पुसलिया जिया विभूती। [विस्तरेणात्मनो योगं विभूतिं चेति] त्याही बोलाविया भूपती। एथ ह्मणसी जरी पुढती। काय सांगों ॥ १९० ॥ तरी हा भाव मनां। झणें जाय हो जनार्दना। पैं प्राकृताही अमृतपाना। नाना ह्मणवे जेविं ॥ ९१ ॥ जें काळकूटाचें सहोदर। हें मृत्युभेणें प्याले अमर। तरि देहांचे पुरंदर। चौदा जाती ॥ ९२ ॥ ऐसा कवण एक क्षीराब्धीचा रस। जयां वायांचि अमृतपणाचा आभास। तयाचाही मिठांशें। जे पुरे ह्मणों नेदी ॥ ९३ ॥ तया पांबळयाहि येतुलेवरी। गोडियेची आथि थोरी। [अमृतं] मग हें तंव अवधारीं। परमामृत साचें ॥ ९४ ॥ जें मंदराचळ न ढाळितां। क्षीरसागर न डहुळतां। अनादि स्वभावता। आइतें आहे ॥ ९५ ॥ जें स्रवेना द्रवे नव्हे बद्ध। जेथ नेणिजती रस गंध। जें भलतयांही सिद्ध। आठवलेंचि फावे ॥ ९६ ॥ [शृण्वतः] जयाची गोठीचि ऐकत-

१ विभूती. २ संक्षेपानें. ३ स्पष्ट. ४ ज्या. ५ प्रभो, मुख्य. ६ शंका. ७ कदाचित्. ८ यःकश्चित्. ९ भावंड. (कारण, समुद्रमंथनसमयीं दोन्हीही समुद्रांतूनच निघालीं आहेत). १० एका दिवसाचे. ११ इंद्र. १२ गोडपणा. १३ उणाखाला सुद्धां. १४ पाहिजे त्याला. १५ प्राप्त होतें. १६ ऐकतांक्षणीं.

खेंवो । आघवा संसार होय वावो । बळियें निलता लागे येवों । आपणपेयां ॥ ९७ ॥ जन्ममृत्यूची भाख । हारपोनि जाय निःशेख । आंत बाहेरि महासुख । वाढोंचि लागे॥९८॥ [ तृप्तिः ] मग दैवगत्या जरी सेविजे । तरि तें आपणचि होऊनि ठाकिजे । [ मे ] तें तुज देतां चित्त माझें । [नास्ति] पुरे ह्मणों न शके ॥ ९९ ॥ तंव तुझें नामचि आह्मां आवडे । वरि भेटी होय आणि ऐवळिक जोडे । पाठीं गोठी सांगसी सुरवाडें । आनंदाचेनी ॥ २०० ॥ आतां हें सुख कायिसया-सारिखें । कांहीं निर्वचेना मज पैरितोखें । [ भूयः कथय ] तरी येतुलें जाणें जे येणें मुखें । पुनरुक्तही हो ॥ १ ॥ हां गा सूर्य काय शिळा । अग्नि ह्मणों येत आहे वोंविळा । कां निख वाहतया गंगाजळा । पारसेपण असे ॥ २ ॥ तुवां स्वमुखें जें बोलिलें । हें आह्मी नादासि रूप देखिलें । आजि चंदनतरूचीं फुलें । तुरंबीत आहों मां ॥ ३ ॥ तया पार्थी-चिया बोला । सर्वांगें श्रीकृष्ण डोलला । ह्मणे भक्तिज्ञानासि जाहाला । आगर हा ॥४॥ ऐसा पैतिकराचिया तोषीआंत । प्रेमाचा ओघ उचंबळत । सायासें सांवरूनि अनंत । काय बोले ॥ ५ ॥

"आणि प्रभो! ज्या विभूती विचारल्या त्याही सांगाव्यात. ह्यावर 'त्याच त्याच पुन्हा काय सांगावयाच्या' असें ह्मणाल, १९० पण **जनार्दना**! हा भाव मनांत आणूं नये. कारण, साधारण अमृतपानही नको असें ह्मणवत नाहीं. १९१ जें काळकूटाचे बंधु; ज्याला मृत्यूच्या भयानें देव प्याले; तरी एका दिवसांत चौदा इंद्र होतात; १९२ असा कोणी एक क्षीरसागरांतील रस; ज्याला अमृताचा केवळ आभास मात्र आहे; त्याचा गोडीळपणा सुद्धां पुरे ह्मणूं देत नाहीं. १९३ त्या यःकश्चित् अमृताची थोरवी इतकी! मग हें तर परमामृत आहे, हें लक्ष्यांत असूंद्या. १९४ **मंदराचल** न हालवितां, **क्षीरसागर** न घुसळतां, हें अनादिसिद्ध–आयतेंच–आहे. १९५ जें पाझरत नाहीं; ओलें होत नाहीं; किंवा बांधूनही रहात नाहीं; त्याची गोडी व स्वादसुद्धां कळत नाहीं. हें पाहिजे त्याला तयार करतां येतें, व स्मरण करतांच प्राप्त होतें. १९६ ज्याची वार्ता ऐकतांच सारा संसार मिथ्या होतो, आणि दृढतर शाश्वति आपणाकडे येऊं लागते. १९७ जन्ममृत्यूचे शब्द सुद्धां निखालस नाहींसे होऊन जातात, अंतर्बाह्य महत्सुखच वाढूं लागतें, १९८ आणि प्रारब्धयोगानें त्याचें सेवन घडलें, तर तें तद्रूपच करून सोडतें. तें आपण मला देत आहां, तेव्हां आपणाला पुरे असें माझ्या चित्तानें ह्मणवतच नाहीं. १९९ आधीं आपलें नांवच आह्मांला आवडतें; त्यावर आपलें दर्शन मिळतें; येवढेंच नव्हे तर, सहवास घडतो; आणखी आनंदानें आपण गोष्टी सांगतां. २०० आतां हें सुख कशासारखें आहे ह्मणावें? मला तर आनंदभरानें कांहीं सांगतां येत नाहीं. तरी इतकें कळतें कीं, ह्या मुखानें पुन्हा एकवार ऐकावें. मग पुनरुक्ति झाली तर झाली. २०१ सूर्य रोज उगवतो ह्मणून तो शिळा; किंवा अग्नि हा ओंवळा; किंवा दररोज वाहणाऱ्या गंगेच्या पाण्याला, पारोसेपणा का असतो? २०२ आपण आपल्या मुखानें जें सांगितलें, तें आह्मी तर ध्वनींना रूप आल्याप्रमाणें पाहिलें. किंवा चंदनाच्या झाडांचीं फुलेंच हुंगीत आहोंत, ह्मटलें तरी चालेल." २०३ ह्या **अर्जुनाच्या** भाषणानें **श्रीकृष्ण** मनापासून डोलले. आणि ह्मणाले "**अर्जुन** भक्तीला आणि ज्ञानाला स्थान झाला खरा." २०४ अशा अनुभवाच्या आनंदलहरींत प्रेमाचा उमाळा आला, तो महत्प्रयासानें अनंतांनीं सावरून काय ह्मणतातः– २०५

श्रीभगवानुवाच—

हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे १९

[ श्रीभगवानुवाच—हंत ] मी पितामहाचा पिता । हें आठवितांही नाठवे चित्ता । कीं ह्मणतसे वा पांडुसुता । भलें केलें ॥ ६ ॥ अर्जुनातें वा ह्मणे एथ कांहीं । आह्मा विस्मो करावया कारण नाहीं । आंगें तो लेंकरूं काई । नव्हेचि नं-

१ व्यर्थ. २ बळकट. ३ वार्ता, शब्द. ४ सान्निध्य. ५ आधिक्यानें. ६ बोलवेना. ७ संतोषानें. ८ पुनरुक्त झालें तरी होवो. ९ पारोसेपणा. १० ध्वनीला. ११ हुंगीत. १२ स्थान. १३ अनुभवाच्या. १४ आनंदामध्यें.

१ ब्रह्मदेवाचा. २ विस्मय. ३ स्वतः.

दाचें ॥ ७ ॥ परि प्रस्तुत ऐसें असो । हें करवी आवडीचा अतिसो । [ ते कथयिष्यामि ] मग ह्मणे आइकें सांगतसों । धनुर्धरा ॥ ८ ॥ तरि तुवां पुसलिया विभूती । [ नास्त्यंतो विस्तरस्य मे ] तयांचें अपारपण सुभद्रापती । जे माझियाचि परी माझिये मती । आकळती ना ॥ ९ ॥ आंगींचिया रोमा किती । जयाचिया तयासि न गणवती । [ दिव्या ह्यात्मविभूतयः ] तैसिया माझिया विभूती । असंख्य मज ॥ २१० ॥ येरवीं तरी मी कैसा केवढा । ह्मणोनि आपणपयांही नव्हेचि फुडा । [ प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ ] यालागीं प्रधाना जिया नामीं रूढा । तिया विभूती आइकें ॥ ११ ॥ जिया जाणितलिया सांटीं । आघविया जाणवतील किरीटी । जैसें बीज आलिया मुठी । तरूचि आला होय ॥ १२ ॥ कां उद्यान हाता चढिनलें । तरि अपैसीं सांपडलीं फळें फुलें । तेविं देखिलिया जिया देखवलें । विश्व सकळ ॥ १३ ॥ येऱ्हवीं साचचि गा धनुर्धरा । नाहीं शेवट माझिया विस्तारा । पैं गगनाऐशिया अपारा । मेनमाजि असणें ॥ १४ ॥

'मी ब्रह्मदेवाचाही पिता' ह्याची आठवण केली तरी सुद्धां आठवण होईना असें भगवंतांस होऊन गेलें. कारण, "वा अर्जुना! भलें केलेंस" असें ह्मणाले. २०६ अर्जुनाला 'वा' असें ह्मटलें, ह्यांत आह्मांस आश्चर्य करण्यासारखें कांहींच वाटत नाहीं. कारण, भगवान् हे स्वतःच नंदाचें लेंकरूं नव्हते काय? २०७ पण प्रस्तुतकालीं हें असेंच राहूंद्या. तें एक प्रेमाधिक्याचें दर्शक आहे. मग ह्मणतात "धनुर्धरा! सांगतों ऐक. २०८ आतां तूं विभूती विचारतोस; तर हे सुभद्रापती! त्या अनंत आहेत. त्या अनंत असें ह्मणण्याचें कारण, त्या माझ्याच आहेत खऱ्या, पण त्या माझ्याही बुद्धीच्या अवसानांत नाहींत. २०९ आंगावरचे केंस किती आहेत, हे ज्याचे त्यास मोजवत नाहींत; त्याप्रमाणें माझ्या विभूतींही मला मोजतां येत नाहींत. २१० बाकी मी असा आणि एवढा आहें ह्मणून कांहीं प्रगट होत नाहीं. ह्यासाठीं मुख्य व नामांकित विभूती ऐक. २११ किरीटी! बीज हातांत आलें ह्मणजे झाडही हातांत आलेंच ह्मणून समजावयाचें. त्याप्रमाणें तेवढ्या समजल्या ह्मणजे साऱ्या ध्यानांत येतील. २१२ किंवा बागच हातास चढली, तर फळें आणि फुलें आपोआप सांपडलींच, त्याप्रमाणें त्यांना ओळखलें ह्मणजे सारें विश्व ओळखल्यासारखें झालें. २१३ बाकी धनुर्धरा! माझ्या विस्ताराला शेवट नाहीं, ही गोष्ट तर खरीच. येवढें अफाट जें गगन, तें सुद्धां माझ्यामध्यें रहातें." २१४

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।
अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥२०॥

[ अहमात्मेति ] आइकें कुटिलालकमस्तका । धनुर्वेदत्र्यंबका । मी आत्मा असें एकैकां । भूतमात्राच्या ठायीं ॥१५॥ आंतुलीकडे मीचि यांचें अंतःकरणीं । भूतां बाहेरी माझीचि गंवसणी । [ अहमादिश्चेति ] आदि मी निर्वाणीं । मध्यही मीचि ॥ १६ ॥ जैसें मेघांयां तैंळींवरी । एक आकाशचि आंत बाहेरी । आणि आकाशींचि जाले अवधारीं । असणेंही आकाशीं ॥ १७ ॥ पाठीं लया जे वेळीं जाती । ते वेळीं आकाशचि होऊनि ठाती । तेविं आदि स्थिती अंतगती । भूतांसि मी ॥ १८ ॥ ऐसें बहुवस आणि व्यापकपण । माझें विभूतीयोगें जाण । तरी जीवचि करूनि श्रवण । आइकोनि आइक ॥ १९ ॥ याहीवर त्या विभूती । सांगणें ठेलें सुभद्रापती । सांगेन ह्मणितलें तुजप्रती । त्या प्रधाना आइकें ॥२२०॥

"हे कुरळकेश मस्तकावर धारण करणाऱ्या! हे धनुर्विद्या शंकरा, अर्जुना! ऐक. हरएक प्राणीमात्राचे ठायीं आत्मा तो मी आहें. २१५ त्यांच्या अंतःकरणांत मीच; प्राणिमात्रांच्या बाहेर आच्छादन माझेंच; त्यांचें मूळ मी; मध्य मी; आणि शेवटही मीच. २१६ ज्याप्रमाणें मेघांच्या खालीं व वर; आंत आणि बाहेर; जसें आकाशच. ते उत्पन्न होतातही आकाशामध्येंच, आणि रहातातही आकाशांतच. २१७ आणि पुन्हा ज्या वेळेस लयास जातात, त्यावेळीं आकाशरूपच होऊन रहातात. त्याप्रमाणें प्राणिमात्रांना उत्पत्ति, स्थिति, व नाश ही मीच आहें. २१८ अशा प्रकारें माझ्या विभूतीयोगेंकरून माझें अनेकत्व आणि व्यापकपण लक्ष्यांत आण. आणि श्रवणरूप जीव करून, नीट ऐक हो नीट ऐक! २१९ हे सुभद्रापती!

१ आधिक्य. २ स्पष्ट. ३ असतां. ४ बाग. ५ माझ्यामध्यें.

१ कुरळ केश मस्तकावर धारण करणाऱ्या. २ धनुर्विद्येविषयीं शंकरच. ३ आच्छादन. ४ खालीं वर. ५ रहातात. ६ उत्पत्ति, स्थिति व नाश.

आतां ह्यावर आणखी विभूति सांगणें कांहीं उरलें नाहीं. तथापि तुला सांगेन असें ह्मटलें, त्या अर्थी मुख्य मुख्य ऐकून ठेव. २२०

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ २१ ॥

हें बोलोनि तो कृपावंत । ह्मणे [ आदित्यानामहं विष्णुः ] विष्णु मी आदित्यांत । [ ज्योतिषां रविरंशुमान् ] रवी मी रश्मिवंत । सुप्रभांमाजी ॥ २१ ॥ [ मरीचिर्मरुतामस्मि ] मरुद्गणांच्या वर्गी । मरीचि ह्मणे मी शार्ङ्गी । [ नक्षत्राणामहं शशी ] चंद्र मी गगनरंगीं । तारांमाजी ॥ २२ ॥

इतकें बोलून ते कृपावंत **भगवान्** ह्मणाले "**आदित्यां**मध्यें **विष्णु** मी. दिव्य पदार्थांमध्यें किरणवान् **सूर्यनारायण** तो मी. २२१ **शारंगनांवाचें** धनुष्य धारण करणारे **श्रीकृष्ण** ह्मणतात "**मरुद्गणां**च्या वर्गामध्यें **मरीची** मी; आकाशरूप पटांगणांत व नक्षत्रांत **चंद्र** तो मी." २२२

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ।
इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना॥२२॥

[ वेदानामिति ] वेदांआंत सामवेदु । तो मी ह्मणे गोविंदु । देवांमाजि जगद्बंधु । महेंद्र तो मी ॥ २३ ॥ [ इंद्रियाणामिति ] इंद्रियांमाजि अकरावें । मन तें मी हें जाणावें । भूतांमाजि स्वभावें । चेतना ते मी ॥ २४ ॥

**गोविंद** ह्मणतात "वेदांमध्यें **सामवेद** तो मी; देवांमध्यें जगद्बंधु **महेंद्र** तो मी. २२३ इंद्रियांमध्यें अकरावें जें मन तें मी, हें लक्ष्यांत ठेव. प्राणीमात्रांमध्यें स्वाभाविक चेतना ती मी." २२४

रुद्राणां शंकरश्चाऽस्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।
वसूनां पावकश्चाऽस्मि मेरुः शिखरिणामहम् २३

[ रुद्राणामिति ] अशेषांही रुद्रांमाझारी । शंकर जो मदनारी । तो मी येथ न धरीं । भ्रांति कांहीं ॥ २५ ॥ यक्षरक्षोगणांआंत । शंभूचा सखा जो धनवंत । तो कुबेर मी हें अनंत । ह्मणता जाहाला ॥ २६ ॥ [ वसूनामिति ] मग आठांही वसूंमाझारीं । पावक तो मी अवधारीं । शिखराथिलियां सर्वोपरी । मेरु तो मी ॥ २७ ॥

१ देवांमध्यें. २ किरणवान्. ३ दिव्य पदार्थांमध्यें. ४ शार्ङ्गनांवाचें धनुष्य धारण करणारा (श्रीकृष्ण.) ५ जीवकला. ६ पर्वतांमध्ये.

" सर्व रुद्रांमध्यें मदनाचा संहार करणारा जो **शंकर** तो मी. ह्यांत कांहीं भ्रांति धरूं नको." २२५ **अनंत** आणखी ह्मणतात " यक्षरक्षःसमुदायामध्यें शंभूचा सखा जो धनाढ्य **कुबेर** तो मी. २२६ तसेंच आठ वसूंमध्यें **अग्नि** तो मी, हें लक्ष्यांत ठेव. सर्व पर्वतांमध्यें **मेरु** तो मी." २२७

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।
सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ॥२४॥
महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः २५

[ पुरोधसामिति ] जो स्वर्गसिंहासना सावावो । सर्वज्ञते आदिचा ठावो । तो पुरोहितांमाजि रावो । बृहस्पती मी ॥ २८ ॥ [ सेनानीनामिति ] त्रिभुवनींचिया सेनापती । आंत स्कंध तो मी महामती । जो हरवीर्यें अग्निसंगती । कृत्तिकांत जाहाला ॥ २९ ॥ सकळिकां सरोवरांसी । माजि समुद्र तो मी जळराशी । [ महर्षीणामिति ] महर्षीआंत तपोराशी । भृगु तो मी ॥ ३० ॥ अशेषांही वाचा । माजी नेटनाच सत्याचा । तें अक्षर एक मी वैकुंठींचा । वेल्हाळ ह्मणे ॥ ३१ ॥ [ यज्ञानामिति ] समस्तांही यज्ञांच्यापैकीं । जपयज्ञ तो मी ये लोकीं । जो कर्मत्यागें प्रणवादिकीं । निपजविजे ॥ ३२ ॥ नामजपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ॥ ३३ ॥ स्थावरां गिरीआंत । पुण्यपूज्य जो हिमवंत । तो मी ह्मणे कांत । लक्ष्मियेचा ॥ ३४ ॥

" स्वर्गाच्या सिंहासनाचा मंत्री; सर्वज्ञतेचें मूलस्थान; पुरोहितांतील राजा; असा जो **बृहस्पती** तो मी. २२८ जो **शंकरा**च्या वीर्यापासून **कृत्तिकां**मध्यें उत्पन्न झालेला, जो त्रिभुवनांतील सेनापतीमध्यें महान् बुद्धिमान् **कार्तिकस्वामी** तो मी. २२९ सर्व सरोवरांमध्यें जलाची केवल राशी असा जो समुद्र तो मी. महर्षींमध्यें तपाची केवळ राशी असा जो **भृगु** तो मी." २३० **वैकुंठविलासी** ह्मणतात " सर्व वाणीमध्यें सत्याचें नृत्य करणारीं जीं अक्षरें, त्यांतील प्रत्येक अक्षर तें मी. २३१ सर्व ज्ञानामध्यें कर्माचा त्याग करून,

१ सहाय, आश्रय. २ कार्तिकस्वामी. ३ नटासारखें नृत्य. ४ विलासी. ५ ओंकारादिकांनीं. ६ पर्वतांमध्यें.

ओंकारादिकांनीं जपयज्ञ ह्मणून जो लोकांमध्यें सिद्ध करतात तो मी. २३२ नामाचा जपयज्ञ हाच श्रेष्ठ आहे. त्याच्या योगानें स्नानादि कर्में बाधूं शकत नाहींत. नामानें धर्म व अधर्महो पवित्र होतात. आणि वेदांमध्येंही नामालाच परब्रह्म असें ह्मटलें आहे." २३३ **लक्ष्मीकांत** ह्मणतात "स्थिर राहणाऱ्यांमध्यें व पर्वतांमध्यें, परम पुण्यकारक व पूज्य असा जो **हिमालय** तो मी." २३४

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।
गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः २६
उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।
ऐरावतं गजेंद्राणां नराणां च नराधिपम् ॥२७॥

[अश्वत्थ इति] कल्पद्रुम हन पारिजात । गुणें चंदनही वाड विख्यात । तरि ययां वृक्षजातां आंत । अश्वत्थ तो मी ॥ ३५ ॥ देवऋषीआंत पांडवा । नारद तो मी जाणावा । [गंधर्वाणामिति] चित्ररथ मी गंधर्वां । सकळिकांमाजी॥३६॥ ययां अशेषांही सिद्धां- । माजि कपिलाचार्य मी प्रबुद्धा । [उच्चैःश्रवसमिति] तुरंगजातां प्रसिद्धां । आंत उच्चैःश्रवा मी ॥ ३७ ॥ [ऐरावतमिति] राज्यभूषणां गजांआंत । अर्जुना मी गा ऐरावत । पयोराशि सुरमथित । वियाला तो मी ॥ ३८ ॥ ययां नरांमाजि राजा । तो विभूतिविशेष माझा । जयातें सकळ लोक प्रजा । होऊनि सेविती ॥ ३९ ॥

"कल्पतरु, पारिजातक, किंवा गुणांनीं चंदनसुद्धा प्रसिद्ध आहे. तथापि ह्या सर्व वृक्षांमध्यें अश्वत्थ तो मी. २३५ **अर्जुना!** देवऋर्षींमध्यें **नारद** तो मी समजावा. सर्व गंधर्वांमध्यें **चित्ररथ** तो मी. २३६ तसेंच हे ज्ञानवंता! ह्या सर्व सिद्धांमध्यें **कपिलाचार्य** तो मी. मोठमोठ्या घोड्यांत **उच्चैःश्रवा** तो मी. २३७ गज हें राज्याचें वैभव आहे. **अर्जुना!** त्या गजांमध्यें देवांनीं मंथन करून समुद्रांतून काढलेला **ऐरावत** तो मी. २३८ ह्या लोकामध्यें जो राजा; ज्याची सारे लोक प्रजा होऊन सेवा करतात; तो माझी मुख्य विभूति." २३९

१ तसाच. २ मोठा. ३ हे ज्ञानवंता. ४ सर्व घोड्यांमध्यें. ५ इंद्राचा समुद्रमंथनसमयीं प्राप्त झालेला घोडा. ६ समुद्र. ७ प्रसवला.

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।
प्रजनश्चाऽस्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः २८
अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।
पितॄणामर्यमा चाऽस्मि यमः संयमतामहम्॥२९॥

[आयुधानामिति] पैं आयुधेयां हतियेरां । आंत वज्र तें मी धनुर्धरा । जें शतमखोत्तीर्णकरा । आरूढोनि असे॥४०॥ धेनूंमध्यें कामधेनु । ते मी ह्मणे विष्वक्सेनु । [प्रजन इति] जन्मवितया आंत मदनु । तो मी जाणें ॥ ४१ ॥ [अनंत इति] सर्पकुळाआंत अधिष्ठाता । वासुकी मी कुंतीसुता । नागांमाजि समस्तां । अनंत तो मी ॥ ४२ ॥ अगा यादसांआंत । जो पश्चिमप्रमदेचा कांत । तो वरुण मी हें अनंत । सांगत असे ॥ ४३ ॥ [पितॄणामिति] आणि पितृगणां समस्तां । माजि अर्यमा जो पितृदेवता । तो मी हें तत्त्वता । बोलत आहें ॥ ४४ ॥ जगाचीं शुभाशुभें लिहिती । प्राणियांच्या मानसाचा झाडा घेती । मग केलियानुरूप होती । भोगनियम जे ॥४५॥ तयां नियमितयांमाजि यम । जो कर्मसाक्षी धर्म । तो मी ह्मणे आत्माराम । रमापती ॥ ४६ ॥

"धनुर्धरा! सर्व हत्यारांमध्यें, शंभर यज्ञ करून उत्तीर्ण झालेल्या इंद्राच्या हातांत असणारें **वज्र** तें मी. २४० **श्रीकृष्ण** ह्मणतात "धेनूंमध्यें कामधेनु ती मी. जन्म देणाऱ्यांमध्यें मदन तो मी. २४१ हे **कुंतीसुता!** सर्पकुलामध्यें मुख्य जो **वासुकी**, तो मी. सर्व नागांमध्यें **अनंत** (शेष) तो मी. २४२ जलचरांमध्यें, पश्चिमदिशेचा स्वामी जो **वरुण** तो मी." असेंही **अनंतांनीं** सांगितलें. २४३ "आणि समस्त पितृगणांमध्यें पितृदेवता जो **अर्यमा**, तो मी. हेंही खरोखर सांगतों. २४४ जगांतील शुभ व अशुभ लिहिणारे; प्राण्यांच्या मनांचा झाडा घेणारे; आणि मग चांगल्या किंवा वाईट केलेल्याप्रमाणें होणारे जे नियम," २४५ **लक्ष्मीपती आत्माराम** ह्मणतात "त्या भोगाच्या नियम करणाऱ्यांतील कर्मांचा साक्षी जो **यमधर्म** तो मी." २४६

१ शस्त्रांमध्यें. २ शंभर यज्ञ करून उत्तीर्ण झालेल्या इंद्राच्या हातास. ३ मुख्य. ४ जलचरांमध्यें. ५ पश्चिमदिशेचा पति. ६ शासन करणारांमध्यें.

प्रह्लादश्चाऽस्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ।
मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥३०॥

[प्रऱ्हाद इति] अगा दैत्यांचिया कुळीं । प्रऱ्हाद तो मी न्याहाळीं । म्हणोनि दैत्यभावादिमेळीं । लिंपेचिना ॥ ४७ ॥ पैं कळितयांमाजि महाकाळ । तो मी म्हणे गोपाळ । [मृगाणामिति] श्वापदांमाजि शार्दूळ । तो मी जाण ॥ ४८ ॥ पक्षिजातीमाझारीं । गरुड तो मी अवधारीं । यालागीं जो पाठीवरी । वाहों शके मातें ॥ ४९ ॥

"बाबा! दैत्यांच्या कुळामध्यें **प्रऱ्हाद** तो मी, हें लक्ष्यांत आण. म्हणून तो दैत्यांच्या स्वभावामध्यें लिप्त झाला नाहीं." २४७ तसेंच **गोपाळ** म्हणतात "हरण करणारांमध्यें महाकाळ तो मी. श्वापदांमध्यें व्याघ्र तो मी. हें ध्यानांत ठेव. २४८ पक्ष्यांच्या जातींमध्यें गरुड तो मी, समजलास? म्हणूनच तो मला पाठीवरून वाहूं शकतो." २४९

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।
झषाणां मकरश्चाऽस्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ३१

[पवन इति] पृथ्वीचिया पैसारा । माजि घडी न लगतां धनुर्धरा । एकेचि उड्डाणें सातांही सागरां । प्रदक्षिणा कीजे ॥ २५० ॥ तयां वेहिलियां गतिमंतां । आंत पवन तो मी पांडुसुता । शस्त्रधरां समस्तां । माजि श्रीराम तो मी ॥५१॥ जेणें सांकडलिया धर्माचे कैवारें । आपणपयां धनुष्य करूनि दुसरें । विजयलक्ष्मीये एक मोहरें । केलें त्रेतीं ॥ ५२ ॥ [झषाणामिति] पाठीं उभें ठाकूनि सुवेळीं । प्रतापलंकेश्वराच्या सिसाळीं । गगनीं उदो म्हणतया हस्तबळी । दिधली भूतां ॥ ५३ ॥ जेणें देवांचा मान गिंवसिलें । धर्मासि जीर्णोद्धार केला । सूर्यवंशीं उदेला । सूर्य जो कां ॥ ५४ ॥ तो हातियेरपरें जितयाआंत । रामचंद्र मी रमाकांत । मकर मी पुच्छवंत । जळचरांमाजी ॥ ५५ ॥ [स्रोतसामस्मि जाह्नवी] पैं समस्तांही वोघां । मध्यें जे भगीरथें आणितां गंगा । जन्हूनें गिळिली मग जंघा । फाडूनि दिधली ॥ ५६ ॥ ते त्रिभुवनैकसरिता । जान्हवी मी पांडुसुता । जळप्रवाहां समस्तां । माझारी जाणें ॥ ५७ ॥ ऐसेनि वेगळालां सृष्टिपैकीं । विभूती नाम ठेवितां एकेकीं । सगळेन जन्मसहस्रें अवलोकीं । अर्ध्या नव्हती ॥ ५८ ॥

"**धनुर्धरा!** पृथ्वीच्या सभोंवार एक घटकाही न लागतां, एकाच उड्डाणाबरोबर सातां समुद्रांलाही प्रदक्षिणा करणारे, २५० अशा वेगवंतामध्यें **अर्जुना!** पवन तो मी. आणि सर्व शस्त्रधाऱ्यामध्यें **श्रीराम** तो मी. २५१ ज्यानें संकटांत पडलेल्या धर्माचा पक्ष घेऊन; फक्त एक धनुष्य काय तें आपलेंसें करून **त्रेतायुगामध्यें** विजयलक्ष्मीला एकछत्री करून सोडलें. २५२ नंतर **सुवेळाचलावर** उभे राहून प्रतापी **रावणाच्या** मस्तकपंक्ति, आकाशांत 'उदो' 'उदो' म्हणणाऱ्या भूतांना बळी दिल्या. २५३ ज्यानें देवांचा मान राखला; धर्माचा जीर्णोद्धार केला; आणि सूर्यवंशामध्यें जो सूर्यासारखा प्रगट झाला. २५४ तो शस्त्रधाऱ्यांतील **सीताकांत राम** मी. जलचरांमध्यें पुच्छ असणारा मकर तो मी. २५५ तसेंच सर्व प्रवाहांमध्यें **भगीरथानें** आणलेली गंगा; जी **जन्हूनें** गिळिली असतां मांडी फोडून निघाली, २५६ **अर्जुना!** ती जलप्रवाहांमध्यें, त्रिभुवनांतील मुख्य नदी जी **भागीरथी** ती मी. २५७ अशा प्रकारें सृष्टींतील निरनिराळ्या विभूतींचीं नांवें घेऊं लागलों तर, साऱ्या हजार जन्मांत त्या अर्ध्यासुद्धा संपणार नाहींत." २५८

सर्गाणामादिरंतश्च मध्यं चैवाऽहमर्जुन ।
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ३२

अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ।
अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ३३

[अहं विश्वतोमुखः] जैसीं अवघींचि नक्षत्रें वेंचावीं । ऐसी चाड उपजेल जैं जीवीं । तैं गगनाची बांधावी । लोथ जेवीं ॥ ५९ ॥ कां पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा । तरि भूगोलचि काखे सुवावा । तैसा विस्तार माझा पाहावा । तरि जाणावें मातें ॥ २६० ॥ जैसें शाखांसी फूल फळ । एकीहेळा वेटाळूं म्हणिजे सकळ । तरी उपडूनियां मूळ । जेविं हातीं घेपे ॥ ६१ ॥ तेवीं माझे विभूतिविशेष । जरी जाणों

१ दैत्यस्वभावानें. २ लिप्त झाला नाहीं. ३ हरण करणारांत. ४ वाघ. ५ विस्तारामध्यें. ६ सर्व वेगवानांमध्यें. ७ वायु. ८ संकटांत पडलेल्या धर्माच्या पक्षानें. ९ एकछत्री. १० मस्तकांच्या पंक्तीनें. ११ बळी. १२ रक्षण केला. १३ शस्त्र धारण करणारांत. १४ त्रैलोक्यांतील मुख्य नदी.

१ सगळ्या. २ इच्छा. ३ मोट. ४ झाडा. ५ घालावा. ६ एका वेळेस. ७ घेतलें पाहिजे.

पाहिजेती अशेष । तरी स्वरूप एक निर्दोष । जाणिजे माझें ॥ ६२ ॥ येऱ्हवीं वेगळालिया विभूती । कायिएक परिससी किती । ह्मणोनि एकीहेळां महामती । सर्व मी जाण ॥६३॥ [सर्गाणामिति] मी आघवियेचि सृष्टी । आदि मध्यांतीं किरीटी । वोतप्रोत पटीं । तंतु जेविं ॥ ६४ ॥ ऐसिया व्यापका मातें जैं जाणावें । तैं विभूतिभेदें काय करावें । परि हे तुझी योग्यता नव्हे । ह्मणोनि असो ॥ ६५ ॥ कां जे तुवां पुसिलिया विभूती । ह्मणोनि तिया आईक सुभद्रापती । [अध्यात्मेति] तरि विद्यांमाजि प्रस्तुती । अध्यात्मविद्या ते मी ॥ ६६ ॥ अगा बोलतयांचिया ठायीं । वाद तो मी पाहीं । जो सकळशास्त्रसंमतें कहीं । सरेचिना ॥ ६७ ॥ जो निर्वचूं जातां वाढे । आईकतयां उत्प्रेक्षा सळ चढे । जयावरी बोलतेयांची गोडें । बोलणीं होती ॥ ६८ ॥ ऐसा प्रतिपादनामाजि वाद । तो मी ह्मणे गोविंद । [अक्षराणामिति] अक्षरांमाजि विशद । अकार तो मी ॥ ६९ ॥ पैं गा समासांमाझारीं । द्वंद्व तो मी अवधारीं । [अहमेवाक्षयः कालः] मशकालागोनि ब्रह्मावेरीं । ग्रासिता तो मी ॥ ७० ॥ मेरुमंदरादिकीं सर्वी । सहित पृथ्वीतें विरवी । जो एकार्णवातेंही जिरवी । जेथिंचा तेथें ॥ ७१ ॥ जो प्रळयतेजा देत मेठी । सगळिया पवनातें गिळी किरीटी । आकाश जयाचेया पोटीं । सामावलें ॥ ७२ ॥ ऐसा अपार जो काळ । तो मी ह्मणे लक्ष्मीलीळ । [उद्भवश्च भविष्यतां] मग पुढती सृष्टीचा मेळ । सृजिता तो मी ॥ ७३ ॥

"ज्याप्रमाणें झाडून सारीं नक्षत्रें मोजण्याची मनांत जेव्हां इच्छा होईल तेव्हां त्या आकाशाची मोट बांधली पाहिजे! २५९किंवा पृथ्वीच्या परमाणूंचा झाडा घेणें असेल तर, भूगोलच्च काखोटीस मारला पाहिजे. त्याप्रमाणें, माझा विस्तार पहाणें असेल तर, मलाच जाणलें पाहिजे. २६० ज्याप्रमाणें शाखांस असलेलीं फूलें, पानें, एकदांच सारीं गुंडाळावयाचीं असतील तर, मुळासकट झाड उपटून हातांत घेतलें पाहिजे. २६१ त्याप्रमाणें माझ्या मुख्य मुख्य विभूती साऱ्याच पाहिजे असतील तर, माझें एक निर्दोष स्वरूपच जाणलें पाहिजे. २६२ नाहींतर, निरनिराळ्या विभूती तूं किती किती ह्मणून ऐकशील? ह्मणून हे बुद्धिमंता! जिकडे तिकडे सारा मीच आहें हें लक्ष्यांत ठेव ह्मणजे झालें. २६३ हे **किरीटी!** वस्त्रामध्यें जसे तंतु भरलेले असतात, त्याप्रमाणें साऱ्या सृष्टीचा आदि, मध्य व अंत ह्यांमध्यें मीच ओतप्रोत भरलेला आहें. २६४ मला एक व्यापकाला जाणल्यानंतर निरनिराळ्या विभूतींना काय करावयाचें आहे? पण तितकी तुझी योग्यता नाहीं; ह्मणून तें असो. २६५ कारण, तूं विभूती विचारल्या आहेस. ह्मणून हे **सुभद्रापती!** त्या आतां ऐक. विद्येमध्यें अध्यात्मविद्या–वेदांत–ती मी. २६६ अरे! बोलणारांमध्यें, सर्व शास्त्रांच्या संमतीनें कधीं सरावयाचाच नाहीं, तो वाद मी. २६७ निश्चय करूं लागलें, तर जो वाढतो; ऐकणारांच्या तर्कांना जोर चढवितो; आणि ज्याच्यामुळें बोलणारांचीं बोलणीं गोड होतात;" २६८ **गोविंद** ह्मणतात "असा प्रतिपादनामध्यें जो वाद, तो मी. अक्षरांमध्यें उघडा जो अकार तो मी. तसेंच समासांमध्यें द्वंद्व तो मी. आणि मशकापासून ब्रह्मदेवापर्यंत ग्रासून टाकणारा तोही मी. २७० **मेरु, मंदार,** इत्यादि सकलांसहवर्तमान पृथ्वीचाही जो भुगा करून टाकणारा; जलमय केलेल्या महोदधीसही जो विरवून टाकणारा; २७१ जो प्रळयकाळच्या तेजालाही मारणारा; हे **किरिटी!** साऱ्या वाऱ्याला गिळून टाकणारा; ज्याच्या पोटांत आकाशही गडप होतें;" २७२ लक्ष्मीशीं लीला करणारे **भगवान** ह्मणतात "असा अपार जो **काल** तो मी. आणि पुन्हा सृष्टीची रचना करणाराही मीच." २७३

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम्।
कीर्तिःश्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ३४

[धाता श्लो० ३३, उद्भवश्च भविष्यतां] आणि सृजिलिया भूतांतें मीचि धरीं । सकळां जीवनही मीचि अवधारीं । [मृत्युः सर्वहरश्चाहं] शेखीं सर्वांतें या संहारीं । तेव्हां मृत्युही मीचि ॥ ७४ ॥ [कीर्तिरिति] आतां स्त्रीग-

१ कालत्रयीं. २ व्यापलेलें. ३ वेदांत. ४ निश्चय करूं लागले तर. ५ उत्कंठेला. ६ बळ. ७ अधिक गोड. ८ माशीपासून. ९ ब्रह्मदेवापर्यंत. १० विरवितो, नाश करतो. ११ जलमय झालेल्या जगास. १२ लक्ष्मीशीं लीला करणारा–श्रीकृष्ण. १३ उत्पन्न करणारा.

णाच्या पैकीं । माझिया विभूती सात आणिकी । तिया ऐक कवतिकीं । सांगिजतील ॥ ७५ ॥ तरी नित्य नवी जे कीर्ती। अर्जुना ते माझी मूर्ती । आणि औदार्येंसीं जे संपत्ती । तेही मीचि जाणें ॥ ७६ ॥ आणि ते गा मी वाचा । जे सुखासनीं न्यायाच्या । आरूढोनि विवेकाच्या । मार्गीं चाले ॥ ७७ ॥ देखिलेनि पदार्थें । जे आठवूनि दे मातें । ते स्मृतिही एथें । त्रिशुद्धी मी ॥ ७८ ॥ पैं स्वहिता अनपायिनी । मेधा ते गा मी इये जनीं । धृती मी त्रिभुवनीं । क्षमा ते मी ॥ ७९ ॥ एवं नारीमाझारीं । या सातही शक्ति मी अवधारीं । ऐसें संसारगजकेसरी । ह्मणता जाहाला ॥ २८० ॥

**" आणखी, निर्माण केलेल्या प्राण्यांना धरणारा मीच; आणि सर्वांना जीवनही मीच आहें, हें लक्ष्यांत ठेव. शेवटीं–ह्या सर्वांच्या संहारकालीं–मृत्यु तोही मीच. २७४ अशाच स्त्रीसमुदायामध्येंही माझ्या आणखी सात विभूति आहेत. त्याही आतां सांगतों ऐक. २७५ तर अर्जुना! नित्य नवी अशी जी कीर्ति, ती माझी मूर्ती. आणि औदार्ययुक्त जी संपत्ति, तीही मीच आहें हें लक्ष्यांत ठेव. २७६ आणि न्यायाच्या सुखासनावर बसून विवेकाच्या मार्गानें चालणारी जी वाचा, ती मी. २७७ जो जो पदार्थ पहावा, त्या त्या पदार्थावरून माझें स्मरण करणारी जी स्मृति, तीही मीच. ही खात्री असूं दे. २७८ तसेंच आपलें हित करणारी, अपायकारक नव्हे; अशी लोकांमध्यें जी बुद्धि असते, ती मी. त्रिभुवनामध्यें धृति ती मी, आणि क्षमा ती ही मीच. २७९ अशा प्रकारच्या स्त्रियामध्यें ज्या सात शक्ति आहेत त्या मीच; हें ध्यानांत असूं दे." संसारगजकेसरी जे भगवान् ते याप्रमाणें बोलले. २८०**

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ।
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥३५॥

[ बृहत्सामेति ] वेदराशीचिया सामा । आंत बृहत्साम जें प्रियोत्तमा । तें मी ह्मणे रमा । प्राणेश्वर ॥ ८१ ॥ गायत्रीछंद जें ह्मणिजे । तें सकळां छंदांमाजि माझें । स्वरूप हें जाणिजे । निभ्रांत तुवां ॥ ८२ ॥ [ मासानामिति ] मासांआंत मार्गशिर । तो मी ह्मणे शार्ङ्गधर । ऋतूंमाजि कुसुमाकर । वसंत तो मी ॥ ८३ ॥

**लक्ष्मीपती** आणखी ह्मणतात " हे प्रियोत्तमा! वेदांच्या समुदायामध्यें **बृहत्साम** तो मी. **२८१ गायत्री छंद ह्मणून जो ह्मणतात, तें सकल छंदांमध्यें माझेंच स्वरूप आहे. हें तूं निःसंशय लक्ष्यांत ठेव." २८२ शार्ङ्गधर** ह्मणतात **" महिन्यामध्यें मार्गशीर्ष तो मी. ऋतूंमध्यें पुष्पांची खाणी जो वसंत तो मी." २८३**

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्वं सत्ववतामहम् ३६

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः ।
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः॥३७॥

[ द्यूतमिति ] छळितयां विंदाणा । माजि जूं तें मी विचक्षणा । ह्मणोनि चोहटां चोरी परि कवणा । निवारूं नये ॥ ८४ ॥ अगा अशेषांही तेजसां । आंत तेज तें मी भरंवसा । [ जयोऽस्मीति ] विजयो मी कार्योद्देशां । सकळांमाजी ॥ ८५ ॥ जेणें चोखाळत दिसे न्याय । तो व्यवसायांत व्यवसाव । माझें स्वरूप हें राय । सुरांचा ह्मणे ॥ ८६ ॥ सत्वाथिलियांआंत । सत्व मी ह्मणे अनंत । [ वृष्णीनामिति ] यादवांमाजि श्रीमंत । तोचि तो मी ॥ ८७ ॥ जो देवकी वसुदेवास्तव जाहाला । कुमारीसाटीं गोकुळीं गेला । तो मी प्राणासकट पियाला । पूतनेतें ॥ ८८ ॥ नुघडतां बाळपणाची फुंली । जेणें मियां अदानवी सृष्टि केली । करीं गिरि धरूनि उमाणिली । महेंद्रमहिमा ॥ ८९ ॥ कालिंदीचें हृदयशल्य फेडिलें । जेणें मियां जळत गोकुळ राखिलें । वासरुंवांसाटीं लाविलें । विरंचीसें पिसें ॥ २९० ॥ प्रथमदशेचिये पहांटे । माजि कंसाऐशीं अचाटें । महाधेंडीं अवचटें । लीळाचि नासिलीं ॥ ९१ ॥ हें काय किती एक सांगावें । तुवांही देखिलें असे आघवें । तरि यादवांमाजि जाणावें । हेंचि स्वरूप माझें ॥ ९२ ॥ आणि सोमवंशीं तुह्मां पांडवां । माजि अर्जुन तो मी जाणावा । ह्मणोनि एकमेकांचिया प्रेमभावा । विघड न पडे ॥ ९३ ॥ संन्यासी तुवां होऊनि जनीं । चोरुनि नेली माझी भगिनी । तऱ्हीं विकल्प नुपजे मनीं । मी तूं दोन्ही

१ स्मरणशक्ति. २ त्रिवार. ३ अपाय न करणारी. ४ बुद्धि, धारणाशक्ति. ५ संसाररूप हत्तीला सिंहासारखा–श्रीकृष्ण. ६ सर्व वेदांमधील.

१ पुष्पांची खाण. २ प्रकारांमध्यें. ३ चव्हाट्यावरची. ४ निर्मळ. ५ उद्योग, व्यापार. ६ सत्वशीलांमध्यें. ७ मुद्रा, आकार. ८ दैत्यरहित. ९ मोजली. १० यमुनेचें. ११ हृदयांतील कंटक–कालिया सर्प. १२ ब्रह्मदेवाला. १३ बाल्यदशेच्या आरंभींच. १४ सहज, लीलेनें. १५ भेद.

स्वरूप एक ॥ ९४ ॥ [ मुनीनामिति ] मुनीआंत व्यासदेव । तो मी ह्मणे यादवराव । कवीश्वरांमाजि धैर्या ठाव । उशना-चार्य तो मी ॥ ९५ ॥

"हे विचक्षणा! छळण्याच्या प्रकारांत जूं तें मी. ह्मणून जुवा खेळणें ही जरी चव्हाट्या-वरची चोरी आहे, तरी तीस प्रतिबंध होत नाहीं. २८४ अरे! एकून एक दिव्य पदा-र्थांत तेज तें मी, ही खात्री असूं दे. तसेंच सर्व कार्याच्या हेतूंमध्यें विजय तो मी." २८५ दे-वांचे प्रभु **श्रीकृष्ण** ह्मणतात. "उद्योगांमध्यें ज्या उद्योगानें न्याय निर्मळ होतो, तें माझें स्वरूप." २८६ **अनंत** ह्मणतात "सत्वशीला-मध्यें सत्व तें मी. यादवांमध्यें असणारा जो, तो मीच. २८७ जो **वसुदेव देवकी**पासून झाला; तरुणीसाठीं गोकुळांत गेला; आणि पू-तनेला प्राणासहवर्तमान प्यालेला जो तो मी. २८८ बाळपणाची मुद्रा गेली नाहीं तोंच ज्या मीं पृथ्वीला दैत्यरहित करून सोडली. हातावर पर्वत धरून **महेंद्रा**च्या महिम्याची मोजदात केली. २८९ **यमुने**च्या हृदयांतील शल्य काढून टाकलें. ज्या मी, गोकुळ जळत असतांना त्याचें संरक्षण केलें. वासरांसाठीं, **ब्रह्मदेवा**ला तर पिसें लावून सोडलें. २९० बाल्यदशेच्या पहिल्या प्रहरांतच **कंसा**सारखीं मोठमोठालीं अचाट धेंडें हां हां ह्मणतां लीले-नेंच विध्वंसून टाकलीं. २९१ असें काय काय आणि किती किती सांगावें? तूं देखील तें सारें पाहिलेलें आहेस, व ऐकलेलेंही आहेस. तर यादवांमध्यें हेंच माझें स्वरूप आहे, हें ध्या-नांत ठेव. २९२ आणखी सोम वंशांत–तुह्मां पांडवांमध्यें–**अर्जुन** तो मी हें लक्ष्यांत ठेव. ह्मणून एकमेकांच्या प्रेमांत बिघड पडत नाहीं. २९३ तूं लोकांमध्यें संन्याशी होऊन माझी ब-हिण चोरून नेलीस, तरी माझ्या मनामध्यें विकल्प आला नाहीं. कारण, मी आणि तूं हीं स्वरूपें एकच आहेत." २९४ यादवराव–श्री-कृष्ण–ह्मणतात "मुनींमध्यें **व्यास** तो मी. कवीश्वरामध्यें धैर्याचें स्थान जें **शुक्राचार्य** तें मी." २९५

१ शुक्राचार्य.

दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।
मौनं चैवाऽस्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ३८

[ दंड इति ] अगा दमितयांमाझारीं । अनिवार दंड तो मी अवधारीं । जो मुंगियेलागोनि ब्रह्मावेरीं । नियमितें पावे ॥ ९६ ॥ पैं सारासार निर्धारितयां । धर्मज्ञानाचा पक्ष धरि-तयां । सकळशास्त्रांमाजि ययां । नीतिशास्त्र तें मी ॥ ९७ ॥ [ मौनमिति ] आघवियाचि गूढां । माजि मौन तें हुंडा । ह्मणोनि न बोलतयां पुढां । स्रष्टाही नेणें होय ॥ ९८ ॥ अगा ज्ञानियांचिया ठायीं । ज्ञान तें मी पाहीं । आतां असो हें ययां कांहीं । पार न देखों ॥ ९९ ॥

"अरे! शासन करणाऱ्यांमध्यें अनिवार दंड तो मी. हें लक्ष्यांत ठेव. जो मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत शासन करतो. २९६ तसेंच सा-रासार विचार करणाऱ्यामध्यें, धर्मज्ञानाचा पक्ष घेणाऱ्या सर्व शास्त्रांमध्यें नीतिशास्त्र तें मी. २९७ हे सुहृदा! साऱ्या गूढामध्यें मौन तें मी. ह्मणूनच न बोलत्यापुढें ब्रह्मदेवसुद्धां हात टेंकतो. २९८ हें पहा! ज्ञान्यांच्या ठि-काणीं ज्ञान तें मी. आतां हें असो. त्यांना कांहीं अंतपार लागावयाचा नाहीं." २९९

यच्चाऽपि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ३९
नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥४०॥

[ नांतोऽस्तीति ] पैं पर्जन्याचिया धारा । वरी लेखँ कर-वेल धनुर्धरा । कां पृथ्वीचिया तृणांकुरां । होईल ठी ॥ ३०० ॥ पैं महोदधीचिया तरंगां । व्यवस्था धरूं नये जेविं गा । तेविं माझिया विशेषलिंगा । नाहीं मिती ॥ १ ॥ [ एषतूद्देशतः प्रोक्तः ] ऐशियाही सांत पांच या प्रधाना । विभूती सांगीतलिया तुज अर्जुना । तो हा उद्देश जो गा मना । आंहाच गमला ॥ २ ॥ [ विभूतेर्विस्तरो मया ] येरां विभूतिविस्तारांसि कांहीं । एथ सर्वथा लेख नाहीं । ह्मणोनि

१ दंड करणाऱ्यांमध्यें. २ ब्रह्मदेवापर्यंत. ३ भेदरहित. ४ सुहृदा–अर्जुना. ५ ब्रह्मदेवसुद्धां. ६ बुद्धिहीन होतो. ७ गणना, मोजदात. ८ शेवट. ९ विभूतींस. १० पंचा-हत्तर. ११ हेतु. १२ उगाच.

परिससी तूं काई । आह्मी सांगों किती ॥ ३ ॥ [ यच्चापीति ] यालागिं एकीहेळां तुज । दाऊं आतां वर्म निज । सर्वभूतांकुरें बीज । विरूढत असे तें मी ॥ ४ ॥ [ न तदस्तीति ] ह्मणोनि सानें थोर न ह्मणावें । उंच नीच भाव सांडावे । एक मीचि ऐसें मानावें । वस्तुजातातें ॥ ५ ॥ तरी यावरी साधारण । आईक पां आणीकही खुण । तरिं अर्जुना ते तूं जाण । विभूती माझी ॥ ६ ॥

**"हे धनुर्धरा! पर्जन्यांच्या धारांचें माप करवेल का? किंवा पृथ्वीवरील तृणांकुरांचा हिशेब मिळेल का? ३०० किंवा महासागराच्या लाटा ज्याप्रमाणें मोजतां येत नाहींत, त्याप्रमाणें माझ्या मुख्य मुख्य विभूतींना मिति नाहीं. ३०१ तरी अर्जुना! त्यांपैकीं मुख्य मुख्य पंचाहत्तर तुला सांगितल्या. त्या तरी, उगाच सांगावें असें मनांत आलें ह्मणून सांगितल्या. ३०२ आणखी विभूतींचा विस्तार सांगावयास लागलों तर, त्यांना मुळींच मोजदात नाहीं. ह्मणून तूं ऐकणार काय? आणि आह्मी सांगणार तरी किती? ३०३ ह्याकरितां एकदांच तुला आतां आमचें एक वर्म दाखवून देतों. सर्व प्राणिमात्रांच्या अंकुरानें जें बीज पसरलें आहे, तें मी. ३०४ ह्मणून हें लहान आणि हें मोठें असें ह्मणूं नये. उंच, नीच, हे भाव सोडून द्यावेत. कोणतीही वस्तु असो, ती मीच आहे असें मानावें. ३०५ तथापि त्यांत आणखीही एक साधारण खूण आहे, तीही तूं लक्ष्यांत घे. आणि अर्जुना! तेथें माझी विभूति आहे, हें लक्ष्यांत ठेव." ३०६**

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवाऽवगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥४१॥

[ यद्यदिति ] जेथ जेथ संपत्ति आणि दया । दोन्ही वसती आलिया ठाया । [ तत्तदिति ] ते ते जाण धनंजया । अंश माझे ॥ ७ ॥

**"धनंजया! जेथें जेथें संपत्ति आणि दया, ह्या वस्ती करावयाला आल्या असतील, तेथें तेथें माझा अंश आहे. समजलास?" ३०७**

१ एकदां. २ लहान. ३ प्रत्येक पदार्थाला.

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवाऽर्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ४२

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतिविस्तारयोगो नाम दशमोऽध्यायः॥१०॥

[ अथवा ] अथवा एकलें एक बिंब गगनीं । परि प्रभा फांके त्रिभुवनीं । तेविं मज एकाची सकळ जनीं । आज्ञा पाळिजे ॥ ८ ॥ तयातें एकले ह्मणीं ह्मण । तो निर्धन या भाषा नेण । काय कामधेनूसवें सर्व साहान । चालतअसे ॥ ९ ॥ तियेतें जें जेधवां जो मागे । तें ते एकसरेंचि प्रसवों लागे । तेविं विश्वविभव तया आंगें । होऊनि असती॥३१०॥ तयातें वोळखावया हेचि संज्ञा । जे जगें नमस्कारिजे आज्ञा । ऐसें आथि ते जाण प्राज्ञा । अवतार माझे ॥ ११ ॥ [ विष्टभ्याहमिदं कृत्स्नं ] आणि सामान्य विशेष । हें जाणणें एथ महादोष । कां जे मीचि एक अशेष । विश्व आहें ह्मणोनि ॥ १२ ॥ [ बहुनैतेन ] तरी आतां साधारण आणि चांग । ऐसा कैसेनि पां कल्पावा विभाग । वायां आपुलिये मती वेंग । भेदाचा लावावा ॥ १३ ॥ येऱ्हवीं तूप कासया घुसळावें । अमृत कां रांधूनि अर्धे करावें । हां गा वायूसि काय पां डावें उजवें । आंग आहे ॥ १४ ॥ पैं सूर्यबिंबासि पोट पाठी । पहातां नासेल आपुली दिठी । तेविं माझ्या स्वरूपीं गोठी । सामान्यविशेषाची नाहीं ॥ १५ ॥ [ किं ज्ञातेन तवार्जुन ] आणि सिनानीं इहीं विभूतीं । मज अपारातें मविसील किती । ह्मणोनि किंबहुना सुभद्रापती । असो हें जाणणें ॥ १६ ॥ [ एकांशेन स्थितो जगत् ] आतां पैं माझेनि एकें अंशें । हें जग व्यापिलें असे । यालागीं भेद सांडूनि सरिसें । साम्यें भज ॥ १७ ॥ ऐसें विबुधवनवसंतें । तेणें विरक्तांचेनि एकांतें । बोलिलें जेथ श्रीमंतें । श्रीकृष्णदेवें ॥ १८ ॥ तेथ अर्जुन ह्मणे स्वामी । येतुलें हें रांभस्य बोलिलें तुह्मी । जे भेद एक आणि आह्मी । सांडावा एकीं ॥ १९ ॥ हां हो सूर्य ह्मणे काय जगातें । आंधारें दवडा कां परौतें । तेविं धसाळे ह्मणों देवातें । तरीं अधिक हा बोल ॥ ३२० ॥ तुझें नामचि एक कोण्ही वेळे । जयांचिये मुखासि कां काना मिळे । तयांचिया हृदयातें सांडूनि पळे । भेद जी साच ॥ २१ ॥ तो तूं परब्रह्मचि अंसकें । मज दैवें दिधलासि हस्तोदकें । तरीं आतां भेद कायसा कें । देखावा कवणें॥२२॥ जी चंद्रबिंबाचा गाभारा । रिगालियावरी ही उबारा । परि

१ कदाचित्. २ साहित्य. ३ ती कामधेनु. ४ एकदम. ५ देऊं लागते. ६ सर्व ऐश्वर्यें. ७ लक्षण, खूण. ८ कळंक, उणेपणा. ९ शिजवून. १० दृष्टि. ११ गोष्ट. १२ वेगवेगळ्या. १३ मोजशील. १४ ज्ञानी हेंच कोणी वन, त्यास वसंतरूप अशा कृष्णानें. १५ रहस्य. १६ अविचारी. १७ सारा. १८ प्रवेश केल्यावर.

राणेपणें शार्ङ्गधरा । बोला हें तुह्मी ॥ २३ ॥ तेथ सांवियाचि परितोषोनि देवें । अर्जुनातें आलिंगिलें जीवें । मग ह्मणे तुवां न कोपावें । आमुचिया बोला ॥ २४ ॥ आह्मी तुज भेदाचिया वोहणी । सांगीतली जे विभूतींची कहाणी । ते अभेदें काय अंतःकरणीं । मानली कीं न मने ॥ २५ ॥ हेंचि पाहावयालागीं । नावेक बोलिलों बाहेरिसँवडिया भंगीं । तंव विभूती तुज चांगी । आलिया बोधा ॥ २६ ॥ [ उत्तराध्यायबीज ] तेथ अर्जुन ह्मणे देवें । हें आपुलें आपण जाणावें । परि देखतसें विश्व आघवें । तुवां भरलें ॥ २७ ॥ पैं राया तो पांडुसुत । ऐसिये प्रतीतीसि जाहाला वरितें । संजयाचिया बोला निवांत । धृतराष्ट्र आहे ॥ २८ ॥ कीं संजय दुखवलेनि अंतःकरणें । ह्मणतसे नवल नव्हे दैवा दवडणें । हा जीवीं धडसा आहे मी ह्मणे । तंव आंतही आंधळा ॥ २९ ॥ परि असो हें तो अर्जुन । स्वहिताचा वाढवीतसे मान । कीं याहीवरी तया आन । धिंवसा उपनला ॥ ३३० ॥ ह्मणे हेचि हृदयाआंतुली प्रतीती । बाहेरि अंवतरो कां डोळ्यांप्रती । ऐसे आर्तीचिया पाउलीं मती । उठती जाहाली ॥ ३१ ॥ मियां इहींच दोंही डोळां । ह्मोंवावें विश्वरूपा सकळा । येवढी हांव तो दैवा आगळा । ह्मणऊनि करी ॥३२॥ आजि तो कल्पतरूची शाखा । ह्मणोनि वांझोळें न लगती देखा । जें जें येईल तयाचिया मुखा । तें तें साचचि करीतसे येरु ॥ ३३ ॥ जो प्रऱ्हादाचिया बोला । विषाही सकट आपणचि जाहाला । तो सद्गुरु असे जोडला । किरीटीसी ॥ ३४ ॥ ह्मणोनि विश्वरूप पुसावयालागीं । पार्थ रिगतां होईल कवणें भंगीं । तें सांगेन पुढलिये प्रसंगीं । ज्ञानदेव ह्मणे निवृत्तीचा ॥ ३३५ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥

श्लोक ४२, ओंव्या ३३५.

“ अथवा आकाशामध्यें एकटें एक बिंब असतें, पण त्याची प्रभा त्रिभुवनांत फांकते. त्याप्रमाणें माझ्या एकट्याचीच सर्व जनांनीं आज्ञा पाळावी. ३०८ त्याला एकटा असें ह्मटलें ह्मणून कदाचित् तो निर्धन असेल, दुबळा असेल, असें मानशील; तर ती गोष्टसुद्धां मनांत आणूं नको. कामधेनू बरोबर सारी सामुग्री चालत का असते? ३०९ तिला ज्या ज्या वेळेस जो जो मागतो, तें तें ती एकदम उत्पन्न करते. त्याप्रमाणें विश्ववैभव त्याच्या आंगीं उत्पन्न होतें. ३१० हे प्राज्ञा! त्याला ओळखण्याला खूण हीच कीं, ज्याची आज्ञा लोक शिरसावंद्य करतात. असे जे असतील ते माझे अवतार. ३११ आणखी, हा सामान्य, व हा विशेष, असें मनांत आणणें हाही मोठा दोष आहे. कारण, सारें विश्व मीच आहें ह्मणून. ३१२ तेव्हां आतां साधारण आणि चांगलें, असा विभाग तरी कसा मानावा? व्यर्थ आपल्या बुद्धीला, भेदाचा कलंक तरी काय ह्मणून लावावा? ३१३ बाकी, तूप घुसळावें कशाला? अमृत शिजवून अर्धें कां करावें? अरे! वायूला डावें किंवा उजवें आंग आहे काय? ३१४ तसेंच, सूर्यबिंबाची पाठ कोणची, व पोट कोणचें ह्मणून पहावयाला लागलें, तर आपली दृष्टी मात्र नाहींशी होईल. त्याप्रमाणें माझ्या स्वरूपांत सामान्याची आणि विशेषाची गोष्टच नाहीं. ३१५ आणखी अशा माझ्या निरनिराळ्या विभूती तूं किती मोजशील? ह्मणून हे सुभद्रापती! तें समजून घेणें पुरे. ३१६ आतां माझ्या एका अंशानें जग व्यापलें आहे, ह्यासाठीं भेद सोडून देऊन सारख्या भावनेनेंच भजन कर.” ३१७

ह्याप्रमाणें, ज्ञानी हेच कोणी वन; त्यांस वसंतरूप, विरक्ताचा जो एकांत; असे श्रीमान् जे श्रीकृष्णदेव ते जेव्हां अशाप्रकारें बोलले, ३१८ तेव्हां अर्जुन ह्मणाला “स्वामी! येवढें तुमचें बोलणें मात्र गूढ आहे. कीं भेद निराळा, आणि आह्मी सोडणारे निराळे, असें झालें. ३१९ अहो! सूर्य हा, आंधारास पलीकडे सारा, असें कां जगाला ह्मणत असतो? तसें देवांना अविचारी ह्मणावें, तर अधिक प्रसंग होईल. ३२० अहो! तुमचें नामच जर एखाद्या वेळीं एखाद्याच्या मुखास आलें, किंवा

१ राजेपणानें. २ सहजच, तत्काल. ३ मार्गी, प्रवाहीं. ४ क्षणभर. ५ बाह्यदृष्टीच्या. ६ रीतीनें. ७ योग्य. ८ उत्कंठा. ९ उत्पन्न झाली. १० प्रगट होवो. ११ ह्या. १२ इच्छेच्या. १३ पावलानें, मार्गानें. १४ मोठा भाग्यवान्. १५ तो अर्जुन. १६ वांझ फुलें. १७ श्रीकृष्ण. १८ आरंभ करील. १९ रीतीं. २० अध्यायामध्यें.

कानावर पडलें, तरी सुद्धां त्याच्या हृदयाला सोडून भेद पळून जातो. ३२१ तो तूं साक्षात् परब्रह्मच मला दैवानें लाभलास. तर आतां भेद कशाचा, कोठें, आणि कोणी पहावयाचा? ३२२ महाराज! चंद्रबिंबाच्या गाभाऱ्यांत शिरल्यावरही उकाडा होईल होय? पण हे **शारंगधरा!** हें आपणच प्रभुत्वानें सांगा पाहूं." ३२३ तेव्हां तत्काल देवांनीं आनंदित होऊन **अर्जुनास** मनापासून आलिंगन दिलें. आणि ह्मणाले "आह्मी असें ह्मटलें, ह्मणून तूं राग मानूं नको. ३२४ आह्मी तुला भेदाच्या प्रवाहानें जी विभूति कथा सांगितली, ती तुझ्या अंतःकरणांत अभेद भावानें उतरली किंवा नाहीं? ३२५ हेंच पहाण्यासाठीं क्षणभर बाह्यात्कारी असें बोललों. तों आमच्या विभूती तुझ्या मनांत चांगल्या ठसल्या असें कळून चुकलें." ३२६ तेव्हां **अर्जुन** ह्मणाला "देवा! तें काय तें आपलें आपण पहावें. परंतु मला तर हें सारें विश्व आपल्यानेंच भरलें आहे असें वाटतें." ३२७

'राजा! अर्जुन तर अशा अनुभवास पात्र झाला.' पण संजयाच्या ह्या भाषणानें धृतराष्ट्र निवांत बसला. ३२८ ह्मणून संजयाला वाईट वाटलें. आणि ह्मणाला 'दैवाला ढकलून देतो, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण, हा हृदयांत तरी धड असेल, असें मीं आजपर्यंत ह्मणत होतों, पण हा आंतूनही आंधळाच!' ३२९ पण हें असो. तो अर्जुन स्वहिताचा मान वाढवूं लागला. कारण, ह्यावर त्याला दुसरी उत्कंठा उत्पन्न झाली. ३३० तो ह्मणाला "ह्याच हृदयांत आलेला अनुभव बाहेर डोळ्यांना दिसावा. ह्या इच्छेचें पाऊल घेऊन बुद्धि निघाली. ३३१ ह्याच दोन्ही डोळ्यांनीं मी साऱ्या विश्वरूपाला झोंबावें. तो मोठा भाग्यशाली होता, ह्मणून त्यानें येवढी हाव धरली. ३३२ ह्यावेळेस **अर्जुन** हा, कल्पतरूची शाखा होती. ह्मणून तिला वांझ फुलें कधीं येत नसत. त्याच्या मुखांतून जें जें येईल, तें तें **श्रीकृष्ण** खरेंच करीत. ३३३ जो **प्रऱ्हादाच्या** भाषणानें विषसुद्धां आपणच बनला, तो त्या **अर्जुनाला** सद्गुरु सांपडला. ३३४ ह्मणून निवृत्तीचे **ज्ञानदेव** ह्मणतात—"**अर्जुन** विश्वरूप विचारावयाला कोणत्या रीतीनें आरंभ करील, तें पुढल्या प्रसंगांत सांगेन." ३३५

## दहावा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय ११ वा.

आतां यावरी ऐकादशीं[1] । कथा आहे दोहीं[2] रसीं । जेथ पार्थां विश्वरूपेंसीं । होईल भेटी ॥ १ ॥ जेथ शांताचिया घरा । अद्भुत आला आहे पाहुणेरा[3] । आणि येरांही[4] रसां पांतिकेरां[5] । जाहाला मान[6] ॥ २ ॥ अहो वधूवरांचिये मिळणी[7] । जैसीं वराडियांही लुगडीं[8] लेणीं । तैसे देशियेच्यां[9] सुखासनीं[10] । मिरवले[11] रस ॥ ३ ॥ परि शांताद्भुत बरवे । जे डोळयांच्या अंजळीं[12] घ्यावे । जैसे हरिहर प्रेमभावें । आले खेंवों[13] ॥ ४ ॥ ना तरीं अंवसेच्या दिवसीं । भेटलीं बिंबें[14] दोनी सरसीं । तेविं ऐकैवळा[15] रसीं । केला एथ ॥ ५ ॥ मिनले[16] गंगेयमुनेचे ओघ । तैसें रसां जाहालें प्रयाग । ह्मणोनि सुस्नात[17] होत जग । आघवें एथ ॥ ६ ॥ माजि गीता सरस्वती गुप्त । आणि दोनी रस ते ओघ मूर्त । यालागिं त्रिवेणी हे उचित । फावली बापा ॥ ७ ॥ एथ श्रवणाचेनि द्वारें । तीर्थी रिघतां सोपारें । ज्ञानदेव ह्मणे दातारें[18] । माझेनि केलें ॥ ८ ॥ तीरें[19] संस्कृताचीं गहनें[20] । तोडोनि मऱ्हाठी-शब्द सोपानें[21] । रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥ ९ ॥ ह्मणोनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें । प्रयागमाधव विश्वरूप पहावें । येतुलेनि संसारासि द्यावें । तिळोदकें[22] ॥ १० ॥ हें असो ऐसे सावयव[23] । एथ सांसिनले[24] आथि रसभाव । जेथ श्रवणसुखाची रोणीव[25] । जोडली जगा ॥ ११ ॥ जेथ शांताद्भुत रोकडे । आणि येरां रसां पेंडप[26] जोडे । हें अल्पचि परि उघडें । कैवल्य[27] जेथ ॥ १२ ॥ तो हा अकरावा अध्याय । जो देवाचा आपणपें विसवंतो[28] ठाव । परि अर्जुन सदैवांचो[29] राव । जे एथही पातला ॥ १३ ॥ एथ अर्जुनचि काय ह्मणों पातला । आजि आंवडतयाही[30] सुकाळ जाहाला । जे गीतार्थ आला । मऱ्हाठिये ॥ १४ ॥ याचिलागीं माझें । विनविलें आइकीजे । तरि अवधान दीजे । सज्जनीं तुह्मी ॥ १५ ॥ तेवींचि तुह्मां संतांचिये सभे । ऐसी सलगी कीर[1] करूं नलेभे[2] । परि मानावें जी लोभें । अपत्या मज ॥ १६ ॥ अहो पुंसा[3] आपणचि पढविजे । मग पढे तरी माथा तुकिजे[4] । कां करविलेनि चोजें[5] न रिझे[6] । बाळका माय ॥ १७ ॥ तेविं मी जें जें बोलें । तें प्रभु तुमचेंचि शिकविलें । ह्मणोनि अवधारिजो[7] आपुलें । आपण देवा ॥ १८ ॥ हें सारस्वताचें[8] गोड । तुह्मीचि लाविलें जी झाड । तरी आतां अवधानामृतें[9] वाडें[10] । सिंपोनि कीजे ॥१९॥ मग हें रसभाव फुलीं फुलेल । नागार्थ फळभारें फळा येईल । तुमचेनि धर्में होईल । सुरवाड[11] जगा ॥ २० ॥ या बोला संत रिझले[12] । ह्मणती तोषलों गा भलें केलें । आतां सांगें जें बोलिलें । अर्जुनें तेथें ॥२१॥ तंव निवृत्तिदास ह्मणे । जी कृष्णार्जुनाचें बोलणें । मी प्राकृत काय सांगों जाणें । परि सांगवा तुह्मी ॥ २२ ॥ अहो रानींचिया पालेखाइरा[13] । नेवाणें[14] करविलें लंकेश्वरा । एकला अर्जुन परी अक्षौहिणी अकरा । न जिणेचि[15] काई ॥ २३ ॥ ह्मणोनि समर्थ जें जें करी । तें नहोनये[16] चराचरीं । तुह्मी संत तयापरी । बोलवा मातें ॥ २४ ॥ आतां बोलिजतसे आइका । हा गीताभाव निका । जो श्रीवैकुंठनायका । मुखौनि निघाला ॥ २५ ॥ बापबाप[17] ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य[18] देवता । तो श्रीकृष्ण वक्ता । जिये ग्रंथीं ॥ २६ ॥ तेथिंचें गौरव कैसें वानावें[19] । जें श्रीशंभूचिये मती नांगवे[20] । ते आतां नमस्कारिजे जिवें भावें । हेंचि भलें ॥ २७ ॥ [चूर्णिका] मग आइका तो किरीटी । घालूनि विश्वरूपीं दिठी[21] । पहिली कैसी गोठी[22] ।

---

१ अकराव्या अध्यायांत. २ दोन रसांनीं युक्त. ३ मेजवानीला. ४ इतरांनाही. ५ पंक्तीला. ६ आमंत्रण. ७ लग्नसमारंभांत. ८ वस्त्रेंभूषणें. ९ मराठीभाषेच्या. १० पालखींत. ११ शोभले. १२ ओंजळींत. १३ आलिंगन देण्याला. १४ गोल. १५ एकोपा. १६ भेटले. १७ पवित्र. १८ दात्यानें—श्रीनिवृत्तिनाथांनीं. १९ दरडी, तट. २० अगम्य. २१ घाट, जिना. २२ फांटा. २३ मूर्तिमंत. २४ भरास आले. २५ राज्य. २६ आश्रय. २७ मोक्षसुख. २८ विश्रांतिचें स्थान. २९ भाग्यवंताचा राजा. ३० पाहिजे त्याला.

१ खरोखर. २ योग्य नव्हे. ३ राघूला—पोपटाला. ४ डोलवावा. ५ कौतुकानें. ६ आनंदित. ७ श्रवण करावें. ८ विद्येचें. ९ एकाग्र अंतःकरणरूप अमृतानें. १० वाढ, वृद्धि. ११ सुख. १२ प्रसन्नझाले. १३ पाले खाणाऱ्या वानरांकडून. १४ पराभव. १५ जिंकिली नाहीं काय.? १६ न होण्याजोगेंही घडुन येतें. १७ श्रेष्ठ, थोर. १८ प्रतिपादन केलेली. १९ वर्णन करावें. २० बुद्धीला आकळत नाहीं. २१ दृष्टी. २२ गोष्ट.

करिता जाह्राला ॥ २८ ॥ हें सर्वही सर्वेश्वर । ऐसा प्रतीतिगत जो पैतिकर । तो बाहेरि होआवा गोचर । लोचनासी ॥ २९ ॥ हे जिवाआंतुली चाड । परि देवासि सांगतां सांकडें । कां जें विश्वरूप गूढ । कैसेनि पुसावें ॥ ३० ॥ ह्मणे मागां कवणीं कहीं । जें पेढियंतेनें पुसिलें नाहीं । तें सहसा कसें काई । सांगा ह्मणों ॥ ३१ ॥ मी जरी सलगीचा चांग । तरि काय आइसीहूनि अंतरंग । परि तेही हा प्रसंग । बिहाली पुसों ॥ ३२ ॥ माझी आवडेतैसी सेवा जाह्राली । तरि काय होईल गरुडाचिया येतुली । परि तोही हे बोली । करीचिना ॥ ३३ ॥ मी काय सनकादिकांहूनि जवळां । परि तयांही नागवेचि हा चाळा । मी आवडेन काय प्रेमळां । गोकुळींचिया ऐसा ॥ ३४ ॥ तयांतेंही लेंकुरपणें झंकविलें । ऐकाचे गर्भवासही साहिले । परि विश्वरूप हें राहाविलें । नदावीच कवणा ॥ ३५ ॥ हा ठायवरी गुज । याचिये अंतरीचें हें निज । केविं उंराउरी मज । पुसों ये पां ॥ ३६ ॥ आणि न पुसेंचि जरी ह्मणें । तरि विश्वरूप देखिलियाविणें । सुख नोहेचि परि जिणें । तेंही विपायें ॥ ३७ ॥ ह्मणोनि आतां पुसों अंलुमाळसें । मग करूं देवा ठाके तैसें । येणें प्रवर्तला सोध्वसें । पार्थ बोलों ॥ ३८ ॥ परि तेंचि ऐसेनि भावें । जे एका दों उत्तरांसवें । दावी विश्वरूप आघवें । झाडा देउनीं ॥ ३९ ॥ अहो वासरूं देखिलियाचिसाठीं । धेनु खडबडोनि मोहें उठी । मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा धंरे ॥ ४० ॥ पाहा पां तया पांडवाचेनि नांवें । जो कृष्ण रानींही प्रतिपाळूं धांवे । तयातें अर्जुनें जंव पुसावें । तंव सांहील काई ॥ ४१ ॥ तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण । आणि येरू स्नेहा घातलें आहे माजवण । ऐसिये मिळणीं वेगळेपण । उरे हेंचि बहु ॥ ४२ ॥ ह्मणोनि अर्जुनाचिया बोलासरिसा । देव विश्वरूप होईल आपैसा । तोचि पहिला प्रसंग ऐसा । ऐकिजे तरी ॥ ४३ ॥

**आतां यापुढें अकराव्या कथेंत दोन रस भरलेले असून तिच्यामध्यें अर्जुनाला विश्वरूपाचें दर्शन होईल. १ येथें शांत रसाच्या घरीं अद्भुत रस मेजवानीस आला आहे. आणि इतर रसांसही पंक्तीस येण्यासाठीं आमंत्रण दिलें आहे. २ अहो! वधुवरांच्या लग्नसमारंभांत** वऱ्हाडीही जसे वस्त्रालंकार घालून मिरवतात, त्याप्रमाणें मराठी भाषेच्या पालखीमध्यें इतर रसही शोभत आहेत. ३ पण त्यांत शांत आणि अद्भुत हे तर उत्तमच आहेत. ते डोळ्यांच्या ओंजळींत घ्यावेत. ज्याप्रमाणें **विष्णु** आणि **शंकर** प्रेमभावानें भेटावयास यावेत, ४ किंवा अमावास्येच्या दिवशीं चंद्राची आणि सूर्याची एक ठिकाणीं गांठ पडावी, त्याप्रमाणें दोन रसांचा येथें संगम झाला आहे. ५ **गंगेचा** आणि **यमुनेचा** ओघ मिळून जसा **प्रयाग** होतो, त्याप्रमाणें ह्या दोन्ही रसांचा येथें संगम झाला आहे. ह्मणून सारें जग येथें पवित्र होतें. ६ ह्यामध्यें गीतारूप **सरस्वती** गुप्त आहे; आणि दोन्ही रसांचे मूर्तिमंत दोन प्रवाह आहेत. ह्याकरितां बाबानो! हा यथायोग्य **त्रिवेणीसंगम** झाला. ७ कर्णेंद्रियद्वारा ह्या तीर्थामध्यें शिरणें सोपें आहे. **ज्ञानदेव** ह्मणतात "हें इतकें माझ्या श्रीगुरुनाथांनीं केलें. ८ धर्माचे केवळ निधि असे जे **श्रीनिवृत्तिदेव** त्यांनीं संस्कृताचे अगम्य असलेले तट तोडून, मऱ्हाठी शब्दांचा जिना तयार केला. ९ ह्मणून येथें पाहिजे त्यानें सद्भावानें स्नान करून विश्वरूप **प्रयाग माधवाचें** दर्शन घ्यावें. आणि तेणेंकरून संसारावर पाणी सोडावें. १० हें असो. अशाप्रकारें येथें सारे रस तुडुंब भरले आहेत. आणि श्रवणसुखाचें राज्य जगास मिळालें आहे. ११ ह्यांत शांत आणि अद्भुत हे रस प्रत्यक्ष असून इतर रसांसही स्थान मिळालेलें आहे. ते थोडेच आहेत, तथापि त्यांनीं मोक्ष अगदीं उघडा करून दिला आहे. १२ तो हा अकरावा अध्याय; जो देवाचें स्वतःचें विश्रांति स्थान. तेव्हां **अर्जुन** हा भाग्यवंताचा राजा ह्मटला पाहिजे. कारण त्यानें तेथेंही प्रवेश केला. १३ पण त्यांत अर्जुनानेंच प्रवेश केला, असें कां ह्मणावें? आज पाहिजे त्याला त्याचा सुकाळच झाला आहे. कारण, गीतेचा अर्थ मराठीमध्यें आला. १४

१ अनुभव. २ प्रत्यक्ष दिसावा. ३ इच्छा. ४ संकट. ५ आवडत्यानें. ६ लक्ष्मीपेक्षां. ७ जिवलग. ८ ती लक्ष्मी सुद्धां. ९ भ्याली. १० भाषण. ११ भाविक. १२ ठकविलें. १३ अंतरीपार्श्वं. १४ आजपर्यंत. १५ एकाएकीं. १६ व्यर्थ. १७ थोडेसें. १८ पाहिजे तसें. १९ भयानें, भीत भीत. २० चोखेल काय! २१ दम धरवेल काय? २२ मूर्ति. २३ कैफ. २४ ऐक्यामध्यें. २५ आपोआप, सहज.

याकरितां मी विनंति करतों ती ऐकावी. ती विनंति एवढीच कीं, तुह्मीं सज्जनांनीं हिकडे आतां लक्ष्य द्यावें. १५ तसेंच, आपल्यासारख्या संतांच्या सभेमध्यें मी इतकी सलगी करणें उचित नव्हे ही गोष्ट खरी. पण महाराज! मी आपलें लेंकरूं असें समजून प्रेमानें ती तुह्मीं मान्य करावी. १६ अहो! राघूला आपणच शिकवावें; आणि तो बोलूं लागला ह्मणजे आपणच मान डोलवावी. किंवा आई आपणच मुलाला शिकवून कौतुक करीत नाहीं काय? १७ त्याप्रमाणें महाराज! मी जें कांहीं बोलतों आहें, तें तें तुह्मींच शिकविलेलें बोलतों आहें. ह्मणून देवा! आपलें आपणच ऐकावें. १८ हें विद्येचें गोड झाड तुह्मींच लावलेलें आहे. तर आतां एकाग्र अंतःकरणरूप अमृतानें शिंपून त्याला वाढवावें. १९ ह्मणजे हें रसभावाच्या फुलांनीं फुलेल; अनेकविध अर्थाच्या फलभारानें फलद्रूप होईल; आणि आपल्या धर्मानें साऱ्या जगाला सुख देईल. २० ह्या भाषणानें संत प्रसन्न झाले आणि ह्मणाले 'अरे! फार उत्तम झालें. आह्मांस संतोष झाला. आतां तेथें **अर्जुन** काय बोलला तें सांग.' २१ तेव्हां **निवृत्तिदास** ह्मणाले "महाराज! मी केवळ प्राकृत मनुष्य. **कृष्णार्जुनांचें** बोलणें मला काय सांगतां येणार? पण तें आपण सांगवा. २२ अहो! रानांतील पाले खाणारांकडून (वानरांकडून) **लंकेश्वराचा** (रावणाचा) पराभव करविला. **अर्जुन** एकटा होता, परंतु अकरा अक्षौहिणी सेना त्यानें जिंकिली नाहीं काय? २३ ह्मणून समर्थ आहेत ते, चराचरांकडूनही जें होणारें नव्हे, तें करतात. त्याप्रमाणें तुह्मीं सज्जनांनीं मला बोलवावें. २४ आतां **श्रीवैकुंठनायकांच्या** मुखांतून निघालेला यथार्थ गीताभाव सांगतों; ऐकावें. २५ अहाहा! गीता ग्रंथ थोर! फारच थोर! कारण, वेदामध्यें प्रतिपाद्य देवता जो श्रीकृष्ण, तो ज्या ग्रंथाचा वक्ता. २६ त्याच्या गौरवाचें किती ह्मणून वर्णन करावें तें **श्रीशंकराच्या** बुद्धीलाही कळत नाहीं. ह्याकरितां आतां जिवाभावानें नमस्कार करावा, एवढेंच खरें. २७ मग तो **किरीटी**, विश्वरूपावर दृष्टी ठेवून (मनांत इच्छा धरून) प्रथम कसें बोलला, तें ऐका. २८ हें सर्वही सर्वेश्वररूपच आहे, असा आलेला जो अनुभव तो प्रत्यक्ष बाहेर डोळ्यांसही दिसावा, २९ ही अंतःकरणांतील इच्छा. पण देवाला सांगावयाचें संकट. कारण, विश्वरूप हें गुप्त आहे, तें विचारावें कसें? ३० 'तो मनांत ह्मणाला' 'पूर्वीं कोणी कधीं आवडल्यानेंही जें विचारलें नाहीं, तें एकाएकीं मला सांगा असें ह्मणावें तरी कसें? ३१ माझा देवाशीं पुष्कळ स्नेह आहे खरा; ह्मणून तो **लक्ष्मी**पेक्षां का अधिक? पण ती लक्ष्मी सुद्धां ही गोष्ट विचारावयाला भ्याली. ३२ मीं हवी तितकी सेवा केली असली, ह्मणून ती काय **गरुडा**इतकी होणार? पण त्यानें सुद्धां असें भाषण केलें नाहीं. ३३ **सनकादिकांहून** मी अधिक काय? त्यांना सुद्धां हे आपले मनोरथ सांगण्याचें धैर्य झालें नाहीं. ३४ मी आवडता आहें खरा; पण **गोकुळां**तील प्रेमळ गोपाळांइतका का आवडता आहें? ३५ त्यांनाही बालपण ह्मणून ठकविलें; **अंबरीषाचे** गर्भवासही सहन केले; पण हें विश्वरूप तसेंच ठेवलें. कोणाला दाखविलें ह्मणून नाहींच. ३६ बरें, तें विचारूं नये ह्मटलें, तर विश्वरूप पाहिल्याशिवाय सुख तर होणार नाहींच; पण त्याशिवाय वांचणें सुद्धां व्यर्थ आहे. ३७ ह्मणून आतां थोडेंसें विचारतोंच. मग देवाला पाहिजे तसें करूंद्यात, असें मनांत आणून **अर्जुन** भीत भीत विचारूं लागला. ३८ पण तें अशा भावानें कीं, एक दोन उत्तरांबरोबर सारें विश्व झाडा देऊन देवांनीं दाखवावें. ३९ अहो! वासरूं पाहिल्याबरोबरच गाय मोहानें खडबडून उठते. मग स्तनाची आणि मुखाची गांठ पडल्यावर ती पान्हा चोरील होय? ४० अहो! असें पहा. ज्या पांडवांच्या नामस्मरणानेंच जो कृष्ण,

**त्यांचें संरक्षण करण्यासाठीं रानांत सुद्धां धांवत गेला, त्याला अर्जुनानें विश्वरूप विचारावें, आणि मग आपण दाखवावें, इतका दम निघेल होय? ४१ तो तर स्नेहाची प्रत्यक्ष मूर्ति; आणि अर्जुनालाही स्नेहाचा अम्मल चढला होता. अशा त्यांच्या एकाग्रतेमध्यें वेगळेंपण राहिलें, हेंच मोठें. ४२ ह्मणून अर्जुनाच्या भाषणाबरोबर देव आपोआप विश्वरूप होईल. तर आतां तो पहिला प्रसंग असा आहे; ऐकावा. ४३**

अर्जुन उवाच.

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ।
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ १ ॥

[अर्जुन उवाच] मग पार्थ देवातें ह्मणे । [मदनुग्रहाय] जी तुह्मी मजकारणें । मज वाच्य केलें जें न बोलणें । कृपानिधे ॥ ४४ ॥ [परमं] जें महाभूतें ब्रह्मीं आटती । जीव महदादिचे ठाय फिटती । तैं जें देव होऊनि ठोकती । तें विसवणें शेषीचें ॥ ४५ ॥ [गुह्यं] होतें हृदयाचिये परिवरीं । ठेविलें कृपणाचिये परी । शब्दब्रह्मासिही चोरी । जयाची केली ॥ ४६ ॥ [अध्यात्मसंज्ञितं] तें तुह्मीं आजि आपुलें । मजपुढां हियें फोडिलें । जया अध्यात्मा वोंवाळिलें । ऐश्वर्य ईशें ॥ ४७ ॥ [यत्त्वयोक्तं वचस्तेन] ते वस्तु मज स्वामी । एकिहेळां दिधली तुह्मीं । हें बोलों तरी आह्मी । तुजपासोनि भिन्न कैंचे ॥ ४८ ॥ [मोहोऽयं विगतो मम इति यावच्छ्लोकसमाप्तिपर्यंतं] परि साचचि महामोहाचिये पुरीं । बुडिलिया देखोनि सीसंवरी । तुवां आपणपें घालोनि श्रीहरी । मग काढिलें मातें ॥ ४९ ॥ एक तूंवांचूनि कहीं । विश्वीं दुजियाची भोंप नाहीं । कीं आमुचें कर्म पाहीं । जे आह्मी आथी ह्मणों ॥ ५० ॥ मी जगीं एक अर्जुन । ऐसा देहीं वाहे अभिमान । आणि कौरवांतें इया स्वजन । आपुलें ह्मणे ॥ ५१ ॥ याहीवरी यांतें मी मारीन । ह्मणें तेणें पापें कें रिगेन । ऐसें देखत होतों दुःस्वप्न । तों चेवविला प्रभु ॥५२॥ देवा गंधर्वनगरींची वस्ती । सोडूनि निघालों लक्ष्मीपती । होतों उदकाचिया आर्ती । रोहिणी पीत ॥ ५३ ॥ जी किरडूं तरी कापडाचें । परि लहरी येतहोतिया साचें । ऐसें वायां मरतयां जीवांचें । श्रेयें तुवां घेतलें ॥ ५४ ॥ आपुलें प्रतिबिंब नेणतां । सिंह कुंवां घालीत देखोनि आतां । ऐसा धरिजे तेविं अनंता । राखिलें मातें ॥५५॥ येऱ्हवीं माझा तरी येतुलेवरी । एथ निश्चय होता अवधारीं । जे आतांचि सातांही सागरीं । एकत्र मिळिजे ॥ ५६ ॥ हें जगचि आघवें बुडावें । वरि आकाशही तुटोनि पडावें । परि झुंजणें न घडावें । गोत्रजेंसी मज ॥५७॥ ऐसिया अहंकाराचिये वोढी । मियां आग्रहजळीं दिधली होती बुडी । चांगचि तूं जवळां येऱ्हवीं काढी । कवण मातें ॥ ५८ ॥ नाथिलें आपणपां एक मानिलें । आणि नव्हतया नाम गोत्र ठेविलें । थोर पिसें होतें लागलें । परि राखिलें तुह्मीं ॥ ५९ ॥ मागां जळत काढिले जोहरीं । तैं तें देहासीच भय अवधारीं । आतां हे जोहरबाहार दुसरी । चैतन्यासकट ॥ ६० ॥ दुराग्रहें हिरण्याक्षें । माझी बुद्धीवसुंधरा सूदली काखे । मग मोहार्णवगवाक्षें । रिघोनि ठेला ॥ ६१ ॥ तेथ तुझेनि गोसावीपणें । एकवेळ बुद्धीचेंया ठाया येणें । हें दुसरें वराह होणें । पडिलें तुज ॥ ६२ ॥ ऐसें अपार तुझें केलें । एकी वाचा काय मी बोलें । परि पांचंही पोलव मोकलिले । मजप्रति ॥ ६३ ॥ तें कांहीं न वचेचि वायां । भलें यश फावलें देवराया । जे सावंत माया । निरसिली माझी ॥ ६४ ॥ आजी आनंदसरोवरींचीं कमळें । तैसे हे जे तुझे डोळे । आपुलिया प्रसादाचीं राउळें । जयालागीं करिती ॥ ६५ ॥ हां हो तयांही आणि मोहाची भेटी । हे कायसी पांबळी गोठी । केउती मृगजळाची वृष्टी । वडवानळेंसी ॥ ६६ ॥ आणि मी तंव दातारा । ये कृपेचिये रिघोनि गाभारां । घेत आहें चारा । ब्रह्मरसाचा ॥ ६७ ॥ तेणें माझा जी मोह जाये । एथ विस्मो कांहीं काय आहे । तरी उद्धरलों कीं तुझे पाये । शिवतले आहाती ॥ ६८ ॥

**मग अर्जुन देवाला ह्मणाला "महाराज! कृपानिधे! जी गोष्ट बोलावयाची नव्हे, ती सुद्धां आपण माझ्यासाठीं बोललांत. ४४ ज्यावेळीं ब्रह्मामध्यें महाभूतें ऐक्य पावतात; ज्यावेळीं मायेपासून झालेल्या जीवांचीं स्थानें मोडून जातात; त्या वेळेस जें देव होऊन राहतात, तेंच शेवटचें विश्रांतिस्थान होय. ४५ कृपणाप्रमाणें हें जें केवळ हृदयरूप आवारांत जतन**

१ बोलेंसें. २ प्रकृति, अविद्या. ३ रहातात. ४ विश्रांतिस्थान. ५ आवारांत. ६ वेदांना सुद्धां. ७ हृदयांतलें गुह्य. ८ शंकरांनीं. ९ एका क्षणांत. १० डोक्यापर्यंत. ११ नांव. १२ आह्मी ह्मणतों. १३ कोठें. १४ जागृत केला. १५ ढगावरील कल्पित नगर. १६ इच्छेनें. १७ मृगजळ.

१ पुण्य. २ पडच्छाया. ३ विहिरींत. ४ येथपर्यंत. ५ ओढीनें. ६ मिथ्या असणाऱ्या. ७ नसणाऱ्याला. ८ लाक्षागृहांत. ९ आगीची पीडा. १० झरोक्यांतून. ११ पांचही. १२ प्राण. १३ दिले. १४ जोडलें. १५ विश्रांतिमंदिरें. १६ पेंबळट, तुच्छ. १७ गोष्ट. १८ कसली? १९ नवल.

करून ठेवले होतें; वेदांपासूनही जें चोरून ठेवलें होतें; ४६ तें तुह्मीं केवळ आपल्या जिवाचें गुह्य मजपाशीं फोडलें. ज्या अध्यात्मासाठीं **शंकरांनीं** आपल्या वैभवाचा त्याग करून स्मशानवास पतकरला, ४७ ती वस्तु, **स्वामी !** तुह्मीं मला एका क्षणांत दिली. हें बोलून दाखवावें, तर तुझ्यापासून आह्मी भिन्न तरी कोठें आहों? ४८ परंतु **श्रीहरी !** खरोखरच महामोहाच्या पूरामध्यें मस्तकापर्यंत बुडालेला पाहून तुह्मीं आपणहून उडी घातलीत, आणि मला वर काढलेंत. ४९ एका तुझ्याशिवाय ह्या विश्वामध्यें दुसरी कधीं कांहीं गोष्ट नाहीं. असें असतां आमचें कर्म पहा! कीं 'आह्मी आहों' असें ह्मणतों. ५० जगामध्यें मी एक **अर्जुन** असा देहाभिमान बाळगतों, आणि ह्या कौरवांना आमचे स्वजन असें ह्मणतों. ५१ आणखी, ह्यांना मी मारीन आणि त्या पापानें कोठें जाईन असें ह्मणत होतों. **प्रभो!** अशा प्रकारच्या दुःस्वप्नांतून आपण मला जागृत केलें. ५२ देवा! **लक्ष्मीपते!** गंधर्वनगरीची वस्ती सोडून उदकाच्या इच्छेनें मृगजळ पीत होतों. ५३ महाराज! किरडूं तर काय कापडाचें; परंतु लहरी मात्र खऱ्या येत होत्या. अशा प्रकारें फुकट मरत असलेल्या जीवांच्या संरक्षणाचें पुण्य आपण घेतलें. ५४ आपलेंच प्रतिबिंब आहे हें न समजून सिंह आतां विहिरींत घालून घेणार, तोंच त्यास जसें आंवरून धरावें, त्याप्रमाणें **अनंता !** आपण माझें संरक्षण केलें. ५५ बाकी ऐका. माझाही आतांपर्यंत असाच निश्चय होता कीं, आतांच सप्तसमुद्रांमध्यें ऐक्यरूप व्हावें. ५६ हें जग सारेंच जरी बुडालें, अथवा आकाश तुटून पडलें तरी, आपल्या गोत्रजांशीं मजकडून युद्ध घडूं नये. ५७ अशा अहंकाराच्या ओढीनें, मीं आग्रहरूप जळामध्यें बुडी दिली होती. परंतु आपण जवळ होतां ह्मणून बरें; नाहीं तर मला कोण काढणार होतें? ५८ मिथ्या असणाऱ्या आपणाला एक मानिलें, आणि नसणाऱ्यांना गोत्रज असें नांव दिलें. केवढें हो हें पिसें लागलें होतें! परंतु आपण बाजू राखली. ५९ मागें लाक्षागृहांत जळत असतांना आपण वांचविलें खरें. पण त्या वेळीं फक्त देहासच भय होतें, हें लक्ष्यांत ठेवा. पण ह्या अग्नीची पीडा कांहीं निराळी आहे. कारण, ती चैतन्याला सुद्धां आहे, ६० दुराग्रहरूप **हिरण्याक्षानें** माझी बुद्धिरूप पृथ्वी काखेंत मारून मोहार्णवाच्या खिडकीतून निघून गेला. ६१ तेव्हां तुमच्या सामर्थ्याला माझी बुद्धी एक वेळ ठिकाणीं आणण्यासाठीं हें दुसऱ्यानदां वराह होणें भाग पडलें. ६२ असे तुझे अनंत उपकार आहेत. ते मी एका वाचेनें काय बोलणार? फार तर काय? पण पंचप्राण सुद्धां आपण मला दिलेत. ६३ त्यांपैकीं कांहींएक व्यर्थ जाणार नाहीं हो! हे देवराया! खरोखरच मोठी कीर्ति संपादन केलीत. कारण, माझी माया समूळ नाहींशी झाली. ६४ आनंदसरोवरांतील कमलें असावींत, त्याप्रमाणें हे तुझे डोळे ज्याच्या करितां आपल्या प्रसादाचीं मंदिरें करितात, ६५ अहाहा! त्याची आणि मोहाची गांठ? छे! ही यःकश्चित् गोष्ट कशाला मनांत आणावी? वडवानळाला मृगजळाची वृष्टि काय होय? ६६ आणि मी तर हे दातारा! ह्या कृपेच्या मंदिरांत शिरून ब्रह्मरसाचा चारा खात आहें. ६७ महाराज! त्यानें माझा मोह जाईल, ह्यांत कांहीं नवल आहे काय? तुझ्या पायाचें दर्शन घडतें, ह्मणून माझा उद्धार झाला." ६८

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।
त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाऽव्ययम् ॥ २ ॥

[ त्वत्तः कमलपत्राक्ष ] पैं कमलायतडोळसा[1] । सूर्यकोटितेजसा । मियां तुजपासोनि महेशा[2] । परिसिलें आजि ॥ ६९ ॥ [ भवाप्ययौ हि भूतानामिति ] इथें भूतें जयापरी होती । अथवा लया हन जैसेनि[3] जाती । ते मजपुढां प्रकृती[4] । विवंचिली[5] देवें ॥ ७० ॥ [ माहात्म्यमपि चाव्ययं ] आणि प्रकृती

१ प्रफुल्ल कमलवत् नेत्र ज्याचे अशा. २ देवाधिदेवा. ३ जिच्या योगेंकरून. ४ माया. ५ विचारपूर्वक सांगितली.

कीरें उगोणा दिधला । परपुरुषाचाही ठाव दाविला । जयाचा महिमा पांघरोनि जाहला । धडौता वेद ॥ ७१ ॥ जी शब्दराशि वाढे जीये । कां धर्माऐशिया रत्नातें विये । ते एथिचे प्रभेचे पांये । वोळंगे ह्मणोनि ॥ ७२ ॥ ऐसें अगाध माहात्म्य । जें सकळ मार्गैकगम्य । जें स्वात्मानुभवरम्य । तें इयापरी दाविलें ॥ ७३ ॥ जैसा कैरु फिटलिया आभाळीं । दिठी दिगे सूर्यमंडळीं । कां हातें सारूनि वाबुळी । जळ देखिजे ॥ ७४ ॥ ना तरी उकलूनियां सापाचे वेढे । जैसें चंदना खेव देणें घडे । अथवा विवसी पळे मग चढे । निधानें हाता ॥ ७५ ॥ तैसी प्रकृती हे आड होती । ते देवेंचि सारोनि परौती । मग परतत्त्व माजिये मती । शेजार केलें ॥ ७६ ॥ ह्मणोनि इयेविषयींचा मज देवा । भरंवसा कीर जाहाला जीवा । परि आणिक एक हेवा । उपनला असे ॥ ७७ ॥ तो भिडा जरी ह्मणों राहो । तरी आनीं कवणा पुसों जावों । काय तुजवांचोनि ठावो । जाणत आहों आह्मी ॥ ७८ ॥ जळचर जळाचा आभारें धरी । बाळक स्तनपानीं उपरोध करी । तरी तया जिणयां श्रीहरी । आन उपायो असे ॥ ७९ ॥ ह्मणोनि भीडसांकडें न धरावें । जीवा आवडे तेंही तुजपुढां बोलावें । तंव राहें ह्मणितलें देवें । चाडे सांगें ॥ ८० ॥

**" तसेंच हे कमलनेत्रा! हे सूर्यकोटितेजसा! हे महेशा! तुझ्या पासून मीं आज ऐकिलें ६९ कीं, हे प्राणिमात्र कोणत्या प्रकारें उत्पन्न होतात, व कोणत्या प्रकारें लयास जातात, त्या प्रकृतीचें देवांनीं मजपुढें सविस्तर वर्णन केलें. ७० प्रकृतीचा तर झाडा दिलाच, पण आणखी परमात्म्याचेंही स्थान दाखविलें. तो महिमा ऐकून हा देह वस्त्रयुक्त—सुशोभित—झाला. ७१ महाराज! शब्दसमूह उत्पन्न होतो वाढतो; किंवा त्यापासून धर्मासारखीं रत्नें उत्पन्न होतात, ह्याचें कारण, ह्या समर्थ पायांचा आश्रय आहे ह्मणून. ७२ अगाध, सकल मार्गांनीं जाणण्यास योग्य, जें स्वात्मानुभवरम्य, असें जें माहात्म्य तें ह्याप्रमाणें दाखविलेंत. ७३ आकाशांतील ढग नाहींसे झाले ह्मणजे, ज्याप्रमाणें सूर्यमंडळांत दृष्टी शिरते; किंवा हातानें शेवाळ बाजूस सारली ह्मणजे पाणी दृष्टीस पडतें; ७४ किंवा चंदनास मिठी घालावयाची तर सर्पाचे वेढे सोडवावे लागतात; अथवा हडळ पळून गेली ह्मणजे मग द्रव्याचा सांठा हातीं लागतो; ७५ त्याप्रमाणें ही प्रकृति आड आलेली होती. ती देवांनींच बाजूला सारून, शुद्धतत्त्व हेंच माझ्या बुद्धीला शयनागार करून दिलें. ७६ ह्मणून देवा! ह्या गोष्टीची माझ्या जिवाला पक्की खात्री पटली. पण आणखी एक इच्छा उत्पन्न झालेली आहे. ७७ ती भिडेनें जर तशीच ठेवली, तर दुसऱ्यास कोणास पुसावयास जावयाचें आहे? तुझ्या शिवाय दुसरी जागा आह्मांस माहित आहे काय? ७८ जलचरांनीं जर जलाचा उपकार मानला, मुलानें जर स्तनपान करावयाला भीड धरली, तर श्रीहरी! त्यांना वांचावयाला अन्य उपाय आहे काय? ७९ ह्मणून भीड, संकोच न धरितां, जिवाला आवडेल तें तुह्मांपुढें बोलावें, हें बरें दिसतें." तेव्हां देव ह्मणाले "तें असो. तुझी इच्छा काय आहे ती सांग, ह्मणजे झालें." ८०**

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥

[ एवमेतद्यथात्थ त्वं ] मग बोलिला तो किरीटी । ह्मणे तुह्मी केली जे गोठी । तिया प्रतीतीची दिठी । निवाली माझी ॥ ८१ ॥ [ परमेश्वर ] आतां जयाचेनि संकल्पें । हे लोकपरंपरा होय हारपे । [ आत्मानं ] जया ठायातें आपणपें । मी ऐसें ह्मणसी ॥ ८२ ॥ [ रूपमैश्वरं ] तें मुद्दल रूप तुझें । जेथूनि इयें द्विभुजें हन चतुर्भुजें । सुरकार्याचेनि व्याजें । घेवोंघेवों येसी ॥ ८३ ॥ पैं जळशयनाचिया अवगणिया । कां मत्स्यकूर्म इया मिरेवणिया । खेळ सरलिया तूं गुणिया । सांठविसी जेथ ॥ ८४ ॥ उपनिषदें जें गाती । योगिये हृदयीं रिगोनि पाहाती । जयातें सनकादिक आहाती । पोटाळूनि-

१ निश्चयेंकरून. २ झाडा. ३ परमात्म्याचा. ४ सुशोभित. ५ आश्रय केला. ६ सर्व मार्गांनीं एकच जाणण्यासारखें. ७ ढग. ८ दूर झाले ह्मणजे. ९ शेवाळ. १० आलिंगन. ११ पिशाच्च, डाकीण. १२ ठेवा. १३ माझ्या. १४ निद्रास्थान, शय्यामंदिर. १५ इच्छा. १६ उत्पन्न झाली. १७ भिडेनें, संकोच धरून. १८ दुसऱ्याला. १९ उपकार. २० संकोच. २१ वांचावयाला. २२ भीड, संकोच. २३ इच्छा.

१ स्वतः ला. २ मुख्य, श्रेष्ठ, मूळचें. ३ घेऊन घेऊन. ४ मिषानें. ५ रूपानें. ६ गारोड्या. ७ मिठी मारून.

यां ॥ ८५ ॥ [द्रष्टुमिच्छामि ते] ऐसें अगाध जें तुझें । विश्वरूप कानीं ऐकिजे । तें देखावया चित्त माझें । उतावीळ देवा ॥ ८६ ॥ देवें फेडूनियां सांकड । लोभें पुसिली जरी चाड । तरि हेचि एकी वाडे । आर्ति जी मज ॥ ८७ ॥ तुझें विश्वरूप आघवें । माझिये दिठीसी गोचर होआवें । ऐशी थोर आस जीवें । बांधोनि आहें ॥ ८८ ॥

**मग अर्जुन म्हणाला "आपण जी गोष्ट सांगितलीत, तिच्या अनुभवानें माझी दृष्टी समाधान पावली. ८१ आतां, ज्याच्या संकल्पानें–इच्छेनें–ही लोकपरंपरा उत्पन्न होते, आणि नाश पावते; आणि ज्या स्थानाला तूं आपलें स्वतःचें असें म्हणवितोस, ८२ तें तुझें मूळ रूप, जेथून देवांच्या कार्याच्या निमित्तासाठीं तूं द्विभुज, चतुर्भुज, रूपें घेऊन येतोस; ८३ तसेंच जलावर शयन करण्याच्या निमित्तानें, किंवा मत्स्य, कूर्म ह्यांचा चमत्कारिक खेळ संपल्यानंतर हे गारोड्या! तूं जेथें भरून राहतोस; ८४ उपनिषदें ज्याचें गायन करतात; योगी ज्याला हृदयामध्यें शिरून पहातात; सनकादिक ज्याला मिठी मारून बसले आहेत; ८५ देवा! असें जें तुझें अगाध विश्वरूप कानांनीं ऐकतों, तें पहाण्यासाठीं माझें चित्त उतावीळ झालें आहे. ८६ देवांनीं संकोच न धरितां प्रेमानेंच जर माझी इच्छा काय आहे ती विचारली, तर महाराज! हीच एक मला प्रबळ इच्छा आहे. ८७ तुझें सारें विश्वरूप माझ्या दृष्टीस पडावें. अशी दृढतर आशा जिवांत धरून बसलों आहें." ८८**

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ।
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥

[मन्यसे यदि तच्छक्यं मया] परि आणीक एक एथ शार्ङ्गी । तुज विश्वरूपातें देखावयालागीं । पैं योग्यता माझिया आंगीं । असे कीं नाहीं ॥ ८९ ॥ हें आपलें आपण मी नेणें । तें कां नेणसी जरी देव म्हणे । तरी रोगिया काय जाणे । निदान रोगाचें ॥ ९० ॥ आणि जी आर्तीचेनि पडिभरें । आर्त आपली ठाकी पैं विसरे । जैसा तान्हेला म्हणे न पुरे । समुद्र मज ॥ ९१ ॥ ऐसा उचाडपणाचिये भुली । न सांभाळवे समस्या आपुली । यालागीं योग्यता जेविं माउली । बाळकाची जाणे ॥ ९२ ॥ [द्रष्टुमिति प्रभो] तयापरी श्रीजनार्दना । विचारिजो माझी संभावना । मग विश्वरूपदर्शना । उपक्रमें कीजे ॥ ९३ ॥ तरि ऐसी ते कृपा करा । येऱ्हवीं नव्हे हें म्हणा अवधारा । वायां पंचमालापें बधिरा । सुख केउतें देणें ॥ ९४ ॥ येऱ्हवीं एकले बापियाचे तृषे । मेघ जगापुरते काय न वर्षे । परी जाहालीही वृष्टि उँपखे । जऱ्हीं खडकीं होय ॥ ९५ ॥ चकोरा चंद्रामृत फांवलें । येरां आण वाहूनि काय वारिलें । परि डोळयांवीण पोहिलें । वायां जाय ॥ ९६ ॥ [दर्शयात्मानमव्ययं] म्हणोनि विश्वरूप तूं सहसा । दाविसी कीर हा भरवसा । कां जे केंडाडा आणि गहिंसा । माजि नित्य नवा तूं कीं ॥ ९७ ॥ [योगेश्वर ततो मे त्वं] तुझें औदार्य जाणों स्वतंत्र । देतां न म्हणसी पात्रापात्र । पैं कैवल्य ऐसें पवित्र । वैरियांहीं दिधलें ॥ ९८ ॥ मोक्ष दुराराध्य कीर होय । परि तोही आराधी तुझे पाय । म्हणोनि धाडिसी तेथ जाय । पाईको जैसा ॥ ९९ ॥ तुवां सनकादिकांचेनि मानें । सायुज्यीं सौरसें दिधला पूतने । जे विषाचेनि स्तनपानें । मारूं आली ॥ १०० ॥ हां गा राजसूय यागाचिया सभासदीं । देखतां त्रिभुवनाची मांदी । कैसा शतधा दुर्वाक्यशब्दीं । निस्तेजिलोसी ॥ १ ॥ ऐशिया अपराधिया शिशुपाळा । आपणपें ठावो दिधला गोपाळा । आणि उत्तानचरणाचिया बाळा । काय ध्रुवपदीं चाड ॥ २ ॥ तो वना आला याचि लागीं । जे बैसावें पितयाचिया वोसंगीं । कीं तो चंद्रसूर्यादिकांपरिस जगीं । श्लाघ्य केला ॥ ३ ॥ ऐसा वनवासियां सकळां । देता एकचि तूं धसाळें । पुत्रा आळवितां अजामिळा । आपणपें देसी ॥ ४ जेणें उरीं हाणितलासि पांयें । तयाचा चरण वहासी दातारा । अझुनी वैरियांचिया कलेवरा । विसंबसी नां ॥ ५ ॥ ऐसा अपकारियां तुझा उपकार । तूं अपात्रींही परि उदार । दे दान म्हणोनि दारवंठेकार । जाहालासि बळीचा ॥ ६ ॥ तूतें आराधीना आयके । होती पुंसा बोलावीत कौतुकें । तिये वैकुंठीं तुवां गणिके । सुरवाड केला ॥ ७ ॥ ऐसीं पाहूनि वांयाणी मिषें । आपणपें

१ भीड. २ प्रबल. ३ इच्छा. ४ कारण. ५ आसक्तीनें. ६ योग्यता, हाव.

१ शंका. २ भक्ति. ३ प्रारंभ. ४ पंचम स्वरानें. ५ कसें? ६ चातकाचे. ७ व्यर्थ जाते. ८ मिळालें. ९ उजाडलेलें. १० पढिकास, जाणत्यास. ११ नेणत्यास. १२ चाकर. १३ स्थान. १४ जी. १५ गर्दी. १६ अपमान पावलास. १७ उत्तानपाद राजाच्या. १८ अढळ पदावर. १९ मांडीवर. २० स्तुतीस पात्र. २१ आपद्ग्रस्तांना. २२ उदार. २३ पुत्रमिषानें नारायणनामोच्चार करणारा ब्राह्मण. २४ लाथ. २५ शरीराला. २६ सोडीत नाहींस. २७ द्वारपाल. २८ पोपटाला, राघूला. २९ सुख. ३० पोकळ.

देवों लागसी वानिवसें । तो तूं कां अनारिसें । मजलागीं करिसी ॥ ८ ॥ हां गा दुभतयाचेनि पवाडें । जे जगाचें फेडी सांकडें । तिये कामधेनूचे पाडे । काय भुकेले ठाती ॥९॥ ह्मणोनि मियां जें विनविलें कांहीं । तें देव न दाखविती हें कीर नाहीं । परि देखावयालागीं देईं । पात्रता मज ॥ ११० ॥ तुझें विश्वरूप आकळे । ऐसे जरी जाणसी माझे डोळे । तरि आर्तीचे डोहळे । पुरवीं देवा ॥ ११ ॥ ऐसी ठायेंठाव विनंती । जंव करूं सरला सुभद्रापती । तंव तया षड्गुणचक्रवर्ती । साहवेचिना ॥ १२ ॥ तो कृपापीयूषसजळ । आणि येरु जवळां आला वर्षाकाळ । नाना श्रीकृष्ण कोकिळ । अर्जुन वसंत ॥ १३ ॥ ना तरी चंद्रबिंब वाटोळें । देखोनि क्षीरसागर उचंबळे । तैसा दुणेंही वरी प्रेमबळें । उल्लसित जाहाला ॥ १४ ॥ मग तिये प्रसन्नतेचेनि आटोपें । गाजोनि ह्मणितलें सकृपें । पार्था देख देख अमुपें । स्वरूपें माझीं ॥१५॥ [ श्रीभगवानुवाच ] एक विश्वरूप देखावें । ऐसा मनोरथ केला पांडवें । कीं विश्वरूपमय आघवें । करूनि घातलें ॥ १६ ॥ [ 'धर्मस्य' ] बाप उदार देव अपरिमित । याचक स्वेच्छा सदोदित । असे सहस्रवरी देत । सर्वस्व आपुलें ॥ १७ ॥ ['ज्ञानस्य'] अहो शेषाचेहि डोळे चोरिले । वेद जयालागीं ठकविले । लक्ष्मियेही राहाविलें । जिव्हार जें ॥ १८ ॥ [ श्रियः ] तें आतां प्रगटुनी अनेकधा । करीत विश्वरूपदर्शनाचा धांदों । बाप भाग्या अगाधा । पार्थाचिया॥१९॥ [ यशसः ] जो जागता स्वप्नावस्थे जाये । तो जेवीं स्वप्नींचें आघवें होये । तेविं अनंत ब्रह्मकटाह आहे । आपणचि जाहाला ॥ १२० ॥ [ वैराग्यस्य समग्रस्येति प्रत्येकमन्वेति ] ते सहसा मुद्रा सोडिली । आणि स्थूळेंदृष्टीची जवनीक फेडिली । किंबहुना उघडली । योगर्द्धी ॥ २१ ॥ परि हा हें देखेल कीं नाहीं । ऐसी सेचि न करी कांहीं । एकसरां ह्मणतसे पाहीं । स्नेहातुर ॥ २२ ॥ [ षड्गुणैश्वर्यमेवेतोऽष्टाविंशतिभिः श्लोकैस्तत्र पूर्वं त्रिभिः समग्रमैश्वर्यमाह ]

१ वैकुंठरूपधर. २ वेगळें, दुजा भाव. ३ अधिकपणानें. ४ संकट. ५ खोंड, वासरें. ६ योग्यता. ७ जाणतां येईल. ८ इच्छेचे. ९ यथायोग्य. १० पुढें झाला. ११ "ऐश्वर्यस्य समग्रस्य धर्मस्य यशसः श्रियः ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा" ह्या पद्यांत भगवच्छब्दस्थ षड्गुणैश्वर्यांची व्याख्या असून पुढील ओव्यांत तीच स्पष्ट केली आहे. १२ कृपामृतानें युक्त. १३ किंवा. १४ पूर्णचंद्र. १५ दुपटीपेक्षांही अधिक. १६ मोठेपणानें. १७ गर्जना करून. १८ बहुत, विपुल. १९ ठकविलें. २० जिवाचें गुह्य. २१ अनेक प्रकारें. २२ धंदा. २३ थोर. २४ ब्रह्मांड. २५ आकार. २६ कृष्णाला मनुष्यदृष्टीनें पहाण्याची. २७ आड पडदा. २८ काढून टाकला. २९ योगाची रेलचेल. ३० विचारच केला नाहीं. ३१ एकदम. ३२ प्रेमबद्ध.

"परंतु हे शार्ङ्गिन्! येथें आणखी एक शंका आहे. ती ही कीं, तुला विश्वरूपानें पाहण्याइतकी योग्यता माझ्या आंगीं आहे किंवा नाहीं? ८९ हें माझें मला कांहीं समजत नाहीं. तें कां समजूं नये? असें जर देव विचारतील तर रोग्याला तरी आपलें निदान समजतें काय? ९० आणखी महाराज! असें आहे कीं, इच्छेच्या आसक्तीनें, इच्छा करणारा मनुष्य आपली योग्यता विसरतो. ज्याप्रमाणें तान्हेलेला असतो त्याला, सारा समुद्रही मला पुरणार नाहीं असें वाटत असतें. ९१ तसा इच्छेच्या अमलानें मी भुकेलों असल्यामुळें, माझी शंका मला फिटत नाहीं. ह्याकरितां, बालकाची योग्यता ज्याप्रमाणें आईला समजते, ९२ त्याप्रमाणें हे **श्रीजनार्दना**! माझ्या भक्तीचा विचार करावा. आणि मग विश्वरूपदर्शनास आरंभ व्हावा. ९३ तसें असेल तर कृपा करावी; नसेल तर तुह्मी तितकी योग्यता नाहीं असें स्पष्ट सांगा बरें. कारण, बहिऱ्याला पंचम स्वरानें वायफळ सुख काय ह्मणून द्यावें? ९४ बाकी, मेघ वर्षाव करितो तो एकट्या चातकाकरितांच करतो, आणि साऱ्या नगराकरितां करित नाहीं असें कां कांहीं आहे? पण तीच वृष्टि खडकावर झाली, तर व्यर्थ जाते. ९५ चकोरानें तेवढेंच चंद्रामृत प्यावें, आणि बाकीच्यांना शपथ घालून मनाई का केलेली असते? पण डोळ्यांशिवाय उजाडलेलें व्यर्थ होय. ९६ तरी तुह्मी एकदम विश्वरूप दाखवाल, हा पक्का भरंवसा आहे. कारण, जाणत्यामध्यें आणि नेणत्यामध्यें तूं नित्य नवाच आहेस. ९७ तुझें औदार्य कांहीं अपूर्व आहे हें आह्मी जाणतों. तूं देऊं लागलास ह्मणजे पात्रापात्रविचार पहात नाहींस. मोक्षासारखी पवित्र देणगी तुह्मीं शत्रूंनाही दिली आहे. ९८ मोक्षाला कोणाची चाकरी नोकरी करण्याची गरज नाहीं हें तर उघडच आहे. पण तो सुद्धां तुमच्या पायाचा दास झालेला आहे. ह्मणूनच तुह्मी धाडाल तिकडे चाकरांसारखा जातो. ९९ जी स्तनामध्यें

विष भरून तें पाजून तुह्मांस मारावें ह्या हेतूनें आली, त्या **पूतनेलाही**, **सनकादिकांचा** सन्मान केल्याप्रमाणें सायुज्यामध्यें स्थान दिलें. १०० अहाहा! राजसूययज्ञाच्या सभासदांमध्यें, त्रिभुवनांतील मंडळीच्या देखत शेकडों दुःशब्दांनीं केवढा बरें तुह्मा पाणउतारा केला? १०१ पण **गोपाळा!** अशा अपराध केलेल्या **शिशुपाळालाही** आपल्या सन्निध स्थान दिलेंत! आणि **उत्तानपाद** राजाच्या मुलाला–**ध्रुवाला**–अढळ पदाची इच्छा तरी होती काय? १०२ तो वनाला एवढ्याच करितां आला होता कीं, पित्याच्या मांडीवर बसावें. पण त्याला चंद्रसूर्याहून जगामध्येंही स्तुत्य करून सोडलेंत! १०३ असा विपद्ग्रस्तांना उदारपणानें देणारा दाता एक तूंच आहेस. **अजामिळानें** पुत्राला हाक मारली होती, पण तुह्मी त्याला स्वतःच वश झालांत. १०४ हे **दातारा!** ज्यानें तुझ्या उरावर लाथ मारली, त्याचा पाय तूं वाहतोस; शिरसा वंद्य करतोस. त्या शत्रूच्या शरीराला अद्यापही विसंबत नाहींस. १०५ असा अपकार करणारांवरही तुझा उपकार असतो. देण्यास योग्य नसला, तरी सुद्धां त्याच्या ठिकाणीं तूं उदार आहेस. **बळीनें** दान दिलें, ह्मणून त्याचा तूं द्वारपाळ झालास. १०६ तुह्मी आराधना करीत नव्हती; तुझे गुणानुवादही ऐकत नव्हती; फक्त लडिवाळपणानें राघूला बोलावीत होती. त्या गणिकेला–वेश्येला–तुह्मीं वैकुंठीचें सुख दिलें! १०७ अशीं अशीं कांहीं तरी निमित्तें लावून आपण होऊन तूं आपल्या वैकुंठासारखीं घरें दिलींस; तो तूं मला दूर लोटिशील काय? १०८ अहो! दुभत्याच्या वैपुल्यानें सर्व जगाचें जी दैन्य निवारण करिते, त्या कामधेनूचीं वांसरें काय उपाशीं रहातील होय? १०९ ह्मणून जें कांहीं मीं विनविलें, तें देव दाखविणार नाहींत असें तर नाहींच. पण तें पाहण्याची योग्यता द्यावी. ११० देवा! तुझें रूप पाहतां येण्यासारखे माझे डोळे आहेत असें जर आपणांस वाटत असेल, तर माझ्या मनांतील हेतु पूर्ण करा." १११ अशा प्रकारें समयोचित विनंती करण्यास **अर्जुन** जों पुढें सरला, तोंपर्यंत षड्गुणचक्रवर्ती जो **भगवान्** त्यास कांहीं दम निघेना. ११२ तो **भगवान्** आधींच कृपामृतानें भरलेला, आणि **अर्जुन** हा वर्षाकाळासारखा जवळ आलेला, किंवा **श्रीकृष्ण** हा कोकिल, आणि **अर्जुन** हा वसंत; ११३ किंवा पूर्ण चंद्रबिंब पाहिलें असतां, **क्षीरसागराला** जशी भरती येते, त्याप्रमाणें तो त्याच्या दुप्पटीपेक्षांही अधिक प्रेमानें उचंबळला. ११४ आणि प्रसन्नतेच्या भरांत त्या दयाळू **भगवंतानें** गर्जना करून ह्मटलें "**पार्था!** पहा पहा!! हीं माझीं हवीं तितकीं स्वरूपें पाहून घे." ११५ **अर्जुनानें** एक विश्वरूप पहावें असा मनोरथ धरला होता; पण देवांनीं सारें विश्वरूपमयच करून सोडलें! ११६ देव सर्व समर्थ; अपरिमित उदार; याचकाच्या इच्छेप्रमाणें सदोदित देतो येवढेंच नव्हे, तर हजार पटीनें अधिक देतो, आणि आपलें सर्वस्व सुद्धां त्याला अर्पण करितो. ११७ अहो! **शेषाच्या** डोळ्यांपासून चोरलेलें; ज्याच्या साठीं वेदांना सुद्धां फसविलें; **लक्ष्मीला** सुद्धां ज्याचा थांग लागूं दिला नाहीं, अशी जिवाची गोष्ट, ११८ ती ह्या वेळीं **अर्जुनास** एक वेळांच नव्हे, तर हजार वेळां पुनः पुनः सांगून, विश्वरूपदर्शन देण्याचा तर धंदाच सुरू केला! तेव्हां **पार्थाची** थोरवी काय सांगावी? केवढें हो त्याचें भाग्य! ११९ जागृत मनुष्य स्वप्नावस्थेमध्यें शिरला, ह्मणजे तो ज्याप्रमाणें सारा स्वप्नरूपच होऊन जातो, त्याप्रमाणें तो अनंत ब्रह्मांडें आपणच बनला. १२० पूर्वीचा आकार सोडून दिला; स्थूलदृष्टीचा पडदा काढून टाकला; किंवा योग्यांचें भांडारच खुलें केलें ह्मटलें तरी चालेल. १२१ पण ह्याला (**अर्जुनाला**) हें दिसेल किंवा नाहीं, ह्याचा कांहीं विचारच केला नाहीं. प्रेमानें लंपट होऊन एकदम ह्मणाला "पहा पहा!!" १२२

श्रीभगवानुवाच—

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ।
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च॥५॥

[ पश्य मे पार्थ रूपाणि 'करुणारसः' ] अर्जुना तुवां एक दावा म्हणितलें । आणि तेंचि दावूं तरि काय दाविलें । आतां देखें आघवें भरिलें । माझ्याचि रूपीं ॥ २३ ॥ [ शतशोऽथ सहस्रशः ] एकें कृशें एकें स्थूळें । एकें ऱ्हस्वें एकें विशाळें । पृथुतरें सरळें । अप्रांतें एकें ॥ २४ ॥ एकें अनावरें प्रांजळें । सव्यापारें एकें निश्चळें । उदासीनें स्नेहाळें । तीव्रें एकें ॥ २५ ॥ एकें घूर्णितें सावधें । असलगें एकें अगाधें । एकें उदारें अतिवद्धें । क्रुद्धें एकें ॥ २६ ॥ एकें शांतें सदामंदें । स्तब्धें एकें सानंदें । गर्जितें निःशब्दें । सौम्यें एकें ॥ २७ ॥ एकें साभिलाषें विरक्तें । उन्निद्रितें एकें निद्रितें । परितुष्टें एकें आर्तें । प्रसन्नें एकें ॥ २८ ॥ एकें अशस्त्रें सशस्त्रें । एकें रौद्रें अति मित्रें । भयानकें एकें विचित्रें । लयस्थें एकें ॥ २९ ॥ एकें जननलीलाविलासें । एकें पालनशीलें लालसें । एकें संहारकें सावेशें । साक्षिभूतें एकें ॥ [ नानाविधानि दिव्यानि ] एवं नानाविधें परि बहुवसें । आणि दिव्यतेजप्रकाशें । तेवींचि एकएका ऐसे । वर्णही नव्हे ॥ ३१ ॥ [ नानावर्णाकृतीनि च ] एकें तातलें साडेपंधरें । तैसीं कपिलवर्णें अपारें । एकें सर्वांगीं जैसें सिंदुरें । डवरलें नभ ॥ ३२ ॥ एकें सोंवियाचि चुळुकीं जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं । एकें अरुणोदयासारिखीं । कुंकुमवर्णें ॥ ३३ ॥ एकें शुद्धस्फटिकसोज्वळें । एकें इंद्रनीळसुनीळें । एकें अंजनवर्णें सकाळें । रक्तवर्णें एकें ॥ ३४ ॥ एकें लसत्कांचनसम पिंवळीं । एकें सजलजलदश्यामळीं । एकें चांपेगोरीं केवळीं । हरितें एकें ॥ ३५ ॥ एकें तप्तताम्रतांबडीं । एकें श्वेतचंद्र चोखडीं । ऐसीं नानावर्णें रूपडीं । देखें माझीं ॥ ३६ ॥ हे जैसे कां नानावर्ण । तैसें आकृतींही अनारिसेपण । लाजा कंदर्प रिघाला शरण । तैसीं सुंदरें एकें ॥ ३७ ॥ एकें अतिलावण्यसाकारें । एकें स्निग्धवपु मनोहरें । शृंगारश्रियेचीं भांडारें । उघडिलीं जैसीं ॥ ३८ ॥ एकें पीनोवयवमांसळें । एकें शुष्कें अतिविकाळें । एकें दीर्घकंठे वितोळें । विकटें एकें ॥ ३९ ॥ एवं नानाविधाकृती । इया पाहातां पार नाहीं सुभद्रापती । ययांच्या एकेकीं अंगप्रांतीं । देख पां जगा ॥ १४० ॥

"अर्जुना ! तूं एक दाखीव म्हटलेंस, आणि तेवढेंच जर मीं तुला दाखविलें, तर दाखविलें तें काय ? आतां झाडून सारें माझ्याच रूपामध्यें भरलेलें आहे पहा. १२३ कांहीं कृश, कांहीं स्थूल; कांहीं गोजिरवाणीं, कांहीं विशाळ; कांहीं जाड, तर कांहींना पारच नाहीं. १२४ कांहीं न आवरणारीं, कांहीं आटोपसूद; कांहीं उद्योगांत गुंतलेलीं, कांहीं निश्चळ; कांहीं प्रेमळ, व कांहीं रागावलेलीं. १२५ कांहीं निद्रिस्त, कांहीं जागीं; कांहीं सोपीं, कांहीं अगाध; कांहीं उदार, कांहीं शांत व कांहीं क्षुब्ध झालेलीं. १२६ कांहीं गंभीर, कांहीं अगदीं मंद; कांहीं स्तब्ध, व कांहीं आनंदभरीत. कांहीं गर्जना करीत असलेलीं, कांहीं उगाच राहिलेलीं, व कांहीं सौम्य. १२७ कांहीं क्रुद्ध, कांहीं विरक्त; कांहीं आळशी, कांहीं कावरींबावरीं; कांहीं सुखी, कांहीं दुःखी; आणि कांहीं दिसण्यांत मोठीं सुप्रसन्न. १२८ कांहीं अशस्त्र, कांहीं सशस्त्र; कांहीं उग्र, कांहीं सौम्य; कांहीं भेसूर, काहीं विचित्र; आणि कित्येक आपल्याच लहरींत गुंग झालेलीं. १२९ कांहीं अवतार धरणारीं; कांहीं प्रीतियुक्त पालन करणारीं; कांहीं आवेशानें खायाला उठलेलीं, कांहीं केवळ साक्षीभूत. १३० अशीं नानाप्रकारचीं परंतु अनेक आणि दिव्य तेजानें दैदीप्यमान, व त्याच प्रमाणें त्यांचे वर्णही भिन्न भिन्न. १३१ कांहीं तप्त सुवर्णासारखीं; कांहीं अतिशय पिंगट, कित्येकांचें आकाशाला शेंदूर माखल्याप्रमाणें सारें आंगच लालीलाल. १३२ कांहीं मूळचींच अशीं सुंदर कीं, जणों काय सारें ब्रह्मांड माणकांनींच मढविलें आहे. कांहीं अरुणोदयासारखीं कुंकुमवर्ण. १३३ कांहीं शुद्ध स्फटिकासारखीं पांढरीं सफेत; काहीं इंद्रनीळासारखीं अस्मानी वर्णाचीं; कांहीं काजळासारखीं काळीं कुळकुळीत व कांहीं लालभडक. १३४ कांहीं बावनकशी सोन्याप्रमाणें पिवळीं धमक; कांहीं भरून आलेल्या मेघाप्रमाणें श्यामवर्ण; कांहीं चाफ्याच्या फुलाप्रमाणें गोरीं गोरीं पान,

१ ठेंगणीं. २ स्थूल. ३ अपार. ४ न आवरणारीं. ५ घोरत असलेलीं. ६ सोपीं. ७ शब्दरहित. ८ जागृत. ९ दुःखी. १० समाधिस्थ. ११ अवतार धारण करणारीं. १२ प्रीतियुक्त. १३ तापलेले. १४ पिंगट. १५ सहज. १६ सुंदर. १७ दिव्य सुवर्णाप्रमाणें. १८ निखालस. १९ पिंवळीं. २० भिन्नभिन्न. २१ लज्जेनें. २२ मदन. २३ तेजःपुंज शरीरें. २४ धिप्पाड. २५ उंच माना निघालेलीं. २६ विस्तृत मस्तकाचीं. २७ अंगप्रदेशांत.

व कांहीं हिरवीं. १३५ कांहीं तापविलेल्या तांब्याप्रमाणें आरक्त; कांहीं चंद्राप्रमाणें पांढरीं फेक; अशीं नानारंगाचीं स्वरूपें पाहून घे. १३६ हे वर्ण जसे भिन्न भिन्न आहेत, त्याप्रमाणेंच त्यांचे आकारही भिन्न भिन्न आहेत. कित्येक इतकीं लावण्यसंपन्न आहेत कीं, मदन सुद्धां लाजून त्यांस शरण जाईल. १३७ कित्येक नक्षत्रांसारखीं रेखलेलीं; कित्येक नाजूक आणि दिव्यकांतीचीं; जणों काय, शृंगाररूप लक्ष्मीचीं भांडारेंच उघडलीं आहेत. १३८ कित्येक पुष्ट, मांसानें भरलेलीं; कित्येक शुष्क आणि अकराळ विकराळ; कित्येक उंच मानेचीं, कित्येकांचीं मस्तकेंच मोठीं, आणि कित्येक तर अकटो विकट! १३९ हे **सुभद्रापती!** अशा प्रकारचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत. तीं पाहूं लागलें तर त्यांस अंत नाहीं. त्यांच्या एकएका अवयवामध्यें साऱ्या जगाला पाहून घे." १४०

पश्यादित्यान्वसून् रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ।
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥

[ पश्यादित्यान् ] जेथ उन्मीलन होत आहे दिठी । तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी । पुढती निमीलेनीं मिठी । देत अहाती ॥ ४१ ॥ [ वसून् ] वदनींचिया वाफेसवें । होत ज्वाळामय आघवें । जेथ पावकादिक पावे । समूह वसूंचा ॥ ४२ ॥ [ रुद्रान् ] आणि भ्रूलतांचे शेवट । कोपें मिळों पाहती एकवाट । तेथ रुद्रगणांचे संघाट । अवतरत देखें ॥ ४३ ॥ [ अश्विनौ मरुतस्तथा ] पैं सौम्यतेचा वोलावा । मिती नेणिजे अश्विनौदेवां । श्रोत्रीं होती पांडवा । अनेक वायु ॥ ४४ ॥ [ बहून्यदृष्टपूर्वाणि ] यापरि एकेकाचिये लीळे । जन्मती सुरसिद्धांची कुळें । ऐसीं अपारें आणि विशाळें । रूपें इयें पाहीं ॥ ४५ ॥ जयातें सांगावया वेद बोबडे । पाहावया काळाचेंही आयुष्य थोकडें । धातयाही परि न सांपडे । ठाव जयाचा ॥ ४६ ॥ जयातें वेदत्रयी कधीं नायके । [ पश्याश्चर्याणि भारत ] तियें इयें प्रत्यक्ष देख अनेकें । भोगीं आश्चर्याचीं कवतिकें । महासिद्धी ॥ ४७ ॥

"ह्यांची दृष्टी जेव्हां उघडते तेव्हां जिकडेतिकडे सूर्य उत्पन्न होतात. आणि पुन्हा झांकली कीं, ते सूर्यच ऐक्यरूपाप्रत पोंचतात. १४१ तोंडांतून वाफ निघूं लागली कीं, सारें विश्व ज्वालामय होऊन जातें, आणि तेथें अग्निआदिकरून वसूंचा समूह उत्पन्न होतो. १४२ आणि भोंवयांचीं टोंकें, रागानें जेव्हां एकमेकांस लागावयास येतात, तेव्हां रुद्रगणांचे समुदाय उत्पन्न होतात. १४३ तसेंच साम्यतेचा ओलावा उत्पन्न झाला कीं, त्यापासून **अश्विनी**सारखे असंख्यात देव निपजतात. **अर्जुना!** कानांपासून अनेक वायु उत्पन्न होतात. १४४ ह्याप्रमाणें एकएका अवयवाच्या लीलेनें देवांचीं कुळें जन्मास येतात. अशीं हीं अपार आणि विशाळ स्वरूपें पाहून घे. १४५ जीं सांगावयाला वेदांची बोबडी वळते; पहावयाला काळाचेंही आयुष्य थोडें होतें; **ब्रह्मदेवाला** सुद्धां ज्यांचा थांग लागत नाहीं. १४६ ज्या स्वरूपांना तिन्ही वेदांनीं कानांनीं सुद्धां कधीं ऐकलेलें नाहीं, तीं ही अनंत स्वरूपें, तूं प्रत्यक्ष पहा. आणि चमत्कारांचे आनंद व महासिद्धि ह्यांचा उपभोग घे." १४७

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥

[ मम देहे गुडाकेश ] इया मूर्तीचिया किरीटी । रोममूळीं देखें पां सृष्टी । सुरतरूतळवटीं । तृणांकुर जैसे ॥ ४८ ॥ वातायनाचेनि प्रभासें । उडत परमाणु दिसती जैसे । भ्रमत ब्रह्मकटाह तैसे । अवयवसंधीं ॥ ४९ ॥ [ इहैकस्थमिति ] एथ एकैकाचिया प्रांतदेशीं । विश्व देख विस्तारेसीं । [ यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ] आणि विश्वाही परौतें मानसीं । जरी देखावें वर्ते ॥ १५० ॥ तरी इयेही विषयींचें कांहीं । एथ सर्वथा सांकडें नाहीं । सुखें आवडे तें माझिया देहीं । देखसी तूं ॥ ५१ ॥ ऐसें विश्वमूर्ती तेणें । बोलिलें कारुण्यपूर्णें । तंव देखत आहे कीं नाहीं न ह्मणे । निवांतचि येरु ॥ ५२ ॥ एथ कां पां हा उगला । ह्मणोनि श्रीकृष्णें जंव पाहिला । तंव ओंतींचें लेणें लेइला । तैसाचि आहे ॥ ५३ ॥

"हे **किरीटी!** झाडाच्या मुळाशीं जसे तृणांकुर उगवलेले असतात, त्याप्रमाणें ह्या

१ उघडी. २ झांकले ह्मणजे. ३ अष्टवसूंचा समुदाय. ४ भोंवयांचे. ५ समुदाय. ६ उत्पन्न झालेले. ७ संख्या. ८ कर्णापासून. ९ ब्रह्मदेवालाही.

१ खिडकीच्या उजेडानें. २ अवयवांच्या भागांत. ३ विश्वरूपी श्रीकृष्णानें. ४ अर्जुन. ५ उगाच. ६ उत्कंठारूप अलंकार घातलेला.

मूर्तीच्या प्रत्येक केसाच्या मुळाशीं सृष्टि कशी गजबरलेली आहे पहा. १४८ खिडकींतून पडलेल्या किरणांमध्यें जसे अणुरेणु उडतांना दिसतात त्याप्रमाणें प्रत्येक अवयवाच्या सांध्यामध्यें ब्रह्मांडें कशीं गिरक्या खात आहेत. १४९ त्या एकएका अवयवाच्या भागामध्यें साऱ्या विश्वाचा विस्तार आहे, हा पहा. आणि विश्वाहूनही कांहीं अधिक पहावयाचें तुझ्या मनांत असलें, १५० तर, त्यालाही येथें कांहीं कठीण आहे असें मुळींच नाहीं. जें जें कांहीं पाहिजे असेल, तें तें तूं ह्या माझ्या देहांत खुशाल पाहून घे." १५१ विश्वमूर्ति, कारुण्यानें भरलेले, असे जे **श्रीकृष्ण**, ते ह्याप्रमाणें बोलले. तरी **अर्जुन** हा, आपल्याला दिसतें किंवा नाहीं हें कांहींच बोलेना. तो आपला स्वस्थच होता. १५२ आतां उगाच कां बसला म्हणून जों **श्रीकृष्ण** पहातात, तों तो उत्कंठा धारण केलेला आहे तसाच आहे. १५३

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥८॥

[ नतु मामिति श्लोकद्वयेन समग्रज्ञानमाह ] मग ह्मणे उत्कंठे वोहट न पडे । अझुनी सुखाची सोय न सांपडे । परि दाविलें तें फुडें । नाकळेचि यया ॥ ५४ ॥ हें बोलोनि देव हांसिले । हांसोनि देखणिया ह्मणितलें । आह्मी विश्वरूप तरी दाविलें । परि देखसीच ना तूं ॥ ५५ ॥ यया बोला येरें विचक्षणें । ह्मणितलें हां जी कवणासि तें उणें । तुह्मीं बकाकरवीं चांदिणें । चरऊं पहा मा ॥ ५६ ॥ हांहो उटोनियां आरिसा । आंधळिया दाऊं बैसा । बहिरिया पुढें हृषीकेशा । गोणीव करा ॥ ५७ ॥ मकरंदकणाचा चारा । जाणतां घालूनि दर्दुरा । वायां धोंडा शार्ङ्गधरा । कोपा कवणा ॥ ५८ ॥ जें अतींद्रिय ह्मणोनि व्यवस्थिलें । केवळ ज्ञानदृष्टीचिया भागा फिटलें । तें तुह्मी चर्मचक्षूपुढें सूदलें । मी कैसेनि देखें॥५९॥ परि हें तुमचें उणें न बोलावें । मीचि साहें तेंचि बरवें । एथ आंथि ह्मणितलें देवें । मानूं बापा ॥ १६० ॥ साच विश्वरूप जरि आह्मी दावावें । तरि आधीं देखावया सामर्थ्य कीं द्यावें । परि बोलत प्रेमभावें । धसाळ गेलों ॥ ६१ ॥ काय जाहालें न वोहतां भुईं पेरिजे । [ दिव्यं ददामि ते चक्षुः ] तरी तो वेलु विलया जाइजे । तरीं आतां माझें निजरूप देखिजे । ते दृष्टी देवों तुज ॥ ६२ ॥ [ पश्य मे योगमैश्वरं ] मग तिया दृष्टी पांडवा । आमुचा ऐश्वर्ययोग आघवा । देखोनियां अनुभवा । माजिवडा करीं ॥६३॥ ऐसें तेणें वेदांतवेद्यें । सकळलोकैकआद्यें । बोलिलें आराध्यें । जगाचेनि ॥ ६४ ॥

मग मनांत ह्मणतात, ह्याची उत्कंठा अद्याप कमी झालेली नाहीं, व सुखाचा मार्गही सांपडलेला दिसत नाहीं. आणि मी तर स्पष्ट दाखविलें, पण ह्याला तें दिसलें नाहीं. १५४ असें ह्मणून ते हांसले, आणि पहाणाराला—ह्मणजे **अर्जुनाला**—ह्मणतात "आह्मी तर विश्वरूप दाखविलें. पण तुला तें दिसतच नाहीं." १५५ ह्या भाषणावर तो बुद्धिवंत **अर्जुन** ह्मणाला, "महाराज! हा दोष कोणाकडे? आपण तर बगळ्याकडून चांदणें भक्षण करवितां आहां. १५६ देवा! **हृषीकेशा!** तुह्मी आरसा पुसून आंधळ्यापुढें दाखवीत बसलां आहांत. आणि बहिऱ्यापुढें गायन करतां! १५७ **शार्ङ्गधरा!** पुष्पपरागाचा चारा, जाणूनबुजून तुह्मी बेडकाला चारतां, आणि उगाच रागावतां कोणावर? १५८ जें, इंद्रियागोचर ह्मणून शास्त्रानेंच सांगितलें आहे; जें केवळ ज्ञानदृष्टीच्याच भागाला मिळणारें; तें विश्वस्वरूप, तुह्मीं माझ्या चर्मचक्षूपुढेंच ठेविलें, तें मी कसें बरें पाहूं? १५९ पण हा तुमचा दोष आह्मीं उच्चारूं नये. आपणच गप्प बसावें तें बरें." तेव्हां देव ह्मणाले, "बा अर्जुना! खरेंच. तूं ह्मणतोस तें मान्य आहे. १६० आह्मी विश्वरूप दाखवावयाचें तर, आधीं खरोखर आह्मीं तें पहाण्याचें सामर्थ्य द्यावें हेंच योग्य. पण प्रेमानें बोलतां बोलतां त्याचें विस्मरणच झालें. १६१ न नांगरतां जमीन पेरली, तर तो वेल नाश पावेल, ह्यांत आश्चर्य तें काय? तर आतां आमचें स्वरूप पहावयाजोगी तुला दृष्टि देतों. १६२ मग

१ मार्ग. २ स्पष्ट. ३ पहाणाऱ्याला. ४ बुद्धिवंतानें. ५ कोणाला? ६ बगळ्याकडून. ७ पहातांना? ८ स्वच्छ पुसून. ९ गायन. १० पुष्पपरागांचा. ११ घालवितां. १२ इंद्रियांस अगोचर. १३ शास्त्रानें सांगितलें. १४ प्राप्त झालें. १५ ठेवलें. १६ उगें रहावें. १७ खरें आहे.

१ विस्मरण झालें. २ न नांगरतां. ३ अनुभवांतर्गत. ४ उपनिषदांनींच ज्ञेय अशा कृष्णानें. ५ मूळपुरुषानें. ६ पूज्य.

**अर्जुना!** त्या दृष्टीनें आमचा सारा ऐश्वर्य-योग पाहून अनुभवामध्यें घे. १६३ उपनिषदांनीं जाणावयास योग्य; सकल लोकांचें मूळरूप; जगाचें आराध्य दैवत; असे जे **श्रीकृष्ण** ते ह्याप्रमाणें बोलले. १६४

संजय उवाच—

एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः।
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥

[संजय उवाच—राजन्] पैं कौरवकुळचक्रवर्ती । मज हाचि विस्मय पुढतपुढती । जे श्रियेहूनि त्रिजगती । सदैव असे कवणी ॥ ६५ ॥ [महायोगेश्वरः] ना तरी श्रुतीचें वानावयालागीं । श्रुतीवांचूनि दावा पां जगीं । ना सेवकपण तरी आंगीं । शेषाच्याचि आथि ॥ ६६ ॥ हां हो जयाचेनि सोसें । शिणत आठही पाहार योगी जैसे । अनुसरले गरुडाऐसें । कवण आहे ॥ ६७ ॥ परि तें आघवेंचि एकीकडे ठेलें । सांपें कृष्णसुखा एकदेरें जाहालें । जिये दिवसींहूनि जन्मले । पांडव हे ॥ ६८ ॥ परि पांचांही आंत अर्जुना । श्रीकृष्ण सावियाचि जाहाला अधीना । कामुक कां जैसा अंगना । आपैतां कीजे ॥ ६९ ॥ पढविलें पाखिरूं ऐसें न बोले । यापरी क्रीडामृगही तैसा न चले । कैसें दैव एथें सुरवाडलें । तें जाणों नये ॥ १७० ॥ आजि परब्रह्म हें सगळें । भोगावया सदैव याचेचि डोळे । कैसे वाचेचे हन लळे । पाळीत असे ॥ ७१ ॥ हा कोपे कीं निवांत साहे । हा रुसे तरी बुझावित जाये । नवल पिसें लागलें आहे । पार्थाचें देवा ॥ ७२ ॥ येऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक दादुले । ते विषयचि वानितां जाहाले । भाट ययाचे ॥ ७३ ॥ हा योगियांचें समाधिधन । कीं होऊनि ठेलें पार्थाअधीन । यालागिं विस्मय माझें मन । करीतसे राया ॥ ७४ ॥ तेवींचि संजय ह्मणे कायसा । विस्मयो एथें कौरवेशा । श्रीकृष्णें स्वीकारिजे तया ऐसा । भाग्योदय होय ॥ ७५ ॥ [एवमुक्त्वा] ह्मणोनि तो देवांचा रावो । ह्मणे पार्थातें तुज दिव्य दृष्टि देवों । जया विश्वरूपाचा ठावो । देखसी तूं ॥ ७६ ॥ [ततः] ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें । निघती ना जंव एकसरें । तंव अविद्येचें आंधारें । जावोंचि लागे ॥ ७७ ॥ तीं अक्षरें नव्हती देखा । ब्रह्मसाम्राज्यदीपिका । अर्जुनालागीं चित्कळिका । उजळलिया श्रीकृष्णें ॥ ७८ ॥ [दर्शयामास पार्थाय] मग दिव्यचक्षुप्रकाश जहाला । तया ज्ञानदृष्टी फांटा फुटला । ययापरी दाविता जाहाला । ऐश्वर्य आपुलें ॥ ७९ ॥ [परमं] हे अवतार जे सकळ । ते जिये समुद्रींचे कां कल्लोळ । विश्व हें मृगजळ । जया रश्मीस्तव दिसे ॥ १८० ॥ जिये अनादिभूमिके निटें । चराचर हें चित्र उमटे । आपणपें श्रीवैकुंठें । दाविलें तया ॥ ८१ ॥ मागां बाळपणीं येणें श्रीपती । जैं एकवेळ खादली होती माती । तैं कोपोनियां हातीं । यशोदां धरिला ॥ ८२ ॥ मग भेणें भेणें जैसें । मुखीं झाडा यावयाचेनि मिसें । चवदाही भुवनें सावकाशें । दाविलीं तिये ॥ ८३ ॥ ना तरी मधुवनीं ध्रुवाचि केलें । जैसें कपोल शंखें शिवतलें । आणि वेदांचियेही मती ठेलें । तें लागला बोलों ॥ ८४ ॥ तैसा अनुग्रह पैं गया । [हरिः] श्रीहरी केला धनंजया । आतां कवणेकडे ही माया । ऐसी भाष नेणेचि तो ॥ ८५ ॥ [रूपमैश्वरं] एकसरें ऐश्वर्यतेजें पाहिलें । तया चमत्कारांचें एकार्णव जहालें । चित्त समाधीं बुडोनि ठेलें । विस्मयाचिया ॥ ८६ ॥ जैसा आब्रह्म पूर्णोदकीं । पोहे मार्कंडेय एकाकी । तैसा विश्वरूपकौतुकीं । पार्थ लोळे ॥ ८७ ॥ ह्मणे केवढें गगन एथ होतें । तें कवणें नेलें पां केउतें । तीं चराचरें महाभूतें । काय जाहालीं ॥ ८८ ॥ दिशांचे ठावही हारपले । अधोर्ध्व काय नेणों जाहालें । चेइलियां स्वप्न तैसें गेलें । लोकाकार ॥ ८९ ॥ नातरी सूर्यतेजप्रतापें । सचंद्र तारांगण जैसें लोपे । तैसी गिळिली विश्वरूपें । प्रपंचरचना ॥ १९० ॥ तेव्हां मनासी मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सांवरे । इंद्रियांचे रश्मी माघारे । हृदयवरी भरले ॥ ९१ ॥ तेथ ताटस्थ्या ताटस्थ्य पडिलें । टकासी टक लागलें । जैसें मोहनास्त्र घातलें । विचाराजातां ॥ ९२ ॥ तैसा विस्मित पाहे कोडें । तंव पुढां होतें चतुर्भुज रूपडें । तेंचि नानारूप चहूंकडे । मांडोनि ठेलें ॥ ९३ ॥ जैसें वर्षाकाळींचे मेघौडे । कां महाप्रळयींचें तेज वाढे । तैसें आपणावीण कवणीकडे । नेदीचि उरों ॥ ९४ ॥ प्रथम स्वरूपसमाधान । पावोनि ठेला अर्जुन । सवेंचि उघडिले लोचन । तंव विश्वरूप देखे ॥ ९५ ॥ इहींचि दोहीं डोळां । पाहावें विश्वरूपा सकळा । तो श्रीकृष्णें सोहळा । पुरविला ऐसा ॥ ९६ ॥ [इतः पंचभिः श्लोकैः समग्रां श्रियमाह]

१ वर्णन करण्याकरितां. २ इच्छेनें. ३ प्रहर. ४ सांप्रत. ५ एकवट. ६ स्त्रियेनें. ७ स्वाधीन. ८ अनुकूल झालें. ९ समजावीत. १० जिंकून. ११ महात्मे. १२ वर्णन करतांना. १३ स्तुतिपाठक. १४ समाधिरूप भाग्य. १५ ब्रह्मरूप सार्वभौमत्वाची मशाल. १६ ज्ञानदीप.

१ किरणांच्या योगानें. २ नीट. ३ आपणहून. ४ श्रीकृष्णानें. ५ यशोदेनें. ६ भीत भीत. ७ गाल. ८ स्पर्श केला. ९ उपदेश. १० उजाडलें. ११ समुद्रमय. १२ समुदायांत. १३ ब्रह्मदेवापर्यंत. १४ कोणीकडे ? १५ जागा झालेल्याला. १६ किंवा. १७ वृत्ति. १८ स्तब्धतेला स्तब्धता. १९ एकाग्रतेला एकाग्रता. २० झाडून साऱ्या विचारांना. २१ आवडीनें. २२ मेघ. २३ ह्याच.

संजय ह्मणतो "हे कौरवकुलचक्रवर्ती राजा **धृतराष्ट्रा!** मला पुन्हा पुन्हा हेंच आश्चर्य वाटतें कीं, **लक्ष्मी**पेक्षांही भाग्यवान् असा कोणी त्रिभुवनांत आहे काय? १६५ ख़ुणेचें वर्णन करावयास श्रुतीशिवाय जगांत कोणी आहे काय? दाखवून द्या बरें. किंवा सेवकपणासुद्धां **शेषाच्याच** आंगीं आहे. १६६ अहो! स्वइच्छेनें योग्यप्रमाणें जो अष्टौप्रहर कष्ट सोसतो, त्या **गरुडा**सारखी सेवा करणार कोण बरें आहे? १६७ पण ज्या दिवशीं पांडव जन्मास आले, त्या दिवसापासून हे सारेच एका बाजूस बसले. आणि सांप्रत सारें कृष्णसुख तर त्या पांडवांच्या ठिकाणीं एकत्र होऊन राहिलें आहे. १६८ पण पांच पांडवांतही, स्त्रियेनें कामी पुरुष जसा स्वाधीन करून घ्यावा त्याप्रमाणें **श्रीकृष्ण** सहजवृत्तीनें **अर्जुना**च्या तर फारच आधीन आहेत. १६९ शिकविलेलें पांखरूं सुद्धां असें बोलणार नाहीं; बाळगलेलें जनावर सुद्धां इतकें हुकमांत चालावयाचें नाहीं; ह्या **अर्जुना**ला दैव किती ह्मणून अनुकूल झालें आहे कळत नाहीं. १७० आज साऱ्या परब्रह्माचा उपभोग घेण्याइतके भाग्यशाली, एक ह्याचेच डोळे. त्याच्या शब्दाचे लळे हा **भगवान्** कसे पूर्ण करतो ह्मणून सांगूं? १७१ तो रागावला, तर आपण शांत राहतो; तो रुसला, तर आपण समजूत करतो; देवाला **अर्जुना**चें इतकें वेड लागलें, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे! १७२ खरें ह्मटलें तर, विषय जिंकून जन्मास आलेले जे **शुका**सारखे समर्थ, ते विषयाचेंच वर्णन करून ह्याचे भाट बनले. १७३ हा योग्यांचें समाधिरूप भाग्य; तो **अर्जुना**च्या स्वाधीन होऊन राहिला. ह्मणून हे राजा! माझ्या मनाला विस्मय वाटतो." १७४ इतकें सांगून **संजय** पुन्हा ह्मणाला "हे **कौरवाधिपते!** पण ह्यांत विस्मय तरी कसला? **श्रीकृष्णांनीं** त्याच्या आधीन होण्याइतकें त्याचें भाग्य होतेंच. १७५ ह्मणून तो देवांचा राजा जिच्या योगानें विश्वरूपाचें दर्शन होईल अशी दिव्य दृष्टी तुला दिली असें **पार्था**ला ह्मणाला. १७६ **श्रीकृष्णा**च्या मुखांतून हीं अक्षरें सारीं बाहेर निघतात न निघतात, तोंच अज्ञानपणाच्या आंधेरानें आपला गाशा गुंडाळला. १७७ अहो! तीं कांहीं अक्षरें नव्हेत. ती ब्रह्मरूप सार्वभौमराष्ट्राची दिवटीच, किंवा **अर्जुना**साठीं **श्रीकृष्णांनीं** ज्ञानाची ज्योत पेटविली असें ह्मटलें पाहिजे. १७८ मग दिव्य नेत्रांचें तेज फांकलें, आणि ज्ञानदृष्टीला फांटा फुटला. ह्याप्रमाणें आपलें ऐश्वर्य दाखविलें. १७९ हे जे सारे अवतार, ते ज्या समुद्रांतल्या केवळ लाटा; ज्या किरणांच्या योगानें विश्व हें केवळ मृगजलवत् दिसूं लागतें; १८० ज्या अनादि भूमिकेमध्यें ह्या चराचराचें चित्र स्पष्ट उमटलेलें दिसतें; ती **श्रीकृष्णांनीं** त्यास मूळ स्वरूपानें दाखविली. १८१ पूर्वी बाल्यावस्थेत ह्या **श्रीकृष्णानें** एक वेळ जेव्हां माती खाल्ली होती, तेव्हां **यशोदेनें** रागारागानें त्याच्या हाताला धरलें. १८२ मग जणों काय भीतभीत तोंडांतील झाडा द्यावयाच्या निमित्तानें तिला चवदाही भुवनें सावकाश दाखविलीं. १८३ किंवा **मधुवना**मध्यें ज्याप्रमाणें **ध्रुवा**च्या गालाला शंखानें स्पर्श केला तेव्हां, वेदांचीही बुद्धि गुंग होईल असें बोलूं लागला. १८४ त्याप्रमाणें हे **राजा! श्रीहरीनें अर्जुना**वर अनुग्रह केला. तेव्हां माया ती कोणीकडे आहे, हा शब्दच त्याला समजेनासा झाला. १८५ एकदम ऐश्वर्याचें तेज फांकलें. त्या चमत्कारानें सारें समुद्रमयच होऊन विस्मयाच्या गर्दीत चित्त अगदीं बुडून गेलें. १८६ ब्रह्मापर्यंत भरलेल्या पूर्णोदकामध्यें **मार्कंडेय**ऋषी ज्याप्रमाणें एकटाच पोहत होता, त्याप्रमाणें विश्वरूपकौतुकामध्यें **अर्जुन**ही लोळूं लागला." १८७ आणि ह्मणाला "येथें केवढें हो आकाश होतें? तें कोणी आणि कोठें नेलें? अहो! तें चराचर, आणि तीं पंचमहाभूतें काय झालीं? १८८ दिशांचीं स्थानेंही नष्ट झालीं; खालीं आणि वर हें कोठें गेलें, कोण जाणे?

जागृत झाल्यावर स्वप्न जसें लयास जातें त्याप्रमाणें हा लोकांचा आकार नाहींसाच होऊन गेला. १८९ किंवा सूर्यतेजाच्या प्रतापानें चंद्रासहवर्तमान नक्षत्रसमूह ज्याप्रमाणें लुप्त होतो, त्याप्रमाणें विश्वरूपानें प्रपंचरचना सारी गिळून टाकली.'' १९० तेव्हां मनाच्या मनोधर्माची स्फूर्ति गेली; बुद्धीला शुद्धि नाहींशी झाली. इंद्रियांच्या वृत्ति मुरडून त्या हृदयांतच भरून राहिल्या. १९१ त्यामुळें स्तब्धपणाला स्तब्धपणा आला; टकाला टक लागून राहिली; सर्व विचारांना जणों काय मोहनास्त्र घालावें, १९२ त्याप्रमाणें तटस्थ होऊन आनंदानें पाहूं लागला. तों असलेलें चतुर्भुज स्वरूपच चहूंकडे नानाप्रकारचीं स्वरूपें बनून राहिलें. १९३ वर्षाकाळांतील मेघ, किंवा महाप्रळयांतील तेज, जसें चहूंकडे गच्च भरून जातें, त्याप्रमाणें त्या स्वरूपानेंही आपल्याशिवाय दुसरें कांहींच उरूं दिलें नाहीं. जिकडे तिकडे आपणच भरून राहिलें. १९४ प्रथमचेंच स्वरूप पाहून अर्जुनास समाधान झालें होतें. ह्मणून त्यानें डोळे झांकले. आणि पुन्हा उघडून पहातो तों विश्वरूप दिसूं लागलें. १९५ ह्याच दोन्ही डोळ्यांनीं साऱ्या विश्वरूपाला पहावें, असें जें अर्जुनाच्या मनांत होतें, तो त्याचा मनोरथ श्रीकृष्णांनीं ह्याप्रमाणें परिपूर्ण केला.'' १९६

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।

अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥

[अनेकवक्त्रनयनं 'शृंगाररसः'] मग तेथ सैंध देखे वदनें । जैसीं रमानायकाचीं राजभुवनें । नाना प्रगटलीं निधानें । लावण्यश्रियेचीं ॥ ९७ ॥ कीं आनंदाचीं वनें सासिन्नलीं । जैसी सौंदर्या रौणीव जोडली । तैसीं मनोहरें देखिलीं । हरीचीं वक्त्रें तेणें ॥ ९८ ॥ तयाहीमाजि एकैकें । साविंयाचि भयानकें । काळरात्रीचीं कटकें । उठावलीं जैसीं ॥ ९९ ॥ कीं मृत्यूसीचि मुखें जाहालीं । हो कां जे भयाचीं दुर्गें पन्नासिलीं । कीं महाकुंडें उघडलीं । प्रळयानळाचीं ॥ २०० ॥ तैसीं अद्भुतें भयासुरें । तेथ वदनें देखिलीं वीरें । आणिकें

१ पुष्कळ. २ गजबजलीं. ३ राज्य. ४ स्वाभाविक. ५ सैन्यें. ६ सज्ज झालीं. ७ शृंगारिलीं, रचिलीं.

असाधारणें साळंकारें । सौम्यें बहुतें ॥ १ ॥ पैं ज्ञानदृष्टीचेनि अवलोकें । परि वदनाचा शेवट न टेंके । मग लोचन ते कवतिकें । लागला पाहों ॥ २ ॥ तंव नानावर्णें कमळवनें । विकासिलीं तैसे अर्जुनें । नेत्र देखिले पालिंगनें । आदित्यांचीं ॥ ३ ॥ तेथेंचि कृष्णमेघाचिया दाटी । माजि कल्पांत विजूचिया फुटी । तैसिया वन्हिपिंगळा दिठी । भ्रूभंगातळीं ॥ ४ ॥ [अनेकाद्भुतदर्शनं] हें एकैक आश्चर्य पाहातां । तिये एकेचि रूपीं पांडुसुता । दर्शनाची अनेकता । प्रतिफळली ॥ ५ ॥ मग ह्मणे चरण ते कवणेकडे । केउते मुकुट कें दोर्दंडें । ऐसी वाढविताहे कोडें । चाड देखावयाची ॥ ६ ॥ तेथ भाग्यनिधि पार्थो । कां विफलत्व होईल मनोरथा । काय पिनाकपाणीचिया भाता । वायकोंडीं आहाती ॥ ७ ॥ ना तरी चतुराननाचिये वाचे । काय आहाती लटिकिया अक्षरांचे सांचे । ह्मणोनि साद्यंतपण अपाराचें । देखिलें तेणें ॥ ८ ॥ जयाची सोय वेदां नाकळे । तयाचे सकळावयव एकेचि वेळे । अर्जुनाचे दोन्ही डोळे । भोगिते जहाले ॥ ९ ॥ चरणौनी मुकुटवरी । देखत विश्वरूपाची थोरी । [अनेकदिव्याभरणं] जे नाना रत्न अळंकारीं । मिरवत असे ॥ २१० ॥ परब्रह्म आपुलेनि आंगें । ल्यावया जाहाला आपणचि अनेगें । तियें लेणीं मी सांगें । काइसयासारिखीं ॥ ११ ॥ जिये प्रभेचिये झळाळा । उजाळू चंद्रादित्यमंडळा । जें महातेजाचा जिव्हाळा । जेणें विश्व प्रगटे ॥ १२ ॥ तो दिव्यतेजश्रृंगार । कोणाचिये मतीसी होय गोचर । देव आपणपेंचि लेइले ऐसें वीर । देखत असे ॥ १३ ॥ [दिव्यानेकोद्यतायुधं] मग तेथेंचि ज्ञानाचिया डोळां । पहात करपल्लवां जंव सरळा । तंव तोडित कल्पांतींचिया ज्वाळा । तैसीं शस्त्रें झळकत देखे ॥ १४ ॥ आपण आंग आपण अळंकार । आपण हात आपण हतियेरें । आपण जीव आपण शरीर । देखे चराचर कोंदलें देवें ॥ १५ ॥ जयाचिया किरणाचे निखरेपणें । नक्षत्रांचे होत फुटाणे । तेजें खिरडला वन्हि ह्मणे । समुद्रीं रिघों ॥ १६ ॥ मग काळकूटकल्लोळीं कवळिले । नानामहाविजूंचे दांगे उमटले । तैसे अपार कर देखिले । उद्यतायुधीं ॥ १७ ॥

"तेव्हां तेथें जणों काय लक्ष्मीपतीचीं राजमंदिरेंच, किंवा सौंदर्यश्रीचीं असंख्य भां-

१ पहाण्यानें. २ लागत नाहीं. ३ समुदाय. ४ चमका. ५ अग्नीसारख्या पिंगट वर्णाच्या. ६ दृष्टि. ७ भोंवयांखालीं. ८ अनुभवास आली. ९ बाहू. १० शंकराच्या भात्यांत. ११ वांझे बाण. १२ मार्ग. १३ चरणांपासून. १४ अनेक रूपांनीं. १५ अलंकार. १६ उजळा. १७ जी. १८ हस्तप्रांस. १९ शस्त्र. २० तीव्रपणानें. २१ मागें हटला. २२ अरण्य. २३ उचललेल्या आयुधासहित.

डारेंच अशा प्रकारचीं अनेक मुखें दिसूं लागलीं. १९७ किंवा आनंदाच्या प्रफुल्लित झालेल्या बागाच, किंवा सौंदर्यास प्राप्त झालेलें राजवैभवच, अशा प्रकारचीं हरीचीं मुखें त्यानें अवलोकन केलीं. १९८ त्यांत कितीएक जणों काय कालरात्रीची फौजच सरसावली आहे, अशीं स्वभावगत्याच भयंकर. १९९ किंवा मृत्यूलाच तोंडें फुटावीत, नाहींतर भयाचेच किल्ले बांधावेत; किंवा प्रळयाग्नीचीं कुंडें उघडावींत, २०० त्याप्रमाणें कित्येक अद्भुत; कित्येक भेसूर; कित्येक अगदींच विलक्षण; कित्येक अलंकार घातलेलीं, कित्येक सौम्य, अशीं नानाप्रकारचीं मुखें त्या वीरानें अवलोकन केलीं. २०१ तो ज्ञानदृष्टीनें अवलोकन करीत होता तरी, त्या मुखांचा अंत लागेना. तेव्हां तो मोठ्या आनंदानें आतां डोळे तरी कसले आहेत तें पहावें असें मनांत आणून डोळ्यांकडे पाहूं लागला. २०२ तेव्हां त्या अर्जुनाला, चित्रविचित्र रंगांच्या कमळांनीं वनें प्रफुल्लित व्हावींत, तसे हजारों सूर्य एकत्र मिळविल्याप्रमाणें डोळे दृष्टीस पडले. २०३ तेथेंच, गर्द काळ्या मेघामध्यें, कल्पांत विजेच्या चमकीप्रमाणें, भिंवयांखालीं पिंगट बुबुळें दिसत होतीं. २०४ त्या एकाच स्वरूपामध्यें निरनिराळें आश्चर्य दृष्टीस पडूं लागलें. तेव्हां दर्शनाची अनेकता अर्जुनाच्या अनुभवास आली." २०५ मग ह्मणाला "पाय ते कोणीकडे आहेत? मुगुट कोठें आहे? बाहु कोठें आहेत?" अशी आनंदानें पहाण्याची इच्छा वाढवीत चालला. २०६ मग भाग्याचें केवळ भांडार असा जो अर्जुन, त्याचे मनोरथ व्यर्थ जातील काय? शंकराच्या भात्यामध्यें निष्फळ बाण कधीं असतात काय? २०७ किंवा ब्रह्मदेवाच्या वाणीमध्यें असत्य अक्षरांच्या मुद्रा आहेत काय? ह्मणूनच ज्याचा पार नाहीं, असें स्वरूप त्यानें नखशिखांत पाहिलें. २०८ ज्याचा मार्ग वेदांना सुद्धां कळला नव्हता, त्या स्वरूपाचे सकल अवयव अर्जुनानें दोनच डोळ्यांनीं एकदम पाहिले. २०९ चरणापासून तों मुकुटापर्यंत नानारत्नालंकारांनीं विराजमान झालेल्या विश्वरूपाची शोभा दृष्टीस पडली. २१० परब्रह्मस्वरूप जो भगवान् तो स्वतःस घालण्यासाठीं, अनेक प्रकारचे अलंकारही आपणच बनला. ते अलंकार कशासारखे होते ह्मणून मीं सांगावें? २११ ज्यांच्या प्रभेच्या चमकीनें चंद्रमंडळाला व सूर्यमंडळाला सुद्धां प्रकाश मिळावयाचा; महत्तेजाचें जें उगमस्थान; ज्याच्या योगानें विश्व उत्पन्न होणारें; २१२ त्या दिव्य तेजाची शोभा कोणाच्या बुद्धीस गोचर होणार? अशा प्रकारें देवांनीं आपणहून आपणाला भूषित केलेलें, त्या शूरानें पाहिलें. २१३ नंतर तसेंच ज्ञानदृष्टीनें सरळ हस्ताग्रें पाहूं लागला, तों कल्पांतीच्या ज्वालांनाही कापून टाकतील, अशीं लखलखत असलेलीं शस्त्रें दृष्टीस पडलीं. २१४ पाहतो तों देह आपण; अलंकारही आपण; हात आपण आणि हत्यारेंही आपणच. जीव आपण, आणि शरीरही आपणच. ह्याप्रमाणें चराचर हें सारें देवानेंच भरून गेलेलें. २१५ ज्याच्या किरणांच्या प्रखरतेनें नक्षत्रांचे केवळ फुटाणे उडतील, असें तेज! ज्या तेजापुढें अग्नीही लज्जित होऊन समुद्रांत जाऊन बसण्याचा विचार करूं लागला. २१६ मग कालकूटाच्या लाटा धरल्याप्रमाणें, किंवा महद्विद्युत्चें अरण्य पसरल्याप्रमाणें उचललेल्या आयुधांसहित अनंत हात दृष्टीस पडले." २१७

दिव्यमाल्यांबरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।
सर्वाश्चर्यमयं देवमनंतं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥

[दिव्यमाल्यांबरधरं] कीं भेणें तेथूनि काढिली दिठी । मग कंठमुगुट पाहातसे किरीटी । तंव सुरतरूंची सृष्टी । जयापासोनि कां जाहाली ॥ १८ ॥ जियें महासिद्धींचीं मूळपीठें । शिणली कमळा जेथ वावेटे । तैसीं कुसुमें अतिचोखटें । तुरंबिलीं देखिलीं ॥ १९ ॥ मुगुटावरी स्तबक । ठायीं ठायीं पूजाबंध अनेक । कंठीं रुळताति अलौकिक । माळांदंड ॥ २२० ॥ स्वर्गें सूर्यतेज वेढिलें । जैसें पर्धरेनें मेरुतें मढिलें । तैसें नितंबा-

१ आयस्थानें. २ लक्ष्मी. ३ विश्रांति पावते. ४ मस्तकावर ठेवलेलीं. ५ घोस, गुच्छ. ६ शोभतात. ७ पुष्पमाला. ८ उत्तम सोन्यानें. ९ कटिपश्चाद्भागावर.

वरी गाढिलें । पीतांबर झळके ॥ २१ ॥ [दिव्यगंधानुलेपनं] श्रीमहादेव कापुरें उटिला । कां कैलास पारदें डेवरिला । नाना क्षीरोदकें पांघरविला । क्षीरार्णव जैसा ॥ २२ ॥ जैसी चंद्रमयांची घडी उपलविली । मग गगनाकरवीं बुंथी घेवविली । तैसी चंदन पिंजरी देखिली । सर्वांगीं तेणें ॥ २३ ॥ जेणें स्वप्रकाशा कांती चढे । ब्रह्मानंदाचा निदाघ मोडे । जयाचेनि सौरभ्यें जीवित जोडे । वेदवंतीये ॥ २४ ॥ जयाचे निर्लेप अनुलेप करी । जें अनंगही सर्वांगीं धरी । तया सुगंधाची थोरी । कवण वानी ॥ २५ ॥ [ सर्वाश्चर्यमयं देवं ] ऐसी एकैक शृंगारशोभा । पाहातां अर्जुन जातसे क्षोभा । तेवींचि देव वैसला कीं उभा । कीं सन्मुख हें नेणवे ॥ २६ ॥ बाहेर दिठी उघडूनि पाहे । तंव आघवें मूर्तिमय देखत आहे । मग आतां न पाहें ह्मणोनि उगा राहे । तरी आंतही तैसेंचि॥२७॥ अनोंवर मुखें समोर देखे । तया भेणें पाठीमोरा जंव ठाके । तंव तयाहीकडे श्रीमुखें । कर चरण तैसेचि ॥ २८ ॥ अहो पाहातां कीर प्रतिभासे । एथ नवलावो काय असे । परि न पाहातांही दिसे । चोजें आइका ॥ २९ ॥ कैसें अनुग्रहांचें करणें । पार्थाचें पाहाणें आणि न पाहणें । तयाही सकट नारायणें । व्यापूनि घेतलें ॥ २३० ॥ ह्मणोनि आश्चर्याच्या पुरीं एकीं । पडिला ठायेंठांवे तडीं ठाकी । तंव चमत्काराचिया आणिकीं । महार्णवीं पडे ॥ ३१ ॥ [अनंतं विश्वतोमुखं] ऐसा अर्जुन असाधारणें । आपुलिया दर्शनाचेनि विंदाणें । कवळूनि घेतला तेणें । अनंतरूपें ॥ ३२ ॥ तो विश्वतोमुख स्वभावें । आणि तेंचि दावावयालागीं पांडवें । प्रार्थिला आतां आघवें । होऊनि ठेला ॥ ३३ ॥ आणि दीपें कां सूर्यें प्रगटे । अथवा निमुटलिया देखावेंचि खुंटे । तैसी दिठी नव्हे जे वैकुंठें । दिधली आहे ॥ ३४ ॥ ह्मणोनि किरीटीसि दोहीं परी । ते देखणें देखें आंधारीं । हें संजय हस्तिनापुरीं । सांगतसे राया ३५ ह्मणे किंबहुना अवधारिलें । पार्थें विश्वरूप देखिलें । नाना आभरणीं भरलें । विश्वतोमुख ॥ ३६ ॥

**"मग भयानें कीं काय कोण जाणे! अर्जुनानें तेथून दृष्टि काढली, आणि कंठ व मुगुट पाहूं लागला. तेव्हां असें वाटलें कीं, कल्पतरू** ह्मणून जितके आहेत, तितके येथूनच निघाले असावेत. २१८ जीं महासिद्धीचीं आद्य स्थानें; **लक्ष्मी** श्रांत झाली असतां, जेथें विश्रांतीला येते; अशा प्रकारचीं अत्युत्तम पुष्पें, मस्तकांवर धारण केलेलीं पाहिलीं. २१९ मुगुटावर तुरे, ठिकठिकाणीं पुष्पगुच्छ; आणि गळ्यामध्यें लोकोत्तर हार शोभत होते. २२० स्वर्गानें सूर्यतेज वेढून घ्यावें, किंवा सोन्यानें मेरूला गुंडाळावें, त्याप्रमाणें कटिपश्चाद्भागावर नेसलेला पीतांबर झळकत होता. २२१ **श्रीमहादेवाला** जसें कापुराचें उटणें लावावें, किंवा **कैलासास** पाऱ्यानें मढवावें, किंवा **क्षीरार्णवावर** जशीं अनेक शुभ्र वस्त्रें पसरावींत, २२२ किंवा चांदण्याची घडी उलगडून गगनाकडून बुरखा घेववावा, त्याप्रमाणें त्यानें सर्वांगावर चंदनाची उटी पाहिली. २२३ ज्याच्या योगानें मूळ कांतीला कांती चढते; ब्रह्मानंदाचा दाह मोडतो; ज्याच्या सुवासानें पृथ्वीला आयुष्य प्राप्त होतें; २२४ न लिप्त होणारें, ज्याला लेप करतें; शरीररहित असणारें जें, तें ज्याला सर्वांगावर धारण करतें, त्या सुगंधाची (चंदनाची) थोरवी कोण वर्णन करील? २२५ अशी शृंगाराची एक एक शोभा पहातां पहातां, **अर्जुनाला** अस्वस्थता उत्पन्न झाली. आणि देव बसला आहे, उभा आहे, कां पुढें समोर आहे हेंही कळेनासें झालें. २२६ बाहेर डोळे उघडून पहातो तों सारें मूर्तिमयच दिसूं लागलें. तेव्हां आतां आपण पाहूंच नये असें मनांत आणून डोळे मिटून उगाच बसला, तों आंतही तशाच साऱ्या मूर्ती! २२७ अंतपार नाहींत अशीं मुखें समोर दिसूं लागलीं; ह्मणून त्या भयानें तो पाठमोरा होऊन उभा राहिला. तों तिकडेही देवाचीं मुखें हात, पाय तसेच! २२८ अहो! डोळे उघडून पाहूं लागलें, तर दिसेल हें तर उघडच आहे. त्यांत आश्चर्य तें काय? पण ही मजा आयका. कीं न पहातां—डोळे मिटले तरी सुद्धां—तें दिसत होतें. २२९ कृपेचा प्रसार कसा तो पहा!

१ नेसलेलें. २ पाऱ्यानें. ३ लिपला. ४ किंवा. ५ पांढऱ्या रंगानें. ६ चांदण्याची. ७ उकलली. ८ खोळ, बुरखा. ९ उटी. १० दाह. ११ सुवासानें. १२ पृथ्वीला. १३ ब्रह्म. १४ मदन सुद्धां. १५ वर्णन करतो. १६ अस्वस्थतेप्रत. १७ आंवरण्यास अशक्य. १८ आश्चर्य. १९ नवल. २० कृपेचें. २१ पुरांत, प्रवाहांत. २२ तत्काळ. २३ तीरीं. २४ विशेषेंकरून. २५ कळेनें, कौशल्यानें. २६ सर्वव्यापी परमेश्वर. २७ झांकली असतां. २८ श्रीकृष्णांनीं. २९ उजेडांत.

अर्जुनाचें पहाणें आणि न पहाणें ह्यासकट नारायणांनीं व्यापून टाकलें. २३० ह्मणून आश्चर्याच्या एका पुरांत पडतांच तो झट्कर कडेला येऊन उभा राहिला. तों पुन्हा चमत्काराच्या महासागरांतच सांपडला! २३१ अशा प्रकारें अर्जुन हा, विशेषेंकरून आपल्या दर्शनाच्या कौशल्यानें आणि त्या अनंत रूपानें अगदीं वेढून टाकला. २३२ तो सर्वव्यापी परमेश्वर मूळचाच विश्वतोमुख; आणि तेंच दाखविण्याविषयीं अर्जुनानें प्रार्थना केली, तेव्हां तो त्या वेळीं जिकडे तिकडे सारें भरून राहिला. २३३ आणखी भगवंतांनीं त्यास दिलेली दृष्टि, दिवा किंवा सूर्य असला, तरच तिला दिसावयाचें, किंवा ती झांकली कीं दिसणें बंद पडावयाचें, अशा प्रकारची नव्हती. तर ती दिव्य दृष्टी होती.२३४ ह्मणून अर्जुनाला आंधार आणि प्रकाश ह्या दोहोंतही तें स्वरूप पहावयास मिळत होतें." असें हस्तनापुरामध्यें संजय धृतराष्ट्रास सांगूं लागला. २३५ आणि ह्मणाला "परिप्रकारच्या अलंकारांनीं भरलेलें, विश्वतोमुख असें विश्वस्वरूप अर्जुनानें पाहिलेलें, आपणही बहुत करून ऐकलें असालच." २३६

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः १२

[दिवि सूर्येति] तिये अंगप्रभेचा देवा । नवलावा काइंसयाऐसा सांगावा । कल्पांतीं एकचि मेळावा । द्वादशादित्यांचा होय ॥ ३७ ॥ तैसे ते दिव्यसूर्य सहस्रवरी । जरी उदयजती कां एकेचि अवसरीं । तऱ्ही तया तेजाची थोरी । उपमूं नये ॥ ३८ ॥ आघवयाची विजूंचा मेळावा कीजे । आणि प्रळयाग्नीची सर्व सामग्री आणिजे । तेवींचि दशकही मेळविजे । महातेजांचा ॥ ३९ ॥ [यदि भाः सदृशीति] तऱ्हीं तिये अंगप्रभेचेनि पाडें । हें तेज कांहीं कांहीं होईल थोडें । आणि तया ऐसें कीर चोखडें । त्रिशुद्धी नोहे ॥ २४० ॥ ऐसें माहात्म्य या श्रीहरीचें सहज । फांकतसे सर्वांगींचें तेज । तें मुनिकृपा जी मज । दृश्य जाहालें ॥ ४१ ॥

"हे राजा! त्या अंगप्रभेचा चमत्कार कशासारखा ह्मणून सांगावा? कल्पांतीं द्वादश सूर्यांचा मेळा जसा एकत्र होतो, २३७ त्यासारख्या दिव्य तेजांचे सूर्य जरी एकदम उगवले, तरी सुद्धां त्या विश्वरूपाच्या तेजाची बरोबरी होणार नाहीं. २३८ साऱ्या विद्युल्लतांचा एक गोळा केला, आणि प्रळयाग्नीची सर्व सामुग्री आणली, आणि तसलींच दहा महत्तेजेंही त्यांत मिळविलीं, २३९ तरी त्यांचें तेज, त्या विश्वरूपाच्या कांतीच्या योग्यतेला थोडें तरी कमी पडेलच पडेल. त्याच्या बरोबरीला, तर कधींच लागावयाचें नाहीं. २४० असें ह्या श्रीहरीचें महात्म्य, असें त्या सर्वांगाचें तेज तें व्यासाच्या कृपेनें मला सहजगत्या पहावयास मिळालें." २४१

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ।
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥ १३ ॥

[तत्रेति] आणि तिये विश्वरूपीं एकीकडे । जग आघवें आपुलेनि पवाडें । जैसे महोदधीमाजि बुडबुडे । सिनाने दिसती ॥ ४२ ॥ कां आकाशीं गंधर्वनगर । भूतळीं पिपीलिका बांधे घर । ना ना मेरुवरी सपुर । परमाणु जैसे॥४३॥ [अपश्यदिति] विश्व आघवेंचि तयापरी । तिया देवचक्रवर्तीचिया शरीरीं । अर्जुन तिये अवसरीं । देखता जाहाला ॥४४॥

"आणखी, आपलें हें येवढें विस्तृत जग त्या रूपामध्यें एका कोपऱ्याला, महासागरांत जसे बुडबुडे दिसावेत, २४२ किंवा आकाशांत जशा निरनिराळया ढगांच्या आकृति दिसाव्यात, किंवा भूमीमध्यें मुंगी जशी घर बांधते किंवा मेरूपर्वतावर जसे बारिक बारिक खडे असावेत, २४३ त्याप्रमाणें त्या देवाच्या विश्वरूपामध्यें हें विश्व त्या वेळीं अर्जुनाला दिसूं लागलें." २४४

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ।
प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥ १४ ॥

[तत इत्यर्धं, अत्राष्टविधसात्विकान्भावानाह—"स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विका मताः"] तेथ एक विश्व एक आपण । ऐसें अळुमाळु

१ हे राजन्. २ कशासारखा. ३ दहा प्रकारचे आवरणाग्नि. ४ योग्यतेला. ५ व्यासाच्या कृपेनें.

१ विस्तारानें. २ निरनिराळे. ३ मेघावरणांतील, कल्पित नगर. ४ बारीक, सूक्ष्म. ५ कांहींसें.

होतें जें दुजेपण । तेंही आटोनि गेलें अंतःकरण । विरालें सहसा ॥ ४५ ॥ ['स्वरभंगः'] आंतु आनंदा चेईरें जाहालें । ['स्तंभः'] बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें । ['रोमांचः'] आपाद पां गुंतलें । पुलकांचलें ॥ ४६ ॥ वार्षिये प्रथमदशे । वोहळलेया शैलांचें सर्वांग जैसें । विरूढे कोमलांकुरीं तैसे । रोमांच जाहाले ॥ ४७ ॥ ['स्वेदः'] शिवतला चंद्रकरीं । सोमकांत द्राव धरी । तैसिया स्वेदकणिका शरीरीं । दाटलिया ॥ ४८ ॥ ['वेपथुः'] माजि सांपडलेनि अलिकुळें । जळावरी कमळकळिका जेविं आंदोळे । तेविं आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें । बाहेरि कांपे ॥ ४९ ॥ ['अश्रुः'] कर्पूरकर्दळीचीं गर्भपुटें । उकलतां कापुराचेनि कोंदांटें । पुळिकां गळती तेविं थेंबुटें । नेत्रौनि पडती ॥२५०॥ ['वैवर्ण्यं'] उदयलेनि सुधाकरें । जैसा भरलाचि समुद्र भरे । तैसा वेळोवेळां ऊर्मिभरें । उचंबळत असे ॥ ५१ ॥ ['प्रलयः'] ऐसा सात्विकांहीं आठां भावां । परस्परें वर्ततसे हेवा । तेथ ब्रह्मानंदाची जीवा । रांणीव फावली ॥ ५२ ॥ [प्रणम्येति] तैसाचि तया सुखानुभावासाठीं । केला द्वैताचा सांभाळ दिठी । मग उससोनि किरीटी । वासें पाहिली ॥ ५३ ॥ तेथ बैसला होता जिर्यासवा । तियाचिकडे मस्तक खालाविला देवा । मग जोडूनि करसंपुट बरवा । बोलत असे ॥ ५४ ॥ [पश्यामीति चतुर्भिः श्लोकैः समग्रं यश आह]

"तेव्हां विश्व एक आणि आपण एक, असा जो थोडासा भिन्नभाव वाटत होता, तोही नाहींसा होऊन गेला. आणि अंतःकरण ह्मणून काय तें शून्य झालें. २४५ आंत आनंदाची जागृति झाली; बाहेर शरीराचें बळ नाहींसें झालें. आणि पायांपासून मस्तकापर्यंत रोमांचांनीं भरून गेला. २४६ वर्षाऋतूच्या प्रारंभीं पाणी वाहून गेलेल्या पर्वतांचें आंग, ज्याप्रमाणें कोमल अंकुरानें भरलेलें दिसतें, त्याप्रमाणें ते रोमांच दिसूं लागले. २४७ चंद्रकांताला, चंद्राचे किरण लागले असतां, जसे जलबिंदू बाहेर पडतात, त्याप्रमाणें घर्माचे बिंदू भरून राहिले. २४८ आणि कमळाच्या कळीमध्यें भ्रमर सांपडला ह्मणजे ती जशी पाण्यावर हेलकावे खात रहाते, त्याप्रमाणें आंतील सुखाच्या उसाळीच्या जोरानें बाहेरही कंप सुटला. २४९ कापराच्या केळीच्या गाभ्यांतील पदर सोडावयास लागलें असतां, कापराच्या विपुलतेमुळें, जशा कापराच्या रसाच्या धारा बाहेर पडतात, त्याप्रमाणें नेत्रांतून अश्रू पडूं लागले. २५० चंद्रोदय झाला असतां, ज्याप्रमाणें भरलेला समुद्रही उचंबळूं लागतो, त्याप्रमाणें आनंदाच्या लहरींनीं तो उचंबळूं लागला. २५१ अशा आठही सात्विक भावांमध्यें जेव्हां परस्पर हेवा उत्पन्न झाला, तेव्हां जीवाला ब्रह्मानंदाचें राज्य प्राप्त झालें. २५२ त्याचप्रमाणें त्या सुखाच्या पाठोपाठ दृष्टीनें द्वैताचें संरक्षण केलें. तेव्हां अर्जुनानें स्वस्थपणानें विचार केला. २५३ आणि देव प्रथम ज्या बाजूकडे बसले होते, त्या बाजूकडे वळून देवापुढें मस्तक नीट नम्र करून हात जोडून बोलूं लागला." २५४

१ जागृति. २ रोमांचांनीं. ३ वाहून गेल्यावर. ४ पर्वतांचें. ५ घर्मबिंदू. ६ भ्रमरसमुदायानें. ७ हाले, आपटे. ८ कापराच्या केळींतील. ९ गाभ्याचे पदर. १० गच्च भरल्यानें. ११ शितोडे. १२ थेंब. १३ नेत्रांतून. १४ लाटांनीं, उमाळ्यांनीं. १५ राज्य. १६ स्वस्थपणानें. १७ वाट. १८ ज्या बाजूस, ज्या सद्वर्तमान.

अर्जुन उवाच—

पश्यामि देवांस्तव देव देहे
सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ।
ब्रह्माणमीशं कमलासनस्थ-
मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ १९ ॥

[अर्जुन उवाच—पश्यामि देवांस्तव देव देहे 'अद्भुतरसः'] ह्मणे जयजयाजी स्वामी । नवल कृपा केली तुह्मी । जें हें विश्वरूप कीं आह्मी । प्राकृत देखों ॥ ५५ ॥ परि साचचि भलें केलें गोसाविया । मज परितोषें जाहाला साविया । जी देखिलासि जो इया । सृष्टीसि तूं आश्रय ॥ ५६ ॥ देवा मंदराचेनि अंगलगें । ठायीं ठायीं श्वापदांचीं दांगें । तैसीं इयें तुझ्या देहीं अनेगें । देखतसें भुवनें ॥ ५७ ॥ अहो आकाशाचिये खोळे । दिसती ग्रहगणांचीं कुळें । कां महावृक्षीं अविसांळें । पक्षिजातीचीं ॥ ५८ ॥ तयापरी श्रीहरी । तुझिया विश्वात्मकीं इये शरीरीं । स्वर्ग देखतसें अवधारीं । सुरगणेंसीं ॥ ५९ ॥ [सर्वांस्तथा भूतविशेषसंघान्] प्रभु महाभूतांचें पंचक । येथ देखत आहें अनेक । आणि भूतग्राम एकेक । भूतसृष्टीचे ॥ २६० ॥ [ब्रह्माणमीशं कमलासनस्थं] जी सत्यलोक तुजमाजि आहे । देखिला चतुरानन हा नोहे ।

१ सामान्य. २ संतोष. ३ सहज. ४ आंगावर. ५ अरण्यें. ६ डेन्यांत. ७ घरटीं. ८ प्राणिसमुदाय.

आणि येरीकडे जंव पाहें । तंव कैलासही दिसे ॥ ६१ ॥ श्रीमहादेव भवानियेसीं । तुझ्या दिसतसे एके अंशीं । आणि तूंतेंही गा हृषीकेशी । तुजमाजि देखें ॥ ६२ ॥ [ऋषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्] पैं कश्यपादिऋषिकुळें । इयें तुझिया स्वरूपीं सकळें । देखतसें पाताळें । पन्नगेंसीं ॥६३॥ किंबहुना त्रैलोक्यपती । तुझिया एकेकाचि अवयवाचिये भिंती । इयें चतुर्दशभुवनें चित्राकृती । अंकुरलीं जाणों ॥ ६४ ॥ आणि तेथिंचे जे जे लोक । ते चित्ररचना जी अनेक । ऐसें देखतसें अलोलिक । गांभीर्य तुझें ॥ ६५ ॥

तो ह्मणाला "**स्वामी! महाराज!** आपला जयजयकार असो. आपण मोठा चमत्कार दाखविलात. फार कृपा झाली कीं, आमच्यासारख्या सामान्य जनालाही विश्वरूप पहावयास मिळालें. २५५ प्रभो! खरोखरच फार उत्कृष्ट केलेंत. मला मोठा संतोष झाला. कारण, ह्या सृष्टीला आश्रयभूत असणारा जो तूं, त्या तुला पहावयाला मिळालें. २५६ देवा! **मंदराचलावर** जशीं ठिकठिकाणीं श्वापदांचीं अरण्यें लागून राहिलेलीं असतात, तद्वत् तुझ्या देहामध्यें अनंत ब्रह्मांडें भरलेलीं आहेत. २५७ अहो! आकाशकटाहामध्यें जसे नक्षत्रांचे पुंज दिसतात, किंवा प्रचंड वृक्षांवर नाना प्रकारच्या पक्ष्यांचीं कोटीं लागून रहातात, २५८ त्याप्रमाणें हे **श्रीहरी!** तुझ्या ह्या विश्वात्मक देहामध्यें देवांसहवर्तमान स्वर्ग सुद्धां दिसत आहे कीं हो! २५९ प्रभो! महाभूतांच्या पंचकड्या तर येथें अनेक आहेत. आणि प्राणिमात्रांपैकीं एकूनएक प्राणी ह्यांत आहे. २६० महाराज! **सत्यलोक**ही आपल्यामध्यें आहे. हा दिसतो आहे, हा ब्रह्मदेवच नव्हे काय? आणि हा पहा, इकडे **कैलास**ही दिसतो आहे. २६१ तुझ्या एका अंशामध्यें, **पार्वती**-सहवर्तमान **शंकर** दिसत आहेत. आणि हे **हृषीकेशा!** तुलाही मी तुझ्यामध्यें पहातोंच आहें. २६२ **कश्यप** आदिकरून ऋषींचीं सारीं कुळें तुझ्या ह्या स्वरूपामध्यें आहेत. आणि सर्पांसहवर्तमान पाताळेंही त्यांत दिसत आहेत. २६३ इतकेंच नव्हे, तर हे **त्रैलोक्यनाथा!** तुझ्या एकएका अवयवरूप भिंतीवर हीं चवदा भुवनें चित्रासारखीं चितारलीं आहेत असें वाटतें. २६४ आणि त्यांतले जे जे लोक आहेत, त्यांचीं आणखी किती तरी चित्रें काढलेलीं आहेत. असें तुझें केवळ अलौकिक असें अगाधपण आज पहावयास मिळालें." २६५

१ पार्वतीसह. २ सर्पांसह. ३ चितारलीं. ४ लोकोत्तर. ५ अगाधपण.

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं
पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ।
नांतं न मध्यं न पुनस्तवादिं
पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपम् ॥ १६ ॥

[अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं] या दिव्यचक्षूचेनि पैसें । चहूंकडे जंव पाहत असें । तंव दोर्दंडिकीं जैसें । आकाश कोंभैलें ॥६६॥ तैसे एकचि निरंतर । देवा देखत असें तुझे कर । करीत आघवेचि व्यापार । एकेचि काळीं ॥ ६७ ॥ मग महाशून्याचेनि पैसारें । उघडलीं ब्रह्मकटाहाचीं भांडारें । तैसीं देखतसें अपारें । उदरें तुझीं ॥ ६८ ॥ जीं सहस्रशीर्षाचे दाखले । कोटीवरी होताति एकीवेळे । कीं परब्रह्मचि वदनफळें । मोडोनि आलें ॥ ६९ ॥ तैसीं वक्त्रें जेउतीं तेउतीं । तुझीं देखतसें विश्वमूर्ती । आणि तयाचिपरि नेत्रपंक्ति । अनेका सैंघ ॥ ७० ॥ [त्वां सर्वतोऽनंतरूपं] हें असो स्वर्गपाताळ । कीं भूमी दिशा अंतराळ । हे विवक्षा ठेली सकळ । मूर्तिमय देखतसें ॥ ७१ ॥ तुजवीण एकादियाकडे । परमाणूहि एतुलें कोंडे । अवकाश पाहातसें परि न सांपडे । ऐसें व्यापिलें तुवां ॥ ७२ ॥ इयें नानापरी अपरिमितें । जेतुलीं सांठविलीं होतीं महाभूतें । तेतुलाही पवाडे तुवां अनंतें । कोंदलें देखतसें ॥ ७३ ॥ ऐसा कवणेठायाहूनि तूं आलासी । एथ बैसलासि कीं उभा आहेसी । आणि कवणिये मायेचिये पोटीं होतासी । तुझें ठाणें केवढें ॥ ७४ ॥ तुझें रूप वय कैसें । तुज पैलीकडे काय असे । तूं काियसयावरी आहासि ऐसें । पाहिलें मियां ॥ ७५ ॥ तंव देखिलें जी आघवेंचि । तरि आतां तुझा ठाव तूंचि । तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि । अनादि आयता ॥ ७६ ॥ तूं उभा ना बैठा । दिघडा ना खुजटा । तुज तळीं वरी वैकुंठा । तूंचि

१ मार्गानें. २ बाहुदंडांत. ३ उपजलें, भरलें. ४ केवळ ब्रह्माचे. ५ विस्तारानें. ६ भरभरून. ७ जिकडे तिकडे. ८ पुष्कळ. ९ बोलण्याची इच्छा. १० येवढा देखील. ११ विस्तार. १२ व्यापलेला. १३ स्थान, आकृति. १४ जन्मरहित, मूळ. १५ दीर्घ. १६ लघु.

आहासी ॥ ७७ ॥ तूं रूपें आपणयांचि ऐसा । देवा तुझी तूंचि वयसा । पाठी पोट परेशा । तुझें तूं गा ॥ ७८ ॥ किंबहुना आतां । तुझें तूंचि आघवें अनंता । हें पुढतपुढती पाहातां । देखिलें मियां ॥ ७९ ॥ [नांतं न मध्यं न पुनस्तवादिं] परि या तुझिया रूपाआंत । जी उणीव एक असे देखत । जे आदि मध्य अंत । तीन्ही नाहीं ॥ २८० ॥ येन्हवीं गिंवसिलें आघवाठायीं । परि सोयें न लाहेचि कहीं । म्हणोनि त्रिशुद्धी हे नाहीं । तिन्ही एथ ॥ ८१ ॥ एवं आदिमध्यांतरहिता । [पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपं] तूं विश्वेश्वरा अपरिमिता । देखिलासि जी तत्त्वता । विश्वरूपा ॥ ८२ ॥ तुज महामूर्तीचिया आंगीं । उमटलिया पृथक् मूर्ती अनेगी । लेइलासि वानेपरिची आंगीं । ऐसा आवडतु आहासी ॥८३ ॥ नाना पृथक् मूर्ती तिया द्रुमवेली । तुझिया स्वरूपमहाचळीं । दिव्यालंकार फुलीं फळीं । सासिन्नलिया ॥ ८४ ॥ हो कां जे महोदधी तूं देवा । जाहालासि तरंगमूर्तीहिलावा । कीं तूं एक वृक्ष बरवा । मूर्तिफळीं फळलासी ॥ ८५ ॥ जी भूतीं भूतळ मांडिलें । जैसें नक्षत्रीं गगन गुर्डारलें । तैसें मूर्तिमय भरलें । देखतसें तुझें रूप ॥ ८६ ॥ जी एकेकीच्या अंगप्रांतीं । होय जाय हे त्रिजगती । एवढिया ही तुझ्या आंगीं मूर्ती । कीं रोमीं जालिया ॥ ८७ ॥ ऐसा पसाडे मांडूनि विश्वाचा । तूं कवण पां एथ कोणाचा । हें पाहिलें तंव आमुचा । सारथी तोचि तूं ॥ ८८ ॥ तरि मज पाहातां मुकुंदा । तूं ऐसाचि व्यापक सर्वदा । मग भक्तानुग्रहें तया मुग्धा । रूपातें धरिसी ॥ ८९ ॥ कैसें चहूं भुजांचें सांवळें । पाहतां वोल्हावती मन डोळे । खेंवें देऊं जाइजे तरि आंकळे । दोहींचि बाहीं ॥ २९० ॥ ऐसी मूर्ति कोडिसवाणी कृपा । करूनि होसी ना विश्वरूपा । कीं आमुचियाचि दिठीस लेपा । जे सामान्यत्वें देखती ॥ ९१ ॥ तरी आतां दिठीचा विटाळ गेला । तुवां सहजें दिव्यचक्षू केला । म्हणोनि यथारूपें देखवला । महिमा तुझा ॥ ९२ ॥ परि मकरतुंडेंमागिलेकडे । होतासि तोचि तूं एवढें । रूप जाहालासि हें फुडें । बोळखिलें मियां ॥ ९३ ॥

"**देवा!** ह्या दिव्य दृष्टीच्या द्वारानें चहूंकडे पाहूं लागावें तों, बाहुदंडापासून आकाशाला कोंभ फुटल्याप्रमाणें, २६६ तुझे सारे हात, एकाच वेळेला अनेक व्यापार करीत असलेले दृष्टीस पडतात. २६७ त्याचप्रमाणें केवळ ब्रह्मरूप विस्तारानें अनंत ब्रह्मांडांचीं भांडारें उघडल्याप्रमाणें तुझीं अपार उदरें दिसत आहेत. २६८ महाराज! आपणांस **'सहस्रशीर्ष'**–हजार मस्तकांचें–असें म्हटलें आहे, त्याचा दाखला येतो येवढेंच नव्हे, तर तीं एखादे वेळीं कोट्यावधि सुद्धां दृष्टीस पडतात. सारें परब्रह्म वदनांनींच लकटलेलें असावें, २६९ त्याप्रमाणें जितकीं तोंडें तितक्या तुझ्या मूर्ती दृष्टीस पडत आहेत. आणि त्याप्रमाणेंच डोळ्यांच्याही रांगांच्या रांगा लागून गेल्या आहेत. २७० हें असो. पण स्वर्ग, पाताळ, भूमि, दिशा किंवा आकाश हें बोलणें सुद्धां खुंटलें. कारण सारें मूर्तिमयच होऊन गेलें आहे. २७१ तुझ्याशिवाय एखाद्या ठिकाणीं अणूरेणू तरी राहील, येवढी रिती जागा पाहतों आहें, परंतु सांपडत नाहीं. इतकें तूं व्यापून टाकलेंस. २७२ **अनंता!** हीं नाना प्रकारचीं अपरिमित पंच महाभूतें जितकीं सांठलीं होतीं, तितका सारा विस्तार आपण व्यापून टाकला आहांत. २७३ असा जो तूं, तो कोणत्या स्थानाहून आलास? येथें बसला आहेस का उभा आहेस? आणि कोणत्या मायेच्या पोटांत होतास? आणि तुझा आकार तरी केवढा? २७४ तुझें रूप कसलें? तुझें वय किती? तुझ्या पलीकडे काय आहे? तूं कशावर आहेस? हें सर्व मीं पाहिलें. २७५ तेव्हां **प्रभो!** सर्व गोष्टींचा उलगडा झाला. तर आतां तुझें स्थान तूंच. तुझ्यायेवढा तूंच. तूं असाच जन्मरहित आणि स्वयंभू आहेस. तूं कोणाचाच नव्हेस. २७६ तूं उभाही नव्हेस व बसलेलाही नव्हेस. तूं उंचही नव्हेस व ठेंगणाही नव्हेस. हे **वैकुंठपते!** तुझ्या खालीं आणि वर तूंच. २७७ रूपानें तुझ्यासारखा तूंच. वडील धाकटा तुझा तूंच. हे **परेशा!** पाठ पोटही तुझें तूंच. २७८ येवढेंच नव्हे, तर **अनंता!** आतां येथें पुन्हा पुन्हा पाहिलें तरी

१ शोधलें. २ सर्व ठिकाणीं. ३ पत्ता, ठिकाण. ४ अनेक प्रकारचे रंग. ५ वाटतो आहेस. ६ वृक्ष व वेली. ७ भरास आल्या. ८ आच्छादिलें, व्यापलें. ९ अंगप्रदेशांत. १० त्रैलोक्य. ११ रोमांत झाल्या किंवा रोम झाल्या. १२ विस्तार. १३ शांत होतात. १४ आलिंगन. १५ सांपडतें. १६ लहान, गोजिरवाणी. १७ मलिन दृष्टीला. १८ साधारणपणानें. १९ यथासांग, नखशिखांत. २० मगराच्या तोंडाच्या आकाराचा रथाचा भाग. २१ स्पष्ट.

तुझा तूंच दिसतो आहेस. २७९ मात्र ह्या तुझ्या स्वरूपामध्यें एक उणीव दिसते. ती हीच कीं, ह्या तुझ्या रूपाला आदि, मध्य व अंत नाहीं. २८० बाकी, शोधूं गेलें तर सर्व ठिकाणीं आहे. पण सीमा मात्र कोठें मिळावयाची नाहीं. ह्मणून आदि, मध्य व अंत हीं तिन्ही नाहींत हें अगदीं खरें आहे. २८१ अशा प्रकारें आदि, मध्य, अंतरहित असणाऱ्या! हे **अपरिमिता!** हे **विश्वरूप विश्वेश्वरा!** तशा प्रकारें तूं आज पहावयास मिळालास. २८२ तुझ्या विशाळ स्वरूपामध्यें अनेक मूर्ती उत्पन्न झालेल्या असून त्यांस नाना प्रकारचे रंग आहेत असें वाटतें. २८३ किंवा निरनिराळ्या मूर्ती ह्याच कोणी वृक्षवल्ली, त्या तुझ्या महत्स्वरूपरूपी पर्वतावर दिव्य अलंकाररूप पुष्पांनीं व फळांनीं गजबरून गेल्या आहेत. २८४ किंवा **देवा!** तूं महासागर, आणि मूर्ती ह्या लाटा, तुजवर हेलकावे खात आहेत. किंवा आपण एक वृक्ष, व मूर्ती हीं फळें, त्यानें तूं लकडून गेला आहेस. २८५ **महाराज!** पंचमहाभूतांनीं ज्याप्रमाणें रसातळ वेढून टाकलें आहे; २८६ नक्षत्रांनीं जसें आकाश व्याप्त करून टाकलें आहे; त्याप्रमाणें तुझें रूप मूर्तींनीं भरून गेलें महाराज! एकएका मूर्तीच्या आंगप्रदेशामध्यें हें त्रैलोक्य उत्पन्न होतें आणि लयास जातें. येवढाल्या एकएक मूर्ती तुझ्या आंगावर केंसाप्रमाणें गजबरल्या आहेत. २८७ असा विश्वांचा विस्तार करणारा तूं कोण? आणि कोणाचा? ह्याचा विचार केला तर, आमचा सारथी तोच तूं. २८८ तर **मुकुंदा!** मला वाटतें कीं, तूं असाच सदासर्वकाल सर्वव्यापीच आहेस. पण भक्तांवर अनुग्रह करण्यासाठींच तूं सगुणरूप धारण करतोस. २८९ अहाहा! ती चतुर्भुज श्याममूर्ती किती सुंदर! जिला पाहतांच मन आणि डोळे तृप्त होतात. आणि आलिंगन द्यावयास गेलें, तर दोहों हातांत सुद्धां सांपडते. २९० हे **विश्वरूपा!** ती गोजिरवाणी मूर्ती कृपा करून पुन्हा व्हालना? जी आमच्या मलिन दृष्टीला केवळ सामान्य दिसते. २९१ पण आतां दृष्टीचाही विटाळ निघून गेला. कारण, आपण सहज दिव्यचक्षु करून सोडलें. ह्मणून नखशिखांत तुझा महिमा पहावयास मिळाला. २९२ तरी नक्रमुखाच्या मागच्या बाजूस होतास, तोच तूं येवढें रूप झालास हें खरोखर ओळखलें." २९३.

किरीटिनं गदिनं चक्रिणं च
तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतम् ।
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समंतात्
दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ १७ ॥

[किरीटिनं गदिनं चक्रिणं च] नोहे तोचि हा शिरीं । मुकुट लेइलासि श्रीहरी । परि आतांचें तेज आणि थोरी । नवल कीं बहु हें ॥९४॥ तेचि हें वरिलीयेचि[1] हातीं । चक्र परिजितयां[2] आयती । सांवरितासि विश्वमूर्ती । ते न मोडे खूण ॥ ९५ ॥ येरीकडे तेचि हे नोहे गदा । आणि तळिलिया दोनी भुजा निरायुधा । वागोरे[3] सांवरावया गोविंदा । संसरिलियां[4] ॥९६॥ आणि तेणेंचि वेगें सहसा । माझिया मनोरथासरिसा । जाहालासि विश्वरूपा विश्वेशा । ह्मणोनि जाणें ॥ ९७ ॥ [तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतं] परि कायसें वा हे चोज[5]। विस्मय करावयाहि पाड[6] नाहीं मज । चित्त होऊनि जातसे निर्बुजें[7]। आश्चर्य येणें ॥ ९८ ॥ हें एथ आथी कां येथ नाहीं । ऐसें आसोंही नये कांहीं । नवल अंगप्रभेची नवाई[8]। कैसी कोंदली सैंघ[9] ॥ ९९ ॥ [दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयं] एथ अग्नीचीही दिठी करपत[10] । सूर्य खद्योत तैसा हारपत । ऐसें तीव्रपण अद्भुत । तेजाचें यया ॥ ३०० ॥ हो कां महातेजाचिया महार्णवीं । बुडोनि गेली सृष्टि आघवी । कीं युगांतविजूंच्या पालवीं[11] । झांकलें गगन ॥ १ ॥ नातरी संहारतेजाचिया ज्वाळा । तोडोनि मांचे[12] बांधला अंतराळां । [दुर्निरीक्ष्यं] आतां दिव्य ज्ञानाचिया डोळां । पाहवेना ॥ २ ॥ उज्वळ अधिकाधिक बहुवस । घडाडीत आहे अतिदाहस[13] । पडत दिव्यचक्षूसही त्रास । न्याहाळितां ॥ ३ ॥ हो कां जे महाप्रळयींचा भडाडें[14] । होता काळाग्निरुद्राचिया ठायीं गूढें[15] । तो तृतीयनयनाचा मेढ[16] । फुटला[17] जैसा ॥ ४ ॥ तैसें पसरलेनि प्रकाशें । सैंघ पांचवनि[18]चेया ज्वाळांचे वळसे[19] । पडता ब्रह्मकटाह कोळिसे । होत

१ वरच्याच. २ धरलेल्या. ३ दोर. ४ सरसावल्या. ५ नवल. ६ योग्यता. ७ थक्क, मोहित. ८ चमत्कार. ९ बहुत. १० दिपून जातो. ११ पडद्यानें. १२ मंडप. १३ धगधगीत. १४ भडभडाट. १५ गुप्त. १६ कलिका. १७ फुलली. १८ प्रलयानल, विद्युदानल, वडवानल, शिवनेत्रानल व द्वादशादित्यानल, ह्या पंचाग्नींच्या. १९ वेढे.

आहाती ॥ ५ ॥ [पश्यामि त्वां] ऐसा अद्भुत तेजोराशी । जन्मा नवल म्यां देखिलासि । नाहीं व्याप्ती आणि कांतीसी । पार जी तुझिये ॥ ६ ॥

"हे श्रीहरी! आपण सांप्रत जो मुकुट घातला आहां, तो पूर्वींचाच ना? परंतु आतांची थोरवी आणि प्रभाव कांहीं विशेष दिसतो, हें केवढें आश्चर्य! २९४ ही विश्वमूर्ति हातांत चक्र घेऊन परजीत आहे. परंतु पूर्वींच्या हातांत असलेलें चक्र तेंच हें, ही खूण कांहीं मोडलेली नाहीं. २९५ पूर्वींच्या हातांत गदा होती, तीच ही गदा नव्हे काय? आणि गोविंदा! आयुधाशिवाय शोभत असलेले हे दोन हात, तेच पूर्वी घोड्याचे लगाम धरण्यास सरसावले होते नव्हे काय? २९६ आणि विश्वेशा! त्याच हिरहिरीसरशीं माझ्या हेतूबरोबर आपण एकदम विश्वरूप झालांत. हें मला समजून चुकलें. २९७ परंतु प्रभो! हे केवढें हो आश्चर्य! विस्मय मानावयाला सुद्धां मला देहभान राहिलें नाहीं किं हो! ह्या अपूर्वतेच्या योगानें माझें चित्त अगदीं थक्क होऊन गेलें आहे. २९८ हें येथें आहे किंवा नाहीं, हेंही लक्ष्यांत येत नाहीं. आणि अंगकांतीची अपूर्वता तरी काय? आणि ह्या मूर्ती तरी किती खेंचून भरल्या आहेत! २९९ येथें अग्नीची दृष्टीही करपून जाते; सूर्य तर काजव्याप्रमाणें फिका पडतो; इतका ह्या तेजाचा प्रखरपणा आहे. ३०० अहो! महातेजाच्या महासागरांत सारी सृष्टी बुडून गेली, किंवा युगांताच्या विद्युल्लतेनें गगन सारें आच्छादून गेलें, ३०१ किंवा संहारतेजाच्या ज्वाळा तोडून अंतरिक्षांत मंडप घातला, त्यामुळें आतां दिव्यज्ञानचक्षूंनीं सुद्धां त्याच्याकडे पहावत नाहीं. ३०२ अधिकाधिक देदीप्यमान आणि उज्ज्वळ असल्यानें अतिशय दाहक अशा ज्वाळा धडधडत आहेत. त्या पाहतांना दिव्य चक्षूंनाही त्रास होतो. ३०३ किंवा काळाग्निरुद्रामध्यें गुप्त असलेला जो महाप्रलयकाळचा भडाका, तो तृतीय नयनाची कळी उमलून जसा बाहेर पडावा, ३०४ त्याप्रमाणें ह्या पसरलेल्या प्रकाशानें, आणि (प्रलयानल, विद्युदानल, वडवानल, शिवनेत्रानल, आणि द्वादशादित्यानल) पंचाग्नींच्या ज्वालांचे वळसे पडल्याच्या योगानें ब्रह्मांडाचे कोळसे होत आहेत. ३०५ अशी अद्भुत तेजाची रास, साऱ्या जन्मांतही तुमचीच पाहिली. महाराज! तुमच्या कांतीला आणि व्याप्तीला पार नाहीं." ३०६

त्वमक्षरं परमं वेदितव्यं
त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता
सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥

अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।

[त्वमव्यय इति] देवा तूं अक्षर । औटावियें मात्रेसि पर । श्रुती जयाचें घर । गिंवसीतें आहाती ॥ ७ ॥ जें आकाराचें आयतन । जें विश्वनिक्षेपैकनिधान । [त्वमस्य विश्वस्य परं निधानं] तें अव्यय तूं गहन । अविनाश जी ॥ ८ ॥ तूं धर्माचा वोलावा । अनादिसिद्ध तूं नित्य नवा । जाणें मी सतीसावा । पुरुष विश्वेश तूं ॥ ९ ॥ [अनादिमध्यांतमनंतवीर्यं] तूं आदिमध्यांतरहित । स्वसामर्थ्यें तूं अनंत । विश्वबाहु अपरिमित । विश्वचरण तूं ॥ १० ॥ [शशिसूर्यनेत्रं] पैं चंद्र चंडांशु डोळां । दावितासि कोपप्रसाद लीळा । एकां रुससी तमाचिया डोळां । एकां पाळितोसि कृपादृष्टी ॥ ११ ॥ [पश्यामीत्यादिसार्धत्रयोदशभिः श्लोकैः समग्रं वैराग्यमाह]

"देवा! तूं अविनाशी; साडे तीन मात्रांच्या पलीकडचा. वेद ज्याचें घर शोधीत आहेत, ३०७ प्रभो! जें आकाराचें स्थान; विश्व ठेवण्याचें भांडार; गहन, नाश न होणारें असें जें अव्यय तें तूं. ३०८ धर्माचा ओलावा तूं. अनादिसिद्ध, नित्य, नवा तूं. सदतिसावा पुरुष जो विश्वेश तो तूं. हेंही मीं ओळखलें. ३०९ आदि, मध्य, अंतरहित तूं. स्वसामर्थ्यानें अनंत तूं. अपरिमित विश्वबाहु, विश्वचरण तूं. ३१० चंद्रसूर्यासारख्या डो-

१ साडेतीन मात्रांच्या पलीकडे. २ शोधितात. ३ घर. ४ विश्व ठेवण्याची जागा. ५ छत्तीस तत्त्वांहून निराळा. ६ सूर्य.

**ळयांनीं कोपाची आणि प्रसादाची लीला दाखविणारा तूंच. एकावर तमाच्या डोळयानें रुष्ट होतोस; आणि एकावर कृपादृष्टी करून पालन करतोस." ३११**

पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं
स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥ १९ ॥

[पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं] जी एवंविधा तूतें । मी देखतसें हें निरुतें । पेटलें प्रळयाग्नीचें उजितें । तैसें वक्त्र हें तुझें ॥ १२ ॥ वणिवेनि पेटले पर्वत । कवळूनि ज्वाळांचे उभेंड उठत । तैसी चाटीत दाढा दांतांत । जीभ लोळे ॥ १३ ॥ [स्वतेजसा विश्वमिदं तपंतं] इये वदनींचिये उबा । आणि जी सर्वांगकांतीचिया प्रभा । विश्व तातलें अति क्षोभा । जात आहे ॥ १४ ॥

**" महाराज ! ह्याप्रमाणें तुह्मी मला दिसतां हें खचित. प्रळयाग्नीचा लखलखाट पडावा त्याप्रमाणें हें तुमचें तोंड आहे. ३१२ वणव्यानें पेटलेले पर्वत जसे ग्रासून जाऊन त्याच्या ज्वाळा उठतात, त्याप्रमाणें दांतांमध्यें दाढा चाटित तुमची जीभ लळलळते आहे. ३१३ ह्या तोंडाच्या वाफेनें आणि सर्वांगाच्या दैदीप्यमान तेजानें विश्व पोळून अतिशय त्रस्त झालें आहे." ३१४**

द्यावापृथिव्योरिदमंतरं हि
व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।
दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं
लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥

[द्यावापृथिव्योरिति] कां जे द्यौलोकें आणि पाताळ । पृथिवी आणि अंतराळ । अथवा दशदिशा समाकुळ । दिशाचक्र ॥ १५ ॥ हें आघवेंचि तुवां एकें । भरलें देखत आहें कौतुकें । परि गगनाही सकट भयानकें । आप्लविजे जेविं ॥ १६ ॥ [दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं] नातरी अद्भुतरसाचिया कल्लोळीं । जाहाली चवदाही भुवनासि कडियोळी । तैसें आश्चर्यच मग मी आकळीं । काय एक ॥ १७ ॥ नावरे व्याप्ती हे असाधारण । न साहवे रूपाचें उग्रपण । सुख दूरी गेलें परी प्राण । विपायें धरी जग ॥ १८ ॥ देवा ऐसें देखोनि तूतें । नेणों कैसें आलें भयाचें भरितें । [लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन्] आतां दुःखकल्लोळीं झळंबतें । तीन्हीं भुवनें ॥ १९ ॥ येऱ्हवीं तुज महात्मयाचें देखणें । तरि भयदुःखासि कां मेळवणें । परि हें सुख नव्हेचि जेणें गुणें । तें जाणवत आहे मज ॥ ३२० ॥ जंव तुझें रूप नोहे दिठें । तंव जगासि संसारिक गोमटें । आतां देखिलासि तरि विषयविटें । उपजला त्रास ॥ २१ ॥ तेव्हांचि तुज देखिलियासाठीं । काय सहसा तुज देवों येइल मिठी । आणि नेदीं तरी शोकसंकटीं । राहों केविं ॥ २२ ॥ ह्मणोनि मागां सरों तंव संसार । अडवीत येतसे अनिवार । आणि पुढां तूं तंव अनावर । नयेसि घेवों ॥ २३ ॥ ऐसा माझारिलियो सांकडां । बापुडया त्रैलोक्याचा होतसे हुरडा । ऐसा हा ध्वनी जी फुडा । चोजवला मज ॥ २४ ॥ जैसा आरंवळला आगीं । तो समुद्राये निवावयालागीं । तंव कल्लोळपातियांचिया तरंगीं । आगळो विहे ॥ २५ ॥ तैसें या जगासि जाहालें । तूतें देखोनि तळमळित ठेलें ॥

**" कारण कीं स्वर्ग आणि पाताळ, पृथ्वी आणि अंतरिक्ष; अथवा दाही दिशा आणि ह्मा ढून कोपरान् कोपरा, ३१५ हीं सारीं तूं एकट्यानें भरलीं आहेस. हें मोठें आश्चर्य वाटतें. परंतु गगनासह वर्तमान सारें भयंकर रीतीनें बुडून जावें त्याप्रमाणें, ३१६ किंवा अद्भुत रसाच्या खळाळांत चौदा भुवनेंही गटकळ्या खावींत त्याप्रमाणें जिकडे तिकडे आश्चर्यमयच होऊन राहिलें आहे. तेव्हां आतां मी काय काय व कोणकोणतें ह्मणून पाहूं? ३१७ ही व्यापकता कांहीं विलक्षण आहे. ती आटोक्यांत येत नाहीं. रूपाची उग्रता सहन होत नाहीं. ३१८ देवा! अशा तुह्मांला पाहून भयाचें भरतें कसें आलें आहे, तें सांगण्याची सोय नाहीं. सांप्रत दुःखांच्या कल्लोळामध्यें त्रैलोक्य बुडतें आहे. ३१९ बाकी, तुमच्यासारख्या माहात्म्याच्या दर्शनानें भय आणि दुःख कां प्राप्त व्हावें? पण तें ज्या रीतीनें मला दिसतें आहे, त्या रीतीनें मात्र सुख ह्मणून होणार नाहींच. ३२० तुझें रूप जोंपर्यंत दृष्टिगोचर झालें नाहीं, तोंपर्यंत जगाला सांसारिक सुख गोड वाटतें. आतां**

१ खरोखर. २ लखलखाट. ३ उमाळे. ४ उबाऱ्यानें. ५ पोळलें. ६ स्वर्ग. ७ अंतरिक्षलोक. ८ बुडवावें. ९ वेष्टण. १० कष्टानें.

१ बुडतात. २ दृष्टिगोचर. ३ मधल्या कचाटींत. ४ लाही, भाजणूक. ५ संशय. ६ स्पष्ट. ७ वाटला. ८ पोळला. ९ अधिक.

प्रत्यक्ष आपलें दर्शन झालें, त्यामुळें विषयांचा वीट येऊन त्रास उत्पन्न होत आहे. ३२१ तसेंच तुमचें दर्शन झालें ह्मणून, तुला एकदम जाऊन मिठी तरी घालतां येते काय? आणि न घालावी, तर ह्या शोकसंकटांत रहावें तरी कसें? ३२२ बरें; त्याकरितां मागें सरावें, तर हें अनिवार जन्ममरण आडवें येत आहे. आणि समोर आपण तर केवळ अनावर(अनंत) आहांत. आपलेंही आकलन करितां येत नाहीं. ३२३ अशा पेंचामध्यें बापड्या त्रैलोक्याचा हुरडा होत आहे. प्रभो! अशी ही अडचण माझ्यापुढें स्पष्ट येऊन उभी राहिली आहे. ३२४ ज्याप्रमाणें आगीनें पोळलेला मनुष्य, शांत होण्यासाठीं समुद्रापाशीं यावा; आणि समुद्राचा खळाळ पाहून अधिकच भ्यावा, ३२५ त्याप्रमाणें ह्या जगाला झालें आहे. तें तुला पाहून तळमळत सुटलें आहे."

अमी हि त्वां सुरसंघा विशंति
केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति ।
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः
स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥२१॥

['भयानकरसः' अमी हि त्वां सुरसंघाः विशंति] यामाजि पैल भले। सुरांचे मेळावे ॥ २६ ॥ हे तुझेनि आंगिकें तेजें। जाळूनि सर्वकर्मांचीं बीजें। मिळत तुजआंत निजे। सद्भावेंसीं ॥ २७ ॥ [केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति] आणिक एक सावियेचि भयभीरु। सर्वस्वें धरूनि तुझी मोहरु। तुज प्रार्थिताति कर। जोडोनियां ॥ २८ ॥ देवा अविद्यार्णवीं पडिलों। जी विषयवागुरे आतुडलों। स्वर्गसंसाराचिया सांकडलों। दोहीं भागीं ॥ २९ ॥ ऐसें आमुचें सोडवणें। तुजवांचोनि कीजेल कवणें। तुज शरण गा सर्वप्राणें। ह्मणत देवा ॥ ३० ॥ [स्वस्तीति] आणि महर्षी अथवा सिद्ध। विद्याधरसमूह विविध। हे बोलत तुज स्वस्तिवाद। करिती स्तवन ॥ ३१ ॥

"ह्या स्वरूपांमध्यें पलीकडे देवांचे मोठमोठे समुदाय, ३२६ हे तुमच्या आंगच्या प्रभेनें, सर्व कर्मांचीं बीजें जाळून टाकून आत्मभावानें तुझ्यांत मिळून जात आहेत. ३२७ कितीएक सहज भयाभीत होऊन तुजपुढें उभे राहून, हात जोडून तुझी प्रार्थना करीत आहेत. ३२८ 'प्रभो! देवा! आह्मी अज्ञानसागरांत पडलों आहों; विषयाच्या जाळ्यांत गुरफटलों आहों; स्वर्ग आणि संसार ह्या दोहोंच्या कचाट्यांत सांपडलों आहों; ३२९ ह्यांतून तुमच्याशिवाय दुसरा कोण सोडवील? देवा! जिवेंभावेंकरून तुह्मांला शरण आहों' असें ह्मणत आहेत. ३३० आणखी महर्षी अथवा सिद्ध, नाना प्रकारच्या वेदवेत्त्यांचे समुदाय आपणांस 'स्वस्ति' 'क्षेम' बोलत आहेत, व स्तुति करीत आहेत." ३३१

रुद्रादित्या वसवो ये च साध्या
विश्वेश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ।
गंधर्वयक्षासुरससिद्धसंघा
वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥

[रुद्रादित्या इति] हे रुद्रादित्यांचे मेळावे। वसु हन साध्य आघवे। अश्विनौ देव विश्वेदेव विभवें। वायुही हे जी ॥३२॥ अवधारा पितर [गंधर्वयक्षासुरसिद्धसंघाः] हन गंधर्व। पैल यक्षरक्षोगण सर्व। जी महेंद्रमुख्य देव। कां सिद्धादिक ॥ ॥ ३३ ॥ [वीक्षंते त्वां विस्मताश्चैव सर्वे] हे आघवेचि आपुलालिया लोकीं। उत्कंठित अवलोकीं। हे महामूर्ती दैविकी। पहात आहती ॥३४॥ मग पाहत पाहत प्रतिक्षणीं। विस्मित होऊनि अंतःकरणीं। [स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः श्लो. २१] करित निजमुकुटीं वोवाळणी। प्रभुची तुज॥३५॥ ते जयजय घोष कलरवें। स्वर्ग गाजविती आघवें। ठेवित ललाटावरी बरवे। करसंपुट ॥ ३६ ॥ तिये विनयद्रुमांचिये अटवीं। सुरवाडेंली सात्विकांची माधवी। ह्मणोनि करसंपुटपल्लवीं। तूं होतासि फळ ॥ ३७ ॥

"महाराज! हे रुद्रांचे व आदित्यांचे समुदाय, वसू आदिकरून सर्व अश्विनीकुमार, वैभवयुक्त वायु, आणि विश्वदेवही, ३३२ आणखी ऐका. पितर; तसेच गंधर्व; पलीकडे यक्षरक्षांचे सर्व समुदाय; आणखी प्रभो! देवांचा राजा इंद्र, आणि सिद्ध आदीकरून ३३३ हे सारेच पहा! आपआ-

१ समुदाय. २ सहजच. ३ मार्ग. ४ हात. ५ विषयरूप जाळ्यांत. ६ सांपडलों. ७ पेंचांत पडलों. ८ आशीर्वाद.

१ वैभवानें. २ इंद्रादिक. ३ देवस्वरूप. ४ मंजुळ शब्दानें. ५ विनयरूप वृक्षांच्या. ६ अरण्यामध्यें. ७ अनुकूल झाला. ८ वसंतकाळ.

पल्या लोकांमध्यें उत्कंठित होऊनही देवस्वरूप महामूर्ती पहात आहेत. ३३४ आणि पहातांपहातां अंतःकरणांत क्षणोक्षणीं विस्मित होऊन हे **प्रभुराज**! तुम्हांला आपुल्या मुकुटाची ओवाळणी करीत आहेत. ३३५ त्या सर्वांनीं जयघोषाच्या मंजुळ ध्वनीनें सारा स्वर्ग घुमवून सोडला आहे. आणि भक्तिभावानें कपाळावर बद्धांजुलि ठेवित आहेत. ३३६ त्या विनयवृक्षांच्या अरण्यामध्यें सात्विक भावांची पालवी फुटली. म्हणून करसंपुटपल्लवांमध्यें आपण फलद्रूप झालांत." ३३७

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं
महाबाहो बहुबाहूरुपादम् ।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं
दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाऽहम् ॥ २३ ॥

[रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं] जी लोचनां भाग्य उदेलें । मना सुखाचें सुयोगें पाहलें । जे अगाध तुझें देखिलें । विश्वरूप इहीं ॥ ३८ ॥ हें लोकत्रयव्यापक रूपडें । पाहातां देवांही वचक पडे । याचें सन्मुखपण जोडे । भलतयाकडुनी ॥३९॥ ऐसें एकचि परि विचित्रें । आणि भयानक वक्त्रें । बहुलोचन [महाबाहो बहुबाहूरुपादं] हे सशस्त्रें । अनंतभुज ॥३४०॥ अनंत ऊरु बाहु चरण । [बहूदरं बहुदंष्ट्राकरालं] बहूदर आणि नानावर्ण । कैसें प्रतिवदनीं मातलेंपण । आवेशाचें ॥ ४१ ॥ हो कां महाकल्पाचिया अंतीं । तेवकलेनियमें जेउततेउतीं । प्रळयाग्नीचीं उजितीं । आंवुखिलीं जैसीं ॥४२॥ नातरी संहारत्रिपुरारीची यंत्रें । कीं प्रळय भैरवाचीं क्षेत्रें । नाना युगांतशक्तीचीं पात्रें । भूतखिचा वोडविलीं ॥ ४३ ॥ तैसीं जियेतियेकडे । तुझीं वक्त्रें जीं प्रचंडें । न समाती दरीमाजि सिंहाडें । तैसे दशन दिसती रागिट ॥ ४४ ॥ जैसें काळरात्रीचेनि आधारें । उल्हासत निघती संहारखेचरें । तैसिया वदनीं प्रळयरुधिरें । काटलियों दाडा ॥ ४५ ॥ हे असो काळें अवंतिलें रण । कां सर्वसंहारें मातलें मरण । तैसें अतिभिंगुळवाणेंपण । वदनीं तुझिये ॥ ४६ ॥ [दृष्ट्वा लोकाः प्रव्यथिताः] हे बापडी लोकसृष्टी । मोटकीयेचि पाहिली दिठी । आणि दुःखकाळिंदीचिया तटीं । झाड होऊनि ठेली ॥ ४७ ॥ तुज महामृत्यूचिया सागरीं । आतां हे त्रैलोक्यजीविताची तरी । शोक दुर्वातलहरी । आंदोळत असे ॥ ४८ ॥ [तथाहं] एथ कोपोनि जरी वैकुंठें । ऐसें हन म्हणिपैल अवचटें । जे तुज लोकांचें काइ वाटे । तूं ध्यानसुख हें भोगीं ॥ ४९ ॥ तरी जी लोकांचें कीर साधारण । वांयां आंड सूतसें वोडणें । केविं सहसा म्हणें प्राण । माझेचि कांपती ॥ ३५० ॥ ज्या मज संहाररुद्र वासिपे । ज्या मजभेणें मृत्यु लपे । तो मी एथें अहाळबाहाळिं कांपें । ऐसें तुवां केलें ॥ ५१ ॥ परि नवल बापा हे महामारी । इया नाम विश्वरूप जरी । हें भ्यासुरपणें हारी । भयासि आणी ॥५२॥

"**महाराज**! आज नेत्रांचें भाग्य उदयास आलें. मनामध्यें सुखसर्वस्वाचा प्रकाश पडला. कारण, त्यांनीं अगाध असें तुमचें विश्वरूप पाहिलें. ३३८ हें त्रैलोक्याला व्यापणारें रूप पाहून देवांनाही वचक वसतो. मग भलताच मनुष्य त्याच्या पुढें कसा जाईल? ३३९ असें हें रूप तर एकच. पण अद्भुत. आणि मुखें अकराळ विकराळ. त्याला डोळे अनंत, हात अनंत, आणि हातांत घेतलेलीं शस्त्रेंही अनंत! ३४० अनंत वक्षस्थळें, अनंत बाहू, आणि अनंत पाय. उदरेंही तशींच, आणि वर्णही निरनिराळे. प्रत्येक वदनावर आवेशाचा आविर्भाव कसा दाटून राहिला आहे पहा! ३४१ किंवा महाकल्पाच्या अंतीं क्रुद्ध झालेल्या **यमानें** जिकडे तिकडे प्रळयाग्नीच्या आगट्या पसराव्यात, ३४२ किंवा **शंकराचीं** संहार करण्याचीं यंत्रें असावींत, किंवा प्रलय करणाऱ्या **भैरवांचे** समुदाय असावेत, किंवा युगांत करणाऱ्या **आदिशक्तीचीं** पात्रें प्राणिमात्रांच्या नाशाला यावींत, ३४३ त्याप्रमाणें जिकडे तिकडे तुझीं प्रचंड तोंडें अगदीं खेटून गेलीं आहेत. आणि दरींत रागावलेल्या सिंहाप्रमाणें त्यांत दांत दिसत आहेत. ३४४ कालरात्रीच्या आधारानें, नाश करणारीं पिशाचें जशीं बाहेर पडतात, त्याप्रमाणें तोंडा-

१ सुकाळ. २ उजाडलें. ३ रागावलेला. ४ जेवढी तेवढी. ५ आगट्या. ६ पसरल्या. ७ समुदाय. ८ भांडीं. ९ भूतांच्या नाशाला. १० प्राप्त झालीं. ११ सिंह. १२ नाश करणारीं पिशाचें. १३ लिडबिडल्या. १४ बोलावलें. १५ अतिशय भयंकरपणा. १६ अंमळ वांकड्या दृष्टीनें.

१ भयंकर यमुना नदीच्या तीरींच्या. २ नौका. ३ मध्यें. ४ घालते. ५ ढाल. ६ भय पावतो. ७ अत्यंत, बहुत. ८ पराभव करतें.

मध्यें प्रलयरुधिरानें लिप्त झालेल्या दाढा दि- सत आहेत. ३४५ हें असो. काळानें बोला- वून आणलेलें युद्ध असावें, किंवा सर्वसंहा- रानें मृत्यूची रेलचेल व्हावी, त्याप्रमाणें तुझ्या तोंडामध्यें अतिशय भयंकरपणा भरला आहे. ३४६ ही बापडी लोकसृष्टी, तिच्याकडे तूं अंमळ वक्रदृष्टीनें पाहिलेंस मात्र, तों ती य- मुनेच्या कांठचें झाड होऊन राहिली आहे. ३४७ तुझ्या महामृत्यूच्या समुद्रामध्यें सांप्रत ही त्रैलोक्यजीविताची नौका, शोकरूप दुष्ट वाऱ्याच्या लहरींनीं हेलकावे खात आहे. ३४८ ह्या वेळीं वैकुंठनायकांनीं रागावून तर एकदम असें ह्मटलें कीं "लोकांशीं तुला काय करावयाचें? तूं हें ध्यानसुख भोग ह्म- णजे झालें." ३४९ तर प्रभो! तेंही खरेंच. लोकांची ढाल (सबब) मीं आपली उगेंच पुढें केली. कारण माझेच प्राण कांपूं लागले आहेत, असें तरी एकदम कसें ह्मणावें? ३५० ज्या मला प्रळयकाळचे रुद्रही चळचळ कां- पत होते; ज्या माझ्या भयानें मृत्यूही लपून बसत होता; तो मी येथें थरथरथरथर कां- पावा असें आपण करून सोडलें. ३५१ परंतु प्रभो! ह्याला विश्वरूप असें जरी नांव आहे तरी, ही मारी कांहीं विलक्षण आहे. ती आ- पल्या भेसुरपणानें भयाला सुद्धां हारींत आणते." ३५२

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितांतरात्मा
धृतिं न विंदामि शमं च विष्णो ॥ २४ ॥

[ नभःस्पृशं ] ठेलीं महाकाळेंसीं हटतेटें । तैसीं कितीएकें मुखें रागिटें । इहीं वाडोनियां धाकुटें । आकाश केलें ॥५३॥ गगनाचेनि वाडपणें नाकेळे । त्रिभुवनींचियाही वारिया न कोळे । [ दीप्तं ] ययाचेनि वाफा आगी जळे । कैसें धडा- डीत असे ॥ ५४ ॥ [ अनेकवर्णं ] तेविंचि एकासारिखें एक नाहें । एथ वर्णावर्णाचा भेद आहे । हो कां जे प्रळयीं सा- वावो लाहे । वन्हीं ययांचा ॥ ५५ ॥ जयाचिये आंगींची दीप्ती येवढी । जे त्रैलोक्य कीजे राखोंडी । [ व्यात्ताननं ] कीं तयाही तोंडें आणि तोंडीं । दांत दाढा ॥ ५६ ॥ कैसा वारया धनुर्वात चढला । समुद्र कीं महापूरीं पडिला । विषाग्नि मारा प्रवर्तला । वडवानळासी ॥ ५७ ॥ हळाहळ अग्नि पियालें । नवल मरण मारा प्रवर्तलें । तैसें संहारतेजा या जाहालें । वदन देखा ॥ ५८ ॥ परि कोणें मानें विशाळ । जैसें तुटिलिया अंतराळ । आकाशासि कव्हाळें । पडोनि ठेलें ॥ ५९ ॥ ना तरी काखे सूनि वसुंधरी । जैं हिरण्याक्ष रिगाला विवरीं । तैं उघडलें हटकेश्वरीं । जेविं पाताळ कुहर ॥ ३६० ॥ तैसा वक्त्रांचा विकाश । माजि जिव्हांचा आगळाचि आवेश । विश्व न पुरे ह्मणोनि घांस । न भरीचि कोडें ॥ ६१ ॥ आणि पाताळव्याळांचिया फूत्कारीं । गरळज्वाळा लागती अंबरीं । तैसी पसरलिये वदनंदरी । माजि हे जिव्हा ॥ ६२ ॥ काढूनि प्रळ- यविजूचीं झुंबाडें । जैसे पन्नासिले गगनाचे हुडे । तैसे आवा- ळुवांवरी आंकडे । धगधगीत दाढांचे ॥ ६३ ॥ [दीप्तविशा- लनेत्रं] आणि ललाटपटाचिये खोळे । जैसे भयातें भेडविताति डोळे । हो कां जे महामृत्यूचे उमाळे । कडवसां राहिले ॥ ६४ ॥ [ दृष्ट्वा हि त्वां ] ऐसें वाऊनि भयाचें भोजें । एथ कायं निप- जवूं पाहातोसि काज । तें नेणों परि मज । मरणभय आलें ॥ ६५ ॥ देवा विश्वरूप पाहावयाचे डोहळे । केले तियें पा- वलों प्रतिफळें । बापा देखिलासि आतां डोळे । निवावे तैसे निवाले ॥ ६६ ॥ [ प्रव्यथितांतरात्मा ] अहो देह पार्थिव कीर जाये । ययाची काकुळती कवणा आहे । परि आतां चैतन्य माझें विपायें । वांचेल कीं न वांचे ॥ ६७ ॥ येन्हवीं भयास्तव आंग कांपे । नावेकें आगळें तरि मन तापे । अथवा बुद्धीही वोसिंपे । अभिमान विसरिजे ॥ ६८ ॥ परि येतुलि- याहि वेगळा । जो केवळ आनंदैककळा । तया अतरात्मयाही निश्चळा । आली शोरी ॥ ६९ ॥ बाप साक्षात्काराचा वेध । कैसा देशधडी केला बोध । हा गुरुशिष्यसंबंध । विपायें नांदे ॥ ३७० ॥ देवा तुझ्या ये दर्शनीं । जें वैकल्य उपजलें आहे अंतःकरणीं । तें सांवरावयालागीं गंवसणी । धैर्याची करितसें ॥ ७१ ॥ [ धृतिं न विंदामि शमं च विष्णो ] तंव माझेनि नामें धैर्य हारपलें । कीं तयाहीवरी विश्वरूपदर्शन जा- हालें । हें असो परि मज भलें आतुडविलें । उपदेशा इया

१ बलात्कारानें. २ मोठेपणानें. ३ आकळत नाहीं. ४ वे- ष्टत नाहीं. ५ अग्नि पेटतो.

१ सहाय. २ मारण्याला. ३ वेढा. ४ घालून, घेऊन. ५ पृथ्वी. ६ पाताळांतील महादेवानें. ७ गुहा. ८ वदनरूप दरीमध्यें. ९ समुदाय, जुमडा. १० शृंगारिले. ११ बुरूज. १२ ओंठांबाहेर. १३ प्रवाह. १४ आंधारांत. १५ राज्य. १६ पृथ्वीचा, मातीचा. १७ कदाचित्. १८ क्षणभर. १९ नाश पावते. २० इतक्याहूनही. २१ कांटा, रोमांच. २२ थोर, फार मोठा. २३ छंद. २४ हद्दपार. २५ कठीण. २६ व्याकुलता. २७ मिळविलें.

॥ ७२ ॥ जीव विसंवावयाचिया चाडा । सैंधें धांवाधांवी करितसे बापुडा । परि सोय ही कवणेंकडां । नलभे एथ ॥ ७३ ॥ ऐसें विश्वरूपाचिया महामारी । जीवित्व गेलें आहे चराचरीं । जी न बोलें तरि काय करीं । कैसेनि राहें ॥७४॥

"महाकाळाहूनही वरचढ अशा प्रकारचीं कितीएक रागीट मुखें, ज्यांनीं आपल्या विशालत्वाच्या योगानें, आकाशही अपूर्तें—लहान—करून सोडलें. ३५३ तीं गगनाच्या थोरपणासही आकलन होत नाहींत; त्रिभुवनांतील वाऱ्यालाही वेष्टण करितां येत नाहींत; ह्यांच्या वाफांनींच अग्नि पेटून कसा धडाडतो आहे पहा! ३५४ त्याचप्रमाणें तीं एकासारखीं-ही एक नाहींत. त्यांच्यामध्यें वर्णावर्णांचा भेद आहे. कारण, महाप्रळयाच्या वेळीं प्रळयाग्नीलाही ह्यांचें सहाय मिळतें. ३५५ ह्यांच्या आंगाचें तेज इतकें प्रखर आहे कीं, त्रैलोक्याची सुद्धां राखुंडी होऊन जाईल. कारण, त्या प्रत्येक तोंडातोंडांत आणखी दांत व दाढाही आहेत. ३५६ वाऱ्याला कसा धनुर्वात चढला आहे पहा! किंवा समुद्रच महापुरांत पडावा, किंवा **वडवानळाला** विषाग्नि मारण्यास तयार व्हावा, ३५७ किंवा **हालाहल** विषानें अग्नि प्राशन करावा, किंवा ही आश्चर्याचीच गोष्ट कीं, मरणच मरण्याला तयार व्हावें, त्याप्रमाणें ह्या संहारतेजाचें तोंड आहे पहा! ३५८ पण केवढें मोठें? आणि विशाळ तरी किती? ज्याप्रमाणें अंतरिक्ष तुटून आकाशास ग्रासून टाकावें, ३५९ किंवा काखेमध्यें पृथ्वी घेऊन **हिरण्याक्ष** जेव्हां विवरांत शिरला, तेव्हां पाताळस्थ **महादेवानें** ज्याप्रमाणें पाताळाची गुहा उघडली, ३६० तद्वत् तोंडाचा विशाळपणा आहे. आणि त्यामध्यें जिव्हांचा आवेश दांडगा. विश्वाचा एक घास सुद्धां पुरता होणार नाहीं, म्हणून मुद्दामच जणों करीत नाहीं. ३६१ आणखी पाताळांतील सर्पांच्या फूत्कारानें विषाच्या ज्वाळा जशा आकाशाला पोंचतात, त्याप्रमाणें ह्या वदनरूप दरीमध्यें ही जिव्हा पसरलेली आहे. ३६२ प्रळयविजांचे ढीगच्या ढीग काढून ज्याप्रमाणें आकाशाचे बुरूज शृंगारावेत, त्याप्रमाणें ओंठाबाहेर दाढांचे आंकडे धगधगत आहेत. ३६३ आणि ललाटरूप वस्त्राच्या पिशवींतून डोळे जसे कांहीं भयाला भेडसावतात, जणों काय महामृत्यूचे प्रवाहही एका कोपऱ्यांत जाऊन पडतील. ३६४ इतकें भयाचें साम्राज्य दाखवून आपण येथें कोणता कार्यभाग करणार कळत नाहीं. परंतु मला मात्र मरणाचें भय पडलें आहे. ३६५ **देवा!** विश्वरूप पहाण्याची इच्छा केली होती, तिचा अनुभव येऊन चुकला. **प्रभो!** तें स्वरूप पाहिलें, आणि डोळे तृप्त व्हावयाचे तसे तृप्त झाले. ३६६ अहो! देह तर मृत्तिकेचा आहे. तो निश्चयेंकरून जाणारच, त्याची काळजी कोणाला आहे? पण माझें चैतन्य राहील किंवा नाहीं, ह्याचीच काळजी वाटते. ३६७ बाकी, भयानें आंग कांपत आहे; क्षणभर मनालाही मनस्वी ताप होत आहे; आणि बुद्धिही आपला अभिमान विसरून नाश पावण्याच्या बेतांत आली आहे; ३६८ पण या साऱ्याहूनही जो वेगळा, आनंदाची केवळ अद्वितीय कळा, असा जो निश्चळ अंतरात्मा, त्याच्या आंगावरही शहारे आले. ३६९ साक्षात्काराचा छंद मोठा विलक्षण खरा. पण ह्या मुलखानिराळा बोध कसला? आतां ह्या गुरुशिष्यसंबंध तरी पुढें नांदणें. तितक्यापुरतेंच दिसतें. ३७० **देवा!** ह्या तुझ्या दर्शनानें अंतःकरणामध्यें जो विकलपणा उत्पन्न झाला आहे, तो कमी करण्याकरितां, धैर्याची गवसणी करण्याची खटपट करतों. ३७१ पण माझ्या धैर्याचें नांवच नाहींसें होऊन गेलें. आणखी विश्वरूपाचें दर्शन तर चालूच आहे. असो. ह्या उपदेशानें मला खाशी जोड दिलीत! ३७२ जीव विश्रांतीच्या इच्छेनें बिचारा मनस्वी धांवाधाव करीत आहे. पण येथें कोणीकडेही सोय सांपडत नाहीं. ३७३ ह्याप्रमाणें ह्या विश्वरूपमहामारीनें चराचरांचे प्राण चालले आहेत. महा-

१ विसांवा व्हावा म्हणून. २ पुष्कळ.

**राज! हें जर न बोलावें, तर काय करावें? आणि कसें रहावें?" ३७४**

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि
दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।
दिशो न जाने न लभे च शर्म
प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥

[ दंष्ट्राकरालानीति ] पैं अखंड डोळ्यांपुढें । फुटलें जैसें महाभयाचें भांडें । तैसीं तुझीं मुखें वितंडें[1] । पसरलीं देखें ॥ ७५ ॥ असो दांतदाढांची दाटी । न झांकवे मा दोहीं वोठीं । सैंध प्रळयशस्त्रांचिया दाट कांटी[2] । लागलिया जैशा ॥ ७६ ॥ जैसें तक्षका विष भरलें । हो कां जे काळरात्री भूत संचरलें । कीं आग्नेयास्त्र परैजिलें[3] । वज्राग्नीं[4] जैसें ॥ ७७ ॥ तैसीं तुझीं वक्त्रें प्रचंडें । वरि आवेश हा बाहेरि वोसंडे[5] । आले मरणरसाचे लोंढे । आह्मांवरी ॥ ७८ ॥ संहारसमयींचा चंडानिळ । आणि महाकल्पांत प्रलयानळ । या दोहीं जें होय मेळ । तें काय एक न जळे ॥ ७९ ॥ तैसीं संहारकें तुझीं मुखें । देखोनि धीर कां आह्मा पारुखे[6] । [ दिशो न जाने ] आतां भुललों मी दिशा न देखें । आपणपें नेणें ॥ ३८० ॥ [ न लभे च शर्म ] मोटकें[7] विश्वरूप डोळां देखिलें । आणि सुखाचें अवर्षण पडिलें । आतां जापाणि जापाणि[8] आपुलें । अस्ताव्यस्त हें ॥ ८१ ॥ ऐसें करिसी ह्मणोनि जरि जाणें । तरि हे गोष्टि सांगावी कां मी ह्मणें । आतां एक वेळ वांचवीं जी प्राणें । या स्वरूपप्रळयापासोनी ॥ ८२ ॥ जरि तूं गोसावी[9] आमुचा अनंता । तरि सुंई[10] वोडण[11] माझिया जीविता । सांटवीं पसारा हा मागुता । महामारीचा[12] ॥ ८३ ॥ [ जगन्निवास ] आइकें सकळ देवांचिये परदेवते । तुवां चैतन्यें गा विश्व वसतें । तें विसरलासि हें उपरतें[13] । संहारूं आदरिलें ॥ ८४ ॥ [ प्रसीद देवेश ] ह्मणोनि वेगीं प्रसन्न होईं देवराया । संहरीं संहरीं आपुली माया । काढीं मातें महाभया । पासोनियां ॥ ८५ ॥ हा ठायवरी पुढतपुढती । तूतें ह्मणिजे बहुता काकुळती । ऐसा मी विश्वमूर्ती । भेंडका[15] जाहालों ॥ ८६ ॥ जैं अमरावतीये आला धाडा[14] । तैं म्यां एकलेनि केला उवेडा[16] । जो मी काळाचियाही तोंडा । वासिपुं[17] न शरीं ॥ ८७ ॥ परि तयां[18] आंतुल नव्हे हें देवा । एथ मृत्यूसही करूनि चढावो[19] । तुवां आमुचाचि घोट भरावा । या सकळविश्वेसीं ॥ ८८ ॥ कैसा नव्हता प्रळयाचा वेळ । गोरवां[1] तुंचि मिनलासि[2] काळ । बापुडा हा त्रिभुवनगोळ । अल्पायु जाहाला ॥ ८९ ॥ अहा भाग्या विपरीता । विघ्न उठिलें शांति करितां । कटकटा विश्व गेलें आतां । तूं लागलासि ग्रासूं ॥ ३९० ॥ हें नव्हे मां रोकडें । सैंघ[3] पसरूनियां तोंडें । कवळितासि चहूंकडे । सैन्यें इयें ॥ ९१ ॥

१ प्रचंड. २ कांटे. ३ प्रेरलें. ४ विद्युत्. ५ उचंबळतो. ६ नष्ट होतो. ७ थोडकेंच. ८ आटप, आटप. ९ धनी. १० घाल. ११ आड. १२ प्रळयाचा. १३ उलटें. १४ भित्रा. १५ छापा. १६ पराभव. १७ भय. १८ त्यांतले, त्यांपैकीं. १९ चराई, ताण.

**"तसेंच डोळ्यांपुढें जणों काय महाभयाचें भांडेंच फुटावें, त्याप्रमाणें हीं तुझीं तोंडें अकराळविकराळ अखंड पसरलीं आहेत पहा! ३७५ हें असो. पण दांतांची आणि दाढांची दाटी काय? दोन्ही ओंठांनीं तीं झांकत सुद्धां नाहींत. प्रळयकाळच्या शस्त्रांचें दाट कुंपण घातल्याप्रमाणें दिसत आहेत. ३७६ ज्याप्रमाणें तक्षकाचें विष भरावें, किंवा कालरात्रीमध्यें भूत निघावें, किंवा ज्याप्रमाणें विद्युदग्नीनें अग्न्यस्त्र सोडावें, ३७७ त्याप्रमाणें तुझीं तोंडें महान् प्रचंड असून त्यांचा आवेश तर, बाहेर उचंबळत आहे. आह्मांवर मृत्युरसाचे लोंढेच आले असे वाटतात. ३७८ प्रळयकालचा झंझावात, आणि महाकल्पांताचा प्रळयाग्नि, हे दोन एकत्र मिळाल्यावर काय ह्मणून जळणार नाहीं? ३७९ तद्वत् तुझीं भस्म करणारीं मुखें पाहून आमचा धीरच सुटून गेला. प्रस्तुत मी अगदीं भांबावून गेलों आहें. माझी दिशाभूल झाली आहे. आणि मी कोण हें माझें मलाच समजत नाहीं. ३८० क्षणभर विश्वरूप पाहिलें, तर साऱ्या सुखावर पाणी पडलें. याकरितां हें अस्ताव्यस्त पसरलेलें स्वरूप आटपा हो आटपा. ३८१ आपण असें कराल, हें जर मला कळलें असतें, तर मीं तें विश्वरूप दाखवा असें ह्मटलें असतें काय? आतां महाराज! एकदां ह्या विश्वरूपप्रळयापासून जीव वांचवा ह्मणजे झालें. ३८२ अनंता! आपण माझे धनी असाल, तर माझ्या प्राणांवर आच्छादन घालाहो. आणि हा महामारीचा पसारा आंवरा. ३८३ ऐका. आपण सर्व देवांहून श्रेष्ठ; तुमच्या चैतन्यानें विश्व राहतें; हें आपण वि-**

१ मध्येंच. २ प्राप्त झालास. ३ पुष्कळ.

सरलांत, आणि उलट आपणच संहार करण्याला प्रारंभ केलात. ३८४ ह्मणून हे **देवराया!** लौकर प्रसन्न व्हा. आणि ही आपली माया आटपा हो आटपा. आणि या महद्भयापासून मला सोडवा. ३८५ एवढा वेळपर्यंत एकसारखी तुमची काकलुत करीत आहें. इतका ह्या विश्वमूर्तीनें मी भिऊन गेलों." ३८६

"**अमरावतीवर** जेव्हां धाड आली, तेव्हां मीं एकट्यानें तिचा पराभव केला. काळाच्या तोंडांतही मी जावयास भिणारा नव्हें; ३८७ पण **देवा!** त्यांतलें हें नव्हे. येथें मृत्यूवरही ताण करून तूं ह्या विश्वासहवर्तमान आमचा घोट घ्यावयाला तयार झालास. ३८८ सांप्रत प्रळयाचा काल नसतां, तूंच मध्यें काळ येऊन कसा प्राप्त झालास! त्यामुळें हा बिचारा त्रिभुवनगोल अल्पायुषी झाला! ३८९ अहो! दैवानें कशी उलट खाल्ली पहा! शांतीमध्यें कसें विघ्न उपस्थित झालें! तूंच आतां खाऊं लागलास. अरेरे! आतां मात्र विश्व बुडालें हो बुडालें! ३९० तूं तोंडेंच्या तोंडें उघडून ही सर्व सेना चहूंकडून धरतो आहेस; हें प्रत्यक्ष दिसत नाहीं काय?" ३९१

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः
सर्वे सहैवावनिपालसंघैः ।
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथाऽसौ
सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ २६ ॥

[ रौद्ररसः, अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः ] नोहेति हे कौरव कुळींचे वीर। आंधळिया धृतराष्ट्राचे कुमर। हे गेले गेले सहपरिवार। तुझिया वदनीं ॥ ९२ ॥ [ सर्वे सहैवावनिपालसंघैः ] आणि जे जे यांचेनि सावायें। आले देशोदेशींचे राये। तयांचें सांगावयास जावों न लाहे। ऐसें सरकटित आहासी ॥ ९३ ॥ मदमुखांचिया संघटा। घेत आहासि घटघटां। ऑरणी हन थाटा। देतासि मिठी ॥ ९४ ॥ जंत्रावरिचील मॉर। पदातीचे मोगॅर। मुखाआंत भार। हारपति मा ॥९५॥ कृतांताचिया जांवळी। जें एकचि विश्वातें गिळी। तियें कोटीवरी सगळीं। गिळितासि शस्त्रें ॥ ९६ ॥ चतुरंगा परिवारा। संजोडियां रहंवरा। दांत न लविसी मा परमेश्वरा। कैसा तुष्टलासि बरवा ॥ ९७ ॥ [ भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ ] हां गा भीष्म ऐसा कवण। सत्यशौर्यनिपुण। तोही आणि ब्राह्मण द्रोण। ग्रासिलासि कटकेंटा ॥९८॥ अहा सहस्रकराचा कुमर। एथ गेला गेला कर्ण वीर। [ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ] आणि आमुचिया आघवयांचा केर। फेडिला देखें ॥ ९९ ॥ कटकटों धातया। कैसें जाहालें अनुग्रहा यया। मियां प्रार्थूनि जगा बापुडिया। आणिलें मरण ॥ ४०० ॥ मागां थोडिया बहुवा उपपत्ती। येणें सांगीतलीया विभूती। तैसा नसेचि मा पुढती। बैसलों पुसों ॥ १ ॥ ह्मणोनि भोग्य तें त्रिशुद्धी न चुके। आणि बुद्धीही होणारासारिखी ठाके। माझ्या कपाळीं पिटावें लोकें। तें लोटेलें काह्या ॥ २ ॥ पूर्वी अमृतही हाता आलें। परि देव नसतींचि उंगले। मग काळकूट उठविलें। शेवटीं जैसें ॥ ३ ॥ परि तें एकवर्गी थोडें। केलिया पतिकारामाजिवडें। आणि तिये अवसरींचें तें सांकडें। निस्तरविलें शंभू ॥ ४ ॥ आतां हा जळता वारा कें वेंटोळे। कोणांही विष भरलें गगन गिळे। महाकाळेंसि कें खेळें। आंगवेत असे ॥ ५ ॥ ऐसा अर्जुन दुःखें शिणत। शोचितं असे जिवाआंत। परि न देखे तो प्रस्तुत। अभिप्राय देवाचा ॥ ६ ॥ जे मी मारिता हे कौरव मरते। ऐसेनि वेंटाळिला होता मोहें बहुतें। तो फेडावयालागीं अनंतें। हें दाखविलें निज ॥ ७ ॥ अरे कोण्हीतें कोण्हा न मारी। एथ मीचि हो सर्व संहारीं। हें विश्वरूपव्याजें हरी। प्रकटित असे ॥ ८ ॥ परि वायांचि व्याकुळता। तें न चोजवेचि पंडुसुता। मग अंहा कंप नव्हता। वाढवित असे ॥ ९ ॥

"हे कौरवकुलांतील वीर व अंधधृतराष्ट्राचे पुत्र नव्हेत काय? हे सारे सहपरिवार तुमच्या तोंडांत गेले हो गेले! ३९२ आणखी, ह्यांचें सहाय करण्यासाठीं आलेले जे देशोदेशींचे राजे, त्यांची दशा सांगावयाला सुद्धां परत कोणीं जाऊं नये असा त्यांचा तूं सरसकट स्वाहा करीत आहेस. ३९३ हत्तींचे समुदाय कसे भराभर गिळून टाकीत आहेस. आणि युद्धांतील साऱ्या सैन्यालाही तूं हात घालीत

१ नव्हेत का? २ सहाय. ३ गिळित. ४ हत्तींचा कळप. ५ युद्ध. ६ तोफा, बंदुकी. ७ गोलंदाज. ८ पायदळाचे. ९ झोरकें. १० भावंड. ११ हत्ती, घोडे, रथ, पायदळ ह्यांसहवर्तमान.

१ घोडे जोडलेल्या. २ रथास. ३ हायहाय. ४ किरकिर. ५ अरेरे! ६ प्रसाद. ७ थोड्याबहुत युक्तीनें. ८ भोगावयाचें तें. ९ चुकेल कशानें? १० उगे बसले नाहींत. ११ एका अर्थी. १२ अनुभवानें पाहिलें असतां. १३ आटोपेल. १४ कोण बरें? १५ महाकाळाबरोबर. १६ सामर्थ्य. १७ शोक करीत. १८ समजे. १९ उगाच.

आहेस. ३९४ तोफांवरील गोलंदाज, पायदळाचे होरके, ह्यांचे भारेच्या भारे तुझ्या तोंडांत गडप होऊन जात आहेतना? ३९५ जें यमाचें केवळ आवंड, जें एकच साऱ्या विश्वाचा संहार करण्याला पुरें होणारें, अशीं कोट्यावधि शस्त्रें तूं गिळतो आहेस! ३९६ हत्ती, घोडे, रथ, पायदळ हें चतुरंगसैन्य, घोडे जोडलेले रथ, ह्यांना दांत सुद्धां न लावतां तूं अचानक गिळून टाकतोसना? **परमेश्वरा!** ह्यांत तुला आनंद तरी कसा वाटतो? ३९७ अहो! ह्या **भीष्मा**सारखा सत्यशौर्यनिपुण कोण आहे? आणि **द्रोण** तर ब्राह्मणना हो? अरेरे! ह्यांना सुद्धां खाऊन टाकतां ना? ३९८ हायहाय! सूर्याचा पुत्र हा **कर्ण**वीरही गेला हो गेला! आणि आमची सर्वांची कटकट गेली. ३९९ हायहाय! **जगदुत्पादका!** हा कसलाहो प्रसाद झाला? मीं प्रार्थना करून जगाला मरण मात्र आणलें. ४०० पूर्वी थोड्याबहुत युक्तीनें यानें आपल्या विभूती सांगितल्या. तेवढ्याच पुरे न ह्मणतां आणखी सांगा ह्मणून विचारित बसलों! ४०१ ह्यावरून जें भोगावयाचें आहे तें कधीं सुटत नाहीं, एवढी गोष्ट खरी. आणि बुद्धि ही होणारासारखीच होते. लोकांना मारावयाचें जें माझ्या कपाळचें अपेश तें चुकणार कसें? ४०२ पूर्वी अमृत हाताला आलें, तरी देव उगीच बसले नाहींत. मग अखेरीला कालकूट विष निघालें. ४०३ पण एका अर्थी अनुभवानें पाहिलें तर तेंही थोडेंच ह्मटलें पाहिजे. आणखी त्या वेळचें तें संकट **शंकरांनीं** निवारण तरी केलें. ४०४ पण आतांचा हा जळता वारा कसा आटोपणार? विषानें भरलेलें आकाश कोणाला तरी गिळवेल काय? महाकाळाबरोबर खेळण्याचें कोणाला सामर्थ्य आहे? ४०५ ह्याप्रमाणें **अर्जुन** दुःखानें जर्जर होऊन अंतःकरणामध्यें शोक करीत होता. पण देवाचा ह्या वेळींचा उद्देश त्याच्या ध्यानांत आला नाहीं. ४०६ तो उद्देश हा कीं मी मारणारा आणि हे मरणारे अशा महामोहानें **अर्जुन** व्याप्त झाला होता, तो नष्ट करण्यासाठींच अनंतांनीं हें निजस्वरूप दाखविलें. ४०७ 'अरे! कोणी कोणाला मारीत नाहीं. सर्वांचा संहार करणारा मीच आहें.' हें **श्रीहरींनीं** विश्वरूपाच्या निमित्तानें व्यक्त करून दाखविलें. ४०८ पण तें **अर्जुनाला** समजलेंच नाहीं. आणि तो उगाच व्याकुळ झाला. आणि व्यर्थ नसता कंप वाढवूं लागला." ४०९

वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति
दंष्ट्राकरालानि भयानकानि ।
केचिद्विलग्ना दशनांतरेषु
संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥

[ वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति ] तेथ ह्मणे पाहा हो एके वेळे । सांसिकवचेंसि दोन्ही दळें । वदनीं गेलीं आभाळें । गगनीं कां जैसीं ॥ ४१० ॥ कां महाकल्पाचिया शेवटीं । जैं कृतांत कोपला होय सृष्टी । तैं ऐकविसांहि स्वर्गा मिठी । पाताळासकट दे ॥ ११ ॥ ना तरी उदासीनें दैवें । संचकाचीं वैभवें । जेथिचीं तेथ स्वभावें । विलया जाती ॥ १२ ॥ तैसीं सांसिनलीं सैन्यें एकवटें । इये मुखीं जाहालीं प्रविष्टें । परि एकही तोंडौनि न सुटे । कैसें कर्म देखा ॥ १३ ॥ अशोकाचे अंगवसे । चघळिले करीनि जैसे । लोक वक्त्रामाजि तैसे । वायां गेले ॥ १४ ॥ [ दंष्ट्राकरालानि ] परि सिसाळें मुकुटेंसीं । पडिलीं दाढांचे सांडसीं । पीठ होत कैसीं । दिसत अहाती ॥ १५ ॥ [ केचिद्विलग्ना दशनांतरेषु ] तियें रलें दांतांचिये सवडी । कूट लागलें जिभेच्या बुडीं । कांहीं कांहीं आगरडीं । दंष्ट्रांचीं माखलीं ॥ १६ ॥ हो कां जे विश्वरूपें काळें । ग्रासिलीं लोकांचीं शरीरें बळें । परि जीवित्व देहींचीं सिसाळें । अवश्य कीं राखिलीं ॥ १७ ॥ [ संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ] तैसीं शरीरामाजि चोखडीं । इयें उत्तमांगें होतीं फुडीं । ह्मणोनि महाकाळाचियाहि तोंडीं । परि उरलीं शेखीं ॥ १८ ॥ [ भयानकानि ] मग ह्मणे हें काई । जन्मलेयां आंनमोहरचि नाहीं । जग आपैसेंचि वदनडोहीं । संचरता हे मा ॥ १९ ॥ यया आपेंआप आघविया सृष्टी । लागलिया आहाति वदनाचिया शेवटीं । आणि हा जेथिचिया तेथ

१ तरवार कवचासकट. २ एकवीस. ३ अननुकूल. ४ संग्रह करणाराचीं. ५ ऐश्वर्यें. ६ पसरलीं. ७ अग्रभाग शेंडे. ८ उंटानें. ९ मस्तकें. १० चिमट्यांत. ११ तुकडे, चुरा. १२ टोकें, अग्रें. १३ दाढांचीं. १४ मस्तकें. १५ मस्तकें. १६ प्राण्यांला. १७ दुसरा मार्ग.

मिठी । देतसे उगर्ळा ॥ ४२० ॥ ब्रह्मादिक समस्त । उंचा मुखांमाजि धांवत । येर सामान्य हे भरत । ऐलीच वदनीं ॥ २१ ॥ आणीकही भूतजात । तें उपजलेचि ठायीं ग्रासित । परि याचिया मुखा निभ्रांत । न सुटेचि कांहीं ॥ २२ ॥

त्या वेळीं अर्जुन पुन्हा ह्मणतो "अहो प्रहाहो! अभ्रें जशीं गगनांत शिरतात, त्याप्रमाणें तरवारींसकट व कवचांसकट हीं दोन्हीं सैन्यें तुमच्या तोंडांत गेलीं आहेत. ४१० किंवा महाप्रळयाच्या शेवटीं सृष्टीवर यम क्षुब्ध झाला ह्मणजे तो जसा पाताळासकट एकवीस स्वर्गांलाही मिठी मारतो, ४११ अथवा दैव प्रतिकूल झालें ह्मणजे संग्रह करणाराचीं सर्व वैभवें आपोआप जेथच्या तेथें जशीं विलयास जातात, ४१२ त्याप्रमाणें हीं जमलेलीं सर्व सैन्यें ह्या मुखामध्यें शिरलीं आहेत. एकही ह्यांतून सुटलेला नाहीं. हें कर्म कसें तें पहा! ४१३ अशोकाचे कोंभ उंटानें चघळून टाकले ह्मणजे ते जसे निरुपयोगी होतात, त्याप्रमाणें हे सर्व लोक तोंडामध्यें जाऊन व्यर्थ होत आहेत. ४१४ तशींच ही मुगुटांसहवर्तमान मस्तकें दाढांच्या चिमट्यांत सांपडून त्यांचें कसें पीठ होत असल्याचें दिसत आहे पहा! ४१५ त्यांतील रत्नें दांतांच्या फटींत वसून त्यांचा चुरा जिभेच्याही बुडास लागला आहे; आणि कांहीं कांहीं दाढांचीं टोंकेंही त्यानें माखलीं आहेत. ४१६ अहो! ह्या विश्वरूपकाळानें लोकांचीं शरीरें जोरानें चाऊन टाकलीं तरी, जीवित्वदेहांतील–लिंगदेहांतील–मस्तकें त्यानें मुद्दाम राखून ठेवलीं आहेत. ४१७ अशा प्रकारचे दिव्य अवयव शरीरामध्यें होते, ह्मणूनच ते महाकाळाच्या तोंडांत पडूनही अखेरीस शिल्लक राहिले." ४१८ मग ह्मणाला "हें हो काय? जो जो प्राणी जन्म घेतो, त्याला त्याला दुसरा मार्ग ह्मणून नाहींच. हें जग आपणहूनच ह्या वदनरूप डोहांत शिरतें आहे कींहो! ४१९ ह्या साऱ्या सृष्टी आपोआपच वदनाच्या टोंकाला लागल्या आहेत, आणि हा जेथल्या तेथें उदासीन राहूनच दडपतो आहे. ४२० ब्रह्मदेवादिक सारे वरच्या मुखामध्यें धांवत आहेत, आणि बाकीचे सामान्य–हे भरत–आलीकडच्याच तोंडांत आहेत. ४२१ आणखी जे निरनिराळ्या जातीचे कोणी आहेत ते उपजल्या ठिकाणींच खाऊन टाकीत आहे. ह्याच्या तोंडांतून सुटावयाचें असें निःसंशय कांहीं नाहीं." ४२२

१ मुकाट्यानें.

> यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः
> समुद्रमेवाभिमुखा द्रवंति ।
> तथा तवामी नरलोकवीरा
> विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥ २८ ॥

[यथा नदीनामिति] जैसे महानदीचे वोघ । वहिले[१] ठाकिती समुद्राचें आंग । [तथा तवामी नरलोकवीरा विशंति] तैसें आघवांचिकडूनि जग । प्रवेशत मुखीं ॥ २३ ॥ आयुष्यपंथें प्राणिगणीं[२] । करोनि अहोरात्रांची सोवाणी[३] । [वक्त्राण्यभिविज्वलंति] वेगें वक्त्रमिळणीं । साधिजत आहाती ॥२४॥

"ज्याप्रमाणें महानदीचे ओघ लौकर लौकर वाहत जाऊन समुद्रास मिळतात, त्याप्रमाणें जग हें चहूंकडून ह्या तोंडांत शिरत आहे. ४२३ सारे प्राणिमात्र अहोरात्रांच्या पायऱ्या करून आयुष्याच्या मार्गानें भराभर तोंडाचा मुक्काम गांठित आहेत." ४२४

> यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा
> विशंति नाशाय समृद्धवेगाः ।
> तथैव नाशाय विशंति
> लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥ २९ ॥

[यथेति] जळतया गिरीच्या गवाखां-[४] । माजि घांपती[५] पतंगाचिया झांकों[६] । [तथैवेति] तैसे समग्र लोक देखा । इये वदनीं पडती ॥ २५ ॥ [समृद्धवेगाः] परि जेतुलें येथ प्रवेशलें । तें तातलियां[७] लोहें पाणिपां गिळिलें । वहिवटींहि[८] पुसिलें । नाम रूप तयाचें ॥ २६ ॥

"वणवा लागलेल्या पर्वताच्या गुहेमध्यें पतंगांच्या जशा उड्या पडतात, त्याप्रमाणें हे सारे लोक ह्या तोंडांमध्यें पडत आहेत पहा. ४२५ पण जितके येथें येऊन पोंचले, तितक्यांचें

१ सत्वर. २ प्राणिसमुदायांनीं. ३ पायऱ्या. ४ छिद्रामध्यें. ५ पडतात. ६ उड्या. ७ तापलेल्या लोखंडानें. ८ वहिवाटीस.

**तापलेल्या लोखंडावरील पाणी जसें जळून खाक होतें, त्याप्रमाणें तुह्मीं त्यांच्या नांवांचें किंवा रूपांचें नांव सुद्धां ठेवलें नाहीं." ४२६**

लेलिह्यसे ग्रसमानः समंता-
ल्लोकान् समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं
भासस्तवोग्राः प्रतपंति विष्णो ॥ ३० ॥

[बीभत्सरसः ग्रसमानः] आणि येतुलियाही आरोगण[1]। करितां भुके नाहीं उणेपण । कैसें दीपनें[2] असाधारण । उदयलें यया ॥ २७ ॥ [लेलिह्यसे] जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला। कां भणगा[3] दुकाळ पाहला । तैसा जिभांचा ललल्लाट देखिला । आवाळुवें[4] चाटितां ॥ २८ ॥ [समंतात्] तैसें आहाराचेनि नांवें कांहीं । तोंडापासूनि उरलेंचि नाहीं । कैसी समसेंमित[5] नवाई । भुकेलेपणाची ॥ २९ ॥ काय सागराचा घोंट भरावा । कीं पर्वताचा घांस करावा । ब्रह्मकटाह घालावा । आघवाचि दाढे ॥ ४३० ॥ दिशा सगळियाचि गिळाविया । चांदिणिया चाटूनि घ्याविया । ऐसें वर्तत आहे सांविया[6]। लोलुंप्य[7] वा तुझें ॥३१॥ [वदनैर्ज्वलद्भिः] जैसा भोगीं काम वाढे। कां इंधनें आगीसि हर्काक[8] चढे । तैसीं खातखातांचि तोंडें। खाखोतें[9] टेलीं ॥३२॥ कैसें एकचि केवढें पसरलें। त्रिभुवन जिव्हाग्रीं आहे टेंकलें। जैसें आतां येतुलीं कैचीं त्रिभुवनें। कां कंवींठ[10] घातलें। वडवानळीं ॥३३॥ ऐसीं अपार वदनें। आतां येतुलीं कैंचीं वदनें। कां आहार न मिळतां येणें मानें। वाढविलीं सैंघ[11] ॥३४॥ अगा हा लोक वापुडा। जाहाला वदनज्वाळां वरपडा[12]। जैसीं वणवेयाचिया वेढां। सांपडती मृगें ॥३५॥ [तेजोभिरापूर्य जगत्समग्रं] आतां तैसें या विश्वा जाहलें। देव नव्हे हें कर्म आलें। कां जगजळचरां पांगिलें[13]। जाळें काळें ॥ ३६ ॥ [भासस्तवोग्राः प्रतपंति] आतां इये अंगप्रभेचिये वांगुरे[14]। कोणीकडूनि निगिजैल चराचरें। हीं वक्रें नोहेति जोहरें[15]। वोडवलीं जगा ॥ ३७ ॥ आगी आपुलेनि दाहकपणें। कैसेनि पोळिजे तें नेणे। परि जया लागे तया प्राणें। सुटिका नाहीं ॥ ३८ ॥ ना तरी माझेनि तिखटपणें। कैसें निवटे[16] हें शस्त्र कायि जाणे। कां आपुलिया मारा नेणे। विष जैसें ॥ ३९ ॥ तैसी तुज कांहीं। आपुलिया उग्रपणाची सेचि नाहीं। परि ऐलीकडिले तुखीं सांई। हों सरली जगाची ॥ ४४० ॥ [विष्णो] अगा आत्मा तूं एक। सकळ विश्वव्यापक। तरि कां आह्मा अंतक। तैसा वोडवलासी ॥ ४१ ॥ तरि मियां सांडिली जीवित्वाची चाड। आणि तुवांही न धरावी भीड। मनीं आहे तें उघड। बोल पां सुखें ॥४२॥ किती वाढविसी या उग्ररूपा। आंगीचें भगवंतपण आठवीं बापा। नाहीं तरि कृपा। मजपुरती पाहीं ॥ ४३ ॥

१ भोजन. २ प्रदीप्तपणा. ३ भिकाऱ्यानें. ४ ओष्टाग्रें. ५ चमत्चमित. ६ सर्वथा. ७ लंपटपणा. ८ हलकल्लोळ. ९ खाईन खाईन करणारीं. १० कवठीचें फळ. ११ पुष्कळ. १२ प्राप्त. १३ पसरलें. १४ जाळ्यांतून. १५ लाक्षाग्नीचीं घरें. १६ मरतें. १७ नाश, क्षय. १८ सरसावली.

**"आणखी, इतकें खाऊनही भुकेला उणेपणा ह्मणून कसला तो नाहींच. ह्याला अशी ही विलक्षण क्षुधा तरी कसली? ४२७ ज्वरांतून जसा एखादा रोगी उठावा, किंवा भिकाऱ्यानें दुष्काळ पाहिला ह्मणजे त्याला जशी खाखा सुटते, त्याप्रमाणें जिभल्या चाटतांना ह्या जिभांचा किती ललल्लाट दिसतो आहे पहा. ४२८ ह्या तोंडाकडून खाण्याचें ह्मणून कांहीं उरलेंच नाहीं. ह्या भुकेलेपणाचा हा केवढा चमत्कार आहे? ४२९ का सागराचा घोट घ्यावा? का पर्वताचा घास करावा? कां हें सारें ब्रह्मांडच दाढेखालीं घालावें ?४३० दिशा साऱ्याच गिळून टाकाव्यात? का चांदण्या साऱ्या चोखाव्यात? अशी तुझी हपाप दिसते. ४३१ भोग भोगावेत तों तों जशी इच्छा वाढते, किंवा जळण घालावें तों तों आगीची जशी हाकाहाक वाढते, त्याप्रमाणें हीं तोंडें इतकें खात असून आणखी खाखा करतातच आहेत. ४३२ एकच तोंड केवढें पसरलें आहे पहा! वडवानळांत एखादें कंवठ टाकल्याप्रमाणें सारें त्रिभुवन फक्त त्यांतील एका जिभेच्या टोंकावरच राहिलें आहे. ४३३ आणि अशीं तोंडें तर अपार आहेत. आतां इतकीं त्रिभुवनें कोठून आणावींत? कां आहार मिळाला नाहीं, ह्मणूनच इतक्या पंक्तीच्या पंक्ती वाढविल्या? ४३४ अहो! हा लोक विचारा ह्या तोंडांच्या ज्वाळांमध्यें सांपडला आहे हो! चहूंकडून वणवा पेटला असतां त्यामध्यें जसे मृग सांपडतात, ४३५ त्याप्रमाणें ह्या विश्वास ह्या वेळीं झालें आहे. देव नव्हे, हें कर्म ओढवलें आहे; किंवा जगद्रूप जलचरा-**

१ प्राप्त झालास.

करितां काळानें हें जाळें पसरलें आहे. ४३६ आतां ह्या आंगप्रभेच्या जाळ्यांतून चराचरें कशीं निघतील? हीं तोंडें नव्हेत, जगाला लाक्षागृहेंच झालीं आहेत. ४३७ आपल्या दाहकपणानें कसें पोळतें तें अग्नीला कळत नाहीं; पण ज्याला तो स्पर्श करतो, त्याला प्राण दिल्यावांचून सुटका नसते. ४३८ अथवा आपल्या तीव्रपणानें मरण कसें येतें, तें शस्त्राला काय माहिती? किंवा आपला अंमल जसा विषाला समजत नाहीं, ४३९ त्याप्रमाणें तुला आपल्या उग्रपणाची कल्पनाच नाहीं. पण आलीकडच्या एकाच तोंडानें जगाचा डोंबाळा उसळला आहे. ४४० अहो! आपण एक आह्मां सर्व विश्वाला व्यापणारे; मग आह्मांलाच काळासारखे कां झालांत? ४४१ तर मीं आतां प्राणाची आशा सोडली. आणि तूंही पण भीड धरूं नको. तुझ्या मनांत असेल तें स्पष्ट सांग पाहूं. ४४२ ह्या उग्र रूपाला आतां किती वाढविशील? **प्रभो!** आपल्या आंगच्या **भगवंतपणाची** कांहींतरी आठवण करा. नाहींतर निदान माझ्यापुरती तरी कृपा करा." ४४३

आख्याहि मे को भवानुग्ररूपो
नमोस्तु ते देववर प्रसीद ।
विज्ञातुमिच्छामि भवंतमाद्यं
नहि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ३१ ॥

[आद्यं] तरि एक वेळ वेदवेद्या । जी त्रिभुवनैकआद्या । विनवणी विश्ववंद्या । आइकें माझी ॥ ४४ ॥ [नमोस्तु ते देववर प्रसीद] ऐसें बोलोनि वीरें । चरण नमस्कारिले शिरें। [विज्ञातुमिच्छामि भवंतं] मग ह्मणे तरी सर्वेश्वरें । अवधारिजो ॥ ४५ ॥ मियां होआवया समाधान । जी पुसिलें विश्वरूपध्यान । आणि एकेचि काळें त्रिभुवन । गिळितचि उठिलासि ॥ ४६ ॥ [को भवानुग्ररूपो] तरि तूं कोण कां येतुलीं। इयें भ्यासुरें मुखें कां मेळविलीं । अवघियाचि करीं परिजिलीं। शस्त्रें काह्यां ॥ ४७ ॥ जी जंव तंव रागीटपणें । वाढोनि गगना आणितोसि उणें । कां डोळे करूनि भिंगुळवाणे । भेडसावीत आहासी ॥ ४८ ॥ [नहि प्रजानामि तव प्रवृत्तिं] एथ कृतांतेंसीं देवा । कासया किजतसे हेवा । [आख्याहि मे] हा आपुला तुवां सांगावा । अभिप्राय मज ॥ ४९ ॥ या बोला ह्मणे अनंत । मी कोण हें आहासी पुसत । आणि कायिसयालागीं असें वाढत । उग्रतेसीं ॥ ४५० ॥

"तर हे **वेदवेद्या! महाराजा! त्रिभुवनैकआद्या!** हे विश्ववंद्या! एकवेळ माझी एवढी विनंती ऐकावी." ४४४ ह्याप्रमाणें बोलून त्या वीरानें आपलें मस्तक चरणावर ठेवून नमस्कार केला. आणि ह्मणाला "तर **सर्वेश्वरांनीं** हिकडे लक्ष्य पुरवावें. ४४५ महाराज! मी समाधान होण्यासाठीं विश्वरूपाचें ध्यान विचारलें, आणि आपण तर एकदम त्रिभुवनच गिळावयाला उठलांत. ४४६ तर तूं असा आहेस तरी कोण? हीं इतकीं भेसूर मुखें तरी कशाला जमा केलीं आहेत? आणि साऱ्या हातांत शस्त्रें कशाकरितां धारण केलीं आहेत? ४४७ महाराजा! क्षणक्षणीं रागाच्या आवेशानें विशाळ होऊन गगनाला कां लहान करतोस? आणि इंगळासारखे डोळे करून भेडसावतोस तरी कां? ४४८ देवा! येथें **यमाशींही** वरचढपणा काय ह्मणून करतां? ह्यांतील उद्देश काय तो सांगा." ४४९ हें भाषण ऐकून **अनंत** ह्मणतात "मी कोण? आणि उग्रता कशासाठीं वाढवितों ह्मणून विचारतोस, होय?" ४५०

श्रीभगवानुवाच—

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो
लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः ।
ऋतेऽपि त्वां न भविष्यंति सर्वे
येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥ ३२ ॥

[श्रीभगवानुवाच—कालोऽस्मीत्यर्धं] तरि मी काळ गा हें फुडें । लोक संहारावयालागीं वाढें । सैंघें पसरिलीं आहाती तोंडें । आतां ग्रासीन हें आघवें ॥ ५१ ॥ [ऋतेऽपि त्वां] एथ अर्जुन ह्मणे कटकटों । उबगिलों मागिल्या संकटा । ह्मणोनि आळविला तंव वोखटा । उवाइला हा ॥ ५२ ॥ तेंविंचि कठिण बोलें आसतुटी । अर्जुन होईल हिंपुटी । ह्मणोनि सवेंचि ह्मणे किरीटी । परि आन एक असे ॥ ५३ ॥ तरि

१ येवढीं. २ भयंकर. ३ धारण केलीं. ४ कशाकरितां? ५ भयंकर.

१ प्रत्यक्ष. २ बहुत, असंख्य. ३ हायहाय. ४ कंटाळलों. ५ प्रार्थना केली. ६ वाईट. ७ प्रगट झाला. ८ निराश. ९ खिन्न.

आतांचि ये संहार वाहरें । तुह्मी पांडव असा वाहिरे । तेथ जातजातां धनुर्धरें । सांवरिले प्राण ॥ ५४ ॥ होता मरण-महामारीं गेला । तो मागुता सावध जाहाला । मग लागला वोला । चित्त देऊं ॥ ५५ ॥ ऐसें ह्मणिजत आहे देवें । अर्जुना माझे तुह्मी हें जाणावें । [ न भविष्यंति सर्वे ] येर जाण मी आघवें । सेरलों ग्रासूं ॥ ५६ ॥ वज्रानळीं प्रचंडीं । जैसी घांपे लोणियाची उंडी । तैसें जग हे माझिया तोंडीं । तुवां देखिलें जें ॥ ५७ ॥ [ येऽवस्थिताः ] तरि तयामाझारीं कांहीं । भरवसेनि उणें नाहीं । इयें वायांचि सैन्यें पाहीं । वल्गिजत आहाती ॥ ५८ ॥ ऐशा चतुरंगाचिया संपदा । करित महाकाळेंसीं स्पर्धा । वांटिवेचियां मदा । वेंळघले जे ॥ ५९ ॥ हे जे मिळोनियां मेळे । कुंथती वीरवृत्तीचेनि वळें । जयावरी गजदळें । वाखाणिजताती ॥ ४६० ॥ ह्मणती सृष्टीवरी सृष्टी करूं । आण वाहूनि मृत्यूतें मारूं । आणि जगाचा भरूं । घोंट यया ॥ ६१ ॥ पृथ्वी सगळीचि गिळूं । आकाश वरिच्यावरी जाळूं । काय बाणवरी खिळूं । वारयांतें ॥ ६२ ॥ वोल ईतियेराहूनि तिखट । दिसती अग्नीपरिस दासटे । मारकपणें कालकूट । मेंहुर ह्मणत ॥ ६३ ॥ तरि हे गंधर्वनगरींचे उंमाळे । जाण पोकळीचे पेंडवेळे । अगा चित्रींचे पुतळे । वीर हे देखें ॥ ६४ ॥ हांगा मृगजळाचा पूर आला । दळ नव्हे कापडाचा साप केला । इया शृंगारूनियां खोळीं । मांडिलिया पैं [ एतदंतमेव षड्गुणैश्वर्यवर्णनमष्टाविंशतिभिः श्लोकैरुक्तं ] ॥ ६५ ॥

"सांगतों तर. खरा काल तो मी. लोकांचा संहार करण्याकरितां वाढतों. हीं इतकीं तोंडें पसरलीं आहेत तीं त्याकरितांच. आतां हें सारें ग्रासून टाकतों पहा." ४५१ तेव्हां अर्जुन ह्मणाला "अरे देवा! मागच्या संकटाला कंटाळलों, ह्मणून गेलों प्रार्थना करावयाला. तों ह्यानें अधिकच खवळावें, ४५२ त्याप्रमाणें बोलूं लागला." पण अर्जुन निराश होईल, खिन्न होईल, ह्मणून लागलेंच भगवान् ह्मणाले "हे अर्जुना! पण ह्यांत एक विशेष आहे. ४५३ कीं, तुह्मी पांडव ह्या संहाराच्या तडाक्याबाहेर आहांत." तेव्हां थोडासा अर्जुनाच्या जिवांत जीव आला. ४५४ नाहींतर तो मृत्यूच्या तडाक्यांतच सांपडला होता. पण पुन्हा सावध होऊन त्याच्या बोलण्याकडे लक्ष्य देऊं लागला. ४५५ तेव्हां देवांनीं असें ह्मटलें कीं "अर्जुना! तुह्मी माझे आहांत, हें लक्ष्यांत ठेवा. बाकी सर्वांना मी खाऊन टाकावयास निघालों आहें. ४५६ प्रचंड वज्रानळामध्यें, ज्याप्रमाणें एखादी लोण्याची उंडी घालावी, त्याप्रमाणें हें जग माझ्या तोंडांत आहे, हें तूं पाहिलेंसच. ४५७ तर त्यामध्यें कांहीं उणें नाहीं, ही खात्री असूं दे. ही सेना बडबड करते आहे ही फुकट. ४५८ ही चतुरंगसेना पराक्रमाच्या गर्वास चढून महाकाळाशींही स्पर्धा करीत आहे. ४५९ हे सारे मिळून शूरवृत्तीच्या बळानें घमंडी मारीत आहेत; आणि हत्तींच्या समुदायांचा मोठा डौल सांगतात. ४६० सृष्टीची प्रतिसृष्टी करूं; मृत्यूला सुद्धां प्रतिज्ञेनें मारूं; आणि ह्या जगाचा घोंट घेऊं अशा वल्गना करीत आहेत. ४६१ पृथ्वी सगळीच्या सगळीच गिळून टाकूं; आकाशाला वरच्यावरच जाळून खाक करूं; बाणांनीं वाऱ्यालाही बांध घालून सोडूं. ४६२ त्यांचे शब्द तर काय? शस्त्रापेक्षां तीक्ष्ण; अग्नीपेक्षां दाहक असे दिसतात. जीव घेण्यामध्यें कालकूटही मधुर ह्मणवील. ४६३ तर हे सारे आकाशांत उठलेले ढग, किंवा पोकळीचें वळलेलें पेंडवळें आहे हें लक्ष्यांत ठेव. अरे! हे सारे वीर ह्मणजे केवळ चित्रांतले पुतळे आहेत. ४६४ किंवा हा मृगजळाचा पूर भरलेला आहे. हें कांहीं सैन्य नव्हे, हा कापडाचा साप करून ठेवलेला आहे. हीं बाहुलीं सजवून पुढें केलीं आहेत." ४६५

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ।
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥

[ मयैवैते निहताः पूर्वमेव ] येर चेष्टवितें जें वळ । तें मागांचि मियां ग्रासिलें सकळ । आतां कोल्हेरीचे वेताळे ।

१ संकटांतून. २ प्रवर्तलों. ३ सांपडते. ४ पराक्रमाच्या. ५ चढले. ६ शूरवृत्तीच्या. ७ वाऱ्याला. ८ शस्त्रापेक्षां. ९ दाहक. १० मधुर. ११ ढगांचे. १२ लोट. १३ भेंडाळें. १४ बाहुल्या.

१ चित्रांतले. २ पुतळे.

तैसे निर्जीव हे आहाती ॥ ६६ ॥ हालविती दोरी तुटली । तरी तियें खांबावरील बाहुलीं । भलतेणें लोटिलीं । उलथोनि पडती ॥ ६७ ॥ तैसा सैन्याचा यया वेगा । मोडता वेळ नलगे पैं गा । [ तस्मात्त्वमुत्तिष्ठ ] ह्मणोनि उठीं उठीं वेगां । शाहाणा होईं ॥ ६८ ॥ [ जित्वा शत्रून् ] तुवां गोग्रहणाचेनि अवसरे । घातलें मोहनास्त्र येकसरें । मग विराटाचेनि मेहा-भेडें उत्तरें । आसडूनि नागविलें ॥ ६९ ॥ आतां हें त्याहूनि निपटारें जाहालें । निवटीं आयितें रण पडिलें । [ यशो लभस्व ] घेईं यश रिपु जिंतिले । एकलेनि अर्जुनें ॥ ४७० ॥ [ भुंक्ष्व राज्यं समृद्धं ] आणि कोरडें यशचि नोहे । समग्र राज्यहि आलें आहे । [ निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ] तूं निमित्तमात्रचि होयें । सव्यसाची ॥ ७१ ॥

**"बाकी त्यांचें हालचालीचें बळ, तें सारें मीं पूर्वींच ग्रासून टाकलें आहे. आतां चित्रांतले पुतळे असावेत, तसे हे निर्जीव होऊन राहिलेले आहेत. ४६६ नाचविणारी दोरी तुटली, ह्मणजे त्या खांबावरची बाहुली, पाहिजे त्यानें लोटली तरी उलथून पडावयाची; ४६७ त्याप्रमाणें ह्या सैन्याचा आकार मोडावयाला वेळ नाहीं. ह्मणून ऊठ ऊठ लौकर. शहाणा हो. ४६८ तूं गोग्रहणाच्या वेळेस सर्वांवर मोहनास्त्र सोडलेंस तेव्हां, त्या विराटाच्या भित्र्या उत्तरानें त्या सर्वांचीं वस्त्रें हिरावून घेऊन नग्न करून सोडलें. ४६९ पण आतां त्यांची स्थिति त्याहूनही वाईट झालेली आहे. आयतें रण पडलेलें आहे, त्याचा संहार कर. आणि एकट्या अर्जुनानें शत्रूंचा पराभव केला असें यश घे. ४७० एकटें यशचसें काय, वरतीं त्याबरोबर सारें राज्यही आलेलें आहे. तर हे सव्यसाची! तूं निमित्ताला मात्र धनी हो." ४७१**

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च
कर्णं तथान्यानपि योधवीरान् ।
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा
युद्ध्यस्व जेताऽसि रणे सपत्नान् ॥ ३४ ॥

[ द्रोणमिति ] द्रोणाचा पाड न करीं । भीष्माचें भय न धरीं । कैसेनि कर्णावरी । पैजूं हें न ह्मणें ॥ ७२ ॥ कोण

१ आकार. २ अतिशय भेकड. ३ हिसकावून. ४ निकृष्ट, हीन. ५ संहार कर. ६ शस्त्र धरूं.

उपाय जयद्रथा कीजे । हें न चिंतू चित्त तुझें । आणीकही आथि जे जे । नांवाणिगे वीर ॥ ७३ ॥ [ मया हतान् ] तेही एक एक आघवे । चित्रींचे सिंहाडे मानावे । जैसे वोलेनि हातें घ्यावे । पुसोनियां ॥ ७४ ॥ यावरी पांडवा । कायसा युद्धाचा मेळावा । हा आभास गा आघवा । येर ग्रासिलें मियां ॥ ७५ ॥ जेव्हां तुवां देखिले । हे माझिया वदनीं पडिले । तेव्हांचि यांचें आयुष्य सरलें । आतां रितीं सोपें ॥ ७६ ॥ [ त्वं जहि ] ह्मणोनि वहिला उठीं । मियां मारिले तूं निवटीं । [ मा व्यथिष्ठाः ] न रिघें शोकसंकटीं । नोथिलिया ॥ ७७ ॥ [ युध्यस्व ] आपणचि आडखिळा कीजे । तो कौतुकें जैसा विंधोनि पाडिजे । तैसें देखें गा तुझें । निमित्त आहे ॥ ७८ ॥ बापा विरुद्ध जें जाहालें । तें उपजतांचि वाघें नेलें । आतां राज्येंसीं संचलें । यश तूं भोगीं ॥ ७९ ॥ [ रणे सपत्नान् ] सावियाची उंतत होते दायाद । आणि बळिये जगीं दुर्मद । ते वधिले विषद । सायास न लगतां ॥ ४८० ॥ [ जेतासि ] ऐसिया इया गोष्टी । विश्वाच्या वाक्पटीं । लिहूनि घालीं किरीटी । विजयी होईं ॥ ८१ ॥

**"द्रोणाची पर्वा करूं नको; भीष्माचें भय धरूं नको; कर्णावर शस्त्र कसें उगारूं हें मनांत आणूं नको. ४७२ जयद्रथाला काय उपाय करावा? ही काळजी अंतःकरणांत बाळगूं नको. आणखी जे जे नामांकित वीर आहेत, ४७३ तेही सारे एक एक चित्रांतले सिंह आहेत असें समज. ते काय ओल्या हातांनीं पुसून काढावेत. ४७४ अर्जुना! ह्यापुढें ह्या युद्धांतील इतर जमातीची कथा काय? हा सारा मिथ्याभास आहे. बाकी साऱ्यांना मीं पूर्वींच गिळून टाकलें आहे. ४७५ तूं ह्यांना माझ्या तोंडांत पडलेले पाहिलेस, तेव्हांच ह्यांचें आयुष्य संपलें. आतां रितीं सोपटें राहिलेलीं आहेत. ४७६ याकरितां लौकर ऊठ. मीं मारलेच आहेत, त्यांचा तूं आतां संहार कर. फुकटच्या शोकांत आणि संकटांत पडूं नको. ४७७ आपण लगोऱ्या कराव्यात आणि त्या मौजेनें आपणच हाणून पाडाव्यात, त्याप्रमाणें तुझें फक्त निमित्त आहे. ४७८ बाबा! जितकें जितकें ह्मणून तुझ्या विरुद्ध होतें तितकें सारें**

१ नामांकित, प्रख्यात. २ मिथ्याभास. ३ निर्जीव सोपटें. ४ लवकर. ५ लटक्या, मिथ्या. ६ लगोऱ्या. ७ उन्मत्त. ८ स्पष्ट, विष देणारे. ९ वाणीरूप पटावर.

वाघानें नेलें. आतां राज्यासहवर्तमान सांडून राहिलेल्या यशाचा तूं उपभोग घे. ४७९ बळानें उन्मत्त झालेले, गर्विष्ठ, विषप्रयोग करणारे जे तुझे भाऊबंद होते, त्या साऱ्यांस सायास न लागतां अगदीं सहज मारून टाकलें. ४८० अर्जुना! अशा ह्या गोष्टी विश्ववाणीरूप पटावर लिहून टाक, आणि विजयी हो कसा!" ४८१

संजय उवाच—

एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य
कृतांजलिर्वेपमानः किरीटी ।
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं
सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ३५ ॥

[ संजय उवाच–एतत् ] ऐसी आघवीचि हे कथा । तया अपूर्ण मनोरथा । संजय सांगे कुरुनाथा । ज्ञानदेव ह्मणे॥८२॥ [ वचनं ] मग सत्यलोकौनि गंगाजळ । सुटलिया वाजत ख[1]ळाळ । तैसी वाचा विशाळ । बोलतां तया ॥ ८३ ॥ ना तरी महामेघांचे उमाळे । घडघडीत एके वेळे । कां घुमघुमिला[2] मंदराचळें । क्षीराब्धि जैसा ॥ ८४ ॥ [केशवस्य] तैसें गंभीरें महानादें । हें वाक्य विश्वकंदें । बोलिलें अगाधें । अनंतरूपें ॥ ८५ ॥ [किरीटी] तें अर्जुनें मोटकें[3] [ श्रुत्वा ] ऐकिलें । [वेपमान] आणि सुख कीं भय दुणावलें । हें नेणों परि कांपिनलें । सर्वांग तयाचें ॥ ८६ ॥ सखोलपणें वळली मोट । [कृतांजलिः] आणि तैसेचि जोडले करसंपुट । [नमस्कृत्वा] आणि वेळोवेळां ललाट । चरणीं ठेवी ॥ ८७ ॥ [सगद्गदं] तेविंचि कांहीं बोलों जाये । तंव गळा बुजलाचि[4] ठाये । हें सुख कीं भय होये । हें विचारा तुह्मी ॥ ८८ ॥ परि तेव्हां देवाचेनि बोलें । अर्जुना हें ऐसें जाहालें । मियां पदावरूनि देखिलें । श्लोकाचिया ॥ ८९ ॥ [ भीतभीतः] मग तैसाचि भेणें भेणें । [प्रणम्य] पुढती जोहारूनि[5] चरण । [ भूय एवाह कृष्णं] मग ह्मणे जी आपण । ऐसें बोलिलेति ॥ ४९० ॥

**ज्ञानदेव** ह्मणतात 'ही कथा, अपूर्णमनोरथी जो **धृतराष्ट्र**, त्यास **संजयानें** सांगितली.' ४८२ मग **सत्यलोकांतून** गंगेचा प्रवाह निघाला ह्मणजे तो जसा खळाळत जातो तशा गंभीर वाणीनें, ४८३ किंवा प्रचंड मेघांचे उमाळे एकदम जसे घडघडाट करतात, किंवा मंदाराचलानें जसा क्षीरसागर दणाणला होता, ४८४ तशा प्रकारच्या त्या विश्वकंदानें– **अनंतस्वरूपानें**–महाशब्दानें गर्जना करून पूर्वीचे शब्द सांगितले. ४८५ ते ओझरते **अर्जुनाच्या** कानांवर आले. त्या योगें करून सुख का भय दुणावलें समजत नाहीं. पण **अर्जुनाचें** आंग कांपूं लागलें, येवढी गोष्ट खरी. ४८६ त्या कंपानें त्याची अगदीं मोटच वळली. त्यासरशीं दोन्ही हात जोडून पुन्हापुन्हा चरणांवर मस्तक ठेवूं लागला. ४८७ कांहीं बोलावयास प्रयत्न करी, पण गळा अगदीं भरून आला. ह्यावरून त्याच्या मनांत सुख होतें कीं दुःख होतें, ह्याचा आपणच विचार करा. ४८८ पण त्या वेळीं देवाच्या त्या भाषणानें **अर्जुनाला** असें झालें खरें. हें मी श्लोकांतील पदावरून ह्मणतों. ४८९ तसेंच भीत भीत पुन्हां चरणांस वंदन केलें आणि ह्मणाला "महाराज! आपण असें बोललां." ४९०

अर्जुन उवाच—

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या
जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।
रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति
सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः ॥ ३६ ॥

[अर्जुन उवाच–स्थाने हृषीकेश] ना तरी अर्जुना मी काळ। आणि प्रसिजे तो माझा खेळ । हा बोलं तुझा कीर अढळ । मानूं आह्मी ॥ ९१ ॥ परि तुवां जी काळें । आजि स्थितीचिये वेळे । प्रासिजे हें न मिळे[2] । विचारासी ॥ ९२ ॥ कैसेनि आंगींचें तारुण्य काढावें । कैंचें नव्हे तें वार्धक्य आणावें । ह्मणोनि करूं ह्मणसी तें नव्हे । बहुत करुनी॥९३॥ हां जी चौपाहरी[3] न भरतां । कोणेही वेळे श्रीअनंता । काय मध्यान्हीं सविता । मावळत आहे ॥ ९४ ॥ [तव प्रकीर्त्या] पैं तुज अखंडिता काळा । तिन्हीं आहाती जी वेळा । त्या तिन्हीं परी सबळा[4] । आपुलालिया समयीं ॥ ९५ ॥ जे वेळीं होंलागे उत्पत्ती । ते वेळीं स्थिती प्रळय हारपती । आणि स्थितिकाळीं न मिरवती । उत्पत्ति प्रळय ॥ ९६ ॥ पाठीं प्रळयाचिये वेळे । उत्पत्ति स्थिति मावळे । हें कायसेनही[6] न ढळे । अनादि ऐसें ॥ ९७ ॥ ह्मणोनि आजि तंव भरें भोगें । स्थिती वर्जित आहे जगें । एथ प्रसिसी तूं हें नलगे । माझ्या जीवीं ॥ ९८ ॥ तंव संकेतें[7] देव बोले । अगा या दोहीं

१ खळाळाप्रमाणें गर्जना करणारे. २ दणाणला. ३ अंमळसें. ४ भरून आला. ५ नमस्कारून, वंदन करून.

१ स्वास्थ्याच्या, पालनाच्या. २ जुळत नाहीं. ३ चार प्रहर. ४ बळयुक्त. ५ पालन. ६ कशानेंही. ७ संक्षेपानें, खुणेनें.

सैन्याचें भरणें पुरलें । तें प्रत्यक्षचि तुज दाविलें । येर यथा काळें जाण ॥ ९९ ॥ हा संकेत जंव अनंता । वेळ लागला बोलतां । तंव अर्जुनें लोक मागुता । देखिला यथास्थित ॥ ५०० ॥ [जगत्प्रहृष्यति] मग ह्मणतसे देवा । तूं सूत्री विश्वलाघवा । जग आला मा आघवा । पूर्वस्थिती पुढती ॥१॥ परि पडिलिया दुःखसागरीं । तूं काढिसी कां जया परी । ते कीर्ति तुझी श्रीहरी । आठवित असें ॥ २ ॥ कीर्ति आठवितां वेळोवेळां । भोगीतसें महासुखाचा सोहळा । तेथ हर्षामृतकल्लोळा-। वरि लोळत आहें ॥ ३ ॥ [अनुरज्यते च] देवा जियालेपणें जग । धरी तुझ्या ठायीं अनुराग । आणि दुष्टां तयां भंग । अधिकाधिक ॥ ४ ॥ [रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति] पैं त्रिभुवनीचिया राक्षसां । महाभय तूं हृषीकेशा । ह्मणोनि पळताती दाही दिशा । पैलीकडे ॥ ५ ॥ [सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः] एथ सुर नर सिद्ध किन्नर । किंबहुना चराचर । ते तुज देखोनि हर्षनिर्भर । नमस्कारित असती ॥ ६ ॥

"कीं **अर्जुना!** मी काळ आहें; आणि ग्रासून टाकणें हा माझा खेळ आहे. हे शब्द अगदीं खरे, ढळणारे नव्हेत असें आह्मी मानतों. ४९१ परंतु **प्रभो!** आपण कालस्वरूपानें आज स्वास्थ्याच्या वेळीं ग्रास करणें हें विचारास नीट दिसत नाहीं. ४९२ आंगचें तारुण्य असेल तें, एकदम कसें काढतां येईल? आणि वार्धक्य तरी कसें आणतां येईल? ह्मणून आपण ग्रास करतों ह्मणतां खरें, पण तो बहुतकरून करतां येणार नाहीं. ४९३ अहो! महाराज! **श्रीअनंता!** हे चार प्रहर भरल्याशिवाय, किंवा भरदोन प्रहरींच सूर्याला मावळतां येईल काय? ४९४ त्याचप्रमाणें तुह्मी निरंतर काळासारखे असणारे, त्या तुह्मांलाही महाराज! तीन वेळा आहेत. आणि त्या तिन्हीही आपआपल्या कालामध्यें अढळ आहेत. ४९५ कारण, ज्या वेळीं उत्पत्ति होऊं लागते, त्या वेळीं स्वास्थ्य आणि संहार नाहींसे होतात. आणि पालन करतांना उत्पत्ति आणि क्षय ह्यांचें कांहीं चालत नाहीं. ४९६ पुन्हा संहाराच्या वेळीं उत्पत्ति आणि पालन ह्यांचा लय होतो. अशी अनादि परंपरा आहे. ती कशानेंही चुकावयाची नाहीं. ४९७ तसें केलेंत तर आज जगाची भोग भोगण्याच्या रंगांत आलेली स्थिति बदलेल. ह्मणून तूं ग्रास करशील हें माझ्या जिवाला खरें वाटत नाहीं. ४९८ तेव्हां संकेतानें-खुणेनें-**देव** ह्मणाले 'अरे! ह्या दोन्ही सैन्यांचें आयुष्य संपलें, हें तुला प्रत्यक्ष दाखविलें. बाकी प्रत्यक्ष होणें तें नेमलेल्या वेळींच होईल, हें समजून ठेव.' ४९९ हा संकेत-किंवा खूण-दाखवावयाला जो वेळ लागला, तितक्या अवकाशांत **अर्जुनाला** पुन्हा सर्व जग पूर्ववत् दिसूं लागलें. ५०० मग ह्मणतो "**देवा!** तुह्मी सूत्रधार व विश्वचमत्कार करणारे अहां. अहो! हें जग आतां पुन्हा पूर्वस्थितीवर आलें कीं! ५०१ परंतु **श्रीहरि!** दुःखसागरामध्यें पडलेल्यास तूं ज्या रीतीनें बाहेर काढतोस, त्या तुझ्या कीर्तीची आठवण करीत आहें. ५०२ तिची पुन्हा पुन्हा आठवण झाली ह्मणजे महत्सुखाचा सोहळा भोगावयाला मिळतो, आणि हर्षामृतकल्लोळांवर लोळतों आहें असें वाटतें. ५०३ **देवा!** आतां जगाच्या जिवांत जीव आल्यामुळें तें तुह्मांवर प्रीति करतें आहे आणि दुष्टांना मात्र अधिकाधिक भीति उत्पन्न झाली आहे. ५०४ हे **हृषीकेशा!** त्रिभुवनांतील राक्षसांना तूं महाभय आहेस. ह्मणून ते दाही दिशांच्याही पलीकडे पळत सुटले आहेत. ५०५ आणि हिकडे देव, मानव, सिद्ध, किन्नर, आणि बहुतेक सर्व चराचर तुला पाहून हर्षयुक्त होत्साते नमस्कार करीतआहेत." ५०६

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन्
गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ।
अनंत देवेश जगन्निवास
त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥

[कस्माच ते न नमेरन्] एथ गा कवणा कारणा । राक्षस हे नारायणा । न लगतीचि चरणा । पळते जाहाले ॥ ७ ॥ आणि हें काय तूतें पुसावें । येतुलें आह्मासिही जाणवे । तरीं सूर्योदयीं राहावें । कैसेनि तमें ॥ ८ ॥ [महात्मन्] जी तूं स्वप्रकाशाचा आगर । आणि जाहाला आह्मासि गोचर ।

१ आयुष्य. २ पूर्ववत्. ३ सूत्रधार. ४ जिवंतपणीं. ५ प्रीति.

ह्मणोनियां निशाचरां केरें। फिटलों सहजें ॥ ९ ॥ [गरीयसे] हें येतुले दिवस आह्मा। कांहीं नेणवेचि श्रीरामा। आतां देखतसें महिमा। गंभीर तुझा ॥१०॥ [ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे] जेथूनि नाना सृष्टीचिया वोली[१]। पसरती भूतग्रामाचिया वेली। तया महद्ब्रह्मातें व्याली। दैविकी इच्छा ॥ ११ ॥ [अनंत देवेश] देव निःसीम सत्व सदोदित। देव निःसीमगुण अनंत। देव निःसीम साम्य सतत। नरेंद्र देवांचा॥१२॥ [जगन्निवास] जी तूं त्रिजगतिये वोलावा। [त्वमक्षरं सदसत्तत्परं यत्] अक्षर तूं सदाशिवा। तूंचि सदसत् देवा। तयाही अतीत तें तूं ॥ १३ ॥

"**नारायणा!** हे येथें राक्षस आपल्या चरणीं न लागतां पळाले कां? ५०७ पण हें तुह्मांला काय विचारावयाचें आहे? तेवढें आह्मांलाही कळतें. तर सूर्योदय झाल्यानंतर अंधकाराला तेथें कसें राहतां येईल? ५०८ **महाराज!** आपण स्वयंप्रकाशाचें भांडार असून विकसित झालां आहांत, तेव्हां निशाचरांना सहजच अडचण पडली. ५०९ **श्रीरामा!** हें इतक्या दिवस आह्मांस कांहींच समजत नव्हतें. तुझा गंभीर महिमा आज दृष्टीस पडला. ५१० जेथून नानाप्रकारच्या सृष्टीच्या ओळी व भूतग्रामांच्या वेली पसरतात, ती आपली माया देवाच्या इच्छेनें झालेली आहे. ५११ देव निरंतर निस्सीम सत्वयुक्त आहे. देव अनंत असून निस्सीम गुणी आहे. देव निरंतर निस्सीम साम्य आणि देवांचाही देव आहे. ५१२ **प्रभो!** आपण त्रिभुवनाचा ओलावा आहांत. **सदाशिवा!** आपण अक्षर आहांत. देवा! सत् आणि असत् तुह्मीच. आणि त्याच्याही अतीत–पलीकडचें–तेंही आपणच." ५१३

त्वमादिदेवः पुरुषः पुराण-
स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम्।
वेत्ताऽसि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनंतरूप ॥ ३८ ॥

[त्वमादिदेवः पुरुषः पुराणः] तूं प्रकृतिपुरुषांचिया आदी। जी महत्तत्वा तूंचि अवधी। स्वयें तूं अनादी। पुरातन ॥१४॥ [त्वमस्य विश्वस्य परं निधानं] तूं सकळ विश्वजीवन। जीवांसि तूंचि निधान। [वेत्तासि] भूतभविष्याचें ज्ञान। तुझ्याचि हातीं ॥ १५ ॥ [वेद्यं च] जी श्रुतीचिया लोचना। स्वरूपसुख तूंचि अभिन्ना। [परं च] त्रिभुवनाचिया आयतना। आयतन तूं ॥१६॥ ह्मणोनि जी परम। [धाम] तूंतें ह्मणिजे महाधाम। कल्पांतीं महद्ब्रह्म। तुजमाजी रिगे ॥ १७ ॥ [त्वया ततं विश्वमनंतरूप] किंबहुना तुवां देवें। विश्व विस्तारिलें आहे आघवें। तरि अनंतरूपा वानावें। कवणें तूतें ॥ १८ ॥

१ अडचण. २ झालों. ३ ओळी. ४ महत्तत्वरूप मायेला. ५ प्रकृतिपुरुषाच्या. ६ गुणसाम्य मायेला. ७ शेवट.

"प्रकृति आणि पुरुष ह्यांच्याही आधींचा तूं; **महाराज!** महत्तत्वाचा शेवट आपणच. अनादि, पुरातनही स्वतः तुह्मीच. ५१४ सकल विश्वांचें जीवन तूं. जिवांना निधान तूंच; भूतभविष्याचें ज्ञान तुझ्याच हातीं. ५१५ महाराज! श्रुतीच्या नेत्रांना अभिन्न असे स्वरूपसूचक तुह्मीच. आणि त्रिभुवनाच्या आश्रयाला आश्रयही तूंच. ५१६ ह्मणूनच **प्रभो!** आपल्याला परम आश्रयस्थान असें ह्मणतात. आणि कल्पांताच्या वेळीं महद्ब्रह्म–भूतें–तुमच्यामध्येंच लीन होतात. ५१७ येवढेंच नव्हे, तर देवा! सारें विश्व तुह्मींच विस्तारलेलें आहे. तर अनंता! तुमचें वर्णन करण्यास कोण समर्थ आहे?" ५१८

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥ ३९ ॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोस्तु ते सर्वत एव सर्व
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ४० ॥

[नमः] जी काय एक तूं नव्हसी। कवणेठायीं नससी। हें असो जैसा आहासी। तैसिया नमो ॥ १९ ॥ [वायुरित्यर्धं] वायु तूं श्रीअनंता। यम तूं नियमिता। प्राणिगणीं वसता। अग्नि तो तूं ॥ २० ॥ वरुण तूं सोम। स्रष्टा तूं ब्रह्म। पितामहाचाही परम। आद्य जनक तूं ॥ २१ ॥ [नमोस्तु ते] आणीकही जें जें कांहीं। रूप आथि अथवा नाहीं। तया

१ आश्रय. २ आश्रयस्थान. ३ लीन होतें. ४ शासनकर्ता.

नमों तुज तैसयाही । श्रीजगन्नाथा ॥ २२ ॥ ऐसें सानुरागें चित्तें । नमन केलें पांडुसुतें । [भूयोऽपि नमो नमस्ते] मग पुढती ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥२३॥ पाठीं तिये सावंते । न्याह्याळी श्रीमूर्तीतें । आणि पुढती ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २४ ॥ पाहत पाहतां प्रांतें । समाधान पावे चित्तें । आणि पुढती ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २५ ॥ इयें चराचरीं जी भूतें । सर्वत्र देखे तयातें । [पुनश्च] आणि पुनःपुना ह्मणे नमस्ते । नमस्ते प्रभो ॥ २६ ॥ ऐसीं रूपें तियें अद्भुतें । आश्चर्यें स्फुरती अनंतें । तंव तंव नमस्ते । नमस्तेचि ह्मणे । ॥ २७ ॥ आणिक स्तुतीही नाठवे । आणि निवांतही [1]नसवे । नेणें कैसा प्रेमभावें । गाजोंचि लागे ॥ २८ ॥ [सहस्रकृत्वाः] किंवहुना इयापरी । नमन केलें सहस्रवरी । [नमः पुरस्तात्] कीं पुढती ह्मणे श्रीहरी । तुज सन्मुखा नमों ॥ २९ ॥ [अथ पृष्ठतस्ते] देवासि पाठि पोट आथि कीं नाहीं । येणें उपयोग आह्मा काई । तरि तुज पाठिमोरेयाही । नमों स्वामी ॥ ५३० ॥ उभा माझिये पाठीसीं । ह्मणोनि पाठिमोरें ह्मणावें तुह्मासी । सन्मुख विन्मुख जगेंसीं । न घडे तुज॥३१॥ [नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व] आतां वेगळालिया अवयवां । नेणें रूप करूं देवा । ह्मणोनि नमों तुज सर्वा । सर्वात्मका ॥३२॥ [अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं] जी अनंत बळसंभ्रमों । तुज नमों अमितविक्रमा । [सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः] सकळकाळीं समा । सर्वदेशा ॥ ३३ ॥ आघविया आकाशीं जैसें । अवकाशचि होऊनि आकाश असे । तूं सर्वपणें तैसें । पातलासि सर्व ॥ ३४ ॥ किंबहुना केवळ । सर्व हें तूंचि निखिळ[3] । परि क्षीरार्णवीं कल्लोळ । पयाचे जैसे ॥ ३५ ॥ ह्मणोनियां देवा । तूं वेगळा नव्हसी सर्वां । हें आलें मज [4]सद्भावा । आतां तूंचि सर्व ॥ ३६ ॥

"महाराज! आपण काय एक नव्हे? कोणत्या ठिकाणीं आपण नाहीं? हें असो. ज्या प्रकारचे तुह्मी असाल, त्या तुह्मांला नमस्कार असो. ५१९ श्रीअनंता! वायु तूं; शासनकर्ता यम तूं; प्राणिमात्रांच्या ठायीं राहणारा अग्नि तो तूं; ५२० वरुण तूं, सोम तूं; स्रष्टा तूं; ब्रह्म तूं; आणि पितामहाचा–ह्मणजे ब्रह्मदेवाचाही–परम आद्यजनक तूं; ५२१ आणखीही दृश्य असलेलें किंवा अदृश्य असलेलेंही तूं. तशा तुलाही हे श्रीजगन्नाथा! नमस्कार असो." ५२२ ह्याप्रमाणें परमभक्तियुक्त चित्तानें अर्जुनानें नमस्कार केला. आणि पुन्हा ह्मणाला "प्रभो! तुह्मांला नमस्कार असो. तुह्मांला नमस्कार असो." ५२३ फिरून त्या मूर्तीकडे साद्यंत अवलोकन करून पुन्हा ह्मणाला "प्रभो! तुह्मांला नमस्कार असो. तुह्मांला नमस्कार असो." ५२४ त्यांतील एकएक अवयव पाहतां पाहतां चित्तांत समाधान पावून पुन्हा ह्मणतो "प्रभो! तुह्मांला नमस्कार असो. तुह्मांला नमस्कार असो." ५२५ ह्या चराचरामध्यें जे प्राणिमात्र दृष्टीस पडत होते, त्या सर्वांकडे पाहून पुनःपुन्हा ह्मणूं लागला "प्रभो! तुह्मांला नमस्कार असो. तुह्मांला नमस्कार असो." ५२६,५२७ ह्यापेक्षां अधिक स्तुति करावयासही सुचेना, आणि उगेंचही राहवेना. प्रेमभावानें किती भरला तें कांहीं सांगतां येत नाहीं. ५२८ इतकेंच नव्हे, तर त्यानें ह्याप्रमाणें हजारों वेळां नमस्कार केला; आणि पुनः ह्मणतो "हे श्रीहरि! तुह्मांला सन्मुख असणाराला नमस्कार असो. ५२९ देवाला पाठ आणि पोट आहे कीं नाहीं, ह्याचा विचार करून आह्मांला काय उपयोग? तरी स्वामी! तुह्मां पाठमोरे असणारालाही नमस्कार असो. ५३० आपण माझ्या पाठीशीं–पाठीकडे–ही उभे आहांत. ह्मणून तुह्मांला पाठमोरे असेंही ह्मणतां येईल. जगाला तुह्मी समोर आणि पाठमोरे दोन्हीही होत नाहीं. कारण, आपण जिकडे तिकडे सर्वव्यापकच आहांत. ५३१ देवा! आतां तुमच्या निरनिराळया अवयवांचें वर्णन मला करतां येत नाहीं. ह्मणून तुला सर्व सर्वात्मकालाच नमस्कार करतों. ५३२ प्रभो! अनंतबलशाली! अमितविक्रमा! सकलकालीं सम असणाऱ्या! सर्वदेशव्यापका! तुला नमस्कार असो. ५३३ साऱ्या आकाशामध्यें जसें आकाशच भरलेलें असतें, त्याप्रमाणें तूं सर्वव्यापकतेनें सर्वच होऊन राहिला आहेस. ५३४ किंवा क्षीराब्धीमध्यें जशा साऱ्या दुधाच्याच लाटा असतात, तद्वत् हें सारें यच्चयावत् निखालस तूंच आहेस. ५३५ ह्मणून देवा! तूं सर्वांवेगळा नव्हेस.

१ न रहावे. २ बलशाले. ३ शुद्ध. ४ प्रत्ययाला.

सारें कायतें तूं. हें आतां मला एकेपणीं समजून चुकलें. " ५३६

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं
हे कृष्ण हे यादव हे सखेति ।
अजानता महिमानं तवेदं मया
प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ४१ ॥

[ सखेति मत्वा ] परि ऐसिया तूतें स्वामी । कहींच नेणो जी आह्मी । ह्मणोनि सोयरे संबंधधर्मीं । राहटलों तुजसीं ॥ ३७ ॥ अहा थोर वाउर जाहालें । अमृतें संमार्जन म्यां केलें । वोरिकें घेऊनि दिधलें । कामधेनूतें ॥ ३८ ॥ परिसाचा खडवाचि जोडला । कीं फोडूनि आह्मी गांडोरा घातला । कल्पतरू तोडोनि केला । कूंप शेता ॥ ३९ ॥ चिंतामणीची खाणी लागली । तेणेंकरूनि वोढाळें वोल्हांटिलीं । तैसी तुझी जवळीक घाडिली । सांगातीपणें ॥ ५४० ॥ [ प्रसभं यदुक्तं ] हें आजिचेंचि पाहें पां रोकडें । कवण झुंझ हें केवढें । एथ परब्रह्म तूं उघडें । सारथी केलासी ॥ ४१ ॥ ययां कौरवांचिया घरा । शिष्टाई धाडिलासि दातारा । ऐसा वेणिजेसाठीं जगेश्वरा । विकलासि आह्मी ॥ ४२ ॥ [ अजानता महिमानं तवेदं ] तूं योगियांचें समाधिसुख । कैसा जाणेंचिना मी मूर्ख । उपरोधें जी सन्मुख । तुजसीं करूं ॥ ४३ ॥

“ परंतु **प्रभो ! महाराजा !** अशा तुह्मांला आह्मीं कधींच जाणलेलें नाहीं. ह्मणून तुझ्याबरोबर सोयरेपणाच्या नात्यानें वागलों. ५३७ छे ! छे ! ही गोष्ट फारच वाईट झाली. अहो ! अमृतानें आह्मीं सडापोतेरें किं हो केलें. किंवा कोंकरूं घेऊन कामधेनु देऊन टाकली. ५३८ परिसाचा दगड सांपडला होता, त्याचा फोडून गडगा किं हो घातला ! कल्पतरू तोडून त्याचें शेताला कुंपण किं हो केलें ! ५३९ चिंतामणींची खाण सांपडली असतां, त्यांतले खडे घेऊन ओढाळ गुरें किं हो हाकून लावलीं ! त्याप्रमाणें तुझें सान्निध्य असलेलें, आह्मीं सहवासांत राहून दूर मात्र केलें. ५४० हें आजचेंच उदाहरण प्रत्यक्ष पाहाना ? युद्ध तें कसलें ? आणि केवढें ? आणि येथें तुला—प्रत्यक्ष परब्रह्म झाला—सारथी केलें आहे ! ५४१ हे **दातारा !** ह्या कौरवांच्या घराला आह्मीं तुला शिष्टाई करावयाला सुद्धां पाठविला. हे **जगदीश्वरा !** अशा व्यापारासाठीं आह्मीं तुला विकावें ना ? ५४२ तूं योग्याच्या समाधीचें सुख, असें असतां मी मूर्ख तुला ओळखित सुद्धां नाहीं. आणखी **प्रभो !** तुमच्या समोर मी हट्ट किं हो करतों. " ५४३

१ सोयरेपणाच्या नात्यानें. २ वागलों. ३ वाईट. ४ सडापोतेरें. ५ कोंकरूं. ६ पर्वतच. ७ गडगा. ८ कुंपण. ९ ओढाळ गुरें. १० हाकविलीं. ११ वाणिज्यार्थ, उदिमासाटीं. १२ आग्रह, हट्ट.

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु ।
एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥

[ तत्समक्षं ] तूं या विश्वाची अनादि आदी । बैससी जिये सभासदीं । [ यच्चावहासार्थं ] तेथें सोयरीकीचिया संबंधीं । रेळीं बोलों ॥ ४४ ॥ [ असत्कृतोऽसि ] विपायें राउळा येवों । तरि तुझेनि अंगें मान पावों । न मानिसी तरी जावों । रुसोनि सलगी ॥ ४५ ॥ पायां लागोनि बुझावणी । तुझ्या ठायीं शार्ङ्गपाणी । पाहिजे ऐशी करणी । बहु केली आह्मी ॥ ४६ ॥ स्वजनपणाचिया वाटा । तुजपुढें बैसें उपराटा । हा पौड काय वैकुंठा । परि चुकलों आह्मी ॥ ४७ ॥ [ विहारशय्यासनभोजनेषु ] देवेंसि कोलकांठी धरूं । आखाडां झोंबीलोंबी करूं । सारी खेळतां तंस्कारू । निकरेंही भांडों ॥ ४८ ॥ चांग तें उराउरी मागों । सर्वज्ञासि कीं बुद्धी सांगों । तेवींचि ह्मणों काय लागों । तुझे आह्मी ॥ ४९ ॥ ऐसा अपराध हा आहे । जो त्रिभुवनीं न समाये । जी नेणतांचि कीं पाय । शिवतिले तुझे ॥ ५५० ॥ देव बोनेयाच्या अवसरीं । लोभें कीर आठवण करी । परि माझा निसुग गर्व अवधारीं । जे फुगूनचि बैसें ॥ ५१ ॥ देवाचिया भोगायतनीं । खेळतां आशंकेना मनीं । जी रिगोनियां शयनीं । सरिसों पहुडें ॥ ५२ ॥ [ हे कृष्ण हे यादव हे सखेति ] कृष्णा ह्मणोनि हाकारिजे । यादवपणें तूतें लेखिजे । आपली आण घालिजे । जातां तुज ॥ ५३ ॥ [ एकोऽथवाप्यच्युत ] मज एकासनीं बैसणें । कां तुझा बोल न मानणें । हें वोतंटीचेनि दाटपणें । बहुत घडलें ॥ ५४ ॥ [ तत्क्षामये त्वामहं ] ह्मणोनि काय काय आतां । निवेदिजेल अनंता । मी राशि आहें समस्तां । अ-

१ विनोदानें. २ कदाचित्. ३ समजूत. ४ पाठमोरा. ५ योगयता. ६ श्रीकृष्णा. ७ दांडपट्टा. ८ कुस्ती. ९ सोंगट्या, सारीपाट. १० तिरस्कार करूं, धिक्कार करूं. ११ बरोबरीनें. १२ जेवणाच्या. १३ रिकामा. १४ विलासगृहांत. १५ शेजारीं, आंगास लावून. १६ हाक मारावी. १७ संघट्टनानें.

पराधांची ॥ ५५ ॥ यालागीं पुढां अथवा पाठीं । जियें राहाटलों बहुवें वोखटीं । तियें मायेचिया परि पोटीं । सामावीं प्रभो ॥ ५६ ॥ जी कोण्ही एके वेळे । सरिता घेऊनि येती खडुळें । तियें सामाविजेति सिंधुजळें । आन उपाय नाहीं ॥ ५७ ॥ [ मया प्रमादात्प्रणयेन वापि ] तैसीं प्रीती कां प्रमादें । देवेंसीं मजविरुद्धें । बोलविलीं तियें मुकुंदें । उपसाहावीं जी ॥ ५८ ॥ आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा । आधार जाली आहे या भूतग्रामा । ह्मणोनि जी पुरुषोत्तमा । विनवूं तें थोडें ॥ ५९ ॥ [ अप्रमेयं ] तरि आतां अप्रमेया । मज शरणागता आपुलिया । क्षमा कीजो जी यया । अपराधांसी ॥ ५६० ॥

"या विश्वाचें अनादि मूळ तूं. असें असतां तूं ज्या सभासदांमध्यें बसलास तेथें, आह्मीं तुझा नात्याच्या संबंधानें विनोदही केला. ५४४ एखाद्या वेळीं तुझ्या घरीं आलों, तर तुझ्याकडून आह्मी बहुमान करून घेत होतों; आणि कांहीं कमी पडलें, तर सलगीनें रुसूनही बसत होतों. ५४५ हे **शार्ङ्गपाणी!** तुझ्याकडून पायधरण्या करवून आह्मीं आमची समजूत करावयास लावली. अशीं मनास वाटतील तशीं आह्मीं अनेक कृत्यें केलीं आहेत. ५४६ तुझ्या ठायीं आपलेपणा धरून आह्मी तुझ्याकडे पाठ करून सुद्धां बसलों आहों. **श्रीकृष्णा!** ही योग्यता का आमची? पण आमच्याकडून ती चुकी झाली. ५४७ देवा ! तुझ्याबरोबर आह्मी दांडपट्टा सुद्धां खेळलों आहों. आखाड्यामध्यें कुस्ती धरलेली आहे. आणि सोंगट्या खेळतांना अनेक वेळां तुझी निर्भर्त्सनाही केलेली आहे, व निकरानें भांडलोंही आहों. ५४८ चांगलें असेल तें बरोबरीनें मागितलें आहे. सर्वज्ञ असतां आह्मीं तुह्मांसच उलटा बुद्धिवाद सांगितला किं हो! त्याचप्रमाणें 'आह्मी तुझें काय लागतों?' असें सुद्धां ह्मणत होतों. ५४९ हा अपराध इतका मोठा आहे कीं, तो त्रिभुवनांत सुद्धां राहणार नाहीं. **महाराज!** आह्मीं न समजून तुमचे पाय सुद्धां तुडविले किं हो! ५५० जेवणाच्या वेळेस देव प्रेमानें न चुकतां आठवण करीत; पण हा माझा गर्व किती निर्लज्ज पहा. कीं तो मला फुगूनच बसवी. ५५१ देवाच्या विलासमंदिरांत खेळतांना मनांत दिकत सुद्धां वाटत नव्हती. **प्रभो!** तुमच्या शय्येवर चढून तुह्मांला अगदीं खेटून किं हो निजत होतों. ५५२ **'अरे कृष्णा'** ह्मणून तुह्मांला हाक मारित होतों. तूं एक यादवांतलाच असें समजत होतों. आणि तूं जाऊं लागलास तर, आह्मी आपली तुला शपत घालित होतों. ५५३ तुझ्या मांडीला मांडी लावून बसलों; तुझा शब्द न मानणें हेंही अतिशय संघट्टपणामुळें मजकडून फार फार घडलें. ५५४ ह्याकरितां **अनंता,** आतां मी काय काय ह्मणून सांगूं? साऱ्या अपराधांची मी राशी आहें. ५५५ ह्यासाठीं **प्रभो,** पुढें-मागें जीं मजकडून वाईट कृत्यें घडलीं असतील, तीं मातेप्रमाणें पोटांत घालावीं. ५५६ **महाराज!** कोणत्या एखाद्या वेळीं नद्या ह्या गढूळ पाणी घेऊन येतात,. त्याचा सुद्धां समुद्राला आपल्या जळांतच समावेश करून घ्यावा लागतो. दुसरा उपाय नाहीं. ५५७ तसें **प्रभो!** प्रीतीनें ह्मणा, किंवा चुकीनें ह्मणा, देवांना जीं काय मी विपरीत भाषणें बोललों असेन तीं **मुकुंदांनीं**—आपण—क्षमा करावींत. ५५८ आणखी देवांच्या क्षमारूपानें ह्या प्राणिसमुदायाला क्षमाही आधार झालेली आहे. ह्मणून **प्रभो! पुरुषोत्तमा!** विनंती करीन तितकी थोडी. ५५९ तर आतां **महाराज! अतर्का!** मला—आपल्या शरणागताला—ह्या अपराधांची क्षमा करावी." ५६०

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥ ४३ ॥

[ पिताऽसि लोकस्य चराचरस्य ] जी जाणीतलें मियां साचें । महिमान आतां देवाचें । देवो होय चराचराचें । जन्मस्थान ॥ ६१ ॥ [ त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ] हरिहर

१ वाईट. २ गढूळ उदकें. ३ क्षमारूपानें. ४ अतर्का, अनिर्वचनीया.

रादि समस्तां । देवा तूं परमदेवता । वेदातेंही पढविता । आद्य गुरु तूं ॥ ६२ ॥ गंभीर तूं श्रीरामा । नानाभूतैकसमा । सकळगुणी अप्रतिमा । अद्वितीया ॥ ६३ ॥ [न त्वत्समोऽस्ति] तुजसीं नाहीं सरिसें । हें प्रतिपादनचि कायसें । तुवां जालेनि अवकाशें । सामाविलें जग ॥ ६४ ॥ [अभ्यधिकः कुतोऽन्यः] तया तुझेनि पाडें दुजें । ऐसें बोलतांचि लाजिजे । तेथ अधिकचि कीजे । गोष्टी केवीं ॥ ६५ ॥ [लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः] ह्मणोनि त्रिभुवनीं तूं एक । तुजसारिखा नाहीं आणिक । तुझा महिमा अलौलिक । नेणिजे वानूं ॥ ६६ ॥

**"प्रभो! देवाचा खरोखर महिमा काय, तो मला आतां कळून चुकला. देव हें चराचरांचें जन्मस्थान आहे. ५६१ देवा! शंकर, ब्रह्मदेवादि सर्व देवांना पूज्य देवता तूं. वेदांनाही पढविणारा आद्य गुरु तूं. ५६२ श्रीरामा गंभीर, नानाभूतैकसम, सकलगुणी, अप्रतिम आणि अद्वितीय असा तूं. ५६३ तुझ्यांशीं बरोबरी करावयाला हें प्रतिपादनचसें काय? पण कोणीच समर्थ नाहीं. तूं धारण केलेल्या देहांत साऱ्या जगाचा समावेश झाला आहे. ५६४ त्या तुझ्या योग्यतेला बरोबर दुसरें आहे असें ह्मणावयालाच लाज वाटते. तेथें अधिक काय बोलावें? ५६५ ह्मणून त्रिभुवनांत तूं एक अद्वितीय आहेस. तुझ्यासारखा दुसरा कोणी नाहीं. तुझा महिमा अलौकिक, वर्णन करतां येत नाहीं." ५६६**

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ४४ ॥

[तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं] ऐसें अर्जुनें ह्मणितलें । मग पुढती दंडवत घातलें । तेथें सात्विकाचें आलें । भरतें तया ॥ ६७ ॥ [प्रसादये त्वामहमीशमीड्यं] मग ह्मणतसे प्रसीदं । वाचा होतसे सद्गद । काढी जी अपराध–। समुद्रोंनी ॥ ६८ ॥ तुज विश्वसुहृदातें कहीं । सोयरेपणें न मनुंचि पाहीं । तुज विश्वेश्वराचिया ठायीं । आश्चर्य केलें ॥ ६९ ॥ तूं वर्णनीय परी लोभें । मातें वर्णिसी पां सभे । तरि मियां मांजिजे क्षोभें । अधिकाधिक ॥ ५७० ॥ आतां ऐसिया अपराधां । मर्यादा नाहीं मुकुंदा । ह्मणोनि रक्ष रक्ष प्रमादा–। पासोनियां ॥ ७१ ॥ [पितेव पुत्रस्य] जी हेंचि विनवावयालागीं । कैंचि योग्यता माझिये आंगीं । परि अपत्य जैसें सैलगी । बापेंसी बोले ॥ ७२ ॥ पुत्राचे अपराध । जरी जाह्याले अगाध । तरी पिता साहे निर्द्वंद्वें । तैसें साहिजो जी ॥ ७३ ॥ सख्याचें उद्धत । सखा साहे निवांत । तैसें तुवां समस्त । साहिजो जी ॥ ७४ ॥ [सखेव सख्युः] प्रियाचियाठायीं सन्मान । प्रिय न पाहे सर्वथा जाण । तेविं उच्छिष्ट काढिलें आपण । तें क्षमा कीजो जी ॥ ७५ ॥ [प्रियः प्रियायार्हसि देव सोढुं] ना तरी प्राणाचें सोयरें भेटे । मग जीवें भूतलीं जियें संकटें । तियें निवेदितां न वाटे । संकोच कांहीं ॥ ७६ ॥ कां उखितें आंगें जीवें । आपणपें दिधलें जिंया मनोभावें । तिया कांत मिनलिया न राहावें । हृदय जेविं ॥ ७७ ॥ तयापरी जी मियां । हें विनविलें तुमतें गोसांविया । आणीक कांहीं एक ह्मणावया । कारण असे ॥ ७८ ॥

**ह्याप्रमाणें बोलून अर्जुनानें देवापुढें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां त्याला अगदीं गहिंवर दाटून आला. ५६७ मग ह्मणतो "तोंडांतून शब्दही फुटत नाहीं. देवा! कृपा करावी. प्रभो! अपराधसमुद्रांतून काढावें. ५६८ तुला सोयरेपणाच्या योगेंकरून विश्वसुहृदाला कधींच मान दिला नाहीं. तुझ्या विश्वेश्वराच्या ठिकाणीं चमत्कारिक भाव धरला! ५६९ तुझें वर्णन करणें योग्य असतां, लोभामुळें तूंच माझें सभेमध्यें वर्णन केलेंस. तरी मी रागारागानें अधिक अधिकच बडबड केली. ५७० मुकुंदा! अशा अपराधांना मर्यादा ह्मणून नाहीं. ह्याकरितां ह्या प्रमादांपासून माझें संरक्षण करा हो, संरक्षण करा. ५७१ प्रभो! ही एवढी विनंती करण्याची तरी माझ्या आंगीं योग्यता कसली? परंतु मूल जसें लडिवाळपणानें बापाला बोलतें त्याप्रमाणें बोलतों. ५७२ पुत्राचे कितीही अपराध झाले तरी दुजाभाव सोडून देऊन ते जसा पिता सहन करतो, त्याप्रमाणें आपण सर्व सहन करावें. ५७४ प्रिय असतो तो प्रियाच्या**

१ तुल्य. २ आकाशें. ३ सांठविलें. ४ बरोबरीनें. ५ कृपा कर. ६ अपराधसमुद्रांतून. ७ वर्णन करावें, बडबड करावी.

१ लडिवाळपणानें. २ पित्याबरोबर. ३ दुजाभाव सोडून. ४ दांडगेपणा. ५ अनुभवलीं, झालीं. ६ उचित रीतीनें. ७ जिनें. ८ भ्रतार भेटला असतां.

**ठिकाणीं सन्मान मिळेल किंवा नाहीं, हें जसें मुळींच पहात नाहीं, त्याप्रमाणें महाराज! आपण उष्टीं काढलींत त्याची क्षमा असावी. ५७५ किंवा जिवाचा मनुष्य भेटला असतां आपल्या जिवानें जीं जीं संकटें भोगलीं असतील, तीं त्याला सांगावयाला जसा कांहीं संकोच वाटत नाहीं, ५७६ किंवा आपला प्राण, देह, सर्वस्व जिनें अर्पण केलेलें असतें, असा पति भेटला असतां, त्याच्यापाशीं हितगुज बोलल्यावांचून जसें स्त्रियेला रहावत नाहीं, ५७७ त्याप्रमाणें महाराज! मीं तुह्मां धन्यापाशीं ह्मणून विनंती केली. आपण मजवर प्रीति करतां असें ह्मणण्याला आणखीही एक कारण आहे." ५७८**

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे ।
तदेव मे दर्शय देव रूपं
प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ४५ ॥

[अदृष्टपूर्वं] तरि देवेंसीं सलगी केली । जे विश्वरूपाची आळी घेतली । ते मायबापें पुरविली । स्नेहाळाचेनि ॥ ७९ ॥ सुरतरुचीं झाडें । आंगणीं लावावीं कोडें । देयावें कामधेनुचें पाडें । खेळावया ॥ ५८० ॥ मियां नक्षत्रीं डाव पाडावा । चंद्र चेंडुवालागीं आणावा । हा छंद सिद्धी नेला आघवा । माउलिये तुवां ॥ ८१ ॥ जिया अमृतलेशालागीं सायास । त्याचा पाउस केला चारि मास । पृथ्वी वाहुन चासेचासें । चिंतामणी पेरिले ॥ ८२ ॥ ऐसा कृतकृत्य केला स्वामी। बहु लळा पाळिला तुह्मीं । दाविलें जें हरब्रह्मीं । नायकीजे कानीं ॥ ८३ ॥ मां देखावयाची केउती गोठी । जयाची उपनिषदां नाहीं भेटी । ते जिव्हारींची गांठी । मजलागीं सोडिली ॥ ८४ ॥ जी कल्पादि लागौनी । आजिची घडी धरुनी । माझीं जेतुलीं होउनी । गेलीं जन्में ॥ ८५ ॥ तया आघवियांचिआंत । घेरडोळी घेऊनि असें पाहत । परि ही देखिली ऐकिली मात । आंतुडेचि ना ॥ ८६ ॥ बुद्धीचें जाणणें । कहीं नवचेनि याचेनि आंगणें । हें सांदेही अंतःकरणें । करवेचिना ॥ ८७ ॥ तेथ डोळयां देखी होआवी । ही गोष्टीचि काय-

१ छंद. २ आवडीनें. ३ वासरूं, खोंड. ४ चेंडू करावयाला. ५ वाफ्यावाफ्यानें. ६ शंकराला व ब्रह्मदेवाला. ७ तर मग. ८ काय गोष्ट! ९ जिवांतली. १० प्रारंभापासून. ११ प्रत्येक घराचा झाडा. १२ सांपडेना. १३ शब्द. १४ दृग्गोचर.

सया करावी । किंबहुना ऐसें पूर्वीं । दृष्ट ना श्रुत ॥ ८८ ॥ [हृषितोऽस्मि दृष्ट्वा] तें हें विश्वरूप आपुलें । तुह्मीं मज डोळां दाविलें । तरि माझें मन झालें । हृष्ट देवा ॥ ८९ ॥ परि आतां ऐशी चाड जीवीं । जे तुजसी गोठी करावी । जवळीक हे भोगावी । आलिंगावयासी ॥ ५९० ॥ तें इयेचि रूपीं करूं ह्मणिजे । तरि कोणें एके मुखेंसीं चावळिजे । आणि कवणा खेंव देइजे । तुज लेखें नाहीं ॥ ९१ ॥ [भयेन च प्रव्यथितं मनो मे] ह्मणोनि वारियासवें धांवणें । नंठके गगना खेंव देणें । जळकेळी खेळणें । समुद्रीं केउतें ॥ ९२ ॥ यालागीं जी देवा । एथिंचें भय उपजतसे जीवा । ह्मणोनि येतुला लळा पाळावा । जे पुरे हें आतां ॥ ९३ ॥ [तदेव मे दर्शय देव रूपं] पैं चराचर विनोदें पाहिजे । मग तेणें सुखें घरीं राहिजे । तैसें चतुर्भुज रूप तुझें । तो विसावा आह्मां ॥ ९४ ॥ आह्मी योगजात अभ्यासावें । तेणें याचि अनुभवा यावें । शास्त्रातें आलोडावें । परि सिद्धांत तो हाचि ॥ ९५ ॥ आह्मी यजनें किजती सकळें । परि तियें फळावीं येणेंचि फळें । तीर्थें होतु सकळें । याचिलागीं ॥ ९६ ॥ आणीकही कांहीं जें जें । दान पुण्य आह्मी कीजे । तया फळीं फळ तुझें । चतुर्भुज रूप ॥ ९७ ॥ ऐसी तेथिंची जीवा आवडी । ह्मणोनि तेंचि देखावया लवडसवडी । वर्तत असे ते सांकडी । फेडिजे वेगीं ॥ ९८ ॥ [जगन्निवास] अगा जीवींचें जाणतेया । सकळ विश्ववसवितेया । [प्रसीद देवेश] प्रसन्न होईं पूजितया । देवांचिया देवा ॥ ९९ ॥

**"तें हें कीं, देवाशीं सलगी करून विश्वरूप दाखविण्याचा छंद घेतला होता, तो दयावंत मायबापांनीं पुरा केला. ५७९ मजेनें खेळण्याकरितां कल्पतरूंचीं झाडें आंगणांत लावा; कामधेनूचीं वासरें आणून द्या; ५८० नक्षत्रांनीं मला डाव टाकावासा वाटतो; चेंडू करावयाला मला चंद्र आणून द्या; अशांपैकींच मीं घेतलेला आळ होता. तथापि आपण माउली होऊन तोही सारा सिद्धीला नेलात. ५८१ ज्या अमृताचा एक बिंदूही मिळावयाला प्रयास पडतात, त्या अमृताचा तुह्मी चतुर्मास पाऊस पाडलात. पृथ्वीवर वाफेच्या वाफे पाडून त्यांत चिंतामणी पेरून सोडलेत. ५८२ स्वामी! ह्याप्रमाणें मला कृतकृत्य केलेंत.**

१ बोलावें. २ मोजदात. ३ न घडे. ४ आलिंगन. ५ जलक्रीडा. ६ अवलोकन करावें. ७ लगवग. ८ अडचण. ९ काढ. १० ब्रह्मांड वसविणाऱ्या.

जें आपण मला दाखवून माझे लाड पुरविलेत तें शंकरांनीं आणि ब्रह्मदेवांनीं कानांनीं सुद्धां ऐकिलें नाहीं, ५८३ मग पहावयाची गोष्ट कोठची? उपनिषदांना सुद्धां ज्याची भेट नाहीं ती अंतरंगांतील गांठ माझ्याकरितां सोडली. ५८४ सृष्टी उत्पन्न झाल्यापासून आजच्या घटकेपर्यंत माझे जितके जन्म होऊन गेले, ५८५ त्या सार्‍यांमध्यें प्रत्येकाचा झाडा घेऊन पाहतों आहे. परंतु ही गोष्ट पाहिलेली किंवा ऐकलेली सुद्धां आढळत नाहीं. ५८६ बुद्धीचें जाणणें कधीं ह्या आंगणांत गेलेलेंच नाहीं. हें अंतःकरणाला सांगतां सुद्धां येत नाहीं. ५८७ तेथें डोळ्यांनीं पाहण्याची गोष्ट कशाला मनांत आणावी? ह्मणजे असलें कधीं पाहिलेलें किंवा ऐकलेलेंही नाहीं. ५८८ तें हें आपलें विश्वरूप तुह्मीं मला डोळ्यांनीं दाखविलें. ह्मणून देवा! माझें मन संतोष पावलें. ५८९ पण आतां मनांत अशी इच्छा आहे कीं, तुझ्या बरोबर बोलावें, आणि आलिंगन देण्याला तूं जवळ असावेंस. ५९० तें ह्याच रूपाशीं करावें ह्मणशील, तर येथें कोणत्या स्वरूपाशीं ह्मणून बोलावें? आणि कोणाला ह्मणून आलिंगन द्यावें? तुला तर संख्याच नाहीं. ५९१ ह्मणून वार्‍याबरोबर धांवणें, किंवा गगनाला आलिंगन देणें व्हावयाचें नाहीं. समुद्रांत जलक्रीडा कशाची? ५९२ ह्याकरितां प्रभो! देवा! जिवाला ह्याचें भय वाटत आहे. ह्मणून एवढा लाड पुरवावा. आतां हें विश्वरूप पुरे. ५९३ ज्याप्रमाणें हें चराचर पाहून त्या आनंदानें घरांत राहण्याला आनंद वाटतो, त्याप्रमाणें तुझें चतुर्भुज स्वरूप हा एक आह्मांला विसावा आहे. ५९४ आह्मीं सारा योगाचा अभ्यास केला तरी मिळणार हेंच; शास्त्रांचा अभ्यास केला, तरी शेवटचा सिद्धांत हाच. ५९५ आह्मीं सारे यज्ञ केले तरी त्या सर्वांची फलप्राप्ती हीच; सारीं तीर्थें झालीं तरी ह्याचसाठीं. ५९६ ह्याशिवाय आह्मी जें जें कांहीं दान किंवा पुण्य करितों त्याचें फळ काय? तर चतुर्भुज स्वरूप. ५९७ अशी त्या रूपाची जिवाला आवड लागून राहिली आहे. ह्मणून तें दाखवा ह्मणण्याची घाई करतों. तर ही अडचण लौकर दूर करावी. ५९८ अहो मनांतील जाणणार्‍या! सारें विश्व वसविणार्‍या! हे सर्वपूज्या! हे देवाधिदेवा! प्रसन्न व्हावें." ५९९

> किरीटिनं गदिनं चक्रहस्त-
> मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।
> तेनैव रूपेण चतुर्भुजेन
> सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥

[ तथैव ] कैसें नीलोत्पलातें रांविते । आकाशाही रंग लाविते । तेजाची वोजें दाविते । इंद्रनीळा ॥ ६०० ॥ जैसा परिमळ जाहाला मरगजा । कां आनंदासि निघालिया भुजा । ज्याचे जानूवरी मकरध्वजा । जोडली बरव ॥ १ ॥ [किरीटिनं] मस्तकीं मुकुटातें लेवविलें । कीं मुकुटामुकुट मस्तक झालें । श्रृंगारा लेणें लाधलें । आंगाचेनि जया ॥ २ ॥ इंद्रधनुष्याचिये ओडणी । माजि मेघ गगनरंगणीं । तैसें आवरिलें शार्ङ्गपाणी । वैजयंतिया ॥ ३ ॥ [ गदिनं चक्रहस्तं ] आतां कवणी ते उदार गदा । असुरां देत कैवल्यपदा । कैसें चक्र हन गोविंदा । सौम्यतेजें मिरवे ॥ ४ ॥ [ इच्छामि त्वां द्रष्टुमहं ] किंबहुना स्वामी । तें देखावया उत्कंठित पां मी । [ तेनैव रूपेण चतुर्भुजेन ] ह्मणोनि आतां तुह्मी । तैसया होआवें ॥ ५ ॥ विश्वरूपाचे सोहळे । भोगूनि निवाले जी डोळे । आतां होताति आंधळे । कृष्णमूर्तिलागीं ॥ ६ ॥ तें साकार कृष्णरूपडें । वांचुनि पाहों नावडे । तें न देखतां थोडें । मानिताति हे ॥ ७ ॥ आह्मां भोगमोक्षाचियाठायीं । श्रीमूर्तिवांचुनि नाहीं । [ सहस्रबाहो भव ] ह्मणोनि तैसाचि साकार होईं । हें उपसंहारीं आतां ॥ ८ ॥

"आपल्या आंगचें तेज काय विचारावें? ज्यानें नीलोत्पलालाही रंग दिला आहे; आकाशालाही लेप केला आहे; आणि इंद्रनील मण्यालाही शोभा दाखवविली आहे. ६०० पाचेला ज्याप्रमाणें सुगंध प्राप्त व्हावा, किंवा आनंदाला हात फुटावेत त्याप्रमाणें ज्या तुमच्या जानूपासून मदनाही सौंदर्य प्राप्त होतें. ६०१ म-

१ रंगवितें. २ चांगुलपणा. ३ पाचेला, मरकतमण्याला. ४ मदनाला. ५ शोभा. ६ घडवंची. ७ वैजयंतीनें. ८ क्षुधित. ९ आवर.

स्तकावर मुगुट धारण केला कीं मुगुटालाच मस्तकाचा मुकुट होतो, आणि अलंकारांना आंग ह्याच अलंकार प्राप्त होतो. ६०२ आकाशामध्यें इंद्रधनुष्याच्या अडणीवर जसा मेघ असतो, त्याप्रमाणें वैजयंतीच्या माला श्रीकृष्णाला वेष्टून टाकतात. ६०३ आणि ती गदा तरी किती उदार? जी असुरांना सुद्धां कैवल्यपद देते. तसेंच तें चक्र तरी किती सौम्य तेजानें शोभतें? ६०४ येवढेंच नव्हे, तर प्रभो! तें पहावयाला मी उत्कंठित झालों आहें. ह्याकरितां आपण आतां तसें व्हावें. ६०५ महाराज! हे विश्वरूपाचे सोहळे भोगून डोळे निवाले. आतां ते कृष्णमूर्तीसाठीं पहिल्याप्रमाणें हापापले आहेत. ६०६ त्यांना साकार कृष्णमूर्तीशिवाय दुसरें पहावयास आवडत नाहीं. तें जर दृष्टी पडलें नाहीं, तर त्यापुढें हें विश्वरूप कमीच आहे असें मानतात. ६०७ आह्मांला भोगांची आणि मोक्षाची इच्छा करणारांना श्रीकृष्णमूर्तीवांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं ह्मणून हें आतां पुरें करावें, आणि साकार व्हावें." ६०८

श्रीभगवानुवाच—

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रूपं परं दर्शितमात्मयोगात्।
तेजोमयं विश्वमनंतमाद्यं
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वं ॥ ४७ ॥

या अर्जुनाचिया बोला। विश्वरूपा विस्मयो जाहाला। ह्मणे ऐसा नाहीं देखिला। धसाळ[1] कोणी ॥ ९ ॥ [‘शांतरसः’ श्रीभगवानुवाच–] कोण हे वस्तु पावला आहासी। तया लाभाचा तोष न घेसी। मा भेणें काय नेणों बोलसी। हेकड ऐसा ॥ ६१० ॥ [मया प्रसन्नेन] आह्मी सांवियाचि[2] जैं प्रसन्न होणें। तैं आंगचिवरी[3] ह्मणे देणें। वांचोनि जीव असे वेचणें। कवणासि गा ॥ ११ ॥ [तवार्जुनेदं] तें हें तुझिये चाडे। [आत्मयोगात्] आजि जीवाचेंचि दळवाडें[4]। कामऊनियां[5] येवढें। रचिलें ध्यान ॥ १२ ॥ [दर्शितं] ऐसी काय नेणों तुझिये आवडी। जाहली प्रसन्नता आमुची वेडी। ह्मणोनि गौप्याचीही गुंढी। उभविली जगीं ॥ १३ ॥ [रूपं परं] तें हे अपरांअपार। स्वरूप माझें परात्पर। एथूनि ते अवतार। कृष्णादिक ॥ १४ ॥ [तेजोमयं विश्वमनंतमाद्यं] हें ज्ञानतेजाचें निखिळें। विश्वात्मक केवळ। अनंत हें अढळ। आद्य सकळां ॥ १५ ॥ [यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वं] हें तुजवांचोनि अर्जुना। पूर्वीं श्रुत दृष्ट नाहीं आना। जे जोगें नव्हे साधना। ह्मणोनियां ॥ १६ ॥

१ अविचारी. २ सहजच. ३ स्वतःस. ४ समुदाय. ५ श्रमपूर्वक तयार करून.

ह्या अर्जुनाच्या भाषणानें विश्वमूर्तीला आश्चर्य वाटलें. आणि ह्मणतात "असा अविचारी कोणींच पाहिला नाहीं. ६०९ ही कोणती वस्तु तुला जोडली आहे, त्या लाभाचा तुला संतोष होत नाहीं. किंवा भयानें काय बोलावें तें समजत नाहीं. असला हेकड कसला तूं? ६१० आह्मी आपणहून प्रसन्न होतों तेव्हां भक्तांना आपलें शरीरच अर्पण करितों. एरवीं कोणीं कोणाला कधीं प्राण अर्पण केला आहे काय? ६११ तें हें तुझ्या इच्छेकरितां आज जीवसमुदायी ध्यान फार श्रमानें तयार केलें. ६१२ तुझी असली कसली आवड कांहीं समजत नाहीं. कीं तिच्या साठीं आमची प्रसन्नताही वेडी झाली. ह्मणून गुप्त गोष्टीचाही जगामध्यें ध्वज उभा केला. ६१३ तें हें अपरंपार आणि परात्पर स्वरूप आहे. कृष्णादिक अवतार ते येथून. ६१४ हें शुद्धज्ञान तेजाचें; केवळ विश्वात्मक; अनंत; अढळ; आणि सर्वांचें मूळ स्वरूप आहे. ६१५ अर्जुना! हें तुझ्यावांचून दुसऱ्या कोणींही पूर्वीं पाहिलेलें नाहीं, व ऐकलेलेंही नाहीं. कारण, तें साधनांनीं साध्य होण्यासारखें नाहीं." ६१६

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै-
र्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः।
एवंरूपः शक्य अहं नृलोके
द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥

[न वेदयज्ञाध्ययनैः] याची सोयें पातळे। आणि वेदीं मौनचि घेतलें। यज्ञ कीर माघौते आले। स्वर्गोनियां ॥ १७ ॥ साधकीं देखिला आयास। ह्मणोनि वाळिला योगाभ्यास।

१ ध्वज. २ सर्वस्व. ३ मार्ग. ४ त्याग केला.

आणि अध्ययनें सौरस। नाहीं एथ ॥ १८ ॥ [न च क्रियाभिः] सीगेचीं सत्कर्में। धाविन्नलीं स्वसंभ्रमें। तिहीं बहुतेकीं श्रमें। सत्यलोक ठाकिला ॥ १९ ॥ [न तपोभिरुग्रैः] तपीं ऐश्वर्य देखिलें। आणि उभयांचि उग्रपण सांडिलें। एवं तपसाधना जें ठेलें। अपारांतरें ॥ ६२० ॥ [न दानैः एवंरूप इति] तें हें तुवां अनायासें। विश्वरूप देखिलें जैसें। इये मनुष्यलोकीं तैसें। न फांवेचि कवणा ॥ २१ ॥ आजि ध्यानसंपत्तिलागीं। तूं एकचि आथिला जगीं। हें परमभाग्य आंगीं। विरंचीही नाहीं ॥ २२ ॥

"ह्याच्या मार्गाला लागण्याबरोबर, वेदांनीं तर मौनच धारण केलें. यज्ञ तर खरोखर स्वर्गाहून परत आले. ६१७ साधन करणारांनीं ह्यांत कष्ट पडतात असें पाहून योगाभ्यासच सोडून दिला. आणि अध्ययनाचा तर येथें कांहींच उपयोग नाहीं. ६१८ सत्कर्में तर काय विचारतां? भाराभर जमून मोठ्या डौलानें धांवत धांवत गेलीं. त्यांतील कित्येकांनीं मोठ्या कष्टानें जेमतेम स्वर्ग गांठला. ६१९ तपांनीं हें आश्चर्य पाहतांच उभ्याउभ्यानेंच उग्रपणा सोडून दिला. ह्याप्रमाणें तपसाधनालाही हें दूर पडतें. ६२० तें हें अनायासानें जसें विश्वरूप तूं पाहिलेंस, तसें ह्या मनुष्यलोकांमध्यें कधींही प्राप्त व्हावयाचें नाहीं. ६२१ आज ह्या असल्या मूर्तिवैभवाचा उपभोग घेणारा जगामध्यें फक्त तूंच एक आहेस. ब्रह्मदेवाच्या आंगीं सुद्धां येवढें मद्भाग्य नाहीं." ६२२

मा ते व्यथा मा च विमूढभावो
दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं
तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ४९ ॥

[मा ते व्यथा] ह्मणोनि विश्वरूपलाभें श्लाघ। एथिचें भय नेघे नेघ। हें वांचूनि अन्य चांग। न मनीं कांहीं ॥ २३ ॥ हांगा समुद्र अमृताचा भरला। आणि अवसांत वरपडा जाहाला। मग कोणीही आथि वोसंडिलो। बुडिजेल ह्मणोनि ॥ २४ ॥ ना तरी सोनयाचा डोंगर। येसणा न चले हा थोर। ऐसें ह्मणोनि अव्हेर। करणें घडे ॥ २५ ॥ दैवें चिंतामणी लेइजे। कीं हें ओझें ह्मणोनि सांडिजे। कामधेनू दवडिजे। न पोसवे ह्मणोनी ॥ २६ ॥ चंद्रमा आलिया घरा। ह्मणिजे निगें करितोसि उबारा। पडिसायि पाडितोसि दिनकरा। परता सर ॥ २७ ॥ तैसें ऐश्वर्य हें महातेज। आजि हातां आलें आहे सहज। कीं एथ तुज गजबज। होआवी कां ॥ २८ ॥ [मा च विमूढभावः] परि नेणसीच गांवढिया। काय कोपों आतां धनंजया। आंग सांडोनि छाया। आलिंगितोसि मा ॥ २९ ॥ हें नव्हे जो मी साचें। एथ मन करूनियां काचें। प्रेम धरिसी आंगवणियेचें। चतुर्भुज जें ॥ ६३० ॥ तरि आझुनिवरी पार्था। सांडीं सांडीं हे आस्था। यियेविषयीं अनास्था। कॅरिसी झणें ॥ ३१ ॥ [दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदं] हें रूप जरि घोर। विकृती आणी थोर। तरि कृतनिश्चयाचें घर। हेंचि करीं ॥ ३२ ॥ कृपणचित्तवृत्ति जैसी। रोंवोनि घाली ठेवयापासीं। मग नुसधेंन देहेंसीं। आपण असे ॥ ३३ ॥ कां अजातपक्षिया जवळा। जीव ठेऊनि अविसांळा। पक्षिणी अंतराळा-। माजि जाय ॥ ३४ ॥ नाना गाय चरे डोंगरीं। परि चित्त बांधिलें वत्सें घरीं। तैसें प्रेम एथिचें करीं। स्थानपती ॥ ३५ ॥ येरें वरिचिलेनि चित्तें। बाह्य सख्य सुखापुरतें। भोगि जो कां श्रीमूर्तीतें। चतुर्भुज ॥ ३६ ॥ परि पुढतपुढती पांडवा। हा एक बोल न विसरावा। जे यिये रूपींहुनी सद्भावा। नेदावें निघों ॥ ३७ ॥ [व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं] हें कहीं नव्हतेंचि देखिलें। ह्मणोनि भय जें तुज उपजलें। तें सांडीं एथ संचलें। असों दे प्रेम ॥ ३८ ॥ [तदेव मे रूपमिदं प्रपश्य] आतां करूं तुज यासारिखें। ऐसें ह्मणितलें विश्वतोमुखें। तरि मागील रूप सुखें। न्याहाळीं पां तूं ॥ ३९ ॥

"ह्मणून विश्वरूपाच्या लाभानें तूं स्तुतीस पात्र झाला आहेस. छेछे! ह्याचें भय धरूं नको. ह्याच्या शिवाय दुसरें कांहीं चांगलें आहे असें मानूं नको. ६२३ अरे! अमृताचा भरलेला समुद्र अकस्मात् प्राप्त झाला, तर त्यांत बुडेन ह्मणून कोणी त्याचा त्याग करील काय? ६२४ किंवा सोन्याचा डोंगर केवढा हा मोठा! हा उचलावयाचा नाहीं, ह्मणून कोणाला सो-

१ गोडी. २ पूर्ण. ३ आपल्या मोठेपणानें. ४ प्राप्त करून घेतला. ५ उभ्या उभ्याच. ६ दूर. ७ प्राप्तच होत नाहीं. ८ स्तुतीस पात्र. ९ घेऊं नकोस. १० अकस्मात्. ११ प्राप्त झाला. १२ आहे. १३ त्याज्य केलेला.

१ येवढा. २ उष्मा, तलखी. ३ पडच्छाया पाडतोस. ४ अज्ञाना. ५ कीं, ना. ६ आकृतीचें, ऐच्छिक. ७ करूं नको. ८ कंटाळा आणितें. ९ ठेव्याजवळ. १० केवळ शरीरानेंच. ११ पक्ष फुटले नाहींत. १२ घरटें. १३ देऊं नये. १४ श्रीकृष्णानें.

स्तकावर मुगुट धारण केला कीं मुगुटालाच मस्तकाचा मुकुट होतो, आणि अलंकारांना अंग हाच अलंकार प्राप्त होतो. ६०२ आकाशामध्यें इंद्रधनुष्याच्या अडणीवर जसा मेघ असतो, त्याप्रमाणें वैजयंतीच्या माला श्रीकृष्णाला वेष्टून टाकतात. ६०३ आणि ती गदा तरी किती उदार? जी असुरांना सुद्धां कैवल्यपद देते. तसेंच तें चक्र तरी किती सौम्य तेजानें शोभतें? ६०४ येवढेंच नव्हे, तर प्रभो! तें पहावयाला मी उत्कंठित झालों आहें. ह्याकरितां आपण आतां तसें व्हावें. ६०५ महाराज! हे विश्वरूपाचे सोहळे भोगून डोळे निवाले. आतां ते कृष्णमूर्तीसाठीं पहिल्याप्रमाणें हापापले आहेत. ६०६ त्यांना साकार कृष्णमूर्तीशिवाय दुसरें पहावयास आवडत नाहीं. तें जर दृष्टी पडलें नाहीं, तर त्यापुढें हें विश्वरूप कमीच आहे असें मानतात. ६०७ आह्मांला भोगांची आणि मोक्षाची इच्छा करणारांना श्रीकृष्णमूर्तीवांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं ह्मणून हें आतां पुरें करावें, आणि साकार व्हावें." ६०८

श्रीभगवानुवाच—

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रूपं परं दर्शितमात्मयोगात्।
तेजोमयं विश्वमनंतमाद्यं
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वं ॥ ४७ ॥

या अर्जुनाचिया बोला। विश्वरूपा विस्मयो जाहाला। ह्मणे ऐसा नाहीं देखिला। धसाळ कोणी ॥ ९ ॥ ['शांतरसः' श्रीभगवानुवाच–] कोण हे वस्तु पावला आहासी। तया लाभाचा तोष न घेसी। मा भेणें काय नेणों बोलसी। हेकड ऐसा ॥ ६१० ॥ [मया प्रसन्नेन] आह्मी सांवियाचि जैं प्रसन्न होणें। तैं आंगचिवरी ह्मणे देणें। वांचोनि जीव असे वेचणें। कवणासि गा ॥ ११ ॥ [तवार्जुनेदं] तें हें तुझिये चाडे। [आत्मयोगात्] आजि जीवाचेंचि दळवाडें। कामऊनियां येवढें। रचिलें ध्यान ॥ १२ ॥ [दर्शितं] ऐसी

१ अविचारी. २ सहजच. ३ स्वतःस. ४ समुदाय. ५ श्रमपूर्वक तयार करून.

काय नेणों तुझिये आवडी। जाहली प्रसन्नता आमुची वेडी। ह्मणोनि गौप्याचीही गुढी। उभविली जगीं ॥ १३ ॥ [रूपं परं] तें हें अपरांअपार। स्वरूप माझें परात्पर। एथूनि ते अवतार। कृष्णादिक ॥ १४ ॥ [तेजोमयं विश्वमनंतमाद्यं] हें ज्ञानतेजाचें निखिळें। विश्वात्मक केवळ। अनंत हें अढळ। आद्य सकळां ॥ १५ ॥ [यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वं] हें तुजवांचोनि अर्जुना। पूर्वी श्रुत दृष्ट नाहीं आना। जे जोगें नव्हे साधना। ह्मणोनियां ॥ १६ ॥

ह्या अर्जुनाच्या भाषणानें विश्वमूर्तीला आश्चर्य वाटलें. आणि ह्मणतात "असा अविचारी कोणींच पाहिला नाहीं. ६०९ ही कोणती वस्तु तुला जोडली आहे, त्या लाभाचा तुला संतोष होत नाहीं, किंवा भयानें काय बोलावें तें समजत नाहीं. असला हेकड कसला तूं? ६१० आह्मी आपणहून प्रसन्न होतों तेव्हां भक्तांना आपलें शरीरच अर्पण करितों. एरवीं कोणीं कोणाला कधीं प्राण अर्पण केला आहे काय? ६११ तें हें तुझ्या इच्छेकरितां आज जीवसमुदायी ध्यान फार श्रमानें तयार केलें. ६१२ तुझी असली कसली आवड कांहीं समजत नाहीं. कीं तिच्या साठीं आमची प्रसन्नताही वेडी झाली. ह्मणून गुप्त गोष्टीचाही जगामध्यें ध्वज उभा केला. ६१३ तें हें अपरंपार आणि परात्पर स्वरूप आहे. कृष्णादिक अवतार ते येथून. ६१४ हें शुद्धज्ञान तेजाचें; केवळ विश्वात्मक; अनंत; अढळ; आणि सर्वांचें मूळ स्वरूप आहे. ६१५ अर्जुना! हें तुझ्यावांचून दुसऱ्या कोणींही पूर्वी पाहिलेलें नाहीं, व ऐकलेलेंही नाहीं. कारण, तें साधनांनीं साध्य होण्यासारखें नाहीं." ६१६

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानै-
र्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः।
एवंरूपः शक्य अहं नृलोके
द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥

[न वेदयज्ञाध्ययनैः] याची सोय पातले। आणि वेदीं मौनचि घेतलें। यज्ञ कीर माघौते आले। स्वर्गोनियां ॥१७॥ साधकीं देखिला आयास। ह्मणोनि वाळिला योगाभ्यास।

१ ध्वज. २ सर्वस्व. ३ मार्ग. ४ त्याग केला.

ाणि अध्ययनें सौरस । नाहीं एथ ॥ १८ ॥ [न च क्रि-ाभिः] सोगेचीं सत्कर्में । धाविन्नलीं स्वैसंभ्रमें । तिहीं बहु-कीं श्रमें । सत्यलोक ठाकिला ॥ १९ ॥ [न तपोभिरुग्रैः] पीं ऐश्वर्य देखिलें । आणि उभयांचि उग्रपण सांडिलें । एवं पसाधना जें ठेलें । अपारांतरें ॥ ६२० ॥ [न दानैः एवं-प इति] तें हें तुवां अनायासें । विश्वरूप देखिलें जैसें । ये मनुष्यलोकीं तैसें । न फावेचि कवणा ॥ २१ ॥ आजि यानसंपत्तिलागीं । तूं एकचि आथिला जगीं । हें परमभाग्य ांगीं । विरंचीही नाहीं ॥ २२ ॥

**"ह्याच्या मार्गाला लागण्याबरोबर, वे-ांनीं तर मौनच धारण केलें. यज्ञ तर खरोखर स्वर्गाहून परत आले. ६१७ साधन करणा-ांनीं ह्यांत कष्ट पडतात असें पाहून योगा-भ्यासच सोडून दिला. आणि अध्ययनाचा र येथें कांहींच उपयोग नाहीं. ६१८ सत्कर्में र काय विचारतां? भाराभर जमून मोठ्या डौलानें धांवत धांवत गेलीं. त्यांतील कित्ये-कांनीं मोठ्या कष्टानें जेमतेम स्वर्ग गांठला. ६१९ तयांनीं हें आश्चर्य पाहतांच उभ्याउभ्या-नेंच उग्रपणा सोडून दिला. ह्याप्रमाणें तप-साधनालाही हें दूर पडतें. ६२० तें हें अ-नायासानें जसें विश्वरूप तूं पाहिलेंस, तसें ह्या मनुष्यलोकांमध्यें कधींही प्राप्त व्हावयाचें नाहीं. ६२१ आज ह्या असल्या मूर्तिवैभ-वाचा उपभोग घेणारा जगामध्यें फक्त तूंच एक आहेस. ब्रह्मदेवाच्या आंगीं सुद्धां येवढें म-हद्भाग्य नाहीं." ६२२**

मा ते व्यथा मा च विमूढभावो
दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदम् ।
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं
तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ४९ ॥

[मा ते व्यथा] ह्मणोनि विश्वरूपलाभें श्लाघ । एथिचें भय नेघे नेघ । हें वांचूनि अन्य चांग । न मनीं कांहीं ॥ २३ ॥ ांगा समुद्र अमृताचा भरला । आणि अवसांत वरपडा जाहाला । मग कोणीही आंथि वोसंडिलो । बुडिजेल ह्मणोनि ॥ २४ ॥ ना तरी सोनयाचा डोंगर । येसणा न चले हा थोर । ऐसें ह्मणोनि अव्हेर । करणें घडे ॥ २५ ॥ दैवें चिंतामणी लेइजे । कीं हें ओझें ह्मणोनि सांडिजे । कामधेनू दवडिजे । न पोसवे ह्मणोनी ॥ २६ ॥ चंद्रमा आलिया घरा । ह्मणिजे निगें करितोसि उबारा । पडिसायि पाडितोसि दिनकरा । परता सर ॥ २७ ॥ तैसें ऐश्वर्य हें महातेज । आजि हातां आलें आहे सहज । कीं एथ तुज गजबज । होआवी कां ॥ २८ ॥ [मा च विमूढभावः] परि नेणसीच गांवढिया । काय कोपों आतां धनंजया । आंग सांडोनि छाया । आलिंगितोसि मा ॥ २९ ॥ हें नव्हे जो मी साचें । एथ मन करूनियां काचें । प्रेम धरिसी आंगवणियेचें । चतुर्भुज जें ॥ ६३० ॥ तरि आझुनिवरी पार्था । सांडीं सांडीं हे आस्था । यियेविषयीं अनास्था । करिसी झणें ॥ ३१ ॥ [दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदं] हें रूप जरि घोर । विकृती आणी थोर । तरि कृतनिश्चयाचें घर । हेंचि करीं ॥ ३२ ॥ कृपणचित्तवृत्ति जैसी । रोंवोनि घाली ठेवयापासीं । मग नुसधेन देहेंसीं । आपण असे ॥ ३३ ॥ कां अजातपक्षिया जवळा । जीव ठेऊनि अविसांळा । पक्षिणी अंतराळा- । माजि जाय ॥ ३४ ॥ नाना गाय चरे डोंगरीं । परि चित्त बांधिलें वत्सें घरीं । तैसें प्रेम एथिचें करीं । स्थानपती ॥ ३५ ॥ येरें वरिचिलेनि चित्तें । बाह्य सख्य सुखापुरतें । भोगि जो कां श्रीमूर्तीतें । चतुर्भुज ॥ ३६ ॥ परि पुढतपुढती पांडवा । हा एक बोल न विसरावा । जे यिये रूपींहुनी सद्भावा । नेदावें निघों ॥ ३७ ॥ [व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं] हें कहीं नव्हतेंचि देखिलें । ह्मणोनि भय जें तुज उपजलें । तें सांडीं एथ संचलें । असों दे प्रेम ॥ ३८ ॥ [तदेव मे रूपमिदं प्रपश्य] आतां करूं तुज यासारिखें । ऐसें ह्मणितलें विश्वतोमुखें । तरि मागील रूप सुखें । न्याहाळीं पां तूं ॥ ३९ ॥

**"ह्मणून विश्वरूपाच्या लाभानें तूं स्तुतीस पात्र झाला आहेस. छेछे! ह्याचें भय धरूं नको. ह्याच्या शिवाय दुसरें कांहीं चांगलें आहे असें मानूं नको. ६२३ अरे! अमृताचा भरलेला समुद्र अकस्मात् प्राप्त झाला, तर त्यांत बुडेन ह्मणून कोणी त्याचा त्याग करील काय? ६२४ किंवा सोन्याचा डोंगर केवढा हा मोटा! हा उचलावयाचा नाहीं, ह्मणून कोणाला सो-**

१ गोडी. २ पूर्ण. ३ आपल्या मोठेपणानें. ४ प्राप्त करून घेतला. ५ उभ्या उभ्याच. ६ दूर. ७ प्राप्तच होत नाहीं. ८ स्तुतीस पात्र. ९ घेऊं नकोस. १० अकस्मात्. ११ प्राप्त झाला. १२ आहे. १३ त्याज्य केलेला.

१ येवढा. २ उष्मा, तलखी. ३ पडच्छाया पाडतोस. ४ अज्ञाना. ५ कीं, ना. ६ आकृतीचें, ऐच्छिक. ७ करूं नको. ८ कंटाळा आणितें. ९ ठेव्याजवळ. १० केवळ शरीरानेंच. ११ पक्ष फुटले नाहींत. १२ घरटें. १३ देऊं नये. १४ श्रीकृष्णानें.

डवेल काय? ६२५ दैवयोगानें चिंतामणि सांपडला, तर तो घ्यावा, का ओझें ह्मणून फेंकून द्यावा? कामधेनु पोसवत नाहीं, ह्मणून हांकलून लावावी, होय? ६२६ चंद्र घराला आला, तर तुझ्यामुळें उकडतें, तूं जा कसा? सूर्या! तूं पडच्छाया पाडतोस, ह्याकरितां तूंही चालता हो. असें कोणी ह्मणेल काय? ६२७ त्याप्रमाणें हें महत्तेजाचें ऐश्वर्य आज सहज हातीं आलेलें आहे; आणि त्या ठिकाणीं तुझी गडबड उडावी का? ६२८पण अर्जुना! तूं गांवढळ आहेस. तुला कांहीं कळत नाहीं. शरीर सोडून सांवलीलाच तूं मिठी मारतोस, आतां तुझ्यावर रागावयाचें तरी काय? ६२९ खरा जो मी, त्या माझ्या ठिकाणीं मनाचा संकोच करतोस, आणि चतुर्भुज मूर्तीचें प्रेम धरतोस, हें कांहीं ठीक नाहीं. ६३० तर अर्जुना! अद्याप तरी ती आस्था सोडून देरे, सोडून दे. त्याच्यावर अनास्था करूं नको बरें. ६३१ हें स्वरूप जरी भयंकर, त्रासदायक, आणि विशाळ आहे, तरी हेंच कृतनिश्चयाचें घर कर. ६३२ कृपण ज्याप्रमाणें आपली चित्तवृत्ति, पुरलेल्या द्रव्यापाशीं घट्ट रोवून ठेवतो, आणि आपण केवळ देहानें राहतो,६३३ किंवा पक्ष फुटले नाहींत अशा पिलांजवळ कोठ्यामध्यें जीव ठेवून पक्षीण जशी अंतरिक्षांत जाते, ६३४ किंवा गाय डोंगरावर चरत असली तरी तिचें जसें चित्त घरांत वासरानें बांधलेलें असतें, त्याप्रमाणें तुझें चित्त ह्या ठिकाणचें वतनदार करून ठेव. ६३५बाकी जो कोणी चतुर्भुज मूर्तीचा उपभोग वरवर चित्तानें घेतो, त्याचें तें सख्य बाह्य सुखापुरतेंच असतें. ६३६ पण अर्जुना! पुन्हा पुन्हा हें भाषण विसरूं नको, किंवा ह्या रूपापासून सद्भाव हालूं देऊं नको. ६३७ हें स्वरूप तूं कधींच पाहिलें नव्हतेंस, ह्मणून तुला भय उत्पन्न झालें. तें सोडून दे. येथें प्रेमाचा सांठा असूं दे." ६३८ विश्वतोमुख झालेले श्रीकृष्ण ह्मणतात "तर आतां तुझ्या सारखेंच करूं. पूर्वींचें स्वरूपच तूं आतां आनंदानें पहा." ६३९

संजय उवाच—

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः
आश्वासयामास च भीतमेनं
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ५० ॥

[ संजय उवाच—इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा ] ऐसें वाक्य बोलतखेवों[1] । मागुता मनुष्य जाहला देवो । हें ना परि नवलावो[2] । आवडीचा तिये ॥ ६४० ॥ श्रीकृष्णचि कैवल्य[3] उघडें । वरि सर्वस्व विश्वरूपांयेवढें । हातीं दिधलें कीं नावडे । अर्जुनासी ॥ ४१ ॥ वस्तु घेऊनि वोळिजे[4] । जैसें रत्नासि दूषण ठेविजे । ना तरी कन्या पाहूनियां ह्मणिजे । मना नये हे ॥ ४२ ॥ तया विश्वरूपायेवढी दशा । करितां प्रीतिचा वाढ कैसा । शेलें दिधलीसे उपदेशा । किरीटीसि देवें ॥४३॥ मोडोनि भांगारांचा[6] रवा । लेणें घडिलें आपलिया सवाँ । मग नावडे जरी जीवा । तरी आटिजे पुढती ॥ ४४ ॥ तैसें शिष्याचिये प्रीती जाहालें । कृष्णत्व होतें तें विश्वरूप जालें । तें मना नयेचि मग आणिलें । कृष्णपण मागुतें ॥ ४५ ॥ हा ठाववरी शिष्याची निर्कसी । साहोंते गुरु आहाती कवणे देशीं । परी नेणिजे आवडी कैशी । संजय ह्मणे ॥ ४६ ॥ [ स्वकं रूपं दर्शयामास भूयः ] मग विश्व व्यापूनि भगवंतें । जें दिव्यतेज प्रकटलें होतें । तेंचि सामावलें मागुतें । कृष्णरूपीं तिये ॥ ४७ ॥ जैसें त्वंपदं[10] हें आघवें । तत्पदीं[11] सामावे । अथवा द्रुमाकार सांठवे । बीजकणिके जेविं ॥ ४८ ॥ ना तरी स्वप्नसंभ्रमें[12] जैसा । गिळी चेइलि[13] जीवदशा । श्रीकृष्णें योग हा तैसा । संहारिला तो ॥ ४९ ॥ जैसी प्रभा हारपली बिंबीं । कीं जळदसंपत्ती नभीं । नाना भरतें सिंधुगर्भी । रिगालें राया ॥ ६५० ॥ होकां जे कृष्णाकृतीचिये[14] मोडी । होती विश्वरूपपटाची घडी । अर्जुनाचिये आवडी । उकलूनि दाविली ॥ ५१ ॥ तंव परिमाणु[15] वा रंग । तेणें देखिले साविया चांग । तेथ ग्राहकीये[16] नव्हेचि लाग । ह्मणोनि घडी केली पुढती ॥ ५२ ॥ [ भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ] तैसें वाढीचेनि बहुवसपणें । रूपें विश्व जिंतिलें जेणें । तें सौम्य कोडिसवांणें[17] । साकार जाहालें ॥ ५३ ॥ किंवहुना अनंतें । धरिलें धाकुटपण मागुतें । [ आश्वासयामास च भीतमेनं ] परि आ-

१ बोलतांक्षणींच. २ आश्चर्य. ३ परब्रह्म. ४ टाकावें. ५ उत्तम वांटा. ६ सोन्याचा. ७ साटीं. ८ जिकीर. ९ सहन करणारे. १० जीवदशा. ११ ब्रह्मरूपामध्यें. १२ स्वप्नाचा विस्तार. १३ जागृति. १४ आकार. १५ गुण, पोत इत्यादि. १६ गिराईक. १७ सुंदर, गोजिरवाणें.

श्वासिलें पार्थातें । बिह्यालियासी ॥ ५४ ॥ जो स्वप्नीं स्वर्गा गेला । तो अंवसांत जैसा चेइला । तैसा विस्मय जाहाला । किरीटीसी ॥ ५५ ॥ ना तरी गुरुकृपेसवें । वोसरलेयो प्रपंचज्ञान आघवें । स्फुरे तत्त्व तेविं पांडवें । श्रीमूर्ति देखिली ॥ ५६ ॥ तया पांडवा ऐसें चित्तीं । आड विश्वरूपाची जवनिका होती । ते फिटोनि गेली परौती । हें भलें जाहालें ॥ ५७ ॥ काय काळातें जिणोनि आला । कीं महावात मागां सांडिला । आपुलिया बाहीं उतरला । सातही सिंधु ॥ ५८ ॥ ऐसा संतोष बहु चित्तें । घेइजत असे पंडुसुतें । विश्वरूपापाठीं कृष्णातें । देखोनियां ॥ ५९ ॥ मग सूर्याचिया अस्तमानीं । मागुती तारा उगवती गगनीं । तैसा तैसा देखों लागला अवनी । लोकांसहित ॥ ६६० ॥ पाहे तंव तेंचि कुरुक्षेत्र । तैसेंचि देखे दोहीं भागीं गोत्र । वीर वर्षताति शस्त्रास्त्र । संघाटेंवरी ॥ ६१ ॥ तया बाणाचिया मांडवाआंत । तैसाचि रथ देखे निवांत । धुरे बैसला लक्ष्मीकांत । आपण तळीं ॥ ६२ ॥

इतकें बोलून लागलीच पुन्हा देव मनुष्य झाले. त्याचें कांहीं आश्चर्य नाहीं. पण त्याच्या आवडीचें आश्चर्य. ६४० श्रीकृष्ण हेच मुळीं प्रत्यक्ष परब्रह्मअसतां, आणखी विश्वरूपासारखें सर्वस्वही अर्जुनाच्या हातांत दिलें. पण तें अर्जुनाला आवडलें नाहीं. ६४१ वस्तु घेऊन टाकून द्यावी; किंवा रत्नाला जशीं नांवें ठेवावींत; किंवा कन्या पहावी, आणि मग मनाला येत नाहीं ह्मणावें. ६४२ त्या विश्वरूपायेवढी खटपट केली, ह्यावरून त्या प्रीतीची अधिकाई कशी ती पहा. देवांनीं अर्जुनाला उपदेशाचा उत्तमच वांटा दिला. ६४३ सोन्याची लगड मोडून आपणासाठीं दागिना करावा, आणि जिवाला आवडत नाहींसा वाटला तर तो पुन्हा आटवावा; ६४४ त्याप्रमाणें शिष्याच्या प्रीतीसाठीं केलें. कृष्णाचें रूप होतें तें विश्वरूप झालें. तेंही मनाला येईना तेव्हां पुन्हा कृष्ण झाले. ६४५ इतकी शिष्याची जिकीर सोसणारे गुरू कोणत्या देशांत आहेत? पण संजय ह्मणतात, 'ही प्रीती कसली समजत नाहीं.' ६४६ मग भगवंतांनीं विश्व व्यापून जें दिव्य तेज प्रगट केलें होतें, तेंच तेज पुन्हा कृष्णस्वरूपांत घातलें. ६४७ ज्याप्रमाणें साऱ्या जीवदशेचा ब्रह्मामध्यें समावेश होतो, अथवा झाडाचा आकार जसा बीजामध्यें राहतो, ६४८ किंवा स्वप्नांतला सारा विस्तार जागृत झाल्यावर जशी जीवदशा गिळून टाकते, त्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं त्या योगाचा उपसंहार केला. ६४९ ज्याप्रमाणें बिंबांत तेज नाहींसें व्हावें, किंवा आकाशांत मेघांच्या पंक्ति जिरून जाव्यात, किंवा समुद्राच्या पोटांत भरती लयास जावी, ६५० किंवा कृष्णाकृतीच्या आकारानें विश्वरूप वस्त्राची घडी घातलेली होती, ती अर्जुनाच्या आवडीसाठीं उलगडून दाखविली. ६५१ तेव्हां रंग, पोत वगैरे त्यानें सावकाशपणीं अवलोकन केलीं. परंतु गिऱ्हाइकाच्या उपयोगी नाहीं असें पाहून पुन्हा घडी केली. ६५२ तद्वत् वाढविण्याच्या अतिशयानें आकारेंकरून ज्यानें विश्वही जिंकिलें होतें, तेंच स्वरूप साकार व गोजिरवाणें झालें. ६५३ ह्याप्रमाणें अनंतांनीं लहान स्वरूप धारण केलें. तरी पुन्हा भ्यालेल्या अर्जुनास आश्वासन दिलें. ६५४ स्वप्नांत स्वर्गास गेलेला मनुष्य जसा एकदम जागा होतो, त्याप्रमाणें अर्जुनाला आश्चर्य वाटलें. ६५५ किंवा गुरुकृपेनें प्रपंचज्ञान सारें नाहींसें होऊन जसा शुद्ध तत्त्वाचा बोध व्हावा, त्याप्रमाणें अर्जुनानें श्रीकृष्णाची मूर्ती पाहिली. ६५६ तेव्हां अर्जुनाच्या मनाला असें झालें कीं, विश्वरूपाचा पडदा जो मध्यें आड आला होता तो निघून गेला. खासें काम झालें. ६५७ जणों काय काळाला जिंकून यावें; किंवा महावात मागें टाकावा; किंवा आपल्या बाहूंनीं सप्त समुद्र ओलांडून जावेत, ६५८ असा विश्वरूपामागून कृष्णाला पहातांच अर्जुनाला मनापासून संतोष झाला. ६५९ मग सूर्यास्त झाला ह्मणजे मागून जशीं नक्षत्रें उगवतात, त्याप्रमाणें सर्व लोकांसहवर्तमान पृथ्वी दिसूं लागली. ६६० पाहूं लागला तों

१ भ्यालेल्यास. २ अकस्मात्. ३ लय पावल्यावर. ४ पडदा. ५ बाहूंनीं. ६ शस्त्रास्त्रांच्या. ७ समुदायानें.

कुरुक्षेत्र तेंच; दुतर्फा उभे राहिलेले आउवंद तसेच; योद्धेही एकमेकांवर शस्त्रांचा भडिमार करतातच आहेत. ६६१ त्या बाणांच्या मंडपामध्यें आपला रथ उभा राहिलेला तसाच; लक्ष्मीकांत धुरेवर बसलेले व आपण रथाच्या खालीं उतरलेलोंही तसेच. ६६२

अर्जुन उवाच—

दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।

इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥

[अर्जुन उवाच–सचेताः प्रकृतिं गतः] एवं मागितलें जैसें जैसें । तेणें देखिलें वीरविलासें । मग ह्मणे जी जियालों ऐसें । जाहालें आतां ॥ ६३ ॥ बुद्धीतें सांडोनि ज्ञान । भेणें वेंळघलें रान । अहंकारेंसीं मन । देशधडी जाहालें ॥ ६४ ॥ इंद्रियें प्रवृत्ती भुलली । वाचा वाचकपणा चुकली । ऐसी आपांपरी होती जाली । शरीरग्रामीं ॥ ६५ ॥ तियें आघवींचि मागुतीं । जिवातें भेटलीं प्रकृतीं । आतां जितांणें श्रीभूतीं । जाहालें यियां ॥ ६६ ॥ ऐसें सुख जीवीं घेतलें । [दृष्ट्वेदं मानुषं रूपं] मग श्रीकृष्णातें ह्मणितलें । मियां तुमचें रूप देखिलें । मानुष हें ॥ ६७ ॥ [तव सौम्यं जनार्दन] हें रूप दाखवणें देवराया । कीं मज अपत्या चुकलिया । धुंझावोनि तुवां माया । स्तनपान दिधलें ॥ ६८ ॥ [इदानीमस्मि संवृत्तः] जी विश्वरूपाचिया सागरीं । होतों तरंग मवित बांवेंवरी । तो इये निजमूर्तीच्या तीरीं । निगालों आतां ६९ ॥ आइकें द्वारकापुरसुहाडा । मज सुकतिया जी झाडा । हे भेटी नव्हे वुंहुडा । मेघाचा केला ॥ ६७० ॥ जी सोंवियाचि तृषा फुटला । तया मज अमृतसिंधू हा भेटला । आतां जिणेयाचा फिटला । अभरंसा ॥ ७१ ॥ माझिया हृदयरंगणीं । होताहे हर्षलतांची लावणी । सुखेंसीं बुझावणी । जाहाली मज ॥ ७२ ॥

ह्याप्रमाणें त्या वीरानें जसें होतें तसें सर्व पाहिलें. मग ह्मणाला "आंता वांचलों असें वाटतें खरेंच. ६६३ ज्ञान हें बुद्धीला सोडून भयानें रानांत शिरलें; मन अहंकारासहवर्तमान देशोधडीस गेलें; ६६४ इंद्रियप्रवृत्तीला भूल पडली; वाणी बोलावयाचें विसरली; अशी शरीरामध्यें दुर्दशा झाली होती. ६६५ तीं सारींच आतां जिवाला येऊन भेटलीं. ह्या श्रीकृष्णाच्या मूर्तीनें वांचविलें. ६६६ इतकें जिवाला सुख झालें." मग श्रीकृष्णाला ह्मणाला "मीं हें तुमचें मनुष्याकृतीस्वरूप पाहिलें. ६६७ हे देवराया! तुह्मीं स्वरूप दाखविलेंत हें मला चुकलेल्या अपत्याला समजूत करून स्तनपान दिल्याप्रमाणें झालें. ६६८ प्रभो! विश्वरूप महासागरामध्यें हातानें लाटा मोजित बसलों होतों, तों आतां ह्या आपल्या मूर्तीच्या तीरास लागलों. ६६९ हे द्वारकेच्या मित्रा! ऐकावें. हें आपलें दर्शन नव्हे, तर मी सुकून चाललेल्या झाडावर आपण मेघ वर्षलां. ६७० प्रभो! एकाएकीं तृषा लागली होती, त्या मला अमृताचा समुद्रच मिळाला. आतां जिवाचा जो वेभरंवसा वाटत होता, तो नाहींसा झाला. ६७१ माझ्या हृदयरूप क्षेत्रांत हर्षवल्लीची लागवड झालेली असल्यामुळें ह्या सर्वांची नीट समजूत पटली." ६७२

श्रीभगवानुवाच—

सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।

देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ ५२ ॥

[श्रीभगवानुवाच—]यया पार्थाचिया बोलासवें । हें काय ह्मणितलें देवें । तुवां प्रेम ठेऊनि यावें । विश्वरूपीं कीं ॥ ७३ ॥ मग इयें श्रीमूर्ती । भेटावें सडिया आयती । ते शिकवण सुभद्रापती । विसरला मा ॥ ७४ ॥ अगा आंधळिया अर्जुना । हाता आलिया मेरुही होय साना । ऐसा आथि माना । चुकीचा भावो ॥ ७५ ॥ [सुदुर्दर्शमिति] तरि विश्वात्मक रूपडें । जें दाविलें आह्मी तुजपुढें । [देवा इति] तें शंभूही परि न जोडे । तपें करितां ॥ ७६ ॥ आणि अष्टांगादिसंकटीं । योगी शिणताति किरीटी । परि अवसर नाहीं भेटी । जयाचिये ॥ ७७ ॥ तें विश्वरूप एकादे वेळ । कैसेनि देखों अलुमाळ । ऐसें स्मरतां काळ । जातसे देवा ॥ ७८ ॥ आशेचिया अंजुळी । ठेऊनि हृदयाचिया निडेळीं । ते चातक निराळीं । लागले जैसे ॥ ७९ ॥ तैसे उत्कंठानिर्भर । होऊनियां सुरवर । घोकीत आठही पाहार । भेटी जयाची ॥ ६८० ॥ परि विश्वरूपासारिखें । स्वप्नींही कोण्ही न देखे । तें प्रत्यक्ष तुवां सुखें । देखिलें हें ॥ ८१ ॥

१ वांचलों. २ वेंघलें, शिरलें. ३ दुर्दशा. ४ सांप्रत. ५ सांप्रत. ६ ओवाळणी. ७ समजूत करून. ८ मोजित. ९ द्वारकाधीशमित्रा. १० कृपादृष्टि. ११ एकाएकींच. १२ आयुष्याचा.

१ संगरहित. २ किंचित्. ३ कपाळीं. ४ अंतराळीं. ५ आशाभरित.

ह्या **पार्थाच्या** भाषणावर देव ह्मणाले "हें काय? तूं विश्वरूपावरच प्रेम ठेवून यावेंस. ६७३ आणि मग संगरहित होऊन ह्या **श्रीमूर्तीला** भेटावें. **अर्जुना!** हें शिकविलेलें विसरलास का? ६७४ हे **अर्जुना!** आंधळ्याच्या हाताला मेरू लागला, तर तो लहानच वाटतो. असा मनाच्या चुकीचा भाव आहे. ६७५ तर विश्वात्मक स्वरूप जें तुझ्यापुढें दाखविलें, तें **शंकरांस** तपें करून सुद्धां प्राप्त होत नाहीं. ६७६ आणखी **अर्जुना?** अष्टांगादि योगांच्या संकटानें योगी हवे तितके कष्ट सोसतात, पण त्यांनाही त्याची भेट होण्याला सवड मिळत नाहीं. ६७७ तें विश्वरूप कसलें आहे तें थोडेंसें तरी पहावयास मिळेल असा तप करतांकरतांच दिवस निघून जातात. ६७८ हृदयरूप कपाळावर आशेच्या ओंजळी ठेवून चातक जसे आकाशाकडे तोंड करून वसतात, ६७९ त्याप्रमाणें मोठमोठे देवही अत्यंत उत्कंठेत होऊन अष्टौप्रहर ज्याच्या भेटीचा घोष करीत आहेत; ६८० पण विश्वरूपासारखें स्वप्नांतही कोणीं पाहिलेलें नाहीं. तें हें तूं प्रत्यक्ष आनंदानें पाहिलेंस." ६८१.

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ५३ ॥

[नाहं वेदैः] पैं उपायासि वाटा । न वाहती एथ सुभटा । साहीसहित वोहटा । वाइला वेदीं ॥ ८२ ॥ [न तपसा] आज विश्वरूपाचिया मोहरा । चालावया धनुर्धरा । तपांचियाही सर्वभारा । नव्हेचि लाग ॥ ८३ ॥ [न दानेन] आणि दानादि कीर्र कानडें । न [चेज्यया] मी यज्ञाही तैसा न सांपडें । [दृष्टवानसि मां यथा] जैसेनि कां सुरवाडें । देखिला तुवां ॥ ८४ ॥ तैसा मी एकिचि परि । आतुडें गा अवधारी । जरी भक्ती येऊनि वैरी । चित्तातें गा ॥ ८५ ॥

"तसेंच हे **वीरश्रेष्ठा!** अमुक उपायानें हें साध्य होईल, असा ह्याला मार्गच नाहीं. सहा शास्त्रांसुद्धां वेदालाही ह्या कामीं ओहोट लागतो. ६८२ हे **धनुर्धरा!** तपांच्या एकूण एक भारांनींही माझ्या विश्वरूपाच्या मार्गानें चालावयाला येत नाहीं. ६८३ आणखी, तूं जसा मला अनायासें पाहिलास, तसा मी दानादिकांनाही सांपडणें कठीण. तसा मी यज्ञांनाही सांपडावयाचा नाहीं. ६८४ तो मी फक्त एकाच उपायानें मिळेन. तो उपाय हा कीं, भक्तीच जर येऊन चित्ताला वरील, तरच मी प्राप्त होईन." ६८५

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥

[भक्त्या त्वनन्यया शक्यः] परि तेचि भक्ती ऐसी । पर्जन्याची सुटिका जैसी । धरावांचूनि अनारिसी । गतीचि नेणे ॥ ८६ ॥ कां सकल जळसंपत्ति । घेऊनि समुद्रातें गिवसिती । गंगा जैसी अनन्यगती । मिनलीच मिळे ॥ ८७ ॥ तैसें सर्वभावसंभारें । न धरत प्रेम एकसरें । मजमाजि संचरे । मीचि होउनी ॥ ८८ ॥ [अहमेवंविधोऽर्जुन] आणि तेविंचि मी ऐसा । थडिये आणि माझारीं सरिसा । क्षीराब्धि कां जैसा । क्षीराचाचि ॥ ८९ ॥ तैसें मजलागुनि मुंगीवरी । किंबहुना चराचरीं । भजनासि कां दुसरी । परीचि नाहीं ॥ ६९० ॥ [ज्ञातुं द्रष्टुं च] तयाचि क्षणासवें । एवंविध मी जाणवें । जाणितला तरी स्वभावें । दृष्टिही होय ॥ ९१ ॥ [तत्त्वेन] मग इंधनीं अग्नि उद्दीपे । आणि इंधन हे भाष हारपे । तें अग्नीचि होऊनि आरोपे । मूर्त जेविं ॥ ९२ ॥ कां उदय न कीजे तेजाकारें । तंव गगनचि होऊन असे आंधारें । मग उदेलियां एकसरें । प्रकाश होय ॥ ९३ ॥ [प्रवेष्टुं च परंतप] तैसें माझिये साक्षात्कारीं । सरे अहंकाराची वारी । अहंकारलोपीं अवधारीं । द्वैत जाय ॥ ९४ ॥ मग मी तो हें आघवें । एक मीचि आथि स्वभावें । किंबहुना सामावे । समरसें तो ॥ ९५ ॥

"पण ती भक्ति अशी पाहिजे कीं, पर्जन्याला जशी पृथ्वीशिवाय दुसरी गति ह्मणून नसतेच, तद्वत. ६८६ किंवा गंगा जशी दुसऱ्या कोठेंही न जातां सकल जलांचें वैभव घेऊन समुद्रालाच येऊन मिळते, ६८७ त्याप्रमाणें

१ सहा शास्त्रांसहित. २ ओहोटीं धरला. ३ मार्गानें. ४ निश्चयेंकरून. ५ कठिण. ६ अनायासें. ७ सांपडें. ८ अंगिकारील.

१ सुटका. २ पृथ्वीशिवाय. ३ अन्यत्र. ४ आवरेना. ५ राहतो. ६ यात्रा.

सर्व भावेंकरून प्रेम ज्याचें मावत नाहीं, इतक्या प्रेमभावानें मत्स्वरूप होऊन जो मजमध्येंच शिरतो, ६८८ आणि त्याचप्रमाणें माझ्या सारखाच मध्यें व शेवटीं सम; क्षीराब्धी जसा क्षीरानें–दुधानेंच भरलेला असतो, ६८९ त्याप्रमाणें माझ्यापासून तों मुंगीपर्यंत, किंवहुना सर्व चराचरामध्यें भजनाला ज्याला दुसरी जागाच नाहीं. ६९० अशी वृत्ति झाली कीं तत्काल हें स्वरूप अशा प्रकारचें आहे हें मनांत बिंबलें, आणि तें बिंबलें कीं दृष्टीही तशीच बनते. ६९१ मग जळणामध्यें अग्नि पेटला कीं, जळण हा शब्द नाहींसा होतो; आणि तें सर्पण स्वतःच मूर्तिमंत अग्नि होऊन राहतें. ६९२ किंवा तेजोबिंबानें प्रकाश केला नाहीं, तोंपर्यंत गगनच अंधार होऊन राहिलेलें असतें; आणि उदय झाला कीं जिकडेतिकडे प्रकाशच होऊन जातो. ६९३ त्याप्रमाणें माझा साक्षात्कार झाला कीं अहंकाराची यात्रा संपते. आणि अहंकार नाहींसा झाला कीं द्वैत नाहींसें होतें. ६९४ मग तो सारा मीच आहे. तो स्वभावानें एका माझ्याचसारखा. किंवहुना तो ऐक्यांतच पोंचला ह्मणून समजावें." ६९५

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ।
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ५५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नाम
एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

[ मत्कर्मकृत् ] जो मजचि एकालागीं। कर्में वाहतसे आंगीं। जया मजवांचोनि जगीं। गोमटें नाहीं ॥ ९६ ॥ [ मत्परमः ] दृष्टादृष्ट सकळ। जयाचें मीचि केवळ। जेणें जिणयाचें फळ। मजचि नाम ठेविलें ॥ ९७ ॥ [ निर्वैरः सर्वभूतेषु ] मग भूतें हे भाष विसरला। जे दिठी मीचि आहे सूदला। ह्मणोनि निर्वैर जाहाला। [ मद्भक्तः ] सर्वत्र भजे ॥ ९८ ॥ [ संगवर्जितः ] ऐसा जो भक्त होये। तयाचें त्रिधातुक[1] हें जैं जाये। [ यः स मामेति पांडव ] ते मीचि होऊनि ठा[रे] पांडवा गा ॥ ९९ ॥ ऐसें जगदुदरें[1] दोंदिलें। तेणें करुणार[सें] रसाळें। संजयो ह्मणे बोलिलें। श्रीकृष्णदेवें ॥ ७०० ॥ यावरी तो पांडुकुमर। जाहाला आनंदसंपदा थोर। अ[...] कृष्णचरणचतुर। एक तो जगीं ॥ १ ॥ तेणें देवाचिया [...] नही मूर्ती। निकिया व्याहाळिलिया चित्तीं। तंव विश्वरू[प ...]हूनि कृष्णाकृतीं। देखिला लाभ ॥ २ ॥ परि तयाचिये [...]णिवे। मान न कीजेचि देवें। जे[2] व्यापकाहूनि न[...] एकदेशी[3] ॥ ३ ॥ हेंचि समर्थावया[4] लागीं। एक दोन चां[गी] उपपत्ती शार्ङ्गी[5]। दाविता जाहाला ॥ ४ ॥ तिया ऐकोनि [...] मद्राकांत। चित्तीं आहे ह्मणत। तरि होय बरवें दोहींआं[...] तें पुढती पुसों ॥ ५ ॥ ऐसा आलोच[6] करूनि जीवीं। अ[...] पुसती चोजें बरवी। आदरील ते परिसावी। पुडें कथा ॥ [६ ॥] प्रांजळ[8] ओवीप्रबंधें। गोष्टी सांगिजेल विनोदें। तें पा[...] आनंदें। ज्ञानदेवो ह्मणे ॥ ७ ॥ भरोनि सद्भावाची अंजु[ळी ...]मियां वोवियाफुलें मोकळीं। अर्पिलीं अंघ्रियुगुळीं[9]। वि[श्वरू]पाच्या ॥ ७०८ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां
एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥
श्लोक ५५, ओंव्या ७०८.

"जो मला एकट्यालाच आपणहून [...] अर्पण करतो, ज्याला जगामध्यें माझ्याशिव[ाय] दुसरी चांगली वस्तु नाहीं, ६९६ शुभ कि[ंवा] अशुभ ज्याचें सारें मीच. आपल्या जन्माचें [सा]र्थक काय तें एक मीच असें समजतो. ६[९७] मग तो 'प्राणी' हा शब्दच नाहींसा हो[तो;] कारण, त्याच्या दृष्टींत मीच शिरलेला अस[तो] ह्मणून तो निर्वैर होऊन जिकडे तिकडे मल[ा] भजतो. ६९८ अर्जुना! असा जो भक्त [अ]सेल, त्याचें त्रिधात्मक शरीर जेव्हां नाह[ीसें] होतें, तेव्हां तो मीच होऊन राहतो." ६[९९]

**संजय** ह्मणतात "याप्रमाणें जगद्रूप [उद]रानें दोंदिल झालेल्या व करुणरसानें [...] झालेल्या **श्रीकृष्णांनीं** सांगितलें. ७०० [...]

---

१ कफ, वात, पित्तात्मक शरीर.

१ ब्रह्मांडायेवढ्या स्थूल उदरानें असणाऱ्या (श्रीकृष्ण[...]
२ कारण. ३ उणें. ४ प्रतिपादन करण्यासाठीं. ५ श्री[...]
६ विचार. ७ इच्छित. ८ स्पष्ट, सरळ. ९ दोन्ही पायां[...]

हां तो अर्जुन आनंदानें अगदीं भरून गेला. आणि कृष्णाचे चरण जाणण्याविषयीं तोच एक चतुर खरा. ७०१ त्यानें देवाच्या दोन्हीही मूर्ति नीट न्याहाळून पाहिल्या. तेव्हां मनांत विश्वरूपाहून कृष्णमूर्तीतच विशेष लाभ आहे असें वाटूं लागलें. ७०२ पण त्याच्या मनाला देवांनीं मान दिला नाहीं. कारण, व्यापक स्वरूपापेक्षां एकदेशीयस्वरूप कांहीं श्रेष्ठ नव्हे. ७०३ हेंच सिद्ध करण्याकरितां श्रीकृष्णांनीं एक दोन सुरेख दृष्टांत सांगितले. ७०४ तें अर्जुनानें ऐकिलें. आणि मनांत ह्मणाला "तर आतां त्या दोहोंमध्यें चांगलें कोणतें तें पुन्हा विचारूं." ७०५ असा मनामध्यें विचार करून आतां आपल्या इच्छेप्रमाणें नीट विचारील. ती कथा पुढें ऐकावी. ७०६ ज्ञानदेव ह्मणतात "स्पष्ट ओवीच्या छंदानें आनंदानें गोष्टी सांगूं. त्या आनंदानेंच ऐकाव्यात. ७०७ मीं ही ओव्यारूप मोकळया फुलांची ओंजळ भरून विश्वरूपाच्या दोहों चरणांवर अर्पण केली आहे." ७०८

अकरावा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय १२ वा.

जयजय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतिये ॥ १ ॥ विषयव्याळें मिठी । दिधलिया सुठी तांटी । ते तुझिये कृपादृष्टी । निर्विष होय ॥ २ ॥ तरि कवणातें ताप पोळी । कैसेनि वो शोक जाळी । जरि प्रसादरसकल्लोळीं । पुरें येसि तूं ॥ ३ ॥ योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळें । सोहंसिद्धीचे लळे । पाळसी तूं ॥ ४ ॥ आंधारशक्तीचिया अंकीं । वाढविसी कौतुकीं । हृदयाकाशपाल्खीं । पैरिये देसी निजें ॥ ५ ॥ प्रत्यक्ज्योतीचीं वोवाळणीं । करिसी मनपवनाचीं खेळणीं । आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेव विसी ॥ ६ ॥ सतरावियेचें स्तन्य देसी । अनाहताचा हुंबर गासी । समाधिबोधें निजविसी । बुझाउनी ॥ ७ ॥ ह्मणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं । याकारणें मी साउली । न संडीं तुझी ॥ ८ ॥ अहो सद्गुरुचिये कृपादृष्टी । तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी । तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥ ९ ॥ ह्मणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापी मातें । ग्रंथनिरूपणीं ॥ १० ॥ नवरसीं भरवीं सागर । करवीं उचिततरत्नांचे आगर । भावार्थाचे गिरिवर । निफजवीं माये ॥ ११ ॥ साहित्यसोनियांचिया खाणी । उघडवीं देशियेचिया क्षोणी । विवेकवल्लीची लावणी । हों देईं सैंघ ॥ १२ ॥ संवादफळनिधानें । प्रमेयांचीं उद्यानें । लावीं ह्मणें गहनें । निरंतर ॥ १३ ॥ पाखांडाचे दरकुटे । मोडीं वाग्वाद अव्हांटे । कुतर्कांचीं दुष्टें । सावजें फेडीं ॥ १४ ॥ श्रीकृष्णगुणीं मातें । सर्वत्र करीं वो सरतें । राणिवे बैसवीं श्रोतयांतें । श्रवणाचिये ॥ १५ ॥ ये मऱ्हाठियेचिया नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥ १६ ॥ तूं आपुलेनि स्नेहपल्लवें । मातें पांघुरविशील सदैवें । तरि आतांचि हें आघवें । निर्मीन माये ॥ १७ ॥ इये विनवणीयेसाठीं । अवलोकिलें गुरुकृपादृष्टी । ह्मणे गीताथेंसीं उठीं । न बोलें बहु ॥ १८ ॥ तेथ जी जी महाप्रसाद । ह्मणोनि साविया जाहाला आनंद । आतां निरोपीन प्रबंध । अवधान दीजे ॥ १९ ॥

**हे शुद्धे! हे उदारे! हे *प्रसिद्धे! हे निरंतर आनंदाचा वर्षाव करणारे! तुझा जयजयकार असो. १ विषयरूप सर्पानें मिठी घातली कीं, मूर्च्छा ह्मणून जात नाहींच. पण तीही तुझ्या कृपादृष्टीनें निर्विष होते. २ तुझ्या कृपाकल्लोळाचा पूर आला, ह्मणजे ताप कोणाला जाळणार? शोक कसा दग्ध करणार? ३ सेवकांना तुझ्याच कृपेनें योगसुखाचीं साधनें भोगावयास मिळतात. परब्रह्म तें मीच अशा भावनेचे तूंच लाड पुरवितेस. ४ त्यांना योगाच्या मांडीवर प्रेमानें वाढवितेस; हृदयाकाशरूपी पाळण्यामध्यें घालून आपल्या हितगुजानें झोंके देतेस; ५ प्रत्यक्ज्योतीचीं ओवाळणी करतेस; मनाचीं आणि वायूचीं खेळणीं करून देतेस; आत्मसुखाचीं बाळलेणीं घालतेस; ६ जीवनकलेचें स्तनपान देतेस; अनाहत चक्राचें गाणें गातेस; आणि समाधिबोधानें थोपटून निजवितेस. ७ ह्मणून साधकाची तूं माउली आहेस. तुझ्या चरणानें विद्येचें पीक पिकतें. ह्याकरितां तुझी सावली मी सोडीत नाहीं. ८ हे आई! हे सद्गुरु कृ-**

१ हें गुरुकृपादृष्टीचें संबोधन. २ निरंतर. ३ वृष्टि करणारे. ४ मूर्च्छा. ५ भाजतो. ६ पुरानें. ७ योगाच्या मांडीवर. ८ हृदयांतील आकाश हाच कोणी पाळणा, त्यांत. ९ झोके. १० गुह्य उपदेशानें. ११ प्रत्यगात्म्याचीं. १२ जीवनकळेचें. १३ अनाहतनामक चक्राचें. १४ गाणें. १५ आश्रय देई. १६ ब्रह्मदेव. १७ अलंकारांचे. १८ देशभाषारूप जमिनींत. १९ पुष्कळ. २० संवादरूप फळांचे ठेवे. २१ अर्थाचीं. २२ गुहा. २३ आडमार्ग. २४ क्रूर. २५ जनावरें. २६ नाश कर. २७ श्रेष्ठ. २८ केवळ सुखच.

१ कृपारूप पदरानें. २ विनंतीबरोबर. ३ महाराज, महाराज. ४ तत्काल, सहज.

* हीं सर्व गुरुकृपादृष्टीचीं संबोधनें आहेत. ही गोष्ट पुढील ९ व्या ओवीवरून ध्यानांत येईल.

पादृष्टे! तुझी दया ज्याला आश्रय देते, तो सकल विद्येच्या सृष्टीचा ब्रह्मदेव होतो. ९ ह्मणून हे मातोश्री! हे श्रीमते! हे निजजन-कल्पलते! ग्रंथ निवेदन करण्याला आज्ञा दे. १० माते! नवरसाचा समुद्र भरीव; उचित अलंकारांचें भांडार करून सोड; माते! भावार्थांचे उंच उंच पर्वत निर्माण कर. ११ साहित्यसुवर्णाच्या खाणी सांपडूं देत; देशभाषेच्या क्षेत्रांत विवेकवल्लीची लावणी दाटून राहूं दे. १२ संवादफळांच्या ठेवी, आणि अर्थाच्या बागा घनदाट लावून ठेव; अशी माझी प्रार्थना आहे. १३ पाखांडाचे खळगे बुझवून सोड; वादविवादाच्या आडवाटा मोडून टाक; आणि कुतर्कांचीं सावजें हांकून लाव. १४ मला जेथें तेथें श्रीकृष्णाच्या गुणानुवादांत श्रेष्ठ करून सोड, आणि श्रोत्यांना श्रवणाच्या राज्यावर बशीव. १५ ह्या महाराष्ट्र भाषानगरामध्यें ब्रह्मविद्येचा सुकाळ करून सोड. आणि ती घेतांना व देतांना जगाला सुखच सुख होईल असें कर. १६ हे मातोश्री! तूं आपल्या ममतारूप पदराचें जर निरंतर मजवर पांघरूण घालशील, तर आई ग! हें सारें मी आतांच्या आतां निर्माण करीन. १७ ह्या विनंतीकडे गुरूच्या कृपादृष्टीनें पाहिलें, आणि ह्मणाली 'गीतेचा अर्थ करण्याला ऊठ. अधिक बोलूं नको'. १८ तेव्हां "आज्ञा महाराज. महाप्रसाद झाला." असें ह्मणतांना सहज आनंद झाला. आतां कवितारूपानें निवेदन करतों, ऐकावें. १९

अर्जुन उवाच—

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।

ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

[अर्जुन उवाच–] तरि सकळवीराधिराज । जो सोमवंशीं विजयध्वज । तो बोलता जाहाला आत्मज । पांडुनृपाचा ॥ २० ॥ कृष्णातें ह्मणे अवधारिलें । आपण विश्वरूप मज दाविलें । तें नवलें[1] ह्मणोनि विहालें[2] । चित्त माझें ॥ २१ ॥ आणि इये कृष्णमूर्तीची सेवें[3] । यालागीं सोय धरिली जीवें । तंव नको ह्मणोनि देवें । वारिलें[4] मातें ॥ २२ ॥ तरि व्यक्तें[5] आणि अव्यक्तें[1] । हें तूंचि एक निभ्रांत । भक्तीं[2] पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ॥ २३ ॥ या दोन्ही जी वाटा । तूतें पावावया वैकुंठा । व्यक्ताव्यक्त दारवंठा[3] । रिगिजे येथ ॥ २४ ॥ पैं जे वानी[4] शैयातुका[5] । तेचि वेगळिये वाला येका । ह्मणोनि एकदेशीया व्यापका । सरिसा[6] पाड ॥ २५ ॥ अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया ॥ २६ ॥ हे कीर माझ्या चित्तीं । प्रतीति आथि जी निरुती[7] । परि पुसणें योगपती[8] । तें तें याचिलागीं ॥ २७ ॥ जे देवा[9] तुह्मी नावेकं[10] । अंगीकारिलें व्यापक[11] । तें साचचि कीं कवतिक । हें जाणावया ॥ २८ ॥ [एवं सततयुक्ता इति] तरि तुजलागिं कर्म । तूंचि जयाचें परम । भक्तीसि मनोधर्म । विकोनि घातला ॥ २९ ॥ इत्यादि सर्वी परी । जे भक्त तूतें श्रीहरी । बांधोनियां जिव्हारीं[12] । उपासिती ॥ ३० ॥ [ये चापि] आणि जें प्रणवापैलीकडे[13] । [अक्षरमव्यक्तं] वैखरीयेसि[14] जें कानडें[15] । कायिसयाहि सांगडें[16] । नव्हेचि जें वस्तु ॥ ३१ ॥ तें अक्षर जी अव्यक्त । निर्दोष देशरहित । सोहंभावें[17] उपासित । ज्ञानिये जें ॥ ३२ ॥ [तेषां के योगवित्तमाः] तयां आणि जी भक्तां । येरयेरांमाजि अनंता । कवणें योग तत्त्वता । जाणितला सांग ॥ ३३ ॥ इया किरीटीचिया बोला । तो जगद्बंधु संतोषला । ह्मणे हो प्रश्न भला । जाणसी करूं ॥ ३४ ॥

तेव्हां सकल वीरांचा शिरोमणी, सोमवंशांतील जो विजयध्वज, तो पंडूराजाचा पुत्र–अर्जुन–बोलूं लागला. २० कृष्णाला ह्मणतो "ऐकलेंत काय? आपण मला विश्वरूप दाखविलेंत, तें अद्भुत होतें. ह्मणून माझें चित्त भयाभीत झालें. २१ आणि ह्या कृष्णमूर्तीची संवय असल्यामुळें, जीवानें त्याची आवड धरली, तों देवांनीं ती आवड धरूं नको ह्मणून माझें निवारण केलें. २२ तर व्यक्त आणि अव्यक्त किंवा सगुण आणि निर्गुण हीं दोन्हीं निःसंशय तुमचीं एकट्याचींच स्वरूपें. भक्तीनें सगुण स्वरूपाची प्राप्ती होते, आणि योगानें निर्गुण स्वरूपाची प्राप्ती होते. २३ हे वैकुंठपते! तुला पावावयाला ह्या दोन वाटा आहेत. आणि व्यक्त व अव्यक्त हीं आंत शिरावयाचीं

१ अद्भुत. २ भ्यालें. ३ अभ्यास, संवय. ४ निवारण केलें. ५ सगुण.

१ निर्गुण. २ भक्तीनें. ३ उंबरा. ४ कस. ५ शंभर भाराला. ६ सारखी योग्यता. ७ खरी. ८ हे योगेश्वरा. ९ कीं. १० क्षणभर. ११ विराट्स्वरूप. १२ अंतःकरणामध्यें. १३ ओंकाराच्या पलीकडे. १४ वाणीला. १५ कटीण, अवघड. १६ सारखें, युक्त. १७ तो मी या भावनेनें.

दोन दारें आहेत. २४ शंभर भार सोन्याला जो कस लागतो, तोच कस एक वालभर सोनें घेतलें, तरी त्यालाही लागतो. ह्मणून एकदेशीय काय आणि सर्वव्यापक काय? दोन्ही स्वरूपांची योग्यता सारखीच. २५ अमृताच्या समुद्रामध्यें त्याच्या गुणाचा जो प्रभाव दृष्टीस पडतो, तोच त्याच्या लाटेच्या एका चुळींतही असतो. २६ हा माझ्या चित्तामध्यें पक्का अनुभव येऊन चुकला. पण हे योगिराजा! ह्यासाठीं तुह्मांला एक विचारावयाचें आहे. २७ कीं, देवा! ही प्रचीति आलेली खरी कीं वरकरणी हें जाणण्यासाठीं आपण क्षणभर विराट्स्वरूप धारण केलें. २८ तर, कर्म करावयाचें तें सर्व तुझ्यासाठीं; ज्यांचा जीवभाव काय तो तूं; ज्यांनीं आपला मनोधर्म भक्तीला विकून टाकला; २९ इत्यादि नाना प्रकारांनीं हे **श्रीहरी!** तुला जे अंतःकरणांत बांधून ठेवून उपासना करतात; ३० आणि जें ओंकाराच्या पलीकडचें, वाणीला जें अगम्य, ज्याच्या बरोबरीला कोणतीच वस्तु लागावयाची नाहीं, ३१ **प्रभो!** असें अक्षर, अव्यक्त, निर्दोष, देशरहित, जें (परब्रह्म) तें मीच या भावनेनें ज्ञानी ज्याची उपासना करितात, ३२ **प्रभो! अनंता!** ते आणि भक्त ह्यांपैकीं खरा योग कोणीं जाणला? हें सांगावें." ३३ ह्या **अर्जुनाच्या** भाषणानें त्या **जगद्बंधूला** संतोष झाला. आणि ह्मणतात "वाहवा! प्रश्न करावयाला तूं फारच चांगलें जाणतोस!" ३४.

श्रीभगवानुवाच–

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच–श्रद्धया परयोपेताः] तरि अस्तगिरीचिया उपकंठीं[१]। रिगालिया रविबिंबापाठीं। रश्मी जैसे किरीटी। संचरती ॥ ३५ ॥ कां वर्षाकाळीं सरिता। जैसी चढों लागे पांडुसुता। तैसी नीच[२] नवी भजतां। श्रद्धा दिसे॥३६॥ [मय्यावेश्य मन इति] परी ठाकिलियाहि[३] सागर। जैसा मागीलही यावा[४] अनिवार। तिये गंगेचिये ऐसा पडिभर[५]। प्रेमभावा ॥ ३७ ॥ तैसें सर्वेंद्रियांसहित। मजमाजि सूनि[१] चित्त। जे रात्रि दिवस न ह्मणत। उपासिती ॥ ३८ ॥ [ते मे युक्ततमा मताः] इया परी जे भक्त। आपणपें मज देत। तेचि मी योगयुक्त। परम मानीं ॥ ३९ ॥

"तर **अर्जुना!** अस्तमान होणाऱ्या पर्वताच्या जवळ सूर्य गेला असतां, त्याच्या मागून जसे किरण जातात, ३५ किंवा **अर्जुना!** वर्षाकालामध्यें ज्याप्रमाणें नदी चढूं लागते, त्याप्रमाणें माझी भक्ति करतांना ज्यांची श्रद्धा नित्य नवी दिसून येते; ३६ सागरास मिळाली तरी, मागचा लोंढा जसा अनिवार येतो, त्या **गंगे**प्रमाणें ज्यांचा प्रेमभाव तुडुंबलेला; ३७ त्याचप्रमाणें सर्वेंद्रियांसहवर्तमान माझ्या मध्यें चित्त ठेवून जे रात्र किंवा दिवस न ह्मणतां माझी उपासना करितात; ३८ अशा प्रकारचे जे भक्त, आपण स्वतःलाच जे मला वाहून टाकतात, तेच परमयोगयुक्त असें मी मानितों." ३९

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते।
सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥

[ये त्वक्षरं] आणि येर तेही पांडवा। जे आरूढोनि सोहंभावा। झोंबती निरवयवा। अक्षरासि ॥ ४० ॥ [अनिर्देश्यं] मनाची नेखी[२] न लगे। जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे। इंद्रियां कीर जोगें। काय होईल ॥ ४१ ॥ [अव्यक्तं] परि ध्यानाही कुवाडें[३]। ह्मणोनि एके ठायीं न सांपडे। व्यक्तीसि माजिवडें[४]। कवणेही नोहे ॥ ४२ ॥ [सर्वत्रगं] जया सर्वत्र सर्वपणें। सर्वांही काळीं असणें। [अचिंत्यं च] जें पावूनि चिंतवणें[५]। हिंपुटी[६] जाहलें ॥ ४३ ॥ जें होय ना नोहे। जें नाहीं ना आहे। ऐसें ह्मणोनि उपाये। उपजतीचिना ॥४४॥ [कूटस्थमचलं ध्रुवं] जें चळे ना ढळे। सरे ना मैळे। [पर्युपासते] तें आपुलेनिचि बळें। आंगविलें[७] जिहीं ॥ ४५ ॥

"आणखी इतर आहेत ते सुद्धां ब्रह्म तेंच मी अशी भावना धरून निराकार, आणि अविनाशी अशांशीं संलग्न होतात; ४० जेथें मनाच्या नखाचाही स्पर्श होत नाहीं; बुद्धीची दृष्टी जेथें शिरत नाहीं; तेथें इंद्रियांना निश्चय करण्याजोगें काय असणार? ४१ पण

१ समीप, जवळ. २ नित्य. ३ मिळाली असतांही. ४ लोट. ५ पूर.

१ घालून. २ नखाचा स्पर्श. ३ गूढ. ४ मध्यें. ५ चिंतणें. ६ कष्टी. ७ स्वाधीन केलें.

ध्यान करण्यालाही कठीण, ह्मास्तव एके ठि-काणीं सांपडत नाहीं; कोणत्याही व्यक्तीमध्यें असत नाहीं; ४२ जें सर्व ठिकाणीं सर्व-पणानें सदा सर्वकाल असतें; ज्याचें चिंतन करतांना विचारच कुंठित होतो; ४३ जें उ-पन्नही होत नाहीं, आणि नाहींसेंही होत नाहीं; जें नाहीं आणि आहे, असें असल्यामुळें कांहीं उपायच चालत नाहीं. ४४ जें चळत नाहीं कीं ढळत नाहीं; जें सरत नाहीं, कीं मळत नाहीं; तें स्वसामर्थ्यानेंच ज्यांनीं स्वा-धीन करून घेतलें," ४५

संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

[संनियम्येंद्रियग्रामं] पैं वैराग्यमहापावकें । जाळूनि वि-षयांचीं कटकें । अधपलीं तवकें । इंद्रियें धरिलीं ॥ ४६ ॥ मग संयमाची थाटी । सूनि मुरडिलीं उपराटीं । इंद्रियें कोंडिलीं कपाटीं । हृदयाचिया ॥ ४७ ॥ अपानींचिया तोंडा । लावोनि आसनमुद्रा सुहाडा । मूळबंधाचा हुडा । पन्नासिलीं ॥ ४८ ॥ आशेचे लाग तोडिले । अधैर्याचे कडे झाडिले । निद्रेचें शोधिलें । काळवखें ॥४९॥ वज्राग्नीचियां ज्वाळीं । करूनि सप्तधातूची होळी । व्याधीच्या सिसाळीं । पूजिलीं यंत्रें ॥ ५० ॥ मग कुंडलिनियेचा टेंभा । आधारीं केला उभा । तया चोजवलें प्रभा । निमथावरी ॥ ५१ ॥ नवद्वारांचिया चौचकी । बांणूनि संयतीची अडवंकी । उघडली खिडकी । ककारांतींची ॥ ५२ ॥ प्राणशक्तिचामुंडे । प्रहारूनि संकल्पाचे मेंडे । मनोमहिषाचेनि मुंडें । दिधली बळी ॥ ५३ ॥ चंद्रसूर्यां बुझावणी । करूनि अनाहताची सुंडावणी । अंतराविचेचें पाणी । जिंकिलें वेगीं ॥ ५४ ॥ मग मध्यमा मध्यविवरें । तेणें कोरिवें दोंदरें । टोंकिलें चंवरें । ब्रह्मरंध्र ॥ ५५ ॥ वरी मकरांत सोपान । तें सांडोनियां गहन । काखे सुनियां गगन । भरले ब्रह्मीं ॥ ५६ ॥ [सर्वत्र समबुद्धयः] ऐसे जे समबुद्धी । मिळावया सोहंसिद्धी । आंगवितांति निरवधी । योगदुर्गें ॥ ५७ ॥ [ते प्राप्नुवंति मामेव] आपुलिया साटोवाटीं । शून्य घेती उठाउठी । तेही मातेंचि किरीटी । पावती गा ॥ ५८ ॥ वांचूनि योगाचेनि बळें । अधिक कांहीं मिळे । ऐसें नाहीं आगळें । कष्टचि तया ॥ ५९ ॥

"वैराग्यरूप महदाग्नीनें विषयांचीं सैन्यें जाळून टाकल्यामुळें इंद्रियांनीं केवळ जळका आवेश धरलेला; ४६ इंद्रियांना संयमाचा (निग्रहाचा) फांस घालून उफराटीं फिरवून हृदयाच्या कपाटांत कोंडून टाकलीं; ४७ अ-पानाच्या तोंडाला आसनाची घट्ट मुद्रा लावून, मूळ बंधाचा बुरूज शृंगारला; ४८ आशेचे संबंध तोडून टाकून अधैर्याचे कडे मोडून नि-द्रेचा काळोख नाहींसा करून, ४९ मूळ बंधा-पासून उत्पन्न झालेला जो अग्नि, त्याच्यामध्यें सप्त धातूंची होळी करून अनेक व्याधींनीं श-रीरस्थ यंत्रांची जे पूजा करितात, ५० आणि मग कुंडलिनीचा पलिता आधारचक्राशीं उभा करून त्याची प्रभा मस्तकापर्यंत पाडून, ५१ नवद्वारांचा प्राणायाम करून, मनःसंयमाची खीळ घालून, सुषुम्नेची खिडकी उघडतात; ५२ आणि प्राणशक्तीरूप **चामुंडा** देवीला संकल्परूप मेंढे मारून मनोमहिषाच्या मुंड्या बळी देतात; ५३ **इडा** व **पिंगळा** नाडीची समजूत करून **अनुहत**ध्वनीची गर्जना करूं लागतात; आणि जीवनकलेचें पाणी जे लौ-कर तोडतात, ५४ आणि **सुषुम्नेच्या** मध्य विवरांतील तयार केलेल्या जिन्यावरून शेव-टच्या ब्रह्मरंध्रास पोंचतात; ५५ नंतर तुर्या-वस्थेचा अवघड जिना लागतो, तो चढून, आकाशाला काखोटींत मारून ब्रह्मामध्यें ऐक्य-रूप होतात. ५६ असे जे स्थिरबुद्धि झालेले, ते परब्रह्म तें आपणच अशी भावना होण्या-साठीं अनेक योगरूप किल्ले बळकावून बस-तात. ५७ आणि–हांहां ह्मणतां–शून्याचा–नि-राकाराचा–मोबदला मिळवितात–पल्ला गांठ-तात. **अर्जुना!** तेही मलाच पावतात. ५८

१ सैन्यें. २ होरपळलीं. ३ फांस. ४ गुहेंत. ५ दृढ. ६ बुरूज. ७ शृंगारला. ८ संबंध. ९ पर्वताचे भाग. १० मूळबंधोत्पन्न ज्वालाग्नीनें. ११ शिरांची पंक्ती. १२ शरीरस्थ यंत्रदेवता. १३ पलिता. १४ मस्तकापर्यंत. १५ प्राणायाम करून. १६ कपाटांत घालून. १७ खीळ. १८ सुषुम्नेची. १९ प्राणशक्तीरूप चामुंडेला. २० मेंढे. २१ इडा पिंगळानाडीच्या समजावणीस. २२ अनुहतध्वनी. २३ गजर. २४ जीवनकळेचें. २५ सुषुम्नानाडीच्या मध्यविवरानें. २६ जिन्यानें. २७ प्राप्त केलें. २८ शेवटलें. २९ तुर्यावस्था. ३० घालून.

१ स्वाधीन करतात. २ योगरूप किल्ले. ३ मोबदल्यास.

**पण योगसामर्थ्यानें सुद्धां ह्याहून अधिक असें कांहींच मिळत नाहीं. कष्ट भोगतात येवढें मात्र कायतें अधिक!" ५९**

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

[सर्वभूतहिते रताः श्लो०४] जिहीं सकळभूतांचिया हितीं । [ अव्यक्तासक्तचेतसां ] निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ती । भक्तीविणें ॥ ६० ॥ [ क्लेशोऽधिकतरस्तेषां ] तयां महेंद्रादि पदें । करितातिं वेटवधें । आणि ऋद्धिसिद्धीचीं द्वंद्वें । पडोनि ठाती ॥ ६१ ॥ कामक्रोधाचे विलग । उठावती अनेग । आणि शून्येंसीं आंग । झुंझवावें कीं ॥ ६२ ॥ ताहानें ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावीं । मैमावा वारा ॥ ६३ ॥ उनिदियाचें पहुडणें । निरोधाचें वेल्हावणें । झाडांसि साजणें । चावळावें गा ॥ ६४ ॥ शीत वेढावें । उष्ण पांघुरावें । वृष्टीचिया असावें । घराआंत ॥ ६५ ॥ किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । भ्रतारावीण करावा । तो हा योग ॥ ६६ ॥ एथ स्वामीचें काज । ना वापिकें व्याज । परि मरणेंसीं झुंझ । नित्य नवें ॥ ६७ ॥ ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख । डोंगर गिळतां मुख । न फाटे काई ॥ ६८ ॥ [ अव्यक्ता हि गतिर्दुःखं ] ह्मणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वांटा । भागा आला ॥ ६९ ॥ [ देहवद्भिरवाप्यते ] पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरियां पडती खाणें । तैं पोट भरणें कीं मरणें । शुद्धी नेणे ॥ ७० ॥ ह्मणोनि समुद्र वाहीं । तरणें आथि केंही । कां गगनामाजि पाई । खोलिजेत असे ॥ ७१ ॥ वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी । सूर्याची पाउठी । कां होय गा ॥ ७२ ॥ यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेवि देहवंतां जीवां । अव्यक्तीं गति ॥ ७३ ॥ ऐसाही जरी धिवंसा । बांधोनियां आकाशा । झोंबती तरी क्लेशा । पात्र होती ॥ ७४ ॥ ह्मणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोटंगले ॥ ७५ ॥

**"जे सर्व लोकांच्या कल्याणासाठीं अनाश्रित अशा अव्यक्तामध्यें भक्तीशिवाय आसक्ति धरतात, ६० त्यांना महेंद्रासारखीं पदें वाटेंत लुटतात, आणि ऋद्धिसिद्धीच्या जोड्या मध्यें आडव्या येतात. ६१ कामक्रोधाचे अनेक उपद्रव उत्पन्न होतात, आणि शून्याशीं शरीर झुंजवावें लागतें. ६२ तहानेनेंच तहान मारावी लागते; भुकेनेंच भूक खावी लागते; अहोरात्र हातांच्या वावांनीं वारा मोजावा लागतो. ६३ जागृतपणानें निजावें लागतें; निरोधानें पसरावें लागतें; आणि झाडाशीं सुद्धां मित्रभावानें बोलावें लागतें. ६४ शीत नेसावें; उष्ण पांघरूण घ्यावें; आणि वृष्टीच्या घरांत रहावें. ६५ किंवा अर्जुना! भ्रताराशिवाय नित्य नव्यानें सती जावें, अशांतला हा योग आहे. ६६ येथें पतीचें कार्य नाहीं; कुलधर्माचेंही निमित्य नाहीं; पण मृत्यूशीं रोज नवेंनवें युद्ध मात्र आहे. ६७ असें मृत्यूहूनही तीक्ष्ण आणि रसरशीत असें विष गिळवेल काय? डोंगर गिळावयास गेलें, तर तोंड फाटावयाचें नाहीं काय? ६८ ह्याकरितां हे वीरश्रेष्ठा! जे योगमार्गानें जाण्यास निघतात, त्यांना दुःखाचा वांटा मात्र प्राप्त होतो. ६९ अरे असें पहा! लोखंडाचे चणे जर बोथऱ्याला खाण्याचा प्रसंग आला, तर त्याला पोट भरतें आहे कां मरण येतें आहे, ह्याची सुद्धां शुद्ध रहाणार नाहीं. ७० ह्मणून समुद्र हा कधीं बाहूंनीं तरून जातां येईल काय? किंवा आकाशामध्यें पायांनीं चालतां येईल काय? ७१ युद्धाची गर्दी उसळली ह्मणजे आंगाला एकही वार न लागतां तेजस्विता प्राप्त होईल काय? ७२ ह्याकरितां अर्जुना, पांगळ्याच्यानें वायूशीं हेवा करणें जसें व्हावयाचें नाहीं, तसें जिवांकडून निराकारामध्येंही गति व्हावयाची नाहीं. ७३ असें असूनही जर धैर्य धरून आकाशाशीं झोंबी खात बसले, तर क्लेशाला मात्र पात्र होतील. ७४ ह्मणून अर्जुना! जे भक्तिमार्गाच्या आश्रयाला लागलेले इतर आहेत, त्यांना हीं दुःखें मुळीं कळत सुद्धां नाहींत." ७५**

---

१ अनाश्रय अशा. २ वाटमारेपण. ३ उपद्रव. ४ हातांच्या वावांनीं. ५ मोजावा. ६ जागृतीचें. ७ पसरणें. ८ मित्रभावानें. ९ बोलावें. १० निमित्त. ११ बोथऱ्याला. १२ कोठेंही. १३ चालणें होतें. १४ समुदाय. १५ पायरी. १६ पैज. १७ धैर्य. १८ आश्रय करून राहिले.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥

[ये तु सर्वाणि कर्माणि] कर्मेंद्रियें सुखें । करिती कर्में अशेखें । जियें कां वर्णविशेखें । भागा आलीं ॥ ७६ ॥ विधीतें पाळित । निषेधातें गाळित । [मयि संन्यस्य] मज देऊनि जाळित । कर्मफळें ॥ ७७ ॥ ययापरी पाहीं । अर्जुना माझे ठाईं । संन्यसूनि नाहीं । करिती कर्में ॥७८॥ [मत्पराः] आणीकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव । तयां मीवांचूनि धांव । आनौती नाहीं ॥ ७९ ॥ ऐसे जे मत्पर । [मां ध्यायंत उपासते] उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें झाले ॥ ८० ॥ [अनन्येनैव योगेन] जयांचिये आवडी । केली मजशीं कुळवाडी । भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ॥ ८१ ॥ ऐसे अनन्ययोगें । विकले जिवें मनें आंगें । तयांचें कायि एक सांगें । जें सर्व मी करीं ॥ ८२ ॥

"वर्णविशेषाप्रमाणें जीं जीं कर्में वांट्यास आलीं आहेत, तीं तीं सर्व, कर्मेंद्रियें आनंदानें करीत असतात. ७६ कर्तव्यकर्में पाळतात; अकर्तव्यांचा त्याग करतात; आणि तीं मला अर्पण करून कर्मांचीं फलें दग्ध करून सोडतात. ७७ अशा प्रकारें पहा अर्जुना! सर्व कर्में माझ्या ठिकाणीं अर्पण करून नाहींशीं करून टाकतात. ७८ आणखी कायावाचामनेंकरून उत्पन्न होणारे जे जे भाव त्या त्या सर्वांची माझ्या शिवाय दुसरीकडे कोठेंही धांव नसते. ७९ असे जे माझ्याशीं लीन होऊन निरंतर माझी उपासना करतात, ध्यानांच्या निमित्तानें माझें घर होऊन बसतात, ८० ज्याची आवड, भोगमोक्षासारखीं कुळें दीनासारखीं टाकून माझ्याशींच देवघेव करिते, ८१ असे जे एकनिष्ठेनें, जिवानें, प्राणानें, आणि शरीरानें मला विकले गेले, त्यांचें मी काय काय ह्मणून करीत नाहीं? सर्व कांहीं करतों." ८२.

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७॥

[तेषां] किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला पां ॥८३॥ तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां । कळिकाळ नोकोनियां । घेतला पटा ॥ ८४ ॥ येन्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥ ८५ ॥ तैसे ते माझे । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजे । तयाचेनि मी ॥ ८६ ॥ [मृत्युसंसारसागरात्] जन्ममृत्यूचिया लाटीं । झळंबती इया सृष्टी । तें देखोनियां पोटीं । ऐसें जाह्लें ॥ ८७ ॥ भवसिंधूचेनि माजें । कवणासि धाक नुपजे । तेथ जरी कीं माझे । बिहिती हन ॥ ८८ ॥ [न चिरात्पार्थ] ह्मणोनि गा पांडवा । मूर्तीचा मेळावा । करूनि त्यांचिया गांवा । धांवत आलों ॥ ८९ ॥ नामाचेया सहस्त्रवरी । नावा इया अवधारीं । सजूनियां संसारीं । तारू जाह्लों ॥ ९० ॥ सैडे जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परीग्रहीं घातले । तरीयांवरी ॥ ९१ ॥ प्रेमाची पेटी । बांधली एकाचिया पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचिया ॥ ९२ ॥ परि भक्तांचेनि नावें । चतुष्पदादि आघवे । वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥ [अहं समुद्धर्ता] ह्मणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयांतें समुद्धर्ता । [भवामि] आथि मी सदा ॥९४॥ [मय्यावेशितचेतसां] आणि जेव्हांचि कां भक्तीं । दिधली आपुली चित्तवृत्ती । तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटीं ॥ ९५ ॥ याकारणें गा भक्तराया । हा मंत्र तुवां धनंजया । शिकिजे जे यया । मार्गा भजिजे ॥ ९६ ॥

"किंवा अर्जुना! जो मातेच्या पोटाला येतो, तो मातेचा इष्ट आप्त कितीसा असतो? ८३ तसें–मग ते कसेही असोत–त्यांच्या कलिकाळाचा पराभव करण्याची मी सनदच घेतलेली आहे. ८४ आणि येन्हवीं तरी, माझ्या भक्तांना आणि संसाराची चिंता? नांव कशाला घेतोस? समर्थाची स्त्री काय कोरान्न मागेल होय? ८५ तसें ते माझे अर्धांगी आहेत असें समज. त्यांचें कांहींही करण्याला मला लाज नाहीं. ८६ जन्ममृत्यूच्या लाटांनीं हे प्राणी बुडतात, हें पाहून माझ्या पोटांत असें कालवतें. ८७ ह्या भवसिंधूच्या पुरानें कोणाला धाक उत्पन्न होणार नाहीं? ह्मणून ते जरी माझे असतात तरी, त्यांस भीति वाटते. ८८ अर्जुना! त्या करितांच हें सगुण रूप घेऊन मी त्यांच्या गांवाला आलों आहें. ८९ निरनिराळ्या नामांच्या हजारों नावा करून संसारामध्यें तारूं झालों आहें. ९० जे एकटे दृष्टीस पडतील, त्यांना ध्या-

१ नाहींशीं. २ उदीम. ३ कितीसा? ४ नाश करावयाचा. ५ मक्ता, सनद.

१ लाटांमध्यें. २ बुडतात. ३ भितात. ४ अवतार. ५ एकटे. ६ सपरिवार. ७ नौकेवर. ८ प्रवेश. ९ ठिकाणीं.

**पण योगसामर्थ्यानें सुद्धां ह्याहून अधिक असें कांहींच मिळत नाहीं. कष्ट भोगतात येवढें मात्र कायतें अधिक!" ५९**

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

[सर्वभूतहिते रताः श्लो०४] जिहीं सकळभूतांचिया हितीं । [ अव्यक्तासक्तचेतसां ] निरालंबीं अव्यक्तीं । पसरलिया आसक्ती । भक्तीविणें ॥ ६० ॥ [ क्लेशोऽधिकतरस्तेषां ] तयां महेंद्रादि पदें । करिताति वाटवधें । आणि ऋद्धिसिद्धीचीं द्वंद्वें । पडोनि ठाती ॥ ६१ ॥ कामक्रोधाचे विलंग । उठावती अनेग । आणि शून्येंसीं आंग । जुंझवावें कीं ॥ ६२ ॥ ताहानें ताहानचि पियावी । भुकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वांवीं । मैमावा वारा ॥ ६३ ॥ उनिदियांचें पहुडणें । निरोधाचें वेल्हांवणें । झाडांसि साजणें । चोंवळावें गा ॥ ६४ ॥ शीत वेढावें । उष्ण पांघुरावें । वृष्टीचिया असावें । घराआंत ॥ ६५ ॥ किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । भ्रतारावीण करावा । तो हा योग ॥ ६६ ॥ एथ स्वामीचें काज । ना बापिकें व्यांज । परि मरणेंसीं झुंझ । नित्य नवें ॥ ६७ ॥ ऐसें मृत्यूहूनि तिख । कां घोंटे कढत विख । डोंगर गिळतां मुख । न फाटे काई ॥ ६८ ॥ [ अव्यक्ता हि गतिर्दुःखं ] ह्मणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वांटा । भागा आला ॥ ६९ ॥ [ देहवद्भिरवाप्यते ] पाहें पां लोहाचे चणे । जैं बोचरियां पडती खाणें । तैं पोट भरणें कीं मरणें । शुद्धी नेणे ॥ ७० ॥ ह्मणोनि समुद्र बाहीं । तरणें आथि केंही । कां गगनामाजि पाई । खोलिजेत असे ॥ ७१ ॥ वळघलिया रणाची थाटी । आंगीं न लगतां काठी । सूर्याची पाउठी । कां होय गा ॥ ७२ ॥ यालागीं पांगुळा हेवा । नव्हे वायूसि पांडवा । तेविं देहवंतां जीवां । अव्यक्तीं गति ॥ ७३ ॥ ऐसाही जरी धिंवसा । बांधोनियां आकाशा । झोंबरी तरी क्लेशा । पात्र होती ॥ ७४ ॥ ह्मणोनि येर ते पार्था । नेणतीचि हे व्यथा । जे कां भक्तिपंथा । वोठंगले ॥ ७५ ॥

**"जे सर्व लोकांच्या कल्याणासाठीं अनाश्रित अशा अव्यक्तामध्यें भक्तीशिवाय आसक्ति धरतात, ६० त्यांना महेंद्रासारखीं पदें वाटेंत लुटतात, आणि ऋद्धिसिद्धीच्या जोड्या मध्यें आडव्या येतात. ६१ कामक्रोधाचे अनेक उपद्रव उत्पन्न होतात, आणि शून्याशीं शरीर झुंजवावें लागतें. ६२ तहानेनेंच तहान मारावी लागते; भुकेनेंच भूक खावी लागते; अहोरात्र हातांच्या वावांनीं वारा मोजावा लागतो. ६३ जागृतपणानें निजावें लागतें; निरोधानें पसरावें लागतें; आणि झाडाशीं सुद्धां मित्रभावानें बोलावें लागतें. ६४ शीत नेसावें; उष्ण पांघरूण घ्यावें; आणि वृष्टीच्या घरांत रहावें. ६५ किंवा अर्जुना! भ्रताराशिवाय नित्य नव्यानें सती जावें, अशांतला हा योग आहे. ६६ येथें पतीचें कार्य नाहीं; कुलधर्माचेंही निमित्य नाहीं; पण मृत्यूशीं रोज नवेंनवें युद्ध मात्र आहे. ६७ असें मृत्यूहूनही तीक्ष्ण आणि रसरशीत असें विष गिळवेल काय? डोंगर गिळावयास गेलें, तर तोंड फाटावयाचें नाहीं काय? ६८ ह्याकरितां हे वीरश्रेष्ठा! जे योगमार्गानें जाण्यास निघतात, त्यांना दुःखाचा वांटा मात्र प्राप्त होतो. ६९ अरे असें पहा! लोखंडाचे चणे जर बोथऱ्याला खाण्याचा प्रसंग आला, तर त्याला पोट भरतें आहे कां मरण येतें आहे, ह्याची सुद्धां शुद्ध रहाणार नाहीं. ७० ह्मणून समुद्र हा कधीं बाहूंनीं तरून जातां येईल काय? किंवा आकाशामध्यें पायांनीं चालतां येईल काय? ७१ युद्धाची गर्दी उसळली ह्मणजे आंगाला एकही वार न लागतां तेजस्विता प्राप्त होईल काय? ७२ ह्याकरितां अर्जुना, पांगळ्याच्यानें वायूशीं हेवा करणें जसें व्हावयाचें नाहीं, तसें जिवांकडून निराकारामध्येंही गति व्हावयाची नाहीं. ७३ असें असूनही जर धैर्य धरून आकाशाशीं झोंबी खात बसलें, तर क्लेशाला मात्र पात्र होतील. ७४ ह्मणून अर्जुना! जे भक्तिमार्गाच्या आश्रयाला लागलेले इतर आहेत, त्यांना हीं दुःखें मुळीं कळत सुद्धां नाहींत." ७५**

१ अनाश्रय अशा. २ वाटमारेपण. ३ उपद्रव. ४ हातांच्या वावांनीं. ५ मोजावा. ६ जागृतीचें. ७ पसरणें. ८ मित्रभावानें. ९ बोलावें. १० निमित्त. ११ बोथऱ्याला. १२ कोठेंही. १३ चालणें होतें. १४ समुदाय. १५ पायरी. १६ पैज. १७ धैर्य. १८ आश्रय करून राहिले.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥

[ये तु सर्वाणि कर्माणि] कर्मेंद्रियें सुखें । करिती कर्में अशेखें । जियें कां वर्णविशेखें । भागा आलीं ॥ ७६ ॥ विधीतें पाळित । निषेधातें गाळित । [मयि संन्यस्य] मज देऊनि जाळित । कर्मफळें ॥ ७७ ॥ययापरी पाहीं । अर्जुना माझे ठाईं । संन्यसूनि नाहीं[1] । करिती कर्में ॥७८॥ [मत्पराः] आणीकही जे जे सर्व । कायिक वाचिक मानसिक भाव । तयां मीवांचूनि धांव । आनौती नाहीं ॥ ७९ ॥ ऐसे जे मत्पर । [मां ध्यायंत उपासते] उपासिती निरंतर । ध्यानमिषें घर । माझें झाले ॥ ८० ॥ [अनन्येनैव योगेन] जयांचिये आवडी । केली मजशीं कुळवाडी[2] । भोग मोक्ष बापुडीं । त्यजिलीं कुळें ॥ ८१ ॥ ऐसे अनन्ययोगें । विकले जिवें मनें आंगें । तयांचें कायि एक सांगें । जें सर्व मी करीं ॥ ८२ ॥

**"वर्णविशेषाप्रमाणें जीं जीं कर्में वांट्यास आलीं आहेत, तीं तीं सर्व, कर्मेंद्रियें आनंदानें करीत असतात. ७६ कर्तव्यकर्में पाळतात; अकर्तव्यांचा त्याग करतात; आणि तीं मला अर्पण करून कर्मांचीं फलें दग्ध करून सोडतात. ७७ अशा प्रकारें पहा अर्जुना! सर्व कर्में माझ्या ठिकाणीं अर्पण करून नाहींशीं करून टाकतात. ७८ आणखी कायावाचामनेंकरून उत्पन्न होणारे जे जे भाव त्या त्या सर्वांची माझ्या शिवाय दुसरीकडे कोठेंही धांव नसते. ७९ असे जे माझ्याशीं लीन होऊन निरंतर माझी उपासना करतात, ध्यानांच्या निमित्तानें माझें घर होऊन वसतात, ८० ज्याची आवड, भोगमोक्षासारखीं कुळें दीनासारखीं टाकून माझ्याशींच देवघेव करिते, ८१ असे जे एकनिष्ठेनें, जिवानें, प्राणानें, आणि शरीरानें मला विकले गेले, त्यांचें मी काय काय ह्मणून करीत नाहीं? सर्व कांहीं करतों." ८२.**

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७॥

[तेषां] किंबहुना धनुर्धरा । जो मातेचिया ये उदरा । तो मातेचा सोयरा । केतुला[3] पां ॥८३॥ तेवीं मी तयां । जैसे असती तैसियां । कळिकाळ नोकोनियां[4] । घेतला पैटा[5] ॥ ८४ ॥ येन्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥ ८५ ॥ तैसे ते माझे । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजे । तयाचेनि मी ॥ ८६ ॥ [मृत्युसंसारसागरात्] जन्ममृत्यूचिया लाटीं[1] । झळंवती[2] इया सृष्टी । तें देखोनियां पोटीं । ऐसें जाहालें ॥ ८७ ॥ भवसिंधूचेनि[3] माजें । कवणासि धाक ऊपजे । तेथ जरी कीं माझे । बिहिती हन ॥ ८८ ॥ [न चिरात्पार्थ] ह्मणोनि गा पांडवा । मूर्तींचा मेळावा[4] । करूनि त्यांचिया गांवा । धांवत आलों ॥ ८९ ॥ नामाचेया सहस्रवरी । नावा इया अवधारीं । सजूनियां संसारीं । तारू जाहलों ॥ ९० ॥ सैंडे[5] जे देखिले । ते ध्यानकासे लाविले । परीग्रहीं[6] घातले । तरीयांवरी ॥ ९१ ॥ प्रेमाची पेटी । बांधली एकाचिया पोटीं । मग आणिले तटीं । सायुज्याचिया ॥ ९२ ॥ परि भक्तांचेनि नावें । चतुष्पदादि आघवे । वैकुंठींचिये राणिवे । योग्य केले ॥ ९३ ॥ [अहं समुद्धर्ता] ह्मणोनि गा भक्तां । नाहीं एकही चिंता । तयांतें समुद्धर्ता । [भवामि] आथि मी सदा ॥९४॥ [मय्यावेशितचेतसां] आणि जेव्हांचि कां भक्तीं । दिधली आपुली चित्तवृत्ती । तेव्हांचि मज सूति । त्यांचिये नाटीं ॥ ९५ ॥ याकारणें गा भक्तराया । हा मंत्र तुवां धनंजया । शिकिजे जे यया । मार्गा भजिजे ॥ ९६ ॥

**"किंवा अर्जुना! जो मातेच्या पोटाला येतो, तो मातेचा इष्ट आप्त कितीसा असतो? ८३ तसें–मग ते कसेही असोत–त्यांच्या कलिकाळाचा पराभव करण्याची मी सनदच घेतलेली आहे. ८४ आणि येऱ्हवीं तरी, माझ्या भक्तांना आणि संसाराची चिंता? नांव कशाला घेतोस? समर्थाची स्त्री काय कोरान्न मागेल होय? ८५ तसें ते माझे अर्धांगी आहेत असें समज. त्यांचें कांहींही करण्याला मला लाज नाहीं. ८६ जन्ममृत्यूच्या लाटांनीं हे प्राणी बुडतात, हें पाहून माझ्या पोटांत असें कालवतें. ८७ ह्या भवसिंधूच्या पुरानें कोणाला धाक उत्पन्न होणार नाहीं? ह्मणून ते जरी माझे असतात तरी, त्यांस भीति वाटते. ८८ अर्जुना! त्या करितांच हें सगुण रूप घेऊन मी त्यांच्या गांवाला आलों आहें. ८९ निरनिराळ्या नामांच्या हजारों नावा करून संसारामध्यें तारूं झालों आहें. ९० जे एकटे दृष्टीस पडतील, त्यांना ध्या-**

१ नाहींशीं. २ उदीम. ३ कितीसा? ४ नाश करावयाचा. ५ भक्का, सनद.

१ लाटांमध्यें. २ बुडतात. ३ भितात. ४ अवतार. ५ एकटे. ६ सपरिवार. ७ नौकेवर. ८ प्रवेश. ९ ठिकाणीं.

नाच्या कासेस लावतों. आणि सहपरिवार असतील, त्यांना नावेंत घेतों. ९१ कोणाच्या पोटाखालीं प्रेमाची सांगड देतों; आणि त्यांस सायुज्याच्या किनाऱ्यास लावतों. ९२ पण भक्तच ह्मणून जे आहेत ते–चतुष्पादादि सर्व–वैकुंठाच्या राज्याला योग्य करून सोडतों. ९३ ह्यामुळें भक्तांना चिंता ह्मणून कसली ती रहात नाहीं. त्यांचा सदासर्वदा उद्धार करणारा मी आहें. ९४ त्यांनीं ज्या वेळीं आपली चित्तवृत्ति भक्तीला अर्पण केली, त्याच वेळीं मीही त्यांच्यांत शिरतों. ९५ ह्याकरितां हे भक्तराजा! अर्जुना! हाच मंत्र तूं शिक. आणि याच मार्गाचें भजन कर.'' ९६

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

[मय्येव मन आधत्स्व] अगा मानस हें एक । माझ्या स्वरूपीं सवृत्तिक[1] । [मयि बुद्धिं निवेशय] करूनि घालीं निष्टंक[2] । बुद्धि निश्चयेंसीं ॥ ९७ ॥ [निवसिष्यसि मय्येव] इयें दोनीसरिसीं । मजमाजि प्रेमेंसीं । रिगालीं तरि पावसी । मातें तूं गा ॥ ९८ ॥ जे मनबुद्धि इहीं । घर केलें माझ्या ठायीं । तरि सांगें मग काई । मी तूं उरे ॥ ९९ ॥ [अत ऊर्ध्वं] ह्मणोनि दीप पालवे[3] । सवेंचि तेज मालवे । कां रविबिंबासवें । प्रकाश जाय ॥ १०० ॥ उचललेया[4] प्राणासरिसीं । इंद्रियेंही निगती जैसीं । तैसा मनबुद्धिपासीं । अहंकार ये ॥ १ ॥ [न संशयः] ह्मणोनि माझिया स्वरूपीं । मनबुद्धी इयें निक्षेपीं[5] । येतुलेनि सर्वव्यापी । मीचि होसी ॥ २ ॥ यया बोला कांहीं । अनारिसें[6] नाहीं । आपली आण पाहीं । वाहतसें गा ॥ ३ ॥

''बाबा! हें एक मन, बुद्धीचा निश्चय करून माझ्या स्वरूपामध्यें अव्याहत वतनदार करून ठेव. ९७ मन आणि बुद्धि हीं दोन्हीं एकसारख्या प्रेमानें मजमध्यें शिरलीं, तर तूं मला पावशील. ९८ कारण, मन व बुद्धि यांनीं माझ्या मध्येंच घर केलें तर, मग तूं आणि मी उरेल काय? सांग. ९९ ह्मणून दिवा मालविला कीं, तेज नाहींसें होतें; किंवा सूर्यबिंब गेलें कीं त्याबरोबर प्रकाशही जातो; १०० किंवा प्राण जावयास निघाला कीं, इंद्रियें जशीं जाण्यास तयार होतात, त्याप्रमाणें मन आणि बुद्धि ह्यांच्यापाशीं अहंकार येतो. १०१ ह्मणून मन आणि बुद्धि हीं माझ्या स्वरूपांत ठेव. ह्मणजे सर्वव्यापी असा मीच होऊन राहशील. १०२ माझी शपत घेऊन सांगतों कीं, ह्या भाषणांत कांहीं चूक नाहीं.'' १०३

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ।
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥ ९ ॥

[अथ चित्तमिति] अथवा हें चित्त । मनबुद्धिसहित । माझ्या हातीं अचुंबित[1] । न शकसी देवों ॥ ४ ॥ [अभ्यासयोगेनेति] तरि गा ऐसें करीं । यया आठां पाहरांमाझारीं । मोटकें[2] निमिषभरी । देत जाईं ॥ ५ ॥ मन जें जें कां निमिखे । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक[4] । विषयीं घेइल ॥ ६ ॥ जैसें शरत्काल रिगे । आणि सरिता वोहटूं लागे । तैसें चित्त काढेल वेगें । प्रपंचौनी ॥ ७ ॥ मग पुनवेहूनि जैसें । शशिबिंब दिसे[5]–। दिसें हारपत अंवसे । नाहींचि होय ॥ ८ ॥ तैसें भोगा आंतूनि निगतां । चित्त मजमाजि रिगतां । हळू हळू पांडुसुता । मीचि होसिल ॥ ९ ॥ अगा अभ्यासयोग ह्मणिजे । तो हा एक जाणिजे । येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ॥ ११० ॥ पैं अभ्यासाचेनि बळें । एका गति अंतराळें[6] । व्याघ्र सर्प प्रांजळे । केले एकीं ॥ ११ ॥ विष कीं आहारीं पडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकीं वाग्ब्रह्म थोकडें । अभ्यासें केलें ॥ १२ ॥ ह्मणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं । यालागिं माझ्या ठाईं । अभ्यासें मिळें ॥ १३ ॥

''अथवा मनबुद्धिसहवर्तमान हें चित्तही वासनारहित माझ्या हातीं देणें होत नसेल, १०४ तर असें कर. ह्या आठ प्रहरांतील एक क्षण तरी मजकडे देत जा. १०५ ह्मणजे जे जे क्षण माझे सुखाचा अनुभव घेतील, तितक्या तितक्यांना विषयाविषयीं तिटकारा येईल. १०६ ज्याप्रमाणें शरदृतु प्राप्त झाला ह्मणजे नदी कमी कमी होत जाते, त्याप्रमाणें चित्त हें प्रपंचांतून लौकर मुक्त होईल. १०७ आणि मग पौर्णिमेपासून ज्याप्रमाणें चंद्राचें बिंब दिवसेंदिवस कमी कमी होत, अमावास्येला अगदींच नाहींसें होतें, १०८ त्याप्र-

१ वतनदार. २ अक्षत, अव्याहत. ३ लय होतांच. ४ निघून जाणाऱ्या. ५ ठेव. ६ अन्य, वेगळें.

१ वासनारहित. २ अल्प. ३ क्षणभर. ४ अरुचि. ५ दिवसेंदिवस. ६ अंतरिक्षांत. ७ आप्त.

माणें चित्त हें भोगांतून निघून माझ्यामध्यें शिरत शिरत, **अर्जुना!** शेवटीं मद्रूपच होऊन जाईल. १०९ बाबा! अभ्यासयोग असें ज्याला ह्मणतात, तो हाच एक आहे हें ध्यानांत ठेव. ह्याच्या योगानें अमुक एक होणार नाहीं असें नाहीं. ११० अभ्यासाच्या योगानें कितीएक अंतरिक्षांत चालतात; कित्येकांनीं वाघ, सर्पही आप्त करून सोडले आहेत. १११ अभ्यासाच्या योगानें विषही पचनीं पडतें; समुद्रावरूनही चालत जातां येतें; कित्येकांनीं तर अभ्यासाच्या योगानें वेदांसही मागें टाकलें आहे. ११२ ह्मणून अभ्यासाला दुष्कर असें कांहींच नाहीं. ह्याकरितां अभ्यासानेंच तूं माझ्या ठिकाणीं ये." ११३

अभ्यासेऽप्यसमर्थोसि मत्कर्मपरमो भव ।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

[अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि] कां अभ्यासाही लागीं । कसें नाहीं तुझिया आंगीं । तरि आहासी जया भागीं । तैसाचि अस ॥ १४ ॥ इंद्रियें न कोंडीं । भोगातें न तोडीं । अभिमान न सांडीं । स्वजातीचा ॥ १५ ॥ कुळधर्म चाळीं । विधिनिषेध पाळीं । मग सुखें तुज सरळी । दिधली आहे ॥ १६ ॥ [मत्कर्मपरमो भव] परि मनें वाचा देहें । जैसा जो व्यापार होये । तो मी करीत आहें । ऐसें न ह्मणे ॥ १७ ॥ करणें कां न करणें । हें आघवें तोचि जाणे । विश्व चळतसे जेणें । परमात्मेनि ॥ १८ ॥ उणया पुरे याचें कांहीं । उरों नेदीं आपुलिया ठायीं । स्वजातीचि करूनि घेईं । जीवित्व हें ॥ १९ ॥ माळियें जेउतें नेलें । तेउतें निवांतचि गेलें । तया पाणिया ऐसें केलें । होआवेंगा ॥ २० ॥ [मदर्थमपि कर्माणि कुर्वन्] ह्मणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ती । इयें वोझीं नेघे मती । अखंड चित्तवृत्ति । माझ्या ठायीं ॥ २१ ॥ येऱ्हवीं तरी सुभटा । उजू कां अव्हांटा । रथ काई खटपटा । करित असे ॥ २२ ॥ आणि जें जें कर्म निपजे । तें थोडें बहु न ह्मणिजे । निवांताचि अर्पिजे । माझ्या ठायीं ॥ २३ ॥ [सिद्धिमवाप्स्यसि] ऐसिया मद्भावना । तनुत्यागीं अर्जुना । तूं सायुज्यसदना । माझिया येसी ॥ २४ ॥

"किंवा अभ्यासास लागण्याचेंही तुझ्या आंगांत सामर्थ्य नसेल, तर ज्या स्थितींत तूं आहेस, तसाच अस. ११४ इंद्रियांनाही कोंडूं नको; भोगालाही सोडूं नको: आणि स्वजातीचा अभिमानही टाकूं नको. ११५ कुलधर्मानेंच चाल; विधिनिषिधाचें संरक्षण कर; ह्या साऱ्याला तुला मोकळीक दिली आहे. ११६ पण मनानें, वाणीनें, किंवा देहानें, जसा जो व्यापार होईल तो, मी करतों असें तरी ह्मणूं नको. ११७ करणें किंवा न करणें हें सारें, ज्या **परमात्म्यानें** हें विश्व चालविलें आहे, तोच जाणतो. ११८ उण्यापुऱ्याचें आपल्याकडे कांहीं उरूं देऊं नको. येवढें तरी आपल्या आयुष्याचें सार्थक करून घे. ११९ पाणी हें, माळी नेईल तिकडे जात असतें, त्याप्रमाणें व्हावें. १२० असें केल्यानें प्रवृत्तीचीं व निवृत्तीचीं ओझीं बुद्धीवर पडत नाहींत, आणि चित्तवृत्ति माझ्या ठिकाणीं राहते. १२१ बाकी हे **वीरश्रेष्ठा!** सरळ मार्ग किंवा आडमार्ग ह्याची विवंचना रथ का करित असतो? १२२ त्याप्रमाणें जें जें कर्म उत्पन्न होईल तें तें, थोडें किंवा पुष्कळ न ह्मणतां मुकाट्यानें माझ्यामध्यें अर्पण करीत जा. १२३ **अर्जुना!** अशा प्रकारच्या सद्भावना जर अंतकालीं राहतील, तर तूं माझ्या सायुज्यसदनाला येशील." १२४

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

[अथैतदप्यशक्तोऽसि] ना तरी हेंही तुज । नेदवे कर्म मज । [कर्तुं मद्योगमाश्रितः] तरि गा तूं भज । पांडुकुमरा ॥ २५ ॥ बुद्धिचिये पाठीं पोटीं । कर्माआदि कां शेवटीं । मातें बांधणें किरीटी । दुवाड जरी ॥ २६ ॥ तरि हेंही असो । सांडीं माझा अतिसो । [यतात्मवान्] परि संयतिसीं वसो । बुद्धि तुझी ॥ २७ ॥ [ततः] आणि जेणें जेणें वेळे । [सर्वकर्मफलत्यागं] घडती कर्में सकळें । तयांचीं तियें फळें । त्यजित [कुरु] जाय ॥ २८ ॥ वृक्ष कां वेली । लोटेती फळें आलीं । तैसीं सांडीं निपजलीं । कर्में सिद्धें ॥ २९ ॥ परि मातें मनीं धरावें । कां मज उद्देशें करावें । हें कांहीं नको आघवें । जाऊं दे शून्यीं ॥ १३० ॥ खडकीं जैसें वर्षलें ।

१ बळ. २ मोकळीक. ३ चालतें. ४ सार्थक. ५ घेऊं नको. ६ आड रस्ता.

१ देववत नाहीं. २ मनांत दृढ धरणें. ३ कठिण. ४ इंद्रियनिग्रहांत. ५ टाकून देतात. ६ हेतूनें.

कां आगीमाजि पेरिलें । कर्म मानीं देखिलें । स्वप्न जैसें॥३१॥ अगा आत्मजेच्या विषीं । जीव जैसा निरभिलाषी । तैसा कर्मी अशेषीं । निष्काम होईं ॥ ३२ ॥ वन्हीची ज्वाळा जैसी। वायां जाय आकाशीं। क्रिया जिरोंदे तैसी । शून्यामाजी॥३३॥ अर्जुना हा फलत्याग । आंवडे कीरे असलग । परि योगामाजि योग । धुरेचा हा ॥ ३४ ॥ येणें फलत्यागें सांडे । तें तें कर्म न विरूढे । एकचि वेळु झाडें । वांझें जैसीं ॥ ३५ ॥ तैसें येणेंचि शरीरें । शरीरा येणें सरे । किंबहुना येरझारें । चिरा पडे ॥ ३६ ॥ [ 'अथ चित्तं' इत्यादि श्लोकचतुष्टयभावार्थः ] पैं अभ्यासाचिया पाउटीं । ठाकिजे ज्ञान किरीटी । ज्ञानें येइजे भेटी । ध्यानाचिये ॥ ३७ ॥ मग ध्यानासि खेंव । देती आघवेचि भाव । तेव्हां कर्मजात सर्व । दूरी ठाके ॥ ३८ ॥ कर्म जेथ दुरावे । तेथ फलत्याग संभवे । त्यागास्तव आंगवे । शांति सगळी ॥ ३९ ॥ ह्मणोनि यावया शांति । हाचि क्रम सुभद्रापति । अभ्यासचि प्रस्तुतीं । करणें एथ ॥ १४० ॥

"अथवा हें कर्महीं तुझ्यानें मला अर्पण करवत नसेल तर, **अर्जुना!** तूं सेवा कर. १२५ किंवा **अर्जुना!** बुद्धीच्या पाठीला किंवा पोटावर अथवा कर्माच्या आदि व अंतींही मला बांधणें कठीण, असें जर तुला वाटत असेल, १२६ तर हेंही राहूं दे. माझा निजध्यास सोडून दे. पण तुझी बुद्धि इंद्रियनिग्रहांत तरी ठेव. १२७ आणि ज्या ज्या वेळीं जीं जीं कर्में घडतील, त्यांच्या त्या फळांचा त्याग करीत जा. १२८ वृक्ष किंवा वेली, आपलीं फळें जशीं सोडून देतात, त्याप्रमाणें कर्मानें प्राप्त झालेलीं फळें तूं सोडून दे. १२९ मला मनामध्यें धरावें किंवा माझ्याकरितां करावें हें कांहींएक नको. सारें शून्यामध्यें जाऊं दे. १३० खडकावर ज्याप्रमाणें मेघवृष्टि व्हावी, किंवा अग्नीमध्यें पेरावें, त्याप्रमाणेंच हें कर्म स्वप्न पडल्याप्रमाणें मान. १३१ अरे! कन्येविषयीं जीव जसा निरभिलाषी असतो, त्याप्रमाणें झाडून साऱ्या कर्मांविषयीं निष्काम हो. १३२ आकाशामध्यें गेलेली अग्नीची ज्वाळा जशी व्यर्थ; त्याप्रमाणें सारी क्रिया शून्यामध्यें जिरूं दे. १३३ **अर्जुना!** फलत्याग हा खरोखरच फार सोपा आहे. तरी तो योगामध्यें एक श्रेष्ठ योग आहे. १३४ ह्या फलत्यागानें लयास गेलेलें कर्म विस्तार पावत नाहीं. कित्येक झाडें एकवारच फल येऊन जशीं वांझ होतात, १३५ त्याप्रमाणें ह्या एकाच शरीरानें पुन्हा शरीर घेणें संपतें. किंबहुना पुनर्जन्माची समाप्तीच होते ह्मटलें तरी चालेल. १३६ तसेंच **अर्जुना!** अभ्यासाच्या पायरीनें ज्ञानसंपादन करावें. आणि ज्ञानानें ध्यानाच्या भेटीस यावें. १३७ ह्मणजे सारे भाव ध्यानालाच कौटाळून धरतात, आणि दूरोवस्त कर्में लांब राहतात. १३८ कर्म दुरावलें कीं तेथें फलत्याग उत्पन्न होतो. आणि तेणेंकरून परिपूर्ण शांति प्राप्त होते. १३९ ह्मणून हे **सुभद्रापती!** शांति यावयाला हाच क्रम. आणि त्यासाठींच आतां अभ्यास कर." १४०

१ कन्येविषयीं. २ वाटतो. ३ निश्चयेंकरून. ४ सोपा. ५ श्रेष्ठ, अग्रगण्य. ६ समयास. ७ समाप्ती होते. ८ आलिंगन. ९ स्वाधीन. १० सांप्रत.

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम्॥१२॥

[ श्रेय इति ] अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान । ज्ञानापासोनि ध्यान । विशेषिजे ॥ ४१ ॥ [ ध्यानादिति ] मग कर्मफलत्याग । तो ध्यानापासोनि चांग । त्यागाहूनि भोग । शांतिसुखाचा ॥ ४२ ॥ ऐसिया यया वाटा । इहींचि पेणीं सुभटा । शांतीचा माजिंवटा । ठाकिला जेणें ॥ ४३ ॥

"**अर्जुना!** अभ्यासाहून ज्ञान हें गहन आहे. आणि ज्ञानाहून ध्यानाची योग्यता मोठी आहे. १४१ आणखी कर्मफलाची इच्छा सोडणें हें ध्यानाहूनही श्रेष्ठ आहे. आणि त्याहूनही शांतिसुखाचा अनुभव श्रेष्ठ आहे. १४२ हे वीरश्रेष्ठा! ज्याला शांतीचा पल्ला गांठणें असेल त्यानें ह्या अशाच वाटांनीं, असेच मुक्काम करीत करीत गेलें पाहिजे." १४३

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥१३॥

[ अद्वेष्टा सर्वभूतानां ] तो सर्वं भूतांच्या ठायीं । द्वेषातें नेणेंचि कहीं । आपपर नाहीं । चैतन्या जैसा ॥ ४४ ॥ उत्तमातें धरिजे । अधमातें अव्हेरिजे । हें कांहींचि नेणिजे । वसुधा जेवीं ॥ ४५ ॥ [ मैत्रः ] कां रायाचें देह चाळूं । रंका परौतें गाळूं । हें न ह्मणेचि कृपाळु । प्राण पैं गा ॥ ४६ ॥

१ ह्याच. २ मुक्कामानें. ३ मध्यें. ४ घेतला.

[करुण एव च] गाईची तृषा हरूं। व्याघ्रा विष होऊनि मारूं। ऐसें नेणेचि कां करूं। तोय जैसें ॥ ४७ ॥ तैसी आघवियांचि भूतमात्रीं। एकपणें जया मैत्री। कृपेसि धात्री[1]। आपण जो ॥ ४८ ॥ [निर्मम इति] आणि मी हे भाषं[2] नेणे। माझें कांहींचि न ह्मणे। सुख दुःख जाणणें। नाहीं जया ॥ ४९ ॥ तेवींचि क्षमेलागीं। पृथ्वीसि पवाड आंगीं। संतोषा उत्संगीं[3]। दिधलें घर ॥ १५० ॥

**"त्याला सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं द्वेष ह्मणून कसला तो माहितच नसतो. चैतन्याप्रमाणें त्याला आप व पर हीं दोन्हींही नाहींत. १४४ उत्तमांना मात्र धारण करावें; आणि अधमांना टाकून द्यावें; हें जसें पृथ्वीला कांहींच समजत नाहीं, १४५ किंवा राजाच्या देहाला मात्र चालवावें, आणि रंकादिकांना वर्ज्य करावेत, असें कृपाळू प्राण ज्याप्रमाणें कधीं ह्मणत नाहीं, १४६ किंवा गायीची तहान भागवावी; आणि वाघाला विष होऊन मारून टाकावें, असें करण्याचें ज्याप्रमाणें उदकाला कधीं माहित नाहीं, १४७ त्याप्रमाणें सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं ज्याची एकसारखी मैत्री असते; स्वतः कृपेची जणूं काय पृथ्वी-आधारच; १४८ आणि 'मी' हा शब्दच ज्याला माहित नाहीं; सुख आणि दुःख ज्याला ठाउकच नाहीं; १४९ त्याचप्रमाणें क्षमेविषयीं तर आंगामध्यें पृथ्वीची योग्यता; संतोषाला तर मांडीवरच घर करून दिलेलें;" १५०**

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः॥ १४ ॥

[संतुष्ट सततं] वार्षियेवीण सागर। जैसा जळें निर्भर[4]। तैसा निरुपचार। संतोषी जो ॥ ५१ ॥ [यतात्मा दृढनिश्चयः] वाहूनि आपली आण। धरी जो अंतःकरण। निश्चया साचपण। जयाचेनी ॥ ५२ ॥ [योगी] जीव परमात्मा दोनी। बैसले एकासनीं। जयाचिया हृदयभुवनीं। विराजती ॥ ५३ ॥ ऐसा योगसमृद्धि। होऊनि जो निरवधि। [मय्यर्पितमनोबुद्धिः] अर्पी मनोबुद्धि। माझ्या ठायीं ॥ ५४ ॥ आंत बाहेरि योग। निर्वाळलेयाही[5] चांग। तरि माझा अनुराग[6]। सप्रेम जया ॥ ५५ ॥ [यो मद्भक्तः स मे प्रियः] अर्जुना तो भक्त। तोचि योगी तोचि मुक्त। तो वल्लभा[7] मी कांत[8]। ऐसा पढिये[1] ॥ ५६ ॥ हें ना तो आवडे। मज जीवाचेनि पाडें[2]। हेंही एथ थोकडें[3]। रूप करणें ॥ ५७ ॥ तरि पढियंतयाची काहाणी। हे भुलीची भारणी[4]। ईयें तंव न बोलणीं। परि बोलवी श्रद्धा ॥ ५८ ॥ ह्मणोनि गा आह्मा। वेगा आली उपमा। येऱ्हवीं काय प्रेमा। अनुवाद असे[5] ॥ ५९ ॥ आतां असो हें किरीटी। पैं प्रियाचिया गोष्टी। दुणा[6] थांव उठी। आवडी गा ॥ १६० ॥ तयाही वरी विपांयें[7]। प्रेमळ संवादिया होये। तिये गोडीसि आहे। कांटाळें मग ॥ ६१ ॥ ह्मणोनि गा पांडुसुता। तूंचि प्रिय आणि तूंचि श्रोता। वरि प्रियाची वार्ता। प्रसंगें आली ॥ ६२ ॥ तरि आतां बोलों। भले या सुखा मीनलों[9]। ऐसें ह्मणतखेंवी[10] डोलों। लागला देवो ॥ ६३ ॥ मग ह्मणे जाण। तया भक्ताचें लक्षण। जया मी अंतःकरण। बैसों घालीं ॥ ६४ ॥

**"वृष्टिशिवायच समुद्र जसा जळानें भरलेला असतो, त्याप्रमाणें कोणत्याही उपचाराशिवायच, जो संतोषित असतो. १५१ आपली शपथ वाहून जो अंतःकरण आवरून धरतो; ज्याच्या योगानें निश्चयाला खरेपणा येतो; १५२ ज्याच्या हृदयमंदिरांत जीव आणि परमात्मा हे दोन्हीही एका सिंहासनावर बसलेले शोभतात; १५३ अशा प्रकारें योगयुक्त होऊन जो निस्सीमपणें माझ्या ठिकाणीं मन आणि बुद्धि अर्पण करतो; १५४ योगसिद्धीनें अंतर्बाह्य पवित्र झाल्यावरही ज्याला माझें भक्तिपुरस्कर प्रेम; १५५ अर्जुना! तोच भक्त, तोच योगी, आणि तोच मुक्त. तो स्त्री आणि मी पति. इतकी एकमेकाची एकमेकाला आवड असते. १५६ इतकेंच नव्हे, तर तो मला प्राणासारखा प्रिय आहे. पण ही उपमा सुद्धां येथें कमीच. १५७ कारण, आवड ही केवळ भ्रमाची भूल आहे. हीं भाषणें सुद्धां बोलावयाचीं नव्हेत, परंतु श्रद्धा बोलविते. १५८ ह्मणून आमच्या तोंडाला उपमा आली. बाकी, त्या प्रेमाला का सीमा आहे होय? १५९ अर्जुना! आतां हें असो. प्रियाची गोष्ट सांगतांना आवडीमुळें दुप्पट रंग चढतो. १६० आणि त्यांतूनही कदाचित् प्रेमळाच्या ठिकाणींच जर तें सांगाव-**

१ पृथ्वी. २ शब्द. ३ मांडीवर. ४ पूर्ण भरलेला. ५ निर्मळपणें सिद्ध झाल्यावरही. ६ प्रीति. ७ स्त्री. ८ पती.

१ आवडता. २ सारखा. ३ उणें, कमीच. ४ भुरळ. ५ हें बोलून दाखवूं नये. ६ दुप्पट रंग चढतो. ७ कदाचित्. ८ उपमा. ९ प्राप्त झालों. १० ह्मणतां क्षणीं.

याचा प्रसंग आला, तर मग त्याला कांहीं उपमा आहे काय? १६१ ह्मणून **अर्जुना!** तूं प्रियही आहेस, आणि श्रोताही आहेस. आणि त्यांतच प्रियाचीच गोष्ट सांगण्याचा प्रसंग प्राप्त झालेला आहे. १६२ तर आतां सांगूं या. ही तर फारच संतोषाची गोष्ट झाली." असें ह्मणून देव डोलूं लागले. १६३ मग ह्मणतात "ज्याला मी अंतःकरणरूपी आसन घालून ठेवतों, त्या भक्ताचें लक्षण असें आहे. ऐक." १६४

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥१५॥

[यस्मादिति] तरि सिंधूचेनि माजें । जळचरां भय नुपजे । आणि जळचरीं नुभजे । समुद्र जैसा ॥ ६५ ॥ तेविं उन्मत्तें जगें । जयासि खंती न लगे । आणि जयाचेनि आंगें । न शिणे लोक ॥ ६६ ॥ [हर्षामर्षेति] किंबहुना पांडवा । शरीर जैसें अवयवां । तैसा नुबगे जीवां । जीवंपणें जो ॥ ६७ ॥ जगचि देह जाहालें । ह्मणोनि प्रियाप्रिय गेलें । हर्षामर्ष ठेले । दुजेनविण ॥ ६८ ॥ ऐसा द्वंद्वनिर्मुक्तें । भयोद्वेगरहित । याहि वरि भक्त । माझ्या ठायीं ॥ ६९ ॥ तरि तयाचा गा मज मोहो । काय सांगों तो पढियावो । हें असो जिवीं जीवो । माझेनि तो ॥ १७० ॥ जो निजानंदें धाला । परिणाम आयुष्या आला । पूर्णते जाहाला । वल्लभ जो ॥ ७१ ॥

"तर समुद्राच्या खळाळानें जलचरांना भय उत्पन्न होत नाहीं, आणि जलचरें जशीं समुद्राला सोडीत नाहींत, १६५ त्याप्रमाणें जगाच्या उन्मत्तपणानें ज्याला खेद होत नाहीं. आणि ज्याच्या योगानें लोकांनाही त्रास होत नाहीं. १६६ किंवा **अर्जुना!** शरीर ज्याप्रमाणें अवयवांना टाकीत नाहीं, त्याप्रमाणें जो आपण जीव असें समजून जिवाचा कंटाळा करीत नाहीं. १६७ जग हाच त्याचा देह झालेला असतो. ह्मणून प्रिय आणि अप्रिय हें त्याचें नाहींसेंच होऊन गेलेलें असतें. १६८ असा द्वंद्वातीत, भय आणि उद्वेगरहित, असा असून आणखी माझ्या ठायीं भक्ति ठेवणारा असला, १६९ तर त्याचें मला प्रेम असतें. तो प्रेमा काय सांगावा? तें असो. तो माझ्या प्राणांतला प्राण आहे. १७० जो निजानंदानें तृप्त झालेला, निराकारच अवतार घेऊन आलेला, आणि पूर्णतेचा जो पतीच." १७१

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः ॥१६॥

[अनपेक्षः] तयाचिया ठायीं पांडवा । अपेक्षे नाहीं रिगावा । सुखासि चढावा । जयाचें असणें ॥ ७२ ॥ [शुचिः] मोक्ष देऊनि उदार । काशी होय कीर । परि वेंचणें लागे शरीर । तिये गांवीं ॥ ७३ ॥ हिमवंत दोष खाये । परि जीविताची हानी होये । तैसें शुचित्व नोहे । सज्जनाचें ॥ ७४ ॥ शुचित्वें शुचि गंगा होये । आणि पाप तापही जाये । परि तेथें आहे । बुडणें एक ॥ ७५ ॥ खोलिये पार नेणिजे । तरी भक्तीं न बुडिजे । रोकडाचि लाहिजे । न मरतां मोक्ष ॥ ७६ ॥ संतांचेनि अंगलगें । पापातें जिणणें गंगे । तेणें संतसंगें । शुचित्व कैसें ॥ ७७ ॥ ह्मणोनि असो जो ऐसा । शुचित्वें तीर्थां कुंवासा । जेणें उळंघविले दिशा । मनोमळ ॥ ७८ ॥ [दक्षः] आंत बाहेरि चोखाळ । सूर्य तैसा निर्मळ । आणि तत्वार्थांचा पायाळ । देखणा जो ॥ ७९ ॥ [उदासीनः] व्यापक आणि उदास । जैसें कां आकाश । तैसें जयाचें मानस । सर्वत्र गा ॥ १८० ॥ [गतव्यथः] संसारव्यथे फिटला । जो नैराश्यें निवटला । व्याधा हातोनि सुटला । विहंगमु जैसा ॥ ८१ ॥ तैसा सतत जो सुखें । कोणीही टवंचें न देखे । नेणिजे गतायुषें । लज्जा जेवीं ॥ ८२ ॥ [सर्वारंभपरित्यागी] आणि कर्मारंभालागीं । जया अहंकृती नाहीं आंगीं । जैसें निरिंधनें आगी । विझोनियां जाय ॥ ८३ ॥ तैसा उपशमचि भोंगा । जयासि आला पैंगा । जो मोक्षाचिया आंगा । लिहिला असे ॥ ८४ ॥ [यो मद्भक्तः] अर्जुना हा ठाववरी । जो सोहंभाव सरोभरी । तो द्वैताच्या पैलतीरीं । निगों सरला ॥ ८५ ॥ कीं भक्तिसुखालागीं । आपणपेंचि दोहीं भागीं । वाटूनियां आंगीं । सेवकै वाणे ॥ ८६ ॥ येरां नाम मी ठेवी । मग भजती वोजें बरवी । न भजतया दावी । योगिया जो ॥ ८७ ॥ [स मे प्रियः] तयाचें आह्मां व्यसन । आमुचें तो निजध्यान । किंबहुना समाधान । तो मिळे तैं ॥ ८८ ॥ त-

१ क्षोभानें. २ कंटाळत नाहीं. ३ खेद. ४ योगानें. ५ त्रासत नाहीं. ६ न कंटाळे. ७ आपण जीव आहें असें मानून. ८ आनंद क्रोध. ९ द्वंद्वातीत. १० आवडता. ११ तृप्त झाला.

१ इच्छेला. २ हिमालय. ३ समागमानें. ४ काय सांगूं? ५ आश्रय. ६ शुद्ध. ७ तत्त्वरूप, द्रव्याचा. ८ पायाळू. ९ निरिच्छ होऊन शोभला. १० पक्षी. ११ त्रास, टोंचणी. १२ मरणोन्मुखानें. १३ काष्टांविरहित. १४ शांतीच. १५ वाटा. १६ आदर करी. १७ निघून गेला. १८ देव आणि भक्त ह्या दोन्ही भागांत. १९ आपल्याकडे. २० सेवाधर्म प्रगट करतो. २१ दुसऱ्या वांट्याला. २२ रीत.

यालागीं मजरूपा येणें । तयाचेनि मज एथें असणें । तया लोण कीजे जीवें प्राणें । ऐसा पढिये ॥ ८९ ॥

"अर्जुना! त्याच्या ठिकाणीं इच्छेचा मुळीं शिरकावच होत नाहीं; ज्याच्या अस्तित्वानें सुखाची वृद्धि होत असते; १७२ मोक्ष देत असल्यामुळें काशी ही उदार आहे ही गोष्ट खरी; पण त्या गांवांत शरीर टाकावें लागतें. १७३ हिमालय पर्वतही दोष नाहींसे करतो; पण तेथेंही जीवित्वाची हानि होते. सज्जनांची पवित्रता तशी नाहीं. १७४ गंगेच्या योगानें पवित्रता येते, आणि पापतापही जातात, तेव्हां तीही पवित्रच आहे. पण तिच्यामध्यें बुडावें लागतें. १७५ भक्तीचा अंतपार नाहीं, पण तींत कोणी बुडत नाहीं. तर न मरतां—जिवंतपणींच—साक्षात्—मोक्ष प्राप्त होतो. १७६ संतांच्या समागमानें गंगेलाही पाप घालवावें लागतें. त्या संतसंगाची पवित्रता किती ह्मणून सांगावी? १७७ ह्मणून तें असो. असा जो पवित्रपणानें तीर्थांनाही आश्रय, ज्यानें मनोमल देशोधडीस लागतात, १७८ अंतर्बाह्य जो सूर्यासारखा निर्मळ आणि तत्त्वरूप द्रव्याला पहाणारा पायाळू, १७९ आकाश ज्याप्रमाणें व्यापक असून उदास असतें, त्याप्रमाणें सर्व ठिकाणीं ज्याचें मन असतें; १८० संसारदुःखांतून सुटलेला, निरिच्छतेनें शोभलेला, व्याधाच्या हातांतून सुटलेला जसा पक्षी असावा, १८१ त्याप्रमाणें जो निरंतर सुखांत असतो. मरणोन्मुखाला जशी लाज असत नाहीं, त्याप्रमाणें त्याला दुःख असें कसलें ही दृष्टीसच पडत नाहीं. १८२ आणि कर्मांचा प्रारंभ करण्यासाठीं ज्याच्या आंगीं अभिमान नाहीं. काष्ठाशिवाय अग्नि जसा विझून जातो, १८३ त्याप्रमाणें ज्याच्या वांट्याला शांतीच आलेली असते. आणि जो मोक्षाच्या आंगाला लिह्लिलेला असतो. १८४ अर्जुना! अशा तऱ्हेनें जो मीच ब्रह्म अशी भावना करून द्वैताच्या पैलथडीला निघून जातो, १८५ किंवा भक्तीच्या सुखासाठीं आपणच देव आणि भक्त ह्या दोन्ही भागांच्या वांटण्या करून आपल्याकडे सेवकपणा घेतो, १८६ आणि दुसऱ्या वांटणीला माझें नांव देऊन न भजणाऱ्यांना सुद्धां जो योगी भजन करण्याची उत्तम रीती दाखवून देतो, १८७ त्याची आह्मांला प्रीति; तो आमचें निजस्वरूप; एवढेंच नव्हे तर, तो मिळेल तेव्हांच आह्मांला समाधान. १८८ त्याच्यासाठींच मला सगुणरूप घ्यावें लागतें; त्याच्या साठींच मला येथें-मृत्युलोकावर-रहावें लागतें; त्याच्या वरून जीवप्राण ओवाळून टाकतों; इतका तो माझा आवडता आहे." १८९

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥१७॥

[यो न हृष्यति] जो आत्मलाभासारिखें । गोमटें कांहींचि न देखे । ह्मणोनि भोगविशेखें । हरिखेना जो ॥ १९० ॥ [न द्वेष्टि] आपणचि विश्व जाहाला । तरि भेदभाव सहजचि गेला । ह्मणोनि द्वेष ठेला । जया पुरुषा ॥ ९१ ॥ [न शोचति] पैं आपुलें जें साचें । तें कल्पांतींही न वचे । हें जाणोनि गताचें । न शोची जो ॥ ९२ ॥ [न कांक्षति] आणि जयापरौतें कांहीं नाहीं । तें आपणपेंचि आपुल्या ठायीं । जाहाला यालागीं जो कांहीं । आकांक्षी ना ॥ ९३ ॥ [शुभाशुभपरीत्यागी] वोखटें कां गोमटें । हें कांहींचि तया नुमटे । रात्रिदिवस न घटे । सूर्यासि जेवीं ॥ ९४ ॥ [भक्तिमान्] ऐसा बोधचि केवळ । जो होऊनि असे निष्केळ । त्याही वरी भजनशीळ । माझ्या ठायीं ॥ ९५ ॥ [यः स मे प्रियः] तरि तया ऐसें दुसरें । आह्मा पढियंतें सोयरें । नाहीं गा साचोकारें । तुझी आण ॥ ९६ ॥

"ज्याला आत्मलाभासारखें चांगलें असें दुसरें कांहीं दिसतच नाहीं. ह्मणून उत्तमोत्तम भोगांनीं सुद्धां ज्याला आनंद होत नाहीं. १९० आपणच विश्व झालेला असल्यामुळें, त्याचा भेदभाव सहजच नाहींसा होऊन गेलेला असतो. ह्मणून त्या पुरुषाचा द्वेषही नाहींसाच होतो. १९१ तसेंच आपलें जें खरें आहे तें, कल्पांतींही जावयाचें नाहीं, हें मनांत आणून गेलेल्याचा जो शोक करीत नाहीं. १९२ आणखी

१ उरलंडी. २ आवडता.

१ नाहींसा झाला. २ उमटत नाहीं. ३ निर्मळ. ४ खरें.

ज्याहून पलीकडे कांहीं नाहीं, असें जें परब्रह्म तें आपणच आपल्या ठिकाणीं होऊन वसलेला असतो. ह्मणून तो कशाचीच इच्छा करीत नाहीं. १९३ सूर्याला जशीं रात्र आणि दिवस हीं नाहींत, त्याप्रमाणें ज्याला चांगलें किंवा वाईट हीं समजत नाहींत. १९४ असा जो अखंड बोधाचीच मूर्ती होऊन राहील, आणि इतकें असून माझ्या ठिकाणीं भजनशील असला, १९५ तर तुझीच शपत, त्याच्यासारखा आवडता आप्त आह्मांला दुसरा कोणी नाहीं." १९६.

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥१८॥

[ समः शत्रौ च मित्रे च ] पार्था जयाचिया ठायीं । वैषम्याची वार्ता नाहीं । रिपुमित्रां दोहीं । सरिसा पाडु ॥ ९७ ॥ कां घरिचियां उजियेड करावा । पारखियां[1] आंधार पाडावा । हें नेणेचि गा पांडवा । दीप जैसा ॥ ९८ ॥ जो खांडावया घाव घाली । कां लावणी जयानें केली । दोघां एकचि साउली । वृक्ष दे जैसा ॥ ९९ ॥ ना तरि इक्षुदंडु । पाळितया गोडु । गाळितया कडु । नोहेचि जेवीं ॥ २०० ॥ अरिमित्रीं तैसा । अर्जुना जया भाव[2] ऐसा । [ तथा मानापमानयोः ] मानापमानीं सरिसा । होत जाय ॥ १ ॥ [ शीतोष्णसुखदुःखेषु समः ] तिहीं ऋतूं समान । जैसें कां गगन । तैसा एकचि मान । शीतोष्णीं जया ॥ २ ॥ दक्षिण उत्तर मारुता । मेरु जैसा पांडुसुता । तैसा सुखदुःखप्राप्तां । मध्यस्थ जो ॥ ३ ॥ माधुर्यें चंद्रिका । सरिसी राया रंका । तैसा जो सकळिकां । भूतां सम ॥ ४ ॥ आघविया जगा एक । सेव्य जैसें उदक । तैसे जयातें तीन्ही लोक । कांक्षिती गा ॥ ५ ॥ [ संगविवर्जितः ] जो सबाह्यसंग । सांडोनियां लोग । एकाकी असे आंग । आंगीं सूनी[3] ॥ ६ ॥

"अर्जुना! ज्याच्या ठिकाणीं वैषम्याची वार्ता सुद्धां नाहीं. शत्रु आणि मित्र ह्या दोहोंची योग्यता सारखीच. १९७ किंवा अर्जुना! घरच्या मनुष्यांना उजेड करावा, आणि परका कोणी आला तर आंधार पाडावा हें जसें दिव्याला माहित नाहीं; १९८ किंवा जो तोडावयास घाव घालतो, अथवा ज्यानें लावणी केलेली असते, त्या दोघांनाही वृक्ष ज्याप्रमाणें सारखीच सावली करतो, १९९ किंवा ऊंस ह्या पालन करतो त्याला मात्र गोड, व गाळतो त्याला कडू जसा कधींच होत नाहीं, २०० त्याप्रमाणें अर्जुना! शत्रूच्या ठिकाणीं आणि मित्राच्या ठिकाणीं सारखा भाव. मान झाला किंवा अपमान झाला, तरीही जो सारखाच. २०१ तीन्ही ऋतूंत आकाश जसें सारखें असतें, त्याप्रमाणें शीत होवो कीं उष्ण होवो त्याला दोन्हींही सारखींच. २०२ अर्जुना! दक्षिणेकडच्या वाऱ्याला आणि उत्तरेकडच्या वाऱ्याला मेरु जसा मध्यस्थ असतो, त्याप्रमाणें सुख किंवा दुःख प्राप्त झालें तरी जो मध्यस्थ. २०३ चांदणें जसें राजाला आणि रंकाला सारखेंच शीतल, त्याप्रमाणें जो सर्व प्राणिमात्रांशीं सम. २०४ साऱ्या जगाला उदक जसें एकसारखें प्रिय, त्याप्रमाणें तिन्ही लोक ज्याची अपेक्षा करतात. २०५ अंतर्बाह्य संग सोडून देऊन, सारा संबंध तोडून टाकून शरीरांतच जो शरीराचा लय करून राहतो," २०६

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ।
अनिकेतस्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥१९॥

[ तुल्यनिंदास्तुतिः ] जो निंदेतें नेघे । स्तुती न श्लाघे[1] । आकाशा न लगे । लेप जैसा ॥ ७ ॥ तैसें निंदे आणि स्तुती । मान करूनि एके पंक्ती । विचरे प्राण वृत्ती । जनीं वनीं ॥ ८ ॥ [ मौनी ] साच लटिकें दोन्हीं । न बोले जाहला मौनी । जो भोगितां उन्मनी[2] । आरायेना[3] ॥ ९ ॥ [ संतुष्टो येनकेनचित् ] जो यथालाभें संतोखे । अलाभें न पारुखे[4] । पाउसेंवीण न सुके । समुद्र जैसा ॥ २१० ॥ [ अनिकेतः ] आणि वायूसि एके ठायीं । बिढार जैसें नाहीं । तैसा न धरीच कहीं । आश्रय जो ॥ ११ ॥ [ स्थिरमतिः ] आघवाचि आकाशस्थिति । जेवीं वायूसि नित्य वस्ती । तेवीं जगचि विश्रांति । स्थान जया ॥ १२ ॥ हें विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहाला ॥ १३ ॥ [ भक्तिमान्मे प्रियो नरः ] मग यावरीही पार्था । माझ्या भजनीं आस्था । तरि तयातें मी माथां । मुकुट करीं ॥ १४ ॥ उत्तमासि मस्तक । खालविजे हें काय कौतुक । परि मान करिती तीन्ही लोक । पायवणियां[5] ॥ १५ ॥ तरि

१ परक्याला. २ संबंध. ३ घालून.

१ महत्त्व मानीत नाहीं. २ उन्मनी अवस्थेंत. ३ विराम पावत नाहीं. ४ रुष्ट होत नाहीं. ५ पायाच्या तीर्थाला.

श्रद्धावस्तूशीं आदरु । करिता जाणिजे प्रकारु । जरी होय श्रीगुरु । सदाशिव ॥ १६ ॥ परि हें असो आतां । महेशातें वानितां । आत्मस्तुती होतां । संचार असे ॥ १७ ॥ ययालागीं हें नोहे । ह्मणितलें रमानाथें[१] । अर्जुना मी वाहें । शिरीं तयातें ॥ १८ ॥ जे पुरुषार्थसिद्धी चौथी । घेऊनि आपुलिया हातीं । रिगाला भक्तिपंथीं । जगा देत ॥ १९ ॥ कैवल्याचा[२] अधिकारी । मोक्षाची सोडी[३] बांधी करी । कीं जळाचिये परी । तळवट[४] घे ॥ २२० ॥ ह्मणोनि गा नमस्कारूं । तयातें आह्मी माथां मुकुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आह्मी ॥ २१ ॥ तथाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणीं । तयाची कीर्ती श्रवणीं । आह्मी लेऊं ॥ २२ ॥ तो पाहावा हे डोहळे । ह्मणोनि अचक्षुसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥ २३ ॥ दोंवरी दोनी । भुजा आलों घेऊनी । आलिंगावयालागुनी । तयाचें आंग ॥ २४ ॥ तयासंगाचेनि सुरवाडें[५] । मज विदेहा देह धरणें घडे । किंबहुना आवडे । निरुपम ॥ २५ ॥ तेणेंसीं आह्मा मैत्र । एथ कायसें विचित्र । परि तयाचें चरित्र । ऐकती जे ॥ २६ ॥ तेही प्राणापरौते । आवडती हें निरुतें[६] । जे भक्तचरित्रातें । प्रशंसिती ॥ २७ ॥ जो हा अर्जुना साद्यंत । सांगीतला प्रस्तुत । भक्तियोग समस्त । योगरूप ॥ २८ ॥ जे मी प्रीति करीं । कां मनीं शिरसा धरीं । येवढी थोरी । जया स्थिंतिये[७] ॥ २९ ॥

"जो निंदा मनास आणीत नाहीं; स्तुतीचें महत्त्व मानीत नाहीं; आकाशाला जसा लेप लागत नाहीं, २०७ त्याप्रमाणें निंदेला किंवा स्तुतीला एकाच पंक्तीला मान देऊन जो जनांत किंवा वनांत कोठेंही राहतो. २०८ हें खरें किंवा हें खोटें हीं दोन्हींही सांगत नाहीं. मौन धरून बसतो. मन लयास जातें, अशा स्थितीचा उपभोग घेतांना जो विसंबत नाहीं. २०९ पावसावांचून समुद्र जसा सुकत नाहीं, त्याप्रमाणें मिळेल त्यांत जो संतोष मानतो. न मिळालें ह्मणून रुष्ट होत नाहीं. २१० आणखी वायूला जसें एके ठिकाणीं विन्हाड नसतें, त्याप्रमाणें जो कधीं आश्रय ह्मणून धरीतच नाहीं. २११ वायूचें नेहेमींचें वसतिस्थान जसें सर्व आकाशभर त्याप्रमाणें ज्याला जग हेंच विश्रांतीचें स्थान होऊन राहतें. २१२ विश्व हेंच माझें घर अशी ज्याची बुद्धि स्थिर झालेली, किंवा सारें चराचरच आपण बनलेला, २१३ इतकें असून आणखी अर्जुना! माझ्या भजनावर प्रेम असेल, तर त्याला मी मस्तकावरचा मुगुट करतों. २१४ अशा थोर पुरुषाला मस्तक वाकविण्यांत विशेष तें काय? पण त्रैलोक्य त्याच्या चरणाचें तीर्थ वंद्य करतें. २१५ अशी श्रद्धा प्राप्त करून घेण्याचा प्रकार कसा, हें समजून घेणें असेल तर, श्रीसदाशिवास गुरु करून घेतलें पाहिजे. २१६ पण तें आतां असो. शंकराची स्तुति करतां करतां आत्मस्तुतीच होऊं लागेल." २१७ ह्याकरितां लक्ष्मीपती ह्मणाले कीं "तें नको. अर्जुना! त्याला मी मस्तकीं धारण करतों. २१८ कारण चवथा पुरुषार्थ जो मोक्ष तो आपल्या हातांत घेऊन भक्तिपंथांत शिरतो, आणि लोकांनाही तो लावून देतो. २१९ मोक्षाचा अधिकारी तोच; मोक्षाला सोडणें किंवा बांधणें तो पाहिजे तें करूं शकतो. किंवा जळाप्रमाणें[१] तो नम्रपणा स्वीकारतो, २२० ह्मणून त्याला आह्मी नमस्कार करतों; त्याला मस्तकावरचा मुगुट करतों; त्याचे चरण आह्मी आपल्या उराशीं घेतों; २२१ त्याच्या गुणांचे अलंकार आह्मी आपल्या आंगावर घालतों; त्याची कीर्ति आह्मी आपल्या कानांवर घेतों; २२२ तो पहाण्याची मला इच्छा होते, ह्मणूनच मला अचक्षुला हे डोळे आहेत. हातांतील लीलाकमलानें आह्मी त्याची पूजा करतों. २२३ त्याच्या शरीरास आलिंगन देण्यासाठीं, दोन हातांवर हे आणखी दोन हात घेऊन आलों

१ रमानाथानें. २ मोक्ष. ३ सोडतो. ४ नम्रता धरतो. ५ अनुकूलतेनें. ६ खरोखर. ७ ज्या स्थितीस.

१ जळ नेहेमीं उतरतीकडे जातें, चढणीकडे जात नाहीं, ही गोष्ट सर्वत्र प्रसिद्धच आहे.

आहे. २२४ त्याचा समागम घडावा, येवढ्यासाठींच मला निराकाराला आकार घेणें भाग पडतें. इतकेंच नव्हे, तर तो मला असा आवडतो कीं, त्याला कांहीं उपमाच नाहीं. २२५ त्याच्या बरोबर आमची मैत्री असेल, ह्यांत आश्चर्य तें काय? पण त्याचें चरित्र जे ऐकतील, २२६ जे माझ्या भक्ताच्या चारित्राची प्रशंसा करतील, ते सुद्धां खरोखर आह्मांला प्राणापेक्षां अधिक आवडतात. २२७ **अर्जुना!** हा जो सांप्रत तुला साद्यंत भक्तियोग सांगितला, ह्यांत सर्व योगांचा समावेश होतो. २२८ कारण, तो साध्य करणाऱ्यावर मी प्रीति करतों, त्याला मस्तकावर धारण करतों; येवढी थोरवी ज्याच्या योगानें प्राप्त होते,"२२९

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥२०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

[ये तु धर्म्यामृतमिदं] ते हे गोष्टी रम्य । अमृतधारा धर्म्य । करिती प्रतीतिगम्य । आइकोनि जे ॥ २३० ॥ [श्रद्दधानाः] तैसीचि श्रद्धेचेनि आदरें । जयाचेठायीं विस्तरे । जीवीं जयां थारे । जे अनुष्ठिती ॥ ३१ ॥ [यथोक्तं पर्युपासते] परि निरूपिली जैसी । तैसीच स्थिती मानसीं । मग सुक्षेत्रीं जैसी । पेरणी जाहाली ॥ ३२ ॥ [मत्परमाः] परि मातें परम करूनि । इये अर्थी प्रेम धरूनि । हें सर्वस्व मानूनि । घेती जे पैं ॥ ३३ ॥ [भक्तास्ते] पार्था गा जगीं । तेचि भक्त तेचि योगी । उत्कंठा तयांलागीं । अखंड मज ॥ ३४ ॥ ते तीर्थ ते क्षेत्र । जगीं तेचि पवित्र । भक्तिकथेसि मैत्र । जयां पुरुषां ॥ ३५ ॥ [अतीव मे प्रियाः] आह्मी जयांचें करूं ध्यान । ते आमुचें देवतार्चन । तेवांचूनि आन । गोमटें न मनूं ॥ ३६ ॥ तयांचें आह्मा व्यसन । ते आमुचे निधिनिधान । किंबहुना समाधान । ते मिळती तैं ॥ ३७ ॥ पैं प्रेमळाची वार्ता । जे अनुवादती पांडुसुता । ते मानूं परमदेवता । आपुली आह्मी ॥ ३८ ॥ ऐसें निजजनांनंदें । तेणें जगदादिकंदें । बोलिलें मुकुंदें । संजयो ह्मणे ॥ ३९ ॥ राया जो निर्मळु । निष्कलंक लोककृपाळु । शरणागतां स्नेहाळु । शरण्य जो ॥ २४० ॥ पैं सुरसहायशीळ । लोकलालनलीळ । प्रणतप्रतिपाळ । खेळ जयाचा ॥ ४१ ॥ जो धर्मकीर्ति धवळ । अगाधदातृत्वें सरळ । अतुळवळें प्रबळ । बळिबंधन ॥ ४२ ॥ जो भक्तजनवत्सल । प्रेमळजनप्रांजल । सत्यसेतु सकळ । कलानिधि ॥ ४३ ॥ तो श्रीकृष्ण वैकुंठींचा । चक्रवर्ती निजांचा । सांगे येरु दैवांचा । आइकत असे ॥ ४४ ॥ आतां ययावरी । निरूपिती परी । संजय ह्मणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ॥ ४५ ॥ तेचि रसाळ कथा । मऱ्हाटिया प्रतिपंथा । आणिजेल आतां । अवधारिजो ॥ ४६ ॥ ज्ञानदेव ह्मणे तुह्मी । संत वोळगावेति आह्मी । हें पढविलें स्वामी । निवृत्तिदेवें ॥ २४७ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ श्लोक २०, ओंव्या २४७.

"ती ही रम्य, अमृताच्या धारेसारखी, धर्मास[1] अनुकूल अशी गोष्ट जे ऐकून घेऊन अनुभवास[2] योग्य करतील, २३० आणि तशीच श्रद्धेच्या योगानें ज्याच्या ठिकाणीं ती विस्तार पावेल, ज्याच्या ठिकाणीं दृढतर विंवून राहील, जे तीस अनुसरतील, २३१ त्यांच्या मनाची स्थिति वर सांगितल्याप्रमाणें बरोबर होत असल्यामुळें उत्तम शेतांत[3] पेरणी झाल्याप्रमाणें होते. २३२ पण मलाच जीवप्राण मानून तशाच प्रकारचें मजवर प्रेम धरून सर्वस्व कायतें मीच असें जे मानतात, २३३ **अर्जुना!** असे जे कोणी जगामध्यें असतील तेच माझे भक्त, तेच योगी; त्यांनाच माझी निरंतर उत्कंठा लागून राहिलेली असते. २३४ जगामध्यें तीर्थ तेंच; क्षेत्र तेंच; पवित्र तेंच; ज्या पुरुषाला भक्तिकथेची मैत्री जडली, २३५ त्याचेंच आह्मी ध्यान करतों; आमची देवता तीच; आह्मी पूजा करतों त्याचीच. त्याच्याशिवाय दुसरें चांगलें असें आह्मी कांहींच मानीत नाहीं. २३६ त्यांचाच आह्मांला निजध्यास; आमचें द्रव्यभांडार तेंच; येवढेंच नव्हे, तर असे

१ धर्मास अनुकूल. २ अनुभवास येण्याजोगें. ३ चांगल्या शेतांत.

१ शरण जाण्यास योग्य. २ दुसऱ्या मार्गाला. ३ शरण जावें.

जेव्हां मिळतील, तेव्हांच आह्मांला समाधान. २३७ तसेंच **अर्जुना!** त्या प्रेमळ भक्तांची कथा जे वर्णन करतील त्यांना सुद्धां आह्मी आपली पूज्य देवता समजूं." २३८

**संजय** ह्मणतात "ह्याप्रमाणें आपल्या भक्तांस आनंद देणारे, जगताचें मूळबीज, असे जे **मुकुंद** त्यांनीं सांगितलें. २३९ **राजा!** जो निर्मळ; निष्कलंक; लोकांवर कृपा करणारा; शरणागतांवर ममता धरणारा; शरण जाण्यास योग्य; २४० तसेंच देवांस साह्य करणारा; लोकांचें लीलेनें पालन करणारा; शरणागताचें रक्षण करणें हा तर ज्याचा खेळ. २४१ जो धर्मानें आणि कीर्तीनें शुभ्र; अगाध दातृत्वानें जो सरळ; अतुल सामर्थ्यानें जो बलवंत; बलवंतांनाही बांधून टाकणारा; २४२ जो भक्तजनांवर कृपा करणारा; प्रेमळ जनांना वश होणारा; सत्याचा जो सेतु; आणि सर्व कलांचा जो समुद्र; २४३ तो **वैकुंठाचा** आणि भक्तजनांचा चक्रवर्ती **श्रीकृष्ण** सांगत आहे, आणि भाग्यशाली **अर्जुन** ऐकतो आहे." २४४ संजय धृतराष्ट्राला ह्मणतात "आतां यापुढील निरूपणाची शैली ऐकावी." २४५ तीच रसभरित कथा, आतां ह्यापुढें मऱ्हाटीच्या मार्गानें आणीन. तर महाराज! ऐकावी. २४६ **ज्ञानदेव** ह्मणतात "तुह्मां संतांना आह्मीं शरण जावें हें **स्वामी निवृत्तिदेवांनीं** मला शिकविलें आहे." २४७

**बारावा अध्याय समाप्त.**

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय १३ वा.

जयांचें केलिया स्मरण । होय सकळ विद्यांचें अधिकरण । तेचि वंदूं चरण । श्रीगुरूचे ॥ १ ॥ जयांचेनि आठवें । शैब्दसृष्टी आंगवे । सारस्वत आघवें । जिव्हेसि ये ॥ २ ॥ वक्तृत्व गोडपणें । अमृतातें पैरुष ह्मणे । रस होती बोलैंगणे । अक्षरांसी ॥ ३ ॥ भावाचें अवतरण । अवतरविती खुण । हाता चढे संपूर्ण । तत्त्वबोध ॥ ४ ॥ श्रीगुरूचे पाय । जैं हृदय गिंवसूनि ठाय । तैं येवढें भाग्य होय । उन्मेषासी ॥ ५ ॥ ते नमस्कारूनि आतां । जो पितामहाचा पिता । लक्ष्मीयेचा भर्ता । ऐसें ह्मणे ॥ ६ ॥

**ज्यांचें स्मरण केल्यानेंच सकल विद्यांना आश्रयस्थान होतें, त्या श्रीगुरूच्या चरणांना वंदन करूं या. १ ज्यांची आठवण केली असतां, कविताशक्ति स्फुरण पावते, आणि जिव्हेला सर्व विद्या प्राप्त होतात. २ भाषा तर, अमृताला शिळें ह्मणविते आणि अक्षरें रसांना आश्रयभूत होतात. ३ अर्थाच्या आगमनानें हृदयास खूण पटते, आणि संपूर्ण तत्त्वबोध हातास चढतो. ४ हृदय जेव्हां सद्गुरूचे पाय धरून राहतें, तेव्हां ज्ञानाला इतकें भाग्य चढतें. ५ ते आतां वंदन करून ग्रंथास सुरवात करतों. ब्रह्मदेवाचा पिता, व लक्ष्मीचा भर्ता जो श्रीकृष्ण—तो येणेंप्रमाणें बोलला. ६**

**श्रीभगवानुवाच—**

इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ।
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञमिति तद्विदः ॥१॥

[श्रीभगवानुवाच–इदमिति] तरि पार्था परिसिजे । देह

१ आश्रयस्थान. २ कविताशक्ति. ३ प्राप्त होते. ४ सर्व विद्या. ५ शिळें. ६ आश्रयभूत. ७ अभिप्रायाचें. ८ आगमन. ९ धरून. १० ज्ञानाला. ११ ब्रह्मदेवाचा.

हें क्षेत्र ह्मणिजे । [एतदिति] हें जाणे तो बोलिजे । क्षेत्रज्ञ एथें ॥ ७ ॥

**"तर अर्जुना, ऐक. देह याला क्षेत्र–शेत–असें ह्मणतात, आणि त्याला जो जाणतो त्याला 'क्षेत्रज्ञ'–जीव–शेतकरी–असें ह्मणतात." ७**

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥

[क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि] तरि क्षेत्रज्ञ जो एथें । तो मीचि जाण निरुतें । [सर्वक्षेत्रेषु भारत] जो सर्वक्षेत्रातें । संगोपोनि असे ॥ ८ ॥ [क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं] क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें । जाणणें जें निरुतें । [यत्तज्ज्ञानं मतं मम] ज्ञान ऐसें तयातें । मानूं आह्मी ॥ ९ ॥

**"आणि त्यामध्यें सर्व क्षेत्राला पोषण करून राहणारा जो क्षेत्रज्ञ तो खरोखर मीच, हें लक्ष्यांत ठेव. ८ क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांना नीट ओळखणें, ह्यालाच ज्ञान असें आह्मी समजतों." ९**

तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत् ।
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥३॥

[तत्क्षेत्रं यच्च] तरि क्षेत्र येणें नांवें । हें शरीर जेणें भावें । ह्मणितलें तें आघवें । सांगों आतां ॥ १० ॥ [यादृक् च] हें क्षेत्र कां ह्मणिजे । [यतश्च यत्] कैसें कें हें उपजे । [यद्विकारि] कवण कवणीं वाढविजे । विकारीं एथ ॥ ११ ॥ औंट हात मोटकें । कीं केवढें पां केतुकें । बेरड कीं पिके । [यत्प्रभावश्च] कोणाचें हें ॥ १२ ॥ [स च यः] इत्यादि सर्व । जे जे याचे भाव । [तत्समासेन मे शृणु] ते बोलिजती सांवेव । अवधान देईं ॥ १३ ॥ पैं याचि स्थळाकारणें ।

१ शेत. २ जीव, शेतकरी. ३ खरोखर. ४ पोसून. ५ अभिप्रायानें. ६ कोठें. ७ साडेतीन. ८ लहान, अल्प. ९ माळ. १० यथासांग.

ति सदां वोवांणे । तर्के येणेंचि ठिकाणें । तोंडाळ केला १४ ॥ चाळितां हेचि बोली । दर्शनें शेवटा आलीं । ते-ंचि नाहीं वुझविलीं । अझुनी द्वंद्वें ॥ १५ ॥ शास्त्रांचियोयरिके । विचंळिजे येणेंचि एकें । याचेनि ऐकवंकें । जगाद ॥ १६ ॥ तोंडेंसी तोंडा न पडे । वोला वोलेंसि न घडे ।या युक्ति वडवडे । त्राय जाहाली ॥ १७ ॥ नेणों कोणाचें स्थळ । परि कैसें अभिलाषाचें वळ । जें घरोघरीं कपाळ।टवीत असे ॥ १८ ॥ नास्तिका द्यावया तोंड । वेदांचेंढें बंड । तें देखोनि पाषांड । आनचि वाजे ॥ १९ ॥णे तुम्ही निर्मूळ । लटिकें वाग्जाळ । ना ह्मणसी तरि पोफंळ ।तलें आहे ॥ २० ॥ पाषांडाचिये कडे । नागवीं लुंचितीडें । नियोजिलीं वितंडें । तळाशि येती ॥ २१ ॥ मृत्युव-ाचेनि माजें । हें जाईल वीर्णं काजें । तें देखोनियां व्याजें।घाले योगी ॥ २२ ॥ मृत्यूसि आधाधिले । तिहीं निरंजनेंविलें । यमनियमाचे केले । मेळावे पुरे ॥ २३ ॥ येणेंचित्राभिमानें । राज्य त्यजिलें ईशानें । गुंतिं जाणोनि श्म-ानें । वास केला ॥ २४ ॥ ऐसिया पैजा महेशा । पांवुरणेंाही दिशा । लांचकेरें ह्मणोनि कोळसा । कोंम केला ॥ २५ ॥ सत्यलोकनाथा । वदनें आलीं बळार्था । तऱ्हीं तो सर्वथा ।ाणेचि ना ॥ २६ ॥

"आतां ज्या उद्देशानें ह्या शरीराला क्षेत्र असें नांव दिलें, तें सारें आतां सांगतों. १० ाला क्षेत्र असें कां ह्मणतात ? हें कसें आणि ोठें उत्पन्न होतें ? कोणकोणत्या विकारानें वाढीस लागतें ? ११ हें येवढेंसें साडेतीन ातच आहे, का केवढें आणि किती मोठें आहे? माळरान आहे, का सुपीक आहे ? हें को-ाचें ? १२ इत्यादि ह्याचे जे जे सारे भाव ाहेत, ते यथासांग सांगतों. लक्ष्य दे. १३ ाच स्थळाकरितां श्रुति सदासर्वकाल वड-ड करते. ह्याच ठिकाणानें न्यायशास्त्राला तों-ाळ करून सोडलें. १४ हेंच सांगतां सांगतां ह्या शास्त्रांचा शेवट लागला. तरी अद्याप त्यांच्यानें द्वंद्वें मोडवलीं नाहींत तीं नाहींतच. १५ ह्याच एकामुळें शास्त्रांचे परस्पर संबंध जोडलेले आहेत. आणि ह्याच एकामुळें जगा-मध्यें वाद चालले आहेत. १६ तरी तोंडास तोंड मिळत नाहीं; शब्दास शब्द पटत नाहीं; वडवड करण्याला हा विषय मात्र खासा झाला आहे. १७ हें ठिकाण कोणाचें कोण जाणे ! पण लोभाचा जोर पहा ! कीं घरो-घरीं जो तो हें माझें ह्मणून कपाळ बडवून घेत आहे. १८ नास्तिकांच्या तोंडास तोंड दे-ण्यासाठीं वेदांचें मोठें बंड उभारलेलें आहे. तें पाहून पाखांड्यांनीं निराळीच वडवड लावली. १९ ते ह्मणतात 'तुह्मांला कांहीं धर ना बंद– तुमची ही वडवड केवळ वायफळ आहे.' २० कित्येकांनीं पाखंडमत स्वीकारलें आहे; कित्येकांनीं दिगंवरदीक्षा धारण केली आहे; कित्येकांनीं मुंडन केलें आहे; २१ मृत्यूच्या तडाक्यासरशीं हें शरीर विनाकारण नाहींसें होईल, ह्मणून–येवढ्याच निमित्तानें–योगी बाहेर पडतात. २२ आणि मृत्यूला भि-ऊन ते एकांतवास पतकरून इंद्रियनिग्रहाची हौस पुरी करून सोडतात. २३ ह्याच क्षेत्राचा अभिमान धरून शंकरांनीं राज्य सोडून दिलें, आणि बंधन प्राप्त होईल ह्मणून स्मशानवास पतकरला. २४ ब्रह्मदेवाला ह्याच वाद क-रण्यासाठीं चार तोंडें आलीं. तरी तें त्याला कळलें नाहींच. " २६

ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ।
ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ४ ॥

[ ऋषिभिर्बहुधा गीतं ] एक ह्मणती हें स्थळ । जीवाचेंचि समूळ । मग प्राण हें कुळ । तयाचें एथ ॥ २७ ॥ जया प्राणाचे घरीं । अंगें राबती भाउ चारी । आणि मना ऐसा आवरी । कुळवाडी कैर ॥ २८ ॥ तयातें इंद्रियबैलांची पेटी । न ह्मणे अवसीं पाहाटीं । विषयक्षेत्रीं आटी । कांढी भली ॥ ॥२९॥ मग विधीची वाफ चुकवी । आणि अन्याय बीज वा-

१ वडवड करते. २ न्यायशास्त्र. ३ षट्दर्शनें. ४ चाल-ात. ५ ऐक्यस्थानापासून, मूळ. ६ आश्रयस्थान. ७ मोठें ारलें. ८ वडवडे. ९ शब्दपांडित्य. १० प्रतिज्ञा, ारी. ११ दिगंबरवादी. १२ क्षौर करतात. १३ वि-ण्वाद. १४ निरर्थक. १५ निमित्तानें. १६ भ्याले. ७ एकांत. १८ समुदाय. १९ शिवानें. २० बंधन, ाधि. २१ लांचखाऊ. २२ मदन. २३ ब्रह्मदेवाला.

१ कर्मवादी. २ अपान, व्यान, उदान, समान. ३ आवरतो. ४ कर, हात मनासारखा सर्व उदीम करतो. ५ जोडी. ६ मेहनत करी, रावे. ७ कर्तव्यकर्मांची वाफ.

फवी । कुकर्मांचा करवी । राव जरी ॥ ३० ॥ तरि तयाचिसारिखें । असंभाव्य पाप पिके । मग जन्मकोटी दुःखें । भोगी जीव ॥ ३१ ॥ ना तरी विधीचिये वाफे । सत्क्रिया बीज आरोपे । तरि जन्मकोटिमापें । सुखचि मविजे ॥ ३२ ॥ तंव आणिकें ह्मणती हें नव्हे । हें जिवाचेंचि न ह्मणावें । आमुतें पुसा आघवें । क्षेत्राचें या ॥ ३३ ॥ अहो जीव एथ उखिता । वस्तीकर वाटे जातां । आणि प्राण हा बलौता । ह्मणोनि जागे ॥ ३४ ॥ अनादि जे प्रकृति । सांख्य जियेतें गाती । क्षेत्र हे वृत्ति । तियेची जाणा ॥ ३५ ॥ आणि तियेतेंचि आघवा । आथी घरमेळावा । ह्मणोनि ते वाहिवा । घरीं वाहे ॥ ३६ ॥ वाहिव्याचिये रहाटी । जे मुदल तिघे इये सृष्टी । ते तियेचिया पोटीं । जाहाले गुण ॥ ३७ ॥ रजोगुण पेरी । तेतुलें सत्व सोंकरी । मग वेळे तम करी । संवगणी ॥ ३८ ॥ रचूनि महत्तत्वाचें खळें । मळी एके कोलुगेनि पोळें । ते अव्यक्ताची मिळे । सांज भली ॥ ३९ ॥ तंव ऐकीं मतिमतीं । या बोलाचिया खंती । ह्मणितलें यया ह्मंसी । अर्वाचीना ॥ ४० ॥ हां हो परतत्त्वाआंत । कें प्रकृतीची मात । हा क्षेत्रवृत्तांत । उगेचि आइका ॥ ४१ ॥ शून्यसेज साळिये । सुलीनतेचिये तुळिये । निद्रा केली होती बळियें । संकल्पें येणें ॥ ४२ ॥ तो अवतसा चेइला । उद्यमीं सदैव भला । ह्मणोनि ठेवा जोडला । इच्छावशें ॥ ४३ ॥ निरालंबींची वाडी । होती त्रिभुवनायेवढी । हे तयाचिये जोडी । रूपा आली ॥ ४४ ॥ मग महाभूतांचें ऐकवाट । सैरीं वेंटाळूनि भाट । भूतग्रामाचे ओघाट । चिरिले चौरीं ॥ ४५ ॥ यावरी आदी । पांचवटेयांची बांधी । बांधली प्रेभेदीं । पांचभौतिकीं ॥ ४६ ॥ कर्माकर्मांचे गुंडे । बांध घातले दोहींकडे । नपुंसकें बरडें । रानें केलीं ॥ ४७ ॥ तेथ येरझारेलागीं । जन्ममृत्यूची सुरंगी । सुहाविली निलोंगी । संकल्पें येणें ॥ ४८ ॥ मग अहंकारासि ऐकलाधी । करूनि जीविताववी । वेहाविलें बुद्धी । चराचर ॥ ४९ ॥ यापरी निरोळीं । वाढे संकल्पाची डाळी । ह्मणोनि तो मुळीं । प्रपंचा यया ॥ ५० ॥

ययापरि मतमुक्तकीं । तेथ पढियायिले आणिकीं । ह्मणती हांहो विवेकी । कैसे तुह्मी ॥ ५१ ॥ परतत्त्वाचिया गांवीं । संकल्पसेज देखावी । तरि कां पां न मनावी । प्रकृती तयांचि ॥ ५२ ॥ परि असो हें नव्हे । तुह्मी या न लगावें । आतांचि हें आघवें । सांगिजैल ॥ ५३ ॥ तरि आकाशीं कवणें । केलीं मेघाचीं भरणें । अंतरिक्षतारांगणें । धरी कवण ॥ ५४ ॥ गगनाचा चांदवा । कोणें ओढिला केधवां । पवन हिंडत असावा । हें कवणाचें मत ॥ ५५ ॥ रोमा कवण पेरी । सिंधू कवण भरी । पर्जन्याचिया करी । धारा कवण ॥ ५६ ॥ तैसें क्षेत्र हें स्वभावें । वृत्ती कवणाची नव्हे । हें वांहे तया फावे । येरां तुटे ॥ ५७ ॥ तंव आणिकें एकें । क्षोभें ह्मणितलें निकें । तरि भोगिजे एकें । काळें केविं हें ॥ ५८ ॥ तरि ययाचा मार । देखताति अनिवार । तरि स्वमतीं भर । अभिमानियां ॥ ५९ ॥ हें जाणें मृत्यू रागिटा । सिंहाडयाचा देरकुटा । परि काय कीजे वांजटां । पूरिजतें असे ॥ ६० ॥ महाकल्पापरौती । कवें घालूनि अवचितीं । सत्यलोकभद्रजाती । आंगविजे ॥ ६१ ॥ लोकपाळ नित्य नवे । दिग्गजांचे मेळावे । स्वर्गीचिये आंडवे । रिगोनि मोडी ॥ ६२ ॥ येर ययाचेनि अंगवातें । जन्ममृत्यूचिये गर्ते । निर्जीवें होऊनि भ्रमतें । जीवमृगें ॥ ६३ ॥ न्याहाळीं पां केव्हडा । पसरलासे चेंवडा । करूनियां मांजिवडा । आकारगज ॥ ६४ ॥ ह्मणोनि काळाची सत्ता । हाचि बोल निरुता । ऐसे वाद पांडुसुता । क्षेत्रालागीं ॥ ६५ ॥ हे बहु उखिविखी । ऋषीं केली नैमिषीं । पुराणें इयेविषीं । मतपत्रिका ॥ ६६ ॥ [ छंदोभिर्विविधैः पृथक् ] अनुष्टुभादि छंदें । प्रबंधीं जियें विविधें । तें पैत्रावलंबन मदें । करिती अझुनी ॥ ६७ ॥ [ ब्रह्मसूत्रपदैश्चैव ] वेदींचें बृहत्सामसूत्र । जें देखणेपणें पवित्र । परि तयाही हें क्षेत्र । नेणवेचि ॥ ६८ ॥ [ हेतुमद्भिर्विनिश्चितैः ] आणीक आणिकींही बहुतीं । महाकवीं हेतुमंतीं । यालागीं मती । वेचिलिया ॥ ६९ ॥ परि ऐसें हें एवढें । कीं अमुकेयाचेंचि फुंडें । हें कोण्हाही वरपडे । होयचिना ॥ ७० ॥ आतां यावरी जैसें । क्षेत्र हें असे । तुज सांगों तैसें । साद्यंत गा ॥ ७१ ॥ [ संक्षेपार्थः ]

१ मोजतो. २ सांख्यमती. ३ उदासीन. ४ बलुता. ५ वतन. ६ कारभारी, वहिवाटदार. ७ लागवडीच्या. ८ मूळ तीन. ९ राखतो. १० काढणी, मोडणी. ११ गुणसाम्यमायेचें. १२ काळनामक. १३ बैलाकडून. १४ रास. १५ मायावादी. १६ तिरस्कारानें. १७ ज्ञान. १८ मायेच्या शय्यामंदिरांत. १९ गादीवर. २० वासनेनें. २१ अकस्मात्. २२ जागा झाला. २३ परब्रह्मांची. २४ जमीन. २५ लाभास, नफ्यास. २६ ऐक्य. २७ यथेच्छ. २८ पडित जमीन. २९ भाग. ३० चतुर्विध सृष्टि. ३१ पांच विषयांची. ३२ वेगळाले. ३३ वाट. ३४ सुशोभित केली. ३५ निराश्रित. ३६ एकमत. ३७ लागवडीस लावलें. ३८ आकाशांत.

१ डहाळी. २ निराधार मतवाले. ३ खंडण केले. ४ स्वभाववादी. ५ परब्रह्माच्या. ६ संकल्पाची वस्ती. ७ मानावी. ८ त्या संकल्पाचीच. ९ वतन. १० मानील, लागवड करील. ११ दुसरें—कालवादी. १२ नाश. १३ रागीट. १४ सिंहाची. १५ गुहा. १६ वृथा. १७ पोसतो. १८ मिठी. १९ स्वाधीन करून घेतो. २० अरण्यांत. २१ पंजा. २२ मध्यें. २३ वादविवाद, भवति न भवति. २४ अभिप्रायपत्रें. २५ ग्रंथाश्रय. २६ गर्वानें. २७ खात्रीनें. २८ निर्णय.

"कोणी (कर्मवादी) ह्मणतात 'हें समूळ
थळ जीवाचेंच आहे.' त्याची लागवड कर-
ारें प्राण हें कूळ. २७ त्या प्राणाच्या घरांत
पान, व्यान, उदान, समान हे चार भाऊ
ततः खपतात. आणि मनासारखा हात हा
ाहिजे तसें पीक पिकवितो. २८ त्याला इं-
द्रियरूप बैलांची जोडी, अवस किंवा पहांट न
णतां विषयरूप क्षेत्रामध्यें यथास्थित राबत
सते. २९ कर्तव्यकर्माची वाफ सोडून देऊन
ाण त्यांत अन्यायाचें बीज पेरून सोडतो. आणि
ाला कुकर्माचें खत घालतो. ३० तेव्हां त्या-
याच सारखें असंभाव्य पाप पिकतें, आणि
ोट्यावधि जन्मपर्यंत जीव दुःख भोगीत रा-
तो. ३१ किंवा कर्तव्याच्या वाफेबरोबर त्यांत
त्कर्माचें बीज पेरलें गेलें तर, कोट्यावधि
न्मपर्यंत सुखच भोगीत राहतो.' ३२ दुसरे
कतीएक (सांख्य) ह्मणतात कीं 'असें न-
हेच. हें क्षेत्र जीवाचेंच आहे, असें ह्मणतां
त नाहीं. तर ह्या क्षेत्राचें सारें आह्मांस वि-
ारा. ३३ अहो! जीव आहे हा येथें केवळ
दासीन, वाट चालतां चालतां वस्तीस उतरले-
याप्रमाणें आहे. आणि प्राण हा येथचा वस्तुता-
शा–ह्मणून पहारा करतो. ३४ आणखी अ-
ादि जी प्रकृति, जिचें सांख्य मतानुयायी
र्णन करितात, त्या प्रकृतीचें–मायेचें–हें क्षेत्र
नाम–वतन–आहे. ३५ आणि तिच्याच घ-
वा हा परिवार आहे, ह्मणून ती ह्या शेताची
ागवड घरींच करते. ३६ तेथील मेहनतम-
ागत करणारे ह्या सृष्टीमध्यें मूळ तिचे गुण आ-
त. ते तिच्याच पोटीं जन्मलेले असतात. ३७
तोगुण जितकें पेरतो, तितकें सत्वगुण संरक्षण
रतो, आणि काढणीच्या वेळेस सर्वांची का-
गी करतो. ३८ नंतर महत्तत्वाचें खळें क-
न कालनामक बैलाकडून त्याची मळणी
रतो. तेव्हां सूक्ष्म भूतांची भली मोठी रास
उते.' ३९ ह्यावर दुसरे कितीएक बुद्धिवान्
मायावादी) ह्मणूं लागले कीं 'ह्या बोल-
ांत काय अर्थ आहे? हें ज्ञान आलीक-
डचें. ४० अहो! परब्रह्मापुढें प्रकृतीची गोष्ट
कसली? ह्या क्षेत्राचा वृत्तांत आह्मी सांगतों
तो मुकाट्यानें ऐका. ४१ मायेच्या शय्यामं-
दिरांत तूर्यावस्थेच्या गादीवर ह्या बलिष्ठ सं-
कल्पानें निद्रा केली होती. ४२ इतक्यांत
अकस्मात् तो जागा झाला. तो अहोरात्र खट-
पट करणारा असल्यामुळें, त्यास इच्छेबरोबर
हा ठेवा सांपडला. ४३ परब्रह्माची त्रिभुवना-
एवढी जमीन होती, ती त्यास प्राप्त झाली. ४४
मग त्या पडित–बेवारशी–जमिनीला त्यानें
पंचमहाभूतांच्या ऐक्याचें हवें तेवढें कुंपण घा-
तलें. आणि प्राणिसमुदायाचे चार प्रकार–
जारज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज–पेरून
सोडले. ४५ नंतर पहिल्यानें पांच विषयांच्या–
शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध–समुदायाचा बांध
घालून पंचभूतांच्या ठिकाणीं निरनिराळेपणा
उत्पन्न केला. ४६ दोहों बाजूंस कर्माकर्माच्या
धोंड्यांचे गडगे रचून निःसत्व–केवळ भरड–
अशा जमिनीचे मळे तयार केले. ४७ आणि
त्यांत येण्याजाण्याकरितां ह्या संकल्पानें
जन्ममृत्यूचें पोकळ असें सुंदर भुयार तयार
केलें. ४८ आणि अहंकाराचें व बुद्धीचें
ऐक्य करून आयुष्य असेपर्यंत स्थावर व
जंगम ह्यांचें तरु लावलें. ४९ ह्याप्रमाणें शून्या-
मध्यें संकल्पाचें कलम वाढीस लागलें ह्मणून ह्या
प्रपंचाला तो संकल्पच मूळ आहे.' ५० असें
निराधार मतवाले ह्मणतात, तोंच दुसऱ्या
कित्येकांनीं (स्वभाववाद्यांनीं) त्याचें खंडण
केलें. ते ह्मणाले 'अहो? तुमचा असला क-
सला विचार? ५१ परब्रह्माच्या गांवामध्यें
संकल्पाची वस्ती आहे असें जर मानतां, तर
प्रकृति ही त्याचीच कां ह्मणूं नये? ५२ प-
रंतु तें असो. तीं दोन्हींही मतें बरोबर नाहींत.
त्यांच्या नादाला तुह्मी लागूं नये. तर आतां
तें सारें सांगतों. ५३ आकाशामध्यें मेघ कोणीं
भरले? अंतरिक्षांत नक्षत्रांस कोण धरतो?
५४ गगनाचें छत कोणीं व केव्हां बांधलें?
वाऱ्यानें फिरत रहावें, हें मत कोणाचें? ५५

फवी । कुकर्माचा करवी । राव जरी ॥ ३० ॥ तरि तयाचिसारिखें । असंभाव्य पाप पिके । मग जन्मकोटी दुःखें । भोगी जीव ॥ ३१ ॥ ना तरी विधीचिये वाफे । सत्क्रिया बीज आरोपे । तरि जन्मकोटिमापें । सुखचि मविजे ॥ ३२ ॥ तंव आणिकें ह्मणती हें नव्हे । हें जिवाचेंचि न ह्मणावें । आमुतें पुसा आघवें । क्षेत्राचें या ॥ ३३ ॥ अहो जीव एथ उखिता । वस्तीकर वाटे जातां । आणि प्राण हा बैलौता । ह्मणोनि जागे ॥ ३४ ॥ अनादि जे प्रकृति । सांख्य जियेतें गाती । क्षेत्र हे वृत्ति । तियेची जाणा ॥ ३५ ॥ आणि तियेतेंचि आघवा । आथी घरमेळावा । ह्मणोनि ते वाहिवा । घरीं वाहे ॥ ३६ ॥ वाहिव्याचिये रहाटी । जे मुदल तिये इये सृष्टी । ते तियेचिया पोटीं । जाहाले गुण ॥ ३७ ॥ रजोगुण पेरी । तेतुलें सत्व सोकेरी । मग वेळे तम करी । संवगणी ॥ ३८ ॥ रचूनि महत्तत्वाचें खळें । मळी एके कौळुगेनि पोळें । ते अव्यक्ताची मिळे । सांज भली ॥ ३९ ॥ तंव एकी मतिमतीं । या बोलाचिया खंती । ह्मणितलें यया ह्मसी । अर्वाचीना ॥ ४० ॥ हां हो परतत्त्वाआंत । कें प्रकृतीची मात । हा क्षेत्रवृत्तांत । उगेचि आइका ॥ ४१ ॥ शून्यसेज साळिये । सुलीनतेचिये तुळिये । निद्रा केली होती बळियें । संकल्पें येणें ॥ ४२ ॥ तो अवतसां चेइला । उद्यमीं सदैव भला । ह्मणोनि ठेवा जोडला । इच्छावशें ॥ ४३ ॥ निरालंबींची वाडी । होती त्रिभुवनायेवढी । हे तयाचिये जोडी । रूपा आली ॥ ४४ ॥ मग महाभूतांचें एकवाट । सैरीं वेंटाळूनि भाट । भूतग्रामाचे आघाट । चिरिले चौरी ॥ ४५ ॥ यावरी आदी । पांचवेंटेयांची बांधी । बांधली प्रभेदीं । पांचभौतिकीं ॥४६॥ कर्माकर्मांचे गुंडे । बांध घातले दोहींकडे । नपुंसकें बरडें । रानें केलीं ॥४७॥ तेथ येरझारेलागीं । जन्ममृत्यूची सुरंगी । सुहाविली निलागी । संकल्पें येणें ॥४८॥ मग अहंकारासि एकलाधी । करूनि जीवितावधी । वेहाविलें वुद्धी । चराचर ॥ ४९ ॥ यापरी निराळीं । वाढे संकल्पाची डाळी । ह्मणोनि तो मुळीं । प्रपंचा यया ॥ ५० ॥ ययापरि मतमुक्तकीं । तेथ पढियायिले आणिकीं । ह्मणती हांहो विवेकी । कैसे तुह्मी ॥ ५१ ॥ परतत्वाचिया गांवीं । संकल्पसेज देखावी । तरि कां पां न मनावी । प्रकृती तयांचि ॥ ५२ ॥ परि असो हें नव्हे । तुह्मी या न लगावें । आतांचि हें आघवें । सांगिजैल ॥ ५३ ॥ तरि आकाशीं कवणें । केलीं मेघाचीं भरणें । अंतरिक्षतारागणें । धरी कवण ॥ ५४ ॥ गगनाचा चांदवा । कोणें ओढिला केधवां । पवन हिंडत असावा । हें कवणाचें मत ॥ ५५ ॥ रोमा कवण पेरी । सिंधू कवण भरी । पर्जन्याचिया करी । धारा कवण ॥ ५६ ॥ तैसें क्षेत्र हें स्वभावें । वृत्ती कवणाची नव्हे । हें वाहे तया फावे । येरां तुटे ॥ ५७ ॥ तंव आणिकें एकें । क्षोभें ह्मणितलें निकें । तरि भोगिजे एकें । काळें केविं हें ॥ ५८ ॥ तरि ययाचा मारे । देखताति अनिवार । तरि स्वमतीं भर । अभिमानियां ॥५९॥ हें जाणें मृत्यू रागिटों । सिंहाडयाचा दरकुटा । परि काय कीजे वांजटां । पूरिजेतें असे ॥ ६० ॥ महाकल्पापरौती । कवं घालूनि अवचितीं । सत्यलोकभद्रजाती । आंगविजे ॥६१ ॥ लोकपाळ नित्य नवे । दिग्गजांचे मेळावे । स्वर्गींचिये आंडवे । रिगोनि मोडी ॥ ६२ ॥ येर ययाचेनि अंगवातें । जन्ममृत्यूचिये गर्ते । निर्जीवें होऊनि भ्रमतें । जीवमृगें ॥ ६३ ॥ न्याहाळीं पां केव्हडा । पसरलासे चंवडा । करूनियां मोजिवडा । आकारगज ॥ ६४ ॥ ह्मणोनि काळाची सत्ता । हाचि बोल निरुता । ऐसे वाद पांडुसुता । क्षेत्रालागीं ॥ ६५ ॥ हे बहु उखिविखी । ऋषीं केली नैमिषीं । पुराणें इयेविषीं । मंतपत्रिका ॥ ६६ ॥ [ छंदोभिर्विविधैः पृथक् ] अनुष्टुभादि छंदें । प्रबंधीं जियें विविधें । तें पत्रावलंबन मदें । करिती अझुनी ॥ ६७ ॥ [ ब्रह्मसूत्रपदैश्चैव ] वेदींचें बृहत्सामसूत्र । जें देखणेपणें पवित्र । परि तयाही हें क्षेत्र । नेणवेचि ॥६८॥ [ हेतुमद्भिर्विनिश्चितैः ] आणीक आणिकींही बहुतीं । महाकवीं हेतुमंतीं । यालागीं मती । वेचिलिया ॥ ६९ ॥ परि ऐसें हें एवढें । कीं अमुकेयाचेंचि फुंडें । हें कोण्हाही वरपडे । होयचिना ॥ ७० ॥ आतां यावरी जैसें । क्षेत्र हें असे । तुज सांगों तैसें । सायंत गा ॥ ७१ ॥ [ संक्षेपार्थः ]

१ भोजतो. २ सांख्यमती. ३ उदासीन. ४ बलुता. ५ वतन. ६ कारभारी, वहिवाटदार. ७ लागवडीच्या. ८ मूळ तीन. ९ राखतो. १० काढणी, मोडणी. ११ गुणसाम्यमायेचें. १२ काळनामक. १३ बैलाकडून. १४ रास. १५ मायावादी. १६ तिरस्कारानें. १७ ज्ञान. १८ मायेच्या शय्यामंदिरांत. १९ गादीवर. २० वासनेनें. २१ अकस्मात्. २२ जागा झाला. २३ परब्रह्मींची. २४ जमीन. २५ लाभास, नफ्यास. २६ ऐक्य. २७ यथेच्छ. २८ पडित जमीन. २९ भाग. ३० चतुर्विध सृष्टि. ३१ पांच विषयांची. ३२ वेगळाले. ३३ वाट. ३४ सुशोभित केली. ३५ निराश्रित. ३६ एकमत. ३७ लागवडीस लावलें. ३८ आकाशांत.

१ डहाळी. २ निराधार मतवाले. ३ खंडण केले. ४ स्वभाववादी. ५ परब्रह्माच्या. ६ संकल्पाची वस्ती. ७ मानावी. ८ त्या संकल्पाचीच. ९ वतन. १० मानील, लागवड करील. ११ दुसरें—कालवादी. १२ नाश. १३ रागीट. १४ सिंहाची. १५ गुहा. १६ वृथा. १७ पोसतो. १८ मिठी. १९ स्वाधीन करून घेतो. २० अरण्यांत. २१ पंजा. २२ मध्यें. २३ वादविवाद, भवति न भवति. २४ अभिप्रायपत्रें. २५ ग्रंथाश्रय. २६ गर्वानें. २७ खात्रीनें. २८ निर्णय.

"कोणी (कर्मवादी) ह्मणतात 'हें समूळ थळ जीवाचेंच आहे.' त्याची लागवड कर-ारें प्राण हें कूळ. २७ त्या प्राणाच्या घरांत पान, व्यान, उदान, समान हे चार भाऊ वतः खपतात. आणि मनासारखा हात हा ाहिजे तसें पीक पिकवितो. २८ त्याला ई-द्रियरूप बैलांची जोडी, अवस किंवा पहांट न णतां विषयरूप क्षेत्रामध्यें यथास्थित रावत सते. २९ कर्तव्यकर्माची वाफ सोडून देऊन ण त्यांत अन्यायाचें बीज पेरून सोडतो. आणि ाला कुकर्माचें खत घालतो. ३० तेव्हां त्या-याच सारखें असंभाव्य पाप पिकतें, आणि ोट्यावधि जन्मपर्यंत जीव दुःख भोगीत रा-तो. ३१ किंवा कर्तव्याच्या वाफेबरोबर त्यांत त्कर्माचें बीज पेरलें गेलें तर, कोट्यावधि न्मपर्यंत सुखच भोगीत राहतो.' ३२ दुसरे कतीएक (सांख्य) ह्मणतात कीं 'असें न-ेच. हें क्षेत्र जीवाचेंच आहे, असें ह्मणतां त नाहीं. तर ह्या क्षेत्राचें सारें आह्मांस वि-ारा. ३३ अहो! जीव आहे हा येथें केवळ दासीन, वाट चालतां चालतां वस्तीस उतरले-ाप्रमाणें आहे. आणि प्राण हा येथचा बलुता-शा–ह्मणून पहारा करतो. ३४ आणखी अ-ादि जी प्रकृति, जिचें सांख्य मतानुयायी र्णन करितात, त्या प्रकृतीचें–मायेचें–हें क्षेत्र नाम–चेतन–आहे. ३५ आणि तिच्याच घ-रा हा परिवार आहे, ह्मणून ती ह्या शेताची ागवड घरींच करते. ३६ तेथील मेहनतम-ागत करणारे ह्या सृष्टीमध्यें मूळ तिचे गुण आ-त. ते तिच्याच पोटीं जन्मलेले असतात. ३७ ोगुण जितकें पेरतो, तितकें सत्त्वगुण संरक्षण रतो, आणि काढणीच्या वेळेस सर्वांची का-ी करतो. ३८ नंतर महत्तत्वाचें खळें क-न कालनामक बैलाकडून त्याची मळणी रतो. तेव्हां सूक्ष्म भूतांची भली मोठी रास ते.' ३९ ह्यावर दुसरे कितीएक बुद्धिवान् मायावादी) ह्मणूं लागले कीं 'ह्या बोल-ांत काय अर्थ आहे? हें ज्ञान आलीक-डचें. ४० अहो! परब्रह्मापुढें प्रकृतीची गोष्ट कसली? ह्या क्षेत्राचा वृत्तांत आह्मी सांगतों तो मुकाट्यानें ऐका. ४१ मायेच्या शय्यामं-दिरांत तूर्यावस्थेच्या गादीवर ह्या बलिष्ठ सं-कल्पानें निद्रा केली होती. ४२ इतक्यांत अकस्मात् तो जागा झाला. तो अहोरात्र खट-पट करणारा असल्यामुळें, त्यास इच्छेबरोबर हा ठेवा सांपडला. ४३ परब्रह्माची त्रिभुवना-एवढी जमीन होती, ती त्यास प्राप्त झाली. ४४ मग त्या पडित–बेवारशी–जमिनीला त्यानें पंचमहाभूतांच्या ऐक्याचें हवें तेवढें कुंपण घा-तलें. आणि प्राणिसमुदायाचे चार प्रकार–जारज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज–पेरून सोडले. ४५ नंतर पहिल्यानें पांच विषयांच्या–शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध–समुदायाचा बांध घालून पंचभूतांच्या ठिकाणीं निरनिराळेपणा उत्पन्न केला. ४६ दोहों बाजूंस कर्माकर्माच्या धोंड्यांचे गडगे रचून निःसत्व–केवळ भरड–अशा जमिनीचे मळे तयार केले. ४७ आणि त्यांत येण्याजाण्याकरितां ह्या संकल्पानें जन्ममृत्यूचें पोकळ असें सुंदर भुयार तयार केलें. ४८ आणि अहंकाराचें व बुद्धीचें ऐक्य करून आयुष्य असेपर्यंत स्थावर व जंगम ह्याचें तरू लावलें. ४९ ह्याप्रमाणें शून्या-मध्यें संकल्पाचें कलम वाढीस लागलें ह्मणून ह्या प्रपंचाला तो संकल्पच मूळ आहे.' ५० असें निराधार मतवाले ह्मणतात, तोंच दुसऱ्या कित्येकांनीं (स्वभाववाद्यांनीं) त्याचें खंडण केलें. ते ह्मणाले 'अहो? तुमचा असला क-सला विचार? ५१ परब्रह्माच्या गांवामध्यें संकल्पाची वस्ती आहे असें जर मानतां, तर प्रकृति ही त्याचीच कां ह्मणूं नये? ५२ प-रंतु तें असो. तीं दोन्हींही मतें बरोबर नाहींत. त्यांच्या नादाला तुह्मीं लागूं नये. तर आतां तें सारें सांगतों. ५३ आकाशामध्यें मेघ कोणीं भरले? अंतरिक्षांत नक्षत्रांस कोण धरतो? ५४ गगनाचें छत कोणीं व केव्हां बांधलें? वाऱ्यानें फिरत रहावें, हें मत कोणाचें? ५५

केंसांची लागवड कोणीं केली ? समुद्र कोणीं भरला ? पर्जन्याच्या धारा कोण करतो ? ५६ त्याचप्रमाणें हें देहरूपी क्षेत्र मूळचें कोणाचेंच नव्हे. जो लागवड करील, त्याला तें मिळतें; न करील त्याला मिळत नाहीं. ' ५७ तेव्हां दुसरे कितीएक रागारागानें निक्षून ह्मणूं लागले कीं ' तर त्याचा एकटा काळच कसा उपभोग घेतो ? ५८ ह्या काळाचा अनिवार तडाका पहात असूनही, अभिमानी लोक आपल्या मताचा अभिमान धरतातच. ५९ ही मृत्यूची खाय आहे; सिंहाची गुहा आहे; असें असतांही बडबड करतात, त्यांस काय करावें ? ६० जो महाकल्पापेक्षांही मोठी अशी अकस्मात् मिठी घालून सत्यलोकरूप हत्ती धरतो; ६१ जो नित्य नवे होणारे इंद्र व दिग्गजांचे कळप ह्यांचा स्वर्गारण्यांत शिरून फडशा पाडतो; ६२ इतर जीवरूप श्वापदें तर त्याच्या आंगाच्या वाऱ्यानेंच निर्जीव होऊन जन्ममृत्यूंच्या खड्डयांत गोते खात बसतात. ६३ अहो ! ह्यानें मध्यें हा सर्व आकाररूपी गज धरलेला पंजा केवढा पसरला आहे पहा ! ६४ ह्मणून सर्वांवर काळाची सत्ता आहे हीच गोष्ट खरी'. अर्जुना ! ह्या क्षेत्राच्या पायांत असे अनेक वाद लागून राहिलेले आहेत. ६५ कवितांमध्यें अनुष्टुप् आदिकरून नानाप्रकारचे छंद अद्यापपर्यंत गर्वानें ग्रंथाचा आश्रय करतातच आहेत. ६७ वेदांचें बृहत्साम नांवाचें जें सूत्र, तें दिसण्यामध्यें पवित्र आहे, तथापि त्याला सुद्धां हें क्षेत्र समजत नाहीं. ६८ अशाच प्रकारें दुसऱ्याही कित्येक कल्पक महान् महान् कवींनीं ह्या कामांत बुद्धिसर्वस्व खर्च केलें आहे. ६९ पण हें देहरूप क्षेत्र असें येवढें आहे, किंवा हें निश्चयेंकरून अमक्याचेंच आहे; हा निश्चय कोणाच्यानेंच झालेला नाहीं. ७० तर आतां हें क्षेत्र जसें व ज्या प्रकारचें आहे, तसें व त्या प्रकारें तुला साद्यंत सांगूं. " ७१

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ ५ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

तरि महाभूतपंचक । आणि अहंकार एक । बुद्धि अव्यक्त दशक । इंद्रियांचा ॥ ७२ ॥ मन आणीकही एक । विषयांचा दशक । द्वेष सुख दुःख । संघात इच्छा ॥ ७३ ॥ आणि चेतना धृति । एवं क्षेत्रव्यक्ती । सांगीतली तुजप्रती । आघवीचि ॥ ७४ ॥ आतां महाभूतें कवणें । कवण विषय कैसीं करणें । हें वेगळालेपणें । एकैक सांगों ॥ ७५ ॥ [ महाभूतानि ] तरी पृथ्वी आप तेज । वायु व्योम इयें तुज । सांगीतलीं बुझें[1] । महाभूतें ॥ ७६ ॥ [ अहंकारः ] आणि जागतिये दशे । स्वप्न लपालें असे । ना तरी अंवसे । चंद्र गूढ ॥ ७७ ॥ नाना अप्रौढवाळकीं । तारुण्य राहे [2]थोकीं । कां न फुलतां कळिकीं । आमोद जैसा ॥ ७८ ॥ किंबहुना काष्ठीं । वन्हि जेविं किरीटी । तेविं प्रकृतीचिया पोटीं । गोप्य जो असे ॥ ७९ ॥ जैसा ज्वर धातुगत । अपथ्याचें मिष पाहत । मग जालिया आंत । बाहेरी व्यापी ॥ ८० ॥ तैसी पांचांही गांठी पडे । जैं देहाकार उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकार गा ॥ ८१ ॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंठीं । नाना संकटीं नाचवी ॥ ८२ ॥ [ बुद्धिः ] आतां बुद्धि जे ह्मणिजे । ते ऐशिया चिन्हीं जाणिजे । बोलिलें यदुराजें । आइकें सांगों ॥ ८३ ॥ तरि कंदें[3]-र्पाचेनि बळें । इंद्रियवृत्तीचेनि [4]मेळे । विभांडूनि[5] येती पाळे[6] । विषयांचे ॥ ८४ ॥ तो सुखदुःखाचा [7]नागोवा । जेथ [8]उगाणों लागे जीवा । तेथ दोहींसी बरवा । पाडु जे धरी ॥ ८५ ॥ हें सुख हें दुःख । हें पुण्य हे दोष । हें मैळ हें चोख । ऐसें निवडिजे ॥ ८६ ॥ जिये अधमोत्तम [9]सुझे । जिये साने थोर [10]झुंझे । जियें[11] दिठी पारखिजे । विषो जीवें ॥ ८७ ॥ जे [12]तेजंतत्त्वांची [13]आदी । जे सत्वगुणाची वृद्धी । जे आत्मया जीवाची संधी । वसवीत असे ॥ ८८ ॥ अर्जुना ते गा जाण । बुद्धि तूं संपूर्ण । आतां आईक वोळखण । अव्यक्ताचें ॥ ८९ ॥ [ अव्यक्तमेव च ] पैं सांख्याचिया सिद्धांतीं । प्रकृती जे महामती । तेचि एथें प्रस्तुतीं । अव्यक्त गा ॥ ९० ॥ आणि सांख्ययोगमतें । प्रकृती परिसविली तुतें । ऐसी दोहीं परी जेथें । [14]विवंचिली ॥ ९१ ॥ तेथ दुजी जे जीवदशा । तिये नांव वीरेशा । अव्यक्त एथ ऐसा । पर्याय हा ॥ ९२ ॥ तरि

१ समजून. २ गुप्त. ३ कामाच्या. ४ समागमानें. ५ मोडून. ६ समुदाय. ७ लूट, नागवण. ८ अनुभवूं लागतो. ९ समजतो. १० कळतो. ११ ज्या दृष्टीनें. १२ ज्ञानेंद्रियांची. १३ मूळ. १४ विस्तारानें सांगितली.

पाहालया[1] रजनी । तारा लोपती गगनीं । कां हारपे अस्तमानीं । भूतक्रिया[2] ॥ ९३ ॥ ना तरी देह गेलिया पाठीं । देहादिक किरीटी । उपाधि लपे पोटीं । कृतकर्माच्या ॥ ९४ ॥ कां बीजमुद्रे[3]आंतु । थोके[4] तरू समस्तु । कां वस्त्रपण तंतु । दशे राहे ॥ ९५ ॥ तैसें सांडूनियां स्थूळधर्म । महाभूतें भूतग्राम । ल्या जाती सूक्ष्म । होऊनि जेथ ॥ ९६ ॥ अर्जुना तया नांवें । अव्यक्त हें जाणावें । आतां आईक आघवे । इंद्रियभेद ॥९७॥ [इंद्रियाणि दश] तरि श्रवण नयन । त्वचा घ्राण रसन । इयें जाण ज्ञान-। करणें[5] पांचै ॥ ९८ ॥ इये तत्त्वमेळापंकीं । सुखदुःखाची उखिविखी[6] । बुद्धि करिते मुखीं । पांचें इहीं ॥ ९९ ॥ मग वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार । पायू हे प्रकार । पांच आणिक ॥ १०० ॥ कर्मेंद्रियें ह्मणिपती । तियें ईयें जाणिती । आइकें कैवल्यपती । सांगतसें ॥ १ ॥ पैं प्राणाची अंतौरी[10] । क्रियाशक्ति जे शरीरीं । तियेचि रिगिनिगी[11] द्वारीं । पांचें इहीं ॥ २ ॥ एवं दाहाही करणें । सांगीतलीं देव ह्मणे । [एकं च] परिस आतां फुडेपणें[12] । मन तें ऐसें ॥ ३ ॥ जें इंद्रियां आणि बुद्धी । माझारिलिये संधी । रजोगुणाच्या खांदीं । तरेळत[13] असे ॥ ४ ॥ नीळिमा अंबरीं । कां मृगतृष्णा लहरी । तैसा वायांचि[14] फेरारीं[15] । वावो[16] जाहाला ॥ ५ ॥ आणि शुक्रशोणितांचा सांधा । मिळतां पांचांचा बांधी[17] । वायुतत्त्व दशधा । एकचि जाहालें ॥ ६ ॥ मग तिहीं दाहींभागीं । देहधर्मांच्या खेवंगीं[19] । अधिष्ठिलें आंगीं । आपुलाल्या ॥ ७ ॥ तेथ चांचल्य निखळ । एकलें ठेलें निढोंळ[20] । ह्मणोनि रजाचें बळ । धरिलें तेणें ॥ ८ ॥ तें बुद्धिसी बाहेरी । अहंकाराच्या उरावरी । ऐसे ठायीं माझारीं । बळियावलें ॥ ९ ॥ वायां मन हें नांव । येऱ्हवीं कल्पनाचि सावेव । जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु ॥ ११० ॥ जें प्रकृतीस मूळ । कामा जयाचें बळ । जें अखंड सुये[21] सेळ[22] । अहंकारासी ॥ ११ ॥ जें इच्छेतें वाढवी । आशेतें चढवी । जें पाठी पुरवी । भयासि गा ॥ १२ ॥ द्वैत जेथ उठी । अविद्या जेणें लोंठी[23] । जें इंद्रियांतें लोटी । विषयांमाजी ॥ १३ ॥ संकल्पें सृष्टी घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी । मनोरथांच्या उतरडी[24] । उतरी रची ॥ १४ ॥ जें भुलीचें कुहरें । वायुतत्त्वाचें अंतर । बुद्धीचें द्वार । झांकविलें जेणें ॥ १५ ॥ तें गा किरीटी मन । या बोला नाहीं आन । आतां विषयाभिधा[1]-। भेद आइकें ॥ १६ ॥ [पंच च] तरि स्पर्श आणि शब्द । रूप रस गंध । हा विषय पंचविध । ज्ञानेंद्रियांचा ॥ १७ ॥ इहीं पांचै द्वारीं । ज्ञानासि धांव बाहेरी । जैसा कां हिरविया[2] चारीं । मांबावे पशु ॥ १८ ॥ ['चकारार्थः'] मग स्वर वर्ण विसर्ग । अथवा स्वीकार त्याग । चंक्रमण[3] उत्सर्ग[4] । विण्मूत्राचा ॥ १९ ॥ हे कर्मेंद्रियांचे पांच । विषय गा साच । जे बांधोनियां माचें । क्रिया धांवे ॥ १२० ॥ [इंद्रियगोचराः] ऐसे हे दाही । विषय गा इये देहीं । आतां इच्छा तेही । सांगिजैल ॥ २१ ॥ [इच्छा] तरि भूतलें[6] आठवे । कां बोलें न झांकवे । ऐसियावरी चेतवे । जे गा वृत्ती ॥ २२ ॥ इंद्रियविषयांचिया भेटी । सरसीच जे गा उठी । कामाची बाहुटी[8] । धरूनियां ॥ ॥ २३ ॥ जियेचेनि उठिलेपणें । मना सैंघ[9] धांवणें । न रिघावें तेथ केरणें । तोंडें सुती[10] ॥ २४ ॥ जिये वृत्तीचिया आवडी । बुद्धी होय वेडी । विषयां जिया गोडी । ते गा इच्छा ॥ २५ ॥ [द्वेषः] आणि इच्छिलिया सांगडें[11] । इंद्रियां आमिष[12] न जोडे । ऐसा जो डाव पडे । तोचि द्वेष ॥ २६ ॥ [सुखं] आतां यावरी सुख । तें एवंविध देख । जेणें एकेंचि अशेषें[13] । विसरे जीव ॥ २७ ॥ मना वाचे काये । जे आपली आण वाये । देहस्मृतीची त्रांये[14] । मोडित ये जें ॥ २८ ॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळा होइजे प्राणें । सात्विकासी दुणें । वरीही लाभ ॥ २९ ॥ कां आघवियाची इंद्रियवृत्ती । हृदयाचिया एकांतीं । थापटूनि सुषुप्ति[15] । आणी जें गा ॥ १३० ॥ किंबहुना सोय[16] । जीवें[17] आत्मयाची लाहे । तेथ जें होय । तया नाम सुख ॥ ३१ ॥ [दुःखं] आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था । जे कीजे तेंचि सर्वथा । दुःख जाण ॥ ३२ ॥ तें मनोरथसंगें न होये । येरवीं सिद्धि गेलेंचि आहे । हे दोनीचि[18] उपाये । सुखदुःखासी ॥ ३३ ॥ [चेतना] आतां असंगा साक्षिभूता । देहीं चैतन्याची जे सत्ता । तिये नाम पांडुसुता । चेतना येथ ॥ ३४ ॥ जे नखौनि[19] केशवरी । उभी जागे शरीरीं । जे तिहीं[20] अवस्थांतरीं । पालटेना ॥ ३५ ॥ मनबुद्ध्यादि आघवीं । जियेचेनि टवटवी । प्रकृतिवनमाधवी[21] । सदांचि जे ॥ ३६ ॥ जडाजडीं अंशीं । राहाटे जे सरिसि । ते चेतना गा तुजसीं । लटिकें

---

१ उजाडल्यावर. २ प्राणिमात्रांचे व्यापार. ३ बीजाच्या आकारांत. ४ थांबून राहतो. ५ इंद्रियें. ६ विचार, वाटाघाट. ७ मुखानें. ८ उपस्थ. ९ हीं श्रवणादि. १० स्त्री. ११ गमनागमन. १२ खुलासेवार. १३ खेळत असतें. १४ व्यर्थ. १५ भास. १६ स्थान. १७ वीर्य आणि रक्त यांचा. १८ ऐक्य. १९ बळानें. २० केवळ. २१ घालतें, करतें. २२ पाठबळ. २३ दांडगी. २४ उतरंडी. २५ कोठार.

१ विषय असें ज्यास नांव आहे त्याचे. २ हिरव्या, ओल्या. ३ चालणें. ४ त्याग. ५ मार्ग, जिना. ६ मागलें. ७ बाहु, हात. ८ जिकडे तिकडे, पुष्कळ. ९ इंद्रियें. १० घालतात. ११ बरोबर. १२ विषयभोग, ईप्सित. १३ संपूर्ण. १४ ठिकाण, थारा. १५ निद्रा. १६ मार्ग. १७ जीवाला. १८ मनोरथसंग आणि मनोरथत्याग, हे दोन उपाय. १९ नखांपासून. २० जागृति, स्वप्न व सुषुप्ति ह्या तिहींत. २१ मायारूप वनाला वसंत.

केंसांची लागवड कोणीं केली ? समुद्र कोणीं भरला ? पर्जन्याच्या धारा कोण करतो ? ५६ त्याचप्रमाणें हें देहरूपी क्षेत्र मूळचें कोणाचेंच नव्हे. जो लागवड करील, त्याला तें मिळतें; न करील त्याला मिळत नाहीं. ' ५७ तेव्हां दुसरे कितीएक रागारागानें निक्षून ह्मणूं लागले कीं ' तर त्याचा एकटा काळच कसा उपभोग घेतो ? ५८ ह्या काळाचा अनिवार तडाका पहात असूनही, अभिमानी लोक आपल्या मताचा अभिमान धरतातच. ५९ ही मृत्यूची खाय आहे; सिंहाची गुहा आहे; असें असतांही बडबड करतात, त्यांस काय करावें ? ६० जो महाकल्पापेक्षांही मोठी अशी अकस्मात् मिठी घालून सत्यलोकरूप हत्ती धरतो; ६१ जो नित्य नवे होणारे इंद्र व दिग्गजांचे कळप ह्यांचा स्वर्गारण्यांत शिरून फडशा पाडतो; ६२ इतर जीवरूप श्वापदें तर त्याच्या आंगाच्या वाऱ्यानेंच निर्जीव होऊन जन्ममृत्यूंच्या खड्डयांत गोते खात बसतात. ६३ अहो ! ह्यानें मध्यें हा सर्व आकाररूपी गज धरलेला पंजा केवढा पसरला आहे पहा ! ६४ ह्मणून सर्वांवर काळाची सत्ता आहे हीच गोष्ट खरी'. अर्जुना ! ह्या क्षेत्राच्या पायांत असे अनेक वाद लागून राहिलेले आहेत. ६५ कवितांमध्यें अनुष्टुप् आदिकरून नानाप्रकारचे छंद अद्यापपर्यंत गर्वानें ग्रंथाचा आश्रय करतातच आहेत. ६७ वेदांचें बृहत्साम नांवाचें जें सूत्र, तें दिसण्यामध्यें पवित्र आहे, तथापि त्याला सुद्धां हें क्षेत्र समजत नाहीं. ६८ अशाच प्रकारें दुसऱ्याही कित्येक कल्पक महान् महान् कवींनीं ह्या कामांत बुद्धिसर्वस्व खर्च केलें आहे. ६९ पण हें देहरूप क्षेत्र असें येवढें आहे, किंवा हें निश्चयेंकरून अमक्याचेंच आहे; हा निश्चय कोणाच्यानेंच झालेला नाहीं. ७० तर आतां हें क्षेत्र जसें व ज्या प्रकारचें आहे, तसें व त्या प्रकारें तुला साद्यंत सांगूं. " ७१

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ ५
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

तरि महाभूतपंचक । आणि अहंकार एक । बुद्धि अव्यक्त
शक । इंद्रियांचा ॥ ७२ ॥ मन आणीकही एक । विषय
दशक । द्वेष सुख दुःख । संघात इच्छा ॥ ७३ ॥ ३
चेतना धृति । एवं क्षेत्रव्यक्ती । सांगितली तुजप्रती । ३
वीचि ॥ ७४ ॥ आतां महाभूतें कवणें । कवण विषय
करणें । हें वेगळालेपणें । एकैक सांगों ॥ ७५ ॥ [ मह
तानि ] तरी पृथ्वी आप तेज । वायु व्योम इयें तुज । स
तलीं बुझें । महाभूतें ॥ ७६ ॥ [ अहंकारः ] आणि जाग
दशे । स्वप्न लपालें असे । ना तरी अंवसे । चंद्र गूढ ॥ ७
नाना अप्रौढबाळकीं । तारुण्य राहे [2]थोकीं । कां न फु
कळिकीं । आमोद जैसा ॥७८॥ किंबहुना काष्ठीं । वन्हि
किरीटी । तेवि प्रकृतीचिया पोटीं । गोप्य जो असे ॥ ७
जैसा ज्वर धातुगत । अपथ्याचें मिष पाहत । मग जा
आंत । बाहेरी व्यापी ॥ ८० ॥ तैसी पांचांही गांठी प
जैं देहाकार उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंका
॥ ८१ ॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञ
पाठीं । सज्ञानाचे झोंवे कंटीं । नाना संकटीं नाचवी ॥ ८
[ बुद्धिः ] आतां बुद्धि जे ह्मणिजे । ते ऐशिया चिन्हीं
णिजे । बोलिलें यदुराजें । आइकें सांगों ॥ ८३ ॥ तरि
पांचेनि बळें । इंद्रियवृत्तीचेनि [4]मेळे । विभांडूनि येती पं[6]
विषयांचे ॥ ८४ ॥ तो सुखदुःखाचा नागोवा । जेथ उग
लागे जीवा । तेथ दोहींसी बरवा । पाडु जे धरी ॥ ८
हें सुख हें दुःख । हें पुण्य हे दोष । हें मैळ हें चोख ।
निवडिजे ॥ ८६ ॥ जिये अधमोत्तम सुझे । जिये साने
थुझे । जियां दिठी पारखिजे । विषो जीवें ॥ ८७ ॥
तेजतत्त्वांची [13]आदी । जे सत्वगुणाची वृद्धी । जे आ
जीवाची संधी । वसवीत असे ॥ ८८ ॥ अर्जुना ते गा ज
बुद्धि तूं संपूर्ण । आतां आईक वोळखण । अव्यक्ताचें ॥ ८
[ अव्यक्तमेव च ] पैं सांख्याचिया सिद्धांतीं । प्रकृती जे
मती । तेचि एथें प्रस्तुतीं । अव्यक्त गा ॥ ९० ॥ आणि
ख्ययोगमतें । प्रकृती परिसविली तुतें । ऐसी दोहीं परी
विवंचिली[14] ॥ ९१ ॥ तेथ दुजी जे जीवदशा । तिये
वीरेशा । अव्यक्त एथ ऐसा । पर्याय हा ॥ ९२ ॥

१ समजून. २ गुप्त. ३ कामाच्या. ४ समागम
५ मोडून. ६ समुदाय. ७ लूट, नागवण. ८ अनुभवूं
गतो. ९ समजतो. १० कळतो. ११ ज्या दृष्टीनें. १२ इं
द्रियांची. १३ मूळ. १४ विस्तारानें सांगितली.

ालया रजनी । तारा लोपती गगनीं । कां हारपे अस्त-
ीं । भूतक्रिया[2] ॥ ९३ ॥ ना तरी देह गेलिया पाठीं ।
ादिक किरीटी । उपाधि लपे पोटीं । कृतकर्माच्या ॥ ९४ ॥
बीजमुद्रेआंतु[3] । [4]थोके तरू समस्तु । कां वस्त्रपण तंतु । दशे
॥ ९५ ॥ तैसें सांडूनियां स्थूळधर्म । महाभूतें भूतग्राम ।
ा जाती सूक्ष्म । होऊनि जेथ ॥ ९६ ॥ अर्जुना तया
ं । अव्यक्त हें जाणावें । आतां आईक आघवे । इंद्रिय-
॥९७॥ [इंद्रियाणि दश] तरि श्रवण नयन । त्वचा घ्राण
न । इयें जाण ज्ञान-। [5]करणें पांचै ॥ ९८ ॥ इये तत्त्वमे-
ळीं । सुखदुःखाची उखिविखी[6] । बुद्धि करिते मुखीं । पांचें
॥ ९९ ॥ मग वाचा आणि कर । चरण आणि अधो-
। पायू हे प्रकार । पांच आणिक ॥ १०० ॥ कर्मे-
ं ह्मणिपती । तियें ईयें जाणिती । आइकें कैवल्यपती ।
ातसें ॥ १ ॥ पैं प्राणाची [10]अंतौरी । क्रियाशक्ति जे
ीं । तियेचि रिगिनिगी[11] द्वारीं । पांचें इहीं ॥ २ ॥ एवं
ाही करणें । सांगीतलीं देव ह्मणे । [एकं च] परिस
तां फुडेपणें[12] । मन तें ऐसें ॥ ३ ॥ जें इंद्रियां आणि
ी । माझारिलिये संधी । रजोगुणाच्या खांदीं । [13]तरेळत
ो ॥ ४ ॥ नीळिमा अंबरीं । कां मृगतृष्णा लहरी । तैसा
ांचि फेरारीं । [18]वांवो जाहाला ॥ ५ ॥ आणि शुक्रशोणि-
वा सांधा । मिळतां पांचांचा बांधा[17] । वायुतत्त्व दशधा ।
ंचि जाहालें ॥ ६ ॥ मग तिहीं दाहीं भागीं । देहधर्माच्या
ांगीं[19] । अधिष्ठिलें आंगीं । आपुलाल्या ॥ ७ ॥ तेथ चांचल्य
ळ । एकलें ठेलें निढळ[20] । ह्मणोनि रजाचें बळ । धरिलें
॥ ८ ॥ तें बुद्धिसी बाहेरी । अहंकाराच्या उरावरी ।
ठायीं माझारीं । बळियावलें ॥ ९ ॥ वायां मन हें नांव ।
हवीं कल्पनाचि सावेव । जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु
११० ॥ जें प्रकृतीस मूळ । कामा जयाचें बळ । जें अखंड
ये सेळ[23] । अहंकारासी ॥ ११ ॥ जें इच्छेतें वाढवी ।
शेतें चढवी । जें पाठी पुरवी । भयासि गा ॥ १२ ॥
जेथ उठी । अविद्या जेणें लौठी । जें इंद्रियांतें लोटी ।
यांमाजी ॥ १३ ॥ संकल्पें सृष्टी घडी । सर्वेचि विक-
नि मोडी । मनोरथांच्या [24]उतरडी । उतरी रची ॥ १४ ॥
भुलीचें कुहरें[25] । वायुतत्त्वाचें अंतर । बुद्धीचें द्वार । झांक-
ें जेणें ॥ १५ ॥ तें गा किरीटी मन । या बोला नाहीं
आन । आतां विषयाभिधा-[1] । भेद आइकें ॥ १६ ॥ [पंच
च] तरि स्पर्श आणि शब्द । रूप रस गंध । हा विषय पंच-
विध । ज्ञानेंद्रियांचा ॥ १७ ॥ इहीं पांचै द्वारीं । ज्ञानासि
धांव बाहेरी । जैसा कां हिरविया चारीं । मांबावे पशु
॥ १८ ॥ ['चकारार्थः'] मग स्वर वर्ण विसर्ग । अथवा
स्वीकार त्याग । चंक्रमण[3] उत्सर्ग[4] । विण्मूत्राचा ॥ १९ ॥ हे
कर्मेंद्रियांचे पांच । विषय गा साच । जे बांधोनियां माचें ।
क्रिया धांवे ॥ १२० ॥ [इंद्रियगोचराः] ऐसे हे दाही ।
विषय गा इये देहीं । आतां इच्छा तेही । सांगिजैल ॥ २१ ॥
[इच्छा] तरि भूतलें[6] आठवे । कां बोलें न झांकवे । ऐसि-
यावरी चेतवे । जे गा वृत्ती ॥ २२ ॥ इंद्रियविषयांचिया
भेटी । सरसीच जे गा उठी । कामाची बांहुटी । धरूनियां ॥
॥ २३ ॥ जियेचेनि उठिलेपणें । मना सैंघ धांवणें । न
रिघावें तेथ करणें । तोंडें [10]सुती ॥ २४ ॥ जिये वृत्तीचिया
आवडी । बुद्धी होय वेडी । विषयां जिया गोडी । ते गा
इच्छा ॥ २५ ॥ [द्वेषः] आणि इच्छिलिया [11]सांगडें । इंद्रियां
[12]आमिष न जोडे । ऐसा जो डाव पडे । तोचि द्वेष ॥ २६ ॥
[सुखं] आतां यावरी सुख । तें एवंविध देख । जेणें एकेंचि
अशेषें[13] । विसरे जीव ॥ २७ ॥ मना वाचे काये । जे आपली
आण वाये । देहस्मृतीची [14]त्रांये । मोडित ये जें ॥ २८ ॥
जयाचेनि जालेपणें । पांगुळा होइजे प्राणें । सात्विकासी
दुणें । वरीही लाभ ॥ २९ ॥ कां आघवियाची इंद्रियवृत्ती ।
हृदयाचिया एकांतीं । थापटूनि सुषुप्ति[15] । आणी जें गा
॥ १३० ॥ किंबहुना सोयें[16] । जीवें[17] आत्मयाची लाहे । तेथ
जें होय । तया नाम सुख ॥ ३१ ॥ [दुःखं] आणि ऐसी
हे अवस्था । न जोडतां पार्था । जे कीजे तेंचि सर्वथा ।
दुःख जाण ॥ ३२ ॥ तें मनोरथसंगें न होये । येरवीं सिद्धि
गेलेंचि आहे । हे [18]दोनीचि उपाये । सुखदुःखासी ॥ ३३ ॥
[चेतना] आतां असंगा साक्षिभूता । देहीं चैतन्याची जे
सत्ता । तिये नाम पांडुसुता । चेतना येथ ॥ ३४ ॥ जे
[19]नखौनि केशवरी । उभी जागे शरीरीं । जे तिहीं[20] अवस्थां-
तरीं । पालटेना ॥ ३५ ॥ मनबुद्ध्यादि आघवीं । जियेचेनि
टवटवी । प्रकृति[21]वनमाधवी । सदांचि जे ॥ ३६ ॥ जडाजडीं
अंशीं । राहाटे जे सरिसि । ते चेतना गा तुजसी । [illegible]

१ उजाडल्यावर. २ प्राणिमात्रांचे व्यापार. ३ बीजाच्या
ारांत. ४ थांबून राहतो. ५ इंद्रियें. ६ विचार, वाटाघाट.
ुखानें. ८ उपस्थ. ९ हीं श्रवणादि. १० स्त्री. ११ गमनागमन.
गुलासेवार. १३ खेळत असतें. १४ व्यर्थ. १५ भास.
स्थान. १७ वीर्य आणि रक्त यांचा. १८ ऐक्य.
बळानें. २० केवळ. २१ घालतें, करतें. २२ पाठबळ.
दांगी. २४ उतरंडी. २५ कोठार.

१ विषय असें ज्यास नांव आहे त्याचें. २ हिरव्या,
ओल्या. ३ चालणें. ४ त्याग. ५ मार्ग, जिना. ६ [illegible].
७ बाहु, हात. ८ जिकडे तिकडे, पुष्कळ. ९ इंद्रियें. १० घात-
तात. ११ बरोबर. १२ विषयभोग, इच्छित. १३ [illegible].
१४ ठिकाण, थारा. १५ निद्रा. १६ मार्ग. १७ [illegible].
१८ मनोरथसंग आणि मनोरथत्याग, हे दोन उपाय.
१९ नखांपासून. २० जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिहींत.
२१ मायारूप वनाला वसंत.

केंसांची लागवड कोणीं केली ? समुद्र कोणीं भरला ? पर्जन्याच्या धारा कोण करतो ? ५६ त्याचप्रमाणें हें देहरूपी क्षेत्र मूळचें कोणाचेंच नव्हे. जो लागवड करील, त्याला तें मिळतें; न करील त्याला मिळत नाहीं. ' ५७ तेव्हां दुसरे कितीएक रागारागानें निक्षून ह्मणूं लागले कीं ' तर त्याचा एकटा काळच कसा उपभोग घेतो ? ५८ ह्या काळाचा अनिवार तडाका पहात असूनही, अभिमानी लोक आपल्या मताचा अभिमान धरतातच. ५९ ही मृत्यूची खाय आहे; सिंहाची गुहा आहे; असें असतांही बडबड करतात, त्यांस काय करावें ? ६० जो महाकल्पापेक्षांही मोठी अशी अकस्मात् मिठी घालून सत्यलोकरूप हत्ती धरतो; ६१ जो नित्य नवे होणारे इंद्र व दिग्गजांचे कळप ह्यांचा स्वर्गारण्यांत शिरून फडशा पाडतो; ६२ इतर जीवरूप श्वापदें तर त्याच्या आंगाच्या वाऱ्यानेंच निर्जीव होऊन जन्ममृत्यूंच्या खड्ड्यांत गोते खात बसतात. ६३ अहो ! ह्यानें मध्यें ह्या सर्व आकाररूपी गज धरलेला पंजा केवढा पसरला आहे पहा ! ६४ ह्मणून सर्वांवर काळाची सत्ता आहे हीच गोष्ट खरी'. **अर्जुना !** ह्या क्षेत्राच्या पायांत असे अनेक वाद लागून राहिलेले आहेत. ६५ कवितांमध्यें अनुष्टुप् आदिकरून नानाप्रकारचे छंद अद्यापपर्यंत गर्वानें ग्रंथाचा आश्रय करतातच आहेत. ६७ वेदांचें **बृहत्साम** नांवाचें जें सूत्र, तें दिसण्यामध्यें पवित्र आहे, तथापि त्याला सुद्धां हें क्षेत्र समजत नाहीं. ६८ अशाच प्रकारें दुसऱ्याही कित्येक कल्पक महान् महान् कवींनीं ह्या कामांत बुद्धिसर्वस्व खर्च केलें आहे. ६९ पण हें देहरूप क्षेत्र असें येवढें आहे, किंवा हें निश्चयेंकरून अमक्याचेंच आहे; हा निश्चय कोणाच्यानेंच झालेला नाहीं. ७० तर आतां हें क्षेत्र जसें व ज्या प्रकारचें आहे, तसें व त्या प्रकारें तुला साद्यंत सांगूं. " ७१

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।
इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ ५ ॥
इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ।
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

तरि महाभूतपंचक । आणि अहंकार एक । बुद्धि अव्यक्त दशक । इंद्रियांचा ॥ ७२ ॥ मन आणीकही एक । विषयांचा दशक । द्वेष सुख दुःख । संघात इच्छा ॥ ७३ ॥ आणि चेतना धृति । एवं क्षेत्रव्यक्ती । सांगीतली तुजप्रती । आघवीचि ॥ ७४ ॥ आतां महाभूतें कवणें । कवण विषय कैसीं करणें । हें वेगळालेपणें । एकैक सांगों ॥ ७५ ॥ [ महाभूतानि ] तरी पृथ्वी आप तेज । वायु व्योम इयें तुज । सांगितलीं बुझें[1] । महाभूतें ॥ ७६ ॥ [ अहंकारः ] आणि जागतिये दशे । स्वप्न लपालें असे । ना तरी अंवसे । चंद्र गूढ ॥ ७७ ॥ नाना अप्रौढबाळकीं । तारुण्य राहे [2]थोकीं । कां न फुलतां कळिकीं । आमोद जैसा ॥७८॥ किंबहुना काष्ठीं । वन्हि जेविं किरीटी । तेविं प्रकृतीचिया पोटीं । गोप्य जो असे ॥ ७९ ॥ जैसा ज्वर धातुगत । अपथ्याचें मिष पाहत । मग जालिया आंत । बाहेरी व्यापी ॥ ८० ॥ तैसी पांचांही गांठी पडे । जैं देहाकार उघडे । तैं नाचवी चहूंकडे । तो अहंकार गा ॥ ८१ ॥ नवल अहंकाराची गोठी । विशेषें न लगे अज्ञानापाठीं । सज्ञानाचे झोंबे कंटीं । नाना संकटीं नाचवी ॥ ८२ ॥ [ बुद्धिः ] आतां बुद्धि जे ह्मणिजे । ते ऐशिया चिन्हीं जाणिजे । बोलिलें यदुराजें । आइकें सांगों ॥ ८३ ॥ तरि कंदर्[3]पाचेनि बळें । इंद्रियवृत्तीचेनि [4]मेळे । विभांडूनि[5] येती पाळे[6] । विषयांचे ॥ ८४ ॥ तो सुखदुःखाचा [7]नागोवा । जेथ [8]उगाणों लागे जीवा । तेथ दोहींसी बरवा । पाडु जे धरी ॥ ८५ ॥ हें सुख हें दुःख । हें पुण्य हे दोष । हें मैळ हें चोख । ऐसें निवडिजे ॥ ८६ ॥ जिये अधमोत्तम सुझे[9] । जिये साने थोर [10]बुझे । जियां[11] दिठी पारखिजे । विषो जीवें ॥ ८७ ॥ जे तेजें[12]तत्त्वांची [13]आदी । जे सत्वगुणाची वृद्धी । जे आत्मया जीवांचीं संधी । वसवीत असे ॥ ८८ ॥ अर्जुना ते गा जाण । बुद्धि तूं संपूर्ण । आतां आईक वोळखण । अव्यक्ताचें ॥ ८९ ॥ [ अव्यक्तमेव चं ] पैं सांख्याचिया सिद्धांतीं । प्रकृती जे महामती । तेचि एथें प्रस्तुतीं । अव्यक्त गा ॥ ९० ॥ आणि सांख्ययोगमतें । प्रकृती परिसविली तुतें । ऐसी दोहीं परी जेथें । विवंचिली[14] ॥ ९१ ॥ तेथ दुजी जे जीवदशा । तिये नांव वीरेशा । अव्यक्त एथ ऐसा । पर्याय हा ॥ ९२ ॥ तरि

१ समजून. २ गुप्त. ३ कामाच्या. ४ समागमानें. ५ मोडून. ६ समुदाय. ७ लूट, नागवण. ८ अनुभवूं लागतो. ९ समजतो. १० कळतो. ११ ज्या दृष्टीनें. १२ ज्ञानेंद्रियांची. १३ मूळ. १४ विस्तारानें सांगितली.

ाहालया रजनी । तारा लोपती गगनीं । कां हारपे अस्तमानीं । भूतक्रिया [२] ॥ ९३ ॥ ना तरी देह गेलिया पाठीं । देहादिक किरीटी । उपाधि लपे पोटीं । कृतकर्माच्या ॥ ९४ ॥ कां बीजमुद्रे[३]आंतु । [४]थोके तरू समस्तु । कां वस्त्रपण तंतु । दशे ाहे ॥ ९५ ॥ तैसें सांडूनियां स्थूळधर्म । महाभूतें भूतग्राम । ल्या जाती सूक्ष्म । होऊनि जेथ ॥ ९६ ॥ अर्जुना तया ांवें । अव्यक्त हें जाणावें । आतां आईक आघवे । इंद्रियभेद ॥९७॥ [ इंद्रियाणि दश ] तरि श्रवण नयन । त्वचा घ्राण सन । इयें जाण ज्ञान-। [५]करणें पांचै ॥ ९८ ॥ इये तत्त्वमेळापंकीं । सुखदुःखाची उखिविखी[६] । बुद्धि करिते मुखीं । पांचें हीं ॥ ९९ ॥ मग वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार । पार्यू हे प्रकार । पांच आणिक ॥ १०० ॥ कर्मेंद्रियें ह्मणिपती । तियें ईयें जाणिती । आइकें कैवल्यपती । ांगतसें ॥ १ ॥ पैं प्राणाची [१०]अंतौरी । क्रियाशक्ति जे ारीरीं । तियेचि रिगिनिगी[११] द्वारीं । पांचें इहीं ॥ २ ॥ एवं हाहाही करणें । सांगीतलीं देव ह्मणे । [ एकं च ] परिस आतां फुडेपणें[१२] । मन तें ऐसें ॥ ३ ॥ जें इंद्रियां आणि बुद्धी । माझारिलिये संधी । रजोगुणाच्या खांदीं । [१३]तरळत असे ॥ ४ ॥ नीळिमा अंबरीं । कां मृगतृष्णा लहरी । तैसा ायांचि [१५]फेरारीं । [१६]वांवो जाहाला ॥ ५ ॥ आणि शुक्रशोणिांचा सांधा । मिळतां पांचांचा बांधा[१७] । वायुतत्त्व दशधा । एकचि जाहालें ॥ ६ ॥ मग तिहीं दाहींभागीं । देहधर्माच्या [१९]बेवंगीं । अधिष्ठिलें आंगीं । आपुलाल्या ॥ ७ ॥ तेथ चांचल्य नेखळ । एकलें ठेलें नि[२०]ढांळ । ह्मणोनि रजाचें बळ । धरिलें तेणें ॥ ८ ॥ तें बुद्धिसी बाहेरी । अहंकाराच्या उरावरी । ऐसे ठायीं माझारीं । बळियावलें ॥ ९ ॥ वायां मन हें नांव । येऱ्हवीं कल्पनाचि सावेव । जयाचेनि संगें जीव-। दशा वस्तु ॥ ११० ॥ जें प्रकृतीस मूळ । कामा जयाचें बळ । जें अखंड [२२]सुये [२३]सैळ । अहंकारासी ॥ ११ ॥ जें इच्छेतें वाढवी । आशेतें चढवी । जें पाठी पुरवी । भयासि गा ॥ १२ ॥ द्वैत जेथ उठी । अविद्या जेणें [२३]लौठी । जें इंद्रियांतें लोटी । विषयांमाजी ॥ १३ ॥ संकल्पें सृष्टी घडी । सवेंचि विकल्पूनि मोडी । मनोरथांच्या [२४]उतरडी । उतरी रची ॥ १४ ॥ जें भुलीचें कुहरें[२५] । वायुतत्त्वाचें अंतर । बुद्धीचें द्वार । झांकवेलें जेणें ॥ १५ ॥ तें गा किरीटी मन । या बोला नाहीं आन । आतां विषयाभि[१]धा-। भेद आइकें ॥ १६ ॥ [ पंच च ] तरि स्पर्श आणि शब्द । रूप रस गंध । हा विषय पंचविध । ज्ञानेंद्रियांचा ॥ १७ ॥ इहीं पांचै द्वारीं । ज्ञानासि धांव बाहेरी । जैसा कां हिरवि[२]या चारीं । मांबावे पशु ॥ १८ ॥ [ 'चकारार्थः' ] मग स्वर वर्ण विसर्ग । अथवा स्वीकार त्याग । चं[३]क्रमण [४]उत्सर्ग । विण्मूत्राचा ॥ १९ ॥ हे कर्मेंद्रियांचे पांच । विषय गा साच । जे बांधोनियां मा[५]चे । क्रिया धांवे ॥ १२० ॥ [ इंद्रियगोचराः ] ऐसे हे दाही । विषय गा इये देहीं । आतां इच्छा तेही । सांगिजैल ॥ २१ ॥ [ इच्छा ] तरि [६]भूतलें आठवे । कां बोलें न झांकवे । ऐसियावरी चेतवे । जे गा वृत्ती ॥ २२ ॥ इंद्रियविषयांचिया भेटी । सरसीच जे गा उठी । कामाची [७]बाहुटी । धरूनियां ॥ ॥ २३ ॥ जियेचेनि उठिलेपणें । मना [८]सैंघ धांवणें । न रिघावें तेथ [९]केरणें । तोंडें [१०]सुती ॥ २४ ॥ जिये वृत्तीचिया आवडी । बुद्धी होय वेडी । विषयां जिया गोडी । ते गा इच्छा ॥ २५ ॥ [ द्वेषः ] आणि इच्छिलिया [११]सांगडें । इंद्रियां [१२]आमिष न जोडे । ऐसा जो डाव पडे । तोचि द्वेष ॥ २६ ॥ [ सुखं ] आतां यावरी सुख । तें एवंविध देख । जेणें एकेंचि अशेष[१३] । विसरे जीव ॥ २७ ॥ मना वाचे काये । जे आपली आण वाये । देहस्मृतीची [१४]त्राये । मोडित ये जें ॥ २८ ॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळा होइजे प्राणें । सात्विकासी दुणें । वरीही लाभ ॥ २९ ॥ कां आघवियाची इंद्रियवृत्ती । हृदयाचिया एकांतीं । थापटूनि [१५]सुषुप्ति । आणी जें गा ॥ १३० ॥ किंबहुना सोयं[१६] । जीवं[१७] आत्मयाची लाहे । तेथ जें होय । तया नाम सुख ॥ ३१ ॥ [ दुःखं ] आणि ऐसी हे अवस्था । न जोडतां पार्था । जे कीजे तेंचि सर्वथा । दुःख जाण ॥ ३२ ॥ तें मनोरथसंगें न होये । येरवीं सिद्धि गेलेंचि आहे । हे दोनीचि[१८] उपाये । सुखदुःखासी ॥ ३३ ॥ [ चेतना ] आतां असंगा साक्षिभूता । देहीं चैतन्याची जे सत्ता । तिये नाम पांडुसुता । चेतना येथ ॥ ३४ ॥ जे [१९]नखौनि केशवरी । उभी जागे शरीरीं । जे तिहीं[२०] अवस्थांतरीं । पालटेना ॥ ३५ ॥ मनबुद्ध्यादि आघवीं । जियेचेनि टवटवी । प्रकृतिवन[२१]माधवी । सदांचि जे ॥ ३६ ॥ जडाजडीं अंशीं । राहाटे जे सरिसि । ते चेतना गा तुजसीं । लटिकें

१ उजाडल्यावर. २ प्राणिमात्रांचे व्यापार. ३ बीजाच्या आकारांत. ४ थांबून राहतो. ५ इंद्रियें. ६ विचार, वाटाघाट. ७ मुखानें. ८ उपस्थ. ९ हीं श्रवणादि. १० स्त्री. ११ गमनागमन. १२ खुलासेवार. १३ खेळत असतें. १४ व्यर्थ. १५ भास. १६ स्थान. १७ वीर्य आणि रक्त ह्यांचा. १८ ऐक्य. १९ बळानें. २० केवळ. २१ घालतें, करतें. २२ पाठबळ. २३ दांडगी. २४ उतरंडी. २५ कोठार.

१ विषय असें ज्यास नांव आहे त्याचे. २ हिरव्या, ओल्या. ३ चालणें. ४ त्याग. ५ मार्ग, जिना. ६ मागलें. ७ बाहु, हात. ८ जिकडे तिकडे, पुष्कळ. ९ इंद्रियें. १० घालतात. ११ बरोबर. १२ विषयभोग, ईप्सित. १३ संपूर्ण. १४ ठिकाण, थारा. १५ निद्रा. १६ मार्ग. १७ जीवाला. १८ मनोरथसंग आणि मनोरथत्याग, हे दोन उपाय. १९ नखांपासून. २० जागृति, स्वप्न व सुषुप्ति ह्या तिहींत. २१ मायारूप वनाला वसंत.

नाहीं ॥ ३७ ॥ पैं रावो परिवार नेणे । आज्ञाचि परचक्र जिणे । कां चंद्राचेनि पूर्णपणें । सिंधु भरती ॥ ३८ ॥ नाना भ्रामकाचें सन्निधान । लोहो करि सचेतन । कां सूर्यसंग जन । चेष्टवी गा ॥ ३९ ॥ अगा मुखमेळेंविण । पिलियाचें पोषण । करी निरीक्षण । कूर्मी जेवीं ॥ १४० ॥ पार्था तयापरी । आत्मसंगती इये शरीरीं । सजीवत्वाचा करी । उपयोग जडा ॥ ४१ ॥ मग तियेतें चेतना । म्हणिपे पैं अर्जुना । आतां धृतीविवंचना । भेद आइकें ॥ ४२ ॥ [धृतिः] तरि तत्त्वां परस्परें । उघड जाती स्वभाववैरें । नोहे पृथ्वीतें नीरें । न नाशिजे ॥ ४३ ॥ नीरातें आटी तेज । तेजा वायूसि झुंज । आणि गगन तें सहज । वायूसि भक्षी ॥४४॥ तेवींचि कोणेहि वेळे । आपण कायसयाही न मिळे । आंत रिघोनि वेगळें । आकाश हें ॥ ४५ ॥ ऐसीं हीं पांचही भूतें । न साहती एकमेकांतें । कीं तियेंही ऐक्यातें । देहा येती ॥ ४६ ॥ द्वंद्वाची उखिविखी । सोडूनि वसती एकीं । एक एकातें पोखी । निजगुणें गा ॥ ४७ ॥ ऐसें न मिळे तयां सांजणें । चळे धैर्यें जेणें । तिये नाम मी म्हणे । धृती पैं गा ॥ ४८ ॥ [संघातः] आणि जीवेंसी पांडवा । या छत्तिसांचा मेळावा । तो हा एथ जाणावा । संघातें पैं गा ॥ ४९ ॥ [एतत्क्षेत्रं समासेन] एवं छत्तीसही भेद । सांगीतले तुज विशद । [प्रथमश्लोकस्थं क्षेत्रमित्यभिधीयते इति पदं व्याचष्टे] यया येतुलेयातें प्रसिद्ध । क्षेत्र म्हणिजे ॥ १५० ॥ रथांगांचा मेळावा । जेविं रथ म्हणिजे पांडवा । कां अधोर्ध्व अवेवां । नाम देह ॥ ५१ ॥ करीतुरंगसमाजें । सेना नाम निपजे । कां वाक्यें म्हणिपती पुंजे । अक्षरांचे ॥ ५२ ॥ कां जळधारांचा मेळा । वाच्य होय ओभाळा । नाना लोकां सकळां । नाम जग ॥ ५३ ॥ कां स्नेहसूत्रवन्ही । मेळ एकिये स्थानीं । धरिजे तो जनीं । दीप होय ॥ ५४ ॥ तैसीं छत्तीसही इयें तत्त्वें । मिळती जेणें एकत्वें । तेणें समूहपरत्वें । क्षेत्र म्हणिजे ॥ ५५ ॥ आणि वाहतेनि भौतिकें । पाप पुण्य एथ पिके । म्हणोनि आह्मी कौतुकें । क्षेत्र म्हणों ॥ ५६ ॥ आणि एकाचेनि मतें । देह म्हणती ययातें । परि असो हें अनंतें । नामें यया ॥ ५७ ॥ पैं परतत्त्वा अरौतें । स्थावराआंतौतें । जें कांहीं होतें जातें । तें क्षेत्रचि हें ॥ ५८ ॥ [सविकारमुदाहृतं] परि सुर नर उरगीं । घडत आहे योनिविभागीं । तें गुणकर्मसंगीं । पडिलें सातें ॥ ५९ ॥ हेचि गुणविवंचना । पुढां म्हणिपेल अर्जुना । प्रस्तुत तुज ज्ञाना । रूप दावूं ॥ १६० ॥ क्षेत्र तंव सविस्तर । सांगितलें सविकार । म्हणोनि आतां उदार । ज्ञान आइकें ॥ ६१ ॥ जया ज्ञानालागीं । गगन गिळिताति योगी । स्वर्गाची आडवंगी । उमरडोनी ॥ ६२ ॥ न धरिती ऋद्धीची भीड । न करिती सिद्धीची चाड । योगा ऐसें दुवाड । हेळसिति ॥ ६३ ॥ तपोदुर्गें वोलांडित । क्रतुकोटि वोवांळित । उलथूनि सांडित । कर्मवल्ली ॥ ६४ ॥ नानाभजनमार्गीं । धांवत उघडिया आंगीं । एक रिघताति सुरंगीं । सुषुम्नेचिये ॥ ६५ ॥ ऐसी जिये ज्ञानी । मुनीश्वरांची उतान्ही । वेदतरूच्या पानोवानीं । हिंडताती ॥ ६६ ॥ देईल गुरुसेवा । इया बुद्धी पांडवा । जन्मशतांचा सांडोवा । टाकित जे ॥ ६७ ॥ जया ज्ञानाची रिगवणी । अविद्ये उणें आणी । जीवा आत्मया बुझावणी । मांडूनि दे ॥ ६८ ॥ जें इंद्रियांचीं द्वारें आडी । प्रवृत्तीचे पाय मोडी । जें दैन्यचि फेडी । मानसाचें ॥ ६९ ॥ द्वैताचा दुकाळ पाये । साम्याचें सुयाण होये । जया ज्ञानाची सोये । ऐसें करी ॥ १७० ॥ मदाचा ठावोचि पुसी । जें महामोहातें ग्रासी । नेदी आपपर ऐसी । भाष उरों ॥ ७१ ॥ जें संसारातें उन्मूळी । संकल्पपंक प्रक्षाळी । अनावरातें वेंटाळी । ज्ञेयातें जें ॥ ७२ ॥ जयाचेनि जालेपणें । पांगुळ होइजे प्राणें । जयाचेनि विंदाणें । जग हें चेष्टे ॥ ७३ ॥ जयाचेनि उजाळें । उघडती बुद्धीचे डोळे । जीव दोंदावरी लोळे । आनंदाचिये ॥ ७४ ॥ ऐसें जें ज्ञान । पवित्रैकनिधान । जेथ विटाळलें मन । चोखें कीजे ॥ ७५ ॥ आत्मया जीवबुद्धी । जे लागली होती क्षयव्याधी । ते जयाचिया सन्निधी । निरुजा कीजे ॥ ७६ ॥ तें अनिरूप्य कीं निरूपिजे । ऐकतां बुद्धी आणिजे । वांचूनि डोळां देखिजे । ऐसें नाहीं ॥ ७७ ॥ मग तेंचि इये शरीरीं । जैं आपुला प्रभावो करी । तैं इंद्रियांचिया व्यापारीं । डोळांहि दिसे ॥ ७८ ॥ पैं वसंताचें रिगवणें । झाडांचेनि सांजेपणें । जाणिजे तेविं करणें । सांगती ज्ञान ॥ ७९ ॥ अगा वृक्षासि पाताळीं । जळ सांपडे मूळीं । ते शाखांचिये बहाळीं । वरीही दिसे ॥ १८० ॥ कां भूमीचें

१ राजा. २ लवाजमा, खटला. ३ जिंकतें, पराभव करतें. ४ अथवा, किंवा. ५ लोहचुंबकाचें. ६ जागृत. ७ स्तनाला तोंड लावल्यावांचून. ८ अवलोकन. ९ धैर्याच्या विचाराचे. १० ऊहापोह, वाटाघाट. ११ मैत्री, सजणपणानें, तयारीनें. १२ समुदाय. १३ अवयवांना. १४ म्हणतात. १५ अभ्राला. १६ सव्यापार. १७ शरीरें. १८ जडतत्त्वाच्या आंत.

१ पडलें असतां. २ पुढें—चवदाव्या अध्यायांत. ३ उत्तम, श्रेष्ठ. ४ आडमार्ग. ५ ओलांडून. ६ आचरतात. ७ तपांचे किल्ले. ८ ओवाळीत. ९ कर्मकांड. १० गुप्तमार्गी. ११ इच्छा. १२ पानोपानांवर. १३ ओवाळणी. १४ शिरकाव. १५ समजूत. १६ अडसर घाली. १७ सुकाळ. १८ आरंभ. १९ उपटून टाकी. २० परब्रह्माला. २१ कळसूत्रानें. २२ प्रकाशानें. २३ शुद्ध. २४ निरोगी. २५ प्रकाश. २६ शिरणें. २७ टवटवीतपणानें. २८ इंद्रियें. २९ विस्तारांत, शेंड्यावर.

ार्दव । सांगे कोंभाची लवलव । नाना आचार गौरव । ुकुलीनाचें ॥ ८१ ॥ अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेह ासा ये व्यक्ती । कां दर्शनाचिये प्रशस्तीं । पुण्यपुरुष ॥८२॥ ा तरी केळीं कापूर जाहला । जेविं परिमळें जाणों आला । ां भिंगारीं दीप ठेविला । बाहेरि फांके ॥ ८३ ॥ तैसें ुदयींचेनि ज्ञानें । जिये देहीं उमटती चिन्हें । तियें सांगों ातां अवधानें । चांगें आइक ॥ ८४ ॥

"तर पंचमहाभूतें आणि एक अहंकार; ुद्धि, अव्यक्त ( माया ) दशेंद्रियें, ७२ आ-ाखी मन एक, दहा विषय, द्वेष, सुख, दुःख ाणि इच्छासमुदाय. ७३ चेतना आणि धृति. ातके ह्या क्षेत्राचे अवयव आहेत. ते तुला सारे ांगितले. ७४ आतां महाभूतें कोण? विषय ोणते? इंद्रियें कसलीं? हीं निरनिराळीं सांगूं. ७५ तर पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश ीं पंचमहाभूतें तुला समजून सांगितलीं. ७६ ाणखी जागृतावस्थेमध्यें स्वप्न जसें लुप्त अ-ातें; किंवा अमावास्येला चंद्र जसा अदृश्य ासतो; ७७ किंवा लहान मुलांमध्यें तारुण्य ासें गुप्त असतें; किंवा कळी उमललेली नाहीं ोंपर्यंत सुगंध जसा मुग्ध असतो; ७८ किंवा ार्जुना! लांकडामध्यें अग्नि जसा गुप्त असतो; ाप्रमाणें प्रकृतीच्या पोटामध्यें जो गुप्तरूपानें ाहतो, ७९ धातुगत ज्वर ज्याप्रमाणें अप-ायाचें निमित्त पहात असतो, आणि तें सांप-लें कीं, तो जसा आंतून आणि बाहेरून व्या-ान सोडतो, ८० त्याप्रमाणें पंचमहाभूतांची ांठ पडून देहाचा आकार निर्माण झाला, कीं ाहूंकडे जो नाचूं लागतो, तो अहंकार होय. ८१ ह्या अहंकाराची गोष्ट मोठी चमत्कारिक ाहे. तो विशेषेंकरून अज्ञानाच्या पाठीस ला-ात नाहीं, पण सज्ञानाचें नरडें धरतो; आणि ाना संकटांमध्यें नाचवितो." ८२ यदुराज (श्रीकृष्ण) ह्मणाले "आतां बुद्धि ह्मणून जिला ाणतात, ती अशा लक्षणांनीं ओळखावी. सांगतों ऐक. ८३ तर कामाच्या बळानें इंद्रियप्रवृत्तीवरो-र विषयांच्या समुदायांचा पराभव करून ८४ त्या सुखदुःखाची जिवास जेथें झडती द्यावी ला-गते, तेथें जी दोहोंची योग्यता नीट ओळखते, ८५ हें सुख आणि दुःख; हें पुण्य आणि हें पाप; हें शुद्ध आणि हें अशुद्ध; ह्याची जी नि-वाडा करते; ८६ जिच्या योगानें उच्च आणि नीच हें समजतें; जिच्या योगानें हें लहान आणि हें थोर असें कळतें; जिच्या दृष्टीनें जि-वांना विषय ओळखतां येतात; ८७ जी ज्ञानें-द्रियांचें मूळ; जी सत्त्वगुणांची रास; आत्म्याची आणि जिवाची ऐक्यता करून देणारी; ८८ अर्जुना! ती सर्व बुद्धि आहे असें समज. आतां अव्यक्ताचें लक्षण ऐक. ८९ तसेंच हे बुद्धि-मंता! सांख्यमतांच्या सिद्धांतामध्यें प्रकृति असें जें ह्मटलें आहे, तेंच ह्या ठिकाणीं अव्यक्त स-मज. ९० आणखी सांख्यमतामध्यें व योगमता-मध्यें प्रकृतीचें विवेचन करून ती दोन प्रका-रची आहे ह्मणून विस्तारानें सांगितलेंच आहे. ९१ हे वीरश्रेष्ठा! त्यांतील दुसरी जी जीव-दशा तिलाच अव्यक्त हें नांव आहे. इतकाच येथें पर्याय. ९२ तर रात्र उजाडली ह्मणजे आ-काशामध्यें नक्षत्रें लोपून जातात, किंवा अस्त-मान झाला ह्मणजे प्राणिमात्रांचे व्यापार थांब-तात, ९३ किंवा अर्जुना! देह गेल्यानंतर पाठीमागें कृतकर्माच्या पोटांत देहाची उपाधि नाहींशी होते, ९४ किंवा बीजाच्या आका-रांत सारें झाड थांबून रहातें, किंवा तंतुदशे-मध्यें वस्त्रपण राहिलेलें असतें, ९५ त्याप्रमाणें महाभूतें स्थूलधर्म टाकून देऊन, प्राण्यांना सोडून, सूक्ष्मरूप होऊन जेथें लयास जातात, ९६ अर्जुना! त्याला अव्यक्त असें नांव आहे. आतां इंद्रियांचे सारे भेद ऐक. ९७ तर कान, डोळे, त्वचा, नाक आणि जिव्हा हीं पांच ज्ञानें-द्रियें आहेत. हें ध्यानांत ठेव. ९८ त्या त-त्त्वांच्या समुदायरूप खिळलांत, ह्या पांच मु-खांनीं बुद्धी ही सुखदुःखाचा विचार करते. ९९ मग वाचा आणि हात; पाय; गुद; आणि उपस्थ हे आणखी जे पांच प्रकार, १०० त्यांना कर्मेंद्रियें असें ह्मणतात. तीं हीं समजावीं."

१ कोमलता. २ समारंभाचा. ३ प्रशस्तपणानें. ४ ता-रुण्यामध्यें.

ह्याप्रमाणें **भगवान्** सांगूं लागले. "ऐक. १०१ तसेंच, शरीरांत असणारी प्राणाची पत्नी जी क्रियाशक्ति तिचीं येण्याजाण्याचीं हीं पांच द्वारें आहेत." १०२ देव ह्मणतात "ह्याप्रमाणें दहाही इंद्रियें तुला सांगितलीं. आतां मन तें निश्चयेंकरून अशा प्रकारचें असतें. ऐक. १०३ तें, इंद्रियें आणि बुद्धि ह्यांच्या मधल्या सांध्यावर व रजोगुणाच्या खांद्यावर खेळत असतें. १०४ आकाशामध्यें ज्याप्रमाणें निळेपणा असावा, किंवा मृगजळाच्या जशा लाटा असाव्यात, त्याप्रमाणें व्यर्थ आभासाला स्थान मात्र झालें आहे. १०५ आणखी शुक्रशोणितांचा सांधा मिळून पंचमहाभूतांचा मिलाफ झाला, ह्मणजे एकच असणाऱ्या वायूतत्त्वाचे दहा प्रकार होतात. १०६ त्यानंतर ते दहा भाग देहधर्माच्या बळानें आपआपल्या ठिकाणीं होतात. १०७ तेथें फक्त एक चांचल्य मात्र निराश्रित राहिलेलें असतें. ह्मणून तें रजाचा आश्रय धरतें. १०८ तें बुद्धीच्या पलीकडे, आणि अहंकाराच्या छातीवर जागा पाहून त्यांत बळावतें. १०९ मन हें नांव व्यर्थ. बाकी विचार केला तर ती मूर्तिमंत कल्पनाच असते. त्याच्याच संगतीनें जीवदशेला अस्तित्व येतें. ११० प्रकृतीला जें मूळ आहे; कामाला ज्याचा आश्रय आहे; आणि अहंकाराला जें नेहेमीं पाठबळ देतें. १११ जें इच्छेला वाढवितें; आशेला चढवितें; आणि भयाचा पाठपुरावा करतें. ११२ ज्याच्या योगेंकरून द्वैताची उठावणी होते; अज्ञान माजतें; आणि इंद्रियांना जें विषयांमध्यें लोटतें; ११३ कल्पनेनें सृष्टि निर्माण करतें; व विकल्प उत्पन्न झाला कीं, लागलेंच ती मोडून टाकतें. मनोरथाच्या उतरंडी चढवितें, आणि उतरतें. ११४ जें भुलीचें कोठार; वायुतत्त्वाचें हृदय; ज्याच्या योगानें बुद्धीचें द्वार झांकलें जातें. ११५ **अर्जुना!** असें जें तें मन. ह्या बोलण्यामध्यें भेद नाहीं. आतां विषय ह्मणून ज्यांना नांव आहे, त्यांचे भेद ऐक. ११६ तर स्पर्श, शब्द, रूप, रस, गंध हे पांच प्रकारचे विषय ज्ञानेंद्रियांचे आहेत. ११७ हिरवा चारा पाहिला ह्मणजे जनावर जसें भांबावून जातें, त्याप्रमाणें ह्या पांच द्वारांनीं ज्ञानाची धांव बाहेर असते. ११८ तसेंच स्वरवर्ण, विसर्ग (बोलणें) अथवा स्वीकार करणें, त्याग करणें, चालणें, मलमूत्र विसर्जन करणें, ११९ हे पांच विषय खरोखर कर्मेंद्रियांचे आहेत. त्यांची सडक बांधून क्रिया धांवत असते. १२० ह्याप्रमाणें ह्या देहामध्यें हे दहा विषय आहेत. आतां इच्छा सांगावयाची, तीही सांगतों. १२१ तर मागें झालेल्याची आठवण, किंवा बोललेलें न विसरणें, अशा रीतीनें जागृत होणारी जी वृत्ति, १२२ इंद्रियांची आणि विषयांची गांठ पडली कीं, लगेच जी वासनेचा हात धरून उठते. १२३ आणखी जिच्या उठण्यानें मनाला जिकडे तिकडे धांवावें लागतें. आणि जेथें शिरूं नये तेथें इंद्रियें तोंडें घालतात; १२४ ज्या वृत्तीच्या आवडीनें बुद्धी वेडी होऊन जाते. आणि जिला विषयांत गोडी लागते, ती इच्छा. १२५ आणखी इच्छा झाल्याबरोबर इंद्रियांना विषयोपभोग न मिळण्याचा प्रसंग, तोच द्वेष. १२६ आतां ह्यापुढें सुख तें असें आहे. पहा. कीं ज्या एकाची प्राप्ती झाली ह्मणजे जीव सर्व कांहीं विसरून जातो. १२७ मनाला, वाणीला आणि देहाला जें शपत घालून देहस्मृतीचें ठिकाण मोडून टाकतें. १२८ जें उत्पन्न झाल्याच्या योगानें प्राण लंगडा पडतो; आणि सात्विक वृत्तीला दुप्पट लाभ होतो. १२९ किंवा साऱ्या इंद्रियप्रवृत्तींना हृदयांत एकांतामध्यें थोपटून निजवितें. १३० किंबहुना जिवाला आत्म्याचा मार्ग सांपडून तेथें जें मिळतें, त्याचें नांव सुख. १३१ आणखी **अर्जुना!** अशा प्रकारची अवस्था प्राप्त झाली नाहीं, ह्मणजे जी स्थिति तिचें नांव दुःख. १३२ तें मनोरथाच्या संगतीनें मात्र होत नाहीं. बाकी तें स्वयंसिद्धच आहे. ह्मणून सुखाला आणि दुःखाला मनोरथसंग व त्याग हे दोनच मार्ग आहेत. १३३ आतां **अर्जुना!** देहामध्यें सं-

गरहित–केवळ साक्षीभूत अशी जी चैतन्याची सत्ता, तिला चेतना असें नांव आहे. १३४ जें शरीरामध्यें नखापासून तों शिखेपर्यंत एकसारखें जागृत असतें, आणि जागृती, स्वप्न व सुषुप्ती ह्या तिन्ही अवस्थांमध्यें ज्यांत बदल होत नाहीं. १३५ मन, बुद्धि आदिकरून सर्व जिच्या योगानें टवटवीत रहातात; जी सदासर्वदां मायारूप वनास वसंताप्रमाणें होते; १३६ जी जड किंवा अजड ह्यांच्या अंशामध्यें सारखे व्यापार करते, तिचें नांव चेतना. तुझ्या पाशीं प्रतारणा नाहीं. १३७ तसेंच राजाला सैन्य माहित नसतें; तरी त्याच्या आज्ञेनें परचक्राचा पराभव होतो; किंवा चंद्राच्या पूर्णत्वानें समुद्रास भरती येते; १३८ किंवा लोहचुंबकाचें सान्निध्य लोखंडाला सचेतन करून सोडितें; किंवा सूर्याची संगति जगाला व्यापार करावयास लावते; १३९ अरे! तोंड लावून घेतल्याशिवायच कासवी ज्याप्रमाणें आपल्या दृष्टीनेंच पिलांचें रक्षण करते; १४० अर्जुना! त्याप्रमाणें शरीरामध्यें आत्मसंगती आहे ती, जडाला सजीवत्वाचा उपभोग करविते. १४१ ह्मणून अर्जुना! तिला चेतना असें ह्मणतात. आतां धैर्याच्या विचाराचे भेद ऐक. १४२ तर पंचतत्त्वांमध्यें परस्पर उघड जातिस्वभावानेंच वैर आहे. पृथ्वीला पाणी नाशित नाहीं असें नाहीं. १४३ पाण्याला तेज अटवून सोडतें; तेजाचा आणि वायूचा झगडा असतो. आणि गगन तर सहज वायूला भक्षण करून सोडतें. १४४ त्याचप्रमाणें हें आकाश, कोणत्याही वेळेला आपण कशालाही मिळत नाहीं. प्रत्येकांत शिरून आपण वेगळेंच असतें. १४५ अशा प्रकारें हीं पंचमहाभूतेंही एकमेकांला पाण्यांत पहातात. पण त्यांनाही देहांत एकत्र रहावें लागतें. १४६ तीं तेथें द्वंद्वाचा वादविवाद सोडून एकोप्यानें रहातात, आणि आपआपल्या गुणांनीं एकमेकांचें पोषण करतात. १४७ अशी त्यांना न प्राप्त होणारी मैत्री ज्या धैर्यानें चालते, त्याला मी 'धृति' असें नांव देतों. १४८ आणखी अर्जुना! ह्या छत्तिसांचा जिवासहवर्तमान असणारा जो मेळा त्याला संघात–ह्मणजे समुदाय–असें समजावें. १४९ अशा प्रकारें हे छत्तीसही भेद, तुला विशद करून सांगितले. ह्या इतक्यांना प्रसिद्ध क्षेत्र असें ह्मणतात. १५० अर्जुना! रथांच्या अवयवांच्या समुदायाला ज्याप्रमाणें रथ असें ह्मणतात, किंवा खालच्या व वरच्या अवयवांना मिळून जसें देह हें नाम आहे, १५१ हत्तीघोड्यांच्या समुदायापासून सैन्य असें नांव उत्पन्न होतें; किंवा वाक्यांना अक्षरांचें पुंज असें ह्मणतात; १५२ किंवा मेघांच्या समुदायाला अभ्र असें ह्मटलें जातें; किंवा सर्व लोकांना मिळून जग असें ह्मणतात; १५३ किंवा तेल, वात व अग्नि ह्या तिघांचा एके ठिकाणीं मिलाफ होणें, तो जनांमध्यें दिवा होतो. १५४ त्याप्रमाणें हीं छत्तीसही तत्त्वें, ज्या योगेंकरून एकत्र मिळतात, त्या समुदायाला क्षेत्र असें ह्मणतात. १५५ आणि शरीराच्या व्यापारानें तेथें पापपुण्य पिकतें, ह्मणून आह्मी कौतुकानें त्यास क्षेत्र असें ह्मणतों. १५६ आणखी कितीएकांच्या मतानें ह्याला देहही ह्मणतात. पण तें असो. कारण, त्याला अशीं अनंत नामें आहेत. १५७ तसेंच परब्रह्म खेरीजकरून स्थावरापासून तों जिवापर्यंत जें काय होतें व जातें तें क्षेत्र हेंच. १५८ पण देव, मनुष्य व सर्प, असे ह्याचे योनीविभाग होतात, ते गुणकर्मसंगतींत पडल्यानें होतात. १५९ अर्जुना! ह्या गुणांचा विचार पुढें सांगूं. तूर्त तुला ज्ञानाचें स्वरूप दाखवितों. १६० क्षेत्र तर सविकार व सविस्तर सांगितलें. आतां उत्तम ज्ञान ऐक. १६१ ज्या ज्ञानासाठीं योगी हे स्वर्गाचा आडमार्ग सोडून आकाश गिळतात. १६२ ऋद्धीची भीड धरीत नाहींत; सिद्धीची इच्छा करीत नाहींत; आणि योगासारखें विकट आचरण करतात. १६३ तपांचे किल्ले उल्लंघन करतात; यज्ञाला ओंवाळून टाकतात; कर्मवल्लीला उपटून काढतात; १६४ उघड्या

आंगानें नाना भजनमार्गांमध्यें धांव घेतात. कोणी सुषुम्नेच्या विवरामध्यें शिरतात; १६५ अशी महान् महान् ऋषिवर्यांचीही ज्या ज्ञानावर इच्छा, जी वेदरूप झाडाच्या पानावर हिंडते. १६६ अर्जुना! गुरुसेवा देईल ह्या बुद्धीनें जे शेंकडों जन्मांची ओंवाळणी करून टाकतात. १६७ ज्या ज्ञानाच्या प्रवेशाबरोबर अविद्या लयास जाते, आणि जीवाची व आत्म्याची एकवाक्यता होते. १६८ जें इंद्रियांचीं द्वारें बंद करून सोडतें; प्रवृत्तीचे पाय मोडतें; आणि मनाचें दैन्य फेडून टाकतें. १६९ ज्या ज्ञानाचा मार्ग द्वैताचा दुष्काळ, आणि साम्याचा सुकाळ करून सोडतो. १७० जें मदाचा ठावच पुसून टाकतें; मोहाला तर ग्रासून टाकतें. आपलें आणि दुसऱ्याचें हे शब्दच उरूं देत नाहीं. १७१ जें संसाराला उपटून पाडतें; संकल्परूप चिखल धुऊन काढतें; आणि ज्ञेय असें जें परब्रह्म, त्याला मिठी घालतें. १७२ ज्याच्या उत्पन्न होण्यानें प्राण पांगळा होऊन जातो; आणि ज्याच्या कौशल्यानें हें जग चालतें. १७३ ज्याच्या प्रकाशानें बुद्धीचे डोळे उघडतात; आणि जीव आनंदाच्या दोंदावर लोळूं लागतो. १७४ असें केवळ पवित्रेचा देव जें ज्ञान; ज्याच्यामध्यें विटाळलेलें मनही शुद्ध होतें; १७५ आत्म्याला, जिवाला व बुद्धीला जो क्षयरोग जडलेला असतो, तो ज्याच्या सान्निध्यानें नाहींसा होतो; १७६ जें सांगण्यासारखें नाहीं, तें कोण सांगणार? तें ऐकून बुद्धीनेंच जाणलें पाहिजे; प्रत्यक्ष डोळ्यांना दिसण्यासारखें नाहीं. १७७ मग तेंच ह्या शरीरामध्यें जेव्हां अंमल बसवितें, तेव्हां तें इंद्रियांच्या व्यापारामध्येंही प्रत्यक्ष डोळ्यांस दिसूं लागतें. १७८ झाडांच्या टवटवीतपणावरून वसंतऋतू लागल्याचें समजतें. त्याप्रमाणें हृदयावरून ज्ञानाची पारख करतां येते. १७९ अरे! वृक्षाच्या मुळांना खोल अगदीं पाताळांत जरी जळ सांपडलें, तरी तें डाहळ्यांवर व शेंड्यावरही दिसतें. १८० किंवा जमिनीची मृदुलता, कोंभाच्या लुसलुशितपणावरूनही कळून येते. किंवा अस्सल कुलवंताच्या गौरवावरून त्याचें आचरण कळून येतें. १८१ आदरातिथ्याच्या अतिशयानें जसा स्नेह व्यक्त होतो; किंवा दर्शनाच्या प्रशस्तपणानें जसा पुण्यपुरुष ओळखतो; १८२ किंवा कर्दळीमध्यें कापूर असलेला जसा सुवासानें कळतो, किंवा भिंगाच्या आंत ठेवलेला पदार्थ जसा बाहेरून दिसून येतो, १८३ त्याप्रमाणें हृदयांतील ज्ञानानें देहामध्यें जीं चिन्हें दिसून येतात, तीं आतां सांगतों. नीट लक्ष्य देऊन ऐक. १८४

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् ।
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥

[अमानित्वं–'अस्मिन्नव लक्षणानि'] तरी कवणेही विषयींचें । साम्य होणें न रुचे । संभावितपणाचें । वोझें जया ॥ ८५ ॥ आथिलेचि[1] गुण वानितां । मान्यपणें मानितां । योग्यतेचें येतां । आंगा रूप ॥ ८६ ॥ तैं गजबजों[2] लागे कैसा । व्याधें रुंधेला[3] मृग जैसा । कां बाहीं तरतां वेळसा[4] । दाटला[5] जेवीं ॥ ८७ ॥ पार्था तेणें पाडें । सन्मानें जो सांकडे । गरिमेतें[6] आंगाकडे । येवोंचि नेदी[7] ॥ ८८ ॥ पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी । हा अमुका ऐसी नोहावी । सेचि[8] लोकां ॥ ८९ ॥ तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा देईल भेटी । मरणेसीं सांटी[9] । नमस्कारितां ॥ १९० ॥ वांचस्पतिचेनि[10] पाडें । सर्वज्ञता तरी जोडे । परि वेडिवेमाजि[11] दडे । महिमे[12] भेणें ॥ ९१ ॥ चातुर्य लपवी । महत्व हारवी । पिसेपण मिरवी । आवडोनी ॥ ९२ ॥ लौकिकाचा उद्वेग[13] । शास्त्रांवरी उबग[14] । उगेपणीं चांग । आथी भर ॥ ९३ ॥ जगें अवज्ञाचि[15] करावी । संबंधीं[16] सोयचि न धरावी । ऐसी ऐसी जीवीं । चाड बहु ॥ ९४ ॥ तळवटपण[17] बाणे । आंगीं हिणावो[18] खेवणें । तें तेंचि करणें । बहुतकरुनी ॥ ९५ ॥ हा जीवंत ना नोहे । लोक कल्पी येणें भावें । तैसें जिणें होआवें । ऐसी आशा ॥ ९६ ॥ पैल चालत कीं नोहे । कीं वारेनि जात आहे । जना ऐसा भ्रम जाये । तैसें होइजे ॥ ९७ ॥ माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो । मज झणें वासिपो[19] । भूतजात ॥ ९८ ॥ ऐसीं जयांचीं नवसियें[20] । जो

---

१ असलेलेही. २ कासावीस. ३ अडविलेला. ४ भोवऱ्यांत. ५ सांपडलेला. ६ मोठेपणाला. ७ न व्हावी. ८ आठवणच. ९ बरोबरी. १० बृहस्पतीसारखें. ११ वेड्यामध्यें. १२ मोठेपणाच्या. १३ भीति. १४ उपेक्षा. १५ अपमान. १६ आप्तांनीं. १७ नीचपणा. १८ हीनपणा हेंच भूषण. १९ भीती पावतील. २० नवसांचीं दैवतें.

नित्य एकांता जात जाये । नामेंचि जो जिये । विजनाचेनी ॥ ९९ ॥ वायू आणि तया पडे । गगनेसी बोलों आवडे । जीवें प्राणें झाडें । पढियंतीं जया ॥ २०० ॥ किंबहुना ऐसऐसीं । चिन्हें जया देखसी । जाणतया ज्ञानेसीं । शेजे जाहाली ॥ १ ॥ पैं अमानित्व पुरुषीं । तें जाणावें इहीं मिषीं । आतां अदंभाचिया वोळखीसी । सौरस देवों ॥ २ ॥ [अदंभित्वं] तरि अदंभित्व ऐसें । लोभियाचें मन जैसें । जीव जावो परि नुमसे । ठेविला ठावो ॥ ३ ॥ तयापरी किरीटी । पडिलाही प्राणसंकटीं । परि सुकृत ना प्रकटी । आंगें बोलें ॥ ४ ॥ खडाणे आला पान्हा । पळवी जेवीं अर्जुना । कां लपवी पण्यांगना । वडिलपणें ॥ ५ ॥ आंढ्य आडुडे अडवी । मग आढ्यता जेविं हारवी । ना तरी कुळवधू लपवी । अवयवांतें ॥ ६ ॥ ना ना कृषीवळ आपुलें । पांघुरेवी पेरिलें । तैसें झांकी निपजलें । दानपुण्य ॥ ७ ॥ वरिवरी देह न पूजी । लोकांतें न रंजी । स्वधर्म वाग्ध्वजीं । बांधों नेणें ॥ ८ ॥ परोपकार न बोले । न मिरवी अभ्यासिलें । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठीं ॥ ९ ॥ शरीरभोगाकडे । पाहातां कृपण आवडे । येऱ्हवीं धर्माविषयीं थोडें । बहु न ह्मणे ॥ २१० ॥ घरीं दिसे सांकड । देहींची आयंती रोड । परि दानीं जया होड । सुरतरूसीं ॥ ११ ॥ किंबहुना स्वधर्मी थोर । अवसरीं उदार । आत्मचर्चे चतुर । येऱ्हवीं वेडा ॥ १२ ॥ केळीचें दळवाडें । हलु पोकळ आवडे । परि फळोनि गाढें । रसाळ जैसें ॥ १३ ॥ कां मेघाचें आंग थिलें । दिसे वारेनि जैसें जाईल । परि वर्षती नवल । घेणट ते ॥ १४ ॥ तैसा जो पूर्णपणीं । पाहातां धाती आयणी । येऱ्हवीं तरी वाणी । तोचि ठाय ॥ १५ ॥ हें असो या चिन्हाचा । नटनाच ठायीं जयाच्या । जाण ज्ञान तयाच्या । हाता चढलें ॥ १६ ॥ पैं गा अदंभपण । ह्मणितलें तें हें जाण । आतां आईक खुण । अहिंसेची ॥ १७ ॥ [अहिंसा] तरि अहिंसा बहुतीं परी । बोलिली असे अवधारीं । आपुलाल्या मतांतरीं । निरूपिली ॥ १८ ॥ परि ते ऐसी देखा । जैसा खांडूनियां शाखा । मग तयाचिया बुडुखा । कुंप कीजे ॥ १९ ॥ कां बाहू तोडोनि पेंचविजे । मग भुकेची पीडा राखिजे । ना ना देऊळ मोडूनि कीजे । पौळि देवा ॥ २२० ॥ तैसी हिंसाचि करूनि अहिंसा । निपजविजे हा ऐसा । पैं पूर्वमीमांसा । निर्णय केला ॥ २१ ॥ जे अवृष्टीचेनि उपद्रवें । गांदलें विश्व आघवें । ह्मणोनि पर्जन्येष्टी करावे । नाना याग ॥ २२ ॥ तंव तिये इष्टीचिया बुडीं । पशुहिंसा तंव रोकडी । मग अहिंसेची थडी । कैंची दिसे ॥ २३ ॥ पेरिजे नुसधी हिंसा । तेथ उगवेल काय अहिंसा । परि नवल बापा धिंवसा । या याज्ञिकांचा ॥ २४ ॥ आणि आयुर्वेद आघवा । तो याच मोहरा पांडवा । जो जीवाकारणें करावा । जीवघात ॥ २५ ॥ नानारोगें आहाळलीं । लोळती भूतें देखिलीं । ते हिंसा निवारावया केली । चिकित्सा पैं ॥ २६ ॥ तंव ते चिकित्सेपहिलें । एकाचे कंद खाणविले । आणि एका उपडविलें । समूळीं सपत्रीं ॥ २७ ॥ एकें आड मोडविलीं । अजंगमाची खोल कढविली । एकें गाभिणीं उकडविलीं । पुटामाजी ॥ २८ ॥ अजातशत्रू तरुवरां । सर्वांगीं देवविल्या शिरा । ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा । कोरडे केले ॥ २९ ॥ आणि जंगमाही हात । लाऊनि काढिलें पित्त । मग राखिले शिणत । आणि जीव ॥ २३० ॥ अहो वसतीं धवळारें । मोडूनि केलीं देव्हारें । नागऊनि वेव्हारें । गवांदी घातली ॥ ३१ ॥ मस्तक पांघुरविलें । तंव तळवटीं उघडें पडिलें । घर मोडोनि केले । मांडव पुढें ॥ ३२ ॥ नानापांघुरणें । जाळूनि जैसें तापणें । कां जालें आंगधुणें । कुंजरांचें ॥ ३३ ॥ ना तरी बैल विकूनि गोठा । पुंसे लावोनि बांधिजे गांठा । इया करणी कीं चेष्टा । काइ हंसों ॥ ३४ ॥ ['बौद्धमतं'] एकीं धर्माचिया वोहणी । गाळूं आदरिलें पाणी । तंव गाळितया आहाळणी । जीव मेले ॥ ३५ ॥ एक न पचवितीचि कण । इये हिंसेचे भेणें । तेथ कंदर्थले प्राण । तेचि हिंसा ॥ ३६ ॥ एवं हिंसाचि अहिंसा । कर्मकांडीं हा ऐसा । सिद्धांत सुमनसा । वोळखें तूं ॥ ३७ ॥ पहिलें अहिंसेचें नांव । आह्मी केलें जंव । तंव स्फूर्ती बांधली हांव । इये मती ॥ ३८ ॥ तरि कैसेनि इयेतें गाळावें । ह्मणोनि पडिलें बोलावें । तेवींचि तुवांही जाणावें । ऐसा भाव ॥ ३९ ॥ बहुतकरूनि किरीटी । हाचि विषय इये गोठी । येऱ्हवीं कां अव्हाटीं । धांविजेल गा ॥ २४० ॥ आणि स्वमताचिया निर्धारा । लागोनियां धनुर्धरा । प्राप्ता मतांतरा । निर्वेचें कीजे ॥ ४१ ॥ ऐसी हे अवधारीं । निरूपिती परी । आतां यया-

---

१ प्रिय, आवडतीं. २ शेजार, प्राप्ती. ३ ह्या लक्षणांनीं. अभिप्राय. ५ उघडा करीत नाहीं. ६ आपल्या मुखानें. लाथऱ्या गायीला. ८ वेश्या. ९ वय. १० धनाढ्य. १ अरण्यांत. १२ शेतकरी. १३ झांकून ठेवतो. १४ कीर्तीसाठीं, प्रतिष्ठेसाठीं. १५ वाटतो. १६ संकट. १७ साक्षी. १८ पैज. १९ प्रसंगाला. २० अप्रतिम. २१ हलकें. २ गारा. २३ समृद्धि. २४ कंगालपणा. २५ उत्कर्ष. ६ मुळाला. २७ शिजवावेत. २८ पोवळी, आवार.

१ कर्मकांडामध्यें. २ गांजलें. ३ नुसती, केवळ. ४ धैर्य. ५ मार्गांतला. ६ पोळलीं. ७ तोडून साफ केलीं. ८ वृक्षांची. ९ साल. १० वाळविले. ११ चुनेगच्ची वाडे. १२ व्यापार. १३ अन्नछत्र. १४ हत्तीचें. १५ राघु, पोपट. १६ पिंजरा. १७ सांप्रदायाप्रमाणें. १८ त्रासानें. १९ भयानें. २० दुखावले. २१ हे प्रसन्नमनाच्या अर्जुना. २२ इच्छा. २३ आडमार्गानें. २४ निवड.

वरी । मुख्य जें गा ॥ ४२ ॥ तें स्वमत बोलिजेल । अहिंसेरूप किजेल । जिया उठलिया आंतुल । ज्ञान दिसे ॥ ४३ ॥ [ 'अहिंसा त्रिधा । कायिकी वाचिकी मानसिकी चेति । तत्र कायिकी त्रिधा । पादेंद्रियसाध्या हस्तेंद्रियसाध्या चक्षुरिंद्रियसाध्या च । सा क्रमेण व्याचष्टे' ] परि तें अधिष्ठिलेनि आंगें । जाणिजे आचरतेनि बैगें । जैसी कसवटी सांगे । वानियोतें ॥ ४४ ॥ तैसें ज्ञानामनाचिये भेटी । सरिसेंचि अहिंसेचें बिंब उठी । तेंचि ऐसें किरीटी । परिस आतां ॥ ४५ ॥ [ 'पादेंद्रियसाध्या' ] तरि तरंग नोलांडिते । लहरी पायें न फोडित । सांचलु न मोडत । पाणियाचा ॥ ४६ ॥ वेगें आणि लेखा । दिठी घालूनि आंविसा । जळीं बक जैसा । पाउल सुये ॥ ४७ ॥ कां कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार । कुंचंबेल केसर । इया शंका ॥ ४८ ॥ तैसे परमाणु पां गुंतले । जाणूनि जीव सानुले । तेथ कारुण्यामाजि पाउलें । लपवूनि चाले ॥ ४९ ॥ ते वाट कृपेची करित । ते दिशाचि स्नेहमरित । जीवातळीं आंथरित । आपुला जीव ॥ २५० ॥ ऐसिया जतना । चालणें जया अर्जुना । हें अनिर्वाच्य परिमाणा । पुरिजेना ॥ ५१ ॥ पैं मोहाचेनि सांगडें । लोसी पिलीं धरी तोंडें । तेथ दांतांचे आंगरडे । लागती जैसे ॥ ५२ ॥ कां स्नेहाळ माये । तान्हयाची वांसे पाहे । तिये दिठी आहे । हळुवार जें ॥ ५३ ॥ नाना कमळदळें । डोलविजती ढाळढाळें । तो जेणें पाडें वुंवुळें । वारा घेपे ॥ ५४ ॥ तैसेनि मार्दवें पाय । भूमीवरी न्यसीत जाय । लागती तेथ होय । जीवां सुख ॥ ५५ ॥ ऐसिया लघिमो चालतां । कृमि कीटक पांडुसुता । देखे तरि मागुता । हळूचि निघे ॥ ५६ ॥ ह्मणे पाय धेंडफडील । तरी स्वामीची निद्रा मोडेल । रेंचलेपणा पडेल । ह्मोती हन ॥ ५७ ॥ इया काकुळती । वोहाणी घे मागुती । कोणेही व्यक्ती । न वचे वरी ॥ ५८ ॥ जीवाचेनि नांवें । तृणातेंही नोलांडवे । मग न लेखितां जावें । हे कें गोठी ॥ ५९ ॥ मुंगिये मेरु नोलांडावे । मशका सिंधु न तरवे । तैसें भेटलिया न करवे । अतिक्रम ॥ २६० ॥ ऐसी जयाची चाली । कृपा फुलीं फळा आली । देखसी जियाली । दया वाचे ॥ ६१ ॥ [ 'वाचिकी' ] स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार । मुख मोहाचें माहेर । माधुर्या जाहाले अंकुर । दशन तैसे ॥ ६२ ॥ पुढां स्नेह पाझरे । मागां चालती अक्षरे । शब्द पाठीं अवतरे । कृपा आधीं ॥ ६३ ॥ तंव बोलणेंचि नाहीं । बोलों ह्मणे जरी कांहीं । तरि बोल कोणाही । खुपेल कां ॥ ६४ ॥ बोलतां अधिकही निघे । तरि कोणाचिया वर्मी न लगे । आणि कोणासि न रिघे । शंका मनीं ॥ ६५ ॥ मांडिली गोठी हन मोडेल । वोसिपेल कोणी उडेल । आइकोनि वोवांडिलें । कोण्ही जरी ॥ ६६ ॥ तरि दुवाळी कोणा नोहावी । भंवई कवणाची नुचलावी । ऐसा भाव जीवीं । ह्मणोनियां ॥ ६७ ॥ मग प्राथिला विपायें । जरि लोभें बोलों जाये । तरि परिसत्या होये । मायबाप ॥ ६८ ॥ कां नादब्रह्मचि मुसें आलें । कीं गंगापय असळलें । पतिव्रते आलें । वार्धक्य जैसें ॥ ६९ ॥ तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥ २७० ॥ विरोधवादबळु । प्राणितापढाळु । उपहास छळु । वर्मस्पर्शु ॥ ७१ ॥ आडुवेग विंदाण । आशा शंका प्रतारण । हे संन्यसिले अवगुण । जया वाचा ॥ ७२ ॥ [ 'चक्षुरिंद्रियसाध्या' ] आणि तयाचिपरी किरीटी । थांउ जयाचिया दिठी । सांडिलिया भृकुटी । मोकळिया ॥ ७३ ॥ कां जे भूतीं वस्तु आहे । तिये रूपों शके विपायें । ह्मणोनि वांस न पाहे । बहुतकरूनि ॥ ७४ ॥ ऐसाही कोणे एके वेळे । भितरले कृपेचेनि बळें । उघडोनि डोळे । दृष्टी घाली ॥ ७५ ॥ तरि चंद्रबिंबौनि धारा । निघतां नव्हती गोचरा । परि एकसरें चकोरां । निघती दोंदें ॥ ७६ ॥ तैसें प्राणियां होये । जरी तो कहीं वास पाहे । तया अवलोकनाची सोये । कूर्मीही नेणे ॥ ७७ ॥ किंबहुना ऐसी । दिठी जयाची भूतांसी । [ 'हस्तेंद्रियसाध्या' ] करही देखसी । तैसेचि ते ॥ ७८ ॥ तरि होऊनियां कृतार्थ । राहिले सिद्धांचे मनोरथ । तैसे जयाचे हात । निर्व्यापार ॥ ७९ ॥ अक्षम आणि संन्यासिलें । कां निरिंधनें आणि विझालें । मुकेनि घेतलें । मौन जैसें ॥ २८० ॥ तयापरी कांहीं । जयां करां करणें नाहीं । जे अकर्तयांच्या ठायीं । बसों येती ॥ ८१ ॥ ओसुडेल वारा । नख लागेल अंबरा । इया बुद्धी करां । चेंवों नेदी ॥ ८२ ॥ तेथ आंगावरिलीं उडवावीं । कां डोळां रिगतें झाडावीं । पशुपक्ष्यां दावावी । त्रासमुद्रा ॥ ८३ ॥ इया केउतियें गोठी । नावडे दंडकाठी । मग शस्त्राचें कि-

---

१ अहिंसेचें वर्णन. २ बाणलें असतां. ३ कृतीनें, मार्गानें. ४ सोन्याची प्रत. ५ न ओलांडतां. ६ संचय. ७ हळू. ८ आमिषार्थ. ९ टाकतो. १० चुरडेल. ११ त्या. १२ बारिक बारिक. १३ मांजरी. १४ अणकुच्या, अग्रें. १५ वाट. १६ पानोपानीं. १७ मार्दव. १८ ठेवीत. १९ हळू. २० आपटेल. २१ निद्रासुखांत. २२ व्यत्यय. २३ मार्ग. २४ मूर्तिमंत. २५ दांत.

१ लागेल. २ भीति पावेल. ३ ओलांडील. ४ शंका, क्लेशबुद्धि. ५ कदाचित्. ६ ऐकणाराला. ७ मूर्तिमंत. ८ उसळलें. ९ मृदु, मधुर. १० परिमित. ११ विरुद्धवादाचें बळ. १२ प्राण्यास कासावीस करणें. १३ कठिण, कोरडें लाघव. १४ कपट. १५ ठकबाजी. १६ प्रांजळता. १७ ब्रह्म. १८ वाट. १९ दृष्ट, स्पष्ट. २० सर, बरोबरी. २१ कासवी सुद्धां. २२ अशक्त. २३ काष्टरहित. २४ अकर्तृत्वाच्या. २५ ओढला जाईल. २६ हालूं देत नाहीं. २७ शिरणारीं. २८ भीतिदायक चिन्ह. २९ कोणीकडे?

ीटी । बोलणें कें ॥ ८४ ॥ लीलाकमळें खेळणें । कां पुष्प-
ाळा झेलणें । न करी ह्मणे गोफणें । ऐसें होइल ॥ ८५ ॥
ालवतील रोमावळी । यालागीं आंग न कुरवाळी । नखांची
ुडाळी । बोटांवरी ॥ ८६ ॥ तंव करणेयाचाचि अभाव ।
ारि ऐसाही पडे डाव । तरि हातां हाचि सैराव । जे जोडि-
ाती ॥ ८७ ॥ कां नाभिकारा उचलिजे । हात पडिलियां
इजे । ना तरि आर्तातें स्पर्शिजे । अळुमाळु ॥ ८८ ॥ हेंही
परोधें करणें । तरी आर्तभय हरणें । नेणती चंद्रकिरणें ।
जन्हाळा तो ॥ ८९ ॥ पावोनि तो स्पर्शु । मळयानिळ खेंर-
सु । येणें मानें पशु । कुरवाळणें ॥ २९० ॥ जे सदांचि ते
ीकळे । जैशीं चंदनांगें शीतळें । न फळतांही निर्फळें ।
ातीचि ना ॥ ९१ ॥ आतां असो हें वाग्जाळ । जाणें तें
रतळ । सज्जनांचे शीळ । स्वभाव जैसे ॥ ९२ ॥ [ 'मान-
ाकी' ] आतां मन तयाचें । सांगों ह्मणों साचें । तरी सांगी-
ले कोणाचे । विलास हे ॥ ९३ ॥ काई शाखा नव्हे तरु ।
ळेंवीण असे सागरु । तेज आणि तेजाकारु । आन काई
९४ ॥ अवयव आणि शरीर । हे वेगळाले काय कीर ।
ीं रस आणि नीर । सिनानीं आथी ॥ ९५ ॥ ह्मणोनि हे
सर्व । सांगीतले बाह्यभाव । तें मनचि सावयव । ऐसें
ाण ॥ ९६ ॥ जें भुईं बीज खोंविलें । तेंचि वरी रुख जा-
ालें । तैसें इंद्रियद्वारां फांकलें । तें अंतरचि कीं ॥ ९७ ॥
मानसींचि जरी । अहिंसेची अवसरी । तरि कैंची बाहेरी ।
संडेल ॥ ९८ ॥ आवडे ते वृत्ती किरीटी । आधीं मानौ-
ाचि उठी । मग ते वाचे दिठी । करांसि ये ॥ ९९ ॥
चूनि मनींचि नाहीं । तें वाचेसि उमटेल काई । बीजेंवीण
ई । अंकुर असे ॥ ३०० ॥ ह्मणोनि मनपण जैं मोडे । तैं
द्रेय आधींचि उबडें । सूत्रधारेंवीण सांइखडें । वोंवो जैसें
१ ॥ उगमींचि वाळूनि जाये । तें वोघीं कैचें वाहे ।
ावो गेलिया आहे । चेष्टा देहीं ॥ २ ॥ तैसें हें पांडवा ।
ळ इंद्रिय भावा । हेंचि राहठे आघवा । द्वारीं इहीं ॥ ३ ॥
े जियेवेळीं जैसें । जें होऊनि आंत असे । बाहेरी ये
ें । व्यापाररूपें ॥ ४ ॥ यालागीं सांचोकारें । मनीं अहिंसा
ावे थोरें । जसी पिकली हुती आदरें । बोभात निघे ॥५॥
ाोनि इंद्रियें तेचि संपदा । वेचितां हीं उदावादा । अहिं-
वा धंदा । करितें आहाती ॥ ६ ॥ समुद्रीं दाटे भरितें ।
समुद्रचि भरी तें स्त्यांतें । तैसें स्वसंपत्ती चित्तें । इंद्रियां

केलें ॥ ७ ॥ हें बहु असो पंडित । धरूनि बाळाचा हात ।
वोळी लिही सुव्यक्त । आपणचि ॥ ८ ॥ तैसें दयाळुत्व आ-
पुलें । मनें हातापायां आणिलें । मग तेथ उपजविलें । अहिं-
सेतें ॥ ९ ॥ याकारणें किरीटी । इंद्रियांचिया गोठी । मना-
चियेचि राहाटी । रूप केलें ॥ ३१० ॥ ऐसा मनें देहें वाचा ।
सर्व संन्यास दंडाचा । जाहाला ठायीं जयाचा । देखशील
॥ ११ ॥ तो जाण वेल्हाळ । ज्ञानाचें वेळाउळ । हें असो
निखिळ । ज्ञानचि तो ॥ १२ ॥ जें अहिंसा कानें ऐकिजे ।
ग्रंथाधारें निरूपिजे । ते पाहावी ऐसें जैं उपजे । तैं तोचि
पाहावा ॥ १३ ॥ ऐसें ह्मणितलें देवें । [ 'इति अहिंसा
लक्षणं, परपीडाजननमहिंसेति वक्तव्ये मतांतरनिरासेन विशे-
षतो व्याख्याने कारणमाह—' ] तें बोलें एकें सांगावें । परि
फांकलें हें उपसाहावें । तुह्मीं मज ॥ १४ ॥ ह्मणाल हिरवे
चारीं गुरूं । विसरे मागील मोहेंर धरूं । कां वारेलगें पाखिरूं ।
गगनीं भरे ॥ १५ ॥ तैसिया प्रेमाचिया स्फूर्ती । फावलिया
रसवृत्ती । वाहविला मती । आकळेना ॥१६॥ तरि तैसें नोहे
अवधारा । कारण असे विस्तारा । येऱ्हवीं पद तरी अक्षरां ।
तिहींचेंचि ॥ १७ ॥ अहिंसा ह्मणतां थोडी । परि तैंचि हे
होय उघडी । जैं लोटिजेती कोडी । मतांचिया ॥ १८ ॥ ये-
ऱ्हवीं प्राप्तें मतांतरें । थातंबूनि आंगभरें । बोलिजेल तें नेसरे ।
तुह्मापासीं ॥ १९ ॥ रत्नपारखिया गांवीं । जाईल गंडकी हरि
सोडावी । काश्मीरीं न करावी । मिंडगण तेथें ॥ ३२० ॥
काइसा वास कापुरा । मंर्द जेथ अवधारा । पिठाचा
विकरा । तियेसांते ॥ २१ ॥ ह्मणोनि इये सभे । वोलकेप-
णाचेनि क्षोभें । लागसर नलभे । बोला प्रभू ॥ २२ ॥ सा-
मान्या आणि विशेषा । सकळै कीजेल देखा । तरि का नों-
चेया मुखा- । कडे न्याल ना तुह्मी ॥२३॥ शंकेचेनि गदळें ।
जैं शुद्ध प्रमेय मैळे । तैं मागुतिया पाउलीं पळे । अवधान
येतें ॥ २४ ॥ कां करूनि बाबळियेची बुंथी । जळें जियें
ठांती । तयांची वास पाहाती । हंस काई ॥ २५ ॥ कां
अभ्रा पैलीकडे । जैं येत चांदिणें कोडें । तैं चकोरें चां-
चुवडें । उचलीतना ॥ २६ ॥ तैसें तुह्मी वास न पाहाल ।
ग्रंथ नेघां वरि कोपाल । जरी अविसंवाद नोहेल । निरूपणें

१ गोफण. २ प्रसंग प्राप्त झाला. ३ अभ्यास. ४ अभ-
ाचनाला. ५ हळूच. ६ संकटानें. ७ तीव्र, कठीण.
निरनिराळें. ९ वृक्ष. १० मनच. ११ अभाव. १२ पडेल.
१ पालथें, पराङ्मुख. १४ कळसूत्री बाहुलीं. १५ व्यर्थ.
६ खरेपणानें. १७ स्थीर होते. १८ सुवास. १९ बो-
टा करीत, फैलावत. २० व्यापार. २१ स्वाऱ्यांना.

१ पंतोजी. २ अगदीं स्पष्ट. ३ व्यापारांचे. ४ हिंसेचा.
५ विस्तृत. ६ घर. ७ निर्मल. ८ विस्तारले. ९ मार्ग.
१० वाऱ्याबरोबर. ११ खंडन केल्या जातात. १२ निरसून.
१३ जशींच्या तशींच. १४ चालणार नाहीं. १५ गंडकी
शिळा. १६ काश्मिरी दगड—गार. १७ स्तुति, तारीफ.
१८ गंधहीन—निर्गुणी—हें पिठाचें विशेषण. १९ त्याच्या बरो-
बर. २० संबंध लागूं शकत नाहीं. २१ न्यायाच्या. २२ मु-
ख्यार्थ. २३ लक्ष्य. २४ शेवाळीची. २५ आच्छादनामध्यें.
२६ राहतात. २७ चोंचा. २८ घेणार नाहीं, स्वीकारणार
नाहीं. २९ विरोधरहित. ३० प्रतिपादन.

॥ २७ ॥ न थुंझाविता[1] मतें । निफजे आक्षेपाचें[2] लागतें । तें व्याख्यान जी तुमतें । जोडूनि नेदी ॥ २८ ॥ आणि माझें तंव आघवें । ग्रंथन[3] येणेंचि भावें । जे तुह्मी संतीं होआवें । सन्मुख सदा ॥ २९ ॥ येऱ्हवीं तरी साचोकारें । तुह्मी गीतार्थाचे सोयरे । जाणोनि गीता एकसरें । धरिली मियां ॥ ३३० ॥ जे सर्वस्व आपुलें घाल । मग ईयेतें[4] सोडवूनि न्याल । ह्मणोनि ग्रंथ नव्हे बोलें । साचचि हे ॥ ३१ ॥ कां सर्वस्वाचा लोभ धरा । बोलीचा अव्हेर करा । तरि गीते मज अवधारा । एकचि गती ॥ ३२ ॥ किंबहुना मज । तुमचिया कृपा[6] काज । तिये लागीं व्याज[7] । ग्रंथाचें केलें ॥ ३३ ॥ तरि तुह्मा रसिकांजोगें । व्याख्यान शोधावें लागे । ह्मणूनि जी मतांगें[8] । बोलों गेलों ॥ ३४ ॥ तंव कथेसि पसरु जाहाला । श्लोकार्थ दूरी गेला । कीजो क्षमा यया बोला । अपत्या मज ॥ ३५ ॥ आणि घांसाआंतिल हेरळ[9] । फेडितां लागे वेळ । तें दूषण नव्हे खंडळ[10] । सांडावा कीं ॥ ३६ ॥ कां संवचोरां चुकवितां । दिवस लागलिया मांता[11] । कोपावें कीं जीवितीं[12] । जिंतीणें[13] कीजे ॥ ३७ ॥ परि यावरिल हें नव्हे । तुह्मी उपसाहिलें तेंचि वरवें । आतां अवधारिजो देवें । बोलिलें ऐसें ॥ ३८ ॥ ह्मणे उन्मेषसुलोचना[14] । सावध होईं अर्जुना । करूं तूज ज्ञाना । वोळखी आतां ॥ ३९ ॥ [क्षांतिः] तरि ज्ञान गा तें एथें । वोळख तूं निरुतें । आक्रोशेंवीण[15] जेथें । क्षमा असे ॥ ३४० ॥ अगाधसरोवरीं । कमळिणी जियापरी । कां सदैवांचिया घरीं । संपत्ति जैसी ॥ ४१ ॥ पार्था तेणें पाडें । क्षमा जयातें वाढे । तेंही[16] लक्षें[17] तें फुडें[18] । लक्षण सांगों ॥ ४२ ॥ तरि पढियंतें[19] लेणें । आंगीं भांवें[20] जेणें । धरिजे तेविं साहणें । सर्वचि जया ॥ ४३ ॥ त्रिविध[21] मुख्य आघवे । उपद्रवांचे मेळावे[22] । वरि पडिलिया नव्हे । वांकडा जो ॥ ४४ ॥ अपेक्षित पावे । तें जेणें तोषें मानावें । अनपेक्षिताही[23] करवे । मान तोचि ॥ ४५ ॥ जो मानापमानातें सोंये[24] । सुखदुःख जेथें सामाये[25] । निंदास्तुती नोहे । दुखंड[26] जो ॥ ४६ ॥ उन्हाळेनि जो न तापे । हिमवंतीं न कांपे । कायसेनिही न वांसिपे[27] । पातलेया ॥ ४७ ॥ स्वशिखरांचा भारु । नेणे जैसा मेरु । कीं धरा यज्ञसूकरु[1] । वोझें न ह्मणे ॥ ४८ ॥ ना ना चराचरीं भूतीं । दाटणी नव्हे क्षिती । तैसा नाना द्वंद्वप्राप्ती[2] । घामेजेना[3] ॥ ४९ ॥ घेऊनि जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट[4] । करी वांड पोट । समुद्र जेवीं ॥ ३५० ॥ तैसें जयाचिया ठायीं । न साहणें कांहींचि नाहीं । आणि साहातसें असेंही । स्मरण नुरे ॥ ५१ ॥ शरीरा जें पातलें । तें करूनि घाली आपुलें । तेथ साहतेनि[6] नवलें । घेपिजेना ॥ ५२ ॥ हे अनाक्रोश[8] क्षमा । जेथ आथी प्रियोत्तमा । जाण तेणें महिमा । ज्ञानासि गा ॥ ५३ ॥ तो पुरुष पांडवा । ज्ञानाचा वोलावा[9] । [आर्जवं] आतां परिस आर्जवा[10] । रूप करूं ॥ ५४ ॥ तरि आर्जव तें ऐसें । प्राणाचें सौजन्य जैसें । आवडतयाही[11] दोषें[12] । एकचि पैं गा ॥ ५५ ॥ कां तोंड पाहुनि प्रकाशु । न करी जेविं चंडांशु[13] । जगा एक अवकाशु । आकाश जैसें ॥ ५६ ॥ तैसें जयाचें मन । माणुसाप्रति आन आन । नोहे आणि वर्तन । ऐसें पैं तें ॥ ५७ ॥ जे जगचि सनोळख[14] । जगेंसीं जुनाट सोयरिक । आप पर हे भाख[15] । जाणणें नाहीं ॥ ५८ ॥ भलतेणेंसी मेळ । पाणिया ऐसा ढाळ[16] । कवणेविखीं आंडळ[17] । नेघे चित्त ॥ ५९ ॥ वारियाची धांव । तैसे सरळ भाव । शंका आणि हांव । नाहीं जया ॥ ३६० ॥ मायेपुढें बाळका । रिघतां नाहीं शंका । तैसें मन देतां लोकां । नालोचि[18] जो ॥ ६१ ॥ फांकलिया[19] इंदीवरां[20] । परिवरु[21] नाहीं धनुर्धरा । तैसा कोनकोंपरा । नेणेचि जो ॥ ६२ ॥ चोखाळपण रत्नाचें । रत्नावरी किरणाचें । तैसें पुढें मन जयाचें । करणें पाठीं ॥ ६३ ॥ ओलोचूं[22] जो नेणे । अनुभवचि जोगोवणें[23] । धरी मोकळीं अंतःकरणें । नोहे जया ॥ ६४ ॥ दिठी नोहे मिणधी[24] । बोलणें नाहीं संदिग्धीं[25] । कवणेसीं हीनबुद्धी । राहाटों नेणे ॥ ६५ ॥ दाहाही इंद्रियें प्रांजळें । निःप्रपंचें निर्मळें । पांचही[26] पालव मोकळे । आठही पाहर ॥ ६६ ॥ अमृताची धार । तैसें उजू अंतर । किंबहुना जो माहेर । या चिन्हाचें ॥ ६७ ॥ तो पुरुष सुभटा । आर्जवाचा आंगवेंटा[27] । जाण तेथेंचि घरटा । ज्ञानें केला ॥ ६८ ॥ [आचार्योपासनं] आतां ययावरी । गुरुभक्तिची परी । सांगों गा अवधारीं । चतुरनाथा ॥ ६९ ॥ अघवीयाचि दैवां । जन्म-

१ समजून दिल्याशिवाय. २ संशयाचें. ३ प्रतिपादन. ४ हिला. ५ तारण, गहाण. ६ कृपेचें काम. ७ निमित्त. ८ अन्यमतें. ९ खडा, माती. १० कचरा. ११ मातेनें. १२ वांचण्यास. १३ कुरवंडी. १४ ज्ञानोत्तमनयना. १५ दुःखरहित. १६ क्षमा सुद्धां. १७ लक्ष्यांत येईल. १८ स्पष्ट. १९ आवडीचें. २० ज्या भावनेनें. २१ अध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक–असे तीन प्रकारचे. २२ समुदाय. २३ अनिष्टासही. २४ सहन करतो. २५ सामावळें जातें. २६ दुभंग. २७ भीत नाहीं.

१ वराह अवतार. २ सुखदुःखादि जोड्या प्राप्त झाल्या असतां. ३ घाम फुटत नाहीं, श्रमत नाहीं. ४ समुदाय. ५ मोठें. ६ सहन केल्याच्या. ७ गुंडाळला जात नाहीं. ८ दुःखरहित शांति. ९ जिव्हाळा. १० सरळपणाचें. ११ पाहिजे त्या. १२ उद्देशानें. १३ सूर्य. १४ ओळखीचें. १५ बोलणें, भाषण. १६ वर्तणूक, रीत. १७ प्रतिबंध. १८ विचार करीत नाहीं. १९ फुललेल्या. २० कमळाला. २१ गुप्तपण. २२ ओलावयाला. २३ पालन करणें. २४ मिंधी. २५ संशयित विषयांत. २६ पंचप्राण. २७ मूर्तिमान्.

भूमी हे सेवा । जे ब्रह्म करी जीवा । शोच्यातेंही ॥ ३७० ॥ ते आचार्योपास्ती । सांगिजेल तुजप्रती । बैसों दे एक पांती । अवधानाची ॥ ७१ ॥ तरि सकळ जळसमृद्धी । घेऊनि गंगा निघाली उदधी । कीं श्रुती हे महापदीं । पैठी जाहाली ॥७२॥ ना ना वेंटाळूनि जीवितें । गुणागुण उंखितें । प्राणनाथासि उचितें । दिधलें प्रिया ॥ ७३ ॥ तैसें सबाह्य आपुलें । जेणें गुरुकुळीं वोपिलें । आपणपें केलें । भक्तीचें घर ॥ ७४ ॥ [सा भक्तिर्नवविधा—"श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं" इति (भा.-स्कं. ७) 'तत्र स्मरणभक्तिमाह—'] गुरुग्रह जिये देशीं । तो देशचि वसे मानसीं । विरहिणी कां जैसी । वल्लभातें ॥ ७५ ॥ तियेकडोनि येतसे वारा । देखोनि धांवे सामोरा । आड पडे ह्मणे घरा । बीजें कीजो ॥ ७६ ॥ साचा प्रेमाचिया भुली । तिये दिशेसीचि आवडे बोली । जीव थानपती करूनि घाली । गुरुगृहीं जो ॥ ७७ ॥ परि गुरुआज्ञा धरिलें । देह गांवीं असे एकलें । वांसरुवा लाविलें । दावें जैसें ॥ ७८ ॥ ह्मणे कै हें बिरडें फिटेल । कै तो स्वामी भेटेल । युगाहूनि वडिल । निमिष मानी ॥ ७९ ॥ ऐसे या गुरुग्रामीचें आलें । कां स्वयें गुरुनींचि धाडिलें । तरि गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ॥ ३८० ॥ कां सुकतया अंकुरा । वरि पडलिया पीयूषधारा । ना ना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ॥८१॥ ना तरी रंकें निधान देखिलें । कां आंधळिया डोळे उघडले । भणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ॥ ८२ ॥ तैसा गुरुकुळींचेनि नांवें । महासुखें अति थोरावे । जे कोडें हन पोटाळवे । आकाश कां ॥ ८३ ॥ पैं गुरुकुळीं ऐसी । आवडी जया देखसी । जाण ज्ञान तयापाशीं । पाइकी करी ॥ ८४ ॥ ['अर्चनं'] आणि अभ्यंतरिलियेकडे । प्रेमाचेनि पवाडें । श्रीगुरूचें रूपडें । उपासी ध्यानीं ॥ ८५ ॥ हृदयशुद्धीचिया आवरीं । आराध्य तो निश्चळ धुरे करी । मग सर्व भावेंसीं परिवारीं । आपण होय ॥ ८६ ॥ कां चैतन्याचिये पोवळीं । माजि आनंदाचिया राउळीं । श्रीगुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥८७॥ उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाळ सात्विका । भरोनियां त्र्यंबका । लाखोली वाहे ॥ ८८ ॥ काळशुद्धी त्रिकाळीं । जीवदशा धूप जाळी । ज्ञानदीपें वोंवाळी । निरंतर ॥ ८९ ॥ सामरस्याची रससोय । अखंड अर्पित जाय । आपण भेराडा होय । गुरू तो लिंग ॥ ३९० ॥ ['सख्यं'] ना तरी जिवाचिये सेजे । गुरु कांत करूनि भुंजे । ऐसी प्रेमाचेनि भोजें । बुद्धि वाहे ॥ ९१ ॥ कोणेएके अवसरीं । अनुराग भरे अंतरीं । कीं तया नाम करी । क्षीराब्धी ॥ ९२ ॥ तेथ ध्येयें ध्यान बहु सुख । तेंचि शेषतुळिका निर्दोख । वरि जेळशयन देख । भावी गुरु ॥ ९३ ॥ मग वोळंगती पांय । ते लक्ष्मी आपण होय । गरुड होऊनि उभा राहे । आपणचि ॥ ९४ ॥ नाभीं आपण जन्मे । ऐसें गुरुमूर्ति प्रेमें । अनुभवी मनोधर्मे । ध्यानसुख ॥ ९५ ॥ एकाधियेवेळे । गुरु माय करी भावबळें । मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरी ॥ ९६ ॥ ना तरी गा किरीटी । चैतन्यतरुतळवटीं । गुरु धेनु आपण पोटीं । वत्स होय ॥ ९७ ॥ गुरुकृपास्नेहसलिलीं । आपण होय मासोळी । कोणे एके वेळीं । हेंचि भावी ॥ ९८ ॥ गुरुकृपामृताचें वडप । आपण सेवावृत्तीचें होय रोप । ऐसेसे संकल्प । मनचि विये ॥ ९९ ॥ चक्षुपक्षेंवीण । पिलूं होय आपण । कैसें पैं अपारपण । आवडीचें ॥ ४०० ॥ गुरूतें पक्षिणी करी । चारा घे चांचूवरी । गुरु तारू धरी । आपण कास ॥ १ ॥ ऐसे प्रेमाचेनि थावें । ध्यानचि ध्यानातें प्रसवे । पूर्णसिंधू हेलावे । फुटती जैसे ॥ २ ॥ किंबहुना यापरी । श्रीगुरुमूर्ती अंतरीं । भोगी आतां अवधारीं । बाह्यसेवा ॥३॥ ['दास्यं'] तरि जीवीं ऐसे आंवांके । ह्मणे दास्य करीन निकें । जैसेनि गुरू कौतुकें । माग ह्मणती ॥ ४ ॥ तैसिया साचा उपास्ती । गोसांवी प्रसन्न होती । तेथ मी विनंती । ऐसी करीन ॥ ५ ॥ ह्मणेन तुमचा देवा । परिवार जो आघवा । येतुले रूपें होआवा । मीचि एक ॥ ६ ॥ आणि उपेकरतीं आपुलीं । उपेकरणें आथि जेतुलीं । माझीं रूपें तेतुलीं । होआवीं स्वामी ॥ ७ ॥ ऐसा मागेन वरु । तेथ हो ह्मणती श्रीगुरु । मग तो परिवारु । मीचि होईन ॥ ८ ॥ उपकरण जात सकळिक । तें मीचि होईन एकैक । तेव्हां उपास्तीचें कौतुक । देखिजेल ॥ ९ ॥ गुरु बहुतांची माये । परि येको-

१ शोकग्रस्तांना सुद्धां. २ गुरूची उपासना. ३ एका ओळीला बसूं देत. ४ समुद्रास. ५ ब्रह्मपदाचे ठिकाणीं. ६ प्रविष्ट. ७ अवधीं उक्त. ८ श्रीमद्भागवताच्या सप्तमस्कंधांत प्रल्हादानें हिरण्यकशिपूला ही नवविध भक्ति सांगितली आहे. ९ साष्टांग नमस्कार घाल. १० घराकडे. ११ आगमन करावें. १२ स्थानपती. १३ पेडें. १४ थोर, मोठे. १५ भिकाऱ्याच्या. १६ आवडीनें. १७ कवटाळून धरील. १८ आकाशही. १९ अंतःकरणांत. २० प्रेमाच्या अतिशयानें. २१ उपासना करतो, भजतो, सेवन करतो. २२ अग्रेसर. २३ ज्ञानाच्या. २४ आवारामध्यें. २५ अभिषेक करतो.

१ परडी. २ शिवगुरूला. ३ ऐक्याची. ४ पाकसिद्धि. ५ पुजारी, भक्त. ६ प्रतिमा. ७ संतोषानें, अतिशयानें. ८ प्रीति. ९ गुरुध्यान. १० शेषाची गादी. ११ विष्णु. १२ सेवा करणारी. १३ पायांची. १४ वृष्टि. १५ पांख फुटले नाहींत, डोळे उघडले नाहींत असें. १६ चोंचीनें. १७ तारक. १८ बळानें, स्थीरतेनें. १९ अवसान धरतो. २० उपासनेनें, भक्तीनें. २१ उपयोगीं पडणारीं. २२ पूजापात्रें, साहित्य करणारे पदार्थ.

लेती होऊनि ठाये । तैसें करूनि आण वाये । कृपे तिये ॥ ॥ ४१० ॥ तया अनुरागा वेधें लावीं । एकपत्नीव्रत घेववीं । क्षेत्रसंन्यास करवीं । लोभाकरवीं ॥ ११ ॥ चतुर्दिक्षुं वारा । न लाहे निघोन बाहिरा । तैसा गुरुकृपे पांजिरा । मीचि होईन ॥ १२ ॥ आपुलिया गुणांचीं लेणीं । करीन गुरुसेवे स्वामिणी । हें असो होईन गंवसणी । गुरुभक्तीसी ॥ १३ ॥ गुरुस्नेहाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटीं । ऐसिया मनोरथांचिया सृष्टी । अनंता रची ॥ १४ ॥ ह्मणे श्रीगुरूचें भुवन । आपण मी होईन । आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिचें ॥ १५ ॥ निर्गमांगमीं दातारें । जे वोलांडिजती उंबरे । ते मी होईन आणि द्वारें । द्वारपाळ ॥ १६ ॥ पाउवा मी होईन । तियां मीचि लेववीन । छत्र मी आणि करीन । वारीपण ॥ १७ ॥ मी तळ उपर जाणविता । चंवरधर हात देता । स्वामीपुढें खोलता । होईन मी ॥ १८ ॥ मीचि होईन सोंगळा । करू सुईन गुरुळा । सांडिती तो नेपाळीं । पडिघा मीचि ॥ १९ ॥ हडप मी वोळगेन । मीचि उंगाळु घेईन । उळिगें करीन मी । आंघोळीचें ॥ ४२० ॥ होईन गुरूचें आसन । अळंकार परिधान । चंदनादि होइन । उपचार ते ॥ २१ ॥ मीचि होईन सुआरु । वोगरीनें उपहारु । आपणपें श्रीगुरु । वोवाळीन ॥ २२ ॥ जे वेळीं देवो आरोगिती । तेव्हां पांतीकर मीचि पांती । मीचि होईन पुढती । देईन वीडा ॥ २३ ॥ ताट मी काढीन । [‘पादसेवनं’] सेज मी झाडीन । चरणसंवाहन । मीचि करीन ॥ २४ ॥ सिंहासन होईन आपण । वरि गुरु करिती आरोहण । होईन पुरेपण । वोळगेचें ॥ २५ ॥ [‘श्रवणं’] श्रीगुरूचें मन । जया देईल अवधान । तो मी पुढां होईन । चमत्कार ॥ २६ ॥ तया श्रवणाचे आंगणीं । होईन शब्दांचिया अक्षौहिणी । स्पर्श होईन घसणी । आंगांचिया ॥ २७ ॥ श्रीगुरूचे डोळे । अवलोकनें स्नेहाळें । पाहाती तियें सकळें । होईन रूपें ॥२८॥ तिये रसने जो रुचेल । तो तो रस म्यां होइजेल । गंधरूपें कीजेल । घ्राणसेवा ॥ २९ ॥ एवं बाह्यमनोगत । श्रीगुरुसेवा समस्त । वेटोळीन वस्तुजात । होऊनियां ॥ ४३० ॥ जंव देह हें असेल । तंव वोळगी ऐसी कीजेल । [‘आत्मनिवेदनं’] मग देहांतीं नवल । बुद्धि आहे ॥ ३१ ॥ इये शरीरींची माती । मेळवीन तिये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाती । श्रीगुरूचे ॥ ३२ ॥ माझा स्वामी कवतिकें । स्पर्शेत जियें उदकें । तेथ लया नेईन निकें । आपीं आप ॥ ३३ ॥ श्रीगुरू वोंवाळिजती । कां भुवनीं जे उजळिजती । तयां दीपांचिया दीप्तीं । ठेवीन तेज ॥ ३४ ॥ चवरी हन विंजणा । तेथ लय करीन प्राणा । मग आंगाचा वोळगणा । होईन मी ॥ ३५ ॥ जिये जिये आवकाशीं । श्रीगुरू असती परिवारेंसीं । आकाश लया आकाशीं । नेईन तिये ॥ ३६ ॥ परि जीत मेला न संडीं । निमेष लोकां न धाडी । ऐसेनि गणावया कोडी । कल्पांचिया ॥ ३७ ॥ येतुलेवरी धिंवसा । जयाचिया मानसा । आणि करूनिही तैसा । अपार जो ॥ ३८ ॥ रात्र दिवस नेणे । थोडें बहु न ह्मणे । ह्मणियाचेनि दाटपणें । साजा होय ॥ ३९ ॥ तो व्यापार येणेंनांवें । गगनाहूनि थोरावे । एकला करी आघवें । एकेचि काळीं ॥ ४४० ॥ हृदयवृत्ती पुढां । आंगचि घे देवडा । काज करी होडां । मानसेसीं ॥ ४१ ॥ एखादिया वेळां । श्रीगुरुचिया खेळा । लोण करी सकळा । जीविताचें ॥ ४२ ॥ जो गुरुदास्यें कृश । जो गुरुप्रेमें संपोष । जो गुरुआज्ञे निवास । आपणचि ॥ ४३ ॥ जो गुरुकुळें सुकुळीन । जो गुरुबंधुसौजन्यें सुजन । जो गुरुसेवाव्यसनें सव्यसन । निरंतर ॥४४॥ गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम । गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचें गा ॥ ४५ ॥ गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता । जो गुरुसेवेपरता । मार्ग नेणे ॥ ४६ ॥ श्रीगुरूचें द्वार । तें जयाचें सर्वस्व सार । गुरुसेवकां सहोदर । प्रेमें भजे ॥ ४७ ॥ [‘कीर्तनं’] जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ॥ ४८ ॥ [‘वंदनं’] शिवतलें गुरुचरणीं । भलतैसें हो पाणी । तया तीर्थयात्रे आणी । तीर्थें त्रैलोक्यींचीं ॥ ४९ ॥ श्रीगुरूचें उशिटें । लाहे जैं अवचटें । तैं तेणें लाभें विटे । समाधीसी ॥ ४५० ॥ कैवल्य सुखासाठीं । परमाणु घे किरीटी । उधळती पायांपाठीं । चालतां जे ॥ ५१ ॥ हें असो सांगावें किती । नाहीं पार गुरुभक्ती । परी गा उत्क्रांतमती । कारण हें ॥५२॥ जया इये भक्तीची चाड । जया इये विषयींचें कोड । जो हे सेवेवांचून गोड । न मनी कांहीं ॥ ५३ ॥ तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आवो । हें असो तो देवो ज्ञों-

---

१ एकव्याची. २ वाहून घेईन. ३ छंद. ४ चहूं दिशांकडून. ५ पिंजरा. ६ अलंकार. ७ जाण्यायेण्याचे वेळीं. ८ पादुका. ९ छत्रधरणें. १० चवरी धरणारा. ११ दिवव्या. १२ झारी धरणारा. १३ गुळणी, पीक. १४ चूळ. १५ तस्त, पिकदाणी. १६ पानदान. १७ पिक, चावलेला विडा. १८ कार्य, सेवा. १९ आचारी. २० वाढीन. २१ भोजन करतील. २२ पंक्तीला बसणारा. २३ पाय चेपणें. २४ सेवेचें. २५ असंख्य समुदाय. २६ आटोपीन, व्यापीन. २७ सेवा.

१ पृथ्वीला. २ राहतील. ३ उदक. ४ सेवक. ५ अज्ञाच कल्प कोटि गणाव्या. ६ धैर्य. ७ आज्ञा केलेल्या कार्याच्या. ८ टवटवीत. ९ धांव. १० पैजा मारतें. ११ ओवाळणी. १२ पुष्ट. १३ गुरुसेवा. १४ उच्छिष्ट. १५ पायधूळ. १६ व्यापक बुद्धि. १७ प्रीति, आवड. १८ शोभा. १९ देवाचा व ज्ञानाचाही भक्त.

न-भक्त ॥ ५४ ॥ हें जाण पां साचोकारें । तेथ ज्ञान
उघडोनि द्वारें । नांदत असे गा पुरें । इया रीती ॥ ५५ ॥
जिये गुरुसेवेविखीं । माझा जीव अभिलाखी । ह्मणोनि सोय-
सुकी । बोली केली ॥ ५६ ॥ येऱ्हवीं असतां हातीं खुळा ।
भजनावधानीं आंधळा । परिचर्येलागीं पांगुळा । पासूनि मंद
॥ ५७ ॥ गुरुवर्णनीं मुका । आळशी पोशिजे फुका । परि
मनीं आथी निका । सानुराग ५८ ॥ तेणें पैं कारणें । हें
स्थूळ पोसणें । पडलें मज ह्मणे । ज्ञानदेवो ॥ ५९ ॥ परि
ही बोल उपसाहावा । आणि बोळेंगे अवसर देयावा । आतां
प्रणेन जी बरवा । ग्रंथार्थचि ॥ ४६० ॥ ['आचार्योपासनं']
परिसा परिसा श्रीकृष्णु । जो भूतभारसहिष्णु । तो बोलतसे
विष्णु । पार्थ ऐके ॥ ६१ ॥ ['शौचं'] ह्मणे शुचित्व गा ऐसें ।
तयापाशीं दिसे । आंग मन जैसें । कापुराचें ॥ ६२ ॥ कां
रत्नाचें देंळवाडें । जैसें सबाह्य चोखडें । आंत बाहेरि एके
पाडें । सूर्य जैसा ॥ ६३ ॥ बाहेरि कर्में क्षाळला । भीतरी
ज्ञानें उजळला । इहीं दोहीं परि आला । पाखाळा एका ॥६४॥
मृत्तिका आणि जळें । बाह्य येणें मेळें । निर्मळ होय बोलें ।
वेदाचेनी ॥ ६५ ॥ भलतेथ बुद्धि बळी । रंजे आरिसा
उजळी । सौंर्दणी फेडी थिगळी । वस्त्रांचिया ॥ ६६ ॥ किंब-
हुना यियापरी । बाह्य चोख अवधारीं । आणि ज्ञानदीप
अंतरीं । ह्मणोनि शुद्ध ॥ ६७ ॥ येऱ्हवीं तरी पांडुसुता ।
अंतर शुद्ध नसतां । बाहेरि कर्म तो सर्वथा । विटंबु गा
॥ ६८ ॥ मृत जैसा श्रृंगारिला । गाढव तीर्थीं न्हाणिला ।
कडु दुधिया माखिला । गुळें जैसा ॥ ६९ ॥ वोसगृहीं तोरण
बांधिलें । कां उपवासी अन्नें लिंपिलें । कुंकुमसेंदुर केलें ।
कांतहीनेनें ॥ ४७० ॥ कलश ढिमांचे पोकळ । जळो वरील
झळाळ । काय करूं चित्रींव फळ । आंत शेण ॥७१॥ तैसें
कर्मी वरिचिलेकडां । न सरे थोर मोलें कुंडा । नव्हे मदि-
रेचा घडा । पवित्र गंगे ॥ ७२ ॥ म्हणोनि अंतरीं ज्ञान
व्हावें । मग बाह्यलाभें स्वभावें । वरी ज्ञान कर्में संभवे ।
ऐसें कें जोडे ॥ ७३ ॥ यालागीं बाह्यभाग । कर्में
धुतला चांग । ज्ञानें फिटला वंग । अंतरींचा ॥ ७४ ॥ तेथ
अंतरबाह्य गेलें । निर्मळत्व एक जाहालें । किंबहुना उरलें ।
शुचित्वचि ॥ ७५ ॥ ह्मणोनि सद्भाव जीवगत । बाहेरि दि-
सती फांकत । स्फटिकगृहींचे डोलत । दीप जैसे ॥ ७६ ॥
विकल्प जेणें उपजे । नाथिली विकृती निपजे । अप्रवृत्तीचीं
बीजें । अंकुर घेती ॥ ७७ ॥ तें आइके अथवा भेटे । परि
मनीं कांहींचि नुमटे । मेघरंगें न कांटे । व्योम जैसें ॥७८॥
येऱ्हवीं इंद्रियांचेनि मेळें । विषयांवरी तरी न लोळे । परि वि-
कराचेनि विटाळें । लिंपिजेना ॥ ७९ ॥ भेटलेया वाटेवरी ।
चोखी आणि माहारी । तेथ नातळे तियापरी । राहाटों
जाणे ॥ ४८० ॥ कां पतिपुत्रांतें आलिंगी । एकचि ते तरु-
णांगी । तेथ पुत्रभावाच्या आंगीं । न रिगे काम ॥ ८१ ॥
तैसें हृदय चोख । संकल्पविकल्पीं सनोळख । कृत्याकृत्य
विशेख । फुडें जाणे ॥ ८२ ॥ पाणियें हिरा न भिजे ।
आधणीं हरळ न शिजे । तैसी विकल्पजातीं न लिंपिजे ।
मनोवृत्ती ॥८३॥ ['स्थैर्यं'] तया नांव शुचित्वपण । पार्था गा
संपूर्ण । हें देखसी तेथ जाण । ज्ञान असे ॥ ८४ ॥ आणि
स्थिरता साचें । घर रिगाली जयाचें । तो पुरुष ज्ञानाचें ।
आयुष्य गा ॥ ८५ ॥ देह तरी वरिचिलीकडे । आपुलिया
परि हिंडे । परि बैसका न मोडे । मानसींची ॥ ८६ ॥ वत्सा-
वरूनि धेनूचें । स्नेह राना न वचे । नव्हती भोग सतियेचे ।
प्रेमभोग ॥ ८७ ॥ कां लोभिया दूर जाये । परि जीव ठेवां
ठाये । तैसा देह चालतां न होये । चळचित्ता ॥ ८८ ॥
जातया अभ्रासवें । जैसें आकाश न धांवे । भ्रमणचक्रीं न
भंवे । ध्रुव जैसा ॥ ८९ ॥ पांथिकाचिया येरझारा ।
सवें पंथ न चले धनुर्धरा । कां नाहीं जेवीं तरुवरां ।
येणें जाणें ॥ ४९० ॥ तैसा चळणवळणात्मकीं । असोनि
ये पांचभौतिकीं । भूतोर्मीं एकीं । चळिजेना ॥ ९१ ॥
वाहुटोळीचेनि बळें । पृथ्वी जैसी न ढळे । तैसा उपद्रव
उमाळें । न लोटे जो ॥ ९२ ॥ दैन्यदुःखीं न तपे । भय-
शोकीं न कंपे । देहमृत्यु न वोसिपे । पातलेनी ॥ ९३ ॥
आर्ति आशा पडिभरें । वय व्याधीं गजरें । उजू असतां
पाठिमोरें । नव्हे चित्त ॥ ९४ ॥ निंदा निस्तेजें दंडी । काम
लोभ वरपडी । परी रोम नव्हे वांकुडी । मानसाची ॥ ९५ ॥
आकाश हें वोसरो । पृथ्वी वरि विरो । परि नेणे मोहरो ।
चित्तवृत्ती ॥ ९६ ॥ हाती हाला फुलीं । पासावणा जेवीं न
घाली । तैसा न लोटे दुर्वाक्यें शेलीं । शेलिलों सांता ॥ ९७ ॥
क्षीरार्णवाचिया कल्लोळीं । कंप नाहीं मंदराचाळीं । आकाश न

१ खरेपणानें. २ विषयीं. ३ मार्ग सोडून. ४ थोटा.
सेवेकरितां. ६ जवळ असून. ७ प्रीति. ८ वर्णन.
सेवेला. १० प्राण्याचा भार सहनकर्ता. ११ समुदाय.
२ धुतला गेला. १३ स्वच्छतेस. १४ याच्या योगें. १५ आ-
नें. १६ पाहिजे तेथें. १७ मळ, धुरोळा. १८ परटाच्या
ट्यांतील धुण्याचें पाणी. १९ मुलाम्याचे. २० चमक.
। बाईट, दांभिक. २२ गंगेनें. २३ सहज. २४ कलंक, डाग.

१ लटकी, मिथ्या. २ कुमार्गाचीं. ३ किटत नाहीं.
४ उत्तम वर्ण. ५ शिवत नाहीं. ६ परिचित. ७ वाळु, खडे.
८ आत्मरूपीं पडलेली बैठक. ९ ठेवलेल्या द्रव्याजवळ
राहतो. १० भूतमात्राच्या विकारानें. ११ लोटानें. १२ भीत
नाहीं. १३ भरानें. १४ हलकल्लोळानें. १५ अपमान.
१६ मिठी पडली असतां. १७ लय पावो. १८ मागें फिरो.
१९ हलक्या फुलांनीं मारलें असतां हत्ती जसा मागें फिरत
नाहीं. २० शल्यानें. २१ छळलें असतां.

जळे जाळीं । वणवियाच्या ॥ ९८ ॥ तैशा आल्या गेल्या उर्मीं । नव्हे गजबज मनोधर्मीं । किंबहुना धैर्य[1] क्षमी । कल्पांतींही ॥९९॥ पैं स्थैर्य ऐसी भाष । बोलिजे जे सविशेष । ते हे दशा गा देख । देखणेया ॥ ५०० ॥ हें स्थैर्य निधंडें । जेथ आंगें जीवें जोडे । तें ज्ञानाचें उघडें । निधान साचें ॥ १ ॥ ['आत्मविनिग्रहः'] आणि ईसाळु जैसा घरा । कां दंदिया[2] हतियेरा । न विसंबे भांडारा । लुब्धक जैसा ॥ २ ॥ कां एकलौतिया[5] बाळका । वरि पढौनि ठाके अंबिका । मधुविषीं मधुमक्षिका । लोभिणी जैसी ॥ ३ ॥ अर्जुना जो यापरी । अंतःकरण जतन करी । नेदी उभें ठाकों द्वारीं । इंद्रियांच्या ॥ ४ ॥ ह्मणे काम बागुल ऐकेल । हे आशा सियारी[6] देखेल । तरी जीवा टेंकेल । ह्मणोनि बिहे ॥ ५ ॥ बाहेरी धीटँ[7] जैसी । दाटुगा[8] पति कळासी । करी टेहेणी[9] तैसी । प्रवृत्तीसीं ॥ ६ ॥ संचेतनीं[10] बाणेपणें । देहासकट आटणें । संयमावरी करणें[11] । कुंझूनि[12] घाली ॥ ७ ॥ मनाचिया महाद्वारीं । प्रत्याहाराचिया[13] ठाणांतरीं[14] । यमदम शरीरीं । जागवी उभे ॥८॥ आधारीं[15] नाभीं[16] कंठीं[17] । बंधत्रयाची[18] घेरटी[19] । चंद्रसूर्यसंपुटीं[20] । सुये[21] चित्त ॥ ९ ॥ समाधीचे शेजेपाशीं । बांधोनि घाली ध्यानासी । चित्तचैतन्यसमरसीं । अंतरें[22] रंते ॥ ५१० ॥ अगा अंतःकरणनिग्रहो जो । तो हा हें जाणिजो । हा आथी तेथ विजयो । ज्ञानाचा पैं ॥ ११ ॥ जयाची आज्ञा आपण । शिरीं वाहे अंतःकरण । मनुष्याकारें जाण । ज्ञानचि तो ॥ १२ ॥

**"तर कोणत्याही विषयांत गर्क होऊन जाणें ज्यास आवडत नाहीं, आणि संभावितपणाचें—मोठेपणाचें—ज्याला ओझें वाटतें. १८५ असलेल्या गुणाचें वर्णन केलें; थोरपणानें मान दिला; आंगीं योग्यतेचें रूप आलें; १८६ तर तो कसा घाबरतो? कीं जणों काय अडविलेला मृगच. किंवा हातानें पोहतांना भोंवऱ्यांत सांपडल्याप्रमाणें. १८७ अर्जुना! सन्मान झाला असतां, जो अशा प्रकारें संकटांत पडतो. आपल्या आंगाकडे मोठेपणा ह्मणून जो येऊंच देत नाहीं. १८८ पूज्यता डोळ्यांनीं पाहूं नये; आपली कीर्ति कानांनीं ऐकूं नये. हा 'अमका' अशी लोकांना आठवणच होऊं नये. १८९ मग सत्काराची गोष्ट कशाला? आणि कोणत्या हेतूनें तो भेट देणार? नमस्कार केला तर ज्याला मरणाप्रमाणें होतें. १९० बृहस्पतीप्रमाणें आंगीं सर्वज्ञता असते, पण महत्त्वाच्या भयानें अज्ञानांत दडावयाचें. १९१ चातुर्य लपवितो; महत्त्व सांडून टाकतो; आणि वेडेपण आवडीनें मिरवितो. १९२ लौकिकाची भीति; शास्त्राची उपेक्षा; आणि स्वस्थ—निवांत बसण्यांत मात्र अगदीं भर. १९३ जगानें आपला अपमान करावा; आप्तांनीं आपल्याकडे ढुंकून बघूं नये; अशा अशा प्रकारची जिवाला मोठी इच्छा. १९४ लीनपणा स्वीकारतात; हीनपण हेंच आपल्या आंगचें भूषण असें मानून कृतीही बहुत करून तशीच करतात. १९५ हा जिवंत आहे कां नाहीं? अशाच भावनेनें लोकांनीं कल्पना कराव्यात, अशा प्रकारची वृत्ति व्हावी, अशी ज्याची इच्छा असते. १९६ पलीकडे चालतो आहे कीं चालत नाहीं! कां वाऱ्यानें जातो आहे? असा लोकांना भ्रम उत्पन्न होईल, अशी जो वागणूक ठेवतो. १९७ माझें अस्तित्व नाहींसें व्हावें; नामरूप विसरावें; प्राणिमात्रांनीं मला भिऊं नये, १९८ असे ज्याचे नवस असतात. जो नित्य एकांतांत जाऊन बसतो. निर्जन नांवानेंच जो जगतो. १९९ वायूची आणि त्याची मैत्री जुळते; ज्याला गगनाशीं बोलणें आवडतें; झाडें हीं ज्याला जीवासारखीं प्रिय. २०० अशा प्रकारचीं लक्षणें ज्याच्या ठायीं दृष्टीस पडतील, त्याला ज्ञानाची प्राप्ती झाली ह्मणून समजावें. २०१ पुरुषाच्या ठिकाणीं अमानित्व तें ह्या लक्षणांनीं असतें ह्मणून लक्ष्यांत ठेव. आतां अदंभाच्या चिन्हाचें विवरण करूं. २०२ तर अदांभित्व तें असें. लोभ्याचें मन जसें जीव गेला तरी, ठेवा**

१ धैर्य क्षमायुक्त. २ बळकट. ३ लोभी, ब्रह्मराक्षस. ४ योद्धा. ५ एकुलता एक. ६ डाकीण. ७ व्यभिचारिणी. ८ दांडगा. ९ टेहळणी. १० आत्मस्वरूपामध्यें. ११ इंद्रियें. १२ समजूत करून. १३ विषयांपासून उपरम पावलेल्या बुद्धीच्या. १४ पहाण्याच्या जागेंत. १५ मूलाधार चक्रांत. १६ मणिपूर चक्रांत. १७ विशुद्ध चक्रांत. १८ वज्र, ओढियाण, जालंधर. १९ गस्त. २० इडापिंगळांच्या संगमस्थानीं. २१ घालतो. २२ आंत रममाण होतें.

ठेवलेली जागा दाखवित नाहीं, २०३ त्याप्रमाणें **अर्जुना!** प्राणावर येऊन बेतलें तरी आपण केलेलें सुकृत आपल्या मुखानें जो बाहेर काढित नाहीं, २०४ **अर्जुना!** लाथऱ्या गायीला आलेला पान्हा जशी ती चोरते, किंवा वेश्या ज्याप्रमाणें वयातीतपणा चोरते, २०५ श्रीमान् मनुष्य अरण्यांत सांपडला असतां तो जसा आपली आढ्यता सोडून देतो, किंवा कुलवधू ज्याप्रमाणें आपले अवयव लपविते, २०६ किंवा शेतकरी आपण पेरलेलें झांकून ठेवतो, त्याप्रमाणें दानापासून प्राप्त झालेलें पुण्य जो झांकून ठेवतो. २०७ वरकरणी देहाची पूजा करीत नाहीं; किंवा लोकांची खुशामतही करीत नाहीं; किंवा आपला धर्म असेल तो, वाचारूपी ध्वजावर बांधूनही ठेवित नाहीं. २०८ केलेला परोपकार बोलून दाखवीत नाहीं. ज्याचा अभ्यास केला असेल, त्याचा डौल मिरवित नाहीं, किंवा कीर्तीसाठीं संपादन केलेलें विकितही नाहीं. २०९ शरीरभोगाविषयीं पाहिलें तर, कृपण वाटतो; पण धर्माच्या कामांत थोडें किंवा बहुत ह्याचा विचारच मनांत आणित नाहीं. २१० घरांत पाहूं गेलें तर दारिद्र्य; देहांतील अवयव पाहिले तर रोड; पण दानामध्यें मात्र कल्पतरूशींही पैज लावणारा. २११ ह्मणजे स्वधर्मामध्यें थोर; प्रसंगाला उदार; आत्मचर्चेमध्यें चतुर; येरवीं मात्र वेडा. २१२ केळीच्या झाडांकडे पाहिलें तर तीं मऊ आणि पोकळ अशीं वाटतात. पण फळांकडून जशीं अत्यंत रसाळ असतात, २१३ किंवा मेघाचें आंग इतकें हलकें वाटतें कीं, तें वाऱ्यानें उडून जाईल. पण ते सुद्धां गारांचा वर्षाव करितात. ही किती आश्चर्याची गोष्ट आहे? २१४ त्याप्रमाणें पूर्णपणानें पाहिलें तर तृप्तीचीही तृप्ति होते. बाकी मूर्तिमंत दारिद्र्य तें तो. २१५ हें असो. ह्या लक्षणाचा उत्कर्ष ज्याच्या ठायीं दिसून येतो त्याच्या हाताला ज्ञान चढलें हें लक्षांत ठेव. २१६ तसेंच अदांभित्व ह्मटलें तें हें. हें ध्यानांत असूं दे. आतां अहिंसेचें लक्षण ऐक.

२१७ अहिंसा ही अनेक प्रकारची असून निरनिराळ्या मतांप्रमाणें निरनिराळ्या प्रकारानें तिचें निरूपण केलेलें आहे. हें लक्षांत ठेव. २१८ पण तें असें आहे कीं, ज्याप्रमाणें खांद्या तोडून मग त्याच्या बुडख्याला त्यांचें कुंपण करावें, २१९ किंवा हात तोडून शिजवावेत, आणि मग त्यानें क्षुधेची पीडा दूर करावी. किंवा देऊळ मोडून त्याची देवाला पोवळी बांधावी. २२० त्याप्रमाणें हिंसा करूनच अहिंसा उत्पन्न करावी, असा कर्मकांडामध्यें निर्णय केलेला आहे. २२१ कारण, अनावृष्टीच्या उपद्रवानें सारें विश्व गांजून जातें. ह्मणून पर्जन्यवृष्टि होण्याकरितां अनेक प्रकारचे याग करितात. २२२ तों त्या यज्ञाच्या आरंभाला प्रत्यक्षच पशुहिंसा असते. मग अहिंसेच्या पलीकडचें तीर कसें दिसणार? २२३ केवळ हिंसाच जेथें पेरली गेली, तेथें अहिंसा उत्पन्न होईल काय? पण बावा! ह्या याज्ञिकांचें धाडस मोठें आश्चर्य करण्यासारखें आहे! २२४ आणखी **अर्जुना!** जीवासाठीं जीवाचा घात करणारा सारा आयुर्वेदही ह्याच पंथांतला. २२५ अनेक प्रकारच्या रोगांनीं प्राणिमात्र होरपळून लोळतांना पाहिले, ह्मणजे ती हिंसा नाहींशी करण्याकरितां चिकित्सा करतात. २२६ पण त्या चिकित्सेसाठीं प्रथमच एकाचे कांदे, एकाचीं मुळें खणून काढवितात. आणि एकास मूळापानांसकट उपटून आणतात. २२७ एक समूळ उपटून काढतात; एकाची साल काढवितात; कित्येक फलद्रूप होणारीं, गर्भवंत झाडेंच भट्टीमध्यें घालून उकडून काढतात, भाजतात. २२८ कोणाचेंही शत्रुत्व न करणाऱ्या झाडांच्या सर्वांगावर खांचा पाडून ठेवतात. **अर्जुना!** अशा प्रकारें त्यांचा जीव घेऊन तीं सुकवून ठेवितात. २२९ आणि जंगमाला–ह्मणजे प्राण्यावरही हात टाकून त्यांचें पित्त काढतात, आणि दुसरे कष्टी होत असलेले जीव असतील ते वांचवितात. २३० अहो! रहावयाचीं चुनागचीं घरें मोडून देवळें बांधावीत,

किंवा व्यापारामध्यें लोकांस बुडवून अन्नसत्र घालावें, २३१ किंवा मस्तकावर पांघरूण घालण्यास जावें, तों खालचें आंग उघडें पडावें. किंवा घर मोडून त्याच्यापुढें मंडप घालावा, २३२ किंवा अनेक प्रकारचीं चिरगुटें जाळून ज्याप्रमाणें तापत बसावें, किंवा हत्तीचें ज्याप्रमाणें स्नान व्हावें, २३३ नाहींतर बैल विकून गोठा बांधावा, किंवा राघू सोडून देऊन पिंजरा तयार करावा, अशा करणीला किंवा चाळ्याला काय हंसावें ? २३४ कित्येक लोक धर्म राखण्याकरितां पाणी गाळून घेतात; तों गाळण्याच्या त्रासानेंच जीव मरतात. २३५ कित्येक ह्या हिंसेच्या भयानें धान्य शिजवितच नाहींत. पण त्यामुळें जिवाला जो त्रास होतो, तीच हिंसा. २३६ ह्याप्रमाणें प्रसन्न मनाच्या **अर्जुना!** कर्मकांडामध्यें हिंसा हीच अहिंसा असा सिद्धांत आहे हें लक्ष्यांत ठेव. २३७ आह्मी जेव्हां प्रथमच अहिंसेचें नांव घेतलें, त्याच वेळीं बुद्धीनें हें सांगण्याची इच्छा धरली. २३८ तेव्हां ती वगळावी कशी ? ह्मणून इतकें बोलावें लागलें. शिवाय, तें तुला कळावें असाही हेतु होताच. २३९ आणखी **अर्जुना!** ह्या गोष्टीही बहुतेक विषयाला धरूनच आहेत. नाहीं तर आडवाटेनें धांवणार कोण ? २४० शिवाय **अर्जुना!** आपल्या मताला पुष्टी आणण्यासाठीं, ओघानुसार दुसऱ्यांच्या मतांचाही उल्लेख करावा लागतो. २४१ विषयप्रतिपादनाची तऱ्हा अशीच असते. हें लक्ष्यांत असूं दे. आतां ह्यापुढें मुख्य असें जें, २४२ माझें मत तें सांगून अहिंसेचें वर्णन करण्यांत येईल. तें सुरूं झालें कीं आंतील ज्ञान दिसूं लागेल. २४३ पण तें आंगीं बाणलें किंवा नाहीं, हें आचरणाच्या कृतीनें समजतें. कसोटी ज्याप्रमाणें सोन्याच्या निरनिराळ्या प्रती दाखविते, २४४ त्याप्रमाणें ज्ञानाची आणि मनाची भेट झाली कीं लगेच अहिंसेची मूर्ति उत्पन्न होते. **अर्जुना!** अशा प्रकारचें जें ज्ञान तेंच आतां ऐक. २४५ तर लाटा न ओलांडतां, पायानें लाटांस न धका लावतां, पाण्याचा संथपणा न मोडतां, २४६ लौकर आणि हळू, भक्ष्यावर दृष्टि ठेऊन पाण्यामध्यें बगळा जसा पाऊल टाकतो, २४७ किंवा केसराचा चुरा होईल अशा शंकेनें कमलावर भ्रमर ज्याप्रमाणें हळूच पाऊल ठेवतात, २४८ त्याप्रमाणें परमाणुवत् लहान लहान जीव भरलेले आहेत, हें मनांत आणून जो दयार्द्र वृत्तीनें चोरून पावलें टाकतो, २४९ तो ती वाटच कृपामय करीत असतो. तो सर्व दिशा ममतेनें भरतो, आणि प्राण्यांच्या खालीं तो आपला जीव आंथरतो. २५० **अर्जुना,** इतकें जपून ज्याचें चालणें, तें खरोखरच फार अवर्णनीय आहे. त्याची मर्यादा सांगतां येत नाहीं. २५१ मांजरी प्रेमानें पिलीं तोंडांत धरते, तेव्हां तिच्या दांतांचीं टोकें जितकीं लागतात, २५२ किंवा दयाळू आई जशी मुलाची वाट पाहातांना तिची दृष्टि जशी कोमल असते, २५३ किंवा कमलपत्रें डोलतांना वायू जसा मंद निघतो, २५४ तशा मृदुलतेनें जो भूमीवर पाउलें टाकतो. आणखी तीं जेथें पडतात, तेथील प्राण्यांना सुख होतें. २५५ **अर्जुना!** अशा रीतीनें हळू हळू चालतांना देखील कृमिकीटक दृष्टीस पडले, तर जो हळूच माघारी फिरतो. २५६ आणि मनांत ह्मणतो कीं पाय आपटला, तर प्रभूचा निद्राभंग होईल आणि निद्रासुखांत विक्षेप घडेल, २५७ अशा काकुलतीनें मागें पाऊल घेतो. कोणताही प्राणी तुडवित नाहीं. २५८ एखाद्या गवताला जर प्राण्याचें नांव असेल, तर तें तृण सुद्धां ओलांडित नाहीं. मग प्रत्यक्ष जिवांना न जुमानतां जाण्याची गोष्ट कशाला ? २५९ मुंगीला जसा मेरु पर्वत ओलांडवत नाहीं, माशीला जसा समुद्र तरवत नाहीं; त्याप्रमाणें कोणताही प्राणी भेटला असतां, त्याचा अतिक्रम ज्याला करवतच नाहीं. २६० अशी ज्याची चाल कृपेच्या फलपुष्पांनीं गजबजलेली, आणि ज्याच्या वाचेंत ही मूर्तिमंत दया, २६१ स्वतः श्वासोच्छ्वास सोडला तरी हळू; मुख तर

स्नेहाचें माहेर घर; दांत जणों काय मधुर वचनाला कोंभच फुटलेले. २६२ पुढें स्नेहाचा पाझर, आणि मागाहून अक्षरें चालतात. आधीं कृपा; आणि शब्दांचा अवतार पाठीमागून. २६३ बोलावयाचें तर नाहींच; आणखी कांहीं बोलावें असें जर मनांत आलें, तर माझें बोलणें कोणास लागेल काय? २६४ किंवा बोलतां बोलतां अधिक निघालें तर कोणाच्या मर्मास लागत नाहीं आणि कोणाच्या मनांत शंकाही येत नाहीं. कोणाच्या चालू क्रमांत प्रत्यय तर येणार नाहींना? २६५ कोणास भीती वाटेल; कोणी उडून जाईल. आपलें भाषण ऐकून त्याचा जरी कोणी अव्हेर केला, २६६ तरी कोणाला क्लेश होऊं नयेत. कोणाची भोंवई उचलूं नये–वक्रदृष्टि होऊं नये. असा हेतु मनामध्यें असतो ह्मणून बोलतच नाहीं. २६७ याउपर कोणी प्रार्थना करून कदाचित् बोलूं लागलाच, तर इतकें प्रेमळ कीं, ऐकणाराला केवळ मायबाप असा वाटतो. २६८ किंवा वेदच मूर्तिमंत प्रगट व्हावेत, किंवा गंगोदकच उसळून वर यावें, किंवा पतिव्रता स्त्रीचें वाक्य असावें, २६९ त्याप्रमाणें सत्य आणि मृदु; परिमित आणि रसाळ; जणों काय अमृताच्या लाटा, असे शब्द. २७० विरुद्ध वादाचा जोर; प्राण्यास कासाविस करणें, उपहास, छळ, किंवा मर्मभेद, २७१ कोरडें लाघव, कपट, आशा, शंका, प्रतारणा इत्यादि अवगुणांचा ज्याच्या वाचेनें त्याग केलेला, २७२ तसेंच अर्जुना! ज्याची दृष्टि सुप्रसन्न, भृकुटि सरळ–कधीं आठ्या नाहींत, २७३ किंवा प्राणिमात्रांत जें तत्त्व–परब्रह्म–भरलेलें आहे, त्याला कदाचित् धक्का लागेल, ह्मणून बहुत करून जे डोळे उघडून वाटेकडे सुद्धां पहातच नाहींत. २७४ असें असतांही एखादे वेळीं, आंतील कृपेच्या जोरानें डोळे उघडून पाहूं लागला २७५ तर, चंद्रबिंबांतून धारा निघालेल्या दिसत नाहींत, तरी चकोरांना भरसकट तृप्ति करून सोडतात. २७६ त्याप्रमाणें प्राणिमात्रांना होऊन जातें. तो जर कधीं कांहीं पाहूं लागला तर, त्याच्या दृष्टींतील प्रेम कासवीच्या दृष्टींतही पहावयास मिळत नाहीं. २७७ अशी ज्याची प्राणिमात्रावर दृष्टि, आणि हातही तसेच. २७८ सिद्धांचे मनोरथ जसे कृतकार्य होऊन राहतात, त्याप्रमाणें ज्याचे हातही निर्व्यापार असतात. २७९ अशक्त असून त्याग केलेला असावा, किंवा काष्ठरहित विझून गेलेला अग्नि असावा, किंवा मुक्यानें जसें मौनव्रत घ्यावें, २८० त्याप्रमाणें ज्याच्या हातांना कांहींच करणें नाहीं. जे अकर्तृत्वाच्या ठिकाणीं बसावयाला येतात. २८१ वाऱ्याला ओढ बसेल, आकाशाला नख लागेल, अशा बुद्धीनें हाताला जो हालूं देत नाहीं. २८२ तेथें आंगावर बसलेल्यास उडवून लावावें, किंवा डोळ्यामध्यें शिरत असलेल्यास झाडून लावावें, व पशुपक्ष्यांना क्रोधमुद्रा दाखवावी, २८३ ह्या गोष्टी कोठच्या? **अर्जुना!** काठीनें दंड करणेंही ज्यास आवडत नाहीं, मग शस्त्राचें नांव कशाचें? २८४ मृदु कमळानें खेळणें, किंवा फुलांचे हार झेलणें, हें सुद्धां तो करीत नाहीं. कारण, तें गोफणीप्रमाणें त्रासदायक होईल असें मानतो. २८५ केशपंक्तीला धक्का लागेल ह्यासाठीं आंग सुद्धां कुरवाळित नाहीं. बोटावर नखाची गुंडाळी वाढवून ठेवतो. २८६ अशा प्रकारें कोणतेंही कर्म करण्याचाच आधीं अभाव; पण तसाही प्रसंग आलाच तर, हातांना ही संवय कीं, त्यांनीं जोडून पुढें व्हावें. २८७ किंवा उचलावयाचा, तर अभय वचन देण्यासाठीं उचलावयाचा. हात द्यावयाचा तर, पडलेल्याला द्यावयाचा, किंवा दुःखितावर हळू हळू फिरवावयाचा. २८८ हें तरी मोठ्या संकटानेंच करावयाचें, पण तेणेंकरूनही दुःखिताचें भय नाहींसें होतें. चंद्रकिरणांनाही जो जिव्हाळा माहित नाहीं, २८९ अशा प्रकारच्या मलयागिरी पर्वतावरून वाहणाऱ्या मंद झुळुकीहूनही मृदु अशा हातांनीं पशूंना स्पर्श करितात.

२९० जे सदा सर्वकाळ चंदनाच्या आंगाप्रमाणें शीतल; व फल नसतांही निष्फल न होणारे अशा प्रकारचे. २९१ आतां हा पाल्हाळ असो. सज्जनांचा जसा स्वभाव असतो, त्याचप्रमाणें त्यांचे हातही असतात. २९२ आतां त्यांचें मन खरोखर कसें असतें तें सांगावयाचें. पण हीं सांगितलेलीं लक्षणें कोणाचीं? २९३ शाखा ह्मटल्या ह्मणजे वृक्ष नव्हे काय? पाण्याशिवाय समुद्र असतो काय? तेज आणि तेजोबिंब हीं निराळीं निराळीं का असतात? २९४ अवयव आणि शरीर हीं खरोखर वेगळीं का असतात? किंवा रस आणि उदक हीं काय भिन्न भिन्न आहेत? २९५ ह्मणून हीं जीं सारीं बाह्य लक्षणें सांगितलीं तीं अवयवांसहवर्तमान मनाचींच हें लक्षांत आण. २९६ भूमीमध्यें जें बीं रुजत घालावें, तेंच वृक्ष होतें. त्याप्रमाणें इंद्रियद्वारानें जें पसरतें, तेंच अंतःकरण, किंवा मन होय. २९७ मनामध्येंच जर अहिंसेला थार नसेल, तर ती बाहेर प्रगट होणार कशी? २९८ अर्जुना! कोणतीही वृत्ति आधीं मनांतच उद्भवते आणि मग ती वाणीमध्यें, दृष्टीमध्यें, व हातामध्यें येते. २९९ ती जर मनांतच नसेल, तर वाणींत उठेल काय? बीजाशिवाय, भूमीमध्यें मोड असतो का? ३०० ह्मणून मनाचा धर्मच जेव्हां मोडतो, तेव्हां इंद्रियें आधींच पराङ्मुख व्यापारशून्य होतात. सूत्रधारावांचून ज्याप्रमाणें कळसूत्री बाहुली व्यर्थ, ३०१ किंवा उगमांतच सुकून गेलेलें, तें ओघामध्यें येणार कोठून? जीव गेल्यानंतर देहांत हालचाल असते काय? ३०२ त्याप्रमाणें अर्जुना! हें मन आधीं मूळ इंद्रियभावनेस कारण होतें. आणि मग त्याच्या सर्वद्वारांतून तें बाहेर पडतें. ३०३ परंतु ज्या वेळेस जसें तें आंत होऊन राहिलेलें असतें, त्याच व्यापारानें तें बाहेर पडतें. ३०४ ह्याकरितां खरोखर मनामध्यें अहिंसा दृढतर बिंबली ह्मणजे पक्वदशेस आलेला मकरंद जसा सर्वांना तृप्त करीत आदरानें बाहेर पडतो, त्याप्रमाणें इंद्रियांना तीच मुबलक संपत्ति दिली असतां, तीं अहिंसेचाच व्यापार करीत रहातात. ३०६ समुद्रामध्यें भरती तुडुंबते, तेव्हां खाड्यांमध्येंही समुद्रच भरतो. त्याप्रमाणें मन आपल्याच संपत्तीनें इंद्रियांना भरून टाकतें. ३०७ हा पाल्हाळ असो. पंतोजी मुलाचा हात धरून आपणच अगदीं रेखल्यासारख्या ओळी लिहितो; ३०८ त्याप्रमाणें मन हें आपलें दयालुत्व हातांपायांना आणतें, आणि मग तें अहिंसा उत्पन्न करतें. ३०९ ह्याकरितां अर्जुना! इंद्रियांचे धर्म सांगतां सांगतां मनाचा व्यापारही उघडा करून दाखविला. ३१० ह्याप्रमाणें कायावाचामनेंकरून ज्याच्या ठिकाणीं, हिंसेचा सर्वसंन्यास झालेला पाहशील, ३११ तोच ज्ञानाचें विशाल मंदिर होय. हें तर काय? पण सारें मूर्तिमंत ज्ञान तोच. ३१२ अहिंसा ह्मणून जी आपण कानांनीं ऐकतों, किंवा ग्रंथाधारानें निरूपण केली जाते, ती पहावीशी जेव्हां मनांत येईल, तेव्हां त्यालाच पहावें. ३१३ असें देवांनीं सांगितलें." तें खरें ह्मटलें ह्मणजे एका शब्दांत सांगावें. पण त्याचा विस्तार झाला, ह्याची आपण क्षमा करावी. ३१४ आतां आपण असें ह्मणाल कीं, हिरवा चारा गुरानें पाहिला ह्मणजे तें मागची वाट धरावयाची विसरतें. किंवा वाऱ्याच्या वेगाबरोबर आकाशामध्यें पांखरूं वाहवत सुटतें, ३१५ त्याप्रमाणें प्रेमाच्या स्फूर्तीला रसवृत्ति मिळाल्याच्या योगानें त्याच्याही बुद्धीनें त्याला वाहविला. आणि ती त्यास आंवरेनाशी झाली. ३१६ तर तसें मात्र नव्हे हो. हें ध्यानांत असूं द्या. येथें विस्तार करण्याला कारण आहे. बाकी अहिंसा हा शब्दच पाहूं गेलें तर तीनच अक्षरांचा आहे. ३१७ अहिंसा ह्मणावयाला गेलें तर थोडीच आहे. पण हजारों मतांचें खंडण करावें, तेव्हांच तिचें स्पष्टीकरण होतें. ३१८ बाकी, इतर पुढें आलेलीं भिन्न भिन्न मतें जशींच्या तशींच ठेवून तुमच्या पुढें बोलूं लागलों

तर चालावयाचें नाहीं. ३१९ रत्नपरीक्षकाच्या गांवामध्यें गंडकीशिला सुद्धां फेंकून देतात, अशा ठिकाणीं संगमरवरी दगडांनीं–गारांनीं–आपली प्रतिष्ठा सांगत बसूं नये. ३२० जो आपल्या संगतीनें मंद–निर्गंध–अशा पिठालाही आपल्या मोलानें विकतो, त्या कापुराला वास कशाचा? हेंही मनांत आणा. ३२१ ह्मणून महाराज! वक्तृत्वाच्या जोरावर बोलण्याचा या आपल्या सभेंत उपयोग होणार नाहीं. ३२२ सामान्य मतें आणि विशेष मतें ह्यांची खिचडी करून बोलूं लागलों, तर तें बोलणें, कानाच्या द्वाराकडे आपण नेणार सुद्धां नाहीं. ३२३ शंकेच्या केरकचऱ्यानें अर्थ मलिन झाले कीं, आलेलें लक्ष्यही मागच्या पायांनीं पळत सुटेल. ३२४ किंवा ज्या वेळीं शेवाळीचें आच्छादन करून पाणी राहिलेलें असतें, तेव्हां हंस त्याच्या वाटेस जातात काय? ३२५ किंवा अभाळाच्या आड चांदणें असलें ह्मणजे चकोरपक्षी आपल्या चोंची आनंदानें कधींही पुढें करीत नाहींत. ३२६ त्याप्रमाणें निर्विवाद निरूपण झालें नाहीं, तर आपण त्याच्याकडे ढुंकूनही पहाणार नाहीं. शब्द तर ऐकणार नाहींच, पण वर आणखी रागावाल मात्र. ३२७ दुसऱ्यांचीं मतें समजून दिलीं नाहींत, त्यांच्यावरच्या आक्षेपांचें खंडण केलें नाहीं, तर आपली प्राप्ती होणार नाहीं. ३२८ आणि माझें सारें प्रतिपादन एवढ्याच हेतूकरितां कीं, तुह्मीं संतांनीं निरंतर सन्मुख असावें. ३२९ बाकी खरें ह्मटलें तर, आपण गीतार्थाचे सोयरे आहांत. हें मनांत आणूनच मी तिला धरून बसलों आहें. ३३० कारण, आपलें सर्वस्व घाल, आणि हिला सोडवून न्याल. ह्मणून गीता हा ग्रंथ नव्हे. हा गहाण जिन्नस आहे हेंच खरें. ३३१ आपण सर्वस्वाचा लोभ धरून ह्या गीतेचा अव्हेर कराल काय? तसें झालें तर गीतेची आणि माझी दशा एकच, हें ध्यानांत ठेवा. ३३२ किंबहुना आपल्या कृपेचीच मला विशेष गरज आहे. त्यासाठीं ग्रंथाचें एक निमित्त पुढें केलें आहे. ३३३ त्याकरितां तुह्मां रसिकांजोगें भाषणही शोधून काढावें लागतें. ह्मणून अन्यमतें सांगितलीं. ३३४ त्यामुळें विषयाचा विस्तार झाला. आणि श्लोकाच्या अर्थाला अंतर पडलें. ह्याकरितां त्या भाषणाबद्दल मला लेंकराला क्षमा करावी. ३३५ शिवाय, घासांतला केरकचरा काढावयाला वेळ लागतो खरा; पण तो कांहीं दोष नव्हे. त्यांतलें गदळ हें काढलेंच पाहिजे. ३३६ किंवा बरोबर असलेल्या चोराला चुकविण्यासाठीं दिवस लागले, तर आईनें मुलावर रागवावें, कां जीव वांचला ह्मणून त्याचें लिंबलोण उतरावें? ३३७ पण ह्यावर इतकें बोलणेंही बरें नव्हे. आपण क्षमा केली हेंच ठीक झालें. आतां महाराज! देव काय बोलले तें ऐकावें. ३३८ ते ह्मणाले "हे ज्ञानोत्तमनयना **अर्जुना!** सावध हो. आतां तुला ज्ञानाची ओळख करून देतों. ३३९ तर गाजावाजा केल्याशिवाय, जेथें क्षमा वास्तव्य करते, तेथें खरोखर ज्ञान आहे हें तूं ध्यानांत ठेव. ३४० अगाध सरोवरामध्यें ज्याप्रमाणें कमळिणी वाढते, किंवा भाग्यवंताच्या घरीं ज्याप्रमाणें संपत्ति वाढते, ३४१ त्याप्रमाणें **अर्जुना!** ज्याच्या ठायीं क्षमा वाढत असते, ती क्षमा नीटरीतीनें लक्ष्यांत येईल असें तिचें लक्षण सांगतों. ३४२ तर आवडते अलंकार ज्या भावनेनें आंगावर घालावेत, त्याप्रमाणें जो सर्व सहन करतो; ३४३ अध्यात्मिक, आधिदैविक, व आधिभौतिक ह्या तीनप्रकारच्या उपद्रवांच्या झुंडीच्या झुंडी येऊन कोसळल्या तरी, जो वांकडा ह्मणून होतच नाहीं; ३४४ आपल्याला ज्याची इच्छा असेल, तें प्राप्त झालें तर, त्याला जितका संतोष होतो, तितकाच अनिष्ट प्राप्त झालें तरीही ज्यास होतो; ३४५ मान आणि अपमान जो सहन करतो; सुख आणि दुःख ह्यांचा ज्याच्यांत समावेश होतो; निंदा किंवा स्तुतीनेंही जो दुभंग होत नाहीं; ३४६ उन्हाळ्यानें ज्याला ताप होत नाहीं; हिंवाळ्यानें जो कांपत

नाहीं; कांहींही प्राप्त झालें तरी, ज्यास भीतिही ह्मणून नाहींच. ३४७ आपल्या शिखराचा भार जसा मेरूला कळत नाहीं; किंवा वराह अवताराला जसें मेरूचें ओझें वाटत नाहीं, ३४८ किंवा चराचरांनीं आणि प्राण्यांनीं पृथ्वीला कांहीं भार होत नाहीं; त्याप्रमाणें सुखदुःखादिक नाना द्वंद्वें प्राप्त झालीं असतां, ज्याला श्रम पडत नाहींत. ३४९ नदीचे आणि नद्यांचे समुदाय, पाण्याचे लोंढे घेऊन आले तरी, समुद्र ज्याप्रमाणें पोट मोठें करतो, ३५० त्याप्रमाणें ज्याच्यामध्यें कांहीं राहात नाहीं, असें कांहींच नाहीं. आणि आपण करतों, ह्याचें ज्याला स्मरणही पण उरत नाहीं. ३५१ शरिरावर जें जें कांहीं येऊन पडेल, तें तें आपलेंच करून सोडतो. आणि तें सहन केलें ह्यांत मोठेंसें आपण शतकृत्य केलें असेंही ज्याच्या मनांत येत नाहीं. ३५२ हे **प्रियोत्तमा!** अशा प्रकारची निरहंकार क्षमा जेथें वस्ती करते, तेथें ज्ञानाचा महिमा वाढतो. ३५३ हे **पांडवा!** तो पुरुष ज्ञानाचा झरा असें समज. आतां आर्जव–ह्मणजे सरळपणा–कशाला ह्मणतात, त्याचीं लक्षणें सांगतों. ३५४ तर पाहिजे त्या प्राण्यामध्यें प्राणाचें सौजन्य जसें एकसारखें असतें, त्याप्रमाणें जी वर्तणूक तिचें नांव आर्जव. ३५५ किंवा सूर्य हा जसा तोंड पाहून प्रकाश करीत नाहीं; किंवा कोणत्याही ठिकाणीं आकाश जसें एकसारखें, ३५६ त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याशीं ज्याचें मन वेगळें वेगळें असत नाहीं, आणि वर्तनही पण तसेंच. ३५७ कारण, सारें जगच त्याच्या ओळखीचें. आणि जगाशीं पहिल्यापासूनच ज्याचा आप्तपणा. आपलें, आणि दुसऱ्याचें हे शब्दच ठाऊक नाहींत. ३५८ पाहिजे त्याशीं मैत्री; पाण्याप्रमाणें नम्रता; चित्त कोणाविषयीं विपरीत भाव घ्यावयाचेंच नाहीं. ३५९ वाऱ्याची धाव जशी सरळ असते, त्याप्रमाणें ज्याचें वर्तन सरळ. शंका किंवा हाव हीं ज्यांना मुळींच नाहीं. ३६० आईपुढें जाण्याला मुलाला जशी शंका वाटत नाहीं, त्याप्रमाणें लोकांना मन देतांना ज्यांना शंका अशी वाटतच नाहीं. ३६१ **धनुर्धरा!** विकास पावलेल्या कमलाला जसा मुकुलितपणा असत नाहीं, त्याप्रमाणें कोनाकोपरा ह्मणून त्याला माहितच नसतो. ३६२ रत्नाच्या स्वतःच्या चकाकीपेक्षांही त्याच्यावरची प्रभा अधिक असते, त्याप्रमाणें ज्याचें मन पुढें; आणि इंद्रियें पाठीमागून. ३६३ बोलणें ज्याला ठाउकच नाहीं. अनुभवाचेंच पालन करीत असतो. अंतःकरण ठेवावयाचें आणि सोडावयाचें, हें ज्याला माहित नाहीं. ३६४ दृष्टीस कपट नाहीं; संदिग्ध बोलणें नाहीं; कोणाबरोबर खोट्या बुद्धीनें वागावयाचें कळत नाहीं. ३६५ दहाही इंद्रियें सरळ–निष्प्रापंचिक व निर्मळ–आणि पंचप्राणांचे[1] पदर आठही प्रहर ज्यांचे मोकळे. ३६६ अमृताच्या धारेप्रमाणें ज्याचें हृदय सरळ; किंबहुना इतक्या लक्षणांचें तो माहेरघरच ह्मटलें तरी चालेल. ३६७ हे **वीरश्रेष्ठा!** तो पुरुष मूर्तिमंत आर्जवाचा पुतळा; असा असेल, तेथेंच ज्ञानानें आपलें घर केलें ह्मणून समजावें. ३६८ हे **चतुरश्रेष्ठा!** आतां ह्यापुढें गुरुभक्तीची पद्धति सांगतों, ती ऐक. ३६९ गुरूची सेवा ही यच्चयावत् भाग्यांची जन्मभूमी आहे. जी शोकग्रस्त जीवांनाही ब्रह्म करून सोडते. ३७० ती गुरुसेवा, तुला सांगतों. ह्याकरितां सारें लक्ष्य इकडे असूं दे. ३७१ तर सकल जलांचा सांठा घेऊन ज्याप्रमाणें गंगा समुद्रांत जाते; किंवा श्रुति ज्याप्रमाणें ब्रह्मपदांत प्रविष्ट होते; ३७२ किंवा गुणासहवर्तमान पंचप्राण एकत्र करून भार्या ज्याप्रमाणें भ्रतारास अर्पण करते, ३७३ त्याप्रमाणें आपलें असलेलें अंतर्बाह्य सर्वस्व ज्यांनीं गुरुकुळास अर्पण करून स्वतःला भक्तीचें मंदिर करून सोडलें. ३७४ विरहिणी स्त्रियेचा पति ज्या देशांत असतो, तो देशच जसा तिच्या ध्यानींमनीं दिसतो, त्याप्रमाणें गुरूचें घर ज्या देशांत असतें, तो देश ज्याच्या मनांत वस्ति

१ अंतःकरण, मन, बुद्धि, चित्त व अहंकार हे पंचप्राण होत.

करून राहतो; ३७५ तिकडून वारा जरी आला, तरी त्याला पहातांच सामोरा धावतो, आणि पुढें लोटांगण घालून 'घरीं चलावें' ह्मणतो. ३७६ प्रेमाच्या भुलीनें वेडा होऊन गेलेला असतो. भाषण करणें, तें सुद्धां त्या दिशेकडे करणेंच आवडतें. जो आपल्या जिवाला गुरुगृहाचा वतनदार करून सोडतो. ३७७ परंतु वासराला दावें लावावें त्याप्रमाणें. गुरूची एक आज्ञा मात्र देहग्रामामध्यें धरून असतो. ३७८ तो ह्मणतो कीं, "हें विरडें केव्हां निघेल? आणि तो स्वामी केव्हां भेटेल?" युगाहूनही निमेष ज्याला थोर वाटतें. ३७९ गुरूच्या गांवाहून कोणी आलें, किंवा गुरूंनीं स्वतः कोणी धाडलें, तर मरणोन्मुखाला जीव आल्याप्रमाणें, ३८० किंवा सुकून चाललेल्या मोडावर अमृतधारा पडावी, किंवा थोड्याशा उदकांतला मासा समुद्रांत जावा, ३८१ नाहींतर रंकाला ठेवा दृष्टीस पडावा, किंवा आंधळयाला डोळे यावेत; किंवा भिकाऱ्याला इंद्रपद प्राप्त व्हावें, ३८२ त्याप्रमाणें गुरुकुलाच्या नामानेंच महत्सुखानें फुगतो; तो इतका कीं, आकाश सहज वेंगाटून धरील. ३८३ अशा प्रकारें गुरुकुळावर ज्याची आवड दिसून येईल, त्याच्याजवळ ज्ञान हें चाकरीला रहात असतें. ध्यानांत असूं दे. ३८४ जो अंतःकरणांत मोठ्या प्रेमानें श्रीगुरूची मूर्ति ध्यानांत आणून सेवन करतो. ३८५ हृदयरूप शुद्ध केलेल्या आवारांत आराध्य दैवत जो गुरु, त्याची अग्रस्थानीं स्थापना करून आपण सर्वभावें त्याचा सेवक बनतो, ३८६ किंवा ज्ञानाच्या आवारांत आनंदाच्या देवालयामध्यें श्रीगुरूच्या प्रतिमेला ध्यानामृताचा अभिषेक करतो, ३८७ बोधरूप सूर्याचा उदय होतांच, बुद्धिरूप परडींत, सात्विकभावांचीं फुलें भरून शिवगुरूला लाखोली वाहतो, ३८८ सांज सकाळ व दुपार ह्या तिन्ही शुद्धकाळीं जो जीवदशारूप धूप जाळतो; जो नित्य ज्ञानदीपानें ओंवाळतो; ३८९ ऐक्याची पाकसिद्धी करून जो अखंड नैवेद्य अर्पण करतो; आणि गुरूंना प्रतिमा करून आपण पुजारी होतो. ३९० नाहींतर जिवाच्या बिछान्यावर गुरु हाच भ्रतार करून त्याचा उपभोग घेतो. अशी प्रेमाच्या संतोषाकडे बुद्धि वहात असते. ३९१ एखाद्या वेळेला हृदयांत प्रेमाचें भरतें आलें, तर तो त्याला क्षीराब्धी असेंच समजतो. ३९२ आणि त्यांत गुरुध्यानापासून होणारें जें सुख तीच निर्मल गादी असें मानतो, आणि त्यावर गुरु हा शेषशाई निजला आहे अशी कल्पना करतो. ३९३ आणि तेथें चरणसेवा करणारी लक्ष्मी ती आपण होतो. आणखी गरुड होऊनही आपणच उभा राहतो. ३९४ नाभिकमलांतून आपणच जन्मतो. अशा प्रकारें गुरुमूर्तीच्या ध्यानाच्या सुखाचा मनोधर्मानें अनुभव घेतो. ३९५ एखाद्या वेळेला भक्तीच्या भरांत गुरूला आई करून, स्तनपान करीत आनंदानें तिच्या अंगावर लोळतो. ३९६ किंवा अर्जुना! चैतन्याच्या झाडाखालीं गुरूला धेनु करतो, आणि आपण तिच्या पोटांतील वांसरूं होतो. ३९७ गुरुकृपेचें प्रेम हेंच कोणीएक पाणी; त्यांत आपण एक मासाच झालों आहों अशीच एखाद्या वेळीं कल्पना करतो. ३९८ गुरुकृपामृताची वृष्टि करून आपण सेवावृत्तीचें रोप होतो. अशा नानाप्रकारच्या कल्पना त्याच्या मनापासूनच निघतात. ३९९ पंख न फुटलेलें, डोळे मिटलेलें आपण पक्ष्याचें पिलूंही होतो. ह्यावरून आवडीचें अपारपण केवढें असतें हें पहा. ४०० आणि गुरूला पक्षीण करून त्याच्या चोंचीनें चारा घेतो. गुरु पारकरणारा (सांगाड्या) करून आपण कासेस लागतो. ४०१ ज्याप्रमाणें भरती येऊन लाटा उसळतात, तशा प्रकारें प्रेमाच्या बळानें ध्यानच ध्यानाला प्रसवतें. ४०२ ह्याप्रमाणें तो श्रीगुरुमूर्तीचा हृदयामध्यें उपभोग घेतो. आतां बाह्योपचार ऐक. ४०३ जिवांत असें अवसान धरावयाचें, आणि असें ह्मणावयाचें कीं, सेवा करावयाची ती खरी खरी करीन. अशी कीं, गुरु आनंदानें वर माग ह्मणतील. ४०४ तशा प्रकारच्या भक्तीनें स्वामी प्रसन्न होतील, तेव्हां मी अशी विनंति

करीन. ४०५ मी ह्मणेन 'देवा! तुमचा जो सारा परिवार आहे, तितक्या रूपानें मला करून टाका. ४०६ आणखी महाराज! आपल्या उपयोगीं पडणारीं जितकीं पूजापात्रें (उपकरणीं) आहेत, तितकीं माझीं रूपें व्हावींत.' ४०७ असा वर मागेन. तेव्हां श्रीगुरु हो ह्मणतील. आणि मग तीं सारीं मी होईन. ४०८ जितकीं जितकीं उपकरणीं ह्मणून लागतात, तितकीं सारीं मी झालों ह्मणजे उपासनेचें (भक्तीचें) कौतुक दृष्टीस पडेल. ४०९ मग गुरुजी सर्वांची माता, ती माझ्या एकट्याचीच होऊन राहील. असें करून त्यांच्या कृपेकडून शपथ वाहून घेईन. ४१० त्यांच्या प्रीतीला वेडी करून तिच्याकडून एकपत्नीव्रत घेववीन. आणि लोभाकडून क्षेत्रसंन्यास[1] करवीन. ४११ गुरुकृपेला मी असा पिंजरा होऊन राहीन कीं, तिला बाहेर पडून चार दिशेचा वारा सुद्धां न लागे. ४१२ गुरुसेवारूपस्वामिणीला मी आपल्या गुणांचे अलंकार घालीन. हें असो. गुरुभक्तीची मी गवसणी होऊन राहीन. ४१३ गुरुस्नेहाच्या वृष्टीखालीं मी पृथ्वी होईन. अशा मनोरथांच्या अनंतसृष्टि रचतो. ४१४ श्रीगुरूचें मंदिर मी स्वतःच होईन. आणि दास होऊन तेथचें दासत्व करीन. ४१५ जातांयेतांना त्या उदाराला जे जे उंबरे ओलांडावे लागतील, ते उंबरे, द्वारें आणि द्वारपालही मीच होईन. ४१६ पादुका मीच होईन, आणि त्या घालावयासही मीच देईन. छत्रही मी होऊन धरण्याचें कामही मीच करीन. ४१७ उंच सखल सांगणारा, (चोबदार) चवरी वारणारा, हात देणारा, आणि स्वामीपुढें मशालजीही मीच होईन. ४१८ झारी धरणारा होऊन मीच तोंडांत चूळ घालीन. आणि चूळ टाकण्याचें तस्तही मीच होईन. ४१९ पानदान होऊन मीच राहीन. चावलेला विडा मीच घेईन, आणि स्नानाचें कामही मीच करीन. ४२० गुरूचें आसन, अलंकार, वस्त्रें मीच होईन. चंदनादि उपचार तेही मीच होईन. ४२१ मीच आचारी होऊन फराळाचें वाढीन आणि स्वतः श्रीगुरूस ओवाळीन. ४२२ देव (गुरु) जेवावयाला बसतील तेव्हां, त्यांच्या पंक्तीला मीच बसेन, आणि मग पुढें होऊन विडाही मीच देईन. ४२३ मी उष्टें काढून टाकीन. आंथरूण घालून ठेवीन व पाय रगडण्याचें कामही मीच करीन. ४२४ मी सिंहासन होईन, ह्मणजे त्यावर गुरु आरूढ होतील. अशा प्रकारें सेवेची परिपूर्णता होईल. ४२५ श्रीगुरूचें मन जिकडे लक्ष्य देतील तो चमत्कार होऊन मी पुढें जाईन. ४२६ त्यांच्या कर्णांच्या आंगणामध्यें लक्षावधि शब्द होऊन राहीन. आंगाशीं सलगी करण्याकरितां स्पर्श होईन. ४२७ श्रीगुरूचे डोळे ममतेनें जें जें पहातील ते ते पदार्थ मीच होईन. ४२८ त्यांच्या जिभेला गोड लागेल, तो तो रस मीच होईन. आणि सुगंधाच्या निमित्तानें नासिकाची सेवा करीन. ४२९ अशा प्रकारें हरएक पदार्थ होऊन त्यांच्या बाह्य मनोगताप्रमाणें श्रीगुरूची सारी सेवा करीन. ४३० हा देह आहे तावत्कालपर्यंत अशी सेवा करीन. पण मग जी सेवा करावयाची मनांत आहे, ती तर विलक्षणच. ४३१ ह्या शरिरांत जी माती आहे ती, श्रीगुरूचें चरण जेथें उभे रहातील, त्या जमिनींत विरवीन. ४३२ माझे स्वामी आनंदानें ज्या पाण्याला स्पर्श करितील, त्या पाण्यांत ह्या शरीरांतील पाणी एकरूप करीन. ४३३ ज्यानें श्रीगुरूला ओवाळावयाचें, किंवा त्यांच्या गृहांत जो लावावयाचा, त्या दिव्याच्या तेजामध्यें मी आपलें तेज ठेवीन. ४३४ चवरी आणि पंखा ह्यांच्यामध्यें मी आपले प्राण विलयास नेईन. आणि मग आंगाची सेवा करीन. ४३५ ज्या ज्या पोकळीमध्यें श्रीगुरु सपरिवार असतील त्या पोकळीमध्यें आकाश लयास नेईन. ४३६ पण जिता असो किंवा मेलेला असो तरी सोडणार ह्मणून नाहीं. एक निमेष मात्र लोकांना मध्यें फिरकूं देणार नाहीं. कोट्यावधि कल्प

[1] एखाद्या क्षेत्रांतून बाहेर पडावयाचें नाहीं, असें जें व्रत त्याला 'क्षेत्रसंन्यास' असें ह्मणतात.

असेच मोजावयाला लावीन. ४३७ येथपर्यंत त्याच्या मनाचा धडा. आणि त्याप्रमाणें करूनही जो अपरिमित असतो. ४३८ रात्र किंवा दिवस पहात नाहीं; थोडें किंवा फार ह्मणत नाहीं. जितकी जितकी आज्ञा करावी, तितका तितका प्रसन्नच होतो. ४३९ तशा प्रकारच्या आज्ञेनें जो आकाशापेक्षांही मोठा होतो. आणि तीं सर्व काम एकटाच एके काळीं करतो. ४४० आंग हें हृदयवृत्तीच्या पुढेंच धावा घेत असतें. आणि काम तर मनाबरोबर पैज मारीत असतें. ४४१ एखाद्या वेळेला श्रीगुरूच्या केवळ खेळासाठीं आपल्या जिवाचें लिंबलोण उतरतो. ४४२ जो गुरूच्या दास्यामध्यें आपलें आंग झिजवितो; गुरूच्या प्रेमानें जो पुष्ट होतो; गुरूच्या आज्ञेचें जो आपणच स्थान होऊन रहातो. ४४३ जो गुरूच्या कुलीनतेनें कुलीन होतो; तो गुरुबंधूच्या सौजन्यानें सुजन होतो; गुरुसेवेच्या व्यसनानें जो निरंतर व्यसनी होतो. ४४४ गुरुसांप्रदायधर्म तेच ज्याचे वर्णाश्रमधर्म; आणि गुरूची सेवा हेंच ज्याचें नित्यकर्म होऊन रहातें; ४४५ क्षेत्र गुरु; देवता गुरु; माता गुरु; पिता गुरु; गुरुसेवेपेक्षां अन्यमार्गच ज्याला माहित नाहीं. ४४६ श्रीगुरूचें द्वार तेंच ज्याचें सर्वस्व. गुरूचे जे सेवक असतील त्यांना जो बंधुसारखा भजतो, ४४७ ज्याचें तोंड निरंतर गुरुनामाचेच मंत्र ह्मणत असतें. गुरुवाक्यावांचून इतर शास्त्राला हातानें शिवत सुद्धां नाहीं; ४४८ गुरुच्या चरणांनीं कसल्याही प्राण्याला स्पर्श केला, तरी त्याच्या तीर्थयात्रेला त्रैलोक्यांतील तीर्थें आणतो. ४४९ श्रीगुरूचें उच्छिष्ट अकस्मात् प्राप्त झालें, तर त्या लाभानें समाधीचाही ज्याला वीट येतो; ४५० अर्जुना! गुरु चालतांना पायाच्या पाठीमागें जे अंतःकरण उडतात, त्याचा मोक्षसुखासाठीं जो स्वीकार करतो; ४५१ हें असो. आतां किती सांगावें? त्याला पार नाहीं. गुरुभक्तीविषयीं व्यापकबुद्धि हेंच ह्याचें कारण. ४५२ अशा भक्तीची ज्याला इच्छा; अशा भक्तीची ज्याला आवड; जो अशा सेवेवांचून कांहीं गोड मानितच नाहीं. ४५३ तत्त्वज्ञानाचें स्थान तें. त्याच्या योगानें ज्ञानाला भूषण. हें असो. देवाचा आणि ज्ञानाचा भक्त तोच. ४५४ त्या ठिकाणीं खरोखर अशा रीतीनें दारें उघडून पूर्णज्ञान नांदत असतें. हें ध्यानांत ठेव. ४५५ त्या गुरुसेवेविषयीं माझा जीव अभिलाष धरून राहिलेला आहे. ह्मणून विषयांतराचें भाषण केलें. ४५६ बाकी हातानें लुला, भजनाच्या अवधानासाठीं आंधळा, सेवेला पांगळा, आळशाहून आळशी, ४५७ गुरूचें वर्णन करण्याविषयीं मुका, फुकट आळशी पोसलेला; परंतु मनामध्यें मात्र खरोखर प्रीतियुक्त आहे. ४५८ तेवढ्याकरितांच मला इतकें बोलणें भाग पडलें. असें **ज्ञानदेव** ह्मणाले. ४५९ पण तें बोलल्याची क्षमा करावी. आणि सेवेला अवकाश द्यावा. आतां महाराज! नीट ग्रंथार्थच सांगतों. ४६० प्राणिमात्रांचा भार सहन करणारा; **विष्णूचा** अवतार; असा जो **श्रीकृष्ण** तो बोलत आहे आणि **अर्जुन** ऐकतो आहे. ह्याकरितां ऐका हो ऐका. ४६१ तो ह्मणाला "बा **अर्जुना!** शुचित्व तें असें. ज्याच्यापाशीं आंग व मन इतकें निर्मल असतें कीं, जणों काय कापुराचेंच केलेलें आहे. ४६२ किंवा रत्नांचे समुदाय जसे सबाह्य सुंदर असतात, किंवा सूर्य जसा आंतून बाहेरून सारखा तेजस्वी, ४६३ त्याप्रमाणें बाहेरच्या कर्मानें धुतलेला, आणि आंत ज्ञानानें उजळलेला, अशा दोन्ही तऱ्हेनें जो एकसारखा पवित्र झालेला. ४६४ मृत्तिका आणि जल येणेंकरून बाहेरचें आंग, आणि वेदाज्ञेनें अंतरंग निर्मळ झालेलें असतें. ४६५ कोठेंही बुद्धि प्रबळ आहे. तिच्याच योगानें आरशावरचा रज–मळ–काढून तो निर्मळ करतां येतो. परटाच्या डोणींतील पाण्यानें वस्त्रांचा मळ नाहींसा होतो. ४६६ फार काय सांगावें? ह्याप्रमाणें बाह्यांग शुद्ध हें लक्ष्यांत ठेव. आणि अंतरंगांत ज्ञानाचा दिवा ह्यामुळें आंतही शुद्ध. ४६७ बाकी **अर्जुना!** अंतःक-

रण जर शुद्ध नसेल, तर बाह्यात्कारीं कर्में ही शुद्ध विटंबना होय. ४६८ प्रेताला जसा शृंगार करावा; गाढवाला जसें तीर्थानें स्नान घालावें; कडू भोंपळ्याला जसें गुळानें लिंपावें; ४६९ ओसाड घरावर तोरण बांधावें; किंवा उपाशी असणाराच्या आंगाला अन्न थापावें; किंवा विधवेनें कुंकुमाचा आणि शेंदुराचा मळवट भरावा; ४७० मुलाम्याच्या कळसावरील झकाकीला काय आग लावावयाची आहे? कारण आंत पोकळ. किंवा कृतीच्या फळाला तरी काय करावयाचें आहे? कारण आंत शेण. ४७१ त्याप्रमाणें खोटा मनुष्य वरकरणींच्या कर्मांनीं कांहीं थोरपणास चढणार नाहीं. मद्याचा भरलेला घडा, गंगेनें कांहीं पवित्र होत नाहीं. ४७२ ह्याकरितां अंतःकरणांत ज्ञान पाहिजे. मग बाहेर आपोआप येतें. वरील कर्मानें ज्ञान कसें प्राप्त होणार? ४७३ ह्यासाठीं बाहेरचा भाग कर्मानें चांगला स्वच्छ केला, आणि ज्ञानानें आंतील कलंक नाहींसा केला, ४७४ म्हणजे आंतील व बाहेरील, दोन्ही मळ जाऊन दोन्हीही निर्मळ होतात, तेव्हां अर्थात् पवित्रपणाच शिल्लक राहतो. ४७५ म्हणून बिलोरी महालांतील दिवे जसे दैदीप्यमान दिसतात; तद्वत् जिवांत असलेले सद्भाव बाहेर विकसित झालेले दिसतात. ४७६ ज्याच्या योगेंकरून विकल्प उत्पन्न होतो; मिथ्या विकार उद्भवतो; कुमार्गाच्या वियांना मोड फुटतात; ४७७ तें ऐकिलें किंवा पाहिलें तरी, मेघांच्या रंगांनीं आकाश जसें काळें होत नाहीं, त्याप्रमाणें मनामध्यें कांहींच ठसत नाहीं. ४७८ येरवीं, सारीं इंद्रियें असतात तरी, तो विषयावर लोळत नाहीं. येवढेंच नव्हे तर विकाराच्या विटाळानें लिप्त सुद्धां होत नाहीं. ४७९ ब्राह्मण आणि महार वाटेवर भेटले, तर परस्परांस शिवत नाहींत, त्याप्रमाणें जो राहूं शकतो. ४८० किंवा पतीला आणि पुत्राला एकच तरुण स्त्री आलिंगन देते. परंतु पुत्राच्या भावनेमध्यें काम शिरत नाहीं. ४८१ त्याप्रमाणें ज्याचें हृदय निर्मल असून संकल्पाला आणि विकल्पाला ओळखून असतें; आणि कृत्याकृत्य ज्याला विशेष रीतीनें कळत असतें. ४८२ पाण्यानें हिरा भिजत नाहीं; अधणामध्यें वाळू शिजत नाहीं; त्याप्रमाणें कोणत्याही विकल्पानें ज्याची मनोवृत्ति लिप्त नाहीं. ४८३ अर्जुना! त्याचें नांव पूर्णशुचित्व. तें जेथें दृष्टिस पडेल तेथें ज्ञान असतें. ध्यानांत ठेव. ४८४ आणि स्थीरता खरोखर ज्याच्या घरांत शिरते, तो-पुरुष ज्ञानाचें आयुष्य आहे असें समज. ४८५ देह तर आपल्या परीनें वरवर हिंडत असतो; परंतु मनांतील बैठक मोडत नाहीं. ४८६ गायीची ममता वासरावरून निघून कांहीं रानांत जात नाहीं; पतिव्रतेचे भोगही प्रेमभोग होत नाहींत; ४८७ किंवा लोभी दूर गेला, तरी जीव ठेवलेल्या द्रव्याजवळ राहतो; त्याप्रमाणें ज्याचें चित्त चंचल आहे, त्याचा देह कांहीं त्याबरोबर चालत नाहीं. ४८८ जात असलेल्या अभ्राबरोबर ज्याप्रमाणें आकाश धांवत नाहीं; किंवा भ्रमण करणाऱ्या तारकाचक्राबरोबर जसा ध्रुव फिरत नाहीं; ४८९ अर्जुना! प्रवाशाच्या जाण्यायेण्यावरोबर जसा मार्ग चालत नाहीं; किंवा वृक्षाला जसें येणें जाणें नाहीं; ४९० त्याप्रमाणें चलनवलनात्मक पंचभूतांचा असूनही भूतमात्रांच्या विकारानें जो चळत नाहीं. ४९१ वाहुटळींच्या जोरानें पृथ्वी जशी हालत नाहीं; तसा उपद्रवांच्या लोंढ्यानेंही जो हालत नाहीं. ४९२ दारिद्र्याच्या दुःखानें जो तापत नाहीं; भयानें किंवा शोकानें जो कांपत नाहीं; देहाला मृत्यु आला, तरीही जो भीत नाहीं; ४९३ ज्याचें चित्त उजू; दुःख, आशा, ह्यांच्या भरानें, किंवा वय, व्याधि ह्यांच्या हलकल्लोळानेंही पाठमोरें होत नाहीं; ४९४ निंदेनें अपमान झाला, कामाची किंवा लोभाची मिठी पडली, तरी मनाचें रोमही वांकडें होत नाहीं. ४९५ आकाश नाहींसें होवो; कीं पृथ्वी वितळून जावो; तरी चित्तवृत्तीला परत फिरणें म्हणून माहित नाहींच. ४९६ हलक्या फुलानें मारलें असतां,

हत्ती जसा मागें हटत नाहीं, त्याप्रमाणें दुर्वाक्याच्या शल्यानें मारलें असतांही मनोवृत्ति ढळत नाहीं. ४९७ क्षीरसमुद्राच्या लाटांनींही मंदराचलाला जसा कंप सुटत नाहीं, किंवा वणव्याच्या जाळानें जसें आकाश जळत नाहीं, ४९८ त्याप्रमाणें कितीही उसळ्या आल्या आणि गेल्या, तरी मनोधर्मांत गडबड ह्मणून होत नाहीं. ४९९ हे विचारवंता **अर्जुना!** स्थैर्य हा शब्द जो विशेषेंकरून बोलतात, त्याची स्थिती अशा प्रकारची असते पहा. ५०० अशा प्रकारचें दृढतर धैर्य, ज्याच्या ठिकाणीं अंतर्बाह्य प्राप्त होतें, तोच खरोखर ज्ञानाचा ेवा. ५०१ आणखी, ब्रह्मराक्षस जसा घर ोडित नाहीं; किंवा योद्धा जसा हत्यार ोडित नाहीं; ५०२ एकुलत्या एक मुलावर आई जशी जीव ठेवून असते; मधाला जशी मधमाशी लुब्ध होते, ५०३ त्याप्रमाणें **अर्जुना!** तो अंतःकरण जतन करतो, इंद्रियांच्या द्वारांत ुद्धां उभें राहूं देत नाहीं, ५०४ तो ह्मणतो ीं कामरूप बागुलबावा ऐकेल, आणि ही आशारूप हडळ पाहिल, तर तीं जिवास चिकटील; ह्मणून भितो. ५०५ दांडगा नवरा, यभिचारी स्त्रीला बाहेर जाण्यास जसा अटाव करतो, त्याप्रमाणें प्रवृत्तीला जो आपल्या ातिबंधांत ठेवतो. ५०६ चैतन्याचा तोटा ाला तरी चिंता नाहीं. अशा बुद्धीनें देहासट संकोच करून इंद्रियांची समजूत करून यांना निग्रहावर ठेवतो. ५०७ मनाच्या दराजावर विषयापासून उपरम पावलेल्या ुद्धीच्या पाहऱ्यांत, शरीरामध्यें यम व दम ्भे जागवितो. ५०८ आधार[1]चक्राच्या ठिकाणीं, नाभिचक्रा[1]च्या ठिकाणीं,—वज्र[2]—ओढि[3]याणा—व जालंधर—ह्या तीन बंधांचीं गस्त ठेवतो; आणि इडा व पिंगळा ह्यांच्या संगमस्थानीं—किंवा दोन वायूंच्या संगमाच्या ठिकाणीं—चित्त ठेवतो, ५०९ समाधीच्या शेजेपाशीं जो ध्यानाला बांधून घालतो. चित्ताच्या आणि चैतन्याच्या ऐक्यामध्यें जो आपलें अंतःकरण ठेवतो; ५१० **बाबा!** अंतःकरणाचा निग्रह जो ह्मणतात तो हा. हें ध्यानांत ठेव. हा जेथें असतो तेथें ज्ञानाचाही विजय असतो. ५११ ज्याची आज्ञा, अंतःकरण हें आपणहून शिरसा वंद्य करतें, तो मनुष्यरूपानें ज्ञानाचाच अवतार असें खचित समजावें.” ५१२

इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्॥ ८ ॥

['लक्षणत्रयं' इंद्रियार्थेषु वैराग्यं] आणि विषयांविखीं । वैराग्याची निकी । पुरवणी मानसीं कीं । जिती आथी ॥ १३ ॥ वमिलिया अन्ना । लाळ न घोंटी जेवीं रसना । आंग न सूये आलिंगना । प्रेताचिया ॥ १४ ॥ विष खाणें नागवे । जळत घरीं न रिघवे । व्याघ्रविवरा न वचवे । वस्ती जेवीं ॥ १५ ॥ धडाडीत लोहरसीं । उडी न घालवे जैसी । न करवे उसी । अजगराची ॥ १६ ॥ अर्जुना तेणें पाडें । जयासी विषयवार्ता नावडे । नेदी इंद्रियांचेनि तोंडें । कांहींच जावों ॥ १७ ॥ जयाचे मनीं आलस्य । देहीं अतिकार्श्य । शमदमीं सौरस्य । जयासि गा ॥ १८ ॥ तपोव्रतांचा मेळावा । जयाचे ठायीं पांडवा । युगांत जया गांवा- । आंत येतां ॥ १९ ॥ बहु योगाभ्यासीं हांव । विजनाकडे धांव । न साहे जो नांव । संघाताचें ॥ ५२० ॥ नाराचांचीं आंथुरणें । पूयपंकीं लोळणें । तैसें लेखी भोगणें । ऐहिकींचें ॥ २१ ॥ आणि स्वर्गातें मानसें । ऐकोनि मानी ऐसें । [10]कुहिलें पिशित[11] जैसें । श्वानाचें कां ॥ २२ ॥ तें हे विषयवैराग्य । आत्मलाभाचें भाग्य । येणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव ॥ २३ ॥ ऐसा उभयभोगीं त्रास । देखसी जेथ बहुवस । जाण तेथें र-

१ ह्यालाच 'मूलाधार' चक्र असें नांव आहे. हें चक्र ाभीच्या खालीं, पाठीच्या कण्याच्या शेवटच्या—खालच्या ाकास स्नायुमय असून त्याचा आकार तिकोनी आहे. ातच कुंडलिनी वेटाळें घालून बसलेली असते. प्रथमचें ित्र पहा.

१ हें चक्र नाभीच्या समोर पाठीच्या कण्यांत असतें. ह्यालाच 'स्वाधिष्ठान' चक्र नांव आहे. ह्याचें स्थान प्रथमारंभींच्या चित्रावरून दिसून येईल. २ अध्याय ६ पान ११९ ओवी १९९; ३ अध्या. ६ पान १२० ओवी २१०; ४ तोच अध्याय ओवी २० हीं पहावींत. ५ घालतो. ६ रुचत नाहीं. ७ व्याघ्राच्या गुहेंत. ८ जाववत नाहीं. ९ बाणांचीं. १० कुजलेलें. ११ मांस.

हिव्रास । ज्ञानाचा तूं ॥ २४ ॥ [ 'अनहंकार एव च' ] आणि सैचाडाचियेपरी । ईष्टापूर्त करी । परी केलेपण शरीरीं । थसों नेदी ॥ २५ ॥ वर्णाश्रमपोषकें । कर्में नित्यनैमित्तिकें । यामाजि कांहीं नैठके । आचरतां ॥ २६ । परि हें मियां केलें । कीं हें माझेनि सिद्धी गेलें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजी ॥ २७ ॥ जैसें अवचितपणें । वायूसीं सर्वत्र विचरणें । कीं निरभिमान उदैजणें । सूर्याचें जैसें ॥ २८ ॥ कां श्रुति स्वभावता बोले । गंगा काजेंविण चाले । तैसें अवष्टंभहीन भलें । वर्तणें ज्याचें ॥ २९ ॥ ऋतुकाळीं तरी फळती । परि फळलों हें नेणती । तयां वृक्षांचिये ऐसी वृत्ती । कर्मी सदा ॥ ५३० ॥ एवं मनीं कर्मी बोलीं । जेथ अहंकारा उखी जाहाली । ऐकावळीची काढिली । दोरी जैसी ॥ ३१ ॥ संबंधेंवीण जैसीं । अभ्रें असती आकासीं । देहीं कर्में तैसीं । जयासि गा ॥ ३२ ॥ मद्यपाआंगींचें वस्त्र । कां लेपाहातीचें शस्त्र । बैलावरी शास्त्र । बांधलें आहे ॥ ३३ ॥ तयापाडें देहीं । जया मी आहें हे सेचि नाहीं । निरहंकारता पाहीं । तया नांव ॥ ३४ ॥ हें संपूर्ण जेथें दिसे । तेथेंचि ज्ञान असे । इयेविषीं अनारिसें । बोलों नये ॥ ३५ ॥ [जन्मेत्यर्धे] जन्म मृत्यु जरा दुःखें । व्याधिवार्धक्यकलुषें । तियें आंगा न येतां देखे । दुरूनि जो ॥ ३६ ॥ साधक विवसियों । कां उपसर्ग योगिया । पावे उणेयापुरेया । वोथंबा जेवीं ॥ ३७ ॥ [जन्मेत्यादि समस्तैकपदस्थानि सप्त पदानि विविच्य व्याख्यायंते 'जन्म' ] वैर जन्मांतरींचें । सर्पा मनौनि नेवचे । तेवि अतीता जन्मांचें । उणें जो वाहे ॥ ३८ ॥ डोळां हरळे न विरे । घाईं कोत न जिरे । तैसें काळींचें न विसरे । जन्मदुःख ॥ ३९ ॥ ह्मणे पूयगर्ते रिघाला । अहा मूत्ररंध्रें निघाला । कटारें मियां चाटिला । कुचस्वेद ॥ ५४० ॥ ऐसऐसिया परी । जन्माचा कांटाळा धरी । ह्मणे आतां तें मी न करीं । जेणें ऐसें होय ॥ ४१ ॥ हांरी उमचावया । जुंवारी जैसा ये डौया । कीं वैरा बापाचेया । पुत्र जंचे ॥ ४२ ॥ मारिलियाचेनि रागें । पाठीचा जेंवीं सूड मागे । तेणें ओक्षेपें लागे । जन्मापाठीं ॥ ४३ ॥ परि जन्मती ते लाज । न सांडी जयाचें निजें । संभाविता निस्तेजें । न जिरे जेवीं ॥ ४४ ॥ [ मृत्यु ] आणि मृत्यु पुढां आहे । तोचि कल्पांतीं कां पाहे । परि आजीच होये । सावध जो ॥४५॥ माजि अथाव ह्मणतां । थडियेचि पांडुसुता । पोहणार आइता । कांसेसि जेवीं ॥ ४६ ॥ कां न पवतां रणाचा ठावो । सांभाळिजे जैसा आवो । वोडण सुइजे घावो । न लागतांचि ॥ ४७ ॥ पांहेचा पेणा पाटवंधा । तंव आजीचि होइजे सावधा । जीव न वचतां औषधा । धांविजे जेवीं ॥ ४८ ॥ येरवीं ऐसें घडे । जो जळत घरीं सांपडे । तो मग न पवाडे । कुहा खणों ॥ ४९ ॥ चोंढिये पाथरु गेला । तैसेनि जो बुडाला । तो बोंबेंही सकट निमाला । कोण सांगे ॥ ५५० ॥ ह्मणोनि समर्थेसीं वैर । जया पडिलें हाडखांइर । तो जैसा आठही पाहर । परजूनि असे ॥ ५१ ॥ ना तरी केवंळली नोवरी । कां संन्यासी जयापरी । तैसा न मरतां जो करी । मृत्युसूचना ॥ ५२ ॥ पैं गा जो ययापरी । जन्मेंचि जन्म निवारी । मरणें मृत्यु मारी । आपण उरे ॥ ५३ ॥ तया घरीं ज्ञानाचें । सांकडें नाहीं साचें । जया जन्ममृत्यूचें । निमालें शल्य ॥ ५४ ॥ [ जरा ] आणि तयाचिपरी जरा । न टेकतां शरीरा । तारुण्याचिया भरा । माजि देखे ॥ ५५ ॥ ह्मणे आजिच्या अवसरीं । पुष्टि आहे शरीरीं । ते होईल काचरी । वाळली जैसी ॥ ५६ ॥ निदैवाचे व्यवसाय । तैसे ठाकती हातपाय । अमंत्रीराजाची परी आहे । बळा यया ॥ ५७ ॥ फुलांचिया भोगा- । लागीं प्रेम टांगों । तें करेयांचा गुडघा । तैसें होईल ॥ ५८ ॥ वोढाळाच्या खुरीं । आषाढवातें धुरी । ते दशा मा या शिरीं । पावेल गा ॥ ५९ ॥ पद्मदळेसी इसाळें । भांडताति हे डोळे । ते होती पडवळें । पिकलीं जैसीं ॥ ५६० ॥ भवईचीं पेडळें । वोमथती शिनेसाळें । उर कुहिजेलें जळें । आंसुवांचेनी ॥ ६१ ॥ जैसें बाभुळीचें खोड । गिरबडूनि जाती सरड । तैसें पिचंडी तोंड । सरकटिजेल ॥ ६२ ॥ रांधवणी चुलीपुढें । पन्हवे उंह्मताति खातवडें । तैसींचि यें नाकाडें । बिडबिडती ॥ ६३ ॥ तांबूलें वोंठ रांऊं । हांसतां दांत दाऊं । सनागर मिरऊं । बोल जेणें ॥ ६४ ॥ तयाचिया तोंडा । येईल जळंबठाचा लोंढा । इया उमळती दाढा । दांतांसींही ॥ ६५ ॥ कुळवांडी रिणें दाटली ।

१ आशेखोरासारखा. २ यज्ञयागादिक. ३ कमी पडूं देत नाहीं. ४ अहंकारावांचून. ५ नाश, उठवण. ६ एकेरी हाराची. ७ चित्राच्या हातांतील. ८ पातकें. ९ विवशीला. १० उपद्रव. ११ आश्रय. १२ मनानेंही. १३ जात नाहीं. १४ दूषण. १५ खडा, रेती. १६ घायामध्यें. १७ भाला, शल्य. १८ पुवाच्या खाड्यांत. १९ अरेरे! २० हरलेला, आंगाशीं आलेला डाव. २१ फेडण्यासाठीं. २२ जुगारी. २३ पेंजेला, कडनिकडीला. २४ जपतो. २५ हट्टानें. २६ मन. २७ अपमान.

१ ठाव नाहीं असा, खोल. २ कंबरेस. ३ डौल. ४ ढाल. ५ उद्याचा. ६ मुक्काम. ७ घात. ८ तयार होत नाहीं. ९ डोहामध्यें. १० दगड. ११ हाडास भेदणारे. १२ शस्त्र धारण करून, सज्ज. १३ सती जाणारी. १४ मृत्यूची सूचना. १५ मस्तक, मोठें. १६ उंटाचा. १७ खांडूक, क्षत, लाळ. १८ स्पर्धेनें. १९ पडदे. २० ओथंबतात. २१ जुन्या सालीप्रमाणें. २२ कुजेल. २३ अश्रूंच्या. २४ खरवडतात. २५ थुंक्यानें. २६ भरेल. २७ चर. २८ वहातात. २९ लिडबिडून जाईल. ३० रंगवूं. ३१ चांगलें. ३२ लाळेचा, बडक्याचा. ३३ ढिल्या होतील, हालूं लागतील. ३४ शेतकी, व्यापार.

कीं वांकडियां ढोरें बैसलीं । तैसी त्रुठी कांहीं केली । जीभची हे ॥ ६६ ॥ कुसळें कोरडी । वारेनें जाती बरडीं । तैसी आपदा तोंडीं । दाढियेसी ॥ ६७ ॥ आषाढींचेनि जळें । जैसीं झिरपती शैलाचीं मोळें । तैसे खोंडीहूनि लाळे । पडती पुर ॥ ६८ ॥ वाचेसि अपवाड । कानीं अनुघड । पिंड गरुवा माकड । होईल हा ॥ ६९ ॥ तृणाचें बुझवणें । आंदोळे वारेंगुणें । तैसें येईल कांपणें । सर्वांगासी ॥ ५७० ॥ पायां पडती वेंगडी । हात वळती मुरकुंडी । बरवेपणा बागडी । नाचविजेल ॥ ७१ ॥ मळमूत्रद्वारें । होऊनि ठाती खोंकरें । नवसिर्वे होती इतरें । माझिया निधनीं ॥ ७२ ॥ देखोनि थुंकील जग । मृत्यूचा पडेल पांग । सोइरियां उबग । येईल माझा ॥ ७३ ॥ स्त्रिया ह्मणती विवेसी । बाळें जाती मूर्छेसी । किंबहुना चिळसी । पात्र होइन ॥ ७४ ॥ उभळीचा उजगरा । सेजारिया सोइलियां घरा । शिणवील ह्मणती झातारा । बहुतांतें हा ॥ ७५ ॥ ऐसी वार्धक्याची सूचणी । आपणियां तरुणपणीं । देखे मग मनीं । विटे जो गा ॥ ७६ ॥ ह्मणे पाहे हें येईल । आणि आतांचें भोगितां जाईल । मग काय उरेल । हितालागीं ॥ ७७ ॥ ह्मणोनि नाईकणें पावे । तंव आइकोनि घाली आघवें । पंगु न होतां जावें । तेथुनियां ॥ ७८ ॥ दृष्टी जंव आहे । तंव पाहावें तेतुलें पाहे । मूकत्वा आधीं वाचा वाहे । सुभाषित ॥ ७९ ॥ हात होती खुंळे । हें पुढील मोटकें कळे । तंव करूनि घाली सकळें । दानादिकें ॥ ५८० ॥ ऐसी दशा येईल पुडें । तें मन होईल वेडें । तंव चिंतूनि ठेवी चोखडें । आत्मज्ञान ॥ ८१ ॥ जैं चोर पांहे झोंबती । तंव आजीचि रुसिजे संपत्ती । कां झांकोंझांकि वाती । न वचतां कीजे ॥ ८२ ॥ तैसें वार्धक्य यावें । मग जें वायां जावें । तें आतांचि आघवें । वैसतें करी ॥ ८३ ॥ आतां मोडूनि टेलीं दुर्गें । कां वळितें धरिलें खंगें । तेथ उपेक्षूनि जो निघे । तो नागवला कीं ॥ ८४ ॥ तैसें वृद्धाप्य होय । आलेपण वायां जाय । जे तो शैतवृद्ध आहे । नेणों कैसा ॥ ८५ ॥ झाडिलींचि कोळें झाडी । तया न फळे जेविं वोंडी । जाहाला अग्नी तरी राखोंडी । जाळील काई ॥ ८६ ॥ ह्मणोनि वार्धक्याचेनि आठवें । वार्धक्या जो नोंगवे । तयाच्याठायीं जाणावें । ज्ञान आहे ॥ ८७ ॥ [व्याधिः] तैसेंचि नाना रोग । पढिंघाती ना जंव पुढां आंग । तंव आरोग्याचे उपेग । करूनि घाली ॥ ८८ ॥ सापाच्या तोंडीं । पडिली जे उंडी । ते लाऊनि सांडी । प्रबुद्ध जैसा ॥ ८९ ॥ [ दुःखदोषानुदर्शनं ] तैसा वियोग जेणें दु:खें । विपत्ति शोक पोखे । तें स्नेह सांडूनि सुखें । उदास होय ॥ ५९० ॥ आणि जेणेंजेणें कडें । दोष सूतील तोंडें । तयां कर्मरंध्रीं गुंडे । नियमाचे दाटी ॥ ९१ ॥ ऐसऐसिया आइती । जयाची परी असती । तोचि तो ज्ञानसंपत्ती । गोसांवी गा ॥ ९२ ॥ आतां आणीकही एक । लक्षण अलौकिक । सांगेन आइक । धनंजया ॥ ९३ ॥

**"आणखी विषयाविषयीं वैराग्याचा निश्चय ज्याच्या मनांमध्यें मूर्तिमंत जागृत असतो. ५१३ ओकलेल्या अन्नाविषयीं ज्याप्रमाणें जीभ लाळ घोटित नाहीं; प्रेताच्या आलिंगनाची, आंग ज्या प्रमाणें इच्छा करीत नाहीं; ५१४ विष खाणें रुचत नाहीं; जळत्या घरांत शिरवत नाहीं; व्याघ्राच्या गुहेंत वस्ती करण्याला ज्या प्रमाणें जाववत नाहीं; ५१५ धगधगीत लोखंडाच्या रसांत ज्याप्रमाणें उडी घालवत नाहीं, अजगराची ज्या प्रमाणें उशी करवत नाहीं; ५१६ अर्जुना! त्या प्रमाणें विषयाची वार्ता सुद्धां ज्याला आवडत नाहीं, इंद्रियांच्या तोंडांत जो कांहींच जाऊं देत नाहीं; ५१७ बाबा! विषयोपभोगाविषयीं ज्याचें मन आळशी; देहानें जो अतिशय कृश; शमदमाविषयीं ज्याला प्रीति; ५१८ अर्जुना! ज्याच्या ठाईं तपाची आणि व्रताची समृद्धि असून गांवांत आलें असतां ज्याला युगांत झाला असें वाटतें; ५१९ योगाभ्यासाची हाव दांडगी; अरण्याकडे ज्याची धांव; लोकसमुदायाचें ज्याला नांवही खपत नाहीं. ५२० ऐहिक भोग भोगणें ह्मणजे शरपंजरीं पडणें, किंवा पुवामध्यें लोळल्याप्रमाणें आहे असें जो समजतो; ५२१ आणखी स्वर्गांतील सुखें ऐकून तीं आपल्या मनामध्यें कुत्र्याच्या सडलेल्या मांसाप्रमाणें आहेत असें**

१ झर्डींत. २ शिखरें. ३ तोंडांतून. ४ अनिवार. ५ अस्पष्ट. ६ मोठा. ७ वाऱ्याच्या योगानें. ८ पायांत पाय अडखळतात. ९ सोंग, चेष्टा. १० फुटकीं मडकीं. ११ नवस करतील. १२ दीनदशा. १३ व्याद. १४ खोकल्याची उसळी. १५ सोबत्याच्या. १६ उद्यां. १७ बहिरेपण. १८ लुले. १९ थोडेसें. २० शुद्ध, उत्तम. २१ उदयीक. २२ दूर करावी. २३ झाकापाक. २४ ठीक. २५ भरभराटीस आलीं. २६ भरून आला. २७ वळवाचा पाऊस. २८ शतायु. २९ तिळांचीं बोंडें.

१ सांपडत नाहीं. २ जों आंगावर आदळत नाहींत. ३ निरिच्छ. ४ कर्मेंद्रियांच्या छिद्रांत. ५ युक्ति.

जो मानतो, ५२२ आत्मलाभाचें भाग्य असें जें विषयवैराग्य तें हें. ह्याच्याच योगेंकरून प्राणी ब्रह्मानंदाला योग्य होतात. ५२३ अशा मृत्युलोकाच्या व स्वर्गाच्या भोगाविषयीं अत्यंत कंटाळा ज्याच्या ठाईं दृष्टीस पडतो, तेथें ज्ञानाची वस्ती आहे ह्मणून समज. ५२४ आणखी आशेखोरासारखा यज्ञ, तलाव, बाग इत्यादि साधनें करतो परंतु केलेल्याचा अभिमान शरीरामध्यें ठेवीत नाहीं. ५२५ वर्णाश्रमधर्माचें संरक्षण करणारीं नित्य–स्नानसंध्यादि–व नैमित्तिक–श्राद्धादिक कर्में-इत्यादि करण्यामध्यें कांहीं उणें पडूं देत नाहीं. ५२६ परंतु हें मीं केलें; किंवा माझ्याकडून हें सिद्धीस गेलें, हा भाव वासनेमध्यें ठेवित नाहीं. ५२७ ज्याप्रमाणें वायु साहजिक सर्वत्र संचार करतो, किंवा सूर्याचें उगवणें जसें निरभिमानपणाचें असतें, ५२८ किंवा वेद जसे स्वभावतःच प्रतिपादन करतात; गंगा जशी कामाशिवायच वहात असते; त्या प्रमाणें ज्याची वागणूक निरभिमान. ५२९ ऋतुकाळीं फलद्रूप होतात; परंतु आपण फलद्रूप झालों आहों हें ज्यांस समजत नाहीं; त्या वृक्षाप्रमाणें ज्यांची सदा सर्वकाळ कर्मामध्यें प्रवृत्ति. ५३० एकसराची दोरी काढून घेतली, ह्मणजे मणी जसे गळून पडतात; त्या प्रमाणें मनामध्यें, कर्मामध्यें, व भाषणामध्यें अहंकार नाहींसा झाला ह्मणजे कर्मेंही लयास जातात. ५३१ संबंधाशिवाय अभ्रें जशीं आकाशामध्यें असतात, त्या प्रमाणें ज्याच्या देहांत कर्में केवळ निरर्थक असतात. ५३२ दारूबाजाच्या आंगावरचें वस्त्र, किंवा चित्रांतल्या हातांतील शस्त्र किंवा बैलावर बांधलेलें शास्त्र असावें, ५३३ त्या प्रमाणें ह्या देहामध्यें मी आहें, ही ज्याला आठवणच नसते. त्याचें नांव निरहंकारता. ५३४ हें सारें जेथें जेथें दिसून येईल, तेथें तेथेंच ज्ञान असतें, ह्याविषयीं अन्यथा बोलूं नये. ५३५ जन्म, मृत्यु, जरा, दुःखें, व्याधि वार्धक्य व पातकें आंगास जडलीं नाहींत तोंच दुरून त्यांस ओळखतो; ५३६ पंचाक्षरी जसा भूतांना; किंवा योगी जसा विघ्नांना; किंवा गवंडी जसा कमीजास्तीपणाला ओळंबा लावण्यांत दक्ष असतो; ५३७ जन्मांतरींचें वैर जसें सर्पाच्या मनांतून जात नाहीं; त्या प्रमाणें जन्मोजन्मींचें दुःख त्याच्या मनांत डांचत असतें. ५३८ डोळ्यामध्यें केर विरत नाहीं; घायामध्यें शस्त्र मुरत नाहीं; त्या प्रमाणें वेळोवेळीं झालेलें जन्माचें दुःख तो विसरत नाहीं. ५३९ तो ह्मणतो 'पुवाच्या खांचेंत शिरलों होतों. अरेरे! मूत्रद्वारांतून बाहेर पडलों. आणि हाय हाय! स्तनांतून निघालेला घामही मीं चाटला!' ५४० अशा अनेक रीतीनें तो जन्माचा कंटाळा करतो. आणि ह्मणतो कीं 'ज्या योगानें पुन्हा असें होईल तें मी कधींही करणार नाहीं.' ५४१ हरलेला डाव फेडण्यासाठीं जुगारी जसा पुन्हा डाव मांडतो, किंवा बापाच्या वैराला मुलगा जसा जागृत असतो, ५४२ मारलेल्याच्या रागानें जसा मागचा सूड उगवितो, तशा कडनिकडीस येऊन जो जन्माच्या पाठीस लागतो. ५४३ परंतु संभाविताला जशी अपकीर्ति सहन होत नाहीं, त्या प्रमाणें जन्म घेतल्याची लाज ज्याचें मन सोडित नाहीं. ५४४ आणखी मृत्यु पुढें उभा असो, किंवा तो कल्पांतीं असो; तरी तो आजच सावध होतो. ५४५ अर्जुना! मध्यें पाणी खोल आहे असें ह्मणतांच, पोहणारा जशी अलीकडेच्या कडेलाच कास घालतो; ५४६ किंवा समरभूमीवर जाण्यापूर्वीच जसा आपला आपण आव राखावा, किंवा घाव लागण्यापूर्वीच जशी ढाल पुढें करावी; ५४७ उद्याच्या मुक्कामास वाटमारे भेटणार तर आजच सावध व्हावें; किंवा जीव जाण्यापूर्वी जशी औषधासाठीं धावाधाव करावी; ५४८ नाहीं तर असें घडतें कीं, जो जळत्या घरांत सांपडतो, त्याला मग विहीर खणावयाला वेळच मिळत नाहीं. ५४९ डोहांत दगड पडल्याप्रमाणें जो बुडतो, तो आरडत आरडत मेला तरी सांगणार कोण? ५५० ह्मणून समर्थाशीं

ज्याचें हाडवैर पडलें, तो जसा अष्टौप्रहर सज्ज असतो, ५५१ किंवा सती निघालेली स्त्री, किंवा संन्याशी ज्या प्रमाणें असतो, त्या प्रमाणें जो न मरतांही मृत्यूची सूचना करतो; (लक्षणें दाखवितो.) ५५२ अशा प्रकारें या जन्मानेंच जो पुढील सर्व जन्म नाहींसे करतो; मरणानें मृत्यु मारून आपण स्वस्वरूप बाकी राहतो; ५५३ त्याच्या घरीं बरोबर ज्ञानाची कमतरता नाहीं. त्याच्या जन्ममृत्यूचें शल्यच नाहींसें होतें. ५५४ आगाखी, त्याच्या शरीराला जरेनें येऊन स्पर्श केला नाहीं, तोंच तारुण्याच्या भरामध्यें, ती प्राप्त झाली आहे असें तो समजतो. ५५५ तो ह्मणतो 'आजच्या स्थितीला शरीराच्या ठिकाणीं पुष्टी आहे खरी; पण तेंच शरीर वाळलेल्या काचरीसारखें होऊन जाईल. ५५६ दुर्दैव्याचे सारे व्यापार जसे बंद पडतात, त्या प्रमाणें हे हातपाय बंद पडतील. आणि प्रधानाशिवाय जी राज्याची दशा, तीच ह्या बळाची होईल. ५५७ फुलाच्या सुवासावर अत्यंत प्रेम धरणारें जें नाक, तें उंटाच्या गुडघ्यासारखें होईल. ५५८ आषाढाच्या हवेनें गुरांच्या पायांना जशी लाळ येते, त्या प्रमाणें या शरीराची दशा होणार ना? ५५९ हे डोळे स्पर्धेनें कमलपत्राशीं भांडतात, पण तेच पिकलेल्या पडवळाप्रमाणें होतील. ५६० भोंवईचे पडदे जुन्या सालीप्रमाणें लोंबत रहातील, आणि अश्रूंच्या उदकानें कुजून जातील. ५६१ बाभळीच्या खोडावर सरड जसे रेखट्या पाडतात, तसें सुरकुत्यांनीं हें तोंड गिजमिडून जाईल. ५६२ स्वयंपाक करावयाच्या चुलीपुढें मोरींत जसें खातेरें माजून राहतें, त्याप्रमाणेंच हें नाक लिडबिडून जाईल. ५६३ तांबुलानें ज्याचे ओंठ रंगवितों; हांसतांना ज्याच्यांतील दांत दाखवितों; आणि ज्याच्या योगानें सुंदर भाषणाचा डौल मिरवितों, ५६४ त्याच तोंडाला लाळेचा लोंढा येईल. आणि दांतासहवर्तमान या दाढाही पडून जातील. ५६५ कर्जाचा बोजा, वाढलेली शेतकी, किंवा झड लागली असतां गुरें जशीं उठवणीस येतात, त्या प्रमाणें ही जीभ कांहीं केलें तरी, उचलणार नाहीं. ५६६ माळ जमिनीवर वाळलेलीं कुसळें जशीं वाऱ्यानें उडून जातात, तशी तोंडामध्यें दाढांची दुर्दशा होईल. ५६७ आषाढांतील पाण्यानें जशीं पर्वतांचीं शिखरें वाहत असतात, तद्वत् तोंडांतून लाळेचे लोंढे वाहावयास लागतील. ५६८ वाणीला अस्पष्टता; कानाला बधिरता; येऊन हा पिंड ह्मातान्या माकडासारखा होईल. ५६९ गवताचें केलेलें बुझावणें जसें वाऱ्यानें हालतें, तसा सर्वांगाला कंप प्राप्त होईल. ५७० पायांत पाय अडखळतील; हात वांकडे होऊन त्यांच्या मुरकुंड्या वळतील; आणि चांगुलपणाच्या चेष्टा होऊन नाचूं लागतील. ५७१ मलमूत्राचीं द्वारें फुटकीं भांडीं होऊन रहातील. माझ्या मरणासाठीं इतर लोक नवस करीत रहातील. ५७२ माझ्याकडे बघून सारें जग थुंकूं लागेल; मृत्यूची काळजी पडेल; आणि सोयऱ्या धायऱ्यांना माझा कंटाळा येईल. ५७३ स्त्रिया ह्मणतील हें पिशाच आहे; मुलें तर मूर्छेना येऊन पडतील. अशा प्रकारें सर्वांच्या चिळसेस पात्र होईन. ५७४ खोकल्याची चढतर, शेजाऱ्या पाजाऱ्यांस सुद्धां त्रासवून सोडील, ५७५ अशीं वार्धक्याचीं लक्षणें जो तरुणपणींच लक्ष्यांत आणतो आणि मग त्याचा तिरस्कार करतो ५७६ तो ह्मणतो कीं "हें उद्यां येणार. आणि आतां भोग भोगतो हे लयास जाणार. मग हित करून घेण्याला साधन असें काय रहाणार?" ५७७ ह्मणून बहिरटपणा येण्यापूर्वींच सारें ऐकून घेतो. पांगळा होण्यापूर्वींच जावयाचें तेथून चालून जातो. ५७८ जों पर्यंत दृष्टि आहे, तों पर्यंत पहाण्याचें तितकें पहातो. मुके होण्यापूर्वींच वाणी सुभाषित बोलून घेते. ५७९ पुढें हात लुले होणार हें भवितव्य थोडेंसें कळतें आहे, तों पर्यंत दानादिक सर्व करून घेतो. ५८० अशी दशा पुढें येईल तेव्हां मन वेडें

होऊन जाईल. ह्यासाठीं शुद्ध असें जें आत्मज्ञान त्याचाच जो विचार करून ठेवतो. ५८१ उद्यां जर चोर लुटणार, तर आजच संपत्तीची लांबवालांबव करावी, किंवा दिवा गेला नाहीं तोंच झाकापाक करून ठेवावी, ५८२ त्या प्रमाणें वार्धक्य येऊन मग जें व्यर्थ जाणार, तें आतांच सारें नीटनेटकें करून ठेवितो. ५८३ आतां किल्ले ढांसळून पडत आहेत; अथवा वळवाचा पाऊस भरून आला आहे; अशा वेळीं त्याची उपेक्षा करून जो जाईल, तो नाश पावलाच ह्मणून समजावें. ५८४ त्या प्रमाणें त्याला वार्धक्य आलें असतां, त्याचें येणें व्यर्थ होतें. कारण, तो आणखी दीर्घायुषी तो कसा होणार? तो मूळचाच वृद्ध असतो. ५८५ तिळांच्या झाडावरचीं बोंडें झाडून टाकलीं, तर त्यांना बोंडें धरत नाहींत. अग्नी झाला, ह्मणून तो राखुंडीला जाळील काय? ५८६ ह्मणून वार्धक्याच्या स्मरणानें (चिंतनानें) जो वार्धक्याचा नाश करून टाकतो, त्याच्या ठिकाणीं ज्ञान आहे ह्मणून समजावें. ५८७ त्याच प्रमाणें नाना प्रकारचे रोग, जों पर्यंत आंगावर येऊन आदळले नाहींत, तों पर्यंत आरोग्याचा जो उपयोग करून घेतो; ५८८ सापाच्या तोंडांत पडलेला घास, शहाणा मनुष्य जसा फेंकून देतो, ५८९ त्या प्रमाणें ज्याच्या वियोगानें दुःख व्हावयाचें, विपत्ति आणि शोक वाढावयाचा, तो स्नेहच मुळीं टाकून देऊन आनंदानें जो निरिच्छ होतो; ५९० आणि जिकडून जिकडून दोष आंतमध्यें तोंड घालतील, त्या त्या कर्मेंद्रियांच्या छिद्रांमध्यें जो नियमांचे धोंडे ठोकून देतो. ५९१ अशा नानातऱ्हेच्या ज्याच्या युक्ति असतात, तोच ज्ञानसंपत्तीचा प्रभु होय. ५९२ आतां अर्जुना! (त्याचें) आणखी एक अलौकिक लक्षण सांगतों ऐक." ५९३

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टाऽनिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

[ 'लक्षणद्वयं' असक्तिः ] तरि जो या देहावरी । उदास ऐसिया परी । उखिता[1] जैसा विढारीं । बैसला आहे ॥ ९४ ॥ [ अनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ] कां वृक्षाची साउली । वाटे जातां मिनली[2] । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ॥ ९५ ॥ साउली सरिसीच असे । परि असे हें नेणिजे जैसें । स्त्रियेचें तैसें । लोलुप्य नाहीं ॥ ९६ ॥ आणि प्रजा[3] जे जाली । तियें वस्तीकरें[4] आलीं । कां गोरुवें[5] बैसलीं । रुखातळीं ॥ ९७ ॥ जो संपत्तिमाजि असतां । ऐसा गमे पांडुसुता । जैसा कां वाटे जातां । साक्षी ठेविला ॥ ९८ ॥ किंबहुना पुंसा[6] । पांजरियामाजि जैसा । वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ॥ ९९ ॥ येऱ्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाणपां धात्री[7] । ज्ञानासि गा ॥ ६०० ॥ [ नित्यं च समचित्तत्वं ] महासिंधू जैसें । ग्रीष्म वर्ष सरिसें । [ इष्टानिष्टोपपत्तिषु ] इष्टानिष्ट तैसें । जयाच्या ठायीं ॥ १ ॥ कां तीन्हीं काळ होतां । त्रिधा नव्हे सविता । तैसा सुखदुःखी चित्ता । भेदु नाहीं ॥ २ ॥ जेथ नभाचेनि पाडें । समत्वा न्यून न पडे । तेथ ज्ञान रोकडें । वोळख तूं ॥ ३ ॥

"तर वाटसरू बिऱ्हाडांत जसा उदास बसलेला असतो, त्या प्रमाणें जो ह्या देहावर उदास. ५९४ किंवा वाटेनें जातांना वृक्षाची सावली सांपडली असतां, तिच्यावर जितकी आस्था, तितकी सुद्धां ज्याची घरावर नाहीं. ५९५ आपली सावली आपल्या अगदीं जवळ असते, तथापि ती समजत नाहीं. त्या प्रमाणें ज्याला स्त्रियेचाही लोभ नाहीं. ५९६ आणि मुलें झालेलीं असतात तीं, वस्ती करावयाला आलेल्या वाटसराप्रमाणें, किंवा झाडा खालीं बसलेल्या गुरांप्रमाणें मानतो. ५९७ जो संपत्तीमध्यें असला तर अर्जुना! वाटेनें जातांना जसा साक्षी असावा त्या प्रमाणें भासतो. ५९८ किंवा पिंजऱ्याला जसा राघू भिऊन असतो, त्या प्रमाणें वेदाज्ञेला जो भिऊन असतो. ५९९ आणखी, बायकामुलें, घरदार ह्यांच्या ठिकाणीं ज्याची मैत्री नाहीं, तोच ज्ञानाची भूमी हें ध्यानांत ठेव. ६०० महासागराला ग्रीष्मऋतु आणि वर्षाऋतु दोन्हीही सारखेच. त्या प्रमाणें इष्ट आणि अनिष्ट हीं दोन्हीही ज्याला सारखीं; ६०१ किंवा तिन्हीकाळ आले असतां, सूर्य

१ वाटसरू, उदासीन. २ सांपडलीं. ३ मुलें. ४ उतरावयास. ५ गुरें. ६ पोपट. ७ पृथ्वी–आधार.

सा तीन प्रकारचा होत नाहीं, त्या प्रमाणें ुखानें व दुःखानेंही चित्ताला भेद नाहीं. ०२ ज्या ठिकाणीं आकाशाप्रमाणें ऐक्यभावाध्यें कमतरता पडत नाहीं, तेथें मूर्तिमंत ज्ञान ासतें, हें तूं लक्ष्यांत ठेव. ” ६०३

मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

[‘लक्षणद्वयं’ मयि चानन्ययोगेन] आणि मीवांचूनि ांहीं । आणीक गोमटें[1] नाहीं । ऐसा निश्चय तिहीं । जयाचा ला ॥ ४ ॥ शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचा ोंश[3] । एक मीवांचूनि वांस[4] । न पाहती आन ॥ ५ ॥ अव्यभिचारिणी ] किंबहुना निकट निजें । जयाचें जाहालें ज । तेणें आपणयां आह्मा सेज । एकी केली ॥ ६ ॥ रितां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि र्डें । एकसरला[6] जो ॥ ७ ॥ [अव्यवहिता] मिळोनि मिळचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसें । र्वेस्वें भजती ॥ ८ ॥ सूर्याच्या होंण्या होइजे । कां सूर्यासचि जाइजे । हें विकलेंपण साजे । प्रभेसि जेवीं ॥ ९ ॥ पैं ाणियांचिये भूमिके । पाणी तेंळपे कौतुकें । ते लहरी ह्मणति ोकिकें । येऱ्हवीं तें पाणी ॥ ६१० ॥ जो अनंन्य यापरी । ो जाहालाही मातें वरी । तोचि तो मूर्तधारी । ज्ञान पैं ा ॥ ११ ॥ [विविक्तदेशसेवित्वं] आणि तीर्थें धौतें तटें । पोवनें चोखटें । आवडती कंपाटें । वसवूं जया ॥ १२ ॥ ैंकक्षोचीं कुहरें । जळांशयपरिसरें । अधिष्टी जो आदरें । गरा नये ॥ १३ ॥ [अरतिर्जनसंसदि] बहु एकांतावरी ीति । जया जंनपदाची खंती । जाण मनुष्याकारें मूर्ती । ानाची तो ॥ १४ ॥ आणिकही पुढती । चिन्हें गा सुमती । ानाचिये निरुती- । लागीं सांगों ॥ १५ ॥

“आणखी माझ्याशिवाय दुसरें कांहींच ांगलें नाहीं, असा कायावाचामनें करून यानें निश्चय केलेला, ६०४ काया, वाचा, ाणि मन हीं कृतनिश्चयाचें तीर्थ प्यालेलीं अल्यामुळें, एका माझ्याशिवाय दुसरा मार्गच ाहात नाहींत. ६०५ येवढेंच नव्हे तर, ज्याचें मन माझ्याजवळ आलें, त्यानें आपणाला व आह्मांला ऐक्याची शय्या तयार केली. ६०६ पतीपुढें जातांना जिवाला किंवा आंगाला जसें संकट वाटत नाहीं, त्या स्त्रियेसारखा जो अनुसरतो; ६०७ गंगेचें उदक समुद्रास जाऊन मिळालें, तरी आणखी पुन्हा मिळतच असतें, त्याप्रमाणें मत्स्वरूप होऊनही पुन्हा मला भजतो; ६०८ सूर्याच्या उत्पन्न होण्यानें होणें, किंवा सूर्याबरोबरच लुप्त होणें, हा अभेदभाव जसा प्रभेला शोभतो; ६०९ किंवा पाणथळ जमिनीमध्यें सहजीं पाणी हालतें ह्मणजे व्यवहारामध्यें त्यास लाटा असें ह्मणतात. बाकी तेंही पाणीच. ६१० ह्याप्रमाणें जो एकनिष्ठ; मी होऊनही माझा स्वीकार करतो, तो साक्षात् ज्ञान होय. ६११ आणखी तीर्थें, पवित्र तडाग, उत्तम उत्तम तपोवनें, आणि गुहा इत्यादि ठिकाणें ज्याला रहावयास आवडतात; ६१२ पर्वतांच्या गुहेमध्यें, जलाशयाच्या नजीक जो आश्रम करतो; नगरांत येत नाहीं; ६१३ एकांतावर ज्याची फार प्रीति; व स्त्रीचा ज्याला कंटाळा; तो मनुष्यरूपानें ज्ञानाचीच मूर्ति आहे असें समज. ६१४ हे **बुद्धिमंता!** ज्ञानाच्या निश्चयासाठीं आणखी त्याचीं कांहीं चिन्हें सांगूं. ” ६१५

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥११॥

[‘लक्षणद्वयं’ अध्यात्मज्ञाननित्यत्वं] तरि परमात्मा ऐसें । जें एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव[1] ॥ १६ ॥ तें एकवांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञानें । तें अज्ञान ऐसा मनें । निश्चय केला ॥ १७ ॥ स्वर्गा जाणें हें सांडी । भवें[2]-विषयीं कान झाडी । दे अध्यात्मज्ञानीं बुडी । सद्भावाची ॥१८॥ भंगलिये[3] वाटे । शोधूनियां अंव्हाटे[4] । निधिजे जेविं निटें । राजपंथें ॥ १९ ॥ तैसें ज्ञानजाता करी । आघवेंचि एकीकडे सारी । मग मन बुद्धि मोहरी[5] । अध्यात्मज्ञानीं ॥६२०॥ ह्मणे एक हेंचि आथी । येर जाणणें ते भ्रांति । ऐसी निर्कें[6]-रेंसी मती । मेंरु[7] होय ॥ २१ ॥ एवं निश्चय जयाचा । द्वारीं

१ चांगलें. २ काया, वाचा, व मन ह्या तिघांनीं. ३ तीर्थ, पथ. ४ वाट. ५ मन. ६ अनुसरतो. ७ होण्यानें. ८ अभेभाव. ९ हालतें. १० एकनिष्ठ. ११ साक्षात्, मूर्तिमंत. २ पवित्र. १३ गुहा. १४ पर्वतांच्या गुहा. १५ उदकाच्या वळचीं स्थळें. १६ आश्रय करतो. १७ वस्तीची. १८ ाश्चयासाठीं.

१ ज्ञानामुळें. २ संसाराविषयीं. ३ ओसाड, मोडलेली. ४ आडवाटा. ५ वळवितो. ६ निश्चयानें. ७ दृढ.

होऊन जाईल. ह्यासाठीं शुद्ध असें जें आत्मज्ञान त्याचाच जो विचार करून ठेवतो. ५८१ उद्यां जर चोर लुटणार, तर आजच संपत्तीची लांबवालांबव करावी, किंवा दिवा गेला नाहीं तोंच झाकापाक करून ठेवावी, ५८२ त्या प्रमाणें वार्धक्य येऊन मग जें व्यर्थ जाणार, तें आतांच सारें नीटनेटकें करून ठेवितो. ५८३ आतां किल्ले ढांसळून पडत आहेत; अथवा वळवाचा पाऊस भरून आला आहे; अशा वेळीं त्याची उपेक्षा करून जो जाईल, तो नाश पावलाच ह्मणून समजावें. ५८४ त्या प्रमाणें त्याला वार्धक्य आलें असतां, त्याचें येणें व्यर्थ होतें. कारण, तो आणखी दीर्घायुषी तो कसा होणार? तो मूळचाच वृद्ध असतो. ५८५ तिळांच्या झाडावरचीं बोंडें झाडून टाकलीं, तर त्यांना बोंडें धरत नाहींत. अग्नी झाला, ह्मणून तो राखुंडीला जाळील काय? ५८६ ह्मणून वार्धक्याच्या स्मरणानें (चिंतनानें) जो वार्धक्याचा नाश करून टाकतो, त्याच्या ठिकाणीं ज्ञान आहे ह्मणून समजावें. ५८७ त्याच प्रमाणें नाना प्रकारचे रोग, जों पर्यंत आंगावर येऊन आदळले नाहींत, तों पर्यंत आरोग्याचा जो उपयोग करून घेतो; ५८८ सापाच्या तोंडांत पडलेला घास, शहाणा मनुष्य जसा फेंकून देतो, ५८९ त्या प्रमाणें ज्याच्या वियोगानें दुःख व्हावयाचें, विपत्ति आणि शोक वाढावयाचा, तो स्नेहच मुळीं टाकून देऊन आनंदानें जो निरिच्छ होतो; ५९० आणि जिकडून जिकडून दोष आंतमध्यें तोंड घालतील, त्या त्या कर्मेंद्रियांच्या छिद्रांमध्यें जो नियमांचे धोंडे ठोकून देतो. ५९१ अशा नानातऱ्हेच्या ज्याच्या युक्ति असतात, तोच ज्ञानसंपत्तीचा प्रभु होय. ५९२ आतां अर्जुना! (त्याचें) आणखी एक अलौकिक लक्षण सांगतों ऐक." ५९३

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।
नित्यं च समचित्तत्वमिष्टाऽनिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

[ 'लक्षणद्वयं' असक्तिः ] तरि जो या देहावरी । उदास ऐसिया परी । उखिता जैसा बिढारीं । बैसला आहे ॥ ९४ ॥ [ अनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ] कां वृक्षाची साउली । वा जातां मिनेली । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ॥ ९५ ॥ साउली सरिसीच असे । परि असे हें नेणिजे जैसें । स्त्रिये तैसें । लोलुप्य नाहीं ॥ ९६ ॥ आणि प्रजा जे जाली । तिं वस्तीकरें आलीं । कां गोरुवें बैसलीं । रुखातळीं ॥ ९७ ॥ जो संपत्तिमाजि असतां । ऐसा गमे पांडुसुता । जैसा व वाटे जातां । साक्षी ठेविला ॥ ९८ ॥ किंबहुना पुंसा । पांजरियामाजि जैसा । वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ॥ ९९ ॥ येऱ्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाण धांत्री । ज्ञानासि गा ॥ ६०० ॥ [ नित्यं च समचित्तत्वं ] महासिंधू जैसें । ग्रीष्म वर्ष सरिसें । [ इष्टानिष्टोपपत्तिषु ] इष्टानिष्ट तैसें । जयाच्या ठायीं ॥ १ ॥ कां तीन्हीं का होतां । त्रिधा नव्हे सविता । तैसा सुखदुःखी चित्ता । भे नाहीं ॥ २ ॥ जेथ नभाचेनि पाडें । समत्वा न्यून न पडे । तेथ ज्ञान रोकडें । वोळख तूं ॥ ३ ॥

"तर वाटसरू धर्मशाळेंत जसा उदास बसलेला असतो, त्या प्रमाणें जो ह्या देहाव उदास. ५९४ किंवा वाटेनें जातांना वृक्षाची सावली सांपडली असतां, तिच्यावर जितकी आस्था, तितकी सुद्धां ज्याची घरावर नाहीं. ५९५ आपली सावली आपल्या अगदीं जवळ असते, तथापि ती समजत नाहीं. त्या प्रमाणें ज्याला स्त्रियेचाही लोभ नाहीं. ५९६ आणि मुलें झालेलीं असतात तीं, वस्ती करावयाला आलेल्या वाटसराप्रमाणें, किंवा झाडा खालीं बसलेल्या गुरांप्रमाणें मानतो. ५९७ जो संपत्तीमध्यें असला तर अर्जुना! वाटेनें जातांना जसा साक्षी असावा त्या प्रमाणें भासतो. ५९८ किंवा पिंजऱ्याला जसा राघू भिऊन असतो, त्या प्रमाणें वेदाज्ञेला जो भिऊन असतो. ५९९ आणखी, बायकामुलें, घरदार ह्यांच्या ठिकाणीं ज्याची मैत्री नाहीं, तोच ज्ञानाची भूमी हें ध्यानांत ठेव. ६०० महासागराला ग्रीष्मऋतु आणि वर्षाऋतु दोन्हीही सारखेच. त्या प्रमाणें इष्ट आणि अनिष्ट हीं दोन्हीही ज्याला सारखीं; ६०१ किंवा तिन्ही काळ आले असतां, सूर्य

१ वाटसरू, उदासीन. २ सांपडली. ३ मुलें. ४ उतरावयास. ५ गुरें. ६ पोपट. ७ पृथ्वी–आधार.

जसा तीन प्रकारचा होत नाहीं, त्या प्रमाणें सुखानें व दुःखानेंही चित्ताला भेद नाहीं. ६०२ ज्या ठिकाणीं आकाशाप्रमाणें ऐक्यभावामध्यें कमतरता पडत नाहीं, तेथें मूर्तिमंत ज्ञान असतें, हें तूं लक्ष्यांत ठेव. " ६०३

मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

['लक्षणद्वयं' मयि चानन्ययोगेन] आणि मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटें नाहीं । ऐसा निश्चय तिहीं । जयाचा केला ॥ ४ ॥ शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचा कोंश । एक मीवांचूनि वांस । न पाहती आन ॥ ५ ॥ [अव्यभिचारिणी] किंबहुना निकट निजें । जयाचें जाहालें मज । तेणें आपणयां आह्मा सेज । एकी केली ॥ ६ ॥ रिगतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । एकसरला जो ॥ ७ ॥ [अव्यवहिता] मिळोनि मिळनचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजती ॥ ८ ॥ सूर्याच्या होण्या होइजे । कां सूर्यासवेंचि जाइजे । हें विकलेंपण साजे । प्रभेसि जेवीं ॥ ९ ॥ पैं पाणियांचिये भूमिके । पाणी तळपे कौतुकें । ते लहरी ह्मणति लौकिकें । येऱ्हवीं तें पाणी ॥ ६१० ॥ जो अनन्य यापरी । मी जाहालाही मातें वरी । तोचि तो मूर्तिधारी । ज्ञान पैं गा ॥ ११ ॥ [विविक्तदेशसेवित्वं] आणि तीर्थें धौतें तटें । तपोवनें चोखटें । आवडती कपाटें । वसवूं जया ॥ १२ ॥ शैलकक्षांचीं कुहरें । जळाशयपरिसरें । अधिष्ठी जो आदरें । नगरा नये ॥ १३ ॥ [अरतिर्जनसंसदि] बहु एकांतावरी प्रीति । जया जनपदाची खंती । जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो ॥ १४ ॥ आणिकही पुढती । चिन्हें गा सुमती । ज्ञानाचिये निरुती- । लागीं सांगों ॥ १५ ॥

"आणखी माझ्याशिवाय दुसरें कांहींच चांगलें नाहीं, असा कायावाचामनें करून ज्यानें निश्चय केलेला, ६०४ काया, वाचा, आणि मन हीं कृतनिश्चयाचें तीर्थ प्यालेलीं असल्यामुळें, एका माझ्याशिवाय दुसरा मार्गच पहात नाहींत. ६०५ येवढेंच नव्हे तर, ज्याचें मन माझ्याजवळ आलें, त्यानें आपणाला व आह्मांला ऐक्याची शय्या तयार केली. ६०६ पतीपुढें जातांना जिवाला किंवा आंगाला जसें संकट वाटत नाहीं, त्या स्त्रियेसारखा जो अनुसरतो; ६०७ गंगेचें उदक समुद्रास जाऊन मिळालें, तरी आणखी पुन्हा मिळतच असतें, त्याप्रमाणें मत्स्वरूप होऊनही पुन्हा मला भजतो; ६०८ सूर्याच्या उत्पन्न होण्यानें होणें, किंवा सूर्याबरोबरच लुप्त होणें, हा अभेदभाव जसा प्रभेला शोभतो; ६०९ किंवा पाणथळ जमिनीमध्यें सहजीं पाणी हालतें ह्मणजे व्यवहारामध्यें त्यास लाटा असें ह्मणतात. बाकी तेंही पाणीच. ६१० ह्याप्रमाणें जो एकनिष्ठ; मी होऊनही माझा स्वीकार करतो, तो साक्षात् ज्ञान होय. ६११ आणखी तीर्थें, पवित्र तडाग, उत्तम उत्तम तपोवनें, आणि गुहा इत्यादि ठिकाणें ज्याला रहावयास आवडतात; ६१२ पर्वतांच्या गुहेमध्यें, जलाशयाच्या नजीक जो आश्रम करतो; नगरांत येत नाहीं; ६१३ एकांतावर ज्याची फार प्रीति; व स्त्रीचा ज्याला कंटाळा; तो मनुष्यरूपानें ज्ञानाचीच मूर्ति आहे असें समज. ६१४ हे बुद्धिमंता! ज्ञानाच्या निश्चयासाठीं आणखी त्याचीं कांहीं चिन्हें सांगूं. " ६१५

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥११॥

['लक्षणद्वयं' अध्यात्मज्ञाननित्यत्वं] तरि परमात्मा ऐसें । जें एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव ॥ १६ ॥ तें एकवांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञानें । तें अज्ञान ऐसा मनें । निश्चय केला ॥ १७ ॥ स्वर्गा जाणें हें सांडी । भवविषयीं कान झाडी । दे अध्यात्मज्ञानीं बुडी । सद्भावाची ॥१८॥ भंगलिये वाटे । शोधूनियां अव्हाटे । निघिजे जेविं निटें, राजपंथें ॥ १९ ॥ तैसें ज्ञानजाता करी । आघवेंचि एकीकडे सारी । मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानीं ॥६२०॥ ह्मणे एक हेंचि आथी । येर जाणणें ते भ्रांति । ऐसी निकेंरेंसी मती । मेरु होय ॥ २१ ॥ एवं निश्चय जयाचा । द्वारीं

१ चांगलें. २ काया, वाचा, व मन ह्या तिघांनीं. ३ तीर्थ, [illegible]. ४ वाट. ५ मन. ६ अनुसरतो. ७ होण्यानें. ८ अभेदभाव. ९ हालतें. १० एकनिष्ठ. ११ साक्षात्, मूर्तिमंत. १२ पवित्र. १३ गुहा. १४ पर्वतांच्या गुहा. १५ उदकाच्या [illegible] स्थळें. १६ आश्रय करतो. १७ वस्तीची. १८ [illegible]साठीं.

१ ज्ञानामुळें. २ संसाराविषयीं. ३ ओसाड, मोडलेली. ४ आडवाटा. ५ वळवितो. ६ निश्चयानें. ७ दृढ.

होऊन जाईल. ह्यासाठीं शुद्ध असें जें आत्मज्ञान त्याचाच जो विचार करून ठेवतो. ५८१ उद्यां जर चोर लुटणार, तर आजच संपत्तीची लांबवालांबव करावी, किंवा दिवा गेला नाहीं तोंच झाकापाक करून ठेवावी, ५८२ त्या प्रमाणें वार्धक्य येऊन मग जें व्यर्थ जाणार, तें आतांच सारें नीटनेटकें करून ठेवितो. ५८३ आतां किल्ले ढांसळून पडत आहेत; अथवा वळवाचा पाऊस भरून आला आहे; अशा वेळीं त्याची उपेक्षा करून जो जाईल, तो नाश पावलाच ह्मणून समजावें. ५८४ त्या प्रमाणें त्याला वार्धक्य आलें असतां, त्याचें येणें व्यर्थ होतें. कारण, तो आणखी दीर्घायुषी तो कसा होणार? तो मूळचाच वृद्ध असतो. ५८५ तिळांच्या झाडावरचीं बोंडें झाडून टाकलीं, तर त्यांना बोंडें धरत नाहींत. अग्नी झाला, ह्मणून तो राखुंडीला जाळील काय? ५८६ ह्मणून वार्धक्याच्या स्मरणानें (चिंतनानें) जो वार्धक्याचा नाश करून टाकतो, त्याच्या ठिकाणीं ज्ञान आहे ह्मणून समजावें. ५८७ त्याच प्रमाणें नाना प्रकारचे रोग, जों पर्यंत आंगावर येऊन आदळले नाहींत, तों पर्यंत आरोग्याचा जो उपयोग करून घेतो; ५८८ सापाच्या तोंडांत पडलेला घास, शहाणा मनुष्य जसा फेंकून देतो, ५८९ त्या प्रमाणें ज्याच्या वियोगानें दुःख व्हावयाचें, विपत्ति आणि शोक वाढावयाचा, तो स्नेहच मुळीं टाकून देऊन आनंदानें जो निरिच्छ होतो; ५९० आणि जिकडून जिकडून दोष आंतमध्यें तोंड घालतील, त्या त्या कर्मेंद्रियांच्या छिद्रांमध्यें जो नियमांचे धोंडे ठोकून देतो. ५९१ अशा नानातऱ्हेच्या ज्याच्या युक्ति असतात, तोच ज्ञानसंपत्तीचा प्रभु होय. ५९२ आतां **अर्जुना!** (त्याचें) आणखी एक अलौकिक लक्षण सांगतों ऐक." ५९३

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।

नित्यं च समचित्तत्वमिष्टाऽनिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

[ 'लक्षणद्वयं' असक्तिः ] तरि जो या देहावरी । उदास ऐसिया परी । उखिता[1] जैसा बिढारीं । बैसला आहे ॥ ९४ ॥ [ अनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ] कां वृक्षाची साउली । वाटे जातां मिनली[2] । घरावरी तेतुली । आस्था नाहीं ॥ ९५ ॥ साउली सरिसीच असे । परि असे हें नेणिजे जैसें । स्त्रियेचें तैसें । लोलुप्य नाहीं ॥ ९६ ॥ आणि प्रजा[3] जे जाली । तियें वस्तीकरें[4] आलीं । कां गोरुवें[5] बैसलीं । रुखातळीं ॥ ९७ ॥ जो संपत्तिमाजि असतां । ऐसा गमे पांडुसुता । जैसा कां वाटे जातां । साक्षी ठेविला ॥ ९८ ॥ किंबहुना पुंसा[6] । पांजरियामाजि जैसा । वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ॥ ९९ ॥ येऱ्हवीं दारागृहपुत्रीं । नाहीं जया मैत्री । तो जाणपां धांत्री[7] । ज्ञानासि गा ॥ ६०० ॥ [ नित्यं च समचित्तत्वं ] महासिंधू जैसें । ग्रीष्म वर्षे सरिसें । [ इष्टानिष्टोपपत्तिषु ] इष्टानिष्ट तैसें । जयाच्या ठायीं ॥ १ ॥ कां तीन्हीं काळ होतां । त्रिधा नव्हे सविता । तैसा सुखदुःखीं चित्ता । भेदु नाहीं ॥ २ ॥ जेथ नभाचेनि पाडें । समत्वा न्यून न पडे । तेथ ज्ञान रोकडें । वोळख तूं ॥ ३ ॥

"तर वाटसरू बिऱ्हाडांत जसा उदास बसलेला असतो, त्या प्रमाणें जो ह्या देहावर उदास. ५९४ किंवा वाटेनें जातांना वृक्षाची सावली सांपडली असतां, तिच्यावर जितकी आस्था, तितकी सुद्धां ज्याची घरावर नाहीं. ५९५ आपली सावली आपल्या अगदीं जवळ असते, तथापि ती समजत नाहीं. त्या प्रमाणें ज्याला स्त्रियेचाही लोभ नाहीं. ५९६ आणि मुलें झालेलीं असतात तीं, वस्ती करावयाला आलेल्या वाटसराप्रमाणें, किंवा झाडा खालीं बसलेल्या गुरांप्रमाणें मानतो. ५९७ जो संपत्तीमध्यें असला तर **अर्जुना!** वाटेनें जातांना जसा साक्षी असावा त्या प्रमाणें भासतो. ५९८ किंवा पिंजऱ्याला जसा राघू भिऊन असतो, त्या प्रमाणें वेदाज्ञेला जो भिऊन असतो. ५९९ आणखी, बायकामुलें, घरदार ह्यांच्या ठिकाणीं ज्याची मैत्री नाहीं, तोच ज्ञानाची भूमी हें ध्यानांत ठेव. ६०० महासागराला ग्रीष्मऋतु आणि वर्षाऋतु दोन्हीही सारखेच. त्या प्रमाणें इष्ट आणि अनिष्ट हीं दोन्हीही ज्याला सारखीं; ६०१ किंवा तिन्हीकाळ आले असतां, सूर्य

१ वाटसरू, उदासीन. २ सांपडलीं. ३ मुलें. ४ उतरावयास. ५ गुरें. ६ पोपट. ७ पृथ्वी–आधार.

जसा तीन प्रकारचा होत नाहीं, त्या प्रमाणें सुखानें व दुःखानेंही चित्ताला भेद नाहीं. ६०२ ज्या ठिकाणीं आकाशाप्रमाणें ऐक्यभावामध्यें कमतरता पडत नाहीं, तेथें मूर्तिमंत ज्ञान असतें, हें तूं लक्ष्यांत ठेव. " ६०३

मयि चाऽनन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

[ 'लक्षणद्वयं' मयि चानन्ययोगेन ] आणि मीवांचूनि कांहीं । आणीक गोमटें नाहीं । ऐसा निश्चय तिहीं । जयाचा केला ॥ ४ ॥ शरीर वाचा मानस । पियालीं कृतनिश्चयाचा कोश । एक मीवांचूनि वास । न पाहती आन ॥ ५ ॥ [ अव्यभिचारिणी ] किंबहुना निकट निजें । जयाचें जाहालें मज । तेणें आपणयां आह्मा सेज । एकी केली ॥ ६ ॥ रिगतां वल्लभापुढें । नाहीं आंगीं जीवीं सांकडें । तिये कांतेचेनि पाडें । एकसरला जो ॥ ७ ॥ [ अव्यवहिता ] मिळोनि मिळतचि असे । समुद्रीं गंगाजळ जैसें । मी होऊनि मज तैसें । सर्वस्वें भजती ॥ ८ ॥ सूर्याच्या होण्या होइजे । कां सूर्यासवेंचि जाइजे । हें विकलेपण साजे । प्रभेसि जेवीं ॥ ९ ॥ पैं पाणियांचिये भूमिके । पाणी तळपे कौतुकें । ते लहरी ह्मणति लौकिकें । येऱ्हवीं तें पाणी ॥ ६१० ॥ जो अनन्य यापरी । मी जाहालाही मातें वरी । तोचि तो मूर्तधारी । ज्ञान पैं गा ॥ ११ ॥ [ विविक्तदेशसेवित्वं ] आणि तीर्थें धौतें तटें । तपोवनें चोखटें । आवडती कपाटें । वसवूं जया ॥ १२ ॥ शैलकक्षांचीं कुहरें । जळाशयपरिसरें । अधिष्ठी जो आदरें । नगरा नये ॥ १३ ॥ [ अरतिर्जनसंसदि ] बहु एकांतावरी प्रीति । जया जनपदाची खंती । जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो ॥ १४ ॥ आणिकही पुढती । चिन्हें गा सुमती । ज्ञानाचिये निरुती- । लागीं सांगों ॥ १५ ॥

" आणखी माझ्याशिवाय दुसरें कांहींच चांगलें नाहीं, असा कायावाचामनें करून ज्यानें निश्चय केलेला, ६०४ काया, वाचा, आणि मन हीं कृतनिश्चयाचें तीर्थ प्यालेलीं असल्यामुळें, एका माझ्याशिवाय दुसरा मार्गच पहात नाहींत. ६०५ येवढेंच नव्हे तर, ज्याचें मन माझ्याजवळ आलें, त्यानें आपणाला व आह्मांला ऐक्याची शय्या तयार केली. ६०६ पतीपुढें जातांना जिवाला किंवा आंगाला जसें संकट वाटत नाहीं, त्या स्त्रियेसारखा जो अनुसरतो; ६०७ गंगेचें उदक समुद्रास जाऊन मिळालें, तरी आणखी पुन्हा मिळतच असतें, त्याप्रमाणें मत्स्वरूप होऊनही पुन्हा मला भजतो; ६०८ सूर्याच्या उत्पन्न होण्यानें होणें, किंवा सूर्याबरोबरच लुप्त होणें, हा अभेदभाव जसा प्रभेला शोभतो; ६०९ किंवा पाणथळ जमिनीमध्यें सहजीं पाणी हालतें ह्मणजे व्यवहारामध्यें त्यास लाटा असें ह्मणतात. बाकी तेंही पाणीच. ६१० ह्याप्रमाणें जो एकनिष्ठ; मी होऊनही माझा स्वीकार करतो, तो साक्षात् ज्ञान होय. ६११ आणखी तीर्थें, पवित्र तडाग, उत्तम उत्तम तपोवनें, आणि गुहा इत्यादि ठिकाणें ज्याला रहावयास आवडतात; ६१२ पर्वतांच्या गुहेमध्यें, जलाशयाच्या नजीक जो आश्रम करतो; नगरांत येत नाहीं; ६१३ एकांतावर ज्याची फार प्रीति; व स्त्रीचा ज्याला कंटाळा; तो मनुष्यरूपानें ज्ञानाचीच मूर्ति आहे असें समज. ६१४ हे बुद्धिमंता! ज्ञानाच्या निश्चयासाठीं आणखी त्याचीं कांहीं चिन्हें सांगूं. " ६१५

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥

[ 'लक्षणद्वयं' अध्यात्मज्ञाननित्यत्वं ] तरि परमात्मा ऐसें । जें एक वस्तु असे । तें जया दिसे । ज्ञानास्तव ॥ १६ ॥ तें एकवांचूनि आनें । जियें भवस्वर्गादि ज्ञानें । तें अज्ञान ऐसा मनें । निश्चय केला ॥ १७ ॥ स्वर्गा जाणें हें सांडी । भवविषयीं कान झाडी । दे अध्यात्मज्ञानीं बुडी । सद्भावाची ॥ १८ ॥ भंगलिये वाटे । शोधूनियां अऱ्हाटे । निघिजे जेविं निटें । राजपंथें ॥ १९ ॥ तैसें ज्ञानजाता करी । आघवेंचि एकीकडे सारी । मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानीं ॥ ६२० ॥ ह्मणे एक हेंचि आथी । येर जाणणें ते भ्रांति । ऐसी निकेंरैंसी मती । मेरु होय ॥ २१ ॥ एवं निश्चय जयाचा । द्वारीं

१ चांगलें. २ काया, वाचा, व मन ह्या तिघांनीं. ३ तीर्थ, शपथ. ४ वाट. ५ मन. ६ अनुसरतो. ७ होण्यानें. ८ अभेदभाव. ९ हालतें. १० एकनिष्ठ. ११ साक्षात्, मूर्तिमंत. १२ पवित्र. १३ गुहा. १४ पर्वतांच्या गुहा. १५ उदकाच्या जवळचीं स्थळें. १६ आश्रय करतो. १७ वस्तीची. १८ निश्चयासाठीं.

१ ज्ञानामुळें. २ संसाराविषयीं. ३ ओसाड, मोडलेली. ४ आडवाटा. ५ वळवितो. ६ निश्चयानें. ७ दृढ.

अध्यात्मज्ञानाचा । ध्रुव देवो गगनींचा । तैसा राहिला ॥२२॥ तयाचिया ठायीं ज्ञान । या बोला नाहीं आन । जे ज्ञानीं बैसलें मन । तेव्हांचि तो मी ॥ २३ ॥ तरी बैसलेपणें जें होये । तें बैसतांचि बोलें न होये । तरि ज्ञाना तया आहे । सैरिसा पाड ॥ २४ ॥ [तत्त्वज्ञानार्थदर्शनं] आणि तत्त्वज्ञान निर्मळ । फळे जें एक फळ । ते ज्ञेयही वेरी सरळ । दिठी जेणें ॥ २५ ॥ येन्हवीं बोधा आलेनि ज्ञानें । जरी ज्ञेय न दिसेचि मनें । तरि ज्ञानलाभही न मने । जाहाला सांता ॥२६॥ आंधळेया हातीं दिवा । देऊनि काय करावा । तैसा ज्ञाननिश्चय आघवा । वायांचि जाय ॥२७॥ जरि ज्ञानाचेनि प्रकाशें । परतत्त्वीं दिठी न पैसे । ते स्फूर्तीचि असे । अंध होउनी ॥ २८ ॥ ह्मणोनि ज्ञान जेतुलें दावी । तेतुली वस्तुचि आघवी । ते देखे ऐसी व्हावी । बुद्धी चोख ॥२९॥ यालागीं ज्ञानें निर्दोषें । दाविलें ज्ञेय देखे । तैसेनि उन्मेषें । आथिला जो ॥६३०॥ जेवढी ज्ञानाची वृद्धी । तेवढी जयाची बुद्धी । तो ज्ञान हें शब्दीं । करणें न लगे ॥ ३१ ॥ पैं ज्ञानाचिये प्रभेसवें । जयाची मती ज्ञेयीं पावे । तो हातधरणिया शिवे । परतत्त्वातें ॥ ३२ ॥ तोचि ज्ञान हें बोलतां । विस्मयो कवण पांडुसुता । काय सवितयातें सविता । ह्मणावें असे ॥ ३३ ॥ तंव श्रोते ह्मणती असो । न सांगें तयाचा अतिसो । ग्रंथोक्ती तेथ आडसो । घालिसी कां हा ॥ ३४ ॥ तुझा हाचि आह्मां थोर । वक्तृत्वाचा पाहुणेर । जे ज्ञानविषो फार । निरोपिला ॥ ३५ ॥ रस होआवा अतिमात्रु । हा घेतासि कविमंत्रु । तरी अवंतूनि शत्रु । करितोसि कां गा ॥ ३६ ॥ ठायीं बैसतिये वेळे । जे रसैसोय घेऊनि पळे । तियेचा येरें वोडव मिळे । कोणा अर्था ॥ ३७ ॥ आघवाचि विषयीं भोंदी । परि सांजवणी टेकों नेदी । ते खुरखोडी नुसधी । पोषी कवण ॥ ३८ ॥ तैसी ज्ञानीं मती न फांके । येर जल्पती नेणों केतुकें । परि तें असो निकें । केलें तुवां ॥ ३९ ॥ जया ज्ञानलेशोद्देशें । किजती योगादि सायासें । तें धणीचें आणि तुझिया ऐसें । निरूपण ॥ ६४० ॥ अमृताची सातवांकडी । लागो कां अनुघडी । सुखाच्या दिवसीं कोडी । गणिजेतुकां ॥ ४१ ॥ पूर्णचंद्रेसीं राती । युग एक असोनि पोहती । तरि काय न पाहत आहाती । चकोर ते ॥ ४२ ॥ तैसें ज्ञानाचें बोलणें । आणि येणें रसाळपणें । आतां पुरे कोण ह्मणे । आकर्णितां ॥ ४३ ॥ आणि सभाग्य पाहुणा ये । सुभगाचि वाढती होये । तैं सरों नेणें रससोये । ऐसें आथी ॥ ४४ ॥ तैसा जाहाला प्रसंग । जे ज्ञानीं आह्मासि लाग । आणि तुजही अनुराग । आथि तेथ ॥ ४५ ॥ ह्मणोनि यथा व्याख्याना । पासीं से आली चौगुणा । ना ह्मणोनयेसी देखणा । होसी ज्ञानी ॥ ४६ ॥ तरि आतां ययावरी । प्रज्ञेचा मांज धरीं । पदें साच करीं । निरूपणीं ॥ ४७ ॥ या संतवाक्यासरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें । माझेंही जी एसें । मनोगत ॥ ४८ ॥ यावरी आतां तुह्मी । आज्ञापिला स्वामी । तरि वायां वाग्जाळ मी । वाढों नेदीं ॥ ४९ ॥ [एतज्ज्ञानमिति प्रोक्तं] एवं इयें अठरा । ज्ञानलक्षणें अवधारा । श्रीकृष्णें धनुर्धरा । निरूपिलीं ॥ ६५० ॥ मग ह्मणे यानावें । ज्ञान एथ जाणावें । हें स्वमत आणि आघवें । ज्ञानियेही ह्मणती ॥ ५१ ॥ करतळावरी वाटोळा । डोलत देखिजे आंवळा । तैसें ज्ञान आह्मी डोळां । दाविलें तुज ॥ ५२ ॥ आतां धनंजया महामती । अज्ञान ऐसी वंदंती । तेही सांगों व्यक्ती । लक्षणेसी ॥ ५३ ॥ [अज्ञानं यदतोन्यथा] येन्हवीं ज्ञान फुडें जालिया । अज्ञान जाणवे धनंजया । जें ज्ञान नव्हे तें अपैसया । अज्ञानचि ॥ ५४ ॥ पाहें पां दिवस आघवा सरे । मग रात्रीची वारी वावरे । वांचूनि कांहीं तिसरें । नाहीं जेवीं ॥ ५५ ॥ तैसें ज्ञान जेथ नाहीं । तें अज्ञानचि पाहीं । तरि सांगों कांहीं कांहीं । चिन्हें तियें ॥ ५६ ॥ [अथ मानित्वाद्यष्टादशलक्षणान्याह—'मानित्वं'] तरि संभावने जिये । जो मानाची वाट पाहे । सत्कारें होय । तोष जया ॥ ५७ ॥ गर्वें पर्वताचीं शिखरें । तैसा महत्वावरूनि नुतरे । तयाचियाठायीं पुरें । अज्ञान आहे ॥ ५८ ॥ ['दंभित्वं'] आणि स्वधर्माची मांगळी । बांधे वाचेच्या पिंपळीं । उभिलें जैसा देउळीं । जाणोनि कुंचा ॥ ५९ ॥ घाली विद्येचा पसारा । सुये सुकृताचा डांगोरा । करि तेतुलें मोहरा । स्फीतीचिया ॥ ६६० ॥ आंग वरिवरी चर्ची । जनातें अर्चितां वंची । तो जाण अज्ञानाची । खाणी एथ ॥ ६१ ॥ [हिंसा] आणि वन्ही वनीं विचरे । तेथ जळती जैसीं जंगमस्थावरें । तैसें जयाचेनि आचारें । जगा दुःख ॥ ६२ ॥ कौतुकें जें जें जल्पे । तें सेंवळाहूनि

१ सारखी योग्यता. २ घेतें. ३ समान दृष्टीनें. ४ झाला असतां. ५ पसरत नाहीं. ६ बुद्धि. ७ ज्ञानानें. ८ संपन्न झाला. ९ प्रकाशाबरोबर. १० हातांसारखा, हां हां ह्मणतां. ११ अडथळा. १२ ज्ञानमंत्र. १३ आमंत्रण देऊन. १४ पानावर. १५ स्वयंपाक. १६ आदर. १७ चांगली. १८ धार. १९ लाथाळ, खोडकर. २० किती तरी, मलभलते. २१ ज्ञानांशाच्या उद्देशानें. २२ तृप्तीचें. २३ सात दिवसांची झड. २४ उघडीपीशिवाय. २५ आनंदाच्या दिवसांच्या. २६ समजतात काय ? २७ उगवलेली.

१ ऐकतांना. २ श्रीमान्. ३ सुग्रण, दैववती. ४ स्वयंपाक. ५ आवड. ६ प्रीति. ७ ह्या भाषणाला. ८ चौपट. ९ बुद्धीचें. १० आधिक्य. ११ ह्मणतात. १२ आपोआप, सहज. १३ पाळी, यात्रा. १४ प्रतिष्टेसाठीं. १५ मांगानें केलेलें दोराचें वेटोळें. १६ बांधतो. १७ उभा करावा. १८ खराटा. १९ प्रतिष्ठेस. २० जगांत. २१ सर्वांपेक्षांही.

तीख रुपे । विषाहूनि संकल्पें । मारक जें ॥ ६३ ॥ तयातें बहु अज्ञान । तो अज्ञानाचें निधान । हिंसेसि आयतन । जयाचें जिणें ॥ ६४ ॥ [‘अक्षांतिः’] आणि फुंके भाता फुगे । रेचिलिया सवेंचि उफगे । तैसा संयोगवियोगें । चढे वोहटे ॥ ६५ ॥ पडली वारयाचिया वेंळसां । धुळी चढे आकाशा । हरिखा वळघे तैसा । स्तुती वेळे ॥ ६६ ॥ निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके । थेंबें विरे वारेनि शोखे । चिखल जैसा ॥ ६७ ॥ तैसा मानापमानीं होये । जो कोण्हीचि ऊर्मी न साहे । तयाच्या ठायीं आहे । अज्ञान पुरें ॥ ६८ ॥ [‘अनार्जवं’] आणि जयाचिया मनीं गांठी । वरिवरी मोकळी वाचा दिठी । आंगें मिळे जीवें पाठी । भलतया दे ॥ ६९ ॥ व्याधाचें चारा घालणें । तैसें प्रांजळ जोगावणें । चांगाचीं अंतःकरणें । विरुद्ध करी ॥ ६७० ॥ गार शेवाळें गुंडाळली । कां निंबोळी जैसी पिकली । तैसी जयाची भ[illegible] बाह्यक्रिया ॥ ७१ ॥ अज्ञान तयाचियाठायीं । टेविलें असे [illegible] । या बोला आन नाहीं । सत्य मानीं ॥ ७२ ॥ [‘आचार्योपासनराहित्यं’] आणि [illegible]कुळीं लाजे । जो गुरुभक्ति उभजे । विद्या घेऊनि [illegible] जो ॥ ७३ ॥ तयाचें नाम घेणें । तें वाचे शूद्रान्न हा[illegible] परि घडलें लक्षणें । बोलतां इयें ॥ ७४ ॥ आतां गुरुभक्तांचें नांव घेवों । तेणें वाचे प्रायश्चित्त देवों । गुरुभक्तांचें नाम पाहों । सूर्य जैसा ॥ ७५ ॥ येतुलेनि पांगू पापाचा । निस्तरेल हे वाचा । जो गुरुतल्पगाचा । नामीं जाला ॥ ७६ ॥ हा ठायवरी । तया नामाचें भय हरी । मग ह्मणे अवधारीं । आणिकें चिन्हें ॥ ७७ ॥ [‘अशौचं’] तरि आंगें कर्में ढिला । जो मनें विकल्पें भरला । अडवीचा अवगळला । कुहा जैसा ॥ ७८ ॥ तया तोंडीं कांटिवडें । आंत नुसधीं हाडें । अशुचि तेणें पाडें । सबाह्य जो ॥ ७९ ॥ जैसें पोटालागीं सुणें । उघडें झांकलें न ह्मणे । तैसें आपुलें परावें नेणे । द्रव्यालागीं ॥ ६८० ॥ इया ग्रामसिंहाचियाठायीं । जैसा मिळणी टावो अठावो नाहीं । तैसा स्त्रीविषयीं कांहीं । विचारीना ॥ ८१ ॥ कर्माचा वेळ चुके । कां नित्य नैमित्तिक ठाके । तें जया न दुखे । जीवामाजी ॥ ८२ ॥ पापीं जो निसुग । पुण्याविषयीं अति निलाग । जयाचिया मनीं वेग । विकल्पाचा ॥ ८३ ॥ तो जाण निखिळा । अज्ञानाचा पुतळा । जो बांधोनि असे डोळा । वित्ताशेतें ॥ ८४ ॥ [‘अशौचं’] आणि स्वार्थें अळुमाळें । जो धैर्यापासोनि चळे । जैसें तृणबीज ढळे । मुंगियेचेनी ॥ ८५ ॥ पावो सूदलिया सवें । जैसें थिल्लर कालवे । तैसा भयाचेनि नांवें । गजबजे जो ॥ ८६ ॥ मनोरथांचिया धारसा । वाहणें जयाचिया मानसा । पूरीं पडिला जैसा । दुधिया पाहीं ॥ ८७ ॥ वायूचेनि सांवाये । धूंई दिगंतरा जाये । दुःखवार्ता होये । तैसें जया ॥ ८८ ॥ वांउधणाचिया परी । आश्रय कहींचि न धरी । क्षेत्रीं तीर्थीं पुरीं । थारों नेणे ॥ ८९ ॥ कां मातलिया सरडा । पुढती बुड पुढती शेंडा । हिंडणें वारा कोरडा । तैसा जया ॥ ६९० ॥ जैसा रोविल्याविणें । रांजण थारों नेणे । तैसा पडे तैं राहाणें । येऱ्हवीं हिंडे ॥ ९१ ॥ तयाच्याठायीं उदंड । अज्ञान असे वितंड । जो चांचल्यें भावंड । मर्कटाचें ॥ ९२ ॥ [‘आत्मविनिग्रहाभावः’] आणि पैं गा धनुर्धरा । जयाचिया अंतरा । नाहीं वोढावारा । संयमाचा ॥ ९३ ॥ लेंढिये आला लोंढा । न मनीं वाळुवेचा वरवंडा । तैसा निषेधाचिया तोंडा । बिहेना जो ॥ ९४ ॥ व्रतातें आड मोडी । स्वधर्म पायें वोलांडी । नियमाची आश तोडी । जयाची क्रिया ॥ ९५ ॥ नाहीं पापाचा कंटाळा । नेणे पुण्याचा जिव्हाळा । लाजेचा पेंडवळा । खाणोनि घाली ॥ ९६ ॥ कुळेंसीं जो पाठमोरा । वेदाज्ञेसीं दुऱ्हा । कृत्याकृत्यव्यापारा । निवाड नेणें ॥ ९७ ॥ वसू जैसा मोकाटें । वारा जैसा अफाट । फुटला जैसा पाट । निरंजनीं ॥ ९८ ॥ आंधळें हातिरूं मातलें । कां डोंगरीं जैसें पेटलें । तैसें विषयीं सुटलें । चित्त जयाचें ॥ ९९ ॥ पैं उकरडां काय न पडे । मोकाट कोणां नातुडे । ग्रामद्वारींचें आंडें । नोलांडी कोण ॥ ७०० ॥ जैसें सत्रीं अन्न जालें । कां सामान्या बीक आलें । वार्धियेचें उभलें । कोण न रिगे ॥ १ ॥ तैसें जयाचें अंतःकरण । तयाच्या ठायीं संपूर्ण । अज्ञानाची जाण । ऋद्धि आहे ॥ २ ॥ [इंद्रियार्थेष्ववैराग्यं] आणि विषयांची गोडी । जो जीत मेला न सांडी । स्वर्गींही खावया जोडी । एथुनीचि ॥ ३ ॥ जो अखंड भोगा जांचे । जया व्यसन कामक्रीडेचें । मुख

---

१ तीक्ष्ण. २ रुततें. ३ घर. ४ दावला असतां. ५ चेवतो. ६ लाभालाभानें. ७ वावटळींत. ८ हर्षास चढतो. ९ अल्प. १० कोरडा पडतो, अटतो. ११ उत्कर्ष. १२ भलत्यालाच. १३ निर्मळ. १४ पालन करणें. १५ शिळा. १६ ग्रासतो. १७ शूद्रान्न भक्षण करणें. १८ हीनत्व. १९ गुरुद्रोह्याच्या. २० नाम घेतल्यानें. २१ रानांतला. २२ अमंगळ. २३ विहीर. २४ काटे. २५ कुत्रें. २६ कुत्र्याला. २७ अंगसंगास. २८ निर्लज्ज. २९ भ्रष्ट.

१ सवें. २ द्रव्यासक्तीला. ३ अल्पस्वल्प. ४ पाय टाकल्यावरोवर. ५ डबक्यांतलें खातेरें. ६ धारेवर. ७ भोंपळा. ८ सहवासानें. ९ धूळ, धुकें. १० वादळाच्या. ११ पुन्हां. १२ परिभ्रमण. १३ उभें राहणें. १४ मोठें. १५ धरबंद. १६ प्रतिबंध. १७ बांध. १८ भीत नाहीं. १९ सीमा. २० कुळधर्माला. २१ निर्णय. २२ बैल. २३ मोकळा. २४ निर्जल प्रदेशांत. २५ हत्ती. २६ वळू. २७ अटकाव, उंबरा. २८ वेदयेला. २९ तेज. ३० छपरांत. ३१ श्रम करतो. ३२ कामनिक कर्माचें.

देखोनि विरक्तार्चे । [1]सचैल करी ॥ ४ ॥ विषो शिणोनियां राहे । परि न शिणे सावध नोहे । [2]कुहिला हातीं खाये । कोढी जैसा ॥ ५ ॥ [3]खरी टेंकों नेदी उडे । [4]लातौनि फोडी नाकाडें । तऱ्हीं जेविं न काढे । माघौता खर ॥ ६ ॥ तैसा जो विषयांलागीं । उडी घाली जळते आगीं । व्यसनाचीं आंगीं । लेणीं मिरवी ॥ ७ ॥ [5]फुंटोनि पडे तंव । मृग वाढवी हांव । परि न ह्मणे ते [6]भाव । रोहिणीची ॥ ८ ॥ तैसा जन्मोनि मृत्युवरी । विषयीं त्रासितां बहुतीं परी । तऱ्ही त्रास नेघे धरी । अधिक प्रेमा ॥ ९ ॥ पहिलिये बाळदशे । आई बाहेचि पिसें । तें सरे मग स्त्री मासें । भुलोनि ठाके ॥७१०॥ मग स्त्री भोगितां [9]थावो । वृद्धाप्य लागे येवों । तेव्हां तोचि प्रेमभावो । बाळकासि आणि ॥ ११ ॥ आंधळें व्यालें जैसें । तैसा बाळें [10]परिसे । परि जीव मरे तों न त्रासे । विषयांसि जो ॥ १२ ॥ जाण तयाच्या ठायीं । अज्ञानासि पार नाहीं । आतां आणीक कांहीं । चिन्हें सांगों ॥ १३ ॥ ['अहंकारः'] तरि देहचि आत्मा । ऐसेया जो मनोधर्मा । [11]वळंघोनियां कर्मा । आरंभ करी ॥ १४ ॥ आणि उणें कां पुरें । जें जें कांहीं आचरे । तयाचेनि [12]आविष्कारें । कुंथों लागे ॥ १५ ॥ [13]डोइये ठेविलेनि [14]भोजें । [15]देवलविसें जेविं [16]फुंजे । तैसा विद्यावयसा माजे । उताणा चाले ॥ १६ ॥ ह्मणे मीचि एक अर्थी । माझ्याचि घरीं संपत्ती । माझी आचरती रीती । कोणा आहे ॥ १७ ॥ नाहीं माझेनि पाडें पाड । मी सर्वज्ञ एकचि [17]ईंढ । ऐसा सर्व [18]तुंटीगंड । घेऊनि ठाके ॥ १८ ॥ व्याधि लागलिया माणुसा । नयेचि भोग दाऊं जैसा । निकें न साहे जो तैसा । [19]पुंढिलांचें ॥ १९ ॥ पैं [20]गुंण तेतुला खाय । स्नेह कीं जाळित जाय । जेथ ठेविजे तेथ होय । [21]मैंसी ऐसें ॥ ७२० ॥ जीवनें शिंपिला [22]तिडिपिडी । [23]वीजिलें प्राण सांडी । [24]लागला तरी काडी । उरों नेदी ॥ २१ ॥ [25]अळुमाळा प्रकाश करी । तेतुलेनीच उबारा धरी । तैसिया दीपाचिया परी । [26]सुविद्य जो ॥ २२ ॥ औषधाचेनि नांवें अमृतें । जैसा नवज्वर [27]आंवुथे । कां विषचि होऊनि परते । सर्पा दूध ॥ २३ ॥ तैसा सद्गुणी मत्सर । व्युत्पत्ती अहंकार । तपोज्ञानें अपार । ताठा चढे ॥ २४ ॥ अंत्यज [29]राणिवे बैसविला । [1]आरें [2]धोरण गिळिला । तैसा गर्वे फुगला । देखसी जो ॥ २५ ॥ जो लाटणें ऐसा न लवे । पाथर तेविं न द्रवे । [3]गुणियासि नागवे । [4]फोंडसें जैसें ॥२६॥ किंबहुना तयापासीं । अज्ञान आहे [5]बांढीसीं । हें [6]निकरें गा तुजसीं । बोलत असों ॥ २७ ॥ ['जन्मादिदर्शनं'] आणीकही धनंजया । जो गृहदेह सामग्रिया । न देखे [7]कांलचेया । जन्मातें गा ॥ २८ ॥ कृतघ्ना उपकार केला । कां चोरा [8]व्यवहार दिधला । [9]निसुग स्तविला । विसरे जैसा ॥ २९ ॥ [10]बोढाळतां लाविलें । तें तैसेंचि कान [11]पुंस बोलें । कीं पुढती बोढाळूं आलें । [12]सुणें जैसें ॥ ७३० ॥ बेडूक सापाचिया तोंडीं । जातसे [13]संवुडवुडीं । तो मक्षिकांचिया [14]कोडी । स्मरेना कांहीं ॥ ३१ ॥ तैसीं [15]नवही द्वारें स्रवती । आंगीं देहाची [16]लुती जिती । जेणें जाली तें चित्तीं । सलेना जया ॥ ३२ ॥ मातेच्या [17]उदरकुहरीं । सूनि विष्ठेच्या [18]दाथरीं । जठरीं नवमासवरी । उकडला जें ॥ ३३ ॥ ते गर्भीची जे व्यथा । कां जें जालें उपजतां । तें कांहींचि सर्वथा । नाठवी जो ॥ ३४ ॥ मळमूत्रपंकीं । जें लोळतें बाळ [19]अंकीं । देखोनि जो न थुंकी । त्रास नेघे ॥ ३५ ॥ कालचि ना जन्म गेलें । [20]पांहेच पुढती आलें । ऐसें हें कांहीं वाटलें । नाहीं जया॥३६॥ ['मृत्योरदर्शनं'] आणि पैं तयाचि परी । जीविताची [21]फेरारी । देखोनि जो न करी । मृत्युचिंता ॥ ३७ ॥ जिणेयाचेनि विश्वासें । मृत्यु एक एथ असे । हें जयाचेनि मानसें । मानिजेना ॥ ३८ ॥ अल्पोदकींचा मासा । हें [22]नांटे ऐसिया आशा । न वचेचि कां जैसा । अगाध डोहां ॥ ३९ ॥ कां [23]गोरीचिया भुली । मृग व्याधा दृष्टी न घाली । गळ न पाहतां गिळिली । उंडी [24]मीनें ॥ ७४० ॥ दीपाचिया [25]झगमगा । जाळील हें पतंगा । नेणवेचि पैं गा । जयापरी ॥ ४१ ॥ [26]गेवार निद्रासुखें । घर जळत असे तें न देखे । नेणतां जेवी [27]विखें । रांधिलें अन्न ॥ ४२ ॥ तैसा जीविताचेनि मिषें । हा मृत्यूचि आला असे । हें नेणेचि [28]रंजिसें । सुखें जो गा ॥ ४३ ॥ शरीरींची वाढी । अहोरात्रांची जोडी । विषयसु-

१ सचैल स्नान. २ कुजलेल्या. ३ गाढवी. ४ लाथांनीं. ५ हृदय फुटून. ६ कपट, चमत्कार. ७ मृगजळाचें. ८ कडेवर घेण्याचें. ९ कंटाळला. १० स्पर्श करतो. ११ चढून. १२ आविर्भावानें. १३ मस्तकावर. १४ भारानें. १५ पुजारी, देवर्षि. १६ अभिमान धरतो. १७ प्रसिद्ध. १८ गर्व. १९ दुसऱ्यांचें. २० वात. ( पक्षीं गुण ). २१ शाई, काजळ. २२ तडतड करतो. २३ वारा घातला तर. २४ स्पर्श झाला तर. २५ थोडासा. २६ ज्ञानी. २७ दुधानें. २८ अधिक होतो, भडकतो. २९ राज्यावर.

१ अजगरानें. २ वाळलेलें काष्ट. ३ गारुड्याला. ४ फुसें. ५ वाढते दशेस. ६ निश्चयानें, आवेशानें. ७ मागच्या पुढच्या. ८ भांडवल. ९ निर्लज्ज. १० ओढाळपण करतांना. ११ पुच्छ. १२ कुत्रें. १३ मुळांसहित. १४ कोटि. १५ मुख, मलद्वार, मूत्रद्वार, नेत्र २, कान २, नासारंध्रें २ हीं नऊ. १६ कुजलेलीं. १७ गर्भगुहेमध्यें. १८ उकाड्यांत. १९ मांडीवर. २० उजाडतांच. २१ चंचल. २२ आटणार नाहीं. २३ पारध्याच्या गाण्याला. २४ माशानें. २५ प्रकाशानें. २६ मूर्ख, गव्हार. २७ विषानें. २८ रजोगुणात्मक सुखानें.

खप्रौढी । साचचि मानी ॥ ४४ ॥ परि बापुडा ऐसें नेणे । जे वेश्येचें सर्वस्व देणें । तेंचि तें नागवणें । रूप एथ ॥४५॥ संवचोराचें साजणें । तेंचि तें प्राण घेणें । लेपा स्नपन करणें । तोचि नाश ॥ ४६ ॥ पांडुरोगें आंग सुटलें । तें तयाचि नांवें खुंटलें । तैसें नेणे भुले । आहारनिद्रा ॥ ४७ ॥ सन्मुख शूला । धांवतया पायें चपळा । प्रतिपदीं जवळा । मृत्यु जेवीं ॥ ४८ ॥ तेविं देहा जंव जंव वाढ । जंव जंव दिवसांचा पवाड । जंव जंव सुरवाड । भोगाचा यया ॥ ४९ ॥ तंव तंव अधिकाधिकें । मरण आयुष्यातें जिंके । मीठ जेविं उदकें । घांसिजत असे ॥७५०॥ तैसें जीवित्व जाये । तयास्तव काळातें पाहे । हें हातोहातींचें न होये । ठाउवें जया ॥५१॥ किंबहुना पांडवा । हा आंगींचा मृत्यु नित्य नवा । न देखे जो भावा । विषयांचिया ॥ ५२ ॥ तो अज्ञानदेशींचा रावो । या बोला महाबाहो । न पडे गा ठावो । आणिकांचा ॥५३॥ ['जराया आदर्शनं'] पैं जीविताचेनि तोषें । जैसा कां मृत्यु न देखे । तैसाचि तारुण्यें पोखे । जरा न गणी ॥ ५४ ॥ कडाडीं लोटला गाडा । कां शिखरौनि सुटला धोंडा । तैसा न देखे जो पुढां । वार्धक्य आहे ॥ ५५ ॥ कां ओडवोहळा पाणी आलें । कां जैसें झुंसयाचें झुंझ मातलें । तैसें तारुण्याचें चढलें । भुररें जया ॥ ५६ ॥ पुष्टि लागे विघरों । कांति पाहे निसरों । मस्तक ओंदरी शिरो । भागीं कंप ॥५७॥ दाढी सांउळ धरी । मान हालौनि वारी । तरी जो करी । मायेचा पैसु ॥ ५८ ॥ पुढील उरीं आदळे । तंव न देखे जेविं आंधळें । कां डोळ्यावरले निगळें । आळसी तोपे ॥ ५९ ॥ तैसें तारुण्य आजिचें । भोगितां वृद्धाप्य पोहेचें । न देखे तोचि साचें । अज्ञान गा ॥ ७६०॥ ['व्याध्यदर्शनं'] देखे अक्षमें कुजे । की विटोवूं लागे फुंजें । परि न ह्मणे पोहें माझें । ऐसेंचि होईल ॥ ६१ ॥ आणि आंगीं वृद्धतेची । संज्ञा ये मरणाची । परि जया तारुण्याची । भुली न फिटे ॥ ६२ ॥ तो अज्ञानाचें घर । हें साचचि घे उत्तर । तेवींचि परियेसीं थोर । चिन्हें आणिक ॥ ६३ ॥ तरि वाघाचिये अडवे । एक वेळ आला चरोनि दैवें । तेणें विश्वासें पुढती धांवे । वसू जैसा ॥ ६४ ॥ कां सर्पघराआंत । अवचटें ठेवा आणिला स्वस्थ । येतुलियासाठीं निश्चित । नास्तिक होय ॥ ६५ ॥ तैसेंचि अचवटें हें । एकदोनी वेळांचि लाहे । एथ उरग एक आहे । हें मानीना जो ॥ ६६ ॥ वैरिया निद आली । आतां द्वंद्वें माझीं सरलीं । हें मानी तो सेपिलीं । मुकला जेवीं ॥ ६७ ॥ तैसी आहारनिद्रेची उजरी । रोग निवांत जोंवरी । तंव जो न करी । व्याधींची चिंता ॥ ६८ ॥ ['दुःखादर्शनं'] आणि स्त्रीपुत्रादिमेळें । संपत्ती जंव जंव फळे । तेणें रंजें डोळे । जाती जयाचे ॥ ६९ ॥ संवळेंचि वियोग पडेल । विळौनि विपत्ति येईल । हें दुःख पुढील । देखेना जो ॥७७०॥ तो अज्ञान गा पांडवा । ['दोषादर्शनं'] आणि तोही तोचि जाणावा । जो इंद्रियें अव्हासवा । चारी एथ ॥ ७१ ॥ वयसेचेनि उंवायें । संपत्तीचेनि सोवायें । सेव्यासेव्य जाये । सरकटित ॥ ७२ ॥ न करावें तें करी । असंभाव्य मनीं धरी । चिंतू नये तें विचारी । जयाची मती ॥ ७३ ॥ रिघे जेथ न रिघावें । मागे जें न घ्यावें । स्पर्शें जेथ न लगावें । आंग मन ॥ ७४ ॥ न जावें तेथ जाये । न पाहावें तें जो पाहे । न खावें तें खाये । तेवींचि तोषे ॥ ७५ ॥ न धरावा तो संग: न लगावें तेथ लाग । नाचरावा तो मार्ग । आचरे जो ॥७६॥ नायकावें तें आइके । न बोलावें तें बके । परि दोष होतील हें देखे । प्रवर्ततां ॥ ७७ ॥ आंगा मनासि रुचावें । येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे । जो करणेंयाचेनि नांवें । भलतेंचि करी ॥ ७८ ॥ परि पाप मज होईल । कां नरकयातना येईल । हें कांहींचि पुढील । देखेना जो ॥ ७९ ॥ तयाचेनि आंगलगें । जगीं अज्ञान दांडुगें । जें सज्ञानाही संगें । झोंबों सके ॥ ७८० ॥ परि असो हें आइक । अज्ञानचिन्हें आणिक । जेणें तुज सम्यक । जाणवेल ॥ ८१ ॥ ['आसक्तिः'] तरि जयाची प्रीति पुरी । गुंतली देखसी घरीं । नवगंधकेसरीं । भ्रमरी जैसी ॥ ८२ ॥ साकरेचिया राशीं । बैसली नुठे माशी । तैसेनि स्त्रीचित्त आवेशी । जयाचें मन ॥ ८३ ॥ ठेलां बेडूक कुंडीं । मशक गुंतला शेंबुडीं । जैसा ढोर सबुडबुडीं । रुतला पंकीं ॥८४॥ तैसें घरींहूनि निघणें । नाहीं जीवें मनें प्राणें । जया साप होऊनि असणें । भोटीं तिये ॥ ८५ ॥ प्रियोत्तमाचिया कंठीं । प्रेमदा घे आंठी । तैसी जीवेंसी कोंपटी । धरूनि ठाके॥८६॥ मधुरसोद्देशें । मधुकर जेंचे जैसें । गृहसंगोपन तैसें । करी जो गा ॥ ८७ ॥ ह्मातारपणीं जालें । रत्न एक विपाइलें ।

१ तन मन धन अर्पण करणें. २ मैत्री. ३ चित्राला. ४ शूळाच्या. ५ अनुकूलता. ६ घांसलें जातें. ७ यमाला. ८ भुली. ९ पुष्ट होतो. १० डोंगराच्या कड्यावरून. ११ अरण्यांतील ओहळास. १२ रेड्याचें. १३ वेड. १४ नाश पावूं दे. १५ मानेला. १६ पांडुरता. १७ विस्तार, फैलाव. १८ गळतें घर. १९ उद्यांचें. २० अशक्त. २१ वेडावूं लागतो. २२ फुगतो. २३ उद्यां. २४ चिन्ह, लक्षण. २५ अरण्यांत. २६ बिळांतून.

१ सर्प. २ भांडणें, तंटे. ३ समूळ. ४ उत्कर्ष. ५ धुंदीनें. ६ तत्काळ. ७ वेळानें. ८ पाहिजे तशी. ९ तारुण्याच्या. १० उत्कर्षानें, सुखांत. ११ साह्यानें, सहवासानें. १२ सरसकट सारखेंच मानतो. १३ स्पर्शूं नये. १४ बडबडतो. १५ समागमानें. १६ दांडगें. १७ राहिला. १८ समूळ. १९ ओसाड जमिनींत. २० स्त्री. २१ मिठी. २२ खोंपट. २३ जाच सोसतो. २४ मूल, पुत्ररत्न. २५ नवानवसाचें.

तयाचें कां जेतुलें । मातापितरां ॥ ८८ ॥ तेतुलेनि पाडें पार्था । घरीं जया प्रेमआस्था । [‘अभिष्वंगः पुत्रादिष्वहमेवेति बुद्धिः’] आणि स्त्रीवांचूनि सर्वथा । जाणेना जो ॥८९॥ तैसा स्त्रीदेहीं जो जीवें । पडोनियां सर्वभावें । कोण मी काय करावें । कांहीं नेणे ॥ ७९० ॥ महापुरुषाचें चित्त । जालिया वस्तुगत । ठाके व्यवहारजात । जयापरी ॥ ९१ ॥ हानि लज्जा न देखे । परापवाद नाइके । जयाचीं इंद्रियें ऐकमुखें । स्त्रिया केलीं ॥ ९२ ॥ चित्त आराधी स्त्रियेचें । आणि तियेचेचि छंदें नाचे । माकड गारुडियाचें । जैसें होय ॥ ९३ ॥ आपणपेंही शिणवी । इष्टमित्र दुखवी । मग केवडाचि वाढवी । लोभी जैसा ॥ ९४ ॥ तैसा पानपुण्यें खांची । गोत्रकुटुंबा वंची । परि बाइणी स्त्रियेची । उणी हों नेदी ॥ ९५ ॥ पूजितीं दैवतें जोगवी । गुरुतें बोलें झकवी । माय बापा दावी । निदारपण ॥ ९६ ॥ स्त्रियेच्या तरि विखीं । भोगसंपत्ती अनेकीं । आणि वस्तु निकी । जे जे देखे ॥९७॥ प्रेमाथिलेनि भक्तें । जैसेनि भजिजे कुळदैवतें । तैसा एकाग्रचित्तें । स्त्री जो उपासी ॥ ९८ ॥ साच आणि चोख । तें स्त्रियेसीचि अशेख । येरींविषयीं जोगावणूक । तेही नाहीं ॥ ९९ ॥ इयेतें हन कोणी देखेल । इयेसी वेखासें जाईल । तरि युगचि बुडेल । ऐसें जया ॥ ८०० ॥ नायटया भेण । न मोडिजे नागांची आण । तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ॥ १ ॥ किंबहुना धनंजया । स्त्रीचि सर्वस्व जया । आणि तियेचिया जालियां- । लागीं प्रेम ॥ २ ॥ आणीकही जें समस्त । तियेचें संपत्तिजात । तें जीवाहूनि आप्त । मानी जो कां ॥ ३ ॥ तो अज्ञानासी मूळ । अज्ञाना तेणें बळ । हें असो केवळ । तो तेंचि रूप ॥ ४ ॥ [‘इष्टानिष्टोपपत्तिषु असमचित्तत्वं’] आणि भांतलिया सागरीं । मोकळिलिया तरी । लाटांच्या येरझारीं । आंदोळे जेवीं ॥ ५ ॥ तेवि प्रियवस्तु पावे । आणि सुखें जो उंचावे । तैसाचि अप्रियासवें । तळवट घे ॥ ६ ॥ ऐसेनि जयाचे चित्तीं । वैषम्याची वोळखती । वाहे तो महामती । अज्ञान गा ॥ ७ ॥ [‘अन्ययोगेन मयि व्यभिचारिणी भक्तिः सनिमित्ता’] आणि माझ्या ठायीं भक्ती । फळालागीं जया आर्ती । धनोद्देशें विरक्ती । नटणें जेवीं ॥ ८ ॥ [‘व्यभिचारिणी’] नातरि कांताच्या मानसीं । रिगोनि स्वैरिणी एक जैसी । राहाटे जारेसीं । जावया लागीं ॥ ९ ॥ तैसा मातें किरीटी । भजती गा पांउटी । करूनी जो दिठी । विषो सूये ॥ ८१० ॥ [‘व्यवहिता’] आणि भजिनलियासवें । तोचि विषय जरी न पावे । तरी सांडी ह्मणे आघवें । टवाळ हें ॥ ११ ॥ कुणबट कुळवाडी । तैसा आन आन देव मांडी । आदिलाची परवडी । करी तया ॥ १२ ॥ तया गुरुमार्गा टेंके । जयाचा सुगरवा देखे । तरि तयाचा मंत्र शिके । येर नेघे ॥ १३ ॥ प्राणिजातेंसी निष्ठुर । स्थावरीं बहु भर । तेवींची नाहीं एकसर । निर्वाह जया ॥ १४ ॥ माझी मूर्ती निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवो देवी । यात्रे जाय ॥ १५ ॥ नित्य आराधन माझें । काजीं कुळदेवता भजे । पर्वविशेषें कीजे । पूजा आना ॥ १६ ॥ माझें अधिष्ठान घरीं । आणि वोवसे आनाचे करी । पितृकार्यावसरीं । पितरांचा होय ॥ १७ ॥ एकादशीच्या दिवसीं । जेतुला पाड आह्मांसीं । तेतुलाचि नागांसी । पंचमीच्या दिवशीं ॥ १८ ॥ चौथें मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चवदसी ह्मणे माये । तुझाचि वो दुर्गे ॥ १९ ॥ नित्य नैमित्तिकें कर्में सांडी । मग वैसे नवचंडी । आदित्यवारीं वाढी । बहिरवां पात्रीं ॥ ८२० ॥ पाठीं सोमवार पावे । आणि वेलेंसीं लिंगा धांवे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो ॥ २१ ॥ ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी । अवघेन गांवद्वारीं । अहेव जैसी ॥ २२ ॥ ऐसेनि जो भक्त । देखसी सैरा धांवत । जाण अज्ञानाचा मूर्त । अवतार तो ॥ २३ ॥ [‘अविविक्तदेशसेवित्वं’] आणि एकांतें चोखटें । तपोवनें तीर्थें तटें । देखोनि जो गा विटे । तोहि तोचि ॥ २४ ॥ [‘जनसंसदि रतिः’] जया जनपदीं सुख । गजबजेचें कवतिक । वानूं आवडे लौकिक । तोही तोचि ॥ २५ ॥ [‘अध्यात्मज्ञाननित्यत्वाभावः’] आणि आत्मा गोचर होये । ऐसी जे विद्या आहे । ते आइकोनी डौरें वाहे । विद्वांसू जो ॥ २६ ॥ उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे । अध्यात्मज्ञानीं जयाचें । मनचि नाहीं ॥ २७ ॥ आत्मचर्चा एकी आथी । ऐसिये बुद्धीची भिंती । पाडूनि जयाची मती । वोडाळ जाहाली ॥ २८ ॥ कर्मकांड तरि जाणे । मुखोद्गत पुराणें । ज्योतिषीं तो ह्मणे । तैसेंचि होय ॥ २९ ॥ शिल्पीं अति निपुण । सूपकर्मींही प्रवीण । विधि आथर्वण । हातीं आथी

१ सिद्धाचें. २ ब्रह्मस्वरूप. ३ निंदा. ४ एकाकार. ५ धनच. ६ कमी करतो. ७ वायदे. ८ टोलवाटोलवी. ९ दरिद्रता. १० उत्तम. ११ प्रेमळ. १२ कसा तरी निर्वाह, भाजी भाकरी. १३ विरुद्ध. १४ नायट्याच्या. १५ मनोगत. १६ मुलांवर. १७ खवळलेल्या. १८ लघुत्व. १९ चिंता, खेद. २० व्यभिचारी.

१ रीतीनें. २ घालून. ३ प्रकार. ४ सुगरीणपणा. ५ एकनिष्ठपणा. ६ कार्यामध्यें. ७ दुसऱ्याची. ८ सत्ता, स्थापना. ९ नवस. १० चतुर्थी. ११ चतुर्दशीला. १२ नवरात्र, चंडीपाठ इत्यादि. १३ सेवन करतो. १४ सर्व प्रकारें. १५ अखंड सौभाग्यवती, वेश्या. १६ स्वेच्छ. १७ वस्तींत, देशांत. १८ गोंधळ्याचें वाद्य. १९ आत्मानात्मनिरूपण. २० कलाकौशल्यांत. २१ पाककर्मांत. २२ अथर्वणवेद तर काय हातांत.

॥ ८३० ॥ कोंकीं नाहीं ठेलें । भारत कीर ह्मणितलें । आगम आपाविले । मूर्त होती ॥ ३१ ॥ नीतिजात सुझे । वैद्यकही बुझे । काव्यनाटकीं दुजें । चतुर नाहीं ॥ ३२ ॥ स्मृतींची चर्चा । दंश जाणे गारुडींचा । निघंटे प्रज्ञेचा । पाइकी करी ॥ ३३ ॥ पैं व्याकरणीं चोखडा । तर्की अतिगाढा । परि एक आत्मज्ञानीं फुंडा । जात्यंध जो ॥ ३४ ॥ तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं । सिद्धांत निर्माणधात्री । परि जळो तें मूळ नक्षत्री । न पाहें गा ॥ ३५ ॥ मोरा आंगीं अशेषें । पिसें असती डोळेसें । परि एकली दृष्टी नसे । तैसें तें गा ॥ ३६ ॥ जरि परमाणूएवढें । संजीवनीमूळ जोडे । तरि बहु काय गाडे । भरणें येरें ॥ ३७ ॥ आयुष्यावीण लक्षणें । सिसेंवीण अळंकरणें । वोहरेंवीण बांधावणें । तो विटंबु गा ॥ ३८ ॥ तैसें शास्त्रजात जाण । आघवेंचि अप्रमाण । पार्था अध्यात्मज्ञानेंविण । एकलेनी ॥ ३९ ॥ यालागीं अर्जुना पाहीं । अध्यात्मज्ञानाच्या ठायीं । जया नित्यबोध नाहीं । शास्त्रमूढा ॥ ८४० ॥ तया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बीं वीरूढलें । तयाचें व्युत्पन्नत्व गेलें । अज्ञानवेलीं ॥ ४१ ॥ तो जें जें बोले । तें अज्ञानचि फुललें । तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञान गा ॥ ४२ ॥ ['तत्त्वज्ञानार्थादर्शनं'] आणि अध्यात्मज्ञान कांहीं । जेणें मानिलेंचि नाहीं । तो ज्ञानार्थ न देखे काई । हें बोलावें असे ॥ ४३ ॥ ऐलीचि थडी न पवतां । पळे जो माघौता । तया पैलद्वीपींची वार्ता । काय होय ॥ ४४ ॥ कां दारवंठाचि जयाचें । शीर रोंविलें खांचे । तो केविं पैरिवरींचें । ठेविलें देखे ॥ ४५ ॥ तेविं अध्यात्मज्ञानी जया । अनोळख धनंजया । तया ज्ञानार्थ देखावया । विपो काई ॥ ४६ ॥ ह्मणोनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें तत्व न देखे । हें सांगावें आंखेलेखें । न लगे तुज ॥ ४७ ॥ जेव्हां सगर्भे वाढिलें । तेव्हांचि पोटिचें धालें । तैसें मागिले पदें बोलिलें । तेंचि होय ॥ ४८ ॥ वांचूनियां वेगळें । रूपकरणें हें न मिळे । जेविं अंवतिलें आंधळें । तें दुजेनसीं ये ॥ ४९ ॥ एवं इयें उपरतीं । ज्ञानचिन्हें मागुति । अमानित्वादि प्रभृती । वाखाणिलीं ॥ ८५० ॥ जे ज्ञानपदें अठरा । केलियां येरी मोहरां । अज्ञान या आकारा । सहजें येती ॥ ५१ ॥ मागां श्लोकाचेनि अर्धार्धें । ऐसें सांगीतलें श्रीमुकुंदें । ना उफराटीं इयें ज्ञानपदें । तेंचि अज्ञान ॥ ५२ ॥ ह्मणोनि इया वाहणी । केली म्यां उपलवणी । वांचूनि दुधा मेळऊनि पाणी । फार कीजे काई ॥ ५३ ॥ तैसें जी न बडबडीं । पदाची कोरें न सांडीं । मुळध्वनींचिये वाढी । निमित्त जाह्यालों ॥ ५४ ॥ तंव श्रोते ह्मणती राहें । कें परिहारा ठाव आहे । विहिसी कां वायें । कविपोषका ॥ ५५ ॥ तूतें श्रीमुरारी । ह्मणितलें प्रकट करीं । जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आह्मी ॥ ५६ ॥ तें देवाचें मनोगत । दावित आहासी तूं मूर्त । हेही ह्मणतां चित्त । दाटेल तुझें ॥ ५७ ॥ ह्मणोनि असो हें न बोलों । परि सावियां गा तोषलों । जे ज्ञानतरिये मेळविलों । श्रवणसुखाचे ॥५८॥ आतां इयावरी । जे तो श्रीहरी । बोलिला तें करीं । कथन वेगां ॥ ५९ ॥ इया संतवाक्यासरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें । जी अवधारा तरी ऐसें । बोलिलें देवें ॥ ८६० ॥ ह्मणती तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चय आघवा । आयिकिला तो जाणावा । अज्ञानभाग ॥ ६१ ॥ इया अज्ञानभागा । पाठी देऊनि पैं गा । ज्ञानविखीं चांगा । दृढा होइजे ॥ ६२ ॥ मग निर्वाळिलेनि ज्ञानें । ज्ञेय भेटेल मनें । तें जाणावया अर्जुनें । आस केली ॥ ६३ ॥ तंव सर्वज्ञांचा रावो । ह्मणे जाणोनि तयाचा भावो । परिसें ज्ञेयाचा अभिप्रावो । सांगों आतां ६४

**" तर परमात्मा ह्मणून जी एक वस्तु आहे, ती ज्या ज्ञानापासून दृष्टीस पडते, ६१६ त्या एका ज्ञानाशिवाय इतर जीं ज्ञानें तें अज्ञान, असा ज्याच्या मनानें निश्चय केलेला; ६१७ स्वर्गाला जाण्याचें सोडून देतो; संसाराविषयीं कान झाडतो; आणि अध्यात्मज्ञानामध्यें सद्भावाची बुडी देतो. ६१८ फुटलेल्या वाटेपैकीं आडमार्ग कोणते, त्याचा विचार करून राजमार्गानें निघावें, ६१९ त्याप्रमाणें ज्ञानरूप हातानें सर्व एका बाजूस सारून मन आणि बुद्धि आत्मज्ञानाकडे वळवितो, ६२० तो ह्मणतो कीं जें काय सारें आहे तें हें ज्ञान आहे. इतर गोष्टी माहित करून घेणें ती भ्रांति होय. ६२१ आकाशामध्यें जसें ध्रुवदैवत अढळ असतें, त्याप्रमाणें ज्याचा निश्चय अध्या-**

---

१ कामशास्त्रांत. २ आपलेसे केले. ३ समजतें. ४ मर्म. ५ कोश. ६ खरा. ७ पृथ्वीतुल्य आधारभूत. ८ मूळ नक्षत्रावर जन्मल्याप्रमाणें. ९ डोळ्यांच्या आकाराचीं. १० संजीवनीची मुळी. ११ मस्तकावांचून. १२ वधूवरांशिवाय. १३ वाजंत्रीं वाजविणें. १४ अज्ञानरूप वेलीवर. १५ परद्वीपाची. १६ उंबऱ्यांत. १७ आवारांतलें. १८ विषय, गम्य. १९ फार विस्तारानें. २० आमंत्रण दिलेलें. २१ ह्या उलट रीतीनें. २२ दुसऱ्या पक्षाकडे.

१ अशा प्रकारें. २ विस्तार. ३ कडा, कांठ. ४ निरास करण्याला. ५ भितोस. ६ गुप्तस्थळीं. ७ भरून येईल. ८ सहज, सर्वथा. ९ ज्ञाननौका. १० ऐकण्यास सुखकारक अशा. ११ लक्षणें. १२ जाणण्यास योग्य वस्तु.

तयाचें कां जेतुलें । मातापितरां ॥ ८८ ॥ तेतुलेनि पाडें पार्था । घरीं जया प्रेमआस्था । [‘अभिष्वंगः पुत्रादिष्वहमेवेति बुद्धिः’] आणि स्त्रीवांचूनि सर्वथा । जाणेना जो ॥८९॥ तैसा स्त्रीदेहीं जो जीवें । पडोनियां सर्वभावें । कोण मी काय करावें । कांहीं नेणे ॥ ७९० ॥ महापुरुषाचें चित्त । जालिया वस्तुगत । ठाके व्यवहारजात । जयापरी ॥ ९१ ॥ हानि लज्जा न देखे । परापवाद नाइके । जयाचीं इंद्रियें ऐकमुखें । स्त्रिया केलीं ॥ ९२ ॥ चित्त आराधी स्त्रियेचें । आणि तियेचेचि छंदें नाचे । माकड गारुडियाचें । जैसें होय ॥ ९३ ॥ आपणपेंही शिणवी । इष्टमित्र दुखवी । मग केवडाचि वाढवी । लोभी जैसा ॥ ९४ ॥ तैसा पानपुण्यें खांची । गोत्रकुटुंबा वंची । परि वाइणी स्त्रियेची । उणी हों नेदी ॥ ९५ ॥ पूजितीं दैवतें जोगवी । गुरुतें बोलें झकवी । माय बापा दावी । निदोरपण ॥ ९६ ॥ स्त्रियेच्या तरि विखीं । भोगसंपत्ती अनेकीं । आणि वस्तु निकी । जे जे देखे ॥९७॥ प्रेमाथिलेनि भक्तें । जैसेनि भजिजे कुळदैवतें । तैसा एकाग्रचित्तें । स्त्री जो उपासी ॥ ९८ ॥ साच आणि चोख । तें स्त्रियेसीचि अशेख । येरींविषयीं जोगावणूक । तेही नाहीं ॥ ९९ ॥ इयेतें हन कोणी देखेल । इयेसी वेखासें जाईल । तरि युगचि बुडेल । ऐसें जया ॥ ८०० ॥ नायटया भेण । न मोडिजे नागांची आण । तैसी पाळी उणखुण । स्त्रियेची जो ॥ १ ॥ किंबहुना धनंजया । स्त्रीचि सर्वस्व जया । आणि तियेचिया जालियां- । लागीं प्रेम ॥ २ ॥ आणीकही जें समस्त । तियेचें संपत्तिजात । तें जीवाहूनि आप्त । मानी जो कां ॥ ३ ॥ तो अज्ञानासी मूळ । अज्ञाना तेणें बळ । हें असो केवळ । तो तेंचि रूप ॥ ४ ॥ [‘इष्टानिष्टोपपत्तिषु असमचित्तत्वं’] आणि भ्रांतलिया सागरीं । मोकळिलिया तरी । लाटांच्या येरझारीं । आंदोळे जेवीं ॥ ५ ॥ तेविं प्रियवस्तु पावे । आणि सुखें जो उंचावे । तैसाचि अप्रियासवें । तळवट घे ॥ ६ ॥ ऐसेनि जयाचे चित्तीं । वैषम्याची वोळखती । वाहे तो महामती । अज्ञान गा ॥ ७ ॥ [‘अन्ययोगेन मयि व्यभिचारिणी भक्तिः सनिमित्ता’] आणि माझ्या ठायीं भक्ती । फळालागीं जया आर्ती । धनोद्देशें विरक्ती । नटणें जेवीं ॥ ८ ॥ [‘व्यभिचारिणी’] नातरि कांताच्या मानसीं । रिगोनि स्वैरिणी एक जैसी । राहाटे जारेसीं । जावया लागीं ॥ ९ ॥ तैसा मातें किरीटी । भजती गा पाउटी । करूनी जो दिठी । विषो सूये ॥ ८१० ॥ [‘व्यवहिता’] आणि भजिनलियासवें । तोचि विषय जरी न पावे । तरी सांडी ह्मणे आघवें । टवाळ हें ॥ ११ ॥ कुणबट कुळवाडी । तैसा आन आन देव मांडी । आदिलाची परवडी । करी तया ॥ १२ ॥ तया गुरुमार्गा टेंके । जयाचा सुगरवा देखे । तरि तयाचा मंत्र शिके । येर नेघे ॥ १३ ॥ प्राणिजातेंसी निष्ठुर । स्थावरीं बहु भर । तेवींची नाहीं एकसर । निर्वाह जया ॥ १४ ॥ माझी मूर्ती निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवो देवी । यात्रे जाय ॥ १५ ॥ नित्य आराधन माझें । काजीं कुळदेवता भजे । पर्वविशेषें कीजे । पूजा आना ॥ १६ ॥ माझें अधिष्ठान घरीं । आणि वोवसे आनाचे करी । पितृकार्यावसरीं । पितरांचा होय ॥ १७ ॥ एकादशीच्या दिवसीं । जेतुला पाड आह्मांसीं । तेतुलाचि नागांसी । पंचमीच्या दिवशीं ॥ १८ ॥ चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चउदसी ह्मणे माये । तुझाचि वो दुर्गे ॥ १९ ॥ नित्य नैमित्तिकें कर्में सांडी । मग बैसे नवचंडी । आदित्यवारीं वाढी । बहिरवां पात्रीं ॥ ८२० ॥ पाठीं सोमवार पावे । आणि बेलेंसीं लिंगा धांवे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो ॥ २१ ॥ ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी । अवघेन गांवद्वारीं । अहेव जैसी ॥ २२ ॥ ऐसेनि जो भक्त । देखसी सैरा धांवत । जाण अज्ञानाचा मूर्त । अवतार तो ॥ २३ ॥ [‘अविविक्तदेशसेवित्वं’] आणि एकांतें चोखटें । तपोवनें तीर्थें तटें । देखोनि जो गा विटे । तोहि तोचि ॥ २४ ॥ [‘जनसंसदि रतिः’] जया जनपदीं सुख । गजबजेचें कवतिक । वानूं आवडे लौकिक । तोही तोचि ॥ २५ ॥ [‘अध्यात्मज्ञाननित्यत्वाभावः’] आणि आत्मा गोचर होये । ऐसी जे विद्या आहे । ते आइकोनी डौर वाहे । विद्वांसू जो ॥ २६ ॥ उपनिषदांकडे न वचे । योगशास्त्र न रुचे । अध्यात्मज्ञानीं जयाचें । मनचि नाहीं ॥ २७ ॥ आत्मचर्चा एकी आथी । ऐसिये बुद्धीची भिंती । पाडूनि जयाची मती । वोडाळ जाहाली ॥ २८ ॥ कर्मकांड तरि जाणे । मुखोद्गत पुराणें । ज्योतिषीं तो ह्मणे । तैसेंचि होय ॥ २९ ॥ शिल्पीं अति निपुण । सूपकर्मींही प्रवीण । विधि आथर्वण । हातीं आथी

१ सिद्धाचें. २ ब्रह्मस्वरूप. ३ निंदा. ४ एकाकार. ५ धनच. ६ कमी करतो. ७ वायदे. ८ टोलवाटोलवी. ९ दरिद्रता. १० उत्तम. ११ प्रेमळ. १२ कसा तरी निर्वाह, भाजी भाकरी. १३ विरुद्ध. १४ नायट्याच्या. १५ मनोगत. १६ मुलांवर. १७ खवळलेल्या. १८ लघुत्व. १९ चिंता, खेद. २० व्यभिचारी.

१ रीतीनें. २ घालून. ३ प्रकार. ४ सुगरीणपणा. ५ एकनिष्ठपणा. ६ कार्यामध्यें. ७ दुसऱ्याची. ८ सत्ता, स्थापना. ९ नवस. १० चतुर्थी. ११ चतुर्दशीला. १२ नवरात्र, चंडीपाठ इत्यादि. १३ सेवन करतो. १४ सर्व प्रकारें. १५ अखंड सौभाग्यवती, वेश्या. १६ स्वेच्छ. १७ वस्तींत, देशांत. १८ गोंधळ्याचें वाद्य. १९ आत्मानात्मनिरूपण. २० कलाकौशल्यांत. २१ पाककर्मांत. २२ अथर्वणवेद तर काय हातांत.

॥ ८३० ॥ कोंकीं नाहीं ठेलें । भारत कीर ह्मणितलें । आगम आपाविले । मूर्त होती ॥ ३१ ॥ नीतिजात सुझे । वैद्यकही बुझे । काव्यनाटकीं दुजें । चतुर नाहीं ॥ ३२ ॥ स्मृतींची चर्चा । दंश जाणे गारुडींचा । निघंटें प्रज्ञेचा । पाइकी करी ॥ ३३ ॥ पैं व्याकरणीं चोखडा । तर्की अतिगाढा । परि एक आत्मज्ञानीं फुंडा । जात्यंध जो ॥ ३४ ॥ तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं । सिद्धांत निर्माणधात्री । परि जळो तें मूळ नक्षत्रीं । न पाहें गा ॥ ३५ ॥ मोरा आंगीं अशेषें । पिसें असती डोळसें । परि एकली दृष्टी नसे । तैसें तें गा ॥ ३६ ॥ जरि परमाणूएवढें । संजीवनीमूळ जोडे । तरि बहु काय गाडे । भरणें येरें ॥ ३७ ॥ आयुष्यावीण लक्षणें । सिसेंवीणें अळंकरणें । वोहरेंवीणें बोधावणें । तो विटंबु गा ॥ ३८ ॥ तैसें शास्त्रजात जाण । आघवेंचि अप्रमाण । पार्था अध्यात्मज्ञानेंविण । एकलेनी ॥ ३९ ॥ यालागीं अर्जुना पाहीं । अध्यात्मज्ञानाच्या ठायीं । जया नित्यबोध नाहीं । शास्त्रमूढा ॥ ८४० ॥ तया शरीर जें जालें । तें अज्ञानाचें बीं वीरुढलें । तयाचें व्युत्पन्नत्व गेलें । अज्ञानवेलीं ॥ ४१ ॥ तो जें जें बोले । तें अज्ञानचि फुललें । तयाचें पुण्य जें फळलें । तें अज्ञान गा ॥ ४२ ॥ ['तत्त्वज्ञानार्थदर्शनं'] आणि अध्यात्मज्ञान कांहीं । जेणें मानिलेंचि नाहीं । तो ज्ञानार्थ न देखे काई । हें बोलावें असे ॥ ४३ ॥ ऐलीचि थडी न पवतां । पळे जो माघौता । तया पैलद्वीपींची वार्ता । काय होय ॥ ४४ ॥ कां दारवंठाचि जयाचें । शीर रोंविलें खांचे । तो केवि पैरिवरींचें । ठेविलें देखे ॥ ४५ ॥ तेवि अध्यात्मज्ञानी जया । अनोळख धनंजया । तया ज्ञानार्थ देखावया । विषो काई ॥ ४६ ॥ ह्मणोनि आतां विशेषें । तो ज्ञानाचें तत्त्व न देखे । हें सांगावें आंखेलेखें । न लगे तुज ॥ ४७ ॥ जेव्हां सगर्भे वाढिलें । तेव्हांचि पोटिचें धालें । तैसें मागिले पदें बोलिलें । तेंचि होय ॥ ४८ ॥ वांचूनियां वेगळें । रूपकरणें हें न मिळे । जेवि अंवतिलें आंधळें । तें दुजेनसीं ये ॥ ४९ ॥ एवं इयें उपरतीं । ज्ञानचिन्हें मागुति । अमानित्वादि प्रभृती । वाखाणिलीं ॥ ८५० ॥ जे ज्ञानपदें अठरा । केलियां येरी मोहरां। अज्ञान या आकारा । सहजें येती ॥ ५१ ॥ मागां श्लोकाचेनि अर्धार्धें । ऐसें सांगीतलें श्रीमुकुंदें । ना उफराटीं इयें ज्ञानपदें । तेंचि अज्ञान ॥ ५२ ॥ ह्मणोनि इया वाहणी । केली म्यां उपलवणी । वांचूनि दुधा मेळऊनि पाणी । फार कीजे काई ॥ ५३ ॥ तैसें जी न बडबडीं । पदाची कोरें न सांडीं । मुळध्वनीचिये वाढी । निमित्त जाहालों ॥ ५४ ॥ तंव श्रोते ह्मणती राहें । कें परिहारा ठाव आहे । बिहिसी कां वायें । कविपोषका ॥ ५५ ॥ तूतें श्रीमुरारी । ह्मणितलें प्रकट करीं । जे अभिप्राय गव्हरीं । झांकिले आह्मी ॥ ५६ ॥ तें देवाचें मनोगत । दावित आहासी तूं मूर्त । हेंही ह्मणतां चित्त । दाटेल तुझें ॥ ५७ ॥ ह्मणोनि असो हें न बोलों । परि सावियां गा तोषलों । जे ज्ञानतरियें मेळविलों । श्रवणसुखाचे ॥ ५८ ॥ आतां इयावरी । जे तो श्रीहरी । बोलिला तें करीं । कथन वेगां ॥ ५९ ॥ इया संतवाक्यासरिसें । ह्मणितलें निवृत्तिदासें । जी अवधारा तरी ऐसें । बोलिलें देवें ॥ ८६० ॥ ह्मणती तुवां पांडवा । हा चिन्हसमुच्चय आघवा । आयिकिला तो जाणावा । अज्ञानभाग ॥ ६१ ॥ इया अज्ञानभागा । पाठी देऊनि पैं गा । ज्ञानविखीं चांगा । दृढा होइजे ॥ ६२ ॥ मग निर्वाळिलेनि ज्ञानें । ज्ञेयें भेटेल मनें । तें जाणावया अर्जुनें । आस केली ॥ ६३ ॥ तंव सर्वज्ञांचा रावो । ह्मणे जाणोनि तयाचा भावो । परिसें ज्ञेयाचा अभिप्रावो । सांगों आतां ६४

**" तर परमात्मा ह्मणून जी एक वस्तु आहे, ती ज्या ज्ञानापासून दृष्टीस पडते, ६१६ त्या एका ज्ञानाशिवाय इतर जीं ज्ञानें तें अज्ञान, असा ज्याच्या मनानें निश्चय केलेला; ६१७ स्वर्गाला जाण्याचें सोडून देतो; संसाराविषयीं कान झाडतो; आणि अध्यात्मज्ञानामध्यें सद्भावाची बुडी देतो. ६१८ फुटलेल्या वाटेपैकीं आडमार्ग कोणते, त्याचा विचार करून राजमार्गानें निघावें, ६१९ त्याप्रमाणें ज्ञानरूप हातानें सर्व एका बाजूस सारून मन आणि बुद्धि आत्मज्ञानाकडे वळवितो, ६२० तो ह्मणतो कीं जें काय सारें आहे तें हें ज्ञान आहे. इतर गोष्टी माहित करून घेणें ती भ्रांति होय. ६२१ आकाशामध्यें जसें ध्रुवदैवत अढळ असतें, त्याप्रमाणें ज्याचा निश्चय अध्या-**

१ कामशास्त्रांत. २ आपलेसे केले. ३ समजतें. ४ मर्म. ५ कोश. ६ खरा. ७ पृथ्वीतुल्य आधारभूत. ८ मूळ नक्षत्रावर जन्मल्याप्रमाणें. ९ डोळ्यांच्या आकाराचीं. १० संजीवनीची मुळी. ११ मस्तकावांचून. १२ वधूवरांशिवाय. १३ वाजंत्रीं वाजविणें. १४ अज्ञानरूप वेलीवर. १५ परद्वीपाची. १६ उंबऱ्यांत. १७ आवारांतलें. १८ विषय, गम्य. १९ फार विस्तारानें. २० आमंत्रण दिलेलें. २१ ह्या उलट रीतीनें. २२ दुसऱ्या पक्षाकडे.

१ अशा प्रकारें. २ विस्तार. ३ कडा, कांठ. ४ निरास करण्याला. ५ भितोस. ६ गुप्तस्थळीं. ७ भरून येईल. ८ सहज, सर्वथा. ९ ज्ञानरूपी नौकेला. १० ऐकण्यास सुखकारक अशा. ११ लक्षणें. १२ जाणण्यास योग्य वस्तु.

त्मज्ञानाच्या दारांत धरणें धरून बसतो. ६२२ त्याच्याच ठाईं ज्ञान असतें. ह्या भाषणांत फरक नाहीं. आणखी, ज्ञानामध्यें मन रमलें कीं तो मीच आहे. ६२३ तरी मन बसल्याच्या योगानें जें कार्य होतें, तें बसलें असें नुसतें बोलून मात्र होत नाहीं. तथापि त्याची (मन रमण्याची) आणि प्रत्यक्ष ज्ञानाची योग्यता सारखीच आहे. ६२४ आणि ज्या एका फलाच्या योगानें निर्मल तत्त्वज्ञान उत्पन्न होतें, आणि ज्याच्या योगानें समदृष्टि प्राप्त होते, तें ज्ञेयाचा ह्मणजे परब्रह्माचाही स्वीकार करतें. ६२५ बाकी विंबलेल्या ज्ञानानेंही जर मनाला ज्ञेय दिसत नाहीं, तर ज्ञानलाभ होऊनही निष्फळ होय. ६२६ आंधळ्याच्या हातांत दिवा देऊन काय करावयाचें आहे? त्याप्रमाणें ज्ञानाच्या ठिकाणीं निश्चय असूनही सारा व्यर्थ होय. ६२७ ज्ञानाच्या प्रकाशानें परमात्मतत्त्वाच्या ठिकाणीं दृष्टि पसरत नाहीं, तर ती बुद्धीच आंधळी झाली असें समजावें. ६२८ ह्मणून ज्ञान जितक्या जितक्या गोष्टी दाखवील, तितक्या तितक्या साऱ्या गोष्टी पाहील अशी बुद्धीच निर्मल असली पाहिजे. ६२९ ह्याकरितां निर्दोष ज्ञानानें दाखविलेलें ज्ञेय पाहील, अशा ज्ञानानें जो संपन्न असतो, ६३० ज्ञानाचा जेवढा विस्तार, तेवढी ज्याची बुद्धि, तो ज्ञानाचा साक्षात् अवतार हें सांगावयास नको. ६३१ तसेंच ज्ञानाच्या प्रभेबरोबर ज्याची बुद्धि परब्रह्माच्या ठिकाणीं जाऊन पोंचते, तो हातावर हात देऊन परब्रह्माला पोंचतो. ६३२ **अर्जुना!** तोच ज्ञान असें ह्मटलें तर आश्चर्य तें काय? सूर्याला सूर्य असें ह्मणावें का लागतें?" ६३३ तेव्हां श्रोते ह्मणाले "तें असो. त्याचें अधिक वर्णन करावयास नको. ग्रंथ सांगण्यांत अडकथा कशाला? ६३४ ज्ञानाच्या विषयाचें प्रतिपादन पुष्कळ झालें. त्या तुझ्या वक्तृत्वाची आह्मांला मोठी मेजवानीच झाली. ६३५ रसाची गर्दीचगर्दी व्हावी, ही कवीची चाल जर स्वीकारशील, तर शत्रूस आमंत्रण केल्यासारखें होईल. ६३६ पानावर बसावयाच्या वेळेला जी स्वयंपाक घेऊन पळते, तिचा दुसरा आदरोपचार काय करावयाचा? ६३७ बाकी सर्व गुणांनीं चांगली आहे, पण कासेंत मात्र हात घालूं देत नाहीं, अशी लाथरी गाय कोण पोशील? ६३८ त्याप्रमाणें ज्ञानामध्यें बुद्धि न पसरतां, कित्येक लोक भलभलतेंच प्रतिपादन करतात. पण तें असो. तूं फार चांगलें केलेंस. ६३९ ज्या ज्ञानांशाकरितां योगादि सायास करितात, तें आधींच समाधानकारक. आणि तुझ्या सारख्याचें त्यावर प्रतिपादन. ६४० अमृताची सारखी–उघडीप न घेतां–झड लागली, तर त्या सुखामध्यें कोट्यावधि दिवस गेले तरी ते समजुतींत येतील काय? ६४१ पूर्ण चंद्र उगवलेली रात्र एक युगाची झाली, तर तिला चकोर पहाणार नाहींत काय? ६४२ तसें ज्ञानाविषयींचें भाषण, आणि तें इतकें रसाळ. तर आतां ऐकतांना पुरे कोण ह्मणणार? ६४३ श्रीमान् गृहस्थ पाहुणा आला, आणि वाढणारीणही सुगरण असली ह्मणजे स्वयंपाक सरूं नये असें होऊन जातें. ६४४ तसा हा प्रसंग आहे. कारण, ज्ञानावर आमची आवड, आणि तुझीही त्यावर प्रीति. ६४५ ह्मणून ह्या प्रतिपादनाला चौपट रंग चढला आहे. तूंही ज्ञानी व समंजस असल्यामुळें तुला सुद्धां ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. ६४६ तर आतां ह्यापुढें बुद्धीची वृद्धि कर. आणि प्रतिपादनामध्यें शब्दार्थच तेवढा खरा करून दाखीव." ६४७ ह्या संतांच्या भाषणावर निवृत्तिदास **ज्ञानदेव** ह्मणाले "महाराज! माझा हेतुही असाच आहे. ६४८ आणखी प्रभो! आपणही आज्ञा केली. तर आतां मीही शुष्क पाल्हाळ लावित नाहीं. ६४९ अशा प्रकारें हीं अठरा लक्षणें **श्रीकृष्णांनीं अर्जुनाला** निवेदन केलीं. लक्ष्यांत असूं द्या." ६५० मग ह्मणतात "ज्ञान ह्मणून जें ह्मणतात, तें अशा प्रकारचें असतें असें माझें मत आहे,

आणि ज्ञानी आहेत तेही असेंच ह्मणतात. ६५१ तळहातावर वाटोळा आंवळा डुलत राहवा, त्याप्रमाणें हें ज्ञान तुझ्या डोळ्यांना दाखवून दिलें. ६५२ हे बुद्धिमंता **अर्जुना!** आतां अज्ञान असें ज्याला ह्मणतात, तेंही लक्षणांनीं तुला स्पष्ट करून सांगूं. ६५३ बाकी **अर्जुना!** ज्ञान स्पष्ट झालें, ह्मणजे अज्ञान काय तें कळतेंच. जें ज्ञान नव्हे, तें अर्थात् अज्ञान हें उघडच आहे. ६५४ अरे असें पहा! दिवस सारा संपला, कीं रात्रीची पाळी यावयाची. त्यावांचून तिसरें जसें कांहीं नाहीं, ६५५ त्याप्रमाणें जेथें ज्ञान नाहीं, तेथें अज्ञानच असतें. तरी त्याचीं कांहीं कांहीं चिन्हें सांगूं. ६५६ प्रतिष्ठेकरितांच जो जीव धरतो; जो मानाची इच्छा करतो; सत्काराच्या योगेंकरून ज्याला संतोष होतो, ६५७ गर्वानें पर्वताच्या शिखरावर चढल्याप्रमाणें जो मोठेपणावरून खालीं उतरत नाहीं, त्याच्या ठिकाणीं परिपूर्ण अज्ञान असतें. ६५८ आणखी देवळांत मुद्दाम जसा खराटा उभा करून ठेवावा त्याप्रमाणें वाचारूप पिंपळावर जो स्वधर्माची मोळी बांधून ठेवतो, ६५९ विद्येचा पसारा मांडतो; सुकृताचा डांगोरा पिटवितो; आणि करावयाचें तें सारें प्रतिष्ठेकरितां करतो. ६६० आपले आंगास वरून उपचार करतो; लोकांना स्तुति करून फसवितो; तो ह्या जगांत अज्ञानाची खाण आहे हें लक्ष्यांत ठेव. ६६१ आणखी अरण्यांत अग्नि पसरला ह्मणजे स्थावरजंगम जसें सारें जळून जातें, त्याप्रमाणें ज्याच्या आचरणानें साऱ्या जगाला दुःख होतें. ६६२ हांसत हांसत बडबड केली तरी ती सुरीपेक्षांही तीक्ष्ण होऊन आंगास झोंबते. आणि त्या भाषणांत मतलब तर असा असतो कीं, विषाहून प्राणहारक. ६६३ त्याला फारच अज्ञान असतें. तो अज्ञानाचा केवळ ठेवा होय. त्याचें जिणें हिंसेचेंच घर. ६६४ भाता फुंकला ह्मणजे फुगतो, आणि दाबला ह्मणजे रिकामा होतो, त्याप्रमाणें लाभानें आणि हानीनें जो चढतो आणि खिन्न होतो. ६६५ वाऱ्याच्या वावटळींत धूळ सांपडली ह्मणजे ती आकाशापर्यंत चढते, त्याप्रमाणें स्तुति ऐकली ह्मणजे हर्षास चढतो, ६६६ पण थोडीशी निंदा ऐकली कीं कपाळ धरून बसलाच. चिखल जसा एका थेंबानें पातळ होतो, आणि वाऱ्याची झुळूक लागतांच सुकून जातो, ६६७ त्याप्रमाणें मानापमानानें ज्याची स्थिति होते. ज्याला कोणाचाही उत्कर्ष सहन होत नाहीं; त्याच्या ठिकाणीं परिपूर्ण अज्ञान असतें. ६६८ आणि ज्याच्या मनामध्यें अढी; वरवर वाचा आणि दृष्टि मात्र मोकळी; भलत्यालाच आंगानें, जिवानें मिळावयाचें, आणि पाठ द्यावयाची; ६६९ पारध्यानें चारा घातल्याप्रमाणें निर्मल पालन करावयाचें, आणि भल्याभल्याच्या अंतःकरणाला वीट आणावयाचा; ६७० गारेला शेवाळीनें गुंडाळावें, किंवा पिकलेली निंबोणी असावी, तशी ज्याची बाह्यक्रिया दिखाऊ. ६७१ त्याच्या ठिकाणीं अज्ञान ठेवलेलें असतें पहा! ह्या भाषणांत भेद नाहीं. सत्य आहे हें ध्यानांत ठेव. ६७२ आणखी गुरूच्या कुलाला जो लाजतो; गुरुभक्तीला जो त्रासतो; विद्या घेऊन गुरूवरच जो उलटून पडतो; ६७३ त्याचें नांव घेणें शूद्राचें अन्न तोंडांत घातल्याप्रमाणें आहे. पण हीं लक्षणें सांगतांना तेंही घडलें. ६७४ ह्याकरितां आतां गुरुभक्तांचें नांव घेऊन वाणीला प्रायश्चित्त देऊं या. सूर्याचें जसें दर्शन घेतात, त्याप्रमाणें गुरुभक्तांच्या नामाचें दर्शन घेऊं या. ६७५ ह्मणजे तेवढ्यानें त्या मात्रागमन्याच्या नांवानें वाचेस लागलेला कलंक धुऊन जाईल. ६७६ अशा प्रकारें त्या नामापासून उत्पन्न होणारें भय नाहींसें होईल." मग ह्मणतात "आणखी लक्षणें ऐका. ६७७ तर आंगानें आणि कर्मानें जो ढिला; जो मनांत विकल्पानें भरलेला; रानांतील जशी अमंगल विहीर असावी, ६७८ तिच्या तोंडीं

कांत्या आणि आंत हाडें असावींत, त्याप्रमाणें अंतर्बाह्य जो अमंगल, ६७९ पोटाकरितां कुत्रें जसें उघडें किंवा झांकलेलें पहात नाहीं, तसें द्रव्यासाठीं जो आपलें आणि दुसऱ्याचें पहात नाहीं. ६८० कुत्र्याला संग करण्याला जसा पात्रापात्रविचार नाहीं, त्याप्रमाणें स्त्रीविषयीं जो कांहीं विचार करीत नाहीं. ६८१ कर्माची वेळ चुकली, किंवा नित्यनैमित्तिक राहिलें, तरी—ज्याच्या मनाला खंत ह्मणून वाटतच नाहीं. ६८२ पापाविषयीं जो निर्लज्ज; पुण्याविषयीं जो भ्रष्ट; ज्याच्या मनामध्यें विकल्पाचा वेग, ६८३ तो नखशिखांत अज्ञानाचा पुतळा हें लक्ष्यांत ठेव. ज्यानें द्रव्यासक्ति डोळ्यांवर बांधलेली असते, ६८४ मुंगीच्या धक्क्यानेंही जसें गवताचें बीं हालतें, तसा अल्पस्वल्प स्वार्थासाठींही ज्याचें धैर्य डळमळतें. ६८५ पाय टाकण्याबरोबर जसें डबक्याचें पाणी ढवळतें, त्याप्रमाणें भयाचें नांव ऐकिलें कीं, ज्याची गडबड उडून जाते, ६८६ पुरांत पडलेल्या दुधभोपळ्याप्रमाणें, ज्याचें मन मनोरथाच्या धारेवरून वहात असतें. ६८७ दुःखवार्ता ऐकली कीं, वाऱ्याच्या संबंधानें धूळ जशी गगनांत जाते, त्याप्रमाणें ज्याला होऊन जातें. ६८८ वादळाप्रमाणें जो अधांतरींच तरंगत असतो. आश्रय ह्मणून कधीं करावयाचाच नाहीं. क्षेत्रामध्यें, तीर्थामध्यें, किंवा गांवामध्यें स्थिर होण्याचें ज्याला माहितच नाहीं. ६८९ किंवा माजलेला सरडा जसा बुडख्यापासून शेंड्याला आणि पुन्हा शेंड्यापासून बुडख्याला खेपा करीत राहतो, त्याप्रमाणें वाऱ्यासारख्या उगाच खेपा करीत असतो. ६९० रोवून ठेविल्याशिवाय रांजण जसा राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें जेथें पडेल तेथेंच राहावयाचा. परवीं फिरतच असावयाचा. ६९१ त्याच्या ठिकाणीं अनुचित असें विपुल अज्ञान असतें. आणि चंचलपणांत जो माकडाचाच भाऊ. ६९२ आणखी अर्जुना! ज्याच्या अंतःकरणाला निग्रहाचा धरबंद ह्मणून कसला तो नाहींच. ६९३ ओढ्याचा लोंढा आला ह्मणजे तो वाळूच्या बांधाला ऐकत नाहीं, त्याप्रमाणें निषेधाच्या तोंडाला ह्मणून भीत नाहीं. ६९४ व्रतांना झुगारून देतो; स्वधर्माला पायानें लाथाडतो; आणि ज्याची क्रिया नियमाची आशा तोडून टाकते. ६९५ पापाचा कंटाळा नाहीं; पुण्याचा जिव्हाळा समजत नाहीं; लाजेचें तर कुंपणच उपटतो; ६९६ कुलधर्माला जो विन्मुख; वेदाज्ञेला जो उलट; सारासारकृत्य ज्याला समजतच नाहीं. ६९७ वसू जसा मोकळा; वारा जसा मोकाट; पाण्याचा जसा तुंबाडा फुटतो; ६९८ मदोन्मत्त हत्ती जसा मस्तीला येतो; किंवा डोंगराला जसा वणवा लागतो; त्याप्रमाणें ज्याचें चित्त विषयाकडे धांवत असतें. ६९९ उकिरड्यावर काय पडत नाहीं? मोकळी वस्तु कोणाला सांपडत नाहीं? गांवची वेस कोण ओलांडित नाहीं? ७०० अन्नछत्रांतील स्वयंपाकाचा, वेश्येच्या सौंदर्याचा, पावसासाठीं बांधलेल्या छपराचा कोण उपभोग करणार नाहीं? ७०१ तसें ज्याचें अंतःकरण असतें, त्याच्या ठिकाणीं साऱ्या अज्ञानाची समृद्धि आहे ह्मणून समज. ७०२ आणखी जिवंत असला किंवा मेला, तरी जो विषयांची गोडी सोडीत नाहीं. स्वर्गांत खावयास काय पाहिजे, त्याची तरतूदही येथूनच करतो. ७०३ जो निरंतर भोगाविषयींचीच खटपट करित असतो. ज्याला कामनिक क्रीडेचेंच व्यसन असतें; विरक्ताचें तोंड पाहिलें कीं जो सचैल स्नान करतो. ७०४ विषय दमून जातात; परंतु हा दमत नाहीं, आणि सावध होत नाहीं. कोड्या मनुष्य जसा कुजलेल्या हातांनीं खातो, ७०५ गाढवी आंगाला आंग लागूं देत नाहीं, लाथा मारून नाकाडें फोडते, तरी गाढव जसा माघारा फिरत नाहीं; ७०६ त्याप्रमाणें जो विषयासाठीं जळत्या आगींत उडी घालतो, आणि व्यसनाच्या अलंकाराचीं भूषणें मिरवितो. ७०७ उरीं फुटेप-

यंत मृग आपली आशा वाढवीतच असतो. परंतु ही मृगजळाची फसवणूक आहे असें ह्मणतच नाहीं. ७०८ त्याप्रमाणें जन्मापासून मरणकालपर्यंत विषयांमध्यें अनेक प्रकारें त्रास झाला तरी त्रास असें [illegible]नित नाहीं. उलट अधिकच प्रेमा धरतो. ७०९ प्रथम बाल्यदशेमध्यें आईच्या कडेवर बसण्याचें वेड; तें सरलें ह्मणजे मग स्त्रीच्या मांसाला भुलून पडतो. ७१० स्त्रियेचा उपभोग घेतां घेतां वार्धक्य येऊं लागलें, ह्मणजे ते [illegible]ना मुलांवर आणतो. ७११ आंधळा [illegible]णें जो मुलाला कुरवाळतो; पण जी[illegible]त विषयांना त्रासत नाहीं. ७१२ त्या[illegible] ठिकाणीं अज्ञानाला अंतपार नाहीं हें लक्ष्यांत ठेव. आतां आणखी कांहीं लक्षणें सांगूं. ७१३ तर देह हाच आत्मा अशा मनोधर्माला चढून जो कर्माला प्रारंभ करतो. ७१४ आणखी, उणें किंवा अधिक जें जें कांहीं आचरण करतो, त्याच्या आविर्भावानें कुंथतो. ७१५ डोक्यावर धरलेल्या महत्त्वानें आंगांत देवचार येणारा माणूस जसा ताठ होतो, त्याप्रमाणें विद्येच्या आणि तारुण्याच्या मदानें उताणाच चालतो. ७१६ तो ह्मणतो कीं मीच एक पैसेवाला; संपत्ति कायती माझ्या घरांत; मी आचरण करतों, ती हातोटी कोणामध्यें आहे? ७१७ सर्वज्ञ काय तो मी; लौकिकवान् काय तो मी; माझी बरोबरी करणारा दुसरा कोण आहे? असा सारा गर्व धरून बसतो. ७१८ व्याधी लागलेल्या माणसाला कोणताही भोग जसा दाखवितां येत नाहीं, तसें दुसऱ्याचें बरें ह्मणून ज्याला सहनच होत नाहीं. ७१९ गुण (वात) तितका खाऊन टाकतो; स्नेह (तेल) तितका जाळून उडवितो; जेथें ठेवावा तेथें काजळाप्रमाणें करून टाकणारा. ७२० पाण्यानें शिपलें तर तिडतिड करतो; वारा घालावा तर विझून जातो. स्पर्श झाला तर काडी सुद्धां शिल्लक राहत नाहीं. ७२१ थोडासा प्रकाश करतो; तितकाच उकाडा करतो; अशा दिव्यासारखा जो ज्ञानी; ७२२ वस्तूचें–दुधाचें–नांव पाहूं गेलें तर अमृत; परंतु त्यानें जसा ज्वर भडकतो; किंवा सर्पाला दूध पाजलें असतां, तें जसें विषच होऊन परत येतें; ७२३ त्याप्रमाणें सद्गुणांनीं मत्सरी होतो; विद्येनें गर्विष्ठ होतो; आणि तपोज्ञानानें अत्यंत ताठा भरतो. ७२४ अत्यंज राज्यावर बसावा, किंवा अजगरानें तुळवंड गिळावें, त्याप्रमाणें जो गर्वानें फुगलेला पहाशील; ७२५ लाटण्याप्रमाणें जो लवत नाहीं; दगडाप्रमाणें जो मऊ होत नाहीं; फुरशाप्रमाणें उपचार करणारासही जो हात टेंकावयास लावतो, ७२६ त्याच्या पाशीं वाढतें अज्ञान आहे ह्मणून समजावें. हें निश्चयानें तुला सांगून ठेवतों. ७२७ आणखी अर्जुना! घरप्रपंचाच्या साधनांना मागील व पुढील जन्म ह्मणून पहातच नाहीं. ७२८ कृतघ्नावर उपकार केला; किंवा चोराला भांडवल दिलें; किंवा कोडग्याची स्तुति केली, तर तो जसा विसरून जातो; ७२९ पुढें पुढें करूं लागलेलें कुत्रें हांकविलें, तर तें कान व शेंपटी ओली आहे तोंच पुन्हां तोंड घालावयास येतें; ७३० बेडूक सापाच्या तोंडांत सरसकट जात असतो, तो माशांच्या थव्याचें स्मरण करीत नाहीं का? ७३१ त्याप्रमाणें नऊ द्वारें हीं पाझरत असल्यामुळें सारें आंग कुजून जातें, तरी ज्याच्या चित्तामध्यें तें सलत नाहीं, ७३२ मातेच्या गर्भगुहेंत जेव्हां विष्ठेच्या उकाड्यांत जठराग्नीनें उकडतो, ७३३ ती गर्भांतील व्यथा, किंवा उपजतांच होणारे कष्ट जो कधींच आठवीत नाहीं; ७३४ मलमूत्राच्या चिखलानें लिडबिडलेलें जें मूल मांडीवर लोळत असतें, तें पाहून जो थुकत नाहीं; त्याचा कंटाळा करित नाहीं; ७३५ कालचें आयुष्य कालच जाऊन आज नवें आलें, असें ज्याला कांहींच वाटत नाहीं; ७३६ आणि तसेंच आयुष्य भराभर जात असलेलें पाहून जो मरणाची चिंता करीत नाहीं, ७३७ जन्मावरच विश्वास असल्यामुळें, येथें एक मृत्यु आहे, हें ज्याचें मन मान्यच करीत नाहीं;

७३८ पाऊलभर उदकांत असलेला मासा, हें उदक आटावयाचेंच नाहीं, अशा आशेनें जसा खोल डोहामध्यें कधीं जात नाहीं; ७३९ किंवा गाण्याच्या वेडांत मृग जसा व्याधाकडे दृष्टि देत नाहीं; मासा गळ न पाहतां घांस गिळून टाकतो; ७४० किंवा दीपाची झगमग आपणास जाळील, हें पतंगाला जसें कळत नाहीं; ७४१ आळशी झोंपेंत मग्न असला ह्मणजे घर जळत असलेलेंही पहात नाहीं; विष घातलेलें अन्न, माहित नसलेला मनुष्य जसा जेवतो; ७४२ त्याप्रमाणें जन्माच्या मिषानें हा मृत्युच आलेला आहे, हें रजोगुणसुखामुळें ज्याला कळत नाहीं; ७४३ अहोरात्रींची जोडी; शरीराची जोपासना; विषयसुखाची थोरवी; हींच काय तीं खरीं असें मानतो; ७४४ परंतु बिचाऱ्याला असें कळत नाहीं कीं, वेश्येचें सर्वस्व अर्पण करणें, तेंच नागवण करण्याचें स्वरूप असतें. ७४५ बरोबर असणाऱ्या चोराची मैत्री, तेंच जीव घेणें; भिंतीवरच्या चित्राला स्नान घालणें तोच त्याचा नाश. ७४६ पंडूरोगानें आंग सुटलें, तर त्या नांवानेंच तें अस्तास गेलें ह्मणून समजावें. तसें आहार आणि निद्रा ह्यांच्या भुलीमध्यें दुसरें कांहीं जाणत नाहीं. ७४७ सुळापुढें धांवत धांवत जाऊं लागलें, तर प्रत्येक पावलाला मृत्यु मात्र जवळ जवळ येतो. ७४८ त्याप्रमाणें देहाची जों जों वाढ होते; दिवसांचा जो जो विस्तार होतो; ह्या भोगांची जों जों अनुकूलता होते; ७४९ तों तों मरण हें आयुष्याच्या अधिक अधिक जवळ येतें. मीठ जसें उदकानें विरतें, ७५० त्याप्रमाणें आयुष्य झिरपत असल्यामुळें तें काळाच्या जवळ जवळ जातें. ही प्रत्यक्ष गोष्टही ज्याला कळत नाहीं, ७५१ किंवा **अर्जुना!** ह्या आंगचाच नित्य नवा असणारा मृत्यु, विषयांच्या भुलीनें जो पहात नाहीं, ७५२ तो अज्ञान देशाचा राजा; **अर्जुना!** ह्या भाषणापुढें इतरांचा टिकाव लागावयाचा नाहीं. ७५३ तसेंच जन्माच्या संतोषानें ज्याप्रमाणें मृत्यूला पहात नाहीं, त्याचप्रमाणें तारुण्याच्या भरांत जरेचीही गणना करीत नाहीं. ७५४ कड्यावरून गाडा पडावा, किंवा उंचावरून दगड कोसळावा, त्याप्रमाणें पुढें असलेलें वार्धक्य जो पहात नाहीं; ७५५ किंवा आड रानांतल्या ओढ्याला पाणी चढलें; किंवा रेड्याची झुंज लागली; ह्मणजे त्यांना जसा जोर चढतो, त्याप्रमाणें ज्याला वेड चढतें. ७५६ पुष्टी विरघळूं लागते; कांति निस्तेज पडूं लागते; मस्तकाला आणि मानेला कंप सुटतो; ७५७ दाढी पांढरी होऊं लागते; मान हालून नको नको ह्मणावयाला लागते; तरी जो मायेचा पसारा वाढवीतच असतो. ७५८ पुढचा पदार्थ उरावर येऊन आदळेपर्यंत जसा आंधळ्याला माहित पडत नाहीं, किंवा डोळ्यावरच्या गुंगीनें आळशास जसा संतोष होतो, ७५९ त्याप्रमाणें चालत्या तारुण्याचा उपभोग घेतांना उद्यांचें वृद्धपण जो जाणत नाहीं, तोच खरोखर अज्ञान होय. ७६० कोणी अशक्त, कुबड वांकलेला पाहिला ह्मणजे गर्वानें जो वेडावून दाखवितो, परंतु उद्यां आपलेंही असेंच होईल हें मनांत आणीत नाहीं, ७६१ मरणाचें चिन्ह जी जरा, ती स्वतःच्या आंगीं आली तरी, ज्याच्या तारुण्याची भूल जात नाहीं, ७६२ तो अज्ञानाचें घर. हे शब्द अगदीं खरे आहेत. त्याचीं आणखीही कांहीं विशेष लक्षणें ऐक. ७६३ तर वाघाच्या अरण्यांत जाऊन एक वेळ चरून दैवयोगानें परत आलों, ह्या भरंवशावर वसु जसा पुन्हा तिकडेच धांवूं लागतो, ७६४ किंवा, सापाच्या बिळांत असलेलें द्रव्य अकस्मात् कांहीं एक अपाय न घडतां हातास आलें ह्मणून तेवढ्यानेंच तो नाहीं असा कृतनिश्चय करतो, ७६५ त्याप्रमाणें हें एक दोन वेळां लाभलें येवढ्यावरून, त्यांत सर्पच आहे हें जो मनांत आणीत नाहीं; ७६६ शत्रूला निद्रा लागली; आतां माझा तंटा मिटला; असें

समजणारा जसा सर्वस्वास मुकतो; ७६७ त्याप्रमाणें आहार आणि निद्रेचा उत्कर्ष आहे; जोंपर्यंत रोग निवांत आहेत; तोंपर्यंत व्याधीची जो चिंता करीत नाहीं; ७६८ आणि स्त्रीपुत्रादिक जों जों जमतात; संपत्ति जों जों मिळूं लागते, तों तों त्या धुळीनें ज्याचे डोळे जातात; ७६९ त्यांचा तत्काल वियोग होईल, आणि थोड्या अवकाशानें विपत्ति प्राप्त होईल, हें पुढील दुःख जो मनांत आणीत नाहीं; ७७० अर्जुना! तो अज्ञान. आणि जो इंद्रियांना हवीं तशीं चरूं देतो, तोही तोच. हें लक्ष्यांत ठेव. ७७१ तारुण्याच्या सुखानें, संपत्तीच्या सहवासानें, सेव्यासेव्य जो सरकटीत जातो; ७७२ करूं नये तें करतो, असंभाव्य असतें तें मनांत धरतो: ज्याची बुद्धि, ज्याचें चिंतन, करूं नये त्याचें चिंतन करते. ७७३ ज्यांत शिरूं नये त्यांत शिरतो; जें घेऊं नये तें मागतो; ज्याला आंग व मन लावूं सुद्धां नये, अशाला मिठी मारतो. ७७४ जो न जावें तेथें जातो; न पहावें तें पहातो; न खावयाचें तें खातो; आणि तसेंच ज्याचा संतोष मानूं नये त्याचा संतोष मानतो. ७७५ ज्याचा संग धरूं नये त्याचा संग धरतो; ज्याशीं संघट्टण करूं नये, त्याशीं संघट्टण करतो, जो मार्ग आचरण करूं नये, तो मार्ग आचरण करतो. ७७६ जें ऐकूं नये तें ऐकतो: जें बोलूं नये तें बोलतो; पण तसें केलें असतां दोष घडतील, हें ज्याला समजत नाहीं. ७७७ आंगाला आणि मनाला आवडलें म्हणजे झालें. त्यापुढें कृत्य आणि अकृत्य आठवत नाहीं. जो करणें योग्य म्हणून भलतेंच करतो. ७७८ परंतु मला पाप लागेल, किंवा नरकाच्या यातना भोगाव्या लागतील, हें पुढचें जो कांहींच पहात नाहीं; ७७९ त्याच्या समागमानें जगामध्यें दांडगें अज्ञान माजून रहातें, आणि तें सज्ञानाबरोबरही झगडा करतें. ७८० पण तें असो. आणखी अज्ञानाचीं लक्षणें ऐक. म्हणजे तें सारें तुला कळेल. ७८१ सुंदर परिमळकेसरामध्यें भ्रमर जसा लुब्ध होतो, त्याप्रमाणें घरावर ज्याची पुरी प्रीति गुंतून राहिलेली असते. ७८२ साखरेच्या राशीवर बसलेली माशी जशी उठत नाहीं, तशा प्रकारें स्त्रियेच्या चित्तावर ज्याचें मन आसक्त झालेलें; ७८३ कुंडामध्यें राहिलेला बेडूक, शेंबडामध्यें गुंतलेली माशी, चिखलांत सपशील रुतलेलें जनावर, ७८४ असावें त्याप्रमाणें जिवानें, मनानें किंवा प्राणानेंही घरांतून निघणें नाहीं. त्या बिळामध्येंच जो साप होऊन बसतो; ७८५ स्त्री आपल्या प्रियपतीच्या गळयाला मिठी घालते, त्याप्रमाणें जिवाचें खोंपट जो गच्च धरून बसतो; ७८६ मधासाठीं भ्रमर जसा यातना सोसतो, त्याप्रमाणें घराचें संरक्षण करतो, ७८७ म्हातारपणीं चुकून एकच मूल झालें, म्हणजे त्याचें, आईबापांना जितकें प्रेम वाटतें, ७८८ अर्जुना! त्याच्या तोडीचें जो घरामध्यें प्रेम ठेवतो; आणि स्त्रीशिवाय दुसरें कांहींच जो जाणत नाहीं; ७८९ अशा प्रकारें स्त्रियेच्या देहावरच जो सर्वोपरी जीव ठेवून राहतो; मी कोण व करतों काय, हें ज्याला कांहींच कळत नाहीं; ७९० सिद्धांचें चित्त ब्रह्मामध्यें लागलें असतां, ज्याप्रमाणें हरएक व्यवहार बंद पडतो; ७९१ त्याप्रमाणें जो हानि व लज्जा पहात नाहीं; लोकनिंदा ऐकत नाहीं; ज्याचीं सारीं इंद्रियें स्त्रीरूप होऊन गेलेलीं; ७९२ स्त्रीचें चित्त सांभाळण्याकडेच ज्याचें लक्ष्य; डोंबाऱ्याच्या माकडाप्रमाणें तिच्याच छंदानें जो नाचतो; ७९३ आपल्याला शिणवितो; इष्टमित्रांना दुःख देतो; आणि कोणीकडूनही लोभी जसा द्रव्य संपादन करतो, ७९४ त्याप्रमाणें दानादिक पुण्यावर पाणी सोडावयाचें; आप्तइष्टांस फसवावयाचें, पण स्त्रीचा शब्द खालीं पडूं द्यावयाचा नाहीं. ७९५ पूजेचे देव धाब्यावर वसवावयाचे; गुरूला शब्दांनीं हातावर तुरी द्यावयाच्या; आईबापांना दारिद्र्यांत ठेवावयाचें;

७९६ जेवढ्या जेवढ्या भोगसंपत्ति, किंवा चांगल्या चांगल्या वस्तु मिळतील तेवढ्या तेवढ्या स्त्रियेसाठीं मात्र आणावयाच्या; ७९७ प्रेमळ भक्त ज्याप्रमाणें आपल्या कुलदैवताला भजतो, त्याप्रमाणें एकाग्र चित्तानें जो स्त्रीची आराधना करतो; ७९८ चांगलें, उत्तम, तें सारें स्त्रियेलाच. बाकीच्यांना जाडीभरडी भाजीभाकरही पुरती नाहीं. ७९९ तिच्याकडे कोणीं पाहिलें, तिच्या कोणीं विरुद्ध केलें, तर जणों काय सारी पृथ्वी बुडाली असें ज्यास होऊन जातें; ८०० नायटे होतील ह्मणून नागाची शपत जशी कोणी मोडित नाहीं, त्याप्रमाणें जो स्त्रियेचे मनोरथ पाळतो; ८०१ किंबहुना **अर्जुना!** स्त्रीच, त्याला सर्वस्व, आणि तिच्यापासून झालेल्यावर प्रेम; ८०२ आणखी तिची ह्मणून जी जी वस्तु, ती प्राणांच्या पलीकडे असें जो मानतो; ८०३ तो अज्ञानाचें मूळ. त्याच्या योगानें अज्ञानाला बळ चढतें. हें असो. तो साक्षात् अज्ञानाची मूर्ति. ८०४ आणखी खवळलेल्या समुद्रांत टाकलें तर, तो जसा लाटांबरोबर खालवर होत असतो, ८०५ त्याप्रमाणें आवडती वस्तु प्राप्त झाली कीं जो सुखानें चढतो, तसेंच अप्रिय प्राप्त झालें असतां जो दुःखानें तळाशीं बसतो; ८०६ अशा प्रकारें चित्तामध्यें जो विषमतेची चिंता वाहतो, तो महा अज्ञानी होय. ८०७ आणखी, द्रव्याचा डल्ला मारण्यासाठीं जसें विरक्ताचें सोंग आणावयाचें, त्याप्रमाणें माझ्या ठिकाणीं भक्ति; फळासाठीं ज्याची आशा; ८०८ किंवा व्यभिचारी स्त्री जशी नवऱ्याच्या मनाप्रमाणें वागते, पण जाराबरोबर जाण्याला जशी तयार असते, ८०९ त्याप्रमाणें **अर्जुना!** माझें भजन करतांना त्यांत तो कामनादृष्टीनें पाउल टाकतो; ८१० आणि भजन केल्याबरोबर तो विषय जर प्राप्त न होईल, तर हें सारें व्यर्थ आहे असें ह्मणून सोडून देतो. ८११ कुणबी जशीं नवीं नवीं शेतें करतो, त्याप्रमाणें जो निरनिराळे देव मांडतो; आणि पहिल्या पहिल्यांची हेळसांड करतो. ८१२ ज्यांत कांहीं चातुर्य दिसून येईल, तो गुरूचा मार्ग धरावयाचा; त्याचा मंत्र घ्यावयाचा, नाहीं तर घ्यावयाचा नाहीं. ८१३ प्राणिमात्रांशीं निष्ठुरता, आणि स्थावरावर भर. एकावर निष्ठा अशी कोठेंच नाहीं. ८१४ माझी मूर्ति करून ती घरांतल्या एका कोपऱ्यांत बसवावयाची, आणि आपण देवांच्या आणि देवींच्या यात्रेला जावयाचें! ८१५ नित्य माझें आराधन करावयाचें, आणि काम लागलें कीं, कुलदेवतांला भजावयाचें. आणि एखादी मोठी पर्वणी वगैरे आली, कीं तिसराच देव! ८१६ घरांत प्रतिष्ठा माझी; आणि हा नवस करतो दुसऱ्यालाच. श्राद्धपक्ष आलें कीं हा पितरांचा अंकित झाला. ८१७ एकादशीच्या दिवशीं जितके आमचे सोपस्कार, तितकेच नागपंचमीच्या दिवशीं नागाचे. ८१८ चतुर्थी आली कीं हा झाला गणपतीचा. चतुर्दशीच्या दिवशीं जगदंबेला ह्मणतो "माते! मी तुझा बरें." ८१९ नित्यनैमित्तिक कर्में टाकून द्यावयाचीं, पण नवरात्रांतील चंडीच्या पाठाला बसावयाचें. आदित्यवार आला कीं, मांडलें बहिरवाचें पान! ८२० पुन्हा सोमवार आला कीं, बेल घेऊन लागला धांवावयाला शंकराकडे! ह्याप्रमाणें एकटाच जो साऱ्यांचें सेवन करतो. ८२१ अशा प्रकारें, अखंड सुवासीन गांवचा जसा उंबरठान् उंबरठा पुजते, त्याप्रमाणें जो अखंड भजन करतो. एक क्षण उगा बसत नाहीं. ८२२ अशा रीतीनें स्वेच्छ धांवणारा जो भक्त असेल, तो अज्ञानाचा पुतळा, हें लक्ष्यांत ठेव. ८२३ एकांत, उत्तम उत्तम तपोवनें, तीर्थें, नदीतटाक, ह्यांना पाहून ज्याला कंटाळा येतो, तोही तोच. ८२४ वस्तीमध्यें ज्याला आनंद; गजबजींत ज्याला मौज, लौकिकाची स्तुति करावयाला पाहिजे; तोही त्यांतलाच. ८२५ आणखी, आत्मा दृष्टिगोचर होतो, अशी जी विद्या आहे ती ऐकून

तिचा जो डौर वाजविल्याप्रमाणें उपहास करून विद्वान् ह्मणवितो; ८२६ जो वेदाकडे जात नाहीं; योगशास्त्र ज्याला आवडत नाहीं; अध्यात्मज्ञानांत ज्याचें मनच बसत नाहीं; ८२७ आत्मानात्मनिरूपणाची भिंत फोडून ज्याची बुद्धि ओढाळ गुराप्रमाणें सैरावैरा धावते; ८२८ कर्मकांड तर जाणतो; पुराणें तर सारीं मुखोद्गत; ज्योतिष तर तो ह्मणतो त्याप्रमाणें होतें. ८२९ शिल्पशास्त्रांत अतिशय निष्णात; पाकशास्त्रांत तरबेज; अथर्वणविधी तर ज्याच्या हातांत; ८३० कामशास्त्रांत कांहीं बाकी ठेवली नाहीं; भारत तर सारें संपविलें; वेद तर मूर्तिमंत आपलेसे केले. ८३१ नीतिशास्त्र तर सारें अवगत; वैद्यकींतही गति तशीच; काव्यनाटकांत तर माझ्यासारखा दुसरा चतुर नाहीं. ८३२ स्मृतींचा ऊहापोह करतां येतो; गारुड्याचें मर्म माहित आहे; कोश तर माझ्या ज्ञानाची चाकरी करतो. ८३३ त्याचप्रमाणें व्याकरणांत पारंगत; तर्कशास्त्रांत फारच प्रवीण; पण आत्मज्ञानामध्यें मात्र शुद्ध आंधळा. ८३४ त्या एकाशिवाय, अवघ्या शास्त्रांतील पृथ्वीतुल्य आधारभूत सिद्धांत असले तरी, त्यांना मूळनक्षत्रावर जन्मलेल्याप्रमाणें आग लागो. त्याकडे ढुंकून सुद्धां पाहूं नये. ८३५ मोराच्या आंगावर डोळ्यांच्या आकाराचीं पिसें असतात, पण एक पहावयाच्या उपयोगीं पडेल तर शपथ. ८३६ अमृतसंजीवनीचें मूळ, परमाणूयेवढें सांपडलें तरी पुरे. बाकीच्यांचे गाडे भरलेले तरी काय करावयाचे? ८३७ आयुष्याशिवाय गुण; मस्तकाशिवाय अलंकार; नवरानवरीशिवाय वाजंत्री; ही विटंबना मात्र. ८३८ त्याप्रमाणें **अर्जुना!** एका अध्यात्माशिवाय शाहून सारीं शास्त्रें मिथ्या होत. ८३९ ह्याकरितां **अर्जुना!** हें पहा. ज्या पढित मूर्खाला अध्यात्मज्ञानाचे ठायीं बोध होत नाहीं, ८४० त्याला शरीर प्राप्त झालें ह्मणजे अज्ञानाच्या बीजालाच कोंब फुटले, आणि त्याची व्युत्पत्ति-विद्या-अज्ञानाच्या वेलीवर गेली. ८४१ तो जें जें बोलतो तीं तीं अज्ञानाचीं फुलें होत. आणि त्याच्या पुण्याला फळें आलीं, तरी तें अज्ञानच. ८४२ जो अध्यात्मज्ञान ह्मणून कसलें तें मानित नाहीं; तो ज्ञानार्थाकडे जात नाहीं, हें काय सांगितलें पाहिजे? ८४३ आलीकडच्या कांठापर्यंत न पोंचतांच जो परत पळतो, त्याला द्वीपांतरींची गोष्ट काय होय? ८४४ किंवा दाराच्या उंबरठ्यांतच ज्याचें शरीर दडपलें गेलें, तो बाहेर असलेलें, पाहणार कसें? ८४५ त्याप्रमाणें **अर्जुना!** अध्यात्माच्या ठिकाणीं ज्यास ओळख नाहीं, त्याला ज्ञानार्थ पहावयाची गोष्ट कसली? ८४६ ह्मणून तो ज्ञानाचें तत्त्व ओळखत नाहीं, हें विशेष विस्तारानें सांगावयास नको. ८४७ गर्भिणीला जेऊं घातलें, कीं पोटांतील बालकाची तृप्ति होते. त्याप्रमाणें मागल्या शब्दांत सांगितलें तें हेंच. ८४८ ह्याशिवाय दुसरें रूप करतां येत नाहीं. ज्याप्रमाणें आंधळ्याला आमंत्रण दिलें कीं, दुसरा (डोळस) बरोबर यावयाचाच, ८४९ तशा प्रकारें ह्याच्या उलट ज्ञानाचीं, अमानित्वप्रभृति लक्षणें पूर्वीं वर्णन केलींच आहेत. ८५० ज्ञानाचीं जीं अठरा लक्षणें सांगितलीं आहेत, तीं वेगळीं काढलीं, ह्मणजे अज्ञान तेंच शिलक राहतें. ८५१ पूर्वीं श्लोकार्धाच्या अर्धामध्यें **श्रीमुकुंदांनीं** असें सांगितलें आहे कीं, ह्या ज्ञानलक्षणाच्या उलट जें तेंच अज्ञान. ८५२ ह्मणून अशा प्रकारें मीं विस्तार केला. नाहीं तर दुधामध्यें फार पाणी घालून काय करावयाचें आहे? ८५३ पण महाराज! तशी मीं बडबड केलेली नाहीं. पदाची सीमा सोडलेली नाहीं. मुळांतील गुप्तार्थाच्या विस्तारास मात्र निमित्त झालों, ८५४ तेव्हां श्रोते ह्मणाले 'थांब. निरास करण्याला स्थळ कोठें आहे? हे कविवर्या! व्यर्थ कां भितोस? ८५५ जे अर्थ आह्मीं गुप्तस्थळीं झांकून ठेवलेले आहेत, ते तूं प्रगट कर, असें **श्रीमुरारींनीं** तुला सांगितलें आहे. ८५६ आणि तें

देवाचें मनोगत तूं मूर्तिमंत दाखवून देत आहेस. हें सांगतांना देखील तुझें चित्त भरून येईल. ८५७ ह्मणून तें असो. तें सुद्धां आह्मी बोलून दाखवित नाहीं. पण सर्वोपरी आह्मांस संतोष झाला आहे. कारण, ऐकण्याची सुखकारक अशी ज्ञाननौका आह्मांस प्राप्त झाली. ८५८ आतां ह्यापुढें तो **श्रीहरी** जें बोलला तें लौकर कथन कर. ८५९ ह्या संतांच्या भाषणावरोबर **श्रीनिवृत्तिदास** ह्मणाले "तर महाराज! ऐका. देव असें ह्मणाले." ८६० ते ह्मणतात "**अर्जुना!** हीं जीं सारीं लक्षणें ऐकलींस तो अज्ञानाचा भाग ह्मणून समज. ८६१ ह्या अज्ञानाच्या भागाला पाठमोरा होऊन ज्ञानाविषयीं चांगला दृढ हो. ८६२ मग त्या शुद्ध ज्ञानानें जी वस्तु जाणण्यास योग्य, ती तुला प्राप्त होईल." ती जाणण्याची **अर्जुनानें** इच्छा केली. ८६३ तो त्याचा हेतु मनांत आणून सर्वज्ञांचा राजा ह्मणाला "जाणण्याजोग्या वस्तूचें आतां स्पष्टीकरण करून सांगतों ऐक." ८६४

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

[ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि] तरि ज्ञेय ऐसें ह्मणणें । वस्तु तें येणेंचि कारणें । जें ज्ञानेंवांचूनि कवणें । उपाया नये ॥ ६५ ॥ [यज्ज्ञात्वामृतमश्नुते] आणि जाणितलेंयावरौतें । कांहीं करणें नाहीं जेथें । जाणणेंचि तन्मयातें[1] । आणि जयाचें ॥ ६६ ॥ जें जाणितलेयासाठीं[2] । संसार काढूनियां कांटीं[3] । जिरोनि जाइजे पोटीं । नित्यानंदाच्या ॥ ६७ ॥ [अनादिमत्] तें ज्ञेय गा ऐसें । आदि जया नसे ।[परं ब्रह्म] परब्रह्म आपैसें । नाम जया ॥ ६८ ॥ [न सत्तन्नासदुच्यते] जें नाहीं ह्मणों जाइजे । तंव विश्वाकारें देखिजे । आणि विश्वचि ऐसें ह्मणिजे । तरि हे माया ॥ ६९ ॥ रूप वर्ण व्यक्ति । नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती । तरि कोण कैसें आथी । ह्मणावें पां ॥ ८७० ॥ आणि साचचि जरी नाहीं । तरि महदादि कोणेठाईं । स्फुरत[4] कैचें काई । तेणेंवीण असे ॥ ७१ ॥ ह्मणोनि आथी नाथी हे बोली । जें देखोनि मुकी जाहाली । विचाराची मोडली । वाट जेथें ॥ ७२ ॥ जैसी भांडघटशरावीं[1] । तदाकार असे पृथ्वी । तैसें सर्व होऊनियां सर्वी । असें जे वस्तु ॥ ७३ ॥

"तिला ज्ञेय वस्तु येवढ्याकरितांच ह्मणावयाची कीं, ज्ञानावांचून दुसऱ्या कशानेंही ती प्राप्त व्हावयाची नाहीं. ८६५ आणि जें जाणल्यानंतर ज्या ठिकाणीं कांहीं करावयाचें उरतच नाहीं. आणि ज्याचें जाणणेंच तदाकारवृत्ति करून सोडतें. ८६६ जें जाणलें असतां संसाराला कांटीं लावून नित्यानंदाच्या पोटांत जिरून जातें. ८६७ तें ज्ञेय असें कीं, ज्याला आदि नाहीं; स्वयमेव परब्रह्म असें ज्याला नांव; ८६८ जें नाहीं ह्मणावयाला जावें, तर विश्वाच्या आकारानें दिसतें; आणि विश्व तें तेंच ह्मणावें, तर ही सारी माया आहे. ८६९ रूप नाहीं; वर्ण नाहीं; व्यक्ति नाहीं; दृश्यही नव्हे आणि द्रष्टाही नव्हे; तेव्हां कोण आणि कसें आहे ह्मणावें? ८७० आणि खरोखरच जर नाहीं, तर महदादिक माया, त्याच्या शिवाय कोठें आणि कशा भासमान होतात? ८७१ ह्मणून आहे किंवा नाहीं हें सांगावयाला शब्द मुके झाले, आणि विचाराची जेथें वाट खुंटली. ८७२ ज्याप्रमाणें घागरीमध्यें घागरीच्याच आकाराची पृथ्वी असते, त्याप्रमाणें सर्वांमध्यें सर्व होऊन जी वस्तु राहते," ८७३

सर्वतःपाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वतःश्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

[सर्वतः पाणिपादं तत्] आघवांचि देशीं काळीं । नव्हतां[2] देशकाळांवेगळी । जे क्रिया स्थूळास्थूळीं । तेचि हात जयाचे ॥ ७४ ॥ तयातें याकारणें । विश्वबाहु ऐसें ह्मणणें । जे सर्वचि सर्वपणें । सर्वदा करी ॥ ७५ ॥ आणि समस्ताही ठाया । एकेकाळीं धनंजया । आलें असे ह्मणोनि जया । विश्वांघ्रि[4] नाम ॥ ७६ ॥ [सर्वतोक्षिशिरोमुखं] पैं सवितया[5] आंग डोळे । नाहींत वेगळे वेगळे । तैसें सर्वद्रष्टें सकळें । स्वरूपें जें ॥ ७७ ॥ ह्मणोनि विश्वतश्चक्षु[6] । हा अचक्षूच्याठायीं पक्षु[7] । बोलावया दक्षु । जाहाला वेद ॥ ७८ ॥ जें सर्वांचे शिरावरी । जें नित्य

१ तदाकारतेस. २ जाणलें असतां. ३ कांठास, किंवा संसाराला कांटीं लावून, विरजण घालून. ४ भासमान.

१ डेरा, घागर, परळ इत्यादिकांत. २ सदासर्वकाळ आणि सर्वत्र. ३ न होतां. ४ ज्याचे पाय सर्वत्र आहेत. ५ सूर्याला. ६ सर्वत्र डोळे असणारा. ७ शहाणा, दक्ष.

नांदे सर्वोपरी । ऐसिये स्थितीवरी । विश्वमूर्धा ह्मणिपे ॥७९॥ पैंगा मूर्ति तेंचि मुख । हुताशना जैसें देख । तैसें सर्वपणें अशेख । भोक्तें जें ॥ ८८० ॥ यालागीं तया पार्था । विश्वतोमुख हे व्यवस्था । आली वाक्पथा । श्रुतीचिया ॥ ८१ ॥ [सर्वतःश्रुतिमल्लोके] आणि वस्तुमात्रीं गगन । जैसें असे संलग्न । तैसे शब्दजातीं कान । सर्वत्र जया ॥ ८२ ॥ [सर्वमावृत्य तिष्ठति] ह्मणोनि आह्मी तयातें । ह्मणों सर्वत्र आइकतें । एवं जें सर्वांतें । आवरूनि असे ॥ ८३ ॥ येऱ्हवीं तरि महामती । विश्वतश्चक्षु इया श्रुती । तयाचिये व्याप्ति । रूप केलें ॥ ८४ ॥ वांचूनि हस्त नेत्र पाये । हे भाष तेथ कें आहे । सर्व शून्यत्वाचा साहे । निष्कर्ष जें ॥ ८५ ॥ पैं कल्लोळातें कल्लोळें । ग्रसिजत असे ऐसें कळे । परि ग्रसितें ग्रासावेगळें । असे काई ॥ ८६ ॥ तैसें साचचि जें एक । तेथ कें व्याप्यव्यापक । परि बोलावया नावेक । करावें लागे ॥८७॥ पैं शून्य जैं दावावें जाहालें । तैं बिंदुलें एक केलें । तैसें अद्वैत सांगावें बोलें । तैं द्वैत कीजे ॥ ८८ ॥ येऱ्हवीं तरि पार्था । गुरुशिष्यसत्पथा । आंडळ पडे सर्वथा । बोल खुंटे ॥ ८९ ॥ ह्मणोनि गा श्रुती । द्वैतभावें अद्वैतीं । निरूपणाची वाहती । वाट केली ॥ ८९० ॥ तेंचि आतां अवधारीं । इये नेत्रगोचरें आकारीं । तें ज्ञेय गा जयापरी । व्यापक असे ॥९१॥

" सदा सर्वकाल आणि सर्व, देश कालाला न सोडतां स्थूलामध्यें किंवा सूक्ष्मामध्यें जी क्रिया चालते, ते त्याचे हात होत. ८७४ ह्मणूनच त्याला 'विश्वबाहु' असें ह्मणतात. कारण, तें सारेंच सारेपणानें सर्व करतें. ८७५ आणखी अर्जुना! सर्व ठिकाणीं एक कालींच असलेलें असतें. ह्मणून 'विश्वपाद'ही त्याचेंच नांव होय. ८७६ सूर्याला आंग, डोळे, जसे वेगवेगळे नाहींत, त्याप्रमाणें सर्व स्वरूपानेंच जें सर्व पाहणारें, ८७७ ह्मणून नेत्रहीनाचाही पक्ष घेऊन 'विश्वतश्चक्षु'—सर्वत्र डोळे असणारें—असा पक्ष घेऊन वेद बोलावयाला पुढें सरला. ८७८ सर्वांच्याही मस्तकावर सदा सर्वकाळ सर्वोपरी नांदतें. अशी स्थिति असल्यामुळें त्याला 'विश्वमूर्धा' असें ह्मणतात. ८७९ तसेंच अग्नीची मूर्ति हेंच ज्याचें तोंड हें लक्ष्यांत ठेव. त्यामुळेंच तें जिकडून तिकडून भोक्तें. ८८० ह्याकरितां अर्जुना? त्याला वेदाच्या बोलण्यांत 'विश्वतोमुख' अशी व्यवस्था आली. ८८१ आणखी वस्तुमात्राला जसें गगन वेष्टिलेलें असतें, तसें हरएक शब्दांच्या ठायीं जिकडे तिकडे ज्याला कान आहेत. ८८२ ह्मणून त्याला आह्मी सर्वत्र ऐकणारें असें ह्मणतों. अशा प्रकारें सर्वांस तें व्यापून राहतें. ८८३ हे महामती! विश्वतश्चक्षु असें जें श्रुतीनें ह्मटलें, त्याचें हें स्पष्टीकरण केलें. बाकी, ८८४ सर्व शून्यत्वाचाच सिद्धांत जेथें भरलेला आहे, तेथें हात पाय, डोळे हे शब्द तरी आहेत कोठें? ८८५ लाटांना लाटा खाऊन टाकतात, येवढें कळतें. पण खातांना कोणी खाणारा असतो काय? ८८६ तसें खरें जें एक, तेथें व्याप्य आणि व्यापक कोठचा? परंतु भाषणांत समजूत पटण्यासाठीं क्षणभर तसें करावें लागतें. ८८७ शून्य—ह्मणजे कांहीं नाहीं—तें जरी दाखवावयाचें असलें तरी, त्याला एक बिंदु केलेला आहे. त्याप्रमाणें अद्वैत, शब्दांनीं सांगताना द्वैत घ्यावें लागतें. ८८८ नाहीं तर अर्जुना! गुरुशिष्यसांप्रदायांत आडकाठी येईल, आणि बोलणेंच खुंटेल. ८८९ ह्मणून श्रुती ह्या द्वैताला धरून अद्वैत निरूपण करण्याचा राजमार्ग केलेला आहे. ८९० तर तेंच ज्ञेय, ह्या दृश्याकारामध्यें व्यापक होऊन कसें असतें तें आतां ऐक." ८९१

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।

असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥

[सर्वेंद्रियगुणाभासं] तरि तें गा किरीटी ऐसें । अवकाशीं आकाश जैसें । पटीं पट होऊनि असे । तंतु जेवीं ॥ ९२ ॥ उदक होऊनि उदकीं । रस जैसा अवलोकीं । दीपपणें दीपकीं । तेज जैसें ॥ ९३ ॥ कर्पूरत्वें कापुरीं । सौरभ्य असे जयापरी । शरीर होऊनि शरीरीं । कर्म जेवीं ॥ ९४ ॥ किंबहुना जैसें पांडवा । सोनेंचि सोनयाचा रवा । तैसें जें या सर्वा । सर्वांगीं असे ॥ ९५ ॥ परि असे रवेपणामाजिवडें । तंव रवा ऐसें आवडे । वांचूनि सोनें सांगडें । सोनया जेवीं

१ सर्व प्रकारें. २ अग्नीला. ३ सर्वत्र तोंडें आहेत असें. ४ बोलण्यांत. ५ ओतप्रोत भरलेलें. ६ ऐकणारें. ७ सिद्धांत. ८ तरंगाला. ९ क्षणभर, उगाच. १० वडील, पूज्य, बिंदू. ११ गुरुशिष्यसंप्रदायांत. १२ आडकाठी. व्यत्यय.

१ सुगंध. २ तुकड्यामध्यें. ३ वाटतें. ४ समागमानें.

॥ ९६ ॥ पैं गा वोघचि वांकुडा। परि पाणी उजू सुहाडा। वन्हि आला लोखंडा। लोह नव्हे कीं ॥ ९७ ॥ घटाकारें वेंटाळें। तेथ नभ गमे वाटोळें। मठीं तरी चौफळें। आयें दिसे ॥ ९८ ॥ [सर्वेंद्रियविवर्जितं] परि ते अवकाश जैसे। नोहिजतीचि आकाशें। जें विकार होऊनि तैसें। विकारी नोहे ॥ ९९ ॥ मनमुख्य इंद्रियां। सत्वादिगुणां ययां। सारिखें ऐसें धनंजया। आवडे कीर ॥ १०० ॥ पैं गुळाची गोडी। नोहे बांधेयां सांगडीं। तैसीं गुण इंद्रियें फुडीं। नाहीं तेथ ॥ १ ॥ अगा क्षीराचिये दशे। घृत क्षीराकारें असे। परिक्षीरचि नोहे जैसें। कपिध्वजा ॥ २ ॥ तैसें जें इये विकारीं। विकार नोहे अवधारीं। पैं आकारा नाम भोंवरी। येर सोनें तें सोनें ॥ ३ ॥ इया उघड मन्हाटिया। तें वेगळेपण धनंजया। जाण गुणइंद्रियां। पासोनियां ॥ ४ ॥ नामरूपसंबंध। जातिक्रियाभेद। हा आकारासीच अँवाद। वस्तूसि नाहीं ॥ ५ ॥ [असक्तं सर्वभृच्चैव] तें गुण नव्हे कहीं। गुणा तया संबंध नाहीं। परि तयाच्याचिठाईं। आभासती ॥ ६ ॥ येतुलेयासाठीं। संभ्रांताच्या पोटीं। ऐसें जाय किरीटी। जे हेंचि धरी ॥ ७ ॥ तरि तें गा धरणें ऐसें। अभ्रातें जेविं आकाशें। कां प्रतिवदनं जैसें। आरसेनी ॥ ८ ॥ ना तरी सूर्य प्रतिमंडळ। जैसेनि धरी सलिल। कां रश्मिकरीं मृगजळ। धरिजे जेवीं ॥ ९ ॥ तैसें गा संबंधेंविण। यया सर्वातें धरी निर्गुण। परि तें वायां जाण। मिथ्यादृष्टीं ॥ ११० ॥ [निर्गुणं गुणभोक्तृ च] आणि यापरी निर्गुणें। गुणातें भोगणें। रंका राज्य करणें। स्वप्नीं जैसें ॥ ११ ॥ म्हणोनि गुणाचा संग। अथवा गुणभोग। हा निर्गुणीं लाग। बोलों नये ॥ १२ ॥

"**अर्जुना!** तर तें, अवकाशामध्यें जसें आकाश, वस्त्रांमध्यें जसे तंतु व्यापून असतात, ८९२ उदकामध्यें रस जसा उदकच होऊन राहतो, दिव्यामध्यें दिवेपणानें जसें तेज; ८९३ कापुरामध्यें कापूर होऊन जसा सुगंध; शरीरामध्यें जसें कर्म शरीर होऊन राहतें, ८९४ किंबहुना **अर्जुना!** सोन्याची लगड सोनेंच असतें. त्याप्रमाणें जें ह्या सर्वांगामध्यें असतें. ८९५ परंतु तुकड्यामध्यें असतें, तेव्हां तो तुकडाच असें वाटतें. पण सोनें सोन्यासारखेंच असतें. ८९६ हे **सुहृदा!** ओघ वांकडा असला, तरी पाणी तें सरळच. अग्नि लोखंडांत शिरला तरी तो कांहीं लोखंड नव्हे. ८९७ घागरीच्या आकारानें गुंडाळलें म्हणजे तेथें आकाश वाटोळें दिसतें. तेंच घरामध्यें पाहिलें म्हणजे चौकोनी असल्यासारखें दिसतें. ८९८ पण ते अवकाश कांहीं आकाश होत नाहींत, किंवा तशा आकारानें त्यास विकारही होत नाहीं. ८९९ तसें मुख्य इंद्रिय जें मन, तें सत्वादि गुणासारखेंच आहे असें निश्चयेंकरून वाटतें. ९०० गुळाची गोडी कांहीं ढेपेंत बांधली जात नाहीं, त्याप्रमाणें गुण आणि इंद्रियें ह्यांमध्यें हेंही बांधलें जात नाहीं. ९०१ अरे! दुधाच्या स्वरूपामध्यें तूपही दूधरूपानेंच असतें. पण **अर्जुना!** तें कांहीं दूध नव्हे. ९०२ त्याप्रमाणें ह्या विकारानें तेंही विकृत होत नाहीं, हें लक्ष्यांत ठेव. आकाराचें नांव बुगडी आणि बाजुबंद; बाकी सोनें तें सोनेंच. ९०३ **अर्जुना!** त्याप्रमाणें गुणांपासून आणि इंद्रियांपासून हेंही अगदीं वेगळें आहे. हें ध्यानांत ठेव. ९०४ नामरूपाचा संबंध; जातिक्रियेमध्यें भेद; ह्या लौकिक संज्ञा आकाराला आहेत. मूळवस्तूला-ब्रह्माला—नाहींत. ९०५ तें कधींही गुण होणार नाहीं. गुणांना आणि त्याला कांहीं संबंध नाहीं. पण ते त्याच्या ठिकाणीं भासमान होतात. ९०६ म्हणूनच **अर्जुना!** अज्ञानाच्या मनांत असें येतें कीं, तेंच त्याला धरतें. ९०७ पण तें धरणें असें असतें कीं, जसें आकाशानें अभ्रांना धरावें त्याप्रमाणें. किंवा आरसा जसा प्रतिबिंब धरतो त्याप्रमाणें. ९०८ किंवा जळ जसें सूर्याचें प्रतिबिंब धरतें, किंवा सूर्याचे किरण जसे मृगजळ धरतात, ९०९ त्याप्रमाणें अलग राहून ह्या सर्वांना निर्गुण धरतें. पण तें भ्रामक दृष्टीनें दिसतें, ह्याकरितां तें मिथ्या होय. ९१० भिकाऱ्यानें स्वप्नांत राज्याचा उपभोग घ्यावा, त्याप्रमाणें निर्गुणाला गुणाचा उपभोग घ्यावा लागतो. ९११

१ हे सुहृदा ! २ चतुष्कोणाकार. ३ झालेलें. ४ होत नाहींत. ५ ढेपीएवढी. ६ बुगडी, बाजुबंद. ७ लौकिक संज्ञा. ८ भासमान होतात. ९ अज्ञानाच्या. १० मुखाचें प्रतिबिंब. ११ सूर्यकिरणांमुळें. १२ परंतु. १३ भ्रामक दृष्टीमुळें.

ह्मणून गुणांचा संग, किंवा गुणांचा उपभोग, ह्या निर्गुणाला लिप्त करतो असें मानतां कामा नये." ९१२

बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च ।

सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ॥१५॥

[भूतानामचरं चरमेव च] जें चराचरभूतां- । माजि असे पांडुसुता । नाना वन्हीं उष्णता । अभेदें जैसी ॥ १३ ॥ [सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं] तैसेनि अविनाशभावें । जें सूक्ष्मदशे आघवें । व्यापूनि असे तें जाणावें । ज्ञेय एथ ॥ १४ ॥ [बहिरंतश्च] जें एक आंत बाहेरी । [दूरस्थं चांतिके च तत्] जें एक जवळी दूरी । जें एकवांचूनि परि । दुजीं नाहीं ॥१५॥ क्षीरसागरींची गोडी । माजि बहु थडिये थोडी । हें नाहीं तया पैरवडी । पूर्ण जें गा ॥ १६ ॥ स्वेदेंजप्रभृती । वेगळाल्या भूतीं । जयाचिये अनुस्यूती । खोमणें नाहीं ॥ १७ ॥ पैं श्रोतेमुख्यटिळका । घटसहस्रा अनेका- । माजि बिंबोनि चंद्रिका । न भेदे जेवीं ॥ १८ ॥ नाना लवणकणाचिये राशी । क्षारता एक जैसी । कां कोडी एकिं उसीं । एकचि गोडी १९

"अर्जुना! जें चराचरामध्यें वास्तव्य करितें; अनेक अग्नींमध्यें उष्णता जशी अभेद्य भावानें राहते, ९१३ त्याप्रमाणें अविनाशधर्मानें—सूक्ष्मरूपानें—जें सर्वांस व्यापून राहतें तें येथें ज्ञेय असें समजावें. ९१४ आंत आणि बाहेर जें एक; जवळ आणि दूर जें एक; ज्या एकाशिवाय दुसरी गोष्ट नाहीं. ९१५ क्षीरसागराच्या मध्यें मात्र गोडी, आणि किनाऱ्याला ती थोडी असें नाहीं. त्याप्रमाणें जें सर्वत्र परिपूर्ण. ९१६ घर्मापासून वगैरे उत्पन्न झालेले जे निरनिराळे जीव, त्यांच्यामध्यें ज्याच्या व्याप्तीला उणीव ह्मणून नाहींच. ९१७ हे श्रेष्ठ श्रोत्या! हजारों घागरींमध्यें चांदणें पडलें असतां जसें भेद पावत नाहीं, ९१८ किंवा मिठाच्या खड्यांच्या राशीमध्यें खारटपणा जसा एकसारखा असतो, किंवा कोट्यावधि उसांमध्यें गोडी जशी एकसारखी असते," ९१९

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।

भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥१६॥

[अविभक्तं च भूतेषु] । तैसें अनेकीं भूतजातीं । जें आहे एकी व्याप्ती । विश्वकार्या सुमती । कारण जें गा ॥ ९२० ॥ [विभक्तमिव च स्थितं] ह्मणोनि हा भूताकार । जेथूनि तेंची तेया आधार । कल्लोळ सागर । जियापरी ॥ २१ ॥ बाल्यादि तीन्हीं वयसीं । काया एकचि जैसी । तैसें आदिस्थितिग्रासीं । अखंड जें ॥ २२ ॥ सायंप्रातर्मध्यान्ह । होतां जातां दिनमान । जैसें कां गगन । पालटेना ॥ २३ ॥ [प्रभविष्णु च] अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा । जया नाम ह्मणती ब्रह्मा । [भूतभर्तृ च] स्थिती जें विष्णुनामा । पात्र जाहालें ॥ २४ ॥ [ग्रसिष्णु] मग आकार हा हारपे । तेव्हां रुद्र जें ह्मणिपे । [ तत्] तेंही गुणत्रय जेव्हां लोपे । तैं जें शून्य ॥ २५ ॥ नभाचें शून्यत्व गिळून । गुणत्रयातें तुरउन । तें शून्य तें महाशून्य । श्रुतिवचनसंमत ॥ २६ ॥

"त्याप्रमाणें सर्व प्रकारच्या प्राणिमात्रामध्यें ज्या एकाचीच व्याप्ति आहे. आणखी हे बुद्धिमंता! विश्वकार्याला जें कारण असतें. ९२० ह्मणून लाटांना जसा सागर हा आधारभूत असतो, त्याप्रमाणें ह्या प्राणिमात्रांचा आकार जेथून झाला आहे, तेंच त्यांना आधारभूत आहे. ९२१ बाल्य आदिकरून तिन्ही अवस्थेमध्यें देह जसा एकच असतो, त्याप्रमाणें उत्पत्ति, स्थिति, आणि लय ह्यांमध्येंही जें अखंड असतें. ९२२ सायंकाळ झाली; उजाडलें किंवा दुपार झाली; सूर्याचा उदय झाला, किंवा अस्त झाला; तरी गगनामध्यें जसा फेरफार होत नाहीं. ९२३ हे प्रियोत्तमा! सृष्टि करावयाच्या वेळेस ज्याला ब्रह्मा असें ह्मणतात; तेंच पालन करावयाच्या वेळेस विष्णु ह्या नामास पात्र होतें. ९२४ हा आकार लय पावला ह्मणजे ज्याला रुद्र असें ह्मणतात. आणि गुणत्रयांचा लोप झाला ह्मणजे जें शून्य होतें; ९२५ तेंच आकाशाचेंही शून्यत्व गिळून, गुणत्रयांना शिल्लक न ठेवून शून्य होतें, तेंच महाशून्य—परब्रह्म—श्रुतिवचनास संमत आहे." ९२६

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ।

ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥१७॥

[ज्योतिषामपि तज्ज्योतिः] जें अग्नीचें दीपन । जें चंद्राचें

१ त्या रीतीनें. २ घामापासून झालेले जीवादिक. ३ व्याप्तीला. ४ अडथळा, न्यूनत्व. ५ कोट्यावधि उसांत.

१ हेतु. २ त्या भूताकाराला. ३ उत्पत्तीस्थितिसंहारकालीं. ४ ब्रह्म.

जीवन । सूर्याचे नयन । देखती जेणें ॥ २७ ॥ जयाचे उजियेडें । तारागण उघडें । महातेज सुरवाडें । राहाटे जेणें ॥ २८ ॥ [तमसः परमुच्यते] आदीची जें आदी । वृद्धीची जें वृद्धी । बुद्धीची जें बुद्धी । जीवाचा जिव ॥ २९ ॥ जें मनाचें मन । जें नेत्राचें नयन । कानाचे कान । वाचेची वाचा ॥ ९३० ॥ जें प्राणाचा प्राण । जें गतीचे चरण । क्रियेचें कर्तेपण । जयाचेनी ॥ ३१ ॥ आकार जेणें आकारे । विस्तार जेणें विस्तारे । संहार जेणें संहारे । पांडुकुमरा ॥ ३२ ॥ जें मेदिनींची मेदिनी । जें पाणी पिऊनि असे पाणी । तेजा दिवेलावणी । जेणें तेजें ॥ ३३ ॥ जें वायूचा श्वासोश्वास । जें गगनाचा अवकाश । हें असो आघवाचि भास । आभासे जेणें ॥ ३४ ॥ [ज्ञेयं] किंबहुना पांडवा । जें आघवेंचि असे आघवा । जेथ नाहीं रिगावा । द्वैतभावासी ॥ ३५ ॥ जें देखिलियाचिसवें । दृश्य द्रष्टा हें आघवें । एकवट कालवे । सामरस्यें ॥ ३६ ॥ [ज्ञानं] मग तेंचि होय ज्ञान । ज्ञाता ज्ञेय हन । [ज्ञानगम्यं] जेणें गंमिजे स्थान । तेंहि तेंचि ॥ ३७ ॥ जैसें सरलियां लेख । आंख होती एक । तैसें साध्यसाधनादिक । ऐक्यासि ये ॥ ३८ ॥ अर्जुना जिये ठाईं । न सरे द्वैताची वही । [हृदि सर्वस्य धिष्ठितं] हें असो जें हृदयीं । सर्वांच्या असे ॥ ३९ ॥

**" जें अग्नीला प्रकाश देणारें; चंद्राला जीवन देणारें; ज्याच्या योगानें सूर्याच्या नेत्रांना पहातां येतें; ९२७ ज्याच्या उजेडानें तारामंडळ दिसूं लागतें. ज्याच्या योगेंकरून महत्तेज सुखानें नांदतें. ९२८ जें आदीचें आदि; वृद्धीची वृद्धि; बुद्धीची बुद्धि आणि जिवाचे जीव. ९२९ जें मनाचें मन, डोळ्यांचे डोळे; कानांचे कान, आणि वाचेची वाचा. ९३० जें प्राणाचा प्राण; जें गतीचे पाय; ज्याच्या योगानें क्रियेला कर्तेपणा येतो. ९३१ ज्याच्या योगानें आकार उत्पन्न होतो; ज्याच्या योगानें विस्तार विस्तारतो; आणि अर्जुना ! ज्याच्या योगानें संहार संहारतो. ९३२ जें पृथ्वीचें पृथ्वी; जें पाणी पिऊन पाणी; ज्याच्या तेजानें तेजाला प्रभा प्राप्त होते; ९३३ जें वायूचा श्वासोच्छ्वास; जें गगनाचा अवकाश. हें असो. सारा भास ज्याच्या योगेंकरून भासतो; ९३४ किंबहुना अर्जुना ! जें पूर्णात पूर्ण असतें; जेथें द्वैतभावाचा शिरकाव नाहीं. ९३५ जें पाहण्याबरोबर ब्रह्मरसामध्यें दृश्य आणि द्रष्टा हीं दोन्हीं एकत्र मिसळून जातात. ९३६ तेव्हां ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय हीं सारीं तेंच. आणि ज्याच्या योगानें स्वस्थानाप्रत पोंचावयाचें, तें स्थानही तेंच. ९३७ हिशेब संपला ह्मणजे आंकडे जसे एक होतात, त्याप्रमाणें साध्य साधनें वगैरे सर्व ऐक्याप्रत पोंचतात. ९३८ अर्जुना ! ज्याच्या ठिकाणीं द्वैताची सीमाच दृष्टि पडत नाहीं. हें असो. जें सर्वांच्या हृदयांत असतें. " ९३९**

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥

[इति क्षेत्रं तथा ज्ञानं] एवं हें तुजपुढां । आदीं क्षेत्र सुहाडा । दाविलें फाडोवाडां । विवंचुनी ॥ ९४० ॥ तैसेंचि क्षेत्रापाठीं । जैसेनि देखसी दिठी । तैसें ज्ञानही किरीटी । सांगीतलें ॥ ४१ ॥ अज्ञानाही कौतुकें । रूप केलें निकें । जंव आयणी तुझी टेंके । पुरे ह्मणें ॥ ४२ ॥ [ज्ञेयं च] आणि आतां हें रोकडें । उपपत्तीचेनि पंवाडें । निरूपिलें उघडें । ज्ञेय पैं गा ॥ ४३ ॥ [उक्तं समासतः] हे आघवीच विवंचना । बुद्धी भरोनि अर्जुना । मत्सिद्धिभावना । माझिया येती । ॥ ४४ ॥ [मद्भक्तः] देहादिपरिग्रहीं । संन्यास करूनियां जिहीं । जीव माझ्याठाईं । वृत्तिक केला ॥ ४५ ॥ [एतद्विज्ञाय] ते मातें किरीटी । हेंचि जाणोनियां शेवटीं । आपणपयां साटोवाटी । मीचि होती ॥ ४६ ॥ [मद्भावायोपपद्यते] मीचि होती परी । हे मुख्य गा अवधारीं । सोहोपी सर्वांपरी । रचिली आह्मी ॥ ४७ ॥ कडां पायरी कीजे । निराळीं माच बांधिजे । अंथावीं सुइजे । तरी जैसी ॥ ४८ ॥ येन्हवीं आघवेंचि आत्मा । हें सांगोनि वीरोत्तमा । परी तुझिया मनोधर्मा । मिळेल ना ॥ ४९ ॥ ह्मणोनि एकचि संचलें । चतुर्धा आह्मीं केलें । जें अंदळपण देखिलें । तुझिये प्रज्ञें ॥ ९५० ॥ पैं बाळ जैं जेवविजे । तैं घांस एक विसा ठायीं कीजे । तैसें एकचि हें चतुर्व्याजें । कथिलें आह्मी ॥ ५१ ॥ एक क्षेत्र एक ज्ञान । एक ज्ञेय एक अज्ञान । भाग केले अवधान । जाणोनि तुझें ॥ ५२ ॥ आणि ऐसेनही पार्था । जरी हा

१ सुखानें. २ ऐक्यानें. ३ जाणावें, पावावें. ४ हिशेब, मोजमाप. ५ आंकडे. ६ प्रतिबंध, कुंपण.

१ प्रियमित्रा. २ स्पष्टपणें. ३ इच्छा. ४ विश्रांति पावते. ५ विस्तारानें. ६ माझ्या प्राप्तीच्या भावनेनें. ७ मद्भक्ताला. ८ परिवारगणांत. ९ वतनदार. १० बदली. ११ होण्याचा प्रकार. १२ खोल पाण्यांत. १३ नौका. १४ अल्पता. १५ बुद्धीनें. १६ चार प्रकारेंकरून.

अभिप्रावो तुज हाता । नये तरी हे व्यवस्था । एक वेळ सांगों ॥ ५३ ॥ आतां चौठायीं न करूं । एकही ह्मणोनि न सरूं । आत्मानात्मया धरूं । सरिसाचि पाड ॥ ५४ ॥ परि तुवां येतुलें करावें । मागों तें आह्मा देआवें । जे कानाचें नांव ठेवावें । आपणतयातें ॥ ५५ ॥ या श्रीकृष्णाचिया बोला । पार्थ रोमांचित जाहाला । तेथ देव ह्मणती भला । उचंबेळें ना ॥ ५६ ॥ ऐसेनि तो येतां वेग । धरूनि ह्मणे श्रीरंग । प्रकृतिपुरुषविभाग । परिसें सांगों ॥ ५७ ॥ जया मार्गातें जगीं । सांख्य ह्मणती योगी । जयाचिये भाटिवेलागीं । मी कपिल जाहालों ॥ ५८ ॥ तो आईक निर्दोख । प्रकृतिपुरुषविवेक । ह्मणे आदिपुरुख । अर्जुनातें ॥ ५९ ॥

"हे **वीरोत्तमा !** ह्याप्रमाणें आधीं क्षेत्र हें तुझ्यापुढें स्पष्ट विवेचन करून दाखविलें. ९४० त्याचप्रमाणें **किरीटी !** क्षेत्राच्या मागून दृष्टीनें पाहावयास मिळेल असें ज्ञानही सांगितलें. ९४१ आणखी तुझी इच्छा तृप्त होऊन तूं पुरे ह्मणेपर्यंत कौतुकाखातर अज्ञानाचेंही यथासांग स्वरूप दाखविलें. ९४२ आणि आतां तर हें प्रत्यक्ष ज्ञेय विस्तारानें प्रतिपादन केलें. ९४३ **अर्जुना !** हे सारे विचार बुद्धीमध्यें भरले, ह्मणजे ती माझ्या सायुज्य सदनाप्रत येते. ९४४ देहादि परिवारांचा संन्यास करून ज्यांनीं माझ्या ठायींच आपला जीव वतनदार केला, ९४५ ते **अर्जुना !** शेवटीं हेंच जाणून आपल्या मोबदला मला घेऊन मीच होतात. ९४६ पण हें लक्ष्यांत ठेव कीं, ही मद्रूप होण्याची आह्मीं एक अतिशय सोपी रीत काढली आहे. ९४७ कड्याला पायऱ्या कराव्यात; उंचीवर जाण्याला माळा बांधावा; किंवा खोल पाण्यांत नौका घालावी; त्याप्रमाणें आह्मींही हाला सोय केली आहे. ९४८ नाहीं तर हे वीरश्रेष्ठा ! जिकडे तिकडे सारा आत्माच भरलेला आहे इतकेंच सांगितलें असतें. पण तें तुझ्या मनांत भरतें ना. ९४९ तुझ्या ज्ञानाचा थोडा कमीपणा वाटला, ह्मणून एकच व्यापलेलें आहे तरी, त्याचे आम्ही चार विभाग केले. ९५० मूल जेवावयाला बसविलें, तर एक घांस विसां ठायीं करावा लागतो. तसें एकाचेच हे चार प्रकार करून तुला सांगितले. ९५१ तुझी ग्राहकशक्ति मनांत आणून एकक्षेत्र; एकज्ञान; एकज्ञेय; एक अज्ञान असे भाग केले. ९५२ आणि **अर्जुना !** इतकेंही करून हा अर्थ जर हातास चढत नसेल, तर तीच व्यवस्था पुन्हा एक वेळ सांगूं. ९५३ आतां चार भागही करित नाहीं, आणि चारही मिळून एकही ह्मणत नाहीं; तर आत्मा आणि अनात्मा हीं दोन्हीं सारखींच आहेत असें मानूं. ९५४ पण तूं येवढें कर. मी जें काय मागतों तेवढें दे. तें हें कीं, आपल्या स्वतःचें नांव कानाला ठेव." ९५५ ह्या **श्रीकृष्णा**च्या बोलण्यानें अर्जुनाच्या आंगावर रोमांच उभे राहिले. तेव्हां **देव** ह्मणाले "व: ! चांगला उत्सुक झाला खरा." ९५६ अशा प्रकारें उमाळा आला तो दाबून धरून **श्रीरंग** ह्मणतात "प्रकृति आणि पुरुष हे विभाग सांगतों, ऐक. ९५७ ज्या मार्गाला जगामध्यें योगी सांख्य असें ह्मणतात; ज्याच्या वर्णनासाठीं मी **कपिल** महामुनी झालों. ९५८ **आदिपुरुष (श्रीभगवान्) अर्जुनाला** ह्मणाले "तो प्रकृति पुरुषाचा निर्दोष विचार ऐक." ९५९

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ १९ ॥

[प्रकृतिं पुरुषं चैव] तरी पुरुष अनादि आथी । आणि तेंचिलागोनि प्रकृती । सवें सरिसी दिवोराती । जयापरी ॥ ९६० ॥ कां रूप नोहे वायां । परी रूपा लागली छाया । निकणें वाढे धनंजया । कणेसीं कोंडा ॥ ६१ ॥ [विद्ध्यनादी उभावपि] तैसीं जाण जेवटें । दोन्हीं इयें एकवटें । प्रकृतिपुरुषें प्रकटें । अनादिसिद्धें ॥ ६२ ॥ पैं क्षेत्र येणें नांवें । जें सांगीतलें आघवें । तेंचि एथ जाणावें । प्रकृति हे गा ॥ ६३ ॥ आणि क्षेत्रज्ञ ऐसें । जयातें ह्मणितलें असे । तो पुरुष हें अनारिसें । नें दोलों घेई ॥ ६४ ॥ इयें आनानें नांवें । परि निरूप्य आन नोहे । हें लक्षण न चुकावें । पुडतपुडती ॥ ६५ ॥ तरी केवळ हे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्तां । क्रिया नाम ॥ ६६ ॥ [विकारांश्च गुणांश्चैव] बुद्धि

१ मान्य करीत नाहीं. २ हालेना. ३ वर्णनासाठीं.

१ तेव्हांपासुन. २ कणाविरहित. ३ जुळीं, द्विभाग गव्हांसारखीं. ४ वेगळें. ५ न बोलतां.

इंद्रियें अंतःकरण । इत्यादि विकारभरण । आणि ते तीन्ही गुण । सत्वादिक ॥ ६७ ॥ [विद्धि प्रकृतिसंभवान्] हा आघवाचि मेळावा । प्रकृती जाहाला जाणावा । हेचि हेतु संभवा । कर्मांचिया ॥ ६८ ॥

"तर दिवसाबरोबर ज्याप्रमाणें रात्र असते, त्याप्रमाणें पुरुष हा अनादि असून त्याच्या बरोबर प्रकृति असते. ९६० किंवा अर्जुना! रूप हें कांहीं मिथ्या नव्हे. पण त्याच्या बरोबर छाया असते. धान्याबरोबर निःसत्त्व कोंडाही वाढतो. ९६१ त्याप्रमाणें ही प्रकृति आणि पुरुष हीं दोन्हीं जुळलेलीं,—एकमेकांस चिकटलेलीं—अनादिसिद्ध आहेत. ९६२ क्षेत्र ह्या नांवानें सारें आह्मीं प्रतिपादन केलें, तीच येथें प्रकृति ह्मणून समजावें. ९६३ आणि क्षेत्रज्ञ असें ज्याला ह्मटलें, तो पुरुष. ह्यांत भेद मानूं नको. ९६४ ह्यांना नांवें मात्र भिन्न भिन्न आहेत, पण स्वरूप भिन्न नाहीं. आतां हें लक्षण पुन्हा पुन्हा चुकूं नको. ९६५ तर अर्जुना! ही जी केवळ सत्ता तो पुरुष; आणि सार्‍या ज्या ज्या क्रिया, त्यांचें नांव प्रकृति. ९६६ बुद्धि, इंद्रियें, अंतःकरण इत्यादि विकार उठणें, सत्वादिक तिन्ही गुण, ९६७ हा सारा समुदाय ह्या प्रकृतींत गणावा. कर्माच्या उपपत्तीला कारण हीच." ९६८

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥२०॥

[कार्यकारणकर्तृत्वे] तेथ इच्छा आणि बुद्धी । घडवी अहंकारेंसीं आधीं । मग तिया लाविती वेधीं । कारणाच्या ॥ ६९ ॥ तेंचि कारण ठाकावया । जें सूत्र धरणें उपाया । तया नांव धनंजया । कार्य पैं गा ॥ ९७० ॥ आणि ईच्छामदाच्या थावीं । लागली मनातें उठवी । तें इंद्रियें रहाटवी । हें कर्तृत्व पैं गा ॥ ७१ ॥ [हेतुः प्रकृतिरुच्यते] ह्मणोनि तीन्ही या जाणा । कार्य कर्तृत्वकारणा । प्रकृती मूळ हें राणा । सिद्धांचा ह्मणे ॥ ७२ ॥ [पुरुष इति] एवं तिहींचेनि समवायें । प्रकृति कर्मरूप होये । परि जया गुणा वाढे आये । त्याचि सारिखी ॥ ७३ ॥ जें सत्वगुणें अधिष्ठिजे । तें सत्कर्म ह्मणिजे । रजोगुणें निपजे । मध्यम तें ॥ ७४ ॥ जे कां केवळ तमें । होती जियें कर्में । निषिद्धें अधर्में । जाण तियें ॥ ७५ ॥ ऐसेनि संतासंते । कर्म प्रकृतीस्तव होतें । तयापासोनि निवोळतें । सुख दुःख गा ॥ ७६ ॥ असंतीं दुःख उपजे । सत्कर्मी सुख निफजे । तया दोहींचा बोलिजे । भोग पुरुषा ॥ ७७ ॥ सुखदुःखें जंववरी । निफजती साचोकारीं । तंव प्रकृति उद्यम करी । पुरुष भोगी ॥ ७८ ॥ प्रकृतिपुरुषांची कुळवाडी । सांगतां असंगडी । जे आंवुली जोडी । आंवुला खाय ॥ ७९ ॥ आंवुलिया आंवुलिये । संगती ना सोये । कीं आंवुलि जग विये । चोज ऐका ॥ ९८० ॥

"त्यांतील इच्छा आणि बुद्धि ह्या आधीं अहंकार उत्पन्न करतात. आणि मग त्या कारणांच्या नादीं लावतात. ९६९ अर्जुना! तेंच कारण खरें करण्याकरितां, या उपायाचें सूत्र धरणें, त्याला कार्य असें नांव आहे. ९७० इच्छा ही मदाच्या पाठबळानें मनाला जागृत करते आणि तें इंद्रियांना प्रवृत्त करतें, तें कर्तृत्व होय." ९७१ ह्मणून सिद्धांचे राजे श्रीकृष्ण ह्मणतात "ह्या कार्यकारणकर्तृत्वाला प्रकृति ही मूळ आहे हें लक्ष्यांत ठेव. ९७२ अशा प्रकारें ह्या तिहींच्या योगानें प्रकृतिही क्रियारूप होते. परंतु ज्या गुणाचा जोर अधिक होतो, त्यासारखी होते. ९७३ सत्वगुणाच्या आश्रयानें जी क्रिया होते, तिला सत्कर्म असें ह्मणतात. रजोगुणाच्या आश्रयानें होते, तीस मध्यम असें ह्मणतात. ९७४ आणि जीं कर्मे केवळ तमाच्या आश्रयानें होतात, तीं कर्में निषिद्ध, अधर्मिक होत. समजलास? ९७५ अशा प्रकारें प्रकृतिपासून सत् किंवा असत् कर्म होतें. आणि त्यांपासून सुख किंवा दुःख ह्यांची निवड होते. ९७६ असत्कर्मानें दुःख होतें; सत्कर्मानें सुख उत्पन्न होतें. त्या दोहोंचा भोग पुरुषाला असें ह्मणतात. ९७७ खरोखर दुःखें व सुखें जोंपर्यंत उत्पन्न होतात तोंपर्यंत प्रकृति उद्योग करते, आणि पुरुष भोगतो. ९७८ ही प्रकृति पुरुषाची शेतकी मोठी चमत्कारिक आहे. कारण, स्त्री मिळविते, आणि पुरुष खातो. ९७९ ह्या पुरुषाचा आणि स्त्रीचा संग

१ कारण. २ कर्माच्या उत्पत्तीला. ३ नादीं. ४ उन्मत्तवेच्छा. ५ संयोगानें. ६ रक्षण, आश्रय.

१ अशास्त्रीय. २ निवडलें जातें. ३ कुणबावा, शेतकी. ४ अघटित. ५ स्त्री. ६ पति. ७ नवल.

**होण्यालाही मार्ग नाहीं. तरी ही स्त्री जग प्रसवते हें केवढें आश्चर्य आहे पेका." ९८०**

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।
कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥

[पुरुषः] जे अनंग तो पेंधा । निकवडा नुसधा । जीर्ण अतिवृद्धा । पासूनि वृद्ध ॥ ८१ ॥ तया आडनांव पुरुष । येऱ्हवीं स्त्री ना नपुंसक । किंबहुना एक । निश्चयो नाहीं ॥ ८२ ॥ तो अचक्षु अश्रवण । अहस्त अचरण । रूप ना वर्ण । नाम आथी ॥ ८३ ॥ [प्रकृतिस्थो हि] अर्जुना कांहींचि जेथ नाहीं । तो प्रकृतीचा भर्तार पाहीं । कीं भोगणें ऐसयाही । सुखदुःखाचें ॥ ८४ ॥ तो तरी अकर्ता । उदास अभोक्ता । परि इया पतिव्रता । भोगविजे ॥ ८५ ॥ जियेतें अळुमाळ । रूपागुणाचा चोळढाळ । ते भलतैसाही खेळ । लेखा आणी ॥८६॥ इये प्रकृती तंव । गुणमयी हेंचि नांव । किंबहुना सांवेव । गुण तेचि हे ॥८७॥ हे प्रतिक्षणीं नित्य नवी । रूपा गुणाचीच आघवी । जडातेंही माजवी । इयेचा माज ॥८८॥ नामें इये प्रसिद्धें । स्नेह इया स्निग्धें । इंद्रियें प्रवुद्धें । इयेचेनी ॥ ८९ ॥ कायि मन हें नपुंसक । कीं तें हिंडवी तिन्ही लोक । ऐसें ऐसें अलौकिक । करणें इयेचें ॥ ९९० ॥ हे भ्रमाचें महाद्वीप । हे व्याप्तीचें रूप । विकार उमप । इया केले ॥ ९१ ॥ हे कामाची मांडवी । हे मोहवनींची माधवी । इये प्रसिद्धचि दैवी । माया हें नाम ॥ ९२ ॥ हे वाङ्मयाची वाढी । हे साकारपणाची जोडी । प्रपंचाची धाडी । अभंग हे ॥ ९३ ॥ कळा येथूनि जालिया । विद्या इयेच्या केलिया । इच्छा ज्ञान क्रिया । वियाली हे ॥ ९४ ॥ हे नादांची टांकसाळ । हे चमत्काराचें वेळाउळ । किंबहुना सकळ । खेळ इयेचा ॥ ९५ ॥ जे उत्पत्ति प्रलय होत । ते इयेचे सायंप्रात । हें असो अद्भुत । मोहन हे ॥ ९६ ॥ हे अद्वयाचें दुसरें । हे निःसंगाचें सोयरें । हे निराळेंसि घरें । नांदत असे ॥ ९७ ॥ इयेतें येतुलावरी । सौभाग्यव्याप्ती थोरी । म्हणोनि तया आवरी । अनावरातें ॥ ९८ ॥ तयाच्या तंव ठायीं । निपटूनि कांहींचि नाहीं । [प्रकृतिजान् गुणान्] की तया आघवेंही । आपणचि होय ॥ ९९ ॥ तया स्वयंभाची संभूती । तया अमूर्ताची मूर्ती । आपण होय स्थिती । ठावो तया ॥ १००० ॥ तया अनांर्ताची आर्ती । तया पूर्णाची तृप्ती । तया अकुळाची जाती । गोत होय ॥ १ ॥ तया अचर्चाचें चिन्ह । तया अपाराचें मान । तया अमनस्काचें मन । बुद्धी ही होय ॥ २ ॥ तया निराकाराचा आकार । तया निर्व्यापाराचा व्यापार । निरहंकाराचा अहंकार । होऊनि ठाके ॥ ३ ॥ तया अनामाचें नाम । तया अजाचें जन्म । आपण होय कर्म । क्रिया तया ॥ ४ ॥ तया निर्गुणाचे गुण । तया अचरणाचे चरण । तया अश्रवणाचे श्रवण । अचक्षूचे चक्षू ॥ ५ ॥ तया भावातीताचे भाव । तया निरवयवाचे अवयव । किंबहुना होय सर्व । पुरुषाचें हे॥६॥ ऐसेनि इया प्रकृती । आपुलिया सर्वव्याप्ती । तया अविकारातें विकृती । माजी कीजे ॥ ७ ॥ तेथ पुरुषत्व जें असे । तें ये प्रकृतिदशे । चंद्रमा अंवसे । हरपला जेंवीं ॥ ८ ॥ विदेळ बहु चोखा । मीनलिया वाला एका । कस होय पांचका । जयापरी ॥ ९ ॥ कां साधूतें गोधळी । संचरोनि सूये मैळीं । नाना सुदिनाचा आभाळीं । दुर्दिन कीजे ॥१०१०॥ जेविं पय पशूच्या पोटीं । कां वन्हि जैसा काष्ठीं । गुंडूनि घेतला पटीं । रत्नदीप ॥ ११ ॥ राजा पराधीन जाहाला । कीं सिंह रोगें रुंधला । तैसा पुरुष प्रकृती आला । स्वतेजा मुके ॥ १२ ॥ जागता नर सहसा । निद्रा पाडूनि जैसा । स्वप्नींचिया सोसा । वश्य कीजे ॥ १३ ॥ [भुंक्ते] तैसें प्रकृति जालेपणें । पुरुषा गुण भोगणें । उदास अंतुरीगुणें । आतुडे जेवीं ॥ १४ ॥ [कारणं गुणसंगोऽस्य] तैसें अजा नित्या होये । आंगीं जन्ममृत्यूचे घाये । वाजती जंव लाहे । गुणसंगातें ॥ १५ ॥ परि तें ऐसें पंडुसुता । तातलें लोह पिटितां । जेवीं वन्हीसीचि घाता । बोलती तया ॥ १६ ॥ कां आंदोळलियां उदक । प्रतिभा होय अनेक । तें नानात्व म्हणती लोक । चंद्रीं जेवीं ॥ १७ ॥ दर्पणाचिया जवळिका । दुजेपण जैसें ये मुखा । कां कुंकुमें स्फटिका । लोहितत्व ये ॥ १८ ॥ तैसा गुणसंगमें । अजन्मा हा जन्मे । पावत ऐसा गमे । येऱ्हवीं नाहीं ॥१९॥ [सदसद्योनिजन्मसु] अधमोत्तम योनी । यासि ऐसिया मानीं । जैसा संन्यासी होय स्वप्नीं । अंत्यजादि जाती ॥ १०२० ॥ म्हणोनि केवळा पुरुषा । नाहीं होणें भोगणें देखा । एथ गुणसंगचि अशेखा । लागीं मूळ ॥२१॥

**"कारण तो निराकार; लंगडा; केवळ कफलुक; आणि म्हातारा तर इतका कीं, साऱ्या वृद्धांतला वृद्ध. ९८१ पुरुष हें त्याला फक्त**

१ निराकार. २ दरिद्री, लंगडा. ३ अकिंचन, शुद्ध. ४ किंचित्. ५ हालचाल. ६ गणतीस. ७ मूर्तिमंत. ८ उपमारहित. ९ मंडपी. १० वसंतऋतु. ११ देवाची. १२ वेदशास्त्रांची. १३ धाड. १४ नादब्रह्माची. १५ घर. १६ निराकारास. १७ येथवर. १८ आटोपते. १९ निखालस. २० उत्पत्ति. २१ रक्षणाचें स्थान, गति. २२ इच्छारहिताची.

१ अनिर्वचनीयाचें. २ परिमाण. ३ मनोविकाररहिताचें. ४ प्रकृति स्थितींत. ५ डाक, हीण. ६ उणास. ७ दुर्जन, भोंदु. ८ घालतो. ९ अभ्राच्छादित. १० गुंडाळून. ११ व्यापला. १२ सुखदुःख भोगावयास. १३ स्त्रीच्या योगानें. १४ जन्मरहिताला. १५ तापलेलें. १६ हालले असतां. १७ प्रतिबिंब. १८ आरक्तता. १९ मानतो, समजतो.

टोपण नांव. बाकी पाहूं गेलें तर, स्त्री किंवा नपुंसक. किंबहुना कोणताच निश्चय नाहीं ह्मटलें तरी चालेल. ९८२ त्याला डोळे नाहींत; त्याला कान नाहींत; हात नाहींत; पाय नाहींत; रूप नाहीं; वर्ण नाहीं. फक्त नांव मात्र आहे. ९८३ अर्जुना ! ज्याला कांहींच नाहीं, तो ह्या प्रकृतीचा ह्मणजे मायेचा भर्ता. समजलास ? पण अशालाही सुखदुःख भोगणें आहे. ९८४ तो तर अकर्ता; उदास; कांहीं भोगणारा नव्हे; पण त्याला ही पतिव्रता सारें भोगावयाला लावते. ९८५ तिला रूपाची आणि गुणाची थोडीशी हालचाल मात्र आहे. तेवढ्यानें ती नानाप्रकारचे खेळ करून दाखविते. ९८६ ह्या प्रकृतीला तर गुणात्मक असेंच नांव आहे. इतकेंच नव्हे, तर मूर्तिमंत गुण ते हीच. ९८७ ही प्रतिक्षणीं रूपागुणानें नवी होते. हिच्या माजानें जडालाही माज येतो. ९८८ हिलाच माया असें प्रसिद्ध नांव आहे. हिच्या मोहानेंच बुद्धिमान् इंद्रियेंही लंपट होतात. ९८९ मन हें तर नपुंसक. पण त्याला सुद्धां ही त्रैलोक्य धुंडावयास लावते. असें हिचें एकएक करणें अगाध आहे. ९९० भ्रमाचें मोठें बेट ही; व्याप्तीचें रूप ही; विकार तर ही अनेक उत्पन्न करते. ९९१ कामाचा मंडप ही; मोहवनाचा वसंत ऋतु ही; देवाची माया हें हिचें प्रसिद्ध नांव. ९९२ वेदशास्त्राची वाढ हिच्याचमुळें; साकारपणाची मैत्रीण हीच; प्रपंचाची अखंड धाड ही हीच. ९९३ हिच्यापासूनच साऱ्या कला उत्पन्न झाल्या. साऱ्या विद्या केलेल्या हिनेंच. इच्छा, ज्ञान, क्रिया ह्यांस प्रसवणारी हीच. ९९४ नादब्रह्माची टांकसाळ हीच; चमत्काराचें घर हीच; येवढेंच नव्हे तर, हा सारा खेळ हिचाच. ९९५ उत्पत्ति आणि प्रळय जे होतात, तीच हिची सांज सकाळ. हें असो. अशी ही अद्भुत मोहनी आहे. ९९६ ही अद्वयाची माळ; ही निःसंगाची सोयरी; आणि निराकाराच्या घरामध्यें नांदणारी अशी आहे. ९९७ येथपर्यंत तिच्या त्या थोर सौभाग्याची व्याप्ति आहे. ह्मणून अनावर असणारालाही ती आवरून धरते. ९९८ त्याच्या ठिकाणीं तर अजीबात कांहीं नाहीं. पण ही, त्याचें सारें आपण होऊन राहते. ९९९ त्या स्वयंभूचा जन्म; त्या निराकाराला आकार; त्याचा ठाव, रक्षणाचें स्थान आपणच होऊन राहते. १००० त्या इच्छारहिताची आपणच इच्छा होते; त्या परिपूर्णाची आपणच तृप्ति होते. त्याला कुळ नाहीं; तरी त्याचे जातिगोत हीच होते. १००१ तो अनिर्वचनीय आहे तरी, त्याचें लक्षण हीच होते; त्या अपाराला हीच सीमा करते; १००२ तो मानसरहित असतां, त्याचें मन व बुद्धि हीच होऊन रहाते. १००३ त्या नामरहिताचें नाम; त्या जन्मरहिताचें जन्म; त्याला क्रियाकर्मही आपणच होते. १००४ त्या निर्गुणाचे गुण; त्या पादरहिताचे पाद; त्या श्रवणरहिताचे श्रवण; अचक्षूचे चक्षु; १००५ त्या भावरहिताचे भाव; त्या निरवयवाचे अवयव; येवढेंच नव्हे तर त्या पुरुषाचें सर्वस्व हीच. १००६ अशा प्रकारें ही प्रकृति आपल्या सर्व व्याप्तीनें त्या अविकृताला विकृतीमध्यें पाडते. १००७ त्यांत जें पुरुषत्व असतें तें, अमावास्येला चंद्र हरवावा, त्याप्रमाणें प्रकृतीच्या स्थितींतच येऊन पोंचतें. १००८ एका वालभर शुद्ध सोन्यांत जर हीण पडलें, तर साराच कस जसा कमी होऊन जातो, १००९ किंवा साधूमध्यें दुर्जन शिरून तो जसा त्याला कलंक लावतो, किंवा अभ्र येऊन तें जसें सुदिनाचा दुर्दिन करून सोडतें, १०१० जनावराच्या पोटांत जसें दूध असतें; किंवा काष्ठाच्या पोटांत जसा अग्नि असतो; किंवा तेजःपुंज रत्न जसें पांघरुणांत लपेटून घ्यावें, १०११ परस्वाधीन झालेला राजा; किंवा रोगग्रस्त झालेला सिंह असतो; त्याप्रमाणें पुरुष प्रकृतीमध्यें आला कीं, तो निस्तेज होतो. १०१२ जाग्या असलेल्या पुरुषाला अकस्मात् निद्रा आणून स्वप्नांतील

सुखदुःखें भोगावयास लावावीत, १०१३ त्याप्रमाणें प्रकृतीपासून पुरुषाला गुणांचा उपभोग घेणें भाग पडतें. उदास असणारा पुरुष, स्त्रीच्या गुणांनीं जसा नाडतो, १०१४ त्याप्रमाणें जन्मरहित, गुणांची संगति असेपर्यंत आपल्या आंगावर जन्ममृत्यूचे घाय घेत असतो. १०१५ पण **अर्जुना!** तें असें. तापलेलें लोखंड ठोकूं लागलें ह्मणजे ते ठोके विस्तवावरच पडले असें ह्मणतात. त्याप्रमाणें, १०१६ किंवा उदक हाललें तर, अनेक प्रतिबिंबें होतात. तितकीं बिंबें चंद्रांत आहेत, असें लोक ह्मणतात. १०१७ आरसा जवळ असला ह्मणजे, तोंडाला जसें दुसरेपण प्राप्त होतें, किंवा कुंकुमानें स्फटिकाला जसा आरक्तपणा येतो, १०१८ त्याप्रमाणें हा जन्मरहित असूनही, गुणांच्या संगतीनें जन्म घेतो, असें वाटतें. येरवीं नाहीं. १०१९ संन्याशी स्वप्नामध्यें जसा आपल्याला अंत्यजादि जातीचा झालेलों आहें असें पाहतो, त्याप्रमाणेंच ह्यालाही अधम उत्तम योनि होतात असें समज. १०२० ह्मणून केवळ पुरुषाला होणेंही नाहीं, व भोगणेंही नाहीं, हें ध्यानांत ठेव. ह्या सर्वांसही सारी गुणांचीच संगत मूळ आहे." १०२१

उपद्रष्टाऽनुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥

[ उपद्रष्टा ] हा प्रकृतिमाजी उभा । परि जुंई[1] जैसा वोथंबा[2] । इया प्रकृती पृथ्वीनभा । तेतुला पाड ॥ २२ ॥ प्रकृतिसरितेच्या तटीं । मेरु होय हा किरीटी । माजि बिंबे परी लोटीं[3] । लोटों नेणें ॥ २३ ॥ [ अनुमंता ] प्रकृति होय जाये । हा तो असतचि आहे । [ भर्ता ] ह्मणोनि आब्रह्माचें होये । शासन[4] हा ॥ २४ ॥ प्रकृति येणें जिये । याचिया सत्ता जग वियें । इयालागीं इये । वरॅयितु[5] हा ॥ २५ ॥ अनंतें काळें किरीटी । जिया मिळती इया सृष्टी । तिया रिगती ययाच्या पोटीं । कल्पांतसमयीं ॥ २६ ॥ [ भोक्ता महेश्वरः ] हा महद्ब्रह्म गोसावी । ब्रह्मगोलकलाघवी[6] । अपारपणें मवी[7] । प्रपंचातें ॥ २७ ॥ [ परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन् ] पैं या देहामाझारीं । परमात्मा ऐसी जे परी । बोलिजे तें अवधारीं । ययातेंचि ॥ २८ ॥ [ पुरुषः परः ] अंगा प्रकृतिपरौता । एक आथी पंडुसुता । ऐसा प्रवाद तो तत्वता । पुरुष हा पैं ॥ २९ ॥

"हा प्रकृतीमध्यें उभा असतो. पण जुईच्या वेलाला खांब असल्याप्रमाणें असतो. ह्या प्रकृतीशीं त्याचा संबंध ह्मणशील तर, पृथ्वीच्या आणि आकाशाच्या संबंधाइतकाच. १०२२ **अर्जुना!** प्रकृतिरूप नदीच्या किनाऱ्याला हा मेरु होऊन राहतो. हा तिच्यामध्यें प्रतिबिंबरूपानें दिसतो. पण तिच्याबरोबर वाहून जात नाहीं. १०२३ प्रकृतिही उत्पन्न होते, व नाहींशी होते. हा असतो तसाच असतो. ह्मणून आब्रह्मपर्यंत संहार करणार हा. १०२४ ह्याच्या योगानें प्रकृति जन्मास येते. ह्याच्याच सत्तेनें जग उत्पन्न होतें. ह्मणून हा तिचा विस्तार. १०२५ **अर्जुना!** अनंत कालपर्यंत ज्या ह्या अनेक प्रकारच्या सृष्टि उत्पन्न होतात, त्या कल्पांतसमयीं ह्याच्या पोटांत शिरतात. १०२६ हा महद्ब्रह्माचा धनी; ब्रह्मगोलाचा सूत्रधार; प्रपंचाची अपारपणानें गणना करतो. १०२७ तसेंच ह्या देहामध्यें परमात्मा आहे असें ह्मणतात, तोही हाच. हें लक्ष्यांत ठेव. १०२८ आणखी **अर्जुना!** प्रकृतीच्या पलीकडे एक पुरुष असल्याबद्दल जी चर्चा चालते, तो पुरुष हाच." १०२९

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २३ ॥

[ य एवं वेत्ति पुरुषं ] जो निखळपणें येणें । पुरुषा यया जाणे । [ प्रकृतिं च गुणैः सह ] आणि गुणाचें[3] करणें । प्रकृतीचें[4] तें ॥ १०३० ॥ हें रूप हे छाया । पैल जळ हे माया[5] । ऐसा निवाड धनंजया । जेवीं कीजे ॥ ३१ ॥ तेणें पाडें अर्जुना । प्रकृतिपुरुषविवेचना । जयाचिया मना । गोचर जाहाली ॥ ३२ ॥ [ सर्वथा वर्तमानोऽपि ] तो शरीराचेनि मेळें । करू कां कर्में सकळें । परि आकाश धुंई[6] न मैळे । तैसा असे ॥ ३३ ॥ [ न स भूयोऽभिजायते ] आंधिलेनि

१ जुईच्या वेलाला. २ खांब. ३ प्रवाहानें, लोंढ्यानें. ४ संहारकर्ता. ५ भर्ता. ६ सूत्रधार. ७ गणना करतो.

१ चर्चा. २ शुद्धपणानें. ३ गुणकर्म. ४ प्रकृतीच्या योगानें. ५ भ्रम, मृगजळ. ६ धुळीनें. ७ प्राप्त झालेल्या.

देहें । जो न घेपे देहमोहें । देह गेलिया नोहे । पुनरपि तो ॥ ३४ ॥ ऐसा तया एक । प्रकृतिंपुरुषविवेक । उपकार अलौकिक । करी पैं गा ॥ ३५ ॥ परि हाचि अंतरीं । विवेक भानूचियापरि । उदैजे ते अवधारीं । उपाय बहुत ॥ ३६ ॥

"अशा प्रकारें ह्या पुरुषाला जो शुद्धपणानें जाणतो; आणि साऱ्या गुणकर्मांचें मूळ प्रकृति हें समजतो; १०३० अर्जुना! हें रूप आणि छाया; जळ तें पलीकडचें; आलिकडचें तें मृगजळ; ही जशी निवडानिवड करावी, १०३१ त्याप्रमाणें अर्जुना! प्रकृति आणि पुरुष ह्यांचा विचार ज्याच्या मनांत ठसला, १०३२ तो शरीराच्या संगतीनें सारीं कर्में करीत असला तरी, धुळीनें जसें आकाश मळत नाहीं, १०३३ देह असला तरी, जो देहाच्या मोहानें कशाचाही स्वीकार करीत नाहीं, आणि देह गेल्यावर जो पुनरपि जन्मास येत नाहीं, १०३४ इतका प्रकृति पुरुषाचा विचार, त्याच्यावर अलौकिक उपकार करतो. १०३५ पण त्याच विचाराचा अंतःकरणांत सूर्याप्रमाणें उदय होईल, असे अनेक उपाय आहेत. ते ऐक." १०३६

ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ।
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चाऽपरे ॥ २४ ॥

[ केचिदात्मानमात्मना ] कोणी एक सुभटा । विचाराचा आगिटा[1] । आत्मानात्माकिटा[2] । पुटें देउनी ॥ ३७ ॥ छत्तीसही वांनी[3] भेद । तोडोनि निर्विवाद । निवडिती शुद्ध । आपणपें ॥ ३८ ॥ [ ध्यानेनात्मनि पश्यंति ] तया आपणपयाच्या पोटीं । आत्मध्यानाचिया दिठी । देखती गा किरीटी । आपणपेंचि ॥ ३९ ॥ [ अन्ये सांख्येनेति ] आणि पैं दैवैंवगें[4] । चित्त देती सांख्ययोगें । एक ते अंगेलगें[5] । कर्माचेनी ॥ १०४० ॥ यया चतुर्विध प्रकारें । जे मज मिनले पुरे । तयांसि कांहीं नुरे । भोक्तव्य गा ॥ ४१ ॥

"हे वीरश्रेष्ठा ! कितीएक विचाराच्या आगीमध्यें आत्मानात्मशंकांना पुटें देऊन, १०३७ छत्तीस कसांचे भेद निर्विवाद तोडून आपल्याला अगदीं शुद्ध करतात. १०३८ आणखी अर्जुना ! त्या आपल्यामध्येंच अध्यात्मज्ञानाच्या दृष्टीनें आपणासच पहातात. १०३९ कित्येक दैवयोगानें कर्माच्या आश्रयानें सांख्यभोगांत लक्ष्य ठेवतात. १०४० अशा चार प्रकारांनीं जे पूर्ण मत्स्वरूप बनले, त्यांना भोगावयाचें कांहीं उरत नाहीं." १०४१

अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वान्येभ्य उपासते ।
तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥२५॥

[ अन्ये त्वेवमजानंतः ] येणें येणें प्रकारें । निस्तरती साचोकारें । हें भव कोंडरें । आघवेंचि ॥ ४२ ॥ परि ते करिती ऐसें । अभिमान दवडूनि देशें । एकाचिया विश्वासें । टेंकती[3] बोला ॥ ४३ जे हिताहित देखती । हांनिकणवा[4] घेपती । पुसोनि शीण हरिती । देती सुख ॥ ४४ ॥ [ श्रुत्वान्येभ्य उपासते ] तयाचेनि मुखें जें निघे । तेतुलें आदरें चांगें । ऐकोनियां आंगें । मनें होती ॥ ४५ ॥ [ श्रुतिपरायणाः ] तया[6] ऐकणें याचेनि नांवें । ठेवँती गा आघवें । तया अक्षरांसी जीवें । लोण करिती ॥ ४६ ॥ [ तेऽपीति ] तेही अंतीं कपिध्वजा । इया मरणार्णवसमाजा । पासूनि निघती वोजा । गोमटेया ॥ ४७ ॥ ऐसैसे हे उपाये । बहुवस एथें पाहें । जाणावया होये । एकी वस्तु ॥ ४८ ॥ आतां पुरे हें बहुत । पैं सर्वार्थांचें मथित । सिद्धांतनवनीत । देऊं तुज ॥ ४९ ॥ येतुलेनि पंडुसुता । अनुभव लांहाणा आयिता । येर तंव तुज होतां । सायास नाहीं ॥ १०५० ॥ ह्मणोनि ते बुद्धि रचूं । मतवाद खांचूं[11] । सोलींव निर्वचूं[12] । फलितार्थचि ॥ ५१ ॥

"अशा अशा तऱ्हेनें हें संसाराचें सारें काहूर निखालस दूर करतात. १०४२ पण तें करतांना अभिमान दूर सोडून देतात, आणि एकाच्याच शब्दावर विश्वास ठेवतात. १०४३ ज्यांना हिताहित समजतें, दुसऱ्याचा नाश पाहून कळवणारे, विचारपूस करून जे शीण घालवितात, व सुख देतात. १०४४ अशांच्या मुखांतून जितकें निघेल, तितकें आदरानें मान्य करतात. आणि तें ऐकून कायावाचामनानें त्यास अनुसरतात. १०४५ त्याचें ऐकावयाचें तर सारे व्यापार एकीकडे ठेवतात. आणि त्यांच्या अक्षराला प्राणाचें लिंबलोण करतात. १०४६

१ आगटींत, शेगडींत. २ आत्मानात्म डाकाला. ३ कसाचे. ४ दैवयोगानें. ५ आश्रयानें.

१ खरेपणानें. २ भ्रांति, भय. ३ आश्रय करतात. ४ दया. ५ चांगलें. ६ ते. ७ वंद करून. ८ ओंवाळणी. ९ मृत्युरूप समुद्रसमुदायापासून. १० प्राप्त, लाभ. ११ खंडण करूं. १२ सांगूं.

हे कपिध्वजा! असे असतात ते, ह्या मृत्युरूप समुद्रसमुदायापासून उत्तम रीतीनें पार पडतात. १०४७ तीं एक वस्तु जाणावयाला असे असे अनेक उपाय आहेत. १०४८ आतां ह्या पाल्हाळ पुरे. ह्यापुढें साऱ्या अर्थाच्या मथनापासून निघालेलें नवनीतच तुला देऊं. १०४९ असें केलें ह्मणजे अर्जुना! आयताच तुला अनुभव येईल, आणि मग कशाचेच सायास पडणार नाहींत. १०५० ह्मणून आतां तिकडे बुद्धि लावूं. मतवाद असेल तो सोडून देऊं. आणि अस्सल फलितार्थच सांगूं." १०५१

यावत्संजायते किंचित्सत्वं स्थावरजंगमम् ।
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २६ ॥

[ क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात् ] तरी क्षेत्रज्ञ येणें बोलें। तुज आपणपें जें दाविलें। आणि क्षेत्रही सांगीतलें। आघवेंचि ॥ ५२ ॥ तया येरयेरांच्या मेळीं। [ यावत्संजायते इति ] होइजे भूतीं सकळीं। अनिलसंगें सलिलीं। कल्लोळ जैसे ॥ ५३ ॥ कां तेजा आणि [1]उर्वरा। भेटी जालिया वीरा। मृगजळाचिया पूरा। रूप होय ॥५४॥ नाना [2]धाराधरधारीं। [3]झळंबलिया वसुंधरी। उठिजे जेविं अंकुरीं। नानाविधीं ॥ ५५ ॥ तैसें चराचर आघवें। जें कांहीं जीव एणें नांवें। [ तद्विद्धि भरतर्षभ ] तें तों उभययोगें संभवे। ऐसें जाण ॥ ५६ ॥ इयालागीं अर्जुना। [4]क्षेत्रज्ञा प्रधाना-। पासूनि न होती भिन्ना। भूतव्यक्ति ॥ ५७ ॥

"तर अशा रीतीनें क्षेत्रज्ञ ह्मणजे काय तें तुला दाखवून दिलें. आणि क्षेत्रही सारें सांगितलें. १०५२ ह्या परस्परांच्या ऐक्यानें, वाऱ्याच्या योगानें पाण्याच्या जशा लाटा होतात, त्याप्रमाणें सर्व प्राणिमात्र उत्पन्न होतात. १०५३ किंवा हे वीरा! ऊन्ह आणि माळजमीन ह्यांची गांठ पडली ह्मणजे जसा मृगजळाचा पूर उत्पन्न होतो, १०५४ किंवा पर्जन्याच्या धारांनीं पृथ्वी भिजली ह्मणजे ज्याप्रमाणें नानाप्रकारचे अंकुर उद्भवतात, १०५५ त्याप्रमाणें हें सारें चराचर–ज्याला जीव असें नांव आहे–तें ह्या दोहोंच्या संयोगानें होतें, हें ध्यानांत ठेव. १०५६ ह्याकरितां अर्जुना! मुख्य क्षेत्रज्ञापासून व्यक्ति कांहीं भिन्न नाहींत." १०५७

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥ २७ ॥

[ समं सर्वेषु भूतेषु ] पैं [1]पटत्व तंतू नव्हे। तरि तंतूचि तें आहे। ऐसें खोलीं डोळां पाहें। ऐक्य हें गा ॥ ५८ ॥ भूतें आघवींचि होती। एकाचीं एक आहाती। परि पैं भूत[2]प्रतीती। वेगळाली असे ॥ ५९ ॥ यांचीं नामेंही आनानें। [3]अनारिसीं वर्तनें। वेषही [4]सिनाने। आघवेयांचे ॥ १०६० ॥ ऐसें देखोनि किरीटी। भेद [5]सुंसी हन पोटीं। तरि जन्माचिया कोटि। न [6]लाहसी निघों ॥ ६१ ॥ पैं [7]नानाप्रयोजनशीळें। दीर्घ वक्रें वर्तुळें। होती एकीचींच फळें। [8]तुंबिणीयेचीं ॥६२॥ होतु कां उजू वांकुडे। परि बोरीचे हें न मोडे। तैसीं भूतें अवघडें। परि वस्तु [9]उजू ॥ ६३ ॥ [10]अंगारकणीं बहुवसीं। उष्णता समान जैसी। [ तिष्ठंतं परमेश्वरं ] तैसा नाना जीवराशीं। परेश असे ॥ ६४ ॥ गगनभरी धारा। परि पाणी एकचि वीरा। तैसा या भूताकारा। सर्वांगीं तो ॥ ६५ ॥ हे भूतग्राम विषम। परि वस्तु ते एथ सम। घटमठीं व्योम। जियापरि ॥ ६६ ॥ [ विनश्यत्स्वविनश्यंतं ] हा नाशतां भूताभास। एथ आत्मा तो अविनाश। जैसा [11]केयूरादिकीं कस। सुवर्णाचा ॥ ६७ ॥ [ यः पश्यति ] एवं [12]जीवधर्महीन। जो जीवेंसीं अभिन्न। देखे तो [13]सुनयन। ज्ञानियांमाजी ॥ ६८ ॥ [ स पश्यति ] ज्ञानाचा डोळ डोळसां। माजि डोळस तो वीरेशा। हे स्तुति नोहे बहुवसा। भाग्याचा तो ॥६९॥

"पटत्व कांहीं तंतु नव्हे. तरी तें तंतुरूपच आहे. तसें ह्या दोहोंचें ऐक्य आहे तें बारीक नजरेनें पहावें. १०५८ सारे उत्पन्न होणारे प्राणिमात्र एकाचेच झालेले असतात, तरी जीवभाव प्रत्येकाचे वेगवेगळे आहेत. १०५९ त्यांचीं नामेंही निरनिराळीं, वर्तनही भिन्नभिन्न, आणि वेषही अनेकाचे अनेक तऱ्हेचे. १०६० अर्जुना! हें पाहून जर पोटामध्यें भेदभाव धरशील, तर कोट्यावधि जन्मानेंही मुक्त होणार नाहींस. १०६१ एकाच भोंपळीच्या वेलीला वाटोळे,

१ माळजमिनीवर. २ पर्जन्यधारांनीं. ३ पृथ्वी भिजली असतां. ४ पुरुषापासून.

१ वस्त्रपण. २ भूतभाव, जीवभाव. ३ भिन्नभिन्न. ४ तऱ्हेतऱ्हेचे. ५ धरशील. ६ निघतां येणार नाहीं. ७ अनेक कार्योपयोगी. ८ भोंपळीचीं. ९ सरळ. १० निखाऱ्यांत. ११ बाहुभूषणांच्या ठाईं. १२ जीवधर्मरहित जें ब्रह्म. १३ डोळस.

लांबट, वांकडेतिकडे भोंपळे लागून ते अनेक कार्यांना उपयोगीं पडतात. १०६२ सरळ असूं देत कीं, वांकडे असूं देत; ते कांहीं बोरींच्या फळांत मोडावयाचे नाहींत. त्याप्रमाणें प्राणिमात्र वांकडेतिकडे आहेत तरी, ज्यापासून ते झाले आहेत, ती वस्तु अगदीं सरळच आहे. १०६३ निखारें अनेक असले तरी, त्यांमध्यें उष्णता सारखीच असते. त्याप्रमाणें अनेक जीवांच्या समुदायामध्यें परमात्मा सारखाच आहे. १०६४ अर्जुना! धारा जरी आकाशभर असल्या, तरी पाणी एकच. त्याप्रमाणें ह्या प्राणिमात्रांच्या आंगामध्यें एक तोच आहे. १०६५ हे प्राणिमात्रांचे समुदाय निरनिराळे आहेत, परंतु घागरींतलें आणि घरांतलें आकाश जसें सारखें, त्याप्रमाणें त्यांतील एक वस्तु–तत्त्व–परब्रह्म–सारखेंच आहे. १०६६ पोची वगैरे दागिन्यांमध्यें सुवर्णाचा कस जसा एक, त्याप्रमाणें ह्या प्राणिमात्रांचा आकार नाहींसा झाला तरी, आत्मा तो अविनाशच आहे. १०६७ अशा प्रकारें जीवधर्मरहित जें ब्रह्म, तें जीवापासून भिन्न नाहीं, असें जो पाहतो, तोच ज्ञानीजनांमध्येंही डोळस होय. १०६८ हे वीरश्रेष्ठा! तो ज्ञानाचा डोळा–डोळसांतील डोळस–ही कांहीं अतिशयोक्ति नव्हे. तर त्याचें भाग्य फारच मोठें. " १०६९

समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम्॥२८

[ न हिनस्त्यात्मनात्मानं ] हे गुणेंद्रिय धोकटी । देह धातूंची त्रिकुटी । पांचमेळावा वोखटी । दारुण हे ॥१०७०॥ हे उघड पांचवेउली । पंचधा आंगीं लागली । जीवपंचाननां सांपडली । हरिणकुटी हे ॥ ७१ ॥ ऐसा असोनि इये शरीरीं। कोण नित्यबुद्धीची सुरी । अनित्यभावाच्या उदरीं । दाटीचिना ॥ ७२ [ ततो याति परां गतिं ] परि इये देहीं असतां । जो नयेचि आपणया घाता । आणि शेखी पंडुसुता । तेथंचि मिळे ॥ ७३ ॥ जेथ योगज्ञानाचिया प्रौढी । वोलांडूनियां जन्मकोडी । न निगों ईंया भाषा बुडी । देती योगी ॥ ७४ ॥ जें आकाराचें पैल तीर । जें नादाची पैल मेरें । तुर्येचें माजघर । परब्रह्म जें ॥ ७५ ॥ मोक्षासगट गती । जेथें येती विश्रांती । गंगादि अपांपती । सरिता जेवीं ॥७६॥ तें सुख येणेंचि देहें । पायपाखाळणिया लाहे । [ सममिति ] जो भूतवैषम्यें नोहे । विषमबुद्धी ॥ ७७ ॥ [ समवस्थितमीश्वरं ] दीपांचिया कोडीं जैसें । एकचि तेज सरिसें । तैसा जो असतचि असे । सर्वत्र ईश ॥ ७८ ॥ ऐसेनि समत्वें पंडुसुता । जिये जो देखतसाता । तो मरणा आणि जीविता । नागवे फुडा ॥ ७९ ॥ ह्मणोनि तो दैवागळा । वानीत असों वेळोवेळां । जे साम्यसेजे होळा । लागला तया ॥ १०८० ॥

१ पिशवी. २ त्रिधातु–वात, कफ, पित्त. ३ पांच नांग्यांची इंगळी. ४ जीवरूप वाघास. ५ सांपळा. ६ भोकसीत नाहीं. ७ ह्या प्रतिज्ञेनें.

" ही गुणेंद्रियांची धोकटी देहधातूंची त्रिपुटी ( कफ, वात, पित्त ) आणि पांचांची गट्टी महाभयंकर! १०७० ही पांच नांग्यांची इंगळी पांच प्रकारें आंगास चावते. आणि जीवरूप पंचाननाला धरणारा, हा तर सांपळा आहे. १०७१ असा हा ह्या शरिरांत असून अनित्यभावाच्या पोटांत नित्यबुद्धीची सुरी कोणीच खुपशीत नाहीं. १०७२ अर्जुना! पण ह्या देहांत असतांना जरी तो आपला घात करीत नाहीं, तरी शेवटीं तो तेथेंच मिळतो. १०७३ ज्यामध्यें योगी हे ज्ञानाच्या प्रौढीनें कोट्यावधि जन्म ओलांडून आह्मी निघणार नाहीं असें ह्मणून बुड्या देतात; १०७४ आकाराचें जें पैलतीर; नादाची पलीकडची कडा; आणि तुर्यावस्थेचें माजघर; जें केवळ परब्रह्म, १०७५ समुद्राकडे गंगादिक नद्या येतात, त्याप्रमाणें मोक्षासहवर्तमान साऱ्या गति जेथें विश्रांतीला येतात, १०७६ तें सुख गुरुभक्तीच्या योगेंकरून याच देहानें प्राप्त होतें. प्राण्यांचे भिन्नभिन्न प्रकार पाहून ज्याच्या बुद्धीमध्यें भेद होत नाहीं, १०७७ कोट्यावधि दिवे असले तरी, त्यांतील तेज जसें एकासारखें एक, त्याप्रमाणें जो निरंतर सर्वत्र सारखी सत्ता करतो; १०७८ अर्जुना! अशा प्रकारें एकत्वानें पाहत असून जो वागतो, तो खरोखर जन्ममृत्यूंत सांपडत नाहीं; १०७९ ह्मणून तो मोठा भाग्यवान् होय. आणि त्या-

१ कडा. २ समुद्राप्रत. ३ पादप्रक्षालनानें. ४ पहात असतां. ५ न सांपडे. ६ खचित.

करितांच त्याचें आह्मी वारंवार वर्णन करतों. कारण, साम्याच्या शेजेवर त्याचा डोळा लागलेला असतो." १०८०

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ २९ ॥

[प्रकृत्यैवेति सचतुरक्षरार्धं] आणि मनोबुद्धिप्रमुखें । कर्मेंद्रियें अशेखें । करी प्रकृतीचि हें देखे । साचें जो गा ॥ ८१ ॥ [तथात्मानमकर्तारं] घरींचीं राहटती घरीं । घर कांहीं न करी । अभ्र धांवे अंबरीं । अंबर तें उगें ॥ ८२ ॥ तैसी प्रकृति आत्मप्रभा[1] । खेळे गुणीं विविधारंभा[2] । येथ आत्मा तो वोथंबा[3] । नेणे कोण ॥ ८३ ॥ [स पश्यति] ऐसेनि येणें निवाडें । जयाच्या जीवीं उजिवडे[4] । अकर्तयातें[5] फुडें । देखिलें तेणें ॥ ८४ ॥

"आणखी मनोबुद्धि आदिकरून सर्व ज्ञानेंद्रियें, आणि झाडून सारीं कर्मेंद्रियें, जें जें करितात तीच प्रकृति, हें जो निश्चयानें समजतो. १०८१ घरांतील माणसें घरांत वागत असतात; परंतु घर कांहींच करीत नाहीं. अभ्र आकाशामध्यें धांवत असतें, पण आकाश स्वस्थच असतें. १०८२ त्याप्रमाणें प्रकृतीही आत्म्याच्या प्रभावानें खेळते; गुणांनीं अनेक कार्यारंभ करते; येथें आत्मा हा आश्रयस्तंभ असतो. तो कोणालाच ओळखत नाहीं. १०८३ ह्याचा स्पष्टपणें ज्याच्या अंतःकरणांत प्रकाश पडतो, त्यानें अकर्त्या आत्म्याला स्पष्ट पाहिलें ह्मणून समजावें." १०८४

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥ ३० ॥

[यदेति त्रयः पादाः] येन्हवीं तैंचि अर्जुना । होइजे ब्रह्मसंपन्ना । जैं या भूताकृती भिन्ना । दिसती एकी ॥ ८५ ॥ लहरी जैसिया जळीं । परमाणुकणिका स्थळीं । रश्मीकरमंडळीं[6] । सूर्याच्या जेवीं ॥ ८६ ॥ ना तरी देहीं अवेव । मनीं आघवेचि भाव । विस्फुलिंग[7] सर्व । वन्हीं एकीं ॥ ८७ ॥ तैसे भूताकारएकाचे । हें दिठी रिगे जैं साचें । [ब्रह्म संपद्यते तदा] तैंचि ब्रह्मसंपत्तीचें । तारूं लागे ॥ ८८ ॥ मग जया तयाकडे । ब्रह्मचि दिठी उघडे । किंबहुना जोडे । अपार सुख ॥ ८९ ॥ येतुलेनि तुज पार्था । प्रकृतिपुरुषव्यवस्था । ठायें[1] ठावो प्रतीतिपथा । माजि जाइली ॥ १०९० ॥ अमृत जैसें ये चुळा । कां निधान देखिजे डोळां । तेतुला जिव्हाळा । मानावा हा ॥ ९१ ॥ जी जाहालिये प्रतीती । घर बांधणें जें चित्तीं । तें आतां नां सुभद्रापती । इयावरी ॥ ९२ ॥ तरि एक दोनी ते बोल । बोलिजती सखोल । देईं मनातें वोल[2] । मग ते घेईं ॥ ९३ ॥ ऐसें देवें ह्मणितलें । मग बोलो आदरिलें । तेथें अवधानाचेंचि केलें । सर्वांग येरें ॥ ९४ ॥

"बाकी **अर्जुना!** ह्या प्राणिमात्रांच्या भिन्न भिन्न असणाऱ्या प्रकृति जेव्हां एकरूपानें दिसूं लागतात, त्याच वेळीं ब्रह्मस्वरूप प्राप्त होतें. १०८५ जळामध्यें जशा लाटा; जमिनीमध्यें जसे परमाणू; सूर्यमंडळांत जसे किरण, १०८६ किंवा देहामध्यें जसे अवयव; मनामध्यें जसे सारे भाव; एकाच विस्तवामध्यें जशा ठिणग्या; १०८७ त्याप्रमाणें हे प्राण्याचे सर्व आकार एकाचे आहेत, हें जेव्हां दृष्टीमध्यें बिंबतें, तेव्हांच ब्रह्मसंपत्तीचें तारूं सांपडतें. १०८८ मग जिकडे तिकडे दृष्टीपुढें ब्रह्मच दिसूं लागतें. येवढेंच नव्हे, तर अपार सुख प्राप्त होतें. १०८९ **अर्जुना!** येवढ्यानें प्रकृति पुरुषाची व्यवस्था यथार्थ रीतीनें तुझ्या अनुभवास येईल. १०९० अमृत जसें चुळीमध्यें यावें; किंवा डोळ्यांनीं जसा ठेवा पहावा; तितका हा अपूर्व लाभ मान. १०९१ **अर्जुना!** हा अनुभव आल्यानंतर, मनामध्यें इमारत रचण्याचा विचार ह्याउपर राहणार नाहीं. १०९२ तरी एक दोन शब्द जरा खोल आहेत, ते सांगतों. पण त्याला आपलें मन ओलीस ठेव, आणि मग घे." १०९३ ह्याप्रमाणें देवांनीं सांगितलें आणि मग बोलण्यास प्रारंभ केला. तेव्हां **अर्जुनानें** आपलें सारें आंगच लक्ष्य करून सोडलें. १०९४

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।
शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥

[परमात्मायं] तरि परमात्मा ह्मणिपे । तो ऐसा जाण स्वरूपें । जळीं जळे न लिंपे । सूर्य जैसा ॥ ९५ ॥ कां जे जळा आदी पाठीं । तो असतची असे किरीटी । माजि बिंबे तें

---

१ आत्म्याच्या प्रकाशानें. २ अनेक कार्यारंभांस. ३ आश्रयस्तंभ. ४ प्रकाशतें. ५ अकर्त्या आत्म्याला. ६ किरणमय सूर्यमंडळांत. ७ ठिणग्या.

१ तत्काळ, वास्तविक. २ गहाण, तारण.

दृष्टी । आणिकांचिये ॥ ९६ ॥ [शरीरस्थोऽपि कौंतेय] तैसा आत्मा देहीं । आथि ह्मणिपे हें कांहीं । साचें तरी नाहीं । तो जेथिंचा तेथें ॥ ९७ ॥ आरिसामुख जैसें । बिंबलीया नाम असे । देहीं वसणें तैसें । आत्मतत्त्वा ॥ ९८ ॥ तया देहा ह्मणती [1]भेटी । हे सपायी निर्जीव गोठी । वारिया वाळुवे गांठी । केंही आहे ॥ ९९ ॥ आगी आणि कापुसा । दोरा [3]ओवावा कैसा । केउता सांदा आकाशा । पृथ्वीयेसी ॥११००॥ एक निघे पूर्वेकडे । एक तें पश्चिमेकडे । तिये भेटीचेनि पाडें । संबंध हा ॥ १ ॥ उजियेडा आणि आंधारेया । जो पाड मृता [4]उभया । तोचि गे आत्मया । देहा जाणा ॥ २ ॥ रात्री आणि दिवसा । कनका आणि कापुसा । अपाड कां जैसा । तैसाचि यासी ॥ ३ ॥ देह तंव पांचांचें जालें । हें कर्मांचे [5]गुणीं गुंथलें । भंवतसे चाकीं [6]सूदलें । जन्ममृत्यूच्या ॥ ४ ॥ हें काळानळाच्या कुंडीं । घातली लोणियाची उंडी । माशी पांख पाखडी । तंव हें सरे ॥ ५ ॥ हें विंपायें आगींत पडे । तरि भस्म होऊनि उडे । जाहालें श्वाना वरपडें । तरि ते विष्टा ॥ ६ ॥ या चुके दोहीं काजा । तरि होय कृमींचा पुंजा । हा परिणाम कपिध्वजा । [9]कश्मल गा ॥ ७ ॥ या देहाची हे दशा । [अनादित्वात्] आणि आत्मा तो ऐसा । पैं शुद्ध नित्य [10]अपैसा । अनादिपणें ॥ ८ ॥ [निर्गुणत्वात्] सकळ ना निष्कळ । अक्रिय ना क्रियाशीळ । कृश ना स्थूळ । निर्गुणपणें ॥ ९ ॥ साभास ना निराभास । प्रकाश ना अप्रकाश । अल्प ना बहुवस । अरूपपणें ॥ १११० ॥ रिता ना भरित । रहित ना सहित । मूर्त ना अमूर्त । शून्यपणें ॥ ११ ॥ आनंद ना निरानंद । एक ना विविध । मुक्त ना बद्ध । आत्मपणें ॥ १२ ॥ येतुला ना तेतुला । आइता ना रचिला । बोलता ना उगला । अलक्षपणें ॥ १३ ॥ [अव्यय] सृष्टीचा [11]होणां न रचे । सर्वसंहारें न वेंचे । आथी नाथी या दोहींचें । [12]पंचत्व हा ॥ १४ ॥ [13]मवे ना चर्चे । वाढे ना खांचे । विटे ना वेंचे । अव्ययपणें ॥ १५ ॥ एवंरूप पैं आत्मा । देही जें ह्मणती प्रियोत्तमा । तें मठाकारें व्योमा । नाम जैसें ॥ १६ ॥ [न करोति] तैसें तयाचिये [14]अनुस्यूती । होती जाती देहाकृती । तो घे ना सांडी सुमती । जैसा तैसा ॥ १७ ॥ अहोरात्रें जैसीं । येती जाती आकाशीं । आत्मसत्ते तैसीं । देहें जाण ॥ १८ ॥ ह्मणोनि इये शरीरीं । कांहीं करवी ना करी । [15]आयताही व्यापारीं । [16]सज्ज न होय ॥ १९ ॥ [न लिप्यते] यालागीं स्वरूपें । उणा पुरा न घेपे । हें असो तो न लिंपे । देहीं देहा ॥ ११२० ॥

" पाण्यामध्यें असलेला सूर्य जसा पाण्यानें भिजत नाहीं; त्याप्रमाणें परमात्मा असें ज्याला ह्मणतात, त्याचें स्वरूप आहे हें लक्ष्यांत ठेव. १०९५ किंवा **अर्जुना!** तो जळाच्या खालीं व वर नेहेमींचाच आहे. आंत बिंबलेला दिसतो, तो दुसऱ्याच्या दृष्टीनें. १०९६ तसें आत्मा देहांत आहे, असें ह्मणणेंही कांहीं खरें नाहीं. कारण, तो जेथल्या तेथेंच आहे. १०९७ ज्याप्रमाणें आरशामध्यें मुखाची प्रतिमा पडली, ह्मणजे तिला नांव असतें. त्याप्रमाणें आत्मतत्त्वाचें देहामध्यें राहणें आहे. १०९८ त्याला देहाचा संबंध आहे असें ह्मणतात, ही अगदीं निखालस खोटी गोष्ट. वाऱ्याची आणि वाळवेची गांठ कोठें आहे? १०९९ आगीला कापसाचा दोरा. कसा घालावा? आकाशाला आणि पृथ्वीला सांधा कसला? ११०० एकानें पूर्वेकडे निघावें; आणि एकानें पश्चिमेकडे निघावें; ह्मणजे त्यांच्या भेटी इतकाच ह्यांचा संबंध आहे ह्मणून समजावें. ११०१ आंधेरामध्यें आणि उजेडामध्यें; जित्यामध्यें आणि मेल्यामध्यें जितकें अंतर, तितकेंच देहामध्यें आणि आत्म्यामध्यें अंतर आहे. ११०२ रात्र आणि दिवस; सोनें आणि कापूस; ह्यामध्यें जितका भेद, तितकाच ह्यांच्यामध्यें. ११०३ देह हा पंचतत्वांचा झालेला आणि कर्मांच्या गुणांनीं बांधलेला असून त्याला जन्ममृत्यूच्या चक्रावर घातल्यामुळें, तो फिरत राहिला आहे. ११०४ ही काळरूप अग्नीच्या कुंडांतील लोण्याची उंडी. माशी पंख हालवितें न हालवितें, तों हें शरीर संपलें. ११०५ हें कदाचित् अग्नींत पडलें, तर भस्म होऊन जाणार. कुत्र्याच्या तोंडीं पडलें, तर त्याची विष्ठा होणार. ११०६ ह्या दोन्हीच्या कचाट्यांतून सुटलें, तर किड्यांचा पुंजका होईल. **अर्जुना!** असा परिणाम होणें वाईटच! ११०७ ह्या देहाची दशा ही अशी. आणि आत्मा तर असा कीं, तो अनादीच असल्यामुळें मुळचाच शुद्ध आणि नित्य. ११०८ तो

१ संबंध. २ सर्वथैव. ३ घालावा. ४ उभ्याला, जिवंत असलेल्याला. ५ दोऱ्यांत. ६ घातलेलें. ७ कदाचित्, चुकून. ८ मिळालें, प्राप्त झालें. ९ वाईटच. १० सहज, आपोआप. ११ होण्यानें. १२ लयस्थान. १३ मोजतां येत नाहीं. १४ व्याप्तीनें, संबंधानें. १५ अद्भुत व्यापारांतही. १६ सक्त.

निर्गुण असल्यामुळें अंशहीनही नव्हे, आणि अंशयुक्त असाही नव्हे. करणारा असाही नव्हे, आणि न करणारा असाही नव्हे. कृशही नव्हे, आणि स्थूलही नव्हे. ११०९ हा निराकार असल्यामुळें, साभासही नव्हे, आणि निराभासही नव्हे. प्रकाशित नव्हे, आणि अप्रकाशितही नव्हे. अल्पही नव्हे, आणि बहुतही नव्हे. १११० तो शून्य असल्यामुळें, रिताही नव्हे, आणि भरलेलाही नव्हे. रहितही नव्हे, आणि सहितही नव्हे. मूर्तही नव्हे, आणि अमूर्तही नव्हे. ११११ तो स्वतः सिद्ध असल्यामुळें आनंदही नव्हे, आणि दुःखही नव्हे. एक नव्हे, आणि अनेकही नव्हे. मुक्त नव्हे, आणि बद्धही पण नव्हे. १११२ त्याला कोणतेंही चिन्ह नसल्यामुळें तो येवढाही नव्हे, आणि तेवढाही नव्हे. हा स्वयंभु नव्हे, आणि केलेलाही नव्हे. हा वक्ताही नव्हे, आणि मुकाही नव्हे. १११३ सृष्टीच्या होण्यानें हा होतही नाहीं, आणि प्रळयकाळानें हा नाशही पावत नाहीं. असलेल्याचें आणि नसलेल्याचें, दोहोंचेंही विलयस्थान हा. १११४ हा अवयवहीन असल्यामुळें मोजवतही नाहीं, आणि वर्णनही करतां येत नाहीं. हा वाढतही नाहीं, आणि कमीही होत नाहीं. हा विटतही नाहीं. आणि घटतही नाहीं. १११५ हे **प्रियोत्तमा!** देहामध्यें आत्मा ह्मणून जो ह्मणतात, तो अशा प्रकारचा आहे. घराच्या आकारामुळें, आकाशाला जसें घर हें नांव येतें, १११६ त्याप्रमाणें त्याच्या संबंधानें देहाचे आकार होतात आणि नाश पावतात. हे **बुद्धिमंता!** तो हे आकार धारणही करीत नाहीं, आणि सोडीतही नाहीं. तो जशाचा तसाच असतो. १११७ दिवस आणि रात्र जशीं आकाशामध्यें होतात आणि जातात, त्याप्रमाणेंच आत्म्याच्या सत्तेनें देह होतात आणि जातात. ध्यानांत असूं दे. १११८ ह्मणून आत्मा हा ह्या शरीरामध्यें कांहीं करीतही नाहीं, व करवीतही नाहीं. अकृत व्यापारामध्येंही सक्त होत नाहीं. १११९ ह्मणून त्याच्या स्वरूपामध्येंही कांहीं कमी जास्ती होत नाहीं. हें असो. हा देहांत असून देहाला लिप्त होत नाहीं." ११२०

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥३२॥

[यथा सर्वगतमिति] अगा आकाश कें नाहीं । हें न रिघेचि कवणेठायीं । परि कायिसेनि कहीं । गादिजेना जैसें ॥ २१ ॥ [सर्वत्रेति] तैसा सर्वत्र सर्वदेहीं । आत्मा असतचि असे पाहीं । परि संगदोषें एकेंही । लिप्त नोहे ॥ २२ ॥ [2]पुढतपुढती एथें । हेंचि लक्षण निरुतें । जे जाणावें क्षेत्रज्ञातें । क्षेत्रविहीना ॥ २३ ॥

"अरे! आकाश हें कोठें नाहीं? तें कोणत्या ठिकाणीं शिरत नाहीं? पण तें कशानेंही कधीं पीडा पावत नाहीं. ११२१ त्याप्रमाणें आत्मा हा सर्वत्र सर्व देहांमध्यें अखंड भरलेलाच आहे. तरी संगतीच्या एकाही दोषानें लिप्त होत नाहीं. ११२२ पुन्हा पुन्हा ह्याचें खरें स्वरूप तें हेंच कीं, क्षेत्रज्ञ हा क्षेत्रापासून अलग आहे हें लक्ष्यांत ठेवावें." ११२३

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ३३

[यथा प्रकाशयतीति] संसर्गें चेष्टिजे लोहें । परि लोह [3]भ्रामक नोहे । क्षेत्रक्षेत्रज्ञां आहे । तेतुला पाड ॥ २४ ॥ दीपकाची [4]अर्ची । राहाटी वाहे घरींची । परि वेगळीक [5]कोडीची । दीपा आणि घरा ॥ २५ ॥ पैं काष्ठाच्या पोटीं । वन्हि असे परि किरीटी । काष्ट नोहे या दृष्टी । पाहिजे हा ॥ २६ ॥ [6]अपाड नभा आभाळा । रवि आणि मृगजळा । तैसाचि हाही डोळां । देखावा पैं ॥ २७ ॥ हें आघवेंचि असो एक । गगनौनि जैसा अर्क । प्रकटवी लोक । [7]नांवें नावें ॥ २८ ॥ [क्षेत्रमिति] एथ क्षेत्रज्ञ तो ऐसा । प्रकाशक क्षेत्राभासा । यावरुतें हें न पुसा । शंका नेघा ॥ २९ ॥

"सान्निध्यानें लोखंड हालतें; तरी लोह कांहीं लोहचुंबक नव्हे. तशीच क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाची गोष्ट आहे. ११२४ दिव्याची ज्योत घरांतील व्यवहार चालविते, पण दिव्यामध्यें आणि घरामध्यें कोटपटीचें अंतर. ११२५

१ पीडा पावत नाहीं. २ वारंवार, पुनः पुन्हां. ३ लोहचुंबक. ४ ज्योत. ५ कोट्यांशांचें अंतर. ६ वैलक्षण्य. ७ नेहेमीं.

**तसेंच अर्जुना! लांकडाच्या पोटांत अग्नि असतो, पण अग्नि हा कांहीं लांकूड नव्हे. अशाच दृष्टीनें आत्म्यालाही पहावें. ११२६ आकाशाला आणि अभ्राला; सूर्याला आणि मृगजळाला; जसें महदंतर असतें, त्याप्रमाणेंच ह्यालाही समजावें. ११२७ हें सारें असो. गगनांतून जसा एक सूर्य नेहमीं प्रकाश करतो, ११२८ त्याप्रमाणें देहाभासास कारण, क्षेत्रज्ञ—ह्मणजे आत्मा आहे. ह्याउपर आणखी ह्याविषयीं कांहीं विचारूंही नको, आणि शंकाही घेऊं नको." ११२९**

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ।
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥३४॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३

[क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवं] शब्दतत्वासारज्ञा । पैं देखणी तेचि प्रज्ञा । जे क्षेत्रक्षेत्रज्ञा । अपाड देखे ॥ ११३० ॥ [अंतरं ज्ञानचक्षुषा] इया दोहींचें अंतर । देखावया चतुर । ज्ञानियांचें द्वार । आराधिती ॥ ३१ ॥ याचिलागीं सुमती । जोडिती शांतिसंपत्ती । शास्त्रांचीं दुभतीं । पोषिती घरीं ॥३२॥ योगाचिया आकाशा । वेंळघिजे येवढा धिंवसा । याचियाचि आशा । पुरुषासि गा ॥ ३३ ॥ शरीरादि समस्त । मानिताति तृणवत । जीवें संतांचे होत । वाहणधर ॥ ३४ ॥ ऐसैसिया परि । ज्ञानाचिया भरोवरी । करूनियां अंतरीं । निरुते होती ॥ ३५ ॥ मग क्षेत्र क्षेत्रज्ञाचें । जे अंतर देखती साचें । ज्ञानें उन्मेख तयांचे । वोवाळूं आह्मी ॥ ३६ ॥ [भूतप्रकृतिमोक्षं च] आणि महाभूतादिकीं । प्रभेदलीं अनेकीं । पसरलीसे लटिकी । प्रकृति जे हे ॥ ३७ ॥ जे शुकनळिकान्यायें । न लगती लागली आहे । जें जैसें तैसें होये । ठोउवें जया ॥ ३८ ॥ जैसी माळा ते माळा । ऐसीचि देखिजे डोळां । सर्पबुद्धि टवाळा । उखी होउनी ॥ ३९ ॥ कां शुक्ति ते शुक्ती । हे साच होय प्रतीती । रुपयाची भ्रांती । जाऊनियां ॥ ११४० ॥ तैसी वेगळी वेगळेपणें । [ये विदुर्यांति ते परं] प्रकृती जे अंतःकरणें । देखती ते मी ह्मणें । ब्रह्म होती ॥ ४१ ॥ जें आकाशाहूनि वाड । जें अव्यक्ताची पैल कड । जें भेटलिया अपाडा पाड । पडों नेदी ॥ ४२ ॥ आकार जेथ सरे । जीवत्व जेथें विरे । द्वैत जेथ नुरे । अद्वय जें ॥ ४३ ॥ तें परमतत्व पार्था । होती ते सर्वथा । जे आत्मानात्मव्यवस्था । राजहंस ॥ ४४ ॥ ऐसा हा जी आघवा । श्रीकृष्णें तया पांडवा । उगाणा दिधला जीवा । जीवाचिया ॥ ४५ ॥ येर कलशींचें येरीं । रिचविजे जयापरी । आपणपें तया श्रीहरी । दिधलें तैसें ॥ ४६ ॥ आणि कोणा देता कोण । तो नर तैसा नारायण । वरि अर्जुनातें श्रीकृष्ण । हा मी ह्मणें ॥ ४७ ॥ परि असो तें नाथिलें । न पुसतां कां मी बोलें । किंबहुना दिधलें । सर्वस्व देवें ॥४८॥ [उत्तराध्यायबीजं] कीं तो पार्थ जी मनीं । अझुनी तृप्ती न मनी । अधिकाधिक उतान्ही । वाढवीत असे ॥ ४९ ॥ स्नेहांचिया भरोवरी । आंवुथिलों दीप घे थोरी । चाड अर्जुना अंतरीं । परिसतां तैसी ॥ ११५० ॥ तेथ सुगरणी आणि उदारे । रसज्ञ आणि जेवणारे । मिळती मग अवतरे । हात जैसा ॥ ५१ ॥ तैसें जी होतसे देवा । तया अवधानाचिया लवलवा । पाहातां व्याख्यान चेंडलें थांवा । चौगुणें वरी ॥ ५२ ॥ सुवाय मेघ सांवरे । जैसा चंद्रें सिंधू भरे । तैसा मातला रस आदरें । श्रोतयांचेनि ॥ ५३ ॥ आतां आनंदमय आघवें । विश्व कीजेल देवें । तें रायें परिसावें । संजयो ह्मणे ॥ ५४ ॥ एवं जे महाभारतीं । श्रीव्यासें अप्रांतमती । भीष्मपर्वे संगतीं । ह्मणितली कथा ॥ ५५ ॥ तो श्रीकृष्णार्जुनसंवाद । नागरीबोलीं विशद । सांगोनि दाऊं प्रबंध । वोविथेचा ॥ ५६ ॥ नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा । जे शृंगाराच्या माथां । पाय ठेवी ॥ ५७ ॥ दाऊं वेल्हाळदेशी नवी । जे साहित्यातें वोजावी । अमृतातें चुकी ठेवी । गोडसपणें ॥ ५८ ॥ बोल वेल्हाळवितेनि गुणें । चंद्रासि घे उमाणे । रसरंगा भुलवणें । नाद लोपी ॥ ५९ ॥ खेचराचियाही मना । आणी सात्विकाचा पान्हा । श्रवणासवें सुमनां । समाधी जोडे ॥ ११६० ॥ तैसा वाग्विलास विस्तारूं । गीतार्थेंसी विश्व भरूं । आनंदाचा आवारू । मांडूं जगा ॥ ६१ ॥ फिटो विवेकाची वाणी । हो काना मना जिणीं । देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ॥ ६२ ॥ दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा । रिघो महाबोध सुकाळा । माजी विश्व ॥ ६३ ॥ हें निफजेल

१ भेद. २ चढावें. ३ धैर्य. ४ पादुकाधारक. ५ साधनें. ६ निश्चल. ७ ज्ञान. ८ राघूला धरण्यासाठीं केलेल्या नळीसारखें. ९ माहित. १० लटकी. ११ नाश. १२ मोठें. १३ प्रकृतीची. १४ साम्यासाम्य. १५ उरों देत नाहीं.

१ विवेचन करणारे. २ प्रत्यय, अनुभव. ३ घागरींतील पाणी. ४ ओतावें. ५ अर्जुनाकडे बोट दाखवून 'हा' मी असें ह्मणतो. 'पांडवानां धनंजयः' अ० १० श्लो. ३७ ६ इच्छा, तृष्णा. ७ मैत्रीच्या. ८ भरपूर साधनांचें. ९ प्रदीप्त केलेला. १० आस्थेनें. ११ बळास चढलें, जोरांत आलें. १२ अनुकूल वाऱ्यानें. १३ उत्तम शब्दानें. १४ आवडती, विस्तृत भाषा. १५ दाखविते, शिकविते. १६ शांत करणाऱ्या गुणांनीं. १७ बरोबरी करणें, माप घेणें. १८ पिशाचाच्या. १९ निर्मळ मनाला. २० दुष्काळ, दैन्य, दारिद्र्य. २१ पाहिजे तो.

आतां आघवें । ऐसें बोलिजेल बरवें । जे अधिष्ठिला असें परमदेवें । श्रीनिवृत्ती मी ॥ ६४ ॥ ह्मणोनि अक्षरीं सुभेदीं । उपमा श्लोक कोंदाकोंदी । झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ॥ ६५ ॥ हा ठावोवरी मातें । पुरतया सारस्वतें । केलें असे श्रीमंतें । श्रीगुरुरायें ॥ ६६ ॥ तेणें जी कृपासावायें ।[3] मी बोलें तेतुलें सामाये । आणि तुमचिये सभे लाहें । गीता ह्मणों ॥ ६७ ॥ वरि तुह्मां संतांचे पाये । आजि मी लाधलों आहें । ह्मणोनि जी नोहे । अटक कांहीं ॥ ६८ ॥ प्रभु काईमीरीं[4] मुकें । नुपजेही कौतुकें । नाहीं उणीं सामुद्रिकें[5] । लक्ष्मीयेसी ॥ ६९ ॥ तैसी तुह्मा संतांपासीं । अज्ञानाची गोठी कायसी । यालागीं नवरसीं । वरुषेन मी ॥ ११७० ॥ किंबहुना आतां देवा । अवसरू मज देयावा । ज्ञानदेव ह्मणे बरवा । सांगेन ग्रंथ ॥ ११७१ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ श्लोक ३४, ओंव्या ११७१.

"हे **शब्दतत्त्वांतील सार जाणणाऱ्या!** क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्यामध्यें फार मोठा भेद आहे, असें जाणणें ह्याचेंच नांव खरें शहाणपण. ११३० चतुर आहेत ते, ह्या दोहोंचा भेद समजण्यासाठीं, ज्ञानी जनांच्या द्वाराची आराधना करतात. ११३१ ह्यासाठींच बुद्धिमान् लोक शांतिसंपत्तीचा अंगिकार करतात, आणि शास्त्रांच्या दुभत्या गायीचें पोषण करितात. ११३२ योगाच्या आकाशांत चढण्याइतकें धैर्य, ह्याच आशेनें पुरुष धरतात. ११३३ शरीरादि सर्व तृणवत् मानून जिवाभावानें संतांचे पादुकाधारक होतात. ११३४ अशा अशा तऱ्हेनें ज्ञानाचीं साधनें करून अंतःकरणामध्यें निश्चल होतात. ११३५ क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्यामधील खरें अंतर ज्यांस समजतें, त्यांच्या ज्ञानावरून आह्मी सर्व ज्ञानें ओवाळून टाकतों. ११३६ आणि ही जी पसरलेली माया आहे ती, महाभूतांदिकामध्यें अनेकत्वें करून पसरली आहे, ती मिथ्या होय. ११३७ जी पोपट व नलिका ह्या न्यायानें न लागतां लागलेली आहे, हें जसेंच्यातसें ज्याला माहित पडतें, ११३८ ज्याप्रमाणें सर्पबुद्धीचा नाश करून, माळा ती माळाच असें डोळ्यांनीं पाहावें, ११३९ किंवा रुपयांची भ्रांति जाऊन शिंप ती शिंपच असा खरा अनुभव यावा, ११४० त्याप्रमाणें माया ही भिन्नत्वानें भिन्न आहे असें जे अंतःकरणांत समजतात, ते ब्रह्मरूप होतात, हें मी सांगून ठेवतों. ११४१ जें आकाशाहून मोठें; प्रकृतीचें जें पैल कड; जें भेटल्यानंतर साम्यासाम्य उरूं देत नाहीं, ११४२ आकार जेथें संपतो; जीवपणा जेथें विरून जातो; द्वैत जेथें राहत नाहीं; असें जें अद्वैत, ११४३ **अर्जुना!** आत्मानात्मविचाराविषयीं जे राजहंस आहेत, तेच तें परमतत्त्व होतात." ११४४ असा हा जिवांतल्या जिवाचा सारा अनुभव त्या **श्रीकृष्णांनीं अर्जुनाला** दिला. ११४५ एका घागरींतलें पाणी जसें दुसऱ्या घागरींत ओतावें, त्याप्रमाणें त्या श्रीहरींनीं आपणहून त्याला (ज्ञान) दिलें. ११४६ बाकी कोण कोणाला देणार? कारण, जसा तो नर, तसाच तो नारायण होता. आणि शिवाय, **श्रीकृष्ण** तर **अर्जुनाला** तूं तो मीच असें ह्मणत असत. ११४७ पण ही निष्फळ गोष्ट असो. कारण, जें विचारलें नाहीं, तें मी बोललों. येवढेंच नव्हे, तर **श्रीकृष्णांनीं** सर्वस्व दिलें. ११४८ तरी महाराज! तो **अर्जुन** अद्यापही मनामध्यें तृप्ति मानित नव्हता. तर अधिक अधिक इच्छा वाढवीतच होता. ११४९ दिव्यामध्यें तेल अधिक अधिक झालें ह्मणजे तो जसा अधिक अधिकच वाढूं लागतो, त्याप्रमाणें **अर्जुनाची** इच्छा ऐकतां ऐकतां उत्तरोत्तर वाढूंच लागली. ११५० रसज्ञ आणि भोक्ते असे जेवणारे मिळाले, ह्मणजे सुगरिण असून उदार असणाऱ्या स्त्रियेचा हात जसा सढळ सुटतो, ११५१ त्याप्रमाणें देवाला होऊन गेलें. त्याच्या लक्ष्याची आस्था पहातांच बोलण्याला चौपट बळ चढलें. ११५२ अनुकूल वाऱ्यानें मेघ जसा भरून येतो, किंवा चंद्रानें जशी समुद्रास

१ दाट. २ परिपूर्ण. ३ कृपेच्या सहायानें. ४ सरस्वतीच्या ठाईं. ५ सामुद्रिक लक्षणें.

भरती येते, त्याप्रमाणें श्रवण करणाऱ्याच्या भक्तीनें रस वाढला. ११५३ आतां देव सारें विश्व आनंदमय करून सोडतील. **संजय** ह्मणतो "तें महाराजांनीं ऐकावें." ११५४ ह्याप्रमाणें महाभारतांतील **भीष्मपर्वांत**र्गत **श्रीव्यासांनीं** अचाट बुद्धीनें जी कथा सांगितली, ११५५ तो **श्रीकृष्णाचा** आणि **अर्जुनाचा** संवाद सुंदर अशा मराठी भाषेमध्यें खुलासेवार ओंवीछंदानें सांगूं. ११५६ खरोखर पाहिलें तर, केवळ शांतरसाची कथाच वाक्पथावर येईल, तरी ती श्रृंगाराच्याही मस्तकावर पाय ठेवील. ११५७ विस्तृत नवी अशी देशी भाषा दाखवून देऊं. ती साहित्यशास्त्र शिकवील. आणि गोडीमध्यें अमृताला मार्गे सारील. ११५८ शब्द हे शांत करणाऱ्या गुणानें चंद्राची बरोबरी करतील. रसरंग भुलवून सोडतील. ११५९ पिशाचांच्या मनाला सुद्धां सात्विक भावाचा पान्हा फुटेल. निर्मळ मनाला ऐकूनच समाधि लागेल. ११६० अशा प्रकारें वाग्विलासाचा विस्तार करूं. गीतार्थानें विश्व भरून टाकूं. जगाला आनंदाचें कुसूं घालून सोडूं. ११६१ विचाराचें द्वैत नाहींसें होईल. कान व मन सजीव होतील. ही ब्रह्मविद्येची खाण, कोणी पाहिजे त्यानें येऊन पहावी. ११६२ परतत्त्व डोळ्यांना दिसावें; त्यानें सुखाचा सोहळा पहावा; महद्बोधाच्या सुकाळामध्यें विश्व बुडून जावें. ११६३ असें सर्व उत्पन्न होईल, इतकें सुंदर भाषण करूं. कारण, परमेश्वरासारखे जे **निवृत्तिदास,** त्यांनीं मजवर अनुग्रह केला आहे. ११६४ ग्रंथार्थाच्या प्रत्येक शब्दामध्यें अक्षरांतील भेदाभेद, उत्तमोत्तम उपमा ह्यांची गर्दीच गर्दी करून सोडीन. ११६५ श्रीमान् गुरुराज ह्यांनीं येवढा वेळपर्यंत मला विद्येनें परिपूर्ण केलें आहे. ११६६ त्या कृपेच्या साहाय्यानें मी बोलेन तितकें खपतें, आणि आपल्यासारख्यांच्या सभेमध्यें गीता सांगावयास सांपडते. ११६७ शिवाय, आपल्यासारख्या साधूंच्या पायांची जोड मला मिळाली आहे. ह्मणून महाराज! कोठेंच अडचण पडत नाहीं. ११६८ प्रभो! **सरस्वती**च्या ठायीं चुकूनही कधीं मुका निपजावयाचा नाहीं. **लक्ष्मी**जवळ सामुद्रिक चिन्हांची कधींही उणीव पडावयाची नाहीं. ११६९ त्याप्रमाणें तुह्मां संतांपाशीं अज्ञानाची गोष्ट कसली? ह्यासाठीं मी आतां नऊ रसांनीं वर्षाव करीन. ११७० येवढेंच नव्हे, तर, **ज्ञानदेव** ह्मणतात "देवा! आतां मला आज्ञा द्यावी. ह्मणजे नीट ग्रंथ सांगेन." ११७१

## तेरावा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी

## अध्याय १४ वा.

जयजय आचार्या । समस्तसुरवर्या । प्रज्ञाप्रभातसूर्या । सुखोदया ॥ १ ॥ जयजय सर्वविसांवया । सोहंभावसुहावया । नाना लोक हेलावया । समुद्रा तूं ॥ २ ॥ आइकें गा आर्तबंधू । निरंतकारुण्यसिंधू । विशदविद्यावधू । वल्लभा जी ॥ ३ ॥ तूं जयाप्रति लपसी । तया विश्व हें दाविसी । प्रकट तैं करिसी । आघवेंची तूं ॥ ४ ॥ कीं पुढिलांची दृष्टी चोरिजे । हा दृष्टिबंध निफजे । परि नवल लांघव तुझें । जें आपणपें चोरे ॥५॥ जी तूंचि तूं सर्वा यया । मा कोणा बोध कोणा माया । ऐसेया आपें आप लाघविया । नमों तुज ॥ ६ ॥ जाणो जगीं आप बोलें । तें तुझिया बोला सुरस जालें । तुझेनि क्षमत्व जालें । पृथ्वीयेसी ॥ ७ ॥ रविचंद्रादि शुक्ती । उदय करिती त्रिजगती । ते तुझिया दीप्ती । तेजें तेजां ॥ ८ ॥ जें चळवळिजे अनिळें । तें दैविकेनि जी निजवळें । नभ तुजमाजी खेळे । लपिथपि ॥ ९ ॥ किंबहुना माया अशेष । ज्ञान जी तुझेनि डोळस । असो वानणें सायास । श्रुतीसि हें ॥ १० ॥ वेद वानूनि तंवचि चांग । जंव न दिसे तुझें आंग । मग आह्मां तया मुंग । एके पांती ॥ ११ ॥ जी एकार्णवाचे ठाईं । पाहातां प्रळयमेघाचा पाड नाहीं । मा महानदी काई । केवढी रेती ॥ १२ ॥ कां उदयलिया भास्वत । चंद्र जैसा खद्योत । आह्मां श्रुती तुज आंत । तो पाड असे ॥ १३ ॥ आणि दुजया थांव मोडे । जेथ पैरेशीं वैखरी बुडे । तो तूं कोणें तोंडें । वानावासि ॥ १४ ॥ यालागीं आतां । स्तुती सांडूनि निवांता । चरणीं ठेविजे माथा । हेंचि भलें ॥ १५ ॥ तरि तूं जैसा आहासि तैसिया । नमों जी गुरुराया । मज ग्रंथोद्यम फळावया । वेव्हारा होईं ॥ १६ ॥ आतां कृपा भांडवल सोडीं । भरीं माझे मतीची पोतडी । करीं ज्ञानपद्य जोडी । थोरा मातें ॥ १७ ॥ मग मी संसरेनें तेणें । संतातें कर्णभूषणें । लेववीन सुलक्षणें । विवेकाचीं ॥ १८ ॥ जी गीतार्थनिधान । काढू माझें मन । सुयीं स्नेहांजन । आपलें तूं ॥ १९ ॥ हे वाक्सृष्टी एकेवेळे । देखोतु माझे बुद्धीचे डोळे । तैसा उदैजो जी निर्मळें । कारुण्यबिंबें ॥ २० ॥ माझी प्रज्ञावेली वेल्हाळ । काव्यें होय सफळ । तो वसंत होयीं स्नेहाळ । शिरोमणी ॥ २१ ॥ प्रमेय महापूरें । हे मतिगंगा ये थोरे ॥ तैसा वर्ष उदारे । दिठीवेनी ॥ २२ ॥ अगा विश्वैकधामा । तुझा प्रसादचंद्रमा । करू मज पूर्णिमा । स्फूर्तींची जी ॥ २३ ॥ जी अवलोकिलिया मातें । उन्मेषसागरीं भरितें । वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तीचे ॥ २४ ॥ तंव संतोषोनि श्रीगुरुराजें । ह्मणितलें विनतिव्याजें । मांडिलें देखोनि दुंजें । स्तवनमिषें ॥ २५ ॥ हें असो आतां वांजेटा । तो ज्ञोपनार्थ करूनि गोमटा । ग्रंथार्थ दावीं उत्कंठा । भंगों नेदीं ॥ २६ ॥ हो कां जी स्वामी । हेंचि पाहत होतों मी । जे श्रीमुखें ह्मणा तुह्मीं । ग्रंथ सांग ॥ २७ ॥ परि हें म्यां केलें । कीं हें माझेनि जालें । ऐसें नाहीं ठेविलें । वासनेमाजि ॥ २८ ॥ सहजें दूर्वेचा डिरु । आंगेंचि तंव अमरु । वरी आला पूरु । पीयूषाचा ॥ २९ ॥ तरि आतां येणें प्रसादें । विन्यासें विदग्धें । मूळशास्त्रपदें । वाखाणीन ॥ ३० ॥ परि जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणि बुडे । ना श्रवणीं तरि चाडे । वाढी दिसे ॥ ३१ ॥ तैसी बोली साचारी । अवतरो माझी मांधुरी । माले मागूनि घरीं । गुरुकृपेच्या ॥ ३२ ॥ तरि मागां त्रयोदशीं । अध्यायीं गोठी ऐसी । श्रीकृष्ण अर्जुनेंसी । चोंवळले ॥ ३३ ॥ जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें । होइजे येणें जगें । आत्मा गुणसंगें ।

---

१ बुद्धिरूप प्रातःकाळच्या सूर्या. २ सुखाचा उदय करणाऱ्या. ३ मी ब्रह्म असा भाव सुशोभित करणाऱ्या. ४ ...किंवा. ५ लाटांचा. ६ निर्मल विद्यारूप नोवरीच्या पते. ७ दुसऱ्याची. ८ बांधावी. ९ नजरबंध. १० चातुर्य, ...ज. ११ आत्मरूपाप्रत. १२ पाणी. १३ शिंपा. १४ तुझ्या ...तीच्या तेजाच्या तेजानें. १५ देवाच्या. १६ लपंडाव. १७ मौन. १८ जलमयझालेल्यांत. १९ पहिल्या वाचेशीं. २० ...रूप उदीम. २१ व्यापारी.

१ ज्ञानमय कवितेचा. २ नफा. ३ सांवरेन. ४ अर्थाच्या, सिद्धांताच्या. ५ कृपादृष्टीनें. ६ स्फूर्तीची. ७ ज्ञानसमुद्राला. ८ भरून सांडेल. ९ स्तुतीच्या मिषानें, द्वैत मांडलेलें पाहून नम्रत्वाच्या मिषानें ह्मटलें. १० द्वैत. ११ निष्फळ बोलणें. १२ जाणावयाचा विषय. १३ अंकुर. १४ चतुर निरूपणानें, प्रशस्त बोलानें. १५ स्पष्ट रीतीनें. १६ नौका, होडी. १७ वाचा, वाणी. १८ खंडोबाचे माळे. ( गळ्यांत नांगर घालून भिक्षा मागणें. ) १९ बोलले.

संसारिया ॥ ३४ ॥ आणि हाचि प्रकृतिगतु । सुखदुःख भोगि हेतुं । अथवा गुणातीतु । केवळ हा ॥ ३५ ॥ तरि कैसा पां असंगा संग । कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोग । सुखदुःखादि भोग । केविं तया ॥ ३६ ॥ गुण ते कैसे किती । बांधती कवणेरिती । नातरी गुणातीतीं । चिन्हें काई ॥ ३७ ॥ एवं इया आघवेया । अर्था रूप करावया । विषो येथ चौदाविया । अध्यायासी ॥ ३८ ॥ तरि तो आतां ऐसा । प्रस्तुत परियेसा । अभिप्राय विश्वेशा । वैकुंठिचा ॥ ३९ ॥ [श्रीभगवानुवाच--] तो ह्मणे गा अर्जुना । अवधानाची सर्व सेना । मेळऊनि इया ज्ञाना । झोंबावें हो ॥ ४० ॥ आह्मीं मागां तुज बहुतीं । दाविलें हें उपपत्ती । तरि आझुनी प्रतीती । कुशीं न रिघे ॥ ४१ ॥

हे प्रभो सर्व देवदेवेश्वरा! हे बुद्धिरूप प्रातःकाळच्या सूर्यनारायणा! हे सुखाच्या उदय करणाऱ्या श्रीगुरो! तुझा जयजयकार असो. १ हे सर्वांचे विश्रांतिस्थाना! 'मी ब्रह्म' असा भाव सुशोभित करणाऱ्या! किंवा लोकलहरीच्या समुद्रा! आपला जयजयकार असो. २ हे आर्तबंधो! हे निरंतर करुणासिंधो! हे शुद्ध विद्यावधूवरा! प्रभो! श्रवण करावें. ३ तूं ज्याच्यापासून गुप्त राहतोस, त्याला विश्व दाखवून सोडतोस. आणि प्रगट होतोस तेव्हां हें सारेंच आत्मस्वरूप करून सोडतोस. ४ किंवा दुसऱ्याची दृष्टि बंद करणें ह्याला नजरबंध असें ह्मणतात. पण तुमचा गारुडीपणा त्याहूनही विलक्षण. कारण तुह्मी आपल्यालाच लपून रहातां! ५ प्रभो! ह्या सर्वांमध्यें तूंच भरून राहिला आहेस. मग बोध तो कोणाला? आणि माया तरी कोणाला? अशा प्रकारें आपलें आपण कौतुक करणाऱ्या! तुला नमस्कार असो. ६ मला तर असें वाटतें कीं ह्या जगामध्यें पाणी ओलें आहे. पण तुझ्याच ओलेपणानें त्याला सरसपणा प्राप्त झाला. तुझ्या क्षमेमुळेंच पृथ्वीच्या आंगीं क्षमाशीलता आली. ७ रवि चंद्र आदिकरून शिंपा त्रिभुवनाला प्रकाशित करतात, त्या तुझ्याच दीप्तीच्या तेजानें. ८ वारा जें जें कांहीं हालवितो, तें तें देवा! तुझ्याच साऱ्या बळानें. आणि आकाश तुझ्यामध्येंच लपंडाव खेळत असतें. ९ किंबहुना प्रभो! सारी माया आणि ज्ञान तुझ्याच योगेंकरून डोळस झालीं आहेत. असो. हें वर्णन करतांना श्रुतींनाही कष्ट पडतील. १० तुमचें स्वरूप जोंपर्यंत दिसलें नाहीं, तोंपर्यंतच वेदांचें वर्णन चांगलें. तें दिसलें ह्मणजे आह्मांप्रमाणेंच त्यांनाही मूग खाऊनच बसलें पाहिजे. ११ महाराज! जलप्रलयामध्यें पाहूं लागलें तर, प्रळयमेघाची सुद्धां मातब्बरी नाहीं, मग महानदीची ती प्रतिष्ठा काय? १२ किंवा, सूर्य उगवला ह्मणजे, चंद्र जसा काजव्याप्रमाणें होतो; त्याप्रमाणें तुह्मांपुढें वेदांची व आमची अवस्था होते. १३ द्वैताचा ठाव मोडतो; जेथें परेसहवर्तमान वैखरी कुंठित होते; बुडून जाते; त्या तुमचें कोणत्या तोंडानें वर्णन करावें! १४ ह्याकरितां आतां, स्तुति सोडून देऊन मुकाट्यानें चरणावर मस्तक ठेवावें हेंच बरें. १५ तर प्रभो! गुरुराया! तूं जसा आहेस तशा तुला नमस्कार असो. तूं मला ग्रंथाच्या व्यापारांत बरकत येण्यासाठीं सावकार हो. १६ आतां कृपेचें भांडवल सोड. माझी बुद्धिरूप पोतडी भर. आणि ज्ञानबंधारणयुक्त कवितेचा खूपसा नफा करून दे. १७ तेणेंकरून मी सावरेन. आणि विचारांचीं उत्तमोत्तम अशीं कर्णभूषणें संतांना घालीन. १८ महाराज! माझ्या मनानें गीतार्थाचा ठेवा काढण्यासाठीं आपण आपलें स्नेहरूप अंजन घालावें. १९ माझ्या बुद्धीचे डोळे एकदांही वाक्सृष्टि पाहोत. आणि त्याचप्रमाणें महाराज! कारुण्यसूर्याचा उदयही होवो. २० माझी बुद्धिरूप वेली विस्तृत काव्यानें फलद्रूप होण्यासाठीं स्नेहामध्यें अग्रगण्य जो वसंत तो तूं हो. २१ ह्या बुद्धिरूप गंगेला महापूर येईल, अशा कृपादृष्टीनें उदार वर्षाव कर. २२ हे विश्वैकधामा! हे प्रभो! तुमचा प्रसादचंद्र मला स्फूर्तीची पौर्णिमा करून सोडो. २३ ती पाहिली असतां, माझ्या ज्ञानसागराला भरती

१ संसारी. २ मायोपाधिक. ३ फलाशेनें. ४ स्पष्ट, उपक्रम. ५ विषय. ६ युक्तीनें. ७ मनांत.

येईल, आणि रसवृत्ति स्फूर्ति भरून सांडूं लागतील. २४ तेव्हां स्तुतीच्या मिषानें द्वैत मांडलेलें पाहून श्रीगुरु नम्रतेच्या मिषानें ह्मणाले, २५ "हें आतां निष्फल बोलणें राहूं दे. जाणावयाचा विषय गोड करून ग्रंथार्थ दाखीव. उत्कंठेचा भंग होऊं देऊं नको." २६ प्रभो! स्वामी! मीही त्याचीच वाट पहात होतों कीं, आपण श्रीमुखानें ग्रंथ सांग असें केव्हां ह्मणाल. २७ परंतु हें मीं केलें; किंवा हें माझ्यानें झालें; असें वासनेमध्यें ठेवलेलें नाहीं. २८ गवताचा अंकुर मूळचाच अमर; आणि त्यावर अमृताचा पूर लोटला; २९ तर आतां ह्या प्रसादाच्या योगानें चतुर निरूपणें करून मूळ शास्त्रांतील पदार्थांचें वर्णन करीन. ३० परंतु जिवाच्या आंत ज्या रीतीनें संशयाची नौका बुडेल, आणि कानामध्यें इच्छेची वृद्धि दिसूं लागेल, ३१ अशी गुरुकृपेच्या घरीं गळ्यांत नांगर घालून भिक्षा मागूनही माझी वाणी बोलण्यामध्यें प्रवेश करो. ३२ तर पूर्वीं तेराव्या अध्यायामध्यें श्रीकृष्णांनीं अर्जुनाला अशी गोष्ट सांगितली ३३ कीं, हें सर्व जग क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्यांच्या संयोगानें झालें आहे. आणि आत्मा हा गुणांच्या सांसर्गानें संसारांत पडला आहे. ३४ आणि हाच मायोपाधिक आहे. फलाच्या आशेनें हा सुखदुःखें भोगतो, कां हा गुणातीत आहे? ३५ तर, असंगाला संग कसा घडतो? हा क्षेत्रक्षेत्रज्ञ योग कसा? त्याला सुखदुःखाचे भोग कसे? ३६ गुण ते कसले, आणि किती? ते कशा तऱ्हेनें बांधतात? किंवा गुणातीताचीं लक्षणें तरी कोणतीं? ३७ अशा प्रकारें ह्या साऱ्या अर्थाचें निरूपण करण्याला, ह्या चवदाव्या अध्यायांत विषय झाला आहे. ३८ तर आतां तो वैकुंठींच्या विश्वेशाचा अभिप्राय ऐका. ३९ ते ह्मणाले "हे अर्जुना! आतां अवधानाची सर्व सेना जमा करून ह्या ज्ञानाला झोंब घे. ४० आह्मीं तुला पूर्वीं नानाप्रकारच्या युक्ति कथन केल्या. तत्रापि अद्याप त्या तुझ्या मनांत भरत नाहींत." ४१

श्रीभगवानुवाच–

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥१॥

[भूयः] ह्मणौनि गा पुढती । [प्रवक्ष्यामि] सांगिजेल तुजप्रती । पर ह्मण ह्मणोन श्रुतीं । डाहारिलें जें ॥ ४२ ॥ [परं] येऱ्हवीं ज्ञान हें आपुलें । परि पैर ऐसेनि जालें । [3]जे आवडोनि घेतलें । भवस्वर्गादिक ॥ ४३ ॥ अगा याचिकारणें । हें उत्तम सर्वोपरी मी ह्मणें । [ज्ञानानां] जे वन्हि हें तृणें । [4]येरें ज्ञानें ॥ ४४ ॥ जियें भवस्वर्गातें जाणती । यागचि चांग ह्मणती । पारखी फुडी आथी । [6]भेदीं जयां ॥ ४५ ॥ तियें आघवींचि ज्ञानें । केलीं येणें स्वप्नें । [ज्ञानमुत्तमं] जैशा वातोर्मी गगनें । गिळिजती अंतीं ॥ ४६ ॥ कां उदितें रश्मिराजें । लोपिलीं चंद्रादि तेजें । नाना प्रळयांबुमाजें । नदी नद ॥ ४७ ॥ तैसें येणें पाहलेया । ज्ञानजात जाय लया । ह्मणोनियां धनंजया । उत्तम हें ॥ ४८ ॥ [यज्ज्ञात्वा] अनादि जे मुक्तता । आपली असे पंडुसुता । तो मोक्ष हाता येता । होय जेणें ॥ ४९ ॥ [मुनयः सर्वे] जयाचिया प्रतीती । विचारवीरीं समस्तीं । नेदिजेचि संसृती । माथा उंधऊं ॥ ५० ॥ [परां सिद्धिमितो गताः] मनें मन घालूनियां मागें । विश्रांति जालिया आंगें । ते देहीं देहा जोगे । होतीचि ना ॥ ५१ ॥ मग तें देहाचें [10]बंळें । वोलांडुनि एकेचि वेळे । संवतुकी कांटोळें । माझे जाले ॥ ५२ ॥

"ह्याकरितां तुला पुन्हा सांगतों. श्रुतीनें ज्याला पुन्हा पुन्हा 'पर' ह्मणून वर्णन केलें आहे. ४२ बाकी, ज्ञान पाहूं गेलें तर आपलेंच आहे. परंतु त्याला पर ह्मणण्याचें कारण, त्याला भवस्वर्गादिक आवडतात. ४३ आणि ह्याकरितांच त्याला सर्वोपरीनें उत्तम असेंही ह्मणतों. कारण, इतर ज्ञानें तृणवत् असून हें ज्ञान अग्नीसारखें आहे. ४४ जीं भवस्वर्गाला जाणतात; यागच चांगलें असें ह्मणतात; आणि जीं भेदालाच मुख्य असें मानतात, ४५ तीं सारींच ज्ञानें हें स्वप्नप्रमाणें करून सोडतें. ज्याप्रमाणें शेवटीं आकाश वाऱ्याच्या लाटा गिळून टाकतें;

---

१ प्रसिद्ध केलें. २ पलीकडचें. ३ कारण. ४ इतर. ५ परीक्षा. ६ भेदच श्रेष्ठ. ७ जलप्रलयाच्या विशालत्वानें. ८ उगवलेल्या. ९ वर काढूं, उद्धरूं. १० बळानें, आश्रयानें. ११ समतोल. १२ ताजवा, तराजू.

४६ किंवा उदय पावलेला सूर्यनारायण चंद्रादिकांचीं तेजें लयास नेतो; किंवा जलप्रलयानें नदीनद जसे लुप्त होऊन जातात; ४७ त्याप्रमाणें ह्या ज्ञानाचा—उदय झाला कीं, एकूनएक ज्ञानें लयास जातात; ह्मणून हे **अर्जुना !** हें ज्ञान उत्तम होय. ४८ **अर्जुना !** आपली अनादि असलेली मुक्तता असा जो मोक्ष, तो ज्याच्या योगेंकरून हस्तगत होतो; ४९ ज्याच्या अनुभवाच्या योगानें साऱ्या विचारवीरांनीं संसाराला माथासुद्धां वर करूं दिला नाहीं; ५० मनानेंच मन मागें सारून ज्यांनीं विश्रांति मिळविली; ते देहांत असूनही देहासारखे होत नाहींत. ५१ आणि मग तर ते देहाचें कुंपण एकदम टाकून देऊन माझ्याच बरोबरीचे होतात." ५२

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।
सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥ २ ॥

[मम साधर्म्यमागताः] जे माझिया नित्यता । तेणें नित्य ते पंडुसुता । परिपूर्ण पूर्णता । माझियाचि ॥ ५३ ॥ मी जैसा अनंतानंद । जैसाचि सत्यसंध[१] । तैसेचि ते भेद । उरेचिना ॥ ५४ ॥ जें मी जेव्हढें जैसें । तें तेचि जाले तैसें । घटभंगीं घटाकाशें । आकाश जेवीं ॥ ५५ ॥ ना तरि दीप मूळकीं[२] । दीपशिखा[३] अनेकी । मिनलिया अवलोकिं । होय जैसें ॥ ५६ ॥ अर्जुना तयापरी । सरली द्वैताची वारी[४] । नांदे नामार्थ[५] एकाहारीं । मींतूंविणें ॥ ५७ ॥ [सर्गेऽपि नोपजायंते] येणेंचि पैं कारणें । जें[६] पहिलें सृष्टीचें जुंपणें[७] । तैंही तया होणें । पडेचिना ॥ ५८ ॥ सृष्टीचिये सर्वादी । जयां देहाची नाहीं बांधी[८] । [प्रलये न व्यथंति च] ते कैंचे प्रळयावधी । निमेतील[९] पां ॥ ५९ ॥ [इदं ज्ञानमुपाश्रित्य] ह्मणौनि जन्मक्षयां । अतीत धनंजया । मी[१०] जाले ज्ञाना इया । अनुसरोनि ॥ ६० ॥ ऐसी ज्ञानाची वाढी । वानिली देवें आवडी । तेविंचि पार्थाही गोडी । लावावया ॥ ६१ ॥ तंव तया जालें आन । सर्वांगीं निधाले[११] कान । सेंपाई[१२] अवधान । आंतला[१३] पां ॥ ६२ ॥ आतां देवाचिया ऐसें । जाकळीजत असे वोरसें । ह्मणोनि निरूपण आकाशें । वेटाळेना ॥ ६३ ॥ मग ह्मणे गा प्रज्ञाकांता[१४] । उंजवली[१५] आजि वक्तृत्वता[१६] । जे बोला येवढा श्रोता । जोडलासी ॥ ६४ ॥ तरि एक मी अनेकीं । गोविंजे देहपाशकीं । त्रिगुणीं लुब्धकीं । कवणेपरी ॥ ६५ ॥ कैसा क्षेत्रयोगें । वियें इयें जगें । तें परिस सांगें । कवणेपरी ॥ ६६ ॥ पैं क्षेत्र येणें व्याजें । यालागीं हें बोलिजे । जे मत्संगबीजें । भूतीं पिके ॥ ६७ ॥

"**अर्जुना !** माझ्या नित्यतेनें ते नित्य होतात; माझ्याच परिपूर्णतेनें ते परिपूर्ण होतात; ५३ मी जसा अनंतानंद आहें, मी जसा सत्यप्रतिज्ञ आहें, त्याचप्रमाणें ते होतात. भेद उरत नाहीं. ५४ मी जेवढा आणि जसा आहें, तसेच तेही तेवढे आणि तसेच होऊन राहतात. घट फुटला असतां, घटाकाश जसें आकाशरूप बनतें; ५५ किंवा दिव्याच्या मूळ ज्योतींत अनेक ज्योति मिळाल्या असतां, ज्याप्रमाणें ऐक्य होतें, ५६ त्याप्रमाणें **अर्जुना !** त्यांची द्वैताची खेप चुकते. आणि मी व तूं ह्यावांचून एक जीव होतात, आणि नाम मात्र शिल्लक राहतें. ५७ ह्याच कारणानें सृष्टि प्रथम उत्पन्न होते, त्या वेळेसही त्याला उत्पन्न व्हावें लागत नाहीं. ५८ सृष्टीच्या प्रारंभालाही ज्यांला देहाचें बंधन नाहीं, ते कल्पाच्या वेळीं नाश तरी कसे पावणार ? ५९ ह्मणून **अर्जुना !** ह्या ज्ञानाला अनुसरून ते जन्मक्षयाच्या अतीत होतात." ६० ह्याप्रमाणें देवांनीं मोठ्या आवडीनें ज्ञानाचें वर्णन केलें. आणखी, पार्थाला गोडी लाऊन देण्याचाही त्यांत उद्देश होता. ६१ त्यामुळें त्याची स्थिति कांहीं वेगळीच झाली. त्याच्या सर्वांगाला कान फुटले; आणि तो नखशिखांत अवधानाची मूर्तीच बनून राहिला. ६२ तेव्हां देवासारख्याच्या स्नेहभरित पान्ह्यानें उचंबळल्यामुळें तें निरूपण आकाशामध्येंही मावेनासें झालें. ६३ मग ह्मणतात "हे **बुद्धिपते !** आज भाषणशैलीचें लग्न झालें. कारण, शब्दायेवढा श्रोता मिळाला. ६४ तर आतां मी एक असून अनेक देहपाशांत गुंततों कसा ? व तीन गुणांच्या पारध्यांस कसा सांपडतों ? ६५ क्षेत्रांच्या योगेंकरून ह्या जगांना कसें प्र-

१ सत्यप्रतिज्ञ. २ मूळज्योतींत. ३ दिव्याच्या ज्योती. ४ गति, येरझार. ५ संज्ञेचा अर्थ. ६ जेव्हां. ७ रचना. ८ बंधन. ९ नाश पावतील. १० मत्स्वरूप. ११ उत्पन्न झाले, फुटले. १२ संपूर्ण. १३ नटला. १४ बुद्धिपते! १५ विवाहित झाली. १६ भाषाशैली.

१ पारध्यानें. २ निमित्तानें.

**सवतों ? ६६ क्षेत्र ह्या नांवाच्या मिषानें ह्याला बोलतों तें ह्यासाठीं कीं, माझ्या संगतीच्या बीजानें प्राणिमात्राचें पीक पीकतें." ६७**

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम् ।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

[मम योनिर्महद्ब्रह्म] येन्हवीं तरी महद्ब्रह्म । यालागीं हें ऐसें नाम । जे महदादिविश्राम । शालिका हे ॥ ६८ ॥ विकारां बहुवस थोरी । अर्जुना हेंचि करी । ह्मणौनि अवधारीं। महद्ब्रह्म ॥ ६९ ॥ अव्यक्तवादमतीं । अव्यक्त ऐसी वेदंती । सांख्याचिया प्रतीतीं । प्रकृती हेचि ॥ ७० ॥ वेदांतीं इयेतें माया । ऐसें ह्मणिजे प्राज्ञराया । असो किती बोलों वायां । अज्ञान हें ॥ ७१ ॥ आपला आपणपयां । विसर जो धनंजया । तेंचि रूप इया । अज्ञानासी ॥ ७२ ॥ आणिकही एक असे । जें विचारावेळे न दिसे । वातीं पाहतां जैसें । आंधारें कां ॥ ७३ ॥ हालविलिया जाये । निश्चळीं तरी होये । दुधी जैसी साय । दुधाची ते ॥ ७४ ॥ पैं जागर ना स्वप्न । ना स्वरूप अवस्थान । ते सुषुप्ति कां घन । जैसी होय ॥ ७५ ॥ कां न विथतां वायूतें । वांझें आकाश रितें । तया ऐसें निरुतें । अज्ञान गा ॥ ७६ ॥ पैल खांब कीं पुरुख । ऐसा निश्चय नाहीं एक । परि काय नेणों आलोक । दिसत असे ॥ ७७ ॥ तेविं वस्तु जैसी असे । तैसी कीर न दिसे । परि-कांहीं अनारीसें । देखिजेना ॥ ७८ ॥ ना राती ना तेज । ते संधि जेविं सांज । तेविं विरुद्ध ना निर्जे । ज्ञान आथी॥७९॥ ऐसी कोण्ही एकी दशा । तिये वाद अज्ञान ऐसा । [तस्मिन्गर्भं दधाम्यहं] तया गुंडलिया प्रकाशा । क्षेत्रज्ञ नाम॥८०॥ अज्ञान थोरिये आणिजे । आपणपें तरी नेणिजे । तें रूप जाणिजे । क्षेत्रज्ञाचें ॥ ८१ ॥ हाचि उभय योग । बुझें बापा चांग । सत्तेचा नैसर्ग । स्वभाव हा ॥ ८२ ॥ [संभवः सर्वभूतानां] आतां अज्ञानासारिखें । वस्तु आपणपांचि देखे । परि रूपें अनेकें । नेणों कोणें ॥ ८३ ॥ जैसा रंक भ्रमला । ह्मणे जा रे मी रावो आला । कां मूछित गेला । स्वर्गलोका॥८४॥ तेविं लेंचकलिया दिठी । मग देखणें जें जें उठी । तया नाम सृष्टी । मीचि वियें पैं गा ॥ ८५ ॥ जैसें कां स्वप्नमोहा । तो एकाकी देखे बहुवा । तोचि पाड आत्मया । स्मरणेंवीण असे ॥ ८६ ॥ हेंचि निभ्रांती । प्रमेय उपलवूं पुढती । परि तूं प्रतीती । याची घे पां ॥ ८७ ॥ ['पुनः' मम योनिर्महद्ब्रह्म] तरि माझी हे गृहिणी । अनादि तरुणी । अनिर्वाच्यगुणी । अविद्या हे ॥ ८८ ॥ इयें नाहीं हेंचि रूप । ठाणें हे अति उमप । हे निद्रितां समीप । चेतां दुरी ॥ ८९ ॥ [तस्मिन्गर्भं दधाम्यहं] पैं माझेनिचि आंगें । पहुडल्या हे जागे । आणि सत्तासंभोगें । गुर्विणी होय ॥ ९० ॥ महद्ब्रह्मउदरीं । प्राकृतीं आठै विकारीं । गर्भाची करी । पैलोवेली ॥ ९१ ॥ उभयसंगें पहिलें । बुद्धितत्त्व प्रसवलें । बुद्धितत्त्वें उभारलें । होय मन ॥ ९२ ॥ तरुणी ममता मनाची । अहंकार तत्त्व रची । तेणें महाभूतांची । अभिव्यक्ति होय ॥ ९३ ॥ आणि विषयेंद्रियां गोसी । स्वभावें तंव भूतांसी । ह्मणोनि येती सरिसीं । तीयेंही रूपा ॥ ९४ ॥ जालेनि विकारक्षोभें । पाठीं त्रिगुणाचें उभें । तेन्हां ये वासना गर्भे । ठायेंठांव ॥ ९५ ॥ रुखाचा आंवांका । जैसी बीजकणिका । जीवीं बांधे उदका । भेटतखेंवो॥ ९६ ॥ तैसी माझेनि संगें । अविद्या नाना जगें । आर घेवों लागे । अणियांची ॥ ९७ ॥ [संभवः सर्वभूतानामिति] मग गर्भगोळा तया । कैसें रूप तें ये आया । तें परियेसें राया । सुजनाचिया ॥ ९८ ॥ पैं मणिजें स्वेदजें । उद्भिजें आंरज । उमटती सहज । अवयव हे ॥ ९९ ॥ व्योमवायुवशें । वाढलेनि गर्भरसें । मणिज उससे । अवयव तो ॥ १०० ॥ पोटीं सूनि तमरजें । आंगळिकां तोय तेजें । उठितां निपजे । स्वेदज गा ॥ १ ॥ आपपृथ्वी उत्कटें । आणि तमोमात्रें निकृष्टें । स्थावर उमटे । उद्भिज हा ॥ २ ॥ पांचां पांचही विरंजीं । होती मनबुद्ध्यादि सांजीं । हीं हेतु जारजीं । ऐसें जाण ॥ ३ ॥ ऐसें चारी हे सरळ । करचरणतळ । महाप्रकृति स्थूळ । तेचि शिर ॥ ४ ॥ प्रवृत्ती पेलेलें पोट । निवृत्ती ते पाठि निट । सुरयोनी आंगें आठ । ऊर्ध्वांचीं ॥ ५ ॥ कंठ उल्हासता स्वर्ग । मृत्युलोक मध्यभाग । अधोदेश चांग । नितंब तो ॥ ६ ॥ ऐसें लेंकरूं एक । प्रसवली हे देख । जयाचें तिन्ही लोक । बाळसें गा ॥ ७ ॥ चौऱ्याशीं लक्ष योनी । तियें कांडा पेरां सांदणी । वाढे प्रतिदिनीं । बाळक हें ॥ ८ ॥ नाना देह अवयवीं । नामाचीं लेणीं लेववी । मोहस्तन्यें वा-

१ मूळमाया. २ भूमि, स्थान. ३ बोलतात. ४ बुद्धिमंता! ५ दिव्यानें. ६ उत्पन्न होतांना. ७ रिकामें. ८ आभास. ९ वेगळें. १० अनात्म. ११ आत्म. १२ समजून घे. १३ साहजिक. १४ चळली ह्मणजे. १५ स्वप्नभ्रांतीनें. १६ यथार्थ. १७ सारांश, अर्थ, सिद्धांत. १८ विस्तारूं.

१ अभाव. २ आकृती. ३ मोठी. ४ निजलेल्याला. ५ जागृताला. ६ गरोदर. ७ वृद्धि. ८ स्पष्टदशा. ९ शोधते. १० तत्काल. ११ वृक्षाचा. १२ आकार. १३ भेटतांच. १४ अंकुर. १५ अग्रयुक्त. १६ आकाराला. १७ अंड्यांपासून उत्पन्न होणारे. १८ घर्मापासून उत्पन्न होणारे. १९ जमिनीपासून उ०. २० गर्भाशयापासून उ०. २१ जन्मास येतो. २२ आधिक्यानें. २३ सहाय्यानें. २४ सज, सिद्ध. २५ पुढें झालें, दोंद वाढलें. २६ देवयोनी आठः—१ गंधर्वाप्सरस. २ सिद्ध. ३ यक्ष रक्ष. ४ चारण. ५ भूतप्रेतपिशाच. ६ वियाध्र. ७ किन्नरादिक, ८ विद्याप्सरस. २७ कटिपश्चाद्भाग.

ढवी । नित्य नवें ॥ ९ ॥ सृष्टी वेगळवेगळीया । तिया करांग्री आंगोळिया । भिन्नाभिमान सूदलिया । मुदिया तेथें ॥ ११० ॥ हें येकोलतें चराचर । अविचारित सुंदर । प्रसवोनि थोर । थोरावली ॥ ११ ॥ पैं ब्रह्मा प्रातःकाळ । विष्णु तो मध्यान्ह वेळ । सदाशिव सायंकाळ । वाळा यया ॥ १२ ॥ महा प्रळयसेजे । खेळोनि निवांत निजे । विषमज्ञानें उमजे । कल्पोदयीं ॥ १३ ॥ अर्जुना इयापरी । मिथ्यादृष्टीच्या घरीं । युगानुवृत्तीच्या करी । चोज पाउलें ॥ १४ ॥ संकल्प जयाचा इष्ट । अहंकार तो विनेट । ऐसिया होय शेवट । ज्ञानें यया ॥ १५ ॥ आतां असो हे बहु बोली । ऐसे विश्व माया व्याली । तेथ सांग जाली । माझी सत्ता ॥ १६ ॥

"बाकी महद्ब्रह्म; किंवा मूळमाया; असें नांव पडण्याचें कारण तरी हेंच, कीं, महत्तत्वादि पंचमहाभूतांचें विश्रांतिस्थान हें. ६८ विकारांना अनेक प्रकारांनीं वाढविणारी तरी हीच. ह्मणूनच अर्जुना! तिला महद्ब्रह्म असें ह्मणतात. ६९ मायावादी लोक ह्यालाच अव्यक्त—माया—असें ह्मणतात. आणि सांख्यांच्या अनुमतानें प्रकृति ती हीच. ७० हे बुद्धिमंता! वेदांती लोक हिलाच माया असें ह्मणतात. असो. हें व्यर्थ किती सांगावें? अज्ञान जें तें हेंच. ७१ अर्जुना! आपला आपल्यालाच जो विसर पडणें तेंच त्या अज्ञानाचें स्वरूप होय. ७२ हिचें आणखी एक असें आहे कीं, विचार केला ह्मणजे ही दिसत नाहीं. दिवा घेऊन पाहूं लागलें ह्मणजे जसा अंधार दिसत नाहीं, ७३ दुधाची साय दुधावरच हालविली असतां नाहींशी होते, आणि तें निश्चळ ठेवलें ह्मणजे उत्पन्न होते. ७४ जागृति नव्हे, आणि स्वप्नावस्थाही नव्हे; साकारही नव्हे आणि निराकारही नव्हे; ह्याप्रमाणें जशी सुषुप्ती किंवा घनावस्था होते, ७५ किंवा वायु उत्पन्न होण्यापूर्वी जी आकाशाची स्थिति असते, त्याच्याच सारखें खरोखर हें अज्ञान आहे. ७६ पलीकडे खांब आहे का कोणी पुरुष उभा आहे? ह्यापैकीं एकाचाही निश्चय होत नाहीं. पण कांहीं तरी आभास आहे खरा; मग काय तो कोण जाणे! ७७ त्याप्रमाणें वस्तु आहे तशी खरोखर दिसत नाहीं. परंतु निराळेंही कांहीं दिसत नाहीं. ७८ रात्रही नव्हे, आणि दिवसही नव्हे; अशी जी वेळा तिचें नांव संध्याकाळ. त्याप्रमाणें खरेंही नव्हे आणि खोटेंही नव्हे असें जें ज्ञान असतें, ७९ अशी जी एक प्रकारची दशा, तिला अज्ञान असें नांव आहे. त्यानें गुंडाळलेलें जें तेज त्याचें नांव क्षेत्रज्ञ. ८० मोठें अज्ञान आणणें, आपणास विसरणें, हें क्षेत्रज्ञाचें स्वरूप होय. ८१ बाबा! ह्या उभयतांचा योग चांगला लक्षांत आण. हाच सत्तेचा नैसर्गिक स्वभाव आहे. ८२ आणखी आपण स्वतः ही एक अज्ञानासारखीच वस्तु आहे असें समजतो. परंतु अनेक रूपें आहेत तीं कोणाचीं कोण जाणे? ८३ ज्याप्रमाणें एखादा भिकारी भ्रमिस्त झाला ह्मणजे ह्मणतो कीं 'अरे जारे! मीच राजा झालों आहें.' किंवा मूर्च्छित झालेला मनुष्य स्वर्गास जातो, ८४ त्याप्रमाणें दृष्टि चळली ह्मणजे मग जें जें दृष्टीपुढें येतें, त्याचें त्याचें नामरूप मींच केलें असें वाटतें. ८५ ज्याप्रमाणें स्वप्नांच्या भ्रांतींत असतों तोंपर्यंत अनेक प्रकार पहातों; तीच गति आत्म्याच्या स्मरणाशिवाय प्राण्यांना आहे. ८६ ह्या निःसंदेह मताचा आतां पुन्हां खुलासा करूं. पण तूं त्याचा अनुभव घे. ८७ तर ही अनादि, तरुणी, जिचे गुण सांगतां येत नाहींत, अशी जी अविद्यारूप स्त्री; ८८ कांहीं नसणें—अभाव—हेंच तिचें स्वरूप असून तें मोठें विशाळ आहे. ही निद्रिताच्या जवळ असते; आणि जागृतापासून लांब जाते. ८९ त्याचप्रमाणें मी स्वतः निजलों ह्मणजे ही जागते, आणि सत्तेच्या संभोगानें ही गरोदर होते. ९० ती सत्ता मायेच्या पोटामध्यें आठही विकारांच्या गर्भाची वृद्धि करते. ९१ उभयतांच्या संभोगामध्यें पहिलें बुद्धितत्त्व जन्मास येतें. त्या बुद्धितत्त्वाच्या योगानें मन उत्पन्न होतें. ९२ मनाची स्त्री ममता. तिच्यापासून अहंकारतत्त्व उत्पन्न होतें.

१ अंगुलि, बोटें. २ वेगळ्या अभिमानाचे पुरुष तेच आंगळ्या. ३ मिथ्यादृष्टि हेंच घर. ४ आवड. ५ खेळगडी, सेवक.

आणि त्यापासून पंचमहाभूतें रूपास येतात. ९३ विषय, इंद्रियें, आणि पंचमहाभूतें ह्यांच्याशीं तिची स्वभावतःच एकगट्टी असते. ह्मणून तींही तत्काल रूपास येतात. ९४ विकारांचा क्षोभ झाला ह्मणजे त्यांच्या मागून तीन गुण उत्पन्न होतात, आणि मग खरोखर वासना ह्मणून जी असते, ती उत्पन्न होते. ९५ उदक भेटलें कीं, बीजाचा दाणा जसा जिवंत वृक्षाचा आकार बांधतो, ९६ त्याप्रमाणें माझ्या संगतीनें अविद्या आहे, तिला नानाप्रकारच्या विश्वांचे कोंभ फुटूं लागतात. ९७ हे **सज्जनप्रिया!** मग त्या गर्भाच्या गोळ्यापासून त्यांचें स्वरूप कसें व्यक्त होतें तें ऐक. ९८ **अंडज**–अंडापासून उत्पन्न होणारे–**स्वेदज**–घामापासून उत्पन्न होणारे–**उद्भिज**–जमिनीपासून उत्पन्न होणारे–**जारज**–गर्भाशयापासून उत्पन्न होणारे–हे भाग आपोआपच उत्पन्न होतात. ९९ वायूच्या संगतीनें आकाशामध्यें गर्भरस वाढला ह्मणजे अंडज भाग उत्पन्न होतो. १०० तम आणि रज पोटांत ठेऊन उदक आणि तेज अधिक झालें ह्मणजे स्वेदज सृष्टि उत्पन्न होते. १०१ पृथ्वी आणि उदक ह्यांच्या आधिक्यानें आणि निकृष्टतमाच्या योगानें उद्भिज सृष्टि उत्पन्न होते. १०२ पांचाला पांचांचेंच सहाय्य मिळाल्यानें मन बुद्धि आदिकरून सिद्ध होतात. हें जारज सृष्टीचें कारण होय. १०३ ह्याप्रमाणें चार सृष्टि ह्या सरळ हातपाय होत, आणि विशाल महाप्रकृति तें मस्तक होय. १०४ प्रवृत्ति हें पुढें आलेलें पोट; आणि निवृत्ति ती सरळ पाठ होय. आणि स्वर्गातील आठ देवयोनी[1] ह्या त्यांचीं अष्टांगें होत. १०५ स्वर्ग हाच उंच कंठ; मृत्युलोक हा मध्यप्रदेश; आणि पाताळ हा उत्तम कटिपश्चाद्भाग. १०६ अशा प्रकारचें ती एक लेंकरूं प्रसवली आहे पहा. तिन्ही लोक हें ज्याचें बाळसें आहे. १०७ चवऱ्याशी लक्ष योनी ह्या पेरापेरांच्या व सांध्यासांध्याच्या सांधणी होत. अशा प्रकारें हें पोर दिवसेंदिवस वाढत असतें. १०८ नानाप्रकारचे देह व अवयव याजवर नामाचे अलंकार घालते. आणि नित्य नवें मोहरूपी स्तन देऊन त्यास वाढविते. १०९ निरनिराळ्या सृष्टी हीं निरनिराळीं हातापायांचीं बोटें होत. आणि निरनिराळे अभिमान, ह्या त्या बोटांतून घातलेल्या मुद्रिका होत. ११० अवर्णनीय, सुंदर, थोर, असें चराचर प्रसवून ती प्रौढ दशेला आली आहे. १११ ह्या बाळाला ब्रह्मा ही सकाळ; विष्णु ही दुपार; आणि शंकर ही सायंकाळ होय. ११२ ह्या बाळाचा खेळ संपला ह्मणजे मग तें प्रळयाच्या बिछान्यावर स्वस्थ निजतें. आणि कल्पोदयाच्या वेळीं विषमज्ञानानें पुन्हा उठतें. ११३ ह्याप्रमाणें **अर्जुना!** मिथ्या दृष्टीच्या घरामध्यें युगानुवृत्तीच्या पाउलानें कौतुक करतें. ११४ संकल्प ज्याचा इष्ट; अहंकार हा ज्याचा खेळगडी; अशा ज्ञानानें ह्याचा शेवट होतो. ११५ आतां हा विस्तार असो. माया ही अशा प्रकारें विश्वाला व्याली आहे, आणि तेणेंकरून माझी सत्ता परिपूर्ण झाली आहे. ११६

सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवंति याः ।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥

[तासां ब्रह्म महद्योनिः] याकारणें मी पिता । महद्ब्रह्म[1] हे माता । अपत्य पंडुसुता । जगडंबर ॥ १७ ॥ [सर्वयोनिषु कौंतेय] आतां शरीरें बहुतें । देखोनि न भेद हो चित्तें । जे मनबुद्ध्यादि भूतें । एकेंचि येथें ॥ १८ ॥ [मूर्तयः संभवंति याः] हां गा एकचि देहीं । काय अनारिसे अवयव नाहीं । तेंवि विचित्र विश्व पाहीं । एकचि हें ॥ १९ ॥ पैं उंचा नीचा डाहाळिया । विषमा वेगळालिया[2] । येकाचि जेवीं जालिया । बीजाचिया ॥ १२० ॥ [अहं बीजप्रदः पिता] आणि संबंध तोही ऐसा । मृत्तिके घट लेंकरूं[3] जैसा । कां पटत्व कापुसा । नातू होय ॥ २१ ॥ ना ना कल्लोळपरंपरा । संतती जैसी सागरा । आह्मा आणि चराचरा । संबंध तैसा ॥ २२ ॥ ह्मणौनि वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ ।

१ आठ प्रकारचा देवसर्गः—("देवसर्गश्चाष्टविधो विबुधाप्सरसो सुराः १ गंधर्वाप्सरसः २, सिद्धाः ३, यक्षरक्षांसि ४, चारणाः ५, भूतप्रेतपिशाचाश्च ६, विद्याध्राः ७, किन्नराद्यः ८" श्रीमद्भागवतस्कंध ३ अध्याय १०)

१ माया. २ पृथक् पृथक्. ३ मुलगा.

तेविं मी गा सकळ । संबंध वाव ॥ २३ ॥ जालेनि जगें मी झांके । तरि जगत्वें कोण फांके । किळेवरी माणिकें । लोपिजे काई ॥२४॥ अळंकारातें आलें । तरि सोनेपण काइ गेलें । कीं कमळ फांकलें । कमलत्वा मुके ॥ २५ ॥ सांग पां धनंजया । अवयवीं अवयविया । आच्छादिलें कीं तया । तेंचि रूप ॥ २६ ॥ विरूढलिया जोंधळा । कणिसाचा निर्वाळा । वेंचला कीं आगळा । दिसतसे ॥ २७ ॥ म्हणौनि जग परौतें । सारूनि पांहिजे मातें । तैसा नोहें उखितें । आघवें मीचि ॥ २८ ॥ हा तूं साचोकारा । निश्चयाचा खरा । गांठी बांध वीरा । जीवाचिये ॥ २९ ॥ आतां मिया मी दाखविला । शरीरीं वेगळाला । गुणीं मींचि बांधला । ऐसा आवडे ॥ १३० ॥ जैसें स्वप्नीं आपण । उठूनियां आत्ममरण । भोगिजे जाण । कपिध्वजा ॥ ३१ ॥ कां कवळांतें डोळे । प्रकाशूनि पिवळे । देखती तेंही कळे । तयांसीचि ॥ ३२ ॥ नाना सूर्य प्रकाशें । प्रकटी तैं अभ्र भासे । तों लोपला हेंही दिसे । सूर्येंचि कीं ॥ ३३ ॥ पैं आपणपेनि जालिया । छाया गा आपुलिया । पाहोनि बिहालिया । आन आहे ॥ ३४ ॥ तैसीं इयें नाना देहें । दाऊनि मी नाना होयें । तेथ ऐसा जो बंध आहे । तेंही देखें ॥ ३५ ॥ बंधचि कीं न बंधिजे । हें जाणणें मजें माझें । नेणणेनि उपजे । आपलेनि ॥ ३६ ॥ तरि कोणे गुणें कैसा । मजचि मीं बंध ऐसा । आवडे तें परियेसा । अर्जुनदेवा ॥ ३७ ॥ गुण तें किंधर्म । कायि ययां रूपनाम । कें जाले हें वर्म । अवधारीं पां ॥ ३८ ॥

"ह्याकरितां **अर्जुना!** मी पिता; माया ही माता; आणि जगडंबर हें अपत्य होय.११७ आतां हीं शरीरें अनेक आहेत ह्मणून चित्तामध्यें तसा भेद आणूं नको. कारण, मन, बुद्धि, आदिकरून सर्व भूतें हीं सर्व ह्या ठिकाणीं एकच आहेत. ११८ अरे बाबा! ह्या एकाच देहामध्यें अवयव हे निरनिराळे नाहींत काय? त्याप्रमाणें हें विश्व भिन्न भिन्न आहे तरी तें एकच. ११९ उंच, सखल, लहान, मोठ्या अशा वेगवेगळ्या डाहळ्या ज्याप्रमाणें एकाच बीजापासून होतात, १२० आणि संबंधही असाच. जसा घट हा मातीचा मुलगा; किंवा वस्त्र हें कापसाचें नातवंड. १२१ किंवा एकामागून येणाऱ्या लाटा, ही जशी सागराची संतति; तितकाच आमचा आणि चराचराचा संबंध आहे. १२२ ह्मणून अग्नि झाला काय, आणि ज्वाला झाल्या काय, दोन्हीही अग्नीच; त्याप्रमाणें सारा मीच आहें. संबंध ह्मणणें हें व्यर्थ. १२३ उत्पन्न झालेल्या ब्रह्मांडांनीं जर मी आच्छादलों गेलों, तर ब्रह्मांडांच्या रूपानें प्रगट होणार कोण? कांतीनें माणिक झांकून जाईल काय? १२४ अलंकाराचें रूप आलें, ह्मणून सोनेंपण नाहींसें होईल होय? किंवा कमल विकास पावलें, ह्मणून त्याचा कमलपणाच नाहींसा होईल काय? १२५ सांग. **अर्जुना?** अवयवांनीं अवयवांना आच्छादून टाकलें, तर तेंच त्याचें स्वरूप होय. १२६ जोंधळा उगऊन आला, आणि कणसें दाटलीं, ह्मणजे खर्च झालेल्या दाण्याहूनही अधिक दाणे दिसूं लागतात. १२७ ह्मणून जग पलीकडे ढकलून मला पहातां येण्यासारखा मी नाहीं. यच्चयावत् सारें मीच आहें. १२८ हे **वीरा!** हा निश्चयाचा खरा सिद्धांत तूं जिवाच्या गांठीस बांधून ठेव. १२९ आतां मी दाखविलेला तो मीच. शरीरामध्यें वेगवेगळ्या गुणांनीं बांधला जाणाराही मीच असें मान. १३० हे **कपिध्वजा!** ज्याप्रमाणें आपण स्वप्नामध्यें उठून आत्महत्या करून घ्यावी, १३१ किंवा कामीण झालेल्याला डोळ्यांच्या प्रकाशानें सारें पिवळें दिसतें, तें त्याचें त्यालाच समजतें. १३२ किंवा सूर्यप्रकाश दाखवून देईल तेव्हांच अभ्र दिसूं लागतें. आणि तो नाहींसा झाला, हेंही सूर्यामुळेंच कळतें. १३३ आपल्यापासूनच आपली छाया पडते; ती पाहून भ्यालें, ह्मणून ती का दुसरी होईल होय? १३४ त्याप्रमाणें मी अनेक प्रकारचे देह दाखवून मी भिन्न भिन्न होतों. पण त्यांत असा संबंध आहे हें लक्ष्यांत ठेव. १३५ मी बद्ध आहें किंवा अबद्ध आहें, ह्या कल्पनाही माझ्याच अज्ञानानें उत्पन्न होतात. १३६ तर हे **अर्जुनदेवा!** माझ्याच

१ व्यर्थ. २ कांतीनें, प्रभेनें. ३ निष्पन्न, दाखला. ४ खर्च झाला, कमी झाला. ५ पहावें. ६ संपूर्ण. ७ सिद्धांत, खऱ्या रीतीनें. ८ वाटतें. ९ काविळीनें. १० किंवा. ११ भ्याल्यास. १२ बद्धपणा. १३ मला. १४ अज्ञानानें. १५ त्यांचे धर्म कोणते?

गुणांनीं मी कसा बांधला जातों तें ऐक. १३७ गुण ते किती ? त्यांचे धर्म काय ? त्यांचें नाम, रूप कसें ? हे कोठून उत्पन्न झाले ? हें तत्त्व ऐक." १३८

सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ।
निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययं ॥ ५ ॥

[ सत्वं रजस्तम इति गुणाः ] तरि सत्वरजतम । तिघांसि हें नाम । [प्रकृतिसंभवाः] आणि प्रकृति [1]जन्म- । भूमिका ययां ॥ ३९ ॥ येथ सत्व तें उत्तम । रज तें मध्यम । तिहींमाजि तम । साविया[2]धारें ॥ १४० ॥ हें एकेचि वृत्तीच्या ठायीं । त्रिगुणत्व आवडे पाहीं । [3]वयसात्रय देहीं । येकीं जेवि ॥ ४१ ॥ कां मिनलेनि [4]कीडें । जंवजंव [5]तूक वाढे । तंवतंव सोनें हीन पडे । पां[6]चिका कसीं ॥ ४२ ॥ पैं सावधपण जैसें । वाहविलें आळसें । सुषुप्ती बैसे । [7]घणावोनि ॥ ४३ ॥ तैसी अज्ञानांगीकारें । निगाली वृत्ति [8]विखुरे । ते सत्वरजद्वारें । तमही होय ॥ ४४ ॥ [ निबध्नंति महाबाहो ] । अर्जुना गा जाण । ययां नाम गुण । आतां दाखऊं खुण । बांधती ते ॥ ४५ ॥ [ देहे देहिनमव्ययं ] तरि क्षेत्रज्ञदशे । आत्मा [9]मोटका पैसे[10] । हें देह मी ऐसें । [11]मुहूर्ते करी ॥ ४६ ॥ आजन्ममरणांतीं । देहधर्मीं समस्तीं । महत्वाची [12]सूती । घे ना जंव ॥ ४७ ॥ जैसी मीनाच्या तोंडीं । पडेना जंव उंडी । तंव गळ आसुडी । [13]जळपारधी ॥ ४८ ॥

" तर सत्व, रज आणि तम अशीं ह्या तीन गुणांना तीन नामें आहेत. आणि प्रकृति ही ह्यांची जन्मभूमि होय. १३९ ह्यांत सत्त्व हें उत्तम; रज हें मध्यम; आणि तम हें ह्या तिहींसही आधारभूत असतें. १४० एकाच देहामध्यें बाल्य, तारुण्य, व वार्धक्य हीं जशीं अवस्थात्रयें असतात, त्याप्रमाणें एकाच वृत्तीमध्यें हें त्रिगुणत्व उत्पन्न होतें. १४१ किंवा सोन्यामध्यें जसें जसें हिण घालावें, तसें तसें त्याचें वजन वाढतें, आणि त्या हिणकसाच्या फिक्या कसानें तें सोनेंही फिकें पडतें. १४२ आळसानें ज्याप्रमाणें सावधपणा नाहींसा केला म्हणजे सुषुप्ति दृढतर होऊन बसते, १४३ त्याप्रमाणें अज्ञानपणाचा स्वीकार केलेली वृत्ति पसरली म्हणजे ती सत्वरजांच्या द्वारें तमस्वरूपीही होऊं शकते. १४४ अर्जुना ! ह्यांचें नांव गुण. आतां ते बांधतात कसे ? तेही सांगतों. १४५ तर क्षेत्रज्ञ दशेमध्यें आत्मा हा लहान (संकुचित) होऊन देह हाच मी असें मानण्यास प्रारंभ करतो. १४६ जन्मल्यापासून मरणकालपर्यंत समस्त देहधर्मांमध्यें अभिमान उत्पन्न झाला न झाला इतक्यांत १४७ माशाच्या तोंडांत जोंपर्यंत उंडी पडत नाहीं, तोंपर्यंत कोळी जसा गळाला हिसके देतो," १४८

1 जन्मस्थान. 2 मुख्य आधारभूत. 3 तीन अवस्था. 4 डांकानें. 5 वजन. 6 हिणकटाच्या कसानें. 7 दृढ होऊन. 8 पसरते. 9 अल्प. 10 होतो. 11 प्रारंभ करतो. 12 अभिमान. 13 कोळी.

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चाऽनघ ॥ ६ ॥

[ तत्र सत्त्वमित्यर्धं ] तेविं सत्वें [1]लुब्धकें । [2]सुखज्ञानाचीं पाशकें । [3]वोढिजेती मग [4]खुडंके । मृग जैसा ॥ ४९ ॥ मग ज्ञानें चडफडी । जाणिवेचे [5]खुरखोडी । स्वयं सुख हें धाडी । हातींचें गा ॥ १५० ॥ [ सुखसंगेन ] तेव्हां विद्यामानें तोखे । लाभमात्रें हरिखे । मी संतुष्ट हेंही देखे । श्लाघों लागे ॥ ५१ ॥ म्हणे भाग्य ना माझें । आजि सुखिये नाहीं दुजे । [6]विकाराष्टकें फुंजे । सात्विकाचेनि ॥ ५२ ॥ [ ज्ञानसंगेन चानघ ] आणि येणेंही न सरे । [7]लांकण लागे दुसरें । जे विद्वत्तेचें भरे । भूत आंगीं ॥ ५३ ॥ आपणचि ज्ञानस्वरूप आहे । तें गेलें हें दुःख न वाहे । कीं [8]विषयज्ञानें होये । गगनायेवढा ॥ ५४ ॥ रावो जैसा [9]स्वप्नीं । रंकपणें रिघे [10]धानीं । तो दों[11]दाणा मानी । इंद्र ना मी ॥ ५५ ॥ तैसें गा देहातीता । जालेया देहवंता । होंलागे पंडुसुता । बाह्यज्ञानें ॥ ५६ ॥ प्रवृत्तिशास्त्र बुझे । यज्ञविद्या उमजे । किंबहुना [12]सुझे । स्वर्गवरी ॥ ५७ ॥ आणि म्हणे आजि आन । मी वांचूनि नाहीं सज्ञान । चातुर्यचंद्रा गगन । चित्त माझें ॥ ५८ ॥ [बध्नाति] ऐसें सत्व सुखज्ञानीं । जीवासि लाउनि [13]वोनी । बैलाची करी वोनी । पांगुळाचिया ॥ ५९ ॥ आतां हाचि शरीरी । रजें जियापरी । बांधिजे तें अवधारीं । सांगिजेल ॥ १६० ॥

त्याप्रमाणें सत्वरूप पारधी, सौख्यज्ञान हाच कोणी एक पाश, त्यानें ओढतो, तेव्हां मृगाप्रमाणें अडकून पडतो. १४९ ज्ञानानें चडफडतो. समजुतीची लाथाळी

1 पारध्यानें. 2 सुखाच्या समजुतीचे. 3 ओढले जातात. 4 तडफडतो. 5 लाथाळी. 6 आठ विकारांनीं. 7 बंधन, शुष्ककाष्ट. 8 पदार्थज्ञानानें. 9 शहरांत. 10 भिक्षेच्या दोन दाण्यांनीं. 11 समजतो. 12 काढण्या. 13 बरोबरी.

करतो; आणि आत्मसुख हातचें दवडतो. १५० तेव्हां विद्येपासून होणाऱ्या सन्मानानें संतोष पावतो; क्षुद्र लाभानें तृप्त होतो; मला आज कांहीं कमी नाहीं, असें मानून प्रौढी सांगूं लागतो. १५१ "माझ्या भाग्यासारखें भाग्य नाहीं. माझ्यासारखें सुख दुसऱ्या कोणास नाहीं." असें ह्मणून सत्वाच्या आठ विकारांनीं फुगतो. १५२ येवढ्यानेंही भागत नाहीं. तर त्याचे मागें दुसरेंही एक शुक्रकाष्ट लागतें. तें कोणतें ? तर आंगांत संचरलेलें विद्येचें भूत. १५३ आपणच ज्ञानस्वरूप असतां, तें स्वरूप नाहींसें झालें, ह्याचें दुःख करीत नाहीं. कारण, विषयज्ञानानेंच गगनायेवढा होतो. १५४ राजा जसा स्वप्नामध्यें भिकारी होऊन शहरांत शिरतो, आणि भिक्षेच्या दोन दाण्यांनीं फुगून इंद्र तो इंद्र नव्हे; तर इंद्र तो मीच असें ह्मणतो; १५५ त्याप्रमाणें अर्जुना! बाह्यज्ञानाच्या योगानें, देहातीताला देह प्राप्त झाला असतां, होऊन जातें. १५६ प्रवृत्तिशास्त्र (संसार) समजून घेतो; यज्ञविद्येला मान देतो; आणि स्वर्गच काय तो श्रेष्ठ असें मानतो. १५७ आणखी ह्मणतो कीं, आज माझ्याशिवाय सज्ञान असा दुसरा कोणीच नाहीं. चातुर्यचंद्राचें आकाश काय तें माझें चित्त. १५८ अशा प्रकारें सत्व आहे तें सुखाच्या ज्ञानानें जिवास काढण्या लावून पांगळ्याच्या बैलासारखें करून सोडतें. १५९ आतां ह्याच देहाला रज कसें बांधतें तेंही सांगतों ऐक." १६०

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं ।

तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनं ॥ ७ ॥

[ रजो रागात्मकं विद्धि ] हें रज याचि कारणें । जीवातें रंजऊं जाणे । हें अभिलाखाचें तरुणें । सदाचि गा ॥ ६१ ॥ हें जीवीं मोटकें रिगे । [ तृष्णासंगसमुद्भवं ] आणि कामाच्या मर्दीं लागे । मग वारया वेंळघे । तृष्णेचिया ॥ ६२ ॥ घृतें ओंबुखूनि आंगियाळें । वैज्रामीचें सांदुकलें । आतां बहु

१ थोडेंसें. २ चिकटतें. ३ शिंपून. ४ अग्निकुंड. ५ विद्युदामीचें. ६ पेटविलें.

थेंकुलें । आहे तेथ ॥ ६३ ॥ तैसी खवळे चाड । होय दुःखासकट गोड । इंद्रश्रीहि सांकड । गमों लागे ॥ ६४ ॥ तैसी तृष्णा वाढिनलिया । मेरूही हाता आलिया । तऱ्ही ह्मणे एखादिया । दारुणा वळंघों ॥ ६५ ॥ जीविताची कुरोंडी । वोवाळूं लागे कवडी । मानी तृणाचिये जोडी । कृतकृत्यता ॥ ६६ ॥ आजि असतें वेंचिजेल । परि पाहे पां कीजेल । ऐसा पांगी वेंडील । व्यवसाय मांडी ॥ ६७ ॥ ह्मणे स्वर्गा हन जावें । तरि काय तेथें खावें । [ कर्मसंगेन ] इयालागीं धांवे । याग करूं ॥ ६८ ॥ व्रतापाठीं व्रतें । आचरे इष्टापूर्तें । काम्यवांचूनि हातें । शिवणें नाहीं ॥ ६९ ॥ पैं ग्रीष्मांतींचा वारा । विसांवो नेणें वीरा । तैसा न ह्मणे व्यापारा । रात्र दिवस ॥ ७० ॥ काय चंचळ मासा । कामिनीकटाक्ष जैसा । लवलाहो तैसा । विजूही नाहीं ॥ ७१ ॥ तेतुलेनि गा वेगें । स्वर्गसंसारपांगें । आगिमाजि रिगे । क्रियांचिये ॥ ७२ ॥ [ देहिनं ] ऐसा देहीं देहावेगळा । ले तृष्णेचिया सांखळा । खटाटोप वाहे गळां । व्यापाराचा ॥ ७३ ॥ [ तन्निबध्नाति कौंतेय ] हें रजोगुणाचें दारुण । देहीं देहियासि वंधन । परिस आतां विंदाण । तमाचें तें ॥ ७४ ॥

"ह्यांस 'रज' असें ह्मणण्याचें कारण, त्यांस जिवाला रंजवितां येतें. हें अभिलाषाचें निरंतर तारुण्य आहे. १६१ हें जिवामध्यें थोडेंसें शिरतें, आणि कामाच्या धुंदींत गुरफटतें. आणि मग त्यास तृष्णारूप वाऱ्याचें सहाय मिळतें. १६२ घृतानें सिंचन केलेल्या अग्निकुंडामध्यें वज्राग्नि पेटविला तर, तो सुद्धां ज्याच्या पुढें लहान होईल, १६३ अशी ज्याची तृष्णा बलवत्तर असते. आणि ही दुःखमय असतांही गोड वाटते. इंद्राचें वैभवही थोडें असें वाटूं लागतें. १६४ अशा प्रकारें तृष्णा वाढली, ह्मणजे मेरु हाताला आला तरी सुद्धां आणखी एखाद्या गहन गोष्टीला हात घालावा ह्मणतो. १६५ कवडीसाठीं जिवाची ओवाळणी करूं लागतो. तृणाच्या लाभांतही जो कृतकृत्यता समजतो. १६६ असलेलें जर आज खर्च केलें, तर उद्यां काय करावयाचें ! अशा

१ लहान. २ संकुचित. ३ भयंकर गोष्टीला. ४ हात घालावा. ५ ओवाळणी. ६ कवडीकरितां. ७ लाभानें. ८ उद्यां. ९ आशेनें. १० मोठा. ११ चंचल. १२ वीज सुद्धां. १३ स्वर्ग किंवा संसार ह्यांच्या इच्छेनें. १४ घेतो. १५ कौतुक.

हव्यासानें मोटमोठ्या कामास हात घालावयाचा. १६७ तो ह्मणतो कीं, स्वर्गाला गेलें तर, तेथें काय खावयाचें? ह्यासाठीं यज्ञ करावयाला धांवतो. १६८ आपलें इष्ट साधण्याकरितां व्रतापाठीमागून व्रतांचें आचरण करीत सुटतो. यज्ञ करतो; तलाव बांधतो; विहीर खणतो; कर्म्यकर्मांशिवाय–फलेच्छेशिवाय कोणत्याही कर्माला हात लावावयाचा नाहीं. १६९ हे **वीरश्रेष्ठा!** ग्रीष्मऋतूंतील अखेरच्या वाऱ्याला जसा विसावा नसतो, त्याप्रमाणें दंव दंव करतांना जो रात्र किंवा दिवस सुद्धां पहात नाहीं. १७० मासा तो कितीसा चंचळ? स्त्रियांचे नेत्रकटाक्ष जसे चपळ तसा जो चपळ. वीज देखील त्याच्या पुढें कांहीं नव्हे. १७१ स्वर्ग आणि संसार ह्यांच्या इच्छेनें, जो तितक्याच वेगानें कर्माच्या आगींत शिरतो. १७२ ह्याप्रमाणें देहामध्यें देहावेगळा असणारा, तृष्णेची बिडी अडकवून घेतो, आणि व्यापाराचा खटाटोप गळ्यामध्यें वागवितो. १७३ हेंच देहामध्यें देह्याला रजोगुणाचें दृढतर बंधन आहे. आतां तमोगुणाचें कौतुक ऐक.” १७४

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

[ तमस्तु ] व्यवहाराचेहि डोळे । मंद जेणें पडळें । मोहरात्रीचें काळें । मेहुडें जैसे ॥ ७५ ॥ [ अज्ञानजं विद्धि ] अज्ञानाचें जियालें । जया एका लागलें । [ मोहनं ] जेणें विश्व भुललें । नाचत असे ॥ ७६ ॥ अविवेकमहामंत्र । जें मौढ्यमयाचें पात्र । हें असो मोहनास्त्र । जीवांसि जें ॥७७॥ पार्था तें गा तम । रचूनि ऐसें वर्म । चौखुरी देहात्म । मानियातें ॥ ७८ ॥ [ सर्वदेहिनां ] हें येकचि कीर शरीरीं । माजों लागे चराचरीं । आणि तेथ दुसरी । गोठी नाहीं ॥ ७९ ॥ [ आलस्य- ] सर्वेंद्रियां जाड्य । मनामाजि मौढ्य । माल्हाती दार्ढ्य । आलस्याचें ॥ १८० ॥ आंगें आंग मोडामोडी । कार्यजातीं अनावडी । नुसती पैरवडी । जांभयांची ॥ ८१ ॥ उघडियाचि दीठी । देखणें नाहीं किरीटी । नीळविताचि उठी । वो ह्मणौनि ॥ ८२ ॥ पडिलिये धोंडी । नेणे कानी मुरडी । तयाचि परी मुरकुंडी । उकलूं नेणें ॥ ८३ ॥ पृथ्वी पाताळीं जावो । कां आकाशाही वरी येवो । परी उठणें हा भावो । उपजों नेणें ॥ ८४ ॥ उचितानुचित आघवें । झांसुरेतां नाठवे जीवें । जेथिंचा तेथ लोळावें । ऐसी मेधा ॥ ८५ ॥ उभऊनि करतळें । पडिघोंये कपोळें । पायाचें शिरियाळें । मांडूं लागे ॥ ८६ ॥ [निद्राभिः] आणि निद्रेविषयीं चांग । जीवीं आथि लाग । झोंपीं जातां स्वर्ग । वावो ह्मणे ॥ ८७ ॥ ब्रह्मायु होइजे । मा निजेलियाचि असिजे । हें वांचूनि दुजें । व्यसन नाहीं ॥ ८८ ॥ कां वाटे जातां वोधें । केव्हांतां ही डोळा लागे । अमृतही परी नेघे । जरी निद आली ॥ ८९ ॥ [प्रमाद-]वेविंचि आक्रोशबळें । व्यापारे कोणे एके वेळे । निगालें तरी आंधळें । रोषें जैसें ॥ १९० ॥ केधवां कैसें राहाटावें । कोणेसीं काय बोलावें । हें ठोंकतें कीं नोगवे । हेंही नेणे ॥ ९१ ॥ वणवा मियां आघवा । पांखें पुसोनि घेयावा । पतंग या हांवों । घाली जेविं ॥ ९२ ॥ तैसा वेळघे साहसा । अकरणींचि धिवसा । किंबहुना ऐसा । प्रमादु रुचे ॥ ९३ ॥ [तन्निबध्नाति भारत] एवं निद्रालस्यप्रमादीं । तम इया त्रिबंधीं । बांधे निरुपाधि । चोखटातें ॥ ९४ ॥ [दिहे देहिनमव्ययमिति पंचमश्लोकस्थपादं सुखबोधाय पुनर्व्याचष्टे] जैसा वन्हि काष्ठीं भरे । तैं दिसे काष्ठाकारें । व्योम घटें आवरे । तैं घटाकाश ॥ ९५ ॥ नाना सरोवर भरलें । तैं चंद्रत्व तेथें बिंबलें । तैसें गुणपाशीं बांधलें । आत्मलगमे ॥ ९६ ॥

“ज्याच्या पटलाच्या योगानें व्यवहाराचे डोळेही मंद पडतात; आणि मेघासारखा मोहरात्रीचा काळोख पडतो; १७५ ज्याचा जन्म एका अज्ञानापासूनच झालेला असतो. ज्याच्या योगानें विश्व हें भ्रमांत पडून नाचत असतें. १७६ जें अविवेकाचे महामंत्र; जें मूर्खत्वरूप मद्याचें पात्र. हें असो. जें जिवाला केवळ मोहनास्त्र. १७७ **अर्जुना!** तें तम, अशा लक्षणेंकरून देह हाच आत्मा ह्मणून मानणाऱ्यास चहूंकडून बांधून टाकतें. १७८ चराचराच्या शरी-

---

१ पडद्यानें. २ मेघ. ३ जिव्हाळा. ४ करून. ५ लक्षण. ६ चहूंकडून ताणून बांधणें. ७ मानणाराला. ८ आश्रय मानतो, अंगिकार करतो. ९ रेलचेल. १० न बोलवतांच.

१ शिळा. २ समजत नाहीं. ३ स्वस्थ पडल्याच्या योगानें. ४ बुद्धि, इच्छा. ५ दावून धरणें. ६ गाल, डोकें. ७ मस्तकाधार. ८ प्राप्तीची इच्छा. ९ सहज. १० कलंडलें असतां उगाच. ११ बलात्कारानें. १२ साध्य आहे. १३ असाध्य आहे. १४ पंखांनीं. १५ इच्छेनें. १६ प्रवृत्त होतो. १७ न करण्याच्या कामीं. १८ धैर्य. १९ चांगल्यास.

रामध्यें हेंच एक माजून राहतें. आणि तेथें मग दुसरी गोष्ट उरत नाहीं. १७९ साऱ्या इंद्रियांना जडपणा येतो; मनामध्यें मूर्खपणा शिरतो; आणि आळसाचें ठाणें बसतें. १८० आंगानें संधिसंधीला आळोके पिळोके देऊं लागतो; कोणतेंही काम करणें आवडत नाहीं; नुसती जांभयांची मात्र रेलचेल उडते. १८१ अर्जुना! डोळे उघडे असूनही जो पहात नाहीं; हाक मारली तर, 'ओ' ह्मणून जो उठावयाचा नाहीं, १८२ दगड कोसळला तरी कुशीला वळावयाचेंही ज्यास माहित नाहीं; १८३ पृथ्वी रसातळाला जावो; किंवा ती आकाशाच्याही वर येवो; पण उठावें असें ज्याच्या मनांत सुद्धां यावयाचें नाहीं. १८४ लोळत पडला ह्मणजे योग्य अयोग्य ह्यांपैकीं कांहींच जिवाला स्मरत नाहीं; जेथल्या तेथें लोळत पडावें हीच इच्छा. १८५ दोन्ही हात उभारून ते गालावर ठेवावयाचे; आणि गुडघ्यांत मान घालून बसावयाचें. १८६ आणखी झोंपेविषयीं जिवाला मोठी आवड. झोंप लागली, कीं तिच्या पुढें स्वर्ग सुद्धां तुच्छ. १८७ मला जर ब्रह्मदेवाचें आयुष्य आलें, तर मी निजलेलाच राहीन. ह्याच्या शिवाय दुसरी इच्छा नाहीं. १८८ किंवा वाटेनें जातांना सहज कलंडून तेथें डुलकी आली आणि झोंप मिळाली, तर त्यापुढें अमृतही तुच्छ. १८९ त्याचप्रमाणें मोठ्या जुलमानें एखाद्या वेळीं काम करावयाला लागलाच, तर रागानें जणों काय आंधळा झालेला. १९० केव्हां कसें वागावें? कोणाला काय बोलावें? हें आपल्या हातून होण्यासारखें आहे का होण्यासारखें नाहीं हेंही कळत नाहीं. १९१ ही सारी आग, मी आपल्या पंखांनीं पुसून घेणार अशी हांव धरून पतंग जसा घालून घेतो, १९२ त्याप्रमाणें साहस करण्याला सरसावतो. आणि जें करूं नये त्यांत धाडस दाखवितो. किंबहुना असा प्रमाद करणें हेंच ज्याला आवडतें. १९३ अशा प्रकारें तम आहे तें निद्रा, आलस्य, आणि प्रमाद ह्या तीन बंधांनीं निरुपाधि आणि पवित्र अशा आत्म्याला बांधतें. १९४ ज्याप्रमाणें अग्नि लांकडामध्यें शिरला ह्मणजे तो लांकडाच्याच आकाराचा दिसूं लागतो. घागरीनें आकाश आच्छादलें, ह्मणजे तें घड्याच्याच आकाराचें होतें. १९५ किंवा सरोवर भरलेलें असतें त्या वेळीं तेथें चंद्रबिंब दिसूं लागतें, त्याप्रमाणें आत्मा हा गुणांनीं बांधला आहे असें वाटतें." १९६

सत्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रसादे संजयत्युत ॥ ९ ॥
रजस्तमश्चाऽभिभूय सत्वं भवति भारत।
रजः सत्वं तमश्चैव तमः सत्वं रजस्तथा ॥१०॥

[तमः सत्वं रजस्तथा] पैं परिहरूनि कफवात। जैं देहीं आटोपे पित्त। तैं करी संतप्त। देह जेविं ॥ ९७ ॥ [रजस्तमश्चाभिभूयेति] कां वर्ष[१] आतप[२] जैसें। जिणौनि शीतचि दिसे। तेव्हां होय हिंव ऐसें। आकाश हें ॥ ९८ ॥ [रजः सत्वं तमश्चैव] नाना स्वप्न जागृती। लोपूनि ये सुषुप्ती। तैं क्षण एक चित्तवृत्ती। तेचि होय ॥ ९९ ॥ [सत्वं सुखे संजयति] तैसीं रजतमें हारवी। जैं सत्व माजु मिरवी। तैं जीवाकरवीं ह्मणवी। सुखिया ना मी ॥ २०० ॥ [ज्ञानमावृत्य तु तमः] तैसेंचि सत्व रज। लोपूनि तमाचें भोजें[३]। वळघे तैं सहज। प्रमादी[४] होय ॥ १ ॥ [रजः कर्मणि भारत]तयाचि गा परिपाटीं। सत्वतमातें पोटीं। घालूनिं जेव्हां उठी। रजोगुण ॥ २ ॥ तेव्हां कर्मावांचूनि कांहीं। आन गोमटें नाहीं। ऐसें मानी देहीं। देहराज ॥ ३ ॥ त्रिगुणनिरूपण। तीं[५] श्लोकीं सांगीतलें जाण। आतां सत्वादिवृद्धिलक्षण। सादर परियेसा ॥ ४ ॥

"तसेंच कफ आणि वात ह्यांचा पराजय करून देहामध्यें सारें पित्तच भरून राहिलें ह्मणजे तें जसें देहाला संतप्त करून सोडतें; १९७ किंवा वर्षाकाल आणि उन्हाळा मागें पडल्यानंतर सारें गारीगार होऊन जातें तेव्हां, सारें आकाश हिमरूपच बनतें. १९८ किंवा स्वप्न आणि जागृति नाहींशा होऊन सुषुप्ति आली ह्मणजे चित्तवृत्तीही क्षणभर तद्रूप होते, १९९ त्याप्रमाणें रजाला आणि तमाला

१ वृष्टि. २ उष्मा. ३ महत्व, राज्य. ४ असावध. ५ 'तत्र सत्वं निर्मलत्वात्' इत्यादि तीन श्लोकांनीं.

**मागें सारून सत्वच जेव्हां प्रौढी मिरवूं लागतें, तेव्हां जिवाकडून ह्मणवितें कीं, सुखी तो मीच नव्हे काय? २०० त्याचप्रमाणें सत्व आणि रज ह्यांचा लोप होऊन तमाचें राज्य होतें तेव्हां, सहजच गाफिल होतो. २०१ ह्याच रीतीनें सत्वाला आणि तमाला पोटांत घालून जेव्हां रजोगुण उठतो, २०२ तेव्हां कर्मावांचून दुसरें कांहींच चांगलें नाहीं. असें देहांतील राजा मानूं लागतो. २०३ ह्याप्रमाणें तीन गुणांचीं लक्षणें तीन श्लोकांत सांगितलीं. आतां सत्वादिकांच्या वृद्धीचें लक्षण लक्ष्य देऊन ऐक." २०४**

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥
लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा ।
रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।
तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥
यदा सत्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।
तदोत्तमविदाँल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥
रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥

[सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्] पैं रजतमविजयें । सत्व गा देहीं ह्ये । वाढतां चिन्हें तियें । ऐसीं होती ॥ ५ ॥ जे प्रज्ञा आंतुलीकडे । न समाती बाहेरी वोसंडे । वसंतीं पद्मखंडें । द्रुती जैसी ॥ ६ ॥ सर्वेंद्रियांच्या आंगणीं । विवेक करी राबणी । साचचि करचरणीं । होती डोळे ॥ ७ ॥ [प्रकाश उपजायते] राजहंसापुढें । चांचूचें आंगेरडें । तोडी जेविं झगडे । क्षीरनीराचे ॥ ८ ॥ तेविं दोषादोषविवेकीं । इंद्रियेंचि होती पारखी । नियम बारे पायिकीं । वोळगे तैं ॥ ९ ॥ नायिकणें तें कानचि वोळी । न पाहणें तें दिठीचि गाळी । अवाच्य टाळी । जीभचि गा ॥ २१० ॥ वातीपुढां जैसें । पळों लागे काळवसें । निषिद्ध इंद्रिया तैसें । समोर नोहे ॥ ११ ॥ धाराधरकाळें । महानदी उचंबळे । तैसी बुद्धी पघळे । शास्त्रजातीं । १२ ॥ [ज्ञानं यदेत्यर्ध] अगा पुनवेच्या दिवशीं । चंद्रप्रभा धांवे आकाशीं । ज्ञानीं वृत्ति तैसी । फांके सैंघ ॥ १३ ॥ वासना एकवटे । प्रवृत्ति वोहटे । मानस विटे । विषयांवरी ॥ ॥ १४ ॥ [यदा सत्वे प्रवृद्धे तु] एवं सत्व वाढे । तैं हें चिन्ह फुडें । [प्रलयं याति देहभृत्] आणि निधनही घडे । तेव्हांचि जरी ॥ १५ ॥ कां पांहालेनि सुयाणें । जालया पैरगुणें । पढियंतें पाहुणें । स्वर्गोनि ये ॥ १६ ॥ [तदोत्तमविदाँल्लोकानिति] तरि जैसीचि घरींची संपत्ती । आणि तैसीच औदार्यधैर्यवृत्ती । मा पैरत्रा आणि कीर्ती । कां नोहावें ॥ १७ ॥ मग गोमटेया तया । जोंवळी असे धनंजया । तेविं सत्वें जाणे देहा । कें आथि गा ॥ १८ ॥ जे स्वगुणीं उद्भट । घेऊनि सत्व चोखट । निघे सांडूनि कोपट । भोगमोक्ष हें ॥ १९ ॥ अवचटें ऐसा जो जाये । तो सत्वाचाचि नवा होये । किंबहुना जन्म लाहे । ज्ञानियांमाजि ॥ २२० ॥ सांग पां धनुर्धरा । रावो रायपणें डोंगरा । गेलिया अपुरा । होय काई ॥ २१ ॥ ना तरि येथिंचा दिवा । नेलिया सेजिर्या गांवा । तो तेथें तरि पांडवा । दीपचि कीं ॥ २२ ॥ तैसी ते सत्वशुद्धी । आगळी ज्ञानेंसी वृद्धी । तरंगावों लागे बुद्धी । विवेकावरी ॥ २३ ॥ पैं महदादिपरिपाटी । विचारूनि शेवटीं । विचारासकट पोटीं । जिरोनि जाय ॥ २४ ॥ छत्तीसां सततीसावें । चोविसां पंचवीसावें । तिन्हीं नुरोनि स्वभावें । चतुर्थ जें ॥ २५ ॥ ऐसें सर्व जें सर्वोत्तम । जालें असे जया सुगम । तयासवें निरुपम । लाहे देह ॥ २६ ॥ इयाचि परी देख । तमसत्व अधोमुख । बैसौनि जैं आगळीक । धरी रज ॥ २७ ॥ [रजस्येतानि जायंते] आपलिया कार्याचा । धुमाड गांवीं देहाचा । माजवी तैं चिन्हाचा । उदय ऐसा ॥ २८ ॥ पांजरली वाहटुळी । करी वेगळ वेंटाळी । तैसी विषयीं सैरळी । इंद्रियां होय ॥ २९ ॥ [लोभः] परदारादिक पडे । परि विरुद्ध ऐसें नावडे । मग शेळियेचेनि तोंडें । सैंघ चारी ॥ २३० ॥ हा ठायवरि लोभ । करी स्वैरत्वाचा राव । वेटाळितां अलाभ । तें ते उरे ॥ ३१ ॥ [प्रवृत्तिः] आणि आड पडलिया । उद्यमजातां भलतिया । प्रवृत्ती धनंजया । हात न काढी ॥ ३२ ॥ [आरंभः] तेविंचि एखादा प्रासाद । कां करावा अश्वमेध । ऐसा अचाट छंद । घेउनि उठी ॥ ३३ ॥ नगरेंचि रचावीं । जळाशयें निर्मावीं । महावनें लावावीं । नानाविधें ॥ ३४ ॥

१ सांडतें. २ सुगंध. ३ अग्र. ४ सेवा. ५ दूर टाळतो. ६ आंधार. ७ पर्जन्यकाळीं. ८ पुष्कळ.

१ उदय पावल्यानें. २ सुकाळ. ३ पक्वान्न, सण. ४ स्वर्ग. ५ उपमा. ६ खोंपट–शरीर. ७ विषयभोगी सामर्थ्यवान्. ८ शेजारच्या. ९ महत्तत्वादिकांचा. १० छत्तीस तत्वांना. ११ देहत्रय अवस्थादि त्रय. १२ ब्रह्म. १३ बसून. १४ धूर. १५ गांवांत. १६ पिंजारलेली. १७ मोकळीक. १८ हवा तसा. १९ स्वेच्छाचार. २० देवालयादिक.

[ कर्मणां ] ऐसैसां अफाटीं कर्मी । समारंभ उपक्रमी । [ अशमः ] आणि दृष्टादृष्टकामीं । पुरें न ह्मणे ॥ ३५ ॥ सागरही सांडीं पडे । आगी न लाहे तीन कवडे । ऐसें अँभिलाषीं जोडे । दुर्भरत्व ॥ ३६ ॥ [ स्पृहा ] स्पृहा मना पुढां । आशेचा घे दँवडा । विश्व घांपे चाडा । पायांतळीं ॥ ॥ ३७ ॥ [ विवृद्धे भरतर्षभ ] इत्यादि वाढतां रजीं । इयें चिन्हें होती सोजीं । [ रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ] आणि ऐशा समाजीं । वेंचे जरी देह ॥ ३८ ॥ तरि आघवाचि इहीं । परिवारला आनी देहीं । रिगे परि योनिही । मानुषीचि ॥ ३९ ॥ सुरवाडेंसि भिकारी । वसो पां राजमंदिरीं । तरी काय अवधारीं । रावो होइल ॥२४०॥ बैल तेथें करबाडें । हें न चुके गा फुडें । नेइजो कां वऱ्हाडें । समर्थाचेनि ॥ ४१ ॥ ह्मणौनि व्यापाराच्या हातीं । उसंतु देहा ना राती । तैसयाचिये पांतीं । जुंपिजे तो ॥ ४२ ॥ कर्मजडाच्या ठायीं । किंबहुना होय देही । जो रजोवृत्तीच्या डोहीं । बुडोनि निमे ॥ ४३ ॥ मग तैसाचि पुढती । रजसत्ववृत्ती । गिळूनि ये उन्नती । तमोगुण ॥४४॥ तैंचि जियें लिंगें । देहींचीं सबाह्य सांगें । तियें परिस चांगें । श्रोत्रबळें ॥ ४५ ॥ [ अप्रकाशः ] तरी होय ऐसें मन । जैसें रविचंद्रहीन । रात्रीचें कां गगन । अंवसेचिये ॥ ४६ ॥ [ अप्रवृत्तिश्च ] तैसें अंतर असोस । होय स्फूर्तिहीन उद्वस । विचाराची भाष । हारपे तैं ॥ ४७ ॥ [ प्रमादः ] बुद्धि मेचवेना धोंडी । हा ठायवरी मंवाळें सांडी । आठवो देशधडी । जाला दिसे ॥ ४८ ॥ [ मोह एव च ] अविवेकाचेनि माजें । सबाह्यशरीर गाजे । एकलेनि घेपे दीजे । मौढ्यें तेथ ॥ ४९ ॥ आचारभंगाचीं हाडें । रूपती इंद्रियांपुढें । मेरे जरी तेणे कडे । क्रिया जाय ॥ २५० ॥ पैं आणिकही एक दिसे । जे दुष्कृतीं चित्त उल्हासे । आंधारीं देखणें जैसें । डुडुळाचें ॥ ५१ ॥ तैसें निषिद्धाचेनि नांवें । भलतेही भरे हावे । तियेविषयीं धांवे । घेती करणें ॥ ॥ ५२ ॥ मदिरा न घेतां डुले । सन्निपातेंवीण बरळे । निष्प्रेमेंचि भुले । पिसें जैसें ॥ ५३ ॥ चित्त तरी गेलें आहे । परि उन्मनी ते नोहे । ऐसें मोल्हातिजे मोहें । मांजिरेनि ॥ ॥ ५४ ॥ [ तमसि ] किंबहुना ऐसैसीं । इये चिन्हें तम पोषी । जैं वाढे आयितीसी । आपुलिया ॥ ५५ ॥ [ तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ] आणि हेंचि होय प्रसंगें । मरणाचें जरी पडे खागें । तरि तेतुलेनि निगे । तमेंसीं तो ॥ ॥ ५६ ॥ राई राईपण बीजीं । सांठवूनियां अंग त्यजी । मग निरुढे तैं दुणी । गोठी आहे ॥ ५७ ॥ पैं होऊनि दीपकलिका । येरु आगी विझो कां । कां जेथ लागे तेथ असका । तोचि आहे ॥ ५८ ॥ ह्मणोनि तमाचिये लोथे । बांधोनियां संकल्पातें । देह जाय तैं मागौतें । तमाचेंचि होय ॥ ५९ ॥ आतां काय येणें बव्हें । जो तमोवृद्धि मृत्यु लाहे । तो पशु कां पक्षी होये । झाडा हा कृमी ॥ २६० ॥

"रज आणि तम ह्यांचा पराभव करून ह्या देहामध्यें सत्व वाढलें ह्मणजे त्याचीं चिन्हें अशीं होतात. २०५ कीं बुद्धि आंत न राहतां, वसंतऋतूमध्यें कमळाच्या कळ्यांतून सुवास बाहेर पडावा, त्याप्रमाणें बाहेर फांकते. २०६ सर्व इंद्रियांच्या आंगणामध्यें विचार राबत असतो. त्यामुळें अर्थात्च हातापायांनांही डोळे उत्पन्न होतात. २०७ राजहंसापुढील दुधाचा आणि पाण्याचा झगडा चोंचीचें अग्र जसा तोडून टाकतें, २०८ त्याप्रमाणें सदोष कोणतें ? आणि निर्दोष कोणतें ? ह्याच्या विचाराचीं इंद्रियें हींच परीक्षक होतात. बा अर्जुना ! नियम हे त्याचे दास बनतात. २०९ जें ऐकूं नये तें कानच दूर लोटतात. जें पहावयाचें नव्हे, तें डोळेच सोडून देतात. जें बोलूं नये त्याची जीभच टाळाटाळ करते. २१० दिव्यापुढें काळोख जसा पळत सुटतो, त्याप्रमाणें निषिद्ध असेल तें, इंद्रियांच्या समोरच येत नाहीं. २११ वर्षाकालामध्यें मोठी नदी जशी भरून जाते, त्याप्रमाणें ज्याची बुद्धि प्रत्येक शास्त्रांत शिरून राहते. २१२ अरे! पौर्णिमेच्या दिवशीं चंद्राची प्रभा जशी आकाशांत धांवते, त्याप्रमाणें ज्यांची वृत्ति ज्ञानामध्यें अतिशय फैलावते. २१३ वासना संपुष्टांत येते; प्रवृत्ति मागें हटते; आणि मनाला विषयांचा वीट

---

१ प्रारंभ करतो. २ लहान मोठें. ३ पराजय पावतो. ४ कवड्या. ५ अपहाराविषयीं. ६ इच्छा. ७ धांव. ८ घालतें. ९ सिद्ध, सज्ज. १० परिवारासह. ११ सुखासहित. १२ कडवा. १३ विसावा. १४ दिवसा. १५ पंक्तीला. १६ कर्माविषयीं श्रद्धाळूंच्या. १७ नाश पावतो. १८ चिन्हें. १९ गढद. २० शून्य. २१ तुलवत नाहीं. २२ मृदु. २३ मेली तरी. २४ घुबडाचें. २५ इंद्रियें. २६ मनाचा लय जींत होतो, ती पांचवी अवस्था. २७ आश्रय पावतो, मत्त होतो. २८ उन्मत्तपणानें.

१ सामुग्रीसहित. २ खळें. ३ वाढतो. ४ सारें. ५ गाठोड्यांत, मोटेमध्यें. ६ बहुभाषणानें.

येतो. २१४ अशा प्रकारें सत्व वाढलें ह्मणजे हीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागतात. आणि अशांतच जर मरण आलें, २१५ किंवा सुबत्तेचा उदय झाला; सणही प्राप्त झाला, आणि स्वर्गाहून आपले आवडते पाहुणेही आले, २१६ आणि घरांत जशी संपत्ति, तशीच औदार्य व धैर्यवृत्ति असली, तर स्वर्ग आणि कीर्ति कां मिळणार नाहीं? २१७ अर्जुना! त्या चांगुलपणाला कांहीं तोड आहे काय? त्याचप्रमाणें असें सत्व प्राप्त झाल्यानंतर देहाला जाणणें तरी कोठें असतें? २१८ कारण, आपल्या गुणांनीं उत्तम प्रकारचें सत्व काढून घेऊन देहरूप विषय भोगणारें खोंपट सोडून तो निघतो. २१९ असा अकस्मात् जो जातो, तो सत्वाचा नवा होतो. किंबहुना ज्ञान्यांमध्यें जन्मास येतो. २२० अर्जुना! राजा आपल्या लव्याजम्यानिशीं डोंगरावर गेला, ह्मणून त्याच्या राजेपणांत कांहीं कमी होईल होय? सांग. २२१ नाहीं तर ह्या ठिकाणचा दिवा, जवळच्या एखाद्या गांवाला नेला, तरी अर्जुना! तेथेंही तो दिवाचना? २२२ त्याप्रमाणें सत्वाची शुद्धि उत्तरोत्तर ज्ञानाची वृद्धिच करीत असते. आणि बुद्धि विवेकावर पोहत असते. २२३ महत्तत्त्वादिकांच्या क्रमाचा विचार करून शेवटीं विचारासकट पोटांत जिरून जातो. २२४ छत्तीसामध्यें सदतिसावें; चोवीसामध्यें पंचविसावें तीन जाऊन स्वभावानें चवथें,–असें जें परब्रह्म. २२५ असें जें सारें सर्वोत्तम, तें ज्याला सुगम झालेलें–त्याच्या बरोबरच त्याला देहही दिव्यच प्राप्त होतो. २२६ ह्याचप्रमाणें पहा. तम आणि सत्व अधोमुख बसून रजाचा जेव्हां शिरजोर होतो, २२७ देहग्रामामध्यें आपल्या कार्याचा जेव्हां धूर माजवितो, त्या वेळीं हीं (खालीं सांगितलेलीं) लक्षणें उत्पन्न होतात. २२८ वावटळ पसरली ह्मणजे ती जशीं निरनिराळीं चक्रें उत्पन्न करते, त्याप्रमाणें इंद्रियांना विषयामध्यें मोकळिक होते. २२९ परदारादिकांशीं प्रसंग पडला, तरी विरुद्ध असें वाटतच नाहीं. तर शेळीच्या तोंडाप्रमाणें भराभर चरूं लागतो. २३० लोभ हा इतकें स्वेच्छाचार वर्तन करित असतो कीं, जेवढें हातांत पडत नाहीं, तेवढें मात्र शिल्लक राहतें. २३१ अर्जुना! भलत्याच उद्योगांत प्रवृत्ति पडत असल्यामुळें तो आपला हात काढित नाहीं. २३२ त्यामुळें एखादें देवालय बांधावें; किंवा अश्वमेध करावा; असा अचाट छंद घेऊन उठतो. २३३ शहरें वसवावींत; विहिरी, सरोवरें बांधावींत; नानाप्रकारचीं मोठमोठीं उद्यानें तयार करावींत; २३४ अशा अशा अफाट कर्मांमध्यें हात घालतो. मग तें काम लहान असो कीं मोठें असो. पुरें ह्मणून ह्मणत नाहीं. २३५ समुद्रही मागें पडेल; अग्नीच्याही तीन कवड्या लागावयाच्या नाहींत, इतका अपहाराविषयीं अधाशीपणा प्राप्त होतो. २३६ इच्छा ही मनाच्याही पुढें आशेचा पाठलाग करीत असते. सारें विश्व आपल्या पायाखालीं घालते. २३७ अशा प्रकारें रजोगुण वाढला ह्मणजे हीं चिन्हें तयार होतात. आणि अशा स्थितीमध्यें जर देह पडला, २३८ तर तो ह्या साऱ्या परंपरेसहवर्तमान अन्य देहामध्यें शिरतो. पण ती योनीही मनुष्याचीच असते. २३९ भिकारी मोठ्या सुखानें राजवाड्यांत राहत असला, ह्मणून तो काय राजा होईल होय? २४० बैल असेल, तेथें कडबा असावयाचाच. मग तो मोठ्या श्रीमंताचें कां लग्न नेईना? २४१ ह्मणून व्यापाराच्या हातांना रात्रंदिवस विश्रांति ह्मणून नाहीं. अशांच्या पंक्तीला तो नेहेमीं जुंपलेला असतो. २४२ जो रजोवृद्धीच्या डोहामध्यें बुडून मरण पावतो, तो बहुतकरून कर्मठांमध्यें–कर्मावर श्रद्धा ठेवणारांमध्यें जन्मास येतो. २४३ ह्याप्रमाणेंच पुन्हा रजोवृत्ति आणि सत्ववृत्ति मिळून तमोगुण वाढतो. २४४ त्या वेळीं देहांत जीं लक्षणें असतात, तींही यथासांग सांगतों. नीट लक्ष्य देऊन ऐक. २४५ तर मन हें असें होऊन

ज्ञातें कीं, अमावास्येच्या रात्रीं चंद्र आणि सूर्य दोन्ही नसल्यामुळें जसें आकाश; २४६ त्याचप्रमाणें अंतःकरण गर्द–स्फूर्तिहीन–शून्य–होऊन गेलेलें असतें. विचाराचें नांवच नाहींसें होऊन जातें. २४७ बुद्धि, दगडही बरा ह्मणवितें. इतकें तिच्यांतील मार्दव नाहींसें होतें. स्मरणशक्ति तर देशोधडीस गेली असें वाटतें. २४८ अविवेकाच्या भरानें शरीर आंतून व बाहेरून तर्र झालेलें असतें. त्या वेळेस घेणें देणें करणारा काय तो एक मूर्खपणा! २४९ अनाचारांचीं हाडें इंद्रियांच्या पुढें रोवलेलीं असतात. तशा स्थितींतच मरण आलें, तर त्याची क्रियाही त्याच्याकडेच जाते. २५० पण त्यांत आणखीही एक दृष्टीस पडतें. तें हें कीं, दुष्कृतींनीं चित्ताला उल्हास होतो. अंधारामध्यें घुबडाला दिसतें, २५१ त्याप्रमाणें निषिद्धाच्या नांवानें भलत्याचीच हाव धरतो, आणि त्याकडे इंद्रियें धांवत सुटतात. २५२ मद्य न घेतांच झोंके खातो, सन्निपातावांचूनच बरळतो; कैफावांचूनच वेड्यासारखा मोहांत पडतो. २५३ चित्त तर गेलेलेंच असतें. पण मनाचा लय होणारी जी उन्मनावस्था तीही प्राप्त होत नाहीं. असे मोहाच्या आश्रयानें उन्मत्त होतात. २५४ अशा अशा प्रकारचीं लक्षणें आपआपल्या सामग्रीसहवर्तमान तम वाढल्यानें उत्पन्न होतात. २५५ अशा स्थितींतच जर मरणाचें खळें पडलें, तर तो तितक्या सहवर्तमान तमांत शिरतो. २५६ बीजामध्यें एकून एक परमाणू सांठवून देह ठेवतो. मग अर्थात्‌च पुन्हा जन्मास येतो, तेव्हां त्याची वाढ दुप्पट होते. २५७ बाकी सारी आग विझली, आणि दिव्याची एक ज्योत जरी शिलक राहिली, तरी तेथें ती सारी आग आहेच ह्मणून समजावें. २५८ संकल्पानें तमाचेंच गाठोळें बांधून देह गेला, तर तो पुन्हा तमाचाच होतो. २५९ आतां हें अधिक अधिक सांगून काय करावयाचें? तमोगुण वृद्धि पावून जो मरण पावतो, तो पशु किंवा पक्षी किंवा कृमि होतो." २६०

कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलम् ।
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥१६॥

[ कर्मणः सुकृतस्याहुरिति ] येणेंचि पैं कारणें । जें निपजे सत्वगुणें । तें सुकृत ऐसें ह्मणे । श्रौतसमो[1] ॥ ६१ ॥ ह्मणौनि तया निर्मळा । सुखज्ञानी सेरळा[2] । अपूर्व ये फळा । सात्विक तें ॥६२॥ [ रजसस्तु फलं दुःखं ] मग राजसा जिया क्रिया । तया इंद्रावणी[3] फळलिया । जे सुखें चितारूनियां[4] । फळती दुःखें ॥ ६३ ॥ कां निंबोळियेचें पिक । वरि गोड आंत विख । तैसें तें राजस देख । क्रियाफळ ॥ ६४ ॥ [ अज्ञानं तमसः फलं ] तामस कर्म जितुकें । अज्ञान फळेंचि पिके । विषांकुर विखें । जियापरी ॥ ६५ ॥

"ह्याकरितांच सत्वगुणानें जें उत्पन्न होतें, त्याला श्रुतिसमुदाय 'सुकृत, किंवा 'पुण्य' असें ह्मणतात. २६१ ह्मणून त्या निर्मळ पुरुषाला, सुखज्ञान्याला, अपूर्व जें सात्विक तें सहज फलद्रूप होतें. २६२ तसेंच राजस क्रिया ज्या ज्या असतात, त्या कडू वृंदावनासारख्या फळतात. ह्मणजे सुख असें दाखवून दुःखें फळाला येतात. २६३ किंवा निंबोण्याचें पीक जसें वरून गोड आणि आंत कडू त्याप्रमाणें राजस क्रियांचें फळ असतें असें समज. २६४ आणखी तामस कर्में जितकें असतें, तितकें अज्ञानाच्या फळानेंच पिकतें. ज्याप्रमाणें विषाच्या बीजानें विषमयच फळ यावें तसें." २६५

सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥१७॥

[ सत्वात्संजायते ज्ञानं ] ह्मणौनि बारे अर्जुना । येथ सत्वचि हेतु ज्ञाना । जैसा कां दिनमाना । सूर्य हा पैं ॥६६॥ [ रजसो लोभ एव च ] आणि तैसेंचि हें जाण । लोभासि रज कारण । आपलें विसरण । अद्वैता जेवीं ॥ ६७ ॥ [ प्रमादमोहौ इत्यर्धे ] मोह अज्ञान प्रैमादा[5] । यया मैळेया दोषवृंदा । पुढती पुढती प्रबुद्धा । तमचि मूळ ॥ ६८ ॥ ऐसें विचाराच्या डोळां । तिन्हीं गुण वेगळवेगळां । दाविले जैसा आंवळा । तळहातींचा ॥ ६९ ॥ तंव रजतमें दोन्हीं ।

१ श्रुतिसमुदाय. २ सहज. ३ कडू वृंदावन. ४ दाखवून, रंगवून. ५ असावधपणा.

देखिलीं प्रौढपतनीं । सत्वावांचुनि नाणी । ज्ञानाकडे ॥ ॥ २७० ॥ ह्मणौनि सात्विकवृत्ती । एक जाले जन्मव्रती । सर्व त्यागें चतुर्थी । भक्ति जैसी ॥ ७१ ॥

"ह्मणून बा **अर्जुना!** दिनमानाला जसा सूर्य कारणभूत आहे, त्याप्रमाणें येथें सत्त्व हेंच ज्ञानाला कारण आहे. २६६ आणखी, अद्वैताला आपलेंच विसरण ज्याप्रमाणें कारण आहे, त्याप्रमाणेंच रज हें लोभास कारण आहे. २६७ मोह, अज्ञान, असावधपणा, ह्या मलिन दोषसमुदायाला हे **बुद्धिमंता!** खचित खचित तम मूळ आहे. २६८ असे विचाररूप नेत्रांना तळहातावरील आंवळ्याप्रमाणें हे तीनही गुण वेगवेगळे दाखवून दिले. २६९ तेव्हां रज आणि तम ह्या दोन्हीमध्यें पतन आहे हें दिसून आलें. ह्याकरितां तूं ज्ञानाकडे सत्वावांचून दुसरा कोणताही गुण आणूं नको. २७० ह्मणूनच सर्व भक्तींचा त्याग करून चतुर्थभक्ति जी ज्ञानाची, तीच आचरण केल्याप्रमाणें कोणी कोणी सात्विकाचरणाचेंच व्रत घेतात." २७१

ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः १८

[ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्थाः] तैसें सत्वाचेनि नटेंनावें । असणें आणें जयांचें । ते तनुत्यागीं स्वर्गीचे । राय होती ॥ ७२ ॥ [मध्ये तिष्ठंति राजसाः] इयाचि परी रजें । जेव्हां कां [4]जीजे मरिजे । तिहीं मनुष्य होइजे । मृत्युलोकीं ॥ ७३ ॥ तेथ सुखदुःखाचें खिंचटें । जेविजे एकेचि तांटें । जेथ इये मरणवाटे । पडिलें नुठी ॥ ७४ ॥ [जघन्यगुणवृत्तिस्थाः] आणि तैयाचिस्थिती तमीं । जे वाढोनि निमती रोगक्षमीं । ते घेती नरकभूमी । मूळपत्र ॥ ७५ ॥ एवं वस्तूचिया सत्ता । त्रिगुणासि पंडुसुता । दाविली सकारणता । आघवीचि ॥ ७६ ॥ [एवं चतुर्दशश्लोकैर्गुणव्याख्या समाप्ता । प्रकरणार्थमुपसंहरति] पैं वस्तु वस्तुत्वें असिकें । तें आपपें गुणसारिखें । देखोनि कार्यविशेखें । अनुकरे गा ॥ ७७ ॥ जैसें कां स्वप्नीचेनि राजें । जैं परचक्र देखिजे । हारि जैत होइजे । आपणचि ॥ ७८ ॥ तैसे मध्योर्ध्व अध । जे हे गुणवृत्तिभेद । ते दृष्टिवांचुनि शुद्ध । वस्तुचि असे ॥ ७९ ॥

"तसेंच, सत्वगुणाच्या उल्हासवृत्तीनें ज्याचें जगणें आणि मरणें असतें, ते देह टाकल्यानंतर स्वर्गाचे राजे बनतात. २७२ तसेंच रजोगुणानें जे जगतात व मरतात, ते मृत्युलोकांत मनुष्याच्या जन्मास येतात. २७३ आणि तेथें सुखदुःखाची खिचडी एकाच ताटांतून—देहांतून—जेवतात. तेथें ह्या मरणाच्या वाटेंत पडल्यानंतर उठावयासच येत नाहीं. २७४ आणखी तसेंच जे तमामध्यें वाढून त्याच देहांत मरण पावतात, ते नरकभूमीचें आमंत्रण घेतात. २७५ **अर्जुना!** अशा प्रकारें तीनगुणांवरील वस्तूची—परब्रह्माची—सत्ता असलेली सर्व सकारण दाखवून दिली. २७६ ब्रह्म तें पूर्णत्वेंकरून ब्रह्मपणानेंच असतें. तें आपण गुणाप्रमाणेंच समजून कार्यविशेषास अनुसरतें. २७७ ज्याप्रमाणें स्वप्नांतील राजा परचक्र पाहतो, तेव्हां त्यांतील जय आणि पराजयही तोच होतो, २७८ त्याप्रमाणें मध्य, ऊर्ध्व, आणि अध हे जे गुणवृत्तीचे भेद आहेत, ते गुण दृष्टीनें आहेत. बाकी परब्रह्म तें शुद्धनिर्विकारच आहे." २७९

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टाऽनुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति १९

[नान्यं गुणेभ्यः कर्तारं] परि हे वोहणी असो । तरि तुज आन न दिसो । परिसें ते सांगतसों । मागील गोष्टी ॥ २८० ॥ ['सत्वं रजस्तम इति' इति पंचमश्लोकाभिप्रायं दर्शयति] तरि ऐसें जाणिजे । सामर्थ्यें तिन्ही सहजें । होती दे[4]हव्याजें । गुणचि हे ॥ ८१ ॥ इंधनाचेनि आकारें । अग्नि जैसा अवतरे । कां आघवेनि तरुवरें । भूमिरस ॥ ८२ ॥ ना ना दहियाचेनि मिसें । परिणमे दूधचि जैसें । कां मूर्त होय उंसें । गोड जेवीं ॥ ८३ ॥ तैसें हें सांतःकरण । देहचि होती त्रिगुण । ह्मणोनि बंधासि कारण । घडे कीर ॥ ८४ ॥ परि चोज हें धनुर्धरा । जे ही गुं[6]फिरा । मोक्षाचा संसारा । उणा नोहे ॥ ८५ ॥ त्रिगुण आपलालिया धर्में ।

१ आजन्मव्रत पाळणारे. २ ववथी. ३ उल्हासवृत्तीनें. ४ वांचावें. ५ खिचडी. ६ देहरूप ताटांत. ७ त्याचप्रमाणें. ८ देहीं. ९ आमंत्रणचिठ्ठी. १० संपूर्ण. ११ गुणानुरूप आत्मस्वरूप पाहून.

१ पराजय. २ गुणदृष्टीशिवाय. ३ बोलणें—विषयांतर. ४ देहाच्या निमित्तानें. ५ पाणी. ६ गुंतागुंतीनें.

[1]देहींचें मागुतें सांउमें । चाळितांही न [2]खोमे । गुणातीतता ॥ ८६ ॥ ऐसी मुक्ती असे सहज । तें आतां परिसऊं तुज । जे तूं [4]ज्ञानांबुज । द्विरेफें कीं ॥ ८७ ॥ [ गुणेभ्यश्च परं वेत्ति ] आणि गुणीं गुणाजोगें । चैतन्य नोहे [6]मागें । बोलिलों तें खागें । तेवींचि हें ॥ ८८ ॥ तरि पार्था जैं ऐसें । बोधलेनि जीवें दिसे । स्वप्न कां जैसें । चेइलेनि ॥ ८९ ॥ ना तरी आपण जळीं । बिंबलों तीरोनि न्याहाळी । चलण होतां कल्लोळीं । अनेकधा ॥ २९० ॥ कां नटलेनि लाघवें । नट जैसा न झकवे । तैसें गुणजात देखावें । न होनियां ॥ ९१ ॥ पै ऋतुत्रय आकाशें । धरूनियांही जैसें । नेदिजेचि येवों [10]वोसें । वेगळेपणा ॥९२॥ तैसें गुणीं गुणापरौतें । जें आपणपें असे आयितें । तिये अहं बैसे अहंते । मूळकेचिये ॥ ९३ ॥ [ यदा द्रष्टानुपश्यति ] पैं तेथूनि मग पाहतां। ह्मणे साक्षी मी अकर्ता । हे गुणचि [12]क्रियाजातां । नियोजिते ॥ ९४ ॥ सत्वरजतमाच्या । भेदीं [13]प्रसर कर्मांचा । होत असे तो गुणांचा । विकार हा ॥ ९५ ॥ ययामाजि मी ऐसा । वनीं कां वसंत जैसा । वनलक्ष्मी [14]विलासा । हेतुभूत ॥९६॥ कां तारांगणीं लोपावें । सूर्यकांतीं [15]उद्दीपावें । कमळीं विकासावें । जावें तमें ॥ ९७ ॥ यवा कोणाचें कांहीं । सविता जैसा देखत नाहीं । तैसा अकर्ता मी देहीं । सत्तारूप ॥९८॥ मी दाउनी गुण देखे । गुणता हे मियां [16]पोखे । ययाचेनि [17]निःशेषें । उरे तें मी ॥ ९९ ॥ ऐसेनि विवेकें जया । उदय होय धनंजया । ये गुणातीतता तया । [18]ऊर्ध्वपंथें ॥ ३०० ॥

"पण हें भाषण असो. आतां तुला दुसरें कांहीं न दिसावें. ती मागची गोष्ट पुन्हा सांगतों ऐक. २८० तर असें समज कीं, आत्मसामर्थ्याचे योगानें देहाच्या निमित्तानें हे गुणच सहज उत्पन्न होतात. २८१ अग्नि जसा जळणाच्या आकारानें दिसूं लागतो, किंवा सर्व वृक्षांच्या आकारानें जसा भूमिरस ( पाणी ) दिसूं लागतो, २८२ किंवा दह्याच्या नांवानें दुधाचेंच जसें रूपांतर होतें, किंवा उंसाच्या योगानें जसा गोडीला आकार येतो, २८३ त्याप्रमाणें अंतःकरणासहवर्तमान त्रिगुण हे देहच आहेत. ह्मणूनच निश्चयेंकरून बंधास कारण होतें. २८४ परंतु अर्जुना! हें एक आश्चर्य आहे कीं, ह्या बद्धपणाच्या योगेंकरून मोक्षवृद्धींत कांहीं अंतर पडत नाहीं. २८५ हे तीन गुण आपआपल्या धर्मानें देहांतील मागचें पुढचें--जन्ममरण--कार्यकारणकर्तृत्व भोगीत असतांही त्याच्या गुणातीततेचा भंग होत नाहीं. २८६ अशी आपोआपच त्याला मुक्ति आहे. ती आतां तुला ऐकऊं. कारण, तूं ज्ञानकमलांतील भृंगच आहेस. २८७ आणि गुणांच्या योगानें चैतन्य हें, गुणरूप होत नाहीं, हा सिद्धांत पूर्वी सांगितला आहे, तसेंच हेंही होय. २८८ तर अर्जुना! अशा प्रकारचें ज्ञान जेव्हां अंतःकरणांत प्रगट होतें तेव्हां जागृत झालेल्यास जसें स्वप्न, २८९ किंवा आपली प्रतिमा जळांत पडलेली तीरावरून पहातो, आणि लाटा हालल्या ह्मणजे तिचे अनेक तुकडे झालेले पहातो, २९० किंवा सोंग घेतल्याच्या कौशल्यानें नट जसा फसत नाहीं, त्याप्रमाणें कोणत्याही गुणाचा आत्मस्वरूपाशीं संबंध नाहीं हें समजतें. २९१ तिन्ही ऋतू धरूनही आकाश जसें आपणाकडे कमीपणा किंवा भिन्नत्व येऊं देत नाहीं, २९२ तसें गुणामध्यें जें गुणातीत, जें आपलें आपण स्वयंभु असणारें, तें मूळचीच अहंता धरून अहंपणानें बसलेलें असतें. २९३ मग तेथून पाहून तें ह्मणतें कीं, मी साक्षी; अकर्ता; हे गुणच सर्व कर्माला योजितात. २९४ सत्वरजतमाच्या भेदानें कर्मांचा विस्तार होतो. तो ह्या गुणांचा विकार. २९५ वनामध्यें वनश्रीच्या शोभेला वसंत हेतुभूत असावा तसा मी. २९६ किंवा नक्षत्रांनीं लुप्त व्हावें; उन्हानें प्रकाशावें; कमलांनीं प्रफुल्लित व्हावें; अंधारानें नाहींसें व्हावें; २९७ हें कोणाचेंही सूर्य जसा पहात नाहीं, त्याप्रमाणें ह्या देहामध्यें मी सत्तारूप असून अकर्ता आहें. २९८ मीं दाखविले ह्मणजे गुण दृष्टीस पडतात; गुणताही माझ्यापासूनच

---

१ देहांतील मागचें पुढचें जन्ममृत्यु कार्यकारणकर्तृत्व. २ पुढचें. ३ कमी होत नाहीं. ४ ज्ञानकमलावरचा. ५ भ्रमर. ६ अध्याय १३ श्लोक ७ 'अनादित्वान्निर्गुणत्वात्' या श्लोकांत सांगितलेलें. ७ तात्पर्य, प्रमेय. ८ कपटानें. ९ उणेपणा. १० मूळवस्तूप्रत. ११ सर्व कर्मांना. १२ योजितात. १३ विस्तार. १४ शोभेला. १५ पेटावें, प्रकाशावें. १६ पोसली जाते. १७ निखालस. १८ उत्तममार्गानें, ऊर्ध्वगतीनें.

पोसली जाते; यांचा समूळ लोप झाल्यानंतर राहतो तो मी. २९९ अर्जुना! अशा प्रकारच्या विवेकानें ज्याचा उदय होतो, त्याला उत्तम मार्गानें गुणातीतता प्राप्त होते." ३००

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥

[ गुणानिति ] आतां निर्गुण असे आणिक । तें तो जाणे अचुक । जे ज्ञान केलें टीकें । तयाचिवरी ॥ १ ॥ [ मद्भावं सोऽधिगच्छति ] किंबहुना पंडुसुता । ऐसी तो माजी सत्ता । पावे जैसी सरिता । सिंधुत्व गा ॥ २ ॥ नळिकेवरूनि उठिला । जैसा शुक शाखे बैसला । तैसा मूळअहंता ठाकिला । तो मी म्हणौनि ॥ ३ ॥ अगा अज्ञानाचिया निर्दां । जो घोरतें होता बदबदा । तो स्वरूपीं प्रबुद्धा । चेइला कीं ॥ ४ ॥ पैं बुद्धिभेदाचा आरिसा । तयाहातोनि पडिला वीरेशा । म्हणौनि प्रकृति मुखाभासा । मुकला तो ॥ ५ ॥ देहाभिमानाचा वारा । आतां वाजों ठेला वीरा । तैं ऐक्य वीचिसागरां । जीवेशां हें ॥ ६ ॥ म्हणौनि मद्भावेंसीं । प्राप्ती पाविजे तेणेंसरिसी । वर्षांतीं आकाशीं । घनजात जेवीं ॥ ७ ॥ तेविं मीं होऊनि निरुता । मग देहींचि ये असतां । नागवे देहसंभूतां । गुणासि तो ॥ ८ ॥ जैसा भिंगाचेनि घरें । दीपप्रकाश नावरे । कां न विझेचि सागरें । वडवानळ ॥ ९ ॥ तैसा आलागेला गुणाचा । बोधं न मैळे तयाचा । तो देहीं जैसा व्योमींचा । चंद्र जळीं ॥ ३१० ॥ तिन्हीं गुण आपुलालिये प्रौढी । देहीं नाचविती बोंगडीं । तो पाहोंही न धाडी । अहंतेतें ॥ ११ ॥ हा ठायवरी । नेहटोनि ठेला अंतरीं । आतां काय वर्ते शरीरीं । हेंही नेणें ॥ १२ ॥ सांडूनि आंगींची खोळी । सर्प रिगालिया पाताळीं । ते त्वचा कोण सांभाळी । तैसें जालें ॥ १३ ॥ कां सौरभ्य जीर्ण जैसा । आमोद मिळोनि जाय आकाशा । माघारा कमळकोशा । नयेचि तो ॥ १४ ॥ पैं स्वरूपसमरसें । तयाही गा जालें तैसें । तेथ किंधर्म हें कैसें । नेणें देह ॥ १५ ॥ [ जन्मेत्यर्धं ] म्हणौनि जन्मजरामरण । इत्यादि जे साही गुण । ते देहींचि ठेले कारण । नाहीं तयां ॥ १६ ॥ घटाचिया खापरिया । घटभंगीं फेडिलिया । महदाकाश अपैसेंया । जालेंचि असे ॥ १७ ॥ तैसी देहबुद्धि जाये । जैं आपणपां आठौ होये । तैं आन कांहीं आहे । तेंवांचुनी ॥ १८ ॥ येणें थोर बोधलेपणें । तयासि गा देहीं असणें । म्हणूनि तो मी म्हणें । गुणातीत ॥ १९ ॥ यया देवाचिया बोला । पार्थ अतिसुखावला । मेघें संबोखिला । मयूर जैसा ॥ ३२० ॥

१ भूषण, टिळा. २ माझी. ३ अहंब्रह्म ह्या भावनेनें. ४ निद्रेनें. ५ 'मी' 'माझें' इत्यादि म्हणणें हेंच घोरणें होय. ६ जागा झाला. ७ मायामुखाच्या प्रतिबिंबाला. ८ लाटांना आणि समुद्राला. ९ येण्याजाण्यानें. १० शुद्ध ज्ञान. ११ मळत नाहीं. १२ सोंगें. १३ निश्चयानें. १४ कांत. १५ परिमळ. १६ जिरलेला. १७ स्वतःचें ब्रह्मस्वरूपास ऐक्य होऊन. १८ आपोआपच.

" तेव्हां निर्गुण तें वेगळें आहे असें तो अचुक जाणतो. कारण, ज्ञानानें त्यास भूषित केलेलें असतें. ३०१ किंबहुना अर्जुना! ज्याप्रमाणें नदी ही समुद्रत्व पावते, त्याप्रमाणें तो माझी सत्ता पावतो. ३०२ नळकांड्यावरून उठलेला पोपट जसा डहाळीवर बसवावा, त्याप्रमाणें तो मूळ आब्रह्म तें मी म्हणून मत्स्वरूप बनतो. ३०३ हे बुद्धिमंता! अज्ञानाच्या निद्रेनें जो घर घर घर घोरत असतो, तो ब्रह्मस्वरूपामध्यें जागा झाला कीं, ३०४ हे वीरश्रेष्ठा! बुद्धिभेदाचा आरसा त्याच्या हातांतून पडतो, म्हणून मायामुखाच्या प्रतिबिंबाला तो मुकतो. ३०५ हे वीरा! देहाभिमानाचा वारा वाजावयाचा जेव्हां बंद होतो, तेव्हां तरंगा सागराचें, आणि जीवेशाचें ऐक्य होऊन जातें. ३०६ म्हणून त्याबरोबर, वर्षाऋतूच्या अखेरीला एकून एक ढग जसे आकाशरूप होतात, त्याप्रमाणें माझ्या भावाची प्राप्ती होते. ३०७ ह्याप्रमाणें शुद्ध स्वरूप होऊन मग मीच देहामध्यें येतों. आणि तेथें असतां तो देहापासून उत्पन्न होणाऱ्या गुणापासून अलिप्त असतो. ३०८ आरसेमहालांतील दिव्याचा प्रकाश जसा आवरत नाहीं, किंवा सागरानें वडवानळ विझला जात नाहीं, ३०९ त्याप्रमाणें आल्यागेल्या गुणेंकरून त्याचें शुद्ध ज्ञान मलिन होत नाहीं. आकाशांतील चंद्र जसा पाण्यामध्यें असतो, त्याप्रमाणें तो देहामध्यें असतो. ३१० तिन्ही गुण आपआपल्या प्रौढीनें देहामध्यें सोंगें नाचवित असतात. तो अहंतेला पहावयाला सुद्धां पाठवित नाहीं. ३११ येथपर्यंत अंतःकरणांत ठासून उभा राहिला, म्हणजे मग शरिरांत काय चाललेलें

१ आठवण. २ श्रीकृष्ण. ३ तृप्त केला.

असतें, तेंही त्यास कळत नाहीं. ३१२ आंगावरची कांत टाकून सर्प पाताळांत शिरतो; ती कांत सांभाळणार कोण? तसें होतें. ३१३ किंवा सुगंधयुक्त पसरलेला वारा, जसा आकाशाला मिळून जातो, आणि मग तो कमळाच्या फुलाकडे येत नाहीं, ३१४ स्वतःचें ब्रह्मस्वरूपाशीं ऐक्य झाल्यामुळें त्याचेंही तसेंच होतें. तेव्हां धर्म ते कोणते व कसले, हें देहाला समजत नाहीं. ३१५ ह्मणून जन्म, जरा, मरण, इत्यादि जे सहा गुण, ते देहांतल्या देहांतच रहातात. त्याला त्यांचें कांहीं कारण नाहीं. ३१६ घडा फुटल्यानंतर घड्याच्या खापऱ्या पडल्या ह्मणजे त्यांतील घटाकाश आपोआपच महदाकाश झालें ह्मणून समजावें. ३१७ त्याप्रमाणें ही देहबुद्धि जाऊन आपली आपल्याला जेव्हां आठवण येईल, तेव्हां त्याच्यावांचून दुसरें कांहीं आहे काय? ३१८ अशा श्रेष्ठ ज्ञानस्थितींतच त्याला देहामध्यें असावें लागतें. ह्मणूनच त्याला मी गुणातीत असें ह्मणतों." ३१९ ह्या देवाच्या भाषणानें मेघानें तृप्त केलेल्या मयूराप्रमाणें अर्जुनाला संतोष झाला. ३२०

अर्जुन उवाच–

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ।
किमाचारः कथं चैतांस्त्रीन् गुणानतिवर्तते ॥२१॥

[ अर्जुन उवाच—कैरिती ] तेणें तोषें वीर पुसे । जी कोण्हीं चिन्हीं तो दिसे । जयामाजी वसे । ऐसा बोध ॥ २१ ॥ [ किमाचार इति ] तो निर्गुण काय आचरे । कैसेनि गुण निस्तरे । हें सांगिजो माहेरें । कृपेचेनि ॥ २२ ॥ यया अर्जुनाचिया प्रश्ना । [ श्रीभगवानुवाच–] तो षड्गुणांचा राणा । परिहार आकर्णा । बोलत असे ॥ २३ ॥ ह्मणे पार्था तुझी नवाई । हें येतुलेंचि पुससी काई । तें नामचि तया पाहीं । साच लटिकें ॥ २४ ॥ गुणातीत जया नांव । तो गुणाधीन तरी नव्हे । ना होय तरी नागवे । गुणां यया ॥ २५ ॥ परि अधीन कां नागवे । हेंचि कैसेनि जाणावें । गुणांचिये रवंरवे- । माजि असतां ॥ २६ ॥ हा संदेह जरी वाहसी । तरि सुखें पुसों लाहसी । परिस आतां तयासी । रूप करूं ॥ २७ ॥

१ निवारण करतो. २ उत्तर. ३ ऐका. ४ न सांपडे. ५ गुंताड्यामध्यें.

त्या आनंदाच्या भरांत त्या वीरानें विचारलें कीं "महाराज! असा बोध ज्याच्यामध्यें ठसलेला असतो, तो कोणत्या लक्षणांनीं युक्त दिसतो? ३२१ तो निर्गुण काय आचरण करतो? कशा प्रकारें गुणांचें निरसन करतो? हें कृपेच्या मायबापांनीं सांगावें. ३२२ ह्या अर्जुनाच्या प्रश्नावर तो षड्गुणांचा राजा जो भगवान् तो समाधान सांगूं लागला. ऐका. ३२३ तो ह्मणाला "अर्जुना! तुझें हें एक विलक्षण आहे! हें इतकेंच कां विचारतोस? तें त्याचें नांवच खरोखर लटकें आहे, ध्यानांत ठेव. ३२४ गुणातीत असें ज्याअर्थी त्याला नांव आहे, त्याअर्थी गुणांचा आधीन तर तो नव्हेच; किंवा झाला तरी तो ह्या गुणांत सांपडत नाहीं. ३२५ पण तो गुणांच्या जाळ्यामध्यें आहे कां वेगळा आहे, हें समजावें कसें? ३२६ असा संशय असेल, तर विचारावयास कांहीं हरकत नाहीं. तर त्याचें आतां विवेचन करूं. ऐक." ३२७

श्रीभगवानुवाच–

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥२२॥

[ प्रवृत्तिं च ] तरि रजाचेनि माजें । देहीं कर्माचें आंणोजें । प्रवृत्ती जैं पेइजे । वेंटाळूनि ॥ २८ ॥ तैं मीचि कां कर्मठ । ऐसेनये श्रीमाठ । कां देरिद्रलिये बुद्धी वीट । तोही नाहीं ॥ २९ ॥ [ प्रकाशं च ] अथवा सत्वेंचि अधिकें । जैं सर्वेंद्रियीं ज्ञान फांके । तैं सुविद्यतातोखें । उभेजेही ना ॥ ३३० ॥ [ मोहमेव च पांडव ] कां वाढिनलेनि तमें । न गिळेजेचि मोहभ्रमें । तैं अज्ञानत्वें न श्रमें । घेणेंही नाहीं ॥ ३१ ॥ [ न द्वेष्टीति ] पैं मोहाच्या अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी । ज्ञानें कर्में नादरी । होतां न दुःखी ॥ ३२ ॥ सायंप्रातर्मध्यान्हा । या तिहीं काळांची गणना । नाहीं जेवीं तपना । तैसा असे ॥ ३३ ॥ तया वेगळाचि काय प्रकाशें । ज्ञानित्व यावें असे । काय जळार्णव पाउसें । धाजा होय ॥ ३४ ॥ ना प्रवर्तलेनि कर्में । कर्मठत्व तया कां गमे । सांगें हिमवंत हिमें । कांपे काय ॥ ३५ ॥ ना तरि मोह आलिया । काइ पां ज्ञाना मूकिजेल तया । महा आगीतें उन्हाळेया । जाळवत असे ॥ ३६ ॥

* अंकुर. १ श्रीमंत. २ दारिद्र्यामुळें. ३ विद्वत्तेच्या गर्वानें. ४ संतोषही होत नाहीं. ५ ताजा.

"तर देहामध्यें रजोगुणाच्या वृद्धीनें; कर्माचा अंकुर प्रवृत्ति जेव्हां वेटाळून घेते, ३२८ तेव्हां मीच काय तो कर्मठ ह्मणून जो फुगत नाहीं. किंवा दारिद्र्यामुळें बुद्धीला वीट यावा, तोही येत नाहीं. ३२९ अथवा सत्वच अधिक झाल्याच्या योगानें सर्व इंद्रियांच्या ठायीं ज्ञानाचा प्रकाश पडतो, तेव्हां मोठ्या विद्वत्तेच्या गर्वानें संतोषही पावत नाहीं. ३३० किंवा तम वृद्धि पावल्याच्या योगानें, मोहाच्या भ्रमानें गिळला जात नाहीं. किंवा तसें झालें ह्मणून अज्ञानानें किंवा जाणूनबुजूनही जो मोहाचा स्वीकार करीत नाहीं. ३३१ बरें मोह पडला, तरी ज्ञान प्राप्त व्हावें ही इच्छा धरीत नाहीं. ज्ञान प्राप्त झालें ह्मणून कर्माचा अनादर करीत नाहीं. किंवा झालीं तरी त्याचें दुःख मानीत नाहीं. ३३२ सांज, सकाळ आणि दुपार ह्या तीन काळांची मोजदात जशी सूर्याला नाहीं, तसा असतो. ३३३ त्यांना सोडून सूर्य काय निराळा प्रकाशतो? जलनिधि काय पावसानें ताजा होतो? ३३४ किंवा कर्में करीत असला, ह्मणून तीं कर्में करणारा मी असें त्यांस वाटेल काय? हिमालय थंडीनें काकडेल काय? ३३५ किंवा मोह प्राप्त झाला, ह्मणून ज्ञान त्याला सोडील काय? मोठ्या आगीला उन्हाळा जाळील होय?" ३३६

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।
गुणा वर्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेंगते ॥२३॥

[ आसीनः ] तैसें गुणागुण कार्य हें । आघवेंचि आपण आहें । ह्मणोनि एकेका नोहे । तेंडातोंडी ॥ ३७ ॥ [ उदासीनवत् ] येवढेया गा प्रतीती । तो देहा आलासे वस्ती । वाटे जाता गुंती- । माजि जैसा ॥ ३८ ॥ तो जिंणता ना हारवी । तैसा गुण नव्हे ना करवीं । जैसी कां श्रोणेवी । संग्रामींची ॥ ३९ ॥ कां शरीराआंतील प्राणु । घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु । नाना चोहटांचा स्थाणू । उदास जैसा ॥ ३४० ॥ [ गुणैर्यो न विचाल्यते ] आणि गुणाचा यावा जाना । ढळे चळे ना पांडवा । मृगजळाचा हेलावा । मेरु जैसा ॥ ४१ ॥ हें वहुत कायि बोलिजे । व्योमवारेनि न वीजिजे । कां सूर्य ना गिळिजे । अंधकारें ॥ ४२ ॥ स्वप्न कां गा जियापरि । जागतयातें न सिंतरी । गुणी तैसा अवधारीं । न बंधिजे तो ॥ ४३ ॥ [ गुणा वर्तंत इत्येव ] गुणासि कीर नातुडे । परि दुरूनि जें पाहे कोडें । तै गुणदोष सैायिखडें । सभ्य जैसा ॥ ४४ ॥ सत्कर्में सात्विकीं । रज तें रजोविषयकीं । तममोहादिकीं । वर्तत असे ॥ ४५ ॥ [ योऽवतिष्ठति नेंगते ] परिस तयाचिया गा सत्ता । होती गुणक्रिया समस्ता । हें फुडें जाणें सविता । लौकिकों जेवि ॥ ४६ ॥ समुद्रचि भरती । सोमकांतची द्रवती । कुमुदें विकासती । चंद्र तो उगा ॥ ४७ ॥ कां वाराचि वाजे विझे । गगनें निश्चळ असिजे । तैसा गुणाचिये गजबजे । डोलेना जो ॥ ४८ ॥ अर्जुना येणें लक्षणें । तो गुणातीत जाणणें । परिस आतां आचरणें । तयाचीं जीं ॥ ४९ ॥

"त्याप्रमाणें गुणांचें सारेंच कार्य तो स्वतः असतो, ह्मणून एकमेकांपासून वेगळा होत नाहीं. ३३७ वाटेंत अडथळा झाला असल्याप्रमाणें, इतका अनुभव घेण्यासाठींच तो देहांतील वस्तीस आलेला असतो. ३३८ जो जिंकणाराही नव्हे, आणि हरणाराही नव्हे. तो युद्धांतील निशाणाप्रमाणें असतो. ३३९ शरीरांतील प्राण, घरीं आतिथ्यास आलेला ब्राह्मण, किंवा चव्हाट्यावरचा खांब जसा उदास असतो, त्याप्रमाणें तोही उदास असतो. ३४० आणखी अर्जुना! मृगजळाच्या हेलकाव्यानें मेरु जसा चळतही नाहीं आणि ढळत नाहीं, त्याप्रमाणें गुणांच्या येण्यानें किंवा जाण्यानें तो चळतही नाहीं आणि ढळतही नाहीं. ३४१ हें फार काय सांगावें? आकाश हें वाऱ्यानें हालत नाहीं; अंधारानें सूर्याला गिळवत नाहीं; ३४२ स्वप्न हें जाग्या माणसाला फसवित नाहीं; त्याप्रमाणें तो गुणांनीं बांधला जात नाहीं. ध्यानांत ठेव. ३४३ गुणांना तर हा निश्चयेंकरून सांपडत नाहींच; पण तो त्यांच्याकडे जेव्हां कौतुकानें पाहतो, तेव्हां गुण दोष हे बाहुलीसारखे आणि तो प्रेक्षकासारखा दि-

१ वेगळा. २ अडथळा. ३ जय पावणार. ४ हरणार. ५ निशाण, भूमि. ६ खांब. ७ येण्याजाण्यानें. ८ हेलाव्यानें.

१ हाले. २ फसवीत. ३ चित्र, बाहुली. ४ पहाणार, सभासद, प्रेक्षक. ५ लोकव्यवहाराला. ६ उगेच राहतो.

सतो. ३४४ सात्विकानें सत्कर्में होतात; रज हें रजोविषयाचीं कर्में करतें; आणि तम आहे तें मोहादिकांत राहतें. ३४५ त्यांच्या गुणक्रियेनें होणाऱ्या साऱ्या क्रियाही ऐक. सूर्य जितपत लोकव्यवहाराला जाणतो, तितपतच तोही त्यांना जाणतो. ३४६ समुद्रच भरतात; सोमकांतच द्रवतात; चंद्रविकासी कमलेंच प्रफुल्लित होतात; चंद्र तो स्वस्थच असतो. ३४७ किंवा वारा वाजतो, आणि स्थिर होतो. गगन तें निश्चळच असतें. तसा गुणांच्या गडबडीनें जो ढळत नाहीं. ३४८ अर्जुना! अशा लक्षणांनीं युक्त असेल तो गुणातीत ह्मणून समजावें. आतां त्याचीं आचरणें आहेत. तींही ऐक." ३४९

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ।
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥२४॥

[ समदुःखसुखः ] तरि वस्त्रासि पाठीं पोटीं । नाहीं सुतावांचूनि किरीटी । ऐसें सुये दिठी । चराचर मद्रूपें ॥ ३५० ॥ ह्मणोनि सुखदुःखांसरिसें । कांटाळें आचरे ऐसें । रिपुभक्तां जैसें । हरीचें देणें ॥ ५१ ॥ येरवीं तरि सहजें । सुखदुःख तैंची सेविजे । देहजळीं होइजे । मासोळी जैं ॥ ५२ ॥ [ स्वस्थः ] आतां तें तंव तेणें सांडिलें । आहे स्वस्वरूपेंसींचि माडिलें । सस्यांतीं निवडिलें । बीज जैसें ॥ ५३ ॥ कां वोघ सांडूनि गंगा । रिघोनि समुद्राचे आंगा । निस्तरली लगबगा । खळाळाची ॥ ५४ ॥ तेविं आपणपांचि जया । वस्ती जाली गा धनंजया । तया देहीं अपैसया । सुख तैसें दुःख ॥ ५५ ॥ रात्रि तैसें पाहलें । हें धारणा जेविं एक जालें । आत्मारामा देहीं आतलें । द्वंद्वें तैसें ॥ ५६ ॥ पैं निद्रिताचेनि आंगेंसि । सांप तैशी उर्वशी । तेविं स्वरूपस्था सरिसीं । देहीं द्वंद्वें ॥ ५७ ॥ [ समलोष्टाश्मकांचनः ] ह्मणौनि तयाच्या ठायीं । शेणा सोनया विशेष नाहीं । रत्ना गुंडेयां कांहीं । नेणिजे भेद ॥ ५८ ॥ [ तुल्यप्रियाप्रियः ] घरा येवो पां स्वर्ग । कां वरिपडो वाघ । परि आत्मबुद्धीसी भंग । कदा नोहे ॥ ५९ ॥ [ धीरः ] निवटलें न उपवढे । जळीनलें न विरूढे । साम्यबुद्धी न मोडे । तयापरी ॥ ३६० ॥ [तुल्यनिंदात्मसंस्तुतिः] हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो । कां नीच ह्मणोनि निंदिजो । परि नेणे जळों विझों । राख जैसी ॥ ६१ ॥ तैसी निंदा आणि स्तुती । नये कोण्हेचि व्यक्ति । नाहीं आंधारें कां वाती । सूर्या घरीं ॥ ६२ ॥

"तर अर्जुना! वस्त्राला सुतावांचून पाठी पोटीं कांहीं नाहीं; त्याप्रमाणें दृष्टि ठेऊन सारें चराचर मद्रूपच पहावें, ३५० ह्मणून शत्रूला आणि भक्ताला हरीचें देणें जसें सारखें; त्याप्रमाणें सुख असो किंवा दुःख असो, आचरण एकसारखें. अगदीं ताजव्यांत घातल्याप्रमाणें. ३५१ येरवीं तरी, देहरूप जळांतील मासाच होऊन रहावें, तेव्हांच सुखदुःख सहज सेवन करतां येतें. ३५२ आणि तें तर त्यानें सोडलेलेंच असतें. मळणीच्या वेळीं जसें बीं निवडून काढावें, त्याप्रमाणें तो स्वस्वरूप होऊन बसलेला असतो. ३५३ किंवा ओघ सोडून गंगा समुद्रांत शिरली, आणि तद्रूप झाली कीं, खळाळाची सारी घाई संपलीच; ३५४ त्याप्रमाणें अर्जुना! ज्याची आत्मस्वरूपांत वस्ती झाली, त्याला देहांमध्यें आपोआपच सुख तसें दुःख. ३५५ त्याच्या बुद्धीला जशी रात्र, तसाच दिवस असें होऊन गेलेलें असतें. त्याचप्रमाणें देहांतील तत्वेंही आत्मारामाला एकरूप असतात. ३५६ निद्रिस्ताच्या आंगाला साप काय आणि उर्वशी काय दोन्ही सारखींच. तसें आत्मस्वरूप होणाऱ्यास देहांतील द्वंद्वें सारखींच असतात. ३५७ ह्मणून त्याला शेणामध्यें व सोन्यामध्यें विशेष असें कांहींच नसतें. रत्नामध्यें व दगडामध्यें भेद ह्मणून समजत नाहीं. ३५८ स्वर्ग घराला येऊं द्या, कीं वाघ येऊन आंगावर पडूं द्या, पण आत्मस्वरूपबुद्धीमध्यें कधींच व्यत्यय येत नाहीं. ३५९ मेलेलें जागें होत नाहीं; भाजलेलें उगवत नाहीं; त्याप्रमाणें ज्याची साम्यबुद्धि मोडत नाहीं. ३६० हा केवळ ब्रह्मदेव आहे असें ह्मणून स्तुति केली; किंवा नीच ह्मणून निंदा केली; तरी राखेला विस्तव असला काय आणि नसला काय, हें जसें कळत नाहीं, त्याप्रमाणें

१ समतोल. २ ताजवा. ३ धान्य मळण्याच्या प्रसंगीं. ४ आत्मस्वरूपामध्यें. ५ आपोआप. ६ उजाडल्यानंतर. ७ बुद्धीला. ८ प्राप्त झालें. ९ जोड्या. ( सुखदुःखादि. ) १० सर्प. ११ खडे. १२ प्राप्त होवो. १३ मेलेलें. १४ उठत नाहीं. १५ जाळलेलें. १६ उगवत नाहीं.

तेंही ज्याला कळत नाहीं. ३६१ त्याचप्रमाणें निंदा किंवा स्तुति, जो कोणत्याच व्यक्तीची करीत नाहीं. कारण, सूर्याच्या घरीं आंधारही नाहीं, आणि दिवाही नाहीं." ३६२

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।
सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥

[ मानापमानयोस्तुल्यः ] ईश्वर ह्मणोनि पूजिला । कां चोर ह्मणोनि गांजिला । वृषगजीं वेढिला । केला रावो ॥ ६३ ॥ [ तुल्यो मित्रारिपक्षयोः ] कां सुहृद पासीं आलें । अथवा वैरी वरपडे जाले । परि नेणे रातीं पोहालें । तेज जेवि ॥ ६४ ॥ साही ऋतु येतां आकाशें । लिंपिजेचिना जैसें । तेविं वैषम्य मानसें । जाणिजेना ॥ ६५ ॥ [ सर्वारंभपरित्यागी ] आणीकही ऐक पाहीं । आचार तयाच्या ठायीं । तरि व्यापारासि नाहीं । जालें दिसे ॥ ६६ ॥ सर्वारंभा उंटकलें । प्रवृत्तीचें तेथ मावळलें । जळती गा कर्मफळें । ते तो आगी ॥ ६७ ॥ दृष्टादृष्टाचेनि नांवें । भावचि जीवीं नुगवे । तें सेविजे स्वभावें । पैठें होये ॥ ६८ ॥ सुखे ना शिणे । पाषाण जेणें मानें । तैसीं सांडि मांडी मनें । वांजिली असे ॥ ६९ ॥ [ गुणातीतः स उच्यते ] आतां किती हा विस्तार । जाणें ऐसा आचार । जयाचा तोचि साचार । गुणातीत ॥ ३७० ॥ गुणातें अतिक्रमणें । घडे उपायें जेणें । तो आतां आईक ह्मणे । श्रीकृष्णनाथ ॥ ७१ ॥

"ईश्वर ह्मणून पूजा केली; किंवा चोर ह्मणून छळ केला; बैल हत्ती सभोंवार ठेवून राजा केला; ३६३ किंवा आप्त इष्ट जवळ आले; अथवा शत्रु प्राप्त झाले; तरी रात्रीमध्यें जसें दिवसाचें तेज दिसावयाचें नाहीं, त्याप्रमाणें कांहींच ज्याला समजत नाहीं; ३६४ सहा ऋतु येतात आणि जातात, तरी त्याची बाधा जशी आकाशाला कांहींच नाहीं, त्याप्रमाणें द्वेष ह्मणजे कायतें मनाला ठाउकच नाहीं. ३६५ आणखीही एक ऐकून ठेव. त्याच्या ठिकाणीं आचार असतो तरी, व्यापारांत गुंतलेला दिसत नाहीं. ३६६ सर्वारंभापासून दूर झालें, कीं तेथें प्रवृत्तीचा लय झाला. ह्मणजे कर्मफळें जाळून टाकणारी आग ती तोच. ३६७ इहलोक आणि स्वर्गलोक ह्या नांवाचा भाव सुद्धां जिवामध्यें उत्पन्न होत नाहीं. ३६८ सुखी होत नाहीं, किंवा कष्टही पावत नाहीं; पाषाण जसें कांहीं घेत नाहीं किंवा टाकीतही नाहीं, त्याप्रमाणें त्याग आणि अत्याग हीं दोन्हींही मनानें ज्यानें वर्ज केलीं आहेत; ३६९ आतां हा विस्तार किती करावा? असा ज्याचा आचार असतो, तोच खरोखर गुणातीत हें लक्ष्यांत ठेव." ३७० श्रीकृष्णनाथ ह्मणतात "आतां ज्या उपायानें गुणांचें अतिक्रमण करतां येतें, तो उपाय सांगतों ऐक." ३७१

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥

['संक्षेपार्थः' ] तरि व्यभिचाररहित चित्तें । भक्तियोगें मातें । सेवी तो गुणातें । जाकळूं शके ॥ ७२ ॥ तरि कोण मी कैसी भक्ति । अव्यभिचारा काय व्यक्ति । हे आघवीचि निरुती । होआवी लागे ॥ ७३ ॥ [ मां च यः ] तरी पार्था परियेसा । मी तंव येथ ऐसा । रत्नीं किळांवो जैसा । रत्नचि तो ॥ ७४ ॥ कां द्रवपणचि नीर । अवकाशचि अंबर । गोडी तेचि साखर । आन नाहीं ॥ ७५ ॥ वन्हि तेचि ज्वाळ । दळांचि नांव कमळ । रूख तेंचि डाळ । फळादिक ॥ ७६ ॥ अगा हिम जें आकर्षलें । तेंचि हिमवंत जेविं जालें । नाना दूध मुरालें । तेंचि दहीं ॥ ७७ ॥ [ अव्यभिचारेण ] तैसें विश्व येणें नांवें । हें मीचि पैं आघवें । घेई चंद्रबिंब सोलावें । न लगे जेविं ॥ ७८ ॥ घृताचें थिजलेपण । न मोडितां घृतचि जाण । कां नाटितां कांकण । सोनेंचि तें ॥ ७९ ॥ न उकलितां पट । तंतूचि असे स्पष्ट । न विरवितां घट । मृत्तिका जेविं ॥ ३८० ॥ ह्मणोनि विश्वपण जावें । मग तें मातें घेयावें । तैसा नव्हे आघवें । सकटचि मीं ॥ ८१ ॥ ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति ह्मणिजे । येथ भेद कांहीं देखिजे । तरि व्यभिचार तो ॥ ८२ ॥ [ भक्तियोगेन ] याकारणें भेदातें । सांडूनि अभेदें चित्तें । आपणयासकट मातें । जाणावें गा ॥ ८३ ॥ पार्था सोनयाची टिक । सोनयासी लागली देख । तैसें आपणपें आणिक । मानावें ना ॥ ८४ ॥ तेजाचा तेजौनि निघाला । परि तेजींचि असे लागला । तया रश्मी ऐसा भला । बोध होआवा

१ बैलहत्तींनीं. २ प्राप्त झालें. ३ उजाडल्यानंतर. ४ दूर झालें. ५ ती आग तों आहे. ६ इहलोक व परलोक. ७ प्राप्त. ८ लागोलागीं.

१ एकनिष्ठेनें. २ जिंकूं, व्यापूं. ३ लक्षण. ४ निश्चय, व्याख्या. ५ तेज. ६ कमलपत्रालाच. ७ फांदी. ८ आटलें नाहीं तरि. ९ ऐक्यानें.

॥ ८५ ॥ पैं परमाणु भूतळीं । हिमकण हिमाचळीं । मजमाजी न्याहाळीं । अहं तैसें ॥ ८६ ॥ हो कां तरंग लाहान । परि सिंधूसीं नाहीं भिन्न । तैसा ईश्वरीं मी आन । नोहेचि मा ॥ ८७ ॥ ऐसेनि बा समरसें । दृष्टी जैं उल्लासे । ते भक्ति पैं ऐसें । आह्मी ह्मणों ॥ ८८ ॥ आणि ज्ञानाचें चांगावें । इये दृष्टी मानावें । योगाचेंही आघवें । सर्वस्व हें ॥ ८९ ॥ [ सेवते ] सिंधू आणि जळधरा- । माजी लागली अखंड धारा । तैसी वृत्ति वीरा । प्रवर्ते ते ॥ ३९० ॥ कां कुहेसीं आकाशा । तोंडीं सांदा नाहीं जैसा । तो परमपुरुषीं तैसा । एकवटे गा ॥ ९१ ॥ प्रतिबिंबौनि बिंबवरी । प्रभेची जैसी डेंजरी । ते सोहंवृत्ति अवधारीं । तैसी होय ॥ ९२ ॥ ऐसेनि मग परस्परें । ते सोहंवृत्ति जैं अवतरे । तैं तियेही सकट सरे । अपैसया ॥ ९३ ॥ जैसा सैंधवाचा रवा । सिंधुमाजी पांडवा । विरालेया विरवावा । हेंही ठाके ॥ ९४ ॥ ना तरि जाळूनि तृण । वन्हिही विझे आपण । तैसें भेद नाशूनि जाण । ज्ञानही नुरे ॥ ९५ ॥ [ स गुणान्समतीत्यैतान् ] माझें पैलपण जाये । भक्त हें ऐलपण ठाये । अनादि ऐक्य जें आहे । तेंचि निवडे ॥ ९६ ॥ आतां गुणातें तो किरीटी । जिणें या गोष्टी । जे एकपणाही मिठी । पडों सरली ॥ ९७ ॥ किंबहुना ऐसी दशा । तें ब्रह्मत्व गा सुदंशा । [ यः ] हें तो पावे जो ऐसा । मातें भजे ॥ ९८ ॥ [ ब्रह्मभूयाय कल्पते ] पुढती इहीं लिंगीं । भक्त जो माझा जगीं । हे ब्रह्मता तयालागीं । पतिव्रता ॥ ९९ ॥ जैसें गंगेचेनि वोघें । ढळमळीत जळ जें निघे । सिंधुपदें तयाजोगें । आन नाहीं ॥ ४०० ॥ तैसा ज्ञानाचिया दिठी । जो मातें सेवी किरीटी । तो होय ब्रह्मतेच्या मुकुटीं । चूडारत्न ॥ १ ॥ यया ब्रह्मत्वासीचि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था । यावि नांव चौथा । पुरुषार्थ गा ॥ २ ॥ परी माझें आराधन । ब्रह्मत्वीं होय सोपान । तेथ मी इन साधन । गमेल हो ॥ ३ ॥ तरि क्षणीं ऐसें । तुझ्या चित्तीं पैसे । पैं ब्रह्म आन नसे । मीवांचूनि ॥

" तर अव्यभिचार भक्तीच्या योगानें माझी सेवा करतो, तो त्या गुणांना जिंकूं शकतो. ३७२ तेव्हां मी कोण? भक्ति कशी करावी? अव्यभिचाराचीं लक्षणें कोणतीं? ह्या सर्वांचें स्पष्टीकरण झालें पाहिजे. ३७३ तर अर्जुना! ऐक. रत्नामध्यें तेज असतें. तेंही रत्नच; त्याप्रमाणें मी येथें असतों. ३७४ किंवा पातळपणा तेंच पाणी; पोकळी तेंच आकाश; गोडी तीच साखर; वेगळी नव्हे. ३७५ अग्नि तीच ज्वाळा; कमलपत्र तेंच कमळ; डहाळ्या, पानें आदिकरून सारें तोच वृक्ष. ३७६ हिम–बर्फ–एके ठिकाणीं जमून बसतें; त्याचेंच नांव हिमालय. किंवा दूध विरजलें ह्मणजे तेंच दहीं. ३७७ त्याप्रमाणें विश्व ह्या नांवानें सारें मीच आहें. चंद्रबिंब घ्यावयाला जसे सोलावें लागत नाहीं, त्याप्रमाणेंच तूं ह्याचा स्वीकार कर ह्मणजे झालें. ३७८ तुपाचा थिजलेपणा मोडला नाहीं, तरी तें तूपच आहे हें लक्ष्यांत ठेव. किंवा कंकण अटलें नाहीं, तरी तें सोनेंच. ३७९ वस्त्राचे तंतु वेगळे वेगळे काढले नाहींत, तरी तें तंतूच. घडा विरघळा नाहीं, तरी जशी ती माती; ३८० ह्मणून विश्वपण नाहींसें व्हावें, आणि मग तो मी आहें असें मानावें, अशांतला प्रकार नाहीं. तर ह्या सर्वांसहवर्तमान मीच आहें. ३८१ अशा मला ओळखणें ह्याला अव्यभिचारभक्ति असें ह्मणतात. ह्यांत कांहीं भेद वाटला, कीं तो व्यभिचार! ३८२ ह्याकरितां भेदाला सोडून देऊन अभेदचित्तानें आपल्यासहवर्तमान मला जाणावें. ३८३ अर्जुना! सोन्याची टीक सोन्यालाच लागते. तसें, आपल्याशिवाय दुसरें कांहीं मानूं नये. ३८४ तेजाचाच, तेजापासूनच निघालेला, पण तेजांतच गणलेला असतो. त्या किरणासारखा बोध (ज्ञान) व्हावा. ३८५ पृथ्वीच्या ठायीं जसे परमाणु; हिमालयामध्यें बर्फाचे रजःकण; ह्याप्रमाणें मी मजमध्येंच आहें हें लक्ष्यांत ठेव. ३८६ लाटा लहान का असेनात? पण त्या कांहीं समुद्राहून भिन्न नव्हेत. त्याप्रमाणें ईश्वरांत आणि माझ्यांत कांहीं भेद नाहीं. ३८७ अशा साम्यभावानें दृष्टि जेव्हां विकसित होईल, तेव्हां तिला भक्ति असें आह्मी ह्मणूं. ३८८ ज्ञानाचा चांगुलपणा तो तरी ह्या दृष्टीमुळेंच मानावयाचा. योगाचें सारें सर्वस्वही हेंच. ३८९ हे शूरा! समुद्र आणि मेघांतील

१ मी असें. २ विहिरीशीं. ३ उत्कर्ष. ४ जिंकील. ५ मर्मज्ञा. ६ ब्रह्मत्व. ७ अशा प्रकारें. ८ स्पष्टपणें. ९ अशा लक्षणांनीं युक्त. १० वहात. ११ समुद्रत्वच. १२ मुकुटमणी. १३ नांव. १४ जिना. १५ मला. १६ वाटेल.

लागलेल्या अखंड धारा असाव्यात, त्याप्रमाणें ती वृत्ति राहते. ३९० किंवा विहिरीच्या तोंडाला आणि आकाशाला जसा सांधा नाहीं, त्याप्रमाणें तो परमपुरुषाचे ठायीं ऐक्यरूप होतो. ३९१ प्रतिबिंबापासून बिंबापर्यंत प्रभेचा जसा उत्कर्ष असतो; तशी ती 'सोऽहं' वृत्ति असते समजलास ? ३९२ अशा प्रकारें परस्पर जेव्हां सोऽहंवृत्ति पसरते, तेव्हां तिच्या सहवर्तमान तो आपणही नाहींसा होऊन जातो. ३९३ **अर्जुना !** मिठाचा खडा जसा समुद्रांत विरला, ह्मणजे विरवावा हें ह्मणणेंही संपलेंच. ३९४ किंवा अग्नि, तृण जाळून मग आपणही विझून जातो, त्याप्रमाणें भेद नाहींसा करून आपणही शिल्लक उरत नाहीं. ३९५ माझा उच्चपणा राहतो; भक्ताचा कमीपणा मोडतो; आणि अनादि जें ऐक्य तेंच पुढें येतें. ३९६ मग **अर्जुना !** तो गुणांना जिंकतो, ह्या गोष्टीच बंद पडतात. कारण, ऐक्याला मिठीच पडून राहते. ३९७ किंबहुना हे **मर्मज्ञा !** अशा मला जो भजतो, तो अशी दशा जी ब्रह्मत्व तिच्या प्रत पोंचतो. ३९८ अशा स्पष्ट लक्षणांचा जो जगामध्यें माझा असेल, त्याचीही ब्रह्मत्वदशा पतिव्रता होऊन राहते. ३९९ ज्याप्रमाणें गंगेच्या ओघांतून जें वाहत वाहत पाणी येतें, त्यास सिंधुपदच योग्य, दुसरें योग्य नाहीं. ४०० तसें **अर्जुना !** ज्ञानाच्या दृष्टीनें जो माझें सेवन करतो, तो ब्रह्मत्वाचा मुकुटमणी होऊन राहतो. ४०१ **अर्जुना !** ह्या ब्रह्मत्वालाच सायुज्यपद असें नांव आहे. चवथा पुरुषार्थ असें ह्मणतात, तेंही ह्याचेंच नांव. ४०२ परंतु माझी आराधना हेंच ब्रह्मपदाला पोंचविण्याचा जिना होतो. आणि तेथें मीच निश्चयेंकरून साधन होतों वरें. ४०३ तर आतां माझ्या शिवाय ब्रह्म तें कांहीं निराळें नाहीं. हें तुझ्या लक्ष्यांत आलेंना ?" ४०४

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।
शाश्वतस्य हि धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥२७॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः १४

[ ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहं ] अगा ब्रह्म या नांवा । अभिप्राय मी पांडवा । [ अमृतस्याव्ययस्य च ]मीचि बोलिजे आघवा । शब्दीं इहीं ॥ ५ ॥ पैं मंडळ आणि चंद्रमा । दोनी नव्हती सुवर्मा । तैसा मज आणि ब्रह्मा । भेद नाहीं ॥ ६ ॥ [ शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्य ] अगा नित्य जें निष्कंप । अनावृत धर्मरूप । सुख जें जें उैमप । अद्वितीय ॥ ७ ॥ [ ऐकांतिकस्य च ] विवेक आपलें काम । सारूनि ठाकी जें धाम । निष्कर्षाचें निःसीम । किंबहुना मी ॥ ८ ॥ ऐसेसें हो अवधारा । तो अनन्याचा सोयरा । सांगतसे वीरा । पार्थासि पैं ॥ ९ ॥ येथ धृतराष्ट्र ह्मणे । संजया हें तूतें कोणें । पुसिलेनिविण वायाणें । कां बोलसी ॥ ४१० ॥ माझी अवसरी ते फेडीं । विजयाची सांगें गुढी । येरु जीवें ह्मणे सांडी । गोठी यिया ॥ ११ ॥ संजय विस्मयमानसीं । आहा करुनि र्सरसीं । ह्मणे कैसें पां दैवेंसीं । द्वंद्व यया ॥ १२ ॥ तरि कृपालु तो तुष्टो । यया विवेक हा घोंटो । मोहाचा फिटो । महारोग ॥ १३ ॥ संजय ऐसें चिंतितां । संवाद हो सांभाळितां । हरिखांचा येत चित्ता । महापूर ॥ १४ ॥ ह्मणोनि आतां येणें । उत्साहाचेनि अवतरणें । श्रीकृष्णाचें बोलणें । सांगिजेल ॥ १५ ॥ तया अक्षराआंतील भाव । पाववीन मी तुमचा ठांव । आइका ह्मणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ॥४१६॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

"**अर्जुना !** ब्रह्म ह्या नांवाचा अर्थ तें मीच ह्या शब्दांनीं तुला सांगून दिला. ४०५ हे **मर्मज्ञा !** चंद्रमंडळ आणि चंद्र हीं कांहीं दोन नव्हेत. त्याप्रमाणें माझ्यामध्यें आणि ब्रह्मामध्यें भेद नाहीं. ४०६ अरे ! जें नित्य; निष्कंप; धर्माचें स्पष्ट स्वरूप; जें अद्वितीय आणि

१ मर्मज्ञा ! २ उघड. ३ अपार. ४ सिद्धांताचें. ५ एकनिष्ठेचा. ६ व्यर्थ. ७ शंका. ८ दुःखानें. ९ गिळो. १० संतोषाचा. ११ हृदयास.

अपार सुख; ४०७ विवेक आपलें काम संपलें ह्मणजे जेथें विश्रांतीला जातो, असें सिद्धांताचें निस्सीम स्थान तें मी." ४०८ अहो! अशा अशा प्रकारें एकनिष्ठ भक्तीचा सोयरा जो **श्रीकृष्ण भगवान्**, तो त्या शूर **अर्जुनाला** सांगता झाला. समजलांत? ४०९ तेव्हां **धृतराष्ट्र** ह्मणाला '**संजया**! हें तुला कोणीं विचारलें? विचारल्याशिवाय भलतेंच कशाला सांगतोस? ४१० तो मनांत ह्मणतो, ह्या भाकडकथा सोडून माझी शंका निवारण कर. आणि विजय कोणाचा झाला तें सांग. ४११ तेव्हां **संजयाच्या** मनाला आश्चर्य वाटलें. आणि दुःखानें ह्मणाला 'अरेरे! देवाशीं ह्याचा कसा दुजा भाव पडा! ४१२ तरी तो कृपाळू संतुष्ट होवो, ह्या विवेकाचा ह्याच्याकडून घोट घेतवो, आणि ह्याचा महारोग जावो, ४१३ असें **संजय** चिंतन करीत, आणि त्या भाषणाचा ओघ सांभाळित सांभाळित, त्याच्या चित्ताला आनंदाचा पूर आला. ४१४ ह्मणून आतां त्या उल्हासाच्या भरानें तो **श्रीकृष्णाचें** बोलणें सांगेल. ४१५ आणि त्या अक्षरांतील अर्थ, मी तुमच्या हृद्यांत प्रविष्ट करीन तर. **निवृत्तिदास ज्ञानदेव** ह्मणतात–'ऐका.' ४१६

**चवदावा अध्याय समाप्त.**

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी

## अध्याय १५ वा.

आतां हृदय हें आपुलें । चौफाळूनियां भलें । वरी बैसऊं पाउलें । श्रीगुरूचीं ॥ १ ॥ ऐक्यभावाची अंजुळी । सर्वेंद्रिय कुडमळीं । भरूनियां पुष्पांजुळी । अर्घ्य देवों ॥ २ ॥ अनन्योदकें धुवट । वासना जे तन्निष्ठ । तें लाविलेंसे बोट । चंदनाचें ॥ ३ ॥ प्रेमाचेनि भांगारें । निर्वाळूनि नूपुरें । लेवऊं सुकुमारें । पदें तियें ॥ ४ ॥ घेणावली आवडी । अव्यभिचारें चोखडी । तिये घालूं जोडी । आंगोळिया ॥ ५ ॥ आनंदामोदबहुळ । सात्विकाचें मुकुळ । तें उमळलें अष्टदळ । ठेऊं वरी ॥ ६ ॥ तेथें अहं हा धूप जाळूं । नाहं तेजें वोवाळूं । सामरस्यें पोटाळूं । निरंतर ॥ ७ ॥ माझी तनु आणि प्राण । इया पाउवा लेऊं श्रीचरण । करूं भोग मोक्ष निंबलोण । पायां तयां ॥ ८ ॥ इया श्रीगुरुचरणसेवा । हों पात्र तया दैवा । जें सकळार्थमेळावा । पाट बांधे ॥ ९ ॥ ब्रह्मीचें विसवणेंवरि । उन्मेष लाहे उजरी । जें वाचेतें इये करी । सुधासिंधू ॥ १० ॥ पूर्णचंद्राचिया कोडी । वक्तृत्वा घांपे कुरोंडी । तैसी आणी गोडी । अक्षरांतें ॥ ११ ॥ सूर्यें अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची । तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी ॥ १२ ॥ नादब्रह्म खुजें । कैवल्यही तैसें न सजे । ऐसा बोल देखिजे । जेणें दैवें ॥ १३ ॥ श्रवण सुखाच्या मांडवीं । विश्व भोगी माधवी । तैसी सांसिने बरषी । वाचावल्ली ॥ १४ ॥ ठाय न पावतां जयाचा । मनेसीं मुरडली वाचा । तो देव होय शब्दाचा । चमत्कारु ॥ १५ ॥ जें ज्ञानासि न चोजवे । ध्यानासिही जें नागवे । तें अगोचर फावे । गोठीमाजि ॥ १६ ॥ येवढें एक सौभंग । वेळघे वाचेचें आंग । श्रीगुरुपादपद्मराग । लाहे जैं कां ॥ १७ ॥ तरि बहु बोलूं काई । आजि तें आनठाईं । मातेंवांचूनि नाहीं । ज्ञानदेव ह्मणे ॥ १८ ॥ जे तान्हेनि मियां अपलें । आणि माझे गुरु एकलौते । ह्मणोनि कृपेसि एकहातें । जालें तिये ॥ १९ ॥ पाहा पां भरोवरी आघवी । मेघ चातकांसी रिचवी । मजलागीं गोसांवी । तैसें केलें ॥ २० ॥ ह्मणोनि रिकामें तोंड । करूं गेलें बडबड । कीं गीता ऐसें गोड । आतुडलें ॥ २१ ॥ होय अदृष्ट आपैते । तैं वाळूंचि रत्नें परते । उजू आयुष्य तैं मारिते । लोभ करी ॥ २२ ॥ आधणीं घातलिया हरळ । होती अमृताचे तांदुळ । जरी भुकेची राखे वेळ । श्रीजगन्नाथ ॥ २३ ॥ तयापरी श्रीगुरु । करिती जैं अंगिकारु । तैं होऊनि ठाके संसारु । मोक्षमय आघवा ॥ २४ ॥ पाहा पां काई श्रीनारायणें । तया पांडवांचें उणें । कीजेचि ना पुराणें । विश्ववंद्यें ॥ २५ ॥ तैसें श्रीनिवृत्तिराजें । अज्ञानपण हें माझें । आणिलें वोजे । ज्ञानाचिया ॥ २६ ॥ परि हें असो आतां । प्रेम रुळतसे बोलतां । कें गुरुगौरव वर्णितां । उन्मेष असे ॥ २७ ॥ आतां तेणेंचि पसायें । तुह्मां संतांचे मी पाये । वोळगेन अभिप्रायें । श्रीगीतेचेनी ॥ २८ ॥ [ प्रस्तुताध्यायसंगतिः ] तरि तोचि प्रस्तुतीं । चौदाविया अध्यायाच्या अंतीं । निर्णय कैवल्यपती । ऐसा केला ॥ २९ ॥ जे ज्ञान जयाच्या हातीं । तोचि समर्थ मुक्ती । जैसा शतमेख संपत्ती । स्वर्गीचिये ॥ ३० ॥ कां शत एक जन्मा । जो जन्मोनि ब्रह्मकर्मा । करी तोचि ब्रह्मा । आन नोहे ॥ ३१ ॥ ना तरी सूर्याचा प्रकाश । लाहे जेविं डोळस । तेविं ज्ञानियां सौरस । मोक्षाचा तो ॥ ३२ ॥ तरि तया ज्ञानालागीं । कवणा पां योग्यता आंगीं । हें पाहतां जगीं । देखिला एक ॥ ३३ ॥ जे पाताळिचेंही निधान । दावील कीर अंजन । परि होआवे लोचन । पायाळाचे ॥ ३४ ॥ तैसें मोक्ष देईल ज्ञान । येथ कीर नाहीं आन । परि तेंचि थोरें ऐसें मन । शुद्ध होआवें ॥ ३५ ॥

---

१ चौरंग करून. २ कळ्यांनीं. ३ अभेद रूप जळानें. ४ श्रीगुरुनिष्ठ. ५ गाळून. ६ घट्ट झालेलीं. ७ जोडवीं. ८ आनंद हाच सुवास. ९ सत्वाचें. १० कमळ. ११ निरभिमानपणाच्या. १२ आलिंगन करतें. १३ पादुका. १४ योग्य. १५ पट्टाभिषेक करतें. १६ विसावा मिळेपर्यंत. १७ ज्ञान. १८ स्वच्छता, प्रकाश. १९ कोटि. २० घालावी. २१ आश्रय दिलेली. २२ संपत्ति, वैभव, राज्य. २३ वेद. २४ शोभतें. २५ भाग्यानें. २६ वसंत. २७ भरास येते. २८ जें जाणणें. २९ जाणवें. ३० सांपडत नाहीं. ३१ प्राप्त होतें. ३२ सौभाग्य. ३३ आश्रय करतें.

१ तान्हें, लहान, अज्ञान. २ एकुलता एक. ३ एकटाच पात्र झालों. ४ सामुग्री. ५ ओततो. ६ सद्गुरूंनीं. ७ सांपडलें. ८ प्रारब्ध. ९ अनुकूळ. १० होतात. ११ नीट. १२ मारणारे. १३ खडे. १४ चांगुलपणाला. १५ दृढ होत आहे. १६ ज्ञान. १७ प्रसादानें. १८ आश्रय करीन. १९ इंद्र. २० प्रसाद. २१ स्थिर होईल.

तरि विरक्तीवांचूनि कहीं । ज्ञानासि तगणें नाहीं । हें विचारूनि ठाई । ठेविलें देवें ॥ ३६ ॥ आतां विरक्तीची कवण परी । जे येऊनि मनातें वरी । हेंही सर्वज्ञें श्रीहरी । देखिलें असे ॥ ३७ ॥ जे विषें रांधिली रससोये । जैं जेवणारा ठाउवी होये । तैं तो ताटचि सांडुनि जाये । जयापरि ॥ ३८ ॥ तैसी संसारा या समस्ता । जाणिजे जैं अनित्यता । तैं वैराग्य दवडितां । पाठी लागे ॥ ३९ ॥ आतां अनित्यत्व या कैसें । तेंचि वृक्षाकारमिषें । सांगिजत असे विश्वेशें । पंचदशीं ॥४०॥ उपडिलें कवतिकें । झाड येरिमोहरा ठाके । तैं वेगें जैसें सुके । तैसें हें नोहे ॥ ४१ ॥ याचि एकेपरी । रूपकाचिया कुसरी । सारीतसे वारी । संसाराची ॥ ४२ ॥ करूनि संसार वावो । स्वरूपीं अहंतेचा ठावो । होआवया अध्यावो । पंधरावा हा ॥ ४३ ॥ आतां हेंचि आघवें । ग्रंथगर्भींचें चांगावें । उंपलविजेल जीवें । आकर्णिजो ॥ ४४ ॥ [ श्रीभगवानुवाच– ] तरि महानंदसमुद्र । जो पूर्णपूर्णिमाचंद्र । तो द्वारकेचा नरेंद्र । ऐसें ह्मणे ॥ ४५ ॥ [ वृक्षरूपकालंकारेण संसारं वर्णयति ] अगा पैं पंडुकुमरा । येतां पैं स्वरूपाचिया घरा । करीतसे आडवारा । विश्वाभास जो ॥ ४६ ॥ तो हा जगडंबरु । नोहे येथ संसारु । हा जाणिजे महातरु । थांवला असे ॥४७॥ परि येरां रुखांसारिखा । तळीं मुळें वरी शाखा । तैसा नोहे ह्मणोनि लेखा । नयेचि कवणा ॥ ४८ ॥ आगी कां कुऱ्हाडी । होय रिगावा जरी बुडीं । तरी हो कां भलतेवढी । वरिचील वाढी ॥ ४९ ॥ जे तुटलिया मुळापासीं । उलंडेल कां शाखांसी । परि तैसी गोठी कायसी । हा सोपा नव्हे ॥ ५० ॥ अर्जुना हें कवतिक । सांगतां असे अलौकिक । जे वाढी अधोमुख । रुखा यया ॥ ५१ ॥ जैसा भानु उंचि नेणो कें । रश्मिजाळ तळीं फांके । संसार हें कोंवरुखें । झाड तैसें ॥ ५२ ॥ आणि आथी नाथी तितुकें । रुंधलें असे येणेंचि एकें । कल्पांतींचेनि उदकें । व्योम जैसें ॥ ५३ ॥ कां रवीच्या अस्तमानीं । आंधारेनि कोंदे रजनी । तैसाचि हा गगनीं । मांडला असे ॥ ५४ ॥ यया फळ ना चुंबितां । फूल ना तुरंबितां । जें कांहीं पंडुसुता । तें रुखचि हा ॥ ५५ ॥ हा ऊर्ध्वमूळ आहे । परि उन्मूळिला नोहे । येणेंचि हा होये । शेंडुळ गा ॥ ५६ ॥ [ ऊर्ध्वमूलमित्यादिश्लोकद्वयभावार्थः श्रुत्यनुसारेण संक्षेपतो व्याचष्टे ] आणि ऊर्ध्वमूळ ऐसें । निगदिलें कीर असे । परी अधींही असोसें । मूळें यया ॥ ५७ ॥ प्रवळला चौमेरीं । पिंपळा कां वडाचिया परी । जे पारंबियामाझारीं । डाहाळिया असती ॥ ५८ ॥ तेविंचि गा धनंजया । संसारतरू यया । अधींचि आथी खांदिया । हेंही नाहीं ॥ ५९ तरी ऊर्ध्वाहीकडे । शाखांचे मादोडे । दिसताति अपाडें । सासिन्नले ॥ ६० ॥ जालें गगनचि पालवीये । कां वारा मांडला रुखाचेनिआयें । नाना अवस्थांत्रयें । उदय केला असे ॥ ६१ ॥ ऐसा हा एक । विश्वाकार विटंकें । उदयला जाण रुख । ऊर्ध्वमूळ ॥ ६२ ॥ आतां ऊर्ध्व या कवण । येथें मूळ तें किंलक्षण । कां अधोमुखपण । शाखा कैसिया ॥ ६३ ॥ अथवा द्रुमा यया । अधीं जिया मुळिया । तिया कोण कैसिया । ऊर्ध्व शाखा ॥ ६४ ॥ आणि अश्वत्थ हा ऐसी । प्रसिद्धी कायसी । आंतमविदविलासीं । निर्णय केला ॥ ६५ ॥ हें आघवेंचि बरवें । तुझिये प्रतीतीसि फावे । तैसेनि सांगों सोलिवें । विन्यासें गा ॥६६॥ परी ऐकें गा सुभगा । हा प्रसंग असे तुजचिजोगा । कानचि करी हो सर्वांगा । हियें आथिलिया ॥ ६७ ॥ ऐसें प्रेमरसें सुरफुरें । बोलिलें जंव यादववीरें । तंव अवधान अर्जुनाकारें । मूर्त जालें ॥ ६८ ॥ देव निरूपिती तें थेंकुलें । येवढें श्रोतेपण फांकलें । जैसें आकाशा खेंवं पसरिलें । दाही दिशीं ॥ ६९ ॥ श्रीकृष्णोक्तिसागरा । हा आगस्तीचि दुसरा । ह्मणौनि घोट भरों पाहे एकसरा । अवघेयाचा ॥ ७० ॥ ऐसी सोयें सांडूनि खवळिली । आवडी अर्जुनीं देवें देखिली । तेथ जालेनि सुखें केली । कुरवंडी तया ॥ ७१ ॥

**आतां ह्या आपल्या हृदयाचा खासा चौरंग करून, त्यावर श्रीगुरूच्या पादुका स्थापन करूं. १ ऐक्यभावाच्या ओंजळींत सर्वेंद्रियांच्या कळ्या भरून देवाला पुष्पांजळी व अर्घ्य देऊं या. २ अनन्योदकानें धुतलेली श्रीगुरुनिष्ठ जी वासना, तें चंदनाचें बोट लावूं. ३ प्रेमाचें सोनें गाळून त्या सकुमार पदांत नूपुरें घालूं. ४ अनन्यभावानें शुद्ध केलेली दृढतर आवड हीं जोडवीं बोटांत घालूं, ५ आणि त्यावर आनंदरूप घमघमित परिमळयुक्त सत्वाचें अष्टदळानें प्रफुल्लित झालेलें कमळ ठेवूं. ६ त्यापुढें**

---

१ टिकाव. २ अंतःकरणांत. ३ स्वयंपाक. ४ उलटें. ५ चतुराई. ६ दवडते. ७ खेप. ८ व्यर्थ. ९ चांगुलपणानें. १० विस्तारेल. ११ प्रतिबंध. १२ दृढ झाला, वाढला. १३ समजुतीस. १४ केवढीही. १५ उपडी होईल. १६ आश्चर्यकारक. १७ व्यापलेलें आहे. १८ चोखावयाला. १९ हुंगावयाला. २० उपटून पडलेला. २१ त्याच योगेंकरून. २२ हिरवा गार.

१ पुष्कळ. २ चाऱ्ही बाजूंनीं. ३ खालीं. ४ जुंवाडे. ५ विस्तारलें. ६ वृक्षाच्याच तोडीचा. ७ तिन्ही अवस्थांचा. ८ मोठा, निबिड. ९ खालीं. १० आत्मज्ञान्यांनीं. ११ अनुभवाला. १२ निरूपणानें. १३ सारे कर्णच. १४ सर्वांगभर. १५ अंतःकरणपूर्वक. १६ भरपूर. १७ लहान. १८ बाहू. १९ मर्यादा.

अहंकारधूप जाळूं, निरभिमानदीपानें ओवाळूं आणि ऐक्यरूपानें त्यांस आलिंगन देऊं. ७ माझा देह आणि प्राण; ह्याच्या पादुका करून त्या गुरूच्या चरणांत घालूं आणि त्या पायांवरून भोग व मोक्ष ह्यांचें निंवलोण उतरूं. ८ आणखी, ह्या श्रीगुरूचरणसेवेनें, ज्याच्या योगानें सकलार्थसिद्धीचें साम्राज्य प्राप्त होतें, अशा दैवाला पात्र होऊं. ९ जें ब्रह्माच्या विश्रांतीपर्यंत शुद्ध ज्ञान देतें; जें ह्या वाचेला अमृताचा सिंधु करून सोडतें; १० कोटि पूर्णचंद्र ज्याच्यावरून ओवाळून टाकावेत, असें वक्तृत्व प्राप्त होतें; आणि अक्षरांनाही तशीच गोडी येते. ११ सूर्यानें आश्रय केलेली पूर्वदिशा, साऱ्या जगाला प्रकाशाचें वैभव देते, त्याप्रमाणें वाचा ही श्रोत्यांना ज्ञानाची दिवाळी करून सोडते. १२ वेद फिके पडतात; मोक्षही तितका शोभत नाहीं; असे शब्द ज्या दैवाच्या योगेंकरून पहावयास मिळतात; १३ श्रवणसुखाच्या मंडपामध्यें विश्व वसंतऋतूचा उपभोग घेतें; आणि तसाच वाचावल्लीला भर येतो. १४ ज्याचा अंत न लागतां, मनासहवर्तमान वाचा रद्द पडते, तो देव शब्दाचा चमत्कार होऊन राहतो. १५ ज्ञानालाही जें जाणतां येत नाहीं, ध्यानालाही जें सांपडत नाहीं; तें अगम्य (ब्रह्म) गोष्टीमध्येंच प्राप्त होतें. १६ श्रीगुरूच्या पदकमलांचा प्रसाद झाला, कीं वाचेच्या आंगीं येवढें सौभाग्य प्राप्त होतें. १७ **ज्ञानदेव** ह्मणतात, "फार काय सांगावें? तें (सामर्थ्य) आज माझ्याशिवाय अन्य ठिकाणीं नाहीं. १८ कारण, मी त्यांचें एकुलतें एक बाळ आहें, आणि ते माझे एकुलते एक गुरु आहेत. ह्मणून कृपेला मी एकटाच पात्र झालों. १९ हें पहा! चातकाला मेघ सारी सामुग्री देतो, त्याप्रमाणें प्रभूंनीं मला करून सोडलें. २० ह्मणून रिकामें तोंड वडवड करूं लागलें तरी गीतेसारखें गोड त्यांत सांपडलें. २१ प्रारब्ध अनुकूल होतें तेव्हां, वाळूचींही रत्नें होतात, आणि मारतें आयुष्यही नीट होऊन लोभ करतें. २२ **श्रीजगन्नाथानें** भुकेची वेळ राखावयाची मनांत आणलें, तर अधणांत घातलेले खडे सुद्धां अमृताचे तांदुळ बनतात. २३ त्याप्रमाणें श्रीगुरु जेव्हां अंगिकार करतात तेव्हां सारा संसारच मोक्षमय होऊन जातो. २४ अहो! **आदिनारायण,** जो **भगवान्** त्यानें त्या पांडवांचें यत्किंचित्‌ही उणें पडूं दिलें नाहीं. येवढेंच नव्हे, तर त्यांस विश्वांत वंद्य करून सोडलें. २५ त्याप्रमाणें **श्रीनिवृत्तिरायांनीं** माझें अज्ञान ज्ञानाच्या पदवीला पोंचविलें. २६ पण हें आतां असो. बोलतांना प्रेम दृढ होत जातें. गुरुगौरवाचें वर्णन करतांना आवधान कोठें रहातें? २७ आज त्याच प्रसादाच्या योगेंकरून श्रीगीतेच्या अर्थानें मी तुह्मां संतांच्या पायांची सेवा करीन. २८ तर तोच निर्णय प्रस्तुत चवदाव्या अध्यायाच्या शेवटीं, कैवल्यपति जे **श्रीकृष्ण,** त्यांनीं असा केलेला आहे. २९ कीं, ज्याच्या हातीं ज्ञान येतें, तोच मुक्तीला समर्थ होतो. जो शंभर यज्ञ करतो, तोच स्वर्गाची संपत्ति भोगावयास योग्य होतो. ३० किंवा शंभर जन्म घेऊन जो ब्रह्मकर्म आचरण करतो, तोच **ब्रह्मदेव** होतो. दुसरा होत नाहीं. ३१ किंवा सूर्याचा प्रकाश जसा डोळस मनुष्यालाच मिळतो, त्याप्रमाणें मोक्षाची गोडी ज्ञानालाच असते. ३२ तर त्या ज्ञानाला मिळविण्याची कोणाच्या आंगांत योग्यता आहे? हें पाहूं लागलें तर एकालाच दिसते. ३३ कारण, पाताळांतील ठेवाही अंजन दाखवील हें खरें; पण त्याला डोळे पाहिजेत तेही पायाळूचेच पाहिजेत. ३४ तसें ज्ञान हें मोक्ष देईल ह्यांत खरोखर भेद नाहीं. पण तें थोर वाटेल, इतकें मन शुद्ध झालें पाहिजे. ३५ पण विरक्तीवांचून ज्ञान कधींच टिकाव धरावयाचें नाहीं. हें देवांनीं आधींच विचारानें ठरविलें होतें. ३६ आणखी, ती विरक्ति कोणत्या रीतीनें येऊन मनाला वरील, ह्याचाही त्या सर्वज्ञ **श्रीहरीनें** विचार करून ठेवला होता. ३७ विष घालून तयार केलेला स्वयंपाक जेवणारास समजला, कीं तो तत्काल तें ताटच टाकून

उठतो, ३८ त्याप्रमाणें ह्या साऱ्या संसाराची अनित्यता जेव्हां कळून येते, तेव्हां वैराग्याला हाकून लावलें तरी तें पाठीस लागतें. ३९ आतां याचें अनित्यत्व कसें ? तें **विश्वेश्वर** ह्या पंधराव्या अध्यायामध्यें वृक्षाकाराच्या दृष्टांतानें सांगतात. ४० एखादें झाड मजेनें उपटून उलटें ठेवलें, तर तें तेव्हांच सुकून जातें. तसें मात्र हें नव्हे. ४१ ह्याच्या आकाराची मोठी मजा आहे. ह्या रूपकाची चतुराई इतकी आहे कीं, हें संसाराची वारी चुकवितें. ४२ संसार हा मिथ्या करून आत्मस्वरूप तें मी असें होण्याला पंधरावा अध्याय हें स्थान आहे. ४३ आतां हेंच सारें ग्रंथाच्या आंतील चांगुलपण मनापासून उघडें केलें जाईल. तर ऐकावें. ४४ तर महदानंदाचा समुद्र, जो पूर्णांचा पूर्णिमाचंद्र, तो **द्वारकाधीश** असें ह्मणाला. ४५ "बा **अर्जुना!** आत्मस्वरूपाच्या घरास यावयाला विश्वाभास अडथळा करतो, ४६ तो कांहीं संसाराचा विस्तार नव्हे. तर तो एक मोठा वाढलेला वृक्ष आहे असें समज. ४७ पण इतर वृक्षांचीं मूळें खालीं असून शाखा वर असतात, तसा हा नव्हे. ह्मणून कोणाच्याच समजुतींत येत नाहीं. ४८ आग किंवा कुऱ्हाड मुळांत घुसली, ह्मणजे मग वरची वाढ केवढीही असो. ४९ कारण, मुळापाशीं तुटलें कीं, शाखाही उपटून पडतात. पण ती गोष्ट येथें काय होय ? हा तशांतला सोपा नव्हे. ५० **अर्जुना!** ह्याचा चमत्कार सांगितला, तर फारच विलक्षण आहे. कारण, ह्या वृक्षाची वाढ अधोमुख आहे. ५१ ज्याप्रमाणें सूर्याची उंची किती आहे हें समजत नाहीं, तरी किरणसमुदाय पृथ्वीवर पसरतो, त्याप्रमाणें संसार हें विचित्र झाड आहे. ५२ आणखी, जितकें असलेलें आणि नसलेलें तितकें सारें ह्या एकानें व्यापलेलें आहे. कल्पांताच्या उदकानें जसें आकाश भरावें, ५३ किंवा सूर्याच्या अस्तमानीं रात्र जशी भरून जावी, त्याप्रमाणेंच हा आकाशामध्यें भरलेला आहे. ५४ चाखूं ह्मटलें तर ह्याला फळ नाहीं, हुंगूं ह्मटलें तर ह्याला फूल नाहीं; **अर्जुना!** जें कांहीं आहे तें सारा हा वृक्ष. ५५ ह्याचें मूळ वर आहे. पण हा उपटलेला नव्हे; ह्मणूनच त्याला पालवी फुटते. ५६ आणखी, अशा प्रकारें त्याचें मूळ वर आहेच; पण खालीं अनेक मुळ्या पसरलेल्या आहेत. ५७ पिंपळासारखा किंवा वडासारखा हा चौफेर फोफावत सुटला आहे. कारण, ह्याच्या पारंब्यांमध्यें आणखीही डाहळ्या फुटल्या आहेत. ५८ तसेंच हे **अर्जुना!** ह्या संसाररूप वृक्षाला खालींच खांद्या आहेत असें नाहीं, ५९ तर, वरच्या बाजूलाही अपार शाखांचे जुंबाडेच्या जुंबाडे विस्तारलेले दिसतात. ६० गगन सारेंच पालवी होऊन रहातें, आणि वृक्षासारखाच जगड्वाळ वाराही उत्पन्न होतो. किंवा तीन अवस्थांचा उदय होतो. ६१ असा हा एक विश्वाकार वृक्ष वर मूळ असलेला उत्पन्न झाला आहे लक्ष्यांत ठेव. ६२ आतां ह्याच्या वर तें काय ? मूळाचें लक्षण कोणतें ? किंवा अधोमुख असलेल्या शाखा कशा ? ६३ अथवा ह्या वृक्षाला ज्या खालीं मुळ्या आल्या आहेत त्या कोण ? आणि ऊर्ध्व शाखा कशा ? ६४ आणि हा अश्वत्थ ह्मणून आत्मज्ञान्यांनीं कसा ठरविला ? व तेंच नांव कां प्रसिद्ध केलें ? ६५ हें सारें नीट तुला समजेल अशा रीतीनें स्पष्ट निरूपण करूं. ६६ तर हे **अर्जुना!** ऐक. हा प्रसंग तुझ्या जोगताच आहे. ह्याकरितां अंतःकरणपूर्वक सर्वांगाला कान कर." ६७ असे प्रेमरसानें थवथवलेले जे **यदुवीर श्रीकृष्ण**—त्यांनीं भाषण केलें. तेव्हां लक्ष्य हें **अर्जुना**च्या रूपानेंच जन्मास आलें. ६८ दाही दिशांनीं आकाशाला आलिंगन द्यावें, त्याप्रमाणें देव निरूपण करतील तेवढें थोडें. असें श्रोतृत्व फैलावलें. ६९ किंवा **श्रीकृष्णा**च्या भाषणरूप सागराला हा (अर्जुन) दुसरा अगस्तीच भेटला. ह्मणून साऱ्याचा एकदम घोट घेण्याची संधि पाहूं लागला. ७० अशी

**आवड अगदीं अमर्याद फोपावत सुटलेली देवांनीं पाहिली, तेव्हां झालेलें सुख त्यांनीं तिच्यावरून ओवाळून टाकलें. ७१**

श्रीभगवानुवाच–

ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥१॥

[ऊर्ध्वमूलं] मग ह्मणे धनंजया । तें ऊर्ध्व गा तरू यया । येणें रुखेंचि कां जया । ऊर्ध्वता गमे ॥ ७२ ॥ येऱ्हवीं मध्योर्ध्व अध । हे नाहीं जेथ भेद । अद्वयासीं ऐकवद । जया ठायीं ॥ ७३ ॥ जो नाइकिजता नाद । जो असौरभ्य मकरंद । जो आंगोंथिला आनंद । सुरतेविण ॥ ७४ ॥ जया जें ऑऱ्हां परौतें । जया जें पुढें माघौतें । दृश्येंवीण देखतें । अदृश्य जें ॥ ७५ ॥ उपाधीचा दुसरा । घालितां वोपेसरा । नामरूपाचा संसारा । होय जयातें ॥७६॥ ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसधेंचि जें ज्ञान । सुखा भरलें गगन । गाळींव जें ॥ ७७ ॥ जें कार्य ना कारण । जया दुजें ना एकपण । आपणयां जें जाण । आपणचि ॥ ७८ ॥ ऐसें वस्तु जें साचें । तें ऊर्ध्व गा यया तरूचें । तेथ आर घेणें मूळाचें । तें ऐसें असे ॥ ७९ ॥ तरी माया ऐसी ख्याती । नसतीच यया आथी । कां वांझेची संतती । वानणें जैसें ॥ ८० ॥ तैसी सत् ना असत् होय । जे विचाराचें नाम न साहे । ऐसे या परीची आहे । अनादि ह्मणती ॥ ८१ ॥ जे नाना तत्त्वांची मांदुसें । जे जगदभ्राचें आकाश । जे आकारजाताचें दुसें । घडी केलें ॥ ८२ ॥ जे भवद्रुमबीजिका । जे प्रपंचचित्रभूमिका । विपरीतज्ञानदीपिका । सांचली जे ॥ ८३ ॥ ते माया वस्तूच्या ठायीं । असे जैसेनि नाहीं । मग वस्तुप्रभावचि पाहीं । प्रगट होय ॥ ८४ ॥ जेव्हां आपणयां आली निद । करी आपणपें जेंवि मुग्ध । कां काजळी आणी मंद । प्रभा दीपीं ॥ ८५ ॥ स्वप्नीं प्रियांपुढें तरुणांगी । निदेली चेवउनि वेगीं । आलिंगिलेनिवीण आलिंगी । सकाम करी ॥ ८६ ॥ तैसी स्वरूपीं जाली माया । आणि स्वरूप नेणणें जें धनंजया । तेंचि तरू यया । मूळ पहिलें ॥ ८७ ॥ वस्तूसी आपला जो अबोध । तो ऊर्ध्वी आंडुळेजे कंद । वेदांतीं हाचि प्रसिद्ध । बीजभाव ॥ ८८ ॥ घन अज्ञान सुषुप्ती । तो बीजांकरभाव ह्मणती । येर स्वप्न हेंन जागृती । हा फळभाव तियेचा ॥ ८९ ॥ ऐसी यया वेदांतीं । निरूपणभाषाप्रतीति । परी तें असो प्रस्तुतीं । अज्ञान मूळ ॥ ९० ॥ तें ऊर्ध्व आत्मा निर्मळें । अधोर्ध्व सूचितीं मूळें । बळिया बांधोनि आळें । मायायोगाचें ॥९१॥

[अधःशाखं] मग आंधिलीं संदेहांतरें । उठती जियें अपारें । तें चौपांसी घेऊनि आगारें । खालावती ॥ ९२ ॥ ऐसें भवद्रुमाचें मूळ । हें ऊर्ध्वी करी बळ । मग आग्रियाचें बेंबळें । अधीं दावी ॥९३॥ तेथ चिद्वृत्ती पहिलें । महत्तत्त्व उमललें । तें पान वाँलेंदुल्हें । एक निघे ॥ ९४ ॥ मग सत्वरजतमात्मक । त्रिविध अहंकार जो एक । तो तिवर्णा अधोमुख । डिरे फुटे ॥ ९५ ॥ तो बुद्धीची घेऊनि आंगारी । भेदाची वृद्धी करी । तेथ मनाचें जळ धरी । साजेपणें ॥ ९६ ॥ ऐसा मूळाचिया गाढिकों । विकल्परस कोंवळिका । चित्तचतुष्टय डाहाळिका । कोंभैजेतों ॥ ९७ ॥ मग आकाश वायु द्योतकें । आप पृथ्वी हे पांच फोकें । महाभूतांचे सरोखें । सरळे होती ॥ ९८ ॥ तैसीं श्रोत्रादि तन्मात्रें । तियें अंगवसां गर्भपत्रें । लुंळलुळितें विचित्रें । उमळती गा ॥ ९९ ॥ तेथ शब्दांकुर वरिपेंडी । श्रोत्रा वाढी देव्हडी । होता करित कांडीं । आकांक्षेचीं ॥ १०० ॥ अंगत्वचेचे वेलपल्लव । स्पर्शांकुरीं घेती धांव । तेथें बावेळ पडे अभिनव । विकारांचें ॥ १ ॥ पाठीं रूपपत्र पालोवेलीं । चक्षु लांब तें कांडें घाली । ते वेळीं व्यामोहता भली । पान्हेली जाय ॥ २ ॥ आणि रसाचें आंगवेसें । वाढतां वेगें बहुवसें । जिव्हे आर्तीचीं अंसोसें । निघती बेचें ॥ ३ ॥ तैसेंचि कोंभेलेनि गंधें । घ्राणाची डिरि थांव बांधे । तेथ घे स्वानंदें । प्रलोभाचा ॥ ४ ॥ एवं महदहंबुद्धि । मन महाभूतसमृद्धि । इये संसाराचिया अवधि । सांसनिजे ॥ ५ ॥ किंबहुना इहीं आठे । आंगीं हा अधिक फांटे । परि शिंपीचियेवढें उमटे । रुपें जेंवि ॥ ६ ॥ कां समुद्राचेनि पैसारें । वरी तरंगता आस्तरे । तैसें ब्रह्मचि होय वृक्षाकारें । अज्ञानमूळ ॥ ७ ॥ आतां याचाचि हा विस्तार । हाचि यया पैसार । जैसा आपणचि स्वप्नीं परिवार । येकाकिया ॥ ८ ॥ परि तें असो हें ऐसें । कोंवरें झाड उससे । यया महदादि आंरवसें । अधोशाखा ॥ ९ ॥ [अश्वत्थं प्राहुः] आणि अश्वत्थ ऐसें ययातें । ह्मणती जे जाणते । तेंही परिस हो येथें । सांगिजेल ॥ ११० ॥

---

१ घृक्षानें. २ ऐक्य. ३ आंगींच असलेला. ४ रतीशिवाय. ५ झुलामा. ६ अंकुर फुटणें. ७ नांव. ८ वर्णन करणें. ९ पेटी. १० वस्त्र. ११ जागी करून. १२ बांधतो. १३ आणि. १४ निघतात.

१ पहिलीं, प्रथम. २ चाऱ्ही बाजूंना. ३ अंकुर, कोंभ. ४ खालीं जातात. ५ झुंबाडा. ६ अंकुर फुटलें. ७ अतिप्रिय, कोमल. ८ तीनपानी. ९ अंकुर. १० लागवड, डाहाळी. ११ दृढतेनें. १२ भेदरूप जल. १३ प्रगट करणारे. १४ डापे. १५ सरळ शाखा. १६ उभे. १७ सूक्ष्मभूतें. १८ साल. १९ कोवळीं लुसलुशीत. २० प्राप्त होते. २१ दुप्पट होती. २२ आधिक्य. २३ रूप हेंच पान. २४ पान्हा फुटतो. २५ साल. २६ फार, जोरानें. २७ पानांतलें पान. २८ बळ, जोर. २९ तयार होतो. ३० प्रसारानें. ३१ विस्तारतो. ३२ भ्रमात्मक, आश्चर्यकारक. ३३ वर येतें, उत्पन्न होतें. ३४ अंकुर.

तरि अश्वत्थ ह्मणिजे उखा[1]। तोंवरी एकसारिखा। नाहीं निर्वाह यया रुखा[2]। प्रपंचरूपा ॥ ११ ॥ जैसा न लोटतां क्षण। मेघ होय नानावर्ण। कां विजू नसे संपूर्ण। निमेषभरी ॥ १२ ॥ कांपतया पद्मदळा। वरीलिया वैसका नाहीं जळा। कां चित्त जैसें व्याकुळा। माणुसाचें ॥ १३ ॥ तैसीचि ययाची स्थिती। नासत जाय क्षणक्षणप्रती। ह्मणौनि ययातें ह्मणती। अश्वत्थ हा ॥ १४ ॥ आणि अश्वत्थ येणें नांवें। पिंपळ ह्मणती स्वभावें। परि तो अभिप्राय नोहे। श्रीहरीचा ॥ १५ ॥ येऱ्हवीं पिंपळ ह्मणतां विखीं[3]। मिया गती देखिली असे निकी। परि तें असो काय लौकिकीं। तुह्मा काज ॥ १६ ॥ ह्मणौनि हा प्रस्तुत। अलौकिक परिसा ग्रंथ। तरि क्षणिकत्वेंचि अश्वत्थ। बोलिजे हा ॥ १७ ॥ आणीकही येक थोर। यया अव्ययत्वाचा डोंगर[4]। आथी परी तो भीतर[5]। ऐसा आहे ॥ १८ ॥ जैसा मेघाचेनि तोंडें। सिंधु एके आंगें काढे। आणि नदी येरीकडे। भरितीचि असती ॥ १९ ॥ तेथ वोहटे ना चढे। ऐसा परिपूर्णचि आवडे। परि ते फुंली[6] जंव नुघडे। मेघानदीची ॥ १२० ॥ ऐसेया रुखांचें होणें जाणें। न तर्के होतेंनि वॅंहिलेपणें[7]। ह्मणोनि ययातें लोक ह्मणे। अव्यय हा ॥ २१ ॥ येऱ्हवीं दानशीळ पुरुष। वेंचक[8]पणेंचि संचक। तैसा व्ययेंचि हा रुख। अव्यय गमे ॥ २२ ॥ जातां वेगें बहुवसें। न वचे कां भूमी रुतलें असें। रथाचें चक्र दिसे। जिया परी ॥ २३ ॥ तैसें काळातिक्रमें जे वाळे। ते भूतशाखा जेथ गळे। तेथ कोडीवरी उमाळे। उठती आणिक ॥ २४ ॥ परी येकी केधवां गेली। शाखाकोडी केधवां जाली। हें नेणवे जेवि उमललीं। आषाढअभ्रें ॥ २५ ॥ महाकल्पाच्या शेवटीं। उदेलिया उमळती[9] सृष्टी। तैसेंचि आणिखीचें दांग[10] उठी। सोसिन्नलें[11] ॥ २६ ॥ संहारवातें प्रचंडें। पडती प्रळयांतींचीं सोलडें[12]। तंव कल्पादीचीं जुवाडें। पाल्हेजती ॥ २७ ॥ रिगे मन्वंतर मनुपुढें। वंशावरी वंशांचे भांडे[13]। जैसी इक्षुवृद्धी कांडेंनकांडें। जिंके जेविं ॥ २८ ॥ कलियुगांतीं कोरडीं। चहूंयुगांचीं सालें सांडी। तंव कृतयुगाची पेली[14] देव्हडी[15]। पडे पुढती ॥ २९ ॥ वर्ततें वर्षे जाये। तें पुढिला मुळहारी[16] होये। जैसा दिवस जात कीं येत आहे। हें चोजवेनां[17] ॥ १३० ॥ जैसा वारियाचा झुळका। सांदा ठाउवा नव्हे देखा। तैसिया उठती पडती शाखा। नेणों किती ॥ ३१ ॥ एकी देहाची डिरी[1] तुटे। तंव देहांकुरीं बहुवी फुटे। ऐसेनि भवतरु हा वाटे। अव्यय ऐसा ॥ ३२ ॥ जैसें वाहतें पाणी जाय वेगें। तैसेंचि आणिक मिळे मागें। येथ असंतचि असिजे जगें। मानिजे संत ॥ ३३ ॥ कां लागोनि डोळा उघडे। तंव कोडीवरी[2] घडे मोडे। नेणतया तरंग आवडे। नित्य ऐसा ॥ ३४ ॥ वायसा[3] एकें बुबुळें दोहीं कडे। डोळा चाळितां अपाडें[4]। दोन्ही आथी ऐसा पडे। भ्रम जेविं जगा ॥ ३५ ॥ पैं भिंगोरी[5] निधिये[6] पडली। ते गमे भूमीसीं जैसी जडली। ऐसा वेगातिशय भुली। हेतु होय ॥ ३६ ॥ हें बहु असो झंडिती। आधारें भोवंडितां कोलती। ते दिसे जैसी आयती। चक्राकार ॥ ३७ ॥ हा संसारवृक्ष तैसा। मोडत मांड सहसा। न देखोनि लोक पिसा। अव्यय मानी ॥ ३८ ॥ [यस्तं वेद स वेदवित्] परि ययाचा वेग देखे। जो हा क्षणिक ऐसा वोळखे। जाणे कोडिवेळा निमिखें। होत जात ॥ ३९ ॥ नाहीं अज्ञानावांचूनि मूळ। ययाचें असिलेपण टवाळ। ऐसें झाड सिनसाळ[9]। देखिलें जेणें ॥ १४० ॥ तयातें गा पंडुसुता। मी सर्वज्ञही ह्मणें जाणता। पैं वेदत्रयीं[10] सिद्धांतीं[11]। वंद्य तोचि ॥ ४१ ॥ योगजाताचें जोडलें। तया येकासींचि उपयोगा गेलें। किंबहुना जियालें[12]। ज्ञानही तेणें ॥ ४२ ॥ हें असो बहु बोलणें। वानिजेल[13] तो कवणें। जो भवरुख जाणे। उखि[14] ऐसा ॥ ४३ ॥

**मग ह्मणतात "अर्जुना! ह्या वृक्षाला वर असें ह्मटलें खरें, पण त्याला जो वरपणा आला आहे, तो ह्या मुळानेंच आलेला आहे. ७२ बाकी, त्याला खालीं वर आणि मध्यें हे भेदच नाहींत. त्याच्या ठिकाणीं अद्वय एकत्र झालें आहे. ७३ जो ऐकल्याशिवाय नाद; जो वास घेतल्यावांचून सुगंध; जो रतिशिवाय स्वयंभूच आनंद; ७४ ज्याच्या आलीकडे पलीकडे तेंच; ज्याच्या मागें पुढें तेंच; पहाणाराशिवाय पहाणारें तेंच; अदृश्य तेंच; ७५ उपाधीचा दुसरा मुलामा चढला ह्मणजे ज्याला नामरूपाचा संसार होतो. ७६ ज्ञातृ, ज्ञेय, ह्याशिवाय केवळ जें ज्ञान; जें गाळीव सुखानें भरलेलें गगन; ७७ जें कार्यही**

---

१ प्रातःकाळ. २ वृक्षाला. ३ विषयीं. ४ प्रसिद्धि. ५ आंत, अंतर्गत अर्थ. ६ मुद्रा, संयोग. ७ निराळेपणानें. ८ खर्चिकपणानें. ९ उपटून पडतात. १० अरण्यें. ११ विस्तारले. १२ साली. १३ वाढते. १४ ओली साल. १५ दुप्पट. १६ आमंत्रण. १७ जाणवेना.

१ अंकुर. २ कोट्यावधि. ३ कावळयाला. ४ सत्वर, भराभर. ५ वावटळ, भिंवरी. ६ अतिभ्रमणांत. ७ झपाट्यानें, लवकर. ८ विस्तृत. ९ क्षणिक, जीर्ण होणारें. १० वेदांतील. ११ सिद्धांताला. १२ सफळ झालें, जिवंत, मूर्तिमान्. १३ कोणाच्यानें वर्णन केला जाईल. १४ नाशिवंत, अनित्य.

नव्हे, आणि कारणही नव्हे. जें एकही नव्हे, आणि अनेकही नव्हे, आपलें आपल्यासच जाणणारें; ७८ अशी जी सत्य वस्तु–परमात्मा–तो ह्या वृक्षाचें ऊर्ध्व–मूळ. तेथें मुळाला अंकुर फुटतो तो असा. ७९ त्या नसलेल्यालाच 'माया' असें प्रसिद्ध नांव आहे. वांझेच्या संततीचें वर्णन करावें, ८० त्याप्रमाणें सत्यही नव्हे, आणि मिथ्याही नव्हे; विचाराचें नांवही जिला सहन होत नाहीं; अशा तऱ्हेची ही असल्याबद्दल पूर्वीपासून ह्मणत आले आहेत. ८१ जी नाना तत्त्वांची पेटी; जी जगद्रूप अभ्राचें आकाश; आणि हरएक आकाराचें घडी केलेलें वस्त्र; ८२ जी संसाररूप वृक्षाची बी; जी प्रपंचचित्राचा पट; जी विपरीत ज्ञानाचा प्रत्यक्ष दिवा; ८३ ती माया परब्रह्माच्या ठिकाणीं नसल्याप्रमाणें असते. तरी परब्रह्माचा प्रभावच प्रगट होतो. ८४ आपणा स्वतःलाच जेव्हां झोंप येते, तेव्हां ती आपणालाच मुग्ध करून सोडते. किंवा दिव्याचीच काजळी दिव्याला मंदप्रभा आणते. ८५ स्वप्नांत पतीपुढें निजलेली तरुणी, लौकर उठून आलिंगनाशिवायच आलिंगन करून त्यास सकाम करते, ८६ त्याप्रमाणें स्वरूपामध्यें माया झालेली आहे. आणखी अर्जुना! स्वरूप न जाणणें हें ह्या वृक्षाचें पहिलें मूळ आहे. ८७ ब्रह्माला आपली जी विस्मृति ती, वर तयार झालेला जो कांदा–गड्डा–वेदांतामध्यें बीजभाव ह्मणून जो प्रसिद्धपणें ह्मटलेला आहे तो हाच. ८८ दृढ अज्ञान आणि सुषुप्ति ह्यांनाच बीजांकुरभाव असें ह्मणतात. आणखी, स्वप्न आणि जागृति हीं त्याचीं फळें. ८९ असें वेदांती मार्गेचें अनुभविक निरूपण आहे. पण तें येथें असो. अज्ञान हें मूळ येवढें ध्यानांत धर ह्मणजे पुरे. ९० निर्मळ आत्मा हें त्याचें वरचें मूळ; त्याचीं पाळें मायायोगाचें (अज्ञानाचें) मोडें बळकट पाळें धरून खालवर पसरतात. ९१ मग पहिलीं जीं अपार संदेहांतरें उठतात, तीं चहुंकडे पसरून त्यांचे अंकुर खालीं वाढतात. ९२ ह्याप्रमाणें ह्या संसाररूप वृक्षाचें मूळ ऊर्ध्वभागीं घट्ट धरून, खालीं डहाळ्यांचे जुंबाडेच्या जुंबाडे दाखविते. ९३ तेव्हां चिद्वृत्ति हें पहिलें महत्तत्त्व उमलतें, तेंच एक नाजुक पान होय. ९४ मग सत्व, रज, तम ह्या तीनगुणात्मक जो एक अहंकार तें त्याचें फुटलेलें त्रिदळ होय. ९५ तें बुद्धीची डहाळी धरून भेदाची वृद्धि करतें. तेव्हां मनाचें खोड टवटवीत होतें. ९६ ह्याप्रमाणें मुळें बळकट धरून भेदरसानें कोमलता उत्पन्न झाल्यावर त्याला चित्तचतुष्टयरूपी पल्लव फुटतात. ९७ मग आकाश, वायु, तेज, आप, पृथ्वी हे पंचमहाभूतांचे फोंक सरळ जातात. ९८ त्याचप्रमाणें श्रोत्रादि सूक्ष्म भूतें ही अंतर्साल व पोटांतील कोंवळीं पत्रें होत. तीं कोंवळीं लुसलुशीत असतात. ९९ तेव्हां शब्दांना अंकुर फुटतात. श्रोत्रांची दुप्पट वाढ झाली ह्मणजे आकांक्षेचीं कांडीं बांधतात. १०० अंतर्त्वचेचे वेलपल्लव स्पर्शांकुरानें धांव घेतात तेव्हां नानाप्रकारचे विकार माजून रहातात. १०१ नंतर रूप हेंच कोणी एक पान, त्याचा विस्तार होतो. डोळे लांब लांब कांडीं घालतात, तेव्हां व्यामोहतेला भला पान्हा फुटतो. १०२ आणि तो रसयुक्त पाला मोठ्या वेगानें वाढला, ह्मणजे जिव्हेला सपाटून आवडीचे शेंडे फुटतात. १०३ तसेंच गंधाला कोंभ फुटले ह्मणजे, घ्राणाची ढापी जोर धरते आणि लोभाचा आनंद माजतो. १०४ अशा प्रकारें महत् आदिकरून अहंबुद्धि, मन, महाभूतांचा समुदाय, हीं संसाराच्या मर्यादेला तयार होतात. १०५ किंबहुना ह्या आठांच्या योगानेंच हा संसाररूप वृक्ष, आंगानें अधिक फैलावतो. परंतु शिंपीएवढें रुपें (सूर्य) ज्याप्रमाणें जिकडे तिकडे पसरतें, १०६ किंवा समुद्राच्या विस्तारानें त्याच्यावर लाटा पसरतात, त्याप्रमाणें ब्रह्म हेंच वृक्षाच्या आकारानें विस्तारलें आहे. आणि अज्ञान हें त्याचें मूळ. १०७ स्वप्नामध्यें जसें आपण एकटेच असून सारा परिवार आपलाच असतो, त्याप्रमाणें ह्याचा

हा विस्तार आणि पसारा आहे. १०८ पण तें असो. हें अशा प्रकारचें चमत्कारिक झाड उत्पन्न होऊन त्याच्या खालीं महदादि शेंडे व शाखा असतात. १०९ आणखी, जे जाणते आहेत, ते ह्याला 'अश्वत्थ' असें ह्मणतात. त्याचें कारणही सांगतों ऐक. ११० तर अश्वत्थ ह्मणजे सकाळ होईपर्यंतही हा प्रपंचरूप वृक्ष रहात नाहीं. १११ एक क्षण गेला नाहीं तोंपर्यंतच, मेघ जसा अनेक वर्णांचा होतो; किंवा वीज जशी एक क्षणभरही टिकत नाहीं, ११२ हालत असलेल्या कमळाच्या पानाला जशी स्थिरता नाहीं, किंवा व्याकुळ माणसाचें चित्त जसें थाऱ्यावर असत नाहीं, ११३ त्यांचप्रमाणें ह्याची स्थिति आहे. हा क्षणोक्षणीं नासत जातो, ह्मणून ह्याला अश्वत्थ असें ह्मणतात. ११४ आणखी ह्याला अश्वत्थ असें नांव असल्यामुळें त्याला सहज पिंपळ असेंही ह्मणतात. परंतु श्रीहरीचा उद्देश तसा नाहीं. ११५ बाकी, पिंपळ ह्मणण्यांतही एक चांगला अर्थ मला दिसून येतो. पण तें असो. तुह्मांला लौकिकाशीं काय काम? ह्मणून तूर्त तुह्मी हा अपूर्व ग्रंथच ऐका. ११६ तर हा क्षणभंगुर असल्यामुळेंच ह्याला अश्वत्थ असें ह्मणतात. ११७ शिवाय, ह्याची अव्यय ह्मणूनही मोठी प्रसिद्धि आहे. पण आंतून तो अशा प्रकारचा आहे. ११८ ज्याप्रमाणें मेघाच्या एका तोंडांतून समुद्र आंत जात असतो, आणि दुसऱ्या तोंडानें नद्या भरत असतात, ११९ तेव्हां तो कमीही होत नाहीं, आणि वाढतही नाहीं. परिपूर्णच आहे असें वाटतें. पण हें कोठपर्यंत? मेघाची आणि नदीची मर्यादा मोडली नाहीं तेथपर्यंत. १२० त्याप्रमाणें ह्या वृक्षाचें होणें जाणें आहे. तें क्षणभंगुर असल्यामुळें तर्क चालत नाहीं. ह्मणून लोक ह्याला अव्यय असें ह्मणतात. १२१ बाकी दान धर्म करणारा पुरुष द्रव्याचा व्यय करूनच संग्रही असतो, त्याप्रमाणें हा वृक्ष नाशवंत असूनच अव्यय असा आहे. १२२ रथ अतिशय वेगानें जात असला ह्मणजे त्याचें चक्र भूमीमध्यें रुतत असूनही रुतत नाहीं असें वाटतें. १२३ त्याप्रमाणें कालातिक्रमानें जें वाढतें, त्याच्या भूतशाखा जेव्हां गळून पडतात, तेव्हां आणखी कोट्यवधि कोंभ त्याला फुटतात. १२४ परंतु एकत्र असलेल्यांचा नाश केव्हां झाला? कोट्यवधि शाखा केव्हां उत्पन्न झाल्या? हें, आषाढांतील अभ्रें उत्पन्न झालीं ह्मणजे जसें कळत नाहीं, त्याप्रमाणें कळत नाहीं. १२५ महाकल्पाच्या शेवटीं उत्पन्न झालेल्या सर्व सृष्टि उपटून पडतात, आणि पुन्हा पहिल्यासारख्याच विस्ताराचें वन माजून राहतें. १२६ प्रचंड संहारवायूनें प्रळय काळच्या साली पडतात, तोंच दुसऱ्या कल्पाच्या आरंभींचे झुंबाडेच्या झुंबाडे उद्भवतात. १२७ मनुपुढें मनु होऊन मन्वंतराची सुरवात होते. कांड्यांवर कांडीं येऊन जशी उंसाची वृद्धि होते, त्याप्रमाणें वंशामागून वंश उत्पन्न होतात. १२८ कलियुगाच्या अंतीं चार युगांचीं वाळलेलीं सालें टाकून देतो तोंच कृतयुगाची ओली साल दुप्पट जोरानें वर येते. १२९ चालू असलेलें वर्ष जातें, तों पुढच्यास आमंत्रण येतें. दिवस जातो आहे किंवा येतो आहे हें ज्याप्रमाणें समजत नाहीं, १३० वाऱ्याच्या झुळुकीचा सांधा जसा कळत नाहीं, त्याप्रमाणें ह्याला शाखा नव्या फुटतात किती, आणि पहिल्या गळून पडतात किती तें कळत नाहीं. १३१ एका देहाचा देंठ तुटतो, तों दुसऱ्या देहाचे मोडच्या मोड उगवतात. ह्यामुळें हा संसाररूप वृक्ष अव्यय असा वाटतो. १३२ वाहतें पाणी जितक्या सपाट्यानें निघून जातें, तितक्याच सपाट्यानें त्याच्या मागोमाग दुसरें येऊन मिळत असतें. तेव्हां जग हें अशाश्वतच असें मानण्यांत मात्र शाश्वत आहे. १३३ किंवा डोळा मिटून उघडीपर्यंत कोट्यवधि लाटा लयास जातात आणि नव्या उत्पन्न होतात. पण अज्ञान्याला त्या तशाच सदोदित आहेत असें वाटतें. १३४

काचळयाला एकच बुबुळ असल्यामुळें दोन्ही बाजूंला लौकर लौकर डोळा फिरवितांना दोन दोन पदार्थ आहेत असा भ्रम पडतो, त्याप्रमाणेंच ह्या जगाला भ्रम आहे. १३५ तसेंच जोरानें वावटळ निघाली, ह्मणजे ती भूमीला चिकटलेली आहे असें वाटतें. त्याप्रमाणें वेगाचा अतिशयपणा ह्याच भुलीस कारण होतो. १३६ हा पाल्हाळ असो. हातांत कोलती धरून ती जर जोरानें गर गर गर गर फिरविली, तर ती वाटोळीच आहे असें वाटतें. १३७ त्याप्रमाणें हा संसारवृक्ष क्षणांत मोडतो आणि क्षणांत तयार होतो. हें न पाहतांच वेडे लोक ह्याला अव्यय असें मानतात. १३८ परंतु जो ह्याचा वेग जाणतो; हा क्षणिक आहे असें जो ओळखतो; हा एका निमेषांत कोट्यवधि वेळां होतो आणि नाश पावतो हें ज्याला समजतें; १३९ अज्ञानाशिवाय ह्याला मूळ नाहीं; ह्याचें अस्तित्व आहे हें खोटें; असें हें क्षणिक झाड ज्यानें ओळखिलें, १४० अर्जुना! त्यालाच मी सर्वज्ञ आणि जाणता असें ह्मणतों. तसेंच वेदांतील सिद्धांतालाही वंद्य असा तोच. १४१ नानाप्रकारच्या योगानें जें काय मिळवावयाचें तें त्याच्या एकट्याच्याच उपयोगीं पडतें. किंबहुना ज्ञानही त्याच्याच योगानें सफल होतें. १४२ हें फार बोलणें असूं दे. संसारवृक्ष हा क्षणभंगुर आहे असें ज्यानें जाणलें, त्याचें वर्णन करणार कोण?" १४३

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि
कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥ २ ॥

[अधश्चोर्ध्वं] मग ययाचि प्रपंचरूपा । अधोशाखिया पादपा । डाहाळिया जाती उमपा । ऊर्ध्वाही उजू ॥ ४४ ॥ [अधश्च मूलानि] आणि अधीं[1] फांकलीं डोळें[2] । तियें होती मूळें । तयांही तळीं पघळे । वेल पालव ॥ ४५ ॥ ऐसें जें आर्ली । ह्मणितलें उपक्रमीं[3] । तेंही परिसें सुगमीं । वोलीं सांगों ॥ ४६ ॥ तरि बद्धमूळ अज्ञानें । महदादिकीं शासनें[4] । वेदांचीं[1] थोरवनें[2] । घेऊनियां ॥ ४७ ॥ परि आधीं तंव स्वेदज । जरायुज उद्भिज अंडज । हें बुडौनि महाभुज । उठती चारी ॥ ४८ ॥ [प्रसृतास्तस्य शाखाः] यया एकैकाचेनि आंगवटें[3] । चौऱ्यांशीं लक्षधा फुटे । ते वेळीं जीवशाखीं फांटे । सैंघचि[4] होती ॥ ४९ ॥ प्रसवत शाख सरळिया । नानासृष्टि डाहाळिया । आड फुटती मोळिया[5] । जातीचिया ॥ १५० ॥ स्त्री पुरुष नपुंसकें । हे व्यक्तिभेदांचे टेंके[6] । आंदोळती आंगिकें । विकारभारें ॥ ५१ ॥ जैसा वर्षाकाळ गगनीं । पाल्हेजे[7] नवघनीं । तैसें आकारजात अज्ञानीं । वेलीजाय[8] ॥ ५२ ॥ [गुणप्रवृद्धाः] मग शाखांचेनि आंगभारें । लवोनि गुंफती परस्परें । गुणक्षोभाचे वारे । उदयजती ॥ ५३ ॥ तेथ तेणें अचाटें । गुणाचेनि झडझडाटें । तिहीं ठायीं हा फांटे । ऊर्ध्वमूळ ॥ ५४ ॥ ['रजोगुणवृद्धाः शाखा आह'] ऐसा रजाचिया झुळुका । झडाडितां आगळिका । मनुष्यजातीं शाखा । थोरावती ॥ ५५ ॥ तिया ऊर्ध्वां ना अधीं । माझारींचि कोंदाकोंदी । आड फुटती खांदी । चतुर्वर्णाच्या ॥ ५६ ॥ [छंदांसि यस्य पर्णानि] तेथ विधिनिषेध सपल्लव[9] । वेदवाक्याचे अभिनव[10] । पालव डोलती बरव[11] । आपुलालिया परी ॥ ५७ ॥ अर्थ काम पसरे । अग्रवनें घेती थारे । तेथ क्षणिकें पदांतरें[12] । इह भोगाचीं ॥ ५८ ॥ [कर्मानुबंधीनि] तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलोभें । खांकरेजती[13] शुभाशुभें । नाना कर्मांचे खांवे । नेणों किती ॥ ५९ ॥ तेवींचि भोगक्षीणें मागिलें । पडती देहांचीं बुडसळें[14] । तंव पुढां वाढी पेले । नवेया देहांची ॥ १६० ॥ [विषयप्रवालाः] आणि शब्दादिक सुहावे[15] । सहज रंगें हवावे[16] । विषयपल्लव नवे । नित्य होती ॥ ६१ ॥ [मनुष्यलोके] ऐसें रजोवातें प्रचंडें । मनुष्यशाखांचे मांदोडे[17] । वाढती तो एथ रूढे । मनुष्यलोक ॥ ६२ ॥ तैसाचि तो रजाचा वारा । निवेक[18] धरी वोसरा[19] । ['तमोगुणवृद्धाः शाखा आह'] मग वाजों लागे घोरा । तमाचा तो ॥ ६३ ॥ [अधःशाखमिति पूर्वश्लोकस्थं पदं पुनर्व्याचष्टे] तेधवां याचिया मनुष्यशाखा । नीच वासना अधीं देखा । [कर्मानुबंधीनीति] पाल्हेजती डाहाळिका । कुकर्माचिया ॥ ६४ ॥ अप्रवृत्तीचे[20] खेणुवाळे[21] । कोंभ निघती सरळे । घेत पान पालव डाळें । प्रमादाचीं ॥ ६५ ॥ [छंदांसीति] बोलती निषेधनियमें ।

१ खालीं. २ डाहाळ्या. ३ आरंभीं. ४ आज्ञा.

१ 'छंदांसि यस्य पर्णानि' याचा तात्पर्यानुवाद. २ मोटीं पानें. ३ शरीरीं. ४ बहुत. ५ आडव्या फांद्या. ६ डाहाळ्यांचीं अग्रें. ७ विस्तारे. ८ विस्तार पावे. ९ सविस्तर. १० नवीन. ११ उत्कृष्ट. १२ अन्य स्थानें. १३ तयारी करतात. १४ शुष्क काष्ठ. १५ चांगलेपणा, साह्यकर्ते. १६ सुशोभित. १७ समुदाय. १८ क्षणभर. १९ ओहट. २० कुमार्गाचे. २१ कठीण, खडबडीत.

जिया ऋचा यजुःसामें । तो पाला तया तुमे । टेंकेयांवरी ॥ ६६ ॥ [ विषयप्रवालाः ] प्रतिपादिती अभिचार । आगम जें परमार । तिहींपानीं घेती प्रसर । वासना वेली ॥ ६७ ॥ तंव तंव होती थोरार्डें । अकर्माचीं तेंळुर्डें । आणि जन्मशाखा पुढेंपुढें । घेती धांव ॥ ६८ ॥ [ मनुष्यलोके ] तेथ चांडाळादि निकृष्ट । दोषजातीचा थोर फांटा । जाळ पडे कर्मभ्रष्टा । भुलोनियां ॥ ६९ ॥ पशु पक्षी सूकर । व्याघ्र वृश्चिक विखार । हे आडशाखानिकर । थोरावती ॥ १७० ॥ परि ऐशा शाखा पांडवा । सर्वांगींही नित्य नवा । नरकभोग यावा । फळाचा तो ॥ ७१ ॥ आणि हिंसाविषयपुढारी । कुकर्मसंगें धुरधुरी । जन्मवरी आंगारी । वाढतीचि असे ॥ ७२ ॥ ऐसे होती तरुतृण । लोह लोष्ट पाषाण । इया खांदिया तेवींचि जाण । फळेंही हेंचि ॥ ७३ ॥ अर्जुना गा अवधारीं । मनुष्यालागोनि इया परी । वृद्धि स्थावरांतवरी । अधोशाखांची ॥ ७४ ॥ [ अधश्च मूलानि ] म्हणोनि जे मनुष्य डोळें । इयेंचि जाणावीं अधींचीं मूळें । जे एथूनि हा पघळे । संसारतरु ॥ ७५ ॥ येन्हवीं ऊर्ध्वींचें पार्था । मुदल मूळ पाहातां । अधींचिया मध्यस्था । शाखा इया ॥ ७६ ॥ [ अनुसंततानि ] परि तामसी सात्विकी । सुकृतदुष्कृतात्मकी । विरूढती या शाखीं । अधोर्ध्वींचिया ॥ ७७ ॥ [छंदांसीति] आणि वेदत्रयाचिया पाना । नये अन्यत्र लागों अर्जुना । जे मनुष्यावांचूनि विधाना । विषय नाहीं ॥ ७८ ॥ म्हणोनि तनुमानुषा । इया ऊर्ध्वमूळींनि जरी शाखा । तरी कर्मवृद्धीसि देखा । इयेंचि मूळें ॥ ७९ ॥ आणि आनीं तरी झाडीं । शाखा वाढतां मुळें गोंढीं । मूळ गाढे तंव वाढी । पैस आथी ॥ १८० ॥ [ कर्मेति ] तैसेंचि इया शरीरा । कर्म तंव देहसंसारा । आणि देह तंव व्यापारा । ना म्हणोंचि नये ॥ ८१ ॥ म्हणोनि देहें मानुषें । इयें मूळें होती न चुके । ऐसें जगज्जनकें । बोलिलें तेणें ॥ ८२ ॥ मग तमाचें तें दारुण । स्थिरावलेया वाउधाण । [ सत्त्ववृद्धिमाह—ऊर्ध्वं प्रसृताः ] सत्वाची सुटे सैंत्राण । वाहुटळी ॥ ८३ ॥ तैं याचि मनुष्याकारा । मुळीं सुवासना निघती अंकुरा । घेऊनि फुटती कोंबांरा । सुकृतांकुरीं ॥ ८४ ॥ उकलतेनि उन्मेखें । प्रज्ञाकुशलतेंचि तिखें । डिरिया निघती निमिखें । बोंबळैजुनी ॥ ८५ ॥ मतीचे सोटे वावे । घालिती स्फूर्तीचे थांवे । बुद्धिप्रकाश घे धांवे । विवेकावरी ॥ ८६ ॥ तेथ मेधारसें सगर्भ । आस्थापत्रीं सेवोंव । सरळ निघती कोंभ । सद्वृत्तीचे ॥ ८७ ॥ [ छंदांसीति ] सदाचाराचिया सहसा । टेंका उठती बहुवसा । घुमघुमिती घोषा । वेदपद्याच्या ॥ ८८ ॥ शिष्टागमविधानें । विविधयागवितानें । इयें पानावरी पानें । पालेजती ॥ ८९ ॥ [ तस्य शाखाः ] ऐशा यमदमीं घोंसाळिया । उठती तपाचिया डाहाळिया । देती वैराग्यशाखा कंवळिया । वेल्हाळपणें ॥ १९० ॥ विशिष्टां व्रतांचे फोक । धीराच्या अणगटी तिख । जन्मवेगें ऊर्ध्वमुख । उंचावती ॥ ९१ ॥ माजि वेदाचा पाला दाट । तो करी सुविद्येचा झडझडाट । जंव वाजे अचाट । सत्वानिळ ॥ ९२ ॥ [ विषयप्रवालाः ] तेथ धर्मडाळं बाहाळी । दिसती जन्मशाखा सरळी । तिया आड फांटती फळीं । स्वर्गादिकीं ॥ ९३ ॥ पुढां उपरति रंगें लोहिवी । धर्ममोक्षाची शाखा पालवी । पाल्हाजत नित्य नवी । वाढतीचि असे ॥ ९४ ॥ पैं रवि चंद्रादि ग्रहवर । पितृ ऋषि विद्याधर । हे आडशाखाप्रकार । पैस घेती ॥ ९५ ॥ याहीपासून उंचवडें । गुंढले फळाचेनि बुडें । इंद्रादिक ते मोंदोडे । थोर शाखांचे ॥ ९६ ॥ मग तयांही उपरी डाहाळिया । तपोधनीं उंचावलिया । मरीची कश्यपादि इया । उपरी शाखा ॥ ९७ ॥ एवं माळोवाळीं उत्तरोत्तर । ऊर्ध्वशाखांचा पैसार । बुडीं साना अग्रीं थोर । फळाढ्य हा ॥ ९८ ॥ वरी उपरिशाखाही पाठीं । येती फळभार जे किरीटी । ते ब्रह्मेशांत अणगटीं । कोंभ निघती ॥ ९९ ॥ फळाचेनि वोझेंपणें । ऊर्ध्वी वोवांडे दुणें । जंव माघौतें वैसणें । मूळींचि होय ॥ २०० ॥ प्राकृताही तरी रुखा । जे फळें दाटली होय शाखा । ते वोवांडली देखा । बुडासि यै ॥ १ ॥ तैसें जेथुनि हा आघवा । संसारतरूचा उठावा । तिये मूळीं टेंकती पांडवा । वाढतेनि ज्ञानें ॥ २ ॥ म्हणौनि ब्रह्मेशांनापरतें । वाढणें नाहीं जीवातें । तेथूनि मग वरौतें । ब्रह्मचि कीं ॥ ३ ॥ परि हें असो ऐसें । ब्रह्मादिक ते आंगवेसें । ऊर्ध्वमूळासरिसें । न तूकती गा ॥ ४ ॥ आणिकही शाखा उपरता । जिया सनकादिकनामें विख्याता । तिया फळीं मूळी नेंडळतां । भरलिया ब्रह्मीं ॥ ५ ॥ ऐसी मनुष्यापासूनि जाणावी । ऊर्ध्वी ब्रह्मादिशेषें पालवी । शाखांची वाडी बरवी । उंचावे

१ हाले. २ अग्रभागीं. ३ जारणमारण. ४ परपीडा. ५ मुळें. ६ जाळें. ७ सर्प. ८ समूह. ९ पुढेंपुढें. १० अंकुर. ११ डहाळ्या. १२ विस्तारे. १३ दृढ. १४ देहाचा संसार. १५ कर्माला. १६ वादळ. १७ सवेग, थोर. १८ अंकुर. १९ कोंभ. २० तीक्ष्ण. २१ विस्तारून. २२ फोक. २३ अवकाश, विस्तारून. २४ बळ.

१ बुद्धीच्या रसानें. २ सुशोभित. ३ शेंडे, अंकुर. ४ शिष्टाचार व वेदोक्त आचरण. ५ नानाप्रकारचे यज्ञ. ६ घोंस. ७ कवळून, आलिंगून. ८ विस्तारानें. ९ मुळ्या. १० जाडी साल. ११ विस्तार. १२ रंगानें. १३ लाल. १४ झांकले. १५ मंडप. १६ माळयामाळ्यावर. १७ ब्रह्मदेव व शिव यांपर्यंत, मुळांत. १८ लवतें. १९ ब्रह्मा व शिव यांपलीकडे. २० सशरीरिक. २१ संसारवृक्षाच्या मूळासमान गणले जात नाहींत. २२ वरच्या. २३ न स्पर्शतां. २४ ब्रह्मदेवादिक समग्र.

पैं ॥ ६ ॥ पार्था ऊर्ध्वींचिया ब्रह्मादि । मनुष्यत्वचि होय आदि । ह्मणौनि इयें अर्धीं । ह्मणीतलीं मूळें ॥ ७ ॥ एवं तुज अलौकिक । हा अधोर्ध्वशाख । सांगीतला भवरूख । ऊर्ध्वमूळ ॥ ८ ॥ आणि अधिंचीं[1] हीं मूळें । उपपत्ती परिसविलीं सविमळें[2] । आतां परिस उन्मूळे[3] । कैसेनि हा ॥ ९ ॥

"मग ह्याच अधःशाखा असणाऱ्या प्रपंचरूप वृक्षाच्या वरही अनेक सरळ अशा डाहळ्या जातात. १४४ आणि खालीं आलेल्या ज्या डाहळ्या (पारंब्या) असतात तीं मुळें होऊन त्यांच्याच खालीं वेल व शेंडे फुटतात. १४५ असें जें आह्मीं प्रारंभीं सांगितलें, तेंही सुलभ शब्दांनीं सांगतों ऐक. १४६ तर अज्ञानानें बद्ध झालेले मुळास महदादिक आज्ञा आणि वेदांचीं थोर थोर पानें फुटल्यानंतर, १४७ प्रथम स्वेदज, जरायुज, उद्भिज, अंडज हे बुंधांतून चार ढापे निघतात. १४८ त्या एकाएकाच्या आंगापासून चौऱ्यायशीं लक्ष (योनी हे) फांटे खालीं फुटूं लागतात. त्या वेळीं जीव शाखेच्या फांट्यांना तर अंतच नाहींसा होतो. १४९ सरळ शाखांना आणि नानाप्रकारच्या सृष्टिरूप डाहळ्यांना आणखी जातिभेदाच्या अनेक आडव्या तिडव्या डाहळ्या फुटतात. १५० तसेंच स्त्री, पुरुष, नपुंसक हे व्यक्तिभेदांचे शेंडे विकाराच्या सपाट्यानें आपोआप हालूं लागतात. १५१ वर्षाकाल जसा नव्या मेघांनीं व्याप्त होतो, त्याप्रमाणें अज्ञानामध्यें प्रत्येक आकाराचे वेल पसरतात. १५२ आणि मग त्या शाखांच्या आंगच्या भारानें त्या लवतात आणि परस्परांमध्यें गुंतून गुणक्षोभाचे वारे उत्पन्न होतात. १५३ त्या वेळीं त्या गुणांच्या अचाट झडझडाटानें ऊर्ध्वमूळ असलेला हा वृक्ष तीन ठिकाणीं फाटतो. (स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक उत्पन्न होतात.) १५४ अशा प्रकारें रजोगुणाच्या झुळुका मोठमोठ्यानें आदळूं लागल्या ह्मणजे मनुष्यजातीच्या डाहळ्या माजून राहतात. १५५ त्या वरतीं किंवा खालतीही न जातां मध्येंच दाटून त्यापासून आणखी त्यांना चतुर्वर्णाचे आडवे तिडवे फांटे फुटतात. १५६ तेव्हां विधिनिषेधाचे शेंडे, व वेदवाक्यांचीं नवीं कोमल पानें मोठ्या मौजेनें आपआपल्या परी डोलत राहतात. १५७ अर्थाची इच्छा फैलावते; आणि ऐहिक भोगांचीं क्षणिक अन्यस्थानें हींच शेंड्यांचीं कोंवळीं कोंवळीं पानें तीं बळावतात. १५८ तेव्हां प्रवृत्तीच्या वृद्धीच्या लोभानें शुभाशुभें तयारी करतात. अनेक प्रकारच्या कर्मांचे खांब किती असतात, त्यांचा तर पत्ताच नाहीं. १५९ तसेंच, पूर्वींचे भोग भोगून क्षीण झालेलीं देहाचीं शुष्क काष्टें गळून पडतात तोंच, नव्या देहांचे अंकुर फुटून वाढीस लागतात. १६० आणि शब्दादिकांच्या सहायानें विषयरूप पल्लव सहज रंगानें नित्य सुशोभित होतात. १६१ अशा प्रकारें रजोरूप प्रचंड वाऱ्यानें मनुष्यांचे समुदाय वाढतात. तोच हा मृत्युलोक होय. १६२ तसेंच तो रजाचा वारा क्षणभर थांबला, तर तमाची मोठी भयंकर गर्जना होऊं लागते. १६३ त्या वेळीं ह्याच मनुष्यशाखांच्या खालीं नीच वासना उत्पन्न होऊन कुकर्मांच्या डाहळ्या फुटतात. १६४ कुकर्मांचे जोरदार कोंभ सरळ निघाले कीं, त्यांना प्रमादाचीं पानें व डाहळ्या फुटतात. १६५ यजु आणि सामवेद निषेधनियमांच्या ज्या ऋचा बोलतात, तो पाला त्यांच्या शेंड्यावर हालत राहतो. १६६ परपीडकशास्त्र जें जारणमारण तें प्रतिपादन करतात. त्याच त्रिदळाला घेऊन वासनावेल फैलावते. १६७ तों तों अकर्मांचीं मुळें वळावत जातात, आणि जन्मरूपशाखा पुढें पुढें धांव घेतात. १६८ तेव्हां भ्रष्ट कर्मांना भुलून अनेक प्रकारच्या दोषांचें जें केवळ स्थान, अशा ज्या चांडाळादि निकृष्ट जाती, त्यांचें जाळें माजतें. १६९ पशु, पक्षी, डुकर, वाघ, विंचू, सर्प इत्यादि आडव्या तिडव्या डाहळ्या फोंपावतात. १७० पण अर्जुना! अशा प्रकारच्या शाखा त्याच्या सर्वांगास असून तो नित्य नवा असतो. आणि

१ खालचीं. २ सविस्तर. ३ उपडेल.

नरकभोग हें त्याला फळ येतें. १७१ हिंसाविषय पुढें करीत, कुकर्माच्या संगतीनें वाढत वाढत जन्मभर अंकुर फुटतच असतात. १७२ अशा प्रकारें झाडें, गवत, लोखंड, माती, दगड, ह्याही खांद्या होतात आणि फळेंही तसलींच येतात. १७३ **अर्जुना!** ऐक. ह्याप्रमाणें मनुष्यापासून तों स्थावरापर्यंत खालच्या डाहळ्यांची वृद्धि करतो. १७४ ह्मणून मनुष्यरूप डाहळया हींच त्याचीं खालचीं मुळें होत. कारण, तेथूनच हा संसाररूप वृक्ष वाढतो. १७५ बाकी **अर्जुना!** वरचें खरें मूळ पाहिलें तर, ह्या खालच्या शाखा ह्या मधल्या होत. १७६ परंतु तामस, सात्विक, सुकृत, दुष्कृतात्मक शाखा ह्या खालच्या आणि वरच्या दरम्यान वाढतात. १७७ आणखी **अर्जुना!** वेदत्रयाचीं पानें दुसऱ्या डाहळ्यांना येत नाहींत. कारण, त्यांच्या विधानांना मनुष्यावांचून दुसरा विषय नाहीं. १७८ ह्मणून मनुष्यभेद ह्या जरी ऊर्ध्व मुळाच्या शाखा आहेत तरी, कर्मवृद्धीला मुळें हींच. १७९ आणि इतर झाडांत तरी, डाहळया वाढल्या ह्मणजे मुळें बळकट होतात, आणि मुळें बळकट झालीं, कीं वाढही वाढत जाते. १८० अशा प्रकारें ह्या शरिराला कर्म, आणि कर्माचा संसार करण्याला देह, अशी ही सांगड असल्यामुळें, देह असेपर्यंत कर्मोला कधींही नाहीं ह्मणतां येत नाहीं." १८१ ह्मणून जगज्जनक जे **श्रीकृष्ण** ते ह्मणाले "मनुष्यदेह हीं मुळें होत ह्यांत संशय नाहीं. १८२ नंतर अशा प्रकारें तमाचें भयंकर वादळ स्थिरावलें ह्मणजे सत्वाची थोर वावटळ सुरू होते. १८३ तेव्हां ह्याच मनुष्यदेहरूपी मुळापासून सुकृताचे कोंभ निघून सद्वासनेला शेंडे फुटतात. १८४ ज्ञानाच्या विस्तारानें, बुद्धीच्या तीव्रतेनें, निमेषामध्यें जोमदार शेंडे पसरून राहतात. १८५ बुद्धीचे फोंक विस्तारून स्फूर्तीचें बळ धरतात. आणि बुद्धीचा प्रभाव विवेकावर धांव घेतो. १८६ तेव्हां बुद्धीच्या रसानें भरलेले, आस्थापत्रांनीं सुशोभित झालेले, सद्वृत्तीचे सरळ कोंभ निघतात. १८७ सदाचाराचे अनेक कोंभ एकदम उठतात, आणि वेदवाक्याचा घोष घुमघुमूं लागतो. १८८ शिष्टाचार, वेदोक्त आचरण, नानाप्रकारचे याग इत्यादि पानांवर पानें गजबरतात. १८९ अशा प्रकारें यमदमाच्या घोंस फुटलेल्या तपाच्या डाहळ्या फुटून त्या विस्तारानें वैराग्याच्या फांद्यांना लपेटतात. १९० विशिष्ट व्रतें हेच कोणी एक फोंक, त्यांना धैर्याच्या तीक्ष्ण मुळ्या फुटून जन्माच्या वेगानें वर तोंड करून उमटतात. १९१ सत्वाचा वारा जेव्हां सोसाट्यानें वाजत सुटतो, तेव्हां मध्यें दाटून राहिलेला वेदांचा पाला सुविद्येची खळखळ करून सोडतो. १९२ तेव्हां धर्मरूप डाहळीचा विस्तार होऊन जन्मशाखा सरळ वाढतात, आणि त्यांपासून निघालेल्या आडव्या डाहळ्यांस स्वर्गादि फळें धरतात. १९३ पुढें उपरतीच्या रंगानें लाल झालेले धर्ममोक्षाचे शेंडे नित्य नवे फुटत राहतात. १९४ तसेंच चंद्रसूर्यादि मोठमोठाले ग्रह, पितृ, ऋषि, विद्याधर, इत्यादि निरनिराळया आडव्या डाहळ्या पसरतात. १९५ ह्याच्याही वर उंच, इंद्रादिक मोठमोठ्या शाखा असतात. पण त्या फळांच्या बुडानें-डेंखानें-झांकलेल्या असतात. १९६ नंतर त्यांच्याही वर तपस्व्यांच्या शाखा असतात. मरीची, कश्यप इत्यादि शाखा त्यांच्याही वर. १९७ अशा प्रकारें माळयांवर माळया होऊन वरच्या शाखांचा विस्तार झालेला असतो. खालच्या ढाळ्यांना फळें थोडीं, व वरच्या डाहळ्यांस मात्र लकटून राहिलेलीं असतात. १९८ **अर्जुना!** त्यावरच्या शाखांच्याही मागून जे फळभार येतात, त्यांचे ब्रह्मदेव शंकरापर्यंतही कोंभ निघतात. १९९ फळांच्या भारानें त्यावरच्या डाहळ्या वांकतात, त्या इतक्या कीं, त्या पुन्हा येऊन मुळास लागतात. २०० सामान्य वृक्षांची गोष्ट सुद्धां अशीच आहे, कीं डाहळीला फळें धरलीं कीं,

त्यांच्या भारानें तीही बुडाला येऊन लागते. २०१ अर्जुना! त्याप्रमाणेंच वाढतीं ज्ञानें आहेत तीं ही, ह्या संसाररूप वृक्षाचा जेथून हा सारा उद्भव झालेला आहे, त्या मुळास जाऊन चिकटतात. २०२ ह्मणून ह्या जिवाला ब्रह्मदेव व महेश्वर ह्यांच्या पलीकडे वाढ नाहीं. त्या पलीकडे एक ब्रह्मच आहे. २०३ पण तें असो. असे जे ब्रह्मदेवादिक ते शारीरिक असल्यामुळें ऊर्ध्व मूळांत गणले जात नाहींत. २०४ आणखीही सनकादिक नामें करून प्रख्यात असणाऱ्या ज्या वरच्या शाखा, त्या फळांना किंवा मुळांना न शिवतां ब्रह्मामध्यें भरलेल्या असतात. २०५ ह्याप्रमाणें मनुष्यांपासून वर ब्रह्मदेवापर्यंत ह्या संसाररूप वृक्षाची सारी पालवी व शाखांची मोठी वाढलेली वाढ आहे ह्मणून समजावें. २०६ बा अर्जुना! ब्रह्मदेव आदिकरून ह्या वरच्या शाखा आहेत. त्यांनाही आदि मनुष्यत्वच घ्यावें लागतें. ह्मणून हीं मुळें खालीं असें ह्मटलें. २०७ ह्याप्रमाणें तुला वर मूळ असलेला, खालीं वर शाखा असलेला अलौकिक संसारवृक्ष सांगितला. २०८ आणखी खालच्या ह्या मुळांची सविस्तर उपपत्तीही कथन केली. आतां हा उपडावा कसा तें ऐक." २०९

न रूपमस्येह तथोपलभ्यते
नांतो न चादिर्न च संप्रतिष्ठा ।
अश्वत्थमेनं सुविरूढमूल-
मसंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥

[ अश्वत्थमेनं सुविरूढमूलं ] परि तुझ्या हन पोटीं । ऐसें गमेल किरीटी । जे येवढें झाड उत्पाटी । ऐसें कायि असे ॥२१०॥ कीं ब्रह्मयाच्या शेवटवरी । ऊर्ध्व शाखांची थोरी । आणि मूळ तंव निराकारीं । ऊर्ध्वीं असे ॥११॥ हा स्थावराही तळीं । फांकत असे अधींच्या डाळीं । माजि धांवतसे दुजा मळीं । मनुष्यरूपीं ॥ १२ ॥ ऐसा गाढा आणि अफाट । आतां कोण करी यया शेवट । तरि ह्मणि हा हळुवट । धरिसी भाव ॥ १३ ॥ [इह] तरि हा उन्मूळावया दोषें । येथ सायासचि कायिसे । [ न रूपमस्य ] काय बाळा बागुल देशें । दवडावा आहे ॥ १४ ॥ गंधर्वदुर्ग काय पाडावें । काय शशविषाण मोडावें । होआवें मग तोडावें । खपुष्प कीं ॥ १५ ॥ तैसा संसार हा वीरा । रूख नाहीं साचोकारा । मा उन्मूळणीं दरारा । कायिसा तरी ॥ १६ ॥ आह्मीं सांगीतली जे परी । मूळडाळांची उजरी । ते वांझेचीं घरभरी । लेंकुरें जैसीं ॥ १७ ॥ काय कीजति चेइलेपणीं । स्वप्नींचीं तियें बोलणीं । तैसी जाण ते काहाणी । हुंगळीचि ते ॥१८॥ वांचूनि आह्मीं निरूपिलें जैसें । ययाचें अचळ मूळ असे तैसें । [ उपलभ्यते ] आणि तैसाचि जरी हा असे । साचोकारा ॥ १९ ॥ तरि कोणाचेनि संतानें । निपजती तया उन्मूळणें । काय फुंकिलिया गगनें । जाइजेल गा ॥ २२० ॥ ह्मणौनि पैं धनंजया । आह्मीं वानिलें रूप तें माया । कासवीचेनि तुपें राया । वोगरिलें जैसें ॥ २१ ॥ मृगजळाचीं गा तळीं । तिये दिठी दुरूनि न्याहाळीं । वांचूनि तेणें पाणियें साळी केळी । लाविसी काई ॥ २२ ॥ मूळ अज्ञानचि तंव लटिकें । मा तयाचें कार्य हें केतुकें । ह्मणौनि संसाररुख सत्यकें । वावोचि गा ॥ २३ ॥ [ नांतः ] आणि अंत यया नाहीं । ऐसें बोलिजे जें कांहीं । तेंही साचचि पाहीं । येके परी ॥ २४ ॥ तरि प्रबोध जंव नोहे । तंव निद्रे काय अंत आहे । कीं रात्री सरे तंव पोहे । तया औरौतें ॥ २५ ॥ तैसा जंव पार्था । विवेक नुधवी माथा । तंव अंत नाहीं अश्वत्था । भवरूपा यया ॥ २६ ॥ वाजतें वारें निवांत । न राहे जेथिचें तेथ । तंव तरंगता अनंत । ह्मणावीच कीं ॥ २७॥ ह्मणौनि सूर्य जैं हारपे । तैं मृगजळाभास लोपे । कां प्रभा जाय दीपें । मालवलेनि ॥ २८ ॥ तैसें मूळवीज अविद्या खाये । तें ज्ञान जैं उभें होये । तैंचि यया अंत आहे । येऱ्हवीं नाहीं ॥ २९ ॥ [ न चादिः ] तेविंचि हा अनादी । ऐसी ही आथी शाब्दी । तो आळु नोहे अनुरोधी । बोलातें यया ॥ २३० ॥ जे संसारवृक्षाच्या ठाईं । साचोकार तंव नाहीं । मा नाहीं तया आदि काई । कोण होईल ॥ ३१ ॥ जो साच जेथुनि उपजे । तयातें आदि हें साजे । आतां नाहींचि तो ह्मणिजे । कोठूनियां ॥ ३२ ॥ ह्मणौनि जन्मेना आहे । ऐसिया सांगों कवण माये । यालागीं नाहींपणेंचि होये । अनादि हा ॥ ३३ ॥ वांझेचिया लेंका । कैंची जन्मपत्रिका । नभीं नीळी भूमिका । कें कल्पूं पां ॥ ३४ ॥ व्योमकुसुमांचा पांडवा । कवणें देंट तोडावा । ह्मणौनि नाहीं ऐसिया भवा ।

१ उपटील. २ ब्रह्मलोकापर्यंत. ३ दाटकट. ४ निजांत, सुर. ५ उद्देशें.

१ खरोखर. २ मूळांची व फांद्यांची. ३ समज. ४ दुर्बळ. ५ कोणा लेंकाच्यानें. ६ मेजवानी केली. ७ कितीसें? ८ सत्यत्वेंकरून. ९ प्रातःकाळ. १० आलीकडे. ११ वर न करी. १२ वार्ता. १३ आळ १४ अनुकूळ नव्हे. १५ सत्यता. १६ आई. १७ आकाशपुष्पांचा.

आदि कैंचीं ॥ ३५ ॥ जैसें घटाचें नाहींपण । असतचि असे केलेनिविण। तैसा समूळ वृक्ष जाण। अनादि हा ॥३६॥ अर्जुना ऐसेनि पाहीं । आद्यंत ययासी नाहीं । [ न च संप्रतिष्ठा ] माजि स्थिती अभासे कांहीं । परि टवाळ ते गा ॥ ३७ ॥ ब्रह्मगिरीहूनि न निगे । आणि समुद्रींही कीर न रिगे । तरि माजि दिसे वाउगें । मृगांबु जैसें ॥ ३८ ॥ तैसा आद्यंत कीर नाहीं । आणि साचही नोहे कहीं । परि लटिकेपणाची नवाई । पडिभासे गा ॥ ३९ ॥ नाना रंगीं गेजबजे । जैसें इंद्रधनुष्य देखिजे । तैसा नेणतया आपजे । आहे ऐसा ॥ २४० ॥ ऐसेनि स्थितीचिये वेळे । भुलवी अज्ञानाचे डोळे । लाघवी हरी मेखळे । लोक जैसा ॥ ४१ ॥ आणि नसतीचि ईयामिका । व्योमीं दिसे तैसी दिसो कां । तरी दिसणेंही क्षणा एका । होय जाय ॥ ४२ ॥ स्वप्नींही मानिलें लटिकें । तरी निर्वाहो कां एकसारिखें । तेविं अभास हा क्षणिकें । रीतीचा गा ॥ ४३ ॥ देखतां आहे आंवडे । घेऊं जाइजे तरि नातुडे । जैसा टिकु कीजे मांकडें । जळामाजि ॥ ४४ ॥ तरंगभंग संडीपडे । विजूही न पुरे होडे । आभासासि तेणें पाडें । होणें गा ॥ ४५ ॥ जैसा ग्रीष्मशेषींचा वारा । नेणिजे समोर कीं पाठिमोरा । तैसी स्थिती नाहीं तरुवरा । भवरूपा यया ॥ ४६ ॥ एवं आदि ना अंत स्थिती । ना रूप ययासि आथी । आतां कायसी कुंथाकुंथी । उन्मूळनीं गा ॥ ४७ ॥ आपुलिया अज्ञानासाठीं । नव्हता थांवला किरीटी । [ असंगशस्त्रेण ] तरि आतां आत्मज्ञानाच्या लोटीं । खांडेनि गा ॥४८॥ वांचूनि ज्ञानेवीण एकें । उपाय करिसी जितुके । तिहीं गुंफसि अधिकें । रुखीं इये ॥ ४९ ॥ मग किती खांदोखांदीं । यया हिंडावें ऊर्ध्वीं अर्धीं । ह्मणौनि मूळचि अज्ञान छेदीं । सम्यक्ज्ञानें ॥२५०॥ येऱ्हवीं दोरीचिया उरगा । डांगा मेळवितां पैं गा । तो शिणचि वाउगा । केला होय ॥ ५१ ॥ तरावया मृगजळाची गंगा । डोणीलागीं धांवतां दांगा- । माजि वोहळें बुडिजे पैं गा । साच जेविं ॥ ५२ ॥ तेविं नाथिलिया संसारा । उपाई जाचतया वीरा । आपणपें लोपे वांरा । विकोपीं जाय ॥५३॥ ह्मणोनि स्वप्नींचेया घाया । औषध चेवोचि धनंजया । तेविं अज्ञानमूळा यया । ज्ञानचि खड्ग ॥ ५४ ॥ [ दृढेन ] परि तेंचि लीला पेरजवे । तैसें वैराग्याचें नवें । अभंगबळ होआवें । बुद्धीसि गा ॥ ५५ ॥ उठिलेनि वैराग्यें जेणें । हा त्रिवर्ग ऐसेनि सांडणें । जैसें वमुनियां सुणें । आतांचि गेलें ॥ ५६ ॥ हाटायवरी पांडवा । पदार्थजाती आघवा । विटवी तो होआवा । वैराग्य लोंटु ॥५७॥ [ छित्वा ] मग देहाहंतेचें दळें । सांडूनि एकेचि वेळे । प्रत्यक्बुद्धी करतळें । होतवसावे ॥५८॥ निसळें विवेकसहणें । जे ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें । मग पुरतेनि बोधें उटणें । एकलेचि ॥ ५९ ॥ परि निश्चयाचें मुष्टिबळ । पाहावें एकदोन वेळ । मग तुळावें अति चोखाळ । मननवरी ॥ २६० ॥ पाठीं हंतियेरां आपणयां । निदिध्यासें एक जालिया । पुढें दुजें नुरेल घाया- । पुरतें गा ॥ ६१ ॥ तें आत्मज्ञानाचें खांडें । अद्वैत प्रभेचेनि वांडे । नेदील उरों कवणेकडे । भववृक्षासि ॥ ६२ ॥ शरदागमींचा वारा । जैसा केर फेडी अंबरा । कां उदयला रवी आंधारा । घोंट भरी ॥ ६३ ॥ नाना उपेवढ होत खेवो । नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो । स्वप्रतीतिधारेचा वाहो । करील तैसें ॥ ६४ ॥ तेव्हां ऊर्ध्व कां अधोमूळ । कां अधीचें हन शाखाडाळ । तें कांहींचि न दिसे मृगजळ । चांदिणा जेविं ॥ ६५ ॥ ऐसेनि गा वीरनाथा । आत्मज्ञानाचिया खड्गलता । छेदूनियां भवाश्वत्था । ऊर्ध्वमूळातें ॥ ६६ ॥

**“ पण तुझ्या मनांत कदाचित् असें येईल कीं, येवढें झाड उपटील असें काय आहे ? २१० कारण, ब्रह्मलोकापर्यंत मोठमोठ्या जगड्वाळ शाखा माजून राहिल्या आहेत, आणि त्याचें मूळ तर वर निराकारामध्यें आहे. २११ आणि त्याच्या खालच्या शाखा स्थावराच्याही खालीं जाऊन पसरल्या आहेत. आणि त्यांच्यामध्यें मनुष्यरूप दुसऱ्या मुळ्या धांवत असतात. २१२ हा इतका बळकट आणि मोठा—आतां असल्याचा शेवट करणार कोण ? असा क्षुद्र विचार कदाचित् मनांत आणशील. २१३ तर हा उपडून काढावयाला येथें सायास ते कशाचे ? बाळाचा बागुलबोवा काय देशोधडीस लावला पाहिजे ? २१४ गंधर्वांचे किल्ले पाडावेत कसे ? सशाचें शिंग मोडावें**

१ स्थिति. २ ब्रह्मगिरी पर्वतांतून. ३ मृगजळ. ४ प्रतिभासे. ५ भरे. ६ वाटतो. ७ सोंगाडी, बहुरूपी. ८ वेष, सोंग. ९ निळेपणा. १० वाटतो. ११ स्थिति. १२ प्रतिबिंबित माकड. १३ एकीकडे जाई. १४ पैज. १५ ग्रीष्मांतींचा. १६ बळावला. १७ शस्त्रानें. १८ काठ्या. १९ होडी. २० अरण्यामध्यें. २१ लटक्या. २२ उपायाचे कष्ट करणारास. २३ वार केल्यानें, विकोपास जाईल. २४ धारण करतां यावें.

१ धर्म, अर्थ आणि काम. २ सुकाळ. ३ अंतरनिष्ठ बुद्धीस. ४ कवच. ५ हातीं द्यावें. ६ पाजळून. ७ विचाररूप सहाणेवर. ८ तीक्ष्ण, खणखणीत. ९ पूर्ण ज्ञानाचें पाणी. १० हत्याराच्या निदिध्यासानें आपण तद्रूप झाल्यावर. ११ शस्त्र. १२ वाढे. १३ जागृति. १४ प्रवाह, तीक्ष्णता.

कसें ? आकाशाला आधीं फूल आलें पाहिजे, मग तोडावयाचा विचार! २१५ त्याप्रमाणें हे शूरा ! हा संसारवृक्ष कांहीं खरा नव्हे. मग तो उपटून काढण्याला भय कशाचें ? २१६ आह्मी ह्यांच्या मुळांचें आणि डाहळयांचें जें स्वरूप सांगितलें, तें वांझेच्या लेंकरांनीं घर भरल्याप्रमाणें आहे. २१७ स्वप्नांतील जीं बोलणीं असतात, तीं जागेपणांत काय होत? तशीच ही गोष्ट केवळ वायफळ आहे असें समज. २१८ आणखी, आह्मीं ह्याचें मूळ जसें अचल ह्मणून वर्णन केलें, तसाच हा जर खरोखर असला, २१९ तर त्याला उपटणें कोणा लेकाच्यानें होणार ? गगनानें फुंकर घातली, तर तो जाईल काय ? २२० ह्मणून **अर्जुना !** आह्मी जें वर्णन केलें, तें रूप मायेचें—खोटें—कासवीचें तूप राजाला वाढावें तसें! २२१ अरे ! मृगजळाचा तलाव दुरून दृष्टीनें पहावयाचा मात्र. नाहीं तर, त्या पाण्यानें काय भात, केळी लावतां येतील होय ? २२२ अज्ञान हेंच मुळीं खोटें. मग त्याचें कार्य तें कितीसें ? ह्मणून संसाररूपवृक्ष, हा खरेपणानें मिथ्याच आहे. २२३ आणखी ह्याला अंत नाहीं असें ह्मणतात, तेंही एका अर्थानें खरेंच आहे. २२४ तर नीट जागा झाला नाहीं, तोंपर्यंत निद्रेला काय अंत आहे ? किंवा रात्र संपली, कीं त्याच्या आधींच उजाडतें. २२५ त्याप्रमाणें **अर्जुना !** विवेक जोंपर्यंत माथा वर करीत नाहीं, तोंपर्यंत ह्या संसाररूप अश्वत्थाला अंत नाहीं. २२६ सुटलेला वारा जेथल्या तेथें निवांत रहात नाहीं, तोंपर्यंत हालचालही अनंत असेंच ह्मटलें पाहिजे. २२७ ह्मणून सूर्य जेव्हां नाहींसा होतो, तेव्हां मृगजळाचा भासही नाहींसा होतो. किंवा दिवा मालवावा तेव्हां प्रभाही नाहींशी होते. २२८ त्याप्रमाणें मूळ बीज जी अविद्या, ती खाऊन टाकणारें ज्ञान जेव्हां उभें रहातें, तेव्हां ह्याचा अंत होतो. एरवीं नाहीं. २२९ त्याचप्रमाणें हा अनादि असल्याबद्दलही लोकवार्ता आहे. तो त्या शब्दांचा आरोपही कांहीं खोटा नव्हे. २३० कारण, संसारवृक्षाच्या ठिकाणीं मुळीं खरेपणाच नाहीं. मग नाहीं त्याला आदि तें काय आणि कोण असणार ? २३१ जो खरा आहे; आणि एखाद्या ठिकाणापासून जो उत्पन्न होतो, त्याला आदि हें ह्मणणें शोभतें. आतां जो नाहींच तो कोठून झाला ह्मणून सांगावा ? २३२ ह्मणून जन्मल्यावांचून जो असणारा, अशाची आई कोणती ह्मणून सांगावी ? ह्याकरितां तो मिथ्यत्वानेंच अनादि आहे. २३३ वांझोटीच्या मुलाला जन्मपत्रिका कसली ? आकाशांतील निळी दिसणारी जमीन कोठें आहे ह्मणून ह्मणावी ? २३४ **अर्जुना !** आकाशाच्या पुष्पाचा देंठ तोडणार कोण ? ह्याकरितां नसणारा जो संसार त्याला मूळ कशाचें ? २३५ घट तयार केला नसला ह्मणजे ज्याप्रमाणें त्याचा अभाव हा मूळचाच असतो, त्याप्रमाणें हा मूळासकट वृक्ष हा अनादि आहे हें लक्ष्यांत ठेव. २३६ **अर्जुना !** अशा प्रकारें ह्याला आदि आणि अंत हीं नाहींत. मध्यें त्याच्या स्थितीचा कांहींसा आभास वाटतो, पण तो खोटा. २३७ ब्रह्मगिरीपर्वतांहूनही निघत नाहीं, आणि समुद्रालाही खरोखर मिळत नाहीं, तरी मध्यंतरी उगेंच जसें मृगजळ दिसतें; २३८ त्याप्रमाणेंच ह्याला खरोखर आदि व अंत नाहीं. आणि तो खराही कधीं होत नाहीं. पण लटिकेपणाचेंच आश्चर्य उत्पन्न होतें. २३९ नाना रंगांनीं गजबरलेलें इंद्रधनुष्य जसें दृष्टीस पडतें, त्याप्रमाणें अज्ञान्यांना हा आहे असा वाटतो. २४० अशा स्थितीच्या वेळीं, सोंगाड्या जसा आपल्या वेषानें लोकांस भूल पाडतो, त्याप्रमाणें अज्ञान हें डोळ्यांस भुरळ घालतें. २४१ आणि खरोखर आकाशांत कांहीं नसतांनाही अस्मानी रंग दिसतो. तो दिसेना कां ? पण तें दिसणें हें एका क्षणांत होतें आणि जातें. २४२ स्वप्नांत मानलेलें लटकें असतें. तें एक सारखें—नित्य—असें ह्मणतां येईल काय?

त्याप्रमाणें आभास हा क्षणभंगुर आहे. २४३ पाहूं गेलें तर आहे असें वाटतें. घेऊं गेलें तर, माकडानें पाण्यांत प्रतिबिंब पाहिल्याप्रमाणें सांपडत नाहीं. २४४ लाटा मोडणें सुद्धां मागें पडतें; विजेच्यानेंही पैज मारवत नाहीं; अशा प्रकारें आभासाचें होणें जाणें आहे. २४५ ग्रीष्मऋतूच्या शेवटचा वारा, समोरचा आहे कीं पाठमोरा हें जसें सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणें ह्या संसाररूप वृक्षाची स्थिति आहे. ती सांगतां येत नाहीं. २४६ अशा प्रकारें ह्याला आदि नाहीं, अंत नाहीं, ह्याला अस्तित्व नाहीं, रूप नाहीं. मग तो उपटून काढावयाला प्रयास ते कसले ? २४७ **अर्जुना !** आपल्याच अज्ञानामुळें हा नसता वृक्ष वळावलेला आहे. तर आतां आत्मज्ञानरूप शस्त्रानें तो तोडून टाक. २४८ ह्या एका ज्ञानाशिवाय जितके ह्मणून उपाय करशील, तितका तितका ह्या वृक्षाला अधिक बांधला जाशील. २४९ मग खांद्यांखांद्यांच्या वर वर, व खालीं खालीं किती ह्मणून हिंडत बसावें ? ह्मणून उत्तम ज्ञानानें मूळ अज्ञानच आधीं छेदून टाक. २५० बाकी, दोराच्या सापाला मारावयासाठीं काठ्या जमा करणें हे कष्ट रिकामेच. २५१ मृगजळाची गंगा तरून जाण्यासाठीं होडीकरितां धांवाधांव करणें, किंवा अरण्यांतील लहानशा ओहोळानें बुडणें जितकें खरें, २५२ **अर्जुना !** तितकेच मिथ्या असणाऱ्या संसाराला उपायांचे कष्ट आहेत. तो आपल्या आपणच नाहींसा होतो. वार करावयास लागलें, तर मात्र विकोपास जाईल. २५३ ह्मणून **अर्जुना !** स्वप्नांतील घायाला जागृतीचेंच औषध; त्याप्रमाणें ह्या अज्ञानमूळाला ज्ञान हीच तरवार आहे. २५४ पण ती सहज उचलतां येईल इतकें वैराग्याचें नवें, अभंग असें बुद्धीला बळ पाहिजे. २५५ जें वैराग्य उत्पन्न झालें असतां ( धर्म, अर्थ आणि काम ) हा त्रिवर्ग सुटतो. कुत्रें जसें तुकतेंच ओकून जावें, २५६ **अर्जुना !** तितका प्रत्येक पदार्थाचा वीट येईल, असा वैराग्याचा पूर चढला पाहिजे. २५७ देह अहंकाराचें म्यान एकदम काढून टाकावें; त्यास अंतर्बुद्धीच्या हातांत घ्यावें; २५८ तें विवेकरूप सहाणेवर पाजळावें; ब्रह्म तें मीच ह्या बोधानें त्यास धार आणावी; त्याच एका बोधाचें त्यावर पाणी चढवावें. २५९ नंतर निश्चयाच्या मुठीचें बळ कसें काय आहे तें एक दोन वेळां पडताळून पहावें. आणि मग अति निर्मल मन करून त्याची तुलना करावी. २६० नंतर त्या हत्याराच्या निजध्यासानें त्याची व आपली तादात्म्यता झाली ह्मणजे दुसरें तोडावयाचें कांहीं उरणारच नाहीं. २६१ ती आत्मज्ञानाची तरवार, अद्वैताच्या झगझगणाऱ्या तेजानें, संसारवृक्षाला कोठें टिकूंच देणार नाहीं. २६२ शरदृतूच्या आरंभींचा वारा आकाशांतील चट सारीं ढगें जशीं नाहींशीं करून टाकतो, २६३ किंवा जागे होतांक्षणीं स्वप्नांतील गोष्टींचा जसा नायनाट होतो, त्याप्रमाणें स्वानुभव धारेचा तीक्ष्णपणा त्याचा फडशा उडवील. २६४ तेव्हां चांदण्यामध्यें जसें मृगजळ दिसत नाहीं, त्याप्रमाणें वरचीं किंवा खालचीं मुळें, किंवा खालीं विस्तारलेल्या शाखा, ह्यांपैकीं कांहींच दिसणार नाहीं. २६५ हे **वीरश्रेष्टा!** अशा प्रकारें आत्मज्ञानाच्या तरवारीच्या पात्यानें ऊर्ध्व मूळ असणाऱ्या अश्वत्थाला छेदून, " २६६

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन् गता न निवर्तंति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥

[ ततः पदं तत् ] मग ईदंतेसि वाळलें । जें मीपणेंवीण डोहारलें । तें रूप पाहिजे आपलें । आपणचि ॥ ६७ ॥ [ परिमार्गितव्यं ] परि दर्पणाचेनि आधारें । एकचि करून दुसरें । मुख पाहाती गावरें । तैसें नको हो ॥ ६८ ॥ हें पाहाणें ऐसें असे वीरा । जैसा नमोडालिया विहिरा । मग आपलीया उगमीं झरा । भरोनि टाके ॥ ६९ ॥ नातरि

१ बोट दाखवून हें ह्मणतां येत नाहीं. २ प्रसिद्ध झालें. ३ पाहावें. ४ गव्हार.

आटलिया अंभे[1] । निजबिंबीं प्रतिबिंब । नेहटे[2] कां नभीं नभ । घटाभावीं ॥ २७० ॥ ना ना इंधनांश सरलेया । वन्हि परते जेविं आपणपयां । तैसें आपेंआप धनंजया । न्याहाळणें[3] जें ॥ ७१ ॥ जिव्हे आपली चवी चाखणें । चक्षु निज बुबुळ देखणें । आहे तया ऐसें निरीक्षणें । आपुले पैं ॥ ७२ ॥ कां प्रभेसि प्रभा मिळे । गगन गगनावरी लोळे । नाना पाणी भरलें खोळे । पाणियाचिये ॥ ७३ ॥ आपणेंचि आपणयातें । पाहिजे जें अद्वैतें । तें ऐसें होय निरुतें । बोलिजतु असे ॥ ७४ ॥ [ तमेव चाद्यं पुरुषं ] जें पाहिजतेनवीण[4] पाहिजे । कांहीं नेणणाचि[5] जाणिजे । आद्यपुरुष ह्मणिजे । जया ठायातें ॥ ७५ ॥ तेथही उपाधीचा वोथंबा[6] । घेऊनि श्रुति उभविती जिभा । मग नामरूपाचा वडंबा[7] । करिती वायां ॥ ७६ ॥ [ प्रपद्ये ] पैं भवस्वर्गा उबगले[8] । मुमुक्षु योगज्ञाना वेळघले[9] । पुढती नेथों[10] इया निगाले । पैजा[11] जेथ ॥ ७७ ॥ संसाराचिया पायां पुढां । पळती वीतराग[12] होडा[13] । ओलांडोनि ब्रह्मपदाचा[14] कर्म कडा । घालिती मागां ॥ ७८ ॥ अहंतादिभावां आपुलियां । झाडा देऊनि आघवेयां । पैंत्र[15] घेती ज्ञानिये जया । मूळघरासी ॥ ७९ ॥ [ यतः प्रवत्तिः प्रसृता पुराणी ] पैं जेथुनी हे येवढी । विश्वपरंपरेची विरूढी[16] । वाढती आशा जैसी कोरडी । निदैवाची ॥ २८० ॥ जिये कां वस्तूचें नेणणें । आणिलें थोर जगा जाणणें । नाहीं तें नांदविलें जेणें । मी तूं जगीं ॥ ८१ ॥ पार्था तें वस्तु पहिलें । आपण पैं आपुलें । पाहिजे जैसें हिंवलें[17] । हिंवें हिंवें ॥ ८२ ॥ [यस्मिन् गता न निवर्तंति भूयः] आणीकही एक तया । वोळखण असे धनंजया । तरि कां जया भेटलिया । येणेंचि नाहीं ॥ ८३ ॥ परि तया भेटती ऐसे । जे ज्ञानें सर्वत्र सरिसे । महाप्रळयांबूचें जैसें । भरलेपण ॥ ८४ ॥

**"मग तें ह्यापासून मुक्त झालेलें; जें मीपणाशिवाय प्रसिद्धीस आलेलें; तें रूप आपलें आपणच पहावें. २६७ परंतु गव्हारलोक दर्पणाच्या आधारानें एकच रूप दुसरें करून पहातात, तसें मात्र पाहूं नको हो! २६८ हे वीरा! तें पहाणें असें आहे कीं, सरोवर खणलें नाहीं तरी, आपल्या उगमाच्या ठिकाणीं झरा भरून राहिलेला असतो तो असतोच. २६९ नाहींतर पाणी आटलें ह्मणजे प्रतिबिंब असतें तें मूळ रूपांत मिळून जातें. किंवा घट नाहींसा झाला ह्मणजे आकाशांत आकाश मिळून जातें. २७० किंवा अर्जुना! सरपण सारें संपलें ह्मणजे अग्नि जसा आपोआप मूळ रूपांत जातो, त्याप्रमाणें आपलें आपणच जें पहाणें. २७१ जिभेनें जशी आपली आपणच चव घ्यावी; डोळ्यांनीं जसें आपलें बुबुळ पहावें; त्याप्रमाणें आपलें आपण पहाणें आहे. २७२ किंवा प्रकाशाला प्रकाश मिळावा; आकाशावर आकाश लोळावें; किंवा पाण्याच्याच पिशवींत पाणी भरावें; २७३ तसें अद्वैतभावानें आपलें आपणास पहाणें आहे. हें तुला निश्चयेंकरून सांगून ठेवितों. २७४ जें पहाणारावांचून पहावयाचें, कांहीं ज्यास समजत नाहीं, त्यानें जाणावयाचें; ज्या स्थानाला आद्यपुरुष असें ह्मणावयाचें; २७५ जेथें उपाधीचा आश्रय करून श्रुतिही जीभ लांब करून नामरूपाचा व्यर्थ गलबला करते. २७६ ज्याठिकाणीं मोक्षाची इच्छा करणारे भवस्वर्गाला कंटाळून योग ज्ञानाकडे वळतात. आणि पुन्हा तिकडे कधीं येणार नाहीं ह्मणून जे प्रतिज्ञा भोगतात. २७७ विरक्तलोक, ब्रह्मपदाचा कडा ओलांडून, कर्माला मागें टाकून संसाराच्या पायापुढें पळतात; २७८ ज्ञानीजन आपल्या अहंतादि झाडून साऱ्या भावांचा झाडा देऊन ज्या मूळ घराची सनद घेतात. २७९ हतभाग्याची कोरडी आशा वाढावी त्याप्रमाणें, जेथून ही येवढी विश्वपरंपरेची वाढ झालेली आहे, २८० ज्या वस्तूचें अज्ञान हेंच ह्या थोर जगाला ज्ञान करून, मी आणि तूं हें नसतां त्याला जगामध्यें कारभार करावयाला लावतें. २८१ अर्जुना! आपल्याच गारठ्यानें थंडीनें जसें कांकडावें त्याप्रमाणें ती आपली आद्यवस्तु आपण पाहिली पाहिजे. २८२ अर्जुना! तिला ओळखण्याला आणखीही एक ओळखावयाचें चिन्ह आहे. तें हें कीं, जिला भेटलें असतां परतून येणें नाहीं. २८३ परंतु महाप्रळयाचें पाणी जसें जिकडे तिकडे भरून राहतें, तसें**

१ पाणी. २ मिळे. ३ पाहणें. ४ पाहणारावांचून. ५ अज्ञानानें. ६ आश्रय. ७ गलबला. ८ कंटाळलें. ९ अनुसरलें. १० न येऊं. ११ प्रतिज्ञेनें. १२ विरक्त. १३ पैजेनें. १४ ब्रह्मपदाचा कडा, प्रांतभाग उल्लंघून कर्म मागें टाकतात. १५ परवाना. १६ विस्तार. १७ जसें थंडीनें थंडीला थंडवावें तसें.

ज्यांचें ज्ञान सर्वत्र सम असतें; त्यांनाच तिची (त्या सद्वस्तूची–परब्रह्माची) प्राप्ति होते." २८४

निर्मानमोहा जितसंगदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञै-
र्गच्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

[ निर्मानमोहाः ] जया पुरुषाचें कां मन । सांडोनि गेले मोह मान । वर्षांतीं जैसे घन । आकाशातें ॥ ८५ ॥ [ जितसंगदोषाः ] निकेवळ्या निष्ठुरा । उबगिजे जेविं सोयेरा । तैसे नागवती विकारां । वेटाळू जे ॥ ८६ ॥ [अध्यात्मनित्याः] फळली केळी उन्मूळे । तैसी आत्मलाभें प्रबळें । जयाची क्रिया ढाळेंढाळें । गळती आहे ॥ ८७ ॥ [ विनिवृत्तकामाः ] आगी लागलिया रुखीं । देखोनि सैरा पळती पक्षी । तैसें सांडिलें अशेखीं । विकल्पीं जे ॥ ८८ ॥ आइकें सैकळ दोषतृणीं । अंकुरिजति जिये मेदिनी । तिये भेदबुद्धीची काहाणी । नाहीं जयातें ॥ ८९ ॥ सूर्योदयासरिसी । रात्री पळोनि जाय अपैसी । गेली देहअहंता तैसी । अविद्येसवें ॥ २९० ॥ [द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः ] पैं आयुष्यहीना जीवातें । शरीर सांडी जेविं अवचितें । तेविं निदसुरें द्वैतें । सांडिले जे ॥ ९१ ॥ लोहाचें सांकडें परिसा । न जोडे अंधार रवी जैसा । द्वैतबुद्धीचा तैसा । दुकाळ सदां जया ॥ ९२ ॥ अगा सुखदुःखाकारें । द्वंद्वें देहीं जियें गोचरें । तियें जयां कां समोरें । होतीचि ना ॥ ९३ ॥ स्वप्नींचें राज्य कां मरण । नोहे हर्षशोकांसि कारण । उपेवढलिया जाण । जियापरी ॥ ९४ ॥ तैसे सुखदुःखरूपीं । द्वंद्वीं जे पुण्यपापीं । न घेपीजती सर्पी । गरुड जैसे ॥ ९५ ॥ [गच्छंति] आणि अनात्मवर्गनीर । सांडूनि आत्मरसाचें क्षीर । चरतीति जे सविचार । राजहंस ॥ ९६ ॥ जैसा वर्षोनि भूतळीं । आपला रस अंशुमाळी । मागौता आणी रश्मिजाळीं । बिंबासीचि ॥ ९७ ॥ तैसें आत्मभ्रांतीसाठीं । वस्तु विखरली बारावाटीं । ते एकवटिती ज्ञानदृष्टी । अखंड जे ॥ ९८ ॥ किंबहुना आत्मयाचा । निर्धारीं विवेक जयांचा । बुडाला बोध गंगेचा । सिंधुमाजि जैसा ॥ ९९ ॥ [ अमूढाः ] पैं आघवेंचि आवुलेपणें । तुरेचि जयां अभिलषणें । जैसें येथुनि पऱ्हा जाणें । आकाशा नाहीं ॥ ३०० ॥ जैसा आगीचा डोंगर । नेघे कोणी बीज अंकुर । तैसा मनीं जयांचा विकार । उदयजेना ॥ १ ॥ जैसा काढिलिया मंदराचळ । राहे क्षीराब्धी निश्चळ । तैसा तुटी जयां सळ । कामोर्मीचा ॥ २ ॥ चंद्रमा कळीं धाला । न दिसे कोणें आंगीं वोसावला । तेविं अपेक्षेचा अवखळा । नपडे जयां ॥ ३ ॥ हें किती बोलूं असांगडें । जेविं परमाणु तुरे वायुपुढें । तैसें विषयाचें नावडे । नांवचि जयां ॥ ४ ॥ एवं जे जे कोणी ऐसे । केले ज्ञानाग्न्यहुताशें । [ तत् ] ते तेथ मिळती जैसें । हेमीं हेम ॥ ५ ॥ तेथ म्हणिजे कवणे ठाईं । ऐसेंही पुससी कांहीं । [पदमव्ययं] तरि तें पद गा नाहीं । वेंचुं जया ॥ ६ ॥ दृश्यपणें देखिजे । कां ज्ञेयत्वें जाणिजे । अमुकें ऐसें ह्मणिजे । तें जें नव्हे ॥ ७ ॥

१ अभिमान. २ पावसाळा सरल्यावर. ३ अतिदरिद्याला. ४ तिरस्कार करतात. ५ आप्त. ६ न सांपडती. ७ उपटून पडते. ८ क्रमाक्रमानें. ९ सकळ दोषरूप तृणें जिच्यावर अंकुर घेतात अशा पृथ्वीरूप भेदबुद्धीची कहाणी, गोष्ट जेथें नाहीं. १० दारिद्र्य, दुष्काळ. ११ रवीला. १२ जागे झाल्यावर. १३ पराजित केले जात नाहींत. १४ जड समुदायरूप जल. १५ वागतात. १६ सूर्य. १७ पसरली.

" वर्षाऋतु संपला ह्मणजे घन जसे आकाशाला सोडून जातात, त्याप्रमाणें ज्या पुरुषाचें मन मोह आणि मान सोडून जातें. २८५ दरिद्री आणि निष्ठुर असलेल्याचा, इष्ट आप्त जसे तिरस्कार करतात, त्याप्रमाणें विकारांना जे कवटाळायाला सांपडत नाहींत; २८६ केळीं आलेली केळ जशी उपटून पडते, तशी प्रबल आत्मलाभाच्या योगेंकरून ज्याची क्रिया क्रमाक्रमानें गळूं लागते; २८७ वृक्षाला आग लागलेली पाहिली, ह्मणजे पक्षी सैरावैरा पळूं लागतात, त्याप्रमाणें यच्चयावत् विकल्प ज्याला सोडून जातात. २८८ आणखी ऐक. ज्या भेदबुद्धिरूप जमिनींत दोषरूप तृणांचे अंकुर उद्भवतात, त्या जमिनीची जेथें गोष्टच रहात नाहीं. २८९ सूर्योदय झाला कीं, रात्र जशी आपोआप लपून जाते, त्याप्रमाणें अविद्येबरोबर ज्याची देहअहंताही नाहींशी होऊन जाते; २९० आयुष्य सरलेल्या जिवाला शरीर जसें एकदम सोडून जातें, त्याप्रमाणें द्वैतरूप निद्रेनें ज्याला सोडलेलें; २९१ परिसाला जसें लोखंडाचें दरिद्र असतें, सूर्याला जसा कधीं अंधकार मिळत नाहीं, त्याप्रमाणें सदा सर्वकाल द्वैताचा ज्याला दुकाळ; २९२ अरे ! सुखदुःखाच्या रूपानें जीं द्वंद्वें देहामध्यें दिसून येतात, तीं ज्याच्या पुढें येतच नाहींत; २९३

१ पलीकडे. २ आश्रय, छल, उसळी. ३ षोडश कलांनीं भरला. ४ न्यून नाहीं. ५ न्यूनता. ६ निरुपम. ७ नाश.

स्वप्नांतील राज्य किंवा मरण, जागें झालें ह्मणजे ज्याप्रमाणें हर्षाला किंवा शोकालाही कारण रहात नाहीं, २९४ सर्पाच्यानें जसा गरुड जिंकला जात नाहीं, त्याप्रमाणें सुखदुःखापासून निघणारें पाप किंवा पुण्य–ह्यानें जो जिंकला जात नाहीं; २९५ आणखी जड समुदायरूपीजल टाकून आत्मरसरूपीं दुग्ध जे राजहंस विचारासहवर्तमान प्राशन करतात, २९६ ज्याप्रमाणें सूर्य आपला रस भूमंडळावर सोडून पुन्हा परत आपल्या बिंबांतील किरणांत आणतो, २९७ त्याप्रमाणें आत्मभ्रांतीमुळें जी वस्तु बारा वाटा पसरलेली असते, ती जे ज्ञानदृष्टीनें अखंड एकत्र करून ठेवतात; २९८ किंवहुना गंगेचा ओघ समुद्रांत बुडाल्याप्रमाणें आमच्यावरच ज्यांचा दृढ निश्चय; २९९ सारें आपलेंच अशी भावना असल्यामुळें, आकाशाला आपल्या ठिकाणाहून जसें पलीकडे जातां येत नाहीं, त्याप्रमाणें ज्यांना अभिलाष धरण्याचें कारण रहात नाहीं. ३०० ज्वालामुखी पर्वतावर ज्याप्रमाणें कोणतेंही बीं किंवा अंकुर उगवत नाहीं, त्याप्रमाणें ज्याच्या मनांत विकार ह्मणून उद्भवतच नाहीं. ३०१ मंदराचल काढला असतां, क्षीरसागर जसा निश्चल होतो, तशी ज्याला कामोर्मींची उसळी ह्मणून उठतच नाहीं. ३०२ चंद्र आपल्या संपूर्ण कलांनीं युक्त झाला ह्मणजे, त्यांत कोठें न्यून दिसत नाहीं, त्याप्रमाणें अपेक्षेची ज्याला गरजच पडत नाहीं. ३०३ हें सारें निरुपम आहे. तें किती ह्मणून सांगावें ? वायूपुढें जसें भूस रहात नाहीं, त्याप्रमाणें विषयांचें ज्याला नांवच आवडत नाहीं. ३०४ ज्ञानरूप अग्नीनें असे जे जे कोणी तयार केले असतील, ते सुवर्णांत सुवर्ण मिळाल्याप्रमाणें तेथें मिळून जातात. ३०५ तेथें ह्मणजे कोणत्या ठिकाणीं ? असेंही कदाचित् तूं विचारशील. तर तें स्थान ह्मणजे ज्याचा नाश नाहीं तें. ३०६ डोळ्यांनीं पहावें, किंवा ज्ञानानें जाणावें, किंवा तें अमकें असें ह्मणावें, अशांपैकीं जें नव्हे तें." ३०७

न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ।
यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥

[न तदिति] पैं दीपाचिया बंबाळीं । कां चंद्र हन जें उजळी । हें काय बोलों अंशुमाळी । प्रकाशी जें ॥ ८ ॥ तें आघवेंचि दिसणें । जयाचें कां न देखणें । विश्व भासतसे जेणें । लपालेनी ॥ ९ ॥ जैसें शिंपीपण हारपे । तंव तंव खरें होय रुपें । कां दोरी लोपतां सापें । फार होइजे ॥३१० तैसीं चंद्रसूर्यादि थोरें । इयें तेजें जियें फारें । तियें जयाचेनि आधारें । प्रकाशती ॥ ११ ॥ [तद्धाम परमं मम] ते वस्तु कीं तेजोराशी । सर्वभूतात्मक सैरिसी । चंद्रसूर्यांच्या मानसीं । प्रकाशे जे ॥ १२ ॥ ह्मणौनि चंद्रसूर्य कैडवसां । पडती वस्तूच्या प्रकाशा । यालागीं तेज जें तेजसा । तें वस्तूचें अंग ॥ १३ ॥ आणि जयाच्या प्रकाशीं । जग हारपे चंद्रार्कैसीं । सचंद्रनक्षत्रें जैसीं । दिनोदयीं ॥ १४ ॥ ना तरी प्रबोधलिये वेळे । ते स्वप्नींची हिंडी मावळे । कां नुरेचि सांजवेळे । मृगतृष्णिका ॥ १५ ॥ तैसा जिये वस्तूच्या ठायीं । कोण्हीच कां आभास नाहीं । तें माझें निजधाम पाहीं पाटाचें गा ॥ १६ ॥ [ यद्गत्वा न निवर्तंते ] पुढती जे तेथ गेले । ते न घेती माघौतीं पाउलें । महोदधीं कां मिनेले । स्रोत जैसे ॥ १७ ॥ कां लवणाची कुंजरी । सुंदलिया लवणसागरीं । होयचि ना माघारी । परती जैसी ॥ १८ ॥ नाना गेलियां अंतराळा । न येतीचि वन्हिज्वाळा । नाहीं तप्तलोहौनि जळा । निघणें जेविं ॥ १९ ॥ तेविं मजसीं एकवट । जे जाले ज्ञानें चोखट । तयां पुनरावृत्तीची वाट । मोडली गा ॥ ३२० ॥ [अयमर्जुनाभिप्रायः] तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो । पार्थ ह्मणे जी जी पैसावो । परि विनंती एकी देवो । चित्त देतु ॥ २१ ॥ तरी देवेंसि स्वयें एक होती । मग माघौती जे न येती । ते देवेंसि भिन्न आथी । कीं अभिन्न जी ॥ २२ ॥ जरि भिन्नचि अनादिसिद्ध । तरी न येती हें असंबद्ध । जे फुला गेले षट्पद । ते फुलेंचि होती का ॥ २३ ॥ पैं लक्षाहूनि अनारिसे । बाण लक्षीं शिवोनि जैसे । मागुते पडती तैसे । येतीचि ते ॥ २४ ॥ ना तरि तूंचि ते स्वभावें तरि कोण कोणेसीं मिळावें । आपणयासी आपण रुंगावें । शस्त्रें केविं ॥ २५ ॥ ह्मणौनि तुजसीं अभिन्नां जीवां । तुझा संयोगवियोग देवा । नये बोलों अवयवां । शरीरेंसीं ॥ २६ ॥ आणि जे सदां वेगळे तुजसीं । तयां मिळणी नाहीं कोणे दिवसीं । मा येती न येती हे कायसी । वांयबुद्धि ॥ २७ ॥

---

१ सूर्य. २ प्रसृत. ३ समान. ४ कवडसा. ५ तेजवंतास. ६ जागृतीनंतर. ७ स्वारी. ८ मुख्य, अधिकाराचें ९ मिळाले. १० हत्तीण. ११ घातली असतां. १२ प्रसाद. १३ वायफळ. १४ निशाणाहून. १५ भिन्न. १६ मोसकावें. १७ ऐक्य. १८ व्यर्थमति.

तरि कोण गा ते तूतें । पावोनि न येती माघौते । हें विश्वतोमुखा[1] मातें । बुझावीं[2] जी ॥ २८ ॥ इये अपेक्षीं अर्जुनाच्या । तो शिरोमणि सर्वज्ञांचा । तोषला बोध शिष्याचा । देखोनियां ॥ २९ ॥ मग ह्मणे गा महामति । मातें पावोनि न येती पुढती । ते भिन्नाभिन्न रिती । आहाती दोनी ॥३३० जैं विवेकें खोलें पाहिजे । तरि मी तेचि ते सहजें । ना आ[3]हाचवाहाच तरि दुजे । ऐसेही गमती ॥ ३१ ॥ जैसें पाणि[4]यावरी वेगळ । तळपतां दिसती कल्लोळ । येऱ्हवीं तरी निखिळ । पाणीचि तें ॥ ३२ ॥ कां सुवर्णाहूनि आनें । लेणीं[5] गमती भिन्नें । मग पाहिजे तंव सोनें । आघवेंचि तें ॥ ३३ ॥ तैसें ज्ञानाचिये दिठी । मजसीं अभिन्नचि ते किरीटी । येर भिन्नपण तें उठी । अज्ञानास्तव ॥ ३४ ॥ आणि साचोका[6]रेनि वस्तुविचारें । कैंचें मज एकासि दुसरें । जें भिन्नाभिन्नव्यवहारें । उमसिजेलें[7] ॥ ३५ ॥ आघवेंचि आकाश सूनि[8] पोटीं । बिंबचि जैं आते[9] खोटी[10] । तैं प्रतिबिंब कें उठी । कें रश्मि शिरे ॥ ३६ ॥ कां कल्पांतींचिया पाणिया । काय वोतें[11] भरिती धनंजया । ह्मणौनि कैंचे अंश अविक्रिया[12] । एका मज ॥ ३७ ॥ परि वोघाचेनि मेळें । पाणि उजू परि वांकुडें जालें । रवी दुजेपण आलें । तोयबगें[13] ॥ ३८ ॥ व्योम चौफळें[14] कीं वाटोळें । हें ऐसें कायसया[15] मिळे । परि घटमठीं वेटाळें । तैसेंही आथी ॥ ३९ ॥ हां गा निद्रेचेनि आधारें । काय एकलेनि जग न भरे । स्वप्नींचेनि जैं अवतरे रायपणें ॥ ३४० ॥ कां मिनलेनि[16] किडाळें । वानिभेदांसि[17] ये सोळें । तैसा स्वमायें वेंटाळें । शुद्ध जै मी ॥ ४१ ॥ तैं अज्ञान एक रूढे । तेणें कोहंविकल्पाचें भांडें[18] । मग विवरूनि कीजे फुडें[19] । देहोहं[20] ऐसें ॥ ४२ ॥

**"दीपांच्या उजेडांत; किंवा चंद्र जें तेज प्रकाशतो त्यांत; हें काय सांगावें? पण सूर्य जें प्रकाशतो तें; ३०८ हें सारें दिसणें हें ज्याचें न पहाणें; जें लुप्त झालें ह्मणजे विश्वाचा भास होतो. ३०९ त्याप्रमाणें शिंपीपण जों जों नाहींसें होऊं लागतें, तों तों रुपें खरें होऊं लागतें. किंवा दोरी नाहींशी होतांच साप** पसरूं लागतो. ३१० त्याप्रमाणें चंद्रसूर्यांचीं महत्तेजें ह्मणून जीं प्रकाशतात तींही ज्याच्या आधारानें प्रकाशतात, ३११ ती वस्तु, किंवा तो तेजाचा पुंज, जो सर्व प्राणिमात्रामध्यें व चंद्रसूर्यांच्या मनामध्येंही सारखा प्रकाशतो. ३१२ ह्मणून त्या मूळ वस्तूचे–प्रकाशाचे–चंद्र सूर्य हे कवडसे होत. ह्याकरितां तेजस्वी पदार्थांमध्यें जें तेज तें त्या मूळ वस्तूचें आंग ह्मणून समज. ३१३ आणखी, दिवस उगवला ह्मणजे चंद्रासहवर्तमान नक्षत्रें जशीं लोपून जातात, त्याप्रमाणें ज्याच्या प्रकाशानें चंद्रसूर्यांसहवर्तमान हें जगही नाहींसें होऊन जातें. ३१४ किंवा जागृत झालें ह्मणजे स्वप्नांतील स्वारी नाहींशी होऊन जाते; किंवा संध्याकाळ झाली ह्मणजे मृगजळ उरत नाहीं; ३१५ त्याप्रमाणें ज्या वस्तूच्या ठिकाणीं कोणाचाच आभास नाहीं, तें माझें वतनदारीचें घर हें ध्यानांत ठेव. ३१६ महासागराला मिळालेले ओघ जसे माघारे येत नाहींत, त्याप्रमाणें ते जेथें जाऊन पोचले, ते माघारी पाऊल ह्मणून घेतच नाहींत. ३१७ किंवा मिठाची हत्तीण करून ती मिठाच्याच समुद्रांत टाकली, तर ती जशी माघारी ह्मणून यावयाचीच नाहीं. ३१८ किंवा अंतरिक्षांत गेलेल्या अग्नीच्या ज्वाळा जशा परतून येत नाहींत, किंवा तापलेल्या लोखंडापासून पाण्याचें जितपत निघणें, ३१९ त्याप्रमाणें उत्तम ज्ञानानें जे माझ्याशीं एकरूप झाले, त्यांना पुनरावृत्तीची वाट खुंटली." ३२० तेव्हां बुद्धिरूप पृथ्वीचा राजा जो अर्जुन, तो ह्मणाला "प्रभो! स्वामी! फार प्रसाद झाला. परंतु देवांनीं एका विनंतीकडे चित्त द्यावें. ३२१ तर देवाशीं जे स्वतः ऐक्यरूप होतात; आणि पुन्हां मग परतून येत नाहींत, ते महाराज! देवापासून भिन्न कीं अभिन्न? ३२२ ते मुळापासून जर भिन्न असतील, तर ते परत येणार नाहींत ह्मणणें हें असंबद्ध होय. कारण, फुलावर गेलेले भ्रमर, फुलेंच होऊन बसतील कीं काय?

१ सर्वत्र मुखें आहेत ज्याला अशा श्रीकृष्णा. २ समजाव. ३ वरवरच. ४ पाण्यावर कल्लोळ दिसतात तेव्हां वेगळेपणा भासतो. ५ अलंकार. ६ खरें पाहिलें असतां. ७ उद्भविजेल. ८ घालून, शिरवून. ९ व्यापी. १० गोळा. ११ ओहोटी. १२ विकार न पावणाराला. १३ पाण्याच्या संबंधानें, योगें. १४ चतुष्कोण. १५ कशानें. १६ हिणकट मिश्रित झालें असतां. १७ भिन्न कसोटीस. १८ पात्र. १९ स्पष्ट. २० देहच मी असें तादात्म्य.

३२३ निशाणाहून बाण भिन्न असतात. ह्मणून ते त्या ठिकाणीं लागून पुन्हा जसे ते परत येतातच. ३२४ अथवा ते स्वभावधर्मानें तूंच असशील, तर कोणीं कोणाला मिळावयाचें? शस्त्रानें आपलें आपणास भोसकावें कसें? ३२५ ह्मणून शरीराला आणि अवयवांना जसा संयोग वियोग नाहीं, त्याप्रमाणें देवा! तुझ्याशीं अभिन्न असणारे जे जीव, त्यांनाही तुझा संयोग वियोग होतो असें ह्मणतां येत नाहीं. ३२६ आणखी सदासर्वदा जे तुझ्याशीं भिन्नत्वानेंच असणारे, ते तुला कधीं मिळावयाचेच नाहींत. तेव्हां ते येतात आणि येत नाहींत हें ह्मणणें व्यर्थ होय. ३२७ तर तुला पोंचून माघारे येत नाहींत ते कोण? हे सर्वत्र मुखें असणाऱ्या! तूं माझी समजूत घाल." ३२८ ह्या अर्जुनाच्या अपेक्षेवरून शिष्याला बोध झालेला पाहून, सर्वज्ञांचा शिरोमणी जो श्रीकृष्ण, तो संतोष पावला. ३२९ आणि ह्मणाला "हे महामती! मला पोंचून जे माघारे न येणारे आहेत ते मजपासून भिन्न, आणि मजपासून अभिन्न अशा दोन्हीही प्रकारचे आहेत. ३३० खोल विचारानें पाहिलें, तर मी तेंच ते असें सहज दिसून येतें. तसें न करितां वरवर पाहिलें तर ते भिन्न असेही दिसून येतील. ३३१ ज्याप्रमाणें पाण्यावर लाटा ह्या वेगळ्या खेळत आहेत असें दिसतें. बाकी खरें पाहिलें तर तेंही सारें पाणीच. ३३२ किंवा अलंकार हे सोन्याहून भिन्न आहेत असें वाटतें. पण पाहूं लागलें तर तेंही सारें सोनेंच. ३३३ त्याप्रमाणें अर्जुना! ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिलें तर, ते माझ्यापासून मुळींच भिन्न नाहींत. त्यांना भिन्नत्व दिसतें तें अज्ञानामुळें. ३३४ आणि खरोखर पाहिलें तर, माझ्या एकापासून भिन्न भिन्न व्यवहारानें उद्भवणारें दुसरें कोठून येणार? ३३५ सारें आकाशच पोटांत घेऊन बिंबानें सर्व व्यापलें, तर प्रतिबिंब उठणार कोठें? आणि किरण तरी शिरतील कोठें? ३३६ किंवा अर्जुना! जलप्रलयाच्या पाण्याला भरती आणि ओहोटी असते काय? ह्मणून मी निर्विकार असणारा जो एकीएक, त्या मला अंश कशाचे? ३३७ परंतु ओघाच्या अनुषंगानें पाणी सरळ असूनही वांकडें होतें; पाण्याच्या योगानें सूर्याला दुसरेपणा येतो; ३३८ आकाश चौकोनी आहे का वाटोळें आहे हें कशानें ठरणार? परंतु घागरीमध्यें आणि घरामध्यें ज्या आकाराचें होऊन राहतें, तसेंही असतें. ३३९ अरे! निद्रेच्या आश्रयानें स्वप्नामध्यें जेव्हां राज्यपदावर बसतो, तेव्हां एकट्यानेंच सारें जग भरत नाहीं काय? ३४० किंवा हीण मिश्र केल्याच्या योगानें सोळाच्या दराच्या (उत्तम प्रतीच्या) सोन्याच्या कसांतही फरक पडतोच. त्याप्रमाणें मी जरी शुद्ध आहें, तरी आपल्याच मायेनें जेव्हां बद्ध होतो, ३४१ तेव्हां एक अज्ञानच पसरतें, आणि तेणेंकरून 'मी कोण?' हा विकल्प उत्पन्न होतो, आणि देह तो मी असेंच प्रतिपादन करीत सुटतो." ३४२

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।
मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति॥ ७॥

[ममैवांशः] ऐसें शरीराचियेवढें। जैं आत्मज्ञान वेगळें पढे। तैं माझा अंश आवडे। थोडेपणें ॥ ४३ ॥ समुद्र कां वायुवशें। तरंगाकार उल्लसे। तो समुद्रांश ऐसा दिसे। सानिवा जेविं ॥ ४४ ॥ [जीवलोके] तेविं जडातें जीववविता। देह अहंता उपजविता। मी जीव गमे पंडुसुता। जीवलोकीं ॥ ४५ ॥ पैं जीवाचिया बोधा। गोचर जो हा धांदा। तो जीवलोकशब्दा। अभिप्राय ॥ ४६ ॥ अगा उपजणें निमणें। हें साचचि जें कां मानणें। तो जीवलोक मी ह्मणे। संसार हन ॥ ४७ ॥ एवंविध जीवलोकीं। [जीवभूतः सनातनः] तूं मातें ऐसा अवलोकीं। जैसा चंद्र कां उदकीं। उदकातीत ॥ ४८ ॥ पैं काश्मीराचा रवा। कुंकुमावरी पांडवा। आणिकां गमे लोहिवा। तो तरी नव्हे ॥ ४९ ॥ तैसें अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडे। परि कर्ता भोक्ता ऐसें आवडे। ते जाण गा भ्रांती ॥ ३५० ॥ किंबहुना आत्मा चोखट। होउनि प्रकृतीसि एकवट। बांधे प्रकृतिधर्मांचा पाट। आपणपयां ॥ ५१ ॥ [मनःषष्ठानींद्रियाणि] पैं मनेसी साही इंद्रियें। श्रोत्रादि [प्रकृतिस्थानि] प्रकृति-

---

१ लहान. २ वाटूं लागतो. ३ अखंडत्व, व्यापार. ४ मरणें. ५ स्फटिकाचा. ६ लाल. ७ स्वीकारी. ८ अधिकार. ९ मायिक.

कार्यें । [ कर्षति ] तियें माझीं ह्मणौनि होये । व्यापारारूढ ॥ ५२ ॥ जैसें स्वप्नीं परिव्राजें[1] । आपणपयां आपण कुटुंब होइजे । मग तयाचेनि धांविजे । मोहें सैरा ॥ ५३ ॥ तैसा आपलिया विस्मृती । आत्मा आपणचि प्रकृती- । सारिखा गमोनि पुढती । तियेसीचि भजे ॥५४॥ मनाच्या रथीं वेळघे[2] । श्रवणाच्या द्वारें निघे । मग शब्दाचिया रिघे । रानामाजि ॥ ५५ ॥ तोचि प्रकृतीचा वागोरा[3] । करी त्वचेचिया मोहरा[4] । आणि स्पर्शाचिया घोरा । वना जाय ॥ ५६ ॥ कोणे एके अवसरीं । रिघोनि नेत्राच्या द्वारीं । मग रूपाच्या डोंगरीं । सैरा हिंडे ॥ ५७ ॥ कां रसनेचिया वाटा । निघोनि गा सुभटा । रसाचा दरकुटा[5] । भरोंचि लागे ॥ ५८ ॥ ना तरि येणेंचि घ्राणें । मदंश[6] करी निघणें । मग गंधाचीं दारुणें । आंडवें[7] लंघी ॥ ५९ ॥ ऐसेनि देहेंद्रियनायकें[8] । धरूनि मन जवळिकें । भोगीजती शब्दादिकें । विषयभरणें[9] ॥ ३६० ॥

"ह्याप्रमाणें शरीरा पुरतेंच आत्मज्ञान आवडूं लागतें तेव्हां, थोडासा माझा अंश भासूं लागतो. ३४३ किंवा समुद्र, वायूच्या संयोगानें लाटांच्या रूपानें उसळतो, तो जसा समुद्राचाच लहान भाग असा दिसतो, ३४४ त्याप्रमाणें **अर्जुना !** जडाला जीवन देणारा; देहांत अहंता उत्पन्न करणारा जो मी, तो मृत्युलोकामध्यें जीव असें वाटूं लागतें. ३४५ तसेंच जिवाच्या बोधानें प्रगट होणारा जो हा व्यापार, तोच जीवलोक ह्या शब्दाचा अर्थ आहे. ३४६ अरे! जन्मणें आणि मरणें हेंच सत्य आहे असें मानणें; तोच जीवलोक-ह्मणजेच संसार—असें मी ह्मणतों. ३४७ अशा प्रकारचा जो जीवलोक, त्याच्यामध्यें मला तूं असा पहा कीं, जसा चंद्र हा जळांत दिसून तो वेगळा असतो तसा. ३४८ **अर्जुना!** स्फटिकाचा खडा कुंकुमावर ठेवला तर, तो इतरांना तांबडा आहे असें वाटतें. पण तो तसा नसतो. ३४९ त्याप्रमाणें माझें अनादित्व मोडत नाहीं; माझें अक्रियत्व भंग होत नाहीं; तरी मी कर्ता व भोक्ता असें वाटतें. ती भ्रांति आहे हें लक्ष्यांत ठेव. ३५० किंबहुना पवित्र-आत्मा प्रकृतीशीं ऐक्य पावून प्रकृतिधर्माचा अधिकार आपण स्वीकारतो. ३५१ आणि मनासहवर्तमान सहा इंद्रियें, श्रोत्र आदिकरून प्रकृतीचीं कार्यें, तीं माझीं असें ह्मणून तो व्यापार करूं लागतो. ३५२ ज्याप्रमाणें स्वप्नामध्यें संन्याशी आपणच आपलें कुटुंब होतो, आणि त्याच्या मोहानें सैरावैरा धांवत सुटतो, ३५३ त्याप्रमाणें आत्म्याला आपलीच विस्मृति पडून, आपण प्रकृतीसारखेंच आहों असें वाटतें, आणि तो पुढें तिलाच भजूं लागतो. ३५४ मनाच्या रथामध्यें चढतो; श्रवणाच्या वेशींतून बाहेर पडतो; आणि मग शब्दाच्या रानामध्यें शिरतो. ३५५ तोच प्रकृतीचा लगाम त्वचेच्या समोर वळवितो, आणि स्पर्शाच्या घोर अरण्यांत जातो. ३५६ एखाद्या वेळीं द्वारांत शिरून स्वरूपाच्या डोंगरामध्यें सैरावैरा हिंडत असतो. ३५७ किंवा हे शूरा! रसनेच्या मार्गाला लागून रसाची गुहा भरूं लागतो. ३५८ नाहीं तर माझाच अंश जो जीव तो ह्याच घ्राणेंद्रियांतून निघतो आणि गंधाचीं मोठमोठालीं अरण्यें ओलांडूं लागतो. ३५९ अशा प्रकारें देहाचा आणि इंद्रियांचा राजा, मनास जवळ घेऊन शब्दादि विषयांचा उपभोग घेतो." ३६०

१ संन्याशानें. २ चढे. ३ वागदोर, लगाम. ४ सन्मुख. ५ दरी, गुहा. ६ माझा अंश, जीव. ७ अरण्यें. ८ जीवानें. ९ पोषण.

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।

गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥

[ईश्वरः] परि कर्ता भोक्ता ऐसें । हें जीवाचें तैंचि दिसे । [ शरीरं यदवाप्नोति ] जैं शरीरीं कां पैसे[1] । येकाधिये ॥६१॥ जैसा आथिला[2] आणि विलासिया । तैंचि वोळखों ये धनंजया । जैं राजसेव्या ठाया[3] । वस्तीसि ये ॥ ६२ ॥ तैसा अहंकर्तृत्वाचा वाढ[4] । कां विषयेंद्रियांचा धुमाड[5] । हा जाणिजे तैं निवाड[6] । जैं देह पावे ॥ ६३ ॥ [ यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ] अथवा शरीरातें सांडी । [ गृहीत्वैतानि संयाति ] तऱ्हीं इंद्रियांची तांडी[7] । हे आपणपयां सवें जोडी । घेउनि जाय ॥ ६४ ॥ [ वायुर्गंधानिवाशयात् ] । जैसा अपमानिला अतिथि । ने सुकृताची संपत्ती । कां ढाइखडेयाची[8] गती ।

१ प्रवेशे. २ संपन्न. ३ नगराला. ४ आधिक्य. ५ योग. ६ विवेचन. ७ समुदाय. ८ कळसूत्री बाहुलीची.

सूत्रतंतू ॥ ६५ ॥ ना ना मावळतेनि तपनें । नेइजती लोकांचीं दर्शनें । हें असो हुती पवनें । नेइजे जैसी ॥ ६६ ॥ तेविं मनःषष्ठां ययां । इंद्रियांतें धनंजया । देहराज ने देहा ।-पासुनि गेला ॥ ६७ ॥

" परंतु शरीरामध्यें जेव्हां एकदेशीयताच पसरते, तेव्हां कर्ता भोक्ता काय तो जीवच असें दिसूं लागतें. ३६१ ज्याप्रमाणें अर्जुना! जो संपन्न आणि विलासी आहे, तो राजधानीच्या नगरांत वस्तीस येईल, तेव्हांच ओळखावयास येतो. ३६२ त्याप्रमाणें अहंकाराची वाढ; इंद्रियांचा योग केव्हां? देह उत्पन्न झाला ह्मणजे. ३६३ अथवा शरीराला सोडले, तरी तो इंद्रियांचे समुदाय आपल्या बरोबर घेऊन जातो. ३६४ ज्याप्रमाणें अपमान पावलेला अतिथि, सुकृताची संपत्ति हरण करून नेतो, किंवा कळसूत्री बाहुल्यांच्या जोडीला सुताच्या दोऱ्या असतात, ३६५ किंवा अस्तास जात असलेला सूर्य, लोकांचीं दर्शनें (दृष्टि) घेऊन जातो. हें असो. वारा जसा सुगंध घेऊन जातो, ३६६ त्याप्रमाणें अर्जुना! मन आदिकरून ह्या सहा इंद्रियांना, देहाचा राजा (आत्मा) देहांतून निघून जातांना आपल्या बरोबर घेऊन जातो." ३६७

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥

[श्रोत्रं चक्षुरिति] मग येथें अथवा स्वर्गी । जेथ जेथ जैं देह आंपंगी । तेथ तैसेंचि पुढती पांगी । मनादिक ॥ ६८ ॥ जैसा मालवलिया दिवा । प्रभेसि जाय पांडवा । मग उंजळिजे तेथ तेधवा । तैसाचि फांके ॥ ६९ ॥ [विषयानुपसेवते] तरि ऐसेसिया राहाटी । अविवेकियांचे दिठी । येतुलें हें किरीटी । गमेचि गा ॥ ३७० ॥ जे आत्मा देहासि आला । आणि विषय येणेंचि भोगिला । अथवा देहोनिं गेला । हें साचचि मानिती ॥ ७१ ॥ येऱ्हवीं येणें आणि जाणें । कां करणें हन भोगणें । हें प्रकृतीचें तेणें । मानियेलें ॥ ७२ ॥

" मग येथें किंवा स्वर्गलोकामध्यें, जेथें जेथें ज्या ज्या वेळीं देह स्वीकारतो, तेथें तेथें त्याचप्रमाणें तो मनादिक पुन्हा प्रगट करतो. ३६८ अर्जुना! ज्याप्रमाणें दिवा मालविला असतां त्याची प्रभाही जाते, आणि पुन्हा लावला ह्मणजे ती पुन्हा पूर्वीप्रमाणें फांकते. ३६९ तरी अर्जुना! अशा ह्या क्रमाच्या योगेंकरून अविवेक्यांच्या दृष्टीला इतकें तर वाटतेंच, ३७० कीं, आत्मा देहाला आला, आणि विषयही त्यानेंच भोगले. अथवा तो देहांतून गेला हेंही खरेंच मानतात. ३७१ किंवा येणें आणि जाणें, किंवा करणें व भोगणें हें मायेचें असें त्यानें मानलें," ३७२

उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् ।
विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥ १० ॥
यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् ।
यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ॥ ११ ॥

[स्थितं वापि] परि देहांचें मोटकें उभें । आणि चेतना तेथ उंपलभे । तिये चळवळेचेनि लोभें । आला ह्मणती ॥ ७३ ॥ [भुंजानं वा गुणान्वितं] तैसेंचि तया संगती । इंद्रियें आपलालां अर्थी वर्तती । तया नांव सुभद्रापती । भोगणें जया ॥ ७४ ॥ [उत्क्रामंतं] पाठीं भोगक्षीण अपैसें । देह गेलिया ते न दिसे । तेथें गेला ऐसें । बोभांती ॥ ७५ ॥ [विमूढा नानुपश्यंति] पैं रुख डोलत देखावा । तरी वारा वाजत मानावा । रुख न दिसे तेथें पांडवा । नाहीं तो गा ॥ ७६ ॥ कां आरसा समोर ठेविजे । आणि आपणपें तेथ देखिजे । तरि तेधवांचि जालें मानिजे । काय आधीं नाहीं ॥ ७७ ॥ कां परता केलिया आरिसा । लोप जाला तया आभासा । तरी आपणपें नाहीं ऐसा । निश्चय करावा ॥ ७८ ॥ शब्द तरि आकाशाचा । परि कपाळीं पिटे मेघाचा । कां चंद्रीं वेग अभ्राचा । आरोपिजे ॥ ७९ ॥ तैसें होइजे जाइजे देहें । तें आत्मसत्ते अविक्रिये । निष्टंकिती गा मोहें । आंधळे ते ॥ ३८० ॥ [पश्यंति ज्ञानचक्षुषः] येथ आत्मा आत्मयाच्या ठायीं । देखिजे देहींचा धर्म देहीं । ऐसे देखणे ते पाहीं । आन आहाती ॥ ८१ ॥ [यतंतो योगिन इत्यर्धं] ज्ञानें कां जयाचे डोळे । देखोनि न राहाती देहींचे खोळे । सूर्यरश्मी आणियाळे । ग्रीष्मीं जैसे ॥ ८२ ॥ तैसी विवेकाचेनि पैसें ।

१ सूर्यानें. २ सुवास. ३ मन आहे साहावें ज्यांला असों पांच ज्ञानेंद्रियें. ४ जीव, आत्मा. ५ आश्रय करी, स्वीकारी. ६ विस्तारी. ७ लावावा. ८ देहांतून.

१ मोटकुळें, लहान. २ मिळे. ३ हाका मारितात, ह्मणतात. ४ वृक्ष. ५ मस्तकीं ठेवितात. ६ निश्चय करतात, निष्कर्ष करितात. ७ पाहणारे. ८ पदरांत. ९ प्रखर, बारीक, तीव्र. १० पसाऱ्यानें.

जयांची स्फूर्ती स्वरूपीं बैसे । ते ज्ञानिये देखती ऐसें । आत्मयातें ॥ ८३ ॥ जैसें तारांगणीं भरलें । गगन समुद्रीं बिंबलें । परि तें तुटोनि नाहीं पडिलें । ऐसें निवडे ॥ ८४ ॥ गगन गगनींचि आहे । हें अभासे तें वांये । तैसा आत्मा देखती देहें । गेवसिलाही ॥ ८५ ॥ खळाळाच्या लगबगी । फेडूनि खळाळाच्या भागीं । देखिजे चंद्रिका कां उगी । चंद्रीं जेविं ॥ ८६ ॥ कां नाडरचि भरे शोषे । सूर्य तो जैसा तैसाचि असे । देह होतां जातां तैसें । देखती मातें ॥ ८७ ॥ घट मठ घडले । तेचि पाठीं मोडले । परि आकाश तें संचलें । असतचि असे ॥ ८८ ॥ तैसें अखंडे आत्मसत्ते । अज्ञानदृष्टि कल्पितें । हें देहचि होतें जातें । जाणती फुडें ॥ ८९ ॥ चैतन्य चढे ना वोहटे । चेष्टवी ना चेष्टे । ऐसें आत्मज्ञानें चोखटें । जाणती ते ॥ ३९० ॥ [ यतंतोऽप्यकृतात्मान इति ] आणि ज्ञानही अपैतें होइल । प्रज्ञा परमाणुही उगाणा देइल । सकळ शास्त्रांचें येइल । सर्वस्व हाता ॥ ९१ ॥ परि ते व्युत्पत्ती ऐसी । जरी विरक्ती न रिगे मानसीं । तरी सर्वात्मका मजसीं । नव्हेचि भेटी ॥ ९२ ॥ पैं तोंड भरो कां विचारा । आणि अंतःकरणीं विषयांसी थारा । तरी नातुडें धनुर्धरा । त्रिशुद्धी मी ॥ ९३ ॥ हां गा वोसणतयाच्या ग्रंथीं । काइ तुटती संसारगुंती । कीं परिवसिलियां पोथी । वाचिली होय ॥ ९४ ॥ ना ना बांधोनियां डोळे । घ्राणीं लाविजती मुक्ताफळें । तरी तयांचें काय कळे । मोल मान ॥ ९५ ॥ तैसा चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो । ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परी न पविजे मातें ॥ ९६ ॥ जो एक मी कां समस्तीं । व्यापक असें भूतजातीं । ऐक तिये व्याप्ती । रूप करूं ॥९७॥

" तरी, देहाचें मोटकुळें उभें राहिलें, आणि तेथें चैतन्य प्राप्त झालें ह्मणजे त्या चळवळीच्या लोभानें तो आला असें ह्मणतात. ३७३ तसेंच **अर्जुना!** त्याच्या संगतीनें इंद्रियें आपआपल्या स्वार्थानें वागतात. त्याला भोगणें असें ह्मणतात. ३७४ पुन्हा भोग आपोआप कमी झाले, आणि देह जाऊन तो दिसेनासा झाला ह्मणजे तो गेला गेला ह्मणून हाकाटी करतात. ३७५ **अर्जुना!** वृक्ष हाललेला पाहिला, तरच वारा वाहतो आहे असें मानावयाचें, आणखी वृक्ष दिसला नाहीं ह्मणून तो तेथें नाहीं होय? ३७६ किंवा समोर आरसा ठेवला आणि त्यांत आपण दृष्टीस पडलों, तर त्याच वेळीं आपण झालों असें मानावयाचें होय? त्याच्या आधीं आपण नसतों काय? ३७७ किंवा आरसा पलीकडे केला, ह्मणजे त्यांतील प्रतिबिंब नाहींसें होतें, ह्मणून आपणही नाहीं, असा निश्चय करावा होय? ३७८ शब्द तर आकाशाचा असतो. पण तो मेघाच्या मस्तकावर लादावा; किंवा अभ्रांच्या वेगाचा आरोप चंद्रावर करावा; ३७९ त्याप्रमाणें देहच होतो आणि जातो तो अविकृत अशा आत्म्याच्या सत्तेनें, असा जे निश्चय करतात, ते मोहानें अंध झालेले ह्मणून समजावें. ३८० येथें आत्म्याच्या ठिकाणीं आत्मा, आणि देहाचे धर्म देहामध्यें असे जे पाहणारे ते निराळे आहेत. ३८१ कारण, त्यांचे डोळे ज्ञानाला पाहिल्यामुळें देहाच्या पडद्यांत राहत नाहींत. ग्रीष्मऋतूमध्यें जसे सूर्याचे किरण असावेत, ३८२ त्याप्रमाणें विवेकाच्या विस्तारानें ज्यांची स्फूर्ति स्वरूपामध्यें स्थिर होते, ते ज्ञानी, आत्म्याला अशा प्रकारें पहातात, ३८३ कीं, जसें तारांगणांनीं भरलेलें आकाश, समुद्रामध्यें प्रतिबिंबित झालें आहे खरें; पण तें तुटून पडलेलें नाहीं, हा निश्चय असतो. ३८४ आकाश आकाशामध्येंच आहे. हा दिसणारा भास व्यर्थ होय. तसा देहांत सांपडलेला आत्मा आहे असें समजतात. ३८५ खळाळाच्या वेगामध्यें खळाळांतील तुकडे टाकून देऊन चांदणें जसें निर्विकार चंद्रामध्यें निवांत आहे असें पाहणें, ३८६ किंवा डबकेंच भरतें आणि सुकतें; सूर्य तर जशाचा तसाच असतो, त्याप्रमाणें देह होतांना आणि जातांना मी तसा असतों असें मानतात. ३८७ घागर व घर तयार केलीं आणि तीं पुन्हा मोडलीं, तर आकाश जसें भरलेलें असतें तसेंच असतें. ३८८ त्याप्रमाणें अखंड आत्मसत्ता होते आणि जाते ही अज्ञान दृष्टीची कल्पना आहे. जे सज्ञान

---

१ व्यर्थ. २ सांपडलेला. ३ वेगांत. ४ डबक, थिल्लर. ५ स्पष्ट. ६ ब्रह्म. ७ यथार्थ. ८ प्राप्त. ९ झाडा. १० स्वप्नांत बोलणाऱ्याच्या. ११ स्पर्शलिया. १२ अभ्यास. १३ कोट्यवधि. १४ स्पष्ट प्रतिपादन करूं.

आहेत ते हा देहच होतो आणि जातो हें स्पष्ट समजतात. ३८९ चैतन्य चढतही नाहीं आणि कमीही होत नाहीं. आपण करीत नाहीं, व करवीतही नाहीं. असें जें उत्तम तत्त्व तें ते आत्मज्ञानानें जाणतात, ३९० आणखी तें ज्ञानही मिळेल; बुद्धिपरमाणू परमाणूंचाही झाडा देईल; सकल शास्त्रांचें सर्वस्वही हाताला चढेल. ३९१ पण त्यांत एक बीज आहे तें हें कीं, मनामध्यें जर विरक्ति विंचणार नाहीं, तर सर्वात्मक जो मी, त्या माझी भेट होणार नाहीं. ३९२ तसेंच अर्जुना! तोंडांत सारे विचार भरलेले, आणि अंतःकरणांत मात्र विषयाची बैठक; असें असेल तर निश्चयेंकरून मी प्राप्त होणार नाहीं. ३९३ अरे! झोंपेंत बरळलेल्या ग्रंथानें काय संसारबंधन सुटेल होय? किंवा पोथीला नुसता हात लावल्यानें वाचल्यासारखें होईल होय? ३९४ किंवा डोळे बांधून मोत्यें आणून नाकाला लावलीं, तर त्यांची परीक्षा व किंमत कळेल काय? ३९५ तसें चित्तामध्यें अहंतेचें स्थान; आणि जिव्हेला सकलशास्त्रांचा अभ्यास; अशानें कोट्यवधि जन्म घेतले तरी तो मला पोंचणार नाहीं. ३९६ सर्व प्राणिमात्रांमध्यें व्यापून राहणारा जो मी एक, त्या माझ्या व्याप्तीचें आतां स्पष्ट विवेचन करूं."३९७

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥१२॥

[ यदादित्यगतं तेजः ] तरी सूर्यासकट आघवी । [ जगद्भासयतेऽखिलं ] हे विश्वरचना जे दावी । [ तत्तेजो विद्धि मामकं ] ते [१]दीप्ति माझी जाणावी । आद्यंतीं आहे ॥ ९८ ॥ [यच्चंद्रमसि] जळ शोषुनि गेलिया सविता । ओलांश पुरवीतसे जे मार्पाता । ते चंद्रीं पंडुसुता । ज्योत्स्ना माझी ॥ ९९ ॥ [ यच्चाग्नौ ] आणि दहन पाचनसिद्धी । करीतसे जे निरवधी । ते हुताशीं तेजोवृद्धी । माझीचि गा ॥ ४०० ॥

" तर सूर्यासकटही अवघी विश्वरचना जें दाखवितें, तें आदि अंतीं माझें तेज आहे, हें ध्यानांत ठेव. ३९८ सूर्य पाणी शोषून गेला ह्मणजे मग अर्जुना! मागून ओलांश पुरविणारी जी चंद्रांतील कांति, ती माझीच. ३९९ आणखी असंख्य वस्तु भाजणारी व पचन करणारी अग्नींतील जी तेजोवृद्धि तीही माझीच."४००

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ।
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥१३

[गामाविश्य च] मी रिगालो असें भूतळीं । ह्मणौनि समुद्र महाजळीं । हे [१]पांसूची ढेंपुळी । विरेचिना ॥ १ ॥ [ भूतानि धारयाम्यहमोजसा ] आणि भूतेंहि चराचरें । हे धरितसे जिये अपारें । तियें मीचि [२]धरीं धरे । रिगोनियां ॥ २ ॥ [सोमो भूत्वा रसात्मकः] गगनीं मी पंडुसुता । चंद्राचेनि मिसें अमृता । भरला जालों चालता । सरोवर ॥ ३ ॥ [पुष्णामि चौषधीः सर्वाः ] तेथुनि फांकती रश्मि कर । ते [३]पाटे पेलुनि अपार । सर्वौषधींचे आगर । भरित असें मी ॥ ४ ॥ ऐसेनि [४]सस्यादिकां सकळां । करीं धान्यजाती सुकाळा । हें अन्नद्वारा जिव्हाळा । भूतजातां ॥ ५ ॥

"मी पृथ्वीमध्यें शिरून राहिलों आहें. ह्मणून ही पृथ्वी केवळ परमाणूंची ढेप असतां ही समुद्रासारख्या महाजळानें विरली जात नाहीं. ४०१ आणि हें सारें अपार चराचर प्राणिमात्रासुद्धां मीच पृथ्वीमध्यें शिरून धारण करतों. ४०२ अर्जुना! आकाशामध्यें चंद्राच्या रूपानें अमृतानें भरलेलें सुंदर सरोवर मीच झालेलों आहें. ४०३ तेथून जे किरण निघतात, त्यांचे अगणित पाट बांधून सर्व औषधींच्या वागा मीच भरतों. ४०४ अशा प्रकारें भात आदिकरून सर्व जातींच्या धान्याचा सुकाळ करून प्राणिमात्रांना अन्नद्वारानें आश्रय देतों." ४०५

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४॥

आणि निपजविलें अन्न । तरि तैसें कैचें दीपन । जेणें जिरुनि समाधान । भोगिती जीव ॥ ६ ॥ [ अहमिति ] ह्मणौनि प्राणिजातांच्या घटीं । करुनि [५]कंदावरी आंगिठी । दीप्ति जठरींही किरीटी । मीचि जालों ॥ ७ ॥ [ प्राणेति ] प्राणापानाच्या जोडभातीं । फुंकफुंकोनियां अहोरातीं । [७]आटीतसें नेणों किती । उदरामाजी ॥ ८ ॥ शुष्कें अथवा

१ प्रकाश. २ उजेड, कांति. ३ भाजणें. ४ अग्नींत.

१ रजःकणांची ढेंप, पृथ्वी. २ जमिनींत. ३ ओघ करुन. ४ धान्यादिकांला. ५ नाभिकंदावर. ६ शेगडी. ७ पचवीतसें.

स्निग्धें । सुपक्कें कां विदग्धें । परि मीचि गा चतुर्विधें । अन्नें पचीं ॥ ९ ॥ एवं मीचि आघवें जन । जना निर्वाहितें मीचि जीवन । जीवनीं मुख्यसाधन । वन्हि मीचि ॥४१०॥ आतां ऐसियाहीवरी काई । सांगों व्याप्तीची नवाई । येथ दुजें नाहींचि पेई । सर्वत्र मी गा ॥ ११ ॥ तरि कैसेनि पां वेखें । सदां सुखियें येकें । येकें तियें बहुदुःखें । क्रांत भूतें ॥ १२ ॥ जैसीं सगळिये पाटणीं । एकेचि दीपें दिवेलावणी । जालिया कां न देखणी । उरलीं एकें ॥ १३ ॥ ऐसी हन उंखिविखी । करित आहासी मानसिकी । तरि परिस तेही निकी । शंका फेडूं ॥ १४ ॥ पैं अवघा मीचि असें । येथ नाहीं कीर अनारिसें । परि प्राणियांचिया उल्लासें । बुद्धि ऐसों ॥ १५ ॥ जैसें एकाचि आकाशध्वनी । वाद्यविशेषीं आनानी । वाजावें पडे भिन्नीं । नादांतरीं ॥ १६ ॥ कां लोकचेष्टीं वेगळाला । जो हा एकचि भानु उगवला । तो आनानी परी गेला । उपयोगासी ॥ १७ ॥ ना ना बीजधर्मानुरूप । झाडां उपजवी आप । तैसें परिणमलें स्वरूप । माझें जीवा ॥ १८ ॥ अगा नेणा आणि चतुरा । पुढां नीळेयांचा दुसरा । नेणा सर्प जाला येरा । सुखालागीं ॥ १९ ॥ हें असो स्वातीचें उदक । शुक्तीं मोतीं व्यालीं विख । तैसा सज्ञानांसी मी सुख । दुःख तों अज्ञानासी ॥ ४२० ॥

**"आणखी अन्न तयार केलें ह्मणून, तें जिरून जिवांना समाधान भोगावयाला मिळेल, असें पचन कसें होणार? ४०६ ह्मणून अर्जुना! प्राणिमात्रांच्या देहामध्यें नाभिकमलावर आगटी पेटवून पोटामध्यें जठराग्नीही मीच होतों. ४०७ प्राणापानाचा दुहेरी भाता, अहोरात्र फुंकून फुंकून पोटामध्यें किती पचवितों, याचा ठिकाण नाहीं! ४०८ ओलीं असोत किंवा वाळलेलीं असोत; शिजवलेलीं असोत, कीं करपलेलीं असोत; पण तीं चारही प्रकारचीं अन्नें मीच पचवून सोडतों. ४०९ अशा प्रकारें सारें जन तें मीच; जनाच्या निर्वाहाचें जीवन तें मीच. आणि जीवनामध्यें मुख्य साधन जो अग्नि तोही मीच. ४१० आतां ह्याउप्पर माझ्या व्याप्तीची अपूर्वता ती काय सांगावी? येथें दुसरें कांहीं नाहींच; सर्वत्र मीच आहें हें ध्यानांत घे ह्मणजे झालें. ४११ तर कितीएक प्राणी सदा सर्वदा सुखी असतात, आणि कितीएक सदासर्वदां दुःखानें व्याप्त झालेले असतात, ते कोणत्या कारणानें? ४१२ नगरामध्यें एकाच दिव्यानें दिवे लावून उजेड केला, तर ज्यांना कांहींच दिसत नाहींत, असेही कित्येक लोक रहातात असें कां बरें? ४१३ असा तर्कवितर्क मनांत आणशील, ह्याकरितां ती सारी शंका निवारण करूं. ऐक. ४१४ मीच सारा भरलेलों आहें, ह्यांत तर फरक नाहीं. परंतु प्राण्याच्या बुद्धीप्रमाणें फळतो. ४१५ ज्याप्रमाणें एकाच आकाशाच्या शब्दामध्यें निरनिराळीं वाद्यें वाजवित असतां, भेदामध्यें वेगवेगळेपणा येतो; ४१६ किंवा सूर्य हा एकच उगवला तरी, लोक निरनिराळे व्यापार करतात, आणि तो निरनिराळ्या उपयोगास लागतो, ४१७ किंवा पाणी बीजाच्या धर्मानुसार, निरनिराळीं झाडें उत्पन्न करतें, त्याप्रमाणें माझें स्वरूप जिवाला भिन्नत्व देतें. ४१८ अरे! अज्ञान आणि चतुर ह्यांच्यापुढें नीलमण्यांचा हार पडला असला, तर अज्ञान्याला वाटतो सर्प, आणि तोच दुसऱ्याच्या सुखास कारण होतो. ४१९ हेंही असो. स्वातीचें उदक शिंपांत पडलें तर, मोतीं होतें. आणि सर्पांत पडलें, तर विष होतें. त्याप्रमाणें सज्ञान्यांना मी सुखावह होतों, आणि अज्ञान्यांना मी दुःखदायक होतों." ४२०**

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो
वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥

[ सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टः ] येऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं । मी अमुका आहें ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं । ते वस्तु गा मी ॥ २१ ॥ [ मत्तः स्मृतिः ] परि संतासवें वसतां । योगज्ञानी पैसतां । गुरुचरण उपासितां । वैराग्येसीं

१ करपलेलीं. २ निर्वाहक. ३ व्यापकपणाची अपूर्वता. ४ वेषानें. ५ नगरांत. ६ एकच उजेड जर सर्व शहरभर केला तर कोणास दिसावें व कोणास दिसूं नये असें कां बरें? ७ तर्कवितर्क. ८ वेगळें. ९ बुद्धीसारखा. १० भिन्नभिन्न. ११ उदक. १२ नीळमण्यांचा. १३ दुपदरी हार.

१ अभ्यासितां.

॥ २२ ॥ येणेंचि सत्कर्में । अशेषही अज्ञान विरमे । जयाचें अहं विश्रामे । आत्मरूपीं ॥ २३ ॥ ते आपेंआप देखोनि देखीं । मियां आत्मेनि सदा सुखी । येथें मी वांचून अवलोकीं । आन हेतु असे ॥ २४ ॥ [ज्ञानं] अगा सूर्योदय जालिया । सूर्यें सूर्यचि पाहावा धनंजया । तेविं मातें मियां जाणावया । मींचि हेतु ॥ २५ ॥ [ अपोहनं च ] ना शरीरपरातें सेवितां । संसारगौरवचि ऐकतां । देहीं जयांची अहंता । बुडोनि ठेली ॥ २६ ॥ ते स्वर्गसंसारालागीं । धांवतां कर्ममार्गीं । दुःखाच्या सेलें भागीं । विभागी होती ॥ २७ ॥ परि हेंही होणें अर्जुना । मजचिस्तव तया अज्ञाना । जैसा जागताचि हेतु स्वप्ना । निद्रेतें होय ॥ २८ ॥ पैं अभ्रें दिवस हरपला । तोही दिवसेंचि जाणों आला । तेविं मी नेणोनि विषय देखिला । मजचिस्तव भूतीं ॥ २९ ॥ एवं निद्रा कां जागणिया । प्रबोधचि हेतु धनंजया । तेविं ज्ञाना अज्ञाना जीवांचिया । मीचि मूळ ॥ ४३० ॥ जैसें सर्पत्वा कां दोरा । दोरचि मूळ धनुर्धरा । तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा । मियांचि सिद्धि ॥ ३१ ॥ [वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यः] म्हणौनि जैसा असें तैसया । मातें नेणोनि धनंजया । वेद जाणों गेला तंव तया । जालिया शाखा[3] ॥ ३२ ॥ तरि तिहीं शाखाभेदीं । मीचि जाणिजे त्रिशुद्धी । जैसा पूर्वापरा नदी । समुद्रचि [4]ठी ॥ ३३ ॥ [वेदांतकृत्] आणि महा सिद्धांतापासीं । श्रुति हारपती शब्देंसी । जैसिया सगंधो आकाशीं । वातलहरी ॥ ३४ ॥ तैसें समस्तही श्रुतिजात । ठाके लाजिलें ऐसें निवांत । तें मींचि करीं यथावत । प्रकटोनियां ॥ ३५ ॥ [वेदविदेव चाहं] पाठीं श्रुतीसहित अशेष । जग हारपे जेथ निःशेष । तें निजज्ञानही चोख । जाणता मीचि ॥ ३६ ॥ जैसें निदेलीया जागिजे । तेव्हां स्वप्नाचें कीर नाहीं दुजें । परि एकत्वही देखों पाविजे । आपलेंचि ॥ ३७ ॥ तैसें आपलें अद्वयपण । मी जाणतसें दुजेनवीण । तयाही बोधाकारण । जाणता मीचि ॥ ३८ ॥ मग आगी लागलिया कापुरा । काजळी ना वैश्वानरा । उरणें नाहीं वीरा । जयापरी ॥ ३९ ॥ तेविं समूळ अविद्या खाये । तें ज्ञानही जैं बुडोनि जाये । तऱ्हीं नाहीं कीर नोहे । आणि न साहे असणेंही ॥ ४४० ॥ पैं विश्व घेऊनि गेला मागेसीं[6] । तया चोरातें कवण कें गिंवसी । जे कोणी एकी दशा ऐसी । शुद्ध ते मी ॥ ४१ ॥ ऐसी जडाजडव्याप्ती । रूप करितां कैवल्यपती । ठी केली निरुपहितीं । आपुल्या रूपीं ॥ ४२ ॥ तो आघवाचि बोध सहसा । अर्जुनीं उमटला कैसा । व्योमींचा चंद्रोदय जैसा । क्षीरार्णवीं ॥ ४३ ॥ का प्रतिभिंती चोखटे । समोरील चित्र उमटे ।

१ लय पावतें. २ शेवटीं. ३ विभाग. ४ स्थान. ५ सुगंधि. ६ मागासकट. ७ शोधी. ८ निर्गुणी, उघड, उपाधिरहित. ९ प्रतिबिंबत्वानें बिंबला.

तैसा अर्जुनें आणि वैकुंठें । नांदतसे बोध ॥ ४४ ॥ तरि बाप वस्तुस्वभाव । फावे तंव तंव गोडीये थाव । म्हणौनि अनुभवियांचा राव । अर्जुन म्हणे ॥ ४५ ॥ जी व्यापकपण बोलतां । निरुपाधिक जें आतां । स्वरूप प्रसंगता । बोलिले देवो ॥ ४६ ॥ तें एकवेळ अव्यंगवाणें । कीजो कां मज सांगणें । तेथ द्वारकेचा नाथ म्हणे । भलें केलें ॥ ४७ ॥ पैं अर्जुना आम्हाहि वोडेंकोडें । अखंड बोलों आवडे । परि काय कीजे न जोडे । पुसेतें ऐसें ॥ ४८ ॥ आजि मनोरथांसि फळ । जोडलासि तूं केवळ । जे तोंड भरूनि निखळ । आलासि पुसों ॥ ४९ ॥ जें अद्वैतावरीही भोगिजे । तें अनुभवींचें तुं विरजें । पुसोनि मज माझें । देतोसि सुख ॥ ॥४५०॥ जैसा आरसा आलिया जवळां । दिसे आपणपें आपला डोळां । तैसा संवादियां तूं निर्मळा । शिरोमणी ॥ ५१ ॥ तुवां नेणोनि पुसावें । मग आम्ही परिसऊं बैसावें । तो गाहा[6] पोढ नव्हे । सोयरेया ॥ ५२ ॥ ऐसें म्हणौनि आलिंगिलें । कृपादृष्टी अवलोकिलें । मग देव काय बोलिले । अर्जुनेंसीं ॥ ५३ ॥ पैं दोहीं वोठीं एक बोलणें । दोहीं चरणीं एक चालणें । तैसें पुसणें सांगणें । तुझें माझें ॥ ५४ ॥ एवं आम्ही तुम्ही येथें । देखावें एका अर्थातें । सांगतें पुसतें येथें । दोन्हीं एक ॥ ५५ ॥ ऐसा बोलत देव भुलला मोहें । अर्जुनातें आलिंगूनि ठाये । मग बिहाला म्हणे नोहे । आवडी हे ॥ ५६ ॥ जाले इक्षुरसाचे ढाळ । तरि लवण देणें किडाळ । जे संवादसुखाचें रसाळ । नासेल [10]थितें ॥ ५७ ॥ आधींच आम्हां यया कांहीं । नरनारायणासी भिन्न नाहीं । परी आतां जिरो माझ्याठाईं । वेग हा माझा ॥ ५८ ॥ इया बुद्धी सहसा । श्रीकृष्ण म्हणे वीरेशा । पैं गा तो तुवां कैसा । प्रश्न केला ॥ ५९ ॥ जो अर्जुन श्रीकृष्णीं विरत होता । तो परतोनियां मागुता । प्रश्नावळीची कथा । ऐकों आला ॥ ४६० ॥ तेथ सद्गदें बोलें । अर्जुनें जी जी म्हणितलें । निरुपाधिक आपुलें । रूप सांगा ॥ ६१ ॥ यया बोला तो शार्ङ्गी । तेंचि सांगावयालागीं । उपाधी दोहीं भोगीं । निरूपीत असे ॥ ६२ ॥ पुसिलिया निरुपेहित । उपाधि कां सांगे येथ । हें कोण्याही प्रस्तुत । गमे जरी ॥ ६३ ॥ तरि ताकाचे अंश फेडणें । तयाचें नांव लोणी काढणें । चोखाचिये शुद्धी तोडणें । कीडचि जेविं ॥ ६४ ॥ बोबुळीचि सारावी हातें । परि पाणी तंव असे आइतें । अभ्रचि जावें गगन तें । सिद्धचि कीं ॥ ६५ ॥ वरिल कोंडियाचा गुंडाळा । झाडूनि केलिया वेगळा । कण घेतां विरंगोळा । असे काई ॥ ६६ ॥ तैसा

१ परिपूर्ण. २ आवडीनें. ३ प्रश्नकर्ता. ४ निर्मळ साधन. ५ डोळ्यानें. ६ योग्यता. ७ म्याला. ८ पाक. ९ गोग. १० स्थित, जमून आलेलें. ११ प्रकारीं. १२ निरुपाधि. १३ शेवाळ. १४ अडथळा, सायास.

उपाधि उपहितां । शेवट जेथ विचारितां । तें कोणातेंही न पुसतां । निरुपाधिक ॥ ६७ ॥ जैसें न सांगणेवरी । बोळा पतीसी रूप करी । बोल निमालेपणें विवरी । अचर्चातें ॥ ६८ ॥ पैं सांगणेयाजोगें नव्हे । तेथिचें सांगणें ऐसें आहे । म्हणौनि उपाधिलक्षण हें । बोलिजे आदि ॥ ६९ ॥ पाडिव्याची चंद्ररेखा । निरुती दावावया शाखा । दाविजे तेवि औपाधिका । बोली इया ॥ ४७० ॥

"बाकी, सर्वांच्या हृदयप्रदेशांत मी अमुक आहें, अशी जी बुद्धि रात्रंदिवस स्फुरण पावते, ती वस्तु मी. ४२१ परंतु सज्जनांच्या संगतीनें राहिलें असतां, योगज्ञानाचा अभ्यास केला असतां, वैराग्यासहवर्तमान गुरुचरणांची उपासना केली असतां; ४२२ त्या सत्कर्मांच्या योगेंकरून अज्ञान निखालस लयास जातें. आणि त्यांचें अहं हें आत्मस्वरूपामध्यें विश्रांति पावतें. ४२३ ते आपोआप आत्मा तोच मी असें डोळ्यांनीं पाहून सदा सुखी असतात. येथें माझ्याशिवाय दुसरा हेतु आहे काय? ४२४ हें पहा **अर्जुना!** सूर्योदय झाला म्हणजे सूर्याच्या साहाय्यानेंच सूर्याला पहावें त्याप्रमाणें मी मला जाणावयाला हेतुही मीच. ४२५ किंवा शरीरावर ज्याची बुद्धि त्याचें सेवन करितां करितां संसाराचें गौरव ऐकतां ऐकतां, देहामध्यें ज्यांची अहंता बुडून गेली, ४२६ ते स्वर्ग संसारासाठीं कर्ममार्गांतून धावतां धावतां शेवटीं दुःखाचे विभागी होतात. ४२७ पण **अर्जुना!** त्या अज्ञान्यांना हें दोन्हीं सुद्धां माझ्याच पासून. ज्याप्रमाणें स्वप्नाला किंवा निद्रेला जागृतीच कारण होते, ४२८ किंवा अभ्रानें लोपलेला सूर्य असतो, तेंही सूर्यानेंच समजतें. त्याप्रमाणें प्राणिमात्र हे मला न जाणून विषयाला पहातात ते मजपासूनच. ४२९ अशा प्रकारें **अर्जुना!** निद्रेला किंवा जागृतीला प्रबोधच कारण असतो. तसें जिवाच्या ज्ञानाला किंवा अज्ञानाला मूळ मीच. ४३० ज्याप्रमाणें **धनुर्धरा!** सर्पत्वाला किंवा दोराला मूळ दोरच. त्याप्रमाणें ज्ञानाच्या किंवा अज्ञानाच्या संसाराला मीच सिद्धि आहें. ४३१ म्हणून **अर्जुना!** मी जसा आहें, तशा मला जाणावयाचें सोडून वेद मला जाणण्याचा प्रयत्न करूं लागला, तों त्याला शाखा फुटल्या. ४३२ तरी, तिन्ही शाखांच्या भेदामध्यें मीच आहें ही खात्री असूं दे. ज्याप्रमाणें पूर्वेकडून वाहणाऱ्या नद्यांना किंवा पश्चिमेकडून वाहणाऱ्या नद्यांना स्थान समुद्रच, ४३३ आणखी महासिद्धांतापाशीं शब्दासहवर्तमान श्रुति लयास जातात. सुगंधयुक्त आकाशामध्यें जशा वायूच्या लहरी (फिक्या पडतात,) ४३४ त्याप्रमाणें झाडून साऱ्या श्रुति लाजल्यासारख्या होऊन तटस्थ बसतात, तेव्हां मीच प्रगट होऊन पूर्ववत् करतों. ४३५ तसेंच पुन्हां श्रुतिसहवर्तमान निःशेष जग जेथें विलयास जातें, तें पवित्र आत्मज्ञान जाणताही मीच. ४३६ ज्याप्रमाणें निजलेल्याला जागा केला म्हणजे स्वप्नांतील दुसरें कांहींच खरोखर रहात नाहीं. तर आपलें ऐक्यच दिसून येतें. ४३७ त्याप्रमाणें, दुसरेपणाशिवाय, माझा अद्वैतपणा मीच जाणतों. आणि त्या बोधाला जाणणाराही मीच. ४३८ मग **वीरा!** आग लागलेल्या कापुरामध्यें जसा कोळसाही रहात नाहीं, आणि विस्तवही रहात नाहीं, ४३९ त्याप्रमाणें समूळ अविद्या खाऊन टाकील असें ज्ञानही जेव्हां बुडून जातें, तेव्हां निश्चयेंकरून नाहीं असेंही होत नाहीं, व असणें हेंही त्यास सहन होत नाहीं. ४४० विश्वच सारें घेऊन माग देखील ज्यानें उरूं दिला नाहीं, त्या चोराला कोण कोठें शोधणार? अशी जी कोणीएक शुद्ध दशा ती मी." ४४१ कैवल्यपती असे जे **श्रीकृष्ण,** त्यांनीं **जडाजड** व्यातीचें अशा प्रकारें विवेचन करून आपल्या रूपाचें निर्गुणत्व स्थापित केलें. ४४२ तो सारा बोध **अर्जुना**च्या ठिकाणीं कसा बिंबला? तर आकाशांत जसा चंद्राचा झालेला उदय क्षीर-

१ उपाधियुक्त. २ कुलस्त्रियेला जवळ असलेल्या पतीचें नांव काय असे विचारिलें असतां ती मान खालीं करते, मौन्य हेंच पतीचें नामरूप. ३ ज्याची चर्चा करितां येत नाहीं अशाला. ४ निश्चयानें.

सागरांत उमटावा, ४४३ किंवा समोरच्या आरशासारख्या तुळतुळीत भिंतीवर समोरचें चित्र उमटावें, त्याप्रमाणें तो बोध **अर्जुना**मध्यें आणि **श्रीकृष्णा**मध्यें सारखा दिसूं लागला. ४४४ तरी वस्तुमात्राचा धर्म मोठा कठीण! गोड मिळालें ह्मणजे आणखी हवें हवेंसेंच वाटतें. त्याला अनुसरून अनुभवाचा राजा जो **अर्जुन**, तो ह्मणतो. ४४५ "महाराज! देवांनीं व्यापकपणा सांगतां सांगतां प्रसंगानुसार आतां जें निरुपाधिक स्वरूप कथन केलें, ४४६ तेंच एक वेळ परिपूर्णपणानें मला सांगावें." तेव्हां **द्वारकाधीश** ह्मणाले "ठीक केलेंस. ४४७ मलाही नेहेमीं बोलावयाला फार आवडतें. पण काय करावें? असा विचारणाराच कोणी मिळत नाहीं. ४४८ आज तूं ह्मणजे केवळ मनोरथाला फळ प्राप्त झालास. कारण, अगदीं तोंड भरून विचारावयास आला आहेस. ४४९ अद्वैताच्याही वर जें भोगावयाचें, तें अनुभवाचें निर्मळ सुख, तूं माझें मला विचारण्याच्या रूपानें देत आहेस. ४५० ज्याप्रमाणें आरसा जवळ आला असतां, आपल्याच डोळ्यांनीं आपण दिसतो, त्याप्रमाणें ह्या संवादामध्यें निर्मळतेहून तूं निर्मळ आहेस. ४५१ **बाबा!** तूं न जाणून पुसावेंस, आणि मग तें आह्मीं तुला ऐकवावयाला बसवावें, हें कांहीं सुहृदाला योग्य नव्हे." ४५२ असें ह्मणून आलिंगन दिलें; कृपादृष्टीनें अवलोकन केलें; आणि मग देव **अर्जुना**ला काय ह्मणतात, ४५३ "ओठ दोन असतात पण बोलणें एक; दोन पायांनीं चालावयाचें परंतु चालणें एक; त्याप्रमाणें तुझें विचारणें आणि माझें सांगणें आहे. ४५४ ह्मणून तुह्मी आणि आह्मी येथें एकाच अर्थानें पहावेत. येथें सांगणें आणि पुसणें, दोन्ही एकच आहेत." ४५५ असें बोलतां बोलतां मोहानें भुलले आणि **अर्जुना**ला मिठी घालून बसले. परंतु लागलेच भ्याले आणि ह्मणाले "ही आवड बरी नव्हे. ४५६ उसाचा रस पक्का झाल्यानंतर त्यांत मीठ (क्षार) टाकतां उपयोग नाहीं. कारण, सेवा सुखाचा जमलेला रस त्यानें नासून जाईल. ४५७ आधींच आह्मी व हा नरनारायण आहोंत, आमच्यामध्यें भिन्नता नाहींच. तर आतां हा माझा वेग, माझ्यामध्येंच जिरून जाऊं दे." ४५८ असें एकदम मनांत येऊन श्रीकृष्ण ह्मणाले "हे **शूर शिरोमणे!** तो प्रश्न तूं कसा काय केलास? ४५९ तेव्हां **श्रीकृष्णा**मध्यें **अर्जुन** जो केवळ एकरूप झाला होता, तो माघारी फिरून प्रश्नावलीची कथा ऐकावयाला आला. ४६० आणि सद्गदित अंतःकरणानें ह्मणाला "महाराज! महाराज! आपलें निरुपाधिक स्वरूप सांगावें. ४६१ ह्या प्रश्नावर तो शारंग धनुष्य धारण करणारा भगवान् तेंच सांगण्यासाठीं उपाधीचे दोन प्रकार सांगूं लागला. ४६२ विचारलें होतें उपाधिरहित आणि त्यावर उपाधि कां सांगूं लागला? असें जर कोणाला ह्या ठिकाणीं वाटेल, ४६३ तर, ताकाचे अंश निराळे करणें त्याचेंच नांव लोणी काढणें; सोन्याची शुद्धि, ह्मणजेच हिणकस नाहींसें करणें; ४६४ शेवाळ बाजूस सारली, कीं पाणी तयारच असतें; अभ्र निघून गेलें, ह्मणजे बाकी उरेल तें गगन हें उघडच आहे. ४६५ वर असलेलें कोंड्याचें आच्छादन काढून वेगळें केलें, ह्मणजे दाणा घेण्याला काय प्रयास? ४६६ त्याप्रमाणें उपाधीच्या उपाधीचा शेवट कोठें? किंवा तिच्या पलीकडे काय? ह्मणून विचारलें तर निरुपाधिक हें कोणालाही विचारावयास नको. ४६७ ज्याप्रमाणें स्त्री न सांगण्याच्या मिषानेंच पतीचें नांव सांगते, किंवा ओळख करून देते. जेथें चर्चा करितां येत नाहीं, तेथें मौन हेंच त्याचें विवेचन होय. ४६८ जें सांगण्यासारखें नव्हे, त्याचें सांगणें हें अशा प्रकारचें असतें. ह्मणून हें उपाधीचें लक्षणच आधीं सांगतात. ४६९ द्वितीयेच्या चंद्राची कोर बरोबर दाखविणें झाली, तर आधीं एखाद्या झाडाची ढाळी वगैरे दाखवावी

लागते. त्याप्रमाणें ह्या उपाधिकाचें विवेचन आहे. ” ४७०

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।**
**क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥१६॥**

[द्वाविमौ पुरुषौ लोके] मग तो ह्मणे गा सव्यसाची । पैं इये संसार पाटणीची । वस्ती साविया टांची । दुपुरुषी ॥ ७१ ॥ जैसी आघवांचि गगनीं । नांदत दिवोरात्रि दोन्हीं । तैसे संसारराजधानीं । दोन्हीचि हे ॥ ७२ ॥ आणिकही तिजा पुरुष आहे । परि तो या दोन्हींचें नांव न साहे । जो उदेला गांवेंसी खाये । दोहींतें ययां ॥ ७३ ॥ परि ते तंव गोठी असो । आधीं दोन्हीचि हे परियेसों । जे संसारग्रामा वसों । आले असती ॥ ७४ ॥ एक आंधळा वेडा पंगु । येर सर्वांगें पुरता चांगु । परि ग्रामगुणें संगु । घडला दोघां ॥ ७५ ॥ [ क्षरश्चाक्षर एव च ] तया एका नाम क्षर । एकातें ह्मणती अक्षर । इहीं दोहींचि परि संसार । कोंदला असे ॥ ७६ ॥ आतां क्षर तो कवण । अक्षर तो किंलक्षण । हे अभिप्राय संपूर्ण । विवंचूं गा ॥ ७७ ॥ [ क्षरः सर्वाणि भूतानीति ] तरि महदहंकारा । लागुनियां धनुर्धरा । तृणांतींचा पांगोरा । वेरि पैं गा ॥ ७८ ॥ जें कांहीं सानें थोर । चालतें अथवा स्थिर । किंबहुना गोचर । मनबुद्धीसि जें ॥ ७९ ॥ जेतुलें पांचभौतिक घडतें । जें नामरूपा सांपडतें । गुणत्रयाच्या पडतें । कामठा जें ॥ ४८० ॥ भूताकृतीचें नाणें । घडत भांगारें जेणें । काळासि जूं खेळणें । जिहीं कवडां ॥ ८१ ॥ जाणणेंनिचि विपरीतें । जें जें कांहीं जाणिजेतें । जें प्रतिक्षणीं निमेतें । होऊनियां ॥ ८२ ॥ अगा कांढूनि भ्रांतीचें दांग । उभवी सृष्टीचें आंग । हें असो बहु जग । जया नाम ॥ ८३ ॥ पैं अष्टधा भिन्न ऐसें । जें दाविलें प्रकृतिमिसें । जें क्षेत्रद्वारा छत्तीसें । भागीं केलें ॥ ८४ ॥ हें मागील सांगों किती । अगा आतांचि जें प्रस्तुतीं । वृक्षाकार रूपकरीती । निरूपिलें ॥ ८५ ॥ तें आघवेंचि साकार । कल्पुनी आपणयां पुर । जालें असे तदनुसार । चैतन्यचि ॥ ८६ ॥ जैसा कुहां आपणचि बिंबे । सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे । मग क्षोभला समारंभें । घाली तेथ ॥ ८७ ॥ कां सलिलीं असतचि असे । व्योमावरी व्योम बिंबे जैसें । अद्वैत होऊनि तैसें । द्वैत घेपे ॥ ८८ ॥ अर्जुना गा यापरी । साकार कल्पूनि पुरी । आत्मा विस्मृतीची करी । निद्रा तेथ ॥८९॥ पैं स्वप्नीं सेजार देखिजे । मग पहुडणें जैसें तेथ कीजे । तैसें पुरीं शयन देखिजे । आत्मयासी ॥४९०॥ पाठीं तिये निद्रेचेनि भरें । मीं सुखी दुःखी ह्मणत घोरें । अहंममतेचेनि थोरें । वोसणाये सादें ॥ ९१ ॥ हा जनक हे माता । हा मी गोर हीन पुरता । पुत्र वित्त कांता । माझें हें ना ॥ ९२ ॥ ऐसिया वळघोनि स्वप्ना । धांवत भवस्वर्गाचिया राना । तया चैतन्या नाम अर्जुना । क्षर पुरुष गा ॥ ॥ ९३ ॥ आतां ऐक क्षेत्रज्ञ येणें । नामें जयातें बोलणें । जगज्जीव कां ह्मणे । जिये दशेतें ॥ ९४ ॥ जो आपुलेनि विसरें । सर्व भूतत्त्वें अनुकरे । तो आत्मा बोलिजे क्षरें । पुरुषनामें ॥ ९५ ॥ जे तो वस्तुस्थिती पुरता । ह्मणोनि आली पुरुषता । वरी देहपुरीं निदैजतां । पुरुषनामें ॥ ९६ ॥ आणि क्षरपणाचा नाथिला । आळ यया ऐसेनि आला । जे उपाधीचि आतला । ह्मणोनियां ॥ ९७ ॥ जैसी खळाळींचिया उदका । सरसीं उदेळे चंद्रिकां । तैसा विकारां औपाधिका । ऐसाचि गमे ॥ ९८ ॥ कां खळाळ मोटका शोषे । आणि चंद्रिका तें सरिसीच भ्रंशे । तैसा उपाधिनाशीं न दिसे । औपाधिक ॥ ९९ ॥ ऐसें उपाधीचेनि पाडें । क्षणिकत्व यातें जोडे । तेणें खोंकरपणें घडे । क्षर हें नाम ॥ ५०० ॥ एवं जीव चैतन्य आघवें । हें क्षर पुरुष जाणावें आतां रूप करूं बरवें । अक्षरासी ॥ १ ॥ [ कूटस्थः ] तरि अक्षर जो दुसरा । पुरुष पैं धनुर्धरा । तो मध्यस्थ गा गिरिवरां । मेरु जैसा ॥ २ ॥ जे तो पृथ्वी पाताळ स्वर्गीं । इहीं न भेदे तिहीं भागीं । तैसा दोहीं ज्ञानाज्ञानांगीं । पडेना जो ॥ ३ ॥ ना यथार्थज्ञानें एक होणें । ना अनेकत्वें दुजें घेणें । ऐसे निखिळ जें नेणणें । तेंचि तें रूप ॥ ४ ॥ पांसुता निःशेष जाये । ना घटभांडादि होये । तया मृत्पिंडाऐसें आहे । मध्यस्थ जें ॥ ५ ॥ पैं आटोनि गेलिया सागर । मग तरंग नां नीर । तया ऐशी अनाकार । जे दशा गा ॥ ६ ॥ पार्था जागणें तरी बुडे । परि स्वप्नाचें कांहीं न मांडे । तैसिये निद्रे सांगडें । न्याहाळणें जें ॥ ७ ॥ विश्व आघवेंचि मावळे । आणि आत्मबोध तरी नुजळे । तिये अज्ञानदशे केवळे । अक्षरनाव ॥ ८ ॥ सर्वा कळीं सांडिलें जैसें । चंद्रपण उरे अंवसे । रूप जाणावें तैसें । अक्षराचें ॥ ९ ॥ पैं सर्वोपाधिविनाशें । हे जीवदशा जेथ पैसे । फळपाकांत जैसें । झाड बीजीं ॥५१०॥ तैसें उपाधीसि उपहित । थोकोनि ठाके जेथ । तयातें

१ वस्ति टांची, उणी, सर्वथा थोडी; दोघांहून तिसरें कांहींच नाहीं. २ गांवांत. ३ भरला. ४ अग्रापर्यंत, बारीक मुळापर्यंत. ५ टांकसाळेंत. ६ सोन्यानें. ७ जुवा खेळ. ८ कवड्यांनीं, द्रव्यानें. ९ नाश पावतें. १० घेऊन. ११ अरण्य. १२ अवयव. १३ वृक्षाकार रूपकानें.

१ निजणें. २ बरळे. ३ शब्दें. ४ हीनांग. ५ सांग, पुरा. ६ चिकटून, आश्रय करून. ७ शरीर आहे तोंपर्यंत, वस्तु व्यापून. ८ स्पर्शला. ९ हाले. १० अमळसा. ११ फुटकेपणें. १२ रजःकणत्व. १३ आकाररहित. १४ सारखें. १५ प्रवेशे. १६ फल पिके तोंपर्यंत. १७ उपाधींत पडलेलें. १८ गुप्त होऊन राहे.

अव्यक्त । बोलती गा ॥ ११ ॥ घनं अज्ञान सुषुप्ती । तो बीजभाव ह्मणती । येर स्वप्न हन जागृती । फळभाव तो ॥ १२ ॥ जयासी कां बीजभाव । वेदांतीं केला ऐसा आव । तो तया पुरुषा ठाव । अक्षराचा ॥ १३ ॥ जेथुनी अन्यथा ज्ञान । फांकोनि जागृती स्वप्न । नाना बुद्धींचें रान । रिगालें असे ॥ १४ ॥ जीवत्व जेथूनि किरीटी । विश्व उठवितचि उठी । ते उभय भेदांची मिठी । अक्षर पुरुष ॥ १५ ॥ येर क्षर पुरुष कां जनीं । देहीं खेळे जागृती स्वप्नीं । तिया अवस्था जो दोन्ही । वियाला गा ॥ १६ ॥ पैं अज्ञानघनसुषुप्ती । ऐसैसी जे कां ख्याती । यॅा उणी येकी प्राप्ती । ब्रह्माची जे ॥ १७ ॥ साचचि पुढती वीरा । जरि न येता स्वप्न जागरां । तरी ब्रह्मभावो सैचोकारा । ह्मणों येता ॥१८॥ परि प्रकृति पुरुष दोनी । अभ्रें जालीं जिये गगनीं । क्षेत्र-क्षेत्रज्ञ स्वप्नीं । देखिला जिये ॥१९॥ हें असो अधोशाखा । या संसाररूपा रुखा । मूळ तें पुरुषा । अक्षराचें ॥ ५२० ॥ ह्या पुरुष कां ह्मणिजे । जे पूर्णपणेंचि निजें । पैं मायापुरीं पहुडिजे । तेणेंही बोलें ॥ २१ ॥ आणि विकारांची जे वैरी । ते विपरीतज्ञानाची परी । नेणिजे जिये माझारीं । ते सुषुप्ती गा ह्या ॥ २२ ॥ [ अक्षरः ] ह्मणौनि यया आपैसें । क्षरणें पां नसे । आणिकेंही ह्या न नाशे । ज्ञानाउणें ॥ २३ ॥ [ उच्यते ] यालागीं ह्या अक्षर । ऐसा वेदांती डगर । केला देशीं थोर । सिद्धांताचा ॥ २४ ॥ ऐसें जीवकार्यकारण । जया मायासंगचि लक्षण । अक्षर पुरुष जाण । चैतन्य तें ॥२५॥

मग तो ह्मणाला “ **अर्जुना !** ह्या संसाररूप नगरांत वस्ती फारच थोडी आहे. कारण, तेथें दोन पुरुषांवाचून तिसरें कोणीच नाहीं. ४७१ ज्याप्रमाणें साऱ्या आकाशामध्यें दिवस आणि रात्र, हीं दोनच नांदत असतात, त्याप्रमाणें संसाररूप राजधानींत हे दोनच वावरत असतात. ४७२ आणखी एक तिसराही पुरुष आहे. पण तो ह्या दोघांचेंही नांव सहन करीत नाहीं. तो गांवांत आला कीं, ह्या दोघांनाही खाऊन टाकतो. ४७३ पण ती गोष्ट तूर्त असूं दे. आधीं हे संसाराच्या गांवास वस्तीस आलेले दोनच ऐकून घे. ४७४ एक आंधळा, वेडा, आणि पांगळा आहे. दुसरा सर्वांगानें परिपूर्ण आणि चांगला आहे. परंतु एका गांवांत आल्यामुळें दोघांची मैत्री जडली. ४७५ त्यांतील एकाचें नांव क्षर, आणि दुसऱ्याला अक्षर असें ह्मणतात. ह्या दोघांनींच सारा संसार भरून टाकला आहे. ४७६ आतां क्षर तो कोण ? अक्षराचें लक्षण कसें ? ह्या अर्थाचें स्पष्टीकरण करूं. ४७७ तर **धनुर्धरा !** महदादि अहंकारापासून तृणाच्या अग्रभागापर्यंत, ४७८ जेवढें कांहीं लहान थोर चालतें, किंवा स्थिर, किंबहुना मनाला किंवा बुद्धीला दिसणारें जें जें, ४७९ पंचभौतिक ह्मणून घडणारें जें जें, जें नामरूपाला सांपडणारें, गुणत्रयाच्या टांकसाळींत पडणारें, ४८० ज्या सुवर्णानें प्राण्यांच्या आकृतीचें नाणें घडतें, ज्या कवड्यांनीं काळाशीं जुवा खेळावा लागतो, ४८१ विपरीत जाणण्यानेंच जें जें कांहीं जाणलें जातें; जें उत्पन्न होऊन क्षणक्षणा लयास जातें; ४८२ अरे ! भ्रांतीचें अरण्य होऊन जें सृष्टीचे अवयव तयार करतें; हें फार असूं दे. ज्याला जग असें नांव आहे; ४८३ प्रकृतीच्या योगानें ज्याचे आठ प्रकार झालेले सांगितले; जें क्षेत्रद्वारां छत्तीस ठिकाणीं विभागलें आहे. ४८४ हें मागचें किती सांगावें ? आतां नुकतेंच जें वृक्षाच्या आकाराच्या रूपकानें विवेचन केलें; ४८५ तें सारें साकार आपल्याला नगर पाहून त्याप्रमाणेंच चैतन्य झालें आहे. ४८६ ज्याप्रमाणें विहिरीमध्यें सिंह, आपणच प्रतिबिंबित होऊन त्या प्रतिबिंबानें क्षुब्ध होतो, आणि त्या क्षुब्धावेशांतच तींत घालून घेतो. ४८७ पाण्यांत असावयाचें तें असून आकाश जसें आकाशावर प्रतिबिंबित होतें, त्याप्रमाणें आपण अद्वैत असून द्वैत स्वीकारतें. ४८८ **अर्जुना !** ह्याप्रमाणें ह्या आकाराचें नगर कल्पून आत्मा ह्या तेथें विस्मृतीची झोंप घेतो. ४८९ तसेंच स्वप्नामध्यें शयनगृह पहावें, आणि मग तेथें जाऊन निजावें, त्याप्रमाणें ह्या नगरांत आत्म्याचें निजणें आहे असें समज. ४९० आणि मग त्या

१ दड. २ डौल, आकार. ३ नाम. ४ या एका वक्ष्यमाण गोष्टीवांचून जी ब्रह्माचीच प्राप्ती. ५ खरा. ६ शयन करतो. ७ यात्रा. ८ प्रकार. ९ आपोआप. १० ज्ञानावांचून. ११ प्रसिद्धी. १२ वेदांतांत.

निद्रेच्या भरांत, मी सुखी दुःखी असें ह्मणत घोरत पडतो; अहंममतेच्या मोठ्या शब्दानें बरळत सुटतो; ४९१ हा बाप; ही आई; हा मी; पंगु; धट्टा कट्टा; पुत्र, धन, स्त्री हीं माझीं. ४९२ अशा स्वप्नाला चिकटून भवस्वर्गाच्या रानामध्यें धांवत असतो. अर्जुना! त्या चैतन्याला क्षर पुरुष असें नांव आहे. ४९३ आतां क्षेत्रज्ञ ह्या नांवानें ज्याला बोलतात; त्या दशेला जगज्जीव असें कां ह्मणतात तें ऐक. ४९४ जो आपल्या विस्मृतीमुळें, सर्व प्राणिमात्र होऊन वागतो, तो क्षर पुरुषनामानें आत्मा समजावा. ४९५ कारण, तो वस्तूला–शरीराला–व्यापतो ह्मणून त्याला पुरुषपणा आलेला स्वीकारतो. ४९६ आणखी ह्याला क्षरपणाचा नसता आरोप ह्याच्यावर अज्ञामुळें आला आहे कीं, उपाधींत गुंततो ह्मणून. ४९७ ज्याप्रमाणें उदकाच्या खळाळाबरोबर चंद्रही हाललासा वाटतो, त्याप्रमाणें विकारामुळें उपाधिक असाच वाटतो. ४९८ किंवा पाण्याचा खळाळ थोडासा आटला कीं, चंद्रही लागलाच नाहींसा होतो. त्याप्रमाणें उपाधीचा नाश झाला कीं, उपाधीचा उपभोग घेणाराही नाहींसा होतो. ४९९ असें उपाधीप्रमाणें ह्यालाही क्षणिकत्व येतें. त्या ढिसूळपणामुळेंच त्याला क्षर असें नांव मिळालें आहे. ५०० अशा प्रकारें जीव आणि चैतन्य हें सारें क्षर पुरुष असें समजावें. आतां अक्षराचेंही नीट स्वरूप सांगूं. ५०१ तर अर्जुना! अक्षर ह्मणून जो दुसरा पुरुष आहे तो, मोठमोठ्या पर्वतांत जसा मेरु असावा, त्याप्रमाणें मध्यस्थ (आधारभूत) आहे. ५०२ कारण, पृथ्वी, पाताळ, व स्वर्ग ह्या तिहींमुळें त्याच्यांत कांहीं फरक ह्मणून होत नाहीं, त्याप्रमाणें तोही ज्ञानांत किंवा अज्ञानांत पडत नाहीं. ५०३ यथार्थ ज्ञानानें ऐक्य होत नाहीं; अनेकत्वाच्या योगेंकरून दुसरेपणा येत नाहीं, असें निर्मळ जें न जाणणें, (अज्ञान) तेंच त्याचें रूप होय. ५०४ तें डिखळे मोडलेल्या, व गाडगी न झालेल्या चिखलाच्या गोळ्याप्रमाणें जें मध्यस्थ आहे. ५०५ तसेंच समुद्र आटून गेला ह्मणजे मग पाणीही नाहीं, आणि लाटाही नाहींत. त्यासारखी जी निराकार दशा, ५०६ अर्जुना! जागृती तर नाहींशी होते; पण स्वप्नही कांहीं पडत नाहीं, त्या निद्रेसारखें तें आहे ह्मणून समजावें. ५०७ विश्व सारें लयास जावें, आणि आत्मबोध तर होऊं नये अशी जी केवळ अज्ञानदशा, तिचें नांव अक्षर. ५०८ सर्व कलांनीं सोडलेलें चंद्रपण जसें अमावास्येला रहातें, त्याप्रमाणें अक्षराचें स्वरूप आहे ह्मणून समजावें. ५०९ सर्व उपाधींचा लय झाल्यानंतर ही जीवदशा जेथें प्रवेश करते; फळ पिकेपर्यंत झाड जसें बीजांत असतें; ५१० त्याप्रमाणें उपाधींत पडलेलें जेथें गुप्त होऊन राहतें; त्याला अव्यक्त असें ह्मणतात. ५११ दृढ अज्ञान आणि सुषुप्ति, ह्यांना बीजभाव असें ह्मणतात; आणि इतर स्वप्न व जागृति तो फळभाव होय. ५१२ ज्याला वेदांतामध्यें बीजभाव असें ह्मटलेलें आहे तो त्या अक्षरपुरुषाचा ठाव होय. ५१३ जेथून अन्यथा ज्ञान फांकून जागृति, स्वप्न व नानाप्रकारच्या बुद्धीचें रान माजून राहिलें आहे. ५१४. हे किरीटी! जेथून जीवत्व हें विश्व उठवीतच उठतें, त्या उभयभेदांची जी मिठी, (ऐक्यभाव) तो अक्षर पुरुष, होय. ५१५ दुसरा जो क्षर पुरुष तो लोकांमध्यें देहांत खेळतो, व जागृति आणि स्वप्न ह्या दोन अवस्था त्याच्यापासून उद्भवतात. ५१६ अज्ञान, दृढ सुषुप्ति अशीं अशीं नांवें ज्यांना आहेत, तेवढीं खेरीज करून जी ब्रह्माचीच प्राप्ती. ५१७ हे वीरा! तीच खरोखर पुढें स्वप्नजागृतींत जर न येता, तर खरा ब्रह्मभाव तो तोच, असें ह्मणतां आलें असतें. ५१८ परंतु त्या गगनामध्यें प्रकृति आणि पुरुष हीं दोन अभ्रें उत्पन्न होऊन स्वप्नामध्यें जो क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाचा उद्भव झालेला पाहतो. ५१९ हें असो. ह्या खालीं शाखा असलेल्या संसाररूप वृक्षाला अक्षर पुरुषाचें मूळ असतें. ५२० ह्याला पुरुष असें कां ह्मणतात? तर तो पूर्ण-

**पणाच्याच निद्रेनें मायापुरीमध्यें शयन करतो ह्याकरितां. ५२१ आणि विपरीत ज्ञानाचे प्रकार, अशी जी विकारांची यात्रा ती जींत समजत नाहीं ती सुषुप्ती हा. ५२२ ह्मणून ह्याला साहजिकच नाश होणें नाहीं. आणखी ज्ञानावांचून दुसऱ्या कशानेंच हा नाश पावत नाहीं. ५२३ ह्यासाठीं हा अक्षर–नाश न होणारा–अशी सिद्धांताच्या देशामध्यें वेदांत्यांनीं थोर प्रसिद्धि केली आहे. ५२४ अशा प्रकारें जीव कार्याचें जें कारण, मायेचा संग हेंच ज्याचें लक्षण, तें चैतन्य अक्षर पुरुष असें समजावें." ५२५**

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥

[उत्तमः पुरुषस्त्वन्यः] आतां अन्यथाज्ञानी । या दोनी अवस्था जया जनीं । तया हरपती घनीं । अज्ञानतत्वीं ॥ २६ ॥ तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया । ज्ञानें कीर्तिमुखत्व केलिया । जैसा वन्हि काष्ठ जाळूनियां । स्वयें जळे ॥ २७ ॥ तैसें अज्ञान ज्ञानें नेलें । आपणहि वस्तु देउनि गेलें । ऐसें जाणणेंनिवीण उरलें । जाणतें जें ॥ २८ ॥ तें तो गा उत्तम पुरुष । जो तृतीय कां निष्कर्ष । दोहींहून आणिक । मागिलां जो ॥ २९ ॥ सुषुप्ती आणि स्वप्ना- । पासूनि बहुवें अर्जुना । जागणें जैसें आना । बोधाचेंचि ॥ ५३० ॥ कां रश्मी आणि मृगजळा । पासूनि अर्कमंडळा । अफाट तेविं वेगळा । उत्तम गा ॥ ३१ ॥ हें ना काष्ठींच्या काष्ठींहुनी । अनारिसा जैसा वन्ही । तैसा क्षराक्षापासुनी । आनचि तो ॥ ३२ ॥ पैं प्रसूनि आपली मर्यादा । एक करीत नदीनदां । उठी कल्पांतीं उदावादा । एकार्णवाचा ॥ ३३ ॥ तैसें स्वप्न ना सुषुप्ती । ना जागराची गोठी आथी । जैसी गिळिली दिवोराती । प्रळयतेजें ॥ ३४ ॥ [परमात्मेत्युदाहृतः] मग एकपण ना दुजें । असे नाहीं हें नेणिजे । अनुभव निर्बुजे । बुडाला जेणें ॥ ३५ ॥ ऐसें आथि जें कांहीं । तें तो उत्तम पुरुष पाहीं । जें परमात्मा इहीं बोलिजे नामीं ॥ ३६ ॥ तेंही येथ न मिसळेंता । बोलणें जीवत्वें पंडुसुता । जैसी बुडणेयाची वार्ता । थडियेचा कीजे ॥ ३७ ॥ तैसें विवेकाचिये काठीं । उभें ठाकलिया किरीटी । पैरावराचिया गोठी । करणें वेदां ॥ ३८ ॥

१ जाग्रत्स्वप्नरूप. २ सन्मुखपणा. ३ शेवटचा. ४ मागें सांगितलेल्या दोहींहून वेगळा. ५ अधिक. ६ किरण. ७ वेगळा. ८ पूर्णत्व. ९ आहे किंवा नाहीं हेंही समजत नाहीं. १० घाबरे. ११ मिळालें असतां. १२ किनाऱ्यावरच्यानें. १३ पलीकडच्याच्या.

ह्मणौनि पुरुष क्षराक्षर । दोन्ही देखोनि अवर । यातें ह्मणती पर । आत्मरूप ॥ ३९ ॥ अर्जुना ऐसिया परी । परमात्मा शब्दवरी । सूंचिजे गा अवधारीं । पुरुषोत्तम ॥ ५४० ॥ येन्हवीं न वोलणेनि वोलणें । जेथिचें सर्व नेणिवा जाणणें । कांहींच न होनि होणें । जे वस्तु गा ॥ ४१ ॥ सोहं तेही अस्तवलें । जेथ सांगतेंचि सांगणें जालें । द्रष्टृत्वेंसी गेलें । देखणें जेथ ॥ ४२ ॥ आतां बिंबा आणि प्रतिबिंबा- । माजि कैंची हें ह्मणों नये प्रभा । जन्ही कैसेनि हे लाभा । जायेचिना ॥ ४३ ॥ कां घ्राणा फुला दोहीं । द्रुती असे माझारिला ठायीं । ते न दिसे तरी नाहीं । ऐसें बोलों नये ॥ ४४ ॥ तैसें द्रष्टा दृश्य हें जाये । मग कोण ह्मणे काय आहे । हेंचि अनुभवें तेंचि पाहे । रूप तया ॥ ४५ ॥ [य ईश्वरः] जो प्रकाश्येंवीण प्रकाश । जो ईशितव्येंवीण ईश । आपणेंनीचि अवकाश । वसवीत असे जो ॥ ४६ ॥ जो नादें ऐकिजता नाद । स्वादें चाखिजता स्वाद । जो भोगीजतसे आनंद । आनंदेंचि ॥ ४७ ॥ जो पूर्णतेचा परिणाम । पुरुष गा सर्वोत्तम । विश्रांतीचाही विश्राम । विराला जेथें ॥ ४८ ॥ सुखासी सुख जोडलें । जें तेजासि सांपडलें । शून्यही बुडालें । महाशून्यीं जिये ॥ ४९ ॥ जो विकासाही वरी उरता । ग्रासातें ही ग्रासूनि पुरता । जो बहुतें पाडें बहुतां । पासूनि बहु ॥ ५५० ॥ [लोकत्रयमाविश्य] पैं नेणतयाप्रती । रुपेपणाची प्रतीती । रुपें न होनि शुक्ती । दावी जेवीं ॥ ५१ ॥ कां नाना अलंकारदशे । सोनें न लपत लपालें असे । विश्व न होवोनियां तैसें । [विभर्ति] विश्व जो धरी ॥ ५२ ॥ हें असो जल तरंगा । नाहीं सिनानपण जेविं गा । तेविं सत्ताप्रकाश जगा । आपणचि जो ॥ ५३ ॥ आपलिया संकोचे विकाशा । आपणचि रूप वीरेशा । हा जळीं चंद्र ह्मन जैसा । समग्र गा ॥ ५४ ॥ तैसा विश्वपणें कांहीं होये । ना विश्वलोपीं केंहीं जाये । जैसा रात्रि दिवसें नोहे । द्विधा रवि ॥ ५५ ॥ [अव्ययः] तैसा कांहींचि कोणीकडे । कायिसेनिहि वेंचीं न पडे । जयाचें सांगडें । जयासीचि ॥ ५६ ॥

**"आतां जनामध्यें अन्यथा ज्ञानानें प्राप्त होणाऱ्या ज्या ह्या दोन (स्वप्न व जागृति) अवस्था, त्या गर्द अज्ञानतत्वामध्यें लय पावतात. ५२६ तें अज्ञान ज्ञानामध्यें बुडून गेलें; ज्ञानानें सन्मुखपणा पतकरला; ह्मणजे अग्नि जसा काष्ठ**

१ अलीकडचे. २ ओळखावा. ३ जाणतां येतच नाहीं. ४ नाकाच्या. ५ सुगंध. ६ कशानेंही जरी अनुभवास येत नाहीं तरी हेंचि अनुभवानें पाहणें तेंच त्याचें रूप. ७ उदयावर. ८ वेगळेपणा. ९ अस्त. १० उदय. ११ आकार. १२ तुलना.

जाळून स्वतःही जळून जातो, ५२७ त्याप्रमाणें ज्ञान अज्ञानास घेऊन जाणारें स्वतः परब्रह्मांशीं गांठ घालून देणारें, असें जाणण्याशिवाय राहणारें जें जाणतें, (ज्ञान) ५२८ तें तो उत्तम पुरुष होय. तोच तिसरा किंवा शेवटचा. मागें जे दोन सांगितले, त्याहून निराळा. ५२९ अर्जुना! सुषुप्ति आणि स्वप्नापासून जागृति ही ज्याप्रमाणें अतिशय निराळ्याच बोधाची; ५३० किंवा किरणापासून आणि मृगजळापासून सूर्यमंडळ जसें फार दूर—अगदीं वेगळें—त्याप्रमाणें उत्तम पुरुष हा वेगळाच आहे. ५३१ हें ह्मणा, किंवा लांकडांतील अग्नि जसा लांकडापासून निराळा तसा क्षराक्षरापासून तोही निराळा आहे. ५३२ आपली मर्यादा खाऊन टाकून नदीनदांना एक करून कल्पांतींच्या महासागराला जसें पूर्णत्व येतें, ५३३ त्याप्रमाणें स्वप्नही नव्हे, आणि सुषुप्तिही नव्हे. जागृतीची ही गोष्ट असत नाहीं. प्रलयतेजानें जशी दिवस आणि रात्र गिळून टाकावी, ५३४ ह्मणजे मग एकपणाही नाहीं, आणि दुजेपणाही नाहीं. आहे किंवा नाहीं, हेंही समजत नाहीं. जेणेंकरून अनुभवही नष्ट झाल्याप्रमाणें दिपून जातो. ५३५ असें जें कांहीं आहे, तें तो उत्तम पुरुष असें समज. त्यालाच परमात्मा ह्या नांवानें बोलतात. ५३६ अर्जुना! तेंही येथें मिळालें नसतां (त्याची प्राप्ती झाल्याशिवाय) जीवत्वानें बोलणें ह्मणजे तीराला उभे राहणाऱ्यानें बुडण्याच्या गोष्टी कराव्यात, ५३७ त्याप्रमाणें अर्जुना! विवेकाच्या कांठावर उभे राहून, वेद आलीकडच्या तीरावरून पलीकडच्या गोष्टी करतात. ५३८ ह्मणून क्षराक्षर हे दोन्ही पुरुष आलीकडचे आहेत असें पाहून आत्मस्वरूप तें अगदीं 'पर' ह्मणजे वेगळें आहे असें ह्मणतात. ५३९ अर्जुना! अशा रीतीनें परमात्मा ह्या शब्दानें पुरुषोत्तम ओळखावा. ध्यानांत ठेव. ५४० बाकी, न बोलण्यानेंच जें भलें वर्णन करावयाचें, अज्ञानानेंच जेथलें सर्व जाणावयाचें; कांहींच न होऊन (तद्रूपता) होणारी जी वस्तु; ५४१ सोहं तेंही जेथें अस्तास जातें; सांगणाराच सांगणें होतो; जेथें देखणें तेंच द्रष्टत्व होऊन रहातें; ५४२ आतां बिंबामध्यें आणि प्रतिबिंबामध्यें ही प्रभा कोठची हें सांगतां येत नाहीं तरी, ती नाहीं ह्मणवत नाहीं. ५४३ किंवा नाक आणि फूल ह्या दोहोंच्या मध्यें वास असतो. तो दिसत नाहीं तरी, नाहीं ह्मणतां येत नाहीं. ५४४ तसेंच द्रष्टा आणि दृश्य हें नातेंच नाहींसें होतें. मग कोण आणि काय आहे ह्मणणार? हें अनुभवानें पहाणें, तेंच त्याचें रूप होय. ५४५ जो प्रकाशावांचून प्रकाश; जो ईशपणावांचून ईश; जो आपला आपणच अवकाश वसवितो. ५४६ जो नादानें ऐकावयाचा नाद; स्वादानें चाखावयाचा स्वाद; जो आनंदानेंच आनंद भोगावयाचा; ५४७ जो पूर्णतेचा शेवट; जो पुरुषांतील सर्वोत्तम पुरुष; विश्रांतीचाही विश्राम जेथें विराम पावतो; ५४८ सुखाला सुख जोडतें; तेजाला तेज प्राप्त होतें; ज्या महाशून्यामध्यें शून्यही लोपून जातें; ५४९ जो विस्तारावरही उरणारा; ग्रासालाही ग्रासून परिपूर्ण अगाध योग्यतेनें बहुताहूनही बहुत; ५५० ज्याप्रमाणें शिंपी ही रुपें नसून अज्ञान्याला रुपेंपणाची प्रतीति दाखविते, ५५१ किंवा नानाप्रकारच्या अलंकारस्वरूपांमध्यें सोनें न लोपतां लोपलेलें असतें, त्याप्रमाणें आपण विश्व न होतां जो विश्व धारण करतो. ५५२ हें असो. जल आणि लाटा ह्यांना जसा वेगळेपणा नाहीं, तसा जगाला सत्ता आणि प्रकाश जो आपणच; ५५३ हे वीरश्रेष्ठा! आपल्या संकोचाला आणि विकासाला आपलाच आकार कारण होतो; किंवा जलामध्यें जसा संपूर्ण चंद्र; ५५४ त्याप्रमाणें विश्वपणाच्या योगानें तो कांहीं होत नाहीं; किंवा विश्व लयास गेलें ह्मणून तो कोठेंही जात नाहीं; ज्याप्रमाणें रात्रीमुळें किंवा दिवसामुळें, सूर्य कांहीं दोन प्रकारचा होत नाहीं; ५५५ त्याप्रमाणें कशानेंही कोणीकडे कांहींच खर्ची पडत नाहीं. त्याची योग्यता त्यालाच." ५५६

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥१८॥

[यस्मात्] जो आपणपेंचि आपणया । प्रकाशीतसे धनंजया । काय बहु बोलों जया । नाहीं दुजें ॥ ५७ ॥ [अतोऽस्मि] तो गा मी निरुपाधिक । [क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः] क्षराक्षरोत्तम एक । [लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः] ह्मणोनि ह्मणे वेद लोक । पुरुषोत्तम ॥ ५८ ॥

**" धनंजया ! तो आपला आपल्यासच प्रकाशित करतो. फार काय सांगावें ? त्याला दुसरेंपण ह्मणून नाहीं. ५५७ अरे ! तो मी निरुपाधिक; क्षर अक्षराहून उत्तम; अद्वितीय; ह्मणून वेद आणि लोकही मला पुरुषोत्तम असें ह्मणतात." ५५८**

यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ।
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥

[यो मामेवं] परि हें असो ऐसिया ।[पुरुषोत्तमं] मज पुरुपोत्तमातें धनंजया । जाणे जो पांहलेया । ज्ञानमित्रें ॥ ५९ ॥ [असंमूढः] चेइलिया आपुलें ज्ञान । जैसें नाहींचि होय स्वप्न । तैसें स्फुरतें त्रिभुवन । वावो जालें ॥५६०॥ कां हातीं घेतलिया माळा । फिटे सर्पाभासाचा कंटाळा । तैसा माझेनि बोधें टवाळा । नागवे तो ॥ ६१ ॥ [जानाति] लेणें सोनेंचि जो जाणे । तो लेणेंपण तें वाव ह्मणे । तेविं मीं जाणोनि जेणें । वांळिला भेद ॥ ६२ ॥ [स सर्ववित्] मग ह्मणे सर्वत्र सच्चिदानंद । मीचि एक स्वतःसिद्ध । जो आपणेनसीं भेद । नेणोनि जाणे ॥ ६३ ॥ तेणेंचि सर्व जाणितलें । हेंही ह्मणणें थेंकुलें । जें तया सर्वत्र उरलें । द्वैत नाहीं ॥ ६४ ॥ [भजति मां] ह्मणोनि माझिया भजना । उचित तोचि अर्जुना । गगन जैसें आलिंगना । गगनाचिया ॥ ६५॥ क्षीरसागरा परगुणें । कीजे क्षीरसागरचिपणें । अमृतचि होऊन भिळणें । अमृतीं जेविं ॥ ६६ ॥ साडेपंधरा मिसळावें । तें साडेपंधरेंचि होआवें । तेविं मी जालिया संभवे । भक्ति माझी ॥ ६७ ॥ हां गा सिंधूसि आनी होती । तरि गंगा कैसेनि मिळती । ह्मणौनि मी न होतां भक्ती । अन्वय आहे ॥ ६८ ॥ [सर्वभावेन भारत] ऐसियालागीं सर्व प्रकारीं । जैसा कल्लोळ अनन्य सागरीं । तैसा मातें अवधारीं । भजिनला जो ॥ ६९ ॥ सूर्या आणि प्रभे । ऐकवंकी जेणें लोभें । तो पाड मानूं लाभे । भजना तया ॥ ५७० ॥

**" पण अर्जुना ! हें असो. अशा मला पुरुषोत्तमाला ज्ञानरूप सूर्योदयानें जो पहातो, ५५९ आपलें ज्ञान जागृत झालें ह्मणजे ज्याप्रमाणें स्वप्न नाहींसें होतें, त्याप्रमाणें स्फुरण पावणारें त्रिभुवनही मिथ्या होतें. ५६० किंवा माळा हातांत घेतली ह्मणजे सर्पाभासाचा त्रास चुकतो; त्याप्रमाणें माझा ज्याला बोध झाला, तो ह्या मिथ्या जगापासून सुटतो. ५६१ अलंकार हें सोनेंच आहे असें जो जाणतो, तो अलंकारत्व व्यर्थ आहे असें ह्मणतो. त्याप्रमाणें मला जाणून ज्यानें भेद टाकून दिला, ५६२ तो मग ह्मणतो कीं, सर्वत्र एक सच्चिदानंद स्वतः सिद्ध मीच आहे, असें जो आपणा सुद्धां भेद न जाणतां ओळखतो, ५६३ त्यानेंच सर्व जाणलें. हें ह्मणणेंही गौणच. कारण, त्याला कोठेंच द्वैत राहिलेलें नसतें. ५६४ ह्मणून अर्जुना ! गगनाच्या आलिंगनाला जसें गगनच योग्य, त्याप्रमाणें माझ्या भजनाला तोच उचित होय. ५६५ क्षीरसागराला मेजवानी करणें तर, क्षीरसागरासारख्यानेंच केली पाहिजे. अमृतानेंच जसें अमृत होऊन मिळावें, ५६६ साडे पंधरांशीं मिश्र व्हावें, तेव्हांच साडे पंधरांचें सोनें होईल. त्याप्रमाणें मत्स्वरूप झालें तरच माझी भक्ति मिळण्याचा संभव असतो. ५६७ गंगा जर समुद्राहून भिन्न असती, तर ती समुद्राला मिळली असती कां ? ह्मणून मी न होतां भक्ति मिळणेंही दुर्लभ आहे. ५६८ ह्याकरितां लाटा जशा सर्व प्रकारें समुद्ररूप असतात, त्याप्रमाणें मला जो भजतो; तो सर्व प्रकारें मद्रूप असतो; हें ध्यानांत असूं दे. ५६९ सूर्यामध्यें आणि प्रभेमध्यें जितका ऐक्यभाव आहे, तितक्याच तोडीची त्याच्या भजनाची योग्यता आहे." ५७०**

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥२०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽध्यायः १५

---

१ जन. २ उजाडलेल्या. ३ जागृत झाला असतां. ४ व्यर्थ. ५ भय, त्रास. ६ मिथ्याजगास. ७ टाकिला. ८ कमीच. ९ पाहुणचार. १० दुर्लभ. ११ एकाकार.

[इति गुह्यतमं] एवं कथिलयादारभ्य । जें हें सर्वशास्त्रै-कलभ्य । उपनिषदां सौरभ्य । कमळदळां जेविं ॥ ७१ ॥ हें शद्वब्रह्माचें मथितें । श्रीव्यासप्रज्ञेचेनि हातें । मथूनि काढिलें आयितें । सार आह्मीं ॥ ७२ ॥ जे ज्ञानामृताची जान्हवी । जे आनंदचंद्रींची सतरावी । विचारक्षीरार्णवींची नवी । लक्ष्मी जे हे ॥ ७३ ॥ ह्मणोनि आपुलेनि पदें वर्णे । अर्थाचेनि जीवेंप्राणें । मी वांचोनि हो नेणें । आन कांहीं ॥ ७४ ॥ क्षराक्षरत्वें समोर जाले । तयांचें पुरुषत्व वोळिलें । मग सर्वस्व मज दिधलें । पुरुषोत्तमीं ॥ ७५ ॥ [शास्त्रं] ह्मणौनि जगीं गीता । मियां आत्मेनि पतिव्रता । जे हे प्रस्तुत तुवां आतां । आकर्णिली ॥ ७६ ॥ [इदं] साचचि बोलावें नव्हे हें शास्त्र । पैं संसार जिणे तें शस्त्र । आत्मा अवतरवी ते मंत्र । अक्षरें इयें ॥ ७७ ॥ [उक्तं मया] परि तुजपुढां सांगीतलें । तें अर्जुना ऐसें झालें । [गुह्यतमं] जें गौप्यधन काढिलें । माझें आजि तुवां ॥ ७८ ॥ मज चैतन्यशंभूचा माथा । जो निक्षेप होता पार्था । तया गौतम जालासि आस्थां । निधी तूं गा ॥ ७९ ॥ चोखटिवा आपुलिया । पुढिला उगाणा घेया-वया । तया दर्पणाचीचि परी धनंजया । केली आह्मां ॥५८०॥ कां भरलें चंद्रतारांगणीं । नभ सिंधु आपणयामाजी आणी । तैसा गीतेसीं मी अंतःकरणीं । सुंदला तुवां ॥ ८१ ॥ [अनघ] जे त्रिविधमळकटा । तूं सांडलासि सुभटा । ह्मणौनि गीतेसीं मज वैसौटा । जालासि गा ॥ ८२ ॥ [एतद्बुध्वा] परि हे बोलों काय गीता । जे हे माझी उन्मेषलता । जाणे तो समस्ता । मोहा मुके ॥ ८३ ॥ सेविली अमृतसरिता । रोग दवडूनि पंडुसुता । अमरपण उचितां । देऊनि घाली ॥ ८४ ॥ तैसी गीता हे जाणितलिया । काय विस्मय मोह जावया । [बुद्धिमान् स्यात्] परि आत्मज्ञानें आपणपयां । मिळिजे जेथ ॥ ८५ ॥ जया आत्मज्ञानाच्या ठायीं । कर्म आपुलेया जीवितें पाही । होऊनियां उतराई । लया जाय ॥ ८६ ॥ हरपलें दावुनि जैसा । माग सरे वीरविलासा । ज्ञानचि कळस वेळघे तैसा । कर्मप्रासादाचा ॥ ८७ ॥ [कृत-कृत्यश्च भारत] ह्मणौनि ज्ञानिया पुरुषा । कृत्य करूं सरलें देखा । ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ॥ ८८ ॥ तें श्रीकृष्णवदनामृत । पार्थी भरोनि असे वोसंडत । मग व्यास-कृपा प्राप्त । संजयासी ॥ ८९ ॥ तो धृतराष्ट्रराया । सूतसे पान करावया । ह्मणौनि जीवितांतया । नोहेचि भारी ॥५९०॥ येऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं । आवडों लागतां अन-धिकारी । परि सेवीं तेचि उंजरी । पातला भली ॥ ९१ ॥ जेव्हां द्राक्षीं दूध घातलें । तेव्हां वायां गेलें गमलें । परि फळपाकीं दुणावलें । देखिलें जेविं ॥ ९२ ॥ तैसीं श्रीहरी-वक्रींचीं अक्षरें । संजयें सांगीतलीं आदरें । तिहीं अंधु तोही अवसरें । सुखिया जाला ॥ ९३ ॥ तेंचि मऱ्हाटेनि विन्यासें । मियां उन्मेषें ठसेंठोंवसें । जी जाणें नेणे तैसें । निरोपिलें ॥ ९४ ॥ सेवंतीये अरसिकांहीं । आंग पाहतां विशेष नाहीं । परि सौरभ्य नेलें तिहीं । भ्रमरीं जाणिजे ॥ ९५ ॥ तैसें घडतें प्रमेय घेइजे । उणें तें मग देइजे । जें नेणणें हेंचि सहजें । रूप कीं बाळा ॥ ९६ ॥ तरि नेणतें जऱ्ही होये । तऱ्ही देखोनि बाप कीं माये । हर्ष केंही न समाये । चोज करिती ॥ ९७ ॥ तैसें संत माहेर माझें । तुह्मीं मिनलिया मी लाडें जें । तेंचि ग्रंथाचेनि व्याजें । जाणिजो जी ॥ ९८ ॥ आतां विश्वात्मक माझा । स्वामी श्रीनिवृत्तिराजा । तो अंव-धारू वाक्य पूजा । ज्ञानदेव ह्मणे ॥ ५९९ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां

पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

श्लोक २०, ओव्या ५९९.

**"अशा प्रकारें ह्या अध्यायाच्या आरंभापासून केलेलें कथन, जें केवळ शास्त्रानेंच प्राप्त हो-णारें, कमलदलाच्या सुगंधाप्रमाणें जें उपनि-षदाचा सुवास; ५७१ हें वेदाचें मंथन केलेलें नवनीत; श्रीव्यासबुद्धीच्या हातानें जें सार आह्मीं आयतेंच काढून घेतलेलें; ५७२ जें ज्ञानामृताची भागीरथी; जें आनंदचंद्राची सतरावी कला; जें विचाररूप क्षीरसागरांतील नवी लक्ष्मी; ५७३ ह्मणून आपल्या पदानें किंवा वर्णानें, अर्थाच्या जीवप्राणेंकरूनही माझ्याशिवाय दुसरें कांहीं होऊं जाणत नाहीं. ५७४ क्षराक्षरानें प्रगट झालेले जे त्यांनीं, पुरु-षत्व टाकून दिलें ह्मणजे मग ते आपलें सर्वस्व मला पुरुषोत्तमाला देतात. ५७५ ह्मणून तूं आतां जी ऐकलीस ती गीता, माझ्याशीं—आ-**

१ पंधराव्या अध्यायाच्या आरंभापासून. २ केवळ शास्त्रानेंच प्राप्त होणारें. ३ सुवास. ४ नवनीत, सार. ५ गीतेच्या. ६ प्रेमानें. ७ होऊं. ८ स्पष्ट. ९ टाकलें. १० जिंकणारे. ११ प्रकट करते. १२ जीवशिवांचा. १३ गं-गारूप ठेवा. १४ इच्छेनें. १५ चांगुलपणास. १६ अनुभव. १७ घातला. १८ काम, क्रोध व लोभ. १९ आश्रय. २० ज्ञानवल्ली. २१ निष्कर्म होय. २२ सर्व वीरांचें विलास-स्थान अशा अर्जुना. २३ चढे. २४ सांडत.

१ देत असे. २ जीवितांतसमर्यी, प्राणांतीं. ३ हवा तो, वाटो. ४ उत्कर्ष. ५ द्राक्षाचे घोंस आल्यावर, परिणामीं. ६ धृतराष्ट्र. ७ निरूपणें. ८ लहानमोठें. ९ सिद्धांत. १० कौ-तुक, नवल. ११ मिळालेत. १२ ऐको.

त्म्याशीं–पतिव्रताधर्मानें-एकनिष्ठेनें राहते. ५७६ खरोखर हें केवळ शब्दांचेंच शास्त्र नव्हे, तर संसार छेदण्याचें शस्त्र आहे. ह्यांच्यांतील अक्षरें हीं आत्म्याला प्रगट करण्याचे मंत्रच आहेत. ५७७ पण **अर्जुना!** ते तुझ्यापुढें सांगितल्यामुळें, तूं आज माझें गुप्तधन घेतल्याप्रमाणें झालें. ५७८ **पार्था!** माझ्या जीवशिवाच्या माथ्यावर जो गंगारूप ठेवा होता त्याला तूं आस्थानिधि असा गौतम झालास. ५७९ हे **धनंजया!** पुढचा अनुभव घेण्यासाठीं आह्मांला तूं आज आरसाच झालास. ५८० चंद्र तारांगणांनीं भरलेलें आकाश, समुद्र जसा आपणामध्यें आणतो, त्याप्रमाणें गीतेसहवर्तमान मला तूं आपल्या अंतःकरणांत सांठविलेस. ५८१ कारण, हे **वीरश्रेष्ठा!** तूं काम, क्रोध, लोभ हे तीन मूळ झाडून टाकलेस, ह्मणून गीतेला आणि मलाही आश्रय झालास. ५८२ पण ही गीता काय सांगावी? कारण, ही माझी ज्ञानवल्ली आहे. ती जो जाणतो, तो सर्व मोहापासून मुक्त होतो. ५८३ **अर्जुना!** अमृताच्या नदीचें सेवन केलें तर ती सर्व रोगास बाहेर घालवून उचित असें अमरत्व देते, ५८४ त्याप्रमाणें ही गीता जाणली असतां मोह जाईल ह्यांत आश्चर्य तें कोणतें? तर ह्या ठिकाणीं आत्मज्ञानानें आत्मस्वरूपांतच आपण तल्लिन होतो. ५८५ ज्या आत्मज्ञानाच्या ठिकाणीं, कर्म हें आपला सारा देहच ओंवाळून टाकून लयास जातें. ५८६ हे **वीरविलासा!** सांडलेलें दाखवून देऊन माग जसा नाहींसा होतो, त्याप्रमाणें कर्मरूप राजवाड्याचा ज्ञान हेंच कळस होऊन रहातें. ५८७ ह्मणून ज्ञानी पुरुषाचें कर्म करावयाचेंच संपतें. समजलास?" ह्याप्रमाणें अनाथाचा सखा जो **श्रीकृष्ण** तो बोलला. ५८८ हें **श्रीकृष्णाच्या** तोंडांतून निघालेलें अमृत, **अर्जुनामध्यें** भरून आणखी खालीं सांडूं लागलें. तें **व्यासाच्या** कृपेनें संजयाला मिळालें. ५८९ तो तें **धृतराष्ट्र** राजाला प्राशन करावयाला देऊं लागला. ह्मणून त्याचें जीवित वांचलें होतें. ५९० बाकी गीता श्रवण करावयाच्या वेळीं, तो अनधिकारी असें वाटेल तर वाटो. पण शेवटीं तोच उत्तम रीतीनें ताळ्यावर आला आहे. ५९१ द्राक्षीला दूध घालावें, तेव्हां तें व्यर्थ गेलें असें वाटतें. पण तेंच, फळें पक्वदशेस आलीं असतां दुणावलेलें दृष्टीस पडतें. ५९२ त्याप्रमाणें **श्रीहरीच्या** तोंडचीं अक्षरें **संजयानें** परमादरानें सांगितलीं. त्यांच्या योगानें तो सुद्धां शेवटीं संतोष पावला. ५९३ तेच महाराज! मी मऱ्हाटी निरूपणानें–लहान मोठ्या ज्ञानानें–समजलें न समजलें तसें निरूपण केलें. ५९४ शेवतीच्या आंगाकडे अरसिकानें पाहिलें, तर त्यांत विशेष दिसत नाहीं. पण त्यांतील परिमळ असेल तो भ्रमर जाणतो, आणि घेऊनही जातो. ५९५ त्याप्रमाणें असलेला अर्थ घ्यावा; कमी असेल तो मला सांगावा; नेणणें हें बाळाचें साहजिकच रूप आहे. ५९६ तें जरी नेणतें असलें तरी, त्याला पाहून बापाचा किंवा आईचा हर्ष कोठेंही न राहतां, त्याचें कौतुकच करतात. ५९७ त्याप्रमाणें संतहो! तुह्मी माझे मायबाप आहांत. तुह्मी मिळालांत ह्मणजे मी लाडानें बोलतों. तेंच ग्रंथाच्या निमित्तानें समजावें. ५९८ **ज्ञानदेव** ह्मणतात 'आतां विश्वात्मक माझा स्वामी जो **श्रीनिवृत्तिराजा**, तो माझी वाक्यरूप पूजा घेवो.' ५९९

**पंधरावा अध्याय समाप्त.**

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी

## अध्याय १६ वा.

मावळवीत विश्वाभास । नवल उदयला चंडांश । [1]अद्वयाब्जिनीविकाश । वंदूं आतां ॥ १ ॥ जो [2]अविद्याराती रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां । जो सुदिन करी ज्ञानियां । [3]स्वबोधाचा ॥ २ ॥ जेणें [4]विवळतिये सवळे । [5]लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे । सांडिती देहाहंतेचीं [6]अविसाळें । जीवपक्षी ॥ ३ ॥ [7]लिंगदेह कमळाचा । पोटीं [8]वेर्चे तया [9]चिद्भ्रमराचा । [10]बंदि [11]मोक्ष जयाचा । [12]उदैलीं होय ॥ ४॥ [13]शब्दाचिया [14]आसकडीं । [15]भेदनदीच्या दोहीं थडीं । आरडत विरहवेडीं । [16]बुद्धिबोध ॥ ५ ॥ तया चक्रवाकांचें मिथुन । [17]सामरस्याचें समाधान । भोगवी जो [18]चिद्गगन । भुवनदिवा ॥ ६ ॥ जेणें [19]पाहालिये पाहांटे । भेदाची [20]चोरवेळी फिटे । रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ॥ ७ ॥ जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेखसूर्यकांत फुणगे । दीपले जाळिती [21]दांगें । संसाराचीं ॥ ८ ॥ [22]जैयाचा रश्मिपुंज [23]निबरें । होतां [24]स्वरूप [25]उखरीं स्थिर । ये महासिद्धीचा पूर । मृगजळ तें ॥ ९ ॥ जो [26]प्रत्यग्बोधाचिया माथया । सोहंतेचा मध्यान्ही आलिया । लपे आत्मभ्रांति छाया । आपणपां तळीं ॥ १० ॥ ते वेळीं विश्वस्वप्नासहितें । कोण [27]अन्यथामती निद्रेतें । सांभाळी जुरेचि जेथें । मायाराती ॥ ११ ॥ म्हणौनि अद्वयबोध[28]पाटणीं । तेथ महानंदाची दाटणी । मग [29]सुखानुभूतीचीं घेणीं देणीं । [30]मंदावों लागती ॥ १२ ॥ किंबहुना ऐसैसें । मुक्तकैवल्य सुदिवसें । सदां लाहिजे कां प्रकाशें । जयाचेनि ॥ १३ ॥

जों निजधामव्योमींचा रावो । [1]उदैलाचि उदैजत खेंवो । फेडी [2]पूर्वादिदिशांसि ठावो । [3]उदयास्ताचा ॥ १४ ॥ नें दिसणें दिसणेंनेसीं मावळवी । [4]दोहीं झांकिलें तें सैंघ [5]पालवी । काय बहु बोलों ते आघवी । [6]उखाचि आनी ॥ १५ ॥ तो अहोरात्रांचा पैलकड । कोणें देखावा ज्ञानमार्तंड । जो [7]प्रकाश्येंवीण [8]सुरवाड । प्रकाशाचा ॥१६॥ तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमोचि म्हणों पुढतपुढती । जे [9]बाधका येइजतसे स्तुती । बोलोंचिया ॥ १७ ॥ देवाचें महिमान पाहोनियां । स्तुती तरि येइजे [10]चांगावया । जरि [11]स्तव्यबुद्धीसीं लया । जाइजे कां ॥ १८ ॥ जो सर्वनेणिवां जाणिजे । मौनाचिया मिठीया वानिजे । कांहींच न होनि जाणिजे । आपणपयां जो ॥ १९ ॥ जया तुझिया उद्देशासाठीं । [12]परश्यंती मध्यमा पोटीं । [13]सूनि परेसीही पाठीं । वैखरी विरे ॥ २० ॥ तया तूतें मी सेवकपणें । लेववीं बोलकेया स्तोत्राचें लेणें । हें [14]उपसाहावेंही म्हणतां उणें । अद्वयानंदा ॥ २१ ॥ परि [15]रंकें अमृताचा सागर । देखिलिया पडे [16]उचिताचा विसर । मग करूं धांवे पाहुणेर । शाकांचा तया ॥ २२ ॥ तेथ शाकही कीर बहुत म्हणावा । तयाचा हर्षवेगचि तो घ्यावा । उंजळोनि दिव्य तेजा [17]हातिवां । ते भक्तीचि [18]पाहावी ॥ २३ ॥ बाळा [19]उचितें जाणणें होये । तरि नाळपणचि कें आहे । परि साचचि येरी माये । म्हणोनि तोषे ॥ २४ ॥ हां गा [20]गांवरसें भरलें । पाणी पाठीं पाय देत आलें । तें गंगा काय म्हणीतलें । परतें सर ॥ २५ ॥ जी भृगूचा कैसा [21]अपकार । कीं तो मानुनि प्रियोपचार । काय तोपेचि ना शार्ङ्गधर । गुरुत्वासी

१ अद्वैतरूप कमलिनीचा प्रकाश करणारा. २ अविद्यारूप रात्र दूर करून. ३ आत्मबोधाचा. ४ उजाडल्यावर होणाऱ्या प्रातःकाळीं. ५ प्राप्त होऊन. ६ घरटीं. ७ वासनात्मक सूक्ष्मदेह. ८ मरण. ९ जीवचैतन्य भ्रमराचा. १० बंधन झालें असतां. ११ सुटका. १२ उदयानें. १३ बुद्धीला मोह करणाऱ्या शास्त्रादिकांच्या. १४ अडचणीच्या जाग्यांत. १५ जीवेश्वर या विषयींची भिन्नबुद्धी. १६ जीव, ईश्वर. १७ ऐक्याचें. १८ ब्रह्मरूप आकाश. १९ उजाडलेली. २० चोरवेळ. २१ अरण्यें. २२ ज्ञानसूर्याचा. २३ तीव्र. २४ आत्मस्वरूप. २५ अज्ञानरूप माळजमिनीवर. २६ आत्मबोधाच्या. २७ विपरीत ज्ञान. २८ शहरांत. २९ आनंदानुभवाचीं. ३० बंद पडतात.

१ नेहमीं उदय पावलेलाच आहे. २ पूर्वादि दिशांसह उदयास्त नाहींसे करितो. ३ अज्ञान ज्ञानासकट. ४ नामरूपांनीं. ५ प्रकटवी. ६ दुसराच प्रातःकाळ. ७ प्रकाशित होणाऱ्या पदार्थांवांचून. ८ सुकाळ. ९ कारण, स्तुति म्हटली म्हणजे बोलाची बाधकता (उपाधि लागते). १० चांगुलपणाला. ११ गुरुस्तवन करण्यास योग्य अशा बुद्धीसहित. १२ चार वाणींतील दुसरी. १३ पाठीमागें घालून. १४ सहन करावें. १५ भिकाऱ्यानें. १६ योग्याचा. १७ काढवात. १८ पाहविती. १९ योग्यपणानें. २० गटाराचें पाणी. २१ लत्ताप्रहार, अन्याय.

॥ २६ ॥ कीं आंधारें खतेलें अंवर । जालें दिवसनाथा समोर । तेणें तयातें पैऱ्हा सर । ह्मणीतलें काई ॥ २७ ॥ तेंविं भेदबुद्धीचिये तुळे । घालूनि सूर्यश्लेषांचें कांटाळें । तुकिलासि तें येकी वेळे । उपसाहिजो जी ॥ २८ ॥ जिहीं ध्यानाचा डोळां पाहिलासी । वेदादिवाचा वानिलासी । जें उपसाहिलें तयांसीं । तें आह्मांही करीं ॥ २९ ॥ परि मी आजि तुझ्या गुणीं । लांचावलों अपराध न गणीं । भलतें करीं परी अर्धधणीं । नुठी कदा ॥ ३० ॥ मियां गीता येणें नांवें । तुझें पसायामृत सुंहावें । वानूं लाधलों तें दुणेंन थावें । दैवलों दैवें ॥ ३१ ॥ माझिया सत्यवादाचें तप । वाचा केलें बहुत कल्प । तया फळाचें हें महाद्वीप । पातली प्रभु ॥ ३२ ॥ पुण्यें पोशिलीं असाधारणें । तियें तुझें गुण वाणणें । देवुनि मज उत्तीर्णे । जालीं आजि ॥ ३३ ॥ जी जीवित्वाच्या आंडवीं । आंतुडलों होतों मरणगांवीं । ते अवदसाचि आघवी । फेडिली आजी ॥ ३४ ॥ जे गीता येणें नांवें नांवाणिगी । जे अविद्या जिणोनि दांडुगी । ते कीर्ति तुझी आह्मा जोगी । वानावया जाली ॥ ३५ ॥ पैं निर्धनाघरीं वोनिवसें । महालक्ष्मी येऊनि बैसे । तयातें निर्धन ऐसें । ह्मणो ये काई ॥ ३६ ॥ कां अंधकाराचिया ठाया । दैवें सूर्य आलिया । तो अंधकाराचि जगा यया । प्रकाश नोहे ॥ ३७ ॥ जया देवाची पाहातां थोरी । विश्व परमाणुही दशा न धरी । तो भावाचिये सरोवरी । नव्हेचि काई ॥ ३८ ॥ तैसा मी गीता वाखाणीं । हे खपुष्पाची तुरंवणी । परि समर्थें तुवां शिरयाणी । फेडिली ते ॥ ३९ ॥ ह्मणौनि तुझेनि प्रसादें । मीं गीतापद्यें अगाधें । निरूपीन जी विशदें । ज्ञानदेव ह्मणे ॥ ४० ॥ [अध्यायसंगतिः] तरि अध्यायीं पंधरावां । श्रीकृष्णें तया पांडवा । शास्त्रसिद्धांत आघवा । उगाणिला ॥ ४१ ॥ जे वृक्षरूपक परिभाषा । केलें उपाधिरूप अशेषा । सद्वैद्यें जैसें दोषा । अंगलीना ॥ ४२ ॥ आणि कूटस्थ जो अक्षर । दाविला पुरुषप्रकार । तेणें उपहितोंही ओंकार । चैतन्या केला ॥ ४३ ॥ पाठीं उत्तमपुरुष । शब्दाचें करूनि मिष । दाविलें चोख । आत्मतत्त्व ॥ ४४ ॥ आत्मविषयीं आंतुवट । साधन जें आंगेदट । ज्ञान हेंही स्पष्ट । चावळला ॥ ४५ ॥ ह्मणौनि इये अध्यायीं । निरूप्य नुरेचि कांहीं । आतां गुरुशिष्यां दोहीं । स्नेह लाहणा ॥ ४६ ॥ एवं इयेविषयीं कीर । जाणते बुझावले अपार । परि मुमुक्षु इतर । साकांक्ष जाले ॥ ४७ ॥ त्या मज पुरुषोत्तमा । ज्ञानें भेटे जो सुवर्मा । तो सर्वज्ञ तोचि सीमा । भक्तीचीही ॥ ४८ ॥ ऐसें हें त्रैलोक्यनायकें । बोलिलें अध्यायांत श्लोकें । तेथें ज्ञानचि बहुतेकें । वानिलें तोषें ॥ ४९ ॥ भरूनि प्रपंचाचा घोंट । कीजे देखतांचि देखतया दृष्ट । आनंदसाम्राज्यीं पाट । बांधिजे जीवां ॥ ५० ॥ येवढेया लोठेपणाचा उपावो । आन नाहींचि ह्मणे देवो । हा सम्यक् ज्ञानाचा रावो । उपायांमाजि ॥ ५१ ॥ ऐसें आत्मजिज्ञासु जे होते । तिहीं तोषलेनि चित्तें । आदरें तया ज्ञानातें । वोवाळिलें जीवें ॥ ५२ ॥ आतां आवडी जेथ पडे । तयाचि अवसुरी पुढें पुढें । रिगों लागे हें घडे । प्रेम ऐसें ॥ ५३ ॥ ह्मणौनि जिज्ञासूंच्यापैकीं । ज्ञानीं प्रतीति होय ना जंव निकी । तंव योगें क्षेमें ज्ञानविखीं । स्फुरेलचि कीं ॥ ५४ ॥ ह्मणोनि तेंचि सम्यक्ज्ञान । कैसेनि होय स्वाधीन । जालिया वृद्धियत्न । घडेल केविं ॥ ५५ ॥ कां उपजोंचि जें न लाहे । जें उपजलेंही अव्हाटा सूये । तें ज्ञानीं विरुद्ध काय आहे । हें जाणावें कीं ॥ ५६ ॥ मग जाणतया जें विरू । तयाची वाट वाहती करूं । ज्ञानहित तें विचारूं । सर्वभावें ॥ ५७ ॥ ऐसा ज्ञानजिज्ञासु तुह्मी समस्तीं । भाव जो धरिला असे चित्तीं । तो पुरवावया लक्ष्मीपती । बोलिजेल ॥ ५८ ॥ ज्ञानासि सुजन्म जोडे । आपली विश्रांतीहीवरी वाढे । ते संपत्तीचे पवाडे । सांगेल दैवी ॥ ५९ ॥ आणि अज्ञानाचेनि कामाकारें । जे रागद्वेषांसि दे थारें । तिये आसुरियेहि घोरें । करील रूप ॥ ६० ॥ सहज इष्टानिष्टकरणी । दोघीचि इया कवतुकिणी । हे नवमाध्यायीं उभारणी । केली होती ॥ ६१ ॥ तेथ सांउमा घेयावा उवावो । तंव वोडवला आन प्रस्तावो । तरी तया प्रसंगें आतां देवो । निरूपीत असे ॥ ६२ ॥ तया निरूपणाचेनि नांवें । अध्याय पद सोळावें ।

---

१ भरलें. २ पलीकडे हो. ३ उपमेचें. ४ तराजू. ५ तोललास. ६ योग्यांनीं. ७ सवकलों. ८ पाहिजे तें कर. ९ अर्धवट तृप्त. १० सेवावें, आवडतें. ११ दुपट बळानें. १२ दैववान् झालों. १३ गीतानामक द्वीप. १४ आचरिलीं. १५ उतराई. १६ अरण्यांत. १७ सांपडलों. १८ पीडा. १९ नामांकित. २० बळवान्. २१ कौतुकानें. २२ भक्तीची बरोबरी. २३ मिथ्या आकाशपुष्पाची. २४ वास घेणें. २५ उणीव, आवड, हौस. २६ स्पष्ट. २७ सांगितला. २८ संपूर्ण. २९ अंगांत मुरलेला. ३० देहांतील शुद्ध आत्मा. ३१ अविनाशी. ३२ उपाधीला. ३३ स्पष्ट केलें. ३४ अंतरंग.

१ बळकट, घट. २ बोलला. ३ सांगण्याजोगें. ४ प्राप्त झाला. ५ समजले. ६ शंकित. ७ मर्मज्ञ. ८ मर्यादा. ९ बहुधा. १० पट्टाभिषेक. ११ बलाढ्य साधनाचा. १२ खऱ्या, उत्तम. १३ आत्मज्ञानेच्छु. १४ वेळीं. १५ अनुभव. १६ अप्राप्ताची प्राप्ति. १७ प्राप्ताचें संरक्षण. १८ विकल्पादिक. १९ आडवाटीं. २० घालवितें. २१ विघ्न करणारें. २२ जिज्ञासूला. २३ विरुद्ध. २४ शांतीपर्यंत. २५ विवेक वैराग्यादि दैवी संपत्ती. २६ अंकितपणानें. २७ टिकाण देतें. २८ प्रत्यक्ष. (उडें अवकाश घेतां यावा इतक्यांत.) २९ घेतां यावा. ३० विचार. ३१ दुसरा प्रसंग.

लावणी[1] पाहतां जाणावें। मागिलावरी[2] ॥ ६३ परि हें असो आतां प्रस्तुतीं । ज्ञानाच्या हिताहितीं । समर्था संपत्ती । इयाचि दोन्ही ॥ ६४ ॥ जे मुमुक्षुमार्गीची बोळावी[3] । जे मोहरात्रीची धर्मदिवी[4] । ते आधीं तंव दैवी । संपत्ति ऐका ॥ ६५ ॥ जेथ एक एकातें पोखी । ऐसे बहुत पदार्थ येकीं[5] । संपादिजती[6] तें[7] लोकीं । संपत्ति ह्मणिजे ॥ ६६ ॥ ते दैवी सुखसंभवी । तेथ दैवगुणें येकोपजीवी[8] । जाली ह्मणौनि दैवी । संपत्ती हे ॥६७॥

**विश्वाभास अस्तास नेणारा, अद्वैतरूप कमलिनीचा विकास करणारा, असा अद्भुत उदय पावणारा जो सूर्य, त्याला आतां वंदन करूं. १ जो अविद्यारूप रात्रीला दूर करून, ज्ञानाज्ञानरूप चांदण्या गिळून टाकतो; जो ज्ञानी जनांना आत्मबोधाचा सुदिन करून सोडतो; २ ज्याची प्रातःकाळ झाली ह्मणजे जीवरूप पक्ष्याला आत्मज्ञानाचे डोळे येतात; आणि ते देह अहंतारूप घरटीं सोडून देतात. ३ ( वासनारूप ) लिंगदेहरूप कमळाच्या पोटांत जीव चैतन्यरूप भ्रमर बंदी पडून त्याला मरणसमय प्राप्त होतो, पण ज्याच्या उदयानें त्याची मुक्तता होते. ४ बुद्धीला मोह पाडणाऱ्या शास्त्रादिकांच्या अडचणीच्या जागेत, जीवेश्वराविषयीं भिन्न बुद्धीरूप नदीच्या दोन्हीं तीरांवर बुद्धिबोधविरहानें वेडावून आरडत बसणाऱ्या, ५ चक्रवाक पक्ष्यांचें मिथुन जें ऐक्याचें समाधान तें, जो चिद्गगनभुवनदिवा भोगवितो; ६ ज्याच्या तेजाच्या पहाटेनें भेदाच्या चोरवाटा नाहींशा होतात; व योगीरूप पांथ आत्मानुभावाच्या वाटेला लागतात; ७ ज्याच्या विवेकरूप किरणांच्या संगतीनें ज्ञानरूप सूर्यकांत प्रदीप्त होतो; आणि आपल्या तेजानें संसारारण्यें भस्म करून सोडतो, ८ ज्याचा किरणसमुदाय प्रखररूपानें आत्मस्वरूपरूपीं—माळ जमिनीवर स्थीर होतांच, महासिद्धींचा पूर येतो; तें मृगजळ होय. ९ जो आत्मबोधाच्या माथ्यावर सोहंतेच्या मध्यान्हीला आला ह्मणजे आत्मभ्रांतिरूप छाया आपल्याखालीं लपून जाते. १० मायेची रात्र जेव्हां राहत नाहीं, तेव्हां विश्वस्वप्नासहित विपरीत ज्ञानरूप निद्रेला सांभाळणार कोण? ११ ह्मणून अद्वय नगरामध्यें महानंदांची दाटण होते, तेव्हां सुखानुभवाचीं घेणीं देणीं बंद पडतात. १२ किंबहुना, असे असे मुक्तकैवल्याचे सुंदर दिवस ज्याच्या प्रकाशानें प्राप्त होतात, १३ जो आपल्या सद्नाकाशाचा राजा; जो सदासर्वकाल उदित झालेला असल्यामुळें पूर्वदिशेला उदयास्ताचा ठावच नाहीं. १४ अज्ञान, ज्ञानासह मावळवितो; झांकून असलेलीं दोन्हीं—नाम आणि रूप—जिकडे तिकडे प्रगट करून सोडतो. १५ जो प्रकाशित होणाऱ्या पदार्थांवांचून प्रकाशाचा सुकाळ करणारा; दिवस आणि रात्र ह्यांच्या पलिकडचा; जो ज्ञानरूप सूर्य, तो कोणीं पहावा? १६ त्या श्रीनिवृत्तिरूप सूर्यनारायणाला आतां पुनः पुन्हा नमस्कार असें ह्मणतों. कारण, स्तुति ह्मटली कीं, ती शब्दांची बाधकता. अर्थात् उपाधीच ती. १७ खरोखर गुरुस्तवनाला योग्य अशी जी बुद्धि, ती लयाला गेली आहे तरी, देवाचा महिमा पाहून तीही चांगुलपणानें येते. १८ ज्या तुमच्या उद्देशासाठीं पश्यंती व मध्यमा पोटीं घालून, इतरांस पाठीं घालून वाणी कुंठित होते, १९ जो सर्व जाणणाऱ्याला जाणतो, जो मौनाच्या मिठीनेंच वर्णन केला जातो, कांहींच न होऊन जो आपणाला आणतो, २० त्या तुह्मांला मी सेवकपणानें बोलक्या स्तोत्राचे अलंकार घालतों. ह्याची क्षमा करा ह्मटलें तर, त्या अद्वयानंदाला न्यूनत्व येईल. २१ परंतु भिकाऱ्यानें अमृताचा समुद्र पाहिला, तर त्याला उचित काय, ह्याचा विसर पडतो. आणि तो त्याला भाजीचीच मेजवानी करण्यासाठीं पळत सुटतो! २२ अशा ठिकाणीं भाजी हीच पुष्कळ असें ह्मटलें पाहिजे. त्याचा हर्षातिशय तोच घेण्यासारखा**

१ संबंध. २ मागल्यावरून. ३ सोबतीण. ४ चंद्रज्योत. ५ एके ठिकाणीं. ६ संपादन केले जातात. ७ तिला. ८ एकच आश्रय.

असतो. तो सूर्यापुढें काडवात लावून भक्तीच दाखवित असतो. २३ मुलाला जर योग्य तें कळलें, तर त्याचा मूलपणा कोठें राहील? पण तेंही खरेंच. त्याच्या जवळ असते, ती आई असते, ह्मणून तिला संतोष होतो. २४ गांवच्या गटारांतील पाणी, घाणींतून सुद्धां येत असतें; त्याला गंगा मागें सर असें ह्मणते काय? २५ महाराज! भृगूचा केवढा वर्ते अन्याय होता? पण तोच उत्तम आदर-सत्कार असें मानून **शार्ङ्गधर** जो **श्रीकृष्ण**, तो त्या मोठेपणानेंच संतोष पावला नाहीं काय? २६ किंवा आंधारानें भरलेलें आकाश सूर्यासमोर आलें, ह्मणून त्यानें त्याला कधीं 'पलीकडे हो' असें ह्मटलें आहे काय? २७ त्याप्रमाणें भेदबुद्धीच्या तराजूंत सूर्याच्या उपमेनें तुझी तुलना केली, ती एक वेळ क्षमा करावी. २८ ज्यांनीं ध्यानाच्या डोळ्यांनीं तुला पाहिलें, वेदादिकांच्या वाणींनीं ज्याची स्तुति केली; त्यांना जशी क्षमा केली; तशी आह्मांसही करावी. २९ पण मी आज तुझ्या गुणांना संवकलों आहें. ह्मणून अपराधांची खिसगणती करीत नाहीं. पाहिजे तें करा; अर्धवट तृप्तीनें मी कधींही उठावयाचा नाहीं. ३० मी गीतेच्या नांवानें तुमचे प्रसादामृताची आवडच वर्णन करूं लागलों, तों ती दुप्पट वाढत चालली. इतका मी भाग्यवान्! ३१ **प्रभो!** माझ्या वाणीनें सत्य भाषणाचें तप अनेक कल्पपर्यंत केलें होतें. त्याच्या फळाचें गीतारूपद्वीप मला प्राप्त झालें. ३२ असाधारण पुण्यें आचरण केलीं, ह्मणून तुझें गुणवर्णन करावयाचें देऊन तीं आज ऋणांतून मुक्त झालीं. ३३ **महाराज!** जीवित्वारण्यांतील मरणगांवांत सांपडलों होतों. ती सारी पीडाच आज दूर केलीत. ३४ कारण, जी गीता ह्या नांवानें प्रसिद्ध; जी अविद्येला जिंकून बळावलेली; ती तुमची कीर्ति, वर्णन करण्याची आज आह्मांला संधि मिळाली. ३५ दरिद्र्याचे घरीं, कौतुकानें जरी महालक्ष्मी येऊन बसली, तरी त्याला मग दरिद्री असें ह्मणतां येईल काय? ३६ किंवा अंधकाराच्या ठिकाणीं दैवयोगानें सूर्य आला, तर तो अंधकारच ह्या जगाला प्रकाश देत नाहीं काय? ३७ ज्या देवाची थोरवी पाहूं गेलें तर, हें विश्व परमाणूबरोबरही लागत नाहीं; पण तोच भक्तीच्या योगानें बरोबरीचा होत नाहीं काय? ३८ त्याप्रमाणें मी गीतेचें वर्णन करतों आहे हें, आकाशाचें फूल हुंगण्यासारखें आहे. पण आपण समर्थ असल्यामुळें तीही हौस पुरविलीत. ३९ ह्मणून **ज्ञानदेव** ह्मणतात 'तुझ्या प्रसादाच्या योगेंकरून मी गीतेचीं अगाध पदें खुलासेवार निरूपण करीन. ४० तर पंधराव्या अध्यायांत **श्रीकृष्णानें** त्या **अर्जुनाला** शास्त्राचा सारा सिद्धांत सांगितला. ४१ आंगांत मुरलेल्या व्याधीची वैद्य ज्याप्रमाणें चिकित्सा करतो, त्याप्रमाणें उपाधीरूप वस्तूला वृक्षाचें रूपक दिलें. ४२ आणि देहांतील अविनाशी जो शुद्ध आत्मा, तो पुरुष प्रकारानें दाखवून दिला. तसेंच उपाधीचें आणि चैतन्याचेंही रूप केलें. ४३ पुन्हा उत्तम पुरुष ह्या शब्दाचें निमित्त करून आत्मतत्वही उत्तम रीतीनें दाखवून दिलें. ४४ आत्म्याविषयीं आंतील बळकट साधन जें ज्ञान तेंही स्पष्ट बोलले. ४५ ह्मणून ह्या अध्यायांत सांगण्यासारखें कांहींच उरलें नाहीं. आतां गुरु आणि शिष्य ह्या उभयतांत स्नेह प्राप्त झाला. ४६ अशा प्रकारें ह्या विषयानें अपार जाणत्यांची समजूत पटली. परंतु इतर जे मुमुक्षु होते, त्यांना शंका प्राप्त झाली. ४७ 'त्या मला--पुरुषोत्तमाला--ज्ञानाच्या योगानें जो जाणतो, तोच मर्मज्ञ, तोच सर्वज्ञ, आणि भक्तीची सीमाही तोच.' ४८ ह्याप्रमाणें मागील अध्यायांतील श्लोकांत त्रैलोक्यनायकांनीं सांगितलें. त्यांत ज्ञानच बहुतकरून आनंदानें वर्णन केलें आहे. ४९ प्रपंचाचा घोट भरून पाहतां पाहतां पाहणारालाच पाहणारा करून सोडला. आणि जिवाला आनंदाच्या साम्राज्याचा पट्टाभिषेक केला. ५० **देव** ह्मणाले "एवढा बलाढ्य उपाय

दुसरा कोणताच नाहीं. उत्तम ज्ञान हा सर्व उपायांतील राजा आहे." ५१ अशा प्रकारचे आत्मज्ञानेच्छु होते त्यांनीं उल्हासवृत्तीनें आदरेंकरून त्या ज्ञानावरून जिवाला ओंवाळून टाकलें. ५२ आतां आवड उत्पन्न झाली, कीं त्याच वेळीं ती आणखी आणखी वाढत जावी, असें ह्या प्रेमाचें लक्षण आहे. ५३ ह्मणून जिज्ञासूंना ज्ञानाचा पक्का अनुभव आला नाहीं तोंपर्यंत ज्ञानाच्या संबंधानें अप्राप्ताची प्राप्ती, व प्राप्ताचें संरक्षण व्हावें ही इच्छा असणारच. ५४ ह्मणून तेंच उत्तम ज्ञान कशानें प्राप्त होईल ? आणि प्राप्त झालें तर तें वाढविण्याविषयीं यत्न कसा करतां येईल ? ५५ किंवा जें उत्पन्न होऊं देत नाहीं, किंवा दिलें तर आडवाटेला घालवितें, असें ज्ञानामध्यें विघ्न आणणारें काय ? हें तरी समजावें. ५६ मग जें जिज्ञासूंच्या विरुद्ध आहे, त्याचा नाश करण्याला समर्थ असें जें ज्ञानहित तेंही सर्वभावेंकरून विचारून घेऊं. ५७ अशा प्रकारें तुह्मी सर्व जिज्ञासूंनीं जो मनांत हेतु धरला आहे, तो पूर्ण करण्यासाठीं लक्ष्मीपती बोलतील. ५८ ज्ञानाला उत्तम जन्म प्राप्त होईल, तें आपल्या विश्रांतिपर्यंत टिकेल. त्या दैवीसंपत्तीची थोरवी सांगूं. ५९ आणि अज्ञानाच्या अंकितपणानें जी रागद्वेषाला थारा होऊन राहते, त्या घोर असुरी संपत्तीचेंही विवेचन करूं. ६० ह्या दोघींची इष्टानिष्ट करणीही सहज कौतुकानें नवव्या अध्यायामध्यें सांगितली होती. ६१ तेथें प्रत्यक्ष विचार करावयाचा, इतक्यांत दुसराच प्रसंग निघाला. ह्मणून तें आतां ह्या प्रसंगीं देव निरूपण करतात. ६२ त्या निरूपणाच्या नांवाचें स्थान हा सोळावा अध्याय आहे. हा संबंध मागच्यावरून लक्षांत आणावा. ६३ पण तूर्त तें असो. ज्ञानाच्या हिताहिताला ह्याच दोन्ही संपत्ति समर्थ आहेत. ६४ जी मुमुक्षुमार्गाची सोबतीण; जी मोहाच्या रात्रींतील चंद्रज्योत; ती दैवीसंपत्ति तर आधीं ऐका. ६५ "एकएकाला पोसणारे असे बहुत पदार्थ एके ठिकाणीं संपादन केले जातात, त्याला लोक 'संपत्ति' असें ह्मणतात. ६६ ती भाग्यवंताचें सुख देणारी, एका दैवगुणालाच आश्रय होते, ह्मणून ही दैवीसंपत्ति होय. ६७"

श्रीभगवानुवाच—

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१॥

[श्रीभगवानुवाच–अभयं] आतां तयाचि दैवगुणा- । माजि धुरेचा[1] वैसणा । बैसे तया आकर्णी[2] । अभय ऐसें ॥ ६८ ॥ तरि नै[3] घलूनि महा पुरीं । न घेपे बुडणयाची शिँयारी[4] । कां रोग न गणिजे घरीं । पथ्याचिया ॥ ६९ ॥ तैसा[5] कर्माकर्माचिया मोहरां । उठूं नेदुनि अहंकारा । संसाराचा दरारा । सांडणें येणें ॥ ७० ॥ अथवा ऐक्यभावाचेनि पैसें[6] । तुजे मानूनि आँत्मा ऐसें । भयवार्ता देशों । दडवणें जें ॥ ७१ ॥ पाणी बुडवूं ये मिठातें । तंव मीठची पाणी आते । तेविं आपण जालेनि अद्वैतें । नाशे भय ॥ ७२ ॥ अगा अभय येणें नांवें । बोलिजे तें हें जाणावें । सम्यक्ज्ञानाचें आघवें । धावणें हें ॥ ७३ ॥ [सत्वसंशुद्धिः] आतां सत्वशुद्धी जे ह्मणिजे । ते ऐशा चिन्हीं जाणिजे । तरी जळे ना विझे । राखोंडी जैसी ॥ ७४ ॥ कां पाडिवो वाळी न मगे । अंवसे तुंटी सांडूनि मागें । माजी अतिसूक्ष्म अंगें । चंद्र जैसा राहे ॥ ७५ ॥ ना तरि वांर्षिया[11] सांडिली । ग्रीष्में नाहीं मांडिली । माजि निजरूपें निवडली । गंगा जैसी ॥ ७६ ॥ तैसी संकल्पविकल्पाचि वोढी[12] । सांडूनि रजतमाची कावडी । भोगितां निजधर्माची[13] आवडी । बुद्धि उरे ॥ ७७ ॥ इंद्रियवर्गीं दाखविलिया । विरुद्धा अथवा भलीया । विस्मय कांहीं केलिया । नुठी चित्तीं ॥७८॥ गांवा गेलिया वल्लभ[14] । पतिव्रतेचा विरह क्षोभ । भलतेसणी[15] हानी लाभ । न मनी जेवीं ॥ ७९ ॥ तेवीं सत्स्वरूप रुचलेपणें । बुद्धी जें ऐसें अनन्य होणें । ते सत्वशुद्धी ह्मणे । केशिहंता[16] ॥८०॥[ज्ञानयोगव्यवस्थितिः] आतां आत्मलाभाविखीं । ज्ञानयोगामाजी एकीं । जे आपुलिया टाकीं । हांवे भरे ॥ ८१ ॥ तेथ सगळिये चित्तवृत्ती । त्याग करणें या रीती । निष्कामें पूर्णाहुती । हुताशीं जैसी ॥ ८२ ॥ कां सुकुळीनें[17] आपुली । आत्मजा सत्कुळींचि दिधली । हें असो लक्ष्मी स्थिरावली ।

१ अग्रभागींचा. २ ह्मणतात. ३ उडी न घालून. ४ भय, कंप. ५ मार्गास. ६ योगानें. ७ सर्व जग आत्मस्वरूप आहे असें मानून. ८ व्याप्त, पाणीमय. ९ प्रतिपदा. १० क्षय. ११ वर्षाऋतु. १२ ओढ. १३ स्वस्वरूपधारणेची. १४ पति. १५ भलत्यानें, पाहिजे तेवढा. १६ केशी दैत्यास मारणारा श्रीकृष्ण. १७ कुळवंतानें.

मुकुंदीं जैसी ॥ ८३ ॥ तैसें निर्विकल्पपणें । जें योगज्ञानींच या वृत्तिक होणें । तो तिजा गुण ह्मणे । कृष्णनाथ ॥ ८४ ॥ [दानं] आतां देहवाचाचित्तें । यथासंपन्नें वित्तें । वैरी जालियाही आर्तातें । न वंचणें जें कां ॥ ८५ ॥ फुलीं फळीं छाया । मुळीं पत्रींही धनंजया । वाटेचा नचुके आलिया । वृक्ष जैसा ॥ ८६ ॥ तैसें मनौनि धनवरी । विंधमानें आल्या अवसरीं । श्रांतांचिये मनोहारीं । उपयोगा जाणें ॥ ८७ ॥ तया नांव जाण दान । जें मोक्षनिधानाचें अंजन । हें असो [दमश्च] आयिक चिन्ह । दमाचें तें ॥ ८८ ॥ तरि विषयेंद्रियमिळणी । करूनि घापे विंतुटणी । जैसें तोडिजे खड्ळपाणी । पैरकेया ॥ ८९ ॥ तैसा विषयजातांचा वारा । वाजों नेदिजे इंद्रियद्वारां । इयें बांधोनि प्रत्याहारा । हातीं वोपी ॥ ९० ॥ आंतुला चित्ताचे अंगेंवरी । प्रवृत्ति पेलूनि माघारी । सुयिजे दाहींही द्वारीं । वैराग्याची ॥ ९१ ॥ श्वासोश्वासाहुनी वहुवसें । व्रतें आचरे खरपुसें । वोसंतितां रात्रिदिवसें । नाराणुक जया ॥ ९२ ॥ पैं दम ऐसा ह्मणिपे । तो हा जाण स्वरूपें । यज्ञार्थही संक्षेपें । सांगों ऐक ॥ ९३ ॥ [यज्ञश्च] तरि ब्राह्मण करूनि धुरे । स्त्रियादिक पैल मेरे । माझारीं अधिकारें । आपुलालेनि ॥ ९४ ॥ जया जें सर्वोत्तम । भजनीय देवताधर्म । तें तेणें यथागम । विधी यजिजे ॥ ९५ ॥ जैसा द्विज षट्कर्में करी । शूद्र तयातें नमस्कारी । कीं दोंहींसिही सरोबरी । निपजे याग ॥ ९६ ॥ तैसें अधिकारपर्यालोचें । हें यज्ञ करणें सर्वांचें । परि विष फळाशेचें । न घापे माजी ॥ ९७ ॥ आणि मी कर्ता ऐसा भावो । नेदिजे देहाचेनि द्वारें जावो । नौ वेदाशेसी तरी ठावो । होइजे स्वयें ॥ ९८ ॥ अर्जुना एवं यज्ञ । सर्वत्र जाण सौज्ञ । कैवल्यमार्गींचा अभिज्ञ । सांगाती हा ॥ ९९ ॥ [स्वाध्यायः] आतां चेंडुवें भूमी हाणिजे । हें नव्हे तो हाता आणिजे । कीं शेतीं बीं विखुरिजे । परी पिकीं लक्ष ॥ १०० ॥ ना तरि ठेविलें देखावया । आदर कीजे दिविया । कां शाखा फळें यावया । सिंपिजे मूळ ॥ १ ॥ हें बहू असो आरिसा । आपणपें देखावया जैसा । पुढतपुढती बहुवसा । उटिजे प्रीती ॥ २ ॥ तैसा प्रतिपाद्य जो ईश्वर । तो होवयालागीं गोचर । श्रुतीचा निरंतर । अभ्यास करणें ॥ ३ ॥ तें द्विजांसीच ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाममंत्र । आवर्तणें पवित्र । पावावया तत्त्व ॥ ४ ॥ पार्था गा स्वाध्यावो । बोलिजे हा ह्मणे देवो । आतां तपशब्दाभिप्रावो । आईक सांगों ॥५॥ [तपः] तरी दानें सर्वस्व देणें । वेंचणें तें व्यर्थ करणें । जैसें फळोनि स्वयें सुकणें । ओषधीचें ॥ ६ ॥ ना ना धूपाचा अग्निप्रवेश । कनकीं तुकाचा नाश । पितृपक्ष पोषितां ऱ्हास । चंद्राचा जैसा ॥ ७ ॥ तैसा स्वरूपाचिया प्रेसरा- । लागीं प्राणेंद्रियशरीरां । आटणी करणें जें वीरा । तेंचि तप ॥ ८ ॥ अथवा अनारिसें । तपाचें रूप जरी असे । तरि जाण जेवि दुधीं हंसें । सुदली चांचू ॥ ९ ॥ तैसें देहजीवाचिये मेळणी । जो उदयजत सूये पाणी । तो विवेक अंतःकरणीं । जागवी जो ॥११०॥ पाहातां आंतमयाकडे । परि बुद्धीचा पैस सांकडे । सनिद्र स्वप्न बुडे । जागणीं जैसें ॥ ११ ॥ तैसा आत्मपर्यालोच । प्रवर्ते जो साच । तपाचा हा निर्वेच । धनुर्धरा ॥१२॥ [आर्जवं] आतां बाळाच्या हितीं स्तन्य । जैसें नानाभूतीं चैतन्य । तैसें प्राणिमात्रीं सौजन्य । आर्जव तें ॥ १३ ॥

**“आतां त्या दैवगुणामध्यें जो अग्रभागीं बैठक मारून बसतो, त्याला अभय असें ह्मणतात. ६८ जो महापूरांत उडी घालीत नाहीं, त्याला बुडण्याचें भय नसतें; किंवा पथ्याच्या घरामध्यें रोगास कोणी विचारीत नाहीं. ६९ त्याप्रमाणें अहंकाराला उठूं न देतां, तो कर्माकर्माच्या वाटेला लागतो, त्यामुळें संसाराचें भय राहत नाहीं. ७० अथवा ऐक्यभावाच्या विस्तारामुळें, इतर सर्व आपला आत्माच असें मानून असतो. त्याच्या योगेंकरून भयाची वार्ता सुद्धां देशोधडीस लागते. ७१ पाणी मिठाला बुडवावयाला आलें, तर तें मीठच पाण्याच्या आंत शिरतें, त्याप्रमाणें आपण अद्वैत झाल्याच्या योगानें भयही नाशाप्रत पावतें. ७२ अरे! अभय अशा नांवानें जें सांगितलें, तें हें ध्यानांत ठेव. उत्तम ज्ञानाची सारी धांव ह्याच्याकडेच असते. ७३ आतां सत्वशुद्धि**

१ वतनदार. २ तिसरा ज्ञानयोग. ३ विन्मुख करणें. ४ मनापासून. ५ प्रस्तुत. ६ प्रसंगीं. ७ दमलेल्यास त्याचे मनोनुरूप. ८ वियोग. ९ निवळीच्या वियांनीं. १० नियमाच्या. ११ देतो. १२ स्थानापर्यंत. १३ फिरवून. १४ घालावी. १५ प्रखर, उत्तम. १६ आचरितां, करितां. १७ अग्रभागीं. १८ यथाशास्त्र. १९ (यजन १, याजन २, अध्ययन ३, अध्यापन ४, दानं ५, व प्रतिग्रह ६) हीं षट्कर्में. २० साम्य. २१ विचारानें. २२ किंवा. २३ सशास्त्र. २४ पेरावें. २५ साफ करणें.

१ जप करणें. २ अध्ययन. ३ खर्च करणें. ४ वजनाचा. ५ प्राप्तीसाठीं. ६ झिजविणें, श्रम. ७ घातली. ८ जन्मतांच. ९ पाणी सोडतो, त्याग करतो. १० आत्मविचार. ११ मार्गी अडचण पावतो. १२ निद्रेसकट. १३ आत्मावलोकन. १४ सिद्धांत. १५ मैत्री.

असें जिला ह्मणतात ती अशा लक्षणांनीं समजावी. तर राखुंडी जशी जळत नाहीं, आणि विझतही नाहीं, ७४ किंवा पाडव्याला वाढीव ह्मणत नाहीं; अवसेला क्षय करूं नको ह्मणून प्रार्थनाही करीत नाहीं; तरी दोहींमध्येंही चंद्र जसा अतिसूक्ष्मरूपानें असतो. ७५ किंवा वर्षाऋतू संपून गेला; ग्रीष्मऋतूही लागला नाहीं; त्या दोहोंमध्यें गंगा जशी आपल्या मूळ–शुद्ध–स्वरूपानें राहते, ७६ त्याप्रमाणें संकल्पाविकल्पाची ओढ सोडून रजतमाच्या आडवाटा टाकून देऊन स्वस्वरूपधारणेची बुद्धि शिल्लक राहते. ७७ इंद्रियवर्गांनीं चांगल्या गोष्टी दाखविल्या, किंवा वाईट गोष्टी दाखविल्या, कांहीं केलें तरीही, ज्याच्या चित्ताला विस्मय ह्मणून उठत नाहीं. ७८ पति गांवाला गेला असतां, पतीचा विरहक्षोभ, पाहिजे तेवढा लाभ किंवा हानीही मानित नाहीं," ७९ **केशी** दैत्यास मारणारे **श्रीकृष्ण** ह्मणतात "त्याप्रमाणें सत्य स्वरूप आवडल्याच्या योगानें अशा प्रकारें बुद्धीचें जें ऐक्य होणें तीच **सत्वशुद्धि** होय. ८० आतां आत्मलाभाविषयीं ज्ञानयोगामध्यें जी एकी असते, ती जेव्हां आपोआपच वृद्धिंगत होते, ८१ तेव्हां सर्व वृत्तींचा, अग्नीमध्यें निष्कामाची पूर्णाहुती टाकल्याप्रमाणें त्याग करणें, ८२ किंवा कुलवंतानें आपली कन्या कुलवंतास द्यावी, हेंही असो. लक्ष्मी जशी मुकुंदापाशीं स्थिरावली आहे," ८३ त्याप्रमाणें कृष्ण ह्मणतात "निर्विकल्पपणानें योगज्ञानाच्या ठिकाणींच वतनदार होऊन रहाणें, तोच तिसरा गुण–ज्ञानयोग–होय. ८४ आतां कायावाचामनेंकरून असेल तेवढ्या द्रव्यानें वैरी जरी आर्त होऊन आला, तरी त्यास जें विन्मुख न करणें, ८५ **धनंजया!** प्रवाशी आला असतां, वृक्ष जसा फूल, फळ, छाया, मूळ, पान पुढें करण्यास चुकत नाहीं, ८६ त्याचप्रमाणें प्रसंगानुसार श्रमून कोणी आल्यास मनापासून धनधान्यापर्यंत असलेल्या पदार्थांत त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला संतुष्ट करणें, ८७ त्याचें नांव दान हें लक्ष्यांत असूं दे. तें मोक्षरूप ठेव्याचें अंजन आहे. हें असो. आतां दमाचें लक्षण ऐक. ८८ तर विषयांच्या आणि इंद्रियांच्या संगमांत विरह घालून ठेवतो; निवळीच्या बिया जसें गढूळ पाणी नाहींसें करून टाकतात, ८९ त्याप्रमाणें कोणत्याहि विषयाचा वारा इंद्रियद्वारामध्यें फिरकूं देत नाहीं. त्यांना बांधून नियमनांच्या हातांत देतो. ९० आंतील चित्ताच्या स्थानापर्यंत प्रवृत्तीला बाहेर घालवून दाहीही द्वारें वैराग्याचीं करून सोडतो. ९१ श्वासोच्छ्वासापेक्षांही अधिक अशीं अनेक तीव्रव्रतें आचरण करतो; रात्रंदिवस आचरण करतां करतां ज्याला विश्रांति नाहीं. ९२ **दम** असें ज्याला ह्मणतात, त्याचें स्वरूप असें असतें लक्षांत ठेव. आतां यज्ञार्थही संक्षेपानें सांगतों. ऐक. ९३ तर ब्राह्मण अग्रभागीं करून, स्त्रियादिकांपर्यंत त्यांच्या त्यांच्या अधिकाराप्रमाणें जो वागतो, ९४ ज्याला जे सर्वोत्तम भजनीय देवताधर्म असतील, ते त्या त्या प्रमाणें यथाशास्त्रविधीनें यजन करावेत. ९५ ज्याप्रमाणें ब्राह्मण षट्कर्में–(यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान, प्रतिग्रह) करतो, आणि शूद्र त्याला नमस्कार करतो, तरी उभयतांचा यज्ञ सारखाच होतो. ९६ त्याप्रमाणें अधिकाराच्या विचारानें यज्ञ करावेत. तें सर्वांचें कर्तव्य आहे. परंतु मध्यें फलाशेचें विष मात्र घालूं नये. ९७ देहाच्या द्वारांतून सुद्धां मी कर्ता असा भाव मनांत येऊं देऊं नये. किंवा वेदाज्ञेचें स्थानही आपण स्वतः होऊं नये. ९८ **अर्जुना!** अशा प्रकारचा यज्ञ हा सर्वत्र सशास्त्र आहे. तो मोक्षमार्गांतील वाटाड्या असून त्यास त्याची माहिती असते. ९९ आतां चेंडूनें भूमीला मारावयाचें नसतें, तर तो पुन्हा हातांत आणावयाचा असतो, किंवा शेतांत बीं पेरलें तर पिकावर लक्ष्य अ-

* येथें 'खड्ग पाणी । पारकेया ॥' असा अन्य पाठ आहे. तेथें "ज्याप्रमाणें हातांत शस्त्र घेऊन शत्रूचा निःपात करावा" असा अर्थ समजावा.

सतें; १०० किंवा ठेवलेल्याला पाहण्याकरितां दिव्याचा आदर करावा लागतो. किंवा शाखा, फळें येण्याकरितां मूळ शिंपावें लागतें; १०१ हें फार राहूं दे. आरसा जसा आपणाला पाहण्यासाठीं वारंवार–अनेक वेळां–अगत्यानें पुसावा लागतो, १०२ त्याप्रमाणें प्रतिपाद्य जो **ईश्वर**, तो गोचर होण्यासाठीं श्रुतीचा निरंतर अभ्यास करावा लागतो. १०३ तें ब्रह्मसूत्र द्विजांचें. इतरांना पवित्रतत्व पावण्याला स्तोत्र किंवा नाममंत्रजप करणें.” १०४ देव ह्मणतात “**अर्जुना! स्वाध्याय** जो ह्मणतात तो हा. आतां तप शब्दाचा अर्थ सांगतों ऐक. १०५ दानामध्यें सर्वस्व द्यावयाचें. आपल्याकरितां खर्च करणें तें व्यर्थ जाणें होय. ज्याप्रमाणें औषधी फल देतात, आणि स्वतः सुकतात. १०६ किंवा धूपाचा अग्निमध्यें प्रवेश; किंवा सोन्यामध्यें वजनाचा नाश होतो; कृष्णपक्ष वाढवितांना जसा चंद्राचा ऱ्हास होतो; १०७ त्याप्रमाणें हे **शूरा!** स्वरूपाच्या प्राप्तीसाठीं प्राणेंद्रियशरीराला झिजविणें ह्याचें नांव **तप.** १०८ अथवा तपाचें रूप याहून भिन्न असलें तरी, हें लक्षांत ठेव कीं, हंसानें जशी दुधांत चोंच घालावी, १०९ त्याप्रमाणें जो उत्पन्न होतांच देहाच्या आणि जीवाच्या संगमावर पाणी सोडतो, तो विवेक जो जागृत ठेवतो; ११० परंतु आत्म्याचा विचार करतांना बुद्धीचा मार्गही संकुचित करीत करीत जागृतीमध्यें निद्रेसहवर्तमान स्वप्न जसें बुडून जातें, १११ त्याप्रमाणें **अर्जुना!** आत्मावलोकनांत जो खरोखर प्रवेश करतो, तोच तपाचा सिद्धांत होय. ११२ आतां मुलाच्या हिताला जसे स्तन, नानाप्रकारच्या प्राणिमात्रांत जसें चैतन्य, त्याप्रमाणें प्राणिमात्रांच्या ठाईं जी प्रीति तें **आर्जव**.” ११३

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ २ ॥

[अहिंसा] आणि जगाचिया सुखोद्देशें । शरीरवाचामानसें । राहाटणें तें अहिंसे । रूप जाण ॥ १४ ॥ [सत्यं] आतां तीख होउनि मवाळ । जैसें जातीचें मुकुळ । कां तेज परी शीतळ । शशांकाचें ॥ १५ ॥ शके दावितांचि रोग फेडूं । आणि जिभे तरि नव्हे कडु । तें वोखद नाहीं मा घडु । उपमा कैंची ॥१६॥ तरि मउपणें बुबुळें । झगडतांही परि नाढळे । येरवीं फोडी कोरांळें । पाणी जैसें ॥ १७ ॥ तैसें तोडावया संदेह । तीख जैसें कां लोह । श्राव्यत्वें तरि माधुर्य । पायीं घाली ॥ १८ ॥ ऐकों ठातां कौतुकें । कानातें निघती मुखें । जें सांचारिवेचेनि विकें । ब्रह्मही भेदी ॥ १९ ॥ किंबहुना प्रियपणें । कोणातेंही झकऊं नेणें । यथार्थ तरी खुपणें । नाहीं कवणा ॥ १२० ॥ येन्हवीं गोरी कीर काना गोड । परि सांचाचा पाखाळीं कीड । आगियेचें करणें उघड । परि जळों तें साच ॥ २१ ॥ कानीं लागतां मेंहुर । अर्थे विभांडी जिव्हार । ते वाचा नव्हे सुंदर । लांवचि पां ॥ २२ ॥ परि अहितीं कोपोनि सोपें । लालनीं मउ जैसें पुष्प । तिये मातेचें स्वरूप । जैसें कां होय ॥ २३ ॥ तैसें श्रवणसुखचतुर । परिणमोनि साचार । बोलणें जें अविकार । तें सत्य येथें ॥२४॥ [अक्रोधः] आतां घालितांही पाणी । पाषाणीं न निघे आणि । कां मथिलिया लोणी । कांजी नेदी ॥ २५ ॥ त्वचा पायें शिरीं । होलेयाही फडे न करी । वसंतीं ही अंबरीं । न होती फुलें ॥ २६ ॥ ना ना रंभेचेनिही रूपें । शुकीं नुठिजेचि कंदर्पें । कां भस्मीं वन्हि न उद्दीपे । घृतेंही जेविं ॥ २७ ॥ तेविंचि कुमारु क्रोधें भरे । तैसिया मंत्रांचीं बीजाक्षरें । तियें निमित्तेंहीं अपारें । मीनलिया ॥ २८ ॥ पैं धांतयाही पायां पडतां । नुठी गतायू पंडुसुता । तैसी नुपजे उपजवितां । क्रोधोर्मि गा ॥ २९ ॥ अक्रोधत्व ऐसें । नांव तें ये दशे । जाण ऐसें श्रीनिवासें । ह्मणीतलें तया ॥ १३० ॥ [त्यागः] आतां मृत्तिकात्यागें घट । तंतुत्यागें पट । त्यजिजे जेविं वट । बीजत्यागें ॥ ३१ ॥ कां त्यजूनि भिंतिमात्र । त्यजिजे आघवेंचि चित्र । कां निद्रात्यागें विचित्र । स्वप्नजाळ तें ॥ ३२ ॥ ना ना जळत्यागें तरंग । वर्षात्यागें मेघ । त्यजिजती जैसे

१ वर्तणें. २ मृदु. ३ जाईची कळी. ४ चंद्राचें. ५ तर मग देऊं. ६ प्रतिबंध न पावे. ७ पर्वताचा कडा, दगड. ८ ऐकलें असतां. ९ नमस्कार करूं लावी. १० साहा शास्त्रें, व चार वेद यांच्या. ११ बळानें. १२ पारध्याचें गायन. १३ शुद्ध सुवर्णांत असलेले हीनकट स्वच्छ करून काढतो. १४ मधुर. १५ फोडी. १६ काळिज. १७ विवशी. १८ पोकळ. १९ अंकुर. २० कांत. २१ हाणतां. २२ मुलगा. २३ शिव्या. २४ निमतात, लय पावतात. २५ ब्रह्मदेवाच्या.

भोग । धनत्यागें ॥ ३३ ॥ तेविं बुद्धिमंतीं देहीं । अहंता सांडून पाहीं । सांडिजे अशेषही । संसारजात ॥ ३४ ॥ तया नांव त्याग । ह्मणे तो यज्ञांग । हें मानूनि [1]सुभग । पार्थ पुसे ॥ ३५ ॥ आतां शांतीचें लिंग । तें व्यक्त मज सांग । देवो म्हणती चांग । अवधान देईं ॥ ३६ ॥ [शांतिः] तरी गिळोनि ज्ञेयातें । ज्ञाता ज्ञानही माघौतें । हारपे निरुतें । ते शांति पैं गा ॥ ३७ ॥ जैसा प्रळयांवूचा [2]उभड । बुडऊनि विश्वाचा पवाड । होय आपणपें [3]निविड । आपणचि ॥ ३८ ॥ मग [4]उगम ओघ सिंधू । हा तुरेचि व्यवहार भेदु । परि जलैक्याचा बोधु । तोही कवणा ॥ ३९ ॥ तैसी ज्ञेया देतां मिठी । ज्ञातृत्वही पडे पोटीं । मग उरे तेंचि किरीटी । शांतीचें रूप ॥ १४० ॥ [अपैशुनं] आतां [5]कदर्थवित व्याधी । [6]बळीकरणाचिया आधीं । आप पर न शोधी । सद्वैद्य जैसा ॥ ४१ ॥ कां चिखलीं रुतली गाये । धडभाकड न पाहे । जो तियेचिया [8]ग्लानी होये । [9]कोलभुला ॥ ४२ ॥ ना ना बुडतयातें सकरुण । न पुसे अंत्यज कीं ब्राम्हण । काढूनि राखे प्राण । हेंचि जाणे ॥ ४३ ॥ कीं मांयवणी पापिये । उघडी केली विपायें । ते नेसविल्यावीण न पाहे । शिष्ट जैसा ॥ ४४ ॥ तैसें अज्ञानप्रमादादिकीं । कां प्राक्तनींही सदोषीं । निंद्यत्वाच्या सर्वविषीं । [11]खिळिले जे ॥ ४५ ॥ तयां [12]आंगीक आपुलें । देउनियां भलें । विसरविजती [13]सैलें । सलतीं तियें ॥ ४६ ॥ अगा पुढिलाचे दोख । करूनि आपुलिये दिठी चोख । मग घापे अवलोक । तयावरी ॥ ४७ ॥ जैसा पुजूनि देव पाहिजे । पेरूनि शेता जाइजे । [14]तोषौनि [15]प्रसाद घेइजे । अतिथीचा ॥ ४८ ॥ तैसें आपुलेनि गुणें । पुढिलाचें उणें । फेडुनियां पाहणें । तयाकडे ॥ ४९ ॥ वांचूनि न विंधिजे वर्मीं । नातुडविजे अकर्मीं । न बोलविजे नामीं । सदोषीं तिहीं ॥ १५० ॥ वरि कोणे एकें उपायें । पडिलें तें उभें होये । तेंचि कीजे परि घाये । नेदावे वर्मीं ॥ ५१ ॥ पैं उत्तमाचिया [16]सांठीं । [17]नीच मानिजे किरीटी । हें वांचोनि दिठी । दोष न घेपे ॥ ५२ ॥ अगा [18]अपैशुन्याचें लक्षण । अर्जुना हें फुडें जाण । मोक्षमार्गींचें सुखासन । मुख्य हें गा ॥ ५३ ॥ [दया भूतेषु] आतां दया ते ऐसी । पूर्णचंद्रिका जैसी । निववितां न [1]कडसी । साने थोर ॥ ५४ ॥ तैसें दुःखितांचें शिणणें । हिरतां [2]सेकणवपणें । उत्तमाधम नेणें । विवंचूं गा ॥ ५५ ॥ पैं जगीं जी[3]वनासारिखें । वस्तु अं[4]गवरी [5]उपखे । परि जातें जीवित राखे । तृणाचेंही ॥ ५६ ॥ तैसें पुढिलांचेनि तापें । कळवळलीये कृपे । दिधलेंही आपणपें । न्यूनचि मानी ॥ ५७ ॥ [6]निम्न भरलिया उणें । पाणी ढळोंचि नेणें । तेविं [7]श्रांता तोषौनि जाणें । सामोरें पां ॥ ५८ ॥ पैं पायीं कांटा नेहटे । तंव व्यथा जीवीं उमटे । तैसा पोळे संकटें । पुढिलांचेनि ॥ ५९ ॥ कां [8]पावो शीतळता लाहे । कीं ते डोळयाचिलागीं होये । तैसा परसुखें जाये । सुखावत जो ॥ १६० ॥ किंबहुना तृषितालागीं । पाणी [9]आरायिलें असे जगीं । तैसें दुःखितांचें [10]सेलंभागीं । जिणें जयाचें ॥ ६१ ॥ तो पुरुष वीरराया । मूर्तिमंत जाण दया । मी उदयजतांचि तया । ऋणिया लाभें ॥ ६२ ॥ [अलोलुप्त्वं] आतां सूर्यासि जीवें । अनुसरलिया [11]रांजीवें । परि तें तो न शिवे । सौरभ्य जैसें ॥ ६३ ॥ कां वसंताचिया [12]वोहाणीं । आलिया [13]वनश्रीच्या अक्षौहिणी । ते न करीतचि घेणी । निगाला तो ॥ ६४ ॥ हें असो महासिद्धीसी । लक्ष्मीही आलिया पाशीं । परि महाविष्णु जैसी । न गणीच ते ॥ ६५ ॥ तैसें [14]ऐहिकींचे कां स्वर्गींचे । भोग पाइक जालिया इच्छेचे । परि भोगावें हें न रुचे । मनामाजी ॥ ६६ ॥ बहुवें काय कौतुकीं । जीव नोहे विषयाभिलाखी । [15]अलोलुपत्वदशा ठाउकी । जाण ते हे ॥ ६७ ॥ [मार्दवं] आतां माशियां जैसें मोहळ । जळचरां जेविं जळ । कां पक्षियां अंतराळ । मोकळें हें ॥ ६८ ॥ ना तरि बाळकोद्देशें । मातेचें स्नेह जैसें । कां वसंतींच्या स्पर्शें । मउ मलयानिल ॥ ६९ ॥ डोळयां प्रियांचीं भेटी । कां पिलियां कूर्मांची दिठी । तैसी भूतमात्रीं राहटी । [16]मवाळ ते ॥ १७० ॥ स्पर्शें अतिमृदु । मुखीं घेतां [17]सुस्वादु । घ्राणासि सुगंधु । उजाळ आंगें ॥ ७१ ॥ तो आवडे तेवढा घेतां । विरुद्ध जरी न होता । तरी उपमे येता । कापुर कीं ॥ ७२ ॥ परि महाभूतें पोटीं वाहे । तेवींचि परमाणु माजि सामाये । या विश्वानुसार होये । गगन जैसें ॥ ७३ ॥ काय सांगों ऐसें जिणें । जें जगाचेनि [18]जीवें प्राणें । तया नांव ह्मणें । मार्दव मी ॥ ७४ ॥ [ह्रीः] आतां पराजयें राजा । जैसा [19]कदर्थिजे लाजा । कां मानिया निस्तेजा । [20]निकृष्टास्तव ॥ ७५ ॥ ना ना चांडाळमंदिराशीं । [21]अवचटें आलिया संन्यासी । मग लाज होय जैसी । उत्तम

---

१ भाग्यवान्. २ उमाळा, झरा. ३ घनदाट. ४ उत्पत्तीचें स्थळ, प्रवाह, व समुद्रास मिळणें. ५ नासवीत, मारीत, कमी करीत. ६ निरोगी होण्याच्या. ७ दूध देणारी किंवा न देणारी. ८ दुःखानें. ९ कासावीस. १० पतिव्रता. ११ कष्टले. १२ सहाय. १३ दुःख. १४ संतोष करून. १५ आशीर्वाद. १६ ठिकाणीं. १७ नीचालाही उत्तम असें समजतो. १८ उणें न पाहाण्याचें.

१ न परीक्षी. २ सदयतेनें. ३ पाण्याप्रमाणें. ४ आंग वेचून. ५ नाश पावे. ६ सखल जागा. ७ श्रमलेल्याला. ८ पाय. ९ उत्पन्न केलें, अनुकूल. १० बऱ्यासाठीं, उत्तमभागीं. ११ कमळानें. १२ मार्गीं. १३ वनशोभेच्या. १४ या लोकींचे. १५ कोणच्याही विषयावर आसक्त नसणें. १६ मृदु. १७ रुचिकर. १८ जगतो. १९ दुःख देतो, त्रासवितो. २० नीचपणामुळें. २१ एकाएकीं.

तया ॥ ७६ ॥ क्षत्रियां रणीं पळोनि जाणें । ते कोण साहे लाजिरवाणें । कां वैधव्यें पाचारणें । महासतीयेतें ॥ ७७ ॥ रूपसा उदयलें कुष्ठ । संभाविता कुटीचें बोट । तया लाजा प्राणसंकट । होय जैसें ॥ ७८ ॥ तैसें औटेहातपणें । जें शव होउनि जिणें । उपजों उपजों मरणें । नावा नावा ॥ ७९ ॥ तियें गर्भमेदमुसें । रक्तमूत्ररसें । बोतींव होऊनि असे । तें लाजिरवाणें ॥ १८० ॥ हें बहु असो देहपणें । नामरूपासि येणें । नाहीं लाजिरवाणें । तयाहूनि ॥ ८१ ॥ ऐससिया अवकळा । घेपे शरीराचा कंटाळा । ते लाज पैं निर्मळा । निसुगा गोड ॥ ८२ ॥ [अचापलं] आतां सूत्रतंतू तुटलिया । चेष्टाचि ठाके सैंयखडिया । तैसी प्राणजयें क-र्मेंद्रियां । खुंटे गती ॥ ८३ ॥ कीं मावळलिया दिनकर । सरे किरणांचा प्रसर । तैसा मनोजयें प्रकार । बुद्धींद्रियां ॥८४॥ एवं मनपवननियमें । होती दाहीं इंद्रियें अक्षमें । तें अचा-पल्य वर्मे । येणें होय ॥ ८५ ॥

"आणि जगाला सुख व्हावें ह्या उद्देशानें कायावाचामनेंकरून वागणें, तें **अहिंसेचें** स्वरूप होय. ११४ आतां तीक्ष्ण असून मऊ जशी जाईची कळी, किंवा चंद्राचें तेज खरें, परंतु शीतल, ११५ प्रभाव दाखवितांच रोग नाहींसा करणारें, आणि जिभेला तर कडू लाग-णारें नव्हे, मग त्या औषधाला उपमा कोठून आणावी? ११६ मऊपणानें अगदीं बुबुळास टोंचलें तरी लागावयाचें नाहीं; पण एऱ्हवीं पाहिलें तर पाणी जसें खडक फोडून निघतें, ११७ त्याप्रमाणें संदेह तोडावयास तीव्र जसें का लोखंड! आणि ऐकावयाला तर असें कीं, माधुर्यानेंही त्याच्या पायीं लागावें! ११८ कौ-तुकानें ऐकावयाला बसलें तर कानांनाच मुखें फुटतात! जें सद्दा शास्त्रें आणि चार वेद ह्यांच्या बळानें ब्रह्मालाही भेदून टाकतें. ११९ किंबहुना प्रियपणाच्या योगानें कोणा-लाही फसवावयाचें माहीतच नाहीं. असतें यथार्थ, तरी कोणालाही खुपत नाहीं. १२० कित्येक, पारध्याच्या गायनाप्रमाणें कानांला गोड लागतात, किंवा शुद्ध सुवर्णात असलेलें हीण, आग जाळून टाकते, त्याप्रमाणें ज्या भाषणानें दुसऱ्याच्या आंगाची लाही होते. पण आग लागो तसल्या सत्याला! १२१ किंवा कानाला तर लागतें मधुर; पण अर्थाकडून मात्र काळिज भेदून जावयाचें. ती वाचा नव्हे, तर सुंदर लावसटच समजली पाहिजे. १२२ परंतु अकल्याण न व्हावें ह्मणून रागांत निष्फळ, लालन करतांना मऊ, जणों काय पुष्पच. अशा-प्रकारचें मातेचें जसें स्वरूप होतें, १२३ त्याप्रमा-णें श्रवणसुख देण्यामध्यें चतुर असून परिणामीं सत्यानुभव देणारें जें अविकृत बोलणें, तें येथें **सत्य** असें समजावें. १२४ आतां दगडावर पाणी घातलें असतांही जसा कोंभ फुटत नाहीं, किंवा पेज घुसळण्यानें जसें लोणी निघत नाहीं, १२५ पायानें कांतेच्या डोक्यावर मा-रलें तरी ती फणा काढीत नाहीं; वसंतऋतु आला तरीही आकाशाला फुलें येत नाहींत; १२६ किंवा रंभेच्या स्वरूपानेंही शुकामध्यें काम उत्पन्न होत नाहीं; किंवा राखेवर तूप घातलें तरीही विस्तव उत्पन्न होत नाहीं; १२७ त्याचप्रमाणें एखादें पोर रागास चढलें ह्मणजे त्याच्या तोंडाला जसें हाड नसतें, तशा प्रकारच्या अभद्र भाषणांचा कोणी जरी वर्षाव केला तरी, १२८ **अर्जुना!** ब्रह्मदेवाच्या पायां पडलें ह्मणून, आयुष्य संपलेला म-नुष्य जसा उठत नाहीं, तशी, आणून देखील ज्यास रागाची उसळी येत नाहीं; १२९ **अक्रोधत्व** तें ह्या दशेचें नांव, ध्यानांत ठेव. असें त्याला **श्रीनिवासांनीं** सांगितलें. १३० "आतां मृत्तिकेचा त्याग केला, ह्मणजे घटाचा त्याग झाला; तंतूंचा त्याग केला, ह्म-णजे वस्त्राचा त्याग झाला; बीजाचा त्याग केला ह्मणजे वटाचा त्याग झाला. १३१ किंवा भिंत आदिकरून टाकून दिलें ह्मणजे सारीं चित्रेंच टाकल्याप्रमाणें होतें. किंवा निद्रेचा त्याग केला ह्मणजे विचित्र असलेल्या स्वप्नजा-ळाचाही त्याग होतो. १३२ किंवा जलत्यागानें तरंगांचा त्याग होतो; वर्षाकालाच्या त्यागानें मेघांचा त्याग होतो; किंवा धनत्यागाच्या यो-

१ हाक मारणें. २ निंदापर आळ. ३ साडेतीन हात. ४ दुश्चिन्ह. ५ साचूला. ६ कोडग्याला. ७ बाहुलीला. ८ पंगु.

गानें ज्याप्रमाणें दरोबस्त भोगांचा त्याग होतो; १३३ त्याप्रमाणें बुद्धिमंतांनीं देहांतील अहंता सोडून दरोबस्त संसाराचा त्याग करावा." १३४ यज्ञरूप भगवान् ह्मणाले "त्याचें नांव त्याग." तें मान्य करून अर्जुन विचारूं लागला १३५ "कीं, आतां शांतीचें स्वरूप कसें तें स्पष्ट करून मला सांगावें." तेव्हां देव ह्मणाले "फार उत्तम. लक्ष्य देऊन ऐक. १३६ तर ज्ञेयाला गिळून ज्ञाता, ज्ञान हीं सारींच फिरून जेथें निश्चयेंकरून लयास जातात, तिचें नांव शांति. १३७ जलप्रलयाचा लोंढा ज्याप्रमाणें विश्वाचा विस्तार नाहींसा करून आपणच आपल्या ठिकाणीं भरून राहिला, १३८ ह्मणजे मग उगम, ओघ, समुद्रास मिळणें हा सर्व व्यवहारिक भेद राहतो. तेव्हां त्रैलोक्याचा बोध तरी होणार कोणाला? १३९ त्याप्रमाणें अर्जुना! ज्ञेयाला मिठी घातली कीं, ज्ञातृत्वही पोटांत पडतें. आणि मग जें शिल्लक राहतें, ती शांति होय. १४० आणखी ज्याप्रमाणें निरोगी करतांना—व्याधि हरण करतांना—उत्तम वैद्य आपला किंवा परकी ह्याचा विचार करीत नाहीं; १४१ किंवा चिखलांत रुतलेल्या गायीच्या दुःखानें जो कळवळतो, तो जसा ती दूध देणारी आहे किंवा नाहीं हें पहात नाहीं; १४२ किंवा दयाळू आहे तो बुडत्याला काढतांना, तो अंत्यज आहे का ब्राह्मण आहे ह्याचा विचार करीत नाहीं. त्याला बाहेर काढून त्याचा जीव वांचवावा, येवढेंच त्याला कळतें. १४३ किंवा कोणी पातक्यानें पतिव्रतेला एखादे वेळीं नग्न केली, तर तिला नेसविल्यावांचून सभ्य गृहस्थ जसा पहात नाहीं. १४४ त्याप्रमाणें अज्ञान, प्रमाद इत्यादिकांत, किंवा दुर्दैवानें दोषयुक्त, निंद्य, अशा सर्व विषयांत जे खिळलेले असतात, १४५ त्यांना आपलें उत्तमप्रकारचें साह्य देऊन त्यांचें दुःख कमी करतात, व त्यांच्या दुःखानें दुःखी होतात. १४६ अरे! दुसऱ्याचे दोष आपल्या दृष्टीनें धुऊन काढून मग त्याच्याकडे पहातात. १४७ ज्याप्रमाणें पूजा करून मग देवाचें दर्शन घ्यावें; पेरणी करून मग शेताकडे जावें; अतिथीचा संतोष करून मग प्रसाद घ्यावा; १४८ त्याप्रमाणें आपल्या गुणानें दुसऱ्याची उणीव भरून काढून मग त्याच्याकडे पहावयाचें. १४९ आणखी, वर्मानें कधीं टोंचावयाचें नाहीं; अकर्मांत कधीं गुंतावयाचें नाहीं; त्यांना दोषयुक्त नांवानें कधींही हाक मारावयाची नाहीं. १५० आणि कोणत्याही उपायानें पडलेलें उभें होईल, असें करावयाचें. परंतु वर्मावर घाव मारावयाचे नाहींत. १५१ अर्जुना! उत्तम ह्मणावयाला गेलें ह्मणजे दुसऱ्याचा नीचपणा मनांत येतो. ह्याकरितां त्याच्या दृष्टीनें हा भेदच मुळीं सोडून दिलेला असतो, ह्मणून ती दोषांचा स्वीकार करीत नाहीं. १५२ अर्जुना! उणें न पाहण्याचें लक्षण हें अशा प्रकारचें आहे. हें स्पष्ट लक्षांत ठेव. मोक्षमार्गांतील श्रेष्ठ सुखासन (वाहन) तें हें. १५३ आतां दया ती अशी, कीं पूर्णचंद्र ज्याप्रमाणें हें लहान किंवा हें थोर न पाहतां सारखा आराम करतो, १५४ त्याप्रमाणें दुःखितांचे कष्ट हरण करतांना, करुणेच्या योगानें जो हा उत्तम व हा अधम ह्याची निवडानिवड करण्याचें मनांत आणीत नाहीं. १५५ जगामध्यें पाण्यासारखी वस्तु सुद्धां आपला देह खर्ची घालते, पण गवताचा प्राण जात असला तर वांचविते. १५६ त्याप्रमाणें दुसऱ्याच्या तापानें आपल्यास कळवळा आला असतां, आपला देह खर्ची घालूनही कमीच असें मानतात. १५७ खोल खळगा भरल्याशिवाय पाण्याला जसें पुढें जावयाचें माहित असत नाहीं, त्याप्रमाणें श्रमलेल्याचा संतोष करून नंतर पुढें जावयाचें; १५८ पायांत कांटा शिरला तर जिवामध्यें व्यथा उत्पन्न होते, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या संकटानें ज्याला दुःख होतें, १५९ किंवा पायाला गारवा मिळाला कीं, तो डोळ्याला पोंचतो. त्याप्रमाणें दुसऱ्याच्या संतोषानें जो सुखी होत जातो. १६०

किंवा जगामध्यें पाणी हें तान्हेल्याकरितां उत्पन्न केलें आहे, त्याप्रमाणें दुःखितांच्या वन्यासाठींच ज्यांचा जन्म झालेला. १६१ हे **वीरश्रेष्ठा!** तो पुरुष मूर्तिमंत **दयेचा पुतळाच** आहे असें समज. तो जन्मतांच त्यानें मला ऋणी करून सोडलें. १६२ आतां सूर्याची कमलानें जीवेंभावें सेवा केली तरी तो, जसा त्याच्या परिमळाला शिवत नाहीं, १६३ किंवा वसंताच्या मार्गामध्यें कोटीच्याकोटी वनशोभा आल्या तरी, त्यांचा स्वीकार न करतां तो जसा पुढें निघून जातो, १६४ हें असो. महासिद्धिसहवर्तमान **लक्ष्मीही** जवळ आली असतां, **महाविष्णु** जसा तिची खिसगणती करीत नाहीं, १६५ त्याप्रमाणें इहलोकचे किंवा स्वर्गलोकचे भोग, इच्छेचे दास बनून राहिले तरी, ज्याच्या मनामध्यें भोगावयाचें आवडत ह्मणून नाहींच. १६६ फार काय सांगावें? कौतुकाखातर सुद्धां जीव विषयांचा अभिलाष करीत नाहीं. कोणत्याही **विषयावर आसक्त न होण्याची जी स्थिति** ती ही; लक्ष्यांत ठेव. १६७ आतां माशांना जसें मोहोळ; जलचरांना जसें जळ; किंवा पक्ष्यांना हें आकाश जसें मोकळें; १६८ किंवा बालकासाठीं जसा आईचा स्नेह; किंवा वसंताच्या स्पर्शानें जसा मलयानिल मृदु; १६९ डोळ्यांना जशी प्रियांची भेट; किंवा पिल्यांना जशी कासवीची दृष्टी; त्याप्रमाणें प्राणिमात्राशीं मृदुवर्तन. १७० स्पर्श करतांना अतिशय मृदु, तोंडांत घातलें तर उत्तम रुचिकर; नाकाला अतिशय सुगंधयुक्त आणि आंगानें निर्मळ; १७१ तो पाहिजे तेवढा घेऊनही जर अपायकारक झाला नसता, तर कापूर सुद्धां उपमेला योग्य झाला असता. १७२ परंतु गगन हें जसें ह्या विश्वाप्रमाणें बनतें, त्याप्रमाणें महाभूतें जो पोटामध्यें धरतो; आणि परमाणूंतही ज्याचा समावेश होतो. १७३ विशेष काय सांगावें? अशा प्रकारचा जन्म; जो जगाच्या प्राणाकरितांच घेतलेला असतो, त्याला '**मार्दव**' असें मी ह्मणतों. १७४ आतां पराजय झाला ह्मणजे राजा जसा लज्जेनें दुःखित होतो; किंवा मानी पुरुषाला नीचपणामुळें जशी निस्तेजता येते; १७५ किंवा चांडाळाच्या घराला अवचित संन्यासी आला ह्मणजे भल्या मनुष्याला जशी लज्जा वाटते; १७६ क्षत्रियाला रणांतून पळून जाणें, ही लाजिरवाणी गोष्ट कोण सहन करील? किंवा महा साध्वीला वैधव्यानें हाका मारणें, १७७ सुस्वरूप मनुष्याला कोड उठणें; संभावितावर आळ येणें, हें त्याला लाजेमुळें जसें प्राणांत संकट होतें, १७८ त्याप्रमाणें साडेतीन हातानें मृताप्रमाणें आयुष्य कंठणें, जन्मून जन्मून पुन्हा पुन्हा मरणें; १७९ त्या गर्भमेदाच्या मुशीमध्यें रक्तमूत्राच्या रसानें ओतवून निघणें, हें लाजिरवाणें होय. १८० हें फार असो. देहाच्या निमित्तानें नामारूपास येणें ह्याच्यासारखें लाजिरवाणें दुसरें कांहीं नाहीं. १८१ अशीं अशीं दुश्चिन्हें मनांत आणून शरीराचा कंटाळा करावयाचा. साधूला त्याची लाज वाटते; पण कोडग्याला तेंच गोड वाटतें. १८२ आतां सुताचा धागा तुटला कीं, बाहुलीची हालचाल बंद पडते, त्याप्रमाणें प्राणावर सत्ता चालविली ह्मणजे कर्मेंद्रियांची गति कुंठित होते. १८३ किंवा सूर्य मावळला कीं किरणांचा विस्तार सरतो. त्याप्रमाणें मनावर सत्ता चालली कीं बुद्धि, इंद्रियांदिकांचीही तशीच स्थिति होते. १८४ ह्याप्रमाणें मनाचें आणि पवनाचें नियमन केलें ह्मणजे दाही इंद्रियें पंगु होतात; ह्याच युक्तीनें त्यांची चंचलता मोडते." १८५

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ।
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

[तेजः] आतां ईश्वरप्राप्तीलागीं । प्रवर्ततां ज्ञानयोगी । धिंवसेयाच्या आंगीं । बोसिंवा नव्हे ॥ ८६ ॥ बोखटें मरणाऐसें । तेंही आलें अग्निप्रवेशें । परी प्राणेश्वरोद्देशें । न

१ धैर्याच्या. २ न्यूनता. ३ पतीकरितां.

गणीचि सती ॥ ८७ ॥ तैसें आत्मनाथाचिया आधीं । लोंऊनि विषयविषाची वोंधी । धावों आडवे पाणधीं । शून्याचिये ॥ ८८ ॥ न ठाके निषेध आड । न पडे विधीची भीड । नुपजेचि जीवीं कोड । महासिद्धीचें ॥ ८९ ॥ ऐसें ईश्वराकडे निंज । धांवे आपसया सहज । तया नांव तेज । आध्यात्मिक तें ॥ १९० ॥ [क्षमा] आतां सर्वही सांहातिया गरिमों । । गर्वा नये तेचि क्षमा । जैसें देह वाहोनि रोमा । वाहणें नेणें ॥ ९१ ॥ [धृतिः] आणि मातलिया इंद्रियांचे वेग । कां प्रांचीनें खवळले रोग । अथवा योगवियोग । प्रियाप्रियाचे ॥ ९२ ॥ यया आघवियाचाचि थोर । एके वेळे आलिया पूर । तरी अगस्त्याहूनि धीर । उभा ठाके ॥ ९३ ॥ आकाशीं धूमाची रेखा । उठिली बहुवा आगळिका । ते गिळी येकीं झुळुका । वारा जेवीं ॥ ९४ ॥ तैसें अधिभूताधिदैवां । अध्यात्मादि उपद्रवां । पातलेयां पांडवा । गिळूनि घाली ॥ ९५ ॥ ऐसें चित्तक्षोभाच्या अवसरीं । उचलूनि धैर्या जें चांगावें करी । धृती ह्मणिपे अवधारीं । तियेतें गा ॥ ९६ ॥ [शौचं] आतां निर्वाळूनि कनकें । भरिला गंगेंपीयूषें । तया कलशाचिया सारिखें । शौच असे ॥ ९७ ॥ जे आंगीं निष्काम आचार । जीवीं विवेक साचार । तो सबाह्य घडला आकार । शुचित्वाचाचि ॥ ९८ ॥ [अद्रोहः] कां फेडित पाप ताप । पोखीतें तीरींचे पोंदप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥ ९९ ॥ कां जगाचें आंध्य फेडित । श्रियेचीं राउळें उघडित । निघे जैसा भांस्वत । प्रदक्षिणे ॥ २०० ॥ तैसीं वांधलीं सोडित । बुडालीं काढित । सांकडी फेडित । आर्तांचिया ॥ १ ॥ किंबहुना दिवसराती । पुढिलांचें सुख उन्नति । आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥ २ ॥ वांचूनि आपुलिया काजालागीं । प्राणिजातांच्या अहितभागीं । संकल्पाचीही आंडवंगी । न करणें जें ॥ ३ ॥ पैं अद्रोहत्व ऐशिया गोष्टी । ऐकसी जिया किरीटी । तें सांगीतलें हें दिठी । पाहों ये तैसें ॥ ४ ॥ [नातिमानिता] आणि गंगा शंभूच्या माथां । पावोनि संकोचली जेविं पार्था । तेविं मान्यपणें सर्वथा । लाजणें जें ॥ ५ ॥ तें हें पुढतपुढती । अमानित्व जाण सुमती । मागां सांगीतलेंसे किती । तेंचि तें बोलों ॥ ६ ॥ [भवंतीति] एवं इहीं सव्विसें । ब्रह्मसंपदा हे वसत असे । मोक्षचक्रवार्तिचें जैसें । अग्रहार होय ॥ ७ ॥ ना ना हे संपत्ती दैवी । या गुणतीर्थांची नित्य नवी । निर्विण्णसगराच्या दैवीं । गंगाचि आली ॥ ८ ॥ कीं गुणकुसुमांची माळा । हे घेऊनि मुक्तिबाळा । वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिंवसीत असे ॥ ९ ॥ कीं सव्विसगुणज्योती । इहीं उजळूनि आरती । गीता आत्मया निजपती- । नीरांजना आली ॥ २१० ॥ उगळिते निर्मळें । गुण इयेंचि मुक्ताफळें । दैवी शुक्ती केळे । गीतार्णवींची ॥ ११ ॥ काय बहु वानूं ऐसी । अभिव्यक्ति ये अपैसी । केलें दैवी गुणराशि । संपत्तीरूप ॥ १२ ॥ आतां दुःखाची आंतुवंठ वेली । दोषकांट्याची जरी भरली । तरी निजाभिधानीं घांतली । आसुरी ते ॥ १३ ॥ पैं त्याज्य त्यजावयालागीं । जाणावी जरी अनुपयोगी । तरी ऐका ते चांगी । श्रोत्रशक्ती ॥ १४ ॥ तरी नरकव्यथा थोरी । आणावया दोषीं अघोरीं । मेळ केला ते आसुरी । संपत्ति हे ॥ १५ ॥ ना ना विषवर्ग एकवट । तया नांव जैसें वासट । आसुरी संपत्ती हा खोटे । दोषांचा तैसा ॥ १६ ॥

"आतां ईश्वरप्राप्तीसाठीं ज्ञानयोगी निघाला ह्मणजे त्याच्या धैर्याच्या आंगांत न्यूनता नसते. १८६ मरणासारखें वाईट, आणि तेंही अग्नींत उडी टाकून आलें तरी, पतिव्रता ही पतीसाठीं जशी त्याची पर्वा करीत नाहीं, १८७ त्याप्रमाणें आत्मनाथाच्या आधीं विषयविषाचे समुदाय जाळून टाकून शून्याच्या पाणधींतून पळत सुटतो. १८८ त्याला निषेध आड येत नाहीं; विधीची भीड पडत नाहीं; महासिद्धीची आवड उत्पन्न होत नाहीं. १८९ ह्याप्रमाणें त्याचें मन ईश्वराकडे आपोआप धांवत असतें. '**अध्यात्मिक**' तेज तें ह्याचें नांव. १९० आतां सर्वही साहजिक असणाऱ्या महत्वाचा गर्व नसणें, तीच **क्षमा** होय. ज्याप्रमाणें देह वाहतांना केंस वाहण्याची आठवण होत नाहीं. १९१ आणखी, इंद्रियांचे वेग माजले; किंवा पूर्वकर्मानें रोग खवळले; अथवा प्रिय अप्रियाचा संयोगवियोग; १९२ ह्या सर्वांचाही एकदम मोठा पूर आला, तरी अगस्तिपेक्षांही धैर्य धरून जो उभा राहतो; १९३ आकाशामध्यें केवढेही मोठे धुराचे लोट उठलेले असले, तरी ते एका झुळुकीबरोबर वारा जसे गिळून टाकतो, १९४ त्याप्रमाणें अर्जुना!

१ जाळून, दूर करून, तोडून. २ समुदाय. ३ कांटेरी मार्गानें. ४ मन. ५ साहजिक. ६ महत्व. ७ पूर्वकर्मानें. ८ अतिशय. ९ शुद्ध, निर्मळ करून. १० गंगोदकानें. ११ पोषीत. १२ वृक्ष. १३ वनशोभेचीं ठिकाणें, कमळें, पुष्पें. १४ सूर्य. १५ संकटें. १६ अडथळा, कुमार्ग. १७ लाजली. १८ श्रीविष्णूचें. १९ इनाम. २० विरक्त सगर राजाचे.

१ शोधीत. २ आरती ओवाळावयास. ३ उघडीत. ४ शकलें. ५ प्रकट. ६ आंतील. ७ आपल्या सांगण्याचे क्रमांत ओंवली. ८ काळकूट. ९ गोळा.

अधिभूत, अधिदैवें, अध्यात्मादि उपद्रव प्राप्त झाले असतां जो गिळून टाकतो; १९५ ह्याप्रमाणें चित्तक्षोभाच्या वेळेला धैर्याची उठावणी करून जी स्थीर राखते, तिला 'धृति' असें ह्मणतात. ध्यानांत ठेव. १९६ ज्याची निर्मलता तर शुद्ध सोन्याच्या कलशांत गंगोदकरूप अमृत भरलेल्या प्रमाणें असते. १९७ कारण, आंगामध्यें निष्कामवर्तन; जिवामध्यें खरा विचार; तो अंतर्बाह्य **शुचित्वाचाच पुतळा** होय. १९८ किंवा गंगेचें पाणी ज्याप्रमाणें पाप ताप दूर करीत, व तीरावर असलेल्या वृक्षांचें पोषण करीत समुद्राला जातें; १९९ किंवा जगाचा अंधकार नाहींसा करीत करीत, वनश्रियांचीं मंदिरें उघडीत उघडीत, सूर्य जसा प्रदक्षिणेला निघतो, २०० त्याप्रमाणें बद्ध झालेलीं सोडवीत सोडवीत, बुडालेलीं काढीत काढीत, दुःखितांचीं दुःखें दूर करीत करीत, २०१ किंबहुना अहोरात्र दुसऱ्याच्या सुखाची उन्नति करीत करीत, स्वार्थामध्यें प्रवेश करतो. २०२ ह्याशिवाय आपल्या स्वार्थासाठीं प्राणिमात्रांच्या अहितभागांत शिरून अडथळा करण्याचें मनांत सुद्धां जें न आणणें, २०३ **अर्जुना!** अशा अद्रोहाच्या गोष्टी, ज्या तूं ऐकत आला आहेस, त्याच, दृष्टीनें पाहतां येतील अशा सांगितल्या. २०४ आणखी गंगा ही शंकराच्या मस्तकावर जातांच जशी लाजली, त्याप्रमाणें **अर्जुना!** प्रतिष्ठेस जें लाजणें, २०५ हे **सुमती! तेंच अमानित्व** असें मागेंही कित्येक वेळां सांगितलेलें आहे. ह्याकरितां तें पुन्हां पुन्हां किती सांगावें? २०६ अशा रीतीनें सव्वीस प्रकारानें मोक्षाच्या चक्रवर्तिराजाच्या इनामाप्रमाणें ही **ब्रह्मसंपत्ति** रहात असते. २०७ किंवा ही **दैवीसंपत्ति** नित्य नव्या गुणतीर्थांनीं भरलेली, विरक्तरूप सगरराजाच्या भाग्यानें गंगाच[1] आलेली आहे. २०८ किंवा ही गुणरूप पुष्पांची माळा घेऊन मुक्तिरूप कन्याच निरपेक्ष व वैराग्यशील अशांचे गळे शोधित आहे. २०९ किंवा सव्वीस गुण ह्याच सव्वीस ज्योति, त्यांची आरती घेऊन गीता ही आत्मारूप आपल्या पतीला ओंवाळण्यास आली आहे. २१० दैवीसंपत्ति हींच गीतासमुद्रांतील शिंपीचीं शकलें, गुणरूप निर्मळ मुक्ताफळेंच (मोत्यें) बाहेर टाकित आहेत. २११ फार काय वर्णन करावें! अशा प्रकारें आपोआपच प्रगट होईल अशा प्रकारचें दैवगुणराशिसंपत्तीचें स्वरूप व्यक्त केलें. २१२ आतां आसुरी संपत्ति ही, दुःखाची माजलेली वेल, दोषरूपकांट्यांनीं जरी भरलेली आहे तरी ती ऐकून ठेव. २१३ ती जरी निरुपयोगी आहे तरी, टाकण्यासारखें काय, तें समजण्यासाठीं तीही माहिती करून घेतली पाहिजे. तर तीही लक्ष्य देऊन ऐका. २१४ तर महा दोषांत शिरून नरकाच्या घोर यातना भोगावयास लावणाऱ्यांचा जो मेळा, तोही आसुरी संपत्ति होय. २१५ किंवा सर्व प्रकारचीं विषें एकत्र करणें ह्याचें नांव जसें काळकूट, त्याप्रमाणें साऱ्या दोषांचा समुदाय, ती ही **आसुरी संपत्ति** होय." २१६

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ४ ॥

[दंभः] तरी तयाचि आसुरा । दोषांमाजी जया वीरा । वाडपणाचा डांगोरा । तो दंभ ऐसा ॥ १७ ॥ जैसी आपुली जननी । नग्न दाविलिया जनीं । तें तीर्थचि परि पतनीं । कारण होय ॥ १८ ॥ कां विद्या गुरूपदिष्टा । बोभाइलिया चोहटां । तरि इष्टदाचि परि अनिष्टा । हेतु होती ॥ १९ ॥ पैं आंगें बुडतो महापुरीं । जे वेगें काढी पैल तीरीं । ते नावचि बांधिलिया शिरीं । बुडवी जैसी ॥ २२० ॥ कारण जें जीविता । तें वानिलें जरि सेवितां । तरि अन्नचि पंडुसुता ।

१ सगर वंशांतील दिलीप राजाचा पुत्र भगीरथ यानें तपश्चर्या करून वंशजांचा उद्धार करण्याकरितां स्वर्गांत असलेली गंगा मृत्युलोकावर आणली. त्यावरूनच तीस 'भागीरथी' असें नांव पडलें.–भा. व. अ. १८ २ मोठेपणाचा. ३ चवाठ्यावर जर उघड केली. ४ पुष्कळ खातां.

१ धरणीकंप, अतिवृष्टि इत्यादि. २ मनोदुःख, शरीरपीडा इत्यादि. ३ विद्युत्पात, पटकी इ.

होय विष ॥ २१ ॥ तैसा दृष्टादृष्टाचा सखा । धर्म जाला तो फोकारिजे देखा । तरि तारिता तोचि दोखा- । लागीं होय ॥ २२ ॥ ह्मणौनि वाचेचा चौवारा । घातलिया धर्माचा पसारा । धर्मचि तो अधर्म होय वीरा । तो दंभ जाणें ॥२३॥ [दर्पः] आतां मूर्खाचिये जिभे । अक्षरांचा आंबुखा सुंभे । आणि तो ब्रह्मसभे । न रिझे जैसा ॥ २४ ॥ कां मादुरी लोकांचा घोडा । गजपतीही मानी थोडा । कां कांटियेवरिल्या सरडा । स्वर्गेही नीच ॥ २५ ॥ तृणाचेनि इंधनें । आगी धांवे गगनें । थिल्लरबळें मीनें । न गणिजे सिंधू ॥ २६ ॥ तैसा माजे स्त्रिया धनें । विद्या स्तुती बहुतें मानें । एके दिवसींचेनि परान्नें । अल्पकु जैसा ॥ २७ ॥ अभ्रच्छायेचिया जोडी । निदैव घर मोडी । मृगांबु देखोनि फोडीं । पाणिथाढें मूर्ख ॥ २८ ॥ किंबहुना ऐसैसें । उेतणें जें संपत्तिमिसें । तो दर्प गा अनारिसें । न बोलें घेई ॥ २९ ॥ [अभिमानश्च] आणि जगा वेदीं विश्वास । आणि विश्वासीं पूज्य ईश । जगीं एक तेजस । सूर्यचि हा ॥ २३० ॥ जगस्पृहे आस्पद । एक सार्वभौमपद । न मरणें निर्विवाद । जगा पेढियें ॥ ३१ ॥ ह्मणौनि जरी उत्साहें । यातें वानूं जाये । कीं तें आइकोनि मत्सर वाहे । फुगों लागे ॥ ३२ ॥ ह्मणे ईश्वरातें खाये । तया वेदा विष सूये । गौरवामाजी न्याये । भंगीत असे ॥३३॥ पतंगा नावडे ज्योती । खद्योता भानुची खंती । टिटिभेनें अपांपती । वैरी केला ॥ ३४ ॥ तैसा अभिमानाचेनि मोहें । ईश्वराचेंही नाम न साहे । बापातें ह्मणे मज हे । सवती जाली ॥ ३५ ॥ ऐसा मान्यतेचा पुष्टगंड । तो अभिमानी परमलंड । रौरवांचा रूंढ । मार्गचि पैं ॥ ३६ ॥ [क्रोधः] आणि पुढिलांचें सुख । देखणियांचें होय मिष । चढे क्रोधाग्नीचें विख । मनोवृत्ती ॥ ३७ ॥ शीतजळाचिये भेटी । तातला तेलीं आगी उठी । चंद्र देखोनि जळे पोटीं । कोल्हा जैसा ॥ ३८ ॥ विश्वाचें आयुष्य जेणें उजळे । तो सूर्य उदैला देखोनि सवळे । पापिया फुटती डोळे । डुंडुलाचे ॥३९॥ जगाची सुखपहांट । चोरां मरणाहूनि निकृष्ट । दुधाचें काळकूट । होय व्याळीं ॥ २४० ॥ अगाधें समुद्रजळें । प्राशितां अधिक जळें । वडवाग्नी न मिळे । शांति कहीं ॥ ४१ ॥ तैसा विद्याविनोदविभवें । देखे पुढिलांचीं दैवें । तंव तंव रोष दुणावे । क्रोध तो जाण ॥ ४२ ॥ [पारुष्यमेव च] आणि मन सर्पाची कुटी । डोळे नाराचांची सुटी । बोलणें ते वृष्टी । इंगळांची ॥४३॥ येर जें कियाजात । तें तिखयाचें करवत । ऐसें सबाह्य खसखसित । जयाचें गा ॥४४॥ तो मनुष्यांत अधम जाण । पारुष्याचें अवतरण । आतां आइक खुण । अज्ञानाची ॥ ४५॥ [अज्ञानं चेति] तरी शीतोष्णस्पर्शां । निवाडे नेणे पाषाण जैसा । कां रात्री आणि दिवसा । जात्यंध तो ॥ ४६ ॥ आगी उठिला आरोगणें । जैसा खाद्याखाद्य न ह्मणे । कां परिस पाड नेणे । सोनया लोहा ॥ ४७ ॥ ना तरि ते नानारसीं । रिघोनि दर्वी जैसी । परि रसस्वादासी । चाखों नेणे ॥ ४८ ॥ कां वारा जैसा पारखी । नव्हेचि गा मार्गामार्गीविखीं । तैसे कृत्याकृत्यविवेकीं । अंधपण जें ॥ ४९ ॥ हें चोख हें मैळ । ऐसें नेणोनियां बाळ । देखे तें केवळ । मुखींचि घाली ॥ २५० ॥ तैसें पापपुण्याचें खिचटें । करोनि खातां बुद्धिचेष्टे । कडु मधुर न वाटे । ऐसी जे दशा ॥५१॥ तिये नाम अज्ञान । या बोला नाहीं आन । एवं साही दोषांचें चिन्ह । सांगितलें ॥ ५२ ॥ इहींच साही दोषांगीं । हे आसुरी संपत्ति दांडुगी । जैसें थोर विष भुजंगीं । अंग सानें ॥ ५३ ॥ कां तिर्धी वन्हीच्या पांती । पाहतां थोडे ठाय गमती । परि विश्वही प्राणाहुती । करूं न पुरे ॥ ५४ ॥ धांतयाही गेलिया शरण । त्रिदोषीं न चुके मरण । तयां तिहीची दुणी जाण । साही दोष हे ॥ ५५ ॥ इहीं साही दोषीं संपूर्णी । जाली इयेची उभारणी । ह्मणोनि आसुरी उणी । संपदा नव्हे ॥ ५६ ॥ परि क्रूरग्रहांची जैसी । मांदी मिळे एकेचि राशी । कां येती निंदकापासीं । अशेष पापें ॥ ५७ ॥ मरणाराचें आंग । पेडिघाती अवघेचि रोग । कां कुमुहूर्ती दुर्योग । एकवटती ॥ ५८ ॥ विश्वासला आंतुडवीजे चोरा । शिणला सुईजे महापुरा । तैसें दोषीं इहीं नरा । अनिष्ट कीजे ॥ ५९ ॥ कां आयुष्य जातिये वेळे । शेळिये सातवेउळि मिळे । तैसे साही दोष सगळे । जोडती तया ॥ २६० ॥ मोक्षमार्गाकडे । जयाचा आंबुखा पडे । न निघे ह्मणौनि बुडे । संसारीं जो ॥ ६१ ॥ अधमां योनींच्या पाउटीं । उतरत जो किरीटी । स्थावरांही तळवटी । बैसणें घे ॥ ६२ ॥ हें असो तयाच्या ठायीं । मिळोनि साहीं दोषीं इहीं । आसुरी संपत्ती पाहीं । वाढवीजे ॥ ६३ ॥ ऐसिया या दोनी । संपत्ती प्रसिद्धा जनीं । सांगीतलिया चिन्हीं । वेगळाल्या ॥ ६४ ॥

१ इहपरलोकींचा. २ उघड केला. ३ चव्हाठा. ४ शितोडा. ५ घातला. ६ चाबुकस्वाराचा. ७ दरिद्री. ८ तळें. ९ माजणें. १० इच्छेचें स्थान. ११ आवडतें. १२ महत्वाच्या योगानें. १३ सत्ता. १४ टिटवीनें समुद्राशीं वैर मांडलें. १५ मोठा ताठा. १६ उन्मत्त. १७ प्रसिद्ध (आरूढ). १८ तापलेल्या. १९ प्रातःकाळीं. २० घुबडाचे. २१ वाईट. २२ ऐश्वर्यानें.

१ वारूळ. २ बाणांचें सुटणें. ३ पोलादी. ४ काठिण्याचें. ५ मूर्ती. ६ जन्मांध. ७ खावयाला. ८ योग्यता. ९ पळी. १० खिचडी. ११ बुद्धिव्यापारास. १२ बलाढ्य. १३ लहान. १४ प्रळयाग्नि, विद्युताग्नि, वडवाग्नि. १५ पंक्तीत. १६ ब्रह्मदेवाला. १७ मंगळशनींची. १८ समुदाय. १९ व्यापिती. २० धरावा, सांपडावा. २१ घालावा. २२ सात नांग्यांची इंगळी. २३ शितोडा, गंवसणी. २४ पावलांनीं.

"तर हे **वीरा!** आसुरी दोषांमध्यें मोठा प्रसिद्ध ह्मणून डांगोरा पिटलेला जो 'दंभ' तो असा. २१७ ज्याप्रमाणें आपली आई लोकांत नग्न दाखविली, तर तें तीर्थ असूनही पतनास कारण होतें; २१८ किंवा गुरूनें उपदेश केलेली विद्या, चव्हाट्यावर जर उघडी केली, तर कल्याणकारक असूनही ती अनिष्टास कारण होते. २१९ ज्याप्रमाणें नाव आपण स्वतः पाण्यांत बुडालेली असतांही, इतरांस पैलतीरास नेऊन पोंचविते; तीच नाव मस्तकावर घेतली असतां, जशी बुडविण्यास कारण होते; २२० **अर्जुना!** जीवितास कारण होणारें अन्नच जर अतिशय सेवन केलें, तर तेंच अन्न जसें विष होतें; २२१ त्याप्रमाणें इहपरलोकचा सखा जो धर्म, तोच जर उघड केला, तर दोषाला तारणारा होतो. २२२ ह्मणून हे **शूरा!** वाणीनें धर्माचा चव्हाटा करून धर्माचा पसारा मांडला, तर तोही धर्मच असून अधर्म होतो. तो **दंभ** होय. २२३ आतां मूर्खाच्या जिभेला अक्षरांचा थोडासा संस्कार झाला कीं तो जसा ब्रह्मसभेला जुमानीत नाहीं. २२४ किंवा चाबुकस्वाराचा घोडा, गजश्रेष्ठालाही जसा तुच्छ मानतो, किंवा कुंपणावरचा सरडा, स्वर्गही जसा नीच मानतो, २२५ तृणाच्या जळणानें आग जशी आकाशांत धांवते; डबक्याच्या बळावर मासा जसा समुद्राची पर्वा करित नाहीं; २२६ एका दिवसाच्या परान्नानें दरिद्री जसा माजतो, व संतोष पावतो; त्याप्रमाणें स्त्रिया, धन आणि विद्याधन ह्यांनीं माजतो; स्तुतीनें संतोष पावतो; २२७ अभ्राची छाया मिळाली कीं, कपाळकरंटा जसें घर मोडून टाकतो; मृगजळ पाहून मूर्ख जसा तळें फोडून टाकतो; २२८ किंबहुना संपत्तीच्या निमित्तानें असें जें माजणें, तो दर्प होय. ह्यांत कांहीं भेद धरूं नको. २२९ आणखी जगाचा वेदावर विश्वास; पूज्य ईश्वर तो विश्वासामर्थ्ये; जगामध्यें खरा तेजस्वी सूर्य हाच. २३० जगाच्या इच्छेचें स्थान; अद्वितीय सत्ताधीश; जगाचें आवडतें; आणि ज्याला मरण नाहीं, हें तर निर्विवाद ठरलेलें. २३१ ह्मणून त्याचें जर उत्साहानें वर्णन करूं लागलें, तर तें ऐकून मत्सरानें जो फुगूं लागतो. २३२ तो ह्मणतो कीं 'त्या ईश्वराला खाऊन टाका; ह्या वेदाला विष द्या;' कोणी ईश्वराचा गौरव करूं लागला तर त्याची निंदा करतो. २३३ पतंगाला ज्योत आवडत नाहीं; काजव्याला सूर्याची खंती वाटते; टिटवी समुद्राला वैरी करते; २३४ त्याप्रमाणें अभिमानाच्या मोहानें ईश्वराचें नांवही ज्याला सहन होत नाहीं. बापाला ह्मणतो कीं 'मला ही सवत झाली' २३५ असा ज्याला आत्मप्रौढीचा ताठा, तो मोठा अभिमानी व उन्मत्त होय. तो नरकाचा प्रसिद्ध मार्गच समजावा. २३६ दुसऱ्याचें सुख पाहण्याचें निमित्य झालें कीं, ज्याच्या मनोवृत्तीला क्रोधाचें विष चढतें. २३७ थंड पाण्याच्या भेटीला तापलेल्या तेलामध्यें जशी आग उसळते; चंद्राला पाहून कोल्हा जसा पोटामध्यें जळतो; २३८ विश्वाच्या आयुष्याला ज्याच्या योगानें बळ चढतें, तो सूर्य प्रातःकाळीं पाहिला कीं, पातकी घुबडाचे डोळे फुटतात; २३९ जगाला सुख देणारी पहांट, चोराला मरणाहून वाईट वाटते; सर्पामध्यें दुधाचें कालकूट होतें; २४० समुद्राचें अपार पाणी पितां पितां वडवाग्नि अधिकाधिकच जळूं लागतो. त्याला शांति अशी कधीं नाहींच. २४१ त्याप्रमाणें विद्याविनोदाच्या वैभवानें दुसऱ्याचीं वैभवें जों जों पाहूं लागतो तों तों ज्याचा संताप दुणावतो; तो '**क्रोध**' हें लक्षांत ठेव. २४२ आणखी मन हें सर्पाचें वारूळ; डोळे हे बाणांचें अग्र; आणि बोलणें तें इंगळाची वृष्टि. २४३ इतर जी जी सारी क्रिया ते पोलादाचें करवत; असें अंतर्बाह्य ज्याचें तीक्ष्ण; २४४ तो मनुष्यामध्यें अधम, व कठिणपणाची मूर्ति होय, हें लक्ष्यांत ठेव. आतां अज्ञानाचें चिन्ह ऐक. २४५ शीत किंवा उष्ण ह्यांच्या स्पर्शाचा निर्णय जसा दगडाला होत नाहीं; किंवा जन्मांधाला

जशीं रात्र आणि दिवस हीं कळत नाहींत; २४६ पोटांत आग उठलेला मनुष्य जसा खाण्यास योग्य किंवा अयोग्य ह्मणत नाहीं; किंवा परिसाला जशी सोन्याची आणि लोखंडाची किंमत कळत नाहीं; २४७ किंवा नानाप्रकारच्या रसांमध्यें शिरूनही पळीला रसास्वाद कळत नाहीं; २४८ किंवा मार्ग आणि अमार्ग ह्याची वाऱ्याला जशी परीक्षा नाहीं; त्याप्रमाणें कृत्य किंवा अकृत्य ह्यामध्यें जे अंधळे; २४९ हें चांगलें व हें वाईट हें न समजून मूल जें पाहील तें तोंडांतच घालतें. २५० त्याप्रमाणें पापपुण्याची खिचडी करून खातांना बुद्धीच्या व्यापाराला कडू किंवा मधुर न वाटणें अशी जी दशा, २५१ तिचें नांव **अज्ञान.** ह्यांत कांहीं संदेह नाहीं. असें हें सहा दोषांचें लक्षण तुला सांगितलें. २५२ ज्याप्रमाणें सर्पाचें आंग लहान, पण विष मोठें; त्याप्रमाणें हेच सहा दोष आंगीं असलेली ही आसुरी संपत्ति बलाढ्य झालेली आहे. २५३ किंवा तिन्ही अग्नीच्या (प्रळयाग्नि, विद्युदाग्नि आणि वडवाग्नि) पंक्तींत जागा थोडीच आहे असें वाटतें. परंतु प्राणाची आहुति करण्याला विश्वही पुरत नाहीं. २५४ तर त्रिदोष झाला तर ब्रह्मदेवाला शरण गेलें तरी, मरण चुकत नाहीं. मग हे तर त्या तिहींच्या दुप्पट-सहा-दोष आहेत! २५५ अशा ह्या संपूर्ण सहा दोषांनीं हिची उभारणी झालेली आहे. ह्मणून ही आसुरी संपत्ति कमी नव्हे. २५६ तसेंच दुष्टग्रहांचा समुदाय जसा एकाच राशीवर येऊन मिळतो, किंवा निंदकापाशीं झाडून सारीं पातकें येतात, २५७ सारे रोग येऊन मरणाराचें आंग व्यापतात, किंवा वाईट मुहूर्तामध्यें दुर्योग सारे एकत्र होतात, २५८ विश्वास ठेवलेला मनुष्य चोराच्या हातीं लागावा, किंवा दमलेला मनुष्य महापुरांत ढकलावा, त्याप्रमाणें हे दोष मनुष्याचें अनिष्ट करतात. २५९ किंवा आयुष्य संपावयाचें असलें ह्मणजे शेळीला सात नाग्यांची इंगळी दंश करिते, त्याप्रमाणें त्याला साधनें प्राप्त होतात. २६० मोक्षमार्गाकडे त्याचा आडपडदा पडलेला असतो. तो निघत नाहीं. ह्मणून तो संसारांत बुडतो. २६१ **अर्जुना!** जो अधमयोनींच्या पायऱ्यांवरून घसरत घसरत शेवटीं शेवटीं जो जड पाषाणापेक्षांही नीच योनींत जातो. २६२ हें असो. त्याच्या ठिकाणीं हे सहा दोष एकत्र होऊन आसुरी संपत्ति वाढवितात, असें समज. २६३ अशा ह्या लोकांमध्यें ह्या दोन्ही प्रसिद्ध असलेल्या संपत्ति निरनिराळ्या लक्षणांनीं सांगितल्या." २६४

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥

[दैवी संपद्विमोक्षाय] इया दोन्हींमाजी पहिली । दैवी जे ह्मणीतली । ते मोक्षसूर्यें पाहली । उखाचि जाण ॥ ६५ ॥ [निबंधायासुरी मता] येरी जे दुसरी । संपत्ति कां आसुरी । ते मोहलोहाची खरी । सांखळी जीवा ॥ ६६ ॥ [मा शुचः] परी हें आइकोनि झणें । भय घेसी हो मनें । काय रात्रीचा दिनें । धाक धरिजे ॥ ६७ ॥ हे आसुरी संपत्ति तया । बंधालागीं धनंजया । जो साहीं दोषां ययां । आश्रय होय ॥६८॥ [संपदं दैवीमिति] तूं तंव पांडवा । सांगीतलेया दैवा । गुणानिधी वरवा । जन्मलासी ॥ ६९ ॥ ह्मणोनि पार्था तूं या । दैवीसंपत्ती स्वामियां । होउनि यावें उवाया । कैवल्याचिया ॥ ७० ॥

"ह्या दोहोंमध्यें पहिली जी दैवी ह्मणून ह्मटली, ती मोक्षसूर्यानें उजाडलेली प्रातःकाळ आहे असें समज. २६५ तिच्या शिवाय दुसरी जी आसुरी संपत्ति आहे, ती मोहरूप लोखंडाची जिवाला बेडीच पडलेली आहे, २६६ पण हें ऐकून मनानें कदाचित् भय घेशील हो! रात्रीचा दिवसानें धाक बाळगावा होय? २६७ हे **धनंजया!** जो ह्या सहा दोषांचा आश्रय होतो, त्यालाच ती बंधास कारण होते. २६८ **अर्जुना!** तूं तर सांगितलेल्या दैवी गुणांचा उत्तम समुद्रच जन्मास आला आहेस. २६९ ह्मणून **अर्जुना!** तूं ह्या दैवी संपत्तीचा स्वामी होऊन मोक्षसुखाला पोंच." २७०

१ उजडविली. २ प्रातःकाळ. ३ संसाररूप जो बंध त्याला कारण. ४ सुखाप्रत.

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥

[द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्] आणि दैवां आसुरां । संपत्तिवंतां नरां । अनादिसिद्ध उजगरा । राहाटींचा आहे ॥ ७१ ॥ जैसें रात्रीच्या अवसरीं । व्यापारिजे निशाचरीं । दिवसा सुव्यवहारीं । मनुष्यादिकीं ॥ ७२ ॥ [दैव आसुर एव च] तैसिया आपलालिया राहाटीं । वर्तती दोनी सृष्टी । दैवी आणि किरीटी । आसुरी येथ ॥ ७३ ॥ [दैवो विस्तरशः प्रोक्तः] तेवींचि विस्तारूनि दैवी । ज्ञानकथनादि प्रस्तावीं । मागील ग्रंथीं बरवी । सांगीतली ॥ ७४ ॥ [आसुरं पार्थ मे शृणु] आतां आसुरी जे सृष्टी । तेथिंची उपलऊं गोठी । अवधानाची दिठी । दे पां निकी ॥ ७५ ॥ तरी वाद्येंवीण नाद । नेदी कवणाही सांद । कां अपुष्पीं मकरंद । न लभे जैसा ॥ ७६ ॥ तैसी प्रकृति हे आसुर । एकली नोहे गोचर । जंव एकाधें शरीर । माल्हाती ना ॥ ७७ ॥ मग आविष्करला लांकुडें । पावक जैसा जोडे । तैसी प्राणिदेहीं सांपडे । आटोपली हे ॥ ७८ ॥ ते वेळीं जे वाढी उंसा । तेचि आंतुला रसा । देहाकार होय तैसा । प्राणियांचा ॥ ७९ ॥ आतां तयांचि प्राणियां । रूप करूं धनंजया । घडले जें आसुरीया । दोषवृंदीं ॥ २८० ॥

"आणखी दैवी व आसुरी संपत्ति असणाऱ्या नरांच्या वागणुकीचे अनादि सिद्ध हे दोन मार्ग आहेत. २७१ ज्याप्रमाणें रात्रीच्या वेळीं निशाचराचे कारभार चालतात, आणि दिवसा मनुष्यादिकांचे उत्तम व्यापार चालतात; २७२ त्याप्रमाणें अर्जुना! येथें दैवी आणि आसुरी ह्या दोन्ही सृष्टि आपआपल्या व्यापारानें चालत असतात. २७३ त्याचप्रमाणें प्रसंगानुसार दैवीचा विस्तार करून ज्ञानकथनादिक मागील विवेचनामध्यें नीट रीतीनें सांगितलें. २७४ आतां आसुरी ह्मणून जी सृष्टि आहे तेथची गोष्ट सांगूं. अवधानाची नीट दृष्टि दे. २७५ तर वाद्याशिवाय नाद हा कोणाला शब्द देत नाहीं; किंवा पुष्प नसतांना मकरंद मिळत नाहीं; २७६ त्याप्रमाणें आसुर प्रकृती ही, एखाद्या शरिराचा स्वीकार केल्याशिवाय, एकटी दृष्टीस पडत नाहीं. २७७ मग लांकडास लागलेला अग्नि जसा त्यास आत्मस्वरूप करून सोडतो, त्याप्रमाणें ही प्राण्यांच्या देहांत व्यापलेली दृष्टीस पडते. २७८ त्या वेळीं उंसाला जी वाढ, तीच आंतील रसाला; त्याप्रमाणें त्या प्राण्याचा आकारही तसाच होतो. २७९ आतां अर्जुना! आसुरी संपत्तीच्या दोषसमुदायांनीं जे प्राणी घडले जातात, त्याच प्राण्यांचें स्वरूप सांगूं." २८०

१ जागरण. २ प्रसंगें. ३ सांगूं. ४ शब्द, ध्वनि, उत्तर. ५ पुष्परस. ६ अंगीकारीना. ७ प्रकट केलेला.



प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥

[प्रवृत्तिं च निवृत्तिं च] तरि पुण्यालागीं प्रवृत्ती । कां पापाविषयीं निवृत्ती । या जाणणेयाची राती । तयांचें मन ॥ ८१ ॥ [जना न विदुरासुराः] निगणेया आणि प्रवेशा । चित्त नेदीत आवेशा । कोशकीट जैसा । जाचिंनला पैं ॥ ८२ ॥ कां दिधलें मागुती येइल । कीं नयें हें पुढील । न पाहतां दे भांडवल । मूर्ख चोरां ॥ ८३ ॥ तैसिया प्रवृत्ति निवृत्ति दोनी । नेणिजती आसुरीं जनीं । [न शौचं] आणि शौच तें स्वप्नीं । देखती ना ते ॥ ८४ ॥ काळिमा सांडील कोळसा । वरि चोखी होईल वायसा । राक्षसही मांसा । विटों शके ॥ ८५ ॥ परि आसुरां प्राणियां । शौच नाहीं धनंजया । पवित्रत्व जेविं भांडिया । मद्याचिया ॥ ८६ ॥ [नापि चाचारो] वाढविती विधीची आस । कां पाहाती वडिलांची वास । कर्मे आचरती हे भाष । नेणतीचि ते ॥ ८७ ॥ जैसें चरणें शेळियेचें । कां धांवणें वारियाचें । जाळणें अग्नीचें । भलतेउतें ॥ ८८ ॥ तैसें पुढांसूनि खैरें । आचरती ते गा आसुर । [न सत्यं तेषु विद्यते] सत्येंसि कीर वैर । सदांचि तयां ॥ ८९ ॥ जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया । तरी साचा बोलिया । बोलती ते ॥ २९० ॥ अपानाचेनि तोंडें । जरि सुगंधा येणें घडे । तरि सत्य तयां जोडे । आसुरांतें ॥ ९१ ॥ ऐसें ते नकरितां कांहीं । आंगेंचि वोखटें पाहीं । आतां बोलती ते नेवाई । सांगिजेल ॥ ९२ ॥ येऱ्हवीं करयांच्या ठायीं चांग । तें तयासि कैचें नीट आंग । तैसा असुरांचा प्रसंग । प्रसंगें परिस ॥ ९३ ॥ उंधवणीचें जेविं तोंड । उंगळी धुंवांचे उंभड । हें जाणिजे तेविं उघड । सांगों ते बोल ॥ ९४ ॥

१ आवेशानें, त्वरेनें. २ कोशकार किडा. ३ शास्त्रविहित धर्माविषयीं विधिवाक्य, व शास्त्रनिषिद्ध आचाराचा निषेध. ४ पांढरेपणा. ५ वाट. ६ प्राङ्मुख. ७ यथेष्ट. ८ वाईट. ९ अपूर्वता. १० उंटाच्या. ११ धुराड्याचें. १२ ओकी. १३ धुराचे. १४ लोट, उमाळे.

जशीं रात्र आणि दिवस हीं कळत नाहींत; २४६ पोटांत आग उठलेला मनुष्य जसा खाण्यास योग्य किंवा अयोग्य ह्मणत नाहीं; किंवा परिसाला जशी सोन्याची आणि लोखंडाची किंमत कळत नाहीं; २४७ किंवा नानाप्रकारच्या रसांमध्यें शिरूनही पळीला रसास्वाद कळत नाहीं; २४८ किंवा मार्ग आणि अमार्ग ह्याची वाऱ्याला जशी परीक्षा नाहीं; त्याप्रमाणें कृत्य किंवा अकृत्य ह्यामध्यें जे अंधळे; २४९ हें चांगलें व हें वाईट हें न समजून मूल जें पाहील तें तोंडांतच घालतें. २५० त्याप्रमाणें पापपुण्याची खिचडी करून खातांना बुद्धीच्या व्यापाराला कडू किंवा मधुर न वाटणें अशी जी दशा, २५१ तिचें नांव **अज्ञान**. ह्यांत कांहीं संदेह नाहीं. असें हें सहा दोषांचें लक्षण तुला सांगितलें. २५२ ज्याप्रमाणें सर्पाचें आंग लहान, पण विष मोठें; त्याप्रमाणें हेच सहा दोष आंगीं असलेली ही आसुरी संपत्ति बलाढ्य झालेली आहे. २५३ किंवा तिन्ही अग्नीच्या (प्रळयाग्नि, विद्युदाग्नि आणि वडवाग्नि) पंक्तींत जागा थोडीच आहे असें वाटतें. परंतु प्राणाची आहुति करण्याला विश्वही पुरत नाहीं. २५४ तर त्रिदोष झाला तर ब्रह्मदेवाला शरण गेलें तरी, मरण चुकत नाहीं. मग हे तर त्या तिहींच्या दुप्पट-सहा–दोष आहेत! २५५ अशा ह्या संपूर्ण सहा दोषांनीं हिची उभारणी झालेली आहे. ह्मणून ही आसुरी संपत्ति कमी नव्हे. २५६ तसेंच दुष्टग्रहांचा समुदाय जसा एकाच राशीवर येऊन मिळतो, किंवा निंदकापाशीं झाडून सारीं पातकें येतात, २५७ सारे रोग येऊन मरणाराचें आंग व्यापतात, किंवा वाईट मुहूर्तामध्यें दुर्योग सारे एकत्र होतात, २५८ विश्वास ठेवलेला मनुष्य चोराच्या हातीं लागावा, किंवा दमलेला मनुष्य महापुरांत ढकलावा, त्याप्रमाणें हे दोष मनुष्याचें अनिष्ट करतात. २५९ किंवा आयुष्य संपावयाचें असलें ह्मणजे शेळीला सात नाग्यांची इंगळी दंश करिते, त्याप्रमाणें त्याला साधनें प्राप्त होतात. २६० मोक्षमार्गाकडे त्याचा आडपडदा पडलेला असतो. तो निघत नाहीं. ह्मणून तो संसारांत बुडतो. २६१ **अर्जुना!** जो अधमयोनीच्या पायऱ्यांवरून घसरत घसरत शेवटीं शेवटीं जो जड पाषाणापेक्षांही नीच योनींत जातो. २६२ हें असो. त्याच्या ठिकाणीं हे सहा दोष एकत्र होऊन आसुरी संपत्ति वाढवितात, असें समज. २६३ अशा ह्या लोकांमध्यें ह्या दोन्ही प्रसिद्ध असलेल्या संपत्ति निरनिराळ्या लक्षणांनीं सांगितल्या." २६४

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ।
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥

[दैवी संपद्विमोक्षाय] इया दोन्हींमाजी पहिली । दैवी जे ह्मणीतली । ते मोक्षसूर्यें पाहली । उखाचि जाण ॥ ६५ ॥ [निबंधायासुरी मता] येरी जे दुसरी । संपत्ति कां आसुरी । ते मोहलोहाची खरी । सांखळी जीवा ॥ ६६ ॥ [मा शुचः] परि हें आइकोनि झणें । भय घेसी हो मनें । काय रात्रीचा दिनें । धाक धरिजे ॥ ६७ ॥ हे आसुरी संपत्ति तया । बंधालागीं धनंजया । जो साहीं दोषां यया । आश्रय होय ॥६८॥ [संपदं दैवीमिति] तूं तंव पांडवा । सांगीतलेया दैवा । गुणानिधी बरवा । जन्मलासी ॥ ६९ ॥ ह्मणोनि पार्था तूं या । दैवीसंपत्ती स्वामियां । होउनि यावें उवाया । कैवल्याचिया ॥ २७० ॥

"ह्या दोहोंमध्यें पहिली जी दैवी ह्मणून ह्मटली, ती मोक्षसूर्यानें उजाडलेली प्रातःकाळ आहे असें समज. २६५ तिच्या शिवाय दुसरी जी आसुरी संपत्ति आहे, ती मोहरूप लोखंडाची जिवाला बेडीच पडलेली आहे, २६६ पण हें ऐकून मनानें कदाचित् भय घेशील हो! रात्रीचा दिवसानें धाक बाळगावा होय? २६७ हे **धनंजया!** जो ह्या सहा दोषांचा आश्रय होतो, त्यालाच ती बंधास कारण होते. २६८ **अर्जुना!** तूं तर सांगितलेल्या दैवी गुणांचा उत्तम समुद्रच जन्मास आला आहेस. २६९ ह्मणून **अर्जुना!** तूं ह्या दैवी संपत्तीचा स्वामी होऊन मोक्षसुखाला पोंच." २७०

१ उजडविली. २ प्रातःकाळ. ३ संसाररूप जो बंध त्याला कारण. ४ सुखाप्रत.

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥

[द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्] आणि दैवां आसुरां । संपत्तिवंतां नरां । अनादिसिद्ध उजगरा । राहाटींचा आहे ॥ ७१ ॥ जैसें रात्रीच्या अवसरीं । व्यापारिजे निशाचरीं । दिवसा सुव्यवहारीं । मनुष्यादिकीं ॥ ७२ ॥ [दैव आसुर एव च] तैसिया आपलालिया राहाटीं । वर्तती दोनी सृष्टी । दैवी आणि किरीटी । आसुरी येथ ॥ ७३ ॥ [दैवो विस्तरशः प्रोक्तः] तेवींचि विस्तारूनि दैवी । ज्ञानकथनादि प्रस्तावीं । मागील ग्रंथीं बरवी । सांगीतली ॥ ७४ ॥ [आसुरं पार्थ मे शृणु] आतां आसुरी जे सृष्टी । तेयिंची उपलऊं गोठी । अवधानाची दिठी । दे पां निकी ॥ ७५ ॥ तरी वाद्येंवीण नाद । नेदी कवणाही सांद । कां अपुष्पीं मकरंद । न लभे जैसा ॥ ७६ ॥ तैसी प्रकृति हे आसुर । एकली नोहे गोचर । जंव एकाधें शरीर । माल्हाती ना ॥ ७७ ॥ मग आविष्करला लांकुडें । पावक जैसा जोडे । तैसी प्राणिदेहीं सांपडे । आटोपली हे ॥ ७८ ॥ ते वेळीं जे वाढी उंसा । तेचि आंतुला रसा । देहाकार होय तैसा । प्राणियांचा ॥ ७९ ॥ आतां तयांचि प्राणियां । रूप करूं धनंजया । घडले जें आसुरीया । दोषवृंदीं ॥ २८० ॥

**"आणखी दैवी व आसुरी संपत्ति असणाऱ्या नरांच्या वागणुकीचे अनादि सिद्ध हे दोन मार्ग आहेत. २७१ ज्याप्रमाणें रात्रीच्या वेळीं निशाचराचे कारभार चालतात, आणि दिवसा मनुष्यादिकांचे उत्तम व्यापार चालतात; २७२ त्याप्रमाणें अर्जुना! येथें दैवी आणि आसुरी ह्या दोन्ही सृष्टि आपआपल्या व्यापारानें चालत असतात. २७३ त्याचप्रमाणें प्रसंगानुसार दैवीचा विस्तार करून ज्ञानकथनादिक मागील विवेचनामध्यें नीट रीतीनें सांगितलें. २७४ आतां आसुरी ह्मणून जी सृष्टि आहे तेथची गोष्ट सांगूं. अवधानाची नीट दृष्टि दे. २७५ तर वाद्याशिवाय नाद हा कोणाला शब्द देत नाहीं; किंवा पुष्प नसतांना मकरंद मिळत नाहीं; २७६ त्याप्रमाणें आसुर प्रकृती ही, एखाद्या शरिराचा स्वीकार केल्याशिवाय, एकटी दृष्टीस पडत नाहीं. २७७ मग लांकडास लागलेला अग्नि जसा त्यास आत्मस्वरूप करून सोडतो, त्याप्रमाणें ही प्राण्यांच्या देहांत व्यापलेली दृष्टीस पडते. २७८ त्या वेळीं उंसाला जी वाढ, तीच आंतील रसाला; त्याप्रमाणें त्या प्राण्याचा आकारही तसाच होतो. २७९ आतां अर्जुना! आसुरी संपत्तीच्या दोषसमुदायांनीं जे प्राणी घडले जातात, त्याच प्राण्यांचें स्वरूप सांगूं." २८०**

१ जागरण. २ प्रसंगें. ३ सांगूं. ४ शब्द, ध्वनि, उत्तर. ५ पुष्परस. ६ अंगीकारीना. ७ प्रकट केलेला.



प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥

[प्रवृत्तिं च निवृत्तिं च] तरि पुण्यालागीं प्रवृत्ती । कां पापाविषयीं निवृत्ती । या जाणणेयाची राती । तयांचें मन ॥ ८१ ॥ [जना न विदुरासुराः] निगणेया आणि प्रवेशा । चित्त नेदीत आवेशा । कोशकीट जैसा । जाचिंनला पैं ॥ ८२ ॥ कां दिधलें मागुती येइल । कीं नये हें पुढील । न पाहतां दे भांडवल । मूर्ख चोरां ॥ ८३ ॥ तैसिया प्रवृत्ति निवृत्ति दोनी । नेणिजती आसुरीं जनीं । [न शौचं] आणि शौच तें स्वप्नीं । देखती ना ते ॥ ८४ ॥ काळिमा सांडील कोळसा । वरि चोखी होईल वायसा । राक्षसही मांसा । विटों शके ॥ ८५ ॥ परि आसुरां प्राणियां । शौच नाहीं धनंजया । पवित्रत्व जेविं भांडिया । मद्याचिया ॥ ८६ ॥ [नापि चाचारो] वाढविती विधीची आस । कां पाहाती वडिलांची वास । कर्मे आचरती हे भाष । नेणतीचि ते ॥ ८७ ॥ जैसें चरणें शेळियेचें । कां धांवणें वारियाचें । जाळणें अग्नीचें । भलतेउतें ॥ ८८ ॥ तैसें पुढांसूनि खैरें । आचरती ते गा आसुर । [न सत्यं तेषु विद्यते] सत्येंसि कीर वैर । सदांचि तयां ॥ ८९ ॥ जरी नांगिया आपुलिया । विंचू करी गुदगुलिया । तरी साचा बोलिया । बोलती ते ॥ २९० ॥ अपानाचेनि तोंडें । जरि सुगंधा येणें घडे । तरि सत्य तयां जोडे । आसुरांतें ॥ ९१ ॥ ऐसें ते नकरितां कांहीं । आंगेंचि वोखटें पाहीं । आतां बोलती ते नवाई । सांगिजेल ॥ ९२ ॥ येन्हवीं करेयांच्या ठायीं चांग । तें तयासि कैचें नीट आंग । तैसा असुरांचा प्रसंग । प्रसंगें परिस ॥ ९३ ॥ उंधवणीचें जेविं तोंड । उंगळी धुंवांचे उभड । हें जाणिजे तेविं उघड । सांगों ते बोल ॥ ९४ ॥

१ आवेशानें, त्वरेनें. २ कोशकार किडा. ३ शास्त्रविहित धर्माविषयीं विधिवाक्य, व शास्त्रनिषिद्ध आचाराचा निषेध. ४ पांढरेपणा. ५ वाट. ६ प्राङ्मुख. ७ यथेष्ट. ८ वाईट. ९ अपूर्वता. १० उंटाच्या. ११ धुराड्याचें. १२ ओकी. १३ धुराचे. १४ लोट, उमाळे.

"तर पुण्याला प्रवृत्त होणें, किंवा पापाला निवृत्त होणें, हें जाणण्याची रात्र हेंच त्यांचें मन; २८१ कोशांतला किडा जसा कुचमत असतो, त्याप्रमाणें निघण्याला किंवा प्रवेश करण्याला चित्त आवेश ह्मणून देतच नाहीं. २८२ किंवा दिलेलें माघारें येईल का येणार नाहीं, हें पुढचें न पाहतां मूर्ख जसा चोराला भांडवल देतो, २८३ त्याप्रमाणें आसुरी संपत्तीचे लोक आहेत ते, प्रवृत्ति आणि निवृत्ती हीं दोन्हींही जाणत नाहींत. आणि शुचिर्भूतपणा तर, स्वप्नांतही त्यांना ठाउक नसतो. २८४ कोळसा काळेपणा सोडील; कावळाही पांढरा होईल; राक्षस मांसालाही विटूं शकेल, २८५ परंतु अर्जुना! मद्याच्या पात्राला जसें पवित्रत्व यावयाचें नाहीं, त्याप्रमाणें आसुरी प्राण्यालाही शुचिर्भूतपणा यावयाचा नाहीं. २८६ विधीची आज्ञा वाढविणें, किंवा वडिलांची वाट पहाणें, किंवा कर्माचरण करणें, ह्याची वार्ताही त्यांना माहित नाहीं. २८७ जसें शेळीचें चरणें, वाऱ्याचें धांवणें, अग्नीचें जाळणें भलतीकडे, २८८ त्याप्रमाणें असुर आहेत ते, समोर, पाहिजे तिकडे यथेष्ट आचरण करित असतात. सत्याशीं तर त्यांचें नेहेमींचेंच हाडवैर. २८९ विंचू आपल्या नांगीनें जर गुदगुल्या करील, तर ते खरा शब्द बोलतील! २९० अपानाच्या तोंडांतून जर सुगंध येईल, तर त्या असुरांना सत्य सांपडेल! २९१ अशा प्रकारचें ते कांहींच करीत नसल्यामुळे ते मूळचेच वाईट आहेत. आतां त्यांच्या बोलण्याची अपूर्वता सांगतों. २९२ बाकी उंटाचें वर्णन करावयाचें तर त्याला नीट आंग आहे कोठें? वांकडें तिकडें असेल तेंच सांगावयाचें. त्याप्रमाणें असुरांशीं प्रसंग आहे. तोही प्रसंगानुसार ऐक. २९३ धुराड्याचें तोंड जसें धुराचे लोट सोडतें, त्याप्रमाणें त्याचे ते शब्द उघड रीतीनें समजतील असे सांगूं." २९४

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥

[असत्यं] तरि विश्व हा अनादि ठावो । येथ नियंता ईश्वरराावो । चावडिये न्यांवो अन्यावो । निवडी वेद ॥ ९५ ॥ वेदीं अन्यायी पडे । तो निरयभोगें दंडे । सन्यायी तो सुरवाडें । स्वर्गीं जिये ॥ ९६ ॥ ऐसी हे विश्वव्यवस्था । अनादि जे पार्था । इयेतें ह्मणती ते वृथा । अवघेंचि हें ॥ ९७ ॥ यज्ञमूढ ठकिले यागीं । देवपिसे प्रतिमालिंगीं । नागवले भगव्रे योगी । समाधिभ्रमें ॥ ९८ ॥ येथ आपलेनि बळें । भोगिजे जें जें वेंटाळें । हेंवांचोनि वेगळें । पुण्य आहे ॥ ९९ ॥ ना अशक्तपणें आंगिकें । वेगळ वेंटाळीं नं टके । ऐसा गादिजेवीण विषयसुखें । तेंचि पाप ॥ ३०० ॥ प्राण घेपती संपन्नांचे । तें पाप जरी साचें । तरी सर्वस्व हाता ये तयांचें । हें पुण्यफळ कीं ॥ १ ॥ वळी अवळातें खाय । हेंचि वाधितें जरी होय । तरी मांसयां कां न होय । निसंतान ॥ २ ॥ [अप्रतिष्ठं] आणि कुळें शोधूनि दोन्ही । कुमारेंचि शुभलग्नीं । मेळवीजती प्रजासाधनीं । हेतु जरी ॥ ३ ॥ तरी पशुपक्ष्यादि जाती । जयां मिति नाहीं संतती । तयां कोणें प्रतिपत्ती । विवाह केले ॥ ४ ॥ चोरियेचें धन आलें । तरि तें कोणासि विष जालें । वाळभें परद्वार केलें । कोढी कोणी होय ॥ ५ ॥ [अनीश्वरं] ह्मणोनि देव गोंसावी । तो धर्माधर्म भोगवी । [किमन्यत्] आणि परत्राच्या गांवीं । करि तो भोगी ॥ ६ ॥ परि परत्र ना देवो । न दिसे ह्मणोनि तें वावो । आणि कर्ता निमे मा ठावो । भोगयासि कवण ॥ ७ ॥ [कामहैतुकं] येथ उर्वशिया इंद्र सुखी । जैसा कां स्वर्गलोकीं । तैसाचि कृमिही नरकीं । लोळत श्लाघे ॥ ८ ॥ ह्मणौनि नरक स्वर्ग । नव्हे पापपुण्यभाग । जे दोहीं ठायीं सुखभोग । कामाचाचि तो ॥ ९ ॥ [अपरस्परसंभूतं] याकारणें कामें । स्त्रीपुरुषयुग्में । मिळती तेथ जन्में । [जगत्] आघवें जग ॥ ३१० ॥ आणि जें जें अभिलाषें । स्वार्थालागीं पोषे । पाठीं परस्पर द्वेषें । कामचि नाशी ॥ ११ ॥ एवं कामावांचूनि कांहीं । जगा मूळचि आन नाहीं । ऐसें बोलती पाहीं । आसुर गा ते ॥ १२ ॥ आतां असो हें किडाळ । बोलीं न करूं पघळ । सांगतांचि सफोल । होतसे वाचा ॥ १३ ॥

"तर विश्व हें अनादि स्थान आहे; ईश्वरराजे हा येथचा नियंता; वेद ही न्यायान्याय निवड करण्याची चावडी; २९५ वेदाने जो अन्यायी ठरविला जातो, त्याला नरकयात-

---

१ न्याय, अन्याय. २ नरकभोगानें. ३ सुखानें. ४ मूर्तींत. ५ बळानें. ६ एकतट झालेलें. ७ न भोगवे. ८ दुःखेंवीण. ९ पाप. १० मत्स्यांना. ११ विधीनें. १२ आवडीनें. १३ व्यभिचार. १४ परलोकीं. १५ मरे. १६ संतोष मानी. १७ आसक्ती, मनोरथ. १८ खोटें. १९ व्यर्थ.

नेचा दंड भरावा लागतो. न्यायी ठरतो, तो सुखानें स्वर्गाला जातो. २९६ अर्जुना! अशी जी ही विश्वाची अनादि व्यवस्था, ती सारीच व्यर्थ असें ते ह्मणतात. २९७ यज्ञ करतात ते मूर्ख, फशीं पडतात; मूर्तिपूजा करतात ते देवभोळे होत; भगवीं वस्त्रें धारण करणारे योगी, समाधीच्या वेडानें नागवले जातात; २९८ येथें आपआपल्या बळावर जें जें मिळेल तें तें भोगून घ्यावें. ह्याशिवाय आणखी पुण्य तें आहे कोठें? २९९ किंवा आंगानें अशक्त असल्यामुळें भोग मिळवितां येत नाहींत, व भोगवत नाहींत, असें विषय-सुखाशिवाय दुःखानें चरफडणें तेंच पाप. ३०० श्रीमंतांचे प्राण घेणें जर पाप खरें, तर त्यांचें सर्वस्व हाताला येतें, हें पुण्याचें फळ नव्हे काय? ३०१ बळी निर्बळांना खातात, हेंच जर पाप असेल, तर माशांचें निसंतान कां होत नाहीं? ३०२ आणखी दोन्ही कुलांचा शोध करून प्रजोत्पत्तीच्या साधनासाठीं जर शुभ मुहूर्त पाहून नवरानवरीची गांठ घालतात, ३०३ तर पशुपक्ष्यादि जाति, ज्यांच्या संततीला पार नाहीं, त्यांचे विधिपूर्वक विवाह कोणीं केले आहेत! ३०४ चोरीचें द्रव्य आणलें असलें, तरी तें कोणाला विष झालें आहे? आवडीनें व्यभिचार केला, ह्मणून कोणाला कोड भरतें? ३०५ ह्मणून देव सर्वसमर्थ आहे; तो धर्माधर्म भोगवितो; आणखी करतो तो परलोकामध्यें भोगतो; ३०६ पण परलोकीं मुळीं देवच नाहीं. तो दिसत नाहीं, त्याअर्थी आहे ह्मणणें व्यर्थ होय. आणि करतांच मरून जातो, मग भोगावयाला राहणार कोण? ३०७ उर्वशीला घेऊन इंद्र जसा स्वर्गलोकांत सुखी असतो, तसाच किडाही नरकामध्यें लोळून आनंद मानित असतो. ३०८ ह्मणून नरक आणि स्वर्ग, हे कांहीं पापपुण्याचे भाग नव्हेत. कारण, दोन्हीही ठिकाणीं इच्छेचाच कायतो सुखोपभोग असतो. ३०९ ह्याकरितां इच्छेनेंच स्त्रीपुरुषांच्या जोड्या एकत्र झाल्या ह्मणजे सारें जग जन्मास येतें. ३१० आणि स्वार्थासाठीं जे जे मनोरथ वाढतात, ते ते पुन्हा परस्पर द्वेषामुळें कामच नाहींसें करून टाकतो. ३११ ह्मणून कामाशिवाय जगाला दुसरें कोणतेंच मूळ नाहीं'. असुर असतात ते ह्याप्रमाणें बोलत असतात. ३१२ आतां हें खोटसाळ बोलणें राहूं दे. अधिक पाल्हाळ करित नाहीं. कारण, तें सांगतांनाच वाणी वायफळ होते. " ३१३

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।
प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतो हिताः ॥ ९ ॥

[एतां दृष्टिमवष्टभ्य] आणि ईश्वराचिया खंती[1] । तुसधियाचि[2] करिती चांथी[3] । हेंही नाहीं चित्तीं । निश्चय एक ॥१४॥ [अल्पबुद्धयः] किंबहुना उघड । आंगीं लाऊनियां पाखंड । नास्तिकपणाचें हाड । रोंविलें जीवीं ॥ १५ ॥ ते वेळीं स्वर्गालागीं आदर । कां नरकाचा अडदर[4] । या वासनांचा अंकुर । जळोनि गेला ॥ १६ ॥ [नष्टात्मानः] मग केवळ ये देहखोडां[5] । अमेध्योदकाचा[6] बुडबुडा । विषयपंकीं दुंहाडा[7] । बुडालेगा ॥ १७ ॥ [प्रभवंत्युग्रकर्माण इति] जैं आटावे[8] होती जळचर । तैं डोहीं मिळती ढीवर[9] । कां पडावें होय शरीर । तैं रोगां उदय ॥ १८ ॥ उदैजणें केतूचें जैसें । विश्वा अनिष्टोद्देशें[10] । जन्मती ते तैसे । लोकां आटूं[11] ॥ १९ ॥ विरूढलिया अशुभ । फुटती तें ते कोंभ । पापाचे कीर्तिस्तंभ । चालते ते ॥ २० ॥ आणि मागां पुढां जाळणें । वांचूनि आगी कांहीं नेणे । तैसें विरुद्धचि एक करणें । भलतेयां ॥ २१ ॥ परि तेंचि गा करणें । आदरिती संभ्रमें[12] जेणें । तो आईक पार्था ह्मणे । श्रीनिवास ॥ २२ ॥

"आणखी ईश्वराविषयीं खेद व नुसती बडबड करतात. येवढेंच नव्हे, तर चित्तामध्यें एक निश्चयही नाहीं. ३१४ किंबहुना उघडपणें आंगाला पाखंड लावून जीवामध्यें नास्तिकपणाचें हाड रोंवतात. ३१५ तेव्हां स्वर्गाचा आदर किंवा नरकाचें भय, ह्या वासनांचा अंकु-

१ खेद. २ बडबड. ३ खेद व बडबड करणें एवढेंच आहे काय? पण तेंही नाहीं. कोणाचा एक निश्चय देखील नाहीं. ४ भय. ५ देहरूप खोड्यामध्यें. ६ अपवित्र जलाचा. ७ सुहृदा अर्जुना. ८ मारावे अशी ईश्वरीच्छा होते. ९ कोळी. १० अकल्याणार्थ. ११ नाशास्तव. १२ समारंभानें.

रच जळून जातो. ३१६ मग केवळ अपवित्र उदकाचा बुडबुडा देहरूप खोड्यामध्यें येतो. हे **सुहृदा!** असे लोक विषयरूप चिखलांत बुडाले बरे! ३१७ जळचरें नाश होण्याची जेव्हां वेळा येते, तेव्हां डोहामध्यें कोळी जमतात; किंवा शरीर पडण्याची वेळ येते तेव्हां रोगांचा उद्भव होतो. ३१८ विश्वाचें अनिष्ट करण्यासाठीं जसा केतूचा उदय, तसे ते लोक जगाच्या नाशासाठींच जन्म घेतात. ३१९ पाप वाढतें, तेव्हां अशा प्रकारचे कोंभ फुटतात. ते पातकाच्या कीर्तीचे चालते बोलते खांबच आहेत असें समज. ३२० आणखी मागून पुढून जाळून टाकावयाचें, ह्यापेक्षां दुसरें कांहीं आगीला जसें कळत नाहीं, त्याप्रमाणें कोणालाही विरुद्ध करावयाचें एवढेंच एक त्यांना माहित असतें." ३२१ श्रीनिवास ह्मणतात "**अर्जुना!** पण तेंच एक कृत्य करावयाला ज्या उत्साहानें ते प्रवृत्त होतात तो उत्साह ऐक." ३२२

काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ।
मोहाद्गृहीत्वाऽसद्ग्राहान्प्रवर्तंतेऽशुचिव्रताः ॥ १० ॥

[काममाश्रित्य दुष्पूरं] तरि [१]जाळ पाणियें न भरे । आगी इंधनें न पुरे । तयां [३]दुर्भरांचिये धुरे । भुकालु जो ॥ २३ ॥ तया कामाचा वोलाँवा । जीवीं धरूनि पांडवा । [दंभमानमदान्विताः] दंभमानाचा मेळावा । मेळविती ॥ २४ ॥ मातलिया कुंजरा । आगळी जाली मदिरा । तैसा मदाचा ताठा तंव जरा । चढतां आंगीं ॥ २५ ॥ [मोहाद्गृहीत्वा] आणि आग्रहा तोचि ठावो । वरि मौढ्या ऐसा सांवावो । मग काय वानूं निर्वाहो । निश्चयाचा ॥ २६ ॥ [असद्ग्राहान्] जिहीं परोपताप घडे । परांवा जीवु रगडे । तिहीं कर्मीं होउनि गाढे । जन्मवृत्ती ॥ २७ ॥[प्रवर्तंते] मग आपुलें केलें फोंकारिती । आणि जगातें धिक्कारिती । दाहीदिशीं पसरिती । स्पृहाजाळ ॥ २८ ॥ [अशुचिव्रताः] ऐसेनि गा आटोपें । थोरिये आणिती पापें । धर्मे धेनू खुरपें । सुटलें जैसें ॥२९॥

"तर जाळें पाण्यानें भरत नाहीं; आगीला जळण पुरत नाहीं; त्या अधाशांच्याही पुढें जो भुकाळू; ३२३ **अर्जुना!** अशा कामाचा ओलावा जिवांत धरून दंभमानांचा समुदाय मिळवितात. ३२४ मत्त झालेल्या हत्तीला खूपशी दारू पाजावी, त्याप्रमाणें त्याची जरा जों जों वाढत जाते, तों तों मदाचा ताठा अधिक अधिकच भरत जातो. ३२५ आग्रहाचें स्थान तोच; आणि त्याला मूर्खपणाचें सहाय; मग निश्चयाची गोष्ट काय सांगावी? ३२६ ज्यानें दुसऱ्याला ताप होईल; अन्याचा जीव जाईल; अशा कामांत जन्मवृत्ति प्रवीण होते. ३२७ मग आपण केलेल्याची प्रौढी सांगत बसतात, आणि जगाचा धिक्कार करतात. दाही दिशांना इच्छेचें जाळें पसरतात. ३२८ भांगलणीचें खुरपें बंद झालें कीं, हरळी जशी तरारते, त्याप्रमाणें ते अशा रीतीनें पापें उच्च दशेला आणतात." ३२९

चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

[चिंतां] याचि येका [१]आयती । तयाचिया कर्मप्रवृत्ती । आणि जिणियाही परौती । वाहती चिंता ॥ ३३० ॥ [अपरिमेयां च] पाताळाहूनि निम्न । जियेचिये उंचिये सानें गगन । जे पाहातां त्रिभुवन । अणुही नोहे ॥ ३१ ॥ [प्रलयांतामुपाश्रिताः] ते योगपटाची मेवणी । जीवीं अनियम चितवणी । जे सांडूं नेणे मरणीं । वल्लभा जैसी ॥ ३२ ॥ तैसी चिंता अपार । वाढविती निरंतर । [कामोपभोगपरमाः] जीवीं सूनि असार । विषयादिक ॥ ३३ ॥ स्त्रियां गाइलें आइकावें । स्त्रीरूप डोळां देखावें । सर्वेंद्रियें आलिंगावें । स्त्रियेतेंचि ॥ ३४ ॥ कुरवंडी कीजे अमृतें । [एतावदिति निश्चिताः] ऐसें सुख स्त्रियेपरौतें । नाहींचि ह्मणौनि चित्तें । निश्चय केला ॥ ३५ ॥ मग तयाचि स्त्रीभोगा- । लागीं पाताळ स्वर्गा । धांवती दिग्विभागा । परौतेही ॥ ३६ ॥

"याच एका साधनानें त्यांच्या कर्मवृत्ति चालतात. आणि जिवापेक्षांही अधिक चिंता वहात असतात. ३३० पाताळाहून खोल, आणि जिच्या उंचीला गगनही लहान, जी पहावयाला गेलें तर, सारें त्रिभुवन जिच्या

१ जाळें. २ काष्ठांनीं. ३ अधाशांहूनही श्रेष्ठ. ४ जिव्हाळा. ५ सहाय, मदत. ६ दुसऱ्यास ताप. ७ अन्याचा. ८ प्रसिद्ध करतात. ९ इच्छेचें जाळें. १० उंच दशेला. ११ हरळी.

१ साधनानें. २ जीवापलीकडील. ३ खोल. ४ ज्या चिंतेला. ५ योगरूप वस्त्राचें. ६ माप. ७ जी चिंता. ८ स्त्री. ९ घालून. १० स्त्रियांनीं. ११ ओवाळून टाकावें. १२ दिशांच्या सीमांबाहेर.

पासंगालाही लागावयाचें नाहीं, ३३१ युक्तिवस्त्राचें जणों काय मापच, अशी अपरंपार चिंता जिवामध्यें वागवितो. स्त्रीला जसें मरण आलें तरी पतीला सोडावयाचें माहित नसतें, ३३२ त्याप्रमाणें जिवामध्यें निरंतर असार विषयादिक ठेवून अपार चिंता वाहतात. ३३३ स्त्रियांनीं गायन केलेलें ऐकावें; स्त्रियांचें स्वरूप डोळ्यांनीं पहावें; सर्वेंद्रियांनीं स्त्रियांनाच आलिंगन द्यावें; ३३४ स्त्रियांपेक्षां दुसरें सुखच नाहीं. अमृतही त्यांच्यावरून ओंवाळून टाकावें, ह्मणून चित्तांत निश्चय करून ठेवलेला. ३३५ मग त्या स्त्रीच्या भोगासाठीं दाही दिशांच्याही पलीकडे—पाताळ स्वर्गापर्यंतही धांवत सुटतात.'' ३३६

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

[आशापाशशतैर्बद्धाः] आमिषकवळु थोरी आशा । न विचारितां गिळी मासा । तैसें कीजे विषयाशा । तयांसि गा ॥ ३७ ॥ वांछित तंव न पवती । मग कोरडियेचि आशेची संतती । वाढऊं वाढऊं होती । कोशकिडे ॥ ३८ ॥ [कामक्रोधपरायणाः] आणि पसरिला अभिलाष । अपूर्ण होय तोचि द्वेष । एवं काम क्रोधाहूनि अधिक । पुरुषार्थ नाहीं ॥ ३९ ॥ दिहा खोलणें रात्री जागोवा । ठाणांतरिया जैसा पांडवा । अहोरात्रिही विसावा । भेटेचिना ॥ ४० ॥ तैसें उंचौनि लोटिलें कामें । नेहंटती क्रोधाचिये ढिमें । तरी रागद्वेष प्रेमें । न माती केंही ॥ ४१ ॥ [ईहंते कामभोगार्थं] तेविंचि जीवींचिया हांवा । विषयवासनांचा मेळावा । केला परी तो भोगावा । अर्थें कीं ना ॥ ४२ ॥ ह्मणोनि भोगावया जोगा । पुरता अर्थ पें गा । आणावया जगा । झोंबती सैरा ॥ ४३ ॥ [अन्यायेनार्थसंचयान्] एकातें साधूनि मारिती । एकाचीं सर्वस्वें हरिती । एकालागीं उभारिती । अपाययंत्रें ॥ ४४ ॥ पांशिकें पोतीं वागुरा । सुणीं ससाणे चिकाटी खोंचारा । घेऊनि निघती डोंगरा । पारधी जैसे ॥ ४५ ॥ ते पोसावया पोट । मारूनि प्राणियांचे संघाट । आणिती ऐसें निकृष्ट । तेंही करीती ॥ ४६ ॥ परप्राणघातें । मेळविती वित्तें । मिळाल्या चित्तें । तोषण कैसें ॥ ४७ ॥

"मासाचा गोळा घ्यावयाची थोर आशा बाळगून न विचार करतां मासा गिळून टाकतो, त्याप्रमाणें त्यांना विषयाची आशा मोहांत गुंतविते. ३३७ वांछित तर मिळत नाहीं; मग कोरड्या आशेची संतति वाढवून वाढवून कोशांतील कीटक बनतात. ३३८ आणखी अभिलाष पसरून त्याची पूर्तता झाली नाहीं ह्मणजे तोच द्वेष होतो. अशा प्रकारें कामक्रोधाहून दुसरा कांहीं पुरुषार्थच रहात नाहीं. ३३९ अर्जुना! दिवसा मुक्तद्वार आणि रात्रीं जागरण; ह्यामुळें पहारेकऱ्याला जसा रात्रंदिवस विसावा ह्मणून कसला तो मिळतच नाहीं, ३४० त्याप्रमाणें कामानें उंचावरून लोटून दिलें ह्मणजे क्रोधाच्या टेंकडीवर आदळतात. तरी रागद्वेषाच्या प्रेमानें कोठेंही रहात नाहींत इतके फुगतात. ३४१ ह्याप्रमाणें जिवांतील धरलेल्या हांवेचा विषयवासनांचा समुदाय मिळविला, पण तो भोगावयाला पैसा पाहिजेना? ३४२ ह्मणून तितके भोग भोगण्यापुरता पैसा आणावयासाठीं जगाला हवेंतसें लुबाडतात. ३४३ लाग साधून एकाला मारतात; एकाला सर्वस्वींच नागवून सोडतात. एकाचा नाश करावयाला युक्तिप्रयुक्तीची योजना करतात. ३४४ पाश, पोतीं, जाळीं, कुत्रे, ससाणे, चिकटा, आणि भाले घेऊन पारधी जसे डोंगराकडे निघतात, ३४५ आणि ते पोट पोसण्यासाठीं प्राण्यांचे समुदाय मारून आणतात, त्याप्रमाणें तेही नीच काम करतात. ३४६ दुसऱ्याचा जीव घेऊन पैसा मिळवितात; आणि तो मिळाला ह्मणजे त्यांना कसा आनंद होतो पण!'' ३४७

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १३ ॥

[इदमद्य मया लब्धं] ह्मणे आजि मियां । संपत्ती बहुतेकांचिया । आपुल्या हातीं केलिया । धन्य ना मी ॥ ४८ ॥

१ मांसाचे गोळे. २ कोसले नांवाचे किडे. ३ दिवसा. ४ मुक्तद्वार. ५ जागृति. ६ देवडीवाला. ७ आदळती. ८ टेंकडीवर. ९ यथेच्छ, हवेतसे. १० उभी करितात, उपारिती. ११ नाशाच्या युक्ती. १२ पाश. १३ जाळीं. १४ शिकारी कुत्रीं. १५ चिकटा. १६ भाले. १७ समुदाय.

[इमं प्राप्स्ये मनोरथं] ऐसा श्लाघों जंव जाये । तंव मन आणीकही वाहे । सवेंचि ह्मणे पाहे । आणिकांचेंही आणूं॥४९॥ [इदमस्तीदमिति] हें जेतुलें असे जोडिलें । तयाचेनि भांडवलें । लाभा घेईन उरलें । चराचर हें ॥ ३५० ॥ ऐसेनि धना विश्वाचिया । मीचि होईन स्वामिया । मग दिठी पडे तया । उरों नेदीं ॥ ५१ ॥

**"तो ह्मणतो 'आज बहुतेक लोकांच्या संपत्ति मी आपल्या हाताखालीं घातल्या आहेत. तेव्हां मी धन्य नव्हे काय?' ३४८ असा जों प्रौढी मिरवूं लागतो, तों मन आणखी पुढें धांवतें! तें लागलीच ह्मणतें 'आणखी दुसऱ्याचेंही पाहून ठेव. तेंही आणूं.' ३४९ हें जितकें मिळालेलें आहे, तेवढ्या भांडवलावर उरलेलें स्थावर जंगम हें त्याच्या व्याजांतच घेईन. ३५० अशा रीतीनें मी साऱ्या विश्वाच्या धनाचा स्वामी होईन. मग दृष्टी पडेल तें राहूं देणार नाहीं." ३५१**

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी॥१४॥

[असौ मया हतः शत्रुः] हे मारिले वैरी थोडे । [हनिष्ये चापरानपि] आणीकही साधीन गाढे । मग नांदेन पवाडें । येकलाचि मी ॥ ५२ ॥ [ईश्वरोऽहमहं भोगी] मग माझीं होतील कामारीं । तियेंवांचूनि येरें मारीं । किंबहुना चराचरीं । ईश्वर तो मी ॥ ५३ ॥ मी भोगभूमीचा रावो । आजि सर्वसुखासी ठावो । ह्मणोनि इंद्रही वावो । मातें पाहूनि॥५४॥ [सिद्धोऽहं] मी मनें वाचा देहें । करीं तें कैसें नोहे । कें मजवांचूनि आहे । आज्ञासिद्ध आन ॥ ५५ ॥ [बलवान्सुखी] तंवचि बळिया काळ । जंव न दिसें मीं अतुर्बळ । सुखाचा कीर निखिळ । रासिवा मींचि ॥ ५६ ॥

**"हे थोडेसे वैरी मारले; आणखीही पुष्कळ मारीन; आणि मग एकटाच मोठ्या प्रतिष्ठेनें राहीन. ३५२ मग माझे जेवढे सेवक होतील तेवढे शिवाय करून बाकीच्यांना मारून टाकीन. किंबहुना चराचरामध्यें ईश्वर तो मी. ३५३ भोगरूप भूमीचा राजा मी; आज सर्व सुखाचें स्थान तें मी; ह्मणून माझ्यापुढें इंद्रही तुच्छ आहे. ३५४ मी मनानें, वाणीनें, आणि शरिरानें जें करीन, तें कसें होणार नाहीं? माझ्याशिवाय आज्ञा करणारा दुसरा कोण आहे? ३५५ मला बलाढ्याला पाहिलें नाहीं, तोंपर्यंतच काल बलवंत; माझ्यापुढें त्याची प्रतिष्ठा नाहीं. खऱ्या सुखाची रास ती मी." ३५६**

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥१५॥

[आढ्यः] कुबेर आथिला होये । परी तो नेणे माझी सोये। संपत्ती मजसम नव्हे । श्रीनाथाही ॥ ५७ ॥ [अभिजनवानस्मि] माझिया कुळाचा उजाळु । कां जातीगोतांचा मेळु । पाहातां ब्रह्माही हेळु । उणाचि दिसे ॥ ५८ ॥ [कोन्योऽस्ति सदृशो मया] ह्मणोनि मिरविती नांवें । वायां ईश्वरादि आघवे । नाहीं मजसीं सरी पावे । ऐसें कोण्ही ॥ ५९ ॥ [यक्ष्ये] आतां लोपला अभिचार । त्याचा करीन मी जीर्णोद्धार । प्रतिष्ठीन परमार । यागवरि ॥ ३६० ॥ [दास्यामि] मातें गाती वानिती । नटनाचें रिझविती । तयां देईन मागती । ते ते वस्तु ॥ ६१ ॥ [मोदिष्ये] माजिरा अन्नपानीं । प्रमदांच्या आलिंगनीं । मी होईन त्रिभुवनीं । आनंदाकार ॥ ६२ ॥ [इत्यज्ञानविमोहिताः] काय बहु सांगों ऐसे । ते आसुरीप्रकृती पिसे । तुरंबिती असोसें । गगनौळें तियें॥६३

**"कुबेर श्रीमंत आहे खरा, पण त्यानें अद्याप माझी संपत्ति पाहिली नाहीं. माझ्या इतकी संपत्ति लक्ष्मीपतीला सुद्धां नाहीं. ३५७ माझ्या कुळाचा नांवलौकिक, किंवा जातीगोतींचा मेळा पाहून ब्रह्मदेवही हलकाच दिसतो. ३५८ ह्मणून ईश्वरादिक नांवानें व्यर्थ मिरवितात. माझी सर पावेल असा कोणी नाहीं. ३५९ जारणमारणाचा आतां अगदीं लोप होऊन गेला आहे. त्याचा मी जीर्णोद्धार करीन. यज्ञापर्यंत परपीडेची मजल पोंचवीन. ३६० माझें जे कोणी गायन करतील, वर्णन करतील, नटनृत्यानें संतोषित करतील, त्यांना ते मागतील ती ती वस्तु देईन. ३६१ हवें तें खाऊन पिऊन मी अगदीं तर्र**

१ स्तवन करूं. २ मारीन. ३ लौकिकानें. ४ सेवक. ५ व्यर्थ. ६ महाबळवान्. ७ राशी.

१ संपन्न. २ विष्णूला. ३ नांवलौकिक. ४ नीच, हलका. ५ जारणमारणादि. ६ परपीडा. ७ वर्णिती. ८ संतोषविती. ९ माजलेला, मद्य, उन्मत्त. १० भूषविती, वास घेती. ११ अपरिमित इच्छेनें. १२ आकाशपुष्प.

होईन. आणि स्त्रियांच्या आलिंगनानें मी त्रिभुवनामध्यें आनंदाकार होऊन राहीन. ३६२ असें किती सांगावें? ते आसुरी प्रकृतीनें वेडे झालेले, आपल्या अपरिमित इच्छेनें आकाशाचीं फुलें (मनोराज्य) हुंगित बसतात." ३६३

अनेकचित्तविभ्रांता मोहजालसमावृताः ।
प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥१६॥

[अनेकचित्तविभ्रांताः] ज्वराचेनि आटोपें । रोगी भलतैसें [1]जल्पे । [2]वावळती संकल्पें । जाण ते तैसे ॥ ६४ ॥ अज्ञाना [3]आतुले धुळी । म्हणौनि आशा [4]वाहटुळी । भोवंडीजती अंतराळीं । मनोरथांच्या ॥ ६५ ॥ अनियम आषाढ मेघ । कां समुद्रोमीं अभंग । तैसे [5]कामिती अनेग । अखंड काम ॥६६॥ [मोहजालसमावृताः] मग पैं [6]कामनाचि तया । जिवीं जाल्या वेलरियां । वोरपिलीं कांटिया । कमळें जैसीं ॥ ६७ ॥ कां पाषाणाचिया माथां । हांडी फुटली पार्था । जीवीं तैसे सर्वथा । कुटके जाले ॥ ६८ ॥ तेव्हां चढतीये रैयणीं । तमाची होय पुरवणी । तैसा मोह अंतःकरणीं । वाढोंचि लागे ॥६९॥ [प्रसक्ताः कामभोगेषु] आणि वाढे जंव जंव मोहो । तंव तंव विषयीं रोहो । विषय तेथ ठावो । पातकासी ॥ ३७० ॥ पापें आपलेनि [11]थावें । जंव करिती मेळावे । तंव जितांचि आघवे । येती नरक ॥ ७१ ॥ [पतंति नरकेऽशुचौ] म्हणौनि गा सुमती । जे कुमनोरथां पाळिती । ते आसुर येती वस्ती । तया ठाया ॥ ७२ ॥ जेथ असि[12]पत्र तरुवर । खदिरांगाराचे डोंगर । [13]तातला तेलीं सागर । उततातो ॥ ७३ ॥ जेथ यातनांची श्रेणी । हे नित्य नवी यमजाचणी । पडती तिये दारुणीं । नरकलोकीं ॥ ७४ ॥ ऐसे नरकाचिये [14]सेले । भागीं जे जे जन्मले । तेही देखों भुलले । यजिती यागीं ॥ ७५ ॥ येऱ्हवीं यागादिक क्रिया । [15]ओंहाणतेचि धनंजया । परि [16]विफळती आचरोनियां । नाटकी जैसे ॥ ७६ ॥ वल्लभाचिया [17]उंजरिया । आपणयाप्रति कुस्त्रिया । जोडोनि तोषिति जैसिया । [18]अहेवपणें ॥ ७७ ॥

"ज्वराच्या भरानें रोगी पाहिजे तसें बडबडतो, तसें ते संकल्पाच्या योगानें बरळत असतात. ३६४ अज्ञान प्राप्त झाल्याच्या योगानें ते धुळीस मिळालेले असतात. म्हणून आशारूपी वावटळ मनोरथाच्या आकाशांत त्यांना फिरवित असते. ३६५ आषाढांतील मेघ जसे अनियमित, किंवा समुद्रांतील लाटा जशा अखंड, त्याप्रमाणें निरंतर अनेक कामाच्या इच्छा चाललेल्या असतात. ३६६ मग त्या मनोरथांच्या त्याच्या जिवामध्यें जाळ्या बांधल्या म्हणजे, कमळें जशीं कांट्यानें ओरबाडावींत, ३६७ किंवा पाषाणाच्या मस्तकावर हांडी फुटावी, त्याप्रमाणें **अर्जुना!** त्यांच्या जिवाचे अगदीं तुकडे तुकडे होऊन गेलेले असतात. ३६८ तेव्हां चढत्या रात्रींत जसा अंधार भरत जातो, त्याप्रमाणें अंतःकरणांत मोह वाढतच असतो. ३६९ आणखी मोह जों जों वाढत जातो, तों तों विषयांची वृद्धि होत जाते. आणि विषय म्हटले कीं, तेथें पातकाचें ठाणें आलेंच. ३७० पापांनीं आपला जोर केला कीं, तेथें जिवंतपणींच नरक येतात. ३७१ म्हणून हे **बुद्धिमंता!** जे वाईट मनोरथ धरतात ते असुर त्या ठिकाणीं वस्तीला येतात. ३७२ जेथें तरवारीसारख्या पानांचे वृक्ष; खैरांच्या निखाऱ्यांचे डोंगर; तापलेल्या तेलाचे उचंबळलेले समुद्र; ३७३ जेथें यातनांचे समुदाय, अशा जेथें नित्य नव्या यमाच्या जाचण्या, त्या दारुण नरकलोकामध्यें पडतात. ३७४ असे असे, नरकाचा वांटा घेण्याकरितांच जन्मास आलेले, तेही मोहपाशांत पडून यज्ञ करतात. ३७५ येरवीं **अर्जुना!** यज्ञादिक क्रिया कल्याणकारकच आहेत. पण ते नाटक्याप्रमाणें आचरण करून व्यर्थ करतात. ३७६ पतीच्या आश्रयानें दुराचारी स्त्रिया जशा परपुरुषाचा लाभ जोडून त्या सौभाग्यानें संतोष पावतात," ३७७

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।
यजंते नामयज्ञैस्ते दंभेनाऽविधिपूर्वकम् ॥ १७ ॥

[आत्मसंभाविताः] तैसें आपणयां आपण । मानितां महंतपण । फुगती असाधारण । गर्वे तेणें ॥ ७८ ॥ [स्तब्धाः] मग लवों नेणती कैसे । आटिवां लोहाचे सांब जैसे । कां

१ बडबडे. २ बरळती. ३ प्राप्त झाले. ४ वावटळ. ५ इच्छिती. ६ मनोरथांनीं. ७ वेलीच्या जाळ्या. ८ ओरबडलीं. ९ रात्र. १० वृद्धि. ११ बळानें, ठिकाणीं. १२ तरवारीसारख्या पानांचे. १३ तापलेल्या. १४ वांटा. १५ कल्याणदायक. १६ व्यर्थ करिती. १७ आश्रयानें. १८ सौभाग्यानें.

उधवले आकाशें । शिळाराशी ॥ ७९ ॥ तैसे आपुलिये बरवे । आपणचि रिझतां जीवें । तृणाहीहूनी आघवें । मानिती नीच ॥ ३८० ॥ [धनमानमदान्विताः] वरि धनाचिया मदिरा । माजूनि धनुर्धरा । कृत्याकृत्यविचारा । सवतें केलें ॥ ८१ ॥ जया आंगीं आयती ऐसी । तेथ यज्ञाची गोठी कायसी । तरि काय काय पिसीं । न करिती गा ॥ ८२ ॥ ह्मणौनि कोणे येके वेळे । मौढ्यमद्याचेनि बळें । [यजंते नामयज्ञैः] यागाचींही टवाळें । आदरिती ॥ ८३ ॥ ना कुंड मंडप वेदी । ना उचित साधनसमृद्धी । [ते अविधिपूर्वकं] आणि तयांसी तंव विधि । द्वंद्वचि सदा ॥ ८४ ॥ देवां ब्राह्मणांचेनि नांवें । आड वारेनहि नोहावें । ऐसें आथी तेथ यावें । लागे कवणा ॥ ८५ ॥ [दंभेन] पैं वासरुवाचा भोकसा । गाईपुढें ठेऊनि जैसा । उगाणा घेती क्षीररसा । बुद्धिवंत ॥ ८६ ॥ तैसें यागाचेनि नांवें । जग वोंउनि हावे । नागविती आघवें । अहेरावारीं ॥ ८७ ॥ ऐशा कांहीं आपुलिया । होमिती जें उंजरिया । तेणें कामिती प्राणियां । सर्वनाश ॥ ८८ ॥

**" त्याप्रमाणें आपल्या ठिकाणीं आपणच मोठेपणा मानून घेऊन त्या असाधारण गर्वानें फुगतात. ३७८ मग नम्र होण्याचें त्यांना माहितच असत नाहीं. कसें? तर ओतलेल्या लोखंडाचे खांब असतात त्याप्रमाणें किंवा गगनांत उंच गेलेले पर्वत असावेत, ३७९ त्याप्रमाणें आपल्या चांगुलपणानें आपल्या जिवाचें समाधान करतांना, सारें तृणाहूनही हलकें मानतात. ३८० आणखी अर्जुना! धनरूप मद्यानें मत्त होऊन कृत्याकृत्य विचाराला दूर करतात. ३८१ अशी ज्याच्या आंगामध्यें सामग्री, तेथें यज्ञाची गोष्ट काय? तरी वेडे असतात ते काय काय करीत नाहींत? ३८२ ह्मणून एखादे वेळेला मूर्खत्वरूप मद्याच्या जोरावर यज्ञाचेंही सोंग आणतात. ३८३ कुंड नाहीं; मंडप नाहीं; वेदी नाहीं; किंवा योग्य सामग्री असावी तीही नाहीं. आणि सदासर्वकाल वैर, हाच त्यांचा विधि. ३८४ देवब्राह्मणांच्या नांवानें आडवाऱ्यानेंही फिरकूं नये, असें आहे तेथें कोणाला यावें लागणार? ३८५ बुद्धिवान् लोक पेंढा भरलेलें वासरूं गायीपुढें ठेवून जसें दूध काढून घेतात, ३८६ त्याप्रमाणें यज्ञाच्या नांवानें जगाची हांव धरून साऱ्यांना अहेरावारी नागवावयाचें! ३८७ अशा आपल्या कांहीं उत्कर्षाकरितां जे यज्ञ करतात, त्या त्यांच्या इच्छेनें प्राणिमात्रांचा सर्व नाश होतो. " ३८८**

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।
मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः ॥ १८ ॥

[अहंकारं] मग पुढां भेरी निशाण । लाउनी ते दीक्षितपण । जगीं फोकारिती आपण । वावो वावो ॥ ८९ ॥ तेव्हां महत्त्वें तेणें अधमा । गर्वा चढे महिमा । जैसे लेवे दिधले तमा । काजळाचे ॥ ३९० ॥ तैसें मौढ्य घणावे । औद्धत्य उंचावे । अहंकार दुणावे । अविवेकही ॥ ९१ ॥ [बलं] मग दुजयाची भाष । नुरवावया निःशेष । बळियेपणा अधिक । होय बळ ॥ ९२ ॥ ऐसा अहंकार बळा । जालया येकवळा । [दर्पं] दर्पसागर मर्यादवेळा । सांडूनि उते ॥ ९३ ॥ मग वोसंडलेनि दर्पें । [कामं क्रोधं च] कामाही पित्त कुरुपे । तया धेंगीं सैंधें पळिपे । क्रोधाग्नि तो ॥ ९४ ॥ [संश्रिताः] तेथ उन्हाळां आगी खरमरा । तेला तुपाचिया कोठारा । लागला आणि वारा । सुटला जैसा ॥ ९५ ॥ तैसा अहंकार बळा आला । दर्प कामक्रोधीं गूढला । या दोहींचा मेळ जाला । जयांच्या ठायीं ॥ ९६ ॥ [मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतः] ते आपुलिया सवेशीं । मग कोणी कोणी हिंसा । या प्राणियांतें वीरेशा । न साधिती गा ॥ ९७ ॥ पहिलें तंव धनुर्धरा । आपुलिया मांसरुधिरा । वेंचें करिती अभिचारा । लागोनियां ॥ ९८ ॥ तेथ जाळिती जियें देहें । यामाजि जो मी आहें । तया आत्मया भज घाये । वाजती ते ॥ ९९ ॥ आणि अभिचारकीं तिहीं । उपद्रविजे जेतुलें कांहीं । तेथ चैतन्य मी पाहीं । सीण पावे ॥ ४०० ॥ [अभ्यसूयकाः] आणि अभिचारावेगळें । विपायें जें अंवगळे । तया टाकिती

१ उचलले. २ पर्वत. ३ संतोषतां. ४ वैरी, वेगळें केलें. ५ सामग्री. ६ टवाळक्या. ७ वैमनस्य. ८ वाऱ्यानें. ९ वासराचा. १० पेंढा भरून जनावरांचा कृत्रिम केलेला पांजरा. ११ झाडा. १२ वेधून-लोभानें. १३ उत्कर्षासाठीं.

१ प्रगट करिती. २ व्यर्थ व्यर्थ, वाहून वाहून. ३ लेप. ४ दृढ होतें. ५ उद्धटपणा. ६ ऐक्य. ७ वाहूं लागतो, भरतो. ८ अतिशयित भरून वाहाणाऱ्या. ९ प्रकोप पावे. १० उबाऱ्यानें. ११ अनिवार. १२ पेटे. १३ स्वेच्छा. १४ खर्च. १५ जारणादि प्रयोगांसाठीं. १६ क्वचित्. १७ प्राप्त झालें.

इंटाळें[1] । पैशुन्याचीं ॥ १ ॥ सती आणि सत्पुरुख । दानशीळ याज्ञिक । तपस्वी अलौकिक । संन्यासी जे ॥ २ ॥ कां भक्त हन महात्मे । इयें माझीं निजाचीं[2] धामें । निर्वाळिलीं[3] होमधर्में । श्रौतादिकीं ॥ ३ ॥ तयां द्वेषाचेनि काळकूटें । वासटोनि[4] तिखटें । कुबोलांचीं सैंदटें । सूंति[6] कांडें[7] ॥ ४ ॥

"मग पुढें भेरी निशाण लावून ते दीक्षितपण आपण व्यर्थ व्यर्थ जगामध्यें मिरवितात. ३८९ तेव्हां त्या महत्वाच्या योगानें, त्यांच्या त्या दुष्ट गर्वाचा महिमा वाढतो. ज्याप्रमाणें अंधाराला काजळाचा लेप द्यावा, ३९० त्याप्रमाणें मूर्खपणा वाढतो; उद्धटपणाची वृद्धि होते; अहंकार आणि अविचार ह्यांची दुप्पट होते. ३९१ दुसऱ्याची निखालस वार्ता सुद्धां राहूं देऊं नये, ह्मणून बलाढ्यतेला अधिकच बळ वाढूं लागतें. ३९२ अशा प्रकारें अहंकार वाढून एकत्र झाला ह्मणजे दर्पसमुद्र आपली मर्यादा सोडून खवळतो. ३९३ असा दर्पाला ऊत आला ह्मणजे कामाचेंही पित्त उसळतें. त्याच्या उबाऱ्यानें क्रोधाग्नि तर अनिवार पेट घेतो. ३९४ तेव्हां उन्हाळा आणि त्यांत खरमरीत आग तेलातुपाच्या कोठाराला लागावी, आणि तशांत वारा सुटला ह्मणजे ती जशी भडकते, ३९५ त्याप्रमाणें अहंकार बळावून त्यांत झपाट्यानें कामक्रोधांचा मिलाफ ज्यांच्या ठिकाणीं होतो, ३९६ हे **वीरश्रेष्ठा!** ते मग आपल्या इच्छेनें कोणकोणत्या प्राण्यांची हिंसा करीत नाहींत? ३९७ **धनुर्धरा!** प्रथम तर आपल्या रक्तमांसाचा जारणमारणाकडे खर्च करतात. ३९८ तेव्हां जे जे देह जाळतात, त्यांमध्यें जो मी आहें, त्या मला आत्म्याला–ते घाय बसतात. ३९९ आणखी, त्या जारणमारणादिकांत जितक्या जितक्यांना उपद्रव होतो, तितक्यांचें चैतन्य जें मी–त्या मला–कष्ट होतात. ४०० आणि जारणमारणाशिवाय, जें सहज प्राप्त होतें, त्यावर दुष्टपणाचे (निंदेचे) दगड टाकतात; ४०१ सती आणि सत्पुरुष; दानशील; याज्ञिक; जे अलौकिक तपस्वी; संन्यासी; ४०२ किंवा भक्त; महात्मे; हीं माझीं आवडतीं घरें, श्रौतादिकांनीं होमधर्मानें निर्मळ केलेलीं आहेत. ४०३ त्यांना द्वेषाचें तीक्ष्ण काळकूट माखून दुःशब्दांचे प्रखर बाण टोंचतात!" ४०४

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान्।
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १९ ॥

[तानहं] ऐसे आघवाचि परी । प्रवर्तले माझ्या वैरीं । तया पापियां जें मी करीं । तें आइक पां ॥ ५ ॥ [द्विषतः] तरी मनुष्यदेहाचा तागा[1] । घेऊनि रुसती[2] जे जगा । ते पदवी हिरोनि पैं गा । ऐसे ठेवीं ॥ ६ ॥ जे क्लेशगांवींचा उकरडा । भवपुरीचा पानवडा[3] । ते तमोयोनि[4] तयां मूढां । वृत्तिचि दें ॥ ७ ॥ [क्रूरान्] मग आहाराचेनि नांवें । तृणही जेथ नुगवे । ते व्याघ्र वृश्चिक आडवे । तैसीये करीं ॥ ८ ॥ [संसारेषु] तेथ क्षुधादुःखें बहुतें । तोडूनि खाती आपणयातें । मरमारों मागुते । होतचि असती ॥ ९ ॥ [अशुभान्] कां आपला गरळजाळीं । जाळिती आंगाची पेंदळी[6] । ते सर्पचि करीं बिळीं । निरुंधैला[7] ॥ ४१० ॥ [नराधमान्] परी घेतला श्वास घापे । येतुलेनही मापें । विसांवा तयां नाटोपे । दुर्जनासी ॥ ११ ॥ [क्षिपाम्यजस्रं] ऐसेनि कल्पांचिया कोडी । गणितांही संख्या थोडी । तेतुला वेळ न काढीं । क्लेशौनि तयां ॥ १२ ॥ [आसुरीष्वेव योनिषु] तरि तयांसी जेथ जाणें । तेथिचें हें पहिलें पेणें[9] । ते पावोनि येरें दारुणें । न होती दुःखें ॥ १३ ॥

"अशा रीतीनें सर्वोपरी माझ्या वैराला प्रवर्तक होतात. त्या पातक्यांना मी काय करतों तें ऐक. ४०५ तर मनुष्यदेहाचा आश्रय घेऊन जे जगावर रुसतात, (द्वेष करतात) तें पद हिरावून घेऊन त्यांना असें ठेवतों, ४०६ कीं क्लेशरूप गांवाचा उकिरडा; संसारनगराचा पानवठा; अशी जी तमोयोनी–मूढ योनी–वृक्षादिक, ती त्यांना वतन देतों. ४०७ मग आहाराच्या नांवानें तृण सुद्धां जेथें उगवत नाहीं, तेथें अरण्यांतील व्याघ्र, विंचु असेही त्यांना करतों. ४०८ तेथें क्षुधेच्या अतिशयित

१ कोलितें. २ आवडतीं, मनाचीं. ३ निर्मळ केलीं. ४ माखून. ५ बळकट. ६ टोंचतात, घालिती. ७ बाण.

१ दोरा, खटारा. २ जगाचा अव्हेर करतात. ३ पाणवठा. ४ मूढयोनि–वृक्षादि. ५ अरण्यवासी. ६ त्वचा, पुष्टि. ७ कोंडलेला. ८ टाकावयास. ९ मुक्काम.

पीडेनें ते आपले आपणांसच तोडून खातात, आणि मरून मरून पुन्हा जन्मतच असतात. ४०९ किंवा आपल्याच विषाच्या आगीनें आंगाची कातडी जळून जाईल असे सर्पच करून त्यांना बिळांत कोंबून टाकतों. ४१० तसाच त्या दुर्जनांना घेतलेला श्वास सोडतील इतक्या प्रमाणानें सुद्धां विसावा देत नाहीं. ४११ अशा रीतीनें कोट्यावधि कल्पांच्या गणितानें मोजलें असतांही संख्या थोडीच होईल, इतक्या कालपर्यंत त्यांना त्या क्लेशांतून काढित नाहीं. ४१२ तरी त्यांना जेथें जावयाचें असतें, तेथचा हा पहिला मुक्काम. ह्यांत जर ही व्यवस्था, तर पुढच्या मध्यें ह्याहूनही दारुण दुःखें असणार नाहींत काय?" ४१३

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।
मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम् ॥२०॥

[आसुरीं] हा ठायवरी चोरी । संपत्ती ते आसुरी । अधोगति अवधारीं । जोडिली तिहीं ॥ १४ ॥ [योनिमापन्ना:] पाठीं व्याघ्रादि तामसा । योनी तो अल्पमाळ ऐसा । देहाधाराचा उसासा । आथी जोही ॥ १५ ॥ [मूढा:] तोही मी वोल्हावा हिरें । मग तमचि होती एकसरें । जेथ गेलें आंधारें । काळवंडेजे ॥ १६ ॥ [जन्मनि जन्मनि] जयांची पापा चिळसी । नरक घेती विवसी । शीण जाय मूर्छी । शिणें जेणें ॥ १७ ॥ मळ जेणें मैळे । ताप जेणें पोळे । जयाचेनि नांवें सळे । महाभय ॥१८॥ पापा जयाचा कंटाळा । उपजे अमंगळ अमंगळा । विटाळही विटाळा । विहे जया ॥ १९ ॥ [ततो यांत्यधमां गतिं] ऐसे विश्वाच या वोखटेयां । अधम जे धनंजया । ते ते होती भोगूनियां । तामसा योनी ॥ ४२० ॥ [मामप्राप्यैव कौंतेय] अहा सांगतां वाचा रडे । आठवितां मन खिरडे । कैंठारे मूर्खी केवढे । जोडले निरय ॥ २१ ॥ कायिसया ते आसुर । संपत्ति पोषिती वोंउर । जिया दिधलें घोर । पतन ऐसें ॥ २२ ॥ ह्मणौनि तुवां धनुर्धरा । नोहावें गा तिया मोहरां । जेउतां वास आसुरा । संपत्तिवंता ॥ २३ ॥ आणि दंभादिदोष साही । हे संपूर्ण जयांच्या ठायीं । ते त्यजावे हें काई । ह्मणों कीर ॥ २४ ॥

१ थोडासा, किंचित्. २ स्वस्थता. ३ काळोख करणारे, काळानें. ४ कंटाळा. ५ भयें. ६ भितें. ७ भीति पावे. ८ निकृष्ट, नाशास्तव. ९ मागें सरे. १० हाय रे हाय. ११ नरक. १२ वावगी, वाईट. १३ मार्गी. १४ जेथें.

"येथपर्यंत ती चोर आसुरसंपत्ति आणि अधोगति त्यांनीं जोडली असें समज. ४१४ पुढें व्याघ्रादि तामस योनींमध्यें यत्किंचित् जी देहाची स्वस्थता असते, ४१५ तो ओलावाही मी हिरावून घेतों. तेव्हां एकसारखे तममयच होऊन जातात, असें कीं, ज्यांत गेलें असतां आंधारालाही काळिमा येते. ४१६ ज्यांच्या पापांच्या चिळशीनें नरकांनाही भय वाटतें; ज्यांच्या कष्टानें कष्टालाही मूर्च्छा येते; ४१७ ज्यांच्या योगानें मळही मळतो; ज्यांच्या योगानें तापाला ताप चढतो; ज्यांचें नांव घेतांच महाभयालाही भीति वाटते; ४१८ ज्यांच्या पापानें पापालाही कंटाळा येतो; अमंगळालाही अमंगळ होतें; ज्यांच्या विटाळाला विटाळही भितो. ४१९ धनंजया! असे विश्वाच्या नाशाकरितां जे अधम उत्पन्न होतात, ते तामस योनी भोगून होतात. ४२० हाय हाय! सांगतांना वाणीला रडें कोसळतें; आठवण करतांना मन मागें सरतें; अरेरे! मूर्खांनीं केवढा बरें हा नरक जोडला! ४२१ ती दुष्ट आसुर संपत्ति, जिला असें घोर पतन आहे, ती कांबरें वाढवितात? ४२२ ह्याकरितां अर्जुना! जेथें आसुरी संपत्तिवंत राहतात, त्या मार्गाला तूं जाऊं नकोस. ४२३ आणखी दंभ आदिकरून सहा दोष ज्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें असतील, त्यांना टाकून दे, हें काय सांगितलें पाहिजे?" ४२४

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥२१॥

[त्रिविधं] परि काम क्रोध लोभ । या तिहींचेंचि थोंब । थावे तेथें अशुभ । पिकलें जाण ॥ २५ ॥ [नरकस्येदं] सर्वदुःखा आपुलिया । देंशीना धनंजया । पाढाऊ हे भलतया । दिधले आहाती ॥ २६ ॥ कां पापियां नरकभोगीं । सुवावयालागीं जगीं । पातकांची दोंटुगी । सभाचि हे ॥२७॥ ते रौरव गा तंवचि वरी । आइकिजती पटांतरीं । जंव

१ बंड, प्रतिष्ठा. २ दाखविण्यास, अनुभवास. ३ वाटाडे, बोधक. ४ घालावया. ५ बलाढ्य. ६ परोक्षत्वें.

हे तिन्ही अंतरीं । उठती ना ॥ २८ ॥ अपाय तिहीं आशा[1]लुग । यातना इहीं सवंग । हाणी हाणी नोहे हे तिघ । हेचि हाणी ॥ २९ ॥ [द्वारं] काय बहु बोलूं सुभटा । सांगीतलिया निकृष्टा । नरकाचा दारवंटा[2] । त्रिशंकु[3] हा ॥ ४३० ॥ [नाशनमात्मनः] या कामक्रोधलोभां । माजि जीवें जो होय उभा[4] । तो निरयपुरींची सभा । येथ पावे ॥ ३१ ॥ [कामेति] ह्मणौनि पुढतपुढती किरीटी । हे कामादिदोषत्रिपुटी । त्यजावीचि गा वोखटी । आघवाविषयीं ॥ ३२ ॥

"परंतु काम, क्रोध, लोभ ह्या तिघांचेंच बंड जेथें माजतें, तेथें–अशुभाचें–पापाचें पीक पिकतें हें लक्ष्यांत ठेव. ४२५ **अर्जुना!** आपलीं सर्व दुःखें दाखविण्यासाठीं पाहिजे त्याला हे वाटाडे दिलेले आहेत. ४२६ किंवा पातक्यांना नरकभोगांत टाकण्यासाठीं, जगामध्यें पातकांची भरलेली ही सभाच आहे. ४२७ हे अंतःकरणांत तिन्ही उठले नाहींत, तोंपर्यंतच रौरवाचें नांव परोक्षत्वेंकरून ऐकावयाचें. ४२८ अपाय करणें हें यांचें हातचें काम. यातनेचा ह्यांच्या जवळ सवंग सुकाळ. हानि ती हानि नव्हे; हे तिघे हानि होत. ४२९ हे **वीरश्रेष्ठा!** ह्यांचा नीचपणा फार काय सांगावा? हा त्रिशूळ लावलेला नरकाचा दरवाजा आहे. ४३० ह्या कामक्रोधलोभांमध्यें जो जिवाभावानें उद्युक्त होतो, तो नरकाच्या सभेस पोंचतो. ४३१ ह्मणून **अर्जुना!** कामादिक दोषांची ही त्रिपुटी, सर्वोपरीनें वाईट आहे. ह्याकरितां ती निखालस टाकून द्यावी." ४३२

एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।
आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥२२॥

[एतैर्विमुक्तः कौंतेय] धर्मादिकां चौंहीआंत । पुरुषार्थाची तैंचि मात । करावी जैं संघात । सांडील हा ॥ ३३ ॥ हे तिन्ही जीवीं जंव जागती । तंववरी निकियेंाची[5] प्राप्ती । हे माझे कान नाइकती । देवही ह्मणे ॥ ३४ ॥ जया आपणपें[6] पढिये । आत्मनाशा जो बिहे । तेणें न धरावी हे सोये[7] । सावध होइजे ॥ ३५ ॥ पोटीं बांधोनि पाषाण । समुद्रीं बाहीं[1] आंगवण । कां जियानया जेवण । काळकूटाचें ॥ ३६ ॥ इहीं कामक्रोधलोभेंसी । कार्यसिद्धि जाण तैसी । ह्मणौनि ठावोचि पुसीं[2] । ययांचा गा ॥ ३७ ॥ [तमोद्वारैस्त्रिभिर्नरः] जैं कहीं अवचटें । हे तिकडी सांखळ तुटे । तैं सुखें आपलिये वाटे । चालों लाभे ॥ ३८ ॥ त्रिदोषीं सांडिलें शरीर । त्रिकुटीं[3] फिटलिया नगर । त्रिदाह[4] निमालिया अंतर । जैसें होय ॥ ३९ ॥ तैसा कामादिकीं तिघीं । सांडिला सुख पावोनि जगीं । [आचरत्यात्मनः श्रेयः] संग लाहे मोक्षमार्गी । सज्जनाचा ॥ ४४० ॥ मग सत्संगें प्रबळें । सच्छास्त्राचेनि बळें । जन्ममृत्यूचीं निमोळें[5] । निस्तरे[6] रानें ॥ ४१ ॥ [ततो याति परां गतिं] ते वेळीं आत्मानंदें आघवें । जें सदा वसतें बरवें । तें तैसेंचि पाटण[7] पावे । गुरुकृपेचें ॥ ४२ ॥ तेथ प्रियाची[8] परमसीमा । तो भेटे माउली आत्मा । तेये खेवीं[9] आटे डिडिमा[10] । सांसारिक हे ॥ ४३ ॥ ऐसा जो कामक्रोधलोभां । झाडी[11] करूनि ठाके उभा । तोचि येवढिया लाभा । गोसावी होय ॥ ४४ ॥

"ह्या मेळा जेव्हां सोडील, तेव्हांच धर्माची आणि चाऱ्ही पुरुषार्थांची गोष्ट काढावी. ४३३ देव सुद्धां ह्मणाले कीं 'हे तिन्ही जिवामध्यें जोंपर्यंत जागत आहेत, तोंपर्यंत कल्याण मिळणें, हें माझे कान ऐकावयाचे सुद्धां नाहींत!' ४३४ ज्याला स्वतःविषयीं प्रेम आहे; आत्मनाशाला जो भितो; त्यानें तो मार्ग धरूं नये. सावध व्हावें. ४३५ पोटाखालीं दगड बांधून समुद्रामध्यें हातांनीं पोहणें, किंवा जगण्याकरितां कालकूटाचें जेवण जेवणें, ४३६ त्याप्रमाणें ह्या कामक्रोधलोभांपासून कार्यसिद्धि आहे. ह्मणून ह्यांचें ठिकाणच मोडून टाक. ४३७ जेव्हां चुकून कधीं ह्या तिघांची सांखळी तुटेल, तेव्हां आनंदानें आपल्या वाटेनें चालतां येईल. ४३८ त्रिदोष निघून गेल्यानंतर शरीर; चोरी, चहाडी व शिंदळकी–ह्या त्रिकुटींतून मुक्त झालेलें नगर; त्रिविध ताप शमल्यानंतर अंतःकरण, जसें होतें, ४३९ त्याप्रमाणें कामादिक तिघांनीं सोडलें असतां, त्याला जगामध्यें सुख

१ सोपे. २ दरवाजा. ३ तीन खिळे मारलेला. ४ उद्युक्त, अनुकूळ. ५ कल्याणाची. ६ स्वतःविषयींचें प्रेम. ७ मार्ग.

१ बाहुशक्ति, सामर्थ्य. २ पुसून टाक. ३ चाहाडी, चोरी व शिंदळकी यांनीं. ४ त्रिविध ताप. ५ खचरट. ६ उलंघी. ७ नगर. ८ आवडत्याची. ९ त्या क्षणीं. १० डंका व गलबल. ११ झाडा.

मिळून, मोक्षमार्गामध्यें सज्जनांच्या संगतीचा लाभ प्राप्त होतो. ४४० मग बलवत्तर सत्संगानें, सच्छास्त्राच्या बळानें, जन्ममृत्यूचीं खचरट रानें उल्लंघन करतो. ४४१ त्या वेळीं आत्मानंदानें सदासर्वकाल गजबरलेलें, शोभायमान, असें जें गुरुकृपेचें शहर, तें तसेंच्या तसेंच प्राप्त होतें. ४४२ तेथें प्रियाची केवळ परम सीमा, अशी आत्मारामरूप माउली भेटते, आणि ती भेटली कीं, हा सांसारिक गलबला–डिंडिम–सारा आटून जातो. ४४३ असा कामक्रोधलोभांला झाडून उभा राहतो, तोच येवढ्या लाभाचा स्वामी होतो." ४४४

य: शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥२३॥

[य:] ना हें नावडोनि कांहीं । कामादिकांच्याचि ठायीं । दाटिली जेणें डोई । आत्मचोरें ॥ ४५ ॥ [शास्त्रविधिमुत्सृज्य] जो जगीं समान सरूप । हिताहित दाविता दीप । तो अमान्य केला बापें । वेद जेणें ॥ ४६ ॥ न धरीचि विधीची भीड । न करीचि आपली चाड । [वर्तते कामकारतः] वाढवीत गेला कोड । इंद्रियांचें ॥ ४७ ॥ कामक्रोधलोभांची कास । न सोडीच पाळिली भाष । स्वैराचाराचें अंसोस । वेंळघला रान ॥ ४८ ॥ [न स सिद्धिमवाप्नोति] तो सुटकेचिया वाहिणीं । मग पिवों न लाहे पाणी । स्वप्नींही ते सुखकाहाणी । दूरीचि तया ॥ ४९ ॥ आणि परत्र तंव जाये । हें कीर तया आहे । [न सुखं] परी ऐहिकही न लाहे । भोग भोगूं ॥ ४५० ॥ तरि माशालागीं भुलला । ब्राह्मण पोंणबुडा रिघाला । कीं तेथही पावला । नास्तिकवाद ॥ ५१ ॥ [न परां गतिं] तैसें विषयांचेनि कोडें । जेणें परत्रा केलें उंबडें । तंव तोचि आणिकीकडे । मरणें नेला ॥ ५२ ॥ एवं परत्र ना स्वर्ग । ना ऐहिकही विषयभोग । तेथ केउता प्रसंग । मोक्षाचा तो ॥ ५३ ॥ म्हणौनि कामाचेनि वळें । जो विषय सेऊं पाहे सेळें । तया विषय ना स्वर्ग मिळे । ना उद्धरे तो ॥५४॥

"किंवा हें कांहींच न आवडून ज्यानें आत्मचोर होऊन कामादिकांच्या ठिकाणींच मस्तक खुपसलें; ४४५ जो जगामध्यें समान; सरूप; हिताहित दाखविणारा दिवा; तो श्रेष्ठ वेद ज्यानें अमान्य केला; ४४६ विधीची भीडच धरावयाची नाहीं; आत्मप्राप्तीची इच्छाच करावयाची नाहीं; इंद्रियांचे लाड मात्र वाढवित जातो; ४४७ कामक्रोधलोभाची कास सोडावयाची नाहीं, म्हणून शपथच घेतलेली; स्वेच्छाचाराच्या निबिड अरण्यांत शिरतो; ४४८ त्याला सुटकारूप नदींतलें पाणी सुद्धां प्यावयास मिळत नाहीं. सुखाची गोष्ट त्याच्या स्वप्नांत सुद्धां दूरच असावयाची. ४४९ आणखी परलोकांत गेला तरी, त्याच्या कपाळीं हेंच. पण ऐहिक भोगही त्याला भोगावयाला मिळत नाहींत. ४५० तर माशाकरतां भुलून ब्राह्मण कोळ्यांत शिरला; पण तेथेंही नास्तिकवाद आलाच. ४५१ त्याप्रमाणें विषयाच्या आवडीनें परलोक पालथा घातला, इतक्यांत तोच मरणानें दुसरीकडे नेला. ४५२ अशा प्रकारें परलोकही नाहीं, आणि स्वर्गही नाहीं. ऐहिक विषयभोगही ठाउक नाहींत, तेथें मोक्षाचा प्रसंग तो कसचा? ४५३ म्हणून कामाच्या बळानें, बलात्कारानें जो विषयभोगाचें सेवन करावयास पहातो, त्याला विषयही मिळत नाहींत, स्वर्गही मिळत नाहीं, आणि तो उद्धरतही नाहीं." ४५४

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥२४॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

[तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते] याकारणें पैं बापा । जया आथी आपली कृपा । तेणें वेदांचिया निरोपा । आन न कीजे ॥५५॥ पतीचिया मता । अनुसरोनि पतिव्रता । अनायासें आत्महिता । भेटेचि ते ॥ ५६ ॥ ना तरी श्रीगुरुवचना । दिठी देतु जतना । शिष्य आत्मभुवना- । माजि पैसे ॥ ५७ ॥ हें असो आपुला ठेवा । हाता आथी जरी यावा । तरी आदरें जेविं दिवा । पुढां कीजे ॥ ५८ ॥ तैसा अशेषांही पुरुषार्था । जो गोसांवी हो म्हणे पार्था । तेणें श्रुतिस्मृती माथां । बैसणें धांपे ॥ ५९ ॥ [कार्याकार्यव्यवस्थितौ] शास्त्र म्हणेल जें सांडावें । तें राज्यही तृण मानावें । जें घेववी तें न म्हणावें । 

१ घातली. २ श्रेष्ठ. ३ आत्मप्राप्तीची इच्छा. ४ शपथ. ५ विचारस्वातंत्र्याचें, स्वेच्छा आचरणाचें. ६ अतिशयेंकरून. ७ लंपट झाला, वेंघला. ८ नदींत, मार्गात. ९ कोळ्याच्या जातींत. १० उपडें. ११ कसचा. १२ बळानें.

१ अवज्ञा, अपमान. २ पावे. ३ घालावें.

विषही विरु[1] ॥ ४६० ॥ ऐसिया वेदैकनिष्ठा । जालिया जरी सुभटा । तरि कें आहे अनिष्ठा । भेटणें गा ॥६१॥ पैं अहितापासूनि काढिती । हित देउनी वाढविती । नाहीं श्रुतीपरौती । माउली जगा ॥ ६२ ॥ [ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं] ह्मणौनि ब्रह्मेसीं मेळवी । तंव हे कोण्हे न सांडावी । अगा तुवांही ऐसी भजावी । विशेषेंसी ॥ ६३ ॥ जे आजि अर्जुना तूं येथें । करावया सत्य शास्त्रें सार्थें । जन्मलासि बैळार्थें । धर्माचेनि ॥ ६४ ॥ आणि धर्मानुज हें ऐसें । ओघेंचि आलें अपैसें । ह्मणौनि अनारिसें[4] । करूं नये ॥ ६५ ॥ कार्याकार्यविवेकीं । शास्त्रेंचि करावीं पारखीं । अकृत्य तें कुडें लोकीं । वाळावें[6] गा ॥ ६६ ॥ [कर्म कर्तुमिहार्हसि] मग कृत्यपणें खरें निगे । तें तुवां आपलेनि आंगें । आचरोनि आदरें चांगें । सारावें गा ॥ ६७ ॥ जे विश्वप्रामाण्याची मुदी । आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धी । लोकसंग्रहासि त्रिशुद्धी । योग्य होसी ॥ ६८ ॥ एवं आसुरवर्ग आघवा । सांगोनि तेथिंचा निर्गावा । तोही देवें पांडवा । निरूपिला ॥ ६९ ॥ इयावरी तो पंडूचा । कुमर सद्भाव जीवींचा । पुसेल तो चैतन्यांचा । कानीं ऐका ॥ ४७० ॥ संजयें व्यासाचिया निरोपा । तो वेळ[10] फेडिला तया नृपा । तैसा मीही निवृत्तिकृपा । सांगेन तुह्मां ॥ ७१ ॥ तुह्मी संत माझिया कडा । दिठीचा कराल वहुडा[11] । तरि तुह्मां मानें[12] येवढा । होईन मी ॥ ७२ ॥ ह्मणोनि निज अवधान । मज वोळगे[13] पसायदान[14] । दीजो जी सनाथ होईन । ज्ञानदेव ह्मणे ॥ ४७३ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ श्लोक २४, ओव्या ४७३.

“ह्याकरितां **बाबा!** ज्याला आपली—आत्मारामाची—कृपा पाहिजे असेल त्यानें, वेदवचनाचा अपमान करूं नये. ४५५ पतिव्रताही पतीच्या मताला अनुसरून अनायासानें ती आत्महितालाही मिळतेच. ४५६ किंवा, श्रीगुरुवचन जतन करण्यावर दृष्टि ठेवून शिष्य, आत्मभुवनामध्यें पोंचतो. ४५७ हें असो. आपला ठेवा आपल्या हस्तगत व्हावा असें जर मनांत असेल तर, साक्षेपानें जसा दिवा पुढें केला पाहिजे. ४५८ त्याप्रमाणें **पार्था!** एकूनएक पुरुषार्थांचा स्वामी व्हावें असें ह्मणत असेल, त्यानें श्रुतिस्मृतींना शिरसिं वंद्य करावें. ४५९ शास्त्र जें सोडावें असें ह्मणेल तें राज्य असलें तरी तृणवत् मानावें. आणि घ्यावें ह्मणेल तें, विष असलें तरी विरुद्ध असें ह्मणूं नये. ४६० हे **वीरश्रेष्ठा!** अशी वेदाच्या ठिकाणीं एकनिष्ठा झाली, तर अनिष्ट कोठें भेटणार आहे? ४६१ अहितापासून काढते; हित देऊन वाढविते; त्या श्रुतीहून जगाला दुसरी सरस माउली नाहीं. ४६२ ह्मणून ब्रह्माशीं गांठ घालून देईपर्यंत तिला कोणींही सोडूं नये. अरे! तूं सुद्धां असेंच विशेषेंकरून तिला भज. ४६३ कारण **अर्जुना!** तूं आज येथें खरोखर शास्त्रें सार्थ करण्याकरितां धर्माच्या बळानें जन्मास आला आहेस. ४६४ आणि धर्माचा धाकटा भाऊ हें नातेंही आपोआपच आलें आहे. ह्मणून दुसरें कांहीं करूं नको. ४६५ कार्याकार्यविचारामध्यें शास्त्राचीच ओळख करावी. अकृत्य हें लोकांमध्यें खोटें आहे. तें टाळावें. ४६६ मग करण्यास योग्य निघेल तें, आपण स्वतः उत्तम रीतीनें करून टाकावें. ४६७ कारण, विश्वानें प्रमाण मानण्याची मुद्रिकाच अशी जी सुबुद्धि, ती आज तुझ्या हातीं आहे. ह्यामुळें लोकसंग्रहाला तूं निःसंशय योग्य होशील. ४६८ अशा प्रकारें असुरवर्ग सारा सांगून, तेथून निघण्याचा प्रकार, तो देखील **देवांनीं अर्जुनाला** निरूपण केला. ४६९ आतां ह्यापुढें **पंडुराजाचा** पुत्र मनांतील सद्भाव विचारील. तो जीवात्म्याच्या कानांनीं श्रवण करा. ४७० **संजयानें** व्यासाच्या निरोपानें त्या **राजाच्या**—**धृतराष्ट्राचा**—वेळ घालविला. तसा मीही **निवृत्तिनाथांच्या** कृपेनें तुम्हांला सांगेन. ४७१ आपण—सज्जन—माझ्याकडे कृपादृष्टीचा वर्षाव कराल तर तुम्हांला मान्य होण्यायेवढा मी होईन. ४७२ ह्मणून **ज्ञानदेव** ह्मणतात ‘मला—आश्रिताला—मनाच्या अवधानाचा प्रसाद द्यावा, ह्मणजे महाराज! मी सनाथ होईन.” ४७३

**सोळावा अध्याय समाप्त.**

१ विरुद्ध. २ अर्थासहित, यथार्थ. ३ धर्माचें बळ तुझ्या ठायीं आहे. ४ अन्यथा. ५ पारख, ओळख. ६ त्यागावें. ७ जगास प्रमाण ठेवण्यायोग्य असा शिक्का. ८ निघण्याचा प्रकार. ९ जीवात्म्याचा. १० वेळ घालविला. ११ वर्षाव. १२ मान्य होण्याजोगा. १३ आश्रितास. १४ प्रसाद.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय १७ वा.

विश्वविकासित[1] मुद्रा। जया सोडवी तुझी योगनिद्रा[2]। तया नमोजी गणेंद्रा। श्रीगुरुराया ॥ १ ॥ त्रिगुण त्रिपुरीं[3] वेढिला। जीवत्वदुर्गीं[4] आडिला। तो आत्मशंभू सोडविला। तुझिया स्मृती ॥ २ ॥ ह्मणोनि शिवेंसी[5] कांटाळा[6]। गुरुत्वें तूंचि आगळा[7]। तऱ्ही हळु[8] मायाजळा। माजि तारुनि ॥ ३ ॥ जे तुझ्याविखीं मूढ। तयांलागीं तूं वक्रतुंड। ज्ञानियांसि तरी अखंड। उजूचि आहासी ॥४॥ दैविकी दिठी[9] पाहतां सानी[10]। तऱ्ही मीलनोन्मीलनीं[11]। उत्पत्ति प्रळय दोन्ही। लीलाचि करिसी ॥ ५ ॥ प्रवृत्तिकर्णाच्या[12] चौळी[13]। उठिलीं मदगंधानिळीं[14]। पूजीजसी नीळोत्पळीं। जीवभृंगींच्या[15] ॥ ६ ॥ पाठीं[16] निवृत्तिकर्णताळें[17]। आहालली[18] ते पूजा विधुळे[19]। तेव्हां मिरविसी मोकळें। आंगाचें लेणें ॥ ७ ॥ वामांगींचा लास्यविलास[20]। जो हा जगद्रूप आभास। तो तांडवमिसें कैळास[21]। दाविसी तूं॥ ८ ॥ हें असो विस्मय दातारा। तूं होसी जयाचा सोयरा। सोइरिकेचिया व्यवहारा। मुकेचि तो ॥९॥ फेडितां बंधनाचा ठावो। तूं जगद्बंधू ऐसा भावो। धरूं वोळंगे[22] उवावो[23]। तुझाचि आंगीं ॥१०॥ दुजयाचेनि नांवें तया। देहही नुरेचि पैं देवराया। जेणें तूं आपणपयां। केलासि दुजा ॥ ११ ॥ तूंतें करूनि पुढें[24]। जे उपायीं घेती देवडे[25]। तया ठोंसी[26] बहुयें पांडें[27]। मागांचि तूं ॥ १२ ॥ जो ध्यानें सूये[28] मानसीं। तया लागीं नाहीं तूं त्याचे देशीं। ध्यानही विसरे तेणेंसीं। वालभ[29] तुज ॥ १३ ॥ तूतें सिद्धचि जो नेणे। तो नांदे सर्वज्ञपणें। वेदांही येवढें बोलणें। नेघसी कानीं ॥ १४ ॥ मौन गा तुझें राशिनांव। आतां स्तोत्रीं कें बांधों हांव। दिसती तेतुली माव। भजों काई ॥ १५ ॥ दैविकें[1] सेवक हों पाहों। तरि भेदितां द्रोहचि लाहों। ह्मणोनि आतां कांहीं नोहों। तुजलागीं जी ॥ १६ ॥ जैं सर्वथा सर्वही नोहिजे। तैं अद्वया तूतें लाहिजे। हें जाणें मी वर्म तुझें। आराध्यलिंगा[2] ॥ १७ ॥ तरि नुरोनि वेगळेपण। रसीं[3] भजिनलें लवण। तैसें नमन माझें जाण। बहु काय बोलों ॥ १८ ॥ आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे। तो उचंवळत भरोनि निगे। कां दशी[4] दीपसंगें। दीपचि होय ॥ १९ ॥ तैसा तुझिया प्रणतीं[5]। मी पूर्ण जालों श्रीनिवृत्ती। आतां आणीन व्यक्ती। गीतार्थी तो ॥ २० ॥ [अध्यायसंगतिः] तरि षोडशाध्यायशेखीं। तिये समाप्तीच्या श्लोकीं। जो ऐसा निर्णयो निष्टंकीं[6]। ठेविला देवें ॥ २१ ॥ जे कृत्याकृत्यव्यवस्था। अनुष्ठावया पार्था। शास्त्रचि एक सर्वथा। प्रमाण तुज ॥ २२ ॥ तेथ अर्जुन मानसें। ह्मणे हें ऐसें कैसें। जे शास्त्रेंवीण नसे। सुटिका कर्मा ॥ २३ ॥ तरी तक्षकाची[7] फडे। ठाकोनि कैं तो मणि काढे। कैं नाकींचा केश जोडे। सिंहाचिये ॥ २४ ॥ मग तेणें तो वोविजे। तरीच लेणें पाविजे। येऱ्हवीं काय असिजे। रिक्तकंठीं ॥ २५ ॥ तैसी शास्त्रांची मोकळी[8]। यां[9] कैं कोण वेंटाळी। एकवाक्यतेच्या फळीं। पैसिजे[10] कैं ॥ २६ ॥ जालयाही एकवाक्यता। के लाभे वेळ अनुष्ठितां। कैंचा पैसार[11] जीविता। येतुलालिया ॥ २७ ॥ आणि शास्त्रें अर्थे देशें काळें। या चहूंही जें ऐकफळें[12]। तो उपावो कें मिळे। आंघवयांसी[13] ॥ २८ ॥ ह्मणौनि शास्त्राचें घडतें[14]। नोहे प्रकारें बहुतें। तरि मूर्खा मुमुक्षां येथें। काय गती पां ॥ २९ ॥ हा पुसावया अभिप्राव। जो अर्जुन करी प्रस्ताव। तो सतराविया ठाव। अध्याया येथ ॥ ३० ॥ [अर्जुन उवाच—] तरि सर्वविषयीं वितृष्ण[15]। जो सकळकळीं प्रवीण। कृष्णाही[16] नवल कृष्ण। अर्जुनत्वें जो ॥३१॥ शौर्या जोडला आधार। जो सोमवंशाचा शृंगार। सुखादि उपकार। जयाची लीळा

---

१ जगरूप प्रफुल्लित मायेची आकृति. २ योगरूप अवस्था, ध्यान. ३ तीन गुणरूपी तीन नगरांनीं. ४ किल्ल्यांत. ५ शिवाबरोबर. ६ तुलनेनें. ७ अधिक. ८ हलका. ९ दिव्यदृष्टि. १० लहान. ११ उघडणें व झांकणें यांत. १२ संसारिकवृत्तीरूप कर्णांच्या. १३ हालविण्यानें. १४ मदरूप सुगंध वायूनें. १५ जीव हेच भ्रमर त्यांनीं युक्त नीलकमलांनीं पूजिला जातोस. १६ नंतर. १७ अंतर्मुखत्ववृत्ति हेच कान. १८ हालली असतां. १९ नाश पावे. २० नृत्यक्रीडा. २१ कौशल्य, चातुर्य. २२ सेवा करावी. २३ योग्यता. २४ निराळा. २५ धांवे. २६ राहसी. २७ सर्व प्रकारें. २८ घाली. २९ आवडी, प्रियत्व.

१ तूं देव अशा नात्यानें. २ हे आराध्यमूर्ते. ३ उदकानें. ४ वात. ५ नमस्कारेंकरून. ६ सिद्धांतीं. ७ सर्पाची. ८ अनेकत्वें मोकळेपणा. ९ शास्त्रांला. १० मार्ग सांपडे. ११ पैस, दीर्घपणा. १२ एकत्र होतें. १३ सर्वांला. १४ साधन. १५ निरिच्छ. १६ कृष्णालाही.

॥ ३२ ॥ जो प्रज्ञेचा[1] प्रियोत्तम[2] । ब्रह्मविद्येचा विश्राम । सहचर[3] मनोधर्म । देवाचा जो ॥ ३३ ॥

जगद्रूप प्रफुल्लित मायेच्या आकृतीला ज्या तुमची योगरूप अवस्था सोडविते, त्या **गणेंद्र**रूप श्रीगुरुरायाला नमस्कार असो. १ त्रिगुणरूप तीन नगरांनीं वेढिलेल्या जीवित्वरूप किल्ल्यांत अडलेला, जो आत्मरूप **शंभु**, तो तुझ्या स्मरणमात्रेंकरूनच सुटतो. २ ह्मणून **शंकराशीं** तुलना केली तर, मोठेपणानें तूंच अधिक आहेस. तरी मायाजळामध्यें तारून नेण्याइतका हलकाही होतोस. ३ तुझ्याविषयीं जे मूढ आहेत, त्यांना तूं वक्रतुंड; परंतु ज्ञान्यांना तूं निरंतर उजूच आहेस. ४ तुमची दिव्यदृष्टि दिसण्यांत सूक्ष्म आहे, तरी तिच्या उघड झांपेबरोबर उत्पत्ति व प्रलय दोन्हीं लीलेनेंच करतां. ५ संसारिक वृत्तीरूप कानाच्या हालचालीनें मदाचा गंधयुक्त वायु उत्पन्न होतो. आणि त्यास लुब्ध झालेले जीवरूपी भ्रमर मस्तकावर येऊन बसतात; त्यामुळें आपल्या मस्तकावर नीलोत्पलांची पूजाच बांधली आहे असें वाटतें. ६ नंतर निवृत्तिरूप कर्णताळें हालली ह्मणजे ती पूजा नाश पावते. तेव्हां व्यक्तस्वरूपाची शोभा दृष्टीस पडते. ७ स्त्रियेची–मायेची नृत्यक्रीडा, असा जो हा जगद्रूप आभास, त्याचें तूं तांडवाच्या निमित्तानें चातुर्य दाखवितोस. ८ हें असो, हे **दातारा!** आणखी एक मोठें आश्चर्य आहे कीं, तूं ज्याचा सोयरा होतोस, तो सोयरेपणाच्या व्यवहारालाच मुकतो. त्याला पुनर्जन्म नाहीं. अर्थात् एकरूपता झाली ह्मणजे आप्तपणा उरतच नाहीं. ९ संसारबंधनाचा ठावठिकाण नाहींसा करतां ह्मणून जगद्बंधूची योग्यता आपल्या आंगीं आहे अशी भावना धरून सेवा करूं ह्मटलें, १० तर देवराया ! त्या सेवा करणाराला आपण दुसरा ह्मणावयाला ( द्वैतभावनेला ) देह सुद्धां उरत नाहीं. कारण, आपण त्याला आपणाहून निराळा राखितच नाहीं.– एकरूप करितां. ११ तुह्मांला पुढें करून– निराळा असें मानून– पूजा इत्यादिकांची धावाधाव करीत सुटतात, त्यांच्यापासून आपण फारच मागें राहतां. ( जे कोणी द्वैतभावनेनें आपली उपासना करतात, ते आपल्यास मुकतात– त्यांस आपली प्राप्ती होत नाहीं असा भाव. ) १२ जो कोणी आपणास ध्यानामध्यें धरतो, त्याच्या आपण गांवीं सुद्धां नसतां. परंतु ध्यानासहवर्तमान ज्याच्या वृत्तीचा लय तुह्मांमध्यें होतो, त्याचीच तुह्मांला फार आवड असते. १३ आपणास जो मुळींच जाणत नाहीं, तोच सर्वज्ञपणानें नांदतो. वेदासारख्यांचें बोलणें सुद्धां आपण कानांवर घेत नाहीं. १४ मौन हेंच आपलें जन्मराशीचें नांव असल्यामुळें, आतां स्तुतीची हांव तरी कशी धरावी ? जेवढें जेवढें पहावें, तेवढें तेवढें मिथ्याच वाटतें. तेव्हां आतां भक्ति तरी करावी कशी ? १५ तूं देव हा नात्यानें सेवक होऊं पहावें, तर भेद मनांत आणला असतां द्रोह मात्र होणार. ह्मणून आतां महाराज! तुमच्याशीं कोणतेंच नातें ठेवित नाहीं. १६ जेव्हां सर्वथा कांहींच न व्हावें, तेव्हांच तुमची प्राप्ति. हे **आराध्यमूर्ते!** हें तुमचें वर्म मला माहित आहे. १७ तर उदकाच्या आश्रयास गेलेल्या मिठांत जसा वेगळेपणा उरत नाहीं, त्याप्रमाणें वेगळेपणा न धरतां माझा नमस्कार आहे. हें ध्यानांत असूं द्या. फार काय बोलावें ! १८ आतां रिकामी घागर समुद्रामध्यें गेली, तर उचंबळत भरून निघते; किंवा वातही दिव्याच्या संगतीनें दिवाच होते; १९ त्याप्रमाणें हे **निवृत्ति राजा!** तुह्मांला नमस्कार करून मी पूर्णतेप्रत पोंचलों. आतां तो गीतार्थ प्रगट करीन. २० तर सोळाव्या अध्यायाच्या शेवटीं, त्याच्या समाप्तीच्या श्लोकामध्यें, देवांनीं असा जो सिद्धांताचा निर्णय करून ठेवला, २१ कीं, **अर्जुना!** कृत्याकृत्यव्यवस्था समजण्याला एक शास्त्र हेंच सर्वथा तुला प्रमाण धरलें पाहिजे. २२ तेव्हां

१ बुद्धीचा. २ आवडता. ३ समागमें असणारा.

**अर्जुनाच्या मनांत आलें कीं, शास्त्राशिवाय कर्माला सुटका नाहीं असें कसें? २३ तर तक्षकाच्या फणिमध्यें असलेला मणि कोठें सांपडेल? सिंहाच्या नाकांतला केंस कोठें मिळेल? २४ मग त्यांत तो ओंवला, तरच भूषण घालावयाचें, नाहीं तर बुच्या गळ्यानेंच का रहावयाचें? २५ तसा शास्त्रांचा विस्तार आहे. त्यांना कोण केव्हां आकलन करणार? त्यांना एकवाक्यतेचीं फळें येणार कधीं? २६ एकवाक्यता झाली तरी, त्याप्रमाणें चालाययाला वेळ आहे कोठें? आयुष्याला इतका विस्तृतपणा कोठचा? २७ आणखी शास्त्र, अर्थ, देश, काळ; ह्या चहूंनीं मान्य केलेला उपाय सर्वांना कोठें सांपडणार? २८ म्हणून अनेक प्रकारानें शास्त्राचें साधन होत नाहीं. तर येथें मूर्खांना—अज्ञान्यांना—मुमुक्षूंना—गति कोणती? २९ हें विचारण्याच्या उद्देशानें अर्जुन जें बोलण्यास आरंभ करील, त्याचें स्थान हा सतरावा अध्याय आहे. ३० तर सर्व विषयांमध्यें निरिच्छ; जो सकल कलांमध्यें प्रवीण; जो अर्जुन*वेंकरून कृष्णालाही आल्हाद देणारा कृष्ण; ३१ जो शौर्याला सांपडलेला आधार; जो सोमवंशाचा शृंगार; सुखादि उपकार ही ज्याची लीला; ३२ जो बुद्धीचा मोठा आवडता; जो ब्रह्मविद्येचा विश्राम; जो देवाच्या मनोरथानुरूप वागणारा; ३३**

अर्जुन उवाच—

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजंते श्रद्धयान्विताः ।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तमः ॥१॥

तो अर्जुन म्हणे गा तमालश्यामा[1] । इंद्रियां फांवलिया[2] ब्रह्मा । तुझा बोल आह्मां । साकांक्ष[3] पैं जी ॥ ३४ ॥ जें शास्त्रेंवांचूनि आणिकें । प्राणियां स्वमोक्ष न देखे । ऐसें का कैं[1] पेखें । बोलिलासी ॥ ३५ ॥ [ये शास्त्रविधिमुत्सृज्य] तरि न मिळेचि तो देश । नव्हेचि काळा अवकाश । जो[2] करवी शास्त्राभ्यास । तोही दुरी ॥ ३६ ॥ आणि अभ्यासीं विरजिया[3] । होती जिया सामग्रिया । त्याही नाहीं आपतिया[4] । तिये वेळीं ॥ ३७ ॥ उंजू नोहेचि प्राचीन[6] । नेदीचि प्रज्ञा संवाहन[5] । ऐसें ठेलें आपादन[8] । शास्त्राचें जया ॥ ३८ ॥ किंबहुना शास्त्राविखीं । येकही न लाहातीचि नेखी[9] । म्हणुनि उंखीविखी[10] । सांडिली जिहीं ॥ ३९ ॥ [यजंते श्रद्धयान्विताः] परि निर्धारूनि शास्त्रें । अर्थानुष्टानें पवित्रें । नांदताति परत्रें[11] । साचारें जे ॥४०॥ तयां ऐसें आह्मी होआवें । ऐसी चाड बांधोनि जीवें । घेती तयांचे मोगावे[12] । आचरावया ॥ ४१ ॥ धडयाचिया आखरा[13] । तळीं वाळ लिहे दातारा । कां पुढांसूनि पडिकरा[14] । अक्षम[15] चाले ॥ ४२ ॥ तैसें सर्वशास्त्रनिपुण । तयाचें जें आचरण । तेंचि करिती प्रमाण । आपलिये श्रद्धे ॥ ४३ ॥ मग शिवादिकें पूजनें । भूम्यादिकें महादानें । अग्निहोत्रादि यजनें । करिती जे श्रद्धा ॥ ४४ ॥ [तेषामिति] तयां सत्वरजतमां- । माजि कोण पुरुषोत्तमा । गति होय ते आह्मां । सांगिजो जी ॥ ४५ ॥ तंव वैकुंठपीठिचें लिंग । जो निगमपद्माचा पराग । जिये[16] जयाचेनि हें जग । अंगच्छाया[17] ॥ ४६ ॥ काळ सावियाचि वाढ । लोकोत्तर[18] प्रौढ । अद्वितीय गूढ । आनंदघन ॥ ४७ ॥ इयें श्लाघीजती जेणें विकें[19] । तें जयाचे आंगीं असिकें[20] । [श्रीभगवानुवाच—] तो श्रीकृष्ण स्वमुखें । बोलत असे ॥ ४८ ॥

**असा जो अर्जुन तो म्हणाला "हे तमालपत्राप्रमाणें नीलवर्ण कृष्णा! इंद्रियांना ब्रह्म भेटविणाऱ्या! महाराज! तुमच्या पूर्वीच्या भाषणानें आम्हांला संदेह उत्पन्न होतो. ३४ शास्त्रांवांचून इतर कोणत्याही साधनानें प्राण्यांना मोक्ष दिसावयाचा नाहीं, असें आपण कोणत्या अर्थानें बोललांत? ३५ तर तो देशच मिळत नाहीं; काळालाही अवकाश मिळत नाहीं; जो शास्त्राभ्यास करविणारा असतो, तोही लांब राहतो. ३६ आणखी, अभ्यासाचीं साधनें असतात, तींही त्याला त्या वेळीं अनुकूल**

---

* अर्जुनाचीं दहा नांवें प्रसिद्ध असून त्यांत कृष्ण हेंही एक नांव आहे. शिवाय अर्जुन हा श्रीकृष्णरूपीच होता, असें ठिकठिकाणीं म्हटलेलेंच आहे.

१ हे तमालपत्राप्रमाणें नीलवर्णा, हे कृष्णा. २ इंद्रियांना ब्रह्म प्राप्त करून देणाऱ्या. ३ संदेहयुक्त.

१ कोणच्या पक्षानें? २ गुरु. ३ सहाय. ४ स्वाधीन. ५ अनुकूळ. ६ पूर्वकर्म. ७ सहाय. ८ संपादन. ९ युक्ति. १० विचार, वादविवाद. ११ परलोकीं. १२ मार्ग. १३ अक्षरांना. १४ डोळस, काठीवाला. १५ अंधळा. १६ वांचे. १७ सांवलीनें. १८ अलौकिक. १९ शक्तीनें. २० असे.

असत नाहींत. ३७ पूर्वकर्म अनुकूल असत नाहीं; बुद्धीचें साह्य मिळत नाहीं. अशा प्रकारें शास्त्रसंपादनच ज्यांचें बंद पडतें. ३८ किंबहुना शास्त्राविषयीं त्यांना एकही युक्ति सांपडत नाहीं; ह्मणून त्याची वाटाघाट किंवा विचार ज्यांनीं सोडूनच दिलेला असतो; ३९ परंतु जे शास्त्राचा निर्धार करून पवित्र अर्थानुष्ठानें आचरून जे परलोकीं उत्तम आचारानें राहतात, ४० त्यांसारखें आपण व्हावें, अशी जिवामध्यें इच्छा धरून, आचरण्याला त्यांचे मार्ग घेतात; ४१ हे **दातारा!** धड्यांतील अक्षरें मूल जशीं खालीं लिहितें, किंवा वाटाड्या पुढें करून जसा आंधळा चालतो, ४२ त्याप्रमाणें सर्व शास्त्रांमध्यें ते निपुण असतात, त्यांचें जें आचरण, तेंच आपल्या श्रद्धेला प्रमाण करतात; ४३ आणि त्याच श्रद्धायुक्त बुद्धीनें शिवादिक पूजनें, भूमि आदिकरून महादानें, अग्निहोत्रादिक यज्ञ याग करतात. ४४ त्यांना हे **पुरुषोत्तमा!** सत्वरजतमांपैकीं कोणती गति मिळते? तेवढें प्रभो! आह्मांस सांगावें." ४५ तेव्हां वैकुंठपीठाचें दैवत; जो वेदकमलांतील मकरंद; ज्याच्या सावलीनेंच हें जग वांचतें; ४६ काल सहजच मोठा; अलौकिक; पुरातन; अद्वितीय; गूढ; आनंदघन; ४७ ज्याच्या शक्तीच्या योगानें ह्या सर्वांस मोठेपणा आला आहे. ती शक्ति आहे ज्याच्या आंगीं, तो **श्रीकृष्ण** आपल्या मुखानें सांगूं लागला. ४८

श्रीभगवानुवाच—

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।
सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥२॥

ह्मणे पार्था तुझा अंतिसो । घेई गा आह्मी जाणतसों । शास्त्राभ्यासाचा ओंडसो । मानितोसि की ॥ ४९ ॥ [श्रद्धा] नुसधियाचि श्रद्धा । पोंचों पाहसी परमपदा । तरि तैसें हें प्रबुद्धा । सोहोपें नोहे ॥ ५० ॥ श्रद्धा ह्मणीतलियासाठीं । पोतेजों नयें किरीटी । काय द्विज अंत्यजघृष्टीं । अंत्यज नोहे ॥ ५१ ॥ गंगोदक जरी जालें । तरि मद्यभांडा आलें । तें घेऊं नये कांहीं केलें । विचारीं पां ॥ ५२ ॥ चंदन होय शीतळु । परि अग्निसी पावे मेळु । तें हातीं धरितां जाळूं । न शके काई ॥ ५३ ॥ कां किडाचिये आटतिये पुटीं । पडिलें सोळें किरीटी । घेतलें चोखटासाठीं । नागवीना ॥ ५४ ॥ तैसें श्रद्धेचें दळवाडें । आंगें कीर चोखडें । [देहिनां सा स्वभावजा] परि प्राणियाच्या पडे । विभागीं जें ॥ ५५ ॥ तैं प्राणिये तंव स्वभावें । अनादिमाया प्रभावें । त्रिगुणाचेचि आघवे । वळिले आहाती ॥ ५६ ॥ तेथही दोन गुण खांचेंती । मग एक धरी उन्नती । तैं तैसियाचि होती वृत्ती । जीवांचिया ॥ ५७ वृत्ति ऐसें मन धरिती । मना ऐसी क्रिया करिती । केलिया ऐसीं वरिती । मरोनि देहें ॥ ५८ ॥ बीज मोडे झाड होये । झाड मोडे बीजीं सामाये । ऐसेनि कल्पकोडी जाये । परी जाति न नाशे ॥ ५९ ॥ तियापरि तियें अपारें । होत जात जन्मांतरें । त्रिगुणत्व न व्यभिचरे । प्राणियांचें ॥ ६० ॥ [त्रिविधा भवति] ह्मणुनि प्राणियांच्या पैकीं । पडिली श्रद्धा अवलोकीं । ते होय गुणांसारिखी । तिहीं ययां ॥ ६१ [सात्विकी] विपायें वाढे सत्व शुद्ध । तेव्हां ज्ञानासी करी साध्य । परि एका दोघे वोखंद । येर आहाती ॥ ६२ ॥ सत्वाचेनि आंगलगे । ते श्रद्धा मोक्षफळा रिगे । तंव रज तम उगे । कां पां राहाती ॥ ६३ ॥ [राजसी चैव] मोडोनि सत्वाची त्रांये । रजोगुण आकाशें जाये । तेव्हां तेचि श्रद्धा होये । कर्मकेरसुणी ॥ ६४ ॥ [तामसी चेति तां शृणु] मग तमाची उठी आगी । तेव्हां तेचि श्रद्धा भंगी । होंलागे भोगालागीं । भलतेया ॥ ६५ ॥

तो ह्मणाला "**पार्था!** तुझ्या मनाचा कल आह्मी जाणून आहों. शास्त्राभ्यासाला अडचण आहे असें मानतोस का? ४९ आणि नुसत्या श्रद्धेनेंच परमपदाला पोंचावयास पाहतोस. तर हे ज्ञात्या! तसें हें सोपें नव्हे. ५० हे **किरीटी!** श्रद्धा ह्मणूनच केवळ विश्वास ठेवून बसूं नये. ब्राह्मण, अंत्यजाच्या समागमानें अंत्यज होत नाहीं काय? ५१ मद्याच्या भांड्यांत गंगोदक जरी आलें तरी तें कांहीं झालें तरी सेवन करूं नये. ध्यानांत ठेव. ५२ चंदन शीतल आहे. पण त्याला अग्नीचा स्पर्श होईल तेव्हां,

१ कल, हट. २ प्रतिबंध. ३ विश्वासूं नये. ४ अंत्यजाच्या समागमें.

१ हिणकटाच्या. २ ह्मणून. ३ बुडविणार नाहीं काय. ४ समूह, स्वरूप. ५ दबती. ६ धारण करिती. ७ मध्यें. ८ प्राप्त झाली. ९ विरुद्ध. १० आश्रय, चौकी. ११ कर्म करणारी.

हातांत धरला तर जाळूं शकणार नाहीं काय? ५३ **किरीटी!** हिणकटाच्या आटलेल्या मुशींत सोळांच्या दराचें सोनें पडलें, आणि तें सर्व चांगलें ह्मणूनच घेतलें, तर बुडवणूक होणार नाहीं काय? ५४ त्याप्रमाणें श्रद्धेचें स्वरूप मूळचें खरोखर उत्तम आहे. परंतु ती प्राण्यांच्या ठिकाणीं विभागलेली असते. ५५ आणि, प्राणी तर स्वभावेंकरून अनादि मायेच्या प्रभावानें त्रिगुणांचेच सारे घडलेले आहेत. ५६ त्यांत देखील दोन गुण दबतात, आणि एक उन्नतीला पोंचतो. तेव्हां जिवाच्या वृत्तीही तशाच होतात. ५७ वृत्तीप्रमाणें मन ठेवतात; मनाप्रमाणें क्रिया करतात; आणि तशा क्रिया केल्या ह्मणजे अशा प्रकारें मरून पुन्हा देह धारण करितात. ५८ बीज नाहींसें होतें, झाड तयार होतें; झाड नाहींसें होतें, बीजांत राहतें; अशा रीतीनें कोट्यावधि कल्प जातात; पण जात मोडत नाहीं. ५९ त्याप्रमाणें हीं अपार जन्मांतरें होतात, आणि जातात; पण प्राण्याच्या त्रिगुणत्वांत कांहीं भेद होत नाहीं. ६० ह्मणून ह्या तिहींच्या योगानें प्राण्यामध्यें उत्पन्न झालेल्या श्रद्धा, त्यांच्या गुणानुरूप होतात, ध्यानांत ठेव. ६१ कदाचित् शुद्ध सत्व वाढलें, तर ज्ञानाची प्राप्ति करतें; पण एकाला दुसरे दोघे विरुद्ध असतात. ६२ सत्वाच्या संगतीनें ती श्रद्धा मोक्षफळामध्यें घुसते. मग रज, तम कां उगेच बसतील? ६३ सत्वाची बैठक मोडून रजोगुण आकाशामध्यें जातो—वाढतो—तेव्हां तीच श्रद्धा कर्म करणारी होते. ६४ मग तमाची आग उठते; तेव्हां तीच श्रद्धेची रीति भलत्याच भोगासाठीं होऊं लागते." ६५

सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥३॥

[सत्वानुरूपा सर्वस्य] एवं सत्वरजतमा- । वेगळी श्रद्धा सुवर्मा[१] । नाहीं गा जीवग्रामा-[२] । माजी यया ॥ ६६ ॥ [श्रद्धा भवति भारत] ह्मणोनि श्रद्धा स्वाभाविक । असे पैं त्रिगुणात्मक । रजतमसात्विक । भेदीं इहीं ॥ ६७ ॥ [श्रद्धामयोऽयं पुरुषः] जैसें जीवनचि उदक । परि विषीं होय मारक । कां मिरयामाजि तीख । उंसीं गोड ॥ ६८ ॥ [यो यच्छ्रद्धः स एव सः] तैसा बहुवसें तमें । जो सदाचि होय निमे[१] । तेथ श्रद्धा परिणमे । तेंचि होउनी ॥ ६९ ॥ मग काजळा आणि मसी । न दिसे विवंचना जैसी । तेवीं श्रद्धा तामसी । भिन्नी[२] नाहीं ॥ ७० ॥ तैसीच राजसी जीवीं । रजोमय जाणावी । सात्विकीं आघवी । सत्वाचीच ॥ ७१ ॥ ऐसेनि हा सकळ । जगडंबर[३] निखिळ । श्रद्धेचाचि केवळ । वोतला असे ॥ ७२ ॥ ['तां शृणु' इति पूर्वश्लोकस्थं पदं] परि गुणत्रयवशें । त्रिविधपणाचें लासें[४] । श्रद्धे जें उठिलें असे । तें वोळख तूं ॥ ७३ ॥ तरि जाणिजे झाड फुलें । कां मानस जाणिजे बोलें । भोगें जाणिजे केलें । पूर्वजन्मींचें ॥ ७४ ॥ तैसीं जिहीं जिहीं चिन्हीं । श्रद्धेचीं रूपें तिन्हीं । देखीजती ते वानी[५] । अवधारीं पां ॥ ७५ ॥

"अशा प्रकारें हे **सुज्ञा!** ह्या जीवग्रामामध्यें सत्व, रज, तम ह्यांहून निराळी श्रद्धा नाहीं. ६६ ह्मणून श्रद्धा ही रज, तम, सत्व ह्या तीन भेदांनीं स्वभावतःच त्रिगुणात्मक आहे. ६७ जसें उदक हें जीवनच आहे, पण तेंच विषांत घातलें कीं, मारक होतें. किंवा मिऱ्यामध्यें तिखट, आणि उसामध्यें गोड होतें. ६८ तसें तम फार वाढलें असतां जो निरंतर जन्मतो व मरतो, त्याची श्रद्धाही तशीच होऊन राहते. ६९ मग काजळामध्यें आणि मशीमध्यें जसा कांहीं भेद दिसत नाहीं, त्याप्रमाणें तामसी श्रद्धा कांहीं वेगळी नाहीं. ७० त्याचप्रमाणें जिवामध्यें राजसी श्रद्धा रजोमय आहे ह्मणून समजावें—सात्विक सत्ता सारी सत्वाचीच असते. ७१ अशा प्रकारें सर्व ब्रह्मांड साऱ्या श्रद्धेनेंच ओतलेलें आहे. ७२ परंतु गुणत्रयांच्या योगेंकरून श्रद्धेला जें त्रिविधपणाचें लक्षण प्राप्त होतें तें तूं ओळख. ७३ तर फुलावरून झाड ओळखतें; किंवा शब्दावरून मन समजतें; भोगावरून पूर्वजन्मीं काय केलें तें कळतें; ७४ त्याप्रमाणें ज्या ज्या चिन्हांनीं

१ सुज्ञा. २ जीवसमूहांत.

१ जन्मतो व मरतो. २ वेगळी. ३ सर्व जग. ४ चिन्ह, डाग. ५ मासल्यावरून, प्रकारावरून.

श्रद्धेचीं तिन्हीं रूपें दृष्टीस पडतात, तो मासला ऐक." ७५

यजंते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः ॥४॥

[यजंते सात्विका देवान्]तरि सात्विक श्रद्धा । जयांचा होय बांधा । तयां बहुत करूनि मेधा । स्वर्गी आथी ॥ ७६ ॥ ते विद्याजात पढती । यज्ञक्रिये निवडती । किंबहुना पडती । देवलोकीं ॥ ७७ ॥ [यक्षरक्षांसि राजसाः] आणि श्रद्धा राजसा । घडले जे वीरेशा । ते भजती राक्षसां । खेचरां हन ॥ ७८ ॥श्रद्धा जे कां तामसी । ते मी सांगेन तुजपाशीं । जे केवळ पापराशी । अतिकर्कशी निर्दयत्वें ॥ ७९ ॥ जीववधें साधूनि बळी । भूतप्रेतकुळें मैळीं ।स्मशानीं संध्याकाळीं । पूजिती जे ॥ ८० ॥ [यजंते तामसा जनाः]ते तमोगुणाचें सार । काढूनि निर्मिले नर । जाण तामसियेचें घर । श्रद्धेचें तें ॥ ८१ ॥ [श्लोकत्रयाभिप्रायः] ऐसी इहीं तिहीं लिंगीं । त्रिविध श्रद्धा जगीं । पैं हें ययालागीं । सांगत असें ॥ ८२ ॥ जे हे सात्विक श्रद्धा । जतन धरावी प्रबुद्धा । येरी दोनी विरुद्धा । सांडाविया ॥ ८३ ॥ हे सात्विकमति जया । निर्वाहति होय धनंजया । बागूल नोहे तया । कैवल्य तें ॥ ८४ ॥ तो न पढो कां ब्रह्मसूत्र । न लोढो सर्व शास्त्र । सिद्धांत न होत स्वतंत्र । तयाच्या हातीं ॥ ८५ ॥ परी श्रुतिस्मृतींचे अर्थ । जे आपण होऊन मूर्त । अनुष्ठानें गाजत । वडील जे हे ॥ ८६ ॥ तयांचीं आचार तीं पाउलें । पाऊनि सात्विकी श्रद्धा चाले । तो तेंचि फळ ठेविलें । ऐसें लाहे ॥ ८७ ॥ पैं एक दीप लावी सायासें । आणिक तेथें लाऊं बैसे । तरि तो काय प्रकाशें । वंचिजे गा ॥ ८८ ॥ कां येकें मोल अपार । वेंचोनि केलें धवळार । तो सुरेवाड वस्तीकर । न भोगी काई ॥ ८९ ॥ हें असो जो तळें करी । तें तयाचीच तृषा हरी । कीं सुंआरासीचि अन्न घरीं । येरां नोहे ॥ ९० ॥ बहुत काय बोलों पैं गा । येका गौतमासीच गंगा । येरां समस्तां काय जगा । वोहाळ जाली ॥ ९१ ॥ म्हणौनि आपलीया परी । शास्त्र अनुष्ठिती कुसरी । जाणे तयांतें श्रद्धाळु जो वरी । तो मूर्खही तरे ॥ ९२ ॥

"तर ज्यांची प्रकृति सात्विक श्रद्धेनें घडलेली असते, त्यांची बुद्धि बहुतकरून स्वर्गांत असते. ७६ ते सर्व विद्या पढतात; यज्ञक्रिया पसंत करितात; किंबहुना देवलोकांत असतात. ७७ आणखी हे **वीरश्रेष्ठा!** राजसश्रद्धेनें जे घडले जातात, ते राक्षसांना आणि पिशाचांना भजतात. ७८ आतां जी केवळ पापाची रास; निर्दयत्वाच्या योगानें जी केवळ कर्कश; अशी जी तामस श्रद्धा ती ही मी तुझ्यापाशीं सांगेन. ७९ जिवाचा घात करून जे बळी देतात, आणि भूतप्रेत इत्यादिकांचीं अमंगळ कुळें जे संध्याकाळीं स्मशानामध्यें पूजतात, ८० ते पुरुष तमोगुणाचा अर्क काढूनच निर्माण केलेले होत. ते, तामस श्रद्धेचें घर हें ध्यानांत ठेव. ८१ अशा ह्या त्रिविधस्वरूपानें त्रिविधश्रद्धा जगामध्यें आहेत. त्या अशाकरितां सांगतों ८२ कीं, हे **सुज्ञा!** सात्विकश्रद्धा आहे ती जतन करावी. आणि बाकीच्या दोन विरुद्ध आहेत त्या सोडून द्याव्यात. ८३ हे **धनंजया!** ही सात्विकबुद्धि ज्याला संरक्षण करते, त्याला कैवल्य ( मोक्ष ) हा कांहीं बागुल वाटत नाहीं. ८४ त्यानें ब्रह्मसूत्रें म्हणावयाला नकोत; सारीं शास्त्रें पढावयाला नकोत; त्याच्या हातीं स्वतंत्र सिद्धांत नसोत; ८५ परंतु श्रुतिस्मृतीचे अर्थ जे आपणच मूर्तिमंत होऊन त्यांच्या अनुष्ठानानें गाजतात, असे जे वडील, ८६ त्यांचे जे आचार असतात, त्याच्या पावलानें सात्विकी श्रद्धा चालत असते. तेव्हां तेंच फळ त्यास ठेवल्यासारखें प्राप्त होतें. ८७ एक दिवा मोठ्या प्रयत्नानें लावला, आणि तेथें दुसरा लावावयास बसलें, तर तो प्रकाश देण्याविषयीं प्रतारणा करील काय? ८८ किंवा एकाद्यानें अपार द्रव्य खर्च करून चुनेगची वाडा बांधला, तर वस्तीस राहिलेला मनुष्य त्याचें सुख भोगित नाहीं काय? ८९ हें राहूं दे. जो तळें तयार करतो, तें त्याचीच का तृषा भागवितें? किंवा घरामध्यें स्वयंपाक करणारासच का अन्न मिळतें? इतरांना खातां येत नाहीं काय? ९० फार काय सांगावें? गंगा ही एका **गौतमा**करितां, आणि इतर साऱ्या जगाला ती ओहोळ झाली काय? ९१ म्हणून आपल्यापेक्षां दक्षतेनें जे शास्त्रें अनु-

१ देहाकृति. २ बुद्धि. ३ सकळ विद्या. ४ पिशाचांला. ५ संरक्षक. ६ चाखो, पढो. ७ प्रकट. ८ प्राप्त होई, लाभे. ९ फसवील काय? १० घर. ११ सुखकर. १२ स्वयंपाक्यास. १३ ओढा. १४ आपल्यापेक्षां. १५ दक्षतेनें. १६ आचरी.

ष्ठान करतात, त्यांच्याच आचरणानें जो श्रद्धाळू चालतो, तो मूर्ख असला तरी तरतो. " ९२

अशास्त्रविहितं घोरं तप्यंते ये तपो जनाः।
दंभाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥

[अशास्त्रविहितं] ना शास्त्राचेनि कीर नांवें । स्वीकरोंही नेणती जीवें । परि शास्त्रज्ञांही शिवें । टेंको नेदिती ॥ ९३ ॥ वडिलांचिया क्रिया । देखोनि वांती वांकुलिया । पंडिता डांकुलिया । वाजविती ॥ ९४ ॥ [दंभाहंकारसंयुक्ताः] आपलेनीचि आटोपें । धनित्वाचेनि दर्पें । [तप्यंते ये तपो जनाः] साचचि पाखंडाचीं तपें । आदरिती ॥ ९५ ॥ [घोरं] आपुलिया पुढिलांचिया । आंगीं घालूनि कातिया । रक्तमांसाप्रेंणीतया । भरभरों ॥ ९६ ॥ रिचविती जळतकुंडीं । लाविती चेडेंयाच्या तोंडीं । नवसियां देती उंडी । बाळकाची ॥ ९७ ॥ अग्रहाचिया उंजरियां । क्षुद्रदेवतां वरीयीं । अन्नत्यागें सांतरिया । ठाकती येक ॥ ९८ ॥ [कामरागबलान्विताः] अगा आत्मपरपीडा । बीज तमक्षेत्रीं सुहाडा । पेरिती मग पुढां । तेंचि पिके ॥ ९९ ॥ बाहू नाहीं आपलिया । आणि नावेतेंही धनंजया । न धरी होय तया । समुद्रीं जैसें ॥ १०० ॥ कां वैद्यातें करी सळा । रसें सांडी पायखोळा । तो रोगिया जेंवि विव्हळा । सैंवता होय ॥ १ ॥ ना ना पडिकोराचेनि सळें । काढी आपलेचि डोळे । तें वानेंवसां आंधळें । जैसें ठाके ॥ २ ॥ तैसें तया असुरां होये । जे निंदूनि शास्त्रांची सोये । सैंघ धांवताती मोहें । आडवी जे कां ॥ ३ ॥ काम करवी ते करिती । क्रोध मारवी तें मारिती । किंबहुना मातें पुरिती । दुःखाचा गुंडां ॥ ४ ॥

" किंवा शास्त्रांनाही खरोखर जीवाभावानें स्वीकार करण्याचें माहित नसतें. आणखी शास्त्रज्ञ कोणी असतील तर, त्यांना सीमेवर सुद्धां येऊं देत नाहींत; ९३ वडिलांच्या क्रिया पाहून त्यांना वेडावतात; पंडितांना पाहून चुटक्या वाजवितात; ९४ आपल्याच व्यापानें धनित्वाच्या गर्वानें खरोखर पाखंडाचींच तपें आचरण करतात. ९५ आपल्या पुढें आलेल्यांच्या आंगांत कोयते खुपसून, रक्तमांसानें यज्ञपात्रें भरभरून, ९६ जळत्या कुंडांत घालतात; चेटकाच्या तोंडाला लावतात; नवस करून बाळकाचा बळि देतात; ९७ कोणी आढ्यतेच्या आग्रहानें क्षुद्रदेवतांपासून वरप्रदान घेण्याकरितां अन्नत्याग करून रात्रींचीं सप्तकेंच्या सप्तकें घालवितात. ९८ हे सुज्ञा! ह्या तमोरूपक्षेत्रामध्यें आपल्याला आणि दुसऱ्याला पीडा हेंच बीज पेरतात; ह्मणून तेंच पुढें पिकतें. ९९ हे धनंजया! आपल्याला हात नाहींत, आणि नावेलाही धरित नाहीं. त्याची जशी समुद्रांत अवस्था होते, १०० किंवा वैद्याचा द्वेष करतो, काढा पायानें लाथळून देतो, त्याला जसा कधीं रोग सोडीत नाहीं, १०१ किंवा डोळसाच्या स्पर्धेनें आपले डोळे काढून तें आंधळें जसें माजघरांत उभें राहतें, १०२ त्याप्रमाणें त्या असुरांना होतें. कारण, ते शास्त्रमार्गाची निंदा करून मोहानें अरण्यांत मारे धावत असतात. १०३ काम जें करवील तें करतात; क्रोध मारवील त्याला मारतात; किंबहुना मला ते दुःखरूप दगडामध्यें पुरतात ह्मटलें तरी चालेल. " १०४

कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः।
मां चैवांतःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥

[कर्षयंत इति पादत्रयं] आपलां परावां देहीं । दुःख देती जें जें कांहीं । मज आत्मया तेतुलाहीं । होय सीण ॥ ५ ॥ [तान्विद्ध्यासुरनिश्चयान्] पैं वाचेनिही पालवें । पापियां तया नातळावें । परि पडिलें सांगावें । त्यजावया ॥ ६ ॥ प्रेत बाहिर घालिजे । कां अंत्यज संभाषणीं त्यजिजे । हें असो हातें क्षाळिजे । कंश्मळातें ॥ ७ ॥ येय शुद्धीचिया आशा । तो लेपु न मनवे जैसा । तयांतें सांडावया तैसा । अनुवाद हा ॥ ८ ॥ तरि अर्जुना तूं तयांतें । देखसी तैं स्मर हो मातें । जें आन प्रायश्चित येथें । मानेल ना ॥ ९ ॥ ह्मणौनि श्रद्धा जे सात्विकी । पुढती तेचि पैं येकी । जतन करावी निकी । सर्वोपरी ॥ ११० ॥ तरि धरावा तैसा संग । जेणें पोखे सात्विक लाग । सत्ववृद्धीचा भाग । आहार घेपे ॥ ११ ॥ येऱ्हवीं तरी पाहीं । स्वभाववृद्धीच्या

---

१ आरंभ करूं. २ हद्दीवर. ३ वेडावून दाखवितात. ४ चुटक्या. ५ व्यापानें. ६ कोयता. ७ यज्ञपात्रें. ८ ओततात. घालितात. ९ चेडुकाच्या. १० आढ्यतेनें, उत्कर्षानें. ११ इतर लहान देवतांपासून (अलौकिक सामर्थ्य) प्राप्तीकरितां. १२ सात दिवसपर्यंत, एकवीस दिवसपर्यंत. १३ सुज्ञा. १४ द्वेष. १५ काढा, औषध. १६ लाथेनें. १७ व्याकुळ. १८ स्वतः. १९ डोळसाच्या. २० स्पर्धेनें. २१ माजघरीं. २२ मार्ग. २३ अनिवार. २४ दगडांत.

१ न स्पर्शावें. २ पातकातें. ३ मानवे. ४ योग्य नाहीं.

ठाईं। आहारावांचूनि नाहीं। बळी हेतु ॥ १२ ॥ प्रत्यक्ष पाहें पां वीरा । जो सावध घे मदिरा । तो होऊनि ठाके माजिरा। तियेचि क्षणीं ॥ १३ ॥ कां जो साविया अन्नरस सेवी। तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं। काय ज्वर जालिया निववी। पैयादिक ॥ १४ ॥ ना तरि अमृत जयापरी। घेतलिया मरण वारी। कां आपुलिया ऐसें करी। जैसें विष ॥ १५ ॥ तेविं जैसा घेपे आहार । धातु तैसाचि होय अकार। आणि धातुऐसा अंतर। भाव पोखे ॥ १६ ॥ जैसें भांडियांचेनि तापें। आंतुलें उदकही तापे। तैसी धातुवशें आटोपे। चित्तवृत्ती ॥ १७ ॥ ह्मणोनि सात्विक रस सेविजे। तें सत्वाची वाढि पाविजे। राजसा तामसा होइजे । येरीं रसीं ॥ १८ ॥ तरी सात्विक कोण आहार । राजसतामसा कायि आकार। हें सांगों करीं आदर। आकर्णनीं ॥ १९ ॥

"आपल्या किंवा परक्याच्या देहाला जें जें ह्मणून कांहीं दुःख देतात, तितका तितका मला आत्म्याला शीण होतो. १०५ त्या पाप्याला वाचेच्या पदरानें सुद्धां पुसूं नये. परंतु तें वर्ज्य करण्याकरितां सांगणें भाग पडलें. १०६ प्रेत असेल तर बाहेर घालावें; किंवा अंत्यज असेल तर त्याशीं भाषण करूं नये. हें असो. मळ असेल तो हातानें धुऊन टाकावा. १०७ निर्मलता पाहिजे असेल, तर घाणीचा तिटकारा करून उपयोग नाहीं. तसें त्यानें सोडावें ह्मणून हा उपदेश आहे. १०८ तर अर्जुना! त्याला तूं पाहिलेंस कीं मला स्मर हो! अशा ठिकाणीं दुसरें कोणतेंही प्रायश्चित्त उपयोगीं पडावयाचें नाहीं. १०९ ह्मणून सात्विक ह्मणून जी श्रद्धा आहे, तीच एक सर्वोपरीनें उत्तरोत्तर निश्चयेंकरून जतन करावी. ११० तर सात्विकाचाच अंश वाढेल असाच संग धरावा. आहार सेवन करणें तो सुद्धां सत्ववृद्धीच्या अंशाचाच करावा. १११ एरवीं तरी असें पहा कीं, स्वभाववृद्धीमध्यें सुद्धां आहाराशिवाय दुसरा प्रधान हेतु नसतो. ११२ हे शूरा! ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण हेंच पहा कीं, जो सावध असतांना मद्य सेवन करतो, तो तत्काल उन्मत्त होतो. ११३ किंवा जो नेहमींचा अन्नरस सेवन करतो, तो त्याच्या स्वभावाप्रमाणेंच वातकफानें व्याप्त होतो. ज्वर आला असतां, दुधादि पदार्थ तो शमन करतील काय? ११४ किंवा अमृत घेतलें असतां ज्याप्रमाणें मरण चुकवितें, किंवा विष जसें आपल्याप्रमाणें करतें, ११५ त्याप्रमाणें आहार जसा सेवन करावा, तशीच धातु उत्पन्न होते. आणि आकारही तसाच उत्पन्न होतो. आणि धातुप्रमाणेंच आंतील वृत्ति वाढते. ११६ ज्याप्रमाणें भांड्यांच्या तापण्यानें आंतील उदकही तापतें, त्याप्रमाणें धातुसारखी चित्तवृत्ति बनते. ११७ ह्मणून सात्विकरस सेवन करावेत, तेव्हां सत्वाची वाढ होते. आणि इतर रसांनीं राजसाची व तामसाची वृद्धि होते. ११८ तर सात्विक आहार कोणता? राजस तामसाचें स्वरूप कसें? हें सांगूं. तर लक्ष्य देऊन श्रवण कर." ११९

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।
यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ ७ ॥

[आहार इति] आणि ऐकसरें आहारा । कैसेनि तिनी मोहरा। जालिया तेंही वीरा । रोकडें दाऊं ॥ १२० ॥ तरि जेवणाराचिया रुची। निष्पत्ति कीं बोनियेचीं। आणि जेविता तंव गुणाची। दासी येथ ॥ २१ ॥ जो जीव कर्ता भोक्ता। तो गुणास्तव स्वभावता। पावोनियां त्रिविधता। चेष्टे त्रिधा ॥ २२ ॥ ह्मणोनि त्रिविध आहार। [यज्ञ इति] यज्ञही त्रिप्रकार। तप दान हन व्यापार । त्रिविधचि ते ॥ २३ ॥ पैं आहारलक्षण पहिलें। सांगों जें ह्मणीतलें। तें आईक गा भलें। रूप करूं ॥ २४ ॥

"हे वीरा! आहाराचे तीन प्रकार एकदम कसे झाले आहेत तेही तुला स्पष्ट दाखवून देऊं. १२० तर जेवणाराच्या रुचीप्रमाणें अन्नाची निष्पत्ति असते, आणि जेवणारा तर तीन गुणांचा दास असतो. १२१ कर्ता भोक्ता जो जीव आहे, तो स्वभावतः गुणामुळें तीन भेद पावून तीन प्रकारानें वावरतो. १२२ ह्मणून आहार तीन प्रकारचे; यज्ञही तीन प्रकारचे; तप, दान, व व्यापार

१ उन्मत्त. २ नेहमींचा. ३ दूध आदि. ४ घ्यावा. ५ अंतर्गत. ६ पोसे. ७ श्रवणीं.

१ एकदम. २ तीन प्रकार झाले. ३ अन्नाची. ४ वागे

देही तीन प्रकारचेच होतात. १२३ त्यांत आहाराचें लक्षण प्रथम सांगूं ह्मटलें, त्याचें चांगलें विवेचन करूं. ऐक." १२४

आयु:सत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥ ८ ॥

[सात्विकप्रियाः] तरी सत्वगुणाकडे । जैं दैवें भोक्ता पडे । तैं मधुरीं रसीं वाढे । मेचु[1] तया ॥ २५ ॥ आंगेंचि द्रव्यें सुरसें । जे आंगेंचि पदार्थ गोडसे । आंगेंचि स्नेहें[2] बहुवसें । सुपक्कें जियें ॥ २६ ॥ [स्निग्धाः] आकारें नव्हती ढेंगळें[3] । स्पर्शें अति निबळें[4] । जिभेलागीं स्नेहाळें । स्वादे जियें ॥ २७ ॥ रसें गाढीं वरी ढिलीं[5] । द्रवभावीं आथिलीं । ठायें ठाव[6] सांडिलीं । अग्नितापें ॥ २८ ॥ [स्थिराः] आंगें सानें परिणामें थोर । जैसें गुरुमुखींचें अक्षर । तैसा अल्पीं जिहीं अपार । तृप्ति राहे ॥ २९ ॥ [हृद्याः] आणि मुखीं जैसीं गोडें । तैसीचिहि ते आंतुलेकडे । तिये अन्नीं प्रीति वाढे । सात्विकांसी ॥ १३० ॥ [आहाराः] एवं गुणलक्षण । सात्विक भोज्य जाण । [आयुः] आयुष्याचें त्राण । नीच नवें हें ॥ ३१ ॥ येणें सात्विकरसें । जंव देही मेहो[7] वरिसे[8] । तंव आयुष्यनदी उससे । देहींचि देहा ॥ ३२ ॥ [सत्वं] सत्वाचिये कीर पांळती[9] । कारण हांचि[10] सुमती । दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ॥ ३३ ॥ [बलं–] आणि शरीरा हन मानसा । बळाचा पैं कुंवासा[11] । हा आहार तरी दशा । कैंची रोगां ॥ ३४ ॥ हा सात्विक होय भोग्य । तैंचि भोगावया आरोग्य । शरीरासी भाग्य । उदयलें जाणों ॥ ३५ ॥ [सुख–] आणि सुखाचें घेणें देणें । निकें उंवाया[12] ये येणें । [प्रीति–] हें असो वाढे सौजणें[13] । आनंदेंसी ॥३६॥ ['विवर्धनाः' इति पदं प्रत्येकं संबध्यते] ऐसा सात्विक आहार । परिणमला[14] थोर । करी हा उपकार । सबाह्यासी ॥ ३७ ॥ आतां राजसासि प्रीती । जिहीं रसीं आथी । करूं तयाही व्यक्ती[15] । प्रसंगें गा ॥ ३८ ॥

"तर दैवयोगानें सत्वगुणाकडे जेव्हां भोक्ता वळतो, तेव्हां त्याची मधुररसाविषयींची आवड वाढत जाते. १२५ मूळचेच सुरस पदार्थ, मूळचेच जे पदार्थ गोड, मूळचींच रसभरित, जीं उत्तम परिपक्क झालेलीं, १२६ आकारानें मोठीं नव्हेत; स्पर्श केला असतां अतिशय मृदु; जिभेला जीं अतिशय आर्द्र व मधुर, १२७ रसानें ओथंबलेलीं आणि वर मृदु; आर्द्रपणानें टवटवीत, बरोबर हवी तशीं शिजलेलीं; १२८ आकारानें लहान; पण गुणानें मोठीं; गुरुमुखांतील जशीं अक्षरें असावीत, त्याप्रमाणें थोडीं असलीं तरी ज्यांपासून अपार समाधान वाटतें, १२९ आणि तोंडाला जशीं गोड तशींच आंतही हितकर–अशीं जीं अन्नें असतात, त्यांजवर सात्विकाची प्रीति वाढते. १३० सात्विक अन्नाचे गुण व लक्षणें अशा प्रकारचीं आहेत ध्यानांत ठेव. हें आयुष्याचें नित्य नवें त्राण आहे. १३१ ह्या सात्विकरसानें जेव्हां देही मेघांचा वर्षाव करतो, तेव्हां दिवसेंदिवस आयुष्याच्या नदीला पूर भरतो. १३२ हे **बुद्धिमंता**! दिवसाच्या उन्नतीला जसा सूर्य, त्याप्रमाणें सत्वाच्या संरक्षणाला निश्चयेंकरून हा आहारच कारण आहे. १३३ आणखी शरीराच्या तसेंच मनाच्या बळालाही हा आहारच आश्रयभूत आहे. तर मग तेथें रोगाची दशा कोठची? १३४ ह्या सात्विक अन्नाचा उपभोग घेऊं लागलें कीं तत्काल, आरोग्य भोगावयाला मिळतें. जणों काय शरीराचें भाग्यच उदयास आलें! १३५ आणखी सुखाचें देणें घेणें जें उत्पन्न होतें, तें ह्या आहाराच्या योगानेंच उत्पन्न होतें. हें असो. ह्याच्या योगानें आनंदाशीं मैत्री वाढत जाते. १३६ ह्याप्रमाणें ह्या सात्विक आहाराचा परिणाम मोठा गुणकारी असून अंतर्बाह्य उपकार करणारा आहे. १३७ आतां प्रसंगानुसार ज्या रसावर राजसांची प्रीति असते, त्याचेंही स्पष्टीकरण करूं." १३८

१ आवड, इच्छा. २ स्वतः. ३ मोठे. ४ मऊ. ५ सघन. ६ वास्तविक. ७ मेघ वर्षे. ८ दिवसानुदिवस. ९ रक्षणार्थ. १० आहार. ११ आश्रय. १२ आकारास. १३ मैत्री. १४ परिणाम पावला. १५ उघड.

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

[कटु–]तरी मारें[1] उणें काळकूट । तेणें मानें जें कडुवट । [अम्ल–] का चुनियाहूनि[2] दाट । आम्ल हन ॥ ३९ ॥

१ मारकपणानें मात्र कमी. २ दाहक, बळकट.

[लवण–] कणिकीतें जैसें पाणी । तैसें मीठ बांधया[1] आणी । तेतुलीच मेळवणी । रसांतरांची ॥ १४० ॥ ऐसें खारट अपाडें[2] । राजसा तया आवडे । [अत्युष्ण–] उन्हाचेनि मिषें तोंडें । आगीचि गिळी ॥ ४१ ॥ वाफेचिया सिगे[3] । वातीही लाविल्या लागे । तैसें उन्ह मागे । राजस तो ॥ ४२ ॥ [तीक्ष्ण–] वांवदळ[4] पाहूनि ठाये । सावळ[5] डाहारला[6] आहे । तैसें तीखं[7] तो खाये । जें घायेविण रुपे ॥ ४३ ॥ [रूक्ष–] आणि राखेहूनि कोरडें । आंत बाहेरी येके पाडें । तो जिव्हादंश[8] आवडे । बहु तया ॥ ४४ ॥ परस्परें दांतां । आदळ होय खातां । तो गा मुखीं घेतां । तोषों लागे ॥४५॥ [विदाहिनः] आधींच द्रव्यें चुरमुरीं[9] । वरी पैंरवढिजती[10] मोहरी । जियें घेतां होती धुंवारी[11] । नाक तोंडा ॥ ४६ ॥ हें असो उगें आगीतें । म्हणें तैसें राइतें । [आहारा राजसस्येष्टाः] पढियें[12] प्राणापरतें । राजसासि गा ॥ ४७ ॥ ऐसा न पुरोनि तोंडा । जिभा केला वेडा । अन्नमिषें अग्नि भडभडां । पोटीं भरी ॥४८॥ [दुःखशोकामयप्रदाः] तैसाचि लवंघा[13] सुटे । मग भुई ना सेजे सांटे[14] । पाणियाचें न सुटे । तोंडोनि पात्र ॥४९॥ ते आहार नव्हती घेतले । व्याधिव्याळ[15] जे सुतले[16] । ते चेववाया[17] घातलें । मांजवण[18] पोटीं ॥ १५० ॥ तैसें एकमेकां सेळें[19] । रोग उठती एके वेळे । ऐसा राजस आहार फळे । केवळ दुःखें ॥ ५१ ॥ एवं राजसा आहारा । रूप केलें धनुर्धरा । परिणामाचाही विसुरा[20] । सांगीतला ॥ ५२ ॥ आतां तया तामसा । आवडे आहार जैसा । तेंही सांगों चिळसा[21] । झणें तुह्मी ॥ ५३ ॥ तरि कुहिलें[22] उष्टें खातां । न मनिजे तेणें अनहिता । जैसें कां उपहिता[23] । हैसी खाय ॥५४॥

**"तर मारकपणानें मात्र उणें, बाकी काळकूटासारखें जें कडू; किंवा चुन्याहून जळजळणारें, तसेंच आंबट, १३९ कणकीला जसें पाणी, तसें ज्यामध्यें मीठ; आणखी त्याचप्रमाणें इतर रसांची भेसळ; १४० अशा प्रकारें राजस असतो त्याला खारट घोट आवडतें; ऊन्ह ऊन्ह पाहिजे ह्या निमित्तानें तोंडानें आगच गिळतो. १४१ राजस असतो तो, वाफेवर वात धरली तर सुद्धां पेटेल, इतकें ऊन्ह ऊन्ह मागत असतो. १४२ दगड कोसळून जिकडे तिकडे कपऱ्या उसळाव्यात, त्याप्रमाणें जखमेवांचूनच आंगांत झणझण्या उठतील असें तो तिखट खातो. १४३ आणखी राखेहूनही कोरडें, आंतबाहेर एकसारखें असें तोंडीं लावणें त्याला फार आवडतें. १४४ खातांना एकमेकांवर दांत आपटावेत, असा पदार्थ तोंडांत घातला कीं आनंद मानूं लागतो. १४५ आधीं मूळचे पदार्थ झणझणीत, त्यावर आणखी मोहरी पसरलेली; जी खातांना नाकांतोंडांतून वेदना निघतात. १४६ हेंही असो. आगीलाही 'गप्प बस' ह्मणेल असें रायतें असेल तें राजसांना प्राणाहूनही प्रिय. १४७ अशा प्रकारें तोंडाला पुरें ह्मणून नाहींच; अशा जिभेनें वेडावलेला. अन्नाच्या निमित्तानें पोटामध्यें भडाभडा अग्नीच भरावयाचा. १४८ तसाच मग दाह होतो तेव्हां भुईवर किंवा हांथरुणावर लोळत पडतो. तोंडाजवळून पाण्याचें भांडें कांहीं निघत नाहीं. १४९ तें जेवलेलें जेवण नव्हे. तर व्याधिरूप सर्प निजलेले असतात, ते जागृत करण्याकरितां पोटामध्यें कैफ द्यावा, १५० त्याप्रमाणें एकमेकांच्या स्पर्धेनें सारे रोग एकदम उठतात. अशा प्रकारें राजस आहार आहे तो, केवळ दुःखरूपानेंच फळतो. १५१ हे धनुर्धरा! ह्याप्रमाणें राजस आहाराचें स्वरूप व्यक्त केलें. आणि त्याच्या परिणामांचा सारांशही सांगितला." १५२ आतां त्या तामसांना जो आहार आवडतो तो सांगूं. पण त्यानें तुह्मांस कदाचित् किळसही येईल. १५३ "तर हैस जशी गपागप आंबोण खाते, त्याप्रमाणें कुजलेलें, उष्टें, खातांना ज्याला अनहित ह्मणून वाटतच नाहीं." १५४**

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥१०॥

[यातयामं] निपजलें अन्न तैसें । दुपाहरीं[1] कां येरें[2] दिवसें ।

१ वांधावयास. २ अतिशय. ३ अग्रावर. ४ दगड. वाऱ्याची वाहाटूळ, विजेचा आघात. ५ पाहार शस्त्र. ६ प्रसिद्ध झाला. ७ तिखट. ८ तोंडीं लावणें. ९ झणझणीत. १० मोहरी पसरतात, अनेक प्रकार करतात. ११ वेदना. १२ प्रिय वाटे. १३ दाह. १४ लोळे. १५ सर्प. १६ निजले. १७ जागृत करण्याकरितां. १८ कैफ. १९ स्पर्धेनें. २० तात्पर्य, अभिप्राय. २१ किळस. २२ कुजलेलें. २३ आंबोण.

१ दोन प्रहरीं. २ दुसऱ्या दिवशीं.

[गतरसं] अतिकरे तैं तामसें। घेइजेतें ॥५५॥ ना तरि अर्ध उकडिलें। कां निपट करपोनि गेलें। तैसेंही खाय चुकलें। रसा जें येवों ॥ ५६ ॥ [पूति] जया कां आथि पूर्ण निष्पत्ती। जेथ रस धरी व्यक्ती। तें अन्न ऐसी प्रतीती। तामसा नाहीं ॥ ५७ ॥ ऐसेनि कहीं विपायें। सदन्न वरपडा होये। तरी घाणी सुटे तंव राहे। व्याघ्र जैसा ॥ ५८ ॥ [पर्युषितं च यत्] कां बहुवे दिवसीं बोलांडिलें। स्वादपणें सांडिलें। शुष्क अथवा सडलें। गाभिणेंही हो ॥ ५९ ॥ [उच्छिष्टं] तेंही बाळाचे हातवरी। चिवडिलें जैसी रोडी करी। कां सर्वे बैसोनि नारी। गोतांबीळ करी ॥ १६० ॥ ऐसेनि कैंसमळें जैं खाय। तैं तया सुखभोजन ऐसें होय। [अपि च] परि येणेंही न धाम। पापिया तो ॥ ६१ ॥ [अमेध्यं] मग चमत्कार देखा। निषेधाचा आंबुखा। जया कां सदोषा। कुद्र-व्यासी ॥६२॥ तया अपेयांच्या पानीं। अखाद्यांच्या भोजनीं। वाढविजे उतान्ही। तामसें तेणें ॥ ६३ ॥ [भोजनं तामस-प्रियं] एवं तामस जेवणारा। ऐसैसी मेचु हे वीरा। तयाचें फळ दुसरा। क्षणीं नाहीं ॥ ६४ ॥ जे जेव्हांचि हें अपवित्र। शिवे तयाचें वक्त्र। तेव्हांचि पापा पात्र। जाला तो कीं ॥ ६५ ॥ यावरतें जें जेवी। ते जेविती वोजे न ह्मणावी। पोटभरती जाणावी। यातना ते ॥ ६६ ॥ शिरच्छेदें काय होये। कां आगी रिघतां कैसें आहे। हें जाणावें काई पाहें। परि साहातचि असे ॥ ६७ ॥ ह्मणौनि तामसा अन्ना। परिणाम गा सिनाना। न सांगोंचि अर्जुना। देव ह्मणे॥६८॥ आतां ययावरी। आहाराचिया परि। यज्ञही अवधारीं। त्रिधा असे ॥ ६९ ॥ तरीं तिहींमाजी प्रथम। सात्विकयज्ञाचें वर्म। आईक पां सुमहिम-। शिरोमणी ॥ १७० ॥

**"अशा प्रकारचें तयार झालेलें, दोनप्रहरीं किंवा दुसऱ्या दिवशीं, अतिक्रांत झालेल्या वेळीं तामस आहे तो अन्न सेवन करतो. १५५ किंवा अर्धवट शिजलेलें, किंवा निखालस करपून गेलेलें, ज्याचा रस पूर्णतेस आलेला नाहीं, असेंही खातो. १५६ ज्याची सिद्धि परिपूर्ण झालेली आहे; ज्यांत रस उत्पन्न झालेला आहे; तें अन्न असें तामसाला वाटतच नाहीं. १५७ असें असतां चुकून एखाद्या वेळीं चांगलें अन्न मिळालेंच तर वाघ जसा तें कुजेपर्यंत थांबतो, त्याप्रमाणें थांबावयाचें. १५८ कारण, फार दिवस होऊन गेलेलें, गोडी नाहींशी झालेली, वाळून कोळ झालेलें, किंवा आंबलेलें, फसफसलेलें असलें तरी चिंता नाहीं. १५९ तें सुद्धां मुलाच्या हातानें चिवडून जणूं काय चिखल झालेला, किंवा बायकोच्या ताटांत बसून गोतांबिल करून एकत्र जेवणें, १६० अशा घाणेरेपणानें जेव्हां खातो, तेव्हां त्याचें मोठ्या आनंदानें भोजन होतें. पण तो पातकी एवढ्यानेंही तृप्त होत नाहीं. १६१ मग चमत्कार पहा! सदोष–ज्या पदार्थावर निषेधाचा शिंतोडा उडालेला आहे, १६२ अशा अपेयास पान करून, अभक्ष्यांचें भोजन करून, तामस आहे तो इच्छा वाढवीतच असतो. १६३ हे वीरा! तामस जेवणाराची आवड अशीच असते. आणि त्याचें फळ मिळावयाला एक घटका सुद्धां लागत नाहीं. १६४ कारण, जेव्हां ह्या अपवित्राचा त्याच्या तोंडानें स्पर्श केला, तेव्हांच तो पापाला पात्र झाला. १६५ अशा प्रकारें जें जेवणें ती जेवणाची रीति ह्मणतां येत नाहीं. पोट भरण्याची ती एक यातना ह्मणून समजावें. १६६ हें पहा! मस्तक छेदलें असतां काय होतें? किंवा आगींत शिरलें असतां कसें वाटतें? ह्याचा अनुभव घ्यावा काय? परंतु तसेंही सहन करणारे असतातच. १६७ ह्मणून तामस अन्नाचा परिणाम अगदींच वेगळा आहे. देव ह्मणतात "अर्जुना! तो नाहींच आह्मी सांगत. १६८ आतां ह्यापुढें आहाराप्रमाणेंच यज्ञही तीन प्रकारचे आहेत. १६९ तरी तिहींमध्यें प्रथम हे महात्म्या! सात्विक यज्ञाचें लक्षण ऐक." १७०**

१ राहिलेलें, अतिक्रांत झालेलें. २ निःशेष. ३ निष्पन्न झालेला, उत्पादन. ४ कदाचित्. ५ उत्तम अन्न. ६ प्राप्त. ७ फुगलेलें. ८ हातानें. ९ चिखल. १० एका ताटांत सर्वांनीं जेवणें. ११ घाणेरेपणानें. १२ तृप्त होत नाहीं. १३ शिंतोडा, सेचन. १४ इच्छा. १५ आवड. १६ तत्क्षणीं. १७ रीत. १८ वेगळाला. १९ उत्तम महिमेच्या.

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥११॥

[मनः समाधाय] तरि एक प्रियोत्तम। वांचोनि वाढों नेदी काम। जैसा कां मनोधर्म। पतिव्रतेचा ॥ ७१ ॥ ना ना सिंधूतें ठाकूनि गंगा। पुढारा न करीचि रिगा। कां आत्मा देखोनि उगा। वेद टेला ॥ ७२ ॥ तैसें जे आपुल्या

स्वहितीं । वेंचूनियां चित्तवृत्ती । नुरवितीचि अहंकृती । फळालागीं ॥ ७३ ॥ पातलेया झाडाचें मूळ । मागुतें सरों नेणेंचि जळ । जिरालें कां केवळ । तयाच्याचि आंगीं ॥७४॥ [यष्टव्यमेवेति] तैसें मनें देहीं । यजननिश्चयाच्या ठाईं । हारपोनि जे कांहीं । वांछितीना ॥ ७५॥ [अफलाकांक्षिभिः] तिहीं फळवांच्छात्यागीं । स्वधर्मावांचूनि विरागीं । कीजे जो यज्ञ सर्वांगीं । अळंकृत ॥ ७६ ॥ [विधिदृष्टः] परि आरिसा आपणपें । डोळां जैसें घेपे । कां तळहातीचें दीपें । रत्न पाहिजे ॥७७॥ ना ना उदितें दिवाकरें । गेमावा मार्ग दिठी भरे । तैसा वेद निर्धारें । देखोनियां ॥ ७८ ॥ तियें कुंडें मंडप वेदी । आणीकही संभारसमृद्धि । ते मेळवणी जैसी विधी । आपणपां केली ॥ ७९ ॥ सकळावयव उचितें । लेणीं पातलीं जैसीं आंगातें । [य इज्यते] तैसे पदार्थ जेथिंचे तेथें । विनियोगुनी ॥ १८० ॥ काय वानूं बहुतीं बोलीं । जैसी सर्वाभरणीं भरली । ते यज्ञविद्याचि रूपा आली । यजनमिषें ॥ ८१ ॥ [यः यज्ञः] तैसा सांगोंपांग । निपजे जो याग । नुठऊनियां लोग । महत्त्वाचा ॥ ८२ ॥ [स सात्विकः] प्रतिपाळ तरी पांटाचा । झाडीं कीजे तुळसीचा । परी फळा फुला छायेचा । आश्रय नाहीं ॥ ८३ ॥ किंबहुना फळाशेवीण । ऐसेया निगुती निर्माण । होय तो याग जाण । सात्विक गा ॥ ८४ ॥

**"तर पतिव्रतेचा मनोधर्म, जसा एका प्रियोत्तमावांचून काम वाढूं देत नाहीं, १७१ किंवा समुद्राला सोडून गंगा जशी पुढें जात नाहीं, किंवा आत्मा पहातांच वेद जसा उगेच बसतो, १७२ त्याप्रमाणें आपल्या स्वहिताकरितां चित्तवृत्ति खर्च करून फळाकरितां अहंकृति ह्मणून उरवितच नाहींत. १७३ पाणी झाडाच्या मुळाशीं गेलें कीं, त्याला मागें सरावयाचें माहितच नसतें. तें केवळ त्याच्याच आंगीं जिरून जातें. १७४ त्याप्रमाणें यजननिश्चयामध्यें मन व देह ह्याचा लय करून जे कोणतीच इच्छा करीत नाहींत, १७५ ते फलवासनेचा त्याग करून स्वधर्माशिवाय अन्य हेतु न धरितां विरक्तपणानें जो यज्ञ करितात, तो सर्वांगानें अलंकृत होतो. १७६ परंतु आरशाच्या योगानें आपल्याच डोळयांनीं जसें आपलें आपणाला पाहातां येतें, किंवा दिव्यानें जसें तळहातावरचें रत्न पाहातां येतें, १७७ किंवा उगवलेल्या सूर्यानें जाण्याचा मार्ग दृष्टीस पडतो, त्याप्रमाणें वेद पाहून निश्चय करतो. १७८ तीं कुंडें; मंडप; वेदी; आणखी नानातऱ्हेचीं द्रव्यें, हीं सर्व जमवाजमव जणों काय स्वतः विधीनेंच स्वतः केली असें वाटतें. १७९ ज्या ज्या अवयवांना जे जे अलंकार योग्य, ते तेच जसे आंगाला मिळावेत, त्याप्रमाणें जेथल्या तेथें व्यवस्थित रीतीनें पदार्थ ठेवून, १८० अधिक बोलून काय वर्णन करावें? ज्याप्रमाणें यज्ञाच्या निमित्तानें ती यज्ञविद्याच सालंकृत होऊन मूर्तिमंत उभी रहावी, १८१ त्याप्रमाणें कोणत्याही इच्छेचा भाग न उठतां तो सांगोपांग यज्ञ होतो; १८२ तुळशीच्या झाडाचा प्रतिपाळ उत्तम रीतीनें करावयाचा, परंतु फळांचा, फुलांचा किंवा छायेचाही आश्रय करावयाचा नाहीं. १८३ किंबहुना फलाशेवांचून अशा युक्तीनें जो यज्ञ निर्माण होतो, तो सात्विकयज्ञ, हें लक्ष्यांत ठेव." १८४**

अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥१२॥

[अभिसंधाय तु फलं] आतां यज्ञ कीर वीरेशा । करी पैं याचिऐसा । परि श्राद्धालागीं जैसा । अवंतिला रावो ॥ ८५ ॥ जरि राजा घरासि ये । तरी बहुत उपयोगा जाये । [दंभार्थमपि चैव यत्] आणि कीर्तीही होये । जगामाजी ॥ ८६ ॥ तैसा धरूनि आवांका । ह्मणे स्वर्ग जोडेल असिको । दीक्षित होईन मान्य लोकां । घडेल याग ॥ ८७ ॥ [इज्यते इति] ऐसी केवळ फळालागीं । महत्त्व फोकरावया जगीं । पार्था निष्पत्ति जे यागीं । राजस पैं ते ॥ ८८ ॥

**"हे वीरश्रेष्ठा! आतां अशाच प्रकारें यज्ञ करतो, पण तो असा करतो कीं, जसा कांहीं श्राद्धाला राजा बोलवावा; १८५ राजा घरास आला तर, पुष्कळप्रकारें उपयोगास येतो, आणखी जगामध्यें कीर्तिही होते. १८६ त्याप्र-**

१ वैराग्यपूर्वक. २ आरशानें. ३ डोळ्यानें आपलें स्वरूप जसें घेतलें जातें. ४ उगवलेल्या. ५ गम्य, जाण्याचा. ६ डोळ्यापुढें येतो. ७ स्वतः विधीनेंच. ८ व्यवस्थेनें मांडून. ९ इच्छा. १० उत्तम प्रकारचा. ११ युक्तीनें.

१ आमंत्रण देऊन आणला. २ अवसान. ३ सर्वथैव. ४ प्रतिष्ठेयर्थ.

माणें हिंमत धरून सर्वथैव स्वर्ग मिळेल असें ह्मणतो. ह्यातून यज्ञ घडेल; दीक्षित होईन; सर्व लोकांत मानमान्यता होईल. १८७ **पार्था!** अशी केवळ फळाकरितां जगामध्यें प्रतिष्ठा व्हावी ह्मणून जी यज्ञाची क्रिया ती राजस होय." १८८

विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम् ।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥

[विधिहीनं] आणि पशुपक्षिविवाहीं । जोसी कामापरौता[1] नाहीं । तैसा तामसा यज्ञा पाहीं । आग्रहचि मूळ ॥ ८९ ॥ वारया वाट न वाहे । कीं मरण मुहूर्त पाहे । निषिद्धांसीं विहे । आगी जरी ॥ १९० ॥ तरी तामसाचिया आचारा । विधीचा आथी ना वोढावारा[2] । ह्मणूनि तो धनुर्धरा । उत्सं[3]खलु ॥ ९१ ॥ नाहीं विधीची तेथ चाड । [मंत्रहीनं] नये मंत्रादिक तयाकड । अन्न जातां न सुये[4] तोंड । मासिये केविं ॥ ९२ ॥ [अदक्षिणं] वैरांचा[5] बोध ब्राह्मणा । तेथ कें रिगेल दक्षिणा । अग्नि जाला वाउधाणा[6] । वरँपडा जैसा ॥ ९३ ॥ [श्रद्धाविरहितं] तैसें वायांचि सर्वस्व वेचे । मुख न देखतां श्रद्धेचें । नागविलें निपुत्रिकाचें । जैसें घर ॥ ९४ ॥ [यज्ञं तामसं परिचक्षते] ऐसा जो यज्ञाभास[9] । तया नाम याग तामस । आइकें ह्मणे निवास । श्रियेचा तो ॥ ९५ ॥ आतां गंगेचें एक पाणी । परि नेलें ओंनानीं[10] वाहणीं । एक मळी एक आणी । शुद्धत्व जैसें ॥ ९६ ॥ तैसें तिहीं गुणीं तप । येथ जाहालें आहे त्रिरूप । तें एक केलें दे पाप । उद्धरी एक ॥ ९७ ॥ तरि तेंचि तिहीं भेदीं । कैसेनि पां ह्मणौनि सुबुद्धी । जाणों पाहासी तरि आधीं । तपचि[11] जाण ॥ ९८ ॥ येथ तप ह्मणिजे काई । तें स्वरूप दाऊं पाहीं । मग भेदिलें गुणीं तिहीं । तें पाठीं[12] बोलों ॥ ९९ ॥ तरि तप जें कां सम्यक । तेंही त्रिविध आइक । शारीर मानसिक । शाब्द गा ॥ २०० ॥ आतां या तिहीं माझारीं । शारीर तंव अवधारीं । तरि शंभू[13] कां श्रीहरी । पाढियंता होय ॥ १ ॥

"आणखी पशुपक्ष्यांच्या लग्नामध्यें कामाशिवाय दुसरा कोणी जोशी नसतो, त्याप्रमाणें तामसयज्ञामध्यें आग्रह हेंच मूळ असतें. १८९ वाऱ्याला वाट लागत नाहीं; मरण मुहूर्त पहात नाहीं; निषिद्धाला जर आग भिईल, १९० तर तामसाच्या आचाराला विधि किंवा मर्यादा असेल. ह्मणून **धनुर्धरा!** तो उच्छृंखळ होय. १९१ तेथें विधीची चाड नाहीं; मंत्रादिक त्याच्याकडे येत नाहींत; माशा कोणत्या अन्नांत तोंड घालित नाहींत? १९२ ब्राह्मणाविषयीं जेथें वैरभाव; तेथें दक्षणा कोठून येणार? वाऱ्याला जसा अग्नि मिळावा, १९३ त्याप्रमाणें, किंवा निपुत्रिकाचें घर जसें नागविलें जातें, (त्याच्या पश्चात् पाहिजे तो लुटतो) त्याप्रमाणें श्रद्धेचें तोंडही न पाहतां व्यर्थ सर्वस्व खर्च करतो." १९४ **लक्ष्मीचा** भर्ता जो **श्रीकृष्ण**, तो ह्मणाला "ऐक. अशा रीतीचें जें यज्ञाचें सोंग, त्याचें नांव तामस यज्ञ. १९५ आतां गंगेचें पाणी एकच असतें; पण तें निरनिराळ्या मार्गांनीं नेलें तर, एक मळ घेऊन येतें, आणि एक जसें शुद्धोदक घेऊन येतें, १९६ त्याप्रमाणें तीन गुणांच्या योगेंकरून तपही तीन प्रकारचें झालेलें आहे. एक केलें असतां पाप होतें, आणि एकानें उद्धार होतो. १९७ हे **सुमते!** तर तेच तीन भेद कसे? ह्मणून जाणण्याची इच्छा करशील, तर आधीं तप ह्मणजे काय तेंच समजून घे. १९८ येथें तप ह्मणजे काय? त्याचें लक्षणच दाखवून देऊं. आणि मग तीन गुणांनीं त्याचे भेद कसे झाले आहेत ते पाठीमागून सांगूं. १९९ उत्तम तप ह्मणून जें आहे, तेंही—कायिक, वाचिक, आणि मानसिक—असें तीन प्रकारचें आहे हें ऐकून ठेव. २०० आतां ह्या तिहींमध्यें शारीरतप ऐक. तर **शंभु** किंवा **श्रीहरी**, यांपैकीं जो कोणी आवडता असेल," २०१

१ विषयसेवनाहून पलीकडे. २ मर्यादा, धरबंद. ३ अमर्याद. ४ घाली. ५ ब्राह्मणाविषयीं वैरभाव. ६ वादळाला. ७ प्राप्त. ८ निपुत्रिकाच्या पश्चात् त्याचें घर कोणीं तरी नागवावें तसें. ९ यज्ञाचें सोंग. १० निरनिराळ्या मार्गानीं. ११ आधीं तप सांगतों ऐक. १२ मग. १३ शिव किंवा विष्णु यांतून आवडेल त्याचें.

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥

[देव—'पूजनमिति प्रत्येकमन्वेति'] तया प्रिय देवतालया ।

यात्रादिकें करावया । आठही पाहार जैसें पायां । उळिंग[1] घापे ॥ २ ॥ देवांगणमिरवणियां[2] । अंगोपचार[3] पुरवणियां । करावया ह्मणियां[4] । शोभती हात ॥ ३ ॥ लिंग का प्रतिमा दिठी । देखत खेंवो अंगेष्टी । लोटिजे कां कांठी[5] । पडळी जैसी ॥ ४ ॥ [प्राज्ञ–] आणि विधिविनयादिकीं । गुणीं वडील जे लोकीं । तयां ब्राह्मणाची निकी । पाइकी[6] कीजे ॥ ५ ॥ [द्विज–] अथवा प्रवासें कां पीडा । कां शिणले जे सांकडां । ते जीव सुरवाडा[7] । आणीजती ॥ ६ ॥ [गुरु–] सकळ तीर्थांचिये धुरे[8] । जिये कां मातापितरें । तयां सेवेसि कीर शरीरें । लोणें[9] कीजे ॥ ७ ॥ आणि संसारा ऐसा दारुण । जो भेटलाचि हरी शीण । तो ज्ञानदानी सकरुण । भजिजे गुरु ॥ ८ ॥ [शौचं] आणि स्वधर्मांचा आंगिठा[10] । देह जोड्या[11]चिया किटा । आवृत्तिपुटीं सुभटा । झाडी कीजे ॥ ९ ॥ वस्तु भूतमात्रीं नमिजे । परोपकारीं भजिजे । [ब्रह्मचर्यं] स्त्रीविषयीं नियमिजे । नांवेंनांव ॥ २१० ॥ [आर्जवं] जन्मतेनि[12] प्रसंगें । स्त्रीदेहें शिवणें आंगें । तेथूनि जन्म आघवें । सोविळें कीजे ॥ ११ ॥ [अहिंसा च] भूतमात्राचेनि नांवें । तृणही नासुडावें[13] । किंबहुना सांडावे । छेद भेद ॥ १२ ॥ [शारीरं तप उच्यते] ऐसैसी जैं शरीरीं । राहाटीची पडे उंजरी[14] । तैं शारीर तप धुमरी[15] । आलें जाण ॥ १३ ॥ पार्था समस्तही हें करणें । देहाचेनि प्रधानपणें[16] । ह्मणौनि ययातें मी ह्मणें । शारीर तप ॥ १४ ॥ एवं शारीर जें तप । तयाचें दाविलें रूप । आतां आईक निष्पाप । वांङ्मय[17] तें ॥ १५ ॥

“ त्या प्रियदेवाच्या देवालयामध्यें यात्रादि करावयासाठीं, पायाला वेठीला धरलेले; २०२ देवाचें आंगण सुशोभित करण्यासाठीं, गंधपुष्पांचे उपचार करण्यासाठीं, हात शोभतात. २०३ लिंग किंवा प्रतिमा पाहिली कीं, तत्काल साष्टांग नमस्कार घालावयाचा, असा कीं जशी काय काठी पडली! २०४ आणखी विद्याविनयादिकांमध्यें आणि गुणांमध्येंही जे जगामध्यें श्रेष्ठ; त्या ब्राह्मणांची जो खरोखर सेवा करतो, २०५ अथवा प्रवासांत असलेले, दुःखित; किंवा संकटांनीं त्रस्त झालेले, त्यांना सुखावस्थेला आणावयाचें. २०६ सकल तीर्थांमध्यें अग्रणी जीं मातापितरें, त्यांच्या सेवेकरितां निश्चयेंकरून शरीर ओवाळून टाकावयाचें. २०७ ज्याचें दर्शन होतांच संसारासारखे दारुण कष्टही लयास जातात; जो ज्ञानदान देण्यामध्यें दयाळू, त्या गुरूला भजतो, २०८ आणखी हे **वीरा!** स्वधर्माच्या आगटीमध्यें देह जाड्याचें कीट पुनः पुन्हा जाळून स्वच्छ करतो; २०९ वस्तूला (ब्रह्माला); भूतमात्राला नमस्कार करावा; परोपकारावर भक्ति ठेवावी; स्त्रीविषयीं क्षणोक्षणीं नियमन करावें; २१० जन्माच्या वेळीं जो कांहीं स्त्रीचा आंगस्पर्श झाला असेल तेवढा, तेथपासून सारा जन्म सोवळा राखतो. २११ तृण सुद्धां प्राणिमात्रच असें मानून त्यास दुखवूं नये; किंबहुना छेदभेद सोडून द्यावेत; २१२ अशा अशा राहाटीचा जेव्हां शरीरामध्यें उत्कर्ष होतो, तेव्हां शरीरतप भरपूर आलें ह्मणून समजावें. २१३ **अर्जुना!** हें सारें करणें देहाच्या योगानें असतें, ह्मणून ह्याला मी शारीरतप असें ह्मणतों. २१४ अशा प्रकारें शारीरतप ह्मणून जें आहे, त्याचें स्वरूप दाखविलें. आतां निष्पाप असें वाङ्मय तप आहे तें ऐक. ” २१५

१ वेंठ, बिगार, भोंवरा. २ सुशोभित करण्यास. ३ गंधपुष्पादिक. ४ सेवा, पूजा. ५ साष्टांग, अंगयष्टि. ६ चाकरी. ७ सुखावस्थेस. ८ अग्रभागीं. ९ ओवाळून टाकावीं. १० अग्नींत, शेगडींत. ११ मळाच्या. १२ जन्मकालींच मात्र स्त्रीस्पर्श. १३ न आसडावें, ओढूं नये. १४ स्वच्छता. १५ भरपूर, घुमत. १६ मुख्यत्वें. १७ वाचिक.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १९ ॥

[अनुद्वेगकरं वाक्यं] तरि लोहाचें आंग तुक[1] । न तोडितांचि कनक । केलें जैसें देख । परिसें तेणें ॥ १६ ॥ तैसें न दुखवितां सहजें । जोंवळिया[2] सुख निपजे । ऐसें साधुत्व कां देखिजे । बोलणा जिये ॥ १७ ॥ [सत्यं] पाणी मुदल झाडा जाये । तृण ते प्रसंगेंचि जिये । तैसें एका बोलिलें होये । सर्वांहि हित ॥ १८ ॥ [प्रिय–] जोडे अमृताची सुरसरी[3] । तैं प्राणांतें अमर करी । स्नानें पाप ताप वारी । गोडीही दे ॥ १९ ॥ [हितं च यत्] तैसा अविवेकही फिटे । आपुलें अनादित्व भेटे । आइकतां रुचि न विटे । पीयूषीं[4] जैसी ॥ २२० ॥ जरी कोणी करी पुसणें । तरी होआवें ऐसें बोलणें । [स्वाध्यायेति] ना तरी आवर्तणें ।

१ आकार, वजन. २ परक्यास. ३ सुरसरित्, गंगा. ४ अमृतीं.

निगम कां नाम ॥ २१ ॥ ऋग्वेदादि तिन्हीं । प्रतिष्ठीजती वाग्भुवनीं । केली जैसी वदनीं । ब्रह्मशाळा ॥ २२ ॥ ना तरि एकाधें नांव । तेंचि शैव कां वैष्णव । वाचे वसे तें वाँग्भव । तप जाणावें ॥ २३ ॥ आतां तप जें मानसिक । तेंही सांगों आइक । ह्मणे लोकनाथनायक- । नायकचि तो ॥२४॥

**"तर लोहाच्या आंगाचा आकार व वजन न मोडतां, परीस असतो तो जसें सोनें करून सोडतो, २१६ त्याप्रमाणें न दुखवितां—सहज—दुसऱ्याला सुख उत्पन्न होणें असें जें बोलण्यांत साधुत्व दृष्टीस पडेल, २१७ पाणी मुख्य झाडाला जात असतें. पण त्या प्रसंगानें गवतही जगतें. तसें एका बोलण्यानें सर्वांचेंही हित होतें. २१८ भागीरथी प्राप्त झाली ह्मणजे प्राणाला अमर करते; स्नानानें पाप ताप वारते; आणि गोडीही देते. २१९ त्याप्रमाणें अविवेक नाहींसा होतो; आपलें अनादित्व मिळतें; अमृताच्या रुचीचा जसा वीट येत नाहीं, त्याप्रमाणें ऐकतांना वीट येत नाहीं. २२० जर कोणीं विचारलें, तर असें बोलणें असावें. नाहीं तर वेदाच्या किंवा नामाच्या आवृत्ति करित बसावें. २२१ ऋग्वेदादि तीन्ही वेद, वाङ्मंदिरांत स्थापन करावेत. जणूं काय तोंडामध्येंच वेदशाळा! २२२ नाहीं तर एखादें नांव; तें शिवाचें किंवा विष्णूचें, वाणीमध्यें वस्ती करतें; तें वाणीपासून झालेलें तप ह्मणून समजावें. २२३ लोकनाथांच्या नायकांचे नायक जे श्रीकृष्ण ते ह्मणतात "आतां मानसिक तप ह्मणून जें आहे, तेंही सांगूं ऐक." २२४**

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥

[मनःप्रसादः] तरि सरोवरतरंगीं । सांडिलें आकाश मेघीं । कां चंदनाचें उरगीं । उद्यान जैसें ॥ २५ ॥ नाना कॅळावैषम्यें चंद्र । कां सांडिला आर्थी नरेंद्रें । ना तरि क्षीरसमुद्र । मंदराचळें ॥ २६ ॥ तैसीं नानाविकल्पजाळें । सांडूनि गेलिया सकळें । मन राहे कां केवळें । स्वरूपें जें ॥ २७ ॥ [सौम्यत्वं] तपनेंवीण प्रकाश । जाड्यंवीण रस । पोकळीवीण अवकाश । होय जैसा ॥ २८ ॥ तैसी आपली सोयं देखे । आणि आपलिया स्वभावा मुके । हिंवली जैसी आंगिकें । हिंवों नेदी ॥ २९ ॥ मग नचलतें कळंकेंवीण । शशिबिंब जैसें नित्य परिपूर्ण । तैसें चोखी श्रृंगारपण । मनाचें जें ॥ २३० ॥ [मौनं] बुजाली वैराग्याची वोरप । जिराली मनाची धांप कांप । तेथ केवळ जाली वाँफ । निजबोधाची ॥ ३१ ॥ ह्मणौनि विचारावया शास्त्र । राहाटवावें जें वक्त्र । तें वाचेचेंही सूत्र । हातीं न धरी ॥ ३२ ॥ [आत्मविनिग्रहः] तें स्वलाभ लाभलें लाभलेपणें । मन मनपणाही धरूं नेणें । शिवतलें जैसें लवणें । आपलें निंज ॥ ३३ ॥ [भावसंशुद्धिः] तेथ कें उठिती ते भाव । जिहीं इंद्रियमार्गीं धांव । घेऊनि ठाकावे गांव । विषयांचे ते ॥ ३४ ॥ ह्मणौनि तिये मानसीं । भावशुद्धीचि असे आपैसी । रोमशुचि जैसी । तळहाताची ॥ ३५ ॥ [इत्येतत्तपो मानसमुच्यते] काय बहु बोलों अर्जुना । जैं हे दशा ये मना । तैं मंनस्तपोभिधाना । पात्र होय ती ॥ ३६ परि तें असो हें जाण । मानसतपाचें लक्षण । देवो ह्मणे संपूर्ण । सांगितलें ॥ ३७ ॥ एवं देहवाचाचित्तें । जें पातलें त्रिविधत्वातें । तें सामान्य तप तूतें । परिसविलें गा ॥ ३८ ॥ आतां गुणत्रयसंगें । हेंचि विशेषें त्रिविधीं रिगे । तेंही आईक चांगें । प्रज्ञाबळें ॥ ३९ ॥

**"तर सरोवर तरंगांनीं सोडावें, मेघांनीं आकाश टाकावें; किंवा सर्पांनीं जसा चंदनाच्या वनाचा त्याग करावा, २२५ किंवा कमजास्त कळांनीं जसा चंद्र सोडावा; व्यार्थींनीं राजा सोडावा; किंवा मंदराचळानें क्षीरसमुद्र सोडावा; २२६ त्याप्रमाणें नाना प्रकारच्या विकल्पांचीं जाळीं सर्व सांडून गेलीं, ह्मणजे मग जें केवळ स्वरूपानें मन राहतें, २२७ उष्णतेवांचून प्रकाश; जाड्याशिवाय रस; पोकळीशिवाय जसा अवकाश असावा, २२८ त्याप्रमाणें आपला मार्ग पाहतो; आणखी थंडावलेले अवयव जसे थंडी देत नाहींत; त्याप्रमाणें आपल्या स्वभावाला मुकतो. २२९ मग न चालणारें, कलंकाशिवाय जसें चंद्राचें नित्य नवें प्रतिबिंब असावें, त्याप्रमाणें मनाचें जें उत्कृष्ट स्थीरत्व; २३० वैराग्याची उत्कंठा नाहींशी झाली,**

१ वेद. २ वाचारूप मंदिरांत. ३ वेदशाळा. ४ वाचेपासून झालेलें. ५ सापांनीं. ६ बाग. ७ कमजास्त कलांनीं. ८ राजा.

१ उष्णतेवांचून. २ मार्ग. ३ शरीरावयव. ४ उत्कंठा, इच्छा. ५ धांव. ६ कंप. ७ योग्यता. ८ संकल्पविकल्प. ९ आपली मूळप्रकृति=पाणी. १० मानसतप अशा नांवाला. ११ तीन प्रकारांत शिरतें. १२ बुद्धीच्या बळानें.

मनाची चलबिचल मोडली, ह्मणजे निजबोधाचीच केवळ वाफ होऊन राहते, २३१ ह्मणून शास्त्राचा विचार करण्यासाठीं जें तोंड कामीं लावावयाचें, तें वाचेचें सूत्रही हातांत धरीत नाहीं. २३२ मिठानें आपली मूळ प्रकृति जें पाणी–त्यास स्पर्श केला असतां, तें जसा आपलेपणा विसरतें, त्याप्रमाणें आपला लाभ प्राप्त झाल्याच्या योगानें तें मन संकल्प विकल्पही धरूं शकत नाहीं. २३३ तेव्हां मग इंद्रियमार्गाकडे धांव घेऊन विषयांच्या गांवाला जाणारे जे भाव, ते कोठें उठणार? २३४ ह्मणून तळहातावर जशी केशरहित स्वच्छ जागा असते, त्याप्रमाणें त्यांच्या मनांत आपोआपच भावशुद्धि असते. २३५ अर्जुना! फार काय सांगावें? मनाला जेव्हां अशी दशा प्राप्त होते, तेव्हां ती **'मानसतप'** अशा नांवाला पात्र होते." २३६ देव ह्मणाले "पण तें असो. हें सारें मानसतपाचें लक्षण आहे. ध्यानांत ठेव. २३७ ह्याप्रकारें कायावाचामनेंकरून ज्याचे तीन प्रकार झाले आहेत, तें सामान्य तप तुला सांगितलें. २३८ आतां, तीन गुणांच्या संगतीनें हेंच तीन विशेष प्रकारांत शिरतें. तेंही आतां नीट चित्त देऊन ऐक." २३९

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्रिविधं नरैः।
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥१७॥

[श्रद्धयेति] तरि हेंचि तप त्रिविधा। जें दाविलें तुज [1]प्रबुद्धा। तेंचि करीं पूर्णश्रद्धा। सांडूनि फळ ॥ २४० ॥ [अफलेति] जैं पुरतिया सत्वशुद्धी। आचरिजे आस्तिक्यबुद्धी। तैं तयातेंचि गा प्रबुद्धीं। सात्विक ह्मणिपे ॥ ४१ ॥

"तर हे **ज्ञात्या!** हेंच तप तुला तीन प्रकारांनीं दाखवून दिलें. तेंच परंतु पूर्णश्रद्धेनें फळ सोडून करावें; २४० तेंच आस्तिक बुद्धीनें, पूर्ण सत्वशुद्धीनें जेव्हां आचरण करावें, तेव्हां त्यालाच ज्ञाते लोक **सात्विकतप** असें ह्मणतात." २४१

१ ज्ञात्या.

सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत्।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥१८॥

[सत्कार–] ना तरि तपस्थापनेलागीं। दुजेपण मांडूनि जगीं। [1]महत्त्वाद्रीच्या [2]श्रृंगीं। बैसावया ॥ ४२ ॥ [मान–] त्रिभुवनींचिया सन्माना। न वचावें ठाया आना। धुरेचिया आसना। भोजनालागीं ॥ ४३ ॥ विश्वाचिया स्तोत्रा। आपण होआवया पात्रा। विश्वें आपलिया यात्रा। कराविया ॥४४॥ [पूजार्थं] लोकांचिया विविधा पूजा। आश्रय न धरावया दुजा। भोग भोगावे [3]वोजा। महत्त्वाचिये ॥ ४५ ॥ [तपो दंभेन चैव यत्] अगा बोल माखूनि तपें। विकावया आपणपें। [4]अंगहीनें पेंडपे। जियापरी ॥ ४६ ॥ हें असो धनमानीं आस। वाढउनी तप [क्रियते तदिव प्रोक्तं] कीजे सायास। तैं तेंचि तप राजस। बोलिजे गा ॥ ४७ ॥ [चलं] परि [6]परहुणीं जें दुहिलें। तैं तें गुरूं न दुभेचि व्यालें। कां उभें-शेत चारिलें। पिकावया नुरे ॥ ४८ ॥ तैसें फोकारितां तप। कीजे जें साक्षेप। तें फळीं तंव सोपें। निःशेष जाय ॥ ४९ ॥ ऐसें निर्फळ देखोनि करितां। माझारीं सांडीं पंडुसुता। [अध्रुवं।] ह्मणोनि नाहीं स्थिरता। तपा तया ॥२५०॥ येन्हवीं तरी आकाश [10]मांडी। जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी। तो अकाळ मेघ काय घडी। राहात आहे ॥ ५१ ॥ [राजसं] तैसें राजस तप जें होय। तें फळी कीर वांझ जाये। परी आचरणींही नोहे। निर्वाहतें गा ॥ ५२ ॥ आतां तेंचि तप पुढती। [11]तामसें येचि रीती। पैं [12]परत्रा आणि कीर्ति। मुकोनि कीजे ॥ ५३ ॥

"नाहीं तर तपाच्या स्थापनेकरितां जगामध्यें द्वैतभाव मांडून महत्वपर्वताच्या शिखरावर बसण्याकरितां, २४२ त्रिभुवनाच्या सन्मानासाठीं, उच्च आसनासाठीं व भोजनांत अग्रमान मिळण्यासाठीं. २४३ विश्वाच्या स्तोत्राला आपण पात्र होण्यासाठीं, विश्वानें आपली यात्रा करावी ह्मणून, २४४ लोकांच्या नानाप्रकारच्या पूजा प्राप्त व्हाव्या; दुसऱ्या आश्रयाची गरज न पडण्यासाठीं, महत्वाच्या चांगलेपणानें भोग भोगण्यासाठीं, २४५ आपल्याला विकण्यासाठीं, आंगाचे हावभाव, शब्द इत्यादि-

१ महत्वपर्वताच्या शिखरावर. २ अग्रभागींच्या. ३ चांगलेपणानें. ४ वेश्या. ५ शृंगार करते. ६ ओंटी केलेली गाई विण्याच्या पूर्वी. ७ प्रसिद्धीस आणितां. ८. व्यर्थ. ९ मंडळी, मांडला जातो. १० टिकण्याजोगें. ११ तमोगुणी प्राण्याच्या. १२ परलोकाच्या.

निगम कां नाम ॥ २१ ॥ ऋग्वेदादि तिन्हीं । प्रतिष्ठीजती वाग्भुवनीं । केली जैसी वदनीं । ब्रह्मशाळा ॥ २२ ॥ ना तरि एकाचें नांव । तेंचि शैव कां वैष्णव । वाचे वसे तें वाग्भव । तप जाणावें ॥ २३ ॥ आतां तप जें मानसिक । तेंही सांगों आइक । ह्मणे लोकनाथनायक- । नायकचि तो ॥ २४ ॥

“तर लोहाच्या आंगाचा आकार व वजन न मोडतां, परीस असतो तो जसें सोनें करून सोडतो, २१६ त्याप्रमाणें न दुखवितां—सहज—दुसऱ्याला सुख उत्पन्न होणें असें जें बोलण्यांत साधुत्व दृष्टीस पडेल, २१७ पाणी मुख्य झाडाला जात असतें. पण त्या प्रसंगानें गवतही जगतें. तसें एका बोलण्यानें सर्वांचेंही हित होतें. २१८ भागीरथी प्राप्त झाली ह्मणजे प्राणाला अमर करते; स्नानानें पाप ताप वारते; आणि गोडीही देते. २१९ त्याप्रमाणें अविवेक नाहींसा होतो; आपलें अनादित्व मिळतें; अमृताच्या रुचीचा जसा वीट येत नाहीं, त्याप्रमाणें ऐकतांना वीट येत नाहीं. २२० जर कोणीं विचारलें, तर असें बोलणें असावें. नाहीं तर वेदाच्या किंवा नामाच्या आवृत्ति करित बसावें. २२१ ऋग्वेदादि तीन्ही वेद, वाङ्मंदिरांत स्थापन करावेत. जणूं काय तोंडामध्येंच वेदशाळा! २२२ नाहीं तर एखादें नांव; तें शिवाचें किंवा विष्णूचें, वाणीमध्यें वस्ती करतें; तें वाणीपासून झालेलें तप ह्मणून समजावें. २२३ लोकनाथांच्या नायकांचे नायक जे श्रीकृष्ण ते ह्मणतात “आतां मानसिक तप ह्मणून जें आहे, तेंही सांगूं ऐक.” २२४

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥

[मनःप्रसादः] तरि सरोवर तरंगीं । सांडिलें आकाश मेघीं । कां चंदनाचें उरगीं । उद्यान जैसें ॥ २५ ॥ ना ना कळावैषम्यें चंद्र । कां मांडिल्य आधी नरेंद्र । ना तरि क्षीरसमुद्र । मंदराचळें ॥ २६ ॥ तैसीं नानाविकल्पजाळें । सांडूनि गेलिया सकळें । मन राहे कां केवळें । स्वरूपें जें ॥ २७ ॥ [सौम्यत्वं] तपनेंवीण प्रकाश । जाड्येंवीण रस । पोकळीवीण अवकाश । होय जैसा ॥ २८ ॥ तैसें आपलें होणें देखे । आणि आपलिया स्वभावा मुके । हिवचि जैसें आंगिकें । हिवें नेलें ॥ २९ ॥ मग नचळतें कळंकेंवीण । शशिबिंब जैसें नि- परिपूर्ण । तैसें चोखी अंगारपण । मनाचें जें ॥ २३० ॥ [मौनं] तुटली वैराग्याची धांप । जिराली मनाची धांव कांप । तेथ केवळ जाली वोळ । निजबोधाचा ॥ ३१ ॥ म्हणोनि विचारावया शास्त्र । राहाटवावें जें वक्त्र । तें वाचेंही सूत्र । हातीं न धरी ॥ ३२ ॥ [आत्मविनिग्रहः] स्वरूप लाभलें लाभलेनें । मन मनपणाही धरूं नेणें । थिजलें जैसें लवणें । आपलें निज ॥ ३३ ॥ [भावसंशुद्धिः] तेथ कें उठिती ते भाव । जिहीं इंद्रियमार्गीं धांव । घेऊनि ठाकावें गांव । विषयांचें तें ॥ ३४ ॥ म्हणोनि तिये मानसीं । भावशुद्धीचि असे आपैसी । रोमशुद्धि जैसी । तळहातीं ॥ ३५ ॥ [इत्येतत्तपो मानसमुच्यते] काय बहु बोलों अर्जुना । जे हे दशा ये मना । तें मनस्तपोभिधाना । पात्र होय ॥ ३६ परि तें असो हें जाण । मानसतपाचें लक्षण । देवो ह्मणे संपूर्ण । सांगितलें ॥ ३७ ॥ एवं देहवाचाचित्तें । जें पातलें त्रिविधत्वातें । तें सामान्य तप तूतें । परिस्फुट केलें गा ॥ ३८ ॥ आतां गुणत्रयवशें । हेंचि त्रिविधें त्रिविधें दिसे । तेंही आइक चांगें । प्रज्ञाबळें ॥ ३९ ॥

“तर सरोवर तरंगांनीं सोडावें, मेघांनीं आकाश टाकावें; किंवा सर्पांनीं जसा चंदनाच्या बनाचा त्याग करावा, २२५ किंवा कमजास्त कलांनीं जसा चंद्र सोडावा; स्वार्थांनीं राजा सोडावा किंवा मंदराचळानें क्षीरसमुद्र सोडावा; २२६ त्याप्रमाणें नाना प्रकारच्या विकल्पांचीं जाळीं सर्व सांडून गेलीं, ह्मणजे मग जें केवळ स्वरूपानें मन राहतें, २२७ उष्णतेवांचून प्रकाश जाड्याशिवाय रस; पोकळीशिवाय जसा अवकाश असावा, २२८ त्याप्रमाणें आपला मार्ग पाहतो; आपणां थंडावलेले अवयव जशी थंडी देत नाहींत; त्याप्रमाणें आपल्या स्वभावाला मुकतो. २२९ मग न चालणारें, कलंकाशिवाय जसें चंद्राचें नित्य नवें प्रतिबिंब असावें, त्याप्रमाणें मनाचें जें उत्कृष्ट स्वरूप २३० वैराग्याची उत्कंठा नाहींशी झाली

१ वेद. २ वाचारूप मंदिरांत. ३ वेदशाळा. ४ वाचेपासून झालेलें. ५ मेघांनीं. ६ बाग. ७ कमजास्त कलांनीं. ८ राजा.

१ उष्णतेवांचून. २ मनों. ३ कलंकरहित. ४ उत्कंट इच्छा. ५ धांव. ६ कंप. ७ [illegible]. ८ [illegible] ९ आपली मूळप्रकृति=[illegible]. १० [illegible] ११ तीन प्रकारांत शिरतें. १२ बुद्धीच्या बळानें.

मनाची चलविचल मोडली, ह्मणजे निजबोधाचीच केवळ वाफ होऊन राहते, २३१ ह्मणून शास्त्राचा विचार करण्यासाठीं जें तोंड कामीं लावावयाचें, तें वाचेचें सूत्रही हातांत धरीत नाहीं. २३२ मिठानें आपली मूळ प्रकृति जें पाणी–त्यास स्पर्श केला असतां, तें जसा आपलेपणा विसरतें, त्याप्रमाणें आपला लाभ प्राप्त झाल्याच्या योगानें तें मन संकल्प विकल्पही धरूं शकत नाहीं. २३३ तेव्हां मग इंद्रियमार्गाकडे धांव घेऊन विषयांच्या गांवाला जाणारे जे भाव, ते कोठें उठणार? २३४ ह्मणून तळहातावर जशी केशरहित स्वच्छ जागा असते, त्याप्रमाणें त्यांच्या मनांत आपोआपच भावशुद्धि असते. २३५ अर्जुना! फार काय सांगावें? मनाला जेव्हां अशी दशा प्राप्त होते, तेव्हां ती '**मानसतप**' अशा नांवाला पात्र होते." २३६ देव ह्मणाले "पण तें असो. हें सारें मानसतपाचें लक्षण आहे. ध्यानांत ठेव. २३७ ह्याप्रकारें कायावाचामनेंकरून ज्याचे तीन प्रकार झाले आहेत, तें सामान्य तप तुला सांगितलें. २३८ आतां, तीन गुणांच्या संगतीनें हेंच तीन विशेष प्रकारांत शिरतें. तेंही आतां नीट चित्त देऊन ऐक." २३९

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः।
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥१७॥

[श्रद्धयेति] तरि हेंचि तप त्रिविधा। जें दाविलें तुज प्रबुद्धा। तेंचि करीं पूर्णश्रद्धा। सांडूनि फळ ॥ २४० ॥ [अफलेति] जैं पुरतिया सत्वशुद्धी। आचरिजे आस्तिक्यबुद्धी। तैं तयातेंचि गा प्रबुद्धों। सात्विक ह्मणिरे ॥ ४१ ॥

"तर हे ज्ञात्या! हेंच तप तुला तीन प्रकारांनीं दाखवून दिलें. तेंच परंतु पूर्णश्रद्धेनें फळ सोडून करावें; २४० तेंच आस्तिक बुद्धीनें, पूर्ण सत्वशुद्धीनें जेव्हां आचरण करावें, तेव्हां त्यालाच ज्ञाते लोक **सात्विकतप** असें ह्मणतात." २४१

१ ज्ञाता.

सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत्।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥१८॥

[सत्कार–] ना तरि तपस्थापनेलागीं। दुजेपण मांडूनि जगीं। महत्त्वाद्रीच्या[1] शृंगीं। बैसावया ॥ ४२ ॥ [मान–] त्रिभुवनींचिया सन्माना। न वचावें ठाया आना। धुरेचिया[2] आसना। भोजनालागीं ॥ ४३ ॥ विश्वाचिया स्तोत्रा। आपण होआवया पात्रा। विश्वें आपलिया यात्रा। कराविया ॥४४॥ [पूजार्थं] लोकांचिया विविधा पूजा। आश्रय न धरावया दुजा। भोग भोगावे वोजा[3]। महत्त्वाचिये ॥ ४५ ॥ [तपो दंभेन चैव यत्] अगा बोल माखूनि तपें। विकावया आपणपें। अंगहीन[4] पंडपे। जियापरी ॥ ४६ ॥ हें असो धनमानीं आस। वाढउनी तप [क्रियते तदिव प्रोक्तं] कीजे सायास। तैं तेंचि तप राजस। बोलिजे गा ॥ ४७ ॥ [चलं] परि परहुणीं[6] जें दुहिलें। तैं तें गुरूं न दुभेचि व्यालें। कां उभें शेत चारिलें। पिकावया नुरे ॥ ४८ ॥ तैसें फोकारितां तप। कीजे जें साक्षेप। तें फळीं तंव सोपें। निःशेष जाय ॥ ४९ ॥ ऐसें निर्फळ देखोनि करितां। माझारीं सांडीं पंडुसुता। [अध्रुवं।] ह्मणोनि नाहीं स्थिरता। तपा तया ॥२५०॥ येव्हवीं तरी आकाश मांडी[9]। जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी। तो अकाळ मेघ काय घडी। राहात आहे ॥ ५१ ॥ [राजसं] तैसें राजस तप जें होय। तें फळी कीर वांझ जाये। परी आचरणींही नोहे। निर्वाहतें गा ॥ ५२ ॥ आतां तेंचि तप पुढती। तामसें येचि रीती। पैं परत्रा आणि कीर्ति। मुकोनि कीजे ॥ ५३ ॥

"नाहीं तर तपाच्या स्थापनेकरितां जगामध्यें द्वैतभाव मांडून महत्वपर्वताच्या शिखरावर बसण्याकरितां, २४२ त्रिभुवनाच्या सन्मानासाठीं, उच्च आसनासाठीं व भोजनांत अग्रमान मिळण्यासाठीं. २४३ विश्वाच्या स्तोत्राला आपण पात्र होण्यासाठीं, विश्वानें आपली यात्रा करावी ह्मणून, २४४ लोकांच्या नानाप्रकारच्या पूजा प्राप्त व्हाव्या; दुसऱ्या आश्रयाची गरज न पडण्यासाठीं, महत्वाच्या चांगलेपणानें भोग भोगण्यासाठीं, २४५ आपल्याला विकण्यासाठीं, आंगाचे हावभाव, शब्द इत्यादि-

१ महत्वपर्वताच्या शिखरावर. २ अग्रभागींच्या. ३ चांगलेपणानें. ४ वेश्या. ५ शृंगार करते. ६ ओटी केलेली गाई विण्याच्या पूर्वी. ७ प्रसिद्धीस आणितां. ८. व्यर्थ. ९ मंडळी, मांडला जातो. १० टिकण्याजोगें. ११ दुर्गतीप्राप्त्याच्या. १२ परलोकाच्या.

कांच्या तपानें वेश्या ज्याप्रमाणें शृंगार करते, २४६ हें असो. धन व मान वाढविण्यासाठीं मोठ्या साहसानें जें तप करणें, तेंच **राजसतप** असें ह्मणावें. २४७ कास करतांच ज्या गुराचें दूध काढावें, तें गुरूं व्यालयानंतर जसें दूध देत नाहीं, किंवा शेत उभें असतांच चारलें तर जसें विकावयाला कांहीं उरत नाहीं; २४८ त्याप्रमाणें प्रसिद्धि करण्यासाठीं साक्षेपानें जें तप करतात, त्याचें फल निखालस नाहींसेंच होतें. २४९ ह्याप्रमाणें **अर्जुना!** तें तप करतां करतां निष्फल आहे असें दृष्टीस पडलें कीं, मध्येंच सोडून देतात. ह्मणून त्या तपाला स्थिरता नाहीं. २५० येरवीं तरी, जो आकाशांत भरतो, गर्जना करून ब्रह्मांड दणाणवितो, तो अकाळीं येणारा मेघ, घटकाभर तरी टिकत असतो का? २५१ त्याप्रमाणें राजसतप असतें तें, फळामध्यें निःसंशय फुकट जातें. आणि आचरण्यांतही टिकण्याजोगें नसतें. २५२ आतां तेंच तप तामस रीतीनें केलें असतां, कीर्ति व परलोक ह्यांना कसें मुकवितें तें सांगतों." २५३

मूढग्राहेणात्मनो यत् पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥

[मूढग्राहेणात्मनो यत्] केवळ मूर्खपणाचा वारा । जीवीं घेऊनि धनुर्धरा । नाम ठेविजे शरीरा । वैरीयाचें ॥ ५४ ॥ पंचाग्नीची दंडगी । खोलेंवीजती शरीरालागीं । कां इंधन कीजे हें आगी । आंतु लावी ॥ ५५ ॥ माथां जाळिजती गुगुळ । पाठीं घालिजती गळ । आंग जाळिती इंगळ । जळतभीतां ॥ ५६ ॥ दवडोनि श्वासोश्वास । कीजती वायांचि उपवास । कां घेपती धूमाचे घांस । अधोमुखें ॥ ५७ ॥ हिमोदकें आकंठें । खडकें सेविजती तटें । जितां मासाचे चिमुटे । तोडिती जेथ ॥ ५८ ॥ [पीडया] ऐसी नानापरी हे काया । घाय सूंतां पैं धनंजया । [क्रियते तपः] तप कीजे [परस्योत्सादनार्थं वा] नाशावया । पुढिलातें ॥ ५९ ॥ आंगभारें सुटला धोंडा । आपण फुटोनि होय खंडखंडा । कां आड जालिया तें रगडा । करी जैसा ॥ २६० ॥ तेविं आपलिया आटणिया । सुखें असतया प्राणिया । जिंयावया शिराणिया । कीजती गा ॥ ६१ ॥ [तत्तामससमुदाहृतं] किंबहुना हे वोखटी । घेऊनि क्लेशाची होतवटी । तप निफजे तें किरीटी । तामस होय ॥ ६२ ॥ एवं सत्वादिकाच्या आंगीं । पडिलें तप तिहीं भागीं । जालें तेंही तुज चांगी । दाविलें व्यक्ती ॥ ६३ ॥ आतां बोलतां प्रसंगा । आलें ह्मणोनि पैं गा । करूं रूपदानलिंगा । त्रिविधा तया ॥ ६४ ॥ येथ गुणाचेनि बळें । दानही त्रिविध असे जालें । तेंचि आइक पहिलें । सात्विक ऐसें ॥ ६५ ॥

"**धनुर्धरा!** केवळ मूर्खपणाचा वारा जिवामध्यें घेऊन, शरीराला वैरी असें नांव ठेवून, २५४ पंचाग्नीची तप्तज्वाला शरिराला लावतात. किंवा शरिराला जळण करून आंतही आग पेटवितात. २५५ मस्तकावर गुगुळ जाळतात; पाठीमध्यें गळ घालतात; लांकडाच्या इंगळानें आंग भाजतात; २५६ श्वासोच्छ्वास दवडून व्यर्थ उपास काढतात; किंवा खालीं तोंड करून धुराचे घांस घेतात; २५७ कंठापर्यंत गार पाणी; खडकाळ नदीतट; ज्यांत जिवंत असतांनाच मांसाचे तुकडे काढावयाचे. २५८ **अर्जुना!** अशीं नानातऱ्हेचीं दुःखें सोसून जें तप करावयाचें, तें दुसऱ्याचा नाश करण्याकरितां असतें. २५९ आपल्या आंगाच्या भारानें धोंडा सुटला, ह्मणजे तो स्वतः फुटून तुकडे तुकडे होऊन पुढें येणाराचाही जसा चुराडा करून टाकतो; २६० त्याप्रमाणें आपल्या नाशानें; सुखी असलेले प्राणी जिंकण्याकरितां, त्यास दुःसह पीडा करतात. २६१ किंबहुना **अर्जुना!** अशा वाईट–क्लेशाच्या रूपानें जें तप निर्माण होतें, तें **तामसतप** होय. २६२ अशा प्रकारें सत्वादिकांच्या सांसर्गानें तें तप तीन प्रकारचें होतें. त्याची तुला चांगली फोड करून दाखविली. २६३ आतां बोलतां बोलतां प्रसंगानुसार आलें, ह्मणून दानाचे तीन प्रकार आहेत, त्यांचेंही विवेचन करूं. २६४ येथें गुणांच्या जोरानें दानही तीन प्रकारचें झालेलें आहे.

१ शरीराला वैरी असें समजून. २ तप्त ज्वाला. ३ लावितात. ४ पेटवी. ५ काष्टें. ६ कंठापर्यंत. ७ खडकाळ. ८ नदीतट. ९ दुःखें सोशीत. १० घालितां. ११ इतरांस.

१ नाशानें. २ जिकण्यास, हारी आणण्यास. ३ महत्वासही. ४ वाईट. ५ रीत.

**त्यांतील पहिलें जें सात्विक तें असें आहे. ऐक." २६५**

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ॥ २० ॥

[दातव्यमिति] तरि स्वधर्मा आंतौतें । जें जें मिळेल आपणयातें । तें तें दीजें बहुतें । सन्मानयोगें ॥ ६६ ॥ जालया सुबीजप्रसंग । पडे क्षेत्र वाफेचा पांग । तैसाचि दानाचा हा लाग । देखतसें ॥ ६७ ॥ अनर्घ्य रत्न हाता चडे । तैं भांगारांची वोढी पडे । दोनी जालीं तरी न जोडे । लेतें आंग ॥ ६८ ॥ परि सण सुहृद संपत्ति । ये तिन्ही येकीं मिळती । जैं भाग्य धरी उन्नती । आपुल्याविषीं ॥ ६९ ॥ तैसें निफजवावया दान । जैं सत्वासि ये संवाहन । तैं देश काळ भाजन । द्रव्यही मिळे ॥ २७० ॥ [देशे] तरि आधीं तंव प्रयत्नेंसी । होआवें कुरुक्षेत्र कां काशी । ना तरि तुके जो इहिंसीं । तो देशही हो ॥ ७१ ॥ [काले च] तेथ रविचंद्राहुमेळ । होतां वाहे पुण्यकाळ । कां तयासारिखा निर्मळ । आनही जाला ॥ ७२ ॥ तैशा काळीं तिये देशीं । [पात्रे च] होआवी पात्रसंपत्ती ऐसी । मूर्ति आहे धरिली जैसी । शुचित्वेंचि कां ॥ ७३ ॥ आचाराचें मूळपीठ । वेदांची उतरपेंठ । तैसें द्विजरत्न चोखट । पावोनियां ॥ ७४ ॥ [दीयते] मग तयाच ठाई वित्ता । निवर्तवावी स्वसत्ता । परि प्रियापुढें कांता । रिगे जैसेनि ॥ ७५ ॥ कां जयाचें ठेविलें तया । देउनि होय जे उतराइया । नाना हडपें विडा राया । दिधला जैसा ॥ ७६ ॥ तैसेनि निष्कामें जीवें । भूम्यादिक अर्पावें । किंबहुना हांवे । नेदावें उठों ॥ ७७ ॥ [अनुपकारिणे] आणि दान जया द्यावें । तयातें ऐसेया पाहावें । जया घेतलें नुमचवे । कायसें नाहीं ॥ ७८ ॥ साद घातलिया आकाशा । नेदी प्रतिशब्द जैसा । कां पाहिला आरसा । येरीकडे ॥ ७९ ॥ ना तरी उदकाचिये भूमिके । आफळिलेनि कुंदुकें । उधळौनि फवतिकें । न येइजे हाता ॥ २८० ॥ नाना वसो घातला चारु । मांधा तुरंबिलों बुरु । न करी प्रत्युपकारु । जियापरी ॥ ८१ ॥ तैसें दिधलें दातयाचें । जो कोणेही आंगें नुमजे । अर्पिलया साम्य तयाचें । कीजे पैं गा ॥ ८२ ॥ [तद्दानं सात्विकं स्मृतं] ऐसिया जें सामग्रिया । दान निफजे वीरराया । तें सात्विक दानवर्या । सर्वांही जाण ॥ ८३ ॥ आणि तोचि देश काळ । घडे तैसाचि पात्रमेळ । दानभागही निर्मळ । न्यायगत ॥ ८४ ॥

**"तर स्वधर्मामध्यें जें जें आपणांस मिळेल, तें तें बहुत सन्मानानें द्यावयाचें, २६६ पेरणीचा हंगाम आला, ह्मणजे जमिनीची वाफ तयार असण्याचीच उणीव असते. त्याचप्रमाणें ह्या दानाची गोष्ट असते. २६७ मोलवान् रत्न हातांत पडतें, तेव्हां सोन्याची टंचाई होते; दोन्हीं मिळालीं तर घालणाराचे अवयव मिळत नाहींत. २६८ तसें आपल्याविषयीं दैवाची उन्नति होते तेव्हां, सण, सुहृद, आणि संपत्ति हीं तिन्हीं एकत्र मिळतात. २६९ त्याचप्रमाणें दान उत्पन्न होण्याला जेव्हां सत्वाचें सहाय्य होतें, तेव्हां देश, काल, पात्र आणि द्रव्य ह्यांचीही अनुकूलता होते. २७० तर आधीं प्रयत्नानें कुरुक्षेत्र किंवा काशी येथें जावें. किंवा ह्यांच्या बरोबरीला लागणारा दुसरा कोणताही देश असला तरी चिंता नाहीं. २७१ तेथें सूर्यचंद्रांचें ग्रहण, अशा प्रकारचा पुण्यकाल पहावा. किंवा त्याच्याच सारखी दुसरी पर्वणी पहावी, २७२ अशा कालामध्यें अशा देशांत आणि पात्राचें महत्त्व तर असें पाहिजे कीं, जणों काय निर्मलत्वानेंच अवतार घेतला आहे. २७३ आचाराचें मूळपीठ; वेदांची उतारपेठ; असें द्विजरत्न पाहून, २७४ मग त्याच्या ठिकाणीं वित्त अर्पण करून आपली सत्ता सोडावी. अशी कीं, प्रियापुढें जशी कांता अनुसरते, २७५ किंवा ज्याची ठेव त्याला देऊन उत्तीर्ण व्हावें, किंवा खिसमतगारानें जसा राजाला विडा द्यावा, २७६ त्याप्रमाणें निष्काम अंतःकरणानें भूम्यादिक अर्पण करावें. किंबहुना हावेला उठून सुद्धां देऊं नये. २७७ आणखी दान ज्याला द्यावें, त्याच्याकडे अशा रीतीनें पहावें कीं, कोणत्याही रीतीनें त्याचा त्याबद्दल प्रत्युपकार होऊं नये. २७८ आका-**

१ मध्यें, आंत. २ उत्तम बीजाचा समय. ३ शेताला. ४ गरज. ५ प्रसंग, संबंध. ६ मोलवान्. ७ सोन्याची. ८ टंचाई. ९ घालणाऱ्याचे अवयव. १० उत्कर्ष. ११ साह्य. १२ दान देण्यास योग्य, सत्पात्र. १३ सूर्यचंद्रग्रहण. १४ दूर करावी, आपली सत्ता सोडून दान द्यावें. १५ उत्तीर्ण. १६ खिसमतगारानें, विडा देणारानें. १७ केलेलें व दिलेलें मनास नये. १८ पाठीकडून, उलटा. १९ आपटलेल्या. २० चेंडूनें. २१ उसळून. २२ नाहीं तरी. २३ पूजीला. २४ धुरा-कृतघ्न. २५ उपकार न करी.

१ दातृत्वाभिमान नाहीं. २ श्रेष्ठ. ३ शास्त्रास अनुसरून.

शाला हाक मारिली असतां, तें जसा प्रतिशब्द देत नाहीं; किंवा उलट्या आरशांत पाहिलें असतां कांहीं फलश्रुति होत नाहीं, २७९ किंवा पाणथळ जमिनींत चेंडू फेंकला असतां, तो उडून कधींही परत हातांत येत नाहीं. २८० किंवा चारा घातलेला वसु; शिरसावंद्य केलेला कृतघ्न; ज्याप्रमाणें प्रत्युपकार करीत नाहीं; २८१ त्याप्रमाणें दिलेल्या दात्याचे जो कोणत्याही तऱ्हेनें प्रत्युपकार करणार नाहीं; दिलेलें मनांत सुद्धां येत नाहीं, इतकें ज्याच्या वृत्तीमध्यें साम्य; २८२ हे **वीरश्रेष्ठा!** अशा **सात्त्विक** सामग्रीनें जें दान करणें, तें सर्वांत श्रेष्ठ असें **दान** होय. २८३ आणि देश, काल, तसाच पात्राचा मेळ, हीं सर्व शास्त्रास अनुसरून असल्यामुळें, तो दानभागही निर्मळ होतो." २८४

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।
दीयते च परिक्लिष्टं तद्राजसमुदाहृतम् ॥ २१ ॥

[यत्तु प्रत्युपकारार्थं] परि मनीं धरूनि दुभतें । चारिजे जेविं गाईतें । कां पेंव करुनि आइतें । पेरूं जायिजे ॥ ८५ ॥ नों ना दिठी घालूनि आहेरा । अवंतूं जाइजे सोयिरा । कां वाण धाडिजे घरा । वोवसीयाचे ॥ ८६ ॥ पैं कैळांतर गांठीं बांधिजे । मग पुढिलाचें काज कीजे । पूंजा घेऊनि रस दीजे । पीडितांसि ॥ ८७ ॥ तैसें जया जें दान देणें । तो तेणेंचि गा जीवनें । पुढती भजावा भावें येणें । दीजे जें कां ॥ ८८ ॥ [फलमुद्दिश्य वा पुनः] अथवा कोणी वाटे जातां । घेतलें उमचों न शकता । मिळे जैं पंडुसुता । द्विजोत्तम ॥ ८९ ॥ तरी कवड्या एकासाठीं । अशेषां गोत्रांचीच किरीटी । सर्व प्रायश्चित्तें सुये मुठी । तयाचिये ॥ २९० ॥ तेविंचि पारलौकिकें । फळें वांछिजती अनेकें । [दीयते च] आणि दीजे तरी भुंके । येकाही नोहे ॥ ९१ ॥ [परिक्लिष्टं] तेंही ब्राह्मण नेवों सरे । कीं हाणिचेनि शिणें झांसुरे । सर्वस्व जैसें चोरें । नागऊनि नेलें ॥ ९२ ॥ [तद्राजसमुदाहृतं] काय बहु सांगों सुमती । जें दीजे या मनोवृत्ती । तें दान गा त्रिजगतीं । राजस पैं ॥ ९३ ॥

१ किंवा. २ आमंत्रण करूं. ३ व्रत करणाराच्या. ४ व्याज. ५ द्रव्य. ६ काढा. ७ आश्रयानें. ८ प्रत्युपकार करूं न शकणारास. ९ हातावर घाली. १० भुकेपुरती. ११ स्वस्थ बसे, झुरे.

"तसेंच मनांत दुभतें धरून नव्या गायीस चारावें, किंवा पेंव तयार करून पेरावयास जावें, २८५ किंवा अहेरावर दृष्टि ठेवून, सोयऱ्याला आमंत्रण करावयास जावें, किंवा व्रत करणाऱ्याच्या घराला जसें वाण लावून द्यावें; २८६ व्याज गांठीला बांधावें आणि मग दुसऱ्याचें काम करावें. किंवा द्रव्य घेऊन व्याधिग्रस्ताला औषध द्यावें, २८७ त्याप्रमाणें ज्याला दान देणें तो त्या दानाच्याच आश्रयानें पुढें आपल्या उपयोगीं पडावा अशा हेतूनें जें देणें; २८८ अथवा **अर्जुना!** कोणी वाटेनें जातांना घेतलेलें परत देण्याचें ज्यास सामर्थ्य नाहीं, असा उत्तम ब्राह्मण प्राप्त झाला, २८९ तर **किरीटी!** एका कवडीसाठीं झाडून साऱ्या कुळाचीं सुद्धां प्रायश्चित्तें त्याच्या हातावर घालतो. २९० आणखी त्यापासून परलोकांतील अनेक फळें प्राप्त व्हावींत अशीही पण इच्छा धरावयाची. आणि प्रायश्चित्तें द्यावयाचीं तीं किती? तर त्या ब्राह्मणाला एका भुकेलाही पुरतें पुरूं नये! २९१ वरें तें तरी ब्राह्मण घेऊन जाऊं लागला ह्मणजे मोठी हानि झाल्याचें दुःख मानून झुरत बसतो. जणों काय सर्वस्व चोरांनीच नागविलें! २९२ हे **सुमति!** फार काय सांगावें? अशा मनोवृत्तीनें जें दान देणें, त्याला त्रिभुवनामध्यें **'राजसदान'** असें ह्मणतात." २९३

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

[अदेशे-] मग म्लेंछाचे वैसौटे । दांगाणे हन कैकटे । कां शिबिरें चोहटे । नगरींचे ते ॥ ९४ ॥ [अकाले] तेही तेही ठाईं मिळणी । समय सांजवेळ कां रजनी । [यद्दानं] तेव्हां उदार होणें धनीं । चोरियेच्या ॥ ९५ ॥ [अपात्रेभ्यश्च] पात्रें भाट नॉंगारी । सामान्य स्त्रिया कां जुवारी । जियें मूर्तिमंतें भुररीं । भुले तयां ॥ ९६ ॥ नृत्याची पुरवणी । ते पुढां डोळे भॉंरणी । गीतें भाटींव तो श्रवणीं । कर्णजप ॥ ९७ ॥

१ स्थानीं. २ अरण्यें. ३ अपवित्र भूमि. ४ तंबू. ५ त्या त्याही. ६. लूट. ७ गारुडी. ८ वेश्या. ९ चेटकें. १० नेत्रसुख. ११ स्तुति.

तयाहीवरी अळुमाळ । जैं घे फुलागंधाचा गुगुळ । तंव भ्रमाचा तो वेताळ । अवतरे तैसा ॥ ९८ ॥ [असत्कृतं] तेथ विभांडूनियां जग । आणिले पदार्थ अनेग । तेणें घालूं लागे मातंग । गवादीसि ॥ ९९ ॥ [दीयते] एवं ऐसेनि जें देणें । तें तामसदान मी ह्मणें । [अवज्ञातं] आणि घडे दैवगुणें । आणिकही ऐक ॥ ३०० ॥ विपार्यें घुणाक्षर पडे । टाळिये कावळा सांपडे । तैसें तामसां पर्व जोडे । पुण्यदेशीं ॥ १ ॥ तेथ देखोनि तो आथिला । योग्य मार्गोंही आला । तोही दर्पा चढला । भांबावे जरी ॥ २ ॥ तरी श्रद्धा न धरी जीवीं । तया माथाही न खालवी । स्वयें न करी ना करवी । अर्घ्यादिक ॥ ३ ॥ आलिया न घली बैसों । तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो । हा अप्रसंग कीर असो । तामसीं नरीं ॥ ४ ॥ पैं बोळविजे रिणाइत । तैसा झंकवी तयाचा हात । तूं करणें याचा बहुत । प्रयोग तेथ ॥ ५ ॥ आणि जया जें दे किरीटी । तयातें उंमाणी तयासाठीं । मग कुंबोलें कां लोटी । अवज्ञेच्या ॥ ६ ॥ [तत्तामसमुदाहृतं] हें बहु असो यापरी । मोल वेंचणें जें अवधारीं । तया नांव चराचरीं । तामस दान ॥ ७ ॥ ऐसें आपुलाल्या चिन्हीं । अळंकृतें तिन्हीं । दानें दाविलीं अभिधानीं । राजतनया ॥ ८ ॥ [श्रीभगवानित्याद्येकविंशतिश्लोकाभिप्राय:] तेथ मी जाणत असें । विपांयें तूं गा ऐसें । कल्पिसील मानसें । विचक्षणा ॥ ९ ॥ जे भवबंधमोचक । येकलें कर्म सात्विक । तरी कां वेखासीं सदोख । येर बोलावीं ॥ ३१० ॥ परि नोसंतितां विवसी । भेटी नाहीं निधीसी । कां धूं न साहतां जैसी । वाती न लगे ॥ ११ ॥ तैसें शुद्धसत्वाआड । आहे रजतमाचें कवाड । तें भेदणेयातें कीडें । ह्मणावें कां ॥ १२ ॥ आह्मीं श्रद्धादिदानांत । जें समस्तही क्रियाजात । सांगीतलें कां व्याप्त । तिहीं गुणीं ॥ १३ ॥ तेथ भरवसेनि तिन्ही । न सांगोंचि ऐसें मानीं । परि सत्व दावाया दोन्हीं । बोलिलों येरें ॥ १४ ॥ जें दोहींमाजि तिजें असे । तें दोहीं सांडितांचि दिसे । अहोरात्रत्यागें जैसें । संध्यारूप ॥ १५ ॥ तैसें रजतमविनासें । तिजें जें उत्तम दिसे । तें सत्व हें आपैसें । फोवासि ये ॥ १६ ॥ एवं दावावया सत्व तुज । निरूपिलें तम रज । तें सांडूनि सत्वें काज । साधीं आपलें ॥ १७ ॥ सत्वेंचि येणें चोखांळें । करीं यज्ञादिकें सकळें । पावसी तैं करतळें । आपलें निजें ॥१८॥ सूर्यें दाविलें सातें । काय एक न दिसे तेथें । तेविं सत्वें केलें फळातें । काय नेदी ॥ १९ ॥ हे कीर आवडतांविखीं । शक्ति सत्वीं आथि निकी । परि मोक्षेंसी एकी । मिसळणें जें ॥ ३२० ॥ तें एक आनचि आहे । तयाचा सावावो जैं लाहे । तैं मोक्षाचाही होये । गांवीं सरतें ॥ २१ ॥ पैं भांगार जऱ्हीं पंधरें । तऱ्ही राजावळीचीं अक्षरें । लाहे तैंचि सरें । जियापरी ॥ २२ ॥ स्वच्छें शीतळें सुगंधें । जळें होती सुखप्रदें । परि पवित्रत्व संबंधें । तीर्थाचेनि ॥ २३ ॥ नैयी होकां भलतैसी थोरी । परि गंगा जैं अंगिकारी । तैंचि तिये सागरीं । प्रवेश गा ॥ २४ ॥ तैसें सात्विका कर्मा किरीटी । येतां मोक्षाचिये भेटी । न पडे आडकाठी । तें वेगळें आहे ॥ २५ ॥ हा बोल आयकतखेवीं । अर्जुना आधि न माये जीवीं । ह्मणे देवें कृपा करावी । सांगावें तें ॥ २६ ॥ तेथ कृपाळुचक्रवर्ती । ह्मणे आईक तयाची व्यक्ती । जेणें सात्विक तें मुक्ती । रत्न देखे ॥ २७ ॥

“तसेंच म्लेंच्छांची जागा असेल तेथें; अरण्यांत; अमंगळ ठिकाणीं; तंबूंत; शहरांतल्या चव्हाट्यावर; २९४ त्या त्या ठिकाणीं आणखी दाटी; वेळ तर अशी कीं करकरीत संध्याकाळ किंवा रात्र; अशा वेळीं उदार व्हावयाचें; आणि तें कशानें? तर चोरीच्या द्रव्यानें! २९५ आणखी सत्पात्रें कोणतीं? भाट, गारोडी, वेश्या, किंवा जुगारी अशीं मूर्तिमंत भुतें–ह्यांना पाहून भुलतो. २९६ नाचाचा पुरवठा हें डोळ्यांचें मोठें सुख; स्तुतिपाठ, गाणें हा कानांतला जप; २९७ आणखी त्याच्यावर थोडासा जेव्हां पुष्पगंधाचा धूप घेतो, तेव्हां जणों काय भ्रमाचा वेताळच अवतार घेऊन आला आहे असें वाटतें. २९८ तेव्हां जगाला लुबाडून अनेक पदार्थ आणलेले असतात त्यांचें मांगानें घातल्याप्रमाणें अन्नछत्र घालूं लागतो. २९९ एवंच अशा प्रकारचें जें देणें, त्याला मी ‘**तामसदान**’ असें ह्मणतों. आणखी दैवयोगानें निराळाही प्रकार होतो. पेक. ३०० एखादे वेळेला चुकून किड्यानें पोखरलेल्या लांकडांवर अक्षरांची आकृति पडावी; टाळी वाजवितांना कावळा सांपडावा; त्याप्र-

१ थोडासा. २ पराभवून. ३ मांग. ४ अन्नछत्रास. ५ किड्यानें लांकूड पोखरलें ह्मणजे अक्षरासारखें दिसतें तें. ६ कावळा. ७ श्रीमान्. ८ विशेषत्व. ९ जुगारी. १० बजावी, अपमान करी. ११ दुष्ट शब्दांनीं. १२ कदाचित्. १३ बुद्धिवंता. १४ आडेवेडे घेऊन. १५ न निवारितां. १६ समंध. १७ धूर. १८ हीनकस, वाईट. १९ प्राप्त होतें. २० शुद्ध. २१ स्वरूप.

१ असतां. २ सर्वथोपरी, पाहिजे त्याविषयीं. ३ साह्य. ४ बंग. ५ नदी. ६ विघ्न. ७ ऐकतांच. ८ मनोव्यथा. ९ दयेचा सार्वभौम.

माणें तामसालाही एखादे वेळीं पुण्यस्थल मिळतें; आणि पर्वणीही पण आलेली असते. ३०१ अशा वेळीं तो श्रीमान् आहे असें समजून कोणी योग्य सत्पात्र पुरुष मागावयालाही येतो. त्या वेळीं तोही गर्वाला चढून तार लागली, ३०२ तर अंतःकरणांत श्रद्धा धरावयाची नाहीं; त्याला मस्तक नम्र करावयाचें नाहीं; अर्घ्यादिक पूजन आपणही करावयाचें नाहीं, व दुसऱ्याकडूनही करवावयाचें नाहीं. ३०३ आलेल्याला बसावयाला सुद्धां घालावयाचें नाहीं, मग गंधाक्षतांत विशेष तें काय? तामस नरानें असें करणें ह्मणजे खरोखर अप्रसंगच तो. तो असूं द्या. ३०४ देणेंकऱ्याला जसा बोळवावा, त्याप्रमाणें त्याचा हात झुगारावयाचा. त्याच्या हातावर तुरी द्यावयाच्या! आणखी अरेतुरेचा प्रसंग तेथें फार. ३०५ आणखी **किरीटी!** ज्याला द्यावयाचें, त्याच्यासाठीं त्याचा अपमान करावयाचा. आणि वेडेवांकडे शब्द बोलून त्याला घालवून द्यावयाचें! ३०६ आतां पाल्हाळ पुरे. अशा प्रकारें चराचरामध्यें जें द्रव्य खर्च करणें, त्याचें नांव **'तामसदान'** हें लक्ष्यांत ठेव. ३०७ हे **राजपुत्रा!** अशीं आपआपल्या लक्षणांनीं अलंकारयुक्त झालेलीं तिन्हीं दानें तुला नामासहवर्तमान दाखवून दिलीं. ३०८ तेव्हां हे **बुद्धिमंता!** मला हेंही कळतें कीं, तूं कदाचित् मनामध्यें अशीही कल्पना बांधशील, ३०९ कीं, भवबंधांतून सोडविणारें एक सात्विक कर्मच आहे. मग इतर जीं दोषयुक्त आहेत, तीं मुद्दाम कशाला सांगावींत? ३१० परंतु समंधाला बाजूला सारल्यावांचून डबोलें पहावयाला मिळत नाहीं; किंवा धूर सहन केल्याशिवाय वात लागत नाहीं; ३११ त्याप्रमाणें शुद्धसत्वाच्या आड रजाचीं आणि तमाचीं दारें असतात. तीं बाजूस सारणें वाईट असें ह्मणतां येईल काय? ३१२ आह्मीं श्रद्धादान इत्यादिक झाडून साऱ्या क्रिया सांगितल्या. ह्याचें कारण त्या तिन्ही गुणांनीं व्याप्त असतात. ३१३ नाहीं तर त्या तिन्ही खरोखरच सांगितल्या नसत्या हें पक्कें समज. परंतु सत्व दाखविण्यासाठीं बाकीचीं सांगितलीं. ३१४ दोहोंच्या मध्यें जें तिसरें असतें, तें, दोन बाजूस सारलीं कीं दिसूं लागतें. दिवस आणि रात्र सोडली कीं, जसें संध्याकाळचें स्वरूप दिसूं लागतें; ३१५ त्याप्रमाणें रज, तम, दूर सारलें ह्मणजे तिसरें स्पष्ट दिसूं लागतें. आणि सत्व तें आपोआप प्राप्त होतें. ३१६ अशा प्रकारें तुला सत्व दाखविण्यासाठीं रज, तम सांगितलें. तें सोडून देऊन सत्वानें तूं आपलें काम करून घे. ३१७ ह्याच शुद्धसत्वानें यज्ञादिक सर्व कर; ह्मणजे हां हां ह्मणतां आपल्या स्वरूपाला पोंचशील. ३१८ सूर्यानें दाखविलें ह्मणजे मग काय काय ह्मणून दिसत नाहीं? त्याप्रमाणें सत्व प्राप्त झालें असतां, काय काय होणार नाहीं? ३१९ ही शक्ति सत्वामध्यें पाहिजे त्याविषयीं आहे, ही गोष्ट खरी. परंतु एका मोक्षाला जें मिळणें, ३२० तें मात्र एक निराळें आहे. त्याचें जर सहाय मिळेल, तर मोक्षाच्या गांवांतही तें वंद्य होईल. ३२१ सोनें पंधरांच्या दराचें जरी असलें, तरी राजहस्ताचीं अक्षरें पडतील तेव्हांच त्याला ज्याप्रमाणें श्रेष्ठत्व येतें, ३२२ स्वच्छ, शीतळ, सुगंध, अत्यंत सुखप्रद अशीं उदकें असतात, तरी त्यांना पवित्रत्व येणें तें तीर्थाच्या संबंधानेंच येतें. ३२३ नदी केवढीही मोठी असो; गंगा जेव्हां तिचा अंगीकार करील, तेव्हांच तिचा सागरांत प्रवेश होईल. ३२४ त्याप्रमाणें **अर्जुना!** सात्विककर्म मोक्षाच्या भेटीला येतांना मध्यें आडकाठी असते, ती निराळीच आहे." ३२५ हें भाषण ऐकतांच **अर्जुनाचा** मनोविकार अंतःकरणांत राहिनासा झाला. तो ह्मणाला "देवांनीं कृपा करावी, आणि तेवढें सांगावें." ३२६ तेव्हां दयेचा सार्वभौम जो **श्रीकृष्ण** तो ह्मणाला "ज्याच्या योगानें सात्विकमुक्तिरत्न पहावयास सांपडतें, त्याचें स्पष्टीकरण ऐक." ३२७

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥

[ब्रह्मणः] तरि अनादि परब्रह्म। जें जगदादि विश्रामधाम। तयाचें एक नाम। त्रिधा पैं असे ॥ ३२८ ॥ तें कीर अनाम अजाती। परि अविद्यावर्गाचिये राती- । माजि वोळखावया श्रुती। खूण केली ॥ २९ ॥ [निर्देशः] उपजलिया बाळकासी। नांव नाहीं तयापाशीं। ठेविलेनि नांवेंसी । ओ देत उठी ॥ ३३० ॥ कष्टले संसारशिणें । जे देवो येती गाऱ्हाणें । तयां ओ दे नांवें जेणें । तो संकेतें हा ॥ ३१ ॥ ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैतत्वें तो भेटावा। ऐसा मंत्र देखिला कणवा। वेदें बापें ॥ ३२ ॥ मग दाविलेनि जेणें एकें। ब्रह्म आळविलें कवतिकें। मांगा असत ठाके। पुढां उभें ॥ ३३ ॥ परि निगमाचळशिखरीं। उपनिषदार्थ नगरीं। आहाति जे ब्रह्माच्या येकांहारीं । तयांसीच कळे ॥ ३४ ॥ हेंही असो प्रजापती। शक्ति जे सृष्टि करिती। ते जया एका आवृत्ती। नामाचिये ॥ ३५ ॥ [पुरा] पैं सृष्टीचिया उपक्रमा। पूर्वी गा वीरोत्तमा। वेडा ऐसा ब्रह्मा । एकला होता ॥ ३६ ॥ मज ईश्वरातें नोळखे। ना सृष्टीही करूं शके। तो थोर केला एकें। नामें जेणें ॥ ३७ ॥ [त्रिविधः स्मृतः] जयाचा अर्थ जीवीं ध्यातां। जें वर्णत्रयचि जपतां। विश्वसृजनयोग्यता। आली तया ॥ ३८ ॥ [ब्राह्मणास्तेन वेदाश्च] तेधवां रचिले ब्रह्मजन। तयां वेद दिधले शासन। यज्ञा ऐसें वर्तन । जीविके केलें ॥ ३९ ॥ [विहिताः] पाठीं नेणों किती येर । सृजिले लोक अपार। जाले ब्रह्मदत्त अग्रहार । तिन्हीं भुवनें ॥ ३४० ॥ ऐसें नाममंत्रें जेणें। धोतया अंढळचि करणें। तयाचें स्वरूप आईक ह्मणे। श्रीकांत तो ॥ ४१ ॥ [ओं तत्सदिति] तरि सर्वमंत्रांचा राजा । तो प्रणव आदिवर्ण वुझा । आणि तत्कार दुजा । तिजा सत्कार ॥ ४२ ॥ एवं ओं-तत्सदाकार । ब्रह्मनाम हें त्रिःप्रकार । हें फुल तुरंबी सुंदर । उपनिषद तें ॥ ४३ ॥ येणेंसीं गा होऊनि एक । जें कर्म चाले सात्विक । तें कैवल्यातें पाइक। घरिचें करी ॥ ४४ ॥ परि कापुराचें थीळेंवें। आणुनि देईल दैव। लेवों जाणणेंचि अंडव। तेथ असे बापा ॥ ४५ ॥ तैसें आदरिजेल सत्कर्म । उच्चरिजेल ब्रह्मनाम । परि नेणिजेल जरि वर्म । विनियोगाचें ॥ ४६ ॥ तरि महंताचिया कोडी । घरा आलियाही वोढी । मानूं नेणता पैरवडी । मुदल तुटे ॥ ४७ ॥ कां त्यांवया चोखट । टीक भांगार एकवट । घालूनि बांधली मोट । गळां जेवीं ॥ ४८ ॥ तैसें तोंडीं ब्रह्मनाम । हातीं तें सात्विक कर्म । विनियोगेंवीण काम । विफळ होय ॥ ४९ ॥ अगा अन्न आणि भूक । पासीं असे परि देख। जेऊं नेणतां बाळक । लंघनचि कीं ॥ ३५० ॥ कां स्नेह सूत्र वैश्वानरा । जालियाही संसारा । हातवटी नेणतां वीरा। प्रकाश नोहे ॥ ५१ ॥ तैसें वेळे कृत्य पावे। तेथिंचा मंत्रही आठवे। परि व्यर्थ तें आघवें। विनियोगेंवीण ॥ ५२ ॥ ह्मणौनि वर्णत्रयात्मक। जें हें परब्रह्मनाम एक। विनियोग तूं आइक। याचा आतां ॥ ५३ ॥

"तर अनादि जें परब्रह्म; जें जगतादिकांचें विश्रांतिस्थान; त्याचें नांवही तीन प्रकारचें आहे. ३२८ खरोखर त्याला नामही नाहीं, आणि जातिही नाहीं; परंतु अविद्यावर्गाच्या रात्रीमध्यें त्याला ओळखण्याकरितां वेदानें एक खूण केलेली आहे. ३२९ बालक जन्माला आलें तर त्याच्यापाशीं कांहीं नांव असत नाहीं. तें ठेवलेल्या नांवानें 'ओ' देत उठतें. ३३० तद्वत् संसारकष्टानें कष्ट पावून जें गाऱ्हाणें सांगावयाला येतात, त्याला ज्या नांवानें तें 'ओ' देतें, त्याची ही खूण आहे. ३३१ 'ब्रह्माचें मौन नाहींसें व्हावें; तें अद्वैतभावानें भेटावें; अशा प्रकारचा, वेदानें कृपाळू होऊन हा श्रेष्ठ मंत्र निवडून काढला आहे. ३३२ ह्मणून तो एक दाखविला असतां, व त्यानें ब्रह्मास आनंदानें हाक मारिली असतां, तें मागें असूनही पुढें येऊन उभें राहतें. ३३३ परंतु वेदपर्वताच्या शिखरावर, उपनिषदार्थाच्या नगरांत जे ब्रह्माच्या एका पंक्तीला बसलेले आहेत, त्यांनाच कळतें. ३३४ हेंही असो. ब्रह्मदेवाला जी सृष्टि करण्याची शक्ति आलेली आहे, ती ह्या एका नामाच्या अनुष्ठानानेंच आलेली आहे. ३३५ हे वीरश्रेष्ठा! ह्या सृष्टिक्रमाच्या आरंभीं ब्रह्मदेव हा एकटाच

१ विश्रांतिस्थान. २ नामजातिरहित. ३ खूण. ४ अनिर्वाच्यपण. ५ कृपेनें. ६ वेद हाच पर्वत त्याचे शिखरावर. ७ पंक्तीस. ८ अनुष्ठानानें, उच्चारानें. ९ आरंभाच्या. १० उत्पत्ति करण्याचें सामर्थ्य. ११ ब्राह्मण. १२ आज्ञा. १३ निर्वाहासाठीं. १४ इनाम. १५ ब्रह्मदेवाला. १६ श्रेष्ठ. १७ ओंकार. १८ समजा. १९ हुंगी. २० चाकर. २१ अलंकार. २२ अडथळा.

१ व्यवस्थेचें. २ कोटी. ३ ओढीनें. ४ प्रकार. ५ पुण्याचा क्षय होई. ६ अलंकारविशेष, टीका. ७ सोनें. ८ तेल, वात व आग. ९ मेळणी.

वेड्यासारखा बसलेला होता. ३३६ मला ईश्वरालाही ओळखीत नव्हता. आणि सृष्टि उत्पन्न करण्याचेंही त्याला सामर्थ्य नव्हतें. त्याला ज्या एका नांवानेंच थोरपणाला चढविलें; ३३७ त्याच्या अर्थाचें अंतःकरणांत ध्यान केलें; त्या तीन अक्षरांचा जप केला; तेव्हांच त्याला विश्वाची उत्पत्ति करण्याचें सामर्थ्य आलें. ३३८ मग त्यानें ब्राह्मण उत्पन्न केले; त्यांना वेदाची आज्ञा दिली; यज्ञाप्रमाणेंच उपजीविकेचींही साधनें उत्पन्न केलीं. ३३९ त्यांच्या पाठीमागून कितीतरी अपार लोक निर्माण केले! त्यांची गणति नाहीं. हीं सारीं त्रिभुवनें, ब्रह्मदेवानें दिलेलीं इनामेंच आहेत." ३४० **श्रीकांत** ह्मणतात "अशा प्रकारें ज्या नाममात्राच्या योगानें ब्रह्मदेवालाही श्रेष्ठ करून सोडलें, त्याचें स्वरूप ऐक. ३४१ तर पहिला वर्ण जो ओंकार, तो सर्व मंत्रांचा राजा समजावा. आणखी तत् शब्द हा दुसरा, व सत् शब्द हा तिसरा. ३४२ अशा प्रकारें ओं–तत्–सत्–ह्या आकारानें ब्रह्माचें नांव तीन प्रकारचें झालें आहे. हें सुंदर फूल, उपनिषदही हुंगित असतें. ३४३ ह्याच्याशीं ऐक्यता पावून जेव्हां सात्विककर्म चालतें, तेव्हां तें कैवल्याला–मोक्षाला–आपल्या घरचा चाकर करून सोडतें. ३४४ पण बाबा! कापराचे अलंकारही प्रारब्ध आणून देईल. पण घालावयाचें माहित असणें, हीच तेथें अडचण असते. ३४५ त्याप्रमाणें सत्कर्म केलें; ब्रह्मनामाचा उच्चार केला; पण व्यवस्थेचें–विनियोगाचें–वर्म जर माहित नसेल, ३४६ तर महंताच्या कोटि अगत्यानें घरीं आल्या असून सत्कार करावयाचा जर माहित नसेल, तर पुण्याचा क्षय होईल. ३४७ किंवा शोभेकरितां टिका आणि सोनें एके ठिकाणीं बांधून मोट करून जशी गळ्यांत घालावी, ३४८ त्याप्रमाणें मुखामध्यें ब्रह्माचें नांव; हातांमध्यें सात्विककर्म असलें तरी, विनियोगाशिवाय–व्यवस्थेशिवाय–निष्फल होय. ३४९ अरे! अन्न आणि भूक दोन्हीही जवळच असतात; परंतु मुलाला जेवावयाचें माहित नसेल तर, लंघनच घडतें. ३५० किंवा हे **वीरा!** तेल, वात, आणि विस्तव एके ठिकाणीं असलीं तरी, हस्तकौशल्य नसेल तर, प्रकाश उत्पन्न व्हावयाचा नाहीं. ३५१ त्याप्रमाणें वेळेला कृत्यही सिद्ध होतें; तेथचा मंत्रही आठवतो; पण विनियोगाशिवाय तें सारें व्यर्थ होतें. ३५२ ह्मणून तीन अक्षरांनीं युक्त जें हें एक परब्रह्माचें नांव आहे, त्याचा आतां तूं विनियोग ऐक." ३५३

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।
प्रवर्तंते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥२४॥

[ब्रह्मवादिनां] तरि या नामीचीं अक्षरें तिन्हीं । कर्मा आदि मध्य निदानीं[1] । प्रयोजावीं[2] पैं स्थानीं । इहीं तिन्हीं ॥ ५४ ॥ हेचि एकी हातवटी । घेउनी हन किरीटी । आले ब्रह्मविद[3] भेटी । ब्रह्माचिये ॥ ५५ ॥ ब्रह्मेसीं होआवया एकी । ते न वंचती[4] यज्ञादिकीं । जें चावळलें[5] वोळखी । शास्त्रांचिया ॥ ५६ ॥ [तस्मादोमित्युदाहृत्य] तो आदि तंव ओंकार । ध्यानें करिती गोचर[6] । पाठीं आणिती उच्चार । वाचेही तो ॥ ५७ ॥ तेणें ध्यानें प्रकटें । प्रणवोच्चारें स्पष्टें । लागती मग वाटे । क्रियांचिये ॥ ५८ ॥ आंधारीं अभंग दिवा । आडवीं समर्थ बोळांवा । तैसा प्रणव जाणावा । कर्मारंभीं ॥ ५९ ॥ [यज्ञ–] उचितदेवोद्देशें । द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें । द्विजद्वारा हन हुताशें । यजिती पैं ते ॥ ॥ ३६० ॥ आहवनीयादि[8] वन्हीं । निक्षेपरूपीं हवनीं । यजिती पैं विधानीं । फुंडे[9] होउनी ॥ ६१ ॥ किंबहुना नाना याग । निष्पत्तीचें घेउनी अंग । करिती नावडतेया त्याग । उपाधीचा[10] ॥ ६२ ॥ [दान–]कां न्यायें जोडला पवित्रीं । भूम्यादिकीं स्वतंत्रीं । देशकाळशुद्ध पात्रीं । देती दानें ॥ ६३ ॥ [तपः–] अथवा ऐकांतरा[11] कृच्छ्रीं । चांद्रायणें मासोपवासीं । शोधोनि गा धातुराशी । करिती तपें ॥ ६४ ॥ एवं यज्ञदान तपें । जियें गाजती बंधरूपें । तिहींच होय सोपें । मोक्षाचें तयां ॥ ६५ ॥ ऐथेळीं[12] नावा[13] जिया दाटिजे[14] । जळीं तियाचि जेवीं तरिजे । तेवीं बंधकीं कर्मीं सुटिजे । नामें येणें ॥ ६६ ॥ परि हें असो ऐसिया । [क्रियाः] या

---

१ शेवटीं. २ योजावीं. ३ ब्रह्मज्ञानी. ४ त्यागिती. ५ बोललें. ६ प्रत्यक्ष. ७ सोबती. ८ आहवनीय, दक्षिणाग्नि व गार्हपत्य हे अग्निहोत्राचे तीन अग्नि. ९ दक्ष. १० अहंकृतीचा. ११ एक दिवस मध्यें सोडून भोजन करणें. १२ कढेस. १३ नौका. १४ भरून राहिलेल्या.

यज्ञदानादिक्रिया । [प्रवर्तंते विधानोक्ताः सततं] ओंकारें सावायिलिया । प्रवर्तती ॥ ६७ ॥ तिया मोटकिया जेथ फळीं । रिगों पाहाती निहाळीं । प्रयोजिती तिये काळीं । तच्छब्द तो ॥ ६८ ॥

"तर ह्या नामांतील तिन्ही अक्षरांची कर्माच्या आदि, मध्यें व अंतीं ह्या तिन्ही ठिकाणांवर योजना करावी. ३५४ हे **किरीटी!** हीच एक हातवटी–युक्ति–साधून ब्रह्मज्ञानी आहेत ते, ब्रह्माच्या भेटीला आले. ३५५ ते ब्रह्माशीं ऐक्यरूप होण्याकरितां, ज्यांनीं शास्त्रांची ओळख करून घेतली, ते यज्ञांचा त्याग करीत नाहींत. ३५६ आधीं ओंकार आहे तो, ध्यानानें प्रत्यक्ष पहातात; आणि मग तोच उच्चार वाणीमध्येंही आणतात. ३५७ नंतर त्या ध्यानानें प्रत्यक्ष झालेल्या, व ओंकाराच्या उच्चारानें स्पष्ट झालेल्या क्रियांच्या वाटेला लागतात. ३५८ अंधारामध्यें अखंड दिवा; अरण्यामध्यें समर्थ सोबती; त्याप्रमाणें कर्मारंभामध्यें ओंकार आहे हें ध्यानांत ठेव. ३५९ नंतर ते धर्मानें मिळविलेलीं अनेक द्रव्यें, उचित देवाच्या उद्देशानें ब्राह्मणद्वारा अग्नीमध्यें अर्पण करतात. ३६० आहवनीय* आदिकरून अग्नीमध्यें, निक्षेपरूप–ब्रह्मार्पण–हवनानें मोठ्या दक्षतेनें विधिप्रमाणें होम करतात. ३६१ किंबहुना नाना यज्ञनिष्पत्तीचें स्वरूप घेऊन (निमित्तानें) नावडत्या उपाधीचा–अहंकाराचा त्याग करतात. ३६२ किंवा न्यायानें मिळविलेली पवित्र भूमी आदिकरून स्वसत्तेचीं अशीं, देश काल शुद्धी पाहून दानें देतात. ३६३ किंवा एक दिवसाआड भोजन करून, किंवा चांद्रायण मासाचीं उपोषणें करून धातुराशी शुद्ध करून, तपें करतात. ३६४ अशा प्रकारचीं यज्ञ, दान, तपें, जीं बंधनाचीं स्वरूपें म्हणून गाजतात, तेणेंकरूनच त्यांना मोक्ष सोपा होतो. ३६५ तीराला ज्या नावा भरून राहिलेल्या असतात, त्याच नावांनीं ज्याप्रमाणें पाण्यांतून तरून जातां येतें, त्याप्रमाणें ह्या नामाच्या योगें करून बद्धक कर्मांतूनही सुटतां येतें. ३६६ पण हें असो. अशा ह्या यज्ञदानादिक क्रिया, ओंकाराच्या योगेंकरून यथासांग झाल्या म्हणजे ३६७ त्या थोड्याबहुत जेव्हां फळामध्यें जाऊं लागतात, तेव्हां पहा! तत् शब्द जो आहे त्याची योजना करतात." ३६८

तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ।
दानक्रियाश्च विविधाः क्रियंते मोक्षकांक्षिभिः २५

[तदिति] जें सर्वांही जगापरौतें । जें एक सर्वेंही देखतें । जें तच्छब्दें बोलिजेतें । पैल वस्तु ॥ ६९ ॥ [दानेति] ते सर्वादिकत्वें चित्तीं । तद्रूप ध्याउनियां सुमती । उच्चारेंही व्यक्ती । आणिती पुढती ॥ ३७० ॥ म्हणती तद्रूपा ब्रह्मा तया । फळेंसीं क्रिया इया । तेचि होतु आह्मां भोगावया । कांहींचि नुरो ॥ ७१ ॥ ऐसेनि तदात्मकें ब्रह्में । तेथ उगाणूनि कर्में । आंग झाडिती नमेमें । येणें बोलें ॥ ७२ ॥ आतां ओंकारें आदरिलें । तत्कारें समर्पिलें । इया रिती जया आलें । ब्रह्मत्व कर्मा ॥ ७३ ॥ तें कर्म कीर ब्रह्माकारें । जालें तेणेंही न सरे । जें करी तेणेंसी दुसरें । आहे म्हणौनि ॥ ७४ ॥ मीठ आंगें जळीं विरे । परि क्षारता वेगळी उरे । तैसें कर्म ब्रह्माकारें । गमे तें द्वैत ॥ ७५ ॥ आणि दुजें जंव जंव घडे । तंव तंव संसारभय जोडे । हें देवो आपलेनि तोंडें । बोलती वेदें ॥ ७६ ॥ म्हणोनि परत्वें ब्रह्म असे । तें आत्मत्वें परियंवसे । सच्छब्द या रिंगादोषें । ठेविला देवें ॥७७॥ तरि ओंकार तत्कारीं । कर्म केलें जें ब्रह्मेशरीरीं । जें प्रशस्तादि बोलवरी । वाखाणिलें ॥ ७८ ॥ प्रशस्तकर्मीं तिये । सच्छब्दा विनियोग आहे । तोचि आइका होये । तैसा सांगों ॥ ७९ ॥

"जें सर्व जगाच्याही पलीकडचें; जें एक असून सर्वांचें प्रकाशक; जें तत् ह्या शब्दानें पलीकडची वस्तु असें सांगतें. ३६९ हे **बुद्धिमंता!** सर्व व्यापकत्वेंकरून त्याचें–ब्रह्माचें–स्वरूप चित्तामध्यें आणून उच्चारानेंही स्पष्ट करून पुढें आणतात. ३७० आणखी, ह्या ज्या क्रिया आहेत, त्या फळासहवर्तमान त्या ब्रह्माशींच

१ सांग झाल्यास. २ अल्प. ३ पहा.

* १ आहवनीय, २ दक्षिणाग्नि, ३ आणि गार्हपत्य, हे अग्निहोत्राचे तीन अग्नि आहेत.

१ पलीकडे, निराळे. २ प्रकाशक. ३ समर्पून. ४ मार्जे नाहीं म्हणून. ५ आपलें तोंड हाच कोणी वेद त्याणें. ६ दुसरेपणें. ७ निदानास पावे. ८ ऋणोद्देशानें. ९ ब्राह्मणदेहीं. १० ऐकण्याजोगा.

**तद्रूप होवोत; आह्मांला भोगावयाला कांहींच न राहो असें ह्मणतात. ३७१ अशा प्रकारें ब्रह्माशीं तद्रूपता पावून तेथेंच सर्व कर्में अर्पण करून "माझें कांहीं नाहीं" असें ह्मणून आंग झाडून मोकळे होतात. ३७२ आतां ओंकारानें आरंभ करतात, आणि तत्कारानें समर्पण करितात. ह्यामुळें ज्या कर्माला ब्रह्मत्त्व प्राप्त होतें, ३७३ तें कर्म ब्रह्मस्वरूप होतें हें खरें; परंतु तेवढ्यानेंच तें पूर्णतेप्रत पोंचत नाहीं. कारण, तेथें करणारा दुसरा, असें होतें ह्मणून. ३७४ मीठ, समूळ जळामध्यें विरतें, परंतु क्षारपणा वेगळा राहतो, तसें कर्म ब्रह्माकार झालें तरी तेथें द्वैत उत्पन्न होतें. ३७५ आणखी द्वैत–किंवा दुजाभाव–जों जों वाढत जातो, तों तों संसाराचें भय उत्पन्न होतें; हें देव आपल्या तोंडानें बोलले, आणि वेदही तसेंच ह्मणतात. ३७६ ह्मणून दुसरेपणानें जें ब्रह्म असतें, तें आत्मस्वरूपांत पोंचण्यासाठीं, ऋणोद्देशानें–तें ऋण फेडावें ह्मणून–देवांनीं 'सत्' शब्द ठेवला आहे. ३७७ तर ओंकारानें आणि तत् कारानें, ब्रह्मस्वरूप होऊन जें कर्म करतात, प्रशस्त शब्दांनीं ज्याचें वर्णन करतात, ३७८ त्या प्रशस्तकर्मामध्यें सत् शब्दाचाही विनियोग आहे. तोही आहे तसा सांगतों. ऐक." ३७९**

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते २६

[सद्भावे] तरि सच्छब्दें येणें । आहूनि असताचें नाणें । दाविजे [१]अव्यंगवाणें । सत्तेचें रूप ॥ ३८० ॥ जे सतचि काळें देशें । होऊं नेणेचि [२]अनारिसें । आपणपां आपण असे । अखंडित ॥ ८१ ॥ [साधुभावे च] हें दिसतें जेतुलें आहे । तें असतपणें जें नोहे । देखतां रूपीं सोये । लाभे जयाची ॥ ८२ ॥ [प्रशस्ते कर्मणि तथा] वेणेंसी प्रशस्त तें कर्म । जें जालें सर्वात्मक ब्रह्म । देखिजे करूनि सम । ऐक्यबोधें ॥ ८३ ॥ [सच्छब्दः पार्थ युज्यते] तरी ओंकार तत्कारें । जें कर्म दाविलें ब्रह्माकारें । तें [४]गाळूनि होइजे एकसरें । सन्मात्रचि ॥ ८४ ॥ ऐसा हा अंतरंग । सच्छब्दाचा विनियोगें । जाणा ह्मणे श्रीरंग । मी न ह्मणें हो ॥ ८५ ॥ ना मीचि जरि हो ह्मणें । तरि श्रीरंगीं दुजें हेंचि [१]उणें । ह्मणोनि हें बोलणें । देवाचेंचि ॥ ८६ ॥ [सदित्येतत्प्रयुज्यते] आतां आणिकीही परी । सच्छब्द हा अवधारीं । सात्विककर्मा करी । उपकार जो ॥ ८७ ॥ तरी सत्कर्में चांगें । चालिलीं अधिका[२]रेंबगें । परि एकाधे कां आंगें । [३]हिणावती जैं ॥ ८८ ॥ तैं उणें एकें अवयवें । शरीर ठाके आघवें । कां अंग[४]हीना भांडावे । रथाची गती ॥ ८९ ॥ तैसें एकेचि गुणेंवीण । सतचि परी असतपण । कर्म धरी गा जाण । जिये वेळे ॥ ॥ ३९० ॥ तेव्हां ओंकार तत्कारीं । [६]सावायिला हा चांगी परी । सच्छब्द कर्मा करी । जीर्णोद्धार ॥ ९१ ॥ तें असतपण फेडी । आणी सद्भावाचिये रूढी । निजसत्वाचिये प्रौढी । सच्छब्द हा ॥ ९२ ॥ दिव्यौषध जैसें रोगिया । कां सांवावो ये भंगलिया । सच्छब्द कर्मा [७]व्यंगलियां । तैसा जाण ॥९३॥ अथवा कांहीं प्रमादें । कर्म आपुलिये मर्यादे । चुकोनि पडे निषिद्धे । वाटे हन ॥ ९४ ॥ चालतयाचि मार्ग सांडे । पारखियाचि [१०]अखरें पडे । राहाटीमाजि न घडे । काइ काइ ॥ ९५ ॥ ह्मणौनि तैसी कर्मा । [१२]रेभस्यें सांडे सीमा । असाधुत्वाचिया दुर्नामा । येवों पाहे जें ॥ ९६ ॥ तेथ गा हा सच्छब्दु । येरां दोहींपरीस [१३]प्रबुद्धु । प्रयोजिला करी साधु । कर्मातें यया ॥ ९७ ॥ लोहा परिसाची [१४]घृष्टी । [१५]वोहळा गंगेची भेटी । कां मृता जैसी वृष्टी । [१६]पीयूषाची ॥ ९८ ॥ पैं असाधुकर्मा तैसा । सच्छब्दप्रयोग वीरेशा । हें असो गौरवचि ऐसा । नामाचा यया ॥ ९९ ॥ घेऊनि येथिचें वर्म । जैं [१७]विचारिसी हें नाम । तैं केवळ हेंचि ब्रह्म । जाणसी तूं ॥ ४०० ॥ पाहें पां ओं तत्सत् ऐसें । हें बोलणें तेथ नेतसे । जेथूनि कां हें प्रकाशे । [१८]दृश्यजात ॥ १ ॥ तें तंव निर्वि[१९]शिष्टें । परब्रह्म चोखट । तयाचें हें [२०]आंतुवट । [२१]व्यंजक नाम ॥ २ ॥ परि आश्रय आकाशा । आकाशचि कां जैसा । या [२२]नामा नामीं आश्रय तैसा । अभेद असे ॥ ३ ॥ उदयिला आकाशीं । रवीचि रवीतें प्रकाशी । हे नामव्यक्ती तैसी । ब्रह्मचि करी ॥ ४ ॥ ह्मणौनि [२३]त्र्यक्षर हें नाम । नव्हे जाण केवळ ब्रह्म । याहीलागीं कर्म । जें जें कीजे ॥ ५ ॥

१ सांगोपांग. २ वेगळें. ३ वाट, मार्ग. ४ टाकून. ५ व्यवस्था.

१ उणीव. २ मार्गें. ३ न्यून होती. ४ चक्रहीना. ५ वंद होते. ६ साह्यभूत असा, अवयवविशिष्ट झालेला. ७ आणतो. ८ सावयवत्व. ९ न्यून झालें असतां, अंगरहिताला. १० परीक्षकाची. ११ भ्रम, खरें नव्हे तें. १२ अविचारें. १३ ज्ञाता. १४ घर्षण. १५ ओढ्याला. १६ अमृताची. १७ उच्चारिसी. १८ दृष्टिगोचर सर्व पदार्थ. १९ अपरिच्छिन्न. २० अंतर्गत. २१ जाणविणारें. २२ वाच्यवाचकत्व. २३ तीनअक्षरी.

"तर ह्या सत्‌शब्दाच्या योगेंकरून असताचें नाणें आटून–जळून–सांगोपांग सत्तेचें स्वरूप दृष्टीस पडतें. ३८० तें सत्‌च असल्यामुळें, काळानें, देशानेंही अन्य होणें त्याला माहितच नसतें. तें निरंतर स्वस्वरूपामध्येंच असतें. ३८१ जितकें आहे असें दिसतें, तितकें असत् असल्यामुळें मिथ्या आहे, हें लक्ष्यांत आलें ह्मणजे ज्याच्या स्वरूपाचा मार्ग सांपडतो. ३८२ तेणेंकरून प्रशस्त जें कर्म, तेंच ब्रह्म सर्वात्मक झालें आहे, असें ऐक्यबोधानें–समदृष्टीकरून–पहावें, ३८३ ह्मणजे ओंकारानें आणि तत्‌कारानें, ब्रह्मरूप करून दाखविलेलें जें कर्म, तें टाकून एकदम सद्रूप व्हावें. ३८४ असा हा सत् शब्दाचा अंतर्गत विनियोग आहे. हें लक्ष्यांत ठेवा." असें **श्रीरंग** ह्मणाले. मी ह्मणत नाहीं हो! ३८५ किंवा मीच ह्मणतों असें जरी ह्मटलें, तरी **श्रीरंगा**मध्यें व मजमध्यें द्वैतभाव येवढीच काय ती उणीव आहे. ह्मणून तें बोलणेंही देवाचेंच. ३८६ "आणखी सात्विक कर्मावर उपकार करणारा जो सत् शब्द, त्याचा आणखी एक गुण आहे. ऐक. ३८७ तर चांगलीं–सत्कर्मे–अधिकारपरत्वें चाललेलीं असतात. परंतु तीं एखाद्या आंगानेंच जेव्हां कमी पडतात; ३८८ तेव्हां, एक अवयव कमी पडला कीं, सारें शरीर बंद पडतें. किंवा चक्राशिवाय रथाची गति बंद पडते. ३८९ त्याप्रमाणें एकाच गुणाशिवाय कर्म सत् असूनही जेव्हां असत्‌पणा धारण करतें, समजलास? ३९० तेव्हां ओंकारानें, तत्कारासह केलेल्या कर्माला, हा सत् शब्द उत्तम रीतीनें साह्य करून त्याचा जीर्णोद्धार करतो. ३९१ हा सच्छब्द, त्याचें असत्‌पण नाहींसें करतो. सद्भावाच्या वृद्धीला, आणि निजसत्वाच्या प्रौढीला आणतो. ३९२ रोग्याला जसें दिव्य औषध; भंगलेल्याला जसें सावयवत्व; त्याप्रमाणें न्यून पडलेल्या कर्माला सच्छब्द आहे. हें ध्यानांत ठेव. ३९३ अथवा कांहीं चुकीनें आपली मर्यादा चुकून कर्म हें निषिद्ध वाटेला पडलें; ३९४ चालणाराचा मार्ग चुकतो; परीक्षकालाही भ्रम पडतो; ह्या रहाटीमध्यें काय काय होत नाहीं? ३९५ ह्मणून त्याच रीतीनें अविचाराच्या योगानें कर्माचीही सीमा सुटते. आणि असाधुत्वाच्या दुर्लौकिकास पात्र होऊं पहातें. ३९६ तेव्हां हा सत्‌शब्द इतर दोहोंपेक्षां फार जाणता आहे. त्याची योजना केली असतां, त्याच कर्माला साधुकर्म करून सोडतो. ३९७ लोखंडाला जसें परिसाचें घर्षण; ओढ्याला जशी गंगेची भेट; किंवा मृताला जशी अमृताची वृष्टि; ३९८ त्याप्रमाणें हे **शूरवर्या!** असाधुकर्माला ह्या सच्छब्दाचा प्रयोग आहे. हें असो. कारण, ह्या नामाचा गौरवच असा आहे. ३९९ ह्यांतील मर्म जाणून ह्या नामाचा विचार करशील तेव्हां हेंच साक्षात् परब्रह्म आहे असें तुला कळून येईल. ४०० हें पहा! ओं, तत्, सत्, असें जें बोलणें तें–जेथून हे सारे दृश्य पदार्थ उत्पन्न होतात, त्या मूळ ठिकाणीं पोंचतें. ४०१ तें परब्रह्म तर अपरिच्छिन्न व शुद्ध आहे. त्याचें अंतरंगबोधक हें नाम आहे. ४०२ परंतु आकाशाला जसा आकाशाचाच आश्रय, तसा ह्या नामाला नामाचाच आश्रय. असा अभेदभाव आहे. ४०३ आकाशामध्यें सूर्योदय झाला, ह्मणजे सूर्यालाच सूर्य दाखवितो; त्याप्रमाणें हें नाम सुद्धां ब्रह्मच प्रगट करतें. ४०४ ह्मणून हें तीन अक्षरी नाम नव्हे; तर साक्षात् परब्रह्मच आहे. हें लक्ष्यांत ठेव. येणेंकरून जें जें कर्म करावें;" ४०५

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥

[यज्ञे इति] ते याग अथवा दानें । तपादिकेंही गहनें । तियें निफजतु कां न्यूनें । होऊनि ठातु ॥ ६ ॥ परि परेसाचा वरकेंळीं । नाहीं चोखाकीडाची बोली । तैसीं ब्रह्मीं अर्पितां केलीं । ब्रह्मचि होती ॥ ७ ॥ उणिया पुरयाची

१ उपजोत. २ कसोटीत. ३ चांगल्यावाइटाची, उत्तम व हिणकट सोन्याची.

परी । नुरेचि तेथ अवधारीं । निवडूं न येती सागरीं । जैसिया नदी ॥ ८ ॥ एवं पार्था तुजप्रती । ब्रह्मनामाची हे शक्ती । सांगीतली उपपत्ती । ढोळसा गा ॥ ९ ॥ आणि येकें कांहीं अक्षरा । वेगळवेगळा वीरा । विनियोग नागरा । बोलिलों रीती ॥ ४१० ॥ एवं ऐसें सुमहिम । झणौनि हें ब्रह्मनाम । आतां जाणीतलें कीं सुवर्म । राया तुवां ॥ ११ ॥ तरी येथुनि थांचि श्रद्धा । उपलविली हो सर्वदा । जयाचें जालें बंधां । उरों नेदी ॥ १२ ॥ [कर्म चैवेति] जिये कर्मी हा प्रयोग । अनुष्ठिजे सद्विनियोग । तेथ अनुष्ठिला सांग । वेदचि तो ॥ १३ ॥

**"ते याग असोत, किंवा दानें असोत; किंवा मोठमोठालीं तपें असोत; तीं व्यंग होऊन जरी राहिलीं, ४०६ तरी, परिसाच्या कसोटींत शुद्धाशुद्धाचें नांव नाहीं, त्याप्रमाणें, ब्रह्मांत अर्पण केलीं असल्यामुळें तीं ब्रह्मस्वरूपच होतात. ४०७ सागरामध्यें नद्यांची जशी निवडानिवड करतां येत नाहीं, त्याप्रमाणें उण्यापुऱ्याची गोष्टच तेथें रहात नाहीं. ध्यानांत ठेव. ४०८ ह्याप्रमाणें अर्जुना! तुला डोळसाला–ज्ञात्याला–ह्या ब्रह्माच्या नांवाच्या सामर्थ्याची उपपत्ति सांगितली. ४०९ आणखी हे वीरा! त्यांतील एक एक अक्षराचा वेगवेगळ्या रीतीनें त्याचा विनियोगही स्पष्ट सांगितला. ४१० असें हें ब्रह्माचें नाम फार महत्वाचें आहे. ह्मणून हे राजा! त्यांतलें खरें मर्म तुझ्या ध्यानांत आलेंना? ४११ तर आजपासून ह्याच नामाची श्रद्धा सदोदित वाढवित जा. तूं त्याचा झालास ह्मणजे तें भवबंधास उरूं देणार नाहीं. ४१२ कोणत्याही कर्मामध्यें हा प्रयोग सद्विनियोगानें अनुष्ठान केला, ह्मणजे सर्व वेदाचें अनुष्ठान केल्याप्रमाणें होतें."**

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥२८॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

[अश्रद्धया हुतं] ना सांडूनि हे सोये । मोडूनि श्रद्धेची बाहे । दुराग्रहाची त्राये । वाढऊनियां ॥ १४ ॥ मग अश्वमेध कोडी कीजे । [दत्तं] रत्नें भरोनि पृथ्वी दीजे । [तपस्तप्तं] एकांगुष्टींही तपिजे । तपसाहस्रीं ॥ १५ ॥ [कृतं च यत्] जळाशयाचेनि नांवें । समुद्रही कीजती नवे । परि किंबहुना आघवें । वृथाचि तें ॥ १६ ॥ [असदित्युच्यते पार्थ] पाषाणावरी वर्षलें । जैसें भस्मीं हवन केलें । कां खेंव दीधलें । साउलिये ॥ १७ ॥ ना तरि जैसें चडकणा । गगन हाणीतलें अर्जुना । तैसा समारंभ सुणा । गेलाचि तो ॥१८॥ घाणा गाळिले गुंडे । तेल ना पेंडी जोडे । तैसें दरिद्र तेवढें । ठेलेंचि आंगीं ॥ १९ ॥ गांठीं बांधली खापरी । येथ अथवा पैलतीरीं । नेंसरोनि जैसी मारी । उपवासीं गा ॥ ४२० ॥ [न च तत्प्रेत्य नो इह] तैसें कर्मजातें तेणें । नाहीं ऐहिकींचें भोगणें । तेथ परत्र तें कवणें । अपेक्षावें ॥ २१ ॥ ह्मणौनि ब्रह्मनामश्रद्धा । सांडूनि कीजे जो धांदा । हें असो सिणू नुसधा । दृष्टादृष्टीं तो ॥ २२ ॥ ऐसें कलुषकरिकेसरी । त्रितापतिमिरतमारी । श्रीवर-वीर-नरहरी । बोलिलें तेणें ॥ २३ ॥ तेथ निजानंदा बहुवसा । माजि अर्जुन तो सहसा । हरपला चंद्र जैसा । चांदिणेनि ॥ २४ ॥ अहो संग्राम हा वोणिया । मार्पें नाराचांचिया आणिया । सूनि मांस घे मेवणिया । जीवितेंसी ॥ २५ ॥ ऐसिया समयीं कर्कशें । भोगीजत स्वानंदराज्य कैसें । आजि भाग्योदय हा नसे । आणिके ठाईं ॥ २६ ॥ संजय ह्मणे कौरवराया । गुणा रिझोये रिपूचिया । आणि गुरुही हा आमुचिया । सुखाचा येथ ॥ २७ ॥ हा न पुसता हे गोठी । तरि देव कां सोडिते गांठी । तरि कैसेनि आह्मां भेटी । परमार्थेंसीं ॥ २८ ॥ होतों अज्ञानाच्या आंधारां । वोसंतीत जन्मवाहरा । तों आत्मप्रकाशमंदिरा । आंत आणिलें ॥ २९ ॥ येवढा आह्मां तुह्मां थोर । केला येणें उपकार । ह्मणोनि हा व्यासहोदर । गुरुत्वें होय ॥ ४३० ॥ तेविंचि संजयो ह्मणे चित्तीं । हा अतिशय या नृपती । खुपेल ह्मणौनि किती । बोलत असों ॥ ३१ ॥ ऐसी हे बोली सांडिली । मग येरीचि गोठी आदरिली । जे पार्थें कां पुसिली । श्रीकृष्णातें ॥ ३२ ॥ याचें जैसें कां करणें । तैसें मीही करीन बोलणें । ऐकिजो ज्ञानदेव ह्मणे । निवृत्तीचा ॥ ४३३ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ श्लोक २८, ओव्या ४३३.

---

१ व्यवस्था. २ चांगल्या. ३ मोठ्या महिमेचें. ४ नामाची. ५ विस्तारिली. ६ जन्मबंधास.

१ मार्ग. २ हात, आश्रय. ३ सत्ता. ४ आलिंगन. ५ धडपडीनें, थापटीनें. ६ शून्य. ७ कामीं न पडे. ८ नुसता शीण. ९ इहपर. १० पातकरूप हत्तीचे सिंह. ११ व्यापार. १२ बाणांचीं अग्रें. १३ मोजणीस. १४ कठोर. १५ प्रीति उत्पन्न होते. १६ करीत, आचरीत. १७ येरझार, वारी. १८ व्यासाचा भाऊ. १९ खोंचेल.

"किंवा हा मार्ग सोडून, श्रद्धेचा आश्रय तोडून दुराग्रहाची सत्ता वाढवून ४१४ मग जरी कोट्यावधि अश्वमेध केले; रत्नांनीं भरून पृथ्वी दिली; एका आंगठ्यावर हजारों तपें जरी तप केलें; ४१५ इतकेंच नव्हे, तर तलावाच्या नांवानें समुद्र जरी नवे बांधले; तरी ते सारे व्यर्थच होत. ४१६ पाषाणावर जसें पाणी घालावें; राखेंत जसा होम करावा; किंवा सावलीला जशी मिठी मारावी, ४१७ किंवा अर्जुना! गगनाला जशी थापट मारावी; त्याप्रमाणें हा सर्व समारंभ फुकट गेला ह्मणून समजावें. ४१८ घाण्यांत दगड गाळले, तर तेलही मिळत नाहीं, आणि पेंडही मिळत नाहीं. त्याप्रमाणें दारिद्र्य तेवढें आंगामध्यें राहतें. ४१९ पदरांत बांधलेली खापरी, ह्या तीरालाही चालत नाहीं, आणि त्या तीरालाही चालत नाहीं. आणि ती जशी उपाशी मारते, ४२० त्याप्रमाणें तसल्या कर्मांनीं ऐहिक भोग सुद्धां मिळत नाहींत. तेथें परलोकच्याची इच्छा कोण करणार? ४२१ ह्मणून ब्रह्मनामावरची श्रद्धा सोडून जो धंदा करणें, तो इहलोकीं आणि परलोकीं क्षीण मात्र आहे. ह्याकरितां तें असो." ४२२

पातकरूप हत्तीचा सिंह; त्रिविधतापरूप तमाचा सूर्य; श्रेष्ठ **लक्ष्मीकांत; नरहरी** असे जे **श्रीकृष्ण**, त्यांनीं ह्याप्रमाणें सांगितलें. ४२३ तेव्हां चांदण्यामध्यें जसा चंद्र लोपून जातो, त्याप्रमाणें निजानंदाच्या महापूरामध्यें, **अर्जुन** मग्न होऊन गेला. ४२४ अहो! संग्राम हा व्यापार. आणि बाणांच्या अणकुच्या हीं मापें. तीं घालून जिवासहवर्तमान मांसाचेंच माप घेण्याचें काम सुरू होतें. ४२५ अशा कठोर वेळीं स्वानंद राज्य हो कसें भोगित बसला? इतकें भाग्य आज दुसऱ्या कोणाऱ्याच ठिकाणीं नाहीं. ४२६ **संजय** ह्मणतो 'हे **कौरवराजा!–धृतराष्ट्रा**–शत्रूच्याही गुणांवर प्रीति उत्पन्न होते. आणि तो ह्या ठिकाणीं आमच्या सुखाचा गुरुही आहे. ४२७ कारण, त्यानें जर ही गोष्ट विचारली नसती, तर **देवांनीं** आपली गांठ कां सोडली असती? आणि मग आह्मांला परमार्थाची भेट कशानें होणार होती? ४२८ अज्ञानाच्या अंधकारांत जन्मांतराच्या घिरट्या घालित होतों, त्यानें मला आत्मप्रकाशमंदिरामध्यें आणलें. ४२९ येवढा आह्मांवर आणि तुह्मांवर थोर उपकार केला. ह्मणून श्रेष्ठपणानें हा (अर्जुन) **व्यासाचा** बंधु होय.' ४३० तसेंच **संजयानें** मनांतही विचार केला कीं, ही अधिक स्तुति राजाच्या मनाला टोंचेल, ह्मणून किती बोलावें? पुरे. ४३१ मग तें बोलणें सोडलें; आणि जी **अर्जुनानें श्रीकृष्णाला** विचारली, ती दुसरीच गोष्ट काढली. ४३२ **निवृत्तीचे ज्ञानदेव** ह्मणतात 'त्यानें जसें केलें, तसेंच मीही भाषण करीन. ऐकावें.' ४३३

## सतरावा अध्याय समाप्त.

# सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी.

## अध्याय १८ वा.

जयजय देव निर्मळ । निजजना[1]खिलमंगळ । जन्मजरा[2]- जलदजाळ- । प्रभंजन[3] ॥ १ ॥ जयजय देव प्रबळ । विदळि[4]तामंगलकुळ । निगमागमद्रुमफळ । फलप्रद ॥ २ ॥ जयजय देव सकळ । विगत[5]विषयवत्सल । कलित[6]काळकौतूहल । कलातीत ॥ ३ ॥ जयजय देव निश्चळ । चलित[7]चित्तपानतुंदिल । जगदुन्मीलना[8]विरल । केलिप्रिय ॥ ४ ॥ जयजय देव निष्कळ । स्फुरद[9]मंदानंदबहळ । नित्य[10]निरस्ताखिलमळ । मूळभूत ॥ ५ ॥ जयजय देव स्वप्रभ[11] । जगदंबुदगर्भनभ[12] । भुवनोद्भवारंभस्तंभ[13] । भवध्वंस[14] ॥ ६ ॥ जयजय देव विशुद्ध[15] । अविद्योद्यान[16]द्विरद । शमदम[17]मदनमद । दयार्णव ॥ ७ ॥ जयजय देवैकरूप[18] । अतिक्रांत[19]कंदर्पसर्पदर्प । भक्त[20]भावभुवनदीप । तापापह ॥ ८ ॥ जयजय देव अद्वितीय । परिणतोपरमैक[21]प्रिय । निजजन[22]जित भजनीय । मायागम्य[23] ॥ ९ ॥ जयजय देव श्रीगुरो । अकल्पना[24]कल्पतरो । स्वसंविद्द्रुम[25]बीजप्ररोहणावनी ॥ १० ॥ हें काय एकैक ऐसें । नानापरिभाषा[26]वशें ।

१ स्वभक्तांला सर्वथैव मंगलकारक. २ जन्मवार्धक्यादिरूपी मेघाला. ३ नाशकर्ता वायु. ४ नाशिलीं आहेत अमंगलाचीं=अकल्याणाचीं कुळें ज्यानें. ५ विगतविषय= वैराग्यसंपन्न; यांचा प्रिय. ६ कृतांतउत्साहनाशक. ७ चंचल चित्ताच्या प्राशनानें दोंदिल. ८ जगास प्रकट करून त्यांत व्यापक. ९ अत्यानंद स्फुरद्रूप करणारा अशा. १० सर्व पापांचा जेथें सर्वकाळ नाश आहे असा. ११ स्वयंप्रकाश. १२ जगद्रूप मेघाच्या आकाशा. १३ जगद्रूप उत्पत्तीचा मूळस्तंभ. १४ संसारनाशक. १५ उपाधिरहित, निर्मळ. १६ अविद्यारूप वनाचा नाश करणारा हत्ती. १७ काममदाचा शमदमेंकरून नाश करणारा. १८ एकरूपच देव. १९ कामसर्पाच्या गर्वाचा तिरस्कार करणारा. २० भाविकभक्तचित्तमंदिराचा दीप. २१ परिपक्व आहे उपरम=शांति ज्यांस त्यांला एकप्रिय=अत्यंत प्रिय, पूर्णवैराग्यशील प्रिय ज्यास. २२ भक्ताधीन व भजनयोग्य असा. २३ मायेस अगम्य. २४ कल्पनारहित कल्पवृक्षा, संकल्पाभावदाता. २५ स्वकीय ज्ञानवृक्षाच्या बीजास उत्पत्तिस्थान. ( हीं सर्व संबोधनें आहेत. ) २६ अनेक प्रकारच्या प्रत्ययांनीं.

स्तोत्र करूं तुज[1]दोषें । निर्विशेषो[2] ॥ ११ ॥ जिहीं विशेषणीं विशेषिजे[3] । तें दृश्य नव्हे रूप तुझें । जें जाणें मी म्हणोनि लाजें । वानणा[4] इहीं ॥ १२ ॥ परि मर्यादेचा सागर । हा तंवचि तया डोंगर । जंव न देखे सुधाकर । उदया आला ॥ १३ ॥ सोमकांत निज[6]निर्झरीं । चंद्रा अर्घ्यादिक न करी । तें तोचि अवधारीं । करवी कीं जी ॥ १४ ॥ नेणों कैसी वसंतसंगें । अवचितिया वृक्षाचीं अंगें । फुटती तें तयांही जोगें । धरणें नोहे ॥ १५ ॥ पद्मिनी रविकिरण । लाहे मग लाजे कवण । कां जळें शिवतलें लवण । आंग भुले ॥ १६ ॥ तैसा तूतें जेथ मी स्मरें । तेथ मीपण मी विसरें । मग जाक[7]ळिला ढेंकरें । तृप्त जैसा ॥ १७ ॥ मज तुवां जी केलें तैसें । माझें मीपण दवडूनि देशें । स्तुतिमिषें पांच पिसें[8] । बांधलें वाचे ॥ १८ ॥ ना येऱ्हवीं तरी आठवीं । राहोनि स्तुति जैं करावी । तैं गुणागुणीं धरावी । सरोभरी[9] कीं ॥ १९ ॥ तरि तूं जी एकरसाचें[10] लिंग । केविं करूं गुणागुणीं विभाग । मोतीं फोडोनि सांधितां चांग । कीं तैसेंचि भलें ॥ २० ॥ आणि बाप तूं माय । इहीं बोलीं ना स्तुती होय । डिंभो[11]पाधिक आहे । विटाळ तेथें ॥ २१ ॥ जी जालेनि पाइकें आलें । तें गोसांवीपण[12] केविं बोलें । ऐसें उपाधी उशिटेलें[13] । काय वर्णूं ॥ २२ ॥ जरि आत्मा तूं एकसरा[14] । हें दी म्हणतां दातारा । तरी आंतुल तूं बाहेरा । घापतोसी[15] ॥ २३ ॥ म्हणूनि सत्यचि तुजलागीं । स्तुती न देखों जी जगीं । मौनावांचूनि लेणें आंगीं । सुसीना[16] मा ॥ २४ ॥ स्तुती कांहीं न बोलणें । पूजा कांहीं न करणें । सन्निधी कांहीं न होणें । तुझ्या ठायीं ॥ २५ ॥ तरि जितलें[17] जैसें भुली[18] । पिसें[19] आलाप[20] घाली । तैसें वानूं[21] तें माउली । उपसाहावें तुवां ॥२६॥

१ तुझ्या हेतूनें. २ ज्यापेक्षां विशेष कांहीं नाहीं अशा. ३ बोलावें. ४ वर्णावयास. ५ ख्याती, आळ, प्रतिबंध. ६ अंगांतून पाझरलेल्या. ७ व्यापिला, वश्य केला. ८ वेड. ९ साहित्य, बरोबरी. १० अखंडैकरसाची मूर्ति. ११ लेंकराच्या उपाधीचा. १२ श्रेष्ठता. १३ उष्टें. १४ एकदम. १५ सांपडतास. १६ घालीत नाहींस कीं. १७ जिकलें. १८ भ्रांतीनें. १९ भ्रमलेलें. २० बडबड करी. २१ वर्णूं.

आतां गीतार्थाची मुक्तमुदी। लेववीं माझिये वाग्वृद्धी। जेणें माने हे सभासदीं। सज्जनाच्या ॥ २७ ॥ तेथ ह्मणितलें श्रीनिवृत्ती। नको हें पुढतपुढती। परिसीं लोहा घृष्टी किती। वेळवेळा कीजे गा ॥ २८ ॥ तंव विनवी ज्ञानदेव। ह्मणे हो कां जी पसाव। तरि अवधान देतु देव। ग्रंथा आतां ॥ २९ ॥ [प्रासादकलशरूपकत्वेनाष्टादशं वर्णयति] जी गीतारत्नप्रासादाचा। कळस अर्थचिंतामणीचा। सर्व गीतादर्शनाचा। पाढाऊ जो ॥ ३० ॥ लोकीं तरी आथी ऐसें। जे दुरूनि कळस दिसे। आणि भेटीचि होतवसे। देवतेची तिये ॥ ३१ ॥ तैसेंचि एथही आहे। जे एकेचि येणें अध्यायें। आघवाची दृष्ट होये। गीतागम हा ॥ ३२ ॥ मी कळस याचि कारणें। अठरावा अध्याय ह्मणें। उंवाइला बादरायणें। गीताप्रासादा ॥ ३३ ॥ नोहे कळसापरतें कांहीं। प्रासादी काम नाहीं। तें सांगतसे गीताही। संपलेपणें ॥ ३४ ॥ व्यास सहजे सूत्री वळी। तेणें निगमरत्नाचळीं। उपनिषदार्थांची माळी-। मौजी खांडिली ॥ ३५ ॥ तेथ त्रिवर्गांचा अंणुआरु। आडऊ निघाला जो अपारु। तो महाभारत प्रोकारु। भोंवता केला ॥ ३६ ॥ माजि आत्मज्ञानाचें ऐंकवट। देंळवाडें ह्माडूनि चोखट। घडिलें पार्थवैकुंठ-। संवाद कुसरी ॥ ३७ ॥ निवृत्तिसूत्र-सोडणियों। सर्वशास्त्रार्थ पुरवणिया। आंवो साधिला मांडणिया। मोक्षरेखेचों ॥ ३८ ॥ ऐसेनि करितां उभारा। पंधरा अध्यायांत पंधरा। भूमी निर्वाळलिया पुरा। प्रासाद जाहाला ॥ ३९ ॥ उपरि सोळावा अध्याय। तो ग्रीवे घंटेचों आय। सप्तदश तो ठाय। पेंडघाणिये ॥ ४० ॥ तयाहीवरी अष्टादश। तो अपैसा मांडला कळस। उपरि गीतादिकीं व्यास। ध्वज लागला ॥ ४१ ॥ ह्मणोनि मागील जे अध्याय। ते चढते भूमीचे आंय। तयांचें पुरें दाविताहे। आपुल्या आंगीं ॥ ४२ ॥ जालया कामा नाहीं चोरी। ते कळसें होय उजरी। तेवि अष्टादश विवरी। साद्यंत गीता ॥ ४३ ॥ ऐसा व्यासें विंदाणियें। गीताप्रासादु जोडणियें। आणूनि राखिले प्राणिये। नानापरी ॥ ४४ ॥ एक प्रदक्षिणा जपाचिया। बाहेरोनि करिती यया। एक ते श्रवणमिषें छाया। सेविती ययाची ॥ ४५ ॥ एक ते अवधानाचा पुरा। विडापाउड भीतरां। घेऊनि रिघती गाभारां। अर्थज्ञानाच्या ॥ ४६ ॥ ते निजबोधें उंराउरी। भेटती आत्मया श्रीहरी। परि मोक्षप्रासादीं सरी। सर्वांही आथी ॥ ४७ ॥ समर्थाचिये पंक्तिभोजनें। तळिल्या वरिल्या एक पक्वान्नें। तेवि श्रवणें अर्थे पठणें। मोक्षचि लाभे ॥ ४८ ॥ ऐसा गीतावैष्णव प्रासाद। अठरावा अध्याय कळस विशद। म्यां ह्मणितला हा भेद। जाणोनियां ॥ ४९ ॥ [अष्टादशाध्यायोत्पत्तिप्रस्तावः] आतां सप्तदशापाठीं। अध्याय कैसेनि उठी। तो संबंध सांगों दिठी। दिसे तैसा ॥ ५० ॥ कां गंगायमुनाउदक। वोघबळें वेगळिक। दावी होऊनि एक। पाणीपणें ॥ ५१ ॥ न मोडतां दोन्ही आकार। घडिलें एक शरीर। हें अर्धनारीनटेश्वर। रूपीं दिसे ॥ ५२ ॥ ना ना वाढली दिवसें। कळा बिंबीं पैसे। परि सिनाने लेवे जैसे। चंद्रीं नाहीं ॥ ५३ ॥ तैसीं सिनानीं चारी पदें। श्लोकें श्लोकावच्छेदें। अध्याय अध्यायभेदें। गमे कीर ॥ ५४ ॥ परि प्रमेयांची उजरी। अनान रूप न धरी। नाना रत्नमणीं दोरी। एकचि जैसी ॥ ५५ ॥ मोतियें मिळोनि बहुवें। एकावळीचा पाड आहे। परि शोभे रूप होये। एकचि तेथ ॥ ५६ ॥ फुलां फुलसरां लेख चढे। हुंतीं दुजी अंगुळी न पडे। श्लोक अध्याय तेणें पाडें। जाणावे हे ॥ ५७ ॥ सात शतें श्लोक। अध्यायां अठरांचे लेख। परी देव बोलिले एक। जें दुजें नाहीं ॥ ५८ ॥ आणि म्यांही न सांडोनि ते सोये। ग्रंथव्यक्ती केली आहे। प्रस्तुत तेणें निर्वाहें। निरूपण आइका ॥ ५९ ॥ [अध्यायसंगतिः] तरी सतरावा अध्याव। पावतां पुरता ठाव। जे संपतां श्लोकीं देव। बोलिले ऐसें ॥ ६० ॥ अर्जुना ब्रह्मनामाच्याविखीं। बुद्धी सांडूनि आस्तिकीं। कर्मं किजती ति-

१ मोत्याची आंगठी, अकुंठित मुद्रा. २ मान्य होईल. ३ पुन:पुन:. ४ घर्षण. ५ प्रसाद. ६ देवळाचा. ७ चिंतामणितुल्य अर्थयुक्त. ८ बोधक संग्रह. ९ हस्तगत होई. १० गीताशास्त्र. ११ वर्णिला, 'वायिला' या पाठीं घातला, अर्पिला. १२ श्रीवेदव्यासानें. १३ शिखरापेक्षां श्रेष्ठ. १४ श्रेष्ठ कारागीर, सुतार. १५ जमिनींत. १६ धर्म, अर्थ, काम यांचा. १७ चाराचुरा. १८ गाळ, असार. १९ आवार, दुर्ग. २० एकत्र. २१ चिरे वगैरे साहित्य. २२ कृष्णार्जुनसंवाद. २३ चातुर्यानें. २४ अंतर्मुखतेची कारागिरी. २५ सांडण्यानें. २६ आकार. २७ मोक्षमर्यादेचा. २८ पंधरा अध्यायरूप थरांनीं पूर्ण सिद्ध झालेल्या. २९ गळमण्यांचा आकार. ३० कळसाची बैठक, मध्यमघंटेची जागा. ३१ आपोआप. ३२ विस्तार. ३३ लांबीरुंदीचें प्रमाण.

१ पूर्णता. २ काम राहिलें नाहीं. ३ स्पष्ट. ४ सांगे. ५ कारागिरीनें. ६ तयार करून. ७ नुसत्या पाठंकरून. ८ विडापैसा. ९ गर्भगृहांत. १० सत्वर, त्वरेनें. ११ बरोबरी. १२ स्पष्ट, स्वच्छ. १३ आरंभापासून सतराव्या अध्यायापर्यंत. १४ ओघाच्या बळानें. १५ प्रसार पावे. १६ वेगळे लेप. १७ चरण. १८ छंद. १९ विषयाची. २० रत्नांत किंवा मण्यांत. २१ फुलांतील दोरा. २२ मुगंधींत. २३ मार्ग. २४ स्पष्टीकरण. २५ श्रद्धावंतांनीं.

तुकीं । असतें होती ॥ ६१ ॥ हा ऐकोनि देवाचा बोल । अर्जुना आला डोलें । ह्मणे कर्मनिष्ठा मळ । ठेविला देखों ॥ ६२ ॥ तो अज्ञानांध तंव बापुडा । ईश्वरचि नदेखे एवढा । तेथ नावेक पुढां । कां सुझे तया ॥ ६३ ॥ आणि रज तमें दोन्हीं । गेलियावीण श्रद्धा सानी । ते कां लागे अभिधानीं । ब्रह्माचिये ॥ ६४ ॥ मग कोतां खेंव देणें । वार्तेवरीलें धांवणें । सांडीं पडे खेळवणे । नागिणीचें तें ॥ ६५ ॥ तैसीं कर्मे दुवाडें । तयां जन्मांतराची कडे । दुर्मेळावे येवढे । कर्मामाजी ॥ ६६ ॥ ना विपायें हें उजू होये । तरि ज्ञानाची योग्यता लाहे । येन्हवीं येणेंचि जाये । निरयालया ॥६७॥ कर्मी हांठायवरी । आहाती बहुवा अवसरी । आतां कर्मठां कें ये वोरी । मोक्षाची हे ॥ ६८ ॥ तरी फिटो कर्मांचा पांग । कीजो अवघाचि त्याग । आदरी जो अव्यंग । संन्यास हा ॥ ६९ ॥ कर्मबाधेचिया कहीं । जेथ भयाची गोठी नाहीं । तें आत्मज्ञान जिहीं । स्वाधीन होय ॥ ७० ॥ ज्ञानाचे आवाहनमंत्र । जे ज्ञानपिक तें सुक्षेत्र । ज्ञान आकर्षितेसूत्र । तंतु जे कां ॥ ७१ ॥ ते दोनी संन्यास त्याग । अनुष्टूनि सुटे जग । तरी हेंचि आतां चांग । व्यक्त पुसों ॥ ७२ ॥ ऐसें ह्मणोनि पार्थे । त्याग संन्यासव्यवस्थे । रूपें होआवया जेथें । प्रश्न केला ॥ ७३ ॥ तेथ प्रत्युत्तरें बोली । श्रीकृष्णें जे चावळिली । तया व्यक्ती जाली । अष्टादशा ॥ ७४ ॥ एवं जन्यजनकभावें । अध्याय अध्यायातें प्रसवे । आतां ऐका बरवें । पुसिलें जें ॥ ७५ ॥ तरि पंडुकुमरें तेणें । देवाचें सरतें बोलणें । जाणोनि अंतःकरणें । कोणी घेतली ॥ ७६ ॥ येन्हवीं तत्वविषयीं भला । तो निश्चित असे कीर जाहाला । परि देवो राहे उगला । तें साहावेना ॥ ७७ ॥ वत्स धालयाही वरी । धेनु न वचावी दुरी । अनन्य प्रीतीची परी । ऐसी आहे ॥ ७८ ॥ तेणें काजेंवीणही बोलावें । तें देखिलें तरी पाहावें । भोगितां चाड दुणावे । पढियंतयाठायीं ॥ ७९ ॥ ऐसी प्रेमाची हे जाती । आणि पार्थ तंव तेचि मूर्ती । ह्मणूनि करूं लाहे खंती । उगेपणाची ॥८०॥

१ वाईट, दुष्ट अर्थी. २ प्रेमा. ३ कर्मावर श्रद्धा ठेवणारास दोष. ४ क्षणभर. ५ समजे. ६ अल्प. ७ भाल्याला, शस्त्राला. ८ आलिंगन. ९ दोरीवर, शब्दावरील. १० मरणास कारण होय. ११ दुर्घट, कठीण. १२ मेळ नसणें. १३ कदाचित्. १४ यथासांग. १५ नरकस्थानास. १६ येथपर्यंत. १७ समय. १८ कर्म करणाराला. १९ प्राप्ति, गति. २० पराधीनता. २१ सांगोपांग. २२ आमंत्रणचिठी. २३ उत्तम भूमि. २४ ओढणारे कळदोरे. २५ स्पष्ट. २६ स्पष्टीकरण. २७ बोलिली. २८ कार्यकारणभावानें. २९ प्राप्य, शेवटचें. ३० क्लेश. ३१ गप्प. ३२ तृप्त झाल्यावर. ३३ आवडत्याच्या ठायीं.

आणि संवादाचेनि मिषें । जे अव्यवहार वस्तु असे । तेचि भोगिजे कीं जैसें । दर्पणीं रूप ॥ ८१ ॥ मग संवाद तोही पारुखे । तरि भोगितां भोगणें थोके । हें कां साहावेल सुखें । लांचावलेया ॥ ८२ ॥ यालागीं त्याग संन्यास । पुसावयाचें घेऊनि मिस । मग उपलविलें दुसें । गीतेचें तें ॥ ८३ ॥ अठरावा अध्याय नोहे । हे एकाध्यायी गीताचि आहे । जैं वत्सचि धेनू दुहे । तैं वेळ कायसी ॥ ८४ ॥ तैसी संपतां अवसरीं । गीता आदरविली माघारीं । स्वामि भृत्याचा न करी । संवाद काई ॥ ८५ ॥ [अर्जुन उवाच–] परि हें असो ऐसें । अर्जुनें पुसिजत असे । ह्मणे विनंती विश्वेशें । अवधारिजो ॥ ८६ ॥

निर्मल, स्वभक्तांना निरंतर मंगलदायक, जन्म वार्धक्यरूप मेघपंक्तीचा जो वायूच, असा जो देव त्याचा जयजयकार असो. १ प्रबळ, अमंगलाचें वंशच्छेदन करणारा, निगमागमरूप वृक्षांचीं फळें देणारा असा जो देव, त्याचा जयजयकार असो. २ सकल वैराग्यसंपन्नांचा मित्र, कालकौतुकाचा नाश करणारा, कलातीत असा जो देव, त्याचा जयजयकार असो. ३ निश्चल, चंचलचित्ताच्या प्राशनानें दोंदिल झालेला, जगाला व्यक्त करून, त्यास व्यापून, आवडीनें क्रीडा करणारा असा जो देव त्याचा जयजयकार असो. ४ निष्कलंक, अत्यानंदाची स्फूर्ति करणारा, सदासर्वकाल पातकांचा नाश करणारा, मूलाधार असा जो देव, त्याचा जयजयकार असो. ५ स्वयंप्रकाश, जगद्रूप मेघांचें आकाश, विश्वोत्पत्तीचा मूलस्तंभ, संसारनाशक असा जो देव, त्याचा जयजयकार असो. ६ उपाधिरहित, अविद्यारूप उद्यानाचा हत्ती, काममदाचा शमदमें करून विध्वंस करणारा, दयेचा सागर असा जो देव, त्याचा जयजयकार असो. ७ कामरूप सर्पाच्या दर्पानें विकार न पावणारा, भक्तचित्तमंदिरांतील दिवा, तापाचें शमन करणारा, असा जो अप्रतिम देव, त्याचा जयजयकार असो. ८ अद्वितीय, परम वैराग्यशीलाची आवड धरणारा; भक्ताधीन व भजन-

१ पारमार्थिक. २ राहे. ३ थांबे. ४ सहन करवेल. ५ संवकलेल्याला. ६ विस्तार केलें. ७ वस्त्र, प्रमेय. ८ ऐकावी.

पात्र, मायेला अगम्य असा जो देव, त्याचा जयजयकार असो. ९ हे **श्रीगुरुदेवा!** हे कल्पनाहीन कल्पवृक्षा! स्वकीयज्ञानवृक्षाच्या बीजास उत्पत्तिस्थाना! तुझा जयजयकार असो. १० हे सर्वश्रेष्ठा! अशा एकेक परोपरीच्या दृष्टांतांनीं तुझें कोठवर ह्मणून स्तोत्र करावें? ११ ज्या ज्या विशेषणांनीं तुझें रूप वर्णन करावें, तें तुझें दृश्यरूप नव्हे, हें मला माहित आहे. ह्मणून अशा प्रकारें वर्णन करण्यासही लाज वाटते. १२ परंतु समुद्र मर्यादा उल्लंघन करीत नाहीं ही प्रतिष्ठा कोठपर्यंत? चंद्रोदय झालेला दृष्टीस पडला नाहीं, तेथपर्यंत. १३ चंद्रकांत हा कांहीं आपल्या आंगच्या पाझरानें चंद्राला अर्घ्यदान देत नाहीं. तर, चंद्रच तें त्याच्याकडून करवितो. हें लक्ष्यांत घ्यावें. १४ वसंताच्या संगतीनें वृक्षांचीं आंगें अकस्मात् कशीं फुटतात, हें समजत नाहीं. आणखी, त्या वेळेस तीं आंगें तशीं फुटण्याच्या योग्यतेचींही असत नाहींत. १५ कमलिनीला सूर्याचे किरण प्राप्त झाले, ह्मणजे मग लाज धरणार कोण? किंवा पाण्यानें मिठास स्पर्श केला कीं, त्याच्या आंगचें देहभान सुटतें. १६ त्याप्रमाणें मीं जेव्हां आपलें स्मरण केलें, तेव्हांच माझा मीपणा मी विसरलों. मग तृप्त झालेला जसा ढेंकर देऊं लागतो, १७ त्याप्रमाणें महाराज! आपण माझी अवस्था करून सोडली. माझा मीपणा देशोधडीस लाऊन, स्तुतीच्या निमित्तानें माझ्या वाणीला वेडच लावून सोडलेंत. १८ किंवा मनामध्यें स्मरण करून जरी स्तुति केली, तरी गुणागुण लक्ष्यांत आणावे लागतात. १९ आणखी आपण तर **महाराज!** ऐश्वर्यरसाची ओतलेली अखंड मूर्ति अहांत. तेव्हां गुणागुणांनीं विभाग तरी कसे करावेत? मोतीं फोडून सांधावें तें बरें, का तसेंच ठेवावें तें बरें? २० आतां, आपण मायबाप आहां ह्मटलें तर स्तुति होणार नाहीं. कारण त्यामध्यें मुलाच्या उपाधीच्या द्वैतभावाचा विटाळ आहे. २१ महाराज! सेवक झाल्यानें आपणाकडे प्रभुत्व येईल खरें; पण आपल्या थोरपणाचें तसल्या उष्ट्या उपाधीच्या शब्दानें कसें वर्णन करावें? २२ तूं जर एक सर्वव्यापी आत्मा आहेस असें ह्मणावयाला गेलों तर, हे **दातारा!** तुला अंतर्यामी असलेल्यास बाहेर घालविल्यासारखें होईल. २३ ह्मणून आपल्याला योग्य स्तुति अशी जगामध्यें खरोखरच नाहीं. आपणाला मौनाशिवाय दुसरा अलंकारच घालतां येत नाहीं. २४ कांहीं न बोलणें हीच आपली स्तुति; कांहीं न करणें हीच आपली पूजा; आणि निरहंकारानें कांहींच न होणें हेंच आपलें सान्निध्य. २५ तरी भ्रांतीनें घेरलेलें वेडेंपिसें बडबडतें त्याप्रमाणें वर्णन करतों, तें आपण माता ह्मणून सहन करावें. २६ आणि गीतार्थरूप प्रसादाची मुद्रिका (शिक्का) माझ्या वाणीवर ठोकावी. ह्मणजे तिच्या योगानें ह्या सज्जन सभासदांपुढें तिला मान मिळेल. २७ तेव्हां **श्रीनिवृत्तिनाथ** ह्मणाले 'ह्याची पुन्हा पुन्हा आवश्यकता नाहीं. परिसानें लोखंडाला काय वारंवार घांसावें लागतें?' २८ तेव्हां **ज्ञानदेवांनीं** विनंति केली. ते ह्मणाले 'प्रसाद झाला काय? तर देवांनीं आतां ग्रंथाकडे लक्ष्य द्यावें.' २९

'तर महाराज! गीतारूप रत्नखचित देवालयाचा, अर्थरूप चिंतामणीचा कळस; तो सर्व गीतादर्शनाचा बोधक आहे. ३० लोकांमध्यें सुद्धां असेंच आहे कीं, कळस दुरून दिसला ह्मणजे त्या देवतेचें दर्शन झाल्याप्रमाणें होतें. ३१ येथेंही तसेंच आहे. कारण, ह्या एकाच अध्यायानें सारें गीताशास्त्र दिसूं लागतें. ३२ ह्याच कारणावरून **श्री वेदव्यासांनीं** ह्या गीतारूप देवालयाला ह्या अठराव्या अध्यायाचा कळस घातला असें मी ह्मणतों. ३३ देवालयांत कळसाच्या पुढें कांहींच काम रहात नाहीं. गीताही संपूर्णतेनें तेंच सुचविते. ३४ **व्यास** हा मूळचा कुशल कारागीर; त्यानें वेदरत्नांच्या पर्वतावर, उपनिषदांच्या सपाट

जमिनींत पाया खटला. ३५ तेव्हां धर्म, अर्थ, काम ह्या त्रिवर्गांचा जो अपार चाराचुरा निघाला, त्याचा **महाभारत** नांवाचा सभोंवार तट घातला. ३६ आणि आंत आत्मज्ञान एकत्र जमवून त्याचे **अर्जुन श्रीकृष्णाचा** संवादरूपी सुरेख चिरे वगैरे घडून मोठ्या चातुर्यानें तयार केलें. ३७ निवृत्तिसूत्र लावून सर्व शास्त्राची भर घालून, मोक्षमर्यादेनें सर्व आकार तयार केला. ३८ अशा प्रकारें इमारत तयार होऊन, पंधरा अध्यायांचे पंधरा थर एकमेकांवर चढविले. ३९ त्यानंतर सोळावा अध्याय हा गळमण्याचा आकार होय. आणि सतरा अध्याय तो मध्यम घंटेची जागा, किंवा खोवण झाली. ४० आणि त्यावर अठरावा अध्याय हा सहजच कळस झाला, आणि त्याच्यावर गीतादिक विस्तार ही ध्वजा लागली. ४१ ह्मणून मागचे अध्याय ते भूमीचे चढते मजले होत. त्यांची पूर्णता हा आपल्या आंगीं दाखवितो. ४२ झालेल्या कामांत कांहीं उणेपणा नाहीं, हें कळसावरून स्पष्ट होतें. त्याप्रमाणें साद्यंत गीतेची अठराव्या अध्यायानें संपूर्णता दिसून येते. ४३ असें हें चतुर **व्यासांनीं** गीतानामक देवालय तयार करून त्यांत नानाप्रकारच्या प्राण्यांचें (भवबंधापासून) संरक्षण केलें. ४४ कोणी ह्याच्या बाहेरूनच प्रदक्षिणा करतात; कोणी श्रवणाच्या निमित्तानें ह्याच्या छायेचा उपभोग घेतात; ४५ कोणी पूर्णलक्ष्याचा—एकाग्रतेचा—विडा पैसा घेऊन अर्थज्ञानाच्या गाभाऱ्यांत शिरतात; ४६ ते हां हां ह्मणतां आत्मबोधाच्या योगेंकरून आत्मरूप **श्रीहरीला** भेटतात; परंतु मोक्षरूप देवालयामध्यें दर्शन हें सर्वांनाच होतें. ४७ श्रीमंतांच्या पंक्तीला भोजन असलें ह्मणजे तळमजल्यावरच्याला, व माडीवरच्यालाही पक्वान्नें सारखींच. त्याप्रमाणें (गीतेच्या) श्रवणानें, अर्थानें, आणि पठणानेंही मोक्षच प्राप्त होतो. ४८ असा हा स्पष्ट भेद जाणून गीतारूप **विष्णूच्या** देवालयाचा अठरावा अध्याय हा कळस आहे असें मी ह्मटलें. ४९ आतां पूर्वींचे सतरा अध्याय कशा प्रकारचे होते, त्यांचा संबंध दृष्टीला दिसेल असा सांगूं. ५० कारण, **गंगेचें** आणि **यमुनेचें** पाणी, प्रवाहाच्या जोरानें भिन्न भिन्न असें वाटतें. परंतु पावन करण्याच्या संबंधानें तें एकच आहे हें स्पष्ट होय. ५१ दोन्ही आकार न मोडतां एक शरीर तयार केलें आहे, हें अर्धनारीनटेश्वराच्या स्वरूपामध्यें दिसून येतें. ५२ किंवा दिवस जसजसे वाढत जातात, त्याप्रमाणें चंद्रबिंबांतील कलाही वृद्धिंगत होत जातात. परंतु चंद्रांत कांहीं तसे भिन्न भिन्न लेप असत नाहींत. ५३ त्याप्रमाणें वेगवेगळे चार चरण; श्लोक, श्लोकार्ध, अध्याय, अध्यायांचे भेद हीं सारीं निरनिराळीं आहेत अशीं वाटतात खरीं, ५४ परंतु नाना रत्नमण्यांना दोरी जशी एकच असते, त्याप्रमाणें अर्थाची निर्मलता कांहीं निरनिराळीं स्वरूपें धारण करित नाहीं. ५५ पुष्कळ मोत्यें मिळून त्यांला हाराची योग्यता येते. परंतु शोभेचें स्वरूप एकच असतें. ५६ फुलें आणि हार असे भेद दिसतात; परंतु सुगंधामध्यें दुसरेपणा असत नाहीं. त्याचप्रमाणें हे श्लोक आणि अध्याय आहेत ह्मणून समजावें. ५७ श्लोक सातशें; आणि अध्यायांचें प्रमाण अठरा आहे. परंतु देव बोललेलें भाषण —अभिप्राय—एक. दुसरें नाहीं. ५८ आणखी मीही तो मार्ग न सोडतां, ग्रंथाचें स्पष्टीकरण केलें आहे. आणि आतांही त्यालाच अनुसरून निरूपण ऐका. ५९ तर सतरावा अध्याय पूर्णत्वास पावला त्याच्या अखेरच्या श्लोकांत देव असें बोलले. ६० "**अर्जुना!** ब्रह्मनामाविषयीं आस्तिक बुद्धि सोडून देऊन श्रद्धावंत जितकीं कर्में करतात, तितकीं सारीं दुष्कर्में होतात." ६१ हें देवाचें भाषण ऐकून **अर्जुनाला** आनंद झाला. तो ह्मणाला "कर्मांवर श्रद्धा ठेवणाराला दोष ठेवलेला दिसतो." ६२ तो तर बिचारा अज्ञानानें आंधळा. येवढा ईश्वरही

त्याच्यानें पहावत नाहीं. त्याला पुढें क्षणभर तरी विचार सुचणार कसा? ६३ शिवाय, रज आणि तम हीं दोन्हीं नष्ट झाल्यावांचून श्रद्धाही दुर्बळ आहे. ती ब्रह्मनामाकडे लागणार कशी? ६४ मग शस्त्राला आलिंगन देणें, दोरीवरून धांवणें, नागिणीशीं खेळणें हें जसें मृत्यूस कारण, ६५ त्याप्रमाणें अनेक कर्मे त्याच्या जन्मांतरांस मात्र कारणीभूत होतात. इतके कर्मामध्यें घोटाळे आहेत. ६६ किंवा कदाचित् तें यथासांग घडलेंच, तर ज्ञानाची योग्यता प्राप्त होईल. नाहीं तर मात्र त्याच्या योगानें नरकांत जावें लागेल. ६७ अशा कर्मामध्यें अनेक तऱ्हेच्या अडचणी आहेत. तेव्हां कर्मठाला, मोक्षाची पाळी येणार कधीं? ६८ तर ह्या कर्माची अडचणच नाहींशी करून टाकावी. साराच त्याग करावा. आणि सांगोपांग संन्यासाचेंच ग्रहण करावें. ६९ ह्मणजे कर्मबंधाच्या भयाची जेथें कधीं गोष्ट नाहीं; ज्यांच्या योगानें आत्मज्ञानही स्वाधीन होतें; ७० ज्ञानाच्या आमंत्रणाचे जे मंत्र; ज्ञान पिकण्याचें जें उत्तम शेतच, किंवा ज्ञानाला आकर्षण करण्याचें कळसूत्रच; ७१ ते संन्यास आणि त्याग ह्या दोहींचेंही अनुष्ठान करून जर जग मुक्त होतें, तर तेंच आतां खुलासेवार विचारूं या. ७२ ह्याप्रमाणें **अर्जुनानें** विचार करून त्याग आणि संन्यास ह्यांच्या व्यवस्थेचें व स्वरूपाचें ज्ञान होण्यासाठीं जेव्हां प्रश्न केला, ७३ तेव्हां प्रत्युत्तरादाखल **श्रीकृष्णांनीं** जें भाषण केलें, त्याचें विवरण अठराव्या अध्यायांत आहे. ७४ अशा प्रकारें कार्यकारणभावानें एका अध्यायापासून दुसरा अध्याय निघाला आहे. आतां त्यानें काय विचारलें तें नीट ऐका. ७५ तर पंडूचा पुत्र जो **अर्जुन**, त्यानें देवाचें बोलणें सरलें असें पाहून त्याच्या अंतःकरणाला वाईट वाटलें. ७६ वस्तुतः तत्त्वज्ञानाच्या संबंधानें तो परिपूर्णच होता. खरें तत्त्व त्याला निश्चयेंकरून कळलेलें होतें. परंतु देव उगेच बसले, हें त्याला आवडलें नाहीं. ७७ वत्स तृप्त झालें तरी, गायीनें दूर जावें असें त्यास वाटत नाहीं. अनन्यप्रीतीचें लक्षणच असें आहे. ७८ त्यानें कामाशिवायही बोलावें; दृष्टी पडत असलें तरी आणखी पहावें; उपभोग घेतांना आवडल्याची इच्छा दुणावते. ७९ असा ह्या प्रेमाचा स्वभावधर्मच आहे. आणि **अर्जुन** तर प्रेमाची प्रत्यक्ष मूर्तीच. ह्मणून (देव) उगे राहिल्याचें त्याला दुःख वाटलें. ८० आणखी संवादाच्या निमित्तानें पारमार्थिक अशी जी वस्तु आहे, तिचा आरशांत रूप पाहिल्याप्रमाणें उपभोग घ्यावयाचा, ८१ पण संवाद थांबला तेव्हां उपभोग घेण्याचेंही राहिलें. जो सुखाला लांचावलेला त्याला हें सहन होईल काय? ८२ ह्यासाठीं त्याग आणि संन्यास विचारावयाचें निमित्त करून गीतेचें वस्त्र पुन्हां उलगडलें. ८३ हा अठरावा अध्याय नव्हे; तर ही एकाध्यायी गीताच आहे. वासरूंच गायीला पिऊं लागल्यावर पान्ह्याला वेळ तो काय? ८४ त्याप्रमाणें समाप्तीच्या वेळेला, गीतेची पुनरावृत्ति करविली. स्वामीचा आणि सेवकांचा संवाद काय काय करणार नाहीं? ८५ पण तें असो. **अर्जुनानें** असें विचारलें. तो ह्मणाला "**विश्वेशांनीं** विनंति ऐकावी." ८६

अर्जुन उवाच—

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥

[संन्यासस्य महाबाहो] हां जी संन्यास आणि त्याग। इयां दोहीं एके अर्थी लाग। जैसा संघात आणि संघ। संघातेंचि बोलिजे ॥ ८७ ॥ [त्यागस्य च हृषीकेश] तैसेंचि त्यागें आणि संन्यासें। त्यागचि बोलिजत असे। [तत्त्वमिच्छामि वेदितुं] आमचेनि तंव मानसें। जाणिजे हेंचि ॥८८॥ [पृथक्केशिनिषूदन] ना कांहीं आथी अर्थभेद। तो देव करोतु विशद। तेथ ह्मणती श्रीमुकुंद। भिन्नचि पैं ॥ ८९ ॥ [श्रीभगवानुवाच–] तरि अर्जुना तुझ्या मनीं। त्याग सं-

१ संबंध. २ असेल. ३ स्पष्ट करोत. ४ द्वितीयाध्यांत. "एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धियोगे त्विमां शृणु" या श्लोकापासून अध्यायसमाप्तीपर्यंत बुद्धियोग सांगितला,

न्यास दोनी । एकार्थ गमले हें मानी । मीही साच ॥ ९० ॥ इहीं दोहीं कीर शब्दीं । त्यागचि बोलिजे त्रिशुद्धी[1] । परि कारण एथ भेदीं । येतुलेंचि ॥ ९१ ॥ निपटूनि[2] कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यास ह्मणिजे । फळ मात्र कां त्यजिजे । तो त्याग गा ॥ ९२ ॥ तरी कोणा कर्माचें फळ । सांडिजे कोण कर्म केवळ । हेंही सांगों विवेळ[3] । चित्त देईं ॥ ९३ ॥ तरि आपैसीं दांगें[4] डोंगर । झाडें लागती अपार । तैसे लांवे[5] राजागर[6] । नुठिती ते ॥ ९४ ॥ न पेरितां सैंधें[7] तृणें । उठती तैसें साळीचें होणें । नाहीं गा रावाउणें[8] । जियापरी ॥ ९५ ॥ कां अंग जाहालें सहजें । परि लेणें उद्यमें[9] कीजे । नदी आपैसी आपादिजे[10] । विहिरी जेविं ॥ ९६ ॥ तैसें नित्य नैमित्तिक । कर्म होय स्वाभाविक । परि न कामितां[11] कामिक । न निफजे[12] ॥ ९७ ॥

"महाराज! संन्यास आणि त्याग ह्या दोहोंचा संबंध एकाच अर्थाचा दिसतो. संघात आणि संघ हे ज्याप्रमाणें एका संघातालाच शब्द आहेत; ८७ त्याप्रमाणेंच त्यागाला आणि संन्यासाला त्याग असेंच ह्मणतात. आमच्या मनाला तर तसेंच माहित आहे. ८८ किंवा त्यांच्या अर्थात कांहीं भेद असेल तर, तो देवांनीं विशद करावा." तेव्हां श्रीमुकुंद ह्मणाले "ते भिन्नच आहेत. ८९ तरी अर्जुना! तुझ्या मनामध्यें त्याग आणि संन्यास ह्या दोहींचे अर्थ एकच असें वाटलें, तेंही एका अर्थी खरेंच आहे. मीही तें मान्य करतों. ९० ह्या दोन्ही शब्दांना खरोखर त्यागच ह्मणतात. पण त्यांत भेद मानावयाला कारण इतकेंच कीं, ९१ सर्वथैव कर्म टाकणें त्याला संन्यास ह्मणतात; आणि फल मात्र टाकणें तो त्याग होय. ९२ तर कोणत्या कर्माचें फळ टाकावें, व निखालस कर्मच कोणतें टाकावें, हेंही व्यक्त करून सांगूं. लक्ष्य दे. ९३ तर, अरण्यामध्यें आणि डोंगरावर अपरंपार झाडें जशीं आपोआप लागलेलीं असतात, त्याप्रमाणें लागवडीचें भात, व बागा कांहीं उगवत नाहींत. ९४ पेरल्याशिवायच गवतें हवीं तितकीं दाट उगवतात, पण राब घातल्याशिवाय जसें भात पिकत नाहीं; ९५ किंवा आंग हें सहज उत्पन्न झालेलें असतें. पण त्याला अलंकार करावयाचे तर उद्योगानें करावे लागतात. नदी आपोआप मिळते; पण विहीर खणली पाहिजे. ९६ त्याप्रमाणें नित्य नैमित्तिक कर्म स्वाभाविक होतें. परंतु इच्छिणारानें इच्छा केल्यावांचून तें उत्पन्न होत नाहीं." ९७

श्रीभगवानुवाच—

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥

[श्रीभगवानुवाच–काम्यानां कर्मणां] कां कामनेचेंचि देंळवाडें[1] । जें उभारावया घडे । अश्वमेधादिक फुडे[2] । याग जेथ ॥९८॥ वापी[3] कूप आराम[4] । अग्रहारें[5] हन महाग्राम । आणीकही नानासंभ्रम । व्रतांचे ते ॥ ९९ ॥ ऐसें इष्टापूर्त[6] सकळ । जया कामना एक मूळ । जें केलें भोगवी फळ । बांधोनियां ॥१००॥ देहाचिया गांवा आलिया । जन्ममृत्यूचिया सोहळ्या । ना ह्मणों नये धनंजया । जियापरी ॥ १ ॥ कां ललाटींचें लिहिलें । न मोडे गा कांहीं केलें । काळेगोरेपण धुतलें । फिटों नेणे ॥ २ ॥ केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया धरणें बैसे । न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना ॥ ३ ॥ कां कामनाही न करितां । अवसांत[10] घडे पंडुसुता । तरि वांयकांड[11] झुंझतां । लागे जैसें ॥ ४ ॥ गुळ नेणतां तोंडीं । घातला देचि गोडी । आगी मानूनि राखोंडी । चेपिला पोळी[12] ॥५॥ काम्यकर्मीं हें एक । सामर्थ्य आथी स्वाभाविक । ह्मणोनि नको कौतुक । मुमुक्षू एथ ॥ ६ ॥ [न्यासं] किंबहुना पार्था ऐसें । जें काम्य कर्म गा असे । तें त्यजिजे विष जैसें । वोकूनियां ॥ ७ ॥ [संन्यासं कवयो विदुः] मग तया त्यागातें जगीं । संन्यास ऐसया भंगीं[13] । बोलिजे अंतरंगीं । सर्वद्रष्टा ॥ ८ ॥ हें काम्य कर्म सांडणें । तें कामनेतेंचि उपडणें । द्रव्यत्यागें दवडणें[14] । भय जैसें ॥ ९ ॥ [सर्वकर्मफलत्यागं] आणि सो-

---

तोच यांत "काम्यानां कर्मणां" या श्लोकापासून ११ श्लोकांनीं सांगतात.

१ निश्चयानें. २ सर्वथैव. ३ स्पष्ट. ४ अरण्यें. ५ पाणी घातलेलें लांवीचें भात. ६ बाग. ७ बहुत. ८ शेतांत राव घालतात त्यावांचून. ९ उद्योगानें. १० संपादावी. ११ न इच्छितां. १२ उत्पन्न होत नाहीं.

१ विस्तार. २ स्पष्ट. ३ पुष्करणी. ४ बाग. ५ इनामें. ६ इष्ट=यज्ञादि, पूर्त=कूप, तलाव, बाग इत्यादि. ७ नशिबांतील. ८ नाहींसें होऊं शकत नाहीं. ९ सोडीत नाहीं. १० अकस्मात्. ११ बाण. १२ पोळते. १३ खुणेनें. १४ घालविणें.

मंसूर्यग्रहणें । येऊनि करविती पार्वणें । कां मातापितरमरणें । अंकित जे दिवस ॥ ११० ॥ अथवा अतिथी हन पावे । हें ऐसैसें पडे जें करावें । तें तें कर्म जाणावें । नैमित्तिक गा ॥ ११ ॥ वार्षियें क्षोभे गगन । वसंतें दुणावे वन । देहा शृंगारी यौवन- । दशा जैसी ॥ १२ ॥ कां सोमकांत सोमें पघळे । सूर्यें फांकूनी कमळें । एथ असतेंचि पाल्हाळे । आन नये ॥ १३ ॥ तैसें नित्य जें कां कर्म । तें निमित्ताचे लाहे नियम । एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय ॥ १४ ॥ आणि सायंप्रातर्मध्याह्नीं । जें कां करणीय प्रतिदिनीं । परि दृष्टि जैसी लोचनीं । अधिक नोहे ॥ १५ ॥ कां नोपादितां गती । चरणीं जैसी आथी । ना तरी ते दीप्ती । दीपबिंबीं ॥ १६ ॥ वांस नेदितां जैसें । चंदनीं सौरभ्य असे । अधिकाराचें तैसें । रूपचि जें ॥ १७ ॥ नित्य कर्म ऐसें जनीं । पार्था बोलिजे तें मानीं । एवं नित्य नैमित्तिक दोन्हीं । दाविलीं तुज ॥ १८ ॥ हेंचि नित्य नैमित्तिक । अनुष्ठेय आवश्यक । ह्मणोनि ह्मणों पाहती एक । वांझ ययातें ॥ १९ ॥ परी भोजनीं जैसें होये । तृप्ती लाभे भूक जाये । तैसें नित्य नैमित्तिकीं आहे । सर्वांगीं फळ ॥ १२० ॥ कीडे आगिठा पडे । तरि मळ तुटे वानी चढे । यया कर्मा तया सांगडें । फळ जाणावें ॥ २१ ॥ जे प्रत्यवाय तंव गळे । स्वाधिकार बहुवें उजळे । तेथ हांतोफळिया मिळे । सद्गतीसी ॥ २२ ॥ येवढेवरी ढिसाळ । नित्यनैमित्तिकीं आहे फळ । [त्यागं] परि तें त्यजिजे मूळ । नक्षत्रीं जैसें ॥ २३ ॥ लता पिके आघवी । तंव च्यूत बांधे पालवी । मग हात न लावित माधवी । सोडूनि घाली ॥ २४ ॥ तैसी नोलांडितां कर्मरेखा । चित्त दीजे नित्यनैमित्तिका । पाठी फळा कीजे अशेखा । वांतिचिये वानी ॥ २५ ॥ [प्राहुस्त्यागं विचक्षणाः] यया कर्मफळत्यागातें । त्याग ह्मणती पैं जाणते । एवं त्याग संन्यास तूतें । परिसविले ॥ २६ ॥ हा संन्यास जैं संभवे । तैं काम्य बांधूं न पवे । निषिद्ध तंव स्वभावें । निषिद्धें गेलें ॥ २७ ॥ आणि नित्यादिक जें असे । तें येणें फळत्यागें नाशे । शिर लोटलिया जैसें । येर आंग ॥ २८ ॥ मग सस्य फळपाकांत । तैसें निमालिया कर्मजात । आत्मज्ञान गिंवसित । अपैसें ये ॥ २९ ॥ ऐसिया निगुती दोनी । त्याग संन्यास अनुष्ठानीं । पडले गा आत्मज्ञानीं । बांधती पोट ॥ १३० ॥ ना तरी हे निगुती चुके । मग त्याग कीजे हातंतुकें । तें कांहीं न त्यजे अधिकें । गोवींचि पडे ॥ ३१ ॥ जें औषध व्याधी अनोळख । तें घेतलिया परते विख । कां अन्न न मानितां भूक । न मारी काय ॥ ३२ ॥ ह्मणोनि त्याज्य जें नोहे । तेथ त्यागातें न सुवावें । त्याज्यांलागीं नोहावें लोभपर ॥ ३३ ॥ चुकलिया त्यागाचें वेंझें । केला सर्वत्यागही होय वोझें । निषिद्धें त्या सर्वत्र जुंझें । वीतराग ते ॥ ३४ ॥

**"किंवा इच्छेच्या विस्तारानें अश्वमेधादिक याग प्रसिद्धपणें करूं लागणें, ९८ तलाव, विहिरी, बाग, इनामजमिनी, गांव इनाम, आणखी व्रतांचेही अनेक प्रकार, ९९ अशा प्रकारें यज्ञ, वापी, कूप इत्यादि सार्‍यांना इच्छा हीच एक मूळ आहे. ती करित असल्यामुळें, त्याचें फळ बांधून घालून ती भोगावयास लावते. १०० अर्जुना! देहाच्या गांवांत आल्यानंतर, जन्ममृत्यूच्या सोहाळयाला ज्याप्रमाणें नाहीं ह्मणतां येत नाहीं; १०१ किंवा कपाळांत लिहिलेलें असतें तें, कांहीं केलें तरी चुकवितां येत नाहीं; काळेपणा किंवा गोरेपणा जसा धुतल्यानें जात नाहीं; १०२ त्याप्रमाणें इच्छा धरून केलेलें जें कर्म, तें, फळ भोगावयास लावण्यासाठीं, देणें दिलें नाहीं ह्मणून जसें कोणी सोडित नाहीं, त्याप्रमाणें धरणें घेऊन बसतें. १०३ किंवा अर्जुना! इच्छा न करतांही अकस्मात् घडेल तर, लढाईमध्यें जसा वांझा बाण लागावा, १०४ गूळ न समजून जरी तोंडांत घातला तरी गोडच लागतो; राखुंडी समजून विस्तव दाबला तरी, तो जसा पोळतो; १०५ त्याप्रमाणें काम्यकर्मांमध्यें हें एक स्वाभाविक सामर्थ्य आहे. ह्मणून मो-**

---

१ नित्य नैमित्तिक भेदानें दोन प्रकारचीं कर्में आहेत. त्यांतील नैमित्तिक कर्में. ( चंद्रसूर्यग्रहणादिक. ) २ पर्वणीचे दिवस. ३ पर्जन्यकाळीं. ४ तारुण्य. ५ चंद्रकांतमणि चंद्रकिरणांनीं द्रवतो. ६ विस्तारे. ७ त्रिकाळ करण्याचीं नित्य कर्में. ८ करावयास योग्य. ९ न चालतां. १० आश्रय न देतां. ११ सुगंध. १२ कर्ता, कर्म. १३ केलेंच पाहिजे. १४ निर्फळ. १५ हीण. १६ अग्नींत. १७ कस. १८ बरोबरीनें, प्रमाणें. १९ दोष. २० हां हां ह्मणतां, जलदी. २१ येथवर. २२ मोठें. २३ आम्रवृक्ष. २४ ओकारीसारखें. २५ निषिद्ध कर्में.

१ तोडिलें असतां. २ धान्य पिकेपर्यंत. ३ शोधीत. ४ युक्तीनें. ५ योग्यता. ६ युक्ति. ७ अटकळीनें. ८ गुंताड्यांत. ९ होतें. १० अत्याज्याचा त्याग व त्याज्याचा लोभ हीं नसावीं. ११ घालावें. १२ सुईचें अग्र, युक्ति. १३ वैराग्यसंपन्न.

न्यास दोनी । एकार्थ गमले हें मानी । मीही साच ॥ ९० ॥ इहीं दोहीं कीर शब्दीं । त्यागचि बोलिजे त्रिशुद्धी । परि कारण एथ भेदीं । येतुलेंचि ॥ ९१ ॥ निपटूनि कर्म सांडिजे । तें सांडणें संन्यास ह्मणिजे । फळ मात्र कां त्यजिजे । तो त्याग गा ॥ ९२ ॥ तरी कोणा कर्माचें फळ । सांडिजे कोण कर्म केवळ । हेंही सांगों विवळ । चित्त देईं ॥ ९३ ॥ तरि आपैसीं दांगें डोंगर । झाडें लागती अपार । तैसे लांवे राजागर । तुठितीचे ॥ ९४ ॥ न पेरितां सैंधें तृणें । उठती तैसें साळीचें होणें । नाहीं गा रावाउणें । जियापरी ॥ ९५ ॥ कां अंग जाहालें सहजें । परि लेणें उद्यमें कीजे । नदी आपैसी आपादिजे । विहिरी जेवि ॥ ९६ ॥ तैसें नित्य नैमित्तिक । कर्म होय स्वाभाविक । परि न कामितां कामिक । न निफजे ॥ ९७ ॥

"महाराज! संन्यास आणि त्याग ह्या दोहोंचा संबंध एकाच अर्थाचा दिसतो. संघात आणि संघ हे ज्याप्रमाणें एका संघातालाच शब्द आहेत; ८७ त्याप्रमाणेंच त्यागाला आणि संन्यासाला त्याग असेंच ह्मणतात. आमच्या मनाला तर तसेंच माहित आहे. ८८ किंवा त्यांच्या अर्थांत कांहीं भेद असेल तर, तो देवांनीं विशद करावा." तेव्हां श्रीमुकुंद ह्मणाले "ते भिन्नच आहेत. ८९ तरी अर्जुना! तुझ्या मनामध्यें त्याग आणि संन्यास ह्या दोहींचे अर्थ एकच असें वाटलें, तेंही एका अर्थी खरेंच आहे. मीही तें मान्य करतों. ९० ह्या दोन्ही शब्दांना खरोखर त्यागच ह्मणतात. पण त्यांत भेद मानावयाला कारण इतकेंच कीं, ९१ सर्वथैव कर्म टाकणें त्याला संन्यास ह्मणतात; आणि फल मात्र टाकणें तो त्याग होय. ९२ तर कोणत्या कर्माचें फळ टाकावें, व निखालस कर्मच कोणतें टाकावें, हेंही व्यक्त करून सांगूं. लक्ष्य दे. ९३ तर, अरण्यामध्यें आणि डोंगरावर अपरंपार झाडें जशीं आपोआप लागलेलीं असतात, त्याप्रमाणें लागवडीचें भात, व बागा कांहीं उ[गव]त नाहींत. ९४ पेरल्याशिवायच गवतें ह[ीं] तितकीं दाट उगवतात, पण राब घातल्या[]शिवाय जसें भात पिकत नाहीं; ९५ कि[ंवा] आंग हें सहज उत्पन्न झालेलें असतें. प[ण] त्याला अलंकार करावयाचे तर उद्योगानें [क]रावे लागतात. नदी आपोआप मिळते; प[ण] विहीर खणली पाहिजे. ९६ त्याप्रमाणें नि[त्य] नैमित्तिक कर्म स्वाभाविक होतें. परंतु इच्छि[]णारानें इच्छा केल्यावांचून तें उत्पन्न हो[त] नाहीं." ९७

श्रीभगवानुवाच—

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ।

[श्रीभगवानुवाच–काम्यानां कर्मणां] कां कामनेचें देव्हाडें । जें उभारावया घडे । अश्वमेधादिक फुडे । याग [जे] ॥९८॥ वापी कूप आराम । अग्रहारें हन महाग्राम । आणीक नानासंभ्रम । व्रतांचे ते ॥ ९९ ॥ ऐसें इष्टापूर्त सकळ । ज[े] कामना एक मूळ । जें केलें भोगवी फळ । बांधोनियां ॥१००॥ देहाचिया गांवा आलिया । जन्ममृत्यूचिया सोहळ्या । ह्मणों नये धनंजया । जियापरी ॥ १ ॥ कां ललाटींचें [ ] हिलें । न मोडे गा कांहीं केलें । काळेगोरेपण धुतलें । [ ] नेणे ॥ २ ॥ केलें काम्य कर्म तैसें । फळ भोगावया घ[े] वैसे । न फेडितां ऋण जैसें । वोसंडीना ॥ ३ ॥ कां क[ ] नाहीं न करितां । अवसांत घडे पंडुसुता । तरि वांयत्र[ ] झुंझतां । लागे जैसें ॥ ४ ॥ गुळ नेणतां तोंडीं । घात[ल्या] देचि गोडी । आगी मानूनि राखोंडी । चेपिला पोळी ॥ [५ ॥] काम्यकर्मी हें एक । सामर्थ्य आथी स्वाभाविक । ह्मणोनि न[ ] कौतुक । मुमुक्षू एथ ॥ ६ ॥ [न्यासं] किंबहुना पार्था ऐसें जें काम्य कर्म गा असे । तें त्यजिजे विष जैसें । वोकूनि[यां] ॥ ७ ॥ [संन्यासं कवयो विदुः] मग तया त्यागातें जग[ीं] संन्यास ऐसया भंगीं । बोलिजे अंतरंगीं । सर्वद्रष्टा ॥ ८ [॥] हें काम्य कर्म सांडणें । तें कामनेतेंचि उपडणें । द्रव्य[ ] दवडणें । भय जैसें ॥ ९ ॥ [सर्वकर्मफलत्यागं] आणि [ ]

तोच यांत "काम्यानां कर्मणां" या श्लोकापासून ११ श्लोकांनीं सांगतात.

१ निश्चयानें. २ सर्वथैव. ३ स्पष्ट. ४ अरण्यें. ५ पाणी घातलेलें लांवीचें भात. ६ बाग. ७ बहुत. ८ शेतांत राब घालतात त्यावांचून. ९ उद्योगानें. १० संपादावी. ११ न इच्छितां. १२ उत्पन्न होत नाहीं.

१ विस्तार. २ स्पष्ट. ३ पुष्करणी. ४ बाग. ५ इन[ाम] ६ इष्ट=यज्ञादि, पूर्त=कूप, तलाव, बाग इत्यादि. ७ [सो]हळ्यांतील. ८ नाहींसें होऊं शकत नाहीं. ९ सोड[त] नाहीं. १० अकस्मात्. ११ बाण. १२ पोळते. १३ [ ] १४ घालविणें.

सूर्यग्रहणें । येऊनि करविती पावेंगें । कां मातापितरमरणें । अंकित जे दिवस ॥ ११० ॥ अथवा अतिथी हन पावे । हें ऐसेंसें पडे जें करावें । तें तें कर्म जाणावें । नैमित्तिक गा ॥ ११ ॥ वार्षियां क्षोभे गगन । वसंतें दुणावे वन । देहा शृंगारी यौवन- । दशा जैसी ॥ १२ ॥ कां सोमकांत सोमें पघळे । सूर्यें फांकुनी कमळें । एथ असतेंचि पाल्हाळे । आन नये ॥ १३ ॥ तैसें नित्य जें कां कर्म । तें निमित्ताचे लाहे नियम । एथ उंचावे तेणें नाम । नैमित्तिक होय ॥ १४ ॥ आणि सायंप्रातर्मध्याहीं । जें कां करणीय प्रतिदिनीं । परि दृष्टि जैसी लोचनीं । अधिक नोहे ॥ १५ ॥ कां नोपादितां गती । चरणीं जैसी आथी । ना तरी ते दीप्ती । दीपवर्ती ॥ १६ ॥ वास नेदितां जैसें । चंदनीं सौरभ्य असे । अधिकाराचें तैसें । रूपचि जें ॥ १७ ॥ नित्य कर्म ऐसें जनीं । पार्था बोलिजे तें मानीं । एवं नित्य नैमित्तिक दोन्हीं । दाविलीं तुज ॥ १८ ॥ हेंचि नित्य नैमित्तिक । अनुष्ठेय आवश्यक । म्हणोनि म्हणों पाहती एक । वांझ ययातें ॥ १९ ॥ परी भोजनीं जैसें होये । तृप्ती लाभे भूक जाये । तैसें नित्य नैमित्तिकीं आहे । सर्वांगीं फळ ॥ १२० ॥ कीड आंगिठा पडे । तरि मळ तुटे वानी चढे । यया कर्मा तया सांगडें । फळ जाणावें ॥ २१ ॥ जे प्रत्यवाय तंव गळे । स्वाधिकार बहुवें उजळे । तेथ हातोफळिया मिळे । सद्गतीसी ॥ २२ ॥ येवढेंवरी डिसाळ । नित्यनैमित्तिकीं आहे फळ । [त्यागं] परि तें त्यजिजे मूळ । नक्षत्रीं जैसें ॥ २३ ॥ लता पिके आघवी । तंव येऊन वांवे पालवी । मग हात न लावित माधवी । मोहूनि घाली ॥ २४ ॥ तैसी नोलांडितां कर्मरेखा । चित्त दीजे नित्यनैमित्तिका । पाठीं फळा कीजे अशेखा । वांतिचिये वानी ॥ २५ ॥ [प्राहुस्त्यागं विचक्षणाः] यया कर्मफळत्यागातें । त्याग म्हणती पैं जाणते । एवं त्याग संन्यास तूतें । परिसविले ॥ २६ ॥ हा संन्यास जैं संभवे । तैं काम्य बांधूं न पवे । निषिद्ध तंव स्वभावें । निषिद्धें गेलें ॥ २७ ॥ आणि नित्यादिक जें असे । तें येणें फळत्यागें नासे । शिर लोटलिया जैसें । येर आंग ॥ २८ ॥ मग सस्य फळाक्रांत । तैसें निमालिया कर्मजात । आत्मज्ञान गिंवसित । अपैसें ये ॥ २९ ॥ ऐसिया निगुती दोनी । त्याग संन्यास अनुष्ठानीं । पडले गा आत्मज्ञानीं । वांवती पाट ॥ १३० ॥ ना तरी हे निगुती चुके । मग त्याग कीजे हातंतुकें । तें कांहीं न त्यजे अधिकें । गोवींचि पडे ॥ ३१ ॥ जें औषध व्याधी अनोळख । तें घेतलिया परते विख । कां अन्न न मावितां भूक । न मारी काय ॥ ३२ ॥ म्हणोनि त्याज्य जें नोहे । तेथ त्यागातें न सुवावें । त्याज्यालागीं नोहावें लोभपर ॥ ३३ ॥ चुकलिया त्यागाचें वेझें । केला सर्वत्यागही होय वोझें । निषिद्धें त्या सर्वत्र झुंझें । वीतराग ते ॥ ३४ ॥

**"किंवा इच्छेच्या विस्तारानें अश्वमेधादिक याग प्रसिद्धपणें करूं लागणें, ९८ तलाव, विहिरी, बाग, इनामजमिनी, गांव इनाम, आणखी व्रतांचेही अनेक प्रकार, ९९ अशा प्रकारें यज्ञ, वापी, कूप इत्यादि साऱ्यांना इच्छा हीच एक मूळ आहे. ती करित असल्यामुळें, त्याचें फळ बांधून घालून ती भोगावयास लावते. १०० अर्जुना! देहाच्या गांवांत आल्यानंतर, जन्ममृत्यूच्या सोहाळ्याला ज्याप्रमाणें नाहीं म्हणतां येत नाहीं; १०१ किंवा कपाळांत लिहिलेलें असतें तें, कांहीं केलें तरी चुकवितां येत नाहीं; काळेपणा किंवा गोरेपणा जसा धुतल्यानें जात नाहीं; १०२ त्याप्रमाणें इच्छा धरून केलेलें जें कर्म, तें, फळ भोगावयास लावण्यासाठीं, देणें दिलें नाहीं म्हणून जसें कोणी सोडित नाहीं, त्याप्रमाणें धरणें घेऊन बसतें. १०३ किंवा अर्जुना! इच्छा न करतांही अकस्मात् घडेल तर, लढाईमध्यें जसा वांझा बाण लागावा, १०४ गूळ न समजून जरी तोंडांत घातला तरी गोडच लागतो; राखुंडी समजून विस्तव दाबला तरी, तो जसा पोळतो; १०५ त्याप्रमाणें काम्यकर्मांमध्यें हें एक स्वाभाविक सामर्थ्य आहे. म्हणून मो-**

१ नित्य नैमित्तिक भेदानें दोन प्रकारचीं कर्में आहेत. त्यांतील नैमित्तिक कर्में. ( चंद्रसूर्यग्रहणादिक. ) २ पर्वणीचे दिवस. ३ पर्जन्यकाळीं. ४ तारुण्य. ५ चंद्रकांतमणि चंद्रकिरणांनीं द्रवतो. ६ विस्तारें. ७ त्रिकाळ करण्याचीं नित्य कर्में. ८ करावयास योग्य. ९ न चालतां. १० आश्रय न देतां. ११ सुगंध. १२ कर्ता, कर्म. १३ केलेंच पाहिजे. १४ निष्फळ. १५ हीण. १६ अग्नींत. १७ कस. १८ बरोबरीनें, प्रमाणें. १९ दोष. २० हां हां म्हणतां, जलदी. २१ येथवर. २२ मोठें. २३ आकाश. २४ मोहून टाकते. २५ निषिद्ध कर्में.

१ तोडिलें असतां. २ धान्य पिकेपर्यंत. ३ शोधीत. ४ युक्तीनें. ५ योग्यता. ६ युक्ति. ७ अटकळीनें. ८ गुंताड्यांत. ९ होतें. १० अत्याज्याचा त्याग व त्याज्याचा लोभ हीं नसावीं. ११ घालवें. १२ दुःखाचें ओझें, युक्ति. १३ वैराग्यसंपन्न.

क्षाची इच्छा करणाऱ्या **अर्जुना!** तूं कौतुकानें सुद्धां त्यांत पडूं नको. १०६ इतकेंच नव्हे तर, **अर्जुना!** असें जें काम्य-इच्छेनें होणारें कर्म आहे तें, विष जसें ओकून टाकून देतात, त्याप्रमाणें टाकून दे." १०७ मग सर्वांतरात्मा, सर्वसाक्षी, जो **भगवान्** तो ह्मणाला "अशा लक्षणांनीं युक्त जो त्याग, त्यालाच जगामध्यें 'संन्यास' असें ह्मणतात. १०८ द्रव्य टाकून दिलें ह्मणजे ज्याप्रमाणें भयाचा नाश होतो, त्याप्रमाणें हें काम्य कर्म सोडलें ह्मणजे इच्छेलाच उपटून टाकल्याप्रमाणें होतें. १०९ आणखी चंद्रसूर्यांचीं ग्रहणें येऊन पर्वणीचे दिवस आणतात; किंवा मातापितरांच्या मरणानें जे दिवस स्मरणीय झालेले असतात; ११० अथवा अतिथि येतो; असें जें जें कांहीं करावें लागतें, तें तें कर्म नैमित्तिक असें समजावें. १११ वर्षाऋतूनें जसें आकाश भरतें; वसंतानें जसें वन दुणावतें; यौवनदशा जशी देहास शोभा आणते; ११२ किंवा चंद्रकांत चंद्रानें पाझरतो; सूर्याच्या योगानें कमलें प्रफुल्लित होतात; अशा ठिकाणीं असतें तेंच वाढतें. दुसरें कांहीं उत्पन्न होत नाहीं. ११३ त्याप्रमाणें नित्य ह्मणून जें कांहीं कर्म असतें, त्यालाच नैमित्तिकाचे नियम लागतात, आणि तें वाढतें-थोर होतें. तेणेंकरून त्यालाच 'नैमित्तिक' असें नांव प्राप्त होतें. ११४ आणखी सकाळीं, संध्याकाळीं व दुपारीं प्रत्येक दिवसांत जें योग्य कर्म आहे तें, डोळ्यांतील दृष्टि जशी अधिक होत नाहीं; ११५ किंवा न चालतांही जशी पायामध्यें गति असते, किंवा दिव्याच्या ज्योतीमध्यें जसें तेज असतें, ११६ वाट न देतांही चंदनामध्यें जसा सुगंध असतो, त्याप्रमाणेंच कर्ता आणि कर्म ह्या अधिकाराचें जें स्वरूप, १७ **अर्जुना!** त्याला लोकांमध्यें नित्यकर्म असें ह्मणतात. हें लक्ष्यांत ठेव. अशीं हीं नित्य आणि नैमित्तिक दोन्हींही कर्में तुला दाखवून दिलीं. ११८ हींच नित्यनैमित्तिक कर्में अवश्य आचरण करावीं लागतात, ह्मणून ह्यांना कोणी कोणी निष्फळ ह्मणण्याचाही घाट घालतात. ११९ परंतु भोजनांत जशी तृप्ति होते आणि भूक भागते, त्याप्रमाणें नित्यनैमित्यामध्यें आदि अंतीं फळ भरलेलें आहे. १२० हिणकट सोनें आगींत पडलें तर मळ नाहींसा होऊन जातो, आणि कस चढतो, त्याप्रमाणेंच ह्या कर्माचेंही फळ आहे हें लक्ष्यांत ठेव. १२१ कारण, दोष तर नाहींसे होतात, आणि स्वाधिकाराच्या अतिशयानें शुद्ध होऊन सद्गति प्राप्त होते. १२२ येवढें मोठें नित्यनैमित्तिकांमध्यें फळ आहे. परंतु तें मूळनक्षत्रावर उपजल्याप्रमाणें वर्ज करावें. १२३ साऱ्या लता फलद्रूप होतात, तों आम्राला पालवी फुटते, परंतु त्याला हातही न लावतां वसंतऋतु सोडून देतो. १२४ त्याप्रमाणें कर्माची मर्यादा उल्लंघन न करितां नित्यनैमित्याकडे चित्त द्यावें. परंतु सर्वफळांचा मात्र वमनाप्रमाणें त्याग करावा. १२५ जाणते आहेत ते ह्या कर्मफळत्यागालाच 'त्याग' असें ह्मणतात. ह्याप्रमाणें त्याग व संन्यास तुझ्याकडून ऐकविले. १२६ हा संन्यास जेव्हां उत्पन्न होतो, तेव्हां काम्य कर्म केलेलें बांधूं शकत नाहीं. आणि निषिद्ध असतें तें, आपल्या स्वभावाप्रमाणेंच निषिद्धाच्या वाटेला जातें. १२७ आणि नित्यादिक जें कर्म असतें, तें शिर गेल्यावर जसें अंग नाश पावतें, त्याप्रमाणें ह्या फलत्यागानें नाश पावतें. १२८ धान्य पिकल्यानंतर झडून जातें, त्याप्रमाणें प्रत्येक कर्म झडून गेलें ह्मणजे आत्मज्ञान आपोआप शोधित येतें. १२९ अशा युक्तीनें त्याग व संन्यास ह्या दोहोंच्याही अनुष्ठानांत पडलेले असतात ते आत्मज्ञानामध्यें योग्यता वाढवितात. १३० नाहीं तर ही युक्ति चुकली, आणि मग कांहींतरी त्याग ह्मणून केला, तर कशाचाच त्याग होत नाहीं. तो अधिक गुंत्यांतच पडतो. १३१ रोगाची परीक्षा झाल्यावांचून औषध द्यावें तें विष होतें. किंवा भुकेशिवाय अन्न हें मारक होणार नाहीं काय? १३२ ह्मणून त्याग करण्याला जें योग्य नाहीं,

त्याचा त्याग करूं नये. आणि त्याग करण्यासारखें असेल, त्याच्यासाठीं लोभाविष्टही होऊं नये. १३३ त्यागाची युक्ति चुकली तर, सर्व त्यागही ओझें होईल. आणि वैराग्यशील असूनही जेथें तेथें निषिद्धकर्माशीं झगडा करीत बसावें लागेल.” १३४

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

[दोषवदित्येके] एकां फळत्याग ने ठाके । ते कर्मातें ह्मणती बंधकें । जैसें आपण नग्न भांडकें । जगातें ह्मणे ॥ ३५ ॥ कां जिव्हालंपट रोगिया । अन्नें दूषी धनंजया । आंगा न रुसे कोढिया । मासियां कोपे ॥३६॥ तैसें फळकाम दुर्बळ । ह्मणती कर्मचि किडाळ । [त्याज्यं] मग निर्णय देती केवळ । त्यजावें ऐसा ॥ ३७ ॥ [यज्ञदानतपःकर्म] एक ह्मणती यागादिक । करावेंचि आवश्यक । जे यावांचूनि शोधक । आन नसे ॥ ३८ ॥ मनशुद्धीच्या मार्गीं । जैं विजयी व्हावें वेगीं । तैं कर्म संबळालागीं । आळस न कीजे ॥ ३९ ॥ भांगार आथि शोधावें । तरी आगी जेविं नुबगावें । कां दर्पणालागीं सांचावें । अधिक रंज ॥ १४० ॥ नाना वस्त्रें चोख होआवीं । ऐसें आथी जरी जीवीं । तरी संवदणी न मानावी । मलिन जैसी ॥ ४१ ॥ तैसीं कर्मे क्लेशकारें । [न त्याज्यमिति चापरे] ह्मणोनि न न्यावीं अव्हेरें । कां अन्नलाभें अरुवारें । रांधितिये उणें ॥ ४२ ॥ इहीं इहीं गा शब्दीं । एक कर्मी बांधती बुद्धी । ऐसा त्याग विसंवादीं । पडोनि ठेला ॥ ४३॥ तरि विसंवाद तो फिटे । त्यागाचा निश्चय भेटे । तैसें बोलों गोमटें । अवधान देईं ॥ ४४ ॥

“आपण नग्न असलेला जगाला जसें भांडखोर ह्मणतो, त्याप्रमाणें कोणाकोणाला फलत्याग साधत नाहीं. ते कर्माला बाधक असें ह्मणतात. १३५ किंवा **धनंजया!** गोड गोड खावेंसें वाटणारा रोगी अन्नाला नांवें ठेवतो. कोड भरलेला मनुष्य आपल्या आंगावर रुसत नाहीं; माशांवर संतापतो; १३६ त्याप्रमाणें फलाची इच्छा करणारे जे दुबळे असतात, ते कर्मच वाईट असें ह्मणतात. आणि तें सारेंच टाकून द्यावें असा सिद्धांत करतात. १३७ कोणी ह्मणतात यागादिक हे अवश्य करावेत. कारण, त्यांच्यावांचून पुनीत करणारें दुसरें कोणी नाहीं. १३८ मनःशुद्धीच्या मार्गानें जर लौकर शुद्ध होणें असेल, तर प्रबळ कर्मांना आळस करूं नये. १३९ सोनें शुद्ध करावयाचें असेल तर, अग्नीला जसें सोडतां कामा नये, किंवा दर्पण पाहिजे असेल तर अधिक मळ सांचूं द्यावा काय? १४० किंवा वस्त्रें स्वच्छ व्हावींत असें जर मनांत असेल तर, परटाची डोणी, जशी घाणेरी ह्मणतां कामा नये, १४१ त्याप्रमाणें कर्मैं हीं कष्टप्रद आहेत ह्मणून त्यांचा अव्हेर करूं नये. स्वयंपाक केल्याशिवाय सुंदर अन्नाचा लाभ होईल काय? १४२ अशा अशा भाषणांनीं कोणी कोणी कर्मांमध्यें बुद्धि घालतात. अशा वितंडवादामध्यें त्याग हा पडून राहिलेला आहे. १४३ तर तो वितंडवाद मोडेल, त्यागाचा निश्चय कळेल, असें नीट कथन करूं. लक्ष्य दे.” १४४

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥४॥

[त्यागो हीति] तरि त्याग एथें पांडवा । त्रिविध पैं जाणावा । तया त्रिविधाही बरवा । विभाग करूं ॥ ४५ ॥ त्यागाचे तीन्ही प्रकार । कीजती जरी गोचर । तरी तूं इत्यर्थाचें सार । इतुलें जाण ॥ ४६ ॥ [निश्चयमिति] मज सर्वज्ञाचियेही बुद्धी । जें आलोट माने त्रिशुद्धी । निश्चयतत्त्व तें आधीं । अवधारीं पां ॥ ४७ ॥ तरि आपुलीये सोडवणें । जो मुमुक्षू जागों ह्मणे । तया सर्वस्वें करणें । हेंचि एक ॥४८॥

“तर **अर्जुना!** येथें त्याग हाही तीन प्रकारचा आहे हें लक्ष्यांत ठेवावें. त्या तिहींचें आतां नीट विवरण करूं. १४५ त्यागाचे तीन प्रकार जरी दाखवून दिले, तरी त्यांच्यांतील तात्पर्याचें सार तूं येवढेंच लक्ष्यांत ठेव. १४६ माझ्या सर्वज्ञाच्या बुद्धीला जें निखालस खरें वाटतें तें निश्चयाचें तत्त्व आधीं ऐक. १४७ तर आपल्या सुटकेविषयीं जो मुमुक्षु जागृत रहावें

१ साधत नाहीं. २ भांडखोर. ३ कुष्टरोगी. ४ फलेच्छु. ५ हीन. ६ शुद्धि करणारें. ७ बळकट. ८ सोनें. ९ न कंटाळावें. १० संग्रह करावें. ११ मळ. १२ स्वच्छ. १३ धोब्याचें कपडे धुण्याचें धातुमय किंवा पाषाणमय पात्र. १४ हेळसांडीनें. १५ सुंदर. १६ रांधल्याशिवाय. १७ विरुद्धवादांत.

१ तात्पर्याचें. २ खरें.

क्षाची इच्छा करणाऱ्या **अर्जुना !** तूं कौतुकानें सुद्धां त्यांत पडूं नको. १०६ इतकेंच नव्हे तर, **अर्जुना !** असें जें काम्य-इच्छेनें होणारें कर्म आहे तें, विष जसें ओकून टाकून देतात, त्याप्रमाणें टाकून दे." १०७ मग सर्वांतरात्मा, सर्वसाक्षी, जो **भगवान्** तो ह्मणाला "अशा लक्षणांनीं युक्त जो त्याग, त्यालाच जगामध्यें 'संन्यास' असें ह्मणतात. १०८ द्रव्य टाकून दिलें ह्मणजे ज्याप्रमाणें भयाचा नाश होतो, त्याप्रमाणें हें काम्य कर्म सोडलें ह्मणजे इच्छेलाच उपटून टाकल्याप्रमाणें होतें. १०९ आणखी चंद्रसूर्यांचीं ग्रहणें येऊन पर्वणीचे दिवस आणतात; किंवा मातापितरांच्या मरणानें जे दिवस स्मरणीय झालेले असतात; ११० अथवा अतिथि येतो; असें जें जें कांहीं करावें लागतें, तें तें कर्म नैमित्तिक असें समजावें. १११ वर्षाऋतूनें जसें आकाश भरतें; वसंतानें जसें वन दुणावतें; यौवनदशा जशी देहास शोभा आणते; ११२ किंवा चंद्रकांत चंद्रानें पाझरतो; सूर्याच्या योगानें कमलें प्रफुल्लित होतात; अशा ठिकाणीं असतें तेंच वाढतें. दुसरें कांहीं उत्पन्न होत नाहीं. ११३ त्याप्रमाणें नित्य ह्मणून जें कांहीं कर्म असतें, त्यालाच नैमित्तिकाचे नियम लागतात, आणि तें वाढतें-थोर होतें. तेणेंकरून त्यालाच 'नैमित्तिक' असें नांव प्राप्त होतें. ११४ आणखी सकाळीं, संध्याकाळीं व दुपारीं प्रत्येक दिवसांत जें योग्य कर्म आहे तें, डोळ्यांतील दृष्टि जशी अधिक होत नाहीं; ११५ किंवा न चालतांही जशी पायामध्यें गति असते, किंवा दिव्याच्या ज्योतीमध्यें जसें तेज असतें, ११६ वाट न देतांही चंदनामध्यें जसा सुगंध असतो, त्याप्रमाणेंच कर्ता आणि कर्म ह्या अधिकाराचें जें स्वरूप, १७ **अर्जुना !** त्याला लोकांमध्यें नित्यकर्म असें ह्मणतात. हें लक्ष्यांत ठेव. अशीं हीं नित्य आणि नैमित्तिक दोन्हींही कर्में तुला दाखवून दिलीं. ११८ हींच नित्यनैमित्तिक कर्में अवश्य आचरण करावीं लागतात, ह्मणून ह्यांना कोणी कोणी निष्फळ ह्मणण्याचाही घाट घालतात. ११९ परंतु भोजनांत जशी तृप्ति होते आणि भूक भागते, त्याप्रमाणें नित्यनैमित्यामध्यें आदि अंतीं फळ भरलेलें आहे. १२० हिणकट सोनें आगींत पडलें तर मळ नाहींसा होऊन जातो, आणि कस चढतो, त्याप्रमाणेंच ह्या कर्मांचेंही फळ आहे हें लक्ष्यांत ठेव. १२१ कारण, दोष तर नाहींसे होतात, आणि स्वाधिकाराच्या अतिशयानें शुद्ध होऊन सद्गति प्राप्त होते. १२२ येवढें मोठें नित्यनैमित्तिकांमध्यें फळ आहे. परंतु तें मूळनक्षत्रावर उपजल्याप्रमाणें वर्ज करावें. १२३ साऱ्या लता फलद्रूप होतात, तों आम्राला पालवी फुटते. परंतु त्याला हातही न लावतां वसंतऋतु सोडून देतो. १२४ त्याप्रमाणें कर्माची मर्यादा उल्लंघन न करितां नित्यनैमित्याकडे चित्त द्यावें. परंतु सर्वफळांचा मात्र वमनाप्रमाणें त्याग करावा. १२५ जाणते आहेत ते ह्या कर्मफळत्यागालाच 'त्याग' असें ह्मणतात. ह्याप्रमाणें त्याग व संन्यास तुझ्याकडून ऐकविले. १२६ हा संन्यास जेव्हां उत्पन्न होतो, तेव्हां काम्य कर्म केलेलें बांधूं शकत नाहीं. आणि निषिद्ध असतें तें, आपल्या स्वभावाप्रमाणेंच निषिद्धाच्या वाटेला जातें. १२७ आणि नित्यादिक जें कर्म असतें, तें शिर गेल्यावर जसें अंग नाश पावतें, त्याप्रमाणें ह्या फलत्यागानें नाश पावतें. १२८ धान्य पिकल्यानंतर झडून जातें, त्याप्रमाणें प्रत्येक कर्म झडून गेलें ह्मणजे आत्मज्ञान आपोआप शोधित येतें. १२९ अशा युक्तीनें त्याग व संन्यास ह्या दोहोंच्याही अनुष्ठानांत पडलेले असतात ते आत्मज्ञानामध्यें योग्यता वाढवितात. १३० नाहीं तर ही युक्ति चुकली, आणि मग कांहींतरी त्याग ह्मणून केला, तर कशाचाच त्याग होत नाहीं. तो अधिक गुंत्यांतच पडतो. १३१ रोगाची परीक्षा झाल्यावांचून औषध द्यावें तें विष होतें. किंवा भुकेशिवाय अन्न हें मारक होणार नाहीं काय? १३२ ह्मणून त्याग करण्याला जें योग्य नाहीं,

त्याचा त्याग करूं नये. आणि त्याग करण्यासारखें असेल, त्याच्यासाठीं लोभाविष्टही होऊं नये. १३३ त्यागाची युक्ति चुकली तर, सर्व त्यागही ओझें होईल. आणि वैराग्यशील असूनही जेथें तेथें निषिद्धकर्मांशीं झगडा करीत बसावें लागेल." १३४

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

[दोषवदित्येके] एकां फळत्याग न ठाके । ते कर्मातें ह्मणती बंधकें । जैसें आपण नग्न भांडकें । जगातें ह्मणे ॥ ३५ ॥ कां जिव्हालंपट रोगिया । अन्नें दूषी धनंजया । आंगा न रुसे कोढिया । मासियां कोपे ॥३६॥ तैसें फळकाम दुर्वळ । ह्मणती कर्मचि किडाळ । [त्याज्यं] मग निर्णय देती केवळ । त्यजावें ऐसा ॥ ३७ ॥ [यज्ञदानतपःकर्म] एक ह्मणती यागादिक । करावेंचि आवश्यक । जे यावांचूनि शोधक । आन नसे ॥ ३८ ॥ मनशुद्धीच्या मार्गीं । जैं विजयी व्हावें वेगीं । तैं कर्म सबळालागीं । आळस न कीजे ॥ ३९ ॥ भांगार आथि शोधावें । तरी आगी जेविं नुबगावें । कां दर्पणालागीं सांचावें । अधिक रज ॥ १४० ॥ नाना वस्त्रें चोख होआवीं । ऐसें आथी जरी जीवीं । तरी संवदणी न मानावी । मलिन जैसी ॥ ४१ ॥ तैसीं कर्में क्लेशकारें । [न त्याज्यमिति चापरे] ह्मणोनि न न्यावीं अव्हेरें । कां अन्नलाभें अरुवारें । रांधितिये उणें ॥ ४२ ॥ इहीं इहीं गा शब्दीं । एक कर्मीं बांधती बुद्धी । ऐसा त्याग विसंवादीं । पडोनि ठेला ॥ ४३॥ तरि विसंवाद तो फिटे । त्यागाचा निश्चय भेटे । तैसें बोलों गोमटें । अवधान देईं ॥ ४४ ॥

"आपण नग्न असलेला जगाला जसें भांडखोर ह्मणतो, त्याप्रमाणें कोणाकोणाला फलत्याग साधत नाहीं. ते कर्माला बाधक असें ह्मणतात. १३५ किंवा धनंजया! गोड गोड खावेंसें वाटणारा रोगी अन्नाला नांवें ठेवतो. कोड भरलेला मनुष्य आपल्या आंगावर रुसत नाहीं; माशांवर संतापतो; १३६ त्याप्रमाणें फलाची इच्छा करणारे जे दुबळे असतात, ते कर्मच वाईट असें ह्मणतात. आणि तें सारेंच टाकून द्यावें असा सिद्धांत करतात. १३७ कोणी ह्मणतात यागादिक हे अवश्य करावेत. कारण, त्यांच्यावांचून पुनीत करणारें दुसरें कोणी नाहीं. १३८ मनःशुद्धीच्या मार्गानें जर लौकर शुद्ध होणें असेल, तर प्रबळ कर्मांना आळस करूं नये. १३९ सोनें शुद्ध करावयाचें असेल तर, अग्नीला जसें सोडतां कामा नये, किंवा दर्पण पाहिजे असेल तर अधिक मळ सांचू द्यावा काय? १४० किंवा वस्त्रें स्वच्छ व्हावींत असें जर मनांत असेल तर, परटाची डोणी, जशी घाणेरी ह्मणतां कामा नये, १४१ त्याप्रमाणें कर्में हीं कष्टप्रद आहेत ह्मणून त्यांचा अव्हेर करूं नये. स्वयंपाक केल्याशिवाय सुंदर अन्नाचा लाभ होईल काय? १४२ अशा अशा भाषणांनीं कोणी कोणी कर्मांमध्यें बुद्धि घालतात. अशा वितंडवादामध्यें त्याग हा पडून राहिलेला आहे. १४३ तर तो वितंडवाद मोडेल, त्यागाचा निश्चय कळेल, असें नीट कथन करूं. लक्ष्य दे." १४४

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥४॥

[त्यागो हीति] तरि त्याग एथें पांडवा । त्रिविध पैं जाणावा । तया त्रिविधाही बरवा । विभाग करूं ॥ ४५ ॥ त्यागाचे तीन्ही प्रकार । कीजती जरी गोचर । तरी तूं इत्यर्थाचें सार । इतुलें जाण ॥ ४६ ॥ [निश्चयमिति] मज सर्वज्ञाचियेही बुद्धी । जें आलोट माने त्रिशुद्धी । निश्चयतत्त्व तें आधीं । अवधारीं पां ॥ ४७ ॥ तरि आपुलीये सोडवणें । जो मुमुक्षू जागों ह्मणे । तया सर्वखें करणें । हेंचि एक ॥४८॥

"तर अर्जुना! येथें त्याग हाही तीन प्रकारचा आहे हें लक्ष्यांत ठेवावें. त्या तिहींचें आतां नीट विवरण करूं. १४५ त्यागाचे तीन प्रकार जरी दाखवून दिले, तरी त्यांच्यांतील तात्पर्याचें सार तूं येवढेंच लक्ष्यांत ठेव. १४६ माझ्या सर्वज्ञाच्या बुद्धीला जें निखालस खरें वाटतें तें निश्चयाचें तत्त्व आधीं ऐक. १४७ तर आपल्या सुटकेविषयीं जो मुमुक्षु जागृत रहावें

१ साधत नाहीं. २ भांडखोर. ३ कुष्टरोगी. ४ फलेच्छु. ५ हीन. ६ शुद्धि करणारें. ७ बळकट. ८ सोनें. ९ न कंटाळावें. १० संग्रह करावें. ११ मळ. १२ स्वच्छ. १३ धोब्याचें कपडे धुण्याचें धातुमय किंवा पाषाणमय पात्र. १४ हेळसांडीनें. १५ सुंदर. १६ रांधल्याशिवाय. १७ विरुद्धवादांत.

१ तात्पर्याचें. २ खरें.

ह्मणून ह्मणत असेल, त्यानें सर्वभावेंकरून हेंच एक करावें." १४८

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

[यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं] जियें यज्ञदानतपादिकें । इयें कर्मे आवश्यकें । तियें न सांडावीं [1]पांथिकें । पाउलें जैसीं ॥ ४९ ॥ हरपलें न देखिजे । तंव तयाचा मागु न सांडिजे । कां तृप्त न होतां न लोटिजे । [2]भाणें जेविं ॥ १५० ॥ नाव थडी न पवतां । न सांडिजे केळी न फळतां । कां ठेविलें न दिसतां । दीप जैसा ॥ ५१ ॥ तैसी आत्मज्ञानविखीं । जंव निश्चिती नाहीं [3]निकी । तंव नोहावें यागादिकीं । उदासीन ॥ ५२ ॥ [कार्यमेव तत्] तरि स्वाधिकारानुरूपें । तियें यज्ञदानें तपें । अनुष्ठावींचि साक्षेपें । [4]अधिकेंवर ॥ ५३ ॥ जें चालणें [5]वेगावत जाये । तो वेग बैसावयाचि होये । तैसा कर्मातिशय आहे । नैष्कर्म्यालागीं ॥ ५४ ॥ अधिकें जंव जंव औषधी । सेवायाची [6]मांडी बांधी । तंव तंव मुकिजे व्याधी । तयाचिये ॥ ५५ ॥ तैसीं कर्मे [7]हांतोपातीं । जें कीजती [8]यथानिगुती । तें रजतमें झडती । झाडा देउनि ॥ ५६ ॥ कां [9]पाठोवाटीं पुटें । भांगारा खार देणें घटे । तें [10]कीडें झडकरी तुटे । [11]निर्व्याज होय ॥ ५७ ॥ तैसें निष्ठा केलें कर्म । तें सांडीं करूनि रजतम । सत्वशुद्धीचें धाम । डोळां दावी ॥ ५८ ॥ ह्मणोनियां धनंजया । सत्वशुद्धी [12]गिंवसीतया । तीर्थांचिया [13]सांवाया । आलीं कर्मे ॥ ५९ ॥ तीर्थें बाह्यमळ क्षाळे । कर्में अभ्यंतर उजळे । एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेचि ॥ १६० ॥ तृषार्ता [14]मरुदेशीं । [15]झळे [16]अमृतें वोळलीं जैसीं । कीं अंधालागीं डोळ्यांसीं । सूर्य आला ॥ ६१ ॥ बुडतया नदीच धाविन्नली । पडतया पृथ्वीच कळवळिली । [17]निमतया मृत्यूनें दिधली । आयुष्यवृद्धी ॥ ६२ ॥ कर्मे कर्मबद्धता । मुमुक्षू सोडविले पंडुसुता । जैसा [18]रसरीति मरतां । राखिला विषें ॥ ६३ ॥ तैसीं एके [19]हातवटिया । कर्मे कीजती धनंजया । बंधकेंचि सोडवावया । मुख्यें होती ॥ ६४ ॥ आतां तेचि हातवटी । तुज सांगों गोमटी । जया कर्मातें किरीटी । कर्मचि [20]रुंसे ॥ ६५ ॥

"पांथस्थानें जसे पाय टाकतां कामा नये, त्याप्रमाणें यज्ञदानतपादिक जीं आवश्यक कर्मे, तींही सोडूं नयेत. १४९ हरवलेलें सांपडलें नाहीं, तोंपर्यंत त्याचा माग सोडतां उपयोग नाहीं. किंवा तृप्त झाल्याशिवाय भोजन दूर सारूं नये. १५० कडेला न पोंचतां नाव; न फळतां केळ; किंवा ठेवलेलें दिसल्याशिवाय दिवा; हीं जशीं टाकतां येत नाहींत, १५१ त्याप्रमाणें आत्मज्ञानाविषयीं जोंपर्यंत ठाम निश्चय झालेला नाहीं, तोंपर्यंत यागादिक करण्यामध्येंही उदासीन होतां कामा नये. १५२ तर आपल्या अधिकारानुरूप, तीं यज्ञ, दान, तपें साक्षेपानें अधिक अधिकच आचरण करावींत. १५३ चालणें जें वेगानें होतें, तो वेग बसण्याकरितांच असतो. त्याप्रमाणें नैष्कर्म्यासाठींच तो कर्मातिशय आहे. १५४ औषध अधिक अधिक घेण्यासाठीं जों जों कंबर बांधावी तों तों त्याची व्याधि दूर जाते. १५५ त्याप्रमाणें यथाविधीनें जेव्हां वारंवार कर्मे करावींत, तेव्हां रज आणि तम समूळ नाहींसे होतात. १५६ किंवा सोन्याला पुन्हा पुन्हा क्षाराचीं पुटें द्यावींत, तेव्हां हीण असतें तें झडकर जळून जाऊन तें तेव्हांच शुद्ध होतें. १५७ त्याप्रमाणें निष्ठेनें केलेलें कर्म, रजतमाला नाहींसें करून डोळ्यांना सत्वशुद्धीचें घर दाखवितें. १५८ ह्मणून धनंजया! सत्वशुद्धीला शुद्ध करण्यासाठीं तीर्थांच्या सादृश्यानें कर्मे आलेलीं आहेत. १५९ तीर्थानें बाहेरचा मळ धुतला जातो, आणि कर्मानें अंतःकरण स्वच्छ होतें. एवंच सत्कर्मे हीं तीर्थेंच आहेत. हें लक्ष्यांत ठेव. १६० मारवाडांत उन्हाचे चटके बसून तान्हेनें कळवळलेल्याकडे जसें अमृतानें यावें, किंवा अंधळ्याच्या डोळ्यांत जसा सूर्य शिरावा, १६१ बुडत्याकडे जसें नदीनेंच धांवावें, पडत्याला पाहून जसा पृथ्वीलाच कळवळा यावा, मरणाराला जसें मृत्यूनेंच दीर्घायू करावें, १६२ किंवा विषानें मरणाराला रसायनानें वांचवावें, त्याप्रमाणें अर्जुना! कर्मे हींच मुमुक्षूला कर्म-

१ मार्गस्थानें. २ भोजन. ३ चांगली. ४ अधिक अधिक. ५ वाढत, वेगवत्तर. ६ कमर बांधतो. ७ लवकर, वारंवार. ८ विधिपूर्वक. ९ एकामागें एक. १० हीन. ११ निर्दोष, शुद्ध. १२ सत्वशुद्धीची इच्छा करणारास. १३ बरोबरीस, सादृश्यास. १४ मारवाड देशांत. १५ उन्हाचे चटके. १६ उदकें. १७ मरणारास. १८ रसायनाप्रमाणें. १९ हातोटीनें. २० दूर करी.

बद्धतेपासून सोडवितात. १६३ तसेंच अर्जुना! त्या कर्मामध्यें एक हातवटी असते. ती साधली तर, तीं बंधनें सोडवण्योलाच पुढारी होतात. १६४ तर आतां अर्जुना! जिच्या योगानें कर्मानेंच कर्मफळें नाहींशीं होतात ती हातोटी तुला सांगूं." १६५

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥

[एतान्यपि तु कर्माणि] तरि महायागप्रमुखें । कर्में निफजतांही अचुकें । [संगं त्यक्त्वा] कर्तेपणाचें न ठाके । फुंजणें आंगीं ॥ ६६ ॥ जो मोलें तीर्था जाये । तया मी यात्रा करित आहें । ऐसिये श्लाघ्यतेचा नोहे । तोष जेवीं ॥ ६७ ॥ कां मुद्रा समर्थाचिया । जो ऐकवटु झोंबे राया । तो मी जिणता ऐसिया । नयेचि गर्वा ॥ ६८ ॥ जो कासे लागोनि तरे । तया पोंहती ऊर्मी नुरे । पुरोहित नाविष्करे । दातेपणें ॥ ६९ ॥ तैसें कर्तृत्व अहंकारें । नेघोनि यथा अवसरें । कृत्यजातांचे मोहरें । सारीजती ॥ १७० ॥ [फलानि च] केल्या कर्मा पांडवा । जो आथी फळाचा थांवा । तया मोहरा हों नेदावा । मनोरथ ॥ ७१ ॥ आधींचि फळीं आस तुटिया । कर्में आरंभावीं धनंजया । पैरांवें बाळ धांया । पाहिजे जैसें ॥ ७२ ॥ पिंपरुवांचिया आशा । न शिंपिजे पिंपळ जैसा । तैसिया फळनिराशा । कीजती कर्में ॥ ७३ ॥ सांडूनि दुधाची टेंकळी । गोंवारी गांवधेनु वेंटाळी । किंबहुना कर्मफळीं । तैसें कीजे ॥ ७४ ॥ [कर्तव्यानीति] ऐसी हे हातवटी । घेऊनि जे क्रिया उठी । आपणा आपुलिया गांठी । लाहेचि तो ॥ ७५ ॥ ह्मणोनि फळीं लोंग । सांडोनि देहसंग । कर्में करावीं हा चांग । निरोप माझा ॥ ७६ ॥ जो जीवबंधें शीणला । सुटके जोंचे आपला । तेणें पुढतपुढती या बोला । आन न कीजे ॥ ७७ ॥

"तर महायागादिक प्रमुख कर्में अचुक करूनही ज्याच्या आंगांत कर्तेपणाचा अहंभाव राहत नाहीं; १६६ मजुरी घेऊन दुसऱ्याप्रीत्यर्थ जो तीर्थाला जातो, त्याला 'मी यात्रा करतों आहें' हा थोरवीचा जसा संतोष वाटत नाहीं; १६७ बलाढ्य राजाच्या आज्ञेवरून जो एकटाच जाऊन दुसऱ्या राजाला धरून आणतो, त्याला 'मी जिंकणारा' हा जसा गर्व होत नाहीं. १६८ जो कमरेला मिठी घालून पलीकडे जातो, त्याला 'मी पोहणारा' ही गुर्मी रहात नाहीं; राजाच्या दानाध्यक्षाला दान केल्याचा जसा डौल वाटत नाहीं. १६९ त्याप्रमाणें कर्तृत्वाचा अभिमान न बाळगतां ज्या ज्या वेळीं जीं जीं कर्में येतील तीं तीं करून टाकावींत. १७० अर्जुना! केल्या कर्मांना फळें येण्याचा जो मार्ग, त्याकडे मनोरथाला येऊं देऊं नये. १७१ हे धनंजया! आधींच फळांची आशा तोडून टाकून मग कर्मांचा आरंभ करावा. दुसऱ्याच्या मुलाकडे जशी दाई पाहते, १७२ पिंपळाचीं फळें मिळावींत ह्मणून जसें त्याला पाणी घालित नाहींत, त्याप्रमाणें फळाची आशा सोडून देऊन कर्में करावींत. १७३ दुधाची आशा सोडून गुराखी जसा गांवच्या गायी जमा करतो, बाळगतो, त्याचप्रमाणें कर्मफलांविषयींही करावें. १७४ अशी ही हातवटी घेऊन ज्याची क्रिया घडते, तो स्वस्वरूपाला पोंचतो. १७५ ह्मणून फळांचा संबंध व देहाचा अभिमान सोडून कर्में करावींत हें माझें सांगणें आहे. १७६ जीवबंधानें ज्याला कष्ट झाले असतील, आपल्या सुटकेची ज्याला काळजी असेल, त्यानें कधींही ह्या सांगण्याबाहेर वागूं नये." १७७

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७ ॥

[मोहादिति] ना तरी आंधाराचेनि रोखें । जैसीं डोळां रोविजती नखें । तैसा कर्मद्वेषें अशेखें । कर्मेंचि सांडी ॥ ७८ ॥ तयाचें कर्मसांडणें । तें तामस मी ह्मणें । शिसाराचे रागें लांवणें । शिसचि जैसें ॥ ७९ ॥ [नियतस्येति] हां गा मार्ग दुवाड होये । तरी निस्तरितील पाये । कीं तेचि खांडणें आहे । मार्गापरायें ॥ १८० ॥ भुकेलिया पुढें अन्न । हो कां भलतैसें ऊन्ह । तरी बुद्धी न घेतां लंघन । भाणें पापं राहात्या ॥ ८१ ॥ तैसा कर्माचा बाध कर्में ।

१ गर्व, अहंकार. २ स्तुतीचा. ३ एकटा. ४ जिंकणारा. ५ अभिमान. ६ आवेश न बाळगी. ७ बुद्धिवळांतील मोहऱ्यांप्रमाणें. ८ प्राप्ति. ९ मार्गी. १० दुसऱ्याचें. ११ दाईनें. १२ पिंपळाच्या फळाच्या. १३ इच्छा, आशा. १४ गुराख्या. १५ संबंध. १६ अभिमान. १७ काळजी धरी.

१ रागानें, रोषानें. २ अर्धशिशी. ३ जाळणें, कापणें. ४ दुर्गम. ५ चालूं न शकतील. ६ तोडणें. ७ लाधेनं हाणावें. ८ दोष.

ह्मणून ह्मणत असेल, त्यानें सर्वभावेंकरून हेंच एक करावें." १४८

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

[यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं] जियें यज्ञदानतपादिकें । इयें कर्मे आवश्यकें । तियें न सांडावीं [1]पांथिकें । पाउलें जैसीं ॥ ४९ ॥ हरपलें न देखिजे । तंव तयाचा मागु न सांडिजे । कां तृप्त न होतां न लोटिजे । [2]भाणें जेविं ॥ १५० ॥ नाव थडी न पवतां । न सांडिजे केळी न फळतां । कां ठेविलें न दिसतां । दीप जैसा ॥ ५१ ॥ तैसी आत्मज्ञानविखीं । जंव निश्चिती नाहीं [3]निकी । तंव नोहावें यागादिकीं । उदासीन ॥ ५२ ॥ [कार्यमेव तत्] तरि स्वाधिकारानुरूपें । तियें यज्ञदानें तपें । अनुष्ठावींचि साक्षेपें । [4]अधिकेंवर ॥ ५३ ॥ जें चालणें [5]वेगावत जाये । तो वेग बैसावयाचि होये । तैसा कर्मातिशय आहे । नैष्कर्म्यालागीं ॥ ५४ ॥ अधिकें जंव जंव औषधी । सेवायाची [6]मांडी वांधी । तंव तंव मुकिजे व्याधी । तयाचिये ॥ ५५ ॥ तैसीं कर्मे [7]होतोपातीं । जैं कीजती [8]यथानिगुती । तैं रजतमें झडती । झाडा देउनि ॥ ५६ ॥ कां [9]पाठोवाटीं पुटें । भांगारा खार देणें घटे । तैं [10]कीड झडकरी तुटे । [11]निर्व्याज होय ॥ ५७ ॥ तैसें निष्ठा केलें कर्म । तें सांडीं करूनि रजतम । सत्वशुद्धीचें धाम । डोळां दावी ॥ ५८ ॥ ह्मणोनियां धनंजया । सत्वशुद्धी [12]गिवसीतया । तीर्थांचिया [13]सांवाया । आलीं कर्मे ॥ ५९ ॥ तीर्थें बाह्यमळ क्षाळे । कर्मे अभ्यंतर उजळे । एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेंचि ॥ १६० ॥ तृषार्तां [14]मरुदेशीं । [15]झंळे [16]अमृतें वोळलीं जैसीं । कीं अंधालागीं डोळयांसीं । सूर्य आला ॥ ६१ ॥ बुडतया नदीच धाविन्नली । पडतया पृथ्वीच कळवळिली । [17]निमेतया मृत्यूनें दिधली । आयुष्यवृद्धी ॥ ६२ ॥ कर्मे कर्मबद्धता । मुमुक्षू सोडविले पंडुसुता । जैसा [18]रसरीति मरतां । राखिला विषें ॥ ६३ ॥ तैसीं एके [19]होतवटिया । कर्मे कीजती धनंजया । बंधकेंचि सोडवावया । मुख्यें होती ॥ ६४ ॥ आतां तेचि हातवटी । तुज सांगों गोमटी । जया कर्मातें किरीटी । कर्मचि [20]हंसे ॥ ६५ ॥

"पांथस्थानें जसे पाय टाकतां कामा नये, त्याप्रमाणें यज्ञदानतपादिक जीं आवश्यक कर्मे, तींही सोडूं नयेत. १४९ हरवलेलें सांपडलें नाहीं, तोंपर्यंत त्याचा माग सोडतां उपयोग नाहीं. किंवा तृप्त झाल्याशिवाय भोजन दूर सारूं नये. १५० कडेला न पोंचतां नाव; न फळतां केळ; किंवा ठेवलेलें दिसल्याशिवाय दिवा; हीं जशीं टाकतां येत नाहींत, १५१ त्याप्रमाणें आत्मज्ञानाविषयीं जोंपर्यंत ठाम निश्चय झालेला नाहीं, तोंपर्यंत यागादिक करण्यामध्येंही उदासीन होतां कामा नये. १५२ तर आपल्या अधिकारानुरूप, तीं यज्ञ, दान, तपें साक्षेपानें अधिक अधिकच आचरण करावींत. १५३ चालणें जें वेगानें होतें, तो वेग बसण्याकरितांच असतो. त्याप्रमाणें नैष्कर्म्यासाठींच तो कर्मातिशय आहे. १५४ औषध अधिक अधिक घेण्यासाठीं जों जों कंबर बांधावी तों तों त्याची व्याधि दूर जाते. १५५ त्याप्रमाणें यथाविधीनें जेव्हां वारंवार कर्मे करावींत, तेव्हां रज आणि तम समूळ नाहींसे होतात. १५६ किंवा सोन्याला पुन्हा पुन्हा क्षाराचीं पुटें द्यावींत, तेव्हां हीण असतें तें झडकर जळून जाऊन तें तेव्हांच शुद्ध होतें. १५७ त्याप्रमाणें निष्ठेनें केलेलें कर्म, रजतमाला नाहींसें करून डोळ्यांना सत्वशुद्धीचें घर दाखवितें. १५८ ह्मणून धनंजया! सत्वशुद्धीला शुद्ध करण्यासाठीं तीर्थांच्या सादृश्यानें कर्मे आलेलीं आहेत. १५९ तीर्थानें बाहेरचा मळ धुतला जातो, आणि कर्मानें अंतःकरण स्वच्छ होतें. एवंच सत्कर्मे हीं तीर्थेंच आहेत. हें लक्ष्यांत ठेव. १६० मारवाडांत उन्हाचे चटके बसून तान्हेनें कळवळलेल्याकडे जसें अमृतानें यावें, किंवा अंधळयाच्या डोळयांत जसा सूर्य शिरावा, १६१ बुडत्याकडे जसें नदीनेंच धांवावें, पडत्याला पाहून जसा पृथ्वीलाच कळवळा यावा, मरणाराला जसें मृत्यूनेंच दीर्घायू करावें, १६२ किंवा विषानें मरणाराला रसायनानें वांचवावें, त्याप्रमाणें अर्जुना! कर्मे हींच मुमुक्षूला कर्म-

१ मार्गस्थानें. २ भोजन. ३ चांगली. ४ अधिक अधिक. ५ वाढत, वेगवत्तर. ६ कमर बांधतो. ७ लवकर, वारंवार. ८ विधिपूर्वक. ९ एकामागें एक. १० हीन. ११ निर्दोष, शुद्ध. १२ सत्वशुद्धीची इच्छा करणारास. १३ बरोबरीस, सादृश्यास. १४ मारवाड देशांत. १५ उन्हाचे चटके. १६ उदकें. १७ मरणारास. १८ रसायनाप्रमाणें. १९ हातोटीनें. २० दूर करी.

बद्धतेपासून सोडवितात. १६३ तसेंच **अर्जुना!** त्या कर्मांमध्यें एक हातवटी असते. ती साधली तर, तीं बंधनें सोडवण्यांलाच पुढारी होतात. १६४ तर आतां **अर्जुना!** जिच्या योगानें कर्मानेंच कर्मफळें नाहींशीं होतात ती हातोटी तुला सांगूं." १६५

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥

[एतान्यपि तु कर्माणि] तरि महायागप्रमुखें । कर्में निफजतांही अचुकें । [संगं त्यक्त्वा] कर्तेपणाचें न ठाके । फुंजणें आंगीं ॥ ६६ ॥ जो मोलें तीर्था जाये । तया मी यात्रा करित आहें । ऐसिये श्लाध्यतेचा नोहे । तोष जेवीं ॥ ६७ ॥ कां मुद्रा समर्थांचिया । जो ऐकवटु झोंबे राया । तो मी जिणता ऐसिया । नयेचि गर्वा ॥ ६८ ॥ जो कांसे लागोनि तरे । तया पोंहती ऊर्मी नुरे । पुरोहित नाविष्करे । दातेपणें ॥ ६९ ॥ तैसें कर्तृत्व अहंकारें । नेघोनि यथा अवसरें । कृत्यजातांचे मोहेंरें । सारीजती ॥ १७० ॥ [फलानि च] केल्या कर्मा पांडवा । जो आथी फळाचा यावा । तया मोहेंरा हों नेदावा । मनोरथ ॥ ७१ ॥ आधींचि फळीं आस तुटिया । कर्में आरंभावीं धनंजया । पैरावें बाळ धाया । पाहिजे जैसें ॥ ७२ ॥ पिंपरुंवांचिया आशा । न शिंपिजे पिंपळ जैसा । तैसिया फळनिराशा । कीजती कर्में ॥ ७३ ॥ सांडूनि दुधाची टेंकळी । गोंवारी गांवधेनु वेंटाळी । किंबहुना कर्मफळीं । तैसें कीजे ॥ ७४ ॥ [कर्तव्यानीति] ऐसी हे हातवटी । घेऊनि जे किया उठी । आपणा आपुलिया गांठी । लाहेचि तो ॥ ७५ ॥ ह्मणोनि फळीं लोंग । सांडोनि देहसंगें । कर्में करावीं हा चांग । निरोप माझा ॥ ७६ ॥ जो जीवबंधें शीणला । सुटके जोंचे आपला । तेणें पुढतपुढती या बोला । आन न कीजे ॥ ७७ ॥

"तर महायागादिक प्रमुख कर्में अचुक करूनही ज्याच्या आंगांत कर्तेपणाचा अहंभाव राहत नाहीं; १६६ मजुरी घेऊन दुसऱ्याप्रीत्यर्थ जो तीर्थाला जातो, त्याला 'मी यात्रा करतों आहें' ह्या थोरवीचा जसा संतोष वाटत नाहीं; १६७ बलाढ्य राजाच्या आज्ञेवरून जो एकटाच जाऊन दुसऱ्या राजाला धरून आणतो, त्याला 'मी जिंकणारा' हा जसा गर्व होत नाहीं. १६८ जो कमरेला मिठी घालून पलीकडे जातो, त्याला 'मी पोहणारा' ही गुर्मी रहात नाहीं; राजाच्या दानाध्यक्षाला दान केल्याचा जसा डौल वाटत नाहीं. १६९ त्याप्रमाणें कर्तृत्वाचा अभिमान न बाळगतां ज्या ज्या वेळीं जीं जीं कर्में येतील तीं तीं करून टाकावींत. १७० **अर्जुना!** केलया कर्मांना फळें येण्याचा जो मार्ग, त्याकडे मनोरथाला येऊं देऊं नये. १७१ हे **धनंजया!** आधींच फळांची आशा तोडून टाकून मग कर्मांचा आरंभ करावा. दुसऱ्याच्या मुलाकडे जशी दाई पाहते, १७२ पिंपळाचीं फळें मिळावींत ह्मणून जसें त्याला पाणी घालित नाहींत, त्याप्रमाणें फळाची आशा सोडून देऊन कर्में करावींत. १७३ दुधाची आशा सोडून गुराखी जसा गांवच्या गायी जमा करतो, बाळगतो, त्याचप्रमाणें कर्मफलांविषयींही करावें. १७४ अशी ही हातवटी घेऊन ज्याची क्रिया घडते, तो स्वस्वरूपाला पोंचतो. १७५ ह्मणून फळांचा संबंध व देहाचा अभिमान सोडून कर्में करावींत हें माझें सांगणें आहे. १७६ जीवबंधानें ज्याला कष्ट झाले असतील, आपल्या सुटकेची ज्याला काळजी असेल, त्यानें कधींही ह्या सांगण्याबाहेर वागूं नये." १७७

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ।
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७ ॥

[मोहादिति] ना तरी आंधाराचेनि रोखें । जैसीं डोळां रोविजती नखें । तैसा कर्मद्वेषें अशेखें । कर्मेंचि सांडी ॥ ७८ ॥ तयाचें कर्मसांडणें । तें तामस मी ह्मणें । शिसाराचे रागें लोंवणें । शिसचि जैसें ॥ ७९ ॥ [नियतस्येति] हां गा मार्ग दुवाड होये । तरी निस्तरितील पाये । कीं तेचि खांडणें आहे । मार्गापराधें ॥ १८० ॥ भुकेलिया पुढें अन्न । हो का भलतैसें ऊन्ह । तरी बुद्धी न घेतां लंघन । भाणें पापं राहाल्या ॥ ८१ ॥ तैसा कर्मांचा बाध कर्में ।

१ गर्व, अहंकार. २ स्तुतीचा. ३ एकटा. ४ जिंकणारा. ५ अभिमान. ६ आवेश न बाळगी. ७ बुद्धिबळांतील मोहऱ्यांप्रमाणें. ८ प्राप्ति. ९ मार्गी. १० दुसऱ्याचें. ११ दाईनें. १२ पिंपळाच्या फळाच्या. १३ इच्छा, आशा. १४ गुराख्या. १५ संबंध. १६ अभिमान. १७ काळजी धरी.

१ रागानें, रोषानें. २ अर्धशिशी. ३ जाळणें, कापणें. ४ दुर्गम. ५ चालूं न शकतील. ६ तोडणें. ७ लाथेनें हाणावें. ८ दोष.

निस्तरिजे करितेनि वर्में । हें तामस नेणें भ्रमें । माजविला ॥ ८२ ॥ कीं स्वभावें आलें विभागा । तें कर्मचि [1]वोसंडी पैंगा । तरि ह्मणें आतला त्यागा । तामसा तया ॥ ८३ ॥

**"किंवा अंधाराच्या रागानें जशीं डोळ्यांत नखें रोंवावीत, त्याप्रमाणें कर्माच्या द्वेषानें सारींच कर्में जो सोडून देतो, १७८ अर्धशिशीवर रागावून ज्याप्रमाणें शिरच कापून टाकावें त्याप्रमाणें त्याच्या त्या कर्माला मी 'तामस' असें ह्मणतों. १७९ अरे! मार्ग दुर्घट असला तर, पायांस चालतां यावयाचें नाहीं. ह्मणून त्या मार्गाच्या अपराधाबद्दल पायच तोडून टाकावेत होय? १८० भुकेल्यापुढें ऊन किंवा शिळें अन्न आलें ह्मणून तें मनाला येत नाहीं ह्याकरितां लाथेनें झुगारून दिल्यास लंघनच पडतें; १८१ त्याप्रमाणें कर्माचा दोष आहे तो कर्त्यानें हातवटीनें कर्मानेंच नाहींसा करावा लागतो. हें भ्रमानें मत्त झाल्यामुळें तामसाला कळत नाहीं. १८२ कारण, स्वभावगत्याच जें कर्म वांट्यास आलेलें असतें, तें कर्मच टाकून देतो, तो तामस त्यागालाच मिळाला ह्मणून खास समजावें." १८३**

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ।
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८ ॥

[दुःखमित्येव यत्कर्म] अथवा स्वाधिकार बुझे । आपलें विहितही सुझे । परि करितया उबेजे । निबंरपणा[6] ॥ ८४ ॥ जे कर्माची ऐलीकड । नावेक दिसे दुवाड । जे वाहतिये वेळे जड । शिदोरी जैसी ॥ ८५ ॥ जैसा निंब जिभे कडवट । हिरडा पहिलें तुरट । तैसा कर्मा ऐल सेवट । खेणुवाळा होय ॥ ८६ ॥ कां धेनू दुवाड शिंग । [10]शेंवतिये [11]अडव आंग । भोजनसुख महाग । पाक करितां ॥ ८७ ॥ तैसें पुढतपुढती कर्म । आरंभींच अतिविषम । ह्मणोनि तो तें श्रम । करितां मानी ॥ ८८ ॥ येऱ्हवीं विहितत्वें मांडी । परि घालितां [12]अंसुरवाडीं । तेथ पोळला ऐसा सांडी । आदरिलेंही ॥ ८९ ॥ [कायक्लेशभयात्त्यजेत्] ह्मणे वस्तु देहासारिखी । आली बहुतीं भाग्यविशेखीं । मा [13]जौचु कां कर्मादिकीं । पापिया जैसा ॥ १९० ॥ केले कर्मी[1] जें यावें । तें ह्मणें मज होआवें । आजि भोगुं ना बरवे । हातिंचे भोग ॥ ९१ ॥ ऐसा शरीराचिया क्लेशा । भेणें कर्में वीरेशा । सांडी तो [स कृत्वा राजसं त्यागं] परियेसा । राजस त्याग ॥ ९२ ॥ [नैव त्यागफलं लभेत्] येऱ्हवीं तेथही कर्म सांडे । परि तया त्यागफळ न जोडे । जैसें उतलें आगीं पडे । तें नलगेचि होमा ॥ ९३ ॥ कां बुडोनि प्राण गेले । ते अधोंदकीं[3] निमाले । हें ह्मणों नये जाहालें । दुर्मरणचि ॥ ९४ ॥ तैसें देहाचेनि लोभें । जेणें कर्मा पाणी सुभे[4] । तेणें साच न लभे । त्यागाचें फळ ॥ ९५ ॥ किंबहुना आपुलें । जैं ज्ञान होय उदया आलें । तैं नक्षत्रातें पोहलें । गिळी जैसें ॥ ९६ ॥ तैशा सकारण क्रिया । हारपती धनंजया । तो कर्मत्याग ये जया । मोक्षफळासी ॥ ९७ ॥ तें मोक्षफळ अज्ञाना । त्यागिया नाहीं. अर्जुना । ह्मणोनि तो त्याग न माना । राजसु तो ॥ ९८ ॥ तरि कोणे पां एथ त्यागें । तें मोक्षफळ घर रिघे । हेंही आइक प्रसंगें । बोलिजेल ॥ ९९ ॥

**"अथवा आपला अधिकारही समजतो; आपलें हित कोणतें तेंही कळतें; परंतु कर्त्याला तें कठीण असें वाटूं लागतें. १८४ कारण, शिदोरी जशी वागवितांना जड वाटते; त्याप्रमाणें कर्माचा प्रारंभ जरासा अवघड वाटतो. १८५ ज्याप्रमाणें लिंब ह्या जिभेला प्रथमतः कडू लागतो; हिरडा प्रथम तुरट लागतो; त्याप्रमाणें कर्माचा आरंभही प्रथम कठीणच वाटतो. १८६ किंवा धेनु मारकी असते; शेवतीच्या झाडाला कांटे असतात; स्वयंपाक करतांना भोजनसुख मिळत नाहीं; १८७ त्याप्रमाणें कर्म आहे तें आरंभालाच फार कष्टप्रद असतें. ह्मणून तो तें करतांना कष्ट पडतात असें समजतो. १८८ येरवीं विधिपूर्वक आरंभ करतो. परंतु कष्ट पडूं लागले कीं, लागलीच आंगाला चटका बसल्याप्रमाणें, तें केलेलेंही लागलीच टाकून देतो. १८९ तो ह्मणतो 'देहासारखी वस्तु मोठ्या भाग्यानें प्राप्त झालेली आहे. मग पातक्यासारखा कर्मादिकांनीं त्याचे हाल कशाकरितां करूं? १९० केलेल्या कर्मांनीं पुढें द्यावयाचें, तें मला नको. आज हातीं**

१ त्यागी. २ प्राप्त झाला. ३ समजे. ४ पाहे. ५ उपजे. ६ कठीणपणा. ७ प्रारंभ. ८ क्षणभर. ९ कठीण. १० शेवंतीच्या झाडास. ११ वाईट. १२ श्रमामुळें. १३ कशासाठीं जाच सोसूं?

१ पूर्वी जें दिलें आहे तेंच मला मिळावें असें आहे. २ ऊत आलेलें. ३ जळसमाधीसारख्या पुण्यरूप मरणानें मेले. ४ घातलें जातें. ५ सूर्योदय, प्रातःकाळ.

असलेले जे चांगले चांगले भोग आहेत ते कां न भोगून घ्यावेत?' १९१ हे **वीरश्रेष्ठा!** असें शरीराच्या भयानें जें कर्म सोडणें, तो राजस त्याग आहे, हें ध्यानांत ठेव. १९२ बाकी, तशानेंही कर्माचा त्याग होतो. पण त्या त्यागाचें फळ मात्र मिळत नाहीं. ज्याप्रमाणें ओतू येऊन आगींत पडलेलें कांहीं होमाच्या उपयोगास लागलें असें होत नाहीं. १९३ किंवा बुडून प्राण गेला, तर तो अपघात झाला. त्यानें जलसमाध घेतली असें ह्मणतां येत नाहीं. १९४ तसें, देहाच्या लोभानें जो कर्मावर पाणी सोडतो, त्याला निश्चयेंकरून त्यागाचें फळ मिळत नाहीं. १९५ किंबहुना आपलें ज्ञान जेव्हां उदयास येईल तेव्हां, उजाडलेलें जसें नक्षत्रांना गिळतें, १९६ त्याप्रमाणें **धनंजया!** सकारण (अज्ञानासह) क्रिया लयास जातात, त्यालाच कर्मत्याग असें ह्मणतात. मोक्षफलही त्यानेंच प्राप्त होतें. १९७ **अर्जुना!** तें मोक्षफळ अज्ञानानें त्याग करणाराला नाहीं, ह्मणून तो त्याग मान्य नव्हे. तो राजस त्याग होय. १९८ तर आतां कोणत्या त्यागानें तें मोक्षफळ घरांत येतें, तेंही प्रसंगानुसार सांगतों. ऐक." १९९

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः ९

[कार्यमिति] तरि स्वाधिकाराचेनि नांवें । जें वांटिया आलें स्वभावें । तें आचरे विधिगौरवें । शृंगारोनि ॥ २०० ॥ [संगं त्यक्त्वा फलं चैव] परि हें मी करित असें । ऐसा आठव त्यजी मानसें । तैसेंचि पाणी दे आशे । फळाचिये ॥ १ ॥ पैं अवज्ञा आणि कामना । मातेच्या ठायीं अर्जुना । केलिया दोनी पतना । कारण होती ॥ २ ॥ तरि दोनी यें त्यजावीं । मग माताचि ते भजावी । वांचूनि मुखालागीं वोळावी । गायचि सगळी ॥ ३ ॥ आवडतियेही फळीं । असारें साली आंठोळी । त्यासाठीं अवगळी । फळातें कोण्ही ॥ ४ ॥ तैसा कर्तृत्वाचा मद । आणि कर्मफळाचा आस्वाद । या दोहींचें नांव बंध । कर्माचा कीं ॥ ५ ॥ तरि या दोहींच्या विखीं । जैसा बाप नातळे लेंकीं । तैसा हों न शके दुःखी । विहिता क्रिया ॥ ६ ॥ [स त्यागः सात्विको मतः] हा तों त्याग तरुवर । जो गा मोक्षफळें ये थोर । सात्विक ऐसा डंगर । यासींच जगीं ॥ ७ ॥ आतां जाळूनि बीज जैसें । झाडा कीजे निर्वंशें । फळ त्यागूनि कर्म तैसें । त्यजिलें जेणें ॥ ८ ॥ तया लागतखेंवो पैरिसीं । धातूचि गंधिकाळिमा जैसी । जाती रजतमें तैसीं । तुटलीं दोन्ही ॥ ९ ॥ मग सत्वें चोखाळें । उघडती आत्मबोधाचे डोळे । तेथ मृगांबु सांजवेळे । होय जैसें ॥ २१० ॥ तैसा बुद्ध्यादिकांपुढां । असतचि विश्वाभास येव्हढा । तो न देखे कवणीकडां । आकाश जैसें ॥ ११ ॥

"तर आपल्या अधिकाराच्या नांवानें जें आपल्या वांट्यास आलेलें आहे तें, विधीच्या गौरवानें सुशोभित करून जो कर्म करतो, २०० परंतु हें मी करीत आहें, ही आठवणही मनांत धरीत नाहीं. आणि त्याचप्रमाणें फलाच्या आशेवर पाणी सोडतो. २०१ **अर्जुना!** मातेच्या ठिकाणीं अवज्ञा केली, किंवा तिच्याविषयीं उपभोगाची इच्छा धरली, तर तीं दोन्हींही पतनास कारण होतात. २०२ ह्मणून तीं दोन्हीं सोडून मग त्या मातेचें सेवन करावें. मुख ओंगळ असलें, ह्मणून सारी गायच टाकून द्यावी काय? २०३ आवडत्या फलामध्येंही साल आणि बिया निरुपयोगी असतात, तेवढ्याकरितां फळच कोणी टाकून देतो काय? २०४ तसें, कर्तेपणाचा अहंभाव आणि कर्मफळाचा उपभोग, ह्या दोहोंचेंही नांव कर्मबंध. २०५ बाप जसा लेंकीला स्पर्श करीत नाहीं, त्याप्रमाणें ह्या दोहोंविषयीं निरिच्छ होऊन विहित क्रिया करतो तो दुःखी होऊं शकत नाहीं. २०६ त्याग हा एक प्रचंड वृक्ष असून त्यालाच मोक्षाचीं मोठमोठालीं फळें येतात. सात्विक असें याचेंच जगामध्यें प्रसिद्ध नांव आहे. २०७ आतां बीं जाळून झाडाचा जसा निर्वंश करावा, त्याप्रमाणें फलाचा त्याग

१ उदक सोडणें, तिलांजलि देणें. २ नरकपातास. ३ त्यजावी. ४ बी. ५ त्यागी. ६ गर्व.

१ तसा जो विहित क्रियेविषयीं=कर्तृत्व व फलेच्छा हीं टाकून विहित क्रिया करतो तो दुःखी होऊं शकत नाहीं. २ प्रसिद्धि. ३ वृक्षाला. ४ स्पर्शतांच. ५ परिसास. ६ अमंगळ काळिमा. ७ स्वच्छ. ८ मृगजळ.

करून ज्यानें कर्म सोडलें, २०८ त्याची, परिस लागतांच लोखंडाची अमंगळ काळिमा जशी निघून जाते, त्याप्रमाणें रज आणि तम हीं दोन्हींही तुटतात. २०९ आणि निर्मल सत्वानें आत्मज्ञानाचे डोळे उघडतात तेव्हां संध्याकाळ झाली ह्मणजे मृगजळ जसें नाहींसें होतें, २१० त्याप्रमाणें बुद्धिसमोर असणारा येवढा हा मिथ्या विश्वाभास असतो तो आकाशाप्रमाणें कोणीकडे जातो तें कळत नाहीं." २११

न द्वेष्टयकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।
त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥१०॥

[न द्वेष्टीति] आणि प्राचीनाचेनि बळें । आलीं कृत्यें कुशलाकुशलें । तियें व्योमाआंगीं आभाळें । विरालीं जैसीं ॥ १२ ॥ तैसीं तयाचिये दिठी । कर्में चोखाळलीं किरीटी । ह्मणोनि सुखदुःखीं उठी । पडेना तो ॥ १३ ॥ तेणें शुभकर्म जाणावें । मग तें हर्षें करावें । कां अशुभालागीं व्हावें । द्वेषिया ना ॥ १४ ॥ [छिन्नसंशयः] तरि इया विषयींचा कांहीं । तया एकही संदेह नाहीं । जैसा स्वप्नाच्या ठायीं । जागिन्नलिया ॥ १५ ॥ [मेधावी] ह्मणऊनि कर्म आणि कर्ता । या द्वैतभावाची वार्ता । नेणे तो पंडुसुता । [त्यागी सत्वसमाविष्टो] सात्विक त्याग ॥ १६ ॥ ऐसेनि कर्में पार्था । त्यजिलीं त्यजिती सर्वथा । अधिकें बांधती अन्यथा । सांडिलीं तरी ॥ १७ ॥

"आणखी पूर्वसंचिताच्या बळानें बरीं किंवा वाईट जीं जीं कर्में प्राप्त होतात तीं, आकाशामध्यें अभ्रें जशीं विरून जावींत, २१२ त्याप्रमाणें अर्जुना! त्याच्या दृष्टीमध्यें कर्में असतात तीं निर्मल होऊन रहातात. ह्मणून सुखदुःखांच्या उद्भवामध्यें तो पडत नाहीं. २१३ त्याला, शुभकर्म पाहिलें ह्मणजे तें हर्षानें करावें, आणि अशुभ कर्म पाहिलें कीं, त्याचा द्वेष करावा हें नाहीं. २१४ जागृताला स्वप्नाविषयीं जशी कांहींएक भ्रांति रहात नाहीं त्याप्रमाणें ह्याविषयीं त्याला एकही संशय रहात नाहीं. २१५ ह्मणून अर्जुना! कर्म आणि कर्ता ह्या द्वैतभावाची वार्ताही तो जाणत नाहीं. तोच सात्विक त्याग होय. २१६ पार्था!

१ प्रारब्ध, पूर्वसंचित. २ बरींवाईट. ३ त्यागिलीं तींच त्यजिलीं जातात.

अशा रीतीनें त्याग केलेलीं जीं कर्में, त्यांचाच खरोखर त्याग होतो. दुसऱ्या कोणत्याही रीतीनें त्याग केला तर, अधिक बंधास कारण होतें." २१७

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥११॥

[न हि देहभृतेति] आणि हां गा सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची । खंती करिती कर्मांची । ते गांवढे गा ॥ १८ ॥ मृत्तिकेचा वीट । घेऊनि काय करील घट । केउतें तंतू पट । सांडील तो ॥ १९ ॥ तेवींचि वन्हित्व आंगीं । आणि उबे उबगणे आगी । कीं तो दीप प्रभेलागीं । द्वेष करील काई ॥ २२० ॥ हिंग त्रासला घाणी । तरी कैंचें सुगंधत्व आणी । द्रव सांडूनि पाणी । कें राहे तें ॥ २१ ॥ तैसा शरीराचेनि आभासें । नांदत जंव असे । तंव कर्मत्यागाचें पिसें । काइसें तरी ॥ २२ ॥ आपण लाविजे टिळा । ह्मणोनि पुसों ये अवलीळा । मा घाली फेंडी निडळा । कां करूं येगा ॥ २३ ॥ तैसें विहित स्वयें आदरिलें । ह्मणोनि त्यजूंये त्यजिलें । परि कर्मचि देह आतलें । तें कां सांडील गा ॥ २४ ॥ जें श्वासोश्वासवरी । होत निजेलियाही वरी । कांहीं न करणेंचि परि । होती जयाची ॥ २५ ॥ या शरीराचेनि मिसेंकें । कर्मचि लागलें असिकें । जिता मेलया न ठाके । इया रिती ॥ २६॥ [यस्तु कर्मफलत्यागी] या कर्मातें सांडिती परी । एकीचि ते अवधारीं । जे करितां न जाइजे हारीं । फळाशेचिये ॥ २७ ॥ कर्मफळ ईश्वरीं अर्पे । तत्प्रसादें बोधें उद्दीपे । तेथ रज्जुज्ञानें लोपे । व्याळशंका ॥ २८ ॥ तेणें आत्मबोधें तैसें । अविद्येशीं कर्म नाशे । [स त्यागीत्यभिधीयते] पार्था त्यजिजे जें ऐसें । तें त्यजिलें होय ॥ २९ ॥ ह्मणोनि इयापरी जगीं । कर्में त्यंजी तो महात्यागी । येर मूर्छने नांव रोगीं । विश्रांति जैसी ॥ २३० ॥ तैसा कर्मीं शिणे एकीं । तो विसावों पाहे आणिकीं । दांडेयाचे घाय बुकी । धोंडणें जैसें ॥ ३१ ॥ परि हें असो पुढती । तोचि त्यागी त्रिजगतीं । तेणें फळत्यागें निष्कृती । नेलें कर्म ॥ ३२ ॥

"आणखी हें पहा सव्यसाची! ह्या देहाची मूर्ति प्राप्त झाली असतां कर्माची जे खंति करतात ते गांवढळ होत. २१८ मातीचा वीट येऊन गाडगें काय करणार? वस्त्र आहे

१ अडाणी. २ मातीला कंटाळून. ३ कंटाळणें. ४ सहज. ५ लावावें. ६ पुसावें. ७ कपाळा. ८ व्यापलें. ९ निमित्तें. १० कर्म करीत असतां फलाशेचे हारी न जाणें हा एक कर्मत्यागाचा प्रकार होय. ११ ज्ञान प्रगटे. १२ मूर्च्छनेस, निचेष्टतेला. १३ सोसणें. १४ निष्कर्म स्थितीस.

तें तंतु कोठें टाकणार? २१९ तसेंच आंगांत अग्नित्व असल्यावर उबेचा आणि आगीचा कंटाळा काय कामाचा? किंवा दिवा हा प्रभेचा द्वेष करील काय? २२० हिंग जर घाणीला कंटाळला तर, सुगंध कोठून आणील? पातळपणा सोडून पाणी रहाणार कोठें? २२१ त्याप्रमाणें शरीराच्या आभासानें जोंपर्यंत नांदत असतो, तोंपर्यंत कर्मत्यागाचें वेड काय कामाचें? २२२ आपणच टिळा लावतो, ह्मणून तो पुसतां येतो. ह्मणून कपाळ मोडावयाला आणि लावावयाला येईल काय? २२३ तसें आपणांस बरें वाटेल तें करतां येतें आणि टाकतां येतें. परंतु देह हा कर्मानें व्यापलेला, तो त्याला कां सोडील? २२४ निजल्यावर सुद्धां श्वासोच्छ्वासापर्यंत कर्म होतें, कांहीं न केलें तरी सुद्धां तें चालू असतें. २२५ ह्या शरीराच्या मिषानें कर्मच सारें पाठीस लागलेलें आहे. तें जिवंत असलें तरी किंवा मेलें तरी सुद्धां सुटावयाचें नाहीं. २२६ ह्या कर्माचा त्याग करण्याचा एकच प्रकार आहे. हें लक्ष्यांत ठेव. तो कोणता? तर तें करतांना फलाशेच्या हारीं न जाणें. २२७ कर्मफल ईश्वराला अर्पण झालें ह्मणजे त्या प्रसादाच्या योगानें ज्ञान उत्पन्न होतें. तेव्हां रज्जुज्ञानानें सर्पाची असलेली शंका नाहींशी व्हावी, २२८ त्याप्रमाणें त्या आत्मबोधानें अविद्येसहवर्तमान कर्म नाश पावतें. **अर्जुना!** अशा रीतीनें केलेला जो त्याग तोच त्याग होतो. २२९ ह्मणून जगामध्यें ह्याप्रमाणें जो कर्माचा त्याग करतो तो महात्यागी समजावा. बाकी सारे, मूर्च्छा आली ह्मणजे रोग्याची विश्रांति समजावी २३० त्याप्रमाणें एका कामांत कष्ट पडतात ह्मणून ते दुसऱ्यामध्यें विसावा मिळेल तर पाहतात. हें दांड्याचे घाव बुकीवर सोसण्यासारखें आहे. २३१ पण हें फार आतां असूं दे. त्रिभुवनामध्यें त्यागी तोच. आणि त्यानेंच कर्मत्यागानें आपलें कर्म निष्कर्मस्थितीला पोंचविलें. २३२

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ।
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥१२॥

येऱ्हवीं तरी धनंजया । त्रिविधा कर्मफळा गा यया । समर्थ ते कीं भोगावया । जे न सांडितीचि आशा ॥ ३३ ॥ आपणचि विऊनि दुहिता[1] । कीं न मम ह्मणे पिता । तो सुटे कीं प्रतिग्रहिता[2] । जावाई शिरके ॥ ३४ ॥ विषाचे आगरही[3] वाहती । ते विकितां सुटले जिंती[4] । येर निमाले[5] जे घेती । वेंचोनि मोलें ॥ ३५ ॥ तैसें कर्ता[6] कर्म करू । अकर्ता फळाशा न धरू । एथ न शके आवरूं । दोंहींतें कर्म ॥ ३६ ॥ वाटे पिकलिया वृक्षाचें । फळ अपेक्षी[7] तयाचें । तेविं साधारण कर्माचें । फळ घेतया ॥ ३७ ॥ परि करूनि फळ नेघे । तो जगाच्या कामीं न रिघे । जे त्रिविध जग अवघें । कर्मफळ हें ॥ ३८ ॥ देव मनुष्य स्थावर । यया नांव जगडंबर । आणि हे तंव तीन्ही प्रकार । कर्मफळाचे ॥ ३९ ॥ तेंचि एक गा अनिष्ट[9] । एक तें केवळ ईष्ट[10] । आणि एक इष्टानिष्ट । त्रिविध ऐसें ॥२४०॥ [अनिष्टं] परि विषयमता[11] बुद्धी । आंगीं सूनि अविधी । प्रवर्तती जे निषिद्धीं[12] । कुव्यापारीं ॥४१॥ तेथ कृमि कीट लोष्ट[13] । हें देह लोहती[14] निकृष्ट । तया नाम तें अनिष्ट । कर्मफळ ॥ ४२ ॥ [इष्टं] कां स्वधर्मा मान देतां । स्वाधिकार पुढां सूतां[15] । सुकृत कीजे पुसतां । आम्नायातें[16] ॥ ४३ ॥ तैं इंद्रादिक देवांचीं । देहें लोहिजती[17] सव्यसाची । तया कर्मफळा इष्टाची । प्रसिद्धी गा ॥ ४४ ॥ [मिश्रं च] आणि गोड आंबट मिळे । तेथ रसांतर फेरसाळें[18] । उठी दोहीं वेगळें । दोहीं जिणतें[19] ॥ ४५ ॥ रेचेंकचि[20] योगवशें । होय स्तंभावया[21] दोषें । तेविं सत्यासत्य समरसें[22] । सत्यासत्यचि जिणिजे[23] ॥ ४६ ॥ ह्मणोनि समभागें शुभाशुभें । मिळोनि अनुष्ठानाचें उभें[24] । तेणें मनुष्यत्व लाभें । तें मिश्रं[25] फळ ॥ ४७ ॥ [त्रिविधं कर्मणः फलं] ऐसें त्रिविध यया भागीं । कर्मफळ मांडलेंसे जगीं । [भवत्यत्यागिनां प्रेत्य] हें न सांडी तयां भोगीं । जे सूदले[26] आशा ॥ ४८ ॥ जेथ जिव्हेचा हात फांटे । तंव जेवितां वाटे गोमटें । मग परि-

१ कन्या. २ दान घेणारा. ३ बाग. ४ वांचती. ५ मेले. ६ कर्म करो अथवा अकर्ता असो, कर्मफलाशा सोडील तर दोघांलाही कर्म बाधणार नाहीं. ७ अपेक्षा करणारालाच फळ मिळतें. ८ आशेंत. ९ प्रतिकूल. १० अनुकूल. ११ विषयप्रिय. १२ कुकर्मी. १३ मातीचें ढेंकूळ. १४ प्राप्त होती. १५ घालितां. १६ वेदाला. १७ मिळती. १८ भिन्नरुचित्व पावे. १९ मूळच्या दोहीं रसांस जिकणारें. २० नाकपुडीनें सोडण्याचा वायु. २१ स्तंभन=प्रतिबंध करण्याच्या उद्देशानें. २२ ऐक्यानें. २३ जिकावें. २४ दोन्ही. २५ परस्परांत मिसळलेंकें. २६ आशेंत सांपडले. २७ रुचि घेणें वाढे.

णामीं शेवटे । अवश्य मरण ॥ ४९ ॥ संवचोर[1] मैत्री चांग । जंव न पविजे तें दांग[2] । सामान्या[3] भली आंग । न शिवे तंव ॥ २५० ॥ तैसीं कर्में करितां शरीरीं । लाहती महत्त्वाची फरारी[4] । पाठीं निधनीं[5] एकसरी । पावती फळें ॥५१॥ जैसा समर्थ आणि ऋणिया । मार्गी आला बाइणिया[6] । न लोटे तैसा प्राणिया । पडे तो भोग ॥ ५२ ॥ मग कणिसौनि[7] कण झडे । तो विरूढला[8] कणिसा चढे । पुढती भूमी पडे । पुढती उठी ॥ ५३ ॥ तैसें भोगीं जें फळ होय । तें फळांतरें वीतें[9] जाय । चालतां पायें पाय । [10]जिणिजे जैसा ॥ ५४ ॥ उतारांचिये[11] सांगडी । ठाके ते ऐलीचि[12] थडी । तेविं न मूकीजती वोढी । भोगयाचिये ॥ ५५ ॥ पैं साध्य साधन प्रकारें । फळभोग तो पसरे । एवं गोंविले[13] संसारें । अत्यागी[14] ते ॥ ५६ ॥ [न तु संन्यासिनां क्वचित्] येरवीं जातीपुष्पाचें विकसणें[15] । त्याचि नाम जैसें सुकणें । तैसें कर्ममिषें न करणें । केलें जिहीं ॥ ५७ ॥ बीजचि वेरोसि[16] वेंचे । तेथ वाढती कुळवाडी[17] खांचे[18] । तेविं फळत्यागें कर्माचें । सारिलें काम ॥ ५८ ॥ ते सत्वशुद्धी साह्याकारें । गुरुकृपामृततुषारें । सोसिवलेंनि[19] वोसरे । द्वैत दैन्य[20] ॥ ५९ ॥ तेव्हां जगदाभासमिषें । स्फुरे ते त्रिविध फळ नाशे । एथ भोक्ता भोग्य आपैसें । निमालें हें ॥ २६० ॥ घडे ज्ञान प्रधान ऐसा । संन्यास जया वीरेशा । तेचि फळभोग सोसीं । मुकले गा ॥६१॥ आणि येणें कीर संन्यासें । जैं आत्मरूपीं दिठी[21] पैसे । तैं कर्म एक ऐसें । देखणें आहे ॥६२॥ पडोनि गेलिया भिंती । चित्रांची केवळ होय माती । कां पाहालेया[22] राती । आंधारें उरे ॥६३॥ जैं रूपचि नाहीं उभें । तैं छाया[23] कैंयाची[24] शोभे । दर्पणेंवीण बिंबें । वदन[25] कैंपां[26] ॥६४॥ फिटलिया निद्रेचा ठाव । कैंचा स्वप्नासि प्रस्ताव[27] । मग सत्य कीं तें वाव[28] । कोण ह्मणे ॥ ६५ ॥ तैसें गा संन्यासें येणें । तंव अविद्येसीचि[29] नाहीं जिणें । मा तियेचें कार्य कोणें । घेपेदीपे[30] ॥ ६६ ॥ ह्मणोनि संन्यासियें पाहीं । कर्माची गोठी कीजेल काई । परि अविद्या आपुल्या देहीं । आहे जैं कां ॥ ६७ ॥ कर्तेपणाचेनि थावें[31] । आत्मा शुभाशुभीं धांवे । दृष्टि भेदाचिये राणिवे । रचलीसे जैं ॥ ६८ ॥ तैं तरी गा सुवर्मा[1] । विजावळी[2] आत्मया कर्मा । अपाडें[3] जैसी पश्चिमा । पूर्वेसि कां ॥ ६९ ॥ ना तरि आकाशा कां आभाळा । सूर्या आणि मृगजळा । विजावळी भूतळा । वायूसि जैसी ॥ २७० ॥ पांघरोनि नईचें[4] उदक । असे नयीमाजि खडक । परि जाणिजे कां वेगळिक । कोडिंची[5] ते ॥ ७१ ॥ हो कां उदकाजवळी । परि सिनीचि[6] ते बाबुळी[7] । काय संगास्तव काजळी । दीप ह्मणों ये ॥ ७२ ॥ जरी चंद्रीं जाला कलंक । तरि चंद्रेंसी नव्हे एक । आहे दृष्टी डोळयां विवेक । अपाड जेतुला ॥ ७३ ॥ नाना वाटा वाटे जातया । वोघा वोघी वाहतया । आरसा आरसां पाहतया । अपाड जेतुला ॥ ७४ ॥ पार्था गा तेतुलेनि मानें । आत्मेनिसीं कर्म सिनें । परि घेवविजे अज्ञानें । तें कीर ऐसें ॥ ७५ ॥ विकाशें[10] रवी ते उपजवी । द्रुती[11] अलीकरवीं भोगवी । ते सरोवरीं कां बरवी । अब्जिणी[13] जैसी ॥ ७६ ॥ पुढतपुढती आत्मक्रिया[14] । अन्यकारणकाचि तैशिया । करूं पांचाही तया । कारणा रूप ॥ ७७ ॥

**“ बाकी अर्जुना! जे आशा सोडीत नाहींत, तेही तीन प्रकारचीं फळें भोगण्यास पात्र असतातच. २३३ कन्येला आपणच उत्पन्न करून पिता ती आपली असें ह्मणत नाहीं, ह्मणून तो सुटतो. आणि दान घेणारा–पाणिग्रहण करणारा–जावयी तिच्या पाशांत गुंततो. २३४ अफूसारख्या विषाचे बाग तयार करतात ते मोकळे असतात; जे विकतात तेही वांचतात; परंतु इतर जे मोल देऊन विकत घेतात ते मात्र मरतात. २३५ तसें, कर्ता कर्म करणारा असो किंवा कर्म न करणारा असो; फलाची आशा सोडली कीं दोघांनाही कर्म बांधणार नाहीं. २३६ वाटेवरील वृक्षाचें पिकलेलें फळ, अपेक्षा करील त्याला. त्याप्रमाणें साधारण कर्माचें फळ घेईल त्याला. २३७ परंतु कर्म करून जो फळ घेत नाहीं, तो जगाच्या इच्छेमध्यें शिरत नाहीं. कारण, तीन प्रकारचें जग**

---

१ सोबतीच्या चोराची. २ अरण्य. ३ वेश्या. ४ भास. ५ मरणकाळीं. ६ वायदाच्या मुदतीस, खोट्या सबबेनें. ७ कणिसांतून. ८ उगवला असतां. ९ प्रसवत. १० जिंकावा. ११ उताराची सांगड=होडी वगैरे ज्या जागीं येईल तेथून तिला दुसऱ्या तीरीं गेलेंच पाहिजे, ह्मणून तिला पलीकडचें तीर नाहीं. दोनी समानच. १२ अंतरती. १३ गुंतलें. १४ त्याग न करणारे. १५ प्रफुल्लित होणें. १६ पोटगीस. १७ उदीम. १८ खचे, नासे. १९ सिद्ध झालेले. २० द्वांव, दुःख. २१ दृष्टि. २२ उजाडल्यावर. २३ साउली. २४ कशाची. २५ कोठें. २६ पुरे झाल्यावर. २७ प्रसंग. २८ मिथ्या. २९ अज्ञानाला. ३० घ्यावें व द्यावें. ३१ बळानें.

१ ऐश्वर्यानें. २ संबंध, दुजेपण. ३ विपरीत. ४ नदीचें. ५ कोटीपटीची. ६ निराळीच. ७ शेवाळ. ८ विलक्षण. ९ वाटसरू. १० प्रकाशें. ११ मकरंद. १२ भ्रमराकडून. १३ कमलिनी. १४ आत्म्याच्या ठायीं क्रिया ही अन्यकारणक आहे त्याचीं कारणें दाखवितो. १५ पहिल्या ओवींत जशी कमलक्रिया अन्यकारणक आहे तशी.

हेंच साऱ्या कर्मांचें फळ आहे. २३८ देव, मनुष्य, आणि स्थावर ह्यांनाच जगडंबर असें नांव आहे. आणखी हे तीन प्रकार तर कर्मफळाचेच आहेत. २३९ तेंच एक अनिष्ट; एक अगदीं इष्ट; आणि एक इष्ट आणि अनिष्ट असें मिश्रित; असें हें तीन प्रकारचें आहे. २४० परंतु विषयप्रियबुद्धि आंगामध्यें धरून विधि सोडून निषिद्ध कर्मामध्यें जेव्हां अनुसरतात, २४१ तेव्हां कृमि, कीटक, मातीचें ढेंकूळ इत्यादि निकृष्टदेह हे प्राप्त होतात. त्याला अनिष्ट कर्मफळ असें नांव आहे. २४२ किंवा स्वधर्माला मान देऊन आपला अधिकार पुढें करून वेदाला विचारून पुण्य केलें, २४३ तर **अर्जुना!** इंद्रादिदेवांचे देह प्राप्त होतात तें इष्टकर्मफल असें प्रसिद्ध आहे. २४४ आणखी गोड, आंबट एकत्र केलें ह्मणजे तेथें एका निराळ्याच रसाची रुचि उत्पन्न होते. त्या दोहोंलाही मागें सारून तिसरा एक नवाच पदार्थ उत्पन्न होतो. २४५ योगबळामध्यें नाकपुडीनें सोडण्याचा वायु असतो, तोच स्तंभन करण्याच्या उपयोगीं पडतो. त्याप्रमाणें सत्यास त्याच्या मिश्रणानेंच सत्यासत्य नाहींसें होतें. २४६ ह्मणजे शुभ व अशुभ ह्या समसमान भागांचें मिश्रण झालें तर, मनुष्यजन्म प्राप्त होतो. तें मिश्रफल होय. २४७ अशा ह्या तीन विभागांनीं जगामध्यें कर्मफल पसरलेलें आहे. जे आशेमध्यें गुंततात, त्यांना तें सोडित नाहीं; भोगावयाला लावतें. २४८ जिभेचा हात फाटेपर्यंत जेवतांना गोड वाटतें; परंतु अखेर परिणामीं मरण हें ठेवलेलें. २४९ चोरांची सोबत चांगली कोठपर्यंत? अरण्य लागलें नाहीं तेथपर्यंत. वेश्या चांगली कोठपर्यंत? आंगास आंग लागलें नाहीं तेथपर्यंत. २५० त्याप्रमाणें शरिरानें कर्में करतांना महत्त्व प्राप्त होतें खरें, परंतु मग मरणसमयीं एकदम फळें दत्त करून पुढें उभीं रहातात. २५१ ज्याप्रमाणें सत्ताधीश असून ऋणकरी, मुदतीला कर्ज मागावयास आला ह्मणजे तो घालविला तरी जात नाहीं, त्याप्रमाणें प्राण्यांना ते भोग भोगणें भाग पडतात. २५२ मग कणसांतून दाणा पडतो आणि तो उगवून त्याला कणीस येतें; त्यांतील दाणे पुन्हां जमिनीवर पडून उगवतात. २५३ त्याप्रमाणें भोगानें जें फल उत्पन्न होतें तें, पावलानें पाऊल वाढल्याप्रमाणें आणखी फळें उत्पन्न करतें. २५४ उताराची सांगड जिकडे असेल तिकडे तिला अलिकडचाच कांठ; त्याप्रमाणें भोग्यांच्या ओढींतून सुटत नाहींत. २५५ तसेंच फलभोग आहे तो साध्य साधन प्रकारानें पसरतो. अशा प्रकारें अत्यागी आहेत ते संसारांत गुंतून पडलेले आहेत. २५६ बाकी, जाईच्या फुलांचें उमलणें तेंच जसें त्यांचें सुकणें, त्याप्रमाणें कर्माच्या निमित्तानें जें न करण्यासारखेंच करून सोडतात. २५७ बींच पोटाला खाऊन सरविलें, तर उत्पन्न व वाढ खुंटलीच. त्याप्रमाणें फलत्यागाच्या योगानें जे कर्माचें कामच संपवून टाकतात; २५८ ते सत्वशुद्धीच्या सहाय्यानें, गुरुकृपामृताच्या वृष्टीनें भरले, कीं त्यांचें द्वैतरूप दैन्य लयास जातें. २५९ तेव्हां जगदाभासाच्या निमित्तानें उत्पन्न होणारें जें तीन प्रकारचें फल, तेंही नाश पावतें, आणि भोक्ता व भोग्य हीं आपोआपच नाश पावतात. २६० हे **वीरश्रेष्ठा!** असा ज्ञानप्रधान संन्यास ज्यांला घडतो, तेच फळभोगाच्या सोहळ्यांतून सुटतात. २६१ आणि ह्याच संन्यासाच्या योगानें निश्चयेंकरून आत्मस्वरूपामध्यें जेव्हां दृष्टि पसरते, तेव्हां कर्म हें एक असें दिसावयास लागतें. २६२ भिंती पडून गेल्या ह्मणजे चित्रांची केवळ माती होऊन जाते. किंवा रात्र उजाडल्यावर आंधार उरतो काय? २६३ जेथें पदार्थच मुळीं उभा नाहीं, तेथें छाया कशाची शोभणार? आरशाशिवाय तोंड दिसणार कोठें? २६४ निद्रेची स्थिति निघून गेल्यावर स्वप्नाचा प्रसंग कोठचा? मग तें खरें खोटें ह्मणणार तरी कोण? २६५ तद्वत् ह्या संन्यासाच्या योगेंकरून अविद्येला मुळीं जीवच नाहींसा होतो, मग

तिचें कोण काय घेणार? आणि कोण देणार? २६६ ह्मणून ह्या संन्यासामध्यें कर्माची गोष्ट काय करणार? परंतु आपल्या देहांत जोंपर्यंत अविद्या आहे, २६७ जोंपर्यंत कर्तेपणाच्या बळानें आत्मा शुभाशुभाकडे धांवतो आहे; ही दृष्टि भेदाच्या राज्यावर लागलेली आहे; २६८ हे **अर्जुना!** तोंपर्यंत पूर्वेमध्यें आणि पश्चिमेमध्यें जितकें अंतर तितकेंच आत्म्यामध्यें व कर्मामध्यें अंतर असतें. २६९ किंवा आकाशाला आणि अभ्राला; सूर्याला आणि मृगजळाला, पृथ्वीला आणि वायूला जितकी तफावत; २७० नदीचें उदक पांघरून खडक ह्या नदीमध्येंच असतो; परंतु तिच्यामध्यें आणि त्याच्यामध्यें कोटपट अंतर आहे. २७१ उदकाजवळ असली तरी, बाभळही उदकाहून निराळीच. काजळ दिव्याच्या संगतीला असतें, ह्मणून त्याला काय दिवा ह्मणतां येईल? २७२ चंद्राला कलंक लागलेला आहे, तरी तो कांहीं चंद्रस्वरूप नव्हे. डोळ्यांनीं पहाणें आणि तर्क बांधणें ह्याच्यामध्यें जितकें अंतर; २७३ किंवा वाटेमध्यें आणि वाटसरामध्यें; ओघामध्यें आणि ओघांत वाहणारामध्यें; आरशामध्यें आणि आरसा पहाणारामध्यें जितकें अंतर, २७४ **अर्जुना!** तितक्याच मानानें आत्म्याहून कर्म भिन्न आहे. तरी त्यास अज्ञान स्वीकारतें तें खरोखर असें:—२७५ आपण विकास पावून रवीला उत्पन्न करणारी; भ्रमरांकडून मकरंदाचा उपभोग घेवविणारी; सुंदर कमलिनी जशी सरोवरांत असते, २७६ त्याप्रमाणें आत्म्यामध्यें वारंवार होणाऱ्या ज्या क्रिया, त्यांनाही अन्य कारणें आहेत. त्या पांच कारणांचें आतां विवरण करूं." २७७

पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ।
सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥१३॥

[पंचैतानि महाबाहो कारणानि] आणि पांचही कारणें तिथें । तूंही जाणसील विंपायें । [सांख्ये कृतांते प्रोक्तानि] जे शास्त्रें उभऊनि बांहे । बोलती जयातें ॥ ७८ ॥ वेदरायाचिया राजधानीं । सांख्यवेदांताच्या भुवनीं । निरूपणांच्या निशाणध्वनीं । गर्जती जियें ॥ ७९ ॥ [सिद्धये सर्वकर्मणां] जे सर्वकर्मसिद्धीलागीं । इयेंचि मुदलें हो जगीं । तेथ न सुंवावा अभंगीं । आत्मराज ॥२८०॥ इया बोलाचे डांगुरटी । तियें प्रसिद्धी आलीं किरीटी । ह्मणोनि तुझ्या हन कर्णपुटीं । वसोत का जें ॥ ८१ ॥ [निबोध मे] आणि मुखांतरीं आइकीजे । तैसें कायसें हें ओझें । मी चिद्रत्न तुझें । असतां हातीं ॥ ८२ ॥ दर्पण पुढां मांडलेया । कां लोकांचिया डोळ्या । मान द्यावा पहावया । आपुलें निकें ॥ ८३ ॥ भक्त जैसेनि जेथ पाहे । तेथ तें तेंचि होत जाये । तो मी तुझें जाहालों आहें । खेळणें आजी ॥ ८४ ॥ ऐसें हें प्रीतीचेनि वेगें । देव बोलतां से नेघे । तंव आनंदामाजी आंगें । विरत पार्थ ॥ ८५ ॥ चांदिणियाचा पडिंभर । होतां सोमकांताचा डोंगर । विर्घरोनि सरोवर । हों पाहे जैसा ॥ ८६ ॥ तैसें सुख आणि अनुभूती । या भावांची मोडूनि भिंती । आंतलें अर्जुनाकृती । सुखचि जेथ ॥ ८७ ॥ तेथ समर्थ ह्मणोनि देवां । अवकाश जाहाला आठवा । मग बुडतयाचा धांवा । जीवें केला ॥८८॥ अर्जुना येसणें धेंडें । प्रज्ञापसरेंसीं बुडे । आलें भरतें एवढें । तें सावरूनि ॥ ८९ ॥ देव ह्मणे हां गा पार्था । तूं आपणपें देख सर्वथा । तंव सांवरूनि येरें माथा । तुकियेलों ॥ २९० ॥ ह्मणे जाणसी दातारा । मी तुजसीं व्यक्तशेजारा । उबगला आदीं एकांहारा । येवों पाहें ॥ ९१ ॥ तयाही हा ऐसा । लोभें देतसा जरी लालसा । तरि कां जी घालीतसा । आड आड जीवा ॥ ९२ ॥ तेथ श्रीकृष्ण ह्मणती निकें । अद्यापि नाहीं मा ठाउकें । वेड्या चंद्रा आणि चंद्रिके । न मिळणें आहे ॥ ९३ ॥ आणि हाही बोलोनि भावो । तुज दाऊं आह्मी भिवों । जे रुसतां बांधे थांवो । तें प्रेम गा हें ॥ ९४ ॥ एथ एकमेकांचिये खुणे । विसंवाद तंवचि जिणें । ह्मणोनि असो हें बोलणें । इयेंविषयींचें ॥ ९५ ॥ मग कसकसें तें आतां । बोलत होतों पंडुसुता । सर्वकर्माभिन्नता । आत्मेनिसीं ॥ ९६ ॥ तंव अर्जुन ह्मणे देवें । माझिये मनींचेचि स्वभावें । प्रस्ताविलें बरवें । प्रमेयें तें जी ॥ ९७ ॥ जें सकळकर्मांचें बीज । कारणपंचक तुज । सांगेन ऐसी पैज । घेतली कां ॥ ९८ ॥ आणि

१ कदाचित्. २ बाहु.

१ भांडवलें. २ न घालावा. ३ दौंडी. ४ ज्ञानरत्न. ५ चांगुलपण. ६ आठवण. ७ भर. ८ पाझरून. ९ अनुभव. १० व्यापलें. ११ देव समर्थ आहे ह्मणून त्यास आठवणीला अवकाश झाला. १२ येवढें थोर. १३ सावध होऊन. १४ डोलविला. १५ स्पष्टसान्निध्य. १६ त्रासला. १७ एकत्वास. १८ लाड. १९ जीवदशेस कां आणतां. २० खरें. २१ भितों. २२ बळ, ठिकाण. २३ परस्पर बोलणें. २४ सांगों आरंभिलें. २५ अर्थ, तात्पर्य.

आत्मया एथ कांहीं। सर्वथा लाग नाहीं। हें पुढारलासि तें देई। लोंढाणें माझें ॥ ९९ ॥ यया बोला विश्वेशें। ह्मणितलें तोपें बहुवसें। इयेविषयीं धरणें बैसे। ऐसें कें जोडे ॥३००॥ तरि अर्जुना निरूपिजेल। तें कीर भाषेआंतुल। परि मेचुये होइजेल। ऋणिया तुज ॥ १ ॥ तंव अर्जुन ह्मणे देवो। काई विसरले मागील भावो। इये गोठी कीं राखत आहों। मीतूंपण जी ॥ २ ॥ एथ श्रीकृष्ण ह्मणती होकां। आतां अवधानाचा पसर निका। करूनियां आइका। पुढारलों तें ॥ ३ ॥ तरि सत्यचि गा धनुर्धरा। सर्वकर्मांचा उभारा। होतसे बाहीरवाहिरा। कैरणीं पांचें ॥ ४ ॥ आणि पंचकारण दळवाडें। जिहीं कर्माकार मांडे। ते हेतु तंव उघडे। पांच आथि ॥ ५ ॥ येर आत्मतत्त्व उदासीन। तें ना हेतु ना उपादान। नातें अंगें करी संवाहिन। कर्मसिद्धीचें ॥ ६ ॥ तेथ शुभाशुभीं अंशीं। निफजती कर्में ऐसीं। राती दिवो आकाशीं। जियापरी ॥ ७ ॥ तोय तेज धूम। ययां वायूसीं संगम। जालिया होय अभ्रागम। व्योम तें नेणे ॥ ८ ॥ नाना काष्ठीं नाव मिळे। ते नावाडेनि चळे। चालविजे अनिळें। उदक तें साक्षी ॥ ९ ॥ कां कवणे एकें पिंडें। वेंचितां अंवतरे भांडें। मग भंवडीजे दंडें। भ्रमे चक्र ॥ ३१० ॥ आणि कर्तृत्व कुलालाचें। तेथ काय तें पृथ्वीयेचें। आधारावांचूनि वेंचे। विचारी पां ॥ ११ ॥ हेंही असो लोकांचिया। राहाटी होतां आघविया। कोण काम सवितया। आंगा आलें ॥ १२ ॥ तैसें पांचहेतुमिळणी। पांचेंचि इहीं कारणीं। कीजे कर्मलतांची लावणी। आत्मा सिनां ॥ १३ ॥ आताचियें वेगळालीं। पांचही विवंचूं गा भलीं। तुकोनि घेतलीं। मोतियें जैसीं ॥ १४ ॥

"आणखी तीं पांच कारणें तुलाही कदाचित् माहित असतील. कारण, शास्त्रांनीं हात उभारून तीं निवेदन केलीं आहेत. २७८ जीं वेदराजाच्या राजधानीमध्यें सांख्यवेदांताच्या मंदिरांत निरूपणाच्या ध्वजध्वनीनें गर्जत असतात; २७९ कारण, सर्व कर्मसिद्धि करावयाला हींच काय तीं जगामध्यें मूळ आहेत. ह्मणून अभंग असा जो आत्मराजा, त्यास त्यामध्यें घालूं नये. २८० हे **किरीटी**! ह्या शब्दांच्या डांगोऱ्यानेंच तीं प्रसिद्धीस आलेलीं आहेत. ह्मणून तीं तुझ्याही कानावर आलेलीं असावींत. २८१ आणखी तुझें ज्ञानरत्न जें मी तें तुझ्या हातांत असल्यामुळें, दुसऱ्याच्या तोंडानें ऐकून घेण्याइतकें संकट तरी कशाला? २८२ आरसाच पुढें ठेवल्यावर आपलें खरें स्वरूप पहावयाला काय, दुसऱ्याच्या डोळ्यांना मान दिला पाहिजे? २८३ भक्त जेथें जसा जसा पाहील, तेथें तसा तसा होत जाणारा जो मी, तो तुझें आज खेळणें झालों आहें." २८४ असें हें प्रेमभरानें जेव्हां बोलले, तेव्हां **अर्जुनाचें** देहभान नाहींसें होऊन तो आनंदामध्यें अगदीं सपशेल बुडून गेला. २८५ चांदण्याचा वर्षाव झाला ह्मणजे चंद्रकांताचा डोंगर विरघळून सरोवर होण्याच्या बेतांत येतो, २८६ त्याप्रमाणें सुख आणि अनुभव ह्या भावांमधील भिंत मोडून **अर्जुनाच्या** रूपानें सुखच जेव्हां भरून राहिलें, २८७ तेव्हां देव समर्थ होते ह्मणूनच पुन्हां देहभानावर आले. आणि मग स्वस्वरूपांत मग्न झालेल्या **अर्जुनास** हाक मारली. २८८ **अर्जुनायेवढें** धेंड, प्रचंड बुद्धिसहवर्तमान बुडून जाण्यायेवढें भरतें आलें होतें तें सावरून, २८९ देव ह्मणाले "हे **अर्जुना**! तूं नीट आपल्याकडे पहा." तेव्हां **अर्जुन** सावध होऊन त्यानें मान डोलविली, २९० आणि ह्मणाला "हे दातारा! मी तुझ्यापासून निराळा-द्वैतभावानें-रहावयास कंटाळलों आहे, आणि तुमच्याशीं ऐक्यरूप व्हावें असें मनांत असल्याचें आपणही जाणतांच, २९१ शिवाय, आपणही लोभानें जर इतके लाड पुरवितां, तर ह्या जिवाला पुन्हा पुन्हा मध्यें आडकाठी कशाला घालतां? (ह्मणजे पुन्हां पुन्हां मला सावध कशाला करतां? असा भाव.) २९२ तेव्हां **श्रीकृष्ण** ह्मणाले "अद्याप खरें तत्त्व तें तुला ठाउक नाहींचना? वेड्या! चंद्र आणि चांदणें ह्यांच्यांत कधीं वियोग असतो काय? २९३ आणखी हा हेतु तुला सांगून थोडेंसें भयही दाखविलें, कारण, रुसण्यामध्यें एक प्रकारचें दृढतर प्रेम असतें. २९४ आणि तें असतें तोंपर्यंतच परस्परांस खूण पटण्यासारखा तेथें संवाद उत्पन्न होतो. ह्मणून त्या विषयींचें बोलणें

१ बोललास. २ देणें. ३ शब्दाचें वर्म. ४ प्रीतिस्तव. ५ बोललों. ६ स्पष्ट, दृष्टिगोचर. ७ पांच साधनांनीं. ८ सत्य. ९ दिवस. १० आकाशासी ये. ११ सूर्याला. १२ कारणें मिळाल्यानें. १३ वेगळा, साक्षी. १४ वेगळीं करूं. १५ वजन करून.

आतां असूं दे. २९५ पण अर्जुना! आतां आपण आत्म्याहून सर्व कर्में अगदीं भिन्न आहेत, ह्या विषयावर कसें कसें बरें बोलत होतों?" २९६ तेव्हां अर्जुन ह्मणाला "देवांनीं माझ्या मनांत भावार्थ होता तो बरा आपोआपच सांगितला. २९७ सकल कर्मांचें बीज असें जें कारणपंचक आहे तें, तुला सांगेन असें वचन दिलें आहे. २९८ आणि आत्म्याला येथें कांहींएक संबंध नाहीं असें आपण बोललांत. ती माझी बाकी फेडा आतां." २९९ हें ऐकून विश्वेशाला फार संतोष झाला. आणि ते ह्मणाले "अशाविषयीं धरणें घेऊन बसणारा तरी कोठें मिळतो? ३०० तर अर्जुना! त्या भाषणांतील मर्म तुला निश्चयेंकरून सांगतों. ह्मणजे तूं धनकोही प्रसन्न होशील." ३०१ तेव्हां अर्जुन ह्मणाला " देव, मागच्या गोष्टी विसरले काय? प्रभो! आह्मी आणि तुह्मी ह्या गोष्टी कोण धरून बसलें आहे?" ३०२ तेव्हां श्रीकृष्ण ह्मणाले "होय का? तर नीट लक्ष्य देऊन मी काय बोलतों तें ऐक. ३०३ तर धनुर्धरा! सर्व कर्मांचा स्पष्ट रीतीनें उदय झालेला जो दिसतो, तो, पांच कारणांनींच दिसतो, हीच गोष्ट खरी आहे. ३०४ आणखी ज्या पांच कारणांनीं हा कर्माकार तयार होतो, ते पांच हेतुही उघडेच आहेत. ३०५ बाकी आत्मतत्व ह्मणून जें आहे तें उदासीनच असतें. त्याला हेतुही नाहीं, आणि कारणही नाहीं. किंवा तें आपणहून कर्मसिद्धीला सहायही करीत नाहीं. ३०६ आकाशामध्यें रात्र आणि दिवस ज्याप्रमाणें उत्पन्न होतात, त्याप्रमाणें शुभाशुभ अंशानें कर्में उत्पन्न होतात. ३०७ पाणी, तेज आणि धूर ह्यांचें वायूशीं मिश्रण झालें ह्मणजे अभ्र उत्पन्न होतें. तें आकाशाला कांहींच माहित असत नाहीं. ३०८ किंवा लांकडाची नौका होते; ती नावाडी लोक पाहिजे तिकडे फिरवितात; तिला चालवितो वायू; आणि पाणी हें फक्त साक्षीदार. ३०९ किंवा एक गोळा खर्च केला ह्मणजे त्याचें मडकें तयार होतें; आणखी काठीनें फिरविलें ह्मणजे चाक फिरूं लागतें; ३१० तें कुंभाराचें कर्तृत्व आहे. त्यामध्यें पृथ्वीला आधाराशिवाय दुसरें काय बरें द्यावें लागतें? विचार कर. ३११ हेंही असो. सर्व लोकांचे व्यापार, उद्योग चालू लागले ह्मणून सूर्याच्या वांटणीला कोणतें काम आलें आहे? ३१२ त्याप्रमाणें पांच हेतु एकत्र होऊन ह्या पांच कारणांनींच कर्मरूप वल्लीची लावणी होते. आत्मा आहे तो वेगळाच आहे. ३१३ आतां त्या पांचही कारणांचें नीट विवेचन करूं. चांगलीं चांगलीं मोत्यें निवडून घेऊन तीं जशीं वजन करून घ्यावींत," ३१४

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधा च पृथक् चेष्टा दैवं चैवाऽत्र पंचमम् ॥१४॥

[अधिष्ठानं] तैसीं यथालक्षणें । आइकें पांचकारणें । तरि देह हें मी ह्मणें । पहिलें एथ ॥ १५ ॥ ययातें अधिष्ठान[1] ऐसें । ह्मणिजे तें याचि [2]दोषें । जे स्वभोग्येंसीं वसे । भोक्ता एथ ॥ १६ ॥ इंद्रियांच्या दाहें[3] हातीं । [4]जाचोनि देवोराती । सुखदु:खें प्रकृती[5] । जोडीजती जियें ॥ १७ ॥ तियें भोगावया पुरुखा । आन ठावोचि नाहीं देखा । ह्मणोनि अधिष्ठान [6]भाखा । बोलिजे देह ॥ १८ ॥ हें चोविसांहीं तत्त्वांचें । कुडुंबघरवस्तीचें । तुटे बंधमोक्षांचें । गुंथाडें एथ ॥ १९ ॥ किंबहुना अवस्थात्रया[7] । हें अधिष्ठान धनंजया । ह्मणोनि देहा यया । हेंचि नाम ॥ ३२० ॥ [तथा कर्ता] आणि कर्ता हें दुजें । कर्मांचें कारण जाणिजे । प्रतिबिंब ह्मणिजे । चैतन्याचें जें ॥ २१ ॥ आकाशचि वर्षे नीर । तें तळवटीं बांधे नोंडर[9] । मग बिंबोनि तदाकार । होय जेविं ॥ २२ ॥ कां निद्राभरें बहुवें । राया रायपण ठांउवें[10] नव्हे । मग स्वप्नींचिये सामावे । रंकपणीं ॥ २३ ॥ तैसें आपुलेनि विसरें । चैतन्यचि देहाकारें । आभासोनि [11]आविष्करे । देहपणें जें ॥ २४ ॥ जया विचाराच्या देशीं । प्रसिद्धी गा जीव ऐसी । जेणें [12]भाष केली देहेंसी । आघवाविषयीं ॥ २५ ॥ प्रकृती करी कर्में । तो म्यां केली ह्मणे भ्रमें । येथ कर्ता येणें नामें । बोलिजे जीव ॥ २६ ॥ [करणं च पृथग्विधं] मग पां[13]तेयांच्या केशीं । एकीच उठती दिठी जैसी । मोकळी चवरी ऐसी । चिरीव[14] गमे

१ आधार. २ उद्देशें. ३ दहा हातांनीं. ४ कष्ट सोसून. ५ प्रकृतीच्या योगानें. ६ शब्दानें. ७ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. ८ ज्ञानाचें. ९ डबकें. १० ठाऊक. ११ प्रकटे. १२ प्रतिज्ञाशब्द देणें. १३ पापण्यांच्या. १४ चिरल्याप्रमाणें.

॥ २७ ॥ कां घराआंतुल एक । दीपाचा अवलोक । गवाक्षभेदें अनेक । आवडे जेविं ॥ २८ ॥ कां एकचि पुरुष जैसा। अनुसरत नवां रसां । नवविध ऐसा । आवडों लागे ॥ २९ ॥ तेविं बुद्धीचे एक जाणणें । श्रोत्रादिभेदें येणें । बाहेरि इन्द्रियपणें । फांके जें कां ॥ ३३० ॥ तें पृथग्विध करण । कर्माचें इया कारण । तिसरें गा जाण । नृपनंदना ॥ ३१ ॥ [विविधा च पृथक्चेष्टा] आणि पूर्वपश्चिमवाहणी । निघालिया वोघाचिया मिळणी । होय नदी नद पाणी । एकचि जेविं ॥ ३२ ॥ तैसी क्रियाशक्ति पवनी । असे जे अनपायिनी । ते पडिली नानास्थानीं । नाना होय ॥ ३३ ॥ जें वाचे करी येणें । तें तेचि होय बोलणें । हाता आली तरी घेणें । देणें होय ॥ ३४ ॥ अगा चरणाच्या ठायीं । तरि गती तेचि पाहीं । अधोद्वारीं दोहीं । क्षरणें तेचि ॥ ३५ ॥ कंदौनि हृदयवरी । प्रणवाची उजरी । करितां तेचि शरीरीं । प्राण ह्मणिजे ॥३६॥ मग ऊर्ध्वीचिया रिगा निगा । पुढती तेचि शक्ति पैं गा । उदान ऐसिया लिंगां । पात्र जाहाली ॥ ३७ ॥ अधोरंध्राचेनि वाहें । अपान हें नाम लाहे । व्यापकपणें होये । व्यान तेचि ॥ ३८ ॥ आरोगिलेनि रसें । शरीर भरी सरिसे। आणि न सांडितां असे । सर्वसंधी ॥ ३९ ॥ ऐसिया इया राहटीं । मग तेचि क्रिया पाठीं । समान ऐसी किरीटी । बोलिजे गा ॥ ३४० ॥ आणि जांभई शिंक ढेंकर । ऐसैसा होतसे व्यापार । नागकूर्म कृकर । इत्यादि होय ॥ ३४१ ॥ एवं वायूची हे चेष्टा । एकीचि परि सुभटा । वर्तनास्तव पालटा । येतसे जे ॥ ४२ ॥ [दैवं चैवाऽत्र पंचमं] ते भेदली वृत्तिपंथें । वायुशक्ती गा एथें । कर्मकारण चौथें । ऐसें जाण ॥ ४३ ॥ आणि ऋतु बरवा शारदु । शारदीं पुढती चांदु । चंद्रीं जैसा संबंधु। पूर्णिमेचा ॥ ४४ ॥ कां वसंतीं बरवा आराम । आरामीं प्रियासंगम । संगमीं आगम । उपचारांचा ॥ ४५ ॥ नाना कमळीं पांडवा । विकास जैसा बरवा । विकासीं ही यैवा । परागाचा तो ॥ ४६ ॥ वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्श जैसा ॥ ४७ ॥ तैसी सर्ववृत्तिवैभवीं । बुद्धीचि एकली बरवी । बुद्धीही बरव नवी । इंद्रियप्रौढी ॥ ४८ ॥ इंद्रियप्रौढीमंडळा । शृंगार एकचि निर्मळा । जै अधिष्ठात्रियां कां मेळा । दैवतांचा जो ॥ ४९ ॥ ह्मणूनि चक्षुरादिकीं दाहें । इंद्रियां पाठीं स्वानुग्रहें । सूर्यादिकां कां आहे । सुरांचें वृंदें ॥ ३५० ॥ तें देववृंद बरवें । कर्मकारण पांचवें । अर्जुना एथ जाणावें । देव ह्मणे ॥ ५१ ॥ एवं माने तुझिये आयणी । तैसी कर्मजातांची हे खाणी । पंचविध आकर्णी । निरूपिली ॥ ५२ ॥ आतां हेचि खाणी वाढे । मग कर्माची सृष्टी घडे । जिहीं ते हेतुही उघडे । दाऊं पांचैं ॥ ५३ ॥

१ झरोका इत्यादिकांच्या योगानें. २ वाटे. ३ निरनिराळें इंद्रिय. ४ मार्गानें. ५ रजोगुणाची कर्तृत्वशक्ति. ६ प्राणवायु. ७ अविनाश. ८ मलमूत्रद्वारीं. ९ नाभीपासून हृदयापर्यंत. १० ओंकाराची वृद्धि. ११ वरल्या रिघण्या निघण्यास. १२ कंठस्थ वायु. १३ चिन्हास, संज्ञेस. १४ गुदस्थ वायु. १५ व्यापक शरीरस्थ वायु. १६ भक्षिलेल्या रसानें. १७ नाभिस्थ वायु. १८ नागादि उपप्राण. १९ शरदृतु. २० बाग. २१ आदर इत्यादिकांचा. २२ आगमन. २३ पुष्परजांचा. २४ गोडी. २५ परब्रह्मस्वरूप. २६ ऐश्वर्यामध्यें.

**"त्याप्रमाणें त्या पांच कारणांचीं यथातथ्य लक्षणें ऐक. तर येथें देह हें एक पहिलें कारण आहे असें मी ह्मणतों. ३१५ ह्यालाच 'अधिष्ठान' ह्मणजे आधार असें ह्मणतात. तें अशा उद्देशानें कीं, आपल्या भोग्यासहवर्तमान भोक्ता येथें राहतो. ३१६ इंद्रियांच्या दहा हातांनीं अहोरात्र कष्ट सोसून प्रकृति जीं सुखदुःखें मिळविते, ३१७ तीं पुरुषाला भोगावयाला दुसरी जागाच नाहीं. ह्मणून देहाला 'अधिष्ठान' ह्या शब्दानें बोलतात. ३१८ हें चोवीस तत्त्वांचें कुटुंबासहवर्तमान रहाण्याचें घर असून, बंधमोक्षाचें गुंताडें येथें तुटतें. ३१९ किंबहुना धनंजया! जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति ह्या तीन अवस्थांना हें अधिष्ठान आहे–आधार आहे–ह्मणून देहालाही हें नांव दिलेलें आहे. ३२० आणखी ज्ञानाचें प्रतिबिंब असें ह्मणतात, तो कर्ता, हें कर्माचें दुसरें कारण आहे. ३२१ आकाश पाणी शिंपडतें; तें खालीं डबक धरून राहतें. आणि त्यांत आकाशाची प्रतिमा पडून तेंही तदाकारच बनतें. ३२२ किंवा गाढ निद्रा लागली ह्मणजे राजाला राजेपणाची स्मृति रहात नाहीं, आणि स्वप्नांतील भिकारपणांत शिरतो. ३२३ त्याप्रमाणें आपल्याच विसरणानें चैतन्य आहे तें देहाकारानें भासून देहपणानें प्रगट होतें. ३२४ ज्या विचाराच्या देशामध्यें 'जीव' अशी त्याची प्रसिद्धि आहे; त्यानें सर्वांबद्दल देहाशीं आणभाक केलेली आहे.**

१ शोभा. २ आश्रय करून राहणाऱ्या. ३ ठायीं. ४ स्वकृपेनें. ५ समुदाय. ६ अशा प्रकारें. ७ आवडीसाठीं.

३२५ कर्में हीं प्रकृति करते. तो तीं मीं केलीं असें ह्मणतो तें भ्रमानें ह्मणतो. ह्मणून ह्याला कर्ता ह्या नांवानें 'जीव' असें ह्मणतात. ३२६ दृष्टि ही एक अगदीं निराळी असून ती पापणीच्या केंसांतून चवरीप्रमाणें चिरल्यासारखी वाटते, ३२७ किंवा घराच्या आंतील एकाच दिव्याचा प्रकाश निरनिराळ्या झरोक्यांमुळें जसा अनेक प्रकारानें भासतो, ३२८ किंवा एकच पुरुष जसा नऊ रसांनीं व्यापला ह्मणजे नऊ प्रकारचा दिसूं लागतो,* ३२९ त्याप्रमाणें बुद्धीचें एकच ज्ञान ह्या श्रोत्रादि भेदानें इंद्रियपणानें जें बाहेर पसरतें. ३३० हे **राजकुमारा!** तीं निरनिराळीं इंद्रियें, हीं ह्या कर्माचें तिसरें कारण होत. हें लक्ष्यांत ठेव. ३३१ आणखी पूर्व पश्चिम वाहत निघालेल्या ओघांचे समुदाय कांहीं नद होतात, कांहीं नद्या होतात; परंतु पाणी जसें एकच. ३३२ त्याप्रमाणें वायूमध्यें जी अविनाश क्रियाशक्ति आहे, ती निरनिराळ्या ठिकाणीं पडल्यानें निरनिराळी होते. ३३३ ती जेव्हां वाचेमध्यें येते, तेव्हां तीच बोलणें होते. हातांत आली ह्मणजे घेणें देणें होते. ३३४ पायामध्यें आली तर तीच गती आहे असें समज. अधोद्वारीं आली, तर मूत्रपुरीष तें तीच. ३३५ नाभीपासून हृदयापर्यंत ओंकाराचा उत्कर्ष केला ह्मणजे तिलाच शरिरांतील प्राण असें ह्मणतात. ३३६ मग वरच्या बाजूनें तीच शक्ति आंत बाहेर जाऊं येऊं लागली, ह्मणजे 'उदान'–कंठस्थवायु–ह्या संज्ञेला पात्र होते. ३३७ तीच पश्चिम द्वारांतून वाहूं लागली ह्मणजे तीस 'अपान' हें नांव प्राप्त होतें. व्यापकपणाच्या योगानें तीच व्यान होते. ३३८ भोजन केलेल्या रसानें एकसारखें शरीर भरतें, आणि कोणताही संधि न सोडतां भरून रहातें. ३३९ अशा रीतीनें तीच क्रिया राहिली ह्मणजे मग **अर्जुना!** तिलाच समान असें ह्मणतात. ३४० आणखी जांभई, शिंक, ढेंकर इत्यादि व्यापार होतो, किंवा नाग, कूर्म, कृकर, इत्यादि उपप्राण होतात. ३४१ ह्या अशा साऱ्या चेष्टा एकाच वायूच्या आहेत. तरी हे **वीरश्रेष्ठा!** वर्तनामुळें त्यांच्यांत जो भिन्नपणा येतो, ३४२ त्या वृत्तिपंथानें जीवनत्त्व पावलेली जी वायुशक्ति ती, त्या कर्मास चौथें कारण आहे हें लक्ष्यांत ठेव. ३४३ आणखी ऋतूंमध्यें उत्तम ऋतु शरत्; शरदृतूंमध्यें चंद्र; आणि चंद्रामध्यें पौर्णिमेचा आणि संपूर्ण. ३४४ किंवा वसंतऋतूमध्यें उत्तम बाग; उत्तम बागेमध्यें प्रियाची भेट; आणि भेटीमध्यें आदरातिथ्य. ३४५ किंवा **अर्जुना!** कमळांचा सुंदर विकास; सुंदर विकासामध्यें पराग; ३४६ वाणीमध्यें उत्तम कवित्त्व, कवित्त्वामध्यें उत्तम गोडी; आणि गोडीमध्यें जसें परब्रह्मस्वरूप; ३४७ त्याप्रमाणें साऱ्या वृत्तीच्या ऐश्वर्यामध्यें एक बुद्धि हीच उत्तम आहे. बुद्धीहूनही इंद्रियांची प्रौढी उत्तम होय. ३४८ त्या इंद्रियप्रौढीमंडळामध्यें ही एक दिव्य प्रभा आहे. ती ही कीं, त्या इंद्रियांना आधार जीं दैवतें ह्यांचा मेळा. ३४९ ह्मणून नेत्रादि दशेंद्रियांच्या मागें आपआपल्या कृपेंकरून सूर्यादि देवतांचे समुदाय असतात. ३५० **अर्जुना!** ते उत्तम देवांचे समुदाय हे कर्माला पांचवें कारण आहे." असें **देव** ह्मणाले. ३५१ "अशा प्रकारें तुझ्या आवडीप्रमाणें सर्व कर्मांची पांच प्रकारची खाण असलेली सांगितली. ३५२ आतां हीच खाण ज्या हेतूंनीं वाढून कर्मांची सृष्टि उत्पन्न होते, ते पांच हेतुही उघडे करून दाखवूं." ३५३

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ।
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥१५॥

* ह्या दृष्टांताला आनंदतनयकृत श्रीरामवर्णनपर पुढील श्लोक, फारच समर्पक आहे:—

सीतेला स्मरसा धनूसि हरसा राजा दिसे वीरसा ।
मूढांला नरसा जनां नृवरसा भक्तांसि माहेरसा ॥
देवां ईश्वरसा रिपूंसि गरसा ज्ञात्यांसि चित्सारसा ।
ऐसा सर्व रसांसि हेतु परिसा जो सूर्य हंसारसा ॥ १ ॥

[शरीरवाङ्मनोभिरिति 'तत्र मनसा'] तरि अवसांत आली माधवी । ते हेतु होय नवपल्लवीं । पल्लव पुष्पपुंज दावी । पुष्प फळातें ॥ ५४ ॥ कां वांर्षियें आणिजे मेघ । मेघें वृष्टिप्रसंग । वृष्टीस्तव भोग । सस्यसुखाचा ॥ ५५ ॥ ना तरी प्राची अरुणातें विये । अरुणें सूर्योदय होये । सूर्यें सगळा पाहे । दिवस जैसा ॥ ५६ ॥ तैसें मन हेतु पांडवा । होय कर्मसंकल्पभावा । तो संकल्प लावी दिवा । वाचेचा गा ॥ ५७ ॥ [वाचा] मग वाचेचा तो दिवेंटा । दावी कृत्यजातांचिया वाटा । तेव्हां कर्ता रिगे कांमठा । कर्तृत्वाच्या ॥ ५८ ॥ [शरीरेण] तेथ शरीरादिक दळवाडें । शरीरादिकां हेतूचि घडे । लोहकाम लोखंडे । निर्वाळिजे जैसें ॥ ५९ ॥ कां तांथुवाचा ताणा । तांथु घालितां वैरणा । तो तंतूचि विचक्षणा । होय पट ॥ ३६० ॥ तैसें मनवाचादेहाचें । कर्म मनादि हेतुचि रचे । रत्नीं घडे रत्नाचें । दळवाडें जेविं ॥ ६१ ॥ [यत्] एक शरीरादिकें कारणें । तेचि हेतु केविं हें कोणें । अपेक्षिजे तरि तेणें । अवधारि जो ॥ ६२ ॥ [तस्य हेतवः] आइका सूर्याचिया प्रकाशा । हेतु कारण सूर्यचि जैसा । कां उंसाचें कांडें उंसा । वाढि हेतु ॥ ६३ ॥ नाना वाग्देवता वानावी । तें वाचाचि लागे कामवावी । कां वेदां वेदेंचि बोलावी । प्रतिष्ठा जेविं ॥ ६४ ॥ तैसें कर्मा शरीरादिकें । कारण हें कीर ठाउकें । परि हेंचि हेतु न चुके । हेंही एथ ॥ ६५ ॥ [कर्म प्रारभते नरः] आणि देहादिकीं कारणीं । देहादि हेतुमिळणी । होय जया उभारणी । कर्मजाता ॥ ६६ ॥ [न्याय्यं वा] तें शास्त्रार्थें मांनिलेया । मार्गा अनुसरे धनंजया । तरि न्याय तो न्याया । हेतु होय ॥ ६७ ॥ जैसा पर्जन्योदकाचा लोट । विर्पायें धरी साळींचा पाट । तो जिरे परि अचाट । उपयोग आथी ॥ ६८ ॥ कां रोषें निघालें अवचटें । पडिलें द्वारकेचिये वाटे । तें शिणे परि सुनाटें । नवचती पंदें ॥ ६९ ॥ तैसें हेतुकारणमेळें । उठी कर्म जें आंधळें । तें शास्त्राचे लाहे डोळे । तें न्याय्य म्हणिपे ॥ ३७० ॥ [विपरीतं वा] ना दूध वोढितां ठावो पावे । तंव उतोनि जाय स्वभावें । तोही वेंच परि नव्हे । वेंचिलें तें ॥ ७१ ॥ तैसें शास्त्रसाह्येंवीण । केलें नोहे जरी अकारण । तरि लागो कां नागवण । दानलेखीं ॥ ७२ ॥ अगा बावना वर्णांपरता । कोण मंत्र आहे पंडुसुता । कां बावनही नुचारितां जीव आथि ॥ ७३ ॥ परि मंत्राची कडेसणी । जंव नेणिजे कोदंडपाणी । तंव उच्चार फळावाणी । न पवे जेविं ॥ ७४ ॥ तेविं कारणहेतुयोगें । जें विसाट कर्म निगे । तें शास्त्राचिये न लगे । कांसे जंव ॥ ७५ ॥ कर्म होतचि असे तेव्हांही । परि तें होणें नव्हे पाहीं । तो अन्याय गा अन्यायीं । हेतु होय ॥ ७६ ॥

१ अकस्मात्. २ वसंतशोभा. ३ कारण. ४ पावसाळ्यांत. ५ धान्याचा. ६ उजेडे. ७ मशाल. ८ व्यापारांत, संभ्रमांत. ९ समुदाय. १० स्वच्छ कीजे. ११ तंतूचा. १२ थोडें थोडें घालतां. (जसें जांत्यांत वगैरे थोडें थोडें वैरण घालतात) १३ जाणण्यास इच्छी. १४ वाढण्यास. १५ सरस्वती. १६ श्रमवावी. १७ अंगीकार करून. १८ अवचित. १९ व्यर्थ. २० पाउलें. २१ न्यायास अनुसरून. २२ अवकाश वाढत जातां. २३ व्यर्थ.

"अकस्मात् वसंतशोभा आली तर ती नूतन पल्लवांस कारणीभूत होते. पल्लवांपासून पुष्पगुच्छ निर्माण होतात, आणि पुष्पांपासून फळें. ३५४ किंवा वर्षाऋतु मेघ आणतो; मेघांपासून वृष्टीचा योग; आणि वृष्टीपासून धान्याच्या सुखाचा उपभोग घ्यावयास मिळतो. ३५५ किंवा पूर्वदिशा अरुणास उत्पन्न करते; अरुणाच्या योगानें सूर्योदय होतो; आणि सूर्याच्या योगानें सर्व दिवस सुप्रभ होतो. ३५६ त्याप्रमाणें **अर्जुना!** कर्मसंकल्पाच्या भावनेला मन हें मूळ आहे. आणि तो संकल्प वाणीचा दिवा लावतो. ३५७ मग वाचेची मशाल असते ती, प्रत्येक कर्माचा वाटा दाखविते, तेव्हां कर्ता हा कर्तृत्वाच्या व्यापारांत शिरतो. ३५८ तेव्हां शरिरादिक समुदायच शरिरादिकांना हेतु होतो. लोखंडाचें काम जसें लोखंडानेंच घांसावें; ३५९ किंवा तंतूचा ताणा थोडे थोडे तंतु घालतो तेव्हां हे **विचक्षणा!** तो तंतूच पट होतो! ३६० रत्नांचे समुचय जसे रत्नांचेच तयार होतात, त्याप्रमाणें मन, वाणी, देह ह्यांचें कर्म मनादि हेतूच करितात. ३६१ आतां शरिरादिक जीं कारणें आहेत, तेच हेतु कसे होतील? असें जर कोणाची जाणण्याची इच्छा असेल, तर त्यानें लक्ष्य द्यावें. ३६२ सूर्याच्या प्रकाशाला कारण आणि हेतु जसा सूर्यच असतो; किंवा उंसाच्या वाढीला जसें उंसाचेंच कांडें हेतु असतो; ३६३ किंवा सरस्वतीचें वर्णन करूं

१ द्रव्यहानि. २ अक्षरांपलीकडे. ३ विवेचन. ४ फलद्रूप. ५ अनियमित.

लागलें तर वाणीलाच शिणवावें लागतें; किंवा वेदानेंच जशी वेदांची थोरवी गावी लागते; ३६४ त्याप्रमाणें कर्माला शरीरादिक हेंच कारण हें निश्चयेंकरून समजतें. परंतु हेतूही तेच हेंही-पण चुकत नाहीं. ३६५ आणि देहादिक कारणांनीं देहादिक हेतूला धरून जें कर्म उत्पन्न होतें, ३६६ अर्जुना! तें शास्त्रार्थानें मान्य केलेल्या मार्गाला अनुसरून असेल, तर तो न्याय न्यायालाच हेतु होतो. ३६७ ज्याप्रमाणें पावसाच्या पाण्याचा लोंढा अकस्मात् भाताच्या पाटांत शिरला, आणि मग तो आटला तरी त्याचा अतिशय उपयोग होतो. ३६८ किंवा रागानें बाहेर पडलेला मनुष्य, अकस्मात् द्वारकेच्याच वाटेनें गेला, तरी त्याला कष्ट होतात हें खरें; परंतु त्याची पाउलें फुकट जात नाहींत. ३६९ त्याचप्रमाणें हेतु कारणांच्या योगानें जें आंधळें कर्म उत्पन्न होतें, त्याला जर शास्त्राचे डोळे आले, तर त्यालाच 'न्याय्य' असें ह्मणतात. ३७० किंवा दुधाला विस्तवावर अधिक वेळ झाला तर तें आपोआपच ओतूं जातें. तोही खर्चच, तरी त्यास खर्च झाला असें ह्मणतां येत नाहीं. ३७१ त्याप्रमाणें शास्त्राच्या सहायावांचून केलें तर तें केलेंसें होत नाहीं. आणि दानाच्या निमित्तानें व्यर्थ बुडवणूक मात्र होते. ३७२ हें पहा अर्जुना! बावन्न अक्षरांशिवाय कोणता मंत्र आहे? आणखी हीं बावन्न अक्षरें उच्चारल्याशिवाय जीव आहे का? ३७३ परंतु हे कोदंडपाणी! मंत्रांचें विवेचन जोंपर्यंत माहिती नाहीं, तोंपर्यंत जशी उच्चाराची फलद्रूपता होत नाहीं; ३७४ त्याप्रमाणें कारण आणि हेतु ह्यांच्या योगानें जें अनियमित कर्म निघतें, तें जोंपर्यंत शास्त्राच्या कासेला लागत नाहीं, ३७५ तोंपर्यंत कर्म हें होतच असतें. पण तें कर्माचें होणें नव्हे असें समज. तो अन्यायच अन्यायाला हेतु होतो." ३७६

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ।
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १६ ॥

[पंचैते इति पूर्वश्लोकस्थं पदं] एवं पंचकारणा कर्मा । पांचही हेतु हे सुमहिमा । [तत्रैवमिति] आतां एथें पाहें पां आत्मा । सांपडला असे ॥ ७७ ॥ भानु न होनि रूपें जैसीं । चक्षुरूपातें कां प्रकाशी । आत्मा न होनि कर्में तैसीं । प्रकटित असे गा ॥ ७८ ॥ पैं प्रतिबिंब आरिसा । दोन्ही न होनि वीरेशा । दोहींतें प्रकाशी जैसा । न्याहाळिता[1] तो ॥ ७९ ॥ कां अहोरात्र हे सविता । न होनि करी पंडुसुता । तैसा आत्मा कर्म कर्ता । न होनि दावी ॥ ३८० ॥ [पश्यत्यकृतबुद्धित्वात्] परि देहाहंमानभुली । जयाची बुद्धी देहींच आतली[2] । तया आत्मविषयीं जाली । मध्यरात्री गा ॥ ८१ ॥ जेणें चैतन्या[3] ईश्वरा ब्रह्मा । देहचि केलें परमसीमा । तया आत्मा कर्ता हे प्रभा[4] । अलोट उपजे ॥ ८२ ॥ आत्माचि कर्मकर्ता । हाही निश्चय नाहीं तत्त्वता । देहचि मी कर्मकर्ता । मानितो साच ॥ ८३ ॥ जे आत्मा मी कर्मातीत । सर्वकर्मसाक्षिभूत । हे आपुली कहीं मात । नायकेचि कानीं ॥ ८४ ॥ [न स पश्यति दुर्मतिः] ह्मणोनि उमपा[5] आत्मयातें । देहचिवरी[6] मविजे[7] एथें । विचित्र काई रात्रिदिवसांतें । डुडुळ[8] न करी ॥ ८५ ॥ पैं जेणें आकाशींचा कहीं । सत्य सूर्य देखिला नाहीं । तो थिल्लरींचें[9] बिंब काई । मानूं न लाहे ॥ ८६ ॥ थिल्लराचेनि जालेपणें । सूर्यासि आणि होणें । त्याच्या नाशीं नाशणें । कंपें कंप ॥ ८७ ॥ आणि निद्रिस्ता चेवो[10] नये । तंव स्वप्न सांच[11] हो लाहे । रज्जु नेणतां सर्पो बिहे । विस्मो[12] कवण ॥ ८८ ॥ जंव कावळ[13] आथि डोळां । तंव चंद्र देखावा कीं पिंवळा । काय मृगीं ही मृगजळा । भोंळावें[14] नाहीं ॥ ८९ ॥ तैसा शास्त्रगुरूचेनि नांवें । जो वाराही टेकों नेदी सिवें[15] । केवळ मौढ्याचेनिचि जीवें । जीयाला[16] जो ॥ ३९० ॥ तेणें देहात्मदृष्टीमुळें[17] । आत्मया धांपे[18] देहाचें जाळें । जैसा अभ्राचा वेग कोल्हें । चंद्रीं मानी ॥ ९१ ॥ मग तया मानणयासाठीं । देहबंदीशाळे किरीटी । कर्माच्या वज्रगांठी[19] । कोंळासे[20] तो ॥ ९२ ॥ पाहें पां बंधभावना दृढा । नळियेवरी तो बापुडा । काय मोकळे-याही चवडा[21] । न ठकेचि पुंसों[22] ॥ ९३ ॥ ह्मणोनि निर्मळे आत्मस्वरूपीं । जो प्रकृतीचें केलें आरोपी । तो कल्पकोडीच्या मापीं । मवीचि[23] कर्में ॥ ९४ ॥ आतां कर्मामाजि असे । परि तयातें कर्म न स्पर्शे । वडवानळातें जैसें ।

१ पाहणारा. २ व्यापली. ३ चैतन्याला. ४ ज्ञान, प्रमाण. ५ मापातीत. ६ देहाएवढा. ७ मोजावा. ८ घुबड. ९ डबक्यांतील. १० जागृती. ११ खरें. १२ नवल. १३ कावीळ नांवाचा रोग. १४ भुलावें. १५ हद्दीस. १६ वांचला. १७ देहच आत्मा अशा दृष्टीमुळें. १८ घाली. १९ बळकट गांठींत. २० बांधला जाय. २१ पाय. २२ राघु. २३ मोजी.

समुद्रोदक ॥ ९५ ॥ तैसेनि वेगळेपणें । जयाचें कर्मी असणें । तो कीर वोळखावा कवणें । तरी सांगों ॥ ९६ ॥ जे मुक्तातें निर्धारितां । लाभे आपलीच मुक्तता । जैसी दीपें दिसे पाहातां । आपली वस्तु ॥ ९७ ॥ ना तरी दर्पण जंव उटिजे । तंव आपणपयां आपण भेटिजे । कां तोय पावतां तोय होइजे । लवणें जेवि ॥ ९८ ॥ हें असो परतोनि मागुतें । प्रतिबिंब पाहे बिंबातें । तंव पाहणें जाउनी आयितें । बिंबचि होय ॥ ९९ ॥ तैसें हारपलें आपणपें पावे । तैं संतांतें पाहातां गिंवसावें । ह्मणोनि वानावे ऐकावे । तेचि सदा ॥ ४०० ॥ परि कर्मी असोनि कर्में । जों नागवे समविषमें । चर्मचक्षुचेनि नेमें । दृष्टी जैसी ॥ १ ॥ तैसा सोडवला जो आहे । तयाचें रूप आतां पाहें । उपपत्तीची बाहे । उभऊनि सांगों ॥ २ ॥

"हे **सत्कीर्तिमंता!** अशा प्रकारें पंचकारणात्मक कर्माला हे पांच हेतुही आहेत. आणखी येथें तो आत्मा त्यामध्यें सांपडलेला आहे, हेंही ध्यानांत ठेव. ३७७ सूर्य ज्याप्रमाणें आपण कोणताही पदार्थ न होतां डोळ्यांना सर्व पदार्थ व्यक्त करून देतो, त्याप्रमाणें आत्मा आपण कर्मरूप न होतां कर्में उत्पन्न करतो. ३७८ तसेंच हे **वीरश्रेष्ठा!** पाहणारा आहे तो आरसा व प्रतिबिंब हीं दोन्हींही आपण न होतां जसें त्या दोहींस उत्पन्न करतो. ३७९ किंवा हे **पंडुसुता!** दिवस आणि रात्र हीं आपण न होतां सूर्य जसा त्यांस उत्पन्न करतो, त्याप्रमाणें आत्मा हा कर्म व कर्ताही न होतां कर्म दाखवितो. ३८० परंतु देह हाच मी अशी ज्याला भुरळ पडलेली असते; ज्याची बुद्धि देहांतच व्यापलेली असते; त्याला आत्म्याविषयीं मध्यरात्र झालेली असते. ३८१ ज्यानें चैतन्याची, आत्म्याची, परब्रह्माची, देह हीच शेवटची मर्यादा करून सोडली, त्याचा आत्मा हाच कर्ता असा दृढनिश्चय उत्पन्न होतो. ३८२ आत्माच कर्मकर्ता आहे, हा सुद्धां त्याचा दृढनिश्चय नसतो. तर देह हाच मी आणि तोच कर्मकर्ता असेंच खरोखर तो समजतो. ३८३ मी आत्मा कर्मातीत असून सर्व कर्मांना साक्षीभूत मात्र आहे. ही जी आपली गोष्ट, ती तो कानांनीं ऐकत सुद्धां नाहीं. ३८४ ह्मणून अनंत असा जो आत्मा, त्याला तो येथें देहायेवढाच समजतो. घुबड, रात्र आणि दिवस मानीत नाहीं, ह्यांत आश्चर्य तें काय? ३८५ तसेंच ज्यानें आकाशांतला खरा सूर्य पाहिलेला नाहीं, तो डबक्यांतलें प्रतिबिंब तेंच सूर्य मानणार नाहीं काय? ३८६ तो ह्मणतो डबक्यांतल्या उत्पन्न होण्यानेंच सूर्य उत्पन्न होतो; त्यांतील नाशानेंच त्याचा नाश होतो; व त्यांतील कंपानेंच तो कंप पावतो. ३८७ आणखी निजलेला जागा झाला नाहीं तोंपर्यंत स्वप्न हें खरेंच वाटत असतें. दोरी ह्मणून समजली नाहीं तोंपर्यंत सर्पाचें भय वाटणें ह्यांत आश्चर्य तें कोणतें? ३८८ जोंपर्यंत डोळ्यामध्यें काविळ आहे, तोंपर्यंत चंद्र पिंवळा दिसतो. मृग आहेत ते मृगजळाला भुलत नाहींत काय? ३८९ त्याप्रमाणें जो शास्त्राचा आणि गुरूच्या नांवाचा वाराही सीमेला लागूं देत नाहीं, केवळ मूर्खपणाच्या जिवानेंच जो वांचतो, ३९० अभ्राचा असलेला वेग कोल्हा जसा चंद्राला आहे असें समजतो, त्याप्रमाणें तो देहात्मदृष्टीमुळें देहाचें जाळें आत्म्यावरच घालतो. ३९१ मग **अर्जुना!** त्या मानण्यामुळें तो (आत्मा) देहाच्या बंदिशाळेमध्यें कर्माच्या वज्रगांठीनें बांधला जातो. ३९२ अरे असें पहा! आपण बद्ध झालों आहों अशी दृढभावना झाल्यामुळें, त्या नळीवर बिचाऱ्या राघूचा, मोकळा असूनही पंजा सुटत नाहींच. ३९३ ह्मणून प्रकृतीनें केलेल्याचा जो निर्मळ स्वरूपीं आत्म्यावर आरोप करतो, तो कोट्यावधि कल्प कर्माचीं मापें मोजितच राहतो. ३९४ तो कर्मामध्येंच असतो, परंतु त्याला कर्माचा स्पर्शही होत नाहीं. वडवानळाला जसें समुद्राचें पाणी, ३९५ त्याप्रमाणें जो भिन्न-

१ निश्चय करितां. २ स्वच्छ करावा. ३ संतांच्या दर्शनमात्रेंकरून प्राप्त होतें. ४ न सांपडे. ५ कातड्यानें. ६ बाहु.

त्वानें कर्मामध्यें असतो, तो निश्चयेंकरून कोणीं ओळखावा तें सांगतों. ३९६ कारण, मुक्त कोणते ह्याचा निश्चय करावयास गेलें ह्मणजे आपलीच मुक्तता होते. आपली वस्तु असते ती जशी दिव्यानें दिसते; ३९७ किंवा आरसा स्वच्छ करावा तेव्हां आपलेंच आपल्याला दर्शन होतें. किंवा मीठ पाण्याला भेटावयास गेलें तर आपणच पाणी होऊन जातें. ३९८ हें असो. प्रतिबिंब फिरून आपल्या बिंबाला पहावयाला लागलें ह्मणजे त्याचा प्रतिबिंबपणा जाऊन तें स्वतःच बिंब होतें. ३९९ त्याप्रमाणें आपण हरवलों असें वाटेल तेव्हां संतांचें दर्शन घ्यावें, ह्मणजें सांपडेल. ह्मणून सदासर्वकाल त्यांचेंच वर्णन करावें, व त्यांचेच गुणानुवाद श्रवण करावेत. ४०० परंतु कर्मांत राहूनही जो समविषमांत सांपडत नाहीं; चर्मचक्षूच्या चामड्यानें जशी दृष्टि, ४०१ त्याप्रमाणें जो निराळा आहे; त्याचें स्वरूप आतां पहा. बाहू उभारून त्याची उपपत्ति सांगूं." ४०२

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।
हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हंति न निबद्ध्यते॥१७॥

[यस्य नाहंकृतो भावः] तरि अविद्येचिया निंदा[1] । विश्वस्वप्नाचा हा धांदा[2] । भोगित होता प्रबुद्धा । अनादि जो ॥ ३ ॥ तो महावाक्याचेनि नांवें[3] । गुरुकृपेचेनि थांवें[4] । माथां हात ठेवणें नव्हे । थापटिला जैसा ॥ ४ ॥ तैसा विश्वस्वप्नेंसीं माया । नीद सांडूनि धनंजया । सहजेंचि चेइला[5] अद्वयानंदपणें जो ॥ ५ ॥ तेव्हां मृगजळाचे पुर । दिसते एक निरंतर । हारपती कां चंद्रकर[6] । फांकतां जैसे ॥ ६ ॥ कां बाळत्व निघोनि जाय । तैं बागुला नाहीं त्राय[7] । पैं जळालिया इंधन न होय । रंधन[8] जेविं ॥ ७ ॥ ना ना चेवो[9] आलिया पाठीं । तैं स्वप्न न दिसे दिठी । तैसी अहंममता गा किरीटी । नुरेचि तया ॥ ८ ॥ मग सूर्य आंधारालागीं । रिघो कां भलते सुरंगीं[10] । परि तो तयाच्या भागीं । नाहींचि जैसा ॥ ९ ॥ तैसा आत्मत्वें वेष्टिला होये । तो जया तया दृश्यातें पाहे । तें दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये । तयाचेंचि रूप ॥ ४१० ॥ जैसा वन्हि जया लागे । तें वन्हीचि जालिया आंगें । दाह्यदाहकविभागें[1] । सांडिजे तें ॥ ११ ॥ तैसा कर्माकारा दुजेया । तो कर्तेपणाचा आत्मया । आळ आला तो गेलिया । कांहीं बोंहीं[2] जें उरे ॥ १२ ॥ तिये आत्मस्थितीचा जो रावो । मग तो देहीं इये जाणेल ठावो । काय प्रलयांबूचा उन्नाहो[3] । बोध मानी ॥ १३ ॥ तैसी ते पूर्ण अहंता । काई देहपणें पंडुसुता । आवरे काई सविता । बिंबें धरिला ॥ १४ ॥ पैं मथुनि लोणी घेपे । तें मागुती ताकीं घापे । तरि तें लिप्तपणें सिंपे[4] । तेणेंसी काई ॥ १५ ॥ नाना काष्ठौनि वीरेशा । वेगळाविलिया[5] हुताशा । राहे काष्ठाचिया मांदुसा[6] । कोंडलेपणें ॥ १६ ॥ कां रात्रीचिया उदराआंत । रिगाला जो हा भास्वत[7] । तो रात्री-ऐसी मात । ऐके काई ॥ १७ ॥ तैसें वेद्यवेदकपणेंसीं[8] । पडिलें कां जयाच्या प्रासी । तया देह मी ऐसी । अहंता कैंची ॥ १८ ॥ आणि आकाशें जेथें जेथुनी । जाइजे तेथ असे भरोनि । ह्मणोनि ठेलें कोंदोनी । आपेंआप ॥ १९ ॥ तैसें जें तेणें करावें । तो तेंचि आहे स्वभावें । मा कोणे कर्मी वेष्टावें । कर्तेपणें ॥ ४२० ॥ नुरेचि गगनावीण ठावो । नोहेचि समुद्रा प्रवाहो । नुठीचि ध्रुवा[9] जावों । तैसें जाहालें ॥ २१ ॥ ऐसेंनि अहंकृतिभावो । जयाचा बोधीं जाहाला वावो । तऱ्हीं देहा जंव निर्वाहो । तंव आथी कर्मे ॥ २२ ॥ वारा जरी वाजोनि वोसरे[10] । तरी तो डोल रुखीं उरे । कां सेंदें[11] द्रुति राहे कापुरें । वेंचलेनी[12] ॥ २३ ॥ कां सरलेया गीताचा समारंभु । न वचे वोहवलेणाचा[13] क्षोभु । भूमी लोळोनि गेलिया अंबु । वोल थारे ॥ २४ ॥ अगा मावळलेनि अर्कें । संध्येचिये भूमिके । ज्योतिदीप्तीकौतुकें । दिसे जैसी ॥ २५ ॥ पैं लक्ष[14] भेदिलियाही वरी । बाण धांवेचि तंववरी । जंव भरली आथी उरी[15] । बळाची तया ॥ २६ ॥ नाना चक्रीं भांडें जालें । तें कुलालें परतें नेलें । परि भ्रमेंचि[16] तें मागिलें । भोंवडिलेपणें ॥ २७ ॥ तैसा देहाभिमान गेलिया । देह जेणें स्वभावें धनंजया । जालें तें अपैसया । चेष्टवीच तें ॥२८॥ संकल्पेंवीण स्वप्न । न लावितां दांगीचें[17] बन । न रचितां गंधर्वभुवन । उठी जैसें ॥ २९ ॥ आत्मयाचेनि उद्यमेंवीण । तैसें देहादिपंचकारण । होय आपणयां आपण । क्रियाजात ॥ ४३० ॥ पैं प्राचीनसंस्कारशेषें[18] ।

---

१ निद्रा. २ धंदा. ३ योगानें. ४ बळानें. ५ जागा झाला. ६ चंद्रकिरण. ७ रक्षण, उपयोग. ८ पाकक्रिया. ९ जागृती. १० भुयारांत.

१ दाह्य=काष्ठें आदि व दाहक=अग्नि हा दोन प्रकारचा विभाग. २ कांहीं, अवशेष. ३ वृद्धि. ४ स्पर्शे. ५ पृथक् केला असतां. ६ पेटींत. ७ सूर्य. ८ जाणण्याचें वस्तु व जाणणारा. ९ ध्रुवमंडळाशीं. १० आटोपे. ११ करंड्यांत, बेलक्यांत. १२ खपून गेला तरी. १३ वाहावा दिल्याचा. १४ निशाण. १५ अवशिष्टता. १६ चक्र. १७ अरण्यांतलें. १८ पूर्व जन्मींच्या संस्कारानें.

पांचही कारणें सहेतुकें । कामवीजती[1] गा अनेकें । कर्माकारें ॥ ३१ ॥ [हत्वापि स इमांल्लोकान्] तया कर्मामाजी मग । संहरो आघवें जग । अथवा नवें चांग । अनुकरो[2] ॥ ३२ ॥ परि कुमुद[3] कैसेनी सुके । तें कमळ कैसें फांके । ये दोन्ही रवी न देखे । जया परी ॥ ३३ ॥ कां वीजु वर्षोनि[4] आभाळ । ठिकेरिया आतो भूतळ । अथवा करू शाड्वळ[6] । पर्जन्यवृष्टी ॥ ३४ ॥ तरि तया दोहींतें जैसें । नेणिजेचि कां आकाशें । तैसा देहींच जो असे । विदेहदृष्टी[7] ॥ ३५ ॥ तो देहादिकीं चेष्टीं । घडतां मोडतां हे सृष्टी । न देखे स्वप्न दृष्टी । चेइला जैसा ॥ ३६ ॥ येन्हवीं चामाचे[9] डोळेवरी[10] । जे देखती देहचिवरी । ते कीर तो व्यापारी । ऐसेंचि मानिती ॥ ३७ ॥ कां तृणाचा बाहुला । जो आंगरामेरे[11] ठेविला । तो सत्य राखता[12] कोल्हा । न मनी काई ॥ ३८ ॥ पिसें[13] नेसलें कां नागवें । हें लोकीं[14] येऊनि जाणावें । टोंणोरियाचे[15] मवावे । आणिकी घाय ॥ ३९ ॥ कां महासतीचे भोग । देखे कीर सकळ जग । परि ते आगी ना आंग । ना लोक देखे ॥ ४४० ॥ तैसा स्वस्वरूपें उठिला । जो दृश्येंसी द्रष्टा आंटला[16] । तो नेणे काय रोहटला[17] । इंद्रियग्राम[18] ॥ ४१ ॥ अगा थोरीं कल्लोळीं कल्लोळ[19] साने । लोपतां तिरींचेनि जनें । एकाएकीं गिळिलें हें मनें । मानिजे जऱ्ही ॥ ४२ ॥ तऱ्हीं उदकाप्रति पाहीं । कोण ग्रसितसे काई । तैसें पूर्णा दुजें नाहीं । जें तो मारी ॥ ४३ ॥ सुवर्णाचिया चंडिका[20] । सुवर्णशूळेंचि देखा । सुवर्णाचिया महिखा[21] । नाश केला ॥ ४४ ॥ तो देवेंलवसिया[22] कडा । व्यवहार गमला फुंडा[23] । वांचूनि महिष शूळ चामुंडा[24] । सुवर्णचि तें ॥ ४५ ॥ पैं चित्रींचें जळ हुताश[25] । तो दृष्टीचाचि आभास । पटीं अग्नि बोलाशें[26] । दोन्ही नाहीं ॥ ४६ ॥ मुक्ताचें देह तैसें । हाले चाले संस्कारवशें[27] । तें देखोनि लोक पिसे । तो कर्ता ह्मणती ॥ ४७ ॥ [न हंति] आणि तयां करणेयांआंत । घडो त्रैलोक्या घात । परि तेणें केला हे मात । बोलों नये ॥ ४८ ॥ अगा अंधकार देखावा तेजें । मग तो फेडिजे[28] हें कें बोलिजे । तैसें ज्ञानियां नाहीं दुजें । तो मारील काई ॥ ४९ ॥ [बुद्धिर्यस्य न लिप्यते] ह्मणोनि तयाची बुद्धी । नेणे पापपुण्याची गंधी[1] । गंगा मीनलिया नदी । विटाळ जैसा ॥ ४५० ॥ अग्नीसि अग्नि झगटलिया[2] । काय पोळे तो धनंजया । कीं शस्त्र रुपे आपणया । आपणचि ॥ ५१ ॥ तैसे आपणपया परतें । जो नेणे क्रियाजातातें । तेथ कैाय लिपवी बुद्धीतें । तयाचिये ॥ ५२ ॥ [न निबद्ध्यते] ह्मणोनि कार्य[4] कर्ता क्रिया । हें स्वरूपचि जाहालें जया । नाहीं शरीरादिकीं तया । कर्मबंध ॥ ५३ ॥ जे कर्ता जीव विंदाणीं । काढूनि पांचही खाणी[6] । घडित आहे करणी । आउती[7] दाहें ॥ ५४ ॥ तेथ न्यावो[8] आणि अन्यावो । हा द्विविध साधुनि आवो[9] । उभारितां न लवी खेंवो[10] । कर्म भुवनें ॥ ५५ ॥ या थोरोंडा[11] कीर कामा । विरंजा[12] नोहे आत्मा । परि ह्मणसी हन उपक्रमा[13] । हात लावी ॥ ५६ ॥ तो साक्षी चिद्रूप[14] । कर्मप्रवृत्तीचा संकल्प । उठी तो कां निरोप । आपणचि दे ॥ ५७ ॥ तरी कर्मप्रवृत्ती ही लागीं । तया आयास नाहीं आंगीं । जे प्रवृत्तीजेही उळिगीं[15] । लोकचि आथी ॥ ५८ ॥ ह्मणोनि आत्मयाचें केवळ । जो रूपचि जाहाला निखिल । तया नाहीं बंदिशाळ । कर्मांची हे ॥ ५९ ॥ परि अज्ञानाच्या पटीं । अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी । तेथ चितारणी[16] हे त्रिपुटी । प्रसिद्ध जे कां ॥ ४६० ॥

१ क्रिया करविती, सिद्ध केल्या जातात. २ रचो. ३ चंद्रविकासी कमल. ४ वीज पडून. ५ तुकडे तुकडे होऊन व्यापो. ६ हिरवें तृण. ७ देहाभिमानरहित. ८ जागा झालेला. ९ चामड्याचे. १० दृष्टीनें. ११ शेताच्या कडेस. १२ संरक्षक. १३ भ्रमिष्ट. १४ लोकांनीं. १५ युद्धीं मेलेल्यांचे. १६ व्यापला. १७ व्यवहारला. १८ इंद्रियसमुदाय. १९ लहान तरंग. २० देवीनें. २१ महिषासुर. २२ गुरवाला. २३ खरा. २४ देवी. २५ अग्नि. २६ गारठा. २७ पूर्वकर्मानें. २८ दूर करावा.

"तर अनादि, प्रबुद्ध असा, जो अविद्येची निद्रा व विश्वरूप स्वप्नाचा धंदा भोगित असतो, ४०३ तो महा वाक्याच्या योगानें, गुरुकृपेच्या बळानें, मस्तकावर हात ठेवावा–नव्हे थोपटावें, ४०४ त्याप्रमाणें **धनंजया!** विश्वस्वप्नासहवर्तमान मायेची झोंप जाऊन जो सहज अद्वयानंदानें जागा होतो, ४०५ तेव्हां चंद्राचे किरण पसरतांच जसें निरंतर एकच मृगजळाचे दिसणारे पूर नाहींसे होतात, ४०६ किंवा बाल्यत्व निघून गेलें ह्मणजे बागुलाला थारा उरत नाहीं; जळण संपल्यानंतर स्वयंपाक होत नाहीं; ४०७ किंवा फिरून जागें झाल्यावर स्वप्न जसें दृष्टीला दिसत नाहीं. त्याप्रमाणें **किरीटी!** त्याला अहंममता ह्मणून उरतच नाहीं. ४०८ मग सूर्य अंधारासाठीं भलत्या एखाद्या भुयारांत

१ वार्ता, गंध. २ भेटला असतां. ३ कोणता पदार्थ. ४ कार्य, तें करणारा, व करणें. ५ कौशल्यानें. ६ हेतु. ७ इंद्रियरूप दहा नांगरांनीं. ८ न्याय. ९ आकार. १० क्षणही. ११ मोठ्या. १२ साह्यकर्ता. १३ आरंभास. १४ ज्ञानस्वरूप. १५ बेगारींत. १६ चित्र काढणारी.

कां शिरेना? तरी तो जसा त्याच्या वांट्याला ह्मणून यावयाचाच नाहीं, ४०९ त्याप्रमाणें आत्मस्वानें जो गुंडाळलेला असतो, तो ज्याच्या दृश्य पदार्थाला पाहतो, तो दृश्य पदार्थ पाहणारा बरोबर पाहणाराचेंच रूप बनतो. ४१० ज्याप्रमाणें विस्तव ज्याला लागतो, तें स्वतःच विस्तव बनतें, ह्मणजे मग जळणें आणि जाळणें हे दोन्हीही प्रकार नाहींसे होतात. ४११ त्याप्रमाणें कर्माच्या आकारामुळें त्या कर्त्याला दुसऱ्या कर्तेपणाचा आळ आलेला असतो, तो गेल्यानंतर जें कांहीं अवशेष राहतें, ४१२ त्या आत्मस्थितीचा जो राजा; तो मग ह्या देहामध्यें आपलें स्थान आहे, असें समजेल काय? प्रळयकाळच्या समुद्राची भरती प्रवाहाची प्रतिष्ठा वाळगील काय? ४१३ त्याप्रमाणें **अर्जुना!** ती अहंता देहपणानें पूर्ण होईल होय? बिंब धरल्यानें सूर्य सांपडेल काय? ४१४ तसेंच घुसळून लोणी काढलें, आणि तें पुन्हा ताकांत घातलें, तर तें लिप्तपणानें त्यास मिळेल काय? ४१५ किंवा हे **वीरश्रेष्ठा!** काष्ठापासून अग्नि निराळा केला, तर तो लांकडाच्या पेटींत कोंडून राहिल काय? ४१६ किंवा हा सूर्य रात्रींच्या पोटांत शिरला तर तो रात्र असा शब्द तरी ऐकेल काय? ४१७ त्याप्रमाणें जाणण्याची वस्तु व जाणणारा हे दोन्हीही ज्याच्या भक्ष्यस्थानीं पडले, त्याला देह हा 'मी' ही अहंता कशाची? ४१८ आणखी आकाश जेथून जेथें जाईल, तेथें तेथें भरूनच असतें, ह्मणून आपोआपच तें कोंडून राहतें. ४१९ त्याप्रमाणें त्यानें जें जें करावें, तें तो स्वतःच आपोआप असतो.मग कर्तेपणानें कोणत्या कर्मांत गुंतून रहावें? ४२० गगनाशिवाय जागाच उरत नाहीं; समुद्राला प्रवाह उत्पन्न होत नाहीं; ध्रुवाला जाग्यावरून उठतां येत नाहीं. तसें होतें. ४२१ अशा प्रकारें अहंकृतीचा भाव त्याच्या ज्ञानानें जरी व्यर्थ झाला, तरी देहाला जोंपर्यंत निर्वाह आहे, तोंपर्यंत कर्में आहेतच. ४२२ वारा जरी वहावयाचा थांबला, तरी त्याचें हालणें झाडामध्यें राहतें. किंवा कापूर गेला तरी, करंड्यांत त्याचा वास रहातो. ४२३ किंवा गायनाचा समारंभ सरला तरी, मनोविकाराचा संस्कार जात नाहीं. भुईवर सांडलेलें पाणी गेलें, तरी ओल रहाते. ४२४ अरे! सूर्य मावळल्यानंतर सायंकाळच्या वेळीं जशी मजेची प्रकाशाची झांक दिसते; ४२५ निशाण भेदल्यावरही आपल्या आंगीं आलेलें बळ अवशिष्ट असलेलें संपेपर्यंत बाण धांवतच असतो. ४२६ किंवा चाकानें मडकें तयार झालें; तें कुंभारानें पलीकडे नेलें; तरी तें आधीं भोंवडलेलें असल्यामुळें फिरतच असतें. ४२७ त्याप्रमाणें **अर्जुना!** देहाभिमान गेला तरी, ज्या स्वभावानें देह झालेला असतो, तो स्वभाव त्याला आपोआपच कर्में करावयाला लावतो. ४२८ मनांत बेत केल्याशिवाय जसें स्वप्न; किंवा लागवड न करतां अरण्यांतलें रान; बांधल्याशिवाय गंधर्वनगर जसें उत्पन्न होतें, ४२९ त्याप्रमाणें आत्म्याच्या उद्योगाशिवाय देहादि पांच कारणांच्या योगानें हरएक क्रिया आपोआपच उत्पन्न होते. ४३० तसेंच पूर्वजन्मींच्या संस्कारानें हेतुसहवर्तमान पांचही कारणें अनेक कर्मांच्या रूपानें क्रिया करवितात. ४३१ मग त्या कर्मांमध्यें साऱ्या जगाचा संहार होवो, किंवा दुसरें त्याहून चांगलें तयार होवो. ४३२ तरी, चंद्रविकासी कमळ कशानें सुकतें; सूर्यविकासी कमल कशानें प्रफुल्लित होतें; हीं दोन्हीही जशीं सूर्य पहात नाहीं. ४३३ किंवा आभाळ हें वीज पाडून पृथ्वीच्या ठिकऱ्या करून टाको; अथवा पर्जन्यवृष्टि करून तृण उत्पन्न करो; ४३४ तरी त्या दोहोंलाही आकाश जसें जाणत नाहीं, त्याप्रमाणें विदेहदृष्टीनें जो देहामध्यें असतो, ४३५ तो देहादिकांच्या व्यापारांनीं ही सृष्टि नवी झाली कीं नाश पावली तरी, जागृत झालेला मनुष्य जसें

स्वप्न दृष्टीनें पहात नाहीं, त्याप्रमाणें तोही पहात नाहीं. ४३६ एरवीं चर्मचक्षूंनीं देहापुरतेंच जे पहातात, ते खरोखर तोच व्यवहार करणारा असें मानतात. ४३७ किंवा शेताच्या बांधावर गवताचा बाहुला ठेवलेला असतो, तो राखित असतो तोंपर्यंत तो खराच आहे, असें कोल्हा मानित नाहीं काय? ४३८ वेडा मनुष्य नेसला आहे कीं नागवा आहे? हें लोकांनीं येऊन पहावें तेव्हां कळावयाचें. युद्धांत पतन पावलेल्याचे घाव दुसऱ्यांनीं मोजावेत! ४३९ किंवा महासतीचे भोग खरोखर सारें जग पहात असतें. परंतु तिला ती आग किंवा आपलें आंग किंवा लोक ह्यांपैकीं कांहींच दिसत नाहीं. ४४० त्याप्रमाणें आत्मस्वरूपानें जो संपन्न झाला, दृश्यासह द्रष्टा नाहींसा होऊन गेला, तो, इंद्रियसमुदाय काय करित आहे हें जाणतच नाहीं. ४४१ अरे! मोठ्या लाटांमध्यें लहान लाटा जिरून गेलेल्या पाहून किनाऱ्यावर उभे राहिलेल्या लोकांनीं त्या एकमेकांस गिळित आहेत असें जरी मानलें, ४४२ तरी, उदकाला कोणी खातो काय? ह्याचा विचार कर. त्याप्रमाणें जो पूर्ण–सिद्ध–झाला त्याला मारावयाला दुसरें कांहींच रहात नाहीं. ४४३ हें पहा! सोन्याच्या चंडीनें–देवीनें–सोन्याच्याच त्रिशूळानें सोन्याच्याच महिषाचा नाश केला; ४४४ तो पुजाऱ्याला–गुरवाला– मात्र खरा व्यवहार वाटतो. बाकी रेडा, त्रिशूळ, चामुंडा, हें सारें सोनेंच. ४४५ तसेंच चित्रांतील पाणी किंवा अग्नि; हा फक्त दृष्टीचा भास. कापडाला जळणें आणि भिजणें हीं दोन्हींही नाहींत. ४४६ त्याप्रमाणें जे मुक्त आहेत त्यांचा देह पूर्वकर्मानें हालतो चालतो, तें पाहून वेडे लोक तोच कर्ता असें ह्मणतात. ४४७ आणि त्याच्या कृतीनें त्रैलोक्याचा जरी घात झाला, तरी तो त्यानें केला ही गोष्ट सुद्धां बोलूं नये. ४४८ अरे! अंधकाराला प्रकाशानें पाहिलें ह्मणजे मग तो दूर करावा हें कोणापाशीं बोलावें? त्याप्रमाणें ज्ञान्याला दुसरें ह्मणून कोणीच नाहीं. तो मारणार काय? ४४९ ह्मणून गंगेला नदी मिळाली ह्मणजे मग ती जसा विटाळ समजत नाहीं, त्याप्रमाणें त्याच्या बुद्धीला पाप आणि पुण्य यांचा गंधही नसतो. ४५० हे धनंजया! अग्नीला अग्नि भेटला तर पोळेल काय? किंवा शस्त्र हें आपलें आपल्यासच कापील काय? ४५१ त्याप्रमाणें कोणतीही क्रिया जो आपल्याहून वेगळी आहे असें समजतच नाहीं, तेथें त्याच्या बुद्धीला लेप कोण घालणार? ४५२ ह्मणून कार्य, तें करणारा, आणि करणें हेंच ज्याचें स्वरूप बनलें; हेंच जो मूर्तिमय बनला; त्याला शरीरादिक कर्मांनीं बंध नाहीं. ४५३ कारण, कर्ता जो जीव तो कौशल्यानें पांचही खाणी (हेतु) काढून इंद्रियरूप दहा आउतांनीं तयार करतो. ४५४ तेव्हां न्याय आणि अन्याय हा दोन बाजूंचा तट घालून कर्मांचीं मंदिरें बांधण्यास क्षणाचाही विलंब लागत नाहीं. ४५५ येवढ्या मोठ्या कामांतही आत्मा हा खरोखर सहाय्य सुद्धां करीत नाहीं. पण तूं कदाचित् असें ह्मणशील कीं, आरंभाला तरी तो हात लावित असेल. ४५६ पण तो ज्ञानरूप असून साक्षिभूत मात्र असतो. प्रवृत्तीचा संकल्प उठतो, तो निरोप तरी आपण देईल काय? ४५७ तर कर्मप्रवृत्तीला त्याच्या आंगाशीं कांहींएक संबंध नाहीं. कारण, प्रवृत्तीच्या बिगारीमध्यें लोकच असतात. ४५८ ह्मणून जो आत्म्याचें शुद्ध स्वरूप बनला, त्याला ह्या कर्मांची बंदिशाळा नाहीं. ४५९ परंतु अज्ञानरूप वस्त्रावर अन्यथा ज्ञानाचें चित्र उठतें, तेथें प्रसिद्ध जी ही त्रिपुटी तीच चितारीण आहे." ४६०

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।
कारणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥

[परिज्ञाता] जें ज्ञान ज्ञाता ज्ञेय । हें जगाचें बीजत्रय । तें कर्माची निःसंदेह । प्रवृत्ती जाण ॥ ६१ ॥ आतां ययाची गा

त्रया। व्यक्ती वेगळालिया। आइकें धनंजया। करूं रूप ॥ ६२ ॥ तरि जीवसूर्यबिंबाचे। रश्मी श्रोत्रादिकें पांचें। धांवोनि विषयपद्माचे। फोडित मढ ॥ ६३ ॥ कीं जीवनृपाचे वारु उपलाणे। घेऊनि इंद्रियांचीं केकाणें। विषयदेशींचें नागवणें। आणीत जे ॥ ६४ ॥ हें असो इहीं इंद्रियीं राहटे। जें सुखदुःखेसीं जीवा भेटे। तें सुषुप्तिकाळीं वोहटे। जेथ ज्ञान ॥ ६५ ॥ तया जीवा नांव ज्ञाता। आणि जें हें सांगीतलें आतां। तेंचि एथ पंडुसुता। ज्ञान जाण ॥ ६६ ॥ जें अविद्येचिये पोटीं। उपजतखेंवों किरीटी। आपणयातें वांटी। तिहीं ठायीं ॥ ६७ ॥ आपुलिये धांवे पुढां। घालूनि ज्ञेयाचा गुंडा। उभारी मागिलीकडां। ज्ञातृत्वातें ॥ ६८ ॥ [ज्ञानं] मग ज्ञातया ज्ञेया दोघां। तो नांदणुकेचा बेगा। माजि जालेनि पैंगा। वाहे जेणें ॥ ६९ ॥ टाकूनि ज्ञेयाची शिव। पुरे जयाची धांव। सकळ पदार्थां नांव। सूतसे जें ॥ ४७० ॥ तें गा सामान्य ज्ञान। या बोला नाहीं आन। [ज्ञेयं] ज्ञेयाचेंही चिन्ह। आईक आतां ॥ ७१ ॥ तरि शब्दस्पर्श। रूप गंध रस। हा पंचविध आभास। ज्ञेयाचा तो ॥ ७२ ॥ जैसें एकेचि चुतफळें। इंद्रिया वेगळवेगळें। रसें वर्णें परिमळें। भेटिजे स्पर्शें ॥ ७३ ॥ तैसें ज्ञेय तरी एकसरें। परि ज्ञान इंद्रियद्वारें। घे ह्मणोनि प्रकारें। पांचें जालें ॥ ७४ ॥ आणि समुद्रीं वोघाचें जाणें। सरे लोणीपासीं धांवणें। कां फळीं सरे वाढणें। सस्याचें जेवीं ॥ ७५ ॥ तैसें इंद्रियांच्या वोहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ ठी। होय तें गा किरीटी। विषय ज्ञेय ॥ ७६ ॥ एवं ज्ञातया ज्ञाना ज्ञेया। तिहीं रूप केलें धनंजया। [त्रिविधा कर्मचोदना] हे त्रिविध सर्व किया। प्रवृत्ति जाण ॥ ७७ ॥ जे शब्दादि विषय। हें पंचविध जें ज्ञेय। तेंचि प्रिय कां अप्रिय। एकेपरिचें ॥ ७८ ॥ ज्ञान मोटकें ज्ञातया। दावी ना जंव धनंजया। तंव स्वीकारा कीं त्यजावया। प्रवर्तेचि तो ॥७९॥ परि मीनांतें देखोनि बेंक। जैसा निधानातें रंक। कां स्त्री देखोनि कामुक। प्रवृत्ति धरी ॥ ४८० ॥ जैसें खोलारां धांवे पाणी। भ्रमर पुष्पाचिये घोणी। ना ना सुटला सांजेवणी। वत्सचि पां ॥ ८१ ॥ अगा स्वर्गींची उर्वशी। ऐकोनि जेवीं माणुसीं। वराता लावीजती आकाशीं। यागांचिया ॥ ८२ ॥ पैं पारिवा जैसा किरिटी। चढला नभाचिये पोटीं। पारवी देखोनि लोटी। आंगचि सगळें ॥ ८३ ॥ हें ना घनगर्जनासरिसा। मयूर वोवाडे आकाशा। ज्ञाता ज्ञेया देखोनि तैसा। धांवचि घे ॥ ८४ ॥ ह्मणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता। हे त्रिविध गा पंडुसुता। होयचि कर्मा समस्तां। प्रवृत्ति येथ ॥ ८५ ॥ [कर्ता] परि तेचि ज्ञेय विपायें। जरी ज्ञातयाचें प्रिय होये। तरी भोगावयासाहे। क्षणही विलंब ॥ ८६ ॥ ना तरी अवचटें। तेंचि विरुद्ध होऊनि भेटे। तरि युगांत वाटे। सांडावया ॥ ८७ ॥ व्याळा कां हारा। वरपडा जालेया नरा। हर्ष आणि दरारा। सरसाचि उठी ॥ ८८ ॥ तैसें ज्ञेयें प्रियाप्रियें। देखिलेनि ज्ञातया होये। मग त्यागस्वीकारीं वाहे। व्यापारातें ॥ ८९ ॥ तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसांवी सर्वदळाचा। रथ सांडूनि पायांचा। होय जैसा ॥ ४९० ॥ तैसें ज्ञातेपणें जें असे। तें ये कर्ता ऐसिये दशे। जेवितें बैसलें जैसें। रंधन करू ॥ ९१ ॥ कां भंवरेंचि केला मळा। वरकल जाला अंकसळा। ना ना देव रिगाला देउळा-। चिया कामा ॥९२॥ तैसा ज्ञेयांचि हांवा। ज्ञाता इंद्रियाचा मेळावा। राहाटवी तेथ पांडवा। कर्ता होय ॥ ९३ ॥ आणि आपण होउनी कर्ता। ज्ञाना आणि करणता। तेथें ज्ञेयचि स्वभावता। कार्य होय ॥ ९४ ॥ ऐसा ज्ञानाचिये निजगती। पालट पडे गा सुमती। नेत्राची शोभा रातीं। पालटे जैसी ॥ ९५ ॥ कां अदृष्ट जालिया उदासु। पालटे श्रीमंताचा विलासु। पूर्णिमेपाठीं शीतांशु। पालटे जैसा ॥ ९६ ॥ तैसा चाळितां करणें। ज्ञाता वेष्टिजे कर्तेपणें। तेथिचीं तियें लक्षणें। ऐक आतां ॥ ९७ ॥ तरि बुद्धि आणि मन। चित्त अहंकार हंन। हें चतुर्विध चिन्ह। अंतःकरणाचें ॥ ९८ ॥ बाह्य त्वचा श्रवण। चक्षु रसना घ्राण। हें पंचविध जाण। इंद्रिय गा ॥ ९९ ॥ तेथ आंतुलें तंव करणें। कर्ता कर्तव्या घे उमाणें। मग तें जरी जाणें। सुखा येतें ॥ ५०० ॥ तरि बाहेरिलें तियेंही। चक्षुरादिकें दाहाही। उठौनि लवलाहीं। व्यापारासुये ॥ १ ॥ मग तो इंद्रियकदंब। करविजे तंव रावें। जंव

---

१ आकार. २ किरण. ३ कळी. ४ घोडे. ५ खोगीर पाठीवर नसलेले. ६ नामें व रूपें. ७ सुखदुःखभोग. ८ गाढ झोंपेंत. ९ अज्ञानाच्या. १० उपजतांच. ११ जाणावयाचा विषयरूप दगड. १२ आपण मागें उभें राहून पुढें विषयवृत्ति. १३ मार्ग, संबंध. १४ ज्ञानें. १५ ठेवितसे, घालीतसे. १६ आम्रफळानें. १७ शेवटापाशीं. १८ धान्याचें. १९ मार्गीं. २० शेवट. २१ अल्प, थोडें. २२ मत्स्याला. २३ बगळा. २४ द्रव्याला, ठेव्याला. २५ उतरणीकडे. २६ घ्राणीं, वासावर. २७ संध्याकाळ, धार काढण्याची वेळ.

१ शिड्या. २ पारवा पक्षी. ३ उलटे. ४ कदाचित्. ५ एकाएकीं. ६ प्रलयासारखें संकट. ७ प्राप्त. ८ प्रिय किंवा अप्रिय ज्ञेय विषय पाहून ज्ञात्याला तसें=पूर्वोक्तासारखें होतें. ९ प्रीति. १० दुसऱ्या मल्लाच्या. ११ पायीं चालणें. १२ जेवणारें. १३ स्वयंपाकास. १४ भ्रमरानें. १५ कसोटी. १६ धातू लावून त्याची परीक्षा करणारा. १७ विषयेच्छेनें. १८ विषयज्ञ. १९ क्रियेचें साधन. २० शरीरादि विषय. २१ दैव. २२ चंद्र. २३ इंद्रियें. २४ मनादि क्रियासाधनें. २५ माप. २६ घाली. २७ समुदाय. २८ राबणूक.

कर्तव्याचा लाभ । हातासि ये ॥ २ ॥ ना तें कर्तव्य जरी दुःखें । फळेल ऐसें देखे । तो लावी त्यागमुखें । तियें दाहाही ॥ ३ ॥ मग फिटे दुःखाचा ठावो । तंव राहाटवी रात्रिदिवो । विकणुवार्तें करावो । जयापरी ॥ ४ ॥ तैसेंनि त्यागस्वीकारीं । वाहातां इंद्रियांची धुरी । ज्ञातयातें अवधारी । कर्ता ह्मणिपे ॥ ५ ॥ [करणं] आणि कर्तयाच्या सर्व कर्मी । औउतांचिया परी क्षमी । ह्मणोनि इंद्रियांतें आह्मी । करणें ह्मणों ॥ ६ ॥ [कर्म] आणि हेचि करणेंवरी । कर्ता क्रिया ज्या उभारी । तिया व्यापे तें अवधारीं । कर्म एथ ॥ ७ ॥ सोनाराचिया बुद्धी लेणें । व्यापे चंद्रकरीं चांदिणें । कां व्यापे वेल्हाळपणें । वेली जैसी ॥ ८ ॥ ना ना प्रभा व्यापे प्रकाशु । गोडिया इक्षुरसु । हें असो अवकाशु । आकाशीं जैसा ॥ ९ ॥ तैसें कर्तयाचिया क्रिया । व्यापलें जें धनंजया । तें कर्म गा बोलावया । आन नाहीं ॥ ५१० ॥ [इति] एवं कर्म कर्ता करण । या तिहींचेंही लक्षण । सांगीतलें तुज विचक्षण- । शिरोमणी ॥ ११ ॥ [त्रिविधः कर्मसंग्रहः] एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय । हें कर्माचें प्रवृत्तित्रय । तैसेंचि कर्ता करण कार्य । हा कर्मसंचय ॥ १२ ॥ वन्हीं ठेविला असे धूम । आथि बीजीं जेविं द्रुम । कां मनीं जोडे काम । सदां जैसा ॥ १३ ॥ तैसा कर्ता क्रिया करणीं । कर्माचें आहे जितंवणी । सोनें जैसें खाणीं । सुवर्णाचिये ॥ १४ ॥ ह्मणोनि हें कार्य मी कर्ता । ऐसें आथि जेथ पंडुसुता । तेथ आत्मा दूरी समस्तां । क्रियांपासीं ॥ १५ ॥ यालागीं पुढतपुढती । आत्मा वेगळाचि सुमती । आतां असो हें किती । जाणतासि तूं ॥ १६ ॥

"ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय हीं जीं जगाचीं तीन बीजें, तींच निःसंशय कर्मप्रवृत्तीस कारणीभूत आहेत हें ध्यानांत ठेव. ४६१ तर आतां **धनंजया!** ह्या तिघांच्या लक्षणांचें निरनिराळें विवेचन करूं, ऐक. ४६२ जीवरूप सूर्यबिंबाचे श्रोत्रादिक पांच किरण धांवून येऊन विषयरूप कमळाची कळी उकलतात. ४६३ किंवा जीव हाच कोणी एक राजा; त्याचे उपलाणे वारू, इंद्रियांचीं नांवें व रूपें घेऊन विषयदेशाचे सुखदुःखरूप भोग हीच लूट, ती आणतात. ४६४ हें असो. ह्या इंद्रियांमध्यें जें वागतें, जें सुखदुःखास घेऊन जिवास भेटतें; तें ज्ञान गाढनिद्रेमध्यें जेथें लय पावतें; ४६५ त्या जिवाचें नांव ज्ञाता. आणि आतां जें हें सांगितलें तें **अर्जुना!** येथें ज्ञान असें समजावें. ४६६ हे **किरीटी!** तें अविद्येच्या पोटीं जन्मल्याबरोबरच आपल्याला तीन ठिकाणीं विभागून सोडतें. ४६७ जाणावयाचा विषयरूप जो दगड, तो आपल्या धांवेच्याही पुढें घालून मागच्या बाजूला जो ज्ञातृत्वानें उभारतो, ४६८ मग ज्ञाता आणि ज्ञेय ह्या दोघांनाही नांदणूक करण्याचा जो मार्ग, तो मध्यें जें निपजल्याच्या योगानें वाहतो; ४६९ ज्ञेयाची शींव लागली ह्मणजे त्याची धांव संपते; तेंच ज्ञान सकल पदार्थांस नांवारूपास आणतें; ४७० अरे! सामान्य ज्ञान ह्मणतात तें हें होय. ह्या भाषणांत संशय नाहीं. आतां ज्ञेयाचें लक्षण ऐक. ४७१ तर शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हा जो पांच प्रकारचा आभास आहे, तो ज्ञेयाचा आहे. ४७२ एकाच अंब्याच्या फलानें रस, वर्ण, गंध स्पर्श येणेंकरून वेगवेगळ्या इंद्रियांना भेटावें. ४७३ त्याप्रमाणें ज्ञेय ह्मणजे विषय जरी एकच आहे, तरी तो इंद्रियांच्या द्वारानें ज्ञानाचा स्वीकार करतो ह्मणून त्याचेही पांच प्रकार होतात. ४७४ आणखी प्रवाहाचें जाणें समुद्रापर्यंत; धांवणें सीमेपर्यंत गेलें कीं संपतें; किंवा फळ आलें कीं जशी धान्याची वाढ खुंटते, ४७५ त्याप्रमाणें **अर्जुना!** इंद्रियांच्या मार्गानें धांवतांना ज्ञानाचा जेथें शेवट होतो, तें ज्ञेयाचें स्वरूप होय. ४७६ अशा प्रकारें **धनंजया!** ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय ह्या तिहींचें स्वरूप सांगितलें. ह्या तिघांकडून होणाऱ्या ज्या क्रिया, ती प्रवृत्ति होय. हें लक्ष्यांत असूं दे. ४७७ कारण, शब्दादिविषय हें जें पांच प्रकारचें ज्ञेय, तें प्रिय किंवा अप्रिय कोणत्या तरी एका प्रकारची, ४७८ अल्पता जोंपर्यंत ज्ञात्याला ज्ञान दाखवून देत नाहीं, तोंपर्यंत तो स्वीकार करण्याला किंवा त्याग करण्याला सरसावतोच. ४७९ परंतु मासा पाहिला ह्मणजे जसा बगळा; द्रव्याला पाहिलें ह्मणजे जसा भिकारी;

१ फोलयुक्त धान्याला. २ सुपाचा वारा. ३ प्रवृत्ति. ४ नांगरादि. ५ समर्थ. ६ क्रियासाधनें. ७ विस्तारानें. ८ अंगाना. ९ कर्माचें साहित्य. १० जिव्हाळा.

किंवा स्त्रीला पाहून जसा विषयी पुरुष उतावळा होतो, त्याप्रमाणें, ४८० पाणी जसें सखल प्रदेशाकडे धांवतें; किंवा भ्रमर जसा पुष्पाच्या परिमळाकडे धांवतो; किंवा सायंकाळीं धार काढण्याच्या वेळेला जसें वासरूं सुटतें, ४८१ अरे! स्वर्गांतल्या उर्वशीची कीर्ति ऐकूनच मनुष्यें जशीं आकाशामध्यें अज्ञानाच्या हुंड्या पाठवितात, ४८२ किंवा **अर्जुना!** पारवा आकाशांत उंच गेलेला असला, आणि पारवी त्याच्या दृष्टीस पडली, ह्मणजे तो जसा सारें आंग एकदम धाड्कर खालीं टाकून देतो, ४८३ त्याप्रमाणें, किंवा मेघगर्जनेबरोबर मोर जसा आकाशाकडे धांव घेत सुटतो, त्याप्रमाणें ज्ञेयाला—ह्मणजे विषयांना पाहून ज्ञाताही धांव घेत सुटतो. ४८४ ह्मणून हे **अर्जुना!** ज्ञान, ज्ञेय, आणि ज्ञाता हे तिघेच येथें कर्माच्या सर्व प्रवृत्तीस कारण आहेत. ४८५ पण तेंच ज्ञेय (विषय) ज्ञात्याला प्रिय झालें, तर त्याचा उपभोग घेण्याला एक क्षणाचाही विलंब सहन होत नाहीं. ४८६ किंवा एकाएकीं तेंच विरुद्ध होऊन आलें तर सोडवावयाला युगांत झाला असें वाटतें. ४८७ पुरुषाला सर्प किंवा हार ह्यांचा लाभ झाला तर, हर्ष आणि भय दोन्ही एकदमच उठतात, ४८८ तसें ज्ञात्याला, ज्ञेयामध्यें प्रिय किंवा अप्रिय दृष्टीस पडलें ह्मणजे होऊन जातें. आणि मग तो त्याग किंवा स्वीकार ह्याचा अवलंब करतो. ४८९ त्या वेळेस दुसऱ्या मल्लाबरोबर कुस्ती धरण्याची ज्याला हौस असते, तो सर्व सेनापतींचा अधिपती असूनही रथांतून उतरून पायीं चालूं लागतो, ४९० त्याप्रमाणें ज्ञातेपणानें जें असतें तेंच कर्ता ह्या स्थितीला पोंचतें. जेवणारांनीं जसें स्वयंपाक करावयाला बसावें, ४९१ किंवा भ्रमरांनींच जसा मळा लावावा, कसोटीनेंच जसें परीक्षक बनावें, ४९२ त्याप्रमाणें **अर्जुना!** ज्ञेयाच्या—विषयाच्या—इच्छेनें ज्ञाता—विषयज्ञ—जेव्हां इंद्रियसमुदाय कामास लावतो, तेव्हां तो कर्ता होतो. ४९३ आणखी कर्ता आपणहून ज्ञानाला क्रियेचें साधन करतो, तेव्हां ज्ञेय असतें तें आपोआपच कार्य होतें. ४९४ हे **बुद्धिमंता!** अशा प्रकारें स्वयंधर्मानें ज्ञानाच्या गतीमध्यें पालट होतो. रात्रीं नेत्रांची शोभा ज्याप्रमाणें पालटते, ४९५ किंवा दैव फिरलें ह्मणजे श्रीमंताच्या विलासांत व्यत्यय येतो, पूर्णिमेनंतर चंद्र जसा बदलतो, ४९६ त्याप्रमाणें इंद्रियांची हालचाल करण्यामुळें ज्ञाता असतो तो कर्तेपणामध्यें गुंततो. तेथचीं त्यांचीं लक्षणें आतां ऐक. ४९७ तर बुद्धि आणि मन; चित्त आणि अहंकार; हें चार प्रकारचें लक्षण अंतःकरणाचें होय. ४९८ बाहेरची त्वचा; कान; डोळे; जिव्हा; नाक; हे इंद्रियांचे पांच प्रकार होत. ४९९ तेव्हां आंतील मनादिक्रियासाधनांनीं कर्ता आहे तो, कर्तव्याचें माप घेऊं लागतो. आणि त्यांत सुखप्राप्ती होते असें जर त्यास वाटलें, ५०० तर बाहेरील नेत्र आदिकरून जीं दहा इंद्रियें, तींही तत्काळ त्याच व्यापारांत घालतो. ५०१ मग तो इंद्रियसमुदाय, कर्तव्याचा लाभ हातास येईपर्यंत त्यांस राबवितो. ५०२ किंवा तेच कर्तव्यांत जर दुःख प्राप्त होतें असें दिसून येईल, तर तो त्या दहांनांही त्याजपासून पराङ्मुख करतो. ५०३ मग दुःखाचा गंड मोडेपर्यंत त्यांना रात्रंदिवस राबवितो. सुपाचा वारा ज्याप्रमाणें धान्याचा स्वीकार करतो, व कोंड्याचा त्याग करतो, ५०४ त्याप्रमाणें त्याग आणि स्वीकार करून इंद्रियांची प्रवृत्ति होत असली, ह्मणजे ज्ञात्याला कर्ता असें ह्मणतात. ५०५ आणि कर्त्याच्या सर्व कर्मांमध्यें इंद्रियें हीं नांगराप्रमाणें काम करण्यास समर्थ असतात ह्मणून त्यांस आह्मी क्रियेचीं साधनें असें ह्मणतों. ५०६ आणि ह्याच इंद्रियांकडून कर्ता ज्या ज्या क्रिया उत्पन्न करतो, त्यांनीं जें व्याप्त झालेलें असतें तें कर्म होय. हें ध्यानांत असूं दे. ५०७ सोनाराच्या बुद्धीनें अलंकार होतात; चंद्रकिरणांनीं चांदणें होतें; किंवा विस्तारानें जशी वेली

पसरते, ५०८ किंवा प्रभेनें जसा प्रकाश प्राप्त होतो; गोडीनें जसा ऊंस व्याप्त होतो; हें असो. अवकाशामध्यें जसा अवकाश व्याप्त होतो; त्याप्रमाणें हे **धनंजया!** कर्त्याच्या क्रियेनें व्यापलेलें जें, तें कर्म होय. ह्या बोलण्यांत संशय नाहीं. ५१० अशा प्रकारें हे **मर्मज्ञशिरोमणे!** कर्म, कर्ता, आणि कारण ह्या तिहींचेंही लक्षण तुला सांगितलें. ५११ येथें ज्ञाता, ज्ञान, आणि ज्ञेय ह्या कर्माच्या तीन प्रवृत्ति आहेत. त्याचप्रमाणें कर्ता, कारण आणि कार्य हें कर्माचें साहित्य होय. ५१२ अग्नीमध्यें जसा धूर ठेवलेला असतो; बीजामध्यें ज्याप्रमाणें वृक्ष ठेवलेला असतो; किंवा निरंतर मनामध्यें जसा काम उत्पन्न झालेला असतो, ५१३ त्याप्रमाणें; किंवा सोन्याच्या खाणीमध्यें जसें सोनें असावें त्याप्रमाणें; कर्ता, क्रिया आणि क्रियासाधन हीं तिन्हीं मिळून कर्माचा जिव्हाळा आहे. ५१४ ह्मणून हे **अर्जुना!** हें कार्य, मी हा कर्ता; असें जेथें असतें, तेथें सर्व क्रियांपासून दूर असणारा आत्मा त्या क्रियेपाशीं येतो. ५१५ ह्याकरितां हे **सुमती!** पुन्हा पुन्हा आत्मा हा अगदीं निराळाच आहे हें ध्यानांत ठेव. आतां हें किती सांगावें? तूंही जाणतोसच. ह्मणून तें असो." ५१६

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥१९॥

[ज्ञानमिति] परि सांगीतलें जें ज्ञान । कर्म कर्ता हन । ते तीन्हीं तिहीं ठायीं भिन्न । गुणीं आहाति ॥ १७ ॥ ह्मणोनि ज्ञाना कर्मा कर्तया । [1]पातेजों नये धनंजया । जे [2]दोनी बांधती सोडावया । [3]ऐकचि प्रौढ ॥ १८ ॥ [प्रोच्यते गुणसंख्याने] तें सात्विक ठाउवें होये । तो गुणभेद सांगों पाहें । जो सांख्यशास्त्रीं आहे । [4]उंवाइला ॥ १९ ॥ जें विचारक्षीरसमुद्र । [5]स्वबोधकुमुदिनीचंद्र । ज्ञानडोळसां नरेंद्र । शास्त्रांचा जें ॥ ५२० ॥ कीं प्रकृतिपुरुष दोनी । मिसळलीं [6]दिवोरजनी । तियें निवडिता त्रिभुवनीं । [7]मार्तंड जें ॥ २१ ॥ जेथ अपारा मोहराशी । तत्त्वाच्या [1]मापीं चोविसीं । [2]उमाणें घेऊनि [3]परेशीं । सुरवाडिजे ॥ २२ ॥ अर्जुना तें सांख्यशास्त्र । पढे जयाचें [4]स्तोत्र । [यथावच्छृणु तान्यपि] तें गुणभेदचरित्र । ऐसें आहे ॥ २३ ॥ जे आपुलेनि [5]आंगिकें । त्रिविधपणाचेनि [6]अंकें । दृश्यजात तितकें । अंकित केलें ॥ २४ ॥ एवं सत्वरजतमा । तिहींची एवढी असे महिमा । जे [7]त्रैविध्य आदिब्रह्मा । अतिक्रमी ॥ २५ ॥ परि विश्वींची आघवी [8]मांदी । जेणें भेदलेनि गुणभेदीं । पडिली तें तंव आदी । ज्ञान सांगों ॥ २६ ॥ जे दिठी जरी चोख कीजे । तरी भलतेंही चोख [9]सुजे । तैसें ज्ञानें शुद्धें लाहिजे । सर्वेंही शुद्ध ॥ २७ ॥ ह्मणोनि तें सात्विक ज्ञान । आतां सांगों दे अवधान । कैवल्यगुणनिधान । श्रीकृष्ण ह्मणे ॥ २८ ॥

"तसेंच ज्ञान, कर्म आणि कर्ता हीं तीन सांगितलीं खरीं, परंतु गुणांच्या संबंधानें आणखीही तीन तीन भेद होतात. ५१७ ह्मणून हे **धनंजया!** ज्ञानावर, कर्मावर किंवा कर्त्यावरही विश्वास ठेवूं नये. कारण, दोन्हीही बांधणाऱ्यांपासून सोडविण्याला समर्थ असें एकच आहे. ५१८ तें सात्विक नीट रीतीनें समजेल असे त्याचे निरनिराळे भेद आहेत ते आतां सांगतों. त्यांचें विवरण सांख्यशास्त्रामध्यें केलेलें आहे. ५१९ जें विचाराचा क्षीरसमुद्र; आत्मज्ञानरूप कमलाला प्रफुल्लित करणारे चंद्र; ज्ञाननेत्रानें पाहणारांना जें शास्त्राचा राजा; ५२० किंवा प्रकृति आणि पुरुष हीं दिवसरात्रींप्रमाणें मिश्र झालेल्याची निवडणूक करण्याला त्रिभुवनामध्यें जे सूर्य; ५२१ जेथें मोहाच्या अपार राशी चोवीस तत्त्वांच्या मापानें माप घेऊन परतत्त्वानें सुख प्राप्त होतें, ५२२ **अर्जुना!** तें सांख्यशास्त्र ज्याची स्तुति गातें; तें गुणभेदाचें चरित्र असें आहे. ५२३ जें आपल्या सामर्थ्यानें तीन प्रकारच्या योगेंकरून जितकें ह्मणून दृश्यजात आहे, तितकें सर्व अंकित करून

१ विश्वासूं नये. २ रज व तम. ३ सत्व-समर्थ. ४ स्पष्ट केला. ५ आत्मबोधकमलास प्रफुल्लितकर्ता चंद्र. ६ दिवसरात्रीप्रमाणें. ७ सूर्य.

१ माप. २ परतत्त्वाशीं. ३ सुखी व्हावें. ४ स्तवन. ५ साद्यानें. ६ आकारानें. ७ तीन प्रकारांनीं. ८ मेळा. ९ कळे, समजे.

**सोडतें. ५२४ अशा प्रकारें सत्व, रज आणि तम ह्या तिहींची व्यापकता येवढी मोठी आहे कीं, तें ब्रह्मदेवापासून तों किड्यापर्यंत सर्वांचें अतिक्रमण करतें. ५२५ परंतु विश्वांतील सर्व समुदाय ज्याच्या भेदानें भिन्न भिन्न गुणात्मक झाले आहेत, तें ज्ञान आधीं सांगूं. ५२६ कारण, दृष्टि चांगली झाली ह्मणजे कोणतेंही चांगलें समजतें. त्याप्रमाणें शुद्धज्ञानानें सारेंच शुद्ध प्राप्त होतें." ५२७ ह्मणून कैवल्यगुणनिधान श्रीकृष्ण ह्मणतात "तें सात्विक ज्ञान आतां सांगूं. लक्ष्य दे." ५२८**

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।

अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम्॥२०॥

[सर्वभूतेषु येनैकं] तरी अर्जुना गा तें फुडें । सात्विक ज्ञान चोखडें । जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे । ज्ञातेनिसीं ॥ २९ ॥ जैसा सूर्य न देखे आंधारें । सरिता नेणिजती सागरें । कां कवळिलिया न धरे । आत्मच्छाया ॥ ५३० ॥ तयापरी जया ज्ञाना । शिवादि तृणावसाना । इया भूतव्यक्ति भिन्ना । नाडळती ॥ ३१ ॥ [भावमव्ययमीक्षते] जैसें होतें चित्र पाहातां । होय पाणियें मीठ धुतां । कां चेवोनि स्वप्ना येतां । जैसें होय ॥ ३२ ॥ तैसें ज्ञानें जेणें । करितां ज्ञातव्यातें पाहाणें । जाणता ना जाणणें । जाणावें उरे ॥ ३३ ॥ [अविभक्तं विभक्तेषु] पैं सोनें आटूनि लेणीं । न काढिती आपुलिया आयणी । कां तरंग न घेपती पाणी । गाळूनि जैसें ॥ ३४ ॥ तैसी जया ज्ञानाचिया हाता । न लगेचि दृश्यकथा । [तज्ज्ञानं विद्धि सात्विकम्] तें ज्ञान जाण सर्वथा । सात्विक गा ॥ ३५ ॥ आरिसा पाहों जातां कोडें । जैसें पाहातेंचि कां रिगे पुढें । तैसें ज्ञेय लोटोनि पडे । ज्ञाताचि जें ॥ ३६ ॥ पुढती तेंचि सात्विक ज्ञान । जें मोक्षलक्ष्मीचें भुवन । हें असो ऐक चिन्ह । राजसाचें ॥३७॥

**"तर अर्जुना! ज्याच्या उदयानें ज्ञात्यासहवर्तमान ज्ञेय लुप्त होऊन जातें, तेंच शुद्ध सात्विक ज्ञान हें स्पष्ट समजावें. ५२९ सूर्य ज्याप्रमाणें आंधारास पहात नाहीं; नद्या समुद्राला पहात नाहींत; किंवा आपल्या छायेला जशी वेंगेत धरतां येत नाहीं; ५३० त्याप्रमाणें ज्या ज्ञानाला शिवापासून तृणापर्यंत ह्या भूतव्यक्ति भिन्न अशा दिसतच नाहींत. ५३१ सारवून चित्र पाहतांना, पाण्यानें मीठ धुतांना, जसें होतें; किंवा जागे झाल्यानंतर स्वप्नाची जशी अवस्था होते, ५३२ त्याप्रमाणें ज्या ज्ञानाच्या योगेंकरून विषयांस पाहिलें असतां विषय, ज्ञाता, व ज्ञान हीं तिन्हींही उरत नाहींत, ५३३ आपल्या आवडीसाठीं अलंकार आटून सोनें काढतात असें नाहीं, किंवा पाणी टाकून जसें तरंग घेत नाहींत, ५३४ त्याप्रमाणें ज्या ज्ञानाच्या हाताला दृश्यपदार्थ ह्मणून लागतच नाहींत. तेंच ज्ञान खरोखर सात्विक आहे असें समज. ५३५ कौतुकानें आरसा पहावयास जावें तों, पहाणाराच पुढें उभा राहतो. त्याप्रमाणें जेथें जें ज्ञाताच बनून राहतें; ५३६ मोक्षलक्ष्मीचें मंदिर असें जें, तेंच सात्विक ज्ञान श्रेष्ठ होय. हें असो. आतां राजस ज्ञानाचें लक्षण ऐक." ५३७**

पृथक्त्वे न तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।

वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥ २१ ॥

[पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं] तरि पार्था परियेस । तें ज्ञान गा राजस । जें भेदाची कांस । धरूनि चाले ॥ ३८ ॥ [नानाभावान्पृथग्विधान्] विचित्रता भूतांचिया । आपण आंतोनि ठिकरिया । बहु चकें ज्ञातया । आणिली जेणें ॥ ३९ ॥ जैसें साचा रूपा आड । घालूनि विसराचें कवाड । मग स्वप्नाचें कोवाड । विवरी निद्रा ॥ ५४० ॥ तैसें स्वज्ञानाचिये पौळी । बाहेरि मिथ्यामोहाचे खळीं । तिहीं अवस्थांची वधाळी । दावी जें जीवा ॥ ४१ ॥ आळंकारपणें झांकलें । बाळका सोनें कां वायां गेलें । तैसें नामीं रूपीं दुरावलें । अद्वैत जया ॥ ४२ ॥ अवतरली गाडग्या घडां । पृथ्वी अनोळख जाली मूढां । वन्हि जाला कोंनडा । दीपत्वासाठीं ॥ ४३ ॥ कां वस्त्रपणाचेनि आरोपें । मूर्खांप्रति तंतु हारपे । ना ना मुग्धां पट लोपे । दाऊनि चित्र ॥ ४४ ॥ तैसी जया ज्ञाना । [वेत्ति सर्वेषु भूतेषु] जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना । ऐक्यबोधाची भावना । निमोनि गेली

१ शुद्ध. २ नद्या. ३ गवतापर्यंत. ४ न दिसती. ५ सारवून. ६ जागें होऊन. ७ विषयाचें. ८ दृष्टीनें, बुद्धीनें. ९ आवडीनें. १० मंदिर.

१ व्यापून. २ वेगवेगळीला. ३ चकभूल, भ्रम. ४ ओसें. ५ स्पष्ट करी. ६ आवार. ७ क्रीडा. ८ घागरीमध्यें. ९ अपरिचित. १० मूर्खांस. ११ नाश पावली.

॥ ४५ ॥ मग इंधनीं भेदला अनळ । फुलावरी परिमळ । कां जळभेदें सकळ । चंद्र जैसा ॥ ४६ ॥ तैसे पदार्थभेद बहुवस । जाणोनि ल्हान थोर वेष । [तज्ज्ञानं विद्धि राजसं] ओळखें तें राजस । ज्ञान येथ ॥ ४७ ॥ आतां तामसाचेंही लिंग । सांगेन तें वोळख चांग । डावलावया मातंग- । सदन जैसें ॥ ४८ ॥

"तर पार्था! ऐक. भेदाची कास धरून चालणारें जें ज्ञान, तें राजस होय. ५३८ ज्यानें आपण व्याप्त होऊन भूतांचे नानाविध भेद करून त्यांस वैचित्र्य आणलें आहे; आणि ज्ञात्यालाच ज्यानें चकभूल करून सोडलें. ५३९ ज्याप्रमाणें खऱ्या स्वरूपाच्या आड विसरणाचें कवाड घालून मग झोंप जशी स्वप्नाचें ओझें लादते, ५४० त्याप्रमाणें आपल्या ज्ञानाच्या आवाराबाहेर मिथ्या मोहाच्या खळ्यामध्यें जिवाला जें तीन अवस्थांची क्रीडा दाखवितें. ५४१ अलंकारानें मुलांना झांकलें, म्हणून सोनें काय व्यर्थ गेलें? त्याप्रमाणें नामानें आणि रूपानें ज्याला अद्वैत दुरावतें; ५४२ गाडग्यामध्यें आणि घागरीमध्यें शिरली म्हणून मूर्खाला पृथ्वीची (मातीची) ओळख नाहींशी होते; दिव्याच्या योगानें अग्नि अपरिचित होतो; ५४३ किंवा वस्त्रपणाच्या आरोपामुळें मूर्खांना तंतूच नाहींसे झालेसे वाटतात; किंवा अज्ञानाला चित्र दाखवून कापड नाहींसें होतें; ५४४ त्याप्रमाणें ज्या ज्ञानाला मिळाल्यानें भूतव्यक्ति भिन्न भिन्न आहेत असें वाटतें, व ऐक्यज्ञानाची भावना लयास जाते; ५४५ तेव्हां जळणानें अग्नीची जशीं निरनिराळीं स्वरूपें व्हावींत; फुलांप्रमाणें परिमळ जसा निरनिराळा व्हावा, किंवा पूर्ण असलेला चंद्र जसा निरनिराळ्या जळांनीं भिन्न भिन्नरूप व्हावा, ५४६ त्याप्रमाणें अनेक प्रकारचे पदार्थमात्रांचे भेद ते लहानथोरच आहेत हें मनांत आणून व्याप्त होणारें जें ज्ञान तें राजस होय. ५४७ आतां टाळून जाण्यासाठीं मांगाचें घर दाखविल्याप्रमाणें तामसाचेंही लक्षण सांगतों. तेंही नीट ध्यानांत ठेव." ५४८

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

[यत्तु] तरि किरीटी जें ज्ञान । हिंडे विधीचेनि वस्त्रें हीन । श्रुति पाठमोरी नग्न । म्हणौनि तया ॥ ४९ ॥ येरीही शास्त्र बाह्यकारीं । जें निंदेचे विटाळवरी । बोळविलेंसे डोंगरीं । म्लेंच्छधर्माच्या ॥ ५० ॥ जें गा ज्ञान ऐसें । गुणग्रहें तामसें । घेतलें भोंवे पिसें । होऊनियां ॥ ५१ ॥ जें सोयरिके बाध नेणे । पदार्थीं निषेध न म्हणे । निरोपिलें जैसें सुणें । शून्यग्रामीं ॥ ५२ ॥ तया तोंडीं जें नाडळे । कां खातां जेणें पोळे । तेंचि येक वांळे । येर घेचि तें ॥ ५३ ॥ पैं सोनें चोरितां उंदिर । न म्हणे थरेविथर । नेणें मांसखाइर । काळें गोरें ॥ ५४ ॥ ना ना वनामाजि बोहरी । कडसणी जेवीं न करी । कां जीत मेलें न विचारी । बैसतां माशी ॥ ५५ ॥ अगा वांतीं कां वाढिलेया । साजुक कां सांडलिया । विवेक कावळिया । नाहीं जैसा ॥ ५६ ॥ तैसें निषिद्धें सांडूनि यावें । कां विहितें आदरें घ्यावें । हें विषयांचेनि नांवें । नेणेचि जें ॥ ५७ ॥ जेतुलें आड पडे दिठी । तेतुलें घेचि विषयासाठीं । मग तें स्त्रीद्रव्य वांटी । शिश्नोदरां ॥ ५८ ॥ तीर्थातीर्थ हे भेद । उदकीं नाहीं संनोळख । तृषा बोळे तेंचि सुख । वांचूनियां ॥ ५९ ॥ तयाचिपरी खाद्याखाद्य । न म्हणे निंद्यानिंद्य । तोंडा आवडे तें मेध्य । ऐसाचि बोध ॥ ६० ॥ आणि स्त्रीजात तितुकें । त्वचेंद्रियेंचि वोळखे । तियेविषीं सोयरिके । सादरचि बहु ॥ ६१ ॥ पैं स्वार्थी जें उपकरे । तयाचि नाम सोयिरें । देहसंबंध न सरे । जिये ज्ञानीं ॥ ६२ ॥ मृत्यूचें आघवेंचि अन्न । आगी आघवेंचि इंधन । तैसें जगचि आपलें धन । तामसज्ञाना ॥६३॥ [कृत्स्नवदेकस्मिन्] ऐसेनि विश्व सकळ । जेणें विषयचि मानिलें केवळ । तया एक जाण फळ । देहभरण ॥ ६४ ॥ आकाशपतिता नीरा । जैसा सिंधुचि येक

---

१ प्रतिबिंबत्वानें भेद. २ व्यापलें. ३ लक्षण, चिन्ह. ४ मांगाचें घर.

१ विरुद्धाचरणानें. २ निंदा करून विटाळून टाकलें. ३ तमोगुणरूप नकारानें. ४ पिशाच, भ्रमिष्ट. ५ शरीरसंबंधाविषयीं. ६ सोडिलें. ७ कुत्रें. ८ ओसाड गांवीं. ९ प्राप्त होत नाहीं. १० लागी. ११ बरें वाईट. १२ मांसभक्षक. १३ अग्नी, वणवा. १४ विचार. १५ ओकलेलें. १६ कुजलेलें. १७ अपवित्र. १८ शास्त्रप्रतिपादित. १९ म्हणणें. २० ओळखीची. २१ हरे. २२ भक्ष्याभक्ष्य. २३ पवित्र. २४ कामास येतें. २५ काष्ठ. २६ विषयच सर्व जग असें मानलें. २७ पोषण.

थारा । तैसें कृत्यजात उदरा- । लागींचि बुझे ॥ ६५ ॥ [अहैतुकं] वांचूनि स्वर्ग नरक आथी । तया हेतु प्रवृत्ती निवृत्ती । इये आघवीयेचि राती । जाणिवेची जें ॥ ६६ ॥ [कार्ये सक्तं] जें देहखंडों नाम आत्मा । ईश्वर पाषाण प्रतिमा । यया परौती प्रमों । ढळों नेणे ॥ ६७ ॥ [अतत्त्वार्थवत्] ह्मणे पडिलेनि शरीरें । केलेनिसी आत्मा सरे । मा भोगावया उरे । कोण वेषें ॥ ६८ ॥ ना ईश्वर पाहातां आहे । तो भोगवी जरी हें होये । तरी देवचि खाये । विकूनियां ॥ ६९ ॥ गांवींचे देवळेश्वर । नियामकचि होती साचार । तरि देशींचे डोंगर । उगे कां असती ॥ ५७० ॥ [अल्पं च] ऐसा विपायें देव मानिजे । तरि पाषाणमात्रचि जाणिजे । आणि आत्मा तंव ह्मणिजे । देहातेंचि ॥ ७१ ॥ येरें पापपुण्यादिकें । तें आघवेंचि करोनि लटिकें । हित मानी अग्निमुखें । चरणें जें कां ॥ ७२ ॥ जें चामाचे डोळे दाविती । जें इंद्रियें गोडी लाविती । तेंचि साच हे प्रेतीती । फुंडी जया ॥ ७३ ॥ [तत्तामसं] किंबहुना ऐसी प्रथा । वाढती देखसी पार्था । धूमाची वेली वृथा । आकाशीं जैसी ॥ ७४ ॥ कोरडा ना वोला । उपयोगा आथी गेला । तो वाढोनि मोडला । भेंड जैसा ॥ ७५ ॥ ना ना उसांचीं कणसें । कां नपुंसकें माणुसें । वन लागलें जैसें । सांबरीचें ॥ ७६ ॥ ना तरी बाळकाचें मन । कां चोराघरींचें धन । अथवा गळस्तन । शेळियेचे ॥ ७७ ॥ तैसें जें वायाणें । वोसोळ दिसे जाणणें । तयातें मी ह्मणें । तामस ज्ञान ॥ ७८ ॥ [उदाहृतं] तेंही ज्ञान इया भाषा । बोलिजे तो भाव ऐसा । जात्यंधाचा कां जैसा । डोळा वोड ॥ ७९ ॥ कां बधिराचे नीट कान । अपेया नाम पान । तैसें आडनांव ज्ञान । तामसा तया ॥ ५८० ॥ हें असो- किती बोलावें । तरि ऐसें जें देखावें । तें ज्ञान नोहे जाणावें । डोळस तम ॥ ८१ ॥ एवं तिहीं गुणीं । भेदलें यथालक्षणीं । ज्ञान श्रोतेशिरोमणी । दाविलें तुज ॥ ८२ ॥ आतां याचि त्रिप्रकारा । ज्ञानाचेनि धनुर्धरा । प्रकाशें होती गोचरा । कर्तयांच्या क्रिया ॥ ८३ ॥ ह्मणौनि कर्म पैं गा । अनुसरे तिहीं भागां । मोहरें जालियां घोघा । तोय जैसें ॥८४॥ तेंचि ज्ञानत्रयवशें । त्रिविध कर्म जें असे । तेथ सात्विक तंव ऐसें । परिस आधीं ॥ ८५ ॥

**"तर अर्जुना! जें ज्ञान विधिरूप वस्त्रावांचून हिंडतें; आणि तें नग्न असल्यामुळें** त्यास श्रुति पाठमोरी होते. ५४९ इतर शास्त्रांनींही ज्याच्यावर निंदेचा बहिष्कार टेवून म्लेंच्छधर्माच्या डोंगरावर बोळवण करून दिली आहे. ५५० असें जें ज्ञान तामसगुणाच्या आग्रहानें तामसानें घेतलेलें, जें वेडें होऊन भ्रमत राहणारें; ५५१ ज्याला शरीरसंबंधाविषयीं प्रतिबंध ह्मणून ठाऊकच नाहीं; पदार्थामध्यें निषेध ह्मणून ह्मणतच नाहीं. ओसाड गांवांत कुत्रें सोडलें ह्मणजे, ५५२ त्याच्या तोंडाला जेवढें मिळत नाहीं, किंवा खातांना ज्यानें तोंड भाजतें, तेवढें मात्र टाकावयाचें. बाकी सारें स्वाहा! ५५३ तसेंच उंदीर सोनें चोरतांना हलकें भारी ह्मणत नाहीं; किंवा मांस खाणारा काळें गोरें ह्याचा विचार करीत नाहीं, ५५४ किंवा वनामध्यें अग्नि जसा कांहीं विचार करीत नाहीं; किंवा माशी बसतांना हा जिवंत आहे कां मेलेला आहे ह्याचा विचार करीत नाहीं; ५५५ अरे! ओकलेलें कीं आंबलेलें; ताजें कीं कुजलेलें; ह्याचा विचार जसा कावळ्याला नाहीं; ५५६ त्याप्रमाणें अविहित असेल तें टाकावें; किंवा विहित असेल त्याचा स्वीकार करावा; हें विषयाच्या संबंधानें ज्याला माहितच नाहीं; ५५७ जितकें ह्मणून दृष्टीपुढें येईल, तितकें विषयाकरितां संपादन करावयाचेंच, आणि मग तें स्त्री व द्रव्य, शिश्नोदराला वांटून द्यावयाचें. ५५८ उदकामध्यें तीर्थ कोणतें, आणि तीर्थ नव्हे असें कोणतें, ह्या शब्दांची ओळख सुद्धां नाहीं. तहान भागते येवढें सुख ठाऊक. दुसरें कांहीं जाणत नाहीं. ५५९ त्याप्रमाणें भक्ष्य कोणतें व अभक्ष्य कोणतें? ह्याचा विचार करावयाचा नाहीं; निंद्य कोणतें आणि अनिंद्य कोणतें हें मनांत आणावयाचें नाहीं; तोंडाला गोड लागलें कीं तें पवित्र हीच मनाची आवड. ५६० आणखी स्त्रीची जात ह्मणून जितकी तितकी इंद्रियावरूनच ओळखावयाची. तिच्याशीं संबंध ठेवावयाचा झटला कीं तिसरा पाय! ५६१ आपल्या स्वार्थामध्यें कामीं

१ परिच्छिन्न देहाला. २ बुद्धि. ३ कर्मासहवर्तमान. ४ नासे. ५ एक नियंते. ६ क्वचित्. ७ खाणें. ८ चामड्याचे. ९ अनुभव. १० खरी. ११ स्थिति, ख्याति. १२ भेंड्याचा वृक्ष. १३ निवडुंगांचें. १४ निरर्थक. १५ शून्य, ओशाळ, वाईट. १६ मोठा. १७ प्रत्यक्ष अंधार. १८ सर्व लक्षणांनीं युक्त. १९ प्रत्यक्ष. २० मार्गास लागलेलें.

पडेल तेवढ्याचेंच नांव सोयरे. ज्या ज्ञानाला देहसंबंधाचा विचार ह्मणून ठाऊकच नाहीं. ५६२ मृत्यूला सारेंच भक्ष्य; अग्नीला सारेंच जळण; त्याप्रमाणें सारें जगही तामस ज्ञानाचीच मालमत्ता आहे. ५६३ अशा प्रकारें सारें विश्व हें केवळ विषयच आहे असें ज्यानें मानलें, त्याला देहाचें पोषण करणें येवढेंच कायतें फळ असतें. ५६४ आकाशांतून पडलेल्या पाण्याला समुद्र हा एकच कायतो आश्रय; त्याप्रमाणें जें जें कृत्य ह्मणून करावयाचें तें पोटाकरितां करावयाचें ह्मणून समजणें. ५६५ शिवाय स्वर्ग आणि नरक जे आहेत, त्यांना प्रवृत्ति आणि निवृत्ति हे हेतु आहेत. ह्या सर्व ज्ञानाची जेथें रात्र असते. ५६६ देहाच्याच तुकड्याला आत्मा हें नांव; दगडाची मूर्ति हाच ईश्वर. ह्याच्या पलीकडे ह्मणून बुद्धि जावयाची नाहीं." ५६७ तो ह्मणतो "शरीर पडलें कीं झालें. कर्मही गेलें आणि आत्माही गेला. त्याचा उपभोग घेण्याला कोण राहणार? ५६८ किंवा पाहतांना ईश्वर असेल व तोच जर हें होणारें सर्व भोगवीत असेल, तर तो देवच विकून खावा ह्मणजे झालें. ५६९ गांवच्या देवळांतले देवच जर जगाचे नियामक असतील, तर देशांतले डोंगर तरी स्वस्थ कां बसतात?" ५७० असा चुकून देव मानलाच तर दगडाचा मात्र मानावयाचा. आणखी देहालाच आत्मा ह्मणावयाचा. ५७१ इतर जीं पापपुण्यादिक आहेत, तीं सारीं खोटीं करून अग्निसारखें पाहिजे तें खात सुटावयाचें हेंच कायतें हित. ५७२ चर्मचक्षूंनीं जें दिसेल, ज्याची इंद्रियें गोडी लावून देतील, तेंच खरें अशी ज्याची पक्की खात्री; ५७३ किंबहुना **अर्जुना!** आकाशामध्यें ज्याप्रमाणें व्यर्थ धुराची वेल वाढते त्याप्रमाणें अशी वाढती स्थिति ज्याच्या ठिकाणीं पहाशील, ५७४ भेंड जसा कोरडाही नव्हे आणि ओलाही नव्हे. उपयोगास न पडतांच लयास जातो. ५७५ किंवा उसांचीं कणसें; नपुंसक माणसें; किंवा साबरीचें (निवडुंगाचें) लागलेलें वन; ५७६ किंवा मुलांचें मन; चोराच्या घरचें द्रव्य; अथवा शेळीच्या गळ्याखालचें अचळ; ५७७ त्याप्रमाणें वायफळ, वाईट दिसणारें जें ज्ञान, त्याला मी तामस ज्ञान असें ह्मणतों. ५७८ त्याला देखील ज्ञान हा शब्द लावावयाचा, यांतला भावार्थ पाहिला तर इतकाच कीं, जन्मांधाचे डोळे मोठे मोठे आहेत असें ह्मटल्याप्रमाणेंच. ५७९ किंवा बहिऱ्याचे कान नीट आहेत असें ह्मणणें; किंवा अपेयाला पान ह्मणणें; तशापैकींच ह्या तामसाला 'ज्ञान' हें फक्त टोपण नांव आहे. ५८० हें असो. किती सांगावें? तर असें ज्ञान दृष्टीस पडतें तें ज्ञान नव्हे. मूर्तिमंत तमच तें असें समजावें. ५८१ अशा प्रकारें हे **सर्वश्रेष्ठ श्रोत्या!** तीन गुणांनीं ज्ञानाचेही झालेले तीन प्रकार तुला दाखवून दिले. ५८२ आतां **धनुर्धरा!** ह्याच ज्ञानाच्या तीन प्रकारांनीं कर्त्याच्या क्रिया प्रगट होतात. ५८३ ह्मणून ओघाचे जसे फांटे फुटतात त्याप्रमाणें पाणी जातें, तसें कर्म असतें तेंही ह्या तीन भागानुसार होतें. ५८४ ह्या तीन प्रकारच्या ज्ञानाप्रमाणें होणारें जें तीन प्रकारचें कर्म आहे, त्यांतील सात्विककर्म असें असतें, तें आधीं ऐक." ५८५

नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् ।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥

[नियतं] तरि स्वाधिकाराचेनि मार्गें । आलें जें मानिलें आंगें । पतिव्रतेचेनि परिष्वंगें[1] । प्रियातें जैसें ॥ ८६ ॥ सांवेळ्या[2] आंगा चंदन । प्रमदालोचना[3] अंजन । तैसें अधिकारासी मंडण[4] । नित्यपणें जें ॥ ८७ ॥ तें नित्यकर्म भलें । होय नैमित्तिकीं सावाइलें[5] । सोनयासि जोडलें । सौरभ्य[6] जैसें ॥ ८८ ॥ [संगरहितं] आणि आंगा जीवाची संपत्ती । वेंचूनि[7] करी बाळाची पाळती[8] । परि जीवें उबगणें[9] हे स्थिती । न पाहे माय ॥ ८९ ॥ [अफलप्रेप्सुना कर्म] तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी । परि फळ न सुये[10] दिठी । उखिती[11]

१ आलिंगनानें. २ श्यामवर्ण. ३ स्त्रियांच्या नेत्रांला. ४ भूषण. ५ साह्य झालें. ६ सुगंध. ७ खर्चून. ८ रक्षण. ९ कंटाळणें, त्रासणें. १० दृष्टीस न घाली. ११ अवघी.

क्रिया पैंठी[1] । ब्रह्मींचि करी ॥ ५९० ॥ [अरागद्वेषतः कृतं] आणि प्रियें[2] आलिया स्वभावें । शंबळ[3] उरे वेंचे ठाउवें नव्हे । तैसें सत्प्रसंगें करावें । पौरुषे[4] जरी ॥ ९१ ॥ तरि अंकरणाचेनि[5] खेदें । द्वेषातें जिवीं न बांधे । जालियाचेनि आनंदें । फुंजों[6] नेणें ॥ ९२ ॥ ऐसऐसिया हातवटिया । कर्म निपजे जें धनंजया । [यत्तत्सात्विकमुच्यते] जाण सात्विक हें तया । गुणनाम गा ॥ ९३ ॥ ययावरी राँजसाचें[7] । लक्षण सांगिजेल साचें । न करीं अवधानाचें । वाणेंपण[8] ॥ ९४ ॥

**"पतिव्रतेचें आलिंगन जसें पतीला व्हावें, त्याप्रमाणें आपल्या अधिकाराच्या मार्गानें आलेलें, जें आंगालाही मान्य झालें, ५८६ काळ्या सावळ्या आंगाला चंदन; स्त्रियांच्या नेत्रांना काजळ; त्याप्रमाणें निरंतरपणानें अधिकारास भूषण. ५८७ तें नित्य कर्मच चांगलें असलें ह्मणजे त्याचा समावेश नैमित्तिकांत होतो. सोन्याला जसा सुगंध प्राप्त व्हावा, ५८८ आणखी आंगाची व जिवाची संपत्ति खर्च करून बाळकाचें पालग्रहण करते; परंतु जिवानें कंटाळावें, ही स्थिति आईला कधीं माहितच नसते. ५८९ त्याप्रमाणें सर्वभावेंकरून कर्माचें अनुष्ठान करावें, परंतु फळावर दृष्टी ठेवूं नये, सारी क्रिया ब्रह्मामध्येंच अर्पण करावी. ५९० आणखी सहजगत्या आपलें कोणी आवडतें माणूस आलें, तर अन्न उरलें कीं संपलें ह्याचें भान राहत नाहीं. त्याप्रमाणेंच सुप्रसंगीं करण्याचें जर कांहीं राहिलें, ५९१ तर न केलेल्याच्या दुःखानें मनामध्यें कांहीं द्वेष धरीत नाहीं. किंवा झालें ह्मणून त्याच्या आनंदानें फुगण्याचें ज्याला माहित नाहीं; ५९२ हे धनंजया! अशा हतोटीनें जें कर्म निपजतें, त्याच्या गुणावरून त्याला सात्विक असें नांव आहे. ५९३ आतां ह्यापुढें खऱ्या रजोगुणाचें लक्षण सांगेन. तरी लक्ष्य देण्याची कमतरता करूं नको." ५९४**

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

[यत्तु कामेप्सुना] तरि घरीं मातापितरां । धड बोली नाहीं संसारा । येर विश्व भरी आदरा । मूर्ख जैसा ॥९५॥ कां तुळशीचिया झाडा । दुरूनि न घांपे[1] सितोडा । द्राक्षींचेया तरि बुडा । दूधचि लाविजे ॥ ९६ ॥ [कर्म] तैसीं नित्यनैमित्तिकें । कर्में जियें आवश्यकें । तयांचेविषीं न शके । वैसला उठूं ॥ ९७ ॥ येरां काम्याचेनि तरि नांवें । देह सर्वस्व आघवें । वेंचितांही न मनेवे । बहु ऐसें ।९८॥ अगा देवेंढी वाढी लाहिजे । तेथ मोल देतां न धाइजे[4] । पेरितां पुरे न ह्मणिजे । बीज जेवीं ॥ ९९ ॥ कां परिस जालिया हातीं । लोहालागीं सर्वसंपत्ती । वेंचितां न ये उन्नति । साधक जैसा ॥ ६०० ॥ तैसीं फळें देखोनि पुढें । काम्यकर्में कुवाडें[6] । [पुनः] करी परि तें थोडें । केलेंहि मानी ॥ १ ॥ तेणें फळकामुकें । यथाविधि नेटकें । काम्य कीजे तितकें । क्रियाजात ॥ २ ॥ [साहंकारेण वा] आणि तयाही केलियाचें ॥ तोंडीं लावी डोंडीचे । कर्मी या नामश्रेष्ठाचें । वाणे सारी[9] ॥ ३ ॥ तैसा भरे कर्माहंकारु । मग पिता अथवा गुरु । ते न मनी काळज्वरु । औषध जैसें ॥ ४ ॥ तैसेनि साहंकारें । फळाभिलाषियें नरें । कीजे गा आदरें । जें जें कांहीं ॥ ५ ॥ [क्रियते बहुलायासं] परि तेंही करणें बहुवसा । वळंघोनि[10] करी सोयासा[11] । जीवनोपाय कां जैसा । कोल्हांटियाचा ॥ ६ ॥ एका कणालागीं उंदीर । अवघा उपसे डोंगर । कां शेवाळा दोषें[12] दर्दुर । समुद्र डेहुळी[13] ॥ ७ ॥ पैं भिकेपरतें न लाहे । तऱ्ही गारुडी साप वाहे । काय कीजे शीणचि होये । गोड येकां ॥ ८ ॥ हें असो परमाणूचेनि लाभें । पाताळ लंघिती बोळंबे[14] । तैसें स्वर्गसुख लोभें । विचंबणें[15] जें ॥ ९ ॥ [यत्तद्राजसमुच्यते] तें काम्य कर्म सक्लेश । जाणावें येथ राजस । आतां चिन्ह परिस । तामसाचें ॥ ६१० ॥

**"तर घरीं आईबापांशीं कीं इतर कुटुंबांतील माणसांशीं धड बोलावयाचें नाहीं; परंतु मूर्ख जसा इतर साऱ्या जगाचें आदरातिथ्य करतो, ५९५ किंवा तुळशीच्या झाडावर दुरून एक शितोडा सुद्धां टाकावयाचा नाहीं. पण द्राक्षीच्या मुळाला दुधाचा रतीब लावा-**

---

१ अर्पिली, प्रविष्ट. २ आवडतें. ३ अप्रिय. ४ राहे. ५ न केलें याविषयींच्या. ६ गर्वास चढत नाहीं. ७ रजोगुणयुक्ताचें. ८ कमतायी.

१ न घाली. २ मानवत नाहीं. ३ दिढी दुपटीनें वाढ. ४ तृप्त न व्हावें. ५ उत्कर्षदशेस. ६ कटीण. ७ चांगलें. ८ प्रसिद्धीच्या. ९ त्यासारिखें करी. १० आरूढ होऊन. ११ कष्टास. १२ उद्देशानें. १३ आलोडी, ढवळी. १४ वाळवी. १५ श्रम करणें.

वयाचा; ५९६ त्याप्रमाणें नित्यनैमित्तिक अशीं जीं अवश्यकर्मै, त्यांच्यासाठीं बसलेला उठावयाचा सुद्धां नाहीं. ५९७ इतर काम्य कर्मांच्या नांवानें देहासुद्धां सर्वस्व खर्च झालें तरी, फार झालें असें वाटत नाहीं. ५९८ दिढी दुपटीची वाढ मिळाली म्हणजे कर्ज देणाराला जशी तृप्ति होत नाहीं, किंवा बीं पेरित असतांना पुरे असें म्हणत नाहीं; ५९९ किंवा परिस हस्तगत झाला असतां, लोखंडासाठीं सारी संपत्ति खर्च झाली तरी, साधकाला पुरेसें होत नाहीं; ६०० त्याप्रमाणें पुढें फळें पाहून हवीं तितकीं काम्य कर्मैं करतो तरी, तितकें केलेलेंही थोडेंच मानतो, ६०१ असा जो फलाची इच्छा करणारा आहे तो, जितक्या जितक्या म्हणून क्रिया यथाविधीनें व नीटनेटक्या करतो, त्या साऱ्या काम्य– म्हणजे फलेच्छेसाठीं करतो. ६०२ आणखी, त्या केलेल्यांचीही तोंडानें दवंडी पिटतो. कर्म करतांनाही त्याच्या प्रौढीची कांहीं वाण करीत नाहीं. ६०३ तशाच रीतीनें कर्म केलेल्याचा अहंकार उत्पन्न होतो; त्यामुळें पित्याला व गुरूलाही मानित नाहीं; कालज्वर आला असतां जसें औषध मानवत नाहीं, ६०४ त्याप्रमाणें अहंकारानें, फलाच्या अभिलाषानें पुरुषानें जें जें कांहीं करावें, ६०५ आणखी तें करणेंही अतिशय कष्ट सोसून करावयाचें. कोल्हाट्यांचा जसा उदरनिर्वाहाचा धंदा असतो, ६०६ किंवा एका धान्याच्या कणासाठीं उंदीर सारा डोंगर पोखरतो; किंवा शेवाळीसाठीं बेडूक जसा सारा समुद्र ढवळून सोडतो; ६०७ भिक्षेपेक्षां कांहीं माती सुद्धां अधिक मिळत नाहीं, तरी गारोडी सर्प वागवितो, हाही मासला त्यांतलाच! एखाद्याला कष्ट काढणेंच गोड वाटतात, त्याला काय करणार? ६०८ हें असो. एका रजःकणा करितां वाळवी पाताळापर्यंत जाते. त्याप्रमाणें स्वर्गींच्या सुखाकरितां जें रखडणें, ६०९ तें कर्म काम्य–कष्टप्रद– तें येथें राजस आहे हें लक्ष्यांत ठेवावें. आतां तामसाचें लक्षण ऐक." ६१०

अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

[अनुबंधं] तरि तें गा तामस कर्म । जें निंदेचें काळें धाम[1] । निषेधाचें[2] जन्म । साच जेणें ॥ ११ ॥ जें निपजविल्या पाठीं । कांहींच न दिसे दिठी । रेघ काढिलिया पोटीं । तोयाचे जेवीं ॥ १२ ॥ कां कांजी[3] घुसळलिया । कां राख फुंकिलिया । कांहीं न दिसे गाळिलिया । वालुघाणा[4] ॥ १३ ॥ ना ना उपणिलिया[5] भूंस । कां विंधिलिया आकाश । ना ना मांडिलिया पाश । वारयासी ॥ १४ ॥ हें अवघेंचि जैसें । वांझें होऊनि नाशे । जें केलिया पाठीं तैसें । वायांचि जाय ॥ १५ ॥ [क्षयं] येऱ्हवीं नरदेहाही येवढें । धन आटणीये[6] पडे । तें कर्म निफजवितां मोडे । जगाचें सुख ॥ १६ ॥ जैसा कमळवनीं फांस । काढिलिया कांटेंस[7] । आपण झिजे नाश । कमळां करी ॥ १७ ॥ [हिंसां] कां आपण आंगें जळे । आणि आंगवी[8] जगाचे डोळे । पतंग जैसा सेळें । दीपाचेनि ॥ १८ ॥ तैसें सर्वस्व वायां जावो । वरी स्वदेहाही होय घावो । परि पुढिलां अपावो । निफजविजे जेणें ॥ १९ ॥ मासी आपणयातें गिळवी । परि पुढिलां वांती शिणवी । तें कैश्मळ[9] आठवी । आचरण जें ॥ ६२० ॥ [अनपेक्ष्य च पौरुषं] तेंही करावया दोषें । मज सामर्थ्य असे कीं नसे । हेंही पुढील तैसें । न पाहातां करी ॥ २१ ॥ केवढा माझा उपावो । करितां कोण प्रस्तावो[11] । केलियाही आवो[12] । काय येथ ॥ २२ ॥ [मोहादारभ्यते कर्म] इये जाणिवेची सोये । अविवेकाचेनि पायें । पुसोनियां होये । सांटोप[13] कर्मी ॥ २३ ॥ आपला वसौटी[14] जाळुनी । बिसोंटे[15] जैसा वन्ही । कां स्वमर्यादा गिळोनि । सिंधु उठी ॥ २४ ॥ मग नेणे बहु थोडें । न पाहे मागें पुढें । मार्गामार्ग येकवढें[16] । करीत चाले ॥ २५ ॥ [यत्तत्तामसमुच्यते] तैसें कृत्याकृत्य सेरकटित[17] । आपपर नुरवित । कर्म होय तें निश्चित । तामस जाण ॥ २६ ॥ ऐसी गुणत्रयभिन्ना । कर्मांची गा अर्जुना । हे केली विवंचना[18] । उपपत्तीसीं ॥ २७ ॥ आतां ययाचि कर्मा भजतां । कर्माभिमानिया कर्ता । तो जीवही त्रिविधता । पातला असे ॥ २८ ॥ चतुराश्रमवशें[19] । एकपुरुष चतुर्धा[20] दिसे । कर्तया

1 घर. २ अपवित्रतेचें. ३ पेज. ४ घाण्यांत वाळू घातली तरी. ५ पाखडलें असतां. ६ खर्चीं. ७ कांट्यांचा. ८ आंधार करी. ९ द्वेषानें. १० सदोष. ११ प्रसंग. १२ तात्पर्य. १३ अहंतायुक्त. १४ वसतिस्थान. १५ पसरे. १६ एकत्र. १७ रगडीत. १८ विवरण. १९ ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, व संन्यास यांच्या योगें. २० चार प्रकारचा.

त्रैविध्य तैसें । कर्मभेदें ॥ २९ ॥ परि तयां तिहींआंत । सात्विक तंव प्रस्तुत । सांगेन दत्तचित्त । आकर्णी[1] तूं ॥६३०॥

"तर जें निंदेचें काळें घर; ज्याच्या योगानें खरी अपवित्रता जन्मास येते; तें कर्म तामस होय. ६११ जें उत्पन्न झाल्यानंतर डोळ्यांना कांहींच दिसत नाहीं; पाण्याच्या पोटावर जशी रेषा काढावी, ६१२ किंवा पेज घुसळली असतां, किंवा राखुंडी फुंकली असतां, किंवा वाळूचा घाणा गाळला असतां, ६१३ किंवा भूस उपणलें असतां, किंवा आकाशाला मारलें असतां, किंवा वाऱ्याला जाळें घातलें असतां, ६१४ तें सारेंच जसें फुकट होऊन नाश पावतें, त्याप्रमाणें जें केल्यानंतर पाठीमागें कांहींच रहात नाहीं, व्यर्थ जातें. ६१५ बाकी, नरदेहायेवढी संपत्तिही खर्चीं पडून तें कर्म उत्पन्न होतें. परंतु त्यानें जगाचें सुख लयास जातें. ६१६ ज्याप्रमाणें कमलाच्या वनांत कांट्यांचा फांस वाढला, तर तो आपण झिजतो, आणि कमळांचाही पण नाश करतो. ६१७ किंवा पतंग जसा दिव्याच्या द्वेषानें आपण स्वतः जळून जगाच्या डोळ्यांनाही शून्याकार करून सोडतो. ६१८ त्याप्रमाणें सर्वस्व व्यर्थ जावो; आणि आपल्या देहालाही दुःख झालें तरी होवो; तरी जो मागच्यांना अपाय करतो. ६१९ माशी आपणाला खाविवते; परंतु दुसऱ्याचीं ओकून ओकून आंतडीं तोडते. जें आचरणाच्या योगानें त्या दोषाची आठवण होते. ६२० तेही दोष करावयाला मजमध्यें सामर्थ्य आहे कीं नाहीं, ह्या पुढच्याचा विचारही न करितां जो करतो; ६२१ माझा उपाय केवढा आहे? करण्याचा प्रसंग कोणता आहे? केल्यामध्यें आज अर्थ कोणता? ६२२ हा ज्ञानाचा मार्ग अविचाराच्या पायानें पुसून टाकून, कर्मामध्यें जो अहंकारयुक्त होतो; ६२३ आपलें रहाण्याचें ठिकाण जाळून अग्नि जसा चहूंकडे पसरतो; किंवा आपली मर्यादा सोडून समुद्र जसा पुढें सरतो; ६२४ मग थोडें किंवा पुष्कळ हें मनांत आणीत नाहीं; मागें किंवा पुढें पहात नाहीं; मार्ग अमार्ग सारे एक करित निघतो; ६२५ त्याप्रमाणें उचित, अनुचित सारेंच दडपीत, आपलें किंवा दुसऱ्याचें बाकी न ठेवतां, जें कर्म होतें तें निश्चयेंकरून तामस होय. ६२६ ह्याप्रमाणें अर्जुना! गुणत्रयानें भिन्न भिन्न झालेल्या कर्मांचें सोपपत्तिक विवरण केलें. ६२७ आतां कर्ता कर्माभिमानी होऊन ह्याच कर्मांना भजूं लागला ह्मणजे तो जीवही तीन प्रकारचा होतो. ६२८ ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास ह्यांच्या योगानें एकच पुरुष चार प्रकारचा दिसतो, त्याप्रमाणें कर्माच्या भिन्नत्वाप्रमाणें कर्त्यालाही त्रिविधता प्राप्त होते. ६२९ परंतु ह्या तिन्हींमध्यें प्रस्तुत सात्विक कर्ता सांगतों. त्याच्याकडे लक्ष्य देऊन तूं श्रवण कर." ६३०

१ श्रवण कर.

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते २६

[मुक्तसंगः] तरि फळोद्देशें[1] सांडिलिया । वाढिती जेविं सैरळिया[2] । शाखा कां चंदनाचिया । बावनया[3] ॥ ३१ ॥ कां न फळतांही सार्थका । जैसिया नागलतिका[4] । तैसिया करी नित्यादिका । क्रिया जो कां ॥ ३२ ॥ परि फळशून्यता । नाहीं तया विफळता । पैं फळासीचि पंडुसुता । फळें कायिसीं ॥ ३३ ॥ [अनहंवादी] आणि आदरें करी बहुवसें । परि मी कर्ता हें नुमसे[5] । वर्षाकाळींचें जैसें । मेघवृंद ॥३४॥ तेविंचि परमात्मलिंगा । समर्पावयाजोगा । कर्मकलाप[6] पैं गा । निपजावया[7] ॥ ३५ ॥ तया काळांतें नुलंघणें । देशशुद्धीही साधणें । कां शास्त्रांच्या[8] वातीं पाहणें । क्रियानिर्णय ॥ ३६ ॥ [धृत्युत्साहसमन्वितः] वृत्तीकरणा[9] येकवळा[10] । चित्त जावों नेदणें फळा । नियमाचिया सांखळा[11] । वाहे सदा ॥ ३७ ॥ हा निरोधें[12] साहावयालागीं । धैर्याचिया चांगाचांगी ।

१ फलेच्छा. २ सरळ. ३ मलयाचलसंबंधीं. ४ नागवेल. ५ नुपजे. ६ समुदाय. ७ उपजण्यासाठीं. ८ शास्त्ररूप दिव्यानें. ९ इंद्रियें, वृत्ती करणें अशा पाठीं बोलणें व चालणें याला. १० ऐक्यता. ११ प्रतिबंध. १२ अटक.

चिंतवणी जिंती आंगीं । वाहे जो कां ॥ ३८ ॥ आणि आत्मयाचिये आवडी । कर्मे करितां वेरपडीं । देहसुखाचिये परवडीं । येवों न लाहे ॥ ३९ ॥ ऐसा निद्रा दुर्‍हावे । क्षुधा न बाणवे । सुरवाड न पावे । आंगाचा ठावो ॥ ६४० ॥ तंव अधिकाधिक । उत्साह धरी आंगळीक । सोनें जैसें पुटीं ठुक । तुटलिया कसीं ॥ ४१ ॥ जरी आवडी आथी साच । तरी जीवितही सैलव । आंगी घालितां रोमांच । देखिजंती सतिये ॥ ४२ ॥ मा आत्मया येवढिया प्रिया । वोलभेला जो धनंजया । देहही सिदेतां तया । काय खेद होईल ॥ ४३ ॥ म्हणौनि विषय सुरवाड तुटे । जंव जंव देहबुद्धि आटे । तंव तंव आनंद दुणवटे । कर्मी जया ॥ ४४ ॥ [सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः] ऐसेनि जो कर्म करी । आणि कोणे येके अवसरीं । तें ठाके ऐसी सैरी । वाहे जरी ॥ ४५ ॥ तरी कडाडीं मोडे गाडा । तो आपणपें न मनी अवघडा । तैसा ठाकलेनिही थोडां । नोहे जो कां ॥ ४६ ॥ ना तरि आदरिलें । अव्यंग सिद्धी गेलें । तरि तेंही जितिलें । मिरऊं नेणें ॥ ४७ ॥ इया खुणा कर्म करितां । देखिजे जो पंडुसुता । [कर्ता सात्त्विक उच्यते] तयातें म्हणिपे तत्त्वता । सात्त्विक कर्ता ॥ ४८ ॥ आतां राजसा कर्तेया । वोळखणें हें धनंजया । जे अभिलाषा जगाचिया । वेंसौटा तो ॥४९॥

**"तर फळाचा हेतु सोडून, मलयागिरी चंदनाच्या शाखा जशा सरळ वाढतात, ६३१ किंवा नागवेलीला फळें न येतांही, ती जशी सार्थकीं लागते, त्याप्रमाणें जो नित्यादिक क्रिया करतो. ५३२ तरी फळाच्या शून्यतेमुळें त्याला विफलता प्राप्त होत नाहीं. हे पंडुसुता! फळांनाच फळें कशीं येणार? ६३३ आणखी, तीं कर्मे अत्यंत आदरानें करावयाचीं. परंतु वर्षाकाळांतील मेघसमुदाय ज्याप्रमाणें मी कर्ता हें मात्र समजत नाहीं, ६३४ त्याचप्रमाणें परमात्मलिंगाला समर्पण करण्याजोगा कर्मसमुदाय निर्माण होईल, ६३५ त्या काळाचें उल्लंघन करावयाचें नाहीं. देशशुद्धीही साधावयाची; किंवा शास्त्ररूप दिव्यानें शास्त्रनिर्णय पहाणें, ६३६ वृत्तीची ऐक्यता करणें, चित्त फलाकडे जाऊं न देणें, निरंतर नियमांची शृंखळा वहाणें; ६३७ हा प्रतिबंध सहन करण्यासाठीं आंगामध्यें जो धैर्याची उत्तमोत्तम जागृति वाहतो, ६३८ आणखी आत्म्याच्या आवडीनें प्राप्त झालेलीं कर्मे करतांना, देहसुखाच्या अवस्थेमध्यें यावयाला मिळत नाहीं. ६३९ अशी निद्रा दूर जाते; भूक समजत नाहीं; सुखावस्था कसली ती आंगाला स्पर्श करीत नाहीं; ६४० तों तों सोनें आटतांना जसें वजनांत कमी झालें तर, कसामध्यें चढतें, त्याप्रमाणें ज्याचा उत्साह अधिकाधिक वाढतच जातो. ६४१ खरी खरी जर प्रीति असेल, तर तिजपुढें प्राण केवळ तुच्छ होय. अग्नीस प्राण अर्पण करतांना सतीच्या आंगावर रोमांच दृष्टीस पडतात काय? ६४२ मग धनंजया! आत्म्यासारख्या आवडत्या वस्तूशीं ज्याचें प्रेम जडलें, त्याला देहाच्या नाशानें खेद होईल होय? ६४३ म्हणून विषयाचें सुख जों जों कमी होतें; देहबुद्धी जों जों मालवते; तों तों कर्मामध्यें आनंद दुणावत असतो. ६४४ अशा रीतीनें जो कर्म करतो, किंवा कोणा एखाद्या वेळीं तें कर्म बंद पडण्याचा जरी प्रसंग आला, ६४५ तरी, कड्यावरून गाडा पडून मोडला तरी त्याचा तो जसा खेद मानित नाहीं; तसा कर्मामध्यें व्यत्यय आला म्हणूनही जो संकोचित होत नाहीं. ६४६ किंवा आरंभलेलें कर्म निर्विघ्नपणें सिद्धीस गेलें तरी, तें आपण पार पाडलें म्हणून त्याचा अभिमानही मिरवावयाचा समजत नाहीं. ६४७ अर्जुना! अशा लक्षणांनीं कर्म करणारा जो पहाशील, त्यालाच खरोखर सात्विककर्ता असें म्हणावें. ६४८ आतां धनंजया! जगाच्या अभिलाषाचें स्थान, असा जो राजसकर्ता, त्याला ओळखण्याचें लक्षण असें." ६४९**

---

१ चिंता. २ जिवंत, जागरूक. ३ प्राप्त. ४ अवस्थेस. ५ अनुभवास नये. ६ सुखावस्था. ७ अधिक. ८ वजन. ९ तुच्छ, दुःखरूप. १० आगींत उडी घालतांना सतीच्याही अंगावर भयानें रोमांच उभारतात. ११ आवडीनें युक्त झाला. १२ दुःख पावत असतां. १३ स्तब्ध राहे. १४ प्रकार. १५ डोंगराच्या अवघड ठिकाणीं. १६ लहान. १७ स्थान.

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः॥२७॥

[ रागी ] जैसा गांवींचिया [1]कश्मळा । उकरडा होय ये-[2]केंवळा । कां स्मशानीं अमंगळा । आघवयांचि ॥ ६५० ॥ तया परी जो [3]अशेषा । विश्वाचिया [4]अभिलाषा । [5]पायपाखळणियां दोषा । [6]घरटा जाला ॥ ५१ ॥ [कर्मफलप्रेप्सुः] ह्मणोनि फळाचा [7]लाग । देखे जिये [8]असलग । तिये कर्मी चांग । [9]रोहो मांडी ॥ ५२ ॥ आणि आपण जालिये [10]जोडी । [11]उपखों नेदी कवडी । क्षणक्षणा कुरोंडी । जीवाची करी ॥ ५३ ॥ [लुब्धः] कृपणचित्तीं ठेवा आपुला । तैसा दक्ष [12]परावियां माला । बक जैसा [13]खुतला । मासेयासी ॥ ५४ ॥ [हिंसात्मकः] आणि [14]गोवी गेलिया जवळी । [15]झगटलिया आंग [16]फाळी । फळें तरी आंत पोकळीं । [17]बोरांटी जैसी ॥५५॥ तैसें मनें वाचा कायें । भलतया दुःख देत जाये । स्वार्थ साधितां न पाहे । पराचें हित ॥ ५६ ॥ [अशुचिः] तेविंच [18]आंगें कर्मी । आचरण नोहे [19]क्षमी । न निघे मनोधर्मी । [20]अरोचक ॥ ५७ ॥ [21]कनकाचिया फळा । आंत माज बाहेरी [22]मौळें । तैसा सबाह्य दुबळा । शुचित्वें जो ॥ ५८ ॥ [हर्षशोकान्वितः] आणि कर्मजात केलिया । फळ लाहे जरी धनंजया । तरि [23]हरिखें जगा यया । [24]वांकुलियां वाये ॥ ५९ ॥ [कर्ता राजसः परिकीर्तितः] अथवा जें आदरिलें । [25]हीनफळ होय केलें । तरि शोकें तेणें [26]जितिलें । धिक्कारों लागे ॥ ६६० ॥ कर्मी राहाटी ऐसी । जयातें होती [27]देखसी । तोचि जाण त्रिशुद्धीसी । राजस कर्ता ॥ ६१ ॥ आतां यया पाठीं [28]येरें । जो कुकर्माचा [29]आगर । तोही करूं [30]गोचरं । तामस कर्ता ॥ ६२ ॥

"ज्याप्रमाणें गांवच्या साऱ्या केरकचऱ्याला उकिरडा ह्मणून एक ठिकाण असतें; किंवा सारीं अमंगलें तेवढीं स्मशानांत राहतात; ६५० त्याप्रमाणें जो यच्चयावत् विश्वाच्या इच्छेच्या पायधुण्याच्या दोषाला आश्रयस्थान होऊन राहिलेला असतो, ६५१ ह्मणून सहजगत्या ज्या फळाचा लाभ साधण्यासारखा असेल, त्या कर्माचा आरंभ आधीं करावयाचा; ६५२ आणखी उत्पन्न होईल तें आपण घ्यावयाचें, एक कवडी खर्च करावयाची नाहीं, घटके घटकेला जीव ओवाळून टाकावयाचा; ६५३ कृपणाच्या चित्तामध्यें जसा सदासर्वकाल आपला ठेवा असतो, किंवा माशाकरितां बगळा जसा ध्यानस्थ बसतो, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या मालाविषयीं जो दक्ष; ६५४ जसें बोरीचें झाड जवळ गेलें तर अडकवितें; हिसकाहिसकी केली तर आंगाला ओरबाडे काढतें; फळलें तर आंत पोकळ; ६५५ त्याप्रमाणें कोणीही असो, कायावाचामनानें त्याला दुःख देत सुटावयाचें. स्वार्थ साधावयाचा येवढें माहित. त्यांत दुसऱ्याचें हित ह्मणून पहावयाचें नाहीं. ६५६ तसेंच आंगानें कर्म करण्याला सामर्थ्य नसेल तर, मनानें तरी त्या वाईट गोष्टीची इच्छा करतो. ६५७ धोतऱ्याच्या फळाला, आंतून कैफ, आणि बाहेरून कांटे; त्याप्रमाणें जो विचारा शुचित्वाच्या संबंधानें आंतून बाहेरून सारखा; ६५८ आणखी **धनंजया!** प्रत्येक कर्म केल्यानंतर फलप्राप्ति होईल तर, त्या आनंदानें जगाला वेडावून दाखवितो; हिणवितो; ६५९ अथवा एखादें कृत्य करूं लागून त्यांत फलप्राप्ति झाली नाहीं, तर त्याच्या शोकानें आपल्या साऱ्या जन्माला धिक्कारूं लागावयाचें. ६६० कर्मामध्यें अशी वर्तणूक ज्याची दिसून येईल, तो निश्चयेंकरून राजस कर्ता असें समज. ६६१ आतां ह्यापुढें दुसरा कुकर्माचा बाग, असा जो तामस कर्ता तोही स्पष्ट सांगूं." ६६२

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते॥२८

[अयुक्तः] तरि मियां लागलिया कैसें । पुढील जळत असे । हें नेणिजे [1]हुताशें । जियापरी ॥ ६३ ॥ पैं शस्त्रें

---

१ मळ, केरकचरा. २ एक ठिकाण. ३ संपूर्ण. ४ इच्छेसाठीं. ५ पादप्रक्षालनार्थ. ६ आश्रय. ७ संबंध. ८ सोपा. ९ उपक्रम. १० लाभानें. ११ न खर्ची. १२ दुसऱ्याच्या. १३ ध्यानस्थ झाला. १४ अडकवी. १५ स्पर्श झाला असतां. १६ फाडी. १७ बोरीची ढाळी. १८ अंगानें करवत नाहीं तथापि मनानें तरी त्या वाईट गोष्टीची इच्छा करतो. १९ समर्थ. २० अरुचि. २१ धोतऱ्याच्या. २२ कांटवण. २३ हर्षानें. २४ वेडावी. २५ निर्फळ. २६ वांचणें. २७ खचित. २८ इतर, तामस. २९ मुख्य स्थान. ३० प्रत्यक्ष.

१ अग्नीनें.

मियां तिखटें । नेणिजे कैसेनि निवटे । कां नेणिजे काळकूटें । आपलें केलें ॥ ६४ ॥ तैसा पुढीलया आपुलया । घात करीत धनंजया । आदरी वोखटिया । क्रिया जो कां ॥ ६५ ॥ तिया करितां ही वेळीं । काय जालें हें न सांभाळी । चळला वायू वाहटुळी । चेष्टे तैसा ॥ ६६ ॥ पैं करणिया आणि जया । मेळ नाहीं धनंजया । तो पाहूनि पिसेयां । कैंची ञाँय ॥ ६७ ॥ [प्राकृत:] आणि इंद्रियांचें वैरिलें । चरोनि राखे जो जिंयालें । बैलातळीं लागलें । गोचिड जैसें ॥६८॥ हांसिया रुदना वेळ । नेणतां आदरी बाळ । रहाटे उच्छृंखळ । तयापरी ॥ ६९ ॥ जो प्रकृती आंतलेपणें । कृत्याकृत्यस्वाद नेणे । फुगे केरें धालेपणें । उकरडा जैसा ॥६७०॥ [स्तब्ध:] ह्मणौनि मान्याचेनि नांवें । ईश्वराही परी न खाटवे । स्तब्धपणें न मनवे । डोंगरासी ॥ ७१ ॥ [शठ:] आणि मन जयाचें कलाली । राहाटी फुंडी चोरिली । दिठी कीर ते बोली । पण्यांगनेची ॥ ७२ ॥ किंबहुना कपटाचें । देहचि वळिलें तयाचें । तें जिणें कीं जुवाराचें । टिटेघर ॥ ७३ ॥ नोहे तयाचा प्रादुर्भावो । तो साभिलाषभिल्लांचा गांवो । ह्मणौनि नये येवों जावों । तया ठाया ॥ ७४ ॥ [नैष्कृतिक:] आणि आणिकाचें निकें केलें । विरु होय जया आलें । जैसें अपेय पैया मिनलें । लवण करी ॥ ७५ ॥ कां हवि ऐसा पदार्थ । घातलिया आगीआंत । तेचि क्षणीं धडाडित । अग्नि होय ॥ ७६ ॥ ना ना सुद्रव्यें गोमटीं । जालिया शरीरीं पैठी । होउनि ठाती किरीटी । मळचि जेविं ॥ ७७ ॥ तैसें पुढिलाचें बरवें । जयाच्या भीतरीं पावे । आणि विरुद्धचि आघवें । होऊनि निगे ॥ ७८ ॥ जो गुण घे दे दोष । अमृताचें करी विष । दूध पाजिलिया देख । व्याळ जैसा ॥ ७९ ॥ [अलस:] आणि ऐहिकीं जियावें । जेणें परत्रा साच यावें । तें उचित कृत्य पावे । अवसरीं जिये ॥ ६८० ॥ तेव्हां जया आपैसी । निद्रा ये ठेविली ऐसी । दुर्व्यवहारीं जैसी । विटाळें लोटे ॥ ८१ ॥ पैं द्राक्षरसा आम्ररसा । वेळे तोंड सडे वायसा । कां डोळे फुटती दिवसा । डुडुळाचे ॥ ८२ ॥ तैसा कल्याण काळ पाहे । तैं तयातें आळस खाये । ना प्रमादीं तरि होये । तो ह्मणे तैसें ॥ ८३ ॥ [विषादी] जेविंचि सागराच्या पोटीं । जळे अखंड आगिठी । तैसा विषाद वाहे गांठीं । जिवाचिये जो ॥८४॥ लेंडोरांआगीं धूमावधि । कां अपाना आंगीं दुर्गंधि । तैसा जो जीवितावधि । विषादें केला ॥ ८५ ॥ [दीर्घसूत्री च] आणि कल्पांताचिया पारा । वेगळेंही जो वीरा । सूत्र धरी व्यापारा । साभिलाषा ॥ ८६ ॥ अगा जगाही परौती । शुचा वाहे पैं चित्तीं । करितां विषीं हातीं । तृणही न लगे ॥ ८७ ॥ [कर्ता तामस उच्यते] ऐसा जो लोकाआंत । पापपुंज मूर्त । देखसी तो अंव्याहत । तामस कर्ता ॥ ८८ ॥ एवं कर्म कर्ता ज्ञान । या तिहींचें त्रिधा चिन्ह । दाविलें तुज सुजन । चक्रवर्ती ॥ ८९ ॥

**"तर मीं स्पर्श केला असतां माझ्यापुढचें कसें जळतें, हें जसें अग्नीला समजत नाहीं; ६६३ मी किती तीक्ष्ण आहें; दुसऱ्यास कसें कांपतों; हें जसें शस्त्राला समजत नाहीं; किंवा कालकूटाला जशी आपली करणी समजत नाहीं; ६६४ त्याप्रमाणें धनंजया! आपल्या पुढच्याचा घात करण्यासाठीं जो दुष्कर्में आचरण करतो. ६६५ आणखी तीं करतांनाही त्यांचा परिणाम काय झाला ह्याकडे लक्ष्यही पोंचवित नाहीं. वारा जसा वावटळींत सांपडला ह्मणजे फिरत राहतो, त्याप्रमाणें व्यापार करतो. ६६६ हे धनंजया! ज्याच्या कृतीला आणि सिद्धीला मेळ नाहीं. त्याच्या पुढें वेड्याची कथा ती काय? ६६७ बैलाच्या खालीं चिकटलेल्या गोचिडाप्रमाणें इंद्रियांच्या तोंडांत जें जें ह्मणून पडेल, तें तें खाऊन जो जीव जगवितो; ६६८ मुलाला कांहीं समजत नसल्यामुळें, तें जसें वेळ अवेळ कांहींच न पाहतां पाहिजे तेव्हां हासूं लागतें, व पाहिजे तेव्हां रडूं लागतें, आणि यथेच्छ वाग्डत असतें. त्याप्रमाणें ६६९ मायेनें व्यापल्यामुळें ज्याला कृत्याकृत्याची रुचि समजत नाहीं. केरानें जसा यथेच्छ उ-**

१ मरे. २ वाईट. ३ हाले. ४ वेड्याला, मूर्खाला. ५ टिकाव. ६ तोंडीं पडलेलें. ७ जीव. ८ हंसण्यास व रडण्यास. ९ प्रारंभी. १० यथेच्छ. ११ व्यापलेपणें. १२ कर्माकर्मांची रुचि. १३ तृप्तपणानें. १४ न लवे. १५ कपटी, दारू विकणारांसारखें लोकांस माल देऊनही वेड लावणारें. १६ खरी. १७ वेश्येची. १८ चोरी, चाहाडी, सिंदळकी, या तिव्यावरचें घर. १९ प्रगटपण. २० विरुद्ध. २१ दुधाला. २२ घृत. २३ प्रज्वलित. २४ प्राप्त. २५ राहती. २६ सर्प. २७ या लोकीं वांचावें. २८ परलोकीं. २९ दुष्कृत्य करतांना. ३० विटाळशीप्रमाणें दूर जाते. ३१ कावळ्याला.

१ घुबडाचे. २ असावधपणीं. ३ तो तैसें होय ह्मणे. ४ खेद. ५ लेंड्यांच्या विस्तवांत. ६ गुदद्वारचा वारा. ७ पलीकडचे. ८ शोक. ९ पापाचा ढीग. १० निरंकुश.

किरडा फुगतो, त्याप्रमाणें जो फुगलेला असतो. ६७० त्यामुळें आंगामध्यें इतका ताठा कीं, ईश्वरासही खालीं वांकावयाचें नाहीं. गंभीरपणामध्यें डोंगरालाही जो तुच्छ मानतो; ६७१ मन ज्याचें कपटी; वागणूक, दृष्टि, व भाषण तर खरोखर वेश्येचें. ६७२ किंबहुना त्याचा सारा देह कपटाचाच घडलेला असतो. त्याचें जिणें ह्मणजे तिव्यावरील जुवाराचेंच घर होय. ६७३ त्याचें प्रगटीकरण तें प्रगटीकरण नव्हे. तर तो लुटारू भिल्लांचा गांव होय. ह्मणून त्या ठिकाणीं जाऊंही नये. ६७४ आणखी दुसऱ्याचें चांगलें केलें तर, तें त्याला विरुद्ध होतें. ज्याप्रमाणें मीठ दुधांत मिसळलें असतां, त्याला तें पिण्यास अयोग्य करतें, ६७५ किंवा तुपासारखा पदार्थ अग्नींत घातला, तरी तो लागलाच प्रज्वलित अग्नीसारखाच होतो. ६७६ किंवा **किरीटी!** चांगले चांगले पदार्थ, शरीरांत गेले असतां, जसे मल होऊन राहतात; ६७७ त्याप्रमाणें दुसऱ्याचें चांगलें तेवढें ज्याच्या आंत जातें, आणि त्याच्या उलट होऊन बाहेर पडतें. ६७८ सापाला दूध पाजिलें असतां, तो जसें अमृताचें विष करून सोडतो, त्याप्रमाणें जो गुण घेतो, आणि दोष देतो. ६७९ आणखी इहलोकीं संरक्षण व्हावें, आणि परलोकींही उपयोगीं पडावें, असें उचित कृत्य करण्याची जेव्हां वेळ येते, ६८० तेव्हां ज्याला आपोआप ठेवल्यासारखी निद्रा येते. आणि दुष्कृत्य करण्यामध्यें मात्र ती विटाळशीप्रमाणें लांब पळते. ६८१ द्राक्षाला आणि आंब्याला फळें आलीं ह्मणजे कावळ्याला मुखरोग येतो. किंवा घुबडाचे डोळे दिवसा फुटतात; ६८२ त्याप्रमाणें कल्याणाचा काल आला कीं त्याला आळस खातो. किंवा चुकीमध्यें तो ह्मणेल तसें चालतो; ६८३ सागराच्या पोटामध्यें ज्याप्रमाणें अखंड अग्नि जळत असतो, त्याप्रमाणें जिवाच्या गाठीमध्यें जो विषाद वाळगतो; ६८४ शेणीच्या विस्तवामध्यें धूर, किंवा अपान वायूमध्यें दुर्गंधी, त्याप्रमाणें जो जन्मभर विषादानें—दुःखानेंच—भरलेला; ६८५ आणखी हे **वीरा!** जो कल्पांताच्याही पलीकडचे निराळयाच अभिलाषाचें सूत्र धरतो, ६८६ **बाबा!** जगामध्यें दृष्टी सुद्धां पडावयाचा नाहीं, इतका शोक जो मनामध्यें वाहतो. पण इतकें करूनही, ज्याच्या हातीं गवताची एक काडीही लागत नाहीं. ६८७ असा जो लोकांमध्यें पापाची केवळ राशी, असा पहाशील, तो निःसंशय तामस कर्ता होय. ६८८ ह्याप्रमाणें हे **सज्जनराजशिरोमणे!** कर्म, कर्ता, आणि ज्ञान ह्या तिहींचीं तीन तीन लक्षणें तुला दाखवून दिलीं." ६८९

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥

[बुद्धेर्भेदं] आतां अविद्येच्या गांवीं । मोहाची वेढूनि मेदवी । संदेहाचीं आधवीं । लेऊनि लेणीं ॥ ६९० ॥ आत्मा निश्चयाची बरव । जया आरिसां पाहे सावयव । तिये बुद्धिचीही धांव । त्रिधा असे ॥ ९१ ॥ [गुणतस्त्रिविधं शृणु] अगा सत्वादिगुणीं इहीं । काइ एक तिहीं ठायीं । न कीजेचि येथ पाहीं । जगामाजी ॥ ९२ ॥ आगी न वसतां पोटीं । कवण काष्ठ असे सृष्टी । तैसें तें कैचें दृश्यकोटी । त्रिविध जें नोहे ॥ ९३ ॥ ह्मणौनि तिहीं गुणीं । बुद्धी केली त्रिगुणी । [धृतेश्चैव] धृतीसिही वांटणी । तैसीचि असे ॥९४॥ [प्रोच्यमानमिति] तेंचि येक वेगळालें । यथाचिन्हीं अळंकारलें । सांगिजेल उपाइलें । भेदलेपणें ॥ ९५ ॥ परि बुद्धि धृति इयां । दोहीं भागांमाजि धनंजया । आधीं रूप बुद्धीचिया । भेदासि करूं ॥ ९६ ॥ तरि उत्तम मध्यम निकृष्टा । संसारासि गा सुभटा । प्राणियां येतिया वाटा । तिनी आथी ॥ ९७ ॥ जे करणीय काम्य निषिद्ध । ते हे मार्ग तिन्ही प्रसिद्ध । संसार भय संबंध । जीवा ययां ॥ ९८ ॥

"आतां अविद्येच्या गांवामध्यें मोहाचें वस्त्र गुंडाळून, संशयाचीं सारीं भूषणें घालून, ६९० आत्मनिश्चयाचें मूर्तिमंत स्वरूप जिच्या आरशांत पाहतो, त्या बुद्धीची धांवही तीन प्रकारची असते. ६९१ अरे! हे सत्वादि तीन

१ वस्त्र. २ चांगुलपणा. ३ मूर्तिमान्. ४ दृश्यवर्गात. ५ धृतीला. ६ आरंभिलेलें. ७ कनिष्ठ. ८ विहित निष्काम कर्म. ९ फलेच्छायुक्तकर्म.

गुण कशा कशाचे ह्मणून ह्या जगांत तीन प्रकार करीत नाहींत? ६९२ पोटामध्यें अग्नि नाहीं, असें लांकूड ह्या सृष्टीमध्यें कोणचें? तद्वत् दृश्य वर्गामध्यें तीन प्रकारचें झालेलें नाहीं, असें काय आहे? ६९३ ह्मणून ह्या तिहींनीं बुद्धीला त्रिगुणात्मक केलेली आहे. धृतीलाही तशीच तीन प्रकारची वांटणी आहे. ६९४ तेंच एक निरनिराळें ज्याच्या त्याच्या लक्षणांनीं सुशोभित झालेलें यथाप्रकारें सांगूं. ६९५ परंतु **धनंजया!** बुद्धि आणि धृति ह्या दोन्ही भागांपैकीं बुद्धीच्या भेदाचें निरूपण आधीं करूं. ६९६ तर हे **वीरश्रेष्ठा!** प्राण्यांना संसारामध्यें आल्यावर उत्तम, मध्यम, आणि कनिष्ठ ह्या तीन वाटा मिळालेल्या असतात. ६९७ करण्यास योग्य, कामनिक, आणि निषिद्ध हे तीन मार्ग प्रसिद्ध आहेत. आणि ह्यांच्या योगानें ह्या जीवांना संसाराच्या भयाचा संबंध आहे.” ६९८

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी ३०

[प्रवृत्तिं च] ह्मणोनि अधिकारें मानिलें । जें विधीचेनि बोधें आलें । तें येकचि येथ भलें । नित्य कर्म ॥ ९९ ॥ [कार्ये] तेंचि आत्मप्राप्ति फळ । दिठी सूनि केवळ । कीजे जैसें कां जळ । सेविजे तान्हे[1] ॥ ७०० ॥ येतुलेनि तें कर्म । [अभये] सांडी जन्मभय विषम । करूनि दे सुगम । मोक्षसिद्धि[2] ॥ १ ॥ ऐसें करी तो भला । संसारभयें सांडिला । करणीयत्वें आला । मुमुक्षुभागा ॥ २ ॥ [मोक्षं च] तेथ जे बुद्धि ऐसा । बळिया बांधे भरंवसा । मोक्ष ठेविला ऐसा । जोडेल येथ ॥ ३ ॥ ह्मणौनि निवृत्तिचि[3] मांडली । सूनि प्रवृत्तितळीं । इये कर्मी बुडकुळी[4] । द्यावी कीं ना ॥ ४ ॥ तृषार्ता उदकें जिणें । कां पुरीं पडलिया पेंव्हणें[5] । अंधकूपीं गति किरणें । सूर्याचेनि ॥ ५ ॥ ना ना पथ्येसीं औषध लाहे । तरी रोगें दाटलाही[6] जिये । कां मीनां[7] जिव्हाळा होये । जळाचा जरी ॥ ६ ॥ तरि तयाच्या जीविता । नाहीं जेवीं अन्यथा । तैसें कर्मी इये वर्ततां । जोडेचि मोक्ष ॥ ७ ॥

हें करणीयाचिया कडे । जें ज्ञान आथी[1] चोखडें[2] । [निवृत्तिं च] आणि अकरणीय हें फुडें । ऐसें जाण ॥ ८ ॥ [अकार्ये] जीं तियें काम्यादिकें । संसारभयदायकें । अकृत्यपणाचें आंबुखें[3] । पडिलें जयां ॥ ९ ॥ तिये कर्मी अकार्यी । [भये] जन्ममरणसमयीं । प्रवृत्ति पळवी पायीं । मागिलींचि ॥ ७१० ॥ पैं आगीमाजि न रिघवे[4] । अथावीं[5] न घलवे । धगधगीत[6] नांगवे[7] । शूळ जेवीं ॥ ११ ॥ कां काळियानाग धुंधुवात[8] । देखोनि न घालवे हात । न वचवे खोपेआंत[9] । व्याघ्राचिये ॥ १२ ॥ तैसें कर्म अकरणीय[10] । देखोनि महाभय । उपजे निःसंदेह । बुद्धी जिये ॥ १३ ॥ [बंधं] वाढिलें रांधूनि विखें । तेथ जाणिजे मृत्यु न चुके । तेवि निषेधीं कां कां देखे । बंधातें जो ॥ १४ ॥ [या वेत्ति] मग बंधभयभरितीं । तियें निषिद्धीं प्राप्तीं । विनियोगें[11] जाणे निवृत्ती । कर्माचिये ॥ १५ ॥ ऐसेनि कार्याकार्यविवेकी । जे प्रवृत्ति[12] निवृत्ति मापकीं[13] । खरा कुडा[14] पारखी । जिया परी ॥ १६ ॥ [बुद्धिः सा पार्थ सात्विकी] तैसी कृत्याकृत्यशुद्धी । बुझे[15] जे निरवधी[16] । सात्विक ह्मणिपे बुद्धी । तेचि तूं जाण ॥ १७ ॥

“ह्मणून अधिकाराला योग्य झाले; जें प्रारब्धाच्या ओघानें आलें; तें एक नित्यकर्मच येथें योग्य आहे. ६९९ तेंच आत्मप्राप्तीच्याच एका फलावर दृष्टि ठेवून, तान्हेला जसें पाणी प्यावयाचें त्याप्रमाणें आचरण करावें. ७०० इतक्यानें तें कर्म विषम असें जें जन्मभय तें दूर करून मुक्तीचा लाभ सुलभ करून देतें. ७०१ असें करील तोच उत्तम; आणि त्याचेंच संसारभय नाहींसें झालें. तो कर्माच्या योगानेंच मुमुक्षूच्या योग्यतेला पोंचतो. ७०२ तेव्हां येथें जी बुद्धि अशा प्रकारचा दृढनिश्चय करून राहते, तिला ठेवल्यासारखा मोक्ष प्राप्त होतो. ७०३ ह्मणून निवृत्तीला प्रवृत्तीच्या तळाशीं घालून ह्याच कर्मामध्यें बुडी देऊं नये काय? ७०४ तृषार्ताला उदक हेंच जीवन; किंवा पुरांत पडलेल्यास पोंहणें; अंधारमय विहिरीमध्यें सूर्याच्या किरणानेंच गति होते. ७०५ किंवा पथ्यासहवर्तमान औषध मिळालें तर रोगानें ग्रस्त

१ तृषाशांत्यर्थ. २ मुक्तिलाभ. ३ निवृत्तीला=अंतर्मुखवृत्तीला, प्रवृत्तीचे=विषयोन्मुख वृत्तीचे खालीं घालून प्रवृत्तिमार्ग धरतो. ४ बुडी मारणें. ५ पोंहणें. ६ व्यापला असतांही वांचतो. ७ मत्स्याला.

१ आहे. २ स्पष्ट, खरें. ३ आवरण. ४ शिरवे. ५ खोल पाण्यांत. ६ प्रखर. ७ धरतां येत नाहीं. ८ फूत्कार टाकीत. ९ जाळींत. १० निषिद्ध. ११ व्यवस्था. १२ स्वार्थत्यागाच्या. १३ मापानें. १४ खोटा. १५ समजे. १६ अत्यंत.

झालेलाही वांचतो. किंवा माशाला जर जळाचा जिव्हाळा मिळाला, ७०६ तर त्याच्या जिवाला मग भीति उरली नाहीं. त्याप्रमाणें ह्या कर्मामध्यें वागत असतांना मोक्ष ह्या मिळावयाचाच. ७०७ ह्या उचित कर्माकडे जें ज्ञान लागतें तें उत्तम होय. आणि अनुचित कर्माचें लक्षण असें असतें हेंही लक्ष्यांत ठेव. ७०८ जीं काम्यादिक; संसारभय दाखविणारीं; ज्यांच्यावर अकृत्यपणाचा—निषिद्धतेचा—शिंतोडा पडलेला, ७०९ अशा कर्मापासून, अकार्यापासून, जन्ममरणाच्या प्रसंगांतून प्रवृत्तीला जी मागच्या पायानें पळविते, ७१० अग्नीमध्यें शिरवत नाहीं; खोल पाण्यांत उडी घालवत नाहीं; प्रखर शूळाला जसें धरवत नाहीं; ७११ किंवा कृष्णसर्प फूत्कार टाकित असतां त्याला हात घालवत नाहीं; व्याघ्राच्या गुहेमध्यें जाववत नाहीं; ७१२ त्याचप्रमाणें निषिद्धकर्म पाहिलें असतां, ज्याच्या बुद्धीला निःसंशय महाभय उत्पन्न होतें. ७१३ विषयुक्त स्वयंपाक करून वाढला तर तेथें मृत्यु चुकावयाचा नाहीं, हें पक्कें समजावें. त्याप्रमाणें निषिद्धकर्मामध्यें बंध आहे असें पाहून जिला, ७१४ पुढील बंधाचें भय घेऊन तीं निषिद्धकर्में प्राप्त झालीं असतां, त्या कर्मांची निवृत्ति करणें माहित असते. ७१५ अशा प्रकारें कार्याकार्यविचार करते; प्रवृत्ति निवृत्तीच्या मापानें, परीक्षक ज्याप्रमाणें खऱ्याची आणि खोट्याची निवड करतो, ७१६ त्याप्रमाणें उचित कृत्य कोणतें, आणि अनुचित कृत्य कोणतें, हें जिला उत्तम तऱ्हेनें कळतें, तिलाच सात्विक बुद्धि ह्मणतात हें तूं लक्ष्यांत ठेव." ७१७

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ३१

[ययेति] आणि बकाच्या गांवीं । घेपे क्षीरनीर संकलवी । कां अहोरात्रींची गोंवी । आंधळें नेणे ॥ १८ ॥ जया फुलाचा मकरंद फावे । तो काष्ठें कोरूं धांवे । परि भ्रमरपणा नव्हे । अव्हांटा जेविं ॥ १९ ॥ तैसीं इयें कार्याकार्यें । धर्माधर्मरूपें जियें । [अयथावत्प्रजानाति] तियें न चोजवितां जाये । जाणती जे कां ॥ ७२० ॥ अगा डोळांवीण मोतियें । घेतां पाँड मिळे विपायें । न मिळणें तें आहे । ठेविलें तेथें ॥ २१ ॥ तैसें अकरणीय अवचटें । नोडवे तरीच लोटे । येरवीं जाणें एकवटें । दोन्हीं जे कां ॥ २२ ॥ [बुद्धिः सा पार्थ राजसी] ते गा बुद्धि चोखविखीं । जाण येथ राजसी । अक्षत टाकिली जैसी । मांदियेवरी ॥ २३ ॥

"आणखी बगळ्याच्या गांवामध्यें दूध व पाणी सरसकट चालतें. किंवा आंधळ्याला दिवस आणि रात्र ह्यांतील संबंध कळत नाहीं. ७१८ ज्याला फुलाचा मकरंद मिळतो, तो लांकडें पोखरावयालाही धांवतो. परंतु भ्रमरपणांत जसा बदल होत नाहीं; ७१९ त्याप्रमाणें हीं धर्माधर्मरूपानें असणारीं जीं कार्याकार्यें, त्यांतील भेदाभेद ज्यास कळत नाहीं. ७२० बाबा! नीट पाहिल्यावांचून मोत्यें घेतलीं, तर चांगलीं मिळतील एखादे वेळीं; परंतु चांगलीं न मिळणें हें मात्र अगदीं ठेवल्यासारखें असावयाचें. ७२१ त्याप्रमाणें अनुचित कृत्य अकस्मात् प्राप्त न झालें तर मात्र घडावयाचें नाहीं. बाकी दोन्हींची योग्यता जेथें एकच. ७२२ साऱ्या गांवाला जसें पैपाहुण्यासुद्धां आमंत्रण द्यावें, त्याप्रमाणें चांगल्या वाईटाची परीक्षा ज्या बुद्धीस नाहीं, ती राजस बुद्धि असें समज. ७२३

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ३२

[अधर्ममिति] आणि राजा जिया वाटा जाये । ते चोरांसि आंडव होये । कां राक्षसां दिवो पाहे । राति होउनी ॥ २४ ॥ ना ना निर्धनचि निदैवां । होये कोळसयाचा उंडवा । पैं असतें आपणपें जीवा । नाहीं जालें ॥ २५ ॥ तैसें धर्मजात तितकें । जिये बुद्धीसी पातकें । साच तें लटिकें । ऐसेंचि बुझे ॥ २६ ॥ [सर्वेति] ते आघवेचि अर्थ । करूनि

१ बगळ्याच्या. २ दूध व पाणी. ३ एकत्र मिश्र, सरसकट.

१ मिळे. २ आडवाट होत नाहीं. ३ न जाणों येतां. ४ योग्यता. ५ क्वचित्. ६ अकस्मात्. ७ प्राप्त न होय. ८ शुद्धविषयीं. ९ सभेवर. १० अरण्य. ११ दिवस उजाडे. १२ ठेवा. १३ भाग्यहीनाला. १४ रास, ढीग. १५ वाटे.

घाली अनर्थ । गुण ... स्थित । दोषचि मानी ॥२७॥ किंबहुना श्रुतिजातें । जें ... ष्टूनि केलें सरतें । तेतुलेंहि उँपरतें । जाणे जे बुद्धी ॥ २८ ॥ कोणातेंही न पुसतां । तामसी जाणावी पंडुसुता । रात्री काय धर्मार्थी । साच करावी ॥ २९ ॥ एवं बुद्धीचे भेद । तिन्ही तुज विशद । सांगीतले स्वबोध- । कुमुदचंद्रा ॥ ७३० ॥ आतां ययाचि बुद्धिवृत्ती । निष्टंकिलां कर्मजातीं । खांद मांडिजे धृती । त्रिविधा जया ॥ ३१ ॥ तिये धृतीचेही विभाग । तिन्हीं यथालिंग । सांगीजति चांग । अवधान दे ॥ ३२॥

**"आणखी राजा ज्या वाटेनें जातो, ती वाट चोराला अरण्य होते; किंवा राक्षसांना दिवस हा रात्रीच्या रूपानें उदयास येतो;७२४ किंवा भाग्यहीनाला द्रव्याचा ठेवा, कोळशाचा ढीग होतो; व आपणाजवळ असलेलेंही जीवाला जसें नाहींसें होतें. ७२५ त्याप्रमाणें धर्म ह्मणून जितकें जितकें तितकीं तितकीं ज्या त्या बुद्धीस पातकें; खरें ह्मणून जितकें असेल, तितकें खोटें अशीच तिची समजूत. ७२६ जे अर्थ असतात त्या सान्यांचाच जी अनर्थ करून सोडते; आणि व्यवस्थित जे जे गुण असतील ते ते दोषच मानते. ७२७ किंबहुना प्रत्येक श्रुतीनें स्थापन करून जें जें मान्य केलेलें तितकें विपरीत–उलट–मानणारी जी बुद्धि; ७२८ हे अर्जुना! ती बुद्धि तामसी आहे हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें. कोणाला विचारण्याचें कारण नाहीं. धर्माथाला जी खरोखर रात्र–अभाव–करणारी ती काय करावयाची? ७२९ अशा प्रकारें हे ज्ञानरूप कुमुदिनीस विकसित करणाऱ्या चंद्रा! बुद्धीचे तीन भेद. तुला स्पष्ट करून सांगितले. ७३० आतां ह्याच बुद्धीच्या वृत्तीनें कर्मामध्यें प्रवृत्त झालें असतां, त्याच्या धृतीचेही तीन प्रकार होतात. ७३१ त्या धृतीचे ते तीनही भाग यथातथ्य रीतीनें सांगतों. तिकडे लक्ष्य दे." ७३२**

धृत्या यया धारयते मनःप्राणेंद्रियक्रियाः ।
योगेनाऽव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी ३३

[धृत्या यया] तरि उदेलिया दिनकर । चोरीसि थोके आधार । कां राजाज्ञा अव्यवहार । कुंठवी जेवीं ॥ ३३ ॥ ना ना पवनाचा सांट । वाजीनलिया नीट । आंगेंसीं बोभाट । सांडिती मेघ ॥ ३४ ॥ कां अगस्तीचेनि दर्शनें । सिंधु घेउनी ठाती मौनें । चंद्रोदयीं कमळवनें । मिठी देती ॥३५॥ हें असो पावो उचलिला । मदमुख न ठेविती खालां । गर्जोनि पुढां जाला । सिंह जरी ॥ ३६ ॥ तैसा जो धीर । उठलिया अंतर । मनादिकें व्यापार । सांडिती उभीं ॥ ३७ ॥ [इंद्रियक्रियाः] इंद्रिया विळयांचिया गांठी । अपैसया सुटती किरीटी । मन मायेच्या पोटीं । रिगती दांही ॥ ३८ ॥ [प्राण–] अधोर्ध्वं गुढें काढी । प्राण नवांची पेंडी । बांधोनि घाली उडी । मध्यमेमाजी ॥ ३९ ॥ संकल्पविकल्पाचें लुगडें । सांडूनि मन उघडें । बुद्धि मागिलेकडे । उगीचि बैसे ॥ ७४० ॥ [धारयते] ऐसी धैर्यराजें जेणें । मन प्राण करणें । स्वचेष्टांचीं संभाषणें । सांडवीजती ॥ ४१ ॥ [योगेन] मग आगवींचि सेंढीं । ध्यानाच्या आंतुल्या मेढीं । कोंडिजती निरवंडी । योगाचिये ॥ ४२ ॥ [अव्यभिचारिण्या] परी परमात्मया चक्रवर्ती । उँगाणिती जंव हातीं । तंव लांच न घेतां धृती । धरिजती जिया ॥ ४३ ॥ [धृतिः सा पार्थ सात्विकी] ते गा धृति येथें । सात्विक हें निरुतें । आईक अर्जुनातें । श्रीकांत ह्मणे ॥ ४४ ॥

**"तर सूर्य उगवला ह्मणजे चोरीचा आश्रय तुटतो, किंवा दुर्व्यवहार असेल तर राजाज्ञेनें बंद होतो. ७३३ किंवा वाऱ्याचा वेग झपाट्यानें सुटला ह्मणजे मेघ विद्युद्गर्जना वगैरे सोडून देतात. ७३४ किंवा अगस्तीला पाहिलें कीं समुद्र मौन धरून बसतात; चंद्रोदय झाला कीं, कमलवनें कोमेजतात. ७३५ हें असो. गर्जना करून सिंह जर पुढें आला, तर हत्ती सुद्धां उचललेला पाय खालीं टेवित**

१ स्थापून. २ मान्य. ३ उलटें, विपरीत. ४ धर्मार्थाला जी खरोखर रात्र=अभाव करणारी ती काय करावयाची. ५ स्पष्ट. ६ ज्ञानरूप कमलास प्रफुल्लित करणाऱ्या चंद्रा. ७ निश्चयात्मक झाला. ८ वेगवेगळेपणा. ९ धैर्य. १० जसे आहेत तसे.

१ थांबे. २ आश्रयस्थान, अंधकार अशा पार्टी, चोरी व अंधकार हीं दोन्ही नाहींशीं होतात. ३ वेग. ४ वीज इत्यादि. ५ गर्जना. ६ राहाती. ७ मिटती. ८ हत्ती. ९ अंतरांतून. १० दाहा इंद्रियें. ११ खालतें वरतें. १२ आवरण. १३ सुषुम्नेंत. १४ शुद्ध, मोकळीं. १५ हृदयीं. १६ कुशलतेनें. १७ जाणती.

नाहींत. ७३६ त्याप्रमाणें अंतःकरणांतून धीर उत्पन्न झाला कीं, मनादिक आपआपले व्यापार उभ्याउभ्याच सोडून देतात. ७३७ हे **किरीटी!** इंद्रियांच्या आणि विषयांच्या गांठी आपोआपच सुटतात. दाही इंद्रियें मनाच्या आणि मायेच्या पोटांत शिरतात. ७३८ प्राण हा खालचीं व वरचीं आच्छादनें काढून नवद्वारांची पेंडी बांधून सुषुम्नेमध्यें उडी घालतो. ७३९ संकल्प विकल्पाचें वस्त्र सोडून मन उघडें पडतें. आणि बुद्धि मागच्या बाजूला उगेच बसलेली असते. ७४० अशा प्रकारें धैर्यरूप राजा, मन, प्राण, व इंद्रियें ह्यांच्या व्यापारांचीं संभाषणेंच बंद करवितो. ७४१ मग हीं सारीं ध्यानाच्या आंतील गाभाऱ्यांत योगाच्या कौशल्यानें जी कोंडून ठेवते, ७४२ आणि **परमात्मरूप** जो सार्वभौम राजा तो त्यास आपल्या ताब्यांत येईपर्यंत, त्यांजकडून लांच लुचपत कांहींएक न घेतां जी त्यांस धरून ठेवते," ७४३ **श्रीकांत** ह्मणतात "बा **अर्जुना!** तीच खरोखर सात्विक धृति होय. हें ऐकून ठेव." ७४४

यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन ।
प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी॥३४॥

[ययेति] आणि होऊनियां शरीरीं । स्वर्गसंसाराच्या दोहीं घरीं । नांदे जो पोटभरी । त्रिवर्गोपायें[1] ॥ ४५ ॥ तो मनोरथांच्या सागरीं । धर्मार्थकामांच्या तारुवांवरी[2] । जेणें धैर्यबळें करी । क्रिया वाणिज[3] ॥ ४६ ॥ [प्रसंगेनेति] जें कर्म भांडवला सुये[4] । तयाची चौगुणीं येती पाहे । येवढें साहस वाहे । जिया धृती ॥ ४७ ॥ ते गा धृती राजस[5] । पार्था येथ परियेस । आतां आइक तामस । तिसरी जे कां ॥ ४८ ॥

"आणखी शरीरामध्यें उत्पन्न होऊन धर्म, अर्थ आणि मोक्ष ह्या तीन उपायांनीं जो पोटभर नांदतो, ७४५ तो मनोरथरूप समुद्रामध्यें धर्मार्थकामाच्या गलबतावरचा मोठ्या साहसानें व्यापार करतो. ७४६ तो जें कर्म भांडवलांत घा.. ध, त्याची चौपट होती हें ध्यानांत ठेव. इतकी ज्याची धृति साहस करते; ७४७ हे **पार्था!** ऐक. ती धृति राजस होय. आतां तिसरी जी तामस धृति ती ऐक." ७४८

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।
न विमुंचति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी॥३५॥

[यथा] तरि सर्वाधमें गुणें । जयाचें कां रूपा येणें । कोळसा काळेपणें । घडला जैसा ॥ ४९ ॥ अहो प्राकृत[1] आणि हीन । तयाही कीं गुणत्वाचा मान । परि न ह्मणिजे पुण्यजन[2] । राक्षस काई ॥ ५५० ॥ पैं ग्रहांमाजि इंगळ[3] । तयातें ह्मणिजे मंगळ[4] । तैसा तमीं धसाळ[5] । गुणशब्द हा ॥ ५१ ॥ जे सर्वदोषांचा वसौटा[6] । तमचि कैंमऊनि[7] सुभटा । उभारिला आंगवठा[8] । जया नराचा ॥ ५२ ॥ [स्वप्नं] तो आळस सूनि[9] असे कांखे । ह्मणौनि निद्रे कहीं न मुके । पापें पोशितां दुःखें । न सांडिजे जेविं ॥ ५३ ॥ [भयं] आणि देहा धनाचिया आवडी । सदा भय तयातें न सांडी । विसंवूं न सके धोंडी[10] । काठिण्य जैसें ॥ ५४ ॥ [शोकं] आणि पदार्थजातीं स्नेहो[11] । बांधे ह्मणौनि तो शोकें ठावो । केला न शके पाप जावों । कृतघ्नौनि[12] जैसें[13] ॥ ५५ ॥ [विषादं] आणि असंतोष जीवेंसीं । धरूनि ठेला[14] अहर्निशीं । ह्मणौनि मैत्री तेणेंसीं । विषादें केली ॥ ५६ ॥ लसणातें न सांडी गंधी[16] । कां अपथ्यशीळातें व्याधी । तैसी केली मरणावधी । विषादें तया ॥ ५७ ॥ [मदमेव च] आणि वयसा वित्तकाम । ययाचा वाढवी संभ्रम । ह्मणौनि मदें आश्रम । तोचि केला ॥ ५८ ॥ [धृतिः सा पार्थ तामसी] आगीतें न सांडी ताप । सळातें जातीचा साप । कां जगाचा वैरी वासिप । अखंड जैसा ॥ ५९ ॥ ना तरि शरीरातें काळ । न विसंबे कवणे वेळ । तैसा आथि अढळ । तामसीं मद ॥ ५६० ॥ [न विमुंचति दुर्मेधाः] एवं पांचही हें निद्रादिक । तामसाच्या ठाईं दोख । जिया धृती देख । धरिले आहाती ॥ ६१ ॥ तिये गा धृती नांवें । तामसी येथ हें जाणावें । ह्मणीतलें तेणें देवें । जगाचेनि ॥ ६२ ॥ एवं त्रिविध जे बुद्धि । कीजे कर्मनिश्चयो आधि । तो धृती या सिद्धि ।

---

१ धर्म, अर्थ, काम या तीन उपायांनीं. २ गलबतावर. ३ व्यापार. ४ घाली. ५ रजोगुणात्मक.

१ प्रसिद्धीस. २ पुण्यवान् लोक. ३ अग्नीसारखा क्रूर ग्रह. ४ कल्याण करणारा. ५ स्थूल, अयथार्थ. ६ वसतिस्थान. ७ सिद्ध करून. ८ आकार. ९ घालून. १० दगड. ११ प्रीति. १२ ठेवितो. १३ अनुपकाऱ्यापासून. १४ राहिला. १५ खेदानें. १६ दुर्गंध. १७ आयुष्यधनवर्धनाची इच्छा. १८ मोठेपण. १९ द्वेषातें. २० सर्वांशीं विरुद्ध. २१ भय.

नेइजो येथ ॥ ६३ ॥ सूर्यें मार्ग [1]गोचर होय। आणि तो कीर पाये। परि चालणें तें आहे। धैर्य जेविं ॥ ६४ ॥ तैसी बुद्धि कर्मातें दावी। तें करणसामग्री निफजवी[3]। परि निफजावया होआवी। धीरता[4] जे ॥ ६५ ॥ ते हे गा तुजप्रति। सांगीतली त्रिविध धृति। यया कर्मत्रया निष्पत्ति। जालिया मग ॥ ६६ ॥ येथ फळ जें एक निफजे। सुख जयातें ह्मणिजे। तेंही त्रिविध जाणिजे। कर्मवशें ॥ ६७ ॥ तरि फळरूप तें सुख। त्रिगुणीं भेदलें देख। विवंचूं आतां चोख। चोखीं बोलीं ॥ ६८ ॥ परि चोखी ते कैसी सांगें। पैं घेवों जातां बोलैंबगें। कानींचियेही लागे। हातींचा मळ ॥ ६९ ॥ ह्मणौनि जंयाचेनि अव्हेरें। अवधानही होय बाहिरें। तेणें आइक हो आदरें। जिवांचेनि जिवें ॥ ७७० ॥ ऐसें ह्मणौनि देवो। त्रिविधा सुखाचा प्रस्तावो[11]। मांडला तो नि[12]नाहो। निरूपित असे ॥ ७१ ॥

"तर कोळसा जसा काळेपणानें व्यापलेला असतो, त्याप्रमाणें सर्व अधम गुणांनींच ज्याचें प्रगट होणें, ७४९ अहो! इतका तो हलका व कनिष्ठ प्रतीचा असून त्याला गुणत्वाचा मान कसा देतात? पण राक्षसालाही पुण्यश्लोक असें ह्मणत नाहींत काय? ७५० ग्रहांमध्यें अग्नीसारखा जो क्रूर ग्रह त्याला मंगळ ह्मणतात. त्याप्रमाणें तमालाही गुण हा शब्द अयथार्थच आहे. ७५१ हे वीरश्रेष्ठा! सर्व दोषांचें जें स्थान, ज्यानें तमालाच कमावून त्याचें शहर वसविलेलें असतें. ७५२ तो आळस काखोटीस मारून बसलेला असतो ह्मणून, पापें पोसलेल्याला दुःखें जशीं कधीं सोडित नाहींत, त्याप्रमाणें निद्रेला कधींही दूर करीत नाहीं. ७५३ देहाच्या आणि धनाच्या आवडीमुळें, दगडाला जसा कठीणपणा सोडित नाहीं, त्याप्रमाणें त्याला भय ह्मणून सदासर्वकाल सोडितच नाहीं. ७५४ आणखी, प्रत्येक पदार्थावर प्रीति ठेवतो. ह्मणून कृतघ्नाला जसें पाप सोडित नाहीं, त्याप्रमाणें त्यालाही शोक सोडित नाहीं. ७५५ आणखी रात्रंदिवस जिवाशीं असंतोषाला धरून बसलेला असतो, ह्मणून खेदाबरोबर त्याची मैत्री जडते. ७५६ लसणीला जशी घाण सोडीत नाहीं; किंवा अपथ्य करणाराला जशी व्याधि सोडित नाहीं; त्याप्रमाणें विषाद हा त्याच्या मरणकालपर्यंत सोबती होऊन बसतो. ७५७ शिवाय, आयुष्य व द्रव्येच्छा ह्यांची प्रतिष्ठा वाढवितो, ह्मणून मदालाही तोच आश्रयभूत होतो. ७५८ ताप अग्नीला सोडीत नाहीं; जातिवंत सर्प द्वेष सोडित नाहीं; किंवा भय हें जसें जगाचें निरंतर वैर धरून असतें; ७५९ नाहीं तर शरिराला काळ जसा केव्हांही विसंबत नाहीं; त्याप्रमाणें तामसामध्यें मदही अढळ होऊन राहिलेला असतो. ७६० ह्याप्रमाणें हे निद्रादिक पांचही दोष तामसाच्या ठिकाणीं ज्या धृतीनें धरले जातात, ७६१ त्या धृतीला" '**जगदीश्वर**' ह्मणतात "तामसी धृति हें नांव आहे हें लक्ष्यांत ठेवावें. ७६२ अशा प्रकारें तीन प्रकारची बुद्धि जी आधीं कर्माचा निश्चय करते, तो ह्या रीतीनें धृति शेवटास नेते. ७६३ सूर्याच्या योगानें मार्ग दिसूं लागतो, आणि तो मार्ग निश्चयें करून पायानें चालतात. परंतु चालणें हें जसें धैर्य आहे, ७६४ त्याप्रमाणें बुद्धि कर्म दाखवून देते; इंद्रियांसाठीं सर्व तयारी करून देते; परंतु तें करण्याला जें धैर्य पाहिजे, ७६५ त्या धैर्याचेच हे तीन प्रकार तुला सांगितले. असें हें तीन प्रकारचें कर्म निष्पन्न झालें ह्मणजे मग, ७६६ तेथें जें एक फल उत्पन्न होतें; ज्याला सुख असें ह्मणतात; तेंही कर्माच्या जातीप्रमाणें तीन प्रकारचें असतें हें लक्ष्यांत असूं दे. ७६७ तर तें फळरूप सुखही तीन गुणांनीं तीन प्रकारचें झालेलें असतें, समजलास? ह्याकरितां त्याचेंच आतां स्पष्ट शब्दांनीं निरूपण करूं. ७६८ परंतु त्याचा चांगुलपणा किती सांगावा? तें शब्दाच्या मार्गानें घेऊं

१ प्रत्यक्ष. २ इंद्रियार्थ. ३ उत्पन्न करी. ४ धैर्य. ५ कर्माच्या योगानें. ६ स्पष्ट शब्दांनीं. ७ शब्दाच्या मार्गानें. ८ अंतःकरणयुक्त श्रवणानें. ९ करतलमलवत्. १० ज्याणें अव्हेरें =तिरस्कार केला असतां अवधान देखील बाहिरें=व्यर्थ होतें त्या जीवाचे जीवानें ऐक. ११ विवरण. १२ व्यवस्था.

**लागलें असतां, कानांच्या हातांचा मळ सुद्धां त्याला लागेल! ७६९ ह्मणून ज्याच्या तिरस्कारानें लक्ष्यही व्यर्थ होतें, त्या जिवाच्या जीवानें आदरपूर्वक ऐक.!" ७७० असें ह्मणून देवांनीं तीन प्रकारच्या सुखाचें निरूपण करण्यास प्रारंभ केला. त्याची व्यवस्था आतां सांगतों. ७७१**

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति॥३६॥

[सुखं त्विदानीमिति] ह्मणे सुखत्रयसंज्ञा । सांगों ह्मणौनि प्रतिज्ञा । बोलिलों तें प्राज्ञा[1] । ऐक आतां ॥७२॥ तरि सुख तें गा किरीटी । दाविजेल तुज दिठी । जें आत्मयाचिये भेटी[2] । जीवासि होय ॥ ७३ ॥ [अभ्यासाद्रमते यत्र] परि मात्रेचेनि मापें[3] । दिव्यौषध जैसें घेपे । कां कथिलाचें कीजे रुपें । रसभावनीं[4] ॥ ७४ ॥ ना ना लवणाचें जळ । होआवया दोनि चार वेळ । देऊनि सांडिजती ढाळ[5] । तोयाचे[6] जेंवि ॥ ७५ ॥ तेविं जालेनि सुखलेशें । जीव भाविलिया अभ्यासें । [दुःखांतं च निगच्छति] जीवपणाचे नासे । दुःख जेथें ॥ ७६ ॥ ते येथ आत्मसुख । जालें असे त्रिगुणात्मक । तेंही सांगों एकैक । रूप आतां ॥ ७७ ॥

**ते ह्मणाले " हे सुज्ञा! तीन प्रकारच्या सुखाचीं लक्षणें सांगूं ह्मणून तुला वचन दिलें होतें; तीं आतां ऐक. ७७२ तर अर्जुना! आत्म्याच्या भेटीनें जिवाला जें सुख होतें, तें सुख तुझ्या दृष्टीला दाखवून देऊं. ७७३ परंतु दिव्य औषध जसें मात्रेच्या प्रमाणानें द्यावयाचें, किंवा रसायनिक प्रयोगानें जसें कथलाचें रुपें करावें, ७७४ किंवा मिठाचें पाणी करण्याकरतां, त्याला जशीं पाण्याचीं दोनचार वेळ पुटें द्यावीं लागतात, ७७५ त्याप्रमाणें झालेल्या यत्किंचित् सुखाचा अभ्यास जिवास घडला असतां, जीवपणाचें जें कांहीं दुःख ह्मणून आहे तें जेथें नाश पावतें; ७७६ तें आत्मसुखही येथें त्रिगुणात्मक झालेलें आहे. त्याचेंही एक एक स्वरूप आतां सांगूं." ७७७**

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ३७

१ बुद्धिमंता. २ भेटीनें. ३ प्रमाणानें. ४ किमयेच्या कृतीनें. ५ पुर. ६ पाण्याचे.

[यत्तदग्रे विषमिव] आतां चंदनाचें बुड । सर्पी जैसें दुवाड[1] । कां निधानांचें तोंड । विवसिया[2] जेवि ॥ ७८ ॥ अगा स्वर्गीचें गोमटें । आडव[3] यागसंकटें[4] । कां बाळपण दुसटें[5] । त्रासकाळें ॥ ७९ ॥ हें असो दीपाचिये सिद्धी । अवघड धूम आधीं । ना तरि तो औषधीं[6] । जिभेचा ठावो ॥ ७८० ॥ तयापरि पांडवा । जया सुखाचा रिगावा । विषम[7] तेथ मेळावा । यमदमांचा ॥ ८१ ॥ देत सर्वस्नेहा मिठी[8] । आंगीं ऐसें वैराग्य उठी । स्वर्गसंसारा कांठी[9] । कोंढितची[10] ॥ ८२ ॥ विवेक श्रवणें खरपुसें[11] । जेथ व्रताचरणें कर्कशें[12] । करितां जाती भोकसें[13] । बुध्यादिकांचे ॥ ८३ ॥ सुषुम्नेचेनि[14] तोंडें । गिळिजे प्राणापानाचे लोंढे । [15]बोहणियेसीचि येवढें । भारी जेथ ॥ ८४ ॥ जें सारसांही[16] विघडतां ॥ होय बोहोंहूनि[17] वत्स काढितां । ना भणग[18] दवडितां । भोणयावरूनी[19] ॥८५॥ पैं मांयेपुढौनि[20] बाळक । काळें नेतां एकुलतें एक । होय कां उदक । तुटतां मीना ॥ ८६ ॥ तैसें विषयांचें घर । इंद्रियां सांडितां थोर । युगांत होय तें वीर । विरागी[21] साहाती॥८७॥ ऐसा जया सुखाचा आरंभ । दावी काठिण्याचा क्षोभ । [परिणामेऽमृतोपमं] मग क्षीराब्धीं लाभ । अमृताचा जैसा ॥ ८८ ॥ पहिलया वैराग्यगरळा[22] । धैर्यशंभु वोडवी[23] गळा । तरि ज्ञानामृतें सोहळा । पाहे जेथें ॥ ८९ ॥ पैं कोलितांहि[24] कोपे ऐसें । द्राक्षांचें हिरवेपण असे । तें परिपाकीं कां जैसें । माधुर्य आवे ॥ ७९० ॥ [आत्मबुद्धिप्रसादजं] तें वैराग्यादिक तैसें । पिकलिया आत्मप्रकाशें । मग वैराग्येंसींही नाशे । अविद्याजात[25] ॥ ९१ ॥ तेव्हां सागरीं गंगा जैसी । आत्मीं मीनल्या[26] बुद्धि तैसी । अद्वयानंदाची आपैसी । खाणी उघडे ॥ ९२ ॥ ऐसें स्वानुभवविश्रामें । वैराग्यमूळ जें परिणमे । [तत्सुखं सात्विकं प्रोक्तं] तें सात्विक येणें नामें । बोलिजे सुख ॥ ९३ ॥

**" आतां चंदनाचें बूड सर्पामुळें जसें भयंकर; किंवा ठेव्याचें तोंड भुतामुळें जसें भेसूर; ७७८ त्याप्रमाणें बाबा! स्वर्गांतील भोग चांगले आहेत. परंतु त्याकरितां यज्ञयागादिक**

१ भयंकर. २ विघ्नदेवतेमुळें. ३ अरण्य. ४ यज्ञरूप क्लेशानें. ५ पीडाकारक. ६ औषधास. ७ विपरीत. ८ दांतखीळ. ९ कांटेरी. १० दूर करीतच. ११ तीव्र. १२ कठोर. १३ आंगच्या कातड्याचें भोंक. १४ मध्यनाडी. १५ प्रथमारंभीं. १६ चक्रवाकाच्या युग्मास. १७ कासेपासून. १८ भिकारी. १९ पात्रावरून. २० आईच्या पुढ्यांतून. २१ विरक्त. २२ विषाला. २३ पुढें करी. २४ निखाऱ्यालाही तीक्ष्ण लागेल, कवलिता अशा पाठीं तक्षक. २५ अज्ञानसमूह. २६ मिळाली असतां.

संकटांचीं अरण्यें ओलांडावीं लागतात; किंवा बालपण कंटाळवाणें असल्यामुळें संतापदायक असतें. ७७९ हें असो. दिवा तयार करण्यापूर्वी धूर कठीण असतो, किंवा औषधाच्या गुणापूर्वी जिभेला कडवटपणा सोसावा लागतो. ७८० त्याप्रमाणें **अर्जुना!** ज्याला ह्या सुखांत प्रवेश करावयाचा असेल, त्याला यम दम ह्यांचा समुदायाचा मोठा अडथळा आहे. ७८१ त्यांच्या योगानें झाडून साऱ्या स्नेहाचें पूज्य होईल; व स्वर्गसंसाराची आडकाठीच निघून जाईल, अशा प्रकारचें वैराग्य उत्पन्न होतें. ७८२तीक्ष्ण विचार कानावर आल्यानें, कठोर व्रताचरणानें, बुद्धि आदिकरून फाडून त्यांना भोकसे पडतात. ७८३ सुषुम्नेच्या तोंडानें प्राणापानांचे लोंढे गिळावे लागतात. बोहनीलाच जेथें इतकें संकट असतें; ७८४ चक्रवाक पक्ष्याच्या युग्मामध्यें बिघाड झाला असतां, कासेपासून वासरूं ओढलें असतां, पात्रावरून भिकारी हांकून दिला असतां, ७८५ एकुलतें एक मूल आईपासून काळानें नेलें असतां, किंवा उदक संपलें असतां, मत्स्याला जसें होतें; ७८६ त्याप्रमाणें विषयांचें घर सोडतांना इंद्रियांना मोठा युगांत झाला असें वाटतें. परंतु हें सर्व, विरक्त वीर मात्र सहन करतात. ७८७ असा सुखाचा आरंभ जरी कठीणपणाचा कडेलोट दाखवितो, तरी मग जसा क्षीराब्धीमध्यें अमृताचा लाभ व्हावा, ७८८ तद्वत् पहिल्या वैराग्यरूप विषाला धैर्यरूप शंकर जर आपला गळा पुढें करील, तरच तेथें आत्मज्ञानामृताचा सोहळा पहावयास मिळतो. ७८९ निखाऱ्याला सुद्धां तीक्ष्ण लागेल इतका द्राक्षाचा आंबटपणा असतो, परंतु त्यालाच परिपक्व झाल्यावर जसें माधुर्य प्राप्त होतें; ७९० त्याप्रमाणें तें वैराग्यादिक आत्मप्रकाशानें परिपक्व दशेला आलें म्हणजे वैराग्यासहित अज्ञान म्हणून जेवढें आहे तेवढें सारें लयास जातें. ७९१ तेव्हां समुद्राला जशी गंगा मिळते, त्याप्रमाणें आत्मस्वरूपामध्यें बुद्धीचें ऐक्य झालें म्हणजे आपोआपच अद्वयानंदाची खाण उघडते. ७९२ अशा प्रकारें स्वानुभवाच्या विश्रांतीनें वैराग्यमूळापासून परिपक्व दशेस आलेलें जें सुख, त्यालाच सात्त्विक सुख असें नांव आहे.” ७९३

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम्॥३८॥

[विषयेति] आणि विषयेंद्रिया । मेळ होतां धनंजया । जें सुख जाय थडिया । सांडूनि दोन्ही ॥ ९४ ॥ अधिकारिया रिगतां गांवो । होय जैसा उत्साहो । कां रिणावरी विवाहो । विस्तारिला ॥ ९५ ॥ नाना रोगिया जिभेपासीं । केळें गोड साखरेसीं । कां बचनागाची जैसी । मधुरता पहिली ॥ ९६ ॥ पहिलें संव-चोराचें मैत्र । हाटभेटीचें कलत्र । कां लाघवीयाचे विचित्र । विनोद ते ॥ ९७ ॥ तैसें विषयेंद्रियदोखीं । जें सुख जीवातें पोखी । [परिणामे विषमिव] मग उपडिला खडकीं । हंस जैसा ॥ ९८ ॥ तैसी जोडी आघवी आटे । जीविताचा ठाय फिटे । सुकृताचियाही सुटे । धनाची गांठी ॥ ९९ ॥ आणिक भोगिलें जें कांहीं । तें स्वप्न तैसें होय नाहीं । मग हानिचाचि घाई । लोळावें उरे ॥ ८०० ॥ ऐसें आपत्ती जें सुख । ऐहिकीं परिणमे देख । परत्रीं कीर विख । होउनि परते ॥ १ ॥ जे इंद्रियजाता लळा । दीधलिया धर्मांचा मळा । जाळूनि भोगिजे सोहळा । विषयांचा जेथ ॥२॥ तेथ पातकें बांधिती थावो । तियें नरकीं देती ठावो । जेणें सुखें अपावो । परत्रीं ऐसा ॥ ३ ॥ पैं नामें विषें मधुरें । परि मारूनि अंतीं खरें । तैसें आदिजे गोडिरें । अंतीं कडु ॥ ४ ॥ [तत्सुखं राजसं स्मृतं] पार्था तें सुख साचें । वेंढिलें आहे रजाचें । म्हणौनि न शिवें तयाचें । आंग कहीं॥५॥

“हे **धनंजया!** विषयांचा आणि इंद्रियांचा मिलाफ झाला म्हणजे जें सुख दोन्ही थडी सोडून जातें. ७९४ अधिकारी गांवांत शिरतांना जसा उत्साह होतो; किंवा ऋण काढून लग्नसोहळा होतो, ७९५ किंवा रोग्याच्या जिभेला जसें साखरेबरोबर केळें गोड लागतें; किंवा बचनागाची गोडी जशी प्रथम मधुर लागते, ७९६ बरोबर येणाऱ्या चोराची पहिली मैत्री; बाजारांत भेटलेली स्त्री; किंवा

१ तीरें. २ अधिकारी. ३ शिरतां. ४ कर्जानें. ५ बाजारांतील स्त्री. ६ थटेखोराचे. ७ विषयांमुळें, उद्देशानें. ८ सांपडला. ९ संपादिलेलें. १० पुण्यरूप धन. ११ घायानें. १२ विपत्तिरूप. १३ या लोकांत. १४ परिणाम पावतें. १५ बळ. १६ अपाय. १७ मधुर नांवाचें विष. १८ मधुर. १९ वनविलें.

खुषमस्कऱ्याची विचित्र थट्टा; ७९७ त्याप्रमाणें विषयेंद्रियांच्या दोषानें जें सुख जिवाला पोसतें; मग हंस जसा खडकावर सांपडावा; ७९८ त्याप्रमाणें संपादलेलें सारें संपून जातें; जीविताचें ठिकाण मोडतें; पुण्यरूप धनाचा सांठा रिकामा पडतो; ७९९ आणखी भोगलेलें जें जें कांहीं, तें स्वप्नवत् नाहींसें होऊन जातें. मग हानीच्या घावामध्यें लोळत बसणें येवढेंच काय तें बाकी उरतें. ८०० असें आपत्तिरूप जें सुख तें ह्या लोकांत आपला गुण करतें, आणि परलोकीं तर जें विष होऊन परततें. ८०१ जें प्रत्येक इंद्रियाचा लळा पुरवितें. ज्यास धर्माचा मळा दिला असतां तो जाळून जेव्हां विषयांचा सोहळा भोगतें, ८०२ तेव्हां पातकें बळावतात; आणि तीं नरकामध्यें नेऊन टाकतात. इतका परलोकामध्यें ज्या सुखानें अपाय होतो. ८०३ तसेंच मधुर नांव असलेलें विष खरें; पण अखेर तें मारून शेवटीं आपलें नांव खरें करतें. त्याप्रमाणें आधीं जें गोड आणि अखेरीला कडू; ८०४ **पार्था!** तें सुख खरोखर रजोगुणाचें बनविलेलें आहे. ह्मणून त्याच्या आंगाला कधीं हात सुद्धां लावूं नको." ८०५

यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥

[यदग्रे इति] आणि अपेयाचेनि पानें। अखाद्याचेनि भोजनें। स्वैरस्त्रीसंनिधानें। होय जें सुख ॥ ६ ॥ कां पुढिलांचेनि मारें। नातरि परस्वापहारें। जें सुख अवतरे। भाटाच्या बोलीं ॥ ७ ॥ [निद्रालस्यप्रमादोत्थं] जें आलस्यावरि पोखिजे। निद्रेमाजी जें देखिजे। जयाच्या आद्यंतीं भूलिजे। आपुली वाट ॥ ८ ॥ [तत्तामसमुदाहृतं] तें गा सुख पार्था। तामस जाण सर्वथा। हें बहु न सांगोंचि जे कथा। असंभाव्य हें ॥ ९ ॥ ऐसें कर्मभेदें मुदलें। फळसुखही त्रिधा जालें। तें हें यथागमें केलें। गोचर तुज ॥ ८१० ॥ तें कर्ता कर्म फळ। हे त्रिपुटी येकी केवळ। वांचूनि कांहींचि नसे स्थूळ। सूक्ष्मीं इये ॥ ११ ॥ आणि हे तंव त्रिपुटी। तिहीं गुणीं इहीं किरीटी। गुंफिली असे पटी। तांतुवीं जैसी ॥१२॥

१ व्यभिचारिणीच्या संसर्गानें. २ प्रगटे. ३ पुष्ट होतें. ४ स्वधर्म. ५ कारण कीं. ६ त्याज्य, निंद्य. ७ तंतूंनीं.

"आणखी अपेयाचें पान केल्यानें, अभक्ष भक्षण केल्यानें, व्यभिचारिणीच्या सांसर्गानें जें सुख होतें; ८०६ किंवा दुसऱ्यास मारून, किंवा दुसऱ्यास सर्वस्वीं नागवून, भाटाच्या बडबडीप्रमाणें जें क्षणिक सुखच प्राप्त होतें; ८०७ आळसानें जें पोसलें जातें; निद्रेमध्यें जें दृष्टीस पडतें; ज्याच्या आदि व अंतीं आपली वाट चुकते; ८०८ हे **पार्था!** तें सुख खरोखर तामस होय. त्याची कथा निंद्य आहे. ह्यास्तव अधिक सांगत नाहीं. ८०९ अशा प्रकारें मूळ कर्मभेदाप्रमाणें फलसुखही तीन प्रकारचें झालेलें आहे. तें हें प्रसंगानुसार तुला दाखवून दिलें. ८१० तें कर्ता, कर्म आणि फल ह्या एका त्रिकुटाशिवाय, ह्या सूक्ष्मामध्यें स्थूळ असें कांहीं नाहीं. ८११ आणि हे **अर्जुना!** हें त्रिकुट तर ह्या तीन गुणांनीं वस्त्रामध्यें तंतु असल्याप्रमाणें गुंफलेलें आहे."८१२

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।
सत्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः॥४०॥

[सत्वं प्रकृतिजैरिति] ह्मणौनि प्रकृतीच्या आलोकीं। न बंधिजे इहीं सत्वादिकीं। [न तदस्तीति] तैसी स्वर्गीं ना मृत्युलोकीं। आथी वस्तु ॥ १३ ॥ कैंचा लोंवेवीण कांबळा। मातियेवीण मोदळा। कां जळेंवीण कल्लोळा। होणें आहे ॥ १४ ॥ तैसें नव्होनि गुणाचें। सृष्टीच्या रचना रचे। ऐसें नाहींच गा साचें। प्राणिजात ॥ १५ ॥ यालागीं हें सकळ। तिहीं गुणांचेंचि केवळ। घडलें आहे निखिळ। ऐसें जाण ॥ १६ ॥ गुणीं देवां त्रयी लाविली। गुणीं लोकीं त्रिपुटी पाडिली। चतुर्वर्णा घातलीं। सिनानि उळिगें ॥ १७ ॥

"ह्मणून प्रकृतीच्या आभासांत ह्या सत्वादिकांनीं बांधली जाणार नाहीं, अशी स्वर्गांत किंवा मृत्युलोकावर एकही वस्तु नाहीं. ८१३ लोंकरीशिवाय कांबळा कशाचा? मातीशिवाय ढेंकूळ कशाचें? किंवा पाण्याशिवाय लाटा उत्पन्न होतील काय? ८१४ त्याप्रमाणें गुणांना घेतल्याशिवाय सृष्टीच्या रचनेंत उत्पन्न होईल, असा कोणताच प्राणी नाहीं. ८१५ ह्याकरितां

१ आभासांत, जगांत, दृष्टींत. २ लोकरीवांचून. ३ मातीचें ढेंकूळ. ४ ब्रह्मा, विष्णु, महेश. ५ कर्ता, कर्म, करणें इ०. ६ कार्यें.

हें सर्व निखालस तीन गुणांचेंच घडलेलें आहे असें समज. ८१६ गुणांनीं देवांतही तीन भेद करून टाकले; गुणांनींच जगामध्यें कर्ता–कर्म आणि करणें असे तीन भेद केले, आणि चतुर्वर्णांना भिन्न भिन्न कर्में लावून दिलीं." ८१७

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥४१॥

[ब्राह्मणक्षत्रियेति] तेंचि चारी वर्ण । पुससी जरी कोण कोण । तरि जयां मुख्य ब्राह्मण । धुरेचे[1] कां ॥ १८ ॥ येर क्षत्रिय वैश्य दोन्ही । तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानीं । जे ते वैदिकविधानीं । योग्य ह्मणौनी ॥ १९ ॥ चौथा शूद्र जो धनंजया । वेदीं लाग कीर नाहीं तया । तऱ्ही वृत्ति[2] वर्णत्रया- । अधीन तयाची ॥ ८२० ॥ तिये वृत्तीचिया[3] जवळिका । वर्णत्रयां ब्राह्मणादिकां । अहो शूद्रही कीं देखा । चौथा जाला ॥ २१ ॥ जैसा फुलाचेनि सांगातें । तांतु[4] तुरंविजे श्रीमंतें । तैसें द्विजसंगें शूद्रातें । स्वीकारी श्रुती ॥ २२ ॥ ऐसैसी गा पार्था । हे चतुर्वर्णव्यवस्था । करूं आतां कर्मपंथा[5] । यांचियां रूप ॥ २३ ॥ [कर्माणि प्रविभक्तानि] जिहीं गुणीं ते वर्ण चारी । जन्ममृत्यूचिये कातरी[6] । चुकोनियां ईश्वरीं । पैठे[7] होती ॥ २४ ॥ जियें आत्मप्रकृतीचे इहीं । गुणीं सत्वादिकीं तिहीं । कर्में चौघां चहूं ठाईं । वांटेलीं वर्णां ॥ २५ ॥ जैसें बापें जोडिलें लेंका । वांटिले सूर्यें मार्ग पांथिकां[8] । नाना व्यापार सेवकां । स्वामीनें जैसे ॥ २६ ॥ [स्वभावप्रभवैर्गुणैः] तैसी प्रकृतीच्या गुणीं । जया कर्मांची वेल्हावणी[10] । केली आहे वर्णीं । चहूं इहीं ॥ २७ ॥ तेथ सत्वें आपल्या आंगीं । समीननिमीन[11] भागीं । दोघे केले स्वनियोगी[12] । ब्राह्मण क्षत्रिय ॥ २८ ॥ आणि रज परी सात्विक । तेथ ठेविले वैश्य लोक । रजचि तमभेषक[13] । तेथ शूद्र ते गा ॥ २९ ॥ ऐसा येकाचि प्राणिवृंदा । भेद चतुर्वेधा[14] । गुणींचि इहीं प्रबुद्धा[15] । केला जाण ॥ ८३० ॥ मग आपलें ठेविलें जैसें । आइतेंचि दीपें दिसे । गुणभिन्न कर्म तैसें । शास्त्र दावी ॥ ३१ ॥ तेंचि आतां कोण कोण । वर्णविहिताचें लक्षण । हें सांगों ऐक श्रवण । सौभाग्यनिधी ॥३२॥

"ते चार वर्ण कोण कोण ? असें विचारशील तर, त्यामध्यें ब्राह्मण हे मुख्य–अग्रगणी–आहेत. ८१८ दुसरे क्षत्रिय आणि वैश्य हे दोन्ही. त्यांचा मानही ब्राह्मणांप्रमाणेंच समजावा. कारण, ते वेदोक्त कर्म करण्यास योग्य आहेत ह्मणून. ८१९ अर्जुना ! जो शूद्र त्याला मात्र वेदांशीं कांहीं संबंध नाहीं. तरी त्याचा जीवनोपाय तिन्ही वर्णांच्या हातांत आहे. ८२० अहो ? त्या वृत्तीच्या सान्निध्यानें ब्राह्मणादि वर्णत्रयांत शूद्र हाही चौथा होऊन बसला कि हो ! ८२१ ज्याप्रमाणें फुलांच्या संगतीनें दोऱ्याचाही श्रीमंत लोक वास घेतात, त्याप्रमाणें श्रुतीनें ब्राह्मणाबरोबर शूद्राचाही स्वीकार केला आहे. ८२२ पार्था ! अशी अशी ही चार वर्णांची व्यवस्था आहे. आतां ह्या चारी वर्णांच्या कर्ममार्गांचें विवरण करूं. ८२३ ते चारी वर्ण ज्या गुणांनीं जन्ममृत्यूच्या कातरींतून सुटून ईश्वराच्या ठिकाणीं पोंचतील, ८२४ अशीं जीं आत्मप्राप्तीचीं सत्वादिक तीन गुणांचीं कर्में, तीं चारी वर्णांना चार प्रकारें वांटून दिलीं. ८२५ बापानें संपादलेलें ज्याप्रमाणें मुलांना वांटून द्यावें, किंवा सूर्य जसा प्रवाशांना मार्ग वांटून देतो, किंवा धन्यानें चाकरांना जशीं कामें वांटून द्यावींत, ८२६ त्याप्रमाणें प्रकृतीच्या ह्या गुणांनीं ज्या कर्मांची ह्या चतुर्वर्णामध्यें वांटणी केली आहे, ८२७ त्यांत सत्वानें आपल्या आंगच्या समविषमभावानें ब्राह्मण व क्षत्रिय हे दोघे स्वाधीन करून ठेवले आहेत. ८२८ आणखी रज–परंतु सात्विक आहे–त्यांत वैश्य लोक ठेवलेले आहेत. आणखी रजच तमानें मिश्रित झालेलें असतें, त्यांत शूद्र असतात. ८२९ हे बुद्धिमंता ! असा एकाच प्राणिसमुदायाचा चार प्रकारचा भेद ह्या गुणांनींच केला आहे, हें लक्ष्यांत ठेव. ८३० मग आपलें ठेवलेलें दिव्यानें जसें सहज दिसूं शकतें, त्याप्रमाणें गुणांनीं भिन्न भिन्न केलेलें कर्म शास्त्र दाखवून देतें. ८३१ हे भाग्यवंता ! तेंच वर्णविहिताचें कोणकोणतें लक्षण ? तें सांगतों. कान देऊन ऐक" ८३२

---

१ अग्रभागींचे. २ जीवनोपाय. ३ वृत्तीच्या सान्निध्यानें. ४ दोरा हुंगतात. ५ या चारी वर्णांच्या कर्ममार्गांचें स्पष्टीकरण. ६ कातरीस. ७ प्राप्त. ८ वाटसरू लोकांस. ९ अथवा. १० वांटणी. ११ अर्धोअर्ध, समविषमभावें. १२ स्वाधीन. १३ तमोमिश्र. १४ वर्णपरत्वें चार प्रकारचा. १५ हे भाग्यवंता.

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ४२

[शमः] तरि सर्वेद्रियांचिया वृत्ती । घेऊनि आपुल्या हातीं । बुद्धि आत्मया मिळे येकांतीं । प्रिया जैसी ॥ ३३ ॥ ऐसा बुद्धीचा उपरम । तया नाम ह्मणिपे शम । तो गुण गा उपक्रम । जया कर्माचा ॥ ३४ ॥ [दमः] आणि बाह्येंद्रियांचें धेंडें । पिटूनि विधीचेनि दंडें । नेदिजे अधर्माकडे । कहींचि जावों ॥ ३५ ॥ तो पैं गा शमा विरंजा । दम गुण जेथ दुजा । आणि स्वधर्माचिया वोजा । जिणें जें कां ॥ ३६ ॥ [तपः] तेविंचि सटवीचिये राती । न विसंबिजे जेविं वाती । तैसा ईश्वरनिर्णय चित्तीं । वाहणें सदा ॥ ३७ ॥ तया नाम तप । हें तिजया गुणाचें रूप । [शौचं] आणि शौचंही निष्पाप । द्विविध जेथ ॥ ३८ ॥ मन भावशुद्धी भरलें । आंग क्रियां अळंकारिलें । ऐसें सबाह्य जियालें । साजिरें जें कां ॥ ३९ ॥ तया नाम शौच पार्था । तो कर्मीं गुण जये चौथा । [क्षांतिः] आणि पृथ्वीचिया परी सर्वथा । सर्व जें साहाणें ॥ ८४० ॥ ते गा क्षमा पांडवा । गुण जेथ पांचवा । स्वरामाजिं सुहावा । पंचम जैसा ॥ ४१ ॥ [आर्जवमेव च] आणि वांकडेनि वोघेंसी । गंगा वाहे उजूचि जैसी । कां पृष्टीं वळला उसीं । गोडी जैसी ॥४२॥ तैसा विषमांहि जीवां- । लागीं उजुकार बरवा । तें आर्जव गा साहावा । जेथिंचा गुण ॥ ४३ ॥ [ज्ञानं] आणि पाणियें प्रयत्नें माळी । अखंड जंचे झाडामुळीं । परि तें आघवेंचि फळीं । जाणे जेविं ॥ ४४ ॥ तैसें शास्त्राचारें तेणें । ईश्वरच येक पावणें । हें फुडें जें कां जाणणें । तें येथ ज्ञान ॥ ४५ ॥ तें गा कर्मीं जिये । सातवा गुण होये । [विज्ञानं] आणि विज्ञान हें पाहें । एवंरूप ॥ ४६ ॥ तरि सत्वशुद्धीचिये वेळे । शास्त्रें कां ध्यानबळें । ईश्वरतत्वींचि मिळे । निष्टंकबुद्धी ॥ ४७ ॥ हें विज्ञान बरवें । तें गुणरत्न जेथ आठवें । [आस्तिक्यं] आणि आस्तिक्य जाणावें । नववा गुण ॥४८॥ पैं राजमुद्रा आथिलियां । प्रजा भजे भलतयां । तेविं शास्त्रें स्वीकारिलिया । मार्गमात्रातें ॥ ४९ ॥ आदरें जें कां मानणें । तें आस्तिक्य मी ह्मणें । तो नववा गुण जेणें । कर्म तें साच ॥८५०॥ [ब्रह्मकर्म स्वभावजं] एवं नवही शमादिक । गुण जेथ निर्दोष । तें कर्म जाण स्वाभाविक । ब्राह्मणाचें ॥ ५१ ॥ तो नवगुणरत्नाकर । यया नवरत्नांचा हार । न फेडित ले दिनकर । प्रकाश जैसा ॥ ५२ ॥ ना ना चांपा चांपेळीं पूजिला । चंद्र चंद्रिका धवळला । कां चंदन निजें चर्चिला । सौरभ्यें जेविं ॥ ५३ ॥ तेविं नवगुणटिकलग । लेणें ब्राह्मणाचें अव्यंग । कहींचि न संडी आंग । ब्राह्मणाचें ॥ ५४ ॥ आतां उचित जें क्षत्रिया । तेंही कर्म धनंजया । सांगों ऐक प्रज्ञेचिया । भैरोवरी ॥ ५५ ॥

**"पतीला जशी एकांतीं स्त्री भेटते; त्याप्रमाणें सर्व इंद्रियांच्या प्रवृत्ति आपल्या हातामध्यें घेऊन बुद्धि आत्म्याला मिळणें, ८३३ अशी जी बुद्धीची उलट, तिलाच शांति असें ह्मणतात. तो गुण ज्याच्या कर्माच्या आरंभाला असतो. ८३४ बाह्येंद्रियांच्या धेंडांना विधीरूपदंडानें शासन करून पिटाळून लावतो. अधर्माकडे कधीं जाऊंच देत नाहीं. ८३५ तसाच तेथें त्या शमाला साह्य करणारा दुसरा गुण जो दम तो जेथें असतो. आणि स्वधर्माच्या रीतीनें जें जगणें, ८३६ तसेंच सटवाईच्या रात्रीं (मूल जन्मल्यापासून पांचव्या व सहाव्या रात्रीं) दिव्याला जसें क्षणभर विसंबत नाहींत, त्याप्रमाणें चित्तामध्यें निरंतर ईश्वराचा निर्णय धरून बसणें, ८३७ त्याचें नांव तप. तें तिसऱ्या गुणाचें लक्षण होय. आणि निष्पाप असा शुचिर्भूतपणाही जेथें दोन प्रकारचा; ८३८ शुद्ध भावनेनें मन भरलेलें, आणि शरीर विहित कर्मांनीं अलंकृत झालेलें; असें अंतर्बाह्य सुशोभित जें जीवित, ८३९ हे पार्था! त्याचें नांव शौच. हा कर्मांतला चौथा गुण होय. आणखी बरोबर पृथ्वीप्रमाणें जें सर्व सहन करणें; ८४० अर्जुना! स्वरामध्यें पंचमस्वर जसा उत्तम–शोभिवंत–त्याप्रमाणें जी क्षमा, ती त्याचा पांचवा गुण होय. ८४१ वांकड्या ओघानें गंगा जशी सरळच वाहते, किंवा उसाला पाठीकडे वळविला तरी, गोडी जशी कायमच्या कायम, ८४२ त्याप्रमाणें वांकड्या**

१ विषयापासून उलटणें. २ शांति. ३ आरंभ. ४ स्वारी. ५ साह्य. ६ रीतीनें. ७ वांचणें. ८ जन्मल्याच्या साहाव्या रात्रीं. ९ दिवा. १० शुद्धि. ११ विचारानें. १२ विहित कार्यांनीं भूषित केलें. १३ जाहालें, जीवित. १४ सुशोभित. १५ पंचम नांवाचा स्वर. १६ पाठीकडे वळले. १७ सरळ. १८ माळी नित्य झाडाच्या मुळांत पाणी घालून जंचे=जपे, श्रम करितो परंतु ते श्रम फळीं जाणतो=फळानें श्रमांचें सार्थक्य होईल असें मानितो. १९ सिद्धांतबुद्धीनें. २० वस्तुसत्यताबुद्धि. २१ राजचिन्हें असलेल्यांला.

१ तोच नवगुणरूप रत्नांचा समुद्र व त्या नवरत्नांचा हार करून तोच ले=आपल्या आंगावर घालितो. २ चांफ्याच्या कळयांनीं. ३ चांदण्यानें शुभ्र केला. ४ शोभिवंत. ५ सामुग्रीनें.

प्राण्यावर सुद्धां सरलता; असें जें आर्जव तें ज्यांतील सहावा गुण. ८४३ आणखी, माळी नित्य झाडाच्या मुळांत पाणी घालून अखंड खपत असतो, पण तें सर्व झाडाच्या फळामध्यें समजून येतें. ८४४ त्याप्रमाणें शास्त्राचार म्हणून जो आहे, त्याच्या योगानें एका ईश्वरालाच पहावयाचें असें स्पष्ट समजणें ह्याचें नांव येथें ज्ञान होय. ८४५ तें कर्मामध्यें राहिलेलें असतें. तें सातवा गुण होय. आणि विज्ञानही तसेंच आहे हें ध्यानांत ठेवावें.८४६ तर सत्वशुद्धीच्या वेळेला शास्त्रद्वारें किंवा ध्यानशक्तीनें सिद्धांतबुद्धि ईश्वरतत्त्वालाच मिळते. ८४७ तें सुंदर विज्ञान हें जेथचें आठवें गुणरत्न आहे. आणि आस्तिक्य—वस्तूच्या—ब्रह्माच्या—ठिकाणीं सत्यताबुद्धि हा नववा गुण आहे हें लक्ष्यांत ठेवावें. ८४८ राजचिन्हें धारण केलेला कोणीही असो, त्याला प्रजा भजूं लागते. त्याप्रमाणें शास्त्रानें स्वीकारलेल्या प्रत्येक मार्गाला, ८४९ आदरानें जें मान देणें त्याला मी 'आस्तिक्य' असें ह्मणतों. तो खरोखर नववा गुण असून त्याच्या योगानें कर्म शेवटास जातें. ८५० ह्याप्रमाणें शमदमादिक नऊही गुण जेथें निर्दोष रीतीनें असतील, तें ब्राह्मणांचें स्वाभाविक कर्म आहे, हें लक्ष्यांत ठेव. ८५१ तो नऊ गुणरूपरत्नांचा समुद्र, व त्याच नऊ रत्नांचा हार, सूर्य जसा प्रकाश धारण करतो, त्याप्रमाणें धारण करतो, दूर करीत नाहीं. ८५२ किंवा चाफ्याची पूजा, चाफ्याच्याच कळ्यांनीं करावी, चंद्राला चांदण्याचीच सफेती द्यावी, किंवा चंदनानें आपल्याच सुगंधाचें उटणें लावावें, ८५३ त्याप्रमाणें त्रिगुणाचा शोभिवंत व अव्यंग असा ब्राह्मणाचा अलंकार आहे. तो ब्राह्मणांच्या आंगापासून कधींही दूर होत नाहीं. ८५४ आतां धनंजया! क्षत्रियांना जें कर्म उचित, तेंही सांगतों, नीट लक्ष्य देऊन ऐक." ८५५

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥४३॥



[शौर्यं] तरि भानु हा तेजें । नापेक्षी जेविं विरेजें । कां सिंहें न पाहिजे । जावळिया ॥ ५६ ॥ ऐसा स्वयंभ जो जीवें [3]लाठ । [4]सावायेंवीण उद्भट । तें शौर्य गा जेथ श्रेष्ठ । पहिला गुण ॥ ५७ ॥ [तेजः] आणि सूर्याचेनि प्रतापें । [6]कोडिही नक्षत्र हारपे । ना तो तरि न लोपे । सचंद्रीं तिहीं ॥ ५८ ॥ तैसेनि आपुले प्रौढिगुणें । जगा या विस्मय देणें । आपण तरी न क्षोभणें । कायसेनही ॥ ५९ ॥ तें प्रागल्भ्यरूप तेजा । जिये कर्मीं गुण दुजा । [धृतिः] आणि धीर तो तिजा । जेथिचा गुण ॥ ८६० ॥ वरिपडलिया आकाश । बुद्धीचे डोळे मानस । झांकी ना तें परियेस । धैर्य जेथें ॥ ६१ ॥ [दाक्ष्यं] आणि पाणी हो का भलतेतुकें । परि तें [9]जिणौनि पद्म फांके । का आकाश उंचिया जिंके । आवडे तयातें ॥ ६२ ॥ तेविं विविधा अवस्था । पातलिया जिणौनि पार्था । प्रज्ञाफळ तया अर्था । वेंझ देणें जें ॥ ६३ ॥ तें दक्षत्व गा चोख । जेथ चौथा गुण देख । [युद्धे चाप्यपलायनं] आणि झुंझ अलौकिक। पांचवा गुण ॥ ६४ ॥ आदित्याचीं झाडें । सदां सन्मुख सूर्याकडे । तेविं समोर शत्रूपुढें । होणें जें कां ॥ ६५ ॥ माहे-[11]वंणी प्रयत्नेंसीं । चुकविजे सेजे जैसी । रिपू पाठी नेदिजे तैसी । समरंगणीं ॥ ६६ ॥ हा क्षत्रियाचेया आचारीं । पांचवा [12]गुणेंद्र अवधारीं । चहूं पुरुषार्थां शिरीं । भक्ति जैसी ॥ ६७ ॥ [दानं] आणि जालेनि फुलें फळें । [13]शाखिया जैसी [14]मोकळे । कां उदार परिमळें । पद्माकर ॥ ६८ ॥ ना ना आवडीचेनि मापें । चांदिणें भलतेणें घेपे । पुढिलांचेनि संकल्पें । तैसें जें देणें ॥ ६९ ॥ तें [15]उमप गा दान । जेथ सहावें गुणरत्न । [ईश्वरभावश्च] आणि [16]आज्ञे एकायतन । होणें जें कां ॥ ८७० ॥ पोषूनि अवयव आपुले । करविज़ती मातविले । तेविं पालणें लोभविलें । जग जें भोगणें ॥ ७१ ॥ तया नाम ईश्वरभावो । जो सर्वसामर्थ्याचा ठावो । तो गुणांमाजि रावो । सातवा जेथ ॥ ७२ ॥ [क्षात्रं कर्म स्वभावजं] ऐसें जें शौर्यादिकीं । इहीं सात गुणविशेखीं । अळंकृत [17]सप्तऋखीं । आकाश जैसें ॥ ७३ ॥ तैसें सप्तगुणीं विचित्र । कर्म जें जगीं पवित्र । तें सहज जाण क्षात्र । क्षत्रियाचें ॥ ७४ ॥ ना ना क्षत्रिय नव्हे नरु । तो सत्व सोनयाचा मेरु । ह्मणौनि गुण स्वर्गा आधारु । सातां यियां ॥ ७५ ॥ ना तरि सप्तगुणार्णवीं । परिवारली बरवी । हे क्रिया नव्हे पृथ्वी । भोगीतसे तो ॥ ७६ ॥ कां गुणाचे सातांही ओघीं ।

१ साध्य. २ सोबती. ३ बळवान्. ४ साह्यावांचून. ५ शूर. ६ कोट्यवधि. ७ कोसळल्यास. ८ भलत्या रीतीनें, कितीही. ९ जिंकून. १० सूक्ष्ममार्ग. ११ रजस्वला. १२ मुख्य गुण. १३ वृक्ष. १४ देतात. १५ मोठें. १६ वेदाज्ञेस एकनिष्ठ. १७ सप्तऋषींनीं. १८ वेष्टिली.

हे क्रिया ते गंगा जगीं। तया महोदधीचिया आंगीं। विलसे जैसी। ७७ ॥ परि हें बहु असो देख। शौर्यादि गुणात्मक। कर्म गा नैसर्गिक। क्षत्रजातीसी ॥ ७८ ॥ आतां वैश्याचिये जाती। उचित जें महामती। तें ऐकें निरुती। क्रिया सांगों ॥ ७९ ॥

" तर सूर्य हा प्रकाश पाडण्यासाठीं कोणाचें साह्य मागत नाहीं; किंवा सिंह हा कधीं सोबती धुंडावयास जात नाहीं. ८५६ त्याप्रमाणें स्वतःच जो बलाढ्य, कोणाच्या साह्यावांचूनच जो शूर, तो शौर्यगुण ज्यामध्यें पहिला व श्रेष्ठ होय. ८५७ आणखी, सूर्याच्या प्रभावानें कोट्यवधि नक्षत्रें असलीं तरीही तीं लोपून जातात. पण चंद्रासहवर्तमान तीं सारीं असलीं तरी, तो मात्र लोपत नाहीं. ८५८ त्याप्रमाणें, आपल्या अप्रतिम गुणानें जें ह्या जगाला अगदीं चकित करून सोडतें, आणि आपण कधींही हार जात नाहीं. ८५९ तें उन्नतीला पोंचलेलें तेज, हें ज्याच्या कर्मांतील दुसरा गुण होय, आणि 'धीर' हा ज्याच्यांतील तिसरा गुण. ८६० मस्तकावर आकाश कोसळून पडलें तरी, हें लक्ष्यांत ठेवावें कीं, मन बुद्धीचे डोळे सुद्धां झांकित नाहीं, असें जेथें धैर्य असतें. ८६१ आणखी कितीही पाणी असो; पण तितक्यासही मार्गे सारून जसें कमल विकास पावतें; किंवा उंचीमध्यें आकाश हें पाहिजे त्याला मागें टाकतें; ८६२ त्याप्रमाणें **पार्था!** नानाप्रकारच्या दशा प्राप्त झाल्या तरी, त्यास मार्गे हटवून त्यामध्यें जी सूक्ष्मबुद्धि खर्च करणें, ८६३ असें जें उत्तम दाक्षिण्य तें ज्यांत चौथा गुण आहे. आणि अलौकिक युद्ध करणें हा पांचवा गुण. ८६४ सूर्यकमळाचीं झाडें, जशीं सदासर्वकाल सूर्याकडे असतात, त्याप्रमाणें नेहेमीं जे शत्रूच्या समोर असतात. ८६५ कांहींही झालें तरी रजस्वला स्त्री जशी शय्यास्थानीं वर्ज्यच केली पाहिजे, त्याप्रमाणें समरांगणामध्यें शत्रूला पाठ म्हणून द्यावयाचीच नाहीं. ८६६ चारी पुरुषार्थांमध्यें जशी भक्ति श्रेष्ठ, तद्वत् क्षत्रियाच्या आचारामध्यें हा पांचवा गुण श्रेष्ठ आहे, हें ध्यानांत ठेवावें. ८६७ आणखी पुष्पें, फळें, तयार झालीं म्हणजे डाहळ्या जशीं तीं देऊन टाकतात; किंवा सुगंध देण्याविषयीं कमळें जशीं उदार असतात; ८६८ किंवा चांदणें हें पाहिजे त्यानें पाहिजे त्या मापानें घ्यावें, त्याप्रमाणें दुसऱ्याच्या संकल्पाप्रमाणें जें देणें; ८६९ तें मोठें दान जेथें सद्दावें गुणरत्न. आणि वेदाज्ञेला जें एकनिष्ठ होणें; ८७० आपले अवयव पोसून पुष्ट करावयाचे, आणि त्यांजकडून पराक्रम करावयाचे, तसेंच जोपासन करून ज्या जगाला आपलेंसें करून त्याचा उपभोग घेणें, ८७१ त्याचें नांव ईश्वरीभाव. तो सर्व सामर्थ्याचें स्थान होय. तो गुणांतील जेथें सातवा राजसगुण होय. ८७२ अशा ह्या शौर्यादिक सात विशेष गुणांनीं जे सुशोभित असतात. आकाशांत जसे सप्त ऋषी असावेत, ८७३ तद्वत् सात गुणांनीं शोभणारें जें जगांतील पवित्रकर्म, तेंच क्षत्रियाचें स्वाभाविक कर्म असें समज. ८७४ किंवा क्षत्रिय तो पुरुष नव्हे; तो सत्वरूप सोन्याचा मेरूच होय. म्हणून गुणरूप सप्तस्वर्गांना त्याचा आधार होतो. ८७५ किंवा सात गुणरूपी सप्तसमुद्रांनीं वेष्टिलेली जी ही क्रिया, ती क्रिया नव्हे; तर ती पृथ्वी असून तिचाच तो उपभोग घेतो. ८७६ किंवा ह्या गुणरूप सात ओघांनीं ह्या जगद्रूप महासागराच्या आंगामध्यें क्रियारूप गंगाच शोभत आहे. ८७७ पण हा पाल्हाळ असो. क्षत्रियजातीला हें शौर्यादि गुणात्मक कर्म स्वाभाविक आहे हें समजून ठेव. ८७८ आतां हे **बुद्धिमंता!** वैश्याच्या जातीला जी क्रिया उचित आहे, ती ही यथार्थ रीतीनें सांगूं. तीही ऐक." ८७९

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥४४॥

[कृषि–] तरि भूमि बीज नागर। यया भांडवलाचा आधार। घेऊनि लाभ अपार। मेळवणें जें ॥ ८८० ॥ किंबहुना

१ शोभे. २ स्वाभाविक. ३ यथार्थ.

कृषीजिणें । [गोरक्ष्य–] गोधनें राखोनि वर्तणें । [वाणिज्यं] कां सेमर्घाची विकणें । महार्घ वस्तु ॥ ८१ ॥ [वैश्यकर्म स्वभावजं] येतुलालाचि पांडवा । वैश्यातें कर्मांचा मेळावा । हा वैश्यजातिस्वभावा । आंतुला जाण ॥ ८२ ॥ [परिचर्येति] आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । हे द्विजन्मे तीन्ही वर्ण । यांचें जें शुश्रूषण । तें शूद्र कर्म ॥ ८३ ॥ पैं द्विजसेवेपरौतें । धावणें नाहीं शूद्रातें । एवं चतुर्वर्णोचितें । दाविलीं कर्में॥८४

**"तर उत्तम प्रकारची भूमी, बीज, ह्यांना भांडवलाचा आधार घेऊन जो अपार नफा मिळविणें; ८८० किंबहुना शेतकीवर निर्वाह करणें; गाई रक्षण करून रहाणें, किंवा स्वस्त जिन्नस घेऊन महाग विकणें, ८८१ अर्जुना! वैश्य जातिस्वभावाच्या आंतील कर्मांचा समुदाय इतकाच. हें लक्ष्यांत असूं दे. ८८२ आणखी, वैश्य, क्षत्रिय, व ब्राह्मण हे दोनदा जन्मास आलेले आहेत. ( स्वाभाविक जन्म हा एक आणि उपनयन हा दुसरा. ह्मणून द्विज असें नांव झालें आहे. ) ह्या द्विजांची शुश्रूषा करणें हें शूद्रांचें कर्म होय. ८८३ द्विजांचे सेवेपुढें शूद्रांना अन्य मार्ग नाहीं. याप्रमाणें चतुर्वर्णांना उचित अशीं जीं कर्में, तीं तुला दाखवून दिलीं." ८८४.**

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु॥ ४५ ॥

[स्वे स्वे कर्मणि] आतां इयेचि विचक्षणा । वेगळालिया वर्णा । उचित जैसें करणा । शब्दादिक ॥ ८५ ॥ ना तरि जेळदच्युता । पाणिया उचित सरिता । सरितेसी पांडुसुता । सिंधु उचित ॥ ८६ ॥ तैसें वर्णाश्रमवशें । जें करणीय आलें असे । गोरेया आंगा जैसें । गोरेपण ॥ ८७ ॥ [अभिरतः] तया स्वभावविहिता कर्मा । शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा । प्रवर्तावयालागीं प्रेमा । अढळ कीजे ॥ ८८ ॥ पैं आपुलेंचि रत्न थितें । घेपे पारखियाचेनि हातें । तैसें स्वकर्म आपैतें । शास्त्रें करावें ॥ ८९ ॥ जैसी दिठी असे आपुलिया ठाईं । परि दीपेंवीण भोग नाहीं । मार्गु न लाहतां काइं । पाय असतां होय ॥ ८९० ॥ ह्मणौनि ज्ञातिवशें साचार । सहज असे जो अधिकार । तो आपुलालिया शास्त्रें गोचर । आपण कीजे ॥ ९१ ॥ [संसिद्धिं लभते नरः] मग घरींचाचि ठेवा । जेविं डोळयां दावी दिवा । तरी घेतां काय पांडवा । आढळ असे ॥ ९२ ॥ [स्वकर्मनिरतः] तैसें स्वभावें भागा आलें । वरी शास्त्रें खरें केलें । तें विहित जो आपुलें । आचरे गा ॥ ९३ ॥ परि आळस सांडुनी । फळकाम दवडुनि । आंगें जीवें मांडुनि । तेथेंचि भेद ॥ ९४ ॥ वोघीं पडिलें पाणी । नेणे आनानी वाहणी । तैसा जाय आचरणीं । व्यवस्थौनि ॥ ९५ ॥ [यथा] अर्जुना जो यापरी । तें विहित कर्म स्वयें करी । [सिद्धिं] तो मोक्षाच्या ऐलतीरीं । [विंदति तच्छृणु] पैठा होय ॥ ९६ ॥ जे अकरणा आणि निषिद्धा । नेवचेचि कांहीं संबंधा । ह्मणौनि भैवा विरुद्धा । मुकला तो ॥ ९७ ॥ आणि काम्यकर्माकडे । न परतेचि जेथ कोडें । तेथ चंदनाचेही खोडें । न लेचि तो ॥ ९८ ॥ येर नित्य कर्म तंव । फळत्यागें वेंचिलें सर्व । ह्मणानि मोक्षाची शिव ! ठेकूं लाहे ॥ ९९ ॥ ऐसेनि शुभाशुभीं संसारीं । सांडिला तो अवधारीं । वैराग्य मोक्षद्वारीं । उभा ठाके ॥ ९०० ॥ जें सकळभाग्याची सीमा । मोक्षलाभाची जें प्रेमा । नाना कर्ममार्गश्रमा । शेवट जेथ ॥ १ ॥ मोक्षफळें दिधलीं वोल । जें सुकृततरूचें फूल । तये वैराग्यीं ठेवी पाउल । भंवर जैसा ॥ २ ॥ पाहीं आत्मज्ञानसुदिनाचा । बोधावा सांगतया अरुणाचा । उदय त्या वैराग्याचा । ठावो पावे ॥ ३ ॥ किंबहुना आत्मज्ञान । जेणें हाता ये निधान । तें वैराग्य दिव्यांजन । जीवें लेतो ॥ ४ ॥ ऐसी मोक्षाची योग्यता । सिद्धी जाय तया पंडुसुता । अनुसरोनि विहिता । कर्मा यया ॥ ५ ॥ हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा । आणि हेचि परम सेवा । मज सर्वात्मकाची ॥ ६ ॥ पैं आघवाचि भोगेंसी । पतिव्रता क्रीडे प्रियेंसी । कीं तयाचि नामें जैसीं । तपें तियां केलीं ॥७॥ कां बाळका एकी माये- । वांचोनि जगणें काय आहे । ह्मणौनि सेविजे कीं तो होये । पेंटाचा धर्म ॥८॥ ना ना पाणी ह्मणौनि मासा । गंगा न सांडितां जैसा । सर्वतीर्थसहवासा । वेरपडा जाला ॥ ९ ॥ तैसें आपलिया विहिता । उपाय असे न विसंबतां । ऐसा कीजे कीं भार न्नाथा ।

१ शेतकीवर निर्वाह करणें. २ स्वस्त दरानें घेतलेली वस्तु. ३ महाग. ४ दोन वेळ जन्म, पहिलें सर्वसामान्य शौक्र व दुसरें उपनयनांग सावित्री मंत्रोपदेशानें सावित्र हीं ज्यांस आहेत ते. (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य.) ५ पडलेल्या मेघजळाला. ६ शुद्धि, प्रमाण. ७ असलेलें. ८ प्राप्त.

१ अडथळा. २ भर, आदर. ३ निरनिराळा प्रवाहमार्ग. ४ प्राप्त. ५ मुळींच कर्म न करण्याला. ६ जातच नाहीं. ७ आत्मप्राप्तीस विरुद्ध जो संसार त्याला. ८ आवडीनें. ९ खोडा, प्रतिबंध. १० स्वीकारित नाहीं. ११ प्राप्तीस लाभतो. १२ वैराग्य हें मोक्षाचें द्वार आहे. १३ प्रमाण. १४ तारण. १५ भ्रमर. १६ वार्ता, उदय. १७ घाली. १८ एकनिष्ठ. १९ जिव्हाळा. २० पतीशीं विहार करी. २१ लाच्चाव. २२ भ्रेष्टत्वाचा. २३ प्राप्त.

[1]आभार पडे ॥ ९१० ॥ अगा जयाचें विहित । तें ईश्वराचें मनोगत । ह्मणौनि केलिया निभ्रांत । सांपडेचि तो ॥ ११ ॥ पै जीवाचे [2]केंसीं उतरली । ते दासी कीं [3]गोसांवीणें जाली । तैसी सेवेची तिया [4]मावली । [5]वेंहि जेविं ॥ १२ ॥ तैसें स्वामीचिया मनोभावा । न चुकीजे हेचि परमसेवा । येर तें गा पांडवा । वाणिज्य करणें ॥ १३ ॥

"आतां हे **विचक्षणा!** तसेंच ह्या निरनिराळ्या वर्णांना, इंद्रियांना जसें शब्दादिक योग्य; ८८५ किंवा **अर्जुना!** मेघापासून निघालेल्या पाण्याला नदी योग्य, नदीला समुद्र योग्य, ८८६ किंवा गोऱ्याच्या आंगाला जसें गोरेपण, तसें वर्णाश्रमधर्मानें जें कर्म आलेलें असतें, ८८७ हे **वीरोत्तमा!** त्या स्वभावविहित कर्माला शास्त्राच्या मुखानें करावयाला निश्चित बुद्धि करावी. ८८८ आपलेंच असलेलें रत्न परीक्षकांच्या हातून घ्यावें, त्याप्रमाणें आलेलें कर्म शास्त्रयुक्तीनें करावें. ८८९ ज्याप्रमाणें डोळे आपल्याजवळ असतात, परंतु दिव्याशिवाय त्यांचा उपयोग नाहीं. मार्गच न सांपडेल तर पाय असून तरी काय उपयोग? ८९० ह्मणून जातिधर्मानुसार स्वयमेवच जो खरा अधिकार असतो, तो आपआपल्या शास्त्रांनीं आपणच पहावा. ८९१ मग **अर्जुना!** घरचाच ठेवा जर दिव्यानें डोळ्यांना दाखवून दिला, तर तो घेण्यास कांहीं हरकत आहे काय? ८९२ तसें स्वभावधर्माप्रमाणें वांट्यास आलेलें, आणखी शास्त्रानें जें खरें केलें—ठरविलें—तें आपलें विहित कर्म जो आचरण करतो; ८९३ परंतु आळस सोडून, फलेच्छा टाकून, जीवाप्राणासुद्धां तेथेंच भर ठेवून, ८९४ ओघांत पडलेल्या पाण्याला, हिकडे तिकडे वहावयाचें माहित नसतें, त्याप्रमाणें व्यवस्थित आचरणानेंच चालतो, ८९५ **अर्जुना!** ह्याप्रमाणें तें विहितकर्म स्वतः करतो, तो मोक्षाच्या पलीकडच्या तीरास पोंचतो. ८९६ कारण, न करण्याच्या आणि निषिद्धाच्या संबंधाला तो जातच नाहीं. ह्मणून विरुद्ध असा जो संसार त्याला तो मुकतो. ८९७ आणखी, काम्यकर्माकडे जो आनंदानें ह्मणून कधीं वळतच नसल्यामुळें चंदनाचे खोडेही त्यास घ्यावे लागत नाहींत. ८९८ बाकीचें नित्यकर्म तर, फलत्याग केल्याच्या योगानें सारें नाश पावतें. ह्मणून मोक्षाची शींव गांठतो. ८९९ अशा प्रकारें संसारांतील शुभाशुभें त्याचीं नाहींशीं होऊन तो मोक्षाच्या द्वारांत उभा राहतो, हें लक्ष्यांत ठेव. ९०० जें सर्व भाग्याची सीमा; जें मोक्षलाभाचें माप; नानाप्रकारच्या कर्ममार्गाच्या श्रमाचा जेथें शेवट होतो; ९०१ मोक्षफळें ज्यानें तारण दिलीं आहेत; जें सुकृततरूचें फूल; त्या वैराग्यामध्यें भ्रमर जसा पाऊल ठेवतो; त्याप्रमाणें पाऊल ठेवतो. ९०२ वैराग्य हें आत्मज्ञानरूप दिवस उगवण्याची सूचना करणाऱ्या अरुणोदयाच्या स्थानीं होतें हें ध्यानांत ठेव. ९०३ किंबहुना आत्मज्ञानरूप ठेवा जेणेंकरून हातास चढेल, असें जें वैराग्यरूपी दिव्यांजन तें तो जीवेंभावेंकरून घालतो. ९०४ हे **अर्जुना!** त्या विहितकर्माला अनुसरल्याच्या योगानें त्याला अशा रीतीनें मोक्षाची सिद्धि होते. ९०५ **अर्जुना!** तें विहितकर्म आपल्याला एकीएक ओलावा—जिव्हाळा—आहे. आणि हीच माझी, सर्वात्मकाची श्रेष्ठ सेवा होय. ९०६ सारे भोग भोगतांना पतिव्रता स्त्री आपल्या पतीशींच क्रीडा करीत असते; किंवा त्याच्या नांवानें ती त्याच्या नामाचें तपच करित असते. ९०७ किंवा एका आईशिवाय मुलाचा जन्म कशाचा? ह्मणून त्यानें तिची सेवा करणेंच योग्य आहे. कारण तोच त्याचा श्रेष्ठ धर्म होय. ९०८ किंवा पाणी समजून जरी माशानें गंगा सोडली नाहीं तरी, त्याला सर्व तीर्थांचा सहवास घडतो. ९०९ त्याप्रमाणें आपल्या हिताचा उपाय असेल तो क्षणमात्र न विसंबतां अशा रीतीनें करावा कीं, त्याचा **जगन्नाथालाही** भार पडेल. ९१० **बाबा!** ज्याचें जें विहित तेंच **ईश्वराचें** मनोगत. ह्म-

१ भार. २ कसोटीस उतरली. ३ धनीण. ४ साठली. ५ हद्द.

णून तें केलें कीं, ईश्वर हस्तगत झालाच. ९११ जीवाच्या कसोटीला उतरते; ती दासी होते, कां धनीन होऊन बसते? तद्वत् वई घातल्याप्रमाणें त्या सेवेची हद्द साधलेली असते. ९१२ अर्जुना! अशा प्रकारें धन्याचें मनोगत न चुकतां जी सेवा करणें, तीच परम सेवा होय. इतर जी सेवा तें केवळ वाणिज्य ह्मणून समजावें." ९१३

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ४६

[ यतः प्रवृत्तिर्भूतानां ] ह्मणौनि विहित क्रिया केली । नव्हे तयाची खूण पाळिली । जयापासूनि कां आलीं । आकारा भूतें ॥ १४ ॥ जो अविद्येचिया चिंधिया । गुंढूनि जीव बाहुलिया । खेळवीतसे तिगुणिया । अहंकाररज्जू ॥ १५ ॥ [ येन सर्वमिदं ततं ] जेणें जग हें समस्त । आंत बाहेरी पूर्ण भरित । जालें आहे दीपजात । तेजें जैसें ॥ १६ ॥ [ स्वकर्मणा तमभ्यर्च्य ] तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोपालागीं ॥ १७ ॥ ह्मणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें । वैराग्यसिद्धि देयिजे । पैसाय तया ॥ १८ ॥ [ सिद्धिं विंदति मानवः ] जिये वैराग्यदशे । ईश्वराचेनि वेधवशें । हें सर्वही नावडे जैसें । वांत होय ॥ १९ ॥ प्राणनाथाचिया आधी । विरहिणीतें जिणेंही बाधी । तैसें सुखजात त्रिशुद्धि । दुःखचि लागे ॥ ९२० ॥ सम्यक्ज्ञान नुदैजतां । वेधेंचि तन्मयता । उपजे ऐसी योग्यता । बोधाची लाहे ॥ २१ ॥ ह्मणौनि मोक्षलाभालागीं । जो व्रतें वाहतसे आंगीं । तेणें स्वधर्म आस्थाचांगीं । अनुष्ठावा ॥ २२ ॥

"ह्मणून विहित क्रिया केली तरी, क्रिया केली असें होत नाहीं. तर ज्यापासून प्राणी उत्पन्न झाले आहेत, त्याची आपण आज्ञा पाळिली असें होतें. ९१४ जो अविद्येच्या चिंध्या गुंडाळून तीन गुणांच्या तिपडीच्या अहंकाररूप दोरीनें जीवरूप बाहुल्या खेळवितो; ९१५ तेजानें जसें सर्व दिवे व्याप्त असावेत त्याप्रमाणें ज्यानें हें सर्व जग आंतून व बाहेरून पूर्ण भरून गेलें आहे; ९१६ हे वीरा! त्या सर्वात्मक ईश्वराला अपार संतोष होण्यासाठीं स्वकर्मरूप पुष्पांनीं पूजा करतो. ९१७ ह्मणून त्या पूजेच्या योगानें आत्मराजा संतुष्ट होऊन, त्याला तो वैराग्यसिद्धिरूप प्रसाददान देतो. ९१८ ज्या वैराग्यदशेमध्यें ईश्वराचा छंद लागल्यामुळें वमन असल्याप्रमाणें हेंही सारें आवडेनासें होतें. ९१९ पतीच्या मनोव्याधीनें विरहिणीचें जिणेंही दुःसह होतें; त्याप्रमाणें सुख ह्मणून जें जें आहे, तें खरोखर दुःखच वाटतें. ९२० ज्ञानाची योग्यता अशी आहे कीं, खरें ज्ञान उत्पन्न झालें नाहीं तोंच, त्या छंदानें तन्मयता उत्पन्न होते. ९२१ ह्मणून मोक्षलाभासाठीं जो स्वतः व्रतें आचरण करतो, त्यानें स्वधर्माचें मोठ्या आस्थेनें अनुष्ठान करावें." ९२२

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ४७

[ श्रेयान्स्वधर्मः ] अगा आपला हा स्वधर्म । आचरणीं जरी विषम । तरी पाहावा तो परिणाम । फळेल जेणें ॥ २३ ॥ [ विगुणः ] जैं सुखालागीं आपणपयां । निंबचि आथी धनंजया । तैं कडुवटपणा तयाचिया । उबगिजे ना ॥ २४ ॥ फळणया ऐलीकडे । केळीतें पाहातां ओस मोडे । ऐसी त्यजिली तरी जोडे । तैसें कें गोमटें ॥ २५ ॥ तेविं स्वधर्म सांकडु । देखोनि केला जरी कडु । तरी मोक्षसुरवाडु । अंतरला कीं ॥ २६ ॥ आणि आपली माये । कुब्जा जरी आहे । तरी जीजे तें नोहे । स्नेह कुन्हें कीं ॥ २७ ॥ [ परधर्मात्स्वनुष्ठितात् ] येरी जिया पराविया । रंभेहूनि बरविया । तिया काय कराविया । बाळकें तेणें ॥ २८ ॥ अगा पाणियाहुनि बहुवें । तुपीं गुण कीर आहे । परि मीना काय होये । असतें तेथ ॥ २९ ॥ पैं आघविया जगा जें विख । तें विखकीडिया पीयूख । आणि गुळ तें देख । मरण दे तया ॥ ९३० ॥ [ स्वभावेति ] ह्मणौनि जे विहित जया जेणें । फिटे संसाराचें धरणें । क्रिया कठोर तन्हि तेणें । तेचि करावी ॥ ३१ ॥ येरा पराचारा बरविया । ऐसें होईल टेंकलेंयां । पायांचें चालणें डोईया । केलें जैसें ॥ ३२ ॥ यालागीं कर्म आपलें । जें जातिस्वभावें असे आलें । तें करी तेणें जितिलें । कर्मबंधातें ॥ ३३ ॥ आणि स्वधर्मेचि पाळावा ।

१ संतुष्ट झाल्यानें. २ प्रसाद. ३ छंदानें. ४ वमन. ५ मनोव्याधि. ६ वांचणें. ७ व्यर्थ. ८ ध्यासानें. ९ चांगल्या आस्थेनें.

१ कठीण. २ त्रासूं नये, कंटाळूं नये. ३ आशाभंग. ४ वांचिजेतें, जेणें वांचावें. ५ वांकडें. ६ गोड. ७ आश्रय केल्यास. ८ डोक्यानें.

परधर्म तो गाळावा[1] । हा नेमही पांडवा । न कीजेचि पैं ॥ ३४ ॥ तरी आत्मदृष्ट नोहे । तंव कर्म करणें कै ठाये[2] । आणि करणें तेथ आहे । आयास आधीं ॥ ३५ ॥

"**बाबा!** आपला हा स्वधर्म आचरणामध्यें जरी कठीण असला, तरी त्याच्या परिणामावर दृष्टि द्यावी. ९२३ **धनंजया!** निंबानेंच आपल्याला आराम होणार असेल, तेव्हां त्याच्या कडवटपणाला त्रासूं नये. ९२४ फळें येण्याच्या आधींच केळीकडे पाहिलें तर आशा खुंटते. म्हणून तिला टाकून दिली, तर तशीं सुंदर फळें कशीं मिळतील? ९२५ त्याप्रमाणें स्वधर्मांत संकट आहे हें पाहून जर कडू मानला, तर मोक्षाचें सुख अंतरलेंच म्हणून समजावें. ९२६ आणखी आपली माता जरी कुब्जा असली, तरी तिच्या पालनपोषण करण्याच्या ममतेंत कांहीं वांकडेपणा नसतो. ९२७ इतर दुसऱ्या स्त्रिया रंभेहूनही सुंदर असल्या तर त्या मुलानें त्यांना करावें? ९२८ **बाबा!** पाण्याहून तुपामध्यें पुष्कळ गुण चांगले आहेत, ही गोष्ट खरी आहे. पण मत्स्यांना त्यांत असणें काय होय? ९२९ तसेंच साऱ्या जगाला विष, तें विषांतील किड्यांना अमृत असतें, आणि गुळाच्या योगानें त्यांना मरण येतें. ९३० म्हणून ज्याला जें विहित; ज्यानें संसाराचें धरणें निघतें; ती क्रिया कठोर असली तरी, त्यानें तीच करावी. ९३१ इतर-दुसऱ्याचा-आचार चांगला आहे म्हणून त्याचा आश्रय केला तर, पायांनीं चालावयाचें जें काम, तें डोक्यानें केल्यासारखें होईल. ९३२ ह्यासाठीं आपलें कर्म जें जातिस्वभावाप्रमाणें आलें असेल, तें जो करील त्यानें कर्मबंधाला जिंकलें म्हणून समजावें. ९३३ आणि **अर्जुना!** स्वधर्मच पाळावा; परधर्माचा त्याग करावा; हा जर नेम केला नाहीं, ९३४ तर आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं. आणि आत्मज्ञान प्राप्त झालें नाहीं तोंपर्यंत कर्म करणें राहील काय? आणखी कर्म करावयाचें म्हटलें कीं, तेथें सायास हे आहेतच." ९३५

१ टाकावा. २ कसें रहातें.

सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ।
सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥

[ सर्वारंभा हि दोषेण ] म्हणोनि भलतिये कर्मीं । आयास जऱ्ही उपक्रमीं । तरी काय स्वधर्मी । दोष सांगें ॥ ३६ ॥ अगा उजू वाटा चालावें । तऱ्ही पायचि सिणवावे । ना आडरानें धांवावें । तऱ्ही तेंचि ॥ ३७ ॥ पैं शिळा का सिदोरिया । दांटणें[1] एक धनंजया । परि जें वाहातां विसावया[2] । मिळिजे तें घेपे ॥ ३८ ॥ येऱ्हवीं कैणा[3] आणि भूसा[4] । काढितांही सोसें[5] सरिसा । जेंवि रंधन[6] श्वानमांसा । तेंचि हवी ॥ ३९ ॥ दधी जलाचिया घुसळणा । व्यापार सारिखेचि विचक्षणा । वाळुवे तिला घाणा । गाळणें एक ॥ ९४० ॥ [ धूमेनाग्निरिवावृताः ] पैं नित्यहोम देयावया । कां सैरां[7] आगीं सुवावया । फुंकितां धूम धनंजया । साहणें तेंचि ॥ ४१ ॥ [ सदोषमपि ] परी धर्मपत्नी धांगडी[8] । पोसितां जरी एकी वोढी । तरि कां अपरवडी[9] । आणावी आंगा ॥ ४२ ॥ हां गा पाठीं लागला घाई । मरण न चुकेचि पाहीं । तरि संमोरला[10] काई । आगळें[11] न कीजे ॥ ४३ ॥ कुळस्त्री दांडयाचे घाये । पेरघर[12] रिगालीहि जरि साहे । तरि स्वपतीतें वांयें । त्यजिलें कीं ॥ ४४ ॥ तैसे आवडतेंही करणें । न निपजे शिणल्याविणें । तरि विहित वारे कोणें[13] । बोलें भारी ॥ ४५ ॥ वरि थोडेंचि अमृत घेतां । सर्वस्व वेंचो कां पंडुसुता । जेणें जोडे जीविता । अक्षयत्व ॥ ४६ ॥ येर कांह्या[14] मोलें वेचूनि । विष पियावें घेउनि । आत्महत्येसि निमोनि । जायिजे जेणें ॥ ४७ ॥ तैसें जाचूनियां इंद्रियें । वेचूनि आयुष्याचेनि दियें[15] । सांचले पापी आन आहे । दुःखावांचूनि ॥ ४८ ॥ [ सहजं कर्म कौंतेय ] म्हणोनि करावा स्वधर्म । जो करितां हिरोनि घे श्रम । उचित देईल परम । पुरुषार्थराज[16] ॥ ४९ ॥ [ न त्यजेत् ] याकारणें किरीटी । स्वधर्माचिये राहटी । न विसंबिजे संकटीं । सिद्धमंत्र जैसा ॥ ९५० ॥ का नाव जैसी उदधीं । महारोगीं दिव्यौषधी । न विसंबिजे तया बुद्धी । स्वकर्म येथ ॥ ५१ ॥ मग ययाचि गा कपिध्वजा । स्वकर्माचिया महापूजा । तोषला ईश तमरजा । झाडा करूनि ॥ ५२ ॥ शुद्ध सत्वाचिया

१ दडपणें. २ विश्रांतीस. ३ धान्य. ४ फोल. ५ श्रम सारखाच. ६ शिजविण्याची खटपट. ७ स्वेच्छ अग्नींत घालण्यास. ८ दांडगी, व्यभिचारिणी. ९ अन्यायवर्तन. १० समोर होऊन केलेला घाय. ११ ज्यास्ती. १२ दुसऱ्याचें घर. १३ कोणत्या शब्दानें कठीण असें म्हणावें. १४ कशाला. १५ दिवस. १६ मोक्ष.

वाटा । आणि अश्रुली उत्कंठा । भव स्वर्ग काळकूटा । ऐसे दावी ॥ ५३ ॥ जियें वैराग्य येणें बोलें । मागां संसिद्धी रूप केलें । किंबहुना तें आपुलें । मेळवी खोगें ॥ ५४ ॥ मग जितिलिया हे भोये । पुरुष सर्वत्र जैसा होये । कां जोंलाहि जें लाहे । तें आतां सांगों ॥ ५५ ॥

"ह्याकरितां कोणत्याही कर्माच्या आरंभाला जर आयास पडतात, तर मग स्वधर्मांत दोष तो कोणता? सांग. ९३६ अरे! सरळ वाटेनें चाललें तरी पाय दमतात; किंवा आडरानांतून धांवलें तरी तेंच; ९३७ तसेंच **धनंजया!** धोंडा आणि शिदोरी दोहींचें ओझें सारखेंच. परंतु जें नेतांना सुखावह होईल तेंच घ्यावें. ९३८ नाहीं तर, दाण्याला आणि भुसाला वेगळें करतांना, दोहोंनाही श्रम सारखेच; कुत्र्याचें मांस शिजवावयाला आणि होमद्रव्य शिजविण्याला खटपट तितकीच. ९३९ हे **बुद्धिमंता!** दहीं घुसळतांना आणि पाणी घुसळतांना क्रिया तीच. घाण्यांत वाळू घातली काय, आणि तीळ घातले काय? गाळणें सारखेंच. ९४० तसेंच **अर्जुना!** नित्य होम देण्याकरितां, किंवा उगाच जाळ करण्याकरितां फुंकणें आणि धूर लागणें हीं सारखींच. ९४१ त्याचप्रमाणें धर्मपत्नीला आणि वेश्येला पोसतांना जर एकसारखीच यातायात करावी लागते, तर अन्यायाचा कळंक तरी आपल्या आंगास कां लावून घ्यावा? ९४२ आणखी असें पहा! पाठीवर घाव लागला तरी मरण चुकत नाहीं, तर मग समोरासमोर होऊन श्रेष्ठत्वच कां घेऊं नये? ९४३ कुळस्त्रीला दुसऱ्याच्या घरांत शिरूनही जर दांड्याचे घाव सोसावे लागतील, तर मग आपल्या नवऱ्याला व्यर्थ टाकून आल्यासारखें मात्र झालें. ९४४ त्याप्रमाणें आवडतें कर्म असलें, तरी सुद्धां तें कष्ट केल्याशिवाय होत नाहीं. तर मग **बाबारे!** विहित असेल तें कोणत्या शब्दानें कठीण असें ह्मणावें? ९४५ आणखी **अर्जुना!** जें मिळालें असतां आयुष्याला चिरस्थायित्व येतें, तें अमृत थोडेंसें घेण्यासाठीं सर्वस्व गेलें तरी हरकत नाहीं. ९४६ जेणेंकरून मरावयाचें, आणि शिवाय आत्महत्त्येचा दोष लागावयाचा, तें विष मोल देऊन घेऊन कशासाठीं प्यावें? ९४७ तसें, इंद्रियांना कष्ट देऊन आयुष्याचे दिवस खर्च करून, सांठविलेल्या पापांत तरी दुःखावांचून दुसरें काय आहे? ९४८ ह्मणून जो आचरण करितांच श्रमाचा परिहार करतो तो स्वधर्मच आचरण करावा. श्रेष्ठ पुरुषार्थ जो मोक्ष तो तोच देईल. ९४९ ह्याकरितां **किरीटी!** स्वधर्माच्या सांप्रदायाची उपेक्षा करूं नये. संकटामध्यें जसा सिद्धमंत्र; ९५० किंवा समुद्रांत जशी नौका; महारोगामध्यें दिव्यौषधाची जशी उपेक्षा करतां कामा नये, त्याच रीतीनें येथें स्वकर्मही उपेक्षूं नये. ९५१ मग हे **कपिध्वजा!** ह्याच स्वकर्माच्या महापूजेनें ईश्वर संतोषित झाला ह्मणजे तो रजतमांचा झाडा करून, ९५२ आपली उत्कंठा शुद्ध सत्वाच्याच वाटेला आणतो. आणि ऐहिक व पारलौकिक भोग काळकूटाप्रमाणें दाखवितो. ९५३ वैराग्य ह्या शब्दानें पूर्वीं "संसिद्धी-"चें [ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ] निरूपण केलें. किंबहुना त्यानें आपलें स्थानच मिळविलें. ९५४ ही भूमी संपादन केली ह्मणजे, सर्वत्र पुरुषच कसा होऊन जातो, किंवा तो सर्वव्यापक झाला ह्मणजे त्याला काय प्राप्त होतें, तें आतां सांगतों." ९५५

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाऽधिगच्छति ४९

[ असक्तबुद्धिः सर्वत्र ] तरि देहादिक हें संसारें । सर्वही मांडलेंसे जें गुंफिरें । तेथ नातुडे तो वागुरे । वारा जैसा ॥ ५६ ॥ पैं परिपाकाचिये वेळे । फळ देठें ना देठ फळें । न धरे तैसें स्नेह खुळें । सर्वत्र होय ॥ ५७ ॥ पुत्र वित्त कलत्र । हे जालियाही स्वतंत्र । माझें न ह्मणे पात्र । विषाचें

१ इहपरसंबंधीं भोग. २ मागें 'स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं' इत्यादिकानें सांगितलें. ३ ठिकाण. ४ भूमि. ५ पूर्ण झालेला.

१ जाळें. २ न सांपडे. ३ जाळ्यांत. ४ पांगळें, वेडानें.

जैसें ॥ ५८ ॥ [ जितात्मा ] हे असो विषयजातीं । बुद्धि पोळली ऐसी माघौती । पाउलें घेउनि एकांतीं । हृदयाच्या रिघे ॥ ५९ ॥ ऐसया अंतःकरण । बाह्य येतां तयाची आण । न मोडी समर्था भेण । दासी जैसी ॥ ९६० ॥ तैसें ऐक्याचिये मुठी । माजिवडें चित्त किरीटी । करूनि वेंधीं नेहटी । आत्मयाच्या ॥ ६१ ॥ विगतस्पृह तेव्हां दृष्टादृष्टें स्पृहे । निर्मणें जालेचि आहे । आगीं दडपलिया धुर्ये । राहिजे जैसें ॥ ६२ ॥ म्हणोनि नियमिलिया मानसीं । स्पृहा नासोनि जाय आपैसी । किंबहुना तो ऐसी । भूमिका पावे ॥ ६३ ॥ [ नैष्कर्म्यसिद्धिं परमां ] पैं अन्यथाबोध आघवा । मावळोनि तया पांडवा । बोधमात्रींचि जीवा । ठाव होय ॥ ६४ ॥ धरवणी वेचें सरे । तैसें भोगें प्राचीन पुरे । नवें तंव उपकरे । कांहींचि करूं ॥ ६५ ॥ ऐशी कर्मे साम्य दशा । होय तेथ वीरेशा । मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ॥ ६६ ॥ रात्रीची चौपाहरी । वेंचलिया अवधारीं । डोळयां तमारी । मिळे जैसा ॥ ६७ ॥ कां येऊनि फळाचा घड । पारुषवी केळीची वाढ । श्रीगुरू भेटोनि करी पोड । मुमुक्षु तैसा ॥ ६८ ॥ मग आलिंगिला पूर्णिमा । जैसा उणीव सांडी चंद्रमा । तैसें होय वीरोत्तमा । गुरुकृपा तया ॥ ६९ ॥ तेव्हां अबोधमात्र असे । तो तंव तया कृपा नासे । तेथ निशिसवें जैसें । आंधारें जाय ॥ ९७० ॥ तैसी अबोधाचिये कुशी । कर्म कर्ता कार्य ऐशी । त्रिपुटी असे ते जैसी । गोभिणी मारिली ॥ ७१ ॥ [ संन्यासेनाधिगच्छति ] तैसेंचि अबोधनाशासवें । नाशे क्रियाजात आघवें । ऐसा समूळ संभवे । संन्यास हा ॥ ७२ ॥ येणें मूळाज्ञानसंन्यासें । दृश्याचा जेथ ठावो पुसे । तेथ बुझावें तें आपैसें । तोचि आहे ॥ ७३ ॥ चेइलियावरि पाहीं । स्वप्नींचिया तिये डोहीं । आपणयातें काई । काढूं जाइजे ॥ ७४ ॥ तें मी नेणें आतां जाणेन । हें सरलें तया दुःस्वप्न । जाला ज्ञातृज्ञेयाविहीन । चिदाकार ॥ ७५ ॥ मुखाभासेंसी आरिसा । परता नेलिया वीरेशा । पाहातेपणेंवीण जैसा । पाहाता ठाके ॥ ७६ ॥ तैसें नेणणें जें गेलें । तेणें जाणणेंही नेलें । मग निष्क्रियें उरलें । चिन्मात्रचि ॥ ७७ ॥ तेथ स्वभावें धनंजया । नाहीं कोणीचि क्रिया । म्हणौनि प्रवाद तया । नैष्कर्म्य तैसा ॥ ७८ ॥ तें आपुलें आपणपें । असतचि होऊनि हारपे । तरंग कां वायुलोपें । समुद्र जैसा ॥ ७९ ॥ [ परमां ] तैसें न होणें निपजे । ते नैष्कर्म्यसिद्धि जाणिजे । सर्वसिद्धींत सहजें । परम हेचि ॥ ९८० ॥ देउळाचिया कामा कळस । परम गंगेसी सिंधुप्रवेश । सुवर्णशुद्धीं कस । सोळावा जैसा ॥ ८१ ॥ तैसें आपुलें नेणणें । फेडिजे कां जाणणें । तेंहि गिळूनि असणें । ऐशी जे दशा ॥ ८२ ॥ तियेपरतें कांहीं । निपजणें येथ नाहीं । म्हणौनि म्हणिपे पाहीं । परमसिद्धि ते ॥ ८३ ॥

१ छंदानें. २ दृश्यपर भोगेच्छेनें. ३ अंत, समाप्ति. ४ विपरीत ज्ञान. ५ धरून ठेवलेलें पाणी. ६ संचित. ७ आरंभ न करी. ८ थांबवी. ९ प्रकार, योग्यता. १० अज्ञान. ११ गर्भिणी. १२ अज्ञानाच्या नाशासह. १३ कर्मत्याग. १४ जाणावें. १५ जागें झाल्यावर. १६ जाणणारा व जाणण्याची वस्तु या भेदावांचून. १७ राहे. १८ क्रियारहित. १९ ज्ञानस्वरूप. २० नांव, बोलणें,

**"तर जाळयामध्यें जसा वारा सांपडत नाहीं; त्याप्रमाणें देहादिक जो हा संसार, तो पसरलेलें जाळें आहे, त्यांत जो सांपडत नाहीं, ९५६ फळ पिकलें म्हणजे त्या फळाला देंठ धरीत नाहीं, व देंठाला फळ धरत नाहीं. त्याप्रमाणें कोठेंच ममता म्हणून नाहीं. ९५७ विषानें भरलेलें पात्र असलें म्हणजे तें आपणास पाहिजे असें ज्याप्रमाणें कोणी म्हणत नाहीं; त्याप्रमाणें पुत्र, वित्त, कलत्र, हीं सर्व आपल्या सत्तेंत असतांही त्यांना आपलीं असें म्हणत नाहीं. ९५८ हें असो. प्रत्येक विषयांत बुद्धि ही पोळून निघाल्याप्रमाणें माघारी पाऊल घेऊन हृदयाच्या एकांतांत शिरते. ९५९ असें असूनही अंतःकरणांतून बाहेर येण्याचा प्रसंग आलाच तर, समर्थाची आज्ञा जशी दासी मोडित नाहीं, त्याप्रमाणें त्याची शपथही ती मोडित नाहीं. ९६० ह्याप्रमाणें अर्जुना! चित्त हें ऐक्याच्या मुठीमध्यें ठेऊन आत्मछंदास लावतो. ९६१ तेव्हां अर्थात्च अग्नि दडपला म्हणजे धूर नाहींसा झालाच, त्याप्रमाणें दृश्यपर भोगेच्छा नाहींशीच होऊन जाते. ९६२ म्हणून मनाचें नियमन केलें कीं, इच्छा आपोआपच नाहींशी होऊन जाते. किंबहुना त्याला अशी अवस्था प्राप्त होते. ९६३ अर्जुना! विपरीत असलेलें सर्व ज्ञान नाहींसें होऊन त्याच्या जिवामध्यें फक्त ज्ञानासच स्थान मिळतें. ९६४ धरून ठेवलेलें पाणी खर्च केलें म्हणजे तें संपतें. त्याप्रमाणें सुकृत हें**

१ तें=जाणणें, असतचि=नेहमीं असणारें आत्मस्वरूप. २ निष्कामकर्मता. ३ सोळा रुपये तोळा दराचा.

भोगल्यानें नष्ट होऊन जातें. आणि नवा आरंभ तर कशाचाच करीत नाहीं. ९६५ हे **वीरश्रेष्ठा!** अशी कर्मांच्या योगानें जेव्हां साम्यदशा प्राप्त होते, तेव्हां मग आपोआपच श्रीगुरु भेटतो. ९६६ आणखी, एका रात्रीचे चार प्रहर गेले ह्मणजे नेत्रांना जसा सूर्य दिसतो, ९६७ किंवा फळांचा घड आला ह्मणजे तो केळीची वाढ खुंटवितो, त्याप्रमाणें श्रीगुरु भेटून मुमुक्षूची दशा करून सोडतो. ९६८ मग पौर्णिमेनें पदरांत घेतलेला चंद्र जसा आपल्या आंगचा कमीपणा सोडून देतो, त्याप्रमाणें हे शूरवर्या! ज्यावर, गुरु कृपा करतात, त्याची योग्यता होते. ९६९ त्या वेळीं अज्ञान ह्मणून जेवढें असतें, तेवढें सारें त्यांच्या कृपेनें नाश पावतें. तेव्हां रात्रीबरोबर जसा आंधार जातो, ९७० त्याचप्रमाणें अज्ञानाच्या पोटांत कर्म, कर्ता आणि कार्य अशी त्रिपुटी असते तीही गर्भिण मारल्याप्रमाणेंच नाश पावते. ९७१ त्याचप्रमाणें अज्ञानाच्या नाशाबरोबरच कर्म ह्मणून जितकें आहे तितकें यच्चयावत् नाश पावतें. अशा प्रकारें हा समूळ संन्यास ( कर्मत्याग ) घडतो. ९७२ ह्या मूळ अज्ञानाच्या संन्यासानें दृश्याचें स्थानच जेव्हां नाहींसें होऊन जातें, तेव्हां जाणावयाचें जें असतें तें आपोआपच शिल्लक राहतें. ९७३ हें पहा! जागें झाल्यानंतर स्वप्नांतील डोहांतून आपणास काय काढावें लागतें? ९७४ माझें अज्ञान मला समजूं लागतें तेव्हां त्याचें सारें दुःस्वप्न संपतें आणि तो ज्ञाता व ज्ञेय ह्या भेदाच्या अतीत होतो. ९७५ हे **वीरश्रेष्ठा!** मुखाचा आभास दाखविणारा आरसा बाजूस नेला ह्मणजे पाहणारा जसा पाहण्याशिवाय राहतो, ९७६ त्याप्रमाणें अज्ञान जेव्हां जातें, तेव्हां तें ज्ञानासही घेऊन जातें. मग क्रियारहित असें ज्ञानरूप मात्र उरतें. ९७७ तेव्हां **अर्जुना!** स्वभावगत्याच तेथें कोणतीही क्रिया रहात नाहीं. ह्मणून त्याला "नैष्कर्म्य" असें ह्मणतात. ९७८ तें नेहेमीं असणारें आत्मस्वरूपच आपलें आपल्यामध्यें लय पावतें. वारा बंद झाला ह्मणजे लाटांचाच जसा समुद्र होतो; ९७९ त्याप्रमाणें न होतां होणारी जी, तिचें नांव निष्कामकर्मता हें लक्ष्यांत ठेव. ह्मणून अर्थात् ती सर्व सिद्धींतील श्रेष्ठ सिद्धि होय. ९८० देवळाच्या कामामध्यें जसा कळस श्रेष्ठ; गंगेला जसा समुद्रप्रवेश श्रेष्ठ; किंवा सोन्याच्या परिक्षेमध्यें जसा सोळांचा कस, ९८१ आपलें अज्ञान नाहींसें करणें आणि ज्ञान असेल तेंही गिळून बसणें अशी जी दशा, ९८२ तिच्यापेक्षां जगामध्यें दुसरें कांहीं साध्य करावयाचें नसतें. ह्मणून तिलाच 'परमसिद्धि—' अत्यंत श्रेष्ठ सिद्धि असें ह्मणतात." ९८३

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाऽप्नोति निबोध मे।
समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥

[निष्ठा ज्ञानस्य या परा] परि हेचि आत्मसिद्धि । जो कोणी भाग्यनिधि । श्रीगुरुकृपेलब्धि-[1] । काळीं पावे ॥ ८४ ॥ उदयजतांचि[2] दिनकर । प्रकाशचि आते आंधार । कां दीपसंगें कपूर ॥ दीपचि होय ॥ ८५ ॥ तया लवणाची कणिका । मिळतखेंवो[3] उदका । उदकचि होऊनि देखा । ठाके जेविं ॥ ८६ ॥ कां निद्रित चेवविलियां[4] । स्वप्नेंसी नीदें[5] वायां । जाऊनि आपणपयां । मिळे जैसा ॥ ८७ ॥ तैसें जया कोण्हासि दैवें । गुरुवाक्य श्रवणाचिसवें । द्वैत गिळोनि विसंवे[6] । आपणया वृत्ती ॥ ८८ ॥ तयासी मग कर्म करणें । हें बोलिजेलचि कवणें । आकाशा येणें जाणें । आहे काई ॥ ८९ ॥ ह्मणौनि तयासि कांहीं । त्रिशुद्धि करणें नाहीं । परि ऐसें जरि हें कांहीं । नव्हे जया ॥ ९० ॥ कानां वचनाचिये भेटी-[7] । ईरिसाचि[8] पैं किरीटी । वस्तु[9] होऊनि नुठी । कवणि एक जो ॥ ९१ ॥ येऱ्हवीं स्वकर्माचेनि वन्हीं[10] । काम्यनिषिद्धाचिया इंधनीं[11] । रज तम कीर दोन्हीं । जाळिलीं आधीं ॥ ९२ ॥ पुत्र वित्त परलोक । यया तिहींचा अभिलाख[12] । घरीं होय पाइक[13] । हेंही जालें ॥ ९३ ॥ इंद्रियें सैरा पदार्थीं । रिगतां विटाळलीं होतीं । तियें प्रत्याहारतीर्थीं[14] । न्हाणिलीं कीर ॥ ९४ ॥ आणि स्वधर्माचें फळ । ईश्वरीं अर्पुनि बळ । घेऊनि केलें अढळ । वैराग्यपद ॥ ९५ ॥ ऐसी आत्मसाक्षा-

१ प्राप्तीच्या वेळीं. २ व्यापी. ३ मिळतां क्षणीं. ४ जागृत केला असतां. ५ निद्रा. ६ विश्रांति पावे. ७ शिष्याचा कान व गुरुवचन यांची भेट. ८ लागलाच. ९ ब्रह्मस्वरूप. १० अग्नीमध्यें. ११ काष्ठांत. १२ इच्छा. १३ नोकर. १४ इंद्रियनिग्रहरूप तीर्थांत.

रकारीं । लाभे ज्ञानाची उंजरी । ते सामग्री कीर पुरी । मेळविली ॥ ९६ ॥ [सिद्धिं प्राप्तः] आणि तेचि समयीं । सद्गुरू भेटले पाहीं । तेवींचि तिहीं कांहीं । वंचिजेना ॥ ९७ ॥ [यथा] परि वोखद घेतखेंवो । काय लाभे आपला ठावो । कां उदयजतांची दिवो । मध्यान्ह होय ॥ ९८ ॥ सुक्षेत्रीं आणि वोलेंटें । बीजहि पेरिलें गोमटें । तरि आलोट फळ भेटे । परि वेळे कीं गा ॥ ९९ ॥ जोडला मार्ग प्रांजळ । मिनेला सुसंगांचाही मेळ । तरि पाविजे वांचूनि वेळ । लागेचि कीं ॥ १००० ॥ तैसा वैराग्यलाभ जाला । वरि सद्गुरूही भेटला । जीवीं अंकुर फुटला । विवेकाचा ॥ १ ॥ तेणें ब्रह्म एक आथि । येर आघवीचि भ्रांति । हेही कीर प्रतीति । गाढ केली ॥ २ ॥ [ब्रह्म] परि तेंचि जें परब्रह्म । सर्वात्मक सर्वोत्तम । मोक्षाचेंही काम । सरे जेथ ॥ ३ ॥ यया तिन्हीं अवस्था पोटीं । जिरवी जें गा किरीटी । तया ज्ञानासिद्धी मिठी । दे जें वस्तु ॥४॥ ऐक्याचें एकपण जेथ सरे । आनंद कणही विरे । कांहींचि नुरोनि उरे । जें कांहीं गा ॥ ५ ॥ [आप्नोति] तियें ब्रह्मीं ऐक्यपणें । ब्रह्मचि होऊनि असणें । तें क्रमेंचि करून तेणें । पाविजे पैं ॥ ६ ॥ भुकेलियापासीं । वोगरिलें षड्रसीं । तो तृप्ती प्रतिग्रासीं । लाहे जेवि ॥ ७ ॥ तैसा वैराग्याचा वोलांवा । विवेकाचा तो दिवा । आंबुथितां आत्मठेवा । काढीचि तो ॥ ८ ॥ तरि भोगिजे आत्मऋद्धी । येवढी योग्यतेची सिद्धी । जयाच्या आंगीं निरवधी । ळेणें जाली ॥ ९ ॥ [तथा] तो जेणें क्रमें ब्रह्म । [समासेनैव] होणें करी गा सुगम । [निबोध मे] तया क्रमाचें आतां वर्म । आईक सांगों ॥ १०१० ॥

"परंतु हीच आत्मसिद्धि श्रीगुरुकृपा होण्याची वेळ आली ह्मणजे जो भाग्यशाली पुरुष असतो, त्यासच प्राप्त होते. ९८४ सूर्य उगवला कीं प्रकाश असतो तोच अंधाराला व्यापून सोडतो, किंवा दिव्याच्या सहवासानें कापुरही दिवाच होतो; ९८५ मिठाचा खडा पाण्याला लागला पुरे, कीं तो जसा पाणीच होऊन राहतो, ९८६ किंवा निद्रिस्त असलेला मनुष्य जागा झाला ह्मणजे स्वप्नासहवर्तमान निद्रा ही नाहींशी होऊन तो जसा आपला आपणांत मिळतो; ९८७ त्याप्रमाणें ज्या कोणाला दैवयोगानें गुरुवचन ऐकण्याबरोबर द्वैत गिळून आत्मवृत्तीमध्यें विश्रांति मिळते, ९८८ त्याला मग कर्म करतो हें कोण ह्मणणार ? आकाशाला येणें आणि जाणें आहे काय ? ९८९ ह्याकरितां त्याला निश्चयेंकरून कांहीं करण्याचें ह्मणून राहत नाहीं. आणि इतकें जरी हें असतें तरी, त्याला तें कांहींच वाटत नाहीं. ९९० अर्जुना! कानाची आणि गुरुवचनाची गांठ पडली कीं, अशा प्रकारें कोणी एखादा परब्रह्मरूपच होऊन जातो. ९९१ बाकी, त्यानें स्वकर्माच्या अग्नीमध्यें काम्यनिषिद्धाच्या सर्पणानें रज आणि तम हीं दोन्हीं आधींच जाळून टाकलेलीं असतात. ९९२ पुत्र, द्रव्य, परलोक ह्या तिहींचा अभिलाष हाही ज्याच्या घरचा नोकर होऊन राहिलेला असतो. ९९३ इंद्रियें भलत्याच पदार्थांत शिरून विटाळलेलीं असतात, त्यांना तो इंद्रियनिग्रहरूप तीर्थांत निश्चयेंकरून स्नान घालतो. ९९४ आणखी, स्वधर्माचें सारें फळ ईश्वराच्या ठिकाणीं अर्पण करून त्याच्या सामर्थ्यानें जो वैराग्याचें पद खंबीर करून सोडतो. ९९५ असा साक्षात्कारामध्यें ज्ञानाचा उत्कर्ष प्राप्त होण्याची जितकी सामग्री असेल, तितकी सारी सामग्री जो जमा करतो, ९९६ आणि त्याच वेळीं जर सद्गुरूंची गांठ पडली, आणि त्यांनीं कोणत्याही प्रकारें उपेक्षा केली नाहीं, ९९७ तरी औषध घेण्याबरोबर आपली पूर्व स्थिति प्राप्त होते काय ? किंवा सूर्योदय झाल्याबरोबर दुपार होते काय ? ९९८ उत्तम शेतांत आणि ओलीमध्यें चांगलें बीं जर पेरलें तर त्यास फळें प्राप्त होतील हें खास. पण बावा! तीं वेळेवर! ९९९ सरळ रस्ता सांपडला; चांगल्यांची संगतही मिळाली; तर मुक्काम गांठणारच. पण वेळ लागावयाचा तो लागावयाचाच. वांचावयाचा नाहीं. १००० त्याप्रमाणें वैराग्याचा लाभ झाला; आणि सद्गुरूही भेटला; आणखी जिवामध्यें विचाराचा अंकुरही फुटला; १००१ त्या-

१ उत्कर्षदशा. २ प्रतारणा केली जात नाहीं. ३ काय? ४ दिवस. ५ ओलसर भूमींत. ६ अत्यंत. ७ हंगामाला. ८ स्पष्ट. ९ मिळाला. १० साधुसंगतीचा. ११ फायदा न होतां. १२ दृढतर. १३ वृत्तिगत आनंदाचा अंश. १४ षड्रसान्न वाढिलें. १५ आश्रय. १६ उजळितां, पेटला असतां.

मुळें ब्रह्म हें एक आहे. बाकीची सारी भ्रांति; हा दृढतर अनुभवही येऊन चुकला; १००२ तरी तेंच जें सर्वात्मक सर्वोत्तम परब्रह्म; जेथें मोक्ष्याचें काम सरतें, १००३ अर्जुना! ह्या तीन अवस्थाही जें पोटांमध्यें जिरवितें. त्या ज्ञानालाही मिठी मारणारी जी वस्तु, १००४ ज्या ठिकाणीं ऐक्याचें एकपण सरतें; आनंदाचा अंशही जेथें लय पावतो; कांहींच न राहतांही जें उरतें; १००५ त्या ब्रह्मामध्यें ऐक्यपणानें ब्रह्मच होऊन राहणें हें त्यासही क्रमाक्रमानेंच प्राप्त होतें. १००६ भुकेलेल्यापुढें षड्रस पक्वान्नें वाढलीं, तर प्रत्येक घासाघासाला त्याचें समाधान होत जातें. १००७ त्याप्रमाणें त्याला वैराग्याचा आश्रय व विवेकाचा दिवा मिळाला कीं, तो आत्मरूप ठेवा काढतोच. १००८ तर आत्मज्ञानाचा उपभोग घेण्याइतक्या योग्यतेची सिद्धि ज्याच्या आंगामध्यें अखंड भूषणभूत होऊन राहते, १००९ तो ज्या कर्मानें ब्रह्मरूप होणें सुगम करतो, त्या कर्माचें धर्म आतां तुला सांगतों. ऐक.'' १०१०

बुद्ध्या विशुद्ध्या युक्तो धृत्यत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ९१

[बुद्ध्या विशुद्ध्या] तरि गुरु दाविलिया वाटा । येऊन विवेकतीर्थतटा । धुऊनीयां मेळकटा । बुद्धीचा तेणें ॥ ११ ॥ [युक्तः] मग राहूनें उंगळिली । प्रभा चंद्रें आलिंगिली । तैसी शुद्धत्वें जडली । आपणयां बुद्धि ॥ १२ ॥ सांडूनि कुळें दोन्ही । प्रियांसी अनुसरे कामिनी । द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं । पडली तैसी ॥ १३ ॥ [शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा] आणि ज्ञानाऐसें जिव्हार । नेवों नेवों निरंतर । इंद्रियीं केले थोर । शब्दादिक जे ॥ १४ ॥ तें रश्मिजाळ काढलेया । मृगजळ जाय लया । तैसें वृत्तिरोधें तयां । पांचांहीं केलें ॥ १५ ॥ नेणतां अधमाचिया अन्ना । खादलिया कीजे वमना । तैसीं घोकविलीं सवासना । इंद्रियें विषयीं ॥ १६ ॥ [धृत्यात्मानं नियम्य च] मग प्रत्यगावृत्ती चोखटें । लाविलीं गंगेचेनि तटें । ऐसीं प्रायश्चित्तें धुवटें । केलीं येणें ॥ १७ ॥ पाठीं सात्विकें धीरें तेणें । शोधारलीं तियें करणें । मग मनेंसीं योगधारणें । मेळविलीं ॥ १८ ॥ [रागद्वेषौ व्युदस्य च] तेविंचि प्राचीनें इष्टानिष्टें । भोगेंसी येउनी भेटे । तेथ देखिलियाही वोखटें । द्वेष न करी ॥ १९ ॥ नीं गोमटेंचि विपायें । तें आणूनि पुढां सूये । तयालागीं न होये । साभिलाष ॥ १०२० ॥ यापरि इष्टानिष्टीं । रागद्वेष किरीटी । त्यजूनि गिरिकपाटीं । निकुंजीं वसे ॥ २१ ॥

"तर गुरूंनीं दाखविलेल्या वाटेनें येऊन, विचाररूप तीर्थाच्या कांठीं तो बुद्धीचा मळ धुऊन टाकतो, १०११ ह्मणून राहूनें ओकलेली, चंद्रानें आलिंगन दिलेली प्रभा जशी शुद्ध असते, त्याप्रमाणें बुद्धि शुद्ध होऊन आत्मस्वरूपांत जडते. १०१२ सासर व माहेर हीं दोन्हीं कुळें टाकून पत्नी जशी पतीशींच रममाण होते, तद्वत् द्वंद्वाचा त्याग करून ती आत्मस्वरूपांतच मग्न होऊन राहते. १०१३ आणखी ज्ञानासारख्या जिवलग मित्राला निरंतर दूर दूर करून इंद्रियांनीं शब्दादि विषय जे थोर करून सोडलेले असतात, १०१४ ते, किरणांचें जाळें काढून घेतलें ह्मणजे जसें मृगजळ लयास जातें, त्याप्रमाणें प्रवृत्तीचा त्याग करून त्या पांचही विषयांना नाहींसें करून टाकतो. १०१५ न कळतां नीचाचें अन्न भक्षण केलें, तर तें ओकून टाकावें लागतें. त्याप्रमाणें वासनेसहवर्तमान विषय हे इंद्रियांकडून ओकवितो, १०१६ आणि मग त्यांना आत्मस्वरूपाकारवृत्तीरूप निर्मळ गंगातटाकावर नेऊन त्यांचा कलंक नाश करून पवित्र करतो. १०१७ नंतर तीं इंद्रियें धैर्यानें आणि सत्वगुणानें संशुद्ध करून मनासहवर्तमान योगधारणेंत त्यांचा प्रवेश करतो. १०१८ त्याचप्रमाणें पूर्व संस्काराच्या योगानें इष्ट किंवा अनिष्ट प्राप्त झालें, आणि त्यांत अनिष्ट पाहिलें तरीही

१ विवेकरूप तीर्थाच्या कांठीं. २ मळ. ३ ओकलेली. ४ प्रकाश. ५ आत्मस्वरूपीं. ६ सासर व माहेर. ७ पतीला स्त्री अनुसरते. ८ द्वैत सोडल्यानें. ९ अंतर्गत, मित्र. १० किरण काढून घेतांच. ११ अंतर्मुखतेनें. १२ पंचविषयांला. १३ नीचाचें अन्न. १४ वांति. १५ वासनासहित विषय इंद्रियांकडून ओकविले.

१ आत्मस्वरूपाकारवृत्ति,=प्रत्याहाररूप गंगातीरीं पाठवून दिलें. २ सत्वगुणानें. ३ शुद्ध केलीं. ४ इंद्रियें. ५ पूर्वसंस्कारानें अनुकूल व प्रतिकूल अशा. ६ अनिष्ट. ७ तिरस्कार. ८ नाहींतर. ९ कदाचित्. १० ठेवी. ११ प्रियाप्रियता. १२ गुहेंत. १३ दाट झाडीच्या अरण्यांत.

**जो द्वेष करीत नाहीं; १०१९ किंवा कदाचित् चांगलें इष्टच पुढें आणून ठेवलें तरी; त्याच्याबद्दल अभिलाष धरीत नाहीं. १०२० याप्रमाणें अर्जुना ! इष्ट येवो किंवा अनिष्ट येवो; कांहीं आलें तरी द्वेष सोडून जो गुहेंत व दाट झाडींत वास्तव्य करतो;" १०२१**

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥९२॥

[विविक्तसेवी] गजबजा सांडिलिया । वसवी वनस्थळिया । अंगाचिया मांदिया । एकलेया ॥ २२ ॥ शमदमादिकीं खेळे । न बोलणेंचि चावळे । गुरुवाक्याचेनि मेळें । नेणे वेळ॥२३॥ [लघ्वाशी] आणि आंगा बळ यावें । ना तरि क्षुधा जावें । कां जिभेचे पुरावे । मनोरथ ॥ २४ ॥ भोजन करितां विखीं । यया तिहींतें न लेखी । आहारीं मिती संतोषीं । माप न सूये ॥ २५ ॥ अनशनाचेनि पांवकें । हारपतां प्राण पोखे । इतुकियाचि भाग मोटकें । अशन करी॥ २६ ॥ [यतवाक्कायमानसः] आणि परपुरुषें कामिलि । कुळवधू आंग न घाली । निद्रालस्या न मोकली । अशन तैसें ॥ २७ ॥ दंडवताचेनि प्रसंगें । भुयीं हन अंग लागे । वांचूनि येर नेघे । रांभस्य तेथ ॥ २८ ॥ देहनिर्वाहापुरतें । राहाटवी हातापायांतें । किंबहुना आपैतें । सबाह्य केलें ॥ २९ ॥ आणि मनाचा उंबरा । वृत्तीसी देखों नेदी वीरा । तेथ कें वाग्व्यापारा । अवकाश असे ॥ १०३० ॥ ऐसेनि देहवाचा मानस । हें जिणोनि बाह्यप्रदेश । [ध्यान–] आकळिलें आकाश । ध्यानाचें तेणें ॥ ३१ ॥ गुरुवाक्यें उठविला । बोधीं निश्चय आला । न्याहाळी हातीं घेतला । आरिसां जैसा॥३२॥ पै ध्याता आपणपेंचि परी । ध्यानरूप वृत्तिमाझारीं । ध्येयत्वें धेहे अवधारीं । ध्यानरूढी गा ॥ ३३ ॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता । यया तिहीं एकरूपता । होय तंव पंडुसुता । कीजे तें गा ॥३४॥ म्हणौनि तो मुमुक्षु । आत्मज्ञानीं जाला दक्षु । [योगपरो नित्यं] परि पुढांसूनि पक्षु । योगाभ्यासाचा ॥ ३५ ॥ अपानरंध्रद्वया- । माझारीं धनंजया । पोष्णीं पिडूनियां । कांवरुमूळ ॥ ३६ ॥ आकुंचूनि अध । देऊनि तिन्ही बंध । करूनि एकवद । वायू भेदी ॥ ३७ ॥ कुंडलिनी जागऊनि । मध्यमा विकाशूनि । आधारादि भेदूनि । अग्निवरी ॥ ३८ ॥ सहस्रदळाचा मेघ । पीयूषें वर्षोनि चांग । तो मूळवरी वोघ । आणूनियां ॥ ३९ ॥ नाचतया पुण्यगिरी । चिद्भैरवाच्या खापरीं । मनपवनाची खीच पुरी । वाढुनियां ॥ १०४० ॥ जालिया योगाचा गाढा । मेळावा सूनि हा पुढां । ध्यान मागिलीकडां । स्वयंभ केलें ॥ ४१ ॥ आणि ध्यानयोगदोनी । इयें आत्मतत्त्वज्ञानी । पैठीं होआवया निर्विघ्नीं । आधींचि तेणें ॥ ४२ ॥ वीतरागतेसारिखा । जोडूनि ठेविला सखा । तो आघवियाचि भूमिकी- । सवें चाले ॥ ४३ ॥ पहावें दिसे तंववरी । दिठीतें न संडी दीप जरी । तरी कें अवसरीं । देखावया ॥४४॥ तैसें मोक्षीं प्रवर्तलया । वृत्ती ब्रह्मीं जाय लया । तंव वैराग्य आथी तया । भंग कैंचा ॥ ४५ म्हणौनि सवैराग्य । ज्ञानाभ्यास तो सभाग्य । करूनि जाला योग्य । आत्मलाभा ॥ ४६ ॥ ऐसी वैराग्याची अंगी । वाणूनियां वज्रांगीं । राजयोगतुरंगीं । आरूढला ॥ ४७ ॥ वरि आडपडिलें दिठी । सानें थोर निवटी । तें बळी विवेकमुष्टीं । ध्यानाचें खांडें ॥ ४८ ॥ ऐसेनि संसाररणाआंत । आंधारीं सूर्य तैसा असे जात । मोक्ष विजय श्रिये वरैतें । होआवयालागीं ॥ ४९ ॥

**"जनांचा सहवास सोडावयाचा; वनांत वस्ती करावयाची; आपल्या आंगाचे अवयव येवढेच काय ते सोबती; १०२२ शमदमादिकांमध्यें खेळतो; न बोलण्याचीच वडबड करतो; गुरुवाक्याच्या तल्लीनतेमध्यें वेळसुद्धां ज्याला कळत नाहीं. १०२३ आणखी आंगाला शक्ति**

१ जनसहवास. २ वनांत स्थळ वसविलें. ३ अवयवसमुदाय. ४ मन इंद्रियांच्या अंतर्मुखतेंत. ५ बोले. ६ क्षुधा मंद व्हावी. ७ विषयीं. ८ भोजलेला. ९ माप घालीत नाहींत. १० जठराग्नीनें, प्राण पोषण होतो. ११ इच्छिली किंवा बोलाविली. १२ दवडीत नाहीं. १३ विषयसुख, अविचार. १४ उपयोग करी. १५ स्वाधीन. १६ शब्दास. १७ जिंकून. १८ ध्यान करण्यास योग्यपणानें. १९ ध्यान करितो. २० प्रकार. २१ शहाणा. २२ पुढें करून. २३ प्रकार. २४ गुदशिश्नछिद्रांच्या. २५ खोटेनें दावून.

१ गुदशिश्नास सांधणाऱ्या रेषाकृतीचें मूळ, चार बोटांचा मध्य. २ आकर्षण करून. ३ गुदस्थानचा वज्रबंध, नाभिस्थान उड्डियाणबंध व कंठस्थान जालंधरबंध. ४ नाभिकमलांतील मूळशक्ति. ५ सुषुम्ना. ६ गुदस्थानच्या आधारचक्राचा भेद करून. ७ कुंडलिनीच्या जागृतावस्थेपासून उत्पन्न झालेल्या तेजावर. ८ मस्तकस्थित ब्रह्मरंध्रींचा. ९ मूलाधारगुदस्थित चक्रापर्यंत. १० द्विदलरूप कमल जें अग्निचक्र तद्रूप पर्वतावर. ११ चैतन्यरूप भैरवाच्या भिक्षापात्रांत म्हणजे सहस्रदलरूप कमलमस्तकांत. १२ मनोरूप वायूची पूर्ण खिचडी. १३ बळकटी. १४ वर सांगितलेला समुदाय पुढें करून. १५ ब्रह्मध्यानाकडे. १६ स्थिर प्राप्त. १७ वैराग्यासारखा. १८ अवस्थांसमागमें. १९ वेळ. २० अहंस्फुरण. २१ कवच. २२ वज्राप्रमाणें बळकट. २३ राजयोगरूप घोड्यावर २४ स्थूल, सूक्ष्म. २५ संहारी. २६ खड्ग. २७ वरणारा, भर्ता.

यावी; किंवा क्षुधा मंद व्हावी; किंवा जिभेचे हेतु पूर्ण व्हावेत; १०२४ भोजन करीत असतां ह्या तिहींनाही जो मोजित नाहीं. आहारामध्यें मोजकेपणा; संतोषामध्यें मात्र माप नाहीं. १०२५ जठराग्नीनें दग्ध होणारा प्राण वांचेल, इतका परिमित आहार मात्र सेवन करावयाचा. १०२६ आणखी परपुरुषानें हाक मारिली तरी, कुलीन स्त्री त्याच्या आंगाला स्पर्श करीत नाहीं, त्याप्रमाणें निद्रेला आणि आळसाला जो थारा देत नाहीं. १०२७ नमस्कार घालतांना जें काय भूमीला आंग लागेल तें लागेल. त्याशिवाय उगाच अविचारानें लोळणें नाहीं. १०२८ देह चालेल इतक्या पुरताच हातापायांचा उपयोग करतो. किंबहुना अंतर्बाह्य सारें आपल्याच स्वाधीन करून सोडतो. १०२९ हे **वीरा!** वृत्तीला मनाचा उंबराही जो पाहूं देत नाहीं, तेथें शब्दादिकांच्या व्यापाराला संधि कोठची? १०३० अशा प्रकारें तो काया, वाचा, व मन हीं जिंकून ध्यानाच्या आकाशासुद्धां बाह्य प्रदेश आपल्या ताब्यांत घेतो. १०३१ तो गुरुवाक्यानें जागृत होतो आणि ज्ञानानें आलेला निश्चय, आरसा घेऊन पहात बसावें त्याप्रमाणें जो पहात बसतो. १०३२ ध्यान करणारा आपणच असतो आणि तोच ध्यानरूपवृत्तीमध्यें ध्यान करण्यास योग्य जें आपण त्याचेंच ध्यान करतो. असा जो ध्यानाचा प्रकार तो आतां ऐक. १०३३ तेव्हां **अर्जुना!** ध्येय, ध्यान आणि ध्याता ह्या तिहींची एकरूपता होईल तोंपर्यंत तें तो करतो. १०३४ ह्मणून तो मुमुक्षु आत्मज्ञानामध्यें प्रवीण होतो. परंतु हें सर्व योगाभ्यासाचा प्रकार पुढें करून करतो. १०३५ **धनंजया!** खालच्या दोन्हीं छिद्रांमध्यें खोट देऊन मधील शिवणीस रेटून, १०३६ अधोभाग (गुदस्थानचा) आकर्षण करून वज्रबंध, (नाभिस्थान) उड्डीयाणबंध, (कंठस्थान) जालंधरबंध हे तिन्ही बंध साधून वायुभेदांची एकवाक्यता लावून, १०३७ कुंडलिनी जागृत करून, मध्यमा-सुषुम्ना विकसित करून आधारचक्राचा भेद करून, त्या अग्नीवर, १०३८ मस्तकांतील ब्रह्मरंध्ररूप मेघापासून अमृताची उत्तम वृष्टि करीत तो ओघ मूलाधारचक्रापर्यंत आणून, १०३९ पुण्यपर्वतावर नाचणारा जो चैतन्यरूप भैरव, त्याच्या भिक्षापात्रांत मनाची आणि वायूची भरपूर खिचडी वाढून, १०४० योगाचा अभ्यास दृढतर झाला ह्मणजे हा सर्व समुदाय पुढें करून त्याच्या पाठीमागें ध्यानाला स्वयंभु करून सोडतो. १०४१ आणखी हें ध्यान व योग दोन्हीही ह्या आत्मतत्त्वज्ञानामध्यें निर्विघ्नपणें स्थिर होण्याकरितां, त्यानें आधींच, १०४२ वैराग्यासारखा मित्र जोडून ठेवलेला असतो. तो प्रत्येक स्थितीमध्यें त्याच्याबरोबर चालत असतो. १०४३ दिसतें तोंपर्यंत पहावें. परंतु दीप जर दृष्टीला सोडित नाहीं, तर पहावयाला अवकाश तरी कोठें राहिला? १०४४ तद्वत् मोक्षामध्यें शिरलें, कीं अहं हें स्फुरण लयास जाईपर्यंत त्याला वैराग्य असतें. मग त्याला भंग कशाचा? १०४५ ह्मणून वैराग्यासहवर्तमान जो ज्ञानाचा अभ्यास करतो, तो भाग्यवान् होय. आणि तोच आत्मलाभाला योग्य होतो. १०४६ अशा प्रकारें वैराग्याचें वज्राप्रमाणें बळकट कवच आंगांत घालून जो राजयोगरूपी (अद्वैतबोधरूप) घोड्यावर बसतो. १०४७ तो विवेकाच्या बळकट मुठींत ध्यानरूप तरवार घेऊन दृष्टीपुढें जें जें लहान किंवा थोर येईल, तें स्थूल असो कीं सूक्ष्म असो, त्याचा संहार करीत सुटतो. १०४८ अशा रीतीनें अंधारांत सूर्य जातो तसा, संसारयुद्धामध्यें मोक्षाची विजयश्री वरण्याकरितां जात असतो." १०४९

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते॥५३॥

[अहंकारं] तेथ आडवावया आले। दोषवैरी जे धोपटिले। तयांमाजी पहिले। देहाहंकार ॥ १०५० ॥ जो न मोकली मारूनी। जीवों नेदी उपजवोनी। विचंवी खोडां घालुनी। हाडांचिया ॥ ५१ ॥ तेयाचा देहदुर्ग हा थारा। मोडोनि

१ श्रमवी. २ त्या अभिमानाचा. ३ देहरूप किल्ला.

**जो द्वेष करीत नाहीं; १०१९ किंवा कदाचित् चांगलें इष्टच पुढें आणून ठेवलें तरी, त्याच्या-बद्दल अभिलाष धरीत नाहीं. १०२० याप्रमाणें अर्जुना ! इष्ट येवो किंवा अनिष्ट येवो; कांहीं आलें तरी द्वेष सोडून जो गुहेंत व दाट झा-डींत वास्तव्य करतो;" १०२१**

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥५२॥

[विविक्तसेवी] गजबजा सांडिलिया । वसवी वनस्थळिया । अंगाचिया मांदिया । एकलेया ॥ २२ ॥ शमदमादिकीं खेळे । न बोलणेंचि चावळे । गुरुवाक्याचेनि मेळें । नेणे वेळ॥२३॥ [लघ्वाशी] आणि आंगा बळ यावें । ना तरि क्षुधा जावें । कां जिभेचे पुरावे । मनोरथ ॥ २४ ॥ भोजन करितां विखीं । यया तिहींतें न लेखी । आहारीं मिती संतोषीं । माप न सूये ॥ २५ ॥ अनशनाचेनि पांवकें । हारपतां प्राण पोखे । इतुकियाचि भाग मोटकें । अशन करी॥ २६ ॥ [यतवाक्कायमानसः] आणि परपुरुषें कामिलि । कुळवधू आंग न घाली । निद्रालस्या न मोकली । अशन तैसें ॥ २७ ॥ दंडवताचेनि प्रसंगें । भुयीं हन अंग लागे । वांचूनि येर नेघे । रांभस्य तेथ ॥ २८ ॥ देहनिर्वाहापुरतें । राहाटवी हातापायांतें । किंबहुना आपैतें । सबाह्य केलें ॥ २९ ॥ आणि मनाचा उंबरा । वृत्तीसी देखों नेदी वीरा । तेथ कें वाग्व्यापारा । अवकाश असे ॥ १०३० ॥ ऐसेनि देहवाचा मानस । हें जिणोनि बाह्यप्रदेश । [ध्यान–] आकळिलें आ-काश । ध्यानाचें तेणें ॥ ३१ ॥ गुरुवाक्यें उठविला । बोधीं निश्चय आला । न्याहाळी हातीं घेतला । आरिसां जैसा॥३२॥ पै ध्याता आपणपेंचि परी । ध्यानरूप वृत्तिमाझारीं । ध्येयत्वें धेहे अवधारीं । ध्यानरूढी गा ॥ ३३ ॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता । यया तिहीं एकरूपता । होय तंव पंडुसुता । कीजे तें गा ॥३४॥ म्हणौनि तो मुमुक्षु । आत्मज्ञानीं जाला दक्षु । [योगपरो नित्यं] परि पुढांसूनि पक्षु । योगाभ्यासाचा ॥ ३५ ॥ अपानरंध्रद्वया- । माझारीं धनंजया । पोष्णीं पिडूनियां । कांवरुमूळ ॥ ३६ ॥ आकुंचूनि अध देऊनि तिन्ही बंध । करूनि एकवद । वायू भेदी ॥ ३७ कुंडलिनी जागऊनि । मध्यमा विकाशूनि । आधारादि भे दूनि । अग्निवरी ॥ ३८ ॥ सहस्रदळाचा मेघ । पीयूषें वर्षो चांग । तो मूळवरी वोघ । आणूनियां ॥ ३९ ॥ नाचतय पुण्यगिरी । चिद्भैरवाच्या खापरीं । मनपवनाची खीच पुरी वाढुनियां ॥ १०४० ॥ जालिया योगाचा गाढा । मेळाव सूनि हा पुढां । ध्यान मागिलीकडां । स्वयंभ केलें ॥ ४१ आणि ध्यानयोगदोनी । इयें आत्मतत्त्वज्ञानीं । पैठीं होआवय निर्विघ्नीं । आधींचि तेणें ॥ ४२ ॥ वीतरागतेसारिखा । जो हूनि ठेविला सखा । तो आघवियाचि भूमिकीं- । सवें चा ॥ ४३ ॥ पहावें दिसे तंववरी । दिठीतें न संडी दीप जरी तरी कें अवसरीं । देखावया ॥४४॥ तैसें मोक्षीं प्रवर्तलया वृत्ती ब्रह्मीं जाय लया । तंव वैराग्य आथी तया । भं कैंचा ॥ ४५ म्हणौनि सवैराग्य । ज्ञानाभ्यास तो सभाग्य करूनि जाला योग्य । आत्मलाभा ॥ ४६ ॥ ऐसी वैराग्याचं अंगी । बाणूनियां वज्रांगीं । राजयोगतुरंगीं । आरूढल ॥ ४७ ॥ वरि आडपडिलें दिठी । सानें थोर निवटी । वळी विवेकमुष्टीं । ध्यानाचें खांडें ॥ ४८ ॥ ऐसेनि सं साररणाआंत । आंधारीं सूर्य तैसा असे जात । मोक्ष विजय श्रिये वरेतं । होआवयालागीं ॥ ४९ ॥

**"जनांचा सहवास सोडावयाचा; वनांत वस्ती करावयाची; आपल्या आंगाचे अवयव येवढेच काय ते सोबती; १०२२ शमदमादिकां-मध्यें खेळतो; न बोलण्याचीच बडबड करतो गुरुवाक्याच्या तल्लीनतेमध्यें वेळसुद्धां ज्याला कळत नाहीं. १०२३ आणखी आंगाला शक्ति**

---

१ जनसहवास. २ वनांत स्थळ वसविलें. ३ अवयवसमुदाय. ४ मन इंद्रियांच्या अंतर्मुखतेंत. ५ बोले. ६ क्षुधा मंद व्हावी. ७ विषयीं. ८ मोजलेला. ९ माप घालीत नाहींत. १० जठराग्नीनें, प्राण पोषण होतो. ११ इच्छिली किंवा बोलाविली. १२ दवडीत नाहीं. १३ विषयसुख, अविचार. १४ उपयोग करी. १५ स्वाधीन. १६ शब्दास. १७ जिंकून. १८ ध्यान करण्यास योग्यपणानें. १९ ध्यान करितो. २० प्रकार. २१ शहाणा. २२ पुढें करून. २३ प्रकार. २४ गुदशिश्नछिद्रांच्या. २५ खोटेनें दाबून.

१ गुदशिश्नास सांधणाऱ्या रेषाकृतीचें मूळ, चार बोटांच मध्य. २ आकर्षण करून. ३ गुदस्थानचा वज्रबंध, नाभिस्थान उड्डियाणबंध व कंठस्थान जालंधरबंध. ४ नाभिकमलांतील मूळशक्ति. ५ सुषुम्ना. ६ गुदस्थानच्या आधारचक्राचा भेद करून. ७ कुंडलिनीच्या जागृतावस्थेपासून उत्पन्न झालेल्य तेजावर. ८ मस्तकस्थित ब्रह्मरंध्रींचा. ९ मूलाधारगुदस्थित चक्रापर्यंत. १० द्विदलरूप कमल जें अग्निचक्र तद्रूप पर्वतावर. ११ चैतन्यरूप भैरवाच्या भिक्षापात्रांत म्हणजे सहस्रदलरूप कमलमस्तकांत. १२ मनोरूप वायूची पूर्ण खिचडी १३ बळकटी. १४ वर सांगितलेला समुदाय पुढें करून. १५ ब्रह्मध्यानाकडे. १६ स्थिर प्राप्त. १७ वैराग्यासारखा. १८ अवस्थांसमागमें. १९ वेळ. २० अहंस्फुरण. २१ कवच. २२ वज्राप्रमाणें बळकट. २३ राजयोगरूप घोड्यावर २४ स्थूल, सूक्ष्म. २५ संहारी. २६ खड्ग. २७ वरणारा, भर्ता.

यावी; किंवा क्षुधा मंद व्हावी; किंवा जिभेचे हेतु पूर्ण व्हावेत; १०२४ भोजन करीत असतां ह्या तिहींनाही जो मोजित नाहीं. आहारामध्यें मोजकेपणा; संतोषामध्यें मात्र माप नाहीं. १०२५ जठराग्नीनें दग्ध होणारा प्राण वांचेल, इतका परिमित आहार मात्र सेवन करावयाचा. १०२६ आणखी परपुरुषानें हाक मारिली तरी, कुलीन स्त्री त्याच्या आंगाला स्पर्श करीत नाहीं, त्याप्रमाणें निद्रेला आणि आळसाला जो थारा देत नाहीं. १०२७ नमस्कार घालतांना जें काय भूमीला आंग लागेल तें लागेल. त्याशिवाय उगाच अविचारानें लोळणें नाहीं. १०२८ देह चालेल इतक्या पुरताच हातापायांचा उपयोग करतो. किंबहुना अंतर्बाह्य सारें आपल्याच स्वाधीन करून सोडतो. १०२९ हे **वीरा!** वृत्तीला मनाचा उंबराही जो पाहूं देत नाहीं, तेथें शब्दादिकांच्या व्यापाराला संधि कोठची? १०३० अशा प्रकारें तो काया, वाचा, व मन हीं जिंकून ध्यानाच्या आकाशासुद्धां बाह्य प्रदेश आपल्या ताब्यांत घेतो. १०३१ तो गुरुवाक्यानें जागृत होतो आणि ज्ञानानें आलेला निश्चय, आरसा घेऊन पहात बसावें त्याप्रमाणें जो पहात वसतो. १०३२ ध्यान करणारा आपणच असतो आणि तोच ध्यानरूपवृत्तीमध्यें ध्यान करण्यास योग्य जें आपण त्याचेंच ध्यान करतो. असा जो ध्यानाचा प्रकार तो आतां एक. १०३३ तेव्हां **अर्जुना!** ध्येय, ध्यान आणि ध्याता ह्या तिहींची एकरूपता होईल तोंपर्यंत तें तो करतो. १०३४ ह्मणून तो मुमुक्षु आत्मज्ञानामध्यें प्रवीण होतो. परंतु हें सर्व योगाभ्यासाचा प्रकार पुढें करून करतो. १०३५ **धनंजया!** खालच्या दोन्हीं छिद्रांमध्यें खोट देऊन मधील शिवणीस रेटून, १०३६ अधोभाग (गुदस्थानचा) आकर्षण करून वज्रबंध, (नाभिस्थान) उड्डीयाणबंध, (कंठस्थान) जालंधरबंध हे तिन्ही बंध साधून वायुभेदांची एकवाक्यता लावून, १०३७ कुंडलिनी जागृत करून, मध्यमा-सुषुम्ना विकसित करून आधारचक्राचा भेद करून, त्या अग्नीवर, १०३८ मस्तकांतील ब्रह्मरंध्ररूप मेघापासून अमृताची उत्तम वृष्टि करीत तो ओघ मूलाधारचक्रापर्यंत आणून, १०३९ पुण्यपर्वतावर नाचणारा जो चैतन्यरूप भैरव, त्याच्या भिक्षापात्रांत मनाची आणि वायूची भरपूर खिचडी वाढून, १०४० योगाचा अभ्यास दृढतर झाला ह्मणजे हा सर्व समुदाय पुढें करून त्याच्या पाठीमागें ध्यानाला स्वयंमु करून सोडतो. १०४१ आणखी हें ध्यान व योग दोन्हीही हा आत्मतत्त्वज्ञानामध्यें निर्विघ्नपणें स्थिर होण्याकरितां, त्यानें आधींच, १०४२ वैराग्यासारखा मित्र जोडून ठेवलेला असतो. तो प्रत्येक स्थितीमध्यें त्याच्याबरोबर चालत असतो. १०४३ दिसतें तोंपर्यंत पहावें. परंतु दीप जर दृष्टीला सोडित नाहीं, तर पहावयाला अवकाश तरी कोठें राहिला? १०४४ तद्वत् मोक्षामध्यें शिरलें, कीं अहं हें स्फुरण लयास जाईपर्यंत त्याला वैराग्य असतें. मग त्याला भंग कशाचा? १०४५ ह्मणून वैराग्यासहवर्तमान जो ज्ञानाचा अभ्यास करतो, तो भाग्यवान् होय. आणि तोच आत्मलाभाला योग्य होतो. १०४६ अशा प्रकारें वैराग्याचें वज्राप्रमाणें बळकट कवच आंगांत घालून जो राजयोगरूपी (अद्वैतबोधरूप) घोड्यावर वसतो. १०४७ तो विवेकाच्या बळकट मुठींत ध्यानरूप तरवार घेऊन दृष्टीपुढें जें जें लहान किंवा थोर येईल, तें स्थूल असो कीं सूक्ष्म असो, त्याचा संहार करीत सुटतो. १०४८ अशा रीतीनें आंधारांत सूर्य जातो तसा, संसारयुद्धामध्यें मोक्षाची विजयश्री वरण्याकरितां जात असतो." १०४९

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते॥५३॥

[अहंकारं] तेथ आडवावया आले। दोषवैरी जे थोरिले। तयांमाजी पहिले। देहाहंकार ॥ १०५० ॥ जो न मोडती मरतां। जीतों नेदी उपजवोनी। विवेकी लोडां घालुनी। हाडांचिया ॥ ५१ ॥ तयाचा देहदुर्ग हा घरा। मोडोनि

१ भ्रमरी. २ त्या अभिमानाचा. ३ देहरूप किल्ला.

घेतला तो वीरा । [बलं] आणि बळ हा दुसरा । मारिला वैरी ॥ ५२ ॥ जो विषयाचेनि नांवें । चौगुणेंही वरी थांवे । जेणें मृतावस्था धांवे । सर्वत्र जगा ॥ ५३ ॥ तो विषयविषाचा ठावो । आघविया दोषांचा रावो । परी ध्यानखड्गाचा घावो । साहेल कैंचा ॥ ५४ ॥ [दर्पं] आणि प्रिय विषयप्राप्ती । करी जया सुखाची व्यक्ती । तेचि घालूनि बुंथी । आंगीं जो वांजे ॥ ५५ ॥ जो सन्मार्गा भुलवी । मग अधर्माच्या आडवीं । सूनि वाघां सांपडवी । नरकादिकां ॥५६॥ तो विश्वासें मारिता रिपु । निर्वटूनि घातला दर्पु । [कामं] आणि जयाचा अहा कंपु । तापसांसी ॥ ५७ ॥ क्रोधा ऐसा महादोख । जयाचा देख परिपाक । भरिजे तंव अधिक । रितें होय जो ॥ ५८ ॥ तो काम कोणेचठायीं । नसे ऐसें केलें पाहीं । [क्रोधं] कीं तेंचि क्रोधाही । सहजें आलें ॥५९॥ मुळाचें तोडणें जैसें । होय कां शाखोद्देशें । काम नाशलेनि नाशे । तैसा क्रोध ॥ १०६० ॥ ह्मणौनि काम वैरी । जाला जेथ ठाणोरी । तेथ सरली वारी । क्रोधाचीही ॥ ६१ ॥ [परिग्रहं] आणि समर्थ आपुला खोडों । शिसें वाहवी जैसा होडों । तैसा भुंजौनि जो गाढा । परिग्रहो ॥ ६२ ॥ जो माथांचि पालवणी । अंगा अवगुण घांलवी । जीवें दांडी घेववी । ममत्वाची ॥ ६३ ॥ शिष्यशास्त्रादिविलासें । मठादिमुद्रेचेनि मिसें । घातले आहाती फांसे । निःसंगा जेणें ॥ ६४ ॥ घरीं कुटुंबपणें सरे । तरीं वनीं वन्य होउनि अवतरे । नागवीयाही शरीरें । लागला आहे ॥ ६५ ॥ [विमुच्य] ऐसा दुर्जय जो परिग्रहो । तयाचा फेडूनि ठावो । भवविजयाचा उत्साहो । भोगीतसे जो ॥६६॥ [निर्ममः] तेथ अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणाचे जे मेळावे । ते कैवल्यदेशींचे आघवे । राव जैसे आले ॥ ६७ ॥ तेव्हां सम्यक्ज्ञानाचिया । राणिवा उगाणूनि तया । परिवार होऊनियां । राहत आंगें ॥ ६८ ॥ प्रवृत्तीचिये राजबिदी । अवस्थाभेदप्रमदीं । कीजत आहे प्रतिपदीं । सुखाचें लोण ॥ ६९ ॥ पुढां बोधाचिये कांबीवरी । विवेक दृश्याची मादी सारी । योगभूमिका आरती करी । येती जैसिया ॥ १०७० ॥ तेथ ऋद्धिसिद्धींचीं अनेगें । वृंदें मिळती प्रसंगें । तिये पुष्पवर्षी आंगें । नाहातसे तो ॥ ७१ ॥ ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें । स्वराज्य येतां जवळिकें । झळंबित आहे हरिखें । तिन्हीं लोक ॥ ७२ ॥ तेव्हां वैरिया कां मैत्रिया । तयासि माझें ह्मणावया । समानता धनंजया । उरेचिही ना ॥ ७३ ॥ हें ना भलतेणे व्याजें । तो जयातें ह्मणे माझें । तें नोडवेचि कां दुजें । अद्वितीय जाला ॥ ७४ ॥ पैं आपुलिया एकी सत्ता । सवेंही कवळूनियां पंडुसुता । केहीं न लगती ममता । धांडिली तेणें ॥ ७५ ॥ [शांतः] ऐसा जितिलिया रिपुवर्ग । अपमानिलिया हें जग । अपैसा योगतुरंग । स्थिर जाला ॥ ७६ ॥ वैराग्याचें गांढलें । अंगत्राण होतें भलें । तेंही नावेक ढिलें । तेव्हां करी ॥ ७७ ॥ आणि निर्वटी ध्यानाचें खांडें । तें दुजें नाहींचि पुढें । ह्मणूनि हात आंसुडे । वृत्तीचाही ॥ ७८ ॥ जैसें रसौषध खरें । आपुलें काज करूनि पुरें । आपणही जुरे । तैसें होतसे ॥ ७९ देखोनि ठाकिताठावो । धांवतां थिरांवे पावो । तैसा ब्रह्मसामीप्यें थांवो । अभ्यास सांडी ॥ १०८० ॥ घडतां महोदधीसी । गंगा वेग सांडी जैसी । कां कामिनी कांतापासीं । स्थिर होय ॥ ८१ ॥ ना ना फळतिये वेळे । केळीची वाढि मोटुळे । कां गांवापुढें वळे । मार्ग जैसा ॥ ८२ ॥ तैसा आत्मसाक्षात्कार । होईल देखोनि गोचर । ऐसा साधनेंहतियेर । हळूचि ठेवी ॥ ८३ ॥ ह्मणौनि ब्रह्मेंसी तया । ऐक्याचा समो धनंजया । होतसे तैं उपाया । वोहटे पडे ॥ ८४ ॥ मग वैराग्याची गोंधळुक । जे ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य । योगफळासही परिपाक । दशा जे कां ॥ ८५ ॥ ते शांति पै गा सुभगा । संपूर्ण ये तयाचिया आंगा । [ब्रह्मभूयाय कल्पते] तैं ब्रह्म होआवयाजोगा । होय तो पुरुष ॥ ८६ ॥ पुनवेहूनि चतुर्दशी । जेतुलें उणेंपण शशी । कां सोळेया ऊनि जैसी । पंधरावी वानी ॥ ८७ ॥ सागरींही पाणी वेगें । संचरे तें रूप गंगे । येर निश्चळ जें उगें । तें समुद्र जैसा ॥ ८८ ॥ ब्रह्मा आणि ब्रह्महोतिये । योगयते तैसा पाड आहे । तेचि शांतीचेनि लाहे । हावें तो

१ सर्व विषयांचें नांव घेतांना. २ बळावे. ३ कसें सहन करील. ४ खोळ. ५ आदळे. ६ अरण्यांत. ७ घालून. ८ गुरुशास्त्रवचनीं विश्वासानें. ९ वधून. १० गर्व. ११ पक्वावस्था. १२ रिकामा. १३ इच्छा. १४ युद्धहत, युद्धकर्ता. १५ वेडी. १६ मस्तकें. १७ पैजेनें. १८ संग. १९ ओझें घाली, डोक्यावर बसतो. २० जडवी. २१ काठी. २२ शिष्यसंप्रदाय वाढविण्याचे प्रकार. २३ मठ करणें, मुद्रा दाखविणें. २४ विरक्तास. २५ ज्या परिग्रहानें. २६ घरकुटुंब त्याग करून दूर झाला. २७ वन्यसंबंधाचे विषयीं. २८ स्वामित्वानें. २९ झाडा करून. ३० राजमार्गावर. ३१ जागृति इत्यादिक क्रियांविषयीं. ३२ धनुष्यानें. ३३ नाहींशी करी.

१ आरती करणाऱ्या. २ पुष्पवृष्टीनें. ३ आनंदित, गुंडाळित. ४ साम्यतेनें. ५ निमित्तानें. ६ प्राप्त होत नाहीं. ७ दुसरेपणानें. ८ वेढून. ९ कधीं. १० फेडिली. ११ शत्रुसमुदाय. १२ सहज. १३ योगरूप घोडा. १४ अंगावर बळकट घातलेलें. १५ कवच. १६ वधी. १७ खड्ग. १८ झुगारी. १९ विश्रांतिस्थान. २० पाय स्थिर होतो. २१ वळ. २२ सरे, कुंठे. २३ शास्त्र. २४ समय. २५ तूट. २६ मावळती वेळ. २७ वृद्धपणा. २८ परिणाम. २९ ऐश्वर्यवंता. ३० उणी. ३१ कस. ३२ साम्य.

गा ॥ ८९ ॥ पैं तेंचि होणेनवीण । प्रतीती आलें जें ब्रह्मपण । ते ब्रह्महोती जाण । योग्यता येथ ॥ १०५० ॥

"तेव्हां दोषरूप शत्रु जे जे आडवे येतात, आणि त्यांपैकीं ज्यांना धोपटून काढावें लागतें, त्यांमध्यें पहिला कोण ? तर देहाहंकार. १०५० त्याला नुसता मारूनच सोडित नाहीं, तर त्यानें पुन्हा डोकेंसुद्धां वर करूं नये असें करून टाकतो. १०५१ हे **वीरा!** त्या देहाहंकाराचें राहण्याचें ठिकाण जो देहरूप किल्ला तो जिंकून टाकलेला असतो. आणखी, बळ हा दुसरा वैरी मारतो. १०५२ विषयांचें नांव घेतांच जो चौपटीहूनही अधिक वाढतो. आणि ज्याच्या योगानें सर्व जगाला मृतावस्था प्राप्त होते. १०५३ तो विषयरूप विषाची खाण; सर्व दोषांचा राजा तरी, ध्यानरूप तरवारीचा वार कसा सहन करणार? १०५४ आणखी प्रिय विषय प्राप्त झाले कीं ज्याचें सुख दिसूं लागतें. आणि तेंच कवच आंगांत घालून जो गरजतो. १०५५ जो सन्मार्गाला भुरळ पाडतो; चुकवितो; आणि अधर्माच्या अरण्यांत घालून नरकादिक वाघांच्या तावडींत देतो. १०५६ विश्वासानें मारणारा दुस्मान; असा जो गर्व तो ज्यानें ठार करून टाकलेला. आणि अरेरे! ज्याचा तपस्व्यांनासुद्धां धाक, १०५७ क्रोधासारखा महादोष हें ज्याचें फळ; भरूं लागलें कीं जो अधिकाधिक रिताच होत जाणारा; १०५८ असा जो काम तो कोठेंच ज्यानें नाहींसा करून टाकलेला. तेव्हां क्रोधाच्या कपाळालाही सहजीं तीच दशा आली. १०५९ ज्याप्रमाणें मूळ तोडलें म्हणजे शाखा तुटतातच; त्याप्रमाणें कामाचा नाश झाला कीं, क्रोधाचाही झालाच. १०६० म्हणून कामरूप शत्रु जेथें पराजित होतो, तेथें क्रोधाचीही वारी संपते. १०६१ आणखी सत्ताधीश असतो तो आपला खोडाही पैजेनें डोक्यावरून न्यावयाला लावतो, त्याप्रमाणें भोग भोगून मातलेला जो परिग्रह, १०६२ जो आपल्या नुसत्या मस्तक हालविण्यानेंच आपल्या आंगचा अवगुण चिकटवितो, व जिवाकडून ममत्वाची दांडी घेववितो, १०६३ शिष्यसांप्रदाय वाढविणें; मठ करणें; मुद्रा दाखविणें, इत्यादि निःसंगावरही ज्यानें फांसे घालून ठेवलेले आहेत. १०६४ घरांतील कुटुंबांतून निघतो परंतु वनामध्यें वन्यविषयीं होऊन राहतो; नागव्यांच्या शरीरालाही जो चिकटलेला; १०६५ असा जिंकण्याला कठीण जो परिग्रह, त्याचा गंड मोडून जो संसारापासून विजयी होत्साता आनंदोत्सवाचा उपभोग घेतो. १०६६ तेव्हां अमानित्वादि सारे ज्ञानगुणांचे समुदाय, ते जणों काय मोक्षदेशाचे राजे असावेत त्याप्रमाणें येतात. १०६७ त्या वेळीं यथार्थज्ञानाच्या राज्याचा त्यांस झाडा देऊन, त्यांचा अंकित होऊन राहतो. १०६८ प्रवृत्तीच्या राजमार्गावर जागृति इत्यादि अवस्था, भेदरूपी स्त्रिया पावलोपावलीं सुखाचें लिंबलोण उतरित असतात. १०६९ पुढें विचार हा ज्ञानाची काठी घेऊन दृश्याची दाटी मागें करतो. आरती ओवाळण्यास स्त्रिया आल्याप्रमाणें योगभूमिका ( अवस्था ) येतात. १०७० तेव्हां प्रसंगानुसार ऋद्धिसिद्धींचेही अनेक समुदाय जमा होतात. आणि त्यांच्या पुष्पवृष्टीनें त्यांचें आंग अगदीं झांकून जातें. १०७१ अशा प्रकारें ब्रह्मैक्यासारख्या स्वराज्याची प्राप्ति झाली म्हणजे त्रिभुवन आनंदामध्यें बुडून जातें. १०७२ त्या वेळीं **धनंजया!** शत्रूला किंवा मित्राला माझें म्हणावयाला कांहीं उरतच नाहीं. १०७३ हें नसलें तर, कोणत्याही इतर निमित्तानें माझें असें म्हटलें तरीसुद्धां तें दुसरें होत नाहीं. कारण, तो स्वतःच अद्वितीय झालेला असतो. १०७४ **अर्जुना!** आपल्या एकाच सत्तेखालीं सर्व घेऊन कधीं न सुटणारी ममता त्यानें सोडलेली असते. १०७५ अशा प्रकारें शत्रुसमुदाय जिंकला; ह्या जगाचा अव्हेर केला; कीं योगरूप घोडा आपोआपच उभा राहतो. १०७६

१ तें ब्रह्म झाल्यावांचून ब्रह्मपणा जो प्रतीतीस येतो ती ब्रह्म होण्याची योग्यता. २ ब्रह्म होण्याची.

त्या वेळेस वैराग्याचें वळकट घातलेलें कवच असतें तें सुद्धां घटकाभर ढिलें करतो. १०७७ आणखी ध्यानाचें खड्गही फेंकून देतो; कारण, दुसरें ह्मणून कांहीं उरत नाहीं त्यामुळें वृत्तीचाही हात झिटकारून देतो. १०७८ ज्याप्रमाणें खरें रसायन आपलें काम पुरतें करून मग आपणही शिल्लक रहात नाहीं, त्याप्रमाणें होतें. १०७९ थांबावयाचें ठिकाण पाहिलें ह्मणजे धांवणारा जसा पाय थांबवितो, त्याप्रमाणें ब्रह्माशीं ऐक्यभाव झाला ह्मणजे अभ्यासाचें ठिकाण सोडून देतो. १०८० महासागराची गांठ पडली कीं, गंगा जशी वेग टाकून देते; स्त्री जशी पतीपाशीं स्थिर होते; १०८१ किंवा फलद्रूप होण्याच्या वेळेला केळीची वाढ खुंटते; किंवा गांवाजवळ जसा मार्ग मुरडतो; १०८२ त्याप्रमाणें आत्मसाक्षात्कार होतो असें समजतांच साधनरूप शस्त्र हळूच खालीं ठेवतो. १०८३ ह्मणून हे **धनंजया!** ब्रह्माच्या आणि त्याच्या ऐक्याचा समय येतो तेव्हां उपायामध्यें तूट पडते. १०८४ मग वैराग्याची जी मावळती वेळ; जें ज्ञानाभ्यासाचें वार्धक्य; योगफळाची जी परिपक्व दशा; १०८५ हे **ऐश्वर्यवंता!** ती संपूर्ण शांति त्याच्या आंगास येते. तेव्हां तो पुरुष ब्रह्म होण्यास योग्य होतो. १०८६ पौर्णिमेपेक्षां चतुर्दशीच्या चंद्रांत जितकी कमतरता, किंवा सोळांच्या कसाहून पंधरांचा कस जितका उणा, १०८७ समुद्रांत जें पाणी जोरानें शिरतें, तें गंगेचें स्वरूप होय. बाकी जें स्थिर–निश्चळ–पाणी तो समुद्र होय. १०८८ त्याप्रमाणें ब्रह्माची आणि ब्रह्म होणाऱ्याची योग्यता अगदीं जवळ जवळ आहे. तीच त्याला शांतीच्या द्वारानें प्राप्त होते. १०८९ तेंच ब्रह्म झाल्याशिवाय ब्रह्मत्वाचा जो अनुभव घडतो, तीच ब्रह्म होण्याची योग्यता होय.” १०९०

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्॥ ५४ ॥

[ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा] ते ब्रह्मभावयोग्यता । पुरुष तो मग पंडुसुता । आत्मबोध प्रसन्नता । पदीं बैसे ॥ ९१ ॥ जेणें निपजे रससोय । तो तापही जैं जाय । तौं तें[1] कां होय । प्रसन्न जैसी ॥ ९२ ॥ ना ना भरतियां लगबगा[2] । शरत्काळीं सांडिजे गंगा । कां गीत राहतां उपांगा[3] । वोहट पडे ॥ ९३ ॥ तैसा आत्मबोधीं उद्यम[4] । करितां होय जो श्रम । तोही जेथें शम[5] । होऊनि जाय ॥ ९४ ॥ आत्मबोध प्रशस्तीं[6] । हे तिये दशेची ख्याती । ते भोगीतसे महामती । योग्य तो गा ॥ ९५ ॥ [न शोचति न कांक्षति] तेव्हां आत्मत्वें शोचावें[7] । कांहीं पावावया कामावें[8] । हें सरलें समभावें । भरितें तया ॥ ९६ ॥ [समः सर्वेषु भूतेषु] उदया येतां गभस्ती[9] । नाना नक्षत्रव्यक्ती । हारवीजती दीप्ती । आगिकां[10] जेवि ॥ ९७ ॥ तेवि उठतिया आत्मप्रभा[11] । हे भूतभेदव्यवस्था । मोडीत मोडीत पार्था । वांस[12] पाहे तो ॥ ९८ ॥ पाटियेवरील अक्षरें । जैसीं पुसतां येती करें[13] । तैसीं हारपती भेदांतरें । तयाचिये दृष्टी ॥ ९९ ॥ तैसेनि अन्यथाज्ञानें[14] । जियें घेपती[15] जागरस्वप्नें । तियें दोन्हीं केलीं लीनें । अव्यक्तामाजि[16] ॥ ११०० ॥ मग तेंही अव्यक्त । बोध वाढतां झिजत । पुरेला-बोधीं[17] समस्त । बुडोनि जाय ॥ १ ॥ जैसी भोजनाच्या व्यापारीं । क्षुधा जिरत जाय अवधारीं । मग तृप्तीच्या अवसरीं[18] । नाहींच होय ॥ २ ॥ नाना चालीचिया वाढी । वाट होत जाय थोडी । मग पातलाठायीं बुडी । देऊनि निमे[19] ॥ ३ ॥ कां जागृती जंव उद्दीपे[20] । तंव तंव निद्रा हारपे । मग जागीनलियां स्वरूपें । नाहींच होय ॥ ४ ॥ हें ना आपुलें पूर्णत्व भेटे । जेथ चंद्रासी वाढी खुंटे । तेथ शुक्लपक्ष आटे । निःशेष जैसा ॥ ५ ॥ तैसा बोध्यजात[21] गिळित । बोधबोधें ये मजआंत । मिसळला तेथ साद्यंत । अबोध[22] गेला ॥ ६ ॥ [मद्भक्तिं] तेव्हां कल्पांताचिये वेळे । नदी सिंधूचे पेंडवळें[23] । मोडुनि भरिलें जळें । आब्रह्म[24] जैसें ॥ ७ ॥ ना ना गेलिया घट मठ । आकाश ठाके एकवट । कां जळोनि काष्ठें काष्ठ । वन्हीचि होय ॥ ८ ॥ ना तरि लेणियांचे[25] ठसे । आटोनि गेलिया मुसे[26] । नामरूपभेदें जैसें । सांडिजे सोनें ॥ ९ ॥ हेंही असो चेइलेयां[27] । हें स्वप्न नाहीं जालया । मग आपणचि आपणयां । उरिजे जैसें ॥ १११० ॥ [लभते

१ रससोय. २ आपणास पूर्ण करण्याची लगबग. ३ मृदंगादि. ४ उद्योग. ५ शांत. ६ मोठेपण. ७ शोक करावा. ८ इच्छावें. ९ सूर्य. १० आंगठ्या. ११ आत्मानुभव. १२ वाट. १३ हातानें पुसतां येतात तशीं. १४ विपरीत ज्ञानानें. १५ घेतलीं जाती. १६ सूक्ष्मवृत्तींत. १७ पूर्ण बोधकाळीं. १८ समयीं. १९ नाश पावे. २० प्रकाश पावे. २१ सर्व बोध, सर्व ज्ञान. २२ अज्ञान. २३ बांध, मर्यादा. २४ ब्रह्मलोकापर्यंत. २५ अलंकार घडण्याचे छाप. २६ मुशींत. २७ जागें झाल्यावर.

परां ]तैसा मी एकवांचूनि कांहीं । तया तयाहीसकट नाहीं । हे चौथी भक्ति पाहीं । माझी तो लेंहे ॥ ११ ॥ येर आर्त जिज्ञासु अर्थार्थी । हे भजती जिये पंथीं । ते तिन्ही पावोनि चौथी । ह्मणिपत आहे ॥ १२ ॥ येन्हवीं तिजी ना चौथी । हे पहिली ना सरती । पैं माझिये सहजस्थिती । भक्ति नाम ॥ १३ ॥ जे नेणणें माझें प्रकाशूनि । अन्यथात्वें मातें दाऊनि । सर्वही सर्वां भजौनि । बुझावीतसे ॥ १४ ॥ जो जेथ जैसें पाहों बैसे । तया तेथ तैसेंचि असे । हें उजियेडें कां दिसे । अखंडें जेणें ॥ १५ ॥ स्वप्नाचें दिसणें न दिसणें । जैसे आपलेनि असलेपणें । विश्वाचें आहे नाहीं जेणें । प्रकाशें तैसें ॥ १६॥ ऐसा हा सहज माझा । प्रकाश जो कपिध्वजा । तो भक्तियेचा वोजा । बोलिजे गा ॥ १७ ॥ ह्मणौनि आर्ताच्या ठायीं । हें आर्ति होऊनि पाहीं । अपेक्षणीय जें कांहीं । तें मीचि केला ॥ १८ ॥ जिज्ञासुपुढां वीरेशा । हेचि होऊनि जिज्ञासा । मी कां जिज्ञास्यु ऐसा । दाखविला ॥ १९ ॥ हेचि होऊनि अर्थना । मींचि माझ्या अर्थी अर्जुना । करूनि अर्थाभिधाना । आणि मातें ॥ ११२० ॥ एवं घेऊनि अज्ञानातें । माझी भक्ति जे हे वर्ते । ते दावी मज द्रष्टयातें । दृश्य करूनि ॥ २१ ॥ येथें मुखचि दिसे मुखें । या बोला कांहीं न चुके । परि दुजेपण हें लटिकें । आरिसा करी ॥ २२ ॥ दिठी चंद्रचि घे साचें । परि येतुलें हें तिमिराचें । जे एकचि असे तयाचे । दोनी दावी ॥ २३ ॥ तैसा सर्वत्र मीचि मियां । घेपंतसें धनंजया । परि दृश्यत्व हें वायां । अज्ञानवशें ॥ २४ ॥ तें अज्ञान आतां फिटलें । माझें द्रष्टृत्व मज भेटलें । निजबिंबीं एकवटलें । प्रतिबिंब जैसें ॥ २५ ॥ पैं जेव्हांही असें किडाळ । तेव्हांही सोनेंचि अढळ । परि तें कीड गेलिया केवळ । उरे जैसें ॥ २६ ॥ हांगा पूर्णिमे आधीं कायी । चंद्र सावयव नाहीं । परि तिये दिवसीं भेटे पाहीं । पूर्णता तया ॥ २७ ॥ तैसा मीचि ज्ञानद्वारें । दिसें परि हस्तांतरें । मग दृष्टत्व तें सरे । मियांचि मी लाभें ॥२८॥ ह्मणौनि दृश्यपथा । अतीत माझ्या पार्था । भक्तियोगें चवथा । ह्मणीतला गा ॥ २९ ॥

**"अर्जुना!** त्या ब्रह्म होणाऱ्या योग्यतेस पोंचलेला पुरुष असतो तो मग आत्मज्ञानप्रसन्नतेच्या सिंहासनावर बसतो. १०९१ जिनें स्वयंपाक तयार होतो, ती आग जेव्हां विझून जाईल, तेव्हांच तो स्वयंपाक उपयोगी पडतो; १०९२ किंवा शरदृतूंमध्यें गंगा पुराचा जोर सोडून देते; किंवा गाणें बंद झालें कीं, बाकी मृदंग वगैरे साधनें बंद पडतात; १०९३ त्याप्रमाणें आत्मज्ञानासाठीं केलेले जे श्रम तेही जेथें शांत होऊन जातात. १०९४ आत्मज्ञानाचें महत्त्व हेंच त्या दशेचें प्रसिद्ध नांव होय. त्या दशेला तो महात्मा योग्य होऊन तिचा उपभोग घेतो. १०९५ तेव्हां आत्मज्ञानासाठीं शोक करावा, कांहीं मिळण्याची इच्छा धरावी, हेंच संपतें. ह्मणून अर्थात्च त्याला साम्यता प्राप्त होते. १०९६ सूर्य उदयास आला ह्मणजे नानाविध असलेल्या नक्षत्रांच्या आंगचें असलेलें तेज लोपून जातें; १०९७ त्याप्रमाणें हे **पार्था!** आत्मानुभव प्राप्त झाला ह्मणजे, प्राणिमात्रांतील भेद मोडित मोडित त्याच मार्गानें तो जात असतो. १०९८ पाटीवर असलेलीं अक्षरें जशीं पुसून टाकतां येतात, त्याप्रमाणें त्याच्या दृष्टींतील भेदाभेद मोडून जातात. १०९९ तसेंच जागृति स्वप्न हीं जीं विपरीत ज्ञानें मानलीं जातात, तीं दोन्हींही तो अव्यक्तामध्यें नाहींशीं करून सोडतो. ११०० मग ज्ञान जसजसें वाढूं लागतें, तसतसें तें अव्यक्तही कमी कमी होत होत पूर्ण ज्ञान झालें ह्मणजे त्यांत सर्वच बुडून जातें. ११०१ ऐक. भोजन करतांना क्षुधा जशी कमी कमी होत जाऊन तृप्तीच्या वेळीं तर ती अगदींच नाहींशी होऊन जाते. ११०२ किंवा चालणें जसें जसें अधिक वाढत जातें, तसतशी वाट थोडथोडी रहाते. आणि नेमलेल्या ठिकाणीं पोंचलें ह्मणजे ती मुळींच नाहींशी होते. ११०३ किंवा जों जों जागेपणा येत जातो, तों तों निद्रा नाहींशी होते. आणखी नीट जागें झाल्यावर तर ती मुळींच नाहींशी होते. ११०४ हें, किंवा चंद्राचें जेथें पूर्णत्व होतें; त्याची जेथें वाढ खुंटते; तेथें जसा शुक्लपक्ष नाहींसा होऊन जातो, ११०५ त्याप्र-

१ शुद्धज्ञान. २ लाभे. ३ पीडित. ४ ज्ञानेच्छु. ५ द्रव्येच्छु. ६ शेवटली. ७ ब्रह्मरूप स्थिति. ८ अज्ञान. ९ अन्य प्रकारें. १० भजतून. ११ समजावीत आहे. १२ प्रकाशानें. १३ भक्तीच्या रीतीनें. १४ पीडिताच्या. १५ इच्छा करण्यास योग्य. १६ ज्ञानेच्छूच्या पुढें. १७ अर्थादिक या नांवास. १८ सर्वसाक्षीला. १९ एवढें. २० नेत्ररोगाचें. २१ घेतला जातों. २२ साक्षीरूपत्व. २३ डाकळग. २४ स्थिर. २५ हीण. २६ उपाधीच्या योगानें हाताच्या अंतरानें. २७ ज्ञान.

माणें झाडून सारें ज्ञान गिळून ज्ञानाच्या ज्ञानानें माझ्या मध्यें एकरूप होऊन जातो, आणि अज्ञान सारें नाहींसेंच होऊन जातें. ११०६ तेव्हां कल्पांताच्या वेळेला नदीची आणि सिंधूची मर्यादा सारीच मोडून ब्रह्मलोकापर्यंत जसें सारें पाणीच पाणी भरून जातें, ११०७ किंवा घट आणि मठ दोन्हीं नाहींशीं झालीं ह्मणजे आकाश जसें एक होऊन राहतें, किंवा लांकडें जळल्यानंतर लांकूड जसें विस्तवच बनतें, ११०८ किंवा अलंकारावरचे ठसे मुशींत आटून गेले ह्मणजे सोनें जसें नामरूप ह्यांच्या भेदाला सोडून देतें. ११०९ हेंही असो. जागे झालेल्याला स्वप्न हें असत नाहीं, आणि तो जसा आपल्याच ठिकाणीं उरतो, १११० त्याप्रमाणें माझ्या एकाशिवाय त्याला त्याच्या सहवर्तमान दुसरें कांहीं दिसत नाहीं. अशी ही माझी चौथी भक्ति त्याला प्राप्त होते. ११११ इतर आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, हे ज्या ज्या पंथानें माझें भजन करतात, त्या तिन्ही पंथांहून ही भक्ति निराळी होय. ह्मणूनच हिला चौथी भक्ति असें ह्मणतात. १११२ बाकी ती तिसरीही नव्हे आणि चौथीही नव्हे. ती पहिलीही नव्हे, आणि शेवटचीही नव्हे. माझ्या ब्रह्मरूप स्थितीलाच भक्ति हें नाम आहे.१११३ जी माझें अज्ञान उघडकीस आणून मला निराळ्या प्रकारानें दाखवून सर्वांच्या भजनांत सर्व प्रकारची समजूत घालून देते. १११४ जो जेथें जसें पहावयास बसेल, त्याला तेथें तसेंच असतें, आणि ज्यानें हें सर्व अखंड प्रकाशित दिसतें. १११५ स्वप्नाचें दिसणें किंवा न दिसणें हें जसें आपल्या अस्तित्वावर अवलंबून असतें, त्याप्रमाणें विश्वाचें असणें आणि नसणें ज्यानें भासमान होतें, १११६ कपिध्वजा! असा जो हा माझा स्वाभाविक प्रकाश तोच भक्ति ह्या शब्दानें बोलतात. १११७ ह्मणून आर्तामध्यें हेंच आर्ति होऊन ज्याची अपेक्षा करावयाची तें मीच होतों. १११८ हे वीरश्रेष्ठा! जिज्ञासूपुढें हेंच जिज्ञासा होऊन जिज्ञासा तो मी असा भास करतें. १११९ हेंच अर्थी होऊन अर्जुना! माझ्याकरितां मीच अर्थादिक नांवास पात्र होतों. ११२० अशा प्रकारें अज्ञानाला घेऊन जी ही माझी भक्ति वागते, तीच मला पाहणाराला पहाण्याचा पदार्थ करून दाखविते. ११२१ येथें तोंडानेंच तोंड दिसतें. ह्या बोलण्यांत कांहींच चूक नाहीं. पण हें जें मिथ्या दुसरेंपण तें आरसा करतो. ११२२ दृष्टी खरोखर चंद्राचाच स्वीकार करीत असते, पण येवढें कृत्य फक्त त्या एक नेत्ररोगाचें; कीं एक असलेला पदार्थ द्विधा करून दाखवावयाचा. ११२३ त्याप्रमाणें धनंजया! सर्व ठिकाणीं मीच माझें सेवन करतों. आणि दृश्यत्व हें अज्ञानानें व्यापल्यामुळें मिथ्या होय. ११२४ आपल्या बिंबांत जसें प्रतिबिंब मिळून जावें त्याप्रमाणें तें अज्ञान आतां नाहींसें होतें. माझें साक्षीरूपत्व माझ्या प्रत्ययास येतें. ११२५ हीण मिसळलेलें असतें, तेव्हांही तें खरोखर सोनेंच असतें. परंतु हीण गेल्यानंतर तें जसें शुद्ध बाकी रहातें; ११२६ किंवा पौर्णिमेच्या आधीं चंद्र सबंध नसतो काय? पण त्या दिवशींच त्याला संपूर्णता प्राप्त होते. ११२७ त्याप्रमाणें ज्ञानद्वारानें मीच दिसतों; पण ह्याताच्या अंतरावरून दिसतों. मग तें दिसणेंही संपतें, आणि माझाच मला लाभ होतो—पाहणारा आत्मस्वरूपाशीं—माझ्याशीं—ऐक्यता पावतो. ११२८ ह्मणूनच अर्जुना! चवथा जो भक्तियोग तो दृश्यमार्गाच्या अतीत—ह्मणजे पलीकडे आहे असें ह्मणतात." ११२९

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ ५५ ॥

[ भक्त्या ] इया ज्ञान भक्ती सहज । भक्त एकवटला मज । तो मीचि केवळ हें तुज । श्रुतही आहे ॥ ११३० ॥ जे उभऊनियां भुजा । ज्ञानिया तो आत्मा माझा । हें बोलिलों कपिध्वजा । सप्तमाध्यायीं ॥३१॥ ते हे कल्पादि भक्ति मियां । श्रीभागवतमिषें ब्रह्मया । उत्तम ह्मणौनि धनंजया । उपदे-

१ 'ज्ञानी त्वात्मैव मे मतं' श्लो० २ यांत. २ जगनिर्माणापूर्वी.

शिली ॥ ३२ ॥ ज्ञानी इयेतें स्वसंविति । शैवें ह्मणती शक्ति । आह्मी परम भक्ति । आपली ह्मणों ॥ ३३ ॥ [ मामभिजानाति ] हे मैज मिळतिये वेळे । तयां कर्मयोगियां फळे । मग समस्तही निखिळें । मियांचि भरे ॥ ३४ ॥ तेथ वैराग्य विवेकेंसी । आटे बंध मोक्षेंसी । वृत्ती तये अवृत्तीसी । बुडोनि जाय ॥ ३५ ॥ घेऊनि ऐलेपणातें । पैरत्व हारपे जेथें । गिळूनि चान्ही भूतें । आकाश जैसें ॥ ३६ ॥ तया परि थडथांद । साध्यसाधनातीत शुद्ध । तें मी होऊनि एंकवद । भोगितो मातें ॥ ३७ ॥ घडोनि सिंधूचिया आंगा । सिंधूवरी तळपे गंगा । तैसा पांड तया भोगा । अवधारी जो ॥ ३८ ॥ कां आरिसयासि आरिसा । उटूनि दाविलियां जैसा । देखणा अतिशय तैसा । भोगणा तिये ॥ ३९ ॥ हें असो दर्पणें नेलिया । तो मुखबोधही गेलिया । देखलेंपण एकलेया । आस्वादिजे जेविं ॥ ११४० ॥ चेईलेया स्वप्न नाशे । आपलें ऐक्यचि दिसे । तें दुजेनवीण जैसें । भोगिजे कां ॥ ४१ ॥ तोचि जालिया भोग तयाचा । न घडे हा भाव जयांचा । तिहीं बोले केविं बोलाचा । उच्चार कीजे ॥ ४२ ॥ [यावान् ] तयांच्या नेणो गांवीं । रवी प्रकाशी हन दिवी । कीं व्योमालागीं मांडवी । उभिली तिहीं ॥ ४३ ॥ हां गा राजन्यत्व नव्हतां आंगीं । रावो रायपण काय भोगी । कां आंधार हन आलिंगी । दिनकरातें ॥ ४४ ॥ आणि आकाश जें नव्हे । तया आकाश काय जाणवे । रत्नाच्या रूपीं मिरवे । गुंजांचें लेणें ॥ ४५ ॥ ह्मणौनि मी होणें नाहीं । तया मीचि आहे केंही । मग भजेल हें कायी । बोलों कीर ॥ ४६ ॥ यालागीं तो कर्मयोगी । मी जालाचि मातें भोगी । तारुण्य कां तरुणांगी । जियापरि ॥ ४७ ॥ तरंगें सर्वांगीं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं । ना ना अवकाश नभीं । लुंठते जैसा ॥ ४८ ॥ तैसा रूप होउनि माझें । मातें कियावीण तो भजे । घनाकार कां सहजें । सोनयातें जेविं ॥ ४९ ॥ कां चंदनाची द्रुती जैसी । चंदनीं भजे अपैसी । कां अकृत्रिम शशीं । चंद्रिका ते ॥ ११५० ॥ तैसी क्रिया कीर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें नव्हे । बोलाऐसें ॥ ५१ ॥ तेव्हां पूर्वसंस्कारछंदें । जें कांहीं तो अनुवादे । तेणें आळविलेनि वो दें । बोलता मीचि ॥ ५२ ॥ बोलतया बोलताचि भेटे । तेथें बोलेल हें न घटे । तें मौन तंव गोमटें । स्तवन माझें ॥ ५३ ॥ ह्मणौनि तया बोलतां । बोली बोलता मी भेटतां । मौन होय तेणें तत्त्वता । स्तवितो मातें ॥ ५४ ॥ तैसेंचि बुद्धी कां दिठी । जें तो देखों जाय किरीटी । तें देखणें दृश्य लोटी । देखतेंचि दावी ॥ ५५ ॥ आरिसया आधीं जैसें । देखतेंचि मुख दिसे । तयाचें देखणें तैसें । मेळवी द्रष्टें ॥ ५६ ॥ दृश्य जाउनियां द्रष्टें । द्रष्टयासिचि जैं भेटे । तैं एकलेपणें न घटे । द्रष्टेपणही ॥ ५७ ॥ तेथ स्वप्नींचिया प्रियां । चेवोनि झोंबों गेलिया । ठायिजे दोन्हीं न होनियां । आपणचि जैसें ॥ ५८ ॥ कां दोहीं काष्ठांचिये घृष्टी । माजी वन्हि येक उठी । तो दोन्हीं हे भाष आटी । आपणचि होय ॥ ५९ ॥ ना ना प्रतिबिंब हातीं । घेऊं गेलिया गभस्ती । बिंबताही असती । जाय जैसी ॥ ११६० ॥ तैसा मी होऊनि देखतें । तो घेऊं जाय दृश्यातें । तेथ दृश्या ने थितें । द्रष्टृत्वेंसी ॥ ६१ ॥ रवि आंधार प्रकाशिता । नुरेचि जेविं प्रकाश्यता । तेविं दृश्यीं नाहीं दृष्टता । मी जालिया ॥ ६२ ॥ मग देखिजे ना न देखिजे । ऐशी जे दशा निपजे । ते तें दर्शन माझें । सौचोकारें ॥ ६३ ॥ तें भलतयाही किरीटी । पदार्थांचिया भेटी । द्रष्टृदृश्यातीता दृष्टी । भोगितो सदां ॥ ६४ ॥ [यश्चास्मि] आणि आकाश हें आकाशें । दाटलें न ढळे जैसें । मियां आत्मेन आपणपें तैसें । जालें तया ॥ ६५ ॥ कल्पांतीं उदक उदकें । रुंधिलियां वाहों ठाके । तैसा आत्मेनि मियां येकें । कोंदला तो ॥ ६६ ॥ पावो आपणयां वोळंघे । केविं वन्हि आपणयां लागे । आपणपां पाणी रिघे । स्नाना कैसें ॥ ६७ ॥ ह्मणोनि सर्व मी जालेपणें । ठेलें तया येणें जाणें । तेंचि गा यात्राकरणें । अद्वया मज ॥ ६८ ॥ पैं जळावरील तरंग । जरी धाविन्नला सवेग । तरी नाहीं भूमिभाग । क्रमिला तेणें ॥ ६९ ॥ जें सांडावें कां मांडावें । जें चालणें जेणें चालावें । तें तोयचि एक आघवें । ह्मणोनियां ॥ ११७० ॥ गेलियाही भलतेउता । उदकपणें पंडुसुता । तरंगाची एकात्मता । न मोडेचि जेविं ॥ ७१ ॥ तैसा मीपणें हा लोटला ।

१ स्वकीय ज्ञानकला. २ शिवोपासक. ३ ही भक्ति ते कर्मयोगी जेव्हां माझ्याशीं ऐक्य पावतात तेव्हां त्यांस सफल होते. ४ लय पावे. ५ येरझारा. ६ त्वंपद. ७ तत्पद. ८ शुद्धस्वरूप कूटस्थ, ब्रह्म तटस्थ, उदासीन. ९ एकस्वरूप. १० शोभे. ११ पदवी. १२ पाहतां. १३ आरसा. १४ जागृतास. १५ तेंच झाला ह्मणजे त्याचा भोग घडत नाहीं असा ज्यांचा भाव आहे ते बोलानेंच बोलाचा कसा उच्चार करतात. १६ त्या प्रकाशकारांच्या गांवीं प्रकाश पाडण्यास रवि दिवा आहे असें वाटतें. १७ आकाशासाठीं मांडव. १८ उभारला. १९ राजेपणा. २० सूर्याला. २१ कोठें. २२ मद्रूप होऊन. २३ लाट. २४ पोकळी. २५ लोळे. २६ लगड. २७ सुवास. २८ साहजिक.

१ पूर्वपुण्यबलानें. २ बोले. ३ विनविल्यानें, हाक मारतांच मी ओ देतों. ४ दृष्टीनें. ५ पलीकडे सारी. ६ पाहणारास. ७ पतीला. ८ जागृत होऊन. ९ भेटण्यास. १० घर्षणानें. ११ बोलणें संपवून. १२ सूर्य. १३ मूळ असणारें नेतें. १४ प्रकाशकपणा. १५ खरेपणानें. १६ प्रतिबंध केला असतां. १७ भरला. १८ ऊंचे. १९ केवढाही.

तो आघवेयाचि मज आला । या यात्रा होय भला । कापडी माझ्या ॥ ७२ ॥ [ततो मां] आणि शरीर स्वभाववशें । कांहीं येक करूं जरी बैसे । तरि मीचि तो तेणें मिषें । भेटें तया ॥ ७३ ॥ तेथ कर्म आणि कर्ता । हें जाऊनि पंडुसुता । मियां आत्मेनि मज पाहतां । मीचि होय ॥ ७४ ॥ पैं दर्पणातें दर्पणें । पाहिलिया होय न पाहणें । सोनें झांकिलिया सुवर्णें । न झांके जेविं ॥ ७५ ॥ दीपातें दीपें प्रकाशिजे । तें न प्रकाशणेंचि निपजे । तैसें कर्म मियां कीजे । तें करणें कैचें ॥ ७६ ॥ कर्मही केरितचि आहे । जैं करावें हें भाष जाये । तैं न करणेंचि होये । तयाचें केलें ॥ ७७ ॥ क्रियाजात मीं जालेपणें । घडे कांहींचि न करणें । तयाचि नांव पूजणें । खुणेचें माझें ॥ ७८ ॥ ह्मणौनि करि तयाही वोजा । तें न करणें हेंचि कपिध्वजा । निपजे तिया महापूजा । पूजी तो मातें ॥ ७९ ॥ एवं तो बोले तें स्तवन । तो देखे तें दर्शन । अद्वया मज गमन । तो चाले तेंचि ॥ ११८० ॥ तो करी तेतुली पूजा । तो कल्पी तो जप माझा । तो निजे तेचि कपिध्वजा । समाधी माझी ॥ ८१ ॥ जैसें कनकेंसीं कांकणें । असिजे अनन्यपणें । तो भक्तियोगें येणें । मजसीं तैसा ॥ ८२ ॥ उदकीं कल्लोळ । कापुरीं परिमळ । रत्नीं उंजाळ । अनन्य जैसा ॥ ८३ ॥ किंबहुना तंतूसीं पट । कां मृत्तिकेसीं घट । तैसा तो येकवट । मजसीं माझा ॥ ८४ ॥ इया अनन्यसिद्धा भक्ती । या आघवाचि दृश्यजातीं । मज आपणपें या सुमती । द्रष्ट्यातें जाणे ॥ ८५ ॥ तिन्ही अवस्थांचेनि द्वारें । उपाध्युपहिताकारें । भावाभावरूप स्फुरे । दृश्य जें हें ॥ ८६ ॥ तें हें आघवेंचि मी द्रष्टा । ऐसिया बोधाचा माजिवटा । अनुभवाचा सुभटा । धेंडो तो नाचे ॥ ८७ ॥ [तत्त्वतः] रज्जु दोर जालिया गोचर । आभासतां तो व्याळाकार । रज्जूच ऐसा निर्धार । होय जेविं ॥ ८८ ॥ भांगारापरतें कांहीं । लेणें गुंजहीभरी नाहीं । हें आटुनियां ठायीं । कीजे जैसें ॥ ८९ ॥ उदका येकापरतें । तरंग नाहींचि हें निरुतें । जाणोनि तया आकारातें । घेपे जेविं ॥ ११९० ॥ ना तरि स्वप्नविकार समस्ता । चेउनियां उमाणें घेतां । तो आपणया परौता । न दिसे जैसा ॥ ९१ ॥ तैसें जें कांहीं आथि नाथी । तेणें होय ज्ञेयस्फूर्ती । तें ज्ञाताचि मी हे प्रतीती । होऊनि भोगी ॥ ९२ ॥ [ज्ञात्वा] जाणे अज मी अजर । अक्षय मी अक्षर । अपूर्व मीं अपार । आनंद मी ॥ ९३ ॥ अचळ मी अच्युत । अनंत मी अद्वैत । आद्य मी अव्यक्त । व्यक्तही मी ॥ ९४ ॥ ईशत्व मी ईश्वरें । अनादि मी अमर । अभय मी आधार । आधेय मी ॥ ९५ ॥ स्वामी मी सदोदित । सहज मी सतत । सर्व मी सर्वगत । सर्वातीत मी ॥ ९६ ॥ नवा मी पुराणु । शून्य मी संपूर्णु । अस्थूळ अनणु । जें कांहीं तें मी ॥ ९७ ॥ अक्रिय मी एक । असंग कीं अशोक । व्याप्त मी व्यापक । पुरुषोत्तम मी ॥ ९८ ॥ अशब्द मी अश्रोत्र । अरूप मी अगोत्र । सम मी स्वतंत्र । ब्रह्म मी पर ॥ ९९ ॥ ऐसें आत्मत्वें मज एकातें । इया अद्वयभक्ती जाणोनि निरुतें । आणि याहि बोधा जाणतें । तेंही मीचि जाणे ॥ १२०० ॥ पैं चेइलेयांनंतरें । आपुलें एकपण उरे । तेंही तयावरी स्फुरे । तयाशींचि जैसें ॥ १ ॥ कां प्रकाशतां अर्के । तोचि होय प्रकाशक । तयाही अभेदा द्योतक । तोचि जैसा ॥ २ ॥ तैसा वेद्याच्या विलयीं । केवळ वेदक उरे पाहीं । तेणें जाणवे तया तेंही । हेंही जो जाणे ॥ ३ ॥ तया अद्वयपणा आपुलिया । जाणती ज्ञप्ती जे धनंजया । ते ईश्वरचि मी हे तया । बोधासि ये ॥ ४ ॥ [विशते तदनंतरं] मग द्वैताद्वैतातीत । मींचि आत्मा एक निभ्रांत । हें जाणोनि जाणणें जेथ । अनुभवीं रिघे ॥ ५ ॥ तेथ चेइलेयां येकपण । दिसे जें आपुलया आपण । तेंही जातां नेणों कोण । होइजे जेविं ॥ ६ ॥ कां डोळां देखतिये क्षणीं । स्वरूपपण सुवर्णीं । नांटितां होय आटणी । अळंकाराचीही ॥ ७ ॥ वा ना लेवण तोय होये । मग क्षारता तोयत्वें राहे । तेही जिरतां जेविं जाये । जालेपण तें ॥ ८ ॥ तैसा मी तो हें जें असे । तें स्वानंदानुभवसमरसें । कालवूनियां प्रवेशे । मजचिमाजि ॥ ९ ॥ [तत्त्वतः] आणि तो हे भाष जेथ जाये । तेथें मी हें को-

१ यात्रेकरू. २ आत्मत्वानें. ३ करीत असतां. ४ त्यांचेंच नांव. ५ रीतीनें, निमित्तानें. ६ सुवर्णाशीं कंकणानें. ७ चकचकाट. ८ या अद्वैतभक्तीनें. ९ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. १० माया शरीर या उपाधीच्या योगानें, उपाधीनें केलेला जो आकार त्याणें. ११ सोहळा. १२ दोर. १३ सोन्याहून. १४ एकत्र. १५ खरें. १६ उठून. १७ माप. १८ आहे व नाहीं अशा स्थितीनें. १९ जाणावयाच्या पदार्थाचें स्फुरण.

१ उत्पन्न न होणारा. २ वृद्धपणरहित. ३ नाशरहित. ४ अविनाश. ५ ज्याच्या पूर्वी कांहीं नाहीं असा. ६ चलन न पावणारा. ७ पतित न होणारा. ८ अंतरहित. ९ पहिला. १० निराकार, अस्पष्ट. ११ ईशितव्य. १२ समष्टिरूप, जीवधर्मरहित. १३ ज्या आधारावर सर्व ठेवलें जातें तें. १४ अधिपति. १५ चेतनाचेतनांत भरून असणारा. १६ सर्वांच्या पलीकडे. १७ जुना. १८ अभावरूप. १९ अणूहून भिन्न. २० क्रियारहित. २१ 'अशब्दमस्पर्शमरूपमव्ययं' या श्रुतीनें प्रतिपाद्य. २२ सत्यतेनें. २३ जागृतीनंतर. २४ सूर्यच आपणाला प्रकाशक करतो असा जो अभेद त्यालाही जसा सूर्यच प्रकाशक तसा. २५ जाणण्यायोग्य पदार्थांच्या नाशानंतर. २६ ज्ञान. २७ ज्ञानकला. २८ दोहोंच्याही पलीकडे. २९ जागृतांस. ३० आटविल्यावांचून. ३१ मीठ पाणी होऊन जातें. ३२ पूर्णानंदाविर्भावानें. ३३ शब्द.

ण्हासी आहे । ऐसा मी ना तो तिये सामाये[1] । माझ्याचि रूपीं ॥१२१०॥ तेव्हां कापुर जळों सरे । तयाचि नाम अग्नि पुरे[2] । मग उभयातीत[3] उरे । आकाश जेवीं ॥ ११ ॥ कां थाडिलिया[4] एका एक । वाढे तो शून्यविशेख । तैसा आहे नाहींचा शेख । मीचि मग आथी ॥ १२ ॥ तेथ ब्रह्म आत्मा ईश । यया बोला मोडे सौरस[5] । न बोलणें याही पैस[6] । नाहीं तेथ ॥ १३ ॥ नें बोलणेंही[7] न बोलोनी । तें बोलिजे तोंड भरूनी । जाणिव नेणिव[8] नेणोनि । जाणिजेतें[9] ॥ १४ ॥ तेथ बुझिजे बोध बोधें । आनंद घेपे आनंदें । सुखवरी[10] सुखें । सुखचि भोगिजे ॥ १५ ॥ तेथ लाभ जोडला लाभा । प्रभा आलिंगिली प्रभा[11] । विस्मय[12] बुडाला उभा । विस्मयामाजी ॥ १६ ॥ शम तेथ सामावला[13] । विश्राम विश्रांती आला । अनुभव वेडावला[14] । अनुभूतिपणें ॥ १७ ॥ किंबहुना ऐसें निखळ । मीपण जोडे तया फळ । सेवूनि वेली वेल्हाळ[15] । कर्मयोगाची ते ॥ १८ ॥ पैं कर्मयोगा किरीटी । चक्रवर्तिच्या मुकुटीं । मी चिद्रत्न[16] तें सांटोवाटीं[17] । होय तो माझा ॥ १९ ॥ कीं कर्मयोगप्रासादाचा[18] । कळस जो हा मोक्षाचा । तया वरील अवकाशाचा[19] । उवावो जाला तो ॥ १२२० ॥ ना ना संसार आंडवी[20] । कर्मयोग वाट बरवी । जोडली ते मदैक्यगावीं[21] । पैठी[22] जालीसे ॥ २१ ॥ हें असो कर्मयोगबोधें । तेणें भक्तिचिद्गंगें[23] । मी स्वानंदोदधिवेगें[24] । टाकिला कीं गा ॥ २२ ॥ हा ठायवरी[25] सुवर्मा[26] । कर्मयोगीं आहे महिमा । म्हणौनि वेळोवेळां तुम्हां । सांगतों आम्ही ॥ २३ ॥ पैं देशें काळें पदार्थें । सांधूनि[27] घेइजे मातें । तैसा नव्हे मी आयतें । सर्वांचें सर्वही ॥ २४ ॥ म्हणौनि माझ्या ठायीं । आंचावें[28] न लगे कांहीं । मी लाभें ईये[29] उपायीं । साचचि गा ॥ २५ ॥ एक शिष्य एक गुरु । हा रूढला साच व्यवहारू । तो मत्प्राप्तिप्रकारू । जाणावया ॥ २६ ॥ अगा वसुधेच्या[1] पोटीं । निधान सिद्ध किरीटी । वन्हि सिद्ध काष्ठीं । वोहां[2] दूध ॥ २७ ॥ परि लाभे[3] तें असतें । तया कीजे उपायातें । येर सिद्धचि तैसा येथें । उपायीं मी ॥ २८ ॥ हा फळवरी[4] उपावो । कां पां प्रस्तावीतसे देवो । हें पुसतां तरि अभिप्रावो । येथिंचा ऐसा ॥ २९ ॥ जे गीतार्थाचें चोंगावें[5] । मोक्षोपायपर[6] आघवें । आन शास्त्रोपाय कीं नव्हे । प्रमाणसिद्ध ॥ १२३० ॥ वारा आभाळचि फेडी[7] । वांचूनि सूर्यातें न घडी[8] । कां हात बाबुळी[9] धाडी । तोय न करी ॥३१॥ तैसा आत्मदर्शनीं आंडळ[10] । असे अविद्येचा[11] जो मळ । तो शास्त्र नाशी येर निर्मळ । मी प्रकाशें स्वयें ॥ ३२ ॥ म्हणौनि आघवींचि शास्त्रें । अविद्याविनाशाचीं पात्रें[12] । वांचोनि न होती स्वतंत्रें । आत्मबोधीं ॥ ३३ ॥ तया अध्यात्मशास्त्रांसीं[13] । जैं सांचपणाची[14] ये पुसी[15] । तैं येईजे जया ठायासी । ते हे गीता ॥ ३४ ॥ भानु भूषिता प्राचियें[16] । सतेजा[17] दिशा आघविया । तैसी शास्त्रेश्वरा[18] गीताया । सनाथें शास्त्रें ॥ ३५ ॥ हें असो येणें शास्त्रेश्वरें । मागां उपाय बहुवे[19] विस्तारें । सांगीतला जैसा करें[20] । घेवों ये आत्मा ॥३६॥ परि प्रथमश्रवणासवें[21] । अर्जुना विपायें[22] हें फावे[23] । हा भाव[24] सकणवे[25] । धरूनि श्रीहरी ॥३७॥ तेंचि प्रमेयें[26] एक वेळ । शिष्यीं होआवया अढळ । सांगतसे मुकुळ[27] । मुद्रा आतां ॥ ३८ ॥ आणि प्रसंग[28] गीता । ठोवही[29] हा संपता । म्हणौनि दावी आद्यंता[30] । एकार्थत्व ॥ ३९ ॥ जे ग्रंथांच्या मध्यभागीं । नाना अधिकारप्रसंगीं । निरूपण अनेगी[31] । सिद्धांतीं केलें ॥ १२४० ॥ तरि तेतुलेही[32] सिद्धांत । इये

---

१ असाच मी नाहीं व तोही नाहीं होऊन माझ्या स्वरूपीं मिळतो. २ विझतो. ३ अग्नि व कापूर यांहून भिन्न. ४ एकांत एक वजा केला असतां बाकी शून्य. ५ अभिप्राय. ६ अवकाश. ७ न बोलणेंही न बोलून मग तोंडभर बोललें जातें तसें जाणीव व नेणीव टाकून जाणलें जातें. ८ ज्ञानाज्ञान. ९ जाणावें. १० सुखमय होऊन. ११ प्रभेनें, प्रकाशानें. १२ नवल, आश्चर्य. १३ विश्रांति पावला. १४ संकोच पावला. १५ त्याला कर्मयोगाची वेल्हाळ=सुंदर वेल सेविल्यानें मीपण=मी हेंच त्यास फळ मिळतें. १६ चैतन्य=ज्ञानरूप रत्न. १७ अदलाबदलीनें. १८ तो कर्मयोगी कर्मयोगप्रासादाचा=देवळाचा मोक्षरूप जो कळस त्यावरच्या आकाशाचा उवावो=प्रसर झाला. १९ अवकाश, प्रसर. २० अरण्यांत. २१ माझ्याशीं जें ऐक्य, तद्रूप गांवांत. २२ प्रविष्ट. २३ भक्ति व ज्ञान एतद्रूप जी गंगा (या दोहोंचा संगम). २४ निजानंदरूप समुद्र. २५ एथपर्यंत. २६ मर्मज्ञा अर्जुना! २७ आपदासा करून. २८ शिणावें लागत नाहीं. २९ हा कर्मयोगानें.

१ पृथ्वीच्या. २ ऊधास (कांसेस). ३ असतें तेंच लाभतें, परंतु त्यास उपाय केला पाहिजे. ४ फलप्राप्तीपर्यंत. ५ चांगुलपण. ६ मोक्षप्राप्तिविषयक. ७ निवारी. ८ तयार करीत नाहीं. ९ शेवाळा, गोंडाळ दूर करी. १० बंध. ११ अज्ञानाचा. १२ अज्ञान हरणारीं पात्रें, योग्य स्थलें. १३ आत्मानात्मप्रतिपादक वेदांतशास्त्रांशीं. १४ जेव्हां खरोखर पुसण्याचें मनांत येई. १५ साह्य. १६ पूर्वेस सूर्योदय होतांच. १७ प्रकाशमय. १८ शास्त्रांत श्रेष्ठ अशा या गीतेनें अन्य सर्व शास्त्रें सनाथें=समर्थ होतात. १९ बहुत. २० हातानें आत्मा हस्तगत होईल असा. २१ नवविधभक्तींतील प्रथम जें श्रवण त्याबरोबर. २२ कदाचित्. २३ प्राप्त होईल. २४ अभिप्राय. २५ दयेनें. २६ तात्पर्य, सार. २७ संक्षिप्त. २८ स्वरूपानें, संक्षेपलक्षण, स्पष्ट लक्षण. २९ गीता हा प्रसंग व हें स्थान हीं दोनीही आतां संपण्याचीं आहेत म्हणून. ३० आरंभापासून शेवटपर्यंत एकार्थता. ३१ अनेक सिद्धांतांनीं. ३२ तेवढेही सर्व.

शास्त्रीं प्रस्तुत । हें पूर्वापार[1] नेणत । कोण्ही जैं मानी ॥४१॥ तें महासिद्धांताचा आवांका[2] । सिद्धांतकक्षा[3] अनेका । मिंडउनि[4] आरंभ देखा । संपवीत असे ॥ ४२ ॥ येथ अविद्यानाश हें स्थळ । तेणें मोक्षापादन[5] फळ । या दोहीं केवळ । साधन ज्ञान ॥ ४३ ॥ हें इतुलेंचि[6] नानापरी । निरूपिलें ग्रंथविस्तारीं । तें आतां दोहीं अक्षरीं । अनुवादावें[7] ॥ ४४ ॥ ह्मणौनि उपेयही[8] हातीं । जालया[9] उपायस्थिती । देव प्रवर्तले ते पुढती[10] । येणेंचि भावें ॥ ४५ ॥

"ह्या ज्ञानभक्तीच्या योगानें सहजगत्या जो भक्त मजशीं ऐक्यता पावतो, तो निखालस मत्स्वरूपच होतो हें तुलाही माहितच आहे. ११३० कारण, हे **कपिध्वजा!** सातव्या अध्यायामध्यें "ज्ञानी तो माझा आत्मा" असें बाहू उभारून—मोठ्या खात्रीनें—मी तुला सांगितलें आहे. ११३१ ती, ही, कल्पांच्याही आदीपासून असलेली भक्ति, उत्तम, ह्मणून **श्रीभागवताच्या** निमित्तानें मी ब्रह्मदेवाला सांगितली. ११३२ ज्ञानी हिला आपली ज्ञानकला असें ह्मणतात. शिवोपासक हिलाच शक्ति असें ह्मणतात. आणि आह्मी आमची परमभक्ति असें ह्मणतों. ११३३ ही भक्ति, कर्मयोगी मला मिळतात, तेव्हांच त्यांस प्राप्त होते. आणि जिकडे तिकडे मीच एक भरून राहतों. ११३४ तेव्हां विचारासहवर्तमान वैराग्य; मोक्षासहवर्तमान बंधही आटून जातो. आणि पुनरावृत्तिसहवर्तमान वृत्तीही बुडून जाते. ११३५ जीवपणाला घेऊन ईश्वरपणाही जेथें नाहींसा होऊन जातो. आकाश जसें चारही भूतें गिळतें, ११३६ त्याप्रमाणें अलिप्त; साध्यसाधनातीत; शुद्ध; तें माझें पद एक स्वरूप होऊन मीच भोगतों. ११३७ समुद्राच्या आंगांत शिरूनही गंगा समुद्राच्या वर शोभते. तीच योग्यता त्या भोगाला आहे, हें लक्ष्यांत ठेव. ११३८ किंवा आरशानें उठून आरशास भेटलें ह्मणजे त्याची शोभा जशी अधिक वाढते, तद्वत् त्या भोगणाराची स्थिति असते, ११३९ हें असो. आरसा नेला ह्मणजे मुखाचें ज्ञानही जातें. पण पाहिलेला अनुभव असतो तो जसा एकट्याला घेतां येतो, ११४० जागृत झाल्यावर स्वप्न नाहींसें होऊन आपलें ऐक्यच दिसूं लागतें, तें दुसरेपणाशिवाय जसें भोगतां येतें, ११४१ तें तोच झाला ह्मणजे त्याचा भोग घडत नाहीं. असा ज्यांचा भाव आहे, ते बोलानेंच बोलाचा कसा उच्चार करतील ? ११४२ त्या प्रकाशकारांच्या गांवीं प्रकाश पाडण्याला रविच दिवा आहे असें वाटतें. किंवा त्यांनीं आकाशासाठीं मांडवच घातला आहे असें वाटतें. ११४३ अरे! आंगांत राजेपणाच नसला तर, राजा राजेपणा भोगील काय ? आंधार हा सूर्याला कधीं आलिंगन देईल काय ? ११४४ आणखी जें स्वतः आकाश नव्हे; त्याला आकाश समजणार कसें ? रत्नाच्या रूपामध्यें गुंजांचे अलंकार मिरवतील काय ? ११४५ ह्मणून मी होणें नाहीं, त्याला मी कोठचा ? मग तो माझें भजन करील ही खात्री तरी काय सांगावी ? ११४६ ह्याकरितां तो कर्मयोगी, तरुणी जसा तारुण्याचा उपभोग घेते, तद्वत् मद्रूप होऊनच मला भोगतो. ११४७ लाट जशी सर्वांगानें पाण्याचाच उपभोग घेते; प्रभा जशी बिंबामध्यें सर्वत्र विलसत असते; किंवा आकाशामध्यें जसा अवकाश लोळत राहतो; ११४८ त्याप्रमाणें मद्रूप होऊन तो क्रियेशिवाय मला भजतो. सोन्याची जशी सहज लगड होते; ११४९ किंवा चंदनाचा सुवास जसा आपोआपच चंदनाची सेवा करतो; किंवा न्यूनत्वरहित जो चंद्र तेंच चांदणें. ११५० त्याप्रमाणें खरोखर क्रिया त्याला आवडत नाहीं तरी, अद्वैतामध्यें भक्ति असते. तें अनुभवानेंच जाणलें पाहिजे. बोलून दाखविण्यासारखें नव्हे. ११५१ ते वेळीं पूर्वपुण्याईच्या बळानें तो जें कांहीं बोलतो, त्या विनंतीरूप हाकेला 'ओ' देऊन बोलणारा मीच. ११५२ बोलणाराला बोलणाराच भेटला, तर

१ पूर्वापार संगती ध्यानांत राहत नाहीं. २ वळ. ३ सिद्धांताच्या युक्ति. ४ मिळवून. ५ मोक्षसंपादन. ६ संक्षेपानें. ७ पुनः बोलावें. ८ उपायसाध्य, उपायानें साध्य होणारें. ९ प्राप्त झालें असतां. १० पुनः.

बोलणें होण्याचा संभवच नाहीं. तेव्हां मौन तेंच माझें उत्तम स्तवन होय. ११५३ ह्मणून तो भाषण करतांना, मला भेटला तरी मौनच धरतो. आणि त्यानेंच माझें उत्तम स्तवन करतो. ११५४ तसेंच अर्जुना! तो बुद्धीनें किंवा दृष्टीनें जें जें काय पहावयास जातो, तेव्हां तेव्हां दृष्टीस पडण्याचे ह्मणून जेवढे जेवढे पदार्थ तेवढे तेवढे दूर लोटून पहाणारालाच दाखवितें. ११५५ आरशाचे पुढें ज्याप्रमाणें पहाणाराचेंच तोंड दिसतें, त्याप्रमाणें त्याचें पहाणें, पहाणाराच दाखवितें. ११५६ पहाण्याचा पदार्थ नाहींसा होऊन पहाणारा पहाणारासच जेव्हां मिळतो, तेव्हां एकत्वानें पहाणाराच नाहींसा होत नाहीं काय? ११५७ तर जागृत होऊन स्वप्नांतल्या पतीस आलिंगन देण्यास गेली असतां, आपण व तो दोघेंही आपणच झालें होतें हें जसें समजून येतें, ११५८ किंवा दोन काष्ठांच्या घर्षणामध्यें अग्नि एकच उत्पन्न होतो. तो दोन हें भाषण नाहींसें करून आपण एक निराळाच होतो. ११५९ किंवा सूर्य आपलें प्रतिबिंब हातांत धरावयाला गेला तर, असलेलें प्रतिबिंबही जसें लुप्त होतें, ११६० त्याप्रमाणें मी देखतें होऊन तो दृश्याला घ्यावयास पहातो, तेव्हां मूळ पहाणारें असतें तें दृष्टत्वासहवर्तमान दृश्यालाच घेऊन जातें. ११६१ सूर्य, आंधाराला प्रकाशित करूं लागला ह्मणजे जसा प्रकाशकपणा उरत नाहीं. त्याप्रमाणें मत्स्वरूप झालें ह्मणजे दृश्यामध्यें द्रष्टताही असत नाहीं. ११६२ मग दिसणें किंवा न दिसणें; पाहणें किंवा न पहाणें; अशी जी दशा उत्पन्न होते; ती दशा हेंच माझें खरोखर दर्शन आहे. ११६३ अर्जुना! तें कोणताही पदार्थ पाहून द्रष्ट दृश्यातीत दृष्टीनें तो सदासर्वकाल भोगित असतो. ११६४ आणि आकाश हें आकाशानें दाटलें ह्मणजे तें जसें हालत नाहीं, तसें त्याला माझ्या आत्मस्वरूपानें होऊन जातें. ११६५ कल्पांताच्या वेळीं पाण्यानेंच पाणी अडवून धरलें ह्मणजे तें वहावयाचें बंद होतें. त्याप्रमाणें माझ्या एका आत्मस्वरूपानेंच तो अगदीं भरून जातो. ११६६ पाय हा आपल्यालाच कसा उल्लंघन करील? अग्नि आपल्यालाच कसा लागेल? पाणी आपल्यामध्येंच स्नानाला कसें जाणार? ११६७ ह्मणून सारें मीच झाल्याच्या योगानें त्याचें जाणें येणें बंद पडतें. तीच माझी अद्वैताची यात्रा ह्मणून समजावें. ११६८ तसेंच पाण्यावरची लाट जोरानें जरी धावली, तरी तिनें कांहीं जमीन ओलांडली असें होत नाहीं. ११६९ तिचें उत्पन्न होणें, लय पावणें; किंवा तिचें चालणें, हें सारें एका पाण्यांतल्या पाण्यांतच असतें ह्मणून. ११७० अर्जुना! पाण्याच्या धर्माप्रमाणें ती हवी तिकडे गेली तरी, त्या लाटेची एकात्मता (पाण्याशीं असलेलें ऐक्य) जशी भंग होत नाहीं; ११७१ तद्वत् हा मीपणा ज्यानें सोडला, तो सर्वतोपरी मजकडेच आला, आणि ह्या माझ्या यात्रेंतला तो एक उत्तम वारकरी–यात्रेकरू–झाला. ११७२ आणखी शरीर, स्वभावधर्माप्रमाणें कांहीं एखादें करावयास लागलें, तर, त्याच्या रूपानें मी त्यास भेटत असतों. ११७३ तेव्हां अर्जुना! कर्म आणि कर्ता हें जाऊन मी आत्मत्वानें पाहून मीच होतो. ११७४ आरशानें आरशाला पाहिलें, तर न पाहिलेल्यासारखेंच होतें. सुवर्णानें सोनें झांकलें तर जसें झांकत नाहीं, ११७५ दिव्यानें दिव्यालाच प्रकाशित केलें तर तें प्रकाशित न केल्यासारखेंच होतें. त्याप्रमाणें मद्रूप होऊन केलेलें कर्म तें केलें कसलें? ११७६ कर्म तर करितच असतो. पण तें केलें हा शब्द जेव्हां नाहींसा होतो, तेव्हां त्याचें केलेलें कर्म न केल्यासारखें होतें. ११७७ प्रत्येक कर्म मद्रूप होत असल्यामुळें, कांहींएक न घडल्याप्रमाणेंच होतें. त्याचेंच नांव माझें खुणेचें पूजन होय. ११७८ ह्मणून हे कपिध्वजा! तो करतो त्या रीतीनें तें करणेंच न करणें होतें. त्याच महापूजेनें तो माझी पूजा

करतो. ११७९ अशाच प्रकारें तो बोलतो तेंच माझें स्तवन; तो पाहतो तेंच माझें दर्शन; तो चालतो तेंच माझें अद्वैताचें चालणें होय. ११८० तो जें जें करतो, ती ती सारी माझी पूजा; तो जी जी कल्पना करतो तो तो माझा जप; आणि हे **कपिध्वजा !** तो निजतो, तीच माझी समाधी. ११८१ सोन्याशीं कंकणाचा जसा ऐक्यभाव असतो, तद्वत् त्याच्या ह्या भक्तियोगानें माझ्याशीं ऐक्यभाव असतो. ११८२ उदकाशीं लाटा; कापराशीं सुगंध; रत्नाशीं तेजस्विता; हीं जशीं ऐक्यरूपानें असतात, ११८३ किंवा तंतूबरोबर वस्त्र; किंवा मातीबरोबर घागर; हीं जितकीं ऐक्यरूप असतात, तितकाच तो माझ्याशीं एकवट असतो. ११८४ हे **सुमते !** ह्या अद्वितीय भक्तीच्या योगानें हें सर्व दिसणारें जें जें म्हणून आहे, तें तें सर्व आपणहूनच मला द्रष्ट्याला जाणतें. ११८५ जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति, ह्या तीन अवस्थांच्या द्वारानें, स्थूल, सूक्ष्म व कारण ह्या तीन देहाकार उपाधींच्या संबंधानें जे हें भाव व अभावरूप दृश्य स्फुरण पावतें, ११८६ हे **शूरवर्या !** तें हें सारें मद्रूपच आहे. अशा ज्ञानाच्या धुंदींत तो ऐक्यभावाचा झेंडा नाचवित असतो. ११८७ रज्जूही दोरीच आहे असें समजलें, म्हणजे सर्पाकाराचा होणारा भास जाऊन ही दोरीच आहे, ह्याप्रमाणें जसा निर्णय होतो. ११८८ अलंकारामध्यें सोन्यावांचून गुंजभरही दुसरें कांहीं नाहीं. हें समजून तें आटून जसें एकत्र करावें, ११८९ एका पाण्याहून लाटा कांहीं भिन्न नाहींत, हाच निश्चय मनांत आणून त्याच्या आकारांत जसा भेद धरीत नाहींत, ११९० किंवा जागें होऊन स्वप्नांतील साऱ्या विकारांचें माप घेऊं लागलें तर, आपणाहून भिन्न असें कांहींच दिसत नाहीं. ११९१ त्याप्रमाणें आहे व नाहीं अशा स्थितीनें जें असतें, त्याच्याच योगानें जाणावयाच्या पदार्थाची स्फूर्ति होते. आणि मग ज्ञाता तेंही तेंच हा अनुभव येऊन त्याचाच तो उपभोग घेतो. ११९२ मी जन्मरहित आहें; मी जरारहित आहें; मी नाशरहित; मी अविनाश; ज्यापूर्वी कांहीं नाहीं असा मी; अपार मी व आनंदही मीच. ११९३ अचल व अच्युत मी; अनंत व अद्वैत मी; आद्य आणि अव्यक्त मी; आणि व्यक्तही मीच. ११९४ सर्वश्रेष्ठ मी; जीवधर्मविरहित मी; अनादि व अमर मी; अभय व आधार मी; आणि आधारभूत ही मीच. ११९५ अधिपति मी; शाश्वत मी; सुलभ मी; निरंतर मी; सर्व मी; व्यापक मी; आणि सर्वांच्या पलीकडचा–अगम्य–मी. ११९६ नवा व जुना मी; शून्य मी; संपूर्ण मी; सूक्ष्म परमाणूहून जें जें कांहीं भिन्न, तें तें मी. ११९७ मी; एक; अक्रिय; असंग; अशोक मी; व्याप्त मी; आणि पुरुषोत्तम तो मी. ११९८ अशब्द, अश्रोत्र तो मी; अरूप अगोत्र मी; सम स्वतंत्र मी; परब्रह्म मी. ११९९ अशा प्रकारें आत्मस्वरूपानें मला एकाला ह्या अद्वय भक्तीनें नीट ओळखून सत्य आणि ह्या ज्ञानाला जाणणारें तेंही मीच, हें लक्ष्यांत ठेव. १२०० तसेंच जागृत झाल्यानंतर आपलें ऐक्यपणच शिल्लक राहतें. तेंही त्यानंतर त्यालाच जसें स्फुरतें. १२०१ किंवा सूर्य प्रकाश करतांना तोच प्रकाशक होतो. त्या अभेदाचा जसा तोच द्योतक. १२०२ त्याप्रमाणें जाणण्याच्या पदार्थाचा नाश झाल्यानंतर केवळ ज्ञानच शिल्लक राहतें. त्याच्या योगानें त्याला तें कळतें हेंही जो जाणतो. १२०३ **धनंजया !** त्या आपल्या अद्वयपणाला जाणणारी जी कला, तीही माझें ईश्वरी स्वरूपच आहे असें त्यास ज्ञान झालेलें असतें. १२०४ मग द्वैताद्वैताच्या पलीकडे असणारा जो आत्मा, तो निःसंशय मीच हें समजून जाणीव जेथें अनुभवांत शिरतें, १२०५ तेव्हां जागृत झाल्यानंतर आपला आपल्याला जो ऐक्यपणा दिसतो तोही गेला असतां काय होईल हें जसें समजत नाहीं. १२०६ किंवा सुवर्णाकडे त्याच्या स्वरूपाच्या दृष्टीनें पाहिलें

कीं, लगेच न आटतांही अलंकाराची आटणी होते. १२०७ किंवा मिठाचें पाणी होतें, आणि मग तो खारटपणा पाण्याच्या स्वरूपानें राहतो. तें पाणीही जिरून गेलें ह्मणजे तें मिश्रणही नाहींसें होऊन जातें. १२०८ त्याप्रमाणें मी आणि तो हें जें आहे तें पूर्णानंदाच्या ऐक्यानें कालवून तो माझ्यामध्येंच शिरतो. १२०९ आणि ' तो ' हा शब्द नाहींसा होतो तेव्हां ' मीपण ' कोणाला असणार? अशा प्रकारें मीही नव्हे, आणि तोही नव्हे असें होऊन माझ्याच स्वरूपामध्यें मिळतो. १२१० कापूर जेव्हां जळून नाहींसा होतो, त्याच वेळेस अग्निही त्याच नांवाबरोबर नाहींसा होतो. आणखी मग दोघांहूनही भिन्न असें जें आकाश, तें जसें शिल्लक राहतें, १२११ किंवा एकांतून एक काढला तर, बाकी शून्य राहतें; त्याप्रमाणें आहे व नाहीं ह्यांचा शेवट मीच आहें. १२१२ तेव्हां ब्रह्म; आत्मा, ईश ह्या बोलण्याचा कांहीं अर्थच नाहींसा होतो. न बोलण्यालाही तेथें जागा रहात नाहीं. १२१३ न बोलणेंही न बोलून मग जें तोंडभर बोललें जातें, आणि जाणीव व नेणीव हीं दोन्हीही टाकून जें जाणलें जातें. १२१४ ज्ञानानें ज्ञान जाणावयाचें; आनंदानें आनंद घ्यावयाचा; केवळ सुखमय होऊन सुख भोगावयाचें. १२१५ तेव्हां लाभालाच लाभ होतो; प्रकाशालाच प्रकाश मिठी मारतो; विस्मय तर विस्मयामध्यें उभाच्या उभाच बुडून जातो. १२१६ तेथें शम शमतो; विश्रामाला विश्रांति प्राप्त होते; अनुभव अनुभवानेंच वेडा होतो. १२१७ किंबहुना ती कर्मयोगाची सुंदर वेल सेवन केली ह्मणजे त्याला ह्याप्रमाणें माझ्या शुद्धस्वरूपाचें फळ प्राप्त होतें. १२१८ हे **किरीटी!** कर्मयोगरूप सार्वभौम राजाच्या मुकुटावर मी ज्ञानरत्न होऊन राहतों. आणि तसाच उलट तोही माझ्या मुकुटावरचें रत्न होऊन राहतो, १२१९ किंवा कर्मरूप देउळाचा कळस जो मोक्ष, त्याच्यावरील आकाशाचा जो विस्तार होऊन राहतो, १२२० किंवा संसारारण्यामध्यें कर्मयोगही उत्तम वाट सांपडलेली असून ती, मदैक्यरूप गांवांत गेली आहे. १२२१ हें असो. कर्मयोगाच्या ओघांतून त्याची भक्ति व ज्ञान एतद्रूप गंगा निजानंदरूप समुद्रास वेगानें जाऊन मिळालेली असते. १२२२ हे **मर्मज्ञा!** इतकें ह्या कर्मयोगाचें माहात्म्य आहे. ह्मणूनच मी तुला पुन्हा पुन्हा सांगतों. १२२३ देश, काल, पदार्थ इत्यादिक पाहून मोठी संधि साधून मला आपलासा केला पाहिजे, अशांतला मी नव्हें. तर, मी सर्वांचा सर्वठायीं आणि आयताच आहें. १२२४ ह्मणून मजकरितां कांहीं कष्ट काढावे लागत नाहींत. मी खरोखर ह्याच उपायांनीं प्राप्त होतों. १२२५ एक शिष्य, एक गुरु; हा केवळ लौकिक व्यवहार वाढलेला आहे, तो फक्त माझ्या प्राप्तीचा प्रकार कळण्यासाठीं. १२२६ हे **अर्जुना!** पृथ्वीच्या पोटांत ठेवा हा पूर्वींचाच आहे. काष्ठामध्यें अग्नि; कासेमध्यें दूध, हीं मूळचींच आहेत. १२२७ असतें तेंच प्राप्त होतें, परंतु त्याला उपाय करावे लागतात. त्याप्रमाणें उपायांनींच मी प्राप्त होतों तरी मूळचा मी सिद्धच आहें." १२२८ हा फळप्राप्तीपर्यंतचा उपाय देवांनीं कशाकरितां सांगितला असें विचाराल तर, त्यांतील हेतु असा. १२२९ कीं, गीतार्थामध्यें असलेले सर्व उपाय, मोक्षप्राप्तिविषयकच असल्यामुळें उत्तम आहेत. तसे इतर शास्त्रांतील उपाय नव्हेत. कारण, ते प्रमाणसिद्ध नसतात. १२३० "वारा अभ्राला दूर करतो; शिवाय सूर्याला कांहीं नवा करीत नाहीं. किंवा हात शेवाळ बाजूस सारतो, पाणी करीत नाहीं. १२३१ तद्वत् आत्मदर्शनाला प्रतिबंध करणारा जो अविद्येचा मळ असतो तो नाश करतो. बाकी मी निर्मळ आणि स्वयंप्रकाशच आहें." १२३२ ह्मणून सारीं शास्त्रें हीं अविद्या हरण करण्याचीं सा-

धनें आहेत. त्यांशिवाय स्वतंत्रपणें आत्मबोध करण्यास समर्थ नाहींत. १२३३ अध्यात्मशास्त्र ह्मणजे काय तें खरोखर त्यांना विचारावयाची इच्छा झाली तर त्यांना ज्या ठिकाणीं आलें पाहिजे, ती ही गीता होय. १२३४ सूर्यानें पूर्वदिशेला शोभा आणली कीं, सार्‍या दिशा प्रकाशमान होतात. त्याप्रमाणें ह्या एका श्रेष्ठ गीताशास्त्रानें सर्व शास्त्रें समर्थ होतात. १२३५ हें असो. ह्या शास्त्रश्रेष्ठानें ज्या रीतीनें आत्मा हस्तगत करतां येईल, असा उपाय मागें पुष्कळ विस्तारेंकरून सांगितला. १२३६ परंतु एकदां ऐकूनच **अर्जुनास** प्राप्त होणें कठीण पडेल, असा सदय अंतःकरणानें **श्रीहरींनीं** हेतु धरून, १२३७ तोच सारांश शिष्याच्या ठिकाणीं दृढतर होण्याकरितां संक्षिप्तरूपानें सांगत आहेत. १२३८ आणखी गीतेचा प्रसंग व स्थान हीं दोन्हींही संपावयाचीं आहेत, ह्मणून आरंभापासून शेवटपर्यंत एकवाक्यता दाखवून दिली. १२३९ कारण, ग्रंथांच्या मध्यभागामध्यें नानाप्रकारच्या समयानुसार अनेक सिद्धांतांचें निरूपण केलें आहे. १२४० तरी तितके सारे सिद्धांत प्रस्तुत ह्या शास्त्रांत आहेत. त्यांची पूर्वापार संगति जर कोणास न राहील, १२४१ तर महासिद्धांताचें वळ, सिद्धांताच्या अनेक युक्ति ह्यांची एकवाक्यता करून आरंभाप्रमाणें समाप्तिही करित आहे. १२४२ येथें अविद्यानाश हें स्थळ असून त्यांत मोक्षसंपादन हें फळ आहे. ह्या दोहोंच्या प्राप्तीलाही साधन एक शुद्ध ज्ञान होय. १२४३ हें इतकें परोपरीनें ग्रंथविस्तारेंकरून निरूपण केलें, तें आतां थोडक्यांत सांगावें, १२४४ ह्मणून उपायानें साध्य झालें असूनही पुन्हा उपाय सांगण्यास **देव** प्रवृत्त झाले, ते याच उद्देशानें. १२४५.

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥५६॥

[सर्वकर्माण्यपि] मग ह्मणे गा सुभटा । तो कर्मयोगि या निष्ठा । मी होउनी होय पैठा । माझ्या रूपीं ॥ ४६ ॥ स्वकर्मांच्या चोखौळीं । मज पूजा करूनि भली । तेणें प्रसादें आकळी । ज्ञाननिष्ठेतें ॥ ४७ ॥ ते ज्ञाननिष्ठा जेथ हातवसे । तेथ भक्ति माझी उल्लासे । तिया मजसी समरसे । सुखिया होय ॥ ४८ ॥ [मद्व्यपाश्रयः] आणि विश्वप्रकाशितया । आत्मया मज आपुलिया । अनुसरे जो करूनियां । सर्वत्रता हे ॥ ४९ ॥ सांडूनि आपला आडळ । लवण आश्रयि जळ । कां हिंडोनि राहे निश्चळ । वायु व्योमीं ॥ १२५० ॥ तैसा बुद्धी वाचा कायें । जो मातें आश्रऊनि ठाये [सदा कुर्वाणः] तो निषिद्धेंही विपायें । कर्मे करू ॥ ५१ ॥ [मत्प्रसादादवाप्नोति] परि गंगेच्या संबंधीं । विदी आणि महा नदी । ऐक्य तेविं माझ्या बोधीं । शुभाशुभांसी ॥ ५२ ॥ कां बावनें आणि धुरें । हा निवाड तंवचि सरे । जंव न घेपती वैश्वानरें । कवळूनि दोन्ही ॥ ५३ ॥ ना ना पांचिकें आणि सोळें । हें सोनया तंवचि आळें । जंव परिस आंगमेळें । येकवटीना ॥ ५४ ॥ तैसें शुभाशुभ ऐसें । हें तंवचिवरी आभासे । जंव येक न प्रकाशें । सर्वत्र मी ॥ ५५ ॥ अगा रात्रि आणि दिवो । हा तंवचि द्वैतभावो । जंव न रिगिजे गांवो । गभस्तीचा ॥ ५६ ॥ ह्मणौनि माझिया भेटी । तयाचीं सर्वकर्मे किरीटी । जाऊनि बैसे तो पाटीं । सायुज्याच्या ॥५७॥ [शाश्वतं पदमव्ययं] देशें काळें स्वभावें । वेंचे जया न संभवे । तें पद माझें पावे । अविनाश तो ॥ ५८ ॥ किंबहुना पंडुसुता । मज आत्मयाची प्रसन्नता । लाहे तेणें नें पविजता । लाभ कवण असे ॥ ५९ ॥

मग ह्मणतात "हे **शूरवर्या!** अशा निष्ठेनें तो कर्मयोगी मत्स्वरूप होऊन मजमध्यें प्रवेश करतो. १२४६ स्वकर्माच्या उत्तम फुलांनीं माझी उत्तम प्रकारें पूजा करून, तिच्या प्रसादानें ज्ञाननिष्ठा संपादन करतो. १२४७ ती ज्ञाननिष्ठा जेव्हां हस्तगत होते, तेव्हां माझी भक्ति पसरते. तिच्या साह्यानें मजशीं ऐक्यरूप होऊन तो सुखी होतो. १२४८ आणखी

१ या भावनेनें. २ प्रविष्ट. ३ चोख पुष्पांनीं. ४ हस्तगत होते. ५ त्या भक्तीनें. ६ ऐक्य पावे. ७ पांचही कोशांत. ८ प्रतिबंध. ९ आकाशांत. १० कायावाचामनेंकरून. ११ क्वचित्. १२ ओहोळ. १३ मैलागिरी चंदन. १४ सामान्य काष्ठ. १५ हिणकट. १६ सोळांच्या दराचें. १७ आळ, अपवाद. १८ भासे, वाटे. १९ दिवस. २० सूर्याचा. २१ पदवीवर. २२ ब्रह्मांत लय पावणें. २३ नाश. २४ न पावण्याजोगें, अप्राप्य असें काय आहे?

जो हेंच सर्वत्र करून विश्वास प्रकाशित करणाऱ्या मला—आपल्या आत्म्याला—अनुसरतो; १२४९ आपला प्रतिबंध नाहींसा करून मीठ जसें जळाचा आश्रय करून राहतें, किंवा वायु आकाशामध्यें हिंडून निश्चळ राहतो, १२५० त्याप्रमाणें जो कायावाचामनेंकरून माझाच आश्रय करून राहतो, त्यानें चुकून एखादे वेळीं जरी निषिद्ध कर्में आचरण केलीं, १२५१ तरी, गंगेशीं मिळणारा ओहोळ आणि मोठी नदी जशीं एकरूप होतात, त्याप्रमाणें माझ्या ज्ञानामध्यें शुभ आणि अशुभ दोन्हींही एकरूप होतात. १२५२ हा मैलागिरी चंदन; आणि दुसरें हें लांकूड; हा भेद तरी, अग्नीनें दोन्हींलाही एके ठिकाणीं कवळून घेतलीं नाहींत तोंपर्यंत चालतो. १२५३ हें हिणकट; आणि हें शुद्ध—सोळांच्या दराच्या सोनें. हा अपवाद तरी, जोंपर्यंत परिसानें आपलें अंग त्यास लावलें नाहीं तोंपर्यंतच. १२५४ त्याप्रमाणें हें शुभ आणि हें अशुभ हें तोंपर्यंतच वाटतें, जोंपर्यंत एक मी सर्वत्र प्रकाशमान झालों नाहीं. १२५५ सूर्याच्या गांवांत शिरलें नाहीं, तोंपर्यंतच हा दिवस आणि ही रात्र; हे दोन भेद. १२५६ ह्मणून अर्जुना! माझी भेट होण्याबरोबर त्यांचीं सर्व कर्में लयास जाऊन तो मुक्तीच्या पदावर जाऊन बसतो. १२५७ देशानें, कालानें, किंवा नैसर्गिक धर्मानें ज्याचा नाश होण्याचा संभवही नाहीं, असें जें अविनाश पद, तें तो पावतो. १२५८ किंबहुना अर्जुना! माझ्या आत्म्याच्या प्रसन्नतेला तो पात्र झाल्यानंतर त्याला लाभ मिळणार नाहीं असा कोणता?" १२५९

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥

[चेतसा सर्वकर्माणि] याकारणें गा तुवां इया । सर्व कर्मा आपुलिया । माझ्या स्वरूपीं धनंजया । संन्यास[1] कीजे ॥१२६०॥

१ त्याग.

परि तोचि संन्यास वीरा । करणीयाचा[1] ह्मणें करा । आत्मविवेकीं धरा[2] । चित्तवृत्ति हे ॥ ६१ ॥ [मयि] मग तेणें विवेकबळें । आपणपें कर्मावेगळें । माझ्या स्वरूपीं निर्मळें । देखिजेल सर्व ॥ ६२ ॥ [संन्यस्य] आणि कर्मांची जन्मभोये[3] । प्रकृति जे कां आहे । ते आपणयाहूनि[4] वहुवे । देखसी दुरी ॥ ६३ ॥ तेथ प्रकृति आपणयां-[5] । वेगळी नुरे धनंजया । रूपेंवीण कां छाया । जयापरी ॥ ६४ ॥ ऐसेनि प्रकृतिनाश । जालया कर्मसंन्यास । निफजेल अनायास । सकारण[6] ॥६५॥ [मत्परः] मग कर्मजात[7] गेलया । मी आत्मा उरें आपणपयां । [बुद्धियोगमुपाश्रित्य] तेथ बुद्धि घापे[8] करूनियां । पतिव्रता ॥ ६६ ॥ बुद्धि अनन्य[9] येणें योगें । मजमाजी जैं रिगे । [मच्चित्तः सततं भव] तैं चित्त चैत्यत्यागें[10] । मातेंचि भजे ॥ ६७ ॥ ऐसें चैत्यजातें सांडिलें । चित्त माझ्या ठायीं जडलें । ठाके तैसें वहिलें[11] । सर्वदा करी ॥ ६८ ॥

"ह्याकरितां हे अर्जुना! तूं ह्या आपल्या सर्व कर्मांचा माझ्या स्वरूपामध्यें संन्यास करून टाक. १२६० पण हे शूरवीरा! तोच संन्यास स्वधर्माचा करशील हो! तसा मात्र करूं नको. तर ही चित्तवृत्ति आत्मविचारामध्यें ठेव. १२६१ ह्मणजे त्या विचाराच्या बळानें आपोआप कर्मांशिवायच, माझ्या स्वरूपामध्यें सारें निर्मळ दृष्टीस पडेल. १२६२ आणखी कर्मांची जन्मभूमि जी प्रकृति ह्मणून आहे, ती स्वस्वरूपाहून फार निराळी आहे, हेंही दृष्टीस पडेल. १२६३ तेव्हां धनंजया! स्वरूपापासून छाया जशी वेगळी नसते, त्याप्रमाणें प्रकृती ही आत्मस्वरूपाहून वेगळी राहणार नाहीं. १२६४ असें केलेंस ह्मणजे प्रकृतीचा नाश होऊन अनायासें कारणासहित आपोआप कर्मांचा संन्यास घडेल. १२६५ असा कर्मांचा संन्यास घडला ह्मणजे मग मी जो आत्मा तोच काय तो स्वतःसिद्ध राहतो. तेव्हां बुद्धिरूप पतिव्रता करून सोडावी. १२६६ ह्या अनन्ययोगेंकरून माझ्या मध्यें जेव्हां बुद्धि प्रविष्ट होते तेव्हां चित्त आपला अहंपणा सोडून माझ्याच भजनीं लागतें. १२६७ अशा

१ स्वधर्मांचा. २ ठेवा. ३ जन्मभूमि. ४ स्वस्वरूपाहून. ५ आत्मस्वरूपाला. ६ कारणासहित. ७ सर्व कर्मसमुदाय. ८ घातली जाते. ९ द्वैतरहित. १० चित्ताचे चंचलादिक धर्मत्यागानें. ११ सत्वर.

**प्रकारें चंचलपणा सोडलेलें चित्त माझ्या ठिकाणीं जडून राहील असा उपाय सदासर्वकाल शीघ्र करीत जा." १२६८**

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।
अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि ॥५८॥

[मच्चित्तः] मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियांचि भरेल जेव्हां । माझा प्रसाद जाण तेव्हां । संपूर्ण जाहाला ॥ ६९ ॥ [सर्वदुर्गाणि] तेथ सकळ दुःखधामें[1] । भुंजीजेती[2] जियें मृत्युजन्में । तियें दुर्गमेंचि[3] सुगमें । होती तुज ॥ १२७० ॥ सूर्याचेनि सावायें[4] । डोळा सावाइला[5] होये । तैं आंधाराचा आहे । पाड[6] तया ॥ ७१ ॥ [मत्प्रसादात्] तैसा माझेनि प्रसादें । जीवकण[7] जयाचा उपमर्दे । तो संसाराचेनि बाधे[8] । बागुलें[9] केविं ॥ ७२ ॥ [तरिष्यसि] म्हणोनि धनंजया । तूं संसारदुर्गती यया । तरसील माझिया । प्रसादास्तव ॥७३॥ अथवा हन अहंभावें[10] । माझें बोलणें हें आघवें । कानामनाचिये शिवें[11] । नेदिसी टेंकों ॥ ७४ ॥ [चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि] तरि नित्यमुक्त अव्यय । तूं आहासि तें होवूनि वांय[12] । [विनंक्ष्यसि] देहसंबंधाचा घाय । वाजेल[13] आंगीं ॥७५॥ जया देहसंबंधाआंत । प्रतिपदीं[14] आत्मघात । भुंजतां उसंत[15] । कहींच नाहीं ॥ ७६ ॥ येवढेनि दारुणें[16] । निमणेंनवीण[17] निमणें । पडेल जरी बोलणें । नेघसी[18] माझें ॥ ७७ ॥

**"मग ह्या अभिन्न सेवेनें चित्त जेव्हां मजमध्यें भरेल तेव्हां माझा प्रसाद संपूर्ण झाला ह्मणून समजावें. १२६९ तेव्हां जन्ममृत्युरूप जीं दुःखाचीं स्थानें भोगावीं लागतात तीं, तुला कठीण असतांही सुलभ होतील. १२७० सूर्याच्या साह्यानें डोळा साह्यभूत होतो, तेव्हां मग त्याला आंधाराची कांहीं मातबरी आहे काय? १२७१ तद्वत् माझ्या प्रसादानें ज्याचा जीवांश नाश पावला, त्याला संसाराच्या बागुलापासून कशी बाधा होणार? १२७२ ह्मणून अर्जुना! तूं ह्या माझ्या प्रसादानें संसाररूप दुर्गतींतून पार पडशील. १२७३ अथवा अभिमानानें माझें हें सारें बोलणें, कानाच्या आणि मनाच्या शिवेला सुद्धां टेंकूं न देशील, १२७४ तर तूं नित्ययुक्त व अव्यय आहेस तें व्यर्थ होऊन देहसंबंधाचा घाय तुझ्या आंगावर पडेल. १२७५ त्या देहसंबंधाच्या आंत पावलोपावलीं आत्मघात असून भोगतांना विसावा ह्मणून कधीं नाहींच. १२७६ हें माझें भाषण मनास जर न आणशील, तर येवढें भयंकर न मरतांच जें मरणें तें भोगावें लागेल." १२७७**

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ५९

[यदहंकारमाश्रित्य] पथ्यद्वेषिया पोषी[1] ज्वर । कां दीपद्वेषिया अंधकार । विवेकद्वेषें अहंकार । पोषूनि तैसा ॥ ७८ ॥ स्वदेहा नाम अर्जुन । परदेहा नाम स्वजन । संग्रामा नाम मलिन । पापाचार ॥ ७९ ॥ इया मती आपुलिया । तिघां तीन नामें ययां । ठेऊनियां धनंजया । [न योत्स्य इति मन्यसे] न जुंझें ऐसा ॥ १२८० ॥ [मिथ्यैष व्यवसायस्ते] जीवामाजी निष्टंकें[2] । करिसी जो आत्यंतिक[3] । तो वायां धाडील नैसर्गिकें[4] । स्वभावचि तुझा ॥ ८१ ॥ आणि मी अर्जुन हे आत्मिक[5] । ययां वध करणें हें पातक । हे माया वांचूनि तात्त्विक[6] । कांहीं आहे ॥ ८२ ॥ आधीं जुंझार[7] तुवां होआवें । मग जुंझावया शस्त्र घेयावें । कां न जुंझावया करावें । देवांगण[8] ॥ ८३ ॥ म्हणौनि न जुंझणें । म्हणसी तें वायाणें[9] । ना मानुं लोकहणें । लोकदृष्टीही ॥ ८४ ॥ [प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति] तऱ्ही न जुंझें ऐसें । निष्टंकिसी[10] जें मानसें । तें प्रकृति अनारिसें[11] । करवीलचि ॥ ८५ ॥

**"पथ्याचा द्वेष करणाराचें जसें ज्वर पोषण करतो; किंवा दीपद्वेष्ट्याचें जसें अंधकार पोषण करतो; त्याप्रमाणें विवेकाच्या द्वेषानें अहंकार पोसून, १२७८ आपल्या देहाला नांव अर्जुन; दुसऱ्या देहाला आपले लोक; आणि युद्धाचें नांव फार वाईट असें पापाचरण. १२७९ धनंजया! अशीं आपल्या बुद्धीनें ह्या तिघांना तीन नामें ठेवून युद्ध करणार नाहींस**

१ दुःखाचीं स्थानें. २ भोगिलीं जातात. ३ अवघड. ४ मदतीनें, साह्यानें. ५ साह्यभूत. ६ योग्यता, विशाद. ७ ज्याचा जीवकण=जीवांश उपमर्दें=नासे किंवा नष्ट झाला. ८ पीडा पावेल. ९ बुझावण्यानें. १० अहंकारानें. ११ हद्दींस. १२ व्यर्थ. १३ आदळेल. १४ पावलोपावलीं. १५ विसावा. १६ भयंकर. १७ न मरुनही मरणें. १८ घेत नाहींस.

१ राखी. २ शेवटचा सिद्धांत. ३ अतिशय. ४ तुझा नैसर्गिक स्वभाव—क्षात्रधर्म. ५ आपले जन. ६ तत्वदृष्टीनें. ७ युद्धकर्ता. ८ मिथ्यानिश्चय, गंधर्वनगर. ९ व्यर्थ. १० निर्धारिसी. ११ निराळें.

असा जो, १२८० तूं जिवामध्यें अतिशय ठाम निश्चय करून बसला आहेस, तो तुझा नैसर्गिक स्वभावच मोडून टाकील. १२८१ आणखी मी अर्जुन; हे आपले; ह्यांचा वध करणें हें पाप; ही माया. खरें तत्त्व आहे तें कांहीं निराळेंच आहे. १२८२ आधीं युद्धाला आपणच तयार व्हावें; आणि मग युद्ध करण्याकरितां शस्त्र उचलावें, कां युद्ध न करण्याचा भलताच निश्चय करावा? १२८३ ह्मणून तूं युद्ध करीत नाहीं ह्मणतोस हें व्यर्थ होय. तें तिन्हाइतपणानें, व व्यवहारदृष्टीनेंही उक्त नाहीं. १२८४ तर युद्ध करित नाहीं असा मनामध्यें निश्चय करून बसला आहेस, त्याला प्रकृति वेगळेंच करावयाला लावील." १२८५

स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोपि तत्॥६०

[स्वभावजेन कौंतेय] पैं पूर्व वाहतां पाणी । पव्हिजे पश्चिमेचे वाहणी । तरि आग्रहचि उरे तें आणी । आपुलिया लेखा ॥ ८६ ॥ कां साळीचा कण ह्मणे । मी नुगवें साळीपणें । तरी आहे आन करणें । स्वभावासि ॥ ८७ ॥ [निबद्धः स्वेन कर्मणा] तैसा क्षात्र संस्कारसिद्धा । प्रकृती घडिलासि प्रबुद्धा । आतां नुठीं ह्मणसी हा धांदा । परि उठविजसीची तूं ॥ ८८ ॥ पैं शौर्य तेज दक्षता । एवमादिक पंडुसुता । गुण दिधले जन्मतां । प्रकृती तुज ॥ ८९ ॥ तरि तयाचिया समवाया । अनुरूप धनंजया । न करितां उगलियां । नयेल असों ॥ १२९० ॥ ह्मणौनियां तिहीं गुणीं । बांधलासि तूं कोदंडपाणी । त्रिशुद्धि निघसि वांहाणी । क्षात्राचिया ॥ ॥ ९१ ॥ [कर्तुं नेच्छसि यन्मोहात्] ना हें आपुलें जन्ममूळ । न विचारीतचि केवळ । झुंजें ऐसें अढळ । व्रत जरी घेसी ॥ ९२ ॥ [करिष्यस्यवशोऽपि तत्] तरि बांधोनि हात पाये । जो रथीं घातला होये । तो न चेले तरी जाये । दिगंता जेविं ॥ ९३ ॥ तैसा तूं आपुलियाकडूनी । मीं कांहींच न करीं ह्मणौनी । ठासी परि भरंवसेनी । तूंचि करिसी ॥ ९४ ॥ उत्तर वैराटिंचा राजा । पळतां तूं कां निघालासि झुंझा । हा क्षात्रस्वभाव तुझा । झुंझवील तुज ॥ ९५ ॥ महावीर अकरा अक्षौहिणी । तुवां येकें नागविले रणांगणीं । तो स्वभाव कोदंडपाणी । झुंझवील तूतें ॥ ९६ ॥ हां गा रोग कायी रोगिया । आवडे दरिद्र दरिद्रिया । परि भोगविजे बळिया । अदृष्टें जेणें ॥ ९७ ॥ तें अदृष्ट अनारिसें । न करील ईश्वरवशें । तो ईश्वरही असे । हृदयीं तुझ्या ॥ ९८ ॥

"पाणी—पूर्वेस वहात असून आपण पश्चिमेकडे पोहूं लागलों, तर आपला हट्ट मात्र दिसून येणार. बाकी तें, आपल्याच मार्गावर आल्यावांचून राहवयाचें नाहीं. १२८६ किंवा भाताच्या दाण्यानें निश्चय केला कीं, मी भाताच्या रूपानें उगवावयाचा नाहीं; तर उपयोग काय? स्वभावकर्म आहे तें निराळेंच आहे. १२८७ त्याप्रमाणें हे बुद्धिमंता! क्षात्र संस्कारानें तुझी प्रकृति बनलेली आहे. ह्यामुळें आतां तूं उठत नाहीं असें ह्मणतोस, पण तें कर्तव्यच तुला उठवील. १२८८ हे पंडुसुता! शौर्य, तेज आणि दक्षता इत्यादि गुण प्रकृतीनेंच तुला दिलेले आहेत. १२८९ तर अर्जुना! त्यांच्या स्वभावानुरूप जर तूं न करशील तर ते तुला उगाच बसूं देणार नाहींत. १२९० ह्याकरितां हे कोदंडपाणी! तूं ह्या तीन गुणांनीं बांधलेला आहेस. ह्मणून तूं क्षात्रमार्गानेंच जाशील ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. १२९१ कारण आपला जन्म, कुल, ह्यांचा कांहींच विचार न करितां "मी युद्ध करणार नाहीं इतकेंच केवळ अढळ व्रत घेऊन बसशील" १२९२ तर हातपाय बांधून ज्याला रथावर घातलेला असतो, तो जरी चालला नाहीं, तरी जसा दिगंताला जातो, १२९३ त्याप्रमाणें तूं आपल्याकडून मी कांहींच करीत नाहीं ह्मणून स्वस्थ बसशील, तरी खात्रीनें सांगतों कीं तूं करणारच. १२९४ विराट

१ पोहावें. २ मार्गानुरूप. ३ पलीकडे, हिशोबास, मार्गास. ४ दाणा. ५ उगवणार नाहीं. ६ प्रकृतिभावास. ७ कारणानुरूप. ८ साहजिक. ९ खरेपणानें. १० मार्गास. ११ क्षत्रियस्वभावाच्या. १२ चालत नसला तरी. १३ स्वस्थ राहासी.

१ तूं गोग्रहणप्रसंगीं उत्तराचा सारथि जेव्हां झालास तेव्हां तो युद्धांतून पळत असतांही तूं मुद्दाम त्याला सारथि करून युद्ध केलेंस, हा तुझा क्षात्रधर्म तुझ्याकडून युद्ध करवील. २ फसविले, पराभूत केले. ३ दुष्कृतसंचित प्रारब्धानें. ४ वेगळें.

**राजाचा पुत्र उत्तर पळूं लागला तेव्हां, तूं कां युद्धाला निघालास ? हा तुझा क्षत्रिय स्वभाव. तोच तुला युद्ध करावयाला लावील. १२९५ हे कोदंडपाणी! तूं एकट्यानें रणांगणामध्यें अकरा अक्षौहिणी महावीर पराजित केलेस. तोच तुझा स्वभाव तुला युद्ध करावयाला लावील. १२९६ अरे! रोग्याला रोग आणि दारिद्र्याला दारिद्र्य काय आवडत असतें ? पण भवितव्य ह्मणून असतें तें बलवान् असतें. तें त्याजकडून भोगवितें. १२९७ तें भवितव्य ईश्वराच्या आधीन असल्यामुळें, त्यालाही भलतेंच करतां येत नाहीं. आणखी तो ईश्वरही तुझ्या हृदयामध्यें आहेच." १२९८**

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१॥

[सर्वभूतानां] सर्वभूतांच्या अंतरीं । हृदय महाअंबरीं । चिद्वृत्तीच्या सहस्रकरीं । उदयला असे जो ॥ ९९ ॥ अवस्थात्रय तिन्ही लोक । प्रकाशूनि अशेष । अन्यथादृष्टि पांथिक । चेवविले ॥ १३०० ॥ वेद्योदकाच्या सरोवरीं । फांकतां विषय कल्हारीं । इंद्रियेषट्पदा चारी । जीवभ्रमरातें ॥ १ ॥ [ईश्वरः] असो रूपक हें तो ईश्वर । सकळ भूतांचा अहंकार । पांघरोनि निरंतर । उल्हासत असे ॥ २ ॥ [मायया] स्वमायेचें आडवस्त्र । लावूनि एकला खेळवी सूत्र । बाहेरी नटी छायाचित्र । चौऱ्यांसीं लक्ष ॥ ३ ॥ तया ब्रह्मादिकीटांतां । अशेषांही भूतजातां । देहाकार योग्यता । पाहोनि दावी ॥ ४ ॥ [यंत्रारूढानि] तेथ जें देह जयापुढें । अनुरूपपणें मांडे । तें भूततया आरूढे । हें मी ह्मणौनि ॥ ५ ॥ सूत सूतें गुंतलें । तृण तृणेंचि बांधलें । कां आत्मबिंबा घेतलें । बाळकें जळीं ॥ ६ ॥ तयापरी देहाकारें । आपणपेंचि दुसरें । देखोनि जीव आविष्करे । आत्मबुद्धी ॥ ७ ॥ ऐसेनि शरीराकारीं । यंत्रीं भूतें अवधारीं । [भ्रामयन्] वाहूनि हालवी दोरी । प्राचीनाची ॥ ८ ॥ तेथ जया जें कर्मसूत्र । मांडूनि ठेविलें स्वतंत्र । तें तिये गती पात्र । होंचि लागे ॥ ९ ॥ किंबहुना धनुर्धरा । भूतांतें स्वर्गसंसारा- । माजि भोंवडी तृणें वारा । आकाशीं जैसीं ॥ १३१० ॥ भ्रामकाचेनि संगें । जैसें लोहो वेढां रिगे । तैसीं ईश्वरसत्तायोगें । चेष्टती भूतें ॥ ११ ॥ जैसे चेष्टा आपुलालिया । समुद्रादिक धनंजया । चेष्टती चंद्राचिया । सन्निधी येकी ॥ १२ ॥ तया सिंधू भरितें दाटे । सोमकांता पाझर फुटे । कुमुदांचकोरांचा फिटे । संकोचु तो ॥ १३ ॥ तैसीं बीज-प्रकृतिवशें । अनेकें भूतें येकें ईशें । चेष्टवीजती तो असे । [हृद्देशेऽर्जुन तिष्ठति] तुझ्या हृदयीं ॥ १४ ॥ अर्जुनपण न घेतां । मी ऐसें जें पंडुसुता । उठतसे तें तत्वता । तयाचें रूप ॥ १५ ॥ यालागीं तो प्रकृतीतें । प्रवर्तवील हें निरुतें । आणि तें झुंझवील तूतें । न झुंजसी जऱ्ही ॥ १६ ॥ ह्मणोनि ईश्वर गोसांवी । तेणें प्रकृति हे नेमावी । तियां सुखें राबवावीं । इंद्रियें आपुलीं ॥ १७ ॥ तूं करणें न करणें दोन्ही । लाऊनि प्रकृतीच्या मांनीं । प्रकृतीही कां अधीनी । हृदयस्था जया ॥ १८ ॥

**"सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणांत हृदयरूप महदाकाशांत चैतन्यवृत्तिरूप हजारों किरणांनीं जो उदय पावलेला आहे, १२९९ प्रवृत्ति, स्वप्न आणि सुषुप्ति, ह्या तिन्ही अवस्था, व स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ ह्या तिन्ही लोकांना संपूर्ण प्रकाशित करून विपरीत ज्ञानानें भुललेले जीव ज्यानें जागृत केले आहेत, १३०० दृश्य वस्तुरूप जलाच्या सरोवरामध्यें विषयरूप कमळें उमललीं ह्मणजे इंद्रियषट्पदरूप जे जीवभ्रमर, त्यांला चारा घालतो. १३०१ हें रूपक असो. तो ईश्वर सर्व प्राणिमात्रांचा अहंकार पांघरून निरंतर प्रकाशतो. १३०२ आपल्याच मायेचें आडवस्त्र लावून एकटाच सूत्र नाचवितो. बाहेर मायारूप नटी आणि तिच्या छायेपासून निघालेलीं तिर्चीं चौऱ्यायशीं लक्ष**

१ हृदयरूप महाकाशामध्यें. २ चैतन्यवृत्तिरूप हजारों किरणांनीं. ३ जागृती, स्वप्न, सुषुप्ति. ४ स्वर्ग, मृत्यु, पाताळ. ५ विपरीत ज्ञानानें भुललेले जीव, वाटसरू. ६ जागृत केले. ७ जाणण्यास योग्य दृश्य वस्तुरूप जलाच्या. ८ कमळांनीं. ९ भ्रमराच्या धोरणानें. १० चारतो. ११ सूत्रधाराची स्त्री. १२—२० लक्ष वृक्ष, ११ लक्ष कीटक, ३० लक्ष पशू, ९ लक्ष जलचर, १० लक्ष पक्षी, ४ लक्ष मनुष्ययोनी. मिळून एकंदर ८४ लक्ष योनी. १३ ब्रह्मदेवापासून कीडमुंगीपर्यंत. १४ योग्यतेनुरूप. १५ भूत असें होऊन. १६ प्रगटे. १७ तें मी नसून मीच अशा बुद्धीनें.

१ पूर्वकर्माची. २ इहपरलोकीं. ३ लोहचुंबकाच्या. ४ वाटोळें फिरे. ५ व्यवहार करतात. ६ चंद्रविकासी कमलांला. ७ मिटलेपणा. ८ प्रकृतिबीजाच्यानें, 'यथा बीजं तथांकुरः' या न्यायानें बीजाच्या प्रकृत्यनुसार—बीजासारखीं. ९ ईश्वर. १० खरें. ११ प्रकृति. १२ इंद्रियस्वामी. १३ प्रकृतीनें. १४ चेष्टवावीं. १५ धोरणानें.

योनी हीं चित्रें. १३०३ त्या ब्रह्मदेवापासून किड्यापर्यंत यच्चयावत् प्राणिमात्रांना योग्यता पाहून आकार देतो. १३०४ तेव्हां ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला जो जो देह प्राप्त होतो तो तो प्राणी, हें 'मी मी' ह्मणून अहंकारास चढतो. १३०५ सूत सुतानेंच गुंतवावें; गवत गवतानेंच बांधावें; किंवा मुलानें पाण्यामध्यें आपलेंच प्रतिबिंब पहावें, १३०६ त्याप्रमाणें देहाकारानें आपणच दुसरा पाहून, जीव हा तोच मी अशी बुद्धि धारण करतो. १३०७ अशा प्रकारें शरीराकाररूप यंत्रामध्यें भूतें अडकवून पूर्वकर्माची दोरी हालवितो, हें लक्ष्यांत ठेव. १३०८ तेव्हां ज्याचें जें स्वतंत्र कर्मसूत्र मांडून ठेवलेलें असतें, तें त्याच्या गतीला पात्र करतें. १३०९ किंबहुना धनुर्धरा! आकाशामध्यें वारा जसा गवताला गरगर गरगर फिरवितो, त्याप्रमाणें इहपरलोकीं तो फिरवित असतो. १३१० लोहचुंबकाच्या सान्निध्यानें लोखंड जसें वाटोळें फिरतें, त्याप्रमाणें ईश्वरी सत्तेच्या योगेंकरून प्राणी व्यापार करतात. १३११ अर्जुना! चंद्राच्या एका सान्निध्यानें समुद्रादिक आपआपला व्यापार करतात. १३१२ समुद्राला भरती येते; सोमकांताला पाझर फुटतो; चंद्रविकासी कमलांचा व चकोर पक्ष्यांचा संकोच नाहींसा होतो; १३१३ त्याप्रमाणें बीजप्रकृतीनुसार एक ईश्वर हे सर्व प्राणी वागवितो. तो ईश्वर तुझ्या हृदयांत आहे. १३१४ हे अर्जुना! मी हा अर्जुन असा अभिमान न धरितां 'मी' असें उत्पन्न होणारें जें स्वरूप, तेंच त्याचें स्वरूप होय. १३१५ ह्याकरितां तो प्रकृतीला पुढें करील हें खचित आहे. आणि तूं जरी युद्ध करित नसलास तरी ती तुला करावयाला लावील. १३१६ ह्मणून ईश्वर हा धनी असून त्यानें जी प्रकृति नेमलेली आहे, तिच्या अनुषंगानें सुखानें आपआपलीं इंद्रियें वागूं द्यावीत. १३१७ तूं करणें आणि न करणें हीं दोन्हीं ज्या हृदयांत राहणाऱ्याच्या स्वाधीन प्रकृति आहे, त्या प्रकृतीच्याच मर्जीवर ठेव." १३१८

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ६२

[तमेव शरणं गच्छेति] तया अहं वांचा चित्त आंग । देऊनियां शरण रिग । महोदधी कां गांग । रिगालें जैसें ॥ १९ ॥ [तत्प्रसादात्परां शांति] मग तयाचेनि प्रसादें । सर्वोपशांतिप्रमदे । कांत होऊनियां स्वानंदें । स्वरूपींच रमसी ॥ १३२० ॥ [स्थानं प्राप्स्यसि शाश्वतं] संभूति जेणें संभवे । विश्रांति जेथें विसंवे । अनुभूतिही अनुभवे । अनुभवा जया ॥ २१ ॥ तिये निजात्मपदींचा रावो । होऊनि ठाकसी अव्ययो । ह्मणे लक्ष्मीनाहो । पार्था तूं ॥ २२ ॥

"गंगेचें उदक जसें महासागरांत शिरतें, त्याप्रमाणें त्याला काया, वाचा, मन आणि अभिमान अर्पण करून शरण जा. १३१९ ह्मणजे त्याच्या प्रसादानें शांतिस्त्रीचा पति होऊन निजानंदानें स्वस्वरूपांतच रममाण होशील. १३२० जेथें उत्पत्तीची उत्पत्ती; जेथें विश्रांतीला विश्रांति; जेथें अनुभवालाही अनुभव घडतो;" १३२१ लक्ष्मीपति ह्मणाले, "पार्था! तूं त्या निजात्मपदाचा अक्षयी राजा होऊन राहशील." १३२२

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥

[इति] हे गीतानाम विख्यात । सर्ववाङ्मयाचें मथित । आत्मा जेणें हस्तगत रत्न होय ॥ २३ ॥ [ज्ञानमाख्यातं] ज्ञान ऐसीया रूढी । वेदांतें जयाची प्रौढी । वानितां कीर्ति चोखडी । पातली जगीं ॥ २४ ॥ बुद्ध्यादिकें डोळसें । हें जयाचें कां कडवसें । मी सर्वद्रष्टाहि दिसें । पाहला जया ॥ २५ ॥ [गुह्याद्गुह्यतरं] तें हें गा आत्मज्ञान । मज गोप्याचेंही गुप्त धन । परि तूं ह्मणूनि आन । केविं करूं ॥ २६ ॥ [मया] याकारणें गा पांडवा । आह्मीं आपला हा गुप्त ठेवा ।

१ त्या हृदयस्थाला. २ ज्या कायावाचामनांला मी ह्मणतोस. ३ गंगोदक. ४ शांतिस्त्रीचा. ५ उत्पत्ति. ६ राहाती. ७ लक्ष्मीपति. ८ वेदांचें. ९ प्रसिद्धि. १० वर्णितां. ११ आभास, परावर्तन, प्रतिबिंब. १२ उदय पावलेला.

[ते] तुज दिधला कणवा[1] । जोंकळिलेपणें ॥ २७ ॥ जैसी भुलली वोरसें । माय बोले बाळा दोषें । प्रीती ही परी तैसें । न करूंचि हो ॥ २८ ॥ येथ आकाश[4] आणि गाळिजे । अमृताही सोली[5] फेडिजे । कां दिव्याकरवीं करविजे । दिव्य जैसें ॥ २९ ॥ जयाचेनि अंगप्रकाशें । पाताळींचा परमाणु दिसे । तया सूर्याहि कां जैसें । अंजन सुदलें ॥ १३३० ॥ तैसें सर्वज्ञेंही मियां । सर्वही निर्धारूनियां । निकें[6] होय तें धनंजया । सांगीतलें तुज ॥ ३१ ॥ [विमृश्यैतदशेषेण] आतां तूं ययावरी । निकें हें निर्धारीं । निर्धारूनि [यथेच्छसि तथा कुरु] करीं । आवडे तैसें ॥ ३२ ॥ यया देवाचिया बोला । अर्जुन उगाचि ठेला । तेथ देवो म्हणती भला । अवंचक[7] होसी ॥ ३३ ॥ वाढितया पुढें भुकेला । उंतरोधें[8] म्हणे धाला[9] । तैं तोचि पीडे[10] आपला । आणि दोषही तया ॥ ३४ ॥ तैसा सर्वज्ञ श्रीगुरू । भेटलिया आत्मनिर्धारू । न पुसिजे जैं आ-[11]भारू । धरूनियां ॥ ३५ ॥ तैं आपणपेंचि वंचे । आणि पांपही[12] वंचनाचें । आपणयाचि साचें । चुकविलें तेणें ॥३६॥ पैं उगेपणा तुझिया । हा अभिप्रावो कीं धनंजया । जें एक-वेळ ऑवांकुनियां[13] । सांगावें ज्ञान ॥ ३७ ॥ तेथ पार्थ म्हणे दातारा । भलें जाणसी माझिया अंतरा । हें म्हणों तरी दु-सरा । जाणता असे काई ॥ ३८ ॥ येर ज्ञेयें[14] हें जी आघवें । तूं ज्ञाता येकचि स्वभावें । मा सूर्य म्हणौनि वानावें । सूर्यातें काई ॥ ३९ ॥ या बोला श्रीकृष्णें । म्हणीतलें काय येणें । हेंचि थोडें गा वानणें । जें बुझतासि[15] तूं ॥ १३४० ॥

"हें गीतानामक सर्व वेदांचें सार आहे. आणि ज्याच्या योगानें आत्म्यासारखें रत्न हस्तगत होतें. १३२३ ज्ञान हें मोठें म्हणून त्याच्या प्रौढीचें वर्णन केलें म्हणून जगामध्यें वेदांची मोठी कीर्ति पसरली. १३२४ बुद्ध्यादिक जाणण्याचीं जीं साधनें तीं ज्याचीं प्रतिबिंबें, माझ्या सर्व द्रष्ट्याचा उदय झालेला ज्याच्यायोगानें दिसतो; १३२५ तें हें आत्मज्ञान–मी जो गुप्त त्या गुप्ताचेंही गुप्त धन. पण तुझ्या जवळ प्रतारणा कां करावी? १३२६ अर्जुना! आम्ही करुणेनें व्याप्त झालों आहों. या कारणानें हा आम्हीं आपला गुप्त ठेवा तुला दिला. १३२७ ज्याप्रमाणें आईला पान्हा दाटून वेदना होऊं लागल्या म्हणजे, प्रीति असूनही आई मुलाला दोष देते. पण तसेंही आम्हीं केलें नाहीं. १३२८ आकाश गाळावें; अमृताची साल काढावी; किंवा दिव्याकडून जसें दिव्य करवावें; १३२९ ज्याच्या अंगच्या प्रकाशानें पाताळांत असलेलाही परमाणु दृष्टीस पडतो, त्या सूर्यालाही जणों काय काजळ घालावें, १३३० तद्वत् मी सर्वज्ञ असतांही सर्व धुंडाळून हे अर्जुना! जें खरें म्हणून होतें तें तुला सांगितलें. १३३१ आतां ह्यावर खरें तत्त्व कोणतें ह्याचा तूंही निश्चय कर. आणि तो निश्चय झाला म्हणजे तुला वाटेल तसें कर." १३३२ ह्या देवाच्या भाषणावर अर्जुन उगाच राहिला. तेव्हां देव म्हणाले "तूं फार भिडस्त आहेस." १६३३ वाढणाऱ्या पुढें भुकेलेला मनुष्य लाजेनें पोट भरलें म्हणाला, तर त्याचा तोच उपाशीं रहातो; आणखी वर खोटें बोलण्याचा दोषही येतो. १३३४ तद्वत् सर्वज्ञ श्रीगुरु भेटले असतांना तेथें भय धरून जर आत्मज्ञान विचारून घेतलें नाहीं, १३३५ तर आपलें आपणासच ठकविल्यासारखें होतें; परवंचना केल्याचें पातक लागतें; आणि आपणच आपल्यास खरें नाहींसें केल्याप्रमाणें होतें. १३३६ अर्जुना! तुझ्या उगाच बसण्यांतील मतलब हा, कीं एक वेळ संपूर्ण सांगावें. १३३७ तेव्हां अर्जुन म्हणाला "हे दातारा! माझें अंतःकरण आपण उत्कृष्ट जाणतां. पण हें बोलून दाखविण्यांत तरी अर्थ कोणता? कारण, दुसरा कोणी जाणता आहे काय? १३३८ स्वभावधर्मेंकरून ज्ञाता असा तूं एक; आणि बाकीचें सारें हें ज्ञेय होय. तेव्हां सूर्य म्हणून सूर्याला तें काय वाखाणावें?" १३३९ ह्या भाषणावर श्रीकृष्ण म्हणाले "झालें हें वर्णन काय

१ कृपेनें. २ व्याप्त झाल्यानें. ३ पान्ह्यानें. ४ आकाश गाळावें, अमृताच्या साली काढाव्या व प्रकाशानें प्रकाश करावा ह्या असंभवनीय गोष्टी, तसें असंभाव्यही मी सर्वज्ञानें निर्धारून इत्यादि १३३१ ओवीशीं संबंध. ५ काजळ घातलें. ६ खरें. ७ वंचना न करणारा–आपणाला ठकविणारा (इष्ट वस्तु कोणी देत असतां ती नको म्हणणारा) असा होणार नाहींस. ८ भिडेनें. ९ तृप्त झालों. १० क्षुधेनें पीडा पावतो. ११ भय, भार. १२ आपणाला फसविलें म्हणून त्याला वंचनाचें पापही लागतें. १३ पूर्णपणें. १४ जाणावयाचें. १५ समजलास.

थोडें झालें ?" ह्मणून समजतोस होय ? १३४०

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ।

इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ६४

[शृणु मे परमं वचः] तरि अवधान पेंघळ[1] । करूनियां आणी एक वेळ । वाक्य माझें निर्मळ । अवधारीं पां ॥ ४१ ॥ [सर्वगुह्यतमं भूयः] हें वाच्य[2] ह्मणोनि बोलिजे । कां श्राव्य[3] मग आयिकिजे । तैसें नव्हे परि तुझें । भाग्य बरवें ॥ ४२ ॥ कूर्मीचिया पिलियां । दिठी[4] पान्हा ये धनंजया । आकाश वाहे वापियां[5] । घरींचें पाणी ॥ ४३ ॥ जो व्यवहार जेथ न घडे । तयाचें फळचि तेथ जोडे । काय दैवें न सांपडे । सानुकूळें ॥ ४४ ॥ येरवीं द्वैताची वारी[6] । सारूनि ऐक्याच्या पैंरिवरीं[7] । भोगिजे तें अवधारीं । रहस्य[8] हें ॥ ४५ ॥ आणि निरुपचारा[9] प्रेमा । विषय होय जें प्रियोत्तमा । तें दुजें नव्हे कीं आत्मा । ऐसेंचि जाणावें ॥ ४६ ॥ [इष्टोऽसि मे] आरिसाचिया देखिलया । गोमटें कीजे धनंजया । तें तया नोहे आपणयां । लागीं जैसें ॥ ४७ ॥ तैसें पार्था तुझेनि मिषें[10] । मी बोलें आपणयाचि दोषें[11] । माझ्या तुझ्या ठाईं असे । मी तूंपण गा ॥४८॥ ह्मणौनि जिव्हारींचें[12] गुज । सांगतसें जीवासीं तुज । हें अनन्य[13] गतीचें मज । आथी व्यसन[14] ॥४९॥ [दृढमिति] पैं जळा आपणपें देता । लवण भुललें पंडुसुता । कीं आघवें तयाचें होतां । न लजेचि तें ॥ १३५० ॥ तैसा तूं माझ्या ठाईं । राखों नेणसीचि कांहीं । तरी आतां तुज काइं । गोप्य मी करीं ॥ ५१ ॥ [ततो वक्ष्यामि ते हितं] ह्मणौनि आघवींचि गूढें । जें पाऊनि अति उघडें । तें गोप्य माझें चोखडें । वाक्य आइक ॥ ५२ ॥

"तर आतां आणखी एक वेळ चांगलें लक्ष्य देऊन माझें निर्मल भाषण ऐक. १३४१ हें बोलण्यासारखें आहे ह्मणून बोलावयाचें, किंवा ऐकण्यासारखें आहे ह्मणून ऐकावयाचें, अशांतला प्रकार नाहीं. तर तुझें भाग्य मोठें असें समज. १३४२ हे धनंजया! कासवांच्या पिलांचा पान्हा दृष्टींतूनच फुटतो; चातकाला आकाश हेंच घरचें पाणी होतें. १३४३ जी गोष्ट जेथें व्हावयाची नाहीं, त्याचें फळ तेथें प्राप्त होतें. दैव अनुकूल झालें ह्मणजे काय काय ह्मणून सांपडणार नाहीं ? १३४४ नाहींतर द्वैताला बाजूस सारून ऐक्याच्या घरामध्यें भोगावयाचें जें रहस्य तें हें. ध्यानांत असूं दे. १३४५ आणखी हे प्रियोत्तमा! जें निरुपचार–निरुपमेय–प्रेमाला जें विषय होतें, तें दुसरें कांहीं नव्हे. तर तोच आत्मा ह्मणून समजावें. १३४६ अर्जुना! आरशांत पाहणाराला शृंगारलें, तर त्याचें त्याला कांहींच नाहीं. तर तें आपल्यालाच शृंगारल्याप्रमाणें आहे. १३४७ तद्वत् अर्जुना! तुझ्या निमित्तानें मी मलाच अनुलक्षून बोलत आहें. माझ्यामध्यें आणि तुझ्यामध्यें मी–तूंपणा आहे काय? १३४८ ह्मणून हें अंतर्गत गुह्य, तुला प्राणासमानाला सांगतों. एकनिष्ठेची मला मोठी आवड आहे. १३४९ अर्जुना! पाण्याला आपला देह अर्पण करतांना मीठ भुलून जातें. तें आपण स्वतः तद्रूप झालें तरी, त्याची त्याला लाज वाटत नाहीं. १३५० त्याप्रमाणें माझ्यापासून लपवून ठेवावयाचें तुला माहितच नाहीं. तर मग मी काय आतां तुझ्यापासून गुप्त ठेवूं ? १३५१ ह्मणून जें गुह्य पाहिलें असतां बाकीचीं कितीही गुह्यें असलीं तरी तीं उघडीं वाटतात, असें जें माझें सुंदर भाषण तें आतां ऐक." १३५२

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।

मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ६५

[मन्मना भव] तरि बाह्य आणि अंतरा । आपुलिया सर्व व्यापारा । मज व्यापकातें वीरा । विषय करीं ॥ ५३ ॥ आघवा आंगीं जैसा । वायू मिळोनि आहे आकाशा । तूं सर्व कर्मी तैसा । मजसींचि असें ॥ ५४ ॥ किंबहुना आपुलें मन । करी माझें ऐकायतन[1] । माझेनि श्रवणें कान । भरूनि घालीं ॥ ५५ ॥ आत्मज्ञानें चोखडीं । संत जे माझीं रुपडीं । तेथ दृष्टि पडो आवडी । कामिनी जैसी ॥ ५६ ॥ मीं सर्ववस्तीचें वसौटें[2] । माझीं नामें जियें चोखटें । तियें जीवा यावया वाटे । वाचेचिये लावीं ॥ ५७ ॥ हाताचें करणें । कां पायांचें चालणें । तें होय मजकारणें । तैसें करीं ॥ ॥ ५८ ॥ [मद्याजी] आपुला अथवा परावा[3] । ठायीं उपकरसी[4]

१ विस्तारलेलें असें. २ बोलण्यासारखें. ३ श्रवण करण्यास योग्य. ४ दृष्टीनें. ५ चातकाला. ६ निवारण. ७ घरीं. ८ गुह्य, तात्पर्य. ९ आदरयुक्त प्रेमानें. १० निमित्तानें. ११ आपल्या उद्देशानें. १२ अंतर्गत. १३ एकनिष्ठतेचें. १४ चटक.

१ एक स्थान. २ वसतिस्थान. ३ दुसऱ्याचा. ४ उपयुक्त हो, उपकार करणारा हो.

पांडवा । तेणें यज्ञें होयीं बरवा । याज्ञिक माझा ॥ ५९ ॥ [मद्भक्तः] हें येकैक शिकऊं काई । पैं सैंवकें आपुल्या ठाईं । उरऊनि येर सर्वही । मी सेव्यचि करीं ॥ १३६० ॥ [मां नमस्कुरु] तेथ जाऊनि भूतद्वेष । सर्वत्र नैमैव नम मीचि येक । ऐसेनि आश्रय आत्यंतिक । लाहसी तूं माझा ॥ ६१ ॥ [मामेवैष्यसि] मग भरलेया जगाआंत । जाऊनि तिजयाची मात । होऊनि ठायील एकांत । आह्मां तुह्मां ॥ ६२ ॥ तेव्हां भलतिये अवस्थे । मी तूतें तूं मातें । भोगिसी ऐसें आइतें । वाढेल सुख ॥ ६३ ॥ आणि तिजें ओडळ करितें । निमालें अर्जुना जेथें । तें मीचि ह्मणौनि तूं मातें । पावसी शेखीं ॥ ६४ ॥ जैसी जळींची प्रतिभा । जळनाशीं बिंबा । येतां गौंभागोभा । कांहीं आहे ॥ ६५ ॥ पैं पवन अंबरा । कां कल्लोळ सागरा । मिळतां आंडवारा । कोणाचा गा ॥ ६६ ॥ ह्मणौनि तूं आणि आह्मी । हें दिसताहे देहधर्मीं । मग ययाच्या विरामीं । मीचि होसी ॥६७॥ [सत्यं ते] यया बोलामाझारीं । होय नव्हे झणें करीं । येथ आन आथी तरी । तुझीच आण ॥ ६८ ॥ [प्रतिजाने] पैं तुझी आण वाहणें । हें आत्मलिंगातें शिवणें । [प्रियोऽसि मे] प्रीतीची जाति लाजणें । आठवों नेदी ॥ ६९ ॥ येऱ्हवीं वेद्नि प्रपंच । जेणें विश्वाभास हा साच । आज्ञेचा नटनाच । काळातें जिणें ॥ १३७० ॥ तो देव मी सत्यसंकल्प । आणि जगाच्या हितीं बाप । मो आणेचा आक्षेप । कां करावा ॥ ७१ ॥ परी अर्जुना तुझेनि वेधें । मियां देवपणाचीं विरुदें । सांडिलीं गा मी हें आधें । सगळेनि तुवां ॥७२॥ पैं काजा आपुलिया । रावो आपली आपणया । आण वाहे धनंजया । तैसें हें कीं ॥ ७३ ॥ तेथ अर्जुन ह्मणे देवें । अचाट हें न बोलावें । जें आमचें काज नावें । तुझेनि एकें ॥ ७४ ॥ यावरी सांगों बैससी । कां सांगतां भेषही देसी । या तुझिया विनोदांसी । पार आहे जी ॥ ७५ ॥ कमळवना विकाशु । करी रवीचा येक अंशु । तेथ आघवाचि प्रकाशु । नित्य देतो ॥ ७६ ॥ पृथ्वी निवऊनि सागर । भरीजती येवढें थोर । वर्षे तेथ मिषांतरें । चातक कीं ॥ ७७ ॥ ह्मणौनि औदार्या तुझेया । मज निमित्त ना ह्मणावया । प्राप्ति असे दानी-राया । कृपानिधी ॥ ७८ ॥ तंव देव ह्मणती राहें । या बोलाचा प्रस्ताव नोहे । पैं मातें पावसी उपायें । साचचि येणें ॥ ७९ ॥ सैंधव सिंधू पडिलिया । जो क्षण धनंजया । तेणें विरेचि कीं उरावया । कारण कायी ॥ १३८० ॥ तैसें सर्वत्र मातें भजतां । सर्व मी होतां अहंता । निःशेष-जाऊनि तत्वता । मीचि होसी ॥ ८१ ॥ एवं माझिये प्राप्तीवरी । कर्मालागोनि अवधारीं । दाविली तुज उजरी । उपायांची ॥ ८२ ॥ जे आधीं तंव पंडुसुता । सर्व कर्मे मज अर्पितां । सर्वत्र प्रसन्नता । लाहिजे माझी ॥ ८३ ॥ पाठीं माझ्या इये प्रसादीं । माझें ज्ञान जाय सिद्धी । तेणें मिसळिजे त्रिशुद्धी । स्वरूपीं माझ्या ॥ ८४ ॥ मग तिये ठाईं । साध्य साधन होय नाहीं । किंबहुना तुज कांहीं । उरेचिना ॥ ८५ ॥ तरि सर्व कर्मे आपलीं । तुवां सर्वदा मज अर्पिलीं । तेणें प्रसन्नता लाधली । आजि हे माझी ॥ ८६ ॥ ह्मणौनि येणें प्रसादबळें । नवे जुंझाचेनि आडळें । न ठाकेचि येकवेळे । भाळलों तुज ॥ ८७ ॥ जें सप्रपंच अज्ञान जाये । जेणें येक मी गोचर होयें । तें उपपत्तीचेनि उपायें । गीतारूप हें ॥ ८८ ॥ मियां ज्ञान तुज आपुलें । नानापरी उपदेशिलें । येणें अज्ञानता सांडवलें । धर्माधर्म जें ॥ ८९ ॥

"तर हे **वीरा!** मला सर्वव्यापकाला आपल्या सर्व अंतर्बाह्य व्यापाराचाच विषय करून सोड. १३५३ सर्वांगानें वायु जसा आकाशाला मिळून असतो, त्याप्रमाणें तूंही सर्वकर्मांमध्यें मलाच मिसळून अस. १३५४ किंबहुना तूं आपलें मन माझ्या ठिकाणचेंच वतन करून ठेव. माझ्या ऐकण्यानेंच कान भरून टाक. १३५५ स्त्रीची दृष्टि जशी आपल्या पतीवर वेधून राहते, त्याप्रमाणें आत्मज्ञानानें पवित्र झालेल्या माझ्या मूर्ति जे सज्जन, त्यांच्यावर तुझी दृष्टि राहूं दे. १३५६ सर्व वस्तींचें वसतिस्थान मी; माझीं जीं उत्तम उत्तम नामें आहेत, तीं जिवाला येण्यासाठीं वाणीच्या वाटेस लाव. १३५७ हाताचें करणें, किंवा पायानें चालणें, तें सुद्धां माझ्या प्रीत्यर्थ होईल असें कर. १३५८ **अर्जुना!** आपला असो कीं, परका

१ सेवकपणा मात्र आपले ठिकाणीं ठेवून बाकी सर्व. २ नमोनमः. ३ अतिशय. ४ प्रेम. ५ प्रतिबंध. ६ गेलें. ७ प्रतिबंध. ८ आकाशास. ९ लाटा. १० अडचण. ११ निरनिराळ्या शरीरांनीं. १२ अभावसमयीं. १३ करूं नको. १४ अन्यथा असेल तर. १५ आत्मस्वरूपाला. १६ लज्जा. १७ हें सर्व दृश्य जग. १८ वेदाज्ञेचा प्रताप. १९ जिंकी. २० सफलसंकल्पी. २१ कल्याणाविषयीं. २२ त्यापेक्षां. २३ शंका. २४ छंदानें. २५ चिन्हें. २६ अर्धे. २७ अद्भुत. २८ वचन. २९ मौजेस. ३० किरण. ३१ निमित्ताला धनी.

१ उदारपणाला. २ धर्मात्मराजा, महादात्या. ३ प्रसंग. ४ मीठ. ५ प्राप्तीपर्यंत. ६ स्पष्टता. ७ पूर्वी. ८ प्राप्त झाली. ९ अटकावानें. १० तुझ्या स्वाधीन झालों. ११ प्रपंचासह. १२ साक्षात्. १३ युक्तीच्या.

असो; त्याजवर उपकार करणारा होऊन, त्या यज्ञानें माझा उत्तम यज्ञ करणारा हो. १३५९ हें एक एक काय काय ह्मणून शिकवावें? एक सेवकपणा मात्र आपल्याकडे घेऊन बाकी सर्व मी आहें हें समजून सेवाच करीत जा. १३६० तेव्हां प्राणिमात्राचा द्वेष जाऊन सर्वत्र मीच एक आहें असें समजून 'नमस्कार' 'नमस्कार' असें करशील, तेव्हांच तूं माझ्या दृढतर आश्रयास पात्र होशील. १३६१ मग साऱ्या भरलेल्या जगामध्यें तिसऱ्याची गोष्ट ही न उरतां, तुह्मांला आह्मांलाच, एकांत होऊन राहील. १३६२ तेव्हां पाहिजे त्या अवस्थेमध्यें मला तुझा आणि तुला माझा उपभोग घेतां येईल, असें आयतेंच सुख वृद्धिंगत होईल. १३६३ आणखी **अर्जुना!** तिसरें, मध्यें अडथळा करणारें नाहींसें झालें ह्मणजे, बाकी राहणार तें मीच; ह्मणून शेवटीं मलाच पावशील. १३६४ ज्याप्रमाणें जळांतील प्रतिबिंब, जळ नाहींसें झाल्यावर बिंबांत येतांना कांहीं प्रतिबंध आहे काय? १३६५ वायु आकाशाला मिळतांना, लाटांस समुद्र मिळतांना, कोणाची आडकाठी असणार? १३६६ ह्मणून तूं आणि मी हे निरनिराळ्या देहामुळें मात्र दिसतों आहों. तेव्हां त्यांच्या अभावीं तूं मत्स्वरूपच होशील. १३६७ ह्या भाषणामध्यें होय नाहीं कांहींएक ह्मणूं नको. ह्यांत अन्यथा असेल तर तुझीच शपथ! १३६८ आणखी तुझी शपथ वाहणें हें आत्मस्वरूपावरच हात मारण्यासारखें आहे. परंतु प्रीतीचें लक्षण असें आहे कीं, ती लज्जेची आठवणच होऊं देत नाहीं. १३६९ बाकी प्रपंचास वेढा घालून ज्याणें हा विश्वाभास सत्य करून दाखविला आहे, आणि ज्याचा आज्ञेचा प्रताप तर असा कीं, जो काळालाही जिंकील. १३७० तो मी सत्यसंकल्प देव; जगाच्या कल्याणाविषयीं तत्पर; मग शपथेबद्दल शंका कशाला घ्यावी? १३७१ पण **अर्जुना!** तुझ्या छंदानें मी देवपणाचीं लक्षणेंही सोडून दिलीं. मी अर्धा आहें. तूं मिळालास ह्मणजे संपूर्ण होतों. १३७२ हे **धनंजया!** आपल्या कार्यासाठीं राजाही आपली आपण शपथ वाहतो, त्यासारखेंच हेंही आहे." १३७३ तेव्हां **अर्जुन** ह्मणाला "**देवा!** इतकें हें अचाट बोलूं नये. कारण, तुझ्या एका नांवानेंच आमचें कार्य होणार आहे. १३७४ असें असतां आपण आणखी सांगावयास तयार होतां, इतकेंच नव्हे, तर सांगतांना वचनही देतां, तेव्हां ह्या तुमच्या प्रसन्नतेला कांहीं अंतपार आहे काय? १३७५ सूर्याचा एक किरणही कमलाचें सर्व वन विकसित करून सोडतो. असें असतां तो साराच प्रकाश निरंतर देतो. १३७६ पृथ्वीला गारीगार करून समुद्र भरून जातील येवढी मोठी वृष्टि होते तेथें, चातकाचें निमित्त कशाचें? १३७७ ह्मणून तुझ्या औदार्याला निमित्त नाहीं ह्मणतां येऊं नये ह्मणून मी निमित्तास धनी झालों आहें. बाकी हे **कृपानिधि!** हे महादात्या! हा आपला लाभ सर्व जगालाही फार मोठा झाला आहे. १३७८ तेव्हां **देव** ह्मणाले "थांब. तें असूं दे. स्तुति करित बसण्याची ही वेळ नव्हे. तर तूं खरोखर ह्याच उपायांनीं मला पावशील. १३७९ **अर्जुना!** मीठ समुद्रांत पडलें, तर तें क्षणामध्यें विरूनच जाईल. उरावयाला कारण काय? १३८० तद्वत् सर्वत्र माझेंच भजन केलें, सर्व मत्स्वरूपच होऊन राहिलें, ह्मणजे झाडून सारी अहंता नाहींशी होऊन तूं खरोखरच मीच होशील. १३८१ अशा प्रकारें कर्मापासून माझ्या प्राप्तीपर्यंत उपायांची स्पष्टता तुला दाखवून दिली, हें लक्ष्यांत आण. १३८२ कारण **अर्जुना!** आधीं तर सारीं कर्मे मला अर्पण केलीं कीं, सर्व ठिकाणीं माझी प्रसन्नताच प्राप्त होते. १३८३ नंतर माझ्या ह्या प्रसादानें माझें ज्ञान परिपूर्ण होतें. आणि त्याच्या योगेंकरून निश्चयानें माझ्या स्वरूपामध्यें ऐक्य होतें. १३८४ मग **पार्था!** त्या ठिकाणीं साध्य आणि साधन हीं दोन्हीही

**नाहींशीं होतात. किंबहुना तुला कांहींच उरत नाहीं ह्मटलें तरी चालेल. १३८५ तर तूं आपलीं सारीं कर्में सदा सर्वकाल मला अर्पण केलींस, त्यामुळें आज ही माझी प्रसन्नता तुला प्राप्त झाली आहे. १३८६ ह्मणून ह्या प्रसादाच्या बळानें ह्या युद्धामध्यें आणखी एक नवीनच आडकाठी येईल, हें एक वेळही मनांत आलें नाहीं. इतका मी तुला भुलून गेलों आहें. १३८७ कारण, प्रपंचासह अज्ञानाचा नाश होतो; जिच्या योगानें एक मीच व्यक्त होतों, त्या युक्तीचा उपाय हें ह्या गीतेचें स्वरूप आहे. १३८८ मी तुला अनेक प्रकारांनीं ज्ञान दिलें. येणेंकरून धर्म आणि अधर्मरूप जें जें ह्मणून कांहीं अज्ञान आहे, तें सारें नाश पावलें आहे." १३८९**

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ६६

[सर्वधर्मान्परित्यज्य] आशा जैसी दुःखातें । व्याली निंदा दुरितें । हें असो जैसें दैन्यातें । दुर्भगत्व ॥ १३९० ॥ तैसें स्वर्गनरकसूचक । अज्ञान व्यालें धर्मादिक । तें सांडूनि घालीं अशेख । ज्ञानें येणें ॥ ९१ ॥ हातीं घेऊनि तो दोर । सांडिजे जैसा सर्पाकार । कां निद्रात्यागें घराचार । स्वप्नींचा जैसा ॥ ९२ ॥ ना ना सांडिलेनि कंवळें । चंद्रींचें धुंपें पिवळें । व्याधित्यागें कडुवाळें- । पण मुखाचें ॥ ९३ ॥ अगा दिवसा पाठी देउनी । मृगजळ घापे त्यजूनी । कां काष्ठत्यागें वन्ही । त्यजिजे जैसा ॥ ९४ ॥ तैसें धर्माधर्माचें टवाळ । दावी अज्ञान जें कां मूळ । तें त्यजूनि त्यजीं सकळ । धर्मजात ॥ ९५ ॥ [मामेकं] मग अज्ञान निमालिया । मीचि येक असें अपैसया । संनिद्र स्वप्न गेलयां । आपण पैं जैसें ॥ ॥ ९६ ॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं । मग भिन्नाभिन्न आन नाहीं । सोऽहंबोधें तयाच्या ठायीं । अनन्य होय ॥ ९७ ॥ [शरणं व्रज] पैं आपलेनि भेदेंविण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥ ९८ ॥ जैसें घटाचेनि नाशें । गगनीं गगन प्रवेशे । मज शरण येणें तैसें । ऐक्य करी ॥ ९९ ॥ सुवर्णमणि सोनयां । ये कल्लोळ जैसा पाणियां । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ १४०० ॥ [अहं त्वा सर्वपापेभ्यः] वांचूनि सागराच्या पोटीं । वड नळ शरण आला किरीटी । जाळूं न ठके तया गोठ वोळूनि दे पां ॥ १ ॥ मजही शरण रिघिजे । आणि जी त्वेंचि असिजे । धिग् बोलीं यिया न लजे । प्रज्ञा बे ॥ २ ॥ अगा प्राकृताही राया । आंगीं पडे जें धनंजय तें दासिरूंहि कीं तया । समान होय ॥ ३ ॥ मा मी वि श्वर भेटें । आणि जीवग्रंथी न सुटे । हे बोल नको बोख कानीं लाऊं ॥ ४ ॥ ह्मणौनि मी होऊनि मातें । सेवणें अ आयितें । तैसें करीं हाता येतें । ज्ञानें येणें ॥ ५ ॥ ताकौनियां काढिलें । लोणी मोघौतें ताकीं घातलें । परि घेपेचि कांहीं केलें । तेणें जेविं ॥ ६ ॥ तैसें अद्वयत्वें मज शरण रिघालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ॥ ७ ॥ लोह उभें खाय माती । तें परिसाचिये संगती सोनें जालया पुढती । न शिविजे मळें ॥ ८ ॥ हें अस काष्ठापासोनि । मथूनि घेतलया वन्ही । मग काष्ठेंही कोंडोनि नं ठके जैसा ॥ ९ ॥ अर्जुना काय दिनकर । देखत आ आंधार । कीं प्रबोधीं होय गोचर । स्वप्नभ्रम ॥ १४१० ॥ तैसें मजसीं येकवटलेया । मी सर्वरूप वांचूनियां । आन कांहीं उरावया । कारण असें ॥ ११ ॥ [मोक्षयिष्यामि] ह्मणौनि तयाचें कांहीं । चिंतीं ना आपुल्या ठाईं । तुझें पापपुण्य नाहीं । मीचि होईन ॥ १२ ॥ तेथ सर्वबंधलक्षणें । पापें उरावें दुजेपणें । तें माझ्या बोधीं वायाणें । होऊनि जाईल ॥ १३ ॥ जळीं पडिलिया लवणा । सर्वही जळ होय विचक्षणा । तुज मी अनन्यशरणा । होईन तैसा ॥ १४ ॥ येतुलेनि अपैसया । सुटलाचि आहासि धनंजया । [मा शुचः] घेईं मज प्रकाशोनियां । सोडवीन तूतें ॥ १५ ॥ याकारणें पुढती । हे आधी न वाहे चित्तीं । मज एकासि ये सुमती । जाणोनि शरण ॥ १६ ॥ ऐसें सर्वरूपरूपसें । सर्वदृष्टिडोळसें । सर्वदेशनिवासें । बोलिले श्रीकृष्णें ॥ १७ ॥ [स्वानुभवसुखोत्कयः] मग सांवळा सकंकण । बाहु पसरोनि दक्षिण । आलिंगिला स्वशरण । भक्तराज तो ॥ १८ ॥ न पवतां जयातें । कोखे सूनि बुद्धीतें । बोलणें मागौतें । वोसरलें ॥ १९ ॥ ऐसें जें कांहीं येक । बोला बुद्धीसिही अटक । तें द्यावया

१ पातकें. २ दुर्दैवपणा. ३ सोडून दे. ४ प्रपंच. ५ कावीळ रोगानें. ६ चांदणें. ७ कडवटपणा. ८ बंड. ९ नाश पावल्यावर. १० निद्रेसह. ११ भिन्नाभिन्न जें द्वैत त्याच्या ठाईं. १२ घटाकाश आकाशांत मिळतें.

१ टाकून दे. २ लाजत नाहीं. ३ यःकश्चित् राजाच्या. ४ बटकूर. ५ जीवदशा. ६ वाईट. ७ ऐकूं. ८ ताकांतून. ९ पुनः. १० न राहे. ११ जागृतींत. १२ प्रत्यक्ष. १३ चिंतूं नको. १४ सर्वथैव बंधाला कारण अशा. १५ व्यर्थ. १६ हे सुज्ञा. १७ प्रकट होऊन. १८ मनोव्यथा. १९ सर्व रूपें ज्याच्या योगानें रूपवान् होतात. २० हस्तभूषणयुक्त. २१ केवळ आपल्याला शरण आलेला. २२ ज्या वस्तूची प्राप्ति न होतां बोलणें बुद्धीला काखेस मारून मागौतें=मागें हटतें अशी जी वस्तु. २३ मागें हटलें. २४ दुःप्रवेश्य.

मिष । खेंवाचें केलें ॥ १४२० ॥ हृदया हृदय येक जालें । ये हृदयींचें ते हृदयीं घातलें । द्वैतें न मोडितां केलें । आपणाऐसें अर्जुना ॥ २१ ॥ दीपें दीप लाविला । तैसा परिष्वंग तो जाला । द्वैत न मोडितां केला । आपणपें पार्थ ॥ २२ ॥ तेव्हां सुखाचा मग तया । पूर आला जो धनंजया । तेथ वाड तऱ्हीं बुडोनियां । ठेला देव ॥ २३ ॥ सिंधु सिंधुतें पावों जाये । तें पावणें ठाके दुणा होये । वरी रिगे पुरवणिये । आकाशही ॥ २४ ॥ तैसें तया दोघांचें मिळणें । दोघां नावरे जाणावें कवणें । किंबहुना श्रीनारायणें । विश्व कोंदलें ॥ २५ ॥ ['गीतायाः गर्भे त्रिकांडोत्पत्तिं व्याकरोति'] एवं वेदाचें मूळसूत्र । सर्वाधिकारैकपवित्र । श्रीकृष्णें गीताशास्त्र । प्रकट केलें ॥ २६ ॥ येथ गीता मूळ वेदां । ऐसें केंवि पां आलें बोधा । हें ह्मणाल तरी प्रसिद्धा । उपपत्ति सांगों ॥ २७ ॥ तरी जयाच्या निश्वासीं । जन्म झालें वेदराशी । तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी । बोलिला स्वमुखें ॥ २८ ॥ ह्मणौनि वेदां मूळभूत । गीता ह्मणो हें होय उचित । आणिकही येकी येथ । उपपत्ति असे ॥ २९ ॥ जें न नेणत स्वरूपें । जयाचा विस्तार जेथ लपे । तें तयाचें ह्मणिपे । बीज जगीं ॥ १४३० ॥ तरि कांडत्रयात्मक । शब्दराशी अशेष । गीतेमाजि असे रुख । बीजीं जैसा ॥ ३१ ॥ ह्मणोनि वेदांचें बीज । श्रीगीता होय हें मज । गमे आणि सहज । दिसतही आहे ॥ ३२ ॥ जे वेदांचे तिन्ही भाग । गीते उमटले असती चांग । भूषणरत्नीं सर्वांग । शोभलें जैसें ॥ ३३ ॥ तियेंचि कर्मादिकें तिन्हीं । कांडें कोणकोणे स्थानीं । गीते आहाति तें नयनीं । दाखऊं आइक ॥ ३४ ॥ ['गीताशास्त्रोत्पत्त्यादिप्रस्तावना'] तरि पहिला जो अध्याव । तो शास्त्रप्रवृत्तिप्रस्ताव । द्वितीयीं सांख्यसद्भाव । प्रकाशिला ॥ ३५ ॥ मोक्षदानीं स्वतंत्र । ज्ञानप्रधान हें शास्त्र । येतुलाळें दुजीं सूत्र । उभारिलें ॥ ३६ ॥ ['कर्मकांडं'] मग अज्ञानें बांधलेया । मोक्षपदीं बैसावया । साधनारंभ तो तृतीया- । ध्यायीं बोलिला ॥ ३७ ॥ जे देहाभिमानबंधें । सांडूनि काम्यनिषिद्धें । विहित परि अप्रमादें । अनुष्ठावें ॥ ३८ ॥ ऐसेनि सद्भावें कर्म करावें । हा तिजा अध्यायीं देवें । निर्णय केला तें जाणावें । कर्मकांड येथ ॥ ३९ ॥ ['उपासनाकांडं'] आणि तेंचि नित्यादिक । अज्ञानाचें आवश्यक । आचरतां मोचक । कैंवी होय पां ॥ १४४० ॥ ऐसी अपेक्षा जालिया । बद्ध मुमुक्षुते आलिया । देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया । सांगीतली ॥ ४१ ॥ जे देह वाचा मानसें । विहित निपजे जें जैसें । तें येक ईश्वरोद्देशें । कीजे ह्मणीतलें ॥ ४२ ॥ हेंचि ईश्वरीं कर्मयोगें । भजनकथनाचें खागें । आदरिलें शेषभागें । चतुर्थाचेनी ॥ ४३ ॥ तें विश्वरूप अकरावा । अध्याय संपे जंव आघवा । तंव कर्मीं ईश भजावा । हें जें बोलिलें ॥ ४४ ॥ तें अष्टाध्यायीं उघड । जाण येथें देवताकांड । शास्त्र सांगतसे आड । मोडूनि बोले ॥ ४५ ॥ ['ज्ञानकांडं'] आणि तेणेंचि ईशप्रसादें । श्रीगुरुसंप्रदायलब्धें । साच ज्ञान उद्बोधे । कोवळें जें ॥ ४६ ॥ तें अद्वेष्टादिप्रभृतिकीं । अथवा अमानित्वादिकीं । वाढविजे ह्मणोनि लेखीं । बारावा गणूं ॥ ४७ ॥ तो बारावा अध्याय आदी । आणि पंधरावा अवधि । ज्ञानफळपाकसिद्धि । निरूपणासी ॥ ४८ ॥ ह्मणौनि चहूंही इहीं । ऊर्ध्वमूळांतीं अध्यायीं । ज्ञानकांड ये ठायीं । निरूपिजे ॥ ४९ ॥ एवं कांडत्रयरूपिणी । श्रुतीच हे कोडिसवाणी । गीतापद्यरत्नाचीं लेणीं । लेयिलि आहे ॥ १४५० ॥ हें असो कांडत्रयात्मक । श्रुति मोक्षरूप फळ येक । बोभावे जें आवश्यक । ठाकावें ह्मणोनी ॥ ५१ ॥ ['षोडशाद्यध्यायत्रयकारणं दर्शयति'] तयाचेनि साधन ज्ञानेंसी । वैर करी जो प्रतिदिवशीं । तो अज्ञानवर्ग षोडशीं । प्रतिपादिजे ॥ ५२ ॥ तोचि शास्त्राचा बोळावा । घेवोनि वैरी जिणावा । हा निरोप तो सतरावा । अध्याय येथ ॥ ५३ ॥ ऐसा प्रथमालागोनी । सतरावा लोणी करूनी । आत्मनिश्वास विवरूनी । दाविला देवें ॥ ५४ ॥ तया अर्थजातां अशेषां । केला तात्पर्याचा आवांका । तो हा अठरावा देखा । कळशाध्याय ॥ ५५ ॥ एवं सकळ सांख्यसिंधु । श्रीभगवद्गीताप्रबंधु । हा औदार्यें आगळा वेदु । मूर्त जाण ॥ ५६ ॥ वेद संपन्न होय ठाईं । परि कृपण ऐसा आन नाहीं । जे कानीं लागला तिहीं । वर्णांच्याचि ॥ ५७ ॥ येरां भवव्यथा ठेलियां । स्त्रीशूद्रादिकां प्राणियां । अनवसर मांडूनियां । राहिला आहे ॥ ५८ ॥ तरी मज पाहातां तें मागील उणें । फेडावया गीतापणें । वेद वेठेला भलतेणें । सेव्य होआवया ॥ ५९ ॥ ना हें अर्थें रिगोनि मनीं । श्रवणें

१ आलिंगनाचें निमित्त केलें. २ दोघांचे देह तसेच असतां. ३ आलिंगन. ४ मोठा. ५ साह्यास. ६ भरलें. ७ सर्व अधिकारांत अतिशुद्ध. ८ सयुक्तिक कारण. ९ श्वासोच्छ्वासांपासून. १० प्रतिज्ञेवर. ११ न नासतां. १२ कर्म-उपासना-ज्ञानरूप. १३ वेद. १४ वृक्ष. १५ वाटे. १६ अशा प्रकारें. १७ इच्छा. १८ मोक्षेच्छुस्थितीला.

१ ठिकाण. २ आठ अध्यायांत. ३ उपासनाकांड. ४ गीताशास्त्र. ५ प्रतिबंध निवारून, गोंधळून. ६ गणनेंत. ७ पंधराव्याच्या. ८ लहानशी. ९ गर्जून सांगे. १० सोबती. ११ जिंकावा. १२ शेवट. १३ वेद, वेद हे निःश्वासापासून झाले 'यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत्। निर्ममे····'. १४ विचार. १५ शिखररूप. १६ प्रकृतिपुरुषांचें विवेचन ज्यानें केलें जातें तो सांख्यसमुद्र. १७ ग्रंथ. १८ प्रत्यक्ष. १९ समर्थ. २० कदर्यु (कद्रू). २१ अनधिकारी. २२ मला (ज्ञानदेवाला) असें वाटतें कीं. २३ आकारला. २४ भलत्या कोणासही.

लागोनि कानीं । जपमिषें वदनीं । वसोनियां ॥ १४६० ॥ ये गीतेचा पाठ जो जाणे । तयाचेनि सांगातीपणें । गीता लिहोनि वाहणें । पुस्तकमिषें ॥ ६१ ॥ ऐसैसा मीसकटा । संसाराचा चोहटां । [3]गैवादि घालित चोखटा । मोक्षसुखाची ॥ ६२ ॥ परि आकाशीं वसावया । पृथ्वीवरी बैसावया । रविदीप्ती [4]राहाटावया । ओंवार नभ ॥ ६३ ॥ तेविं उत्तम अधम ऐसें । सेवितां कवणातेंही न पुसे । [6]कैवल्यदानें सरिसें । निववीत जगा ॥ ६४ ॥ यालागिं मॉगिलि कुटी- । भ्याला वेद गीतेच्या पोटीं । रिगाला आतां गोमटी । कीर्ति पातला ॥ ६५ ॥ ह्मणौनि वेदाची सुसेव्यता । ते हे मूर्त जाण श्री- गीता । श्रीकृष्णें पंडुसुता । उपदेशिली ॥ ६६ ॥ परि वत्सा- चेनि वोरसें । दुभतें होय घरा उद्देशें । जालें पांडवाचेनि मिषें । जगदुद्धरण ॥ ६७ ॥ चातकाचियें केणवे । मेघ [10]पाणियेसिं धांवे । तेथ चराचर आघवें । [11]निवालें जेविं ॥६८॥ कां [12]अनन्यगती- कमळा- । लागीं सूर्य ये वेळोवेळा । किं सुखिया होइजे डोळा । त्रिभुवनींचा ॥ ६९ ॥ तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें । संसारायेवढें थोर ओझें । [13]फेडिलें जगाचें ॥ १४७० ॥ सर्वशास्त्ररत्नदीप्ती । उजळिता हा त्रिजगती । सूर्य नव्हे लक्ष्मीपती । [14]वैकाकाशींचा ॥७१॥ बापकुळ तें पवित्र । जेथिंचा पार्थ या ज्ञाना पात्र । जेणें गीता केलें स्वतंत्र । [15]ओंवार जगा ॥ ७२ ॥ हें असो मग तेणें । सद्गुरु-श्रीकृष्णें । पार्थाचें [16]मिसळणें । आणिलें द्वैता॥७३॥ पाठीं ह्मणतसे पांडवा । शास्त्र हें मानलें कीं जीवा । तेथ येरू ह्मणे देवा । आपुलिया कृपा ॥ ७४ ॥ तरि निधान जोडावया । भाग्य घडे गा धनंजया । परि जोडिलें भोगावया । विर्पायें होय ॥ ७५॥ पैं क्षीरसागरायेवढें । [19]अविरजी दुधाचें भांडें । सुरां असुरां केवढें । मथितां जालें ॥ ७६ ॥ तें सांहसही फळा आलें । जें अमृतही डोळां देखिलें । परि वरिचिल चुकले । [21]जतनेतें ॥ ७७ ॥ तेथ अमरत्वा [22]वोगरिलें । तें मरणाचिलागीं जालें । भोगों नेणतां जोडलें । ऐसें आहे ॥ ७८ ॥ नहुष [23]स्वर्गाधिपति जाला । परी [24]राहाटीं भोवावला । तो भुजंगत्व पावला । नेणसी कायी ॥७९॥ ह्मणौनि बहुत पुण्य तुवां । केलें तेणें धनंजया । आजि शास्त्रराजा [25]ईयां । जालासि विषय ॥१४८०॥ तरि ययाचि शास्त्राचेनि । संप्रदायें [1]पांगु- रौनि । शास्त्रार्थ हा [2]निकेनी । अनुष्ठीं हो ॥ ८१ ॥ येऱ्हवीं अमृतमथना- । सारिखें होईल अर्जुना । जरी रिघसी अनुष्ठाना । संप्रदायेंवीण ॥ ८२ ॥ गाय घड जोडे गोमटी । ते तैंचि [3]पैय दे किरीटी । जैं जाणिजे हातवटी । [4]सांजवणीची ॥८३॥ तैसा श्रीगुरु प्रसन्न होये । शिष्य विद्याही कीर लाहे । परि ते फळे संप्रदायें । उपासिलिया ॥ ८४ ॥ ह्मणौनि शास्त्रीं जो इये । उचित संप्रदाय आहे । तो ऐक आतां बहुवें- । [5]आदरेंसी ॥ ८५ ॥

"आशेपासून दुःखें; आणि निंदेपासून पातकें जशीं उत्पन्न होतात; हें असो, दुर्दैव जसें दारिद्र्य उत्पन्न करतें, १३९० त्याप्रमाणें स्वर्गनरकसूचक अज्ञानापासून धर्मादिक उत्पन्न होतात. तीं सारीं ह्या ज्ञानाच्या योगानें नाहींशीं करून टाक. १३९१ दोर हातांत घेऊन सर्पाकार जसा टाकून द्यावा, किंवा निद्रा गेल्यानंतर स्वप्नांतला प्रपंच जसा सोडावा, १३९२ किंवा कामीण नाहींशी झाली ह्मणजे चंद्राच्या चांदण्यांतील पिंवळेपणाही नाश पावतो; रोग गेला ह्मणजे तोंडाचा जसा कडवटपणा जातो; १३९३ दिवस गेला ह्मणजे मृगजळ जसें नाहींसें होतें, किंवा (जळकें) लांकूड टाकून दिलें ह्मणजे जसा अग्नि टाकावा लागतो, १३९४ त्याप्रमाणें धर्माधर्माचें बंड, ज्याच्या मुळाशीं अज्ञान असलेलें दृष्टीस पडतें, तें टाकून सारे दरोबस्त धर्मच सोडून दे. १३९५ तें अज्ञान निघून गेलें ह्मणजे अर्थात् मीच एक राहतों. निद्रेसहवर्तमान स्वप्न गेलें ह्मणजे जसें आपलें आपण राहतों, १३९६ त्याप्रमाणें माझ्या एकाशिवाय दुसरें भिन्न अभिन्न असें दुसरें कांहींच नाहीं. "तोच मी" ह्या ज्ञानानें त्याच्या ठिकाणीं अनन्य हो. १३९७ आपल्याही भेदावांचून माझें एकत्व जाणणें त्याचेंच नांव मला शरण येणें होय. १३९८ घटाचा नाश झाला ह्मणजे जसें त्यांतील आकाश, आकाशामध्यें शिरतें, त्याप्रमाणें मला शरण येणें माझ्याशीं ऐक्य करतें. १३९९ सोन्याचे मणी जसे सोन्यांत येतात; पाण्याच्या

१ मजसहित. २ चवाठ्यावर. ३ सत्र. ४ फिरण्याला. ५ अवकाश. ६ मोक्षदानानें. ७ मागल्या निंदेला भ्याला. ८ पान्ह्यानें, ममतेनें. ९ दयेनें. १० पाण्यासहित. ११ शांत झालें. १२ एकनिष्ठ अशा कमळासाठीं. १३ दूर केलें. १४ सुखरूप आकाशींचा. १५ वसतिस्थान. १६ आलिंगन. १७ गुप्त धन. १८ क्वचित्. १९ न विरजलेलें. २० जिवावर उदार होऊन झटणें. २१ संभाळण्याला. २२ वाढिलें. २३ नहुष राजाला कांहीं दिवस स्वर्गाचें आधिपत्य मिळालें तेव्हां. २४ वर्तणुकींत चुकला. २५ या गीतेला.

१ धारण करून. २ चांगलेपणानें. ३ दूध देते, पिवां ये अशा पाठीं धार काढणें. ४ दोहनाची. ५ आस्थापूर्वक.

लाटा जशा पाण्यांत येतात; त्याप्रमाणें अर्जुना! तूंही मला शरण ये. १४०० नाहींतर अर्जुना! समुद्राच्या पोटामध्यें वडवानळ शरण आला तर काय उपयोग? तो त्याला जाळणार नाहीं, ही गोष्ट सोडून दे. १४०१ मला शरण येऊन सुद्धां जीवपणानेंच कायम राहिला, अशा बोलण्याला धिक्कार असो. तसें करतांना बुद्धीला लज्जा वाटणार नाहीं काय? १४०२ वा अर्जुना! यःकश्चित् राजाच्या आंगाखालीं पडणारें एखादें बटकुर असलें, तर तें सुद्धां त्याच्या बरोबरीचें होतें. १४०३ मग मी तर विश्वेश्वर आहें. आणि तो मला भेटल्यानंतरही जीवदशा सुटणार नाहीं, हें दुर्भाषण कानावर सुद्धां घेऊं नको. १४०४ ह्मणून मी होऊन आयतें मलाच सेवन करावयाचें असतें. ह्याकरितां ह्या आलेल्या ज्ञानानें मी हस्तगत होईन असें कर. १४०५ मग ताकापासून काढलेलें लोणी फिरून ताकांत घातलें, तर तें कांहीं केलें तरी जसें घेत नाहीं, १४०६ त्याप्रमाणें अद्वयपणानें मला तूं शरण आलास ह्मणजे अर्थात् तुला धर्माची किंवा अधर्माची कांहीं गरज राहणार नाहीं. १४०७ लोखंड उभें असलें तर, माती खातें. पण तें परिसाच्या संगतीनें सोनें झाल्यानंतर मळ त्याला शिवत नाहीं. १४०८ हें असो. काष्ठापासून मंथन करून अग्नि काढला ह्मणजे मग तो जसा काष्ठांनीं कोंडून राहत नाहीं, १४०९ अर्जुना! सूर्य हा कधीं आंधार पाहतो काय? किंवा जागृतींत स्वप्नाचा भ्रम प्रकट होतो काय? १४१० त्याप्रमाणें माझ्याशीं ऐक्यरूपता झाली ह्मणजे मग माझ्या सर्व स्वरूपाशिवाय, दुसरें रहावयाला कांहीं कारण आहे काय? १४११ ह्मणून त्याची तूं आपल्या ठिकाणीं कांहींएक चिंता करूं नको. हें पहा! तुझें पाप आणि पुण्य मीच होईन. १४१२ तेव्हां सर्वथैव बंधाला कारण, अशा पापानें दुसरेपणानें रहावें हें माझ्या ज्ञानानें व्यर्थ होऊन जाईल. १४१३ हे सुज्ञा! पाण्यांत मीठ पडलें तर सारें पाणीच होऊन जातें. त्याप्रमाणें तूं मला अनन्यभावें शरण आलास ह्मणजे तसाच मद्रूप होऊन जाशील. १४१४ अर्जुना! तेवढ्यानें आपोआपच मुक्त होशील. याकरितां मला आपलासा करून घे. ह्मणजे मी तुला सोडवीन १४१५ आणखी पुन्हां ही मनामध्यें चिंता वाहूं नको. हे बुद्धिमंता! मला एकालाच तूं शरण ये." १४१६ सर्व रूपें ज्याच्या योगानें रूपवान् होतात; सर्व दृष्टी ज्याच्या योगानें डोळस होतात; असे सर्वत्र व्यापून असणारे जे श्रीकृष्ण ते ह्याप्रमाणें बोलले. १४१७ आणखी कंकणयुक्त शामवर्णाचा उजवा बाहु पसरून आपणास शरण आलेल्या भक्तराजास आलिंगन दिलें. १४१८ ज्या वस्तूची प्राप्ति न होतां, बोलणें बुद्धीला काखोटीस मारून मागें हटतें; १४१९ अशी जी कांहीं एक वस्तु, जिच्यामध्यें भाषण व बुद्धिही शिरकत नाहीं, ती वस्तु देण्यासाठीं आलिंगनाचें एक निमित्त केलें. १४२० हृदयाला हृदय भिडलें; ह्या हृदयांतलें त्या हृदयांत घातलें; द्वैत न मोडतां अर्जुनाला आपणासारखें करून सोडलें. १४२१ दिव्यानें दिवा लावावा त्याप्रमाणें तो आलिंगनाचा प्रकार झाला. द्वैत न मोडतां पार्थाला स्वस्वरूप करून सोडलें. १४२२ तेव्हां त्या अर्जुनाला इतका कांहीं सुखाचा पूर आला कीं, देव येवढे मोठे होते तरी सुद्धां त्यांत बुडून गेले. १४२३ समुद्राला समुद्र भेटा[illegible] गेला ह्मणजे तें भेटणें एका बाजूस राहून [illegible] दुप्पट होतो. आणि शिवाय आपल्या सांठ[illegible] अवकाश सुद्धां होतो. १४२४ त्याप्रमाणें दोघांची भेट दोघांनाही आवरेना. हें कळ[illegible] तरी कोणाला? किंबहुना श्री नारायणां[illegible] सारें विश्वच कोंदून टाकलें ह्मटलें तरी चालेल. १४२५ अशा प्रकारें वेदाचें मूळसूत्र, सर्व अधिकारामध्यें अत्यंत पवित्र, असें जें गीताशास्त्र, तें श्रीकृष्णांनीं प्रगट केलें. १०२६ येथें गीता ही वेदाचें मूळ असें कशावरून समजलें असें ह्मणाल ह्मणून, सबळ कारण सांगतों

१४२७ तर ज्याच्या श्वासोच्छ्वासापासून वेदराशींचें जन्म झालें, असा जो सत्यप्रतिज्ञ **भगवान्** त्यानें आपल्या मुखानें ती सांगितली. १४२८ म्हणून वेदांना मूळभूत गीता असें म्हटलें तें योग्यच आहे. शिवाय आणखीही एक कारण आहे. १४२९ नाश न पावणारें जें स्वरूप, आणि ज्याचा विस्तार ज्यांत गुप्त असतो, तें त्याचें बीज असें जगामध्यें म्हणतात. १४३० तर बीजामध्यें जसा वृक्ष असतो; त्याप्रमाणें त्रिकांडात्मक एकून एक वेदराशी ह्या गीतेमध्यें आहेत. १४३१ ह्मणून **श्रीगीता** हें वेदांचें बीज आहे असें मला वाटतें. आणि उघड दिसण्यांतही दिसतेंच आहे. १४३२ रत्नालंकारांनीं जसें सारें आंग शोभतें, त्याप्रमाणें वेदाचे जे तिन्ही भाग ते, गीतेमध्यें उत्कृष्ट रीतीनें उमटलेले आहेत. १४३३ तींच कर्मादिक तीन कांडें, गीतेमध्यें कोणकोणत्या ठिकाणीं आहेत तीं डोळ्यांस दाखवून देऊं. ऐका. १४३४ तर पहिला जो अध्याय तो शास्त्रारंभाची प्रस्तावना होय. दुसऱ्या अध्यायांत सांख्यशास्त्राचीं उत्तम लक्षणें व्यक्त केलीं. १४३५ हें शास्त्र ज्ञानप्रधान असून मोक्षदान देण्याविषयीं मुखत्यार आहे, अशाबद्दल दुसऱ्या अध्यायांत सूत्राची उभारणी केली आहे. १४३६ नंतर अज्ञानानें बद्ध झालेल्याला मोक्षपदावर बसावयाला साधनें काय तीं सांगण्याला आरंभ तिसऱ्या अध्यायांत केला आहे, १४३७ असा कीं, देहाभिमानानें बद्ध झालेलीं काम्य, व निषिद्ध कर्में सोडून विहित असणारीं कर्में, प्रमादरहित अशीं आचरण करावींत. १४३८ अशा सद्भावनेनें कर्म करावें. ह्या देवांनीं तिसऱ्या अध्यायांत निर्णय सांगितला. तें येथें कर्मकांड आहे हें लक्ष्यांत ठेवावें. १४३९ आणखी तसेंच नित्य नैमित्तिक कर्म आचरण करतांना अज्ञानाची आवश्यक मुक्तता कशी होईल? १४४० बद्ध मुमुक्षु होऊन त्यास अशी अपेक्षा उद्भवल्यास त्याकरितां **देवांनीं** ब्रह्मार्पणामध्यें क्रिया सांगितली. १४४१ ती अशी कीं, कायावाचामनेंकरून जें जसें विहित कर्म होईल, तें एक ईश्वरप्रीत्यर्थ करावें असें सांगितलें. १४४२ हेंच कर्मयोगानें ईश्वराचें भजन करण्याचें ठिकाण होय. हें चवथ्या अध्यायांतील राहिलेल्या भागांत सांगितलें. १४४३ तें अकराव्या अध्यायांतील विश्वरूप संपेपर्यंत जें सारें कर्मानें ईश्वराचें भजन करावें असें कथन केलें, १४४४ तेंच देवताकांड आठ अध्यायांत स्पष्ट, सर्व शंका दूर करून हें शास्त्र बोललें. १४४५ आणि त्याच ईश्वरप्रसादानें श्रीगुरुकृपाप्राप्तीनें कोमल आणि सत्वज्ञानाचा जो अनुभव, १४४६ तें 'अद्वेष्टादि'क श्लोकांनीं किंवा 'अमानित्वादि'क श्लोकांनीं वाढविलें. ह्यांतच बाराव्याची गणना आहे. १४४७ तो बारावा अध्याय पहिला, आणि पंधरावा शेवटचा, येथपर्यंत ज्ञानफलाची पाकसिद्धि निरूपण केली आहे. १४४८ ह्मणून ह्या चारी अध्यायांनीं **'ऊर्ध्वमूल'** ह्या अध्यायाच्या अखेरपर्यंत ज्ञानकांडाचें निरूपण केलें. १४४९ अशा प्रकारची गीतापद्यरूप रत्नालंकार घातलेली ही एक गोजिरवाणी लहानशी श्रुतीच आहे. १४५० हें असो. ही त्रिकांडात्मक श्रुति, मोक्षरूप फल घेण्यासाठीं 'थांबा' 'थांबा' ह्मणून हाका मारित आहे. १४५१ त्याचें साधन जें ज्ञान, त्याच्याशीं प्रत्येक दिवशीं वैर करणारा जो अज्ञानवर्ग, तो सोळाव्या अध्यायांत वर्णन केला आहे. १४५२ तो वैरी, शास्त्राचा स्नेही घेऊन जिंकावा, ह्याचें निरूपण तो सतरावा अध्याय होय. १४५३ ह्याप्रमाणें पहिल्या अध्यायापासून सतराव्या अध्यायापर्यंत देवांनीं आपल्याच श्वासोच्छ्वासाचें—वेदांचें—निरूपण केलें. १४५४ त्यांतील एकून एक तात्पर्याचा ज्यांत विचार केला आहे, तो हा अठरावा—कळसरूप अध्याय आहे हें समजावें. १४५५ अशा प्रकारें सांख्य—प्रकृति पुरुषाचा—विचार केलेल्या शास्त्राचा समुद्र असा हा श्रीमद्भगवद्गीता ग्रंथ प्रत्यक्ष वेदाचाच अवतार असून औदार्यानें त्याहूनही थोर आहे. १४५६ वेद आपल्या ठिकाणीं समर्थ आहे खरा; पण त्या-

च्या सारखा दुसरा कृपणच कोणी नाहीं. कारण, तो तिन्ही वर्णांच्याच कानांशीं लागतो. १४५७ इतर स्त्रीशूद्रादिक प्राण्यांना ते संसारयातनेंत पडले तर, त्यांना त्यानें अनधिकारी करून ठेवले आहेत. १४५८ तर मला असें वाटतें कीं, तो मागचा उणेपणा काढून टाकण्यासाठीं आणि पाहिजे त्याला सेवन करतां येण्यासाठीं, गीतेच्याच रूपानें वेद जन्मास आला. १४५९ किंवा हें [गीताशास्त्र] अर्थानें मनांत शिरून श्रवणानें कानास लागून जपाच्या निमित्तानें मुखांत राहून, १४६० ह्या गीतेचा पाठ जो करतो, त्याच्या संगतीला बसून गीता लिहून पुस्तकरूपानें जो जवळ बाळगतो; १४६१ त्याला अशा अशा निमित्तानें संसाराच्या चव्हाट्यावर मोक्षसुखाचें त्यानें अन्नछत्रच घालून ठेवलें आहे. १४६२ परंतु आकाशांत संचार करण्याला, पृथ्वीवर बसावयाला, सूर्यप्रकाश पसरावयाला जसें आकाशच अवार, १४६३ त्याप्रमाणें सेवन करतांना गीताही तूं उत्तम आहेस कीं अधम आहेस हें विचारित नाहीं. मोक्ष देऊन सरसकट सर्व जगाला तृप्त करून सोडते. १४६४ याकरितां मागच्या निंदेला वेद भ्याला, आणि गीतेच्या पोटांत शिरला. ह्मणून तो आतां सुंदर कीर्तीस पात्र झाला आहे. १४६५ ह्याकरितां वेदांचें सुलभ सेवन अशी जी ही मूर्तिमंत श्री गीता, तिचा **श्रीकृष्णांनीं अर्जुनाला** उपदेश केला. १४६६ पण वासराच्या पान्ह्यानें साऱ्या घराला दुभतें होतें. तद्वत् **अर्जुनाच्या** निमित्तानें जगाचा उद्धार झाला. १४६७ चातकाची करुणा येऊन मेघ पाणी घेऊन धांवतो, तेव्हां सारें चराचर ज्याप्रमाणें गारीगार होतें, १४६८ किंवा कमलाच्या एकनिष्ठेकरितां सूर्य वारंवार येतो; पण त्यानें त्रिभुवनांतील सर्व डोळ्यांस संतोष होतो. १४६९ त्याप्रमाणें **अर्जुनाच्या** निमित्तानें **लक्ष्मीकांतांनीं** गीता प्रकट करून जगाचें संसारायेवढें प्रचंड ओझें कमी करून टाकलें. १४७० हा **लक्ष्मीपती** नव्हे, तर त्रिभुवनांतील सर्व शास्त्ररत्नांच्या प्रभेला देदीप्यमान करणारा वदनाकाशांतील सूर्यच होय. १४७१ तें कुलही फार श्रेष्ठ व पवित्र होय, कीं ज्यांतील **पार्थ**, ह्या ज्ञानास पात्र होऊन त्यानें गीता हें साऱ्या जगाला स्वतंत्र आवार करून सोडलें. १४७२ हें असो. मग त्या सद्गुरु **श्रीकृष्णांनीं अर्जुनाची** मिठी सोडली. १४७३ मग **अर्जुनाला** ह्मणाले "हें शास्त्र तुझ्या जिवाला आवडलें काय ? " तेव्हां तो ह्मणाला "**देवा** ! आपली कृपा." १४७४ तर **अर्जुना** ! ठेवा मिळण्याइतकें दैव अनुकूल होतें, परंतु जोडलेल्याचा उपभोग घेणें मात्र कठीण आहे. १४७५ देवदानवांना समुद्रमंथनाच्या वेळीं क्षीरसागरायेवढें विरजण न घातलेलें दुधाचें भांडें मिळालें; १४७६ त्या साहसाचें फलही मिळालेलें जें अमृत तेंही डोळ्यांनीं पाहिलें. पण कित्येक तें सांभाळावयास चुकले. १४७७ तेव्हां अमरत्व येण्यासाठीं वाढलेलें, तें मरणालाच कारण झालें. संपादलेल्याचा उपभोग कसा घ्यावा, हें माहित नसलें ह्मणजे हें असें होतें. १४७८ **नहुषराजा**[1]

१ नहुष हा आयुराजाच्या पुत्रांतील ज्येष्ठ पुत्र होय. हा राजा परम पराक्रमी व सद्गुणी असा होता. ह्मणून वृत्रासुराच्या हत्येनें इंद्र पीडित होऊन जलामध्यें विश्रांति घेत असतां, संपूर्ण देव आणि ऋषि यांनीं मिळून त्याला इंद्रपदाचा अधिकारी केलें होतें. त्याप्रमाणें तो तेथील अधिकार व ऐश्वर्य भोगित असतां, कांहीं काळानें यास असें वाटलें कीं, इंद्राणीचाही उपभोग आपणांस घडावा, ह्यास्तव ह्यानें तिला पाचारण्याकरितां, देवदूतांस पाठविलें. तेव्हां तिनें गुरुबृहस्पतींच्या संमतीनें असा निरोप पाठविला कीं, तूं एखाद्या अपूर्व वाहनांत बसून ये, ह्मणजे मी तुझी सेवा करीन. तें अपूर्व असें वाहन कोणतें ? ह्याचा तो विचार करूं लागला. तेव्हां दुर्दैवानें त्यास असें सुचलें कीं, आजपर्यंत वाहनास कोणी सप्तऋषि लावलेले नाहींत, ह्याकरितां ते लावावेत, ह्मणजे अपूर्व वाहन झालें. त्याप्रमाणें त्यानें आपल्या वाहनास ऋषि लावून तो इंद्राणीकडे जावयास निघाला, सारे ऋषि, आपल्या पायाखालीं कृमिकीटक सांपडूं नयेत ह्मणून पायाखालीं पहात पहात हळू हळू चालले होते. परंतु नहुषाला, जाण्याची फार त्वरा झाली होती. ह्यास्तव तो ऋषींस लत्ताप्रहार करून "सर्प, सर्प"–लौकर लौकर पाय उचला–असें ह्मणूं लागला. तेव्हां अगस्तिऋषीस कोप

कांहीं दिवस स्वर्गाचा राजा झाला होता. परंतु वर्तणुकींत चुकला. ह्मणून तो सर्प झाला हें तुला माहित नाहीं काय? १४७९ ह्याकरितां अर्जुना! तूं पुष्कळ पुण्य केलें आहेस, ह्मणूनच ह्या शास्त्रराजाला पात्र झालास. १४८० तर ह्याच शास्त्राचे सांप्रदाय धारण करून ह्याच शास्त्रार्थ नीट रीतीनें अनुष्ठान कर. १४८१ नाहीं तर अर्जुना! सांप्रदायाशिवाय अनुष्ठान करशील तर, अमृतमंथनासारखें होईल बरें! १४८२ अर्जुना! गाय चांगली खाशी सांपडली, पण धार काढावयाची माहित असेल, तरच ती दूध देईल. १४८३ तसें श्रीगुरुही प्रसन्न होतील; शिष्याला निश्चयेंकरून विद्याही प्राप्त होईल; परंतु ती सांप्रदायानें उपासना केल्यावांचून फलप्राप्ति मात्र होणार नाहीं. १४८४ ह्मणून ह्या शास्त्रामध्यें जो उचित सांप्रदाय आहे, तो आतां नीट अगत्यपूर्वक ऐक." १४८५

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥६७॥

[इदं ते] तरि तुवां हें जें पार्था । गीताशास्त्र लाधलें आस्था । [नातपस्काय] तें तपोहीना सर्वथा । [न] सांगावें ना हो ॥ ८६ ॥ [नाभक्ताय] अथवा तापस ही जाला । परि गुरुभक्तीं जो ढिला । तो वेदीं अंत्यज वाळिला । तैसा वाळी ॥ ८७ ॥ ना तरि पुरोडाशु जैसा । न घापे वृद्ध तरी वायसा । गीता नेदी तैसी तापसा । गुरुभक्तिहीना ॥ ८८ ॥ [न चाशुश्रूषवे वाच्यं] कां तपही जोडे देहीं । भजे गुरुदेवांच्या ठाईं । परि आकर्णनीं नाहीं । चाड जरी ॥ ८९ ॥ तरि मागील दोहीं आंगीं । उत्तम होय कीर जगीं । परि या श्रवणालागीं । योग्य नोहे ॥ १४९० ॥ मुक्ताफळ भलतैसें । हो परि मुख नसे । तंव गुणं प्रवेशे । तेथ कायी ॥ ९१ ॥ सागर गंभीर होये । हें कोण ना ह्मणत आहे । परि वृष्टी वायां जाये । जाली तेथ ॥ ९२ ॥ धालिया दिव्यान्न सुवावें । मग जें वायां धाडावें । तें आर्तां कां न करावें । उदारपण ॥ ९३ ॥ [कदाचन] ह्मणौनि योग्य भलतैसे । होत परी चाड नसे । तरि झणें वानिवसें । देसी हें तयां ॥ ९४ ॥ रूपाचा सुजाण डोळा । वोडंवूं ये कायि परिमळा । जेथ जें माने तें फळा । तेथचि गा ॥ ९५ ॥ ह्मणौनि तपीं भक्ति । पाहावे ते सुभद्रापति । परि शास्त्रश्रवणीं अनासक्ति । वाळावेचि ते ॥ ९६ ॥ [नच मां योऽभ्यसूयति] ना तरी तपभक्ति । होऊनि श्रवणीं आर्ति । आथी ऐसी ही आयती । देखसी जरी ॥ ९७ ॥ तरी गीताशास्त्रनिर्मिता । जो मी सकळलोकशास्ता । तया मातें सामान्यता । बोलेल जो ॥ ९८ ॥ माझ्या सज्जनेंसि मातें । पैशुन्याचेनि आव्हाते । येक आहाती तयांतें । योग्य न ह्मण ॥ ९९ ॥ तयाची येर आघवी । सामग्री ऐसी जाणावी । दीपेंवीण ठाणदिवी । रात्रिची जैसी ॥ १५०० ॥ अंग गोरें आणि तरुणें । वरि लेयिलें आहे लेणें । परि येकलेनि प्राणें । सांडिलें जेविं ॥ १ ॥ सोनयाचें सुंदर । निर्वाळिलें होय घर । परि सर्पांगना द्वार । रुंधलें आहे ॥ २ ॥ निपजे दिव्यान्न चोखट । परि माजी काळकूट । असो मैत्री कपट- । गर्भिणी जैसी ॥ ३ ॥ तैसी तपभक्तिमेधा । तयाची जाण प्रबुद्धा । जो माझयांची कां निंदा । माझीचि करी ॥ ४ ॥ याकारणें धनंजया । तो भक्त मेधावी तपिया । तरि नको बापा इया । शास्त्रा आतळों देवों ॥ ५ ॥ काय बहु बोलों निंदका । योग्य स्रष्ट्याहीसारिखा । गीता हे कवतिका- । लागींही नेदीं ॥ ६ ॥ ह्मणोनि तपाचा धनुर्धरा । तळीं दाटोनि गाडोरा । वरि गुरुभक्तीचा पुरा । प्रासाद जो जाला ॥ ७ ॥ आणि श्रवणेच्छेचा पुढां । दारवंटा सदा उघडा । वरी कळश चोखडा । अनिंदारत्नांचा ॥ ८ ॥

"तर अर्जुना! तुला हें जें गीताशास्त्र प्राप्त झालें, तें ज्याला आस्था नाहीं, ज्याला तप नाहीं, त्याला कधींही सांगूं नकोस बरें! १४८६ अथवा तपस्वीही आहे. परंतु गुरुभक्तीमध्यें ढिला असेल, तर वेदामध्यें जसें अंत्यजाला दूर टाकलें आहे, त्याप्रमाणें त्याला

येऊन "तूंच सर्प होऊन पतन पावशील" असा त्यांनीं त्यास शाप दिला. त्यावरोबर तो अजगर होऊन पतन पावला.
—भा. उद्योग–अ० ११–१७—

१ अनुष्ठानादिरहिताला. २ उदासीन. ३ दूर केला. ४ त्याज्य करावा. ५ यज्ञाचा अवशेष चरु. ६ श्रवणीं. ७ इच्छा. ८ कर्मानुष्ठानांत. ९ छिद्र. १० दोरा.

१ तृप्ताला. २ वाढावें. ३ दवडावें. ४ क्षुधिताला. ५ कदाचित्. ६ कौतुकानें. ७ पुढें करूं येईल. ८ आवड नसलेले. ९ त्यागावे. १० सामुग्री. ११ शासन करणारा. १२ ताडणानें. १३ प्रकाशमान. १४ नागिणीनें. १५ धरलें. १६ कपट आहे गर्भांत जिच्या=कापट्यरूप. १७ केवळ तपाविषयींच बुद्धि. १८ बुद्धिमान्. १९ स्पर्शों. २० ब्रह्मदेवासारखा. २१ दगडाचा पाया. २२ देवालय. २३ दरवाजा. २४ कळस.

दूर टाकावें, ७ किंवा यज्ञाचा अवशेष, ह्मातारा कावळा असला तरी त्यास घालित नाहींत; त्याप्रमाणें तापस असून गुरुभक्तिहीन असेल तर, त्यास ही गीता देऊं नये. १४८८ किंवा देहाला तपही घडलें असेल, गुरुदेवांच्या ठाईं भक्तिही असेल, पण ऐकण्याची जर इच्छा नाहीं, १४८९ तर पूर्वीं सांगितलेलीं दोन्ही अंगें जरी खरोखर त्याचीं चांगलीं असलीं तरी, तोही ऐकण्याला योग्य नाहीं. १४९० मोतीं कसलेंही असलें तरी, त्याला जर तोंड नाहीं, तर त्यांत दोरा जाईल काय? १४९१ समुद्र गंभीर आहे, हें कोण नाहीं ह्मणतो आहे? पण त्यावर झालेली वृष्टि वांया जातेच. १४९२ तृप्त झालेल्याला सुग्रास अन्न घालून मग जें वांया दवडावें, त्यापेक्षां भुकेलेल्याला घालूनच उदारपणा कां दाखवूं नये? १४९३ ह्मणून पाहिजे तितकें योग्य असून त्यांना जर ऐकण्याची इच्छा नाहीं, अशांना एखादे वेळीं हें देशील हो! १४९४ रूपाला उत्तम तऱ्हेनें जाणणारा डोळा आहे, ह्मणून तो परिमळाकडे लावला तर चालेल काय? जेथें जें योग्य असतें, तेंच तेथें फलद्रूप होतें. १४९५ ह्मणून हे **सुभद्रापती!** तपस्वी भक्तिमान् असतील ते पहावेत. पण शास्त्रश्रवणांत जर आवड नसेल तर, त्यांचा त्याग करावा. १४९६ किंवा तप, भक्ति, व श्रवण करण्याची इच्छा, इतकी सामग्रीही असलेली जरी पाहशील, १४९७ तरी त्या गीताशास्त्राला निर्माण करणारा, सकल लोकांचें शासन करणारा जो मी; त्या मला सामान्य असें जो मानील, १४९८ मला, माझ्या सुजनतेला, जे कोणी वाग्प्रहार करणारे असतील, त्यांना थोर असें ह्मणूं नको. १४९९ रात्रीच्या वेळीं दिव्याशिवाय जशी ठाणवई असावी, त्याप्रमाणें त्यांची बाकी सारी सामुग्री समजावी. १५०० आंग चांगलें गोरें असून तरुणही आहे; त्याच्यावर अलंकारही घातलेले आहेत; परंतु तें एका प्राणाशिवाय जसें टाकावें लागतें, १५०१ सोन्याचें सुंदर घर असून तें मोठें निर्मळ आहे; परंतु नागीण बसली आहे दार धरून! १५०२ सुग्रास अन्न तयार झालेलें आहे, पण त्यांत विष आहे; पोटांत कपट असलेली जशी मैत्री, १५०३ त्याप्रमाणें हे **बुद्धिमंता!** जो माझ्या भक्तांची किंवा माझी निंदा करतो, त्याची केवळ तपाविषयींच बुद्धि आहे हें लक्ष्यांत ठेव. १५०४ ह्याकरितां **अर्जुना!** तो भक्त, बुद्धिमान् व तपस्वी असला तरी बाबा! ह्या शास्त्राला शिवूं देऊं नकोस. १५०५ फार काय सांगावें? **ब्रह्मदेवा**सारखा योग्य असूनही तो जर निंदक असेल, तर त्याला ही गीता कौतुकखातर सुद्धां देऊं नकोस. १५०६ ह्मणून **धनुर्धरा!** खालीं तपाचा पाया भरून वर जो गुरुभक्तीचा संपूर्ण राजवाडा बांधील, १५०७ आणखी श्रवणेच्छेचा दरवाजा निरंतर पुढें उघडा असून त्याच्या वर अनिंदारत्नांचा सुंदर कलश बसविलेला असेल," १५०८

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ ६८ ॥

[य इदं परमं गुह्यं] ऐशा भक्तालयीं चोखटीं । गीतारत्नेश्वर हा प्रतिष्ठीं । मग माझिया सर्वेसाटी । तुकसी जगीं ॥ ९ ॥ कां जे एकाक्षरपणेंसी । त्रिमात्रकेचिये कुशी । प्रणव होता गर्भवासीं । सांकडला ॥ १५१० ॥ तो गीतेचिया बाहळीं । वेदबीज गेलें पाहाळीं । कीं गायत्री फुलींफळीं । श्लोकांच्या आली ॥ ११ ॥ ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्ता । अनन्यजीवना माता । बाळका जैसी ॥ १२ ॥ [मद्भक्तेष्वभिधास्यति] तैसी भक्तां गीतेसीं । भेटी करी जो आदरेंसी । तो [मामेवैष्यत्यसंशयः] देहा पाठीं मजसीं । येकचि होय ॥ १३ ॥

"अशा सुंदर भक्तमंदिरांत हा गीतारत्नेश्वर स्थापन कर. ह्मणजे जगामध्यें माझ्या साम्यतेस योग्य होशील. १५०९ किंवा एका-

१ स्थापन कर. २ बरोबरीस, साम्यतेस. ३ योग्य होशील. ४ अकार, उकार व मकार या तीन मात्रांच्या ५ ओंकार. ६ संकुचित होऊन राहिलेला. ७ विस्तारामध्यें. ८ वृक्षरूपानें उंच. ९ मातेच्या स्तनावांचून अन्य जीविकेचा साधन नाहीं अशा.

क्षरपणानें अकार, उकार, व मकार ह्या तीन मात्रांच्या पोटामध्यें गर्भवासी 'प्रणव' कुचमत होता, १५१० तो गीतेच्या विस्तारांत वेदरूप बीजानें जन्मास आला आहे. किंवा श्लोकांच्या फुलामध्यें आणि फळामध्यें गायत्री उत्पन्न झाली आहे. १५११ ती ही मंत्ररहस्यरूप गीता, जो कोणी माझ्या भक्तांना देईल; दुसरें जीवनच ज्याला माहिती नाहीं, अशी आई ज्याप्रमाणें मुलाला भेटते, १५१२ त्याप्रमाणें अगत्यपूर्वक गीतेची आणि भक्ताची जो कोणी गांठ घालून देईल, तो देह टाकल्यानंतर मत्स्वरूपाला पोंचेल." १५१३

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥६९॥

[तस्मात्] आणि देहाचेंही लेणें । लेऊनि वेगळेपणें । असे तंव जीवें प्राणें । तोचि पढिये ॥ १४ ॥ [मनुष्येषु] ज्ञानियां कर्मठां तापसां । यया खुणेचिया माणुसां- । माजि तो एक गा जैसा । पढिये मज ॥१५॥ [न च] तैसा भूतळीं आघवा । आन न देखें पांडवा । जो गीता सांगे मेळावां । भक्तजनांचा ॥१६॥ [भक्ति मयि परां कृत्वा इति पूर्वश्लोकस्थं पदं] मज ईश्वराचेनि लोभें । हे गीता पढतां अक्षोभें । जो मंडन होय सभे । संतांचिये ॥ १७ नवपल्लवीं रोमांचित । मंदानिळें कांपवित । आमोदजळें वोलवित । फुलांचे डोळे ॥ १८ ॥ कोकिळा कलरवाचेनि मिषें । सद्गद बोलवीत जैसें । वसंत कां प्रवेशे । मद्भक्तआरामीं ॥ १९ ॥ कां जन्माचें फळ चकोरां । होत जैं चंद्र ये अंबरा । ना ना नव घन मयूरां । वो देत पावे ॥ १५२० ॥ [कश्चिन्मे प्रियकृत्तमः] तैसा सज्जनाच्या मेळापीं । गीतापद्यरत्नीं उमपीं । वर्षे जो माझ्या रूपीं । हेतु ठेऊनी ॥२१॥ [भवितेति] मग तयाचे निपाडें । पढियंतें मज फुडें । नाहींचि गा मागेंपुढें । न्याहाळितां ॥ २२ ॥ अर्जुना ह्या ठायवरीं । मीं तयातें सूयें जिव्हारीं । जो गीतार्थाचें करी । परगुणें संतां ॥ २३ ॥

"आणखी देहाचा अलंकार घालूनही तो जर त्यापासून अलिप्त राहील, तर त्याची मला जीवाभावापासून आवड. १५१४ ज्ञानी, कर्मठ, तपस्वी, ह्या लक्षणांच्या मनुष्यामध्यें तो जसा मला प्रिय आहे, १५१५ तसा अर्जुना! जो भक्तसमुदायामध्यें गीता सांगतो, त्याच्या सारखा सर्व भूमंडळावर दुसरा कोणी दिसत नाहीं. १५१६ माझ्या ईश्वराच्या लाभासाठीं स्थिर चित्तानें गीता सांगून जो संतांच्या सभेमध्यें भूषणभूत होईल, १५१७ रोमांच ही नवी पलुवी; मंद वाऱ्यानें कंपवीत सुगंधरूप जळानें फुलांचे डोळे ओले करीत, १५१८ कोकिळ मधुर स्वराच्या निमित्तानें सद्गद भाषण करीत, माझ्या भक्तरूप बगीच्यांत जणों काय वसंतच प्राप्त व्हावा, १५१९ किंवा चंद्रोदय झाला ह्मणजे चकोराला जसें जन्माचें सार्थक झालें असें वाटावें, किंवा नवे मेघ मयूराला जसे "ओ" देत यावेत, १५२० त्याप्रमाणें जो माझ्या स्वरूपामध्यें हेतु ठेवून सज्जनांच्या समुदायांत अनेक गीतापद्यरत्नांचा वर्षाव करतो; १५२१ त्याच्या इतका खरोखरच आवडता पदार्थ मागचा पुढचा विचार केला तरी, मला दुसरा कोणताच नाहीं. १५२२ अर्जुना! जो संतांना गीतार्थाची मेजवानी घालतो, त्याला मी इतका जिवाशीं बाळगतो." १५२३

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥७०॥

[अध्येष्यते इति] पैं माझिया तुझिया मिळणीं । वाढीनली जे हे काहाणी । मोक्षधर्म कां जिणी । आलासे जेथं ॥ २४ ॥ तो ह्य सकळार्थप्रद । आह्मां दोघांचा संवाद । न करितां पदभेद । पाठेंचि जो पढे ॥ २५ ॥ [ज्ञानयज्ञेनेति] तेणें ज्ञानानळीं प्रदीप्तीं । मूळ अविद्येचिया आहुतीं । तोषविला होय सुमती । परमात्मा मी ॥ २६ ॥ घेऊनि गीतार्थ उगाणा । ज्ञानिये जें विचक्षणा । ठाकिती तें गाणावाणा । गीतेचा तो लाहे ॥ २७ ॥ गीतापाठकासि असे । फळ अर्थज्ञाचिसरिसें । गीता माउलिये कीं नसे । जाणेंतान्हें ॥ २८ ॥

१ अत्यंत प्रिय. २ समुदायाला. ३ अहंकाररहित, स्थिरचित्तानें. ४ भूषणरूप. ५ सुगंधोदकानें. ६ मधुर स्वराच्या. ७ बगीचांत. ८ नूतन मेघ. ९ समुदायांत. १० पुष्कळ. ११ आवडतें. १२ हृदयांत ठेवतों. १३ पाहुणेर, मेजवानी.

१ समागमांत. २ जगण्यास, हारीस. ३ एक पद सुद्धां न सोडतां, किंवा पदच्छेदादिक न करितां केवळ श्लोकांचा पाठ. ४ प्रज्वलित ज्ञानाग्नींत. ५ अज्ञानाच्या. ६ गीतेचा अर्थ उगाणा=अनुभवून जें ज्ञान्याला प्राप्त होतें तेंच गीतेच्या गाणावाणा=गाण्यानें व वर्णन करण्यानें प्राप्त होतें. ७ आहे. ८ जाणतें नेणतें.

"तसेंच माझ्या तुझ्या समागमांत ही जी कथा वाढली आहे, जींत मोक्षधर्म जन्मास आला आहे, १५२४ तो सकलार्थप्रद आपणा उभयतांचा हा संवाद, एकही पदच्छेद न करतां जो केवळ पठण करील, १५२५ त्यानें हे **बुद्धिमंता!** ज्ञानाग्नीच्या प्रज्वलित ज्वालेमध्यें मूळ अविद्येची आहुति देऊन मला परमात्म्याला तृप्त केलें. १५२६ हे **विचक्षणा!** गीतार्थाचा ठाव पाहून ज्ञानी ज्या पदास पोंचतात, तेंच पद गीतेचें गायन करणारास व वर्णन करणारास प्राप्त होतें. १५२७ गीतेचा पाठ करणाराला, गीतेचा अर्थ जाणणाऱ्याइतकेंच फल असतें. गीतामाउलीला जाणतें मूल आणि नेणतें मूल, अशी भेदबुद्धीच नाहीं." १५२८

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ७१

[श्रद्धावाननसूयश्च] आणि सर्वमार्गीं निंदा । सांडूनि आस्था पैं शुद्धा । गीताश्रवणीं श्रद्धा । उभारी जो ॥ २९ ॥ [श्रृणुयादपि यो नरः] तयाच्या श्रवणपुटीं । गीतेचीं अक्षरें जंव पैठीं[१] । होती ना तंव उठाउठी । पळेचि पाप ॥१५३०॥ [पुण्यकर्मणां] अटवीयेमाजि[२] जैसा । वन्हि रिघतां सहसा । लंघिती का दिशा । वनौकें[३] तियें ॥ ३१ ॥ कां उदयाचळकुळीं । झळकतां अंशुमाळी[४] । तिमिरें[५] अंतराळीं । हारपती ॥ ३२ ॥ तैसा कानाच्या महाद्वारीं । गीता गजर जेथ करी । तेथ सृष्टीचिये आदिवरी[६] । जायचि पाप ॥३३॥ ऐसी जन्मवल्ली[७] धुवट । होय पुण्यरूप चोखट । याही वरी अचाट[८] । लाहे फळ ॥ ३४ ॥ जे धिये गीतेचीं अक्षरें । जेतुलीं कां कर्णद्वारें । रिघती तेतुले होती पुरे । अश्वमेध कीं ॥ ३५ ॥ म्हणौनि श्रवणें पापें जाती । [शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्] आणि धर्म धरी उन्नती । तेणें स्वर्गराज्य संपत्ती । लाहेचि शेखीं[९] ॥ ३६ ॥ [सोऽपि मुक्तः] तो पैं मज यावयालागीं । पहिलें पेणें[१०] करी स्वर्गीं । मग आवडे तंव भोगी । पाठीं मजचि मिळे ॥ ३७ ॥ ऐसी गीता धनंजया । ऐकतया आणि पढतया । फळे महानंदें मियां । बहु काय बोलों ॥ ३८ ॥ याकारणें हें असो । परि जयालागीं शास्त्रातिसो[१] । केला तें तंव तुज पुसों । काज तुझें ॥ ३९ ॥

"आणि सर्वतोपरी निंदा सोडून शुद्ध आस्थेनें गीता ऐकण्याविषयीं जो श्रद्धा बाळगील, १५२९ त्याच्या कर्णामध्यें गीतेचीं अक्षरें शिरतात न शिरतात तोंच, पाप उठाउठीं पळून जातें. १५३० अरण्यामध्यें अकस्मात् वणवा लागला म्हणजे वनचरें जशीं दशदिशेला पळत सुटतात, १५३१ किंवा उदयाचलावर सूर्य झळकूं लागला कीं, अंधकार जसा आकाशामध्यें नाहींसा होतो, १५३२ त्याप्रमाणें कानाच्या महाद्वारावर जेव्हां गीतेचा चौघडा झडूं लागतो, तेव्हां सृष्टीच्या आदिपासून झालेलें पाप सुद्धां नाहींसें होतें. १५३३ ह्याप्रमाणें जन्माची परंपरारूप वेल अशा रीतीनें निर्मळ—उत्तम पुण्यरूप—झाली म्हणजे मग तिला फळ येतें, तें फार मोठें येतें. १५३४ कारण ह्या गीतेचीं जितकीं जितकीं अक्षरें कर्णद्वारांत शिरतील, तितके तितके अश्वमेध घडल्याप्रमाणें होतें. १५३५ म्हणून श्रवणानें पापें जातात, आणि धर्माची उन्नति होते. आणि त्यामुळें शेवटीं स्वर्गाच्या राज्याची संपत्ति मिळते. १५३६ माझ्याकडे येण्यासाठीं तो पहिला मुक्काम स्वर्गाचा करतो; आणि वाटेल तेथपर्यंत त्याचा उपभोग घेऊन मागाहून मलाच येऊन मिळतो. १५३७ **अर्जुना!** अशी ही गीता, ऐकणाराला आणि पठण करणाराला महदानंदानें फळते. ह्याहून फार तें मी काय सांगूं ? १५३८ ह्याकरितां तें असो. पण ज्याकरितां हें येवढें शास्त्र वाढविलें, तें तुझें काम कसें काय झालें, तें तुला विचारूं या." १५३९

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।
कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥

[कच्चिदेतच्छ्रुतं पार्थेति] तरि सांग पां पांडवा । हा शास्त्रसिद्धांत आघवा । तुज एकचित्तें फावा-। गेला आहे ॥१५४० ॥ आम्हीं जैसें जया रीती । उगाणिलें[२] कानांच्या हातीं । येरीं तैसेंचि तुझ्या चित्तीं । पैठें केलें[३] कीं ॥ ४१ ॥ अथवा मा-

१ प्रविष्ट. २ दाट अरण्यांत. ३ वनचरें, पशुपक्ष्यादि. ४ सूर्य. ५ अंधकार. ६ आधींचें. ७ जन्माची परंपरारूप वेल. ८ मोठें. ९ शेवटीं. १० मुक्काम.

१ अतिशय. २ समजून चुकला. ३ पदरीं घातलें.

ज्ञारीं । गेलें सांडी विखुरी । किंवा उपेक्षेवरी । वाळुनि सांडिलें ॥ ४२ ॥ जैसें आह्मीं सांगीतलें । तैसेंचि हृदयीं फावलें । तरी सांग पां वहिलें । पुसेन तें मी ॥ ४३ ॥ [कच्चिदज्ञानसंमोह इति । ] तरि स्वाज्ञानजनितें । मागिले मोहें तूतें । भुलविलें तो येथें । असे कीं नाहीं ॥ ४४ ॥ हें बहु पुसों काई । सांगें तूं आपुल्या ठायीं । कर्माकर्म कांहीं । देखतासी ॥ ४५ ॥ पार्थ स्वानंदैकरसें । विरेल ऐसा भेददशे । आणिला येणें मिषें । प्रश्नाचेनि ॥ ४६ ॥ पूर्णब्रह्म जाला पार्थ । तरि पुढील साधावया कार्यार्थ । मर्यादा श्रीकृष्णनाथ । उल्लंघों नेदी ॥ ४७ ॥ येऱ्हवीं आपुलें करणें । सर्वज्ञ काय तो नेणे । परि केलें पुसणें । याचिलागीं ॥ ४८ ॥ एवं करोनियां प्रश्न । नसतेंचि अर्जुनपण । आणूनियां जालें पूर्णपण । तें बोलवी स्वयें ॥ ४९ ॥ मग क्षीराब्धीतें सांडितं । गगनीं पुंजें मंडित । निवडे जैसा न निवडित । पूर्णचंद्र ॥ १५५० ॥ तैसा ब्रह्म मी हें विसरे । तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे । हेंही सांडी तरी विरे । ब्रह्मपणही ॥ ५१ ॥ ऐसा मोडत मांडत ब्रह्में । तो दुःखें देहाचिये सीमे । मी अर्जुन येणें नामें । उभा ठेला ॥ ५२ ॥ मग कांपतां करतळीं । दडपूनि रोमांवळी । पुलिका स्वेदजळीं । जिरऊनियां ॥५३॥ प्राणक्षोभे डोलतया । आंगा आंगचि टेकया । सूनि स्तंभ चाळया । भुलौनियां ॥ ५४ ॥ नेत्रयुगुळाचेनि वोतें । आनंदामृताचें भरितें । वोसंडंत तें मागुतें । काढूनियां ॥ ५५ ॥ विविधा औत्सुक्यांची दाटी । चीपें दाटत होती कंठीं । ते करूनियां पैठी । हृदयामाजी ॥ ५६ ॥ वाचेचें वितुळणें । सांवरूनि प्राणें । अक्रमाचें श्वसणें । ठेऊनि ठायीं ॥ ५७ ॥

**"तर अर्जुना! हा सारा शास्त्राचा सिद्धांत तुला नीट एकाग्रचित्तानें समजला ना? सांग पाहूं. १५४० आह्मी जसें, ज्या रीतीनें, तुझ्या कानाच्या स्वाधीन केलें, तसेंच त्यांनीं तुझ्या चित्तास अर्पण केलें ना? १५४१ कां मध्येंच सांडावांडी वारी गेलें? कां तिरस्कारानें फेंकून दिलें? १५४२ आह्मीं जसें सांगितलें, तसेंच हृदयामध्यें शिरलें असेल तर, मी विचारतों तें झटपट सांग पाहूं. १५४३ तर तुझ्या अज्ञानापासून मागें उद्भवलेल्या मोहानें तुला भ्रमविलें होतें. तो आतां आहे कां नाहीं? १५४४ हें आतां फार काय काय ह्मणून विचारावें? कर्म कोणतें आणि अकर्म कोणतें? हें तुझें तुलाच समजूं लागलें किंवा नाहीं? हें सांग बरें." १५४५ अर्जुन हा निजानंदस्वरूपांत ऐक्यरूप होईल हें मनांत आणून ह्या प्रश्नाच्या निमित्तानें त्याला अशा भेदस्थितीला आणला. १५४६ अर्जुन जर पूर्ण ब्रह्म बनला, तर पुढील कार्यभाग साधावयाचा नाहीं. तो साधावा ह्मणून श्रीकृष्णांनीं द्वैताची मर्यादा उलंघन करूं दिली नाहीं. १५४७ बाकी तो सर्वज्ञ होता, तेव्हां त्याचें सामर्थ्य त्यास माहित नव्हतें कीं काय? पण विचारलें तें ह्याच करितां. १५४८ अशा प्रकारें प्रश्न करून, नसलेलें अर्जुनपण त्याच्या आंगीं आणून, त्याच्या स्वतःच्या तोंडून आंगीं पूर्णपणा आलेलें बोलविलें. १५४९ मग क्षीराब्धीला सोडून आकाशांतील तारकामंडळासहवर्तमान पूर्णचंद्र वेगळा नसतांही वेगळा दिसतो; १५५० त्याप्रमाणें ब्रह्म मी हें विसरतें, तेव्हां ब्रह्मानें सारें विश्वच भरून जातें. तेंही सोडलें तर, ब्रह्मपणही नाहींसें होतें. १५५१ अशा प्रकारें ब्रह्मानें धरून धरून सोडला तेव्हां, मोठ्या दुःखानें तो "मी अर्जुन" ह्या भावानें देहाच्या सीमेवर येऊन उभा राहिला. १५५२ मग कांपऱ्या कांपऱ्या तळहातांनीं उभे राहिलेले केंस दडपून घामामध्यें रोमांच जिरवून, १५५३ प्राणाच्या उचंबळीनें डोलत असलेल्या आंगाला, आंगाचाच टेंका देऊन, स्तंभाचे चाळे सोडून, १५५४ नेत्रयुग्माच्या अश्रुप्रवाहानें आनंदामृताचा पूर वाहत होता तो पुसून काढून, १५५५ अनेक उल्हासलहरींची दाटी होऊन गळा दाटून येऊन, स्वरभंग होत होता**

१ लवंडून. २ चालढकलीवर. ३ झुगारून दिलें. ४ प्रविष्ट झालें. ५ सत्वर. ६ स्वकीय अज्ञानापासून उत्पन्न. ७ निजानंदरूप सामरस्यानें. ८ ओलांडूं देत नाहीं. ९ झालेलें पूर्णपण. १० सोडीत. ११ तारागणांला शोभवीत. १२ विरघळे. १३ एथून आठ सात्विकभाव वर्णिले आहेत ते येणेंप्रमाणें—'स्तंभः स्वेदोऽथ रोमांचः स्वरभंगोऽथ वेपथुः । वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विका मताः'. १४ कांपऱ्या तळहातानें. १५ रोमांच. १६ प्राणाच्या वाढीनें. १७ टेंका देण्यास ठेवून. १८ कंप, चाळ्याला. १९ अश्रुप्रवाहानें. २० उसळत. २१ स्वरभंग. २२ प्रविष्ट. २३ क्रियारहितपणाचें.

**तो हृदयांतील हृदयांत दावून, १५५६ वाणी विस्कळित झाली होती तिला प्राणानें सांवरून धरून मधून मधून येणारे हुंदके जागच्या जागीं ठेवून," १५५७**

अर्जुन उवाच—

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ।
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥

[नष्टो मोहः] मग अर्जुन ह्मणे काय देवो । पुसताति आवडे मोहो । तरि तो सकुटुंब गेला जी ठावो । घेऊनि आपला ॥ ५८ ॥ पासीं येऊनि दिनकरें । डोळयातें आंधारें । पुसिजे हें काथि सेरे । कोणें गांवीं ॥५९॥ तैसा तूं श्रीकृष्णराया। आमुचिया डोळ्यां । गोचर हेंचि कायिसया । न पुरे तंव ॥ १५६० ॥ वरि लोभें मायेपासूनि । तें सांगसी तोंड भरूनि । जें कायीसेंनिही करूनि । जाणूं नये ॥ ६१ ॥ आतां मोह असे कीं नाहीं । हें ऐसें जी पूससी काई । कृतकृत्य ज्राहलों पाहीं । तुझेपणें ॥ ६२ ॥ गुंतलों होतों अर्जुनगुणें । तो मुक्त झालों तुझेपणें । आतां पुसणें सांगणें । दोन्ही नाहीं ॥ ६३ ॥ [त्वत्प्रसादान्मयाच्युत] मी तुझेनि प्रसादें । लाधलेनि आत्मबोधें । मोहाचे या कांदे । नेदीच उरों ॥६४॥ [स्मृतिर्लब्धा] आतां करणें कां न करणें । हें जेणें उठी दुजेपणें । तें तूंवांचूनि नेणें । सर्वत्र गा ॥ ६५ ॥ [स्थितोऽस्मि गतसंदेहः] येविषयीं माझ्या ठायीं । संदेहाचें नुरेचि कांहीं । त्रिशुद्धी कर्म जेथ नाहीं । तें मी जालों ॥ ६६ ॥ तुझेनि मज मी पावोनि । कर्तव्य गेलें निपटूनि । [करिष्ये वचनं तव] परि आज्ञा तुझीवांचोनि । आन नाहीं प्रभो ॥ ६७ ॥ कां जें दृश्य दृश्यातें नाशी । जें दुजें द्वैतातें ग्रासी । जें एक परि सर्वदेशीं । वसवी सदां ॥ ६८ ॥ जयाचेनि संबंधें बंध फिटे । जयाचिया आशा आस तुटे । जें भेटलयां सर्व भेटे । आपणपांचि ॥ ६९ ॥ तें तूं गुरुलिंग जी माझें । जें येकलेपणीचें विरजें । जयालागीं बोलांडिजे । अद्वैत बोध ॥ १५७० ॥ आपणचि होऊनि ब्रह्म । सारिजे कृत्याकृत्याचें काम । मग कीजे कां निःसीम । सेवा जयाची ॥ ७१ ॥ गंगा सिंधु सेवूं गेली । पावतांचि समुद्र जाली । तेविं भक्तां सेलें दिधली । निजपदाची ॥ ७२ ॥ तो तूं माझा जी निरुपचारू । श्रीकृष्णा सेव्य सद्गुरू । मा ब्रह्मतेचा उपकारू । हाचि मानीं ॥ ७३ ॥ जें मज तुह्मां आड । होतें भेदाचें कवाड । तें फेडोनि केलें गोड । सेवासुख ॥ ७४ ॥ तरी आतां तुझी आज्ञा । सकळ देवाधिदेवराज्ञा । करीन देयीं अनुज्ञा । भलतियेविषयीं ॥ ७५ ॥ यया अर्जुनाचिया बोला । देव नाचे सुखें भुलला । ह्मणे विश्वफळा जाला । फळ हा मज ॥ ७६ ॥ उणेनि उमचला सुधाकर । देखुनी आपला कुमर । मर्यादा क्षीरसागर । विसरेचिना ॥ ७७ ॥ ऐसें संवादाचा बहुलां । लग्न दोघांचिया आंतुलां । लागलें देखोनि जाला । निर्भर संजय ॥ ७८ ॥ तेणें ह्मणतसे संजयो । बाप कृपानिधीरावो । तो आपुला मनोभावो । अर्जुनेंसीं केला ॥ ७९ ॥ तेणें उचंबळलेपणें । संजय धृतराष्ट्रातें ह्मणे । जी कैसें बादरायणें । रक्षिलों दोघे ॥ ८० ॥ आजि तुमतें आवधारा । नाहीं चर्मचक्षुही संसारा । कीं ज्ञानदृष्टी व्यवहारा । आणिलेति ॥ ८१ ॥ आणि रथींचिये राहाटी । घेइ जो घोडेयासाटीं । तया आह्मां या गोष्टी । गोचरा होती ॥ ८२ ॥ झुंझाचें निर्वाण । मांडलें असे दारुण । दोहीं हारीं आपण । हारपिजे जैसें ॥ ८३ ॥ येवढा जिये सांकडां । कैसा अनुग्रहो पैं गाढा । जे ब्रह्मानंद उघडा । भोगवीतसे ॥ ८४ ॥ ऐसें संजय बोलिला । परि न द्रवे येरू उगला । चंद्रकिरणीं शिवतला । पाषाण जैसा ॥८५॥ हे देखोनि तयाची दशा । मग करीचिना सेरिसा । परि सुखें जाला पिसा । बोलतसे ॥ ८६ ॥ भुलविला हर्षवेगें । ह्मणौनि धृतराष्ट्रा सांगे । येऱ्हवीं नव्हे तयाजोगें । हें कीर जाणे ॥ ८७ ॥

**मग अर्जुन ह्मणाला "देवा ! मोह आवडतो कीं काय ह्मणून विचारतां होय ? तर महाराज ! तो आपलें ठिकाण सोडून सहकुटुंब गेला हो ! १५५८ सूर्यानें जवळ येऊन डोळ्यांनाच विचारावें कीं, आतां आंधार आहे काय ? असें कोणत्या गांवीं घडलें आहे ? १५५९ त्याप्रमाणें हे श्रीकृष्णराया ! तूं आमच्या डोळ्यांसमोर आहेस येवढेंच त्याला पुरें होणार नाहीं काय ? १५६० आणखी लोभानें ममतापूर्वक जें कशानेंही समजणारें नव्हे, तें सोंड**

१ आवडता होतो. २ समीप. ३ शिरके. ४ हेंच कोणत्या गोष्टीला पुरणार नाहीं ? सर्व इतक्यानेंच होईल. ५ कळवळ्यानें, ममतापूर्वक. ६ कशाही प्रयासानें. ७ त्वद्रूपत्वानें. ८ प्राप्त झालेला. ९ गड्या, मुख्या. १० खरेपणानें. ११ तुझ्या योगानें मी माझ्या स्वरूपीं मिळून. १२ जें दृश्य प्रत्यक्ष होतांच. १३ द्वैत, गुरुशिष्यभाव. १४ आशा कुंठित होते. १५ गुरुमूर्ति. १६ साद्य. १७ वांटा. १८ आदराचा.

१ प्रतिबंधक. २ उणेनि=कलंकापासून. उमचला=मुक्त झालेला, सुटलेला. सुधाकर=चंद्र आपला कुमर=क्षीरसागराचा मुलगा. (समुद्रमंथनाच्या वेळीं, चवदा रत्नांपैकीं निघालेलें चंद्र हें एक रत्न प्रसिद्धच आहे. ३ बहुल्यावर. ४ हृद्गत गुणेनें. ५ गहिंवरून. ६ व्यावहारिक दृष्टीनें. ७ रथाची राहटी चालली पाहिजे ह्मणून घोड्यांची संगति ज्यानें केली अशा आह्मांस असल्या गोष्टी गोचरा=प्रत्यक्ष होतात. ८ युद्धप्रकरण. ९ [illegible]. १० [illegible]. ११ [illegible]. १२ संबंध.

भरून सांगतोस. १५६१ तेव्हां आतां मोह आहे किंवा नाहीं हें **महाराज!** विचारावें काय? त्वद्रूपत्वानें कृतकृत्य झालों हो! १५६२ अर्जुनाच्या गुणांनीं गुंतलों होतों, तो तुझेपणानें मुक्त झालों. आतां विचारणें आणि सांगणें हीं दोन्हींही उरलीं नाहींत. १५६३ तुझ्या प्रसादेंकरून प्राप्त झालेल्या आत्मज्ञानसामर्थ्यानें त्या मोहाचे कांदे ह्मणून उरूनच दिले नाहींत. १५६४ आतां करणें किंवा न करणें हें ज्या दुसरेपणानें उत्पन्न होतें, तें आतां तुझ्याशिवाय दुसरें कोठेंच दिसत नाहीं. १५६५ ह्याबद्दल माझ्या मनामध्यें संशय ह्मणून कांहीं उरलाच नाहीं. कर्मांचा संबंधच ज्यास नाहीं, असें जें स्वरूप तेंच शपथपुरस्कर मी बनलों आहें. १५६६ तुझ्या योगानें मी माझ्या स्वरूपीं मिळून कर्तव्य सारें लयास गेलें आहे, ह्मणून, **प्रभो!** तुझ्या आज्ञेशिवाय दुसरें कांहीं राहिलें नाहीं. १५६७ कारण, जें प्रत्यक्ष होतांच दृश्याचा नाश करतें. जें द्वैताद्वैतालाच गिळून टाकतें; जें एक असून सर्वत्र सर्वकाल वास्तव्य करतें; १५६८ ज्याच्या संबंधानें बंध तुटतो; ज्याच्या आशेनें आशा नाहींशी होते; ज्याची भेट झाली असतां आपल्याच ठिकाणीं सर्व कांहीं भेटतें. १५६९ **महाराज!** जें एकत्वाला साह्य करतें; ज्याच्यावरून अद्वैत ओंवाळून टाकावें; ती आपण माझी गुरुमूर्ति. १५७० आपणच ब्रह्म होऊन कृत्याकृत्याचें काम संपवावें, आणि मग त्याची निस्सीम सेवा करावी. १५७१ गंगा समुद्राची सेवा करावयाला गेली, ती तेथें पोंचतांच समुद्ररूप बनली. त्याप्रमाणें आपणही भक्तांला निजपदाचा वांटा दिलात. १५७२ **श्रीकृष्णा!** तो तूं माझा आदराचा सेव्य गुरु आहेस. मग ब्रह्मत्वाचा हाच उपकार मानावयास नको काय? १५७३ तुमच्या माझ्यामध्यें जें भेदाचें दार आडवें होतें, तें काढून टाकून सेवासुख गोड केलेंत. १५७४ तर आतां हे सकल **देवाधिदेवा!** तुमची आज्ञा मला शिरसा वंद्य आहे. मग ती कशाविपर्योंही कां असेना?" १५७५ ह्या अर्जुनाच्या भाषणानें **देव** अगदीं भांबावून गेले. आणि आनंदाच्या भरानें नाचूं लागले. आणि ह्मणाले "हा मला विश्वफळालाही फळ झाला!" १५७६ आपला मुलगा चंद्र सर्व कलांनीं युक्त पाहिला ह्मणजे समुद्र तरी थोडा उंचबळतो काय? आपली मर्यादा सुद्धां विसरत नाहीं काय? १५७७ तसें संवादाच्या बहुल्यावर दोघांच्या अंतःकरणाचें लग्न लागलेलें पाहून **संजयाला** परमानंद झाला. १५७८ त्या भरांत **संजय** ह्मणाला, "**प्रभु! कृपानिधि!** फार थोर! त्यानें **अर्जुनाला** आपला मनोभावच करून सोडला." १५७९ तसाच सद्गदित कंठानें **संजय धृतराष्ट्रास** ह्मणाला "**महाराज! व्यासांनीं** आपलें दोघांचें कसें बरें संरक्षण केलें! १५८० अहो ऐका! तुह्मांलाही आज संसार करावयाला डोळे नाहींत. ह्मणून ज्ञानदृष्टीनेंच सर्व व्यवहार करावा लागतो. १५८१ आणि रथाचें काम चालविण्यासाठीं ज्यानें घोड्याची संगत पतकरली आहे, त्या आह्मांला ह्या असल्या गोष्टी उपलब्ध

१ संजय हा गावल्गण नामक सूताचा पुत्र असून धृतराष्ट्रराजाचा सारथी होता. तेव्हां त्यानें आपल्या स्थितीचे दर्शक असे हे उद्गार काढले आहेत. हा मोठा सत्यवक्ता व निस्पृह असे. तो धृतराष्ट्रासही बोध करण्यास मागेंपुढें पहात नसे. युद्धांतील सर्व वृत्त घर बसल्याच यास व्यासप्रसादानें कळे, आणि तें जशाचें तसेंच हा त्यास सांगे. संजय हा दिव्यदृष्टी, दिव्यज्ञानी, व दिव्यशरीरी असा होता. त्याचें वर्णन फार चमत्कारिक आहे. तें असें:—

चक्षुषा संजयो राजन् दिव्येनैव समन्वितः।
कथयिष्यति ते युद्धं सर्वज्ञश्च भविष्यति ॥ १ ॥
प्रकाशं वाऽप्रकाशं वा दिवा वा यदि वा निशि।
मनसा चिंतितमपि सर्वं वेत्स्यति संजयः ॥ २ ॥
नैनं शस्त्राणि छेत्स्यंति नैनं बाधिष्यते श्रमः।
गावल्गणिरयं जीवन् युद्धादस्माद्विमोक्ष्यति ॥ ३ ॥

—भा. भी. अ० २—

धृतराष्ट्रराजाचा सारथी संजय; अर्जुनाचा सारथी कृष्ण; कर्णाचा सारथी शल्य; ह्या सर्वांचा विचार मनांत आणला ह्मणजे प्राचीनकालीं सारथ्यकर्म हें फार महत्वाचें असून त्यांत अत्यंत श्रेष्ठ लोकही पडत असत असें दिसतें.

**झाल्या! १५८२ युद्धाची तर घनचक्कर माजून राहिली आहे. दोहों पक्षांमध्यें आपण तर कोणीकडच्या कोणीकडेच जाऊं, १५८३ येवढें जेथें संकट, त्यांतच हा अनुग्रह हें किती विलक्षण पहा! कीं ज्याच्या योगानें प्रत्यक्ष ब्रह्मानंदच भोगावयास मिळतो." १५८४ याप्रमाणें संजय बोलला. पण धृतराष्ट्राच्या मनाला यत्किंचित्‌ही द्रव आला नाहीं. चंद्रकिरणांनीं स्पर्श केला तर, धोंडा जसा उगाच बसतो, त्याप्रमाणें तोही उगाच बसला. १५८५ ही त्याची अवस्था पाहून त्यानें बोलण्याचें सोडून दिलें. हर्षातिशयानें तो अगदीं भुलला होता, म्हणून तो धृतराष्ट्राशीं भाषण करूं लागला. १५८६ नाहीं तर तो तें सांगण्याच्या योग्यतेचा नव्हे, हें तो पूर्णपणें जाणून होता. १५८७**

संजय उवाच—

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥

[इति] मग ह्मणे पैं कुरुराजा । ऐसा भ्रातृपुत्र तो तुझा । बोलिला तें अधोक्षजा । गोड जालें ॥ ८८ ॥ [महात्मनः] अगा पूर्वापर सागर । यया नामासीचि सिनार । येर आघवें तें नीर । एक जैसें ॥ ८९ ॥ तैसा श्रीकृष्ण पार्थ ऐसें । हें आंगाचिपासीं दिसे । मग संवादीं जी नसे । कांहींचि भेद ॥ १५९० ॥ पैं दर्पणाहूनि चोखें । दोन्ही होती सन्मुखें । तेथ येरीं येर देखे । आपणपें जैसें ॥ ९१ ॥ [संवादं] तैसा देवेंसी पंडुसुत । आपणपें देवीं देखत। पांडवेंसीं देखे अनंत। आपणपें पार्थी ॥ ९२ ॥ देव देवा भक्तालागीं । जिये विवर देखे आंगीं । येरु तियेचिही भागीं । दोन्ही देखे ॥ ९३ ॥ आणिक कांहींचि नाहीं । म्हणौनि करिती काई । दोघे येकपणें पाहीं । नांदताति ॥ ९४ ॥ आतां भेद जरी मोडे । तरी प्रश्नोत्तर कां घडे । ना भेदचि तरि जोडे । संवादसुख कां ॥ ९५ ॥ ऐसें बोलतां दुजेपणें । संवादीं द्वैत गिळणें । [इममश्रौषं] तें ऐकिलें बोलणें । दोघांचें नियां ॥ ९६ ॥ उटूनि दोन्ही आरसे । वोडविलीयां सरिसे । कोण कोणा पाहातसे । कल्पावें पां ॥ ९७ ॥ कां दीपासन्मुख। ठेविलिया दीपक । कोण कोणा अधिक । कोण जाणे ॥ ९८ ॥ ना ना अर्कापुढें अर्क । उदयलिया आणिक । कोण ह्मणे प्रकाशक । प्रकाश्य कवण ॥ ९९ ॥ [अद्भुतं] हें निर्धारूं जातां पुढें । निर्धारासि ठक पडे । ते दोघे जाले येवढे । संवादें सरिसे ॥१६००॥ [अहं] जीं मिळतां दोन्ही उदकें- । माजि लवण वारूं ठाके । कीं तयासींही निमिखें । तेंचि होय ॥ १ ॥ तैसें श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही । संवादले तें मनीं । धरितां मजही वानी । तेचि होतसे ॥ २ ॥ ऐसें ह्मणे ना मोटकें । तंव हिरोनि सात्विकें । आठव नेला नेणों कें । संजयपणाचा ॥ ३ ॥ [रोमहर्षणं] रोमांच जंव फरके । तंव तंव आंग सुरके । स्तंभ स्वेदांतें जिंके । एकला कंप ॥ ४ ॥ अद्वयानंदस्पर्शे । दिठी रसमय जाली असे । ते अश्रु नव्हती जैसें । द्रवत्वचि ॥ ५ ॥ नेणों काय माय पोटीं । काय नेणों गुंफे कंठीं । वांगर्था पडत मिठी । उसासचिया ॥ ६ ॥ किंबहुना सात्त्विका आठां। चांचर मांडता उमेठा। संजय जाहालासे चोहटां । संवादसुखाचा ॥ ७ ॥ तया सुखाची ऐसी जाती । जे आपणचि धरी शांती । मग पुढती देहस्मृती । लाधली तेणें ॥ ८ ॥

**मग म्हणाला "हे कौरवाधिपते! असें तुझा पुतण्या जो अर्जुन तो बोलला. तें अधोक्षजाला फार गोड वाटलें. १५८८ अरे! पूर्वसमुद्र, पश्चिमसमुद्र हीं नांवेंच कायतीं वेगवेगळीं, बाकी पाणी सारें जसें एकसारखेंच, १५८९ त्याप्रमाणें श्रीकृष्ण आणि अर्जुन हे देहामुळेंच भिन्न भिन्न दिसत. परंतु संवादामध्यें भेद म्हणून कांहींच नव्हता. १५९० आरशाहूनही स्वच्छ असे दोन पदार्थ जर समोरासमोर आले, तर ते जसे परस्पर आपणांला पहातात, १५९१ त्याप्रमाणें अर्जुन, देवामध्यें आपणास पहात होता; आणि देव आपणाला पार्थामध्यें पहात होते. १५९२ देव, देवाला आणि भक्ताला ज्या ठिकाणीं पहात होता, त्याच ठिकाणीं तोही दोघांस पहात होता. १५९३ दुसरें कांहींच नाहीं, तेव्हां करणार काय? म्हणून दोघेही एकत्रपणानें नांदूं लागले. १५९४ आतां असा जर भेद**

१ पुतण्या (अर्जुन). २ वेगळेंपण. ३ देहभिन्नतेच्या दृष्टीनें. ४ छिद्र. ५ समोरासमोर ठेविले असतां. ६ प्रकाशक, इच्छा करणार.

१ स्तब्धता. २ निवारण करण्यास राहे. ३ क्षणांत. ४ लवणाप्रमाणें. ५ थोडें बोलतो न बोलतो तों. ६ उभारे. ७ संकोच पावे. ८ स्तब्धता व घाम यांस. ९ ब्रह्ममय. १० पाझरच. ११ कंठरूप गुंफेंत. १२ शब्दार्थांना. १३ श्वासोच्छ्वासाच्या. १४ आठ सात्विक भावांस. १५ दोबडी वळली असतां. १६ अतिशय.

मोडलेला होता, तर प्रश्नोत्तरें कशीं झालीं? भेदच जर नाहीं, तर संवादाचें सुख तरी मिळणार कसें? १५९५ असें द्वैतपणानें बोलतां बोलतांच संवादामध्यें द्वैत नाहींसें होऊन गेलें, असें जें दोघांचें भाषण तें मीं श्रवण केलें. १५९६ दोन आरसे उठून एकमेकांपुढें आले तर, त्यांपैकीं कोणकोणाकडे पहातो आहे ह्मणून कल्पना करावी? १५९७ किंवा दिव्यासमोर दिवा ठेवला, तर कोणकोणाचा प्रकाशक कोण जाणे? १५९८ किंवा सूर्यापुढें आणखी एक सूर्य उगवला तर, प्रकाश करणारा कोण आणि प्रकाश करून घेणारा कोण? १५९९ ह्याचा खरा निर्णय करावयाला गेलें ह्मणजे विचारच खुंटतो. इतके दोघे संवादानें एकरूप झाले. १६०० **महाराज!** दोन ठिकाणचीं उदकें एकमेकांस मिळतील ह्मणून त्यांचें निवारण करण्यास मध्यंतरीं जर मीठ बसलें, तर क्षणमात्रांत तेंही तद्रूप होऊन जातें. १६०१ त्याप्रमाणें **श्रीकृष्ण** आणि **अर्जुन** ह्या दोघांचें संभाषण झालें तें मनांत आल्यामुळें माझीही तशीच अवस्था झाली." १६०२ असें बोलला न बोलला, तों त्या संभाषणाची स्मृति सात्विकपणानें कोठें नेली कोण जाणे! १६०३ जों जों रोमांच उभे राहूं लागले, तों तों आंगाचा संकोच होऊं लागला. गहिंवर आणि घाम ह्या दोघांस एका कंपानेंच मागें सारलें. १६०४ अद्वयानंदाची गांठ पडल्यामुळें दृष्टि ब्रह्ममयच होऊन गेली होती. त्यामुळें आलेले अश्रु, अश्रु नव्हेत, तर जणों काय पाझरच फुटलेसे दिसत होते. १६०५ पोटांत काय राहिलें होतें कोण जाणे? कंठांत काय बसलें तें समजेनाच! हुंदके येऊन ते शब्दार्थाला आडकाठी करूं लागले. १६०६ किंबहुना अशा सात्विकाच्या आठ भावांनींही त्याची अगदीं घोबडीच वळवून सोडली. त्यामुळें **संजय** हा त्या संवादसुखाचा चव्हाटाच होऊन राहिला. १६०७ पण त्या सुखांत एक असा धर्म होता कीं, तें आपलें आपणच शांति धरित असे. त्यामुळें पुन्हां तो देहभानावर आला. १६०८

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥७५॥

[व्यासप्रसादाच्छ्रुतवान्] तेव्हां बैसतेनि आनंदें । ह्मणे जी जें उपनिषदें । नेणती तें व्यासप्रसादें[१] । ऐकिलें मियां ॥ ९ ॥ [एतद्गुह्यमहं परं] ऐकतांचि ते गोठी । ब्रह्मत्वाची पडिली मिठी । मीतूंपणेसी दिठी । विरोनि[२] गेली ॥१६१०॥ [योगं योगेश्वरात्कृष्णात्] हे आघवेचि कां योग । जयाठाया येते मार्ग । तयाचें वाक्य सवंग । केलें मज व्यासें ॥ ११ ॥ [साक्षात्कथयतः स्वयं] अहो अर्जुनाचेनि मिषें । आपणपेंचि दुजें ऐसें । नटोनि आपणया उद्देशें । बोलिले जें देव ॥ १२ ॥ तेथ कीं माझे श्रोत्र । पाटाचें[३] जाले जी पात्र । काय वानूं स्वतंत्र । सामर्थ्य श्रीगुरूचें ॥ १३ ॥

तेव्हां आनंद स्थीर झाल्यानंतर ह्मणूं लागला "**महाराज!** जें उपनिषदांना सुद्धां माहित नाहीं, तें मला **व्यासाच्या** प्रसादानें ऐकावयास मिळालें. १६०९ तो संवाद ऐकतांच ब्रह्मत्वाचीच गांठ पडली आणि मी तूंपणाची दृष्टि होती ती नाहींशीच झाली. १६१० हे सारे योग ज्याच्या ठिकाणीं जाण्याचे मार्ग, त्या **भगवंताचें** वाक्य **व्यासांनीं** मला सुलभ करून दिलें. १६११ अहो! **अर्जुनाच्या** निमित्तानें आपणच दुसरेपणाचें सोंग घेऊन आपल्यासाठींच **देव** बोलले. १६१२ त्याच्या अधिकाराला किहो माझे कान पात्र झाले! तेव्हां त्या श्रीगुरूचें स्वतंत्र सामर्थ्य किती ह्मणून वर्णन करूं?" १६१३

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥७६॥

[राजन् इमं अद्भुतं] राया हें बोलतां विस्मित होय । [केशवार्जुनयोः पुण्यं] तेणेंचि मोडावला[४] ठाये । रत्नीं कीं रत्नकिळा[५] ये । झांकोळित जैसी ॥ १४ ॥ [हृष्यामि च मुहुर्मुहुः] हिमवंतीचीं सरोवरें । चंद्रोदयीं होती कांश्मीरें[६] । मग सूर्यागमीं माघारें । द्रवत्व ये ॥ १५ ॥ [संस्मृत्य संस्मृत्य

---

१ उपनिषत्सारसंवाद. २ हारपली. ३ योग्यतेचें, अधिकाराचें पात्र. ४ हिरमुसला होऊन राहे. ५ चकाकीला. ६ स्फटिकाकार.

संवाद] तैसा शरिराचिया स्मृती । तो संवाद संजय चित्तीं । धरी आणि पुढती । तेचि होय ॥ १६ ॥

हें ऐकून धृतराष्ट्र राजाला मोठें आश्चर्य वाटलें. त्यामुळें संजय हिरमुष्टि होऊन राहिला. रत्नाची झकाकीच जशी रत्नाला झांकते, १६१४ हिमालय पर्वतावरील सरोवरें, चंद्रोदय झाला कीं, स्फटिकासारखीं होतात. आणि सूर्योदय झाला ह्मणजे फिरून तीं पाझरूं लागतात. १६१५ त्याप्रमाणें देहभानावर येतांच तो संवाद पुन्हा संजयाच्या मनांत आला, आणि पुन्हा त्याची पूर्ववत् अवस्था झाली! १६१६

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।

विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ७७

[राजन्] मग उठोनि ह्मणे नृपा । [तच्चेति] श्रीहरीचिया विश्वरूपा । रेखिलया उगा कां पां । असों लाहसी ॥ १७ ॥ न देखणेंनि जें दिसे । नाहींपणेंचि जें असे । विसरें आठवे तें कैसें । चुकऊं आतां ॥ १८ ॥ [विस्मयो मे महान्] देखोनि चमत्कार । कीजे तो नाहीं पैसार । मजही सकट महापुर । नेत आहे ॥ १९ ॥ ऐसा श्रीकृष्णार्जुन- । संवाद-संगमीं स्नान । करूनि देतसे तिळदान । अहंतेचें ॥ १६२० ॥ [हृष्यामि च पुनः पुनः] तेथ असंवरें आनंदें । अलौकिकही कांहीं स्फुंदे । श्रीकृष्ण ह्मणे सद्गदें । वेळोवेळां ॥ २१ ॥ या अवस्थांची कांहीं । कौरवातें परी नाहीं । ह्मणोनि रायें तें कांहीं । कल्पावें जंव ॥२२॥ तंव जाला सुखलाभ । आपणपां करूनि स्वयंभ । बुझाविला अवष्टंभ । संजयें तेणें ॥ २३ ॥ तेथ कोणी येकी अवसरी । होआवी ते करूनि दुरी । रावो ह्मणे संजया पैरी । कैसी तुझी गा ॥ २४ ॥ तेणें तूतें येथें व्यासें । बैसविलें कायसा उद्देशें । अप्रसंगामाजि ऐसें । बोलसी काई ॥२५॥ रानीचें राउळा नेलिया । दाही दिशा मानी सुनिया । कां रात्री होय पांहलया । निशाचरा ॥२६॥ जो जेथिचें गौरव नेणे । तयासि तें भिंगुळवाणें । ह्मणौनि अप्रसंग तेणें । ह्मणावा कीं तो ॥ २७ ॥ मग ह्मणे सांगें प्रस्तुत । उदयलेंसे जें उत्कळित । तें कोणासि बारे जैत । देईल शेखीं ॥ २८ ॥ येऱ्हवीं विशेषें बहुतेक । आमुचें ऐसें मानसिक । जे दुर्योधनाचे अधिक । प्रताप सदा ॥ २९ ॥ आणि येरांचेनि पाडें । दळही याचें देव्हडें । ह्मणौनि जैत फुडें । आणील ना तें ॥ १६३० ॥ आह्मां तंव गमे ऐसें । मा तुझें जोतीष कैसें । तें नेणों संजया असे । तैसें सांग पां ॥ ३१ ॥

मग उठून ह्मणाला "महाराज!–अकराव्या अध्यायांत वर्णन केलेलें–श्रीहरीचें विश्वरूप मनांत बिंबलें असतांही, आपल्याच्यानें स्वस्थ बसवतें तरी कसें? १६१७ न पाहतांही जें दिसतें; नसूनच जें भासतें; विस्मृतींतही जें स्मरतें; त्याला आतां टाळावें तरी कसें? १६१८ तो चमत्कार पाहून चमत्कार असें ह्मणण्याला सुद्धां अवकाश रहात नाहीं. इतका तो महापूर मला सुद्धां वाहून नेत आहे! १६१९ ह्याप्रमाणें श्रीकृष्णार्जुनाच्या संवादरूप संगमांत स्नान करून अहंतेची तिळांजुळी देऊं लागला. १६२० तेव्हां आनंद आंवरेनासा झाला. कांहीं विलक्षण प्रकारचे हुंदके देऊं लागला. सद्गदित अंतःकरणानें वारंवार "श्रीकृष्ण" "श्रीकृष्ण" असें ह्मणूं लागला. १६२१ ह्या अवस्थेची धृतराष्ट्राला कल्पनाही नव्हती. ह्मणून तो असें कां करतो, असा तर्क करणार, १६२२ तोंपर्यंत संजयानें यथेच्छ सुख भोगलें, आणि मग आपला आपणच निग्रह करून आलेला गहिंवर सांवरून घेतला. १६२३ तेव्हां राजा ह्मणाला "संजया! तूं कांहीं तरी करमणूक करावयाची तें सारें टाकून ही तुझी भलतीच तऱ्हा कसली? १६२४ तुला येथें त्या व्यासांनीं कोणत्या उद्देशानें बसविलेलें आहे? आणि हें–अप्रासंगिक–भलतेंच काय बडबडत बसला आहेस?" १६२५ रानांत राहणाऱ्याला जर घरांमध्यें नेलें, तर त्याला दाही दिशा शून्य वाटूं लागतात. किंवा चोराला उजाडलें कीं, रात्र होते. १६२६ ज्या ठिकाणचें महत्त्व ज्याला समजत नाहीं, त्याला तें भयंकरच वाटतें. तेव्हां त्यानें त्याला अप्रसंग ह्मणावा हें योग्य च आहे. १६२७ मग ह्मणाला "बाबारे! आतां हें सांग, कीं हें जें युद्ध उपस्थित झालें आहे,

१ शरीराच्या स्मृतीला संवादानें कांहीं वेळ धरलें=आवरलें पण पुनः तीच स्मृति झाली. २ न दिसणें व दिसणें, नसणें व असणें, स्मृति व आठव असें जें अत्यद्भुत. ३ प्रसार. ४ न सांवरणाऱ्या. ५ हुंदके देई, उसासा टाकी. ६ जिरविला. ७ सात्विकाहंकार. ८ करमणूक. ९ रीत. १० कोणत्या. ११ अवधान सोडून. १२ उजाडलें असतां. १३ भयंकर. १४ ज्याची मला उत्कंठा तें. १५ विजय.

१ इतर जे पांडव त्यांच्या योग्यतेस. २ सैन्य. ३ अधिक. ४ गणित, भाकीत.

**त्यांत शेवटीं विजयी कोण होईल? १६२८ बाकी फार करून–हजार वाटेनें–आमचा तर्क तर असा आहे कीं, केव्हांही झालें तरी दुर्योधनाचा प्रताप हा अधिकच. १६२९ आणखी प्रतिपक्षाच्या योग्यतेनें पाहिलें तर, यांचें सैन्यही फार मोठें आहे. तेव्हां त्याला विजय येणार नाहीं काय? १६३० आह्मांला तर असें वाटतें. मग संजया! तुझें ज्योतिष कसें काय तें कळत नाहीं. तर तें कसें काय आहे सांग पाहूं." १६३१**

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवानीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगो नामाष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

[यत्र योगेश्वरः कृष्णो] यया बोला संजयो ह्मणे । जी येरयेरांचें[1] मी नेणें । परि आयुष्य तेथें जिणें । हें फुडें कीं गा ॥ ३२ ॥ चंद्र तेथें चंद्रिका[2] । शंभु तेथें अंबिका । संत तेथें विवेको[3] । असणें कीं जी ॥ ३३ ॥ रावो[4] तेथें कटक । सौजन्य तेथें सोइरीक । वन्हि तेथें दाहक । सामर्थ्य कीं ॥ ३४ ॥ दया तेथें धर्म । धर्म तेथें सुखागम । सुखीं पुरुषोत्तम । असे जैसा ॥ ३५ ॥ वसंत तेथें वनें । वन तेथ सुमनें[5] । सुमनीं पालिंगनें[6] । सारंगांचीं[7] ॥ ३६ ॥ गुरु तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन । दर्शनीं समाधान । आथि जैसें ॥ ३७ ॥ भाग्य तेथ विलास । सुख तेथें उल्हास । हें असो तेथ प्रकाश । सूर्य जेथें ॥ ३८ ॥ तैसे सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी कां सनाथ । तो श्रीकृष्ण रावो जेथ । [तत्र श्रीः] तेथ लक्ष्मी ॥ ३९ ॥ [भूतिः] आणि आपलेनि कोतेसीं[9] । ते जगदंबा जयापासीं । अणिमादिकी[10] काय दासी । नव्हती तयातें ॥ १६४० ॥ [विजयः] कृष्ण विजयस्वरूप निजांगें । तो राहिला असे जेणें भागें । तैं जय लागवेगें । तेथेंचि आहे ॥ ४१ ॥ [यत्र पार्थो धनुर्धरः] विजयी नामें अर्जुन विख्यात । विजयस्वरूप श्रीकृष्णनाथ । श्रियेसीं[11] विजय निश्चित । तेथेंचि असे ॥ ४२ ॥ तयाचिये देशींच्या झाडीं । कल्पतरूतें होडी[12] । न जिणोवें[13] कां येवढीं । मायबापें असतां ॥ ४३ ॥ ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें[14] कां नोहावे । तिये भूमिके कां न यावें । सुवर्णत्व ॥ ४४ ॥ तयाचिया गांवींचिया । नदी अमृतें वाहाविया । नवल काय राया । विचारीं पां ॥ ४५ ॥ तयाचे विसाट[1] शब्द । सुखें ह्मणों येती वेद । संदेह[2] सच्चिदानंद । कां नोहावे ते ॥ ४६ ॥ पैं स्वर्गापवर्ग दोन्हीं । इयें पदें तया अधीनीं । श्रीकृष्ण बाप जननी । कमळा[3] जया ॥ ४७ ॥ ह्मणौनि जिया[4] बाहीं उभा । तो लक्ष्मीयेचा वल्लभा[5] । तेथ सर्वसिद्धि स्वयंभा । येर मी नेणें ॥ ४८ ॥ आणि समुद्राचा मेघ । उपयोगें तयाहूनि चांग । तैसा पार्थीं आजि लाग[6] । आहे तये ॥ ४९ ॥ कनकत्वदीक्षागुरू[7] । लोहा[8] परीस होय कीरु । परि जगा पोसिता व्यवहारु । तेंचि[9] जाणें ॥ १६५० ॥ येथ गुरुत्वा येतसे उणें । ऐसें झणें[10] कोण्ही ह्मणे । वन्हिप्रकाश दीपपणें । प्रकाशी आपला ॥ ५१ ॥ तैसा देवाचिया शक्ती । पार्थ देवांसीच[11] बहुती । पैं[12] री माने इये स्तुती । गौरव असे ॥ ५२ ॥ आणि पुत्रें मी सर्व गुणीं । जिणावा हे बापा शिरोणी[13] । तरी ते शार्ङ्गपाणी । फळा आली ॥ ५३ ॥ किंबहुना ऐसा नृपा । पार्थ जालासे कृष्णकृपा । तो जयाकडे सांक्षेपा[14] । रीती आहे ॥ ५४ ॥ तोचि गा विजयासि ठावो । येथ तुज कोण संदेहो । तेथ नये तरी वांवो[15] । विजैयोचि होय ॥ ५५ ॥ ह्मणौनि जेथ श्री तेथ श्रीमंत । जेथ तो पंडुचा सुत । तेथ विजय समस्त । अभ्युदय[16] तेथ ॥ ५६ ॥ [ध्रुवा] जरी व्यासाचेनि सांचें[17] । धिरे[18] मन तुमचें । तरी या बोलाचें । ध्रुवेंचि[19] माना ॥ ५७ ॥ [नीतिः] जेथ तो श्रीवल्लभ । तेथ भक्तकदंब[20] । तेथ सुख आणि लाभ । मंगळाचा[21] ॥ ५८ ॥ [मतिर्मम] या बोला आन होये । तरि व्यासाचा अंकें[22] न वाहें । ऐसें गाजोनि[23] बाहे । उभिली तेणें ॥ ५९ ॥ ['श्लोकमाहात्म्यं'] एवं भारताचा आवांका[24] । आणूनि श्लोकीं[25] येका । संजयें कुरुनायका । दीधला हातीं ॥ १६६० ॥ जैसा नेणो केवढा वन्हि । परि गुणाग्रीं[26] ठेऊनी । आणिजे सूर्याची हानी । निस्तरावया[27] ॥ ६१ ॥ तैसें शब्दब्रह्म अनंत । जालें सवालक्ष भारत । भारताचें शतें सात । सर्वस्व गीता ॥ ६२ ॥ तयाही सातां शतांचा । इत्यर्थ हा श्लोकैशेषींचा[28] । व्यासशिष्य संजयाचा । पूर्णोद्गार जो ॥ ६३ ॥ येणें येकेंचि श्लोकें । राहे तेणें असकें ।

१ दुसऱ्या तिसऱ्यांचें. २ चांदणें. ३ विचार. ४ राजा असेल तिकडे सैन्य. ५ पुष्पें. ६ समुदाय. ७ भ्रमरांचीं. ८ सुखोपभोग. ९ पतीसह. १० अष्टसिद्धि. ११ लक्ष्मीसह. १२ पैजारी. १३ न जिंकावे. १४ चिंतामणी.

१ भलते, अव्यवस्थित. २ ते मूर्तिमंत सच्चिदानंदरूप का न व्हावे, आहेतच. ३ लक्ष्मी. ४ ज्या पक्षाकडे, ज्या भागीं. ५ पति. ६ संबंध. ७ सुवर्णपणा येण्याची दीक्षा देणारा गुरु. ८ लोखंडाला सुवर्ण करणारा परिस आहे परंतु. ९ सुवर्णच. १० कदाचित्. ११ या स्तुतीनें देवालाच महत्व आहे. १२ प्रकारें. १३ इच्छा. १४ पक्षपातपूर्वक. १५ विजयाचें विजयत्व व्यर्थ होईल. १६ अधिक उदय. १७ खरेपणानें. १८ विश्वासे. १९ अढळत्वच. २० भक्तसमुदाय. २१ कल्याणाचा. २२ अंकितपण, शिष्यत्वचिन्ह. २३ असें मोठ्यानें बोलून हात उभारला. २४ मतलब. २५ 'यत्र योगेश्वरः कृष्णो' ह्या शेवटच्या श्लोकांत. २६ वातीच्या अग्रीं. २७ नाश दूर करायास. २८ संपूर्ण.

अविद्याजाताचें नि[illegible] ॥ ऐसे श्लोकशतें सात । गीतेचीं पदें आंग[illegible] ह्मणों कीं परमामृत । गीताकाशींचें ॥ ६५ ॥ कीं अ[illegible]राजाचिये सभे । गीते वोडवले हे खांबे । मज श्लोक प्रतिभे । ऐसे येत ॥ ६६ ॥ कीं गीता हे सप्तशती । मंत्रप्रतिपाद्य भगवती । मोहमहिषा मुक्ती । आनंदली असे ॥ ६७ ॥ ह्मणौनि मनें कायें वाचा । जो सेवक होईल इयेचा । तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ॥ ६८ ॥ कीं अविद्यातिमिररोखें । श्लोक सूर्यातें पैजा जिंके । ऐसे प्रकाशिले गीतामिषें । रायें श्रीकृष्णें ॥ ६९ ॥ कीं श्लोकाक्षरद्राक्षलता । मांडव जाली आहे गीता । संसारपथ-श्रांता । विसंवावया ॥ १६७० ॥ कीं सभाग्यसंतीं भ्रमरीं । सेविले ते श्लोक कल्हारीं । श्रीकृष्णाख्यसरोवरीं । सांसिन्नली हे ॥ ७१ ॥ कीं श्लोक नव्हती आन । गमे गीतेचें महिमान । वाखाणिते बंदिजनें । उदंड जैसे ॥ ७२ ॥ कीं श्लोकांचिया आवारा । सात शतें करूनि सुंदरा । सर्वागम गीतापुरा । वसों आले ॥ ७३ ॥ कीं निजकांता आत्मया । आवडी गीता मिळावया । श्लोक नव्हती वाह्या । पसर कां जो ॥ ७४ ॥ कीं गीताकमळींचे भृंग । कीं हे गीतासागरतरंग । कीं हरीचे हे तुरंग । गीतारथींचे ॥७५॥ कीं श्लोकसर्व तीर्थसंघात । आला श्रीगीतेगंगे आंत । जे अर्जुन सिंहस्थ । जाला ह्मणौनि ॥ ७६ ॥ कीं नोहे हे श्लोकश्रेणी । अचिंतचित्तचिंतामणी । कीं निर्विकल्पां लावणी । कल्पतरूंची ॥ ७७ ॥ ऐसिया शतेंसातश्लोका । परी आगळा येकयेका । आता कोण वेगळिका । वानावों पां ॥ ७८ ॥ तान्ही आणि पौरटी । इया कामधेनूतें दिठी । सूनि जैसिया गोटी । कीजती ना ॥ ७९ ॥ दीपा आगिलें मागिल । सूर्य धाकुटा वडील । अमृतसिंधू खोल । उथळ कायसा ॥ १६८० ॥ तैसे पहिले सरते । श्लोक न ह्मणावे गीते । जुनीं नवीं पारिजातें । आहाती काई ॥ ८१ ॥ आणि श्लोका पाड नाहीं । हें कीर समर्थू काई । येथ वाच्य वाचकही । भाग न धरी ॥ ८२ ॥ ['पाठमाहात्म्य'] जे इये शास्त्रीं येक । श्रीकृष्णचि वाच्य वाचक । हें प्रसिद्ध जाणे लोक । भलताही ॥ ८३ ॥ येथें अर्थ तेंचि पाठें । जोडे येवढें निघटें । वाच्यवाचक येकवटें । साधितें शास्त्र ॥ ८४ ॥ ह्मणोनि मज कांहीं । समर्थनीं आतां विषय नाहीं । गीता जाणा हे वाङ्मयी । श्रीमूर्ति प्रभूची ॥ ८५ ॥ शास्त्र वाच्यें अर्थें फळे । मग आपण मावळे । तैसें नव्हे हें सगळें । परब्रह्मची ॥ ८६ ॥ कैसा विश्वाचिया कृपा । करूनि महानंद सोपा । अर्जुनव्याजें रूपा । आणिला देवें ॥ ८७ ॥ चकोराचेनि निमित्तें । तिन्हीं भुवनें संतप्तें । निववि़लीं कळावंतें । चंद्रें जेविं ॥ ८८ ॥ का गौतमाचेनि मिषें । कळिकाळज्वरितोद्देशें । पाणिढाळ गिरीशें । गंगेचा केला ॥ ८९ ॥ तैसें गीतेचें हें दुभतें । वत्स करूनि पार्थातें । दुभीनली जगापुरतें । श्रीकृष्ण गाय ॥ १६९० ॥ येथें जीवें जरी न्याल । तरी हेंच कीर होआल । ना तरि पाठमिषें तिंबाल । जीभचि जरी ॥ ९१ ॥ तरि लोह एकें अंशें । झगटलीया परिसें । येरीकडे अपैसें । सुवर्ण होय ॥ ९२ ॥ तैसी पाठाची ते वाटी । श्लोक पाद लावावा जंव वोठीं । तंव ब्रह्मतेची पुष्टी । येयील आंगा ॥ ९३ ॥ ना येणेंसी मुख वांकडें । करूनि ठाकाल कानवडें । तरि कानींही घेतां पडे । तेचि लेख ॥ ९४ ॥ जे हे श्रवणें पाठें अर्थें । गीता नेदी मोक्षाअरौतें । जैसा समर्थ दाता कोण्हातें । नास्ति न ह्मणे ॥ ९५ ॥ ह्मणोनि जाणतया सवा । गीताचि येकी सेवा । काय कराल आघवां । शास्त्रीं येरीं ॥ ९६ ॥ आणि कृष्णार्जुनीं मोकळी । गोठी चावळिली जे निराळीं । ते श्रीव्यासें केली करतळीं । घेवों ये ऐसी ॥ ९७ ॥ बाळकातें वोरसें । माय जैं जेवऊं बैसे । तैं तया ठाकती तैसे । घांस करी ॥ ९८ ॥ कां अफाटा समीरणा । औपैतेंपण शाहाणा । केलें जैसें विंजणा । निर्मूनियां ॥ ९९ ॥ तैसें शब्दें जें न लभे । तें घडूनियां अनुष्टुभें । स्त्रीशूद्रादिप्रतिभे । सामाविलें ॥ १७०० ॥ स्वातीचेनि पाणियें । न होती जरी मोतियें । तरि आंगीं सुंदराचिये । कां शोभती तियें ॥ १ ॥ नाद वाद्या न येतां । तरि का गोचर होता । फुलें न होतां घेपता । आमोद केविं ॥२॥ गोडी न होती पक्वान्नें । तरि का फावती रसनें । दर्पणाविण नयनें । नयन का दिसे ॥ ३ ॥ द्रष्टा श्रीगुरुमूर्ती । न रिगता दृश्यपंथीं । तरि का ह्या उपास्ती । आकळता तो

१ गीता हीच काशी तिचें, स्वर्गीचें. २ प्रतिभारून येतात. ३ भ्रांतिमहिषासुराची मुक्तता निरास केल्यानें. ४ करिते. ५ अज्ञानांधकार आडवून. ६ कमळांनीं. ७ सिद्ध झाली. ८ स्तुतिपाठक. ९ वेदशास्त्रादि. १० भ्रमर. ११ अचिंत=विरक्त यांच्या चित्ताला चिंतामणि. १२ वर्णावा. १३ धाकटा. १४ दृष्टि देऊन. १५ पुढचामागचा. १६ श्रेष्ठ, शेवटले. १७ पारिजात जुना असो नवा असो, परिमळ सारखाच. १८ मोठ्या पराक्रमानें प्राप्त होण्याजोगें.

१ प्रतिपादनाला. २ वाणीरूप. ३ जगावर कृपा करून. ४ अर्जुनाच्या निमित्तानें. ५ प्रत्यक्षतेस. ६ कलिकालरूप जो ज्वर, त्याणें पीडित. ७ पायउतार. ८ भिजवाल. ९ एका अंगावर. १० प्रकार. ११ नाहीं. १२ झाल्यावरावर. १३ स्पष्ट. १४ बोलिली. १५ आकाशांत. १६ पान्हा दाटून आल्यानें, अति नमतेनें. १७ सोईस पडतील तसे. १८ वाऱ्याला. १९ आधीनपण, वश्यता. २० पंखा. २१ प्रतिबिंबांत. २२ फुलें उत्पन्न झालीं नसतीं तर सुगंध कसा घेतां येता? २३ पक्वान्नें गोड झालीं नसतीं तर जिभेला गोड कां लागतीं? २४ साक्षी. २५ साकार झाला नसता. २६ उपासनेला.

॥ ४ ॥ तैसें वस्तु जें असंख्यात । तया संख्या शतें सात । न होती तरि कोणा येथ । फावों शकतें ॥ ५ ॥ मेघ सिंधूचें पाणी वाहे । तरी जग तयातेंचि पाहे । कां जें उमप तें नोहे । ठाकतें कोण्हा ॥ ६ ॥ आणि वाचा जें न पवे । तें हे श्लोक न होते बरवे । तरि कानें मुखें फावे । ऐसें कां होतें ॥ ७ ॥ ह्मणोनि श्रीव्यासाचा हा थोर । विश्वासि जाला उपकार । जे श्रीकृष्ण उक्ती आकार । ग्रंथाचा केला ॥ ८ ॥ आणि तोचि हा मी आतां । श्रीव्यासाचीं पदें पाहातां पाहातां । आणिला श्रवणपथा । मऱ्हाठिया ॥ ९ ॥ व्यासादिकांचे उन्मेख । राहाटती जेथ साशंक । तेथ मीही रंकु येक । वांचाळी करीं ॥ १७१० ॥ परि गीता ईश्वर भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा । तरि माझिया दूर्वादळा । ना न ह्मणे कीं ॥ ११ ॥ आणि क्षीरसिंधूचिया तटा । पाणिया येती गजघटा । तेथ काय मुरकुटा । वारिजत असे ॥ १२ ॥ पांखें-फुटे पाखिरुं । नुडे तरी नभींच स्थिरु । गगन आक्रमी सत्वरु । तो गरुडही तेथ ॥ १३ ॥ राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शहाणें । आणिकें काय कोणें । चालावेंचि ना ॥ १४ ॥ जी आपुलेनि अवकाशें । अगाध जळ घेपे कलशें । चुळीं चूळपणा ऐसें । भरूनि न निघे ॥ १५ ॥ दिवटीच्या आंगीं थोरी । तरि ते बहु तेज धरी । वाती आपुलिया परी । आणीच कीं ना ॥ १६ ॥ जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाश आभासे । थिल्लरीं थिल्लराऐसें । बिंबेचि पैं ॥ १७ ॥ तेवि व्यासादिक महामती । वावरों येती इये ग्रंथीं । मा आह्मी ठाकों हे युक्ती । न मिळे कीर ॥ १८ ॥ जिये सागरीं जळचरें । संचरती मंदराकारें । तेथ देखोनि शफरें येरें । पोहों न लाहती ॥ १९ ॥ अरुण आंगाजवळिके । ह्मणोनि सूर्यातें देखे । मा भूतळींची न देखे । मुंगी काई ॥ १७२० ॥ यालागीं आह्मां प्राकृतां । देशिकारें बंधे गीता । ह्मणणें हें अनुचिता । कारण नोहे ॥ २१ ॥ आणि बाप पुढां जाये । ते घेत पाउलाची सोये । वाळ ये तरि न लाहे । पा[...] २२ ॥ तैसा व्यासाचा मागोवा घेत । भाष्यकारातें [...] तयां पुसत । अयोग्यही मी न पवत । कें जाइन ॥ २३ ॥ आणि पृथ्वी जयाचिया क्षमा । नुबगे स्थावर जंगमा । जयाचेनि अमृतें चंद्रमा । निववी जग ॥ २४ ॥ जयाचें आंगिक असिकें । तेज लाहोनि अर्कें । आंधाराचे सावाइकें । लोटिजत आहे ॥ २५ ॥ समुद्रा जयाचें तोय । तोया जयाचें माधुर्य । माधुर्या सौंदर्य । जयाचेनि ॥ २६ ॥ पवना जयाचें बळ । आकाश जेणें पैघळ । ज्ञान जेणें उज्वळ । चक्रवर्ति ॥ २७ ॥ वेद जेणें सुभास । सुख जेणें सोल्लास । हें असो रूपस । विश्व जेणें ॥ २८ ॥ तो सर्वोपकारी समर्थ । सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथ । रहाटत असे मजहीआंत । रिघोनियां ॥ २९ ॥ आतां आयती गीता जगीं । मी सांगें मऱ्हाठिया भंगीं । येथ कें विस्मयालागीं । ठाव आहे ॥ १७३० ॥ श्रीगुरुचेनि नांवें माती । डोंगरीं जयापासीं होती । तेणें कोळियें त्रिजगती । येकवदें केली ॥ ३१ ॥ चंदनें वेधलीं झाडें । जालीं चंदनाचेनि पाडें । वसिष्ठें मांडली कीं भांडे । भानुसीं शाटी ॥ ३२ ॥ मा मी तंव चित्ताथिला । आणि श्रीगुरु ऐसा दांदुला । जो दिठीवेनि आपुला । वैसवी पदीं ॥ ३३ ॥ आथींचि देखणी दिठी । वरी सूर्य पुरवी पाठी । तैं न दिसे ऐसी गोठी । कैंही आहे ॥ ३४ ॥ ह्मणोनि माझे नित्य नवे । श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे । श्रीगुरुकृपा काय नोहे । ज्ञानदेव ह्मणे ॥ ३५ ॥ याकारणें मियां । श्रीगीतार्थ मऱ्हाठिया । केला लोकां यया । दिठीचां विषो ॥ ३६ ॥ परि मऱ्हाठे बोलरंगें । कवळितां पैं गीतांगें । तैं गातयाचेनि पांगें । येकांव्यता नोहे ॥ ३७ ॥ ह्मणौनि गीता गावों ह्मणे । तैं गाणिवे होती लेणें । ना मोकळे तरि उणें । गीताही आणित ॥ ३८ ॥ सुंदर आंगीं लेणें न सूये । तैं तो मोकळा शृंगार होये । ना लेइलें तरि आहे । तैसें कें उचित ॥ ३९ ॥ कां मोतियांची जैसी जाती । सोनयांही मान देती । ना तरि मानवती । अंगेंचि सैडीं ॥ १७४० ॥ ना ना गुंफिलीं कां मोकळीं । उणीं न होती परिमळीं । वसंतागमींचीं वाटोळीं । मोगरीं जैसीं ॥ ४१ ॥ तैसा गाणीवेनें

---

१ मिळूं शकतें. २ अगणित. ३ जर हे श्लोक चांगले झाले नसते तर वाचा जें न पवे–वाणीला जें अगोचर तें कानें मुखें फावे–कानांला व मुखाला प्राप्त कसें झालें असतें. ४ ग्रंथ. ५ ज्ञानोद्धार. ६ अनिर्धारित. ७ बडबड. ८ व्यासोक्तिरूप फुलांची माळा. ९ गजसमुदाय. १० चिलटाला. ११ पंख फुटणारें पांखरूं व गरुड आपआपल्या सामर्थ्यानुरूप आकाशांत उडतात. सीमा दोघांलाही नाहीं. "नभः पतंत्यात्मसमं पतत्रिणः" भागवत. १२ सुंदर. १३ कलश अगाध जलांत गेला तरी त्याच्या अवकाशाइतकेंच पाणी त्यांत रहातें. १४ तसे व्यासादि या ग्रंथांत वावरतात. आह्मी मात्र ठाको–हात टेंकावे–उगेच बसावें–हें बरें नव्हे. १५ लहान मत्स्य. १६ अगदीं जवळ राहणारा, सारथी. १७ देशभाषेनें. १८ अयोग्यपणाला. १९ पावलट.

१ माग घेत घेत. २ न पावतां. ३ कोणीकडे? ४ सहनशक्तीमुळें. ५ न कंटाळे. ६ संपूर्ण साह्य. ७ संपूर्ण ऐहिक. ८ दूर करीत आहे. ९ विस्तार. १० चांगलें बोलणारा. ११ प्रकाशित, देखणें. १२ भाषेच्या रीतीनें. १३ एकत्र. १४ इतर झाडें चंदनसहवासानें त्याच्या तुलनेस येतात. १५ भांडणाच्या निवाड्यासाठीं. १६ छाटी. १७ चित्त सद्गुरुमय झालेला, सचेतन. १८ धनी. १९ दृष्टिमात्रानें. २० पाठीराखा. २१ काव्य, ग्रंथ. २२ दृष्टिगोचर. २३ अधीनपणानें. २४ एकदेशित्व. २५ गाणीं. २६ सुवर्णरहित, नुसतीं.

सिरवी । गीतेवीणही रंग दावी । तो लभाचा प्रबंध वोवीं । केला मियां ॥ ४२ ॥ तेणें आबाळसुबोधें । वोवियेचेनि प्रबंधें । ब्रह्मरससुस्वादें । अक्षरें गुंफिलीं ॥ ४३ ॥ आतां चंदनाच्या तरुवरीं । परिमळालागीं फुलवरी । पारुखणें जियापरी । लागेना कीं ॥ ४४ ॥ तैसा प्रबंध हा श्रवणीं । लागतखेंवो समाधि आणी । ऐकिलियाही वाखाणी । काय व्यसन न लवी ॥ ४५ ॥ पाठ करितां व्याजें । पांडित्यें येती वेंपंजें । तें अमृतातें नेणिजे । फावलिया ॥ ४६ ॥ तैसेनि आइतेपणें । कवित्वा जालें हें उपेणें । मनन निदिध्यास श्रवणें । जिंतिलें आतां ॥ ४७ ॥ हे स्वानंदभोगाची सेल । भलतयासीचि देईल । सर्वेंद्रियां पोषवील । श्रवणाकरवीं ॥ ४८ ॥ चंद्रातें आंगवणें । भोगूनि चकोर शाहाणे । परि फोवे जैसें चांदिणें । भलतयाही ॥ ४९ ॥ तैसें अध्यात्मशास्त्रीं यिये । अंतरंगचि अधिकारिये । परि लोक वाक्चातुर्यें । होईल सुखिया ॥ १७५० ॥ ऐसें श्रीनिवृत्तिनाथाचें । गौरव आहे जी साचें । ग्रंथ नोहे हें कृपेचें । वैभव तिये ॥ ५१ ॥ क्षीरसिंधूपरिसरीं । शक्तीच्या कर्णकुहरीं । नेणों कें श्रीत्रिपुरारीं । सांगीतलें जें ॥ ५२ ॥ तें क्षीर कल्लोळाआंत । मकरोदरीं गुप्त । होता तयाचा हात । पैठें जालें ॥ ५३ ॥ तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं । भग्नावयवा चौरंगीं । भेटला कीं तो सर्वांगीं । संपूर्ण जाला ॥५४॥ मग समाधी अव्युत्यया । भोगावी वासना यया । ते मुद्रा श्रीगोरक्षराया । दिधली मीनीं ॥ ५५ ॥ तेणें योगाब्जिनीसरोवर । विषयविध्वंसैकवीर । तिये पदीं कां सर्वेश्वर । अभिषेकिले ॥ ५६ ॥ मग तिहीं तें शांभव । अद्वयानंदवैभव । संपादिलें सप्रभव । श्रीगैणीनाथा ॥ ५७ ॥ तेणें कळिकळित भूतां । आला देखोनि निरुतां । ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥ ५८ ॥ ना आदि गुरु शंकरा- । लागोनि शिष्यपरंपरा । बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ॥ ५९ ॥ तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां । सर्व प्रकारीं धांवों । करीं पां वेगीं ॥ १७६० ॥ आधींच तंव तो कृपाळु । वरि गुरुआज्ञेचा बोलु । जाला जैसा वर्षाकाळु । खवळणें मेघां ॥ ६१ ॥ मग आर्तांचेनि वोरसें । गीतार्थग्रंथनमिसें । वर्षला शांतरसें । तो हा ग्रंथ ॥ ६२ ॥ तेथ पुढां मीं वापिया । मांडला आर्ती आपुलिया । कीं यासाठीं येवढिया । आणिलों यशा ॥ ६३ ॥ एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन जें आपुलें । तें ग्रंथें बोधोनि दिधलें । गोसावीं मज ॥ ६४ ॥ वांचूनि पढे ना वाची । ना सेवाही जाणें स्वामीची । ऐशिया मज ग्रंथाची । योग्यता कें असे ॥ ६५ ॥ परि साचचि गुरुनाथें । निमित्त करूनि मातें । प्रबंधव्याजें जगातें । रक्षिलें जाणा ॥ ६६ ॥ तऱ्ही पुरोहितगुणें । मी बोलिलों पुरें उणें । तें तुह्मीं माउलीपणें । उपसाहिजो जी ॥ ६७ ॥ शब्द कैसा घडिजे । प्रमेयीं कैसें पां चढिजे । अलंकार ह्मणिजे । काय तें नेणें ॥ ६८ ॥ साहिखडेयाचें बाहुलें । चालविल्या सूत्राचेनि चाले । तैसा मातें दावीत बोलें । स्वामी तो माझा ॥ ६९ ॥ यालागीं मी गुणदोष । विषीं क्षमाविना विशेष । जे मी संजात ग्रंथलों देख । आचार्यें कीं ॥ १७७० ॥ आणि तुह्मां संतांचिये सभे । जें उणिवेसीं ठाके उभें । तें पूर्ण नोहे तैं लोभें । तुह्मांसीचि कोपों ॥ ७१ ॥ सिवतलियाही परिसें । लोहत्वाचिये अवदसे । न मूकिजे आयसें । तैं कवणा बोल ॥ ७२ ॥ वोहळें हेंचि करावें । जे गंगेचें आंग ठाकावें । मग ही गंगा जरी नोहावें । तैं तो काय करी ॥ ७३ ॥ ह्मणौनि भाग्ययोगें वहुवे पां हे । तुह्मां संतांचे मी पाये । पातलों आतां कें लाहें । उणें जगीं ॥ ७४ ॥ अहो जी माझेनि स्वामी । मज संत जोडूनि तुह्मीं । दिधलेति तेणें सर्वकामीं । परिपूर्ण जालों ॥ ७५ ॥ पाहा पां मातें तुह्मां सांगडें । माहेर तेणें सुरवाडें । ग्रंथाचें आळियांडें । सिद्धी गेलें ॥ ७६ ॥ जी कनकाचें निर्खळ । वोतूं येईल भूतळ । चिंतारत्नीं कुळाचळ । निर्मूं येती ॥ ७७ ॥ सातांही हो सागरांतें । सोपें भरितां अमृतें । दुवाड नोहे तारांतें । चंद्र करितां ॥ ७८ ॥ कल्पतरूचे आराम । लावितां नाहीं विषम । परी गीतार्थाचें वर्म । निवडूं नये ॥ ७९ ॥ तो मी येक सर्व मुका । बोलोनि मऱ्हाटिया भाषा । करीं डोळेवरी लोकां । घेवों ये ऐसें जें ॥ १७८० ॥ हा ग्रंथसागर येव्हडा । उतरोनि पैलीकडा । कीर्तिविजयाचा धेंडा । नाचें जें कां ॥८१॥

१ गाण्यावांचून. २ आबालवृद्धांस सुगम. ३ सुवासासाठीं. फूल येण्यापर्यंत. ४ वाट पहाणें. ५ लागण्याबरोबर. ६ व्याख्यानरूपानें. ७ स्पष्ट. ८ प्राप्त झाल्यास. ९ विश्रांतिस्थान. १० विभाग. ११ नवसानें, स्वभावें, आपल्या शक्तीनें. १२ प्राप्त होय. १३ या आत्मानात्मविचारशास्त्रीं. १४ अंतर्मुख. १५ सन्निधभागीं. १६ पार्वतीच्या कानांत. १७ लाटांमध्यें. १८ माशाच्या पोटांत. १९ प्राप्त. २० हातपाय तुटलेल्या चौरंगीनाथास. २१ निर्विघ्न. २२ या वासनेनें, इच्छेनें. २३ मत्स्येंद्रनाथांनीं. २४ योगरूप कमलिनीचें. २५ विषयनाशाला मुख्य कारण. २६ अध्यात्मविद्या–शंभूपासून उत्पन्न झालेलें तें. २७ मुख्यपासून. २८ कळीनें ग्रस्त असा. २९ सारा. ३० विस्तार. ३१ धांवून रक्षणें.

१ पीडिताच्या पान्ह्यासाठीं. २ ग्रंथ करण्याच्या निमित्तानें. ३ चातक. ४ गुरुपरंपरेनें. ५ परस्वाधीनपणानें. ६ क्षमा करा. ७ अर्थान्वयांत. ८ कळसूत्री बाहुली. ९ ग्रंथयुक्त बोललों ग्रंथच मी झालों आहें. १० कोपूं लागेन, रुसेन. ११ स्पर्शलेल्या. १२ वाईट स्थितीला. १३ लोहानें. १४ प्रवाहानें. १५ तुमच्याखातर. १६ अनुकूल. १७ हट्ट. १८ सर्व. १९ पर्वत. २० कठिण. २१ बाग. २२ विपरीत. २३ प्रत्यक्ष, दृग्गोचर

गीतार्थाचा ऑवारु । कलशेंसी महामेरू । रचूनि माजी श्रीगुरु- । लिंग जें पूजीं ॥ ८२ ॥ गीता निष्कपट माय । चुकोनि तान्हें हिंडे जें वांय । ते मांयपूतां भेटि होय । हा धर्म तुमचा ॥ ८३ ॥ तुह्मीं सज्जनांचें केलें । आकळूनि जी मी बोलें । ज्ञानदेव ह्मणे थेंकुलें । तैसें नोहे ॥ ८४ ॥ काय बहु बोलों सकळां । मेळविलों जन्मफळा । ग्रंथसिद्धीचा सोहळा । दाविला जो हा ॥ ८५ ॥ मियां जैसजैसिया आशा । केला तुमचा भरंवसा । ते पुरऊनि जी बहुवसा । आणिलों सुखा ॥ ८६ ॥ मजलागीं ग्रंथाची स्वामी । दुजी सृष्टी जे हे केली तुह्मी । ते पाहोनि हांसों आह्मी । विश्वामित्रातेंही ॥ ८७ ॥ जे असोनि त्रिशंकुदोषें । घातयाही आणावें वोसें । तें नासतें कीजे कीं ऐसें । निर्मावें नाहीं ॥ ८८ ॥ शंभू उपमन्यूचेनि मोहें । क्षीसागरही केला आहे । येथ तोही उपमेसरी नोहे । जे विषगर्भ कीं ॥ ८९ ॥ अंधकार निशाचरा । गिळितां सूर्यें चराचरा । धांवा केला तरी खरा । ताउनी कीं तो ॥ १७९० ॥ ताततलिया जगाकारणें । चंद्रें वेंचिलें चांदिणें । तया सदोषा केवि ह्मणें । सारिखें हें ॥ ९१ ॥ ह्मणोनि तुह्मीं मज संतीं । ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं । उपयोग केला तो पुढती । निरुपम जी ॥ ९२ ॥ किंबहुना तुमचें केलें । धर्मकीर्तन हें सिद्धी नेलें । येथ माझें जी उरलें । पाईकपण ॥ ९३ ॥ आतां विश्वात्मकें देवें । येणें वांग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ ९४ ॥ जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥ ९५ ॥ दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ९६ ॥ वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ॥ ९७ ॥ चला कल्पतरूचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ९८ ॥ चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ९९ ॥ किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदि पुरुषीं । अखंडित ॥ १८०० ॥ आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ॥ १ ॥ थ ह्मणे श्रीविश्वेशरावो । हा होइल दानपसावो । येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥ २ ॥ ऐसें युगीं परिकळीं । आणि महाराष्ट्रमंडळीं । श्रीगोदावरीच्या कूलीं । दक्षिणिलीं ॥ ३ ॥ त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोशक्षेत्र । जेथ जगाचें जीवनसूत्र । श्रीमहालया असे ॥ ४ ॥ तेथ यदुवंशविलास । जो सकळकळानिवास । न्यायातें पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ॥ ५ ॥ तेथ महेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें । केलें ज्ञानदेवें गीते । देशीकारलेणें ॥ ६ ॥ एवं भारताच्या गांवीं । भीष्मनाम प्रसिद्ध पर्वीं । श्रीकृष्णार्जुनीं वरवी ॥ गोठी जे केली ॥ ७ ॥ जें उपनिषदांचें सार । सर्वशास्त्रांचें माहेर । परमहंसीं सरोवर । सेविजे जें ॥ ८ ॥ तिये गीतेचा कळश । संपूर्ण हा अष्टादश । ह्मणे निवृत्तिदास । ज्ञानदेव ॥ ९ ॥ पुढती पुढती पुढती । इया ग्रंथपुण्यसंपत्ती । सर्वसुखीं सर्वभूतीं । संपूर्ण होइजे ॥ १८१० ॥ शके बाराशतें बारोत्तरें । तैं टीका केली ज्ञानेश्वरें । सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकु जाहाला ॥ १८११ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायामष्टाद-

शोऽध्यायः ॥ १८ ॥

इति श्रीभावार्थदीपिका समाप्ता ॥

श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्लोक ७८, ओंव्या १८११.

**ह्या भाषणावर संजय ह्मणाला "महाराज! मला दुसऱ्या तिसऱ्याचें कांहीं माहित नाहीं. पण आयुष्य असेल तेथें जीव असावयाचा हें उघड आहे. १६३२ महाराज! चंद्र तेथें चांदणें; शंकर तेथें पार्वती; संत तेथें विचार; हीं असावयाचींच. १६३३ राजा तेथें सैन्य; सौजन्य तेथें स्नेह; अग्नि असेल तेथें जाळण्याचें सामर्थ्य. १६३४ दया असेल तेथें धर्म; धर्म तेथें सुखोत्पत्ति; आणि सुख तेथें जसा ईश्वर असतो. १६३५ वसंत असतो तेथें वनें; वन तेथें पुष्पें; आणि पुष्पें असतील तेथें भ्रमरांचे समुदाय. १६३६ गुरु तेथें ज्ञान; ज्ञान तेथें**

---

१ देऊळ. २ व्यर्थ. ३ मायलेंकरांस. ४ तुह्मीं संतांनीं केलेल्याचा विचार करून हें माझें बोलणें आहे. केवळ थेंकुलें–ज्ञानेश्वराचें यःकश्चित् बोलणें नव्हे. ५ त्रिशंकुराजाच्या हेतूनें. ६ उणें. ७ दिला. ८ तप्त झालेल्या. ९ सेवकत्व. १० ग्रंथरूप यज्ञानें. ११ प्रसाद. १२ वक्रदृष्टि. १३ भगवज्जनांची. १४ समुदाय. १५ सर्वकाळ. १६ चालत्या. १७ कोटी, अंकुर. १८ जीवंत. १९ लांछनरहित. २० सूर्य. २१ श्रीगुरु. २२ दानप्रसाद.

१ कलियुगांत. २ दक्षिणभागच्या तीरीं. ३ पांच कोश विस्तृत, पंचक्रोशींत. ४ मोहनीराजदेव–श्रीविष्णूंनीं घेतलेल्या मोहनीचा अवतार. हें देवालय नेवासें येथें असून त्यास, स्त्रीपुंसवाचक दोन्हींही नामें देतात. अधिक माहिती 'केरळकोकिळां'तील "ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी" ह्या लेखांत पहावी. ५ यादव वंशास सुशोभित करणारा. ६ आदिनाथपरंपरासंभूत, शिवसंप्रदाय. ७ शिष्यरूप पुत्रानें. ८ देशभाषेचा अलंकार. ९ कळस. १० उत्तरोत्तर.

[?]मदर्शन; आणि आत्मदर्शनामध्यें जसें समा-[?]असतें. १६३७ भाग्य तेथें सुखोपभोग; सुख तेथें उल्हास; हें असो. जेथें सूर्य तेथें प्रकाश; १६३८ त्याप्रमाणें सकल पुरुषार्थांनें शोभणारा प्रभु जेथें **श्रीकृष्ण, तेथें लक्ष्मी;** १६३९ आणखी, आपल्या पतिसहवर्तमान **जगदंबाच** ज्याच्यापाशीं असेल, त्याच्या अणिमादिक सिद्धि दासी होणार नाहींत काय? १६४० **कृष्ण** हा स्वयमेव विजयस्वरूपच आहे. तो ज्या पक्षाकडे राहिलेला आहे, तिकडे विजय असणार हें उघडच दिसतें. १६४१ शिवाय **'विजय'** हें **अर्जुनाचें** नांव प्रसिद्धच आहे. **श्रीकृष्णनाथ,** तर विजयस्वरूपीच. ह्याकरितां **लक्ष्मी**सहवर्तमान विजय तेथेंच असणार हें खचित. १६४२ येवढे ज्याचे आ[?]बाप आहेत, त्या गांवांतलीं झाडें सुद्धां कल्पतरूशीं पैज मारून त्याला जिंकावयाचीं नाहींत काय? १६४३ तेथले जे दगड असतील, त्या साऱ्यांनीं चिंतामणी तरी कां होऊं नये? आणि तेथच्या जमिनी सुवर्णाच्या तरी कां होऊं नयेत? १६४४ हे **राजा!** त्याच्या गांवांतल्या नद्यांतून अमृत वहावयाला लागलें तर आश्चर्य तें काय? विचार कर. १६४५ त्यांच्या अव्यवस्थित शब्दांना सुद्धां वेद ह्मणावें लागेल. ते मूर्तिमंत सच्चिदानंदरूपच नव्हेत काय? आहेतच. १६४६ स्वर्ग आणि मोक्ष हीं दोन्हीं पदें, **श्रीकृष्ण** ज्यांचे बाप, व **लक्ष्मी** ज्यांची आई आहे, त्यांच्या अगदीं हातांतलींच आहेत. १६४७ ह्मणून तो **लक्ष्मीचा पति** ज्या बाजूकडे उभा राहील, त्या बाजूकडे सर्व सिद्धि स्वयंभूच आहेत. दुसरें मी कांहीं जाणत नाहीं. १६४८ आणखी समुद्रापासून मेघ होतो, पण तो उपयोगामध्यें समुद्राहूनही चांगला असतो. तर तीच गोष्ट आज त्या **अर्जुनाला** लागू आहे. १६४९ लोखंडाला सुवर्णाची दीक्षा देणारा परिस आहे, ही गोष्ट खरी. परंतु जगाला पोषण करण्याचें काम लोखंडालाच माहिती आहे. १६५० अशानें गुरुत्वाला उणेपणा येतो असें जर कोणी ह्मणेल, तर अग्नीचें तेज दिव्याच्या रूपानें आपलेंच तेज प्रकाशित करतें. १६५१ त्याप्रमाणें **पार्थ** ही देवाचीच शक्ति होय. पण ही त्याची स्तुति देवालाच फार मानवते. आणि त्यांतच त्याला मोठेपणा आहे. १६५२ आणखी आपणाला सर्व गुणांमध्यें मुलानें जिंकावें अशी बापाला मोठी हौस असते. तर तीही शार्ङ्गपाणी जे भगवान् त्यांची पूर्ण झाली. १६५३ किंबहुना **राजा!** अशा कृष्णकृपेस तो **अर्जुन** पात्र झाला आहे. तो ज्याकडे पक्षाभिमानानें राहिला, १६५४ तेंच विजयाचें स्थान, ह्यांत तुला संशय तो कसला? तिकडे जर विजय न आला, तर त्याचें विजय हें नांवच व्यर्थ होईल. १६५५ ह्मणून जेथें **लक्ष्मी,** तेथें **लक्ष्मीपति;** आणि जेथें तो **अर्जुन** तेथें सारा विजय आणि भरभराट. १६५६ **व्यासाच्या** खरेपणावर जर तुमचा विश्वास असेल, तर हें भाषण अढळच आहे, हें लक्ष्यांत ठेवा. १६५७ जेथें तो **लक्ष्मीपति;** तेथें भक्तांचे समुदाय; तेथेंच कल्याणाचा आणि सुखाचा लाभ. १६५८ ह्या भाषणांत जर अंतर पडेल तर, पुन्हा **व्यासाचा** शिष्याच ह्मणविणार नाहीं." असें मोठ्यानें बोलून त्यानें आवेशानें हात उचलला. १६५९ ह्याप्रमाणें **संजयानें** साऱ्या भारताचें सार एका श्लोकांत आणून कौरवराजा जो **धृतराष्ट्र,** त्याच्या हातांत दिलें. १६६० अग्नि हा केवढा आहे हें कांहीं समजत नाहीं. पण तो वातीच्या टोंकावर ठेवून, सूर्यापासून झालेली हानि भरून काढण्याकरितां (दिव्याच्या रूपानें) जसा त्याला घेऊन येतात, १६६१ त्याप्रमाणें वेद हे अनंत, त्यांपासून सव्वालक्ष भारत झालें. भारताचें सर्वस्व—सातशें श्लोकांची गीता. १६६२ त्या सातशें श्लोकांच्या इत्यर्थाचा, **व्यासाचा** शिष्य जो **संजय,** त्याचा जो पूर्णोद्गार तो हा शेवटचा श्लोक. १६६३ ह्या एकाच श्लोकाचा जो कोणी आश्रय करून राहील, त्यानें सर्व अज्ञान जिंकलें ह्मणून समजावें.

१६६४ असे गीतेचीं पदें वाहणारे सातशें श्लोक आहेत. त्यांना पदें ह्मणावींत कां गीतारूप भागीरथीचें परमामृत ह्मणावें? १६६५ किंवा आत्मराजाच्या गीतारूप सभेला हे श्लोकरूपी खांबच लावलेले आहेत, असें माझ्या मनाला वाटतें. १६६६ किंवा गीता ही सप्तशती मंत्रानें प्रतिपादन केलेली भगवतीच असून, मोहरूप महिषाला मुक्ति देऊन ती आनंदित झाली आहे. १६६७ ह्मणून कायावाचामनेंकरून जो हिचा सेवक होईल, तो स्वानंदसाम्राज्याचा उपभोग घेईल. १६६८ किंवा अज्ञानांधकारास रोखून धरतील, सूर्याशींही पैजा मारतील, असे श्रीकृष्ण प्रभूंनीं गीतेच्या रूपानें हे श्लोक प्रकाशित केले. १६६९ किंवा संसाराचा मार्ग क्रमण करून थकलेल्यांना विसांवा घेण्यासाठीं श्लोकांशरूप द्राक्षाच्या वेलीला, ही गीता मांडवच झाली. १६७० किंवा भाग्यवान् संतसज्जनरूपी भ्रमरांना सेवन करण्याकरितां श्रीकृष्णरूप सरोवरांतून श्लोकरूप कमळेंच वर आलीं आहेत. १६७१ किंवा हे श्लोक नव्हेत. दुसरेच कोणी असावेत. गीतेचा महिमा वर्णन करण्यासाठीं जणों काय हे शेंकडो भाटच जमलेले आहेत. १६७२ किंवा सातशें श्लोकांचा सुंदर तट घालून सर्व शास्त्रें ह्या गीतानगरांत राहावयास आलीं आहेत. १६७३ किंवा हे श्लोकही नव्हेत. तर आपला पति जो आत्माराम, त्याला परम प्रीतीनें भेटण्यासाठीं गीतेनें हे हातच पसरले आहेत. १६७४ किंवा गीतारूप कमलांतील हे भृंग असावेत; किंवा गीतारूप समुद्राच्या लाटा; किंवा श्रीहरीच्या गीतारूप रथाचे हे घोडे होत. १६७५ किंवा अर्जुन हा सिंहस्थ पर्वणी झाला ह्मणून सारे श्लोक हीं अनेक तीर्थें होत. तीं श्रीगीतारूप गंगेमध्यें येऊन मिळालीं. १६७६ किंवा ही श्लोकपंक्ति नव्हे. विरक्त चित्ताचे चिंतामणीच होत. किंवा विकल्परहित अशा ब्रह्माची प्राप्ती करून देणारे हे कल्पवृक्षच होत. १६७७ अशा प्रकारें ह्या सातशें श्लोकांची योग्यता एकापेक्षां एक चढ आहे. तेव्हां एकएकांचें वर्णन कोठपर्यंत करावें? १६७८ कामधेनूच्या संबंधानें बोलतांना व्यालेली आहे का पालटी आहे? ह्याची जशी कोणी चौकशी करीत नाहीं; १६७९ दिवा ( ? ) मागचा कसला आणि पुढचा कसला? सूर्य ( ? ) लहान कसला आणि मोठा कसला? अमृताचा समुद्र उथळ कसला, आणि खोल कसला? १६८० त्याप्रमाणें गीतेच्या श्लोकांना चांगले आणि वाईट ह्मणूंच नयेत. पारिजातकाचीं पुष्पें, नवीं आणि जुनीं अशीं असतात काय? १६८१ याउप्पर श्लोकांना मोल नाहीं, ह्मणून आणखी किती तरी प्रतिपादन करावें? तेथें वाच्य आणि वाचक ह्यांचा भागच रहात नाहीं. १६८२ कारण, ह्या शास्त्रामध्यें श्रीकृष्ण हेच एक काय ते वाच्य आणि वाचक आहेत, ही गोष्ट सर्व प्रसिद्ध–कोणा पाहिजे त्यालाही माहित आहे. १६८३ येथें जें अर्थानें तेंच पठणानेंही प्राप्त होतें. आणि वाच्यवाचकांचें ऐक्य करणारें असें हें महत्वाचें शास्त्र आहे. १६८४ ह्मणून मला आतां प्रतिपादन करण्याचा हा विषय नाहीं. कारण, गीता ही वाणीरूप श्रीप्रभूची मूर्ति आहे हें लक्ष्यांत ठेवा. १६८५ कोणतेंही शास्त्र वाचेनें व अर्थानेंही फल देतें, आणि मग आपण नाहींसें होतें. त्याप्रमाणें हें शास्त्र नव्हे. हें सारें परब्रह्मस्वरूपच आहे. १६८६ देवांनीं विश्वावर कृपा करून अर्जुनाच्या रूपानें महदानंद सोपा करून रूपाला कसा आणला पहा! १६८७ कलायुक्त चंद्रानें चकोराच्या निमित्तानें संतप्त झालेले तिन्ही लोक जसे निवऊन सोडावेत, १६८८ किंवा कलिकालरूपी ज्वरानें लोक पीडित झाले असें पाहून श्रीत्र्यंबकांनीं जसा गंगेचा प्रवाह निर्माण केला, १६८९ त्याप्रमाणें श्रीकृष्ण ही कोणीएक गाय, अर्जुनाला वांसरूं करून जगाला पुरेसें तिनें गीतारूप दूधच दिलें. १६९० हें पोटांत घ्याल तर तत्स्वरूप व्हाल ह्यांत तर शंका नाहींच.

णाच्या निमित्तानें नुसती जीभ जरी राल, १६९१ तरी, लोखंडाची एक री परिसाला लागली तरी दुसरी बाजू आपोआप सोनें बनत जाते, १६९२ श्लोक, चरण, इत्यादिकांच्या पाठाची जरी तोंडाला लावली, तरी आंगाला स्वरूपाची पुष्टी येईल. १६९३ किंवा त्याला, वांकडें करून एका कुशीवरच पडाल आणि ांत थोडेंसें घ्याल, तरी सुद्धां तसाच प्रकार ाईल. १६९४ कारण, श्रीमान् व समर्थ दाता जसा कोणाला 'नाहीं' असें ह्मणत नाहीं, त्याप्रमाणें ही गीता अर्थासह पठण करा, कीं नुसती पठण करा; किंवा श्रवण करा; कांहीं केलें तरी, ती मोक्षाशिवाय दुसरें कांहीं द्यावयाचीच नाहीं. १६९५ ह्मणून जाणत्या लोकांप्रमाणें गीताच एक सेवन करावी. बाकी शास्त्रांना घेऊन काय करावयाचें? १६९६ आणखी **श्रीकृष्ण** व **अर्जुन** ह्यांनीं जें भाषण केवळ मोकळें–अवांतरीं–केलें होतें, तें तळहातांत घेतां येईल, असें **श्रीव्यासांनीं** करून ठेवलें. १६९७ आई ममतेनें जेव्हां मुलांस जेऊं घालावयास बसते, तेव्हां त्याच्या सोयीसारखे घास करते. १६९८ किंवा अफाट असलेल्या वाऱ्याला बेतापुरताच घेण्यासाठीं शहाण्या लोकांनीं जसा पंखा तयार केलेला आहे, १६९९ त्याप्रमाणें शब्दांनीं जी गोष्ट कळावयाची नाहीं, ती अनुष्टुप् छंदांत आणून स्त्रीशूद्रादिकांतही तिचा प्रसार करून टाकला. १७०० स्वातीच्या पाण्यानें जर मोत्यें बनलीं नसतीं, तर तीं सुंदर आंगावर विराजमान झालीं असतीं काय? १७०१ वाद्यांत जर नादच नसता, तर ऐकावयाला कोठून मिळाला असता? फुलेंच नसतीं तर वास कसा घ्यावयास मिळाला असता? १७०२ पक्वान्नें गोड झालीं नसतीं, तर तीं जिभेला रुचकर कशीं लागतीं? आरशाशिवाय, डोळ्याला डोळा दिसता काय? १७०३ पाहणारे–साक्षी–असे जे श्रीगुरु, ते जर हृदय आकारास न येते, तर त्यांची कोणत्या उपासनामार्गानें प्राप्ती झाली असती? १७०४ त्याप्रमाणें अनंत असें जें ब्रह्म, त्याची सातशें श्लोकांनीं गणना न होती, तर तें कोणाच्या हस्तगत झालें असतें? १७०५ मेघ हा समुद्रांतलेंच पाणी आणतो, तरी सारें जग त्याच्याकडेच पहात असतें. कारण, जें अपरिमित आहे, तें कोणालाच आकलन करितां येत नाहीं. १७०६ हे सुंदर श्लोक जर न होते, तर वाणीला जें अगम्य तें कानाला आणि मुखाला कसें प्राप्त झालें असतें? १७०७ ह्मणून **श्रीकृष्णाच्या** भाषणाला ग्रंथाचा आकार दिला, हा **श्रीव्यासाचा** विश्वावर मोठाच उपकार झाला. १७०८ आणि तोच हा गीताग्रंथ मी **श्रीव्यासांचीं** पदें पाहतां पाहतां महाराष्ट्र लोकांच्या श्रवणमार्गास आणला. १७०९ **व्यासा**दिकासारख्यांच्याही ज्ञानाला, संचार करतांना शंका रहातात. त्याची मी ही एका यःकश्चित् मनुष्यानें बडबड केली. १७१० परंतु गीतारूप **ईश्वर** भोळा आहे. तो व्यासोक्तरूप फुलांची माळा धारण करतो, कीं माझ्या एका दूर्वादळालाही नाहीं ह्मणत? १७ ११ आणखी **क्षीरसागराच्या** तटाकाला हत्तींचे कळपच्या कळप पाणी प्यावयास येतात, ह्मणून त्यानें मुरकुटास कधीं मज्जाव केलें आहे काय? १७१२ तो गरुड तेथें भराभर आकाश आक्रमण करित आहे, ह्मणून पंख फुटलेलें पांखरूं मुळीं उडणारच नाहीं काय? आकाशांतच स्थिर राहील? १७१३ भूमंडळावर राजहंसाचें चालणें फार उत्तम आहे, ह्मणून दुसऱ्या कोणी मुळीं चालूंच नये काय? १७१४ **महाराज!** आपल्या सांठवणाप्रमाणें घागर पुष्कळ पाणी घेते, पण चुळीमध्यें चुळीच्या मानानें पाणी राहत नाहीं काय? १७१५ दिवटीचा आकार मोठा असतो, ह्मणून तिचा प्रकाश मोठा पडतो. पण वात आपल्या परीनें उजेड करीत नाहीं काय? १७१६ **महाराज!** आकाशाचें प्रतिबिंब समुद्राच्या विस्तारा-

प्रमाणें समुद्रांत पडतें, तसेंच डबक्याप्रमाणें डबक्यांतही पडतेंच, १७१७ तद्वत् व्यासासारखे महान् महान् बुद्धिमान् ह्या ग्रंथामध्यें परिश्रम करतात ह्मणून आह्मीं मागें सरावें हें खरोखरच सयुक्तिक दिसत नाहीं. १७१८ ज्या समुद्रामध्यें मंदराचळ पर्वतासारखीं महान् महान् जलचरें संचार करतात, तीं पाहून तेथेंच लहान लहान मासेही पोहत नाहीं काय? १७१९ अरुण अगदीं सान्निध्याला असतो ह्मणून सूर्याला पहातो, पण जमिनीवरील मुंगीला तो पहातां येणार नाहीं काय? १७२० ह्याकरितां आमच्यासारख्या प्राकृतांनीं देशी भाषेंत गीतेचें काव्य करणें तें कांहीं अयोग्यतेस कारण होणार नाहीं. १७२१ आणखी बाप पुढें गेलेला असला, आणि त्याच्याच पाउलाच्या वाटेनें मूल आलें, तर तें त्याच्या ठिकाणीं पोंचणार नाहीं काय? १७२२ त्याप्रमाणें व्यासाचा माग काढीत काढीत, भाष्यकारांना वाट विचारीत विचारीत मी आलों. व तां मी अयोग्य असलों तरी, त्यांच्या ठिकाणीं जाणार नाहीं, तर कोठें बरें जाईन? १७२३ ज्याच्या क्षमेच्याच योगानें पृथ्वी ही स्थावर जंगमाला कंटाळत नाहीं; ज्याच्या अमृतानें चंद्र साऱ्या जगाला गारीगार करून सोडतो; १७२४ सूर्य, ज्याच्या आंगचें सर्व तेज घेऊन अंधाराची रास दूर झुगारून देत आहे; १७२५ समुद्राला ज्याचें पाणी; पाण्याला ज्याचें माधुर्य; ज्याच्या योगानें माधुर्याला सौंदर्य; १७२६ वाऱ्याला ज्याचें बळ; आकाशाला ज्याचा विस्तार; सर्वांवर सत्ता करणारें ज्ञान ज्याच्या योगानें दैदीप्यमान झालें आहे. १७२७ वेद ज्याच्या योगानें बोलका झाला; सुख ज्यानें उल्हासयुक्त झालें; हें असो. सारें विश्व ज्याच्या योगानें प्रकाशित झालें आहे. १७२८ तो सर्वांवर उपकार करणारा, समर्थ, सद्गुरु जो **श्रीनिवृत्तिनाथ** तो मजमध्यें प्रवेश करून सारा व्यवहार करीत आहे. १७२९ ह्मणून आतां मी आयती ही गीता जगाला मऱ्हाठी भाषेनें सांग... तेव्हां आतां आश्चर्याला जागा कोठें र... १७३० श्रीगुरूचें नांव ठेवलेली मार्ता, ...रामध्यें ज्याच्याजवळ होती, त्या को...

---

१ हा एकलव्य होय. हा हिरण्यधेनुक नामक ...धिपतीचा पुत्र. भीष्मानें द्रोणाचार्यांस, धार्तराष्ट्र आणि इ० मुलांस धनुर्वेद शिकविण्यासाठीं हस्तिनापुरीं ... समीप ठेऊन घेतल्यावर, तीं मुलें त्यासमीप अभ्या... लागलीं. हें वर्तमान देशोदेशीं कळून, अनेक राजपु... येऊन द्रोणाचार्यासमीप अस्त्रविद्येचा अभ्यास करूं ल... असें ऐकून हाही तेथें आला, आणि माझा अंगीकार व... विद्या पढवावी, ह्मणून आचार्यांस प्रार्थू लागला. पण त्य... त्यांनीं अंगीकार केला नाहीं. त्यावरून त्यानें द्रोणाचार्यां... पादुका मागितल्या, त्या त्यांनीं यास विमुख लावूं नये ह्म... दिल्या असतां, हा, त्या घेऊन स्वगृहीं गेला, आणि भ... पुरःसर द्रोणाचार्यांची मृण्मय मूर्ति करून व तीपुढें आ...लेल्या पादुका ठेवून, त्यांची नियमपूर्वक नित्य पूजा कर... होत्साता, हस्तामध्यें आपणच धनुष्यबाण घेऊन उभा राह... व असें अस्त्र सोडूंना? ह्मणून आपण आपल्याच मना... प्रश्न करी, व आपणच, हो हो, असेंच सोड, ह्मणून उत्त... करून, सोडी. असें करतां करतां, विमोक्ष, आदा... संधान इ० जीं धनुर्विद्येचीं प्रकरणें, त्यांत तो अल्पकाळ...तच तिकडे प्रवीण झाला.

इकडे कौरव, पांडव, तसेच अन्य राजपुत्र, हेही धनुर्वि...द्येंत प्रवीण होऊन, एकदां सर्वही मृगयेस गेले, व मृगामागें लागले असतां, त्यांचा मृगयाश्वान त्यांपासून दूर राहून चुकल्यामुळें, जेथें एकलव्य होता, तिकडे गेला. परंतु त्यास नेहेमीं सुंदर वेष केलेल्या राजपुत्रांस पाहण्याची संवय असल्यामुळें, विचित्रवेषधारी एकलव्यास पाहून तों त्याच्या आंगावर भुंकूं लागला. तें त्याचें पसरलेलें मुख एकलव्यानें पाहून त्यांत अशा युक्तीनें एक लहान लहान बाणांचा जुंबडा भरला कीं, त्यास भुंकतां व तोंड मिटतां येऊं नये. पुढें तो श्वान तेथून पळाला, व इकडे तिकडे हिंडत आहे तों त्यानें राजपुत्रांस, व राजपुत्रांनीं त्यास परस्पर पाहिलें. नंतर तो समीप आला असतां, संपूर्ण राजपुत्रांनीं त्याच्या मुखांत भरलेला बाणांचा जुंबडा पाहातांच, त्यास अति आश्चर्य झालें, व अशी कृति करणारा धनुर्धर या अरण्यांत कोण असावा, ह्मणून ते त्याचा शोध करीत चालले. जातां जातां, हस्तांत धनुष्यबाण घेतलेल्या एकलव्यास त्यांनीं पाहिलें, व हाच तो असावा, ह्मणून ते सर्व तेथें उभे राहिले. नंतर सर्व राजपुत्रांत, एकजण पुढें होऊन, त्यानें त्यास पुसलें कीं, तूं कोण व कोणाचा शिष्य आहेस? त्यानें

आता ...ने एक ... न, सोडलें. १७३१ ... संगतीला असलेलीं झाडें चंदना- १७ ... योग्यतेचीं होतात. भांडणाचा निर्णय मींनीं ... करितां वसिष्ठ ऋषींनीं सूर्यास आ- ली. ... बरोबर साक्षीकरितां घेतलें व त्रैलोक्य १७ ... शेत करण्याच्या कामगिरीवर आपली म्हणू... ठेवली! १७३२ छाटी निर्जीव होती; ...नेंच ...मी तर सजीव; आणि श्रीगुरूसारखा धनी; चित दृष्टिमात्रानेंच आपल्या पदावर बसविणारा; समु ७३३ आधींच उत्तम पाहणारे डोळे; आ- णखी त्यावर सूर्य पाठिराखा; मग दिसणार नाहीं ही गोष्ट कोठें राहणार? १७३४ म्हणून माझे नित्य नवे श्वासोच्छ्वास सुद्धां काव्येंच होऊं लागले आहेत. ज्ञानदेव म्हणतात

---

उत्तर केलें, मी हिरण्यधेनुक नामक निषादाधिपतीचा पुत्र असून, द्रोणाचार्यांचा शिष्य आहें. त्यावरून सर्वांसही कांहींसा विषाद वाटून ते गृहीं आले, आणि आचार्यांस म्हणाले कीं, आपण आम्हांस न कळूं देतां, गुप्तपणें एक निषाद प्रवीण केलात हें कसें? तें ऐकून द्रोणाचार्यांस त्याचा कांहींच संबंध ...नांत येईना, तथापि तो कोण असावा हें पाहून यावें म्हणून आचार्य हस्तिनापुरांतून राजपुत्रांस समागमें घेऊन त्यास पाहण्यास निघाले, व तेथें गेले. त्यांस पाहतांच एकलव्यानें दंडवत् प्रणाम केला, व हात जोडून आचार्यांपुढें उभा राहिला. पुढें द्रोणाचार्यांनीं याच्या अस्त्रविद्येची परीक्षा पाहून, तींत तो अत्युत्कृष्ट प्रवीण आहे, असें जाणल्यावर त्यास पुसलें कीं, ही विद्या, तूं मजपासून कशी संपादन केलीस? तेव्हां यानें संपूर्ण पूर्ववृत्त त्यांस निवेदन केलें. तें ऐकून राजपुत्र निःसंशय झाले, व त्याच्या भावनेचें आणि आचार्यांच्या पुण्यप्रभावाचें, त्यांस परमाश्चर्य होऊन, ... ...रांशीं गोष्टी करीत आहेत तों आचार्यांनीं, हा प्रसंगवशात् अर्जुनासही भारी होईल असें मनांत आणून, यास गुरुदक्षिणा मागितली कीं, तूं तुझा अंगुष्ठ, बाण सोडतांना इतःपर कधींही त्यास स्पर्शवीत जाऊं नको. त्यावरून यानें तथास्तु म्हणून, त्या दिवसापासून बाणास अंगुष्ठाचा स्पर्श करणें सोडलें. तें व्रत अजून सर्व किरात पाळतात. तात्पर्य, इतकें जरी द्रोणाचार्यांनीं यास बांधून घेतलें होतें, तरी हा अर्जुनास भारीच होता. (भार० आदि०) हा भारती युद्धांत दुर्योधनाकडे म्हणायास ...त होता; परंतु युद्धसमयीं मुळींच आला नाहीं.

भा० प्रा० पे० कोश.—

श्रीगुरुकृपा काय काय म्हणून क... नाहीं १७३५ ह्याच कारणानें श्रीगीतेचा अर्थ मऱ्हाठी भाषेमध्यें ह्या लोकांच्या दृष्टीचा विषय ... १७३६ मऱ्हाठी शब्दांच्या माधुर्यानें सर्वतोपरी अंगीकार केला, तरी, पठ... त्याला कांहीं उणीव येत नाहीं. १७३७ ह... गीता पठण करून आणखी अर्थही सम... घेतला, तर तें पठण भूषणभूत होईलच होईल पण अर्थ समजला नाहीं तरी सुद्धां, पठण करणाराला गीता कोणत्याही प्रकारें उणेपणा आणीत नाहीं. १७३८ आंगावर उत्तमोत्तम अलंकार घातले नाहींत तरी, साधा शृंगार तो असतोच. किंवा ते घातले, तर मग त्याच्या तुलनेला दुसरें कोठें काय आहे? १७३९ मोत्यांची जात जशी सोन्याचें महत्त्व वाढविते, किंवा मोकळीं असलीं तरी एकटींही लोकांस आवडतात. १७४० किंवा वसंतऋ- तूंतील बटमोगरीचीं फुलें गुंफलेलीं असोत किंवा मोकळीं असोत, परिमळांत जशीं ... कमी पडत नाहींत, १७४१ त्याप्रमाणें ... ह्याला लाभ घडेल तर घडेलच; पण अ... वांचून नुसतें पठण करणारासही तोच ल... घडेल. अशा प्रकारचें हें ओवीबद्ध काव्य ... रचलें आहे. १७४२ त्या ओवीबद्ध काव्याच्या योगानें आबालवृद्धांसही सुलभ होतील अशीं, ब्रह्मरसाच्या उत्तम स्वादानें युक्त अशीं अक्षरें गुंफलेलीं आहेत. १७४३ आतां चंदनाच्या वृक्षापासून परिमळ येण्याला फूल येईपर्यंत वाट पहात बसावें लागत नाहीं. १७४४ त्याप्रमाणें ... काव्य कानावर पडतांच स... लावतें. मग अर्थ ऐकल्यावर तें चटक ल... त्याशिवाय राहील काय? १७४५ के... पाठाच्या निमित्तानें अंगीकार केला ... मूर्तिमंत पांडित्य येऊन उभें राहतें. ... अमृताचा लाभ होत असला तरी, त्या... इच्छा जात नाहीं. १७४६ अशा प्र... कवित्व आयतेंच विश्रांतिस्थान होऊन आहे. मनन आणि निजध्यास हे एका अ...

१६ …कलेले आहेत. १७४७ हें पाहिजे त्याला आत्मानंदभोगाचा वांटा देईल, आणि कानामार्गानें सर्व इंद्रियांना पोशील. १७४८ चंद्राचा उपभोग घेऊन चकोर मोठे श्रेष्ठ ह्मणवितात. पण चांदणें हें पाहिजे त्याला मिळतें. १७४९ तसें ह्या अध्यात्मशास्त्राचे, अंतर्मुख ज्ञानीच योग्य अधिकारी आहेत. परंतु इतर लोक भाषणशैलीनेंच आनंदित होतील. १७५० महाराज! खरोखर असा हा **श्रीनिवृत्तिनाथां**चा महिमा आहे. हा ग्रंथ नव्हे. तर त्यांच्या कृपेचें वैभव आहे. १७५१ क्षीरसिंधुसमीप **श्रीशंकरांनीं पार्वती**च्या कानांत जें सांगितलें–केव्हां तें मात्र समजत नाहीं. १७५२ पण त्या वेळीं क्षीरसमुद्राच्या लाटांमध्यें मत्स्याच्या पोटांत मत्स्येंद्रनाथ गुप्त होते, त्यांना तें हस्तगत झालें. १७५३ ते **मत्स्येंद्रनाथ सप्तशृंग** पर्वतावर येऊन हातपाय तुटून पडलेल्या **चौरंगीनाथास** भेटतांच तो संपूर्ण …क झाला. १७५४ नंतर **गोरक्षना-** …समाधिसुख भोगावें, अशी **मत्स्येंद्र-** …च इच्छा झाल्यावरून **मत्स्येंद्रनाथांनीं** …**नाथास** या अध्यात्मविद्येची मुद्रा–…दीक्षा–दिली. १७५५ आणि योगरूपी …ळणीच्या सरोवरांतील विषयविध्वंसक …श्वरपदावर त्यांची स्थापना केली. १७५६ …अध्यात्मविद्येचें अद्वयानंदवैभव त्यांनीं **गइनीनाथास** दिलें. १७५७ **गइनीनाथांनीं** कलिकालग्रस्त जीवांचा उद्धार करण्याकरितां **श्रीनिवृत्तिनाथास** अशी आज्ञा केली. १७५८ …आदिगुरु **श्रीशंकरा**पासून शिष्यपरं- …जो बोध (ज्ञान) अर्थात् आत्मज्ञानाचा … आमच्यापर्यंत येऊन पोंचला आहे, …तो सारा हा तूं घेऊन त्यानें, कलि- …सलेल्या जीवांचें सर्व प्रकारें सं- … १७६० ते स्वभावानें प्रथमपासू- …; त्यांत आणखी गुरूची आज्ञा … मग काय? मेघांना खवळायाला …ळाचें निमित्त होतें, तसें झालें.

१७६१ पीडितज… कोठें ग्रंथ करण्याच्या निमित्तानें शांतरूप … साची वृष्टि केली. तो हा ग्रंथ आहे. १… तेव्हां मी चातकरूपानें आपल्या दुःखानें … झालेला पुढेंच तोंड करून बसलों … ह्मणून एवढ्या यशास पात्र झालों. १… अशा प्रकारें गुरुपरंपरेनें प्राप्त झालेलें जें … माधिरूप धन, ते प्रभूंनीं ग्रंथरूपानें … माझ्या स्वाधीन केलें. १७६४ नाहीं तर, … कांहीं शिकलेला नाहीं; कांहीं वाचलेलें ना… स्वामींची–सद्गुरूंची–सेवा करावयाचीही म… हिती नाहीं. अशा मला ग्रंथ करण्याची योग्यता कोठची? १७६५ परंतु खरोखर गुरुनाथांनीं माझें निमित्त करून–मला पुढें करून–काव्याच्या निमित्तानें जगाचें संरक्षण केलें. हेंच खचित समजा. १७६६ तर महाराज! परस्वाधीनपणानें–आचार्य या नात्यानें–मी जें उणें पुरें बोललों, त्याची आपण जननीच्या नात्यानें मला क्षमा करावी. १७६७ शब्द कसा योजावा? अर्थ कसा साधावा? अलंकार ह्मणजे काय? तें मला माहीत नाहीं. १७६८ कळसूत्री बाहुलें, नाचविणाराच्या दोऱ्यानें नाचत असतें; त्याप्रमाणें माझ्या स्वामींनीं–सद्गुरूंनीं–मला दाखवून दिलें, तसतसें बोलत गेलों. १७६९ ह्याकरितां गुणदोषाबद्दल फारशी क्षमा मागत बसत नाहीं. कारण, ग्रंथद्वारें मीं जें सारें भाषण केलें आहे तें आचार्यांच्या नात्यानें केलेलें आहे. १७७० आणखी तुह्मां संतांच्या सभेमध्यें उणीव जर जशीच्या तशीच राहील,–ती पूर्ण होणार नाहीं, तर ममतेनें–लडिवाळपणानें–मी तुह्मांवरच रुसेन. १७७१ परिसानें स्पर्श केला असूनही लोखंडांतील हलकेपणा निघून गेला नाहीं, तर त्याचा शब्द कोणावर बरें? १७७२ ओढ्याचें काम एवढेंच कीं, त्यानें जाऊन गंगेस मिळावयाचें. इतकें करूनही तो गंगा झाला नाहीं, तर तो काय करणार? १७७३ ह्मणून मोठ्या सुदैवानें तुह्मां संतांचे हे पाय मला प्राप्त झाले

आतां जगामध्यें उणेपणा रहाणार १७७४ अहो महाराज! माझ्या स-र्मीनीं मला आपली संतांची जोड मिळ-ली. तिच्या योगानें सर्व इच्छा परिपूर्ण . १७७५ मला आपल्यासारखे मायबाप हाणून त्यांच्या अनुकूलतेनें ग्रंथाचा टास गेला. १७७६ महाराज! सान्या नेंच पृथ्वी ओतवून काढतां येईल; सारे चिंतामणीचेच करतां येतील; १७७७ समुद्रही अमृतानें सहज भरतां येतील; रांचा चंद्र करावयाचेंही कठीण नाहीं. १७७८ कल्पतरूंचे मळे लावण्यालाही फारशी अडचण नाहीं; पण गीतार्थाचें मर्म मात्र काढतां येणार नाहीं. १७७९ तो मी एक केवळ मुका; असें असतां मराठी भाषेंत तो प्रत्यक्ष घेतां येईल असें जें केलें; १७८० हा एवढा ग्रंथसागर उतरून कीर्तिविजयाचा जो पलीकडे झेंडा फडकाविला; १७८१ गीतार्थाचें देऊळ महामेरु कळसासहवर्तमान तयार करून त्या-मध्यें श्रीगुरुमूर्तीचें पूजन केलें; १७८२ गी-तारूप निष्कपट मातेला चुकून हें मूल व्यर्थ भटकत होतें, त्या मायलेंकरांची भेट झाली; हा तुमचा प्रसाद. १७८३ ज्ञानदेव ह्मणतात "महाराज! तुह्मी सज्जनांनीं केलेल्याचा विचार करून मी बोलतों. तें उगाच कांहीं तरी भाषण नव्हे. १७८४ फार काय सांगूं? ग्रंथसमाप्तीचा हा जो सोहळा आपण दाख-विलात येणेंकरून सकल जन्माची सफलता झाली. १७८५ महाराज! मी आपल्या भरं-वशावर जितक्या जितक्या आशा धरल्या, तितक्या तितक्या सर्व परिपूर्ण होऊन मी अप्रतिम सुखास पात्र झालों. १७८६ महाराज! तुह्मीं माझ्याकडून ग्रंथाची ही दुसरी सृष्टि निर्माण केली, ती पाहून आह्मी विश्वामि-त्राला सुद्धां हिणावूं. १७८७ कारण, त्रिशं-कूकरितां ब्रह्मदेवालाही कमीपणा आणावा, ह्मणून त्यानें दुसरी सृष्टि निर्माण क… ती नाशवंत होती, व ही माझी अवि…

१ त्रिशंकु हा इक्ष्वा… …राजाचा पुत्र व …ळचें नांव सत्यव्रत असें होतें. हा 'बाल्यापासूनच दु… वर्ती' होता, व पुढें त्यानें 'ब्राह्मणस्त्रियाही हरण' के… तेव्हां पित्यास याचा राग येऊन, त्यानें ह्यास राज्यांतून हाकून लाविलें. आणि त्या दुःखानें, ह्याचा पिताही स… मंत्रिमंडळावर राज्याचा भार टाकून, अरण्यांत तपश्च… करण्यास गेला. पितापुत्र उभयतांही 'श्वपाकाप्रमाणें' अर-ण्यांत भटकूं लागल्यामुळें अयोध्या नगरीस कोणी धनी ना वाली असें होऊन, सारी बेबंद पातशाही माजली आणखी 'दुष्काळांत तेरावा महिना' या ह्मणीप्रमाणें तशां… तही सान्या राज्यांत अवर्षण पडलें. अशा दुर्धर प्रसंगीं विश्वामित्र ऋषि अरण्यांत तपश्चर्येस गेले होते, व इकडे त्यांच्या मागें त्यांचीं बायकामुलें उघडीं पडून, अन्नास मोताद होऊं लागलीं. अशा वेळीं ह्या सत्यव्रतानें त्यांस रोज … मांस आणून देऊन, त्यांचा सांभाळ केला. पण त्याच… ह्याच्या हातून वसिष्ठ ऋषींचा एक अक्षम्य अपराध झा… होता. ह्मणजे सत्यव्रतानें विश्वामित्राच्या कुटुंबास … ष्ठाच्या धेनूचा वध करून, एकदां मांस आणून दिलें. … वसिष्ठ क्रोधाविष्ट होऊन, त्यांनीं त्यास शाप दिला कीं, … णस्त्रियांचा अपहार, पित्याचा क्रोध, आणि धेनूचा वध … तीन शंकूस्तव (पातकास्तव) सत्यव्रत हा त्रिशंकु नाम … तेव्हांपासून तर हा अधिकच वेड्यासारखा वनांत … लागला. पुढें कालांतरानें ह्याचा पिता पुन्हां स्वनगरीस आ… पण त्यानें त्याचें मुळींच कांहीं नांव काढलें नाहीं. तेव्ह… तर हा देहत्या…ही प्रवृत्त झाला. तों इतक्यांत कोणं… देवतेनें यास सांगितलें कीं, 'तूं देहत्याग करूं नको. तुझा पिता तुला लवकरच राज्यावर स्थापील.' तेव्हां त्रिशंकूनें तो बेत रहित केला. कांहीं काल लोटल्यावर ह्याच्या पित्यानें ह्यास राज्यसूत्रें हातीं घेण्यास आज्ञा दिली, व सदुपदेश केला. प्रथमतः एकदां ह्याच्या पित्यानें ह्यास उपदेश केला होता, पण त्या वेळीं 'पालथ्या घागरीवर पाणी' झालें तथापि ह्या वेळीं मात्र तो पितृबोध ह्याच्या पथ्यावर पड… व पुढें त्रिशंकु नीतीनें राज्य करूं लागला. असो. हा … शंकूचा थोडासा मूळवृत्तांत झाला.

त्रिशंकु ह्याप्रमाणें राज्य करीत असतां, एकदां त्या… मनानें घेतलें कीं, आपण 'या मर्त्यदेहानेंच स्वर्गास ज… तेथील दिव्य भोग चिरकाळ भोगीत बसावें, असा ए… करावा.' ह्मणून तो वसिष्ठाकडे गेला. तेव्हां वसिष्ठा… गितलें 'तूं ह्मणतोस तसें होणार नाहीं.' तेव्हां … 'हं समजलों. पूर्वी मी आपली धेनु मारिली

१६७८८ उपमन्यूच्या मोहासाठीं शं-
ानीं क्षीरसागरही निर्माण केला. पण
तोही येथें उपमेला योग्य होत नाहीं. कारण-
त्याच्या पोटांत विष आहे. १७८९ अंधका-
ररूप राक्षस स्थावरजंगमास गिळूं लागला
असतां, सूर्य धांवून संरक्षण करतो खरा, पण
लोकांना त्याच्यापासून ताप होतो. १७९०
संतप्त झालेल्या जगासाठीं चंद्रानें चांदणें पाडलें
पण त्या कलंकयुक्त चंद्राला ह्यासारखें कसें ह्मणा-
वें? १७९१ ह्मणून महाराज! तुह्मीं संतांनीं
मजकडून जो हा ग्रंथाच्या रूपानें त्रिभुवनावर

यास आणून, असा यज्ञ करून स्वर्गास जातों कीं नाहीं तें
पहा.' यावर वसिष्ठ रागानें ह्मणाले, 'तूं स्वर्गास जा किंवा न
जा पण आतांच्या आतां तर चांडाल हो.' असें ह्मणतांच,
त्रिशंकूस चांडालस्वरूप प्राप्त झालें. त्यामुळें त्रिशंकूस पराका-
ष्ठेची लाज वाटली, व पश्चात्ताप झाला. त्याच संधीस विश्वा-
मित्र आले, व 'माझ्या मागें तुमचें रक्षण कोणीं केलें?'
असें कामुलांस विचारूं लागले. तेव्हां त्यांनीं त्याचें
वृत्त, त्रिशंकूची हताश स्थिति निवेदन केली. पुढें
विश्वामित्राची व त्रिशंकूची गांठ पडली. तेव्हां त्रिशंकु
ह्मणाला, 'आतां माझें रक्षण करणें आपणांकडे आहे.'
विश्वामित्र ह्मणाले:—'ठीक आहे.' नंतर त्या दोहोंनीं यज्ञ
आरंभिला; व ब्राह्मणांस निमंत्रणें केलीं. पण वसिष्ठांनीं
'चांडाल यजमान व क्षत्रिय उपाध्याय' ह्मणून निंदा केल्या-
मुळें ब्राह्मण कोणी येतना. तेव्हां विश्वामित्रानें रागानें
वसिष्ठपुत्रांस 'तुह्मी चांडाल व्हाल' ह्मणून शाप दिला.
तदनंतर कांहीं ब्राह्मण आले. परंतु पुढें हविर्भागास देव
घेईनात. तेव्हां विश्वामित्रानें त्रिशंकूस सांगितलें कीं, 'आतां
जर कांहीं माझेंच स्वार्जित पुण्य असेल, तर तूं स्वर्गीं
जाशील.' 'इतकें ह्मणतांच त्रिशंकु पक्ष्याप्रमाणें उडून स्वर्गीं
जाऊं लागला.' तेव्हां इंद्रास क्रोध येऊन, त्यानें गुरुशापानें दग्ध
झालेला जो तूं त्या तुला मर्त्यदेहानें स्वर्गीं येण्याचा अधिकार
नाहीं, यास्तव खालीं पतन पाव' असें ह्मटलें. 'तेव्हां त्रिशंकु
खालीं पडूं लागला, व ओरडूं लागला. तें ओरडणें ऐकून
विश्वामित्रानें 'तिष्ठ तिष्ठ' (स्थिर रहा, स्थिर रहा) असें ह्मटलें.
त्यावरून हा तेथेंच अंतरिक्षांत स्थिर राहिला.' 'नंतर
विश्वामित्रानें प्रतिसृष्टि व प्रतिस्वर्ग निर्माण करून, तेथें
तूं इंद्र स्थापीन अशी प्रतिज्ञा करून इष्टी आरंभिली, व
देवांचीही निर्माण केले. त्यावरून इंद्रानें त्याची समजूत
१७ त्रिशंकुकडून टाकवून, त्यास दिव्यदेही के-

उपकार केलात, तो फारच निरुपम
१७९२ एवढेंच नव्हे तर महाराज! भाषेनें स
जें हें मीं धर्मकीर्तन केलें तें तुमचें गा कोठे
सिद्धीस नेलेंत. आणि त्यांत माझा सेलेली मा
मात्र उरला. १७९३ आतां विश्वात्मक ं, त्या
हा जो मीं वाग्यज्ञ केला—गीतेवर टीका
तिच्या योगानें संतुष्ट होऊन मला
प्रसाद द्यावा. १७९४ कीं, दुष्टांची दु
जाऊन त्यांना सत्कर्माची अभिरुचि
व्हावी. प्रत्येक प्राणिमात्रामध्यें परस्परांचा
जमावा. १७९५ पापरूपी अंधकार लय
जाऊन विश्वामध्यें स्वधर्मरूप सूर्याचा उदय
व्हावा. आणि जो जो प्राणी जी जी इच्छा
करील, ती ती त्याची परिपूर्ण व्हावी.
१७९६ सदासर्वकाळ जगताचें कल्याण इ-
च्छिणारे, भाग्यवान्, अशा ईश्वरनिष्ठांचे स-
मुदायच्या समुदाय निरंतर प्राणिमात्रांस भे-
टावेत. १७९७ कोट्यावधि चालते बोलते
कल्पतरूच; सजीव चिंतामणींचे गांवच; अमृ-
ताचे बोलते चालते समुद्रच; १७९८ जे
कलंकरहित चंद्र; जे तापरहित सूर्य; असे जे
संतसज्जन ते, सर्वांचे सदासर्वकाळ सोयरे—
आप्त—होवोत. १७९९ किंबहुना तिन्ही लोक
सर्वसुखीं पूर्ण होऊन सदासर्वकाळ आदिपुरुष
जो **परमेश्वर** त्याच्या भजनीं लागोत. १८००
आणखी महाराज! ह्या लोकांमध्यें जे कोणी
विशेष आदरानें ग्रंथ वाळगतील ते या लोकांत
व परलोकांतही विजयी व्हावेत; १८०१
ह्यावर **सद्गुरु** ह्मणाले **"हा प्रसाद होईल."**
त्या वराच्या योगेंकरून **ज्ञानदेवांना** फार
आनंद झाला. १८०२ अशा प्रकारें कलियुगांत
आणि महाराष्ट्रदेशामध्यें, **श्रीगोदावरी**च्या
दक्षिणतीरीं, १८०३ त्रिभुवनामध्यें अत्यंत
पवित्र असें जें अनादि **पंचक्रोशी**क्षेत्र—ज्या-
मध्यें जगाचें जीवनसूत्र **श्रीमहालया** वा-

१ 'श्री महालया' हें [illegible] अहमदनगर जिल्ह्यांतील ने-
वासें ह्या गांवीं, त्यान जाऊन मोहनीराज' असें दुसरें

धेनुक नाम
धार्तराष्ट्र
हस्तिनापुरी
समीप अ
नेक रा
प क

ले; त्यांत आणखी गुरूची आज्ञा
मग काय? मेघांना खवळायाला
पावसाळ्याचें निमित्त होतें, तसें झालें.

वयाचें. इतकें करूनही तो गंगा झाला नाहीं,
तर तो काय करणार? १७७३ ह्मणून मोठ्या
सुदैवानें तुह्मां संतांचे हे पाय मला प्राप्त झाले